...and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k 8419
155M2J.8
Joshi, Mahadev Shastri,
...kriti

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

8419

Y73(P15):1k
155M2J·8

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No 8

SHRI JAGADGURU VISHWARADHYA JNANAMANDIR
(LIBRARY)
JANGAMAWADIMATH, VARANASI

Please return this volume on or before the date last stamped
Overdue volume will be charged 1/- per day.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृति कोश

- आठवा खंड -

राजस्थान ते बिहार

संपादक

पं. महादेवशास्त्री जोशी

सहसंपादक

तर्कतीर्थ सौ. पद्‌मजा होडारकर, एम. ए.

भा र ती य सं स्कृ ति को श मं ड ळ

४१०, शनिवार पेठ, पुणे, ४११०३०.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकाशक :
पं. महादेवशास्त्री जोशी
कार्यवाह, भारतीय संस्कृति कोशमंडळ -
४१०, शनिवार पेठ,
पुणे ४११०३०

❑

प्रथमावृत्ती : शके १८९६
(३१ ऑगस्ट १९७४)

पुनर्मुद्रण : चैत्र शके १९१५
(इ. स. १९९३)

❑

© पं. महादेवशास्त्री जोशी

Y73(P15):1k
155M2J.8

❑

मुद्रक :
श. हे. गुर्जर
आयुर्विद्या मुद्रणालय
९९२ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

❑

फोटो प्रोसेसिंग
ब. शं. दाते.
कलाप्रतिमा पुणे - ३०

❑

वितरक :
अनमोल प्रकाशन
६८३, बुधवारपेठ
अप्पा बळवंत चौक
पुणे ४११००२

S.J.V.J. PRATISHTHAN
LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 8

SRI JAGADGURU VISHWARADHYA
JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8419

मूल्य : दोनशे पन्नास रुपये

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तावना

भारतीय संस्कृती कोशाचा आठवा खंड गेले सहा महिने दुर्मिळ झाला होता. ती उणीव पुनर्मुद्रणाने आज भरून निघत आहे. कोशाचा संकल्प, योजना आणि व्याप्ती या विषयी प्रथम खंडाच्या प्रस्तावनेत सविस्तर लिहिलेच आहे. म्हणून त्याची पुनरुक्ती इथे टाळीत आहे.

मात्र काहीं गोष्टींचा खुलासा दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, पाचव्या, सहाव्या व सातव्या खंडांच्या प्रस्तावनेत केला आहे. तोच इथे पुन्हा उद्धृत करणे आवश्यक आहे.

शुद्धलेखन : मराठी साहित्य महामंडळाने शुद्धलेखनाचे नवे नियम केले व त्यांना महाराष्ट्र राज्य सरकारने मान्यता दिली. त्या नियमांना अनुसरुन या आठव्या खंडाचे मुद्रण केले आहे.

जाती-जमातींची माहिती - गेल्या शतकात व चालू शतकाच्या प्रारंभी अनेक पाश्चात्त्य व भारतीय संशोधकांनी भारतातील, बहुसंख्य जाती- जमातींचे संशोधन करून मोठमोठे ग्रंथ लिहून ठेवले आहेत. अशा अनेक ग्रंथांचा उपयोग करून आम्ही विविध जाती- जमातींची माहिती संकलित केली आहे व तिचा योग्य तो उपयोग केला आहे. पण त्यातील बरीच माहिती आता जुनी झाली आहे. कालमानाप्रमाणे बहुतेक जाती-जमातींच्या व्यवसायात, राहणीत व चालीरितीत पुष्कळ फरक पडले असणे शक्य आहे. पण त्याची प्रत्यक्ष पाहणी करून त्यांच्याविषयी अद्यावत माहिती मिळवणे आम्हाला शक्य झाले नाही. अर्थात प्रत्येक गोष्टीची समक्ष पाहणी करुन एखादा ज्ञानकोश निर्माण करणे शक्यच नसते. संपादकाला उपलब्ध ग्रंथांच्या आधारेच आपला कार्यभाग साधावा लागतो. आम्हीही तेच आणि तसेच केले. मात्र अलिकडे भारतीय व पाश्चिमात्त्य संशोधकांनी काही जाती जमातींची प्रत्यक्ष पाहणी करून नवे ग्रंथ लिहिले आहेत. त्यांचा आम्ही शक्य तेवढा उपयोग करून घेतला आहे.

भारतातील अनेक जिल्ह्यांचे जिल्हानामे (गॅझेटिअर्स) यांचा शक्य तेवढा उपयोग केलेला आहे.

गेले काहीं वर्षे भारतीय संस्कृती कोशाचा तिसरा, चौथा, पाचवा, सहावा, सातवा व आठवा हे खंड दुर्मिळ झाले होते. ग्राहकांना पुरा संच मिळत नव्हता. हे दुर्मिळ खंड पुनर्मुद्रित करावयाचे तर त्यासाठी लागणारी मदत मिळवण्यासाठी माजी कार्यवाह व संपादक पं. महादेवशास्त्री जोशींना अनेक उदार दात्यांकडे याचना करण्यासाठी भ्रमन्ती करावी लागली असती. पण त्यांच्या उतारवयामुळे व शारिरीक दुर्बलतेमुळे त्यांना हे काम सर्वथैव अशक्य होते. त्यांची ही परिस्थिती लक्षात घेऊन "अनमोल प्रकाशन"चे श्री पद्माकर नांदुरकर व कलाप्रतिमा पुणे या संस्थेचे श्री ब. शं. दाते हे त्यांचे मित्र कोशाचे हे खंडित झालेले काम पुढे चालविण्यासाठी त्यांच्या मदतीला आले आणि त्यांनी सर्व आर्थिक जबाबदारी उचलण्याचे ठरवून खंड तिसरा, चवथा, पाचवा सहावा, सातवा पुनर्मुद्रित करण्याचे काम तडीस नेले. याच क्रमाने उर्वरीत सर्व खंड संपतील तसे तसे पुनर्मुद्रित करण्याचा मनोदय त्यांनी शास्त्रीबुवांकडे व्यक्त केला होता. त्यानुसार शास्त्रीबुवांच्या डिसेंबर १९९२ मधील दुःखद निधनानंतरही त्यांनी आपले आश्वासन पाळले व आठवा खंड पुनर्मुद्रित झाला. त्यांच्या या उदार सहाय्याबद्दल मी कोश मंडळातर्फे त्यांचे हार्दिक आभार मानतो.

त्याचप्रमाणे आयुर्विद्या मुद्रणालय या संस्थेचे मालक व सहकारी यांनी छपाईची जबाबदारी घेतली व ती वेळेत व सुबक रित्या पार पाडली. त्यांच्या या सहाय्याबद्दल मी कोशमंडळातर्फे त्यांचेही हार्दिक आभार मानतो. वरील सद्गृहस्थांच्या या सहकार्यामुळे आता ग्राहकांना कोशाचा समग्र संच उपलब्ध होऊ शकेल.

पुणे
चैत्र, शके १९१५
एप्रिल १९९३

सर्वांचा नम्र
शं. मं. होडारकर
कार्यवाह
भा. सं. कोशमंडळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संदर्भ ग्रंथ संक्षेप

अॅ. अँ. रा — Annals and Antiquities of Rajasthan, J. Tod.

अ. च. को. — अर्वाचीन चरित्रकोश, सि. वि. चित्राव, १९४६.

अ. दे. अ. सा. — असा देश असे साधुसंत, सौ. वासंती शहा, १९६७.

अ. म. भा. —अथर्ववेदाचे मराठी भाषांतर, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, १९७२.

अ. श. ब्र. प्रे. — अठारहवीं शताब्दी के ब्रजभाषा काव्य में प्रेमाभक्ति, देवीशंकर अवस्थी, १९६९.

अ. सा. — अपभ्रंश साहित्य, हरिवंश कोछड, १९५६.

अ. सु. अ. — अथर्ववेदाचा सुबोध अनुवाद, श्री. दा. सातवळेकर.

आ. ऑ. रा. — The Art of the Rashtrakutas, O. C. Ganguli, A. Goswami, 1958.

आ. ए. इं. — The Iron Age In India, N. R. Banerjee, 1965.

आ. थो. वि. — आजकालच्या थोर विभूती, गोपीनाथ तळवलकर.

आ. द. दे. — आमच्या दहा देवता, सदानंद चेंदवणकर, १९६४.

आ. मा. आ. अ. — आपला मान : आपला अभिमान – यदुनाथ थत्ते, १९६१.

आ. स. प्रा. अ. इ. — आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास, ऋग्वेदी, १९१६.

आ. सं. मू. — आर्य संस्कृति के मूलाधार, बलदेव उपाध्याय.

आ. सा. जी. — आदिवासींचे सामाजिक जीवन, विलास संगवे, १९७२.

आ. सा. मा. — आचार्य सायण और माधव, बलदेव उपाध्याय, १९४७.

आ. सें. — Alvar Saints, Swami Shudhanand Bharati, 1942.

इं. अँ. — Indian Antiquary.

इं. आ. (इ. पि.) — Indian Architecture (Islamic Period), Percy Brown.

इं. आ. (बु. हिं.) — Indian Architecture (Buddhist and Hindu) Percy Brown.

इं. इं. आ. — Introduction to Indian Architecture, Charls Fabri, 1963.

इं. कॉ. व. थॉ. क. — Indias Contribution to world Thought and Culture, Lokeshchandra, 1970.

इं. फो. आ. क्रा. — Indian Folk Arts and Crafts, Jasleen Dhamija, 1970.

इं. फो. लो. — Indian Folklore.

इं. बु. इ. — The Indian Buddhist Iconography, Benoytosh Bhattacharya, 1958.

इं. वे. क. सू. — India of vedic Kalpasutras, Ram Gopal, 1959.

इं. सा. — Indian Sadhus, G. S. Ghurye, 1953.

इं. स्क. — Indian Sculpture, C. Shivaramamurti, 1961.

इं. स्ट. पा. प्रे. — Indian Studies, Past and Present, Calcutta.

इति. सह. — इतिहासातील सहली, य. न. केळकर, १९५१.

इ. वा. शा. — इहवादी शासन, पु. ग. सहस्रबुद्धे, १९७२.

उ. कों. प्रा. इ. — उत्तर कोंकणाचा प्राचीन इतिहास, पु. वा. जोशी, १९२६.

उ. प्र. लो. नृ. — उत्तर प्रदेश में लोकनृत्य, भगवतीशरण सिंह.

उ. भा. मं. — उत्तर भारतातील मंदिरे, कृष्ण देव, १९६९.

उ. भा. सं. प. — उत्तरी भारत की संत परंपरा, परशुराम चतुर्वेदी, १९५२.

उ. यो. द. — उमेश योगदर्शन, उमेशचंद्रजी, अनु.-प्रभाकर रानडे, १९५९.

उ. सं. सं. रे. — उदासी संप्रदाय और कवि संत रेण, सच्चिदानंद शर्मा, १९६७.

उ. सा. इ. — उत्कल साहित्य का इतिहास, अनसूया प्रसाद पाठक.

ऋ. आ. — ऋग्वेदिक आर्य, राहुल सांकृत्यायन, १९५७.

ऋ. द. — ऋग्वेद दर्शन, रा. गो. कोलंगडे, १९५४.

ऋ. ब्र. स. — ऋग्वेदीय ब्रह्मकर्मसमुच्चय

ऋ. भ. — ऋग्वेदातील भक्तिमार्ग, हरि दामोदर वेलणकर, १९५२.

ऋ. म. भा. — ऋग्वेदाचे मराठी भाषांतर, सि. वि. चित्राव, १९६९.

ऋ. सां. इ. — ऋग्वेदकालीन सांस्कृतिक इतिहास, चिं. ग. काशीकर, १९३५.

ए. इं. ट्रा. — Ancient Indian Tribes, B. C. Law, 1926.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ए. इं – मजु. — Ancient India, R. C. Majumdar, 1960.

ए. ए. इं. — Education in Ancient India, A. S. Altekar, 1957.

एन्सा. मुंडा. — Encyclopaedia Mundarica, Haufman, 1950.

एन्सा. रि. ए. — Encyclopaedia of Religion and Ethics, James Hastings, 1955.

एन्सा. सो. सा. — Encyclopaedia of Social Sciences.

एन्सा. हि. आ. — Encyclopaedia of Hindu Architecture, Prasannakumar Acharya, 1946.

ए. से. ए. इं. — Ethnic Settlements in Ancient India, Shashi Bhushan Choudhuri, 1955.

ए. हि. इं. ब्रा. — Ancient and Hindu India, The Brahmanic Period, J. T. Wheeler, 1961.

ए. हो. रा. — एक होता राजा, सरोजिनी वाबर, १९६४.

ऐ. सं. नि. — ऐतिहासिक संकीर्ण निबंध, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे ३०.

ओ. इ. इं. — Original Inhabitants of India, G. Oppert.

ओ. नि. सं. — ओझा निबंध संग्रह, गौरीशंकर हीराचंद ओझा, १९५४.

औ. इं. फि. — Outlines of Indian Philosophy, M. Hiriyanna, 1951.

कं. सं लि. — A Companion to Sanskrit Literature, Sures Chandra Banerji, 1971.

क. अ. वि. प्र. — कदीम अग्रवाल विवाह प्रथा, किरण कुमारी गुप्ता, १९५४.

क. का. — कवि और काव्य, बलदेव उपाध्याय, १९४७.

क. कौ. – कविता कौमुदी, रामनरेश त्रिपाठी, १९४६.

क. द. — Karnatak Darshan, R. S. Hukkerikar, 1955.

क. नृ. का. — कलचुरी नृपति आणि त्यांचा काळ, वा. वि. मिराशी, १९५६.

क. म. — Customs of Mankind, Lilian Eichler.

क. सं. — कल्पना संगीत, गो. स. टेंबे.

क. सा. ई. ए. — The Culture of South East Asia, Reginald Le, May 1956.

क. हि. वा. पु. — Cultural History from the Vayu Puran, D. K. Patil, 1946.

का. ए. सां. अ. — कादंबरी : एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५८.

काँ. के. सं. लि. — The Contribution of Kerala to Sanskrit Literature, K. K. Raje, 1958.

कॉ. टे. इं. — The Costumes and Textiles of India, Brija Bhushan Jamil, 1958.

का. ट्रा. नि. डो. — The Castes and Tribes of H. E. H. The Nizams Dominions, S. S. Hassan, 1920.

का. ट्रा. स. इं. – Castes and Tribes of Southern India, Thurston.

का. भा. — कालिदास का भारत, भगवतशरण उपाध्याय.

का. सा. सा. — काशी की सारस्वत साधना, गोपीनाथ कविराज, १९६५.

की. पॉ. — The Keys of Power, J. Abbot, 1932.

कृ. क. त. — कृत्यकल्पतरु.

कै. सा. द. — कैरली साहित्य दर्शन, रत्नमयीदेवी दीक्षित, १९५६.

कौ. अ. प्र. — कौटिलीय अर्थशास्त्रप्रदीप, गो. गो. टिपनीस, १९२३.

क्रि. स्ट. ले. उ. — A Critical Study of The Later Upanishadas, S. G. Desai.

क्ला. डि. हिं. मा. — Classical Dictionary of Hindu Mythology etc. John Dauson, 1957.

ग. को. — श्रीगणेश-कोश, अमरेंद्र गाडगीळ, १९६८.

गां. गा. — गांवगाडा, त्रि. ना आत्रे, १९५९.

गा. दै. — गाजती दैवते, पं. महादेवशास्त्री जोशी, १९५९.

गॉ. नॉ. बु. — The Gods of Northern Budhism.

गी. र. — गीतारहस्य, लो. बा. गं. टिळक, १९५६.

गुज. सा. इ. — गुजराती साहित्य का इतिहास, जयंतकृष्ण हरिकृष्ण दवे, १९६३.

गु. जा. — गुन्हेगार जाती, त्रि. ना. आत्रे, १९११.

गु. सं. हिं. दे. — गुजरात के संतों की हिंदी साहित्य को देन, रामकुमार गुप्त, १९६७.

गु. सा. इ. — गुप्त साम्राज्य का इतिहास, वासुदेव उपाध्याय, १९३९.

गो. क. अ. ग्रं. — गोपीनाथ कविराज अभिनंदन ग्रंथ, संपा. सक्सेना, १९६७.

गो. च. प. — श्रीगुरु गोरक्षनाथ चरित्र आणि परंपरा, रा. चिं. ढेरे, १९५९.

गो. दे. — गोमंतकातील देवालये, ना. भा. नायक.

ग्रे. वी. इ. — Great Women of India, Swami Madhavananda, 1953.

ग्लॉ. ट्रा. पं. नॉ. प्रॉ. — A Glossary of The Tribes and Castes of Punjab and N. W. Frontier Province, H. A. Rose, 1914.

चं. जि. गॅ. — Gazetter of India Champaran District, P. C Roy Choudhury, 1960.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चं. मौ. उ. का. — चंद्रगुप्त मौर्य और उसका काल, राधाकुमुद मुकर्जी, १९६२.

च. भा. नि. — चतुर्दश भाषा निबंधावलि, बिहार राष्ट्रभाषा परिषद, १९५७.

चै. म. ब्र. सा. — चैतन्य मत और ब्रज साहित्य, प्रभुदयाल मीतल, १९६२.

जं. रा. — जंगलचे राजे, कुसुम व वसंत नारगोळकर, १९५५.

ज. द. — जयपूरदर्शन, म. म. द. वा. पोतदार, १९४८.

ज. स्मा. ग्रं. — बिहार जयंति स्मारक ग्रंथ, शिवपूजन सहाय, १९४२.

जा. का. भा. सं. — जातककालीन भारतीय संस्कृति, पंडित मोहनलाल महतो 'वियोगि', १९५८.

जॉ. पु. — The Geography of The Puranas, S. Muzfer Ali, 1966.

जु. वा. न. सं. – जुने वाङ्मय नवे संशोधन, पंडित आवळीकर, १९६४.

जे. चि. क. के. — जेथे चिनी सैन्याने कबजा केला होता, कुसुम नारगोळकर, १९६४.

जै. इ. — The Jain Iconography, B. C Bhattacharya.

जै. ध. — जैन धर्म, कैलाशचंद्र शास्त्री, १९५५.

जै. व्र. वि. सं. — जैन व्रतविधान संग्रह, बारेलाल जैन राजवैद्य, १९५२.

जै. सा. इ. — जैन साहित्य और इतिहास, नाथूराम प्रेमी, १९५६.

जै. सि. भा. — जैन-सिद्धान्त-भास्कर, त्रैमासिकपत्र, आरा.

टें. ली. आं. प्र. — Temples and Legends of Andhra Pradesh, N. Ramesan, 1962.

ट्रा. इं. — Tribes of India, Bharatiya Adimjati Sevak Sangha, New Delhi, 1950.

ट्रा. ए. इं. — Tribes in Ancient India, Editor–Bimal Churn Law, 1943.

ट्रा. का. बॉ. — The Tribes and Castes of Bombay, R. E. Enthoven.

ट्रा. का. सें. प्रॉ. इं. — Tribes and Castes of The Central Provinces of India, R. V. Russel, R. B. Hiralal.

ट्रा. के. — Tribes of Kerala, A. A. D. Luiz, 1962.

डा. इं. — Dance of India, Projesh Banerji, 1956.

डि. इ. — Dictionary of Islam, T. P. Hughes, 1935.

डे. हिं. इ. — The Development of Hindu Iconography, Jitendranath Banerjee, 1959.

तं. सं. शॉ. अ. — Tantraraj Tantra A Short Analysis, John Woodrof, 1954.

तं. त. शा. — तंतकवि तथा शाहीर, य. न. केळकर, १९५२.

त. प्र. हिं. कृ. — आळवार भक्तों का तमिल प्रबन्धम् और हिंदी कृष्णकाव्य, मलिक मोहंमद, १९६४.

त. सा. सं. — तमिळ साहित्य और संस्कृति, अवधनंदन, १९५८.

तां. बौ. सा. सा. — तांत्रिक बौद्ध साधना और साहित्य, नागेंद्रनाथ उपाध्याय, १९३९.

ते. सा. इ. — तेलुगु साहित्य का इतिहास, बालशौरि रेड्डि, १९६४

द. क. वि. — The Cult of Vithoba, G. A. Deleury, 1960.

द. सं. इ. — दत्त संप्रदायाचा इतिहास, रा. चिं. ढेरे, १९६४.

दा. चं. — दानचंद्रिका.

दि. सु. इ. — दिल्ली सुलतानशाहीचा इतिहास, मा. म. देशमुख, १९६१.

दे. ऋ. ब्रा. प. — देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण परिचयग्रंथ, सि. वि. चित्राव, १९४४.

दे. को. — देवीकोश – आदिशक्तीचे विश्वस्वरूप, प्र. कृ. प्रभुदेसाई.

दे. लि. स्व. वि. स. — देवनागरी लिपी-स्वरूप, विकास और समस्याएँ, न. चिं. जोगळेकर, भगवानदास तिवारी, १९६२.

द्र. गॉ. मॉ. हिं. — Dravidian Gods in Modern Hinduism, W. T. Elmore.

द्वि. अ. ग्रं. — द्विवेदि अभिनंदन ग्रंथ.

ध. शा. मं. — धर्मशास्त्रमंथन, महादेवशास्त्री दिवेकर, १९३३.

ध. शा. वि. — धर्मशास्त्रविचार, पां. वा. काणे, १९३५.

ध. सि. — धर्मसिंधु.

ध. सू. — Dharma Sutras : A Study in their Origin and Development, S. C. Banerjee, 1962.

नं. मौ. यु. भा. — नंद-मौर्ययुगीन भारत, मंगलनाथ सिंह, १९६९.

न. हिं. ध. — नवा हिंदुधर्म, पं. महादेवशास्त्री दिवेकर, १९४२.

ना. प्र. प. — नागरी प्रचारिणी पत्रिका.

नि. सिं. — निर्णयसिंधू.

ने. नॉ. इं. — Natives of Northern India, W. Crooke, 1907.

न्यू इं. अँ. — New Indian Antiquary.

पं. क. — पंडित–कवि, के. ना. वाटवे १९५२.

पं. का. — Punjab Castes, Denzil Ibbetson.

पं. जी. सा. — पंजाब जीवन और साहित्य, मनसराम शर्मा, १९६१.

पं. ज्यो. शा. — पंचांगातील ज्योतिषशास्त्र, त्र्यं. गो. ढवळे, १९५८.

पं. ला. ल. — पंजाबकेसरी लाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लजपतराय, रा. गो. भिडे, १९६०.

प. का. भा. — पतंजलिकालीन भारत, प्रभुदयाळ अग्निहोत्री, १९६२.

पा. क. — पाटलिपुत्र की कथा, सत्यकेतु विद्यालंकार, १९४६.

पा. का. भा. — पाणिनीकालीन भारतवर्ष, वासुदेवशरण अग्रवाल, १९५५.

पा. पा. व्या. सं. — पाणिनि व पाणिनीय व्याकरण संप्रदाय, म. दा. साठे, १९६२.

पॉ. रि. फो. नॉ. इं. — Popular Religion and Folklore of Northern India, Crooke, 1894.

पा. सा. इ. — पाली साहित्य का इतिहास, भरतसिंह उपाध्याय, १९५१.

पॉ. सा. ए. हिं. — Positive Sciences of the Ancient Hindus, Brajendranath Seal, 1958.

पी. के. गो. को. व्हॉ. — P. K. Gode Commemoration Volume, Ed. Hariyappa, Patkar, 1968.

पु. इं. — Puran Index, V. R. Ramchandra Dikshitar, 1955.

पु. छ. शि. — पुण्यश्लोक छत्रपति शिवाजी, बाळशास्त्री हरदास.

पु. त. नि. — पुरातत्त्व निबंधावली, — राहुल सांकृत्यायन, १९३७.

पु. नि. — पुराणनिरीक्षण, त्र्यंबक गुरुनाथ काळे.

पु. प. — पुराणपरिशीलन, पं. गिरिधर शर्मा चतुर्वेदी, १९७०.

पु. वि. — पुराणविमर्श, बलदेव उपाध्याय, १९६५.

पु. वे. सा. स. अ. — पुराणगत वेदविषयक सामग्री का समीक्षात्मक अध्ययन, रामशंकर भट्टाचार्य, १९६५.

पू. का. भा. — पूर्व मध्यकालीन भारत, वासुदेव उपाध्याय, १९५२.

पू. प. सं. म. — पूर्व और पश्चिम की सन्त महिलाएँ, स्वामी घनानंद, १९६२.

पे. का. म. — पेशवेकालीन महाराष्ट्र, वा. कृ. भावे, १९३५.

पो. वी. हिं. सि. — Position of women in Hindu Civilization, A. S. Altekar, 1956.

पौ. भा. ध. — पौराणिक भागवतधर्म, शं. दा. पेंडसे, १९६७.

प्रा. च. को. — प्राचीन चरित्र कोश, सि. वि. चित्राव, १९३२.

प्रा. भा. न. न. जी. — प्राचीन भारत में नगर तथा नगर–जीवन, उदय नारायणराव, १९६५.

प्रा. भा. म. — प्राचीन भारतीय मनोरंजन, मन्मथ राय, १९५७.

प्रा. भा. रा. — प्राचीन भारतीय राजनीति, र. पं. कंगले, १९६९.

प्रा. भा. लो. ध. — प्राचीन भारतीय लोकधर्म, वासुदेवशरण अग्रवाल, १९६४.

प्रा. भा. वि. — प्राचीन भारतीय विद्यापीठे, ना. गो. तवकर, १९५०.

प्रा. भा. वे. — प्राचीन भारतीय वेशभूषा, मोतीचंद्र, १९५१.

प्रा. भा. शा. प. — प्राचीन भारतीय शासनपद्धती, अ. स. अळतेकर, १९५९.

प्रा. भा. सं. — प्राचीन भारतीय संस्कृती, स. का. दीक्षित, १९६०.

प्रा. भा. सा. सां. भू. — प्राचीन भारतीय साहित्य की सांस्कृतिक भूमिका, रामजी उपाध्याय, १९६६.

प्रा. म. — प्राचीन महाराष्ट्र, श्री. व्यं. केतकर, १९६३.

प्रा. म. क. पं. — प्राचीन मराठी कविपंचक, द. सि. पंगु, १९४४.

प्रा. म. को. ले. — प्राचीन मराठी कोरीव लेख, शं. गो. तुळपुळे, १९६३.

प्रा. म. जै. सा. — प्राचीन मराठी जैन साहित्य, सुभाषचंद्र अक्कोळे, १९६८.

प्रा. म. धा. इ. — प्राचीन महाराष्ट्राचा धार्मिक इतिहास, र. म. भुसारी, १९६५.

प्रा. म. वा. इ. — प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, अ. ना. देशपांडे, १९६६.

प्रा. म. वा. स्व. — प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, ह. श्री. शेणोलीकर, १९६२.

प्रा. म. सं. — प्राचीन मराठी संतकवी, ज. र. आजगांवकर, १९५७.

प्रा. मौ. बि. — प्राङ्मौर्य बिहार, देवसहाय त्रिवेदी, १९५४.

प्रा. यु. वि. — प्राचीन युद्धविद्या, कृ. वि. वझे, १९३४.

प्रा. व्य. प्र. — प्रायश्चित व्यवहार प्रकाश अथवा हिंदुधर्मशास्त्रदर्पण, संपा. वि. दा. धारूरकर, १९०८.

प्रा. सा. इ. — प्राकृत साहित्य का इतिहास, जगदीशचंद्र जैन, १९६१.

प्रो. इं. हि. कॉं. — Proceedings of the Indian History Congress.

प्रो. ट्रॅ. ऑ. इं. ओ. कॉं. — Proceedings and Transactions of All India Oriental Conference.

फि. फॉ. ने. — A Philosophy for Nefa, Verier Elwin, 1960.

फे. फे. आ. — Fairs and Festivals of Assam, Barua, Baveja, 1956.

फे. फे. म. — Fairs & Festivals of Maharashtra, Maharashtra Census office, Bombay. 1969.

बं. सा. क. — बंगला साहित्य की कथा, भोलानाथ शर्मा, १९५७.

बं. सा. सं. इ. — बंगला साहित्य का संक्षिप्त इतिहास, सत्येंद्र, १९६१.

बॉं. बे. क्रा. — Bombay Beggars and Criers.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बु. इ. ओ. — Budhism in Orisa, N. K. Sahu.

बु. द. — धर्मचक्रवर्ती भगवान बुद्ध – दर्शन, रा. गो. कोलंगडे, १९५९.

बु. भा. स. — बुद्धकालीन भारतीय समाज, ना. गो कालेलकर, १९३६.

बौ. का. भा. — बौद्धकालीन भारत, जनार्दन भट्ट, १९२६.

बौ. द. मी. — बौद्धदर्शन मीमांसा, पं. बलदेव उपाध्याय, १९५४.

बौ. ध. द. — बौद्ध धर्म दर्शन, आचार्य नरेंद्र देव, १९५६.

ब्र. कृ. भा. भ. — व्रजभाषा के कृष्ण काव्य में माधुर्य भक्ति, रूपनारायण, १९६२.

ब्र. ध. इ. — ब्रज के धर्मसंप्रदायों का इतिहास, प्रभुदयाल मीतल, १९६८.

ब्र. लो. सा. अ. — व्रज लोकसाहित्य का अध्ययन, सत्येंद्र, १९४९.

ब्र. सां. इ. — व्रज का सांस्कृतिक इतिहास, प्रभुदयाल मीतल, १९६०.

ब्र. सा. — व्रजबुलि साहित्य, रामपूजन तिवारी, १९६०.

भ. वि. — भक्ति का विकास, मुंशीराम शर्मा, १९५८.

भां. ओ. रि. इं. — Bhandarkar Oriental Research Institute, Poona 4.

भा. इ. रू. — भारतीय इतिहास की रूपरेखा, जयचंद्र विद्यालंकार, १९३३.

भा. इ. सं. मं. — भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.

भा. क. बि. दे. — भारतीय कला को बिहार की देन, विन्ध्येश्वरी प्रसाद सिंह, १९५८.

भा. ज्यो. इ. — भारतीय ज्योतिष का इतिहास, गोरख प्रसाद, १९५६.

भा. ज्यो. शा. — भारतीय ज्योतिष शास्त्र, शं. बा. दीक्षित, १९३१.

भा. त. रा. — भारतीय तत्त्वज्ञान अथवा राष्ट्रधर्म, पु. ग. सहस्रबुद्धे, १९६५.

भा. द. — भारतीय दर्शन, (१) बलदेव उपाध्याय, १९५७, (२) उमेश मिश्र, १९५७.

भा. द. सं. — भारतीय दर्शन संग्रह, पं. द. वा. जोग, १९५८.

भा. प्र. वि. — भारतीय प्रतीक विद्या, जनार्दन मिश्र, १९५९.

भा. प्रा. जै. ती. — भारत के प्राचीन जैन तीर्थ, जगदीशचंद्र जैन, १९५२.

भा. प्रा. रा. — भारत के प्राचीन राजवंश, विश्वेवरनाथ रेउ, १९२१.

भा. बृ. इ. — भारतवर्ष का बृहद् इतिहास, भगवद्दत्त.

भा. भा. स. — भारत का भाषासर्वेक्षण, उदयनारायण तिवारी, १९५९.

भा. रा. प्र. — भारतीय राज्यशास्त्र प्रणेता, श्यामलाल पांडेय, १९६४.

भा. रा. शा. — भारतीय राज्यशास्त्र, टोकेकर, महाजन, १९६०.

भा. री. प. — भारतीय रीति-रिवाज और परंपरा, रतिभानुसिंह 'नाहर', १९५६.

भा. लो. नृ. — भारत के लोकनृत्य, लक्ष्मीनारायण गर्ग, १९६१.

भा. लो. सा. — भारतीय लोकसाहित्य, श्याम परमार, १९५४.

भा. वा. इ. — भारतीय वाद्यांचा इतिहास, ग. ह. तारळेकर, १९७३.

भा. वा. शा. — भारतीय वास्तुशास्त्र, हिंदुप्रासाद, द्विजेन्द्रनाथ शुक्ल, १९५८.

भा. वै. — भारतीय वैज्ञानिक, श्याम नारायण कपूर, १९४२.

भा. सं. — (१) भागवत संप्रदाय, बलदेव उपाध्याय, १९५४, (२) भारतीय संस्कृती, शिवदत्त ज्ञानी, १९४४.

भा. सं. ए. — भागवतोत्तम संत एकनाथ, शं. दा. पेंडसे, १९७१.

भा. सं. जै. यो. — भारतीय संस्कृति में जैन धर्म का योगदान, हिरालाल जैन, १९६२.

भा. सं. म. — भारतके संत-महात्मा, रामलाल, १९५७.

भा. सं. मा. — भारतीय संगीत माला, पं. यशवंतबुवा मिराशी.

भा. सा. — भारत सावित्री, वासुदेवशरण अग्रवाल, १९५७.

भा. सां. इ. — भारताचा सांस्कृतिक इतिहास, रा. वि. ओतुरकर, १९५२.

भा. सा. इ. — भारतवर्ष का सामाजिक इतिहास, विमलचंद्र पाण्डेय, १९६०.

भा. सा. शा. — भारतीय साहित्यशास्त्र, ग. त्र्यं. देशपांडे, १९५८.

भो. उ. सा. — भोजपुरी और उसका साहित्य, कृष्णदेव उपाध्याय, १९५७.

भो. क. का. — भोजपुरी कवि और काव्य, दुर्गाशंकर प्रसाद सिंह, १९५८.

मं. म. — मंत्रमहोदधि.

मं. मू. श्री. — मंगलमूर्ती श्रीगणेश, पु. रा. बेहेरे, १९५९.

म. आ. प्र. — महाराष्ट्रातील आदिवासी आणि त्यांचे प्रश्न, सुधीर फडके, १९६३.

म. क. — मनोरम कश्मीर, मनोहर कृष्ण दर, १९५८.

म. क. च. — महाराष्ट्रीय कविचरित्र, ज. र. आजगावकर.

म. कृ. सा. जी. अ. — मध्ययुगीन कृष्ण काव्य में सामाजिक जीवन की अभिव्यक्ति, हरगुलाल, १९६७.

म. ग्रा. स. — महाराष्ट्राची ग्रामीण समाजरचना, दांडेकर-जगताप, १९५७.

म. च. को. — मध्ययुगीन चरित्रकोश, सिद्धेश्वरशास्त्री चित्राव, १९३७.

म. चा. दै. — महाराष्ट्राची चार दैवते, ग. ह. खरे, १९५८.

म. ज. अ. ग्रं. — मध्यभारत जनपदीय अभिनंदन ग्रंथ, सत्यदेव विद्यालंकार, १९५४.

म. जि. — महाराष्ट्राचें जिल्हे, महाराष्ट्र सरकार.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म. जी. — महाराष्ट्र जीवन, संपादक – गंगाधर बाळकृष्ण सरदार, १९६०.

म. ध. प्र. — महाराष्ट्र धर्माचे प्रणेते १९५८.

म. प्रा. इ. सं. — महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास व संस्कृती, द. बा. डिसकळकर, १९६४.

म. भा. उ. — महाभारताचा उपसंहार, चिं. वि. वैद्य, १९२१.

म. भा. ना. — महाभारत में नारी. वनमाला भवाळकर, १९६४.

म. भा. व्या. — महाभारतावरील व्याख्याने, बाळशास्त्री हरदास, १९६१.

म. भा. स. — महाभारतकालीन समाज, सुखमय भट्टाचार्य, १९६५.

म. म. पू. — महाराष्ट्र महोदयाचा पूर्वरंग, ना. कृ. गद्रे, १९७१.

म. म. वा. — महानुभावीय मराठी वाङमय; य. खु. देशपांडे, १९६०.

म. यु. भा. — मध्ययुगीन भारत, चिं. वि. वैद्य, १९२३.

म. लो. उ. — मराठी लोकसंस्कृतीचे उपासक, रा. चिं. ढेरे, १९६४.

म. लो. त. — मराठी लोककला-तमाशा, नामदेव व्हटकर, १९५९.

म. लो. मा. — महाराष्ट्र लोकसाहित्य-माला, महाराष्ट्र लोकसाहित्य समिती

म. लो. सं. — मराठी लोकांची संस्कृती, इरावती कर्वे, १९५१.

म. वा. इ. — मराठी वाङमयाचा इतिहास, भाग ३ रा, ल. रा. पांगारकर, १९३९.

म. वा. वि. — मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, रा. श्री. जोग, १९५९.

म. सं. — मऱ्हाटी संस्कृति, शं. बा. जोशी, १९५२.

म. सं. जी. — मराठवाड्यातील संतांची जीवनगंगा, मो. व्यं. जोशी, १९७३.

म. सं. प. मा. — मराठी संतवाङमयातील परमार्थमार्ग, कृ. वें. गजेंद्रगडकर, १९६३.

म. सा. — महाराष्ट्र सारस्वत, वि. ल. भावे, १९५१.

म. सा. अ. — मध्यकालीन साहित्य में अवतारवाद, कपिलदेव पांडेय, १९६३

म. सा. प. — महाराष्ट्र साहित्य पत्रिका.

म. सा. सिं. — मराठी साहित्याचे सिंहावलोकन, द. के. केळकर, १९६३.

म. ज्ञा. को. — महाराष्ट्रीय ज्ञानकोश, श्रीधर व्यंकटेश केतकर.

मा. गु. लि. — Milestones in Gujarati Literature, K. M. Jhaveri 1934.

मा. पु. सां. अ. — मार्कंडेय पुराण : एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९६१.

मा. लो. वि. अ. — मालवी लोकगीत— एक विवेचनात्मक अध्ययन, चिंतामणी उपाध्याय, १९६४.

मी. द. — मीमांसा दर्शन, मंडनमिश्र शास्त्री, १९५५.

मुं. इ. जा. — मुंबई इलाख्यातील जाती, गो. मं. कालेलकर, १९२८.

मु. का. भा. — मुगलकालीन भारत, आशीर्वादीलाल श्रीवास्तव १९५९.

मु. पू. म. — मुसलमानपूर्व महाराष्ट्र, वा. कृ. भावे, १९४६.

मु. म. सं. क. — मुसलमान मराठी संतकवी, रा. चिं. ढेरे, १९६७.

मू. वि. — मूर्तिविज्ञान, ग. ह. खरे.

मै. गु. अ. ग्रं. — मैथिलीशरण गुप्त अभिनंदन ग्रंथ, संपा.–वासुदेवशरण अग्रवाल, १९५९.

मै. ट्रा. का. — Mysore Tribes and Castes, Nanjundayya and Iyer, Mysore University.

मो. सिं. स. — मोंहेंजो-दडो तथा सिंधु सभ्यता, सतीशचंद्र काला, १९५१.

यं. चिं. — यंत्रचिंतामणि

या. का. म. — यादवकालीन महाराष्ट्र, मु. ग. पानसे, १९६३.

या. स्मृ. — श्रीयाज्ञवल्क्यस्मृति, भाषांतरकार–विष्णुशास्त्री बापट, १९२३

ये. इ. घ. — येथे इतिहास घडला, रामकृष्ण गोपाळ भिडे, १९६३.

रा. अ. ग्रं. — राजर्षि अभिनंदन ग्रंथ, संपादक--स्नातक व व्यास, १९६०.

रा. का. सं. — रामायणकालीन संस्कृती, शां. ना. व्यास, १९५८.

रा. का. स. — रामायणकालीन समाज, शा. ना. व्यास, १९५८

रा. जा. — राजस्थान की जातियां बजरंगलाल लोहिया, १९५४.

रा. टा. — The Rashtrakutas and Their Times, A. S. Altekar, 1934.

रा. पिं. सा. — राजस्थान का पिंगल साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५८.

रा. भ. शा. — रामभक्तिशाखा, रामनिरंजन पांडेय, १९६०.

रा. भा. सा. — राजस्थानी भाषा और साहित्य, मोतीलाल मेनारिया, १९५२.

रा. म. रा. रा. — रामायण व महाभारतातील राज्यसंस्था आणि राज्यानुशासनविषयक सिद्धांतांचा तौलनिक अभ्यास, म. म. बाळशास्त्री हरदास, १९६५.

रा. र. सं. — रामभक्ति में रसिक संप्रदाय, भगवतीप्रसाद सिंह, १९५७.

रा. रा. उ. ऱ्हा. — राजपुत राज्यांचा उदय व ऱ्हास, ह. वा. देशपांडे, १९३८.

रा. रा. का. — रास और रासान्वयी काव्य, दशरथ ओझा, दशरथ शर्मा, १९५९.

रा. ले. सं. — राजवाडे लेखसंग्रह, संपा. लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५८.

रा. लो. ना. — राजस्थानी लोकनाट्य, देवीलाल सामर, १९५७.

रा. लो. नृ. — राजस्थानी लोकनृत्य, देवीलाल सामर, १९५७.

रा. सं. सि. सा. — राधावल्लभ संप्रदाय,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धान्त और साहित्य, विजयेंद्र स्नातक, १९५८.

रा. सा. प. — राजस्थानी साहित्य की गौरवपूर्ण परंपरा, अगरचंद नाहटा, १९६७.

रा. सा. म. उ. — रामभक्ति साहित्य में मधुर उपासना, श्रीभुवनेश्वर नाथ मिश्र, १९५७.

रि. इं. — The Religions of India, A. P. Karmarkar, 1950.

रि. वे. लि. — Origin and Development of the Religion in Vedic Literature, P. W. Deshmukha, 1933

रे. क. इं. — Races and Cultures of India, D. N. Majumdar, 1958.

लं. ल. वि. — लंगडी, लगोऱ्या, विटीदांडू या खेळांचे नियम, अ. म. शा. शि. मंडळ, १९५८.

ल. क. मी. — ललितकला मीमांसा, गो. चिं. भाटे, १९२५.

ल. वि. सो. — लग्नविधि आणि सोहळे, ना. के. अलोनी, १९०४.

लो. ना. प. — लोकनाटयाची परंपरा, वि. कृ. जोशी, १९६१.

लो. सा. रू. — लोकसाहित्याची रूपरेखा, दुर्गा भागवत, १९५६.

लो. सा. वि. — लोकसाहित्य विज्ञान, सत्येंद्र, १९६२.

लौ. दं. — लौकिक दंतकथा, गो. मं. कालेलकर, १९३४.

वा. नृ. का. — वाकाटक नृपति व त्यांचा काल, वा. वि. मिराशी, १९५७.

वा. पं. इ. — वारकरी पंथाचा इतिहास, शं. वा. दांडेकर, १९५७.

वा. पु. स्ट. — Vaman Puran : A Study, Vasudeo Sharan Agrawal, 1964.

वा. रा. — वाल्मीकिरामायण

वा. रा. को. — वाल्मिकी रामायणकोश, रामकुमार राय, १९६५.

वा. सं. उ. वि. — वारकरी संप्रदाय – उदय व विकास, बहिरट, भालेराव, १९७२.

वि. ध. द. — विश्व धर्म दर्शन, सांवलिया विहारीलाल वर्मा, १९५३.

वि. मुं. रा. प. — विशाल मुंबई राज्य परिचय, प्रसाद प्रकाशन, १९६०.

वि. सं. मं. वा. — विदर्भ संशोधन मंडळ वार्षिक.

वि. सा. इ. — विजयनगर साम्राज्य का इतिहास, वासुदेव उपाध्याय, १९४५.

वि. स्मा. ग्रं. — विजयनगर स्मारक ग्रंथ, संपा. द. प. करमरकर, रा. वि. ओतूरकर, १९३७.

वि. स्मृ. ग्रं. — विक्रम स्मृतिग्रंथ, १९४५.

वी. शै. र. — वीरशैवरहस्य.

वे. इं. — Vedic Index of Names and Subjects, Macdonell and Keith, 1954.

वे. का. इ. — वेदांच्या काळचा इतिहास, परशुराम हरी थत्ते, १९२५.

वे. का. स. — वेदकालीन समाज, शिवदत्त ज्ञानी, १९६७.

वे. पा. सौ. — वेदान्त पारिजात सौरभ, पं. दत्तात्रयशास्त्री कवीश्वर, १९६५.

वे. रा. द. — वेदांतील राष्ट्रदर्शन, म. म. बाळशास्त्री हरदास, १९५७.

वै. ऐ. नि. — वैद्यांचे ऐतिहासिक निबंध, चिं. वि. वैद्य, १९३१.

वै. द. — वैदिक दर्शन, फतहसिंह, १९६२.

वै. दे. अ. द. — वैदिक देवतांचे अभिनव दर्शन, रा. ना. दांडेकर, १९५१.

वै. दे. स्था. मं. — वैदिक देवता, त्यांची स्थाने व मंत्र, र. वि. वैद्य, १९६४.

वै. नि. — वैदिक निबंध, ना. गो. चापेकर, १९२९.

वै. मा. — वैदिक माइथॉलोजी, ए. ए. मकडौनल, १९६१.

वै. वा. भा वि. — वैदिक वाङ्मयातील भागवतधर्माचा विकास, शं. दा. पेंडसे, १९६५.

वै. वि. भा. प. — वैज्ञानिक विकास की भारतीय परंपरा, सत्यप्रकाश, १९५४.

वै. वि. भा. सं. — वैदिक विज्ञान और भारतीय संस्कृति, गिरिधरशर्मा चतुर्वेदी, १९६०.

वै. शां. अ. म. — वैदिक–शांकर–अद्वैत-मतानुवाद, द. वा. जोग, १९५४.

वै. शै. म. व. — The Vaishnava sects, the Shaiva sects, Mother Worship, Swami Tattvananda.

वै. सं. वि. — वैदिक संस्कृतीचा विकास, लक्ष्मणशास्त्री जोशी, १९५१.

वै. सा. — वैदिक साहित्य, पं. रामगोविंद त्रिवेदी, १९६०.

वै. सा. सं. — वैदिक साहित्य और संस्कृति, बलदेव उपाध्याय, १९५८.

व्या. ज्ञा. को. — व्यायाम ज्ञानकोश, सरदार मुजुमदार, बडोदे.

व्र. ति. नि. — व्रततिथिनिर्णय, नेमिचन्द्र शास्त्री, १९५६.

व्र. प. — व्रतपरिचय, हनुमान शर्मा, १९५७.

श. क. — शब्दकल्पद्रुमः, राजा राधाकान्त देव.

शि. इ. — शिखांचा इतिहास, न. वि. गाडगीळ, १९६३.

शि. नि. — शिवाजी निबंधावली, श्री शिवचरित्र कार्यालय, पुणे, १९३०.

शी. त. म्यू. — Sheaves from Tamil Muse, Edi. – P. S. Acharya, 1959.

ष. द. भे. — षट्चक्र दर्शन व भेदन, श्री. म. वैद्य, १९६७.

सं. क. द. — संस्कृत-कवि-दर्शन, भोलाशंकर व्यास, १९५५.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सं. कौ. — संस्कार कौस्तुभ, वेंकटाचार्य गजेन्द्रगडकर, १९१४.

सं. चा. अ. — संस्कृति के चार अध्याय, रामधारीसिंह दिनकर, १९५६.

सं. ना. सौं. — संस्कृत नाट्यसौंदर्य, के. ना. वाटवे, १९६२.

सं. प्रां. — संस्कृतीच्या प्रांगणात, पं. महादेवशास्त्री जोशी, १९६९.

सं. मि. — संशोधकाचा मित्र, ग. हु. खरे, १९३१.

सं. मु. — संशोधन-मुक्तावली, वा. वि. मिराशी.

सं. सा. इ. — (१) संस्कृत साहित्य का इतिहास, ए. बी. कीथ, १९६०; (२) बलदेव उपाध्याय, १९५६.

सं. सा. शा. इ. — संस्कृत साहित्यशास्त्राचा इतिहास, पां. वा. काणे, १९३१.

सं. सा. सो. इ. — संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास, वि. वा. करंबेळकर, १९५४.

सं. सु. — संस्कृतिसुगंध, संपा. वेंकटेशशास्त्री जोशी, १९७०.

स. पॉ. — The Serpent Power, Arthur Avalon, 1958.

स. भा. प्र. व. — सचित्र भारत प्रवास वर्णन, बाळासाहेब घोरपडे, १९१२.

स. म. खे. पु. — सचित्र मराठी खेळांचे पुस्तक, अ. वा. देवघर, १९०५.

स. सं. गा. — सकल संत गाथा.

स. सा. वा. — समग्र सावरकर वाङ्मय.

सां. द. इ. — सांख्य दर्शन का इतिहास, पं. उदयवीर शास्त्री, १९५०.

सा. इं. इ. गॉ. गॉ. — South Indian Images of Gods and Goddesses.

सा. इं. गॉ. — South Indian Gods, Bartholomaeur Ziegeubalg.

सा. इं. फे. — South Indian Festivities, P. V. Jagadisa Ayyar, 1921.

सा. इं. (म. आं.) — South India (Madras and Andhra Pradesh), Publications Division, 1957.

सा. भा. वि. — सामान्य भाषाविज्ञान, बाबूराम सक्सेना, १९४३.

सा. भू. — सारस्वतभूषण, ग. रा. शर्मा, १९५०.

सा. सं. — साहित्य-संग्रह भाग १ ला, शि. म. परांजपे, १९२२.

सिं. ऋ. हिं. सं. — सिंधु संस्कृति ऋग्वेद व हिंदु संस्कृती, प्र. रा. देशमुख, १९६६.

सि. क. — Sindhi Culture, U. T. Thakur, 1958.

सिं. स. — सिंधु सभ्यता, सतीशचंद्र काला, १९५५.

सि. इ. — सिख इतिहास, ठाकूर देशराज, १९५४.

सि. सा. — सिद्ध साहित्य, धर्मवीर भारती, १९५५.

सी. ऋ. — The Seers of The Rigved, V. G. Rahurkar, 1964.

सु. वि. को. — सुलभ विश्वकोश, य. रा. दाते, चिं. ग. कर्वे.

सू. ब्र. सा. — सूरपूर्व ब्रजभाषा और उसका साहित्य, शिवप्रसाद सिंह, १९५८.

सू. सा. श. — सूरसागर शब्दावली, निर्मला सक्सेना, १९६२.

से. इं. — Census of India.

से. इं. १९५१, वे. बें. — Census of India, 1951, West Bengal.

स्कू. से. जै. लि. — Schools and Sects. in Jain Literature, Amulya chandra Sen, 1931.

स्ट. इं. लि. हि. — Studies in Indian Literary History, P. K. Gode.

स्ट. उ. — Studies in the Upapuranas vol. 1, R. C. Hazra, 1958.

स्ट. ओ. फो. — A Study of Orissan Folk-Lore, Kunjbihari Das, 1953.

स्ट. जॉ. ए. मे. इं. — Studies in the Geography of Ancient and Medieval India, D. C. Sircar, 1960.

स्ट. वा. वि. — A Study on Vastuvidya, Tarapad Bhattacharya, 1947.

स्प्लें. दॅ. वॉ. इं. — The Splendour that was Ind, K. T. Shah, 1930.

स्वा. वि. ज. स्मृ. — स्वामी विवेकानंद जन्मशताब्दी स्मृतिग्रंथ, संपा. रा. चिं. ढेरे, १९६३.

ह. च. सां. अ. — हर्षचरित – एक सांस्कृतिक अध्ययन, वासुदेवशरण अग्रवाल, १९५३.

ह. प्रा. लो. — हमारे कुछ प्राचीन लोकोत्सव, मन्मथ राय, १९५३.

हिं. क. भ. तु. अ. — हिंदी और कन्नड में भक्तिआंदोलन का तुलनात्मक अध्ययन, हिरण्मय, १९५९.

हिं. कृ. पु. प्र. — हिंदी कृष्णभक्ति काव्यपर पुराणों का प्रभाव, शशि अग्रवाल, १९६०.

हिं. जै. भ. क. — हिंदी जैन भक्तिकाव्य और कवी, प्रेमसागर जैन, १९६४.

हिं. ते. म. रा. तु. अ. — हिंदी और तेलुगू के मध्यकालीन रामसाहित्यों का तुलनात्मक अध्ययन, चावलि सूर्यनारायण मूर्ति, १९६६.

हिं. ते. वै. भ. — हिंदी और तेलुगू वैष्णव भक्तिसाहित्य, के. रामनाथन, १९६८.

हि. दे. का. व. — हिंदुस्थान देशातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारागिरीचे वर्णन, बाळकृष्ण आत्माराम गुप्ते, १८८९.

हिं. ना. उ. वि. — हिंदी नाटक-उद्गम और विकास, दशरथ ओझा, १९५४.

हिं. नी. वि. — हिंदी में नीतिकाव्य का विकास, रामसरूप, १९६२.

हिं. प. मी. — हिन्दू परिवार मीमांसा, हरिदत्त वेदालंकार, १९५५.

हिं. बं. वै. क. — १६ वी शती के हिंदी और बंगाली वैष्णव कवि, रत्नकुमारी, १९५६.

हिं. ब्रि. उ. वा. — हिंदुस्थानातील ब्रिटिश साम्राज्याचा उदय आणि त्याची वाढ, द. बा. करकरे, १९१६.

हिं. रा. तं. — हिंदू राज्यतंत्र, काशीप्रसाद जायस्वाल, १९५२.

हिं. वि. को. — हिन्दी विश्वकोश, नागरी प्रचारिणी सभा, वाराणसी.

हिं. व्य. ध. — हिंदु-व्यवहारधर्म–शास्त्र, का. न. केळकर, बाळुताई खरे, १९३२.

हिं. व्र. प. त्यौ. — हिंदुओं के व्रत, पर्व और त्यौहार, रामप्रताप त्रिपाठी, १९५९.

हिं. सं. — हिंदू संस्कार, राजवली पांडेय, १९५७.

हिं. स. सं. वि. — हिंदू समाज–संघटना आणि विघटना, पु. ग. सहस्रबुद्धे, १९६७.

हिं. सा. — हिंदी साहित्य, धीरेंद्र वर्मा, व्रजेश्वर वर्मा, १९५९.

हिं. सा. इ. — (१) हिंदी साहित्य का इतिहास, रामचंद्र शुक्ल १९६२, (२) रामकुमार वर्मा, १९५७.

हिं. सा. को. — हिंदी साहित्यकोश, संपादक – धीरेंद्र वर्मा, १९५९.

हिं. सा. वि. — हिंदी साहित्य और बिहार, संपादक – शिवपूजन सहाय, १९६०.

हिं. सा. बृ. इ. — हिंदी साहित्य का बृहत् इतिहास, संपा. – राजवली पांडेय.

हि. इं. ई. आ. — History of Indian and Eastern Architecture, James Fergusson, 1967.

हि. इं. फि. — A History of Indian Philosophy, Surendranath Dasgupta.

हि. ओ. लि. — History of Oriya Literature, Mayadhar Mansinha, 1962.

हि. क. इं. पी. — History and Culture of the Indian People, Bharatiya Vidya Bhavan.

हि. गो. सं. सा. — श्रीहितहरिवंश गोस्वामी – संप्रदाय और साहित्य, ललिताचरण गोस्वामी, १९५८.

हि. जॉ. ए. इं. — Historical Geography of Ancient India, Bimal Churn Law, 1954.

हि. जै. मो. — History of Jain Monachism, S. B. Deo, 1956.

हि. द्वै. वे. लि. — A History of the Dvaita School of Vedant and its Literature, B. N. K. Sharma, 1961.

हि. ध. — History of Dharma-Shastra, P. V. Kane.

हि. बें. लँ. लि. — History of Bengali Language and Literature, D. C. Sen 1954.

हि. श्री. वै. — Sir S. Ayyar Lectures on the History of Shri Vaishnavas, T. A. Gopinath Rao, 1923.

हि. सा. इं. — A History of South India, Nilakantha Shastri, 1955.

हि. हिं. सि. — History of Hindu Civilization. P. N. Bose, 1894.

हे. क. — The Heritage of Karnatak, R. S. Mugali, 1946.

व्हि. गॉ. सा. इं. — The Village Gods of South India, Henry Whitehead, 1921.

व्हि. टु बि. — A Visit to Bijapur, H. S. Kaujalgi, 1950.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संदर्भ ग्रंथ सूची

अगारिया — The Agaria, Verrier Elwin, 1940.

अध्यात्मदर्शन — के. वि. बेलसरे, १९६२.

अस्पृश्यांचा प्रश्न — श्री. म. माटे, १९३३.

आर्यसंस्कृती — बलदेव उपाध्याय, १९५३.

आसेतुहिमाचल — वि. गो. साठचे १९५७.

कर्नाटक — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६१.

कल्पनासंगीत — गो. स. टेंबे.

कवि और काव्य — बलदेव उपाध्याय, १९४७.

केरळ — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६०.

कोल्हापूर गॅझे. — Gazetteer of India, Kolhapur District, 1960.

गंगाजळी — रा. चिं. ढेरे, १९७२.

गया गॅझे. — Gazetteer of India, Gaya District, P. C. Roy Choudhury, 1957.

गाजती दैवते — पं. महादेवशास्त्री जोशी, १९५९.

गुजरात — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६२.

चित्पावन — ना. गो. चापेकर, १९३८.

जिवंत व्रतोत्सव — काका कालेलकर, १९४०.

ज्योतिर्लिंग — भार्गव आत्माराम मुळे, १९४९.

ज्योतिर्वैभव — त्र्यं. गो. ढवळे, १९५६.

तमिळनाडू — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६०.

तीर्थयात्रा प्रबंध — गणेशशास्त्री लेले, १९६४.

त्रिवेंद्रम गॅझे. — Gazetteer of India, Trivendrum District, A. S. Menon, 1962.

दि खासीज् — The Khasis, Major P. R. T. Gurdon, 1907.

देवीकोश — आदिशक्तीचे विश्वस्वरूप, प्र. कृ. प्रभुदेसाई, १९६८.

धर्मविवादस्वरूप — के. ल. दप्तरी, १९३४.

धर्मशास्त्रविचार — पां. वा. काणे, १९३५.

ध्वनिविचार — ना. गो. कालेलकर, १९५५.

नवयुगधर्म १ — नवयुगधर्म प्रथम खंड, स. कृ. फडके, १९२७.

नक्षत्रलोक — पं. महादेवशास्त्री जोशी, १९५७.

पंढरी-माहात्म्य — विठ्ठल दाजी धारूरकर, १९०८.

पंढरी-वर्णन — सचित्र पंढरी वर्णन, ना. रा. गोखले, १९२४.

परधान्स — The Pardhans, Shamrao Hivale, 1946.

पशुपुराण — Pashu-Puran, G. S. Hattingdi, 1967.

पुष्पदंत — पं. महादेवशास्त्री जोशी, १९६१.

पुणा गॅझे. — Gazetteer of the Bombay Presidency, Poona District, 1884.

पृथिवीपुत्र — वासुदेवशरण अग्रवाल, १९६०.

पोवाडे — इतिहासप्रसिद्ध पुरुषांचे व स्त्रियांचे पोवाडे, एच. ए. आक्वर्थ, शं. तु. शालिग्राम, १८९१.

प्रवास — शं. गो. तुळपुळे, १९६४.

बदलापूर — आमचा गाव बदलापूर, ना. गो. चापेकर.

भक्तनामावली — राधाकृष्णदास, १९२८.

भागवतदर्शन — हरवंशलाल शर्मा, १९६३.

भारतरत्न — राजा मंगळवेढेकर, १९६८.

भारतीय व्रतोत्सव — आचार्य पुरुषोत्तमशास्त्री चतुर्वेदी, १९५७.

भाषाशास्त्र — ना. भ. पावगी, १९०१.

मंत्रशास्त्र — श्रीयोगेश्वरानंदतीर्थ, १९५७.

मदुरा गॅझे. — Gazetteer of India, Madurai District, 1960.

मानसोल्लास — एक सांस्कृतिक अध्ययन, शिवशेखर मिश्र, १९६६.

मुद्रा — Mudra, E. Dale Saunders, 1960.

मोंघीर गॅझे. — Gazetteer of India, Monghir District, 1960.

योगविद्या — श्री. शं. खानवेलकर, १९५८.

रजःकण — ना. गो. चापेकर, १९४३.

रत्ना. गॅझे. — Gazetteer of India, Ratnagiri District.

राजपुत संस्कृती — ह. वा. देशपांडे, १९३६.

राजस्थान — (१) पं. महादेवशास्त्री जोशी, १९६३.
(२) Rajasthan, Dharm Pal, National Book Trust,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(3) Rajasthan, Publications Division, Govt. of India.
रामकथा -- कामिल बुल्के, १९६२.
रामानुजाचार्य--आर. पार्थसारथी, भाषांतर-चारुशीला गुप्ते, १९७२.
रुद्रार्थ दीपिका -- श्रीपादशास्त्री किंजवडेकर, १९६०.
लोकयात्रा -- श्रीपाद जोशी, १९६०.
विचारसागर रहस्य -- वि. ना. जोशी (साखरे), १९५५.
विजापूर गॅझे. -- Gazetteer of India Bijapur District, Satthayan, 1966.
विद्याज -- Vidyas, A Homage to Comte and a Contribution to Sociology of knowledge, G. S. Ghurye, 1957.
विष्णुगीता -- श्री भारतधर्म्म महामंडल, काशी, १९१९.
वेदविद्या -- वासुदेवशरण अग्रवाल, १९५९.
वैदिक संपत्ति -- रघुनंदन शर्मा, १९३१.
व्रतचंद्रिका -- गौरीशंकर उपाध्याय, १९५२.
व्रतपरिचय -- हनुमान शर्मा, १९५७.
व्रतराज -- विश्वनाथ शर्मा, १९५३.
शंकराचार्य -- बलदेव उपाध्याय, १९५०.
शिवभारत -- कवीन्द्र परमानन्दकृत श्रीशिवभारत, संपा :- स. म. दिवेकर १९२७.
शिवलिंगोपासना -- स. कृ. फडके, १९५४.
शैवमत -- यदुवंशी, १९५५.
श्रीगणेशकोश -- संपादक अमरेंद्र गाडगीळ, १९६८.
श्रीविद्यार्णवतंत्र -- Iconography of Shri Vidyarnava Tantra, S. Shrikanth Shastri.
श्रुतिबोध -- ऋग्वेदाचे सुरम्य मराठी भाषांतर, र. वि. पटवर्धन, १९४०.
शृंगार-हाट -- मोतीचंद्र, अग्रवाल, १९५९.
संतांच्या आत्मकथा -- रा. चिं. ढेरे, १९६७.
समर्थांचा गाथा -- श्रीसमर्थांचा गाथा, अनंतदास रामदासी, १९२८.
सह्याद्रि -- रा. आ. जोगळेकर, १९५२.
सातारा गॅझे. -- Gazetteer of India, Satra District, Government of Maharashtra, Setumadhavrao, 1963.
सारण गॅझे. -- Gazetteer of India, Saran District, 1960.
सुरत गॅझे. -- Gazeteer of India, Surat District, Govt. of Gujarat, 1962.
सुलभ काव्यशास्त्र -- पं. महादेवशास्त्री जोशी, १९६१.
स्पर्शास्पर्श -- स्पर्शास्पर्श अथवा चारही वर्णांचा परस्पर व्यवहार, श्री. दा. सातवळेकर, १९२४.
स्मृतिगंध -- साहित्य आणि संस्कृती, ना. गो. दीक्षित, १९७२.
हडप्पा -- (सिंधुसभ्यता का आदिकेंद्र) केदारनाथ शास्त्री, १९५९.
हिंदुत्व -- रामदास गौड, १९३९.
हिमाचल प्रदेश -- Himachal Pradesh, H. D. Saraswat, 1970.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारतीय संस्कृतिकोश

खंड आठवा

(सातव्या खंडातील अपूर्ण विषय पुढे चालू)

राजस्थान **लोक** – राजस्थानातले लोक म्हणजे सगळेच काही राजपूत नव्हेत. असंख्य जातीजमातींच्या सरिता एकत्र मिळून तिथला जनसागर बनला आहे. या प्रदेशातील बहुतेक संस्थाने राजपूत वंशाच्या निरनिराळ्या शाखांनी स्थापलेली होती व राजपूत जहागीरदार तिथले भूमिधर होते. त्यामुळे राजपूत लोकांना राजस्थानात सर्वश्रेष्ठ मानाचे स्थान प्राप्त झाले. पण त्यांचे ते स्थान आता राहिलेले नाही. राजपुतांच्या अनेक जाती आहेत. राठोड, भाटी, चौहान, कछवाहा, पवार, सोळंखी, पडिहार, तंवर, झाला अशी त्यांची नावे आहेत. भाट व चारण हे राजपुतांचे सांस्कृतिक सगेसोयरे होत.

ब्राह्मणांची लोकसंख्या राजस्थानात सर्वांत अधिक म्हणजे शेकडा १० च्या वर आहे. पुष्करणा, दायमा, गौड, कनोजिया, पालिवाल, पुरोहित, सारस्वत, श्रीमाळी, खंडेलवाल, जोशी, सनाढ्य, डाकोत, इ. त्यांच्या पोटजाती आहेत. त्यांतील श्रीमाळी हे सनातन धर्माचे पालन करणारे असून, पूर्वी ते केवळ पौरोहित्य हाच व्यवसाय करीत.

महाजन किंवा मारवाडी हे लोक मुख्यतः व्यापारी आहेत. त्यांची संख्या शेकडा ८ असून, अग्रवाल, ओसवाल, माहेश्वरी, सरोगी, पोरवाल, इ. त्यांच्या पोटजाती आहेत.

जाट हे राजस्थानच्या उत्तर व पश्चिम भागातले शेतकरी म्हणून प्रसिद्ध आहेत. पूर्वी भरतपूर व धोलपूर येथील राजे जाट होते. त्यामुळे जाटांना त्या भागात बराच मान आहे. जाट लोक सुदृढ, राकट व उद्योगी असून, शेतीची कामे उत्तम प्रकारे करतात. ते चांगले सैनिकही आहेत. गुजर लोकही जाटांसारखेच असून, ते शेती व पशुपालन करतात. त्यांची वस्ती मुख्यतः भरतपूर व अलवार या प्रदेशांत आहे.

राजस्थानात गावोगावी ठाकूर, ठिकाणदार व जहागीरदार यांचे गड व कोट आढळतात. त्याचप्रमाणे क्षत्रियांच्या ब्राह्मण पुरोहितांचे वंशजही जागोजागी आढळून येतात. तसेच दगडी जाळीदार कारागिरी करणारे पाथरवट, लाकडावर नक्षी कोरणारे कारागीर व दस्तकार यांचा भरणा तिथे पुष्कळ आहे. गायन, वादन व नृत्य करणारे कलावंत आणि ज्योतिषीही राजस्थानात बरेच भेटतात.

याव्यतिरिक्त राजस्थानात कायस्थ, मोहनोत, बंजारा, गाडी लोहार, भंडारी, भाट, चारण, मोतीसर, रावळ, मीरासी, भांड, कलावंत, ढाढी, चूडीगर, लोहार, रंगरेज, धोबी, कहार, कुंभार, खाटिक, रेहगर, भंगी, बेलदार, इ. जाती भिन्न भिन्न व्यवसायांमुळे बनलेल्या आहेत. भिल्ल, ग्रासिया, कठोडी, मीन, रबारी, मेव, मेर, सहरिया, इ. अनेक आदिवासी जमातींची वस्ती या प्रदेशातील डोंगराळ व जंगली भागात आढळते. भांबी, बलाई, धाणका, खाटिक हे तिथले हरिजन लोक होत.

राजस्थानच्या पूर्व व पश्चिम भागात नैसर्गिक परिस्थिती अगदी भिन्न प्रकारची आहे. आणि जशी परिस्थिती तसेच तिथले लोकही परस्पर विरोधी प्रवृत्तीचे आढळतात.

राजस्थानी लोकांचे मुख्य अन्न म्हणजे ज्वारी, बाजरी व मका. त्या प्रदेशाच्या काही भागातच गहू पिकतो, त्यामुळे ते आम जनतेचे खाद्य होऊ शकत नाही. तिथले लोक बाजरीचे सोगरा, राब, खीच वगैरे कितीतरी भिन्न पदार्थ बनवतात आणि मक्याचे पिठले करतात. राजस्थानात भाजीपाला तसा कमीच आहे, पण दह्यादुधाचा सुकाळ आहे. बाफला, बाटी, चुरमा, शिरा, खीर, इ. पक्वान्ने ते सणासमारंभाला करतात. कोणत्या सणाला कोणते पक्वान्न करायचे हे पुरातन काळापासून ठरलेले आहे. गणगौरीच्या विसर्जनाला खीर, राखी पौर्णिमेला खीर व बुंदीचे लाडू, दुर्गानवमीला तिखटमिठाचे व गोडाचे घावन, लक्ष्मीपूजनाला मुगाच्या डाळीचा शिरा असे पदार्थ असतात. राजस्थानातल्या बहुतेक जाती मांसभोजी आहेत. जैन ब्राह्मण आणि वैष्णव हे तेवढे शाकाहारी आहेत.

सणसमारंभ – होळी, गणगौर, आखातीज, तीज, जन्माष्टमी, राखीपूनम, सतीपूजन, दशहरा, दिवाळी, वसंतपंचमी व रामनवमी हे राजस्थानातले मुख्य सण आहेत. सतीपूजन हे स्त्रियांचे एक व्रत आहे. ते भाद्रपद अमावास्येला केले जाते. झुनझुनू या गावी सतीमातेचे मोठे देऊळ आहे. तिची पूजा करण्यासाठी हजारो स्त्रिया तिथे जमतात. काही स्त्रिया घरो-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरी सतीची पूजा करतात. ऐतिहासिक काळात ज्या हजारो स्त्रियांनी जोहार म्हणजे शीलरक्षणासाठी आत्मत्याग केला, त्यांची स्मृती या व्रताच्या रूपाने राजस्थानी स्त्रियांनी कायम ठेवली आहे. याशिवाय गावोगावी पाबू, तेजाजी, रामदेव, जांभा, इ. दैवतांच्या नावांनी सण केले जातात व जत्राही भरतात. सोझी नावाचा कुमारिकांचा एक उत्सव पितृपक्षात असतो.

वेषभूषा – राजस्थानी लोकांचा पोषाख रंगीबेरंगी व आकर्षक असतो. त्यांची आनंदी वृत्ती त्यात दिसून येते. सर्वसाधारण पुरुष धोतर, अंगरखा व पागोटे घालतात. धोतराचा एक शेव कमरेभोवती बांधलेला असतो. सणसमारंभाच्या वेळी पुरुष चुणीदार तुमान, कुडता व अचकन आणि डोक्याला पगडी घालतात किंवा साफा बांधतात. सर्व प्रकारच्या पगड्यांत मारवाडी पगडी विशेष उल्लेखनीय आहे. राजस्थानाच्या भिन्न भिन्न भागांत आणि निरनिराळ्या जातीच्या लोकांत पगडीचे व फेट्याचे निरनिराळे प्रकार प्रचलित आहेत. राजपूत लोक मुख्यतः साफा बांधतात. त्यावर सुंदर छपाईही केलेली असते. राजस्थानी शैलीच्या चित्रात पगडीचे अनेक प्रकार पाहायला मिळतात. मोगल बादशहाही राजस्थानी पगडी वापरत होते. त्यामुळे ती मुसलमान लोकांनाही प्रिय झाली. पंडित व धार्मिक वृत्तीचे पुरुष पांढरे पागोटे बांधतात.

सांप्रत सरकारी अधिकारी जोधपुरी कोट वापरतात, त्याचा उगम राजस्थानी अंगरख्यात सापडतो. राजस्थानातील राजपुरुषांनी मोगलांच्या वर्चस्वाच्या काळी शेरवानी अंगिकारली होती. पण ब्रिटिश राजवटीत जुना अंगरखा अंगासरसा घट्ट बनून कोटाच्या रूपाने लोकप्रिय झाला. इंग्रजांचा शिकारीचा पोषाख हे राजस्थानी पोषाखाचे अनुकरणच आहे. त्याला जोधपूर हेच नाव पडले आहे. जोधपूरचे लोक उत्तम वेषभूषेसाठी प्रसिद्ध आहेत.

राजस्थानी पुरुषांना रुबाबदार दाढी-मिशांचा शोक अजूनही आहे. ते मिशांप्रमाणेच लांब दाढीचा भांग पाडून ती दोन्ही बाजूंनी वर वळवतात.

राजस्थानी ललनांची वेषभूषा वरीच भडक असते. त्या खूप मोठ्या घोळाचा घागरा नेसतात व अंगात काचोळी घालतात. त्यांची काचोळी वक्षस्थळ झाकते व दोन्ही हातांच्या कोपरापर्यंत जाते; पण पाठ मात्र उघडी राहते. पाठीवर बंद असतात. त्यावर एक लांबलचक ओढणी असते. घागरा म्हणजे ४० वार लांबीचे लुगडेच असते. स्त्रिया डोक्यापासून पायापर्यंत अनेक दागिने घालतात. पायांत साखळ्या व कडी, हातांत पांढऱ्या किंवा गुलाबी हस्तिदंताच्या बांगड्या व बाजूबंद ही त्यांची सौभाग्यचिन्हे आहेत. मेंदी हे त्यांचे आणखी एक सौभाग्यचिन्ह आहे. प्रत्येक मंगल कार्यात मेंदी लावणे आवश्यक असते, कारण ती शुभशकुनी मानली जाते.

राजस्थानी ललना

पूर्वी राजस्थानी स्त्रिया पडदा पाळीत नव्हत्या. पण मुसलमानांच्या संपर्कामुळे उच्च वर्गातल्या स्त्रिया पडदानशीन झाल्या. आता पड्द्याची प्रथा मागे पडू लागली आहे.

कलापरंपरा – शौर्याच्या परंपरेप्रमाणेच राजस्थानी संस्कृतीत संगीत, नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प या कलांची परंपराही जुनी आहे. या प्रदेशात निरनिराळ्या ठिकाणी आढळणारी मंदिरे, मूर्ती, प्रासाद व चित्रे म्हणजे एक बहुमोल सांस्कृतिक ठेवा आहे.

संगीत – राजस्थानातील राजदरबारांत संगीताला नेहमीच मानाचे स्थान मिळत होते. राजस्थानातील मीराबाईचा मल्हार राग प्रसिद्ध आहे. त्याव्यतिरिक्त मांड व सिंधू हे राजस्थानातील खास राग आहेत. मांड शृंगाराचा राग असून, तो जैसलमीर येथे उदय पावला, असे म्हणतात. सिंधू हा वीररसाचा राग होय. उदयपूर येथील सरस्वतीभांडारात रागमाला या ग्रंथाची एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चित्रित प्रत आहे. त्या ग्रंथात सिंधूला दीपक रागाचा पुत्र म्हटले आहे. त्यात या रागाचे एक चित्रही आहे. प्राचीन काळी युद्धासाठी प्रयाण करताना ढोली व ढाढी लोक हा राग गात सेनेच्या पुढे जात असत.

राजस्थानात संगीतशास्त्रावर बरेच चांगले ग्रंथ निर्माण झाले आहेत. मेवाडचा राणा कुंभ याने तीन ग्रंथ रचले आहेत. जयपूरचा कछवाहा राजा माधवसिंग याने खानदेशातील पुंडरीक विठ्ठल याच्याकडून रागमंजरी नामक ग्रंथ लिहून घेतला होता. त्यानंतरही राजस्थानातील अनेक राजांनी संगीतावर अनेक चांगले ग्रंथ रचून घेतले.

नृत्य-नाट्य – राजस्थानात लोकनृत्याचे विविध प्रकार निरनिराळ्या भागांत प्रचलित आहेत. त्यांतील घूमर, झूमर, डंडिया, गींदड, गैर, घूमरा, गौरी व भवाई हे प्रकार फार लोकप्रिय आहेत. घूमर नृत्य जैसलमीर, बीकानेर व मेवाड या भागांत विशेष चालते. हे राजस्थानातले मुख्य नृत्य होय. प्रत्येक सणाच्या प्रसंगी स्त्रिया हे नृत्य करतात. झूमर नृत्य हे बूंदी-कोटा भागातील खेड्यापाड्यांत चालते. हाडौती राजपूत स्त्री-पुरुष मिळून हे नृत्य करतात. डंडिया हे समूह–नृत्य मोठ्या नगरांतील पुरुष करतात. गींदड नृत्य सर्व जातीचे लोक होळीच्या सणात करतात, त्यात सोंगे आणतात व गाणी गातात. गैर व घूमरा ही भिल्लांची नृत्ये आहेत. गैर नृत्यात इतर लोकही भाग घेतात. घूमरा नृत्य स्त्री-पुरुष मिळूनही करतात. वालर नृत्य गरासिया लोक करतात. यातील नर्तक हातात तलवारी व धनुष्यबाण घेतात. स्त्रियाही यात भाग घेतात. गौरी हे भिल्लांचे नृत्य-नाट्य आहे. भस्मासुराच्या कथेशी ते संबद्ध आहे. भवाई लोकांचे नृत्य-नाट्य विशेष प्रसिद्ध आहे. हे लोक अत्यंत कुशल नर्तक असतात. त्यांची आता वेगळी जातच बनली आहे.

लोकनाट्य – राजस्थानात लोकनाट्याचे अनेक प्रकार प्रचलित आहेत. त्यांत संगीताला प्राधान्य असले, तरी संगीत, नृत्य व अभिनय यांचा सुंदर समन्वय केलेला आढळतो. या लोकनाट्याला ख्याल म्हणतात. नौटंकी, रम्मत, सांग, सांगीत, तमाशा, रासधारी, तुर्रा-कलंगी हे सर्व ख्यालाचेच भिन्न भिन्न प्रकार होत. रामलीला व रासलीला हे लोकनाट्याचे प्रकारही राजस्थानात लोकप्रिय आहेत. या लोकनाट्यांत वीरपूजेची भावना प्रबळ असते. त्यामुळे वीरपुरुषांवर बरेच ख्याल रचले गेले आहेत. काही लोकनाट्ये प्रेमकथांवर आधारलेली आहेत, तर काहींमध्ये पौराणिक कथा आहेत. त्यांच्या प्रयोगांना रंगमंचाची आवश्यकता नसते. भवाई व कठपुतळी हे लोकनाट्याचेच प्रकार आहेत.

चित्रकला – राजस्थानातील आणखी एक महनीय कला म्हणजे चित्रकारी होय. राजस्थानातील मंदिरे व राजप्रासाद यांच्या भिंती, पुराणे व महाकाव्ये यांतील प्रसंगांच्या चित्रांनी सुशोभित केलेल्या होत्या. त्यांतील प्रमुख विषय म्हणजे राधा-कृष्णांचा लीलाविहार हा होय. रागरागिणींची चित्रे हे राज-



विभास राग – राजपूत शैलीचे चित्र

स्थानी शैलीचे दुसरे वैशिष्ट्य होय. राजस्थानी चित्रकारांनी आपली कुंचली आणि विविध रंग यांनी एक नवाच चित्रलोक वसविला आहे. त्यांनी आपल्या आवडीप्रमाणे चित्रांतल्या व्यक्तींच्या मागे मनोहारी निसर्ग उभा केला आहे. राजस्थानी कलमातून आकाराला येणारी कोणतीही स्त्री अप्रतिम सुंदर असते आणि तिचे डोळे मृगनयन किंवा मीननयन असतात. (राजपूत चित्रशैली पाहा).

मूर्तिकला – राजस्थानची राजधानी जयपूर हे भारतातले मूर्तिकलेचे प्रमुख केंद्र आहे. कछवाहा वंशातील मानसिंग याच्या काळी जयपूरची मूर्तिकला विकासोन्मुख झाली. तिथल्या बहुतेक मूर्ती संगमरवरी पाषाणाच्या असतात. तो पाषाण मकरानाच्या खाणीतून मिळतो. मूर्ती घडवल्यानंतर ती विशेष प्रकारच्या दगडाने घासून गुळगुळीत करतात व मग तिला रंग देतात.

राजस्थानी मूर्तिकलेची परंपरा फार जुनी आहे. भरतपूर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पासून ३ मैलांवर नोह नामक गावी माणसाच्या उंचीची एक यक्षमूर्ती सापडली आहे. ती बावीसशे वर्षांपूर्वीची आहे, असे म्हणतात. कर्कोटनगर व मालवनगर या ठिकाणी झालेल्या उत्खननात सन पूर्व पहिल्या शतकातल्या काही मृण्मूर्ती मिळाल्या आहेत. त्यांतील महिषमर्दिनी, मकरध्वज, कामदेव, विष्णू, इ. देवतांच्या मूर्ती प्रतिमाविज्ञानाच्या दृष्टीने मोलाच्या आहेत. कुशाणोत्तर कालातील काही मृत्तिकाफलक बीकानेरच्या संग्रहालयात आहेत. त्यांत गोवर्धन कृष्णाची मूर्ती आहे, ती सर्वांत प्राचीन कृष्णमूर्ती मानली जाते.

राजस्थानातील मंदिरांत ज्या असंख्य मूर्ती पाहायला मिळतात, त्यांची विविधता व कलात्मकता विस्मयजनक आहे. अबनेरी येथील सुंदर मूर्ती देवगडच्या गुप्त परंपरेची आठवण करून देतात. त्या मूर्ती अत्यंत सजीव आहेत. ओसियन, बाडोली, सिकर, अत्रू, नागरा व चंद्रावती येथे अतिशय सुंदर मूर्ती आढळतात. बाडोलीच्या मूर्ती ओसियनमधील मूर्तींपेक्षा मोठ्या आहेत. अत्रू येथील मूर्ती विपुल अलंकरणामुळे फार आकर्षक वाटतात. गुप्तकालातल्या कित्येक सुबक, सुंदर मूर्ती आंबेरच्या संग्रहालयात ठेवलेल्या आहेत. त्यांतील नृत्यगणपती व सप्तमातृकांसह शिव या मूर्ती विशेष उल्लेखनीय आहेत. भरतपूरच्या संग्रहालयात आदिनाथाची एक चतुर्मुख मूर्ती आहे, ती एक गुप्तकालीन उत्कृष्ट कलाकृती समजली जाते. पींडवाडा, अमरसर, खिवसर इ. ठिकाणी जैन धातुमूर्ती मिळाल्या आहेत.

स्थापत्य – राजस्थानातील स्थापत्यकलेची परंपराही मौर्यकालापर्यंत मांगे नेता येते. जयपूरपासून ५३ मैलांवरील बैराट येथे केलेल्या उत्खननात मौर्यकालीन स्तूपांचे अवशेष सापडले आहेत. लालसोट नामक गावी काही स्तंभ सापडले आहेत, त्यांवर शुंगकालीन स्तूपांच्या आकृती कोरलेल्या दिसतात. झालावाड क्षेत्रात बौद्ध गुंफांचे व स्तूपांचे अवशेष आढळतात.

मेवाड हे भागवत धर्माचे केंद्र होते. चितोडपासून ८ मैलांवर मध्यमिकानगरी या गावी कृष्ण-बलरामांचे मंदिर आहे, ते सर्व वैष्णव मंदिरांत प्राचीन आहे. ते शुंगकालीन असून, यज्ञवेदी व बौद्ध स्तूप यांच्या धर्तीवर त्याची रचना केलेली दिसते. त्यांत देवतांच्या मूर्ती नसून प्रतीके आहेत.

गुप्तयुगात राजस्थानात अनेक मंदिरे निर्माण झाली. ती मंदिरे मुसलमान आक्रमकांनी उद्‌ध्वस्त केली आहेत; पण त्यांचे काही भाग मुस्लिम शिल्पकामात वापरलेले आढळतात व त्यांवरून त्या मंदिरांच्या शिल्पसौंदर्याची कल्पना करता येते. त्या काळातले एक शिवमंदिर मुकंदरा येथे चांगल्या स्थितीत आहे.

झालावाड जिल्ह्यात चंद्रावती येथे इ. स. ६८९ च्या सुमारास बांधलेले शीतलेश्वराचे मंदिर आहे, त्याचा गाभारा नेवढा उरला आहे. पुढे पडवी आहे, पण तिला छप्पर नाही. पडवीपुढे हेमाडपंती पद्धतीचा मंडप आहे. गाभाऱ्याच्या बाजूंना महिरपी कोनाडे असलेली दालने असून, त्यांत सुंदर नक्षीकाम आढळते. भिंती साध्या असल्या तरी, त्यांच्या मधोमध मोठे चौकोनी स्तंभ आहेत. त्यांच्या तळांशी वेलबुट्टीची नक्षी असून, वर कीर्तिमुखे आहेत. गाभाऱ्याच्या चौकटीच्या खालच्या भागात गुप्तकालीन पद्धतीच्या गंगा व यमुना यांच्या आकृती कोरलेल्या दिसतात.

जयपूर जिल्ह्यात अबनेरी येथे भग्न झालेले हर्षदमातेचे मंदिर आहे. त्याचा फक्त गाभारा उंच चौथऱ्यावर उभा आहे. तो पंचरथ पद्धतीचा आहे. हे मूळचे विष्णुमंदिर होते; पण आता गाभाऱ्यात हरसिद्धीची प्रतिष्ठापना करण्यात आलेली आहे. स्थानिक लोक तिलाच हर्षदमाता म्हणतात. या मंदिराचे शिल्पकाम गुप्तकालीन परंपरेचे वाटते. मात्र ते इ. स. च्या ८ व्या शतकात बांधलेले असावे. त्याच काळात राजपूत राजांनी अनेक शिवमंदिरे निर्माण केली. बाप्पा रावळ याने बांधलेले एकलिंगजीचे मंदिर अगदी वेगळ्याच पद्धतीचे आहे. राजपूत राजांनी दधिमाता, क्षेमंकरी, शर्करमाता, अरण्यवासिनी, इ. देवींची मंदिरेही बांधली असून, ती सगळी नागर शैलीची आहेत. त्यांच्या सभामंडपांच्या छतांवर, स्तंभांवर व भिंतींवर नाना प्रकारच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

जोधपूर जिल्ह्यात ओसियन येथे बरीच मंदिरे आहेत. इ. स. च्या ८ व्या व ९ व्या शतकांतली मंदिरे उंच चौथऱ्यावर बांधलेली असून, चौथऱ्यांवरच्या बाजूवर महिरपी कोनाडे आहेत, त्यांत अनेक देवतांच्या मूर्ती व नक्षीकाम कोरलेले दिसते. मंदिरांची रचना पंचरथ पद्धतीची आहे. त्यांच्या भिंतींतल्या कोनाड्यांत नरसिंह, वराह, विष्णू, हरिहर, गणेश, सूर्य-चंद्र, ब्रह्मदेव व पार्वती यांच्या आकृती आहेत. तर काही ठिकाणी दिक्पाल, ऋषी, अप्सरा यांच्या प्रतिमा आहेत. या मंदिरांची शिखरे प्रायः पंचरथ पद्धतीची असून, त्यांच्या माथ्यावर आमलक आहेत. गाभाऱ्यापुढे सभामंडप व पुढे देवडी असते. मंडपाच्या दर्शनी भागात नक्षीदार कठडे असून, काही जागी हत्तींची मस्तके पुढे आलेली दिसतात.

या समूहातील सूर्यमंदिर व हरिहरमंदिर ही पंचायतनमंदिरे आहेत. सूर्यमंदिराच्या गाभाऱ्याच्या दाराला एकावर एक अशा चार पाच चौकटी असून, त्यांतील एकीवर नागांच्या आकृती आहेत. त्या नागांच्या शेपट्या गरुडांच्या हाती आहेत. मंदिरातील स्तंभांवर व छतावरही नागपाश आहेत. हरिहरमंदिराच्या सभामंडपाचे घुमटाकार छत अप्रतिम नक्षीकामाने अलंकृत केलेले आहे. हे मंदिर व महावीरमंदिर यांचे रचनाशिल्प उत्कृष्ट आहे. महावीरमंदिराचे सुंदर तोरण इ. स. १०१६ म

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधलेले आहे. ओसियन येथील दुसऱ्या समूहातील मंदिरे इ. स. च्या १० व्या व ११ व्या शतकांत बांधलेली आहेत. त्यांचा गाभारा पंचरथ पद्धतीचा आहे. त्यांच्या चौथऱ्यावरील नक्षी अधिक प्रगत असून, तिच्यावर ओळीनें हत्ती कोरलेले आहेत.



सूर्यमंदिर – ओसियन

काही जागीं मानवी आकृती आढळतात. त्यांच्या सभामंडपाला घंटेच्या आकाराचे छत असते किंवा त्याच्यावर शिखर असून, त्यावर आमलक असतो. भिंतीवर आणि मधल्या मोकळ्या जागेत देव, अप्सरा व साधू यांच्या आकृती दिसतात.

चितोडगड येथील कालिकामातेचे मंदिर व बूंदीचे शिवमंदिर ही इ. स. च्या १० व्या शतकातील शिल्पकलेची चांगली उदाहरणे होत. कालिकामातेचे मंदिर पूर्वी सूर्यमंदिर होते. त्याला पंचरथपद्धतीचा गाभारा, प्रदक्षिणामार्ग, पडवी, बंदिस्त सभागृह, त्याच्या बाजूचे सोपे व पुढे पडवी आहे. पण यांपैकी कशावरही छत उरलेले नाही. गाभाऱ्याच्या भिंतींवर सूर्यमूर्ती व कोनाड्यांत राजप्रतिनिधींच्या मूर्ती आहेत. बाजूंच्या दालनांना चौकोनी खांब असून त्यांवर बरेच नक्षीकाम दिसते. त्यांना दुहेरी चापाचे घोडे आहेत. सभामंडपाच्या छतावर देवादिकांच्या आकृती कोरलेल्या दिसतात. गाभाऱ्याच्या दाराची चौकट चौपदरी असून, तिच्यावर मध्यभागी सूर्य आहे व बाकीच्या भागात देवतांच्या आकृती व विपुल नक्षीकाम कोरलेले आहे. चितोडवरील कुंभश्यामंदिर या मंदिरासारखेच व त्याच कालातले आहे.

पाली जिल्ह्यात औवा गावी इ. स. च्या ९ व्या शतकातले कामेश्वराचे मंदिरही पंचरथ पद्धतीचे असून, नक्षीदार कलाकुसरीमुळे ते सुंदर दिसते. त्याचे बांधकाम दुमजली असून, आकार पिरामीडसारखा आहे व माथा घंटेच्या आकाराचा आहे. त्याच काळातले सिरोही जिल्ह्यातील वर्मन येथले सूर्यमंदिर अगदीच भग्न अवस्थेत आढळते. त्याच्या मुख्य दरवाज्याच्या चौकटीवर सूर्यप्रतिमा आहे. गाभाऱ्यातही अनेक कोनाड्यांत अशा प्रतिमा आढळतात. जे भग्नावशेष आहेत, त्यांवर विपुल नक्षीकाम केलेले दिसते.

उदेपूर किंवा उदयपूर जिल्ह्यातील बाडोली गावी असलेल्या घंटेश्वरमंदिराचा गाभारा पंचरथ पद्धतीचा असून, त्याचे शिखर प्रमाणबद्ध व सुंदर आहे. त्याच्या पडवीचे तिकोनी छप्पर पायऱ्यापायऱ्यांनी वर निमुळते होत गेलेले आहे. मंडपाचे छत घंटेच्या आकाराचे आहे. शिखरही पंचरथ पद्धतीचे असून, त्यावर दोन आमलक आहेत आणि त्यांवर कळस आहे. गाभाऱ्याचे छत गोलाकार असून, त्यावर सुंदर लोंबती कमळे काढलेली आहेत. सभामंडपाच्या प्रवेशद्वारावर सुरेख मकरतोरण आहे. मंडपाच्या चार स्तंभांपैकी दोन स्तंभांचा खालचा भाग अष्टकोनी आहे. त्यावर अप्सरांच्या आकृती कोरलेल्या आहेत. खांबांवर आमलक व कमळे असून, नक्षीदार आकृतीही काढलेल्या आहेत. छतावरही विपुल नक्षीकाम आहे.

उदेपूर जिल्ह्यातील जगत या गावी अंबिकामातेचे मंदिर आहे. त्याची रचना व त्यातील नक्षीकाम अधिक विकसित वाटते. त्यावरून हे मंदिर नंतरच्या काळातले असावे असे वाटते. याचे शिखर पंचरथ असून, त्याच्या बाजूला सतरा लहान मनोरे



अंबिकामातामंदिर – जगत

आहेत. सभामंडपाचे छप्पर पिरामीडच्या आकाराचे असून, पायऱ्यापायऱ्यांनी वर निमुळते होत गेले आहे. त्याच्या छतावर तिहेरी कोरीव काम आहे. त्याच्या बाजूच्या दालनांना जाळीदार खिडक्या आहेत. मंदिराच्या भिंतींवर विपुल नक्षीकाम आहे. काही जागीं देवता, अप्सरा, हत्ती व दिक्पाल यांच्या आकृती कोरलेल्या दिसतात. या मंदिरात इ. स. ९६१ चा एक शिलालेख आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाली जिल्ह्यातील घनेराजवळ एक महावीरमंदिर आहे. त्याचा गाभारा त्रिरथ पद्धतीचा असून, भिंतीतील कोनाड्यांत दिक्पालांच्या मूर्ती आहेत. मधल्या खणांना जाळीदार खिडक्या असून, त्यांच्यावर तोरणे आहेत व त्यांत गायकनर्तकांच्या सुंदर आकृती कोरलेल्या आहेत. हे मंदिर इ. स. च्या १० व्या शतकातले असावे. मुख्य मूर्ती इ. स. ९५४ मध्ये बनवलेली आहे.

सिकरजवळच्या हर्षनाथ टेकडीवर इ. स. च्या १० व्या शतकात बांधलेले महादेवाचे मंदिर बहुतेक पडलेले आहे. त्याचे शिल्पकाम उच्च प्रतीचे दिसते.

नागदा येथे दोन वैष्णव मंदिरे आहेत, ती ' सासबहू ' मंदिरे म्हणून ओळखली जातात. त्यांचे शिल्पकाम बरेच प्रगत शैलीचे आहे. त्यांच्या प्रवेशद्वारावर एक मकरतोरण आहे. ते बाडोलीच्या घंटेश्वरमंदिरासारखेच आहे. दोहोपैकी मोठ्या मंदिराभोवती दहा लहान मंदिरे आहेत. दुसरे मंदिर पंचायतन आहे. या दोन्ही मंदिरांच्या सभामंडपांत निरनिराळ्या देवतांच्या अनेक मूर्ती आहेत आणि विपुल नक्षीकाम आहे. मोठ्या मंदिराच्या सभामंडपाच्या मध्यभागी चार खांब असून, तिथे अनेक मकरतोरणेही आहेत. बाजूच्या दालनांना असलेल्या जाळीदार खिडक्या अप्रतिम कलाकुसरीने सुशोभित केलेल्या आहेत. ही मंदिरे इ. स. च्या १० व्या शतकातली आहेत.

उदेपूरजवळ आहाड येथील मीरा व महादेव यांची मंदिरे त्याच कालातली असून, सुंदर रचनेच्या व नक्षीकामाच्या बाबतीत जगत येथील अंबिकामातेच्या मंदिरासारखी वाटतात.

बारमेर जिल्ह्यात किराडू येथे काही मंदिरे आहेत. ती इ. स.



सोमेश्वरमंदिर – किराडू

च्या १० व्या व ११ व्या शतकांतल्या राजस्थानी स्थापत्यकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. ती बहुतेक मंदिरे पडकी आहेत. त्यांतील सोमेश्वराचे मंदिर प्रगत रचनेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्यात गाभारा, सभामंडप, पडवी, देवडी, इ. सर्व दालने असून, त्यांच्या रचनेत विकसित शिल्पकलेचा प्रत्यय प्रकर्षाने येतो. गाभारा ज्या चौथऱ्यावर उभा आहे, त्याच्यावर हत्ती, घोडे व मानव यांच्या आकृती वेगवेगळ्या रांगांत कलात्मक रीतीने कोरलेल्या आहेत. भिंतीच्या पुढे आलेल्या भागावरही अशाच उठावदार आकृती दिसतात. मंदिरावर अनेक शिखरांचा गुच्छ आहे. सभामंडप प्रशस्त व भव्य असून त्याचे अष्टकोनी स्तंभ नक्षीकामाने अलंकृत केलेले आहेत.

मेवाडात बिजोलियापासून ८ मैलांवर मेनाल या गावी इ. स. च्या १२ व्या शतकातले एक शिवमंदिर आहे, ते चौहान शिल्पपद्धतीचे सुंदर उदाहरण आहे.

ओसियन येथील सचियामातेचे मंदिर बहुधा इ. स. च्या १२ व्या शतकात बांधलेले असावे. त्याची रचना अधिक प्रगत वाटते. त्याला प्रदक्षिणामार्ग व मोठे सभागृह आहे. सभागृहाला आठ तोरणे आहेत. मंदिराचे छत सुंदर नक्षीकामाने सुशोभित केलेले असून, त्याची शोभा सोळा शानदार घोड्यांमुळे वाढली आहे. मंदिराच्या शिखराभोवती मनोऱ्यांच्या दोन रांगा आहेत.

इ. स. च्या १२ व्या शतकानंतरच्या काळात मारवाड, मेवाड वगैरे प्रदेशांवर गुजरातच्या सोळंकी राजांचे प्रभुत्व असल्यामुळे राजस्थानी स्थापत्यावर सोळंकी शैलीचा प्रभाव पडलेला दिसून येतो. चितोड, एकलिंगजी, जालोर, राणकपूर, इ. ठिकाणी त्या काळात बांधली गेलेली मंदिरे त्या प्रभावाची साक्ष देतील. तथापि राजस्थानातील अबू पर्वतावरील काही मंदिरे सोळंकी शैलीची असूनही राजस्थानी स्थापत्यकलेची उत्तम उदाहरणे मानली जातात. दिलवाड्याच्या जैन मंदिरात त्या दोन्ही शैलींचा उत्तम संगम झालेला दिसतो. लूणवसही हे मंदिर इ. स. १२३१ मध्ये बांधलेले आहे. त्याच्या सभामंडपाचे भव्य स्तंभ, छतावरील कलाकुसर, दारांच्या चौकटीवरील नक्षीकाम यांतील विलक्षण सौंदर्य पाहून डोळे थक्क होतात. राणकपूर येथील चौमुखी आदिनाथाचे मंदिर त्याचा विस्तार व भव्यपणा यांसाठी प्रसिद्ध आहे.

त्यानंतरच्या काळात राजस्थानातील अनेक राजपुरुषांनी मंदिरे निर्माण केली. मेवाडात राणा कुंभ, जगतसिंह व राजसिंह; जयपुरात मानसिंह व सवाई जयसिंग; जोधपुरात विजयसिंह व मानसिंह यांच्या वेळी अनेक भव्य मंदिरे बांधली गेली. त्यांतील काही मंदिरे प्राचीन शिल्पग्रंथांच्या आधारे बांधलेली आहेत; तर काहींवर मुस्लिम स्थापत्यकलेचा प्रभाव आहे. मेवाडमधील एकलिंगजी, कुंभश्याम व जगदीश ही मंदिरे व आंबेरचे जगत-शिरोमणीमंदिर; ही पहिल्या प्रकारची उत्कृष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उदाहरणे होत.

राजस्थानात मुसलमानी सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर राजवाडे व गडकोट यांची रचना अधिक प्रमाणात झालेली दिसते. असे असंख्य राजवाडे व गड राजस्थानात जागोजागी आढळतात. त्यांतील बहुतेक राजवाडे विस्तीर्ण क्षेत्रात पसरलेले आणि विविध प्रकारे बांधलेले आहेत.

इ. स. च्या १७ व्या व १८ व्या शतकांत राजस्थानात वल्लभ संप्रदाय खूप फैलावला आणि त्या संप्रदायाच्या अनुयायांनी अनेक वैष्णव मंदिरे निर्माण केली. त्यांतील नाथद्वारा, कांकरोली व बीकानेर येथली मंदिरे विशेष प्रसिद्ध आहेत. पण त्यांच्या शिल्पकामात प्राचीन मंदिरांची सजीवता व कलात्मकता दिसत नाही. त्यांवर मोगल पद्धतीचा प्रभाव पडलेला दिसतो. ती भव्य व विस्तीर्ण आहेत; पण त्यांत सौंदर्य नाही. [हमारा राजस्थान – श्री. पृथ्वीसिंह महता विद्यालंकार, १९५०; राजपुताने का इतिहास – श्री. जगदीशसिंग गहलोत, १९३७; म. यु. भा.; राजस्थान; ज. द.; राजस्थानकी स्थापत्यकला : मंदिर – श्री. विजयशंकर श्रीवास्तव, मरुभारती, जुलै १९६३; रा. पिं. सा.; उ. भा. मं.; रा. जा.; भा. लो. नृ.; राजस्थानी लोकनाट्य – श्री. देवीलाल सामर, १९५७; राजस्थानी लोकोत्सव – श्री. गेंडाराम वर्मा, १९५७; संयुक्त राजस्थान, ऑक्टोबर १९५६]

राजस्थानी भाषा व साहित्य

राजस्थानाच्या साहित्यिक परंपरेचा प्रारंभ बराच प्राचीन आहे. एका काळी राजस्थानाच्या एका भागातून सरस्वती नदी वाहत होती. असे सांगतात, की या नदीच्या तीरावर आश्रम उभारून अनेक ऋषींनी वेदाच्या ऋचा गायिल्या. त्यानंतर काही कालाने महर्षी कपिल जन्माला आला. बीकानेर जिल्ह्यातल्या कोलायत गावी त्याचे वास्तव्य होते. त्याने सांख्य दर्शनाचे प्रणयन केले. त्याचप्रमाणे इतर अनेक कवींनी आणि आचार्यांनी राजस्थानात राहून ग्रंथरचना केली.

राजस्थानात अनेक भाषांमध्ये साहित्यनिर्मिती झाली आहे. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, हिंदी व राजस्थानी या त्यांतल्या प्रमुख भाषा होत. वैदिक व पौराणिक परंपरेतल्या विद्वानांनी रचलेले धर्मशास्त्र, जैनांचे धर्मशास्त्र, मंत्रतंत्रात्मक साहित्य, राजप्रशस्तीची व वीरप्रशस्तीची काव्ये, संतसाहित्य, लोकसाहित्य, असे या साहित्यरचनेचे विविध प्रकार आहेत.

राजस्थानी भाषा ही आर्य भाषेची एक शाखा आहे. सांप्रत ती जवळजवळ साऱ्या राजस्थानात व माळव्यात बोलली जाते. मध्य प्रदेश, सिंध व पंजाब यांच्या काही भागांतही राजस्थानीचा प्रचार आहे. सुमारे दोन कोटी लोकांची ती मातृभाषा आहे. भारतीय भाषांमध्ये तिचा सहावा क्रमांक लागतो.

अपभ्रंशाचे सत्तावीस भेद मानलेले आहेत. त्यांत नागर अपभ्रंश नावाचा एक भेद आहे. गुजरात व पश्चिम राजस्थान हे त्या अपभ्रंशाचे क्षेत्र होते. श्री. मुन्शी यांनी त्याला गुर्जरी अपभ्रंश असे म्हटले आहे. कारण प्राचीन गुर्जर देशात आधुनिक गुजरात आणि राजस्थान हे दोन्ही देश संमीलित होते. या गुर्जर अपभ्रंशापासूनच पुढे राजस्थानी भाषा जन्माला आली. तिचे प्राचीन नाव मरुभाषा असे होते. इ. स. च्या आठव्या शतकात निर्माण झालेल्या कुवलयमाला या ग्रंथात, तिच्या या नावाचा उल्लेख आहे.

राजस्थानीच्या प्रारंभाचा काळ ठरवणे कठिण आहे. अनुमान असे आहे, की ११ व्या शतकाच्या पूर्वार्धात ती अपभ्रंशापासून पृथक झाली आणि तिने स्वत:चा संसार सुरू केला. राजस्थानीच्या अंतर्गत काही बोलीही आहेत, त्या अशा –

मेवाती – ही बोली दिल्लीच्या दक्षिणेस अलवार, भरतपूर या भागांत प्रचलित आहे. हिच्यावर व्रज भाषेचा प्रभाव दिसून येतो. हिच्यात थोडेसे साहित्यही आहे. चरणदास आणि त्याच्या दोन शिष्या सहजो व दया यांची काव्यरचना मेवातीतच आहे.

ढूंढाडी – शेखावटी प्रदेश सोडून साऱ्या जयपूर भागात; तसेच अजमेर, मेवाड यांच्या ईशान्य भागात तिचा प्रचार आहे. हिच्यावर गुजराती आणि मारवाडी या दोन्ही भाषांचा प्रभाव आहे. या बोलीत गद्यपद्यात्मक विपुल साहित्य आहे. मिशनऱ्यांनी या बोलीत बायबलचा अनुवादही केला आहे. दादू दयाळ आणि त्याचे शिष्य-प्रशिष्य यांनी काव्यरचना करून तिला गौरवान्वित केले आहे.

मालवी – समस्त माळवा आणि मेवाडचा काही भाग यांत ही बोली प्रचलित आहे. ती कोमल व श्रुतिसुखद असून, सर्वत्र समान रूपाने कानी पडते. तिला थोडाबहुत मराठीचा स्पर्श आहे. चंद्रसखी, नटनागर, इ. कवींची रचना याच बोलीत आहे. मीराबाईच्या भावजीवनाची कथा आणि व्यथा याच बोलीच्या द्वारे अभिव्यक्त झाली आहे.

बागडी – डुंगरपूर–बाँसवाडा या प्रदेशाला पूर्वी बागडदेश म्हणत. त्या प्रदेशाची बोली म्हणून हिचे नाव बागडी पडले. हिच्यावर गुजरातीची छाप आहे. हिचे अल्पस्वल्प साहित्यही आहे.

मारवाडी – जोधपूर, बीकानेर, जेसलमीर, मेवाड, किशनगढ अशा बऱ्याच मोठ्या प्रदेशात या बोलीचा प्रसार आहे. हिचे विशुद्ध स्वरूप जोधपुरास ऐकायला मिळते. इतिहासकाळातले हिचे साहित्यिक रूप म्हणजे डिंगल होय. हे नाव कवी बाँकीदास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याच्या कुकविबत्तीसी या ग्रंथात प्रथम आढळते.

राजस्थानीचे स्वत:चे असे छंद व अलंकारही आहेत. या विशिष्ट छंदाचे नाव गीत होय. ही गीते गायली जात नाहीत; तर एका विशिष्ट स्वरात वाचली जातात. या गीतांची रचन चारणांनी केली आहे. प्रत्येक गीतात कमीत कमी तीन व जास्तीत जास्त पाच पद्ये असतात. प्रथम पद्याच्या प्रथम चरणाच्या आरंभी कधी कधी काही मात्रा किंवा वर्ण अधिक असतात. ते गीताचा आरंभ सूचित करतात. गीताचा एक नमुना असा –

पाताळ तठै बळि रहण न पाऊं ।
रिघ मांडे स्रग करण रहै ।
मो म्रित लोक राइ सिंघ मारै ।
कठै रहुं हरि दळिद्र कहै ।
नाग अमर पर भुवण निरखतां ।
हेक ठोड छै कहे हरि ।
घर आरि नान्हा सिंघ घातिया ।
फुरिंद तठै लाई वास करि ।।

भावार्थ – (दारिद्र्य विष्णूला विचारते) पाताळ लोकात मी राहू शकत नाही, कारण तिथे दाता कर्ण माझी हकालपट्टी करतो. मृत्युलोकात मी राहू शकत नाही, कारण तिथे रायसिंह राजा मला पाय ठेवू देत नाही. मग मी राहू तरी कुठे ? त्यावर विष्णू दारिद्र्याला म्हणतो – नागलोक, स्वर्ग आणि मृत्युलोक यांचे निरीक्षण करता हे दारिद्र्या, तुला तिथे स्थान नाही. तेव्हा तुला एक जागा दाखवतो. तू रायसिंहाने पराभूत केलेल्या शत्रूंच्या घरी जाऊन सुखाने राहा.

व्रज भाषेतली कविता पिंगलकथित छंदामध्ये होत असल्यामुळे ती पिंगल नावाने प्रसिद्ध झाली. त्याच धर्तीवरच्या राजस्थानी गीतांची भाषा पिंगलाच्या प्रतिसंदर्भात डिंगल म्हटली जाऊ लागली. चारण लोक प्राय: डिंगल भाषेत गीते रचीत व भाट पिंगल भाषेत काव्ये करीत. पिंगल भाषेची सर्वप्रसिद्ध रचना म्हणजे 'पृथ्वीराज रासो' हे बृहत्काव्य होय.

डिंगलचा वाङ्‌मयीन बगीचा फुलण्यापूर्वी राजस्थानात राजदरबारी संस्कृतला प्राधान्य होते. राजप्रशस्तीही संस्कृतातच लिहिल्या जात. पण मारवाडी अर्थात डिंगल भाषा जसजशी प्रौढ व नागर बनू लागली, तसतशी राजदरबारात मान मिळवण्याची तिलाही महत्त्वाकांक्षा उत्पन्न झाली. सर्वांत आधी चारण कवी तिला दरबारात घेऊन गेले. त्यांनी विविध प्रशंसागीते रचून ती राजांना ऐकविली. संस्कृत प्रशंसेचा त्या राजांना दुसऱ्याकडून अन्वयार्थ लावून घ्यावा लागे, पण चारण जे डिंगलगीत रचून म्हणत, ते सरळसरळ त्या राजांच्या हृदयाला जाऊन भिडे. त्यामुळे राजे लोक खूष झाले. त्यांनी चारणांना संस्कृत पंडितांच्या बरोबरीने राजाश्रय दिला. चारण कवी राजस्थानात हजारोंच्या संख्येने होऊन गेले. बाराव्या ते तेराव्या शतकापासून त्यांची फुटकळ रचना आढळू लागते. जैन विद्वानांनी या चारणरचित पद्यांचा आपल्या प्रबंधात उपयोग करून घेतला आहे. पंधराव्या शतकापासून चारण साहित्याची अविच्छिन्न धारा सुरू झाली. इ. स. च्या १७ ते १९ या शतकांतले बरेचसे साहित्य चारणांनीच निर्माण केले आहे.

राजस्थानीच्या अलंकारांमध्ये जया व वैणसगाई हे दोन विशेष उल्लेखनीय आहेत. जये अनेक प्रकारचे आहेत. ज्या गीताच्या प्रथम पद्यामध्ये वर्णिलेला भावच पुढच्या पद्यात फुलवला जातो तो शुद्ध जया होय. त्याला महल असे म्हणतात. वैणसगाई हा आद्यानुप्रास आहे. त्यात पद्यांच्या प्रत्येक चरणाचा पहिला व अंतिम शब्द एकाच वर्णाने सुरू होतो.

राजस्थानी लिपी देवनागरीशी बऱ्याच प्रमाणात जुळणारी आहे. काही अक्षरांचे वळण देवनागरीपेक्षा भिन्न असले, तरी ही भिन्नता हळूहळू लोप पावत आहे. राजस्थानी लिपी प्राय लपेटीने लिहिली जाते. राजकीय कार्यालयात ही लिपी शुद्ध स्वरूपात आढळते म्हणून तिला महाजनी म्हणतात. वैश्य वर्गाच्या हिशेबाच्या वह्यांत या लिपीची शुद्धता राखली जात नाही म्हणून तिला बाणियावटी मुडिया म्हणतात. ही एक प्रकारची लघुलिपी आहे.

राजस्थानी साहित्याचे तीन विभाग पडतात, ते असे –

(१) इ. स. ११५० ते १५५० प्रारंभिक काल.

(२) इ. स. १५५० ते १८७५ मध्य काल.

(३) इ. स. १८७५ ते १९५० आधुनिक काल.

प्रारंभिक काल – या कालातले बहुतेक राजस्थानी साहित्य जैनांनी निर्माण केलेले आहे. या कालखंडात धनपाल, जिन वल्लभसूरी, वादिदेवसूरी, शालिभद्रसूरी, जिनेश्वरसूरी, जिन प्रभसूरी, इ. सुमारे पन्नास ग्रंथकार आढळतात. यांच्याही आधी उद्योतनसूरी, हरिभद्रसूरी व जयसिंहसूरी हे ग्रंथकार होऊन गेले.

उद्योतनसूरीने जालौर येथे कुवलयमाला नावाचा भाव विषयक ग्रंथ रचला. हरिभद्रसूरीने चितोड येथे राहून उपमितिभवप्रपंचकथा हा महान ग्रंथ तयार केला. त्याचे सोळा हजार श्लोक आहेत. याशिवाय त्याने धूर्ताख्यान नावाचा कथाग्रंथही रचला. हरिभद्रसूरी हा प्रकांड पंडित होता. जैन व जैनेतर अशा दोन्ही दर्शनांवर त्याचा समान अधिकार होता. त्याने सुमारे १०० ग्रंथ रचले आहेत.

बाराव्या शतकात जिनेश्वरसूरी नावाचा एक प्रख्यात जैनाचार्य होऊन गेला. त्याने जैन न्यायावर ग्रंथ लिहिले व क

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोष ग्रंथाची रचना केली. त्याचा शिष्य धनेश्वरसूरी याने सुरसुंदरीकथा लिहिली. जिनचंद्रसूरीने सवेगरंगशाला नावाचा ग्रंथ लिहिला. अभयदेवसूरीने शृंगार शतकलिहिले आणि अनेक स्तोत्रेही रचली. वादिदेवसूरीने न्यायशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला. जिनपतिसूरीने गुर्वावली हा ग्रंथ लिहून त्यात खरतरगच्छाच्या सर्व आचार्यांची, काल व स्थान यांच्यासह तपशीलवार, चरित्रे वर्णिली. धर्मघोषसूरीने धर्मकल्पद्रुम नावाचा ग्रंथ रचला. लक्ष्मीतिलक याने प्रत्येकबुद्धचरित्र, चंद्रतिलक याने अभयकुमारचरित्र, विवेकसमुद्रगणीने नरवर्णचरित्र व नयचंद्रसूरीने हमीर या नावाची महाकाव्ये रचली.

या कालखंडातले सर्व जैन साहित्य कथा, प्रबंध, रासो, चौपदी, फाग, बारहमासी, चौमासी, संवाद, धवल, दूहा, गजल, मातृक, स्तवन, सूज्झय, पत्रावली, इ. प्रकारांनी वैविध्यपूर्ण आहे. जैनांनी आपले ग्रंथ लुप्त होऊ दिले नाहीत. त्यांनी त्यांच्या अनेक प्रती करून विविध ग्रंथालयांतून त्यांचे संरक्षण केले. जैनेतर ग्रंथांविषयीही अनुदार बुद्धी न धरता त्यांनी त्यांतलेही अनेक ग्रंथ प्रयत्नपूर्वक सुरक्षित ठेवले.

प्रस्तुत कालखंडात राजस्थानामध्ये हजारो चारण कवी होऊन गेले. चारण हे आपापल्या दात्या राजांच्या प्रशस्ती लिहीत. इतकेच नव्हे; तर ते लढाईच्या वेळी रणभूमीवरही जात आणि वीररसपूर्ण काव्यपंक्ती गाऊन वीरांना मरण-मारणाविषयी प्रोत्साहन देत. चारणांचे साहित्य हे वीररसप्रधान आहे. छोट्या छोट्या दोन ओळींच्या दोह्यांमधूनही त्यांनी वीरतेचे स्फुलिंग फुलवले आहेत. या दोह्यांचा राजस्थानात खूप प्रचार झाला व आजही तो आहे. त्यांतले नमुन्यादाखल काही दोहे असे —

जननी जणेतो अहडा जण कै दाता कै सूर ।
ना तर रहजे बांझड़ी, मती गमाजे नूर ॥

अर्थ — हे जननी ! पुत्र जन्माला घालशील तो असा घाल, की तो दाता तरी असेल किंवा वीर तरी असेल. तसे नसल्यास वांझ राहिलीस तरी चालेल. निकामी पुत्राला जन्म देऊन स्वतःच्या यौवनाचा नूर वाया घालवू नकोस.

रजवट नह दीठी सखी ! दीन घणा सुभट्ट ।
सिर पड जावै, धड लडै वा रूडी रजवट्ट ॥

अर्थ — हे सखी, बहुत वीर पाहिले, पण राजपुती वीरता कुठे दिसली नाही. युद्धात शीर तुटले, तरी धडाने लढत राहावे, ही खरी राजपुती होय.

सूर न पूछै टीपणौ, सुगन न देखै सूर ।
मरणा नूं मंगल गिणै, समर चढै मुख नूर ॥

अर्थ — वीर रणभूमीवर जाताना कधी पंचांग पाहत नाही, की शकुन पाहत नाही. तो युद्धात येणारे मरण हे मंगलच समजतो. रणभूमीवर जाताच त्याच्या मुखावर तेज चढते.

ऐ भग्गा पारक्कडा तो सखि मुझ पिएण ।
ऐ भग्गा आपां तणां तो तिह जूझ पडेण ॥

अर्थ — हे सखी, रणभूमीवर जर शत्रू पळत असतील तर समज, की माझ्या पतीच्या पराक्रमामुळे ती गोष्ट घडत आहे. आणि जर आपले सैनिक पळत असतील, तर खात्री बाळग, की माझा पती युद्धात मारला गेला आहे.

मध्य काल — प्रस्तुत कालखंडात राजस्थानातल्या अनेक बोलींमध्ये साहित्यरचना होऊ लागली असली तरी, सर्वांत अधिक गौरव मारवाडीने प्राप्त करून घेतला. मारवाडी अर्थात डिंगल ही समस्त राजस्थानची साहित्य-भाषा बनली. या कालात संतकाव्य, वीरकाव्य व शृंगारकाव्य असे विविध साहित्य निर्माण झाले. प्रस्तुत कालात अग्रदास नावाचा एक संत निर्माण झाला. तो कृष्णदास पयहारीचा प्रमुख शिष्य व रामभक्त होता. त्याने श्रीरामभजनमंजिरी, पदावली, हितोपदेश भाषा, इ. नऊ ग्रंथ रचले. अग्रदासाचा शिष्य नारायणदास. त्याने भक्तमाल नावाचा ग्रंथ लिहून त्यात अनेक भक्तांची चरित्रे वर्णिली. मीराबाईही याच कालखंडातली. तिची कित्येक पदे राजस्थानीतच आहेत. आशानंद हा आणखी एक चारण कवी. त्याने लक्ष्मणायन, निरंजनप्राण, गोगाजीरी पेडी, इ. सहा ग्रंथ लिहिले. मालदेव या वीरश्रेष्ठाच्या मृत्यूनंतर उमादे या नावाची त्याची भार्या सती गेली, त्या प्रसंगाचे चित्रण कवीने पुढीलप्रमाणे केले आहे —

सझ सौळे सिणगार, सत्तव्रत अंग सनाहै ।
अरक बार मुख ऊग, नीर गंगाजळ नाहै ॥
चीर पहर अस चढै, मुकुट वेणी सिर खुललै ।
देती परदिखणांह, हंस गत राणी हललै ॥
सुरभुवण पंथ लीधौ, सरग, साम तणौ मन रंजिया ।
रूसणो मालदे राक सूं, भटियाणी इन भंजियौ ॥

अर्थ — सोळा शृंगारांनी शरीर सजवून आणि सत्य व्रत धारण करून उमादे सती जायला प्रवृत्त झाली. तिच्या मुखावर जणू बारा सूर्यांचे तेज प्रगटले. तिने गंगाजलाने स्नान केले. चीर वस्त्र परिधान केले. शिरोभूषण काढून टाकले. केस मोकळे सोडले. ती घोड्यावर स्वार झाली. तिने पेटत्या चितेला प्रदक्षिणा करून तिच्यात उडी घेतली. ती हंसगतीने चालत स्वर्गात पोचली. तिला पाहून मालदेवाचे मन प्रसन्न झाले. अशा प्रकारे उमादेने मालदेवाशी असलेला आपला रुसवा घालवला.

ईसरदास हा रोहाडिया शाखेचा आणखी एक चारण कवी. तो भक्त आणि चमत्कारी पुरुष होता. त्याच्या अनेक दंतकथा राजस्थानात प्रचलित आहेत. ' ईसरा सो परमेसरा ' (ईसर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दास म्हणजे परमेश्वर) असे म्हणून लोक त्याची पूजा-प्रार्थना करतात.

त्याचे 'हरिरस' व 'हालाँ झालाँ रा कुंडलियाँ' हे दोन लोकप्रिय ग्रंथ आहेत. दुसरा ग्रंथ वीररसप्रधान आहे. याशिवाय त्याने इतरही अनेक ग्रंथ लिहिले आहेत. ईसरदासाच्या काव्याचा नमुना असा –

सीहण हेको सीह जण छापर मंडे आळ ।
बूध विटालण कापुरुष, बौहळा जणै स्यिाळ ॥

अर्थ – सिंहीण एकाच पुत्राली जन्म देते. आणि तो खुल्या मैदानात घेरा घालतो. कोल्हीण दुधाला लाज आणणाऱ्या अनेक भित्र्या पुत्रांना जन्म देते; पण त्यांचा उपयोग काय !

हिरणा लांबी सींगडी, भाजण हणौ सभाव ।
सूरां छोटी दांतली, दै घण थट्टा घाव ॥

अर्थ – हरिणांची शिंगे लांब असतात; पण त्यांचा स्वभाव पळण्याचा असतो. डुकरांचे सुळे लहान असतात; पण ते शत्रूच्या झुंडीवर खोल घाव करतात.

केशवदास या कवीने गुणरूपक, राव अमरसिंहजी रा दूहा व विवेक वार्ता असे तीन ग्रंथ लिहिले. पृथ्वीराज राठोड हा महाराजा रायसिंह याचा मोठा भाऊ होता. तो जसा कवी तसा वीरही होता. कवी म्हणून पृथ्वीराजाचे स्थान उंच मानतात. वेलि क्रिसन रुक्मिणी री, ही त्याची सर्वोत्कृष्ट रचना आहे. हे वेलीयो या छंदात लिहिलेले ३०५ पद्यांचे एक खंडकाव्य असून, त्यात कृष्ण-रुक्मिणीच्या विवाहप्रसंगाचे वर्णन आहे. त्याच्या काव्याचा नमुना असा –

गत्र प्रभा थियों रासि रयणि गळती,
ससर मन्दा सई वहन वरि ।
दीपक परजळतौं हुंन दीपै
नासफरिम सु रजनि नरि ॥

अर्थ – रात्र संपल्यावर चंद्रबिंब कांतिहीन झाले, जसे पती अस्वस्थ होताच पतिव्रतेचे मुखमंडल. दिवा जळत असूनही प्रकाश देईना, जसा आज्ञाभंग झाल्याने राजा.

संयोगिणी चरि रई कैरव श्री
घर हट ताळ भ्रमर गोघोख ।
दिणयर ऊगि एतरा दीधा ।
मोखियाँ बंध बांधियाँ मोरख ॥

अर्थ – सूर्याने उदय पावताच पतिसंयुक्त स्त्रियांचे वस्त्र, मंथनदंड आणि कुमुद या तीन खुल्या वस्तूंना बंधन दिले आणि घर, बाजार, कुलूप, भ्रमर आणि गोशाला या बंद वस्तूंना मुक्त केले.

दूरसाजी हाही असाच एक चारणकवी होय. याचे काव्य विशुद्ध डिंगल भाषेचा नमुना समजला जातो. कुशललाभ हाही एक कवी आणि नामांकित पंडित होता. ढोला मारू री चौपाई व माधवानल–कामकंदला या त्याच्या दोन रचना फार लोकप्रिय आहेत. परशुराम हा निंबार्क संप्रदायातला होता. त्याने लहानमोठे २२ ग्रंथ लिहिले आहेत. हा सगुण–निर्गुण या दोहोंचा उपासक होता. माधोदास हा एक हरिभक्त व उच्च कोटीचा कवी होता. याने रामरासौ व भाषा दशमस्कंध असे दोन ग्रंथ लिहून कीर्ती मिळविली. याशिवाय कित्येक कवी प्रस्तुत कालखंडात निर्माण होऊन प्रसिद्धी पावले.

मध्यकालाच्या उत्तरार्धात डिंगलबरोबरच पिंगलचीही चांगली प्रगती झाली. दोन्ही भाषांत उच्च कोटीचे ग्रंथ रचले गेले. या काळातल्या कवींचा प्रिय विषय कृष्ण हा होता. राधाकृष्णांच्या प्रेमलीलांवर या कालात अनेक शृंगारप्रधान ग्रंथ निर्माण झाले. या काळात काही कवींनी वीररसही आळवला. अशा कवींत बिहारीलाल, वृंद व नागरीदास हे विशेष उल्लेखनीय आहेत. सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात माधोदास दधवाडियाने राम रासौ लिहून रासौलेखनाची जी परिपाटी निर्माण केली होती, तिला या काळात बळ मिळाले. खुंमाण रासौ, पृथ्वीराज रासौ, राणा रासौ, हमीर रासौ, इ. अनेक रासौ ग्रंथ राम रासौच्या शैलीवर लिहिले गेले.

आधुनिक काल – या कालाच्या प्रारंभी बूंदी येथे सूरजमल नावाचा एक कवी निर्माण झाला. चारण लोक याला आपल्या जातीचा सर्वश्रेष्ठ कवी मानतात. बंगालमध्ये रवींद्रनाथ ठाकूर यांचा प्रभाव तत्कालीन आणि उत्तरकालीन कवींवर पडला होता, तसाच तो राजस्थानात सूरजमलचा पडला होता. सूरजमलची प्रतिभा गगनभरारी मारणारी होती व कवित्व अनेक गुणांनी संपन्न होते. राजस्थानात जिथे जावे तिथे त्याचेच नाव ऐकू येई. वंशभास्कर, वीरसतसई (अपूर्ण) बलवंतविलास व छंदोमयूख हे सूरजमलचे प्रमुख ग्रंथ होत. वीररस हा त्याचा आवडता रस होता. एका रणभूमीचे चित्र उभे करताना तो पुढील काव्यपंक्ती लिहितो –

फहरंफिक दिसान दिसान बडे
बहरंफिक निसान उठै बिथरै ।
रसना अहिनायककी निकसैं
कि पराक्षल हौरियकी प्रसरै ।
गजघंट ठनंकिय फोज फरी ।
पखरान हनंकिय बान सनंकिय
चाप तनंकिय ताप परी ।

भावार्थ – छोटीमोठी निशाणे दिशा दिशांना फडकून लहरू लागली. जणू शेष नागाच्या जिभाच लवलवत आहेत किंवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होळीच्या ज्वाळाच धगधगत आहेत. दुर्गीच्या घंटा, रणभेरी आणि कवचांच्या कड्या वाजत आहेत. घोड्यांच्या खोगिरांचा झंकार, बाणांचा सणत्कार आणि धनुष्यांचा टणत्कार यांनी वातावरण भयकंपित झाले आहे.

महाराज चतुरसिंह हा एक बहुभाषी कवी होता. याने एकूण सोळा काव्यग्रंथ लिहिले. मेवाडमध्ये घराघरांतून याच्या कवितेचा प्रचार आहे. मीरेनंतर मेवाडमध्ये हाच लोकप्रिय आहे. त्याच्या कवितेचा नमुना असा –

रहँट फिरै चरखौ फरै पण फरवा में फेर।
हेक बाड हरयौ करै हिक छंतारा ढेर॥

अर्थ – रहाट फिरतो आणि घाणाही फिरतो. पण दोहोंच्या करणीत अंतर आहे. रहाट उसाचे शेत हिरवेगार करतो, तर घाणा पेंडीचा ढीग जमा करतो.

कल्हा पिचै विरोध जो करै फूंकड़ो चाड।
या सूं तो भाठा भला ऊप नै मेटे राड॥

अर्थ – जे लोक दोन प्रेमिकांच्या मध्ये भिगड घालून मनोमालिन्य उत्पन्न करतात त्यांच्यापेक्षा दगड बरा. तो बिचारा दोन शेतांच्या सीमेवर गाडून घेऊन सीमेसंबंधीचा वाद निपटून टाकतो.

राजस्थानीच्या आधुनिक साहित्याचा प्रारंभ भारताच्या राष्ट्रीय आंदोलनाच्या समकाली झाला. राष्ट्रीय भावनेने भारलेले कित्येक कवीही त्या कालात उदयाला आले. त्यांनी भारताच्या गुलामगिरीविरुद्ध आपला आवाज उठवला. त्या कालातल्या गद्य-पद्याला नव्या चाकोरीतून नेणारा मातब्बर राष्ट्रीय कवी म्हणजे शाहपुरा येथील बारठ केशरीसिंह सौदा हा होय. तो केवळ शब्दांचे बुडबुडे उठवूनच थांबला नाही, तर त्याने ब्रिटिशांविरुद्ध क्रांतिवादी राजकारणात भाग घेतला. त्याची कविता ही ब्रिटिश साम्राज्य आणि राजस्थानी सरंजामशाही यांच्या विरुद्ध प्रखर बंडखोरी होती. नाथुराम महियारिया हा केशरीसिंहाचा अनुयायी बनला. त्याने वीरसतसई लिहिली. उदयराजाने राष्ट्रीय आंदोलनातल्या वीरांची गीते गाइली. ठाकूर रामसिंह हा नव्या काव्यधारेचा अग्रदूत ठरला. राजस्थानीच्या पुनरुत्थानाचे पुढारीपण त्याच्याकडे आले.

मरु मयंक आणि मेह और धरा ही त्याची दोन उत्कृष्ट काव्ये होत. मानवता आणि मातृभूमी यांच्या प्रेमाची ती मूर्तिमंत उदाहरणे आहेत. त्याचे मातृभाषा रो गीत हे राजस्थानचे राष्ट्रगीत ठरले आहे. मुरलीधर कवीचे दूहे रसिकांच्या प्रेमाला पात्र झाले. नव्या कवींत कन्हैयालाल सेठिया याला उच्च कोटीत गणले जाते. त्याचे पातल और पीथल (प्रताप आणि पृथ्वीराज) हे काव्य सरस आहे. चंद्रसिंह हा राजस्थानी भाषेचा निसर्गकवी आणि नानूराम हा ग्रामीण प्रकृतीचा कवी आहे. दोघांनाही बरीच लोकप्रियता लाभली आहे.

शिवचंद्र भारतीय हा राजस्थानीचा पहिला नाटककार होय. केशरविकास, बुढापे की सगाई आणि फाटका जंजाल अशी तीन नाटके त्याने लिहिली. भगवतीप्रसाद दारुका याने पाच नाटके लिहून समाजातल्या दुष्ट रूढींवर कोरडे ओढले.

मुरलीधर व्यास हा राजस्थानी भाषेचा प्रथितयश कथालेखक आहे. त्याने कौटुंबिक आणि सामाजिक संबंधांना महत्त्व दिले. मुन्नालालने आपल्या कथांतून राजस्थानी वीरता वाखाणली. आधुनिक गद्य लेखकांत गुलाबचंद नागोरी, अगरचंद नाहटा, भंवरलाल नाहटा आणि चंद्रसिंह हे विशेष उल्लेखनीय आहेत. मोतीलाल मेनारिया हे इतिहासलेखक म्हणून प्रसिद्ध आहेत. सूर्यकरण पारीक आणि नरोत्तमदास यांनी लोकसाहित्याचा परामर्श घेतला आहे. असे आणखी कितीतरी लेखक वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत आजमितीस वावरत आहेत. मात्र हळूहळू डिंगल अर्थात राजस्थानी भाषेत लेखन करण्याची वृत्ती कमी कमी होत असून, बहुतेक लेखक आता खडी बोलीतूनच साहित्यनिर्मिती करू लागले आहेत.

राजस्थानी लोकसाहित्य – राजस्थानच्या विभिन्न बोलींमध्ये मारवाडी बोलीचे लोकसाहित्य सर्वांत अधिक आहे. शतकानुशतके मौखिक परंपरेने चालत आलेली गीते, पवाडे, पडे, सिलोके, म्हणी, वात, ख्यात, इ. साहित्यप्रकार आजही राजस्थानी जनजीवनात महत्त्वपूर्ण स्थान राखून आहेत.

राजस्थानी भाषेतले सर्वांत अधिक प्रसिद्ध आणि अतिप्राचीन लोकगीत 'ढोलामारू–रा–दूहा' हे आहे. त्याची लहानमोठी कितीतरी रूपांतरे मिळतात. याचा कर्ता अज्ञात आहे. तो कोणीतरी ढाढी जातीचा असावा. पण सांप्रतचे त्या काव्याचे विशाल रूप पाहता अनेक लोककवींनी त्यात भर घातली असल्याचे दिसून येते. 'ढोलामारू–रा–दूहा' हे एक गंभीर प्रेमाख्यान आहे. ढोला नावाचा एक राजपुत्र आणि मारू किंवा मारवणी ही राजकन्या यांच्या आत्यंतिक प्रेमाची कथा यात वर्णिली आहे.

बीसलदेव रासो हेही एक असेच लोकगीत आहे. सुमारे ३५० पद्यांचे हे काव्य असून, इ. स. च्या १७ व्या शतकात ते लेखनिविष्ट झाले. या ग्रंथाच्या जितक्या प्रती आजवर मिळाल्या आहेत, त्या सगळ्या जैन लेखकांनी लिपिबद्ध केल्या आहेत.

राजस्थानी जनतेचे दुसरे लोकप्रिय काव्य म्हणजे रुक्मिणीमंगल हे होय. पदम तेली या कवीने ते रचले. या काव्याचे सुमारे २५०० श्लोक आहेत. कृष्ण–रुक्मिणींच्या विवाहाची कथा यात वर्णिली आहे. त्यातही अनेक लोककवींनी भर घातली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. नरसी जी माहेरो हेही याच प्रकारचे लोकप्रिय काव्य आहे. राजस्थानात त्याचा खूप प्रचार आहे. वरील दोन्ही काव्ये काही जातींच्या लोकांनी आजवर जिवंत ठेवली आहेत. ही काव्ये गाऊन लोकरंजन करणे हा काही जातींचा व्यवसायच बनला आहे.

ख्याल किंवा खयाल ही लोकनाट्यासाठी उपयोगी पडणारी काव्ये आहेत. ती दूहा, चौबोला, दुबोला, चौपाई, शेर, कबित्त, छप्पय्य, इ. छंदांत आहेत. अनेक कवींनी रचलेले शेकडो ख्याल राजस्थानी जनतेत प्रचलित आहेत. त्यांत जिणमातारो गीत व डूगजी जवारजीरो गीत हे दोन खयाल फार लोकप्रिय आहेत. ख्याल जसे वीरपुरुषांवर रचले गेले आहेत, तसेच ते श्रीमंतांना लुटून गरिबांना मदत करणाऱ्या डाकूंवरही रचलेले आहेत.

पॅवाडा या नावाने प्रसिद्ध असलेल्या अनेक वीरगाथा राजस्थानात प्रसिद्ध आहेत. राजस्थानात वीरपूजेने देवपूजेचे स्थान मिळविले आहे. ज्यांनी देशाच्या, सती-साध्वींच्या, लोकांच्या आणि स्वाभिमानाच्या रक्षणासाठी लढाया केल्या व प्रसंगी प्राणार्पणही केले, अशा वीरपुंगवांना राजस्थानी लोक देव समजून पूजतात आणि त्यांचे पॅवाडे गातात. राजस्थानात जे पॅवाडे उपलब्ध आहेत, त्या सर्वांत पाबूजीचे पॅवाडे अधिक आहेत व ते अत्यंत लोकप्रिय आहेत. पाबूजी हा देवल चारणीच्या गोधनाचे रक्षण करताना वीरगतीला गेला. त्याची यशोगाथा ऐकता ऐकता राजस्थानातले लोक रोमांचित होतात.

नानडिया हा पाबूजीचा पुतण्या होता. खींची नावाच्या सरदाराने आपल्या चुलत्याला व बापाला युद्धात मारले. या घटनेचा सूड नानडियाने खींचीचे शिर धडावेगळे करून घेतला, म्हणून तोही लोकांचा आवडता वीर पुरुष ठरला. त्याच्यावरही पॅवाडे निर्माण झाले.

गोगाजी हाही असाच एक वीरदेव आहे. तो पृथ्वीराज चौहानच्या वंशात होऊन गेला. हा गजनीच्या महंमदाशी लढताना मारला गेला आणि लोकादराला पात्र ठरला. याचेही पॅवाडे निर्माण झाले आहेत. राजस्थानात धारातीर्थी पडणाऱ्या वीरांना झुंझार हे नाव मिळाले आहे. अशा झुंझारांच्या स्मारकशिला गावोगावी दिसतात. या झुंझारांवरही लोकांनी कवने रचली आहेत. त्यांतल्या एका कवनाचा नमुना असा –

सूरा माला राळचा जी बाळू रेत में
सूरा बरछयां री वाजी घमरोळ
सूरा गोडीवाळीजी झीणी रेत में
सूरा नम नम वाही तरवार
सूरा झाड़ी झाड़ी व्हेगी देवळयां

अर्थ –वीरयोद्धा मारवाडच्या वाळूच्या मैदानात भाले-बरच्या चालवून घमासान युद्ध करीत आहे. वीर घायाळ झाला, ओल्या रेतीत बसला, पण घावांची पर्वा न करता तलवारीचे वार करीत राहिला. झाडी-झाडीत शत्रूंच्या समाध्या उभारीत तो स्वतः झुंझार झाला.

बात आणि ख्यात – राजस्थानीचे प्राचीन गद्य साहित्य अत्यंत समृद्ध आहे. आजही असंख्य बाता, ख्याता, म्हणी व वाक्प्रचार जुन्या पोथ्यांतून आढळतात, तसेच ते लोकांच्या तोंडूनही ऐकू येतात. भाट-चारणांनी अनेक बाता आणि ख्याता रचून राजस्थानी गद्याचे भांडार भरून टाकले आहे. बाता अर्थात लोककथा यांमध्ये ऐतिहासिक, पौराणिक, आध्यात्मिक व काल्पनिक अशा सर्व विषयांना स्थान मिळाले आहे. लहानांत लहान बात पाचसहा पंक्तींची असते, तर मोठ्यांतली मोठी बात दोन रात्री सांगूनही संपत नाही. प्राचीन काळी जेव्हा आजच्यासारखी शिक्षणपद्धती नव्हती, तेव्हा लोकांना बहुश्रुत करण्याचे कार्य या बातांनीच केले. बातेची काही वैशिष्ट्ये अशी–

बात मौखिक परंपरेने चालत आलेली असते. तिचा रंग रात्रीच्या वेळीच जमतो. बात सांगणाऱ्याला श्रोत्यांनी हुंकार द्यायचा असतो. बातेच्या मुख्य कथेत उपकथाही येतात. बात सांगणारा ती कधी गद्यात तर कधी पद्यात सांगतो. प्रसंगानुसार स्वरात चढउतार व हावभावही करतो. तो श्रोत्यांची उत्सुकता सतत वाढवीत ठेवतो. बहुतेक सर्व बाता सुखान्त असतात. राजा भोजरी बात या कथेचा एक अंश असा –

रिषि कपाट जाड़ि गुफा में बैठो हुतो। राजा आय कह्यो "किंवाड़ खोलो।" जद रिषि कह्यो – "कुण है ?" राजा कह्यो – "हूं राजा छूं।" जद रिषि कह्यो – "राजा तो इंद्र है।" जद भोज कह्यो – "किंवाड़ खोलो, हूं क्षत्रिय छूं।" जद रिषि कह्यो – "क्षत्रिय तो अर्जुन हुयो।" जद भोज कह्यो – "खोलो किंवाड़"। रिषि कह्यो – "कुंण छै।" भोज कह्यो – "मिनख छै।" रिषि कह्यो – "मिनख तो धारापती भोज है।" जद राजा कह्यो – "हूं भोज हूं।" रिषि कह्यो – "हाथ लगा बिना खोलियाँ किंवाड़ खुल जासी।"

अर्थ – ऋषी कवाड बंद करून गुहेत बसला होता. भोज राजा तिथे आला आणि म्हणाला, 'दार उघड.' तेव्हा ऋषीने विचारले 'कोण आहे ?' राजा म्हणाला. 'मी राजा आहे' त्यावर ऋषीने म्हटले. 'राजा तर इंद्र आहे.' तेव्हा भोज म्हणाला. 'दार उघड. मी क्षत्रिय आहे.' त्यावर ऋषी म्हणाला. 'क्षत्रिय तर अर्जुन होऊन गेला.' भोज म्हणाला. 'मिनख आहे.' ऋषी म्हणाला. 'मिनख तर धारापती भोज आहे.' राजा म्हणाला 'मी भोजच आहे.' ऋषी म्हणाला. 'हात न लावताच दार उघडेल.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'नैणसी री ख्यात' हे राजस्थानी गद्याचे एक अपूर्व उदाहरण आहे. नैणसी मुहणोत, बांकीदास आसिया व दयालदास सिंधायच हे लेखक ख्यातलेखकांत अग्रणी आहेत. बांकीदासाचा ख्यात हा अनेक गाथांचा संग्रह आहे. दयालदासाच्या ख्यातात अनेक लोककथा संग्रहित आहेत.

भिन्न भिन्न विषयांवर अनामिक कवींनी व कवयित्रींनी रचलेली असंख्य लोकगीते राजस्थानात प्रचलित आहेत. जीवनाच्या प्रत्येक महत्त्वपूर्ण कार्यात गीताला स्थान आहे. गर्भिणीची कौतुके पुरवताना, पुत्रजन्माचा आनंद व्यक्त करताना, मूल आजारी पडल्यास देवदेवतांची पूजा प्रार्थना करताना, संस्कार करताना अशा सर्व प्रसंगी म्हटली जाणारी गीते आहेत. कुटुंबातला मनुष्य मृत्यू पावल्यावर त्याच्या उद्धारासाठी गंगेची प्रार्थना करतानाही गीत आहे. याशिवाय ऋतुगीते, श्रमगीते, प्रेमगीते, बालगीते, इ. विविध विषयांवरही गीते आहेत.

कित्येक गीतांचा संबंध नृत्याशी आहे. घूमर, डंडिया, रास, इ. नृत्यांसह गायिली जाणारी गीते खूप आहेत. दांपत्यजीवनातील साजुक सुखाच्या अनुभूतीचीही अनेक गीते आहेत. संयोगाच्या मागून वियोग बहुधा येतोच; त्याची गीतेही बरीच आहेत. त्यांना झोरावा असे म्हणतात. त्याचा एक नमुना असा –

काजळ टीकी रो धण पण लियो जी
बिंदली रो सरब सुहाग
दूध दही रो थारी धण पण लायो जी
अन्न बिन रह्यो ए न जाय

भावार्थ – विरहकालात पत्नीला साजशृंगारात कोणताही रस नाही. प्रियतमाच्या उपस्थितीवाचून शृंगाराचे काय कौतुक आहे? फक्त पतीच्या शुभकामनेसाठी बिंदी हे सौभाग्यचिन्ह ती धारण करते. तिने दही-दूध खाणे सोडून दिले आहे. ती अन्न एवढ्यासाठीच खाते, की पती येईपर्यंत जिवंत राहता यावे.

चैत्रातली गणगौर, श्रावणातली तीज, हे राजस्थानी स्त्रियांचे सौभाग्यवर्धक उत्सव होत. त्यासंबंधीची अनेक गाणी राजस्थानातल्या बायका गातात (गणगौर पाहा). सांवण जाडो, चो मासो, बारह मासो, इ. ऋतुगीतेही आहेत. विवाहातल्या प्रत्येक लहानमोठ्या विधीवर गीत असतेच.

राजस्थानात पणिहारी नावाची गीते लोकांची आवडती आहेत. पणिहारी म्हणजे पाणी आणण्यासाठी तळ्या-विहिरीवर गेलेली स्त्री. पणिहारी गीतात हास्य-विनोद, सासुरवास, कारुण्य, विरह, प्रतीक्षा, इ. अनेक विषय असतात. राजस्थानी स्त्रीचे सतीत्व कसे ज्वलंत असते, त्याविषयीचे एक पणिहारी गीत असे –

घडो तो पटक दे नी ताळ में ए पणिहारी ए लो।
चालै मी ओढीड़े री लार, वा'ला जो।
बाळूं तो जाळूं थारी जीभड़ली ए लंजा ओठीडा ए लो।
उसे तने काळो नाग, वा'ला जो।
घड़ो तो भर नै पाछी वळी ए पणिहारी ए लो।
आइ आइ फळसै री बार वा'ला जो।
घड़ो तो पटक दूं उभी चौक में ए म्हारा सासू जी ए लो
वेगेरो घड़ियो उतराव, वा'ला जो।

भावार्थ – पणिहारीचा घडा भरला होता. कोणी तरी तो उचलून डोक्यावर द्यायला हवा होता. तिने पाहिले एक ओढी (उंटावरचा स्वार) तलावाजवळच्या रस्त्याने जात होता. तिने घडा उचलण्यासाठी त्याला हाक मारली. ओढी आला. त्याने पणिहारीकडे निरखून पाहिले आणि तिला विचारले –

"दुसऱ्या बायकांनी काजळ-बिंदी केली आहे. तुझे नेत्र फिके का? बाकीच्या बायकांनी चुनड्या ओढल्या आहेत. तुझी वस्त्रे मलिन का?"

पणिहारी म्हणाली. "त्या सगळ्यांचे पती घरी आहेत. माझा पती परदेशी आहे."

ओढी म्हणाला. "तुझा घडा तलावात टाकून दे आणि चल माझ्या मागून."

ओढीचे हे बोलणे पणिहारीला रुचले नाही. ती रागाने लाल होऊन ओढीला म्हणाली. "तुझी जीभ जाळून टाकीन. तुला काळा नाग डसेल. मी पतिव्रता आहे, माझ्याकडे वाईट नजरेने पाहतोस काय?"

ओढी यावर काहीही न बोलता मनात खूप होऊन पुढे निघून गेला. पाठीमागून भरला घडा घेऊन पणिहारी घरी आली. तिचे मुखमंडल लाल झाले होते. तिने सासूला म्हटले, "सासूबाई, घडा लौकर उतरा." सासूला काहीतरी आगळेवेगळे वाटले. तिने विचारले. "सूनबाई, तुला कोणी अपशब्द बोलले का? कोणी शिव्या दिल्या का?" सून म्हणाली. "तलावावर एक ओढी भेटला. त्याची दृष्टी साफ नव्हती. तो मला भलतेसलतेच काहीतरी सांगू लागला; पण एक गोष्ट आश्चर्यजनक होती. त्या ओढीचा चेहरामोहरा माझ्या दिरासारखा आणि नणंदेसारखा होता." त्यावर सासू काय ते समजली. ती सुनेला म्हणाली. "भोळी ग भोळी! अग तो तर तुझा भ्रतार होता!"

राजस्थानी लोकगीतांचे संकलन व अध्ययन अनेक विद्वानांनी केले आहे. डॉ. मोतीलाल मेनारिया यांनी राजस्थानातल्या पिंगल साहित्यावर, डॉ. मोहनलाल जिज्ञासू यांनी चारणी साहित्यावर, डॉ. हरीष यांनी राजस्थानीच्या आदिकालावर डॉ. जगदीशप्रसाद श्रीवास्तव यांनी डिंगल साहित्यावर व डॉ. अचल शर्मा यांनी राजस्थानी गद्याचा उद्भव आणि विकास या विषयावर शोधप्रबंध लिहिले आहेत. याशिवाय श्री. अगरचंद नाहटा, सूर्य-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करण पारीक, रानी लक्ष्मीकुमारी चूंडावत, इ. विद्वानांनीही राजस्थानी लोकसाहित्यावर ग्रंथ लिहिले आहेत. मरुभारती व वरदा या त्रैमासिकांनीही राजस्थानी भाषेच्या अंगोपांगांवर साहित्य प्रकाशित करून राजस्थानीची भरीव सेवा केली आहे. [रा. भा. सा.; राजस्थानी साहित्य की गौरवपूर्ण परंपरा – श्री. अगरचंद नाहटा, १९६७; हिं. सा. बृ. इ. १६; राजस्थानी लोकगीत – सूर्यकरण पारीक; राजस्थानी लोकगीत – रानी लक्ष्मीकुमारी चूंडावत, १९५८; श्री. नरोत्तमदास स्वामी – संयुक्त राजस्थान, मार्च १९५७; भा. भा. स.]

राजहार शेतकाम करणाऱ्या लोकांची एक जात. या लोकांची वस्ती मध्य प्रदेशात आहे. राजभार हे त्यांचे मूळचे नाव असावे, असे म्हणतात. यांच्यांत सगोत्र विवाह होत नाहीत. पूर्वी हे पौरोहित्याला ब्राह्मण बोलावीत असत; पण ब्राह्मणांनी लावलेली लग्ने अयशस्वी होतात, अशी काही कारणाने यांची समजूत झाली आणि तेव्हापासून यांनी ब्राह्मणांचे पौरोहित्य नाकारले. विधवेने आपल्या मृत किंवा रुग्ण पतीच्या धाकट्या भावाबरोबरच विवाह केला पाहिजे, असे यांच्यांत बंधन आहे. स्त्री व्यभिचारी निघाल्यास तिला घटस्फोट दिला जातो.

हे लोक मृत मनुष्याच्या प्रेताला पश्चिमेकडे डोके करून पुरतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

राजा राज्यसंस्थेतला पहिला आणि प्रमुख घटक. या शब्दातला मूळ धातू राज् असा असून, त्याचा अर्थ प्रकाशणे असा आहे. पण प्राचीन भारतीय राज्यशास्त्रज्ञांनी 'रञ्जनाद् राजा' = जो प्रजेचे रंजन करतो तो राजा, अशी त्या शब्दाची व्याख्या केली आहे. केवळ प्रजेच्या हिताकडे लक्ष ठेवून जो आदर्श राज्यकारभार करतो त्यालाच राजा म्हणावे, असा वरील व्याख्येचा अभिप्राय आहे. प्राचीन व मध्ययुगीन संस्कृत साहित्यात व प्राकृत साहित्यात राजा शब्दाची हीच व्याख्या गृहीत धरलेली आहे. भारतातल्या राजे लोकांनाही ही व्याख्या मान्य होती व राज्यघटनेतही हिलाच मान्यता होती.

राजा कसा निर्माण झाला व त्याचे माहात्म्य काय, याविषयी मनुस्मृतीत काही विचार व्यक्त केले आहेत, ते असे –

अराजकामुळे सर्व समाजव्यवस्था व अर्थव्यवस्था पार विघडून गेल्यामुळे समाजाची सुरक्षा, सुबत्ता आणि नीतिमत्ता दृढ करून त्याला उत्कर्षाप्रत नेण्यासाठी परमेश्वराने राजा उत्पन्न केला. इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरुण, चंद्र व कुबेर यांच्या व्यक्तित्वांतून सारभूत भाग अंशरूपाने काढून घेऊन ईश्वराने राजाची निर्मिती केली. ज्या अर्थी सर्वश्रेष्ठ देवांच्या अंशातून राजा निर्माण झाला, त्या अर्थी बल-पराक्रमाच्या बाबतीत तो सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ असतो.

बालोऽपि नावमन्तव्यो मनुष्य इति भूमिपः ।
महती देवता ह्येषा नररूपेण तिष्ठति ॥

(मनु. ७.९)

अर्थ – (म्हणून). राजा जरी बाल असला तरी तो एक सामान्य मनुष्य आहे, अशा बुद्धीने त्याचा अवमान करू नये. कारण राजा म्हणजे एक महती देवता नररूपाने उभी असते.

त्याचा प्रसाद झाला असता लक्ष्मी प्राप्त होते. त्याच्या पराक्रमात विजयाची सिद्धी होते. त्याच्या क्रोधात मृत्यू निहित असतो, कारण तो सर्वतेजोमय आहे. पाहा – राज्यसंस्था.

राजाई (इ. स. चे १३ वे १४ वे शतक) संतश्रेष्ठ नामदेवाची पत्नी आणि गोविंदशेटी सदावर्ते यांची कन्या. नामदेवाप्रमाणे तीही विठ्ठलाची भक्त होती. पण नामदेव शिवण्याटिपण्याचा धंदा सोडून भजन-कीर्तन करीत बसतो, हे तिला आवडत नसे. नवऱ्यापुढे आपले काही चालत नाही, असे दिसल्यावर ती मग या बाबतीत आपली कुलस्वामिनी येसाई हिच्याकडे तक्रार करू लागली. एका तक्रारीत ती म्हणते, 'माझ्या घरात खाणारी चौदा माणसे आहेत. परंतु हा नामदेव लाज सोडून रात्रंदिवस नुसता नाचत असतो.'

राजाईचे काही अभंग उपलब्ध आहेत. वरील तक्रार तिने ज्या एका अभंगात मांडली आहे, तो अभंग असा –

घरधन्यानी केला गुरु । बाई मी आता काय करूं ।
असून नाही हा संसारु । चमत्कार कृपेचा ॥
धाव पाव गे येसाई । कवणाचेंही न चले काही
सत्यपण तुझिये ठायीं । असून नाहीसें करी हे ॥
मंत्र घेतलासे जैसा । घरी संताचा सोळसा ।
दोष पडो या हरिदासां । गेले न येती मागुती ॥
काय सांगू यांच्या रीती । सोसे पायवणी पिती ।
अवघे भांबरभूते होती । नाचताती आनंदे ॥
एकमेकांच्या पडती पायां । लौकिकातुन गेले वायां ।
म्हणती ये गा पंढरीराया । ब्रह्मानंदें डुल्लती ॥
भोळी सासू गोणाबाई । पांढरा स्फटीक त्याली काई ।
त्याने जोडला शेषशायी । म्हणे राजाई काय करूं ॥

राजाईच्या अभंगात फटकळपणा असला, तरी भक्तीचा ओलावाही दिसतो. [म. सा.; प्रा. म. वा. इ.]

राजापूर महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यातील एक तालुक्याचे ठिकाण. हे एक बंदरही आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गावापासून थोड्या अंतरावर असलेल्या एका टेकडीतून कधी कधी पाण्याचा प्रवाह वाहू लागतो. या प्रवाहाला लोक गंगा नदीचा प्रवाह असे समजतात. गंगावतरणाच्या वेळी इथे मोठी यात्रा भरते. परंतु या अवतरणाचा काळ-वेळ मात्र ठरलेला नसतो. या पाण्यात गंगेच्या पाण्याचे गुणधर्म आहेत अशी भाविकांची श्रद्धा आहे. शिवाय या पाण्याने संधिवात व कातडीचे रोग नष्ट होतात, असेही समजतात.

इथे गंगा अवतरली, की तिचे पाणी १४ कुंडांतून वाहते. त्यांत काशीकुंड हे प्रमुख आहे. या सर्व कुंडांतील पाण्याचे तपमान भिन्न-भिन्न असते. छत्रपती शिवाजीमहाराजांनी व कविवर्य मोरोपंतांनी या गंगेत स्नान केले होते.

राजापुरी अवतरणाच्या गंगेच्या आगमनासंबंधी अनेक दंतकथा सांगितल्या जातात. या गावात विठ्ठलाचे एक मंदिर असून, तिथे आषाढ व कार्तिक या दोन महिन्यांत यात्रा भरते. [देवीकोश ३; वि. मुं. रा. प.; कल्याण – तीर्थांक; रत्ना. गॅझे.]

राजाराम (१) (इ. स. च्या १८ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक मराठी संतकवी. याचा जन्म मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याच्या वैजापूर तालुक्यातील बाभुळगावी झाला. हा राजपूत वंशाचा होता. चिदंबर दीक्षित हे त्याचे गुरू होत. बाभुळगावातच द्वारकादास नावाचे एक सिद्धपुरुष होते. बालपणापासूनच राजाराम त्यांच्या आश्रमात भागवत ऐकायला जाऊ लागला. भागवतातल्या ध्रुवाख्यानाचा त्याच्या मनावर खोल ठसा उमटला आणि त्याने ध्रुवाप्रमाणेच देवाचा ध्यास घेतला. तेव्हा द्वारकादासांनी 'तुला चिदंबर नामक एक सत्पुरुष भेटेल व तो तुझा उद्धार करील' असे आश्वासन दिले. कालांतराने राजारामाचे लग्न झाले. त्याने कृष्णा व राधा अशा दोन बायका केल्या. त्याने काही काळ हुशंगाबादला शिलेदाराची नोकरीही केली.

पुढे तेलंगणातील कोण्या कृष्णभट्ट नावाच्या ब्राह्मणाने त्याला चिदंबराकडे जायला सांगितले. राजाराम नोकरी सोडून कर्नाटकात चिदंबराच्या भेटीला निघाला असता कुंदगोळ नावाच्या गावात त्याला चिदंबराचे दर्शन झाले. त्याला चिदंबराचा अनुग्रहही मिळाला. अखेर राजाराम भक्ताग्रणी झाला. त्याने गुर्लेहोसूरला स्वामींची मूर्ती करवून घेतली व ती बाभुळगावी आणली. राजारामाने आपले उर्वरित आयुष्य इथेच घालवले, असे म्हणतात. पण त्याची समाधी मात्र बेळगावजवळच्या शहापूर नावाच्या गावी आहे. विठाबाई नावाची याची एक प्रख्यात शिष्या होती.

चिदंबराच्या आशीर्वादाने राजारामाने ग्रंथरचनेला प्रारंभ केला. त्याने निजात्मबोध, ब्रह्मानंदलहरी, महानुभाव, ज्ञानगर्भ, ब्रह्मानुभव, सद्‌गुरूपदेश, गुरुगम्यठेवा, अद्वैतसार, इ. लहानमोठे ग्रंथ रचले आहेत. शिवाय त्याने दीड लाख अभंग रचले, असेही सांगतात. पण त्यांतील फार थोडे प्रकाशित आहेत. त्याचा एक अभंग असा –

प्रत्यक्ष येवोनी राहावे भजनीं ।
तेव्हां माझे मनीं समाधान ॥
प्रसन्न होवोनी देई वरदान ।
ऐसे हें भजन चालवावें ॥
कलिमाजी भक्त जाहले ते अपार ।
होतासी तत्पर भजनी त्यांच्या ॥ ३ ॥
भजनविषयीं कां हो करिता आळस ।
तरी भजनास कां लाविलें ॥
दास म्हणे जैसें लाविले भजन्न ।
तैसी ही वासना पुरवावी ॥ ५ ॥

राजारामाच्या भाषेसंबंधी लिहिताना श्री. आजगावकर म्हणतात की 'राजारामबुवा जरी मोठे व्युत्पन्न नव्हते, तरी त्यांची ग्रंथरचना स्वानुभवयुक्त असल्यामुळे तीत एक प्रकारच्या अधिकारीपणाचे तेज ठिकठिकाणी चमकत असलेले आढळून येते.' [म. क. च. भाग ५ वा, १९२०; जु. वा. न. सं.; श्री. म. वि. निखळ – भा. इ. सं. मंडळ, त्रैमासिक, वर्ष ४४.]

(२) महाराष्ट्राचा एक राजा व छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुत्र. पाहा – भोसले राजवंश.

राजाराम प्रासादी (इ. स. चे १९ वे शतक) रामदासी संप्रदायातील एक कवी. हा सिद्धेश्वर महाराजांचा शिष्य होता. याची समाधी जांबजवळच्या गुंज गावी नदीच्या तीरावर आहे. भक्तमंजरीमाला नावाचा एक ग्रंथ याने रचला आहे. यात १०९ अध्याय आहेत. त्यांपैकी १०८ अध्यायांना भक्तरूप तुलसीमाला म्हटले आहे आणि अखेरच्या अध्यायाला मेरूमणी असे नाव दिले आहे. पहिल्या काही अध्यायात रामदासांचे चरित्र असून, पुढे अनेक संतांची चरित्रे आहेत.

सामान्यतः महीपतीने ज्यांची चरित्रे लिहिली नाहीत, त्यांची चरित्रे याने लिहिली आहेत.

प्रस्तुत ग्रंथ लिहिताना राजारामाने खूप कष्ट घेतलेले दिसतात. त्यात अनेक ठिकाणी संतांच्या परंपरा, समकालीन संत आणि त्यांचे जन्म-मृत्यू वगैरेंचे शक त्याने दिले आहेत. ही माहिती राजारामाने कुठून घेतली हे नीटसे सांगता येत नाही. आज उपलब्ध असलेल्या प्राचीन चरित्रग्रंथांत भक्तमंजरीमालेला बरेच वरचे स्थान आहे, एवढे मात्र खरे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजारामाची पुष्कळ पदे प्रसिद्ध आहेत. त्यांतील अनेक चमत्कृतिजनक आहेत. त्याच्या एका पदातील काही भाग असा –

देवा कोण आता तारी । धुंदी झाली दरबारी ॥
पांडव तुज म्हणती खासा । दवडिसी त्यांतें वनवासा ॥
छळि निशि येऊनि दुर्वासा । परि तो पावे सुप्रासा ॥
गोपी अनुसरल्या रासा । विरहें देसि तयां त्रासा ॥
आवडे तुज कुब्जा नारी । धुंदी झाली दरबारी ॥

राजारामाची भाषा सर्वजनसुलभ आहे. [म. सा.]

राजावायन द. भारतातील एक लोकदेव. त्रिचनापल्ली जिल्ह्यात याचे ठाणे आहे. राजपिता असा या शब्दाचा अर्थ आहे. याचे प्रतीक म्हणून चारपाच फूट उंचीचे चार खुंट जवळजवळ बसविलेले असतात. खुंटावर लोखंडी त्रिशूल असतात. [व्हि. गॉ. सा. इं.]

राजूजी तेली एक राजस्थानी मुसलमान संतकवी. याचा जन्म जोधपूर जिल्ह्याच्या बिलाड भागातील घाणमगरा गावी एका तेल्याच्या पोटी झाला. हा सिद्धपुरुष असून, रामदेवाचा परम भक्त होता. याच्यासंबंधी अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

एकदा एका रात्री त्याला रामदेवाने दर्शन दिले आणि तेव्हापासून तो राजस्थानी भाषेत कविता करू लागला. काया ने जीव रो संवादो, आगम पुराण, कुसुंग डोर, आईजी की जन्मपत्री, शनिदेव रो भजन, रामरिसिया, इ. त्याच्या रचना प्रसिद्ध आहेत. त्याच्या या रचना अनेक गायक आजही गात असतात.

अखेरच्या काळात रामदेवाचे मंदिर असलेल्या बगडी गावी तो जाऊन राहिला. तिथेच त्याचेही स्मारक आहे. [श्री. शिवसिंह चोयल – मरुभारती जुलै १९६५.]

राजूर एक गणेशस्थान. हे ठिकाण मराठवाड्यातील औरंगाबाद जिल्ह्याच्या भोकरदन तालुक्यात आहे. याला गणेशाच्या साडेतीन पीठांपैकी एक पूर्णपीठ मानतात. मोरगावच्या मयूरेश्वराने कमलासुराचा वध करून त्याचे तीन तुकडे केले आणि त्यांपैकी गळ्यापासून बेंबीपर्यंतचा तुकडा इथे पडला, असे लोक मानतात. मात्र या स्थानासंबंधी एक वेगळीच पुराणकथा आहे, ती अशी –

वरेण्य नावाचा राजा इथे राहत होता. या स्थानाच्या आसपासच्या भागाला राजापुरी असे म्हणत. राजापुरीच्या बाजूला दंडकारण्य होते. वरेण्याला मूल नव्हते; म्हणून त्याने दंडकारण्यात तपश्चर्या केली. नंतर गणेशाने प्रसन्न होऊन त्याच्या पत्नीच्या पोटी जन्म घेतला. पण मुलाची शारीरिक ठेवण विचित्र होती. त्यामुळे राजाने त्याला टाकून दिले. ऋषिमुनींनी या मुलाचे संगोपन केले. या वेळी या भागात सिंदुरासुर फार मातला होता. गणेशाने त्याचे पारिपत्य करून तिथल्या प्रजेला निर्भय केले. त्याच्या या कृत्याने राजाला पश्चात्ताप झाला आणि तो गणेशाला शरण गेला. राजाच्या विनंतीनुसार गणपतीने तिथे निरंतर वास्तव्य करण्याचे मान्य केले.

याचे मंदिर गावाजवळच्या एका टेकाडावर आहे. या मंदिराशिवाय इथे विठ्ठलाचे एक आणि शिवाचे एक, अशी दोन मंदिरे आहेत. गणेशमंदिरात अहोरात्र शेकडो समया तेवत असतात, हे इथले वैशिष्ट्य आहे. या समया नवसाच्या असतात. भाद्रपद व माघ महिन्यातल्या शुद्ध चतुर्थीला इथे मोठे उत्सव होतात. माघातला उत्सव आठ दिवस चालतो. चैत्र शुद्ध प्रतिपदेला या गणेशाचे दर्शन घेणे, हे विशेष पुण्यकारक समजले जाते. प्रत्येक संकष्टीला इथे यात्रा भरते. [ग. को.]

राजेंद्रप्रसाद (इ. स. १८८४–१९६३) एक थोर देशभक्त स्वतंत्र आणि सार्वभौम प्रजासत्ताक भारताचे पहिले राष्ट्रपती. यांचा जन्म ३ डिसेंबर १८८४ रोजी बिहारच्या सारण जिल्ह्यातील जीरादेई गावी एका श्रीवास्तव कायस्थ घराण्यात झाला. त्यांचे आजोबा हथुआ संस्थानचे दिवाण होते. राजेंद्रप्रसादांचे वडील महादेव सहाय हे अत्यंत परोपकारी गृहस्थ होते. त्यांना आयुर्वेद व युनानी औषधपद्धती यांची चांगली माहिती होती. आपल्या स्वतःच्या खर्चाने निरनिराळी औषधे तयार करून ते गोरगरिबांना देत असत. राजेंद्रप्रसादांची माता कँवलेश्वरीदेवी ही अत्यंत साध्वी स्त्री होती. मातापित्यांचेच हे गुण राजेंद्रप्रसादांच्या ठिकाणी संक्रांत झाले, असे म्हणायला हरकत नाही. राजेंद्रबाबूंना तीन बहिणी व एक भाऊ होता. भावाचे नाव महेंद्रप्रसाद असे होते. महेंद्रप्रसाद कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद होते.

त्या काळात राजेंद्रबाबूंच्या गावी शाळा नसल्यामुळे घरी मौलवीच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे उर्दू व फारसी भाषांचे शिक्षण सुरू झाले. पुढे छपरा, हथुआ व पाटणा या ठिकाणी त्यांचे हायस्कूल शिक्षण झाले. इ. स. १९०२ च्या मार्च महिन्यात ते कलकत्ता विश्वविद्यालयाच्या मॅट्रिकच्या परीक्षेला बसले व वीस हजार विद्यार्थ्यांत पहिले आले. यावरून त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता दिसून येते. पुढे त्यांनी कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजमधून बी. ए. व एम्. ए. या पदव्या उत्तम तऱ्हेने उत्तीर्ण होऊन मिळवल्या. त्या काळी सर्व विद्यार्थ्यांना विज्ञानाचे अध्ययन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करावे लागे. प्रेसिडेन्सी कॉलेजात असताना त्यांना सुप्रसिद्ध वनस्पतिशास्त्रज्ञ जगदीशचंद्र बोस व रसायनशास्त्रज्ञ आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांच्या अध्यापनाचा लाभ झाला. इ. स. १९०९ मध्ये त्यांनी कायद्याची बी. एल्. ही परीक्षा दिली व इ. स. १९११ पासून त्यांनी कलकत्ता हायकोर्टात वकिली सुरू केली. पुढे १९१५ साली ते एम्. एल्. ची परीक्षा पहिल्या श्रेणीत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. नंतरच्या काळातही त्यांची विद्वत्ता, त्याग व देशसेवा पाहून अलाहाबाद विश्वविद्यालयाने त्यांना डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी दिली. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने त्यांना भारतरत्न ही सर्वोच्च उपाधी देऊन त्यांचा सन्मान केला.

राजेंद्रबाबूंनी आपल्या शैक्षणिक जीवनात अनेक बक्षिसे व व शिष्यवृत्त्या मिळवल्या होत्या. त्या पैशावरच त्यांचे बहुतेक सर्व शिक्षण पार पडले. त्यांचे विद्यार्थिजीवन आदर्शभूत होते. त्यांना जरी अलौकिक बुद्धिमत्ता लाभली होती, तरी प्रत्येक परीक्षेच्या वेळी ते कसून अभ्यास करीत असत. आपल्या हुषारीच्या घमेंडीत ते कधीच गेले नाहीत. वाङ्मय हा जरी त्यांचा मुख्य विषय होता; तरी इतिहास, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, रसायनशास्त्र व गणित या विषयांचा त्यांनी अनेक पुस्तके वाचून सखोल अभ्यास केला होता.

शाळेत व कॉलेजात असताना त्यांची राहणी अगदी साधी होती. विशेष म्हणजे मोठेपणी मोठमोठी अधिकारपदे मिळाल्यावरही ती तशीच राहिली. त्यांचा स्वभावही पहिल्यापासून विनयशील, शांत, अभ्यासू व भाविक होता.

शाळेत शिकत असतानाच, त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे त्यांचा विवाह झाला. त्यांचे वय त्या वेळी जेमतेम बारा वर्षांचे होते. त्यांच्या पत्नीचे नाव राजवंशीदेवी असे होते.

कॉलेजात असताना अभ्यासाबरोबर सार्वजनिक कामाकडेही ते लक्ष देऊ लागले होते. समाजसेवा करण्याची त्यांना पहिल्यापासूनच आवड होती. कलकत्त्याला असताना त्यांचा निरनिराळ्या सार्वजनिक संस्थांशी संबंध आला. इ. स. १९०१ मध्ये कलकत्त्याला अरुण मंडळ नावाची एक धार्मिक संस्था स्थापन झाली होती. त्या संस्थेचे सभासद होऊन राजेंद्रबाबूंनी भगवद्गीता वगैरे तत्त्वज्ञानात्मक ग्रंथांचा व्यासंग वाढवला. या मंडळाशिवाय, बिहारी क्लब या संस्थेशीही त्यांचा विशेष संबंध आला. कलकत्त्याला राहणाऱ्या बिहारी विद्यार्थ्यांची संघटना करून त्यांना सर्व प्रकारच्या सुखसोयी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा क्लब स्थापन करण्यात आला होता. राजेंद्रबाबू या संघाचे बरेच दिवस मुख्य चिटणीस होते. इ. स. १९०६ साली त्यांनी कलकत्त्यातील बिहारी लोकांचे एक संमेलन भरवले. त्यामुळे त्यांची संघटनाशक्ती लोकांच्या प्रत्ययाला आली. याच संमेलनाचे पुढे बिहार छात्रसंमेलन असे नामकरण झाले आणि बिहारमधील निरनिराळ्या गावी दर वर्षी १९२० सालापर्यंत त्याची वार्षिक अधिवेशने भरू लागली. या छात्रांपैकी अनेकांनी पुढे स्वातंत्र्यचळवळीतही भाग घेतला.

सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे संस्थापक नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांनी इ. स. १९१० मध्ये राजेंद्रबाबूंची भेट घेतली व आपल्या संस्थेचे सभासद होऊन देशसेवा करण्याविषयी त्यांना विनंती केली. राजेंद्रबाबूंनी त्यांची विनंती मान्य करण्याचे मनोमन ठरवले होते. पण आपले मोठे बंधू महेंद्रप्रसाद यांच्या नकारामुळे त्यांना तो बेत रहित करावा लागला.

विद्यार्थिदशेत असतानाच राजेंद्रबाबूंनी स्वदेशीचे व लोकसेवेचे व्रत घेतले होते. एम्. ए. झाल्यावर त्यांनी मुझफ्फरपूरच्या भूमिहार ब्राह्मण कॉलेजात अत्यंत अल्प वेतनावर अध्यापकाची नोकरी पत्करली. ते कॉलेज त्या वेळी आर्थिक आपत्तीत सापडले होते व त्याच्या व्यवस्थापकांनी गळ घातल्यामुळे त्यांनी ही नोकरी स्वीकारली होती. एक वर्षभर त्यांनी तिथे काम केले. त्या अवधीत प्रिन्सिपॉल म्हणूनही त्यांनी काही दिवस काम केले. त्यानंतर सहा महिने कलकत्ता येथे त्यांनी सिटी कॉलेजात प्रोफेसर म्हणून नोकरी केली. ते फार उत्तम शिकवीत असल्यामुळे विद्यार्थिवर्गात अत्यंत प्रिय झाले.

पुढे कलकत्त्याच्या हायकोर्टात वकिली करीत असताना, त्यांनी १९१४ ते १९१६ अशी दोन वर्षे कलकत्ता युनिव्हर्सिटीच्या लॉ कॉलेजात प्रोफेसर म्हणून काम केले. कलकत्ता युनिव्हर्सिटीचे व्हाइस चॅन्सेलर सर आशुतोष मुकर्जी यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी ही नोकरी स्वीकारली होती. यानंतर मात्र त्यांनी कोणत्याही सरकारी कॉलेजात नोकरी केली नाही. पुढे इ स. १९२१ साली त्यांनी स्वतःच एक राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केले. त्यात त्यांनी प्रोफेसर, प्रिन्सिपॉल व व्हाइस चॅन्सेलर म्हणून कामे केली.

इ. स. १९११ सालापासून राजेंद्रबाबू कलकत्त्याच्या हायकोर्टात वकिली करीत होते. १९१६ साली बिहारमध्ये पाटणा येथे नवीन हायकोर्ट स्थापन झाले. तेव्हा ते कलकत्त्याहून पाटण्याला आले व तिथे त्यांनी वकिली सुरू केली. त्यांचा तिथे चांगला जम बसला व त्यांची मासिक प्राप्ती तीन ते पाच हजार रुपयांवर पोचली. १९२० सालापर्यंतच त्यांनी वकिली केली. त्या वर्षी असहकारितेची चळवळ सुरू झाली. तेव्हा त्यांनी वकिलीला रामराम ठोकला व देशसेवेला पूर्णपणे वाहून घेतले. वकिलीत एवढी प्राप्ती होत असतानाही त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे गरीब विद्यार्थी, सार्वजनिक संस्था व इतर याचक यांच्यासाठी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचे सर्व पैसे खर्च होऊन गेले. वकिली सोडली, तेव्हा त्यांच्याजवळ पंधरा रुपयेसुद्धा शिल्लक नव्हते.

बिहारच्या चंपारण्य जिल्ह्यात अनेक इंग्रज लोक राहत होते. ते मोठे जमीनदार होते व नीळ पिकवीत होते. जगातल्या बाजारात नीळ विकून ते खूप पैसा कमावीत. चंपारण्यातील शेतकरी कुळांनी आपल्या जमिनीच्या मूळ मालकासाठी, जमिनीच्या तीन विसांश भागात निळीचीच लावगड केली पाहिजे, असा कायदा होता. याला तीन कठियांचा रिवाज असे नाव होते. (त्या भागात वीस कठियांचा एक एकर असे मोजमाप असे.) या निळीच्या लागवडीत शेतकऱ्यांना बरेच नुकसान सोसावे लागे. त्यामुळे ते काही वेळा निळीची लागवड करीत नसत. अशा वेळी इंग्रज मालक त्यांच्यावर खूप अत्याचार करीत, त्यांना मारपीट करीत, कोंबडखान्यात कोंडून ठेवीत, त्यांची घरे लुटीत आणि जाळूनही टाकीत. या अत्याचारांची कहाणी महात्मा गांधींच्या कानावर गेली, तेव्हा तिथली परिस्थिती समक्ष पाहावी या हेतूने १९१७ साली गांधीजी चंपारण्यात गेले. त्यांच्या कामात मदत करण्यासाठी राजेंद्रप्रसादही आपली वकिली सोडून चंपारण्यात गेले. तिथे केलेल्या आंदोलनात गांधीजी यशस्वी झाले. सरकारने तीन कठियांचा कायदा रद्द केला. त्या वेळेपासून राजेंद्रबाबू हयातभर महात्मा गांधींचे निकटचे सहकारी बनले.

इ. स. १९०६ सालापासून राजेंद्रबाबू काँग्रेसचे सभासद होते. पण १९१९ सालापासून त्यांचा काँग्रेसशी निकटचा संबंध आला. या वर्षी रौलट कायदा पास झाला. तो कायदा रद्द व्हावा, यासाठी देशात सार्वत्रिक सत्याग्रहाची चळवळ सुरू झाली. त्यात राजेंद्रबाबूंनी उडी घेतली. इ. स. १९२० च्या सप्टेंबर महिन्यात त्यांच्या अध्यक्षतेखाली बिहार प्रांतिक परिषद भरली होती. तिच्यात त्यांनी गांधींच्या धोरणाचा व कार्यक्रमाचा जोरदार पुरस्कार केला व जनतेला असहकारितेची तत्त्वे पटवून दिली. स्वतः त्यांनी आपली उत्तम चाललेली वकिली सोडून दिली. त्यांच्या कित्येक मित्रांनीही त्यांचे अनुकरण केले. बिहारमधील चळवळीचे नेतृत्व राजेंद्रबाबूंकडे आले. त्यांनी बिहारात दौरा काढला व गावोगाव प्रचार करायला सुरुवात केली. त्यांच्या दौऱ्यामुळे बिहारमध्ये अभूतपूर्व जागृती झाली. राजेंद्रबाबूंचे विधायक कार्याकडे विशेष लक्ष होते. त्यामुळे त्यांनी पहिल्याप्रथम संघटना व राष्ट्रीय शिक्षण यावर भर दिला व आपल्या स्नेह्यांच्या सहकार्याने पाटणा येथे राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केले. त्याचबरोबर राष्ट्रीय सभेच्या आज्ञेप्रमाणे ग्रामसंघटना, काँग्रेस कमिट्यांची पुनर्घटना, काँग्रेसचे सभासद वाढवणे, टिळक स्वराज्य फंड जमवणे, चरख्याचा प्रसार करणे, परदेशी मालावरील बहिष्काराचा प्रचार करणे, मद्यपानबंदीचा पुरस्कार करणे, वगैरे कार्यांतही त्यांनी हिरीरीने भाग घेतला.

बिहारमधील राष्ट्रीय विद्यापीठ स्थापन केल्यावर ते स्वतः त्याचे प्राचार्य बनले. अनेक विद्वानही तिथे अध्यापनाचे काम करू लागले. नंतर राजेंद्रबाबू या विद्यापीठाचे उपकुलपती व कुलपती नेमले गेले. परंतु पुढे अनेक कामांच्या व्यापामुळे त्यांना या विद्यापीठाकडे द्यावे तितके लक्ष देता आले नाही.

राष्ट्रीय शिक्षणाप्रमाणेच राजेंद्रबाबूंनी खादीच्या प्रचाराकडेही खूप लक्ष दिले. भारतातील दरिद्री जनतेला जगण्यासाठी खादीशिवाय तरणोपाय नाही, अशी त्यांची खात्री झालेली होती. त्यामुळे त्यांनी बिहार प्रांतात हजारो खादीकेंद्रे उघडली. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली अखिल भारतीय चरखा संघ निघाला होता, त्यात एक प्रमुख सभासद म्हणून राजेंद्रबाबूंना घेतले होते. बिहारमध्ये त्यांनी खादीचा इतका प्रसार केला, की गरीब व बेकार बिहारी लोकांना पोटभर अन्न मिळायला राजेंद्रबाबूंचा चरखाच उपयोगी पडला.

इ. स. १९३० साली म. गांधींनी सुरू केलेल्या कायदेभंगाच्या चळवळीत स्वतः राजेंद्रबाबूंनी महत्त्वाचा वाटा उचलला. त्यांनी आपल्या अनुयायांसह मिठाचा कायदा मोडला. चौकीदारी कर द्यायचे नाकारले व बेकायदा मिरवणुकी काढल्या. त्यांत त्यांना लाठ्याही खाव्या लागल्या. कायदेभंगाच्या चळवळीबद्दल त्यांना दोनदा तुरुंगवास घडला. इ. स. १९३०-३१ व १९३२ साली काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून राजेंद्रबाबूंची दोनदा हंगामी नेमणूक झाली होती. इ. स. १९३३ सालीही तेच अध्यक्ष होते. त्या वेळी बेकायदा काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांना पकडण्यात आले व पंधरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. परंतु तुरुंगात त्यांची प्रकृती फारच बिघडल्याने मुदतीपूर्वी तीन महिने त्यांची सुटका झाली.

इ.स. १९३४ साली बिहारमध्ये फार मोठा भूकंप झाला. त्यात सुमारे वीस हजार लोक मरण पावले व बहुसंख्य घरे जमीनदोस्त झाली. या भूकंप-पीडितांना ताबडतोब अन्नधान्य, कपडे, भांडी अशा मदतीची जरुरी होती. राजेंद्रबाबू त्या वेळी दम्याने अतिशय आजारी होते. तरी त्यांनी लगेच मदतकार्याला सुरुवात केली. लक्षावधी घरे पडली होती, शेकडो विहिरी वाळूने भरून गेल्या होत्या, बऱ्याचशा विहिरींत पाणीच उरले नव्हते आणि लहानमोठ्या नद्यांची पात्रे व शेतजमिनी वाळूने भरून गेल्या होत्या. अशा रीतीने बिहारपुढे फार बिकट समस्या निर्माण झाल्या होत्या. त्यासाठी एक मदत समिती स्थापन करण्यात आली. राजेंद्रबाबू तिचे अध्यक्ष झाले. अन्नधान्य, भांडी, कपडे वगैरे तातडीची मदत लोकांना पोचवल्यावर समितीने शेकडो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नव्या विहिरी व तलाव खोदले आणि कित्येक जुन्या विहिरी व तलाव दुरुस्त केले. लोकांना घरे बांधण्यासाठी वाजवी दरात सामान दिले व ब्रह्मदेशातून तांदूळ मागवून तोही भूकंप-पीडितांना योग्य दरात विकला. हे सर्व मदतकार्य फार मोठ्या प्रमाणावर चालू होते व राजेंद्रबाबू त्यासाठी प्रकृतीची पर्वा न करता रात्रंदिवस खपत होते. राजेंद्रबाबूंचे हे कार्य बिहारच्या इतिहासात अजरामर झाले आहे.

इ. स. १९३४ साली मुंबई येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अधिवेशन भरले होते. त्याचे अध्यक्ष म्हणून राजेंद्रबाबूंची निवड झाली होती. हे अधिवेशन मोठ्या उत्साहाने व थाटा-माटाने पार पडले.

इ. स. १९४२ साली ९ ऑगस्टला इंग्रज सरकारने महात्मा गांधींसह अनेक मोठ्या पुढाऱ्यांना पकडले व कैदेत ठेवले. त्याच दिवशी पाटणा येथे राजेंद्रबाबूंनाही अटक करण्यात आली. बांकीपूर तुरुंगात त्यांची रवानगी झाली. तिथून १५ जून १९४५ रोजी ते सुटले. या तुरुंगवासात त्यांनी द्विखंड भारत हे पुस्तक लिहिले व आत्मकथेचाही बराचसा भाग पुरा केला.

पुढे २ सप्टेंबर १९४६ रोजी पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार किंवा हंगामी मंत्रिमंडळ स्थापन झाले. त्यात नेहरू, पटेल, राजगोपालाचारी इत्यादींच्या बरोबर राजेंद्रबाबूं-चाही समावेश होता.

९ डिसेंबर १९४६ रोजी दिल्ली येथे घटना परिषद भरली. तिचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची एकमताने निवड करण्यात आली. या हिंदी घटना परिषदेने तीन वर्षांच्या परि-श्रमानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताची राज्यघटना मंजूर केली. या घटनेनुसार २४ जानेवारी १९५० ही पहिले राष्ट्रपती निवडण्याची तारीख ठरविण्यात आली. घटना परि-षदेने पहिले राष्ट्रपती म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांचीच एकमताने निवड केली. हा दिवस म्हणजे राजेंद्रप्रसादांच्या जीवनमंदिराचा सोन्याचा कळस होय. आपल्या आयुष्याची तेहतीस वर्षे त्यांनी देशसेवेतच खर्च केली होती. त्यांच्या सेवावृत्तीचे फळ त्यांना या रूपाने मिळाले. राजेंद्रबाबूंच्या शिक्षणाची सुरुवात फारसी व उर्दू या भाषांच्या अध्ययनाने झाली. नंतर त्यांनी इंग्रजी, हिंदी व बंगाली या भाषा अभ्यासल्या. गुजराती भाषेचेही त्यांना थोडेबहुत ज्ञान होते आणि हिंदू कायद्याचे अध्ययन तर त्यांनी संस्कृत ग्रंथांवरूनच केले होते. इतक्या भाषा येत असल्या तरी हिंदी भाषेबद्दल त्यांना विशेष प्रेम होते. बिहार प्रांतात व दक्षिण भारतात हिंदीचा प्रसार व्हावा, म्हणून त्यांनी खूप परिश्रम घेतले. राजेंद्रबाबू कलकत्त्याला शिकत असताना त्यांचा तिथल्या साहित्यिकांशी व हिंदी साहित्यपरिषदेशी बराच संबंध आला. इ. स. १९१२ साली कलकत्त्याला जे तिसरे हिंदी साहित्य संमेलन भरले, त्या संमेलनाचे ते मुख्य चिटणीस होते. इ. स. १९२० साली पाटणा येथे भरलेल्या दहाव्या

डॉ. राजेंद्रप्रसाद

साहित्य संमेलनातही त्यांचा प्रमुख भाग होता. इ. स. १९२६ साली पाटणा येथे भरलेल्या बिहार प्रांतीय संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. याशिवाय, १९२३ सालचे काकिनाडा येथील हिंदी साहित्यसंमेलन, १९२६ सालचे दरभंगा येथील बिहार-प्रांतीय हिंदी साहित्यसंमेलन, १९२७ साली गुरुकुल कांगडी येथे भरलेले संयुक्तप्रांतीय साहित्यसंमेलन व १९३६ साली नाग-पूरला भरलेले अखिल भारतीय हिंदी साहित्यसंमेलन, या संमे-लनांच्या अध्यक्षपदाचा बहुमान त्यांना मिळाला होता.

राजेंद्रबाबूंनी विपुल म्हणण्याजोगे लेखन केले नाही. तरी त्यांनी अनेक हिंदी व इंग्रजी लेख लिहिले आहेत. चंपारण्य में महात्मा गांधी, मेरे युरोप के अनुभव व आत्मकथा ही त्यांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुस्तके हिंदी भाषेत आहेत. इकॉनॉमिक्स ऑफ खादी व डिव्हाय- डेड इंडिया ही त्यांची इंग्रजी पुस्तके होत.

वर्तमानपत्रांच्या बाबतीतही राजेंद्रबाबूंची कामगिरी स्पृहणीय आहे. पाटण्याचे इंग्रजी दैनिक सर्च लाइट या पत्राचे ते एक संस्थापक होते. पाटणा लॉ विकली या साप्ताहिकातही त्यांचा प्रमुख भाग होता. पण ते लवकरच बंद पडले. ६ एप्रिल १९२० रोजी त्यांनी देश नावाचे हिंदी साप्ताहिक सुरू केले. अल्पावधीतच त्याला हजारो वर्गणीदार मिळाले. सुरुवातीला काही काळ राजेंद्रबाबू त्याचे संपादक होते. पण नंतर इतर कामांमुळे त्यांनी ते पद सोडले.

आपल्या गुणवत्तेच्या जोरावर राजेंद्रबाबूंनी अनेक श्रेष्ठ सन्मान प्राप्त करून घेतले. तसेच काही विद्यापीठांनीही त्यांना सन्मानदर्शक पदव्या अर्पण केल्या. इ. स. १९३७ साली अलाहाबाद विश्वविद्यालयाने त्यांना डॉक्टर ऑफ लॉज ही पदवी देऊन गौरविले, तर २० डिसेंबर १९४७ रोजी पाटणा विश्वविद्यालयाने त्यांना डॉक्टर ऑफ लिटरेचर हा किताब बहाल केला. त्याचप्रमाणे सागर विद्यापीठ, म्हैसूर व दिल्ली येथील विश्वविद्यालये यांनीही आपल्या सर्वोच्च पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. काशी विद्यापीठाच्या विद्वत्परिषदेने १९५० साली त्यांना विद्यावाचस्पती ही उपाधी प्रदान केली.

राजेंद्रबाबूंना परदेशप्रवासाची संधीही काही वेळा मिळाली होती. इ. स. १९२७ साली ते सिलोनला गेले होते. इ. स. १९२८ च्या मार्चमध्ये एका जमीनदाराच्या खटल्यातील अपील दाखल करण्यासाठी ते इंग्लंडला गेले आणि तिथले काम संपल्यावर त्यांनी युरोपची सफर केली. त्यानंतर भारताचे राष्ट्रपती या नात्याने १९५६ मध्ये त्यांनी नेपाळला भेट दिली. इ. स. १९५८ साली ते जपानला गेले होते. त्याच वेळी मलाया, इंडोनेशिया, कंबोडिया, दक्षिण व उत्तर व्हिएटनाम, लाओस आणि नंतर सिलोन या विविध देशांना त्यांनी भेट दिली. इ. स. १९६० साली ते रशियाच्या सदिच्छादर्शक दौऱ्यावर गेले होते.

राजेंद्रबाबूंनी समाज सुधारणेच्या कार्यातही सक्रिय भाग घेतला. ते धर्मनिष्ठ होते; पण रूढिप्रिय नव्हते. काळाच्या ओघाबरोबर जुने रीतिरिवाज बदलले पाहिजेत व समतेवर आणि माणुसकीवर आधारित अशा नवीन परंपरा निर्मिल्या पाहिजेत, असे त्यांचे मत होते. सुधारणेचे पहिले पाऊल त्यांनी आपल्या घरापासूनच उचलले होते. आपल्या तीन्ही मुलांच्या लग्नांत त्यांनी एक पैही हुंडा म्हणून घेतली नाही आणि अत्यंत साध्या पद्धतीने त्यांनी हे लग्नसमारंभ साजरे केले.

राजेंद्रबाबूंचा विवाह लहानपणीच झाला होता. परंतु सुरुवातीला शिक्षणाच्या निमित्ताने, नंतर नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने आणि त्यानंतर देशाचा संसार अंगावर घेतल्या राजेंद्रबाबू घरापासून जवळजवळ दूरच होते. लग्नाला ४५ वर्षे झाली, तरी तेवढे महिनेही ते दांपत्य एकत्र राहू शकले नाही. घराची आर्थिक जबाबदारी बहुतांशी त्यांचे थोरले बंधू महेंद्रप्रसाद यांनी सांभाळली आणि प्रपंचाचे कष्ट राजवंसीदेवींनी उपसले. महेंद्रप्रसाद हयात होते तोपर्यंत, संसारातल्या अडचणी, कटकटी व आजार या कशाचीही वार्ता राजेंद्रबाबूंपर्यंत कधी पोचली नाही.

राजेंद्रबाबू पाटण्यात गेले तरी सदाकत आश्रमात राहत असत. राजवंसीदेवी पाटण्यातच अन्य कुटुंबियांबरोबर राहत. राजेंद्रबाबू दौऱ्यावरून परतल्याचे कळले, की आपल्या नणंदे बरोबर त्या आश्रमात येत. राजेंद्रबाबूंना दम्याचा विकार होता. त्यामुळे अधूनमधून त्यांची प्रकृती ठीक नसे. अशा वेळी राजवंसीदेवी आश्रमात येऊन राहत व पतीची सेवाशुश्रूषा करीत. त्यांनी उपसलेल्या कष्टांचे शेवटी सार्थक झाले. भारताच्या राष्ट्रपतीची अर्धांगी म्हणून त्यांनाही जग ओळखू लागले. राष्ट्रपतिभवनात त्यांचे वास्तव्य घडले आणि थोरामोठ्यांचा परिचय झाला. अशा रीतीने कृतकृत्य होऊन त्यांनी ९ सप्टेंबर १९६२ रोजी या जगाचा निरोप घेतला.

राष्ट्रपती बनून राजेंद्रबाबू राष्ट्रपतिभवनात राहायला गेले. पण आपण भारतातील दरिद्री नारायणाचे प्रतिनिधी व लोकसेवक आहो, या गोष्टीचा त्यांना कधीही विसर पडला नाही. राष्ट्रपतिभवनातील विशाल उद्यान त्यांनी जनतेसाठी खुले केले. तसेच तिथले प्रचंड आणि सुसज्ज स्वयंपाकघर त्यांनी बंद करून टाकले. इंग्रजी साम्राज्यशाहीला साजेशा त्या वैभवाचा स्वराज्यात उपयोग नाही, अशी त्यांची धारणा होती.

वस्तुतः एवढ्या विस्तीर्ण वास्तूचे वस्तुसंग्रहालयात रूपांतर करावे, अशी गांधीजींच्याप्रमाणे राजेंद्रबाबूंचीही इच्छा होती. पण ती फलद्रूप झाली नाही. तेव्हा राष्ट्रपतिभवनातील एक विशाल कक्ष त्यांनी आपल्या कार्यालयासाठी ठेवून घेतला आणि स्वतःचे मासिक वेतन फक्त तीन हजार रुपये ठरवून इतर राजेशाही वैभव-विलास यांपासून ते दूर राहिले. राष्ट्रपती झाले तरी ते स्वतः आणि त्यांचा परिवार पूर्वीप्रमाणेच साधेपणाने राही. राष्ट्रपतिभवनातील दारांचे व खिडक्यांचे पडदे, पलंगपोस, टेबलक्लॉथ, कोच व खुर्च्या यांवरील आवरणे त्यांनी खादीच्या कापडाची करून घेतली. अशा तऱ्हेने अनेक बडेजावाच्या गोष्टी त्यांनी कमी केल्या, तरी राष्ट्रपतिपदाची प्रतिष्ठा राखणाऱ्या काही गोष्टी त्यांना कराव्या लागल्या. राजेंद्रबाबू एरवी आपल्या वेषभूषेबाबत उदासीन होते. पण राष्ट्रपती झाल्यावर त्यांना राष्ट्रपतीचा विशेष पोषाख शिवावा लागला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचे शिलाईचे बिल २५० रुपये आले, हे पाहून त्यांना नवल वाटले. त्यांनी आपल्या चिटणीसाला एवढा खर्च कसा, असे विचारले. राष्ट्रपतीच्या पोषाखाला एवढा खर्च येणारच, असे त्याने सांगितल्यावर ते काही बोलले नाहीत. पण अंतरात मात्र व्यथित झाले.

राष्ट्रपती झाल्यानंतर ते रोज राज्यकारभारावर लक्ष ठेवीत. आठवड्यातून एकदा ते भिन्न भिन्न खात्यांच्या मंत्र्यांना भेटून निरनिराळ्या प्रश्नांवर चर्चा करीत व महिन्यातून एकदा तरी पंतप्रधानांशी औपचारिक मुलाखत घडवून आणीत. निरनिराळ्या राज्यांतील राज्यपालांकडून दर आठवड्याला ते अहवाल मागवीत आणि राज्यकारभाराच्या फायली काळजीपूर्वक वाचून त्यांवर मार्गदर्शनपर सूचनाही लिहीत. घटनेने दिलेल्या मूलभूत हक्कांची जपणूक व कर्तव्याचे पालन शासनयंत्रणेकडून होते की नाही तेही, ते लक्षपूर्वक पाहत.

बारा वर्षे राष्ट्रपतिपदाची धुरा वाहिल्यानंतर १९६२ साली ते निवृत्त झाले. १० मे १९६२ रोजी दिल्लीच्या नागरिकांच्या वतीने रामलीला मैदानावर त्यांना निरोप देण्याचा समारंभ झाला. त्या वेळी अत्यंत भावपूर्ण स्वरात पंतप्रधान जवाहरलाल उद्‌गारले, की 'राजेंद्रयुग मावळले आहे.'

१३ मे १९६२ रोजी नूतन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी राजेंद्रबाबूंना भारतरत्न ही सर्वोच्च पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

त्यानंतर ते पुन्हा पाटणा येथील आपल्या सदाकत आश्रमात वास्तव्य करू लागले. तिथेच २८ फेब्रुवारी १९६३ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

राजेंद्रबाबू हे हाडाचे लोकसेवक होते. दीनदुबळ्यांना, अनाथ-अपंगांना ते नेहमी मदत करीत. तुरुंगात असतानासुद्धा फाशीची शिक्षा झालेल्या कैद्यांना ते दयेचा अर्ज लिहून देत.

त्यांच्या दयाबुद्धीच्या, साधेपणाच्या व निरहंकारी वृत्तीच्या कितीतरी गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी काही पुढे दिल्या आहेत —

इ. स. १९३४ साली बिहारमध्ये प्रलयंकारी भूकंप झाला, त्यानंतरची गोष्ट. राजेंद्रबाबू भूकंपपीडितांना साहाय्य करण्यासाठी दरभंग्याला चालले होते. भर उन्हाळ्याचे दिवस आणि दुपारची वेळ. आगगाडीच्या डब्यात प्रचंड गर्दी होती. त्या गर्दीतून पाणी, पाणी असे केविलवाणे शब्द ऐकू येत होते. ते शब्द ऐकून राजेंद्रबाबूंचे हृदय कळवळले. ते डब्यातून खाली उतरले. स्टेशनवरचे पाण्याचे-नळ भूकंपात नष्ट झाले होते. म्हणून ते जवळपास कुठेतरी गेले आणि एका हातात पाण्याने भरलेली बादली आणि दुसऱ्या हातात चार-पांच ग्लास घेऊन डब्याजवळ गेले. ते विचारीत सुटले; 'कौन भाई पानी पीयेंगे। लो बाबू यह ठंडा पानी आपके लिये ही लाया हूं।'

एकदा पावसाळ्यात दामोदर नदीला महापूर आला. त्यामुळे तिच्या जवळपासच्या प्रदेशातील घरे व गावे पाण्याखाली बुडाली. सर्वत्र हाहाकार माजला. पुराची वार्ता कळताच राजेंद्रबाबू पूरग्रस्तांच्या मदतीला धावले. आपल्या कार्यकर्त्यांसह नाव घेऊन ते पाण्याने वेढलेल्या घरांजवळ गेले आणि तिथे अडकलेल्या अनेक लोकांचे त्यांनी प्राण वाचवले. दिवसभर पूरग्रस्तांसाठी ते काम करीत आणि रात्री रेल्वेच्या रुळाशेजारी किंवा प्लॅटफॉर्मवर येऊन झोपत.

राजेंद्रबाबू काँग्रेसचा प्रचार करण्यासाठी नेहमी दौरे काढीत असत. गावोगाव सभांचे कार्यक्रम ठरलेले असत. एका दिवसात अनेक ठिकाणी सभा होत. एक दिवस अशीच संध्याकाळी पाच वाजता एका गावी त्यांची सभा ठरली होती. त्या गावी वेळेवर पोचण्यासाठी ते पहिल्या गावाहून मोटारने निघालेही होते, पण मोटार वाटेत बंद पडली आणि ती लवकर सुरू होण्याचे काही चिन्ह दिसेना. तेव्हा ते जवळच्या रेल्वेस्टेशनवर गेले आणि त्या गावाला जाणाऱ्या गाडीत बसले. ती गाडी रात्री नऊ वाजता त्या गावी पोचली. राजेंद्रबाबू आगगाडीने येणार याची कल्पना नसल्यामुळे स्टेशनवर त्यांच्या स्वागतासाठी कोणीच हजर नव्हते. तेव्हा राजेंद्रबाबू वळकटी काखोटीला मारून गाडीतून खाली उतरले आणि स्टेशनमास्तरच्या ऑफिसात गेले. 'काँग्रेसकचेरीत फोन करू का, मास्तरसाहेब ?' असे त्यांनी नम्रपणे स्टेशनमास्तरला विचारले. मास्तरने एकदा त्यांच्याकडे निरखून पाहिले आणि हा कोणीतरी खेडूत दिसतो, असे वाटून त्याने विचारले. 'फोन करणारा तू रे कोण ?' राजेंद्र नम्रपणे म्हणाले, 'राजेंद्र...'. त्यांना पुरते बोलू न देता तो म्हणाला, 'अरे, राजेंद्रबाबू आलेच नाहीत अजून. चल जा तू इथून'. राजेंद्रबाबू बिचारे स्वतःची ओळख न देता वळकटी काखोटीला मारून तिथून गावात गेले.

राजेंद्रबाबूंना न्यायाची चाड होती. सत्यावर त्यांचा अढळ विश्वास होता. वकिली करीत असतानाही त्यांनी सत्यनिष्ठा कधी सोडली नाही. इ. स. १९१७–१८ च्या सुमाराची गोष्ट. पाटण्याच्या हायकोर्टात एक विद्वान कायदेपंडित म्हणून राजेंद्रबाबूंची ख्याती झाली होती. एकदा श्री. भवानी दयाळ यांच्या एका नातेवाईकाला पाटण्याच्या हायकोर्टात एक खटला दाखल करायचा होता. म्हणून भवानी दयाळांचे ओळखपत्र व कागदपत्रे घेऊन ते गृहस्थ राजेंद्रबाबूंकडे आले. राजेंद्रबाबूंनी सारी कागदपत्रे काळजीपूर्वक पाहिल्यावर त्यांच्या लक्षात आले, की ही केस जर आपण जिंकली, तर विरुद्ध पक्षाच्या विधवा बाईला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अन्नाला मोताद व्हावे लागेल, म्हणून त्यांनी आलेल्या गृहस्थांना सल्ला दिला, की तुम्ही हा दावा दाखल करू नका. एका विधवेची मालमत्ता बळकावलीत, तर तुम्हांला जन्मभर शांती लाभणार नाही.

ते गृहस्थ परत गेले आणि भवानी दयाळाना म्हणाले. 'अहो भाईसाहेब, तुम्ही मला वकिलाकडे धाडले होते, की एखाद्या महात्म्याकडे? अहो, राजेंद्रबाबू हे खरे वकील नसून साधुसंत आहेत. त्यांनी माझी कागदपत्रे पाहून स्वतः दावा तर दाखल केला नाहीच; उलट मलाच वर धर्म आणि नीती यांचा उपदेश करून परत धाडून दिले. मी आता दावा दाखल करणार नाही.'

राजेंद्रबाबूंचे व्यक्तिमत्त्व असे सर्वस्पर्शी व विशाल होते. राजेंद्रबाबूंच्या भव्य व्यक्तिमत्त्वासंबंधी लिहायचेच झाले, तर सुवर्णाची लेखणी मधात बुडवूनच लिहिले पाहिजे, असे सरोजिनी नायडू एकदा म्हणाल्या होत्या.

सौजन्य, विद्वत्ता, कार्याविषयी निष्ठा आणि उदारपणा यांचे राजेंद्रबाबू हे मूर्तिमंत प्रतीक होते. ज्यांना त्यांच्या सहवासाचे भाग्य लाभले, त्यांना त्यांच्या ठिकाणी असलेला सरळपणा, निर्मळपणा व प्रेमळपणा यांचा नेहमीच प्रत्यय येत राहिला.

महात्मा गांधीही त्यांना किती मानीत असत हे त्यांच्या पुढील उद्गारांवरून कळून येते.

'माझ्याबरोबर चांगल्या चांगल्या लोकांनी काम केले. परंतु चांगल्या लोकांतही सर्वश्रेष्ठ असे राजेंद्रबाबू आहेत. त्यांनी माझ्यावर एवढे अपार प्रेम केले आहे, की त्यामुळे मी अपंग बनलो. त्यांच्या साहाय्याशिवाय एक पाऊलही पुढे टाकणे मला अशक्य झाले होते. राजेंद्रबाबूंचा त्याग ही आमच्या गौरवाची निशाणी आहे. नेतृत्व करण्यासाठी त्यांच्यासारखे चारित्र्य हवे, आचरण हवे. त्यांच्याएवढा विनम्रपणा मी पाहिला नाही.' [आत्मकथा – डॉ. राजेंद्रप्रसाद, अनुवादक श्री. नरेश कवडी, १९५८; भारतरत्न, भाग ४–श्री. राजा मंगळवेढेकर, १९६८; हिं. वि. को.]

राजौली एक नगर. हे बिहार प्रदेशातील गया जिल्ह्यामधील नावाड नगराच्या दक्षिणेला सुमारे अठरा मैलांवर आहे. याच्या दक्षिणेला सप्तशृंग नावाची, सात शिखरे असलेली एक टेकडी आहे. या शिखरांवर सात ऋषी रहात होते, अशी आख्यायिका आहे. प्रत्येक टेकडीला त्या त्या ऋषीचे नाव आहे. उदा० लोमश, दुर्वास, शृंग, इत्यादी. या सर्व शिखरांमध्ये शृंगिरीख शिखर महत्त्वाचे आहे. तिथे एक दगडी जोते असून, लोक त्याची पूजा करतात. या शिखराच्या पायथ्याजवळ दर वर्षी मोठी यात्रा भरते. राजौलीच्या आग्नेयीला दुबौर किंवा दुर्वासपूर नावाचे गाव असून, तिथे दुर्वासाचे वास्तव्य हो[ते] असे म्हणतात. दुबौरला लोरिक नावाचा गवळी जाती[चा] योद्धा जन्माला आला होता. त्याने बौरी ऊर्फ अगौरी गावात[ल्या] एका मुलीबरोबर विवाह केला. लोरिकने त्या प्रदेशावर न्याय[ाने] राज्य केले व तो प्रदेश सुपीक बनविला. अहीर गवळी या रा[जा]संबंधीची लोकगीते आवडीने गातात.

राजौलीच्या उत्तरेला, अकबरपूरला नानक पंथाचा एक [मठ] आहे. इथे मुसलमानांची एक मशीद असून, तिथे मक्केहून आ[ण]लेला अग्नी गेली चारशे वर्षे सतत तेवत असतो. [गया गॅझे.]

राज्यद्वादशीव्रत एक काम्य व्रत. याचा विधी असा: मार्गशीर्ष शुद्ध दशमीला संकल्प, ए[का]दशीला उपवास आणि विष्णूची पूजा; त्यानंतर 'तद् विष्[णोः] परमं पदम्' (ऋ. १.२२.२०) या मंत्राने उत्तम खाद्यप[दा]र्थांचा होम; रात्री जागर, गायन व नृत्य; द्वादशीला पू[जा,] मौन. व्रतावधी एक वर्ष. याचप्रमाणे वद्य पक्षातही हा वि[धी] याच क्रमाने करतात. मात्र या वेळी देवाची पूजा तांबडी व[स्त्रे] नेसून करावी व दिवे तुपाचे न लावता तेलाचे लावावे, [असे] सांगितले आहे. फल – तीन वर्षांनी मंडलेश्वरपद आणि बा[रा] वर्षांनी राज्यपद प्राप्त होते. [हि. ध.]

राज्यप्राप्तिदशमी एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध दशमी[ला] या व्रताला प्रारंभ करतात. ऋतू, द[क्ष,] वसू, सत्य, काल, काम, मुनी, कुरुवान, मनुज व परशुराम [या] विश्वेदेवांची गंधपुष्पादिकांनी पूजा करून पारण्याच्या दिव[शी] सुवर्णदान, असा याचा विधी आहे.

हे देव म्हणजे केशवाचीच निरनिराळी स्वरूपे आहेत. फल- विष्णुलोकप्राप्ती व राज्यलाभ. [हि. ध.; व्र. प.]

राज्यव्रत एक काम्य व्रत. ज्येष्ठ शुद्ध तृतीयेला या व्रताल[ा] प्रारंभ करतात. प्रातःकाली शुद्ध भूमीवर वायूं[ची] पूजा, दुपारी अग्नीमध्ये सूर्याची पूजा आणि सूर्यास्ताच्या वे[ळी] पाण्यात चंद्राची पूजा, असा याचा विधी आहे. फल – वर्षभ[र] व्रत करणाऱ्याला स्वर्गप्राप्ती होते. तीन वर्षे व्रत केले तर पा[च] हजार वर्षे स्वर्गवास मिळतो आणि बारा वर्षे व्रत केले त[र] एक लाख वर्षे स्वर्गप्राप्ती होते. [हि. ध.]

राज्यसंस्था शासनसंस्थेचे नाव. प्राचीन साहित्यात राज्य[सं]स्थाविषयक विवेचनाला राजधर्म, राज्य[]शास्त्र, दंडनीती, नीतिशास्त्र व अर्थशास्त्र अशी नावे आहेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन काळी भारतात राजतंत्र प्रचलित असल्यामुळे राजकारण-विषयक सर्व आदेश व उपदेश राजालाच दिले जात. त्यामुळे राजधर्म अथवा राज्यशास्त्र ही नावे शासनसंस्थेच्या शास्त्राला देणे स्वाभाविक होते.

भारतीय राज्यशास्त्रपंडित राज्यसत्तेचा प्रमुख आधार दंड किंवा बलप्रयोग असल्याचे समजत होते. म्हणून दंडाच्या आधारे चालणाऱ्या शासनसंस्थेच्या शास्त्राला त्यांनी दंडनीती असेही नावदिले. नी धातू नेणे, मार्गदर्शन करणे, इ. अर्थांनी परिचित आहे. नीती म्हणजे योग्य मार्ग दाखवणे व त्या मार्गाने लोकांना जायला लावणे असा त्याचा आशय आहे. उचित कोणते, अनुचित कोणते, कार्य कोणते, वैध कोणते, अवैध कोणते, या गोष्टी समजल्या तरच राजाकडून प्रजेला योग्य मार्गदर्शन होऊ शकेल. हा सर्व विचार ज्या शास्त्रात केला जातो, त्याला पंडितांनी नीतिशास्त्र असेही नाव दिले. कामंदक व उशना यांचे राज्यशास्त्रविषयक ग्रंथ नीतिशास्त्र या नावानेच प्रसिद्ध आहेत. कौटिल्याने त्याला अर्थशास्त्र हे नाव दिले. त्याने या शब्दाचा अर्थ बराच व्यापक घेतला आहे. तो म्हणतो (१५.१)–

मनुष्याणां भूमिरर्थः मनुष्यवती भूमिरर्थः।
तस्याः पृथिव्या लाभपालनोपायः शास्त्रमर्थशास्त्रमिति।

भावार्थ – अर्थ शब्दाने जसे माणसांचे उद्योगधंदे सूचित होतात, त्याचप्रमाणे ज्या भूमीवर राहून माणसे हे उद्योगधंदे करतात, ती भूमीही अर्थ या शब्दाने सूचित होऊ शकते. म्हणून भूमी मिळवणे व तिचे पालन करणे, यासबंधीचे जे शास्त्र त्याला अर्थशास्त्र म्हणणे उचित होईल.

शुक्रनीतीत म्हटले आहे, की केवळ संपत्तिप्राप्तीच्या उपायांची चर्चा करणे एवढेच नीतिशास्त्रात येते असे नाही, तर शासनशास्त्राचे सिद्धान्त प्रस्थापित करणे हेही त्यात येते.

राज्यशास्त्रावरचे ग्रंथ – राज्यशास्त्रावरचे लिखित साहित्य सन पूर्व ५०० वर्षांपर्यंत आढळत नाही. संहितांत आणि ब्राह्मणांत राज्यशास्त्रावर इतस्ततः काही फुटकळ वचने मिळतात. त्यावरून तत्कालीन राज्यव्यवस्थेचा अल्पसा परिचय होतो. ऋग्वेदात राज्यशास्त्रविषयक उल्लेख फार थोडे आहेत. अथर्ववेदात त्या मानाने जास्त आहेत. यजुर्वेद संहितांत व ब्राह्मणांत राज्याभिषेक, राज्यारोहण व त्यानंतर केले जाणारे यज्ञ, यांचे वर्णन ठायी ठायी आहे. त्या उल्लेखांवरून त्या काळी राजपदाची प्रतिष्ठा केवढी होती, राजकर्मचारी कोण असत, प्रजेकडून कोणकोणते कर बसूल केले जात, इ. विषयांची बरीच माहिती मिळते. यांमध्ये पुष्कळशी स्थळे अशीही आहेत, की त्यांवरून भिन्न भिन्न जाती, त्यांचे परस्पर संबंध, त्यांचे अधिकार, त्यांचा आणि राज्यसंस्थेचा संबंध, इ. गोष्टींवरही प्रकाश पडतो.

सनपूर्व ८ व्या शतकाच्या सुमारास इतर अनेक शास्त्रांबरोबर राज्यशास्त्राचाही उदय झाला. मात्र त्या काळी राज्यशास्त्राचे विवेचन धर्मशास्त्राच्याच अनुषंगाने होत असे. पण अशा प्रकारचे, सनपूर्व ६ व्या शतकात रचले गेलेले ग्रंथ सांप्रत नष्ट झाले आहेत. त्या काळात राजनीतिशास्त्राचा विकास होणे हे स्वाभाविकच होते. कारण त्या काळी भारतात शेकडो छोटी छोटी राज्ये होती आणि राजे लोक आपले पुरोहित व मंत्री यांच्याशी राज्यशास्त्राविषयी नेहमी चर्चा करीत असत. त्या चर्चा मग ग्रंथनिविष्ट होत.

महाभारत हा ग्रंथ मुख्यत्वे राजकीय घडामोडींनी भरलेला आहे. त्यावरून तत्कालीन राज्यसंस्थेच्या स्वरूपाची बरीचशी कल्पना येऊ शकते. त्यात राजनीतीचे स्वतंत्र निरूपणही केलेले आहे. शांतिपर्वात राजधर्म नामक स्वतंत्र उपपर्वच आहे. राज्यप्राप्तीनंतर धर्मराज शरपंजरी पडलेल्या भीष्माकडे येतो आणि त्याला राजनीतीसंबंधी अनेक प्रश्न विचारतो, असा तो प्रसंग आहे. धर्माच्या प्रश्नांना उत्तरे देण्याच्या निमित्ताने भीष्माने राजनीतिविषयक अनेक मुद्यांचे सविस्तर विवेचन केले आहे. हे विवेचन एकजिनसी व सुसंगत असे नाही. मात्र ते विवेचन पूर्वीच्या राजनीतीवरील ग्रंथांच्या आधारेच केलेले आहे, यात शंका नाही. त्यांत राजनीतिशास्त्राच्या उत्पत्तीविषयीची कथा प्रथम सांगून मग ब्रह्मदेवाने लोकांत सुरक्षितता नांदावी, या उद्देशाने एका महान ग्रंथाची रचना केल्याचे सांगितले आहे. या ब्रह्मकृत ग्रंथात एक लक्ष अध्याय असून, त्यांत धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांचे व त्रयी, आन्विक्षिकी, वार्ता आणि दंडनीती या चार विद्यांचे विवेचन केलेले होते.

पुढील युगात मनुष्याचे आयुष्य कमी कमी होत आहे हे जाणून विशालाक्ष म्हणजेच शंकर याने ब्रह्मदेवाच्या त्या ग्रंथाचा १०हजार अध्यायांत संक्षेप केला तो वैशालाक्षशास्त्र या नावाने प्रसिद्ध आहे. पुढे इंद्राने त्याचा ५ हजार अध्यायांत संक्षेप करून बाहुदंतकशास्त्र निर्माण केले. त्याचाही ३ हजार अध्यायांत संक्षेप करून बृहस्पतीने बार्हस्पत्यशास्त्र प्रस्थापित केले. शेवटी उशनसाने त्याचा १ हजार अध्यायांत संक्षेप करून औशनसशास्त्र प्रचारात आणले (म. भा. शांति. ५९.२९-८७).

प्राचीन राजनीतिशास्त्राच्या प्रवर्तकत्वाचा मान वर उल्लेखिलेल्या बृहस्पती आणि उशना (शुक्र) यांना दिला जातो. कौटिल्यानेही आपल्या ग्रंथाच्या प्रारंभी 'नमः शुक्रबृहस्पतिभ्याम्' असे या दोघांना नमन केले आहे. या दोन नावांनी प्रसिद्ध असलेले बार्हस्पत्य व औशनस हे ग्रंथ राजनीतीच्या विवेचनाला वाहिलेले सर्वांत प्राचीन ग्रंथ होत. याविषयी श्री. र. पं. कंगले लिहितात, ते असे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बृहस्पती आणि उशनस ऐतिहासिक व्यक्ती होत्या असे समजण्याचे कारण नाही. बृहस्पती हा देवांचा पुरोहित आणि उशनस हा दानवांचा असे मानले गेले आहे. यावरून राजनीतिशास्त्राच्या उत्पत्तीचा संबंध पुरोहितांशी जोडणे स्वाभाविक ठरते आणि प्राचीन काळच्या परिस्थितीचा विचार करता असे दिसून येते, की पुरोहितांचा राजसत्तेशी फार निकटचा संबंध असे. मंत्री, सेनापती आदी अन्य संस्था अस्तित्वात येण्याच्या अगोदरपासून पुरोहित ही संस्था विद्यमान होती. वैदिक काळाच्या प्रारंभापासून राजाला पुरोहित असणे आवश्यक मानले गेले आहे आणि राजाने त्याच्या सल्ल्याप्रमाणे वागावे, असे अनेक ठिकाणी म्हटले आहे. तेव्हा पुरोहितांना राज्याच्या व्यवस्थेसंबंधी पूर्ण ज्ञान व्हावे हे स्वाभाविक होते. तेव्हा त्यांच्यापैकी काहींनी त्याविषयीचे आपले विचार सूत्रबद्ध वा श्लोकबद्ध करून व्यक्त केले असावेत असे मानणे चूक ठरणार नाही. हीच या शास्त्राची उत्पत्ती मानता येईल आणि या उत्पत्तीचा मान पुरोहितांना देणे रास्त होईल. प्रारंभीच्या शास्त्रकर्त्या पुरोहितांनी या शास्त्राच्या प्रवर्तकत्वाचा मान स्वतःकडे न घेता तो बृहस्पती आणि शुक्र या दोन आद्य पुरोहितांना द्यावा हे प्राचीन परंपरेशी सुसंगत असेच आहे. कालांतराने राज्यकारभारासाठी मंत्री नेमले जाऊ लागल्यानंतर त्यांच्यापैकी काहींनी या शास्त्राच्या विकासास हातभार लावला असला पाहिजे, हे उघड आहे. कौटिल्याने निर्देश केलेल्या पूर्वीच्या आचार्यांपैकी भारद्वाज, पिशुन वगैरे पुरोहित नसून मंत्री असावेत, असे दिसते.

राज्यशास्त्रावरील उपलब्ध सर्व ग्रंथांत कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ मुकुटमणी ठरावा असा आहे. केवळ राजनीतीलाच तो वाहिलेला आहे. त्या ग्रंथात एकंदर १५ अधिकरणे म्हणजे विषयविभाग असून, एकूण १५० अध्यायांत १८० प्रकरणे आहेत. ग्रंथातील विवेचनाचे स्थूल मानाने दोन भाग पडतात. एक अंतर्गत राज्यव्यवस्थेविषयीचा व दुसरा परराष्ट्रसंबंधाविषयीचा. या दोन्ही भागांतील विवेचन सविस्तर व सर्वांगपरिपूर्ण आहे.

कौटिल्य केवळ राजनीतिज्ञच नव्हता, तर एका संप्रदायाचा संस्थापकही होता. राजा या व्यक्तीला विजिगीषू व मंडळाच्या केंद्रस्थानी कल्पून त्याने आपल्या अर्थशास्त्राची उभारणी केली आहे. पुढची कित्येक शतके तोच ग्रंथ प्रमाणभूत ठरला. व्याकरणशास्त्रात पाणिनीला जे स्थान, तेच राजनीती या विषयात कौटिल्याला मिळाले.

त्यानंतरच्या काळात जे ग्रंथ निर्माण झाले, ते बहुधा कौटिल्याचे अनुकरण करणारेच होते. उदा० कामंदकीय नीतिसार हा ग्रंथ इ. स. ५०० च्या सुमारास लिहिला गेला. अर्थशास्त्राचा छंदोबद्ध संक्षेप एवढेच त्याचे स्वरूप आहे. अर्थशास्त्रानंतर दुसरा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे शुक्रनीती हा होय. या ग्रंथात राज्यशास्त्राचे सैद्धांतिक विवेचन नाही; पण त्यात शासनव्यवस्थेचे जे सांगोपांग विवरण आहे, ते दुसऱ्या कोणत्याही ग्रंथात सापडत नाही. इ. स. ११०० नंतर भारतीय वाङ्मयातील मौलिकता हळूहळू कमी होऊ लागली. राज्यशास्त्रही त्याला अपवाद राहिले नाही. इ. स. च्या ११ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत जे ग्रंथ निर्माण झाले, ते केवळ संकलनात्मक आणि तपशिलाचे होते. इ. स. च्या १२ व्या शतकातला सोमेश्वराचा मानसोल्लास हा ग्रंथ याचे उदाहरण म्हणून सांगता येईल. त्याच्या ग्रंथात तपशील खूपच आहे, पण त्यामध्ये कोणत्याही प्रकारची नवीनता किंवा मौलिकता नाही.

राज्यशास्त्रावरील ग्रंथांच्या बाहेर संस्कृत, पाली व प्राकृत या भाषांतल्या इतर ग्रंथांतही केव्हा केव्हा राज्यशास्त्रावर प्रकाश टाकलेला आढळतो. पुराणांमध्ये काही अध्याय राज्यशास्त्राची चर्चा करण्यात खर्ची पडलेले दिसतात. प्रतिज्ञायौगंधरायण, रघुवंश, मालविकाग्निमित्र, पंचतंत्र, हितोपदेश, कादंबरी, हर्षचरित, दशकुमारचरित्र, राजतरंगिणी, इ. ललित वाङ्मयात राज्यशासनविषयक जी सामग्री आढळते, तिच्यावरून तत्कालीन राजकीय परिस्थितीवर काहीसा प्रकाश पडतो.

जैनांचे आचारांग सूत्र व बौद्धांचे दीघनिकाय, चुल्लवग्ग, जातक, दिव्यावदान, इ. ग्रंथ यांत राज्यशास्त्रविषयक बरीच माहिती, विशेषतः गणराज्यांसंबंधीची माहिती, आढळते. शिलालेख व ताम्रपट हेही त्या त्या कालच्या राजनीतीविषयी काही सांगू शकतात. कित्येक शिलालेखांतले व ताम्रपटांतले राजविषयक वर्णन अतिशयोक्त असले, तरी त्यांतील इतर माहिती विश्वसनीय असते. केव्हा केव्हा शिलालेखांमध्ये राज्यसंस्थांचे ध्येय काय असावे, राजा व मंत्री यांची कर्तव्ये कोणती असावी, इ. विषयांबद्दल सुभाषितात्मक सुंदर श्लोक आढळतात. प्राचीन भारतीय शासनपद्धतीच्या अध्ययनासाठी नाणी व राजमुद्रा याही उपयोगी पडतात.

म. म. काणे यांनी आपल्या ग्रंथात राज्यशास्त्रविषयक ग्रंथ व ग्रंथकार यांची सूची दिलेली आहे, ती अशी –

(१)	अर्थशास्त्र कौटिलीय	– चाणक्य
(२)	नीतिकमलाकर	– कमलाकर
(३)	नीतिकल्पतरु	– क्षेमेंद्र
(४)	नीतिगर्भितशास्त्र	– लक्ष्मीपती
(५)	नीतिचिंतामणी	– वाचस्पती मिश्र
(६)	नीतिदीपिका	
(७)	नीतिप्रकाश	– कुलमुनी
(८)	नीतिप्रकाश	– वैशंपायन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(९) तत्त्वनिवृत्ती — क्षीताराम
(१०) नीतिप्रदीप — वेताळभट्ट
(११) नीतिभाजन भाजन
(१२) नीतिमंजरी — द्याद्विवेदिन्
(१३) नीतिमंजरी — शंभुराज
(१४) नीतिमयूख — नीलकंठ
(१५) नीतिमाला — नारायण
(१६) नीतिरत्न — वररुची
(१७) नीतिरत्नाकर — कृष्णवृहत्-पंडितमहापात्र
(१८) राजनीतिरत्नाकर — चंडेश्वर
(१९) नीतिलता — क्षेमेन्द्र
(२०) नीतिविलास — व्रजराज शुक्ल
(२१) नीतिविवेक — करुणाशंकर
(२२) नीतिवाक्यामृत — सोमदेवसूरी
(२३) नीतिशास्त्रसमुच्चय
(२४) नीतीसमुच्चय
(२५) नीतिसार — घटकर्पर
(२६) नीतिसार — शुक्राचार्य
(२७) नीतिसारसंग्रह — मधुसूदन
(२८) नीतिसुमावली — अप्पा वाजपेयी
(२९) राजधर्मकौस्तुभ — अनंतदेव
(३०) राजधर्मसारसंग्रह — तुलाजिराज
(३१) राजनीती
(३२) राजनीती — देविदास
(३३) राजनीती — भोज
(३४) राजनीती — वररुची
(३५) राजनीती — हरिसेन
(३६) राजनीतिकामधेनू
(३७) राजनीतिप्रकाश — मित्रमिश्र
(३८) राजनीतिप्रकाश — रामचंद्र अल्लडीवार
(३९) राजनीतिमयूख — नीलकंठ
(४०) राजनीतिशास्त्र — चाणक्य
(४१) राजभूषणी — रामानंदतीर्थ
(४२) राजमार्तंड — भोज
(४३) राजलासक
(४४) राजवल्लभ — सूत्रंधारमंडन
(४५) राजाभिषेक — अनंत
(४६) राजाभिषेकप्रयोग — नीलकंठ
(४७) राजाभिषेक — येडरानंद
(४८) राजाभिषेकपद्धती —
(४९) राजाभिषेकपद्धती — अनंतदेव
(५०) राजाभिषेकपद्धती — शिव
(५१) राज्याभिषेकप्रयोग — कमलाकर
(५२) राज्याभिषेकप्रयोग — रघुनाथ सम्राट्स्थपती
(५३) राजकल्पद्रुम — अनंतभट्ट
(५४) मानसोल्लास — सोमेश्वर
(५५) नीतिसार — भार्गव
(५६) ओशनसी दंडनीती

राज्यसंस्थेची उत्पत्ती — राज्यशास्त्रावरच्या आधुनिक ग्रंथांत राज्याच्या मूळ उत्पत्तीविषयी सविस्तर विवेचन आढळते. पण अत्यंत प्राचीन अशा वैदिक वाङ्मयात राज्यसंस्था कधी उत्पन्न झाली, याविषयी विशेष काही आढळत नाही. ते समजून घेण्यासाठी पुराणे आणि आख्यायिका यांचाच आधार घ्यावा लागतो. महाभारतातील शांतिपर्वाच्या ५८ व्या अध्यायात व बौद्धांच्या दीघनिकाय ग्रंथाच्या तिसऱ्या भागात राज्याच्या मूळ उत्पत्तीविषयी काही गोष्टी सांगितल्या आहेत. वरील दोन ग्रंथ भिन्न संप्रदायांचे असूनही, त्या दोन्ही ग्रंथांतील विचारांत महत्त्वपूर्ण साम्य आहे.

राज्याच्या उत्पत्तीविषयी महाभारतात एक कथा दिली आहे, ती अशी —

पूर्वी कृतयुगात राज्य नव्हते, राजा नव्हता, दंड नव्हता आणि दंड देणाराही नव्हता. कारण ज्याला दंड करावा असा कोणी अपराधीच नव्हता. सर्व प्रजा आत्मकर्तव्याची जाणीव ठेवून परस्परांना अनुकूल अशा प्रकारे वागत होती. या अवस्थेत वैयक्तिक संयमाला प्राधान्य होते. पण लोकांना हळूहळू या अवस्थेचा ताण सहन होईना. संयम ढिला पडू लागला. त्याची जागा मोहाने घेतली. या मोहाने लोकांच्या धर्मभावनेवर आघात केला. मोहातून लोभ उत्पन्न झाला. जी वस्तू आपली नाही आणि जिच्यावर आपला अधिकार नाही, ती वस्तू आपल्यालाच मिळावी, आणि दुसऱ्या कोणालाही मिळू नये, अशी वासना लोकांच्या मनांत निर्माण झाली. लोक कामविकाराच्या आहारी जाऊन अगम्यागमन करू लागले. ते भक्ष्याभक्ष्यविवेक पाळीनासे झाले. वाणीचे पावित्र्य लोपले. बऱ्या-वाइटाचा विवेक गेला. सत्याचे अधिष्ठान संपले आणि त्याबरोबरच धर्माचाही ऱ्हास झाला.

ही शोचनीय परिस्थिती पाहून समाजातल्या विचारवंतांना उद्वेग वाटला. मग ही परिस्थिती बदलण्यासाठी ते प्रयत्नशील झाले. त्यांनी मग सर्वांच्या संमतीने, सर्वांना लागू होईल असा एक करार केला. जो कोणी निष्ठुर बोलेल, लोकांना निष्कारण पीडा देईल, लोकांवर आघात करील, परस्त्रीगमन करील आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परधनाचा अपहार करील, अशा माणसाला सर्व लोकांनी समाजातून बहिष्कृत करावे, असा तो करार होता.

लोकांनी हा करार मानला. मग सर्व वर्णांचे लोक या कराराचे पालन करून सुखासमाधानाने राहू लागले. पण हीही परिस्थिती फार काळ टिकली नाही. पुनश्च समाजाची घडी विस्कटली. समाजात बळी तो कान पिळी अशी अवस्था निर्माण झाली. दुर्बळांना आपल्या वित्त-जीविताची शाश्वती वाटेनाशी झाली. सर्व लोक मन मानेल तसे वागू लागले. समाज उत्सन्न होण्याची पाळी आली. त्या वेळी सर्व प्रजा भयभीत होऊन ब्रह्मदेवाला शरण गेली आणि म्हणाली –

" भगवन, एखाद्या शास्त्याच्या अभावी आम्ही सर्व लोक विनाशाच्या मार्गाला लागलो आहो. तेव्हा तुम्ही जो सर्वांना शासन करण्यास समर्थ असेल, असा एखादा राजा आम्हांला द्या. आम्ही सगळे त्याचा आदर करू आणि त्याची आज्ञा पाळू. "

ब्रह्मदेवाने ती वस्तुस्थिती जाणली आणि मनूला आदेश दिला, की 'तू या सर्व लोकांचा राजा हो.' पण मनूने त्या आदेशाचा स्वीकार केला नाही. तो म्हणाला –

बिभेमि कर्मणः पापाद् राज्यं हि भृशदुस्तरम्।
विशेषतो मनुष्येषु मिथ्यावृत्तेषु नित्यदा ॥
(म. भा. शांति. ९०.२२)

अर्थ – मी पापकर्माला फार घाबरतो. राज्य करणे हे अतिशय कठीण कर्म आहे. विशेषतः सदैव मिथ्याचाराने वागणाऱ्या माणसांवर राज्य करणे तर त्याहून दुष्कर आहे.

त्यावर लोक त्याला म्हणाले – 'मनुमहाराज, तुम्ही भिऊ नका. जो पाप करील त्यालाच ते बाधेल. आम्ही सर्व लोक तुमच्या कोशाच्या वृद्धीसाठी प्रत्येक पन्नास पशूंतला एक पशू कर म्हणून तुम्हाला देऊ. आमच्याजवळच्या सोन्याचा ५० वा भाग आणि पिकवलेल्या धान्याचा १० वा भागही कररूपाने आम्ही तुम्हांला देऊ.'

मनूने प्रजाजनांचे ते सांगणे मान्य केले आणि तो त्यांचा पहिला राजा झाला. त्याने राज्यशासन हाती घेताच दुराचारी लोकांना भय उत्पन्न झाले आणि ते स्वधर्माने वागू लागले.

अशा प्रकारे जगात राजा आणि राजसत्ता निर्माण झाली.

पण राजसंस्थेची ही दैवी उपपत्ती प्रा. अ. स. अळतेकर यांना मान्य नाही. त्यांनी याविषयीचा दुसरा विचार मांडला आहे, तो असा –

अर्वाचीन विचारकांनी राज्याच्या उत्पत्तीसंबंधी ज्या कल्पना केल्या आहेत, त्यांतली एक कल्पना अशी, की फार प्राचीन काळी लोकांनी स्वेच्छेने कोण्या व्यक्तिविशेषाला आपणांवर सत्ता चालविण्याचा अधिकार दिला. हा माणूस जमातीतला पुरोहित असू शकेल, छां छूं करणारा मांत्रिक असू शकेल किंवा जडीबुट्टी देऊन रोग बरे करणारा वैद्य असू शकेल. त्याला जेव्हा लोकांकडून अधिकार मिळाला, तेव्हा त्याने आपला दरारा निर्माण केला. क्वचित बळही वापरले आणि लोकांना आपल्या अधीन ठेवले.

काही आदिम जातींत अशा प्रकारे शासनसंस्थेची उत्पत्ती होणे शक्य आहे.

पण आर्य जातीत पितृप्रधान एकत्र कुटुंबपद्धती चालत होती. या कुटुंबात आजा, पिता, चुलता, पुतण्या, मुलगे, नातू असे लोक एकत्र राहत. या कुटुंबात जो गृहपती असे, त्याचा अधिकार परिवारातल्या सर्व लोकांवर चालत असे. हा गृहपती आपल्या स्वाधीन व्यक्तीला मनात आल्यास विकू शकत असे किंवा अपराध केल्यास त्याचा अवयवच्छेदही करू शकत असे. अशा प्रकारचे एक उदाहरण ऋग्वेदात आढळते. ऋज्राश्व नावाचा एक ऋषी मेंढ्या राखीत असता त्याचे दुर्लक्ष झाले आणि त्याच्या कळपातल्या १०० मेंढ्या लांडगा खाऊन गेला. ऋज्राश्वाच्या बापाला या गोष्टीचा राग आला आणि त्याने आपल्या मुलाचे दोन्ही डोळे फोडून टाकले (ऋ. ७. ११६. १७) दुसरे उदाहरण शुनःशेपाचे. दुष्काळात त्याच्या बापाने कुटुंबाचे प्राण वाचविण्यासाठी त्याला विकले होते (ऐ. ब्रा. ७. १५).

यावरून कळते, की प्रागैतिहासिक कालात कुटुंबामध्ये गृहपतीचा अधिकार राजासारखा होता. या संयुक्त कुटुंबपद्धतीतूनच शासनसंस्थेचा उगम झालेला आहे. ती दैवी नाही. पुढे कुटुंब-संस्थेचा विस्तार झाला आणि एकाच गावात एकाच पूर्वजापासून उत्पन्न झालेली अनेक कुले नांदू लागली. या कुलांनी संघाचे रूप धारण केले, तेव्हा गृहपतीच्या अधिकाराचे क्षेत्रही वाढले. गावातल्या सर्वांत मोठ्या कुलाचा सर्वांत वृद्ध गृहपती हा त्या कुलसंघाचा कारभार ग्राम वृद्धांच्या सल्लामसलतीने चालवू लागला. त्यानंतर ग्रामवृद्धांचे महत्त्व वाढले. कुटुंबात गृहपतीला जो मान व आदर मिळे, तो पुढे ग्रामवृद्धाला मिळू लागला. कालांतराने अशा अनेक ग्रामांचा संघ बनून त्या संघाचा एक अधिपती निर्माण झाला. अशा प्रकारे शासनसंस्थेचा विकास होत होत राज्यसंस्था अस्तित्वात आली.

ऋग्वेदावरून आणखी एक गोष्ट कळते ती ही, की तत्कालीन समाज, कुटुंब, जन्मन, विश व जन यांमध्ये विभागला होता. (ऋ. ८.२६.३). कुटुंबाचे वर्णन वर आलेच आहे. जन्मनबद्दल निश्चित सांगता येत नाही. कदाचित एका पूर्वजाच्या वंशाने वसवलेले ते गाव असावे. ग्रामसमूहाला विश म्हणत. त्याच्या प्रमुखाला विश्पती असे नाव होते. विशाचे संघटन मजबूत असे. प्रत्येक विशाची वेगळी लढाऊ तुकडी असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कित्येक विश मिळून एक जन बनत असे. त्याच्या मुख्याला जनपती किंवा राजा म्हणत.

सर्वांत प्रमुख शहराला स्थानीय असे म्हणत. हे शहर त्या जनपदाची राजधानी असे. जनपदाचा विस्तार सामान्यपणे छत्तीसशे चौरस मैलांपासून चौदा हजार चारशे चौरस मैल इतका असावा. यावरून ही स्मृतिकालीन जनपद राज्ये श्रुतिकालीन गणाधिष्ठित राज्यांपेक्षा फार विस्तृत बनली होती, हे उघड आहे. दुसरा फरक असा, की गणांमध्ये असलेला एकसंधपणा जनपद राज्यांत राहिला नाही. त्यांतील नागरिकांमध्ये सामाजिक दृष्टचा खूप विविधता उत्पन्न झाली. या सर्वांचा परिणाम राजाच्या हाती असलेली सत्ता वृद्धिंगत होण्यात झाला. राजा हा कुटुंबप्रमुखासारखा असतो, ही कल्पना मागे पडून राजा म्हणजे दंड धारण करून समाजव्यवस्थेचे रक्षण करणारा, या विचाराला प्राधान्य आले. राजाला सर्वंकष सत्ता प्राप्त झाली. स्मृतिग्रंथ सांगू लागले, की राजा हा ईश्वरनिर्मित असल्यामुळे व त्याच्या ठिकाणी देवतांचा अंश विद्यमान असल्यामुळे त्याची कोणतीही आज्ञा शिरसावंद्य मानणे, प्रत्येकाचे कर्तव्य आहे. या स्मृतिकालातच राजाला स्वामी ही संज्ञा प्राप्त झाली. त्याचबरोबर राज्याच्या सप्तप्रकृतींचा सिद्धान्त दृढमूल झाला. स्वामी, अमात्य, सुहृद, कोश, राष्ट्र, दुर्ग व बल या सात प्रकृती म्हणजे राज्याचे सात घटक मानले गेले.

राज्यसंस्थेचा इतिहास – आर्यांचे भारतात आगमन होण्यापूर्वी या देशात एक विकसित संस्कृती नांदत होती. तिलाच सिंधुसंस्कृती असे म्हणतात. त्या लोकांची काही तरी शासनव्यवस्था निश्चितच असली पाहिजे; पण तिचे स्वरूप कसे होते, अधिष्ठान कोणते होते, तिचा वापर कशा पद्धतीने होत असे आणि ती कोणत्या प्रकारच्या समाजघटनेशी निगडित होती, या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे अद्याप तरी मिळालेली नाहीत. म्हणून राज्यसंस्थेचा इतिहास ऋग्वेदकालाचा आरंभ धरूनच पाहावा लागतो.

वेदांत राजा शब्द आढळतो. त्यावरून कोणत्या तरी प्रकारची राज्यसंस्था ऋग्वेदकालाच्या अगोदरच अस्तित्वात आली होती, असे अनुमान करता येते. आर्य लोक भारतात आले त्या वेळी ते पंचजनांत विभागलेले होते. या प्रत्येक जनाला म्हणजे गणाला एखादा पुढारी किंवा अधिपती असणे आवश्यक होते. अगदी आदिम अवस्थेत असलेल्या जमाती–टोळ्यांनाही एखादा नायक असतोच. जमातीचे सर्व प्रकारच्या संकटांपासून रक्षण करणे, दैवी आपत्तींचा परिहार करणे व अन्य मानवी शत्रूंशी मुकाबला करण्यात जमातीला सदैव सज्ज व संघटित ठेवणे हे त्याचे काम असे. आर्यांच्या गणांच्या बाबतीतही आरंभी अशीच अवस्था असण्याची शक्यता आहे; पण भारतात प्रवेश करण्याच्या आधीपासूनच त्या गणांच्या नेत्यांकडे फक्त शत्रूपासून संरक्षण करणे एवढीच कामगिरी राहिली होती. आर्यांच्या गणांत देवतांशी संबंध असणारे कोणतेही कृत्य पार पाडण्यासाठी पुरोहित नावाची स्वतंत्र संस्था अस्तित्वात आली होती. या गणांच्या अधिपतींना राजा म्हणत, असे ऋग्वेदावरून कळते.

हा वैदिक राजा जन्मसिद्ध नसून, तो निवडणुकीने राजपदावर येत असे. या निवडीमागची प्रेरणा काय असावी, याविषयी पुढील कथांवरून कल्पना येते –

देव आणि असुर यांची सदैव युद्धे होत; पण त्या युद्धांत देवांचा नेहमीच पराजय होई. असे का व्हावे, याचा विचार करता त्यांना कळून आले –

अराजतया वै नो जयन्ति, राजानं करवामह इति । तथेति । ते सोमं राजानमकुर्वंस्तेन सोमेन राज्ञा सर्वा दिशोऽजयन् ।

(ऐ. ब्रा. १.१४.५-६)

अर्थ – राजा नसल्यामुळे आमचा पराभव होतो म्हणून आपण राजा करू या. ठीक आहे (सर्वांनी म्हटले). त्यांनी सोमाला राजा केले. तो सोम राजा झाल्यामुळे देवांनी सर्व दिशा जिंकल्या.

असुरांवर विजय मिळविण्यासाठी देवांनी इंद्राला आपला प्रमुख नेमले, असा निर्देश शतपथ ब्राह्मणातही आहे. (३.४-२. १-३). ऐतरेय ब्राह्मणात देवांनी इंद्राला केलेल्या महाभिषेकाचेही वर्णन आहे (८.१२.२३). राजाशिवाय युद्ध करताच येणार नाही, असे. तै. ब्राह्मणातही म्हटले आहे (१.५.९.१).

या सर्व वचनांवरून असे अनुमान करता येते, की युद्धकाली समर्थ नेतृत्व करू शकेल अशा पुरुषाची जनांना आवश्यकता वाटली व तशा पुरुषाची त्यांनी राजपदासाठी निवड केली.

प्राचीन कालातही आजच्याप्रमाणेच लोक अराजकाला भीत होते. अराजक माजले तर काय घडेल याविषयी महाभारतात लिहिले आहे, ते असे –

बलवान लोक दुर्बलांची मालमत्ता बलात्काराने हस्तगत करतील. ते दुसऱ्यांच्या बायकाही पळवतील. त्यामुळे वैवाहिक आणि कौटुंबिक संबंध नष्ट होतील. ही बायको, हा मुलगा, इ. नात्यांचा मागमूसही राहणार नाही. यज्ञसंस्थेचा लोप होईल व त्यामुळे वेद लोप पावतील. शेती, व्यापार, इ. व्यवसायांत गोंधळ माजून अनर्थ ओढवेल. सर्व प्रकारचे अनाचार व दुराचार बोकाळतील. (शांति. ६८).

समाजात कुणीतरी शास्ता असावा आणि त्याने सर्व लोकांना जरब बसवून मर्यादेत ठेवावे, यासाठी राजाची आवश्यकता उत्पन्न झाली. कौटिलीय अर्थशास्त्रात म्हटले आहे, की सबलाने दुर्बलांना खावे या प्रचलित मात्स्यन्यायाने लोक हैराण झाले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि ते वैवस्वत मनूकडे गेले. त्यांनी मनूला काही कर देण्याचे कबूल करून त्याला आपला राजा केले (१.१३.५–६). मनुस्मृतीतही अशाच प्रकारचे वर्णन आले आहे (७.३). दीघनिकाय या बौद्ध ग्रंथात याविषयी जे वर्णन आहे ते श्री. र. पं. कंगले यांनी पुढीलप्रमाणे दिले आहे –

सृष्टीची उत्पत्ती झाली तेव्हा सर्व प्राण्यांचे देह अपार्थिव, केवळ मनोमय होते आणि ते अंतरिक्षातच संचार करीत. कालांतराने पृथ्वी जलतत्त्वापासून निराळी झाली आणि सूर्य व चंद्र उत्पन्न होऊन दिवस-रात्र इत्यादी भेद अस्तित्वात आले. अधर्माचाही उगम झाला. तथापि त्या वेळी उपजीविकेसाठी वनस्पती सदा उपलब्ध असल्यामुळे संघर्षाला वाव नव्हता. पण नंतर काही कालाने अधर्माची वाढ होऊन स्वर्गीय सुखाचा अधिकाधिक ऱ्हास होत गेला. क्षेत्रांची विभागणी होऊन खाजगी मालकी अस्तित्वात आली. परिणामतः दुसऱ्याची मत्ता चोरण्याची प्रवृत्ती उत्पन्न होऊन शासन करणे आवश्यक झाले. चौर्य, असत्य भाषण, निंदा इत्यादी अनिष्ट प्रकार वाढल्यामुळे संत्रस्त झालेल्या लोकांनी असे ठरविले, की गुन्हेगारांचे दमन करण्यास समर्थ अशा एका माणसाची ह्या कामासाठी निवड करणे आवश्यक आहे. त्या कामगिरीबद्दल त्याला काही धान्य देण्याचे ठरवून लोकांनी सर्वांत सुंदर आणि समर्थ अशा माणसाला हे पद स्वीकारण्याची विनंती केली. त्याने ते मान्य केल्यावर त्याला 'महासंमत' म्हणजे लोकांनी संमती दिलेला सर्वश्रेष्ठ मनुष्य, अशी संज्ञा प्राप्त झाली. त्यानंतर तो क्षेत्रांचा अधिपती झाला म्हणून त्याला 'खत्तिय' (म्हणजे क्षत्रिय) हे दुसरे नाव प्राप्त झाले. आणि तो धम्माने (म्हणजे धर्माने) सर्वांचे रंजन करू लागला म्हणून 'राजा' ह्या तिसऱ्या नावानेही तो ओळखला जाऊ लागला.

राज्यसंस्थेची आवश्यकता का उत्पन्न झाली, या संबंधात महाभारत व दीघनिकाय या दोहोंचे ऐक्यमत आहे. पण ही संस्था कशा प्रकार अस्तित्वात आली, याविषयीचे विचार मात्र भिन्न आहेत. पहिला राजा विष्णूने निर्माण केला आणि तो त्या देवाचा मानसपुत्र होता, असे वर्णन महाभारतात आहे. पृथूच्या देहात विष्णूने प्रवेश केला, असेही महाभारतात सांगितले आहे. म्हणजे राजा हा देवनिर्मित असून, त्याच्या शरीरात देव वास्तव्य करतो, असे हे मत आहे. दीघनिकायाचे मत याच्या उलट, म्हणजे लोकांनीच आपल्यातल्या एका श्रेष्ठ पुरुषाला राजा म्हणून निवडले, त्याला शासनाचे अधिकार दिले व त्याला धान्याच्या रूपात कर देण्याचेही ठरवले, असे आहे.

राज्याची निर्मिती देवाने केली ही कल्पना वैदिक कालापासून प्रचलित आहे. ऋग्वेदात एका ठिकाणी इंद्राने राजा म्हणून एका पुरुषाची स्थापना केली, असे वर्णन आहे (१०.१७३.३). ऐतरेय ब्राह्मणातही निरनिराळ्या दिशांवर स्वामित्व गाजवण्यासाठी वरुणाने राजाची स्थापना केली असे म्हटले आहे (८.१४) मनुस्मृतीत या कल्पनेचा विस्तार करून अष्ट दिक्पालांचे शाश्वत अंश घेऊन विधात्याने त्यापासून राजाची मूर्ती घडवली, असे म्हटले आहे (७.४–५).

राजाचे देवत्व – ब्राह्मणकालात राजाला देव मानण्याची प्रवृत्ती हळूहळू वाढीस लागली. युद्धातला विजय हे त्या काळी इंद्राच्या कृपेचे फल समजले जात असे. त्यामुळे विजयी राजाला इंद्राच्या उपाधी लावल्या जाऊ लागल्या. राज्याभिषेकाच्या वेळी पुरोहित प्रजाजनांना सांगू लागले, की हा राज्याभिषेक सवित्याच्या आदेशानुसार होत असून, तो मनुष्याच्या हाताने नाही; तर पूषा व अश्विनौ या देवांच्या हाताने होत आहे. या अभिषेककाली राजाच्या शरीरात अग्नी, सविता व बृहस्पती या देवता प्रवेश करीत आहेत.

उत्तर वैदिककालात राजाला देव मानण्याच्या प्रवृत्तीला वातावरण अत्यंत अनुकूल होते. इ. स. च्या पहिल्या शतकात कुशाण राज्याची स्थापना याच भावनेने झाली होती. आणि त्याच भावनेने त्या राज्याला बलही मिळाले होते. चिनी परंपरेने प्रभावित झाल्याकारणाने या वंशाचे राजे स्वतःला देवपुत्र मानीत आणि आपल्या राजमुद्रांवर ढगांतल्या दैवी ज्योतीतून आपण खाली उतरत असल्याचे चित्र अंकित करीत. कुशाण सम्राटांनी आपल्या पूर्वजांची मंदिरेही उभारली आणि त्यांत त्यांच्या प्रतिमा स्थापून देवाप्रमाणे ते त्या प्रतिमांची पूजा करू लागले.

स्मृती आणि पुराणे यांनी तर राजाला स्पष्टपणे देवच म्हटले आहे. मनू म्हणतो (मनु. ७.५)–

यस्मादेषां सुरेन्द्राणां मात्राभ्यो निर्मितो नृपः।
तस्मादभिभवत्येष सर्वभूतानि तेजसा॥

अर्थ – ज्या अर्थी या देवतांच्या अंशाने राजाची निर्मिती झाली आहे, त्या अर्थी हा राजा आपल्या तेजाने सर्व भूतांना निस्तेज करतो.

ब्रह्मा जनार्दनो रुद्र इन्द्रो वायुर्यमो रविः।
हुतभुग्वरुणो धाता पूषा भूमिर्निशाकरः॥
एते चान्ये च ये देवाः शापानुग्रहकारिणः।
नृपस्यैते शरीरस्थाः सर्वदेवमयो नृपः॥
(विष्णू पु. १.१३ – १४)

अर्थ – ब्रह्मा, विष्णू, रुद्र, इंद्र, वायू, यम, सूर्य, अग्नी, वरुण, धाता, पूषा, भूमी, चंद्र हे आणि अन्य निग्रहानुग्रहसमर्थ देव राजाच्या शरीरात वसत असल्यामुळे राजा हा सर्वदेवमय आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढच्या काळात बौद्ध लोकही राजाला सम्मतिदेव म्हणू लागले. त्याचा अर्थ हा, की राजाचे देवत्व प्रजेला मान्य आहे.

समाजात अवतारकल्पना रूढ झाली त्याबरोबर राजाही परमेश्वराचा अवतार मानला जाऊ लागला. भागवताने पृथुराजाला विष्णूचा अवतार म्हटले आहे. शिलालेखांवरून असे कळते, की गाहडवाल वंशातले चंद्र व गोविंदचंद्र हे राजे अनुक्रमे ब्रह्मा – विष्णूचे अवतार मानले जात. पृथ्वीराजविजय या काव्यात पृथ्वीराजाला रामाचा अवतार मानले आहे. आधुनिक काळात शिवाजीमहाराजांना शिवावतार मानले गेले आहे.

राजाचे देवत्व प्रस्थापित झाल्यामुळे प्रजा त्याला देवासमान मान देईल आणि त्याची आज्ञा चांगल्या प्रकारे पाळील, असे पुराणकारांना वाटले. पण राजा जर अधर्मी आणि पापाचारी बनला, तर त्याला देवत्वाच्या आवरणाखाली आपली पापे झाकता येत नसत किंवा आपल्या जुलूम – जबरदस्तीचे समर्थनही करता येत नसे. अशा राजाला धर्मशास्त्रकारांनी राक्षस मानले आहे.

राज्यसंस्थेचे स्वरूप – वेदकालाच्या प्रारंभापासून आर्य लोकांमध्ये ब्रह्म, क्षत्र आणि विश असे तीन वर्ग पडलेले होते. यज्ञयागादी प्रसंगी पौरोहित्य करणारा तो ब्रह्मवर्ग, युद्धात नेतृत्व आणि राज्यकारभार करणारा तो क्षत्रवर्ग आणि सर्वसाधारण लोकांचा तो विशवर्ग, अशी ही समाजाची विभागणी वैदिक आर्यांमध्ये प्रचलित होती. या तीन वर्गांपैकी राज्यसंस्थेशी साक्षात संबद्ध असल्यामुळे क्षत्रांपैकीच कोणाची तरी राजा म्हणून निवड होत असे. राज्य करण्यास ब्राह्मण समर्थ नाही आणि वैश्य स्त्रीच्या मुलाला कुणी राज्याभिषेक करीत नाही, अशा अर्थांची वचने शतपथ ब्राह्मणात आली आहेत (५.१.१.१२; १३.२.९.८).

असे असले तरी प्राचीन भारतात शुंग, काण्व, वाकाटक असे अनेक ब्राह्मण राजे होऊन गेले. हर्ष वैश्य होता व काही राजे शूद्रही होते. जेंव्हा यवन, शक, पार्थियन, हूण, इ. राजांनी भारतात आपापली राज्ये स्थापली, तेव्हा क्षत्रियेतर मनुष्यही राजा होऊ शकतो, असे शास्त्रकार सांगू लागले.

ज्याची राजा म्हणून निवड करायची तो राजन्य अर्थात श्रेष्ठ क्षत्रिय कुलात जन्मलेला असावा ही गोष्ट अभिप्रेत होती. यज्ञाच्या प्रसंगी राजाचा निर्देश अमुक तमुक पित्याचा व अमुक तमुक मातेचा, असा होत असे. यावरून राजाची उभय कुले विशुद्ध असणे आवश्यक होते, असा निष्कर्ष काढता येतो. राजा म्हणून निवड होण्यासाठी ज्या मुख्य गुणाची आवश्यकता असे, तो म्हणजे पराक्रम वा युद्धनेतृत्व हा होय. याविषयी श्री. कंगले लिहितात, ते असे –

'आर्यांच्या ह्या गणांना प्रारंभापासून युद्धाचा अवलंब करण्याची शक्यता वाटत राहिली हे वैदिक वाङ्मयावरून स्पष्ट आहे. येथे अगोदर निवास करून राहिलेल्या दास आदि लोकांशी त्यांना लढावे लागले हे समजण्यासारखे आहे. पण ह्या आर्यगणांची आपसांतही युद्धे होत यात शंका नाही. ऋग्वेदकालीही आर्यांआर्यांत संघर्ष निर्माण होऊन लढाया होत, हे दाशराज्ञ युद्धावरूनही स्पष्ट आहे. आणि ब्राह्मण ग्रंथांत भरत आणि इक्ष्वाकू, भरत आणि सात्वत, पंचाल आणि कुंती इत्यादी आर्यगणांच्या आपसातील युद्धांचे निर्देश आहेत. तेव्हा प्रथमपासून समर्थ नेतृत्वाची गरज भासून त्यासाठी म्हणून राजा निवडला जाण्याची प्रथा सुरू झाली, असे विधान करणे चूक होणार नाही.'

राजाचे निर्वाचन – राजन्यांपैकी एखाद्याची होणारी निवड ही विशांमार्फत म्हणजे सामान्य लोकांमार्फत होत असे, असे दिसते. तशा प्रकारचे पुढील उल्लेख वैदिक वाङ्मयात आढळतात –

ता ईं विशो न राजानं वृणाना
बीभत्सवो अप वृत्रादतिष्ठन् ।

(ऋ. १०.१२४.८)

अर्थ – मानवी प्रजाजन जसे राजाला निवडतात तसे आपोदेवींनी इंद्राला निर्वाचित केले. कारण त्यांना वृत्राचा तिटकारा आलाच होता आणि त्या त्याच्यापासून दूरच राहिल्या होत्या.

त्वां विशो वृणतां राज्याय ।

(अथर्व. ३.४.२)

अर्थ – हे पुरुषा, विश तुझी राज्यासाठी कामना करोत.

राज्याभिषेकाच्या एका मंत्रात अशी प्रार्थना आढळते, की अभिषिक्त राजा आपल्या श्रेणीच्या व्यक्तींमध्ये प्रतिष्ठित होतो. त्यावरून संभव असा दिसतो, की जनतेचे नेते कुलपती आणि विशपती हेच राजाचे निर्वाचन करीत असावेत.

निर्वाचनाची ही प्रथा वैदिक कालाच्या अखेरी अखेरीस मागे पडली. वैदिक कालातही ती प्रथा सर्रास चालू होती की नाही याचीही शंकाच आहे. उत्तर वैदिक कालाच्या आधीच राजपद आनुवंशिक बनले होते. इक्ष्वाकुवंशाची नामावळ पाहिल्याअंती असे दिसते, की रामाच्या कित्येक पूर्वीच्या पिढ्या आणि रामाच्या कित्येक उत्तरकालीन पिढ्या यांमध्ये राजपद आनुवंशिकपणे चालत आले होते. आनुवंशिक राज्यपद्धतीतही काही वैधानिक गोष्टी होत्या. सामान्यपणे हिंदू कुटुंबपद्धतीत वडिलार्जित संपत्ती सर्व भावांमध्ये विभागून दिली जात होती. पण राज्य मात्र अविभाज्य असे. आंधळा, बहिरा, मूर्ख किंवा रोगी नसेल, तर राजाचा ज्येष्ठ पुत्रच राज्याचा उत्तराधिकारी होत असे. रामायणात म्हटले आहे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इक्ष्वाकूणां हि सर्वेषां राजा भवति पूर्वज: ।
(अयोध्या. ११०.३६)

अर्थ – सर्व इक्ष्वाकूंच्यामध्ये प्रथम पुत्र हा राजा होतो.

जेव्हा मोठा भाऊ राजा होई तेव्हा छोटया भावांना प्रदेशांवरचे राज्यपाल किंवा एखादा उच्च अधिकारी म्हणून नेमले जात असे. जातकांत आणि इतिहासात अशी अनेक उदाहरणे आढळतील.

जर राजाच्या मृत्युसमयी थोरला मुलगा अज्ञान असेल तर त्याची माता, त्याचा काका किंवा एखादा जवळचा नातेवाईक अज्ञानपालक या नात्याने राज्यतंत्र चालवीत असे. राष्ट्रकूटवंशी अमोघवर्ष (पहिला) याच्या बाल्यावस्थेत कर्क याने व गंगवंशी शिवमार (दुसरा) हा युद्धबंदी असताना त्याचा भाऊ विजयादित्य याने राजप्रतिनिधी म्हणून राज्य चालवले होते. पण अशा वेळी अज्ञान व्यक्तीचे पालन करणारे काही राजप्रतिनिधी लोभवश होऊन स्वत:च राज्य गिळंकृत करण्याचे उद्योग करीत असत. त्यासाठी अशी प्रथा सुरू झाली की राजाच्या अज्ञानदशेत राजमातेच्या अध्यक्षतेखाली एक प्रशासक मंडळ निर्माण करावे. अशा प्रकारच्या राज्यव्यवस्थेचे उल्लेख जातककथा, नाटके, शिलालेख यांमध्ये आढळतात. प्राचीन भारतात नयनिका (सनपूर्व १२५) प्रभावती गुप्ता (इ. स. ३८०) इ. अनेक राजमाता पुत्राच्या बाल्यावस्थेत राज्य चालवीत होत्या.

जेव्हा राजपदाचे निर्वाचन होत असे, त्या वेळी त्या व्यक्तीची राजपदी प्रतिष्ठा अभिषेकाने होत असे. ऐतरेय ब्राह्मणात इंद्राला झालेल्या अशा महाभिषेकाचे वर्णन आहे. राजाला अभिषेक करण्याच्या या प्रथेचा उगम ऐंद्र महाभिषेकातूनच झाला असला पाहिजे. अभिषेक हा राजाने केलेल्या यज्ञाचा एक भागच बनल्यामुळे तो एक धार्मिक स्वरूपाचा विधी झाला होता. वैदिक काळात व त्यानंतरही राजाने अश्वमेध, वाजपेय, राजसूय, अशांसारखे यज्ञ कर्तव्य म्हणून केले पाहिजेत, असा सामान्य नियम होता. सूर्यवंशातल्या सगर, रघू, राम, इ. राजांनी अश्वमेध केल्याचे दाखले आहेत. सोमवंशातही असे अनेक राजे यज्ञकर्ते होऊन गेले. युधिष्ठिराने तर राजसूय यज्ञ केला होता. हे यज्ञ राजाच्या वैयक्तिक कल्याणाकरिता नसून, ते राज्यात समृद्धी व्हावी व प्रजेची भरभराट व्हावी या उद्देशाने केले जात. ‘ पुष्कळ गायी, घोडे, मेंढे-बकरे, व्रीही, यव, माष, तिल, हिरण्य, दास, इ. गोष्टींनी राज्यातले विश संपन्न व्हावे म्हणून अश्वमेध यज्ञ करून मनुष्य राजा होवो ’ असे तैत्तिरीय ब्राह्मणात म्हटले आहे (३.८.५.३). अभिषेकाच्या वेळी राजा पुढीलप्रमाणे प्रार्थना करीत असे, असे शतपथ ब्राह्मणात सांगितले आहे –

‘ रोगराई व किल्मिष यांपासून वनस्पती मुक्त व्हाव्या व प्रजाजन मुक्त व्हावे यासाठी मला अभिषेक होवो. भय आणि विनाश यापासून मुक्त अशा राज्यासाठी मला अभिषेक होवो ’ (५.२.३.७–९; ५,२.४.१–३).

वर उल्लेखिलेला राज्याभिषेक पुरोहिताच्या हस्ते होत असे. ऋग्वेदकालाच्या प्रारंभापासून राजाला पुरोहिताची आवश्यकता मानली आहे. ऐतरेय ब्राह्मणात तर पुरोहिताला राजाचा अर्धा आत्माच म्हटले आहे (७.२६). युद्धकाळी लढण्याचे काम राजाचे असे; तर राजाला युद्धात विजय मिळावा यासाठी मंत्रयुक्त धार्मिक विधी करण्याचे काम पुरोहिताचे असे.

पुरोहिताचे मुख्य काम जरी यागादी विधींच्या द्वारे विजय, समृद्धी आदी प्राप्त करून देण्याचे असे, तरी अन्य प्रसंगीसुद्धा त्याची सल्लामसलत घेणे राजाला उपयुक्त वाटत असले पाहिजे. श्रुतिकाली मंत्री किंवा अमात्य नेमण्याची प्रथा अस्तित्वात आल्याचे दिसत नाही. तेव्हा राजाला त्याच्या कारभारात सल्ला देऊन साहाय्य करण्याचे काम मुख्यत: पुरोहिताकडे असे. परंतु त्याचा सल्ला राजावर बंधनकारक नसे. पुरोहिताचे महत्त्व त्याच्या स्वत:च्या व्यक्तिमत्त्वावर व त्याचे राजाशी ज्या तऱ्हेचे संबंध असतील त्यांवर अवलंबून राहणे स्वाभाविक मानता येईल. नंतरच्या काळात राज्यकारभारासाठी मंत्री, अध्यक्ष, इ. विशिष्ट अधिकाऱ्यांची नियुक्ती आवश्यक झाल्यावर पुरोहिताचे कार्य त्याच्या स्वत:च्या अशा कार्यक्षेत्रापुरते मर्यादित झाले, तरी त्याची प्रतिष्ठा कमी झाली नाही.

वेदकालातली शासनपद्धती राजतंत्र असली तरी स्मृतिकाली तिच्यात बराच फरक पडला. या कालाच्या प्रारंभी अनेक मोठी राज्ये अस्तित्वात आली. त्यांना महाजनपदे असे म्हणत. बौद्ध ग्रंथांत अशा सोळा महाजनपदांचा निर्देश आहे. श्रुतिकालाच्या प्रारंभीचे अस्थायी गण आता निरनिराळ्या प्रदेशांत स्थायिक होऊन मोठाली राज्ये अस्तित्वात आली होती. सामान्यपणे एका जनपदात सुमारे ८०० लहानमोठी गावे असत; असे कौटिलीय अर्थशास्त्रात म्हटले आहे.

गणराज्ये – भारतात राजतंत्राव्यतिरिक्त प्रजातंत्री अशाही शासनसंस्था पुरातन काली होत्या. त्यांना गणराज्ये असे नाव होते. ज्या पद्धतीत एका विशिष्ट व्यक्तीच्या हाती राजसत्ता नसते आणि ज्या पद्धतीत समूहाचे प्रतिनिधी बहुमताने शासन चालवतात, अशा राज्यांना गणराज्ये म्हणत. ब्राह्मण व जैन-बौद्ध ग्रंथ यांत गणराज्यांचे उल्लेख विपुल प्रमाणात आढळतात. बुद्धपूर्व काळातले मद्र, कुरू, पांचाल, शिबी आणि विदेह हे मानवसमूह गणराज्यपद्धतीने आपले शासन चालवीत होते, असे कळते (गणराज्ये पाहा).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजसत्ता – कौटिल्याच्या कालात राजाची सत्ता कोणत्याही बाह्य स्वरूपाच्या नियंत्रणाने मर्यादित होत नसे. तथापि त्याने मन मानेल तसे वागून सुलतानशाही गाजवू नये, म्हणून अनेक प्रकारची योजना केलेली दिसते. या सर्व योजनांमध्ये प्रथम भावी राजाच्या अर्थात राजपुत्राच्या शिक्षणाचा विचार केलेला आहे. कौटिल्य म्हणतो, की उपनयनानंतर राजपुत्राने वेदत्रयी, आन्वीक्षिकी म्हणजे सांख्य, योग आणि लोकायत, इ. दर्शने; वार्ता म्हणजे कृषी, गोरक्ष व वाणिज्य हे व्यवसाय व दंडनीती म्हणजे राजनीतिशास्त्र या चार विद्यांचे अध्ययन करावे. वेदाध्ययनाने त्याला धर्म व समाज यांचे यथार्थ ज्ञान होईल. आन्वीक्षिकीच्या अध्ययनाने त्याच्या बुद्धीला समतोलपणा व सारासार विवेक येईल. वार्तेच्या अध्ययनाने त्याला एकंदर अर्थव्यवस्थेचे स्वरूप समजेल आणि दंडनीतीच्या अध्ययनाने त्याला शास्त्रशुद्ध दृष्टीने राज्यकारभार करता येईल. मनुस्मृतीत व इतरत्रही राजाने या चार विद्यांचे अध्ययन करावे, या गोष्टीवर विशेष भर दिला आहे. अशा प्रकारच्या शिक्षणानं बनलेला राजा सामान्यतः स्वच्छंदी व निरंकुश होणार नाही, अशी या मागची भूमिका आहे.

स्मृतिकारांनी राजाचा इंद्रियनिग्रहही अपेक्षिला आहे. कौटिल्यही या गोष्टीवर भर देतो. राजाने काम, क्रोध, लोभ, मान, मद आणि हर्ष ह्या सहा विकारांवर ताबा मिळविणे आवश्यक आहे. अन्यथा राजा आणि त्याचे राज्य नाश पावते हे कौटिल्याने अनेक उदाहरणे देऊन प्रतिपादन केले आहे. राजाने मद्य, स्त्री, द्यूत आणि मृगया ही कामविकारापासून उद्भवणारी व्यसने; निंदा, नालस्ती, द्रव्यादिकांचा अपहार; दंड, पारुष्य, इ. क्रोधविकारापासून उत्पन्न होणारी व्यसने ही अनर्थकारी असल्यामुळे ती टाळावी म्हणजेच त्याचा कारभार प्रजेला सुसह्य होईल, असे मनू व कौटिल्य यांनी आवर्जून सांगितले आहे.

राजासंबंधी दुसरी महत्त्वपूर्ण धारणा अशी होती, की तो प्रजेचा सेवक आहे. बौधायन म्हणतो, की राजा वास्तवात प्रजेचा सेवक आहे आणि प्रजेकडून जो षष्ठांश कर त्याला मिळतो, ते त्याचे वेतन आहे (बौधा. ध. सू. १०.६). नारदानेही प्रजेकडून मिळणारा कर हे राजाचे पारिश्रमिक असल्याचे म्हटले आहे. कारणावाचून कोणीही कोणालाही काही देत नाही. प्रजा राजाला जो कर देते तो त्याने आपले रक्षण करावे ही आकांक्षा धरूनच देते. शुक्र म्हणतो –

सर्वतः फलभुग् भूत्वा दासवत् स्यात्तु रक्षणे ।

(शुक्र. ४.२.१३०)

अर्थ – प्रजा राजाला सर्व बाजूंनी सर्व प्रकारचे फल देते, त्या अर्थी त्याने भृत्याप्रमाणे प्रजेची सेवा करायला हवी.

राजा हा प्रजेच्या संपत्तीचा विश्वस्त आहे, ही कल्पनाही प्राचीन भारतात विद्यमान होती. शुक्राने राजाला जी चेतावणी दिली आहे, ती अशी –

बलप्रजारक्षणार्थं धर्मार्थं कोशसंग्रहः ।
स परत्रेह सुखदो नृपस्यान्यस्तु दुःखदः ।।
स्त्रीपुत्रार्थं कृतो यश्च स्वोपभोगाय केवलम् ।
नरकायैव स ज्ञेयो न परत्र सुखप्रदः ।।

(शुक्र. ४.२.३–५)

अर्थ – राजाचा कोशसंग्रह हा सैन्य, प्रजा व धर्म यांच्या रक्षणासाठी आहे. तशा प्रकारे त्याने त्या कोशाचा उपयोग केल्यास तो सुखद ठरेल. दुरुपयोग केल्यास तो दुःखद होईल. जर राजा आपला राजकोश स्त्री–पुत्रांच्यासाठी आणि स्वतःच्या विषयोपभोगांसाठी उपयोगात आणील, तर त्याला दुःख होईल व तो नरकाला जाईल.

राजाने सदैव धर्माधारेच वर्तावे, असे आग्रहपूर्वक सांगितले आहे. बृहदारण्यकात याविषयी एक वचन (१.४.१४) आहे, ते असे –

तदेतत् क्षत्रस्य क्षत्रं यद्धर्मः । तस्माद् धर्मात् परं नास्ति ।

अर्थ – धर्म हेच क्षत्रियाचे क्षत्रियपण आहे. म्हणून धर्माहून श्रेष्ठ असे काहीही नाही.

धर्म हा राजांचाही राजा असून, राजदंड हा धर्मरक्षणासाठी उत्पन्न झाला आहे, असे मनूने म्हटले आहे. शुक्रनीतीनेही त्याला दुजोरा दिला आहे. भारतीय राजा हा विधिनियमांच्या अतीत नसतो व तो विधिनियम करण्यासाठीही उत्पन्न झालेला नसतो. रागद्वेषविहीन अशा ऋषि-मुनींनी निर्माण केलेले धर्मनियम व्यवहारात आणण्यासाठी तो निर्माण झाला आहे. इंग्लंडच्या राज्यघटनेत ‘राजाच्या हातून कधीही अधर्म घडत नाही’ असे मानलेले आहे; पण भारतीय राज्यशास्त्रज्ञांनी राजाही अधर्मी आणि अविचारी बनू शकेल हे गृहीत धरून त्याला धर्मनियमांनी बांधून टाकले आहे. राजा जर अधार्मिक आणि जुलमी झाला, राजनीतीला सोडून वागू लागला, तर त्यालाही अपराधी समजून इतरांच्यापेक्षा एक हजारपट अधिक दंड करावा, असे मनूने स्पष्ट सांगितले आहे.

अधर्मी राजाला महाभारतात राजकली म्हटले असून, अशा राजाला प्रजेने उलथून पाडावे किंवा प्रसंगविशेषी त्याचा वधही करावा, असे स्वच्छ म्हटले आहे. महाभारतात अशा प्रसंगाची काही उदाहरणेही दिली आहेत.

वेन या जुलमी राजाला ब्रह्मवादी ऋषींनी मंत्रपूत कुशांनी ठार मारले. हे सर्वांत मोठे उदाहरण होय (म. भा. शांति. ५९). उद्योगपर्वात अशा १४ कुलांगार राजांची यादीच दिली आहे (७४). अनुशासनपर्वात कशा प्रकारचा राजा हा राज-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कली अथवा वध्य ठरतो, त्याविषयी पुढील श्लोक दिलेले आहेत –

धिक् तस्य जीवितं राज्ञो राष्ट्रे यस्यावसीदति ।
द्विजोऽन्यो वा मनुष्योऽपि शिबिराह वचो यथा ॥
यस्य स्म विषये राज्ञः स्नातकः सीदति क्षुधा ।
अवृद्धिमेति तद्राष्ट्रं विन्दते सहराजकम् ॥
क्रोशन्त्यो यस्य वै राष्ट्राद् ह्रियन्ते तरसा स्त्रियः ।
क्रोशतां पतिपुत्राणां मृतोऽसौ न च जीवति ॥
अरक्षितारं हर्तारं विलोप्तारमनायकम् ।
तं वै राजकलिं हन्युः प्रजाः संनह्य निर्घृणम् ॥
अहं वो रक्षितेत्युक्त्वा यो न रक्षति भूमिपः ।
स संहत्य निहन्तव्यः श्वेव सोन्माद आतुरः ॥
(म. भा. अनु. ६१.२९–३३)

अर्थ – ज्याच्या राज्यात द्विज अथवा कोणत्याही वर्णाचा मनुष्य नष्ट पावतो, त्या राजाच्या जीविताचा धिक्कार असो. ज्याच्या राष्ट्रात विद्यावंत पुरुष अन्नाच्या अभावी भुकेच्या आगीने होरपळून निघतो, ते राष्ट्र समृद्ध तर होत नाहीच; पण राज्ययंत्रासहित विनाश पावते. ज्या राष्ट्रातून पती आणि पुत्र असहाय्यपणे आक्रोश करीत असता रडणाऱ्या, ओरडणाऱ्या स्त्रियांचे बलात्काराने अपहरण होते, त्या राज्ययंत्राचा चालक जीवन्मृत आहे असे समजावे. संरक्षण न करणाऱ्या, लुबाडणाऱ्या, उपजीविका नष्ट करणाऱ्या व कोणतीही नियंत्रणे न मानणाऱ्या राजाला प्रजेने राजकली समजून निर्घृणपणे संघटित रीत्या ठार मारावे. मी तुमचे संरक्षण करीन, असे सांगून जो राजा आपल्या प्रजेचे संरक्षण करीत नाही, त्याला सर्वांनी मिळून संघटितपणे मरणपंथाला लागलेल्या आणि पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे ठार करावे.

राजधर्म – राजाचे धर्म कोणते, त्याची प्रजेशी वागणूक कशी असावी किंवा कशी नसावी राज्यातील अंतर्गत व्यवहार चालविताना त्याने कोणती तत्त्वे पाळावी आणि शत्रु-राष्ट्रांशी वागताना कोणते सूत्र अवलंबावे याविषयी महाभारतात तपशिलवार आणि स्पष्ट विवेचन केले आहे.

राजा हा युगकर्ता असतो. काल किंवा परिस्थिती घडविण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते –

कालो वा कारणं राज्ञो राजा वा कालकारणम् ।
इति ते संशयो माऽभूद्राजा कालस्य कारणम् ॥
(उद्योग. १३२.१६)

अर्थ – काल किंवा परिस्थिती ही राजाला घडवते का राजा परिस्थितीला निर्माण करतो, याविषयी तुला संशय नको. राजा हाच (बऱ्या-वाईट) परिस्थितीचा जनक असतो.

राजैव कर्ता भूतानां राजैव च विनाशकः ।
(शांति. ९१.६)

अर्थ – राजा हाच सर्व भूतांचा कर्ता असतो व तोच सर्व भूतांचा विनाशकही होऊ शकतो.

सर्व धर्म हे राजधर्मप्रधान असतात. हत्तीच्या पावलात ज्याप्रमाणे सर्व पशूंची पावले समाविष्ट होतात, त्याप्रमाणे राजधर्मात सर्व धर्म समाविष्ट असतात. याचा अर्थ असा, की राज्यातील सर्व सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक, इ. घटनांची जबाबदारी राजावर पडते. वैदिक कालापासूनच राजा हा धर्माचा रक्षक व पोषक समजला गेला आहे.

राजा हा प्रजेचा नेता असतो. प्रजा त्याच्या मागून जाते. म्हणून राजाचे आचरण शुद्ध व आदर्शभूत असले पाहिजे. प्रजेचे रोग, शोक आणि कष्ट हे राजाच्या कर्तव्यच्युतीमुळे होतात, असेही समजले जात होते. एका जातककथेत म्हटले आहे, की राजा जर अन्यायी झाला, तर मीठ आणि साखर यांचाही स्वाद निघून जातो.

प्रजेचे संरक्षण करणे हा राजाचा पहिला व श्रेष्ठ धर्म होय. यात परचक्रापासून संरक्षण आणि राज्यातल्या चोर, डाकू, दुष्ट इ. लोकांपासून संरक्षण या दोन्ही गोष्टी गृहीत आहेत. दुष्टांना त्यांच्या अपराधाप्रमाणे शासन करणे व धर्मच्युत लोकांना धर्म पाळायला लावून नीतिनियमांच्या चौकटीत आणणे, ही कर्तव्ये जो राजा पाळतो, त्याला रोज यज्ञ केल्याचे व हजारो गायी दान दिल्याचे पुण्य मिळते. तसेच तो इहपरलोकीही सुखी होतो (मनु. ९.३०६; याज्ञ. १.३३५).

राजाची पाच प्रमुख कर्तव्ये सांगताना अत्री म्हणतो –

दुष्टस्य दण्डः सुजनस्य पूजा । न्यायेन कोशस्य च संप्रवृद्धिः ।
अपक्षपातोऽर्थिषु राष्ट्ररक्षा । पञ्चैव यज्ञाः कथिता नृपाणाम् ॥
(अत्रि. २८)

अर्थ – दुष्टाला दंड देणे, सज्जनाचा सन्मान करणे, न्यायाने कोशाची वृद्धी करणे, अर्जदारांचा न्यायनिवाडा करणे व राष्ट्राचे रक्षण करणे हे राजाचे पाच यज्ञ सांगितले आहेत.

प्रजेचे व राष्ट्राचे संरक्षण करताना संग्राम करावा लागला आणि त्यात मृत्यूला सामोरे जावे लागले, तरी राजाने ते भूषण मानावे (मनु. ७.८७ – ८९; याज्ञ. १.१३४). प्रजेचे केवळ संरक्षण केल्यानेच राजाचे काम संपत नाही. त्याने दीन-दुबळे, अंध-मूक, लुळे-पांगळे, अनाथ, वृद्ध, विधवा, रोगग्रस्त, संकटग्रस्त अशा सर्व लोकांना अन्न, वस्त्र, औषधे, आसरा, इ. गोष्टी देऊन आधार दिला पाहिजे (म. भा. शांति. ८६.२४). शेतीसाठी तळी, कालवे, इत्यादींची सोय करणे, बी पुरवणे, उंदीर, हत्ती, इ. कृषिनाशकांचा बंदोबस्त करणे, गुरांच्या चाऱ्यासाठी कुरणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निर्माण करून ती वाढवणे; प्रजेची व्यावहारिक, आर्थिक व सांस्कृतिक उन्नती करणे; तसेच विद्वान ब्राह्मण, कवी, पंडित व शिक्षणसंस्था यांना आश्रय देऊन त्यांचा योगक्षेम चालवणे ही राजाची कर्तव्ये होत.

राजाने देशातला व्यापार वाढवला पाहिजे. त्यात प्रामाणिकपणा राखला जातो की नाही ते पाहिले पाहिजे. वजने-माप प्रमाणबद्ध करून ती नेहमी तपासण्याची व्यवस्था केली पाहिजे. अधिकारी लोक कामात कुचराई करीत नाहीत ना, लाचलुचपत घेत नाहीत ना, याची चौकशी केली पाहिजे. अशा प्रकारची अनेक राजकर्तव्ये स्मृतिग्रंथांतून व नीतिग्रंथांतून विशदपणे सांगितलेली आहेत.

महाभारतात राजनीती, राजकर्तव्ये आणि राजाचे गुण यांविषयी सर्वांगीण विचार केलेला आढळतो.

राजाच्या नीतीला दोन बाजू असतात. एक गृहनीती व दुसरी परनीती. आपल्या देशातील लोक अर्थात आपले प्रजाजन यांच्याशी वागण्याचे जे नियम आणि जे धोरण ती गृहनीती होय. आणि प्रच्छन्न शत्रू व उघड शत्रू यांच्याशी वागण्याचे जे नियम ती परनीती होय. गृहनीतीमध्ये सत्य, न्याय, अहिंसा, दया, क्षमा, इ. तत्त्वांचा जितका उत्कर्ष होईल, तितका तो राजाला भूषणावहच ठरतो. स्वतःच्या प्रजेसाठी पराकाष्ठेचा त्याग करणे आणि प्रजेशी प्रसंगी कठोर व प्रसंगी मृदू वागून तिला योग्य मार्गावर ठेवणे हा राजाचा श्रेष्ठ धर्म होय. त्याचबरोबर, जो आपला शत्रू आहे, जो आज ना उद्या आपला, आपल्या प्रजेचा आणि आपल्या राष्ट्राचा घात करायला कचरणार नाही अशा राजाशी वागताना कोणत्याही प्रकारच्या सत्यासत्याचा, धर्माधर्माचा विचार न करता, कठोरपणे वागून, प्रसंगी कपट करूनसुद्धा त्याचा नायनाट करावा, असेही भारतीय तत्त्ववेत्यांनी निर्भयपणे सांगितले आहे. या गृहनीतीचा व परनीतीचा उपदेश भीष्माने धर्मराजाला केला आहे, तो असा –

हे कुरुश्रेष्ठा, गर्भिणी जसे आपल्या गर्भाला जपते व आपल्या अन्नोदकाने त्याचे पोषण करते, त्याप्रमाणे राजाने आपल्या प्रजेचे पालन करायला हवे. गर्भिणी जशी स्वतःला प्रिय असलेल्या गोष्टींचा त्याग करून आपल्या गर्भाला हितकारक तेच करते, त्याप्रमाणे राजानेही आपल्याला इष्ट असतील त्या गोष्टींचा त्याग करून, जी जी गोष्ट लोकहिताची असेल, ती ती केली पाहिजे. कोप न करणारा, व्यसनशून्य, सौम्य शिक्षा करणारा आणि जितेंद्रिय असा राजा प्रजेच्या विश्वासाला पात्र होतो. ज्याच्या राज्यात प्रजाजन आपल्या पित्याच्या घरात असल्याप्रमाणे निर्भयपणे वावरतात, तोच राजा सर्वांत श्रेष्ठ होय. राजाची उत्पत्ती धर्मासाठी आहे; आपल्या भोगलालसा तृप्त करण्यासाठी नाही. लोकांनी प्रार्थना करण्याच्या आधीच राजाने त्यांचे प्रिय करावे. जो राजा आपल्या प्रजेशी असत्याचरण करतो, त्याचा आत्मा परशूने तोडलेल्या वनाप्रमाणे या असत्य कर्माच्या योगाने क्षीण होतो.

स्वकीयांसाठी केलेला केवढाही मोठा त्याग राजाला अभिनंदनीयच ठरेल. पण याच गृहनीतीच्या नियमांना अनुसरून शत्रूशी वागणूक ठेवली, तर मात्र फार मोठा धोका संभवतो. म्हणूनच शत्रूशी वागण्याचे नीति-नियम अगदी वेगळे आहेत. अहिंसा गृहनीतीतले सर्वश्रेष्ठ तत्त्व खरे; पण परनीतीत ते घातक ठरते. शत्रूशी वागताना वेगळ्या प्रकारे वागले पाहिजे. भीष्म म्हणतो –

राजा, व्यवहारदृष्टीचा लोप झाला, तर राजाचे इहपर अकल्याणच होते. शत्रूचा कोणत्याही सूक्तासूक्त मार्गाने संहार करणे हे राजाचे कर्तव्य ठरते. कालकवृक्षीय मुनी क्षेमदर्शी राजाला सांगतात, ते असे – हे राजा, प्रथम उत्कृष्ट प्रकारे शुचिर्भूत राहून व चांगली कर्मे करून तू शत्रूची मर्जी संपादन कर. मित्रांचे पाठबळ मिळव. मुत्सद्दी मंत्र्यांच्या साहाय्याने गुप्त विचार कर. विश्वासू लोकांकडून शत्रूमध्ये फाटाफूट कर. आणि अशा गोष्टींनी बेलफळाने बेलफळ तोडावे, त्याप्रमाणे शत्रूकडूनच शत्रूचा नाश कर. सुंदर आणि स्वादिष्ट असे पदार्थ, स्त्रिया, वस्त्रे, शय्या, आसने, गृहे, रस, सुगंधी पदार्थ आणि फळे यांवर शत्रूची आसक्ती निर्माण कर. या आसक्तीच्या योगे शत्रूचा परस्पर नाश होईल.

नाघ्नतः कीर्तिरस्तीह न वित्तं न पुनः प्रजाः ।
इन्द्रो वृत्रवधेनैव महेन्द्रः समपद्यत ॥

(शांति. १५.१५)

अर्थ – शत्रूचा वध न करणाऱ्या राजाला या लोकी कीर्ती लाभणार नाही, धन मिळणार नाही आणि त्याची प्रजाही सुरक्षित राहणार नाही. इंद्रसुद्धा वृत्रासुराचा वध करूनच महेंद्रपदवीला पोचला.

निकृत्या निकृतिप्रज्ञा हन्तव्या इति निश्चयः ।
न हि नैकृतिकं हत्वा निकृत्या पापमुच्यते ॥

(वन. ५२.२२)

अर्थ – कपटबुद्धी शत्रूंचा कपटाने वध करावा असा सिद्धान्त आहे. कपटी शत्रूचा कपटाने वध केला असता त्याला पाप म्हणत नाहीत.

शत्रूच्या अपराधाबद्दल त्याला क्षमा करणे किंवा शिक्षा करणे या गोष्टी प्रसंग पाहून तारतम्याने कराव्या. शत्रू पुन्हा उचल करणार नाही, ही निश्चिती करून घेऊनच त्याच्याशी कसे वागायचे ते ठरवावे. ऋण, अग्नी आणि शत्रू यांचा जर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अवशेष ठेवला, तर ते पुनःपुन्हा वृद्धिंगत होतात. शत्रू अवशिष्ट ठेवले, तर त्यांचा अपमान झालेला असल्यामुळे, ते पुढे धोका निर्माण करतात. म्हणून त्यांचा समूळ नाश करणेच श्रेयस्कर होय. बृहस्पती इंद्राला आणखी काही राजनीतीची तत्त्वे सांगतो; ती अशी –

शत्रू जर अवेळीच आपल्यावर चालून आला, तर त्या वेळी आपले सामर्थ्य बाजूला ठेवून शत्रूशी स्नेह करावा. क्रोध व अहंकार यांचा त्याग करून शत्रूचे छिद्र शोधीत राहावे आणि तशी संधी मिळताच सर्व सामर्थ्यानिशी त्याच्यावर प्रहार करावा. पुष्कळ शत्रू असले, तर त्यांच्याशी एकटयाने लढू नये. त्या वेळी साम, दाम, भेद व दंड या उपायांचा योग्य प्रमाणात अवलंब करून क्रमाने एकेकाचा विध्वंस करावा. सामर्थ्य असले तरी, बुद्धिमान पुरुषाने एका वेळी अनेकांशी युद्ध करायचा प्रसंग आणू नये. दुसरी गोष्ट म्हणजे शत्रूवर लवमात्र विश्वास ठेवू नये.

संक्षेपो नीतिशास्त्राणामविश्वासः परो मतः ।

(शांति. १३८.१९७)

अर्थ – सर्व नीतिशास्त्राचे थोडक्यात सार हेच, की कोणाचा विश्वास धरू नये.

आपल्यावर ज्याचा विश्वास नसेल, त्याच्यावर तर विश्वास ठेवू नयेच; पण आपल्यावर विश्वास आहे त्याच्यावरही विश्वास ठेवू नये.

महाभारतात सांगितलेल्या या परनीतीचे सार भारद्वाजाच्या शब्दांत सांगता येते, ते असे –

राजा शत्रुंजया, आपत्तीच्या प्रसंगी योग्य प्रकारची मसलत करावी, योग्य प्रकारे पराक्रम गाजवावा, योग्य प्रकारे युद्ध करावे आणि प्रसंग पडला तर योग्य रीतीने पलायनही करावे. त्याविषयी विचार करू नये. नम्रता केवळ वाणीत असावी, पण अंतःकरण वस्तऱ्यासारखे तीक्ष्ण असावे. जे कार्य केले असता शत्रूचे व आपले सारखेच हित होईल, त्या कार्यासाठी शत्रूशी संधी करावा. तथापि त्याजवर विश्वास ठेवू नये आणि कार्य झाले म्हणजे लागलीच शत्रूपासून दूर व्हावे. मित्राप्रमाणेच शत्रूचेही मधुर भाषणाच्या योगाने सांत्वन करीत असावे. पण सर्पयुक्त असलेल्या गृहाची जशी लोक भीती बाळगतात तशीच त्याची भीती बाळगावी. कल्याणेच्छू राजाने शत्रूपुढे प्रसंगानुरूप हात जोडावे, शपथ वाहावी, सामोपचाराचा अवलंब करावा, शिरसाप्रणाम करून भाषण करावे व अश्रूही ढाळावे.

वहेदमित्रं स्कन्धेन यावत् कालविपर्ययः ।
आगतं समयं वीक्ष्य भिन्द्याद्घटमिवाश्मनि ।।

अर्थ – आपला काळ उलट असेल तोवर शत्रूला खांद्यावर घ्यावा, पण योग्य काल आलेला दिसताच घडा दगडावर आपटून फोडावा त्याप्रमाणे शत्रूचा नाश करावा.

कर्मणा येन केनैव मृदुना दारुणेन च ।
उद्धरेद्दीनमात्मानं समर्थो धर्ममाचरेत् ।।

अर्थ – सौम्य असो अथवा दारुण असो, प्रसंगी जे युक्त कर्म करून राजाने आपला दीनदशेतून उद्धार करून घ्यावा, प्रथम समर्थ व्हावे आणि सामर्थ्य आल्यानंतर धर्म आचरावा.

राज्यसंस्थेवरील नियंत्रणे – प्राचीन राज्यपद्धतीत राजा हा राज्याचा कर्ता धर्ता असला, तरी तो एकमेव सर्वाधिकारी नसे. राज्यसंस्थेवर निरनिराळ्या अंतर्गत संस्थांची नियंत्रणे असत. ही नियंत्रणे नेहमी राजाला त्याच्या कारभारात उपयुक्तच ठरत असत. राजा जुलमी निघाल्यास त्याला राज्यभ्रष्ट करणे, प्रसंग पडल्यास त्याचा वधही करणे, या गोष्टी या नियंत्रणसंस्थांकडून केल्या जात. ही नियंत्रणे पुढीलप्रमाणे होती –

सभा व समिती – वैदिक वाङ्मयाच्या अध्ययनावरून असे कळते, की तत्कालीन बहुतेक सर्व राज्यांतल्या प्रत्येक गावात लोकांनी निवडलेल्या काही प्रमुख व्यक्तींची सभा असे व राजधानीत संपूर्ण राज्याची केंद्रीय लोकसभा अर्थात समिती असे. वैदिक कालात या संस्थांना शासनव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान होते. याविषयी अथर्ववेदात (७.१२.१) म्हटले आहे ते असे –

सभा च मा समितिश्चावतां प्रजापतेर्दुहितरौ संविदाने।

अर्थ – (राजा म्हणतो) सभा व समिती या दोन प्रजापतीच्या जुळ्या मुली असून, त्या दोघींनी माझे संरक्षण करावे.

ऋग्वेदाच्या अंतिम सूक्तात समितीचा उल्लेख सामाजिक मंडळी किंवा विद्वान मंडळी अशा अर्थाने केलेला असावा, असे वाटते. ऋग्वेदातच आणखी एका ठिकाणी, 'आदर्श राजा आपल्या समितीत जातो, असा उल्लेख आहे (ऋ. १०.१६६.४). एका पदच्युत राजाने पुनश्च सिंहासनारूढ झाल्यावर सर्वांत मोठी आकांक्षा ही धरली आहे, की 'माझ्या कारकीर्दीत समिती नेहमी माझ्या बाजूने राहो' (अथर्व. ६.८८.३). ब्राह्मणाच्या धनाचा अपहार करणाऱ्या राजाला असा शाप दिला जात असे, की 'तुझी समिती तुला साथ न देवो' (अथर्व. ५.१९.१५).

समितीचे सदस्य समाजातले प्रतिष्ठित व धनिक लोक असत, त्यामुळेच शासनावर त्यांचा प्रभाव राहत असे. मात्र ही समिती निर्वाचित असे का सरकारनियुक्त असे, हे वैदिक वाङ्मयावरून समजत नाही. पण आश्चर्याची गोष्ट ही, की ऋग्वेद व अथर्ववेद यांच्या काळात इतकी प्रमुख व प्रभावशाली असलेली राजनियंत्रक संस्था ब्राह्मणकालात जवळजवळ लुप्त झाली. नाव राहिले; पण स्वरूप बदलले. ती राजाला केवळ सल्लामसलत देणारी संस्था राहिली. या समितीच्या बैठकी वारंवार होत असत आणि तिचा सभापतीही असे (वाज. सं. १६.२४). या समि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तीचे स्थान पुरोहिताच्या बरोबरीचे असे (ऐ. ब्रा. ८.२१).

सभा व समिती यांच्या बरोबरीने विदथ असाही एक शब्द वैदिक वाङ्मयात आढळतो. त्याविषयी श्री. बाळशास्त्री हरदास लिहितात –

" वेदकाळी समितीच्या अंतर्गत असणारी एक ' विदथ ' नावाची संस्था होती. राष्ट्राचे सैनिकी जीवन नियंत्रित करणे हे तिचे काम होते. विदथ म्हणजे सेनाविभाग, असेही काही विचारकांचे मत आहे. सभा, समिती व सेना या तीन लोकसंस्थांचे स्वतंत्र अस्तित्व अथर्ववेदाने ' तं सभा च, समितिश्च, सेना च ' या वाक्याने स्पष्ट केले आहे. काही लोकांच्या मते विदथ हीच मूळ संस्था असून, ती विकसित झाल्यावर सभा, समिती व सेना असे तिचेच तीन प्रकार झाले आहेत. पण या म्हणण्यास निर्णायक पुरावा उपलब्ध नाही. विदथ संस्थेचा उल्लेख ऋग्वेदात पुढीलप्रमाणे आढळतो. ऋग्वेदाच्या प्रथम मंडलात, ६० व्या सूक्तातील पहिल्याच ऋचेत ' विदथस्य केतुं ' या नात्याने अग्नीचे वर्णन आहे. ऋग्वेदाच्या तृतीय मंडलातील अडतिसाव्या सूक्तात " विदथस्य धीभिः क्षत्रं राजाना प्रदिवो दधाथे " असा उल्लेख असून, त्यावरून विदथमध्ये होणाऱ्या चर्चेतून राजाला विशिष्ट धोरणासंबंधीचे मार्गदर्शन मिळे हे उघडच दिसते. "

पौर–जानपद – पौर म्हणजे नागर व जानपद म्हणजे ग्रामीण लोक होत. यांच्या वेगवेगळ्या समित्या असत. या समित्यांच्या संमतीविना राजाला कोणतीही महत्त्वाची गोष्ट करता येत नसे. राज्याचा वारस ठरवण्याच्या बाबतीतही पौर-जानपदांचे मत प्रभावी असे. याविषयी महाभारतातले पुढील उदाहरण निर्णायक आहे – प्रतीप राजाला देवापी, शांतनू व बाल्हीक असे तीन मुलगे होते. त्यांपैकी देवापी हा ज्येष्ठ पुत्र असल्यामुळे राज्याचा वारस ठरत होता. तो इतर सर्व दृष्टींनी योग्य असला तरी त्याला कातडीचा काही रोग होता. राजाने त्यालाच राज्य द्यायचे ठरवून त्याच्या अभिषेकाची सिद्धता केली. पण पौर-जानपदांना ती गोष्ट आवडली नाही. त्यांनी देवापीचा राज्याभिषेक बंद पाडला व शांतनूला राज्याचा वारस ठरवले (म. भा. उद्योग. १४९).

राज्याचा मुख्य प्रधानही राजाला पौर-जानपदांच्या संमतीवाचून निश्चित करता येत नसे. याविषयीचा श्लोक असा –

तस्मै मन्त्रः प्रयोक्तव्यो दण्डमाधित्सता नृप ॥
पौरजानपदा यस्मिन् विश्वासं धर्मतो गताः ॥

अर्थ – हे राजा, दंडनीती नीट चालवू इच्छिणाऱ्या राजाने पौर-जानपदांना ज्याच्याविषयी अत्यंत विश्वास असेल अशालाच राज्याचा मुख्य मंत्री करावे.

राज्ययंत्राच्या धोरणाविषयी प्रधानमंडळात चर्चा झाल्यावर पौर-जानपदांना संमत असेल तरच ते धोरण व्यवहारात आणावे असा विचारही महाभारतात प्रकट केला आहे – आठ मंत्र्यांच्या मध्ये बसून राजाने चर्चा केल्यानंतर ठरविलेले धोरण पौर-जानपदांकडे पाठवावे व त्यांच्या प्रतिनिधीला दाखवावे. धोरण गंभीर विषयासंबंधीचे असो किंवा सामान्य विषयासंबंधीचे असो; राजाने प्रजेशी वागताना याच धोरणाचा अवलंब केला पाहिजे (म. भा. शांति. ८५.११–१५).

तपस्वी ब्राह्मण – हे नियंत्रण नैतिक स्वरूपाचे असे. लौकिक धनमानादिकांचा परित्याग करून अरण्यात राहणारे ऋषी हे राजा व प्रजा या दोहोंच्याही विश्वासाला सारख्याच प्रमाणात पात्र असत. त्यांना राज्यसंस्थेकडून कोणत्याही लाभाची किंवा मानाची अपेक्षा नसे. भारतीय इतिहासातला कितीतरी भाग अशा त्यागी, तपस्वी व विद्वान ऋषींच्या वर्णनाने भरलेला आहे. राष्ट्र संकटात सापडले अथवा काही महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला म्हणजे राजे लोक मार्गदर्शनासाठी या वर्गाकडे येत असत. गणराज्यांत भेद उत्पन्न झाल्यावर तो कसा नष्ट होईल व लोक सुखी कसे होतील याविषयी प्रत्यक्ष श्रीकृष्णानेही नारदमुनींचा विचार घेतला होता, असे महाभारतावरून कळते. अशा ज्ञानी ऋषिवर्गातूनच राजा आपला पुरोहित निवडीत असे. राजाने पुरोहित केलाच पाहिजे, असे महाभारतात सांगितले आहे (शांति. ७३.१).

वाल्मीकी रामायणात या संबंधात एक कथा दिलेली आहे, ती अशी –

विश्वामित्र ऋषी दशरथाच्या दरबारात येऊन त्याने आपल्या यज्ञाच्या रक्षणासाठी राम-लक्ष्मणांना आपल्या बरोबर पाठव, असे दशरथाला सांगितले. ' मागशील ते देईन ' असे आधी त्याने दशरथाकडून वचन घेतले होते; पण दशरथ पुत्रमोहामुळे त्या वचनाला पराङ्मुख होऊन विश्वामित्राची मागणी अमान्य करू लागला. त्या वेळी वसिष्ठाने पुढे होऊन दशरथाला निर्भय शब्दांत आदेश दिला- ' दशरथा, कोणत्याही स्थितीत धर्माचा त्याग करणे तुला शोभणारे नाही. कसलेही दुःख आले तरी तुला धर्मप्रमाणेच वागले पाहिजे. आधी एखादी गोष्ट कबूल करून मग जर ती तू नाकारशील, तर तुझ्या आजवर संपादिलेल्या पुण्याला व पावित्र्याला कलंक लागेल. त्यासाठी दिलेल्या वचनानुसार तू रामलक्ष्मणांना विश्वामित्राच्या स्वाधीन कर. ' वसिष्ठाचा हा निर्णय दशरथाला मान्य करावा लागला.

अमात्यसंस्था – राजा म्हटला, की त्याला मंत्री हे असलेच पाहिजेत. मनू म्हणतो – स्वतःला उत्कृष्ट विचार करता येत असला आणि अंगी केवढेही कौशल्य असले, तरी एकट्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजाने मंत्र्यांना बगळून कोणताही निर्णय घेऊ नये. असे न करता स्वच्छंद वागणारा राजा स्वतःवर अनर्थ ओढवून घेतो, प्रजा त्याला दुरावते आणि त्याच्या राज्याचीही शकले उडतात (मनु. ७.५७). महाभारतातही असेच विचार मांडलेले आहेत (शांति. ८३).

मंत्रिमंडळ – प्राचीन भारतीय आचार्यांनी मंत्रिमंडळ हे राज्यसंस्थेचे एक महत्त्वपूर्ण अंग मानले आहे. महाभारतात म्हटले आहे, की प्राणिमात्र जसे पावसावर, ब्राह्मण जसे वेदांवर आणि स्त्रिया जशा आपल्या पतीवर अवलंबून असतात, तेवढ्याच प्रमाणात राजा आपल्या मंत्र्यांवर अवलंबून असतो (उद्योग. ३७-३८). ज्याप्रमाणे एका चाकावर रथ चालत नाही, त्याचप्रमाणे मंत्र्यांच्या मदतीवाचून एकटा राजा राज्य चालवू शकत नाही, असे अर्थशास्त्रात म्हटले आहे. मनू म्हणतो –

अपि यत्सुकरं कर्म तदप्येकेन दुष्करम् ।
विशेषतोऽसहायेन किं नु राज्यं महोदयम् ।
(मनु. ८.५३)

अर्थ – सुकर कार्यही एका माणसाला अन्य कोणाच्या साहाय्यावाचून दुष्कर होते; मग राज्य चालवण्यासारखे महान कार्य मंत्रिगणांच्या साहाय्यावाचून पार पडणे कसे शक्य आहे ?

शुक्रनीतीत म्हटले आहे – शहाणा राजाही सर्व गोष्टी समजू शकत नाही. व्यक्तिगणिक बुद्धिवैभव वेगवेगळे असते. म्हणून राजाने आपल्या राज्याच्या अभिवृद्धीसाठी योग्य मंत्री नियुक्त करावे. अन्यथा त्याच्या राज्याचा अधःपात अटळ आहे.

ऋग्वेद आणि अथर्ववेद यांमध्ये राजाचा निर्देश होतो; पण मंत्र्यांचा नाही. यजुर्वेद संहिता आणि ब्राह्मणग्रंथ यांमध्ये मात्र राज्यसंस्थेतल्या काही उच्च अधिकाऱ्यांचा उल्लेख आढळतो. या अधिकाऱ्यांना रत्नी असे म्हटले आहे. रत्नी हे राजपरिषदेचे सदस्य असावे. मात्र भिन्न भिन्न ग्रंथांत त्यांची नावे वेगवेगळी दिली आहेत. कोणत्या रत्नीचे कोणते काम हे समजणेही कठीण आहे. या रत्नींची नावे अशी - पट्टराणी, पुरोहित, सेनानी, सूत, ग्रामणी, संग्रहीता, भागधुक्, क्षत्ता, अक्षावाप, पालागल, गोविकर्त, तक्षा, रथकार इत्यादी.

या रत्नींचे स्थान राज्यामध्ये उच्च समजले जात असे. राजसूय यज्ञाच्या प्रसंगी राजा स्वतः रत्नींच्या घरी जाऊन तिथे इष्टी करीत असे. रत्नींचे हे महत्त्व लक्षात घेऊन 'ते वै राष्ट्रस्य प्रदातारः' = रत्नी हे राजाला राज्य देणारे असतात, असे तैत्तिरीय ब्राह्मणात म्हटले आहे (१.८.३).

वैदिक यज्ञाचा प्रचार हळूहळू कमी होऊ लागल्यावर त्याच प्रमाणात रत्नींचाही अस्त होऊ लागला. पुढे रत्नींचे स्थान त्यांच्याहून प्रभावशाली अशा एका संस्थेने घेतले. संस्था म्हणजेच मंत्रिमंडळ किंवा अमात्यपरिषद ही होय. ऐतिहासिक काळातही मंत्रिमंडळ हे राज्यसंस्थेचे महत्त्वाचे अतएव अविच्छेद्य अंग राहिले. भारतातले सर्वांत ऐतिहासिक राज्य मगधाचे होय. त्या राज्याचा राजा अजातशत्रू याला वस्सकार नावाचा एक महामात्य होता, असे बौद्ध वाङ्मयावरून कळते. त्याचा समकालीन कोशल राजा प्रसेनजित याला मृगधर व श्रीवृद्ध नावाचे दोन मंत्री होते. जातकांमध्ये मंत्र्यांचे उल्लेख वारंवार मिळतात. शिलालेखादी साहित्यात मौर्य व शुंग यांच्या मंत्रिपरिषदेचे वर्णन आढळते. गुप्त सम्राटांच्या लेखांतही मंत्र्यांचा वारंवार उल्लेख येतो.

काही काही राज्यांत मंत्रिमंडळाला फार मोठे अधिकार असत. मौखरींचे राज्य हे या बाबतीत उदाहरण म्हणून सांगता येईल. त्या वंशाचा शेवटचा राजा अकस्मात आणि निपुत्रिक अवस्थेत मरण पावला असता, त्याच्या मंत्र्यानीच स्वतःच्या हिमतीवर हर्षवर्धनाला मौखरींच्या सिंहासनावर बसवले. परमार राजा यशोवर्मा याच्या एका लेखात महाप्रधान म्हणून पुरुषोत्तमदेवाचे नाव येते. दक्षिण भारतातल्या अनेक लेखांवरून कळते, की मंत्र्यांना सामंत राजाप्रमाणेच महासामंत किंवा महामंडलेश्वर अशी उपाधी दिली जात असे.

मंत्रिमंडळात सदस्य किती असावे याविषयी मात्र मतभेद आहेत. मनू म्हणतो –

सचिवान् सप्त चाष्टौ वा कुर्वीत सुपरीक्षितान् ।
(मनु. ७.५४)

अर्थ – राजाने चांगली परीक्षा करून सात किंवा आठ मंत्री नेमावे.

मंत्री किती असावे याविषयी कौटिल्याचे मत असे –

एको मन्त्री न कर्तव्यः । एको निरवग्रहश्चरति मुह्यति च कार्यकृच्छ्रेषु । द्वावपि मन्त्रिणौ न कर्तव्यौ । तौ संहतौ चरन्तौ भक्षयन्तौ गृहीतौ च विनाशयतः । अतः पञ्च सप्त वा मन्त्रिणः कार्याः ।।

अर्थ – एक मंत्री कधीही करू नये. कारण तो एखाद्या वेळी लहरीप्रमाणे वागू लागतो किंवा कठीण प्रसंगी त्याला मोहही होण्याचा संभव असतो. दोन मंत्रीही करू नयेत. कारण ते परस्परांत संगनमत करून आपला स्वार्थ साधण्याचा उद्योग सुरू करतात. आणि ते जर राजाच्या ध्यानात आले, तर ते राजाचाच नाश करतात. म्हणून पाच किंवा सात मंत्री राजाने नेमावे.

मंत्रिमंडळातील संख्येविषयी निरनिराळ्या ग्रंथकारांची मते वेगवेगळी आहेत. सामान्यतः मंत्रिसंख्या आठ असावी, असा संकेत दिसतो. इतिहासकाळात छत्रपती शिवाजीमहाराजांचे मंत्रीही आठच होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंत्र्यांची नावे शुक्रनीतीत सांगितली आहेत, ती अशी –

(१) सुमंत्र – याच्याकडे अर्थखाते असावे. आयव्यय किंवा अर्थसंकल्प याच्यावर त्याचाच अधिकार असावा. वैदिक काळात याला संग्रहीता व मौर्य काळात समाहर्ता म्हटलेले आहे. मंत्रिमंडळात याचे स्थान महत्त्वाचे असे.

(२) पंडितामात्य – याच्याकडे धार्मिक बाबतीत राजाला सल्लामसलत देणे हे काम असे. प्राचीन धर्म, युगधर्म, लोकधर्म इ. धर्मांचा विचार करून त्याने राजाला सल्ला द्यायचा असे.

(३) मंत्री – काही जणांच्या मते याच्याकडे गृहखाते तर काहींच्या मते परराष्ट्रसंबंधाचे खाते असे. भारतात प्राचीन काळी छोटी छोटी अनेक राज्ये होती. त्यामुळे राज्यांच्या सरहद्दीचे प्रश्न अनेक वेळा उपस्थित होत. त्यामुळे परराष्ट्रसंबंध खात्याला फार महत्त्व असे. म्हणून हा मंत्री साम, दान, दंड आणि भेद हे उपाय तारतम्याने योजण्यात कुशल व अनुभवी असावा, असे म्हटले आहे.

(४) प्रधान – हा मंत्रिमंडळाचा प्रमुख होय. हा सर्वदर्शी असावा. त्याचे अनुशासन राज्यात सर्वत्र असले पाहिजे.

(५) सचिव – याच्याकडे युद्धविषयक खाते असे. याला सचिव म्हटले असले तरी मौर्य कालात तो सेनापती आणि गुप्त काळात महाबलाधिकृत या नावाने ओळखला जाई.

(६) अमात्य – राज्यातील गावे, शहरे, इ. चा महसूल वसूल करणे ही कामे याच्याकडे असत. त्याला शेतीविषयक ज्ञानही चांगले असले पाहिजे, अशी अपेक्षा असे.

(७) प्राड्विवाक – याच्याकडे न्यायखाते असे. राजाच्या गैरहजेरीत त्याचा प्रतिनिधी म्हणून हा न्यायदानाचे कार्य करी.

(८) प्रतिनिधी – हा राजातर्फे बरीच कामे पाहत असे. काही विद्वानांच्या मते तो पौर-जानपदांनी निवडून दिलेला अधिकारी असावा.

आदर्श मंत्री हा त्या देशाचा रहिवासी, उच्च कुलातला, प्रतिष्ठित, दूरदर्शी, प्राज्ञ, मेधावी, निर्भय, वाक्पटू, चतुर, प्रत्युत्पन्नमती, उत्साही, मनस्वी, चारित्र्यसंपन्न, स्वामिभक्त, पराक्रमी व आरोग्यसंपन्न असावा, असे अर्थशास्त्रात सांगितले आहे (अर्थ. १.५). खरे पाहू जाता असा सर्वगुणसंपन्न मंत्री मिळणे दुरापास्तच म्हटले पाहिजे. पण मंत्री नेमताना राजाने वरील आदर्श ध्यानी घेऊन शक्य तेवढा चांगला मंत्री नेमावा, यासाठी ही गुणवत्ता सांगितली आहे.

मंत्रिमंडळाव्यतिरिक्त राजाला सल्लामसलत देणारी आणखी एक मोठी संस्था होती, तिच्या सदस्यांना अमात्य म्हणत. महाभारतात ३६ सदस्यांच्या अमात्यपरिषदेचा उल्लेख आहे (शांति. ८५.७–८). अमात्यांची संख्या अधिक असली तरी त्यांचे स्थान मात्र मंत्र्यांच्या खालचे असे. त्यांचे वेतनही मंत्र्यांपेक्षा कमी असे. पण राज्यावर एखादा कठिण प्रसंग गुदरल्यास त्या वेळी मंत्र्यांच्या बरोबर अमात्यांनाही सल्लामसलतीसाठी बोलावले जात असे.

राज्याची देश-परदेशविषयक नीती निर्धारित करणे, ती कार्यवाहीत आणणे, त्या कामी येणाऱ्या अडचणी दूर करणे, राज्याचे आय-व्यय यामध्ये संतुलन ठेवणे, त्यावर नियंत्रण ठेवणे, राजकुमारांच्या शिक्षणाची व्यवस्था करणे, शेजारी राज्यांतले राजे आणि साम्राज्यातले कर देणारे सामंत यांच्या चालीवर लक्ष ठेवणे, इ. गोष्टी मंत्र्यांना कराव्या लागत. मंत्र्यांचे सर्वांत मोठे आणि पहिले कर्तव्य हे असे, की राजा कुमार्गाने जाऊ लागला तर त्याचा निरोध करणे आणि त्याच्यावर नियंत्रण ठेवणे. जे मंत्री उन्मार्गगामी राजाला ताळ्यावर आणतात, तेच खरे राजाचे सुहृद होत, असे कामंदकाने म्हटले आहे. जे मंत्री प्रभावशाली असत, ते राजाला कर्तव्यच्युत होऊ देत नसत. चंद्रगुप्त मौर्य हा कौटिल्याच्या अधीन होता. कौटिल्यानेच चंद्रगुप्ताकडून साम्राज्याची स्थापना करवली. अशोकाला आडमाप दाने करण्याचा छंद होता. पण त्याच्या मंत्र्यांनी त्याला आळा घातला. श्रावस्तीचा राजा विक्रमादित्य याला विपुल द्रव्याचे दान करण्याची इच्छा होती. पण विक्रमादित्याची ही अविवेकी दानप्रवृत्ती त्याच्या मंत्र्यांनीच रोखून धरली.

सामान्यपणे मंत्रिमंडळाची बैठक राजाच्या अध्यक्षतेखालीच होत असे. अशा परिषदेत एखाद्या मंत्र्याने अप्रिय पण हितकारक असे भिन्न मत दर्शवल्यास राजाने त्या मंत्र्यावर रागावू नये, असे बार्हस्पत्य अर्थशास्त्रात म्हटले आहे. मनूच्या मताप्रमाणे राजाने मंत्रिमंडळाच्या बैठकीत किंवा एकेकाशी अलग विचारविनिमय करावा. राजाच्या समक्ष त्याच्या विरुद्ध मत देणे कित्येकदा मंत्रिजनांना कठीण होत असावे. अशा वेळी मंत्र्याने आपले मत सप्रमाण लिहून राजाकडे पाठवावे, असे शुक्रनीतीत सांगितले आहे. सामान्यतः मंत्रिमंडळाने एकत्रित विचारविमर्श करून संयुक्त रूपाने राजाला सल्ला द्यावा. तसेच अशा उत्तम मंत्राचे राजाने स्वागत करावे आणि तो मंत्र अमलात आणावा, असे कौटिल्य सांगतो (अर्थ. १.६).

सामान्यपणे राजा आपल्या मंत्रिजनांचा मान ठेवीत असे व मंत्रीही स्वामिनिष्ठ असत. मंत्री हे राज्याचे आधारस्तंभ मानले जात व राजा सामान्यपणे त्यांच्या विचाराने चाले. राष्ट्रकूट राजा कृष्ण (तिसरा) याने आपल्या नारायण नावाच्या मंत्र्याला आपला उजवा हात म्हटले आहे. पयरीचा राजा परबल हा आपल्या मंत्र्याला 'शिरसावंदनीय' मानी. यादवनरेश कृष्ण याच्या एका लेखात प्रधानमंत्र्याला राजाची जिव्हा आणि उजवा हात असे गौरवाने म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज्यसंरक्षण – राज्य म्हटले की त्याच्या संरक्षणासाठी काही उपाय अत्यावश्यक असतात. किल्ले, कोट, खंदक, सैन्य, आयुधे, हत्ती, घोडे, रथ, इ. गोष्टींचा प्राचीन राजनीतिशास्त्रात संरक्षणाच्या दृष्टीने विचार केला आहे. संरक्षणासाठी बांधलेल्या मजबूत कोटांचा निर्देश ऋग्वेदात आहे; पण हे कोट मूळ जमातींचे असावे; कारण इंद्राने ते उद्ध्वस्त केले, असे ऋग्वेदात म्हटले आहे. वैदिक आर्यांना स्वतःचे संरक्षण करण्यासाठी किल्ले बांधण्याची आवश्यकता वाटली नाही. इथल्या मूळच्या जमातींपासून त्यांना भीती उरली नव्हती. एक तर त्यांचा समूळ उच्छेद झाला होता किंवा ते आर्यांपुढे युद्धात निभाव न लागल्यामुळे दुर्गम पहाडी प्रदेशात पळून गेले होते. आर्यांच्या गणांचे आपापसात संघर्ष होत, पण ते फारसे तीव्र नसत. एखाद्या गणाला दुसऱ्या गणापासून फारच उपद्रव होऊ लागला, तर तो स्थलांतर करून दुसरीकडे जात असे व तिथे स्थायिक होत असे. मुख्यतः याच रीतीने पाठीमागच्या गणांकडून पुढे पुढे रेटले गेलेले आर्यांचे गण गंगा–यमुनांच्या खोऱ्यामधून पूर्व दिशेला व आग्नेयी दिशेला पसरत गेले व तिथे तिथे स्थायिक झाले, असे ब्राह्मणग्रंथांवरून कळून येते.

वेदकाळी ज्याप्रमाणे संरक्षणासाठी दुर्गांची आवश्यकता भासली नाही, त्याचप्रमाणे खडे सैन्य उभारण्याचीही गरज वाटली नाही. कारण गणांतील प्रायः सर्व पुरुष युद्धासाठी सदैव सिद्ध असत. विशांमधले लोकही लढाईत मागे नसत. फरक सांगायचा तर तो एवढाच, की राजन्य म्हणजे क्षत्रिय मुख्यत्वे रथात बसून लढत, तर विश लोक पदाती म्हणून लढत.

वैदिक वाङ्मयात राज्यांच्या परस्पर संबंधाविषयी निश्चित स्वरूपाची माहिती आढळत नाही. राजापेक्षा वरच्या दर्जाचे वाटतील अशा सम्राट, विराट, इ. अधिपतींचा निर्देश आढळतो हे खरे. पण नंतरच्या काळात जी साम्राज्यकल्पना उदयाला आली, तशा प्रकारची कल्पना त्या शब्दांवरून करणे उचित नव्हे. दुसऱ्या राजाचा प्रदेश पादाक्रांत करून आपल्या राज्याचा विस्तार करणे अथवा तिथल्या राजाला आपला मांडलीक बनवणे, अशा तऱ्हेच्या कल्पना वैदिक वाङ्मयात आढळत नाहीत. पुढे स्मृतिकाळात विस्ताराने बरीच मोठी आणि स्थायी स्वरूपाची राज्ये अस्तित्वात आली आणि मग मात्र राज्याच्या संरक्षणासाठी दुर्ग आणि सैन्य ही दोन साधने आवश्यक ठरली. राज्याच्या सात प्रकृतींमध्ये त्यांचा अंतर्भाव झाला. कौटिल्याने या दोन्ही साधनांचा तपशिलवार विचार केला असून, श्री. र. पं. कंगले यांच्याच शब्दांत तो पुढे दिला आहे–

"अर्थशास्त्रात सांगितलेल्या सीमेवरील चार दुर्गांचा आणि तेथील अंतपालांचा मागे उल्लेख केलाच आहे. ह्या दुर्गांमुळे शत्रूच्या सैन्याला राज्यात घुसण्यास प्रतिबंध करता येईल. ह्या सीमादुर्गांशिवाय राजधानीच्या ठिकाणी बांधावयाच्या मुख्य दुर्गाचे अर्थशास्त्रात सविस्तर वर्णन आहे. सीमेवरील दुर्ग तेथील भूप्रदेशाच्या अनुरोधाने जलदुर्ग पर्वतदुर्ग, मरुदुर्ग आणि वनदुर्ग यांपैकी कोणत्याही प्रकारचे करावेत. पण राजधानीचा मुख्य दुर्ग पक्का बांधून तयार केला पाहिजे. सभोवार तीन खंदक खणून व त्यांतील मातीचा आत कोट उभारून, त्याच्यावर विटांनी अगर दगडांनी बारा ते चोवीस हात उंच व उंचीच्या निम्म्याने रुंद अशी पक्की भिंत बांधावयास सांगितले आहे. त्यावरील मनोरे, बुरूज, भिंतीतील दरवाजे इत्यादींचे वर्णन करून, संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक अशा सर्व योजनांचे दिग्दर्शन केले आहे. ह्या दुर्गामध्ये चारही प्रकारचे सैन्य ठेवावयाचे आहे; पण ते सैन्य निरनिराळ्या स्वतंत्र अधिकाऱ्यांच्या हुकमतीखाली असावे, असे म्हटले आहे. सर्व शिबंदीवर एकच मुख्य अधिकारी नेमला तर तो शत्रूला फितुर झाल्यास अगर राजद्रोही बनल्यास अनर्थ ओढवण्याचा संभव आहे, म्हणून ही व्यवस्था सुचविली आहे. शिवाय राजा स्वतः राजधानीच्या ठिकाणी असल्यामुळे तेथील सर्व सैन्यावर एकमुखी ताबा त्याचाच असणार. हा दुर्ग म्हणजे बलहीन राजाचे अंतिम आश्रयाचे ठिकाण. यास्तव त्यात धान्य, शस्त्रास्त्रे वगैरे भरपूर प्रमाणात नेहमी साठविलेली असली पाहिजेत. जरूर पडल्यास गुप्त मार्गाने दुर्गातून निसटून जाण्याची सोय करून ठेवणेही आवश्यक आहे.

मनुस्मृतीत धन्वदुर्ग म्हणजे मरुदुर्ग, महीदुर्ग म्हणजे जमिनीवर बांधलेला किल्ला, जलदुर्ग, वृक्षदुर्ग म्हणजे वनदुर्ग, नृदुर्ग म्हणजे सुसज्ज सेनारूपी दुर्ग आणि गिरिदुर्ग अशा सहा प्रकारच्या दुर्गांचा उल्लेख आहे. यांपैकी नृदुर्ग हा खऱ्या अर्थाने दुर्ग नाही. बाकीच्या पाचांचा कौटिल्यानेही निर्देश केला आहे. मनुस्मृतीत सीमेवरील दुर्ग व राजधानीचा दुर्ग असा भेद केलेला नाही. राज्यात एकच दुर्ग असावा व तो राजधानीच्या ठिकाणीच असावा हे अभिप्रेत आहे. अर्थशास्त्रातही काही ठिकाणी हीच कल्पना गृहीत धरलेली दिसते. सर्व प्रकारच्या दुर्गांत गिरिदुर्ग श्रेष्ठ, असे मनूने म्हटले असून, दुर्ग आवश्यक का हे सांगताना असे प्रतिपादन केले आहे, की तटावर असलेला एक योद्धा जमिनीवरील शंभर योद्ध्यांचा मुकाबला करू शकतो.

दुर्ग असला तरी राज्याच्या संरक्षणाचा मुख्य भार दंड म्हणजे सैन्यावरच पडतो. सैन्य असल्याशिवाय शत्रूच्या हल्ल्यापासून राज्याचा बचाव करणे अशक्य आहे. अर्थशास्त्रात एके ठिकाणी केलेल्या विवेचनावरून असा बोध होतो, की चारही वर्णांतील पुरुषांची सैन्यात भरती होत असावी. प्राचीन आचार्यांचे असे मत असल्याचा उल्लेख आहे, की तेजःप्राधान्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळे ब्राह्मण सैन्य लढण्याच्या कामी अधिक उपयोगी ठरेल आणि त्याच्या खालोखाल क्रमाने क्षत्रिय सैन्य, वैश्य सैन्य, शूद्र सैन्य उपयोगी पडतील. हे मत खोडून काढताना कौटिल्याने असे म्हटले आहे, की शत्रू प्रणिपाताने ब्राह्मण सैन्याला निवृत्त व्हावयास लावण्याची शक्यता आहे, म्हणून युद्धात तरबेज असे क्षत्रिय सैन्य उत्तम किंवा खूप मोठे असे वैश्य व शूद्र यांचे सैन्य चांगले. जरी सर्व वर्णांचे लोक युद्धात भाग घेऊ शकत असत असे दिसले, तरी लढण्याचा प्रभार मुख्यतः क्षत्रिय सैन्यावरच पडत असे यात शंका नाही. लढणे हा क्षत्रियाचा स्वधर्म मानला आहे. मनुस्मृतीत ब्राह्मणाला क्षत्रिय धर्माने वागण्याची परवानगी फक्त आपत्काली, म्हणजे जेव्हा त्याला त्याच्या स्वधर्माप्रमाणे वागून उपजीविका प्राप्त करता येत नसेल तेव्हा, दिली आहे. इतर दोन वर्णांना तो अधिकार दिलेला दिसत नाही.

साधारणपणे सेनेची हत्ती, रथ, अश्व आणि पदाती अशी चार अंगे किंवा विभाग मानले गेले आहेत. हे विभाग उभारून त्यांना युद्धकुशल व सुसज्ज बनविण्याची कामगिरी हस्त्यध्यक्ष, रथाध्यक्ष, अश्वाध्यक्ष आणि पत्त्यध्यक्ष यांनी करायची आहे. ज्या वेळेस युद्धाचा प्रसंग उद्‌भवून सैन्याची जमवाजमवी करायची असते, त्या वेळेस सहा प्रकारचे सैन्य विचारात घ्यावे लागते. मौलबल, भृतबल, श्रेणीबल, मित्रबल, अमित्रबल आणि अटवीबल अशा ह्या सहा प्रकारच्या सैन्यांतून त्या प्रसंगी वापरावयास सर्वांत सोईच्या अशा प्रकारांची निवड केली पाहिजे. मौलबल म्हणजे वंशपरंपरेने राजघराण्याशी एकनिष्ठ असणाऱ्या लष्करी पेशाच्या कुटुंबांतून उभारलेले खडे सैन्य. हे सैन्य अर्थातच सर्वोत्कृष्ट मानले गेले आहे. आणि प्रबल शत्रूशी सामना द्यावयाचा असल्यास ह्याचाच मुख्यतः उपयोग केला पाहिजे. त्याच्या खालोखाल भृतबल म्हणजे पगारी सैन्य उपयुक्त ठरेल. मौलबलालाही पगार असणारच. पण ह्या दोहोंत फरक असा दिसतो, की भृतबल जरूर तेव्हाच उभारावयाचे असे आहे; मौलबलासारखे कायम स्वरूपाचे नाही. श्रेणीबल म्हणजे शांततेच्या काळी कृषी वगैरे व्यवसाय करणाऱ्या, परंतु जरूर पडल्यास शस्त्र धारण करणाऱ्या संघांचे सैन्य. लढवय्या जमातींच्या श्रेणींचे हे सैन्य सरकारी सैन्याहून भिन्न असून, त्याच्यावर त्यांचे स्वतःचे सेनापती असत असे दिसते. मित्रबल म्हणजे एखाद्या मित्रराजाकडून साहाय्यार्थ आलेले सैन्य. अमित्रबल म्हणजे एखाद्या शत्रूपासून जिंकून घेतलेले, विकत घेतलेले, उसने अगर भाड्याने आणलेले सैन्य. एका शत्रूशी अशा तऱ्हेचा व्यवहार करून दुसऱ्या शत्रूशी लढता येते, हे अर्थशास्त्रावरून स्पष्ट आहे. अटवीबल म्हणजे शबर, पुलिंद प्रभृती अरण्यनिवासी लोकांचे सैन्य. ह्या सैन्यावरही त्यांचे स्वतःचे सेनाधिकारी असत. कौटिल्याने म्हटले आहे, की ह्या शेवटच्या दोन प्रकारच्या सैन्यांचा वापर सावधगिरीने केला पाहिजे. कारण युद्धात त्यांचे लक्ष केवळ लुटीकडे असण्याचा संभव असतो.

सैन्य नेहमी युद्धक्षम रहावे यासाठी कौटिल्याने त्याच्या कवायतीवरही जोर दिला आहे. पूर्णिमा व अमावास्या या दोन तिथी वगळून दररोज सूर्योदयाचे वेळी गावाच्या बाहेर जाऊन चतुरंग दलाने आपापल्या युद्धपद्धतींचा अभ्यास करावा, असे कौटिल्य सांगतो. विविध प्रकारची यंत्रे, आयुधे, आवरणे व उपकरणे राजाने तयार करून घ्यावी. हत्ती, रथ व घोडे सदैव युद्धक्षम ठेवावे. गुप्तचर नेमावे. त्यांच्याकडून सैन्यातील शिलेदारांच्या राजनिष्ठेची तपासणी करावी. गुप्तचरांकडून शत्रूच्या हालचाली जाणून घ्याव्यात. संधी, विग्रह, द्वैधी भाव, आसन (शत्रू दुर्बल होण्याची प्रतीक्षा करणे) व यान (शत्रूवर चाल करणे), इ. गोष्टींचे संरक्षणाच्या संदर्भात कौटिल्याने विवेचन केले आहे."

राज्याची अर्थव्यवस्था – वेदकालाच्या प्रारंभी भारतीय आर्यांची अर्थव्यवस्था प्राथमिक स्वरूपाची होती. वैदिक आर्यांचे वेगवेगळे गट घोडे, गोधन, रथ, इ. स्वरूपात असलेली आपली संपत्ती बरोबर घेऊन भारतात आले असे म्हणतात. यद्यपि त्यांचे जीवन काही अंशी भटक्या टोळ्यांसारखे असले तरी, भारतात आल्यावर ते थोड्याच कालात शेतीच्या व्यवसायाशी परिचित झाले. ऋग्वेदातील कृषिविषयक अवजारे आणि कृषिविषयक देवता यांच्या उल्लेखांवरून हे कळून येते. पण ऋग्वेदकाली शेतीपेक्षा गोपालनासच अधिक महत्त्व होते. गोधन हीच संपत्ती मानली जात होती. त्या काळी गुरांचे मोठमोठाले कळप राजाच्या मालकीचे असत; तसेच खाजगी मालकीचेही असत. त्या काळात वाणिज्य व्यवसायाला फारसा वाव नव्हता, हे खरे; पण तरीही ऋग्वेदात वणिज, क्रय, विक्रय, इ. व्यापारविषयक निर्देश आढळतात. पंडितांच्या मते ऋग्वेदात उल्लेखलेले पणी हे व्यापारीच होते. त्या कालातला व्यापार मुख्यत्वे वस्तुविनिमयाच्या स्वरूपातच चालत असावा. वैदिक कालाच्या उत्तरार्धात मात्र अनेक प्रकारचे औद्योगिक व्यवसाय अस्तित्वात आले. ऋग्वेदात काही धातूंचा निर्देश आहे. त्यांच्यावर प्रक्रिया करून उपकरणे वगैरे वस्तू निर्माण करणाऱ्यांमध्ये कर्मार हा सर्वांत प्राचीन कारागीर वर्ग होय. सुवर्णकार, कैवर्त (कोळी), कुलाल (मातीच्या वस्तू बनविणारा), धनुष्यकार, रथकार, तक्षा (सुतार) हे व्यवसायही पुरातनच मानले पाहिजेत. मणिकार, बुरूडकाम करणारा, रंगारी, इ. आणखी काही कारागिरांचा उल्लेख यजुर्वेदात आढळतो. हे सगळे कारागीर वर्ग आपल्या उत्पन्नातला वाटा राजाला कर म्हणून देत असावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजाला देण्याच्या कराची कल्पना वेदांत आहे. पण त्या काळी कर हा शब्द रूढ झाला नव्हता. त्या अर्थी बली हा शब्द वापरला जाई. बली दर वर्षी ठराविक प्रमाणात राजाला देणे आवश्यक होते असे दिसत नाही. तो कदाचित् विशिष्ट प्रसंगी राजाला द्यायचा उपहार असावा. बली मुख्यतः विशांपासून मिळत असे. कारण धनोत्पादन करणारा तोच वर्ग होता.

स्मृतिकाली मात्र अर्थव्यवस्थेत पुष्कळच बदल घडून आला. गोपालन हा दुय्यम व्यवसाय ठरून शेतीला अधिक महत्त्व मिळाले. स्मृतिकालाच्या प्रारंभी गुरांच्या चरण्यासाठी कुरणे म्हणून राखून ठेवलेली जमीन लागवडीखाली आणली जाऊ लागली. याच काळात कृषी, गोरक्ष्य व वाणिज्य या तीन व्यवसायांना मिळून वार्ता ही संज्ञा प्राप्त झाली. याचा अर्थ, ही तीन उपजीविकेची प्रमुख साधने बनली. या तीन साधनांचा विकास राजाने करायचा असे. नवीन वसाहती स्थापणे, तिथे शेतीच्या व्यवसायाला प्रोत्साहन देणे, अधिकाधिक जमिनी लागवडीखाली आणणे, त्यांना नदी, नाले, तलाव, इ. द्वारे पाणी उपलब्ध करून देणे, जंगले वाढवणे, इ. कामे शेतीच्या विकासासाठी राजाने केली पाहिजेत, असे कौटिल्याने सांगितले आहे.

कृषीनंतर गोरक्षणाचा क्रमांक येतो. गुरांपासून दूध-दुभते व नांगरटीच्या कामासाठी बैल हे विपुल प्रमाणात मिळवायचे असल्यास गुरांच्या चाऱ्याची निर्वेध सोय असायला हवी. त्या कामी विवीताध्यक्ष नावाचा अधिकारी नेमून राजाने त्याच्या करवी गोधनाच्या सुखसोयींची व्यवस्था करावी आणि सरकारी मालकीच्या गुरांच्या कळपावर गोध्यक्ष नावाचा अधिकारी नेमावा, असे सांगितले आहे.

तिसरे अर्थसाधन वाणिज्य हे होय. व्यापाऱ्यांना मालाची ने-आण करण्यासाठी सोयिस्कर असे रस्ते राजाने निर्माण करून द्यावे व त्यांच्या संरक्षणाचीही काळजी घ्यावी, असे कौटिल्य सांगतो. जमिनीवरच्या रस्त्यांप्रमाणेच व्यापारी उपयोगासाठी जलमार्गाचीही सोय असावी, असे कौटिल्याने सांगितले असून, नदी-मार्ग, समुद्राच्या किनाऱ्याने जाणारा मार्ग व भर समुद्रातून जाणारा मार्ग अशा तीन जलमार्गांचा विचार केला आहे.

राज्याच्या अंतर्गत चालणारा व्यापार काही अंशी खाजगी व्यापाऱ्यांच्या हाती व काही अंशी सरकारच्या हाती, अशी व्यवस्था अर्थशास्त्रात दिसते.

वरील तीन व्यवसायांखेरीज कौटिल्याच्या काळात खाणी व इतर प्रकारचे उद्योगधंदे यांना महत्त्व आले होते. खाणींचे महत्त्व सांगताना अर्थशास्त्रात म्हटले आहे, ते असे–

आकरप्रभवः कोशः कोशाद्दण्डः प्रजायते ।
पृथिवी कोशदण्डाभ्यां प्राप्यते कोशभूषणा ॥

अर्थ – खाणीपासून कोश म्हणजे खजिना उत्पन्न होतो. ख[जि]न्यामुळे सैन्याची उभारणी करता येते आणि कोश व सैन्य यांच्या साहाय्याने सर्व पृथ्वी जिंकता येते.

या खाणी काही सरकारी मालकीच्या तर काही खाज[गी] मालकीच्या असत. खाजगी क्षेत्रात होणाऱ्या खनिज उत्पन्ना[चा] काही अंश राजाला कराच्या रूपात मिळत असे. खाणीतू[न] काढलेल्या धातू, रत्ने, इ. वस्तूंवर संस्कार करून त्यांच्यापासू[न] विविध वस्तू बनविण्याचे कारखाने असत. सूत व कापड तया[र] करून घेण्याचा व्यवसाय सरकारी क्षेत्रात केला जाई. म[द्य]निर्मिती हाही एक सरकारीच उद्योग होता. सर्व प्रकारच्या कारागिरांवर सरकारचे नियंत्रण असे. त्यामुळे उत्पादन व्य[व]स्थित होऊन सरकारी तिजोरीत भर पडत असे. सरकार[च्या] उत्पन्नाचे व खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची कामगिरी समाहर्ता नावाच्या अधिकाऱ्यावर सोपवीत असे. सरकारी मालकीच्या व्यवसायापासून होणारे उत्पन्न, खाजगी व्यवसाया[वर] बसविलेल्या कराच्या रूपाने मिळणारे उत्पन्न आणि विधि[-]नियम मोडल्याबद्दल किंवा अपराधाबद्दल केलेल्या दंडाच्या रूपा[ने] मिळणारे उत्पन्न, या राज्याच्या उत्पन्नाच्या मुख्य बाबी होत्या.

खर्चाच्या बाबतीत खाजगी आणि कारभारविषयक अशी दोन खाती असलेली दिसतात. अंतःपुर, मुदपाकखाना, देवपि[तृ]पूजा व दानधर्म या बाबी खाजगी खर्चाच्या होत्या. इतर दूत[-]प्रेषण, कोठारे, आयुधागारे, पण्यगृहे, कारखाने, नोकर, इ. वरचा खर्च हा कारभारविषयक खर्च मानला जाई.

कोणतेही राज्य प्रजाजनांकडून व व्यावसायिकांकडून कर घेतल्यावाचून चालणेच शक्य नाही. म्हणून मनुस्मृतीत कर घेण्यासंबंधीचा एक सूत्ररूप विचार सांगितला आहे, तो असा-

यथाल्पाल्पमदन्त्याद्यं वार्योकोवत्सषट्पदाः ।
तथाल्पाल्पो ग्रहीतव्यो राष्ट्राद्राज्ञाब्दिकः करः ॥
(मनु. ७.१२९)

अर्थ – राजाला व प्रजेला आपापल्या कार्याचे फळ ज्या योगे मिळेल असे कर बसवावे. ज्याप्रमाणे जळू रक्त शोषते, वासरू दूध पिते किंवा भ्रमर मध चाखतो त्याप्रमाणे, प्रजेला तापदायक न होतील अशा रीतीने, थोडे थोडे कर घ्यावे.

वैदिक काल व मौर्यकाल यांच्या मधल्या कालखंडात राज्यांची करव्यवस्था कशा प्रकारची असे, याविषयी माहिती फारशी मिळत नाही. मौर्यकालासंबंधी मात्र अर्थशास्त्र, धर्मसूत्रे व स्मृती यांच्यावरून बरीचशी माहिती हाती लागते. तत्कालीन शिलालेख, ताम्रपट आणि ग्रीक लेखकांचे ग्रंथ यांवरून वरील ग्रंथांतील माहितीला उपोद्‌बलक असे पुरावेही मिळू शकतात.

प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या आधारे तत्कालीन करव्यवस्थे[चे]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धान्त प्रा. अळतेकर यांनी सांगितले आहेत, ते असे –

(१) कर न्याय्य व मर्यादित असावे. प्रजेला करांचा बोजा झाल्यास प्रजा जेवढी रुष्ट होते तेवढी अन्य कोणत्याही गोष्टीने नाही (म. भा. शांति. १२.८७). माळी फुले तोडतो; पण झाडाला हानी पोचू देत नाही. राजाने हेच तत्त्व लक्षात धरून करांची आकारणी करावी (पंचतंत्र १.२४३).

(२) योग्य कराची कसोटी ही, की राजा व प्रजा किंवा राजा आणि व्यवसायी यांना आपल्या परिश्रमांचे योग्य फल मिळत आहे, असे वाटावे.

(३) कोणत्याही वस्तूंवर दुबार कर घेतला जाऊ नये.

(४) जर कर वाढवायचा असेल, तर तो एकदम न वाढवता हळू हळू वाढवला जावा.

(५) राष्ट्रावर आपत्ती किंवा परचक्र येईल तेव्हा अतिरिक्त कर लागू करायला हरकत नाही. राजाने प्रजेला अशा वेळी वस्तुस्थिती समजावून द्यावी, म्हणजे प्रजा स्वेच्छेने वाढीव कर देईल. अन्य सर्व उपाय हरले तरच राजाने प्रजेवर अतिरिक्त कर लादावा.

वरील सिद्धान्त हे आदर्श सिद्धान्त आहेत आणि आजच्या युगातही त्यांचे पालन योग्य ठरेल.

करमुक्ती – परिस्थिती पाहून करांत अंशतः किंवा पूर्णपणे सूट देण्याची व्यवस्थाही प्राचीन शास्त्रकारांनी सांगून ठेवली आहे. एखाद्या माणसाने आपल्या प्रयत्नाने बेकार भूमीला कृषियोग्य बनवली आणि पाण्याची सोय करून तिची उत्पादनशक्ती वाढवली, तर शासनाने नाममात्र कर ठेवून ती भूमी त्याला वापरायला द्यावी आणि क्रमाने थोडा थोडा कर वाढवून ४–५ वर्षांनंतर तिच्यावर योग्य तो कर घ्यावा (शुक्रनीती ४.२.१२२).

प्रस्तुत नीतीचे पालन भारतात इ. स. च्या १८ व्या शतकापर्यंत चालू होते, अशी प्रमाणे मिळतात.

नियमित काळात पुरेशा संख्येने सैनिकभरती करणाऱ्या गावांना कर माफ असे.

लुळे, पांगळे, आंधळे, बहिरे यांना त्यांच्या अपंगतेमुळे करमुक्त समजले जाई. विद्यार्थी, अध्यापक व तपोधन ऋषी करमुक्त असत. प्रारंभीच्या काळात स्त्रियांना संपत्तीचा अधिकार नव्हता. त्यामुळे त्यांच्याकडून कर घेण्याचा प्रश्नच नव्हता. पण स्मृतिकाळात त्यांना दायभाग मिळाला आणि त्याही करपात्र ठरल्या.

स्मृतींनी श्रोत्रिय (विद्वान व अध्यापक) ब्राह्मण करमुक्त असावे, या गोष्टीवर भर दिला आहे (मनु. ७.१३३). काही स्मृतींनी तर, समस्त ब्राह्मणवर्गच करमुक्त असावा, असे प्रतिपादन केले आहे (विष्णु. ३.२५). पण या बाबतीत शास्त्रकारांमध्ये मतभेद आहे. या संबंधात महाभारताने स्पष्टपणे सांगितले आहे, ते असे–

> अश्रोत्रियाः सर्व एव सर्वे चानाहिताग्नयः ।
> तान् सर्वान् धार्मिको राजा बलिं विष्टिं च कारयेत् ॥
> (शांति. ७६.५)

अर्थ – जे ब्राह्मण श्रोत्रिय नसतील व अग्नीची उपासना करणारे म्हणजे अग्निहोत्री नसतील, त्या सर्वांवर धार्मिक राजाने कर बसवावा; इतकेच नव्हे तर त्यांना वेठीलाही धरावे.

जो ब्राह्मण वेतनावर नियुक्त आहे, जो सरकारी अधिकारी आहे आणि जो अर्थोत्पादक व्यवसाय करीत आहे, अशा ब्राह्मणाकडून पुरा कर वसूल केला जावा, असेही महाभारतात म्हटल आहे.

देवालयांच्या मालकीची विस्तृत भूमी असल्यास तीही करमुक्त नव्हती. ज्या मंदिरांचे उत्पन्न कमी असेल अशा देवालयांकडून आंशिक कर घेतला जात असे. राज्यांचा कर भरण्यासाठी मंदिरसंस्थेने आपल्या भूमीचा काही भाग विकल्याचीही उदाहरणे आहेत. केव्हा केव्हा तर कराची थकबाकी वसूल करण्यासाठी सरकारच अशा मंदिरांची भूमी विकीत असे.

भूमिकर हेच राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. शिलालेखांवरूनही ही गोष्ट कळते. स्मृतिग्रंथांत कर-आकारणीचा दर निश्चित असा सापडत नाही. शेकडा ८ पासून शेकडा ३३ पर्यंत कर घ्यावा, असे उल्लेख मिळतात (मनु. ८.१३०; गौतम. १०.२४.२७; अर्थशास्त्र ५.२). हा फरक जमिनीच्या सकसनिकसपणावर अवलंबून असावा. पण सामान्यतः उत्पन्नाचा षष्ठांश एवढाच कर घेण्याची पद्धती होती. कर गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना षष्ठाधिकृत म्हणत, यावरून ही गोष्ट कळते.

अर्थशास्त्र व ग्रीक लेखकांचे ग्रंथ यांच्यावरून कळते, की मौर्यांच्या राज्यात भूमिकर शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर शेकडा २५ या हिशेबाने घेतला जात असे. दक्षिणेत चोल राज्यात सामान्यतः भूमिकर शेकडा २० होता आणि सिंचाईची व्यवस्था असलेल्या भूमीवर शेकडा ३३ होता. भौतिक उत्पातामुळे शेतांची नासाडी झाल्यास परिस्थिती पाहून करात योग्य तेवढी सूट दिली जात होती. भूमिकर अन्नधान्याच्या रूपातच घेतला जात होता, याविषयी बरीच प्रमाणे मिळतात. काही लेखांवरून असे कळते, की नवव्या शतकानंतर कुठे कुठे भूमिकर रोख रकमेच्या स्वरूपातही घेतला जात होता. कर बुडवणाऱ्या शेतकऱ्याची भूमी एका निश्चित अवधीनंतर विकून कर वसूल केला जात असे. थकबाकीवर व्याजही आकारले जात असे.

इथे आणखी एक प्रश्न उद्भवतो तो असा, की शेतीच्या भूमीचा स्वामी कोण? सरकार का शेतकरी? जर भूमीचा स्वामी राजा असेल तर शेतकऱ्यांकडून घेतला जाणारा कर हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खंड म्हणून समजावा लागेल. जर शेतकरी जमीनमालक असेल तर मात्र त्याला भूमिकर म्हणता येईल. सांप्रतच्या प्रमाणेच प्राचीन कालातही या प्रश्नात मतभेद होते. मनू म्हणतो, की भूगर्भातल्या निधींचा स्वामी राजा आहे; कारण तो भूस्वामी आहे (८.३९). यावरून केवळ कृषियोग्य भूमीवरच नव्हे; तर राज्यातल्या सर्व भूमीवर राजाचे स्वामित्व निर्माण होते. अर्थशास्त्राचा टीकाकार भट्टस्वामीही म्हणतो, की साऱ्या भूमीवर राजाचाच अधिकार आहे आणि तो इतर कोणाचाच नाही. डायडोरस हा इतिहासकारही म्हणतो, की भारतात भूमीचा स्वामी राजाच मानला जातो. पण या बाबतीत निश्चित काही सांगणे कठीण आहे.

पूर्वमीमांसेवरून असे कळते, की राजा हा एखादा यज्ञ केल्यानंतर सर्वस्व दान करीत असे; पण त्याला प्रजेच्या मालकीच्या भूमीचे दान करता येत नसे (६.७.३). अर्थशास्त्रही राजाची भूमी आणि प्रजेची व्यक्तिगत भूमी यांतला स्पष्ट फरक सांगते (२.२०). नारदाचेही सांगणे आहे, की राजाने प्रजेच्या घर, दार आणि शेत यांच्या स्वामित्वात हस्तक्षेप करू नये. तसे झाल्यास राज्यात अव्यवस्था माजेल (नारद. ९.४२).

प्रागैतिहासिक काळात भूमीवर समाजाचे सामायिक स्वामित्व मानले जात होते, असे काही आचार्यांच्या उल्लेखांवरून कळते (याज्ञ. २.१३३ मिताक्षरावरील). या सामायिक स्वामित्वाचा अर्थ हा होता, की भूमीचे हस्तांतर करण्यावर काही निर्बंध असावे आणि कोणी नको असलेली व्यक्ती गावामध्ये येऊ नये. वैदिक काळात एखाद्या शेजाऱ्याने हरकत घेतली, तर राजाही अशा भूमीचे दान करू शकत नसे.

सन पूर्व ६०० च्या नंतर कृषियोग्य भूमीचे स्वामित्व त्या त्या व्यक्तीचेच होते आणि कर चुकवण्याच्या कारणाशिवाय राजाही त्याच्या भूमीचे अपहरण करू शकत नसे. यावरून असे सिद्ध होते, की शेतकऱ्यांकडून घेतली जाणारी रक्कम हा भूमीचा खंड नसून तो भूमिकरच होता.

भूमिकरानंतर इतर करांचा विचार करणे ओघानेच येते. व्यापार आणि उद्योग यांवर कर होता. वेश्यागारे, पानगृहे व जुगाराचे अड्डे यांवरही कर होता. व्यापाऱ्यांचा माल गावात किंवा नगरात येत असे, तेव्हा त्यावर जकात द्यावी लागे. या रकमेतून राज्यातल्या सडकांची दुरुस्ती आणि सुरक्षा यांवर खर्च केला जात असे. ही जकात नगद किंवा वस्तू या स्वरूपात घेतली जाई. वस्तूंच्या किमतीला अनुसरून जकातीचा दर वेगवेगळा असे. जळण, मांस, मध, तूप, गंध, औषधी, फुले, भाज्या, मातीची भांडी व चामड्याच्या वस्तू यांवर शेकडा सोळा जकात घेण्याची अनुमती दिलेली आहे. अर्थशास्त्राने मात्र या पदार्थांवर शेकडा चार किंवा पाच जकात घ्यावी असे म्हटले आहे. मद्य व रेशमी वस्त्रे यांवर ५ ते १० टक्के जकात असे.

यज्ञ, विवाह, इ. धार्मिक विधी व संस्कार यांच्यासाठी लागणारे सामान, तसेच वधूला भेट देण्यासाठी आणले जाणारे वस्त्रालंकार यांवर कर घेऊ नये, असे चाणक्याने सांगितले आहे (अर्थ. २.२१). हिंदू, जैन व बौद्ध यांच्या मंदिरांतील मूर्तींसाठी जे अलंकार घेतले जात, त्यांवर कर घेतला जात नसे. लोकांना नौकेतून अलिकडे पलिकडे नेणाऱ्या तरीवर नौकाकर लागू असे. वजनेमापे यांवर सरकारी मोहर उठवून त्यांवर कर घेतला जात असे. दुकानांना कर लागू असे. मद्यनिर्मिती करणाऱ्या कारखान्यांवर शेकडा ५ अबकारी कर द्यावा लागत असे. राज्यातल्या सर्व खाणी या सरकारी मालकीच्या समजल्या जात. सरकार स्वतः त्या उकरीत असे आणि ज्या ठेकेदाराला त्यांतून माल काढण्याचा ठेका दिला जात असे, त्याच्याकडून भारी कर घेतला जाई. खाणींतून निघणाऱ्या सोन्यावर व हिऱ्यावर ५० टक्के कर होता. चांदी आणि तांबे यावर ३३ टक्के आणि अन्य धातूंवर १६ ते २५ टक्के कर होता. मिठावरही अबकारी कर होता. जे लोक गरिबीमुळे धान्यादीरूपात सरकारला कर देण्यास असमर्थ असत, त्यांच्याकडन शारीरिक श्रमांच्या रूपात कर वसूल केला जाई. महिन्यात एक किंवा दोन दिवस त्यांना सरकारी काम करावे लागे. ही वेठ-बिगार करताना त्यांना सरकारकडून भोजन मिळत असे.

भूमिगत धन, भूगर्भातली खनिजे आणि जंगले ही राज्याच्या मालकीची असत. उत्पन्न मिळवण्यासाठी सरकार स्वतःही काही उद्योगधंदे चालवीत असे. वस्त्रमाग, दारूचे कारखाने, कसाईखाने, पशुशाला, इ. प्रकारचे हे कारखाने असत. जिला कोणी उत्तराधिकारी किंवा स्वामी नाही अशा संपत्तीवर राज्याचा हक्क असे. अशा वेळी मृत व्यक्तीची संपूर्ण संपत्ती सरकारजमा होत असे.

राज्याच्या व्ययाबद्दल प्रमाणभूत सामग्री उपलब्ध नाही. स्मृतिग्रंथांत आणि महाभारतातही याविषयी विशेषशी माहिती नाही. फक्त अर्थशास्त्रावरून काही माहिती मिळू शकते. मात्र अर्थशास्त्रातल्या खर्चाच्या बाबी राजमहालावर होणाऱ्या खर्चाच्याच आहेत. शुक्रनीतीत मात्र राज्याच्या उत्पन्नापैकी कोणत्या खात्यावर किती प्रमाणात खर्च करावा याचा तपशील दिला आहे, तो असा –

(१) सेनाविभाग –	शे.	५०
(२) दानधर्म –	„	८$\frac{१}{३}$
(३) उच्चाधिकारी –	„	„
(४) शासनखर्च –	„	„
(५) राजपरिवारखर्च –	„	„

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(६) स्थायी कोश — पॅरेग्राफ १६६

स्थायी कोश हे हिंदू राज्यपद्धतीचे एक वैशिष्ट्य होते. मुसलमान लेखकांनी लिहून ठेवले आहे, की हिंदू राजांना आपल्या पूर्वजांकडून साठवलेला भरपूर खजिना मिळत असे आणि हे राजे खजिन्याला हात लावीत नसत. विशिष्ट प्रसंगी सरकारने कर्ज उभारणे ही कल्पना प्राचीन काळी अज्ञात होती. त्यामुळे ज्या राजाचे भांडार भरलेले असे, तोच राजा आपत्ती व परचक्र या काळात प्रजेचे रक्षण करण्यास समर्थ ठरे. अलाउद्दीन आणि मलिक काफूर यांनी दक्षिणेवर स्वारी करून निरनिराळ्या राज्यांतून धनाच्या राशी लुटून नेल्या, ही गोष्ट इतिहासात प्रसिद्ध आहे. हे धन अर्थात परंपरेने संचित केलेले होते. या संचित धनातला एक मोठा भाग कोणत्यातरी गुप्त स्थळी पुरून ठेवला जात असे आणि काही विशिष्ट विश्वासार्ह व्यक्तींनाच त्या विशिष्ट गुप्त स्थळाची माहिती असे.

न्यायदान — आधुनिक युगात न्यायदान पद्धती हे राज्यसंस्थेचे एक महत्त्वाचे अंग समजले जाते. अपराधी मनुष्याला शिक्षा होते हे पाहून सामान्य नागरिकाला शासनसंस्थेच्या सर्वंकष सामर्थ्याची ग्वाही मिळते. न्यायालय हे राज्याच्या प्रभावी शक्तीचे एक तेजःपुंज प्रतीक असते.

पण प्राचीन काळी न्यायालय ही संस्था अस्तित्वात नव्हती. जगाच्या कुठल्याही भागात तिची स्थापना झालेली नव्हती. त्यामुळे आपल्या नुकसानीच्या भरपाईसाठी किंवा आपल्यावर झालेल्या अन्यायाच्या परिमार्जनासाठी व्यक्तीला स्वतःच काहीतरी उपाययोजना करावी लागत असे. प्राचीन काळी भारतात अशी प्रथा होती, की ज्याचे नुकसान झाले आहे असा मनुष्य नुकसान करणाऱ्या अपराध्याच्या घरापुढे धरणे धरून बसे व अपराध्याने नुकसानभरपाई करीपर्यंत त्याला घराच्या बाहेर जाऊ देत नसे. अशा वेळी त्याला स्वतःच्या आणि आप्तेष्टांच्या सामर्थ्यावरच अवलंबून राहावे लागे. मनूने या प्रकाराचे समर्थन केले आहे, ते असे —

> धर्मेण व्यवहारेण छलेनाचरितेन च ।
> प्रयुक्तं साधयेदर्थं पञ्चमेन बलेन च ॥
>
> (मनु. ८.४९)

अर्थ — नुकसान झालेल्या मनुष्याने राजाकडे फिर्याद करावी किंवा सामोपचाराने, सतत तगादा करून, किंवा एखादी वस्तू उचलून आणून किंवा धरणे धरून किंवा सरतेशेवटी बलप्रयोग करून आपले नुकसान भरून घ्यावे.

नारद थोडा याच्या पुढे गेला आहे. तो म्हणतो, की जेव्हा नुकसानभरपाई हा विवाद्य विषय असेल, त्या वेळी त्याने राजाकडे फिर्याद गुदरावी आणि त्याची संमती मिळाली तरच अपराध्यावर बलप्रयोग करावा (नारद. १.४५).

प्राचीन काळी एखाद्याचा खून झाला, तरी ती सरकारने दखल घेण्याची घटना समजली जात नसे. त्याविषयीचा खटला ही, ज्याचा खून झाला असेल त्याच्या नातलगांना नुकसानभरपाई मिळवून देण्याइतकी, अतएव केवळ वैयक्तिक बाब होती.

वैदिक वाङ्मयात न्यायालयांचा निर्देश मिळत नाही; तसाच प्रधान न्यायाधिशाच्या रूपात राजाचाही उल्लेख मिळत नाही. पण वेदोत्तर कालात राजाकडे प्रमुख न्यायाधिशाचे काम आले. न्यायदानाविषयी याहून अधिक काही माहिती वेदोत्तर कालातही मिळत नाही.

अर्थशास्त्र व धर्मसूत्रे यांच्यामध्ये मात्र पूर्ण विकसित असे न्यायदानपद्धतीचे चित्र मिळते. मध्यंतरीच्या काळात हा विकास कसा झाला, ते मात्र कळत नाही. सूत्रांच्या कालात राजाच न्यायाधीश असे व तो स्वतः प्रतिदिन काही वेळ न्यायदानाचे कार्य करीत असे. अपराध्यांना योग्य तो दंड देणे हे सूत्रकारांनी व स्मृतिकारांनी राजाचे पवित्र कर्तव्य मानले आहे. मात्र सर्वच खटले राजाकडे निर्णयार्थ येत असत असे नव्हे. काही महत्त्वाचे कज्जे-खटले तेवढेच राजापुढे येत. आणि सामान्य खटल्यांचे न्यायदान राजाचा प्रतिनिधी म्हणून प्राड्विवाक नावाचा अधिकारी करी.

स्मृतिप्रणीत विधिनियमांनुसार पक्षपात न करता न्यायदान करणे हे राजाचे पवित्र कर्तव्य असे. याविरुद्ध वर्तन केल्यास राजा स्वतः दोषी ठरत असे. प्राचीन भारतात विधिनियम हे विधानसभेच्या द्वारे निश्चित केले जात नसत. जे धार्मिक स्वरूपाचे नियम असत, ते श्रुति-स्मृतींच्या द्वारे निर्धारित केलेले असत व जे व्यावहारिक स्वरूपाचे असत, त्यांचे ज्ञान व स्वरूप, देशधर्म, जातिधर्म, इ. गोष्टींवरून निर्धारित केले जात असे. यासाठी, मुख्य न्यायाधीश हा धर्मशास्त्रज्ञ असावा आणि त्याला देशधर्म जातिधर्म, इ. गोष्टींचेही ज्ञान असावे अशी अपेक्षा असे.

धर्मशास्त्राच्या ग्रंथांत न्यायदानामध्ये न्यायसभेचे महत्त्व स्वीकारलेले आहे. राजा किंवा न्यायाधीश तीन, पाच किंवा सात सभासदांच्या साहाय्यावाचून कोणत्याही विवाद्य विषयाचा विचार करू शकत नसे. सभासदांची संख्या विषम एवढ्याकरता ठेवली गेली होती, की निर्णयाच्या बाबतीत एकमत न झाल्यास मताधिक्याने निर्णय देता यावा. न्यायसभेतले हे सभासद वेदशास्त्रसंपन्न, धर्मज्ञ, सत्यवक्ते आणि निःपक्षपाती असावे असे याज्ञवल्क्याने सांगितले आहे (२.२).

न्यायसभेतले सभासद ब्राह्मण असावे असे याज्ञवल्क्याने सांगितले आहे (२.१). याचे कारण श्रुतिस्मृत्यादी ग्रंथांत सांगितलेल्या धर्मशास्त्रीय नियमांचे सम्यक ज्ञान त्या काळी ब्राह्मणांनाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपलब्ध होते. पण ज्या विवाद्य विषयांत धर्मशास्त्रीय ज्ञान आवश्यक नसे, किंवा जे दावे शेतकरी, व्यापारी किंवा वनवासी लोकांच्या संबंधातले असत, त्या दाव्यांतले सभासद शेतकरी, व्यापारी किंवा त्या त्या जातींचे असावे, असे गौतमधर्मसूत्रा (२०.२३) व मनुस्मृतीत सांगितले आहे.

सन पूर्व ६०० च्या नंतर जेव्हा राज्ये मोठी होऊ लागली, तेव्हा मंडल, विषय, स्थान, द्रोणमुख, इ. प्रादेशिक विभाग निर्माण करावे लागले व त्या त्या विभागात न्यायालयांचीही स्थापना होऊ लागली (अर्थ. ३.१). या न्यायालयांना स्मृतींमध्ये मुद्रित न्यायालये असे म्हटले आहे. कारण त्यांची स्थापना राजमुद्रांकित आदेशाने होत असे. ज्या विभागातला न्यायनिवाडा त्याच विभागात करणारीही न्यायालये असत. नारदाने त्यांना चल न्यायालय म्हटले आहे.

फौजदारी गुन्ह्यांची तपासणी करणारे कंटकशोधन नावाचेही एक न्यायालय असे. यात राजद्रोहादी अपराधांचा, तसेच समाजद्रोही गुन्ह्यांचा निवाडा केला जात असे. भेसळ करणारे व्यापारी, कमी मजुरी देणारे धंदेवाले, मालकाचे नुकसान करणारे मजूर, चोर, डाकू, इ. गुन्हेगारांना कंटकशोधन न्यायालयात उचित शिक्षा मिळत असे.

काही न्यायालये बिगरसरकारीही असत. भारतीय शासनपद्धतीचे हे एक वैशिष्ट्य होते. वैदिक काळात बहुधा ग्रामसभाच न्यायदानाचे काम करीत असत. कौटिल्याच्या काळात शासनपद्धतीचे फार मोठ्या प्रमाणात केंद्रीकरण झाले, पण तरीही त्या काळात काही दावे अशा बिगरसरकारी न्यायालयाकडे सोपवले जात. सीमाविवादांचा निवाडा शेजारचे ग्रामवृद्धच करीत असत. त्यांना तसा अधिकार दिलेला असे. देवस्थाने, ब्राह्मण, संन्यासी, स्त्रिया, वयात न आलेली मुले आणि वृद्ध यांचे दावे तिथल्या धर्मस्थानाच्याद्वारे निर्णीत होत. याज्ञवल्क्याने कुल, श्रेणी व पूग अशा तीन प्रकारच्या बिगरसरकारी न्यायालयांचा निर्देश केला आहे. कुलन्यायालयातल्या निवाड्याविरुद्ध श्रेणीन्यायालयात व त्याच्याविरुद्ध पूगन्यायालयात अपील करता येत असे. पूगन्यायालयात अनेक जातींचे, अनेक व्यवसायांचे, पण एकाच ठिकाणी राहणारे लोक न्यायनिवाडा करीत. ग्रामवृद्धही त्यात असत. वरील न्यायालयांचे निर्णय शासनसंस्थेच्या साहाय्याने कार्यान्वित केले जात. प्राचीन व मध्ययुगीन हिंदू व मुसलमान राज्यांची प्रायः अशी नीती होती, की सर्व कज्जे-खटले प्रथम बिगरसरकारी न्यायालयामध्येच निर्णीत केले जावे. ही बिगरसरकारी न्यायालये शासनाचे काम हलके करण्यास मदत करीत. सत्य निर्धारित करण्याच्या कामी या न्यायालयांचे बहुमोल साहाय्य मिळत असे. लहान-मोठे सर्व दिवाणी दावे ग्रामपंचायतीत सोडवले जात. त्याविरुद्ध राजकीय न्यायालयात अपील करता येत असे. चोरी, दरोडेखोरी, राजद्रोह यांविषयीचे खटले मात्र सरकारी न्यायालयाच्या कक्षेत येत. वादी-प्रतिवादींना बिगरसरकारी न्यायालयातही न्यायशुल्क द्यावे लागत असे. ज्याला निर्णय अनुकूल होईल त्याने शे. १० व त्याच्या प्रतिस्पर्ध्याने शे. ५ न्यायशुल्क (कोर्ट फी) द्यायचे असे. गैरसरकारी न्यायालयातही लेखक, बेलीफ, पंच, इ. कर्मचारी असत. वादीप्रतिवादींना त्यांच्यासाठीही श्रममूल्य द्यावे लागे.

न्यायनिर्णयाच्या बाबतीत काही मूलभूत सिद्धान्त स्वीकृत केलेले होते, ते असे – खटला किंवा दावा एकांतात न चालवता सार्वजनिक स्थानी सर्वांसमक्ष चालवला जावा (शुक्रनीती ४. ५. ६.). महत्त्वाच्या दाव्यांना अग्रक्रम मिळावा. न्यायनिर्णय शक्य तेवढा त्वरित व्हावा. न्यायाधिशांच्या कार्यात सरकारी अधिकाऱ्यांचा हस्तक्षेप असू नये (मनु. ८.४३) न्यायाधिशाने निःपक्षपाती असावे; जोवर दावा चालत आहे तोवर वादी-प्रतिवादीशी संभाषण व त्यांच्याबरोबर भोजनादी व्यवहार त्याने करू नयेत (कात्या. स्मृ. ३. १.३५). नियम सोडून वागणाऱ्या किंवा पक्षपात करणाऱ्या न्यायाधिशाला दंड केला जावा. लेखकाने जबानी योग्य प्रकारे न लिहिल्यास त्यालाही दंड करावा (अर्थशास्त्र ३.२०;४.९). गुन्हा करण्याच्या हेतूने एखाद्या व्यक्तीने काही कारवाई केली, पण आकस्मित कारणामुळे त्याचा तो हेतू सफल झाला नाही, तर अशा वेळीही त्या व्यक्तीला गुन्हेगार ठरवून शिक्षा द्यावी (गौतम. ३. ४.११). गुन्हेगाराला द्रव्य, अन्न व शस्त्र देणे हेही गुन्हेगारीचे कृत्य समजले जावे. अपराध्याने जर आपण वयात न आल्याचे किंवा आत्मसंरक्षणासाठी बलप्रयोग केल्याचे किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या दडपणामुळे अपराध करावा लागल्याचे सिद्ध केले, तर त्याला दंड देऊ नये (मनु. ८.१८१).

अर्थदंड, कारावास, हद्दपारी, अंगविच्छेद व वध अशा पाच प्रकारच्या शिक्षा प्राचीन भारतात दिल्या जात. ज्यांना कारावासाची शिक्षा मिळे, त्यांच्याकडून रस्तेदुरुस्तीचे काम करून घेत. चोर-दरोडेखोरांचे हातपाय तोडीत. ही प्रथा भारताप्रमाणेच अन्य देशांतही होती. उच्चवर्गीय लोकांना देशातून हद्दपार करीत. खून, राजद्रोह, दरोडा, आणि स्त्रियांचा विनयभंग, इ. घोर अपराधांसाठी प्राणदंड दिला जाई.

न्यायनिर्णयाचे वरील मूलभूत सिद्धान्त आजही मान्य ठरलेले आहेत. मात्र प्राचीन न्यायपद्धतीत एक वैगुण्य होते, त्याविषयी श्री. अ. स. अळतेकर लिहितात –

दंडाचे स्वरूप व परिणाम निश्चित करण्याच्या वेळी गुन्ह्याचे स्वरूप, गुन्हेगाराचा हेतू, वय, सामाजिक दर्जा, इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोष्टींचा विचार केला जात असे. जातीच्या कारणामुळेही दंडामध्ये विषमता दाखवली जात होती. धर्मसूत्रांच्या मतानुसार ब्राह्मणवधासाठी १००० गायी, क्षत्रिय वधासाठी ५०० गायी, वैश्यवधासाठी १०० गायी व शूद्रवधासाठी १० गायी नुकसानभरपाई म्हणून गुन्हेगाराकडून घेतल्या जात. दंडाचे परिमाण वर्णानुसार कमी–अधिक असे, हा आपल्या न्यायपद्धतीचा एक दोष होता, यात संदेह नाही.

मनुस्मृतीमध्ये (८.४–७) न्यायालयापुढे येणाऱ्या अभियोगांचे अठरा प्रकार सांगितले आहेत, ते असे –

तेषामाद्यमृणादानं निक्षेपोऽस्वामिविक्रयः ।
सम्भूय च समुत्थानं दत्तस्यानपकर्म च ।
वेतनस्यैव चादानं संविदश्च व्यतिक्रमः ।
क्रयविक्रयानुशयो विवादः स्वामिपालयोः ॥
सीमाविवादधर्मश्च पारुष्ये दण्डवाचिके ।
स्तेयं च साहसं चैव स्त्रीसङ्ग्रहणमेव च ॥
स्त्रीपुंधर्मो विभागश्च द्यूतमाह्वय एव च ।
पदान्यष्टादशैतानि व्यवहारस्थिताविह ॥

अर्थ – (१) कर्ज घेणे (२) ठेवीचे व्यवहार (३) स्वतः मालक नसताना वस्तूचा विक्रय करणे (४) अनेकांनी मिळून भागीदारीत व्यापार करणे (५) दिलेले वेतन परत घेणे (६) सेवकाचा पगार न देणे (७) करार मोडणे (८) विकलेल्या अथवा घेतलेल्या वस्तूबद्दल पश्चात्ताप करणे (९) मालक व पशुपाल यांमध्ये वाद (१०) सीमेविषयी वाद (११) शिवीगाळ करणे अथवा कठोर भाषण करणे. (१२) चोरी (१३) साहस (१४) स्त्रीपुरुषांचा समागम (१५) स्त्रीपुरुष धर्म व्यवस्थिती (१६) पितृधनविभाग (१७) द्यूत व (१८) पशु–पक्ष्यांची झुंज; न्यायालयापुढे येणाऱ्या अभियोगांची ही अठरा पदे होत.

दावे चालविण्याची पद्धती पुढीलप्रमाणे असे – प्रथम वादी आवेदनपत्र पाठवून आपला दावा दाखल करी. त्यात जी कारणे दिली जात, त्यांमध्ये वादीला पुढे काही बदल करता येत नसे. दावा दाखल होताच प्रतिवादीला बोलावणे जाई व वादीच्या पत्राचे उत्तर (प्रत्यावेदन) निश्चित वेळात द्यायला सांगितले जाई. वादीप्रतिवादींचे आवेदन-प्रत्यावेदन यांचा विचार करून न्यायाधीश त्या दोघांना आपापल्या पक्षाचे पुरावे देण्याचा आदेश देई. साक्ष, लेख व भुक्ती (पझेशन) हे तीन मुख्य पुरावे समजले जात. भुक्तीला लेखाहून व लेखाला साक्षीहून अधिक महत्त्व दिले जाई. जर वादी – प्रतिवादींना कोणताही पुरावा देता येत नसेल, तर अशा वेळी त्यांना दिव्य करण्यास सांगितले जाई. प्राचीन व मध्ययुगीन कालात भारतात व युरोपातही लोकांचा असा विश्वास होता, की दैवी शक्ती निरपराधी माणसाला आपले निर्दोषत्व प्रस्थापित करण्यामध्ये साहाय्य देते. स्मृतिग्रंथांत अशी अनेक दिव्ये सांगितलेली आहेत. अशा प्रकारे उपस्थित प्रमाणांची चिकित्सा करून व सभ्यांशी विचारविनिमय करून न्यायाधीश दाव्याचा निर्णय देत असे. निर्णयपत्राची एक प्रत वादी – प्रतिवादींना दिली जात असे.

प्राचीन न्यायपद्धतीत वकिलाचा निर्देश फारसा आढळत नाही. शुक्रनीतीमध्ये मात्र त्याचा उल्लेख सापडतो. तिथे त्याला नियोगी म्हटले आहे. शुक्र म्हणतो, की कायदा ठाऊक नसणे, इतर कोणत्यातरी कामात व्यग्र असणे, इ. कारणांनी आपला दावा जर वादी – प्रतिवादी योग्य प्रकारे चालवू शकत नसतील, तर त्यांना आपल्यातर्फे प्रतिनिधी नियुक्त करता येतो. हा नियोगी आपल्या अशिलाचा दावा चालवू शकत असे. जर त्याने विरुद्ध पक्षाला साहाय्य केले, तर तो गुन्हा समजून त्याला दंड केला जात असे. वकिलाची फी शेकडा ६ पासून अर्ध्या टक्क्यापर्यंत असे. दाव्याची रक्कम मोठी असल्यास वकिलाच्या फीचे प्रमाण टक्केवारीत कमी असे. वकिलांची संख्या मोठीशी नसे. सांप्रतच्या प्रमाणे वकिलांचा एक प्रतिष्ठित वर्ग समाजात निर्माण झाला नव्हता.

आंतरराष्ट्रीय संबंध – वैदिक कालात भिन्न भिन्न राज्यांमध्ये परस्पर संबंध कशा प्रकारचे असत, याविषयी काही माहिती मिळत नाही. त्या काळची बहुतेक राज्ये ही जनराज्ये होती आणि कित्येक शतके त्यांची सारी शक्ती अनार्य जातींना जिंकण्याच्या कामीच खर्ची पडली होती. त्यामुळे साधारणपणे आर्यांच्या भिन्न भिन्न राज्यांत मैत्रीभाव असण्याची शक्यता आहे. पुढे एकाचा उत्कर्ष दुसऱ्याला सहन न होणे आणि सत्तास्पर्धा सुरू होणे या गोष्टी आर्यजनांतही दिसून येऊ लागल्या. त्यामुळे आर्य जातीतही परस्पर संघर्ष होऊ लागले आणि त्या कामी काही आर्य जातींनी अनार्य जातींचेही सहकार्य घेतले.

उ. वैदिक काळात आर्यांचे छोटे छोटे संघ एकत्र होऊन काही मोठ्या राज्यांची स्थापना झाली. त्या काळातील ऋषींनी आर्य राजांच्या पुढे साम्राज्याचा आदर्श उभा केला. तदनुसार त्यांना यज्ञ करण्यास प्रवृत्त केले. राजांचा राजा बनण्याची आकांक्षा असलेला राजा त्या काळी अश्वमेध यज्ञ करी व सम्राटपदाचा अभिलाषी वाजपेय यज्ञ करी. त्यामुळे राज्यांच्या परस्परसंबंधात अस्थिरता उत्पन्न होऊ लागली.

कोणताही विजिगीषू राजा साम्राज्यविस्ताराच्या महत्त्वाकांक्षेने कोणत्याही राज्यावर केव्हाही चढाई करीत असे. मनूने तर असे स्पष्ट सांगितले आहे, की जेव्हा राजाला आपले सैन्य बलवान आणि राज्य समृद्ध असल्याची खात्री पटेल आणि अन्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राज्यांची स्थिती याच्या उलट असेल, तेव्हा बलवान राजाने अल्पशक्तीच्या राज्यावर बेलाशक चाल करावी (७.१७१). बलवंताने दुर्बलावर आक्रमण करून आपला स्वार्थ साधायचा, हे प्रारंभापासून वर्तमान काळापर्यंत सदैव चालत आलेले आहे. स्मृतींनी व राज्यशास्त्रकारांनी युद्धाला कधीच उत्तेजन दिले नाही आणि विभिन्न राज्यांत शांती आणि सलोखा नांदावा याविषयी औदासीन्यही दाखवले नाही. युद्धाची खुमखुमी असलेल्या राजांनाही त्यांनी साम, दान आणि भेद या उपायांनीच इष्ट हेतू साध्य करावा आणि ते उपाय हरले तरच युद्धाला प्रवृत्त व्हावे, असे स्पष्टपणे बजावले आहे. आणि बलसंपन्न राजानेही युद्ध करायचेच तर ते धर्मयुद्ध करावे; अधर्मयुद्ध करू नये असे सांगितले आहे. याविषयी भीष्माने धर्मराजाला उपदेशिले आहे, ते असे –

> नाधर्मेण महीं जेतुं लिप्सेत पृथिवीपतिः ।
> अधर्मविजयं लब्ध्वा कोऽनुमन्येत भूमिपः ।
> अधर्मयुक्तो विजयो ह्यध्रुवोऽस्वर्ग्य एव च ॥
> (म. भा. शांति. ९६.१.३)

अर्थ – कोणत्याही राजाने अधर्माने पृथ्वी जिंकण्याची अभिलाषा धरू नये. अधर्माने विजय मिळविणाऱ्या भूपतीला कोण बरे मान देईल ! अधर्मयुक्त विजय हा अस्थिर तर असतोच; शिवाय तो नरकाला नेणाराही असतो.

कौरव–पांडवांमध्ये युद्ध न होता संधी घडून यावा म्हणून श्रीकृष्णाने खूप प्रयत्न केला. धर्मराजाने तर पाच गावांवर संतुष्ट राहण्याची तयारी दाखवली. यावरून प्राचीन भारतात युद्धाच्या बाबतीत बराच संयम दाखवला जात असे, असे दिसते.

राज्यशास्त्रज्ञांना हे ठाऊक होते, की युद्धे पूर्णतः बंद करणे अशक्य आहे. म्हणून त्यांनी युद्धसंभव यावच्छक्य कमी करण्यासाठी विविध राज्यांची मंडले बनवून त्यामध्ये शक्तिसंतुलन कायम राखण्याची व्यवस्था केली. एखाद्या राजाला सम्राट्पदाची महत्त्वाकांक्षा निर्माण झाली, तर त्याच्या त्या महत्त्वाकांक्षेला कोणी लगाम घालू शकत नसे. पण अशाही वेळी राजाने कोणते नियम पाळायला हवे, ते शास्त्रकारांनी पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

पराजित राज्याचा अपहार करू नये. त्याच्या शासनपद्धतीत हस्तक्षेप करू नये. त्या राज्यातले रीतिरिवाज मोडण्याचा प्रयत्न करू नये. पराजित राजाला केवळ आपले मांडलिकत्व स्वीकारायला लावावे, त्याच्याकडून करभार घ्यावा आणि त्याला स्वतःचे राज्य चालवण्याला मोकळीक द्यावी. जर एखादा राजा युद्धात वीरगतीला गेला किंवा जिवंत असूनही त्याने पराधीनपणे राज्य करण्याचे नाकारले, तर त्याच्या पुत्राला गादीवर बसवावे. राजा जिंकला गेला तरी त्याचा अपमान करू नये आणि त्या राज्यातल्या प्रजेलाही जित मानून तिचा उपमर्द करू नये. शरण आलेल्या शत्रूला प्राणदान किंवा अभयदान द्यावे. शरणागत शत्रूवर शस्त्र चालवू नये. घायाळ किंवा पळणाऱ्या शत्रूवरही वार करू नये. जखमी युद्धबंद्यांची चिकित्सा करावी. युद्धबंद्यांना गुलाम बनवू नये किंवा त्यांना विकूही नये. युद्ध संपल्यावर त्यांना घरी परतण्याची अनुमती द्यावी (मनु. ७.२०२; विष्णु. ३.३०; शुक्र. ४.७.३७३ व ३९७–८).

हे नियम बऱ्याचशा प्रमाणात पाळलेही जात असत, असे दिसते. विजयी राजाने पराजित राजाचे राज्य आपल्या राज्यात समाविष्ट करून घेतले, असे एकही उदाहरण जातकांत सापडत नाही. कोसलाच्या राजाने जेव्हा युद्धात काशीराजाला जिंकले, तेव्हा काशीराजाचा मंत्री त्याला समजावतांना म्हणाला, 'महाराज भिऊ नका. तुमचे वाईट होणार नाही. तुमचे राज्य कायम राहील. केवळ तुम्हांला कोसल राजाचे आधिपत्य स्वीकारावे लागेल एवढेच.' इ. स. च्या आठव्या–नवव्या शतकांत मुसलमान प्रवासी इतिहासकार दक्षिण भारतात आले असता तिथल्या राजांचा हा धर्मविजय पाहून फार प्रभावित झाले होते. त्यांतील सुलेमान या यात्रिकाने लिहून ठेवले आहे, ते असे– जेव्हा एक राजा दुसऱ्या राजाला पराजित करतो, तेव्हा तो जित राजाच्या वंशातल्या एखाद्या व्यक्तीला राजगादीवर बसवतो. फक्त आपल्या नावाने शासन चालवावे, एवढीच त्याला विजेत्या राजाची आज्ञा असते. मौर्य साम्राज्यातली अंतर्गत व्यवस्था कशी होती, याविषयी फारशी माहिती मिळत नाही; पण मौर्य सम्राटांनीही राजस्थान आणि पंजाब येथील शक्तिशाली गणराज्यांची आंतरिक स्वायत्तता कायम ठेवली होती. गुप्त साम्राज्यातही अशी अंतर्गत सामंत राज्ये चालत होती. हर्षवर्धनाच्या साम्राज्यातही त्याला कर देऊन स्वतंत्रपणे आपले राज्य चालवणारे सामंत राजे अस्तित्वात होते. प्रतीहार, सातवाहन, चालुक्य, राष्ट्रकूट व यादव यांच्या राज्यांतही स्वायत्त असे सामंत राजे होते.

जोवर धर्मविजयाचा आदर्श मलिन झाला नव्हता, तोवर राज्यांच्या अपहरणाच्या घटना फार थोड्या होत होत्या. धर्मयुद्धाच्या या आदर्शात वीरतेबरोबरच उदारतेलाही स्थान होते. पण जेव्हा साम्राज्यवादाच्या भावनेने बळ धरले आणि सामंत राजांना आपले दास बनवण्याची पद्धती सुरू झाली, तेव्हा त्या छोट्या आणि अल्पबल अशा राजांमध्ये कसेही करून आत्मरक्षण केले पाहिजे ही भावना प्रबल होऊ लागली. ते मग युद्ध अंगावर येऊ नये आणि आक्रमक राजा पराभूत व्हावा, निदान त्याची हानी तरी पुष्कळ व्हावी म्हणून उचित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नुचिताचा विचार बाजूला ठेवून सर्व प्रकारचे बरे-वाईट उपाय योजू लागले. कौटिल्याने तर स्वच्छच सांगितले आहे, की जोवर आपली ताकद भारी आहे, तोवर धर्मयुद्धाचा आदर्श मानण्यात कोणतीही हानी नाही. पण आपली बाजू कमकुवत असली तर मात्र ज्या उपायांनी आपला जय होईल असे कोणतेही सूक्तासूक्त उपाय निःशंक वापरावे; मग ते अधर्मयुद्ध ठरले तरी हरकत नाही (अर्थशास्त्र १०.३). शुक्राचार्यांनीही हेच मत मांडले आहे (शुक्रनीती १.३५०).

अन्य राज्यांत दूत पाठवण्याची प्रथाही प्राचीन काळी होती. हे दूत तीन श्रेणींचे असत –

(१) निसृष्टार्थ – या दूताला आपल्या राज्याच्या बाजूने सर्व विवाद्य प्रश्नांचा दुसऱ्या राजाशी विचारविनिमय करून निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार असे.

(२) परिमितार्थ – हा दूत आपल्या राजाने आखून दिलेल्या धोरणाप्रमाणेच आणि विशिष्ट बाबतीतच अन्य राजांशी विचारविनिमय करी. त्याबाहेर अधिक काही करण्याचा त्याला अधिकार नसे.

(३) संदेशहर – हा दूत आपल्या राजाकडून संदेश घेऊन दुसऱ्या राजाकडे जाई व त्या संदेशाचे उत्तर घेऊन परत येई. त्याला बातचीत करण्याचा अधिकार नसे.

आधुनिक संकेताप्रमाणे प्राचीन कालातही दूत हा अवध्य असे. दूताचा वध करणारा राजा आपल्या सचिवांसह नरकात जातो, असे महाभारतात स्पष्ट म्हटले आहे (शांति. १२.८५. २६). मात्र दूताने काही अनुचित आचरण केल्यास त्याला विरूप करून किंवा डाग देऊन घालवून देत असत. [प्रा. भा. रा.; प्रा. भा. शा. प.; हिं. रा. तं.; भा. रा. शा.; भा. त. रा.; हिं. ध.; वे. रा. द.; प्रा. भा. सा. सां. भू.; रा. म. रा. रा.]

राज्याभिषेक

राजपदाचा अधिकार प्राप्त व्हावा म्हणून राजाला केलेला अभिषेक. हा अभिषेक करण्याची प्रथा वेदकाळीच सुरू झाली होती. वेदकाळी प्रजाच राजाची निवड करीत असे. त्यामुळे त्याला अभिषेक करण्याचा अधिकारही प्रजेलाच असे (ऋ. १०.१७८). राजाला गादीवर बसवण्याच्या कार्यात जे लोक प्रामुख्याने भाग घेत, त्यांना राजकृत् किंवा राजकर्ते असे म्हणत (श. ब्रा. ३.४.१.७). या लोकांत सूत, ग्रामणी व राजाचे जवळचे आप्त यांचा समावेश असे (ऐ. ब्रा. ८.१७.५). हे प्रजेचे प्रमुख प्रतिनिधी असत. राजाला गादीवर बसवताना हे लोक राजाच्या हातात पळस-वृक्षाचा वनवलेला मणी किंवा रत्न नामक अलंकार घालीत. त्यामुळे त्यांना रत्नी असेही म्हणत. राजाच्या गादीवर वाघ किंवा सिंह यांचे चामडे अंथरीत. राजाला मग जलाने अभिषेक करीत.

अशा प्रकारे वेदकाळी राज्याभिषेकाचा विधी अगदी साधा होता. पण पुढे ब्राह्मणकाळात तो विस्तृत व जटिल झाला. अभिषेकाचे सविस्तर वर्णन ऐतरेय ब्राह्मणात दिलेले आहे (८.५). अभिषेकाचे प्रकारही अनेक होते. देवांनी इंद्राला आपला राजा म्हणून निवडले व त्याला जो अभिषेक केला, त्याला ऐंद्र महाभिषेक असे म्हटले आहे (अभिषेक पाहा). त्यानंतरच्या काळात क्षत्रिय राजांना जो अभिषेक करीत, तो या ऐंद्र महाभिषेकाला अनुसरूनच करीत असत. या अभिषेकविधीत वड, उंबर, पिंपळ व प्लक्ष या वृक्षांची फळे; व्रीही, महाव्रीही, प्रियंगू आणि यव ही धान्ये; उंबराची आसंदी किंवा आसन; उंबराच्या लाकडाचे चमसपात्र; दही, दूध, तूप, मध वगैरे द्रव्ये आणि सूर्याच्या उन्हात तापवलेले पाणी, या द्रव्यांनी राजाला अभिषेक करीत. त्यानंतर राजाचे आप्तेष्ट, मंत्री, अधिकारी व प्रजाजन घोषणा करीत, की 'हा राजा ब्राह्मणांचे, धर्माचे व प्रजेचे संपूर्ण रक्षण करील. या राजाला इंद्राप्रमाणेच अनेक प्रकारचे वैभव व सत्ता या कार्यासाठी प्राप्त होवो.'

अभिषेक झाल्यानंतर राजा रेशमी वस्त्रे परिधान करी व मस्तकावर मुकुट धारण करी. मग तो आपल्या कर्तव्याची घोषणा करी. 'जर मी तुमचा द्रोह करीन तर माझे सर्व राज्य नाश पावो.' या प्रतिज्ञेनंतर राजपुरोहित त्याला सांगे –

इयं ते राड् यन्तासि यमनो ध्रुवोऽसि धरुणः ।
कृष्यै त्वा क्षेमाय त्वा रय्यै त्वा पोषाय त्वा ।

(वाज. सं. ९.२२)

भावार्थ – हे राज्य तुझे आहे. त्याचा तू संचालक आणि नियंता आहेस. तू अचल आहेस आणि या राज्याचा पोषक आहेस. शेती, प्रजाकल्याण, राष्ट्रसमृद्धी व लोकपोषण यांच्यासाठी तुला हे राज्य दिले आहे.

यानंतर राजा आपल्या आसनावरून खाली उतरून रानडुकराच्या कातड्यापासून बनवलेले जोडे घाली (श. ब्रा. ५. ४. ४. २३) आणि गादीवर आरोहण करी. मग राजपुरोहित एका दंडाने राजाच्या वरगडीला स्पर्श करी. याचा अर्थ असा असे, की राजाने आपल्या प्रजेच्या अनीतीचे नियंत्रण या दंडाने करावे. पण तो दंड राजाच्याही अनीतीच्या वर्तनाला नियंत्रण घालू शकत असे (श. ब्रा. ५.४.४.७).

यानंतर राजा भूमिवंदन करी व पुरोहित त्याच्या हातात तलवार देई. मग लोक राजाला नजराणे देत आणि राजाही त्यांच्या योग्यतेनुरूप वस्त्राभरणे देऊन त्यांचा परत सत्कार करी.

राजाच्या अभिषेकाप्रमाणेच युवराज व सेनापती यांनाही एक प्रकारचा अभिषेक करण्यात येत असे. महाभारतात युधि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठिराच्या यौवराज्याभिषेकाचे (आदि. १३९), अर्धराज्याभिषेकाचे (आदि. २०७), राजसूयाभिषेकाचे (सभा. ३५), पट्टाभिषेकाचे (शांति. ४०) आणि अश्वमेधाभिषेकाचे (आश्व. ८८) वर्णन केलेले आहे. रामायणात रामचंद्राच्या अभिषेकाचे वर्णन केलेले आहे. अग्निपुराण, वीरमित्रोदय, नीतिमयूख, राजधर्मकौस्तुभ, विष्णुधर्मोत्तर पुराण, इ. ग्रंथांत राज्याभिषेकाचे सविस्तर वर्णन केलेले आहे. वर्धमानसूरी नामक पंडिताने इ. स. च्या १५ व्या शतकात रचलेल्या आचारदिनकर नामक ग्रंथात, नृपत्व, सामंतत्व, मंडलेश्वरत्व, देशमंडलाधिपत्य, ग्रामाधिपत्य, मंत्रित्व, सेनापतित्व व कर्माधिकारित्व असे आठ प्रकारचे अभिषेक सांगितले आहेत.

नीलकंठभट्टाने (इ. स. चे १७ वे शतक) नीतिमयूख नामक एक ग्रंथ रचला आहे. त्यात राज्याभिषेकाचा समग्र विधी वर्णिलेला आहे. त्यातील काही भाग पुढे दिला आहे –

पूर्वीचा राजा मृत झाल्याने ज्या वेळी नवीन राजाला अभिषेक केला जातो, त्या वेळी राजज्योतिषी व राजपुरोहित यांनी नूतन राजाला नेहमीप्रमाणे स्नान घालून, तीळ व मोहऱ्या यांचा लेप करवून, यापुढे राष्ट्राचा हा राजा झाला आहे, असे म्हणून त्याचा जयजयकार करून व त्याला पूर्वीच्या राजाच्या आसना शेजारी बसवून मंत्र्यादिकांनी त्या नवीन राजाचे दर्शन नागरिकांना करवावे. राजाने त्या आसनावरून कारागृहातील कैद्यांची मुक्ती करावी, त्यांना अभयवचन द्यावे व राज्यकारभार करावा आणि राज्याभिषेकासाठी योग्य कालाची वाट पाहावी. नंतर योग्य काल येताच स्वतःला अभिषेक करवून घ्यावा.

पूर्वीचा राजा जिवंत असताना काही विशेष कारणामुळे नवीन राजाला अभिषेक करायचा असेल, तर कालप्रतीक्षा करण्याची आवश्यकता नाही. तथापि अभिषेक मात्र योग्य कालीच करावा. अभिषेकाच्या पूर्वी एखाद्या शुभ दिवशी पुरोहिताने ऐंद्री शांती करावी.

पुरोहिताने प्रथम मास, पक्ष, इत्यादींचा उल्लेख करून ऐंद्री शांतीचा समंत्रक संकल्प करावा. नंतर अनुक्रमे गणेशपूजा, स्वस्तिवाचन व आचार्यवरण ही करावी व आचार्य आणि ऋत्विक् यांची कुंडल, अंगठी, वस्त्रे इत्यादींच्या दानांसह पूजा करावी.

यानंतर ग्रंथकाराने ऐन्द्री शांतीचा विधी सविस्तर व समंत्रक वर्णन केला आहे. त्यात प्रथम यज्ञवेदी तयार करण्याचा विधी सांगितलेला आहे. शमीच्या वृक्षाची बारा अंगुले लांब अशी एक समिधा घेऊन तिने माप घेऊन शास्त्रोक्त वेदीच्या चतुर्मर्यादा कशा आखून घ्याव्या, वेदी कशी बांधावी, नंतर तिच्यात अग्निचयन कसे करावे, तो अग्नी शुद्ध कसा करावा, त्याचे पूजन कसे करावे, वगैरे सर्व याज्ञिक विधी यापुढे सांगितला आहे व प्रत्येक विधीच्या वेळी कोणकोणते मंत्र उच्चारावे, तेही सांगितले आहेत.

यानंतर ब्रह्मा, होता वगैरे ऋत्विजांचे वरण कसे करावे व त्यांना आसनस्थ करून त्यांची पूजा कशी करावी, ते सांगितले आहे. नंतर क्रमाने आधाराज्य होम, अभ्यातान होम, सन्नती होम, उपस्ती होम, स्विष्टकृत् होम, प्रायश्चित्त होम, इ. अनेक होमांचा समंत्रक विधी दिला आहे.

यानंतर महाबली, क्षेत्रपालबली, वगैरे बलिदानविधींचे वर्णन व होमांच्या पूर्णाहुतीचे वर्णन केले आहे. यानंतर ऐंद्री शांतीच्या अंतर्गत असलेल्या अभिषेकाचे वर्णन दिले आहे, ते असे –

आचार्य व ऋत्विज यांनी कलशोदक, शांत्युदक व दूर्वापल्लव घेऊन उत्तराभिमुख उभे राहावे आणि त्या द्रव्यांनी सकुटुंब बसलेल्या राजाला अभिषेक करावा. अभिषेकसमयी राजाच्या पत्नीने त्याच्या डाव्या अंगाला बसावे. राजावर शतधारा सोडाव्या. याप्रमाणे अभिषेक झाल्यावर राजदंपतीने आपल्या अंगाला औषधिलेप (सुगंधी द्रव्यलेप) करून मग शुद्धोदकाने स्नान करावे व त्यानंतर शुभ्र वस्त्रे, पुष्पमाला व अलंकार धारण करावे. त्यानंतर सपत्नीक राजाने आचार्य, ऋत्विज, इत्यादींचे पूजन करून त्यांना दक्षिणा द्यावी.

नंतर पीठदेवतांचे विसर्जन करून पीठावरील प्रधान देवतेची प्रतिमा आचार्याला दान करावी. मग अग्नीची पूजा करून ब्राह्मणभोजन घालून त्यांचे विसर्जन करावे.

अशा प्रकारे अभिषेकपूर्व ऐंद्री शांती करावी. मग राज्याभिषेक करावा.

यानंतर प्रत्यक्ष अभिषेकाच्या दिवसाचा राजाचा कार्यक्रम सांगितला आहे, तो असा –

राज्याभिषेकाच्या दिवशी नित्य कर्म आटपून राजाने आपल्या हातात दर्भ घेऊन पूर्वेकडे मुख करून आसनावर बसावे व आपल्या इष्ट देवतांना स्मरणपूर्वक नमस्कार करून, मासपक्षादिकांचा उल्लेख करून 'सर्व राष्ट्राला वश करण्याची इच्छा असलेला मी आपल्या ज्योतिष्याकडून व उपाध्यायाकडून स्वतःला अभिषेक करवून घेतो' असा संकल्प करावा. नंतर गणपतिपूजन, स्वस्तिवाचन, मातृकापूजन, वसुधारापूजन, आभ्युदयिक श्राद्ध वगैरे करून त्याने ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद या तीनही वेदांच्या एकेका ब्राह्मणाचे अभिषेककार्यासाठी वरण करावे. तसेच ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या वर्णांच्या व तदितर वर्णाच्या मिळून चार अमात्यांना बोलवावे व सर्वांचे मधुपर्कासह स्वागत करून त्यांना कुंडल, केयूर, कटक, कंठाभरण, अंगठी व वस्त्रे देऊन त्यांची पूजा करावी व प्रजेपैकी चारही वर्णांच्या प्रमुख नेत्यांना तिथे आणून बसवावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यानंतर कलशस्थापनेचा विधी दिला आहे, तो असा – राजपुरोहिताने आदल्या दिवशी उपवास करून शुद्ध व्हावे व नंतर कदलीस्तंभयुक्त अशा एका मंडपात कलशस्थापना करावी. एका कलशात अनेक तीर्थांचे जल, सर्व औषधी, सुगंध, सर्व रत्ने, सर्व बीजफले व वृक्षपल्लव टाकावे. त्याच्या शेजारी पंचगव्याने भरलेला एक मृत्तिकाकुंभ, घृताने भरलेला सुवर्णकुंभ, दुधाने भरलेला रजतकुंभ, दह्याने भरलेला तांब्याचा कुंभ, मधाने भरलेला मृत्तिकाकुंभ, शंभर छिद्रे पाडलेला सुवर्णकलश हे ठेवावे.

यानंतर आचार्यांनी प्रधानहोम करावा. तो होम झाल्यावर राजाने मंगलस्नान करावे. त्या वेळी पूर्वी स्थापन केलेल्या पंचगव्याच्या कुंभातील उदकाने त्याला अभिषिंचन करावे.

मग राजाने शुभ्र चंदन, शुभ्र पुष्पमाला, शुभ्र वस्त्रे वगैरे परिधान करून अंगावर सर्व अलंकार घालून अग्नीच्या दक्षिणेस बसावे. नंतर राजज्योतिषी, राजपुरोहित, इतर ज्योतिर्विद वगैरेसह त्याने शुभ शकुन अवलोकन करावे. त्यानंतर पुरोहिताने पूर्वस्नात राजाला स्नानगृहात आणवून आसनावर बसवावे व त्याला मृत्तिकादी वस्तूंनी यथाविधि स्नान घालावे.

नंतर राजाने ते स्नानासन सोडून भद्रासनावर बसावे. हे भद्रासन सोन्याचे, चांदीचे, तांब्याचे किंवा खैराच्या लाकडाचे अथवा खैराच्या आसनाला वरील धातूचा पत्रा चढवलेले असे असावे. हे आसन मांडलिक राजासाठी एक हात उंचीचे, एक हात लांबीचे व एक हात रुंदीचे असावे. आजूबाजूच्या राजांवर विजय मिळविणाऱ्याचे आसन सव्वा हात चौरस व सम्राटाचे दीड हात चौरस असावे.

भद्रासनाच्या चारही बाजूंना चार अमात्यांनी उभे राहावे. पूर्व दिशेला ब्राह्मण अमात्याने हातांत घृतपूर्ण सुवर्णकुंभ घेऊन त्यातील घृताने 'तेजोऽसि०' या मंत्राने राजाला अभिषेक करावा. दक्षिण दिशेला उभे राहून क्षत्रिय अमात्याने दुधाने भरलेला रजतकुंभ हातात घेऊन 'आप्यायस्व०' या मंत्राने त्यातील दुधाने राजाला अभिषेक करावा. पश्चिम दिशेला उभे राहून वैश्य अमात्याने हातांत ताम्रकुंभ घेऊन त्यातील दह्याने 'दधिक्राव्णो०' या मंत्राने राजाला अभिषेक करावा. सामग अमात्याने उत्तर दिशेला उभे राहून आपल्या हातांत मधाने भरलेला मातीचा कुंभ घेऊन, 'मधुवाता०' या मंत्राने त्यातील मधाने राजाला अभिषेक करावा. त्यानेच आपल्या हातांत कुशोदकाने भरलेला कुंभ घेऊन त्यातील जलाने 'देवस्य त्वा०' या मंत्राने राजाला अभिषेक करावा. तो अभिषेकाचे मंत्र म्हणत असताना जमलेल्या सदस्यांपैकी काहींना अग्निरक्षणासाठी यज्ञशाळेत पाठवावे व तिथून आणवलेल्या संपानकुंभातून जल घेऊन पुरोहिताने राजसूय यज्ञातील मंत्रांनी राजाला अभिषेक करावा.

त्यानंतर वेदशास्त्रज्ञ अशा दुसऱ्या एका ब्राह्मणाने शंभर छिद्रे पाडलेल्या सुवर्णकलशातील उदकाने राजाला अभिषेक करावा. नंतर ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अनुलोम अशा सर्व प्रकारच्या लोकांनी इतर अनेक कलशांतील पुण्यजलाने राजाला अभिषेक करावा.

त्यानंतर राजाने सुगंधी तेल लावून उष्ण जलाने स्नान करावे, पांढरी वस्त्रे परिधान करावी, तुपाच्या पात्रात आपले स्वतःचे प्रतिबिंब पाहावे व सोन्याच्या श्रीविष्णूच्या प्रतिमेची पूजा करावी.

मग सर्व ब्राह्मणांना वस्त्रालंकार द्यावे. राजज्योतिषी व राजपुरोहित यांना मधुपर्क व वस्त्रालंकार द्यावे आणि त्यांची पूजा करावी.

याप्रमाणे अभिषेकाचा विधी झाल्यावर राजमुकुटबंधनाचा विधी सांगितला आहे, तो असा –

ज्योतिष्याने सुलक्षणी असा राजपट राजाच्या ललाटभागी व राजमुकुट राजाच्या शिरोभागी बांधावा. नंतर राजपुरोहिताने राजाला राजगादीवर बसवावे. या गादीवर वृषभ, मार्जार, तरस, सिंह, वाघ इत्यादींची बहुमूल्य चर्मे एकावर एक अशी अनुक्रमाने पसरलेली असावी. तिथे बसल्यावर द्वारपालाने राजाचे दर्शन अमात्य व नागरिक यांना करवावे. नंतर राजाने जमलेल्या ब्राह्मणांचा, ज्योतिष्यांचा, पुरोहितांचा वगैरे सत्कार करून त्यांना भोजन द्यावे. नंतर हातात धनुष्य, बाण, इ. आयुधे धारण करून अग्नीला प्रदक्षिणा घालावी, गुरुजनांना वंदन करावे व एक बैल आणि एक सवत्स धेनू यांच्या पृष्ठभागाला स्पर्श करावा.

नंतर राजपुरोहिताने उत्तम लक्षणांचा एक घोडा व महान हत्ती आणवून त्यांना स्नान घालून वस्त्रालंकारादिकांनी सजवावे व घोड्याला राजासमोर आणून त्याला अभिमंत्रण करावे. राजज्योतिष्याने हत्तीच्या कानात मंत्र म्हणावा व मग त्या गजावर राजाने आरोहण करावे.

नंतर राजाने गजारूढ होऊन मुख्य अमात्य, मंत्री, सामंत, राजज्योतिषी, राजपुरोहित इत्यादींना बरोबर घेऊन राजरस्त्याने नगरप्रचार करावा. नंतर त्याने देवालयात जाऊन देवतांचे दर्शन घ्यावे व त्यांची पूजा करावी; मग पुन्हा गजारूढ होऊन सर्वांसह राजवाड्यात परत यावे; मग आपल्याबरोबरच्या सर्व लोकांचा, त्याचप्रमाणे जमलेल्या इतर लोकांचा दान, मान, मधुर भाषण इत्यादींनी सत्कार करावा, ब्राह्मणांची पूजा करावी व दीन, अनाथ यांना दान द्यावे. मग स्वस्तिवाचन करून समारंभ पूर्ण झाल्यावर त्याने अन्नांत हर्षित मनाने आप्तेष्टांसह भोजन करावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही महत्त्वाच्या राज्याभिषेकांचे वर्णन असे –

रामाचा राज्याभिषेक – रावणवध करून राम सर्व परिवारासह अयोध्येला पोचल्यावर त्याला राज्याभिषेक करण्यात आला. त्यासाठी जांबवान, हनुमान, वेगदर्शी व ऋषभ यांनी चार सागरांतून उदकाचे सुवर्णकलश भरून आणले. वसिष्ठ ऋषीने रामचंद्राला सीतेसह रत्नमय सिंहासनावर बसवले. नंतर वसिष्ठ, विजय, जाबाली, कश्यप, कात्यायन, गौतम आणि वामदेव यांनी निर्मल व सुगंधी जलाने रामाला अभिषेक केला. ऋत्विज, ब्राह्मण, कन्या, मंत्री, योद्धे, लोकपाल व देव यांनीही त्याला अभिषेक केला. नंतर सभास्थानातील रत्नजडित सिंहासनावर वसिष्ठाने रामाला यथाविधि बसवले व त्याच्या मस्तकावर किरीट चढवला. ऋत्विजांनी त्याला अलंकार घातले. शत्रुघ्नाने त्याच्यावर शुभ्र छत्र धरले. सुग्रीव व बिभीषण त्याच्यावर चामर ढाळू लागले. लाखो अश्व, दुभत्या गाई, शेकडो बैल, तीन कोटी मोहरा, मौल्यवान आभूषणे व वस्त्रे रामाने ब्राह्मणांना दिली. सुग्रीव, अंगद व हनुमान यांनाही त्याने रत्नजडित आभूषणे दिली.

युधिष्ठिराचा राज्याभिषेक – भारतीय युद्ध समाप्त झाल्यावर पांडवांनी हस्तिनापुरात मोठ्या समारंभाने प्रवेश केला व भगवान श्रीकृष्णाच्या अनुज्ञेने त्यांनी युधिष्ठिराच्या राज्याभिषेकाची तयारी केली. अभिषेकसमारंभाला पुण्याहवाचनाने सुरवात झाली. युधिष्ठिर एका उत्कृष्ट आसनावर बसला. त्याच्या समोर सात्यकी व श्रीकृष्ण आणि मागच्या बाजूला भीम व अर्जुन हे रत्नमय आसनांवर विराजमान झाले. कुंती, नकुल, सहदेव, सुधर्मा, विदुर, धौम्य, इ. आप्त निरनिराळ्या आसनांवर स्थानापन्न झाले. युधिष्ठिराने शुभ्र पुष्पे, सर्वतोभद्र चक्र वगैरे काढलेली देवतापीठे, अक्षता, भूमी, सुवर्ण, रौप्य आणि रत्ने यांना प्रथम स्पर्श केला. नंतर पुरोहित धौम्य यांच्या अनुमतीने सर्व प्रजांनी अनेक मंगलकारक पदार्थ घेऊन धर्मराजाचे दर्शन घेतले. त्या वेळी तिथे भूमी, सुवर्ण, नाना प्रकारची रत्ने, सर्व प्रकारच्या साहित्याने पूर्ण असलेली अभिषेकपात्रे; सुवर्ण, ताम्र, रौप्य आणि मृत्तिका यांचे जलपूर्ण कुंभ, साळीच्या लाह्या; दर्भ, शमी, पिंपळ आणि पळस यांच्या समिधा, मध, तूप, उंबराच्या काष्ठाची स्रुवा व सुवर्णाने सुशोभित केलेला शंख या सर्व वस्तू होत्या. मग श्रीकृष्णाच्या अनुज्ञेने पुरोहित धौम्य मुनी यांनी ईशान्येकडे सखल होत गेलेल्या वेदिकेवर शुभ शकुन पाहून रेषा काढल्या आणि व्याघ्रचर्म अंथरलेल्या, शुभ्रवर्ण आसनावर युधिष्ठिर आणि द्रौपदी यांना बसवून मंत्रोच्चारपूर्वक यथाविधि हवन केले. नंतर श्रीकृष्णाने पांचजन्य शंख घेऊन त्यातल्या उदकाने युधिष्ठिराला अभिषेक केला. त्यानंतर पणव, आनक, दुंदुभी, इ. वाद्यांचा घोष झाला. मग युधिष्ठिराने श्रीकृष्णादिकांची यथाविधि पूजा केली. त्यानंतर श्रोत्रिय ब्राह्मणांकडून त्याने स्वस्तिवाचन करविले व त्यांना सहस्र निष्क दक्षिणा दिली. त्यामुळे ब्राह्मण संतुष्ट झाले व त्यांनी युधिष्ठिराला 'तुझे कल्याण होवो व तुझा जय होवो,' असा आशीर्वाद दिला.

शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक – अर्वाचीन काळात शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक झाला होता. त्याचे वर्णन बखरींत केलेले आहे, ते असे – प्रथम गागाभट्टाने शिवाजीमहाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध केले. मग राज्याभिषेकाची पूर्वतयारी सुरू झाली. राज्याभिषेकापूर्वी शिवाजीमहाराजांनी निरनिराळ्या क्षेत्रीं जाऊन तिथल्या देवतांचे दर्शन घेतले. इ. स. १६७४ च्या मे महिन्यात ते चिपळूणला गेले व परशुरामाची पूजा करून १२ मे ला रायगडावर परत आले. मग चार दिवसांनंतर प्रतापगडावरील रामवरदायिनी मातेचे त्यांनी दर्शन घेतले व देवीला दीड मण वजनाची सुवर्णाची छत्री आणि इतरही वस्तू दिल्या. त्यानंतर रायगडावरील महादेव, भवानी व इतर देवता यांची यथासांग पूजा केली. त्यानंतर गागाभट्टांनी महाराजांकडून यथाशास्त्र प्रायश्चित्त करविले व त्यांना शुद्ध करून घेतले. दि. २८ मे रोजी गागाभट्टाने त्यांचा उपनयन संस्कार केला व त्यांना गायत्री मंत्राचा उपदेश केला.

दुसऱ्या दिवशी त्याने ज्ञाताज्ञात-दोषपरिहारार्थ सप्तधातू व सप्तधान्य यांनी महाराजांची तुला केली व एक लाख होनांसह त्या सर्व वस्तू ब्राह्मणांना दान दिल्या.

शालिवाहन शके १५९६, आनंद नाम संवत्सरे, ज्येष्ठ शु. १३ शनिवार (ता. ६ जून १६७४) हा दिवस राज्याभिषेकासाठी निश्चित करण्यात आला होता. त्याच्या आदल्या दिवशी महाराजांनी गंगोदकाने स्नान केले व उपोपण करून ब्राह्मणांना दक्षिणा दिली. गागाभट्टाला याच दिवशी पाच हजार होन व इतर ब्राह्मणांना प्रत्येकी शंभर शंभर होन मिळाले.

ज्येष्ठ शु. १३ या दिवशी महाराजांनी पहाटे समंत्रक अं… शुद्धोदकाने स्नान केले व कुलस्वामिनीचे दर्शन घेतले. गागाभट्ट आणि इतर विद्वान ब्राह्मण यांना त्यांनी नमस्कार केला व रामदासस्वामी आणि मातुःश्री जिजाबाई यांना वंदन केले.

अभिषेकाच्या वेळी शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्रे परिधान केली व गळ्यात फुलांचे हार घातले. मग ते सोन्याच्या चौरंगावर बसले. हा चौरंग दोन फूट उंच व दोन फूट रुंद होता. महाराजांच्या डाव्या बाजूला त्यांची पट्टराणी सोयराबाई व मागच्या बाजूला युवराज संभाजी बसला होता. मग अष्टप्रधानांनी सुवर्णाचे आठ कलश व तांब्याचे आठ कलश यांतून सप्त महानद्…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 8419

व समुद्र यांच्या उदकांनी मंत्रोच्चाराच्या गजरात व मंगल वाद्यांच्या घोषात महाराजांना अभिषेक केला. सोळा ब्राह्मण सुवासिनींनी त्यांना पंचारती ओवाळली. याप्रमाणे अभिषेकाचा विधी यथासांग पार पडला. मग महाराजांनी भरजरी शेंदरी अंगरखा, रत्नजडित सुवर्णालंकार, मोत्यांचा कंठा, फुलांचा हार आणि मोत्यांचा तुरा असलेली उंच पगडी असा पोषाख केला. ढाल, तलवार व धनुष्यबाण यांची पूजा केल्यावर त्यांनी गुरुजनांना वंदन केले व सिंहासन ठेवलेल्या दालनांत सुमुहूर्तावर प्रवेश केला.

राज्यारोहण ज्या दालनात व्हायचे होते ते दालन उत्तम प्रकारे सजवलेले होते. त्याच्या भिंतींवर शास्त्रानुसार निरनिराळ्या बत्तीस आकृती, स्वस्तिके व शुभ वृक्षांची चित्रे काढलेली होती. जमिनीवर मोठेमोठे रुजामे पसरले होते आणि मध्यभागी सुंदर नक्षीकाम केलेले सिंहासन ठेवले होते. सिंहासन बत्तीस मण सुवर्णाचे होते व त्याला मौल्यवान रत्ने जडवलेली होती. त्या सुवर्णाचे मूल्य चौदा लक्ष रुपये होते. रत्नांची किंमत त्याहून अधिक होती. सिंहासनाच्या अष्टकोनांना रत्नजडित आठ खांब होते. छत्रही मोती जडवलेले होते. व्याघ्रचर्माला मखमल लावून ते सिंहासनावर अंथरले होते. सिंहासनाच्या दोन्ही बाजूंना सोन्याचे त्रिशूळ उभे केले होते व त्यांवर निरनिराळी राजचिन्हे लटकवलेली होती. राजवाड्याच्या मुख्य द्वाराजवळ जलकुंभ ठेवलेले होते व त्यांच्यावर वृक्षपल्लव पसरले होते. तसेच गोपुराजवळ हत्तीचे पिल्लू व दोन सुंदर घोडे उभे केलेले होते. अशी ही सर्व शुभ चिन्हे होती.

शिवाजीमहाराज सिंहासनावर आरूढ होताच दरबारी मंडळींनी त्यांच्यावर सुवर्णपुष्पांची व रत्नपुष्पांची वृष्टी केली. मग सोळा ब्राह्मण सुवासिनींनी त्यांना पंचारती ओवाळली आणि ब्राह्मणांनी वैदिक मंत्रांच्या घोषात त्यांना आशीर्वाद दिले. महाराजांनी त्यांना नमस्कार केला. तेव्हा सर्वांनी 'शिवाजीमहाराज की जय' असा जयघोष केला. त्याने आकाश दुमदुमून गेलें. सर्व वाद्ये एकाच वेळी वाजू लागली. राज्यातील सर्व किल्ल्यांवर राज्यारोहणाच्या ठरवलेल्या वेळी तोफांची सरबत्ती झाली. गागाभट्टाने मोत्यांचा तुरा लावलेला भरजरी राजमुकुट महाराजांच्या मस्तकावर ठेवला व 'छत्रपती की जय' असा घोष केला.

नंतर वेदोनारायणांनी त्यांना आशीर्वाद दिले. त्या सर्वांना मिळून महाराजांनी चौवीस हजार होन दक्षिणा वाटली. त्यांपैकी सात हजार होन गागाभट्टाला मिळाले. याशिवाय महाराजांनी अनेकांना रत्नजडित सुवर्णकमले, सुवर्णपुष्पे व नानाविध वस्त्रे दिली; षोडश महादानेही दिली. अष्टप्रधानांपैकी प्रत्येकाला एक लक्ष होन, एक हत्ती, एक घोडा, वस्त्रे व अलंकार दिले. अष्टप्रधानांची मुसलमानी नावे बदलून त्यांनी मुख्य प्रधान, मंत्री, अमात्य, सुमंत, पंडितराव, सचिव, सेनापती व न्यायाधीश अशी संस्कृत नावे ठेवली व तीच पुढे प्रचलित केली.

युवराज संभाजी, मुख्य प्रधान मोरो त्रिंबक पिंगळे आणि मुख्य राजगुरू गागाभट्ट असे तिघेजण सिंहासनाच्या किंचित खालच्या बाजूला पण सर्वांना दिसतील; असे बसले. बाकीचे सात प्रधान सिंहासनाच्या उजव्या व डाव्या बाजूला ओळीत उभे राहिले. बाकीची दरबारी मंडळी व पाहुणे आपापल्या योग्यतेप्रमाणे उभे राहिले. सर्वांनी महाराजांना नजराणे दिले. मग महाराज सिंहासनावरून खाली उतरले व बाहेर येऊन आपल्या घोड्यावर स्वार झाले. राजवाड्याच्या मैदानात आल्यावर महाराज घोड्यावरून उतरले व आपल्या आवडत्या हत्तीवर आरूढ झाले. हा हत्ती उत्तम प्रकारे सजवलेला होता. हत्तीच्या आसपास अष्टप्रधान, मागे सगळी फौज आणि जरीपटका व भगवा झेंडा, सर्वांत पुढे दोन हत्तींवर आपापल्या तुकडीचे झेंडे घेऊन सज्ज झालेले पायदळ, नंतर तोफखाना व वाद्ये असा या स्वारीचा थाट होता. रायगडावर या वेळी प्रत्येक घर ध्वजापताकांनी व तोरणांनी शृंगारले होते. स्वारी राजरस्त्यावरून चालली असता घरोघरच्या सुवासिनींनी राजावरून मंगलदीप ओवाळले व त्याच्यावर लाह्या, फुले व दुर्वा यांचा पाऊस पाडला. रायगडावरील अनेक मंदिरांत जाऊन महाराजांनी दर्शन घेतले व स्वारी राजमहालात परत फिरली.

या समारंभासाठी हिंदुस्थानातील सर्व ठिकाणचे विद्वान ब्राह्मण मुद्दाम बोलावण्यात आले होते. शिवाय, हा अभूतपूर्व समारंभ पाहण्यासाठी शेकडो लोक आपणहोऊन रायगडावर आले होते. एकंदर अकरा हजार ब्राह्मण सहकुटुंब सहपरिवार रायगडावर जमले होते. म्हणजे त्यांचीच संख्या जवळजवळ पन्नास हजार झाली होती. याशिवाय सरदार, आप्तेष्ट, राज्यातील बहुतेक अंमलदार, इतर राजांचे वकील, परदेशी व्यापारी व प्रवासी असे सुमारे पन्नास हजार लोक जमले होते. अशा प्रकारे सुमारे एक लक्ष लोक रायगडावर जमले होते व प्रत्यही दोन वेळा तिथे लक्षभोजन होत होते. या सर्व लोकांच्या सुखसोयींचा आगाऊ विचार करून त्यांची राहण्याची व जेवणखाण्याची व्यवस्था करण्यात शिवाजीमहाराजांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय येतो, असे तत्कालीन इंग्रज लेखकांनी लिहून ठेवले आहे. [राज्याभिषेकचंद्रिका–श्री. दाजी नागेश आपटे, १९५०]

राझू द. भारतातील एक तेलुगू जात. या लोकांना राजू असेही म्हणतात. कडप्पा आणि उत्तर अर्काट या जिल्ह्यांत यांची सर्वांत जास्त वस्ती आहे. विजयानगरच्या सैन्याबरोबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते या प्रदेशात आले व इकडे स्थायिक झाले. हे लोक स्वतःला क्षत्रिय म्हणवून घेतात. पूर्वी हे लोक लष्करात नोकरी करीत.

उत्तर अर्काटमधील राझू लोकांनी लष्करी पेशाचा त्याग केला असून, ते शेती करतात. यांच्यापैकी बरेचसे लोक वैष्णव असून, काही थोडे शैव आहेत. निमिपांबा नामक देवीलाही हे भजतात. क्षत्रिय असल्यामुळे पुरुष गळ्यात जानवे घालतात.

विशाखापट्टम जिल्ह्यातील राझूंचे कोंड राझू (डोंगरमाथ्यावर राहाणारे) आणि भूराझू (सपाट जमिनीवर राहणारे) असे दोन भेद आहेत.

गोदावरी जिल्ह्यातील राझू हे आपल्याला सूर्यवंशी, चंद्रवंशी व मच्छीवंशी मानतात आणि आपला संबंध अनुक्रमे रामचंद्र, पांडव आणि हनुमान यांच्याशी जोडतात. त्यांच्या स्त्रिया गोषा पाळतात. इथले बहुतेक लोक शेती करतात. जमीनदार राझूंची काली ही कुलदेवता असते. काही राझू लक्ष्मीलाही भजतात.

तिनेवेल्ली जिल्ह्यातील राजापालैयम या गावी आणि त्याच्या आसपास बरेच राझू लोक राहतात. विजयनगरच्या राजाच्या धाकट्या भावाबरोबर चारपाच शतकापूर्वी आपण इथे आलो, असे हे सांगतात. त्यांच्यांत धनंजय, काश्यप, कौंडिण्य आणि वसिष्ठ ही चार गोत्रे असून, त्यांत पुन्हा पोटभेद आहेत. ते तेंगलई वैष्णवपंथी असले, तरी अय्यनारला भजतात. यांचे पुरोहित ब्राह्मण असतात.

विवाहप्रथा – साखरपुडा मुलीच्या घरी होतो. मांडवात एका चौथऱ्यावर केळी, नारळ, विड्याची पाने, सुपाऱ्या, हळकुंडे व फुले या वस्तूंनी भरलेली तवके ठेवतात.

एक ब्राह्मण सुवासिनी पंचवीस रुपये व खण ठेवलेले एक तवक घेऊन येते. मग या सर्व वस्तूंनी वधूची ओटी भरतात, तिला फुले माळतात आणि तिच्या अंगाला हळद व चंदन लावतात. या वेळी ब्राह्मण सुवासिनीला थोड्या साळी देतात.

लग्नाच्या दिवशी सकाळी वधूपक्षाकडील मंडळी वाजतगाजत, मिरवणुकीने केळी, नारळ पानसुपाऱ्या व एक पागोटे घेऊन वरगृही जातात. नंतर नवरामुलगा पुरोहित व आप्तेष्ट स्त्रीपुरुषांसह विहिरीवर स्नानासाठी जातो. तिथे स्त्रिया त्याला मस्तकावर दूध शिंपडतात व त्याला स्नान घालतात. घरी परत आल्यावर मांडवात दूधखांब पुरतात आणि त्याला आंब्याचे टाळे बांधतात. त्या खांबावर एक आडवा खांब ठेवतात आणि त्याला एका फडक्यात नारळ, सुपारी व हळकुंड गुंडाळून बांधतात. नंतर ते सर्व सुताराला देतात. नवरामुलगा व त्याची इतर मंडळी मग वधूगृही जातात व तिथेही दूधखांब पुरण्याचा विधी होतो. नंतर वरपक्षाकडील लोक आपल्या घरी येतात. मग न्हावी वराची हजामत करतो व त्याची नखे कापतो. मग ब्राह्मण पुरोहित त्याचे जातकर्म, नामकरण, चौल, उपनयन, इ. संस्‍ पार पाडतो. संध्याकाळी वर पालखीत बसून वधूगृही जा आणि बोहल्यावर बसतो. वधूलाही तिचे भाऊ त्याच्या शेजा आणून बसवतात. एक भाऊ तिचेच हात तिच्या डोळ्यांवर दा

राझू नवरामुलगा

धरतो. तिने वराला पाहू नये, म्हणून ही योजना असते. ल ब्रूण म्हणून पुरोहित वराच्या गळ्यात दुसरे जानवे घालतां सर्वजण वधू-वरांवर अक्षता टाकतात. नवरा मुलगा व गळ्यात ताळी बांधतो. मग वधूचे डोळ्यांवरचे हात बाजूला तात. त्यानंतर वधू-वर बोहल्याभोवती प्रदक्षिणा घालतात ती दोघे एका खोलीत ओळीने मांडून ठेवलेल्या पन्नास रंगवं घटांची पूजा करतात. मग जमलेल्या लोकांना पानसुपारी तात. तिसऱ्या दिवशी पाच घटांची पूजा झाल्यावर नवरा वधूच्या गळ्यात काळी पोत बांधतो. लग्नसमारंभ चालू अ स्त्रियांना लग्नमंडपात बसायला बंदी असते. [का. ट्रा. ह

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राठोड राजपूत लोकांची प्रमुख पोटजात. जोधपूरच्या राठोड वंशाच्या उज्ज्वल राजकीय परंपरेमुळे या पोटजातीला मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. बीकानेर, किशनगढ, रतलाम, ईडर, भभुला, अमजेहरा, सीतामऊ व सैलाना येथील अधिपती-देखील जोधपूरच्या राठोड वंशातलेच होते. या राठोड जातीच्या शंभराहून अधिक शाखा झाल्या आहेत. त्यांची वस्ती मुख्यतः

राठोड राजपूत

मारवाडात आहे. प्रत्येक शाखेत अनेक सरदार, जहागीरदार व जमीनदार आहेत. राठोड वंशाच्या कुलदेवीचे नाव नागनोचिया असे आहे. पूर्वी तिचे नाव राजेश्वरी किंवा राठेश्वरी होते; पण राव डूहड याने पंचभद्र परगण्यातील नागान नामक गावी त्या देवीचे एक मंदिर बांधले, तेव्हापासून ती नागनोचिया या नावाने प्रसिद्ध झाली. प्रत्येक गावी या देवीचे स्थान निंबवृक्षाखाली असते. म्हणून राठोड लोक निंबवृक्षाला पवित्र मानतात.

राठोड लोक शिवाची आणि विष्णूची उपासनाही करतात. काही लोक हनुमान, गंगा व रामदेव यांची पूजा करतात. मेडता गावी चतुर्भुजा देवीचे मंदिर असून, तिथले राठोड लोक तिला भजतात व तिच्या नावाने पगडीवर रेशमी तुरा लावतात.

हे लोक शौर्य व स्वामिभक्ती यांसाठी प्रसिद्ध आहेत. [रा. जा.]

राठोड राजवंश पश्चिम. राजस्थानात राज्य करणारा एक वंश. राठोड व गाहडवाल ही एकाच वंशाची भिन्न नावे होत, अशी एक समजूत प्रचलित आहे. चंद वरदाईच्या पृथ्वीराज रासोमध्ये कनौजचा गाहडवाल राजा विजयचंद्र याला राठोड म्हटले आहे; त्यामुळे ही कल्पना उदय पावली. पण ती भ्रामक आहे असे श्री. गौरीशंकर ओझा यांनी म्हटले आहे. राष्ट्रकूट या नावाचा अपभ्रंश होऊन राठोड हे नाव उत्पन्न झाले. कनौज येथे गाहडवालांचे राज्य चालू असतानाच बदायूं येथे राष्ट्रकूटांची एक शाखा राज्य करीत होती. गाहडवाल राजे सूर्यवंशी होते, तर राठोड चंद्रवंशी होते आणि त्यांच्यांत विवाहसंबंध होत असत.

इ. स. ११९४ मध्ये कनौजचा राजा जयचंद्र याचा नाश झाल्यानंतर मुसलमानी आक्रमणामुळे बदायूंच्या राष्ट्रकूट (राठोड) घराण्यातील काही लोक परागंदा होऊन राजस्थानात स्थायिक झाले. त्यांच्यांतील सीयजी किंवा शिवजी नामक पुरुष कोलूमदच्या सोळंकी सरदाराच्या आश्रयाला गेला. त्याच्या पदरी राहून शिवजीने खूप पराक्रम केला आणि मेर व मीना नामक आदिवासी जमातींचा पराभव करून त्यांच्या प्रदेशावर आपली सत्ता स्थापली. शिवजीच्या शौर्यामुळे प्रसन्न होऊन सोळंकीने त्याला आपली बहीण दिली. शिवजी हा राठोड वंशाचा मूळ पुरुष व स्वतंत्र राज्याचा संस्थापक मानला जातो. इ. स. १२०० ते १४०० या दोन शतकांच्या कालखंडात अश्वत्थामा, डूहड, रायपाल, कन्हल, जल्हण, चाडो, थीडो, सिल्को, वीरमदेव व चोंडा या राठोड पुरुषांनी पालीच्या आसपासच्या लहानमोठ्या संस्थानिकांना जिंकून त्या राज्याचा विस्तार केला. डूहड याने तर कनौजवर स्वारी केली होती. पण त्या धाडसी प्रयत्नात तो मारला गेला. इ. स. १३९५ मध्ये चोंडा याने पडिहारांची राजधानी मंडोरनगरी जिंकून घेतली व पडिहार राजकन्येशी विवाह केला. त्याने मंडोरला आपली राजधानी नेली. त्यानंतरच्या २५–३० वर्षांत चोंडाने भोवतालची बरीच ठिकाणे जिंकली.

श्री. अनिलचंद्र बानर्जी यांच्या मते शिवजीला मारवाडात राठोडांचे राज्य स्थापण्यात यश आले नव्हते; तो केवळ पालीच्या राजाचा प्रधान होता. त्याचा पुत्र अस्थन याने मात्र खेड व ईडर ही ठिकाणे जिंकून तिथे आपले लहानसे राज्य स्थापले. अस्थनचा पुत्र डूहड याने इ. स. च्या १४ व्या शतकाच्या प्रारंभी आसपासची १४० गावे घेऊन आपले राज्य वाढवले. डूहडचा पुत्र रायपाल याने पडिहार, परमार व भट्टी यांच्याशी युद्धे करून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही प्रदेश जिंकला. त्याच्या १३ पुत्रांनी मारवाडात राठोडांचे वर्चस्व प्रस्थापित केले, अशा कथा प्रचलित आहेत.

त्यांतील ज्येष्ठ पुत्र कनपाल (कन्हल) याने भट्टींशी संग्राम केले. पण त्यात तो स्वतः मारला गेला. भट्टींना सिंधमधील मुसलमान मदत करीत होते. त्यामुळे राठोडांचा मुसलमानांशी संघर्ष सुरू झाला. कनपालचा पुत्र जलनशी (जल्हण) याने सिंध, मुलतान, ठठ्ठा, भिन्नमाळ, पालनपूर वगैरे प्रदेशांवर स्वाऱ्या करून आपले राज्य विस्तारण्याचा प्रयत्न केला. पण त्याला यश मिळाले नाही. उलट तो लढाईत मारला गेला. त्याचा पुत्र चाडो याचीही तीच गत झाली. तो आणि त्याचा पुत्र तिडो (थीडो) यांनी भट्टी, चौहान व मुसलमान यांच्या प्रदेशांवर बऱ्याच स्वाऱ्या करून लूट मिळवली, असे दिसते. तिडोच्या मागून सल्खा (सिल्को), कन्हड, त्रिभुवनसी, मल्लीनाथ, जैतमल, बीरमदेव यांचा उल्लेख आढळतो. त्या कालखंडात राठोड घराण्यात यादवी माजली होती आणि त्या घराण्यातील निरनिराळे पुरुष खेड, महोबा व सिवाना येथे स्वतंत्रपणे राज्य करीत होते, असे श्री. बानर्जी म्हणतात. बीरमदेवाचा पुत्र चोंडा याने त्या कठीण परिस्थितीला धैर्याने तोंड देऊन सर्व राठोड शाखांचे संघटन केले आणि मंडोर येथे प्रबळ सत्ता स्थापली. टॉडच्या मते चोंडाने पडिहार सरदाराला ठार मारून मंडोर घेतले; पण पंडित रेऊ म्हणतात, की ईडरच्या पडिहार राजाने त्याला आपली कन्या दिली व मंडोरही दिले. चोंडाने हळूहळू मुसलमानांकडून नागौर, खाटू, डिडवाना, सांभर व अजमेर ही ठिकाणे घेतली. त्याने चौहानांकडून नाडोल घेतले व स्वतःचा भाऊ जयसिंग याच्याकडून फालोडी घेतले. त्या वेळी दिल्लीचे सुलतान दुबळे झाले होते; पण गुजरातचा सुलतान मात्र प्रबळ होता. राठोडांना त्याच्याशी झगडा करावा लागला.

चोंडाच्या कारकीर्दीत राठोडांचे राज्य बरेच विस्तारले होते. तरीही ते मेवाडचे श्रेष्ठत्व मान्य करीत होते. चोंडानंतर त्याचा लहान पुत्र काना हा गादीवर बसला. त्याची बहीण हंसा मेवाडचा महाराणा लाखा याला दिली होती. चोंडाचा ज्येष्ठ पुत्र रणमल्ल नाराज होऊन महाराणा लाखाकडे गेला. महाराणा लाखा याच्या मृत्यूनंतर हंसाबाईचा पुत्र मोकल मेवाडच्या गादीवर बसला. रणमल्लाचा भाऊ काना मरण पावल्यावर रणमल्लाने मेवाडच्या सहाय्याने मंडोरचे राज्य घेतले. त्याचा पुत्र जोधा याने इ. स. १४५९ मध्ये जोधपूर नगराची स्थापना केली. तिथे त्याने ३० वर्षे राज्य केले. त्या काळात मारवाडचे वैभव खूप वाढले आणि त्याची गणना मेवाडच्या खालोखाल होऊ लागली. इ. स. १४६५ साली जोधाचा सहावा पुत्र बीका याने पश्चिमेकडच्या वाळवंटात दूरवर शिरून तिकडे एका स्वतंत्र राज्याची स्थापना केली. तेच सांप्रतचे बीकानेर होय. बीकानेर पाहा.

जोधानंतर त्याचा पुत्र सूरजमल आणि त्याच्यानंतर त्याचा नातू गंगा यांनी राज्य केले. गंगाच्या कारकीर्दीत मेवाडचा महाराणा सांगा व बाबर यांची लढाई झाली. त्या लढाईत मारवाडच्या सैन्यानेही भाग घेतला होता. बाबराशी शिक्री येथे झालेल्या लढाईत गंगाचा नातू रायमल्ल व आणखी अनेक राठोड सरदार मारले गेले.

इ. स. १५३२ साली महाराजा गंगा मरण पावला व मालदेव गादीवर बसला. तो फार कर्तबगार होता. बाबराच्या चढाईमुळे त्या वेळी मेवाड व मारवाड ही दोन्ही राज्ये हतबल झालेली होती. मालदेवाने आपल्या राज्यातील सरदारांना संघटित करून राठोडांचे सामर्थ्य वाढवले आणि बीकानेर, नागौर व अजमेर ही राज्ये जिंकून आपल्या राज्याला जोडली. मेवाड, आंबेर व जैसलमीर या राज्यांवरही त्याने आक्रमण केले. राज्याच्या संरक्षणासाठी त्याने अनेक किल्ले बांधले. जोधपूर शहराच्या भोवती त्याने मजबूत तट बांधला. राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनेही त्याने बऱ्याच सुधारणा केल्या.

इ. स. १५४० मध्ये शेरशहाने हुमायून बादशहाचा पराभव केला, तेव्हा मालदेवाने त्याला मारवाडला येण्याचे निमंत्रण दिले होते. पण तो लगेच तिकडे न जाता सिंधमध्ये गेला व तिथून गुजरातेत गेला. पुढे मालदेवाने शेरशहाशी सख्य करण्याचा प्रयत्न केला. पण शेरशहाने इ. स. १५४४ साली मारवाडवर स्वारी केली. मालदेवाने त्याला तोंड देण्यासाठी मोठे सैन्य पाठवले. मेडता येथे दोन्ही सैन्यांची गाठ पडली. पण लढाई अशी झालीच नाही. शेरशहाने कपटनीती आचरून मालदेवाच्या सरदारांमध्ये फूट पाडली आणि त्यामुळे मालदेव निराश होऊन जोधपुराला निघून गेला. नंतर काही स्वामिनिष्ठ सरदारांनी चिडून शेरशहाच्या सैन्यावर जोरदार हल्ला केला; पण ते सैन्यासह रणात मारले गेले. नंतर शेरशहादेखील, त्या उजाड प्रदेशात अधिक दिवस काढणे कठिण झाल्यामुळे, परत गेला. मालदेवाने त्यानंतर अनेक वर्षे निर्वेध राजकारभार केला. पुढे इ. स. १५६२ साली अकबर बादशहाने मारवाडवर मोठे सैन्य पाठवले आणि मेडताचा किल्ला जिंकला. तेव्हा मालदेवाने अकबराचे प्रभुत्व मान्य केले.

मालदेव इ. स. १५६२ मध्ये मरण पावला व त्याचा पुत्र चंद्रसेन गादीवर आला. तो मोगलांचे प्रभुत्व मानण्यास तयार नव्हता. म्हणून अकबराने इ. स. १५७० मध्ये मारवाडवर स्वारी केली. तेव्हा निरुपाय होऊन चंद्रसेनाने अकबराचे प्रभुत्व मान्य केले. बीकानेरच्या रायसिंहानेही मोगलांचे प्रभुत्व मानले.

चंद्रसेन इ. स. १५८१ मध्ये मरण पावला आणि त्याचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठा भाऊ उदयसिंह गादीवर आला. त्याने मोगलांची सार्वभौम सत्ता मान्य केली आणि आपली कन्या जगत गोसाई उर्फ जोधाबाई राजपुत्र सलिम याला दिली. मग अकबराने अजमेर वगळून त्याचा सर्व प्रदेश त्याला परत दिला. उदयसिंहाने इ. स. १५९५ पर्यंत मोगलांचा सामंत म्हणून राज्याचा उपभोग घेतला. त्याच्या नंतर त्याचा पुत्र सूरसिंह मारवाडचा राजा झाला. त्याने अकबराच्या साम्राज्यविस्ताराच्या मोहिमांत भाग घेऊन मोठी कामगिरी केली. त्यामुळे प्रसन्न होऊन अकबराने त्याला सवाई राजा ही पदवी दिली होती. त्याने इ. स. १६१९ पर्यंत राज्य केले. त्याच्या कारकीर्दीत मारवाडचे व जोधपूरचे वैभव खूप वाढले. त्याने सूरसागर नावाचा एक सुंदर तलाव बांधला. त्याच्या नंतर त्याचा पुत्र गर्जसिंह याने इ. स. १६१९ ते १६३८ पर्यंत मोगल साम्राज्याची सेवा केली. तो दक्षिण हिंदुस्थानचा सुभेदार होता. त्याचा पुत्र जसवंतसिंह इ. स. १६३८ साली मारवाडचा राजा झाला. मारवाडच्या इतिहासात यानेच प्रथम महाराजा ही पदवी धारण केली. तो अत्यंत पराक्रमी व कर्तबगार होता. मोगल साम्राज्याचे भवितव्य त्याच्या हाती होते, असे म्हणतात. पहिली २० वर्षे त्याने शहाजहान बादशाहाची सेवा एकनिष्ठेने केली. बादशहा आजारी पडल्यानंतर त्याच्या पुत्रांमध्ये जी यादवी माजली होती, तीत जसवंतसिंहाने प्रथम दाराची बाजू घेतली. पण लढाईत जसवंतसिंहाचा पराभव होऊन तो मारवाडात निघून गेला. त्यानंतर औरंगजेबाने त्याला बोलावून घेतले आणि गुजरातचा सुभेदार नेमले. पुढे त्याने औरंगजेबाच्या साम्राज्यात ठिकठिकाणी सुभेदारी केली. तो बादशहाशी एकनिष्ठ होता. पण औरंगजेबाला मात्र त्याच्याविषयी सदैव संशयच वाटे. औरंगजेबाला जसवंतसिंहाशी उघड वैर करण्याची हिंमत झाली नाही. जसवंतसिंह जिवंत असेपर्यंत औरंगजेबाला निर्धास्त वाटणार नाही, असे मेवाडचा महाराणा राजसिंह म्हणत असे. शेवटी काबुल येथे असताना इ. स. १६७८ साली बादशाहाने त्याला विषप्रयोग करून ठार मारविले, असे काही इतिहासकारांचे मत आहे.

जसवंतसिंह फार धर्मनिष्ठ होता, तसाच महापराक्रमी होता. मेवाडचा राजसिंह, आंबेरचा जयसिंह व छत्रपती शिवाजीमहाराज यांचे साहाय्य घेऊन मोगल साम्राज्याचा नाश करणे त्याला शक्य झाले असते. तेवढे सामर्थ्य त्याच्या अंगी होते. पण ती दृष्टीच त्याला नव्हती. मोगल बादशाहीची एकनिष्ठपणे सेवा करतानाच तो कपटाने मारला गेला.

जसवंतसिंहाचे तीन पुत्र आधीच मरण पावले होते. मेवाडच्या राजसिंहाची बहीण जसवंतसिंहाची राणी होती. पतीच्या मृत्युसमयी ती गरोदर होती. तिला जो पुत्र झाला त्याचे नाव अजितसिंह होय. औरंगजेबाने त्या दोघांनाही कपटाने कैद केले व मारवाडचे राज्य मोगल साम्राज्यात समाविष्ट केले. पण राठोड वीर दुर्गादास याने मोठे धाडस करून राणी व राजपुत्र यांची सुटका केली. मग त्यांना घेऊन तो राजसिंहाच्या आश्रयाला गेला. त्यानंतर त्याने सुमारे ३० वर्षे औरंगजेबाशी संग्राम केला. राजसिंहाच्या मृत्यूनंतर मेवाडच्या राजाने मोगलांशी तह केला. पण दुर्गादास मात्र लढतच राहिला. शेवटी औरंगजेबाच्या मृत्यूनंतर इ. स. १७०९ मध्ये त्याने अजितसिंहाला मारवाडचा राजा म्हणून सिंहासनावर बसवले.

बहादुरशहाबरोबर झालेल्या तहाने मोगल व राठोड यांचा लढा काही काळ थांबला. पुढे बादशाहीच्या उलथापालथीत अजितसिंहाने आपल्या पराक्रमाने बादशाहीची सूत्रे अनेक वेळा आपल्या हाती घेतली. पुढे फर्रुखसियर बादशाहाने त्याला ठठ्ठाची सुभेदारी देऊ केली; पण ती त्याने नाकारली. कारण त्याला गुजरातची सुभेदारी हवी होती. मग बादशाहाने हुसेनअल्लीला मारवाडवर पाठवले. त्याने अजितसिंहाचा पराभव केला. इ. स. १७१४ साली त्यांचा तह होऊन अजितसिंहाने मोगलांची ताबेदारी मान्य केली व आपली कन्या फर्रुखसियरला दिली. पुढे इ. स. १७१९ साली अजितसिंह व सय्यद बंधू यांनी मिळून बादशाहाला कैद केले. त्या वेळी चार दिवस दिल्लीवर अजितसिंहाची सत्ता होती. पण ती त्याने कायम केली नाही. त्याने सय्यद बंधूकडून फक्त गुजरात व अजमेरची सुभेदारी तेवढी मिळवली. इ. स. १७२० मध्ये सय्यद बंधूंची सत्ता नष्ट झाल्यावर अजितसिंहाने अजमेरला स्वतंत्र सिंहासनाची स्थापना करून चक्रवर्ती राजाची चिन्हे धारण केली. त्याने आपल्या कन्येला सोडवून आणून पुन्हा हिंदू करून घेतले. पुढे इ. स. १७२३ साली मुहम्मदशहाने अजमेरवर स्वारी करून ते जिंकले. मग अजितसिंहाने मोगलांशी तह करून पुन्हा आपल्या पुत्राच्या नावाने मनसबदारी स्वीकारली. इ. स. १७२४ साली अजितसिंहाचा दुसरा मुलगा भक्तसिंह याने मोगलांच्या चिथावणीमुळे बापाचा वध केला; असे म्हणतात.

अजितसिंहानंतर त्याचा पुत्र अभयसिंह याने इ. स. १७४९ पर्यंत राज्य केले. तो गुजरातचा सुभेदारही होता. त्याने बादशाहीच्या वतीने अहमदाबाद जिंकले व सरबुलंदखानाचे बंड मोडून काढले. पुढे त्याने बीकानेरवर स्वारी केली असता, जयपूरचा जयसिंह बीकानेरच्या साहाय्यार्थ गेला. तेव्हा गंगवाना येथे इ. स. १७४१ मध्ये लढाई होऊन अभयसिंहाने जयसिंहाचा पराभव केला. त्या वेळी मेवाडच्या राण्याने मध्यस्थी केली आणि जयपूर, मारवाड व मेवाड या तीन राज्यांत स्नेहसंधी घडवून आणला. इ. स. १७४९ मध्ये अभयसिंह मरण पावला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यानंतरचा राठोडांचा इतिहास यादवीने भरलेला आहे. अभयसिंहानंतर त्याचा पुत्र रामसिंह गादीवर बसला. पण त्या समयी त्याचा चुलता नागौरचा जहागीरदार भक्तसिंह त्याला राजतिलक लावण्यास गेला नाही. तो गादीचा अपमान समजून रामसिंहाने नागौरवर स्वारी केली. भक्तसिंहाने त्याचा पराभव करून जोधपूर घेतले व स्वतःच गादी बळकावली. रामसिंह मराठ्यांच्या आश्रयाला गेला. भक्तसिंहाने तीन वर्षे राज्य केले. त्या अल्पावधीत त्याने राज्याची स्थिती बरीच सुधारली. पुढे रामसिंहाने शिंद्यांची मदत घेऊन मारवाडवर स्वारी केली. तेवढ्यात भक्तसिंहाच्या वहिणीने पित्याच्या वधाचा सूड म्हणून भक्तसिंहाला विषप्रयोग करून ठार मारले. त्याच्या नंतर त्याचा पुत्र विजयसिंह गादीवर बसला. त्याचे व रामसिंहाचे युद्ध सुरू झाले. पण विजयसिंहाचे सरदार त्याला सोडून गेल्यामुळे तो पळून गेला. तेवढ्यात जयाप्पा शिंद्याचा वध झाला. त्यामुळे चिडलेल्या मराठ्यांनी तिथे खूप लूटमार केली व ते निघून गेले. रामसिंह त्यामुळे निराधार होऊन वनवासी जीवन कंठू लागला आणि विजयसिंह पुन्हा गादीवर बसला. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरपर्यंत त्याने राज्य केले. त्याची त्याच्या सरदारांशी झालेली युद्धे, मराठ्यांच्या स्वाऱ्या व जबरदस्त खंडणीची वसुली, भाडोत्री रोहिले व सिंधी शिपायांनी प्रजेवर केलेले अत्याचार व विजयसिंहाचे दुराचरण या गोष्टींनीच त्याची कारकीर्द गाजली. त्या अवधीत मारवाडची समृद्धी पार नष्ट झाली. विजयसिंहाने आपल्या मानसिंह नामक नातवाला, आपल्या एका नाटकशाळेच्या मांडीवर दत्तक देऊन मारवाडच्या गादीचा वारस नेमले होते. पण विजयसिंहाच्या मृत्यूनंतर त्याच्या भीमसिंह नामक पुत्राचा पुत्र भीमसिंह याने अचानक उठाव करून सिंहासन मिळवले. गादीचे वारसदार असलेल्या आपल्या चुलत्यांना व भावांना त्याने ठार मारले. मानसिंह पळून गेला म्हणून वाचला. भीमसिंहाचा कारभारही जुलमीच होता. तो मरण पावल्यानंतर त्याच्या सरदारांनी मानसिंहाला बोलावून आणून गादीवर बसविले. तो कर्तृत्वशून्य निघाला. त्याची कारकीर्दही जुलूम, लूटमार व अत्याचार यांनीच गाजली. त्याच्याकडून इंग्रजांनी मारवाडचे राज्य इ. स. १८१८ च्या डिसेंबर महिन्यात घेतले. [राजस्थान; रा. रा. उ. ऱ्हा; मु. का. भा.; श्री. अनिलचंद्र बानर्जी – प्रो. इं. हि. कॉं., १४ वे अधिवेशन, जयपूर, १९५१; ओ. नि. सं. २]

राणादेवी (१) धनगर लोकांच्या बावीस कुळांची कुलस्वामिनी. या कुळांतील लोकांच्या लग्नप्रसंगी पुरोहित या देवीच्या नावाने प्रारंभी सर्व दिशांना तांदूळ फेकतात आणि दिशाबंधन करतात. चैत्र महिन्यात देवीची जत्रा भरते. त्या वेळी तिला कोंबडा व बकरे बळी देतात. बळी दिलेल्या प्राण्याचे शिर तिच्या आसनाखाली पुरतात. या देवीचे मंदिर कुठे आहे, त्याचा उल्लेख मात्र कुठेही मिळत नाही. [देवीकोश ३]

(२) खानदेशात वस्ती करून राहणाऱ्या यजुर्वेदी ब्राह्मणांची कुलदेवता. हिला रण्णा व सण्णा अशी दोन नावे आहेत. ज्येष्ठ मुलाच्या मुंजीत या देवीचा कुलाचार करतात. याला जागाची मुंज असे म्हणतात. हिचा विधी असा–

रविवारी या मुंजीला प्रारंभ करतात. घरातले व बाहेरचे काही लोक वाजतगाजत गावाबाहेरच्या एका आंब्याच्या झाडाखाली जमतात. तिथे झाडाखालची पाच पाट्या माती काढून तिची पूजा करतात. पूजेच्या वेळी तुपाचा एक दिवा लावतात. नंतर ती माती व दिवा घेऊन घरी येतात. हा दिवा सव्वा महिना सतत तेवत ठेवावा लागतो. मग घरात पाच चौरंग मांडून त्यावर एकेक नवी टोपली ठेवतात व त्यांत आणलेली माती ओतून धान्य पेरतात. प्रत्येक टोपलीवर आंब्याच्या लाकडाचा एकेक पाट ठेवतात. पाटावर देवीची सोन्याची प्रतिमा असते, तं राणादेवी होय. चौरंगाच्या दोन्ही बाजूंना दोन लाकडी सम ठेवतात. एकीत तेल व दुसरीत तूप असते. या समयाही आंब्याच्याच लाकडाच्या असतात. त्यादेखील सव्वा महिना तेवत ठेवायच्या असतात. या काळात रोज सोळा मेहुणे जेवायला बोलावतात. दुसऱ्या रविवारी राणादेवीचे शंकराशी लग्न लावतात लग्नाचा सर्व सोहळा करतात. शंकराची मूर्ती कुंभाराकडून मातीची करून आणतात. या दोन रविवारांमध्ये मुलाला लाभे त्या दिवशी त्याची मुंज करतात. नवव्या दिवशी देवीची बोळव असते. आठही दिवस तिला पक्वान्नांचा नैवेद्य दाखवितात. ह कुलाचार लग्नात करायचा नसतो. पाहा– कानबाई. [रज:कप.

राणा प्रताप (इ. स. १५४०–१५९७) राजस्थानातील ए शूर व स्वाभिमानी पुरुष. याचा जन्म राज स्थानातील सुप्रसिद्ध शिसोदिया कुलात झाला. मेवाडचा रा उदयसिंह यांचा हा ज्येष्ठ पुत्र. अकबराने चितोड घेतल्यानंतर उदयसिंह वनवासी झाला व चार–पाच वर्षांतच मरण पावला मृत्यूपूर्वी त्याने आपल्या आवडत्या राणीचा मुलगा जगमल याला राज्याधिकार दिले. पण तो लहान व नालायक असल्यामुळे द बारातील मातबर राजपूत सरदारांनी त्याला पदच्युत केले आणि त्याच्या जागी मेवाडचा खरा युवराज प्रताप याला सिंहासनावर बसवले. इ. स. १५७२ मध्ये कुंभलगड येथे प्रतापचा राज्याभिषेक झाला, तेव्हा तो बत्तीस वर्षांचा होता.

प्रताप गादीवर आला, त्या वेळी मेवाडची अगदी दुर्दशा झाली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. वारंवार होणाऱ्या मोगली आक्रमणांमुळे सगळा मुलूख उजाड आणि उद्ध्वस्त झाला होता. बहुसंख्य तरुण धारातीर्थी मरण पावले होते. शत्रूने शेतांतली उभीच्या उभी पिके जाळून, लुटून फस्त केल्यामुळे लोकांची आणि गुरा-ढोरांची अन्नान्नदशा चालू होती. मोठमोठे राजे-महाराजे आणि सरदार अकबराला शरण गेले होते. अनेकांनी अकबराशी नातेसंबंध जोडण्यासाठी आपल्या तरण्याताठ्या लेकी त्याला आणि त्याच्या आप्तांना बहाल केल्या होत्या. प्रतापच्या हाती केवळ अरवली पर्वतावरचा १००मैल लांब आणि ६०–७० मैल रुंद एवढा भूप्रदेश स्वतंत्र राज्य म्हणून उरला होता. बाकी जवळजवळ सगळ्या राजस्थानावर मोगलांची सत्ता प्रस्थापित झाली होती.

मेवाडच्या या दुर्दशेमुळे राणा प्रतापाच्या स्वाभिमानी मनाला विलक्षण वेदना होत. मेवाडचे हे छिन्नभिन्न रूप पालटून

राणा प्रतापसिंह

टाकले पाहिजे, बाप्पा रावळच्या वंशाचे वैभव पुन्हा एकदा प्रस्थापित केले पाहिजे, या एकाच विचाराने तो झपाटून गेला. प्रथम त्याने स्वदेशाशी व स्वधर्माशी दुष्मनी करून अकबराची साथसंगत करणाऱ्या स्वकीय राजपूत सरदार-संस्थानिकांशी कडक असहकार पुकारला. कोणाही प्रजाजनाने त्यांना कसलेही साहाय्य-सहकार्य देऊ नये, असा त्याने हुकूमच काढला. मग त्याने आपल्या सगळ्या प्रजाजनांना आपली शेतीवाडी व उद्योग-धंदा स्थगित करून अरवलीच्या पहाडी प्रदेशात स्थायिक होण्याची आज्ञा दिली. हेतू हा, की अकबराच्या सैनिकांना अन्नधान्य किंवा गरजेच्या कोणत्याही वस्तू मिळू नयेत व पहाडी प्रदेशातून त्यांची रसद मारून त्यांना जर्जर करता यावे. राणा प्रतापाने आपल्या प्रजाजनांना अशा प्रकारे वनवासी होण्याची आज्ञा दिली; एवढेच नव्हे, तर तो स्वतःही त्यांच्याबरोबरच वनवासी झाला. मऊ मुलायम बिछायत सोडून तो गवताच्या गादीवर झोपू लागला. त्याने मिष्टान्ने आणि पक्वान्ने यांचा त्याग केला आणि कंदमुळे व फळे यांच्यावर त्याने आपले उदरभरण सुरू केले. भरजरी आणि उंची वस्त्रप्रावरणे टाकून देऊन तो सामान्य राजपुताच्या पेहेरावात वावरू लागला. त्याने त्याग केला नाही फक्त शस्त्रांचा आणि स्वाभिमानाचा. अशा प्रकारे सर्वसंगपरित्याग करून स्वातंत्र्याच्या सिद्धीसाठी त्याने अरवलीच्या पहाडात एक घोर तप सुरू केले.

राजस्थानचे सारे राजमुकुट आपल्या चरणी वाकले, परंतु अजून मेवाडचा राणा प्रताप आपल्याला शरण येत नाही, या गोष्टीचे अकबराला विलक्षण वैषम्य वाटत होते. त्याने आपल्याला शरण आलेल्या राजपूत सरदारांच्या द्वारे प्रतापशी बोलणी केली व त्याने आपल्याला शरण येण्यातच त्याचे हित कसे आहे, हे त्याला सांगून पाहिले. पण राणा प्रतापाने त्याच्याशी कोणतीही अपमानकारक तडजोड करण्याचे नाकारले. त्यामुळे लढाई अपरिहार्य ठरली. प्रतापाची त्यासाठी सज्जता होतीच. अरवलीच्या पहाडातल्या डोंगरी जातींची व सबंध राजस्थानातील स्वाभिमानी लहान-थोर राजपुतांची सुसज्ज सेनापथके उभारून तो अकबराच्या आक्रमणाला तोंड देण्यास सिद्ध झाला.

असे सांगतात, की याच काळात मानसिंह कछवाहा हा राणा प्रतापाला भेटायला गेला; परंतु प्रतापने त्याच्या बहिष्काराच्या तत्त्वाला अनुसरून त्याच्याबरोबर जेवणही करण्याचे नाकारले व तो ज्या जागी भोजनास बसला होता ती जमीन गंगाजल व गोमूत्र शिंपडून पवित्र करून घेतली. त्याचा स्वाभिमान किती जाज्वल्य होता, हे या प्रसंगावरून कळून येते.

मानसिंहाचा अशा प्रकारे अपमान झाल्यामुळे तो सूडाने पेटून उठला व अकबराचे सेनाधिपत्य स्वीकारून प्रतापाला नमविण्यासाठी त्याच्यावर चालून गेला. प्रतापाने त्याला हुलकावण्या देत देत हळदीघाटाच्या खिंडोत गाठले. ही खिंड नाथद्वारापासून ११ मैल नैर्ऋत्येस आहे. गोगुंदा व खम-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

णोर यांच्यामध्ये पहाडांच्या ज्या बिकट व दुर्गम रांगा पसरल्या आहेत, त्यांतल्या एका अरुंद वाटेला हळदीघाट असे नाव आहे. त्याच्या दोहो बाजूंना राजपूत व भिल्ल सैनिकांची पथके ठेवून प्रतापाने मानसिंहाच्या सैन्याची चांगली कोंडी केली. मग त्याने स्वतः तीन सहस्र राजपूत सैनिकांसह खिंडीबाहेरच्या मोगल सैन्यावर हल्ला चढवला. राणा प्रतापाने अकस्मात चढवलेल्या या हल्ल्यामुळे मोगल सेनेची अगदी दाणादाण उडाली. मग मोगल सैन्याची कापाकापी करीत तो थेट मानसिंहाच्या हत्तीला जाऊन भिडला. मानसिंह हत्तीवरील अंबारीत बसला होता. राणा प्रतापाच्या चेतक घोड्याने त्या हत्तीच्या गंडस्थळावरच आपल्या टापा रोवल्या आणि निमिषार्धात राण्याने आपला भाला मानसिंहाच्या रोखाने फेकला. मानसिंह पटकन बाजूला झाल्यामुळे प्रतापाचा नेम चुकला आणि मानसिंह थोडक्यात वाचला. राणा प्रतापाच्या भोवती तेवढ्यातच मोगल सैन्याने वेढा आवळायला सुरुवात केली; परंतु प्रतापाने प्रसंगावधान राखून माघार घेतली व तो चपळाईने बाहेर पडला. त्याच्या चेतक घोड्याला शेकडो जखमा झाल्या होत्या. त्यांमुळे त्याने लवकरच प्राण सोडला.

त्यानंतर चार महिने मानसिंहाची फौज गोगुंदा येथे तळ देऊन राहिली. पण तिथे तिची फार उपासमार झाली. मग मानसिंह अजमेरला परत गेला.

त्यानंतर प्रतापसिंहाने गुजरातेतील मोगली मुलखावर छापे घालायला आरंभ केला. प्रतापाचे हे नवे साहस पाहून अकबर स्वतः गोगुंद्याला गेला व तिथे तळ टाकून प्रतापाशी मुकाबला करू लागला. सतत सहा महिने तो प्रतापाशी झुंजत होता; पण त्याचे पारिपत्य करणे त्याला जमले नाही. अखेर तो परत फिरला. अकबराची पाठ वळताच प्रतापाने पुन्हा पहाडातून बाहेर येऊन त्याच्या सैन्यावर छापे घातले व आपली ठाणी परत जिंकून घेतली.

त्यानंतरही अकबराने वारंवार प्रतापावर सैन्य धाडले; पण प्रताप अजिंक्यच राहिला. या काळात त्याने दाखवलेल्या अविचल ध्येयनिष्ठेवर व स्वातंत्र्यप्रीतीवर लुब्ध होऊन अनेक राजपूत राजे–महाराजे त्याला येऊन मिळाले व त्या सर्वांच्या साहाय्याने त्याने मेवाडचा कीर्तिध्वज डौलाने अस्मानात लहरत ठेवला. इ. स. १५८४ पर्यंत त्याने चितोड व मांडलगड सोडून उदयपुरासह सर्व मेवाड स्वतंत्र केला. ही बारा वर्षे राणा प्रतापाने अक्षरशः वनवास भोगला. अनेक वेळा त्याने उपास काढले. ऊन, वारा, पाऊस या नैसर्गिक शक्तींशी आणि अकबराच्या सैनिकांशी झुंजता झुंजता तो थकला; पण वाकला नाही, शरण गेला नाही. त्याच्या या स्वाभिमानी वृत्तीचा अन्य राजपूत सरदारांना केवढा अभिमान वाटत असे, हे पुढील प्रसंगावरून कळून येईल –

एकदा प्रताप शरण येत असल्याची वार्ता अकबराने बीकानेरचा राठोड सरदार पृथ्वीराज याला सांगितली, तेव्हा पृथ्वीराजाने प्रतापाला पत्र पाठवून त्या वार्तेचा खरेपणा अजमावला. पृथ्वीराजाने प्रतापाला लिहिले –

पातलं जो पतसाह, बोलै मुखहूंता बयण।
मिहर पछम दिस मॉह, ऊगे कासप राव उत॥
पटकूं मूंछा पाण, के पटकूं निज तण करद।
दीजे लिख दीवाण, इण दो मांहली बात इक॥

अर्थ – महाराणा प्रतापसिंह जर अकबराला आपल्या तोंडाने बादशहा म्हणेल, तर सूर्य पश्चिमेस उगवेल. हे दीवाण (महाराणा) मी आपल्या मिशांवर ताव देऊ, की आपल्या तलवारीने आपल्याच शरीरावर प्रहार करून घेऊ? या दोहोंतली एक गोष्ट कळवा.

राणा प्रतापाने पृथ्वीराजाच्या या पत्राला उत्तर दिले, तेही कवितेतच ! त्याने लिहिले –

तुरक कहासी मुखपतौ, इण तन सूं इकलिंग।
ऊगे जांही ऊगसी, प्राची बीच पतंग॥
खुसी हूंत पीथल कमध, पटको मूंछां पाण।
पछटन है जेतै पतौ, कलमों सिर कै बाण॥

अर्थ – एकलिंगजी या मुखातून अकबराला तुर्कच म्हणवितील व सूर्योदय हा पूर्वेलाच होत राहील. हे राठोड पृथ्वीराज ! जोपर्यंत प्रतापसिंहाने आपली तलवार यवनांच्या शिरावर धरली आहे, तोपर्यंत आपण खुशीने मिशीवर ताव देत राहा.

इ. स. १५८४ नंतर प्रतापाला काही थोडे स्वास्थ्य लाभले. सुमारे तेरा वर्षे त्याने शांततेचा व स्वास्थ्याचा उपभोग घेतल्यावर इ. स. १५९७ साली तो आतड्याच्या विकाराने आजारी पडला व त्यातच त्याचा अंत झाला. मृत्यूसमयीही चितोड मुक्त न झाल्याची खंत त्याला वाटत होती. त्याच्या सरदारांनी जेव्हा त्याला 'आपण चितोड मुक्त करू' असे वचन दिले, तेव्हाच त्याने शांतपणे प्राण सोडला.

मेवाडचा इतिहास लिहिणारा कर्नल टॉड याने प्रतापसिंहाचा गौरव केला आहे, तो असा – 'प्रबळ महत्त्वाकांक्षा, शासननिपुणता आणि अपरिमित साधनसंपत्ती यांच्या जोरावर अकबराने दृढनिश्चयी, अदम्य वीर्यशाली, उज्ज्वल कीर्तिमान, साहसी आणि अत्यंत उद्यमशील अशा प्रतापाला नमविण्याचा प्रयत्न केला, पण तो निष्फळ ठरला. अरवलीत अशी एकही खिंड नसेल, की जी प्रतापाच्या कोणत्या ना कोणत्या वीरकार्याने,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उज्ज्वल विजयाने अथवा त्याहून अधिक कीर्तियुक्त पराजयाने पवित्र झाली नसेल'.

भारताच्या इतिहासात राम, कृष्ण व शिवाजी यांच्याप्रमाणेच राणा प्रतापाचे नावही अजरामर झाले आहे. [रा. रा. उ. न्हा.; म. च. को.; राजपूताने का इतिहास भाग १]

राणी सती देवतास्वरूप बनलेली एक राजपत्नी. हिचे मंदिर राजस्थानातील झुंझनू गावी आहे. राणी सतीला जगदंबा मानून तिची तिथे पूजा-अर्चा होते. या देवीची ऐतिहासिक माहिती अशी –

हिचे मूळ नाव नारायणी असे होते. हिचा सासरा जालीराम अग्रवाल हा प्रथम हिसारला राहात होता. त्याचे आणि तिथल्या नबाबाचे वितुष्ट आल्यावर तो झुंझनूला राहायला गेला. तिथे त्याचा ज्येष्ठ मुलगा तनधनदास याच्याबरोबर नारायणीचा विवाह झाला. तो वधूला घेऊन घरी येत असता वाटेत नबाबाच्या सेनेने त्याच्यावर हल्ला केला. या लढाईत तनधनदास मारला गेला. त्या वेळी नारायणी युद्धासाठी उभी राहिली आणि तिने शत्रूचा पराभव केला. मग ती पतीबरोबर सती गेली. एक सेवक घोड्यावरून तिच्या अस्थी घेऊन येत असता तो घोडा झुंझनूला थांबला आणि तिथेच राणीचे मंदिर बांधले गेले.

राणी सतीच्या मंदिराजवळच इथे अन्य बारा सतींची मंदिरे आहेत. साऱ्या राजस्थानात राणी सतीला खूप प्रतिष्ठा लाभली असून, झुंझनू हे एक पुण्यक्षेत्र बनले आहे. [कल्याण–तीर्थांक]

राणी सावरगाव देवीचे एक स्थान. हे गाव मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यात गंगाखेड तालुक्यात आहे. इथे रेणुकेचे मंदिर आहे. या गावातून एक लहानशी नदी वाहते. नदीच्या पैलतीरावर रेणुका आणि अलिकडे मूळ पीठ आई अशी दोन स्थाने आहेत. रेणुका मंदिराच्या बाहेर कल्लोळ नावाचे कुंड आहे. मंदिर मोठे आहे. त्याच्या सभामंडपात होमाची जागा आहे. गाभाऱ्यात देवीचा तांदळा आहे.

दरवर्षी नवरात्रात आणि चैत्री पौर्णिमेला इथे देवीचा उत्सव असतो. चैत्रातला उत्सव पौर्णिमेपासून एकादशीपर्यंत असतो. या कालात देवीची रोज निरनिराळी वाहने करून मिरवणूक काढतात. अखेरच्या दिवशी मोठी यात्रा भरते. तिला तेलघुनीची यात्रा म्हणतात.

याशिवाय इथे काही शिवमंदिरेही आहेत. त्यांतले केदारेश्वराचे मंदिर प्रसिद्ध आहे. केदारेश्वराची शाळुंका एका आडावर असून, ती चातुर्मासात पाण्यात बुडालेली असते.

रातहव्य आत्रेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील ६५ व ६६ ही दोन सूक्ते याने रचली आहेत. त्यांपैकी ६६ व्या सूक्ताच्या तिसऱ्या ऋचेत रातहव्याचा उल्लेख आहे. परंतु तिथे अत्रीचा संबंध दिसत नाही. याव्यतिरिक्त ऋग्वेदातच अनेक ठिकाणी रातहव्याचा उल्लेख आढळतो, पण तिथे त्याचा व्यक्तिवाचक अर्थ होत नाही.

मित्रावरुणांची स्तुती हा वरील दोन्ही सूक्तांचा विषय आहे. त्यांतील एक ऋचा (ऋ. ५.६६.१) अशी –

आ चिकितान सुक्रतू देवौ मर्त रिशादसा ।
वरुणाय ऋतपेशसे दधीत प्रयसे महे ।।

अर्थ – हे ज्ञानवान भक्तांनो, स्वकार्यकुशल मित्रावरुणांना आणि विशेषेकरून उदकरूपी वरुणाला तुम्ही हविपूर्वक आवाहन करा.

सहासष्टाव्या सूक्ताच्या अखेरीस लोकमतानुवर्ती स्वराज्याची प्रार्थना केलेली आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; सी. ऋ.]

रातीजगा एक लौकिक विधी. विवाह, पुत्रजन्म, नवस फेडणे, इ. शुभ प्रसंगी राजस्थानात गाणी गाऊन रात्र जागविण्याची प्रथा आहे, तिला रातीजगा असे म्हणतात. ही गाणी बायका गातात. हरियाणा, मध्य प्रदेश, इ. ठिकाणीही ही प्रथा आहे. रातीजगा गीतांचा प्रारंभ कुलदेवतेच्या गीतांनी होतो. याशिवाय दीपक गीत, पूर्वज गीत; तसेच सतीमाता, भैरव शीतला, पीरज, इ. अनेक देवतांची गीते या प्रसंगी गायली जातात. [लोककला त्रै.; मा. लो. वि. अ.; ह. प्रा. लो.]

रात्र सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या कालाला रात्र असे म्हणतात. त्या काळात काही कृत्ये विहित आहेत, ती अशी – सायंसंध्या, होम वगैरे झाल्यावर दीप प्रज्वलित करावा आणि त्याची पूजा करावी. त्यानंतर भोजन करून स्तोत्रे वगैरे म्हणावी. रात्रीचा एकतृतीयांश भाग संपल्यावर झोपायला जावे. झोपताना पादत्राण, दंड, पाणी व विड्याचे सामान जवळ ठेवावे. ओले वस्त्र नेसून झोपू नये. पूर्वरात्र उलटल्यावर, शुभ दिवशीच रतिसुख घ्यावे. स्नान, दान, श्राद्ध, इ. कृत्ये रात्री करू नयेत.

ऋग्वेदात रात्रीचे वर्णन आले आहे. त्यातील दोन ऋचा (ऋ. १०.१२७.४–५) अशा –

सा नो अद्य यस्या वयं नि ते यामन्नविक्ष्महि ।
वृक्षे न वसतिं वयः ।।
नि ग्रामासो अविक्षत निपद्वन्तो नि पक्षिणः ।
नि श्येनासश्चिदर्थिनः ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – ती रात्री आज आमची आहे. पक्षी जसे घरट्यात विसाव्याला जातात, तसे हे रात्री, आम्ही तुझ्या सर्व प्रहरांत प्रवेश केला आहे. या रात्रीच्या वेळी ग्रामवासी, प्रवासी, पशु-पक्षी आणि भक्ष्य शोधायला फिरणारे श्येन (हेसुद्धा) स्वस्थ निद्रासुख घेतात.

रात्रिभोजनत्याग जैनांचा एक महत्त्वाचा आचारधर्म. हा आचार श्रावक व मुनी या सर्वांसाठी आहे. अहिंसादी पंच महाव्रतांच्या रक्षणासाठी जिनेश्वरांनी हे व्रत सांगितले आहे. या व्रतात सूर्यास्तापूर्वी दोन घटिका आणि सूर्योदयानंतर दोन घटिका उलटल्यावर जेवायचे असते. आहाराचे अन्न, पान, खाद्य व लेह्य असे चार भेद मानले जातात. श्रावकाने प्रारंभीच्या काळात रात्री अन्नाशिवाय इतर तीन आहार घ्यायला हरकत नसते. भात, भाकरी हे पदार्थ रात्री न खाण्यानेही प्राथमिक श्रावकाचे रात्रिभोजनत्याग हे व्रत पाळले जाते.

रात्री मी जेवणार नाही अशी प्रतिज्ञा केलेल्या जांगरा नामक मांगिणीला सागरदत्त श्रेष्ठीच्या कुळात जन्म मिळाला, अशी या व्रताची कथा आहे.

रविषेणाचार्याच्या पद्मपुराणात म्हणजे जैन रामायणात या व्रताचा उल्लेख आहे. [रात्रिभोजनत्याग – कथा, पं. जिनदास पार्श्वनाथ फडकुले, १९५६]

रात्री भारद्वाजी एक सूक्तद्रष्टी. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १२७ वे सूक्त हिने रचले आहे. सूक्ताची देवता रात्री असून, तिचे स्तवन करणे हा या सूक्ताचा विषय आहे. कुशिक सौभर हा या सूक्ताचा कर्ता आहे, असे सायणाचार्यांचे मत आहे. डॉ. राहुरकरांच्या मते रात्री हे नाव या सूक्तातील प्रतिपाद्य विषयाच्या अनुरोधाने घेतलेले असावे. या सूक्तातली एक ऋचा अशी –

रात्री व्यख्यदायती पुरुत्रा देव्यक्षभिः । विश्वा अधि श्रियोऽधित ॥

(ऋ. १०.१२७.१)

अर्थ – अनेक देशांवर राज्य करणारी, द्रुतगामी आणि शोभायमान रात्रिदेवी स्वतःच्या नक्षत्ररूपी नेत्रांनी विश्व-निरीक्षण करते.

या सूक्ताला शांतिकर्मात महत्त्व दिलेले आहे. जागृत वा निद्रित असताना पडलेल्या दुःस्वप्नांच्या परिहारासाठी दूध-भाताच्या आहुतीसह याचे पठण करावे, असे सांगितले आहे. दुष्ट ग्रहांच्या निवारणासाठी शांतिपाठ म्हणूनही याचे पठण करतात.

या सूक्तात रात्रिदेवीची स्तुती आहे. रात्रिदेवीचे जीवरात्री व ईश्वररात्री असे दोन प्रकार आहेत. ईश्वररात्रीचे दुसरे एक नाव कालरात्री असे आहे. दुर्गोपनिषदात दुर्गेला कालरात्री असे म्हटले आहे. म्हणून दुर्गासप्तशतीसमवेतही या सूक्ताचे पठण करतात. मारीचकल्पात दुर्गासप्तशतीच्या पारायणाला प्रारंभ करण्यापूर्वी रात्रिसूक्त म्हणावे, असे सांगितले आहे. [ऋ. म. भा.; प्रा. च. को.; सी. ऋ.; ह. प्रा. लो.]

राधा गोकुळातली एक गोपी, कृष्णाची प्रेयसी व वैष्णव संप्रदायातली आराध्य देवता. निरनिराळ्या पुराणांत हिच्या जन्माच्या वेगवेगळ्या कथा दिल्या आहेत, त्या अशा –

(१) पूर्वी राधा गोलोकात विष्णूसह वास करीत होती. विष्णू पृथ्वीतलावर अवतार घेणार, हे समजताच राधाही पृथ्वीवर येण्यास निघाली. भाद्रपद शुद्ध अष्टमी, रविवार, ज्येष्ठ नक्षत्र, चतुर्थ चरण या योगावर ती पृथ्वीवर अवतरली. वृषभानू राजा यज्ञासाठी भूमिशोधन करीत असता त्याला एक मुलगी सापडली व त्याने तिचे संगोपन केले. तीच राधा होय. (पद्म. पु. ब्र. ७)

(२) राधा वृषभानू नामक वैश्याला कलावती नामक भार्ये-पासून झाली (ब्रह्मवै. २. ४९).

(३) गोलोकात असताना राधेने एकदा सुदाम्याजवळ कृष्णाची निंदा केल्यामुळे सुदाम्याने तिला शाप दिला, की 'तू मानवी योनीत जन्म घेशील.' म्हणून राधा गोलोकातून पृथ्वीवर आली. (नारद पु. २८१).

(४) रामावतारात रामाने दिलेल्या वरामुळे त्याची सगुणा नामक दासी कृष्णावतारी राधा झाली. (आनंदरामायण उत्तर ९)

राधेच्या वरील भिन्न भिन्न उत्पत्तिकथा विद्वानांना घोटाळ्यात पाडतात. एकाच व्यक्तीच्या जन्मकथा भिन्न भिन्न असणे कसे शक्य आहे! राधेच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाविषयी काही पुरावे सापडत नसल्यामुळे कित्येक विद्वान तिला काल्पनिक समजतात. पण हिची काल्पनिक निर्मिती कोणत्या कालात कशासाठी झाली आणि तिचा आधार काय, हे प्रश्न शिल्लक उरतातच.

राधेच्या उत्पत्तीच्या संबंधात सर्वाधिक प्रचलित मत असे – राधा ही आर्य जातीची देवता नसून, ती मुळात आभीर जातीची कुलदेवता होती. आर्यांचा आभीरांशी जेव्हा घनिष्ट संबंध आला तेव्हा त्यांनीही या आभीर देवतेला स्वीकारले आणि तिची आराधना सुरू केली. श्री. रामकृष्ण भांडारकर यांनी हे मत मांडले आहे आणि इतर अनेकांनी त्याला पुष्टी दिली आहे. मात्र काही विद्वान तिला आर्यांचीच देवता मानतात आणि ती सांख्यशास्त्रातून उगम पावली आहे, असे प्रतिपादितात.

राधा आणि कृष्ण या दोघांचे आधार म्हणजे सांख्यशास्त्रातले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकृति-पुरुष होत. वैष्णव धर्मात प्राधान्य मिळविणारी राधा ही आपल्या मूलरूपात सांख्यांची प्रकृतीच आहे. ब्रह्मवैवर्त पुराणात श्रीकृष्णाच्या तोंडूनच तसे वदविले आहे –

ममार्द्धशस्वरूपा त्वं मूलप्रकृतिरीश्वरी।

अर्थ – हे राधे, तू माझ्या देहाची अर्धस्वरूप असून, ईश्वराची मूल प्रकृती आहेस.

काही विद्वान राधा-कृष्णसंबंध हा तंत्रमताच्या विकासाची एक पुढची अवस्था मानतात. तांत्रिकांच्या मते राधेच्या उगमाचे बीज शक्तिकल्पनेत आहे. तांत्रिक तिला श्रीकृष्णाची ल्हादिनी शक्ती मानतात व वैष्णवही त्या मताचा अनुवाद करतात.

वैष्णव सहजिया संप्रदायात स्त्री-पुरुष तत्त्वांचे प्रतिपादन करताना स्त्रीतत्त्व म्हणजे राधा व पुरुषतत्त्व म्हणजे श्रीकृष्ण असे म्हटले आहे; तर रसिक वैष्णवांच्या मते राधा-कृष्ण हे अनुक्रमे रती आणि रस हे आहेत.

शाक्ततंत्रात वामापूजेला प्राधान्य असून, त्रिपुरसुंदरी ही त्यांची मुख्य देवता आहे. प्रत्येक स्त्रीपुरुषाने स्वतःला त्रिपुरसुंदरी समजून साधना करावी, असे शाक्तमतात म्हटले आहे. शाक्तांच्या मते स्त्रीतत्त्वाचा स्वीकार केल्यावाचून साधनेचा मार्ग प्रशस्त होऊ शकत नाही. काही वैष्णव परमात्म्याची उपासना सखीभावाने करावी असे जे म्हणतात, त्या त्यांच्या मतावर शाक्तमताचा प्रभाव स्पष्ट दिसतो. अशा अनेक कारणांनी कित्येक विद्वानांनी राधाकृष्णभक्तीवर शाक्तमताचा प्रभाव असल्याचे प्रतिपादिले आहे.

राधाभावाच्या क्रमविकासात आळवार संतांनी जी कामगिरी बजावली, तिचाही विचार करणे उपयुक्त ठरेल. आळवारांचा काळ इ. स. चे ५ वे ते ९ वे शतक असा आहे. आळवारांनी श्रीकृष्णच पूज्य व पुरुषोत्तम मानला आहे. हे आळवार स्वतःला कृष्णाची नायिका मानीत असत. आळवारांच्या वाङ्मयात सुमारे चार हजार पदे कृष्णलीलाविषयक आहेत. त्यात कृष्णाबरोबर एका प्रमुख गोपीचेही वर्णन आहे. नप्पिनै हे तिचे नाव आहे. राधा हे नाव मात्र कुठेच नाही. कुरवैकूत्तू नावाचे एक तमिळ नृत्य असून, ते भागवतातल्या रासलीलेशी मिळते व जुळते आहे. यावरून असे अनुमान करता येते, की दक्षिणेत आळवार संतांमध्ये रासलीला आणि राधा-कृष्णांचा युगुलविहार याचे कोणते ना कोणते तरी रूप त्या काळी विद्यमान होते. पुढच्या काळात ते अधिकाधिक व्यक्त आणि विशद होत गेले. या कामी पुराणकारांनी व सांप्रदायिकांनी खूप हातभार लावला.

पुराणांत राधेचे विस्तृत वर्णन आढळते; पण राधा हे नाव पुराणकारांनी आणलेले नाही. त्याचा उगम पुराणांच्या पूर्वीही सापडतो. इ. स. च्या १ ल्या शतकात महाराष्ट्रामध्ये हालाची गाथासप्तशती निर्माण झाली. या गाथासप्तशतीत राधेच्याही गाथा आढळतात. त्या कालातही राधा ही कृष्णाची सखी व प्रेयसीच होती. याविषयीची एक गाथा अशी –

मुखमारुतेन त्वं कृष्ण गोरजो राधिकाया अपनयन्।
एतासां वल्लवीनामन्यासामपि गौरवं हरसि ॥

(गा. स. ८९.१)

अर्थ – हे कृष्णा, संध्याकाळी गोठ्याकडे परतणाऱ्या गायींच्या पावलांमुळे उडालेले धुळीचे कण राधेच्या डोळ्यांत गेले. ते धूलिकण काढण्यासाठी तू तिच्या डोळ्यांत फुंकर घालतोस व गोपींचा तसेच इतर स्त्रियांचाही गौरव हरण करतोस.

भागवत पुराणाला वैष्णवांचा वेद अशी संज्ञा आहे. हे पुराण द्राविड देशात रचले गेले, असे श्री. फर्कुहर यांचे मत आहे. भागवतात राधेचा प्रत्यक्ष उल्लेख नाही, तरी एक विशिष्ट गोपी इतर गोपींहून कृष्णाला अधिक प्रिय होती व तिच्याशी एकांतात तो क्रीडा करीत असे, असे वर्णन भागवतात आहे. ही गोपी म्हणजे राधेची पूर्व छाया समजली पाहिजे, असे श्री. करंबेळकर म्हणतात. इ. स. च्या ५ व्या व ६ व्या शतकांत स्वतःला राधा मानून श्रीकृष्णाची उपासना करणाऱ्या कित्येक द्रविडकन्या तमिळनाडूत निर्माण झाल्या होत्या. एक आळवार संत म्हणतो, की 'ज्या काळात श्रीकृष्ण राधेसहित विहार करीत होता, त्या काळात मी का बरे जन्माला आलो नाही?' आळवारांच्या या भावनेचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रभाव भागवतावर पडला आहे, यात शंका नाही.

आनंदवर्धनाच्या ध्वन्यालोकात (इ. स. चे ९ वे शतक) व त्रिविक्रमभट्टाच्या नलचंपूत (१० वे शतक) राधा-कृष्णांच्या विलासवर्णनाचे श्लोक आहेत. धनंजयाच्या दशरूपकात तर (१० वे शतक) श्रीकृष्ण राधेचा अनुनय करताना दिसतो. 'केनालीकमिदं तवाद्य कथितं राधे मुधा ताम्यसि!' = हे राधे, तुला हे (माझ्या अन्य स्त्री-प्रेमाविषयी) खोटेच काहीतरी कुणी सांगितले? उगाच का माझ्यावर रागावतेस?'

ब्रह्मवैवर्त पुराणात राधा-कृष्णांच्या लीला दिव्य शृंगाराच्या पार्श्वभूमीवर रंगवल्या आहेत. भागवतात छायारूपाने वावरणारी राधा ब्रह्मवैवर्त पुराणात कृष्णाची शृंगारसहचरी म्हणून निश्चित झाली. तसेच तिचे स्वरूप व कार्यही स्पष्ट झाले.

इ. स. च्या बाराव्या शतकात बंगालमध्ये कवी जयदेव याने गीतगोविंद नावाचे राधा-कृष्णांच्या शृंगारलीलांचे काव्य लिहिले. भाषासौंदर्य, रसमाधुर्य व छंदोवैचित्र्य या वाङ्मयीन गुणांनी त्या काव्याने जनमनाची चांगलीच पकड घेतली. बंगालमधल्या वैष्णवांचा पुढे तो भक्तिग्रंथच ठरला. बंगाल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मधल्या वैष्णव धर्माची इमारत गीतगोविंदाच्या पायावरच उभारली गेली. गीतगोविंदातले राधा-कृष्णांचे विरहप्रसंग हे जीवात्मा आणि परमात्मा यांच्या विरहाचे द्योतक समजले जातात. त्यांचे मीलन हे जीव-ब्रह्मांचे मीलन मानले जाते. त्यांतली राधा कृष्णरमणोत्सुक आहे. ती कामातुरही आहे. याविषयीचा एक श्लोक असा –

स्मरातुरां दैवतवैद्यहृद्य त्वदङ्गसङ्गामृतमात्रसाध्याम् ।
विमुक्तबाधां कुरुषे न राधामुपेन्द्र वज्रादपि दारुणोऽसि ।।

अर्थ – हे अश्विनीकुमारतुल्य सुंदर उपेंद्रा, मी कामातुर आहे. हा माझा विकार केवळ तुझ्या अंगसंगरूपी अमृतानेच दूर होणार आहे. या राधेची ही मदनव्यथा तू नष्ट करणार नसशील, तर तू वज्राहूनही कठोर आहेस.

जयदेव, बोपदेव, उमापती, चंडीदास हे सर्व कवी राधेला कृष्णाची परकीया नायिका मानतात. नरसी मेहताही राधा-कृष्णांच्या प्रेमलीला शृंगारांच्या पार्श्वभूमीवरच वर्णितो.

निंबार्काचार्यांचे दशश्लोक नावाचे एक स्तोत्र असून, त्यात त्यांनी राधेला कृष्णाची मूलप्रकृती मानले आहे –

अङ्गे तु वामे वृषभानुजां मुदा विराजमानामनुरूपसौभगाम् ।
सखीसहस्रैः परिसेवितां सदा भजेम देवीं सकलेष्टकामदाम् ।।

अर्थ – श्रीकृष्णाच्या वामांगी आनंदाने विराजमान होणारी, जिचे सौंदर्य कृष्णाला अनुरूप आहे अशी, हजारो सख्यांनी नेहमी परिसेविलेली आणि सकल इष्टकाम पूर्ण करणारी अशा वृषभानुकन्या राधादेवीला आम्ही भजावे.

अष्टछाप कवींत सूरदास प्रभृती कवी येतात. त्यांनी राधेला कृष्णाची प्रेयसी, कृष्णांची मूलशक्ती, त्याची वृंदावनातील शृंगार-सहचरी, विश्वाची ल्हादिनी शक्ती अशा विविध स्वरूपांत पाहिले आहे व वर्णिले आहे.

हरिऔध या हिंदी कवीचे प्रियप्रवास नावाचे कृष्णविषयक काव्य आहे. त्यातली राधा सरल, सुशील व अतिप्रेमळ आहे. ती कृष्णाची नायिका आहे. कृष्ण आपला पती व्हावा यासाठी ती प्रयत्न करते. ती म्हणते –

बहुव्रत रखती हूं देवता हूं मनाती ।
मम पति हरि होवे चाहती मैं यही हूं ।।

अर्थ – मी अनेक व्रते करते. अनेक देवतांना नवस करते. श्रीकृष्ण माझा पती व्हावा एवढीच गोष्ट मला हवी आहे.

विद्यापती, चंडीदास वगैरे गौडदेशीय कवींनी राधेचे कृष्ण-प्रेम शरीरप्रधान, व्यामोहयुक्त व भावनासंकुल बनवले आहे. सूरदासाच्या काव्यातही राधा शारीरिक भावनांपासून अलिप्त झालेली नाही. पण यांपैकी कोणीही राधेच्या माधुर्यभक्तीचा अध्यात्माशी संयोग घडवून आणलेला नाही. ते काम अलिकडच्या काळात श्री. द्वारिकाप्रसाद मिश्र यांनी आपल्या कृष्णायन नामक काव्यात केले. कृष्णायनातील राधा प्रेमयोगिनी आहे, साक्षात भक्ती आहे, प्रेमशक्ती आहे आणि आपल्या माधुर्यबळावर कृष्ण-परब्रह्माशी अद्वैत साधून सामरस्यात विलीन झालेली आहे. श्री. मिश्र लिहितात–

लखी सच्चिदानन्द निज सन्मुख हरि तन्मय, उत्कंठित उन्मुख ।
राधामाधव मिलन अनूपा हरि राधा राधा हरिरूपा ।।

अर्थ – राधा स्वतःच्या सन्मुख सच्चिदानंद कृष्णाला पाहत आहे. श्रीहरी राधामय झाला असून, उत्कंठित आणि उन्मुख झाला आहे. हे राधा–माधवांचे मीलन आगळे आहे. इथे राधा हरिरूप आणि हरी राधारूप बनला आहे.

म्हणूनच श्री. करंबेळकर म्हणतात – 'राधातत्त्वाचा पूर्ण विकास 'कृष्णायनात' आढळतो. पं. द्वारिकाप्रसाद मिश्रांनी अशी सर्वथा शुद्ध, सर्वदोषातीत व प्रेममयी राधा निर्माण करून तिच्या माधुर्यभक्तीच्या द्वारे तत्त्वज्ञानातील एक गहन कूट सोडविले आहे. ही त्यांची कृष्णचरित्राची अतुलनीय सेवा आहे.'

पौराणिक राधा – सर्व पुराणांमध्ये ब्रह्मवैवर्त पुराणाने राधे-विषयी विस्तृत लिहून तिचे माहात्म्य वाढविले आहे. त्याचा आशय असा – राधा हा एक मंत्र आहे. त्यातल्या रकाराच्या उच्चारणाने कोटी जन्मातील शुभाशुभ कर्मे आणि कर्मफले नष्ट होतात. आकाराच्या उच्चारणाने गर्भवास, मृत्यू व रोग टळतो. धकार दीर्घायुष्य देतो आणि आकार भवबंधातून मुक्त करतो.

राधा ही प्रथम गोलोकात उत्पन्न होऊन कृष्णाची प्राणेश्वरी बनली. ती पुढे वृषभानू गोपाच्या उदरी वृंदावनात जन्मली आणि व्रजमंडलातल्या भक्तजनांची आराध्य बनली. रायाण नावाच्या एका वैश्य तरुणाशी तिचे लग्न झाले; पण हे लग्न राधेच्या छायेशी झाले. राधा आपल्या देहात स्वतःची छाया ठेवून त्या देहापासून दूर झाली आणि मूलरूपात कृष्णाच्या हृदयात जाऊन बसली.

देवीभागवतात राधेला मूलप्रकृती मानले आहे आणि तिच्या पूजेचे विस्तृत विधान सांगितले आहे. 'श्रीराधायै स्वाहा' हा तिचा षडक्षरी मंत्र होय. हा मंत्र मूलप्रकृतीच्या उपदेशाने सर्व-प्रथम कृष्णाला रासमंडलात प्राप्त झाला. राधेची पूजा केल्या-वाचून कृष्णपूजेचा अधिकार प्राप्त होत नाही. या आद्य प्रकृतीशी आदि-पुरुषाने क्रीडा केली तेव्हा जो पुत्र उत्पन्न झाला, तोच महाविष्णू होय. त्यामुळे राधा श्रीकृष्णाचीही माता ठरते. तो तिची पूजा करीत असे.

सांप्रदायिक राधा – मधुराभक्तीच्या संप्रदायात राधेचे स्थान अत्युच्च आहे. ती कृष्णाच्या वामांगातून उत्पन्न झाली असून, त्याची ल्हादिनी शक्ती आहे, असे मानले जाते. श्रीकृष्णाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समस्त लीलांची ती संचालिका असून, कृष्णाकडून आराध्य आहे.

वल्लभसंप्रदायात तिचे माहात्म्य वर्णिले आहे, ते असे–राधा गोलोकात नित्य चालणाऱ्या रसरूप कृष्णाच्या रासनृत्यात भाग घेणारी आहे. ती भगवंताच्या आनंदाची पूर्णशक्ती आहे. त्या दोघांचा संबंध चंद्रचंद्रिकेसारखा आहे. ती श्रीकृष्णाची केवळ प्रेयसीच नसून, त्याची स्वामिनी आहे. भगवान तिच्या अधीन आहे.

निंबार्क संप्रदायात ती कृष्णाची स्वकीया असून, भक्तीची परमाराध्य आहे. त्यांचा नित्य दांपत्य संबंध आहे. रसत्व व रसिकत्व हे त्या युगुलात सुप्रतिष्ठित आहे. या संप्रदायानेच राधा-कृष्णांची युगलउपासना रूढ केली. त्यानेच कृष्णाजवळून रुक्मिणीला दूर केले आणि तिच्या जागी राधेची प्रतिष्ठा केली.

राधावल्लभ संप्रदायात राधा ही आनंदस्वरूप आहे. कृष्णाच्या आनंदाचेच नाव राधा होय. राधा–कृष्णांचा विहार हा नित्य आहे. राधाभाव हा कोणत्याही बाह्य लौकिक कर्मांनी किंवा ज्ञानाने उपलब्ध होणारा नव्हे. केवळ तो प्रेमभावनेनेच उपलब्ध होईल. राधा ही कृष्णाची उपासिका नाही, तर कृष्णाची उपास्य आहे. खरे तर इथे कोणी उपास्य नाही किंवा उपासकही नाही. कोणी साध्य नाही किंवा साधकही नाही. ती दोघे एकाच श्री-तत्त्वाची रूपे आहेत.

चैतन्य संप्रदायात राधा ही परकीया नायिका आहे. परकीया असल्यामुळेच तिच्या कृष्णप्रेमाला एवढी उत्कटता आली आहे. चैतन्यांच्या काळात भारतामध्ये शाक्तमताचे प्राबल्य होते. शिव आणि शक्ती या दांपत्याच्या नावावर शाक्तांनी बीभत्स प्रकार सुरू केले होते. जनमानसात त्यांचा विकृत परिणाम दिसू लागला होता. चैतन्यांना या गोष्टीचा उबग आला. या बीभत्स उपासना-मार्गातून समाजाला बाहेर काढण्यासाठीं चैतन्यांनी राधा स्वीकृत केली आणि राधेसह कृष्णाच्या भक्तीचा आणि पूजेचा प्रचार केला. त्यांनी राधा–कृष्णांचे गुणसंकीर्तन करून ती उपासना सर्वजनसुलभ केली व तिच्यातले हीण काढून टाकले.

कलाविषय राधा – मध्ययुगीन कला, काव्य आणि संगीत यांचा नायक कृष्ण आहे, तर नायिका राधा आहे. चित्रकारांनी रंगरेखांच्या माध्यमातून राधेला सजीव केले, तर जयदेवादी कवींनी पदलालित्य, अलंकार आणि भावभंगिमा यांनी तिला श्रवणरम्य केले. संगीतकारांनीही स्वर आणि शब्द यांच्या साह्याने तिला आळवले. अशा प्रकारे राधा ही मध्ययुगीन ललित कलांचा प्राण बनून राहिली. ललित कलांच्या क्षेत्रात राधेने नव्या प्रेरणा उत्पन्न केल्या. रसिक भक्तांना राधेच्या रूपमाधुर्याने एक नवे भावजीवन प्राप्त झाले. राधा आणि कृष्ण भारतातल्या कोटी कोटी जनतेच्या हृदयांत विराजित झाले. राधा-कृष्णांच्या पूर्वी आणि नंतर अशी नायक-नायिकांची जोडी समाजाला आणि कलाकारांना प्राप्त झाली नव्हती. शृंगाराला भक्तिरसाच्या सागरात संमीलित करण्याचे श्रेय राधा-कृष्णांनाच मिळाले आहे.

राधेची जी अनेक चित्रे निर्माण झाली आहेत, त्यांत किशनगढ शैलीची अभिसारिका राधा रूप आणि भाव या दोन्ही बाबतींत अग्रगण्य आहे. तनुलतेचा गहूवर्ण, खंजन पक्ष्याप्रमाणे तिरपी दृष्टी, नागिणीप्रमाणे भरदार केसांची वेणी व तनुलतेला उठाव देणारा वेष, असे त्या अभिसारिकेचे संमोहक स्वरूप आहे. कांगडा शैलीच्या चित्रकारांची तर ती जणू प्रेरक शक्तीच आहे. किशनगढ शैलीतली राधा अलंकृत आहे; तर कांगडा शैलीतली राधा भावमुग्ध आहे. [प्रा. च. को.; रा. सं. सि. सा.; स्मृतिगंध; श्री. महेन्द्रनाथ सिंह– अजंता, डिसेंबर १९५७]

राधाकिशोरपूर

एकावन्न शक्तिपीठांपैकी एक. हे स्थान त्रिपुरा राज्यात त्रिपुरापासून थोड्याच अंतरावर आहे. इथे त्रिपुरेचे मंदिर आहे. सतीचा उजवा पाय इथे गळून पडला होता. [कल्याण – तीर्थांक]

राधाकुंड

ब्रजमंडळातील प्राचीन तीर्थ. गोवर्धन पर्वताच्या उत्तरेला चार मैलांवर हे ठिकाण आहे. इथे राधाकुंड आणि कृष्णकुंड नावाची दोन कुंडे आहेत. या कुंडांच्या निर्मितीचा इतिहास पुढीलप्रमाणे – अरिष्ट नावाचा कंसाचा एक सरदार होता. कृष्णाने त्याला मारून ज्या ठिकाणी स्नान केले ते कृष्णकुंड बनले. त्याच्या शेजारी राधेने एक कुंड बांधले. राधाकुंडात कार्तिक वद्य अष्टमीच्या मध्यरात्री स्नान करणे विशेष पुण्यकारक मानतात.

मध्यंतरी हे कुंड लोक विसरून गेले होते. परंतु महाप्रभू चैतन्याने खूप प्रयासानंतर याचा पुनश्च शोध लावला. त्यामुळे चैतन्य सांप्रदायिकांचे ते एक प्रमुख तीर्थ बनले आहे.

ब्रजमंडलाच्या यात्रेतील चौथा मुक्काम या कुंडाजवळ करतात. [हिं. जॉ. ए. इं.; ब्र. सां. इ.]

राधाचक्र

राधेच्या उपासनेचे एक यंत्र. या चक्राला अष्टदळे असतात. कमळाच्या मध्यभागी कृष्ण व त्याच्या भोवती श्रीमती, हरिद्रा, विशाला, श्रद्धा, पद्मा, भद्रा, ललिता व श्यामला या गोपी उभ्या चितारतात. सोळा पाकळ्यांचे कमळ असेल, तर सोळा गोपी असतात. [क्रि. स्ट. ले. उ.]

राधान आट

कर्नाटकातील लोकनाट्याचा एक प्रकार. मराठी तमाशाचे हे कन्नड रूप आहे. मराठी तमाशातील राधा या पात्रावरून या लोकनाट्याला राधान आट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे नाव दिलेले आहे. कालांतराने त्याला राजान आट असे दुसरे एक नाव मिळाले. यातील संगीत हे छक्कड, कव्वाली व लावणी यांच्या धर्तीवर असून, त्याला सारंगी आणि धप्प या वाद्यांची साथ असते. पूर्वी यातील कथानके पौराणिक असत. पण आता ती सामाजिक असतात. बहुधा प्रेमाच्या त्रिकोणाभोवती कथानक गुंफलेले असते. रूपसिंगन आट, मुकुंद-गोविंद आणि संध्या बाळचा हे त्यातले तीन वग विशेष लोकप्रिय आहेत. राधान आटमधील पात्रांची वेषभूषा फारशी भडक नसते. वगातील गीते गाण्यासाठी सुमारे आठ व्यक्तींचा एक वृंद असतो.

प्रणयप्रधान कथानक, अश्लीलतेकडे झुकणारे संवाद व त्याला अनुरूप असे हावभाव यांमुळे खेडोपाडी हे लोकनाट्य अत्यंत लोकप्रिय ठरले आहे. सुमारे वीस वर्षांपूर्वी उत्तर कर्नाटकातील प्रत्येक गावात या लोकनाट्याचे एक किंवा दोन फड उभारलेले असत. [दि कर्नाटक थिएटर – डॉ. ए. के. रंगनाथ, १९६०]

राधानृत्य महाराष्ट्रातील एक कलात्मक नृत्यप्रकार. शिमग्याच्या महिन्यात याचे कार्यक्रम होतात. यात अभिनयाला फार महत्त्व असते. या नृत्यात एका मुलाला लुगडे-चोळी नेसवून स्त्रीवेष देतात व त्यालाच राधा म्हणतात. ही राधा मध्ये उभी असते व तिच्या भोवती अर्धवर्तुळाकार इतर सवंगडी उभे राहतात. नृत्याचा प्रारंभ राधा करते. त्या वेळी ती पदविन्यास करीत राधा-कृष्णांची गाणी गाते. वर्तुळातले लोक ध्रुपद गातात. नाचाला मृदंग व झांज यांची साथ असते. कुठे या वाद्यांच्या ऐवजी इतर वाद्येही घेतात.

राधेची आळवणी करणे ही या नाचातली कृष्णाची भूमिका असते. कधी राधा त्याचे प्रेम स्वीकारते; तर कधी झिडकारून दूर जाते. अलिकडे या नृत्यात अश्लीलतेचा भाग बराच येऊ लागला आहे. [भा. लो. नृ.; रत्ना गॅझे.]

राधामोहनदास (इ. स. चे १९ वे शतक) राधावल्लभ संप्रदायाचा एक अनुयायी आणि संस्कृत भाष्यकार. याला बलभद्र असे दुसरे नाव होते. हा राजा जयसिंह – देवाचा मुलगा होता. याने आपले गुरू म्हणून गोस्वामी चंद्रलालजी, रूपलाल व मोतीलाल यांची नावे सांगितली आहेत. रोवारहिवासी संत प्रियादास याने याला भक्तिमार्गात आणले.

याने राधावल्लभभाष्यम् व श्रीमद्भागवतार्थदिग्दर्शनम् हे दोन संस्कृत ग्रंथ रचले आहेत. राधावल्लभभाष्यम् हे ब्रह्मसूत्राच्या चार अध्यायांवरील भाष्य आहे. गोपीसंप्रदायाच्या अनुसरणानेच राधाकृष्णात्मक ब्रह्माचा साक्षात्कार होईल, असा सिद्धान्त यात मांडला आहे. भागवतदिग्दर्शनात भागवताचा गद्यात संक्षिप्त अनुवाद केलेला आहे. [हि. गो. सं. सा.]

राधावल्लभदास (इ. स. चे १६ वे शतक) एक बंगाली वैष्णव कवी. याची काही पदे उपलब्ध आहेत. त्यांवरून श्रीनिवास आचार्य हे त्याचे गुरू होते, असे अनुमान करता येते.

राधावल्लभदासाने सनातन गोस्वामीर सूचक व सहजतत्त्व हे दोन ग्रंथ रचले आहेत आणि विलापकुसुमांजली या संस्कृत ग्रंथाचा बंगाली अनुवादही केला आहे. [हि. बं. वै. क.]

राधावल्लभ संप्रदाय एक वैष्णव संप्रदाय. व्रजमंडलात या संप्रदायाचा जन्म झाला आणि तिथेच तो फळी-फुली बहरला. आजही या संप्रदायाच्या अनुयायांचे व्रजमंडल हेच प्रमुख केंद्र आहे.

श्रीहितहरिवंश हा या संप्रदायाचा संस्थापक होय. त्याला श्रीकृष्णाच्या मुरलीचा अवतार मानतात. त्याचे काव्य सरस व स्निग्ध आहे. भक्तांच्या कर्णपुटात मुरलीच्या मधुर ध्वनीप्रमाणे ते अमृतरसाचा वर्षाव करीत असते, असे सांप्रदायिक मानतात. हितहरिवंशाच्या कालाबद्दल व जन्मस्थानाबद्दलही विद्वानांत मतभेद आहेत. स्थलाबद्दल त्याचा सर्वश्रेष्ठ शिष्य सेवक म्हणतो की हितहरिवंशाचा जन्म, मथुरेपासून चार कोस अंतरावर असलेल्या बाद नामक गावी झाला.

हितहरिवंश गौड ब्राह्मण होता. त्याच्या पित्याचे नाव केशवदास मिश्र, मातेचे नाव तारावती व आडनाव व्यास असे होते. केशवदास मुळात सहारनपूरजवळच्या देवबंद गावाचा रहिवासी असून, महापंडित होता. त्या वेळच्या बादशहाबरोबर तो सहकुटुंब फिरतीवर असताना बाद ग्रामात हितहरिवंशाचा जन्म झाला (इ. स. १५०३). लहान वयातच राधेने हितहरिवंशाला स्वप्नामध्ये गुरुमंत्र दिला. देवबंद गावी सुरवातीला राहत असताना तिथल्या घराजवळच्या विहिरीत त्याला श्रीकृष्णाची एक मूर्ती सापडली. मग त्याने एक मंदिर बांधले आणि त्यात त्या मूर्तीची स्थापना केली. तो नित्य तिची पूजा करू लागला. पुढे राधेच्याच आदेशावरून त्याने घरदार सोडले व तो वृंदावनात जाण्यासाठी निघाला. वाटेत चिडथावल नामक गावाचा एक रहिवासी आत्मदेव याने आपल्या दोन कन्या व राधावल्लभ श्रीकृष्णाची एक सुंदर मूर्ती त्याला अर्पण केली. वृंदावनात गेल्यावर तिथे एक मंदिर बांधून हितहरिवंशाने त्यात त्या मूर्तीची स्थापना केली. त्या मूर्तीच्या भजनपूजनातच तो आपला सारा दिवस घालवू लागला.

हितहरिवंश हा राधा-कृष्णाच्या युगलमूर्तीचा उपासक होता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यातही श्रीकृष्णापेक्षा राधेची भक्ती अधिक महत्त्वाची व शीघ्र फलदायी आहे, असे त्याचे मत होते.

हितहरिवंशाने राधावल्लभाची उपासना आणि प्रेमभक्ती यांचा उपदेश व प्रचार केला. त्याचे दोन प्रमुख ग्रंथ आहेत. त्यांपैकी राधासुधानिधी हा ग्रंथ संस्कृत भाषेत असून, त्यात राधेचे सौंदर्य व तिची सेवा यांचे सुंदर वर्णन २७० पद्यांत केलेले आहे. त्याचा दुसरा ग्रंथ हितचौरासी हा ब्रज भाषेत असून, त्यातही राधा-कृष्णांचे सौंदर्य व सेवामाधुर्य वर्णिलेले आहे.

या संप्रदायाचा दुसरा आचार्य दामोदरदास हा सेवक या नावाने प्रसिद्ध आहे. हा रसिक वृत्तीचा भक्त होता. त्यालाही राधेनेच स्वप्नात दीक्षामंत्र दिला होता. त्याने सोळा प्रकरणांत हरिवंशाचे माहात्म्य व राधावल्लभ संप्रदायाचे तात्त्विक विवेचन केले आहे. याची भाषा साधी, सरळ व सोपी आहे.

या संप्रदायातील त्यानंतरचा आचार्य म्हणजे हरिराम शुक्ल हा होय. काशीच्या पंडितांनी त्याला व्यास ही उपाधी दिली होती. त्याच नावाने तो पुढे प्रसिद्धीस आला. इ. स. १५१०मध्ये ओरछाचे निवासी सुमोखन शुक्ल व त्यांची पत्नी पद्मावती यांच्या पोटी त्याचा जन्म झाला. ओरछानरेशाच्या दरबारात सुमोखन शुक्लांना फार मान होता. त्यामुळे त्यांची सांपत्तिक स्थिती फार उत्तम होती. हे परम वैष्णव होते. हरिरामाने आपल्या पित्याकडूनच वैष्णव दीक्षा घेतली होती. पण त्याने हितहरिवंशाकडून दीक्षा घेतली, असेही एक मत आहे. हरिराम व्यास हा गृहस्थाश्रमी असूनही युगलकिशोराच्या उपासनेत दंग असे. इ. स. १५५५ मध्ये आपले घर सोडून तो कायमचा वृंदावनात राहायला गेला. तत्कालीन ओरछानरेश मधुकरशाह हा त्याचा मंत्रशिष्य होता. त्याने परत आपल्या गावी राहायला यावे, म्हणून स्वत: मधुकरशाह त्याला नेण्यासाठी वृंदावनात गेला. पण व्यासाने त्याचे मानले नाही. वैष्णव भक्त त्याला विशाखा सखीचा अवतार मानतात. विशाखा ही राधा-माधवांच्या मीलनाला साहाय्य करणारी सखी होती. व्यास हा राधा-कृष्णाचा उच्च कोटीचा भक्त होता. त्याने नवरत्न आणि व्यास-वाणी हे दोन ग्रंथ रचले आहेत. त्यांपैकी नवरत्न हा ग्रंथ संस्कृतात असून, संप्रदायाचे सिद्धान्त त्यात सांगितलेले आहेत. हा ग्रंथ अप्रकाशित आहे. व्यासवाणी हा ग्रंथ ब्रज भाषेत असून, त्यात सुमारे सातशे पदे आहेत. व्यासवाणीचे दोन खंड आहेत. पहिल्या खंडात भक्तिसिद्धान्ताचे वर्णन असून, दुसऱ्यात राधा-कृष्णांच्या लीलांचे प्रत्ययकारी वर्णन आहे.

त्यानंतरचा आचार्य म्हणजे चतुर्भुजदास होय. जबलपूर-जवळच्या गढा नामक गावी इ. स. १५२८ च्या सुमारास त्याचा जन्म झाला. हा सेवकाचा परम मित्र होता. चतुर्भुजदासाचे ग्रंथ द्वादश यश या नावाने प्रसिद्ध आहेत. हे ग्रंथ ब्रज भाषेत आहेत.

ध्रुवदास हा राधावल्लभ संप्रदायाचा विशेष प्रचारक होता. देववंद गावी एका कायस्थ कुलात याचा जन्म झाला. इ. स. १५९३ ते १६८३ हा याचा काल होय. याने चाळिसाच्या वर ग्रंथ रचले आहेत. त्यांपैकी वृंदावनसत, सिंगारसत, रसरत्नावली, नेहमंजरी, सुखमंजरी, रहस्यमंजरी, इ. ग्रंथ मुख्य आहेत. त्याचा भक्तनामावली हा ग्रंथ तर ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. कारण त्यात प्राचीन आणि त्याच्या समकालीन भक्तांचा परिचय दिलेला आहे. ध्रुवदासाच्या काव्यात वृंदावनाच्या सृष्टि-सौंदर्याचे आणि प्रेमतत्त्वांचे विश्लेषण चांगल्या प्रकारे केले आहे.

याशिवाय नेही नागरीदास, कल्याण पुजारी, अनन्य अली, रसिकदास, वृंदावनदास, इ. भक्तकवींनीही वृंदावनाच्या सौंदर्याचे आणि राधा-कृष्णांच्या दिव्य लीलांचे आपापल्या काव्यांतून मनोहर चित्रण केले आहे. या सर्व कवींनी ब्रज भाषेतील साहित्यात मोलाची भर घातली आहे.

संप्रदायाचे सिद्धान्त – हितहरिवंशाची साधनाप्रणाली गूढ व रहस्यमय आहे. सर्वसामान्य साधक या साधनेचा अधिकारी होऊ शकत नाही. विशेष निष्ठा असलेल्या भक्तालाच ही साधना घडू शकते. त्याचे मुख्य सिद्धान्त असे –

प्रेमतत्त्व – या संप्रदायातील प्रेमाचे स्वरूप इतर वैष्णव संप्रदायांपेक्षा वेगळे, व्यापक आणि मोहक आहे. राधाप्रेम हा या संप्रदायाचा मूलाधार आहे. राधाप्रेमाच्या पुढे मला कैवल्याचीही क्षिती नाही, असे हितहरिवंशाने म्हटले आहे. राधा व कृष्ण किंवा श्यामा-श्याम एक क्षणभरही एकमेकांपासून दूर होत नाहीत. पण सदैव एकत्र राहूनही ती दोघे विरहसदृश अतृप्तीचा अनुभव घेतात आणि अधिकाधिक समीप येण्याची कामना धरतात. राधा-कृष्णांची ही प्रेमस्थिती या संप्रदायात श्लाघ्य मानलेली आहे. श्रीकृष्णाच्या मांडीवर विसावलेली असूनही राधा एकदम 'हा मोहन, हा मोहन' असे विरहोद्‌गार काढते, असे राधासुधानिधी या ग्रंथात म्हटले आहे. प्रेमातील विरह-मीलनाच्या या अवस्थेचे स्पष्टीकरण करण्यासाठी हितहरिवंशाने आपल्या स्फुटवाणीत चक्रवाकदंपती आणि सारसयुगल यांच्या प्रेमाची उदाहरणे दिली आहेत. रात्र पडली, की चक्रवाकीला चक्रवाकाचा विरह सहन करावा लागतो. रात्रभर ती विरह-व्याकुळ होऊन सकाळ होण्याची वाट पाहत राहते. प्रियतमाचा विरह झाला असताही चक्रवाकी जिवंत राहते, ही सारसाच्या दृष्टीने तिच्या प्रेमातील उणीव आहे. तो तिला म्हणतो –

चकई प्राण जु घट रहे पिय बिछुरन्त निकज्ज ।
सर अंतर, अरु काल निशि, तरफ तेज घन कज्ज ।।
तरफ तेज घन कज्ज लज्ज तुहि बदन न आवै ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जल बिहून करि नैन भोर किय भाय बितावै ॥
हितहरिवंश विचारि याद अस कौन जु चकई ।
सारस यह संदेश प्राण घट रहै जु चकई ॥

अर्थ – हे चक्रवाकी, प्रियविरह होऊनही तुझ्या शरीरात प्राण राहतात. नदीच्या दोन तीरांचे अंतर, रात्रीची भयंकर वेळ, निर्जन स्थान आणि भीषण मेघगर्जना अशा परिस्थितीत तू आपल्या प्रियतमाचा वियोग होऊनही जिवंत राहतेस. तुला याबद्दल लाज कशी वाटत नाही ? अश्रुविहीन नेत्रांनी सकाळ होण्याची वाट पाहत तू प्राणरक्षण कसे करतेस ? असा कोणता संदेश आहे, की जो तुला जिवंत ठेवतो ? विरहाच्या क्षणीही जिवंत राहणे, ही मी प्रेमातील न्यूनता मानतो.

परंतु चक्रवाकीच्या दृष्टीने प्रियतमाच्या विरहातही जिवंत राहणे, ही प्रेमातील न्यूनता नसून उलट परिपूर्णता आहे. तिच्या दृष्टीने सारसाचे प्रेम एकांगी आहे. ती त्याला म्हणते–

सारस पर बिछुरंत को जौ पल सहय शरीर ।
अगिन अनंग जु तिय भखै तो जानै पर पीर ॥
तौ जानै पर पीर धीर धरि सकहि वज्र तन ।
मरत सारसहि फूटि पुनि न परचौ जु लहत मन ॥
हितहरिवंश विचारि प्रेम विरहा बिन वा रस ।
निकट कंत नित रहत मरम कह जानै सारस ॥

भावार्थ – हे सारसा, नदीच्या दुसऱ्या तीरावर जाऊन, रात्रभर विरहवेदना सहन करून आणि प्रेमाग्नीच्या तापाचा अनुभव घेऊन जिवंत राहणे, हे प्रेमोन्मादाचे लक्षण आहे. वियोगावस्थेत प्राण दिल्याने प्रेमिकाला मर्मस्पर्शी अनुभवाची संधीच मिळत नाही. प्रेमाच्या यथार्थ व परिपूर्ण अनुभवासाठी विरहदाह सहन केलाच पाहिजे. हे सारसा, तू सतत आपल्या प्रियेजवळ राहतोस, म्हणून तुला प्रेमातले मर्मच समजलेले नाही.

हा प्रेमविरहच राधावल्लभ संप्रदायाचे रहस्य आहे. मीलनातही विरहातल्यासारखी उत्कंठा वाटणे, हा त्याचा प्राण आहे. युगलकिशोर राधा-वल्लभलाल यांच्या नित्य मीलनात वास्तविक क्षणाचाही विरह नसतो. पण तरीही त्यांच्या प्रेमात न्यूनता निर्माण होत नाही; उलट प्रतिक्षण त्यात नूतनताच भासते. राधा आणि कृष्ण हे नित्य अतिनिकट असूनही त्यांचे एकमेकावर उत्कट प्रेम असल्यामुळे त्यांना त्यातच वियोगाचाही अनुभव येतो.

स्वसुखाची सिद्धी हे सामान्यतः प्रेमाचे लक्ष्य असते. पण या संप्रदायातील प्रेमिकांचा प्रकार तसा नाही. राधेचे सर्व प्रयत्न, तिच्या सर्व क्रिया माधवाला प्रसन्न करण्यासाठी असतात आणि राधेने खूष असावे, म्हणून माधव प्रयत्नशील असतो. ती दोघे आत्मविसर्जन करून दुसऱ्याला सुखसंतोष देण्यासाठी झटत असतात. या पंथाच्या मते आत्मविसर्जनालाच महत्त्व आहे.

राधा – हितहरिवंशाने श्रीकृष्णाला आपले आराध्य दै[वत] मानले नाही किंवा युगलकिशोर नंदनंदन व वृषभानुसुता रा[धा] यांनाही त्याने आपले इष्ट दैवत मानले नाही. नित्यविहारि[णी] राधा हीच त्याची इष्ट देवता आहे. तो म्हणतो –

ईशानी च शची महासुखतनुः शक्तिः स्वतन्त्रा परा।
श्रीवृन्दावननाथपट्टमहिषी राधैव सेव्या मम ॥
(राधासुधानिधी ७८)

अर्थ – राधा ही ईशानी व शची असून, ती स्वतंत्र, म[हा]सुखरूप व पराशक्तिरूप आहे. अशी ही श्रीकृष्णाची पट्टरा[णी] असलेली राधा हीच मला सेव्य आहे.

जे लोक राधेच्या चरणाची सेवा केल्याशिवाय श्रीकृष्णा[च्या] प्रेमाची इच्छा धरतात, ते पौर्णिमेवाचून पूर्णचंद्राची अपे[क्षा] करतात. श्यामसुंदराच्या रतिप्रवाहाचे बीज राधा आहे, [हे] त्यांना माहीत नाही, असे हितहरिवंशाने म्हटले आहे. त्या[चप्रमाणे] हितहरिवंश म्हणतो– प्रेमसाधना करण्यासाठी राधेला [...] करणे, एवढा एकच नियम मी केला आहे. विधिविधाने, [...] कांड यांच्या मागे लागल्यास त्यांचेच अवडंबर माजते [...] शुद्ध प्रेमाची उपासना बाजूला पडते. त्यामुळे हृदयात स्नेह[ाचा] अभाव निर्माण होतो व राधा-कृष्णांच्या नित्यविहाराचा [...] भक्ताला घेता येत नाही.

राधावल्लभ संप्रदाय हा वस्तुतः रससंप्रदाय आहे. प्रेम[...] राधा–माधव यांच्या नित्यमीलनाच्या प्रसंगी साधकाने त[...] होऊन त्यांची सेवा करणे, हेच त्याच्या जीवनाचे चरम [...] होय, असे या संप्रदायात प्रतिपादिले आहे.

या संप्रदायाने नित्यविहारात राधा, कृष्ण, वृंदावन व सह[चरी] ही चार विधायक तत्त्वे मानलेली आहेत. त्यांचे स्वरूप असे [...]

राधा ही अवाङ्मनसगोचर असूनही अनुभवैकगम्य आहे. [...] अनादी वस्तूचे नित्यरूप घेतले असून, ती अखिल ब्रह्मां[ड] व्यापून राहिली आहे. ती स्वतः आनंदस्वरूप आहे.

या राधेच्या दर्शनाची सहचरीरूप जीवाला अनिवार्य [...] लागलेली असते. कृष्णाचे स्थान राधेपेक्षा गौण आहे. [...] कृष्ण हे परतत्त्व नसून, राधा हे परतत्त्व आहे. वृंदावनवि[हारी] श्रीकृष्ण हा रसिक किशोररूपात एकमात्र नित्यविहारी [...] असून, राधा ही त्याची परा प्रकृती आहे. ती त्याची वि[...] द्विशिष्ट शक्ती व आल्हादिनी आहे. चराचर जगत हे [...] किशोराचेच प्रतिबिंब होय.

सखी किंवा सहचरी म्हणजे अध्यात्मसाधक जीव [...] प्रेमरूप सखीभाव हे त्याचे निजस्वरूप आहे. जीव ही [...] विसरतो आणि म्हणूनच जन्ममृत्यूच्या फेऱ्यांत सापडतो. [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्यावर राधेची कृपा होते, तेव्हा त्याला सहचरीरूप प्राप्त होते आणि तो लौकिक सुखदु:खांच्या पलिकडे जाऊन नित्य विहारदर्शनाने मिळणारा आनंद अनुभवू लागतो. या सहचरीरूपात स्त्री-पुरुष असा लिंगभेद नाही. सखीचे स्वरूप राधासुधानिधी या ग्रंथात वर्णिले आहे, ते असे –

राधाकेलिकलासु साक्षिणि कदा वृन्दावने पावने
वत्स्यामि स्फुटमुज्ज्वलाद्भुतरसे प्रेमैकमत्ताकृतिः।
तेजोरूपनिकुञ्ज एव कलयन् नेत्रादिपिण्डस्थितं
तादृक् स्वोचितदिव्यकोमलवपुः स्वीयं समालोकये ॥

अर्थ – राधेच्या क्रीडाकलांच्या साक्षी आणि पवित्र, उज्ज्वल आणि अद्भुत रसाने परिपूर्ण अशा वृंदावनात, प्रेमाने मत्त होऊन मी केव्हा बरे वास करीन ? तसेच नेत्रादी पिंडांत तेजोरूप निकुंजच वसत आहे, अशी कल्पना करून, त्या कल्पनेला अनुरूप असे माझे दिव्य व सुकुमार शरीर मी केव्हा बरे पाहीन ! (अशी कामना करणारी ती सखी होय)

राधा-माधवांनी रतिक्रीडा करावी, म्हणून सख्या त्यांना साहाय्य करतात आणि कुंजातील रंध्रांतून ती क्रीडा बघून परमानंदित होतात. हीच त्यांची उपासना होय.

अन्य संप्रदायांत वर्णिलेल्या गोपींपेक्षा या सख्या निराळ्या आहेत. गोपींप्रमाणे या सख्यांच्या मनात कृष्णाविषयी रतिभाव नसतो. त्याच्याशी मीलन व्हावे, त्याला आलिंगन द्यावे, इ. आकांक्षा मनात धरून त्या रासक्रीडेत सहभागी होत नाहीत. या तत्सुखिभावातच त्यांचा वेगळेपणा आहे.

वृंदावन हे श्रीकृष्णाचे निवासस्थान असल्यामुळे, वैष्णव भक्तांनी त्याला वैकुंठ व गोलोक यांपेक्षाही श्रेष्ठ मानले आहे. वृंदावनातील रज:कणांना स्पर्श केला असता भक्ताची जन्मजन्मांतरींची पापे धुवून जातात आणि तो भगवंताच्या समीप पोचतो, असे त्याचे माहात्म्य वर्णिलेले आहे. या वृंदावनातील लताकुंजांत श्रीकृष्ण आणि राधा रास खेळतात आणि नित्यविहार करतात. राधा-कृष्णांच्या अशा निरंतर सहवासाने वृंदावनही नित्य व शाश्वत बनले आहे.

ध्रुवदासाने वृंदावनाचे वर्णन करणारे वृंदावनलीला नामक काव्य लिहिले असून, त्यातील काही दोहे असे –

लता लता सब कल्पतरु, पारिजात सब फूल।
सहज एक रस रहत हैं झलकत यमुनाकूल ॥
वृंदावनवैभव जितौ तितौ कह्यौ नहिं जात।
देखत संपत्ति विपिन की कमलाहू ललचात ॥

अर्थ – वृंदावनातील सर्व लता या कल्पतरू आहेत. तिथली सर्व फुले पारिजातकाची आहेत. यमुनातीरावर सदैव एकच रस वाहत असतो. वृंदावनात जेवढे वैभव आहे तेवढे कुठेही आणि कधीही नव्हते. वृंदावनातील हे ऐश्वर्य पाहून लक्ष्मीलाही त्याचा मोह पडतो.

नित्यविहार – रसमार्गीय उपासनापद्धतीचा स्वीकार केलेल्या वैष्णव संप्रदायात नित्यविहार हा शब्द अनेक वेळा आढळतो. तो एका गूढ अशा अनिर्वचनीय रसदशेचा द्योतक आहे. वृंदावनातील शीतल, घनदाट व कोपऱ्यात असलेल्या एका कुंजात, प्रिया व प्रियतम (राधा-माधव) ही दोघे निरंतर रतिक्रीडेत मग्न असतात. त्यांची ही क्रीडा कोणताही बाह्य किंवा आंतरिक अडथळा न येता अविरत चालू असते. या क्रीडेने ती दोघे सहचरीरूप जीवात्म्याला अमित आनंद देतात. हे सहचरीरूप जीव निकुंजाच्या रंध्रांतून ही क्रीडा पाहून धन्य होतात.

हा नित्यविहार सिद्ध व्हावा, म्हणून या संप्रदायात नित्यकिशोरी राधा, नित्यकिशोर कृष्ण, नित्यकिशोरी सहचरी व नित्यधाम वृंदावन ही चार तत्त्वे मानलेली आहेत. नित्यविहारात लीन झालेल्या राधा-कृष्णांच्या प्रणयाचे वर्णन हितहरिवंशाने पुढीलप्रमाणे केले आहे –

आज निकुंज मंजु में खेलत नवल किशोर नवीन किशोरी।
अति अनुपम अनुराग परस्पर सुनि अभूत भूतल पर जोरी ॥
विद्रुम फटिक विविध निर्मित धर नवकर्पूर पराग न थोरी।
कोमल किसलय शयन सुपेशल तापर श्याम निवेशित गोरी ॥
मिथुन हासपरिहासपरायन पीक कपोल कमल पर झोरी।
गौर श्याम भुज कलह मनोहर नीवीबंधन मोचत डोरी ॥

भावार्थ – आज सुंदर अशा कुंजात नवलकिशोर व नवलकिशोरी खेळत आहेत. त्यांचे परस्परांवर उत्कट प्रेम आहे. भूतलावर त्यांच्यासारखे युगल कधी झाले नाही. पोवळी आणि विविध प्रकारचे स्फटिक यांनी तिथली जमीन निर्माण केलेली आहे. त्यावर कापरासारखे शुभ्र पुष्पपराग पडले आहेत. तिथे कोमल पल्लवांनी शय्या तयार करून, तिच्यावर श्यामसुंदराने गौर राधिकेला बसवले आहे. ती दोघे नर्मविनोदात गुंग झाली आहेत. श्याम तिचे नीवीबंधन सैल करतो आहे.

श्रीकृष्ण ही जी रासलीला करतो, ती प्रेमतत्त्वाच्या विकासासाठी करतो. या लीलेत एकच श्रीतत्त्व श्रीकृष्ण आणि सहचरी यांच्या रूपांत आविर्भूत होते. ही एक शुद्ध व निरतिशय आनंददायी अशी प्रेमलीला आहे. त्यामुळे प्रेमाच्या लौकिक रूपाला अनुसरून शृंगारिक क्रीडा या रासलीलेत आवश्यक ठरतात. रासलीला ही फक्त वृंदावनातच चालते. गोलोकात ती होत नाही. आजही वृंदावनात ही रासलीला नित्य होत असते, असे या संप्रदायाचे अनुयायी मानतात.

हितहरिवंशाने रचलेली चौऱ्यांशी पदे हितचौरासी या ग्रंथात संग्रहित केलेली आहेत. हा त्या संप्रदायाचा आधारग्रंथ मानला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जातो. त्यात या रासलीलेच्या वर्णनाचे एक पद आहे, ते असे –

आज बन नीको रास बनायो ।
पुलिन पवित्र सुभग यमुना तट मोहन वेनु बजायो ।
कल कंकन किंकिन नुपूर धुनि सुनि खग मृग सचु पायो ।।
जुवतिन मंडल मध्य स्यामघन सारंग राग बजायो ।
ताल मृदंग उपंग मुरज डफ मिलि रस सिंधु बढायो ।।
विविध विशद वृषभानुनंदिनी अंग सुधंग दिखायौ ।

भावार्थ – आज वृंदावनात सुंदर रासलीला झाली. यमुना नदीच्या तीरावरील पवित्र वाळवंटात मोहनाने मुरली वाजवली. कंकणे व पायांतील नूपुर यांचा मधुर ध्वनी ऐकून पशुपक्षी फार आनंदित झाले. युवतीजनमंडलाच्या मध्यभागी घनश्यामसुंदराने सारंग राग आळविला. टाळ, मुरज, मृदंग, डफ यांच्या साथीने तिथे रससिंधू उचंबळला. त्या रासलीलेत वृषभानुसुता राधेने विविध क्रीडा प्रकार सुललित ढंगाने प्रस्तुत केले.

वैष्णव धर्मातील बाह्याचारासंबंधीच्या रूढींना या संप्रदायात महत्त्व दिलेले नाही. एकादशी, तीर्थस्थान, इ. गोष्टीही त्यांनी आवश्यक मानलेल्या नाहीत.

पूजा–अर्चा – या संप्रदायात राधा-कृष्णांची सेवा-पूजा यासंबंधी विशिष्ट नियम आहेत. हितहरिवंशाच्या काळातच इ. स. १५३४ मध्ये पहिला पाटोत्सव झाला होता. त्याच वेळी राधावल्लभाच्या मूर्तीची विधिपूर्वक स्थापना करण्यात आली. त्या वेळी मंदिरातील पूजाअर्चा, आरती, अष्टयाम सेवा, इत्यादीं-संबंधी नियम ठरवण्याची आवश्यकता निर्माण झाली.

प्रथम पाटोत्सवाच्या वेळी नवीन मंदिरात वृंदावनेश्वर श्रीकृष्णाचीच मूर्ती फक्त स्थापन करण्यात आली. या संप्रदायाची इष्टाराध्या राधा हिची मात्र मूर्ती बसवली गेली नाही. त्याऐवजी श्रीकृष्णाच्या वामभागी वस्त्रनिर्मित एक गादी स्थापण्यात आली व तिच्यावर श्रीराधा असे नाव लिहिलेले एक सुवर्णपत्र ठेवण्यात आले. प्रस्तुत संप्रदायात हे सुवर्णपत्र हीच राधा आहे. त्यालाच सर्व पूजोपचार समर्पित होतात.

हितहरिवंशाच्या मते राधेचे स्वरूप अनिर्वचनीय आहे. तिच्या मूर्तीत कदाचित तिच्या सर्व गुणांचे आधान करता येणार नाही, म्हणून तिची मूर्ती न बनवता सांकेतिक स्वरूपात तिचे ध्यान करण्याची नवीन पद्धती त्याने अंमलात आणली.

संप्रदायाचे लोक काष्ठावर किंवा पाषाणावर श्रीराधा असे जे नाव लिहितात, त्याला नामसेवा असे नाव आहे. रासमंडलादी पवित्र स्थानी या नामसेवेची स्थापना आणि पूजाअर्चा करतात. हितहरिवंशाने जे रासमंडल निर्माण केले, त्यांत त्याने पहिल्या प्रथम अशी नामसेवा स्थापन केली.

वल्लभ संप्रदायात ज्याप्रमाणे श्रीकृष्णाचे गुणगान करण्यामाठी कीर्तनपरंपरा आहे, त्याप्रमाणे या संप्रदायात समाज नाम[क] व्यवस्था आहे. समाजाच्या मुख्य गायकाला मुखिया असे म्हण[]तात. निरनिराळ्या उत्सवांच्या वेळी कोणकोणत्या रागरागि[ण्या] गायच्या, ते ठरलेले असते. तसेच, नित्यविहाराच्या वेळी [ज्या] लीलेसंबंधी पदे गातात, त्यांत वर्णिलेल्या वेषभूषेप्रमाणे राधा[] वल्लभाची वेषभूषा करतात.

मंदिरात रोज अष्टयाम सेवा असते. मंगलारती, शृंगा[र], राजभोग, उत्थापन, संध्या, शयन व शय्यासमय अशी या अष्ट[] यामांची नावे आहेत. प्रत्येक सेवेच्या वेळी आरती होते आ[णि] त्या वेळी ठराविक पद्ये गायिली जातात.

नैमित्तिक उत्सवही अनेक असतात. हितहरिवंशाच्या काळा[त] पाटोत्सवानंतर राधावल्लभमंदिरात अनेक उत्सव साजरे केल्या[ची] वर्णने वाणीग्रंथात आढळतात. फागू, डोल, चंदनवसन, ती[] पाट, दीपमालिका प्रतिपदा, वनविहार, खिचरी, वसंत हे [त्यां]पैकी प्रमुख उत्सव होत. या उत्सवांत आता आचार्यकुला[तील] गोस्वामींच्या जन्मोत्सवांची भर पडली आहे.

या संप्रदायाचे अनुयायी विशिष्ट पद्धतीने तिलक लावता[त]. कपाळावर दोन सरळ उभ्या रेघा व त्यांमध्ये बिंदू अशी त्या[ची] रचना असते. तिलक कृष्णरूपाचे व बिंदू राधेच्या रूपाचे प्रती[क] मानतात. तिलकासाठी काही लोक राधाकुंडातील रज, [] काही कुंकू, प्रशस्त मानतात.

संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर त्या भक्ताला तुळशी[च्या] मण्यांची दुहेरी कंठी धारण करावी लागते. कंठीचे हे दोन [] युगलध्यानाचे निदर्शक मानतात. पाहा – हितहरिवंश. [भार[त]] संप्रदाय; रा. सं. सि. सा.; हि. गो. सं. सा.]

राधाष्टमी एक व्रत. भाद्रपद महिन्यातल्या दोन्ही पक्षांत[ल्या] अष्टमींना राधाष्टमी असे म्हणतात. राधे[चा] जन्म भाद्रपद शुद्ध सप्तमीला झाला असे समजतात आणि [अष्ट]मीच्या दिवशी तिची पूजा करतात. पूजाविधी असा –

प्रातःकाली स्नानानंतर व्रतसंकल्प करावा. एका मंड[लात] मृत्तिकेचा किंवा तांब्याचा कलश ठेवावा. त्यावर असले[ल्या] तांब्याच्या पत्र्यावर राधेची सुवर्णाची मूर्ती ठेवून तिला [] वाहावी. मग तिची पूजा करून ती मूर्ती ब्राह्मणाला दान [द्या]वी. शक्य असेल तर उपवास करावा.

काही लोक या व्रतात राधा–कृष्ण युगलाचीही पूजा कर[तात].

फल – पापनाश.

राधाष्टमीच्या व्रताप्रमाणेच तिचा उत्सवही साजरा [केला] जातो. मध्ययुगीन कृष्णभक्त कवींनी या उत्सवाची वर्णने [केली] आहेत. [हि. ध.; व्र. प.; हि. व्र. प. त्यौ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राधास्वामी संप्रदाय उत्तर भारतातील एक धार्मिक संप्रदाय. आग्रानिवासी शिवदयालसिंहाने या संप्रदायाचे प्रवर्तन केले. शिवदयाल गृहस्थाश्रमी होता. त्याने सतत पंधरा वर्षे सुरत शब्दयोगाचा अभ्यास केला आणि नंतर आपला पंथ स्थापला. त्याच्या नंतर राय शालग्रामसिंह हा त्याचा उत्तराधिकारी झाला. त्याने राधास्वामी असे या संप्रदायाचे नामकरण केले आणि राधास्वामी या नाममंत्राचा उपदेश करायला प्रारंभ केला. शालग्रामानंतर पं. ब्रह्माशंकर मिश्र हा महाराज साहेब या नावाने गादीवर आला. महाराज साहेबानंतर या गादीची धुरा कामताप्रसाद ऊर्फ सरकार साहेब याने स्वीकारली. त्याच्या कारकीर्दीत या संप्रदायाची खूप भरभराट झाली. त्याने आग्र्याला दयालबाग नावाची संस्था स्थापन करून तिच्यामार्फत विद्यालये, महाविद्यालये, इ. शिक्षणसंस्था निर्माण केल्या. या संप्रदायप्रवर्तकाचे समाधिमंदिर आग्रा येथे असून, बहुतेक सर्व सांप्रदायिक आग्र्यातच आढळतात.

राधास्वामी संप्रदाय असे या संप्रदायाचे नाव असले तरी, हा पंथ कृष्णभक्तीचा नाही. परमेश्वर या शब्दाला समानार्थक असा हा शब्द आहे, असे हे समजतात.

या पंथात गुरुभक्तीला खूप प्राधान्य आहे. गुरूच्या नितान्त आवश्यकतेमुळेच याला गुरुमत असेही म्हटले जाते. गुरू आपल्या शिष्यांना सुरत शब्दयोगाचा उपदेश करतात. सुरत शब्दयोग म्हणजे अंतर्नादयोग असे म्हटले जाते. एका विशिष्ट आसनात बसून या योगाचे साधन करायचे असते. दीक्षासमारंभाच्या वेळी या योगाची माहिती देण्यात येते.

राधास्वामी हा या पंथाचा मंत्र असून, त्याला आदिनाद असे दुसरे नाव आहे. प्राणायाम, हठयोग, इ. गोष्टींना संप्रदायात स्थान नाही.

सतुगुरू, सतुनाम, सत्संग व अनुराग या चार गोष्टींना ते प्राधान्य देतात. सत्संगाचे आभ्यंतर सत्संग व बाह्य सत्संग असे दोन प्रकार आहेत. आभ्यंतर सत्संगाने सत्पुरुष राधास्वामीच्या चरणाशी लीन होतो आणि बाह्य सत्संगामुळे साधुसंग घडतो असे सांगितले जाते.

यांच्या तत्त्वज्ञानात पिंड, ब्रह्मांड व दयालदेश असे सृष्टीचे मुख्य तीन भाग मानलेले आहेत. या तीन प्रकारांचेही पुन्हा अठरा उपप्रकार होतात. पहिल्या भागात सांसारिक विषयांना प्राधान्य आणि परमार्थाला गौणत्व असते. दुसऱ्या अवस्थेत धार्मिक विचारांना महत्त्व येऊन सांसारिक वासना गौण ठरतात. त्यापुढील अवस्थेत सांसारिक वासनांचा समूळ नाश होतो आणि शुद्ध धार्मिक भावनांची जागृती होते.

तीर्थ, व्रत, मंदिर, जप, मूर्तिपूजा, इ. गोष्टींना या पंथात स्थान नाही. जीवात्म्याला हे राधास्वामीचा अंश समजतात. तो शरीरात नेत्रांच्या मागे राहतो, अशी यांची समजूत आहे.

सारवचन, शब्दसंग्रह, संतवाणीसंग्रह, प्रेमसमाचार, इ. ग्रंथ हे या संप्रदायाचे प्रमाणग्रंथ होत. या ग्रंथांमधून कबीर, पलटूदास, दादू दयाळ यांची वचने पाहायला मिळतात. या पंथाच्या लोकांना सत्संगी असेही म्हणतात.

या पंथात जातिभेद नाही. मद्य-मांसाचा निषेध आहे. कोणत्याही पंथातील लोकांना या पंथाचे अनुयायी होता येते.
[उ. भा. सं. प.; म. ज्ञा. को.; हिं. वि. को.; वि. ध. द.]

रानडे, महादेव गोविंद (इ. स. १८४२–१९०१) महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत, व्यासंगी विद्वान, समाजसुधारक, अर्थशास्त्रज्ञ आणि द्रष्टे पुरुष. त्यांचे नाव महादेव असले तरी, काही लोक त्यांना माधवराव म्हणत. त्यांचा जन्म नासिक जिल्ह्यातील निफाड गावी झाला. त्यांचे घराणे भारद्वाजगोत्री चित्पावन ब्राह्मण होते. त्यांचे वडील प्रथम नगर जिल्ह्यातील दुय्यम कलेक्टरच्या हाताखाली कारकून होते. नंतर ते कोल्हापूरच्या कारभाऱ्याच्या पदरी जवाबनिशीच्या हुद्द्यावर काम करू लागले.

महादेवरावांच्या आईचे नाव गोपिकाबाई होते. महादेवरावांना दुर्गा नावाची एक बहीण होती. महादेवरावांचे मराठी व प्राथमिक इंग्रजी शिक्षण कोल्हापूरला झाले. त्या शाळेत असताना त्यांची बुद्धिमत्ता फारशी दिसून आली नव्हती. लहानपणी ते अगदी मुखदुर्बळ व एकमार्गी होते. त्यांचा स्वभाव अतिशय थंड होता. ते कधीही चिडत नसत. ते फार सत्यवादी होते. डामडौलाचा त्यांना तिरस्कार वाटत असे.

कोल्हापूरला पुढील शिक्षणाची सोय नव्हती, म्हणून त्यांच्या वडिलांनी इ. स. १८५६ साली त्यांना मुंबईस पाठवून तिथल्या एल्फिन्स्टन शाळेत दाखल केले. त्या शाळेत त्यांच्या बुद्धीची चमक दिसू लागली. पुढे १८५८ साली ते एल्फिन्स्टन कॉलेजात प्रविष्ट झाले. त्या वेळी शाळेच्या परीक्षेवरूनच विद्यार्थ्यांना कॉलेजात प्रवेश मिळत असे. १८५९ साली मुंबई विद्यापीठाची पहिली मॅट्रिक्युलेशनची परीक्षा झाली व महादेवराव त्या परीक्षेला बसले. त्या परीक्षेसाठी लिहिलेल्या एका मराठी निबंधात त्यांनी इंग्रजी राजवटीबद्दल काही कडक शब्द लिहिले होते, त्यामुळे त्यांना कमी गुण मिळाले. त्यांनी दुसऱ्या एका निबंधात शिवाजीची राज्यपद्धती व इंग्रजी राज्यपद्धती यांची तुलना करून इंग्रजांच्या राज्यपद्धतीला दूषण दिले. त्याचा परिणाम म्हणून त्यांची शिष्यवृत्ती प्रिन्सिपॉल ग्रँटसाहेबांनी सहा महिने बंद केली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी त्यांना एक इंग्रजी निबंध लिहायचा होता. महादेवरावांनी मराठी सत्तेचा उदय व उत्कर्ष हा विषय निवडून त्यात शिवाजीवरील लुटारूपणाच्या आरोपाचे खंडन केले. कॉलेजात असतानाच विद्यालयीन अभ्यासाव्यतिरिक्त इतिहास, काव्य, निबंध, प्रवास, कादंबऱ्या, इ. विषयांवरील अनेक ग्रंथ त्यांनी अभ्यासले होते. इ. स. १८६२ मध्ये महादेवराव बी. ए. च्या परीक्षेत पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाले. त्यावेळी ऑनर्सची परीक्षा निराळी घेण्याचा प्रघात होता. महादेवरावांनी इतिहास व अर्थशास्त्र हे विषय घेऊन तीही परीक्षा दिली. ते दुसऱ्या वर्गात उत्तीर्ण झाले. पण त्यांची विद्वत्ता पाहून निरीक्षकांनी स्वतंत्रपणे एक सुवर्णपदक व काही पुस्तके त्यांना बक्षीस म्हणून दिली. बी. ए. होण्यापूर्वी म्हणजे इ. स. १८६१ पासूनच महादेवराव अध्यापनाचे काम करू लागले होते. इतिहास, भूगोल, गणित, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, निबंधलेखन, इंग्रजी, इ. अनेक विषय ते शिकवीत. इतिहास व अर्थशास्त्र हे त्यांचे आवडते विषय होते. ते शिकवताना त्यांची बुद्धिमत्ता व विद्वत्ता दिसून येत असे. इतर विषयही ते उत्तम प्रकारे शिकवीत.

पुढे इ. स. १८६४ साली त्यांनी एम. ए. ची परीक्षा दिली आणि इ. स. १८६५ मध्ये ते कायद्याची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या परीक्षांसाठी त्यांनी असंख्य ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. पुढे विद्यापीठाच्या फेलोंमध्ये या तरुण पदवीधराचा समावेश करून सरकारने त्यांचा सन्मान केला. महादेवरावांच्या सर्व गुरूंना, हा एक अद्वितीय पुरुष होणार, अशी खात्री वाटत होती.

इ. स. १८६६ च्या जूनमध्ये रानड्यांची ओरिएंटल ट्रान्स्लेटरच्या जागी नेमणूक करण्यात आली. मराठी भाषेत जे ग्रंथ प्रसिद्ध होतील, त्यांवर अभिप्राय लिहिणे, हे त्यांचे काम होते. त्यांच्या त्या अभिप्रायांत त्यांनी साहित्य, इतिहास, सामाजिक रूढी, इ. विषयांवर विस्तृत विवेचन केलेले आढळते. हे काम करीत असतानाच ते अक्कलकोट व कोल्हापूर इथे अनुक्रमे कारभारी व न्यायाधीश म्हणून काम करू लागले. पुढे १८६८ मध्ये त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजात प्रोफेसर म्हणून कायम नेमणूक झाली. तरीदेखील ते कधी स्मॉल कॉज कोर्टाचे न्यायाधीश, कधी पोलिस मॅजिस्ट्रेट, तर कधी हायकोर्टाचे डेप्युटी किंवा असिस्टंट रजिस्ट्रार म्हणून काम करीत होते. इ. स. १८७१ च्या अखेरीला ॲडव्होकेटची परीक्षा दिल्यावर त्यांची पुण्याला न्यायखात्यात नेमणूक झाली. या वेळी सरकारने आणखी एक गुणग्राहकता व्यक्त केली. सामान्यपणे दुय्यम जज्जांना अपिले ऐकण्याचा अधिकार नसतो. पण सरकारने तो अधिकारही त्यांना दिला. हे काम काही काळ केल्यावर त्यांना वरचा हुद्दा मिळाला आणि ते इ. स. १८९३ साली हायकोर्ट जज्ज झाले. न्यायदानाच्या कामात निःस्पृहपणा, अभ्यास, खोल विचार व न्यायीपणा हे त्यांचे गुण प्रकर्षाने दिसून आले. त्यांच्या निकालपत्रात केवळ बुद्धिचापल्य दिसत नसून, विद्वत्ता, कायद्याचे

न्या. महादेव गोविंद रानडे

अचूक ज्ञान व परिश्रम यांचेही दर्शन होत असे. वरिष्ठ न्यायासनावर ते विराजमान झाल्यास त्या न्यायासनाचाच बहुमान होईल, असे उद्‌गार सरन्यायाधीश सर मायकेल वेस्ट्रॉप यांनी काढले होते, असे म्हणतात.

महादेवराव रानडे यांचे दोन विवाह झाले होते. वयाच्या १२ व्या वर्षी त्यांचे पहिले लग्न वाईच्या दांडेकर घराण्यातल्या रमाबाई नावाच्या कन्येशी झाले. इ. स. १८६६ मध्ये फेलो झाल्यानंतर त्यांनी मुंबईत संसार थाटला. पण ऐन उमेदीत इ. स. १८७३ साली त्यांची प्रथम पत्नी मरण पावली. त्यानंतर लवकरच महादेवरावांचा दुसरा विवाह झाला. तेव्हा ते एकतीस वर्षांचे होते आणि त्यांची द्वितीय पत्नी अकरा वर्षांची होती. असा विवाह करणे महादेवरावांना पसंत नव्हते; पण वृद्ध वडिलांच्या अत्याग्रहामुळे ते या विवाहाला तयार झाले. बालविवाहाचा निषेध आणि विधवाविवाहाचा पुरस्कार करीत असताना महादेवरावांनी अकरा वर्षांच्या कुमारिकेबरोबर विवाह केला म्हणून त्यांच्यावर लोकांनी टीकेची झोड उठवली.

समाजसुधारणा – महादेवराव रानडे यांच्या आधी तीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हितवादी, विष्णुशास्त्री पंडित, म. ज्योतिबा फुलेप्रभृती पुरुषांनी महाराष्ट्रात समाजसुधारणेची चळवळ सुरू केली होती. विद्यार्थिदशा संपल्यानंतर महादेवरावही त्या चळवळीत सहभागी झाले. इ. स. १८६२ मध्ये काही महिने त्यांनी इंदुप्रकाश या वृत्तपत्राच्या इंग्रजी विभागातून समाजसुधारणेवर काही लेख लिहिले. इ. स. १८६५ साली विधवाविवाहोत्तेजक मंडळाची स्थापना झाली. रानडे हे त्या मंडळाचे एक प्रमुख आधारस्तंभ होते. इ.स.१८६९ मध्ये त्या मंडळाने एक विधवाविवाह घडवून आणला. त्यामुळे सनातन धर्माच्या अभिमान्यांनी शंकराचार्यांच्या अनुमतीने त्या विधवाविवाहाच्या पुरस्कर्त्यांवर बहिष्कार टाकला. त्यांतील बहुतेकजणांनी प्रायश्चित्त घेऊन स्वतःची सोडवणूक करून घेतली. पण रानड्यांनी मात्र त्या सामाजिक संकटाला धैर्याने तोंड दिले. त्यामुळे त्यांना पुष्कळ त्रास सहन करावा लागला. या वादाच्या निमित्ताने महादेवरावांनी वेद, स्मृती, पुराणे व इतिहास यांचा अभ्यास करून आणि सगळे शास्त्राधार विचारात घेऊन एक विद्वत्ताप्रचुर निबंध लिहिला. त्यातील विवेचनावरून त्यांचा धर्मशास्त्राचा व्यासंग केवढा होता, ते ध्यानात येते.

रानडे सर्वांगीण सुधारणेचे पुरस्कर्ते होते. राजकारण, अर्थकारण, धर्मकारण व समाजकारण ही समाजाची भिन्न अंगे परस्परांशी अगदी संबद्ध अशी आहेत; म्हणून समाजजीवनाचा साकल्याने विचार केला पाहिजे, हे त्यांच्या समाजकारणाचे पहिले तत्त्व होते.

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी त्यांच्या सामाजिक कार्याविषयी विवेचन केले आहे, ते असे –

"न्या. रानडे यांनी समाजकारणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतल्यानंतर समाजसुधारणेमागे निश्चित असे तत्त्वज्ञान उभे केले आणि लेख लिहून, व्याख्याने देऊन व विविध संस्था स्थापून त्या चळवळीला संघटित व प्रतिष्ठित रूप आणले.

ज्याच्या साठी समाजसुधारणा करावयाची त्या मानवाच्या प्रतिष्ठेचे उज्जीवन हे सर्व समाजसुधारणेचे मूलसूत्र होय, असे न्या. रानडे यांनी सांगितले आहे. आपली सामाजिक, धार्मिक व राजकीय बंधने ही सर्व विवेकबंधने नसून, जड व बाह्य अशी, कार्यकारणसंबंध नसलेली, कोणीतरी लादलेली आहेत. त्यामुळे या समाजाला स्वयंशासनाने येणारी प्रतिष्ठा आलेलीच नाही, असे त्यांचे मत होते. १८९६ साली सामाजिक परिषदेतील भाषणात ते म्हणाले, 'मानवाची बुद्धी प्रथम मुक्त केली पाहिजे; त्याची कर्तव्यनिष्ठा उन्नत केली पाहिजे आणि त्याच्या सर्व शक्ती परिणत केल्या पाहिजेत. अशा रीतीने मानवाला पूर्णत्व प्राप्त करून देणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.' त्यांनी स्त्रीशिक्षण, प्रौढविवाह, पुनर्विवाह, स्त्री-पुरुषसमता, भिन्न जातींची समता, इ. बहुतेक सर्व सुधारणांचा पुरस्कार केला. मात्र त्यांच्या सर्व लेखांत समाजात मनःक्रांती घडवून आणणे हीच दृष्टी दिसून येते. व्यक्तिस्वातंत्र्य आणले पाहिजे, बुद्धिनिष्ठा रुजविली पाहिजे, जन्मनिष्ठेपेक्षा गुणनिष्ठेची जोपासना केली पाहिजे व अंध दैववादाऐवजी मानवत्वाची प्रतिष्ठा या गुणांचा अवलंब केला पाहिजे, असे त्यांचे तत्त्वज्ञान होते.

न्या. रानडे विकासवादी होते. भारताच्या प्राचीन इतिहासाचा त्यांना अतिशय अभिमान होता आणि आजच्या सुधारणा प्राचीन ऋषींच्या तत्त्वज्ञानातूनच परिणत होत आहेत, असे ते म्हणत. पण अंधश्रद्धेचा लवलेशही त्यांच्या मनात नव्हता. आपल्या तत्त्वज्ञानाला महादेवरावांनी कृतीची जोड दिली असती, तर समाजाची अधिक प्रगती झाली असती. पण प्रथम पत्नी निवर्तल्यावर त्यांनी स्वतःच्या उपदेशाप्रमाणे विधवेशी विवाह केला नाही व प्रौढविवाहही केला नाही. पंचहौद मिशन प्रकरणी विवेकाविरुद्ध जाऊन त्यांनी प्रायश्चित्त घेतले. या विसंगतीमुळे सुधारकांच्या व त्याचबरोबर समाजसुधारणेच्या तत्त्वज्ञानाच्या प्रतिष्ठेला धक्का बसला."

सनदशीर राजकारण – इ. स. १८७१ मध्ये न्या. रानडे पुण्याला बदलून आले. इ. स. १८७० साली पुण्यात 'सार्वजनिक सभा' स्थापण्यात आली होती. महादेवरावांनी त्या सभेची सूत्रे आपल्या हाती घेतली. सरकारी नोकरीत राहूनच त्यांनी सार्वजनिक सभेच्या कार्याला राजकीय चळवळीचे स्वरूप दिले. हिंदुस्थानातील प्रागतिक सनदशीर राजकारणाचा पाया त्यांनीच घातला. त्यांच्या बौद्धिक मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सभेचे चिटणीस गणेश वासुदेव जोशी म्हणजे सार्वजनिक काका यांनी मोठी कामगिरी केली. लोकहितवादींनी स्वदेशीचा उपदेश केला होता, पण स्वदेशीचा प्रचार व संघटना करण्याचे कार्य रानडे व जोशी यांनी सुरू केले. रानडे यांनी स्वदेशी उद्योगधंद्यांचा ऱ्हास व त्यांच्या उन्नतीचे उपाय यावर दोन विद्वत्ताप्रचुर व्याख्याने दिली. पहिल्या व्याख्यानात त्यांनी देशाच्या संपत्तीचे इंग्रज सरकार व व्यापारी कसे शोषण करीत आहेत, ते स्पष्ट करून सांगितले आणि दुसऱ्या व्याख्यानात समाइक भांडवलाच्या मंडळ्या स्थापून यांत्रिक कारखाने काढल्याखेरीज औद्योगिक उन्नती होणार नाही, हे तत्त्व लोकांच्या मनावर ठसवले. सार्वजनिक काकांनी स्वदेशीचे व्रतच सुरू केले आणि ठिकठिकाणी स्वदेशी मालाची दुकाने काढून स्वदेशी मालाला उत्तेजन देण्याचा प्रचारही सुरू केला. रानड्यांनी आपल्या देशात औद्योगिक क्रांती व्हावी म्हणून संरक्षक जकातीचे तत्त्व पुरस्कारले व इंग्रज सरकारला अर्थशास्त्राच्या आधाराने ते पटवून देण्याचा उद्योग आरंभला. अशा प्रकारे न्या. रानडे यांनी स्वतंत्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा हिंदी अर्थशास्त्राचा पाया घातला, असे मानले जाते.

महाराष्ट्रात दुष्काळाची चिन्हे दिसू लागली, तेव्हा रानड्यांनी सार्वजनिक सभेच्याद्वारा महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीची पाहणी सुरू केली. त्या पाहणीत, शेतकऱ्यांची हलाखी केवळ सरकारच्या धोरणामुळे झाली होती, असे दिसून आले. आपल्या दुःखाला आपणच वाचा फोडली पाहिजे व त्यावर आपणच स्वतंत्र रीतीने उपाययोजना केली पाहिजे, असे रानड्यांनी प्रतिपादिले. इ. स. १८७४ मध्ये त्यांच्याच प्रेरणेमुळे सार्वजनिक सभेने जबाबदार राज्यद्धपतीच्या मागणीचा अर्ज पार्लमेंटकडे धाडून दिला. त्या मागणीला सामान्य जनतेचा पाठिंबा आहे हे दाखविण्यासाठी, त्यावर हजारो लोकांच्या सह्या घेण्यात आल्या होत्या.

इ. स. १८७६ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडून जिकडे तिकडे दंगे झाले. सरकारने त्या दंग्यांचे खापर जनतेच्या डोक्यावर फोडले. पण महादेवरावांनी दंग्यांची बारकाईने चौकशी करून, 'दंग्यांचे मूळ सरकारी धोरणातच आहे' असे निवेदन सरकारकडे पाठवले. त्यानंतर १८७७ साली दिल्ली येथे भरलेल्या दरबारात राणी व्हिक्टोरिया हिला 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' ही पदवी अर्पण करण्यात आली. त्या प्रसंगी रानड्यांनी सार्वजनिक सभेमार्फत राणीला एक मानपत्र दिले आणि त्याबरोबर हिंदी जनतेच्या मागण्यांचा एक अर्जही दिला. त्या अर्जात हिंदुस्थानातील लोकांच्या त्या वेळच्या राजकीय आकांक्षांचे उत्तम चित्र रेखाटलेले आहे.

अशा प्रकारे न्या. रानडे सनदशीर राजकारणाचे कार्य करीत होते, तरी वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाला त्यांची अंतस्थ फूस आहे, अशी काही सरकारी अधिकाऱ्यांची समजूत होती. त्यातच इ. स. १८७९ मध्ये १३ मे रोजी रात्री पुण्यातील बुधवारवाडा व विश्रामबागवाडा हे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. एका रानडे नावाच्या सरकारी नोकराने ती आग लावली होती. पण प्रथम सरकारला न्या. रानड्यांचाच संशय आला. म्हणून सरकारने त्यांची बदली धुळ्याला केली व त्यांच्या पत्रव्यवहारावर कडक लक्ष ठेवले. पण लवकरच सरकारचा न्या. रानड्यांबद्दलचा संशय दूर झाला.

इ. स. १८८५ साली काँग्रेसची स्थापना झाली. त्या कार्यात न्या. रानड्यांचा भाग पुष्कळ होता. ते सरकारी नोकर असल्यामुळे राजकीय संस्थेत प्रत्यक्षपणे भाग घेऊ शकत नव्हते. त्याच वर्षी त्यांना कौन्सिलचे सभासद नेमण्यात आले. पुढील वर्षी त्यांना सरकारने फायनान्स कमिटीत घेतले. महादेवरावांचे सार्वजनिक कार्य काही वेळा त्यांच्या बढतीच्या आड येत असे. बढतीसाठी त्यांनी कधीही ते कार्य सोडले नाही. पण त्यांची योग्यता एवढी मोठी होती, की सरकार विलंबाने का होई पण त्यांना बढती देत असे.

इ. स. १८९० साली न्या. रानड्यांनी औद्योगिक परिषदे उपक्रम सुरू करून औद्योगिक विकासाला चालना दिली. वेळचे त्यांचे प्रास्ताविक भाषण फारच महत्त्वाचे आहे. त्यानं त्यांनी या विषयावर अनेक उद्बोधक व्याख्याने दिली. इ. १८९२ मध्ये रानड्यांनी डेक्कन कॉलेजात 'हिंदी अर्थशास्त्र या विषयावर एक निबंध वाचला. त्यापूर्वी हिंदुस्थानला वे अर्थशास्त्र असेल, असे कोणाला वाटले नव्हते. पण महादे रावांनी आपल्या निबंधात प्रत्येक राष्ट्रातील परिस्थितीप्रम त्या राष्ट्राचे स्वतंत्र असे अर्थशास्त्र बनते, असे सप्रमाण सि केले आहे. खुला व्यापार व संरक्षित व्यापार यांचे विवे करून त्यांनी कंगाल हिंदुस्थानला स्वतंत्र अर्थशास्त्र असावे, प्रतिपादिले. अशा रीतीने त्यांनी हिंदी अर्थशास्त्रातील नवे सुरू केले.

इ. स. १८९३ साली महादेवरावांना मुंबईच्या वरिष्ठ न्याया लयात न्यायमूर्तींची जागा मिळाली. त्या प्रसंगी पुण्यातं लोकांनी मोठा उत्सव केला. तो महादेवोत्सव आठ दिवस च होता. पुण्यातील प्रत्येक संस्थेने त्यांचा गौरव केला. सत समारंभाला ते जात, तेव्हा लोक त्यांच्यावर अक्षरशः पुष्पवृ करीत. त्यानंतर न्या. रानडे यांनी एक विश्वस्त निधी नि करून, त्याच्या व्याजातून निरनिराळ्या संस्थांना देण देण्याची व्यवस्था केली.

न्यायमूर्ती झाल्यानंतरही त्यांचे सार्वजनिक कार्य थां नाही. न्यायदानाच्या कामाव्यतिरिक्त सर्व वेळ ते सार्वजनि कार्यासाठी खर्च करीत. काँग्रेस व सामाजिक परिषद यांना पू प्रमाणेच ते मार्गदर्शन करीत.

इ. स. १८९० मध्ये पुण्यात सामाजिक सुधारणेच्या वाद अत्यंत कठोर रूप प्राप्त झाले होते. त्यामुळे सार्वजनिक क करणाऱ्या अनेक व्यक्तींमध्ये चिरकालीन वैमनस्याचे बी रोपण झाले. त्याचे पर्यवसान सार्वजनिक सभेत फाटा होण्यात झाले. लो. टिळक आणि त्यांचे सहकारी यांनी त्या स आपले बळ वाढवून न्या. रानड्यांच्या अनुयायांना दूर सा तेव्हा रानड्यांनी इ. स. १८९६ साली पुण्यांत डेक्कन सभा नवी संस्था काढली. त्या वेळी त्यांनी काढलेल्या पत्रकात ल राजकीय तत्त्वज्ञान स्पष्ट केलेले आहे. लोकशिक्षण हाच रा कीय चळवळीचा उद्देश आहे. पायरीपायरीने प्रगती करा अशक्य किंवा अतिदूरस्थ ध्येयाच्या नादी लागू नये. ना कत्वाची उभारणी स्वाभिमान व स्वावलंबन या गुणां योगाने होत असते. हे गुण अंगी बाणण्याला दीर्घ काला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लागतो, असे त्यांचे मत होते. जातीपातीचा दुरभिमान सोडणे यालाच ते उदारमतवाद म्हणत.

आचार्य जावडेकर यांनी न्यायमूर्तींच्या राजकीय धोरणाचा ऊहापोह केला आहे, तो असा —

" ऐतिहासिक घडामोडींकडे परमेश्वरी हेतूच्या दृष्टीने पाहण्याची त्यांची मनोवृत्ती असून, प्रत्येक वाईट गोष्टीतून काही तरी चांगले निर्माण होते, अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. देशात सर्वत्र कायद्याचे राज्य स्थापन करून शांतता प्रस्थापित कशी करावी या गोष्टीचे शिक्षण देण्यासाठीच परमेश्वराने ब्रिटिश लोकांना या देशात धाडले, असा त्यांचा विश्वास होता व देशातील कायद्याच्या राज्याला धक्का बसेल असे कोणतेही कृत्य आपण करू नये, यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. न्यायमूर्ती प्रागतिक होते, तसेच नेमस्तही होते. वंशभेद किंवा धर्मभेद न मानता मनुष्यामनुष्यांत समानता व न्याय प्रस्थापित करणे म्हणजे प्रागतिकत्व आणि तडजोड व देवाणघेवाण करून हळूहळू प्रगती करणे म्हणजे नेमस्तपणा, असा अर्थ ते करीत."

धार्मिक कार्य — महादेवराव रानडे हे प्रार्थना समाजाचे एक प्रमुख आधारस्तंभ होते. त्या पंथाची तत्त्वे, उपासनापद्धती आणि विधी यांचे समर्थन करण्यासाठी त्यांनी 'एकेश्वरनिष्ठाची कैफियत' या नावाचा एक निबंध लिहिला. प्रार्थना समाज हे स्वदेशबांधवांच्या धार्मिक उद्धाराचे एक साधन आहे, अशी त्यांची समजूत होती. ब्राह्म समाजाप्रमाणे हिंदू धर्मातून बाहेर पडण्याचा विचार त्यांना मुळीच मान्य नव्हता. भक्तीचा प्रसार करण्यासाठी प्रार्थना समाजाचा जन्म आहे, असेही त्यांनी प्रतिपादिले आहे.

साहित्यसेवा — नासिक येथे असताना न्या. रानड्यांनी 'मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी' या नावाची एक संस्था स्थापन केली. इतिहास, शास्त्रे, देशाची सुधारणा, थोर पुरुषांची चरित्रे, धर्म, इ. विविध विषयांची पुस्तके प्रसिद्ध करणे हा तिचा उद्देश होता. पण ती संस्था फार वर्षे चालली नाही. मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी महादेवराव सतत प्रयत्नशील होते. त्यांची इतिहासनिष्ठा प्रबळ होती. शेतसाऱ्याचा प्रश्न असो, वतनदारीचा विषय असो किंवा समाजसुधारणा असो, महादेवराव सर्वांचा विचार ऐतिहासिक दृष्टीने करीत. त्यांनी मराठेशाहीचा इतिहास लिहून इंग्रज इतिहासकारांच्या विकृत मतांचे खंडन केले आहे. त्या ग्रंथात त्यांनी साधुसंतांच्या कामगिरीचाही परामर्श घेतला आहे.

व्यक्तिमत्त्व — न्या. रानडे हे एक उत्तम वक्ते होते. मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. कोणत्याही प्रश्नाचा सखोल अभ्यास व देशोद्धाराची तळमळ यांमुळे त्यांची व्याख्याने अत्यंत रसाळ व मार्गदर्शक होत असत.

न्या. रानडे यांचे शरीर भारदस्त असून, त्यांचे डोके विशेष मोठे होते. त्यांच्या चेहऱ्याची ठेवण मात्र मनात भरण्याजोगी नव्हती. वाचनातिरेकामुळे त्यांचा उजवा डोळा जवळजवळ निकामी व दुसरा डोळा अधू झाला होता. पण त्यामुळेच ते प्रज्ञाचक्षू झाले होते. महादेवरावांची वेशभूषा व राहणी अत्यंत साधी असे. त्यांची वृत्ती नेहमी शांत असे. ते कधीही रागावत नसत. मानापमानाच्या कल्पना त्यांना कधी शिवल्या नाहीत. अहंकाराचाही त्यांच्या मनाला स्पर्श झाला नव्हता. ते परोपकारी होते. एकदा एका ओझेवाल्या बाईने त्यांना ओझे उचलून देण्याची विनंती केली असता, त्यांनी चटकन तिला हातभार लावला होता. ते भौतिकशास्त्रांचे पुरस्कर्ते असले तरी, त्यांची वृत्ती धार्मिक होती. संतांचे भक्तिपर अभंग म्हणून भजन करण्यात ते रोज काही वेळ घालवीत.

न्या. रानडे हे त्यांच्या ऋजू स्वभावामुळेच अतिशय लोकप्रिय झाले होते आणि त्यामुळेच विविध क्षेत्रांतली माणसे त्यांच्या भोवती गोळा होत असत. त्यांनी अनेकांना कार्यप्रवण केले. योजकता हा त्यांचा गुणविशेष तर त्यांच्या सर्व कार्यसंभारात प्रकर्षाने जाणवतो. त्यांनी कित्येक संस्था स्थापल्या आणि त्यांचा भार अन्तकाळापर्यंत सांभाळला. सतत उद्योग हा त्यांचा स्थायीभावच बनला होता. आळसात वेळ घालवणे म्हणजे त्यांना पाप वाटे. प्रकृती बरी नसली तरीदेखील ते शक्य तितके लेखन-वाचन करीत. देहाला विश्रांती देण्यापेक्षा काम करताकरताच मरण यावे, अशी त्यांची इच्छा होती. शेवटचे चार पाच महिने त्यांच्या हृदयात कळा येत असत, त्या कशातरी सहन करून ते अखेरपर्यंत आपले काम करीत राहिले.

महादेवरावांच्या अंगी असलेल्या अनेक थोर गुणांचा प्रत्यय लो. टिळकांना आला होता. म्हणूनच त्यांच्याविषयी लिहिलेल्या मृत्युलेखात लो. टिळकांनी त्यांची थोरवी गायिली आहे, ती अशी — " महाराष्ट्र म्हणजे त्या वेळी एक थंड गोळा होऊन पडला होता. त्या थंड गोळ्याला कोणत्या तऱ्हेने ऊब दिली असता तो पुन्हा सजीव होईल व हातपाय हालवू लागेल, याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनी, अनेक उपायांनी, अनेक रीतींनी त्यास पुन्हा जिवंत करण्याचे दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरिता जिवापाड मेहनत जर कोणी केली असेल, तर ती प्रथमतः माधवरावांनीच केली, असे म्हटले पाहिजे व आमच्या मते हेच त्यांच्या थोरवीचे किंवा असामान्य मोठेपणाचे मुख्य चिन्ह होय." [न्या. म. गो. रानडे यांचे चरित्र — (१) श्री. न. र. फाटक, १९६६, (२) श्री. दा. पां. रानडे, १९५०; म. जी.; आधुनिक भारत — आचार्य शं. द. जावडेकर, १९३८]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रानडे, रा. द. (इ. स. १८८६–१९५७) एक आंग्लविद्या-विभूषित साक्षात्कारी संत. यांना गुरुदेव म्हणत. यांचे वडील पूर्वीच्या जमखंडी संस्थानात कुंदगोळ वगैरे ठिकाणी काही काळ मामलेदार होते. गुरुदेवांच्या मातु:श्रींचे नाव पार्वतीबाई होते. गुरुदेवांचा जन्म रामेश्वराच्या कृपेने झाला म्हणून त्यांचे नाव रामचंद्र असे ठेवण्यात आले. वयाच्या सहाव्या वर्षी त्यांचे उपनयन झाले.

गुरुदेवांना शिक्षणाचे पहिले पाठ त्यांची थोरली बहीण भागूअक्का यांनी दिले. इ. स. १९०२ साली ते मॅट्रिक झाले. त्या परीक्षेत त्यांना जगन्नाथ शंकरशेठ ही संस्कृतची शिष्यवृत्ती मिळाली. मग ते पुण्याच्या डेक्कन कॉलेजात दाखल झाले. इंटरच्या वर्गात असताना त्यांना वरजीवनदास ही संस्कृतासाठी ठेवलेली शिष्यवृत्ती मिळाली. याच वर्षी त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला. बी. ए. ला त्यांनी गणित हा विषय घेऊन डॉ. भाऊ दाजी हे पारितोषिक मिळविले (१९०७).

बी. ए. झाल्यावर ते 'दक्षिणा फेलो' म्हणून डेक्कन कॉलेजात काम करू लागले. त्या काळी फेलोकडे शिकविण्याचेही काम असे. गुरुदेव संस्कृत नाटके शिकवीत असत. प्रो. बेन हे प्रिन्सिपॉल असल्याने गुरुदेवांचा त्यांच्याशी विशेष संबंध आला. पुढे प्रो. बेन यांनी त्यांना कॉलेजच्या वसतिगृहाचे अधिकारी म्हणून नेमले. पुढे त्यांनी इ. स. १९११ मध्ये फर्ग्युसन कॉलेजात इंग्रजीच्या ट्यूटरची जागा पत्करली. ते डेक्कन कॉलेजातील हस्तलिखित ग्रंथसंग्रहाचे प्रमुख म्हणूनही काम करू लागले (१९१३). नंतर एम. ए. होण्यापूर्वी ते डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सभासद झाले आणि फर्ग्युसन कॉलेजात तत्त्वज्ञान हा विषय शिकवू लागले. तोच विषय घेऊन पुढे ते एम. ए. झाले. चॅन्सलरचे व न्या. तेलंगांचे अशी दोन सुवर्णपदके त्यांनी मिळविली. परीक्षकांनी त्यांच्याविषयी शेरा लिहिला की 'परीक्षकांपेक्षा हा विद्यार्थी या विषयात अधिक जाणकार आहे.' गुरुदेव पुढे दहा वर्षे त्या सोसायटीत होते. दरम्यानच्या काळात लो. टिळकांनी त्यांना केसरी-मराठा संस्थेत संपादक म्हणून येण्याचा आग्रह केला. परंतु त्यांनी त्या गोष्टीला नकार दिला. इ. स. १९२१मध्ये त्यांची प्रकृती फार विघडली. पुण्याची हवा त्यांना मानवेनाशी झाली म्हणून सोसायटीने त्यांची बदली सांगलीच्या विलिंग्डन कॉलेजात केली. परंतु सांगलीही त्यांना मानवली नाही. पुढे त्यांनी सोसायटीचा राजीनामा दिला आणि ते निंबाळला जाऊन राहिले.

प्रा. रानड्यांच्या फर्ग्युसन कॉलेजातील अध्यापनकौशल्यासंबंधी लिहिताना प्रा. दे. द. वाडेकर म्हणतात –

"त्या कॉलेजातील तत्त्वज्ञानाच्या अध्यापनाच्या दृष्टीने प्रा. रानडे यांचे कार्य विशेष महत्त्वाचे आहे. प्रि. आगरकर आणि प्रि. भाटे यांनी तत्पूर्वी तेथे रूढ केलेल्या प्रत्यक्षवाद आणि अज्ञेयवाद या दोन विचारसरणींच्या परंपरेला आदर्शवाद आणि साक्षात्कारवाद यांची जोड देण्याचे कार्य प्रा. रानडे यांनी केले. परंतु त्यांची फर्ग्युसन कॉलेजातील खरी कामगिरी म्हणजे त्यांनी तत्त्वज्ञानाच्या अध्यापनात दाखविलेली व्यासंगाची गाढता आणि प्रज्ञेचे स्वातंत्र्य ही होय. त्यामुळेच सिंध-वऱ्हाडसारख्या दूरदूरच्या प्रांतातील विद्यार्थीही त्यांच्याकडे आकर्षिले जात. त्यांची वर्गातील व्याख्याने अंत:स्फूर्तीने भरलेली व एखाद्या आत्मप्रत्ययी प्रेषिताप्रमाणे विद्यार्थ्यांना तात्त्विक चिंतनाकडे प्रवृत्त करणारी असत."

निंबाळला गेल्यावर गुरुदेवांनी इ. स. १९२४ मध्ये ॲकेडमी ऑफ फिलॉसफी अँड रिलिजन या संस्थेची स्थापना केली. ईश्वरविषयक प्रश्नांचे तात्त्विक दृष्ट्या संशोधन करण्याची ज्यांना आस्था आहे, अशा सर्वांना एकत्र आणणे, हे या संस्थेचे ध्येय होते. या संस्थेच्या सल्लागार मंडळात डॉ. जयकर, डॉ. राधाकृष्णन, डॉ. बेलवलकर, सर गंगानाथ झा, न्या. भवानीशंकर नियोगी, इ. विद्वान मंडळी होती. गुरुदेव हे या संस्थेचे पहिले संचालक आणि डॉ. गोडे व प्रा. दामले हे पहिले चिटणीस होते. भारतीय तत्त्वज्ञानाचा एक विस्तृत ज्ञानकोशसदृश इतिहास प्रसिद्ध करणे, ही या संस्थेची एक योजना होती. त्यासाठी त्यांचे संपादकमंडळ होते. परंतु दुर्दैवाने त्यांना आवश्यक ते साह्य न मिळाल्याने या योजनेतील सोळा खंडांपैकी केवळ दोनच खंड प्रसिद्ध होऊ शकले. त्यांतील एक खुद्द गुरुदेवांचा व दुसरा नागराज शर्मा यांचा आहे. शिवाय या संस्थेच्या वतीने त्यांनी रिव्ह्यू ऑफ फिलॉसफी अँड रिलिजन हे त्रैमासिक सुरू केले. डॉ. गोडे त्याचे संपादक होते. सहा वर्षे हे मासिक चालून पुढे बंद पडले.

इ. स. १९२७ अखेरपर्यंत गुरुदेवांचा मुक्काम निंबाळला होता. तिथे त्यांनी अनेक महत्त्वाची कामे केली. कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसफी हा उपनिषदांवरील ग्रंथ त्यांनी तिथेच पुरा केला. हा ग्रंथ पुरा झाल्यावर त्यांना खूप कीर्ती मिळाली आणि ते जागतिक कीर्तीचे तत्त्वज्ञ ठरले. अनेक पौर्वात्य व पाश्चात्त्य विद्वानांनी या ग्रंथाची खूप प्रशंसा केली. हा ग्रंथ वाचूनच अलाहाबाद विद्यापीठाचे कुलगुरू सर गंगानाथ झा यांनी गुरुदेवांची आपल्या विद्यापीठात तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक म्हणून नियुक्ती केली. तिथे त्यांनी वीस वर्षे तत्त्वज्ञान विभागाचे प्रमुख म्हणून काम केले. ते वर्गात परतत्त्वशास्त्र, नीतिशास्त्र, मानसशास्त्र, धर्मशास्त्र, इ. विषय आलटून पालटून शिकवीत. काही काळ ते या विद्यापीठातील कलाशाखेचे (फॅकल्टी ऑफ आर्टस्)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञानशाखाप्रमुख होते. अखेरीस ते त्या विद्यापीठाचे कुलगुरूही झाले. तिथून निवृत्त झाल्यावर त्या विद्यापीठाने सन्मान्य प्राध्यापक म्हणून त्यांचा गौरव केला आणि त्यांना डी. लिट् ही पदवीही दिली.

अलाहाबाद विद्यापीठातून सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी सांगलीच्या राजेसाहेबांच्या साहाय्याने अध्यात्मविद्यामंदिर या नावाची संस्था स्थापली. पूर्वीची अध्यात्मविद्यापीठ ही संस्था होतीच. परंतु गुरुदेव अलाहाबादला गेल्याने तिचे कार्य थोडे खंडित झालेले होते. हे खंडित झालेले कार्यच त्यांनी या नव्या संस्थेच्या रूपाने पुढे चालू केले. हिचे मुख्य केंद्र निंबाळला असून, अलाहाबाद व सांगली इथे तिच्या शाखा होत्या. या संस्थेच्या वतीने बरीच व्याख्याने व ग्रंथप्रकाशनेही झाली. स्वतः गुरुदेवांनी हिंदी भाषेतील संतवाङ्मयावर दिल्ली, अलाहाबाद, बेळगाव, धारवाड, इ. ठिकाणी व्याख्याने दिली. यांतील दोन व्याख्याने दिल्लीच्या राष्ट्रपतिभवनात डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली झाली. हिंदी संतांवरील, पाथ वे टु गॉड व परमार्थ-सोपान हे त्यांचे दोन ग्रंथ अध्यात्मविद्यामंदिरातर्फेच प्रकाशित झाले. परमार्थ-सोपान या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या वेळी डॉ. राधाकृष्णन म्हणाले, की 'गुरुदेव रानडे यांच्या बाबतीत तत्त्वज्ञान हा केवळ अभ्यासाचा विषय नसून, तो त्यांचा ज्ञानमार्ग आहे, ती त्यांची जीवननिष्ठा आहे.'

यानंतर श्री. रानड्यांचा अमृतमहोत्सव झाला. या वेळी त्यांनी लिहिलेल्या तत्त्वज्ञानपर व इतर निबंधांचा संग्रह प्रसिद्ध करण्यात आला. मग गुरुदेव पुनः अलाहाबादला गेले. पण तिथे त्यांची तब्येत फारच बिघडल्याने ते निंबाळला परत आले. पुढे थोड्याच दिवसांत त्यांनी देह ठेवला.

गुरुदेवांचे दोन विवाह झाले होते. पहिला विवाह फडणीस घराण्यातल्या मुलीशी झाला. पण ही पत्नी इ. स. १९१८ मध्ये वारल्यावर त्यांचे दुसरे लग्न इस्लामपूरच्या विष्णुपंत वैद्यांच्या मनुताई या मुलीबरोबर झाले.

पारमार्थिक जीवन – गुरुदेवांच्या घराण्यात भगवद्भक्ती परंपरागत होती. त्यांच्या मातुःश्रींची वृत्ती पारमार्थिक असून, त्यांनी भाऊसाहेब महाराज उमदीकर यांच्याकडून उपदेश घेतला होता. गुरुदेवांची गुरुपरंपरा निंबरगी महाराज – रघुनाथप्रिय (साधुबुवा) – भाऊसाहेब उमदीकर – गुरुदेव रानडे अशी आहे. ती नाथसंप्रदायातली आहे. इ. स. १९०१ मध्ये गुरुदेवांनी श्रीभाऊसाहेब उमदीकर यांच्याकडून अनुग्रह घेतला. गुरूंचा प्रत्यक्ष सहवास त्यांना थोडाच लाभला; कारण अनुग्रह घेतल्यापासून पाच-सहा वर्षे रानड्यांच्या हातून फारशी साधना झाली नाही. इ. स. १९१०पर्यंत त्यांना गुरुसान्निध्यही लाभले नाही. इ. स. १९१०मध्ये त्यांना इंचगेरी येथे गुरुसहवास घडला. त्या सहवासात सद्‌गुरूंचे महिमान कळून येऊन गुरुदेव परमार्थात स्थिरावले. इ. स. १९१४मध्ये श्रीभाऊसाहेबांनी देह ठेवला. तोपर्यंत गुरुदेवांनी गुरुसेवेचे व्रत यथाशक्ति आचरले. त्यातूनच त्यांना गुरूच्या परब्रह्मस्वरूपाचा अनुभव आला.

गुरुदेवांच्या परमार्थाची वाढ मात्र त्यानंतर गुरुबंधू अंबूराव यांच्या सान्निध्यात असताना झाली. श्री भाऊसाहेबांच्या पश्चात ते अंबूरावांनाच गुरू मानू लागले.

गुरुदेव रानडे यांची प्रकृती बहुधा नादुरुस्तच असे. तशातच पुत्र, पत्नी व माता यांचे वियोग त्यांच्यावर एकामागून एक ओढवले. पुढे त्यांची प्रकृती फारच बिघडल्यामुळे ते इंचगेरी येथे जाऊन अंबूरावांच्या जवळ राहिले. त्यांनी आपल्या जिवाची आशाच सोडली होती. पण गुरुकृपेमुळे ते आजारातून बरे झाले. त्यामुळे पुढे ते परमार्थातील अखेरची चढण चढून जाऊन सिद्धावस्थेला पोचले, कृतार्थ झाले. इ. स. १९२३ मध्ये ते निंबाळला जाऊन स्थायिक झाले. ते अधिकारी पुरुष गणले गेले असले तरी, इ. स. १९३३ पर्यंत म्हणजे अंबूरावांचे निधन होईपर्यंत त्यांनी कोणालाही अनुग्रह दिला नव्हता. त्यानंतर मात्र ते लोकांना अनुग्रह देऊ लागले.

गुरुदेव रानडे हे एक बुद्धिनिष्ठ संत होते. त्यांची मूळची बुद्धिनिष्ठा श्रीभाऊसाहेबमहाराज व प्रो. बेन यांच्या सहवासामुळे वाढली, दृढमूल झाली. त्यांनी बुद्धिनिष्ठ साक्षात्कारवादाचाच जन्मभर पुरस्कार केला.

गुरुदेवांना आपल्या संप्रदायासंबंधी खूप प्रेम होते. या संप्रदायाला ते स्वरूप संप्रदाय म्हणत. त्यात वारकरी संप्रदाय आणि रामदासी संप्रदाय हे दोन्ही समाविष्ट आहेत, असे ते समजत.

व्यक्तिमत्त्व – गुरुदेव हे गौर वर्णाचे, मध्यम उंचीचे व सडसडीत बांध्याचे होते. त्यांची प्रकृती कधीच धडधाकट नव्हती. त्यांची राहणी अगदी साधी होती. ते एका धोतरजोडीची तीन पाने करून वापरीत असत. त्यांनी टेबल–खुर्ची कधी वापरली नाही. गोमयाने सारवलेली खोली त्यांना आवडत असे. त्यांचे जेवणही अगदी साधे व फार कमी असे. ते चहा फार घेत असत; पण त्यात केशरापासून मिठापर्यंत कोणताही पदार्थ घालीत असत. ते रागीट असले तरी द्वेषी नव्हते. त्यांच्या अंगी कर्मठपणा नव्हता. प्रवृत्ती आध्यात्मिक असूनही त्यांनी आधिभौतिक शास्त्रांची कधीही अवहेलना केली नाही.

गुरुदेव बहुभाषिक होते. त्यांना संस्कृत, मराठी, हिंदी, कन्नड, इंग्रजी या भाषा येत होत्या. युरोपीय भाषांपैकी ग्रीक, लॅटिन, फ्रेंच व जर्मन या भाषाही ते शिकले होते. ते आदर्श संशो-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धकही होते. डॉ. प. कृ. गोडे हे त्यांना आपल्या संशोधनकार्यातले गुरू मानीत. त्यांनी तत्त्वज्ञानाचे व्याकरण मांगितले म्हणून त्यांना परमार्थाचे पाणिनी म्हटले जाते.

गुरुदेव रा. द. रानडे

तत्त्वज्ञान – गुरुदेव रानडे यांच्या तत्त्वज्ञानाचे वर्णन मिस्टिसिझम या शब्दाने करतात. या शब्दासंबंधाने ते स्वतः म्हणतात– ‘‘साक्षात्कारशास्त्राला गूढविद्या म्हणतात; परंतु ती गूढ विद्या नाही, प्रकट विद्या आहे. मात्र ज्याला आत्मानुभव आहे, त्यालाच ती प्रकट आहे. साक्षात्कारात शास्त्रीय पद्धती आहे. आधिभौतिक शास्त्रात एखादी नवी कल्पना गृहीत कृत्य म्हणून स्वीकारली जाते, त्याप्रमाणे प्रयोग करण्यात येतात व त्यांवरून ती खरी ठरली तर सिद्धान्ताचे स्वरूप येते. त्याप्रमाणे विद्येतही संतांनी सांगितलेला साधनमार्ग असेच गृहीत कृत्य म्हणून स्वीकारायचा असतो. आपल्या अनुभवाने त्यातील सिद्धान्त खरे ठरले तरच तो मार्ग व ते शास्त्र खरे. शेवटी एक आपला अनुभवच सत्यासत्याचा निर्णायक.’’

मिस्टिसिझम या शब्दाचा अर्थ ओठ मिटणे असा आहे. मिस्टॅन या ग्रीक शब्दावरून तो बनला आहे. मिस्टिसिझम म्हणजे मौन. ‘मुनेर्भावः मौनम्’ = मुनीची स्थिती म्हणजे मौन, असे आपले शास्त्र सांगते. मौन शब्दाचा न बोलणे असाही अर्थ आहे. मिस्टिसिझम म्हणजे ग्रीक भाषेतील मौन. असे मौन काही ग्रीक तत्त्वज्ञ पाळीत असत. आपला अनुभव शब्दांनी व्यक्त करता येत नाही, तो शब्दातीत आहे, म्हणून खरा मुनी मौन स्वीकारतो.

गुरुदेवांचे तत्त्वज्ञान आत्मप्रत्ययी आहे. त्यात पारमार्थिक अनुभवाला व प्रचीतीला मोठे स्थान आहे. त्यांनी देव हा शब्द आत्मा या अर्थी वापरलेला असून, त्या आत्म्याचा अनुभव हेच आत्मज्ञान, अशी त्यांची विचारसरणी आहे. आपणास आपण पाहणे हेच आत्मदर्शन होय. ‘आत्मा वा अरे द्रष्टव्यः’ असे उपनिषदातच म्हटले आहे (बृहदा. २.४.५). ही विचारपद्धती म्हणजे बुद्धिवादावर आधारलेला अनुभूतिवाद होय. या अनुभूतीपासून मिळणारा आनंद अनिर्वाच्य कोटीतील असतो. त्यात बुद्धी, भावना व इच्छा यांचा संयोग असला, तरी या तीन शक्ती आध्यात्मिक साक्षात्कार घडविण्यास पुरेशा नाहीत. कारण या अनुभवाची प्रेरक शक्ती स्वतंत्र व स्वयंभू असून, ती अंतःस्फूर्तिरूप आहे. ही शक्ती व पारमार्थिक अनुभव यांचा निकट संबंध असून, तो काहीसा गुप्तस्वरूप होऊन बसला आहे. याचा अर्थ मिस्टिसिझम ही गूढ विद्या आहे असा नाही; तर उलट ती प्रकट विद्या आहे. कारण आत्मप्रत्यय ही अनुभवाची सर्वांत श्रेष्ठ कसोटी आहे. म्हणून मिस्टिसिझम म्हणजे केवळ भक्ती किंवा भक्तिमार्ग नव्हे; तर भक्तीची परिसीमा होय, असे त्यांचे मत आहे. यासाठीच ते मिस्टिसिझमचा अनुवाद गूढवाद असा न करता, साक्षात्कारवाद असा करतात.

त्यांच्या तत्त्वज्ञानात परमार्थप्रवृत्तीच्या कारणांना महत्त्व आहे. त्यांची ही विचारपद्धती गीतेत सांगितलेल्या विचारानुसार आहे.

साधनामार्ग – साधक परमार्थप्रवृत्तीच्या कारणांचा जितका अधिक विचार करील तितकी त्याची साधनेवरील निष्ठा अधिक वाढते. त्यांचा साधनामार्ग कृतिप्रधान आहे. ही कृती म्हणजे भक्तियोग होय. त्याची गुरुशोधन, दुर्गुणत्याग, सद्गुणसेवन, नामस्मरण व संतसंग ही प्रधान अंगे होत. यातील नामस्मरण हे साधन आणि साक्षात्कार हे ध्येय आहे. यांलाच गुरुदेव ईश्वरप्राप्तीचा मार्ग असे म्हणतात. हे नामस्मरण सबीज असावे लागते. सबीज म्हणजे दिव्य नाम होय. ज्या नामाने देवाची प्रचीती येते, तेच खरे नाम. या नामात दिव्य शक्ती असते. ते सद्गुरूकडून प्राप्त होते. कारण सद्गुरू हा आत्मसाक्षात्कारी होऊन ब्रह्मस्वरूप झालेला असल्याने, त्याने दिलेल्या नामात एक दिव्य शक्ती येते. या नामस्मरणाला गुरुदेव नेम असे म्हणतात. प्रपंचाविषयी कमालीची अनासक्ती, देवाबद्दल नम्रता, अंतःकरणात भेदभाव न ठेवणे व शुद्ध अंतःकरण ही साधनामार्गातील चतुःसूत्री असल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यांच्या मते हठयोग व कर्मयोग यांपेक्षा भक्तियोग हा श्रेष्ठ आहे आणि तो सद्गुणांचा मुकुटमणी आहे.

गुरुदेव रानड्यांचे महत्त्वाचे ग्रंथ पुढीलप्रमाणे आहेत : (१) ए कन्स्ट्रक्टिव्ह सर्व्हे ऑफ उपनिषदिक फिलॉसफी (

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मिस्टिसिझम् इन् महाराष्ट्र (३) मिस्टिसिझम् इन् कर्नाटक (४) पाथ-वे टु गॉड इन् हिंदी लिटरेचर (५) परमार्थ-सोपान (६) दि भगवद्गीता अँज ए फिलॉसफी ऑफ् गॉड रियलायझेशन (७) ज्ञानदेव व भारतीय संत.

याशिवाय अध्यात्मग्रंथमालेत त्यांनी ज्ञानेश्वरवचनामृत, तुकारामवचनामृत, संतवचनामृत, एकनाथवचनामृत आणि रामदासवचनामृत अशी पुस्तके संपादित केली आहेत. त्यांच्या बहुतेक सर्व इंग्रजी ग्रंथांचा मराठी अनुवाद प्रसिद्ध झाला आहे.

भांडारकर प्राच्य विद्यामंदिर ही संस्था स्थापन करण्यामध्ये गुरुदेव रानडे यांचा मोठा वाटा आहे. हे कार्य त्यांच्या अनेक ग्रंथांइतकेच महत्त्वाचे आहे. [प्रा. रा. द. रानडे, चरित्र आणि तत्त्वज्ञान – श्री. शं. गो. तुळपुळे, १९५८; म. जी. खंड १ ला.; प्रा. दे. द. वाडेकर – नवभारत, ऑक्टोबर १९५७; सत्संग, गुरुदेव रानडे विशेषांक, जून १९६९]

राभा

एक जमात. यांची वस्ती मुख्यत्वे आसामात व पश्चिम बंगालच्या जलपैगुडी आणि कुचबिहार या जिल्ह्यांत आहे. राभा लोक मंगोलाइड वंशाचे असून, बोडो गटातील गारो, काचारी, मेच, इ. लोकांशी त्यांचे साम्य आहे. राभा लोकांची एकूण संख्या सुमारे १ लाख १५ हजार आहे.

पश्चिम बंगालमधील राभा लोकांची माहिती अशी –

या लोकांच्या शरीराची ठेवण सर्वसाधारण मंगोलाइड लोकांच्या शरीराच्या ठेवणीमारखीच असते. ते ठेंगणे किंवा मध्यम उंचीचे असून, त्यांचा वर्ण पिवळा, नाक चपटे व केस सरळ किंवा किंचित कुरळे असतात.

वेषभूषा – राभा पुरुष धोतर नेसतात व सदरा घालतात. थंडीच्या दिवसांत वर एक चादर पांघरतात. स्त्रिया साडी नेसतात व अंगात पोलके घालतात. जुन्या वळणाच्या स्त्रिया वेगळ्या पद्धतीने साडी नेसतात; सुधारलेल्या स्त्रिया बंगाली पद्धतीने नेसतात. सांप्रत आसपासच्या सुधारलेल्या लोकांच्या पेहरावाचा त्यांच्यावर हळूहळू प्रभाव पडू लागला आहे.

स्त्रिया केसांचा अंबाडा बांधतात. नेहमी त्यांच्या अंगावर दागिने नसतात. पण सणासुदीला त्या कर्णफुले, हार, बांगड्या, वाकी, साखळ्या, इ. अलंकार घालतात. हे अलंकार चांदीचे, पितळेचे, शंखाचे किंवा काचेचे असतात.

हे लोक उन्हाळ्यात रोज दोनदा आंघोळ करतात. थंडीत मात्र लहान मुले व म्हातारी माणसे रोज स्नान करीत नाहीत.

राभा लोक सर्वसाधारणपणे स्थानिक बंगाली बोली बोलतात. फक्त वयस्क लोक त्यांची मूळची राभा बोली बोलतात.

अन्न – भात हे राभांचे मुख्य अन्न आहे. त्याबरोबर भाज्या, डाळी, मांस, मासे, इ. पदार्थ ते परवडतील त्या प्रमाणात खातात. सणासुदीला ते डुकराचे, बकऱ्याचे किंवा कोंबडीचे मांस खातात. लाह्या आणि दहीपोहे हे त्यांच्या आवडीचे पदार्थ आहेत.

राभा स्त्रिया

सर्वसाधारण राभा लोक गरीब असून, वर्षातून काही महिने ते अर्धपोटी असतात. पूर्वी हे लोक तांदुळापासून बनवलेले मद्य फार पीत असत. भात पिकून अंगणात येऊन पडले, की त्यांच्या आनंदाला पारावार राहत नसे. मद्य तयार करण्यात त्यातले बरेचसे भात खर्च होई आणि त्यामुळे पुढे त्यांना काही दिवस अर्धपोटी राहावे लागे. दोन वर्षांच्या मुलापासून म्हाताऱ्या माणसापर्यंत सर्व लोक नियमितपणे मद्यपान करीत. सांप्रत मात्र यांच्यांतील मद्यपानाचे प्रमाण बरेच कमी झाले आहे. मद्याची जागा आता चहाने घेतली आहे. ते दूध सहसा वापरीत नाहीत. निघालेले दूध बाजारात विकतात. हे लोक निरनिराळी जाळी व पिंजरे लावून मासे पकडतात.

घरे – या लोकांची घरे बांबूची असतात. प्रथम जमिनीवर बांबूचा सांगाडा उभारतात. घराच्या भिंती मातीचा गिलावा थापून बनवतात. छप्पर गवताचे असते. घराला पुढे पडवी असते व एक दार असते. खिडक्या बहुधा नसतात. सर्वसाधारण घरात दोन खोल्या असतात. घराशेजारी गुरांसाठी गोठा आणि डुकरे, बकऱ्या, कोंबड्या यांच्यासाठी स्वतंत्र आडोसे बांधलेले असतात.

काही लोकांना ट्रायबल वेल्फेअर खात्यातर्फे घरे बांधून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिलेली आहेत. ती चौकोनी असून, त्यांत एकच खोली असते. त्यांच्या भिंती बांबूच्या आणि छपरे पत्र्याची असतात. घराला पुढे बंदिस्त पडवी असते. अशा घरांना दोन-तीन खिडक्या असतात. घर बांधून झाल्यावर ते वास्तुशांत करून मग घरात राहायला जातात.

उद्योगधंदे – शेती हा या लोकांचा मुख्य व्यवसाय असून, ते प्रामुख्याने भात पिकवतात. यांच्यापैकी काही लोक मजुरी करतात. भाताशिवाय ते भाजीपाला, कडधान्ये, तेलबिया, ताग, इ. काही पिके काढतात.

पिके चांगली यावी, भुताखेतांपासून आणि कृमिकीटकांपासून पिकांचे संरक्षण व्हावे, म्हणून हे लोक काही धार्मिक विधी व पूजा करतात.

वैशाख किंवा ज्येष्ठ महिन्यात ब्राह्मण पुरोहित किंवा अधिकारी मुहूर्त पाहून विश्वकर्म्याच्या पूजेचा दिवस ठरवतो. त्या दिवशी कुटुंबप्रमुख स्नान करून धूतवस्त्र नेसतो आणि अंगणातील एका सारवलेल्या जागी विश्वकर्म्याची पूजा करतो. नंतर तो शेतीच्या अवजरांवर तुलसीजल शिंपडतो आणि त्यांना कुंकुमतिलक लावतो. त्यानंतर तो शेतात जाऊन थोडीशी जमीन नांगरतो आणि घरी येऊन इष्टमित्रांसमवेत मद्यपान आणि मिष्टान्नभोजन करतो.

भाताच्या पेरणीच्या वेळी हे लोक शेतात जाऊन लक्ष्मीची पूजा करतात आणि थोडे भात पेरतात.

मार्गशीर्ष महिन्यात भात कापण्यापूर्वी ते माइहन नामक उत्सव करतात. त्यासाठी ते एक शुभ दिवस ठरवतात. त्या दिवशी शेतात जाऊन कुमारिका लक्ष्मीची पूजा करतात. भाताच्या काही रोपांना कुंकुमतिलक लावून ती कापतात आणि त्यांचे दोन भारे बांधून ते नव्या कापडात गुंडाळून घरी नेतात. भारे देवघरात आठ दिवस ठेवल्यावर घराच्या किंवा कोठीच्या दाराच्या खांबाला बांधून ठेवतात. हा समारंभ झाल्याशिवाय कोणीही भात कापायचे नसते. नवे भात पिकले, की हे लोक पितरांची पूजा करतात.

हे लोक गुरे, शेळ्या, डुकरे, कोंबड्या वगैरे प्राणी पाळतात आणि त्यांचे दूध, मांस, अंडी वगैरे विकून थोडे पैसे मिळवतात.

हे गायीला पवित्र मानतात. एखाद्याच्या हातून गोवध झाला, तर त्याबद्दल त्याला प्रायश्चित्त घ्यावे लागते.

राभा लोकांत काही पोटभेद आहेत. प्रादेशिक दृष्ट्या त्यांचे खेडेगावांत राहणारे आणि पश्चिम बंगाल सरकारच्या राखीव वनविभागांतील वस्त्यांत राहणारे असे दोन भेद आहेत. खेडेगावांत राहणारे लोक मुख्यत्वे शेती करतात आणि वनविभागात राहणारे तिथे मजुरी करतात.

या दोन भेदांतील लोकांमध्ये लग्नसंबंध सहसा होत नाही.

वांशिक दृष्ट्या पश्चिम बंगालमधील राभा हे कोच राभा गटातील आहेत. डाल्टनच्या मते राभांचे रंगदणी आणि पाटी

राभा पुरुष

असे दोन भेद आहेत. पाटी लोकांनी बंगाली लोकांच्या अनेक चालीरीती व बंगाली भाषा यांचा स्वीकार केला आहे. गेटने त्यांचे रंगदणी, पाटी, मैटोरिया, डाबुरी व काचारी असे पाच भेद सांगितले आहेत. या लोकांत अनेक हुसुक किंवा गोत्रे आहेत. समान गोत्रांत लग्नसंबंध होत नाही.

विवाहप्रथा – राभा लोक विवाहाला फार महत्त्व देतात. कारण विवाह केल्यावाचून पुत्रप्राप्ती होत नाही आणि पुत्रप्राप्तीवाचून मुक्ती मिळत नाही, अशी त्यांची श्रद्धा आहे.

मुलगा लग्नाचा झाला, की त्याचा बाप त्याला योग्य अशी मुलगी शोधायला लागतो. तशी एखादी मुलगी आढळली, की मुलाचा बाप आप्तेष्ट, ग्रामप्रमुख व गावचा ब्राह्मण पुरोहित यांच्यासह मुलीच्या घरी जातो.

तिथे चहा-फराळ झाल्यावर मुलगी दिवा, थोड्या साळी, दूर्वा व कुंकू असलेले तबक घेऊन बाहेर येते आणि ते खाली ठेवून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वांना नमस्कार करते. मुलाचा बाप तिला काही पैसे देतो.

मुलीकडील लोकही मुलाच्या घरी जाऊन मुलाला पाहतात. दोन्ही पक्षांना संबंध पसंत पडला, तर लग्नाचा मुहूर्त, देजाची रक्कम, इतर देणीघेणी वगैरे गोष्टी ठरवतात.

लग्नाच्या आदल्या दिवशी अधिवास नामक एक विधी वधू व वर या दोघांच्याही घरी करतात. त्या वेळी दुपारी अंगणात दोन केळी लावतात आणि घराच्या दाराच्या दोन्ही बाजूंना आंब्याची सात पाने व पानसुपारी ठेवलेले दोन घट ठेवतात. नंतर पुरोहित कुलदेवतेची पूजा करतो. लग्नाच्या दिवशी सकाळी वधू-वरांना आपापल्या घरी हळद लावण्याचा कार्यक्रम होतो.

दुपारी मुलाचा मामा व इतर काही लोक वाजतगाजत वधूला घेऊन येण्यासाठी तिच्या घरी जातात. तिथे त्यांचे चांगले स्वागत होते. जेवण झाल्यावर मुलाचा मामा वधूच्या वडिलांना देज देतो व सर्वजण वधूला घेऊन मिरवीत वरगृही येतात.

लग्नमंडपात बाजूच्या चार खांबांशी चार व मध्यभागी एक असे घट स्थापलेले असतात. वराच्या मोठ्या बहिणीचा नवरा त्याला कडेवर घेऊन मांडवात आणतो. वर पूर्वेकडे तोंड करून उभा राहतो आणि दोघेजण त्याच्या समोर अंतरपाट धरतात. वधूच्या मोठ्या बहिणीचा नवरा तिला उचलून घेऊन मांडवात आणतो व नवऱ्यामुलाच्या भोवती सात वेळा फेऱ्या घालतो. प्रत्येक फेरी पूर्ण झाल्यावर वधू वराच्या अंगावर मूठभर लाह्या टाकते. सात फेऱ्या पूर्ण झाल्यावर वधूचा मेहुणा तिच्यासह वराच्या समोर उभा राहतो. नंतर वधूच्या व वराच्या मस्तकावर बुरखे घालतात. मग मधला अंतरपाट बाजूला सारतात आणि वधू-वर आपापले बुरखे बाजूला करून समारंभपूर्वक एकमेकांना पाहतात. त्यानंतर पुरोहित वराच्या उजव्या तळव्यावर वधूचा डावा तळवा ठेवतो आणि दोघांना मंत्र म्हणायला सांगतो. नंतर दोघांच्या जुळवलेल्या हातांवर तो रुमाल घालतो व त्याच्यावर घट ठेवतो. मग तो त्या दोघांच्या वस्त्रांना गाठ मारतो. त्यानंतर सिंदूरदान हा विधी होतो. त्या वेळी नवरामुलगा वधूच्या कपाळी तीनदा सिंदूरतिलक लावतो व तिच्या भांगातही शेंदूर भरतो. वधू त्याच्या कपाळावर तीनदा काजळाचा ठिपका लावते. त्यानंतर वधू-वर एकमेकांना आरसा दाखवतात व त्यात तोंड पाहतात. मग वधू आपल्या गळ्यातील फुलांचा हार वराच्या व वर आपल्या गळ्यातील हार वधूच्या गळ्यात घालतो. त्यानंतर लाजाहोम होतो. रात्री वधू–वर कवड्या खेळतात.

दुसऱ्या दिवशी वधू जमलेल्या सर्व लोकांना खायला देते. लोकांना जर ही वधू एक समाजघटक म्हणून स्वीकारायची नसेल, तर ते तिच्या हातचे अन्न घेत नाहीत. त्यामुळे लोकांनी तिच्या हातचे अन्न स्वीकारले, की ती एक आनंदाची बाब ठरते आणि त्यानंतर मेजवानी होते. त्यानंतर आठव्या दिवशी वधूचे नातेवाईक वरगृही जातात. तिथे त्यांना भोजन देतात. दुसऱ्या दिवशी वराकडील नातेवाईक वधूच्या घरी जातात. तिथे त्यांचे तसेच स्वागत होते. एवढ्याने लग्नसमारंभ संपतो.

बंगाली आचारविचार स्वीकारलेल्या राभा लोकांचे लग्न मुलीच्या घरी होते. देज द्यायला पैसे नसल्यास एखादा तरुण आपल्या भावी सासऱ्याकडे काही दिवस काम करतो व मग मुलीशी लग्न करतो. अनेकदा तो घरजावईही बनतो.

प्रसूतिप्रथा – गरोदरपणी स्त्री विशेष कष्टाची कामे करीत नाही. दहा महिने दहा दिवस मातेच्या गर्भात राहिल्यानंतर मूल जन्माला येते, अशी यांची समजूत आहे. प्रसूतीच्या वेळी सुइणीला बोलावतात. प्रसूतीपूर्वी मुलाच्या कल्याणासाठी सुईण सोलोमातृकेची पूजा करते. हल्ली मात्र स्त्रिया प्रसूतीसाठी सरकारी दवाखान्यांत जातात. जननाशौच तीस दिवस पाळतात. जननाशौच संपते, त्या दिवशी नापित मुलाचे जावळ काढतो. आणि मुलाच्या आईची नखे कापतो. त्यानंतर घरातील सर्वजण बाळ-बाळंतिणीसह जवळच्या झऱ्यावर स्नानासाठी जातात. स्नान करून सर्वजण परतल्यावर पुरोहित बलरामाची पूजा करतो. संध्याकाळी सर्वांना जेवण दिले जाते. याच दिवशी बहुधा मुलाचे नाव ठेवतात. क्वचित मूल एक महिन्याचे झाल्यावर व दोन महिने व्हायच्या आत शुभ दिवस पाहून नाव ठेवतात.

मुलाचा मामा किंवा आजा (आईचा बाप) त्या दिवशी मुलाला मांडीवर घेतो व पाण्याने भरलेल्या एका द्रोणात जे नाव ठेवायचे ते उच्चारून तांदुळाचा एक दाणा टाकतो. तो जर पाण्यावर तरंगला, तर तेच नाव ठेवतात. तो जर बुडला, तर दुसरे नाव उच्चारून दुसरा दाणा टाकतात. दाणा तरंगेपर्यंत असे करतात. नाव ठेवल्यावर जमलेल्या लोकांना जेवण देतात.

मुलगा नऊ महिन्यांचा झाल्यावर व मुलगी सात महिन्यांची झाल्यावर अन्नप्राशनाचा विधी करतात. या दिवशीही पुरोहित बलरामाची पूजा करतो.

देवधर्म – पूर्वी हे लोक भूतपूजक होते. पण आता या शतकाच्या सुरुवातीला या लोकांनी सामुदायिकपणे हिंदू धर्माचा स्वीकार केला आहे.

हे लोक अनेक देवदेवतांना भजतात. ऋषी किंवा महाकाल ही त्यांची सर्वश्रेष्ठ देवता होय. याशिवाय ते काली, कामाक्षा, शीतला, गंगादेवी, नारायण, बडा ठाकूर, सत्यपीर, इ. देवता व काही भुतेखेते यांना भजतात. प्रत्येक घरात देवपूजेसाठी बांबूचा एक चौथरा असतो. त्यावर मातीचा लहानसा ओटा असतो. त्यावर तांदुळाने भरलेला एक घट महाकालाचे प्रतीक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून ठेवलेला असतो. त्याला कोंबडे, डुक्कर यांचा बळी देतात.

काही देवतांच्या पूजेचे काही खास दिवस ठरलेले असतात.

बलरामपूजा – हा उत्सव वैशाखात होतो. सर्वांचे आरोग्य चांगले राहावे, म्हणून ही पूजा करतात. एका शुभ दिवशी पुरोहित प्रथम तुळशीची पूजा करतो आणि तुळशीवृंदावनातच बलरामाची पूजा करतो.

निशाकालीपूजा – ज्या लोकांची निशाकाली ही देवता असते, असे लोक एखाद्या सामाजिक किंवा धार्मिक उत्सवप्रसंगी सायंकाळी किंवा रात्री तिची पूजा करतात. धार्मिक कारणासाठी ही पूजा करायची असते, तेव्हा ती घरातील कर्ती स्त्री करते. अन्यथा त्यासाठी ब्राह्मण पुरोहिताला किंवा देवसीला बोलावतात. देवसी पूजा करणार असेल, त्या वेळी अंगणात मातीचा ओटा घालतात. त्यावर एक बांबूचे रोपटे पुरतात. त्याच्या फांद्यांना पाच-सात दोरे व फुले बांधतात. मग देवसी प्रथम घरात आणि नंतर अंगणात तिची पूजा करतो आणि तिला कोंबडे किंवा बकरे बळी देतो. नंतर त्याचे मांस शिजवून सर्वजण प्रसाद म्हणून भक्षण करतात.

याशिवाय, ते जन्माष्टमी, राधाष्टमी, बिसहरीपूजा, कामाख्यापूजा, कालीपूजा, सत्यनारायणपूजा, शिवपूजा, इ. उत्सव करतात.

मर्तिकप्रथा – भुताखेतांच्या प्रकोपामुळे आजार व मृत्यू येतो अशी पूर्वी या लोकांची समजूत होती. पण आता म्हातारपण, आजार, अपघात, इ. कारणांनी मृत्यू येतो, असे ते मानतात. मृताला सर्वसाधारणपणे जाळतात; क्वचित पुरतात. प्रेत तिरडीवरून स्मशानात नेतात. प्रेत जळल्यावर त्या जागी कापडाचा मांडव घालतात. त्याला मृताची छत्री व इतर वस्तू टांगतात. दहाव्या दिवशी मृताला पिंडदान करतात. मृताशौच तीस दिवस पाळतात. शेवटच्या दिवशी मृताला पिंड देतात. त्यानंतर जमलेल्या लोकांना जेवण देतात.

आसामातील राभा लोकांविषयी फारशी माहिती मिळत नाही. जी काही थोडी माहिती मिळते, ती अशी –

हे लोक मंगोलियन वंशाचे असून, ठेंगणे, सुदृढ, लहान डोळ्यांचे व श्यामल वर्णाचे आहेत. पूर्वी हे लोक गारो टेकड्यांत राहत असावे. पण गारो लोकांशी न पटल्यामुळे त्यांनी सपाट प्रदेशात स्थलांतर केले असे काही लोकांचे मत आहे.

राभा पुरुष कमरेभोवती एक आखूड वस्त्र गुंडाळतो. स्त्रियाही कमरेभोवती एक व चोळीऐवजी दुसरे वस्त्र वक्षःस्थळाभोवती बांधतात. स्त्रिया उत्तम विणकर असून, स्वतः विणलेली वस्त्रे त्या वापरतात. राभा लोक स्वच्छ व नीटनेटके असतात.

हे लोक अरण्यात टोळ्या करून राहतात. पण दक्षिण आसामध्ये मात्र ते विखुरलेले आहेत. शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. ते मुख्यत्वे भात पिकवतात. यांच्यापैकी अनेक लोक सैन्यात नोकरी करतात. बरेच लोक डुकरे, कोंबड्या, इ. प्राणी पाळतात.

या लोकांत रंगदणी, पाटी, मैटोरिया, इ. सात भेद आहेत. शेजारच्या गारो आणि खासी लोकांच्या विवाहपद्धतीप्रमाणे यांची विवाहपद्धती आहे. यांची कुटुंबव्यवस्था मातृसत्ताक आहे. लग्न झाल्यावर मुलगा पत्नीच्या माहेरी राहायला जातो. कुटुंबात स्त्री प्रमुख असते.

हे लोक वन्य देवतांची पूजा करतात. ठाकूर संन्यासी ही यांची प्रमुख देवता आहे. याशिवाय ते दुर्गा, काली, महामाया, इ. हिंदू देवतांनाही भजतात. हिंदूंच्या काही चालीरीतीही त्यांनी उचलल्या आहेत. आपल्या गावात त्यांनी भजन व नामसंकीर्तन करायला सुरुवात केली आहे. काही ठिकाणी प्राथमिक शाळाही उघडल्या आहेत.

पूर्वी हे मृतांना पुरीत; हल्ली जाळतात. तेराव्या दिवशी मृताचे श्राद्ध करतात. [म. ज्ञा. को.; दि राभाज् ऑफ वेस्ट बेंगॉल – ए. के. दास, एम्. के. राहा, १९६७]

राम

इक्ष्वाकू कुलातील अयोध्येचा राजा. दशरथ व कौसल्या यांचा पुत्र. दशावतारांमधला सातवा अवतार. याचा जन्म त्रेतायुगात चैत्र शु. नवमीच्या मध्याह्नी अयोध्येत झाला. चार भावांत तो ज्येष्ठ होता. पण केवळ ज्येष्ठत्व हे त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे गमक नव्हे. वाल्मीकी म्हणतो (बाल. १८.२७) –

तेषामपि महातेजा रामः सत्यपराक्रमः ।

अर्थ – त्या चौघांमध्ये महातेजस्वी असा राम हा सत्यपराक्रमी आहे.

रामाचे इतर बंधू कर्तव्यनिष्ठ नव्हते असे नाही. पण ते पुष्कळदा भावनेच्या आहारी गेले आहेत. रामाचे मात्र तसे नाही. रामाच्या ठिकाणी भावनांचा ओलावा निश्चित आहे; पण तरीही भावनेला मागे लोटून तो नेहमी कर्तव्याला सामोरा गेला आहे. म्हणूनच त्याला मर्यादापुरुषोत्तम असे म्हणतात.

रामाचे लोकांवर असामान्य प्रभुत्व होते. लहानांना सोडाच; पण त्याच्याहून वयाने आणि अधिकाराने मोठ्या असलेल्या व्यक्तींनाही तो प्रसंगी कर्तव्याचा उपदेश करू शकतो. महत्त्वाची गोष्ट म्हणजे काही प्रसंगीं मोठ्यांनीही रामाचा हा कर्तव्योपदेश मानला आहे. रामाविषयी सानथोरांची अपार श्रद्धा हे त्याचे महत्त्वाचे कारण आहे. काही उदाहरणे अशी –

कैकेयीने रामाच्या यौवराज्याभिषेकात अडथळा आणला आणि रामावर वनवासाला जाण्याचा प्रसंग आला. या प्रसंगाने दशरथाचे दुःख-शोक अनावर झाले. दशरथाला रामाचा वियोग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सहन होण्याजोगा नव्हता. म्हणून तो रामाला म्हणाला. 'कैकेयीला दिलेल्या वरामुळे मी संभ्रान्त झालो आहे. तू माझा निग्रह कर म्हणजे मला बंदीत ठेव आणि वनवासाला न जाता अयोध्येचा राजा हो.' पण तो हात जोडून दशरथाला म्हणाला–

भवान् वर्षसहस्राय पृथिव्या नृपते पतिः ।
अहं त्वरण्ये वत्स्यामि न मे राज्यस्य काङ्क्षिता ॥
नव पञ्च च वर्षाणि वनवासे विहृत्य ते ।
पुनः पादौ ग्रहीष्यामि प्रतिज्ञान्ते नराधिप ॥

(वा. रा. अयोध्या. ३४.२८–२९)

अर्थ – हे राजन्, तुम्ही सहस्र वर्षे पृथ्वीचे राज्य करा. मी अरण्यात राहीन. मला राज्याची आकांक्षा नाही. चौदा वर्षे अरण्यात राहून तुमची प्रतिज्ञा पूर्ण केल्यावर मी पुनश्च परत येऊन तुमच्या चरणांना वंदन करीन.

तो पुढे म्हणतो– 'पिता हे माझे दैवत आहे. तुमची आज्ञा ही परमेश्वराची आज्ञा असे समजून मी तिचे परिपालन करीन. तुम्ही व्यर्थ संताप करून घेऊ नका. भावनेचा असा क्षोभ चांगला नव्हे. या घटनेने सर्व प्रजा आज शोकाकुल होऊन अश्रुमोचन करीत आहे. तिला धीर देणे आणि सांभाळणे हे आता तुमचे काम आहे. स्वतःच रडत बसणे हे चांगले नव्हे. तुम्ही शोक आवरा.'

असाच उपदेश त्याने कौसल्यामातेलाही केला आहे –

'आई, हा दारुण शोक माझ्या पित्याचा अन्त करणार नाही अशा पद्धतीने तू त्यांच्या हिताला जप. जी स्त्री आपल्या पतीचे अनुवर्तन करताना व्रतस्थ व दक्ष राहते, तिलाच श्रेष्ठ म्हणतात. म्हणून तुला शोकमग्न होऊन कर्तव्यच्युत होता येणार नाही.'

वसिष्ठासारखा तपोधन आणि ज्ञानवृद्ध ऋषी; पण रामाला वनवासापासून परावृत्त करण्याचा मोह त्यालाही आवरला नाही. त्या वेळी वसिष्ठाला समजवताना राम म्हणतो –

'आई-बापांचे मुलावर फार मोठे उपकार असतात. त्यांची परतफेड कोणालाही करता येणे शक्य नाही. या गोष्टीचे स्मरण ठेवून मला पित्याची प्रतिज्ञा खरी करणेच भाग आहे.'

रामाचे हे नैतिक वजन केवळ त्याच्या परिवारावरच होते असे नव्हे; तर जे जे त्याच्या सहवासात आले, त्यांना त्यांना रामाच्या व्यक्तिमत्त्वापुढे नमावेच लागले आहे. या बाबतची दोन उदाहरणे ठळक आहेत –

(१) बिभीषणाने रावणाचा पक्ष सोडला आणि तो रामाला येऊन मिळाला. त्याने आपल्याला आश्रय देण्याची रामाला विनंती केली. बिभीषण हा शत्रुपक्षाचा आहे; तेव्हा त्याला आश्रय देऊ नये असेच सर्वांचे मत होते. पण रामाने त्या सर्वांच्या विरोधाला न जुमानता आपला निर्णय सांगितला, तो असा –

सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते ।
अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद्व्रतं मम ॥
आनयैनं हरिश्रेष्ठ दत्तमस्याभयं मया ।
बिभीषणो वा सुग्रीव यदि वा रावणः स्वयम् ॥

(वा. रा. युद्ध. १८.३३–३४)

अर्थ – जो कोणी एकवार शरण येऊन, मी तुमचा आहे व मला वाचवा असे म्हणेल, तो कोणीही असला तरी त्याला सर्व भूतांपासून अभय देणे हे माझे व्रत आहे. हे सुग्रीवा, मी बिभीषणाला अभय दिले आहे. तू स्वतः त्याला इकडे घेऊन ये. बिभीषणच काय पण प्रत्यक्ष रावण जरी अभय मागायला आला तरी मी ते त्याला दिल्यावाचून राहणार नाही.

(२) रावणाने सीतेचे हरण केल्यानंतर जो राम दुःखावेगाने वृक्ष-पाषाणांना मिठ्या मारून रडला, तोच राम रावणवधानंतर समोर आणून उभ्या केलेल्या सीतेला वज्रकठिण शब्दांनी वाक्ताडन करता झाला. 'तुझ्या चारित्र्याविषयी मला संशय उत्पन्न झाला आहे. अशा स्थितीत मोठ्या कुळाचे नाव सांगणारा मी तुझा स्वीकार करू शकत नाही. तू वाटेल तिकडे जा आणि वाटेल त्याच्याबरोबर राहा. तुला दाही दिशा मोकळ्या आहेत.'

वाल्मीकी म्हणतो –

नहि रामं तदा कश्चित् कालान्तकयमोपमम् ।
अनुनेतुमथो वक्तुं द्रष्टुं वाप्यशकत् सुहृत् ॥

(वा. रा. युद्ध. ११६.२२)

अर्थ – त्या वेळी एखाद्या अन्तकाप्रमाणे भयंकर दिसणाऱ्या रामचंद्राचा अनुनय करणे व त्याच्याशी प्रत्यक्ष बोलणे तर लांबच राहिले; पण त्याच्याकडे त्याचा मित्रही प्रत्यक्ष पाहू देखील शकेना.

रामाच्या अभिजात व्यक्तिमत्त्वाचा प्रभावच इतका जबरदस्त होता, की इच्छा असो वा नसो, मुकाट्याने त्याच्या म्हणण्याला व वागण्याला लोक अनुमोदन देत.

रामाचे मानवत्व – रामाच्या समग्र चरित्राचे अवलोकन केल्यास त्यात त्याच्या मानवत्वाचे मनोहर वर्णन आढळते. रामाच्या मानुषधर्मासंबंधी जी चित्रे वाल्मीकीने रंगवली आहेत, ती अत्यंत हृद्य आहेत. रामही हर्षामर्षशून्य नव्हता. मानवी स्वभावाप्रमाणे त्यालाही भावनेचे भरते येत होते, दुःख होत होते आणि विषादही होत होता. जेव्हा सुमंत दशरथाचा संदेश घेऊन रामाकडे आला, तेव्हा उद्या आपण निश्चितपणे युवराज होणार या कल्पनेने रामाला आनंद झाला आणि तो त्याने सीतेजवळ पुढीलप्रमाणे व्यक्त केला –

यादृशी परिषत्तत्र तादृशो दूत आगतः ।
ध्रुवमद्यैव मां राजा यौवराज्येऽभिषेक्ष्यति ॥
हन्त शीघ्रमितो गत्वा द्रक्ष्यामि च महीपतिम् ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सह त्वं परिवारेण सुखमास्व रमस्व च ॥

(वा. रा. अयोध्या. १६.१९–२०)

अर्थ – कैकेयीच्या महालात जी बैठक भरली आहे, तिच्या निर्णयाला अनुसरूनच दूत मला बोलवायला आला आहे. खात्रीने आज राजा मला यौवराज्याचा अभिषेक करणार आहे. मी आता तावडतोब जातो आणि राजाला भेटतो. तोवर तू इथे आपल्या परिवारासह सुखाने राहा आणि मन रमव.

पुढचा प्रसंग दुःखाचा आहे. रामाला दुःख आवरण्याची सवय होती; पण क्वचित प्रसंगी आपल्या प्रिय व्यक्तीपुढे त्याला दुःख आवरणे कठिण होई. ते दुःख त्याच्या हालचालीतून आणि मुख-मुद्रेवरूनही व्यक्त होत असे. वनवासाची बातमी सीतेला सांगताना रामाची जी शोकाकुल अवस्था झाली, तिचे वर्णन वाल्मीकीने केले आहे, ते असे –

प्रविवेशाथ रामस्तु स्ववेश्म सुविभूषितम् ।
प्रहृष्टजनसम्पूर्णं ह्रिया किञ्चिदवाङ्मुखः ॥
अथ सीता समुत्पत्य वेपमाना च तं पतिम् ।
अपश्यच्छोकसन्तप्तं चिन्ताव्याकुलितेन्द्रियम् ॥
तां दृष्ट्वा स हि धर्मात्मा न शशाक मनोगतम् ।
तं शोकं राघवः सोढुं ततो विवृततां गतः ॥

(वा. रा. अयोध्या. २६.५–७)

अर्थ – राम आपल्या सुशोभित महालात शिरला. महालातली सर्व माणसे हर्षाने उचंबळलेली होती; पण आत शिरताना रामाची मुद्रा मात्र म्लान व संकुचित झाली होती. सीतेने त्याची चिंताकुल अवस्था आणि हालचाल पाहिली. त्यामुळे तीही व्याकुळ झाली. सीतेला पाहताच रामही आपले दुःख आवरू शकला नाही आणि त्याचे मुख म्लान झाले.

कित्येकदा राम एखाद्या सामान्य माणसाप्रमाणे बोलताना दिसून येतो. वनवासाच्या पहिल्या रात्री तो लक्ष्मणाला म्हणतो –

'आज कैकेयी आपली इच्छा पूर्ण झाल्यामुळे आनंदित झाली असेल. आज खरोखरी जगात जर कोणी सुखी असेल, तर तो कैकेयीचा पुत्र भरत हाच होय. तो आता सपत्नीक मोठ्या आनंदाने कोसल देशाचे राज्य करील.'

रामाचे हे उद्‌गार ऐकल्यानंतर थोरातले पोरपण प्रत्ययाला आल्यावाचून राहत नाही.

राम हा मोहवश झाल्याचे उदाहरण म्हणजे मारीच राक्षसाचा प्रसंग. मायामृग होऊन पळून जाणाऱ्या मारीचाला मारण्यासाठी राम त्याचा पाठलाग करीत वनात गेला असता, पाठीमागे रावणाने सीतेचे अपहरण केले. आश्रमात परत आल्यावर सीता जेव्हा त्याला दिसली नाही, तेव्हा तिचा शोध करीत तो वणवण भटकू लागला. त्या वेळी विकारवश झाल्यामुळे त्याला क्रोधाचाही अनावर उमाळा आला. तो म्हणतो –

'जर माझ्या सीतेचा ठावठिकाणा मला कोणी सांगितला नाही, तर मी देव, गंधर्व, मनुष्य व सर्प यांच्यासह हे सर्व जग नष्ट करून टाकीन.'

सुग्रीवाच्या बाबतीतही रामाला असाच एकदा क्रोध आला होता. रामाने वालीला मारायचे आणि सुग्रीवाने सीतेचा शोध करायचा, असा त्यांचा परस्पर संकेत ठरला होता. रामाने वालिवधाचे काम पूर्ण केले; पण सुग्रीव मात्र आपल्या कामात चालढकल करतो आहे, असे रामाला वाटले. त्यामुळे राम त्याच्यावर खवळला. तो लक्ष्मणाला म्हणाला –

उच्यतां गच्छ सुग्रीवस्त्वया वीर महाबल ।
मम रोषस्य यद्‌रूपं ब्रूयाश्चैनमिदं वचः ॥
न स सङ्कुचितः पन्था येन वाली हतो गतः ।
समये तिष्ठ सुग्रीव मा वालिपथमन्वगाः ॥
एक एव रणे वाली शरेण निहतो मया ।
त्वां तु सत्यादतिक्रान्तं हनिष्यामि सबान्धवम् ॥

(वा. रा. किष्किंधा. ३०.८०–८२)

अर्थ – वीरा लक्ष्मणा, सुग्रीवाकडे जा आणि त्याला माझ्या क्रोधाची यथार्थ कल्पना दे. त्याला म्हणावे नीट मार्गावर राहा. ज्या रस्त्याने वाली गेला, तो रस्ता संकुचित नाही. त्या रस्त्याने तुलाही जायचे नसेल, तर संकेताचे पालन कर. मी वालीला एकट्यालाच ठार मारले; पण तुला मात्र सत्याची मर्यादा मोडल्यामुळे पुत्रपौत्र आणि बांधव यांच्यासह ठार मारीन.

रामाला उपजत विनोदबुद्धी होती, त्या गोष्टीचे एक उदाहरण असे –

वनवासाला जाण्यापूर्वी राम आपली संपत्ती ब्राह्मणांना दान देत होता. त्या वेळी गर्गकुलातला त्रिजट नावाचा एक ब्राह्मण त्याच्याकडे याचक म्हणून आला. त्याची ती दीन मुद्रा पाहून रामाला त्याची थट्टा करायची लहर आली. तो म्हणाला –

'हे ब्राह्मणा, तू तुझ्या हातातला हा दंड जितक्या लांब फेकशील तितक्या अंतरात वसणाऱ्या सर्व गायी मी तुला देईन.' तेव्हा ब्राह्मणाने आपले सर्व बळ एकत्र करून दंड फेकला; पण तरीही तो फारसा काही लांब गेला नाही. त्यामुळे ब्राह्मण निरुत्साही झाला. त्यावर रामचंद्राने त्याला आलिंगन दिले व पुष्कळ गोधनही दिले. ब्राह्मणाचे सांत्वन करीत तो म्हणाला –

'रागावू नकोस हं! मी तुझी सहज थट्टा केली.'

रामाने मर्यादापुरुषोत्तम ही आपली पदवीही कृतार्थ केली. माता, पिता, बंधू, सेवक, प्रजा या सर्वांच्याविषयी त्याने आपल्या मर्यादा पाळल्या आणि कर्तव्येही बजावली.

आदर्श पुत्र – पित्याने दिलेल्या वचनासाठी राज्यत्याग आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चौदा वर्षांचा खडतर वनवास यांना धीरोदात्तपणे तोंड देणे, या गोष्टी केल्यामुळेच राम आदर्श पुत्र झाला. कैकेयीने मागितलेले ते दोन वर रामाला सांगण्यासाठी दशरथाला शब्दच फुटेना. त्यावर रामाने, काय प्रकार आहे म्हणून कैकेयीला विचारले. तेव्हा कैकेयी म्हणाली. 'तू पित्राज्ञा पाळणार आहेस का, तर सांगते.' आपल्याविषयी कैकेयीने शंका घेतली, असे जाणून रामाला मरणप्राय दुःख झाले. तो म्हणाला –

नियुक्तो गुरुणा पित्रा नृपेण च हितेन च।
तद्ब्रूहि वचनं देवि राज्ञो यदभिकाङ्क्षितम् ।
करिष्ये प्रतिजाने च रामो द्विर्नाभिभाषते ॥

(वा. रा. अयोध्या. १८.२९–३०)

अर्थ – राजा, गुरु, पिता या सर्वच दृष्टींनी माझे वडील मला सर्वस्वी आदरणीय आहेत. तेव्हा जे राजाचे अभिलषित असेल, ते तू मला निःशंकपणे सांग. मी तुला प्रतिज्ञेवर सांगतो, की पित्याचे अभिलषित कितीही दुष्कर असले तरीही मी ते करीन. कारण राम दोनदा बोलत नसतो.

आदर्श बंधू – रामाचे बंधुप्रेम अमर्याद होते. बंधूंच्या सुखासाठी तो वाटेल तो त्याग करायला तयार असे. रामाला टाळून भरत राज्यावर बसणार, ही गोष्ट लक्ष्मणाला रुचली नाही. त्याने भरताचा वध करण्याची इच्छा रामापुढे बोलून दाखवली. तेव्हा राम त्याला निक्षून बोलला –

यद् द्रव्यं बान्धवानां वा मित्राणां वा क्षये भवेत् ।
नाहं तत्प्रतिगृह्णीयां भक्षान्विषकृतानिव ॥
धर्ममर्थं च कामं च पृथिवीं चापि लक्ष्मण ।
इच्छामि भवतामर्थे एतत्प्रतिशृणोमि ते ॥

(वा. रा. अयोध्या. ९७.४–५)

अर्थ – मित्र किंवा बांधव यांचा नाश करून जी संपत्ती मिळणार असेल, ती मी कधीच घेणार नाही. विषमिश्रित अन्नाप्रमाणे ती सर्वथा त्याज्य होय. लक्ष्मणा ! धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांची माझी साधना अथवा ही पृथ्वीदेखील मला केवळ तुम्हां भावांसाठी हवी आहे, हे मी प्रतिज्ञेवर सांगतो.

आदर्श पती – राम हा आदर्श पतीही होता. प्रेम आणि निष्ठा या गोष्टी जर आदर्श पतित्वाच्या निदर्शक असतील, तर राम त्या बाबतींत कुठेही कमी पडला नाही. सीतेवर त्याचे आत्यंतिक प्रेम होते. वनवासात तो तिची अनेक प्रकारे काळजी घेत असे आणि तिचे अनुरंजन करीत असे. वनात सीतेचा वियोग झाला, तेव्हा त्याने सामान्य माणसाप्रमाणे दुःखाचा पूर वाहवला. सीतेचा शोध घेण्यासाठी तो देहभान विसरून भटकला. हे प्रसंग त्याच्या उत्कट प्रेमाची साक्ष देतात. पुढे त्याने गर्भिणी सीतेचा, आपल्या धर्मपत्नीचा त्याग केला. कालिदासाने त्याविषयी एक मार्मिक श्लोकार्ध लिहिला आहे तो (रघु. १४.८४) असा –

कौलीनभीतेन गृहान्निरस्ता न तेन वैदेहसुता मनस्तः ।

अर्थ – लोकापवादाच्या भयाने रामाने सीतेला घरातून बाहेर घालवले, मनातून नाही.

सीतात्यागानंतर रामाने राज्यविषयक सर्व भोग भावांच्या वाट्याला दिले आणि स्वतः विरक्त जीवन स्वीकारले. पुढे त्याने यज्ञ केला. त्यात पत्नी म्हणून त्याने सीतेची प्रतिकृती आपल्या शेजारी बसवली, पण दुसरी भार्या केली नाही. आपल्या हृदयातले सीतेचे स्थान त्याने अढळ राखले. म्हणूनच राम हा एकपत्नीव्रताचा महान आदर्श ठरला.

आदर्श मित्र – रामायणात निषादाधिपती गुह आणि वानरराज सुग्रीव हे दोघे रामाचे मित्र या नात्याने दिसतात. 'या संपूर्ण विश्वात रामाइतका दुसरा कुणीही प्रिय नाही' असे गुह शपथेवर सांगतो. रामानेही त्याच्या बाबतीत म्हटले आहे, की 'मी माझ्या स्वतःवर जितके प्रेम करतो तितकेच गुहावर करतो. कारण तो माझा सखा आहे.' अग्निसाक्षीने सुग्रीवाशी मित्रत्व जोडले गेल्यावर राम त्याला म्हणतो, की 'आपणा दोघांचे सुख-दुःख आता अगदी एकरूप झाले आहे.' एकमेकांच्या उपयोगी पडणे, हे मैत्रीचे फळ रामाने मान्य केले आहे. म्हणूनच त्याने सुग्रीवाच्या स्त्रीचे अपहरण करणाऱ्या वालीचा वध केला. राम जेव्हा महाप्रस्थानाला निघाला, तेव्हा सुग्रीवही त्याच्या बरोबर महायात्रेसाठी सिद्ध झाला. त्या वेळी राम त्याला म्हणतो – 'मित्रा सुग्रीवा, आपला आजवर कधीच वियोग झाला नाही. मग देवलोकाला जातानाही आपण बरोबरच कसे निघणार नाही !'

प्रजावत्सल राम – रामाने प्रजेवर आणि प्रजेने रामावर केलेले प्रेम, पुराणे आणि इतिहास यांत अद्वितीय आणि अतुलनीय आहे. प्रजेसाठी राम कोणताही त्याग करायला कचरला नाही. 'प्रजेच्या कल्याणासाठी मी माझ्या बंधूंचा, पत्नीचा आणि स्वतःच्या प्राणांचाही त्याग करीन' असे तो बोलला आहे. प्रजेच्या मनात सीतेच्या चारित्र्याबद्दल किंतू उत्पन्न झालेला आहे, हे समजून येताच त्याने यत्किंचितही विलंब न लावता आपल्या प्राणप्रिय पत्नीचा त्याग केला.

धर्मविजयी राम – राम हा सामर्थ्याचा महानिधी होता. पण आपला पराक्रम त्याने धर्माच्या सिद्धीसाठी आणि प्रतिष्ठेसाठीच वापरला आहे. मारीच राक्षस हा रामाचा शत्रू होता; पण तोच जेव्हा रामाच्या पराक्रमाचे वर्णन करतो, तेव्हा त्या वर्णनाला विशेष गौरव प्राप्त होतो. मारीच म्हणतो –

रामो विग्रहवान् धर्मः साधुः सत्यपराक्रमः ।
राजा सर्वस्य लोकस्य देवानामिव वासवः ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – राम हा मूर्तिमंत धर्म आहे. तो सज्जन आहे आणि सत्यपराक्रमी आहे. देवांचा जसा इंद्र तसा तो सर्व लोकांचा राजा आहे.

(वा. रा. अरण्य. ३७.१३)

धर्म हीच रामाच्या अंतःकरणाची प्रेरक शक्ती होती. त्याने लक्ष्मणाला एकदा सांगितले, की मी जर संतापलो तर एकट्या अयोध्येचीच कथा काय; पण संपूर्ण पृथ्वी देखील पराजित करीन; पण मला तसे करता येत नाही. कारण तो अधर्म ठरेल. वनवासाची आपत्ती मी स्वीकारतो याचे कारण, माझा धर्म व सद्‌गती यांचे रक्षण व्हावे, हे आहे.

रामाचा आत्मप्रत्यय विलक्षण होता. युद्धप्रसंगी थकलेल्या आणि प्राणसंकटात सापडलेल्या रावणावर हत्यार न चालवता त्याने रावणाला सोडून दिले आणि 'उद्या पूर्ण तयारीनिशी लढायला ये' असे सांगितले.

रावणाबरोबर तो लढला आणि त्याने रावणाला मारलेही. पण त्याने त्याची अवहेलना कधीच केली नाही. रावण युद्धात पडल्यावर बिभीषण त्याची अन्त्यक्रिया करण्यास तयार नव्हता, तेव्हा रामाने त्याला बजावले –

'रावण कसाही असो; पण त्याने शूर म्हणून अनेकवार रणांगणात कीर्ती मिळविली आहे. जिवंतपणी त्याने साऱ्या विश्वाचा थरकाप उडविला होता. शत्रुत्व मरेपर्यंतच असते. रावण मेल्यावर त्याचे व माझे शत्रुत्वाचे प्रयोजन संपले आहे. बिभीषणा, तू त्याचा अन्त्यसंस्कार कर. आता तो माझा शत्रू नसून तुझ्याशी त्याचे जे नाते, तेच आता माझ्याशीही आहे.'

रामाचे कोणत्याही व्यक्तीशी वैर नव्हते; तर पाप, अधर्म व अत्याचार यांच्याशी त्याचे वैर होते. जगात आर्त हा शब्द राहू नये, एवढ्यासाठीच क्षत्रियांनी धनुष्य धारण करायचे असते, अशी त्याची धारणा होती. वालीला मारल्यावर किष्किंधेचे राज्य विजेता या नात्याने रामाचेच होते. पण त्याने ते सुग्रीवाला दिले आणि वालिपुत्र अंगदाला यौवराज्याचा अभिषेक करून राज्याची गादी वालीच्याच वंशात कायम ठेवली. लंकेचे राज्य तर निर्विवादपणे रामाचेच होते; पण लंकेत पायही न ठेवता त्याने ते बिभीषणाच्या स्वाधीन केले आणि त्याला बजावले –

लङ्कां प्रशाधि धर्मेण धर्मज्ञस्त्वं मतो मम ।

(वा. रा. उत्तर. ४०.१०)

अर्थ – हे बिभीषणा, तू धर्मज्ञ आहेस, असे मी मानतो. तेव्हा तू धर्ममर्यादा पाळूनच लंकेत राज्य कर.

रामाचे व्यक्तिमत्त्व – राम हा पुरुषपुंगव होता. शारीरिक दृष्टीने तो निरोगी, सुंदर आणि सुघटित होता. त्याचे खांदे पुष्ट होते. तो आजानुबाहू होता. त्याचा गळा शंखासारखा होता. छाती रुंद होती. मस्तक सुंदर होते. ललाट भव्य होते. त्याचा बांधा फार ठेंगू नव्हे आणि फार उंच नव्हे, असा मध्यम होता. त्याचे डोळे टपोरे होते आणि त्याच्या सर्व देहावर एक अवर्णनीय अशी कांती होती. वयात येईपर्यंत त्याचे व्यक्तिमत्त्व पूर्ण विकसित झाले होते. आपल्या शौर्य-वीर्यादी गुणांनी तो अयोध्येच्या प्रजाजनांना अत्यंत प्रिय ठरला होता. त्याने धनुर्वेद तर आत्मसात केला होताच; शिवाय देव आणि असुर यांच्या शस्त्रांचीही उत्तम माहिती करून घेतली होती. हत्ती व घोडे यांच्यावर आत्मविश्वासाने तो स्वार होत असे. तो सैन्यसंचालन उत्तम प्रकारे करी. संग्रामात तो अजिंक्यच होता. राजकुमार असल्याकारणाने तो राजनीतीच्या व्यवहारांत पारंगत होता. क्षात्रधर्मावर त्याची श्रद्धा होती. सज्जनांचा संग्रह आणि दुर्जनांचा निग्रह कसा करावा हे त्याला चांगले अवगत होते. त्याचे हर्षामर्ष कधीही वांझोटे नसत. धर्म, अर्थ व काम या तीन्ही पुरुषार्थांचे त्याच्या ठिकाणी संतुलन होते. कोणत्याही अशुभ कर्मात त्याला रुची नव्हती. त्याचे चित्त सदैव शांत, गंभीर असे. तो कृतज्ञ होता आणि कोणाचा अल्पसा उपकारही कधी विसरत नसे. भोग आणि त्याग यांचा योग्य समय त्याला माहीत असे. तो प्रज्ञा, प्रतिभा आणि धारणा यांचे आगर होता. एकदा अभ्यासलेले त्याच्या बुद्धीतून कधीही निसटत नसे. संस्कृत आणि प्राकृत या दोन्ही भाषा त्याला अवगत होत्या. संगीत, वाद्य आणि चित्रकला यांचेही त्याला ज्ञान होते. सामयिक आचार व लोकाचार तो चांगल्या प्रकारे जाणत होता. ब्रह्मचर्याचे नियम पाळून त्याने विद्या मिळवली होती. व्यवहारज्ञान आणि तत्त्वज्ञान त्याने ऋषिमुनींकडून मिळविले होते. वनवासकालात तो अनेक ऋषिमुनींच्या आश्रमांत गेला आणि त्यांच्याशी सहवास करून त्याने काही शस्त्रे संपादन केली आणि बहुश्रुतताही मिळविली. वसिष्ठाच्या सहवासात त्याला उत्तम तत्त्वज्ञानाचा लाभ झाला.

नाट्यगत राम – संस्कृत नाटककारांना रामायण हे सुरवातीपासून प्रेरणास्थान ठरले आहे. वैदिक आख्याने आणि उपनिषदांतल्या कथा यांच्यापेक्षा रामायणातील कथा मानवी सुखदुःखांशी अधिक जवळिकीची आहे. रामायणातल्या घटना आणि त्यामागचे मनोभाव हृदयस्पर्शी आणि सुखसंवेद्य आहेत. म्हणूनच संस्कृत नाटककारांना रामायण हा एक खजिनाच सापडला.

भासनाटकचक्रात बालचरित, अभिषेक व प्रतिमा ही तीन नाटके रामायणावर आधारलेली आहेत. त्या तिघांत मिळून प्रायः समग्र रामकथा नाट्यबद्ध झाली आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भासाच्या नंतर बरीच शतके रामकथेवर नाटक लिहिले गेले नाही. इ. स. च्या सातव्या शतकाच्या उत्तरार्धात भवभूतीने रामकथेवर महावीरचरित व उत्तररामचरित ही दोन नाटके लिहिली. संस्कृत नाटकांच्या निर्मितीच्या शेवटच्या काळात रामायणाचा कविमनावर पुनश्च प्रभाव पडलेला दिसून येतो. दिङ्नागाची कुंदमाला, राजशेखराचे बालरामायण, मुरारीचे अनर्घराघव, जयदेवाचे प्रसन्नराघव आणि रामभद्र दीक्षिताचे जानकीपरिणय ही रामकथेवरील नाटके आहेत.

बहुतेक सर्व देशी भाषांमध्ये रामकथेचे एखादे तरी नाटक आढळतेच. अण्णासाहेब किर्लोस्करांचे रामराज्यवियोग, मामा वरेरकरांचे भूमिकन्या सीता, ही रामकथेवरील मराठीतली नाटके होत. रामकथेवरचे चित्रपट तर अखिल भारतात विपुल संख्येने निर्माण झाले आहेत आणि अजूनही होत आहेत. रामलीला नावाचे एक लोकनाट्य उत्तर भारतात आजही प्रचलित व लोकप्रिय आहे.

नृत्यगत राम — रामकथेवरची विदग्ध नृत्ये आणि लोकनृत्ये भारतात प्रचलित आहेत. केरळात कृष्णनाट्टम या कृष्णविषयक नृत्यपद्धतीप्रमाणेच रामनाट्टम, नावाची नृत्यलीला प्रचारात आली. कथक, कथकली, भरतनाट्यम, इ. विदग्ध परंपरेतही राम-लक्ष्मण, सीता, इ. रामायणातील व्यक्तींचे नृत्यप्रसंग बसविलेले आढळतात. अलिकडेच श्री. सचिन शंकर यांनी रामायणावर एक लोकनृत्य बसविले असून, त्याचे महाराष्ट्रात प्रयोग सुरू आहेत. त्या नृत्याची पदे श्री. ग. दि. माडगूळकर यांनी लिहिली आहेत.

काव्यगत राम — भारतातल्या अगणित कवींना रामकथेने प्रेरणा दिली आहे. राम हा कवींचा चिरंतन आदर्श बनून राहिला आहे. वाल्मीकीचे प्रासादिक वर्णन, सरळ छंद आणि संगीतमय विविधता या गुणांनी न्हाऊन निघालेल्या या आदिकाव्याचा भारतीय कविमनावर विलक्षण प्रभाव पडला, ही काही आश्चर्याची गोष्ट नव्हे. प्राचीन आणि मध्यकालीन कवींमध्ये ज्याने वाल्मीकीकडून काही घेतले नाही, असा कवी आढळायचा नाही. संस्कृत साहित्यात महाकाव्याचा भव्य आदर्श वाल्मीकि-रामायण हाच ठरला आहे. त्याचे विश्लेषण करूनच साहित्यशास्त्रज्ञांनी महाकाव्याची लक्षणे ठरविली. 'सर्गबन्धो महाकाव्यम्' = महाकाव्याची रचना सर्गबद्ध असली पाहिजे, हे लक्षण रामायणातल्या अध्यायांना सर्ग म्हटले आहे, त्यावरूनच आले आहे. दंडीने आपली महाकाव्य-लक्षणे रामायण पुढे ठेवूनच सांगितली आहेत.

रामायणाचा नायक एकच आणि तो म्हणजे राम. तोच सर्व ग्रंथाचा केंद्रबिंदू. रामायणरचनेत जटिलता नाही आणि विषयान्तरही फार कमी आहे. ते एक सुसंघटित काव्य आहे. त्यामुळे नंतरच्या कवींना त्याचा आदर्श पुढे ठेवणे सोपे झाले. अनुष्टुप छंद हा रामायणातच अवतीर्ण झाला आणि नंतरच्या संस्कृत कवींनी त्याचा मुक्तपणे स्वीकार केला.

रामाचे संक्षिप्त चरित्र महाभारतात आणि बहुतेक पुराणांत आले आहे. पुराणकारांना रामकथेची मोहिनी किती जबरदस्त होती, त्याचे हे उदाहरण आहे. वाल्मीकीच्या ठिकाणी सर्व कवींची अपार श्रद्धा आहे. कविकुलगुरु कालिदास त्याला आदिकवी म्हणून गौरवतो. पूर्वसूरींनी आपला मार्ग प्रशस्त केला आहे, असे रघुवंशात तो म्हणतो, त्या वेळी त्याच्या दृष्टीपुढे वाल्मिकीच उभा आहे, यात संदेह नाही. कालिदासाने शब्द, भाव आणि कल्पनाबंध वाल्मीकीच्या अध्ययनानेच समृद्ध केले आहेत. अश्वघोष हा बौद्ध कवी होता; पण त्यानेही आपल्या बुद्धचरितातला सिद्धार्थ गौतम रामचरितावरूनच साकार केला आहे. भट्टी, भारवी, प्राकृत कवी आढ्यराज आणि बाणभट्ट यांच्यावरही वाल्मीकीची छाप स्पष्ट दिसते.

मध्यकालीन कवींवर रामायणाप्रमाणेच तत्कालीन परिस्थितीचाही प्रभाव होता. त्यामुळे त्यांची मन:स्थिती द्विधा झालेली दिसते. शिवाय मध्ययुगीन कवींना लोकांचे रंजन किंवा प्रबोधन करायचे नव्हते. त्यांना पंडितांकडून प्रशंसा मिळवायची होती. म्हणून त्यांनी वाल्मीकीच्या सहजसुंदर आणि सुबोध अशा भाषेचा त्याग करून अलंकारांचा आणि क्लिष्ट कल्पनांचा आश्रय केला आणि आपली काव्ये सजवली. त्यामुळ त्यांना रामायणाची लोकप्रियता कधीही लाभली नाही. इ. स. च्या ९ व्या व १० व्या शतकांत प्राकृत भाषांमधून वेगवेगळया आधुनिक देशी भाषांचा उद्गम झाला. त्यांच्या प्रगतीचा मार्गही रामायणानेच निश्चित केला. संस्कृत भाषेत ज्याप्रमाणे वाल्मीकीच्या आधारावर अनेक रामायणे निर्माण झाली, त्याचप्रमाणे देशी भाषांतल्या साहित्यातही रामकथेने प्रमुख स्थान मिळविले. तमिळमधले कंबन रामायण, तेलुगूमधले द्विपद-रामायण, मलयाळममधले अध्यात्मरामायणम्, कन्नडमधले तोरवे रामायण, बंगालीतले कृत्तिवास रामायण, हिंदीतले रामचरितमानस, ओडियामधले बलरामदास रामायण, आसाममधले असमिया रामायण, मराठीतले भावार्थ रामायण व मोरोपंती रामायणे, गुजरातीतले रामबालचरित, राजस्थानीमधले रघुनाथ रूपक गीतां रो, ही सर्व देशी भाषांतील प्रमुख रामायणे होत. याशिवाय रामकथेवर स्फुट काव्ये निर्माण झाली आहेत, ती वेगळीच. प्रत्येक भाषेच्या लोकगीतांमधूनही राम-सीतेची गीते विपुल प्रमाणात आढळतात. या सर्व संस्कृत, प्राकृत व देशी भाषांतील आणि लोकसाहित्यातील रामकथेने रामाला आसेतु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिमाचल लोकजीवनात अढळपद मिळवून दिले. गेली कित्येक शतके रामकथेचे पठण आणि श्रवण भारतात सर्वत्र चालू आहे. बौद्ध व जैन हेही रामकथेच्या व्यापक प्रभावातून सुटले नाहीत. बौद्धांच्या दशरथ जातक व अनामक जातक यांमध्ये रामकथेचे बौद्ध रूप पाहायला मिळते. जैनांचे पउमचरिय व हेमचंद्राचार्यांचे रामायण प्रसिद्ध आहे. यात जैन परंपरेला धरून रामकथा वर्णिलेली आहे. परधर्मी अकबर बादशाहालाही रामकथा इतकी आवडली, की त्याने रामायण फारशीमध्ये अनुवादित करण्याचा आदेश दिला. हिंदीमध्ये रामायणाचे अनेक अनुवाद व भावार्थ निर्माण झाले आहेत. त्यांतला एक अनुवाद भारतेंदू हरिश्चंद्र यांचे वडील गिरिधरदास यांनी केला आहे. बृहत्तर भारतात कंबोडिया, लाओस, थायलंड, हिंदचीन, इ. देशांत त्यांची स्वतःची अशी रामाख्याने असून, ती लोकप्रिय आहेत. अगदी अलिकडच्या काळात श्री. ग. दि. माडगूळकर यांनी मराठीत गीतरामायण लिहिले आणि महाराष्ट्रात ते लोकप्रिय ठरले.

चित्रगत राम – रामकथेवरची प्राचीन चित्रे सांप्रत उपलब्ध होत नाहीत. पण रामविषयक चित्रांची परंपरा भारतात असली पाहिजे असे वाटते. भवभूतीने आपल्या उत्तररामचरिताच्या पहिल्या अंकात राम आणि सीता आपला चित्रांकित केलेला जीवनपट पाहत आहेत, असा एक प्रसंग घातला आहे. त्यावरून रामकथेच्या चित्रांची परंपरा असायला हवी. भारतातल्या वेगवेगळ्या संग्रहालयांमध्ये मध्ययुगीन चित्रकृतींचे जे नमुने सुरक्षित आहेत, त्यांत मात्र रामायणावरची चित्रे आहेत. भारतीय चित्रकलेचा विकास पाहिल्याअंती असे दिसते, की त्यात रामायण आणि महाभारत यांमधील दृश्ये अनेक ठिकाणी पुनरावृत्त झाली आहेत. लंडनमधील इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयामध्ये एका सचित्र रामायणाचे काही अंश संग्रहीत केलेले आहेत. राजपूत आणि कांगडा या चित्रशैलींमध्ये रामायणातली अनेक दृश्ये अंकित झाली आहेत. जोधपूरच्या संग्रहालयात सुमारे शंभर वर्षांपूर्वीच्या रामायणविषयक ९१ चित्रांचा संग्रह सुरक्षित आहे. जयपूरच्या पोथीखान्यामध्ये एक फारशी रामायणाची हस्तलिखित प्रत असून, तिच्यात रामकथेची ७६ सुंदर चित्रे आहेत. श्री. कनिंगहॅम यांच्या चित्रसंग्रहातही रामायणविषयक अनेक चित्रे आहेत. अलिकडच्या काळात राजा रविवर्मा यांनीही रामायणातल्या काही प्रसंगांवर चित्रे काढली असून, त्यांचे रामपंचायतन नावाचे चित्र अनेक घरांतून पूजास्थानी लावलेले आढळते. कंबोजरामायणामधल्या कित्येक प्रसंगांची चित्रे कंबोडियामध्ये व हिंदचीनमध्ये आढळतात. त्यात जनकाला सीतेची प्राप्ती, रामकृत शिवधनुर्भंग, राम-परशुरामभेट, इ. प्रसंगांची चित्रे उल्लेखनीय आहेत. मराठीत अलिकडेच श्री. भय्यासाहेब ओंकार यांनी एक चित्र रूप रामायण प्रसिद्ध केले आहे.

शिल्पगत राम – प्राचीन भारतीय स्थापत्याचे जे नमुने उपलब्ध झाले आहेत, त्यांवर रामायणात वर्णिलेल्या नगरांची



रामलक्ष्मणांचे धनुर्विद्येचे शिक्षण – रविवर्म्याचे चित्र

आणि प्रासादांची छाप दिसून येते, असे श्री. सी. शिवराममूर्ती यांनी दाखवून दिले आहे. लंकानगरी दुर्भेद्य कोट आणि कमा[illegible] युक्त खंदक यांनी युक्त होती, असे वाल्मीकीने सांगितले आहे (वा. रा. सुंदर. २.१४). या वर्णनाची हुबेहूब प्रतिकृती सांची मध्ये आणि अन्यत्र उत्खननातही मिळाली आहे. लंकेतले [illegible] प्राकार, तोरण, इ. स्थापत्यप्रकार सांची, अमरावती व अ[illegible] त्रही पाहायला मिळतात. अयोध्येतला रामाचा राजवाडा [illegible] चौकांचा होता. त्याचे तपशीलवार वर्णन वाल्मीकीने केले [illegible] (अयोध्या. १५.३०–३९). त्याची अनुकृती अमरावती, सां[illegible] व भरहूत येथील प्रासादस्थापत्यामध्ये झालेली दिसते. मंदि[illegible] निर्मितीत आणि पाषाणशिल्पांत रामकथा विपुल प्रमाणा[illegible] अंकित झाली आहे. देवगढ येथील दशावतारमंदिर, हळेबि[illegible] येथील राममंदिर, वेरूळची कैलासगुंफा, ऐहोळे येथील दु[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिर, नागार्जुनकोंडा व पहाडपूर (बंगाल) येथील एक मंदिर, इ. ठिकाणी रामकथा विपुल प्रमाणात कोरली गेली आहे. राजस्थानात केकींदा येथील नीलकंठ महादेवाच्या सभामंडपात, किराडू येथील सोमेश्वर मंदिरात, खेडच्या रणछोडरायाच्या मंदिरात रामायणातले कित्येक प्रसंग खोदलेले आहेत. बृहत्तर भारतातही रामकथा पाषाणात कोरली गेली आहे. कंबोडियाच्या 'टॉवर ऑफ दि गोल्डन हॉर्न' नावाच्या इमारतीच्या भिंतीवर रामायणातल्या प्रसंगांच्या सुंदर उत्कीर्ण पट्टिका आढळतात. कंबोडियाच्या अंकोरवट या मंदिरातही कित्येक रामायणदृश्ये खोदलेली आहेत.

भारतातल्या कित्येक राजांच्या नाण्यांवरही रामकथेतली काही दृश्ये उठवलेली आढळतात. उदाहरणार्थ – अयोध्या कांडात एक श्लोक आहे की–

इच्छामो हि महाबाहुं रघुवीरं महाबलम्।
गजेन महता यान्तं रामं छत्रावृताननम्॥

(वा. रा. अयोध्या. २.२२)

अर्थ–(हे दशरथराजा) युवराजपदावर अभिषिक्त होणारा महाबाहु आणि महाबल असा रघुवीर राम हत्तीवरून मिरवत निघाला आहे आणि त्याच्या मागे सेवकाने त्याच्या मस्तकावर छत्र धरले आहे, असे दृश्य पाहण्याची आम्हांला इच्छा आहे.

इ. स. च्या ५व्या शतकातील कुमारगुप्त (पहिला) याच्या सुवर्णमुद्रेवर अशा प्रकारचे दृश्य उठावाने निर्माण केलेले आहे.

अवतार राम –छांदोग्य उपनिषदात वासुदेव कृष्णाचा उल्लेख मिळतो. हे उपनिषद सन पूर्व ६०० वर्षांचे मानले गेले आहे. वासुदेवकृष्णाचा सांप्रदायिक विकास कसा झाला, ते पाणिनीची अष्टाध्यायी आणि कित्येक शिलालेख यांवरून कळते. प्रामाणिक सूत्रांचा अभाव असल्यामुळे रामाचा ऐतिहासिक विकास मात्र कसा झाला, ते कळत नाही. वैदिक साहित्यात ज्या रामाचा उल्लेख आहे, त्या रामाचा दाशरथी रामाशी काहीही संबंध नाही. मात्र श्री. याकोबी आणि अन्य काही विद्वानांनी वाल्मीकि-रामायणाची समीक्षा करून रामाचा संबंध इंद्राशी दाखविला आहे. याकोबींचे, असे अनुमान आहे, की दाशरथी राम हा वैदिक इंद्राचेच एक वेगळे रूप असून, पश्चिम भारतामध्ये तो बलराम या स्वरूपात व पूर्व भारतात तो दाशरथी राम या स्वरूपात विकसित झाला. त्याचप्रमाणे गृह्यसूत्रांमध्ये इंद्रपत्नी समजली जाणारी सीता पुढच्या काळात रामाची भार्या बनली. बौद्ध जातके ही कुठल्यातरी प्राचीन परंपरेला अनुसरून लिहिली गेली आहेत. त्यांमध्ये बुद्ध हा रामाचा पुनरवतार मानला गेला आहे. वाल्मीकि-रामायणाच्या बाल व उत्तर कांडांत राम हा अवतार असल्याचा उल्लेख आहे; पण ती दोन कांडे रामायणाला मागाहून जोडलेली आहेत, अशी काही विद्वानांची धारणा आहे. महाभारताच्या नारायणी उपाख्यानात अवतारांच्या दोन नामावली आहेत आणि त्यांत रामाचे नाव आले आहे. रामायण व महाभारत यांच्यावर वैष्णव मताची छाप पडल्यानंतर रामाला अवतार हे स्वरूप प्राप्त झाले, असे संशोधक समजतात. वरील दोन्ही ग्रंथांचे दुसरे संस्करण ज्या काळात घडले, त्या काळातील ही घटना आहे. हा काळ इ. स. २०० च्या सुमाराचा असावा, असे श्री. फर्कुहर मानतात.

वासुदेव कृष्णाची विष्णूशी अभिन्नता तैत्तिरीय आरण्यकाच्या काळात पूर्ण झाली होती. नारायणीय उपाख्यानावरून कळते, की ते आख्यान निर्माण झाल्याच्या काळी वासुदेवकृष्ण विष्णूच्या दशावतारात गणला जाऊ लागला होता. त्याबरोबरच तो उपास्यही बनला होता. अवतारकल्पना पहिल्याप्रथम कृष्णाच्या बाबतीतच लागू झाली. कृष्ण अवतार आणि उपास्य बनण्यापूर्वी राम हा केवळ एक प्रतापशाली आणि मर्यादारक्षक पुरुषोत्तम एवढ्याच स्वरूपात लोकांना माहीत होता.

वैष्णव धर्म पहिल्याप्रथम वासुदेवकृष्णाला उपास्य बनवूनच प्रचारात आला. त्यानंतर भारतीय संस्कृतीत एक महान परिवर्तन झाले. अवतारकल्पना व्यापक झाली. अवतार अनेक ठरले. सहा, दहा, चोवीस अशी त्यांची भिन्न भिन्न संख्या पुढे आली. रामाचे अवतारपणही त्याच काळात रूढ झाले. राम हा अवतार असून तो पूजनीय आहे, ही भावना इ. स. च्या पहिल्या शतकापर्यंत लोकमानसात दृढ झाली असावी, असे श्री. परशुराम चर्वेतुदी म्हणतात. पुढे पुराणकारांनी रामाच्या उपास्य रूपावर विशेष भर दिला. बौद्ध साहित्यात बुद्धाला रामाचा अवतार आणि बोधिसत्व मानले असून, जैनांनी त्याला आठवा बलदेव म्हटले आहे. या वाङ्मयीन पुराव्यांवरून राम हा इ. स. च्या पूर्वीच अवतार म्हणून प्रसिद्ध झाला असावा, असे डॉ. कपिलदेव पांडेय यांचे मत आहे.

मध्यकालात रामभक्ती ही कृष्णभक्तीप्रमाणेच व्यापक बनली. पण कृष्णभक्तीची जितकी प्राचीन चिन्हे किंवा प्रमाणे मिळतात तितकी ती रामभक्तीची मिळत नाहीत. त्यावरून डॉ. रा. गो. भांडारकर यांनी अनुमान केले आहे, की रामोपासनेचा प्रचार इ. स. च्या ११व्या शतकापासून सुरू झाला. पण हे मत अनेकांना मान्य नाही. कारण दक्षिणेत त्या कालाच्या पूर्वीही रामोपासना प्रचलित असल्याची अनेक प्रमाणे मिळतात. श्री. कृष्णस्वामी अय्यंगार यांनी आपल्या 'हिस्टरी ऑफ तिरुपती' या ग्रंथात अशी अनेक प्रमाणे दिली आहेत. तमिळ प्रदेशात बारा आळवार होऊन गेले. इ. स. चे ५ वे ते ९ वे शतक हा आळवारांचा काल आहे. ते विष्णूचे आणि त्याच्या अवतारांचे उपासक होते. या आळ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वारांपैकी कुलशेखर आळवार हा तिरुवितांकुर प्रदेशाचा राजा होता. त्याची रामावर विशेष भक्ती होती. त्याने रचलेल्या पद्यांत रामचरितातील अनेक प्रसंग वर्णिलेले आहेत. तिरुमंगई आळवारही रामाचा विशेष भक्त होता. आळवारांच्या साहित्यात रामाचा पूर्ण उत्कर्ष दिसून येतो. त्यांच्या एका पद्यात म्हटले आहे, की राम हा पूर्णावतार असून अन्य अवतार हे गौण आहेत.

याच्याही मागे म्हणजे इ. स. च्या तिसऱ्या शतकात भासाने आपली नाटके लिहिली. त्यांत राम आणि सीता केवळ अवतारच नाहीत, तर ती उपास्यही आहेत, असा संकेत मिळतो. इ. स. च्या चौथ्या शतकामध्ये, म्हणजे गुप्तकालात रामोपासनेचे अस्तित्व स्पष्टपणे दिसते. सम्राट चंद्रगुप्ताची कन्या रामोपासक होती, असा इतिहासात उल्लेख आहे. गुप्तकालात वैष्णव धर्माला खूप बल मिळाले. अर्थात वैष्णव धर्माची रामभक्तिशाखाही त्याच कालात वाढीला लागली, असे म्हणता येते. रामाच्या सांप्रदायिक रूपांचा विकास गुप्तकालातच झाला असे म्हणतात.

इ. स. च्या ११व्या शतकानंतर रामभक्तीचा प्रसार पुष्कळच वाढला. रामभक्तिपर परमेश्वरसंहिता याच काळातील आहे. रामपूर्वतापनीय व रामउत्तरतापनीय ही उपनिषदेही याच कालातली आहेत. या उपनिषदांत रामाला परब्रह्मस्वरूप मानले आहे.

इ. स. च्या १५व्या शतकात अध्यात्म-रामायणाची निर्मिती झाली. रामावत संप्रदायात ते निर्माण झाले, असे काही लोक समजतात; तर त्याआधी, म्हणजे १४व्या शतकात ते रामानंद-स्वामीनेच निर्माण केले, असे काही विद्वान समजतात. या ग्रंथाला रामभक्तिसाहित्यात फार वरचे स्थान आहे. त्याने रामाला विष्णूचा पूर्णावतार किंवा पूर्ण परब्रह्मच ठरविले आहे. अशा प्रकारे रामाला पूर्णब्रह्माची पदवी दिल्यानंतर अध्यात्म-रामायणाच्या कर्त्याला काही प्रसंग बदलावे लागले आहेत. वाल्मीकीचा राम अगस्त्याच्या आश्रमात गेल्यावर अगस्त्याचे पाय धरतो; तर अध्यात्मरामायणातला राम अगस्त्याश्रमात गेल्यावर स्वतः अगस्ती रामाची पूजा करतो व 'माझ्या हृदयात तुझी भक्ती अखंड राहो अशी प्रार्थना करतो. वाल्मीकि-रामायणातला रावण हा रामाचा अंतर्बाह्य शत्रू आहे; पण नंतरच्या काही रामायणांतून रावणही अंतरात रामभक्त होता आणि त्याची भक्ती ही विरोधी भक्ती होती, असे वर्णिलेले आहे. या सगळ्याचा अर्थ असा, की राम हा अवतार बनल्यावर त्याचे वाल्मीकीवर्णित स्वरूप पार बदलून गेले. वैष्णव सांप्रदायिकांनी त्याचा पूर्ण कायापालट केला.

भूभारहरण व देवशत्रूंचा नाश हा रामावताराचा द्विविध उद्देश अध्यात्मरामायणाने प्रतिष्ठित केला. गोस्वामी तुलसीदासाने तो याहून व्यापक केला आहे. तो म्हणतो की, 'भक्त, भूदेव, सुरभी (गाय) व मनुष्य यांच्यावर कृपा करण्यासाठी रामाने अवतार धारण केला.' रामचरितमानसात राम हा क्षीरशायी विष्णूचा अवतार असल्याचे म्हटले आहे. हा क्षीरशायी वाल्मीकि-रामायणातला विष्णू नसून, ते त्याचे पुराणांत वर्णिलेले परवर्ती नारायणरूप आहे. नारदाच्या शापाने क्षीरशायी विष्णूने रामरूपाने अवतार घेतला, असे तुलसीदासाने म्हटले आहे. त्याचप्रमाणे तो निर्गुण परब्रह्माचा अवतार आहे, असेही त्याने लिहिले आहे. तो म्हणतो –

अगुन अरूप अलख अज जोई। भगत प्रेमवस सगुन सो होई॥

अर्थ – जे अगुण, अरूप, अलक्ष्य आणि अज असे ब्रह्म, ते भक्तांच्या प्रेमासाठी रामरूपाने सगुण बनले.

तुलसीदासानंतरच्या रामसाहित्यात रामाची दोन स्वरूपे आढळतात. पहिले स्वरूप सांप्रदायिक असून, कील्लदास, द्वारकादास, इ. रामानंद परंपरेतील कवींनी त्याचा विकास केला. दुसरे रूप हे राधा-कृष्णाप्रमाणे सीता-राम असे युगलरूप असून, त्याचा विकास अग्रदास, नाभादास, इ. कवींनी केला. अग्रदास एका पद्यात म्हणतो. 'राम हा भक्तवत्सल, जानकीरमण व अयोध्येचा नायक आहे. तो करुणासिंधु असून भक्ताची अल्पस्वल्प सेवाही मेरूसारखी मानणारा आहे. संतांचे रक्षण करण्यासाठी रात्रंदिवस तो धनुष्यबाण घेऊन सज्ज आहे' (रामकल्पद्रुम १.६). नाभादासाने रामाच्या नित्य युगल रूपाचे माहात्म्य विशद करताना म्हटले आहे, ते असे–

अयोध्याही रामाची अखंड विहारभूमी आहे. प्रभूचे सर्व अवतार रामाची नित्य सेवा करीत आहेत. राम हा सर्व गुणांचे विश्रांतिस्थान असून, तो द्वादश रस व विविध लीला यांनी युक्त आहे. हे रामाचे माधुर्यरूप आहे. वृंदावन हे जसे श्रीकृष्णाचे नित्य लीलाधाम, तसेच अयोध्या हे रामाचे लीलाधाम आहे.

रामाच्या युगलरूपाला अनुसरून रामभक्ति-संप्रदायात सखीभावाचा उदय झाला. अग्रदासादी भक्त कवी हे सखीभावाने युगलरसात लीन असल्याचे मानले गेले आहे. श्रीप्रसाद, चंद्रकला, मदनकला, चारुशीला, हेमा, क्षेमा, इ. राम व सीता यांच्या अष्टसख्या मानल्या गेल्या. या सर्व सखी-सहचरींसह राम-सीतेचे युगलरूप अयोध्येत नित्य लीलाविहार करीत असते असे रामभक्ति-संप्रदायातल्या मधुर शाखेने मानले आहे.

रामाचा जीवनपट – पुराणांत रामकथेचा तिथिवार उल्लेख आढळतो, तो असा–

वैशाख शु. १ वनवास प्रथम दिवस
" " २ चित्रकूटावर गमन
" " ६ भरतभेट (१२ वर्षे, ६ महिने पंचवटीत निवास)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्तिक शु. १० शूर्पणखेचे नाक-कान कापणे
माघ शु. ८ रावणकृत सीताहरण (दहा महिन्यांनंतर)
मार्ग. शु. ९ संपाती व वानर यांची भेट
" " ११ महेंद्रावरून मारुतीचे उड्डाण
" " १२ सीता व मारुती यांची भेट
" " १३ अक्षादिकांचा वध व अशोकवनध्वंस
" " १४ मारुतिबंधन व लंकादहन
" " १५ मारुतिप्रत्यागमन
मार्ग. व. १ ते ५ प्रवास
" " ६ वानरभेट व मधुवनध्वंस
" " ७ राम-मारुती भेट
" " ८ रावण-वध प्रतिज्ञा. उत्तरा फाल्गुनी नक्षत्र व विजययोग यांवर दक्षिणेकडे प्रयाण.
" " ९ ते ३० समुद्रतीरापर्यंत सैन्यासह प्रवास
पौष शु. ४ बिभीषण रामाकडे आला
" " ५ समुद्रतरणविचार
" " ६ ते ९ प्रायोपवेशन
" " १० ते १३ सेतुबंधन
" " १४ रामाचे सुवेलाचलावर आगमन
" " १५ ते व. २ सैन्य पलिकडे गेले
" व. ३ ते १० लंकेस वेढा
" " ११ शुक व सारण हे रावणाचे वकील रामाकडे आले
" " १२ रामसैन्यगणना
" " १३ ते ३० रावणसैन्यगणना
माघ शु. १ अंगदशिष्टाई
" " २ ते ८ युद्ध
" " ९ रामलक्ष्मणांना इंद्रजिताने नागपाशांनी बांधले
" " १० त्यांना गरुडमंत्राने मारुतीने सोडविले
" " ११ ते १२ धूम्राक्षवध
" " १३ अकंपनवध
" " १४ ते व. १ नीलकृत प्रहस्तवध
" व. २ ते ४ राम-रावण युद्ध, रावणपलायन
" " ५ ते ८ कुंभकर्णाला जागे करणे.
" " ९ ते १४ कुंभकर्णाशी युद्ध व त्याचा वध
" " ३० युद्धविराम
फाल्गुन शु. १ ते ४ इंद्रजितादिकांशी युद्ध
" " ५ ते ७ अतिकाय युद्ध
फाल्गुन शु. ८ ते १२ कुंभ व निकुंभ यांच्याशी युद्ध
" " १३ ते व. २ मकरादिकांशी युद्ध. लक्ष्मणमूर्च्छा
" व. ३ ते ७ युद्धविराम. औषधी आणणे
" " ८ ते १३ लक्ष्मणाचे इंद्रजिताबरोबर युद्ध व इंद्रजिताचा वध
" " १४ रावणयज्ञ
" " ३० रावण युद्धास येतो
चैत्र शु. १ ते ५ राक्षसवध
" " ६ ते ८ महापार्श्वादिकांचा वध
" " ९ लक्ष्मणास शक्ती लागली, द्रोणाचल आणला
" " १० युद्ध बंद
" " ११ इंद्राकडून मातली रथासह येतो
" " १२ ते व. १४ रामरावण युद्ध व रावणवध
" " ३० रावणप्रेतसंस्कार
वैशाख शु. २ बिभीषणराज्याभिषेक
" " ३ राम-सीता भेट
" " ४ राम विमानात बसतो
" " ५ वनवासाची चौदा वर्षे संपतात भरद्वाजाश्रमी गमन
" " ६ राम-भरत भेट

सीता रावणाच्या बंदीत अकरा महिने चौदा दिवस होती. राज्याभिषेकाच्या वेळी राम व सीता यांची वये अनुक्रमे बेचाळीस व तेहतीस वर्षांची होती. स्कंद पुराणातही प्रायः अशीच मितिवार माहिती मिळते (स्कंद पु. ३.२.३०; पद्म. पु. पाताल.३६). लग्नाच्या वेळी राम पंधरा वर्षांचा व सीता सहा वर्षांची होती; राम सत्ताविसाव्या वर्षी वनाला गेला (पद्म. पु. पाताल. ३६); या माहितीचा वाल्मीकि-रामायणाशी मेळ बसत नाही.

ही पद्म पुराणातली माहिती उपेक्षणीय ठरवून रामायणाच्या तिलकटीकेत कतक व तीर्थ यांच्या मताप्रमाणे चैत्र शु. दशमीस वनवास प्रथमदिन, माघ शु. प्रतिपदेस युद्धारंभ, आश्विन शु. प्रतिपदेस रावणयुद्धाचा प्रारंभ व नवमीस रावणवध, असा निश्चय केलेला आढळतो. कालिका पुराणात याप्रमाणेच माहिती असून, उत्तर हिंदुस्थानातील रामलीला वगैरे उत्सव या धोरणानेच चालू आहेत. याप्रमाणे राम अयोध्येस आश्विन वद्य षष्ठीस आला असावा. चांद्रमासाप्रमाणे अधिकमासविरहित गणना केल्यास ही गणना जुळवता येते. ती वाल्मीकि-रामायणाशी जुळती आहे.

राममूर्ती – रामाच्या मूर्ती भारतात अनेक ठिकाणी आढळतात. आकार मानवाचा पण तेज दैवी, असे त्यांचे स्वरूप असते. दक्षिण भारतात रामाच्या मूर्तींचे प्रमाण विशेष आहे. राजलक्षणयुक्त शरीर, मनमोहक सौंदर्य, विशाल नेत्र आणि अलंकारमंडित

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा तिथल्या मूर्ती दिसतात. हंपीच्या रामस्वामीमंदिरात, तसेच कुंभकोणम व चंद्रगिरी येथील मंदिरांत रामायणातले काही कथाप्रसंग चित्रित केलेले आहेत व काही प्रसंग प्राकाराच्या भिंतींवर कोरलेले आहेत.

शिल्पसंग्रह या ग्रंथात राममूर्ती कशी असावी, त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे दिले आहे – राम एकटा असेल, तेव्हा तो चतुर्भुज, धनुष्य, बाण, शंख व चक्र धारण करणारा आणि उभा असावा. जेव्हा तो परिवार-सहित असेल, तेव्हा द्विभुज व पुष्पक विमानात वीरासन घालून बसलेला असावा. त्याच्या वामांगी सीता व मागे कल्पवृक्ष असावा. शेजारी सुग्रीव, बिभीषण व लक्ष्मण असावेत. समोर हनुमान पोथी वाचीत उभा आहे आणि राम त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश करीत आहे, असे दाखवावे. बाकीचे बंधू, ऋषिगण, इ. विस्तार सभोवती दाखवला तरी चालेल.

कोदंडराम

राम उभा असतो, तेव्हा तो धनुष्यबाण धारण करतो. धनुष्याला कोदंड म्हणतात. म्हणून धनुर्धारी राममूर्तीला कोदंडराम म्हणतात. [प्रा. च. को.; वाल्मीकि-रामायण – व्याख्याने, श्री. बाळशास्त्री हरदास, १९५१; वाल्मीकि-रामायण – परीक्षण, चिं. वि. वैद्य, १९२०; म. सा. अ.; सा. ड. इ. गॉ. गॉ.]

रामकली हिंदुस्थानी संगीतातील एक राग. हा भैरव थाटातून निघतो. याची जाती संपूर्ण संपूर्ण असून, याचा वादी स्वर पंचम व संवादी षड्ज आहे. आरोह स्वर – सा रे ग म प ध नि सा. अवरोह स्वर – सां नी ध प म प ध नि ध प म ग म रे सा. गानसमय प्रातःकाल. या रागात तीव्र, मध्यम व कोमल निषाद या स्वरांचा प्रयोग वेगळ्या प्रकारे होतो.

रामकृष्ण चक्रवर्ती (इ. स. चे १६ वे शतक) एक श्रेष्ठ नैयायिक. याचा निवास काशीत होता. काशीतल्या बंगाली पंडितांमध्ये जगद्गुरू महामहोपाध्याय भट्टाचार्य म्हणून याचा गौरव होत असे. दीधितिकार रघुनाथशिरोमणी हा याचा साक्षात गुरू होता, असे अनेक पंडितांचे मत आहे. ऐने अकबरीत उल्लेख केलेला तार्किक रामकृष्ण हाच असावा असे म्हणतात. याने चिंतामणिदीधितिटीका, गुणदीधितिप्रकाश, लीलावतीदीधितिटीका, पदार्थखंडनटीका व आत्मतत्त्वविवेकदीधितिटीका हे ग्रंथ रचले. चिंतामणिदीधितिटीका ही केवळ प्रत्यक्ष व अनुमान खंडावर असून, तिची रचना काशीत झाली असावी, असे तिच्या मंगलाचरणावरून वाटते. [का. सा. सा.]

रामकृष्ण परमहंस (इ. स. १८३६–१८८६). एक संतश्रेष्ठ, अद्वैत वेदान्ताचे प्रचारक आणि सर्वधर्म-समन्वयाचे प्रणेते. बंगाल प्रदेशातील हुगळी जिल्ह्यात कामारपुकुर नावाचा एक छोटासा गाव आहे. तिथल्या चट्टोपाध्याय घराण्यातील क्षुदिराम व चंद्रादेवी या ऋषितुल्य मातापित्यांच्या पोटी यांचा जन्म झाला. हे घराणे रामोपासक होते. रामकृष्णांच्या जन्माची हकीकत दैवी स्वरूपाची आहे. उतारवयात क्षुदिराम यात्रेच्या निमित्ताने गयेला गेले असता तिथे एका रात्री गदाधराने त्यांच्या स्वप्नात येऊन म्हटले, 'क्षुदिरामा ! तुझ्या भक्तीने मी संतुष्ट झालो आहे. पुत्ररूपाने तुझ्या घरी अवतीर्ण होऊन मी तुझी सेवा ग्रहण करीन.' इकडे चंद्रादेवींनाही याच स्वरूपाचे स्वप्न पडले होते. तसेच, पुढे एक दिवस त्या घरासमोरील शिवमंदिरापुढे उभ्या असताना शिवाच्या शरीरातून एक दिव्य ज्योती बाहेर पडून तिने चंद्रादेवींच्या शरीरात प्रवेश केला. तेव्हा त्यांना गर्भसंचाराची भावना झाली. आणि अखेर ते स्वप्न सत्य ठरले. त्यांना यथाकाली पुत्र झाला. गदाधराच्या कृपेने त्याची प्राप्ती



कामारपुकुर येथील शिवमंदिर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली म्हणून त्याचे नाव त्यांनी गदाधर असे ठेवले.

क्षुदिरामांनी गदाधराचे जातक वर्तविले. भृगुसंहितेनुसार त्याचे फल पुढीलप्रमाणे आले– अशा प्रकारचा माणूस धर्मवेत्ता, वंदनीय व पुण्यकर्मरत होईल. तो नवा धर्मसंप्रदाय सुरू करील आणि परमेश्वराचा अवतार म्हणून गणला जाईल.

योग्य वेळी गदाधराला शाळेत घातले. त्याची धारणाशक्ती अलौकिक होती. तो एकपाठी होता. लिहिणे-वाचणे त्याला चटकन आले. पण गणिताचा मात्र त्याला तिटकारा होता. स्वभाव जात्याच हूड असल्याने तो शाळा सोडून अन्यत्रच कुठेतरी हिंडत असे. परंतु घरी विचारले तर मात्र नेहमी खरे सांगत असे. भीती ही त्याच्या स्वभावातच नव्हती. मोठमोठी माणसे भुतांच्या भीतीने जिथे जायला कचरत, तिथे हा खुशाल जात असे. गदाधराची अनुकरणशक्तीही मोठी होती. पुराण ऐकून आल्यावर तो पुराणिकाची हुबेहूब नक्कल करी. तसेच, कुंभाराकडच्या मूर्ती पाहून घरी आल्यावर त्या जशाच्या तशा स्वहस्ते बनवी. त्याचे मन एखाद्या विषयात रमले म्हणजे त्याला अन्य कशाचेही भान राहत नसे.

गदाधराच्या सातव्या वर्षी क्षुदिराम सेरामपुराला दुर्गेच्या उत्सवाला गेले. तिथे त्यांना संग्रहणी झाली आणि त्यातच त्यांचा मृत्यू झाला. गदाधर अचानकपणे पितृ-सुखाला पारखा झाला. त्याला परिस्थितीची जाणीव झाली. त्याने हट्ट सोडले. तो नियमित शाळेत जाऊ लागला. पण त्याचा ओढा मात्र पुराण, भजन व मूर्तिकला यांकडेच राहिला. याशिवाय या काळात त्याला आणखी एक छंद लागला. गावाजवळ असलेल्या धर्मशाळेत जाऊन तिथे उतरलेल्या साधू-बैराग्यांची तो सेवा करू लागला. त्यांना कमी पडेल ते आणून द्यावे, प्रसंगी तिथेच जेवावे, असा त्याचा दिनक्रम सुरू झाला.

वयाच्या ९व्या वर्षी गदाधरचे उपनयन झाले. पुढे एका शिवरात्रीच्या दिवशी त्याने शिवचरित्रपर नाटकात शिवाची भूमिका केली आणि त्या भूमिकेत त्याची भावसमाधी लागली. त्या वेळेपासून त्याची मधूनमधून अशी समाधी लागू लागली. देवादिकांचे ध्यान करीत असताना किंवा गाणी म्हणत असताना तो एकदम समाधीत जाई. त्या अवस्थेतून सावध झाल्यावर तो म्हणे, की मी ज्या देवतेचे ध्यान करतो, ती देवता माझ्यापुढे उभी राहते. त्याची अशी भावावस्था झाली म्हणजे गावातील स्त्रिया त्याची श्रीकृष्ण अथवा चैतन्य महाप्रभू म्हणून पूजा करीत. पूजेसाठी त्यांनी एक मुकुट व सोन्याची मुरलीही करून ठेवली होती. त्याच्या या धर्मप्रवृत्तीकडे पाहून घरच्या लोकांनी त्याच्यावरचे शाळेचे बंधन शिथिल केले. त्यामुळे शाळा मागे पडली, पण वाचन मात्र वाढले. लोक त्याच्याकडून रामायण-महाभारतातील आख्याने आस्थेने वाचून घेऊ लागले.

क्षुदिराम गेल्याने त्यांच्या कुटुंबाचा कणाच मोडल्यासारखा झाला होता. घरची सांपत्तिक स्थिती अधिकाधिक खालावत चालली होती. म्हणून गदाधराचे थोरले बंधू रामकुमार कामारपुकुर सोडून कलकत्त्याला गेले. तिथे त्यांनी एक पाठशाळा काढली. पाठशाळेचा जम बसल्यावर रामकुमारांनी शिक्षणासाठी व आपल्या मदतीसाठी गदाधराला कलकत्त्याला नेले. परंतु तिथे गेल्यावरही त्याची अभ्यासात फारशी प्रगती झाली नाही. एक दिवस रामकुमारांनी त्याला शिक्षणाचा उपदेश केला असता तो नम्रतेने पण निश्चयाने म्हणाला, 'केळ्या-तांदुळाची गाठोडी बांधण्याची विद्या मी शिकू इच्छीत नाही; मी अशी विद्या शिकू इच्छितो, की जिच्या योगे ज्ञानाचा उदय होऊन माणूस कृतार्थ होईल.' त्याचे हे उत्तर म्हणजे त्याच्या साधकभावाचा पहिला आविष्कार होय, असे म्हटले जाते. या वेळी त्याचे वय अवघे सतरा वर्षांचे होते.

चट्टोपाध्याय यांचे घर – कामारपुकुर

पुढे रामकुमारांची स्थिती अधिकच खालावली. ते अन्य व्यवसायाच्या शोधात असता कलकत्ता येथील राणी रासमणी नामक सधन स्त्रीने दक्षिणेश्वरी बांधलेल्या कालीमातेच्या मंदिरात त्यांना पुजारी म्हणून काम मिळाले. थोड्याच दिवसांत गदाधरही तिथे गेला. पण तो देवीचा प्रसाद न घेता आपले जेवण आपणच बनवी. कारण राणी रासमणी कोळी जातीची होती. काही दिवसांनी तो रात्रीचा प्रसाद ग्रहण करू लागला. पण कोळ्याचे अन्न खावे लागते, म्हणून त्याला फार वाईट वाटत असे. नंतर तो स्वतः देवीची पूजा करू लागला. पूजा करताना तो तन्मय होत असे. त्या वेळी आपणाजवळ कोणी आहे की नाही याचेही भान त्याला नसे. त्याच्या डोळ्यांतून एकसारख्या अश्रुधारा वाहत; त्यामुळे त्याची छातीही भिजून जाई. या संदर्भात त्याने स्वतःच सांगितले आहे ते असे – 'अंगन्यास वगैरे पूजांगे करीत असता, ते ते मंत्रवर्ण उज्ज्वल अक्षरांनी आपल्या देहावर उमटत आहेत, असे मला प्रत्यक्ष दिसे.' देवीच्या पूजेसाठी शक्तिदीक्षा घेणे आवश्यक आहे, असे वाटल्यावरून गदाधराने केनाराम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भट्टाचार्य नावाच्या एका मोठ्या साधकाकडून शक्तिदीक्षा घेतली.

पुढे थोड्याच कालात त्याचे बंधू रामकुमार यांना देवाज्ञा झाली. त्यामुळे गदाधर अधिकच उदासीन झाला. तो सारा वेळ ईश्वरचिंतनात घालवू लागला. देवीच्या मंदिराचे दार बंद असल्यावर तो पंचवटीत बसून जगन्मातेचे ध्यान व चिंतन करी. रात्रीच्या वेळी तो पंचवटीतील आवळीच्या झाडाखाली बसून ध्यान करी. यावेळी तो लज्जा, घृणा, भय, कुल, शक्ती, जाती, मान व अभिमान या अष्टपाशांपासून मनाने मुक्त होण्याचा प्रयत्न करी. अहंकाराचा नाश होऊन अंगी नम्रता बाणावी म्हणून तो आपल्या हातांनी शौचकूपादी घाणेरड्या जागाही स्वच्छ करी. सर्व जीव ईश्वरस्वरूप आहेत, हा ठसा मनावर बिंबावा म्हणून तो भिकाऱ्यांच्या पंगतीतले उच्छिष्टान्न देवीप्रसाद म्हणून ग्रहण करी. पुढे पुढे जगदंबेने आपल्याला साक्षात दर्शन द्यावे म्हणून तिची तो प्रार्थना करू लागला. त्यासाठी व्याकुळ होऊ लागला. 'आई ! तू रामप्रसादाला दर्शन दिलेस आणि मला तेवढे देत नाहीस ? मला धन नको, मान नको, भोगसुख नको; फक्त तुझे दर्शन हवे.' अशी त्याची विनवणी सुरू झाली. या व्याकुळतेची लक्षणे त्याच्या शरीरावरही दिसू लागली. त्याचा आहार कमी झाला, निद्रा कमी झाली व वक्षःस्थळ आरक्त दिसू लागले. तरीही देवीचे दर्शन होत नाही, असे पाहून तो एके दिवशी आत्मघाताला प्रवृत्त झाला. त्या वेळी मात्र त्याला जगदंबेने दर्शन दिले.

हे दर्शन झाल्यावर गदाधरांना आकांक्षा उत्पन्न झाली, की हे दर्शन अखंड होत राहावे. अशा परिस्थितीत ते ओक्साबोक्शी रडत आणि जमिनीवर लोळण घेत. मग पुन्हा त्यांना दर्शन होई. मग मात्र त्यांना आई हसत आहे, बोलत आहे, सांत्वन करीत आहे, असे अनुभव वारंवार येऊ लागले.

हळूहळू गदाधरांच्या मनातील प्रेमाभक्ती इतकी वाढली, की त्यांना जगदंबेची पूजाअर्चाही पार पाडणे अशक्य झाले. ही त्यांची भावावस्था इतरांना कशी कळावी ! त्यांना वाटले, की गदाधरांना वात झाला आहे. त्यातच आणखी एका प्रसंगाची भर पडली. एके दिवशी गदाधर कशी काय पूजा करतात, ते पाहण्यासाठी स्वतः राणी रासमणी मंदिरात आल्या. पूजा संपल्यावर त्यांनी गदाधरांना जगदंबेची एकदोन पदे म्हणायला सांगितली. गदाधर पदे म्हणू लागले व त्यात तन्मय झाले. पण त्यांनी एकाएकी गाणे बंद करून रासमणींना दोन चापट्या मारल्या. ते रागाने त्यांना म्हणाले. 'इथेसुद्धा संसाराचे विचार!' हा प्रकार पाहून लोकांमध्ये गोंधळ उडाला. पण 'आपल्या मनात या वेळी कोणते विचार चालू होते, हे गदाधरांनी कसे ओळखले,' या विचाराने रासमणी आश्चर्य करू लागल्या. राणी रासमणीचे जावई मथुरबाबू मंदिराचे व्यवस्थापक होते. गदाधरांची ही स्थिती पाहून मथुरबाबूंनी ते 'बरे' होईपर्यंत त्यांच्या जागी त्यांचा चुलतभाऊ रामतारक याची नेमणूक केली.

गदाधरांना वात झाला आणि त्यांनी पूजेचे काम सोडले, ही बातमी त्यांच्या आईला समजली. तिने त्यांना कामारपुकुरला बोलावून घेऊन पुष्कळ मंत्रतंत्र केले. पुढे त्यांची व्याकुळता बरीच कमी झाली आणि त्यांचे जीवन सुरळीत सुरू झाले. त्यांचा हा रोग पुन्हा उद्भवू नये म्हणून आईने त्यांच्या विवाहाचा विचार सुरू केला. थोड्याच दिवसांत जयरामवाडीतील रामचंद्र मुखोपाध्याय यांच्या

राणी रासमणी

मुलीशी त्यांचे लग्न झाले. विवाहानंतर सहा–सात महिन्यांनी ते पुन्हा आपल्या कामावर रुजू झाले. तिथे गेल्यावर थोड्याच दिवसांत ते सांसारिक गोष्टी पूर्ण विसरून गेले आणि पूर्वीच्या गोष्टी पुन्हा सुरू झाल्या. ही बातमी ऐकून त्यांच्या आईला फारच काळजी वाटू लागली. तिने त्यांच्यासाठी महादेवाच्या देवळात धरणे धरले. पण शिवाने अनुकूल कौल दिल्यामुळे तिला समाधान वाटले.

दक्षिणेश्वरी आल्यावर थोड्याच दिवसांत राणी रासमणीचा मृत्यू व भैरवी ब्राह्मणीचे आगमन या दोन महत्त्वाच्या गोष्टी घडून आल्या. गदाधरांनी तांत्रिक साधना या भैरवी ब्राह्मणीच्याच देखरेखीखाली सुरू केली. या संदर्भात त्यांनी स्वतः च सांगितले आहे, ते असे – 'मुख्य मुख्य चौसष्ट तंत्रांमध्ये ज्या साधना सांगितल्या आहेत, त्या सर्व ब्राह्मणीने माझ्याकडून एकामागून एक करून घेतल्या. काय त्या कठीण साधना ! त्या आचरीत असता बहुतेक साधक पथभ्रष्ट होतात; पण आईच्या कृपेने मी त्या साऱ्यांतून पार पडलो.' कोणतीही साधना करायला त्यांना तीन दिवसांहून अधिक वेळ कधीच लागला नाही.

तंत्रोक्त साधना झाल्यावर वैष्णव मताची साधना करण्याची त्यांच्या मनात उत्कट इच्छा झाली. या साधनेसाठीही त्यांना भैरवी ब्राह्मणीचे खूप मार्गदर्शन झाले. पुढे त्यांनी एका गुरूकडून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राममंत्र घेऊन रामोपासनाही केली. त्यानंतर त्यांनी श्रीकृष्णाची मधुरभावाने राधारूपात सेवा केली. त्यांचे कामगंधहीन मन गोपीभावाशी इतके तन्मय झाले, की आपण पुरुष आहो याचीही जाणीव त्यांना उरली नाही. त्यांचे सर्व व्यवहार स्त्रियांसारखेच होऊ लागले. या साधनाकालात त्यांनी सहा महिनेपर्यंत स्त्रीवेषही धारण केला होता.

मधुरभावाच्या साधनेनंतर अल्प काळातच त्यांनी दक्षिणेश्वरी आलेल्या परमहंस तोतापुरीच्या मार्गदर्शनाने अद्वैतसाधनेची दीक्षा घेतली. त्यासाठी त्यांनी शिखासूत्राचा त्याग करून यथाविधि संन्यास घेतला. तोतापुरींनी त्यांचे रामकृष्ण असे नवे नाव ठेवले. आपला हा शिष्य अलौकिक आहे, असे पाहून त्यांनीच रामकृष्णांना परमहंस ही पदवी दिली. अल्पावधीतच रामकृष्णांना निर्विकल्प समाधीचा लाभ झाला. यासंबंधी तोतापुरींनीच म्हटले आहे. 'जी गोष्ट साध्य करून घ्यायला मला चाळीस वर्षे सतत परिश्रम करावे लागले, ती गोष्ट या महापुरुषाने तीनच दिवसांत साध्य करून घेतली.' यानंतर रामकृष्ण सहा महिने त्या निर्विकल्प समाधीत होते.

ही अवस्था संपल्यावर मथुरबाबूंची पत्नी जगदंबादासी खूप आजारी पडली. तेव्हा रामकृष्णांनी तिचा आजार आपल्या शरीरावर घेतला. या आजारातून उठल्यावर त्यांनी गोविंदराय नावाच्या साधकाकडून इस्लामी साधनेची दीक्षा घेतली.

पुढे ते पुनश्च कामारपुकुरला आले. तिथे त्यांचा मुक्काम सहा-सात महिने होता. त्यांच्या पत्नीलाही माहेराहून तिथे आणले गेले. रामकृष्णांनी तिला योग्य ते शिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांच्या दिव्य प्रेमाने त्यांच्या पत्नीची पारमार्थिक उन्नती झपाट्याने झाली. तिने निर्विकल्प समाधीपर्यंत मजल गाठली. त्यानंतर रामकृष्ण परत दक्षिणेश्वरी गेले आणि तिथून तीर्थयात्रेला निघाले. त्यांच्याबरोबर मथुरनाथ, जगदंबादासी, चंद्रादेवी, इ. सुमारे १२५ मंडळी होती. ही सर्व मंडळी वैद्यनाथ, काशी, प्रयाग, इ. तीर्थे करून वृंदावनाला गेली. व्रजमंडलात रामकृष्णांना राधा-कृष्णांचे अनेक रूपांत दर्शन झाले. पुढे ते गौरांगप्रभूंच्या जन्मस्थानी म्हणजे नवद्वीपातही गेले आणि तिथून कलकत्त्याला परत गेले.

मध्यंतरीच्या काळात आपल्या पतीला वेड लागले आहे, अशा बातम्या त्यांच्या पत्नीच्या कानावर येऊ लागल्या. तेव्हा प्रत्यक्ष पडताळा पाहण्यासाठी ती दक्षिणेश्वरी गेली आणि तिथेच राहिली. एके दिवशी रात्री रामकृष्णांचे पाय चेपीत असता ती त्यांना म्हणाली. 'मी कोण आहे असे तुम्हाला वाटते?' यावर रामकृष्ण म्हणाले. 'जी माता त्या कालिमंदिरात आहे, तिनेच या शरीराला जन्म दिला असून, सध्या नौबतखान्यात ती राहात आहे आणि तीच आता इथे माझे पाय चेपीत आहे.' हे उत्तर त्यांना अनपेक्षित होते. एक वर्षाहून अधिक काळ एकत्रित राहूनही रामकृष्णांच्या मनात कामकल्पनेचा उदय झाला नाही. एकदा तर त्यांनी कालिमंदिरात आपल्या पत्नीची देवी म्हणूनच पूजा केली. हीच पूजा त्यांच्या जीवनात षोडशी पूजा म्हणून प्रसिद्ध आहे. मग ती कामारपुकुरला परत गेली. त्यानंतर रामकृष्णांनी ख्रिस्ती, बौद्ध, जैन व शीख या साधनाही आचरल्या.

विविध साधना आचरून झाल्यावर आपल्याला अणिमादी सिद्धी प्राप्त झाल्या आहेत, असा अनुभव रामकृष्णांना आला. पण त्यांनी त्यांचा कधीही उपयोग केला नाही. इतरांनाही या सिद्धींचा वापर करायला ते विरोध करीत. त्यांनी हठयोगाचाही अभ्यास केला होता.

निर्विकल्प समाधीच्या अवस्थेनंतर त्यांच्याकडे गुरुपद चालत आले. या वेळी त्यांच्या मनात अहंकाराचा लेशही उरला नव्हता. उलट तिथे सर्वात्मभावाला जागा मिळाली. नुसत्या स्पर्शाने अथवा इच्छेने दुसऱ्याचा विचार बदलून टाकण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी उत्पन्न झाले. त्याचप्रमाणे दुसऱ्याचे रोग आपल्या अंगावर ओढून घेण्याची शक्तीही त्यांच्या ठायी होती. तरीही त्यांनी कधी दंभ केला नाही. अद्वैताच्या अत्युच्च अवस्थेत असतानाही त्यांनी परमेश्वराबरोबर माय-लेकराचा जिव्हाळ्याचा संबंध ठेवला होता. आपल्या कोणत्याही नेमात त्यांनी कधी खंड पडू दिला नाही. निंदास्तुती ही त्यांना सारखीच झाली होती. पण देवीची कोणी निंदा केली, तर मात्र ते रागावून बोलत असत. त्यांचे वैराग्य असाधारण होते. त्यांनी सर्व भोगवासनांचा त्याग केला होता. संपत्ती ही ईश्वरप्राप्तीच्या मार्गातील धोंड आहे, हे जाणून तिचाही त्यांनी त्याग केला होता. त्यांच्या मनात सत्यनिष्ठा जबर होती. थट्टेत देखील त्यांना खोटे बोललेले आवडत नसे.

हळूहळू लोक त्यांचे शिष्य बनू लागले. त्यांचा परिवार वाढू लागला. मात्र कोणाचीही नीट परीक्षा केल्याशिवाय ते त्याला आपल्या शिष्यमंडळात घेत नसत आणि एकदा शिष्याला स्वीकारले, की मग त्याच्या साधनेकडे बारकाईने लक्ष देऊन त्याचे कल्याण करीत असत. स्वामी विवेकानंद हे त्यांचे पट्टशिष्य होते. त्यांचीही त्यांनी परीक्षा घेतली होती. आपल्याकडे येणाऱ्या प्रत्येकाचा भाव ओळखून ते त्याच्याशी वागत. शारीरिक लक्षणांवरूनही ते माणसांची परीक्षा करीत. ते जशी दुसऱ्याची परीक्षा घेत, तशी लोकांनीही आपली परीक्षा घ्यावी असे त्यांना वाटे. ते नेहमी म्हणत, की साधूला दिवसा पाहावे, रात्री पाहावे आणि मग त्याच्यावर विश्वास ठेवावा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामकृष्णांच्या सहवासात राहणे हेच एक प्रकारचे आध्यात्मिक शिक्षण होते. त्यांची कोणतीही कृती निरर्थक नसे.



रामकृष्ण परमहंस

आपल्याकडे येणाऱ्याला ते प्रथम आपलासा करीत आणि मग त्याला जे सांगायचे आहे ते सिद्धान्तरूपाने सांगत. त्याच्या वैगुण्यावर बोट ठेवून ते कधी गोडीने तर कधी रागावल्यासारखे करून ते वैगुण्य काढून टाकीत. संसारी लोकांपुढे बोलताना ते म्हणत. 'अरे, ज्याने ईश्वरासाठी सर्वस्वाचा त्याग केला, तो तर नेहमी त्याचे नामस्मरण करीलच; त्यात काय बहादुरी ? पण संसारात राहून जो ईश्वराचे नामस्मरण करील त्याची मातब्बरी खरी' बालभक्तांना वैराग्याच्या गोष्टी सांगायच्या असल्यास जवळपास कोणी संसारी भक्त नाही हे पाहून ते त्यांच्याशी बोलत. प्रत्येकाच्या स्वभावानुरूप ते त्याला मार्ग दाखवीत. श्रद्धा असल्याशिवाय धर्ममार्गात कधीही उन्नती होत नाही, असे त्यांचे म्हणणे असे. ते साधकाला लज्जा, घृणा, भय यांचा त्याग करायला शिकवीत.

आपला वर्ण्यविषय लहान मुलालाही समजेल, इतका सोपा करून ते सांगत त्यासाठी साधे सोपे दृष्टांतही देत. एकदा ईश्वर आणि माया यांचा प्रश्न निघाला. 'माया ही ईश्वराची शक्ती. ती ईश्वरात वास करते. तर मग ईश्वरही काय आमच्यासारखाच मायाबद्ध आहे. ?' असे कोणीतरी रामकृष्णांना विचारले. यावर ते म्हणाले 'छे रे, तसे नाही. माया ईश्वराची असली व ती त्याच्याच ठिकाणी सर्वदा राहत असली, तरी त्यामुळे ईश्वर कधीही मायाबद्ध होत नाही. हेच पाहा ना, सापाच्या तोंडात नेहमी विष असते. त्याच तोंडाने तो खातो पितो; पण तो स्वतः कधीही त्या विषाने मरत नाही. तो ज्याला चावतो, तो मात्र मरतो. त्यासारखेच हे आहे.'

ईश्वरदर्शन झाल्यावर हजार जन्मांचे पातक एकदम नाहीसे होते, असे रामकृष्णांनी म्हटल्यावर एक शिष्य त्यांना म्हणाला- 'हे पटत नाही !' यावर रामकृष्ण उत्तरले. 'का बरे? एखाद्या गुहेतील हजारो वर्षांचा अंधकार तिथे दिवा नेताच एकदम नाहीसा होऊन जातो, थोडाथोडा नाहीसा होत नाही. तीच गोष्ट ईश्वरदर्शनाची !'

'महाराज, ईश्वर साकार आहे की निराकार आहे ?' हा आणखी एकाचा प्रश्न. त्यावर रामकृष्ण म्हणाले. 'बाबारे, तो साकार आहे आणि निराकारही आहे. जसे पाणी आणि बर्फ. पाण्याला आकार नाही, पण बर्फाला आहे. थंडीमुळे पाण्याचे बर्फ होते; त्याचप्रमाणे भक्तिरूपी थंडीने अखंड सच्चिदानंदसागरात ठिकठिकाणी साकाररूप बर्फ जमते !'

आणखी एक प्रश्न –'महाराज नेति नेति विचार म्हणजे काय व तो करीत गेल्याने ज्ञानविज्ञान कसे प्राप्त होते ?' रामकृष्ण म्हणाले. "एका काळोख्या खोलीत एकजण निजला होता. त्याला शोधण्यासाठी दुसरा एकजण त्या खोलीत गेला. प्रथम एक खुर्ची त्याच्या हाताला लागली. तो म्हणाला –'छे! हा तो नव्हे.' असे म्हणून तो दुसरीकडे चाचपू लागला; आता त्याच्या हाताला एक टेबल लागले; तेव्हा 'हाही तो नव्हे', असे त्याने जाणले. तो पुन्हा चाचपू लागला व आणखीही इतर वस्तू त्याच्या हाताला लागल्या. तो म्हणाला 'नेति नेति !' काही वेळाने त्याचा हात त्या पलंगावर निजलेल्या गृहस्थाला लागला. त्याचबरोबर मात्र हाच तो (इति, इति), असे तो आनंदाने उद्गारला. त्याचे अर्धेअधिक काम झाले होते. त्याला ज्ञान झाले होते; पण अजून विज्ञान झाले नव्हते. त्या गृहस्थाला उठवून, त्याच्याशी चार गप्पागोष्टी झाल्यानंतर त्याचे काम पुरे झाले. म्हणजे त्याला विज्ञान झाले ! विज्ञान म्हणजे विशेष रूपाने जाणणे. समजले ?'

रामकृष्ण कधीही खंडन–मंडनाच्या भरीला पडले नाहीत. मतभेद झाला तरीही ते कोणाशी वाद घालीत नसत. कधी कधी अधिक स्पष्टीकरणासाठी ते संतांची पदे म्हणवून दाखवीत.

रामकृष्णांना जे अनेक भक्त मिळाले, त्यांत राखालचे नाव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोठे आहे. रामकृष्ण त्यांना आपला मानसपुत्र मानीत. ब्रह्मानंद हे त्यांचे उत्तराश्रमीचे नाव होय. विवेकानंद राखालनंतर रामकृष्णांकडे आले. त्यानंतर महेंद्रनाथ गुप्त आले. याशिवाय केदारनाथ चट्टोपाध्याय, केशवचंद्र सेन, रामचंद्र दत्त, मनमोहन, विजयकृष्ण गोस्वामी, ईश्वरचंद्र विद्यासागर, बंकिमचंद्र चटर्जी, इ. अनेक नामवंत भक्तमंडळी त्यांच्याभोवती जमा झाली. त्यांच्यासमवेत रामकृष्णांनी खूप धर्मप्रचार केला.

अखेर त्यांच्या गळयाला एक विलक्षण रोग झाला. ते दीड वर्ष रुग्णशय्येवर पडून होते. त्यांचा उत्साह मात्र कायम होता. या काळातही त्यांनी खूप भक्तमंडळी एकत्रित केली. पुढे आजार हळूहळू वाढू लागला. भक्तांनी त्यांना औषधोपचारासाठी कलकत्याला आणले. त्यांच्या सेवेसाठी त्यांच्या पत्नीही आल्या. पण कशाचाच उपयोग झाला नाही. मृत्यूपूर्वी काही दिवस त्यांनी आपला शिष्योत्तम नरेंद्र याला आपल्या सर्व सिद्धींचे दान केले. मृत्यूशी झुंज देत असताना ते महेश्वर गुप्तांकडे पाहून म्हणाले. 'मला आता काय दिसत आहे सांगू ? तोच सर्व काही झाला आहे. सर्व जगत त्यानेच व्यापले आहे. बली ज्यावर मारला जातो तो ठोकळा आणि तो मारणारा, सर्व तोच झाला आहे !' मरणसमयी त्यांना होणारे क्लेश पाहून स्वामी विवेकानंदांच्या मनात संशयाने घर केले. रामकृष्णांना ते समजले. ते विवेकानंदांना म्हणाले, 'अजूनही शंका ? पक्के लक्षात ठेव, की जो राम आणि जो कृष्ण तोच आता रामकृष्ण ! तुझ्या वेदान्ताच्या दृष्टीने नाही; तर प्रत्यक्ष.' १६ ऑगस्ट १८८६ या दिवशी रामकृष्ण हे जग सोडून निघून गेले.

रामकृष्णांच्या अनेक भक्तांनी त्यांची चरित्रे लिहिली आहेत. त्यांत स्वामी सारदानंद, महेश्वर गुप्त आदींची चरित्रे प्रसिद्ध आहेत. प्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित प्रा. माक्स म्यूलर यांनी व रोमाँ रोलाँ यांनीही त्यांचे चरित्र लिहिले आहे.

श्रीरामकृष्ण हे देवत्वाची सजीव मूर्तीच होते. त्यांच्या उक्ती म्हणजे पढिक पंडितांची कोरडी वचने नव्हेत; तर ती त्यांच्या जीवनग्रंथाची पृष्ठेच होत. त्यांत त्यांचे स्वतःचे अनुभव प्रकट झालेले आहेत. म्हणूनच त्यांचा वाचकांच्या मनावर खोल परिणाम होतो.

महर्षि दयानंद, राजा राममोहन राय, ब्रह्मसमाजी केशवचंद्र सेन, हे रामकृष्णांच्या समकालीन होते आणि ते सगळे धर्मसुधारक होते. पण रामकृष्ण हे अनेक बाबतींत त्यांच्याहून वेगळे होते. दयानंद हे भारतीय परंपरेचे प्रकांड पंडित होते, तर दुसरे दोघे आंग्लविद्याविभूषित असून, पाश्चात्य दृष्टीने आपल्या हिंदू धर्माची सुधारणा व्हावी, असे मानणारे होते. परधर्मी लोकांनी हिंदू धर्माची निंदानालस्ती चालवली होती, ती वाचून त्यांचे चित्त व्यथित झाले होते. त्यामुळे हे तिघेही सांस्कृतिक क्रांतीचे अग्रदूत म्हणून पुढे आले. पण रामकृष्णांचा त्यांच्या या आंदोलनाशी कसलाही संबंध नव्हता. कारण कोणत्याही धर्माविषयी त्यांच्या मनात आकस नव्हता. हिंदू धर्म संकटात आहे, असे त्यांनी कोणालाही सांगितले नाही आणि आपला धर्मोपदेश इतरांना देण्यासाठी ते आपल्या आश्रमाच्या बाहेर कधी गेले नाहीत. कारण धर्म ही अनुभूतीची वस्तू आहे, अशी रामकृष्णांची धारणा होती. धार्मिक सत्य हे केवळ बुद्धिगम्य नसून, ते प्रत्यक्ष अनुभवाचा विषय आहे आणि त्या सत्यापुढे संसारातल्या साऱ्या अभिलाषा, सारे सुखभोग केवळ तृणवत आहेत, असे त्यांनी मानले होते.

ज्या काळी आस्तिक व नास्तिक; तसेच हिंदू, खिरस्ती व मुसलमान आपला धर्म चांगला आणि इतरांचा धर्म निकृष्ट व त्याज्य अशा समजुतीने एकमेकांशी लढत होते, वादविवाद करीत होते, त्या काळी रामकृष्ण परमहंसांनी सर्व धर्मांची परमतत्त्वे आपल्या जीवनात साकारली, अनुभवली आणि असे करून साऱ्या विश्वाला संदेश दिला. 'धर्माला विवादाचा विषय बनवू नका. शक्य असेल तर सरळ सरळ अनुभूती घेण्याचा प्रयत्न करा. जगातील सर्व धर्म निरनिराळ्या मार्गाने साधकाला ईश्वराकडेच घेऊन जातात. कोणत्याही धर्माच्या मूलतत्त्वात फरक नाही. साधनेचे मार्ग मात्र अनेक असू शकतात. मनुष्याने त्यांतला कोणताही मार्ग पत्करावा. माणसाला शांती मिळते ती विशिष्ट मार्गाने गेल्यामुळे मिळत नसून, ती अनुभूतीच्या द्वारेच मिळते. अनुभवाच्या त्या उंचीवर गेल्यानंतर हा हिंदू, हा खिरस्ती, हा मुसलमान हा विचारच व्यर्थ ठरतो.'

श्री. रामधारी सिंह 'दिनकर' रामकृष्णांच्याविषयी लिहितात, ते असे —

भारतीय जनतेच्या पुरातन अशा धर्मसाधनारूपी वेलीवर रामकृष्ण हे एका अभिनव पुष्पासारखे चमकले. त्यांचे दर्शन झाल्यावर धार्मिक आणि भाविक लोकांच्या मनांत असा विश्वास उत्पन्न झाला, की अनुभवसिद्ध अशा प्राचीन ऋषिमुनींच्या आणि संतांच्या ज्या कथा आपण ऐकतो, त्या खोट्या नाहीत.

रामकृष्ण इंग्रजी शिकले नव्हते आणि संस्कृतही पढले नव्हते. ते कुठल्या सभेत धर्मप्रवचन करायला गेले नाहीत आणि त्यांनी त्यासाठी लेखही लिहिले नाहीत. त्यांचे सारे धन, सारी संपदा केवळ कालीमातेचे नामस्मरण एवढीच होती. दक्षिणेश्वर येथील एका कुटीमध्ये एका खाटेवर बसल्या बसल्या ते धर्मव्याख्यान करीत. त्या व्याख्यानाचा एक धागा अतिप्राचीन भूतकालाच्या गुहेमध्ये पोचलेला असे आणि दुसरा धागा भविष्याच्या गिरिकंदरापर्यंत लांबलेला असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना अनेक गुरू मिळाले आणि त्यांनी त्यांच्याकडून विविध धर्मांचा उपदेश घेऊन काही काल त्या त्या धर्मांची साधनाही केली. मात्र अनेक धर्मांच्या साधनेमध्ये रममाण होत असताही कालीमातेवरील त्यांची श्रद्धा दृढ होती, अभंग होती. एखाद्या बालकाने प्रत्येक वस्तू जशी आपल्या आईकडे मागावी, तशी रामकृष्ण प्रत्येक वस्तू कालीमातेकडे मागत आणि कोणतेही काम तिच्या आज्ञेनेच करीत. हिंदू धर्मातले गांभीर्य आणि माधुर्य यांचे ते मूर्तिमंत प्रतीक होते. त्यांची इंद्रिये पूर्णपणे त्यांच्या स्वाधीन होती. ते आपादमस्तक जणू आत्मज्योतीचा प्रकाशच बनले होते. आनंद आणि पावित्र्य यांची प्रभा त्यांच्या मुखमंडलाभोवती पसरलेली दिसे. साधना करता करता त्यांचे शरीर इतके विशुद्ध बनले होते, की ते जणू ईश्वरानुभूतीचे निर्मल यंत्रच म्हटले जावे.

रुपये-पैसे आणि सोने-चांदी या वस्तूंचा पुढे पुढे त्यांना स्पर्शही सहन होईनासा झाला होता. एकदा कोणीतरी त्यांची परीक्षा पाहण्याच्या उद्देशाने त्यांच्या बिछान्याखाली गुप्तपणे एक रुपया घालून ठेवला. रामकृष्ण त्या बिछान्यावर टेकले मात्र! ते एकदम विंचू चावल्यागत चीत्कार करीत उठले. काय झाले म्हणून लोक पाहतात, तो बिछान्याखाली रुपया.

साधनेच्या द्वारे ते अशा एका गंगोत्रीच्या ठिकाणी जाऊन पोचले होते, की जिथून दर्शनांची उत्पत्ती आणि धर्मांचा जन्म होत असतो. जेव्हा ते बोलू लागत, तेव्हा त्यांचा तो गंगौघासारखा वाक्प्रवाह ऐकताना मोठमोठे तर्कपंडित स्वतःचे पांडित्यच नव्हे, तर देहभानही विसरत. उपनिषदांतले ऋषी आणि बुद्ध, महावीर, इ. धर्मप्रवर्तक ज्या शैलीत लोकांना उपदेश करीत, तीच शैली रामकृष्णांनी स्वीकारली होती. तर्क व पांडित्य यांना दूर ठेवून उपमा व दृष्टान्त यांनी ते श्रोत्यांना विषय समजावून देत. ते म्हणत, 'वादविवाद किंवा शास्त्रार्थ मला आवडत नाही. ईश्वर हा शास्त्रार्थाच्या शक्तीच्या पलिकडे आहे. जे काही आहे, ते सारे ईश्वरमय आहे, असे जर मला प्रत्यक्ष दिसते, तर मी तर्काचा आधार कशाला घेऊ?'

विद्वत्ता व पांडित्य यांच्याबद्दल त्यांना आदर होता; पण विद्वानांच्या ठायी शील व सदाचार या गोष्टी असायला हव्या असे त्यांचे म्हणणे होते. रामकृष्णांच्या ठिकाणी विनोदप्रियता स्वाभाविक होती. त्यांचे विनोद मार्मिक असूनही आनंददायक असत. ते केशवचंद्र सेन यांची सदैव थट्टामस्करी करीत. 'केशवा, तू असा एक पक्षी आहेस, की ज्याच्या उराशी पत्थर बांधलेला आहे. हा पक्षी समाधीपर्यंत उंच उडू शकेल. पण बालबच्चे त्याला खाली खेचून आणतात.'

रामकृष्णांचे नाव त्यांच्या जीवनकालातच दूरवर पसरले. पुढे त्यांच्या निर्वाणानंतर स्वामी विवेकानंदांनी त्यांचा उपदेश जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचविला. म. गांधी म्हणत, की रामकृष्णांचे चरित्र हे व्यवहारात उतरलेल्या जीवनधर्माचे चरित्र आहे. प्रसिद्ध ब्राह्मसमाजी साधक आणि विद्वान श्री. प्रतापचंद्र मुजुमदार एकदा म्हणाले. "रामकृष्ण आणि मी! आमच्यात काय साम्य आहे? मी अर्धनास्तिक आणि लोकांच्या दृष्टीने सुशिक्षित तार्किक असा आहे. पण माझी सारी चिंता केवळ माझ्याबद्दल आहे. आणि रामकृष्ण! ते निर्धन, अशिक्षित, व्यवहारज्ञान नसलेले, मूर्तिपूजक आणि कोणाचाच आधार नसलेले हिंदू भक्त आहेत. मग मी तासनृतास त्यांच्या सेवेत घालवतो ते काय म्हणून! पण मीच कशाला! माझ्यासारखेच तार्किक आणि पाश्चात्य विचारांचे आणि वळणाचे अनेक विद्वान माझ्याप्रमाणेच रामकृष्णांची सेवा करतात. रामकृष्ण हे राम, शिव, काली, इ. देवतांची पूजा करतात; पण त्याबरोबर वेदान्ताच्याही ठिकाणी त्यांची दृढ श्रद्धा आहे. ते मूर्तिपूजक आहेत; पण निर्गुण, निराकाराचे पूर्ण ज्ञान देण्याच्या कामी त्यांच्याहून श्रेष्ठ असा दुसरा कोणी आढळणार नाही. आनंद हा त्यांचा धर्म आहे. पूजा ही त्यांची समाधी आहे. त्यांचे समग्र व्यक्तिमत्व विलक्षण श्रद्धा आणि भावना यांच्या ज्वालांनी प्रदीप्त झालेले आहे." [श्रीरामकृष्ण – चरित्र – श्री. न. रा. परांजपे, १९५७; श्रीरामकृष्णलीलाप्रसंग – स्वामी सारदानंद १९६९; सं. चा. अ.]

रामकृष्णभट्ट (१) (इ. स. चे १६ वे शतक) एक प्रसिद्ध मीमांसक. हा पाराशरगोत्री ब्राह्मण होता. याचे कुल माळव्यातले, पण याचा पिता माधव आणि आई प्रभावती हे काशीत राहायला गेले आणि तिथेच त्यांचा वंशवेल वाढला. मीमांसा व वेदान्त यांचे अध्ययन व अध्यापन या कुलात परंपरेने चालत आले होते. रामकृष्ण रामभक्त असून, धर्म हे रामचंद्ररूपच आहे, असे मानीत होता. याने अनेक ग्रंथ रचले आहेत. त्यांत पार्थसारथी मिश्राच्या शास्त्रदीपिकेवर युक्तिस्नेहप्रपूरणी नावाची व्याख्या फार मोलाची आहे. त्याच्या पूर्वी शास्त्रदीपिकेवर कोणीही टीका लिहिली नव्हती. आणि पुढे ज्या टीका लिहिल्या गेल्या, त्या रामकृष्णाच्या टीकेएवढ्या प्रौढ नाहीत. प्रतापमार्तंड नावाचा एक ग्रंथ याने रचला आहे. या ग्रंथामुळे त्याला पंडितशिरोमणी ही उपाधी मिळाली. भट्ट ही देखील त्याची पदवीच होती. [का. सा. सा.; मी. द.]

(२) (इ. स. चे १६ वे शतक) काशीच्या भट्ट घराण्यातील एक धर्मशास्त्रकार. याच्या पित्याचे नाव नारायणभट्ट असे होते. याने जीवत्पितृककर्मनिर्णय, ज्योतिष्टोमपद्धती, विभागतत्त्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मासिकश्राद्धनिर्णय, तंत्रवार्तिकटीका, इ. ग्रंथ लिहिले आहेत. हा वयाच्या बावन्नाव्या वर्षी मरण पावला. त्या वेळी त्याची पत्नी उमा ही सती गेली. निर्णयसिंधुकार कमलाकरभट्ट हा याचाच मुलगा होय. [शि. नि.; म. च. को.]

रामकृष्ण संघ स्वामी विवेकानंदांनी प्रवर्तित केलेली एक लोकोपयोगी धार्मिक संघटना. स्वामी विवेकानंदांचे गुरू श्रीरामकृष्ण परमहंस हे काशीपूरच्या उद्यान-गृहात अंतिम शय्येवर असताना त्यांनी या संघटनेचे बीजारोपण केले. रामकृष्णांनी आपल्या दिव्य दृष्टीने हे जाणले होते, की भोगपरायणतेने ग्रासलेल्या आणि क्षुद्र भेदाभेदांनी त्रासलेल्या मानवजातीला दिव्य जीवनाचा अनुभव प्राप्त करून घ्यायचा असेल, तर या भूमीत स्वार्थत्यागी आणि लोकोपयोगी संन्याशांची एक संघटना उभारली गेली पाहिजे. आपल्या शिष्य-प्रशिष्यांनी आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धार करण्याचे व्रतही स्वीकारले पाहिजे, अशी आपली इच्छा ते वारंवार बोलून दाखवीत. काशीपूर येथे मृत्युशय्येवर असताना त्यांनी याच इच्छेने आपल्या सर्व शिष्यांना एकत्र बोलावले व संघस्थापने-बद्दलचे आपले विचार बोलून दाखवले. त्याचबरोबर या शिष्य-संघाचे नेतृत्व स्वामी विवेकानंदांनी करावे, असेही सांगितले.

नंतर आपल्या निर्याणापूर्वी, म्हणजे इ.स.१८८५ च्या डिसेंबर महिन्यात एके दिवशी आपल्या निकट असणाऱ्या अकरा शिष्यांना रामकृष्णांनी वर्ण आणि जाती यांचा विचार न करता माधुकरी मागायला लावले व पुढे एके दिवशी त्यांना स्वहस्ते भगवी वस्त्रे दिली. ही लहानशी घटना म्हणजेच प्रत्यक्ष रामकृष्णांच्या हस्ते झालेली रामकृष्ण संघाची प्रस्थापना होय.

या नंतर १६ ऑगस्ट १८८६ या दिवशी रामकृष्ण परमहंस यांचे निर्याण झाले. त्यांच्या वियोगाने सर्व शिष्यमंडळी काही काळ विलक्षण अस्वस्थ झाली. तथापि लवकरच स्वामी विवेकानंदांनी त्यांना एकत्र करून नव्या संन्यस्त जीवनाचे मार्गदर्शन केले. कलकत्त्याच्या वराहनगर विभागातील एका पडक्या घरात, लोकप्रसिद्धीपासून सर्वस्वी अलिप्त राहून सतत सहा वर्षे या तरुण संन्याशांनी विवेकानंदांच्या मार्गदर्शनाखाली तपश्चरण केले व त्यायोगे आत्मतेज वृद्धिगत केले. पुढे अनेकांनी भारतभर अनवाणी पदयात्रा करून लोकस्थिती अभ्यासली.

स्वतः विवेकानंद इ. स. १८८८ मध्ये भारतयात्रेसाठी बाहेर पडले व १८९२ च्या अखेरीस ते भारताच्या दक्षिण टोकाला कन्याकुमारी येथे गेले. त्या ठिकाणी ध्यानावस्थेत असताना त्यांना भारतीयांच्या गुण-दोषांचे, यशापयशांचे आणि सुखदुःखांचे विराट दर्शन घडले. भारताच्या पाच सहस्र वर्षांच्या प्रदीर्घ इतिहासातील सर्वांश त्यांना प्रतीत झाला आणि वर्तमान दुर्दशेचे निदानही झाले. भारताला अध्यात्माचा वारसा फार मोठा आहे. त्याची जाणीव ठेवून व तो वारसा वाढवून जर भारतीयांनी आपले सामर्थ्य वाढवले, तर भारत वर्तमान पारतंत्र्यातून वर उठेल, त्याचे नष्टचर्य संपेल व तो जगाचेही नेतृत्व करू शकेल, असा साक्षात्कार स्वामीजींना कन्याकुमारी येथे झाला.

इ. स. १८९२मध्ये वराहनगरातील मठ आलमबाजार विभागात हलविण्यात आला. पुढे आपल्या जगत्संचारानंतर स्वामीजींनी आपल्या सर्व संन्यासी व गृहस्थाश्रमी गुरुबंधूंना एकत्र करून, त्यांच्या साहाय्याने व सहकार्याने दि. १ मे १८९७ या दिवशी ' दि रामकृष्ण मिशन ॲसोसिएशन ' या नावाची एक समिती स्थापन केली. या समितीची उद्दिष्टे अशी होती —

(१) रामकृष्णांनी उपदेशिलेली व स्वतःच्या जीवनात आचरलेली वेदान्ताची मूलतत्त्वे लोकांना समजावून देणे, वेदान्त-शिक्षणाला उत्तेजन देणे आणि सर्व धर्मांचा व्यापक भूमिकेवरून तौलनिक अभ्यास करून, सर्वधर्मसमन्वयाचे वातावरण तयार करणे.

(२) साहित्यादी सर्व कला, भौतिक शास्त्रे आणि उद्योग-धंदे यांचे शिक्षण देणे आणि तशा शिक्षणास उत्तेजन देणे.

(३) वरील ज्ञानशाखांचे शिक्षण देऊ शकणारे शिक्षक तयार करणे आणि त्यांचा समाजाशी संबंध घडवून आणणे.

(४) शाळा, महाविद्यालये, अनाथ शिशुगृहे, यंत्रालये, प्रयोग-शाळा, इस्पितळे, दवाखाने, अपंगालये, इ. स्वरूपाच्या लोकोपयोगी संस्था स्थापन करणे, त्यांचे संगोपन करणे आणि सातत्य टिकविणे; तसेच दुष्काळासारख्या आपत्तींच्या वेळी लोकांना शक्य ते सर्व साहाय्य देणे आणि अशाच स्वरूपाची शैक्षणिक व परोपकारक कार्ये करणे.

(५) आपल्या उद्दिष्टांच्या प्रचारासाठी आवश्यक ते वाङ्मय, नियतकालिके व पुस्तके छापून प्रसिद्ध करणे आणि विकणे किंवा अन्य मार्गांनी सामान्य जनापर्यंत पोचविणे.

(६) समितीच्या उद्दिष्टांना पोषक ठरणारे अन्य कोणतेही कार्य करणे.

या समितीच्या स्थापनेनंतर अवघ्या चार-सहा आठवड्यांत भयंकर भूकंप होऊन त्याच्या धक्क्याने आलमबाजारातील मठाच्या इमारतीची पडझड झाली. त्यामुळे फेब्रुवारी १८९८ मध्ये आलमबाजारमठाचे स्थलांतर नीलांबर मुखर्जी यांच्या प्रशस्त व प्रसन्न उद्यानगृहात गंगेच्या पश्चिम तीरावरील बेलूर नामक खेड्यात करण्यात आले. पुढे थोड्याच दिवसांत म्हणजे दि. ५ मे १८९८ रोजी स्वामीजींनी बेलूर विभागातच अन्यत्र एक जागा खरेदी केली. या जागेवर नव्या मठाचे बांधकाम झपाट्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरे करण्यात येऊन दि. ९ डिसेंबर १८९८ रोजी स्वामीजींनी आपल्या गुरुदेवांची प्रतिमा आणि पार्थिव अवशेषांचा करंडक स्वतःच्या मस्तकावरून आदरपूर्वक वाहून आणला आणि बेलूर-मठात त्यांची उत्सवपूर्वक प्रतिष्ठापना केली.

या घटनेने स्वामीजींच्या दिव्य स्वप्नांच्या परिपूर्तीची पाया-भरणी झाली. यानंतर लगेच स्वामीजींनी बेलूर मठाचे विश्वस्त-पत्र सिद्ध केले आणि त्या अन्वये बेलूर मठ हा रामकृष्ण संघाचे प्रधान केंद्र बनला. स्वामी विवेकानंदांनी संघासाठी एक बोध-चिन्ह बनविले आहे. त्या बोधचिन्हातील लाटा हे कर्माचे प्रतीक आहे, कमळ हे भक्तीचे प्रतीक आहे व उगवता सूर्य हे ज्ञानाचे प्रतीक आहे. चित्राभोवती असलेले सापाचे वेटोळे हे योगाचे व जागृत कुंडलिनी शक्तीचे प्रतीक आहे आणि हंस हे परमात्म्याचे प्रतीक आहे. हे बोधचिन्ह असे सुचविते की कर्म, ज्ञान, भक्ती व योग यांच्या समन्वयी साधनेतून परमात्म्याचे दर्शन घडते. त्यापुढच्या काळात रामकृष्ण संघाच्या उद्दिष्ट-पूर्तीची मठ आणि मिशन अशी दोन अंगे बनली—

(१) मठ—श्रीरामकृष्णांच्या दिव्य जीवनातून प्रेरणा घेऊन, पावित्र्य आणि वैराग्य यांनी युक्त असे आध्यात्मिक जीवन व्यतीत करणाऱ्या साधूंचा संघ अस्तित्वात आणणे आणि त्या संन्यासी साधूंपैकी काहींना शिक्षकाच्या किंवा कार्यकर्त्याच्या भूमिकेने सिद्ध करून जगाच्या कोणत्याही भागात सेवाकार्यास पाठविणे, ही झाली रामकृष्ण मठाच्या कार्याची दिशा.

(२) मिशन—सर्वसाधारण कार्यकर्त्यांचा सहकार साधून त्यांच्या करवी जाती, वर्ण, पंथ आणि देश यांचा भेद न मानता, सर्व मानवांना ईश्वराची रूपे मानून त्यांच्या सेवेची कामे करणे, ही झाली रामकृष्ण मिशनच्या कार्याची दिशा.

आरंभी मिशनच्या सर्व कार्याचा भार बेलूर मठाच्या संन्यासी विश्वस्तांकडेच होता; परंतु मिशनच्या कार्याचा व्याप वाढल्या-वर मिशनचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व आवश्यक वाटल्यामुळे १९०९ मध्ये रामकृष्ण मिशनला सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्टा-नुसार कायदेशीर स्वरूप देण्यात आले. मठ आणि मिशन या त्यांच्या दोन विभिन्न संस्था असल्या, तरी त्या मूलतः एकच आहेत. त्यांच्या ध्येयपूर्तीच्या विषयात सुसूत्रता व एक-वाक्यता आहे. कार्यसुकरतेसाठी केलेली ती एक स्थूल विभागणी आहे, एवढेच. बेलूर मठाच्या विश्वस्तमंडळातूनच मिशनचे नियामक मंडळ बनते. मठातील संन्यासी आणि ब्रह्मचारीच मिशनचे कार्यकर्ते असतात. मठाचे आणि मिशनचे प्रधान केंद्र बेलूरमठच आहे.

दि. ४ जुलै १९०२ या दिवशी स्वामी विवेकानंद बेलूरमठात समाधिस्थ झाले. त्यांच्यानंतर ब्रह्मानंदस्वामी, स्वामी शिवानंद, स्वामी अखंडानंद इ. संन्यासी रामकृष्ण संघाचे अध्यक्ष झा[ले] व त्यांनी विवेकानंदांच्या उदात्त उद्देशांना अनुसरून जनसे[वेचे] काम सुरू केले.

रामकृष्ण संघाचे बोधचिन्ह

रामकृष्ण संघाची अनेक मठकेंद्रे आणि मिशनकेंद्रे भार[तात] व भारताबाहेरही अनेक देशांत काम करीत आहेत. भूकंप, [म]-पूर, दुष्काळ, अतिवृष्टी, सांसर्गिक रोगांच्या साथी, इ. [अनेक] आपत्प्रसंगी रामकृष्ण संघाचे कार्यकर्ते मोठ्या उत्साहा[ने] दक्षतेने लोकांच्या साहाय्यास धावून जातात आणि त्यांना [दुःख]-मुक्त करतात, असा जगभरच्या लोकांचा अनुभव आहे. [या] शिवाय, अनेक ठिकाणी स्थायी स्वरूपाची औषधालये, [रुग्णालये], प्रशाला, महाविद्यालये, अनाथालये व वसतिगृहे चालवून [राम]-कृष्ण संघ लोकसेवा करीत आहे.

स्वामी विवेकानंदांच्या प्रेरणेमुळे अमेरिकेत जी अनेक वे[दांत]-मंडळे स्थापन झाली, त्या सर्वांना मार्गदर्शन करण्यासाठी [राम]-कृष्ण परमहंसांचे चार साक्षात शिष्य अमेरिकेत जाऊन [राहिले] होते. स्वामी शारदानंद, स्वामी अभेदानंद, स्वामी तुरी[यानंद] आणि स्वामी त्रिगुणातीतानंद ही त्यांची नावे होत. [या] चौघांच्या मार्गदर्शनामुळे अमेरिकेतील रामकृष्ण संघ बहु[विध] लोकसेवा करू शकला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भारत आणि ब्रह्मदेश येथील बहुतेक मठ आणि मिशने यांच्या केंद्रांतून लोकांना वैद्यकीय साहाय्य दिले जाते. अशा प्रकारच्या सेवाकार्यांत जाती, वर्ण, पंथ आणि देश यांपैकी कसलाही भेद-भाव पाळला जात नाही.

स्त्रीशिक्षणाच्या आणि स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धाराच्या विषयात रामकृष्ण संघाने केलेले कार्य असेच बहुमोल व बहुविध स्वरूपाचे आहे. सुमारे सहा-सात हजार विद्यार्थिनी रामकृष्ण संघाच्या विविध शिक्षणसंस्थांतून शिकत आहेत. कलकत्त्याच्या बागबाजारात भगिनी निवेदिता यांनी स्थापन केलेली आणि पुढे त्यांच्याच नावाने प्रसिद्धीस आलेली 'रामकृष्ण मिशन निवेदिता कन्याशाळा' ही एक आदर्श शिक्षणसंस्था समजली जाते. या शाळेशी संलग्न असलेल्या 'शारदा-मंदिरात' व्रतस्थ ब्रह्मचारिणींच्या निवासाची व शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. या संस्थेत प्रथम स्त्री-शिक्षणाचे बीजारोपण झाले आणि पुढे भारतात रामकृष्ण संघाने असंख्य स्त्री-शिक्षणसंस्था उभारल्या. इ. स. १९५४ साली शारदामाता यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने दक्षिणेश्वराच्या कालीमंदिराजवळ गंगेच्या किनारी शारदा-मठाची स्थापना झाली. हा शारदामठ म्हणजे स्त्रियांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रव्राजिका स्त्रियांनी चालविलेला एक आश्रम आहे. कलकत्त्यातील शिशुमंगलप्रतिष्ठान आणि मातृभवन, जलपैगुडी येथील सूतिकासेवामंदिर, काशी आणि रंगून येथील इस्पितळातील स्त्री-विभाग, काशीचे अपंग स्त्रियांसाठी असलेले निवासगृह, मद्रासचे शारदाविद्यालय, त्रिचूरचे मातृमंदिर, चोवीस परगण्यातील सारिशा येथील शारदा-मंदिर, इ. स्त्रियांच्या उन्नतीसाठी चालविलेल्या संस्था म्हणजे रामकृष्ण संघाच्या स्त्रीविषयक कार्याची आदर्श प्रतीके होत.

ग्रामीण जनता, आदिवासी, हरिजन आणि गिरिजन, कारखान्यांतील मजूर यांच्याही सेवा-शिक्षणाची कामे रामकृष्ण संघाकडून सातत्याने चालू आहेत.

जनजागरणासाठी रामकृष्ण, शारदामाता, विवेकानंद, निवेदिता यांची चरित्रे आणि उपदेश, तसेच रामकृष्णांच्या परंपरेतील सत्पुरुषांची व जगातील थोर धर्मसंस्थापक, साधू आणि संत यांची चरित्रे व उपदेश याविषयीची हजारो पुस्तके वेदान्ताचे मूलसूत्र यत्किंचित ढळू न देता मिशनमार्फत प्रसृत केली जातात. उपनिषदे आणि अन्य अनेक संस्कृत वेदान्तग्रंथ यांच्या सार्थ व सटीप आवृत्त्या प्रकाशित केल्या जातात. 'प्रबुद्ध भारत' हे हिमालयातील मायावती आश्रमातून आणि 'वेदान्त-केसरी' हे रामकृष्णमठ मयलापूर, मद्रास येथून, अशी दोन इंग्रजी नियतकालिके रामकृष्ण संघाकडून प्रसिद्ध होतात.

श्रीरामकृष्ण संघात ज्यांना आश्रमवासी घटक म्हणून प्रवेश मिळवायचा असेल, त्यांच्यासाठी पुढील नियम करण्यात आले आहेत— (१) आश्रमवासी घटकाचे वय १८ ते ३० च्या दरम्यान असले पाहिजे. (२) रामकृष्ण व विवेकानंद यांच्या वचनांवर त्याची नितान्त निष्ठा असली पाहिजे. (३) कनक आणि कामिनी यांच्या मोहापासून दूर राहून परमात्म्याच्या साक्षात्कारासाठी आणि शिवभावाने जीवसेवा करण्यासाठी आपले जीवन समर्पिण्याची त्याची सिद्धता असली पाहिजे. (४) त्याचे शिक्षण कमीत कमी माध्यमिक शालान्त परीक्षेइतके झालेले असले पाहिजे. (५) त्याचे शारीरिक आरोग्य उत्तम असले पाहिजे व (६) त्याच्यावर कोणत्याही कौटुंबिक जबाबदाऱ्या असता कामा नयेत.

आठ वर्षे सतत साधना केल्यानंतर त्या साधकाला संन्यास-दीक्षा दिली जाते आणि मगच तो श्रीरामकृष्ण संघाचा पूर्णांशाने घटक बनतो.

भारतातील बंगाल, आसाम, बिहार, ओडिसा, उ. प्रदेश, दिल्ली, पंजाब, महाराष्ट्र, गुजरात, आंध्र, मद्रास, केरळ, म्हैसूर, इ. सर्व राज्यांत व भारताबाहेर बांगलादेश, ब्रह्मदेश, श्रीलंका, सिंगापूर, फिजी बेटे, मॉरिशस, संयुक्त संस्थाने (अमेरिका), अर्जेंटिना (द. अमेरिका), इंग्लंड, स्वित्झर्लंड, इ. ठिकाणी सांप्रत रामकृष्ण संघाच्या शाखा काम करीत आहेत. [श्रीरामकृष्ण संघः उदय आणि विकास – श्री. रा. चिं. ढेरे, १९६३]

रामगीता (१) एक तत्त्वज्ञानपर ग्रंथ. अद्वैत वेदान्ताच्या अनुभवाद्वैत नामक पंथाच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन या ग्रंथात केले आहे. वसिष्ठकृत तत्त्वसारायण ग्रंथाच्या उपासना कांडातील दुसऱ्या अध्यायात ही रामगीता आलेली आहे. हिच्यात अठरा अध्याय व एक हजार श्लोक आहेत.

अयोध्येतील सुंदर अशा उद्यानात बांधलेल्या एका अतिरम्य सभामंडपात दिव्य सिंहासनावर बसून प्रभू रामचंद्र समाधिनिष्ठ झाला. समाधी उतरल्यावर त्याचा एकनिष्ठ सेवक हनुमान याने त्याला संसारदुःखातून मुक्त होण्यासाठी ब्रह्माच्या निर्गुण स्वरूपाची माहिती विचारली व रामचंद्राने ती त्याला सांगितली. अशी या रामगीतेची पूर्वपीठिका आहे.

या ग्रंथात अनुभवाद्वैत पंथाच्या तत्त्वज्ञानाला अनुसरून श्रौत किंवा वैदिक, सांख्य आणि योग यांचा पुरस्कार केलेला आहे. या पंथाच्या अनुयायांना कर्म, भक्ती, ज्ञान आणि योग असे चारही मार्ग सारखेच मान्य आहेत. त्यांचे म्हणणे असे – नुसत्या ज्ञानाने साधकाला पूर्णता येत नाही. जीवन्मुक्त स्थितीच्या अगदी उच्च कोटीला पोचलेल्या ज्ञानयोग्यांनीसुद्धा शरीर आहे तोपर्यंत, वर्णाश्रमधर्माप्रमाणे आचरण सोडता कामा नये. त्यांनी नित्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर्मे केलीच पाहिजेत.

ज्ञानपूर्वक सप्तमाङ्गिक उपास्तियोग हा रामगीतेच्या मताप्रमाणे मोक्षाचे अंतिम साधन आहे. ब्रह्मात्मैक्याचे अनुसंधान करणे, याला शब्दानुविद्ध किंवा सविकल्प समाधी असे नाव रामगीतेत दिलेले आहे. या सविकल्प समाधीचा अभ्यास वाढला म्हणजे ज्योतिर्दर्शन घडते आणि त्या योगाने मायेचे आवरण नाहीसे होऊन दुःखाचा पूर्ण क्षय होतो व साधकाला परिपूर्ण स्वानंद मिळतो. उपास्य वस्तूशी तादात्म्य पावल्यावर जीवाला जीवन्मुक्तावस्था प्राप्त होते. देहाविषयी ज्याची ममत्वबुद्धी सुटली, तो जीवन्मुक्त आणि देहाविषयी ज्याला पूर्ण विस्मृती झाली, तो विदेहमुक्त, असा भेद या गीतेत केला आहे.

गुरू करायचा तो एकशे आठ उपनिषदे जाणणारा व वेदविद्याव्रतस्नात असला पाहिजे, असा रामगीतेचा कटाक्ष आहे.

> वेदविद्याव्रतस्नातदेशिकस्य मुखात् स्वयम् ।
> गृहीत्वाऽष्टोत्तरशतं ये पठन्ति द्विजोत्तमाः ॥
> तेषामादित्यवज्ज्ञानं स्वयमेव प्रकाशते ।
> सदेहा अपि ते सद्यो विदेहा स्युर्न संशयः ॥
>
> (रामगीता २. ४१–४२)

अर्थ – ज्याने वेदाध्ययन व व्रते यांची यथाविधि समाप्ती करून समावर्तन केले आहे, अशा उभयस्नातक श्रोत्रिय गुरूच्या प्रत्यक्ष मुखापासून जे उत्तम द्विज या अष्टोत्तरशत उपनिषदांचा पाठ घेऊन तो चालू ठेवतात, त्यांच्या ठिकाणी आत्मज्ञानाचा, सूर्याप्रमाणे आपोआप प्रकाश होतो आणि मग ते देहात असूनही विदेही होतात, यात संशय नाही.

सदाचारावर रामगीतेचा फार भर आहे. सदाचारी मनुष्याचे कल्याण होईलच होईल, अशी रामगीतेने ग्वाही दिली आहे. ज्ञानी असून पुरुष सद्‌गुणी व सदाचारी नसेल, तर त्याचा जन्म व्यर्थ आहे, असे रामचंद्राने म्हटले आहे. म्हणूनच रामचंद्राने मारुतीला बजावले आहे की, 'ज्ञान प्राप्त झाल्यावर त्याची सिद्धी मिळो वा न मिळो, शुभाचार कोणत्याही कारणासाठी आणि केव्हाही सोडू नको.'

हनुमंताच्या विनंतीवरून, १२ व्या अध्यायात रामचंद्राने आपल्या विश्वरूपाचे वर्णन करायला सुरुवात केली. पण त्या वर्णनाच्या कल्पनेनेच हनुमान मूर्च्छित पडला.

या ग्रंथात शेवटी रामचंद्राने हनुमंताला, गीतामृत प्राशन केल्यामुळे तू चिरंजीव होशील, असा वर दिला आहे. [रामगीतेचे समूल सान्वय मराठी भाषांतर – श्री. म. ह. मोडक व श्री. सी. म. फडके, १९२५]

(२) अध्यात्मरामायणातही एक रामगीता आलेली आहे. या रामगीतेत बासष्ट श्लोक आहेत. मूळ ग्रंथाच्या अनुरोधाने रामगीतेत अध्यात्मविचार चर्चिला आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या जीवो ब्रह्मैव नापरः' = ब्रह्म हे एकच तत्त्व सत्य असून, जग म्हणून दिसणारा दुसरा पदार्थ हा केवळ आभासमय असल्याने मिथ्या होय; जीव हा परब्रह्मापासून भिन्न नसून, तो साक्षात ब्रह्मच आहे, या अद्वैत वेदान्ताच्या सिद्धान्ताचे यात विवेचन केले आहे.

लक्ष्मणाने रामचंद्राला मोक्षज्ञानाचा उपदेश करण्याची विनंती केली आणि रामचंद्राने त्याप्रमाणे त्याला थोडक्यात हे ज्ञान सांगितले, अशी या गीतेची पूर्वपीठिका आहे. [श्रीरामगीता – श्री. गो. स. सरदेसाई, १९६६.]

रामचंद्र आचार्य

(इ. स. चे १४ वे शतक) अनेक शास्त्रांतील एक जाणकार आचार्य. याचे वास्तव्य काशीत होते. हा ऋग्वेदी कौंडिण्यगोत्री तेलंगी ब्राह्मण होता. याच्या पित्याचे नाव कृष्ण असे होते. रामचंद्राने गोपाल नावाच्या आपल्या चुलत्याजवळ सर्व शास्त्रांचे अध्ययन केले. त्याने पाणिनीच्या अष्टाध्यायीवर प्रक्रियाकौमुदी नावाचा ग्रंथ रचला आहे, परंतु त्यात अष्टाध्यायीतील सूत्रक्रम मात्र सांभाळलेला नाही. व्याकरणाव्यतिरिक्त याने धर्मशास्त्र, वैष्णवशास्त्र, वेदान्त, ज्योतिष, इ. शास्त्रांवर ग्रंथरचना केली आहे. कालनिर्णयदीपिका हा त्याचा धर्मशास्त्रावरील प्रसिद्ध ग्रंथ असून, तो अनंत उपाध्यायांच्या तिथिनिर्णय या ग्रंथाचे सार आहे. अनंत उपाध्याय हे त्याचे पणजोबा होते. वैष्णवसिद्धान्तसद्दीपिका व कृष्णार्चनप्रक्रिया हे त्याचे अन्य ग्रंथ होत. आचार्य ही रामचंद्राला मिळालेली उपाधी आहे. [का. सा. सा.]

रामचंद्र गोस्वामी

(इ. स. च्या १६ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक बंगाली वैष्णव कवी. याचा जन्म इ. स. १५३८ च्या सुमारास झाला. याने कडचामंजरी, संपुटिका व पाखंडदलन असे तीन ग्रंथ लिहिले आहेत. पाखंडदलन ग्रंथात त्याने श्रीकृष्णाचे सर्वेश्वरत्व, भजनीयत्व, दयालुत्व, तसेच नाम आणि भक्तिमाहात्म्य, इ. विषय वर्णिले आहेत. संपुटिका ही त्याची छोटेखानी रचना आहे. तिच्या चार लहरी आहेत.

याने तीर्थयात्रा केल्या होत्या व काही काळ वृंदावनात वास्तव्य केले होते. तिथून त्याने राधा-कृष्णांची युगलमूर्ती घेऊन गौड देशात प्रयाण केले. [हिं. वं. वै. क.]

रामचंद्रदोलोत्सव

एक व्रत. चैत्र शुद्ध तृतीयेच्या दिवशी प्रभु रामचंद्राची राजोपचारांनी पूजा करतात आणि त्याला दक्षिणाभिमुख झोपाळ्यावर बसवून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k 155M2J.8

देतात. रात्री त्या मूर्तीपुढे जागरण करतात. हे व्रत महिनाभर चालवायचे असतें. फल – सर्वपापनाश. [हि. ध.; व्रतराज]

रामचरण (इ. स. १७१९–१७९८) एक संत व कवी. निर्गुण उपासनेचा व नामजपाचा पुरस्कर्ता. याने रामसनेही संप्रदायाची स्थापना केली. पाहा– रामसनेही संप्रदाय.

रामचरितमानस रामायणावर आधारलेले एक महाकाव्य. हे अवधी भाषेत आहे. गोस्वामी तुलसीदास हा याचा कर्ता होय. हा ग्रंथ रामायण, तुलसीरामायण किंवा चौपाई रामायण या नावांनी प्रसिद्ध आहे; पण याचे खरे नाव रामचरितमानस असे आहे. तुलसीदास स्वत: म्हणतो –

रामचरितमानस यह नामा सुनत स्रवण पाइय विस्रामा।

अर्थ – रामचरितमानस या नावाचे हे काव्य जो ऐकेल, त्याला विश्राम प्राप्त होईल.

कवीने हे काव्य विशेषतः चौपायांमध्ये रचले आहे; पण त्यात अधूनमधून दोहा, सोरठा, हरिगीतिका, त्रिभंगी, तोटक, तोमर, भुजंगप्रयात, नागस्वरूपिणी, इ. छंद आदळतात. कवी कित्येक चौपायांच्या नंतर स्वतःच्या आवडीला अनुसरून एखादा दोहा किंवा एखादा सोरठा घालतो. या मानसरूपी सरोवराला सात सोपान अर्थात सात कांडे आहेत, असे कवीने सांगितले आहे. प्रत्येक कांडाच्या प्रारंभी संस्कृत श्लोक घातले आहेत. उत्तरकांडाच्या अंतीही दोन संस्कृत श्लोक आहेत. काही कांडांच्या मध्यभागी संस्कृत स्तोत्रे आहेत. कांडांचा अनुक्रम वाल्मीकीला अनुसरूनच आहे. फक्त युद्धकांडाला तेवढे लंकाकांड म्हटले आहे.

कृष्ण-रुक्मिणीप्रमाणेच राम-सीतेचे स्वयंवर लिहावे, एवढीच कवीची सुरुवातीची कल्पना असावी. म्हणून रुक्मिणी-मंगलाच्या अनुकरणाने त्याने राम व सीता यांचे मिथिलेच्या एका पुष्पवाटिकेत परस्परांना दर्शन घडविले व त्यांच्या मनांत परस्पर अनुराग निर्माण केला. श्रीकृष्णाने ज्याप्रमाणे शिशुपालादिकांचे मर्दन करून रुक्मिणीशी लग्न केले, त्याप्रमाणे रामाने धनुर्भंग करून व दुष्ट राजांचे निर्दालन करून सीतेशी लग्न केले. हे काव्य केल्यानंतर मग त्याला समस्त रामायण रचण्याची स्फूर्ती झाली आणि त्याने ते कार्य अंगीकारले व पूर्णही केले.

आपण कोणता हेतू मनात धरून हे काव्य लिहिण्यास प्रवृत्त झालो, याविषयी कवी सांगतो, ते असे –

स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा –
भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति।

अर्थ – आपल्या अंतःकरणाला आनंद व्हावा म्हणून श्रीरघुनाथाची अत्यंत सुंदर कथा देशी भाषेत ग्रथित करून तुलसीदास लिहीत आहे.

भाषानिबंध म्हणजे देशी भाषेत ग्रंथरचना होय. कवीने स्वान्तःसुखाय हा त्या रचनेचा हेतू सांगितला हे खरे; पण तेवढाच एक मर्यादित हेतू धरून कवीने एवढा प्रचंड उद्योग केला, असे म्हणवत नाही. त्याचा उद्देश त्याहून अधिक व्यापक होता, अधिक खोल होता.

तुलसीदासाच्या काळी हिंदू समाजाची अवस्था अत्यंत शोचनीय झाली होती. तो समाज आदर्शहीन व उद्देशभ्रष्ट बनला होता. त्या काळी धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रांत अराजक निर्माण झाले होते. अनेक दुष्ट रूढींनी हिंदू समाजाला ग्रासून टाकले होते. उदात्त भावना, उच्च आदर्श, तसेच शौर्य व पराक्रम या गोष्टी हिंदू समाजातून अस्तंगत झाल्या होत्या. त्याच काळात मुसलमानांनी भारतावर आपल्या सत्तेचे पाश आवळले होते. हिंदू नावाची चीज भारतात शिल्लक राहू नये आणि सारा भारत इस्लाममय व्हावा अशी मुसलमान सत्ताधीशांची महत्त्वाकांक्षा होती. तसे त्यांचे प्रयत्नही सुरू होते. त्याचबरोबर हिंदूंमधल्या निर्गुणिया संतांनी उलटे सुलटे उपदेश करून हिंदूंच्या मनांत भ्रम निर्माण केला होता. रामानुजांनी लक्ष्मी-नारायणांची उपासना सुरू करून उत्तर भारतात तिचा प्रचारही चालवला होता. त्यामुळे लोकांच्या मनांत काही भक्तिभाव निर्माण झाला होता खरा; पण त्यामुळे सामाजिक जीवन प्रभावित झाले नव्हते. त्यातूनच राधा-कृष्णांची शृंगारप्रधान उपासना पुढे आली आणि लोकांच्या भक्तिभावनेला अनिष्ट असे वळण लागले. त्या काळी अनेक कृष्णकवी निर्माण झाले, पण त्यांनी कृष्णाचे राधारमण हेच रूप आळवले. कृष्णाचे लोकमंगल, लोकसंग्राहक आणि दुष्टदुर्जननिर्दालक हे स्वरूप त्यांनी लोकांपुढे उपस्थित केलेच नाही. त्यामुळे लोकमानसासमोर जीवनाचा एखादा आदर्श उभाच राहिला नाही.

तुलसीदासाने मात्र तसा भव्योदात्त आदर्श मर्यादापुरुषोत्तम रामाचे चरित्र रसाळ भाषेत वर्णून लोकांच्या पुढे तेजःपुंज स्वरूपात उभा केला. याचा अर्थ, तुलसीदासाचा उद्देश केवळ स्वान्तःसुखाय नव्हता; तर सर्वान्तःसुखाय होता, असे म्हटले पाहिजे. कवीने सर्व समाजाच्या सुकृताची, सुखाची आणि समृद्धीची चिंता वाहिली, हे त्याच्या पुढील पंक्तींवरून कळून येईल –

अद्‌भुत सलिल सुनत गुनकारी। आस पिआस मनोमल-हारी॥
राम सुप्रेमहि पोषत पानी। हरत सकल कलि-कलुष गलानी॥
भवश्रम सोषक तोषक तोषा। समन दुरित दुख दारिद दोषा॥
काम कोह मद मोह नसावन। विमल विवेक बिराग बढावन॥
सादर मज्जन पान किए तें। मिटहिं पाप परिताप हिए तें॥

भावार्थ – हे अद्‌भुत आख्यान ऐकणाऱ्याला गुणकारी आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राम हा आशा-तृष्णा आणि मनोमल नष्ट करतो, सर्व कलिक-ल्मष दूर करतो, भवश्रम सुकवितो, आनंद तुष्टवितो व दुरित-दुःख-दारिद्र्य नष्ट करतो. हे रामचरितमानस काम-क्रोध-मद-मोह-मत्सर यांचा नाश करते. निर्मल विवेक-वैराग्य वाढवते. या मानसात मज्जन केल्याने व त्याचे पान केल्याने हृदयातले ताप आणि परिताप मिटून जातात.

वाल्मीकीचे रामायण हाच वस्तुतः कवीचा मूल आधार आहे. पण लसीदासाने केवळ वाल्मीकीचेच अनुकरण केले नाही. त्याने प्रारंभीच 'नानापुराणनिगमागमसंमत' असे म्हणून स्पष्ट केले आहे, की मी रामकथा नाना पुराणे आणि निगमागम यांतून जशी उचित वाटली तशी स्वीकारली आहे. त्यामुळेच मानसाची रामकथा वाल्मीकीच्या रामकथेहून भिन्न झाली आहे.

रामचरित मानसावर वाल्मीकीपेक्षाही अध्यात्मरामायणाचा विशेष प्रभाव आहे. ते रामायण उमा-महेशांच्या संभाषणातून आकाराला आले आहे. तुलसीदासाने अध्यात्मरामायणाचीच संवादपद्धती स्वीकारली आहे. मात्र हा संवाद तीन वक्ते आणि तीन श्रोते यांच्या मधला आहे. रामकथा ही शिवाने उमा व भुशुंडी यांना सांगितली. भुशुंडीने गरुडाला सांगितली आणि याज्ञवल्क्याने भरद्वाजाला सांगितली. मात्र अनेक ठिकाणी तुल-सीदासाने अध्यात्मरामायणाशी मतभिन्नताही दर्शविली आहे. स्वीकारलेली कथावस्तू कलापूर्ण रीतीने परिवर्धित करून व प्रसंगी तिच्यात फरक करून कवीने काव्याचा जो उत्कर्ष साधला आहे, तसा तो अध्यात्मरामायणात झालेला नाही.

महाभारत व इतर अनेक पुराणे यांत जिथे जिथे रामकथा आढळली, तिथून तिथून काही अंश तुलसीदासाने उचलला आहे. रघुवंश, प्रसन्नराघव व हनुमन्नाटक यांतूनही बरीच सामग्री तुलसीदासाने मिळवली आहे.

तुलसीदासाने ब्रह्मा-विष्णू-महेशांहूनही रामाला उंच चढवले आहे. तुलसीदासाला इतिहास, भक्ती, आणि प्रेरणा यांचा समन्वय साधायचा होता. त्याला इतिहास, पुराण, नीती आणि धर्म यांचा समावेश असलेला ग्रंथ निर्माण करायचा होता.

तुलसीदास हा केवळ भक्त नाही; केवळ इतिहासकथकही नाही. तो या दोहोंहूनही श्रेष्ठ असा महाकवी आहे. त्याने राम-कथेला आपल्या प्रतिभेने अधिक उंच केले, नवरसांनी समृद्ध केले, गुणांनी शोभविले आणि अलंकारांनी नटविले. या सर्व गोष्टींचा आश्रय करून त्याने आपले महाकाव्य रसिकहृदया-स्वाद्य केले. वर्ण्य विषयाचा बोध सुलभतेने व्हावा, म्हणून तो जीवनात हरघडी आढळणारी उपमाने व प्रतीके वापरतो. याचे एक उदाहरण असे –

नगर ब्यापी गई बात सुतीछी।
छुअत चढ़ी जनु सब तन बीछी॥

भावार्थ – विंचवाचे विष जसे शरीरात पसरावे आ[णि] त्याने वेदना द्याव्या, त्याप्रमाणे रामाच्या वनगमनाची [वार्ता] अयोध्येत फैलावली आणि नगरवासी जनांना पीडा देती झा[ली]

तुलसीदासाने आपल्या काव्यात कित्येक ठिकाणी सां[ग] परंपरित अशी मनोज्ञ रूपके केली आहेत. लाला भगवानदि[न] त्याला रूपकांचा बादशहाच मानतात. तुलसीदासाने आप[ल्या] रामचरितमानसावरही रूपक केले आहे, ते असे –

पाठकहो, या मनोरम मानससरोवराची शोभा तर [प]एकदा ! याला सात कांडांचे सात घाट बांधले आहेत. ते स[रो]वराच्या उभय तीरांवर विराजमान आहेत. विभिन्न काव्य[प्र]रूपी मासे यात चमकत आहेत. जप-तपादी जलचर कल्लो[ळ] करीत आहेत. संतसभा ही या सरोवराला घेरून राहिले[ली] वाटिका आहे. तिच्यात श्रद्धारूपी वसंत सदा बहरलेला [आहे] दया-क्षमारूपी वृक्ष-लता या वाटिकेची शोभा वाढवीत आहे यम-नियम ही त्या वाटिकेतील फुले आहेत. ज्ञान त्यांचे [फळ] आहे आणि हरिचरणरती हा त्या फुलांतला मकरंद आहे.

तुलसीदासाच्या उत्प्रेक्षाही तितक्याच सुंदर असतात. उदा[हरणार्थ]

लता-भवन तें प्रगट भे, तेहि अवसर दोउ भाय।
निकसे जनु जुग बिमल बिधु, जलद-पटल बिलगाय॥

भावार्थ – जेव्हा सीता आपल्या सख्यांसह उपवनात पार्वती-पूजेसाठी पोचली, त्याच वेळी राम-लक्ष्मण लता-कुंजा[तून] लोंबत्या वेली बाजूला सारून अशा प्रकारे सीतेपुढे प्रकट [झाले] की जणू मेघाचा पडदा फाडून एकाच्या वदली दोन कां[ति]चंद्र खुलून प्रकट व्हावे.

तुलसीदासाचे रसनिर्माणसामर्थ्यही लक्षणीय आहे. शृंगार रसराज कवीने कुठेही औचित्यभंग न होऊ देता किंवा मर्या[दा] उल्लंघता आळविला आहे. राम-सीतेची पहिली भेट ही शृंगार[रसाची] निर्झरणीच होय. त्या भेटीच्या वेळी सीतेची काय अवस्था झा[ली] तिचे वर्णन कवीने पुढीलप्रमाणे केले आहे –

लता ओट तब सखिन लखाए। स्यामल गौर किसोर सुहा[ए]
देखि रूप लोचन ललचाने। हरषे जनु निज निधि पहिचाने
थके नयन रघुबर छबि देखें। पलकन्हिहूँ परिहरी निमेषें।
अधिक सनेह देह भइ भोरी। सरद ससिहि जनु चितव चकोरी
लोचनमग रामहि उर आनी। दीन्हे पलक कपाट सयानी
(बाल. …)

अर्थ – इतक्यात सीतेच्या सखीने लतेच्या आड असलेल्[या] श्यामगौर सुंदर किशोरांकडे खुणेने संकेत केला. ते रूप पा[हून] सीतेचे डोळे तिथे लोभावले. जणू काही आपला हर[वलेला] खजिनाच सापडावा एवढा त्या दोघींना परमानंद [झाला]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रघुपतीचे ते दिव्य लावण्य पाहून डोळे थक्क झाले व पापण्यांनी आपली उघडझाप बंद केली. हृदयातून स्नेहाचा पाझर उसळू लागला व देहभान हरपू लागले. शरद ऋतूतील चंद्राकडे टक लावून पाहणारी जणू ती एक चकोरीच आहे, असे वाटले. शेवटी नयनांच्या मार्गाने, रामाला हृदयात स्थिर करून शहाण्या सीतेने ते रूप बाहेर पडू नये म्हणून पापण्यांची दारे घट्ट लावून घेतली.

वीररसाचेही वर्णन अनेक स्थळी आले आहे. शिवधनुष्य उचलण्याच्या बाबतीत जनकाने रामाला उद्देशून अपमानास्पद वाटावे, असे काही शब्द उच्चारले. ते ऐकून लक्ष्मणाला क्रोध उत्पन्न झाला. तो खवळून म्हणाला –

सुनहु भानुकुल पंकजभानू । कहौं सुभाय न कछु अभिमानू ॥
जौं राउर अनुशासन पाऊँ । कंदुक इव ब्रह्मांड उठाऊँ ॥
काँचे घट जिमि डारौं फोरी । सकौं मेरु मूलक इव तोरी ।
तव प्रतापमहिमा भगवाना । का बापुरो पिनाक पुराना ।

(बाल. २५३)

अर्थ – हे भानुकुल पंकजभानू ! मी अभिमानाने मुळीच बोलत नाही. हा कुलस्वभाव मला बोलायला भाग पाडीत आहे. तुम्ही जर मला आज्ञा दिली, तर सर्व ब्रह्मांड चेंडूसारखे मी उचलीन किंवा एखाद्या कच्च्या मडक्याप्रमाणे ते फोडूनही टाकीन. मेरुपर्वत मुळ्यासारखा मोडून टाकीन. हे भगवन् ! आपल्या प्रतापाच्या महिम्याने मी हे करू शकतो. मग या बिचाऱ्या जीर्ण धनुष्याची काय कथा !

तुलसीदासाची व्यक्तिचित्रणे उदात्त आहेत, तशीच सहानुभूतिपूर्ण आहेत. सामान्यत: रामायणातील ज्या पात्रांची लोक निंदा करतात, त्यांच्या बाबतीतही तुलसीदासाने सहानुभूती दाखवली आहे. रामाला वनवासाला धाडण्याचा दोष कैकेयी आणि तिची कुब्जा दासी मंथरा यांच्या माथी लादला जातो; पण तुलसीदास म्हणतो, की मंथरेची बुद्धी सरस्वतीने बिघडवली आणि देवाने आपल्या काजासाठी तिला निंदास्पद बनवले. कैकेयी तर दुष्टपणाची मूर्ती समजली जाते; पण जेव्हा रामभेटीसाठी ती अन्य सवतींबरोबर चित्रकूटावर पाय ठेवते, तेव्हा ती जणू पश्चात्तापाची प्रतिमाच बनते. तुलसीदास म्हणतो–

प्रथम राम भेंटी कैकेयी । सरल सुभायँ भगति मति भेयी ॥
पग परि कीन्ह प्रबोध बहोरी । काल-करम-बिधि-सिर धर खोरी ॥

(अयोध्या. २४४)

अर्थ – सर्व मातांच्या अगोदर राम कैकेयीला भेटला व आपल्या अंत:करणातील शुद्ध भक्तीच्या भावनेने व सरळ स्वभावाने त्याने तिची दुष्ट बुद्धी पश्चात्तापाने अगदी भिजवून चिंब केली. त्याने तिच्या पायांवर आपले मस्तक ठेवले व सर्व दोष प्रतिकूल काल, विधी आणि कर्म यांच्या माथी मारून तिचे सांत्वन केले.

तुलसीदासांच्या मते रावण तर रामाचा विरोधी भक्तच आहे. त्याने सीतेचे अपहरण केले, ते काही तिच्या सौंदर्यावर भुलून किंवा मनात विषयवासना धरून मुळीच नव्हे. त्याला रामाच्या हातून मृत्यू मिळवून हा भवसागर तरून जायचा होता. वैर केल्यावाचून रामाच्या हस्ते आपल्याला मरण येणार नाही, हे जाणूनच त्याने हा वाकडा मार्ग अवलंबिला. तो म्हणतो–

खर-दूषन मोहि सम बलवंता । तिन्हहिं को मारइ बिनु भगवंता ॥
सुर-रंजन भंजन महिभारा । जौं भगवंत लीन्ह अवतारा ॥
तौ मैं जाइ बैरु हठि करऊँ । प्रभु-सर प्रान तजें भव तरऊँ ॥

(अरण्य. २२)

अर्थ – खर-दूषण हे माझ्यासारखेच बलवान होते. मग त्यांना भगवंताशिवाय दुसरा कोण मारणार ? देवांचे दु:ख नाहीसे करून भूमीचा भार हलका करणाऱ्या भगवंताने जर अवतार घेतला असेल, तर मी त्याच्याकडे स्वत: जाऊन हट्टाने वैर करीन. मग प्रभू आपल्या बाणांनी मला ठार करील. साहजिकच अशा प्रकारे प्राण सोडल्याने मी भवसागरातून तरून जाईन.

रामाच्या सर्व भावांत भरताची रामभक्ती तुलसीदासाने श्रेष्ठ मानली आहे. श्री. सीताराम चतुर्वेदी म्हणतात, की भरताच्या चरित्रचित्रणात तुलसीदासाने जे असामान्य भावकौशल्य दाखवले आहे, ते जगातल्या सर्व काव्यांत अद्वितीय आहे. सारे अयोध्याकांड म्हणजे भरताच्या उज्ज्वल चरित्राची मूर्तिमती गाथा आहे. चित्रकूटावर भरताच्या येण्याविषयी लक्ष्मण संशय व रोष प्रकट करतो, तेव्हा राम त्याला म्हणतो–

सुनहु लखन भल भरत सरीसा ।
बिधि-प्रपंच महँ सुना न दीसा ॥

अर्थ – हे लक्ष्मणा, भरतासारखा भला माणूस नाही. या जगात त्याच्यासारखा सज्जन मी तरी कुठे बघितला नाही अथवा नुसता ऐकलाही नाही.

सीतेचे चरित्र हे कवींच्या प्रतिभेलाही अगम्य आहे. तुलसीदासानेही तसेच मानले आहे. तो तिचे जगदंबा म्हणून स्मरण करताना म्हणतो–

जगदंबा जगजननि जानकी । अतिसय प्रिय करुणानिधानकी ॥
ताके जुगपद कमल मनावौं । जासु कृपा निरमल मति पावौं ॥

भावार्थ – जानकी ही साक्षात् जगदंबा भवानी आहे. करुणेचे निधान अशा परमात्म्याला ती अतिशय प्रिय आहे. तिची पावले जणू कमळेच आहेत. तिच्या कृपेमुळेच मला निर्मळ बुद्धी मिळाली आहे.

तुलसीदासाने वाल्मीकिरामायणात वर्णिलेले रामकृत सीतात्यागाचे कथानक गाळले आहे. रामचरित्र वाचताना ' काकांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पिक व्हावे आणि बकांनी हंस व्हावे' अशी त्याची अपेक्षा होती. काव्याच्या अखेरीस अत्यंत करुण असा सीतात्यागाचा प्रसंग आळवून त्या रसातच कथानकाची इतिश्री करावी, हे तुलसीदासाला मानवले नाही. वाल्मीकीचे काव्य हे करुण काव्य आहे. वाल्मीकीच्या काळापर्यंत 'मधुरेण समापयेत्' (=कोणतेही काव्य माधुर्यरसातच समाप्त केले जावे), हा काव्यशास्त्रज्ञांचा संकेत निर्माण झाला नव्हता. तुलसीदासाच्या काळात तो संकेत मान्य झालेला असल्यामुळे, तुलसीदासाने रामराज्याचे वर्णन करून व पुढचा त्यागप्रसंग वगळून ग्रंथ समाप्त केला आहे.

थोडचाच कालात तुलसीच्या या रामचरितमानसाचा उत्तर भारतात खूप प्रसार झाला. घरोघरी त्याचे पाठ होऊ लागले. तुलसीदास हा श्रेष्ठ रामभक्त होता. भक्तीचे माहात्म्य विशद करताना तो म्हणतो–

जिन्ह हरि भगति हृदय नहिं आनी।
जीवत सव समान तेइ प्रानी।

अर्थ – ज्यांच्या हृदयात हरिभक्तीने प्रवेश केला नाही, ते प्राणी शवासमान होत.

त्याने आपल्या काव्यात भक्तिरसच आळवला आहे. त्यामुळे रामभक्तांना हा ग्रंथ प्रिय आणि आदरणीय ठरला. त्यातल्या काव्यगुणांनी रसिकजनांच्या चित्ताला मोहिनी घातली. सारा उत्तर भारत याच ग्रंथामुळे राममय बनला. रामचरितमानस हे गेय काव्य असल्यामुळे अनेक गायकांनी रामायणमंडळचा स्थापन केल्या. त्या मंडळचा गावोगाव हिंडून विविध समाजोत्सवांत मानसाचे गायन करून लोकांना श्रवणसुख देऊ लागल्या.

रामचरितमानसाची भाषा अवधी आहे. त्या काळापर्यंत अवधीमध्ये ज्या कवींनी कथाकाव्ये रचली, ते सर्व कवी एक ईश्वरदास वगळता सूफी मुसलमान होते. त्यांनी आपल्या मतप्रचारासाठी आपले काव्यग्रंथ निर्माण केले होते. त्यांना केवळ अशिक्षित लोकांत मतप्रचार करायचा असल्यामुळे त्यांनी बोलचालीची भाषा निवडली. त्यांनी भाषेच्या शुद्धीकडे मुळीच लक्ष दिले नाही. तुलसीदासाने मात्र भाषाशुद्धीचेही ध्यान ठेवले. रामचरितमानसात विशेषत्वाने संस्कृताप्रमाणे त्याने कोमलकांत पदावलीचे प्रयोग केले आहेत. काही स्थळे मात्र अशी आहेत, की त्यांतली भाषा सरळ, सुबोध आणि लोकांच्या बोलचालीची आहे. तुलसीदासाने विषयानुरूप भाषेचा प्रयोग केल्यामुळे, हा ग्रंथ अत्यंत सुंदर व मनोहर बनला आहे.

तुलसीदासाच्या काळापासूनच रामचरितमानसाचे नाट्यरूपात प्रयोग होऊ लागले. आजही रामलीलेच्या उत्सवातली सर्व पात्रे तुलसीदासाचेच संवाद बोलतात. नटवर्गाला आजही त्यात फरक करण्याची आवश्यकता वाटत नाही. असे असूनही रामलीलेच्या रंजकतेत कमीपणा आलेला नाही.

तुलसीदासाने सर्व प्राणिमात्रांसाठी, सर्वांचे श्रेष्ठ सुख लक्षात घेऊन, रामकथेची रचना केली. श्रद्धा आणि भक्ती उरात वाळगून त्याने रामकथा गायिली. तिच्यात त्याने भक्तीचे प्रतिपादन केले, कर्मयोगाचे शिक्षण दिले; समाजाचे चित्त विचलित करून भलत्या मार्गाने नेणाऱ्या मतांचे आणि पंथांचे खंडन केले; सज्जनांचे स्वरूप विशद केले आणि दुर्जनांचे स्वरूप उघडे केले. माणसाचा आचार कसा असावा, माणसा-माणसांमधले संबंध कसे असावे, लहानांनी मोठ्यांशी आणि मोठ्यांनी लहानांशी कसे वागावे, समाज व्यवस्था व राज्यव्यवस्था कशी असावी आणि मनुष्याचे श्रेय आणि प्रेय कोणते, या सर्व गोष्टींचे त्याने जागोजाग दिग्दर्शन केले आहे. धर्म कोणता आणि अधर्म कोणता, हे त्याने अवघ्या दोन पंक्तींत सांगितले आहे–

परहित सरिस धरम नहिं भाई।
पर पीडा सम नहिं अधमाई ॥

अर्थ – दुसऱ्याचे कल्याण करणे यासारखा धर्म नाही आणि दुसऱ्याला पीडा देणे यासारखा अधर्म नाही.

तुलसीदासाने अवधपुरीत या ग्रंथाचा प्रारंभ रामनवमीच्या दिवशी केला; पण त्याची समाप्ती कुठे झाली, हे मात्र त्याने सांगितले नाही. लोक अनुमान करतात, की त्याने आरण्यकांडापर्यंतचा ग्रंथ अयोध्येत लिहिला आणि बाकीचा काशीमध्ये लिहून पुरा केला. पाहा – तुलसीदास. [गोस्वामी तुलसीदास – (१) आचार्य सीताराम चतुर्वेदी, १९५६ व (२) श्री. शिवनंदन सहाय, १९६१]

राम जोशी

(इ. स. १७५८ – १८१३) पेशवाईतील एक विख्यात शाहीर व कीर्तनकार. राम जोशी हे मूळचा सोलापूरचा असल्यामुळे, त्याला सोलापूरकर राम जोशी असेही म्हणत. त्याचे मूळ आडनाव तासे असे होते; परंतु त्याच्या घराण्याची वृत्ती जोसपणाची असल्यामुळे कालांतराने तासे हे आडनाव लुप्त होऊन जोशी हेच आडनाव कायम झाले.

याचे संपूर्ण नाव रामचंद्र जगन्नाथ जोशी. राम जोश्याचा बाप जगन्नाथ व चुलता अनंत हे दोघेही वेदशास्त्रसंपन्न होते व समाजात त्यांना चांगली मानमान्यता होती. राम जोश्याचा थोरला भाऊ मुद्गलभट हा कथा-कीर्तन करी व पुराणही सांगे. त्याचे प्रमाणे तो आपली परंपराप्राप्त भिक्षुकीही चालवी. वडील वारल्यावर धाकट्या भावाचा सांभाळ करणे त्याच्याकडेच आले. तो व्युत्पन्न कवीही होता. त्याच्या मराठी स्फुट सुभाषितांचा संग्रह व रघुवंशाच्या धर्तीवर रचलेले यदुवंश नामक १९ सर्गांचे एक महाकाव्य आजही उपलब्ध आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राम जोश्यानेही आपल्याप्रमाणेच कीर्तन-प्रवचन करावे, भिक्षुकी चालवावी व आपल्या कुलाची कीर्ती वाढवावी, अशी स्वाभाविकच त्याची इच्छा होती. परंतु राम जोशी हा बालपणापासून हूड व उनाड असल्यामुळे त्याने भावाच्या इच्छेची कदर केली नाही. जात्या तो बुद्धिमान व प्रतिभावान होता खरा. परंतु तमासगिरांच्या संगतीने त्याला वाईट वळण लागले. लवकरच त्याने शाळाही सोडली व आपल्या घरासमोरील धोंडिबा नामक शाहिराकडे तो अष्टौप्रहर बैठक करू लागला. कधी कधी तो त्या मंडळीतच जेवणखाणही करी.

मुद्गलभटाने त्याला शिस्त लावण्याचा प्रयत्न सुरू करताच त्याने त्याच्याशी संबंध तोडून टाकला व तो राजरोस तमाशाच्या फडात सामील झाला.

आरंभी तो धोंडिबा शाहिराला लावण्या रचून देण्याचे काम करी; परंतु पुढे तो स्वतःच तमाशा करू लागला. लवकरच एक नामवंत तमासगीर शाहीर म्हणून त्याचा सर्वत्र लौकिक झाला. त्याला कीर्ती आणि संपत्तीही भरपूर मिळाली; तथापि त्याच्या चैनी आणि व्यसनी वृत्तीमुळे ती त्याला टिकवता आली नाही. शेवटी तो अगदीच कफल्लक बनला व मग पश्चात्ताप पावून पंढरपूर मुक्कामी वे. शा. सं. बाबा पाध्ये यांच्याकडे विद्याध्ययनासाठी राहिला. नंतरची काही वर्षे त्याने तिथे अगदी मन लावून अभ्यास केला व उत्तम कीर्तनकार व पुराणिक म्हणून तो पुनश्च सोलापूरला परतला.

राम जोशी सोलापूरला पुराणिक म्हणून कसा प्रसिद्ध झाला, याविषयी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

सोलापूरच्या एका प्रसिद्ध मंदिरात राम जोश्याचा भाऊ मुद्गलभट महाभारतावर प्रवचन करीत असता एकदा त्याला ताप येऊ लागला. साहजिकच त्यामुळे पुराणात खंड पडला व त्याची मुद्गलभटास खंत वाटू लागली. एवढ्यात त्याच वेळी सोलापुरास परतलेला राम जोशी घरी आला. त्याला पाहताच मुद्गलभटास संताप आला व तो राम जोश्याला 'कुलांगार', 'घरबुडव्या' अशा शब्दांनी दूषणे देऊ लागला. तथापि राम जोशी रागावला नाही. भावाच्या शिव्याशापांवर किंचितही प्रतिवाद न करता तो म्हणाला. 'पोथी कुठे आहे ? मी आज तुमच्याऐवजी पुराण सांगतो.' मुद्गलभटाला राम जोश्याच्या परिवर्तनाची काहीच कल्पना नसल्यामुळे तो ओरडून राम जोश्याला म्हणाला. "डफ वाजविण्यात आणि पुराण सांगण्यात महदंतर आहे." तरीही राम जोश्याने अधिकोत्तर केले नाही. तो शांतपणे पोथी घेऊन देवळात गेला व तिथे त्याने अस्खलित भाषेत रसाळपणे पुराण सांगितले. त्याच्या पुराणकथनावर श्रोते एवढे खूप झाले, की अनेकांनी त्याची स्तुती मुद्गलभटापुढेही केली.

पुढे राम जोश्याने कीर्तनेही करायला सुरुवात केली. बारामतीच्या मुक्कामात बावूजी नाइकांच्या घरी झालेल्या कीर्तनप्रसंगी त्याची कविवर्य मोरोपंतांशी भेट झाली. प्रथम भेटीतच



राम जोशी

मोरोपंतांची त्याच्यावर मर्जी बसली. राम जोश्याच्या कवनांवर मोरोपंत एवढे खूप असत, की त्याला ते पत्रांतून 'कविप्रवर' म्हणून संबोधीत.

पुढील काळात राम जोशी सबंध महाराष्ट्रभर कीर्तने करीत राहिला. पंढरपूरवर्णन, तुळजापूरवर्णन, गिरीच्या व्यंकटेशाचे वर्णन, इ. लावण्या त्याने त्या त्या प्रवासातच रचल्या. राम जोश्याला शेवटी काशीयात्रा करण्याची इच्छा झाली; परंतु त्याच्या उधळ्या वृत्तीमुळे यात्रेसाठी लागणारे धन त्याच्यापाशी नव्हते. म्हणून त्याने दुसऱ्या बाजीरावाकडे धन देण्याबद्दल अर्ज केला. परंतु बाजीरावाने त्या अर्जाला कोणताच प्रतिसाद न दिल्यामुळे व अन्यही काही सोय न झाल्यामुळे त्याची काशीयात्रेची इच्छा अपुरीच राहिली.

राम जोशी हा मुख्यत्वे शृंगारकवी म्हणून प्रसिद्ध आहे. त्याची आध्यात्मिक काव्यरचना ही त्याचा तमाशाचा नाद सुटल्यानंतरची आहे. लावणीवाङ्मयात राम जोशी हा शृंगाराचा सिद्धहस्त कवी आहे. उपमा, उत्प्रेक्षा, तरल कल्पना आणि अनुप्रास या वाङ्मयीन गुणांनी त्याचे लावणीवाङ्मय कोणाचेही मन मोहवून सोडील असे झाले आहे. त्याचा एक नमुना असा—

सुंदरा मनामधि भरली । जरा नाहिं ठरली ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हृवेलित शिरलि । मोत्याचा भांग ।
रे गड्या हौस नाहिं पुरलि । म्हणोनी विरलि ।
पुन्हा नाहिं फिरलि । कुणाची सांग ॥ ध्रु. ॥
जशि कळी सोनचाफ्याची । न पडु पाप्याची ।
दृष्टि, सोप्याची । नसल ती नार ।
अति नाजुक तनु देखणी । गुणाची खणी ।
उभी नवखणीं । चढुन सुकुमार ॥
जशि मन्मथरति धाकटी । सिंहसम कटी ।
उभी एकटी । गळ्यामधि हार ।
अंगि तारुण्याचा बहर । ज्वानिचा कहर ।
मारिते लहर । मदनतल्वार ॥
पायिं पैंजण झुबकेदार । कुणाची नार ।
कोण सरदार । हिचा भरतार ।
कुलविद्याजडावटिकलि । मनामधिं टिकलि ।
नाहिं हटकली । तेज अनिवार ।
नाकामध्ये बुलाख सुरति । चांदणी वरति ।
चमकती परति । हिच्यापुढे फार ।
चालते गजाची चाल । लड सुटली कुरळे बाल ।
किनखाप अंगिचा लाल । हिजपुढे नको धनमाल ।
शोभवी विठोणा गाल । हिला जरि गाल ।
हिला मोगाल । फिटल तरि पांग ।
ही शुद्ध इंदुची कळा । मतिस नाकळा ।
इतर वाकळा । न हिजहुनि चांग ॥

अध्यात्मपर लावणीमध्ये तो भक्ती व ज्ञान यांचा पुरस्कार करताना आढळतो. त्या प्रकारची एक लावणी अशी –

मला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा ।
धरिशि तरि हरिचा सेवक सुधा ॥ ध्रु० ॥
घरावरि गुरु तरावयाला नरा शिरावर हरी ।
जरा तरि समज धरी अंतरी ॥
हटातटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं ।
मठाची उठाठेव कां तरी ॥
मनात अथवा जनात हो कां मनात व्हावे परी ।
हरीचे नाव भवांबुधि तरी ॥
काय गळ्यांत घालुनि तुळशीची लांकडें ।
हीं काय भवाला दुर करतिल माकडें ।
बाहेर मिरविशी आंत हरिसि वांकडे ।
अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा ।
हरिरस सांडुनि घेशी दुधा ॥

राम जोश्याच्या ठायी पांडित्य आणि पाचकळपणा, प्रौढता आणि ग्राम्यता, वैराग्य आणि विलासीपणा अशा परस्पर विरोधी गुणांचा एक मजेदार संगम झाला होता. त्याची रचना संस्कृतप्रचुर, भाषा रसाळ आणि वर्णने खुमासदार आहेत. [तंतकवी तथा शाहीर– श्री. य. न. केळकर, १९५२; मऱ्हाटी लावणी– श्री. म. वा. धोंड, १९५६]

रामटेक विदर्भातील एक अतिप्राचीन स्थान. रामगिरी हे याचे संस्कृत नाव होय. रेल्वेने नागपूर-रामटेक हे अंतर २९ मैल व बसने २६ मैल आहे.

रामटेक हे प्राचीन काळापासून धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय या तीन्ही दृष्टींनी महत्त्वाचे शहर आहे. राम वनवासात असताना काही काळ या ठिकाणी विसाव्यासाठी आला होता, असे सांगतात. त्यावरून या स्थळाला रामटेक असे नाव पडले. रामटेकला काशीचे महाद्वार असेही म्हणतात. रामटेकच्या जवळच्या डोंगरावर एका काळी हिरण्यकशिपू हा दैत्य राज्य करीत होता, असे उल्लेख आहेत. विष्णूने त्याला मारले आणि त्याच्या रक्ताने हा सगळा डोंगर लालीलाल झाला, त्यावरून याला सिंदुरगिरी असेही म्हणू लागले.

रामटेकबद्दल ऐतिहासिक काळातील माहिती मिळविण्याच्या कामी श्री. वा. वि. मिराशी यांनी बरेच संशोधन केले आहे. त्यांच्या संशोधनाचा निष्कर्ष असा –

रामटेक हे रामगिरी या नावाने निदान १५०० वर्षे तरी प्रसिद्ध आहे. प्राचीन काळी या टेकडीवर रामाच्या पादुकांचे



रामगिरी

पूजन होई. 'वन्द्यैः पुंसां रघुपतिपदैरङ्कितं मेखलासु' = रामचंद्राच्या पूज्य पावलांनी अंकित झालेला हा रामगिरी, असे कालिदासाने मेघदूतात म्हटले आहे, त्यावरून वरील विधानाला पुष्टी मिळते. इतिहासकाळात कधीतरी तिथे पादुकांऐवजी राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती स्थापल्या गेल्या असाव्या.

वाकाटक राजकुलातले लोक रामाचे उपासक होते. वाकाटकांनी येथील देवस्थानांच्या व्यवस्थेसाठी काही कायमची तरतूद

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केली होती, असे त्यांच्या ताम्रपटांवरून दिसते. वाकाटकांची राजधानी नंदीवर्धन (हल्लीचे नगरधन) रामटेकच्या अगदी नजीक होती. या कुलातला एक राजा प्रवरसेन (दुसरा) याच्या दरबारात कालिदास हा सम्राट चंद्रगुप्ताचा वकील म्हणून काही काळ राहिला होता. तिथल्या राजमंडळीबरोबर तोही रामटेकला वारंवार जात असे. इथला मनोहर निसर्ग पाहूनच त्याला आपले मेघदूत हे खंडकाव्य लिहिण्याची स्फूर्ती झाली. इथे बसूनच त्याने ते पूर्ण केले, असे म्हणतात.

औरंगजेबाच्या कारकीर्दीत इथल्या मूर्ती सुरक्षित राहणार नाहीत, अशी भीती उत्पन्न झाल्यामुळे पुजाऱ्यांनी त्या उचलून दुधाळे नावाच्या तळ्यात बुडवून ठेवल्या. पुढे नागपूरचे रघुजी भोसले यांनी त्या मूर्ती तलावातून काढून इ. स. १७५३ साली त्यांची पुनःप्रतिष्ठापना केली. त्यांच्या पुजेअर्चेची कायम व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी खूप द्रव्य दिले आणि एक विश्वस्तनिधीही उभारला.

गडावर जायला जे अनेक मार्ग आहेत, त्यांमध्ये धूम्रेश्वर व अंबाळा हे दोन महत्त्वाचे आहेत.

धूम्रेश्वर हे जवळच्या एका टेकडीवरचे शिवलिंग आहे. शूद्र मुनी शंबूक हा इथेच तप करीत होता. शूद्राला तपाचा अधिकार नाही, या धर्मशास्त्रातल्या वचनाचे पालन करण्यासाठी रामाने त्या शंबूकाचा वध केला. मृत्यूसमयी त्याने रामाकडे तीन वर मागितले, ते असे— (१) रामाने या पर्वतावर कायम राहावे. (२) माझा (शंबूकाचा) देह शिवलिंगरूप व्हावा. (३) रामटेकवर जाणाऱ्या यात्रेकरूंनी प्रथम माझ्या दर्शन घ्यावे. रामाने हे तीन्ही वर त्याला दिले. त्या दिवसापासून भाविक लोक प्रथम धूम्रेश्वराचे दर्शन घेऊन मग रामदर्शनाला जातात.

अंबाळा मार्गात प्रथम अंबाळे तलाव लागतो. तिथून गड चढताना उजवीकडे राधाकृष्ण मंदिर, प्रेमकुटी आणि वैष्णवी देवीचे स्थान लागते. तिथून पुढे दगडी पायऱ्या सुरू होतात. या मार्गात एका बाजूला दत्तमंदिर व दुसऱ्या बाजूला सिंदूरवापी (सेंदूरबावली) नावाची एक विहीर लागते. या विहिरीला मुद्गरतीर्थ असे नाव आहे..

इथून उत्तरेच्या टेकडीवर त्रिविक्रम वामनाचे मंदिर आहे. मंदिर भग्न, तशी मूर्तीही भग्न आहे. या मूर्तिशिल्पात वामनाच्या पायाशी बळिराजा कोरलेला आहे. वामनाचा डावा पाय भूमीवर रोवलेला असून, बळीच्या मस्तकावर ठेवला जाणारा उजवा पाय गुडघ्यातून भंगला आहे. या भग्नतेमुळे लोक मूळ मूर्तीची ओळख विसरले आणि त्यांनी ते भावा-बहिणीचे शिल्प ठरवून टाकले. त्यातून एक लोककथा निर्माण झाली, ती अशी—

एक होती मुलगी. तिला होता एक वडील भाऊ. तो तिचा आवडता होता. एकदा बहिणीकडून काही अपराध घडला. त्यामुळे भाऊ चिडला. त्याने बहिणीला लाथ मारली. पण बहीण होती सात्त्विक. तिने भावाचा अपराध पोटात घातला.



अंबाळे तलाव आणि त्याजवळची मंदिरे

भावाने तिला लाथ मारली त्याचे प्रायश्चित्त म्हणूनच की काय त्याच्या पायाला किडे पडले. बिचारी बहीण! तिला भावाचे दुःख पाहून कळवळा आला व ती त्याच्या पायातले किडे काढू लागली. ती अद्याप किडे काढीतच आहे व पुढे आणखी किती काळ काढीत बसणार आहे देव जाणे!

हेच मूर्तिशिल्प पाहून कवी अनिल (आ. रा. देशपांडे) यांच्या प्रतिभेने पालाण घेतले आणि त्यातून भग्नमूर्ती नावाचे एक ओजस्वी खंडकाव्य निर्माण झाले.

सेंदूरबावलीच्या दक्षिणेस नरसिंहाची दोन देवळे आहेत. छोटा नरसिंह व मोठा नरसिंह या नावांनी ती ओळखली जातात. मोठा नरसिंह बसलेला असूनही त्याची उंची सुमारे नऊ फूट आहे. तिथून पुढे गडाच्या आतल्या तटबंदीचा दरवाजा लागतो. तिथे जवळच वराहाचे मंदिर आहे. ही मूर्ती चतुष्पाद, चार फूट उंचीची व धष्टपुष्ट आहे. तिच्या पदतळी हिरण्याक्ष दैत्य दडपलेला आहे. लोक या मूर्तीच्या पोटाखालून सरपटत पलिकडे जातात. वराह हे राष्ट्रकूटांचे उपास्य प्रतीक होते.

तिथून पुढे गेल्यावर डावीकडे भोगरामाचे व उजवीकडे देवीचे देऊळ लागते. या दोन देवळांच्या मध्यभागी जी मोकळी जागा आहे, ती महानुभाव पंथाचे लोक अत्यंत पवित्र मानतात. महानुभावांची इथे मोठी यात्रा भरते. चक्रधरस्वामी इथे दहा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महिने मुक्कामाला होते, असा महानुभावांच्या स्थानपोथीत उल्लेख आहे.

रामटेकवरचे प्रमुख देवालय म्हणजे राममंदिर होय. यात राम-सीतेच्या काळ्या पाषाणाच्या व वनवासी वेषातल्या सुंदर



राममंदिर–रामटेक

मूर्ती आहेत. या मंदिराला विस्तीर्ण प्राकार असून, चारही दिशांना द्वारे आहेत. मंदिररचनेवर बौद्ध शिल्पाचा प्रभाव दिसतो.

राममंदिराच्या समोर लक्ष्मणाचे स्वतंत्र मंदिर आहे. या देवालयात एक यादवकालीन शिलालेख असून, त्यात यादवराजांनी केलेल्या पराक्रमांचे वर्णन आहे. देवळाच्या दक्षिणेस असलेले कुंड सीतेची न्हाणी या नावाने ओळखले जाते.

रामनवमी व त्रिपुरी पूर्णिमा या तिथींना इथे मोठी जत्रा भरते. या दोन्ही उत्सवांत देवाला नवी वस्त्रे नेसवतात. याशिवाय इतरही अनेक उत्सव असतात.

रामटेकच्या पंचक्रोशीत अनेक तीर्थस्थाने असून, ती सांस्कृतिक व ऐतिहासिक अशा दोन्ही दृष्टींनी महत्त्वाची आहेत. [मेघदूतातील रामगिरी अर्थात रामटेक– श्री. वा. वि. मिराशी; मेघदूतावरील नवा प्रकाश–श्री. वा. कृ. परांजपे; इथे टेकले श्रीराम– आकाशानंद, सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन, १९६०]

रामतत्त्वप्रकाश रामाच्या माधुर्य-उपासनेवरचा एक प्रमाणभूत ग्रंथ. मधुराचार्य हा त्याचा कर्ता होय. याचे १३ उल्लास आहेत. यात राम व सीता यांच्या सर्वांगसुंदर रूपाचे प्रामुख्याने वर्णन आहे. रामसाहित्यातील विविध वचनांच्या आधारे ग्रंथकर्त्याने राम हा रसिकशिरोमणी असल्याचे सिद्ध करून, राम व सीता यांचा नित्य संयोग असल्याचे सांगितले आहे. सर्व अवतारांमध्ये राम हा श्रेष्ठ असून, तो अनेक नायिकांचा नायक आहे, असे त्याने प्रस्थापित केले आहे. श्रीकृष्णाप्रमाणेच रामही आपल्या नायिकांच्या समवेत रास खेळत असतो, असे ग्रंथकार सांगतो. त्याची भाषा पांडित्यपूर्ण आहे. त्यामुळेच रामभक्तिसाहित्यात त्याला प्रामाण्य लाभले आहे. [रा. सा. म. उ.]

रामतापनीय एक नव्य उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबद्ध असून, यात ७५ मंत्र आहेत. हे उपनिषद बृहस्पती प्रश्नकर्ता व याज्ञवल्क्य उत्तरदाता यांच्या संवादांतून निर्माण झाले आहे. याचा सारांश असा –

राम हा सत्यरूप परब्रह्म आहे. रामरूप असल्यामुळे हे जगही सत्य आहे. जीवात्मा व रामरूप परमात्मा यांचा संबंध सेव्य-सेवक, आधार-आधेय, नियाम्य-नियामक, इ. स्वरूपांचा आहे. ज्याप्रमाणे समग्र वृक्ष आपल्या बीजामध्ये स्थित असतो, त्याप्रमाणे सर्व चराचर जगत रामबीजामध्ये स्थित आहे. राम आपली आल्हादिनी शक्ती म्हणजेच सीता हिच्याशी सदैव आलिंगनयुक्त आहे.

शेवटी म्हटले आहे, की रामाने प्रसन्न होऊन शिवाला षडक्षर मंत्र दिला व त्या मंत्राच्या प्रभावाने शिव हा काशीत मुक्तीचे सदाव्रत चालवीत आहे. [रा. सा. म. उ.]

रामतीर्थ (१) (इ. स. चे १६ वे शतक) एक वेदान्ती. याचा निवास काशीत होता. कृष्णतीर्थ हे याचे गुरु होत. याने पदयोजनिका, अन्वयार्थप्रकाशिका, सुरेश्वराच्या दक्षिणामूर्तिवार्तिकावरील टीका, सदानंदकृत वेदान्तसारावर विद्वन्मनोरंजनी टीका, शारीरकरहस्यार्थतत्त्वप्रकाशिका व वाक्यार्थदर्पण हे ग्रंथ रचले आहेत. पदयोजनिका ही आचार्यकृत उपदेशसाहस्रीवरील टीका असून, अन्वयार्थप्रकाशिका ही संक्षेपशारीरकाची टीका आहे. हा रामतीर्थ म्हणजे भक्तिविवेककार (प्रथम) अनंतदेव याचा गुरू असावा, असे कांही पंडितांचे मत आहे. [का. सा. सा.]

(२) (इ. स. १८७३-१९०६) वेदान्ताचे प्रचारक, व्यवहारी तत्त्वज्ञानाचे उद्गाते, कवी आणि देशभक्त. पश्चिम पंजाबातील गुजराणवाला जिल्ह्यात मुरलीवाला नावाच्या खेड्यात यांचा जन्म झाला. हिरानंद हे त्यांच्या वडिलांचे नाव होते. ते पौरोहित्य करून आपला प्रपंच चालवीत. रामतीर्थांचे आजोबा (आईचे वडील) ज्योतिषी होते. नातवाची जन्मकुंडली पाहिल्यावर ते म्हणाले, की 'हा मुलगा जगला तर मातृसुखाला अंतरेल आणि महात्मा होऊन आपल्या ज्ञानाने जगाला दिपवील.'

त्यांच्या म्हणण्याचा पडताळा थोड्याच दिवसांत आला आणि रामतीर्थ मातृसुखाला पारखे झाले. त्यामुळे त्यांचे लालन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पालन त्यांची मावशी व आत्या यांनी केले.

रामतीर्थांचे पाळण्यातले नाव तीर्थराम असे होते. बाळपणीच त्यांच्या मनावर चांगले धार्मिक संस्कार झाले. परिणामतः त्यांना भजने व प्रवचने ऐकण्याचा विलक्षण नाद लागला.

तीर्थराम दोन वर्षांचे झाले, तेव्हा त्याच जिल्ह्यातील विरोकी गावचे पं. रामचंद्र यांच्या मुलींशी त्यांचा औपचारिक विवाह झाला. विधियुक्त लग्न मात्र त्यांच्या वयाच्या दहाव्या वर्षी झाले.

पाचव्या वर्षी तीर्थरामांना शाळेत घातले. त्यांची बुद्धी कुशाग्र होती. थोडयाच काळात त्यांनी शाळेचा अभ्यास सांभाळून शेख सादी कवीचे गुलिस्तान व बोस्तान हे फारसी ग्रंथ मुखोद्गत केले. शाळेतून घरी आल्यावर ते मंदिरात जात आणि तिथे कीर्तनात ऐकलेल्या सर्व कथा घरी येऊन बिनचूकपणे सांगत.

प्राथमिक शिक्षण संपवून पुढच्या शिक्षणासाठी ते गुजराणवाला या गावी आले. तिथे धन्नाराम भगत नावाचे त्यांच्या वडिलांचे एक मित्र होते. ते विरक्त साधू असून, रामकृष्णांचे शिष्य होते. हेच पुढे तीर्थरामांचे गुरू झाले. तीर्थराम त्यांच्याकडेच राहत असत. तीर्थरामांना इंग्रजीच्या एका स्वतंत्र वर्गात दाखल करण्यात आले. त्यामुळे त्यांनी मिडलस्कूलचा अभ्यास दोन-अडीच वर्षांत पुरा करून हायस्कुलात प्रवेश केला. तिथल्या प्रवेशपरीक्षेत त्यांना एक मासिक शिष्यवृत्तीही मिळाली. तीर्थरामांनी पुढचे शिक्षण न घेता प्रपंचाला हातभार लावावा असे हिरानंदांचे मत होते; पण तीर्थरामांना शिक्षण अपुरे ठेवणे उचित वाटले नाही. ते लाहोरला जाऊन फोरमन ख्रिश्चन कॉलेजात दाखल झाले. घरून आर्थिक मदत मिळण्याजोगी नव्हती, म्हणून ते शिकवण्या करू लागले. पुढे त्यांनी एक शिष्यवृत्ती मिळवली आणि बी. ए. च्या अभ्यासाला प्रारंभ केला.

तीर्थरामांना मोठी शिष्यवृत्ती मिळाल्याचे समजल्यावर त्यांच्या वडिलांनी त्यांच्या पत्नीला लाहोरला पाठविले. पत्नी आल्यामुळे संसार थाटावा लागला. पण त्यात त्यांची ओढघस्त सुरू झाली. तिच्यावर मात करण्यासाठी ते कधी एक वेळच जेवत, तर कधी उपासही करीत. पण अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी शिक्षणाचा विचार सोडला नाही. त्यांचा हा दृढ निर्धार पाहून त्यांच्या वडिलांनी सुनेला परत आपल्या गावी आणले. दुर्दैवाने बी. ए. च्या परीक्षेत पहिल्या वर्षी ते अनुत्तीर्ण झाले. दुसऱ्या वर्षी मात्र त्या परीक्षेत त्यांना चांगले यश मिळाले. पुढे त्यांनी एम. ए. च्या अभ्यासाला प्रारंभ केला. इ. स. १८९५ साली ते गणित विषय घेऊन एम्. ए. ला पहिले आले. ही परीक्षा देण्यापूर्वीच ते फोरमन कॉलेजात बी. ए. च्या वर्गाला गणित विषय शिकवीत असत.

तीर्थराम एम्. ए. झाल्यावर त्यांच्या खऱ्या संसाराला प्रारंभ झाला. त्यांनी एफ्. ए. व बी. ए. च्या विद्यार्थ्यांसाठी गणिताचा एक वर्ग काढला होता. या वर्गाला काही प्राध्यापकही येत असत. परंतु शिकविण्याच्या दगदगीने ते आजारी पडले. त्यामुळे त्यांना जन्मगावी परत यावे लागले. तिथून पुनश्च लाहोरला गेल्यावर ते तिथल्या धर्मसभेच्या शिक्षणमंडळाचे प्रथम सभासद व नंतर चिटणीस झाले. याच वेळी त्यांनी चित्रकलेचेही ज्ञान मिळविले. गणिताचा वर्ग बंद झाल्याने त्यांनी सियालकोटच्या मिशन हायस्कुलात नोकरी पत्करली. तिथल्या वेतनातून ते आपल्या वडिलांना व गुरूला नियमित पैसे पाठवू लागले. पुढे ते त्याच शाळेच्या वसतिगृहाचे प्रमुख झाले. पुन्हा त्यांची लाहोरच्या फोरमन कॉलेजात नेमणूक झाली. या कॉलेजात असतानाच ते ओरिएंटल कॉलेजात रीडरचेही काम करीत. त्यामुळे त्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली. या वेळी लौकिक सुखसाधनांची वाढ करणे त्यांना शक्य होते. पण ते यदृच्छालाभसंतुष्ट राहिले. त्यांचा आनंद विषयोपभोगात नसून अध्यात्मात होता. आपल्या गुरुजींना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात. 'द्रव्यसंग्रह हे सुखाचे साधन आहे, अशी माझी समजूत नाही. दागिने करण्याचा अथवा कोणत्याही सांसारिक वस्तूंचा संग्रह करण्याचा विचार माझ्या मनात येत नाही. आपल्या कृपेने घराच्या ऐवजी वृक्षाची छाया, वस्त्रांच्या ऐवजी विभूती, शय्येला भूमी आणि क्षुधाशांतीसाठी भिक्षान्न मिळेल, तर त्यातही मी आनंद मानीन. आपण भिक्षावृत्तीने राहण्याची आज्ञा कराल, तर तसेही राहण्याची माझी तयारी आहे.'

तीर्थराम कृष्णभक्त होते. कॉलेजला उन्हाळ्याची सुटी लागली, की ते मथुरा-वृंदावनास जात. तिथे गीतेचा गूढार्थ समजून घेऊन त्याच्याशी समरस होण्याचा ते प्रयत्न करीत. कृष्णभक्तीची तीव्रता वाढली, की ते रात्र रात्र जागून काढीत. लाहोरला परतल्यावरही कधी कधी रावीच्या तीरावर ते कृष्णचिंतनात इतके मग्न होत, की रात्र किती झाली याचे भानही त्यांना राहात नसे. एकदा तर रावीच्या किनाऱ्यावरील जंगलात भटकत असताना कृष्णदर्शनाच्या व्याकुळतेने त्यांची शुद्धच हरपली.

पुढे पुढे त्यांना पुराण ऐकत असताना व कोणाच्या बासरीचा आवाज ऐकत असताना समाधी लागू लागली. त्यांचा एक मित्र एके दिवशी त्यांना म्हणाला. 'गुसाईजी, ज्याचा तुम्ही शोध करीत आहा, तो तर तुमच्या जवळ, तुमच्या हृदयातच आहे.'

मित्राचे हे शब्द ऐकताच त्यांनी कपडे फाडले व ते आपले हृदय नखांनी फाडण्याचा प्रयत्न करू लागले. त्यातून रक्तस्राव सुरू झाला. याच अवस्थेत ते बेशुद्ध पडले. बऱ्याच वेळाने शुद्धीत आल्यावर एकाएकी त्यांची वृत्ती शान्त बनली. त्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अवस्थेत त्यांना श्यामसुंदर कृष्णाचे दर्शन झाले. या संदर्भात ते म्हणतात. 'मी स्नान करीत असता मला माझ्या श्यामसुंदराचे दर्शन झाले. माझा प्रियकर अगदी जवळ येऊन मला दृढालिंगन देऊन गुप्त झाला.'

याच सुमाराला द्वारकामठाचे शंकराचार्य श्री राजराजेश्वर-तीर्थ लाहोरला गेले होते. त्यांचा वेदान्तावर मोठा अधिकार होता. त्यांच्या इच्छेवरून तीर्थराम त्यांच्याबरोबर काश्मीरला गेले. त्यामुळे त्यांना सत्समागम घडला, ब्रह्मसूत्रे व उपनिषदे यांवरील भाष्ये ऐकायला मिळाली आणि भक्त तीर्थराम आता ज्ञानी भक्त झाले. कॉलेजची सुटी संपल्यावर ते परत लाहोरला गेले. तिथे त्यांनी पुनश्च वेदान्ताच्या अभ्यासाला प्रारंभ केला. आता त्यांना कॉलेजातील दोन-तीन तासांच्या नोकरीचाही भार वाटू लागला. मथुरा-वृंदावनला जाण्यापेक्षा हरिद्वार-हृषिकेशला जाऊन आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे, असे त्यांना वाटू लागले. म्हणन त्यांनी इ.स. १८९७ मध्ये हरिद्वारला एक जागा भाड्याने घेतली. तिथे ते जाऊन येऊन राहू लागले.

तीर्थरामांचे लक्ष आता आत्मसाक्षात्काराकडे लागले होते. त्यांनी अद्वैतामृतवर्षिणी नावाची साधूंची एक सभा स्थापन केली. तीत आत्मसाक्षात्काराच्या दृष्टीने चर्चा होत असत. त्यांतून जो निष्कर्ष निघेल त्याचा अनुभव एकान्तात घ्यावा व पुन्हा आपला अनुभव सभेपुढे मांडावा, असा उपक्रम त्यांनी सुरू केला.

हृषिकेश येथे दोन-तीन वेळा जाऊनही साक्षात्कार होत नाही, असे दिसल्यावर ते एकदा निश्चयाने तिथे गेले. या वेळी वडिलांना लिहिलेल्या पत्रात ते म्हणतात. "बाबा, तुमचा मुलगा आता परत येत नाही. प्रिय विद्यार्थ्यांनो, तुमचा गुरू आता परत येणार नाही. आप्तेष्टांनो, तुमचे नाते किती दिवस टिकणार! बकऱ्याची आई किती दिवस नवस करणार? बाबा, तुमच्या सर्व आशांवर व संकल्पांवर लेखणीच्या फटकाऱ्याने पाणी ओतले जाईल! रामाच्या निजानंदलहरीत देश, काल व निमित्त कुठल्याकुठे पार विरून जाईल किंवा निदान रामाचे (स्वतःचे) शरीर तरी गंगाप्रवाहात अदृश्य होईल." एवढा दृढ निश्चय करून हृषिकेश येथे ठाण मांडल्यावर त्यांना कृष्णाचे दर्शन झाले. या सुमारास त्यांचे वय अवघे पंचवीस वर्षांचे होते.

तीर्थराम आता साधकदशेतून सिद्धदशेत गेले. ही सिद्धावस्था प्राप्त करून ते पुनश्च लाहोरला परतले. संसारातून त्यांचे मन पार उडाले होते. कॉलेजातला पगार हाती पडताच एक-दोन दिवसांत ते पुनश्च निष्कांचन बनत असत. अशा स्थितीत त्यांनी इ. स. १८९९ च्या उन्हाळ्याच्या सुटीत काश्मीरातल्या अमरनाथची यात्रा केली. ही यात्रा संपल्यावर काही दिवसांनी त्यांनी आपले विचार लोकांपुढे मांडण्यासाठी अलिफ् (परमेश्वरी) नावाचे मासिक सुरू केले. या मासिकाचे तीन अंक निघण्यापूर्वीच त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला आणि अरण्याचा रस्ता धरला. याविषयी मित्रांनी चौकशी केली असता ते म्हणाले. 'नोकरी करणे नोकराचे काम आहे. मी खुद्द रामबादशहा आहे. मी नोकर नाही व माझा कोणी मालकही नाही. राजे-महाराजे माझ्यापुढे हात जोडून उभे असतात. मी म्हणजे हा देह नव्हे. मी देहप्राणांहून निराळा आहे. मला देह समजणे ही तुमची चूक आहे. मी तुमचा आत्मा आहे. अखिल विश्वाचा आत्मा आहे. पंचतत्त्वे माझे नोकर आहेत व त्या सर्वांतही मीच भरलेला आहे. असा एकही पदार्थ नाही, की ज्यामध्ये मी नाही. जोपर्यंत मी आपल्याकडे देहात्मबुद्धीने पाहत होतो, तोपर्यंत हे शरीर नोकरी करीत होते.'

तीर्थरामांनी आता वानप्रस्थाश्रम स्वीकारला होता. त्यासाठी त्यांनी आपला मुक्काम लाहोरहून टेहरीला हलवला. त्यांच्या

स्वामी रामतीर्थ

बरोबर त्यांची पत्नी, मदनमोहन व ब्रह्मानंद हे दोन मुलगे व एक मुलगी असा परिवार होता. तिथे ते असंग्रही व अयाचित वृत्तीने राहत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबियांचे खाण्या-पिण्याचे हाल होऊ लागले. या सुमारास कलकत्ताक्षेत्रमंडळाचे व्यवस्थाप

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वामी रामनाथ हे प्रवास करीत तिथे गेले. त्यांनी त्यांच्या उदर-भरणासाठी महिना दहा रुपयांच्या धान्याची व्यवस्था केली.

तिथे असतानाच एका रात्री तीर्थराम अचानक निघून गेले. तीर्थराम नाहीत हे ध्यानी आल्यावर त्यांच्या पत्नीने धसका घेतला आणि त्यातच ती आजारी पडली. काही दिवसांनी ते परत आले आणि त्यांनी सर्वांना घरी परत पाठविले. पण त्यांची पत्नी मात्र त्या आजारातून उठली नाही. २४ जून १९०७ या दिवशी ती मृत्यू पावली.

पुढे एका वर्षाच्या वनवासानंतर वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी तीर्थरामांनी शिखासूत्राचा त्याग करून संन्यास घेतला. ते तीर्थ-रामाचे रामतीर्थ बनले. या विधीचा त्यांना एवढा आनंद झाला, की त्या भरात त्यांची समाधी लागली. त्यानंतर त्यांनी उत्तराखंडाची यात्रा केली. त्या यात्रेत त्यांनी जम्नोत्री, गंगोत्री, वृद्धकेदार, त्रिजुगी नारायण, बदरी केदार, बदरीनारायण, इ. क्षेत्रे पाहिली. नंतर अल्मोडामार्गे ते मथुरेला गेले. तिथे भारत-धर्म महामंडळाच्या अध्यक्षपदावरून त्यांनी वैदिक धर्माचा पुर-स्कार केला. नंतर त्यांनी लखनौ, आग्रा, इ. ठिकाणी फिरून वैदिक धर्माचा प्रसार केला. पुनश्च ते टेहरीच्या घनदाट जंगलात प्रविष्ट झाले. तिथे त्यांची व टेहरीच्या महाराजांची गाठ पडली. महाराज रामतीर्थांच्या दर्शनाने खूप प्रभावित झाले. आता रामतीर्थ स्वतःला रामबादशहा म्हणवून घेऊ लागले होते.

विश्वविजयार्थ संचार— इ. स. १९०२ च्या जुलै महिन्यात जपानमधील टोकिओ येथे सर्वधर्मपरिषद भरणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाले. रामतीर्थांनी या संधीचा फायदा घ्यावा म्हणून टेहरीच्या महाराजांनी त्यांना जपानला पाठवले. तिथे गेल्यावर रामतीर्थांना कळले, की त्या बातमीत सत्यता अजिबात नव्हती. पण तिथल्या अल्पशा मुक्कामातही त्यांनी केलेले धर्मकार्य मोलाचे ठरले. तिथे त्यांना वेदान्ताचे उत्साही आचार्य म्हणून गौर-विण्यात आले. तिथल्या एका बौद्ध विद्यापीठात त्यांचे 'यशाची गुरुकिल्ली' या विषयावर व्याख्यान झाले. स्वामींचे विचार ऐकून तिथले संस्कृतचे प्राध्यापक ताकाकात्सू म्हणाले. 'संस्कृत भाषेच्या अभ्यासाकरिता इंग्लंडमध्ये असताना पंडित माक्स म्यूलर यांच्या घरी किंवा जर्मनीतील काही ठिकाणी हिंदुस्थाना-तील मोठमोठ्या पंडितांच्या व साधूंच्या भेटीचा लाभ मला घडला होता. परंतु स्वामी रामतीर्थांसारखा सत्पुरुष आजपर्यंत मला आढळला नाही. थोडक्यात सांगायचे तर स्वामी हे वेदा-न्ताची मूर्तिमंत प्रतिमा आहेत.' या मुक्कामात असतानाच त्यांना पुरणसिंह नावाचा शिष्य भेटला.

याच सुमारास प्रो. छत्रे यांची सर्कस जपानात होती. त्यांनीच स्वामींना आपल्याबरोबर अमेरिकेत नेले. स्वामींचा मुक्काम तिथे सुमारे अडीच वर्षे होता. परंतु ते व्याख्याने देण्यापुरतेच शहरात असत. उर्वरित वेळ ते कॅलिफोर्नियाच्या जंगलात काढीत. या काळातच त्यांनी वॉल्ट व्हिटमन, इमर्सन, इंगरसाल, थोरो, इ. तत्त्वज्ञांचे वाङ्मय वाचून त्याची टिपणे केली. तिथे वारंवार होणाऱ्या त्यांच्या वेदान्तावरील व्याख्यानांनी लोकांचे पूर्ण समा-धान होईना; म्हणून स्वामींनी तिथे वेदान्ताचे वर्ग सुरू केले. जंगलात असताना जळणासाठी लागणारी लाकडे ते स्वतः तोडून आणीत. कंदमुळे, फळे, दूध, पालेभाज्या यांवरच ते मुख्यत्वे आपली उपजीविका करीत.

अमेरिकेचे अध्यक्ष श्री. रुझवेल्ट स्वामींना भेटायला गेले होते. त्याचप्रमाणे बेलमन नामक एका स्त्रीने त्यांचे शिष्यत्व पत्करून भगवी वस्त्रे धारण केली होती. ती स्वामींच्या जन्म-भूमीचे दर्शन घेण्यासाठी भारतातही आली होती.

अमेरिकेत त्यांनी व्याख्यानांच्या द्वारे वैचारिक जागृती पुष्क-ळच केली. 'आनंदाचा इतिहास व स्थान' या व्याख्यानातील विषय केवळ अमेरिकनांपुरतेच मर्यादित नव्हते; तर ते साऱ्या मानवजातीलाच उद्देशून होते. स्वामींनी अमेरिकेत ज्या संस्था स्थापन केल्या, त्यांत हरमेटिक ब्रदरहूड ही संस्था विशेष प्रसि-द्धीला आली.

अमेरिकेतून ते इजिप्तला गेले. तिथे त्यांनी पर्शियन भाषेतून व्याख्यान दिले. नंतर इ. स. १९०४ मध्ये ते भारतात आले. भारतात आल्यावर प्रथम त्यांचा मुक्काम काही काळ मुंबईत होता. नंतर ते आग्रा, मथुरा, पुष्कर, इ. ठिकाणी संचार करून शेवटी हरिद्वारला गेले. या संचारकालातही त्यांनी ठिकठिकाणी वेदान्तावर व्याख्याने दिली. याशिवाय भारताची तत्कालीन परिस्थिती सुधारण्यासाठी त्यांनी काही लेख लिहून विधायक विचारही मांडले. सहकार्य व संघटना या दोन मुद्यांवर त्यांचा विशेष भर होता. 'भारतवर्षापुढील प्रश्न व सांप्रतच्या गरजा' या लेखात ते म्हणतात—

"हिंदुस्थानातील कोटचवधी मेंदू व हात वाहत चाललेले दिसत आहेत. कुठल्या दिशेने आणि कोणीकडे ते वाहत जात आहेत कोणाला ठाऊक! अर्धकच्च्या समजुतीप्रमाणे हिंदुस्थाना-तील हजारो समाज आणि संस्था हिंदुस्थानची राष्ट्रनौका आपल्या आवडत्या दिशेने वल्हवून नेण्याचा यत्न करीत आहेत. परंतु या नौकेला दूरदर्शी कर्णधार मिळाल्याचे अद्यापि दिसत नाही. तुमच्या हातांतील वल्ही आहेत तशीच असू द्या. तुम्ही बसला आहात तसेच बसलेले राहा. जाग्यावरून हालण्याचे कारण नाही. तुम्हा सर्वांचे वल्हवणे एका दिशेने असू द्या, म्हणजे झाले. सर्व राष्ट्राचे कल्याण होण्यातच घटक व्यक्तीचे कल्याण असते. समाज बुडत असेल तर तुम्ही तराल काय?"

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशा रीतीने जनजागृतीचे विचार काही काळ प्रसृत केल्यावर पुढे त्यांना एकान्ताची इच्छा झाली. म्हणून ते नारायणस्वामी नामक आपल्या शिष्यासह हिमालयातील व्यासाश्रमात गेले. तिथे त्यांचा मुक्काम पाच महिने होता. या काळात त्यांनी सामवेद, पातंजल भाष्य व यास्काचे निरुक्त यांचे अध्ययन केले. मग ते देवप्रयागहून वसिष्ठाश्रमी गेले. तिथे त्यांची प्रकृती बिघडली म्हणून त्यांना टेहरीला परत यावे लागले. या सगळ्या संचारकालात सर्वत्र आत्मतत्त्व भरलेले आहे, असा अनुभव ते घेत होते. टेहरीला आल्यानंतर थोड्याच काळात त्यांनी गंगेत जलसमाधी घेतली.

अनासक्ती, समाधानी वृत्ती व साधी राहणी या त्रयीवर रामतीर्थांनी आपल्या आयुष्याची इमारत उभी केली होती. संन्यासी असूनही ते केवळ आत्मसाक्षात्काराचा विचार करीत नव्हते. या देशाचे भले व्हावे; तो समर्थ, स्वतंत्र आणि आत्मसंपन्न व्हावा या दृष्टीनेही त्यांचे विचार चालत. त्यांची काही व्याख्याने व कविता वाचल्या तर याचे प्रत्यंतर येते. ते म्हणत. "जेव्हा मी चालतो तेव्हा भारत माझ्या संगे असतो. जेव्हा मी श्वासोच्छ्वास करतो तेव्हा भारत माझ्याशी एकरूप असतो. माझ्या मुखातून भारतच बोलत असतो. मीच भारत आहे." प्रेम व स्वातंत्र्य या राष्ट्रोन्नतीच्या प्रेरणा आहेत, असे त्यांचे मत होते. त्याचप्रमाणे भारतभूमी म्हणजे ऋषिमुनींचे निवासस्थान, विविध शास्त्रांच्या निर्मात्यांची भूमी आणि जगताला तत्त्वज्ञानाचा मार्ग दाखविणारी भूमी म्हणून ते तिला पवित्र मानीत.

रामतीर्थांचा वेदान्त केवळ शाब्दिक नव्हता; तर तो आचरणात आणलेला होता. ते वारंवार बजावीत. "जर वेदान्त रोजच्या जीवनात आणता येत नसेल तर तो हवा कशाला ? पुस्तकात तो लिहून ठेवायचा, ती पुस्तके कपाटात मांडायची आणि त्यांतली पाने कसरीने खायची, असे उपयोगी नाही. तुम्ही वेदान्त जगायला हवा. वेदान्त हा पूर्ण सत्य आहे. तो संपूर्णपणे आपण जगलो नाही, तर तो नष्ट होईल."

रामतीर्थ हे श्रेष्ठ सुधारक होते. पण त्यांची सुधारणा बाह्य नसून आंतरिक होती. जो आत्मोद्धार करतो, तोच खरा सुधारक, असे त्यांचे मत होते. सुधारणेचा उपदेश कोणी करावा यासंबंधी ते म्हणतात. "ज्याचे आचरण शुद्ध नाही, असा मनुष्य मोठ्या उपदेशाच्या गोष्टी सांगू लागला तरी त्या उपदेशामुळे कोणी दुर्जनाचा सज्जन होणार नाही. पण याउलट ज्याचे चित्त निर्मळ आहे, त्याने मौन धारण केलेले असले, तरी त्याचे आचरणच इतरांना मार्गदर्शक ठरेल."

रामतीर्थ जन्मजात कवी होते. त्यांच्या काव्यात वेदान्त, भक्ती, वैराग्य, देशप्रेम, निसर्गवर्णने, इ. अनेक विषय आलेले आहेत. त्यातून आर्तता, आत्मसमर्पण, इ. भावना दृग्गोचर होता[त]. रेव्हरंड सी. एफ. अँड्र्यूज रामतीर्थांच्या काव्याबद्दल लिहिता[ना] म्हणतात– "त्यांच्या कवितेची रचना आणि शब्दयोजना ओबड[धोबड] आहे, परंतु त्या अपूर्ण अपरिस्फुट शब्दांच्या मागे सहृद[य] वाचकाला स्वामींचे कविमन दिसू शकेल. वेदना सहन कर[ीत] असतानाही ते कविमन हसते. हालअपेष्टांतून जातानाही [ते] हसते. अशा या प्रसन्न कविहृदयाने दिलेला संदेश सांप्रत[च्या] अवनत भारताला त्याच्या निराशामय जीवनात फार प्रेर[क] आणि आवश्यक ठरेल."

स्वामींचा शिष्यपरिवार मर्यादित असला तरी, त्यात भारता[बा]हेरचेही लोक आहेत. नारायणस्वामी, पूरणानंदजी, टेहरी[चे] महाराज, मदनमोहन मालवीय, स्वामी शिवानंद, डॉ. महंम[द] इक्बाल, महंमद हुसेन, हे त्यांचे भारतीय शिष्य होत. मिसे[स] वेलमन या अमेरिकेतील आणि प्रो. ताता किड हे जपानमधी[ल] शिष्य होत.

रामतीर्थांनी अनेक ग्रंथ लिहिले होते, परंतु त्यांनी ते गंग[ार्]पण केले. त्यामुळे त्यांची भाषणे आणि काही टिपणे एवढे[च] साहित्य सांप्रत उपलब्ध आहे. ते बहुतेक मराठीत अनुवा[दित] झाले आहे. त्यांनी लिहिलेल्या सर्व कवितांचाही संग्रह प्रका[शित] झाला आहे.

भौतिक प्रगतीला सर्वस्व मानणाऱ्या पाश्चिमात्यांपुढे, भौति[क] शास्त्रांच्या आधारेच वेदान्ताचे सिद्धान्त मांडून ते आजच्या प्र[गत] कालातही खरे ठरतात, हे रामतीर्थांनी अनेक प्रमाणांनी सि[द्ध] केले आहे. हेच स्वामींचे अविस्मरणीय कार्य होय. भावी पिढ्यां[ना] आदर्शाचा ठेवा वाटावा, इतके त्याचे मोल आहे. [स्वानंदसाम्रा[ज्याचे] स्वामी रामतीर्थ – श्री. गो. प्र. भावे, १९६३; स्वामी रा[म]तीर्थ – श्रीपाद रामशर्मा, अनु. श्री. वा. शि. आपटे, १९६५.]

रामदान

(इ. स. १७५२–१८२६) एक चारण कवी. जोधपूरचा रहिवासी असून, याचे गोत्र लालन[स] होते. याच्या पित्याचे नाव फतहदान होते. इ. स. १८०१ म[ध्ये] याला जोधपूरच्या महाराजा मानसिंहाने तालेसर नामक [गाव] दान दिला होता. काही वर्षे हा मेवाडमध्येही राहत होता. [याने] मेवाडच्या भीमसिंहावर भीमप्रकाश नामक एक ग्रंथ डि[ंगळ] भाषेत लिहिला असून, त्यात भीमसिंहाच्या राजमहालाचे, [दर]बारी वैभवाचे; तसेच गणगौर इ. तत्कालीन उत्सवां[चे] सुंदर वर्णन केले आहे. दोहा, कवित्त, इ. छंदांत गुंफलेल्या [या] काव्याचा काही भाग गद्यातही रचलेला आहे. एकूण १७५ छं[दांचे] हे काव्य असून, पहिल्या ७० छंदांत मेवाडचा गौरवशाली इ[ति]हास त्याने मांडला आहे. [रा. भा. सा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामदास (१) (इ. स. १५३४-१५८१) शिखांचा चौथा गुरू. हा पंजाबातील चुनेमंडी लाहोर या गावी खत्री जातीच्या सोधी कुळात जन्मला. याच्या पित्याचें नाव हरिदास व आईचे नाव दयाकुँवरी होते. रामदासाचे मूळ नाव जेथा असे होते. बालपणीच आईबाप निवर्तल्यामुळे वयाच्या बाराव्या वर्षापर्यंत त्याचा सांभाळ त्याच्या आजीने केला. लहानपणापासूनच त्याला सत्संग व हरिभजन यांची गोडी लागली. तो नेहमी साधुसंतांच्या दर्शनाला जाई व त्यांचे उपदेश ऐके.

असाच एकदा तो गुरू अमरदास यांच्याकडे गेला व मग तिथेच राहिला. धर्मशाळेची साफसफाई व अमरदासांची सेवा-शुश्रूषा ही दोन कामे त्याने स्वीकारली. रामदासाचे देखणे रूप, हसरा चेहरा व विनयशील स्वभाव पाहून गुरू अमरदास आणि त्यांच्याकडे येणारे सर्व लोक यांना तो विशेष आवडू लागला.

काही वर्षांनी अमरदासांनी आपली मुलगी रामदासाला देऊन त्याला आपला जावई करून घेतले. इतकेच नव्हे, तर आपल्यानंतर त्यानेच गुरुगादीवर बसावे, असेही घोषित केले. स्वतःच्या निर्याणापूर्वी त्यांनी रामदासाला सांगितले, की 'तुंग, सुल्तान आणि गुमटाला या गावांच्या मधोमध असलेल्या जंगलात तू एक सरोवर तयार कर.' रामदासाने गुर्वाज्ञा प्रमाण

गुरू रामदास

मानून तत्काळ सरोवर खोदण्यास आरंभ केला; परंतु सरोवर पुरे खोदून होण्यापूर्वीच गुरू अमरदासांचे निर्याण झाले. त्यामुळे सरोवराच्या परिपूर्तीनंतर त्याला अमरसर असे नाव देण्यात आले. यानंतर या सरोवराच्या परिसरात एक गाव वसविण्यात आले, त्याला रामदासपूर असे म्हणू लागले. कालांतराने इथेच शिखांचे प्रख्यात सुवर्णमंदिर उभे राहिले. पुढे या सरोवराला व गावाला मिळून अमृतसर हे नाव प्राप्त झाले.

अशा प्रकारे शिखांचे पवित्र तीर्थक्षेत्र उभारण्याची महनीय कामगिरी गुरू रामदास यांनी केली. [सि. इ.; शि. इ.]

(२) (इ. स. १७२७-१७९९) एक राजस्थानी भक्तकवी. याचा जन्म जोधपूर राज्यातील बींकोकोर नामक गावी झाला. हा जातीने मेघवाल होता. याच्या पित्याचे नाव शार्दूलजी. बालपणी याने थोडासा विद्याभ्यास केला; परंतु पुढे याला वैराग्य प्राप्त झाले व हा गुरूच्या शोधार्थ इकडे तिकडे भटकू लागला. एकामागे एक असे बारा गुरू करूनही याला चित्तस्वास्थ्य गवसेना. शेवटी एक दिवस याला एका गृहस्थाच्या मुखातून बीकानेरच्या हरिरामदास नामक सत्पुरुषाची काही कवने ऐकायला मिळाली. ती कवने ऐकून रामदास विशेष प्रभावित झाला. तत्काळ त्याने बीकानेर गाठले व तो हरिरामदासांना भेटला. रामदासाची गुरुकृपेविषयीची तीव्र उत्कंठा जाणून हरिरामदासांनी त्याला स्वतःच्या रामसनेही पंथाची दीक्षा दिली व राममंत्राचा प्रभाव विशद करून सांगितला. यानंतर रामदास हरिरामदासांच्या चरणाशी बसून राममंत्राचा जप करू लागला. इ. स. १७६५ पर्यंत तो तिथे राहिला व मग जोधपूरजवळ खेडापे नामक गावी त्याने स्वतःची स्वतंत्र गादी स्थापन केली. तिथे त्याला शेकडो शिष्य मिळाले व त्या शिष्यांनी भोवतालच्या परिसरात रामसनेही पंथाचा खूप प्रचार केला. वयाच्या ७२ व्या वर्षी रामदास मरण पावला.

रामदासाने गुरुमहिमा, भक्तमाल, चेतावनी, जम फारगती, इ. अनेक लहानमोठे ग्रंथ लिहिले असून, अंगवद्ध अनुभववाणी नामक कवितावलीही लिहिली आहे. या अनुभववाणीचे दास, उदास, संभव आणि खुदवह असे चार विभाग आहेत. [रा. भा. सा.]

(३) (इ. स. चे १८ वे शतक) ओडिसा प्रांतातील एक भक्तकवी. हा गंजाम जिल्ह्यातील एका ब्राह्मण कुळात जन्मला. याने दार्ढ्यताभक्तिरसामृत व रामरसामृत असे दोन काव्यग्रंथ लिहिले असून, ओडिसातील घराघरांत त्यांचे पठण चालते. दार्ढ्यताभक्तिरसामृत हा ग्रंथ नवाक्षरी छंदात गुंफला असून, त्याची भाषा सर्वसामान्य जनांना चटकन समजेल अशी आहे. या ग्रंथात भक्तांची चरित्रे वर्णिली आहेत. भक्तिसाहित्यात या ग्रंथाला बरेच उच्च स्थान लाभलेले आहे. रामदासाची वर्णनशैली प्रत्ययकारी व रसाळ आहे. [उ. सा. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामदास आदक (इ. स. चे १७ वे शतक) एक बंगाली भक्तकवी. याने धर्ममंगल नामक एक काव्य लिहिले असून, त्या काव्याच्या प्रारंभी आपले आत्मचरित्रही सांगितले आहे. त्यावरून त्याच्याविषयी माहिती मिळते, ती अशी – याचा जन्म हुगळी जिल्ह्यातील हयातपूर नामक गावी झाला. हा जातीने कैवर्त होता. याच्या पित्याचे नाव रघुनंदन असे होते. एकदा रघुनंदनाने सरकारी कर न भरल्यामुळे गावच्या पाटलाने रामदासालाच पकडून कैदेत टाकले. ते ऐकून रघुनंदनाने तत्काळ कर भरला व मुलाची सुटका करण्यासाठी धाव घेतली; परंतु तेवढ्यात रामदास तुरुंगातून पळाला व वाट फुटेल तिकडे चालू लागला. प्रथम तो मामाच्या घरी गेला. वाटेने जात असताना त्याला अनेक शुभ शकुन झाले. परंतु पुढे पाडा बागनान गावाच्या जवळ तो पोचला, तेव्हा त्याला दिसले, की समोरून घोडेस्वार येत आहेत. त्यांना पाहून रामदास घाबरला व लपण्यासाठी जागा पाहू लागला. पण तेवढ्यात शिपायांनी त्याला पकडलेच. ते त्याला जेव्हा दरडावू लागले, तेव्हा रामदास रडू लागला. त्याने आपले डोळे झाकून घेतले व अधोमुख होऊन तो परमेश्वराचा धावा करू लागला. थोड्या वेळाने त्याने डोळे उघडले. पाहतो तो शिपाई वगैरे कोणीच नाही. त्याला आश्चर्य वाटले. पुढे तो एका नदीकाठी पोचला. त्याला खूप तहान लागली होती; पण नदीत पाणीच नव्हते. आता मात्र रामदासाला रडू आवरेना. मग धर्मठाकुराला त्याची कीव आली. तो एका ब्राह्मणाच्या रूपाने गंगाजलाचा कमंडलू घेऊन रामदासाच्या पुढे उभा राहिला. रामदासाला त्याने ते गंगाजल पाजले. ते पिऊन रामदास ताजातवाना झाल्यावर धर्मठाकुराने त्याला धर्ममंगल काव्य लिहिण्याची आज्ञा केली. रामदास म्हणाला. "देवा! मी लहान मुलगा. मी शिकलेला नाही; मला काही येत नाही. खेळताखेळता मी धर्मपूजा केली आहे. मला कुठून धर्मठाकुराचे गुणगान जमणार?" त्यावर धर्मठाकुराने अभय देऊन सांगितले. "तू लिही. आजपासून तू कवीश्वर झाला आहेस. मी जाडगावचा धर्माधिकारी आहे. माझे नाव कालू ब्राह्मण. माझे नुसते स्मरण केलेस, की तुला गीते, कविता, काव्य सारे लिहिता येईल. आजपासून तुझ्या मुखातून मधुर गीतांच्या धाराच स्रवू लागतील."

एवढे बोलन धर्मठाकुराने रामदासाच्या उजव्या हातावर मंत्र लिहिला व निमिषमात्र त्याला आपले चतुर्भुजयुक्त प्रसन्न दर्शन देऊन तो अंतर्धान पावला.

यानंतर रामदासाने धर्ममंगल काव्याची रचना केली व शके १५८४ (इ. स. १६६२) च्या भाद्रपदात आपल्या गावच्या धर्मठाकुराच्या मंदिरात त्याचे गायनही केले. [बं. सा. क.]

रामदासस्वामी (इ. स. १६०८–१६८१) महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संत. मुसलमानी सत्तेच्या अमलाखाली चिरडल्या गेलेल्या आणि मोहनिद्रेत घोरत पडलेल्या महाराष्ट्र पुरुषाला आपल्या तपःपूत व संजीवक वाणीने जागे करणारा एक श्रेष्ठ महंत. एकनाथ, तुकाराम, रामदास व छत्रपती शिवाजी या चौघांनी गुलामीत खितपत पडलेल्या महाराष्ट्राचे अभ्युत्थान घडवून आणले. शिवछत्रपतींनी स्वराज्य स्थापले व समर्थ रामदासांनी त्यांच्या त्या कार्याला आशीर्वाद व प्रोत्साहन दिले. श्री. पांगारकर म्हणतात, की "नाथ-तुकोबांनी भागवत धर्माचा जयजयकार करून महाराष्ट्राची मनोभूमी शुद्ध केली आणि शिवबा–रामदासांनी त्याच भूमीवर स्वराज्याची भव्य इमारत उभारली."

कृष्णाजीपंत ठोसर हे समर्थांचे पूर्वज होत. ते ऋग्वेदी व जामदग्न्य गोत्राचे होते. त्यांचे वास्तव्य बेदर प्रांती होते. तिथे दुष्काळ व राज्यक्रांती या आपत्ती उद्भवल्या मुळे त्यांनी हिवरे येथे स्थलांतर केले. त्यांच्या पाच पुत्रांना बीड प्रांतात जोशी कुलकर्णीपणाची वृत्ती मिळाली. कृष्णाजीपंतांच्या दशरथ नामक पुत्राने हिवऱ्यापासून तीन कोसांवर जांब नावाचे गाव वसवले. तिथले जोशी-कुलकर्णीपणाचे वतनही त्याने मिळवले. दशरथाला सहा पुत्र होते. त्यांपैकी रामाजीपंत हा ज्येष्ठ पुत्र होय. त्यापासून विसाव्या पिढीत रामदासस्वामींचा



श्रीसमर्थ रामदासस्वामी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जन्म शके १५३० चैत्री नवमीला ऐन माध्यान्ही झाला.

सूर्याजीपंत ठोसर हे रामदासांच्या वडिलांचे नाव व राणूबाई हे त्यांच्या मातेचे नाव होय. त्यांना सूर्योपासना होती. सूर्याने त्यांना 'तुला दोन पुत्र होतील' असा आशीर्वाद दिला आणि या वराने त्यांना गंगाधर व नारायण असे दोन पुत्र झाले. गंगाधर हे पुढे श्रेष्ठ किंवा रामीरामदास या नावाने व नारायण प्रथम रामदास व नंतर समर्थ या नावांनी प्रसिद्धीस आले.

चैत्र शुद्ध नवमीला रामाचा जन्मोत्सव चालू असताना नारायणाचा (रामदास) जन्म झाला. नारायण लहानपणी अतिशय हूड असल्याच्या आख्यायिका आहेत. मात्र तो अत्यंत बुद्धिमान होता. वयाच्या १२ व्या वर्षांपर्यंत त्याने शब्दरूपावली, समासचक्र, अमरकोश, रुद्र, पवमान, इ. ग्रंथ मुखोद्गत केले. सूर्याजीपंत हे सत्पुरुष असल्यामुळे जे कोणी उपदेश मागायला येतील, त्यांना ते मंत्रदीक्षा देत असत. त्यांचे निधन झाल्यानंतर नारायणाचे थोरले बंधू गंगाधर ते काम करू लागले. नारायणाला वाटले, की आपणही मोठ्या भावाकडून मंत्रदीक्षा घ्यावी. पण 'तुझा हूडपणा जाऊन तू थोडा मोठा झालास, म्हणजे तुला उपदेश देऊ' असे श्रेष्ठ (गंगाधरपंत) त्याला म्हणाले. नारायणाला ते आवडले नाही. तो रुसून गावाबाहेरच्या मारुतीच्या देवळात जाऊन बसला. तिथे नारायणाला रामाचे दर्शन झाले आणि त्यानेच नारायणाला झोपेतून उठवून मंत्रोपदेश केला. रामदासांनी हा वृत्तान्त पुढील अभंगात सांगितला आहे —

राघवाची भक्ति सुखाची विश्रांति । पितयाची शांति झाली पुढे ॥
पुढे ज्येष्ठ बंधु न सांगेचि कांहीं । सुखें देवालयीं निद्रा केली ॥
निद्रा केली तेथें श्रीरामें उठवूनी । तोचि मंत्र कानीं सांगितला ॥

नारायणाचा हूडपणा काही केल्या कमी होत नाही व त्याच्या हातून संसाराला कोणत्याही प्रकारे हातभार लागत नाही, असे पाहिल्यावर त्याची आई एक दिवस त्याला उद्वेगाने म्हणाली. "नारायणा, तू शहाणा कधी होणार ? चार पैसे मिळवून वडील भावाला मदत केव्हा करणार ? अरे, पुरुषाने संसाराची काही चिंता वाहिली पाहिजे." नारायणाला ती गोष्ट लागली. तो रुसला व एका अंधाऱ्या खोलीत लपून बसला. लोकांनी आजूबाजूला पुष्कळ शोध केला; पण तो काही सापडला नाही. मग राणूबाई काही निमित्ताने त्या खोलीत गेली असता तिचा पाय त्याला लागला.

"नारायण, तू का रे ?" तिने विचारले.

"होय आई."

"इथे काय करतोस ?"

"आई, चिंता करतो विश्वाची." आणि खरोखरीच तसे झाले. राणूबाईला वाटले, की याला संसाराची बेडी घातली नाही, तर हा एक दिवस घरातून निघून जाईल आणि सैरावैरा भटकत राहील. म्हणून ती त्याच्या लग्नाच्या विचाराला लागली. नारायणाजवळ ती गोष्ट काढताच तो रानात धूम पळाला. लोक शोधायला गेले तर तो एका उंच वृक्षाच्या फांदीवर बसून झोके घेत होता. हे लोक आपल्याला पकडायला आले आहेत असे समजताच त्याने वृक्षावरून खाली नदीत उडी घेतली. ती उडी पाण्यातल्या खडकावर पडली. डोक्याला टेंगुळ आले आणि ती खूण जन्मभर कायम राहिली.

हा प्रसंग ताजा असूनही पुन्हा एकदा राणूबाईने त्याच्या लग्नाची गोष्ट काढलीच. 'माझ्यासाठी तू लग्नाला तयार हो. अंतरपाट धरीपर्यंत नाही म्हणू नकोस, तुला माझ्या गळ्याची शपथ आहे.' त्यावर नारायणाने 'आज्ञा प्रमाण' म्हटले.

आसनगावी नारायणाचे मामा भानजीपंत राहत होते. त्यांची कन्या वधू नेमस्त केली. लग्नाचे वऱ्हाड जांब गावी आले. सीमान्तपूजन, वाङ्निश्चय झाले. वरास समारंभाने वधूगृही आणले. फाल्गुन शु. अष्टमीचा ११ घटकेचा मुहूर्त साधायचा होता. मंगलाष्टके सुरू झाली. द्विजांनी 'सावधान' म्हणताच नारायणाने झुकांडी दिली. लग्नातून तो निसटला व त्याने तीन कोसावरचे गोदातीर गाठले. नारायणाने आईस दिलेले वचन अक्षरशः पाळले.

रामदास लग्नमंडपातून जे निघाले ते सरळ गोदावरीच्या परिसरात नासिक क्षेत्राजवळच्या टाकळी गावी गेले. तिथे नंदिनी व गोदावरी यांच्या संगमस्थानी त्यांनी तपश्चर्येसाठी जागा निश्चित केली. पहाटे संगमावर स्नान, मध्याह्नकालापर्यंत एका पायावर उभे राहून गायत्रीपुरश्चरण, माध्याह्नी सिद्ध भिक्षा, मग भोजन, नंतर नासिक क्षेत्री जाऊन शास्त्री-पंडितांपाशी संस्कृत ग्रंथांचे अध्ययन, नंतर तिथेच कथा—कीर्तनश्रवण आणि सायंकाळी टाकळीस परत आगमन, अशा प्रकारे रामदासांनी बारा वर्षे टाकळीत काढली. या एका तपात त्यांनी तीन गायत्रीपुरश्चरणे व 'श्रीराम जय राम जय जय राम' या त्रयोदशाक्षरी मंत्राचा १३ कोटी जप एवढ्या गोष्टी केल्या.

प्रस्तुत तपश्चर्येच्या काळात रामदासांनी जे विविध क्षेत्रांतले ज्ञान संपादले, त्याविषयी प्रा. न. र. फाटक सांगतात, ते असे—

पुरश्चरणाच्या व तीर्थयात्रेच्या काळात समर्थांनी आपल्या भक्तीच्या ध्येयाला अवश्य असणारे ज्ञानार्जन केले असले पाहिजे. नासिक हे प्रसिद्ध तीर्थस्थान असल्याने तेथे विद्वानांचे वास्तव्य असणे स्वाभाविक आहे. याशिवाय सिंहस्थासारख्या पर्वणीला इतर ठिकाणचे श्रेष्ठ पुरुष नाशकास येऊन आपल्या योग्यतेचा लाभ तेथील जनतेला देत असतील. समर्थांनी श्रवणाच्या क्षेत्रात बहुतेक सारे ज्ञानाचे विषय दाखल केलेले आहेत. जे जे काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या जाणतेपणात भर टाकणारे असेल ते सर्व ऐकावे, अशी समर्थांच्या विवेकप्रेमाची खूण श्रवणाच्या विवेचनात न चुकता



जुने राममंदिर– चाफळ

आलेली आहे. ज्ञानगुणांच्या संबंधात इतर संतांपेक्षा समर्थांचा विशेष म्हणजे त्यांचे संगीतकलेवरील प्रभुत्व हा होय. संगीत-विद्येत त्यांचे प्रावीण्य होते याची खात्री पटविणारी कविता कितीतरी आहे. गायन-वादनाचा निर्देश साध्या उपदेशातसुद्धा त्यांनी अनेकदा केलेला आहे. त्यांनी आपली पदे निरनिराळ्या रागांत रचलेली असून, रागांची लक्षणगीतेसुद्धा त्यांच्या कविते-मध्ये इतस्ततः सापडतात. कीर्तनासाठी गायनाचा सामान्य अभ्यास इतर संतांनी केलेला असेल, परंतु गायनविद्येचे सूक्ष्म ज्ञान व उत्कट प्रेम समर्थांच्या वाङ्मयात जसे दृष्टीस पडते, तसे ते इतर संतांच्या कवितेमध्ये दिसत नाही. समर्थांना पुस्तकी ज्ञान तर होतेच; परंतु त्यांचे अनुभवाचे ज्ञानदेखील विलक्षण आहे. रानातली व बागेतली झाडे, जनावरे, किडे, फुले, फळे; माणसांना भोगाव्या लागणाऱ्या नानाविध मानसिक विकृती व आपत्ती, भौतिक सृष्टीतील नानाविध अनुभव, यांचे वर्णन करू लागले की समर्थांना आपली माहिती आवरत नाही. विद्या, अनुभव, वैराग्य, परोपकारपटुता अशा साधनसंपत्तीची परि-पक्वता अंगी बाणल्यावर कृष्णातटाकी समर्थांनी जेव्हा देवा-धर्माचा अभिमान चेतविण्याचे कार्य हाती घेतले तेव्हा त्या भागात एका नव्या युगाला प्रारंभ झाला.

अशी ही तपश्चर्या संपल्यावर रामदास टाकळी सोडून सरळ तीर्थयात्रेला निघाले. प्रथम त्यांनी प्रयाग, काशी, गया ही त्रिस्थळी केली. नंतर ते काही काळ काशीत राहिले. पुढे त्यांनी अयोध्येस एक वर्ष वास्तव्य केले. नंतर ते हिमालयातल्या बदरी केदार, बदरी नारायण या क्षेत्रांच्या यात्रेस गेले. हिमालयाच्या प्रवासात त्यांना श्वेतमारुतीचे ध्यानस्थ स्थितीत दर्शन घडले. हिमालयाच्या उंच ठिकाणी समर्थांना शैत्यबाधा झाली. ती बाधा निवारण करण्यासाठी श्वेतमारुतीने त्यांना टोप, वल्कले, हुरमुजी रंगाची वस्त्रे, मेखला, जपमाळ, खडावा व कुबडी असा वेष दिला. रामदासांचा हाच वेष पुढे कायम राहिला.

अशा प्रकारे उत्तरेतील इतर तीर्थे करून जगन्नाथपुरीवरून ते दक्षिणेत उतरले. दक्षिणेतली रामेश्वर, शिवकांची, किष्किंधा, पंपा, गोकर्ण, इ. क्षेत्रे करून ते महाराष्ट्रात आले. महाराष्ट्रातली सर्व सुप्रसिद्ध क्षेत्रेही त्यांनी पाहिली. त्यांच्या या तीर्थयात्रेचे वर्णन हनुमंतस्वामींनी आपल्या बखरीत सविस्तर लिहिले आहे.

लग्नात द्विजांनी 'सावधान' म्हणताच समर्थ घरातून निघून गेले, त्याला आता चोवीस वर्षे झाली होती. तीर्थयात्रा संपल्यानंतर त्यांना वाटले, की एकदा घरी जाऊन मातुःश्रीचे दर्शन घ्यावे. म्हणून ते जांबेस आले. त्या वेळी त्यांची माता वृद्धत्वाने थकली होती. पुत्रवियोगाने रडत रडत दिवस काढल्याने तिची दृष्टीही गेली होती. अशा स्थितीत 'आई, मी नारायण

श्रीराममूर्ती–चाफळ

आलो आहे' असे म्हणून समर्थ जवळ येताच तिने त्यांना कडकडून मिठी मारली. समर्थांनी हस्तस्पर्श करून जेव्हा पुन्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दृष्टी दिली, तेव्हा तर तिच्या आश्चर्याला पारावारच उरला नाही. ती समर्थांना म्हणाली, 'तू भूतचेष्टा शिकलास काय? लहानपणापासून पिशाच्चाप्रमाणे हिंडतोस, मध्येच गुप्त होतोस आणि पुनः प्रकट होतोस, ही सारी भूतचेष्टाच वाटते मला.' त्यावर रामदासांनी उत्तर दिले, 'मला एक भूत कायमचे लागले आहे, ते भूत अद्‌भुत आहे.'

होते वैकुंठिचे कोनी। शिरले अयोध्याभुवनी।
लागे कौसल्येच्या स्तनी। तेंचि भूत गे माय॥

असा प्रारंभ करून रामदासांनी सगळी रामायणकथा थोडक्यात आईला ऐकविली व शेवटी म्हटले —

सर्व भूतांचे हृदय। नाम त्याचे रामराय।
रामदास नित्य गाय। तेंचि भूत गे माय॥

काही दिवसांनी चातुर्मास लागला. त्या अवधीत समर्थांनी भागवतातील कपिल–देवहूती या प्रकरणावर आईला पुराण सांगितले. ते ऐकल्यावर राणूबाईला समर्थांच्या योग्यतेची खरी कल्पना आली. ती समर्थांना म्हणाली, 'नारायणा! तू माझ्या कुशीत जन्म घेऊन माझा उद्धार केलास. तू अवतारी पुरुष आहेस. माझा मोहपाश तुटला. मी दुःखशोकातीत झाले. आता जगदुद्धार करण्यासाठी संचार करण्यास तू मोकळा आहेस.'



नवे राममंदिर — चाफळ.

समर्थांनी ही मातेची आज्ञा मानली आणि ते जांबेहून कृष्णेच्या परिसरात येऊन दाखल झाले. त्याच भागात शिवछत्रपतींचा स्वराज्यस्थापनेचा उद्योग चालू होता. त्या उद्योगाला पूरक असे देवाधर्माचे कार्य त्यांच प्रदेशात सुरू करावे, अशा विचाराने समर्थांनी तो प्रदेश निवडला.

इ. स. १६४४ च्या वैशाखात रामदास कृष्णातीरी दाखल झाले. प्रथम महाबळेश्वर येथे चार महिने राहून नंतर वाई व माहुली करून कराडजवळच्या शहापूरच्या डोंगरावर ते राहायला गेले. तिथे त्यांनी एका मारुतीची स्थापना केली. त्यांनी जे अकरा मारुती स्थापले, त्यांतला हा पहिला मारुती होय. समर्थ हे रामोपासक असल्यामुळे त्यांनी रामाचा साक्षात्कार घडवून आणणाऱ्या मारुतीची कृतज्ञताबुद्धीने जागोजागी स्थापना केली, असे श्री. न. र. फाटक म्हणतात. समर्थांचा मारुतीशी असलेला दृढ संबंध पाहून लोक त्यांना मारुतीचा अवतार मानू लागले.

समर्थांच्या मनात रामाचे एक मंदिर बांधण्याची इच्छा होती. ती इच्छा चाफळ येथे राममंदिर बांधून त्यांनी पुरी केली. त्यामुळे त्यांना फार धन्यता वाटली. जवळच्या एका डोहात त्यांना एक मूर्ती सापडली, तिची त्यांनी त्या मंदिरात स्थापना केली. ती सूर्यमूर्ती आहे, असे म्हणतात. नंतर त्यांनी या चाफळच्या देवस्थानाच्या पूजे-अर्चेसाठी काही इनामेही मिळविली. त्यांना हिंदू राजांनी जशी इनामे दिली, तसेच विजापूरच्या मुसलमान बाहशहानेही इनाम दिले. पुढे शिवाजीराजांनी त्याच कामासाठी अनेक गावे इनाम दिली व आदिलशाही इनाम पुढेही कायम राहील, असे आश्वासन दिले. सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. अरविंद मफतलाल यांनी प्रस्तुत देवालयाचा नुकताच जीर्णोद्धार केला असून, लाखो रुपये खर्च करून मूळच्या जागी अप्रतिम सुंदर व कलापूर्ण मंदिर निर्माण केले आहे.

स्वामींना चाफळ खोरे फार पसंत पडले. तिथे त्यांनी कायमचा निवास केला. स्वामी कीर्तनाच्या द्वारे लोकांना प्रपंच-परमार्थाचा बोध करीत. त्यामुळे ज्यांचा हृदय-पालट होई, ते स्वामींचे शिष्य होत. अनेक विद्वान व कर्तृत्ववान मंडळी समर्थांच्या शिष्यगणांत समाविष्ट झाली होती. त्यांत कल्याण हा स्वामींचा पट्टशिष्य होता. समर्थ आपल्या शिष्यवर्गात पुरुषांबरोबर स्त्रियांचाही समावेश करीत. कित्येक विधवा स्त्रियांवर अनुग्रह करून त्यांना त्यांनी परमार्थमार्गावर आणले होते. या शिष्य स्त्रियांमध्ये अक्काबाई व वेणूबाई या त्यांच्या प्रसिद्ध शिष्या होत. समर्थांच्या शिष्यवर्गात सर्व जातींचे स्त्री-पुरुष होते. त्यांत मुसलमान फकीरही होते. समर्थांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठिकाणी हा हिंदू, हा मुसलमान असा भेदभाव नव्हता. ते जाणत्या शिष्यांना मठस्थापनेस उद्युक्त करीत. महाराष्ट्रात, विशेषतः वाईपासून कोल्हापूरपर्यंतचा प्रांत, या भागात समर्थांच्या प्रेरणेने अनेक मठ निर्माण झाले होते. चाफळचा मठ हे त्यांचे आदिपीठ होते.

श्रीराम, हनुमान व तुळजाभवानी ही तीन समर्थांची उपास्य दैवते होती. दुर्जननाशक, सज्जनरक्षक व धर्मसंस्थापक ईश्वरावतार असे त्यांनी रामाचे रूप कल्पिले आहे. अचूक कार्यसिद्धी करणारा, महावीर, बुद्धिमान व शक्तिमान असे त्यांनी हनुमंताचे रूप वर्णिले आहे. भक्ताला रामाची भेट घडवून देणारा मध्यस्थ या स्वरूपातही त्यांनी मारुतीला पाहिले आहे. तुळजाभवानी ही रामवरदायिनी आणि रामराज्याची अधिष्ठात्री या स्वरूपात वर्णिली आहे.

छत्रपती शिवाजीमहाराजांनीही रामदासांचा उपदेश घेऊन त्यांचे शिष्यत्व पत्करले होते. त्यांनी अनेक गुरू केले होते; पण त्यांत समर्थांचा अधिकार विशेष होता. समर्थांनाही शिवाजीमहाराज हे रामराज्याचे संस्थापक अशा रामप्रभूचे अवतार असल्याचे वाटत होते. समर्थांनी महाराजांना लिहिलेल्या एका ओवीबद्ध पत्रात महाराजांची महती स्वच्छ शब्दांत वर्णून, त्यांना आदेश दिला आहे, तो असा–

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें नृपवर । तुच्छ केले ॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्मरक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय झाले । शिव कल्याणराजा ॥
सर्वत्र मंडळी धर्ममूर्ति । सांगणें काय तुम्हांप्रति ।
धर्मस्थापनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥

अशा रामराज्याची सांस्कृतिक पार्श्वभूमी निर्माण करणे म्हणजेच धर्मस्थापना करणे, हेच रामदासांचे अंगीकृत कार्य होते. त्याकरिता दुर्जनसंहार आणि भक्तजनांना आधार होण्यासाठी म्हणून 'रामकथा सर्व विश्वांत पसरवा' असा आदेश त्यांनी आपल्या शिष्य-महंतांना दिला.

महाराष्ट्रातील क्षत्रियांना त्यांनी असे सांगितले, की 'तुम्ही तुळजाभवानीचे स्मरण करून धर्मसंस्थापनेसाठी संघटित

मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।

असा समर्थांचा वीरांना आदेश आहे. तुळजाभ[...] रामदासांनी एका स्फुट कवितेत प्रार्थना केली आहे, ती [...]

येकची मागणें आतां । द्यावें ते मजकारणें ॥
तुझा तूं वाढवीं राजा । सीघ्र आम्हाची देखतां ॥
दुष्ट संव्हारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ सामर्थ्यें दाखवी ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । ईछा पूर्णची ते करी ॥

शिवाजी आणि रामदास यांच्या अनेकदा भेटी झाल्या[...] हे अनेक बखरींवरून व समर्थचरित्रांतून कळून येते. शि[...] पतींच्या स्वराज्यस्थापनेच्या उद्योगात व मसलतीत रामदा[...] प्रत्यक्ष भाग होता की नाही याबद्दल अजून वाद आहे[...] गृहीत धरूनही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात, ते[...]

'शिवाजीच्या राज्यविषयक उलाढालीत रामदासांचा [...] हात नव्हता हे जरी खरे मानले, तरी रामदास राजकार[...] नव्हते, ते इतर संतांसारखे केवळ परमार्थी व केवळ [...]द्भजनात दंग होते, हे मुळीच मान्य होण्यासारखे नाही. [...]परागत भक्तियोग व त्याचे अद्वैत तत्त्वज्ञान यांच्यांत [...]सांनी ऐहिक, सामाजिक जीवन भाग्यशाली व्हावे या [...] अनुसरून तात्त्विक अर्थ व्युत्पादून दाखविला आहे, तसा [...] कोणत्याही– ज्ञानेश्वरांपासून तुकारामापर्यंतच्या– संतांनी [...]विला नाही. ज्ञान, नित्यानित्यविवेक, बुद्धियोग, अहंता[...] सत्त्वगुण, सद्विद्या, योग, विरक्त, इत्यादी पारमार्थिक पद[...] अर्थ सांगताना त्यांची प्रपंचात परमार्थाइतकीच उप[...] आवश्यकता रामदासांनी प्रतिपादिली आहे. असे प्रति[...] अन्यत्र आढळत नाही. ऐहिक समाजजीवन म्हणजे ईश्वरी [...] असा अर्थ दाखविणाऱ्या जर्मन तत्त्वज्ञ हेगेलशी राम[...] वैचारिक साम्य इतिहाससंशोधक राजवाडे यांना दिसून [...] महत्त्वपूर्ण मानावे लागते.'

रामदासांनी कृष्णेच्या परिसरात अकरा मारुतींची स[...] केली, ती ठिकाणे अशी – (१) शहापूर (२) मसूर [...] उंब्रज (४) शिराळे (५) मनपाडळे (६) पारगाव (७) [...]गाव (८) बहेगाव (९) शिंगणवाडी आणि (१०) व (११) चाफळ. आणखीही कित्येक गावी त्यांनी मारुतींची स[...] केली होती, असे म्हणतात. मात्र वरील अकरा ठिकाणे स्व[...] रक्षणाच्या दृष्टीने मोक्याची होती म्हणून त्यांना विशेष [...] देण्यात येते.

समर्थांचे प्रमुख शिष्य – (१) छत्रपती शिवाजीम[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१) बाळाजी आवजी चिटणीस (३) प्रल्हादपंत (४) रामचंद्र नीळकंठ अमात्य (५) नानाजीपंत (६) रामकृष्ण सावकार (७) विश्वंभरपंत (८) विश्वासराय (९) नारायणपंत (१०) नरसो मलनाथ अंबर (११) कल्याण, इत्यादी. समर्थांच्या शिष्यिणी – (१) सतीबाई (२) चिमणाबाई ऊर्फ अक्का (३) द्वारकाबाई (४) कृष्णाबाई (५) वेणाबाई, इ.

समर्थांचे मठ असे – (१) जांब (२) चाफळ (३) सज्जनगड (४) डोमगाव (५) शिरगाव (६) कण्हेरी (७) दादेगाव, इ.

समर्थांचे अनुग्रहीत महंत – (१) कल्याण– मठ डोमगाव (२) दत्तात्रय– मठ शिरगाव (३) वासुदेव– मठ कण्हेरी (४) देवदास– मठ दादेगाव (५) रंगनाथ अडसुळे– मठ पाली (६) उद्धव– मठ टाकळी (७) बाजी– मठ शिरोळ (८) दिवाकर– मठ चाफळ, इत्यादी.

बहुतेक साऱ्या भारतात समर्थांचे शिष्य किंवा महंत त्या काळी विखुरले होते. कोणत्याही निमित्ताने अनेक लोक ज्या क्षेत्रात एकत्र येत, तिथे तिथे समर्थांचा एखादा तरी शिष्य किंवा महंत असेच. हे महंत प्रथम काही काळ रामदासांच्या सान्निध्यात घालवीत, त्यांच्याकडून संप्रदायाची रहस्ये समजावून घेत, त्यांचे ग्रंथ उतरून घेऊन त्यांची भक्तिभावाने पारायणे करीत आणि त्यांतील गूढ तत्त्वांचा अनुभव घेण्याचा प्रयत्न करीत.

अखेरचे दिवस – आयुष्याच्या अखेरीस सुमारे चार वर्षे समर्थांचे वास्तव्य सज्जनगडावर होते. त्या वेळी पूर्वीची संचारशक्ती त्यांच्या देहात उरली नसावी. अशा परिस्थितीत शिवाजीमहाराजांचा अकाली अंत झाला. समर्थांच्या चित्तावर त्या घटनेचा अनिष्ट परिणाम झाला असावा. महाराजांच्या पश्चात त्यांनी संभाजीला लिहिलेल्या पत्रात शिवाजीमहाराजांचे स्मरण ठेवून राज्य सांभाळण्याचा उपदेश केलेला आहे. शके १६०३च्या रामनवमीला समर्थांनी चाफळास जाऊन उत्सवात भाग घेतला. उत्सव आटोपल्यावर ते सज्जनगडास परत गेले. मार्गशीर्ष महिन्यात त्यांनी वीस दशकी दासबोधाची रचना पूर्ण केली. 'आपल्या मागे जगदीशाचे भजन चालवावे याशिवाय शिष्यांजवळ आपले दुसरे काही मागणे नाही' अशा अर्थाची ओवी त्यांनी शेवटी जोडली म्हणतात; परंतु ती ओवी बाराव्या दशकाच्या शेवटच्या समासात आहे. माघ वद्य ५ या दिवशी समर्थांनी कर्नाटकातून आलेल्या श्रीरामाच्या मूर्तीचे दर्शन घेतले, ती वेळ मध्यरात्रीची होती. दर्शनाचे समाधान व्यक्त करून 'ज्याच्या हातून पूजा घडेल त्याचे कल्याण होईल' असा आशीर्वाद त्यांनी दिला. माघ वद्य ९ च्या दिवशी अवतारसमाप्तीची वेळ जवळ येत असल्याचे जाणून समर्थांनी पलंग सोडला व खाली भुईवर उतरून ते उत्तराभिमुख बसले. अखेरच्या क्षणापूर्वी स्वामींनी त्रिवार रामनामाचा उच्च स्वराने घोष केला आणि स्वामींचा अवतार संपला. त्यापूर्वी शिष्यांच्या चित्ताची व्याकुळता पाहून समर्थांनी जे उद्गार काढले, ते सर्वांना मार्गदर्शक आहेत –

माझी काया आणि वाणी। गेली म्हणाल अंतःकर्णी।
परि मी आहें जगज्जीवनीं। निरंतर॥
आत्माराम दासबोध। माझें स्वरूप स्वतःसिद्ध।
असतां न करावा हो खेद। भक्तजनीं॥

समर्थांचे वाङ्मय – समर्थांचा वाङ्मयप्रपंच फार मोठा आहे. त्यात त्यांच्या दासबोधाला प्रथम स्थान आहे. अवतारी पुरुषांचे कार्य परिस्थितीनुरूप एकेरी किंवा दुहेरी असू शकते. दशावतारांपैकी पहिल्या काही अवतारी पुरुषांचे कार्य विशिष्ट परिस्थितीत मर्यादित होते. पण राम-कृष्णांचे कार्य मात्र एकेरी नाही. ते बहुविध आणि शाश्वत स्वरूपाचे आहे. रामराज्याचा आदर्श हा तीन्ही कालांत आदर्शभूत आहे. श्रीकृष्णाने उपदेशिलेल्या गीतेचे मूल्यही चिरंतन आहे. छत्रपती शिवाजी व रामदास यांचे अवतारकार्यही असेच चिरंतर प्रेरणा देणारे आहे. समर्थांचा दासबोध हा महाराष्ट्राची आधुनिक काळातील गीता होय, असे श्री. ज. स. करंदीकर म्हणतात. त्यात प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधला आहे. साध्या व्यवहारातल्या चातुर्याबरोबर राजकारणातले चातुर्यही त्यात उपदेशिले आहे. प्रस्तुत दासबोध वीस दशकांचा असून प्रत्येक दशतकात दहा समास आहेत. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात– स्वामी समर्थांचे व त्यांच्या दासबोध या ग्रंथाचे मराठी भाषेवरील ऋण कधी न फिटणारे आहे. मराठीचे अपार शब्दवैभव व विविध अर्थाची बोधक शब्दसामर्थ्ये समर्थांच्या ग्रंथाइतकी, प्राचीन व अर्वाचीन अशा कोणत्याही मराठी साहित्यात आढळत नाहीत. दासबोधात व इतर रामदासवाङ्मयात तर्कशुद्ध विचारसरणी व साहित्यसौंदर्य यांचे हृद्य मीलन झाले आहे. सृष्टीचे व मानवी व्यवहाराचे सूक्ष्म निरीक्षण त्यात प्रतिबिंबित झाले आहे. (दासबोध पाहा).

दासबोधाखालोखाल मनाचे श्लोक प्रसिद्ध आहेत. त्यांतील श्लोक बहुतेकांच्या तोंडी असतात. त्यांतील काही श्लोक असे –

समर्थाचिया सेवका वक्र पाहे
असा सर्व भूमंडळीं कोण आहे।
जयाची लिला वर्णिती लोक तीन्ही।
नुपेक्षी कदा राम दासाभिमानी॥
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें।
तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जनीं बंध सें सर्व भावें करावें ॥ इ.

या मनोबोधात उदात्त नीतिबोध आहे, भक्तिमाहात्म्य आहे, अद्वैताचे तत्त्वज्ञान आहे आणि प्रभू राम हा भक्तांना संकटात तारणारा असल्याची घोषणा आहे.

समर्थांनी सुंदर व युद्ध अशा दोन कांडांपुरते रामायण लिहिले असून, ते इतर रामायणांहून वेगळ्या प्रकारचे आहे. त्यात १३०० च्या वर श्लोक आहेत. शिवकालात या रामायणाचे गडा-गडावर रात्री वाचन होत असे. लंकादहनाच्या वेळी मारुतीने तिथे जो घोर अनर्थ घडवून आणला, त्याचे वर्णन समर्थांनी पुढीलप्रमाणे केले आहे –

बळें लागला पंडवारा भरारां ।
पुरीमाजि तो वन्हि धांवे सरारां ।
शिखा चालल्या अंतराळीं भडाडां ।
जळों लागली दिव्य लंका धडाडां ॥
रिपू क्षोभिले पाडिले वृक्षघातें ।
भुमी लोळती दैत्य होवोनि प्रेतें ।
पुढें देखतां जंबुमाळी कुटीला ।
बळें आखया आपटीला पिटीला ॥
पळाले फळी फूटली राक्षसांची ।
पुढें हाक गेली तया आखयाची ॥

'पंचवीस प्रश्न व पंचीकरणादी अभंग' या स्फुट काव्यात सुमारे २५० अभंग आहेत. हे अभंग समर्थांचे सहजोद्‌गार होत. रोज रात्रीची आरती व भजन झाल्यावर श्रोत्यांना अभंगाच्या रूपाने काही निरूपण ऐकविण्याचा समर्थांचा परिपाठ होता. अशाच प्रसंगी समर्थांना हे अभंग स्फुरले आहेत. मात्र समर्थ या काव्याला अभंग न म्हणता ओवी म्हणतात. त्यांतील एक अभंग असा–

ओवीचेनि मिसें देव आठवावा । हृदयीं धरावा सर्वकाळ ॥
सर्वकाळ मनीं स्वरूपाचा छंद । तेणें भवबंध तुटतील ॥
भक्ति भावें घडे सगुण देवाची । संगती देहाची जंव आहे ॥
आहे देव तंव सगुणीं भजावें । स्वस्वरूप व्हावें आपणचि ॥
आपणचि देव आपणचि भक्त । संतसंगें मुक्त आपणचि ॥

या प्रकरणातील पंचवीस प्रश्नांत जीव-शिव, आत्मा-अनात्मा व परमात्मा, प्रपंचाची उभारणी व संहारणी, विद्या-अविद्या, सगुण-निर्गुण, इ. गोष्टींची लक्षणे सांगितली आहेत. या प्रश्नांच्या उत्तरांत सारे अध्यात्म साठवले आहे. या प्रकरणातील ४०-५० अभंगांतून सत्संगाचे महत्त्व उत्कृष्ट प्रकारे सांगितले आहे. चंदनाच्या संगतीने सभोवारचे वृक्ष चंदनच होतात किंवा कस्तुरीच्या सहवासाने काळी मातीही कस्तूरी बनते. त्याचप्रमाणे साधुसंगतीने सामान्य जनही साधूच होतात. साधुसंगाने जीव संदेहरहित होतो. त्याला निश्चयाचे आत्मज्ञान होते व त्याच्या अंगचे अज्ञानादी दोष मावळून तो सुखस्वरूप होतो.

संतांचेनि संगें देव पाठी लागे । सांडू जातां मागें सांडवेना ॥
सांडवेना देव सदा समागमीं । बाह्य अंतर्यामीं सारिखाचि ॥
सारिखाची कडेकपाटीं शिखरीं । गृहीं वनांतरी सारिखाचि ॥

शंभर ओव्यांची एक, अशी बारा ओवीशतके असलेले समर्थांचे एक प्रकरण आहे. यात परमार्थाची रोकडी शिकवण आहे. साधूची लक्षणे, विवेक-वैराग्य, सगुण-निर्गुण ध्यान, इ. विषयांचे सहजसुंदर निरूपण यात आहे. यातील साधूच्या लक्षणांच्या काही ओव्या अशा–

सारिखाचि दिसे जनांचियेपरी । परी तो अंतरीं वेगळाचि ॥
वेगळाचि दिसे पूर्ण समाधानें । स्वस्वरूपीं मनें वस्ती केली ॥
तया नाहीं काम तया नाही क्रोध । तया नाहीं खेद स्वार्थबुद्धी ॥
बुद्धि निश्चयाची स्वरूपीं जयाची । कल्पना ठाइंची निर्विकल्प ॥
समाधान शांति क्षमा आणि दया । रंका आणि राया सारिखाचि ॥
सारिखाचि बोध जेथें नाहीं खेद । सर्वांसी अभेद सर्व काळ ॥
सर्व काळ गेला श्रवणमननें । सत्क्रिया भजनें हरिभक्ति ॥
हरिभक्ति करी जन तारावया । स्वधर्म विलया जाऊं नेदी ॥
निरंतर भाव सगुणभजन । येणें बहुजन उद्धरती ॥

आत्माराम हे प्रकरण समर्थांच्या सर्व अध्यात्मप्रकरणांत अत्यंत सरस आहे. ते एक पूर्णबोधाचे दिव्य रसायन आहे. त्यात आत्मारामाचे म्हणजेच परमात्म्याचे वर्णन करताना समर्थांनी लिहिले आहे, ते असे –

जेथें भांबावला तर्क । जेथें पांगुळला विवेक ॥
तेथें शब्दाचें कौतुक । केंवि घडे ? ॥
ऐसा सर्वात्मा श्रीराम । सगुण निर्गुण पूर्णकाम ।
उपमाचि नाहीं, निरुपम । रूप जयाचें ॥

चतुर्थमान, पंचमान, जनस्वभाव गोसावी, पंचसमासी, सप्तसमासी, जुनाट पुरुष व त्याची कन्या, षड्रिपुनिरूपण, पंचीकरणयोग, इ. स्फुट प्रकरणांतून त्यांनी भक्ती, नीती व आत्मनिवेदन स्थिती यांचे विवरण केलेले आहे. यांतील पंचीकरणयोगात मूळ मायेचे स्वरूप दाखविले असून, पुढे पंचीकरण सांगताना म्हटले आहे, ते असे –

पोटानें गांजिले प्राणी मृत्यूनें मारिले सदा ।
नेणती देव तो कैसा सिणती बहुधापरी ॥
ज्ञानेंचि चालते सृष्टी ज्ञान हें देव बोलिजे ।
धुंडितां धुंडितां देवो सत्संगें सांपडे जनीं ॥
कर्म तो पिपीलिकामार्ग ज्ञानमार्ग विहंगमु ।
ज्ञानऊपासनेमध्यें भेद तो पाहतां नसे ॥
तें ज्ञान कोणतें कैसें अभ्यासें पाविजे जनीं ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रवणभक्तिच्या योगें मुक्ती सायोज्य पाविजे ।।
मुक्तीनें मोकळें केलें भक्तीनें भेद नासिला ।
अभेदभक्तिच्या योगें आत्मनिवेदनी क्रिया ।।

करुणाष्टके नावाचे समर्थांचे एक मनोवेधक प्रकरण आहे. ही सारी करुणामय स्तोत्रे आहेत. ती अष्टकेच आहेत, असे नाही. त्यांत काही पंचके व दशकेही आहेत. श्लोकसंख्येचा त्यात नियम नाही. ही करुणाष्टके फार लोकप्रिय आहेत. नामदेव-तुकाराम यांच्या करुणापर अभंगांत जी भावविवशता आहे, तीच या करुणाष्टकांत आहे. देवाच्या भेटीची अत्यंत भूक लागली आहे, दर्शन होत नाही म्हणून जीव तळमळत आहे, जनसंसर्गाचा वीट आला आहे, आपल्या अवगुणांची खंत वाटून भक्त-श्रेष्ठांचे उत्तम गुण अंगी बाणावे, म्हणून जिवाची कासाविशी होत आहे, अशा अनुतप्त अंतःकरणाचा प्रेमपाझर म्हणजे ही करुणाष्टके होत. त्यांतील दोन श्लोक असे —

अनुदिनि अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा नीरसीं मोहमाया ।
अचपळ मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धांव आतां ।।
भजनरहित रामा सर्वही जन्म गेला ।
स्वजनजनधनाचा व्यर्थ म्यां स्वार्थ केला ।
रघुपति ! मति माझी आपुलीशी करावी ।
सकळ त्यजुनि भावें कास तूझी धरावी ।।

समर्थांचे जीवन व तत्त्वज्ञान — याविषयी मूलगामी विवेचन प्रा. गं. बा. सरदार यांनी आपल्या रामदास-दर्शन या ग्रंथात केले आहे, त्यातील सारभूत भाग असा —

लोकांचे धर्मविषयक औदासीन्य, भ्रांती व भ्रष्टता नाहीशी करून त्यांच्या चित्तात शुद्ध परमार्थविचार ठसवावा, हेच राम-दासांचे प्रमुख उद्दिष्ट होते.

रामदासांच्या विचारसरणीचा काही भाग चिरंतन स्वरूपाचा आहे आणि काही अर्थातच कालसापेक्ष आहे. मात्र या दोन्ही भागांच्या मुळाशी असलेला जीवनविषयक दृष्टिकोण एकच असल्याने, त्यांना एकमेकांपासून अगदी अलग काढणे योग्य होणार नाही. जेव्हा तात्कालिक प्रसंग व प्रश्न डोळ्यांपुढे ठेवून ते लेखन करतात, तेव्हा आपोआपच त्यात कालसापेक्षता येते. पण अशा लेखनातही ते आपल्या मूलश्रद्धांचे अनुसंधान सुटू देत नाहीत.

ते वैदिक धर्माचे अभिमानी होते. वेदशास्त्रपुराणांचे प्रामाण्य त्यांनी मानले होते. वेदान्तात वेदविद्येचे सारसर्वस्व ग्रथित झालेले आहे, अशी त्यांची धारणा होती.

रामदासांनी आपल्या ग्रंथांमधून त्या काळातील धर्मग्लानीचे चित्र अनेक ठिकाणी रेखाटले आहे. लोकांच्या धर्मभावनेला योग्य वळण लावण्याची, प्राचीन विद्येचे रक्षण, संवर्धन व प्रसार करण्याची जबाबदारी ब्राह्मणांची, पण त्यांनी वेदान्त-विचाराचे लोण सर्वसामान्य जनांपर्यंत कधी नेऊन पोचविले नाही. उलट ते स्वतःच श्रद्धाहीन व कर्तव्यपराङ्मुख बनले. शिपाईगडी व उदमी कारागीर आपापल्या व्यवसायांत गढून गेले होते. देवाधर्माची, नीतिन्यायाची कुणालाही चाड नव्हती. धार्मिक जीवनांत सर्वत्र अराजक फैलावले होते.

धर्मकारणातील, देवकारणातील हा गोंधळ नाहीसा करावा, बहुदेववादाचे प्रस्थ कमी करून मुख्य परमात्म्याकडे लोकांचे लक्ष वेधावे, भक्तिमार्ग वाढवावा, वेदान्तातील अद्वैतबोध लोकांच्या गळी उतरवावा, वैदिक धर्माची विस्कटलेली घडी पुन्हा नीट बसवावी अशी समर्थांची आकांक्षा होती.

परमार्थ हा रामदासाच्या चिंतनाचा मुख्य विषय असला, तरी प्रपंचाची हेळसांड त्यांना मुळीच मान्य नव्हती. परमार्थ काय किंवा प्रपंच काय त्यात सावधपण व साक्षेप यांची हरघडी गरज लागते, असे त्यांनी म्हटले आहे.

प्रपंचीं जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंचीं जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।।

म्हणून साधकाने प्रपंच व परमार्थ यांची सारखीच काळजी घेतली पाहिजे, असा समर्थांचा स्पष्ट अभिप्राय आहे. त्या दृष्टीनेच त्यांनी परमार्थविवेकाबरोबर प्रपंचबोधाचेही निरूपण केले. मात्र प्रपंच नेटकेपणाने करणे व प्रपंचात गुंतून राहणे यांत फार मोठी तफावत आहे. मनुष्य स्वभावतःच प्रपंचासक्त असतो. परमेश्वराचे ध्यान करावयास बसावे तो प्रपंचविषयक वासना व विचार भंडावून सोडतात. म्हणून "परमार्थासि मोडू नये । प्रपंचबळे" असा रामदासांनी इशारा दिला आहे.

त्यांना कलेची आवड होती. त्यांच्या वैराग्यवृत्तीत अरसिक-तेला थारा नव्हता. बाह्य सौंदर्य त्यांनी कधी तुच्छ लेखले नाही. रूपलावण्य व स्वरमाधुर्य यांना ते निषिद्ध मानत नव्हते. त्यांच्या वाङ्मयातील वर्णनपर भाग वाचला, की त्यांच्या सौंदर्यदृष्टीची साक्ष पटते. 'धन्य ते गायनी कळा' हे त्यांचे स्फुट प्रकरण प्रसिद्ध आहे. मात्र कलेचा विनियोग लोकांच्या तात्कालिक करमणुकीसाठी होता कामा नये, परमेश्वराच्या सेवेसाठी कला-वंताने आपली कला राबवली पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. "श्रीहरिवीण जे कळा । तेचि जाणावी अवकळा" असे त्यांनी कलोपासकांना स्पष्टपणे बजावले आहे. रसोत्कर्ष साधणारा वाग्विलास हे रामदासांनी साहित्याचे एक प्रमुख लक्षण म्हणून सांगितले आहे. आणि भक्तिरस हा सर्वश्रेष्ठ कल्पून, शृंगारादी लौकिक रसांचा मोह झुगारून देण्याचा त्यांनी साधकांना उप-देश केला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शृंगारिक ते आवडे। भक्तिवैराग्य नावडे।
कळालाघवी पवाडे। तो रजोगुण ॥

रामदासांच्या वाङ्मयात काही भाग गद्यगुणांनी संपन्न आहे; तर काही भागात काव्यगुणांचा उत्कर्ष साधलेला आहे.

रामदासांच्या विवेचनात्मक व उपदेशपर वाङ्मयातील भाषाशैली सुगम व अर्थगर्भ, अकृत्रिम व रोखठोक, प्रगल्भ आणि प्रभावी अशी आहे. त्यांचे शब्दभांडार समृद्ध आहे. त्यांच्या लेखनात कुठेही क्लिष्टता किंवा बोजडपणा नाही. अनुभवांचे वैपुल्य आणि अवलोकनाची सूक्ष्मता हे गुण त्यांच्या वाङ्मयात पदोपदी दिसून येतात. कोणत्याही विषयाचा तपशील देण्याच्या बाबतीत रामदासांचा हातखंडा आहे. त्यामुळे काही वेळा प्रतिपाद्य विषयाला उठाव मिळतो; पण काही वेळा अकारण पाल्हाळ व पुनरुक्ती हे दोष उत्पन्न होतात.

अध्यात्म हा रामदासांच्या विचारप्रणालीचा मध्यबिंदू आहे. मायाब्रह्माचा विवेक म्हणजे अध्यात्म. या जगात ब्रह्म हेच काय ते शाश्वत तत्त्व आहे; त्रिकालाबाधित अंतिम सत्य आहे. ते एकच एक आहे, अद्वितीय आहे. त्याव्यतिरिक्त दुसऱ्या कशालाच पारमार्थिक सत्ता नाही; म्हणजे खरेखुरे अस्तित्व नाही. जे काही दृश्य आणि अदृश्य, स्थुल आणि सूक्ष्म, सचेतन आणि अचेतन म्हणून आहे; जे डोळ्यांना दिसते किंवा मनाला भासते ते केवळ मायिक आहे; तो निव्वळ भ्रम आहे. नामरूपात्मक विश्व हा मायेचा पसारा आहे. मायिक विश्वाची उत्पत्ती, स्थिती आणि लय हा दृष्टिबंधनाचा खेळ आहे. मानवांची बाजीगिरी, राक्षसांची वोडंबरी तशी परमेश्वराची विचित्र माया आहे.

याचें ऐसें प्रतिवचन। ब्रह्म जें कां सनातन।
तेथें माया मिथ्या मान। विवर्तरूप भासे ॥

अशा आशयाचे प्रतिपादन त्यांच्या ग्रंथांतून वारंवार दृष्टीस पडते. त्याप्रमाणे मायेच्या साह्यानेच मायेचा निरास करावा लागतो. माया शुद्ध आणि शबल अशी द्विविध आहे. शुद्ध माया साधकाला मायातीताचे दर्शन घडवून स्वत: विराम पावते. माया बंधक आहे हे तर सर्वश्रुत आहे. पण

माया भवसिंधूचे तारूं। माया पाववी पैल पारू।
मायेवीण उद्धारू। प्राणीयास नाही ॥
मायेकरितां देव आणि भक्त। मायेकरितां ज्ञाते विरक्त ॥
मायेकरितां जीवन्मुक्त। होती स्वानुभवें ॥

असे तिचे तारकत्वही रामदासांनी दाखवून दिले आहे.

रामदास हे फक्त अध्यात्म व भक्ती यांचे निरूपण करून थांबले नाहीत, तर त्यांनी व्यवहारधर्माचाही ऊहापोह केला आहे. अध्यात्मविचारात मायावाद किंवा जगन्मिथ्यात्व स्वीकारणाऱ्या तत्त्ववेत्त्याची शिकवण ही नेहमी ऐहिक उत्कर्षाला वि[...]तक असते, हा आक्षेप किती फोल आहे ते रामदासांच्या [...]मयावरून चांगले ध्यानात येते. ते इतर संतांच्या मानाने शं[...]चार्यांच्या केवलाद्वैतमताला अधिक जवळ आहेत. तरी दे[...] व्यावहारिक गुणदोषांची इतकी उद्बोधक छाननी त्यां[...] खेरीज दुसऱ्या कोणीही केलेली नाही.

रामदासांची शिकवण ही सर्वसामान्य साधकांसाठी [...] आहेच, पण त्यांच्या आदेशानुसार धर्मस्थापनेच्या कार्यात [...] गेलेल्या महंतासाठी ती विशेषत्वाने आहे. आपल्या धार्मि[...] सामाजिक जीवनातील अंधभक्ती, विवेकशून्यता व आ[...]भ्रष्टता नाहीशी करून त्यात खऱ्या धर्मभावनेचे व आत्म[...]याचे वातावरण निर्माण करण्याचा समर्थांचा उद्देश होता. [...]साठी त्यांना सामुदायिक प्रयत्नांची गरज भासली. म्हणून [...] उत्सव, हरिकथा, निरूपणे यांच्या द्वारा समुदाय उभा कर[...] त्यांनी महंतांना प्रेरणा दिली.

रामदासांनी राजकारण हा शब्द कोणत्या अर्थाने [...] आहे, हा प्रश्न गेली कित्येक वर्षे वादग्रस्त होऊन राहिला [...] त्यांच्या वाङ्मयात जेथे जेथे राजकारण हा शब्द आलेला [...] तेथील निरूपणाचा प्रतिपाद्य विषय आणि त्याचा मागचा [...] संदर्भ नीट पाहिल्यास या प्रश्नाचा नीट उलगडा होऊ [...] शाश्वत नीतितत्त्वांना बाध न येता प्रपंच भाग्यशाली व [...] होण्यासाठी जे व्यवहारचातुर्य लागते, त्यालाच राम[...] राजकारण असे म्हटले आहे.

रामदास हे वैदिक परंपरेचे अभिमानी होते. वैदिक प[...] सामान्यत: ब्राह्मण व क्षत्रिय यांचे प्राबल्य होते. वेदविद्या [...] कर्ममार्ग यांचे रक्षण करण्याची जबाबदारी ब्राह्मणांची, प[...] योगक्षेम व प्रतिष्ठा ही राजाश्रयावर अवलंबून होती. [...] राजा हा परमार्थाची चाड बाळगणारा, देवांधर्मांचा [...] घेणारा आणि ब्राह्मणांची चिंता वाहणारा असला पाहिजे, [...] त्यांची धारणा होती. परधर्मियांच्या राज्यात धर्माचा [...] ढासळत होता. तीर्थक्षेत्रे मोडकळीस आली होती. ब्राह्मण [...]श्रित व सत्त्वहीन बनले होते. अशा निराशाजनक [...] धर्मशील राजा उदयास आला, तर धर्मस्थापनेचे कार्य [...] प्रभावी ठरेल असा समर्थांचा आशावाद होता. वैदिक [...] भवितव्य उज्ज्वल होण्याच्या दृष्टीने त्याला राजसत्तेचे [...] मिळण्यासारखी दुसरी स्पृहणीय गोष्ट नाही अशी त्यांची [...] होती. शिवाजीमहाराजांचे कर्तृत्व पाहून त्यांच्या मनात [...] राजाची कल्पना साकारली.

वारकरी संतांचा भागवतधर्म आणि रामदासप्रणीत [...] राष्ट्रधर्म यांचे जीवनविषयक तत्त्वज्ञान अगदी भिन्न आहे[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुष्कळांचा समज आहे. पण तो चुकीचा आहे. परमार्थसिद्धी, आत्मसाक्षात्कार हेच मनुष्यमात्राचे अंतिम साध्य आहे, असे दोन्ही संप्रदाय मानतात. समर्थांचे उपास्य दैवत रामचंद्र, पण राम आणि विठ्ठल यांत ते भेद मानत नाहीत. विठ्ठलाचा अवतार पतितांना पावन करण्यासाठी, दीन-अनाथांना तारून नेण्यासाठी आहे. ते भक्तांचे कृपास्थान आहे. रामचंद्रांचा अवतार दुष्टांच्या निर्दालनासाठी, राक्षसांच्या विनाशासाठी होता. पण कोदंडधारी रामाची पतितपावन म्हणूनही ख्याती आहे. पतितपावनाचा दास म्हणवून घेण्यात रामदासांना भूषण वाटत होते.

आपला समाज जात्याचा स्थितिप्रिय आणि अनेक वेगवेगळ्या थरांत विभागलेला आहे. अशा स्थितीत अगदी तळापर्यंत जनजागृती घडवून आणण्याचे कार्य दीर्घ काळ चालू ठेवावे लागते व त्याचे फळ पदरात पडण्यास बराच कालावधी लागतो. म्हणून स्वराज्य-स्थापना किंवा धर्मरक्षण यांसारख्या तात्कालिक उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी समाजातील प्रबळ व प्रतिष्ठित वर्गालाच मुख्यतः आवाहन करावे लागते. सामाजिक जीवनात त्याचे वर्चस्व असल्याने सर्वसामान्य लोकांचे साह्य त्याला मिळवता येते. शिवाजीमहाराजांच्या प्रेरणेने हे कार्य महाराष्ट्रात सुरू झाले होते. स्वधर्मनिष्ठेचा, प्रयत्नवादाचा व पुरुषार्थाचा उपदेश करून समर्थांनी या कार्याला नैतिक पाठिंबा दिला. ऐतिहासिक दृष्टचा त्यांची ही कामगिरी अतिशय मौलिक स्वरूपाची आहे. [म. वा. इ. ३; म. ध. प्र.; श्रीसमर्थचरित्र – श्री. न. र. फाटक, १९५१; रामदास : वाङ्मय आणि कार्य – श्री. न. र. फाटक, १९५३; श्रीसमर्थचरित्र – ज. स. करंदीकर; रामदास–दर्शन– श्री. गं. वा. सरदार, १९७२]

रामदासी संप्रदाय

समर्थ रामदासांनी स्थापलेला एक संप्रदाय. देश-काल-परिस्थिती पाहून समर्थांनी आपल्या या संप्रदायाची उभारणी केली आणि आपले धर्मकार्य शिष्यपरंपरेने पुढील पिढ्यांमध्येही चालत राहावे या दृष्टीने त्याची जडण–घडणही केली. या संप्रदायाला श्रीसंप्रदाय, समर्थसंप्रदाय दाससंप्रदाय, महाराष्ट्रधर्म, राघवाचा धर्म, इ. अन्यही नावे आहेत. रामदासस्वामी रामाला समर्थ हे बिरुद लावीत. ते स्वतः समर्थांचे सेवक होते; पण या सेवेमुळेच त्यांच्याही अंगी समर्थ रामाच्या सामर्थ्याचा संचार झालेला होता. रामाचा दासही त्याच्या कृपेने समर्थ होतो, असा रामदासांचा स्वानुभव आहे.

राघवाचा धर्म सांगताना समर्थ म्हणतात—

राघवाचा धर्म गाजो । कीर्ति अद्भुत माजो ।
ठाईं ठाईं देवालयें । भक्तमंडळीं साजो ।
शक्ति आहे तोचि फावे । दोनी लोक साधावे ।
इहलोक परलोक । शत्रु सर्व रोधावे ॥

आपल्या संप्रदायाची आखणी करताना रामदासांनी आपल्या पूर्वीच्या संतांची परंपरा कायम राखली आहे. जीवाला सायुज्यमुक्तीचे वर्म सापडावे, त्याच्या अंगी वैराग्यासह विवेक बाणावा, ज्ञानप्राप्तीने जीव हा शिवस्वरूप व्हावा आणि भक्तीची कास धरून जीवाने आपले हे शाश्वत कल्याण साधावे, या हेतुसमुच्चयाने ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ आणि तुकाराम यांनी आपली ग्रंथनिर्मिती केली. समर्थांनीही तेच उद्देश डोळ्यांपुढे ठेवले होते. कर्म, भक्ती व ज्ञान याविषयींचे समर्थांचे विचार भागवतधर्मी संतांप्रमाणेच आहेत. समर्थांनाही मोक्ष हाच एकमेव साध्य होता. पण त्यांची धारणा थोडी वेगळी होती. ज्याचे ऐहिक जीवन धड नाही, त्याचे परत्रही धड असू शकत नाही. तेव्हा मोक्षसिद्धीचा मार्ग चोखाळीत असतानाही ऐहिक प्रपंचाविषयी उदासीन न राहता प्रयत्नशील असावे व प्रपंच नेटका करीत करीतच परमार्थ साधावा, असे त्यांना वाटे. प्रपंच व परमार्थ या दोन्ही ठिकाणी सावधानता असावी, रिकामा क्षण दवडू नये, झडझडून कष्ट करावे, यत्न तो देव जाणावा, कठीण प्रसंगासाठी थोडाबहुत द्रव्यसंचयही करावा, असे सामान्य जनांना समर्थांचे सांगणे असे. ते म्हणतात–

कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥

धर्म, अर्थ, काम व मोक्ष अथवा प्रपंच-परमार्थ, अरत्र-परत्र, किंवा अभ्युदय-निःश्रेयस या ध्येयाची सिद्धी ज्याने प्रयत्नपूर्वक केली, त्याला समर्थ उत्तम पुरुष म्हणतात. आपण स्वतः ज्ञानाने तृप्त व्हावे, ते ज्ञान दुसऱ्याला द्यावे, 'आधी केले मग सांगितले' अशा वृत्तीने वागावे, वाणी मृदू व रसाळ असावी, मन मोठे करून दुसऱ्यांच्या सान-थोर अपराधांची क्षमा करावी आणि सकळ जन राजी राखावे, असा समर्थांचा आपल्या महंतांना उपदेश असे. हें उत्तम गुण अंगी बाणवील, तो उत्तम पुरुष होईल, असे ते सांगत.

श्रीराम उपास्य – समर्थांनी आपल्या संप्रदायाचे श्रीराम हे उपास्य दैवत ठरवले. समर्थांचा उपास्य श्रीराम हा धनुर्धारी आहे. अनुकूल काळाची वाट पाहत बसण्याचे दिवस संपले असून, आता संघटनसंचलनाचे मोके साधण्याचे दिवस आले आहेत, हे जाणून परिस्थितीसापेक्ष असे धनुर्धारी रामाचे दैवत समर्थ संप्रदायाने लोकांना दिले. धनुर्धारी रामाने दैत्य-दानव मर्दिले आणि सर्व जनांना निर्भय, सुखसंपन्न, धर्माधिष्ठित करून सकलकल्याणकारी असे रामराज्य स्थापले, हा इतिहास रामायणावरून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कळतो. तेच रामराज्य पुनश्च या भूमीवर निर्माण व्हावे, म्हणून समर्थांनी धनुर्धारी रामाची उपासना लोकांत प्रसृत केली. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या ठिकाणी त्यांना रामप्रभूच अवतरलेला दिसला. उत्तम पुरुषाच्या लक्षणांनी युक्त असा हा नरपुंगव देशातली परधर्मियांची अस्मानी सुलतानी नष्ट करून, परचक्राचा विध्वंस करून आणि दैत्य-दुर्जनांची बंडे मोडून काढून, या भरतभूमीवर रामराज्य स्थापील, अशी रामदासांच्या मनात श्रद्धा उत्पन्न झाली. या उत्तम पुरुषाचे प्रयत्न सिद्धीस जायचे असतील, तर सर्व समाज बलशाली, निधड्या छातीचा, स्वामिभक्त आणि प्रसंगी प्राणावर उदार होऊन 'मारिता मारिता मरणारा' असा व्हायला हवा होता, म्हणून समर्थांनी रामाच्या जोडीनेच जितेंद्रिय, बलसंपन्न आणि स्वामिकार्यसाधक अशा मारुतीची उपासना समाजात रूढ केली. हनुमंत हा समर्थांच्या रामोपासनेचा परमादर्श आहे. रामभक्तांना रामाची भेट घडवून देणारा मध्यस्थही तोच आहे. इतकेच नव्हे, तर राम आणि हनुमंत हे एकात्मच आहेत. ते म्हणतात –

आमुचे कुळीं हनुमंत। हनुमंत आमुचें मुख्य दैवत ॥
तयावीण आमुचा परमार्थ। सिद्धीतें न पावे कीं ॥
साह्य आम्हांसी हनुमंत। आराध्य दैवत श्रीरघुनाथ।
सद्गुरू श्रीराम समर्थ। काय उणें दासासी ॥

समर्थ हे आपला संप्रदाय स्वरूप संप्रदाय असल्याचे सांगतात. अयोध्या मठ हा त्या संप्रदायाचा आदिमठ आहे.

स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ। जानकी देवी श्रीरघुनाथ दैवत।
मारुती उपासना मार्ग नेमस्त। वाढविला परमार्थ रामदासी ॥

यावरून हे स्पष्ट होईल, की समर्थसंप्रदाय हा पुरातन स्वरूप संप्रदायाचाच एक युगसापेक्ष समर्थ आविष्कार आहे.

संप्रदायाचा उद्देश – कार्य, कार्यदेश, समाज व उपास्य निश्चित केल्यानंतर समर्थांनी एका राष्ट्रीय ध्येयाने समाजाची संघटना करण्यास सुरुवात केली. आपले कार्य सर्वत्र फैलावले जावे, यासाठी समर्थांनी प्रथम काही महंत निर्माण केले. प्रत्येक महंताला मठ बांधून दिला. या मठात महंताने भैक्ष्य वृत्तीने राहून समाज प्रबोधन करावे, असा त्यांना समर्थांचा उपदेश असे. समर्थांनी आपल्या आयुष्यात ११०० महंत निर्माण केले. महंत होण्याची पात्रता ज्यांच्या अंगी आहे असे समर्थांना दिसे, अशा विशी-बावीशीच्या आतल्या ब्राह्मण व मराठा तरुणांना समर्थ निवडून काढीत. समर्थ त्यांना काही काळ स्वतःजवळ ठेवून घेत, त्यांना योग्य ते शिक्षण देत आणि मग त्यांना महंती चालवण्यासाठी कुठल्यातरी विभागात पाठवून देत. शिष्याला महंतीसाठी पाठविताना समर्थ त्याला कोणत्या वस्तू देत आणि कोणती कर्तव्ये सांगत, याचे दिग्दर्शन पुढील ओव्यांत आहे –

करूं महंतीला धाडिती जयासी। दासबोध झोळी काठी तयासी ॥
बोधूनि सिकविती श्रीरामासी। धरोन मानसी वर्तावें ॥
ग्रंथांतरीं विवरत जावें। नित्यनेम श्रद्धेनें सर्वदा करावे।
कीर्तनासि विन्मुख न व्हावें। सार शोधावें प्रत्ययानें ॥
येका कारणें बोलतां स्वहित। सकळांसी तेणें बिंबतो अर्थ।
जेंवि उद्धवासि बोधितां कृष्णनाथें। जाले पावन बहुतेकी ॥

संप्रदायाची लक्षणे – आपल्या संप्रदायाची वीस लक्षणे समर्थांनी सांगितली आहेत, ती अशी –

प्रथम लिहिणें दुसरें वाचणें। तिसरें सांगणें अर्थांतर ॥
आशंकानिवृत्ति ऐसी चौथी स्थिति। पांचवी प्रचीति अनुभवें ॥
साहावें तें गाणें, सातवें नाचणें। टाळी वाजविणें आठवें तें ॥
नववा अर्थभेद, दहावा प्रबंध। अकरावा प्रबोध प्रचीतीसी ॥
बारावें वैराग्य, तेरावा विवेक। चौदावा तो लोक राजी राखे ॥
पंधरावे लक्षण तें राजकारण। सोळावें तें जाण अव्यग्रता ॥
पंधरावें जाणावा हा गुण सत्रावा। काळ समजावा सर्वां ठायीं ॥
अठरावें लक्षण वृत्ती उदासीन। लोलंगता जाण तेथें नाहीं ॥
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान। राखे समाधान ज्यांचें त्यांचें।
विसावें लक्षण रामउपासना। वेध लावी जना भक्तिरंगें ॥

ही सर्व लक्षणे सांप्रदायिकांनी, विशेषतः महंतांनी अंगी बाणवून घेतली पाहिजेत, असा समर्थांचा कटाक्ष होता. महंतांनी समुदाय करावा असे समर्थांचे मुख्य सांगणे असे (दास. १२.१०.३२). समुदाय करण्यासाठी महंताच्या अंगी रोकडी प्रबोधनशक्ती (विचार पटवून देण्याचे सामर्थ्य) आणि बहुतांचे मनोगत जाणणे या दोन गोष्टी असाव्या लागत. समुदाय म्हणजे संघटना. समुदायाचा नेमका अर्थ सांगताना प्रा. न. र. फाटक म्हणतात –

समुदाय म्हणजे कसल्या तरी अकल्पित निमित्ताने सहज एकत्र गोळा होणाऱ्या व निमित्त संपल्यावर पांगून आपापल्या ठिकाणी जाणाऱ्या माणसांचा जमाव नव्हे. अनेक व्यक्ती एका उद्देशाने व जुटीने आपल्या गुरूची विचारसरणी ऐकण्यासाठी व अंमलात आणण्यासाठी स्नेहाच्या, सहकाराच्या भावनेने पुनःपुन्हा ठरलेल्या वेळी, ठरल्या स्थळी एकत्र येतात, तेव्हा त्या व्यक्तींच्या जमावाला समुदाय हा शब्द औचित्याने लावता येतो. समुदायाच्या ठिकाणी जूट व शिस्त या दोन गुणांचे अस्तित्व प्राबल्याने पाहिजे. संप्रदाय, पक्ष हे शब्द जुटीच्या, शिस्तीच्या व एका समुदायाचेच पर्याय होत. सभा, फड, मंडळे, मंडळ्या, मजलस इ. शब्दांचा समर्थ समुदायाच्या कार्याच्या अर्थाने उपयोग करताना आढळतो. मठ हा शब्द पारमार्थिक समुदायाच्या विवरणात आढळतो.

मठ, महंत, दिनचर्या – रामदासी मठात रामपंचायतनाची स्थापना केलेली असते. पुढे वीर मारुती उभा केलेला असतो. शिवाय दासबोधादी समर्थांचे ग्रंथ व समर्थविषयक ग्रंथ ठि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठेवलेले असतात. मठाचा खर्च भिक्षेवर चालवला जातो. ही भिक्षा लोकांकडून कोरडी धान्यरूपाने मिळविलेली असते. महंताच्या हाताखाली काही रामदासी हे भिक्षा मागण्याचे काम करतात. मठामध्ये प्रसंगोपात्त उत्सव होतात. हे उत्सव हा समुदायाचा एक भाग असतो. ब्रह्मचारी व घरभारी असे दोन प्रकारचे महंत असतात. दोन्ही प्रकारच्या महंतांना खाजगी मालमत्ता करण्याचा निषेध असतो. भिक्षेत जे काही धनधान्य मिळेल ते सगळे त्यांना मठार्पण करावे लागते. मठामध्ये महंताने जी कर्तव्ये नित्य करायची असतात, ती अशी –

(१) दासबोधाचे दोन समास व मनोबोधाचे अकरा श्लोक यांचे नित्य वाचन.

(२) दिनचर्या – पहाटे उठणे, तत्त्वमसि मंत्राचे चिंतन, मोक्षसाधनमंत्राचा जप, पूजामूर्तीचे ध्यान, भजन व प्रार्थना, रामाचे चिंतन, आरती, नित्यकर्मे, एकांती भजन, मानसपूजा व मंत्रजप, देवपूजा, गुरुवंदन, सूर्यनमस्कार, तत्त्वमसि मंत्राने तीनदा तीर्थग्रहण, नैवेद्यसमर्पण, भोजन, आपापला व्यवसाय करणे, सायंकाळी स्तोत्रे म्हणून मारुतीची आराधना, भोजन.

(३) पंचपदी – दासविश्रामधामात पंचपदी नावाचे आणखी एक कर्तव्य सांगितले आहे. ही पंचपदी अशी – 'श्रीराम समर्थ जय जय राम' या मंत्राचा जप, भजन, करुणाष्टके म्हणत रामाचे ध्यान, रामदासी कवितांचे वाचन व आरती. एवढा कार्यक्रम झाल्यावर रात्रीची झोप.

रामदासी संप्रदाय हा वारकरी संप्रदायाप्रमाणे अद्वैतवादी आहे. तरी पण द्वैतवादी माध्व संप्रदायाचे काही आचार त्याने स्वीकारलेले आहेत. या विषयी श्री. कालगावकर सांगतात, ते असे – 'आचार व उपासना ह्यांत बहुतांशी साम्य असल्यामुळे माध्व लोकांचा फार मोठा समुदाय रामदासी पंथात मिळून गेलेला आहे. आचारादिकांत साम्य असल्यामुळे महाराष्ट्रीय माध्व रामदासी पंथाकडे सहजच वळतात.'

संप्रदायाची सांप्रतची अवस्था – समर्थांच्या पश्चात प्रस्तुत संप्रदायाची पिछेहाट झाली. समर्थांचे अनेक शिष्य पारमार्थिक क्षेत्रात अधिकारी पुरुष गणले जात होते. त्यांनी काही वाङ्मयनिर्मिती केली व मठ-महंती सांभाळली. पण महंतांमहंतांमध्ये स्वार्थामुळे कलह माजले. राज्यकर्त्यांकडून इनाम जमिनी मिळवाव्या आणि त्या उत्पन्नावर देवतार्चनादी कृत्ये करून जगावे, एवढीच माफक आकांक्षा महंतांमध्ये दिसू लागली. त्यामुळेच जनतेत संप्रदाया विषयी आस्था उरली नाही. समर्थांनी उभारलेल्या मठ-मंदिरांना सांप्रत अवकळा आली असून, तिथे चैतन्याचा अभावच जाणवतो. या विषयात अधिक विवेचन करताना श्री. पु. पां. गोखले यांनी लिहिले आहे, ते असे –

समर्थांच्या हयातीत संप्रदायाची वाढ झपाट्याने झाली. समर्थांची अद्वितीय कर्तृत्व–वक्तृत्वशक्ती व पुढे मिळालेले राजसहाय्य आणि जनतेतील विभूतिपूजेचा परंपरागत जिव्हाळा ही त्याची प्रमुख कारणे होत. शिवाजीमहाराजांनी इ. स. १६५८ मध्ये रामोत्सवास दोनशे होनांची देणगी दिली तेव्हापासून व विशेषतः चाफळच्या देवस्थानास इ. स. १६७८ च्या दसऱ्याच्या दिवशी छत्रपतींनी सनद करून दिल्यापासून समर्थ संप्रदायास सुरू झालेला राजाश्रय संभाजी, राजाराम व शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सुरू होताच. त्यामुळेच रे. डेमिंगने "समर्थसंप्रदाय हा व्यवहारदृष्ट्या महाराष्ट्र राज्याचा धर्मच होऊन बसला होता" असा शेरा मारला आहे. असे असूनही समर्थांच्या पश्चात समर्थ संप्रदायाला उतरती कळा लागली. त्यांच्या स्वर्गवासानंतर त्यांची जागा भरून काढील, असा नेता नव्हताच. औरंगजेबाच्या दख्खन स्वारीच्या धामधुमीमुळे चाफळास व सज्जनगडास दरसाल भरणारा महंतमेळावा बंद पडला. समर्थशिष्या अक्काबाई देशपांडे यांनी चाफळ-सज्जनगडाचे मठ नित्यनैमित्तिक चालवून सांभाळले व त्यांचेच अनुकरण इतरही सांप्रदायिकांनी केले. पण समर्थ सांप्रदायिकांच्या वंशपरंपरागतांनी व नूतन दीक्षितांनी आपला संप्रदाय तेजस्वी करण्याचे व समर्थांचा वारसा ऐतिहासिक दृष्ट्या चालविण्याचे मनावरच घेतले नाही. किंबहुना तो मगदूर आपल्यात नाही, असेच ते वागले. एकदा हा जो क्षय त्या संप्रदायाला लागला, तो ब्रिटिश अमलातही चालू राहिला. वाईचे गोसेवक चौंडेमहाराज, गोंदवलेकर महाराज, हैदराबाद मठाचे केशवबुवा बोरगावकर अगर गोमांतकशुद्धिप्रसिद्ध विनायकमहाराज मसूरकर यांनी आणि ब्रिटिशांना बाधक वाटणारा 'रामदासीबोवा' लिहिणारे ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर व समर्थ वाग्देवतामंदिराचे शंकर कृष्ण देव यांनी आपापल्या परीने समर्थ संप्रदायाला धार आणण्याचे काही काळ यशस्वी प्रयत्न केले. पण ते तोटकेच पडले. चाफळ, सज्जनगड व ठिकठिकाणचे मठ येथे हल्लीही राम-हनुमंतोत्सव होतात आणि यात्रा भरतात. पण भक्तिभावाच्या परिपाटीपलिकडे फारसे चैतन्य त्यांत नाही. प. पू. श्रीधरस्वामीमहाराजांचे समर्थसेवा मंडळ नव्या काळाशी साजेशी व्यवस्था राखून समर्थांची कर्तृत्वस्थाने समाजाच्या स्फूर्तीकरिता नीटनेटकी ठेवण्याचा प्रयत्न करून राहिले आहे व समर्थसंजीवनीचा प्रसार करीत आहे. पण सांप्रदायिकांची साखळीसून वळकट संघटना बांधून समाजाचे जीवन 'उत्कटभव्य' करण्यासाठी सांप्रदायिकांनीच सहकारपूर्वक कर्तव्य बजावल्याशिवाय संप्रदायाला अपेक्षित तेज चढणार नाही. [श्रीसमर्थचरित्र – श्री. न. र. फाटक, १९५१; म. वा. इ. ३; स्वा. वि. ज. स्मृ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामदेव (इ. स. १४१२–१४५८) राजस्थानातील एक सिद्ध पुरुष. दिल्लीच्या तोमर (तुंवर) वंशातील राजा अनंगपाल याच्या कुलात, रुणेचा गावी रामदेवाचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव अलमल व मातेचे नाव मैनादे असे होते. रामदेवाला वीरमदेव नावाचा एक भाऊ होता. एकदा रामदेव व वीरमदेव हे दोघे चेंडू खेळत खेळत पोकरण गावाच्या दिशेने बरेच लांब गेले. वीरमदेव नंतर घरी परत आला. पण रामदेव तसाच पुढे गेला व सिद्ध योगी बालकनाथाच्या कुटीत पोचला. हा सत्पात्र आहे, असे जाणून बालकनाथाने आपला सिद्ध हस्त त्याच्या मस्तकावर ठेवला व त्याला आपला शिष्य बनवले. गुरु-कृपेचा लाभ झाल्यावर रामदेवाने अत्यंत क्रूर अशा भैरू नामक पुरुषाचा वध केला. लोक भैरूला राक्षसच समजत असत. त्याच्या भयाने पोकरणाच्या आसपासचा भाग उजाड झाला होता. बालकनाथाच्या आज्ञेने रामदेवाने व त्याच्या पित्याने पोकरणाचा भाग पुन्हा नांदता केला.

रामदेवाने पुढे साधना केली व अनेक सिद्धी प्राप्त करून घेतल्या. त्याने केलेले चमत्कार पाहून अनेक हिंदू व मुसलमान त्याचे भक्त बनले. रामदेवाने पोकरणापासून आठ मैलांवर असलेल्या रुणेचा गावी जीवत्समाधी घेतली. सांप्रत त्या गावाला रामदेवरा असे म्हणतात.

त्याच्या समाधीच्या स्थानी भाद्रपद व माघ या महिन्यांत मोठी यात्रा भरते. राजस्थान, गुजरात व माळवा या प्रदेशांतून हजारो यात्रेकरू त्या वेळी इथे येतात. रामदेवाचे पुजारी चांभार असतात. त्यांना रिखिया किंवा भगत असे म्हणतात. रामदेवाची गीते गाऊन हे लोक त्या दिवसांत जागरण करतात, त्याची आरती करतात व त्याला नैवेद्य दाखवतात. रामदेवाचे भक्त सोन्याच्या किंवा चांदीच्या पत्र्यावर त्याची मूर्ती कोरून, तो पत्रा गळयात घालतात.

रामदेवावर अनेक पुस्तके लिहिलेली आहेत. रामदेवजीवन-रत्नावली, रामदेवजीका ब्यावला, रामदेवसागर, रामदेवलीला, रामदेवचालीसा, इ. पुस्तके अत्यंत लोकप्रिय आहेत. रामदेवा-विषयी हजारो भजनेही लिहिलेली आहेत. [राजस्थानी लोकोत्सव, मरुभारती, ऑक्टो. १९५५; धर्मयुग, २ डिसें. १९६२]

राम दैवज्ञ (इ. स. चे १७ वे शतक) एक ज्योतिर्विद. हा नीलकंठ ज्योतिर्विदाचा कनिष्ठ बंधू होता. इ. स. १६०० साली काशी येथे राम दैवज्ञाने मुहूर्तचिंतामणी हा ग्रंथ रचला. आजही ज्योतिषाच्या विद्यार्थ्यांना हा ग्रंथ शिकविला जातो. काशीच्या आसपासच्या प्रदेशात यात्रा, विवाह, उत्सव इत्यादींसाठी याच ग्रंथाच्या आधारे मुहूर्त काढतात. या ग्रंथावर नीलकंठाचा पुत्र गोविंद दैवज्ञ याने पीयूषधारा नामक टीका लिहिली आहे.

जयपूरनरेश रामचंद्र यांच्या सांगण्यावरून राम दैवज्ञाने रामविनोद नामक एक करणग्रंथही लिहिला आहे. यात सूर्यसिद्धान्तानुसार वर्षमान, क्षेपक व ग्रहगती दिलेल्या आहेत. या ग्रंथात ११ अध्याय व २८० श्लोक आहेत. [भा. ज्यो. इ.; का. सा. सा.]

रामन, चंद्रशेखर वेंकट (इ. स. १८८८–१९७०) आंतरराष्ट्रीय कीर्तीचे हिंदी विज्ञानाचार्य व जगप्रसिद्ध रामन परिणामाचे जनक. यांचा जन्म त्रिचनापल्ली येथे ७ नोव्हेंबर १८८८ रोजी झाला. त्यांच्या पित्याचे नाव रामनाथ चंद्रशेखर अय्यर व मातेचे नाव पार्वती-अम्मल असे होते. रामनाथ चंद्रशेखर अय्यर यांना संगीताची आणि विज्ञानाची फार आवड होती. ते विजगापट्टम येथील कॉलेजात विज्ञानाचे अध्यापक होते. ते वीणा उत्कृष्ट वाजवीत. रामनांना संगीताचा आणि विज्ञानाचा वारसा वडिलांपासून मिळाला.

मोठेपणी रामन विज्ञानमहर्षी झाले, पण बालपणी रामनांचे मन धर्म आणि अध्यात्म या विषयांत रमले होते. त्यांची बुद्धी तीव्र होती. लहान वयातच त्यांनी रामायण आणि महाभारत या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. ते कॉलेजात बी. ए. च्या वर्गात असताना प्राचीन महाकाव्ये या विषयावर एक निबंधस्पर्धा ठेवलेली होती. या निबंधस्पर्धेत रामनांनी रामायण-महाभारतावर एक सुंदर निबंध लिहून पहिले बक्षीस मिळविले. त्या वेळी रामनांचे वय अवघे चौदा वर्षांचे होते. मॅट्रिकची परीक्षा ते बाराव्या वर्षीच उत्तीर्ण झाले होते.

मद्रासच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात बी. ए. ला असताना त्यांनी विज्ञान हा विषय घेतला. त्यांचा वाचनाचा वेग दांडगा होता. त्यामुळे ते नेहमी वर्गातील अभ्यासाच्या खूप पुढे असत. बी. ए. ची परीक्षा ते पहिल्या वर्गात पास झाले आणि पदार्थविज्ञानात सर्वांत अधिक गुण मिळाल्याने त्यांना ॲनी सुवर्णपदकही मिळाले. नंतर त्यांनी एम. ए. चा अभ्यास सुरू केला. वर्गातल्यापेक्षा त्यांचा अभ्यास पुष्कळच पुढे असल्याने वर्गातील व्याख्यानांना हजर राहिले पाहिजे, हा नियम त्यांच्या बाबतीत सैल करण्यात आला. या वेळाचा उपयोग त्यांनी आपल्या विषयाचे सखोल अध्ययन व संशोधन करण्याच्या कामी केला. एकदा त्यांचा एक मित्र ध्वनिशास्त्राचा प्रयोग करीत असता त्याला काही नवीन गोष्टी आढळल्या. त्यांची कारणे त्याने आपल्या प्राध्यापकांना विचारली, पण प्राध्यापकांना ती सांगता येईनात. रामनना ही गोष्ट समजताच त्यांनी स्वतः तेच प्रयोग केले व अनेक पुस्तके वाचून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नव्या निरीक्षणाचीं कारणे शोधून काढली. एवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर ध्वनिलहरींच्या प्रयोगाच्या मेल्डे यांच्या पद्धतीत त्यांनी नवा बदल सुचवला. ही नवीन पद्धत आज सर्वांनी मान्य केली आहे.

आपल्या नव्या संशोधनावर त्यांनी मग एक प्रबंध लिहिला. तो लंडनच्या फिलॉसॉफिकल मॅगेझिनमध्ये छापून आला. केवळ पंधरा वर्षांच्या कुमाराच्या या संशोधनाचा गौरव परदेशी वृत्तपत्रांनी केला व त्याला कीर्ती मिळाली. पुढच्या वर्षी प्रकाश या विषयावर त्यांचा एक लेख नेचर या इंग्रजी मासिकात प्रसिद्ध झाला. एम. ए. च्या परीक्षेत रामन पहिल्या वर्गात पहिले आले. आजवर मद्रास विद्यापीठात पदार्थविज्ञान हा विषय घेऊन कोणीच पहिला वर्ग मिळवला नव्हता.

एम. ए. झाल्यावर पुढील शिक्षणासाठी विलायतेला जावे, असा रामनांचा बेत होता. पण वैद्यकीय तपासणीत नापास झाल्यामुळे त्यांचा तो बेत अंमलात आला नाही. मग त्यांनी भारत सरकारच्या अर्थखात्याच्या परीक्षेला बसण्याचे ठरविले व त्या परीक्षेतही ते पहिले आले. या वेळी त्यांचे वय फक्त अठरा वर्षांचे होते. पण सरकारने नियमानुसार अर्थखात्याच्या डेप्युटी अकौंटंट जनरल या जबाबदारीच्या जागेवर त्यांची नेमणूक केली व ते कलकत्ता येथे त्या जागेवर रुजू झाले.

त्यानंतर श्रीकृष्ण स्वामी अय्यर यांच्या लोकसुंदरी नावाच्या कन्येशी त्यांचा विवाह झाला.

रामन अर्थखात्यात नोकरी करीत होते, पण विज्ञानाशी संपर्क ठेवण्यासाठी ते सारखे धडपडत होते. कलकत्त्याला भारतीय विज्ञानसंवर्धन नामक एक संस्था होती. आशुतोष मुकर्जी हे त्या संस्थेचे चालक होते. रामन त्या संस्थेत जाऊ लागले व आपला रिकामा वेळ तिथेच संशोधनात घालवू लागले. त्यांच्या संशोधनाचे वृत्तांत छापून प्रसिद्ध होऊ लागले. एवढ्यात त्यांची बदली रंगूनला झाली. पण त्यांचे वडील वारल्यामुळे थोड्याच दिवसांत ते रंगूनहून मद्रासला परत आले. याच मुदतीत त्यांची रंगूनहून नागपूरला बदली झाली. इ. स. १९११ मध्ये पुन्हा कलकत्त्याला त्यांची बदली झाली.

रामन कलकत्त्याला गेल्यावर आशुतोष मुकर्जींनी त्यांना कलकत्ता विद्यापीठात प्राध्यापकाची जागा स्वीकारण्याबद्दल विनंती केली. रामनांनी त्यांची विनंती मान्य केली आणि ते प्राध्यापक म्हणून काम करू लागले. रामनांच्या आगमनाने विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचा सारा नूर पालटला आणि संशोधनाचे कार्य जोरात सुरू झाले. रामनांच्या या कार्याचा गौरव करण्यासाठी विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट ही सन्माननीय पदवी दिली.

त्यानंतर १९२१ साली त्यांना शास्त्रज्ञांच्या परिषदेसाठी इंग्लंडला पाठविण्यात आले. इ. स. १९२४ मध्ये पुन्हा ते इंग्लंडला गेले. त्या वेळी लंडन येथील रॉयल सोसायटीने त्यांना आपल्या विज्ञानसंस्थेचे फेलो म्हणून गौरविले. त्या काळी हा मोठाच मान समजण्यात येई. मात्र हा मान म्हणजे रामनांनी पुढील आयुष्यात मिळविलेल्या बहुमानाची केवळ नांदीच होती.

इटलीच्या विज्ञान परिषदेने १९२८ मध्ये त्यांना मेथ्यूसी पदक देऊन गौरविले. इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटीने १९२८ मध्ये त्यांना आपला फेलो म्हणून निवडले. इ. स. १९३० साली झूरिच येथील फिजिकल सोसायटीने त्यांना आपले ऑनररी फेलो म्हणून घोषित केले; तर रॉयल सोसायटी ऑफ लंडन या संस्थेने १९३० सालीच त्यांना ह्यूजेस पारितोषिक बहाल केले. इ. स. १९४१ साली फिलाडेल्फियाच्या फ्रँकलिन इन्स्टिट्यूटने फ्रँकलिन पदक देऊन त्यांचा गौरव केला.

परदेशांतून परत आल्यावर भारतातील मद्रास, लाहोर, नागपूर, पाटणा व डाक्का या विद्यापीठांत त्यांची व्याख्याने झाली. या कालात विज्ञानविषयक नियतकालिकाच्या संपादनाची जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. एवढे व्याप सांभाळूनही ध्वनी व प्रकाश या विषयांवर त्यांचे संशोधन एका बाजूला चालूच होते. साबणाच्या तरल फुग्यांवरही त्यांनी प्रयोग केले. त्यासाठी फुग्यांची मोजमापे घेतली. फुग्याच्या वरच्या बाजूवर दिसणाऱ्या काळ्या ठिपक्यांची जाडी पाच–एक लक्षांश इंच इतकी असते, असे त्यांनी सप्रमाण सिद्ध केले.

रामन विशाखापट्टनमला असताना, जमिनीच्या साहचर्याने समुद्राचे रंग बदलतात, ही गोष्ट त्यांच्या ध्यानात आली होती. पुढे १९२१ मध्ये यूरोपच्या प्रवासात भूमध्य समुद्राचे निळे पाणी पाहून त्यांची ती कल्पना दृढ झाली. पाण्यात दिसणारे विविध रंग हे पाण्यात तरंगणाऱ्या विविध कणांमुळे व पाण्याच्या अणूंमुळे प्रकाशाचे जे विवर्तन होते त्यामुळे दिसतात, ही त्यांची मीमांसा जगन्मान्य झाली.

इ. स. १९२८ साली रामनांनी प्रकाशशास्त्राविषयी नवा शोध लावला. वेगवेगळ्या पारदर्शक माध्यमांतून प्रकाशकिरण परावर्तित होऊन बाहेर पडताना आपल्याला सात रंग दिसतात. विविध माध्यमांतील कणांमुळे जे प्रकीर्णन होते, त्यामुळे ही रंगांची किमया दिसते. रामनांनी वर्णपटदर्शकाच्या साहाय्याने या प्रकीर्ण प्रकाशलहरींचा अभ्यास केला. तेव्हा त्यांना असे आढळून आले, की वेगवेगळ्या माध्यमांतील अणूंमुळे प्रकाशकिरणांची लांबी बदलते व प्रकाशलहरींची मूळची लांबी व बदललेली लांबी मोजणे शक्य होते. जर अणूंच्यामुळे हे प्रकीर्णन होते, तर वस्तूमधील अणुरचनेचा हा परिणाम होय. म्हण-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जेंच प्रकीर्ण लहरींच्या लांबीवरून पदार्थांतील अणूंची रचना समजणे शक्य होते. अणूंमुळे जे प्रकीर्णन घडते, त्यानंतरच प्रकाशलहरींची लांबी बदलते. हाच शोध 'रामन परिणाम' म्हणून ओळखला जातो. या अणुप्रकीर्णनाच्या शोधामुळे स्फटिकांच्या आंतररचनेचे संशोधन करण्याची एक नवी शाखा विज्ञानात निघाली. सांप्रत क्ष किरण व 'रामन परिणाम' यांच्या साहाय्याने स्फटिकांच्या अंतरंगघटनेचा व अणुरचनेचा अभ्यास करणे सुलभ झाले आहे. हिरा हा एक आदर्श स्फटिक असल्यामुळे रामनांनी वेगवेगळ्या हिऱ्यांच्या जाती एकत्र करून त्यामुळे प्रकाशलहरींवर होणाऱ्या परिणामाचा अभ्यास केला. त्यासाठी त्यांनी विविध प्रकारचे सोळाशे हिरे जमवले होते. 'रामन परिणाम' या त्यांच्या शोधावद्दल १९३० साली त्यांना पदार्थविज्ञानाचे नोबेल पारितोषिक मिळाले.

कलकत्त्याप्रमाणेच बंगलोरलाही इ. स. १९०९ पासून इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स या नावाची संस्था चालू होती. इ. स. १९३३ मध्ये रामन हे या संस्थेचे अध्यक्ष झाले. त्यामुळे तिथल्या संशोधनाला अधिक चालना मिळाली. भारतात शास्त्रीय उपकरणे बनत नव्हती. रामनांनी बंगलोर येथे सूक्ष्मगणक उपकरणे बनविण्याची सोय केली. इ. स. १९४३ मध्ये बंगलोर येथेच 'रामन रिसर्च इन्स्टिटयूट' स्थापन झाली. इ. स. १९४४ व १९४९ मध्ये रामनांनी 'इंडियन अॅकडमी ऑफ सायन्स' या संस्थेच्या वार्षिक परिषदेचे अध्यक्षस्थान विभूषित केले.

रामन अनेकदा परदेशांत गेले. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इ. देशांतून त्यांना व्याख्यानासाठी निमंत्रणे आली.

या दौऱ्यांत निरनिराळ्या वैज्ञानिक संस्थांना आणि विद्यापीठांना त्यांनी भेटी दिल्या. अनेक वैज्ञानिक विषयांवर त्यांनी माहितीपूर्ण व्याख्याने दिली. अनेक शास्त्रज्ञ त्यांच्या व्याख्यानांना हजर राहत असत. रामनांची मधुर वाणी व विषय समजावून सांगण्याची धाटणी यांमुळे श्रोते विस्मयचकित होत. निरनिराळ्या विद्यापीठांनी व संस्थांनी त्यांना अनेक पारितोषिके व सन्मान्य पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. ब्रिटिश सरकारनेही त्यांना 'सर' हा किताब बहाल केला.

भारत स्वतंत्र झाल्यावर, भारत सरकारने त्यांना पदार्थविज्ञानाचे पहिले राष्ट्रीय प्राध्यापक नेमले. त्यानंतर १९५४ मध्ये भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांना 'भारतरत्न' ही सर्वोच्च पदवी देऊन त्यांचा गौरव केला.

अनेक मानसन्मान मिळूनही त्यांना अहंकाराची बाधा झाली नाही. ते वृत्तीने नम्र होते आणि शेवटपर्यंत नम्रच राहिले. त्यांना प्राप्त झालेल्या मानसन्मानांबद्दल अनेक संस्थांनी त्यांचे सत्कार केले. अशाच एका सत्कारप्रसंगी त्यांनी काढलेले उद्गार मननीय आहेत. ते म्हणाले—

"खऱ्याखुऱ्या विज्ञानसाधकांना अशा पदव्यांचे महत्त्व मुळीच वाटत नाही. त्याला नवनवीन संशोधनकार्यात मग्न राहण्यातच आनंद असतो. आपल्या या कार्याबद्दल कुणी सन्मान करावा

चंद्रशेखर वेंकट रामन

किंवा मूल्यवान भेट द्यावी, अशी त्याची अपेक्षा नसते. पदवी, भेट किंवा सत्कार या गोष्टींना त्याच्या जीवनात अत्यंत गौण स्थान असते."

रामन हे शेवटपर्यंत आपल्या संस्थेत संशोधनकार्यात मग्न राहिले. त्यांचे वैशिष्टच हे, की संशोधनासाठी ते परदेशांतील सुसज्ज प्रयोगशाळांमध्ये गेले नाहीत; तर भारतात उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या साहाय्यानेच संशोधन करीत राहिले. अनेक विद्यार्थ्यांना त्यांनी संशोधनात मार्गदर्शन केले. आज भारतभर त्यांचे शिष्य पसरलेले आहेत. डॉ. कृष्णन हे त्यांचे एक पट्टशिष्य समजले जातात.

२१ नोव्हेंबर १९७० रोजी या थोर शास्त्रज्ञांचा त्यांच्या संशोधनसंस्थेत अंत झाला. [अ. च. को.; भा. वं.]

रामनवमी चैत्र शु. नवमीला रामनवमी असे म्हणतात. त्या दिवशी पुनर्वसू नक्षत्रावर, माध्यान्ही, कर्क लग्नी सूर्यादी पाच ग्रह असताना अयोध्येत रामचंद्राचा जन्म झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या दिवशी रामाचे व्रत करतात. अष्टमीच्या दिवशी व्रताचा संकल्प करतात. नवमीच्या दिवशी सकाळी पूजास्थानी लता-पल्लवांनी युक्त अशी मंडपी तयार करतात. तिच्या चार बाजूंना चार द्वारे ठेवून, पूर्व द्वारावर शंख, चक्र व हनुमान; पश्चिम द्वारावर गदा, खड्ग व अंगद; दक्षिण द्वारावर धनुष्य, बाण व गरुड आणि उत्तर द्वारावर पद्म, स्वस्तिक व नील यांच्या प्रतिमा लावून ती मंडपी सुशोभित करतात. तिच्या मध्यभागी वेदी तयार करून तिच्यावर तीर्थोदकाने भरलेला कलश व त्यावर पूर्णपात्र ठेवतात. पूर्णपात्रात सीतेसह रामाची सुवर्णप्रतिमा ठेवतात. प्रतिमेची षोडशोपचारे पूजा करतात. मग—

दशाननवधार्थाय धर्मसंस्थापनाय च ।
दानवानां विनाशाय दैत्यानां निधनाय च ॥
परित्राणाय साधूनां जातो रामः स्वयं हरिः ।
गृह्णात्वर्घ्यं मया दत्तं भ्रातृभिः सहितो विभुः ॥

हे मंत्र म्हणून शंखोदकाने अर्घ्य देतात व प्रार्थना करतात. रामाचा जन्म माध्यान्ही झाला असल्यामुळे त्या वेळी वाद्ये वाजवून पुष्पांजली वाहतात.

याशिवाय, या दिवशी रामचंद्राचे स्मरण किंवा राममंत्राचा यथाविधि जप आणि सर्व दिवस उपवास या गोष्टींना प्राधान्य आहे. रात्री कथाश्रवण, स्तोत्रपाठ, नृत्य, गीत वगैरेंच्या साहाय्याने जागरण करतात.

दशमीच्या दिवशी रामचंद्रांची पूजा करून आज्य आणि पायस यांच्या प्रत्येकी १०८ आहुतींचे हवन करतात. नंतर आचार्यांची पूजा करून त्यांना ती प्रतिमा दान देतात. मग व्रताचे पारणे करतात. त्यासाठी ब्राह्मणभोजन घालतात.

हे व्रत केल्याने सर्व व्रते केल्याचे फळ मिळते; तसेच, त्यामुळे सर्व पापे नष्ट होऊन अंती उत्तम लोकाची प्राप्ती होते, असे सांगितले आहे.

कित्येक राममंदिरांतून चैत्र शु. प्रतिपदेपासून नऊ दिवस हा उत्सव चालतो. रामायणाचे पारायण, कथाकीर्तन आणि राममूर्तीला विविध शृंगार अशा प्रकारे हा उत्सव साजरा होत असतो. नवमीच्या दिवशी दुपारी रामजन्माचे कीर्तन होते. माध्यान्हकाळी, कुंची घातलेला एक नारळ पाळण्यात ठेवून तो पाळणा हलवतात. भक्तमंडळी त्यावर गुलाल आणि फुले उधळतात. नंतर या बालरामाचे सर्व सोहाळे झाल्यावर उत्सवाची सांगता होते.

नासिक, अयोध्या, तिरुपती व रामेश्वर या ठिकाणी हा उत्सव फार थाटात साजरा होतो. हजारो यात्रेकरू त्या दिवशी त्या क्षेत्रांत जमतात.

राजस्थानातील सुवासिनी स्त्रिया रामनवमीच्या दिवशी सकाळी स्नान करून जमिनीवर स्वस्तिक काढतात आणि त्यावर एक जलपूर्ण कलश ठेवतात. नंतर तिथेच गणेशाची स्थापना करतात आणि रामाची कहाणी ऐकतात. ती कहाणी अशी —

राम, लक्ष्मण व सीता वनात चालले होते. रामाबरोबर एक हंसही होता. चालता चालता लक्ष्मण आणि सीता ही दोघे दमली, म्हणून सर्वजण एका गावात विश्रांतीसाठी थांबले. गावातील एका म्हातारीच्या घरी त्यांनी मुक्काम केला. म्हातारीने त्यांचे चांगले आगतस्वागत केले. दुपारी जेवायची वेळ झाली, तेव्हा रामचंद्राने म्हातारीकडे हंसासाठी मोत्यांचा चारा मागितला. म्हातारीकडे कुठली मोत्ये असणार! पण अतिथींची इच्छा पुरी करणे हा गृहस्थाचा धर्म आहे, असे समजून ती तिथल्या राजाकडे गेली. तिने राजाकडे एक ओंजळभर मोत्ये उधार मागितली. आपल्याला ही मोत्ये परत मिळणे शक्य नाही असे जाणून राजाने तिला जुनीपुराणी मोत्ये आणून दिली. ती घेऊन म्हातारी घरी आली आणि तिने हंसाला त्यांचा चारा दिला. मग सर्वांनी भोजन केले. दुसऱ्या दिवशी तिथून निघण्यापूर्वी रामाने म्हातारीच्या परसात एक झाड लावले.

कालांतराने ते झाड मोठे झाले आणि त्याला मोत्ये लागू लागली. म्हातारीची शेजारीण हळूच ती मोत्ये वेचून नेऊ लागली. काही दिवसांनी म्हातारीला या गोष्टीचा पत्ता लागला. तिनेही झाडाखाली पडलेली असंख्य मोत्ये वेचली. मग काही मोत्यांचे एक लहानसे गाठोडे बांधून घेऊन ती राजाकडे गेली. ती मोत्ये पाहून राजा आश्चर्यचकित झाला. 'ही मोत्ये कुठून आणलीस?' म्हणून त्याने म्हातारीला विचारले. म्हातारीने सर्व हकीकत सांगितली. तेव्हा राजाने तिच्याकडे तो वृक्ष मागितला. साध्याभोळ्या म्हातारीने राजाला तो वृक्ष देऊन टाकला. राजाने तो आपल्या अंगणात आणून रोवला. पण त्या वृक्षाला मोत्यांऐवजी काटेच येऊ लागले. एक दिवस त्याचा एक काटा राणीच्या पायात घुसला. तेव्हा राणीने तो वृक्ष पुन्हा म्हातारीच्या परसात नेऊन लावायला सांगितले.

म्हातारीच्या परसात लावल्यावर त्या वृक्षाला पुन्हा मोत्ये लागू लागली. म्हातारीला खूप आनंद झाला. ती स्वतः त्या मोत्यांचा उपयोग करू लागली आणि इतरांनाही देऊ लागली.

ही कहाणी ऐकल्यावर राजस्थानी स्त्रिया रामाच्या मंदिरातून चरणामृत व पंचामृत आणून ते प्राशन करतात व त्यानंतर भोजन करतात. [हि. ध.; व्रतराज; वरदा, जाने. १९५८]

रामनवरत्नसारसंग्रह

रामोपासनेचा एक ग्रंथ. स्वामी रामचरणदास 'करुणासिंधु' यांनी हा ग्रंथ रचला असून, त्यात नऊ अध्याय आहेत. विविध शास्त्रांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – हे तारामाते, असा कधी दिवस उजाडेल का, की जेव्हा 'तारा', 'तारा' अशी आर्त हाक मारीत असता नेत्रांतून अश्रू ओघळतील, हृदयकमल उमलून येईल, अंधार नष्ट होईल आणि मी भूमीवर लोटांगण घेऊन, तुझे नामस्मरण करीत धन्य होईन ! भेदभाव सोडून देऊन मी मन:समाधान प्राप्त करीन का ? हे वेदांनो, माझी माता तारादेवी निराकार आहे. ती घटाघटात विराजमान झाली आहे. हे डोळे असून आंधळे असणाऱ्या प्राण्यांनो, ही पाहा, ही (तारामाता) अंधकाराचा विनाश करून व तेजस्वी ज्योत बनून (तळपत) येत आहे.

रामप्रसाद हा स्वत: कौलतंत्राचा उपासक असला, तरी त्याचा निर्मळ भक्तीवरच विशेष भर होता. आपली तांत्रिक मतेही त्याने भक्तीच्या मधुर पाकात घोळवून जनमानसात प्रचारिली व रुजविली. [भा. सं. म.; बं. सा. क.]

रामप्रसाद बिंदुकाचार्य (इ. स. १७०३ – १८०४) एक भक्तकवी. याचा जन्म अवध प्रदेशातील मल्हिाबाद नामक गावी एका कान्यकुब्ज ब्राह्मणाच्या घरी झाला. ऐन तारुण्यात याला वैराग्य आले. मग हा अयोध्येला आला. असे सांगतात, की साक्षात भगवती सीतेने याला दीक्षा दिली. ही गोष्ट इ. स. १७२०च्या जानकीनवमीला घडली. याने शिक्षापत्री व गीतातात्पर्यनिर्णय या नावाचे दोन ग्रंथ लिहिले आहेत. मात्र तो कवी म्हणून नव्हे, तर एक विख्यात अधिकारी सत्पुरुष म्हणून प्रसिद्ध आहे. [अ. श. ब्र. प्रे.]

रामवल्लभ (इ. स. च्या १९ व्या शतकाचा मध्यकाल) एक पंथसंस्थापक. हा बंगालमधल्या बंसबेरिया या गावी राहत असे. हा अशिक्षित होता तरी बुद्धिमान होता. याने स्वत:च्या नावावर रामबल्लवी नावाचा एक पंथ स्थापला होता. आपल्या पंथात तो सर्व धर्मांच्या लोकांना दाखल करून घेत असे. त्याला मानवांमधील उच्चनीच भेद मान्य नव्हते. सर्वांनी परस्परसहकार्याने वागावे, सर्वांवर प्रेम करावे व कुणाचाही द्वेष करू नये, अशी त्याची शिकवण होती. जेव्हा धर्मग्रंथांचे वाचन होई, त्या वेळी तो सर्वधर्मियांचे सहभोजन घडवून आणीत असे. कोणत्याही नावाने परमेश्वराची भक्ती केली, तरी ती त्याला पोचते, असे तो सर्वांना सांगे. [हि. हिं. सि.]

रामभट (इ. स. चे १६ वे शतक) एक ज्योतिर्विद व ग्रंथकार. हा काशीत राहत होता. याचे मूळ घराणे विदर्भातील धर्मपुरी हे होते. हा गार्ग्यगोत्री ब्राह्मण होता. अकबराचा धान श्रीमहाराज रामदास याच्या आज्ञेवरून रामभटाने रामविनोद नावाचा करणग्रंथ रचला. त्याचे अकरा अधिकार असून, त्यात सांप्रतच्या सूर्यसिद्धान्तातील वर्षमान, क्षेपक व ग्रहगती हे विषय आहेत. ग्रहगतींना त्याने बीजसंस्कार दिला आहे. या ग्रंथाच्या अंगभूत तिथ्यादी साधनांचा एक सारणी–ग्रंथही आहे. या ग्रंथावरूनच जयपूर भागाकडे पंचांगे तयार करतात. मुहूर्तचिंतामणी हा याचा दुसरा ग्रंथ होय. त्यावर स्वत: ग्रंथकाराने प्रमिताक्षरा नावाची टीका लिहिली आहे. [भा. ज्यो. शा.]

रामभद्रांबा (इ. स.च्या १६ व्या शतकाची अखेर) तेलुगु साहित्यातील एक प्रतिभाशाली शीघ्र कवयित्री. ही एका घटकेत १०० श्लोक रचीत असे, असे सांगतात. ही तंजाऊरच्या रघुनाथ नायक राजाच्या आश्रयाला होती. कोणी तिला रघुनाथ नायकाची राणीही मानतात.

रघुनाथाभ्युदयम् या नावाचे एक संस्कृत महाकाव्य तिने रचले आहे. त्याचे १२ सर्ग व ९०० श्लोक आहेत. या काव्याला साहित्यिक व ऐतिहासिक महत्त्व आहे. विजयनगरच्या इतिहासाचे ते एक प्रमाणभूत साधन आहे. विजयनगरचा उत्कर्षापकर्ष, विजयनगरच्या सम्राटांनी केलेली युद्धे, त्यांच्या सभा, इ. विषयांचे वर्णन त्यात आहे. रघुनाथ नायकाच्या कारकिर्दीचे वर्णनही त्यात केलेले आहे. तिचे तेलुगू ग्रंथ उपलब्ध नाहीत.

विजयविलासम् नावाचे आणखीही एक काव्य तिने लिहिले आहे. तिची भाषा प्रसादपूर्ण व ओघवती आहे. तिला एकूण आठ भाषा अवगत होत्या, असे सांगतात. [ग्रे. वी. इं.; तें. सा. इ.]

राममम्म द. भारतामधील एक देवता. ही गुरांच्या रोगांची देवता मानली जाते. या देवतेविषयी एक दंतकथा सांगतात, ती अशी – ही एक विधवा स्त्री होती. तिचा बुधा नावाच्या पुरुषाशी अनैतिक संबंध घडला. तिच्या भावाला या गोष्टीचा राग येऊन त्याने त्या दोघांनाही ठार केले. नंतर काही दिवसांनी त्या गावात गुरांच्या रोगाची साथ सुरू झाली. लोकांना वाटले, की बुधा व राममम्म या भुतांनीच हे अरिष्ट गावावर आणले आहे. म्हणून त्यांनी त्या दोघांना पशुबली दिला.

तेव्हापासून, गुरांचा रोग झाल्यावर बुधा–राममम्म यांना पशुबली, देण्याची चाल इथे सुरू झाली. या बलिदानाच्या वेळी बुधा–राममम्म यांच्या दोन लाकडी मूर्ती करून त्यांना मिरवणुकीने दुसऱ्या गावाच्या सीमेत नेऊन टाकतात. [व्हि. गॉ. म्रा. इं.]

रामरसायन राजस्थानी भाषेतील रामविषयक काव्य. याचा कर्ता बगसू (बख्श्) नावाचा गूजरगौड ब्राह्मण होता. या काव्याचा वाल्मीकिरामायण व रामचरितमानस यांवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कशाशीही संबंध नाही. सुमारे चारशे वर्षांपूर्वी हे काव्य निर्माण झाले असावे. हे दोहा छंदात आहे. राजस्थानातील कोटा, बुंदी व झालावाड या भागात याचा प्रचार आहे. हे काव्य गाणाऱ्या संगीतमंडळया त्या भागात आहेत. त्यांतला प्रमुख माणूस दोहा गातो व इतर सगळे त्याचा पुनरुच्चार करतात. हे काव्य गाताना, गाणारे लोक फेर धरून उभे राहतात. प्रत्येकाच्या हाती हातभर लांबीची एक टिपरी असते. प्रत्येकजण दुसऱ्याच्या टिपरीवर आघात करून गायनाचा ताल धरतो. मुख्य गायक फेराच्या मध्यभागी उभा राहतो. त्याच्या हातात मात्र टिपरी नसते. ही संगीतमंडळी गावोगाव हिंडून या गीताचे गायन करतात.

प्रस्तुत काव्यातील सीताहरण–प्रसंगाचे काही दोहे असे –

भेव बणायो जोगीसंतको, चिमटो झोली लेर।
अलख अलख ॐ करतो आईयो, दे भख्या मत कर देर ॥
कार उलांघी सीता भूल कर, ज्यों लछमण खींची रेख।
तुरत उठाली रावण गोद में, अर छांड्यो जोगी भेख ॥
सीता डरपी रावण देखता, बीस भुजा दस माथ।
चाल्यो उडतो ऊंचा आकास में, सो सीता थरथर गात ॥
गीध जटायु देख्यो जावतो, तो कीनू चोंच प्रहार।
लडतां लडतां बूढो थाकियो, तो पड्यो धरण पै आर ॥

भावार्थ–रावणाने जोगी संताचा वेष घेतला. चिमटा व झोळी घेतली. तो अलख अलख पुकारीत आला व सीतेला म्हणाला. 'मला खायला दे; उशीर करू नको.' सीतेला लक्ष्मणरेषेची आठवण उरली नाही आणि ती रेषा ओलांडून पुढे आली. तावडतोब रावणाने जोग्याचा वेष टाकला आणि सीतेला उचलले. त्याच्या वीस भुजा व दहा तोंडे पाहून सीता घाबरली. रावण जेव्हा तिला घेऊन आकाशमार्गाने जाऊ लागला, तेव्हा सीतेची गात्रे थरथरू लागली. रावण सीतेला घेऊन जात असता जटायूने त्याला पाहिले. तो उडाला आणि त्याने रावणावर चंचुप्रहार सुरू केले. पण तो म्हातारा जटायू लढता लढता थकला आणि धरणीवर पडला.

बगसूने हे काव्य हरिद्वारक्षेत्रात बसून लिहिले, असे सांगतात. [मरुभारती, जानेवारी १९६९]

रामरहस्यसाहब (इ. स. चे १९वे शतक) एक कबीरपंथी साधू. याचे पूर्वीचे नाव रामरज दूबे असे होते. त्याच्या कवितांमध्ये रामरहेस असेही नाव आढळते. त्याने कबीरचौरा (काशी) चे १५वे गुरु शरणदास यांच्याकडून दीक्षा घेतली. नंतर तो गया येथे राहू लागला.

कबीरपंथाचे तत्त्वज्ञान व दर्शने यांचा तो चांगला ज्ञाता होता. कबीरपंथाच्या सिद्धान्तांना तर्कशुद्ध व नियमबद्ध स्वरूप यानेच दिले. त्याने पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यांमध्ये पंचग्रंथी हा प्रमुख आहे. कबीराचे सिद्धान्त लोकप्रिय करण्याचे श्रेय या ग्रंथाला आहे. म्हणूनच त्याला सद्‌ग्रंथ म्हटले आहे. [हिं. सा. बि.]

रामरक्षा स्तोत्र एक प्रसिद्ध स्तोत्र. ज्याच्या पठनाने रामाकडून रक्षण होते, ते स्तोत्र म्हणजे रामरक्षा स्तोत्र होय. यात एकूण एकूण चाळीस श्लोक आहेत. बुधकौशिक हा याचा कर्ता व सीता-रामचंद्र ही देवता आहे. स्तोत्राचा प्रमुख छंद अनुष्टुप, सीता ही शक्ती, हनुमान हे कीलक आणि रामचंद्राच्या प्रीतीच्या लाभासाठी या स्तोत्राचा जप करणे, हा त्याचा विनियोग आहे.

भगवान शंकराने बुधकौशिक ऋषीच्या स्वप्नात येऊन त्याला ही रामरक्षा सांगितली आणि प्रातःकाळी उठल्यावर बुध कौशिकाने ती लिहून काढली. हे स्तोत्र संस्कृत भाषेत आहे. पण त्याची भाषा अतिशय सोपी आहे. पाच वृत्ते त्यात योजिलेली आहेत.

या स्तोत्रात रामचंद्राची स्तुती आहे. ज्या योगे या स्तोत्राचे रामरक्षा हे नाव सार्थ होते, असे केवळ बाराच श्लोक यात आहेत. या बारा श्लोकांतही पहिले सहा श्लोक म्हणजे खरी रामरक्षा आणि दुसरे सहा म्हणजे रक्षाकार्यार्थ केलेली सदिच्छा आहे. म्हणून त्या भागाला कवच म्हणतात. कवचामध्ये त्या त्या देवतेने आपल्या सर्व शरीरावयवांचे रक्षण करावे, अशी प्रार्थना असते. रामरक्षेतील हे कवच पुढीलप्रमाणे –

शिरो मे राघवः पातु भालं दशरथात्मजः ॥
कौसल्येयो दृशौ पातु विश्वामित्रप्रियः श्रुती।
घ्राणं पातु मखत्राता मुखं सौमित्रिवत्सलः ॥
जिह्वां विद्यानिधिः पातु कण्ठं भरतवन्दितः।
स्कन्धौ दिव्यायुधः पातु भुजौ भग्नेशकार्मुकः ॥
करौ सीतापतिः पातु हृदयं जामदग्न्यजित्।
मध्यं पातु खरध्वंसी नाभिं जाम्बवदाश्रयः ॥
सुग्रीवेशः कटी पातु सक्थिनी हनुमत्प्रभुः।
ऊरू रघूत्तमः पातु रक्षःकुलविनाशकृत् ॥
जानुनी सेतुकृत् पातु जङ्घे दशमुखान्तकः।
पादौ बिभीषणश्रीदः पातु रामोऽखिलं वपुः ॥

अर्थ – राघव माझ्या शिराचे, दशरथात्मज भालप्रदेशाचे, कौसल्यापुत्र डोळ्यांचे, विश्वामित्रप्रिय कानांचे, मखरक्षक नाकाचे, लक्ष्मणाविषयी वात्सल्य धारण करणारा मुखाचे, विद्यानिधी जिव्हेचे, भरतवंदित कंठाचे, दिव्य आयुधे धारण करणारा खांद्यांचे, शिवधनुष्य भग्न करणारा भुजांचे, सीतापती हातांचे, परशुरामाला जिंकणारा हृदयाचे, खर राक्षसाचा वध करणारा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामनारायणदास रामभक्तीच्या रसिक संप्रदायाचा एक कवी. याने भजनरत्नावली नावाचा एक पद्यग्रंथ लिहिला असून, त्यात रामाचे विविध लीलाविलास वर्णिले आहेत. त्याच्या काव्याची भाषा सहजसुंदर व भक्तिरस-परिप्लुत आहे. त्याची पद्ये रागरागिण्यांत रचली गेली असल्या-मुळें ती गेय आहेत. रसिक रामभक्तांचा तो एक आदरणीय ग्रंथ ठरला आहे. [रा. भ. शा.; रा. सा. म. उ.]

रामपाणिवाद (इ. स. चे १८ वे शतक) केरळातील एक पंडित आणि कवी. याने संस्कृत आणि प्राकृत भाषेत अनेक ग्रंथ रचले आहेत. वेट्टट्टुनाडचा राजा, पालियत अक्कनचा प्रमुख, अंपलप्पुळचा राजा, मनक्कुलमचा राजा आर्य श्रीकंठ रामवर्मन आणि त्रिवांकुरचा राजा मार्तंडवर्मा यांचा त्याला आश्रय होता.

पाणिवाद किंवा नंबियार हा अंबलवासी जातीचा एक पोट-भेद आहे. राम हे त्या कवीचे विशेष नाम आहे. तो मंगल नामक गावाचा रहिवासी होता. नारायण भट्ट हा त्याचा गुरू होता.

रामपाणिवादाने राघवीय आणि विष्णुविलास ही दोन महा-काव्ये रचली आहेत. राघवीय काव्याचे वीस सर्ग असून, त्यांत १५७२ श्लोक आहेत. त्यात उत्तरकांड वगळून रामायणकथा आलेली आहे. विष्णुविलास काव्याचे आठ सर्ग असून, त्यांत विष्णूच्या पहिल्या नऊ अवतारांचे वर्णन आहे. त्याने सीताराघव नामक एक सात अंकी संस्कृत नाटक लिहिले आहे. चंद्रिका आणि लीलावती या दोन त्याच्या वीथी आहेत. वीथी हा नाट-काचा एक प्रकार असून, त्यात एक अंक व दोन पात्रे असतात. मदनकेतुचरित हे त्याचे एक प्रहसन आहे. मुकुंदशतक आणि शिवशतक व सूर्याष्टक ही स्तोत्रे त्याने रचली आहेत. वृत्तांवरील वृत्तवार्तिक नामक एक ग्रंथ त्याने लिहिला आहे.

याशिवाय, प्राकृत भाषेत त्याने कंसवहो व उपानिरुद्ध ही दोन काव्ये रचली असून, वररुचीच्या प्राकृतप्रकाशावर टीकाही लिहिली आहे.

याची भाषा साधी आणि सरळ आहे. प्राचीन संस्कृत कवींचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून याने आपली काव्ये व नाटके रचली आहेत. [कॉं. के. सं. लि.]

रामपुरवा बिहार राज्यातील चंपारण्य जिल्ह्यातील एक गाव. या ठिकाणी सम्राट अशोकाचा एक कोरीव स्तंभ आहे. हा स्तंभ वालुकामय पाषाणाचा व गुळगुळीत आहे. त्याच्या शिरोभागी बैलाच्या मस्तकाची उत्कृष्ट शिल्पकृती होती. कालांतराने ती निखळून खाली पडली. सध्या ती दिल्लीत राष्ट्र-पतिभवनाच्या आवारात ठेवलेली आहे. या स्तंभावर ब्राह्मी लिपीत अशोकाच्या धर्माज्ञा खोदलेल्या आहेत. या स्तंभाचा माथा व मधला भाग निरनिराळा झालेला आहे. मधला भाग बहुतेक दलदलीत गेलेला आहे. हा माथा व मधला भाग हे एक-मेकांना शुद्ध तांब्याच्या भरीव दांड्याने जोडलेले होते.

स्तंभाजवळ दोन मातीची टेकाडे असून, त्यांमध्ये ६ फूट उंचीच एक स्तूप आहे. या टेकड्यांविषयी स्थानिक लोक पुढील दंतकथा सांगतात – एकदा भीम (पांडव) हा मातीने भरलेल्या दोन पाट्या एका दांडक्याला अडकवून कावडीप्रमाणे त्या खांद्या-वर घेऊन चालला होता. इथल्या स्तंभाच्या जागी त्याची दांडी मोडली व पाटीतील माती सांडली. या दोन टेकड्या या मातीच्या बनलेल्या आहेत. [हिं. वि. को.; चं. जि. गॅ.]

रामपुरा जैनांचे प्रसिद्ध स्थान. हे राजस्थानातील उदेपूरच्या पश्चिमेस अरवली पर्वतातील साद्री घाटात आहे. इथे पार्श्वनाथाची दोन मंदिरे आहेत. ती इ. स. १४४० च्या सुमारास धरमशेट नावाच्या जैनाने सुमारे पाऊण कोट रु. खर्चून बांधली. पार्श्वनाथाची इथली मूर्ती काळ्या पाषाणाची असून, मंदिराची एकंदर बांधणी भव्य व सुबक आहे. मंदि[illegible]वरील कोरीव शिल्पकाम अप्रतिम आहे. मुख्य मंदिराशिवाय इथे इतरही ८६ छोटी देवळीवजा मंदिरे असून, त्यांत लहान [illegible] सुबक अशा जिनमूर्ती आहेत. [स. भा. प्र. व.]

रामपूर हिमाचल प्रदेशातील एक जिल्हा. या जिल्ह्याचे सध्याचे नाव किन्नर असे आहे. रामपूर हे जिल्ह्याचे मुख्य ठिकाण असून, ते कोसी नदीवर वसलेले आहे. हे [illegible] व्यापारी शहर असून या ठिकाणी चाकू, सुरे, इ. वस्तू बनतात. त्याचप्रमाणे चिनीमातीच्या वस्तूही इथे तयार होतात.

इथे अरबी भाषेचे एक विद्यापीठ असून त्यात रहीम [illegible] धर्मशिक्षण मोफत दिले जाते. बंगाल, अफगाणिस्थान, बोल[illegible] इ. ठिकाणांहून विद्यार्थी या ठिकाणी शिक्षणासाठी येतात. [[illegible] वि. को.; हिमाचल प्रदेश; किन्नर देश में – राहुल सांकृत्यायन]

रामपूर्वतापनीय उपनिषद् अथर्ववेदाचे एक उपनिषद. उपनिषदात ‘राम’ शब्दाचे अनेक व्युत्पत्ती व अर्थ दिले आहेत. त्यापैकी ‘राति राजते महीं स्थितः सन् रामः’ जो दान देतो, प्रकाशतो किंवा पृथ्वीवर राहतो, तो राम होय, ही व्युत्पत्ती यात अधिक ग्राह्य मानली आहे. संस्कृतमधील रा धातूचा अर्थ दान देणे, असा आहे. [illegible] हा दानशील व सज्जनांची पीडा दूर करणारा आहे. [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुखी व्हावे, म्हणून त्याने जन्मभर तप केले, असेही म्हटले आहे.

राज् या संस्कृत धातूचा अर्थ प्रकाशणे असा आहे. राम हा तेजस्वी, पराक्रमी व सुंदर आहे, असा या व्युत्पत्तीतून अर्थ निघतो.

मनुष्यरूप धारण करून राक्षसांना शासन करणारा तो राम होय, अशीही व्युत्पत्ती यात सांगितली आहे. राक्षसातला रा व मनुष्यातला म मिळून राम शब्द बनलेला आहे.

परब्रह्म म्हणजेच राम असून, तेच रामाच्या रूपाने पृथ्वीवर अवतीर्ण झाले आहे. सर्व देवदेवता रामाच्या स्वरूपातच अंतर्भूत आहेत.

राममंत्र हा जड व चेतन अशा जगताच्या ज्ञानाने ओतप्रोत आहे. त्याचा प्रभाव अनंत आहे. या मंत्राच्या निरंतर ध्यानाने साधकाला सर्व रहस्ये खुली होतात. रामोपासनेचा मालामंत्र या उपनिषदात पुढीलप्रमाणे सांगितला आहे—

ॐ नमो भगवते रघुनन्दनाय रक्षोघ्नविशदाय मधुरप्रसन्नवदनायामिततेजसे बलाय रामाय विष्णवे नमः ॐ।

या उपनिषदात रामाचे पूजायंत्र दिलेले असून, त्यावर सर्व विश्वशक्तींची अभेदाने उपासना होते, असे सांगितले आहे. या पूजायंत्रावर रामाच्या शक्ती म्हणून हनुमान, सुग्रीव, भरत, बिभीषण, लक्ष्मण, अंगद, जांबवान व शत्रुघ्न यांचा अंतर्भाव केलेला आहे. [रा. भ. शा.]

रामप्रसाद (इ. स. १७१२–१७७५) एक बंगाली संतकवी. हाली शहराजवळच्या कुमारहट्ट या गावी हा जन्मला. याचे घराणे शाक्तपंथी होते. याच्या वडिलांचे नाव रामराम व आडनाव सेन असे होते. याचे बालपण अत्यंत हलाखीच्या स्थितीत गेले; तथापि याची बुद्धी तल्लख असल्यामुळे अल्प वयातच त्याने विद्याभ्यासात खूप प्रगती केली. लवकरच त्याने बंगाली, संस्कृत, हिंदी व फारसी या चार भाषांत प्राविण्य संपादिले.

पित्याच्या मृत्यूनंतर त्याला नोकरीच्या शोधात घराबाहेर पडावे लागले. थोड्याच दिवसांत एका जमीनदाराकडे त्याला दिवाणाची नोकरी मिळाली; परंतु त्याचा मूळचा पिंड आध्यात्मिक असल्यामुळे नोकरीत त्याचे मन रमेना. एके दिवशी तर त्याला दुर्गादेवीच्या नुसत्या स्मरणानेच भावावस्था प्राप्त झाली. त्या अवस्थेतच त्याला देवीचे गुणगान स्फुरले. जवळ दुसरा कागदकपटा नसल्याने त्याने ते काव्य हिशेबाच्या वहीतच लिहायला सुरुवात केली. अर्धेअधिक काव्य लिहून झाल्यावर जमीनदाराने ते पाहिले. पण त्यामुळेच त्याला रामप्रसादाची योग्यता कळून आली. प्रसन्न होऊन त्याने रामप्रसादाला ते काव्य गायला सांगितले. रामप्रसादानेही ते तन्मय होऊन गायिले. मग जमीनदार खूष झाला व त्याने रामप्रसादाला प्रतिमासी ३० रुपये द्यायचे ठरवून आपल्या नोकरीतून मुक्त केले. आता रामप्रसाद स्वच्छंदपणे कालीचे पूजन-अर्चन व गुणगायन करायला मोकळा झाला.

अशीच एकदा त्याची नवद्वीपचे महाराज कृष्णचंद्र यांच्याशी भेट झाली. कृष्णचंद्रांनी त्याची कालीवर्णनपर गीते त्याच्याकडून गाऊन घेतली व त्याच्या रचनेवर संतुष्ट होऊन त्याला आपल्या आश्रयाला येऊन राहण्याचा आग्रह केला परंतु रामप्रसादाने ती गोष्ट नाकारली. मग महाराजांनी त्याला आणखी एखादे काव्य त्यांच्या स्वतःसाठी लिहिण्याची विनंती केली. रामप्रसादाने ही विनंती मानली व कालिकामंगल किंवा विद्यासुंदरेर काहिनी नामक एक काव्य रचून महाराज कृष्णचंद्र यांना सादर केले. ते ऐकताना महाराज भारावून गेले. त्यांनी रामप्रसादाला 'कविरंजन' ही पदवी देऊन त्याचा मोठा सन्मान केला व त्याला १०० बिघे जमीनही दिली.

विद्यासुंदरेर काहिनी हे काव्य प्राधान्याने शृंगाररसाने भरलेले आहे. रामप्रसाद संस्कृत पंडित असल्यामुळे त्याच्या पांडित्याची प्रभा त्याच्या सर्व काव्यावर पसरलेली दिसून येते. या काव्यातील चरित्रचित्रण विलक्षण प्रभावी व प्रत्ययकारी असल्याचे समीक्षकांचे मत आहे.

वरील काव्याशिवाय याने दुर्गाभक्तिचिंतामणी, काली कीर्तन, शिवसंकीर्तन, कृष्णकीर्तन, इ. काव्ये व दुर्गाभक्तिपर अनेक स्फुट गीते लिहिली. या भक्तिगीतांच्या द्वारे त्याने बंगालमधल्या घराघरातून कालीची उपासना पोचवली. तिथल्या आबालवृद्ध जनांच्या मनीमुखी रामप्रसादाची ही भक्तिगीते आजही खेळत आहेत.

मृत्यूच्या वेळी रामप्रसादाने कालीमातेचे विधियुक्त पूजन करून, तिचे संकीर्तन करीतच देह ठेवला. काहींच्या मते दुर्गापूजेच्या अखेरीस दुर्गामूर्तीचे विसर्जन करताना त्याला दुःख अनावर झाले व त्याने देहत्याग केला.

रामप्रसादाच्या भक्तिगीताचा एक नमुना पुढीलप्रमाणे —

एमन दिन कि हबे तारा, जबे तारा तारा तारा बले।
तारा बये पडबे धारा ॥ हृदि पद्म उठबे फुटे।
मनेर अंधार जाबे छुटे। तरवन धरातले पडब लुटे।
तारा बले हब सारा ॥ तयाजिब सब भेदाभेद।
घुचे जाबे मनेर खेद। और शत शत सत्यवेद।
तारा आमार निराकार ॥ रामप्रसाब रटे।
मा विराजे सर्व घटे। और आखि अंध, देख माके।
तिमिरे तिमिर हरा ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आधार घेऊन रामाच्या माधुर्य उपासनेच्या विविध अंगांचा परिपोष यात केलेला आहे.

श्रीराम हाच परब्रह्म आहे व त्याच्याशिवाय जगात काहीही नाही, असे करुणासिंधूने म्हटले आहे. श्रीरामाच्या रूपानंतर त्याच्या तेजाचीही चर्चा करून, श्रीरामभक्तीची साधना कशी करावी, तेही यात सांगितले आहे. [रा. सा. म. उ.]

रामनवरात्र एक व्रत. हे काही ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणांत असते. वर्षप्रतिपदेपासून दशमीपर्यंत ते करतात. यात रामाची नित्यपूजा, अध्यात्मरामायणवाचन, कीर्तन, इ. कार्यक्रम शक्यतेनुसार करतात. नऊ दिवस उपवास किंवा धान्य-फराळ करतात. नवमीच्या दिवशी रामजन्माचे कीर्तन होते व दशमीला पारणे असते. [दे. ऋ. ब्रा. प.]

रामनाथ (१) गोमंतकातील एक देवस्थान. रावणाचा वध केल्यामुळे श्रीरामचंद्राला ब्रह्महत्येचे पातक लागले; त्याचे क्षालन व्हावे म्हणून त्यांनी रामेश्वर येथे शिवलिंगाची स्थापना केली. 'रामनाथ' हे त्याचे नाव होय. प्राचीन काळी वत्स व कौंडिण्य गोत्री गौड सारस्वत ब्राह्मणांनी गोव्या-

श्रीरामनाथ – बांदिवडे

तील सासष्टीमध्ये लोटली गावी वसाहत केली, तेव्हा त्यांनी आपला कुलदेव श्रीरामनाथ याची मूर्ती बरोबर नेली होती. त्या मूर्तीची तिथे एका देवालयात प्रतिष्ठापना करण्यात आली. त्याच आवारात श्रीलक्ष्मीनारायण, श्रीशांतादुर्गा (सांतेरी), वेताळ व श्रीसिद्धनाथ या देवतांचीही स्थापना झाली. त्या पाच देवतांची पांच मंदिरेही नंतर बांधली गेली व त्या स्थानाला 'देऊळवाडा' असे नाव मिळाले.

इ. स. च्या १६ व्या शतकात गोवा पोर्तुगीजांनी घेतला आणि हिंदूंना बाटवण्यास प्रारंभ केला. हिंदूंच्या देवालयांचाही ते नाश करू लागले. म्हणून इ. स. १५६६मध्ये लोटलीच्या ग्रामस्थांनी आपल्या सर्व देवतांसह स्थलांतर केले. विजापूरकरांच्या राज्यातील अंत्रूज महालात बांदिवडे गावी जाऊन ते स्थायिक झाले व तिथेच त्यांनी आपल्या देवतांची पुन्हा स्थापना केली. पुढे त्या लोकांची स्थिरस्थावर होऊन व्यापारधंद्याची भरभराट झाल्यावर त्यांनी बांदिवडे येथे पाच निरनिराळी मंदिरे बांधली आणि त्यांत पाच देवतांची स्थापना केली.

त्यात मध्यभागी असलेल्या मंदिरात लक्ष्मीनारायणाची काळ्या पाषाणाची सुंदर मूर्ती आहे. डाव्या बाजूला रामनाथ व शांतादुर्गा यांची मंदिरे आहेत आणि उजव्या बाजूला कामाक्षीचे मंदिर आहे. रामनाथाच्या देवालयातच सिद्धनाथाची स्थापना केलेली आहे. रामनाथाच्या प्राकारात वेताळ व काळभैरव यांची लहान देवळे आहेत.

गेल्या शतकात ही जुनी मंदिरे पडू लागल्यामुळे इ. स. १९०५ मध्ये त्यांचा जीर्णोद्धार करण्यात आला आणि नवी भव्य मंदिरे बांधण्यात आली. त्या वेळी मुख्य गर्भागारात उच्च स्थानी लक्ष्मीनारायण व मध्यभागी रामनाथ या देवतांची स्थापना करण्यात आली. उजवीकडच्या मंदिरातील गर्भागारात कामाक्षी देवी, डावीकडच्या मंदिरातील गर्भागारात शांतादुर्गा व तिच्या उजव्या बाजूला गर्भागाराबाहेर सिद्धनाथ यांची स्थापना झाली. वेताळ व काळभैरव यांची जुनी मंदिरेच मजबूत असल्यामुळे तशीच ठेवली आहेत. मुख्य मंदिराच्या दोन्ही बाजूंना व मागे अग्रशाळा आहेत. इ. स. १९३४ साली या देवालयाचा नगारखाना बांधण्यात आला आणि १९५१मध्ये सध्याचा सभामंडप तयार झाला. त्या जागी पूर्वी माघ महिन्यात तात्पुरता मंडप उभारण्यात येई व तो वैशाखापर्यंत तसाच ठेवीत.

बांदिवडे गावातील या देवस्थानाला 'रामनाथी' असे नाव आहे. तिथे वर्षातील प्रत्येक मासात काही ना काही उत्सव चालू असतो. त्यांतील माघ मासात होणारा महाशिवरात्रि-महोत्सव विशेष प्रसिद्ध आहे. तो माघ कृ. १२ पासून फाल्गुन शु. २ पर्यंत चालतो. त्यात लालखी, पालखी, इ. निरनिराळ्या वाहनांतून देवतांच्या मिरवणुकी काढतात. शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी पहाटे व संध्याकाळी रामनाथाची रथातून मिरवणूक निघते, ती फार प्रेक्षणीय असते. त्या उत्सवात ४–५ दिवस अनेक कार्यक्रम

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होतात. त्यांत नाट्यप्रयोगही होतात. दर सोमवारी, अक्षय्यतृतीयेला व दसऱ्यालाही रामनाथाच्या पालखीचा सोहळा असतो. याव्यतिरिक्त लक्ष्मीनारायण, शांतादुर्गा, कामाक्षा यांचेही उत्सव आणि पालखी-सोहळे निरनिराळ्या प्रसंगी केले जातात. फाल्गुन मासात दशमीला देवतांच्या पुनःप्रतिष्ठादिनाचा स्मारकोत्सव होतो. त्यात दुपारी पक्वान्नयुक्त संतर्पण आणि रात्री चार देवतांची मिरवणूक, नौकाविहार, दीपोत्सव, इ. कार्यक्रम असतात. शिमग्याच्या सणात रंगपंचमीला होणारा पालखीसोहळा विशेष मजेदार असतो. [रामनाथ-देवस्थान-महाजन-नाट्यसेवा रौप्यमहोत्सव-स्मरणिका, १९६९]

(२) (इ. स. १८६४–१९३०) एक राजस्थानी भक्तकवी. हा बूंदीचा रहिवासी होता. याच्या वडिलांचे नाव राव गुलाबजी. हा बहुश्रुत, विद्वान व व्रजभाषेचा उत्तम कवी होता. याने समस्यासार, सतीचरित्र, रामनीती, नीतिसार, शंभशतक, परमेश्वराष्टक, गणेशाष्टक, सूर्याष्टक, दुर्गाष्टक, शिवाष्टक, नीतिशतक, इ. एकूण अकरा लहानमोठे ग्रंथ लिहिले आहेत. याने प्राधान्याने भक्तिगीते लिहिली असून, त्यांची रचना सरळ व मनोहर अशी आहे. याच्या कवितांतून बोधपर वचने खूपच आढळतात. [रा. पि. सा.]

रामनामग्रहणव्रत

एक पारमार्थिक व्रत. व्रतावधी बारा वर्षे. प्रत्येक वर्षाचे रामनाम वेगळे असते. उदा० राम, श्रीराम, तुलसी-त्रिभुवनराम, इत्यादी. जेवताना, खाताना, पिताना, प्रत्येक वेळी त्या त्या वर्षीच्या रामनामाचे प्रथम उच्चारण करायचे असते. व्रताचा प्रारंभ रामनवमी किंवा मकरसंक्रांती या दिवशी करतात. प्रथम संकल्प करून मग ब्राह्मणमुखाने रामनामाचे ग्रहण करतात. दुसऱ्या वर्षी पहिल्या वर्षीच्या रामनामाचे विसर्जन करतात.

बारा वर्षांनंतर व्रताचे उद्यापन करतात. त्या वेळी सीतारामाची सुवर्ण प्रतिमा कलशावरील पूर्णपात्रात ठेवून तिची पूजा करतात. साखर मिसळलेले तूप व पायस यांचे हवन करतात. मग आचार्यपूजन, प्रतिमादान, ब्राह्मणभोजन, इ. कृत्ये करून व्रताची समाप्ती करतात. [व्रतराज]

रामनामजप

श्रीराम हा स्वयमेव परब्रह्म आहे आणि तोच सर्व संकटांतून तारणारा आहे, अशी श्रद्धा ठेवून त्याच्या नामाचा जप करावा असे सांगितले आहे. रामनामाला बीजमंत्राचे महत्त्व स्वामी रामानंद यांनी दिले. सर्व मनुष्यमात्राला रामनामजपाचा अधिकार आहे व हा जप तारक आहे, असे तुलसीदासांनीही सांगितले आहे. सगुण-निर्गुण रामभक्तांनीही रामाच्या नामजपाला गौरविले आहे. नवविधा भक्तीच्या श्रवण, कीर्तन, अर्चन, इ. प्रकारांपेक्षाही ते नामजपाला विशेष महत्त्व देतात. योगमार्गात चित्ताची एकाग्रता आवश्यक असते आणि ती रामनामाचा जप केल्याने साध्य होते, असे बहुतेक संतांचे सांगणे आहे. म. गांधींचीही रामनामावर श्रद्धा होती. त्यांच्या नित्यप्रार्थनेत ' रघुपतिराघव राजा राम । पतितपावन सीताराम ' हे भजन म्हटले जात असे.

रामनामजपामुळे भक्ताचे भीती, आसक्ती, कुविचार, इ. दोष नष्ट होतात. मात्र हा जप मनःपूर्वक केला पाहिजे. अज्ञानाच्या अंधारात ठेचा खाणाऱ्या जीवाला रामनाम हे दीपकाप्रमाणे योग्य मार्ग दाखवते, असाच संत-महात्म्यांचा अभिप्राय आहे. तुलसीदासाने तर प्रत्यक्ष रामापेक्षाही रामनामाचे महत्त्व अधिक असल्याचे म्हटले आहे; कारण रामाने स्वतः उद्धार केलेल्या व्यक्तींपेक्षा रामनामाने उद्धार झालेल्यांची संख्या फार मोठी आहे.

रामनामाबद्दल रामरक्षेत बुधकौशिक म्हणतो, ते असे –

भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसम्पदाम् ।
तर्जनं यमदूतानां राम रामेति गर्जनम् ॥

अर्थ – रामनामाचा घोष हा संसाराचे वासनारूप बीज भाजून टाकणारा, सुखसंपदा मिळवून देणारा व यमदूतांना धाक दाखवणारा आहे.

अंतकाळी ज्याच्या मुखातून रामनाम येते, त्याला उत्तम गती प्राप्त होते, अशी भाविकांची धारणा आहे. [हिं. वि. को.]

रामनामलेखन व्रत

एक परमार्थसाधक व्रत. या व्रतात सहस्रलक्षादी संख्या निश्चित करून रामनाम लिहायचे असते. व्रताचा प्रारंभ रामनवमी किंवा इतर कोणत्याही शुभ दिवशी करतात. या व्रताचा सर्वांना अधिकार आहे. व्रताची प्रमुख देवता राम आहे. रामनाम लिहिलेली पत्रिका हे त्या देवतेचे प्रतीक आहे. संकल्प करून त्या प्रतीकाची पूजा करतात. मग संकल्पित रामनामाचे लेखन करतात.

उद्यापनाच्या वेळी राम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांच्या सुवर्णमूर्ती करून त्या पीठावर सर्वतोभद्र मंडलात मांडलेल्या कलशावरील पूर्णपात्रात स्थापतात. नंतर आचार्यद्वारा अग्निमुख करून पलाशसमिधा, आज्य, चरू, तिल, या द्रव्यांचे १०८ किंवा त्याहून अधिक संख्येने हवन करतात. शेवटी बलिदान, पूर्णाहुती, प्रतिमापूजन, अभिषेक, दक्षिणा, विविध दाने, उमा-महेश्वरांची पूजा, इ. कृत्ये झाल्यानंतर तीन कुमारी, एक बटू, एक योगी व आचार्यादी ब्राह्मण यांना भोजन घालून व क्षेत्रपालाला बली देऊन व्रत पूर्ण करतात. [व्रतराज]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कटिभागाचे, जांबवानाला आश्रय देणारा नाभीचे, सुग्रीवाचा धनी कंबरेचे, हनुमंताचा प्रभू जांघांचे, राक्षसांच्या कुळांचा संहार करणारा रघुकुलातील श्रेष्ठ मांडयांचे, सेतू बांधणारा गुडघ्यांचे, रावणाचा नाश करणारा पोटऱ्यांचे व बिभीषणाला राज्यलक्ष्मी देणारा पायांचे रक्षण करो. याप्रमाणे श्रीरामचंद्र माझ्या सर्व शरीराचे रक्षण करो.

हा सर्व रक्षामंत्रविभाग लिहीत असताना बुधकौशिकाने रामायणातील महत्त्वाच्या प्रसंगांचा कालक्रमाने उल्लेख केला आहे.

याव्यतिरिक्त, या स्तोत्रात रामचंद्राचे यथार्थ वर्णन, राम स्तुती, फलश्रुती, रामायणाची रूपरेषा, रामवंदन, रामभक्त-स्तुती, पूर्वसूरींना वंदन व त्यांची स्तुती, रामनामाची महती, इ. विषय आलेले आहेत.

रामरक्षेच्या रोजच्या पठणाने घरातील सर्व पीडा व भूत-बाधाही दूर होते, असे सांगतात. रामसामर्थ्याने युक्त अशा या स्तोत्राचे जो पठण करील, तो दीर्घायुषी, सुखी, संततिवान, विजयी आणि विनयसंपन्न होईल, अशी फलश्रुती या स्तोत्रातच सांगितली आहे.

महाराष्ट्रात काही घरांत अद्यापही तिन्हीसांजा झाल्या, की मुले हातपाय धुवून देवाला नमस्कार करतात आणि रामरक्षा म्हणतात; घरातील शिशूला रामरक्षा म्हणून विभूती लावतात. [श्री. स. कृ. देवधर, प्रसाद, नोव्हेंबर १९६९]

रामराजभूषण (इ. स.चे १६ वे शतक) हा भाट जातीचा एक श्रेष्ठ दर्जाचा कवी होता. विजयनगरचा सम्राट कृष्णदेव याच्या दरबारातील अष्ट दिग्गज कवींत याची गणना होती. याला भट्टमूर्ती असेही म्हणत.

याने वसुचरित्र, हरिश्चंद्रनलोपाख्यान व नरसभूपालीय असे तीन काव्यग्रंथ लिहिले. वसुचरित्र हे महाभारतातील उपरिचर वसूच्या एका उपाख्यानावर लिहिलेले असून, याचे सहा आश्वास आहेत. तेलुगू साहित्यातील पंचकाव्यांमध्ये याची गणना होते. रामराजभूषण हा संगीतज्ञ असल्यामुळे याच्या काव्यात संगीत व साहित्य यांचा मणिकांचनयोग जुळून आला आहे. श्री. पुट्टपती नारायणाचार्य म्हणतात, की 'ज्याला साहित्य, संगीत व नृत्य यांचे विशेष ज्ञान आहे, त्यालाच वसुचरित्राचे महत्त्व कळेल.'

नरसभूपालीय हे एक रीतिकाव्य आहे. हरिश्चंद्रनलोपाख्यान हे एक जोडकाव्य असून, ते द्व्यर्थी आहे. म्हणजे यातले वर्णनपर श्लोक जसे नलाला लागू पडतात तसेच ते हरिश्चंद्रालाही लागू पडतात. या काव्यात कवीचे पांडित्य प्रकर्षाने जाणवते. [ते. सा. इ.]

रामराय (इ. स. च्या १६ व्या शतकाचा पूर्वार्ध) ब्रजभाषेचा एक श्रेष्ठ कवी आणि संत. हा सारस्वत ब्राह्मण असून विठ्ठलनाथाचा सेवक व भगवानदास नामक एका सुभेदाराचा पुरोहित होता. प्रथम हा चैतन्यमतानुयायी होता; पण पुढे तो वल्लभसंप्रदायात दाखल झाला.

रामराय हा गीतगोविंदकार जयदेव याच्या वंशातला असून, जयदेवापासून चौदाव्या पिढीत येतो. याचा जन्म लाहोरात झाला व आयुष्याची पहिली काही वर्षे तो तिथेच होता, असे म्हणतात.

समजू लागल्यापासूनच विरक्ती अंगी बाणल्यामुळे रामराय अविवाहितच राहिला. त्याच्या घराण्यात राधा-माधवाची उपासना बऱ्याच पिढ्यांपासून चालू होती; तीच त्याने स्वीकारली. त्याने संस्कृत भाषेत ब्रह्मसूत्रांवर काही ग्रंथ लिहिले आहेत. आदिवाणी व गीतगोविंदभाषा हे त्याचे ब्रजभाषेतले ग्रंथ होत. आदिवाणी ही राधा-माधवावर लिहिलेली १०१ भक्तिपर पदे होत. या पदांची भाषा शुद्ध व प्रौढ आहे. गीतगोविंदभाषा हा त्याच काव्याचा ब्रजभाषेतला अनुवाद आहे. [चै. म. ब्र. सा.]

रामलिंगस्वामी (इ. स. १८२३–१८७४) तमिळनाडू मधील एक शैव कवी आणि संत. याचा जन्म चिदंबरमजवळच्या मरुदूर नामक गावी झाला. याच्या मातापित्यांची नावे अनुक्रमे चिन्नमय्यार व रामय्या पिल्लै अशी होती. त्या कुटुंबात रामलिंगम हा सर्वांत धाकटा होता. बाल-पणीच रामलिंगमचे पितृछत्र नष्ट झाले. समापती नावाच्या त्याच्या थोरल्या भावाने मग त्याचे पालनपोषण केले. त्याच्या शिक्षणाचीही त्यानेच व्यवस्था केली.

रामलिंगमची बुद्धी लहानपणापासूनच तीक्ष्ण होती. लहानपणीच भगवद्भक्तीच्या कविता रची आणि त्या ऐकून लोक आश्चर्यचकित होत. तो स्कंदाचा उपासक होता. त्याला सांसारिक आसक्ती कधीच नव्हती. मातेच्या आग्रहाखातर त्याने लग्न केले; पण तरीही तो संसारात रमला नाही. तो सदा भक्तिसाधनेतच निमग्न राहिला. त्याने आपले पूर्वायुष्य मद्रास व तिरुवायूर या ठिकाणी घालवले. साधना करता करता तो सिद्ध बनला. पुढे अनेक भक्त आणि विद्वान त्याचे अनुयायी झाले.

मातेच्या मृत्यूनंतर रामलिंगस्वामी चिदंबरमजवळच्या वडलूर (पार्वतीपुरम) या गावी गेला. वडलूर इथे तो ज्या कुटीत राहत होता, त्या कुटीत एके दिवशी एका दिव्य ज्योतीचे अवतरण झाले. त्याने त्या दिव्य ज्योतीला भगवती मानून १९... छंदांमध्ये तिचे स्तोत्र केले. हा स्तोत्रसंग्रह अरुळ्पा या नावाने प्रसिद्ध असून, रामलिंगमची ती अमर कृती मानली जाते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अमर घटनेची स्मृती म्हणून एक दीप तिथे कायमचा प्रज्वलित ठेवला गेला आहे.

हळूहळू ती आध्यात्मिक ज्योती आपल्याला मिळावी म्हणून शेकडो साधक रामलिंगमच्या भोवती गोळा झाले. तो त्यांना ईश्वरी अनुग्रहाचा किंवा ज्योतीच्या दर्शनाचा मार्ग उपदेशू लागला. त्याने जो मार्ग उपदेशिला, त्याला षडन्तसमरस सन्मार्ग असे नाव त्याने दिले आहे. योगान्त, कलान्त, नादान्त, बोधान्त, वेदान्त आणि सिद्धान्त असे हे सहा अन्त आहेत. या अंतांच्या द्वारे ईश्वराचा साक्षात्कार होऊ शकतो. हे अन्त म्हणजे भक्तिमार्गाच्या पायऱ्याच आहेत. साधकभक्त योगान्तापासून सिद्धान्तापर्यंत पोचल्यावर त्याला निर्विकल्प समाधीत अनिर्वचनीय अशी शिवानंदाची प्राप्ती होते.

(१) योगान्त – 'योग' हा चित्तवृत्तिनिरोधक असतो. चित्ताच्या वृत्ती पाच प्रकारच्या मानलेल्या आहेत. त्यांतल्या काही क्लेशयुक्त आहेत, तर काही क्लेशरहित आहेत. अष्टांग योगाच्या अभ्यासाने त्यांचा निरोध करून समाधी प्राप्त करायची असते.

(२) कलान्त – शैव सिद्धान्तानुसार छत्तीस तत्त्वे अथवा कला आहेत. कला हाच विद्यातत्त्वाचा आधार आहे. तिच्या साहाय्याने साधक अविद्येचे निराकरण करण्यास समर्थ होतो. कलेशी संबंध ठेवूनच आत्मा ज्ञानप्रकाश प्राप्त करून देतो. शिवज्ञानसिद्धी या ग्रंथात या विषयाचे विवरण आहे.

(३) नादान्त – नाद म्हणजे श्रूयमाण ध्वनी होय. ध्वनी अनेक प्रकारचे आहेत. त्या सर्वांना आधारभूत म्हणजे ॐकार ध्वनी होय. यालाच प्राचीन ऋषिमुनींनी नाद म्हटले आहे. साधक समाधीप्रत पोचल्यावर त्याला शिवाच्या नादात्म स्वरूपाचा अनुभव घडू लागतो.

(४) बोधान्त – बोध म्हणजे बुद्धी. बोधाच्या द्वारे शिवरूपाचा अंत जाणून घेणे म्हणजेच शिवानुभूती प्राप्त करून घेणे. या स्थितीत शिव ज्योतिर्मय स्वरूपात दिसू लागतो.

(५) वेदान्त – बोधावस्थेत ज्योतिर्मय शिवाचे होणारे ज्ञान या अवस्थेमध्ये अधिक स्पष्ट होते. ज्योतिर्मय ज्ञानाचा अतिस्पष्ट अनुभव म्हणजेच वेदान्त होय.

(६) सिद्धान्त – ही अंतिम अवस्था आहे. या दशेत साधकाच्या श्रमांचे साफल्य होऊन तो कृतार्थ होतो.

वडलूर गावाजवळच्या मेलकुप्पम्मध्ये रामलिंगस्वामीने सत्यज्ञानसभेची स्थापना केली व तिच्यामार्फत त्याने आपल्या आध्यात्मिक सिद्धान्तांचा प्रचार करण्याची व्यवस्था केली. आपली पदे आणि स्तोत्रे यांचे अध्ययन-अध्यापन करण्यासाठी समरसवेदपाठशाळा निर्माण केली. शिवगुणसंकीर्तनासाठी एक भजनमठ बनवला. दीन व धार्मिक पुरुषांना भोजन मिळावे म्हणून त्याने सत्यधर्मशाळा उघडली. मेलकुप्पम्ला त्याने उत्तरज्ञानचिदंबरम असे नाव दिले.

रामलिंगस्वामी हा उदारहृदयी होता. भक्तिमार्गात तो जातिभेद व उच्चनीच भाव मानीत नसे. आपल्या गीतांतून त्याने जातिभेदाचे खंडनही केले आहे. त्याचे एक पद्य पुढे दिले आहे, त्यावरून त्याच्या भक्तीचा आणि प्रतिभेचाही प्रत्यय येईल –

वेण्णिलाक् कण्णिहळ्
अम्बरत्तिल् आडुहिन्रार वेण्णिलावे । अवर्
आडुहिन्र वण्णम् एन्न वेण्णिलावे ।
अन्दरत्तिल् ओडुकिन्रार वेण्णिलावे । अवर्
आडुम् वहै एप्पडियो ? वेण्णिलावे ।
अणुविल् अणुवायिरुन्दार वेण्णिलावे ! एङ्गुम्
आहि निन्र वण्णम् एन्न ? वेण्णिलावे ।
अणु वहिरणुम् एल्लाम वेण्णिलावे । ऐयर
आट्टम् एनरु शोलवदेन्न ? वेण्णिलावे ।
अम्बरत्तिल् आडुहिन्रार वेण्णिलावे । एन्नै
आट्हिन्रार इम्बरत्ते वेण्णिलावे.

अर्थ – चंद्रा, घुंघट दूर कर. कोमल चंद्रा ! पृथ्वी व स्वर्ग यांच्या विशाल प्रांगणात माझा प्राणनाथ जे नृत्य करीत आहे, त्याचा डौल व शोभा यांचे रहस्य तू मला समजावून सांगणार नाहीस का ? अत्यंत सूक्ष्माणूपेक्षाही माझा देव सूक्ष्म आहे. तरीही सर्व विश्व त्याच्या नृत्यातील तालासुरावर थरथरते आहे, हा एक अद्भुत चमत्कारच नव्हे काय ? परमेश्वरी प्रेरणेमुळे असंख्य विश्वे अनंत आकाशात भ्रमत आहेत, नाचत आहेत. त्यांचे रहस्य तू मला सांगशील का ? नाजुक चंद्रा, मी त्याच्या हातातील एक खेळणे आहे, हे तुला माहीत नाही का ?

याने समाधी घेतली, तेव्हा एक चमत्कार झाला. तो आपल्या कुटीत बसला आणि त्याने आपल्या शिष्यांना सांगितले, की 'कुटीला बाहेरून कुलूप लावा !' शिष्यांनी तसे केले. काही वेळाने शिष्य दार उघडून पाहतात; तर रामलिंगस्वामी त्या कुटीत नव्हता. तो दैवी ज्योतीत विलीन झाला होता. [भा. सं. म.; चंद्रकांत मुदलियार–दक्षिण भारत, एप्रिल १९५९; स्वामी शुद्धानंद भारती –कल्याण, डिसेंबर-जानेवारी १९३५–३६; शी. त. म्यू.]

रामलीला

उत्तर प्रदेशातील एक धार्मिक लोकनाट्य. प्रभू रामचंद्राच्या जीवनातील काही प्रसंग यात नाट्यरूपाने दाखवतात. तुलसीदासाने या रामलीलेचा प्रारंभ केला, असे काही विद्वानांचे मत आहे. आश्विन शु. प्रतिपदेला रामलीलेला सुरुवात होते आणि दसऱ्याच्या दिवशी ती संपते.

सर्वसाधारणपणे, उत्तर प्रदेशातील खेडेगावांत रामलीलेच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजस्थानात या पंथाच्या तीन शाखा आहेत. या तीन शाखांत मूल सिद्धान्तांच्या बाबतीत फारसा फरक नाही. पण त्यांचे आचार्य वेगवेगळे असल्यामुळे त्यांचे अनुयायी स्वतःला एकमेकांपासून भिन्न समजतात.

शाहपुरा येथील शाखा रामचरणाने प्रवर्तित केली. या शाखेचे साधू रामद्वारात राहतात व भिक्षा मागून उदरनिर्वाह करतात. ते कोणाकडूनही पैसा घेत नाहीत. ते वाचन व भजन यांत सतत निमग्न असतात.

खेडापा येथील शाखा हरिरामदासाने प्रवर्तित केली. बीकानेर राज्यातील सिंहथल नामक गावी, एका ब्राह्मणकुळात त्याचा जन्म झाला. हा अत्यंत कुशाग्र बुद्धीचा होता. लहान वयातच त्याने वेदान्त, ज्योतिष, इ. शास्त्रांत प्रावीण्य मिळवले. इ. स. १७४३ मध्ये त्याने जैमलदासाकडून दीक्षा घेतली. जैमलदास हा रामानंदी वैष्णव साधू होता. जैमलदासाचा एक शिष्य रामदास याने खेडापा गावी आपली गादी स्थापन केली. त्यामुळे खेडापा येथील रामसनेही रामदासाला आपला आदिगुरू, हरिरामदासाला आदिप्रवर्तक व जैमलदासाला आदि-आचार्य मानतात. रामदास स्वतः गृहस्थ होता व आपल्या शिष्यांनाही त्याने गृहस्थाश्रम स्वीकारायचा आदेश दिला होता. याचा पुत्र दयालदास व नातू पूरणदास यांनी रामसनेही साधूंचे विरक्त, विदेही, परमहंस, घरबारी व प्रवृत्ती असे पाच भेद केले व ते अद्यापही चालू आहेत. हे मूर्तिपूजा करीत नाहीत, पण रामद्वारात आपल्या गुरूची तसबीर ठेवतात.

रैण या गावी या पंथाची तिसरी शाखा असून, इथले रामसनेही दरियासाहब याला आपला आदिगुरू मानतात. [उ. भा. सं. प.; रा. पिं. सा.; गु. सं. हिं. दे.; इं. सा.]

रामसरस्वती (इ. स.च्या १६ व्या शतकाची अखेर) असमिया भाषेचा एक सिद्धहस्त कवी. हा चमरिया गावाचा रहिवासी होता. कविचंद्र नामक मोठ्या भावाकडून त्याला कवितेची प्रेरणा मिळाली. हा वैष्णवपंथी होता.

कोचराजा नरनारायण व त्याचा भाऊ चिलाराय यांनी रामसरस्वतीला राजाश्रय दिला व त्याला रामायण-महाभारताचा असमिया भाषेत अनुवाद करण्यास सांगितले. कवीने संपूर्ण महाभारत असमिया भाषेत अनुवादले. त्यात काही ठिकाणी संक्षेप केले, काही विस्तार केले आणि काही काल्पनिक कथानके रचून घातली. रामसरस्वतीच्या सर्व रचनेवर शंकरदेवाच्या काव्याचा प्रभाव दिसून येतो. शंकरदेव व माधवदेव या दोन कवींनंतर कवित्वाच्या बाबतीत रामसरस्वतीचेच नाव घेतले जाते. प्रस्तुत कवीने गीतगोविंदाचे असमिया भाषेत रूपांतर केले आहे. त्याची स्वतंत्र व लोकप्रिय रचना म्हणजे भीमचरित ही होय. हे काव्य म्हणजे हास्य, विनोद व उपरोध यांचा जणू खजिनाच आहे.

कवीच्या काव्यविषयक प्रचंड कामगिरीमुळे लोकांनी व राजांनी त्याला कविचंद्र, भारतचंद्र, भारतभूषण, कविचूडामणी, इ. पदव्या दिल्या होत्या. [च. भा. नि.]

रामस्वामी शास्त्री (इ. स. १८२३–१८८७) केरळातील एक कवी. इलत्तूरच्या पश्चिम अग्रहारात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव शंकरनारायण शास्त्री असे होते. प्रारंभी संस्कृत भाषेचे अध्ययन केल्यावर रामस्वामी तर्क आणि व्याकरण ही शास्त्रे शिकला. इ. स. १८४९ पासून तो त्रिवांकुरच्या राजाच्या दरबारात गेला आणि आमरण तिथेच राहिला. मध्यंतरी आयिलिअम तिरुनाल रामवर्मा या राजाची त्याच्यावर इतराजी झाली आणि रामस्वामी तो देश सोडून निघून गेला. पण राजाने त्याला पुन्हा बोलावून घेतले आणि दरबारातील प्रमुख कवी म्हणून त्याची नेमणूक केली.

रामस्वामीने पुष्कळ ग्रंथ रचले आहेत. त्याने भट्टिकाव्याच्या धर्तीवर सुरूपराघव नामक एक महाकाव्य रचले आहे. रामाची कथा सांगता सांगताच त्याने व्याकरणाचे नियम आणि अलंकार यांची माहिती त्यात दिली आहे. या काव्याचे पंधरापेक्षा जास्त सर्ग होते, असे सांगतात. पण सांप्रत उपलब्ध असलेले त्याचे हस्तलिखित आठव्या सर्गाच्या मध्यभागीच संपले आहे. त्याच्या कीर्तिविलास या काव्याचा फक्त एकच उल्लास उपलब्ध असून, त्यात दरबारातील पंडितांच्या व कवींच्या सभेचे वर्णन आहे. याव्यतिरिक्त त्याने गांधारचरित, पार्वतीपरिणय, अंबरीषचरित, तुलाभारप्रबंध, अन्यापदेशद्वासप्तती, गौणसमागम, इ. काव्ये आणि देव्यष्टप्रासशतक, शिवाष्टप्रासशतक, इ. अनेक स्तोत्रे रचली आहेत. त्याने काही शास्त्रीय विषयांवरही ग्रंथ रचले आहेत. त्याचा वृत्तरत्नावली हा वृत्तांसंबंधी, रामोदय हा काव्यशास्त्रावरील व क्षेत्रतत्त्वदीपिका हा भूमितिशास्त्रावरील ग्रंथ होय. हे ग्रंथ त्याने संस्कृत भाषेत लिहिले आहेत. मलयाळम भाषेतही त्याने काही रचना केली आहे. [कॉ. के. सं. लि.]

रामह्रद कुरुक्षेत्रातील एक प्राचीन तीर्थ. स्थानेश्वरच्या उत्तरेला पाच मैलांवर हे तीर्थ आहे. याचे वैदिक नाव शर्यणावत असे होते. याव्यतिरिक्त हे द्वैपायनह्रद व ब्रह्मसर या नावांनीही ओळखले जाते. वसुदेवाने यज्ञ पुरा झाल्यावर यज्ञासाठी आलेल्या सर्व लोकांसह या सरोवरात अवभृथ स्नान केले, असे भागवतात म्हटले आहे (१०.८४.५३).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ब्रह्मदेवाची आदियज्ञवेदी या सरोवराच्या किनाऱ्यावर होती, म्हणून या सरोवराला ब्रह्मसर असे नाव मिळाले, असे म्हणतात. त्याचप्रमाणे परशुरामाने सर्व क्षत्रियांना जिंकल्यावर या सरोवराच्या जलाने पितृतर्पण केले म्हणून याला रामह्रद असे नाव मिळाले. पाहा – ब्रह्मसर. [हि. ध.; भा. सा.]

रामाई पंडित (इ. स. च्या १० व्या शतकाचा उत्तरार्ध) पश्चिम बंगालमधील धर्म नामक संप्रदायाचा संस्थापक. याचा जन्म बांकुडा जिल्ह्यातील दारुकेश्वर नदीच्या किनारी असलेल्या चंपाईघाट नामक गावात झाला. रामाई पाच वर्षांचा असताना त्याचे वडील वारले. त्यानंतर एका ब्राह्मणाने त्याचे पालनपोषण केले. ब्राह्मणाने त्याचे उपनयन न करता त्याला ताम्रदीक्षा दिली. ही दीक्षा घेतल्यानंतर पुरुषाला धर्मठाकुराची पूजा करण्याचा अधिकार प्राप्त होतो. त्या काळात रामाई हा धर्मठाकुराचा सर्वश्रेष्ठ पुरोहित मानला जात होता. वयाला ऐंशी वर्षे झाल्यावर याने केशवती नामक एका कन्येशी विवाह केला. त्याला तिच्या ठिकाणी एक पुत्र झाला. त्याचे नाव धर्मदास असे होते. रामाईचे अनेक शिष्य होते. प. बंगालमधील हाकुंडा गावी याने योगबलाने देहत्याग केला. कोणी त्याला ब्राह्मण मानतात, तर कोणी डोम समजतात.

रामाई पंडिताने शून्यपुराण नामक एक ग्रंथ रचला आहे. ग्रंथाची भाषा जुनी बंगाली आहे. त्याच्या पहिल्या पाच अध्यायांत विश्व कसे उत्पन्न झाले, त्याचे वर्णन आहे. सर्व विश्व शून्यातून निर्माण झाले, हे महायान बौद्धांचे तत्त्व त्यात प्रतिपादले आहे. पुढील पन्नास अध्यायांत धर्म-पूजा कशी करावी, ते सांगितले आहे. निरंजनाचा क्रोध नामक शेवटचा अध्याय सुमारे तीनशे वर्षांनंतर मूळ ग्रंथाला जोडला गेला असावा. त्यात सद्धर्माचा म्हणजे बौद्ध धर्माचा ऱ्हास व हिंदू धर्माचे पुनरुज्जीवन कसे झाले, ब्राह्मणांनी बौद्धांचा छळ कसा केला आणि ब्राह्मणांवर सूड उगवण्यासाठी देवांनी मुसलमानांचा अवतार कसा घेतला, इ. वर्णन आहे. [हि. बें. लँ. लि.; हृ. प्रा. लो.]

रामा जनार्दन (इ. स. चे १६ वे शतक) एक सत्पुरुष. हा जनार्दनस्वामींचा शिष्य आणि एकनाथांचा गुरुबंधू होता. रामा जनार्दनाचे मूळ उपनाम बहुकुले (बुकुले) असे होते. जनार्दनस्वामींनी चाळीसगाव येथील आपली देशपांडेपणाची वृत्ती इ. स. १५६९ मध्ये आपणहून प्रेमाने रामा जनार्दनाला वहाल केली. तेव्हापासून रामा जनार्दनाच्या घराण्यात ही वृत्ती चालू आहे.

रामा जनार्दनाने किती काव्यरचना केली, ते कळायला मार्ग नाही. त्याची सद्गुरुविषयक दोन स्फुटे, विठ्ठलाची आरती, ज्ञानेश्वरांची आरती आणि संतलक्षणविषयक एक अभंग, एवढीच कविता उपलब्ध आहे. पण या रचनेवरून त्याच्या पारमार्थिक उंचीची स्पष्ट कल्पना येते. विठ्ठल हे त्याचे उपास्य दैवत दिसते. तो ज्ञानेश्वरांचाही भक्त होता. ज्ञानेश्वर हे पांडुरंगाचाच अवतार आहेत, अशी त्याची श्रद्धा होती.

त्याची ज्ञानेश्वरांची आरती पुढीलप्रमाणे –

आरती ज्ञानराजा । महा कैवल्यतेजा ।
सेविती साधुसंत । मनू वेधला माझा ॥
लोपले ज्ञान जगीं । हित नेणती कोणी ।
अवतार पांडुरंग । नाम ठेविलें ज्ञानी ॥
प्रगट गुह्य बोले । विश्व ब्रह्मचि केले ।
रामा जनार्दनी । पायीं टकचि ठेलें ॥

ही आरती अत्यंत लोकप्रिय असून, कीर्तनाच्या व भजनाच्या शेवटी ती म्हणतात. [गंगाजळी; म. वा. इ. ३]

रामाद्वय (इ. स. चे १३ वे शतक) एक अद्वैतवेदान्ती. अद्वयानंद हे याचे गुरू होत. याने वेदान्तकौमुदी नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. ब्रह्मसूत्राच्या पहिल्या चार अधिकरणांवरील आलोचनात्मक टीका म्हणजे हा ग्रंथ होय. या ग्रंथाचे चार अध्याय आहेत. हा ग्रंथ स्वतंत्र नसून पंचपादिका व पंचपादिकाविवरण यांचाच तो विस्तार आहे, असे म्हणतात.

शुद्ध चैतन्यावर अविद्येचे आवरण आहे, मन सत्त्वगुणयुक्त आहे, क्षुब्ध झालेले मन विषयज्ञान करून देण्याच्या वेळी किरणस्वरूप होते व विषयापर्यंत जाऊन विषयाचे ज्ञान करून देते. इ. सिद्धान्त यात विवरले आहेत.

सिद्धान्तलेशसंग्रह नामक ग्रंथात व अन्य परवर्ती ग्रंथांनीही कौमुदीकार म्हणून याचा आदरपूर्वक उल्लेख येतो. [शंकराचार्य]

रामानंद (इ. स. १४१०–१५१०) रामावत संप्रदायाचा प्रणेता व आचार्य. काही लोक रामानंदाचा जन्मकाल इ. स. १३०० मानतात; पण तो बरोबर नाही. रामानंदाच्या चरित्रातील तीन घटना विचारात घेता इ. स. १४१० हाच त्याचा जन्म मानावा लागतो – (१) शिकंदर लोदीच्या काळात रामानंद हयात होता. लोदीचा काळ इ. स. १४८९ ते १५२६ हा आहे. (२) कबीरदासाची प्रौढावस्थेत शिकंदर लोदीशी भेट झाली होती आणि कबीरदास हा रामानंदाचा शिष्य होता. व (३) सेना न्हावी हा बांधवगडाचा राजा राजाराम (इ. स. १४५४ ते १४६१) याचा नापित होता आणि तो रामानंदाचा शिष्य होता. या साऱ्या व्यक्ती १५ व्या शतकातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामवन मध्य प्रदेशातील एक ठिकाण. जबलपूर-अलाहाबादच्या दरम्यान सतना स्टेशनवर उतरून रामवनाला जाता येते. तुलसीदासांचे मोठे स्मारक म्हणून या स्थानाला महत्त्व आले आहे. रामचरितमानसाच्या बालकांडात वर्णन केल्याप्रमाणे एक स्वस्तिकाकार सरोवर इथे बांधले आहे. या सरोवराला चार घाट असून, प्रत्येक घाटाला सात पायऱ्या व एक चबुतरा आहे. पूर्वेला तुलसीदासांचे पिवळे मंदिर, दक्षिणेला भारद्वाजांची लाल झोपडी, पश्चिमेला ज्ञानमार्गी शिवाचे धवल मंदिर आणि उत्तरेला काक भुशुंडीचा निळा मंडप आहे. पलिकडे दोन झोपड्या असून, त्यांत राम, सीता व लक्ष्मण यांच्या मूर्ती आहेत. पुढे हात जोडलेली हनुमंताची मूर्ती आहे.

इथे एक संग्रहालय असून, त्यात तुलसीसाहित्याचा मोठा संग्रह आहे. रामचरितमानसाची काही हस्तलिखितेही इथे पाहायला मिळतात. मल्लिनाथाच्या मुलाने लिहिलेली मेघदूतावरील पंजरिका टीका हे या संग्रहालयाचे भूषण आहे. ही टीका अन्यत्र पाहायला मिळत नाही. श्री. शारदाप्रसाद या धनाढ्य गृहस्थाने या रामवनाची निर्मिती केली. [धर्मयुग, ३१ मार्च १९६३]

रामसखे (इ. स. चे १८ वे शतक) रामभक्तीच्या रसिक संप्रदायातील एक कवी. हा जयपूर राज्यातील एका गौड ब्राह्मणाचा मुलगा होता. मोठा झाल्यावर हा रामभक्त बनून तीर्थयात्रा करीत दक्षिणेतील उडुपी गावी गेला. तिथे त्याने माध्व आचार्य वसिष्ठतीर्थ यांच्याकडून दीक्षा घेतली. नंतर तो अयोध्या, चित्रकूट, उचहेरा, इ. ठिकाणी राहून अखेरीला मेहर गावी गेला. तिथे तो अखेरपर्यंत राहिला.

रसिक संप्रदायातील सख्य भावाचा प्रवर्तक म्हणून याला मान्यता मिळाली आहे. याने द्वैतभूषण, दानलीला, पदावली, बानी, रूपरसामृतसिंधू, मंगलशतक, राममाला, नृत्यराघवमीलन दोहावली, सत्यपद्धती, इ. लहानमोठे दहा ग्रंथ रचले आहेत. [रा. सा. म. उ.; रा. भ. शा.; अ. श. ब्र. प्रे.]

रामसनेही संप्रदाय रामरूपी ब्रह्माची उपासना करणारा एक संप्रदाय. स्नेहाच्या म्हणजे प्रेमाच्या मार्गाने रामरूपी विलीन होणे, हा या संप्रदायाचा प्रमुख सिद्धान्त असल्यामुळे, त्याला रामसनेही संप्रदाय असे नाव मिळाले आहे.

रामचरण हा या पंथाचा संस्थापक होय. त्याचा जन्म राजस्थानाच्या ढूंढाड या प्रदेशातील सूरसेन किंवा सोडो या गावी इ. स. १७१९ मध्ये बीजावरगी वैश्य कुळात झाला. त्याचे पहिले नाव रामकृष्ण असे होते. मोठा झाल्यावर त्याने जयपूरच्या दरबारात नोकरी पत्करली. एकतिसाव्या वर्षी त्याच्या आयुष्यात एक महत्त्वाची घटना घडली. एका रात्री त्याला स्वप्न पडले, की आपण नदीच्या प्रवाहात वाहात चाललो आहो आणि एक साधू आपल्याला आपला हात पकडून वर काढीत आहे. या स्वप्नाचा त्याच्यावर इतका परिणाम झाला, की तो तावडतोब घर सोडून त्या साधूच्या शोधार्थ निघाला. काही दिवस भ्रमण केल्यावर मेवाड प्रांतातील दांतडा या गावी त्याला त्या साधूचे दर्शन झाले. तो लगेच त्या साधूला शरण गेला. साधूचे नाव कृपाराम असे होते. कृपारामाने लगेच त्याला आपल्या मताची दीक्षा दिली आणि रामचरण असे त्याचे नवे नामकरण केले.

त्यानंतर रामचरणाने सतरा वर्षे एका गुहेत राहून तपश्चर्या केली. पुढे त्याने अनेक काव्यवचनांची रचना केली. तो आपल्या सिद्धान्तांचा लोकांना उपदेश करू लागला. पुढे इ. स. १७६८ मध्ये त्याने रामसनेही नामक एका स्वतंत्र संप्रदायाची स्थापना केली.

पंथाचे तत्त्वज्ञान – परब्रह्म म्हणजे रामच होय. परमात्मा हा निराकार, निर्गुण व सर्वशक्तिमान आहे. तो सृष्टी, स्थिती व लय यांचा कर्ता आहे. जीवात्मा हा परमात्म्याचा अंश असून त्याच्या इच्छेशिवाय तो काहीही करू शकत नाही. त्यामुळे [illegible] परमात्मा राम जी काय परिस्थिती निर्माण करतो, त्यात मा[illegible]साने प्रसन्न राहिले पाहिजे.

गुरुमाहात्म्य – या पंथात गुरूला फार महत्त्व दिलेले आहे. रामचरणाने गुरूला रामाचाच प्रतिनिधी मानले आहे. त्यानुसार या पंथाचे अनुयायी गुरूचेच ध्यान करतात. गुरूच्या अनु[illegible] स्थितीत ते गुरूचे नख, केस किंवा वस्त्र यांना नमस्कार करतात. या पंथाच्या स्त्रिया तर गुरूला आपल्या पतीपेक्षाही श्रे[illegible] मानतात.

निर्गुण रामाचे नामस्मरण करणे, हे मुक्तीचे सर्वश्रेष्ठ सा[illegible] आहे, असे या पंथाचे अनुयायी मानतात. हे नामस्मरण [illegible] करावे, ते रामचरणाने आपल्या शब्दप्रकाश या ग्रंथात पुढी[illegible]प्रमाणे सांगितले आहे –

रामनाम हा तारक मंत्र असून, तो सद्‌गुरूकडून प्राप्त क[illegible] घेतला पाहिजे. या मंत्राचे रोज श्रद्धापूर्वक पठण केले पाहि[illegible] त्यासाठी पद्मासन घालून बसावे व मन स्थिर करून [illegible] स्मरण करावे. तसेच अंतरात रामाच्या संबंधी विरहभाव जा[illegible] करावा. नामस्मरण निरंतर चालू असता एका विशिष्ट प्र[illegible] रचा अनुभव येऊ लागतो. काही वेळा साधकाची दशा बि[illegible] मनुष्याप्रमाणे होते. त्याला रामनामाव्यतिरिक्त कुठ[illegible] गोष्टीत रस वाटत नाही. शरीराकडेही त्याचे दुर्लक्ष होते. [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामनाम हे हृदयात उतरते व परमात्म्याच्या अलौकिक ज्योतीच्या द्वारे प्रकाशित होऊन नाभिकमलात विराम पावते. मग तिथे एक प्रकारचा ध्वनी उठत राहतो. त्यानंतर काय घडते ते त्याने पुढील ओळींत सांगितले आहे –

नाभिकमल में सब्द गुंजारैं । नौसे नारी मंगल उचारैं ।
रोम रोम झुणकार झुणक्कं । जैसे अंतर तांत ठुणक्कं ।
माया अच्छर इहां बिलाया । ररंकार इक गगन सिधाया ।
पच्छिम दिशा मेरु की घाटी । बीसों गाँठ घोर से फाटी ।
त्रिकुटी संगम किया सनाना । जाय चढचा चौथे अस्थाना ।
जहाँ निरंजन तुख्त विराजैं । ज्योति प्रकाश अनंत रवि राजैं ।
अनहद नाद गिणत नहिं आवैं । भाँति भाँति को रान उठावैं ।
सर्वं सुषुम्ना नीर फुंहारा । सून्य सिखर का यह बिवहारा ।

भावार्थ – नाभिकमलात शब्दाचा गुंजारव सुरू झाला, की त्याच्याशी संबंधित सर्व नाड्या झंकृत होतात. मग रोमरोमातून तोच ध्वनी निघू लागतो. तोच ध्वनी सुषुम्ना नाडीच्या ग्रंथींचा भेद करून सहस्रार चक्रापर्यंत पोचतो आणि साधक त्रिकुटीसंगमात स्नान करून तुरीय पदाला पोचतो. तिथे त्याला शून्य शिखरावर निरंजनाच्या ज्योतीचे दर्शन होते, अनाहत नाद विविध रागांत ऐकू येतो आणि सुषुम्नेच्या अमृतस्रावाचे आस्वादन होऊ लागते. या सुखाच्या अनुभवाचे वर्णन शब्दांनी करणे अशक्य आहे.

या पंथाचे अनुयायी सकाळी, दुपारी व संध्याकाळी रामाची प्रार्थना करतात. त्यांच्या मठाला रामद्वारा असे म्हणतात. त्यांचा प्रमुख मठ शाहपुरा येथे असून दाँतडा, गलता, इ. अन्य ठिकाणी इतर मठ आहेत.

रामचरण हा शाहपुरा गावी राहत असता राजाच्या एका नोकराने त्याच्यावर मारेकरी घातला. त्या मारेकऱ्यासमोर रामचरण मान खाली घालून उभा राहिला आणि त्याला म्हणाला. " हे बघ, ईश्वराच्या इच्छेविरुद्ध कोणाचेही प्राण घेता येत नाहीत. जर तू माझे प्राण घेणार असशील, तर काय होईल ते पाहा. " रामचरणाचे हे बोलणे ऐकून मारेकरी घाबरला व शस्त्र टाकून त्याला शरण गेला.

इ. स. १७९८ मध्ये रामचरण मृत्यू पावला. त्याने एकूण ३६२५० 'वाणी' रचल्या असे सांगतात. त्याच्या रचनांचा एक संग्रह, स्वामीजी श्रीरामचरणजी महाराज की अणभै वाणी, या नावाने प्रसिद्ध झालेला आहे. त्यात गुरुमहिमा, नामप्रताप, शब्दप्रकाश, अगभैविलास, विश्वासबोध, रामरसायनबोध, पंडितसंवाद, इ. विषय आलेले आहेत.

रामचरणाचे २२५ शिष्य होते व त्यांपैकी बारा प्रमुख होते. रामजन, दूल्हाराम, चन्द्रदास, इ. त्याच्या काही शिष्यांनी काव्यरचना केली आहे.

या संप्रदायाचे अनुयायी प्रामुख्याने गुजरात व राजस्थान या प्रदेशांत आढळतात. ते गळयात तुळशीकाष्ठाची माळ घालतात आणि कपाळावर पांढरा टिळा लावतात. अनुयायांत गृहस्थ व साधू असे दोन भेद आहेत. साधू भगवी वस्त्रे नेसतात, लाकडी कमंडलूतून पाणी पितात व मातीच्या पात्रात भोजन करतात. ते रात्री जेवत नाहीत किंवा पाणीही पीत नाहीत. जीवहत्या होऊ नये म्हणून ते फार काळजी घेतात.

रामसनेही साधूंचे मुनी किंवा मौनी आणि विदेही किंवा बंदिही असे मुख्य दोन भेद आहेत. मौनी साधू बारा वर्षे मौन

रामसनेही साधू

पाळतात आणि या काळात फक्त दूध पिऊन राहतात. बंदिही साधू नग्न राहतात किंवा फक्त एक लंगोटी लावतात. शास्त्राध्ययन करणे, निःस्वार्थ होऊन परोपकार करणे, शारीरिक भोग न घेणे, इ. नियम त्यांना पाळावे लागतात.

कोणत्याही जातीच्या पुरुषाला या पंथाची दीक्षा घेता येते. पण दीक्षा देण्याआधी महंत त्याची परीक्षा घेतो. त्याला साधू व्हायचे असेल, तर त्यापूर्वी चाळीस दिवस शिक्षण घ्यावे लागते.

या पंथाच्या संघटनात्मक व्यवस्थेसाठी बारा व्यक्तींचे एक मंडळ असते. मुख्य महंताच्या मृत्यूनंतर तेराव्या दिवशी शाहपुरा या गावी गृहस्थ व साधू यांची सभा भरते व ही सभा दुसऱ्या महंताची निवड करते. त्या वेळी रामसरी नामक मंदिरात सहभोजन होते. महंत बहुधा शाहपुरातच राहतो व आवश्यकता पडली तरच काही दिवस बाहेर जातो.

मठाच्या व्यवस्थेसाठी काही साधूंची नेमणूक केलेली असते ते मठातील अन्नधान्य, कपडा, साधूंची वागणूक, त्यांचे शिक्षण, इ. बाबींकडे लक्ष देतात. पाच साधूंची एक पंचायतही असते. फाल्गुन महिन्यात मठात फूलडोल नामक एक उत्सव साजरा करतात. त्या वेळी दूरदूरचे रामसनेही इथे जमतात. पंथातील ज्या लोकांनी काही अपराध केला असेल, त्यांना या वेळी पंथातून काढून टाकतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेळी काही लोक तुलसीरामायण वाचतात व काही लोक त्या श्लोकांचा अर्थ सांगतात. या लोकांना अनुक्रमे पाठक व धारक अशी नावे आहेत. काही वेळा रामायणातील ते ते प्रसंग काही लोक रंगमंचावर नाटयरूपाने सादर करतात. काही काही गावांत हे नाटय एकाच रंगमंचावर दाखवीत नाहीत. निरनिराळया प्रसंगांना अनुरूप अशी पार्श्वभूमी ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी ते ते प्रसंग दाखवतात. सर्वसाधारणपणे, रामचंद्राच्या वनवासापर्यंतचे प्रसंग मंदिरांत दाखवतात; तर गंगा पार करण्याचा प्रसंग गावातील जलाशयाच्या किंवा नदीच्या काठी दाखवतात. चित्रकूटावर आगमन आणि त्यानंतरच्या लीला गावाच्या बाहेर असलेल्या एखाद्या विस्तीर्ण मैदानावर दाखवतात; तर भरतभेटीच्या प्रसंगासाठी पुन्हा गावात येतात. अशा रीतीने, रामलीलेचा रंगमंच हा यथातथ्यवादी करण्यासाठी प्रयत्न करतात.

याच रंगमंचाचा आणखी एक प्रकार आहे, तो असा– एका विस्तीर्ण मैदानाची एक बाजू अयोध्या व त्याच्या समोरची दुसरी बाजू ही लंका, असे समजतात. मैदानाच्या मध्यभागी उंच रंगमंच उभारतात. त्याच्या चारही बाजूंना प्रेक्षक बसतात. रंगमंचावर एका बाजूला पाठक व धारक बसतात. प्रसंगानुसार, राम अयोध्येतून व रावण लंकेतून रंगमंचावर येतो. काही काही गावांत तर असा रंगमंच कायमचाच उभारून ठेवतात. लंका व अयोध्या यांच्या जागी ओटे बांधतात आणि त्यांच्यावर तात्पुरत्या किंवा कायमच्या खोल्या बांधतात. त्यांत वेषभूषेचे साहित्य ठेवतात. पात्रांना तिथे विश्रांतीही घेता येते. मैदानाच्या एका भागात वनवासाचे दृश्य दाखवण्यासाठी गवताच्या झोपड्या उभारतात. माळवा आणि बुंदेलखंड यांच्या सीमेवर असे खुले रंगमंच दृष्टीस पडतात.

अशा उत्सवासाठी मोठ्या शहरांत एका मोठ्या मैदानात लोक जमतात. तिथे रामायणातले काही प्रसंग नाटयरूपाने दाखवतात. काही मुले राम लक्ष्मण सीतादिकांची आणि वानरांची सोंगे घेतात. कुणीतरी भलाभक्कम माणूस लांब शेपूट जोडून हनुमान होतो. शोभेच्या दारूने भरलेला रावणाचा एक पुतळा मैदानात मध्यभागी उभा करतात. काही वेळा त्याच्या जवळ मेघनाद व कुंभकर्ण यांचेही पुतळे उभारतात. त्याच्या भोवतीच्या जागेला लंका समजतात. दसऱ्याच्या दिवशी रामाचे सोंग घेतलेला पुरुष रथात बसून लंकेवर चाल करतो आणि त्या रावणाच्या पुतळ्यावर बाण सोडतो. त्यासरशी तो पुतळा पेट घेतो आणि त्यातून दारूकाम उडू लागते. थोड्या वेळात तो पुतळा भस्मसात होऊन खाली कोसळतो. त्या वेळी वानरमंडळी ओरडून हर्ष व्यक्त करतात. मग राम सीतेला रथात बसवून परत आणतो आणि त्यानंतर खेळ संपतो.

दिल्ली शहरात रामलीला मोठ्या उत्साहाने साजरी करतात. त्यासाठी तिथे एक रामलीला मैदान तयार केलेले आहे. स.१९२० पासून तिथे मोठ्या प्रमाणावर रामलीलेचा कार्यक्रम



रावणाचा प्रचंड पुतळा – रामलीला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होत असतो. लहान लहान वस्त्यांतूनही छोट्या प्रमाणावर हजारो रामलीलांचे कार्यक्रम होतात. बहादुरशहा ज़फ़रच्या कारकिर्दीत महंत राघोदासाने दिल्लीतील या रामलीलेचा प्रारंभ केला. इ. स. १९३८ मध्ये या कार्यक्रमासाठी एक समिती नेमण्यात आली आणि तेव्हापासून या समितीतर्फेच हा उत्सव साजरा होतो.

उत्तर प्रदेशातील काही शहरांत रामलीला मोठ्या प्रमाणावर साजरी करतात. अयोध्या नगरीत रामलीला आश्विन वद्य नवमीला सुरू होऊन पुढे सतरा दिवस चालते. इथला लंकादहनाचा कार्यक्रम वैशिष्ट्यपूर्ण असतो. त्यासाठी रावणाचा महाल



रावणाचा दुसरा एक पुतळा

साठ-सत्तर फूट उंच बनवतात. हनुमान दोरीच्या साहाय्याने त्या महालावर चढतो आणि त्याला आग लावतो.

काही ठिकाणी रावणाच्या पुतळ्याला दहा तोंडे एका वर्तुळात लावलेली असून, त्यांच्यावर मध्यभागी एक गाढवाचे तोंड बसवलेले असते.

आग्रा शहरात आश्विन वद्य प्रतिपदेपासून रामलीलेला प्रारंभ होतो. ज्या वेळी राम वनवासाला निघतो, त्या वेळी सर्व प्रेक्षकही त्याच्या मागोमाग निघतात व त्याला यमुनापार पोचवून परत येतात.

काशीजवळच्या रामनगर गावाची रामलीला फार प्रसिद्ध आहे. या रामलीलेचा सर्व खर्च काशीचे महाराज करतात. साधारणपणे सात-आठ मैलांच्या परिसरात ही रामलीला सादर करतात. त्यासाठी रामायणातील अयोध्या, जनकपुरी, शरयू नदी, पंचवटी, लंका, इ. स्थाने आधीच पक्की बांधून ठेवतात. कथानक जसजसे पुढे जाते, तसतशी अभिनयाची जागाही बदलत जाते आणि प्रेक्षक एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातात. या रामलीलेला चाळीस दिवस लागतात. रंगमंचाच्या तीन्ही बाजूंना प्रेक्षक बसतात. प्रयोग सुरू होण्यापूर्वी महाराज आपल्या आप्तेष्टांसह हत्तीवर बसून त्या ठिकाणी येतात. प्रेक्षकांच्या मागच्या बाजूला उंच मंचावर कथाकार व वादकवृंद बसतो. कथाकार खड्या आवाजात तुलसीदासाच्या रामचरितमानसातील चौपाया गातो. त्या वेळी कलाकार रंगमंचावर स्तब्ध उभे राहतात. त्याचे गायन संपल्यावर कलाकार त्यांतील आशय स्थानिक बोलीत संवादरूपाने बोलतात व त्याप्रमाणे अभिनय करतात. दृश्य बदलले, की अनेकदा रंगमंचही बदलतो. अशोकवाटिकेचे दृश्य बदलून रावणाच्या दरबाराचे दृश्य दिसणार असेल, तर प्रेक्षक या नव्या दृश्याच्या ठिकाणी उठून जातात. लंकादहनाच्या वेळची आतषबाजी पाहण्यासाठी हजारो प्रेक्षक गोळा होतात. शेकडो कलाकार चमकदार व भडक मुकुट घालून मुखवटे चढवून आणि अनुरूप वेषभूषा करून सात-आठ मैल पसरलेल्या विशाल रंगमंचावर चाळीस दिवसपर्यंत रामलीला सादर करतात. प्रेक्षकही त्या लीलांशी समरस होतात. बहुधा अशा प्रकारचा कार्यक्रम भारतात अन्यत्र कुठेच होत नसावा.

राजस्थानात रामलीला दाखवणाऱ्या अनेक मंडळ्या आहेत. त्या वर्षभर अधूनमधून त्यांचे प्रयोग करीत असतात. गायक तुलसीरामायणातील चौपाया गातो. पुष्कळदा तो पेटीही वाजवतो. साथीला नगारा, ढोल, तबला, इ. वाद्ये असतात. पात्रे चौपायांतील आशय गद्यात संवादरूपाने बोलतात. एका गावात पंधरा दिवसांपासून एक महिन्यापर्यंत रामलीला चालते. गावातील भक्तमंडळी नटवर्गाला आळीपाळीने आपल्या घरी जेवायला बोलावते. राम, लक्ष्मण व सीता घोड्यावर बसून वाजतगाजत जेवायला जातात. वाटेत भाविक लोक त्यांना देव समजून नमस्कार करतात.

पंजाब, मध्य प्रदेश, गुजरात, बिहार, उडीसा, बंगाल, हिमाचल प्रदेश या प्रदेशांतही दसऱ्याला रामलीला होते. [रा. लो. ना.; ब्र. सां. इ.; नरेंद्र धीर, युगप्रभात, १६ ऑक्टो. १९६७; श्री. श्याम परमार, राष्ट्रभारती, जून १९५७]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. रामानंदाला शंभर वर्षांचे (काहींच्या मते १११) वर्षांचे आयुष्य लाभले होते. यावरून १५ व्या शतकाच्या प्रारंभीच रामानंदाचा जन्मकाल मानावा लागतो.

रामानंदाने आपली गुरुपरंपरा सांगितली आहे, ती अशी– रामचंद्र–सीता – विष्वक्सेन – शठकोप–नाथमुनी–पुंडरीकाक्ष– राममिश्र – यामुनाचार्य – महापूर्णाचार्य – रामानुज – कुरेश– माधवाचार्य – बोपदेवाचार्य – देवाधिप – पुरुषोत्तम – गंगाधर– रामेश्वर – द्वारानंद – देवानंद – श्रीयानंद – हर्यानंद – राघवानंद – रामानंद.

विद्वानांनी ही परंपरा मान्य केली आहे. हिच्यात रामानुजाच्या १४ व्या पिढीत रामानंद येतो.

रामानंदाचा समग्र जीवनपट उपलब्ध होत नाही. त्याच्या जीवनातील विशिष्ट घटनांचाच तेवढा उल्लेख मिळतो. परंपरेने त्याची जीवनकथा चालत आली आहे, ती अशी –

रामानंदाला खुद्द रामाचा अवतार मानतात. 'रामानन्दः स्वयं रामः प्रादुर्भूतो महीतले' (स्वतः रामच रामानंदाच्या रूपाने पृथ्वीतलावर अवतीर्ण झाला), असे वैश्वानरसंहितेत म्हटले आहे. काही लोक त्याला कपिलदेवाचा, तर काही सूर्यनारायणाचा अवतार मानतात.

रामानंदाचा जन्म प्रयागक्षेत्री एका कान्यकुब्ज ब्राह्मणाच्या घरी झाला. त्याच्या पित्याचे नाव पुण्यसदन व मातेचे सुशीला असे होते. त्याचे प्रारंभिक शिक्षण पित्याच्या घरी झाले; पण समजू लागल्यापासूनच तो वीतराग बनू लागला होता. मोठेपणी त्याचे वैराग्य बळावले आणि तो गृहत्याग करून काशीस गेला. तिथे त्याने राघवानंद नामक एका सत्पुरुषाचे शिष्यत्व स्वीकारले. राघवानंद हा काशीत पंचगंगा नावाच्या घाटावर राहत असे. तो वृद्ध झाला होता आणि कोण्यातरी योग्य शिष्याच्या शोधात होता. रामानंद हा तसा शिष्य आहे, असे समजताच राघवानंदाने त्याला ज्ञान देऊन कृतार्थ केले. पुढे कठोर साधना करून रामानंदाने ते ज्ञान परिपक्व केले.

रामानंदाने राघवानंदाचे शिष्यत्व पत्करले, त्याबद्दल एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

रामानंदाचे मूळ नाव रामभारती असे होते. काशीत आल्यावर तो एका अद्वैती संन्याशाचा शिष्य बनला. त्या गुरूकडे राहून तो स्मार्त पद्धतीने धर्म–कर्मे करीत असे. पुढे योगायोगाने एके दिवशी त्याची राघवानंदाशी गाठ पडली. त्याने रामानंदाकडे पाहून त्यांच्या गुणांचे कौतुक केले; पण 'तू अल्पायुषी आहेस' असे त्याला सांगितले. ही गोष्ट रामानंदाने आपल्या गुरूला सांगितली. गुरूला त्या गोष्टीचे दुःख झाले आणि आपल्या शिष्याचा अपमृत्यू टळावा, म्हणून त्याने रामानंदाला राघवानंदाच्या स्वाधीन केले. राघवानंदाने त्याला उपदेश देऊन त्याचे रामानंद असे नाव ठेवले. पुढे योगचर्या आणि समाधी यांचे त्याला पूर्ण शिक्षण दिले. अपमृत्यूची वेळ जवळ आली आहे, असे समजताच राघवानंदाने त्याला समाधी लावून बसण्यास सांगितले. रामानंदाने तसे केले. समाधीत मृत्यू त्याला स्पर्श करू शकला नाही. समाधी उतरल्यावर राघवानंद त्याला म्हणाला, 'बेटा, तुझा मृत्यू टळला आहे.'

पुढे त्याने बराच काळ तीर्थयात्रा केल्या. राघवानंदाच्या संप्रदायात जातीपातीचे व खाण्यापिण्याचे नियम कडक असत. रामानंद त्या बाबतीत फारसा कर्मठ नव्हता. त्यामुळे यात्राकालात त्याने खाण्यापिण्याचे नियम पाळले नाहीत. राघवानंदाला हे समजताच त्याने रामानंदाला प्रायश्चित घेण्यास सांगितले; पण रामानंदाने ते मानले नाही. तो म्हणाला–

जातिपाँति पूछै नहीं कोई ।
हरिको भजै सो हरिका होई ।।

अर्थ – जात-पात ही विचारात घेण्याजोगी गोष्ट नाही. जो श्रीहरीला भजतो, तो श्रीहरीचा होऊन जातो.

तेव्हा हरिभक्ताकडील अन्नोदक घेतल्याने मला पाप लागत नाही. त्यामुळेच मला प्रायश्चित घेण्याची गरज नाही.

राघवानंदाला शिष्याचा हा व्यापक व उदार दृष्टिकोन मानवला नाही. त्याने त्याला आपल्या संप्रदायातून अलग होण्यास सांगितले.

रामानंदाने ती गोष्ट मान्य केली आणि आपली रामभक्तीची नवी शाखा प्रवर्तित केली. या संप्रदायात त्याने जाट, क्षत्रिय, कोष्टी, नापित, चांभार, ब्राह्मण आणि स्त्रिया अशा सर्वांना एकत्र आणले आणि आपले शिष्य बनवले. त्याच्या संप्रदायात शेकडो लोक शिष्य म्हणून प्रविष्ट झाले. त्यातले बारा शिष्य प्रमुख होते. त्यांची नावे अशी – (१) अनंतानंद (२) सुखानंद (३) सुरसुरानंद (४) नरहर्यानंद (५) पीपा (६) भावानंद (७) कबीर (८) सेना (९) धना (१०) रैदास (११) पद्मावती व (१२) सुरसरी. शेवटच्या दोन स्त्रिया आहेत.

राघवानंद विशिष्टाद्वैत मानणारा होता. त्याने रामानंदाला त्याच मताची दीक्षा दिली होती. पुढे रामानंद त्या शास्त्रात पारंगत झाला. त्याने तीर्थयात्रेच्या मिषाने भारतभ्रमण करून अद्वैती, सिद्ध, योगी, जैन आणि मुसलमान यांना वादविवादात पराभूत केले आणि पांडित्याचा दिग्विजय केला, असे रामानंदाचे चरित्रकार सांगतात; पण त्यांच्या या सांगण्यात इतिहासाचा अंश कमी आहे, असे बलदेव उपाध्याय आणि डॉ. हजारीप्रसाद द्विवेदी यांचे मत आहे. त्यात एवढीच गोष्ट खरी, की आपल्या शिष्यांसमवेत रामानंदाने उ. भारताच्या यात्रा केल्या हो...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि आपल्या संप्रदायाचा प्रचारही केला होता. रामानंद हा त्या काळचा एक प्रभावी प्रचारक होता. त्याच्या व्यक्तिमत्त्वाने प्रभावित होऊन श्रेष्ठ भक्त आणि समाजसुधारक एक तर त्याचे शिष्य बनले होते किंवा त्याच्याविषयी आदर बाळगणारे होते.

रामानंदाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी त्याच्या चरित्रकारांनी पुष्कळच लिहिले आहे. पण ते सगळेच विश्वसनीय नाही. त्याच्या समकाली मौ. रशीदुद्दीन नावाचा एक फकीर काशींत राहत असे. त्याने तजकिरतुकफुकरा नावाचे एक पुस्तक लिहिले असून, त्यात मुसलमानी संतांच्या कथा वर्णिल्या आहेत. त्यात प्रसंगाने रामानंदाविषयीही चर्चा आली आहे. ती चर्चा मात्र 'चक्षुर्वै सत्यम्' म्हणता येईल. तो म्हणतो –

काशीत पंचगंगा घाटावर एक प्रसिद्ध महात्मा राहात आहे. तो तेजःपुंज व पूर्ण योगेश्वर आहे. तो वैष्णवांचा सर्वमान्य आचार्य असून, सदाचार व ब्रह्मनिष्ठा यांचा मूर्तिमंत पुतळाच आहे. परमात्मतत्त्वाचे रहस्य तो पूर्णपणे जाणतो. खऱ्याखुऱ्या भगवद्भक्तांवर आणि ब्रह्मवेत्त्यांच्या समाजावर त्याचा उत्कृष्ट प्रभाव आहे. इतकेच नव्हे, तर धर्मसत्तेत तो हिंदूंचा धर्म-कर्म-सम्राट आहे. तो केवळ ब्राह्ममुहूर्ती आपल्या पवित्र गुंफेतून गंगास्नानासाठी बाहेर पडतो. त्या पवित्र आत्म्याला लोक स्वामी रामानंद म्हणतात. त्याच्या शिष्यांची संख्या पाचशेहून अधिक आहे.

रामानंदाच्या व्यक्तिमत्त्वाविषयी प्रा. बलदेव उपाध्याय लिहितात, ते असे – हिंदू समाजात जातिभेदविरहित असे ऐक्य प्रस्थापित करण्यात स्वामीजींचा विशेष हात होता. जर रामानंदसंप्रदाय या भारतवर्षात उत्पन्न झाला नसता, तर मुसलमानांच्या आक्रमणापुढे हिंदुसमाजाने कितीसा तग धरला असता, हे सांगणे कठीण आहे. त्या काळी धर्मांध मुसलमानांच्या तलवारीपुढे इराणपासून काबूलपर्यंत तिथल्या लोकांची संस्कृती व सभ्यता उद्ध्वस्त होऊन इस्लाम धर्मात परिवर्तित झाली होती. केवळ भारतीय संस्कृतीनेच या यवन संस्कृतीशी परिणामकारक मुकाबला केला. या कामी रामानंदाचे कार्य फार मोठे आहे. हिंदू समाजात ऐक्य स्थापन करून व त्याचे धार्मिक संघटन घडवून रामानंदाने मुसलमानी आक्रमणाचा समर्थ प्रतिकार केला, त्याला इतिहास साक्षी आहे. रामानंदस्वामी हा निःसंशय युगप्रवर्तक महापुरुष होता. याचा प्रत्यय येऊनच नाभादासाने पुढील पंक्तीत त्याचा योग्य तो गौरव केला आहे –

श्री रामानंद रघुनाथ ज्यों
दुतिया सेतु जगतरन कियौ

अर्थ – रामानंद हा साक्षात रामप्रभूच आहे. त्याने जगाला भवसागरातून तारण्यासाठी दुसरा सेतू (रामनामाचा) बांधला.

रामानंदाने संस्कृत व हिंदी भाषांत जे ग्रंथ लिहिले, त्यांची नावे अशी – (१) वैष्णवमताब्जभास्कर (२) रामार्चनपद्धती (३) गीताभाष्य (४) उपनिषद्भाष्य (५) आनंदभाष्य (६) सिद्धान्तपटल (७) रामरक्षास्तोत्र (८) योगचिंतामणी (९) श्री गुरु रामानंद – कबीरजी का ज्ञानतिलक (१०) श्रीरामाराधनम् (११) वेदान्तविचार (१२) रामानंदादेश (१३) राममंत्र जोग ग्रंथ (१४) राम–अष्टक (१५) ज्ञानलीला व (१६) अध्यात्मरामायण. याव्यतिरिक्त त्याची काही फुटकळ पदेही आहेत.

यांतील वैष्णवमताब्जभास्कर हा ग्रंथ रामानंदाचा निश्चितपणे मानला जातो. हिंदीमधले ज्ञानतिलक व रामरक्षा हे ग्रंथही रामानंदाचे मानतात. इतर ग्रंथ मात्र त्याचे असतील की नाही, याबद्दल विद्वानांनी शंका व्यक्त केली आहे.

रामानंद हा युगधर्म पूर्णपणे ओळखणारा धर्मसुधारक होता. मुसलमानांनी बळजबरीने बाटवलेल्या कित्येक हिंदूंना रामतारक मंत्र देऊन त्याने पुनश्च हिंदू बनविले. भविष्य पुराणात याविषयी अतिशयोक्तीने सांगितले आहे (३.४.२१), ते असे –

म्लेच्छास्ते वैष्णवाश्चासन् रामानन्दप्रभावतः
संयोगिनश्च ते ज्ञेया अयोध्यायां बभूविरे ।
कण्ठे च तुलसीमाला जिह्वा राममयी कृता
भाले त्रिशूलचिह्नं च श्वेतरक्तं तदाऽ भवत् ॥

अर्थ – (जे शिकंदर लोदीच्या कारकिर्दीत मुसलमान केले गेले होते) ते रामानंदाच्या प्रभावाने पुनश्च संयोगी नामक वैष्णव बनले. ही गोष्ट अयोध्येत घडली. त्यांच्या गळ्यात तुळसीमाला, जिभेवर रामनाम, भालप्रदेशी श्वेत-रक्त असे त्रिशूल चिन्ह आपोआप झाले.

काशीतील पंचगंगा घाटावर रामानंदाचा जो मठ होता, तो सांप्रत जीर्ण अवस्थेत कसाबसा आहे. त्यावर रामानंदी महंतांचीच सत्ता आहे. त्या मठात रामानंदाचे एक चित्र असून, त्याच्या चरणपादुकाही स्थापित आहेत. भिंतीवर कबीर, अनंतानंद, हनुमान व नरसिंह यांची चित्रे आहेत. तिथे ग्रंथ मात्र एकही नाही. मुसलमानांच्या आक्रमणात ते नष्ट झाले असावे.

सांप्रदायिक लोक माघ कृ. सप्तमी ही रामानंदाची जन्मतिथी मानून त्या दिवशी आपल्या मठात, तसेच अयोध्या, मिथिला, चित्रकूट, इ. सांप्रदायिक केंद्रांत त्याची जयंती समारंभाने साजरी करतात.

रामानंदाने हिंदी भाषेत जे ग्रंथ लिहिले, त्यामुळे हिंदी भाषा समृद्ध होण्यास खूप मदत झाली, असे त्या भाषेचे समीक्षक म्हणतात. [रामानंद संप्रदाय तथा हिंदी साहित्यपर उसका प्रभाव – डॉ. बदरीनारायण श्रीवास्तव, १९५७; रामानंद की

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिंदी रचनाएँ – संपा. डॉ. पीतांबरदत्त बडथ्वाल; भागवत संप्रदाय – प्रा. बलदेव उपाध्याय, १९५४]

रामानंद संप्रदाय एक उपासनासंप्रदाय. याला रामावत संप्रदायाच्या अंतर्गत मानतात. राघवानंद हा रामानंदाचा गुरू होय. तो रामावत संप्रदायाचा महान नेता होता. हा संप्रदाय दक्षिणेत निर्माण झाला व राघवानंदाने तो तेथून उत्तरेत आणला. विशिष्टाद्वैत हे या संप्रदायाचे तत्त्वज्ञान होते.

राघवानंद हा जातीपातींचा भेद मानणारा, कर्मठ व सोवळा होता. या उलट रामभक्तीत असा सोवळेपणा असता कामा नये आणि सर्व जाती-जमातींना संप्रदायात समाविष्ट करून ऐक्यभावनेच्या सुदृढ पायावर संप्रदाय उभा केला पाहिजे, असे रामानंदाचे मत होते. त्यामुळे गुरु-शिष्यांमध्ये वाद उत्पन्न झाला आणि रामानंदाने सर्वसमावेशक तत्त्वावर संप्रदायाची उभारणी केली, तेव्हा त्याचे मूळचे रामावत संप्रदाय हे नाव मागे पडून रामानंद संप्रदाय हे नाव रूढ झाले.

रामानंद संप्रदायाला श्रीसंप्रदाय असेही म्हणतात. सुमारे पन्नास वर्षांपूर्वीपर्यंत हा संप्रदाय श्रीसंप्रदायाची एक शाखा मानला जात होता. पण पुढे उ. भारतात प्रस्तुत संप्रदाय हा रामानुजांच्या श्रीसंप्रदायाहून स्वतंत्र आहे, असे आंदोलन सुरू झाले. रामानंदी लोकांनी 'श्री'चा लक्ष्मी हा अर्थ टाकून सीता हा अर्थ ग्रहण केला व अशा रीतीने त्या संप्रदायापासून आपली फारकत करून घेतली. तत्त्वज्ञान मात्र त्या संप्रदायाचे अर्थात विशिष्टाद्वैत हेच राहिले. आनंदभाष्य हा रामानंद संप्रदायाचा प्रमाणभूत तात्त्विक ग्रंथ असून, त्यात विशिष्टाद्वैतमताचे शास्त्रीय पद्धतीने विस्तृत विवेचन केले आहे. प्रस्तुत संप्रदायात ब्रह्मसूत्रांवरची जानकीभाष्य, आनंदभाष्य व वेदभाष्य अशी तीन भाष्ये प्रसिद्ध आहेत. जानकीभाष्य व वेदभाष्य या दोन भाष्यांत शूद्रांना वेदाध्ययनाचा अधिकार दिलेला नाही. आनदभाष्यात मात्र तो दिलेला आहे. म्हणूनच त्या भाष्याला रामानंद संप्रदायाचे अधिकृत भाष्य मानले जाते.

संप्रदायाच्या अन्य प्रमुख ग्रंथांत अगस्त्यसंहिता, रामस्तवराज, जानकीस्तवराज, रामतापिनी उपनिषदावरचे भाष्य, अग्रदास व हरिदास यांनी रचलेली रहस्यत्रये, इ. ग्रंथ उल्लेखनीय आहेत. रामतापिनीचा पुरेपूर उपयोग आनंदभाष्यात केलेला आहे. प्रस्तुत संप्रदायाचे सिद्धान्त थोडक्यात असे–

ब्रह्म – ब्रह्म शब्दाने रामाचाच बोध होतो. रामरूपी ब्रह्म हे निकृष्ट प्राकृतिक गुणांनी रहित असल्यामुळे निर्गुण आहे व दव्य गुणांनीं युक्त असल्यामुळे सगुणही आहे. त्याच्यापासूनच विश्वाची सृष्टि-स्थिति-प्रलय होतात. राम हा करुणा[...] कल्याणगुणाकर व तीन्ही लोकांमध्ये परमप्राप्य आहे. भ[...] त्याचे दास्य करावे, असे सांगताना रामानंद म्हणतो –

रामाय साङ्गाय सपार्षदाय सीतासमेताय सहानुजाय।
आम्नायवेद्याय विधाय शश्वत् कैङ्कर्यमौर्ष्यारहितः समाहि[...]

अर्थ – सांग, पार्षदसहित, सीतासमवेत, बंधूसमवेत व[...] वेद्य अशा रामाचे दास्य निरंतर स्वीकारून (भक्ताने) [...] रहित व समाधानी राहावे.

सीता ही भगवान रामप्रभूची प्रिया आहे. ती शुभ [...] संपन्न, वात्सल्याची सीमा, विद्युद्वर्ण व असीम क्षमावती [...] दिक्पालांचेही अद्भुत भोगैश्वर्य तिच्या कटाक्षावर अव[...] असते. रामार्चनपद्धतीत तिचे वर्णन केले आहे, ते असे–

विकचपद्मदलायतलोचनां प्रणतकामदुघाङ्घ्रिसरोरुहाम्।
अशरणः शरणं जनकात्मजे प्रतिदिनं भवतीमनुचिन्तये॥

अर्थ – प्रफुल्ल कमळपत्रासारखे जिचे टपोरे डोळे [...] जिची चरणकमले नम्र भक्ताला कामधेनूप्रमाणे आहेत, [...] तुला हे जानकी, मी अशरण होत्साता शरण येऊन प्र[...] तुझेच अनुचिंतन करीत आहे.

ईश्वर – रामचंद्र हाच परमेश्वर मानून रामानंदाने [...] पूर्वक व आग्रही वृत्तीने त्याच्या उपासनेचे प्रवर्तन केले. [...] नंदाला श्रीवैष्णवांचे तत्त्वत्रय सर्वथा मान्य आहे. [...] चिदचिद्विशिष्टरूपाने एकच आहे; पण नामभेदाने व [...] भेदाने त्याचे पुढील तीन प्रकार होतात – (१) चित् [...] (२) अचित् (अचेतन) व (३) ईश्वर. ही तीन्ही तत्त्वे [...] आहेत. चित् व अचित् या दोहोंनी विशिष्ट असल्यामुळे [...] अर्थात श्रीराम हा चिदचिद्विशिष्ट होतो. ईश्वराला [...] अचित् असे पृथक अस्तित्व असणारे विशेष नाहीत. अर्था[...] व अचित् यांची सत्ता ईश्वराहून भिन्न नाही. चिद्विशिष्ट [...] व अचिद्विशिष्ट ईश्वर एकच आहे. अंतर केवळ स्थूल-सू[...] चिदचित् अशा दोन्ही दशांमध्ये त्याच्या स्वरूपाचा [...] होत नाही. ते विशिष्ट रूपाने एकच असते. म्हणूनच [...] विशिष्टाद्वैत म्हणतात.

जीव – जीवाचे स्वरूप रामानंदाने सांगितले आहे, ते [...]

नित्योऽज्ञश्चेतनोऽजः सततपरवशः सूक्ष्मतोऽत्यन्तसूक्ष्मो
भिन्नो बद्धादिभेदैः प्रतिकुणपमसौ नैकधा सूरिवर्यैः।
श्रीशाकान्तालयस्थो निजकृतिफलभुक् तत्सहायोऽभिमा[...]
जीवः सम्प्रोच्यते श्रीहरिपदसुमते तत्त्वजिज्ञासुवेद्यः॥

अर्थ – जीव हा नित्य ईश्वराच्या अपेक्षेने अज्ञ, चेतन[...] सर्व काल भगवंताच्या अधीन, सूक्ष्माहूनही सूक्ष्म, बद्धादि [...] भिन्न भिन्न शरीरांत भिन्न भिन्न प्रकारे असणारा, भगव[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरीरात राहणारा व स्वकर्मानुसार फल भोगणारा असा आहे. भगवान हा त्याचा सर्वदा साहाय्यक आहे. स्वतःला कर्ता, भोक्ता समजण्याचा त्याला अभिमान असतो. तत्त्वजिज्ञासूंना जाणण्यास तो योग्य असतो. अशा विशिष्ट तत्त्वाला विद्वान जीव म्हणतात.

भगवान् शेषी व जीव त्याचा शेष आहे. भगवंताचे दास्य करणे, हे त्याचे एकमेव प्रयोजन आहे. भगवंताच्या निर्हेतुक कृपेवाचून त्याला मोक्ष मिळत नाही. त्यासाठी प्रपत्तीची आवश्यकता असते. भगवान व जीव यांचे पिता-पुत्र, रक्ष्य-रक्षक, सेव्य-सेवक, इ. नऊ प्रकारचे संबंध आहेत. बद्ध व मुक्त असे जीवांचे दोन भेद आहेत. बद्ध जीव अनादी कर्मांच्या समूहाने नाना प्रकारचे देह धारण करून त्यांच्या ठिकाणी अभिमान बाळगतात. मुक्त जीव नित्य भगवत्परायण राहून त्याचेच ध्यान करीत असतात.

प्रकृती – प्रकृतीविषयी रामानंदाने म्हटले आहे, ते असे – प्रकृती ही नाना वर्णांची, सत्त्व, रज व तम या गुणांना आश्रयभूत, स्वतंत्र, व्यापारहीन व ईश्वराधीन असते. तीच महत्तत्त्व, अहंकार, इ. पदार्थांना उत्पन्न करते. तीच जगताची सृष्टी करते.

सृष्टीच्या पूर्वी सूक्ष्म चिदचिद्विशिष्ट ब्रह्म कारणावस्थेत राहते व सृष्टिकाली तेच स्थूल चिदचिद्विशिष्ट होऊन सृष्टीचे उपादान कारण बनते. प्रलयावस्थेतही हे ब्रह्म सूक्ष्म व चिदचिद्विशिष्ट राहते. ते जगाचे उपादान, तसेच निमित्त कारणही आहे. परिणाम विशेषणाच्या अंशात उत्पन्न होतो. विशेष्य निर्विकारच राहते.

मोक्ष – भगवदनुग्रहाने सांसारिक बंधनातून सुटका करून घेऊन व साकेत लोकात जाऊन रामसायुज्याला प्राप्त होणे म्हणजे मोक्ष होय. रामानंद म्हणतो –

जितेन्द्रियः प्रपन्नस्तं बुध आत्मरतिर्हरिम् ।
आप्नुयात् परमं स्थानं योऽनुतिष्ठेदिदं मतम् ।।

अर्थ – जितेंद्रिय व आत्मरत होऊन जो विद्वान त्या भगवान श्रीरामाची शरणागती पत्करील व या मताचे (विशिष्टाद्वैत) आचरण करील, तो परमपदाला (साकेत लोक) प्राप्त होईल.

रामानंद संप्रदायात भक्ताला सायुज्य मुक्ती मिळते, असे सांगितले आहे. या मुक्तीसाठी त्या संप्रदायात साकेत नावाचा एक दिव्य लोक मानला आहे. सुषुम्ना नाडी, उत्तरायण, अर्ची, इ. मार्गातून पुढे जाता जाता भक्त साकेत लोकात पोचतो व तिथे भगवंताचा कृपाकटाक्ष मिळवून आनंदाच्या साम्राज्यात निमग्न राहतो. एकदा या अवस्थेला पोचल्यावर त्याचा पुनर्जन्म कायमचा टळतो.

मोक्षसाधनसामग्री – रामानंद संप्रदायात भक्ती ही मोक्षाचे प्रमुख साधन म्हणून स्वीकारली आहे. भक्तियुक्त होण्यासाठी साधकाला स्वतःवर पाच संस्कार करावे लागतात, ते असे –

तप्तेन मूले भुजयोः समङ्कनं शरेण चापेन तयोर्ध्वपुण्ड्रकम् ।
श्रुतिश्रुतं नाम च मन्त्रमाले संस्कारभेदाः परमार्थहेतवः ।।

अर्थ – धनुष्यबाणांच्या तप्त मुद्रा बाहूंवर धारण करणे, ऊर्ध्वपुंड्र भालप्रदेशी लावणे, नामकरण, मंत्रजप व गळयात तुलसीमाला धारण करणे, हे पाच संस्कार परमार्थाला हेतुभूत आहेत.

एक वर्षपर्यंत गुरूने शिष्याची परीक्षा करावी, नियमानुसार अग्निपूजा करून धनुष्यबाण, चक्र, इत्यादींच्या तप्त मुद्रा त्याच्या भुजांवर अंकित कराव्या, त्याचे दासान्त नवे नाव ठेवावे आणि त्याला राममंत्राचे प्रदान करावे.

प्रस्तुत संप्रदायात मूलमंत्र, रामद्वयमंत्र व चरममंत्र या तीन मंत्रांना रहस्यत्रय म्हटले आहे. ते मंत्र असे –

मूलमंत्र – रां रामाय नमः । हा षडक्षरी आहे. या मंत्रात ॐचा त्याग करून रां हे बीज स्वीकारले आहे.

रामद्वयमंत्र – श्रीमद्रामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये, श्रीमते रामचन्द्राय नमः । हा पंचवीस अक्षरांचा आहे.

चरममंत्र – सकृदेव प्रपन्नाय तवास्मीति च याचते ।
अभयं सर्वभूतेभ्यो ददाम्येतद् व्रतं मम ।।

भक्तीची व्याख्या – रामानंदाने भक्तीची व्याख्या दिली आहे, ती अशी– विवेकादिकांपासून ज्याची उत्पत्ती होते, ज्याच्या ठिकाणी यम-नियमादी आठ अंगे आहेत आणि जो तैलधारेप्रमाणे स्मृतिसंततीच्या रूपाने वाहत आहे, असा (भगवंताच्या ठिकाणी) अनुराग म्हणजे भक्ती होय.

भक्तीचे गौणी व परा असे दोन भेद आहेत. गौणीचेही वैधी व रागानुगा असे दोन भेद होतात. प्रपत्ती व न्यास ही भक्तीची दोन प्रमुख अंगे आहेत. भगवंताच्या निर्हेतुक कृपेला प्रपत्ती व स्वतःच्या निवृत्तीला न्यास असे म्हणतात. भक्ताने भगवंताशी तादात्म्य प्रस्थापित करणे आवश्यक आहे. हे तादात्म्य ध्यानाच्या योगे स्थापित होऊ शकते. ध्यानश्लोक असा –

प्रसन्नलावण्यसुभन्मुखाम्बुजं जगच्छरण्यं पुरुषोत्तमं परम् ।
सहानुजं दाशरथिं महोत्सवं स्मरामि रामं सह सीतया सदा ।।

अर्थ – भगवान राम सदैव लक्ष्मणाच्या बरोबर असतो. तो सर्व जनांना शरण्य, पुरुषोत्तम, महोत्सवस्वरूप व दशरथपुत्र आहे. त्याचे मुखकमल प्रसन्न लावण्याने सुशोभित आहे अशा त्या रामाचे मी सीतेसह सर्व काल स्मरण करतो.

भक्तीची आवश्यक अंगे म्हणून साधकाने काही महाव्रते पाळली पाहिजेत, ती अशी – रामनवमी, जानकीनवमी (वैशाख शुद्धनवमी), हनुमानजन्म, नृसिंहजयंती, कृष्णाष्टमी व वामनद्वादशी. साधकाने ही महाव्रते आचरावी आणि त्याचबरोबर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भगवंताच्या रथयात्रादी पर्वोत्सवात सहभागी व्हावे.

रामार्चनपद्धती – या ग्रंथात रामानंदाने भगवंताच्या सेवाप्रणालीचे विस्ताराने वर्णन केले आहे. तो म्हणतो –

भक्ताने ऊर्ध्वपुंड्र व तुलसीमाला धारण करून भगवंताचे सदैव स्मरण करावे. तीर्थक्षेत्री वास करावा. रामाची यथासांग नित्यपूजा करावी. त्यानंतर रामायण, महाभारत, श्रीभाष्य, इ. ग्रंथांचे पठण किंवा श्रवण करावे. पूर्णकुंभ व पंचपात्र यांची पूजाही आवश्यक आहे.

रामाची पुष्टिमार्गी पद्धतीप्रमाणे अष्टयामपूजा अग्रदासाने चालू केली. त्याने त्यासाठी रामाष्टयाम नावाचा ग्रंथही लिहिला. ती परंपरा छपरा येथील महंत गीवाराम व इतर महंत यांनी विकसित केली. रामाचे हे अष्टयाम अग्रदासाने पुढीलप्रमाणे सांगितले आहेत –

(१) निशान्त – यात श्रीरामाचे स्नान व शृंगार असतो.
(२) प्रभातकाल – राम चतुरंग सैन्यासह मृगयेला जातो.
(३) पूर्वाह्ण – मृगयेहून परतल्यावर भोजन करतो.
(४) मध्याह्न – थोडी विश्रांती घेऊन सभेला जातो. तिथे नृत्य, वाद्य, गीत, इ. पाहतो व श्रवण करतो.
(५) अपराह्ण – अस्त्र-शस्त्रादींचे शिक्षण घेतो.
(६) सायंकाल – द्यूतक्रीडा करतो.
(७) प्रदोष – स्नान, शृंगार व भोजन करतो.
(८) रात्र – रात्री प्रियेबरोबर प्रेमालाप करीत पलंगावर शयन करतो.

संप्रदायविस्तार – मध्ययुगात रामानंदशिष्य अनंतानंद याच्या शिष्यप्रशिष्यांनी उ. भारतात आपापल्या गाद्या स्थापन केल्या व सर्व वैष्णव संप्रदायांत रामानंद संप्रदायाला अधिक प्रबल बनवले. रामटहलदास यांनी आपल्या ग्रंथात संप्रदायाच्या ज्या गाद्यांची नामावली दिली आहे, त्यांतल्या काही प्रमुख गाद्या व त्यांची स्थाने अशी –

(१) अनंतगुंफा – मथुरा. (२) सुरसुरानंद – अबूचा पहाड. (३) नरहर्यानंद – गढरवाला (राजस्थान) (४) सुखानंद – धौरतया (राजस्थान) (५) रामकबीर – कदमखंडी, गोवर्धनाजवळ. (६) भावानंद – फतेहपुर. (७) पीपा – काठेवाड (८) कील्ह – जयपूरजवळचे गलता क्षेत्र. (९) भगवन्नारायण – पिंडोरीधाम (पंजाब) (१०) केवलकूबा – झीथडा (मारवाड)

संप्रदायाच्या अशा एकूण ३६ गाद्या नोंदल्या गेल्या आहेत.

रामानंदी आखाडे – या आखाड्यांचा संक्षिप्त इतिहास असा – रामानंदी वैष्णवांना अन्य गोसाव्यांकडून बराच उपद्रव सहन करावा लागला. त्यांपैकी लक्ष्मीगिरी गोसावी हा एक मोठा उपद्रवी होता. पाच वैष्णवांचा नित्य वध केल्यावाचून भोजन करायचे नाही, अशी त्याची प्रतिज्ञा होती. भैरवगि हाही एक त्याच जातीचा होता. दुसऱ्या बाजूने मुसलमा त्यांच्यावर दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणात अत्याचार करू ला होते. मूर्ती आणि मंदिरे यांचा विध्वंस करण्याचा त्यांनी स चालवला होता. धार्मिक क्षेत्रेही उद्ध्वस्त केली जात हो समस्त उत्तर भारत त्यामुळे एका महान धर्मसंकटात साप होता. अशा परिस्थितीत बालानंद हा वरागी पुढे आला. जयपूरच्या महाराजांच्या सैन्याला साधुमंत्र देऊन अत्या मुसलमानांविरुद्ध लढण्यासाठी पाठवले. त्याचेच अनुकरण क बैराग्यांनीही आपापली दले संघटित केली. ही संघटि म्हणजेच रामानंदी आखाडे होत. असे सात आखाडे आ त्यांची नावे व वर्णन पुढीलप्रमाणे –

(१) दिगंबर – या आखाड्याची स्थापना बलरामदा अयोध्येत केली. गेली अडीचशे वर्षे हा आखाडा चालत आ यातले बैरागी प्रायः नग्नच राहतात.

(२) निर्वाणी – याचे प्रमुख केन्द्र हनुमानगढी येथे अ अयोध्येत या आखाड्याचे बैरागी बऱ्याच मोठ्या संख्येने आ याचेही आणखी काही उपआखाडे निर्माण झाले असून, हे बैरागी श्रीमंत आहेत.

(३) निर्मोही – या आखाड्याची स्थापना गोविंददा जयपूर येथे केली.

(४) खाकी – याची स्थापना दयाराम या बैराग्याने चि कूट पर्वतावर केली. हे बैरागी मुक्तहस्ताने भस्मचर्चन कर

(५) निरालंबी – बीरमलदास या बैराग्याने कोटा ये आखाड्याची स्थापना केली.

(६) संतोषी – रतिराम याने जयपूर येथे हा आ स्थापला. हे बैरागी दरिद्री असून यांची संख्याही कमी आ

(७) महानिर्वाणी – पुरुषोत्तमदास याने अयोध्येत या आ ड्याची स्थापना केली. हे बैरागी भगवंताची उपासना नि पणे करतात. बरेचसे बैरागी भ्रमणशील असतात.

आखाड्यांचे कर्तव्य – विपक्षी व परधर्मी लोकांपासून धर्माचे व मंदिरांचे रक्षण करणे, वैष्णव धर्माला विरोध कर ऱ्यांचे दमन करणे व कुंभपर्वाच्या प्रसंगी आपापल्या आ ड्याची मर्यादा रक्षण करणे, हे या आखाड्यांचे प्रमुख क ठरलेले आहे. याच कारणामुळे रामानंदी साधूंचा बरा जीवनकाल सैनिकी शिक्षण घेण्यात व्यतीत होतो. डॉ. श्रीव म्हणतात, की 'या आखाड्यांनी गेली तीनशे वर्षे हिंदू ध हिंदू जाती यांची फार मोठी सेवा केली आहे.'

शासनव्यवस्था – आखाड्याच्या सदस्यांना नागा-अतीत म्हणतात. हे लोक आपला महंत निवडतात. महंताला सा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशी, पंच, सरपंच, इ. लोकांची एक कार्यकारिणी असते. महंताला तिची आज्ञा मानावी लागते. न मानल्यास पदच्युत व्हावे लागते. एक व्यवस्थापक – समिती आखाडयाच्या संपत्तीची देखभाल करते. महंत त्या संपत्तीचा स्वामी असतो. आखाडयाजवळच एक राममंदिर असते व त्याची पूजा, अर्चा, इ. कामे महंतालाच करावी लागतात. सांप्रदायिक वेषभूषा व आचार–विचार यांचे पूर्णपणे पालन करून त्याला परंपरेचे रक्षण करावे लागते. महंताला आपला उत्तराधिकारी स्वतः नियुक्त करता येत नाहीं. ते काम नागा-अतीतांच्या अधिकारात असते. संप्रदायाच्या सर्व मठांत दुपारी व रात्री शेकडो साधूंना नित्य भोजन मिळते व त्यांच्या राहण्याची सोयही केली जाते.

रामानंदी आखाडयाचा एक ध्वज असतो. तो आखाडयाच्या बाहेर फडकत असतो. ध्वजाच्या एका बाजूला हनुमान व दुसऱ्या बाजूला सूर्यनारायण यांचे चित्र असते.

कुंभमेळयाच्या वेळी नासिक, प्रयाग, हरिद्वार व उज्जैन या क्षेत्रांत सर्व आखाडे स्नानासाठी एकत्र येतात. त्यांच्या भेटण्याचा क्रमही ठरलेला असतो. प्रथम राटंबरी, बलभद्री व हरिव्यासी हे आखाडे एकत्र मिळतात. नंतर खाकी, निरावलंबी हे हरिव्यासीशी एकत्र होतात. त्या दोन्ही समूहांचा मिळून जो एक संघ बनतो, त्याला निर्वाणी अनी म्हणतात. दिगंबर आखाडा या संघात न मिळता अलग राहतो. जेव्हा त्यांची मिरवणूक निघते, तेव्हा पुढे निर्मोही आखाडा, मध्ये दिगंबर व शेवटी निर्वाणी असतो. या मिरवणुकीत हत्तीघोडेही असतात. प्रत्येक वैरागी हा शस्त्रधारी असतो. ही मिरवणूक पाहताना छातीवर दडपण आल्यासारखे होते. [रामानंदी संप्रदाय – बदरिनारायण श्रीवास्तव; रामानंद की हिंदी रचनाएँ – डॉ. पीतांबरदत्त बडथ्वाल; भागवत संप्रदाय – प्रा. बलदेव उपाध्याय]

रामानुजन श्रीनिवास (इ. स. १८८७–१९२०) एक अलौकिक प्रतिभावान गणितज्ञ. याचा जन्म तमिळनाडमध्ये तंजाऊरजवळच्या एरोड गावी एका गरीब ब्राह्मणकुळात झाला. रामानुजन पाचव्या वर्षी शाळेत गेला. दोनच वर्षांत त्याने आपले प्राथमिक शिक्षण संपवले आणि वयाच्या सातव्या वर्षी तो प्रशाळेत दाखल झाला. त्याची स्मरणशक्ती तीव्र होती. पण यापेक्षाही गणितात त्याची बुद्धी फार तल्लख होती. गणिताची उदाहरणे सोडविण्यात त्याला ब्रह्मानंद होत असे. प्रशाळेत असताना तो बी. ए. च्या वर्गातील विद्यार्थ्यांना अवघड वाटणारी उदाहरणे सोडवून दाखवी. इ. स. १९०३ मध्ये तो मॅट्रिक परीक्षा पास झाला व कुंभकोणमच्या सरकारी कॉलेजात दाखल झाला. पहिल्या वर्षी कॉलेजात त्याला शिष्यवृत्ती मिळाली. कॉलेजात गेल्यावर त्याचे सर्व लक्ष गणिताकडेच असे. कधी इतर विषयांकडे दुर्लक्ष झाल्यामुळे, कधी कॉलेजचे दिवस पुरते न भरल्यामुळे; तर कधी आजारी पडल्यामुळे कॉलेजच्या पहिल्या वर्षाच्या परीक्षेत तो तीनदा नापास झाला. इ. स. १९०७ साली तो त्या परीक्षेत उत्तीर्ण झाला. नापास झाल्यामुळे त्याची कॉलेजची शिष्यवृत्ती बंद झाली आणि घरची गरिबी असल्यामुळे पुढचे कॉलेजशिक्षणही त्याला बंद करावे लागले. परंतु त्याचा गणिताचा व्यासंग मात्र अव्याहत चालू राहिला. वह्याच्या वह्या तो गणिताने भरीत होता. पोटापाण्यासाठी काही उद्योग करावा, असे त्याला वाटतच नव्हते. तेव्हा या गणिताच्या समाधीतून त्याला बाहेर काढावे आणि काही उद्योगाला प्रवृत्त करावे, या हेतूने घरच्या मंडळींनी इ. स. १९०९ मध्ये त्याचे लग्न केले. त्यानंतर त्याला नोकरी करणे भागच पडले. म्हणून त्याने मद्रासच्या पोर्ट ट्रस्टमध्ये हिशेबखात्यात कारकुनी पत्करली. तिथे त्याला महिन्याकाठी तीस–पस्तीस रुपये मिळत; पण काम मात्र रोज पंधरा-सोळा तास करावे लागे. त्यातून मिळेल त्या वेळात तो गणिताचा अभ्यास करी.

त्या सुमारास, त्याचे काही लेख जर्नल ऑफ दि इंडियन मॅथेमॅटिकल सोसायटी, या पत्रिकेत प्रसिद्ध झाले. काही मित्रांच्या आग्रहावरून त्याने आपले गणितविषयक काही संशोधन, प्रसिद्ध गणितज्ञ व केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक जी. एच. हार्डी यांच्याकडे पाठविले. त्याचे ते संशोधनपर लिखाण वाचून हार्डी चकित झाले. त्यांनी त्याला केंब्रिजला आपल्याकडे शिकायला येण्याविषयी सुचविले. परंतु हिंदू धर्मात समुद्रयात्रा निषिद्ध मानलेली असल्यामुळे, स्वतः रामानुजन व त्याची आई यांनी परदेशगमनाचा विचारच केला नाही.

दरम्यानच्या काळात भारतीय मीटियरॉलॉजी विभागाचे अध्यक्ष डॉ. वॉकर मद्रासला आले होते. त्यांनी रामानुजनचे गणितातील संशोधन पाहिले आणि ते आश्चर्यचकित झाले. गणितविद्येच्या उपासनेसाठी जर त्याला आपला सर्व वेळ देता आला, तर गणितशास्त्राच्या विकासात तो मोलाची भर घालू शकेल, याबद्दल त्यांची खात्री झाली. म्हणून मद्रास विद्यापीठाने त्याला पाठ्यवेतन द्यावे, अशी खटपट त्यांनी केली. त्यांच्या खटपटीला यश येऊन रामानुजनला दरमहा पंचाहत्तर रुपयांचे पाठ्यवेतन मिळू लागले. तेव्हा त्याने पोर्ट ट्रस्टमधील नोकरी सोडली व आपले सर्व लक्ष गणितविषयक संशोधनावर केंद्रित केले.

प्रा. हार्डीही रामानुजनने केंब्रिजला यावे, म्हणून खटपट करीतच होते. कारण त्याला जर योग्य तऱ्हेने आधुनिक गणिताचा परिचय होईल, तर तो या काळातील एक अद्वितीय गणिती ठरेल, अशी त्यांची खात्री होती. हार्डींच्या प्रयत्नांना यश येऊन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मद्रास विद्यापीठाने उच्च शिक्षणासाठी त्याला शिष्यवृत्ती देण्याचे मान्य केले. केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजनेही त्याचा काही खर्च सोसण्याची तयारी दाखविली. त्याच्या व त्याच्या मातेच्या समुद्रयात्रेसंबंधीच्या विचारांत पुढे बदल झाला आणि इ. स. १९१४ मध्ये तो केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजात दाखल झाला.

प्रा. हार्डींनी रामानुजनला गणित शिकवायला सुरुवात केली. त्या काळातील तो सर्वांत उत्कृष्ट व अद्‌भुत गणितज्ञ आहे, असे त्यांचे मत बनले. रामानुजन सुमारे चार वर्षे केंब्रिज येथे राहिला. इ. स. १९१८ मध्ये त्याला लंडनच्या रॉयल सोसायटीचे फेलो नेमण्यात आले. एका भारतीयाला हा मान प्रथमच मिळाला होता. याच वर्षी ट्रिनिटी कॉलेजनेही त्याची फेलो म्हणून निवड केली आणि सहा वर्षे, वार्षिक अडीचशे पौंडांची रक्कम त्याला देण्याचे ठरवले. त्याला बी. ए. ची पदवीही दिली गेली.

पण इ. स. १९१७ मध्ये रामानुजन आजारी पडला. त्याला क्षयाची बाधा झाली. इंग्लंडच्या अतिशय थंड हवेतही तो संपूर्ण शाकाहारी राहिला. त्यामुळे रोग हटवणे कठीण झाले. आजारी असताना त्याला मायभूमीची ओढ वाटू लागली व १९१९ मध्ये तो भारतात परतला. भारतातही त्याच्यावर पुष्कळ उपचार करण्यात आले. पण त्यांचा काही उपयोग न होऊन तो २६ एप्रिल १९२० रोजी कालवश झाला. जगातले सर्व गणिती त्याच्या मृत्यूने हळहळले.

रामानुजनच्या संशोधनाचे विषय मुख्यत्वे संख्यासिद्धान्त (थिअरी ऑफ नंबर्स), विभाजनसिद्धान्त (थिअरी ऑफ पार्टिशन) व वितत भिन्नांचा सिद्धान्त (थिअरी ऑफ कंटिन्यूड फ्रॅक्शन्स) यांच्याशी संबंधित होते. बीजगणितात डग्लस–रामानुजन आयडेंटिटी प्रसिद्ध आहे. हायपर जॉमेट्रिकल सीरीज् आणि कंटिन्यूड फ्रॅक्शनमध्ये त्यांच्या नावे तीन आयडेंटिटीज् आहेत. प्रा. हार्डींच्या बरोबर त्याने राउंड नंबर्स वर संशोधन केले. त्याने संशोधन केलेल्या विषयांचे आकलन होण्यासाठी उच्च व नवीन गणिताचे ज्ञान असणे आवश्यक आहे. उच्च कोटीचे विद्वान गणितज्ञ त्याचे संशोधन हे अपूर्व व अद्‌भुत असल्याचे मान्य करतात.

रामानुजनच्या मृत्यूनंतर त्याचे कायमचे स्मारक व्हावे, असा प्रयत्न त्याच्या इंग्रज मित्रांनी केला. त्याचे चारशे पाने संशोधन छापून प्रसिद्ध झाले होते. पण हजारो पाने तशीच पडून होती. प्रा. वॉट्सननी ती सर्व कागदपत्रे चाळून त्यांतील काहींची छापण्यासाठी निवड केली. प्रा. हार्डी, अय्यर आणि विल्सन यांनी त्याचे प्रबंध एकत्र करून प्रसिद्ध केले व त्याच्यावर निरनिराळ्या ठिकाणी व्याख्याने दिली. त्यांच्या निवडक आठ व्याख्यानांचा संग्रह केंब्रिज विद्यापीठाने प्रसिद्ध केला आहे. त्यात सुमारे अडीचशे पाने मजकूर रामानुजनच्या संशोधनावर आहे. भारतातही त्याच्या स्मरणार्थ बंगलोर येथे रामानुजन मॅथेमॅटिकल रिसर्च इन्स्टिटयूटची स्थापना करण्यात आली आहे. गणितशास्त्राचे अध्ययन करणारी भारतातील ही प्रमुख संस्था आहे. [हिं. वि. को.; भा. वै.]

रामानुजाचार्य (इ. स. १०१७–११३७) एक वैष्णव आचार्य व विशिष्टाद्वैताचे पुरस्कर्ते. तमिळनाडमधील पेरुंबुदुर या गावी इ. स. १०१७ मध्ये रामानुजांचा जन्म झाला. त्यांच्या पित्याचे नाव केशव सोमयाजी व मातेचे नाव कांतिमती असे होते. कांतिमतीचा भाऊ श्रीशैलपूर्ण हा तिरुपती येथे रहात असे. आपल्या बहिणीला पुष्कळ वर्षांनी मुलगा झाला आहे, हे ऐकून तो बहिणीला भेटायला गेला. त्या वेळी त्या लहान मुलाच्या मस्तकाभोवती त्याला एक तेजोवलय दिसले. त्याचप्रमाणे, त्याच्या अंगावर प्रभू रामचंद्राचा धाकटा भाऊ लक्ष्मण, याची लक्षणेही दिसली, म्हणून त्याने मुलाचे नाव रामानुज असे ठेवले.

रामानुजांचे प्राथमिक शिक्षण पित्याच्या देखरेखीखाली झाले. त्यानंतर ते कांची येथे यादवप्रकाश या महान अद्वैती आचार्याकडे वेदान्ताचे अध्ययन करण्यासाठी गेले. रामानुज कुशाग्रबुद्धीचे होते. त्यांनी थोड्याच काळात वेदान्त तत्त्वज्ञान आत्मसात केले. पुढे एखाद्या उपनिषदातील काही वाक्यांचा अर्थ लावण्यात त्यांचा गुरूशी मतभेद होऊ लागला. यादवप्रकाशाला ते रुचले नाही. त्यामुळे रामानुजांबद्दल त्याला वाटत असलेली आत्मीयता हळूहळू नष्ट झाली आणि तिची जागा द्वेषाने घेतली. रामानुज अद्वैतवादाचा कट्टा विरोधक होऊन आपला नवा पंथ स्थापणार, अशी जेव्हा त्याची खात्री झाली, तेव्हा आपल्या परंपरागत अद्वैत सिद्धान्तांचे रक्षण करण्यासाठी रामानुजांना या जगातून नाहीसे करायचे त्याने ठरवले. आपल्या या मसलतीत त्याने आपल्या इतर शिष्यांनाही सामील करून घेतले. सर्वांनी मिळून काशीयात्रेला जायचे आणि वाटेत रामानुजांचा काटा काढायचा, असा त्यांनी बेत केला. रामानुज सर्वांच्या बरोबर काशीयात्रेला निघाले. त्यांचा मावसभाऊ गोविंद हा यादवप्रकाशाचाच शिष्य होता. तोही त्यांच्याबरोबर निघाला. वाटेत गोविंदाने रामानुजांना गुरूच्या कपटकारस्थानाची माहिती दिली. ती ऐकून रामानुजांनी घरी परत जाण्याचा निश्चय केला आणि कोणाला कळू न देता ते एका अंधाऱ्या रात्री समूहातून पसार झाले. पण सभोवतीच्या अरण्यातून वाट कशी काढावी, हे त्यांना समजेना. तेव्हा त्यांनी वरदराजाचे स्मरण केले. तेवढ्यात वरदराजा व लक्ष्मी भिल्ल-भिल्लिणीचे रूप धारण करून तिथे प्रकट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाली आणि त्यांनी रामानुजांना कांचीपर्यंत पोचवले. कांची दिसू लागल्यावर ती दोघे अंतर्धान पावली. रामानुज मग घरी गेले आणि त्यांनी घडलेली सर्व हकीगत आपल्या आईला सांगितली. त्यानंतर त्यांनी काही दिवस घरी स्वतःच अध्ययन करायचे ठरवले. याच वेळी मातेच्या आज्ञेने रामानुज विवाहबद्ध झाले. काही पंडितांच्या मते, रामानुजांचा पिता केशवभट्ट याने सोळाव्या वर्षी त्यांचे लग्न केले होते.

रामानुजांची कीर्ती श्रीरंगम येथे असलेल्या यामुनाचार्यांच्या कानी गेली होती. आपल्यामागून त्यांनाच श्रीरंगम येथील मंदिराचा उत्तराधिकारी करावे, असे त्यांनी ठरवले व आपला शिष्य महापूर्णस्वामी याला रामानुजांना श्रीरंगम येथे आणण्यासाठी पाठविले. रामानुजांनाही यामुनाचार्यांना भेटण्याची इच्छा होतीच. म्हणून ते महापूर्णस्वामीबरोबर श्रीरंगमला जायला निघाले. पण ते श्रीरंगमला पोचण्यापूर्वीच थोडा वेळ यामुनाचार्यांचे निधन झाले. रामानुजांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले, तेव्हा त्यांच्या हाताची तीन बोटे दुमडलेली आहेत, असे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी त्याविषयी जवळच्या लोकांकडे विचारणा केली असता आपल्या अपूर्ण राहिलेल्या इच्छा मोजीत असतानाच यामुनाचार्यांना मृत्यू आला, असे लोकांनी सांगितले. त्या तीन इच्छा अशा—

(१) ब्रह्मसूत्रांवर भाष्य लिहिणे (२) त्या वेळच्या दिल्लीच्या बादशहाकडे असलेल्या विष्णूच्या मूर्तीचा ताबा घेणे व (३) दिग्विजय करून विशिष्टाद्वैत मताचा प्रचार करणे.

काहींच्या मतानुसार या तीन इच्छा वेगळ्या होत्या. त्या अशा – (१) ब्रह्मसूत्रांवर भाष्य रचणे (२) द्राविड वेदाचा प्रचार करणे व (३) दोन पुरुषांना पराशर व शठकोप या उपाधी प्रदान करणे.

रामानुजांनी या तीनही इच्छा पुऱ्या करण्याची प्रतिज्ञा केली. त्याबरोबर यामुनाचार्यांची मुडपलेली बोटे सरळ झाली. त्यांचा अंत्य संस्कार करून रामानुज कांचीला परत आले.

कांचीला परतल्यावर रामानुज वरदराजाची उपासना करू लागले. एका बाजूने त्यांचा विद्याव्यासंग चालूच होता. यापुढे आपण पेरियनंबी किंवा महापूर्ण याच्याकडे अध्ययन करावे, असे त्यांना वाटू लागले. म्हणून ते श्रीरंगम येथे जायला निघाले. वाटेत मधुरांतकम या ठिकाणी त्यांची पेरियनंबीशी गाठ पडली. तोही रामानुजांना भेटण्यासाठीच निघाला होता. मग रामानुज त्याला घेऊन कांचीला आपल्या घरी परतले. सहा महिने पेरियनंबी त्यांच्या घरी राहिला आणि तेवढ्या अवधीत त्याने रामानुजांना वेदान्तसूत्रे आणि तीन हजार गाथा शिकवल्या.

रामानुजांचे वैवाहिक जीवन फारसे सुखी नव्हते. म्हणून त्यांनी पत्नीला माहेरी पाठवून दिले आणि संन्यास घेतला. नंतर वरदराजाच्या मंदिराजवळ त्यांनी एक मठ उभारला आणि तिथे ते राहू लागले. पुढे त्यांना अनेक शिष्य मिळाले. त्यांचा पहिला गुरू यादवप्रकाश यानेही त्यांचे शिष्यत्व पत्करले. कालांतराने रामानुजांना काही शिष्याही मिळाल्या.

त्यानंतर यामुनाचार्यांचा पुत्र वरदरंग रामानुजांकडे आला आणि त्यांना श्रीरंगम येथे घेऊन गेला. तिथे गेल्यावर श्रीरंगनाथाच्या देवालयाची व तिथल्या मठाची सर्व सूत्रे रामानुजांनी आपल्या हाती घेतली. मग त्यांनी गोष्ठीपूर्णाकडून पुन्हा दीक्षा घेतली. गोष्ठीपूर्णाने त्यांना 'ॐ नमो नारायणाय' हा मंत्र दिला व त्याचे रहस्य समजावून सांगितले. तसेच हा मंत्र कोणालाही न देण्याची त्यांना आज्ञा केली. हा मंत्र ऐकल्यावर माणसाला मुक्ती मिळते, हे जेव्हा रामानुजांना समजले, तेव्हा ते जवळच्या मंदिराच्या शिखरावर चढले आणि मोठमोठ्याने तो मंत्र म्हणू लागले. शेकडो स्त्रीपुरुष तो मंत्र ऐकू लागले. ही हकीकत कळल्यावर गोष्ठीपूर्ण फार रागावला आणि त्याने रामानुजांना बोलावून म्हटले. 'तू गुरूची आज्ञा मोडलीस, तेव्हा

श्रीरामानुजाचार्य

तुला अनंत काळपर्यंत नरकात खितपत पडावे लागेल !' यावर रामानुजांनी म्हटले, की 'जर आपल्या कृपेने हे सर्व स्त्रीपुरुष मुक्त होणार असतील आणि मी एकटा नरकात पडणार असेन, तर मला त्यात आनंदच आहे.' रामानुजांचे हे बोलणे ऐकून गुरू प्रसन्न झाला आणि म्हणाला, की 'आजपासून विशिष्टा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्वैतवाद हा तुझ्याच नावाने रामानुजदर्शन म्हणून प्रसिद्ध होईल.'

रामानुजांची कीर्ती हळूहळू चहूकडे पसरू लागली. त्यामुळे रंगनाथाच्या पुजाऱ्याला त्यांचा मत्सर वाटू लागला. त्याने रामानुजांना विष देऊन ठार मारायचे ठरविले. पण त्याच्या पत्नीने त्याचा हा बेत हाणून पाडला. नंतर पुजाऱ्याला आपल्या कृत्याबद्दल पश्चात्ताप झाला आणि त्याने रामानुजांची क्षमा मागितली.

एकदा यज्ञमूर्ती नावाचा एक अद्वैतवादी संन्यासी दिग्विजय करीत व जयपत्रे मिळवीत श्रीरंगमला आला. तिथे रंगनाथाच्या देवालयात त्याचा रामानुजांशी अठरा दिवस शास्त्रार्थ झाला आणि त्यात यज्ञमूर्तीचा पराभव झाला. त्याने मग वैष्णव मताचा स्वीकार करून रामानुजांचे शिष्यत्व पत्करले. त्याला अरुळाळ-पेरुमाळ एंबरुमानार असे नाव त्यांनी दिले. त्याने ज्ञानसार व प्रमेयसार हे दोन ग्रंथ लिहिले.

यानंतर रामानुजांनी यामुनाचार्यांच्या शवाजवळ केलेल्या प्रतिज्ञांची पूर्ती करायचे ठरवले. ब्रह्मसूत्रांवर विशिष्टाद्वैती भाष्य लिहिणे, ही पहिली प्रतिज्ञा होती. भाष्य लिहिण्यापूर्वी, शंकराचार्यांनी आपल्या भाष्यात ज्या बोधायनवृत्ती नावाच्या ग्रंथाची प्रशंसा केली होती, तो ग्रंथ मिळवून त्यांना अभ्यासायचा होता. काश्मीरात तो ग्रंथ आहे, असे कळल्यावरून रामानुज कुरेश व इतर काही शिष्य यांना बरोबर घेऊन काश्मीरात गेले. कुरेशाने तो सर्व ग्रंथ पाठ केला. त्यानंतर श्रीरंगमला परत येऊन रामानुजांनी ब्रह्मसूत्रांवर श्रीभाष्य या नावाचे भाष्य लिहिले. भाष्य लिहून झाल्यावर रामानुज पुन्हा काश्मीरला गेले. तिथे सरस्वतीपीठाने त्यांच्या भाष्याचा मोठा गौरव केला. तिथल्या पंडितांनी त्यांना हयग्रीवाची एक मूर्ती भेट दिली. आजही म्हैसूरच्या परकालमठात ती मूर्ती असून, तिची नित्य पूजा होते. त्यानंतर दिल्लीला जाऊन त्यांनी तत्कालीन बादशहाच्याकडे असलेली एक विष्णुमूर्ती हस्तगत केली, असे सांगतात. पुढे त्यांनी आपल्या मताचा देशभर प्रचार केला. अशा रीतीने त्यांनी यामुनाचार्यांच्या तीन्ही इच्छा पुऱ्या केल्या.

रामानुजांचा शिष्य कुरेश याला पुष्कळ वर्षांनी दोन पुत्र झाले. रामानुजांच्या आज्ञेवरून त्यांपैकी एका मुलाचे नाव पराशर असे ठेवण्यात आले. काही लोकांच्या मते यामुनाचार्यांची ही एक अपुरी इच्छा होती. तीही या गोष्टीने पूर्ण झाली.

त्या काळातील चोळ देशाचा राजा कुलोत्तुंग किंवा दुसरा राजेंद्र चोळ हा शैव होता. रामानुज वैष्णव धर्माचा प्रचार करतात, हे त्याला सहन होईना. शिवापेक्षा कुठलेही दैवत श्रेष्ठ नाही, अशी मान्यता रामानुजांकडून घ्यावी, असा राजाला त्याच्या सल्लागारांनी सल्ला दिला. तेव्हा राजाने रामानुजांना घेऊन येण्यासाठी सेवकांना पाठविले. सेवक मठात पोचले, तेव्हा रामानुज स्नानासाठी नदीवर गेले होते. कुरेशाने गुरूवर आलेले संकट जाणून संन्याशाचा वेष अंगावर चढवला आणि पेरियनंबी किंवा महापूर्ण याच्यासह तो राजदरबारात पोचला. शिव हेच श्रेष्ठ दैवत आहे, हे त्यांनीही मान्य केले नाही. म्हणून राजाने या दोघांचे डोळे काढायला लावले. त्या क्लेशांमुळे पेरियनंबी मरण पावला.

यानंतर शिष्यांच्या सल्ल्यावरून रामानुज श्रीरंगमहून होयसळ राज्यातील तोंडण्णूर या गावी गेले आणि बरीच वर्षे तिथे राहिले. तिथला राजा बिट्टिदेव हा जैन होता. रामानुजांची महती पटल्यामुळे त्याने नंतर वैष्णव पंथाचा स्वीकार केला. रामानुजांनी त्याला विष्णुवर्धन असे नवे नाव दिले. रामानुजांनी मग राजाच्या साहाय्याने मेलकोटे किंवा तिरुनारायणपुरम येथे नारायणाचे एक मंदिर बांधले. आणखीही पाच ठिकाणी त्यांनी विष्णूची मंदिरे बांधली. मेलकोटे येथील मंदिरात त्यांनी अस्पृश्यांनाही प्रवेश मुक्त ठेवला.

मेलकोटे गावी रामानुज बारा वर्षे राहिले. एवढ्यात चोळ राजा कुलोत्तुंग मरण पावल्याची वार्ता आली. मग ते श्रीरंगमला परतले. तिथे त्यांनी जवळजवळ सर्व आळवारांच्या मूर्ती स्थापन केल्या. पुढे काही कालाने ते तिरुपती येथे गेले. तिरुपतीच्या मंदिरातील मूर्ती समुद्रात फेकून देण्यात आली होती. रामानुजांनी ती समुद्रातून वर काढली आणि तिची पुन्हा स्थापना केली. त्यानंतर रामानुज श्रीरंगम सोडून कुठेच गेले नाहीत. कुरेशाचा पुत्र पराशर भट्टर याला त्यांनी आपला उत्तराधिकारी नेमले व आपल्या वैष्णवमताच्या प्रचारासाठी चौऱ्याहत्तर शिष्यांची योजना केली. अशा प्रकारे आपले सर्व आयुष्य अध्ययन व धर्मप्रचार यांत व्यतीत करून रामानुज १२० वर्षे आयुष्य भोगल्यावर इ. स. ११३७ मध्ये विष्णुरूपी विलीन झाले.

आपल्या मताच्या प्रचारासाठी रामानुजांनी श्रीभाष्याव्यतिरिक्त वेदान्तसंग्रह, वेदान्तदीप, वेदान्ततत्त्वसार, गीताभाष्य, अष्टादशरहस्य, कूटसन्दोह, गुणरत्नकोष, न्यायरत्नमाला, नारायणमन्त्रार्थ, नित्याराधनविधी, पञ्चरात्ररक्षा, मुण्डकोपनिषद्व्याख्या, विष्णुविग्रहशंसनस्तोत्र, इ. अनेक ग्रंथांची रचना केली. [हिंदुत्व; रामानुजाचार्य; हि. श्री. वै.]

रामायण

आदिकाव्य किंवा छंदोबद्ध इतिहास. वाल्मीकी मुनी हा या महाकाव्याचा निर्माता आहे. प्रस्तुत ग्रंथाचे सात कांडे असून, सर्गसंख्या ६४५ आहे या आदिकाव्यात इक्ष्वाकु वंशातला पुरुषोत्तम श्रीराम याचे चरित्र वर्णिलेले आहे. त्यात सांगितलेली कथा संक्षेपात अशी –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामायणकथा – एकदा नारदमुनी भेटला असता वाल्मीकीने त्याला प्रश्न केला.

" हे मुनिश्रेष्ठा, सांप्रत पृथ्वीवर गुणवान, पराक्रमी, धर्मज्ञ, सत्यवचनी आणि कोपला असता देवांनाही भीती उत्पन्न करणारा असा गुणसंपन्न पुरुष कोण आहे ? " त्यावर नारदमुनी बोलला. " हे महर्षे, तू उल्लेखिलेले सगळे गुण एकत्र दुर्लभ आहेत. तथापि इक्ष्वाकू वंशात जन्मलेला राम हा तू विचारतोस तसा आदर्श पुरुष आहे. "

त्यावर वाल्मीकी म्हणाला. " तर मग मला त्याचे समग्र चरित्र सांगा. "

" ऐक तर " असे म्हणून नारदाने संपूर्ण रामकथा सांगितली. ती ऐकून वाल्मीकी परम संतुष्ट झाला. मग त्याने नारदाची पूजा करून त्याला निरोप दिला.

नंतर वाल्मीकी भरद्वाज नावाच्या शिष्यासह तमसा नदीवर स्नानाला गेला. वाटेत एका वृक्षावर क्रौंच पक्ष्याचे एक जोडपे विहार करीत असलेले त्याला दिसले. एवढ्यात एका निषादाने कुठूनतरी बाण मारला आणि त्यांपैकी नरपक्ष्याला खाली पाडले. लगेच तो पक्षी गतप्राण झाला. आपला जोडीदार पडलेला पाहून त्याची मादी आक्रोश करू लागली. त्या दृश्याने वाल्मीकीचे हृदय द्रवले. त्याला त्या निषादाचा क्रोधही आला. आणि त्याच्या मुखातून शापवाणी बाहेर पडली –

> मा निषाद ! प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः ।
> यत्क्रौञ्चमिथुनादेकमवधीः काममोहितम् ॥

अर्थ – हे निषादा, तू या भूतलावर फार वर्षे जगणार नाहीस. कारण तू काममोहित अशा क्रौंचयुग्मापैकी एकाचा वध केला आहेस.

ही शापवाणी गद्य नसून पद्यरूप होती. तो एक सहजस्फूर्त असा अनुष्टुप् छंद होता. वाल्मीकीला त्या घटनेचे आश्चर्य वाटले. त्या श्लोकाचा विचार करीतच तो आश्रमात आला.

पाठोपाठ पितामह ब्रह्मदेव वाल्मीकीच्या पुढे प्रकट झाला. वाल्मीकीने त्याचे स्वागत करून त्याला तो श्लोक ऐकवला. तो ऐकून ब्रह्मदेव म्हणाला. " हे ऋषिश्रेष्ठा, तुझ्या ठिकाणी सरस्वती आविर्भूत झाली आहे. तू या अनुष्टुप छंदात समग्र रामचरित्राचे वर्णन कर. "

असे म्हणून ब्रह्मदेव निघून गेला. मग वाल्मीकी रामचरित्र लिहिण्यास बसला. चौवीस हजार श्लोक, पाचशे सर्ग, सहा कांडे व सातवे उत्तरकांड ज्यात आहेत, असे ते महाकाव्य निर्माण झाले. वाल्मीकीने त्याला पौलस्त्यवध असे नाव दिले. मग त्याच्या मनात विचार आला की, हे काव्य लोकांना कोण बरे गाऊन दाखवील ? त्यासरशी कुश-लव हे कुमार पुढे येऊन म्हणाले. " गुरुजी, हे काव्य आम्हांला शिकवा. आम्ही ते वीणेच्या साथीवर गाऊन दाखवू " थोड्याच काळात वाल्मीकीने शिकविलेले ते काव्य कुश-लवांनी आत्मसात केले व ऋषींच्या एका सभेत गाऊन दाखवले. कुश-लव ती काव्यबद्ध रामकथा गाऊ लागले असता, त्या गायनातून रामचरित्राचा पट उलगडला जाऊ लागला, तो असा –

बालकांड – सरयूच्या तीरी कोशल नावाचा एक विस्तीर्ण व समृद्ध असा देश होता. त्या देशाची राजधानी अयोध्या. ती मनूने वसवली होती. या नगरीत इक्ष्वाकू कुलातला दशरथ राजा राज्य करीत होता. तो इतर सर्व बाबतींत भाग्यवान असूनही पोटी पुत्रसंतान नसल्यामुळे दुःखी होता. एके दिवशी तो आपला कुलगुरू वसिष्ठ याला बोलावून म्हणाला. " पुत्रप्राप्तीसाठी मी अश्वमेध करण्याचे ठरवले आहे. तुम्हांला काय वाटते ते सांगा. " वसिष्ठाने त्याच्या विचाराला अनुमोदन दिले. मग दशरथ अंतःपुरात गेला आणि त्याने आपल्या कौसल्या, सुमित्रा व कैकेयी या तीन प्रमुख राण्यांना ही गोष्ट सांगितली.

यज्ञासाठी ऋष्यशृंग नावाच्या महातपस्वी मुनिकुमाराला मुख्य ऋत्विज म्हणून आणावा असे ठरले. ऋष्यशृंग हा विभांडक ऋषीचा पुत्र असून, अंग देशाच्या रोमपाद राजाने आपली शांता नामक कन्या देऊन त्याला घरजावई केले होते. दशरथ स्वतः रोमपाद राजाकडे गेला आणि ऋष्यशृंग व शांता या दंपतीला घेऊन अयोध्येस परत आला. ऋष्यशृंगाला ब्रह्मत्व देऊन ब्राह्मणांनी यज्ञकृत्य सुरू केले. एक वर्षानंतर अश्वमेधाचा सोडलेला घोडा परत आला व यज्ञ यथासांग पुरा झाला. मग दशरथाला पुत्रप्राप्ती व्हावी, म्हणून ऋष्यशृंगाने पुत्रकामेष्टीचे अनुष्ठान सुरू केले. योग्य वेळी त्या यज्ञाच्या अग्निकुंडातून एक कृष्णवर्ण व रक्तमुख असा महापुरुष प्रकट झाला. त्याच्या हातात सुवर्णपात्र होते व त्यांत देवनिर्मित पायस होता. तो यज्ञपुरुष राजाला म्हणाला. " हा पायस तू ग्रहण कर व तो तुझ्या राण्यांना सेवन करायला दे. म्हणजे तुझा हेतू सफल होईल."

दशरथाने मग त्या संपूर्ण पायसातला अर्धा भाग कौसल्येला दिला व त्यातला चौथा भाग तिच्याकडून सुमित्रेला देवविला. उरलेला अर्धा भाग कैकेयीला दिला व त्यातला चौथा भाग तिच्याकडून परत सुमित्रेला देवविला. तीन्ही राण्यांनी आपापला भाग सेवन केला. यथाकाल तीन्ही राण्यांना गर्भसंभव झाला. नवमास झाल्यावर चैत्र शुद्ध नवमीच्या दिवशी पुनर्वसू नक्षत्रावर पाच ग्रह उच्चस्थानी असता, मध्यान्ही कौसल्या प्रसूत झाली. तिने सर्वगुणसंपन्न अशा रामाला जन्म दिला. कैकेयीला भरत आणि सुमित्रेला लक्ष्मण व शत्रुघ्न असे दोन पुत्र झाले. त्यांपैकी राम हा विष्णूचाच अर्धा अंश होता. दशरथाने वसिष्ठाकडून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या चारही कुमारांचे नामकरणादी संस्कार करविले. चौघांनाही उत्तम शिक्षण दिले. सोळा वर्षे वयापर्यंत ते राजकुमार धनुर्विद्येत प्रवीण झाले. इतरही अनेक विद्या त्यांनी अभ्यासिल्या.

पुत्रकामेष्टी यज्ञ

त्यानंतर एके दिवशी विश्वामित्र मुनी अयोध्येत येऊन दशरथाला भेटला. दशरथाने त्याचा सत्कार करून विचारले. "किंनिमित्त आगमन झाले ?" 'मागशील ते देईन' असे वचन देत असशील तर सांगतो, असे विश्वामित्र म्हणाला. दशरथाने तसे वचन दिले. त्यावर विश्वामित्र म्हणाला.

"मारीच व सुबाहू हे दोन राक्षस माझ्या यज्ञात सदैव विघ्ने आणीत आहेत. त्यांना मारल्यावाचून माझा यज्ञ सिद्धीस जाणार नाही. तुझा थोरला पुत्र राम हे काम करील, अशी माझी खात्री आहे. म्हणून तू रामाला माझ्याबरोबर पाठव."

ती मागणी ऐकून दशरथ हतबुद्ध झाला. क्षणभर त्याला मूर्च्छाच आली. सावध झाल्यावर त्याने म्हटले. "मुनिश्रेष्ठा, रामाचे वय अजून लहान आहे. त्या मायावी राक्षसांपुढे त्याचा निभाव लागणार नाही. म्हणून रामाला तुझ्याबरोबर पाठवायला माझा जीव धजत नाही."

ते ऐकून विश्वामित्र संतप्त झाला. आपल्या मागणीचा अवमान झालेला पाहून तो तडक उठून जायला निघाला. एवढ्यात वसिष्ठाने पुढे येऊन त्याला थोपवून धरले आणि दशरथाला म्हटले. "हे राजा, आधी वचन देऊन नंतर नकार देणे, हे तुला शोभत नाही. अशाने तुझे सर्व पुण्य नाश पावून तुझ्या कीर्तीला कलंक लागेल. रामाला धाडलेस, तर विश्वामित्राजवळ देवादिकांनाही दुर्लभ अशी जी अस्त्रे आहेत, ती त्याला मिळतील. लक्षात ठेव, की विश्वामित्र स्वतःच्या फायद्यासाठी नव्हे; तर तुझ्या रामावर कृपाप्रसाद करण्यासाठीच त्याची मागणी करीत आहे."

या भाषणानंतर दशरथ राजाने अनिच्छेने का होइना; पण रामाला विश्वामित्राबरोबर पाठवण्याचे ठरविले. रामाबरोबर त्याने लक्ष्मणालाही पाठविले. विश्वामित्र त्या दोघांना घेऊन आपल्या आश्रमाकडे जायला निघाला.

वाटेत सरयू नदीच्या दक्षिण तीरी विश्वामित्राने रामाला बला व अतिबला नावाचे मंत्रसमुदाय उपदेशिले. मुक्काम करीत करीत ते पुढे चालले. पुढे त्यांना हिंस्र श्वापदांनी गजबजलेले एक निबिड अरण्य लागले. विश्वामित्र रामाला म्हणाला.

"हे ताटकेचे वन आहे. ती सुंदाची भार्या असून, मारीच हा तिचा पुत्र आहे. ही राक्षसी महाभयंकर आहे. ती आत्ताच आपल्यावर चालून येईल. तू तिचा वध कर. स्त्रीला कसे मारू, असा विचार मनात आणू नकोस. कारण तिच्या वधामुळे हे वन निष्कंटक होणार असून, लोकांचेही कल्याण होणार आहे."

एवढ्यात ती राक्षसी रामावर धावून आलीच. रामाने एका बाणातच तिला यमसदनाला पाठवले. रामाचे हे अमोघ शरसंधान पाहून विश्वामित्र प्रसन्न झाला. त्याने मग आणखी काही अस्त्रांचे मंत्र रामाला शिकवले.

नंतर थोड्याच कालात विश्वामित्र राम-लक्ष्मणांसह आपल्या सिद्धाश्रमात आला. लगेच त्याने यज्ञदीक्षा घेतली. यथाविधि यज्ञाचे अनुष्ठान सुरू झाले. तो यज्ञ सहा दिवस चालायचा होता. पाच दिवस निर्विघ्न पार पडले. सहाव्या दिवशी मारीच, सुबाहू आणि त्यांचे अनुयायी यांनी यज्ञमंडपावर चाल केली. यज्ञमंडपात रक्ताचा सडा पडू लागला. त्या मायावी राक्षसांनी सगळे नभोमंडळ भरून टाकले. पाठोपाठ मारीच व सुबाहू हे राम-लक्ष्मणांच्या अंगावर चालून आले. रामाने लगेच धनुष्याला बाण लावून त्यावर मानवास्त्राचे अभिमंत्रण केले. रामाने बाण थेट मारीचाच्या वक्षःस्थळावरच मारला. त्यासरशी मारीच कित्येक योजने दूर जाऊन पडला. रामाच्या दुसऱ्या बाणाने सुबाहू ठार झाला. त्यानंतर इतर सर्व राक्षसांचेही रामाने कंदन केले. अशा रीतीने राक्षसांचा संहार झाल्यावर विश्वामित्राचा यज्ञ सिद्धीस गेला. विश्वामित्र प्रसन्न झाला.

दुसऱ्या दिवशी विश्वामित्र रामाला म्हणाला. "मिथिलाधिपती जनकाच्या घरी एक यज्ञ होणार असून, आम्ही सगळे आज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'तिकडे निघणार आहो. तेव्हा आमच्याबरोबर तूही चल. जनकाकडे एक अद्भुत धनुष्य, असून ते शंकराने त्याला दिले आहे. 'त्या धनुष्याला आजवर कोणीही दोरी चढवू शकला नाही. तू एकदा ते पाहा."

रामाने ते मान्य केले. ते सगळे मिथिलेच्या रस्त्याला लागले. वाटेत त्यांना गौतमाचा आश्रम लागला. गौतमाची अहल्या नावाची भार्या होती. तिच्याकडून व्यभिचार घडला होता. इंद्राने गौतमाचे रूप घेऊन तिच्याशी समागम केला होता. ही गोष्ट गौतम ऋषीला कळताच त्याने तिला शाप दिला होता, की "यापुढे तू केवळ वायुभक्षण करीत राखेत पडून राहशील. पुढे त्रेतायुगात जेव्हा दाशरथी राम या वनात येईल, तेव्हा त्याच्या पादस्पर्शाने तुझा उद्धार होईल." हा वृत्तांत विश्वामित्राने रामाला सांगितला आणि तो त्याला घेऊन त्या आश्रमात गेला. रामाचे पाय त्या राखेच्या ढिगाऱ्याला लागताच अहल्येचा उद्धार झाला. तिला मूळचे रूप प्राप्त झाले. तिने मग मनोभावे रामाची पूजा केली.

मिथिलेला पोचताच जनकराजा त्या सर्वांना सामोरा आला. यथोचित स्वागतसत्कार झाल्यावर विश्वामित्राने जनकाला राम-लक्ष्मणांची ओळख करून दिली. दुसऱ्या दिवशी पुन्हा जनकाची भेट होताच विश्वामित्राने ते शिवधनुष्य रामाला दाखवण्याविषयी जनकाला सांगितले. लगेच सेवकांकरवी जनकाने ते धनुष्य पुढे आणले. त्या वेळी जनक म्हणाला. "माझी मुलगी सीता ही यज्ञासाठी भूमी नांगरीत असता मला मिळाली. मोठी झाल्यावर अनेक राजे तिला मागणी घालू लागले; पण सामर्थ्यसंपन्न अशा पुरुषालाच मी मुलगी द्यायचे ठरवले होते. म्हणून मी प्रत्येकाला सांगत असे, की हे धनुष्य तुम्ही वाकवून दाखवा; ही गोष्ट तुमच्या हातून झाली तर माझी सीता तुम्हांला मिळेल. अनेकांनी तसा प्रयत्न केला; पण कोणालाही त्यात यश आले नाही."

ते ऐकून विश्वामित्राने रामाकडे साभिप्राय पाहिले. राम उठून त्या धनुष्याजवळ गेला. त्याने ते सहज लीलेने उचलले. तितक्याच सहजतेने ते वाकवून त्याला दोरीही चढवली. मग रामाला वाटले, की आपण हे एकदा आकर्ण ओढून पाहावे. रामाने त्याची दोरी खेचली. धनुष्य वाकले आणि वाकता वाकता कडकन मोडून गेले.

ते पाहून जनक आश्चर्यचकित झाला. तो म्हणाला. "रामापाशी एवढी शक्ती असेल, याची मला कल्पना नव्हती. आता मी माझी सीता रामाला अर्पण करीन."

विश्वमित्राने त्या विचाराला अनुमोदन दिले. लगेच जनकाने अयोध्येला आपला मंत्री पाठवला. अयोध्येच्या राजकुलातील सर्व मंडळींना वसिष्ठासह त्याने मिथिलेला बोलावून घेतले. ती मंडळी आल्यानंतर राम आणि सीता यांचा थाटाने विवाह झाला. त्याच लग्नमंडपात जनकाने आपली दुसरी मुलगी उर्मिला ही लक्ष्मणाला दिली. कुशध्वज हा जनकाचा धाकटा भाऊ. त्याला मांडवी व श्रुतकीर्ती अशा दोन मुली होत्या. त्या त्याने अनुक्रमे भरत व शत्रुघ्न यांना दिल्या. लग्नसोहळा आटपल्यावर दशरथ राजा सर्वांसह अयोध्येकडे यायला निघाला.

वाटेत त्याला अपशकुन होऊ लागले. पाठोपाठ धुरळा उठला. तो शमल्यावर भार्गव परशुराम समोर उभा असलेला दशरथाला दिसला. दशरथाने व बरोबरीच्या ऋषिमुनींनी त्याचे स्वागत केले. पण त्याकडे दुर्लक्ष करून परशुराम रामाला म्हणाला.

"तू शिवधनुष्याचा भंग केल्याचे ऐकले. आता मी तुझी परीक्षा घेणार आहे. शिवधनुष्यासारखेच हे दुसरे जामदग्न्य धनुष्य आहे. याला तू बाण लावून दाखव. हे केलेस तर मी तुला माझ्या तोडीचा वीर समजेन आणि तुझ्याशी द्वंद्वयुद्ध करीन."

ते ऐकून दशरथ फारच घाबरला. पण राम धीरगंभीर होता. तो पुढे झाला. त्याने परशुरामाच्या हातातले धनुष्य घेतले व त्याला लीलेने बाण जोडला. त्यासरशी परशुरामाच्या अंगातले तेज रामाच्या शरीरात प्रविष्ट झाले. लगेच परशुराम निस्तेज झाला. राम त्याला म्हणाला. "तू ब्राह्मण असल्यामुळे अवध्य आहेस; पण माझा बाण अमोघ आहे. तेव्हा माझ्या या बाणाने तुझी पृथ्वीवरची गती अवरुद्ध करून टाकू, का तपाने संपादन केलेले तुझे अप्रतिम लोक नष्ट करू? यांपैकी एक काय ते सांग." त्यावर परशुराम रामाची स्तुती करून म्हणाला. "तू माझे उत्तम लोक नष्ट करून टाक. पण माझी पृथ्वीवरील गती कायम राहू दे. म्हणजे मी इथून महेंद्र पर्वतावर जाईन!"

रामाने बाण सोडून परशुरामाच्या सांगण्याप्रमाणे केले. मग परशुराम निघून गेला. दशरथ राजा अयोध्येत आला. अयोध्येत दशरथांच्या चारही मुलांचे गृहस्थाश्रम चालू झाले. राम दशरथाच्या राज्यकारभारात लक्ष घालू लागला. तो सर्व प्रजेला प्रिय बनला. काही दिवसांनी राजाच्या सांगण्यावरून भरत केकय देशाला म्हणजे मातुलगृही निघाला. जाताना त्याने शत्रुघ्नालाही बरोबर नेले.

अयोध्याकांड – हळूहळू दशरथाला आपल्या वार्धक्याची जाणीव होऊ लागली. त्याने दरबार भरवला आणि मंत्रिगणांना तसेच ऋषिमुनींना आपण रामाला यौवराज्याचा अभिषेक करण्याचे ठरवले असल्याचे सांगितले. त्या गोष्टीला सर्वांचे मत अनुकूल पडले. दशरथाला आनंद झाला. दुसऱ्या दिवशीच तो समारंभ घडवून आणावा म्हणून त्याने ब्राह्मणांना अभिषेकाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तयारी करण्यास सांगितले. रामाला बोलावून त्याने आपला मनोदय सांगितला. रामालाही त्या गोष्टीचा आनंद झाला. त्याने सीतेसह आदल्या दिवशी उपवास करून नारायणाचे चिंतन केले व त्या रात्री दर्भशय्येवर शयन केले. दुसऱ्या दिवशी अयोध्यानगरी शृंगारली गेली. प्रजाजनांच्या आनंदाला उधाण आले. प्रजाजन गर्दी करून राजवाड्याकडे लोटले. राज्याभिषेकाची सर्व सिद्धता झाली.

कैकेयीची मंथरा नावाची एक कुबडी दासी होती. तिच्या माहेराकडून ती आली होती. ती स्वभावाने दुष्ट आणि कुटिल होती. रामाच्या दाईकडून तिला कळले, की उद्या सकाळी रामाला युवराजपदाचा अभिषेक होणार आहे. ती वार्ता ऐकताच मंथरेचे माथे भडकले. ती कैकेयीच्या महालात गेली. कैकेयी त्या वेळी झोपी गेली होती. तिला जागे करून मंथरेने म्हटले.

" देवी, तुझा सर्वनाश होण्याची वेळ आली आहे आणि तू झोपली आहेस काय ?"

" काय झाले?" कैकेयी म्हणाली.

" अहो बाईसाहेब, उद्या सकाळी रामाला युवराजपदाचा अभिषेक होणार आहे."

" मग ही तर आनंदाची वार्ता आहे. अशी चांगली वार्ता सांगितल्याबद्दल माझ्या गळ्यातला दागिना मी तुला बक्षीस देते, तो घे."

" जळो तुझा दागिना. तू मूर्ख आहेस. तुला परिणामाची कल्पना नाही. उद्या राम राजा झाला, की कौसल्या राजमाता होणार. तू कौसल्येची दासी आणि भरत रामाचा दास होणार!"

"कुबडे, भलते सलते बरळू नकोस. राम कौसल्येहून माझ्यावर अधिक प्रेम करतो. तो भरतालाही आत्मतुल्य मानतो."

"ते काही असले, तरी राम राजा झाल्यावर राज्याची गादी त्याच्याच वंशात चालणार. तुझा भरत कायमचा राज्याला वंचित होणार. अग त्यासाठीच तर राजाने भरताला आजोळी धाडण्याचा डाव केला. तुला ही गोष्ट कळत नसली, तरी मला कळते."

या बोलण्यावर मात्र कैकेयीचे मन फिरले. ती क्रोधसंतप्त होऊन म्हणाली.

" मंथरे, आता काय करायचे ग ?"

"मी सांगते. राजाने मागे एकदा युद्धात तू त्याचे प्राण वाचवलेस म्हणून तुला दोन वर दिले होते. ते तू राजाकडे ठेव म्हणून ठेवले आहेस. ते आज मागून घे. एका वराने रामाला चौदा वर्षे वनवासाला पाठव आणि दुसऱ्या वराने भरतासाठी राज्य मागून घे." असे मंथरा म्हणाली. कैकेयीने विचारले-

" पण राजा माझे ऐकेल का? "

"अवश्य ऐकेल. तो तुझ्याविषयी लंपट आहे. तू क्रोधागारात जाऊन पडून रहा आणि राजा तुला भेटायला आला, की आकांड तांडव कर. म्हणजे तुझा हेतू साध्य होईल."

कैकेयीने तसे केले. दशरथ तिची समजावणी करण्यासाठी गेला. तिने त्या दोन वरांचा हट्ट धरला. दशरथाचा निरुपाय झाला. त्याला दिलेले वर नाकारता येईनात आणि रामवियोगाची कल्पनाही सहन होईना. अशा स्थितीत तो जडमूढ होऊन बसला. या प्रकारात सारी रात्र निघून गेली. सकाळी राम कैकेयीच्या महालात आला. पाहतो तो दशरथाची विचित्र अवस्था झाली होती. त्याच्या तोंडून शब्दही फुटत नव्हता. ही स्थिती पाहून रामाने कैकेयीला विचारले.

" माते हा काय प्रकार आहे ?"

" तुझ्या पित्याला सांगणे जड जाते. पण राजाला काय घ्यायला हवे आहे, ते मी तुला सांगते. मात्र त्याप्रमाणे वागायचे तू वचन दिले पाहिजेस. " कैकेयी म्हणाली.

" माते, मी तुझ्यासाठी आणि वडिलांसाठी काय करणार नाही ! वस्तुस्थिती काय ती तू मला सांग. "

" ऐक तर मग. मी राजाकडे ठेव म्हणून ठेवलेले दोन वर आज मागून घेतले आहेत. एका वराने तू चौदा वर्षे वनवासाला जायचे आहे आणि दुसऱ्या वराने माझ्या भरताला राज्य मिळायचे आहे. बोल, पित्याचे वचन तू खरे करणार, की नाही?"

" अवश्य करीन. मी आत्ताच वनवासाला जाण्याची तयारी करतो. "

असे म्हणून राम तिथून निघाला. त्याने प्रथम कौसल्येच्या महालात येऊन तिला हे वर्तमान सांगितले. कौसल्येच्या हृदयावर जणू वज्राघातच झाला. तिथून राम सीतेच्या महालात गेला. तिलाही त्याने घडलेला वृत्तांत सांगितला. तो म्हणाला.

" मी आत्ताच्या आत्ता वनवासाला निघत आहे. तू सर्वांची सेवा करून आणि मर्जी संभाळून इथे राहा."

" तुम्हांला सोडून मी इथे राहणार नाही. जर तुम्ही मला तुमच्याबरोबर नेले नाही, तर मी प्राणत्याग करीन. " सीता निग्रहाने म्हणाली.

लक्ष्मण तिथे जवळच होता. तोही म्हणाला.

" तुम्हां दोघांची सेवा करण्यासाठी मीही वनात येणार !"

मग रामाने दोघांनाही आपल्याबरोबर नेण्याचे ठरवले. लगेच राम-सीतेने ब्राह्मणांना व दासदासींना आपले अलंकार दिले. द्रव्यदानही केले. सीता वल्कले नेसली. तिघांनीही मोठ्या माणसांच्या पायांवर मस्तक ठेवले. सुमंत्राने रथ आणला. तिघेही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रथात बसले. रथ अयोध्येतून बाहेर पडला. सर्व प्रजाजन रथा-मागून धावले. पाठीमागे अयोध्येत एकच हाहाकार उठला.

त्या रात्री रामाने तमसा नदीवर मुक्काम केला. लोकही तिथे येऊन थडकले. रामाने शयन करताच तेही आजूबाजूला झोपी गेले. प्रहर रात्र उरली असता रामाने सुमंत्राला रथ जोड-ण्यास सांगितले. मग तिघेही रथात बसून पुढच्या मार्गाला लागले. पहाटे प्रजाजन जागे होतात, तर त्यांना राम कुठे दिसेना. बिचारे धाय धाय रडले आणि अयोध्येला परत गेले.

राम पुढे निघाला, तो गंगातीरी आला. रामाचा मित्र व शृंगवेरपुराचा अधिपती गुह हा तिथे रामाला भेटायला आला. त्यांचे कुशल प्रश्न झाल्यावर रामाने सीतेसह दर्भशय्येवर शयन केले. गुह व लक्ष्मण पहारा करीत बसले. उजाडल्यावर रामाने तिथून सुमंत्राला निरोप दिला. सुमंत्र रथ घेऊन अयोध्येकडे परतला. मग राम-लक्ष्मणांनी वडाचा चीक आणून आपल्या जटा बांधल्या. गुहाने नौकेत बसवून त्यांना गंगापार केले. रामाला निरोप देताना गुहाचे डोळे भरून आले.

पुढे गंगा–यमुनांच्या संगमावर त्यांना भरद्वाजाचा आश्रम दिसला. त्या ऋषीने रामाचे उत्तम स्वागत केले. "आम्हांला

भरद्वाजाच्या आश्रमात राम, सीता व लक्ष्मण–
भरहूतचे शिल्पकाम

राहण्यासाठी एखादे चांगले स्थान सुचवा." असे रामाने म्हणताच भरद्वाजाने त्याला चित्रकूट पर्वताचे नाव सांगितले. राम यमुना नदी पार करून चित्रकूट पर्वताकडे निघाला. तो पर्वत सुंदर आणि समृद्ध होता. रामाला ते स्थान आवडले. लक्ष्मणाने तिथे माल्यवती नदीच्या तीरावर राम-सीतेसाठी एक पर्णशाला बांधली. सगळे तिथे सुखाने राहू लागले.

इकडे अयोध्येत दशरथ राजाची अवस्था दिवसेंदिवस कठीण होऊ लागली. एका रात्री त्याला वाटले, की आपण आता थोड्याच कालाचे सोबती आहोत. त्याने कौसल्येला जवळ बोलावले. त्याला मागची एक घटना आठवली. तो म्हणाला.

"आर्ये, माणसाला त्याच्या शुभाशुभ कर्मांचे फळ मिळाल्या-वाचून राहत नाही. तुला एक गोष्ट सांगतो. एका पावसाळ्यात शिकारीसाठी मी वनात गेलो होतो. सरयू नदी दुथडी भरून वाहत होती. रात्रीच्या अंधारात सावजे पाणी पिण्यासाठी नदी-वर येतील, तेव्हा त्यांची शिकार करावी, म्हणून मी दबा धरून बसलो. थोड्या वेळाने नदीतून हत्तीच्या आवाजासारखा आवाज आला. मी शब्दवेधी होतो. त्यामुळे माझ्याकडून सुटलेला बाण अचूक लक्ष्य वेधून गेला. पाठोपाठ माणसाचा करुण आवाज ऐकू आला. मी पुढे जाऊन पाहतो तर एक तपस्वी कुमार माझ्या बाणाने विद्ध होऊन पडला होता. तो आपल्या आई-वडिलांसाठी पाणी नेण्यासाठी घागर घेऊन नदीवर आला होता. "आता माझे वृद्ध आई-बाप कसे जगतील," असे म्हणता म्हणता त्याला मृत्यू आला. मी त्याच्या आई-बापांना पाहण्यासाठी आश्रमात गेलो आणि त्यांना झालेली गोष्ट सांगितली. त्या दोघांनी आकांत करून प्राण सोडला. मरतेवेळी त्या म्हाताऱ्या जोडप्याने मला शाप दिला, की "आमच्याप्रमाणेच तुझाही मृत्यू पुत्रशोकानेच होईल."

ही गोष्ट सांगून दशरथ कौसल्येला म्हणाला. "देवी, तो शाप खरा होऊ पाहत आहे." एवढे बोलता बोलताच त्याला ग्लानी आली आणि तिच्यातच त्याचा प्राण निघून गेला. अयोध्येत सगळीकडे हलकल्लोळ माजला. भरत तिथे पोचेपर्यंत दशरथाच्या प्रेताला अग्निसंस्कार करता येणार नव्हता. म्हणून अमात्यांनी त्याचे प्रेत तेलाच्या कढईत ठेवले आणि भरताला बोलावण्यासाठी केकय देशाकडे दूत रवाना केले. अयोध्येत घड-लेल्या कोणत्याही घटनेची भरताला माहिती सांगायची नाही, असा त्या दूतांना अमात्यांचा आदेश होता. त्यामुळे अयोध्येला परत येईपर्यंत भरताला सगळ्याच गोष्टी अज्ञात होत्या.

अयोध्येत प्रवेश केल्यावर त्याला सगळीकडे अवकळा पसर-लेली दिसली. तो राजमहालात जातो, तर त्याला दशरथ कुठेच दिसेना. म्हणून तो कैकेयीच्या महालात गेला. कैकेयीने त्याला जवळ घेऊन त्याचे मुख कुरवाळले आणि दशरथाच्या मृत्यूची वार्ता सांगितली. भरताने बराच वेळ पित्यासाठी विलाप केला आणि विचारले, "आई, राम कुठे आहे?"

तेव्हा कैकेयीने मोठ्या कौतुकाने त्याला सांगितले.

"मी तुझ्यासाठी राज्य मिळविले आहे आणि रामाचा तुला त्रास होऊ नये म्हणून त्याला मी वनवासाला धाडले आहे."

भरतावर ही दुहेरी आपत्ती होती. एका बाजूने पितृवियोग आणि दुसऱ्या बाजूने बंधुवियोग! आपली आई किती दुष्ट आणि उलटया काळजाची आहे, हे त्याला त्या वेळी समजले. तो कैकेयीची निर्भर्त्सना करून म्हणाला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

" पापिणी, मी राजा होण्याची तुझी इच्छा कधीच पुरी होणार नाही. मी वनात जाऊन रामाला परत आणीन व त्यालाच गादीवर बसवीन."

मग भरताने दशरथाच्या प्रेताला अग्निसंस्कार केला; बारा दिवस सगळे क्रियाकर्मांतर केले; ब्राह्मणांना विपुल दाने दिली. तेराव्या दिवशी त्याने दशरथाच्या अस्थी गोळा केल्या. चौदाव्या दिवशी अयोध्येतले धुरंधर पुरुष एकत्र होऊन भरताला म्हणाले. " आता तू सिंहासनावर बैस. सांप्रत या देशाला कुणी राजा नाही. त्यामुळे राज्यात अराजक माजण्याची भीती आहे. म्हणून तू राज्याचा स्वीकार करून प्रजेचे कल्याण कर."

पण भरताने त्या लोकांचे मानले नाही. तो म्हणाला.

" राज्याचा वारस राम आहे; मी नव्हे. मी त्याला घेऊन येतो व राज्यावर बसवतो." त्याचे हे शब्द ऐकून सर्वांनी त्याची वाहवा केली.

आणि मग थोड्याच वेळात अमात्य, सेनापती, सैन्य व आपल्या तीन्ही माता या सर्वांना घेऊन भरत चित्रकूट पर्वतावर निघाला. राम ज्या मार्गाने गेला होता, तोच मार्ग त्याने अनुसरला. वाटेत त्यालाही गुहाचे राज्य लागले. गुह नजराणा घेऊन भरताच्या भेटीला आला; पण 'भरत रामाला अपाय करण्यासाठी तर इकडे आला नसेल ना' अशी त्याच्या मनात शंका होती. भरताशी थोडा वेळ बोलल्यावर गुहाची ती शंका दूर झाली. गुह त्याला म्हणाला. " अनायासे प्राप्त झालेले राज्य टाकून तू रामाला परत आणण्यासाठी जात आहेस; यामुळे जगात तुझी कीर्ती अजरामर होईल."

मग गुहाने त्याला नौकांतून सर्व मंडळीसह गंगेच्या पलीकडे पोचवले. भरद्वाजाच्या आश्रमात गेल्यावर त्याने वसिष्ठाला पुढे घातले. भरद्वाजाने त्या सर्वांचे स्वागत केले खरे; पण त्याच्याही मनात अशुभाची शंका होतीच. भरताला ती समजताच त्याचे डोळे भरून आले. तो दीन वाणीने म्हणाला.

" मुनिश्रेष्ठा, माझ्या मातेने माझ्यासाठी जे केले, ते मला मान्य नाही. मी रामाला परत आणण्यासाठी निघालो आहे. तुम्ही शंका सोडा आणि सांप्रत राम कुठे आहे, ते मला सांगा."

भरताच्या या बोलण्याला वसिष्ठाने दुजोरा दिला. मग भरद्वाजाने रामाचे वास्तव्य चित्रकूट पर्वतावर आहे असे, सांगून भरताच्या सर्व सैन्याला सुग्रास भोजन देऊन संतुष्ट केले.

भरत तिथून जो निघाला, तो चित्रकूट पर्वताच्या पायथ्याशी आला. सैन्याला तिथेच थांबवून त्याने सुमंत्रासह पर्वत चढायला सुरुवात केली.

त्याच वेळी राम सीतेसह पर्वतावर संचार करण्यास निघाला होता. लक्ष्मणही त्याच्या मागे होताच. तेवढ्यात रामाला धुळीचे लोट दिसू लागले आणि माणसांचा कोलाहल ऐकू येऊ लाग[ले.] तो लक्ष्मणाला म्हणाला. " तू जरा शोध घे बरे!" लगे[च] लक्ष्मण एका सालवृक्षावर चढला. तिथून त्याला भरताचे चतु[-]रंग सैन्य दिसले. तो म्हणाला. " रामभद्रा! सैन्यातल्या रथा[-]वर आपल्या कुलाचा कोविदार ध्वज फडकत आहे. तेव्हा [हे] सैन्य भरताचेच असले पाहिजे. तुला मारून राज्य निष्कं[टक] करण्यासाठी तो तुझ्यावर चालून येत असावा. तसे असेल त[र] त्याच्याशी लढून मी त्याचा वध करीन."

" छे! छे! भरताचा वध करून मी लोकापवादाला पा[त्र] ठरणार नाही. तो अधर्म होईल. अधर्माने मिळणारे अयोध्ये[चे] राज्यच काय, पण देवांचेही राज्य मला नको आहे. भरत इ[थे आला] असेल तर, त्याचा उद्देश चांगलाच असेल." रामाने म्हटले.

भरत रामाच्या पर्णशालेजवळ पोचला. जटा वाढ[लेला,] वल्कले नेसलेला राम दृष्टीस पडताच भरत त्याच्याकडे धाव[त] गेला. त्याने रामाला मिठीच मारली. त्याला अश्रूंचा पू[र] आवरेना. रामाने त्याचे सांत्वन करून त्याला विचारले. " [तू] इकडे आलास, पण वडील कुठे आहेत?" भरताने दशरथाच्[या] मृत्यूची वार्ता रामाला सांगितली. ती ऐकताच राम दुःखातु[र] झाला. तो सीतेकडे वळून म्हणाला. " तुझे पूज्य श्वशुर मृ[त्यू] पावले आहेत." थोडा वेळ सगळीच शोकसागरात बुडून गे[ली.] मग रामाने नदीवर जाऊन दशरथाला तिलांजली दिली व पि[ंड]दान केले. एवढे करून राम पर्णकुटीत परत आला.

एवढ्यात रामाच्या माता तिथे पोचल्या. सर्वांनी रामा[ला] अयोध्येस चलण्याबद्दल विनवले. भरत तर हट्टच धरून बसल[ा.] पण रामाने कोणाचेही ऐकले नाही. त्याने भरतालाच राज्[य] करण्यास सांगितले. भरताचा निरुपाय झाला. त्याने बरोब[र] आणलेल्या सोन्याच्या पादुका रामापुढे ठेवल्या व रामा[ला] त्यावर पाय ठेवण्यास सांगितले. रामाने तसे केले. भरताने त[्या] पादुका उचलून मस्तकी लावल्या आणि म्हटले.

" हे रामा, तुझ्या या पादुका पुढे ठेवूनच मी चौदा व[र्षे] राज्यकारभार चालवीन. तोवर मीही जटावल्कले धारण कर[ून] कंदमुळांवर जीव जगवीन. चौदा वर्षांनंतर तू जर परत आ[ला] नाहीस, तर मी अग्निप्रवेश करून प्राणत्याग करीन."

रामाने तसे वचन देऊन भरताला परत पाठविले. भर[त] सैन्यासह मागे फिरला. मात्र अयोध्येत न राहता त्याने अ[योध्येज]ळच्या नंदिग्रामी वास्तव्य केले. तिथे त्याने रामाच्या पादु[का] स्थापन केल्या आणि त्या पादुकांच्या वतीने तिथूनच तो अ[यो]ध्येचा राज्यकारभार करू लागला.

भरत परत गेल्यावर रामाने चित्रकूट पर्वत सोडला. त्या[ने] दंडकारण्यात जायचे ठरवले. तिथून निघाल्यावर वाटेत त्यां[ना]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अत्रिऋषीच्या आश्रमात मुक्काम केला. अत्री व त्याची भार्या अनसूया यांनी रामाचे यथोचित स्वागत केले. अनसूया सीतेला म्हणाली.

"जानकी, तुझी धर्मावर श्रद्धा आहे, ही भाग्याची गोष्ट होय. आपण राजकन्या आहो हा अहंकार न धरता, सर्व वैभवाचा त्याग करून तू वनात आलीस, हे फार चांगले केलेस. सीते, पती हेच स्त्रियांचे दैवत होय. तू आपल्या पतीची खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी हो; म्हणजे तुला यश व पुण्य लाभेल. मी तुला एक दिव्य माला व उटी देते. त्यांनी तुझ्या शरीराची शोभा आणि कांती कायम राहील."

अरण्यकांड – दुसऱ्या दिवशी राम तिथून पुढे निघाला. दंडकारण्यात प्रवेश केल्यावर त्याला तपस्वी मुनींचा आश्रमसमुदाय दिसला. त्या मुनींनी रामाचा आदरसत्कार केला. पुढच्या प्रवासात वाघाचे कातडे पांघरलेला एक धिप्पाड राक्षस रामापुढे उभा राहिला. त्याचे नाव विराध असे होते. त्याने सीतेला उचलले. थोड्या अंतरावर जाऊन तो म्हणाला. "अरे मनुष्यप्राण्यांनो, बरे सापडलात. मी आता तुम्हांला मारून तुमचे रक्त पिऊन टाकीन व या स्त्रीला माझी बायको बनवीन."

रामाला ती घटना अकल्पित होती. त्याने लगेच धनुष्याला दोरी जोडली आणि सात बाणांनी विराधाचे विंधान केले; पण तेवढ्याने त्याला काही झाले नाही. तो उलट रामावर चालून आला. दोघांचे थोडा वेळ युद्ध झाले. काही केल्या तो मरेना, असे पाहिल्यावर रामाने त्याला आडवे घातले व त्याच्या मानेवर पायाचा दाब देऊन लक्ष्मणाला म्हटले. "लक्ष्मणा, तू एक मोठा खड्डा खण. आपण याला त्या खड्डयात पुरून टाकू." तेव्हा विराध रामाला म्हणाला. "रामा, मी खराखुरा राक्षस नाही. माझे नाव तुंबरू आहे. मी एक गंधर्व असून, कुबेराच्या शापाने मला या राक्षसयोनीत पडावे लागले. रामाकडून वध झाल्यावर पुनश्च तुला गंधर्वरूप मिळेल, असा उःशाप मला कुबेराने दिला आहे. तेव्हा तू आता मला मारून टाक. म्हणजे पुनश्च मी गंधर्व होऊन स्वर्गात जाईन." मग रामाने विराधाचा वध करून त्याला खड्डयात टाकले.

पुढे तो शरभंग ऋषीच्या आश्रमात गेला. शरभंगाने रामाच्या दर्शनासाठीच देह धारण केला होता. त्याने रामाला आश्रम उभारायला योग्य अशी जागा सांगितली आणि स्वतः अग्निप्रवेश करून शरीराचा त्याग केला.

त्यानंतर राम पुढे निघाला. वाटेत त्याला पंचप्सर नावाचे एक सरोवर दिसले. ते चार योजने पसरलेले होते. त्याच्या काठी ऋषींचे अनेक आश्रम होते. ते स्थान रमणीय होते. रामाला वाटले, की आपण इथेच वास्तव्य करावे. राम त्या स्थानी वेगवेगळ्या ऋषींच्या आश्रमात दहा वर्षे राहिला. नंतर तो तिथून पुढे निघाला आणि कित्येक योजने वाटचाल करून अगस्त्याच्या आश्रमात गेला. रामदर्शनाने अगस्त्याला फार आनंद झाला. त्याने त्या तिघांचा यथोचित सत्कार केला व वैष्णव धनुष्य, ब्रह्मदत्त बाण व खड्ग ही स्वतःला इंद्राकडून मिळालेली आयुधे रामाला दिली. निरोप देताना रामाला त्याने सांगितले, की "आता तुम्ही पंचवटीत राहा."

पंचवटीला जाताना रामाला एक धिप्पाड गृध्र पक्षी भेटला. "तू कोण?" असे रामाने त्याला विचारले. तो म्हणाला. "मी तुझ्या पित्याचा मित्र आहे. माझे नाव जटायू. तुझी इच्छा असल्यास तू मला बरोबर घेऊन चल. मी तुझ्या आश्रमपरिसरात राहीन. तुम्ही दोघे बाहेर गेल्यावर मी सीतेचे रक्षण करीन." रामाने त्याचे म्हणणे मान्य केले. मग सर्व मंडळी गोदावरीच्या काठी असलेल्या पंचवटीच्या स्थानी आली. लक्ष्मणाने रामसीतेसाठी एक छानदार पर्णकुटी बांधली. तिथे त्यांचे वास्तव्य सुरू झाले.

रावणाची बहीण शूर्पणखा ही त्याच वनात राहत होती. एके दिवशी राम-लक्ष्मण बोलत बसले असता ती त्यांच्यासमोर आली. रामाचे मदनसुंदर रूप पाहिल्यावर तिला रामाविषयी आकर्षण वाटले. ती रामाला म्हणाली. "तू पत्नी म्हणून माझा स्वीकार कर." राम म्हणाला. "मी विवाहित आहे." शूर्पणखा बोलली. "मी तुझ्या या बायकोला आणि भावाला खाऊन टाकते, म्हणजे तुझा मार्ग मोकळा होईल." राम म्हणाला. "मला तसे करता येणार नाही. तुला लग्न करायचे असेल तर या माझ्या भावाशी कर." त्यावर ती लक्ष्मणाकडे गेली. पाठीमागून रामाने लक्ष्मणाला खूण केली. लक्ष्मणाने तलवार उपसली आणि तिचे नाक, कान छाटून टाकले. ती भेसूर ओरडली आणि तिथून पळत सुटली.

खर राक्षस हा तिचा भाऊ होता. त्याच्याकडे जाऊन ती म्हणाली. "राम-लक्ष्मणांनी माझी ही दशा करून टाकली. तू याचा सूड घे." खराने रामावर चौदा राक्षस पाठवले. रामाने त्या सर्वांचा संहार केला. मग त्याने आपल्या दूषण नावाच्या सेनापतीला चौदा हजार राक्षसांचे सैन्य ताबडतोब उभे करण्यास सांगितले. त्या सर्व सैन्यानिशी खराने रामावर चाल केली. पण रामाने त्या सर्व सैन्याचा फडशा पाडला आणि शेवटी ब्रह्मदत्त बाण सोडून खराचाही वध केला.

अशा प्रकारे खर-दूषणांचा अंत झाल्यावर शूर्पणखा रडत-ओरडत लंकेत गेली. रावण अमात्यांसमवेत सभेत बसला असताना ती त्याच्या समोर जाऊन उभी राहिली. तिने आपला सर्व वृत्तांत व चौदा हजार राक्षससैन्याचा विध्वंस रावणाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांगून त्याच्या बेफिकीर वृत्तीबद्दल त्याला दोष दिला. रावणाने तिला विचारले. "हा राम कोण ?" त्यावर तिने तो कोण, कुठला, ते सर्व कथन करून म्हटले. "रावणा, त्या रामाची बायको अत्यंत देखणी आहे. ती तुला भार्या म्हणून शोभून दिसेल. तू तिचे अपहरण कर." शूर्पणखेचे हे बोलणे ऐकून रावणाने राजसभा बरखास्त केली आणि तो सीताहरणाच्या तजविजीला लागला.

लगेच रथात बसून तो मारीचाच्या आश्रमात आला. त्याचा आश्रम समुद्राच्या पैलतीरावर होता. मारीच राक्षस जटावल्कले धारण करून त्या आश्रमात राहत होता. रावणाने त्याला म्हटले. "तू मायावी मृगाचे रूप धारण करून रामाच्या आश्रमाकडे जा. तुला पकडण्यासाठी रामलक्ष्मण आश्रमातून बाहेर जातील आणि मग एकट्या सीतेचे हरण करून मी तिला लंकेत घेऊन येईन."

मारीचाला रावणाचा हा बेत आवडला नाही. कारण यात त्याच्या जिवाला धोका होता आणि रामाचा पराक्रम त्याला ठाऊक होता. म्हणून रावणाला त्याच्या या दुष्ट हेतूपासून परावृत्त करण्यासाठी त्याने बरेच काही सांगून पाहिले. पण रावणाने त्याचे काहीएक ऐकले नाही. आणि त्याने मारीचाला आपल्या योजनेत सहभागी होण्यास भाग पाडले.

साधुवेषातील रावण सीतेजवळ भिक्षा मागत आहे– देवगडचे शिल्प

मारीचाने सुवर्णमृगाचे सुंदर मायावी रूप धारण केले व तो रामाच्या आश्रमापुढे येऊन चरू लागला. सीतेची त्याच्यावर नजर गेली. तिला त्या सुवर्णमृगाचा मोह पडला. ती रामाला जवळ बोलावून म्हणाली. "नाथ ! हा हरिण तुम्ही जिवंत पकडा. तो आपल्या अयोध्येच्या अंतःपुरात शोभून दिसेल. जिवंत न सापडल्यास त्याला मारा. मी त्याचे कातडे बसायला घेईन."

पण रामाला तो मृग खरा कोण आहे, ते कळले होते. तो सीतेला म्हणाला. "अग, हा मृग नसून मारीच राक्षस मृगाचे रूप घेऊन तुला भुलवायला आला आहे. पण तरीही तुझ्या इच्छेसाठी मी या मृगाला मारीन." लगेच राम लक्ष्मणाकडे वळून म्हणाला. "लक्ष्मणा, मी या मृगाच्या मागावर जातो. तू आश्रमात सीतेचे रक्षण कर." असे म्हणून राम धनुष्य-बाण घेऊन त्या मायामृगाच्या मागे गेला. त्या मृगाने रामाला खूप हुलकावण्या दाखवल्या व त्याला आश्रमापासून खूप दूर नेले. मग तो बाणाच्या टप्प्यात आला असे पाहून रामाने त्याच्यावर बाण सोडला. तो मारीचाच्या मर्मस्थानी घुसला. पण मरता मरता रामाचे शक्य तेवढे वाईट करावे म्हणून रामाच्या आवाजासारखा आवाज काढून तो ओरडला. "हा सीते ! हा लक्ष्मणा !!" आणि मग दुसऱ्याच क्षणी तो मरून पडला.

तो शब्द सीतेच्या कानी पडला. ती लक्ष्मणाला म्हणाली. "भाऊजी, धावत जा आणि आर्यपुत्रांची काय हकीकत आहे, ते पाहा." पण लक्ष्मण जागचा हालेना. कारण सीतेचे रक्षण करण्याची जबाबदारी रामाने त्याच्यावर सोपविली होती. लक्ष्मणाचा हा धीमेपणा सीतेला आवडला नाही. ती त्याच्यावर रागावली आणि त्याला हवे तसे टाकून बोलली. "भाऊजी, तुम्ही माझ्या पतीचे बंधू नसून वैरी आहा. तुम्हांला माझ्याविषयी अभिलाषा आहे. माझे पती मृत झाल्याने तुमची ही अभिलाषा साध्य होणार आहे."

तिचे हे विषारी शब्द लक्ष्मणाला वर्मी झोंबले. 'आता वनदेवताच तुझे रक्षण करोत' असे म्हणून लक्ष्मण रामाच्या दिशेने निघून गेला.

पाठोपाठ साधूचा वेष घेतलेला रावण तिथे येऊन दाखल झाला. सीतेला त्याचे कपट कळले नाही. तो खरा साधू आहे, अशा कल्पनेने तिने त्याचे स्वागत केले आणि आपला परिचयही करून दिला. मग ती रावणाला म्हणाली. "आता तुमचे नाव, कुळ मला सांगा !" त्यावर रावण तिला म्हणाला. "सीते, लंकाधिपती रावण तो मीच. तुझ्यावर माझे मन जडले आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मी तुला लंकेत नेईन व तुला माझी बायको करीन." त्याचे हे उद्धट उत्तर ऐकून सीता संतप्त झाली. तिने त्याची खूप निर्भर्त्सना केली. पण रावणाने तिची पर्वा न करता आपले मूळ रूप धारण करून सीतेला अलगद उचलले. त्याने आपला

सीताहरण – एक कोरीव शिल्प

गाढवे जोडलेला रथ जवळच आणून ठेवला होता. तो रथ विमाना-प्रमाणे आकाशमार्गे चालत असे. सीतेला त्या रथात घालून तो लंकेकडे जाण्यास निघाला.

सीता रामाच्या नावाने आक्रोश करू लागली. जटायू जवळच होता. त्याने हे दृश्य पाहिले. तत्काळ त्याने रावणाच्या रथावर झेप घेतली. रावणाचे व जटायूचे घोर युद्ध झाले. पण जटायूला रावणाने रक्तबंबाळ करून खाली पाडले व तो आकाशमार्गाने पुढे निघाला. आता आपला तरणोपाय नाही, असे दिसताच सीतेने आपल्या अंगावरची भूषणे उत्तरीय वस्त्रात गुंडाळली व एका पर्वतावर बसलेल्या पाच वानरांकडे टाकून दिली. हे वानर तरी रामाला हे गाठोडे देऊन आपल्या अपहरणाची वार्ता रामाला सांगतील, असे तिला वाटले. थोड्याच वेळात रावण सीतेला घेऊन लंकेत गेला. त्याने तिला आपल्या अंतःपुरात ठेवून दिली. तो रोज तिची मनधरणी करू लागला. "सीते, माझी लंका जशी समृद्ध आहे तशीच अजिंक्य आहे. तू माझा स्वीकार कर आणि या सर्व वैभवाची स्वामिनी हो." ते ऐकून सीतेने त्याचा धिक्कार केला. ती म्हणाली.

"सत्यवचनी राम हा माझा पती असून, तेच माझे दैवत आहे. मी तुझा स्वीकार करून माझ्या नावाला कलंक लावून घेणार नाही. रावणा, तू देव-दैत्यांना अवध्य असशील; पण माझा पती तुझा खात्रीने वध करील."

सीता कशाही प्रकारे बधत नाही, असे पाहिल्यावर रावण संतापून तिला म्हणाला. "हे हट्टी स्त्रिये, मी तुझी एक वर्ष वाट पाहीन. तेवढ्यात तू जर मला वश झाली नाहीस, तर एके दिवशी सकाळच्या न्याहारीसाठी तुझ्या देहाचे तुकडे तुकडे करून मी तुला खाऊन टाकीन."

मग त्याने सीतेला अशोकवनात नेऊन ठेवले व तिच्यावर अकाळ-विकाळ राक्षसींचा जागता पहारा ठेवला.

इकडे राम आपल्या पर्णकुटीत येतो, तो त्याला सीता तिथे दिसली नाही. काहीतरी घात झाला आहे, असे रामाला वाटले. तो लक्ष्मणाचा हात पकडून म्हणाला. "सीतेला एकटीला टाकून तू माझ्या मागे आलास, हे बरे केले नाहीस." मग राम सीतेला शोधीत इकडे तिकडे हिंडू लागला. एखाद्या भ्रमिष्टासारखी त्याची अवस्था झाली. लक्ष्मणाने त्याचे सांत्वन करण्याचा खूप प्रयत्न केला; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. पुढे जाता जाता काही हरिणे त्याला दिसली. तेव्हा रामाने त्यांनाच विचा-रले, की "माझी सीता कुठे आहे?" त्या मुक्या प्राण्यांना काही सांगायचे होते म्हणून त्यांनी दक्षिणेकडे तोंड केले. तो संकेत लक्ष्मणाने ओळखला. तो म्हणाला. "दादा, ज्या अर्थी ही हरिणे दक्षिणेकडे तोंड करून उभी आहेत, त्या अर्थी सीता याच दिशेला गेली असावी. तेव्हा आपणही त्याच दिशेने जाऊन तिचा शोध करू." राम-लक्ष्मण दक्षिणेकडे जाऊ लागले. वाटेत त्यांना रावणाचा मोडून पडलेला रथ दिसला. त्यावरून रामाला वाटले, की सीता स्वतःच्या पायाने गेली नाही, तर तिला कुणीतरी पळवून नेले आहे. थोडे पुढे गेल्यावर रक्ताने सर्वांग माखून अस्ताव्यस्त पडलेला जटायू त्याला दिसला. रामाला वाटले, की या गिधाडानेच सीतेला खाऊन टाकले. राम त्याच्यावर धावून गेला. त्यावर जटायूने क्षीण आवाजात त्याला म्हटले. "रामा, माझ्यावर का खवळतोस? सीतेला रावणाने चोरून नेले आहे. तिला सोडविण्यासाठी मी लढलो आणि त्याने माझी अशी दशा करून टाकली." मग जटायूने सर्व हकीकत रामाला सांगितली आणि प्राण सोडला. आपल्या बापाचा मित्र म्हणून रामाने जटायूची सर्व अंत्यक्रिया केली व तो पुढे निघाला.

पुढच्या मार्गात त्याला कबंध नावाचा एक राक्षस भेटला. त्याला शिर नव्हते, तर नुसते धडच होते. त्याचे बाहू खूपच लांब होते. त्याने ते बाहू पसरून राम-लक्ष्मणांना पकडले. त्याचे ते दोन्ही हात तोडून राम-लक्ष्मणांनी आपली सुटका करून घेतली. रामाच्या हातून मरत असता तो रामाला म्हणाला. "हे रामा, मी दनूचा पुत्र आहे. माझे पूर्वीचे रूप त्रैलोक्यात प्रसिद्ध होते; पण राक्षसरूप घेऊन मी ऋषींना त्रास देऊ लागल्यामुळे स्थूल-शिरा नावाच्या ऋषीने शाप देऊन मला हे विचित्र रूप प्राप्त करून दिले. तो ऋषी पुढे म्हणाला, की "रामाच्या हातून तू मृत्यू पावशील, तेव्हा तुझे पूर्वरूप तुला मिळेल."

मग रामाने त्याला मारले आणि त्याच्या देहाला अग्नी दिला. त्या अग्नीतून एक दिव्य पुरुष प्रकट झाला. त्याने रामाला सांगि-तले. "तू पंपा सरोवराकडे जा. तिथल्या ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव नावाचा वानरराज वास्तव्य करतो. त्याच्याशी तू सख्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कर. तो तुला सीतेच्या शोधासाठी मदत करील." असे म्हणून तो दिव्य पुरुष विमानात बसून निघून गेला. मग राम-लक्ष्मण पंपा सरोवराच्या मार्गाला लागले.

वाटेत त्यांना शबरीचा आश्रम लागला. शबरी रामाचीच वाट पाहात तिथे राहिली होती. तिने रामाचे उत्तम स्वागत केले आणि रानातली फळे-मुळे त्याला अर्पण केली. मग तिने रामासमक्षच अग्निप्रवेश केला आणि ती दिव्य लोकाला गेली.

पुढे राम-लक्ष्मण पंपा सरोवराजवळ प्राप्त झाले. ऋष्यमूक पर्वतावर बसलेल्या सुग्रीवाने त्यांना दुरून पाहिले. वाली हा सुग्रीवाचा वंधु होता आणि त्याने किष्किंधेचे राज्य सुग्रीवाकडून बळकावून घेऊन सुग्रीवाला किष्किंधेतून हाकलून दिले होते. सुग्रीवाची पत्नी रुमा हिलाही त्याने बळजबरीने आपल्या अंतःपुरात खेचले होते. सुग्रीव त्या दिवसापासून ऋष्यमूक पर्वतावर राहिला होता आणि तिथेही भयभीतपणेच दिवस घालवीत होता.

राम-लक्ष्मणांना पाहताच सुग्रीवाला वाटले, की हे दोघे तरुण वीर वालीनेच आपल्याला मारण्यासाठी पाठविले असावे. शंका निरसन करण्यासाठी त्याने हनुमंताला खाली पाठविले. तो तापसवेषाने राम-लक्ष्मणांकडे आला. त्याने म्हटले. " मी वायुपुत्र हनुमान असून, सुग्रीवाने मला तुमच्या चौकशीसाठी इकडे पाठविले आहे." त्यावर लक्ष्मणाने हनुमंताला रामाचा सर्व वृत्तांत सांगितला. तो ऐकून हनुमान म्हणाला. " तुम्ही सुग्रीवाकडे चला. तो तुम्हांला सीतेच्या शोधाच्या कामी मदत करील."

मग हनुमान त्या दोघांना घेऊन सुग्रीवाकडे गेला. त्याने सुग्रीवाचा संशय दूर केला. मग अग्नी पेटवून त्याच्या साक्षीने त्याने राम-सुग्रीवांचे सख्य घडवून आणले. सुग्रीव रामाला म्हणाला.

" तू वालीच्या भयापासून माझे रक्षण कर. मी सीतेला शोधण्यासाठी तुला सर्व प्रकारे मदत करीन. काही दिवसांपूर्वी एक राक्षस एका स्त्रीला आकाशमार्गे पळवून नेत असल्याचे आम्ही पाहिले होते. ती खात्रीने सीताच असावी. तिने उत्तरीय वस्त्रात बांधून अलंकारांची एक पुरचुंडी खाली टाकली होती. ती आम्ही जपून ठेवली आहे. मी तुला ती दाखवतो."

असे म्हणून सुग्रीवाने गुहेत ठेवलेली ती पुरचुंडी राम-लक्ष्मणांपुढे आणून उलगडली, तेव्हा राम लक्ष्मणाला म्हणाला. " ही वस्त्रभूषणे सीतेचीच दिसत आहेत. खात्री करून घे." लक्ष्मणाने ते सर्व अलंकार पाहिले. तो म्हणाला. " ही बाहुभूषणे माझ्या ओळखीची नाहीत; पण नित्य सीतेला नमस्कार करीत असल्यामुळे मी तिच्या पायांतली नुपूरे तेवढी ओळखतो." त्यावर रामाने म्हटले. " मित्रा सुग्रीवा, त्या दुष्ट राक्षसाने माझ्या प्रियेला कुठे पळवून नेले व तो कुठे राहतो, ते मला सांग. मी खात्रीने त्याला यमसदनाला पाठवीन." रामाची ती शोकाकुल अवस्था पाहून सुग्रीव गहिवरला. तो म्हणाला. " रामा, तो राक्षस कुठे राह… ते मला ठाऊक नाही. पण माझे वानर सैनिक तुझ्या सी… निश्चित शोधून काढतील. तू धीर धर !"

रामाचे सुग्रीवाला अभयदान— देवगढचे शिल्पकाम

ते आश्वासन ऐकून रामाला बरे वाटले. तो म्हणाला. "सी… शोध नंतर. त्याआधी तुझा शत्रू जो वाली, त्याचा मी वध… टाकतो." पण सुग्रीव होकार देईना. लक्ष्मणाने विचा… सुग्रीवा, तू असा दुर्मुखलेला का? सुग्रीवाने म्हटले. "वाली… पराक्रमी आहे. त्याला मारणे रामाला कितपत जमेल… मला शंका वाटते." लक्ष्मणाने विचारले. " रामाने काय… म्हणजे तुझी खात्री पटेल ?" सुग्रीव म्हणाला. " पलिकडे ते… सात सालवृक्ष ओळीने दिसतात. वाली त्यांच्या जवळून गेला… त्यांची पाने झडून जातात. रामाने त्यांतला एक वृक्ष… बाणाने खाली पाडला, तरी मला त्याच्या पराक्रमाची… पटेल. तसेच या बाजूला अस्थींचा एक ढिगारा दिसतो… रामाने पायाने उचलून दोनशे धनुष्ये लांब फेकावा."

राम त्या कामी सज्ज झाला. त्याने एकाच बाणात ते… सालवृक्ष आडवे घातले आणि अस्थींचा ढीग पायाच्या… अंगठ्याने दहा योजने दूर फेकून दिला. ते पाहून सुग्री… खात्री पटली. त्याने रामाला कडकडून मिठी मारली.

नंतर ते सर्व मिळून किष्किंधानगरीकडे गेले. सुग्रीवाने… गर्जना करून वालीला युद्धाचे आव्हान दिले. राम-लक्ष्मण… झाडाआड लपले. वाली खवळून बाहेर आला. त्या दो… भीषण युद्ध सुरू झाले. त्यात सुग्रीवाचा पराभव झाला आणि… जीव घेऊन पळत सुटला. राम-लक्ष्मण त्याच्या मागे गेले. रा… पाहून सुग्रीव म्हणाला. " रामा, हे तू काय केलेस? मी वा… मारणार नाही असे आधीच सांगितले असतेस, तर मी वा…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खोडी काढलीच नसती." त्यावर राम म्हणाला. "तुम्ही दोघे इतके सारखे दिसत होता, की तुमच्यांतला वाली कोण व सुग्रीव कोण हे मला ओळखताच येईना. म्हणून मी स्तब्ध बसलो. आता आपण एक युक्ती करू. लक्ष्मणा, तू या गजपुष्प वेलीची माळ करून ती सुग्रीवाच्या गळ्यात घाल म्हणजे मला सुग्रीव ओळखणे सोपे जाईल." लक्ष्मणाने तसे केले. मग ती सर्व मंडळी पुनश्च किष्किंधेजवळ आली. सुग्रीवाने वालीला पुनः आव्हान दिले. वाली फुंफाटत पुढे आला. दोघांचे पुनश्च युद्ध जुंपले. थोड्याच वेळात सुग्रीवाची शक्ती मंद होत चालली. झाडाआड लपून राहिलेला राम ते पाहून सावध झाला. त्याने एक तीक्ष्ण बाण नेम धरून वालीच्या वक्षःस्थळावर मारला. त्या बाणाने आपले काम केले. वाली घायाळ होऊन जमिनीवर पडला. राम झाडाआडून पुढे आला. त्याला पाहून मरणोन्मुख वाली कठोर शब्दांत त्याला म्हणाला. " रामा, तू जटा-वल्कले धारण केली आहेस, मग अधर्माने तू माझा वध का केलास ? दशरथासारख्या महात्म्याच्या पोटी तू पापी पुत्र कसा जन्माला आलास !" त्यावर रामही तितक्याच कठोर वाणीने बोलला.

"सुग्रीव हा माझा मित्र आहे. तो तुझा धाकटा भाऊ आहे. असे असता त्याच्या भार्येचा तू अपहार केलास. सुग्रीवाशी मी सख्य केले आहे. शिवाय त्याला भार्या व राज्य प्राप्त करून देण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. म्हणूनच मला तुझा वध करणे प्राप्त झाले. मृगयेतला मृगवध दोषास्पद नाही, असे धर्मवेत्ते सांगतात. तू शाखामृग आहेस; म्हणून तुझ्या वधाचे पाप मला लागणार नाही."

त्यावर वालीचा संताप कमी झाला. त्याने कटू भाषणाबद्दल रामाची क्षमा मागून त्याला म्हटले. " मला माझ्या मृत्यूबद्दल काही वाटत नाही. मला माझ्या मुलाची म्हणजे अंगदाची तेवढी काळजी वाटते. तेव्हा माझ्या मागे तू अंगदाची नीट व्यवस्था लाव." त्यावर रामाने वालीला आश्वासन दिले, की " सर्व काही ठीक होईल."

मग वालीने प्राणत्याग केला. पती मृत झालेला पाहून त्याची पत्नी तारा हिने आक्रोश मांडला. ती रामाला म्हणाली. "रामा, माझ्या पतीला मारलास तसा एक बाण मला मार. म्हणजे मी स्वर्गलोकी माझ्या पतीच्या भेटीस जाईन." रामाने तिचे सांत्वन केले व सुग्रीवाकडून वालीची अंत्यक्रिया करवली. राम सुग्रीवाला म्हणाला. " तू किष्किंधेत जाऊन स्वतःला अभिषेक करवून घे. अंगदाला यौवराज्याचा अभिषेक कर. मी पावसाळ्याचे चार महिने इथल्या पर्वताच्या गुहेत राहीन. त्यानंतर तू सीतेला शोधण्याचा प्रयत्न कर."

पुढे पावसाळा संपून शरद ऋतू सुरू झाला. मग हनुमंताने सुग्रीवाला मित्रकार्याची जाणीव दिली. सुग्रीवाने नील नावाच्या वानराला सर्व सैन्य एकत्र करण्याची आज्ञा केली.

पण राम-लक्ष्मणांना तो अशी काही तयारी करीत आहे याची कल्पना आली नव्हती. त्यांना असे वाटले, की सुग्रीव दिलेल्या वचनाची टाळाटाळ करीत आहे. म्हणून रामाने सुग्रीवाला त्या गोष्टीची जाणीव देण्यासाठी लक्ष्मणाला त्याच्याकडे पाठविले. लक्ष्मण क्रोधाच्या भरातच सुग्रीवाकडे पोचला; पण तारेने त्याचे सांत्वन करून सुग्रीव सीताशुद्धीची काय काय तयारी करीत आहे, हे त्याला सांगितले. लक्ष्मण शांत होऊन रामाकडे आला. पाठोपाठ सुग्रीवही पालखीत बसून रामाच्या भेटीस आला. राम-सुग्रीवांची भेट झाली. दोघांनी मैत्रीपूर्ण वातावरणात पुढील कार्याची रूपरेषा आखली.

मग सुग्रीवाने चार दिशांना चार वानरवीर वानरसैन्याच्या तुकडीसह रवाना केले. त्यांत हनुमान दक्षिण दिशेला गेला. थोड्याच कालात पूर्व, पश्चिम व उत्तर या दिशांना गेलेले वीर



मारुतीला सीतादर्शन – एक शिल्प

परत आले आणि त्यांनी आपल्याला सीतेचा शोध लागला नाही, असे सुग्रीवाला सांगितले.

दक्षिण दिशेला गेलेला हनुमान मात्र परत आला नाही. तो अंगदासह पुढे जात असता ऋक्षबिल नावाचे एक विवर त्याला दिसले. त्या विवरातून भिजलेले जलपक्षी बाहेर येत असलेले वानरांनी पाहिले. ते सर्व वानर तहानेने व्याकुळ झालेले होते. म्हणून त्यांनी त्या विवरात प्रवेश केला. एक योजन ते पुढे पुढे गेले. नंतर त्यांना त्या विवरात स्वयंप्रभा नावाची एक कन्या दिसली. वानरांनी तिची विचारपूस केल्यावर ती त्यांना म्हणाली. ' मी या स्थळाचे रक्षण करीत आहे. तुम्ही तहानलेले, भुकेलेले दिसता; तेव्हा तुम्ही इथल्या वनातील भरपूर फळे खा. इथल्या सरोवराचे भरपूर पाणी प्या. " वानरांनी तिच्या आज्ञेप्रमाणे तहान-भूक शमविली. त्या कन्येच्या साहाय्यानेच ते त्या विवराच्या बाहेर आले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इतके फिरूनही त्यांना सीतेचा शोध लागला नव्हता आणि सुग्रीवाने दिलेली मुदत टळून गेली होती. आता आपण परत गेलो तर सुग्रीव आपणांस ठार करील, असे त्या वानरांना वाटले. म्हणून ते समुद्रतीरावरच्या एका पर्वतावर प्रायोपवेशनास बसले. तिथे संपाती नावाचा एक गृध्र राहत होता. तो जटायूचा बंधू होता. त्याचे पंख गळून गेल्यामुळे त्याला कुठे हालता येत नव्हते. वानरांकडून त्याला जटायूची हकीकत कळली. बंधूच्या मृत्यूचे त्याला फार दुःख झाले. त्याने वानरांना रावणाचा ठावठिकाणा सांगितला. त्याची लंका कुठे व कशी आहे तेही सांगितले. तो म्हणाला. ' तुमच्यापैकी कुणी समुद्र उल्लंघून लंकेत जाईल, तर त्याला सीतेचा शोध निश्चित लागेल."

ते काम हनुमंताने आपल्या अंगावर घेतले. उड्डाण करण्यासाठी तो महेंद्र पर्वताच्या शिखरावर चढला. त्याने तिथून लंकेकडे झेप घेतली. वाटेत त्याला सुरसा नावाच्या नागमातेने राक्षसरूप घेऊन अडवले. ती हनुमंताला म्हणाली. " शिर माझ्या उघड्या जबड्यात; आणि चटकन बाहेर ये." हनुमंत तिला म्हणाला. " मी मावेन एवढा तुझा जबडा मोठा कर. " सुरसेने जबडा मोठा केला. हनुमंताने लघुरूप घेऊन तिच्या जबड्यात प्रवेश केला आणि तिने जबडा मिटायच्या आतच तो बाहेर पडला. पुढे सिंहिका नावाच्या राक्षसीने मारुतीला अडवले. अक्राळ विक्राळ जबडा पसरून ती त्याला खायला आली. मारुती हळूच तिच्या पोटात शिरला आणि तिचे पोट विदारून बाहेर आला. सिंहिका मरून समुद्रात कोसळली. पुढचे त्याचे उड्डाण निर्विघ्न पार पडले व तो रावणाच्या लंकेत सुखरूप उतरला.

सकृद्दर्शनीच लंका त्याला सुशोभित आणि वैभवशाली दिसली. तिचे अवलोकन करीत त्याने दिवस मावळू दिला व रात्री सूक्ष्म रूप धारण करून तो लंकेच्या अंतर्भागात प्रवेशला. जाता जाता तो रावणाच्या राजवाड्यापाशी पोचला. तो वाडा सोन्याचा होता. त्यातला रावणाचा महाल हिऱ्या-मोत्यांनी शृंगारलेला होता. रावणाचे अंतःपुर तर संपूर्ण रत्नखचितच होते. त्यातल्या एका सुशोभित पलंगावर रावण गाढ झोपला होता. जवळच्या एका पलंगावर एक लावण्यवती स्त्री झोपी गेली होती. ती नखशिखांत दागिन्यांनी मढली होती. हनुमंताने सीतेला पूर्वी कधी पाहिले नसल्याने त्याला वाटले, की हीच सीता असावी; पण लगेच त्याचा विचार बदलला. तो स्वतःशीच म्हणाला. " छेः ! ही सीता असणेच शक्य नाही. कुलस्त्रीला परपुरुषाच्या अंतःपुरात अशी निवांत झोप कशी येईल ! " मग तो इकडे तिकडे हिंडून सीतेचा शोध घेऊ लागला. शेवटी अशोकवनात सीता त्याला दिसली. ती मलिनवस्त्र व मलिनमुख होती. ती रामाचे स्मरण करीत होती व मधून मधून विलापही करीत होती. पूर्ण खात्री करून घेण्यासाठी मारुती एका झाडावर लपून बस[ला] आणि निरीक्षण करू लागला.

रावणं सीतेला धमकी देतो– नालंदा येथील चित्रांक[न]

एवढ्यात उत्तर रात्री रावण तिच्याकडे आला व ति[...] आपलीशी करण्याबद्दल धाकधपटशा दाखवू लागला. मार[...] ते ऐकले व सीतेने केलेली त्याची निर्भर्त्सनाही ऐकली. नि[...] होऊन रावण अशोकवनातून परत फिरला. सीतेला आ[...] असह्य होत होते. त्यामुळे तिला एकदम रडूच कोसळले.

त्यावरून मारुतीची खात्री पटली, की सीता ती हीच. [...] पुढे जाण्यास हीच वेळ योग्य आहे, असे जाणून मारुती [...] वरून उतरून तिच्या पुढे उभा राहिला. त्याने तिला नम[...] करून विचारले. " रामपत्नी सीता ती तूच ना ? " सीतेने [...] म्हटले. त्यावर मारुतीने आपण रामदूत असल्याचे सां[...] सीतेचा त्याच्यावर चटकन विश्वासच बसेना. त्यावर मा[...] रामाची नाव कोरलेली अंगठी तिच्या हाती देऊन [...] आपली ओळख पटवली. ती अंगठी पाहून सीतेला [...] राम भेटल्याचा आनंद झाला. मारुतीने तिला सांगित[ले] " लवकरच राम प्रचंड वानरसेना बरोबर घेऊन इथे [...] रावणाला मारील आणि तुझी सुटका करील. " तो आ[...] म्हणाला. " तुला जर इथे राहणे दुःसह होत असेल तर तू [...] पाठुंगळी बैस. मी तुला आत्ताच्या आत्ता रामाकडे घेऊन [...] पण सीतेने त्या गोष्टींना नकार दिला. ती म्हणाली. "[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पतीने इथे येऊन व रावणाचा वध करून मला सोडवावे हेच त्याच्या पराक्रमाला भूषणावह होईल." मारुती 'ठीक आहे'

अशोकवनात सीता व हनुमान—संथकुलंगर येथील इ. स. च्या १४ व्या शतकातील कोरीवकाम

असे म्हणाला. त्याने तिच्याकडे काही खूण मागितली. सीतेने पदराला बांधून ठेवलेले एक दिव्य शिरोरत्न मारुतीच्या स्वाधीन केले. सीतेला प्रणाम करून तो परत जाण्यास निघाला; तेव्हा सीता त्याला म्हणाली. "तू एक दिवस आणखी थांबलास, तर मला तेवढेच बरे वाटेल." मारुतीने तिचे म्हणणे मान्य केले.

मग त्याने विचार केला, की पुढे युद्धाचा प्रसंग ओढवलाच तर शत्रूचे बलाबल आत्ताच एकवार अजमावून ठेवावे. त्याच्या अवतीभोवती अशोकवन पसरले होते व ते फलपुष्पांनी समृद्ध होते. या वनाचा विध्वंस केला, तर सारे राक्षससैन्य आपल्यावर धावून येईल व मग त्या राक्षसांना आपल्या पराक्रमाची चुणूक दाखवता येईल.

लगेच हनुमंताने ती कल्पना अंमलात आणली. तो अशोकवनाचा विध्वंस करीत सुटला. रक्षक राक्षसांनी ही वार्ता रावणाला सांगितली. रावणाने त्याच्यावर राक्षसांचे सैन्य पाठविले. मारुतीने त्या सगळ्या राक्षसांचा फडशा पाडला. रावणाने आपला पुत्र इंद्रजित याला मारुतीवर चाल करण्यास सांगितले. तो आला. त्या दोघांचे भयानक द्वंद्वयुद्ध झाले. कोणीच कोणाला हार जाईना. मग इंद्रजिताने मारुतीवर ब्रह्मास्त्र सोडले. त्याने मात्र मारुती बांधला गेला. राक्षसांनी त्याला रावणापुढे नेऊन उभे केले. मारुतीने रावणाला आपली ओळख सांगितली व म्हटले. "शहाणा असशील तर सीतेला रामाकडे परत पाठव. अन्यथा तुझी धडगत नाही."

मारुतीच्या या बोलण्यावर रावण संतप्त झाला व त्याने मारुतीचे शेपूट जाळून टाकण्याची आपल्या सेवकांना आज्ञा दिली. सेवकांनी त्याच्या शेपटीला वस्त्र लपेटून ते पेटवून दिले. पण त्याचा परिणाम उलटाच झाला. त्या जळत्या शेपटीने मारुतीने साऱ्या लंकेलाच आग लावून दिली. लंका चहूबाजूंनी दग्ध केल्यावर समुद्राच्या पाण्यात त्याने आपले जळते शेपूट विझवून टाकले. मग सीतेचा निरोप घेऊन त्याने पुनश्च समुद्र उल्लंघला व तो रामाकडे आला. सीतेचे शिरोरत्न रामाच्या हवाली करून त्याने आपण सीतेचा शोध लावल्याची सर्वांना खात्री पटवली.

रामाने मारुतीला प्रेमभराने घट्ट आलिंगन दिले. मग तो सुग्रीवाला म्हणाला. "सीतेचा शोध लागला हे खरे, पण मधला दुस्तर सागर पार करून लंकेला कसे जायचे?" त्यावर सुग्रीवाने रामाला सेतू बांधण्याची सूचना केली. मग एका विजयमुहूर्तावर राम, लक्ष्मण, सुग्रीव व सगळे वानरवीर समुद्राच्या दिशेने निघाले. अनेक पर्वत, नद्या व अरण्ये ओलांडून ते दक्षिण समुद्राच्या तीरावर येऊन ठेपले.



हनुमानाच्या शेपटीला आग – एक शिल्प

राम, लक्ष्मण, सुग्रीव व वानरसैन्य लंकेवर स्वारी करण्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी समुद्राच्या पैलतीरावर येऊन थडकले असल्याचे रावणाला समजले. त्यामुळे तोही थोडा गांगरला. त्याने दरबार भरवून पुढे काय करावे याबाबत सेनापती व इतर अधिकारी यांचा सल्ला घेतला. सर्वांनीच त्याला युद्धाचा सल्ला दिला. बिभीषणाने मात्र वेगळा विचार सांगितला. तो म्हणाला. " राजा, तू रामाची पत्नी सीता पळवून आणलीस, हे अनुचित केले आहेस. ही घटना लंकेचा सर्वनाश घडवून आणील. तो जर तुला टाळायचा असेल, तर तू सीतेला रामाकडे परत पाठवून दे. "

पण बिभीषणाचा हा सुविचार रावणाला रुचला नाही. त्याने रामाशी युद्ध करण्याचाच निर्णय घेतला.

बिभीषणाने त्याबाबत रावणाची निर्भर्त्सना केली व तो लंका सोडून रामपक्षाला मिळण्यासाठी रामाकडे आला. रामाच्या चरणांना स्पर्श करून त्याने रामाला म्हटले. " लंका, मित्र व संपत्ती या सर्वांचा त्याग करून मी तुझ्याकडे आलो आहे. आता माझे भवितव्य तुझ्यावर अवलंबून आहे." बिभीषणाचे मनोगत व त्याचा सच्चेपणा लक्षात घेऊन रामाने त्याला सांगितले. " मी रावणाचा वध करून लंकेचे राज्य तुला देईन. " एवढे बोलूनच राम थांबला नाही, तर त्याने लक्ष्मणाकडून समुद्राचे उदक आणवून बिभीषणाला तिथल्या तिथे अभिषेक केला.

मग रामाने तीन रात्री समुद्रतीरी शयन करून समुद्राने आपल्याला मार्ग द्यावा म्हणून त्याची आराधना केली. पण समुद्राने त्याला दाद दिली नाही. शेवटी राम समुद्रावर खवळला. समुद्राला शासन करण्याचे ठरवून त्याने ब्रह्मास्त्राचे अभिमंत्रण केले. ते पाहून समुद्र घाबरला व पुरुषरूप घेऊन रामाला शरण आला. तो म्हणाला. " रामा, तू नल नामक वानराकडून माझ्यावर सेतू बांधून घे. तो मी धारण करीन व तुला ससैन्य लंकेत जाऊ देईन. "

असे म्हणून समुद्र गुप्त झाला. रामाने नलाला सेतू बांधण्याची आज्ञा दिली. त्याने ते काम पुरे केले. राम वानरसेनेसह समुद्र उल्लंघून लंकेच्या परिसरात दाखल झाला. तिथे त्याने सुवेल पर्वताजवळ आपला तळ ठोकला.

रावणाला ही वार्ता समजली. त्याने गुप्त हेरांकरवी रामाच्या सैन्याची माहिती काढली. मग रावणाने एक वेगळाच पण अघटित विचार केला. रावणाला अनेक माया अवगत होत्या. त्याने रामाचे हुबेहुब शिर व धनुष्य तयार केले व ते घेऊन तो अशोकवनात सीतेकडे गेला. त्याने सीतेला म्हटले. " पाहा माझा पराक्रम. माझ्या एका राक्षसाने रामाचे मस्तक तोडले. तू प्रत्यक्षच बघ. आणि हे त्याचे धनुष्य ! आता तरी तू मला वश हो आणि पती म्हणून माझा स्वीकार कर. यापुढे तुला अन्य तरणोपाय नाही. "

सीतेने ते धडावेगळे मस्तक पाहिले. तिला त्यात कसली शंका वाटली नाही. आपला सर्वनाश झाला या जाणिवेने तिला एकदम मूर्च्छा आली. थोड्या वेळाने सावध झाल्यावर रामा ते मस्तक उराशी धरून ती विलाप करू लागली. नंतर ती

बिभीषणाला राज्याभिषेक

रावणाला म्हणाली. " मी हे जवळ घेऊन सती जाणार आहे. मला तू अडथळा करू नको. "

एवढ्यात रावणाला त्याच्या सेनापतीचे बोलावणे आले. लगेच निघून गेला. पाठोपाठ बिभीषणाची पत्नी सरमा सीते जवळ येऊन तिला म्हणाली. " सीते, ही सर्व रावणाची आहे. तुझा राम सुखरूप आहे. मी बित्तंबातमी काढून आ आहे. तू मुळीच शोक करू नकोस. " ते ऐकून सीतेचे सुस्थित झाले.

मग उभय पक्षांनी आपापली युद्धसिद्धता केली. थोड्या वेळात रामाच्या आज्ञेने लंकेला वानरसैन्याचा वेढा प प्रत्यक्ष युद्धाला तोंड लागण्यापूर्वी शिष्टाई करण्यासाठी रा वालीपुत्र अंगदाला रावणाकडे पाठवले. अंगद रावणापुढे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राहिला. त्याने म्हटले. " सीतेला मुक्त कर आणि मला शरण ये, अन्यथा सर्व राक्षसांसह मी तुझा संहार करीन, असा रामाचा तुला संदेश आहे." तो संदेश ऐकताच रावण प्रक्षुब्ध झाला. त्याने अंगदाला ठार करण्याची सेवकांना आज्ञा दिली; पण अंगद आकाशमार्गे उडाला व रामसैन्यात सुखरूप परत आला.

उभयपक्षी युद्धाला तोंड लागले. गर्जना, आक्रोश व रक्तपात या गोष्टी चालू झाल्या. थोडयाच वेळात रावणपुत्र इंद्रजित आघाडीवर आला. पण अंगदाने त्याच्या रथाचे घोडे व सारथी यांना मारून टाकले. ते पाहून इंद्रजित अदृश्य झाला व अदृश्यावस्थेत रामसैन्यावर शरवर्षाव करू लागला. त्या शरवर्षावाने राम-लक्ष्मण घायाळ झाले व भूमीवर पडले. इंद्रजिताने नागपाशांनी त्यांना बांधून टाकले. हा अद्भुत पराक्रम बापाला सांगण्यासाठी तो रावणाकडे गेला. रावणाने त्याची पाठ थोपटली.

इकडे बद्ध झालेल्या राम-लक्ष्मणांना मुक्त करण्यासाठी गरुड युद्धभूमीवर आला. त्याला पाहताच पाशाचे नाग भयभीत झाले आणि जीव वाचवण्यासाठी पळून गेले. राम-लक्ष्मण मुक्त झाले. गरुडाने त्या दोघांच्याही देहांवरून हात फिरवला. त्यासरशी दोघेही सावध झाले व त्यांच्या देहावरील घावही भरून आले.

पुनश्च युद्धाला प्रारंभ झाला. राम-लक्ष्मणांनी आणि वानरांनी अनेक राक्षसवीर ठार मारले. शेवटी नील नामक वानराने रावणाचा प्रहस्त नावाचा सेनापतीही मारला. ते पाहून रावण जातीने रणभूमीवर आला. त्याने वानरसैन्याची पहिल्या फेरीत दाणादाण उडवून दिली. रावण व मारुती यांचे द्वंद्वयुद्ध सुरू झाले. त्यात मारुतीने रावणाला जमिनीवर लोळवले; पण थोडयाच वेळात रावण सावध झाला. त्याने सोडलेल्या शक्तीने लक्ष्मण घायाळ झाला व निश्चेष्ट पडला. त्यानंतर मारुतीच्या पाठीवर बसून रामाने रावणाशी युद्ध सुरू केले. त्याने रावणाचा रथ मोडून टाकला व वक्षःस्थळावर बाण मारून रावणाला घायाळ केले. रावणाची ताकदच संपली. तो रणभूमी सोडून राजवाडयात परत गेला.

मग त्याने दीर्घकाल झोपेत पडलेल्या कुंभकर्णाला जागे करण्याबद्दल राक्षसांना आज्ञा दिली. मोठया कष्टाने कुंभकर्ण जागा होऊन उठला. प्रथम त्याने मद्य-मांसावर यथेच्छ ताव मारून आपली तहान-भूक शमवली व मग तो रावणाकडे गेला. रावणाने त्याला लंकेवरील अरिष्ट निवेदन केले व रामाला ठार करण्यासाठी रणभूमीवर जाण्याची आज्ञा दिली; पण कुंभकर्णाने वेगळेच काही बोलला. त्याने म्हटले. " राजा, तू सीताहरणाचे पाप आचरलेस, त्याची कटुफळे आता तुला चाखावी लागत आहेत. जो राजा नीतिशास्त्रज्ञ अशा मंत्र्यांचा सल्ला न घेता मन मानेल तसे वागतो, तो असाच गोत्यात यायचा. पण ते जाऊ दे. मी तुझी आज्ञा मानतो."

असे म्हणून कुंभकर्ण आगीच्या लोळासारखा रणांगावर धावला व रामावर तुटून पडला. रामाशी त्याने बराच वेळ घनघोर युद्ध केले; पण अखेर रामाने त्याचे मस्तक उडवले.

त्यानंतरच्या युद्धात रावणाचे काही पुत्र मारले गेले. मग इंद्रजिताने पुनश्च बळ बांधले. तो रणभूमीवर आला. त्याने प्रथम अग्नी प्रदीप्त करून त्यात मंत्रपूर्वक हवन केले व शेवटी एक जिवंत बोकड अग्नीत टाकून दिला. इतके करून तो आकाशात गुप्त झाला. अदृश्यपणे त्याने रामसैन्यावर ब्रह्मास्त्र सोडले. त्या अस्त्राने हजारो वानरवीर मरून पडले व राम-लक्ष्मण घायाळ होऊन बेशुद्ध झाले. अशा रीतीने त्या दिवसाचे युद्ध संपले. रात्री राम-लक्ष्मणांकडे जाऊन जांबवान नामक वानर वैद्याने हनुमंताला म्हटले.

" हे अजून मृत झालेले नाहीत. तू आता ताबडतोब हिमालय पर्वतावर जा. त्याच्या ऋषभ व कैलास या शिखरांच्या मध्ये औषधींनी भरलेला एक पर्वत आहे. त्यामधील चार दिव्य औषधी घेऊन त्वरित परत ये."

हनुमंताने लागलीच उड्डाण केले व त्या पर्वताचे शिखरच उपटून आणले. त्या औषधींच्या वासानेच राम-लक्ष्मण शुद्धीवर आले व त्यांचे घावही भरून आले." मृत वानरही सावध झाले.

कुंभकर्ण व रावणाचे पुत्र युद्धात पडल्यामुळे लंका हवालदिल झाली. अशातच सुग्रीवाच्या आज्ञेने वानरवीर लंकेवर तुटून पडले. त्यांच्या हाती पेटत्या मशाली होत्या. त्यांनी चहू बाजूंनी लंकेला आग लावून दिली. सगळीकडे एकच हाहाकार उडाला. हा सर्व प्रकार पाहून रावण संतप्त झाला. त्याने मोठमोठे राक्षसवीर वानरसेनेवर पाठवले; पण त्या राक्षसांना राम, सुग्रीव व त्यांचे सैनिक यांनी कंठस्नान घातले. शेवटी इंद्रजिताने पुन्हा एकदा निकराचा हल्ला करण्याचे ठरविले. मग अदृश्य होऊन त्याने बाणांचा पाऊस पाडला. राम गलितधैर्य व्हावा म्हणून त्याने मायाही रचली. त्याने एक मायावी सीता निर्माण करून तिला रणभूमीवर ओढीत आणले. ती ' हे नाथ ' म्हणून आक्रोश करू लागली. थोडयाच वेळात त्याने खड्ग उपसले आणि तिचा शिरच्छेद केला. हा अघोरी प्रकार वानरसेनेने पाहिला. ते भयभीत होऊन सैरावैरा पळू लागले.

ही वार्ता हनुमंताने रामाला सांगितली. प्राणप्रिय सीतेचा वध झाला हे ऐकून राम मूर्च्छित पडला. सावध झाल्यावर बिभीषणाने त्याला सांगितले. " प्रभो, ही इंद्रजिताची माया आहे. तुझी सीता सुखरूप आहे. मात्र तू एक गोष्ट कर. इंद्रजित आज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निकुंभिलेच्या देवालयात होम करणार आहे. होम पुरा झाल्या-वर तो अजिंक्य होईल. यास्तव तू तावडतोब लक्ष्मणाला त्याच्यावर पाठव."

रामाच्या आज्ञेने लक्ष्मण इंद्रजितावर चाल करून गेला. दोघांचे युद्ध जुंपले. ते शस्त्रांनी लढले तसे अस्त्रांनीही लढले; पण अंती लक्ष्मणाने ऐंद्र अस्त्र सोडून इंद्रजिताचे मस्तक उड-वले. रावणाला ही बातमी समजताच तो शोकाकुल झाला. आपला सर्वनाश झाला असेच त्याला वाटले. त्या विपरीत प्रसंगी त्याच्या मनाचा तोल सुटला. तो म्हणाला. "ज्या सीतेमुळे एवढा अनर्थ गुदरला, त्या सीतेलाच मी आता ठार करतो." तो खड्ग उपसून अशोकवनात गेला सुद्धा; पण त्याच्या सुपार्श्व नामक अमात्याने त्याला आवरले. तो म्हणाला. "स्त्रीवध करणे तुला योग्य नव्हे. त्यापेक्षा तू रामालाच ठार कर!"

इकडे लढाई सुरूच होती. घटकेघटकेला राक्षसांचे सैन्य मरून कमी होत होते. आता रावणच खुद्द रणभूमीवर आला. त्याने प्रथम लक्ष्मणाशी युद्ध सुरू केले. बराच वेळ लढूनही लक्ष्मण आवरत नाही असे पाहून, रावणाने आपली अमोघ शक्ती लक्ष्मणावर सोडली. त्या शक्तीचा प्रहार हृदयावर होताच लक्ष्मण धरणीवर कोसळला. लक्ष्मणाची ती दशा पाहून राम शोक करू लागला. ते पाहून सुषेण नामक वैद्याने रामाला म्हटले: "लक्ष्मण अजून जिवंत आहे." लगेच मारुतीकडे वळून म्हणाला. "हनुमंता, तावडतोब महोदय पर्वतावर उड्डाण कर आणि तिथली दिव्य औषधी घेऊन ये." मारुती मनोवेगाने उडाला आणि त्या पर्वताचे शिखरच तोडून घेऊन आला. सुषे-णाने त्यावरच्या एका वनस्पतीचा रस काढून तो लक्ष्मणाच्या नाकात घातला. त्याचा प्रभाव तत्काळ दिसला. लक्ष्मण सावध झाला आणि उठून बसला. रामाने हर्षभराने त्याला दृढ आलिं-गन दिले.

नंतर राम व रावण यांचे युद्ध जुंपले. रावण रथात बसून लढत होता, तर राम जमिनीवरूनच लढत होता. इंद्राला हे विषम युद्ध आवडले नाही. त्याने मातलीबरोबर रामाला दिव्य रथ पाठवून दिला. राम त्यावर आरूढ झाला. मग त्या दोन महा-वीरांचे अभूतपूर्व युद्ध सुरू झाले. ते दोघे अस्त्रांनी लढू लागले. एका अस्त्रफेकीने रावण मूर्छित पडला. ते पाहून सारथ्याने त्याचा रथ युद्धभूमीवरून दूर नेला. रावण थोड्याच वेळात सावध झाला. आपला रथ रणभूमीवरून दूर नेल्याबद्दल त्याने सारथ्याला दोष दिला. तो पुनश्च रणभूमीवर आला. रामही त्या युद्धात दमला होता. तेव्हा अगस्त्य मुनीने जवळ येऊन त्याला आदित्यहृदय स्तोत्राचा जप करण्यास सांगितले. रामाने ते स्तोत्र जपले. त्या-मुळे त्याच्या अंगात फिरून रणोत्साह संचरला. पुनश्च ते दोघे एकमेकांना भिडले. अटीतटीचे युद्ध सुरू झाले. ते पाहण्या... आकाशात जमलेले देव, गंधर्व एकमेकांना म्हणू लागले. "नी... वर्णामुळे सागराला आकाशाची व आकाशाला सागराची उ... देता येईल; पण राम-रावणांच्या या युद्धाला मात्र राम-रा... णांच्या युद्धाचीच उपमा द्यावी लागेल."

एवढ्यात रामाने एक तीक्ष्ण बाण सोडून रावणाचे मस्... उडवले; पण रावण मेला नाही. उडविलेल्या शिराच्या ... रावणाच्या धडावर दुसरे शिर निर्माण झाले. रामाने ... तोडले. अशी शंभर शिरे उगवली आणि तेवढी रामाने तो... पण तरीही रावण मरेना. मग मातलीने रामाला ब्रह्मास्त्... प्रयोग करण्यास सांगितले. त्या अस्त्राचा प्रयोग करताच ... रावण मरून पडला. ते पाहून वानर मंडळी आनंदाने ... लागली. आकाशात देवांनी दुंदुभी वाजवल्या. सर्वांनी राम... पराक्रमाची प्रशंसा केली.

रावणवधाची वार्ता ऐकताच रावणाची पट्टराणी मंदो... रणभूमीवर आली. तिने आकांत मांडला. ती मृत पतीला ... म्हणाली. "नाथ, मी तुम्हाला रामाशी वैर करू नका, ... सांगितले होते; पण तुम्ही ऐकले नाही. त्याचे हे फळ तुम्... मिळाले. खरे तर साध्वी सीतेच्या तपःसामर्थ्याने तुम्हां... झाला होता. आता मी हे वैधव्य कसे सहन करू?" असे ... ती रावणाच्या हृदयावर मूर्छित पडली. तिच्या सवतींनी ... कसेबसे सावरले.

मग रामाच्या आज्ञेने बिभीषणाने रावणाच्या देहाला ... दिला मातली रामाचा निरोप घेऊन स्वर्गाला निघून ... रामाने लक्ष्मणाला आज्ञा दिली. "तू बिभीषणाला घेऊन ... जा आणि त्याला राज्याभिषेक कर." लक्ष्मणाने तसे केले. ... रामाने हनुमंताला सीतेकडे पाठवले. मारुतीच्या तोंडून ... वधाचे वृत्त ऐकताच हर्षातिरेकाने काही वेळ सीतेच्या ... शब्दच फुटेना. ती म्हणाली. "या शुभ वार्तेसाठी तुला ... द्यायला माझ्याजवळ काहीच नाही." हनुमान तिच्याकडून ... आल्यावर बिभीषण तिच्याकडे गेला. तो म्हणाला. "मी ... रामाकडे न्यायला आलो आहे.'

सीता बिभीषणाबरोबर रामापुढे आली. राम तिला ... म्हणाला. "हे कल्याणी, मी माझ्या शत्रूला ठार करून तुला ... वले आहे. मात्र मी तुझा स्वीकार करणार नाही. का... शत्रूच्या घरी दीर्घ काल राहिली आहेस. तेव्हा आता तू ... तिकडे जाण्यास मोकळी आहेस."

रामाचे हे बोलणे म्हणजे सीतेच्या हृदयावर वज्रा... होता. ती गहिवरून म्हणाली. "रावणाने मला बळा... पळविले; पण माझे पातिव्रत्य अभंग आहे. तुम्हांला वाट...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मी नाही." नंतर लक्ष्मणाकडे वळून ती म्हणाली. "माझ्यासाठी चिता तयार कर. मिथ्यापवाद शिरावर घेऊन मी जगू इच्छित नाही." निरुपाय म्हणून लक्ष्मणाने चिता तयार करून ती प्रज्वलित केली. त्या अग्नीजवळ उभे राहून सीता म्हणाली. "मी जर शुद्ध असेन, तर हा लोकसाक्षी अग्नी माझे रक्षण करील." असे म्हणून सीतेने अग्नीत निःशंक उडी घेतली. सर्वांच्या तोंडून 'हाय ! हाय !' असे उद्‌गार निघाले.

एवढ्यात एक आश्चर्य घडले. साक्षात अग्नी सीतेला अंकावर घेऊन चितेतून प्रकट झाला. सीता जशी होती तशीच किंबहुना त्याहून सतेज बनली. तिच्या अंगावर भाजल्याची कुठेही तिळाएवढीसुद्धा खूण नव्हती. अग्नी रामाला म्हणाला, 'सीतेच्या ठिकाणी कसलाही दोष नाही. ती निष्पाप आहे. तू शुद्ध अंतःकरणाने तिचा स्वीकार कर."

ते ऐकून रामाचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आले. तो अग्नीला म्हणाला. "लोकांसमक्ष सीतेची शुद्धी होणे आवश्यक होते. ही गोष्ट मी केली नसती तर लोकांनी मला बालिश व विषयलंपट म्हटले असते." राम एवढे बोलतो न बोलतो तोच स्वर्गातून खुद्द दशरथ खाली आला. राम-लक्ष्मणांना कवटाळून त्याने 'हे मुली,' अशी सीतेला प्रेमाने हाक मारली. तो म्हणाला. "रामा, सीता सर्वथैव शुद्ध आहे. तिचा स्वीकार कर. जानकी, तूही रामावर रागावू नकोस. कारण त्याने तुझ्या हितासाठीच तुझी ही शुद्धी घडवून आणली." एवढे बोलून दशरथ परत स्वर्गलोकी गेला. रामाने सीतेचा स्वीकार केला. सीता कृतार्थ झाली.

दुसऱ्या दिवशी रामाने अयोध्येला जाण्याची तयारी केली. बिभीषणाने त्यांच्यासाठी रावणाचे पुष्पक विमान आणवले. निरोपाच्या वेळी राम सुग्रीवादी वानरांना म्हणाला. "तुम्ही मित्रकार्य केले आहे. आता तुम्ही स्वस्थानी जायला मोकळे आहात. सुग्रीव म्हणाला. "आम्हांलाही तुझ्याबरोबर अयोध्येला यायचे आहे. तुझा राज्याभिषेक पाहायचा आहे." रामाला ते ऐकून आनंद झाला. त्याने सर्वांनाच बरोबर घेऊन विमानात आरोहण केले. विमान अयोध्येच्या दिशेने उडाले.

राम प्रथम भरद्वाजाच्या आश्रमात उतरला. त्याने भरद्वाजाला भरताचे क्षेमकुशल विचारले. भरद्वाज त्याला म्हणाला, "भरत सकुशल आहे आणि डोळ्यांच्या पणत्या करून तुझीच वाट पाहतो आहे." रामाला त्या गोष्टीचा आनंद झाला. रामाने हनुमंताला भरताकडे पाठवून त्याला आपल्या आगमनाचे वृत्त कळवण्यास सांगितले. त्याचबरोबर त्याने हेही सांगितले. "हनुमंता, तू भरताचा मनोभाव नीट जाणून घे. त्याला जर अयोध्येच्या राज्याची अभिलाषा उत्पन्न झाली असेल, तर त्यालाच राज्य करू देण्यास मी तयार आहे, असे त्याला सांग."

पण भरताच्या मनात तसे काही नव्हते. 'रामाची स्वारी येत आहे' असे हनुमंताने सांगताच त्याला अपार आनंद झाला. त्याने अयोध्येतल्या स्त्री-पुरुषांना नंदिग्रामी रामाला सामोरे येण्याची आज्ञा दिली.

पुष्पक विमान नंदिग्रामी उतरताच राम-भरताची भेट झाली. रामाने भरताला कडकडून आलिंगन दिले. भरत रामाला म्हणाला. "माझ्यापाशी ठेव म्हणून ठेवलेले तुझे राज्य तू आता परत घे." रामाने "ठीक आहे" असे म्हटले. मग नापिताकडून जटा साफ करून घेतल्यावर रामाने मंगल स्नान केले व उंची वस्त्रे आणि अलंकार धारण केले. मग राम दिव्य रथावर आरूढ झाला. अयोध्येकडे त्याची मिरवणूक निघाली. अयोध्यावासी जनांनी रामाचे आनंदाश्रूंनी स्वागत केले. लगेच पुरोहितांनी राज्याभिषेकाचा मुहूर्त निश्चित केला. वानरांनी भारतातल्या पवित्र नद्या व समुद्र यांचे उदक अभिषेकासाठी आणले. राम-सीता यांच्यावर अभिषेक झाला. मनू व त्याच्या वंशातील राजे यांनी राज्याभिषेकाच्या वेळी जो रत्नखचित मुगुट वापरला होता, तोच वसिष्ठाने रामाच्या मस्तकावर चढवला. दिव्य सिंहासनावर आरूढ होऊन रामाने सर्वांना वस्त्र-भूषणे दिली. अशा रीतीने रामाचा राज्याभिषेक यथाविधि पार पडला. मग रामाचा निरोप घेऊन बिभीषण लंकेला व सुग्रीव वानरमंडळीसह किष्किंधेला गेला. काही दिवसांनी रामाने लक्ष्मणाला यौवराज्याचा अभिषेक करण्याची इच्छा व्यक्त केली. पण लक्ष्मणाने म्हटले. "राजा, हा मान मला नको. तो भरताला मिळू दे." रामाने ते मानले व भरताला यौवराज्य दिले. नंतर रामाने पुष्पक विमानहि कुबेराकडे परत पाठविले.

थोड्याच दिवसांत सीता गर्भवती झाली. एके दिवशी राम तिला म्हणाला. "तुझे कोणते डोहाळे पुरवू ?" त्यावर सीता म्हणाली. "आर्यपुत्र, गंगेच्या पवित्र तीरावर तपोवनात काही दिवस राहावे असे मला वाटते." ते ऐकून राम तिला म्हणाला, "मी उद्याच तुला पाठवतो."

नंतर राम मधल्या चौकात जाऊन सुहृदांशी गोष्टी करू लागला. त्याने भद्र नामक सेवकाला विचारले. "नगरात लोक माझ्याबद्दल काय बोलतात ?" पण खरे ते सांगायला भद्राची जीभ धजेना. रामाने आग्रहच केला तेव्हा तो म्हणाला. "महाराज, लोक तुमच्याबद्दल चांगले बोलतात, पण रावणाने बळजबरीने पळविलेल्या आणि बरेच दिवस लंकेत राहिलेल्या सीतेचा तुम्ही स्वीकार केला, याबद्दल तुम्हांला दोष देतात."

ते ऐकून रामाला फार दुःख झाले. त्याने लगेच सीतेचा त्याग करण्याचा निश्चय केला. लक्ष्मणाला पुढे बोलावून त्याने त्याला आज्ञा दिली. "लक्ष्मणा, तू उद्या प्रातःकाळी सीतेला रथात बस-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वून घेऊन जा आणि तमसा नदीच्या तीरावर वाल्मीकी मुनीच्या आश्रमाकडे सोडून दे. माझे मन वळवण्याचा कोणीही प्रयत्न करू नये." हे बोलता बोलता रामाचे डोळे अश्रूंनी भरले. तो लगेच अंतःपुरात निघून गेला.

लक्ष्मणाने दुसऱ्या दिवशी तसे केले. वाल्मीकीच्या आश्रमाजवळ पोचताच त्याने सीतेला सांगितले, की 'रामाने तुझा त्याग केला आहे.' ते ऐकून सीतेला धक्काच बसला. ती आसवे गाळीत लक्ष्मणाला म्हणाली. "विधात्याने मला सदैव दुःखे भोगण्यासाठीच जन्माला घातले आहे. लक्ष्मणा, अशा परित्यक्त अवस्थेत जगण्यापेक्षा मी गंगत जीव दिला असता; पण तोही मार्ग मला बंद आहे. कारण माझ्या पोटात राजाचा गर्भ आहे."

असे म्हणून सीता मुक्त कंठाने विलाप करू लागली. बिचारा लक्ष्मण! तो तिला नमस्कार करून अश्रू ढाळीत कसाबसा परत फिरला. सीता तिथेच रडत बसली. वाल्मीकीच्या शिष्यांनी तिला पाहिले व त्याला जाऊन सांगितले. "गुरुवर्य, कोणी तरी स्त्री या तपोवनात येऊन रडत बसली आहे." काय प्रकार आहे हे पाहण्यास वाल्मीकी लगेच निघाला. त्याने सीतेला ओळखले व म्हटले. "सीते, तू शुद्ध आहेस. मी अंतर्ज्ञानाने हे जाणतो. पण तरीही तुझ्यावर हे संकट कोसळले आहे. तू भिऊ नकोस. तू माझ्या आश्रमात निश्चित मनाने राहा. माझा आश्रम हे तुझे दुसरे माहेरच आहे, असे समज."

ते ऐकून सीतेला त्यातल्या त्यात बरे वाटले. ती वाल्मीकीला नमस्कार करून त्याच्या मागोमाग आश्रमात गेली. योग्य वेळी ती त्याच आश्रमात प्रसूत झाली. तिला जुळे मुलगे झाले. वाल्मीकीने थोरल्याचे नाव लव व धाकट्याचे कुश असे ठेवले. ते दोघे रामपुत्र आश्रमात वाढू लागले.

काही वर्षांनी रामाने अश्वमेध यज्ञ करण्याचे ठरविले. नैमिषारण्यात गोमती नदीच्या काठी यज्ञभूमी तयार करण्यात आली. यज्ञासाठी ऋषिमुनींना व राजेरजवाड्यांना पाचारण करण्यात आले. सगळे आले. किष्किंधेहून सुग्रीव आला. लंकेहून बिभीषण आला. रामाने अश्वमेधाचा घोडा सोडला. लक्ष्मण त्याच्या रक्षणार्थ त्याच्यामागे गेला. या यज्ञासाठी वाल्मीकी मुनीही आला होता. त्याने आपल्याबरोबर कुश-लवांनाही आणले होते. स्वतः रचलेले रामायण हे काव्य त्याने कुश-लवांना शिकविले होते. ते दोघे सुस्वर कंठाने ते काव्य गात होते. गात-गात ते रस्त्याने हिंडू लागले. लोकांना ते काव्य आवडले. त्यांनी ती गोष्ट रामाला सांगितली. रामाने त्यांना यज्ञमंडपात पाचारण केले. त्यांच्या मुखाने ते काव्य अर्थात आत्मचरित्र रामाने ऐकले. राम अत्यंत प्रसन्न झाला. तो त्या मुलांना बिदागी देऊ लागला; पण त्यांनी ती घेण्याचे नाकारले. रामाने विचारले. "या काव्याचा कर्ता कोण?" कुश-लवांनी वाल्मीकीचे नाव सांगितले. रामाने वाल्मीकीला यज्ञमंडपात पाचारण केले. तो येतांना सीतेला बरोबर घेऊन आला. तो रामाला म्हणाला.

"रामा, लोकापवादामुळे तू जिचा त्याग केलास ती ही सीता! ही सर्वथैव शुद्ध आहे. निर्दोष आहे. मी असत्य बोलत असेन तर माझी दीर्घ तपश्चर्या विफल होवो."

त्यावर राम म्हणाला. "तुमचे म्हणणे यथार्थ आहे. मी सर्व काही जाणतो. हे कुश-लव माझे पुत्र आहेत, हेही मला ठाऊक आहे. आता तोच लोकापवाद नष्ट करण्यासाठी सीतेने पुनश्च शपथ घ्यावी. इथल्या लोकांची खात्री पटवावी. सीतेने तो आदेश ऐकला. ती दिव्य करायला सिद्ध झाली. तिने हात जोडून व मान खाली घालून यज्ञमंडपात जमलेल्या लोकांसमक्ष प्रतिज्ञा उच्चारली.

"रामावाचून अन्य पुरुष मी मनातही आणला नसेल तरही विष्णुपत्नी भूदेवी मला विवर देवो!"

या शपथेसरशी भूमीतून एक दिव्य सिंहासन वर आले. त्यावर साक्षात भूदेवी बसली होती. तिने सीतेला उचलून घेतले आणि पाहता पाहता ती भूदेवी पुनश्च पाताळात प्रविष्ट झाली. हे आश्चर्य पाहून भरल्या सभेच्या मुखातून धन्योद्गार निघाला.

रामाला मात्र सीता कायमची अंतरली. तो शोकविव्हल झाला. तेव्हा ब्रह्मदेवाने येऊन त्याचे सांत्वन केले. मग कुश-लवांचा स्वीकार करून राम अयोध्येत परत आला. त्याने पुढे मोठमोठे यज्ञ केले आणि प्रजेलाही सुखात ठेवले. रामराज्यात राजा आणि प्रजा धर्माचे पालन करून सुखाने नांदल्यानंतर काही काळाने रामाच्या तीन्ही माता स्वर्गवासी झाल्या. भरत, शत्रुघ्न व लक्ष्मण यांना पुत्रप्राप्ती झाली. हे सर्व पुत्र मोठे झाल्यावर रामाने वेगवेगळ्या प्रदेशांत त्यांना राज्ये दिली.

त्यानंतर प्रत्यक्ष काल ऋषिरूपाने रामाच्या भेटीस आला. तो म्हणाला. "रामा, मी तुला एक संदेश घेऊन आलो आहे. मात्र तो मी तुला एकांतात सांगेन. तो जर कुणी ऐकला किंवा आपणा दोघांना कुणी एकांतात पाहिले, तर तू त्याचा तात्काळ वध करावास." रामाने ते मान्य केले. लक्ष्मणाला दारावर उभे करून राम एकांतात गेला. त्या वेळी काल रामाला म्हणाला. "तुझी या जन्माची आयुर्मर्यादा संपली असून, तू आता स्वर्गी देवलोकी निघून ये, असा तुला विधात्याचा निरोप आहे." त्यावर राम म्हणाला. "मी सिद्ध आहे." मग ते दोघे आणखी काही बोलत बसले. एवढ्यात दुर्वासमुनी तिथे आला आणि लक्ष्मणाला म्हणाला. "मला आत्ताच्या आत्ता रामाची भेट हवी आहे." लक्ष्मणाने विचार केला, की हा कोपिष्ट मुनी खवळला तर त्याचे दुष्परिणाम रामाला भोगावे लागतील. या भीतीने लक्ष्मणाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकांतमंदिराचे दार उघडले व दुर्वास मुनी आल्याचे रामाला सांगितले. मग रामाने दुर्वास मुनीचे स्वागत केले, तेव्हा तो रामाला म्हणाला, ' मी अनशन व्रत केले असून आज मला त्याचे पारणे करायचे आहे. तेव्हा तू माझ्या भोजनाची सिद्धता कर !' रामाने कालाला निरोप दिला आणि दुर्वासालाही भोजन घालून परत पाठवले. मग लक्ष्मण पुढे होऊन रामाला म्हणाला. " तू माझा वध करून तुझी प्रतिज्ञा पार पाड ! कारण मी तुमच्या एकांताचा भंग केला आहे."

रामाला त्या गोष्टीचे फार दुःख झाले. त्याला लक्ष्मणाचा वध करवेना. त्याग हा वधाचाच पर्याय होऊ शकतो, असे ज्ञानवृद्धांनी सांगितल्यावर रामाने तोच उपाय अवलंबिला. ' मी तुझा त्याग करीत आहे ' हे वाक्य रामाने उच्चारताच लक्ष्मणाचे डोळे अश्रूंनी भरले. लक्ष्मण तिथून निघाला, तो शरयू नदीवर गेला. नदीत स्नान करून व श्वासनिरोध करून लक्ष्मणाने देहत्याग केला.

लक्ष्मण मृत झाला, हे समजताच रामाला आपले जीवित भारभूत वाटू लागले. त्याने आपल्या महाप्रयाणाची तयारी केली. सर्व निरवानिरव करून तो शरयू नदीकडे जाऊ लागला. रामाच्या पाठोपाठ अयोध्येतले सर्व प्रजाजन, वानर व राक्षस हेही महाप्रयाणासाठी निघाले. सर्वांसह राम शरयू नदीवर आला. पाठोपाठ ब्रह्मदेव तिथे आला. त्याने रामाला विष्णुरूपात विलीन होण्याचा आदेश दिला. रामाने तसे केले. त्यासरशी आकाशातून पुष्पवृष्टी झाली. त्यापाठोपाठ अयोध्येतले सर्व प्रजाजन शरयूच्या पात्रात शिरले आणि त्यांनीही देहत्याग केला. त्या सर्व लोकांना संतानक नावाचा ऊर्ध्व लोक प्राप्त झाला. मग सर्व देवांसह ब्रह्मदेवही आपल्या लोकी निघून गेला.

रामकथेचा विकास – वैदिक साहित्यात रामकथेतल्या अनेक पात्रांची नावे मिळतात; पण त्यांच्याविषयी अधिक माहिती मिळत नाही. रामाचा वंश हा इक्ष्वाकुवंश या नावाने प्रसिद्ध आहे. इक्ष्वाकूचा ऋग्वेदात एकदा आणि अथर्ववेदात चारदा उल्लेख आला आहे. ऋग्वेदातल्या एक दानस्तुतीत दशरथाचा उल्लेख आला असून, तिथे त्याची प्रशंसा केली आहे. ऋग्वेदात रामाचा एकदाच उल्लेख झाला आहे. मात्र तो तत्कालीन कोणीतरी राजा असावा. ऐतरेय ब्राह्मणात राम मार्गवेय, शतपथब्राह्मणात राम औपतस्विनी व जैमिनीय उपनिषद्ब्राह्मणात राम क्रातुजातेय असे आणखी तीन राम आढळतात. वैदिक साहित्यात सीता ही चक्याच ठिकाणी कृषीची एक अधिष्ठात्री देवता व एका ठिकाणी सूर्याची कन्या या स्वरूपात आढळते. तैत्तिरीय ब्राह्मणात सीतासावित्री नावाची आणखी एक स्त्री आढळते; पण हे नामोल्लेख सोडल्यास वैदिक साहित्यात कुठेही कथा किंवा आख्यान या स्वरूपात रामकथा उपलब्ध होत नाही.

रामकथेचा मूलस्रोत कुठे आढळेल, याविषयी संशोधन करीत असता डॉ. वेबरने अनुमान केले, की बौद्ध जातकांतले दशरथजातक आणि होमरचे इलियड हे महाकाव्य ही दोन रामकथेची उगमस्थाने असावी. पण श्री. कामिल बुल्के या संशोधकाने दशरथजातक हे वाल्मीकीय रामकथेचेच विकृत स्वरूप आहे आणि होमरच्या महाकाव्याचाही रामकथेशी एकदोन साम्य स्थळे सोडल्यास कसलाच संबंध पोचत नाही, असे सिद्ध केले आहे.

रामकथा ही ऐतिहासिक का केवळ काल्पनिक, अशा दोन्ही दृष्टींनी देशी-विदेशी विद्वानांनी आपापले तर्क चालविले आहेत. डॉ. याकोबी म्हणतो, की रामायणातील केवळ अयोध्या कांडातल्या घटना तेवढ्या ऐतिहासिक आहेत आणि बाकीचे रामायण काल्पनिक आहे. पण रामायणाची समग्र कथावस्तू ऐतिहासिक मानण्यास कोणतीही अडचण नाही, असे अनेक विद्वान मानतात. वाल्मीकिरामायण समग्र वाचल्यानंतर वाल्मीकीच्या मनात रामकथेच्या ऐतिहासिकतेसंबंधी कोणताही संदेह नाही, असेच आढळून येईल.

डॉ. वेबर याच्या मतानुसार समस्त रामायण काव्य हे इतिहास नसून, केवळ एक रूपक आहे आणि त्याच्या द्वारे आर्य संस्कृतीचा व कृषिविद्येचा आर्यांनी दक्षिणेत प्रचार केला, हे ध्वनित होते. पण हेही मत तर्काच्या कसोटीवर टिकण्यासारखे नाही. वास्तवात रामकथेचा आणि कृषिविद्येचा संबंध दाखवता येण्याजोगा नाही. शिवाय आर्यांचा दक्षिणेत पायरव सुरू होण्याच्या पूर्वीच दक्षिणेत कृषिविद्या प्रस्थापित झाली होती. श्री. व्हीलर व श्री. दिनेशचंद्र सेन यांच्या मते ब्राह्मणी धर्म व बौद्ध धर्म या दोन धर्मांच्या संघर्षाचे रामायण हे प्रतीक आहे. बौद्धांच्या भिक्षुधर्माची प्रतिक्रिया म्हणून वाल्मीकीने गृहस्थधर्माचे आदर्श लोकांपुढे ठेवण्याच्या उद्देशाने रामायणकथा लिहिली आणि रामायणातील राक्षस म्हणजे बौद्ध होत. पण हेही मत समंजस वाटत नाही. राक्षस हे ब्राह्मणविरोधी निश्चित होते, पण ते स्वतः यज्ञ करीत होते आणि ते नरभक्षकही होते. राक्षसांचा आणि बौद्ध अहिंसेचा बादरायण संबंधही जोडता येणे शक्य नाही. रामायणात राक्षसांचे जे चित्रण मिळते, यामध्ये राक्षस म्हणजे बौद्ध असा कोणताही निर्देश आढळत नाही. अशा परस्पर विरुद्ध विचारसरणीमुळे रामकथेचा मूलस्रोत कोणता असावा, हे सांगणे कठीण आहे.

एवढे मात्र खरे, की वाल्मीकीच्या पूर्वी रामाविषयी काही गाथा प्रचलित होत्या. याचे प्रमाण बौद्ध त्रिपिटिकावरूनही मिळू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शकते. या रामविषयक गाथा हाच रामकथेचा मूलस्रोत असे म्हणता येईल. हरिवंशात तशा अर्थाचा एक श्लोकच आहे –

गाथा अप्यत्र गायन्ति ये पुराणविदो जनाः।
रामे निबद्धतत्त्वार्थमाहात्म्यं तस्य धीमतः॥
(हृ. वं. ४१.१४९)

अर्थ– पुराणवेत्ते जन, ज्यांमध्ये रामविषयक तत्त्वार्थ निबद्ध आहे आणि त्या धीमान पुरुषाचे ज्यांत माहात्म्य आहे, अशा गाथाही या ठिकाणी गातात.

या सर्व गाथा वाल्मीकीच्या पूर्वकालीन आहेत, हे उघड आहे. कुशीलव किंवा सूत हे गाथागायक म्हणून प्रसिद्ध आहेत. निरनिराळ्या राजवंशांमध्ये असे कुशीलव आपल्या पदरी बाळगण्याची प्रथा होती. हे लोक त्या त्या राजवंशातील प्रतापी पुरुषांच्या महत्त्वाच्या चरित्रप्रसंगांवर गाथा रचीत व त्या राजेलोकांना ऐकवीत. त्याला अनुसरून रामविषयक गाथा इक्ष्वाकू वंशातच निर्माण झाल्या असाव्या. याबद्दल रामायणातच पुरावा आहे. तो असा –

इक्ष्वाकूणामिदं तेषां राज्ञां वंशे महात्मनाम्।
महदुत्पन्नमाख्यानं रामायणमिति श्रुतम्॥
(वा. रा. बाल. ५.३)

अर्थ – इक्ष्वाकू वंशातील मोठ्या राजांच्या वंशात हे महदाख्यान निर्माण झाले आणि तेच पुढे रामायण म्हणून प्रसिद्ध झाले.

म्हणजे प्रथम गाथा, त्यावरून रामविषयक आख्याने आणि त्या आख्यानांवरून वाल्मीकीचे रामायण, असा हा क्रम लागतो. महाभारताच्या द्रोण व शांती पर्वात जे संक्षिप्त रामचरित्र दिलेले आहे, ते प्राचीन आख्यानकाव्यांनाच अनुसरणारे आहे, असे म्हणतात. सामान्यपणे ही रामविषयक मूळ आख्याने सनपूर्व सहाव्या शतकात निर्माण झाली असावी, असा कामिल बुल्के यांचा तर्क आहे.

हीच स्फुट आख्यानकाव्ये संकलित करून व ती एकाच कथासूत्रात ग्रथित करून एक महाकाव्य रचण्याचे कार्य वाल्मीकीने केले आणि तेच पुढे रामायण या नावाने प्रसिद्ध झाले. यावरून कुशीलवगाथा हाच रामकथेचा मूलस्रोत मानावा लागतो.

बालकांडाचा विकास– अयोध्याकांडापासून युद्धकांडापर्यंतच्या रामकथेवर आदिकवी वाल्मीकीची छाप स्पष्ट दिसते. या सर्व कांडांतल्या घटना एकसंधपणे कथेची गती सारखी वाढवीत नेतात. त्यामुळे उत्तरकालीन रामकथांमध्ये या कांडांचा विकास तुलनेने कमी झालेला आहे. बालकांड व उत्तरकांड यांची परिस्थिती वेगळी आहे. प्रारंभापासूनच या दोन कांडांतील कथा सुश्लिष्ट व एकसंध नव्हत्या. त्यामुळे या दोन कांडांत सर्वांत अधिक परिवर्तन आणि परिवर्धन झालेले दिसते.

इक्ष्वाकूच्या वंशावलीतच विभिन्नता दिसून येते. अधिकांश पौराणिक साहित्यात इक्ष्वाकूपासून रामापर्यंत ६३ राजांची नावे दिलेली आहेत; तर रामायणात ही संख्या केवळ ३६ आहे. खोतानी रामायणात सहस्रबाहू हा दशरथाचा पुत्र व राम-लक्ष्मण हे सहस्रबाहूचे पुत्र मानलेले आहेत. सयाममधील रामजातकात दशरथाला रावणाचा चुलता म्हटले आहे. उत्तरकालीन रामकथांमध्ये दशरथाच्या पूर्वजन्मांची चर्चा केलेली आहे. तिला अनुसरून दशरथ हा पूर्वजन्मात कश्यप, स्वायंभुव मनू, धर्मदत्त कुमुद किंवा कुंतल नामक राजा होता.

दशरथाच्या विवाहाविषयी उत्तरकालीन रामायणांत अनेक कथा आढळतात. आनंदरामायणात कौसल्या–दशरथ यांच्या विवाहाचे विस्तृत वर्णन आहे. दशरथ व कौसल्या यांचा विवाह झाल्यावर त्यांना जो पुत्र होईल तो तुला मारील, असे ब्रह्मदेव रावणाला सांगतो. रावण कौसल्येचे अपहरण करतो व तिला एका पेटीत घालून समुद्रात सोडून देतो. शरयूत विहार करीत असलेल्या दशरथाची नौकाही तो बुडवतो. कौसल्येची पेटी एका बेटाला लागते आणि दशरथही वाहत वाहत त्याच बेटावर जाऊन पोचतो. तिथेच दोघांचे लग्न होते.

कैकेयीच्या स्वयंवराचे वर्णन रामायणात आढळत नाही; पण ते पउमचरिय, कृत्तिवासरामायण, असमिया रामायण व सत्योपाख्यान यांमध्ये आढळते. सुमित्रा ही सिंहलद्वीपाचा राजा सुमित्र याची कन्या असून, तिचा दशरथाशी विवाह झाला व कौसल्या आणि कैकेयी यांनी, ती सर्वदा उपेक्षित राहावी असा शिवाकडून वर मिळवला, अशी कथा कृत्तिवासरामायणात दिली आहे.

दशरथाच्या स्त्रियांच्या संख्येतही खूप मतभेद आहेत. वाल्मीकिरामायणानुसार ३५०, पउमचरियाच्या मते ५००, आनंदरामायणानुसार ७०३, कृत्तिवासमते ७५० व दशरथजातकाच्या मते १६ हजार ही दशरथाच्या स्त्रियांची संख्या आहे.

वाल्मीकिरामायणात दशरथाच्या चार पुत्रांचे वर्णन असून, त्यांतले लक्ष्मण व शत्रुघ्न हे जुळे आहेत. पउमचरियाच्या मते भरत व शत्रुघ्न हे जुळे आहेत. जावा येथील सेरनकांडात म्हटले आहे, की दशरथाच्या दोन राण्यांना दोन दोन पुत्र झाले; थोरलीला राम-भरत व धाकटीला लक्ष्मण-शत्रुघ्न.

अहल्योद्धार– महाभारतातील अहल्येच्या कथेत रामाचा उल्लेख नाही. रामद्वारा अहल्योद्धार या प्रसंगाचे प्राचीनतम रूप वाल्मीकीच्या रामायणातच आहे. उत्तरकालीन रामायणांमध्ये अहल्या ही शिलारूप होऊन पडली होती आणि रामाने तिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या पदस्पर्शाने पुनर्जन्म प्राप्त करून दिला, अशी कथा मिळते. रामाने मिथिलेच्या प्रवासात अहल्येचा उद्धार केला, असे बहुतेक रामायणांत आहे. तर काही रामकथांमध्ये रामाने ते उद्धारकार्य वनवासाला जाताना केले, असे वर्णन आहे.

परशुरामप्रसंग – वाल्मीकिरामायणात परशुरामाचा तेजोभंग हा बालकांडाच्या अंती येतो. महाभारताच्या रामोपाख्यानात व पउमचरियंमध्ये या घटनेचा उल्लेख कुठेही नाही. राम व परशुराम यांच्या संघर्षाचे कारण हे होते, की परशुराम हा कोणातरी समर्थ क्षत्रियाशी युद्ध करू इच्छित होता, असे बहुतेक रामायणांत सांगितले आहे; पण अन्य काही रामायणांत परशुरामाने शिवाच्या धनुष्याची अवहेलना केली, हे त्या दोघांच्या संघर्षाचे कारण सांगितले आहे. शंकरदेवकृत रामविजयात या प्रसंगाची कथा पुढीलप्रमाणे दिली आहे –

मिथिलेहून अयोध्येला परत येताना परशुरामाने रामाचा वध करण्याचा प्रयत्न केला. कारण रामाने त्याच्या गुरूचे धनुष्य तोडून टाकले होते. पण द्वंद्वयुद्धात रामाने परशुरामाला पराजित केले व त्याचा स्वर्गमार्ग कायमचा बंद केला.

तोरवेरामायणानुसार रामाने आपल्या तोमराने परशुरामाचा परशू आकाशात उडवून दिला आणि नंतर रथातून उतरून परशुरामाच्या हातातले वैष्णव धनुष्य हिसकावून घेतले. खोतानी रामायणात तर रामाने बाण सोडून परशुरामाचा वधच केला, असे म्हटले आहे.

दशरथकृत यज्ञ – वाल्मीकिरामायणात दशरथाने पुत्रप्राप्तीसाठी प्रथम अश्वमेध व नंतर पुत्रकामेष्टी असे दोन यज्ञ केल्याचे वर्णन आहे. पण महाभारतातल्या रामोपाख्यानात यज्ञाचा उल्लेख मिळत नाही. कित्येक पुराणांतही दशरथाच्या यज्ञाचा उल्लेख मिळत नाही. स्कंदपुराणात पुत्रप्राप्तीसाठी दशरथाने कार्तिकेयपुरात तप केल्याचा उल्लेख आहे. या तपाच्या शेवटी विष्णू प्रकट होतो व चार रूपे धारण करून दशरथाचे पुत्र बनण्याचे अभिवचन देतो. वराहपुराणानुसार पुत्रप्राप्तीसाठी दशरथाने रामद्वादशीव्रत केले होते. दशरथाने कपिला गाईचा अपमान केला आणि तिने त्याला 'तू अपुत्र राहशील,' असा शाप दिला. नंतर दशरथाने कपिलेला वाघाच्या हल्ल्यातून सोडवले आणि मग तिने त्याला वर दिला, की 'तुला चार पुत्र होतील.' ही कथा उडिया महाभारतात आहे.

ग्रामगीतांतून दशरथाला कोण्या योग्याच्या प्रसादापासून पुत्र प्राप्त झाले, असे उल्लेख मिळतात. बिर्होर जातीच्या रामकथेत दशरथ कोण्या ब्राह्मणाला आपला थोरला मुलगा देण्याची प्रतिज्ञा करतो आणि नंतर त्याच्याकडून चार पुत्र प्राप्त करून घेतो. संतालांच्या रामकथेत दशरथाला एका योग्याकडून चार आम्रफले मिळतात व ती खाल्ल्याने दशरथाच्या राण्या गर्भवती होतात, असे सांगितले आहे.

वाल्मीकीने रामाच्या बाललीलांचे विशेष वर्णन केले नाही. उत्तरकालीन रामायणांत मात्र याविषयी पुष्कळ लिहिले गेले आहे. भागवत पुराणातल्या कृष्णलीलांच्या धर्तीवर अध्यात्मरामायणात रामाचा खोडकरपणा, त्याचे नवनीतचौर्य, दह्यादुधाची मडकी फोडणे, इ. रामलीला वर्णिल्या आहेत. आनंदरामायण, पद्म पुराण, सत्योपाख्यान, तुलसीदासाची कवितावली, इ. ग्रंथांत रामाच्या बाललीलांचे कृष्णाच्या धरतीवरच पुष्कळ वर्णन आहे. बालकृष्णावर कंस मारेकरी घालतो, त्याचप्रमाणे रावण बालरामावर काकभुशुंडी नावाचा राक्षस मारेकरी घालतो; पण राम त्याला शरण यायला लावतो, अशा कथा अनेक रामायणांत आहेत. अध्यात्मरामायण, सत्योपाख्यान, कृत्तिवासरामायण, बलरामदासरामायण, इ. ग्रंथांतून रामकृत मृगयेचेही वर्णन आहे.

राम-सीताविवाह – वाल्मीकिरामायणात रामाने शिवधनुष्याचा भंग करून सीतेचे पाणिग्रहण केले, असे वर्णन आहे. सत्योपाख्यान व बृहत्कोशलखंड यांत शिव जनकाला स्वप्नात दर्शन देऊन सांगतो, की 'धनुर्भंग करणाऱ्या पुरुषालाच तू आपली सीता दे.' पउमचरियामध्ये सांगितले आहे, की चंद्रगती नामक विद्याधर वज्रावर्त नावाचे धनुष्य मिथिलेत जनकाकडे पाठवतो व त्या धनुष्यावर रामाची बलपरीक्षा घेतो. उत्तरकालीन बहुतेक रामायणांत लहान वयातली सीता शिवधनुष्याचा घोडा करून खेळते आणि ते पाहून जनकराजा पण करतो, की या धनुष्याला जो दोरी चढवील त्यालाच सीता द्यायची. तदनुसार जनकराजा सीतेचे स्वयंवर मांडतो आणि त्यासाठी देशोदेशींच्या राजपुत्रांना बोलावणे पाठवतो; पण शिवधनुष्य कोणालाच उचलत नाही. शेवटी रावणही स्वयंवरमंडपात येऊन धनुष्य उचलण्याचा प्रयत्न करतो; पण त्यालाही ते उचलत नाही. ते त्याच्या पोटावर पडते आणि मग विश्वामित्राच्या आदेशानुसार राम ते धनुष्य लीलेने उचलतो. तो त्यावर दोरी चढवू लागताच ते धनुष्य मोडून पडते. अशा प्रकारे राम जनकाचा पण जिंकतो आणि सीतेचे पाणिग्रहण करतो.

रामकथांचा एक वर्ग असा आहे, की त्यात राम मिथिलेत प्रवेश करताना सीता त्याला पाहते आणि त्याच क्षणी तिच्या अंतरात रामाविषयी प्रेमांकुर उगवतो. अशा प्रकारचे वर्णन पहिल्याप्रथम स्कंद पुराणात आढळते. त्याचे अनुकरण मग कल्कीपुराण, आनंदरामायण, कृत्तिवासरामायण, बलरामदासरामायण, गोविंदरामायण, असमिया रामायण, भुशुंडीरामायण, रामचरितमानस, इ. ग्रंथांत केलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाल्मीकिरामायणात रामाच्या कित्येक स्त्रिया असल्याचा संकेत आहे. पण उत्तरकालीन रामायणांत सीता ही रामाची एकच पत्नी असून, राम एकपत्नीव्रत पाळणारा आहे, असे म्हटले आहे. आनंदरामायणात रामाच्या मुखानेच याविषयी वदविले आहे, ते असे–

अन्यत्सीतां विनाऽन्यस्त्री कौसल्यासदृशी मम।
न क्रियते परा पत्नी मनसाऽपि च चिन्तये ॥
(विलासकाण्ड सर्ग ७)

अर्थ – सीतेवाचून अन्य स्त्रिया मला कौसल्येसारख्या आहेत. मी दुसरी पत्नी करणार नाही आणि मनानेही तसे चिंतन करणार नाही.

रसिकसंप्रदायात रामाला बहुपत्नीक मानले आहे. भुशुंडीरामायणात रामाच्या दोन पट्टराण्या असून, त्याव्यतिरिक्त त्याला हजारो बायका असल्याचे म्हटले आहे.

विदेशातील रामकथेत मात्र एक दोन अपवाद सोडल्यास सर्वत्र रामाला एकपत्नी मानले आहे.

सीतासंभव – रामकथेच्या मूलस्रोतात सीतेच्या कुलपरंपरेविषयी निश्चित असे काही सांगितले गेले नाही. त्यामुळे सीतेच्या जन्माबद्दल निरनिराळ्या रामायणांतून सर्वस्वी भिन्न अशा कथा प्रचलित झाल्या आहेत. वाल्मीकिरामायणात सीतेच्या उत्पत्तीविषयी कथा सांगितली आहे, ती अशी–

एक दिवस जनकराजा यज्ञभूमी तयार करण्यासाठी नांगर चालवीत होता. तसे करताना त्याला एक लहान बालिका मातीतून वर आलेली दिसली. जनकाने कन्या म्हणून तिचा स्वीकार केला व तिचे नाव सीता असे ठेवले.

सीताजन्माचा हा वृत्तान्त बहुतेक रामकथांमध्ये आढळतो; पण या अलौकिक उत्पत्तीचा हरिवंशात संकेतानेही उल्लेख आढळत नाही. त्यावरून असे वाटते, की रामायणाच्या मूळरूपात किंवा आदिरामायणात ती जनकाची औरस मुलगीच मानली गेली असावी. महाभारतातल्या रामकथेत तर तिला जनकात्मजाच म्हटले आहे. त्याविषयीचा श्लोकार्ध असा –

विदेहराजो जनकः सीता तस्यात्मजा विभो।
(वन. २५८.९)

अर्थ – हे विभो, जनक हा विदेहाचा राजा असून, सीता ही त्याची कन्या आहे.

सीता ही भूमीतून उत्पन्न झाली असल्यामुळे ती अयोनिजा ठरली. तिच्या या अयोनिसंभवाला कारण म्हणून वाल्मीकीच्या उत्तरकांडात वेदवतीची कथा दिली आहे, ती अशी–

कुशध्वज ऋषीची वेदवती नामक एक कन्या होती. श्रीविष्णू पती मिळावा म्हणून ती हिमालय पर्वतावर तप करू लागली. त्या अवधीत एके दिवशी रावणाची तिच्यावर दृष्टी पटली. तिच्या रूपलावण्यावर लुब्ध होऊन त्याने तिचे केस पकडले. त्यासरशी आपल्या हाताचे खड्ग बनवून तिने आपले केस कापून टाकले व स्वतःची सुटका करून घेतली. नंतर तिने अग्निप्रवेश केला. तो करण्यापूर्वी तिने रावणाला शाप दिला, की 'मी तुझा नाश करण्यासाठी अयोनिज रूपात पुनश्च जन्म घेईल.'

सीतेच्या उत्पत्तीसंबंधी सर्वस्वी भिन्न अशा कल्पना पुढीलप्रमाणे–

(१) महाभारत, हरिवंश व पउमचरिय या ग्रंथांत सीतेला जनकाची औरस कन्या म्हटले आहे.

(२) वाल्मीकिरामायण व बहुतेक रामकथा यांत ती भूमिकन्या आहे.

(३) वसुदेवहिंडी, उत्तरपुराण, महाभागवतपुराण, काश्मीरी रामायण, खोतानीरामायण, सेरनकांड, रामकियेन, रामजातक, इ. ग्रंथांत ती रावणाची कन्या मानलेली आहे.

(४) दशावतारचरितात ती कमलोत्पन्ना आहे.

(५) अद्भुतरामायण व सिंहलद्वीपातील रामकथा यांत ती रक्तोद्भव आहे.

(६) आनंदरामायण व भावार्थरामायण यांत ती अग्निसंभव आहे.

(७) काही पाश्चात्य वृत्तान्तात ती फलांतून किंवा वृक्षांतून जन्मली आहे.

(८) दशरथजातक व जावा आणि मलाया येथील रामायणे यांत ती दशरथकन्या आहे.

सीतेला सीता हे नाव दिले गेले व तिला भूमिकन्या मानले गेले, ही घटना वैदिक साहित्यातील सीता नामक कृषिदेवतेच्या प्रभावावरून घडलेली असावी कसे काहींचे मत आहे; पण श्री. कामिल बुल्के म्हणतात– वैदिक देवता सीता आणि रामायणीय सीता या दोघी अभिन्न आहेत, असे म्हणता येणार नाही. वैदिक सीता ही ऐतिहासिक नसून ते सीता (नांगराच्या फाळाने निर्माण केलेली सरी) हिचे मानवीकरण आहे; मात्र एवढे खरे, की ऐतिहासिक सीतेची निश्चित कुलपरंपरा अज्ञात असल्यामुळे ऐतिहासिक सीतेवर कृषिदेवता सीता हिच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव पडला असणे शक्य आहे.

अयोध्याकांडाचा विकास – प्रस्तुत कांडाचा फारसा विकास झालेला नाही. या कांडात वाल्मीकीने राम व निषादपती गुह यांच्या मैत्रीपूर्ण भेटीचा वृत्तान्त दिला आहे. कृत्तिवासरामायणातही त्यांच्या मैत्रीचे विस्तृत वर्णन आहे व गुहाच्या पूर्वजन्माचाही वृत्तान्त आहे. गुह हा पूर्वजन्मात वसिष्ठपुत्र वामदेव होता. दशरथाने अंधमुनिपुत्र सिंधू याचा वध केला व त्याबद्दल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रायश्चित विचारण्यासाठी तो वसिष्ठाकडे गेला. वसिष्ठ त्या वेळी घरी नव्हता. म्हणून वामदेवानेच त्याला सांगितले, की 'तू तीन वेळा रामायणाचा जप कर म्हणजे पापमुक्त होशील!' हा वृत्तान्त वसिष्ठ घरी आल्यावर वामदेवानेच त्याला सांगितला. त्यावर तो विलक्षण क्रुद्ध होऊन बोलला. "एका रामनामाने कोटी ब्रह्महत्या दूर होतात. असे असता तू दशरथाला तीन वेळा रामनाम घ्यायला का सांगितलेस? माझा तुला शाप आहे. तू चांडाल होशील." मग वामदेवाने वडिलांकडे उःशाप मागितला तेव्हा तो म्हणाला, की "दशरथाच्या घरी राम जन्मेल आणि त्याच्या पदस्पर्शाने तू शापमुक्त होशील."

वाल्मीकिरामायणात प्रस्तुत कांडामध्ये दशरथाचे मरण, भरताचा राज्य स्वीकारण्यास नकार, दशरथाची अंत्येष्टी आणि भरताची चित्रकूटयात्रा हे प्रसंग विस्तारपूर्वक वर्णिले आहेत. उत्तरकालीन रामायणांत या प्रसंगांमध्ये फारसे परिवर्तन झालेले नाही. जे झाले आहे, त्यातल्या काही बाबी अशा –

(१) चित्रकूटाऐवजी मिथिलेतच भरत रामाच्या पादुका ग्रहण करतो आणि राम तिथूनच वनप्रस्थान करतो, असे महावीरचरितात म्हटले आहे.

(२) कैकेयी भरताला इतकी घाबरते की, चित्रकूटयात्रेत भरताबरोबर न येता ती अयोध्येतच राहते, असे कृत्तिवास म्हणतो.

(३) चित्रकूटावर इतरांच्याबरोबर जनकही येतो, असे तुलसीदासाने म्हटले आहे.

चित्रकूटावर राम दशरथाला पिंडदान करतो, असे वाल्मीकिरामायणात सांगितले आहे. याविषयी ब्रह्मपुराणातील परिवर्तन असे – दशरथ राम-लक्ष्मणांना दर्शन देऊन आपण नरकात पडल्याचे सांगतो व 'गोदावरीच्या तीरावर तू मला पिंड दे,' अशी रामाला आज्ञा देतो. रामाने पिंडदान केल्यावर तो नरकातून मुक्त होतो.

पण उत्तरकालीन काही रामकथांमध्ये रामाऐवजी सीतेने दशरथाला पिंडदान केल्याचे वर्णन आहे. राम-लक्ष्मण दशरथाच्या श्राद्धाची सामग्री आणण्यासाठी गावाला जातात. त्यांना परत यायला विलंब होतो. श्राद्धकाल थोडासाच शिल्लक राहिला आहे, असे समजून सीता स्वतः श्राद्ध करते. तिचा पिंड घेण्यासाठी दशरथ स्वतः खाली येतो व संतुष्ट झाल्याचे सांगतो. नंतर राम श्राद्ध करू लागला असता दशरथ परत येऊन म्हणतो, की "कशाला माझे श्राद्ध करतोस? मी सीतेच्या पिंडदानाने संतुष्ट आहे." ही कथा शिवमहापुराणात आहे.

सीता फल्गू नदीत स्नान करून १०८ वाळूचे पिंड तयार करते. दशरथाचा हात नदीच्या पात्रातून प्रगट होतो व सीता त्या हातावर एकेक पिंड ठेवते. पण ही गोष्ट ती कुणाला सांगत नाही. राम पिंडदान करीत असताना मात्र हात प्रकट होत नाही. तेव्हा सीता म्हणते, की "दशरथाने माझ्याकडून पिंडग्रहण केले आहे." रामाचा त्यावर विश्वास बसत नाही. शेवटी दशरथ प्रकट होऊन ती गोष्ट खरी असल्याचे सांगतो. ही कथा आनंदरामायणात आहे.

महानाटकानुसार राम वनवासाला निघताना भरत अयोध्येतच होता. सिंहली व तिबेटी रामकथेत राम एकटाच वनात जातो. रामायणात वनवासाचा अवधी चौदा वर्षांचा सांगितला आहे; पण दशरथजातकात तो बारा वर्षांचा व पउमचरियामध्ये सोळा वर्षांचा सांगितला आहे.

वाल्मीकीने कैकेयेची दुष्टता व कुटिलता स्पष्ट शब्दांत वर्णिली आहे, पण अन्य काही रामायणांत तिच्या या दोषांचे निवारण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. वसुदेवहिंडीमध्ये कैकेयीच्या पश्चात्तापाचे वर्णन आहे.

राम वनवासाला गेल्यावर प्रजेने जो विलाप केला, तो पाहून कैकेयीचे चित्त द्रवते, ती रामाकडे जाऊन त्याची क्षमा मागते व अयोध्येला परत येण्याबद्दल त्याला विनवते. राम तिला क्षमा करतो; पण परत येत नाही. ही कथा तत्त्वसंग्रहरामायणात आहे. सरस्वतीने येऊन मोह घातल्यामुळे कैकेयी अशी वागली, असे अध्यात्मरामायण, आनंदरामायण, रामचरितमानस, या ग्रंथांत म्हटले आहे. देवेंद्राने मला प्रेरणा केल्यामुळे मी रावणवधाच्या उद्देशाने तुला वनवासाला धाडले, असे कैकेयी स्वतःच रामाला सांगते, असे वर्णन रामलिंगामृतात आहे.

अरण्यकांडाचा विकास – प्रस्तुत कांडातली मुख्य घटना सीताहरण ही आहे. वाल्मीकिरामायणात लक्ष्मणाच्या संयमी वृत्तीचे विशेषसे वर्णन नाही; पण अन्य रामायणांत या गोष्टीला खूप महत्त्व दिले गेले आहे. लक्ष्मण चौदा वर्षे उपाशी राहिला व जागा राहिला, असे अध्यात्मरामायण सांगते. इंद्रजिताच्या संबंधात बिभीषण रामाला सांगतो, की "जो चौदा वर्षे उपवासी व जागृत आहे, त्याच्याच हातून इंद्रजित मरेल." विश्वामित्राने लक्ष्मणाला एक मंत्र दिला होता व त्या मंत्राच्या बळावर तो चौदा वर्षे उपवासी राहू शकला, असे कृत्तिवासरामायणात सांगितले आहे. वाल्मीकिरामायणानुसार लक्ष्मण वनवासात असताना राम-सीतेची निःसंकोच वृत्तीने सेवा करीत होता. गंगापार करताना रामाने लक्ष्मणाला आज्ञा दिली होती, की "सीतेला उचलून नावेत ठेव." पंचवटीत पोचल्यावर लक्ष्मणाने एकच पर्णशाला उभारली होती व तिच्यात तिघेही राहत होती; पण अन्य रामायणांत लक्ष्मणाने सीतेकडे डोळे वर करून पाहिले नाही, असे म्हटले आहे. भावार्थरामायणात एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रसंग सांगितला आहे. तो असा — एके दिवशी राम बाहेर गेला व जाताना त्याने 'सीतेचे रक्षण कर' असे लक्ष्मणाला सांगितले. सीतेला झोप लागली. त्या अवस्थेत तिच्या अंगावरची वस्त्रे अस्ताव्यस्त झाली. पण लक्ष्मणाने सीतेच्या त्या अवस्थेकडे मुळीच पाहिले नाही. रामाने परत आल्यावर लक्ष्मणाला विचारले, "स्त्रीरूप पाहून कोणाचे मन चंचल होत नाही?" लक्ष्मण म्हणाला, "जो रामभक्त असेल तोच अशा वेळी अविचल राहू शकतो."

वाल्मीकिरामायणात शबरीची कथा दिली आहे, पण महाभारतातल्या रामोपाख्यानात शबरीचा उल्लेख नाही. उत्तरकालीन साहित्यात या कथेचा उत्तरोत्तर अधिक विकास झालेला आहे. उत्तरकालीन शबरीच्या कथेचे स्वरूप प्रायः अध्यात्मरामायणाला अनुसरूनच आहे. अध्यात्मरामायणाने शबरीची कथा रामभक्तीच्या माहात्म्यात परिणत केली असून, तिच्या हीन जातीला विशेष महत्त्व दिले आहे. रामभक्ती ही कोणताही उच्चनीच असा भेद न करता सर्वांना मुक्ती प्रदान करते, हे त्या कथेचे तात्पर्य आहे. शबरीने दिलेली रानफळे तिने उष्टावलेली होती, असे वेगवेगळ्या शबरी-आख्यानांतून सांगितलेले आहे. बलरामदासाने वैशिष्ट्य सांगितले आहे, की ज्या फळाला शबरीचा दात लागला नाही, ते फळ रामाने खाल्ले नाही.

शबरीची कथा आदिवासी जमातींमध्ये बरीच लोकप्रिय आहे. मध्य प्रदेशातले कोल लोक स्वतःला शबरीचे वंशज मानतात. ते प्रस्तुत संबंधात कथा सांगतात, ती अशी — वनवासात एके दिवशी राम-लक्ष्मणांनी शबरीची भेट घेतली. ती मंडळी भुकेली आहेत, असे पाहून तिने त्यांना जंगली बोरे देऊन तृप्त केले. पुढे त्या मंडळींना बोरे देण्यासाठी शबरी नित्य जाऊ लागली. एक दिवस तिचे चित्त अस्वस्थ होते. ती प्रत्येक फळ तोडी, ते चाखून पाही व टोपलीत ठेवून देई. घरी आल्यावर तिला कळले, की आपण सगळी बोरे उष्टी केली आहेत. पण राम तिला म्हणाला, 'दे ती फळे इकडे.' राम व सीता दोघेही ती उष्टी फळे खाऊ लागली. लक्ष्मणाने मात्र त्यांना हात लावला नाही. ते पाहून एका कोलाने लक्ष्मणाला बाणाने घायाळ केले. जोवर तो उष्टे बोर खाणार नाही, तोवर त्याचा घाव भरून येणार नाही, असे त्याने सांगितले.

सीताहरणाच्या बाबतीतही भिन्न भिन्न कारणे दिली गेली आहेत. शूर्पणखेचे विरूपण हे सीताहरणाचे मूळ कारण वाल्मीकीने मानले आहे. पउमचरियामध्ये शंबूकाचा लक्ष्मणाने केलेला वध हे सीताहरणाचे कारण दिले आहे. पउमचरियामधली ही कथा रंगनाथरामायण, उडिया महाभारत, तोरवेरामायण, आनंद-रामायण, भावार्थरामायण, रामकियेन या ग्रंथांतही आलेली आहे. जैन उत्तरपुराणात नारद रावणाकडे जाऊन सीतेच्या अद्वितीय सौंदर्याचे वर्णन करतो व रावण सीतेचे हरण करतो, असे म्हटले आहे. तिथे शूर्पणखेच्या विरूपणाचा उल्लेखही नाही. रामभक्तीचा देशात प्रसार झाल्यानंतर सीताहरणाला आणखी एक कारण मिळाले. वाल्मीकिरामायणाच्या दाक्षिणात्य पाठात या संबंधात कथा सांगितली आहे, ती अशी — एके दिवशी रावण सनत्कुमारांच्या भेटीला गेला. सनत्कुमारांनी त्याला सांगितले, की जे दैत्य, दानव, राक्षस श्रीविष्णूकडून मारले जातात, ते वैकुंठ मिळवतात. श्रीहरीचा क्रोधही वरासारखाच असतो. मग रावणाला वाटले, की आपल्यालाही विष्णूचा अवतार जो राम त्याच्याकडून मरण यावे. रामाचे शत्रुत्व कोणत्या प्रकारे ओढवून घेता येईल, याचा विचार करता सीतेचे अपहरण करण्याची कल्पना त्याला सुचली. त्याने ती गोष्ट केली. त्याने सीतेला लंकेत नेले, पण मातेप्रमाणे तिचे रक्षण केले.

सुवर्णमृगाला मारण्यासाठी राम आश्रमातून निघून गेल्यावर, त्याचा घायाळ आवाज ऐकून सीतेने लक्ष्मणाला त्याच्याकडे पाठवले, अशी कथा वाल्मीकिरामायणात आढळते. पण चिंतामणराव वैद्यांच्या मते मूळ रामायणात सुवर्णमृगाचा कोणताही उल्लेख नव्हता. लोकांना अद्‌भुत रस आवडतो हे समजून आल्यावर सुवर्णमृगाची ही कथा पाठीमागून रामायणात समाविष्ट केली गेली आहे. कूर्मपुराणानुसार सीता एकटी रानात भटकत असता रावणाने तिचे हरण केले. म्हणजे त्यातही सुवर्णमृगाचा उल्लेख नाही. पुढे पुढे सुवर्णमृगाची कथा इतकी रोचक ठरली, की तिबेट, खोतान, हिंदेशिया, सयाम व ब्रह्मदेश यांतील रामायणांतही तिचा समावेश झाला.

ब्रह्मचक्रनामक एका हस्तलिखित रामायणात सीताहरणाचे एक सर्वस्वी वेगळे रूप आढळते, ते असे — रावणाची शूर्पणखा नावाची एक बहीण होती. ती आपल्या दोन मुलींसह लंका व किष्किंधा यांमधील सीमेचे रक्षण करीत असे. एके दिवशी राम-लक्ष्मण-सीता यांना शूर्पणखेने त्या भागात पाहिले. शूर्पणखेने त्यांच्यावर हल्ला चढवला. त्या चकमकीत लक्ष्मणाने तिच्या दोन्ही मुलींना ठार मारले. शूर्पणखेला मागे हटावे लागले. ती लंकेत गेली. तिने रावणाला भडकावले. रावण सीतेचे हरण करण्याकरिता निघाला असता तिनेच सुवर्णमृगाचे रूप घेतले. राम त्या सुवर्णमृगाची शिकार करण्यास गेला. तो संकटात आहे हे जाणून लक्ष्मणही तिकडे गेला. जाताना त्याने सीतेच्या रक्षणाची जबाबदारी पृथ्वीवर सोपवली. रावणाने सीतेला उचलले; पण पृथ्वीने सीतेचे पाय घट्ट पकडून ठेवले. त्यामुळे रावणाला तिला उचलता येईना. एवढ्यात लक्ष्मण आलेला पाहून रामाने त्याला विचारले, की "सीतेच्या रक्षणाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काय व्यवस्था केलीस ?" लक्ष्मण म्हणाला. "मी तिला पृथ्वीच्या हाती निरविले आहे." राम म्हणाला. "तू चूक केलीस. पृथ्वीवर माझा विश्वास नाही." रामाचे हे शब्द पृथ्वीच्या कानी पडले. रामाने आपल्यावर अविश्वास दर्शविल्याबद्दल तिला वाईट वाटले. तिने लगेच सीतेचे पाय सोडले. मग रावण तिला उचलून निघून गेला.

बिर्होर आदिवासींची एक कथा अशी – लक्ष्मण रामाच्या मागून जायला निघाला, तेव्हा त्याने सीतेला मोहऱ्या अभिमंत्रित करून दिल्या आणि सांगितले. "जर कोणी तुला त्रास द्यायला आला तर त्याच्यावर या मोहरीचे दाणे फेक. एक दाणा फेकलास, तर तो एक तास मूर्च्छित पडेल. दोन दाणे फेकलेस तर दोन तास मूर्च्छित पडेल." एवढे सांगून लक्ष्मण निघून गेला. पाठोपाठ रावण तिथे आला. सीतेने त्याच्यावर एक दाणा फेकला तो मूर्च्छित पडला. सावध झाल्यावर पुन्हा एक दाणा फेकला. पुनः रावणाची तीच अवस्था. मग तो सीतेला म्हणाला "इतके कष्ट कशाला घेतेस. सगळेच दाणे एकदम फेक; म्हणजे मी मरून जाईन." सीतेने तसे केले. रावण मरून पडला; पण लगेच सजीव होऊन उठला आणि त्याने सीतेला उचलून नेले.

दुसरी कथा रेघ ओढण्याची. जाण्याच्या पूर्वी लक्ष्मणाने आश्रमाच्या चारही बाजूंनी एक रेघ ओढली आणि सीतेला सांगितले. "तू या रेघेच्या बाहेर जाऊ नकोस म्हणजे तुला धोका होणार नाही. या रेघेच्या आत जो कोणी येईल त्याचे मस्तक फुटेल.' लक्ष्मण गेल्यावर लगेच रावण आला व सीतेकडे भोजन मागू लागला. सीता रेघेच्या आत राहून भोजन देऊ लागली. पण तसे करताना तिचा हात तेवढा बाहेर आला. तोच पकडून रावणाने तिला रेघेच्या बाहेर ओढले. ही कथा कृत्तिवास, आनंद, भावार्थ ही रामायणे व रामचरितमानस या ग्रंथांत थोड्याफार फरकाने दिली आहे.

सीतेचे हरण केल्यानंतर रावणाने तिला प्रथम आपल्या अंतःपुरात व नंतर अशोकवनात ठेवले आणि तिच्याभोवती राक्षसींचा पहारा बसवला, अशी कथा वाल्मीकिरामायणात आली आहे. इतर ग्रंथांत ही कथा आढळते, ती अशी –

रावणाने सीतेला एका वाटिकेत ठेवून तिच्या रक्षणाचा भार मंदोदरीवर सोपवला. मंदोदरी येऊन पाहते, तर ती तिची मुलगीच निघाली. सीतेला जन्म दिल्यानंतर मंदोदरीने तिला नदीत फेकून दिले होते. दोघींची परस्पर ओळख पटताच सीतेने आपला जीवनवृत्तान्त मंदोदरीला ऐकवला व दोघीही विलाप करू लागल्या (काश्मीरी रामायण).

रावणाने सीतेला प्रथम देवरमण व नंतर स्यमंतकुसुम उद्यानात ठेवले. तो मंदोदरीला म्हणाला. "मी सीतेचे हरण केले आहे. जर सीता माझा तिरस्कार करीत राहील तर माझे प्राण वाचणार नाहीत. तेव्हा तू, ती मला वश होईल असे कर." त्यावर मंदोदरी म्हणाली. "तुम्ही तिच्यावर बलप्रयोग करा." रावण म्हणाला "त्यामुळे माझ्या व्रताला बाध येईल. तिने स्वतः होऊन वश झाले पाहिजे !" मग मंदोदरीने सीतेचे त्या बाबतीत मन वळवण्याचा प्रयत्न केला. रावणाने माया रचून सीतेला नाना प्रकारचे भय दाखवले. इतके करूनही सीता रावणाला वश झाली नाही (पउमचरिय).

रावणाने अपहरण करतेवेळीही सीतेला स्पर्श केला नाही. कारण तसे तो करता तर पतिव्रतेच्या स्पर्शाच्या पापामुळे त्याची आकाशगमिनी विद्या नष्ट होणार होती (उत्तरपुराण). रावणाने आणलेल्या विमानात ती स्वतः चढली (नरसिंहपुराण; उत्तरपुराण).

रावणाला खरी सीता मिळालीच नाही. त्याने पळविले ते एका मायावी सीतेला, असे अध्यात्मरामायणात म्हटले आहे.

गोदावरी सागराला सीताहरणाचा वृत्तान्त सांगते. सागर विचारतो, की "निशाचर रावणाने सीतेला स्पर्श केला?" त्यावर गोदावरी म्हणते. "नाही. जेव्हा रावणाने सीतेवर हात टाकण्याचा प्रयत्न केला, तेव्हा अनसूयेने सीतेला दिलेला अंगराग अग्नीच्या रूपात परिणत होऊन तो तिचे आवरण बनला. मग रावणाने वरुणमंत्र जपून मेघांना बोलावले आणि त्या मेघांमध्ये गुंडाळून सीतेचे हरण केले "(प्रसन्नराघव).

अशा प्रकारे भिन्न भिन्न युक्त्या योजून सर्व रामकवींनी सीतेला रावणस्पर्शापासून दूर ठेवले आहे. यावरून कळून येते ते हे, की या सर्व कवींच्या अंतरात सीतेविषयी व तिच्या पातिव्रत्याविषयी नितांत आदर वसत होता. या सर्व कवींनी सीतेवर अपार प्रेम केले असून, जनमानसातून तिची प्रतिमा डागळली जाऊ नये म्हणून बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला आहे.

किष्किंधाकांडाचा विकास– राम-लक्ष्मणांची सुग्रीव-हनुमंताशी भेट, हा किष्किंधाकांडाचा महत्त्वाचा प्रसंग आहे. हनुमंताने भिक्षुरूपाने जाऊन राम-लक्ष्मणांची भेट घेतली व सुग्रीवाशी त्या दोघांचे सख्य घडवून आणले, अशी कथा वाल्मीकिरामायणात आहे. या प्रसंगानंतर हनुमान रामाचा दास झाला. पण उत्तरकालीन रामकथांमधून हनुमंताने रामाचे जे दास्य पत्करले, त्याच्या मागे एक वेगळीच कथा दिली आहे–

लक्ष्मण फळे तोडण्यासाठी शिवाच्या वाटिकेत गेला. तिथे हनुमान द्वारपाल होता. हनुमान लक्ष्मणाला फळे तोडू देईना. त्यामुळे दोघांचे द्वंद्वयुद्ध झाले. लक्ष्मणाला यायला उशीर झाला म्हणून राम तिथे गेला. तिकडून शिवही आला. शिवाचे व रामाचे युद्ध झाले. रामाचा पराक्रम पाहून शिव प्रसन्न झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व त्याने हनुमंताला रामाच्या हाती दिले. अशा प्रकारे शिवाची सेवा सोडून मारुती रामभक्त बनला (बंगाली रामायण).

एका संताळी रामकथेतला एक प्रसंग असा – मारुती टरबुजे राखीत असता लक्ष्मण ती तोडायला येतो. मारुती तोडू देत नाही. त्यामुळे दोघांचे युद्ध होते. पाठोपाठ रामही तिथे येऊन मारुतीविरुद्ध लढू लागतो. शेवटी राम-लक्ष्मणांचा पराक्रम पाहून मारुती त्यांना टरबुजे खाऊ घालतो व रामाचा दास बनतो.

बिर्होर रामकथेतला वेगळेपणा असा– राम-लक्ष्मण वनात सीतेचा शोध करीत होते. मारुती त्या वेळी अंजनीच्या गर्भात होता. गर्भातच त्याला राम-लक्ष्मण दिसले आणि गर्भातूनच तो ओरडला. "दादा, थांबा. मला तुमच्या बरोबर यायचे आहे." असे म्हणून मारुतीने जन्म घेतला आणि तो राम-लक्ष्मणांबरोबर चालता झाला.

वाल्मीकिरामायणाच्या दाक्षिणात्य पाठात वाली व सुग्रीव यांना अनुक्रमे इंद्र व सूर्य यांचे पुत्र मानले आहे. ऋक्षरजा नावाचा एक वानर ब्रह्मदेवाच्या अश्रूतून निर्माण झाला. एके दिवशी मेरू पर्वतावर हिंडत असता त्याला तहान लागली. तो एका सरोवरावर पाणी पिण्यासाठी गेला. तीरावरून पाण्यात डोकावल्यावर त्याला तिथे आपले प्रतिबिंब दिसले. ऋक्षरजाला वाटले, की पाण्यात कोणी तरी आपला शत्रू लपून बसला आहे. त्याला मारण्यासाठी ऋक्षरजाने सरोवरात उडी घेतली. बाहेर येऊन पाहतो, तर त्याचे पुरुषत्व लोपून त्याला स्त्रीत्व प्राप्त झाले होते. एवढ्यात इंद्र व सूर्य तिथे आले व त्या दोघांनीही त्या स्त्रीशी समागम केला. इंद्रापासून तिला वाली झाला व सूर्यापासून सुग्रीव झाला. इंद्राने वालीला अक्षय सुवर्णमाला दिली व सूर्याने सुग्रीवाच्या सेवेसाठी मारुतीला नियुक्त केले. दुसऱ्या दिवशी सूर्योदय होताच ऋक्षरजा पुनश्च पुरुष झाला. मग त्या दोन्ही पुत्रांना घेऊन तो ब्रह्मदेवाकडे गेला. ब्रह्मदेवाने त्याला किष्किंधेचे राज्य दिले.

हीच कथा अध्यात्म व आनंद या दोन्ही रामायणांत दिलेली आहे.

ऋक्षरजा स्त्री झाला त्याचे कारण पार्वतीचा त्या सरोवराला तसा शाप होता, असे भावार्थरामायणात सांगितले आहे.

सारलादास याच्या महाभारतात वाली-सुग्रीव यांच्या जन्माची कथा अगदी वेगळी दिली आहे, ती अशी–

अहल्या ही गौतमाची पत्नी. ती अतिशय सुस्वरूप होती. गौतमाचा तिच्यावर विश्वास नव्हता. तो स्नानाला नदीवर जाताना तिचा जीव बरोबर घेऊन जाई. मग ती निश्चेष्ट पडे. त्या अवस्थेत एके दिवशी ती इंद्र व सूर्य यांच्या दृष्टीस पडली. ते तिच्यावर आसक्त झाले. इंद्र तिच्या शरीरात शिरला आणि अहल्या सचेतन झाली. लगेच सूर्याने तिचा उपभोग घेतला. नंतर सूर्य तिच्या शरीरात प्रवेशला आणि इंद्राने तिच्याशी समागम केला. त्या संबंधामुळे तिला दोन पुत्र झाले. अंजनी नावाच्या गौतमाच्या कन्येने एके दिवशी ही गोष्ट गौतमापुढे उघड केली. तिच्या सांगण्याची परीक्षा घेण्यासाठी त्या दोन पुत्रांना गौतमाने पाण्यात फेकले आणि ते तावडतोब वानर बनले. खड्ग नावाचा एक निपुत्रिक राजा होता. गौतमाने ते दोन्ही पुत्र त्याला देऊन टाकले. राजाने थोरल्याचे नाव वाली व धाकट्याचे नाव सुग्रीव ठेवले.

पउमचरियामधील कथा अशी आहे–आपला पुत्र वाली याला राजा व सुग्रीवाला युवराज करून आदित्यरजाने जिनदीक्षा ग्रहण केली. नंतर थोड्याच दिवसांत वालीला वैराग्य येऊन त्याने आपले राज्य सुग्रीवाकडे सोपवले. सुग्रीवाने तारेशी विवाह केला. त्याला अंगदभट व जयानंद असे दोन पुत्र झाले. सहस्रगती नावाचा एक विद्याधर होता. त्याच्या मनातून तारेशी लग्न करायचे होते, पण ते त्याला जमले नाही. म्हणूनच त्याने रूप परिवर्तन करणारी विद्या सिद्ध करण्यासाठी हिमालयात साधना सुरू केली. त्याला ती जमली. मग त्याने सुग्रीवाचे रूप धारण करून सुग्रीवाची पत्नी व त्याचे राज्य छिनावून घेतले.

वाली-सुग्रीवाच्या वैरात सुग्रीवाचा पक्ष घेऊन राम उभा राहिला. दोघांचे द्वंद्वयुद्ध चालू असता रामाने आडोशाला उभे राहून वालीला बाण मारला व त्याचा वध केला. हे कर्म क्षत्रियोचित नव्हते; पण रामाला त्या दोषातून मुक्त करण्याचा प्राचीन कवींनी प्रयत्न केला आहे. वाल्मीकिरामायणात म्हटले आहे, की वाली हा शाखामृग असल्याने त्याच्या वधाचा दोष क्षत्रिय रामाला लागू शकत नाही.

सुंदरकांडाचा विकास– यात सीतेच्या शोधासाठी निघालेला मारुती समुद्र उल्लंघून लंकेत प्रवेशला आणि तिथे त्याला सीतेचा शोध लागला, ही कथा मुख्यत्वे आहे. संताळ आदिवासींच्या कथेत मारुतीने, समुद्राच्या मध्यभागी रामाने सोडलेल्या बाणावर विश्रांती घेतली, असे वर्णन आहे. दुसऱ्या एका हिंदी कथेत मारुती प्रथम एक बाण सोडतो व त्यावर आरूढ होऊन समुद्र पार करतो, असे म्हटले आहे. वाल्मीकिरामायणानुसार लंकेत शिरताना मारुतीने मांजराएवढे रूप धारण केले होते. उत्तरकालीन कथांमध्ये त्याचा मांजर असा स्वाभाविक विकास झाला. आनंदरामायणाच्या मते तो छोट्या बालकाच्या रूपात सीतेपुढे प्रकट झाला. भ्रमर, मूषिक, ब्राह्मण, शुक, काक, ... अशीही मारुतीची रूपे सांगितली आहे.

राक्षसांची बलपरीक्षा करण्यासाठी व रावणाचे मन जाण...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी मारुतीने अशोकवनाचा नाश व लंकादहन केले, असे वाल्मीकीने म्हटले आहे. या सगळ्या घटनेत अद्‌भुताचा अंश प्रभावी असल्यामुळे उत्तरकालीन कवींनी त्या प्रसंगात पुष्कळ मालमसाला भरला आहे.

मारुतीला भूक लागली आणि त्याने सीतेची अनुमती घेऊन अशोकवनातली फळे खाल्ली, याविषयीची कथा आनंदरामायणात पुढीलप्रमाणे वाढवली आहे –

मारुतीने अशोकवनातली फळे खाण्याची अनुज्ञा सीतेकडे मागितली. सीतेने आपल्या हातातले कंकण काढून मारुतीला म्हटले. "बाजारात जाऊन या कंकणाच्या मोबदल्यात हवी तेवढी फळे विकत घेऊन खा." मारुती म्हणाला. "मी दुसऱ्याने तोडलेली फळे खात नाही, राहू दे. मी उपाशीच परत जाईन." सीतेला त्या गोष्टीचे वाईट वाटले. ती म्हणाली' 'तू जमिनीवर पडलेली फळे खा; तोडून मात्र खाऊ नकोस." मारुतीला ती पडल्या फळाची आज्ञा पुरली. त्याने आपल्या पुच्छाचे विळखे घालून सगळी झाडे गदगदा हलवली आणि झाडांवरची फळे पडल्यावर ती खाल्ली. अशा प्रकारे अशोकवनातल्या सर्व फळांचा त्याने फडशा पाडला.

मारुतीच्या शेपटाला फडकी गुंडाळून राक्षसांनी त्या शेपटाला आग लावून दिली. या घटनेतही कवींच्या कल्पनाविलासाला खूप अवसर मिळाला आहे. आनंद व भावार्थ या रामायणांत रावण मारुतीच्या पुच्छाला फुंकर घालू लागला, तेव्हा आग भडकली आणि रावणाच्या दाढीमिशा जळून गेल्या, असे वर्णन आहे.

वाल्मीकिरामायणानुसार हनुमंताने आपली जळणारी शेपटी समुद्रात बुडवून विझवली. कृत्तिवासरामायणात या गोष्टीचे परिवर्तन झाले, ते असे– मारुतीने फुंकर घालून शेपटी विझवली. तसे करीत असता त्याचे तोंड जळून काळे झाले. आपल्या काळ्या तोंडाबद्दल त्याने सीतेजवळ गाऱ्हाणे करून म्हटले, की "आता मला सगळे वानर हसतील !" त्यावर सीता म्हणाली. "जे हसतील त्या साऱ्यांची तोंडे काळी पडतील." आणि तसेच झाले. जळालेल्या लंकेचे पुढे काय झाले, याबद्दलही काही कवींनी लिहून ठेवले आहे. लंका जळाल्यावर रावणाने स्वर्गातून एक महर्षी बोलावला आणि त्याच्याकडून लंकेची पुनर्रचना करून घेतली, असे सेरीराम या काव्यात म्हटले आहे. लंका जळालेली पाहून स्वर्गातल्या देवांनी विश्वकर्म्याला पाठवले आणि त्याने एका रात्रीत लंका नवी करून दिली, असे बलरामदासाच्या रामायणात सांगितले आहे.

युद्धकांडाचा विकास – सेतुबंध, राम-रावणयुद्ध, सीतेचे अग्निदिव्य आणि रामाचे अयोध्येत पुनरागमन हे युद्धकांडाचे प्रमुख विषय आहेत. अनेक रामकथांमध्ये सेतुबंधाचा उल्लेख मिळत नाही. जैन रामायणात राम-लक्ष्मण वानरसैन्यासह लंकेजवळ उतरतात आणि तिथे समुद्र व सेतू या नावाच्या दोन राजांना अनुक्रमे नल व नील हे पराजित करतात.

पद्मपुराणाच्या पातालखंडातली कथा अशी–रामाने समुद्राच्या तीरावर साहाय्यासाठी शिवाची प्रार्थना केली. शिवाने प्रसन्न होऊन रामाला अजगव नावाचे धनुष्य दिले. रामाने ते धनुष्य समुद्रात फेकले व त्याच्यावर बसवून वानरसैन्याला समुद्रपार केले. रामाने आपल्या बाणांनी समुद्राचे शोषण केले व समुद्राने प्रार्थना केल्यावर वारुणास्त्रद्वारा त्यात पुनश्च जल भरले, अशी कथा याच पुराणाच्या उत्तरखंडात आहे. लक्ष्मणाने रागावून समुद्रावर उडी घेतली व त्याच्या शरीराच्या उष्णतेने समुद्र सुकून गेला. नंतर समुद्राच्या प्रार्थनेवरून लक्ष्मणाने राम-सीतेसाठी अश्रू वाहवून समुद्र पुन्हा भरून टाकला, अशी कथा अद्‌भुतरामायणात आहे. मारुतीने आपले पुच्छ वाढवले आणि त्यावर बसवून रामलक्ष्मणांना समुद्रपार केले, असे बिर्होरांच्या रामकथेत म्हटले आहे.

नलाने समुद्रावर सेतू बांधला ही रामायणातली कथा; पण विदेशी रामायणांत तो मारुतीने बांधला असा उल्लेख आहे. नलाने पाण्यावर ठेवलेले दगड न बुडता तरंगत राहत होते. हे दगड तारण्याचे सामर्थ्य नलाला एका शापाने प्राप्त झाले होते. नलाने कोण्या एका ब्राह्मणाचा शाळिग्राम गंगेत फेकून दिला. ब्राह्मणाने त्याला शाप दिला, की 'तुझ्या स्पर्शाने दगडसुद्धा तरतील.' ही कथा आनंदरामायणात आहे. हा शापच सेतुबंधाच्या कामी नलाला वरदरूप ठरला; पण त्यामुळेच त्याला गर्वही झाला. त्याचा परिणाम म्हणून त्याने ठेवलेले दगड बुडू लागले. तो हताश होऊन रामाकडे आला. राम त्याला म्हणाला. "एका दगडावर रा व दुसऱ्या दगडावर म अशी अक्षरे कोरून ते दगड जोड आणि समुद्रात टाक." नलाने तसे केले व त्याचे सेतुबंधाचे काम पुढे सुरू झाले. ही कथा थोड्याफार फरकाने आनंद व भावार्थ या रामायणांतही आली आहे.

उत्तरकालीन रामायणांत सेतुबंधाच्या प्रसंगी नल व मारुती यांच्या कलहाचेही वर्णन आहे. मारुतीने उचलून आणलेले पर्वत नल एका हातात पकडीत होता व दुसऱ्या हाताने ते समुद्रावर ठेवीत होता. तसे करताना मारुतीपेक्षा आपली शक्ती मोठी आहे, ही घमेंड त्याला मिरवायची होती. रामाने त्याचा गर्व नष्ट करण्याचे ठरविले व मारुतीला सुचविले. "तू सात योजने लांबीचा एक पर्वत उचलून आण." मारुतीने तसे केले आणि नलाला तो पर्वत झेलून घेता आला नाही. ही कथा रंगनाथरामायणात सांगितली आहे.

रामकियेन या विदेशी रामकथेत हीच कथा अगदी वेगळ्या पण अद्‌भुत स्वरूपात सांगितली आहे. मारुतीने आपल्या शरीरा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरच्या एकेका केसात एकेक शिळाखंड बांधून आणला आणि नीळाबदलाला (नील) म्हटले, की "तू हे सगळे शिळाखंड एकदम घे." पण नीलाबदलाला तसे करता येईना. त्यामुळे त्या दोघांत लढाई सुरू झाली. रामाला ते आवडले नाही. त्याने दोघांनाही शिक्षा केली. नीलाबदलाला सुग्रीवाच्या जागी राज्य सांभाळण्यासाठी किष्किंधेला पाठवले व मारुतीला सात दिवसांत सेतू बांधण्याचा आदेश दिला.

राम-रावणयुद्धात लक्ष्मणाला रावणाने शक्ती मारली, तो मूर्च्छित पडला आणि मारुतीने हिमालयात जाऊन विशल्याकरणी ओषधी आणल्यावर तिच्या उपचाराने लक्ष्मण बरा झाला, असे वाल्मीकीने सांगितले आहे. पउमचरियामध्ये या ओषधीचे मानवीकरण केले आहे, ते असे – लक्ष्मणाला शक्ती लागल्यानंतर एक विद्याधर रामाला येऊन भेटला व म्हणाला. "द्रोणमेघाची विशल्या नावाची कन्या आहे, तिच्या स्नानजलाने लक्ष्मणाला बरे वाटेल." ते ऐकून हनुमंताने अयोध्येत जाऊन भरताला सीताहरण व लंकायुद्ध यांचा वृत्तान्त सांगितला. परत येताना त्याने विशल्येला बरोबर आणले. तिच्या स्पर्शाने लक्ष्मण सावध झाला आणि विशल्येशी लक्ष्मणाचे लग्न झाले.

रामाने रावणाला मारले ही वाल्मीकिरामायणातली कथा; पण तिलाही पर्याय निर्माण झाले आहेत. खोतानी रामायणात रामाच्या बाणांनी घायाळ झाल्यावर रावणाने रामाला करभार देण्याचे मान्य केले व युद्ध थांबले. जैन रामकथा व बिर्होर आदिवासींची रामकथा यांमध्ये रामाऐवजी लक्ष्मणाने रावणाला मारल्याचे सांगितले आहे.

उत्तरकालीन रामकथांमध्ये अनेक ठिकाणी रावणाचे मर्मस्थान सांगितले आहे आणि काही ठिकाणी रावणाचा जीव अन्यत्र कुठेतरी गुप्त आहे, अशा कथा आहेत –

रावणाच्या नाभिप्रदेशात अमृत ठेवलेले होते. बिभीषणाला ही गोष्ट ठाऊक होती. त्याने ती रामाला सांगितली व आग्नेय अस्त्र फेकून रामाने ते अमृत सुकवले. ही कथा अध्यात्म, आनंद, भावार्थ, इ. रामायणांत व तुलसी रामायणात सांगितली आहे.

रावणाचे मर्मस्थान त्याच्या पायाच्या अंगठ्यात होते, असे तत्त्वसंग्रह, खोतानी व तिबेटी रामायणांत सांगितले आहे.

सीता हनुमंताला सांगते, की रावणाच्या उजव्या कानाखाली जे छोटे शीर आहे, त्यात त्याचा जीव ठेवलेला आहे. ही कथा सेरीराम या कथेत दिली आहे.

रावणाने अमरपदासाठी तप केले. ब्रह्मदेवाने त्याला ब्रह्मास्त्र दिले व सांगितले, की 'या ब्रह्मास्त्राने तुझ्या मर्मस्थानावर प्रहार झाला तरच तुला मरण येईल.' रावणाने ते अस्त्र मंदोदरीकडे ठेवायला दिले होते. ही गोष्ट बिभीषणाला ठाऊक होती. त्याने ती गोष्ट रामाला सांगितली व रामाने मारुतीला त्या अस्त्राचा शोध करण्याची आज्ञा दिली. मग मारुती ब्राह्मणवेषाने मंदोदरीकडे जाऊन म्हणाला. "जोवर ब्रह्मास्त्र तुझ्याजवळ सुरक्षित आहे, तोवर रावण मरणार नाही. पण मला एक भीती वाटते की तू ब्रह्मास्त्र कुठे लपविले आहेस, ते बिभीषणाला ठाऊक असण्याची शक्यता आहे." त्यावर मंदोदरी म्हणाली. "मी फार दक्ष आहे. मी जिथे बसले आहे, तिथल्या खांबात ते मी लपविले आहे. हे मी कोणालाच सांगितले नाही." मारुतीने लगेच तो स्फटिकाचा खांब मोडला व ते ब्रह्मास्त्र तिथून काढून रामाला नेऊन दिले. ही कथा कृत्तिवासरामायणात आहे.

रावणाचा जीव त्याच्या महालातल्या एका पेटीत सुरक्षित ठेवलेला होता. मारुतीने त्या महालात प्रवेश मिळवून ती पेटी हस्तगत केली आणि ती उघडून तिच्यातला तो जीव बाहेर सोडून दिला. ही कथा बिर्होरांच्या रामकथेत आहे.

रावणवधानंतर सीतेला रामाकडे आणले गेले व रामाने तिच्या चारित्र्याविषयी संदेह व्यक्त केल्यामुळे सीतेने अग्नि दिव्य केले, अशी कथा वाल्मीकीच्या रामायणात आहे. पण हा प्रसंग प्रक्षिप्त आहे, असे श्री. कामिल बुल्के म्हणतात. महाभारतातल्या रामोपाख्यानात आणि इतर अनेक पुराणांमध्ये अग्निपरीक्षेचा अभाव आहे. मध्यकालीन रामायणात मायासीता अग्नीत प्रवेश करते आणि खरी सीता अग्नीतून प्रकट होते, असे म्हटले आहे. सीता आपले हरण होण्यापूर्वी तीन रूपांत विभक्त झाली होती. अग्निप्रवेशानंतर ती त्या तीन रूपांत एकत्र होऊन प्रकट झाली, असे आनंदरामायणात सांगितले आहे.

उत्तरकांडाचा विकास – या कांडात सीतात्याग, कुश-लव-चरित, रावणाचा वृत्तान्त, हनुमच्चरित्र, इ. आख्याने आहेत.

युद्धकांडाच्या अंतिम सर्गात रामाने दहा अश्वमेध केल्याचे वर्णन आहे. रामाने रावणाचा वध केला आणि रावण ब्राह्मण असल्यामुळे त्याला ब्रह्महत्या लागली. हा दोष घालवण्यासाठी प्रायश्चित्त म्हणून रामाने अश्वमेध यज्ञ केले, असे पौराणिक साहित्यात सांगितले आहे. वाल्मीकीने मात्र या गोष्टीचा उल्लेख केलेला नाही. अध्यात्म व आनंद या रामायणांत रामाने ब्रह्महत्येच्या निराकरणासाठी अनेक शिवलिंगांची स्थापना केली असे म्हटले आहे.

सीतात्यागाचा प्रसंगही वेगवेगळ्या प्रकारे विकसित झाला आहे. काही विद्वान असे मानतात, की वाल्मीकीच्या अगोदर आदिरामायण मानता येईल असे एक कथाकाव्य होते, त्यात सीतात्याग नव्हता. ती कथा रामाच्या राज्याभिषेकानंतर सुखी अवस्थेत समाप्त झाली होती. हरिवंश, वायुपुराण, विष्णुपुराण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नृसिंहपुराण इत्यादी ग्रंथांतही सीतात्यागाचा संकेत नाही.

बौद्धांच्या अनामकजातकात सीतात्यागाचा उल्लेख नाही; पण सीतेच्या चारित्र्याविषयी लोकापवाद निर्माण झाल्याचा मात्र संकेत आहे. लोकापवादामुळे रामाने सीतेचा त्याग केला, या कथेला मूळ आधार हे अनामकजातक असावे, असा डॉ. कामिल बुल्के यांचा तर्क आहे.

उत्तरकालीन रामायणकारानीं सीतात्यागाची कथा वाल्मीकीला अनुसरून लिहिली असली, तरी कारणे मात्र भिन्न भिन्न दर्शवली आहेत.

या कथेत पुढे एका धोब्याला प्राधान्य मिळाले. एक धोबी घरातून निघून गेलेल्या बायकोला परत घरात घ्यायला नकार देतो व म्हणतो, की "मी काही, दीर्घ काल परगृही असलेल्या सीतेला घरात घेणारा राम नव्हे." हीच कथा थोडचा विस्ताराने कथासरित्सागरात व संक्षेपाने भागवत पुराणात आली आहे. राम हा काही ठिकाणी स्वतः लोकापवाद ऐकतो, तर काही ठिकाणी तो गुप्तचरांकडून ऐकतो व सीतेचा त्याग करतो, अशीही भिन्न मते आहेत.

जैन रामायणात एक निराळेच कारण दिले आहे, ते असे – सीता गर्भवती झाल्यावर तिच्या तीन सवती तिच्याविषयी मत्सर करू लागल्या. त्यांनी लाडी-गोडी दाखवून सीतेला म्हटले. "तू आम्हांला रावणाचे चित्र काढून दाखव." त्यावर सीतेने त्याच्या चरणांचे तेवढे चित्र काढले. मग सवती ते चित्र घेऊन रामाकडे गेल्या. त्यांनी सीतेच्याविषयी रामाच्या मनात किल्मिष उत्पन्न केले व त्याविषयी राज्यातही बभ्रा केला. थोडचाच कालात नागरिकांनी येऊन सीतेविषयीचा लोकापवाद रामाच्या कानी घातला. रामाने गुप्तपणे नगरात हिंडून तो लोकापवाद ऐकला व सीतेचा त्याग केला. कृत्तिवासरामायणातही थोडचा-फार फरकाने अशीच कथा आहे. सीतेला रावणाचे चित्र काढायला लावण्याचे हे काम कैकेयीने केले, असे आनंदरामायणाने म्हटले आहे. ती कथा अशी – कैकेयी सीतेला मनात कपट धरून रावणाचे चित्र काढायला सांगते. सीता म्हणते. "मी केवळ रावणाच्या उजव्या पायाचा अंगठाच तेवढा पाहिला आहे" कैकेयी म्हणते. "तेवढाच काढ" सीता तेवढाच काढून दाखवते. त्यावरून कैकेयी ते समग्र चित्र पूर्ण करते व रामाला म्हणते. "पाहिलेस! रावण सीतेच्या मनात कसा ठसून राहिला आहे! अन्यथा तिला असे चित्र काढता आले नसते. बाबा रे, स्त्रीचरित्र अगम्य आहे.' त्यावर राम कलुषित होऊन सीतेचा त्याग करतो. कित्येक रामविषयक लोकगीतांतूनही हेच कारण सांगितलेले आहे.

काही कवींनी याव्यतिरिक्त सीतात्यागाची काही परोक्ष कारणे सांगितली आहेत, ती अशी –

(१) विष्णूने भृगुपत्नीची हत्या केली होती, त्यावरून भृगूने विष्णूला शाप दिला, की तुला मनुष्यजन्म (रामरूपात) घ्यावा लागेल आणि पत्नीवियोगाचे दुःख सोसावे लागेल (वा. रा. उत्तर. ५१).

(२) वालिवधानंतर तारेने रामाला शाप दिला, की 'तुला सीतेची संगती अल्पकाळच लाभेल' (कृत्तिवास, भावार्थ, बलरामदास, विलंका, इ. रामायणे).

(३) लग्न होण्यापूर्वी सीतेने उद्यानातल्या शुकदंपतीकडून रामकथा ऐकली. ती ऐकल्यावर त्या पक्ष्यांना सीता म्हणाली. "जोवर राम माझे पाणिग्रहण करीत नाही, तोवर मी तुम्हा दोघांना पिंजऱ्यात बंदिस्त करून ठेवीन." तिने तसे केले. त्यावेळी शुकी गर्भवती होती. "तिच्या प्रसूतीसाठी आम्हांला मुक्त कर" असे त्या दंपतीने सीतेला विनविले. सीतेने नराला मुक्त केले, पण मादीला अडकवून ठेवले. मादीने पिंजऱ्यातच प्राणत्याग केला. मरतेवेळी तिने सीतेला शाप दिला. "ज्याप्रमाणे तू माझा आणि पतीचा वियोग केलास, त्याचप्रमाणे तू गर्भिणी अवस्थेत रामापासून वियुक्त होशील" (पद्मपु. पाताल. ५७).

प्रस्तुत रामायणपूर्वीचे रामायण हे सुखान्त होते. त्यात रामाचा राज्याभिषेक व सुखसमृद्धिपूर्ण असे रामराज्य, यांच्या वर्णनाने ते समाप्त झाले होते. वाल्मीकीच्या उत्तरकांडातील रामकथा मात्र दुःखान्त आहे. उत्तरकालीन रामकथांमध्ये सीतात्याग व सीतेचा भूमिप्रवेश आढळतो; पण तरीही काही रामकथांमध्ये तिला सुखान्त बनविण्याचा प्रयत्न केलेला आढळतो–

वाल्मीकीने राम व अयोध्यावासी जन यांना आपले एक नाटक पाहण्यास बोलावले. ते नाटक सीता-त्याग व लव-कुशजन्म या कथानकांवर आधारलेले होते. त्यातील पात्रांचा तो करुणरसात्मक अभिनय पाहिल्यावर अयोध्यावासी जनांचा सीतेच्या सतीत्वावर विश्वास बसला. तिला दिव्य करायला लागले नाही. मग राम आपले पुत्र व सीता यांना घेऊन अयोध्येत आला (उत्तररामचरित). बृहत्कथामंजिरीतही रामकथा सुखान्तच दर्शविली आहे.

कुंदमालेच्या शेवटच्या अंकात सीता आपल्या शुद्धत्वाची साक्ष देण्यासाठी पृथ्वीची प्रार्थना करते. पृथ्वीदेवी प्रकट होते व सीतेच्या निष्कलंक चारित्र्याची साक्ष देऊन अंतर्धान पावते. त्यानंतर सीता व कुश-लव यांच्यासह राम अयोध्येला परत जातो.

रामकथेची व्यापकता– वाल्मीकीच्या पूर्वी रामकथाविषयक गाथा व आख्याने निःसंशय निर्माण झाली होती. पण त्यांची लोकप्रियता व व्यापकता यांच्याविषयी निश्चित माहिती मिळत नाही. महाभारताच्या द्रोणपर्वात व शांतिपर्वात जी संक्षिप्त रामकथा आहे, ती प्राचीन पण बिखुरलेल्या गाथा एका कथासूत्रात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्रथित करून तयार केलेली आहे. तेव्हापासून रामकथेच्या दिग्विजयाला प्रारंभ झाला. रामायणावरूनच कळते, की काव्योपजीवी कुशीलव समस्त देशात संचार करून या आदिकाव्याचा प्रचार करू लागले. त्यामुळे हळूहळू रामकथा लोकप्रिय होऊ लागली. त्याचबरोबर राम हा अवतारही भावना जनमानसात दृढ होऊ लागली. पुढे जैन, बौद्ध यांनीही रामकथेचा स्वीकार केला. बौद्धांनी सनपूर्व कित्येक शतकांच्या आधी रामाला बोधिसत्त्व मानून रामकथेला जातकसाहित्यात स्थान दिले. जैन ग्रंथांत अत्यंत विस्तृत अशा स्वरूपात रामकथा आढळून येते. जैनांनी राम, लक्ष्मण व रावण यांना जैनधर्मी मानले आहे. इतकेच नव्हे, तर त्यांना त्रिषष्टिशलाकापुरुषांतही स्थान दिले आहे. जैनमते राम, लक्ष्मण व रावण हे क्रमाने आठवा बलदेव, वासुदेव व प्रतिवासुदेव आहेत. जैनांनी वानर व राक्षस या दोन समाजांना विद्याधर वंशाच्या दोन भिन्न शाखा मानले आहे. अशा प्रकारे राम हा पौराणिक धर्मात विष्णूचा अवतार, बौद्ध धर्मात बोधिसत्त्व व जैनधर्मात आठवा बलदेव ठरला आहे.

उत्तर काळात संस्कृत धार्मिक साहित्यात, संस्कृत ललित साहित्याच्या प्रत्येक शाखेत, अन्य भारतीय भाषांच्या साहित्यात आणि भारताच्या निकटवर्ती देशांच्या साहित्यातही रामकथेने महत्त्वपूर्ण स्थान मिळवले.

हरिवंश व प्राचीनतम पुराणे यांत राम हा विष्णूचा अवतार मानून, त्याची संक्षिप्त कथा दिली आहे. नंतरच्या पुराणांत व उपपुराणांत रामकथाविषयक सामग्री वृद्धिंगत झाली आहे. स्कंद, पद्म व देवी पुराणांत ही वाढ प्रकर्षाने दिसून येते. भारतात रामभक्तीचा प्रसार झाल्यावर तर असंख्य सांप्रदायिक रामायणे व संहिता निर्माण झाल्या. अध्यात्म, अद्‌भुत, आनंद व तत्त्वसंग्रह ही रामायणे या बाबतीत विशेष उल्लेखनीय आहेत.

संस्कृत ललित साहित्याच्या उत्कर्षकालात कितीतरी कवींनी रामकथेवर महाकाव्ये आणि नाटके रचली. रघुवंश, भट्टिकाव्य, महावीरचरित, उत्तररामचरित, जानकीहरण, कुंदमाला, अनर्घराघव, बालरामायण, महानाटक, इ. काव्य-नाटके उल्लेखनीय आहेत. त्यापुढच्या काळात रामकथाविषयक कित्येक श्लेषकाव्ये, विलोम काव्ये, चित्रकाव्ये, चंपूकाव्य, शृंगारिक काव्ये व खंडकाव्ये निर्माण झाली.

आधुनिक भारतीय भाषांच्या साहित्यांतही रामकथेला अद्वितीय स्थान लाभले आहे. भारतातल्या प्रत्येक भाषेत रामायण आढळते. कंबनकृत तमिळ रामायण, तेलुगूतील द्विपदरामायण, असमिया भाषेतले माधवकंदलीय रामायण, बंगालीमधील कृत्तिवास रामायण, हिंदीतील रामचरितमानस, उडिया भाषेतील बलरामदास रामायण व मराठीतील भावार्थरामायण; समर्थांचे रामायण, तसेच मोरोपंती रामायणे ही देशी भाषांतली प्रमुख रामायणे होत.

रामकथा भारताच्या सीमा उल्लंघून विदेशातही पसरली आणि तिकडेही तिला अमाप लोकप्रियता मिळाली. पहिल्या प्रथम बौद्धांनी रामकथेचा प्रचार परदेशांत केला. त्यांच्या अनामकजातक व दशरथकथान या रामकथांचा चिनी भाषेतही अनुवाद झाला आहे. त्यापुढे रामकथेची एक वेगळी धारा उत्तरेकडे वाहत गेली. तिची साक्ष तिबेटी व खोतानी रामायणांत मिळते. या दोन्ही रामायणांतली कथावस्तू पौराणिक रामकथांवर आधारित आहे. हिंदेशिया व हिंदचीन या देशांत वाल्मीकिरामायण प्राचीन कालापासून ज्ञात आहे. जावा, मलाया या देशांतही रामकथेवर साहित्यरचना झाली आहे. भट्टिकाव्याच्या आधारावर जावामध्ये रामायणककविन नावाचे रामायण निर्माण झाले आहे. त्याचप्रमाणे सेरनकांड व सेरीराम अशीही काव्ये रचली गेली आहेत. हिंदचीन, सयाम व ब्रह्मदेश यांत प्रचलित असलेल्या रामकथा सेरीरामवर आधारलेल्या आहेत. सयाममधले रामायण रामकियेन या नावाने प्रसिद्ध आहे. ख्मेर साहित्यातली सर्वोत्तम साहित्यकृती रामकेर्ती ही असून तिच्यावर सेरीरामची छाप आहे. ब्रह्मदेशातले रामयागन महाकाव्य सर्वांत महत्त्वपूर्ण ठरले आहे.

इ. स. च्या १५ व्या शतकानंतर पाश्चात्य प्रवासी व धर्मोपदेशक यांनी लिहिलेल्या ग्रंथांतही रामकथेची पुष्कळशी सामग्री मिळते. जे. फेनिच्चियो या जेसुइट मिशनऱ्याने लिब्हर … नावाचा ग्रंथ लिहिला. त्यात दशावतारांचे निरूपण करताना रामकथा विस्तारपूर्वक वर्णिली आहे. त्या कामी लेखकाने वाल्मीकीचाच आधार घेतला आहे. ए. रोजेरियुस या पाद्र्याने … दि ओपने दोरे या ग्रंथात वाल्मीकीला अनुसरून रामकथा … आहे. पी. बलडेयुस याने डच भाषेत रामायण रचले आहे. … कितीतरी, पाश्चात्य धर्मोपदेशकांनी रचलेली रामायणे … भाषांमध्ये प्रसिद्ध आहेत.

अशा प्रकारे रामकथा ही केवळ भारतीय संस्कृतीचीच … तर एशियाटिक संस्कृतीचीही एक महत्त्वपूर्ण वस्तू बनून … आहे. रामकथेच्या या विश्वव्यापक प्रसाराचे श्रेय … वाल्मीकीलाच दिले पाहिजे.

रामायणकालीन संस्कृती – भारताच्या सांस्कृतिक … समजून घ्यायच्या तर महाभारताइतकाच रामायणाचाही … आवश्यक आहे. वाल्मीकीने आर्यसंस्कृतीच्या एका अतिशय … उत्कृष्ट युगाला रामायणातील व्यक्तींच्या रूपाने साकार …

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. रामायणाच्या सांस्कृतिक अध्ययनाचे महत्त्व केवळ सैद्धांतिक किंवा शैक्षणिकच नाही. त्याचे व्यावहारिक महत्त्वही फार आहे. रामायण ही आर्यसंस्कृतीची आधारशिला आहे. रामराज्य म्हणजे सुखी, संपन्न, कर्तव्यनिष्ठ, प्रेममय व आनंदमय सुराज्य, असे भारतीय लोक युगानुयुगे मानीत आले आहेत. रामराज्य हा शासनव्यवस्थेचा आदर्श ठरला आहे. दुसरी गोष्ट म्हणजे रामायण हे कौटुंबिक कोमल भावनांनी विणलेले एक महावस्त्र आहे. सत्य, सदाचार आणि कर्तव्यपालन यांचा अनुकरणीय आदर्श वाल्मीकीने भारतीयांच्या पुढे ठेवला आहे.

भारतात गेली कित्येक वर्षे रामायणाचा अभ्यास सुरू आहे. पण तो मुख्यत्वे धर्म, दर्शन, काव्य, व्याकरण व भाषाशास्त्र या दृष्टींनीच झाला आहे. अनेक पाश्चात्य पंडितांनी रामायणाचे खोलवर संशोधन व समालोचन केले आहे. या सर्व पंडितांत लॅसेन नामक जर्मन पंडित अग्रगण्य मानला जातो. या सर्वांनी रामायणातील ऐतिहासिक सत्ये शोधण्याचा व रामायणाच्या कालनिश्चितीचा प्रयास केला आहे. श्री. चिंतामणराव वैद्य यांनी काव्य आणि इतिहास अशा उभय दृष्टींनी रामायणाचे समीक्षण केले आहे. कुमारी धर्मा यांनी रामायणकालीन राजनैतिक परिस्थितीचे विश्लेषण केले आहे. श्री. श्रीनिवासशास्त्री यांनी रामायणातील पात्रांचे सुंदर चरित्रचित्रण केले आहे. श्री. रामस्वामीशास्त्री यांनी रामायणातील काही समस्या उलगडून दाखवल्या आहेत. डॉ. कामिल बुल्के या युरोपीय पंडिताने रामकथेची उत्पत्ती आणि विकास यांचे विस्तारपूर्वक संशोधन केले आहे.

पण या सर्व ग्रंथांत रामायणकालीन संस्कृतीची, म्हणजेच तत्कालीन समाजरचना, आचार-विचार, आहार-विहार, वेषभूषा, क्रीडाविनोद, अध्ययन-अध्यापन, कला-कौशल्य, ज्ञान-विज्ञान, नगररचना, वर्णाश्रमधर्म, इ. विषयांचा कोणीही साक्षेपाने अभ्यास केलेला नाही. हे महत्त्वाचे कार्य डॉ. शांतिकुमार नानूराम व्यास या विद्वान गृहस्थांनी केले आहे. रामायणकालीन संस्कृति व रामायणकालीन समाज या नावाचे त्यांचे दोन ग्रंथ हिंदीमध्ये प्रकाशित झाले आहेत.

आचारविचार – रामायणकाल हे सभ्यता, शिष्टता आणि विनम्र व्यवहार यांचे युग होते. सामाजिक शिष्टाचारांत अतिथिसत्काराला सर्वश्रेष्ठ स्थान दिले जात होते. वाल्मीकि-रामायणात म्हटले आहे –

अतिथिः किल पूजार्हो प्राकृतोऽपि विजानता।

(वा. रा. सुंदरकाड १.११२)

अर्थ – अतिथी सामान्य असला तरी शहाण्या माणसाने त्याचा सत्कार अवश्य केला पाहिजे.

वनवासी ऋषिमुनीही हा आचारधर्म निष्ठापूर्वक आचरीत, हे अगस्त्य व भारद्वाज यांच्या कथांवरून कळून येते. मित्र व संबंधी जन भेटल्यावर लोक ज्येष्ठांना प्रणाम करीत, समवयस्कांना आलिंगन देत व छोट्यांकडून अभिवादन स्वीकारीत. सांप्रतच्या कालात भेटलेल्या व्यक्तीला हात जोडण्याची प्रथा आहे. तशी त्या काळी एकमेकांना आलिंगन देण्याची प्रथा होती. काही वेळा पती भेटला असता पत्नीही त्याला आलिंगन देत असे. खर-दूषणांना मारून जेव्हा राम परत आला, तेव्हा त्याला सीतेने अनेकवार आलिंगिले होते. पुरुषांमध्ये परस्पर सौहार्द प्रकट करण्यासाठी हस्तसंपीडन (एकमेकांचा हात दाबणे) करण्याचीही प्रथा होती. मैत्रीचा प्रस्तावही हस्तसंपीडनाने केला जात असे. उपकारासाठी आभारप्रदर्शनही होत असे.

दैनंदिन जीवनात सत्य व निष्कपट आचरण यांना सर्वाधिक महत्त्व दिले जात असे. आपल्या हातून काही प्रमाद घडल्यास लोक क्षमायाचनेसाठी तत्पर असत. प्रतिज्ञापालनात सुग्रीव कुचराई करीत आहे, असे समजून लक्ष्मण सुग्रीवाला काही कठोर शब्द बोलला; पण वस्तुस्थिती तशी नाही, असे कळताच त्याने सुग्रीवाची सपशेल क्षमा मागितली. दीर्घ प्रवासाला जाण्यापूर्वी सुसंस्कृत व्यक्ती वडिलधाऱ्या माणसांजवळ ज्ञाताज्ञात अपराधांबद्दल त्यांची क्षमा मागत.

सामाजिक रीतिरिवाज हे लौकिक समय, लोकवृत्त किंवा लोकाचार या नावांनी ओळखले जात. लौकिक परंपरांना देशाच्या अधिकृत कायद्यांइतके महत्त्व मिळालेले होते. लोकवृत्ताचे उल्लंघन करणारा दंडार्ह मानला जाई. रामाला अशा परंपरांचे सम्यक ज्ञान होते.

आजच्याप्रमाणे त्या कालातही एखाद्याने एखादे चांगले काम केले, तर त्याचे अभिनंदन करण्याची प्रथा होती. किशोर रामाने जेव्हा खर-दूषणांसहित राक्षससैन्याला धूळ चारली, तेव्हा देव, ऋषी व चारण यांनी तिथे येऊन रामाचे अभिनंदन केले होते.

दोन व्यक्तींत मैत्रीसंबंध प्रस्थापित करतेवेळी अग्नी प्रज्वलित करून त्याला साक्षी ठेवीत. राम-सुग्रीवाची मैत्री हनुमंताने याच विधीने प्रस्थापित केली होती.

आपल्या वचनाची सत्यता पटवण्यासाठी शपथ घेण्याची पद्धत होती. ज्याने शपथ घेतली नाही, असे पात्र रामायणात क्वचितच सापडेल. आपल्या अत्यंत प्रिय व्यक्तीच्या नावानेही शपथ घेतली जाई. प्रायोपवेशन करून प्राणत्याग करण्याची प्रथा त्याही कालात होती. अंगदाच्या नेतृत्वाने जे वानरदल सीताशोधासाठी गेले होते, त्याला त्या कामी अपयश आल्यावर त्याने समुद्रकिनारी प्रायोपवेशन करण्याचा निश्चय केला होता.

वाहनात चढण्यापूर्वी त्या वाहनाची पूजा केली जात असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सीतेसह अयोध्येत जाऊ इच्छिणाऱ्या वानरस्त्रियांनी पुष्पक विमानाची आणि रामाने इंद्रप्रेषित रथावर आरूढ होण्यापूर्वी त्या रथाची पूजा केली होती.

तीन या संख्येला विशेष महत्त्व होते. विशिष्ट धार्मिक क्रिया सुफलित व्हावी यासाठी तिचे तीन वेळा उच्चारण किंवा आचरण करीत. रावणवधापूर्वी रामाने आदित्यहृदय हे स्तोत्र तीनदा जपले होते. पाणिग्रहणाच्या प्रसंगी वधू-वर तीनदा अग्नीची प्रदक्षिणा करीत. दानाचा संकल्प त्रिवार उच्चारीत.

दैनंदिन जीवनात ज्योतिष व मुहूर्त यांना फार महत्त्व होते. मांगलिक आणि युद्धविषयक कामे मुहूर्त पाहूनच करीत. प्रस्थान करताना दक्षिणेकडे तोंड करून निघत नसत. कारण ती यमाची दिशा आहे. शत्रुभूमीत पाय ठेवताना डावा पाय पुढे करीत. पूर्ण कुंभ आणि बैलाचे शिंग समृद्धी व मंगल यांचे सूचक मानीत. दैव किंवा नशीब यावर बरीच श्रद्धा असे. रामाचीही ती तशी होती. राज्याभिषेकाच्या जागी वनवास आला, ही घटना रामाच्या मते दैवाचीच विचित्र लीला होती. दैवावर विश्वास न ठेवणाऱ्याही काही मोठ्या व्यक्ती होत्या. लक्ष्मण हा एक त्यांतला आहे. तो पुरुषार्थाचा समर्थक होता. निमित्त किंवा शकुन यांच्यावरही लोकांचा विश्वास होता. रणभूमीवर प्रस्थान करण्याच्या वेळी शकुनांकडे फार लक्ष दिले जात असे. सूर्य निस्तेज होणे, उल्कापात होणे, चंद्र मलिन दिसणे, भूकंप होणे, वृक्ष उन्मळून पडणे, समुद्राला उधाण येणे, रथाला जोडलेल्या घोड्यांना मार्गात ठोकर लागणे, कावळ्यांनी काव काव करणे, रथध्वजावर गिधाड येऊन बसणे, डावा डोळा किंवा डावा बाहू स्फुरण पावणे, इ. गोष्टी अशुभ समजल्या जात. भुताखेतांवरही विश्वास असे. भुताची बाधा नष्ट करण्यासाठी मंत्र-तंत्रांचे प्रयोग केले जात.

वेषभूषा – कुशचीर, मृगचर्म व वल्कले ही वस्त्र निर्माण होण्यापूर्वीची प्रावरणे होत. वाल्मीकीने या तिहींचाही उल्लेख केला आहे. रामायणकालात वस्त्रोद्योग बराच प्रगत झाला होता. वस्त्रांचे उल्लेख वारंवार येतात. रेशमी वस्त्रे त्या काळात अधिक प्रमाणात वनत. सीतेला अनेक वेळा कौशेयवासिनी म्हटले आहे. क्षौम वस्त्र हे तलम व अधिक किंमतीचे असे. पूजेअर्चेच्या वेळी तेच वापरीत. अळशीच्या रोपांच्या तंतूपासून ते तयार करीत. कुशचीर हे गवतापासून बनवीत. त्याला मुनिवस्त्र म्हणत. वस्त्रांना किनारी लावण्याची प्रथा रामायणकालाइतकीच जुनी आहे. कापसाची वस्त्रे बनत; पण ती वरील वस्त्रांपेक्षा कमी प्रमाणात होत. ब्रह्मचारी केवळ कमरेपुरते एक वस्त्र वापरीत. गृहस्थ उत्तरीय व अधोवस्त्र अशी दोन वस्त्रे वापरीत. स्त्रियाही दोन वस्त्रे वापरीत. स्त्रियांची अधोवस्त्रे कमरेला गाठ बांधून नेसली जात. स्त्रिया आपल्या पदराला नेहमी एखादे नाणे किं[वा] एखादा दागिना बांधून ठेवीत. त्यांचे उत्तरीय वक्षःस्थल झाकण्या[इतके] पुरते असे. त्याला स्तनोत्तरीय असे म्हणत. वस्त्रे रंगविली जात. अपहरणप्रसंगी सीता पिवळे वस्त्र नेसली होती. राक्ष[]सांना लाल वस्त्रे विशेष आवडत. भिक्षू लोक आणि वृद्ध द्वार[]पाल काषाय वस्त्र वापरीत. शिवण्याची कला ज्ञात होती. [सू]ई आणि शिंपी (तुन्नवाय) हे शब्द रामायणात आले आहेत. [स्त्रि]कांनी वापरायचा कंचुक हा शिवूनच बनवला जात असे. राम[ा]यणकालात प्रत्येक व्यक्ती मुगुट वापरीत असे. मुगुट नस[ल्यास] तर पगडी वापरली जाई. स्त्रियाही पगडी वापरीत. पादत्रा[ण] म्हणून लाकडी पादुका किंवा चामड्याच्या वहाणा वापरी[त]. राजकुमारांच्या पादुका सोन्याने मढवल्या जात. स्त्रियांप्रमाणे पुरुषही दागिने घालीत. वानर आणि राक्षस यांनाही दा[] दागिन्यांचा शौक होता. धनुष्य आणि खड्‌ग ही आयुधे सोन्या[ने] मढविलेली असत. पशूंनाही दागिने घालून सजवीत. रथ अ[लं]कारांनी सुशोभित करीत. मस्तकावरच्या अलंकारांत चूडाम[णि] हे प्रमुख असे. स्त्रिया कपाळी तिलक लावीत. कुंडल हे सा[]भूषण असे. सुवर्णकुंडल आणि रत्नकुंडल असे त्याचे प्रकार अ[सत]. गळ्यात ग्रैवेयक (हसळी), निष्क (कंठी), माला व हार [] अलंकार घालीत. बाजूबंद, चूडा, कडे व अंगठी हे हाताचे अ[लं]कार असत. कमरेत मेखला किंवा करधनी वापरीत. मेख[ला] अधोवस्त्र घट्ट बसवण्याच्या कामी साहाय्यक होत असे. [नू]पुर हा पायांचा अलंकार असे. त्याला घुंगरे जडवीत. चूडामणि वेणीत गुंफण्याचा अलंकार असे. तो प्रफुल्लित कमलासा[रखा] बनवीत. त्याच्या पाकळ्या हिऱ्यामोत्यांच्या असत. [] गळ्यात चित्रविचित्र माळा घालून वावरत. ते डोक्यावरचे [केस] कापीत नसत. ते दाढी-मिशाही राखीत. ऋषी आणि [] स्त्रिया केसांच्या जटा बांधीत. राजपरिवारात स्नानक्रिया वि[धि]पूर्वक आचरली जात असे. राजपरिवारातल्या लोकांना मु[] परिचारिका स्नान घालीत. राजे लोक आपल्या अनेक रा[ण्यांसह] नदीत किंवा सरोवरात पुष्कळदा सामुदायिक स्नान करीत अ[सत]. स्नानानंतर शरीराला सुगंधी अंगराग लावीत. मुखवासही ([मुख] सुगंधित करण) करीत. वायका आपल्या पायांना अ[ळिता] लावीत, डोळ्यांत काजळ घालीत व गालांवर वेलपत्ती चित[ारीत].

खानपान – रामायणकाल हा अन्नबहुल काळ होता. आ[मिष] व निरामिष असे दोन्ही प्रकारचे खाद्यपदार्थ तत्कालीन [] चांगल्या प्रकारचे बनवीत. अतिथीला पक्वान्नांचे भोजन घा[लीत]. लाडू बनवण्याची पद्धती होती. तांदूळ, यव व गहू हे तीन [] अन्नपदार्थ होते. मूग, चणे, कुळीथ व उडीद यांच्या डा[ळी] भोजनपदार्थांत वापरीत. तांदुळाची खीर बनवीत. भोज[न]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दूध व तूप बऱ्याच प्रमाणात वापरीत. चटण्याही बनवीत. जेवणात फळेही असत. फळांचे रस काढून त्यांचे सूपही बनवीत. श्राद्धात ब्राह्मणांना मांसपदार्थ वाढीत. चरबीदार पक्षी आहाराच्या दृष्टीने उत्तम समजले जात. मासळीही भोजनात असे. मात्र असे असले तरी, मांसाहारापेक्षा संयमित शाकफलाहार हा सांस्कृतिक दृष्टीने उच्च समजला जात असे. ब्राह्मणांना मांस निषिद्ध नसले तरी, ते प्रायः शाकाहारी असत. दूरच्या प्रवासाला जाताना लोक आपले भोजन बांधून आपल्याबरोबर घेत. त्याला पथ्याशन असे म्हणत. दिवसातून तीन वेळा भोजन करण्याची पद्धती होती. शेवटचे भोजन रात्री होत असे. भोजन बनविणारे आचारी असत. वाढण्याच्या वेळी ते सुंदर वस्त्रभूषणे लेवून पुढे येत. भोजन करण्याच्यापूर्वी लोक बलि-वैश्वदेव करीत. पेय पदार्थांत दूध, कपित्थ (मठ्ठा), आसव, मद्य व मदिरा ही प्रमुख पेये होती. फळांचे रस मधुर व सुवासिक बनवून पीत असत. सुवासित मदिरेला मैरेय म्हणत. गुळापासून बनविलेल्या मद्याला सीधू म्हणत. फळे, फुले व साखर यांच्यापासून मद्यार्क काढीत. सौवीरक हे साधारण प्रतीचे मद्य असून, खजुरापासून बनविलेली वारुणी ही दारू विशेष नशेवाली असे. मद्यपान व्यापक प्रमाणात प्रचलित होते. आर्य-अनार्य, सर्व जातींचे स्त्री-पुरुष मद्यपान करीत. उत्तरकांडात रामाने आपल्या हाताने सीतेला मधुमद्य पाजल्याचा उल्लेख आहे. मदिरागृहेही अस्तित्वात होती. त्यांना पानभूमी असे म्हणत. सामान्यतः खालच्या थरातील लोक पानभूमीत एकत्र जमून मातीच्या पात्रांतून मद्य पीत. मात्र असे असले तरी, लोकांनी मद्य-मांसाच्या आहारी जाऊ नये, असेच जाणत्या लोकांचे मत होते.

क्रीडा-विनोद — रामायणकालात लोकांना ऐहिक सुखसोयी बऱ्याच प्रमाणात उपलब्ध होत्या. त्यामुळे तत्कालीन राष्ट्रजीवन मनोविनोद व क्रीडाकौतुके यांना अनुकूल होते. आमोद-प्रमोदांची सार्वजनिक अभिरुची होती. सामाजिक उत्सव व समारोह राष्ट्रसंवर्धनाला पोषक मानले जात. अशा प्रसंगी सामुदायिक भोजने होत. उत्सवप्रसंगी गणिका, नट—नर्तक, पुरोहित, सेनाध्यक्ष, व्यापारी, नागरिक, ग्रामजन व राजपरिवारातले लोक एकत्र जमून आनंदोत्सव करीत. इंद्रध्वज नावाचा एक सामाजिक महोत्सव त्या काळी लोकप्रिय होता. तो सार्वजनिक स्वरूपात साजरा केला जाई. परंपरेने चालत आलेल्या कथा सांगणे व ऐकणे हा मनोरंजनाचा सुलभ प्रकार होता. तत्कालीन ऋषि-मुनींजवळ अशा कथांचा भरपूर संग्रह असे. यज्ञरक्षणासाठी राम-लक्ष्मणांना घेऊन जात असता विश्वामित्राने त्यांना अनेक मनोरंजक व ज्ञानवर्धक कथा सांगितल्या होत्या. त्या काळी जसे कथाकार होते, तसे लोकांना हसविणारे विदूषकही होते. राजकारणाची गंभीर चर्चा करून दमलेल्या राजे लोकांना हे विदूषक आपल्या विनोदाने हसायला लावीत व त्यांचे श्रम हलके करीत. रामही अशा कलेत निष्णात होता. द्यूताचे व्यसनही त्या काळात होते. संगीत आणि वाद्य यांना सर्व मनोरंजक प्रकारांत श्रेष्ठ स्थान होते. नागरिकजीवनाचे ते एक अभिन्न अंग होते. युद्धप्रसंगीही गीत-वाद्याला स्थान होते. अर्थात युद्धाच्या वेळची वाद्ये शंख, भेरी, दुंदुभी अशा प्रकारची असत. संगीताचे प्रेम नागरिकांप्रमाणेच वनवासी ऋषिजनांनाही होते. भरत जेव्हा भरद्वाजाच्या आश्रमात गेला, तेव्हा त्याच्या सन्मानार्थ भरद्वाजाने संगीताचा एक अपूर्व जलसा आयोजित केला होता. धार्मिक कृत्यांमध्येही संगीताला स्थान होते. कुलदेवता आणि नगरदेवता यांची पूजा होत असता, संगीत उपयोजिले जात असे. नृत्यही प्रचारात होते. राजकीय समारंभांत नृत्यप्रयोग आवर्जून केले जात. नाटके करण्याचीही प्रथा होती. त्यांतही नृत्य व संगीत यांचा उपयोग होत असे.

नागरिकांच्या मनोरंजनासाठी नगरांतून सार्वजनिक बागबगीचे असत. अविवाहित कन्या सायंकाळी नटूनथटून क्रीडा करण्यासाठी उद्यानात जात. बहुतेक सर्व नागरिकांना उद्यानक्रीडेची आवड असे. आमोद—प्रमोदांत पुरुष आपल्याबरोबर स्त्रियांनाही भाग घ्यायला लावीत.

मृगया ही विशेषेकरून राजे लोकांची क्रीडा होती. मल्लविद्येतही अनेक लोक प्रवीण असत. ते माणसांप्रमाणेच वाघ, सिंह, वराह अशा जंगली जनावरांबरोबरही कुस्ती खेळून लोकांचे रंजन करीत. रामाजवळ अशा मल्लांची एक तुकडीच होती.

शिक्षण — कोसल राज्यात शिक्षणाचा प्रचार बराच होता. विद्याध्ययन हा केवळ ब्राह्मणांचाच अधिकार नसून, तो त्रैवर्णिकांना प्राप्त होता. समाज आणि विद्यार्थी हे दोन्ही वर्ग गुरूला मोठा मान देत. विद्यादान हे श्रेष्ठ दान असल्यामुळे गुरू हा शिष्यांच्या पितरांमध्ये गणला जाई. गुरूच्या मागून आचार्य व कुलपती यांची गणना होत असे. कुलपतीचे मोठे गुरुकुल असे व दूरदूरहून आलेले शेकडो विद्यार्थी त्यात शिकत असत. उपाध्याय लोक शुल्क घेऊन विशिष्ट शास्त्र शिकवीत. तापसगणही आपल्याजवळ आलेल्या विद्यार्थ्यांना वेदशास्त्रे शिकवीत.

गुरुविषयी श्रद्धा बाळगणे व त्याच्या आज्ञा पाळणे हे शिष्याचे सर्वश्रेष्ठ कर्तव्य मानले जाई. अध्ययनकालात विद्यार्थ्याला शिस्तबद्ध वागावे लागे. विद्यार्थी संयमी व निग्रही असावा, अशी अपेक्षा असे. स्नान, संध्या, जप, होम, स्वाध्याय व गुरुसेवा या गोष्टी विद्यार्थ्यांनी नित्य करायच्या असत. ब्रह्मचर्याच्या काळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षत्रियकुमार इतर विद्यांच्या बरोबरच शस्त्रास्त्रांचे प्रयोगही शिकत. भरद्वाज आणि वाल्मीकी या दोन्ही ऋषींच्या आश्रमांत कित्येक विद्यार्थी शिक्षण घेत. गीत, वाद्य व अभिनयही शिकवला जाई. उच्च किंवा विशिष्ट शिक्षणासाठी विद्यार्थी एका आश्रमातून दुसऱ्या आश्रमात जात. शस्त्रविद्येचे पहिले धडे रामाने सुधन्वा या शिक्षकाकडून घेतले व युद्धविद्येचे उच्च शिक्षण विश्वामित्राकडून मिळवले होते. अगस्त्याकडूनही त्याने शस्त्रविद्येचे अभिनव प्रयोग शिकून घेतले होते.

त्या काळी अयोध्येत वसिष्ठकुलातील पुरुषांनी चालविलेले एक विद्यालय होते. रामाच्या काळी सुयज्ञ नामक शिक्षक एक विद्यालय चालवीत असे. तैत्तिरीय, कठ, कलाप, इ. वेदशाखा तिथे शिकवल्या जात.

अयोध्येत शास्त्रज्ञांचे वादविवादही नेहमी चालत. यज्ञप्रसंगी विद्वत्परिषदा भरत. विविध संप्रदायांचे आचार्य खंडनमंडनात्मक शास्त्रार्थ करीत.

विद्यार्थ्याला बौद्धिक शिक्षणाबरोबरच नैतिक व शारीरिक शिक्षण मिळावे, अशी व्यवस्था असे. चारित्र्य, सत्यनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा, चित्तशुद्धी व इंद्रियसंयम ही सुशिक्षित व्यक्तींची लक्षणे समजली जात. त्या काळी लेखन-पद्धतीचा प्रचार अत्यल्प होता. त्यामुळे बहुतेक शिक्षण मौखिक असे. शिकवलेली विद्या विसरली जाऊ नये, ती कंठस्थ राहावी, यासाठी विद्यार्थ्याला नित्य स्वाध्याय करावा लागे. नवयुवक छात्र विद्यासंपन्न झाल्यावर वादविवादात विजयी होण्याची आकांक्षा बाळगीत.

रामायणकालात भारतातल्या, विशेषत: आग्नेय भागातील मुली आश्रमात मुलांच्या बरोबर राहून विद्या शिकत. सीतेला तिच्या वडिलांच्या घरीच शिक्षा-दीक्षा प्राप्त झाली होती.

विद्यार्थ्यांच्या पुढे आदर्श उभे करणे, विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा सर्वांगीण विकास करणे आणि त्याचे शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आध्यात्मिक, व्यावहारिक, व्यक्तिगत व सामाजिक जीवन समुन्नत करणे, हा तत्कालीन शिक्षणाचा आदर्श होता.

विज्ञान – ज्ञानाबरोबरच विज्ञानाचीही उपासना चालत असे. खगोल किंवा नक्षत्रशास्त्र विद्यार्थ्यांना शिकवले जाई. रामायणात नक्षत्रविषयक उपमा अनेक वेळा आल्या आहेत. चंद्र–रोहिणींचा संयोग हा वाल्मीकीने प्रगाढ दांपत्यप्रेमाचा आदर्श मानला आहे. ग्रहांचा परस्पर संघर्ष, त्यांचा नक्षत्रांशी होणारा संयोग, सूर्य–चंद्रांची ग्रहणे, इ. गोष्टी रामायणात आढळतात. नक्षत्रज्योतिषाबरोबरच फलज्योतिषही प्रगत होत होते. रोहिणी नक्षत्र बुध, राहू किंवा मंगळ या ग्रहांनी आक्रांत होणे, चित्रेवर शनीचे आक्रमण होणे, क्रूर ग्रहांनी चंद्राला घेरणे, धूमकेतूने नैर्ऋत्य नक्षत्राला ग्रासणे, इ. गोष्टी अशुभसूचक मानल्या जात. शुक्र ग्रह निर्मल व कांतिमान दिसणे, विशाखेच्या दोन्ही तारा स्पष्ट प्रकाशित होणे, चंद्र-पुष्यसंयोग, इ. आकाशीय घटना शुभ मानल्या जात. सामुद्रिक व मुहूर्तज्योतिष यांनाही महत्त्व आले होते. मुहूर्त व ज्योतिष जाणणाऱ्या विद्वानांची राजसभेत नेमणूक होत असे.

रामायणात आयुर्वेदाचे, तसेच त्रिदोषांचे उल्लेख आढळतात. अनुभवी वैद्यांना राजे लोक आपल्या पदरी बाळगीत. उन्माद, उदररोग, गर्भपात, चित्तमोह, नेत्ररोग, भ्रम, व्रण, वातरोग, मलमूत्राचा अवरोध, इ. रोगांची नावे रामायणात आली आहेत. वैद्य लोक वनस्पतींच्या साह्याने रोगचिकित्सा करीत. मंत्र-तंत्र व जडी-बुटी यांचाही चिकित्सेत प्रयोग केला जाई. युद्धात घायाळ होणाऱ्या सैनिकांना उपचार करण्यासाठी वैद्यांची योजना होत असे. रोग-प्रतिबंधक व जंतुनाशक अशा काही वनौषधीही वैद्यांना माहीत होत्या. नाकात औषध घालून कित्येक रोगी बरे केले जात. प्रसंगी शस्त्रक्रियाही करीत. मुख्यत्वे प्रसूतीच्या वेळी मूल आडवे आले, तर शस्त्रक्रिया करीत. प्रेत कुजू न देता बरेच दिवस तसेच ठेवण्याची विद्या वैद्यांना ज्ञात होती. अशा वेळी तेल व लेप यांचा उपयोग करीत. एखाद्या रोगाला पथ्य कोणते व अपथ्य कोणते याचे ज्ञान असे. काही आयुष्यवर्धक रसायनेही वैद्य बनवीत.

तत्कालीन विद्वानांना भूमितीचेही ज्ञान असल्याची उदाहरणे आढळतात. गृहनिर्माण, नगररचना व स्थापत्यकला यांमध्ये ते भूमितीचा उपयोग करीत.

कलाप्रकार – रामायणकाली लोक कलात्मक अभिरुचीने संपन्न होते. बालकांडाच्या सहाव्या सर्गामध्ये वाल्मीकीने अयोध्येच्या लोकांचे जे वर्णन केले आहे, ते वाचल्यावर त्या लोकांची अभिरुची कळून येते. कला हे केवळ मनोरंजनाचे साधन मानले न जाता, एक सात्त्विक अनुष्ठान समजले जाई. प्रत्येक धार्मिक व सामाजिक प्रसंगी कोणत्या ना कोणत्या तरी कलेचा आविष्कार होत असे. कलेच्या अर्थी रामायणात शिल्प शब्द वापरलेला आहे. गीत, नृत्य, वाद्य, चित्रकर्म, इ. ललितकला शिल्पात समाविष्ट असत. अशा अनेक शिल्पांची सामग्री रामायणात आढळते. त्यात चित्रकलेचे उल्लेख विशेष प्रमाणात आढळतात. त्या काळी घरे, त्यांच्या भिंती, दालने, वसायचे रथ, इ. वस्तूंना चित्रित करण्याची पद्धत होती. रावणाच्या पुष्पक विमानावर सुवर्णखचित चित्रकारी होती. पर्वतमाला, वृक्षांवरची फुले आणि पाकळ्या अशा प्रकारे त्या विमानावर चित्ररचना केलेली होती. राजभवनात स्वतंत्र चित्रशाला असत. वालीचे प्रेत ज्या पालखीत बसवून स्मशानात नेले ती पालखी विविध चित्रांनी सुशोभित केलेली होती. हत्तींच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मस्तकांवर, वीरांच्या पताकांवर व राजप्रासादांच्या तोरणांवर रमणीय चित्रकारी केली जात असे.

रामायणकालापर्यंत भारतात मूर्तींची निर्मिती होऊ लागली होती. वाल्मीकीने सीतेची तुलना मयनिर्मित सुवर्णमूर्तीशी केली आहे. रामाने यज्ञदीक्षा घेताना सीतेची सुवर्णप्रतिमा बनवून घेतली होती. चित्रकूटाच्या मार्गात भरतासाठी जी विश्रामस्थले बनवली होती, त्यांत रत्नमूर्ती ठेवलेल्या होत्या. रावणाचे शयनागार हस्तिदंत, सुवर्ण, रुपे, मणी, मोती आणि प्रवाळ यांच्या मूर्तींनी सुसज्ज होते. पुष्पक विमान तर तत्कालीन कलाकौशल्याचा सर्वोत्कृष्ट नमुना मानता येईल. त्याचे विस्तृत वर्णन सुंदरकांडाच्या नवव्या सर्गात दिलेले आहे.

शास्त्रीय कलेच्या रूपात संगीताची प्रगती रामायणात दिसून येते. त्या युगातले संगीत हे स्वर, वर्ण व ताल या तीन रूपांत आविष्कृत होत असे. स्वरसंगीत आलापप्रधान होते. त्यात स्वरांच्या नियंत्रणाला विशेष स्थान असे. लव-कुशांना स्वरज्ञान उत्तम होते. रामायणकालात सामवेदी लोक उत्कर्षाप्रत गेले होते. दशरथाच्या अंत्येष्टीच्या प्रसंगी त्यांनी शास्त्रीय पद्धतीने सामश्रुतींचे गायन केले होते. वर्णसंगीतात वर्णांच्या ध्वनीला प्राधान्य होते. वर्णसंगीत ऱ्हस्व व दीर्घ अक्षरांचा उच्चार, त्यांच्या मात्रा व ध्वनी या तीन प्रकारांवर आधारित होते. वर्णसंगीताचे सर्वांत प्रारंभिक स्वरूप म्हणजे अनुष्टुप छंद होय. स्वतः वाल्मीकीच त्याचा जनक होता. तालसंगीत हे ताल देऊन गायिले जाई. तालाच्या ठिकाणी आघात असे. तालापर नामक गायनात तालावर विशेष भर असे. हाताने व स्वस्तिक नावाच्या वाद्याने ताल दिला जात असे. वाल्मीकीच्या मताप्रमाणे गायकाचीच वाणी नव्हे; तर वक्त्याची वाणीही प्रसंगानुकूल अशा उपयुक्त ध्वनी व स्वर यांनी युक्त असणारी आणि इष्ट भाव अभिव्यक्त करण्यास समर्थ अशी असायला हवी.

नृत्त, नृत्य व लास्य या तीन्ही प्रकारांचा रामायणात उल्लेख केलेला आहे. नृत्य हे देवतांच्या विशेष पूजे-अर्चेच्या वेळी करविले जात असे.

स्थापत्याच्या क्षेत्रात रामायणकालातली प्रगती आश्चर्यकारक मानावी लागेल. नगरे, दुर्ग व राजप्रासाद यांची वाल्मीकीने केलेली वर्णने वाचल्यावर त्या काळी स्थापत्यविज्ञानाचे एक उन्नत व व्यवस्थित असे स्वरूप स्थिर झाले होते, असे दिसते. दानवांचा स्थपती मय नावाचा दानव असून, त्याने तपश्चर्या करून शुक्राचार्यांच्या शिल्पविद्येचे समस्त ज्ञान ब्रह्मदेवाकडून मिळवले होते, अशी कथा किष्किंधाकांडात आलेली आहे. शुक्राचार्यांची सारी उपकरणे व अवजारेही त्याला मिळाली होती. मयाबरोबरच विश्वकर्म्याचाही उल्लेख आहे. मय द. भारतातला व विश्वकर्मा उ. भारतातला स्थपती होता. शिल्पशास्त्रातले अनेक पारिभाषिक शब्द रामायणात आले आहेत. सप्तभौम, अष्टभौम, अनेकभौम (सात, आठ किंवा अनेक मजल्यांचा) प्रासादांचे उल्लेख रामायणात मिळतात. प्रासाद शिखरयुक्त असत. शेकडो किंवा हजारो स्तंभांवर ते उभे असत. पद्म नावाचा प्रासाद कमलाकृती असे. ज्याला पूर्वेकडे द्वार नाही, अशा घराला स्वस्तिक व ज्याला दक्षिणेकडे द्वार नाही, अशा घराला वर्धमान म्हणत. मोठमोठ्या घरांना तोरणे व चौक असत. भिंतींना जाळीदार गवाक्षे असत. खिडक्या सुंदर बनवणे व त्यांना सोन्या-चांदीच्या जाळ्या करणे, ही त्या लोकांची विशेष आवड होती. राजप्रासादांना अनेक चौक असत. रथात बसूनही त्या चौकात प्रवेश करता येत असे. दशरथाच्या राजप्रासादाला पाच चौक होते, व सुग्रीवाच्या प्रासादाला सात चौक होते. सुंदरकांडात रावणाच्या राजप्रासादाचे विस्तृत वर्णन आले आहे. याव्यतिरिक्त यज्ञशाला, अग्निशाला, देवमंदिर व चैत्य ही भवनेही अशीच भव्य आणि कलापूर्ण असत. या वास्तुनिर्मितीत कोणत्या प्रकारची साधनसामग्री वापरीत ते मात्र कळत नाही.

नगररचनाशास्त्रही त्या काली विकसित झाले होते. त्या काळच्या नगरांच्या भोवती कोट उभारलेला असे व त्याच्या भोवती खंदक असे. प्रत्येक नगर म्हणजे एकेक सुरक्षित दुर्गच असे. हा दुर्ग नेहमी धान्य, शस्त्रास्त्रे, यंत्रे, शिल्पकार व धनुर्धर यांनी सुसज्जित ठेवला जात असे. कोणाचेही परचक्र आले, तरी त्याचा प्रतिकार करता यावा आणि नगर सुरक्षित ठेवता यावे, यासाठी हा सगळा बंदोबस्त असे. सांकाश्य व वाराणसी ही नगरे उंच उंच प्राकारांनी घेरलेली होती. राजगृह नगराला चारही बाजूंनी दुर्गम असा खंदक होता. नगरद्वारावर गोपुरे उभारलेली असत. अट्ट म्हणजे बुरूजही बांधलेले असत. बहुतेक नगरे नदीतीरावर व दुर्गम पर्वतात वसवलेली असत. नगरांचे वर्गाकार, आयताकार, अष्टकोणाकार, वर्तुलाकार, अंडाकार, कमलाकार, अर्धचंद्राकार, इ. प्रकार असत. नगरात कलापूर्ण असे चौक असत. मार्ग स्वच्छ व समतल असत. मधेमधे उद्याने, उपवने, तळी व पुष्करिणी असत. देवतांची मंदिरेही असत. नगराच्या मध्यभागी राजवाडा व राजपरिवारातल्या लोकांचे महाल असत. नगरातले प्रमुख रस्ते चहूबाजूंनी राजवाड्याकडे आलेले असत. राजवाडा हे केंद्र व इतर भाग हा त्याचा विस्तार असे. अधिकारी, श्रेष्ठी, सावकार यांच्या कोठ्या नगराच्या मध्यभागी, राजवाड्याच्या परिसरात असत.

नगरनिर्मितीत प्राचीन राजे विशेष अभिरुची दाखवीत. अयोध्यानगरी इक्ष्वाकू वंशाची परंपरागत राजधानी होती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दशरथ राजाने आपल्या कारकिर्दीत तिच्यात पुष्कळ सुधारणा केल्या होत्या. त्यामुळे तिची गणना श्रेष्ठ नगरांत होऊ लागली होती. लंकानगरी सुंदर आणि वैभवशाली तर होतीच; शिवाय ती निर्माण करणाऱ्या रावणाची कलात्मक अभिरुचीही उच्च दर्जाची होती. लंका समुद्रतीरावर, पण तिथल्या त्रिकूट पर्वतावर उभारलेली होती. त्यामुळे तिच्या भोवतीची दुर्गरचना विश्वकर्म्याला अभेद्य बनवावी लागली होती. आक्रमण व प्रत्याक्रमण या दोन्ही दृष्टींनी ती सुदृढ व दुर्भेद्य बनवण्यात आली होती. लंका वीस योजने लांब व दहा योजने रुंद होती वानरराजधानी किष्किंधा ही एक महापुरी होती. ती डोंगराळ प्रदेशात प्रस्रवण गिरीच्या जवळ उभारलेली होती. तिच्यातही रचनासौंदर्य भरपूर होते. नागरिकांच्या सुखसोयीही चांगल्या केलेल्या होत्या.

समस्त राज्य पुर व राष्ट्र (जनपद) अशा दोन भागांत विभागलेले असे. ग्रामांची गणना जनपदांत केली जात असे. ग्राम, महाग्राम व घोष (गौळवाडे) अशा तीन प्रकारच्या गावांचा रामायणात उल्लेख आढळतो. गावाजवळ व्यापारासाठी वसलेल्या मोठ्या वस्तीला पट्टन असे म्हणत. रामायणकालीन संस्कृती ही मुख्यत्वे नागरिकसंस्कृती होती. त्यामुळे ग्रामवस्तीचे आणि ग्रामजनांचे विशेषसे वर्णन रामायणात मिळत नाहीत.

देवधर्म – भारतात धर्माचे स्थान नेहमीच सर्वोपरी राहिलेले आहे. भारतीय जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात धर्माचा प्रभाव सर्वांत मोठा आहे. रामायणकाल हा वैभव, समृद्धी आणि कलाविलास यांच्या उत्कर्षाचा काल होता. त्यातही धर्मभावना दिसून येते. धार्मिक क्षेत्रात वेदांना सर्वोच्च स्थान होते. तर्क, वितर्क आणि क्षुद्र आक्षेप यांनी वेदांची महती कमी केली जात नसे. रामायणकालीन आर्य लोक वैदिक कर्मकांडाचे निष्ठावंत अनुयायी होते रामाने रावणाला मारण्यासाठी धनुष्याला जोडलेला बाण वेदोक्त विधीने अभिमंत्रित केला होता. सर्व कर्मानुष्ठानांत वेदमंत्रांचा प्रयोग होत असे. वाल्मीकीने वेदानुसारिणी बुद्धीची प्रशंसा केली आहे.

शांती व मंगल यांच्या कामनेसाठी काही विशिष्ट धर्मकृत्ये केली जात. नवीन गृहप्रवेशाच्या वेळी वास्तुशांती करीत. शरद ऋतूत आग्रयण नावाचे मांगलिक करीत. यात नव्या पिकाचे धान्य शेतातून कापून आणून देव व पितर यांना समर्पण करीत. प्रत्येक महत्त्वपूर्ण कार्याच्या प्रारंभी स्वस्त्ययन नामक विधी करीत. त्यात पुरोहित यजमानाला मंगल मंत्रांनी आशीर्वाद देत. स्नान, अर्घ्य, तर्पण, प्राणायाम, गायत्रीजप, होम व देवतार्चन ही आर्यांची नित्यकृत्ये असत. जनकराजा ही सर्व कृत्ये करूनच राजकीय व्यवहारात भाग घेत असे. अग्नीची उपासना नित्य चाले. गृह्याग्नीवर लोकांची विशेष श्रद्धा असे. प्रत्येक घराच्या अग्न्यागारात अग्नी रात्रंदिवस प्रज्वलित ठेवलेला असे. महत्त्वाच्या गोष्टीसाठी लोक देवतांची प्रार्थना करीत. अंतःपुर व नगर यांची द्वारे आणि चवाठे यांचीही पूजा केली जाई. शस्त्रास्त्रांच्याही देवता मानलेल्या असत व योद्धे लोक त्यांचा वापर करण्यापूर्वी त्यांची पूजा करीत.

रामायणकाळात देवमंदिरेही निर्माण झाली होती. रामाचा राज्याभिषेक होणार हे ऐकून अयोध्यावासी जन हिमालयाच्या शिखराप्रमाणे उत्तुंग असलेल्या देवमंदिरावर ध्वजपताका फडकवू लागले होते. त्यांच प्रसंगी राजपुरोहित वसिष्ठ यानेही देवमंदिरे व चैत्य यांची पूजा करण्याविषयी संबंधित मंत्र्यांना आदेश दिला होता. ही मंदिरे म्हणजे सार्वजनिक देवस्थाने असण्याचीही शक्यता आहे. याशिवाय वैयक्तिक देवालयेही असत. कौसल्येच्या महालात एक देवस्थान होते. अगस्त्याच्या आश्रमातही भिन्न भिन्न देवतांच्यासाठी वेगवेगळी देवस्थाने बनवलेली होती.

उत्तरकांडात शिवलिंगाचाही उल्लेख आढळतो. त्यावरून असे वाटते, की रामायणकालात लिंगपूजा प्रचलित झाली होती. लक्ष्मीची मूर्ती कमलावर बसवलेल्या स्थितीत बनवली जात असे. विष्णू शंख, चक्र, गदा व पद्म धारण करणारा बनवीत. ब्रम्हयाला चार मुखे असत.

गृह्यसूत्रांत निर्दिष्ट केलेले कित्येक संस्कार त्या काळी रूढ झाले होते. राम व त्याचे बंधू यांचे जातकर्म, नामकरण, इ. संस्कार झाले होते. धार्मिक आचारांत तीर्थयात्रेलाही उचित स्थान होते. त्या काळी गोप्रतार, गोकर्ण, कुरुक्षेत्र, प्रयाग, नैमिष व सेतुबंध ही स्थाने तीर्थरूपांत प्रतिष्ठा पावली होती. नद्यांचा संगम पवित्र मानला जाई. गंगेला श्रेष्ठत्व दिले जाई. गंगेत पितरांना पिंडदान करीत. हिमालय पर्वत तपश्चर्येसाठी अनुकूल समजला जाई. नैमिषारण्य हे यज्ञानुष्ठानासाठी आदर्श मानले जाई. वैदिक युगाइतकेच त्या काळीही गायीला सन्मानाचे स्थान होते. गोहत्या हे महापाप समजले जाई. राज्याभिषेकाच्या समारोहात गाईंचाही समावेश असे. गोप्रदान हे महत्त्वाचे दान समजले जाई. मांगलिक प्रसंगी गाईंना व तिच्या वासरांना शृंगारून त्यांचे दान केले जाई. यज्ञाची दक्षिणाही गाईंच्या रूपातच देत. मान्यवर अतिथीलाही गाय भेट म्हणून देत.

रामायणकाल हा यज्ञसंस्थेच्या उत्कर्षाचा काल होता. दिग्विजय कीर्ती मिळवायची, तर राजे लोकांना नाना प्रकारचे यज्ञ करावे लागत. दशरथाला यायजूक (यज्ञांचे नियमित अनुष्ठान करणारा) असे म्हटले आहे. हे यज्ञ संपन्न करण्यासाठी श्रोत्रिय ऋत्विज नगरामध्ये सन्मानपूर्वक वसवलेले असत. यज्ञाच्या सामग्रीलाही देवतास्वरूप मानीत. रामाने वनवासाला निघतांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अभिषेकासाठी आणलेल्या पात्रांना प्रदक्षिणा केली होती. सर्व यज्ञांत अश्वमेध यज्ञाला मोठी प्रतिष्ठा होती. अश्वमेध करूनच राजेलोक आपली सार्वभौम सत्ता उद्घोषित करीत. यज्ञात पशुहननही केले जाई. राक्षससमाजात अंत्येष्टीच्या वेळी कित्येक पशू बळी दिले जात.

जड वस्तूंतही चेतन आत्म्याचा निवास असतो, असे मानले जाई. पर्वत, समुद्र, आकाश, पृथ्वी, वायू, दिवस, रात्र व संध्या यांना सचेतन देवता मानून, त्यांनी रामाची वनवासात रक्षा करावी, अशी प्रार्थना कौसल्येने केली होती. नदीपूजा व वृक्षपूजा प्रचलित होती. वृक्षांमध्ये वटवृक्ष पवित्र मानला जात असे.

वेदकालात ज्या देवता निसर्गरूप मानल्या जात होत्या, त्यांचे रामायणकालात पूर्ण मानवीकरण झाले होते. ब्रह्मा, विष्णू, महेश हे तीन महान देव सृष्टिस्थितिसंहारकर्ते म्हणून प्रसिद्धी पावले होते. शिव मोठा की विष्णू मोठा, यासंबंधीही लोकांमध्ये चर्चा चालत. त्या दोघांचे संप्रदाय निर्माण झालेले असले, तरी त्यांच्यामध्ये सांप्रदायिक वैमनस्य नव्हते. कित्येकदा शिव व विष्णू या दोघांचीही बरोबरीने पूजा केली जात असे. कौसल्येने तशी ती केली होती. सर्व देवता एकाच परमात्म्याच्या मूर्ती समजल्या जात. ज्याप्रमाणे इष्ट देवतांची पूजा होई, त्याचप्रमाणे अनिष्टकारक देवतांची व प्राण्यांची विघ्ननिवारणासाठी पूजा केली जाई.

नैतिक सदाचार हे धर्माचे एक अभिन्न अंग समजले जाई. रामायणात या गोष्टीवर इतका भर दिलेला आहे, की जणू नीतीचेच कवितेचे रूप धारण केले आहे, असे वाटावे. नीतीमध्ये सत्य हे सर्वश्रेष्ठ मूल्य समजले जाई. सत्य हाच परमधर्म, कृतघ्नता हे महापाप, वासनांवर नियंत्रण ठेवणे हे नैतिक सदाचाराचे मूलसूत्र, वशीभूत चित्त हे मोक्षाचे प्रवेशद्वार, तपस्येच्या द्वारेच आध्यात्मिक फलाची प्राप्ती, दान हे इहपर कल्याणाचे साधन आणि सर्व दानांत भूदान श्रेष्ठ मानले जाई.

सांप्रत काली हिंदू लोक ज्या पद्धतीने मृताच्या दाहसंस्कारादी अंत्यक्रिया करतात, त्याच पद्धतीने सामान्यपणे रामायणकालातही त्या क्रिया करीत. आर्य, वानर आणि राक्षस या तीन्ही समाजांत प्रेताची दाहक्रिया होत असे. अंतर एवढेच, की सांप्रत काली दुसऱ्या दिवशी अस्थिसंचयन करतात, ते त्या काळी तेराव्या दिवशी केले जात असे. दाहसंस्कारानंतर मृताला तिलांजली व पिंड देत असत. पूर्वज दोन प्रकारचे मानीत. जे थोड्याच कालापूर्वी मृत झाले आणि ज्यांचे स्मरण ताजे आहे, अशांना प्रेत म्हणत. बऱ्याच अतीतकाली मृत झालेल्या व बहुतांशी विस्मृत झालेल्या पूर्वजांना पितर म्हणत. पितरांसाठी दैनिक पितृयज्ञ व सांवत्सरिक श्राद्ध करीत. पितरांना यज्ञभागाचेही अधिकारी समजत. श्राद्धात ब्राह्मणभोजन घालीत व दक्षिणाही देत. प्रत्येक पुत्राकडून पित्याची ही अपेक्षा असे, की त्याने एक वेळ तरी गयेत जाऊन आपले श्राद्ध करावे.

रामायणामध्ये धर्म शब्द व्यापक अर्थाने आला आहे. त्यात ईश्वराभिमुख विचार, उच्चार व आचार यांचे परिगणन होत असे. सदाचारी जीवनाला प्रेरक ठरणारे सर्व सद्‌गुणही धर्माच्या अंतर्गत मानले जात व पापाकडे प्रवृत्त करणारे दुर्गुण अधर्म समजले जात. धर्म हा जीवनाच्या समस्त उत्कर्षाची गंगोत्री आहे, असे सांगताना सीता म्हणते –

> धर्मादर्थः प्रभवति धर्मात् प्रभवते सुखम् ।
> धर्मेण लभते सर्वं धर्मसारमिदं जगत् ।।
>
> (अरण्य. ९.३०)

अर्थ – धर्मापासून अर्थाचा व सुखाचा लाभ होतो. (किंबहुना) धर्मापासून सर्वच काही मिळते. (कारण) जगतातली एकमात्र सारभूत वस्तू धर्म हीच आहे.

धर्माचे एक प्रधान साधन म्हणजे कर्तव्याचे आचरण हे होय. कोणत्याही आपत्तीला भिऊन आणि कोणत्याही तात्कालिक सुखाला भुलून कर्तव्य टाळणे योग्य नव्हे. धर्माचा मार्ग हा क्लेशसाध्य आहे; पण अंती सुखप्रद आहे. तो मुख्यत: आत्मिक उन्नतीचे साधन असला तरी तो शारीरिक व भौतिक कल्याणाला विरोधी नाही. धर्मामध्ये तीन्ही पुरुषार्थांची प्रतिष्ठा आहे. राम म्हणतो (अयोध्या. २१.५१) –

> धर्मार्थकामाः खलु जीवलोके समीक्षिता धर्मफलोदयेषु ।
> ये तत्र सर्वे स्युरसंशयं मे भार्येव वश्याभिमता सपुत्रा ।।

अर्थ – ज्या प्रकारे एकच भार्या पतीला वश राहून धर्माचे, प्रियतमा बनून कामाचे व पुत्रवती बनून अर्थाचे संपादन करते, त्याच प्रकारे एका धर्मफलाची प्राप्ती झाल्यावर धर्म, अर्थ व काम या तीन्ही पुरुषार्थांची सिद्धी होते.

स्त्रीजीवन – समाजातली स्त्रीची स्थिती हा समाजाच्या संस्कृतीचा व सभ्यतेचा मानदंड असतो. रामायणकालीन स्त्रीसंस्कृती समजण्याच्या कामी वाल्मीकीने पुष्कळ सामग्री उपलब्ध करून ठेवली आहे. रामायणात कित्येक प्रमुख व गौण स्त्रीपात्रे वावरताना दिसतात. त्यांतली काही सद्‌गुणी व सदाचारी आहेत; तर काही दुर्गुणी व दुराचारीही आहेत. त्यामुळे स्त्रीसंस्कृतीचे भल्याबुऱ्या दोन्ही अंगांनी दर्शन होऊ शकते. पंचकन्यांमधल्या द्रौपदी सोडून सर्व प्रातःस्मरणीय स्त्रिया रामायणातल्याच आहेत.

कन्या जन्माला आली, की मातापित्यांना काळजी सुरू होते. उत्तरकांडात अशी कित्येक स्थळे आहेत, की जिथे उपवर मुलींचे वय वाढत असलेले पाहून आईबापांना चिंतेने ग्रासलेले आहे. त्यावरून प्रश्न असा उत्पन्न होतो, की या चिंतेपासून मुक्त होण्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

साठी आईबाप जन्मतःच मुलींचा त्याग तर करीत नसतील ? या संबंधात वाल्मीकीने दिलेली एक उपमा विचारणीय वाटते. अशोकवनात विलाप करणाऱ्या सीतेचे वर्णन करताना तो लिहितो (सुंदर. २८: २)–

कान्तारमध्ये विजने विसृष्टा।
बालेव कन्या विललाप सीता ॥

अर्थ – निर्जन अरण्यात टाकून दिलेल्या बालिकेप्रमाणे सीता विलाप करू लागली.

ही केवळ उपमा आहे असे वाटत नाही. या श्लोकार्धातून ध्वनी निघतो, तो असा की वाल्मीकीच्या काळात नवजात कन्यांना वनात टाकून देण्याच्या घटना काही प्रमाणात तरी घडत असाव्या. सीता जनकाला सापडली, ती परित्यक्त अवस्थेतच, हेही या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

मात्र सर्वसामान्यपणे असे दिसते, की कुटुंबात मुलींची आबाळ केली जात नसे आणि त्यांनाही प्रेमाने वाढवले जात असे.

कुमारी कन्या मंगलसूचक मानल्या जात. सुंदर व सुवेष कन्या दिसणे व अशा कन्यांनी एखाद्याचे स्वागत करणे, हे भाग्यसूचक समजले जाई. म्हणूनच राम जेव्हा वनवासातून अयोध्येत प्रविष्ट झाला, तेव्हा त्याच्या मिरवणुकीत कन्या सर्वांत अग्रभागी चालत होत्या. रामाच्या यौवराज्याभिषेकाच्या वेळी जी सामग्री एकत्रित केली गेली, तिच्यात आठ सुंदर कन्याही समाविष्ट होत्या. रामाला राज्याभिषेक झाला, त्या वेळी कुमारिकांनी त्याच्यावर जल-सिंचन केले होते. कोणत्याही मांगलिक व सामाजिक समारंभात कुमारिकांची उपस्थिती शुभद मानली जात असे.

रामायणातल्या प्रमुख स्त्रीपात्रांकडे लक्ष दिल्यावर, त्यांना आईबापांच्या घरी योग्य ते शिक्षण मिळाले होते, असे समजून येते. हे शिक्षण धार्मिक, नैतिक व व्यावहारिक असे त्रिविध होते. कर्मकांड आचरण्यासाठी श्रुति-स्मृती व पुराणे यांचेही जरुरी-पुरते शिक्षण त्यांना दिले जाई. रामाच्या यौवराज्याभिषेकाच्या दिवशी कौसल्येने अग्नीला समंत्रक आहुती दिली होती; तर सीता नित्य संध्योपासनाही करीत असे. तारेला तर मंत्रवित् असेच म्हटले आहे. मुलींना नृत्य, संगीत, इ. ललित कलाही शिकवल्या जात. काही महत्त्वाकांक्षी मुलींना युद्धाचेही शिक्षण दिले जाई. एका युद्धात दशरथ राजा मूर्च्छित पडला असता त्याच्या बरोबर रणभूमीवर गेलेल्या कैकेयीने त्याला युद्धभूमीपासून दूर नेऊन त्याचे प्राण वाचवले होते. कैकेयीला रथही चालवता येत असे. रामायणकालातल्या मुली गोषा किंवा कडक नियंत्रणे यांपासून मुक्त होत्या. त्यांना समाजात मिसळू दिले जाई. सामूहिक क्रीडेतही त्या भाग घेत.

स्त्रियांनी आपल्या पतीशी कसे वागावे, हे सांगताना वाल्मीकीने निष्ठा व सेवा यांविषयी आग्रह दर्शविला आहे. त्याचे कारण हे, की पती हे पत्नीचे एकमेव आश्रयस्थान आहे, असे तत्कालीन समाज समजत होता व पत्नीकडून कठोर पातिव्रत्य आणि आत्मत्याग यांची अपेक्षा बाळगीत होता. पती अवगुणी, अवलक्षणी असला, तरी पत्नीने त्याची सेवा केली पाहिजे, अशी समाजाची धारणा होती. म्हणूनच साध्वी स्त्रियांची प्रशंसा रामायणात अनेक ठिकाणी आली आहे. ज्याप्रमाणे पत्नीने पति-परायण राहावे, अशी अपेक्षा केली जाई; त्याचप्रमाणे पतीनेही आपल्या साध्वी पत्नीचा कधीही त्याग करू नये, असेही समजले जाई. मात्र रामायणात दुष्ट पत्नीचा त्याग करण्याला अनुमती दिलेली आहे. नैतिक गुणांव्यतिरिक्त आदर्श पत्नीच्या ठिकाणी शारीरिक आकर्षणाचीही अपेक्षा केली जात असे. मनोहर स्मित, कटाक्ष आणि हावभाव, तसेच वाणीचे माधुर्य या गुणांनी पत्नीला पतीच्या प्रेमाला पात्र होता येते, असे म्हटले आहे. त्या गुणांच्या बरोबरच तिचे हृदय उदार आणि स्वभाव मधुर असल्यास तो दुग्धशर्करायोगच समजावा. वाल्मीकीने सीतेला याच स्वरूपात चित्रित केले आहे.

त्या काळी पती प्रवासाला गेल्यानंतर पत्नीला काही विशेष विधिनियम पाळावे लागत. तिने प्रातःकाळी उठावे, स्नान करावे, देवपूजा करावी, व्रतोपवास करावे, साधी वस्त्रे व अल्प अलंकार वापरावे, आमोद-प्रमोदांत मन रमवू नये आणि कोणत्याही पदार्थांवर आसक्ती जडवू नय, असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे सौभाग्यवती स्त्रियांनी पतीच्या कल्याणासाठी व्रत-नियम आचरावे आणि ब्राह्मणांना दान-दक्षिणा द्यावी, असेही सांगितले आहे.

कन्येच्या विवाहप्रसंगी आई-बाप तिला जे धन देत असत ते तिचे स्त्रीधन मानले जाई. त्यावर तिचा एकटीचाच अधिकार राही. राजकुलात प्रसंगविशेषी राजाकडून राण्यांना जो द्रव्यरूप किंवा अलंकाररूप उपहार मिळे, त्यावरही त्या त्या राणीचे स्वामित्व राही. पतीच्या मृत्यूनंतर हा तिचा आत्मसंपत्तीवरचा अधिकार सुरक्षित असे. राज्याभिषेकाच्या प्रसंगी राजाला राणी-सह अभिषेक केला जाई. स्त्रीला आपल्या पतीच्या अंत्यक्रियेत भाग घेण्याचा अधिकार असे. दशरथाच्या राण्यांनी त्याच्या प्रज्वलित चितेला प्रदक्षिणा केल्या होत्या. वालीच्या स्मशान-यात्रेत त्याच्या स्त्रियाही सामील झाल्या होत्या. दिवंगत पितरांचे तर्पण करण्याचा अधिकारही त्यांना होता.

स्त्रीच्या जीवनाची कृतार्थता तिच्या मातृत्वात समजली जाई. विवाहसंबंध हा विषयसुखासाठी नव्हे; तर सुयोग्य पुत्राच्या प्राप्तीसाठी करायचा असतो. त्यासाठी कन्येचे कौमार्य अभग्न असावे आणि वराचे चारित्र्य शुद्ध असावे, अशी अपेक्षा धरीत. त्या काळी पुत्रांचे मातेशी व्यवहार सादर व स्नेहपूर्ण असत. स्त्री ही तत्का-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तीन कौटुंबिक जीवनाच्या केंद्रस्थानी असे. पतिमरण हे महान संकट खरे, पण ते आल्यावरही तत्कालीन स्त्रिया सती जात नसत. उत्तरकांडात कुशध्वजाच्या पत्नीने पतीच्या मृत्यूनंतर त्याच्यासह अग्निप्रवेश केला, ही एक घटना सोडल्यास रामायणात सती जाण्याचा प्रसंग आढळत नाही. मांगलिक प्रसंगी विधवांची उपस्थिती अशुभ समजत नसत. राम वनवासातून परत आल्यावर त्याच्या विधवा मातांनी पुढे येऊन त्याचे स्वागत केले होते. राज्याभिषेकाच्या वेळी सीतेचा शृंगार तिच्या विधवा सासवांनीच केला होता. राजपरिवारातल्या स्त्रिया आपल्या महालातून प्रायः बाहेर पडत नसत. पण इतरत्र स्त्रिया पडदा पाळीत असत, असे दिसत नाही. राक्षससमाजात मात्र पुरुष आपल्या स्त्रियांना पडद्यात ठेवीत आणि त्यांनी पडदा न पाळल्यास ते क्रुद्धही होत असत.

वेश्यावर्गाचा राजकीय परिस्थितीसाठी स्वीकार ही गोष्ट भारतीय संस्कृतीच्या इतिहासात रामायणामध्येच प्रथम दिसते. रोमपादाच्या राज्यात अवर्षण पडल्यावर त्याचे निवारण करण्यासाठी रोमपादाने यज्ञ करायचे ठरविले. त्या कामी ऋष्यशृंगाची उपस्थिती आवश्यक होती. म्हणून राजाने आपल्या मंत्र्यांशी सल्लामसलत करून त्याला भुलवून आणण्यासाठी सुंदर वेश्या व नर्तकी यांची व्यवस्था केली होती. रामाच्या यौवराज्याभिषेकाची तयारी करताना राजमहालाच्या दुसऱ्या चौकात अलंकृत वेश्यांनी उभे असावे, असा आदेश वसिष्ठाने दिला होता. भरतानेही रामाच्या आगमनप्रसंगी गणिकांचा एक संघ सुसज्ज ठेवला होता. शत्रूवर चाल करून जाताना ज्या ज्या गोष्टी बरोबर घेऊन जात, त्यांत वेश्यांचाही समावेश होत होता. वेश्या हे नागरी जीवनाचे एक अभिन्न अंग होते. अयोध्यानगरी 'गणिकावरशोभिता' = सुंदर वेश्यांनी शोभिवंत, होती.

एकूण पाहता समाजात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान असे. यात्रा, विहार, इ. प्रसंगी पुरुष आपल्या स्त्रियांना आपल्या बरोबर घेत. न्यायालयात जाऊन आपली फिर्याद राजापुढे गुदरणे, या गोष्टीचाही स्त्रियांना अधिकार होता. त्या काळच्या स्त्रिया फाजील लाज किंवा फाजील संकोच बाळगीत नसत. हे झाले सामान्य स्त्रियांच्या बाबतीत. पण अंतःपुरातील स्त्रियांची स्थिती मात्र याहून वेगळी असे. अंतःपुर राजवाड्याच्या अंतर्भागात असे. त्याच्या द्वारावर स्त्रीद्वारपालांचा आणि हिजड्यांचा सशस्त्र पहारा असे. मात्र त्या स्त्रियांना मनोविनोदनासाठी उद्याने बनवलेली असत आणि विविध प्रकारची क्रीडासाधनेही पुरवली जात असत.

रामायणकाली सुंदर स्त्रिया उपहार म्हणून देण्याची प्रथा होती. या स्त्रिया दासीच्या दर्जाच्या असत. रामाला कररूपाने सुंदर दासी मिळाल्या होत्या. दशरथाचे श्राद्ध करीत असता भरताने ब्राह्मणांना इतर वस्तूंबरोबर दासीही दान दिल्या होत्या. तत्कालीन अश्वमेध यज्ञात राजे लोक दक्षिणा म्हणून आपल्या राण्याही पुरोहितांना दान देत. दशरथाने आपल्या यज्ञात आपल्या राण्या दक्षिणा म्हणून पुरोहितांना दिल्या होत्या आणि त्यांच्या मोबदल्यात धनधान्य देऊन त्या परत घेतल्या होत्या.

हा प्रकार स्त्री ही संपत्तीच्या अनेक वस्तूंपैकी एक मानली जात होती, या गोष्टीचा निदर्शक ठरतो. शैलूप (नट) आपल्या स्त्रिया दुसऱ्यांच्या उपयोगासाठी देत असल्याचा उल्लेख सीतेने एका ठिकाणी केला आहे. पती हा पत्नीचा निरंकुश स्वामी मानला जात असल्याचे हे द्योतक आहे.

थोरल्या भावाच्या पत्नीला मातेसमान मानले जात असे. कुलीन स्त्रियांच्या पुढे पूर्वसूचना न देता अचानक जाऊन उभे राहणे शिष्टसंमत नव्हते. पुरुषांनी स्त्रियांचे सर्व प्रकारे रक्षण करावे, असा आग्रह असे. तरी त्यांना स्वाधीन ठेवण्यासाठी बलप्रयोग निंद्य समजला जाई. सभ्य व सुसंस्कृत लोक स्त्रियांच्या संबंधात कोणताही क्रूर व्यवहार करीत नसत. स्त्रियांचा अपहार हा अपराध समजला जाई. स्त्रिया अवध्य मानल्या जात. स्त्रीवध करणाऱ्याची निंदा होत असे. एतावता रामायणातले सर्व स्त्रीविषयक उल्लेख एकत्र केले असता असे दिसते, की त्या काळी स्त्रियांची एकूण परिस्थिती सुखावह होती. कन्या, पत्नी, माता आणि विधवा या चारही रूपांत स्त्रियांना सर्व सुखसोयी उपलब्ध होत्या आणि त्यांना काही अधिकारही होते. एकूण स्त्रियांचा दर्जा बराच वरचा होता.

प्रशासन – रामायणकालात भारतामध्ये कोणतेही एकछत्री साम्राज्य नव्हते. आर्यावर्त हा अंग, काशी, कोसल, केकय, मगध, मत्स्य, मिथिला, वंग, विशाला, सिंधू, सौवीर, सौराष्ट्र, सांकाश्य, इ. वेगवेगळ्या स्वतंत्र राज्यांत विभक्त होता. रामायणात कोणत्याही गणराज्याचा उल्लेख नाही. मर्यादित राज्यतंत्र असे तत्कालीन शासनाचे स्वरूप होते. विधिनियमांनी प्रस्थापित अशा सुदृढ शासनव्यवस्थेवर लोकांचा अत्यंत विश्वास होता. तत्कालीन प्रजा अराजकतेला फार घाबरत होती.

राजपद हे त्या काळी कुलपरंपरागत असे. इक्ष्वाकूंची वंशावळ पाहता अयोध्येत पिढ्यान्‌पिढ्या आनुवंशिकपणे राजपद चालू असल्याचे कळते. नवा राजा सिंहासनावर यायच्या वेळी त्याला सभेची अनुमती घ्यावी लागत असे. भावी राजा प्रथम वर्तमान राजाकडून सुचविला जात असे व सभेकडून आणि सामंत राजांकडून अनुमती मिळाल्यानंतर तो राजा बनत असे. रामाला यौवराज्य देण्याच्या वेळी दशरथाने आपल्या सभेची मान्यता घेतली होती. यावरून तत्कालीन राज्यतंत्र हे काही प्रमाणात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकमतानुवर्ती होते असे कळते.

प्रायः थोरला मुलगाच युवराजपदाचा अधिकारी होत असे. मात्र तो गुणवान आणि धर्मनिष्ठ असणे आवश्यक होते. तो अयोग्य असला, तर त्याला यौवराज्य देण्यास सभा आपली संमती देत नसे. इक्ष्वाकू वंशातच सगर नावाचा एक राजा झाला. त्याचा ज्येष्ठ पुत्र असमंजस नावाचा होता. पण तो अत्याचारी निघाल्यामुळे प्रजेने त्याला युवराजपद घेऊ दिले नाही. इतकेच नव्हे, तर प्रजेच्या आग्रहावरून राजाला त्याला राज्यातून हाकलून द्यावे लागले.

एखाद्या वेळी युवराजाची नियुक्ती होण्यापूर्वीच राजाचा मृत्यू झाला तर 'राजकर्तारः' (राजपद देणारे लोक) राजाचे निर्वाचन करीत असत. राजाला व्यक्तिगत हिताकडे दुर्लक्ष करून जनहिताकडे विशेष लक्ष द्यावे लागे. जनमतापुढे पुष्कळदा त्याला झुकणेही भाग पडत असे. प्रजा आपल्या उत्पन्नातला सहावा भाग राजाला कररूपाने देत असल्यामुळे प्रजेचे पालन, दुष्टांचे दमन व साधूंचे संरक्षण या गोष्टी राजाला कर्तव्य म्हणून कराव्या लागत. राज्यात रोगराई निर्माण झाली, काही प्रक्षोभ झाला किंवा लोक नीतिभ्रष्ट झाले, तर या सर्व गोष्टींबद्दल राजाला जबाबदार धरले जाई. ज्याला राजाच्या भेटीची इच्छा असेल, त्याला ती भेट राजाकडून सरळपणे मिळावावी लागे. राज्यातल्या स्त्री-पुरुषांच्या सर्व तक्रारी ऐकून घेणे व त्या दूर करणे हेही राजकर्तव्यांत मोडत असे. राज्यशासनाची योग्य ती व्यवस्था केल्यावाचून राजाला राज्य सोडून जाता येत नसे. भगीरथ राजाने तपस्येसाठी वनात जाताना राज्यव्यवस्था मंत्रिजनांच्या हाती सोपविली होती.

सभा, मंत्रिपरिषद व तीर्थ (शासनाधिकारी) ही तत्कालीन शासनतंत्राची तीन मुख्य अंगे होती. या तीन्हींच्या मदतीने राजा शासन चालवीत असे. सभेचे सदस्य सरकारी व बिनसरकारी असे दोन्ही प्रकारचे असत. सरकारी सदस्यांत अमात्यगण (क्षत्रिय), मंत्रिगण (ब्राह्मण) व सेनापती हे सरकारी सदस्य असत. बिनसरकारी सदस्यांत सामंत, पौर व जानपद हे असत. पौर-जानपद हे सभेचे अंग विशेष शक्तिशाली असे. सामान्यपणे शासनविषयक सर्व महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सभेचा विचार घेतला जात असे. सभेत उपस्थित होण्यासाठी सभासदांना दूतांकडून निमंत्रण दिले जाई. राजाच्या अनुपस्थितीत पुरोहित किंवा अमात्य सभेचे अधिवेशन बोलावी. सभेचा अध्यक्ष राजाच असे. त्याच्या अनुपस्थितीत पुरोहित ते पद ग्रहण करी. बाहेरून येणाऱ्या सदस्यांसाठी राजधानीत निवासस्थानेही बनवलेली असत. अयोध्येचे सभाभवन हे राजप्रासादाचेच एक अंग होते. सभेत राजाने व सभासदांनी उत्तम वस्त्राभरणे लेवून आले पाहिजे, असा दंडक होता. सभेचे सर्व शिष्टाचार योग्य प्रमाणात पाळले जात. सभासदांच्या कर्तव्याविषयी वाल्मीकीने एका ठिकाणी म्हटले आहे, ते असे–

न सा सभा यत्र न सन्ति वृद्धा वृद्धा न ते ये न वदन्ति धर्मम्।
नासौ धर्मो यत्र न सत्यमस्ति न तत्सत्यं यच्छलेनानुविद्धम् ॥
ये तु सभ्याः सदा ज्ञात्वा तूष्णीं ध्यायन्त आसते।
यथा प्राप्तं न ब्रुवते ते सर्वेऽनृतवादिनः ॥
जानन्न वाब्रवीत् प्रश्नान् कामात् क्रोधाद् भयात्तथा।
सहस्रं वारुणान् पाशानात्मनि प्रति मुञ्चति ॥

(उत्तर. ५९.३४–३६)

अर्थ – जिच्यात वृद्ध (ज्ञानी वृद्ध) नाहीत, ती सभा नव्हे. जे वृद्ध धर्माला धरून बोलत नाहीत ते वृद्ध नव्हेत. जो सत्यापासून दूर आहे असा धर्म हा धर्म नव्हे आणि जे सत्य छलकपटविरहित व स्वयंप्रेरित नसेल ते सत्य नव्हे. अर्धसत्य गोष्टी बोलणे किंवा विधाने करणे हे निंद्य आहे. जे सभासद सत्य गोष्ट माहीत असूनही त्याविषयी मौन धरतात, त्यांना असत्यवादीच समजले पाहिजे. जे सभासद स्वार्थ, क्रोध व भय यांच्या आहारी जाऊन कर्तव्यप्राप्त असलेली सत्य गोष्ट सांगत नाहीत, ते सहस्र वारुण पाशांनी बांधले जातात.

दशरथ राजाचे आठ अमात्य होते. धृष्टी, जयंत, विजय, सिद्धार्थ, अर्थसाधक, अशोक, मंत्रपाल व सुमंत अशी त्यांची नावे होती. राजधानीचे नगर व समस्त राष्ट्र यांमध्ये शांतता राखण्याचे उत्तरदायीत्व अमात्यांवर होते. लोकांमध्ये कायद्याचे भय निर्माण करणे आणि त्यांना नीतिधर्माने चालायला लावणे हीही जबाबदारी अमात्यांची होती. तीर्थ (शासनाधिकारी) हे संख्येने अठरा होते. हे वेगवेगळ्या खात्यांचे प्रमुख होते. न्यायदानाची पद्धती सरळ, स्वस्त आणि त्वरित होती. त्या काळी धंदेवाईक वकील नव्हते आणि दावा लढवण्यासाठी द्रव्यही द्यावे लागत नव्हते. कोणत्याही मुकदम्याचा निर्णय स्वतः राजाच करीत असे. वादी-प्रतिवादी विनासायास राजापुढे स्वतः पोचू शकत असत. तत्कालीन न्यायाचे सिद्धान्त कोणत्या प्रकारचे होते, हे त्याविषयी रामाने भरताला जे कच्चित प्रश्न विचारले त्यांवरून कळून येईल..

कच्चिदार्योऽपि शुद्धात्माऽऽक्षारितश्चापकर्मणा।
अदृष्टः शास्त्रकुशलैर्न लोभाद् वध्यते शुचिः ॥
गृहीतश्चैव पृष्टश्च काले दृष्टः सकारणः।
कच्चिन्न मुच्यते चोरो धनलोभान्नरर्षभ ॥
व्यसने कच्चिदाढ्यस्य दुर्बलस्य च राघव।
अर्थं विरागाः पश्यन्ति तवामात्या बहुश्रुताः॥

(अयोध्या. १००.५६–५८)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – हे भरता, एखाद्या माणसाने श्रेष्ठ, निर्दोष व शुद्धात्म अशा पुरुषांवर दोषारोप करावे आणि तू शास्त्रज्ञानात कुशल अशा विद्वानांकडून त्या आरोपित व्यक्तीबद्दल विचार न करता लोभाने त्याला दंड द्यावास, असे तर तुझ्या राज्यात होत नाही ना? जो चोरीच्या अपराधात पकडला गेला आहे, ज्याला चोरी करतांना कोणीतरी पाहिले आहे, ज्याने चोरी केल्याचे साक्षी-पुराव्याने सिद्ध झाले आहे आणि ज्याच्याजवळ चोरीचा मालही सापडला आहे, अशा चोराला तुझ्या राज्यात द्रव्यलोभाने सोडून तर दिले जात नाही ना? जर धनिक आणि गरीब यांमध्ये काही विवाद उत्पन्न झाला आणि तो न्यायालयात निर्णयासाठी आला तर तुझे अमात्य धनादिकांच्या लोभाने गरिबाला अन्याय होईल अशा प्रकारे विचार करीत नाहीत ना?

त्या काळी सर्वोच्च न्यायालयाचा अध्यक्ष स्वतः राजाच असे. त्याला निर्णयाच्या कामी साहाय्य करण्यासाठी धर्मपारग व व्यवहारज्ञ असे पुरोहित, मंत्रिगण; तसेच परंपरा व लोकाचार जाणणारे अनुभवी ऋषिमुनी, अर्थशास्त्रपारंगत असे सदस्य, प्रमुख व्यापारी व राजाचा भाऊ हे न्यायालयात वसत.

राजद्रोह, खोटी साक्ष, कुमारिकांवर बलात्कार, परस्त्रियांचे अपहरण, ठेवींचा दुरुपयोग, चोरी, दरोडेखोरी, ब्रह्महत्या, सैनिकांना ठरलेले वेतन न देणे, युद्धात शत्रूला पाठ दाखविणे, बालके, स्त्रिया व वृद्ध यांची हत्या, आग लावणे, जलाशयात विष कालवणे आणि गुरुस्त्रीगमन, हे घोर अपराध समजले जात. अशा अपराध्यांना यातनादंडापासून प्राणदंडापर्यंत शिक्षा होत असत. वंधन व वद्ध असे शब्द आले आहेत, त्या अर्थी त्या काळी कारागृहे असावीत असे वाटते.

तत्कालीन राज्यसंस्थेत गुप्तचरांना बरेच महत्त्व दिले जात होते. त्यांना चर, चार किंवा चारण म्हटले जात असे. अयोध्येच्या राज्यात असा एक कायमचा गुप्तचरविभाग होता. दशरथाचे मंत्री शत्रुराजांच्या हालचाली गुप्तचरांद्वारे समजून घेत असत. गुप्तचरांचे नागरिक व सैनिक असे दोन प्रकार होते.

राज्यातल्या निरनिराळ्या नगरांचे शासन स्थानिक नागरिकांच्या समितीमार्फत चालवले जाई. राजधानीची व्यवस्था पौरसमितीकडे असे. या पौरसमितीचा अध्यक्ष राजा किंवा युवराज असे. नागरवस्तीची स्वच्छता, राजमार्गांची देखभाल, पाण्याची व्यवस्था, दिव्यांची व्यवस्था, यातायातीचे नियंत्रण, उत्सवप्रसंगी नगराची सजावट, उद्यानांची व्यवस्था, इ. कामे पौरसमितीने करायची असत. गाव आणि गौळवाडे या ठिकाणीही स्वायत्त समित्या असत. त्या समितीच्या अध्यक्षांना अनुक्रमे ग्राममहत्तर व घोषमहत्तर असे म्हणत.

रामकालीन राज्य हे एक प्रजानुरंजक असे सुराज्य होते. त्यावरूनच आदर्श राज्यपद्धतीला रामराज्य असे पुढच्या काळात म्हणू लागले. या रामराज्याचे वर्णन रामायणातच बालकांड व युद्धकांड यांमध्ये आलेले आहे, त्याचा सारांश असा –

रामराज्यात क्षुद्र, चोर, दुराचारी व दुष्ट असा मनुष्य नव्हता. वर्णसंकर नव्हता. विधवांचा विलाप कानी पडत नव्हता. सर्पादी दुष्ट जंतू व रोग यांचे भय नव्हते. कोणी पाप आचरीत नव्हता. कोणाला अपमृत्यू नव्हता. सर्व लोक प्रसन्न, धर्मपरायण व पुत्र–पौत्रसंपन्न होते. वृक्षांची मुळे मजबूत होती व ते सदैव फलपुष्पसंपन्न होते. मेघ हवा तेवढाच पाऊस पाडीत होता. वारे सुखकर होते. दुर्भिक्षाचे भय नव्हते. सर्व लोक आपापल्या कामात संतुष्ट होते. स्त्रिया पतिव्रता होत्या. सर्व नगरे व जनपदे धनधान्यसंपन्न होती. कोणी कोणाला कष्ट देत नव्हते. सारी प्रजा सुखी, संतुष्ट आणि परिपुष्ट होती (बाल. १.९०-९३; युद्ध. १२८.९८-१०४).

रामायणाचे पाठभेद – रामायणामध्ये वेळोवेळी प्रक्षेपांच्या रूपाने भर पडत गेली आहे. हे परिवर्तन काही प्रमाणात संस्कृत विद्वानांनी व काही प्रमाणात प्रतिभाशाली कवींनी केले. हे प्रक्षिप्त अंश लोकांना रुचतील, त्यांतले नैतिक सिद्धान्त लोकांच्या मनावर ठसतील आणि त्यावरोबरच ग्रंथही वाढून सर्वांगसुंदर होईल, अशी या भर घालणाऱ्या विद्वानांची समजूत असावी. प्राचीन कालापासून लोकांची धारणा अशी होती, की वाल्मीकीचे रामायण मुळात खूप मोठे होते; पण त्यातले बरेच भाग लुप्त झाले. हे लुप्त झालेले भाग त्या त्या ठिकाणी पुनरुद्धृत करून बसवावे आणि त्याला पूर्णता द्यावी असा निश्चय काही विद्वानांनी केला; पण त्याचा परिणाम असा झाला, की हे परिवर्धित रामायण वाल्मीकीच्या मूळ रामायणापासून फार दूर गेले.

भारताच्या प्रत्येक प्रदेशात सूत व गायक ज्या क्रमाने रामकथेचे गायन करीत होते, त्याच क्रमाने रामायण त्या त्या प्रदेशात लिपिबद्ध करण्यात आले. त्यामुळेच भारताच्या भिन्न भिन्न भागांत रामायणाचे भिन्न भिन्न पाठ प्रचलित झाले. या पाठभेदांना धरून गेल्या दीड-दोनशे वर्षांत रामायणाची अनेक संस्करणे छापली गेली. सर्वप्रथम इ. स. १८०६ मध्ये डॉ. विल्यम केरी व डॉ. जोशुआ मार्शमेन नावाच्या दोन पाद्र्यांनी रामायणाची पहिली दोन कांडे इंग्रजी अनुवादासह छापून प्रसिद्ध केली. त्या कामी त्यांनी रामायणाचा वायव्य पाठ स्वीकारला. इ. स. १८२९ साली जर्मन विद्वान श्लेगेल याने पहिली दोन कांडे लॅटिनमध्ये अनुवादिली. संपूर्ण रामायण सर्वप्रथम गोरेशियो या रोमन विद्वानाने इ. स. १८४३–१८६७ या कालखंडात प्रकाशित केले. हे संस्करण बंगाली पाठावर आधारित होते. त्यानंतर इ. स. १८८८ मध्ये मुंबईमध्ये निर्णयसागर प्रेसने समग्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामायण छापले. त्याचप्रमाणे १९१२ ते १९२० या कालात मुंबईच्याच गुजराती प्रेसने सात खंडांत आणखी एक रामायण छापले. मुंबईची ही संस्करणे दाक्षिणात्य पाठाला अनुसरून केली गेली. पं. भगवद्दत्त, पं. रामलभाया व पं. विश्वबंधू यांनी लाहोर येथे एक रामायण संपादित करून १९२३ ते १९४७ या काळात छापले. त्यांनी वायव्य पाठ स्वीकारला. बडोदे येथील प्राच्य विद्यामंदिराने, भांडारकर प्राच्य विद्यामंदिराने संपादित केलेल्या महाभारताच्या संशोधित आवृत्तीप्रमाणे वाल्मीकि–रामायणाचे एक प्रमाणित संस्करण प्रसिद्ध केले आहे.

रामायणाच्या या अनेक पाठांत वंगीय, दाक्षिणात्य व वायव्य हे तीन पाठ महत्त्वाचे मानतात. दाक्षिणात्य पाठात उपलब्ध असलेले कित्येक कथाप्रसंग अन्य दोन पाठांत उपलब्ध होत नाहीत. जे अन्य कथाप्रसंग गोरेशियाच्या रामायणात आढळतात, ते दाक्षिणात्य पाठात आढळत नाहीत. कित्येक प्रसंग तीन्ही पाठांत आढळतात, पण त्यांचे प्रमाण कमी आहे.

रामायणाचा काल – रामायणरचनेच्या कालाबद्दल विद्वानांमध्ये मूलभूत मतभेद आहेत. मूळ रामायणाची रचना बुद्धाच्या पूर्वी म्हणजे सन पूर्व पाचव्या शतकापूर्वी झाली असावी, असे श्री. कामिल बुल्के यांचे मत आहे. याकोबी, मॅक्डोनेल, विंटरनिट्झ मोनियर विलियम्स व चिं. वि. वैद्य यांचेही हेच मत आहे. कीथ मात्र मूळ रामायण सनपूर्व चौथ्या शतकात झाले असे मानतो. डॉ. शांतिकुमार नानूराम व्यास यांच्या मते वाल्मीकीचे मूळ रामायण पाणिनीच्या पूर्वी (सन पूर्व ८००) रचले गेले असले पाहिजे. कारण रामायणात संस्कृत भाषेचे अनेक आर्ष प्रयोग आढळतात. जर वाल्मीकी पाणिनीच्या नंतरचा असता तर ही गोष्ट होती ना. पाणिनीच्या शिवादिगणात रवण व ककुत्स्थ हे दोन शब्द आले आहेत. त्याच दोन शब्दांवरून रावण व काकुत्स्थ हे शब्द सिद्ध केलेले आहेत. पाणिनीला रामायणसंहिता चांगलीच अवगत होती, हे सिद्ध करणारा मजकूर श्री. बाळशास्त्री हरदास यांनी दिला आहे, तो असा –

नखमुखात् संज्ञायाम् (४.१.५८) या सूत्राने नख किंवा मुख शब्द शेवटी आला तर आणि तो शब्द कोणाची संज्ञा असला तर ङीप् हा स्त्रीप्रत्यय करू नये, असा या सूत्राचा अर्थ आहे. या सूत्राप्रमाणे शूर्पणखा हा शब्द ङीप् (ई) प्रत्यय न होता टाप् (आ) प्रत्यय लावून केलेला आहे. येथील संज्ञा हा शब्द महत्त्वाचा आहे. शूर्पाप्रमाणे नखे असलेली स्त्री, या सामान्य अर्थी शब्द वापरावयाचा असला तर शूर्पणखी असे म्हणायचे आणि ते नाव असेल तर शूर्पणखा म्हणायचे, असा भेद उपर्युक्त सूत्रातील संज्ञा या शब्दाने स्पष्ट केलेला आहे. शूर्पणखा हे नाव केवळ रामायणसंहितेतलेच आहे. पाणिनीच्या काळी रामायणसंहितेला सर्वमान्य ग्रंथाचे स्वरूप प्राप्त झाले होते, असे सिद्ध होते. म्हणूनच तर पाणिनीला रामायणातील काही संज्ञांच्या स्पष्टीकरणासाठी विशेष नियम करावे लागले.

मूळ रामायणाचा विकास होऊन त्याने बृहत्काय रूप धारण केले, त्या गोष्टीला मध्यंतरी कित्येक शतके लोटली असावी. प्रस्तुत रामायण हे इ. स. च्या दुसऱ्या शतकात निर्माण झाले, असे याकोबी व विंटरनिट्झ हे पंडित मानतात; तर चिं. वि. वैद्य यांच्या मते हा काल स्थूलमानाने स. पू. १०० हा येतो. श्री. महाराष्ट्रीय व श्री. बाळशास्त्री हरदास यांच्या मते हा काल स. पू. २५२८ हा आहे.

रामायण आधीचे की महाभारत आधीचे, असाही एक वाद आहे. महाभारत आधी रचले गेले व नंतर रामायण रचले गेले, असे मानणारे विद्वान आंपल्या मतप्रतिपादनार्थ जे विचार मांडतात, ते असे –

महाभारतात वर्णिलेली लोकस्थिती प्रक्षोभयुक्त, संघर्षपूर्ण व अव्यवस्थित अशी आहे, तर रामायणातील परिस्थिती महाभारताच्या तुलनेने अधिक शांत, व्यवस्थित, सुसंस्कृत व [illegible] आहे. महाभारतापेक्षा रामायणात संस्कृतीचा विकास झालेला दृष्टीस पडतो. या व इतर अनेक कारणांनी रामायण हे महाभारतानंतरचे ठरते.

पण हे मत तर्काच्या कसोटीवर टिकू शकत नाही. रामायण व महाभारत या संहितांपैकी जिची रचना आधी झाली [illegible] तिचा प्रभाव नंतरच्या संहितेवर पडणे स्वाभाविक आहे. [illegible] दृष्टीने दोन्ही संहितांचे समालोचन केल्यास महाभारतात रामायणाचा स्पष्ट प्रभाव दिसतो. महाभारताचा रामायणात पुसटसुद्धा प्रभाव नाही. रामायणाचे नायक व खलनायक महाभारतात उपमान झाले आहेत. भीष्म व द्रोण [illegible] योग्यता वर्णन करताना त्यांना रामाची उपमा दिली [illegible] (आदि. २०५.६). कौरवांकडून दुसऱ्यांदा द्यूताचे बोलावणे आले असता धर्म प्रकृतिवश होऊन द्यूताला प्रवृत्त झाला. [illegible] घटनेचा निर्देश करताना व्यासांनी सुवर्णमृगाच्या मागे जाणाऱ्या रामाचे उदाहरण दिले आहे –

असम्भवे हेममयस्य जन्तोस्तथापि रामो लुलुभे मृगाय।
प्रायः समापन्नपराभवाणां धियो विपर्यस्ततरा भवन्ति॥

(म. भा. सभा. ७६.[illegible])

अर्थ – सोन्याचा प्राणी असणे असंभवनीय आहे, हे [illegible] असूनही राम सुवर्णमृगावर लुब्ध झाला. (तात्पर्य काय) ज्यांचा पराभव समीप येऊन ठेपला आहे, अशा लोकांच्या बुद्धी [illegible] फार विपर्यस्त होतात.

द्वैत वनात युधिष्ठिराचा वनवास पाहून मार्कंडेयाला राम[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वनवासाचे स्मरण झाले आहे. महाभारतात रामायणातल्या कित्येक पात्रांचा उपमाने म्हणून उपयोग झाला आहे. वनपर्वात (१४७.११) व स्वर्गारोहणपर्वात (६.९३) रामायण या ग्रंथाचाच उल्लेख आहे. रामायण व महाभारत यांतील सामाजिक व राजकीय परिस्थितीचे सूक्ष्म अवलोकन करून रामायण हे महाभारताच्या आधीचे आहे, हे सुस्पष्ट करताना डॉ. शांतिकुमार नानूराम व्यास हे लिहितात –

रामायणातली पात्रे ही आर्यांव्यतिरिक्त राक्षस, वानर अशी आदिवासी समाजातली आहेत; तर महाभारतातली मुख्य पात्रे सुसंस्कृत आहेत. रामायणातल्या वीर पुरुषांचे नैतिक आचरण हे मूल्यांवर आधारलेले आहे; तर महाभारतातल्या वीरांचे आचरण काही अंशी बौद्धिक आहे, व्यवहारी आहे. त्यामुळे महाभारतीय वीरांकडून कित्येकदा अन्यथा आचरण झालेले दिसते. महाभारतकालीन भारतात बरीच नगरे, बरीच तीर्थस्थाने व बऱ्याच नागरिक हालचाली दिसत आहेत. रामायणकालीन भारतात मात्र जंगले विपुल होती; कित्येक रस्ते अज्ञात होते आणि निसर्गाशी अधिक संपर्क होता. रामायणकालीन समाज आपल्या मर्यादित भूगोलाच्या कक्षेत अधिक सुघटित, व्यवस्थित व संघर्षरहित आहे; तर महाभारतातील समाजाच्या भौगोलिक समस्या अधिक विस्तारल्या आहेत. तो समाज संघर्षसंकुल आहे. राजकीय बाबतीत रामायणकाली एखाद्या सार्वभौम सत्तेचा अभाव दिसतो. त्या काळी देशात छोटी छोटी बरीच राज्ये होती. महाभारतकाली जरासंधाचे सार्वभौम साम्राज्य प्रस्थापित झाले होते व त्याने अनेक राज्ये आपल्या उदरात समाविष्ट करून टाकली होती. रामायण हे इक्ष्वाकू कुलाचा गौरव सांगणारे कथन आहे. या इक्ष्वाकूंचे कोसलावर स्वतंत्र आधिपत्य होते, हे रामायणावरून कळते; पण महाभारतकाली कोसल राज्य हे मगधांचे मांडलिक बनलेले दिसते.

रामायणाचा प्रभाव – वाल्मीकिरामायण हे भारताचे आदिकाव्य आहे. धार्मिक व नैतिक आदर्शांचे ते भांडार आहे. हजारो शतकांपूर्वी भारतीय समाज कोणत्या प्रकारे जीवनयापन करीत होता, त्याचे सुस्पष्ट वर्णन रामायणात मिळत असल्यामुळे, त्याला समाजशास्त्रीय महत्त्वही आहे. एका पुरातन युगाच्या जिवंत परंपरा, धारणा, चिंता, आकांक्षा व भावना यांचे चित्रण करीत असल्यामुळे रामायण हा ग्रंथ भारतीय संस्कृतीचा बहुमोल खजिना ठरला आहे. रामायणरूपी उत्तुंग पर्वतशिखरावर आरोहण करून तिथून आपण प्राचीन आर्यांच्या सामाजिक, आर्थिक, राजनैतिक, धार्मिक व कलाविषयक धारणांचे व क्रियाकलापांचे विहंगम दर्शन करू शकतो. वेदोत्तरकालीन भारतीय समाजाचा इतिहास समजण्याच्या कामी रामायणाचा जेवढा उपयोग होतो, तेवढा दुसऱ्या कोणत्याही ग्रंथाचा होत नाही. आजही कोट्यवधी भारतीयांच्या धार्मिक श्रद्धांशी रामायणाची गाठ बांधलेली आहे. आदिकवी वाल्मीकीने ज्या धर्म व सत्यरूपी महावृक्षांचे बीजारोपण केले, ते वृक्ष आजही सुफलित व सुपुष्पित आहेत.

रामायणाचे याहून वेगळे महत्त्व विशद करताना श्री. बाळशास्त्री हरदास यांनी लिहिले आहे, ते असे –

सर्व पुराणवाङ्मयात वाल्मीकीच्या ग्रंथाचे अधिनायक हे सर्व सद्‌गुणांचे परमोच्च प्रतीक म्हणून मानले गेले आहेत. जीवनाच्या विशाल सागरातील कोणत्याही एका आदर्श बिंदूचा निर्देश करावयाचा झाला, तर सरळ श्रीरामचंद्राकडे अंगुलिनिर्देश करण्याची महाभारतकारांची प्रथा आहे. श्रीमद्‌भागवताच्या एकादश स्कंधाच्या पाचव्या अध्यायात कलियुगाची उपास्य देवता म्हणून रामचंद्राचा निर्देश आहे. वाल्मीकीचा राम हाच केवळ उपासनेचा विषय झालेला नसून, त्याचे रामायणही उपासनेचा विषय आहे. रामायणाच्या सुंदरकांडाचा उपासना म्हणून पाठ करणारे व मंत्रशास्त्र म्हणून त्यातील श्लोकांचा उपयोग करणारे अनेक उपासक आहेत. भारतीय राष्ट्रात ज्यां ज्या वेळी समाज पतनाच्या सीमारेषेवर येऊन ठेपला, त्या त्यां प्रत्येक वेळी राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी उपासनेचे केंद्र आणि सामाजिक भावना व संघटना यांचा मध्यबिंदू म्हणून व जीवनध्येयाचे सुस्पष्ट दर्शन म्हणून भारतातील त्या त्या वेळच्या द्रष्टयांनीं रामायणाचा उपयोग करून घेतला आहे. भावार्थरामायणाचे कर्ते संत एकनाथ, उत्तर भारतात यावनी कहरात आपल्या रामचरितमानसाच्या द्वारे हिंदुधर्माला संजीवन देणारे अपर वाल्मीकी गोस्वामी तुलसीदास व श्रीसमर्थ रामदास यांच्या कृती व जीवनेतिहास ही याचीच निदर्शने होत. भारताच्या इतिहासाची उदात्तता रामायणाने टिकविली आहे व आजच्या तमोयुगात दीपस्तंभाप्रमाणे मानवतेचे मार्गदर्शन करण्याचे सामर्थ्य रामायणात आहे.

[रामकथा–कामिल बुल्के, १९६२; वाल्मीकिरामायण–पं. बाळशास्त्री हरदास, १९५५; रा. का. सं.; रा. का. स.; वाल्मीकिरामायण– परीक्षण– चिं. वि. वैद्य, भाषांतर – शि. गो. भावे, १९२०; रामायण–निरीक्षण– श्री. त्र्यं. गु. काळे, १९१४; महामुनी वाल्मीकिप्रणित रामायण– श्री. ना. रा. अभ्यंकर, १९५६]

रामायण महानाटक

एक काव्यरूप रामनाट्य. याचे दहा अंक असल्यामुळे याला महानाटक ही संज्ञा प्राप्त झाली. प्राणचंद चौहान याने इ. स. १६१० मध्ये याची रचना केली. या नाटकावर रामचरितमानस या ग्रंथाचा खूप प्रभाव आहे. त्यातले कितीतरी प्रसंग कवीने यात घेतले आहेत. हे हिंदीचे पहिले काव्यनाटक मानतात. [हिं. सा. को. २]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रामावत संप्रदाय द. भारतातील एक रामभक्तीचा संप्रदाय. वाल्मीकिरामायण व अध्यात्मरामायण हे दोन्ही ग्रंथ या संप्रदायाने प्रमाणभूत मानलेले होते. डॉ. फर्कुहर याच्या मते एका मूळ श्रीसंप्रदायाच्या दोन शाखा झाल्या. एकीने लक्ष्मीनारायणाची व दुसरीने सीतारामाची उपासना स्वीकारली. रामावत ही दुसरी शाखा होय. कालांतराने दुसरी शाखा निष्प्रभ झाली. पण पुढे रामानंदाने तिचे पुनरुज्जीवन केले. पाहा– रामानंद संप्रदाय.

रामावत साधू राजस्थानातील एक जात. हे लोक रामानुजपंथाचे अनुयायी असून, विष्णूची व रामाची उपासना करतात. हे आपल्या शरीरावर शंख, चक्र, गदा आणि पद्म यांच्या आकृत्या गंधाने रेखतात. यांचे अनेक गुरुद्वारे असून, त्यांपैकी धुलेरिया, झींतडा आणि खोड येथील गुरुद्वारे विशेष प्रसिद्ध आहेत. [रा. जा.]

रामेश्वर एक पवित्र क्षेत्र. हे बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आणि चार धामांतले दक्षिण धाम आहे. यात्रा म्हटली, की लोकांच्या तोंडून 'काशी-रामेश्वर' ही जोड नावे बाहेर पडतात. यावरून या क्षेत्राच्या माहात्म्याची कल्पना येईल. रामेश्वर म्हणजे रामाने स्थापलेले शिवलिंग होय. रामचंद्राने इथे शिवलिंग का स्थापले, त्याची कथा अशी –

रामाने लंकेवर स्वारी करून रावणाचा वध केला व तो गंधमादन पर्वतावर येऊन काही काळ विसावला. अगस्त्यादी ऋषींनी त्याचे सहर्ष स्वागत केले. पण रामप्रभूचे मुखमंडळ त्यांना खिन्न दिसले. रामाने लंकेवर विजय मिळवला खरा; पण त्या आनंदापेक्षा आपण रावणाला म्हणजेच एका ब्राह्मणाला मारले आणि ब्रह्महत्या या महापातकाचे धनी झालो, हे दुःखच रामाच्या अंतराला त्या वेळी जाळीत होते. ऋषींनी त्याला दुःखाचे कारण विचारल्यावर रामाने आपली मनोव्यथा त्यांना निवेदिली. ती ऐकून अगस्त्याने ब्रह्महत्यानिरसनार्थ सागरतीरावर लिंगस्थापना करण्याचा रामाला आदेश दिला. त्यासाठी ज्येष्ठ शुद्ध दशमीचा मुहूर्तही काढून दिला. रामाने मग दिव्य लिंग आणण्यासाठी मारुतीला कैलासावर पाठवले. मारुती कैलासावर गेला; पण त्याला भगवान शंकराचे दर्शन होईना. म्हणून त्याने तप आरंभले. कालांतराने शंकर प्रगट झाला आणि त्याने हनुमंताला आपले दिव्य लिंग दिले. पण विलंब झाल्यामुळे मारुतीला मुहूर्ताची वेळ साधता आली नाही. त्या वेळी सीतेने एक वालुकामय लिंग बनवून दिले. ऋषींच्या आदेशानुसार रामाने मग त्याचीच स्थापना केली. तेच हे रामेश्वरलिंग होय. स्थानिक लोक त्याला रामनाथलिंग असे म्हणतात.

मारुती परतल्यावर जेव्हा त्याला रामाने लिंग स्थापन केलेले दिसले, तेव्हा त्याला फार दुःख झाले. मग रामाने त्याला स्थापित लिंगाच्या जवळच त्याने आणलेल्या लिंगाची स्थापना करायला सांगितले. तसेच, त्याने स्थापलेल्या लिंगाचे दर्शन घेतल्यावाचून यात्रिकांना रामेश्वरदर्शनाचे फल मिळणार नाही, असेही त्याला आश्वासन दिले. मग हनुमंताने कैलासावरून आणलेल्या दिव्य लिंगाची स्थापना केली. या लिंगाला काशी-विश्वनाथ किंवा हनुमदीश्वर असे नाव आहे.

रामेश्वर हे स्थान भारताच्या दक्षिणेला असलेल्या रामेश्वर बेटावर आहे. हे बेट सुमारे अकरा मैल लांब व सात मैल रुंद आहे. तमिळनाडू राज्यातील रामनाड जिल्ह्यात या बेटाचा समावेश होतो. बेटावर जाण्यासाठी पांबनची खाडी ओलांडावी लागते.

रामेश्वरला पोचल्यावर यात्रेकरू प्रथम लक्ष्मणतीर्थात स्नान करतात. या तीर्थाच्या चोहोंबाजूंना पायऱ्या असून, त्याच्या मध्यभागी एक मंडप आहे.

रामेश्वराचे मंदिर बेटाच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. मंदिर द्राविड शिल्पपद्धतीने बांधलेले आहे. हे मंदिर प्रचंड असून विस्तार आणि भव्यता या बाबतीत त्याच्याशी बरोबरी करणारे दुसरे मंदिर भारतात नाही. मंदिराचे आवार उत्तुंग भिंतींनी बंदिस्त आहे. या आवाराची पूर्व-पश्चिम लांबी ८२५ फूट असून दक्षिणोत्तर रुंदी ६५७ फूट आहे. मंदिराच्या चारही बाजूंना चार गोपुरे आहेत. त्यांपैकी पूर्वद्वारावरील गोपुराला दहा मजले असून, पश्चिम द्वारावरील गोपुराला सात मजले आहेत. चारही गोपुरांवर असंख्य मूर्ती कोरलेल्या आहेत. आतील मंदिरात तीन विस्तीर्ण दालने असून, ती भव्य स्तंभांच्या रांगांनी विभागलेली आहेत. या दालनांची उंची इतकी आहे, की देवाच्या उत्सव-मूर्तींच्या मिरवणुकीतील हत्ती अंबारीसह चालला, तरी छताच्या हंड्या-झुंबरांना व दिव्यांना त्याचा धक्का लागत नाही. प्रत्येक दालनाची लांबी ४०० फूट असून, रुंदी १७ ते २१ फूट आहे. या दालनांच्या घडणीत वापरलेल्या अनेक शिळा चाळीस चाळीस फूट लांबीच्या आहेत. भिंतींना लागून मूर्तींच्या पंक्ती बसवलेल्या आहेत. रामेश्वरमंदिरात एकूण २२ तीर्थे आहेत. त्यांपैकी ६ तीर्थे सर्वांत बाहेरच्या तिसऱ्या दालनात आहेत. त्या...

मंदिराच्या तिसऱ्या दालनात रामेश्वरलिंग आहे. त्याच्या समोरच मृण्मय व श्वेतवर्ण असा भला मोठा नंदी आहे. या नंदीची उंची १३ फूट, लांबी ८ फूट व रुंदी ९ फूट आहे. नंदीच्या जवळच सुवर्णाच्या पत्र्याने मढवलेला गरुडस्तंभ आहे. पार्वतीचे मंदिर स्वतंत्र आहे. शिव व पार्वती या दोघांच्या उत्सव...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुवर्णाच्या आहेत आणि उत्सवप्रसंगी त्यांना पाठीवर मिरवणारा नंदीही सुवर्णाचाच आहे.

रामेश्वराच्या ज्योतिर्लिंगावर शेषाची फणा आहे. या देवालयातील दैनंदिन कार्यक्रम असा—

पहाटे साडेचार-पाचच्या सुमारास पुजारी शंख आणि जयघंटा यांचा नाद करतो. त्याच वेळी गायन-वादन सुरू होते.



रामेश्वर येथील शिवलिंग

त्यानंतर पुजारी, देवस्थानचे इतर अधिकारी व देवदासी महामंडपात येतात. रामेश्वराच्या पूजेच्या वेळी नैवेद्यासाठी जो भात वगैरे लागतो, त्यासाठी संबंधित अधिकारी आचाऱ्यांना शिधा काढून देतात. साडेपाचच्या सुमाराला पूजेची सर्व तयारी पूर्ण होते. नैवेद्याचा स्वयंपाकही तयार होतो. नंतर गर्भगृहाचा दरवाजा उघडतात. पुजारी गायक-वादकांसह पार्वतीच्या मंदिराकडे जातात व स्तोत्रे गाऊन शिवाला जागे करतात. मग शय्येवरील शिवाची सुवर्णमूर्ती पालखीत ठेवतात आणि वाद्यांच्या घोषात पालखी मिरवीत रामेश्वराच्या मंदिरात नेतात. त्या वेळी देवदासी पालखीपुढे नृत्य करते. सुवर्णमूर्ती अर्धमंडपात ठेवतात. मग पुजारी गर्भगृहात जाऊन लिंगावरील निर्माल्य बाजूला करतो आणि पूजेचा संकल्प करतो. एकजण मंदिरातील मोठा हंडा तिसऱ्या प्राकारात असलेल्या विहिरीच्या पाण्याने भरतो. या पाण्याने पुजारी लिंगाला स्नान घालतो. मग त्याला दोन वस्त्रे नेसवतो. मग तो लिंगाची पूजा करतो आणि हत्तीच्या पाठीवरून आणलेल्या अन्नाचा त्याला नैवेद्य दाखवतो. ही पूजा साधारण सहाच्या सुमारास संपते. या पूजेच्या वेळी गर्भगृहाच्या दारावर पडदा टाकलेला असतो.

दुसरी पूजा सकाळी साताच्या सुमारास सुरू होते. ही पूजा भाविकांना बघता येते. तिसरी पूजा सकाळी नवाला सुरू होते. या वेळी हत्तीच्या पाठीवरून पाण्याची घागर मिरवीत आणतात आणि त्या पाण्याने लिंगाला स्नान घालतात. नंतर पंचामृताने व शहाळ्याच्या पाण्यानेही स्नान घालतात. या वेळी देवाला मुगाच्या खिचडीचा नैवेद्य दाखवतात. त्यानंतर लिंगाला चांदीचे डोळे जडवतात.

अशाच पूजा दुपारी, संध्याकाळी आणि रात्री होतात. रात्रीची पूजा झाल्यावर शिवाची सुवर्णाची मूर्ती पालखीतून पार्वतीच्या मंदिरात नेतात. या वेळी पुत्रकामना असणाऱ्या स्त्रिया शिवाला साष्टांग नमस्कार घालतात. कारण या दर्शनाने पुत्रप्राप्ती होते, अशी भाविकांची श्रद्धा आहे.

या देवालयाच्या परिसरात सर्व तीर्थे वास करतात, असा समज आहे. प्रत्येक तीर्थाची पुष्करणी आहे. राम, सीता आणि लक्ष्मण ही कुंडे देवालयाच्या बाहेर आहेत. याच कुंडांवर यात्रेकरू स्नान, श्राद्धविधी वगैरे धार्मिक कृत्ये करतात.

इथे कोणालाही शिवलिंगाची पूजा करता येत नाही. जे काही देवाला वाहणे असेल, ते पुजाऱ्याजवळ द्यावे लागते. ब्राह्मणवर्गाला फक्त गाभाऱ्याच्या पहिल्या पायरीपर्यंत जाता येते. इतरांना ठरवलेल्या मर्यादेवरून दर्शन घ्यावे लागते. गाभारा आणि सभामंडप एकाच पातळीत आहेत. शिवलिंग गाभाऱ्यात उच्च स्थानी आहे. त्यामुळे दुरूनही त्याचे दर्शन होते.

रामेश्वराव्यतिरिक्त इथे पार्वती, षडानन, गणपती व काशीविश्वेश्वर यांची स्वतंत्र मंदिरे आहेत. उपदैवते तर असंख्य असून, त्यांत नंदिकेश्वर, रामपंचायतन, नवग्रह, विशालाक्षी, अन्नपूर्णा व सप्त मातृका यांचीही स्वतंत्र मंदिरे आहेत.

या मंदिराची उभारणी प्रामुख्याने रामनाडच्या सेतुपती राजघराण्याने केलेली आहे. सांप्रतचे मंदिर इ. स. १४१४ मध्ये उदयन सेतुपतीने लंकेचा परराजशेखर याच्या साहाय्याने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उभारले आणि पुढे तीन साडेतीनशे वर्षे सेतुपती घराण्यातील राजपुरुषांनीच त्याचा विस्तार केला. देवस्थानच्या पूजे–अर्चेसाठी त्यांनी बहात्तर गावे देवस्थानला लावून दिली. देवाची पहिली पूजा याच घराण्याची असते. इथले उपाध्ये महाराष्ट्रीय ब्राह्मण आहेत. त्यांच्या पूजेच्या पाळ्या ठरलेल्या आहेत.

इथे बाराही महिने यात्रिकांची गर्दी असते. भाविक यात्रेकरू इथल्या चोवीस पवित्र तीर्थांत क्रमाने स्नान करतात आणि रामेश्वराला काशीहून आणलेल्या गंगाजलाने अभिषेक करतात. तसेच, रामेश्वरापासून बारा मैल दूर असलेल्या सेतुबंधावरील सेतू (वाळू) आणून व तो सेतू रामेश्वरमंदिरातील सेतुमाधवाजवळ ठेवून त्याची पूजा करतात. हा सेतू प्रयाग येथील त्रिवेणीसंगमात विधिपूर्वक विर्सर्जित केल्यानंतरच या यात्रेची खरी सांगता होते, अशी श्रद्धा आहे. या श्रद्धेमुळेच हजारो वर्षे आसेतुहिमाचल भारतवर्षाचे ऐकात्म्य अनंत आघात होऊनही टिकून राहिले आहे.

इथल्या मंदिरात साप्ताहिक, मासिक व वार्षिक असे अनेक उत्सव होत असतात. प्रत्येक शुक्रवारी रात्री पार्वतीच्या पालखीची मिरवणूक निघते. पालखीवर चार दिशांना असलेले चार लाकडी गरुड पार्वतीवर फुले उधळतात व तिला चार माळा अर्पण करतात. महाशिवरात्रीला इथे फार मोठा उत्सव होतो. तो दहा दिवस चालतो. दहा दिवस रोज निरनिराळ्या वाहनांतून उत्सवमूर्तीची मिरणूक निघते. ज्येष्ठात रामलिंगप्रतिष्ठा होते. आषाढात भरणी नक्षत्रावर रामेश्वराचा दहा दिवस उत्सव होतो. श्रावण शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत पार्वतीच्या लग्नाचा सोहळा चालतो. तसेच वैशाखात वसंतोत्सव व आश्विनात नवरात्राचा उत्सव होतो. कार्तिक शुद्ध षष्ठीला कार्तिकस्वामीचा वाढदिवस होतो. दुसऱ्या दिवशी त्याचा ब्रह्मदेवाच्या कन्या वळ्ळी व देवसेना यांच्याशी विवाह होतो. मोठ्या उत्सवांसाठी लांबलांबचे यात्रेकरू इथे येतात. त्यातल्या त्यात आदी अमावासई या आषाढातील उत्सवाला इथे फार मोठी यात्रा भरते. [तमिळनाडु; ज्योतिर्लिंग; आसेतुहिमाचल; कल्याण –तीर्थांक; सेतुबंध रामेश्वर – श्री. रा. चिं. ढेरे, केसरी, ३१ मार्च १९६८]

रामेश्वरदास बाबा (इ. स. १७१८–१८२८) बिहार प्रदेशातील एक सिद्ध व भक्त. हा काश्यपगोत्री ब्राह्मण असून, शहाबाद जिल्ह्यातील कवलपट्टी नामक गावी याचा जन्म झाला. बालपणीच याचे वडील वारले. त्यामुळे याला आईबरोबर मामाच्या गावी जाऊन राहावे लागले. तिथेच त्याचा विवाहही झाला. त्याची प्रकृती धडधाकट होती. मामांच्या शेतावर जाऊन तो राखणदारीचे काम करीत असे. परंतु बालपणापासूनच त्याचा ओढा ईश्वरचिंतनाकडे होता.

एकदा काही निमित्त होऊन त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले आणि त्याने बारा वर्षे घराबाहेर राहून तीर्थयात्रा केल्या. या भ्रमंतीच्या काळातच पूर्णानंद नावाच्या एका योग्याकडून त्याने योगाची दीक्षा घेतली. मग त्याने काही काळ गुंडी नावाच्या गावी गुप्तपणे योगाभ्यास केला. घरच्या लोकांना ही माहिती कळल्यावर त्यांनी रामेश्वराला घरी चलण्याचा आग्रह केला. परंतु तो घरी गेला नाही. पुढे त्याची पत्नी त्याच्याकडे गेली व त्याच्या बरोबरच ईश्वरभजनाला लागली.

रामेश्वरदास चांगला कवी होता. त्याने सतसई नावाच्या एका ग्रंथाची रचना केली होती. परंतु तो ग्रंथ अजून कोणाला मिळाला नाही. त्याने खडी बोली व भोजपुरी या भाषांत अनेक स्फुट पदेही रचली असून, ती त्याचे वंशज रघुवीर नारायण ओझा यांच्या संग्रही आहेत. [हिं. सा. बि.; भो. क. का.]

रामेश्वरभट्ट (इ. स. च्या १६ व्या शतकाचा प्रारंभ) मीमांसा, व्याकरण, तर्क व वेदान्त या शास्त्रांतील एक पारंगत विद्वान. हा देशस्थ ऋग्वेदी होता. याचे गोत्र विश्वामित्र असल्याने या वंशाला गाधिवंश असे म्हणत. कोल्हापूरची महालक्ष्मी ही या वंशाची कुलदेवता होती. गोविंदभट्ट हे त्याच्या पित्याचे नाव होय. रामेश्वरभट्टाचा मुलगा नारायणभट्ट याने त्रिस्थलीसेतू नामक ग्रंथात आपल्या पित्याचा पुढील प्रमाणे गौरव केला आहे – ' विश्वामित्रगोत्ररूपी सागरात पूर्णचंद्र व सर्व कलांचा निधी असा रामेश्वरभट्ट होता. त्याच्या शिष्य-प्रशिष्यांनी सर्व भूमी भरून गेली होती. विद्यारूपी कमलांचा विकास करणारा तो केवळ भास्करच होता.'

रामेश्वरभट्ट प्रथम पैठणमध्ये राहात असे. तिथे भारतातील बहुतेक सर्व भागांतून अनेक विद्यार्थी त्याच्याकडे शिकायला येत. म्हणून गाधिवंशचरितात त्याच्या पैठणच्या विद्यापीठाला रामचंद्राच्या सैन्याची उपमा दिली आहे. याला सिद्धीही प्राप्त होती अशी समजूत आहे. अहमदनगरच्या दरबारातील जाफर मलिक नावाच्या उमरावाच्या मुलाला याने महारोगापासून मुक्त केले असे सांगतात. रामेश्वरभट्टाला पुत्र नव्हता. म्हणून तो महालक्ष्मीच्या आराधनेसाठी कोल्हापूरला गेला. तिथून तो विजयानगरचा सम्राट कृष्णदेवराय याच्या राजसभेत गेला असता त्याचा मोठा सत्कार करण्यात आला. त्यानंतर तो द्वारकेच्या यात्रेला निघाला असता वाटेत संगमनेरला त्याला मुलगा झाला आणि त्याने त्याचे नाव नारायण ठेवले. द्वारकेत काही काळ राहून त्याने महाभाष्य व सुरेश्वराचार्यांचे वार्तिक यांचे अध्

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पन केले आणि नंतर तो पैठणला परतला. सुमारे चार वर्षे पैठणात राहून तो काशीला राहायला गेला. वाटेतच त्याला दुसरा मुलगा झाला. काशीत गेल्यावर तिसरा मुलगा झाला. त्याचे नाव माधव होय. वृद्धापकाळी त्याला काशीमध्ये मृत्यू आला. त्याच्या पत्नीने त्याच्या बरोबर सहगमन केले. नारायण भट्टाचा पुत्र रामकृष्ण व त्याचा नातू गागाभट्ट होय. हा भट्टवंश आपल्या पांडित्याने काशीमध्ये चिरस्मरणीय झालेला आहे.

श्रीहर्षाच्या नैषधीय चरिताशी स्पर्धा करण्यासाठी रामेश्वर भट्टाने रामकुतूहल नावाचे एक काव्य रचले होते, असे सांगतात. पण हे काव्य उपलब्ध नाही. रामेश्वरभट्टाची शिष्यपरंपरा फार मोठी होती. तीत अनंतभट्ट चितळे, दामोदर सरस्वती, मधुसूदन सरस्वतींचे गुरू माधव सरस्वती, दरभंगा राज्याचा संस्थापक महेश ठक्कर, गुजरातमधील गोविंद द्विवेदी व कनोजचा गीत-गोविंदाचा टीकाकार शंकरमिश्र शर्मा यांचा समावेश होतो. [शि. नि.; पु. छ. शि.; का. सा. सा.; म. च. को.]

रामोत्तरतापनीय उपनिषद अथर्ववेदाचे एक उपनिषद. या उपनिषदानुसार रां रामाय नमः, रामचन्द्राय नमः व रामभद्राय नमः अशी तारक मंत्राची तीन रूपे क्रमाने ओंकारस्वरूप, तत्स्वरूप व ब्रह्मस्वरूप आहेत. हीच सत्स्वरूप, चित्स्वरूप व आनंदस्वरूप आहेत. रा आणि मं यांमध्ये काही भेद नसून, ती दोन्ही तारक ब्रह्म आहेत.

एखाद्या व्यक्तीने आपल्या देवतेची निरंतर उपासना व चिंतन केले असता ती व्यक्ती स्वतः पवित्र बनते आणि ती त्या पावित्र्याचा प्रसारही करते, असे या उपनिषदांत सांगितले आहे. शिव हा रामाचा निरंतर उपासक आहे, असेही यात म्हटले आहे.

या उपनिषदात पांचरात्र मतातील संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध व वासुदेव यांच्या सिद्धान्तांचा मांडूक्य उपनिषदातील चतुष्पाद ब्रह्माशी संबंध जोडला आहे. तसेच राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांना चतुष्पाद ब्रह्माच्या वासुदेव, संकर्षण, अनिरुद्ध व प्रद्युम्न या रूपांशी संबद्ध केले आहे. कृष्णोपासनेशी संबद्ध असलेले हे चतुर्व्यूह इथे रामोपासनेशी जोडून देऊन रामोपासना व कृष्णोपासना यांत अभेद प्रस्थापित केला आहे.

या उपनिषदात लक्ष्मणाला रामब्रह्माचा प्रथम पाद मानलेले आहे. ओंकारातील अ पासून लक्ष्मणाची उत्पत्ती झाली असून, तो जाग्रत अवस्थेचे स्वरूप आहे; शत्रुघ्न हा ओंकारातील उ या अक्षरापासून उत्पन्न झालेला असून, तो तैजस स्वभावाचा आहे. तो रामब्रह्माचा द्वितीय पाद आहे. भरत हा ओंकारातील म या अक्षरापासून उत्पन्न झाला असून, तो प्रज्ञास्वरूप आहे. तो रामब्रह्माचा तृतीय पाद आहे.

ओंकाराच्या अर्धमात्रेपासून रामाची उत्पत्ती झाली असून, तो ब्रह्मानंदस्वरूप आहे. या निर्गुणावस्थेतूनच राम सगुण होतो. ब्रह्माच्या या अवस्थेला ब्रह्माचा चतुर्थ पाद मानलेले आहे. या विराट रामाच्या सगुण व निर्गुण भक्तीत, चतुर्वर्गाच्या सिद्धीचे बीज आहे, असे या उपनिषदात सांगितले आहे. [रा भ. शा.]

रामोशी एक जात. या लोकांची वस्ती प्राधान्याने महाराष्ट्रात आढळते. ही कानडी बेरडांची एक शाखा असावी, असे म्हणतात. हे लोक आपल्याला रामवंशी म्हणवितात. त्यावरूनच रामोशी हे त्यांचे जातिनाम बनले असावे. रामोशी स्वतःला क्षत्रिय समजतात. यांना रामोशी ही संज्ञा का मिळाली यासंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी –

राम वनवासात असताना भरत त्याच्या भेटीसाठी गेला. रामाची व त्याची भेट झाल्यावर भरताने तिथल्या वनवासी लोकांना आपल्याबरोबर अयोध्येत नेले. राम परत आल्यावर त्याने या लोकांची व रामाची भेट घडवली. रामाने त्यांना गावांचे रखवालदार नेमले व रामवंशी म्हणवून घेण्याची परवानगी दिली.

यांच्यांत पुरंदर रामोशी व होळगा रामोशी असे दोन पोटभेद आहेत. या दोन्ही गटांत रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. त्याचप्रमाणे एकाच आडनावांच्या कुळांत व समान कुलदैवते असणाऱ्या कुळांतही विवाह होत नाहीत.

रामोशी पुरुष उंचेपुरे, बळकट, बांधेसूद व राकट असतात. त्यांचा वर्ण काळा असतो. ते कानात कर्णफुले घालतात. त्यांच्या गळ्यात कंठी व सुलेमानी गंडा असतो. त्यामुळे भूतपिशाचांपासून आपले संरक्षण होते, असे ते समजतात. त्यांच्या स्त्रिया दिसायला चांगल्या असतात. गोमांस सोडून इतर सर्व प्रकारचे मांस ते खातात.

पूर्वी हे लोक तेलुगू भाषा बोलत असत. पण सध्या ते मराठी बोलतात. काही लोकांच्या बोलण्यात कानडी शब्द येतात. त्यांची एक सांकेतिक भाषा आहे. पूर्वी लूटमारी करीत असताना किंवा गुप्त व्यवहार करताना ते ही भाषा बोलत. त्या भाषेतील काही शब्द व काही वाक्ये अशी–अकुल = विड्याचे पान, अदत = स्त्री अथवा पत्नी, अरिल = सोनार, कडमल = भाकरी, यडूल = बैल, पटण = पकडणे, नोलग्या = फौजदार. कुडमल इडमड अन ओकना = त्याला भाकरी द्या आणि जाऊ द्या. गोंन्ये तरी यरवाड मात इसमाडू नको = ठार मारले तरी सांगू नको.

विवाहप्रथा – यांच्यांत आते-मामे बहिणीशी लग्नसंबंध होतो. मुलाचा बाप मुलीकडे मागणी घालायला जातो. देवक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसवण्यापूर्वी लग्नमंडपात बरेच बोकड कापतात. लग्नाला जाताना नवरा मुलगा हातात खंजीर घेऊन व घोड्यावर बसून वाजत-गाजत जातो. तो वधूच्या गावी गेला की महार त्याला ओवाळतो. मग वरपक्षाचे लोक मारुतीच्या मंदिराकडे जातात. वधूकडील मंडळी वराच्या डोक्यावर एक पापड मोडतात. नंतर नवरा मुलगा लग्नमंडपात येतो. विवाहाच्या प्रसंगी तांदुळाचे दोन ढीग करतात. एका ढिगावर पश्चिमेकडे तोंड करून नवऱ्या मुलाला उभे करतात. त्या वेळी त्याच्या एका हातात खंजीर व दुसऱ्या हातात नारळ देतात. त्याच्या समोर दुसऱ्या ढिगावर नवरीला उभे करतात. याला कन्यादानविधी असे म्हणतात. हाच विधी महत्त्वाचा असतो. नंतर वधूला घेऊन वर दुसऱ्या दिवशी आपल्या घरी येतो. तिथे वरपक्षाने चावडीवर गाव-भोजन द्यायचे असते. यांचे पौरोहित्य देशस्थ ब्राह्मण किंवा जंगम करतात.

यांचे विधवाविवाह जंगम पुरोहित गोरज मुहूर्तावर लावतो. अशा विवाहाला फक्त पुरुषच उपस्थित असतात. लग्नाच्या संध्याकाळी पति-पत्नी एकमेकांपासून दूर जातात. ते जातभाई-नाही एक दिवस भेटत नाहीत. स्त्रीचे पहिले तीन नवरे मेल्या-नंतर तिला चौथा विवाह करायचा असल्यास, ती आपल्या डाव्या हाताखाली एक कोंबडा ठेवते. पुरोहित प्रथम कोंबड्याला उद्देशून व नंतर नवरदेवासाठी मंत्र म्हणतो. असे केल्याने सर्व अभद्र त्या कोंबड्यावर जाते, अशी त्यांची श्रद्धा आहे.

प्रसूतिप्रथा – या लोकांमध्ये मुलगा जन्माला आला तर थाळी वाजवून आनंद व्यक्त करतात. मुलगी झाली तर मात्र त्यांना दुःख होते. ज्या घरात मुलगा जन्मला असेल, त्या घरापुढे कुणबी, धनगर, गवळी, कोळी, महार, मांग, हे लोक सडा घाल-तात. पाचव्या दिवशी पाचवीची पूजा करून घरातील सर्व स्त्री-पुरुष रात्रभर जागरण करतात. बाराव्या दिवशी रस्त्याच्या कडेला पाच-सात खडे मांडून त्यांची पूजा करतात. हे जनना-शौच पाळीत नाहीत. मुलाचे नाव ब्राह्मण अथवा जंगम ठेवतो. मूल दोन-तीन महिन्यांचे झाल्यावर त्याला सटवाई, एकाई किंवा इतर कुठल्यातरी देवीच्या दर्शनाला घेऊन जातात. मुलांचे जावळ काढतात. जावळाचे केस करवंटीत घालून देवीपुढे ठेवतात आणि बोकडाचा बळी देतात.

लग्नानंतर रामोशी आपल्या आध्यात्मिक उन्नतीसाठी एखाद्या गोसाव्याला गुरू करतो. त्या वेळी तो आपले आवडते फळ अर्पण करतो व ते फळ मग जन्मभर खात नाही. प्रतिवर्षी गुरू शिष्याला भेटून त्याच्या घरी काही दिवस राहतो.

देवधर्म – राम, खंडोबा, महादेव, कृष्ण, इ. देवांना हे लोक भजतात. त्याचप्रमाणे अनेक संत व पीर यांनाही मानतात. बोलाई, इ. कनिष्ठ देवतांचीही ते पूजा करतात. खंडोबाची शपथ घेताना हातांत भंडारा घेतात आणि ती शपथ अखेरपर्यंत पाळतात. नंदी, माकड, गाय यांचीही ते पूजा करतात. नाग-पंचमीला नाग व दसऱ्याला घोडा पूजतात.

शिमग्याचा सण हे विशेष उत्साहाने साजरा करतात. पुरुष स्त्रियांचा वेष घेऊन रात्रभर अश्लील गाणी गातात.

व्यवसाय – दरोडे घालणे, चोऱ्या करणे, हे यांचे एका काळी प्रमुख व्यवसाय होते. त्यासाठी ते तोडीच्या बंदुका, गोफणी, कुऱ्हाडी, काठ्या, इ. हत्यारे वापरीत. मराठेशाहीत यांच्याकडे पाळेगारीचे काम असे. पण इंग्रजी राजवटीत त्यांना कामावरून कमी करण्यात आले व त्यांची इनामेही जप्त करण्यात आली. त्यामुळे हे लोक दरवडे घालू लागले. उमाजी नाइक हा रामोशी दरोडेखोर असूनही सचोटी व गरिबांचा कळवळा या त्याच्या गुणांमुळे प्रसिद्ध होता. वासुदेव बळवंतांना या लोकांत धाडस, निष्ठा व इमान हे गुण आढळले म्हणून त्यांनी रामोशांची एक संघटना उभारली होती. ज्याच्या घरचे मीठ हे खात, त्याच्याशी नमकहरामी करीत नसत. बारा बलुत्यांमध्येही रामोशांची गणना होते. काही रामोशी जागल्याचेही काम करतात. अलीकडे हे शेती, नोकरी, इ. व्यवसाय करू लागले आहेत.

रामोश्यांचा सामाजिक दर्जा कुणब्यांहून खाली, पण महार-मांगाहून वरचा मानतात. बुरुड, घडशी, मुसलमान, परीट, सोनार, सुतार व तेली यांना रामोश्यांच्या हातचे अन्न चालत नाही.

जातपंचायत – यांच्यांत जातपंचायत असते. पंचायतप्रमुखाला सरनायक असे म्हणतात. सरनायक जातींतील तंटे-बखेड्यांचा निवाडा करतो.

मर्तिकप्रथा – हे मृतांना पुरतात. माणूस मरणार असे दिसले की त्याचा वारस त्याचे डोके आपल्या मांडीवर घेऊन ... दानधर्म करतो. पितृपक्षात हे महालय करतात. त्या दिवशी कावळ्यांसाठी घराच्या छपरावर अन्न ठेवतात. [मुं. इ. जा. गु. जा.; अ. प्र.; पूना गॅझे.; म. ज्ञा. को.]

राय अमृतराम

(इ. स. चे १८ वे शतक) एक राजस्थानी भक्तकवी. हा जातीचा पल्लेवाल ब्राह्मण होता. याचे घराणे मूळचे उदयपूर संस्थानातील जैवण गावचे असून, त्यातील काही लोक जयपूरच्या माधोसिंहाबरोबर जयपूरला गेले. अमृतराम हा जयपूरचा राजा सवाई प्रतापसिंह याच्या पदरी होता. त्याच्या काव्यावर प्रसन्न होऊन प्रतापसिंहाने त्याला राय ही पदवी आणि मोठी जहागीर दिली. प्रतापसिंहानंतर त्याचा मुलगा सवाई जगतसिंह गादीवर आला. त्या वेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अमृतरामाने काही काळ त्याचा प्रधान म्हणून काम केले. पुढे जगतसिंहाचे व त्याचे बिनसले आणि तो जयपूर सोडून गेला.

अमृतराम कृष्णभक्त होता. त्याने जयपूरला असताना आपल्या घरानजिक अटलबिहारीचे सुंदर व वैभवशाली मंदिर बांधले व त्यात राधा-कृष्णांची मूर्ती स्थापली.

अमृतरामाच्या लहानमोठ्या, पूर्णापूर्ण मिळून ११ काव्य-रचना उपलब्ध आहेत. त्यांची नावे अशी — अमृतप्रकाश, चौपरि-हुलास, विरहतरंग, प्रीतिबेली, सुखकरण लता, नेहसमर, बंसी-बहार, रैनरंग, प्रेमबहार, कवित्तसंग्रह आणि रासरेखता.

अटलबिहारीच्या उत्सवाच्या निमित्ताने रचलेली पदे आणि राम, शिव, देवी यांचे वर्णन करणारी पदे, असे त्याच्या पदांचे दोन प्रकार आहेत. अमृतरामाला काव्यशास्त्राचा परिचय नसावा असे वाटते. कारण कवित्त, दोहा, सवैया, बरवै, इ. छंदांतून त्याची रचना असली तरी, त्यांत प्रौढता दिसून येत नाही. त्याच्या भाषेवर पंजाबी, उर्दू, ब्रज आणि मेवाडी या भाषांचा प्रभाव आहे. [मरु-भारती, जुलै १९५७]

राय दाशरथी (इ. स. १८०४ – १८५७) एक लोककवी. याचा जन्म बंगाल प्रदेशातील बरद्वान जिल्ह्याच्या बंदमूर गावी झाला. देवीप्रसाद हे याच्या पित्याचे नाव होय. देवीप्रसाद गरीब असल्यामुळे दाशरथीचे शिक्षण फारसे झाले नाही. त्याने पुढे सकाइ येथील निळीच्या मळयात नोकरी धरली. तिथे अक्षयपतिनी नावाच्या एका हीन जातीच्या मुलीवर त्याचे प्रेम बसले. तिचा एक मेळा होता. या मेळ्या-साठी दाशरथी पदे रचू लागला. ही गोष्ट दाशरथीच्या घरच्या लोकांना आवडली नाही. पुढे त्याने त्या मेळ्याचा संबंध तोडला आणि स्वतंत्रपणे तो काव्यरचना करू लागला. त्याने पंचली नावाचा एक काव्यप्रकारही नव्याने सुरू केला. त्या प्रकारात त्याने कृष्णलीलेवर पदे रचली. त्याची ही पदे फार लोकप्रिय झाली. त्याची भाषा संस्कृतप्रचुर व मधुर होती. त्याच्या रचनेत अश्लीलता मात्र बरीच आढळते. [हिं. बें. ब्रि. लि.]

राय, प्रफुल्लचंद्र (इ. स. १८६१–१९४४) आधुनिक काळा-तले एक थोर रसायनशास्त्रज्ञ. यांचा जन्म बंगालमधील खुलना जिल्ह्यात, ररूलीकतिपरा या गावी झाला. यांचे वडील हरीशचंद्र राय हे विद्याप्रेमी, सुधारक वृत्तीचे व बुद्धिवादी होते. हिंदू समाजाच्या उन्नतीसाठी इंग्रजी शिक्षणाची नितांत आवश्यकता आहे, हे जाणून त्यांनी आपल्या गावी इंग्रजी शाळा सुरू केली व आपले घर त्या शाळेसाठी देऊन टाकले. प्रफुल्लचंद्राचे प्राथमिक शिक्षण त्याच शाळेत झाले. तो नऊ वर्षांचा असताना, हरीशचंद्र त्याला घेऊन कलकत्त्याला गेले. तिथल्या शाळेत शिक्षण घेत असताना प्रफुल्लचंद्राने विपुल वाचन केले. सुरेंद्रनाथ बानर्जी व आनंदमोहन बसू यांची व्याख्याने ऐकून त्याच्या मनात देशप्रेमाची ज्योत निर्माण झाली. केशवचंद्र सेन यांची धर्मविषयक भाषणे ऐकून तो फार प्रभा-वित झाला आणि त्यांच्या ब्राह्म समाजाचा सभासदही झाला. इ. स. १८७९ मध्ये प्रफुल्लचंद्र प्रवेशपरीक्षेत चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झाला आणि त्याने ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी स्थाप-लेल्या संस्थेच्या कृष्णनगर महाविद्यालयात नाव घातले.

वास्तविक प्रफुल्लचंद्र राय यांना इतिहास व साहित्य या विषयांची अधिक आवड होती. पण गॅलिलिओ, न्यूटन, फ्रॅंक्लिन, इ. शास्त्रज्ञांची चरित्रे वाचून त्यांना विज्ञानाविषयी आकर्षण वाटू लागले. विज्ञानाच्या उपासनेवाचून आपल्या देशाचा उत्कर्ष होणार नाही, हे जाणून त्यांनी विज्ञानाचा अभ्यास करायचे ठरवले. कृष्णनगर महाविद्यालयात विज्ञानाची शाखा नव्हती. म्हणून ते भौतिक शास्त्रांवरील व्याख्याने ऐकायला प्रेसिडेन्सी कॉलेजात जाऊ लागले. तिथेही प्रयोगासाठी आवश्यक अशा उपकरणांची उणीवच होती. म्हणून त्या अभ्यासासाठी इच्छा विलायतेला जावे अशी त्यांच्या मनात उद्भवली.

त्या वेळी गिल्ड ख्रिस्त शिष्यवृत्तीसाठी परीक्षा घेतली जाई. सर्व भारतातले विद्यार्थी त्या परीक्षेला बसत. त्या परीक्षेत पहिला येणाऱ्या विद्यार्थ्याला ती शिष्यवृत्ती मिळत असे आणि विलायतेत त्याच्या पुढील शिक्षणाची व्यवस्था होत असे. इ. स. १८८२ मध्ये प्रफुल्लचंद्र त्या परीक्षेला बसले व पहिले आले. त्यामुळे त्यांना इंग्लंडमध्ये जाऊन शास्त्राभ्यास करण्याची संधी मिळाली. इ. स. १८८२ मध्ये इंग्लंडमध्ये जाऊन त्यांनी एडिंबरो विद्यापीठात नाव घातले. तिथे त्यांनी पदार्थविज्ञान, रसायन-शास्त्र, प्राणिशास्त्र व जीवशास्त्र या विषयांचा अभ्यास केला. मात्र त्यांनी रसायनशास्त्राकडे विशेष लक्ष दिले.

एडिंबरो विद्यापीठाच्या रेक्टरने बंडापूर्वीचा व नंतरचा भारत या विषयावर एक निबंधस्पर्धा आयोजित केली होती. प्रफुल्लचंद्रांनी त्या विषयाचा कसून अभ्यास करून निबंध लिहिला व तो स्पर्धेसाठी पाठवला. त्या निबंधात त्यांनी ब्रिटिश सरकारवर कडक टीका केली होती. त्यामुळे परीक्षकांनी निबंध उत्कृष्ट ठरवला तरी प्रफुल्लचंद्रांना त्याचे पारितोषिक मिळाले नाही. वृत्तपत्रांनी त्या निबंधाची प्रशंसा केली व लोकांनाही तो खूप आवडला. भारत हा अडाणी व रानटी लोकांचा देश आहे, अशी समजूत इंग्लंडमध्ये प्रचलित होती. ती या निबंधामुळे पार बदलून गेली.

भारताच्या औद्योगिक विकासासाठी रसायनशास्त्राचा अधिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उपयोग आहे, हे जाणून प्रफुल्लचंद्रांनी त्या शास्त्राचा अभ्यास कर्तव्यबुद्धीने केला. इ. स. १८८५ साली त्यांना पदवी मिळाली. आणखी दोन वर्षे तिथेच अधिक संशोधन करून त्यांनी डी. एस-सी. ही श्रेष्ठ पदवीही मिळवली. सर्व विद्यार्थ्यांमध्ये त्यांचे संशोधन सरस ठरल्यामुळे त्यांना मानाची पदके व शिष्यवृत्तीही मिळाली. त्यापूर्वीच ते विद्यापीठाच्या रसायनमंडळाचे उपाध्यक्ष झाले होते. डॉक्टरेट मिळाल्यानंतर आणखी एक वर्ष तिथे संशोधन करून मग ते मायभूमीस परत आले.

इंग्लंडमधून परत येण्यापूर्वी प्रफुल्लचंद्र राय यांनी इंडियन एज्युकेशनल सर्व्हिसमध्ये जागा मिळवण्याचा प्रयत्न केला. पण त्या कामी त्यांच्या प्राध्यापकांची प्रशस्तिपत्रेही निष्फळ ठरली. कारण काळ्या हिंदी माणसाला अखिल भारतीय कारभारात प्रवेश देण्यास ब्रिटिश सरकार तयार नव्हते. परत आल्यानंतर त्यांना प्रांतीय शिक्षणखात्यातही नोकरी मिळायला एक वर्षभर थांबावे लागले. शेवटी इ. स. १८८९ मध्ये त्यांना प्रेसिडेन्सी कॉलेजात असिस्टंट प्रोफेसर म्हणून रु. २५०/– मासिक वेतनाची जागा मिळाली. वास्तविक त्यांची योग्यता मोठी होती. त्यांच्यापेक्षा कमी योग्यतेची माणसे त्याच कॉलेजात मोठ्या पगारावर नेमलेली होती. त्या अन्यायाविरुद्ध तक्रार करण्यासाठी प्रफुल्लचंद्र राय त्या वेळच्या शिक्षणसंचालकाला भेटायला गेले. तो होता इंग्रज. तो उपहासाने त्यांना म्हणाला, की 'तू स्वतःला एवढा मोठा केमिस्ट समजतोस तर काही स्वतंत्र उद्योग का नाही सुरू करीत ?' ते शब्द प्रफुल्लचंद्रांना बरेच लागले. पण त्या वेळी परिस्थिती कठीण असल्यामुळे त्यांनी ते सहन केले आणि ते प्रेसिडेन्सी कॉलेजातच काम करीत राहिले. तिथे त्यांनी शास्त्रीय संशोधन सुरू केले. त्या वेळी प्रेसिडेन्सी कॉलेजात किंवा भारतात अन्यत्र कुठेही शास्त्रीय संशोधनाची व्यवस्था नव्हती. तरीदेखील प्रफुल्लचंद्रांनी स्वतःच कांही साधनसामग्री जमवून प्रयोग सुरू केले आणि आपल्या काही विद्यार्थ्यांनाही संशोधनासाठी प्रोत्साहन दिले. आपल्या घराचीही त्यांनी प्रयोगशाळा बनवली. त्यांच्या या प्रयत्नाने तरुण वर्गात संशोधनाविषयी आवड निर्माण झाली.

इ. स. १८९२ साली प्रफुल्लचंद्रांनी आपल्या राहत्या घरातच विलायती औषधे बनवण्यासाठी बंगाल केमिकल अँड फार्मास्युटिकल वर्क्स नावाचा कारखाना सुरू केला. अशा प्रकारचा भारतातला तो पहिलाच कारखाना असून, पुढे त्याची खूपच प्रगती झाली. सांप्रत त्यातून कोट्यवधी रुपयांची औषधे निर्माण केली जातात.

हवेतल्या नायट्रोजन वायूला बद्ध करून नायट्रोजनयुक्त पदार्थ तयार करण्याचे प्रयोग जगातले अनेक शास्त्रज्ञ करीत होते. प्रफुल्लचंद्रांनी त्यासंबंधी प्रयोग केले, तेव्हा त्यांना मर्क्युरस नायट्राइट तयार करण्यात यश आले. हा शोध त्यांनी इ. स. १८९६ मध्ये, म्हणजे इतर शास्त्रज्ञांच्या आधी लावल्यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती लाभली. परदेशातील शास्त्रज्ञांनी आणि पत्रकारांनी त्यांची त्याबद्दल पुष्कळ प्रशंसा केली. त्यानंतर प्रफुल्लचंद्रांनी अशी असंख्य संयुक्ते बनवली आणि त्या शास्त्रातल्या अनेक जटिल समस्या सोडवल्या. इ. स. १९०४ मध्ये बंगाल सरकारने त्यांना युरोपातील निरनिराळ्या रासायनिक प्रयोगशाळांचे निरीक्षण करण्यासाठी सरकारी खर्चाने पाठवले. त्या वेळी परदेशातील शास्त्रज्ञांनी आणि वैज्ञानिक संस्थांनी त्यांचा अभूतपूर्व सन्मान केला.

प्रफुल्लचंद्रांनी दहा-बारा वर्षे प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून 'हिंदू रसायनशास्त्राचा इतिहास' या नावाचा एक इंग्रजी



आचार्य प्रफुल्लचंद्र राय

ग्रंथ लिहिला. त्या ग्रंथात प्राचीन भारतातील असंख्य रसविद्यांची व त्यांच्या प्रयोगांची सविस्तर माहिती मिळते. ती वाचून देशातील व परदेशांतील लोकही स्तिमित झाले. युरोपमधील अनेक भाषांमध्ये त्या ग्रंथाचे अनुवाद प्रसिद्ध झाले आहेत. डरहॅम विद्यापीठाने प्रफुल्लचंद्रांना त्या ग्रंथासाठी डी. एससी. ही पदवी सन्मानपूर्वक अर्पण केली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रफुल्लचंद्र राय हे एक थोर देशभक्त व समाजसेवक होते. आपला अज्ञानग्रस्त व रूढिबद्ध समाज दास्यमुक्त होण्यासाठी त्याला शास्त्रीय ज्ञान मिळाले पाहिजे, अशी त्यांची खात्री झाली, तेव्हा ते बंगालीत विज्ञानविषयक लेख लिहू लागले. आगरकरांच्या प्रमाणेच जातिभेद, अस्पृश्यता, दुष्ट रूढी यांवर त्यांनी हल्ले चढवले. ते संन्यस्त वृत्तीने जीवन जगले. व्यक्तिगत संसार न मांडता त्यांनी आपले सर्व आयुष्य संशोधनकार्याला वाहिले. अनेक गरीब विद्यार्थ्यांना त्यांनी मदत केली. जीवनाला अत्यावश्यक तेवढे अल्प द्रव्य ठेवून उरलेले सर्व त्यांनी संशोधनकार्यासाठी खर्च केले. विज्ञानाच्या क्षेत्रात शेकडो विद्यार्थ्यांना हाताशी घेऊन त्यांनी संशोधकांची परंपरा निर्माण केली, हे त्यांचे महान कार्य होय.

प्रफुल्लचंद्रांचे व त्यांच्या विद्यार्थ्यांचे संबंध प्राचीन गुरुकुलातील गुरुशिष्यांसारखे असत. त्यांच्यांमध्ये परस्पर आत्मीयतेचे धागे असल्यामुळे ते आचार्य म्हणून ओळखले जाऊ लागले.

हिंदुस्थान सरकारने इ. स. १९११ मध्ये त्यांना सी. आय. ई. ही पदवी व पहिल्या महायुद्धानंतर सर ही पदवी बहाल केली. निवृत्तीनंतर त्यांना सरकारी पेन्शनही मिळू लागले. तथापि निवृत्तिवेतन भोगीत असताही सरकारवर कडक टीका करण्यास ते कधी कचरले नाहीत.

इ. स. १९२० सालच्या विज्ञानपरिषदेचे ते अध्यक्ष होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात ते म्हणाले. 'आपली बुद्धी ग्रंथप्रामाण्याने कुंठित झाली आहे. विज्ञानाची भक्ती जर आपल्यांत उत्पन्न झाली तर आपण खऱ्या अर्थाने सत्यसंशोधन करू शकू व आपली बुद्धी मुक्त होऊ शकेल.' त्यांनी बंगाली भाषेत अनेक शास्त्रीय पुस्तके लिहिली आहेत. त्यांतील जंतुविज्ञानासंबंधीचे पुस्तक विशेष उल्लेखनीय आहे. बंगाली भाषेतील श्रेष्ठ लेखकांत प्रफुल्लचंद्रांची गणना केली जाते.

इ. स. १९२२ साली बंगालला महापूर व दुष्काळ या दोन्ही आपत्तींनी घेरले असता प्रफुल्लचंद्र राय संकटग्रस्तांच्या मदतीला धावून गेले. त्यांच्या बरोबर शेकडो तरुण विद्यार्थीही त्या कामी सरसावून पुढे आले. प्रफुल्लचंद्रांची त्या वेळची संघटनशक्ती पाहून मोठमोठे सरकारी अधिकारी चकित झाले.

त्याच प्रसंगी प्रफुल्लचंद्रांना म. गांधींचा चरखा व खादी यांचे महत्त्व समजले व ते चरख्याचा प्रचार करू लागले. चरख्यामुळे ग्रामीण जीवनाची सर्वांगीण उन्नती होईल, असा त्यांना विश्वास वाटत होता. देशाचे दारिद्र्य दूर करण्याचे सामर्थ्य चरख्यात आहे, असे वाटून ते चरख्याचे परमभक्त बनले.

इ. स. १९२० मध्ये अनेक लोकांनी प्रफुल्लचंद्रांना विधिमंडळाच्या निवडणुकीसाठी उभे राहण्याचा आग्रह केला. पण त्यांना राजकारणी पुढारी व्हायचे नव्हते. त्यांनी जनसेवेच्या अनेक क्षेत्रांत कामे केली; पण ते मरेपर्यंत रसायनशास्त्राचे निःस्वार्थ उपासकच राहिले. इ. स. १९१३ साली निवृत्त झाल्यानंतरही ते १९२६ पर्यंत कलकत्ता विद्यापीठाच्या रसायनप्रयोगशाळेचे प्रमुख होते. त्या काळात त्यांना जें द्रव्य मिळाले ते सर्व त्यांनी नवी उपकरणे घेण्यासाठी प्रयोगशाळेला देऊन टाकले.

इ. स. १९२४ मध्ये त्यांनी इंडियन केमिकल सोसायटीची स्थापना केली. देशातील सर्व संशोधकांमध्ये सहकार्याची वृत्ती निर्माण व्हावी हा तिचा उद्देश होता. त्या संस्थेच्या भवनासाठी त्यांनी स्वतःचे रु. १०,३५०/– दान दिले.

पुढे अखेरपर्यंत त्यांनी संशोधनाचे कार्य अविरत चालवले. आधुनिक भारतीय रसायनशास्त्राचे प्रवर्तक व आचार्य अशा प्रफुल्लचंद्रांची जीवनज्योत १९४४ च्या जूनमध्ये मालवली. [भा. वै.; हिं. वि. को.]

रायबंशी

बंगाल प्रदेशातील एक युद्धप्रधान लोकनृत्य. या नृत्याचे मूळ तिथल्या मध्ययुगीन वातावरणात आहे, असे म्हणतात. बंगालमध्ये रायबंशी शिपायांच्या पलटणी होत्या. त्या लोकांनी हे युद्ध नृत्य सुरू केले.

रायबंशी नाचात लुटुपुटीची लढाई असते. नाचाला ढोलाची साथ असते. नर्तकांच्या पायात चाळ असतात. नर्तक फक्त धोतर नेसतात आणि कधी कधी डोक्याला लाल फडके बांधतात. या नृत्यात गाणी नसून केवळ युद्धाचे हावभाव असतात. मात्र नर्तकांच्या हातात आयुधे नसतात. हावभावाच्या बदलांवर ढोलाची चालही बदलते. नर्तक तोंडाने निरनिराळ्या प्रकारचे आवाज काढतात व हातांनी टाळ्या वाजवतात. नृत्य मंडलाकर असते. शेवटी शरीरसौष्ठवाचे प्रदर्शन करणारे काही प्रयोग असतात. [भा. लो. नृ.; ए. हो. रा.]

राय, राजा राममोहन

(इ. स. १७७२–१८३३) आधुनिक भारतातील एक अग्रगण्य धर्म-सुधारक, समाजसुधारक, थोर देशभक्त व आदी ब्राह्मोसमाजाचे संस्थापक. यांचा जन्म बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील राधानगर नामक गावी झाला. यांचे घराणे मूळ भिक्षुक वृत्तीचे होते; परंतु यांच्या एका पूर्वजाने बंगालच्या नबाबाच्या पदरी नोकरी पत्करली. कालान्तराने त्याच्या कामावर खूष होऊन नबाबाने त्याला 'राय' ही बहुमानदर्शक पदवी दिली व तेव्हापासून या घराण्याचे मूळ बंद्योपाध्याय किंवा बानर्जी हे उपनाव मागे पडून राय या नावानेच ते ओळखले जाऊ लागले.

राममोहन राय यांच्या वडिलांचे नाव रमाकान्त व आईचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तारिणीदेवी असे होते. असे सांगतात, की रमाकान्त राय हे वैष्णव होते आणि तारिणीदेवी यांच्या माहेरी शक्तिदेवीची उपासना होती. तथापि रमाकान्त राय यांच्याशी विवाहबद्ध झाल्यावर त्यांनी आपल्या माहेरची शक्त्युपासना सोडून राय घराण्यातील वैष्णवोपासना स्वीकारली. त्यामुळे बापलेकीत काही काल वितुष्टही आले.

बालपणी राममोहन फार धर्मनिष्ठ व देवभक्त होते. देवपूजा व भागवताचा एखादा अध्याय वाचून झाल्याशिवाय तोंडात पाणीही घ्यायचे नाही, असा त्यांचा नियम होता. शिक्षणाची त्यांना विलक्षण आवड होती. ते बुद्धिमान होते, तसेच एकपाठीही होते. त्यामुळे त्या वेळच्या पद्धतीनुसार त्यांनी घरच्या घरीच बंगाली, संस्कृत व फारसी या भाषांचे प्राथमिक शिक्षण घेतले व पुढील शिक्षणासाठी वयाच्या आठव्या वर्षी ते पाटण्याला गेले. तिथल्या मुक्कामात त्यांनी अरबी भाषेतील युक्लिडचे भाषांतर, ॲरिस्टॉटल्च्या ग्रंथांची रूपांतरे व कुराण यांचा बारकाईने अभ्यास केला.

तत्कालीन रीतीला अनुसरून राममोहन राय यांना अगदी बालपणीच गृहस्थाश्रमी बनावे लागले. तथापि त्यांची प्रथम पत्नी लवकरच मरण पावल्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांची दुसऱ्या दोन लहान मुलींबरोबर अनुक्रमे इ. स. १७८१ व इ. स. १७८२ साली दोन लग्ने लावून दिली.

पुढे राममोहन आईच्या इच्छेसाठी वाराणसीला गेले व तिथे त्यांनी संस्कृत शास्त्रांचा कसून अभ्यास केला. परंतु या विविध भाषांच्या अध्ययनाचा व त्यांतील ग्रंथवाचनाचा राममोहन यांच्या मनावर विपरीत परिणाम झाला. वयाच्या पंधरा-सोळाव्या वर्षी ते नास्तिक व मूर्तिपूजाविरोधी बनले.

राममोहनांमध्ये झालेले हे विपरीत विचारपरिवर्तन पाहून त्यांची मातापितरे स्तंभितच झाली. आपला गुणी व धर्मनिष्ठ मुलगा एकदम इतका बदलून जाईल, हे काही केल्या त्यांना खरे वाटेना. त्यांचे व राममोहनांचे एकसारखे खटके उडू लागले. एक दिवस तर त्यांचे वडील त्यांच्यावर इतके संतापले, की त्यांनी राममोहन यांना घरातून घालवून दिले.

मग राममोहन तिबेटात गेले. तिथे बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास करीत असता त्यांना कळून चुकले, की बौद्ध लोकही बुद्धाच्या प्रतिमा पूजतात व लामाला ईश्वर समजून त्याचीही पूजा करतात. स्वाभाविकच राममोहनांना ही गोष्ट आवडली नाही व त्यांनी मूर्तिपूजा, धर्मगुरूची पूजा, इ. बौद्ध कर्मकांडावर टीकेची झोड उठवली. त्यामुळे बौद्ध लोक चिडले व त्यांनी राममोहनांना ठार मारण्याचे प्रयत्न आरंभले. सुदैवाने या वेळी काही दयाळू स्त्रिया त्यांच्या मदतीला धावल्या व त्यांनी राममोहन यांना या प्राणसंकटातून मुक्त केले व सुरक्षितपणे स्वदेशी परत पाठवले.

इ. स. १७९० साली राममोहन स्वगृही परतले. या वेळे-पर्यंत त्यांच्या माता-पित्यांचा रागही निवळला होता. तीन-चार

राजा राममोहन राय

वर्षे घराबाहेर राहून व उघड्या जगातील टक्के-टोणपे खाऊ[n] आपला मुलगा आता सुधारला असेल, अशी त्यांची कल्पना होती. परंतु लवकरच त्यांचा भ्रमनिरास झाला. मधल्या काळात राम-मोहन सुधारले तर नाहीतच; उलट स्वमतप्रतिपादनाच्या बाबतीत अधिकच ताठर व कणखर बनले आहेत, असे त्यांना दिसून आले. सनातनी लोकही त्यांचा द्वेष करू लागले व त्यांनी राम-मोहनांच्या वडिलांना पुनश्च त्यांना घराबाहेर काढायला लावले.

त्यानंतर राममोहन यांनी पुन्हा वाराणसी गाठली. पुढे चार-पाच वर्षे त्यांनी अनेक महत्त्वाच्या संस्कृत धर्मग्रंथांचे सखोल अध्ययन केले. या वेळी त्यांच्या समवेत त्यांची पत्नीही होती. वाराणसी सोडल्यावर राममोहन बरद्वान जिल्ह्यातील आपल्या वडिलांच्या शेतीची देखभाल करू लागले. इ. स. १७९६ पासून राममोहन यांनी इंग्रजी भाषेचा अभ्यास सुरू केला व मेहनत घेऊन त्यांनी ती भाषा चांगल्या प्रकारे आत्मसात केली.

इ. स. १८०० साली राममोहन यांना पुत्रप्राप्ती झाली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राममोहन यांनी त्याचे नाव राधाप्रसाद असे ठेवले. राधाप्रसाद याच्या जन्मानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढू लागल्या म्हणून मग राममोहन यांनी प्रथम काही दिवस कलकत्त्याच्या दिवाणी कोर्टात व नंतर फोर्ट वुइल्यम कॉलेज येथे नोकरी केली. इ. स. १८०३ सालच्या ७ मार्चला त्यांनी डाक्का येथील कलेक्टर थॉमस वुडफर्ड याचे दिवाणपद स्वीकारले. याच वर्षाच्या मे महिन्यात त्यांचे वडील रमाकांत राय मरण पावले. रमाकांतांच्या मृत्यूनंतर राममोहन मुर्शिदाबाद येथे राहू लागले. याच वेळी त्यांनी 'तुहफत उल मुवाहिद्दीन' अथवा ईश्वर-भक्तांस देणगी या नावाचा एक लहानसा ग्रंथ फारसी भाषेत लिहिला. या ग्रंथात त्यांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत —

'सृष्टिकर्ता व पालनकर्ता एक परमेश्वर आहे, असाच सर्व धर्मांचा पाया आहे; पण त्यावर निरनिराळ्या धर्मांच्या लोकांनी आपल्या भलभलत्या कल्पनांचा डोलारा चढविल्यामुळे त्या धर्मांना भिन्न भिन्न रूपे आली आहेत. प्रत्येक धर्मातील लोक आपला धर्म मात्र खरा व इतर धर्म खोटे म्हणतात. अशा स्थितीत खरा धर्म कोणता हे ठरविण्यासाठी प्रत्येक धर्मातील खऱ्या व खोट्या गोष्टींचा विचार झाला पाहिजे.'

इ. स. १८०५ साली राममोहन राय यांची रामगड जिल्हा कोर्टाचे रजिस्ट्रार मि. डिग्बी यांच्याशी मैत्री जमली. पुढच्याच वर्षी राममोहनांनी त्यांच्या हाताखाली नोकरी पत्करली. मात्र पहिल्याच दिवशी त्यांनी डिग्बीसाहेबांस बजावले, की 'यापुढे जेव्हा जेव्हा तुम्ही मला तुमच्या खोलीत बोलवाल, तेव्हा तेव्हा तुम्ही मला स्वतंत्र खुर्ची देऊन मानाने वागवले पाहिजे.'

इंग्रजांच्या झगझगीत राजवटीपुढे दिपून जाऊन, प्रत्येक साहेबाची हांजी हांजी करण्याच्या त्या काळात राममोहन राय यांचा हा तेजस्वीपणा डिग्बीसाहेबांस कौतुकास्पद वाटला. डिग्बीसाहेबांच्या कार्यालयात राममोहन नोकरीला राहिले तेव्हा ते साधे कारकून होते; परंतु लौकरच त्यांनी आपल्या अंगच्या गुणांच्या बळावर शिरस्तेदारीपर्यंत मजल मारली.

राममोहन यांचा विविध विषयांचा चौफेर अभ्यास, त्यांची तीव्र व तरल बुद्धी, स्वतःला पटलेल्या तत्त्वांसाठी प्रसंगी प्राण-संकटेही ओढवून घेण्याची त्यांची तयारी, कामाचा उरक, सदैव नवनवीन ज्ञानशाखांचे अध्ययन करण्यासाठी चाललेली त्यांची धडपड, स्वदेशबांधवांविषयी त्यांना वाटणारी तळमळ, इ. त्यांच्या गुणसंपदेवर डिग्बीसाहेब विलक्षण खूष झाले. राममोहनांशी ते अनेक विषयांवर संवाद करीत, ख्रिस्ती धर्माविषयीच्या त्यांच्या शंका निवारीत व त्यांच्या समवेत विविध धर्मग्रंथ वाचीत. डिग्बीसाहेबांचा हा स्नेह राममोहन राय यांना अनेक दृष्टींनी लाभदायी ठरला.

इ. स. १८१० साली राममोहनांनी सरकारी नोकरी सोडली व रंगपूरच्या जवळ माहीगंज येथे स्वतःचे घर बांधून ते तिथे राहू लागले. कोर्टाजवळ त्यांनी स्वखर्चाने एक तळे बांधले आणि लोकांची पाण्याची सोय केली. स्वतःचे घर बांधल्यावर राममोहन यांनी तिथे आपल्या स्नेह्यासहकाऱ्यांसह धर्मचर्चासत्र सुरू केले. राममोहनांकडे येणाऱ्या मित्रमंडळींत विविध धर्म-पंथांचे लोक असत. त्या सगळ्यांच्या संवाद-चर्चेचे सार एकच असे व ते म्हणजे 'मूर्तिपूजेला शास्त्राधार नाही!' परंतु लवकरच या विधानाला हरकत घेणारे व मूर्तिपूजेची बाजू उचलून धरणारे ज्ञानचंद्रिका नावाचे एक पुस्तक गौरीकांत भट्टाचार्य यांनी लिहिले व राममोहन राय यांना आव्हान दिले. गौरीकांतांनी व इतर सनातन्यांनी त्यांना विविध मार्गांनी छळायलाही सुरुवात केली. राममोहन हे जात्याच धाडसी व तत्त्वनिष्ठ असल्यामुळे ते हा सर्व त्रास हसतमुखाने व मुकाटपाने सहन करीत; परंतु त्यांच्या पत्नीला व मुलांना अशा स्थितीत गावात राहणे अगदी कठीण झाले. म्हणून मग राममोहन राय यांनी राधानगराजवळ रघुनाथपूर येथे जुन्या स्मशा-नाच्या जागेत एक नवे घर बांधले व तिथे ते बायको-मुलांसह राहू लागले. या घरासमोर त्यांनी एक वेदी उभारून तिच्यावर ॐतत्सत्, एकमेवाद्वितीयम्, इ. उपनिषदांतील महावाक्ये कोरून घेतली. या वेदीसन्निध बसूनच ते ईश्वरोपासना करीत. या घरातच त्यांच्या दुसऱ्या पुत्राचा जन्म झाला. त्याचे नाव त्यांनी रामप्रसाद ठेवले.

राममोहन रघुनाथपुराजवळ राहत असताना जवळच्याच लांगूलपारा येथे त्यांची आई राहात होती. त्या वेळी राममोहन यांची धाकटी दोन भावंडे मृत्यू पावली होती, त्यामुळे तिची मनःस्थिती फार नाजुक झाली होती. म्हणून राममोहन तिच्या सांत्वनासाठी तिला भेटायला गेले; परंतु तशाही स्थितीत त्या करारी बाईने आपल्या धर्मद्रोही पुत्राची भेट घेण्याचे नाकारले. राममोहनांना या घटनेने फार दुःख झाले. तेही मग आईला भेटण्यासाठी हट्ट धरून बसले. तेव्हा आईने त्यांना निरोप पाठवला, की 'तू आपला कुलदेव राधागोविंद याच्यापुढे मस्तक नमविल्याशिवाय मी तुला मजजवळ येऊ देणार नाही.' राम-मोहनांनी ही गोष्ट मान्य केली. त्यांनी राधागोविंदापुढे साष्टांग नमस्कार घातला व म्हटले, 'मी माझ्या आईच्या देवाला नमस्कार करतो.'

इ. स. १८१४ साली राममोहन कलकत्त्याला स्थायिक झाले. तिथे येताच त्यांनी अनेक सामाजिक चळवळींना प्रारंभ केला. आरंभी आत्मीयसभा नामक एक संस्था स्थापून तिच्या द्वारा त्यांनी भिन्न भिन्न विषयांवर चर्चा-संवाद सुरू केले. याच काळात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेदान्तसूत्रे, उपनिषदे, इ. धर्मग्रंथांची भाषांतरे त्यांनी छापून प्रसृत केली.

यानंतर राममोहन राय यांनी सतीप्रथेसंबंधी सर्व बाजूंनी अभ्यास केला व त्यावरून त्यांना पूर्णपणे समजून आले, की या

राममोहन राय यांचा वाडा – कलकत्ता

प्रथेचे कोणत्याही प्रकारे समर्थन करता येण्यासारखे नाही व वाटेल त्या प्रयत्नांनी ही घातकी प्रथा लवकरात लवकर संपुष्टात आणली पाहिजे. त्यासाठी मग त्यांनी अगदी पहिला उपाय म्हणून जिथे एखादी स्त्री सती जात असेल, तिथे आपल्या सहकाऱ्यांसह जाऊन त्या स्त्रीला सती जाण्यापासून परावृत्त करायचे असे ठरविले. परंतु असे करण्याने सनातनी मंडळी तंटे उभारू लागली. राममोहन व त्यांचे मित्र धर्मोच्छेदक आहेत, त्यांना हिंदू धर्मात ढवळाढवळ करायचा हक्क नाही; ते मिशनऱ्यांचे हस्तक आहेत, बाटगे आहेत, असा एकच गदारोळ या मंडळींनी उठवला व त्याचा परिणाम म्हणून सर्वसामान्य समाजाचा बुद्धिभेद होऊ लागला. त्यामुळे राममोहनांना आपल्या हिंदुत्वाविषयी, ब्राह्मणत्वाविषयी जाहीर ग्वाही द्यावी लागली व आपल्या धर्मसुधारणाविषयक चळवळींमध्ये हिंदू धर्माच्या मूल स्वरूपाचा उच्छेद करणारे काही नाही, असे आवर्जून उद्घोषून सांगावे लागले.

इ. स. १८१८ साली सतीला बंदी व्हावी म्हणून राममोहन यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या व अन्य प्रतिष्ठित मंडळींच्या सह्यांसह एक अर्ज सरकारकडे पाठविला, त्यात म्हटले होते – 'या चालीस शास्त्राधार नाही. विधवांची इस्टेट मिळावी म्हणून त्यांचे आप्त त्यांना सती जाण्यास भाग पाडतात. विधवांची सामाजिक स्थिती हीन असल्यामुळे काही विधवा आधी सती जाण्यास तयार होतात; परंतु ज्वाला सहन न होऊन त्यांच्यापैकी कोणी परत येऊ लागली तर तिला काठीने आत ढोसून हे आप्त तिचा खून करतात. त्यामुळे ही अमानुष चाल बंद करण्यासाठी सरकारने कायदा करावा.'

तत्कालीन ब्रिटिश सरकार कोणाच्या धर्मात ढवळाढवळ नको म्हणून या बाबतीत स्वस्थ बसले होते; पण ही सतीप्रथा दिवसेंदिवस अधिकाधिक निर्घृण होत आहे, असे दिसून येताच ग. ज. लॉर्ड वुइल्यम बेंटिक यांनी राममोहनांना आवर्जून बोलावून घेतले व त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा करून सतीबंदीच्या कायद्याची निश्चिती केली. यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे दि. ४ डिसेंबर १८२९ रोजी लॉर्ड बेंटिक यांनी सतीबंदीचा कायदा लागू केला. अशा प्रकारे राममोहन राय यांनी अंगीकारलेल्या एका मोठ्या सामाजिक कार्यात त्यांना विजय मिळाला.

सतीबंदीची चळवळ चालू असतानाच राममोहन राय यांनी बायबलचा व ख्रिस्ती धर्माचा सांगोपांग अभ्यास आरंभिला. त्यासाठी त्यांनी ग्रीक व हिब्रू या भाषांचे सखोल अध्ययन केले. हिब्रू भाषा शिकल्यामुळे त्यांना मूळ बायबलची संहिता अभ्यसता आली. राममोहन राय ख्रिस्ती धर्माच्या व बायबलच्या इतके मागे लागलेले पाहून अनेक ख्रिस्ती मिशनऱ्यांना व हिंदू पंडितांनाही ते आता ख्रिस्ती होणार असे वाटू लागले. परंतु राममोहन राय यांनी तसे काही न केल्याने त्या सर्वांचा भ्रमनिरास झाला. इतकेच नव्हे; तर ख्रिस्ती मिशनरी बायबलमधील अनेक घटनांचा विपरीत अर्थ लावून भोळ्या-भाबड्या भारतीय बांधवांना फसवतात व त्यांना आपल्या कळपात ओढतात, असे पाहताच राममोहन राय त्यांच्याशी वाद घालू लागले आणि त्यांचे सत्य स्वरूप समाजापुढे मांडू लागले. इ. स. १८२० साली राममोहनांनी 'येशूच्या आज्ञा, शांती व सुखाचा मार्ग' या नावाचे, ७० पृष्ठांचे, एक इंग्रजी पुस्तक प्रसिद्ध केले व त्याद्वारा बायबलच्या सत्यशोधनाचा शुभारंभ केला. याच पुस्तकात त्यांनी येशूचे उदात्त उपदेश इकडील लोकांस वाचण्यास मिळावे म्हणून आपण ते बंगाली व संस्कृत भाषांत भाषांतरित करणार असल्याचा मनोदय प्रकट केला.

इ. स. १८२१ साली राममोहनांनी बायबलातल्या चारही शुभवर्तमानांचे बंगालीत भाषांतर केले. शिवप्रसाद शर्मा या नावाच्या आपल्या एका मित्राच्या नावाने त्यांनी 'ब्रॅह्मॉनिकल मॅगॅझिन' नामक एक मासिक सुरू केले व त्यातून ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या उपद्व्यापांना उत्तरे देण्यास सुरुवात केली. ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराविषयी एका अंकात त्यांनी म्हटले-

'इंग्रजांचे राज्य नाही अशा देशात इंग्रज मिशनऱ्यांनी ख्रिस्ती धर्माचा प्रचार केला, तर त्यांची उत्कंठा व धर्मनिष्ठा दिसेल. येथे इंग्रज राज्यकर्ते असल्यामुळे व इकडील धर्मात हात न घाल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ण्याचे धोरण असता, गेल्या २० वर्षांपासून मिशनऱ्यांनी इतर धर्मांस नावे ठेवून, आपल्या धर्माची स्तुती करून व गरीबांस आर्थिक मदत करून, ख्रिस्ती करणे सुरू केले. गरीब लोक सर्वच इंग्रजांस ते राज्यकर्ते असल्यामुळे भितात, यामुळे इंग्रज मिशनऱ्यांनी अशांना ख्रिस्ती करणे ईश्वराच्या व मनुष्यांच्या दृष्टीने अयोग्य होय.'

दि. ४ डिसें. १८२१ रोजी राममोहन राय यांनी संवादकौमुदी नामक एक साप्ताहिक सुरू केले. या साप्ताहिकातून लोककल्याणविषयक सर्व विषयांचा ऊहापोह करण्याचे धोरण त्यांनी ठेवले. भारतीयांच्या अनेक प्रकारच्या मागण्या व तक्रारी सरकारपुढे मांडणारे आणि भारतीय माणसाने सुरू केलेले पहिले पत्र म्हणून भारतीय वृत्तपत्रव्यवसायात राममोहन राय यांच्या या संवाद–कौमुदीचे स्थान अनन्यसाधारण समजले जाते.

इ. स. १८२२ साली त्यांनी 'मिरत-अल्-अखबार' (वर्तमान आदर्श) या नावाचे एक फारसी पत्र सुरू केले. हे पत्र मुख्यतः सुशिक्षितांसाठी असून, त्याची भाषादेखील बरीच कडक असे. याच वेळी सरकारने असा हुकूम काढला, की 'गव्हर्नर जनरलच्या परवान्याशिवाय कोणी पत्र अथवा नियतकालिक काढू नये.' सरकारचा हा हुकूम म्हणजे एतद्देशीय वृत्तपत्रांतून सरकारवर होणाऱ्या टीकेला पायबंद घालण्याचा प्रकार होता. एका अर्थी वृत्तपत्रस्वातंत्र्यावर गंडांतर आणण्याचा हा प्रयत्न होता. राममोहन राय यांना स्वाभाविकच याचा विस्मय वाटला व रागही आला. त्यांनी आरंभी सर्व सामोपचाराचे मार्ग अवलंबून सरकारचा वरील हुकूम अन्याय्य असल्याचे सरकारला दाखवून दिले.

वृत्तपत्रस्वातंत्र्यासाठी सरकार-दरबारी त्यांनी बराच काळ झगडा चालू ठेवला. पुढे त्यांनी शिक्षणविषयक प्रश्नाला हात घातला. त्या वर्षी सरकारी शिक्षणखाते स्थापन झाले व या खात्यातील मंडळींनी कलकत्ता येथे संस्कृत कॉलेज काढण्याचा सल्ला सरकारला दिला. राममोहन राय यांना ही गोष्ट आवडली नाही. कारण त्यांच्या मते भारताचा भाग्योदय होण्यास व त्याचा दर्जा अन्य राष्ट्रांबरोबर होण्यास पाश्चात्त्य शिक्षणाच्या धर्तीवर भारतात लोकशिक्षण मिळायला हवे. त्यासाठीच त्यांनी कलकत्त्यात पदार्पण केल्याबरोबर इंग्रजी शिक्षण देणाऱ्या संस्था काढण्याविषयी सरकारकडे एकसारख्या अर्ज-विनंत्या चालू केल्या होत्या. प्राचीन परंपरेनुसार संस्कृत शिक्षण देण्यामुळे घोकंपट्टी वाढण्यापलिकडे व मर्यादित ज्ञानसंपादनाशिवाय अधिक काही साधणार नाही, असे ते निक्षून सांगत. शेवटी सरकारी शिक्षणखाते ही संस्कृत विद्येचीच महाविद्यालये काढण्याच्या विचारात असल्याचे पाहून त्यांनी तत्काळ सरकारकडे आपला सविस्तर विरोध नोंदवला.

राममोहन यांनी संस्कृत महाविद्यालयाच्या स्थापनेला विरोध दर्शविला असला, तरी ते संस्कृत विद्येचे योग्य महत्त्व जाणून होते. ते स्वतः संस्कृत भाषेचे पंडित होते. वेद व उपनिषदे यांचा त्यांनी सखोल अभ्यास केला होता. त्यामुळे संस्कृत महाविद्यालयाला विरोध करण्याच्या काळातच त्यांनी स्वखर्चाने वेदान्त महाविद्यालयाची स्थापना केली व तिथे संस्कृत भाषा आणि वेद-वेदान्त यांचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली. इ. स. १८२४ साली बंगाली भाषेत इतिहास, भूगोल, व्याकरण, इ. अनेक विषयांवर त्यांनी पुस्तके लिहिली. आणखी दोन वर्षांनी त्यांनी बंगाली व्याकरणावर मोठे पुस्तक लिहिले. त्यांच्यामुळेच बंगाली भाषेला उत्कर्षाचे दिवस प्राप्त झाले. इ. स. १८२४ साली दक्षिण महाराष्ट्रात दुष्काळ पडला, तेव्हा राममोहनांनी दुष्काळग्रस्तांच्या साहाय्यासाठी सर्वतोपरी परिश्रम घेतले.

यानंतरची दोन-चार वर्षे राममोहन राय यांनी एका नव्या धर्मपंथाच्या स्थापनेच्या पूर्वतयारीत घालवली. बाळपणी ते जरी मूर्तिपूजा व जपजाप्यादी करीत असले, तरी कालांतराने त्यांचा त्यावरील विश्वास उडाला होता व हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, इ. अनेक धर्मांचे प्रधान ग्रंथ वाचून त्यांची निर्गुण, निराकार व एकमेव ईश्वरावर श्रद्धा बसली होती. या ईश्वराला नित्यशः प्रार्थनेने प्रसन्न करावे व आपले प्राप्त कर्म करीत राहावे, असे त्यांना पुढे वाटू लागले. इ. स. १८२८ साली त्यांनी आपल्याला पटलेल्या या ईश्वरविषयक व धर्मविषयक विचारांच्या प्रसरणासाठी आदी ब्राह्मसमाज किंवा ब्राह्मसभा नामक एका नव्या पंथाची स्थापना केली. दि. २० ऑगस्ट १८२८ या दिवशी कलकत्त्यातील चितपुर रस्त्यावर असणाऱ्या जोडा सँको नामक एका गल्लीतील एका घरात राममोहन राय हे रामचंद्र विद्यावागीश, उत्सवानंद विद्यावागीश, ताराचंद्र चक्रवर्ती, इ. आपल्या सहकाऱ्यांसह जमले व त्यांनी ब्राह्मसमाजी पद्धतीने उपासनेला आरंभ केला. पुढील वर्षी त्यांनी आपल्या नवपंथाची यथोचित कल्पना देणारे सार्वत्रिक धर्म नावाचे पुस्तक लिहिले. त्यात त्यांनी ईश्वरपूजेविषयी लिहिताना म्हटले. 'ईश्वरपूजा म्हणजे त्याच्या गुणांचे चिंतन. तो अतर्क्य व अवर्णनीय आहे, तरी सृष्टिक्रमावरून समजतो. त्याची पूजा करण्यासाठी जिथे व ज्या वेळी मन शांत असेल, ती जागा व ती वेळ चांगली.'

दि. १९ नोव्हें. १८३० या दिवशी दिल्लीचा बादशाहा दुसरा अकबर याच्या काही राजकीय तक्रारी निवारण्यासाठी राममोहन राय इंग्लंडला गेले. या निमित्ताने बादशहाने त्यांना राजा असा किताब दिला. प्रवासात असताना त्यांना केप ऑफ गुडहोप येथे फ्रेंच बोटीवर स्वतंत्र फ्रान्सचा ध्वज फडफडताना दिसला. त्याबरोबर त्यांचे स्वातंत्र्यप्रिय अंतःकरण आनंदाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भरून आले व ते तडक त्या ध्वजाला अभिवादन करण्यासाठी धावले. धावताना त्यांचा पाय अडखळून ते पडले, त्यांचा पाय मुरगळला; परंतु तरीही ते फ्रेंच बोटीवर पोचलेच व तिथे फ्रान्सचा जयजयकार करून मग परतले. परदेशात त्यांचे अनेक ठिकाणी सत्कार झाले. भारतातून परदेशात जाणारे पहिले लोकनेते म्हणून तिथल्या सगळ्याच लोकांना त्यांच्याविषयी आदर वाटला. राममोहन राय यांनीही अनेक सभा-समारंभां-



राममोहन राय यांची समाधी – कार्नोव्हेल (इंग्लंड)

तून भाषणे व चर्चा-संवाद करून भारताची प्रतिमा उजळून ठेवली. परंतु याच वेळी ते एकदम आजारी पडले व अखेर त्याच आजारात २७ सप्टेंबर १८३३ या दिवशी ब्रिस्टल येथे मरण पावले. द्वारकानाथ ठाकूर आदी त्यांच्या स्नेह्यांनी व अनुयायांनी कार्नोव्हेल येथे त्यांची समाधी उभारली.

राममोहन राय यांच्या जीवनकार्यासंबंधी तर्कतीर्थ लक्ष्मण-शास्त्री जोशी यांनी आपल्या वैदिक संस्कृतीचा विकास या ग्रंथात जे विचार व्यक्त केले आहेत, त्यांचा सारांश असा –

पाश्चात्त्य विद्येने तीन नवीन मूलभूत मूल्ये या देशात प्रथमतः आणली. बुद्धिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सर्व मानवांची राष्ट्र, वंशधर्म, इ. भेदांनी निरपेक्ष अशी समता, ही ती तीन मूल्ये होत. या मूल्यांना अनुसरून भारतीय समाजाची नव्याने पुनर्घटना करण्यास पुढे सरसावलेला पहिला प्रज्ञाशाली पुरुष म्हणजे राजा राममोहन राय. सुंदर, भव्य, विद्वान, त्यागी व तपस्वी असा हा पुरुष इंग्रजी राज्याच्या स्थापनेनंतर लवकरच उदयास आला. त्याने समाजसुधारणा आणि धर्मसुधारणा यांचा अविभाज्य संबंध ओळखला. धर्मदृष्टी बदलल्याशिवाय सामाजिक बंधने नष्ट करण्याचे मानसिक सामर्थ्य लाभत नसते, कारण हीन प्रकारच्या धार्मिक अंधश्रद्धेनेच सामाजिक रूढी बळकट केलेली असते. धार्मिक अंधश्रद्धांचे पोषण धार्मिक ग्रंथ करतात, म्हणून धर्मसुधारकास पहिला आघात ग्रंथप्रामाण्यावर करावा लागतो. त्याप्रमाणे राजा राममोहन राय यांनी धर्मग्रंथांचे परिशीलन करून सर्व धर्मांत मूलभूत सत्य एकच आहे व ते म्हणजे एक ईश्वर हे होय, असा संदेश दिला. या संदेशाच्या प्रसारार्थ त्यांनी ब्राह्म समाजाची स्थापना केली.

ब्राह्म समाजाच्या स्थापनेने हिंदी नवयुगाची प्रभातच घोषित झाली. जुने संकुचित आचार व कृपण बंधने मोडण्यात खरे धार्मिकत्व असल्याचा विश्वास या नवधर्माने निर्माण केला. व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केल्यामुळे गृहसंस्थेतील स्त्रियांचे व्यक्तित्व जुन्या धर्माने नष्ट झाले होते, त्या स्त्रीजातीच्या सर्वांगीण उद्धाराचा प्रश्न राममोहन राय आणि त्यांचे सहकारी यांनी प्रथम हाती घेतला. सतीची अमानुष चाल त्यांनी कष्ट-परिश्रमांनी शेवटी बंद पाडली. सतीची चाल ही अशा एका तत्त्वाची सूचक होती, की स्त्री ही या जगात स्वतःकरिता अस्तित्वात नाही, ती पुरुषाकरिता अस्तित्वात आहे. तिचे जीवन पुरुषात समर्पित आहे. राममोहन राय यांनी सतीप्रथेचा नामशेष करून स्त्रियांच्या सर्वांगीण उद्धाराचा शुभारंभ केला. त्यांनी कन्याविक्रय, कन्याहत्या, बालविवाह, बालाजरठविवाह इ. अनेक जोखडांतून भारतीय स्त्रीला मुक्त करण्यासाठी वारंवार लहानमोठ्या चळवळी केल्या.

राजा राममोहन राय हा आधुनिक भारतातील पहिला संत होय. वैदिक संस्कृतीचा व्यापक दृष्टीने अभ्यास करून तिचे शाश्वत रहस्य आकलन केलेला असा हा प्रतिभाशाली पुरुष, चतुरस्र विद्वान व त्रिकालदर्शी संत होता. त्यांनी स्वतः स्थापन केलेल्या धर्मसंघटनेस ब्राह्म समाज असे जे अभिधान दिले, त्यात त्यांनी दाखविलेले औचित्य इतिहासाचा फार खोल असा गर्भितार्थ सूचित करते. विश्वाच्या अंतिम सत्याचा व मानवी अचिंत्य चित्शक्तीचा बोधक असा ब्रह्म हा शब्द उपनिषदांत वापरलेला आहे. या शब्दात वैदिक संस्कृतीचे सारसर्वस्व असलेले तत्त्व व्यक्त झाले आहे. जुन्या परंपरागत पावित्र्याचा उच्छेद करणारा हा समाजसुधारकांचा पितामह शरपंजरी पडेपर्यंत भूतकाळाशी लढला; परंतु भारतीय भूतकाळाच्या अंतरंगातील चैतन्याचा उगम असलेला विचार मात्र त्यांनी आपल्या विजयध्वजाखाली उभारलेल्या विचारमंदिराच्या गर्भागारात नेऊन स्थापन केला. ब्रह्मचिंतनाने प्रबोधन पावलेली आध्यात्मिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शक्ती मानवी समतेचे युग आणील याची जाणीव राजा राममोहन राय यांना होती. राजकीय किंवा सामाजिक सुधारणावाद व क्रांतिवाद यांत मनुष्याच्या आध्यात्मिक शक्तींना सर्वांगीण व्यक्तता येत नाही. ती संतांच्या सुधारणाचळवळीतच येते. राजा राममोहन राय यांच्या चरित्रात असे संतपण प्रकट झालेले दिसते. सामाजिक सुधारणा व राजकीय क्रांती ही दोन्ही ध्येये निर्वाणीच्या त्यागास तयार होऊन त्यांनी जागृत ठेवली होती आणि आध्यात्मिक भावना या दोन्ही ध्येयांचे पोषण करीत होती.

राममोहन राय यांचे व्यक्तिमत्व मोठे प्रसन्न, विलोभनीय व भव्योदात्त होते. त्यांची अंगकाठी सुमारे ६ फूट उंच व बळकट होती. सुदृढता आणि सुंदरता यांचा तर ते पुतळाच होते. त्यांचा चेहरा भव्य-गंभीर असून, बोलताना विशेष सतेज व आनंदी दिसे. त्यांच्या वागण्यात भारदस्तपणा व विनय असे. वाद करताना प्रतिपक्षी चिडला-संतापला तरी ते स्वतः शांत असत. त्यांच्या भाषणात, संभाषणात व लेखनात त्यांचे प्रचंड ज्ञान, न्यायास धरून वाद करण्याची शैली व पुष्कळ वेळा विनोदही पाहण्यास सापडे. अद्‌भुत प्रतिभा, कुशाग्र बुद्धी, तीव्र स्मरणशक्ती, एकपाठी वृत्ती, कोणतेही काम करताना ते नीटनेटके व टापटिपीने करण्याचा स्वभाव, कामाचा दांडगा उरक व उत्साह, इ. गुणसंपदेमुळे त्यांची सर्वांवर छाप पडे. त्यांचा पोषाख तत्कालीन चालीप्रमाणे इस्लामी धर्तीचा असे. अनेक वेळा घरीही त्यांच्या मस्तकी पगडी असे. त्यांना संस्कृत, बंगाली, अरबी, फारसी, ग्रीक, हिब्रू, लॅटिन, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, इ. अनेक भाषा चांगल्या प्रकारे अवगत होत्या. [राजा राममोहन राय–श्री. बी. बी. केसकर, १९१५; राजा राममोहन राय–मा. स. केळकर; वैं. सं. वि.]

रायशेखर

(इ. स. चे १६ वे शतक) एक बंगाली वैष्णव कवी. गोविंददासानंतर ज्यांची नावे घेतली जातात, अशा कवींमध्ये याची गणना होते. श्री. नगेंद्रनाथ गुप्तांसारखे इतिहासकार रायशेखर व विद्यापती यांना एकच मानतात. परंतु त्यांच्या या मताला अनेक पंडितांनी विरोध दर्शविला आहे. फार तर एवढेच म्हणता येईल, की रायशेखराची कविता विद्यापतीच्या कवितेसारखीच मधुर आहे.

खंडनिवासी रघुनंदन गोस्वामी हे रायशेखराचे गुरू होत. रायशेखराने बंगाली व ब्रजबुली भाषत कविता रचली आहे. पदकल्पतरूमध्ये याची बरीच पदे आढळतात. शिवाय दंडात्मिका नावाचा याचा एक काव्यसंग्रहही आहे. त्यात कृष्णविषयक पदे आहेत. [हिं. वं. वै. क.; ब्र. सा.]

रायसिंह

एक लोकदेव. हा मुळात बुंदेलखंडाचा राजा छत्रसाल याचा मुलगा होता. छत्रकोट शहरावर झालेल्या हल्ल्यात हा मारला गेला आणि त्याचे शौर्य पाहून लोकांनी त्याला देव बनवले. त्यांनी त्याची समाधीही बांधली. त्यानंतर त्याला देवपण कसे प्राप्त झाले यासंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी –

एक माणूस हिवतापाने आजारी पडला. त्याने रायसिंहाच्या समाधीपाशी जाऊन नवस केला, की ' मी या आजारातून बरा झालो, तर जन्मभर रोज तुला नैवेद्य देईन. ' नवसाप्रमाणे त्याला रायसिंह पावला. पुढे तो आजारी पडला नाही. मग इतरांच्याही नवसाला तो पावू लागला. अशा रीतीने त्याला हळूहळू देवत्व प्राप्त झाले. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

राय हनुमंत

(इ. स. चे १८ वे शतक) एक रामभक्त मराठी कवी. याचे जन्मस्थान अथवा निवास कर्नाटकात तुंगभद्रेच्या काठी कुठेतरी असावा. हनुमंत हे त्याचे जन्मनाव असून, त्याने गुर्वाज्ञेने मुख्यप्राण हे दुसरे नाव धारण केले होते.

राय हनुमान याने रामलहरी अथवा रामचंद्रोदय, रामलहरीपूर्वपीठिका, रामादर्श, स्वानुभवविंशती, इ. लहान-मोठी काव्ये रचली आहेत. रामलहरी हे सप्तकांडात्मक लघुरामायण मुख्यत्वे शिखरिणी वृत्तात आहे. श्रीरामाने आपणाला स्वप्नदर्शन देऊन आज्ञा केली म्हणून आपण हे काव्य रचायला प्रवृत्त झालो, असे त्याने म्हटले आहे. रामलहरीपूर्वपीठिकेत रामचरित्र, रामनाम, रामभक्ती इत्यादींचा महिमा गाणारी पदे आहेत. तिच्यात काही संस्कृत श्लोकांची मराठी समश्लोकीही दिली आहे. अनुष्टुभ, वसंततिलका, शार्दूलविक्रीडित, इ. लहान-मोठ्या वृत्तांत ही रचना आहे. स्वानुभवविंशती ही एकवीस अभंगांची रचना असून, तीत मोक्षासाठी तळमळणारे त्याचे मन आणि अद्वैतावरील उत्कट निष्ठा व्यक्त झालेली आहे. याव्यतिरिक्त त्याने काही आरत्याही रचल्या आहेत. त्याच्या काव्याचा एक नमुना असा –

रामा राजीवनेत्रा दशरथतनुजा राघवा रम्यगात्रा ।
सीताकांता पवित्रा मनुजतनुधरा पूर्णलीलाचरित्रा ॥
सन्मित्रा शत्रुमित्रा सम करिसि गती ऐकुनी विश्वमित्रा ।
वाटे माझ्या छिनेत्रां अतिथि वपु तुझे आणि हो कां स्वतंत्रा ॥

राय हनुमंताची कविता पंडिती वळणाची आहे. तिच्यावर रामदासांचा प्रभाव विशेष आहे. अनुप्रास व समर्पक दृष्टान्त यामुळे त्याचे काव्य रोचक ठरले आहे. हे काव्य अजून अप्रकाशित आहे. [वि. सं. मं. वा. १९६४]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राल दुर्गा एक देवता. बंगाली स्त्रिया हिचे व्रत करतात. मार्गशीर्षापासून फाल्गुनापर्यंतच्या प्रत्येक पौर्णिमेला हे व्रत करायचे असते. सूर्य ही या व्रताची देवता आहे. व्रतावधी चार वर्षे. पहिल्या पौर्णिमेला व्रतकर्ती स्त्री तांदुळाचे सात दाणे, सात दूर्वा, शेंदूर, रक्तचंदन व फुले या साहित्याने सूर्याची पूजा करते. अशी पूजा पुढच्या पौर्णिमेपर्यंत रोज करायची असते. पूजाकालात स्त्रीला केवळ सात मुठी तांदुळाच्या पिठीचाच आहार घ्यावा लागतो. पुढच्या पौर्णिमेला सतरा मुठी तांदूळ घेऊन त्यांची खीर करतात. तिसऱ्या महिन्यात तांदुळाच्या पिठाचे मुटके करून खायचे असतात. त्या दिवशी दोन केळी, रक्तचंदन व गुलाबाचे फूल हे साहित्य गंगेत सोडतात. फल – पुत्रप्राप्ती व महारोगनिवारण. [इं. फो. लो.]

राव एक जात. यांची वस्ती राजस्थान व गुजरात या प्रदेशांत आढळते. अनेक लोक राव आणि भाट यांना एकच मानतात. परंतु राव लोक मात्र स्वतःला भाटांहून भिन्न समजतात. ते ब्रह्मदेवाच्या यज्ञापासून आपली उत्पत्ती झाली, असे सांगतात. भाट लोक राजांच्या पिढ्यान्‌पिढ्यांच्या वंशावळी जतन करून ठेवतात आणि ब्राह्मण, वैश्य, इ. जातींकडे भिक्षेसाठी जातात. परंतु राव लोक मात्र केवळ राजपुतांचेच याचक असतात. वास्तविक राव ही या जातीची पदवी आहे. ते त्यांचे मूळचे नाव नव्हे.

कविता करणे व चांगल्या चाली लावून त्या गाणे हा यांचा व्यवसाय होय. यांनी प्राचीन इतिहास काव्यबद्ध करून तो पिढ्यान्‌पिढ्या जतन करून ठेवला आहे. राजपूत लोक यांना मोठ्या आदराने वागवतात. इतिहासकाळात राजपुतांनी रावांना मोठमोठ्या जहागिऱ्याही दिल्या आहेत. त्या भूमीवर ते उदरनिर्वाह करतात. अलिकडे गुजरात प्रदेशातील रावांनी भिक्षावृत्ती सोडून व्यापार-उदीम सुरू केला आहे. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. त्या मानाने राजस्थानातील राव मात्र अजूनही गरीबच आहेत.

या जातीत अनेक कवी व विद्वान होऊन गेले. चंदबरदाई, किशोरदास, गुलाबजी हे त्यांपैकी प्रसिद्ध आहेत.

यांच्या रीतीभाती राजपुतांप्रमाणेच असतात. यांच्यांत पडद्याची प्रथा आहे. हे लोक हिंगलाज देवीचे उपासक आहेत. [लोककला त्रै., १९५७; रा. भा. सा.]

रावण (१) लंकेचा अधिपती व रामाचा शत्रू. पुलस्त्य ऋषीच्या विश्रवा नामक पुत्राचा हा पुत्र होय. याच्या आईचे नाव कैकसी असे रामायणात सांगितले आहे. केशिनी व पुष्पोत्कटा अशीही नावे आढळतात. कुबेर हा याचा ज्येष्ठ सावत्र भाऊ होता. त्याच्याजवळ अमाप संपत्ती व पुष्पक नावाचे विमान होते. एके दिवशी कुबेर आपल्या विमानात बसून बापाच्या भेटीस जात असता कैकसीने त्याला पाहिले. त्याची ती श्रीमंती पाहून कैकसीच्या मनात मत्सर उत्पन्न झाला. तिने रावणाला सांगितले, की ‘ तुलाही कुबेरासारखे श्रीमंत व्हायला हवे.’ ही गोष्ट तपश्चर्येनेच साध्य होईल, हे जाणून रावण तपश्चर्येसाठी गोकर्णक्षेत्री गेला. तिथे त्याने दहा हजार वर्षे तपश्चर्या केली. प्रत्येक एक हजार वर्षांच्या शेवटी तो आपले एकेक मस्तक अग्नीत हवन करीत असे. शेवटी ब्रह्मदेव त्याला प्रसन्न झाला. त्याने रावणाला वर दिला, की ‘ तुला मनुष्येतरापासून मृत्यूचे भय नाही.’ (वा. रा. उत्तर. ९) हाच वर रावणाला शंकराने दिला, असे पद्मपुराणात सांगितले आहे (उत्तरखंड २४२).

लंका ही त्यापूर्वी कुबेराची राजधानी होती. रावणाने बलात्काराने तिचा ताबा घेतला व कुबेराला कैलासावर जाऊन राहायला भाग पाडले. त्याचे पुष्पक विमानही त्याने पळवून आणले.

वरानंतर रावण बलदंड झाला. त्याने मरुत्त, अनरण्य इ. अनेक राजांना जिंकले. इंद्रादी देवांचा पराभव केला. अश्मनगरातील कालकेय राजाशी युद्ध करीत असता त्याची बहीण शूर्पणखा हिचा पती त्याच्या हातून मारला गेला. पाताळ जिंकण्यासाठी गेल्यावेळी मात्र बळीने त्याचा पराभव केला. कार्तवीर्य अर्जुनाने याला एकदा धनुष्याच्या दोरीने जखडून टाकले होते. पुलस्त्याने रदबदली केली म्हणून तो सुटला. किष्किंधेच्या वालीनेही एकदा याला काखोटीस मारून चारही समुद्रांवरून फिरवून आणले होते. पुढे वालीचे व त्याचे सख्य झाले.

विमानातून फिरत फिरत निघाला असता रावणाचे विमान कैलासाजवळच्या शरवनापाशी कुंठित झाले. शरवनात प्रवेश करणारा पुरुष स्त्री होत असे, म्हणून तो त्या वनात शिरला नाही. नंदी हा त्या वनाचा रखवालदार होता. रावणाने त्याचा उपहास केल्यावर नंदीने त्याला शाप दिला, की ‘ तुझा वानरांकडून पराभव होईल. ’ त्यासरशी रावणाने संतापून कैलास पर्वत गदगदा हालवायला सुरुवात केली; पण शंकराने पायाच्या अंगठ्याने पर्वत खाली दाबताच हा चिरडला गेला आणि ओरडू लागला. शेवटी त्याने सामगायन करून शंकराला प्रसन्न करून घेतले.

रावण सीतेच्या स्वयंवराला गेला होता, तेव्हा त्याने धनुष्य उचलायचा प्रयत्न करताच ते त्याच्या छातीवर पडले आणि रामाने ते उचलून त्याला मोकळे केले (आ. रा. सारकांड सर्ग ३).

दंडकारण्यात याने अतिथिरूपाने जाऊन सीतेचे अपहरण केले. त्याने सीतेला वश करण्याचे अनेक उपाय योजले; पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सीता त्याला वश झाली नाही. शेवटी रामाशी झालेल्या युद्धात हा रामाकडून मारला गेला.

हा ब्राह्मण असल्याचे पद्मपुराणात सांगितले आहे. कुंभकर्ण व बिभीषण असे दोघे भाऊ याला होते. याला मंदोदरीशिवाय हजार स्त्रिया होत्या. इंद्रजित, देवांतक, नरांतक, त्रिशिरस आणि अतिकाय हे याचे पुत्र होत. रावणाला दहा तोंडे व वीस हात असल्याचे काही ठिकाणी वर्णन आहे. वाल्मीकीने याला दोन हात व एक तोंड असल्याचेच सांगितले असले तरी, वाल्मीकिरामायणातच काही ठिकाणी त्याला दशग्रीव असेही म्हटलेले आहे.

रावणाचे व्यक्तिदर्शन व स्वभावचित्रण श्री. बाळशास्त्री हरदास यांनी केले आहे, त्याचा सारांश असा –

रावण हा मातृवंशाकडून राक्षस व पितृवंशाकडून ब्राह्मण ऋषी होता. त्याचा पिता अग्निहोत्री व तपःसंपन्न होता; पण रावणाने मात्र मातृवंशाचेच वळण घेतले. रावण हा त्या काळातला एक महाबलाढ्य पुरुष होता. शौर्य, साहस, विद्वत्ता, चिकाटी, निर्भयता व कोणापुढेही नतमस्तक न होण्याची प्रवृत्ती हे त्याचे गुणविशेष होते. रामाचा तो प्रमुख शत्रू; पण त्यानेही त्याच्या गुणविशेषांची वाखाणणी केली आहे. राम म्हणतो –

अधर्मानृतसंयुक्तः कामं त्वेष निशाचरः ।
तेजस्वी बलवान् शूरः सङ्ग्रामेषु च नित्यशः ॥
शतक्रतुमुखैर्देवैः श्रूयते न पराजितः ।
महात्मा बलसम्पन्नो रावणो लोकरावणः ॥

(वा. रा. युद्ध. १११.९८–९९)

अर्थ – हा राक्षस अधर्म व अनृत यांनी खुशाल युक्त असो. पण तो तेजस्वी व बलवान असून, समरांगणात नेहमीच शूर म्हणून गाजलेला आहे. या महानुभाव रावणाचे सामर्थ्य मी असे ऐकले आहे, की त्याने सर्व जगाला थरकापायला लावले व इंद्रादी देवही त्याचा पराभव करू शकले नाहीत.

त्याच्याविषयी त्याचा सहोदर बिभीषण म्हणतो, की याने याचकांना दाने दिली, सर्व राजभोगांचा उपभोग घेतला, आपल्यावर अवलंबून असणाऱ्यांचे योग्य पालनपोषण केले, मित्रांना अपरंपार धन दिले व शत्रूंचाही मर्यादित सूड उगवला. हा आहिताग्नी व अत्यंत तपश्चर्याशील होता. हा मोठा तत्त्वज्ञानी असून धर्मकर्मांच्या आचरणात अग्रगण्य होता.

पण या सर्व सद्‌गुणांवर सपशेल पाणी पडावे असे त्याच्या अंगी पराकाष्ठेचे दुर्गुणही वसत होते. त्यामुळे त्याच्या सद्‌गुणांचा चांगल्या कामासाठी कधीही उपयोग झाला नाही.

रावणाने कुबेराचे राज्य केवळ दंडेली करून मिळवले; पण तरीही कुबेराने त्याच्याशी कधीही वैर केले नाही. तो सुधारावा, अशा अपेक्षेने कुबेराने त्याला उपदेश करण्यासाठी एक दूत पाठवला; पण रावणाने त्या दूताकडे कुबेराची निर्भर्त्सना केली व 'कोणताही दूत अवध्य आहे' या राजकीय संकेताला ठोकरून त्या कुबेरदूताचे भर सभेत तुकडे तुकडे करून ते राक्षसांना खायला दिले.

अलिकडे पुराणांतल्या कित्येक दुष्ट दुर्जनांचे उदात्तीकरण करण्याचे प्रयत्न काही विद्वान इतिहाससंशोधनाच्या नावाखाली करताना दिसतात. त्यांचे एक विधान असे, की रावणाने सीताहरणाच्या पूर्वी कोणत्याही स्त्रीचे अपहरण केले नाही. पण रामायणातील उदाहरणेच ते विधान खोडून काढण्यास पुरेशी आहेत.

कुशध्वज ऋषीच्या वेदवती नावाच्या कन्येवर रावणाने बलात्कार केला व ते सहन न होऊन तिने स्वतःला जाळून घेतले. देवभूमीवरून फिरत असता रंभा ही अप्सरा त्याच्या दृष्टीस पडली. रावण तिच्या मागे लागला. ती रावणाला म्हणाली. 'तुझा बंधू कुबेर याच्या नलकूबर नावाच्या मुलाशी आज माझा संकेत ठरला आहे. त्यामुळे धर्माने मी तुझी सून झाले आहे, तेव्हा तू माझ्या अंगावर हात टाकू नकोस.' पण रावणाने तिचे काही ऐकले नाही व संभोग करूनच तिला सोडले. भोगावती नगरीत जाऊन त्याने वासुकीचा पराभव केला व तक्षकाच्या धर्मपत्नीचे अपहरण केले. त्याने जेव्हा दिग्विजय केला, तेव्हा पराभूत राजांच्या अनेक स्त्रिया त्याने पळवून नेल्या. जी स्त्री सुंदर दिसेल ती कन्या असो वा विवाहित असो, रावणाने तिच्या आप्तेष्टांना ठार मारून तिचे अपहरण केले. मनुष्य, देव, दानव, नाग, यक्ष, असुर या सर्व जातींतल्या, इतकेच काय पण त्याच्या स्वतःच्या जातीतल्या कन्यादेखील त्याच्या तावडीतून सुटल्या नाहीत. सीतेला वश करण्यासाठी तर त्याने रामाच्या मस्तकासारखे एक मस्तक कृत्रिम रीतीने तयार केले व ते सीतेकडे पाठवले. 'राम युद्धात ठार झाला आहे; तेव्हा आता माझ्याशिवाय तुला कोणाचा आधार उरला नाही,' असे तो तिला सांगू लागला. हे त्याचे कृत्यही अधमपणाचेच होय. इंद्रजित मारला गेल्यानंतर तो संतापाने सीतेला ठार करायला निघाला होता. नलकूबराने रंभेच्या प्रसंगात रावणाला शाप दिला होता, की 'यापुढे तू कोणत्याही स्त्रीवर अत्याचार करशील तर त्याच क्षणी तुझ्या मस्तकाचे सात तुकडे होतील.' या शापाचे भय असल्यामुळेच सीता त्याच्या तावडीतून बचावली.

रावण हा नरमांसभक्षक होता, हे त्याच्याच उद्‌गारांवरून दाखवून देता येईल. त्याने सीतेला एकदा निर्वाणीचे सांगितले, होते की 'हे सीते, मी एक वर्षभर तुझ्या संमतीची वाट पाहीन.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यानंतर जर तू माझ्या शय्येचा स्वीकार केला नाहीस, तर मुदपाकखान्यातले माझे आचारी तुझे तुकडे तुकडे करून माझ्या सकाळच्या न्याहारीसाठी माझ्यापुढे आणून ठेवतील.'

असा हा क्रूरकर्मा रावण व त्याचे राक्षसगण यांचा संहार करून रामप्रभूने मानवसमाजावर फार मोठे उपकार केले, असाच वाल्मीकीच्या वर्णनाचा आशय आहे. [प्रा. च. को.; वा. रा.–बाळशास्त्री हरदास; रा. का. स.]

(२) वेदांचा भाष्यकार. याने ऋग्वेद व यजुर्वेद यांवर भाष्ये लिहिली आहेत. परंतु हा रावण कोण असावा, याबद्दल विद्वानांमध्ये मतभेद आहेत. काही लोकांच्या मतानुसार लंकाधिपती रावण हाच या भाष्यांचा कर्ता असावा. कारण रावणाला वेदांचे चांगले ज्ञान होते. त्यावरून यानेच वेदांवर भाष्य केले, असे त्यांचे मत पडते. पण अन्य काही विद्वान भाष्यकार हा रावण वेगळाच असावा असे म्हणतात. या रावणाचे चरित्र उपलब्ध नाही. रावण या नावावर माध्यंदिनसंहितेवरही एक भाष्य आढळते. [वै. सा.]

(३) वैशेषिक सूत्रांचा भाष्यकार. याच्या भाष्याचा उल्लेख काही ग्रंथांत आहे; पण रावणभाष्य हा ग्रंथ मात्र उपलब्ध नाही. इ. स. च्या ८ व्या शतकात रावण हा वैशेषिक पंडित म्हणून प्रख्यात होता. अनर्घराघव नामक ग्रंथात रावणाने स्वतःला वैशेषिक कटन्दी पंडित असे म्हटले आहे. [भा. द.]

रावळ एक जात. हिला राऊळ किंवा रावळिया असेही म्हणतात. या लोकांची वस्ती प्रामुख्याने गुजरात, राजस्थान, महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांत आहे. हे लोक पूर्वी भाट म्हणून प्रसिद्ध होते. त्यांच्यापैकी काही शेती करतात, काही विणकर म्हणून काम करतात; तर काही सकाळी उठून त्रिशूळ हातात घेऊन दोहे गात भिक्षा मागतात. राजस्थानातील रावळ लोक बारा-बारा व्यक्तींचा एक फड उभारून गावोगाव फिरतात व चारण लोकांना आपले नृत्य-गायनाचे खेळ करून दाखवतात.

पंजाबमध्येही रावळ नावाचे लोक आहेत. ते बहुतेक सर्व मुसलमान आहेत. त्यांना जोगी असेही म्हणतात. ते आध्यात्मिक गीते गाऊन भिक्षा मागतात. त्यांच्यापैकी काही हकीम असतात. वास्तविक त्यांनी वैद्यकीचे काहीच शिक्षण घेतलेले नसते. त्यामुळे त्यांच्या गावात त्यांची वैद्यकी चालत नाही. म्हणून हिवाळ्याच्या सुरुवातीला या धंद्यासाठी ते दुसऱ्या गावात जातात आणि पैसे मिळवतात. काही लोक भविष्य सांगण्याचा व्यवसाय करतात; तर काही चोऱ्या करण्यात फार पटाईत असतात. रावळपिंडी हे नाव रावळ लोकांवरूनच पडले, असे सांगतात. मुहर्रमच्या सणात हे लोक महंमद पैगंबराच्या कथा, त्याने केलेले चमत्कार वगैरे सांगतात आणि त्याची स्तुतिस्तोत्रे गातात.

गुजरातमधील रावळ – या लोकांत बरिया, भलिया, ... इ. सात पोटभेद आहेत. परमार, चोहान, वाणिया, पटलिया, गधेडिया, होरांची, इ. आडनावे यांच्यांत आहेत. यांनी ... किंवा बारा गावांचा मिळून एकेक गट बनवलेला असतो. ... काने आपल्या गटातच विवाहसंबंध केला पाहिजे, असा नि... यांच्यांत आहे.

विवाहप्रथा – वधूपिता वरगृही मुलगी सांगून जातो. मुलगी पसंत पडल्यास वरपिता सुमारे चाळीस रुपये तिच्यासाठी दे...

रावळ पुरुष

देतो. ज्योतिषी लग्नाचा मुहूर्त काढून देतो. लग्नात पौरो... ब्राह्मण करतो. लग्नाच्या आधी तीन, पाच, सात किंवा ... दिवस वधू-वरांच्या घरी गणपतीची प्रतिष्ठापना करतात ... त्या रात्री स्त्रिया गीते गातात. लग्नाच्या दिवशी नवरा ... वाजत-गाजत वधूगृही जातो.

लग्नाच्या वेळी वधू-वर एकमेकांचा उजवा हात ... घेतात आणि नंतर एकमेकांच्या गळ्यांत हार घालतात. ... ती दोघे अग्नीभोवती पाच प्रदक्षिणा घालतात आणि ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ती दोघे एकमेकांना कणकेच्या लाडवाचे पाच घास भरवतात.

विधवेला पुनर्विवाह करता येतो. पुरुषाला कोणत्याही क्षणी आपल्या बायकोला सोडता येते, पण स्त्रीला मात्र नवऱ्याच्या संमतीशिवाय घटस्फोट घेता येत नाही. घटस्फोटित स्त्रीला पुन्हा लग्न करता येते.

हे लोक महाकाली, अंबा, बहुचरा, हिंगलाज, इ. देवतांना भजतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात. मृताला बसल्या स्थितीत पुरतात व त्याचे तोंड दक्षिणेकडे करतात. बाराव्या दिवशी संध्याकाळी तांदुळाच्या पिठाचा दिवा करून तो पेटवतात व त्याच्या समोर एका पाटावर गहू, तांदूळ, फुले, फळे, इ. वस्तू ठेवतात व रात्रभर त्याच्या शेजारी बसून राहतात.

महाराष्ट्रातील रावळ – या लोकांत चव्हाण, छत्रभुज, लके, पोवार, गायकवाड, जाधव, कवड, इ. आडनावे आहेत.

विवाहप्रथा – समान आडनावांच्या कुळांत लग्नसंबंध होत नाही. लग्नापूर्वी साखरपुडा करण्याची पद्धत आहे. त्या वेळी वराकडील लोक मुलीला साखरेचा पुडा व साडीचोळी देतात. लग्नापूर्वी दोन किंवा चार दिवस नवऱ्या मुलाला हळद लावतात व उरलेली हळद वधूला लावण्यासाठी तिच्या घरी पाठवतात. हळदीबरोबर हिरवी साडीचोळी व मुंडावळयाही धाडतात. दुसऱ्या दिवशी देवकाप्रीत्यर्थ बकरा मारून त्याच्या मांसाची मेजवानी देतात. लग्नाच्या दिवशी वराला घोड्यावरून मिरवीत प्रथम मारुतीच्या देवळात नेतात आणि तिथे त्याला नवे पागोटे व थैली देतात. तिथून नवरा मुलगा वधूगृही जातो. तिथे वधू-वरांना समोरासमोर उभे करतात आणि ब्राह्मणपुरोहित अंतरपाट धरून मंगलाष्टके म्हणतो. मंगलाष्टके झाल्यावर अंतरपाट बाजूला करतात आणि ती दोघे पति-पत्नी बनतात. संध्याकाळी जेवणावळ होते.

हे लोक महादेव, त्याचा त्रिशूळ, भैरोबाचा मुखवटा किंवा चांदीचा टाक, देवी व खंडोबा यांना पुजतात. त्यांच्या घरात भैरोबा, तुळजापुरची भवानी, चतुःशृंगी येथील देवी, गोरखनाथ, खंडोबा, मच्छिंद्रनाथ, इत्यादींच्या मूर्ती असतात.

मर्तिकप्रथा – रावळ माणूस आसन्नमरण झाला, की त्याच्या तोंडात गंगाजळ व गोमूत्र घालतात. प्रेत बांबूच्या मखरातून स्मशानात नेतात. प्रेत पूर्वेकडे तोंड करून पुरतात. मृताचा उत्तराधिकारी शंखातून थोडे पाणी त्याच्या तोंडात घालतो. मृताच्या शरीरावर आधी बरेच मीठ ओततात व मग माती लोटतात. त्या जागी मग चबुतरा उभारतात. तिसऱ्या दिवशी सकाळी स्मशानात जाऊन मृतात्म्याला भात, भाजी अर्पण करतात. अकराव्या दिवशी घराच्या तुळईला फुलांचा एक हार टांगतात आणि त्याच्या खाली एक तांब्या व कणकेचा दिवा ठेवतात. मग एक बकरा बळी देतात. त्या वेळी मृतात्मा एखाद्या नातेवाइकाच्या अंगात प्रवेश करतो आणि आपल्या इच्छा सांगतो. अंगात आलेला माणूस निश्चेष्ट पडला, की मृत स्वर्गाच्या दाराशी पोचला, असे समजतात. त्यानंतर मेजवानी होते. मृताचे वर्षश्राद्ध करतात. काही वेळा नागपंचमीला किंवा दसऱ्याला श्राद्ध करतात.

पश्चिम खानदेशातील राऊळ – सुमारे आठशे वर्षांपूर्वी चितोड आणि अबू येथून हे लोक खानदेशात आले. घरातील कर्त्या पुरुषाची रावळ ही उपाधी आहे, असे हे लोक मानतात. हे लोक राजपुतांचेच वंशज असावे, असे वाटते. कारण त्यांच्या मुलांना राजपूत राजघराण्यातील मुलांप्रमाणे कुंवर म्हणतात. त्यांच्यांत विधवाविवाहाला बंदी आहे आणि त्यांची गोत्रनामे राजपूत लोकांप्रमाणे आहेत. आपले मूळ स्थान सोडून ते इकडे का आले, ते मात्र समजत नाही.

बहुतेक लोक शेती करतात. काही लोकांना मोठमोठ्या जमिनी इनाम मिळालेल्या आहेत.

यांचे एकूण शहाण्णव पोटभेद आहेत, असे सांगतात. पण चव्हाण, चित, धवल, डोरिक, जाधव, कुंभे, परमार, सोळंकी, इ. काही पोटभेदच या भागात आढळतात.

विवाहप्रथा – यांच्यांत मामे बहिणीशी लग्न होऊ शकते, पण आते आणि मावस बहिणीशी मात्र होत नाही. लग्नापूर्वी काही दिवस साखरपुडा करतात. त्या वेळी वराकडील मंडळी वधूच्या हातात साखरेचा पुडा देतात. लग्नाच्या वेळी अंतरपाट बाजूला केल्यावर वधू-वर एकमेकांचे दोन्ही हात हातात धरतात. मग ती दोघे परस्परांना कणकेच्या लाडवाचे पाच घास भरवतात. बाकीचा लग्नविधी महाराष्ट्रातील इतर राऊळ लोकांच्या लग्नविधीसारखाच असतो. चित आणि डोरिक राऊळ कपाळावर बाशिंग बांधीत नाहीत.

हे लोक महादेव, गणपती, विठोबा, कृष्ण, देवी, खंडोबा व त्रिशूळ यांची पूजा करतात. दक्षिणी किंवा गुजराती ब्राह्मण यांचे पुरोहित असतात. गोसावी हे त्यांचे धार्मिक बाबतीतील गुरू असतात. चित व डोरिक राऊळ मुलांच्या मुंजी करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात. त्यापूर्वी वडाच्या किंवा पिंपळाच्या पानाने मृताच्या तोंडात थोडे पाणी घालतात. अकराव्या दिवशी माणूस ज्या ठिकाणी मरण पावला, तिथे एक लहान खड्डा खणून त्यात एक जिवंत मासा पुरतात. मग त्या खड्ड्यावर थोडे तांदूळ गोलाकार पसरतात, त्या वर्तुळावर अकरा दिवे आणि अकरा भाकऱ्या ठेवतात व त्या सर्वांची पूजा करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे लोक मृताचे श्राद्ध करतात व महालयही करतात. [ट्रा. का. बाँ.; रा. जा.; ग्लॉ. ट्रा. पं. नॉ. प्रॉ.]

रावळ राजवंश चितोड येथे राज्य करणारा एक वंश. इ. स. च्या १२ शतकाच्या उत्तरार्धात गुहिलोत वंशातील राजा रर्णसिह (कर्णसिंह) चितोड येथे राज्य करीत होता. म्हणसिंह, क्षेमसिंह, माहप व राहप या नावांचे चार पुत्र त्याला होते. रणसिंहाच्या पश्चात क्षेमसिंह चितोडच्या गादीवर बसला. माहपाला शिसोदा गावाची जहागिरी मिळाली. त्याने तिथे स्वतंत्र राज्य स्थापले. मात्र तो चितोडचा सामंत म्हणूनच राज्य करीत होता. अशा प्रकारे गुहिलोत वंशाच्या दोन शाखा झाल्या. क्षेमसिंहाच्या वंशाला रावळ हे नाव मिळाले आणि माहपाचा वंश राणा या नावाने ओळखला जाऊ लागला. हा राणा वंश पुढे शिसोदिया या नावाने प्रख्यात झाला.

क्षेमसिंहापासून चितोडची रावळ शाखा सुरू होते. त्याला सामंतसिंह व कुमारसिंह हे दोन पुत्र होते. क्षेमसिंहानंतर सामंतसिंह गादीवर आला. त्याने इ. स. ११७४ च्या सुमारास गुजरातचा सोळंकी राजा अजयपाल याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला, असे म्हणतात. पुढे त्याने आपल्या सरदारांच्या जहागिरी जप्त केल्यामुळे ते त्याच्यावर रुष्ट झाले. अशा परिस्थितीत नाडोलचा चौहान राजा कीर्तिपाल याने मेवाडवर स्वारी करून चितोडगड घेतला, तेव्हा सामंतसिंह बागड (डूंगरपूर–बांसवाडा) देशात गेला व तिथे त्याने राज्य स्थापले. मेवाडवर काही वर्षे चौहानांचे राज्य राहिले. पण सामंतसिंहाचा धाकटा भाऊ कुमारसिंह याने लवकरच गुजरातचा राजा भीमदेव सोळंकी व शिसोद्याचा राणा भुवनपाल यांच्या साह्याने मेवाडचे राज्य परत जिंकून घेतले.

कुमारसिंहानंतर त्याचा पुत्र मथनसिंह व त्याचा पुत्र पद्मसिंह यांनी राज्य केले. त्यानंतर इ. स. १२१३ मध्ये पद्मसिंहाचा पुत्र जैत्रसिंह राजा झाला. तो अत्यंत पराक्रमी व कर्तबगार होता. दिल्लीचा सुलतान शमसुद्दीन इल्तमश याने मेवाडवर स्वारी करून नागदा घेतल्यामुळे जैत्रसिंहाने चितोडगड येथे राजधानी स्थापली. त्यानंतर मात्र जैत्रसिंहाने त्याचा पराभव केला. सिंधचा सुलतान जलालुद्दीन खार्जमी याचा सरदार खवासखां याने अणहिलवाडवर स्वारी करून मेवाडकडे मोर्चा वळवला, तेव्हा जैत्रसिंहाने त्याच्यावर आपले सैन्य पाठवून त्याचा पराभव केला. जैत्रसिंहाने मारवाड, गुजरात, माळवा, जांगलदेश व नाडोल येथील राजांचाही पराभव केला. दिल्लीचा सुलतान नासिरुद्दीन याने चितोडवर स्वारी करून ७-८ महिने वेढा घातला होता. पण त्याला यश मिळाले नाही. जैत्रसिंहाने इ. स.१२५२ पर्यंत राज्य केले असावे. त्याच्या नंतर त्याचा पुत्र तेजसिंह हा राजा झाला. तोही जैत्रसिंहाप्रमाणेच पराक्रमी होता. गुजराथचा राजा बीसलदेव वाघेला याने मेवाडवर स्वारी केली, तेव्हा तेजसिंहाने त्याचा पराभव केला. त्याने परमभट्टारक, महाराजाधिराज व परमेश्वर या पदव्या धारण केल्या होत्या. त्याच्या नंतर त्याचा पुत्र समरसिंह गादीवर आला. तोही मोठा पराक्रमी व धर्मात्मा होता. दिल्लीचा सुलतान बल्बन याच्या सैन्याने गुजरातवर स्वारी केली, तेव्हा समरसिंह धावून गेला व त्याने गुजरातचे रक्षण केले. तो स्वतः शिवोपासक होता, पण त्याची माता जयतलदेवी हिचा जैन धर्माकडे कल असल्यामुळे त्याने जैन पंडितांचा सत्कार केला; जैन मठांना व मंदिरांना देणग्या दिल्या आणि राज्यात प्राणिहत्येला बंदी केली.

समरसिंहाने इ. स. १३०१ पर्यंत राज्य केले. त्याच्या नंतर त्याचा पुत्र रत्नसिंह (प्रथम) हा गादीवर बसला. त्याचा दुसरा पुत्र कुंभकर्ण नेपाळात गेला व तिथे त्याने राज्य स्थापले, असे म्हणतात. तोच नेपाळच्या राजवंशाचा मूळपुरुष मानला जातो.

समरसिंहानंतर त्याचा पुत्र रत्नसिंह चितोडच्या गादीवर बसला; पण त्याला फार वर्षे राज्य करता आले नाही. इ. स. १३०३मध्ये अलाउद्दीन खिलजीने मेवाडवर स्वारी केली, तिथला बराच प्रदेश उद्ध्वस्त केला व चितोडगडाला वेढा दिला. त्या वेळी शिसोदा येथील सामंत राणा लक्ष्मणसिंह आपल्या सात पुत्रांसह चितोडगडावर आलेला होता. रत्नसिंहाची पत्नी राणी पद्मिनी अत्यंत रूपवती होती व तिच्या प्राप्तीसाठी अलाउद्दीनाने चितोडगडावर स्वारी केली, अशी आख्यायिका प्रचलित आहे. पण ती केवळ काल्पनिक असून, तिला ऐतिहासिक आधार नाही. गडाला वेढा पडल्यानंतर रत्नसिंहाने सुमारे सहा महिने गड लढवला. पण गडावरील अन्नसामग्री संपत आली आणि बाहेरून कोणीही त्याच्या मदतीला धावून आले नाही. तेव्हा राणी पद्मिनीने अनेक राजस्त्रियांसह अग्निप्रवेश केला. पाठोपाठ रावळ रतनसिंहाने केशरी वस्त्रे धारण करून हजारो सैनिकांसह शत्रूवर जोरदार हल्ला चढवला. त्या घनघोर संग्रामात स्वतः रतनसिंह मारला गेला व त्याच्या शूर सैनिकांनाही वीर मरण मिळाले. त्यानंतर वृद्ध लक्ष्मणसिंहानेही आपल्या सात पुत्रांसह युद्धात आवेशाने भाग घेतला. पण तेही सर्वजण धारातीर्थी पडले. शेवटी अलाउद्दीन खिलजीने चितोडगड जिंकला आणि तिथे आपला मुलगा खिजरखां याला मेवाडचा सुभेदार म्हणून ठेवले.

अशा प्रकारे मेवाडच्या रावळ वंशाचा अंत झाला. इ. स. च्या १३ व्या शतकात दिल्लीच्या सुलतानांची सत्ता प्रबळ झाली होती. त्यांनी मेवाडवर अनेक स्वाऱ्या केल्या, पण रावळ राजांनी त्यांचा पराभव करून आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण केले. इतके

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नव्हे; तर आसपासच्या हिंदू राज्यांचे स्वातंत्र्यही अबाधित राखले. त्या शतकात मेवाडचे वैभव बरेच वाढले. [राजपुताने का इतिहास, भाग १–जगदीशचंद्र गहलोत, १९३७; रा. रा. उ. न्हा.]

रावुळो ओडिसा प्रदेशातील एक जात. यांच्यांत रावुळो, माळी व मुनी अशा तीन पोटजाती आहेत. हे तिथल्या मंदिरांमध्ये सेवकाचे काम करतात. हे लोक शैवपंथी देवालयात आणि ब्राह्मणांच्या विवाहसमारंभात शंख वाजवतात. शिवाय ते फुले विकण्याचाही व्यवसाय करतात. मात्र ते आपल्याला माळी व मुनी यांच्याहून श्रेष्ठ समजतात. माळी इसम शैवपंथी अथवा वैष्णवपंथी देवालयात चाकरी करतात आणि फुले विकतात. परंतु मुनी लोक केवळ ग्रामदेवतांच्या मंदिरातच सेवाचाकरी करतात.

यांच्यांत सक्तीचा बालविवाह असतो, पण विधवाविवाहाला परवानगी असते. घटस्फोट घेताना त्यांना एक विचित्र प्रकारची शिक्षा भोगावी लागते. यांच्यांत मासे पकडण्याचा एक पिंजरा असतो. घटस्फोट घेणाऱ्या जोडप्यापैकी नवऱ्याला त्या पिंजऱ्याखाली आणि बायकोला त्या पिंजऱ्याच्या वर बसवतात. नंतर प्रेत स्मशानात नेण्यापूर्वी ते जिथे ठेवून त्यावर पाच घागरी पाणी ओततात, तिथे तो पिंजरा ठेवतात आणि त्या पति-पत्नींवर पाच घागरी पाणी ओततात. नंतर स्त्री स्वयंपाकाचे एक मडके फोडते, हातांतल्या बांगड्या वाढवते आणि गळसरी तोडून टाकते. मग ती आपल्या बापाच्या घरी जाऊन पुर्नविवाह करते.

काही रावुळो जानवे घालतात. त्यांना ब्राह्मण पुरोहित लागतो. ते मासे व मांस खातात, पण त्यांना कोंबड्याचे मांस चालत नाही. ते दारू पीत नाहीत. मुनी लोक शिव-शक्ती, गणेश, सूर्य यांना भजतात. सारला दास नावाच्या एका मुनीने महाभारताचे ओडिया भाषेत केलेले भाषांतर फार लोकप्रिय आहे. सारलाला ते शूद्र संत म्हणून ओळखतात. [का. ट्रा. स. इं.]

राशिव्रत एक काम्य व्रत. कार्तिक मासाच्या पौर्णिमेपासून या व्रताला आरंभ करतात. याचा विधी असा — पहिल्या पौर्णिमेला नक्त भोजन करावे व सोन्याचा एक मेंढा करून दान द्यावा. मार्गशीर्ष पौर्णिमेला राजाचे दर्शन घेऊन बैलांची जोडी दान द्यावी. अशा प्रकारे वर्षअखेरच्या पौर्णिमेला एका राशीचे दान द्यावे. फल – ग्रहांचे अनिष्ट परिणाम टळतात आणि सर्व मनोरथ पूर्ण होऊन सोमलोक मिळतो. [हि. ध.]

राशी क्रान्तिवृत्ताचे समसमान बारा भाग कल्पिलेले आहेत, त्यांना राशी असे म्हणतात. क्रान्तिवृत्ताचे एकूण ३६० अंश असल्यामुळे प्रत्येक राशीचे ३०–३० अंश होतात. हे विभाग गणिताच्या सोयीसाठी आहेत, म्हणून त्यांना विभागात्मक राशी असे म्हटले आहे. विभागात्मक राशी म्हणजे क्रान्तिवृत्त मोजण्याची मोजपट्टीच होय. सूर्यमार्गावरचे हे ३० अंशावरचे टप्पे ध्यानात ठेवण्यासाठी त्या मार्गावरच्या काही ठळक तारका प्रत्येक विभागात आकृतिबद्ध करून, तशा बारा आकृती कल्पिण्यात आल्या आहेत. त्यांना तारात्मक राशी असे म्हणतात. या तारात्मक राशींची नावे अशी – (१) मेष, (२) वृषभ, (३) मिथुन, (४) कर्क, (५) सिंह, (६) कन्या, (७) तूळ, (८) वृश्चिक, (९) धनू, (१०) मकर, (११) कुंभ व (१२) मीन.

तारात्मक राशींची गणना अश्विन्यादी नक्षत्रांना धरून केलेली आहे. प्रत्येक नक्षत्राचे चार चरण म्हणजे चार भाग पाडलेले आहेत. त्यामुळे नऊ चरणांची म्हणजेच सव्वादोन नक्षत्रांची मिळून एक राशी बनते. हे कोष्टक पुढीलप्रमाणे–

(१) अश्विनी, भरणी व कृत्तिकांचा पहिला चरण - मेष.
(२) कृत्तिकांचे तीन चरण, रोहिणी व मृगाचे पहिले दोन चरण - वृषभ.
(३) मृगाचे पुढचे दोन चरण, आर्द्रा व पुनर्वसूंचे पहिले तीन चरण - मिथुन.
(४) पुनर्वसूंचा चौथा चरण, पुष्य व आश्लेषा - कर्क.
(५) मघा, पूर्वा व उत्तरेचा पहिला चरण - सिंह.
(६) उत्तरेचे पुढचे तीन चरण, हस्त व चित्रेचे पहिले दोन चरण - कन्या.
(७) चित्रेचे पुढचे दोन चरण, स्वाती व विशाखांचे पहिले तीन चरण - तूळ.
(८) विशाखांचा चौथा चरण, अनुराधा व ज्येष्ठा - वृश्चिक.
(९) मूळ, पूर्वाषाढा व उत्तराषाढांचा पहिला चरण - धनू.
(१०) उत्तराषाढांचे पुढचे तीन चरण, श्रवण व धनिष्ठेचे पहिले दोन चरण - मकर.
(११) धनिष्ठेचे पुढचे दोन चरण, शततारका व पूर्वा भाद्रपदेचे पहिले तीन चरण - कुंभ.
(१२) पूर्वा भाद्रपदेचा चौथा चरण, उत्तरा भाद्रपदा व रेवती – मीन.

फलज्योतिषात राशी, नक्षत्रे व ग्रह यांच्या संयोगाने फलादेश सांगितलेला असतो. राशीचे फल तिच्या स्वामीवरूनही विचारात घेतले जाते. मेषादिक्रमाने हे राशींचे स्वामी असे—
(१) मंगळ, (२) शुक्र, (३) बुध, (४) चंद्र, (५) रवी, (६) बुध, (७) शुक्र, (८) मंगळ (९) गुरु, (१०) शनी (११) शनी व (१२) गुरु.

चर, स्थिर व द्विस्वभाव असे राशींचे स्वभावही कल्पिलेले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. ते मेषादिक्रमाने समजावे. मेष, कर्क, तूळ, मकर–चर.

जन्मलग्नकुंडलीत राशी ज्या स्थानी येतात, त्या स्थानांचे व राशींचे मिळून फल विचारात घेतले जाते. ग्रह आपल्या राशीत, मित्रराशीत व उच्च राशीत चांगले फल देतात आणि नीच राशीत व शत्रुराशीत वाईट फल देतात.

पंचांगात चंद्र व सूर्य यांच्या राशी दिलेल्या असतात. पंचांगातल्या शेवटच्या स्तंभात जी राशींची नावे दिलेली असतात, ती चंद्राचे राशिभ्रमण सांगणारी असतात. याव्यतिरित पंचांगात ' मेषेऽर्कः ', ' वृषभेऽर्कः ' असे एखाद्या तिथीच्या कोष्टकाबाहेर लिहिलेले असते, त्या सौर राशी होत. ' मेषेऽर्कः ' म्हणजे सूर्याने मेष राशीत प्रवेश केला, असा त्याचा अर्थ होय. एका वर्षात सूर्य बारा राशींतून भ्रमण पूर्ण करतो.

भारतीय वेदांग ज्योतिष हे २७ नक्षत्रांवर आधारलेले आहे. त्यात राशींचा उल्लेख नाही. महाभारतात राशींचा उल्लेख न येता नक्षत्रांचाच उल्लेख येतो. म. भा. मध्ये बलराम म्हणतो, की ' मी तीर्थयात्रेला पुष्य नक्षत्रावर गेलो व श्रवण नक्षत्रावर परत आलो. ' बौद्ध त्रिपिटिकातही राशींचे उल्लेख नसून नक्षत्रांचेच आहेत. बौद्धांचे बरेचसे ग्रंथ बुद्धाच्या निर्याणानंतर (सन पूर्व ४७५) आणि अशोकाच्या कालापर्यंत तयार झाले आहेत. तेव्हा भारतीय ज्योतिषात राशींचा उल्लेख अशोकानंतर झाला असावा, असे मानण्यास जागा आहे. राशींची कल्पना भारतीय ज्योतिष्यांनी ग्रीक ज्योतिष्यांकडून स्वीकारली, याविषयी बहुतेक विद्वानांचे एकमत आहे. स. पू. ६ व्या शतकात पर्शियन सम्राट दरायस याने पंजाबवर स्वारी केली होती. त्यानंतरच्या काळात ग्रीक ज्योतिषी व भारतीय ज्योतिषी यांचा शतकानुशतके संपर्क आला. ग्रीकांचे ज्योतिर्गणित राशींवर आधारलेले होते. भारतीय ज्योतिष्यांनी त्यांची राशिकल्पना स्वीकारली आणि आपल्या ज्योतिषग्रंथात सामावून घेऊन राशीवरून फलादेश वर्तवायला सुरुवात केली. स. पू. ४२५ वर्षे हा भारतात राशी प्रचारात येण्याचा काळ होय, असे शं. बा. दीक्षित मानतात; तर स. पू. दोनशे वर्षांच्या सुमारास भारतात राशी प्रचारात आल्या, असे श्री. चिं. वि. वैद्य मानतात. या काळानंतरचे सर्व ज्योतिर्ग्रंथ राशींवर आधारून लिहिलेले आहेत.

राशींचे सायन–निरयण असे आणखी दोन भेद आहेत. वर अश्विन्यादी गणनेला धरून ज्या राशी दिल्या आहेत, त्या निरयणराशी होत. निरयण याचा अर्थ गती नसणारा, न चळणारा असा होतो. निरयण पद्धतीत मेष राशीची सुरुवात ही क्रान्तिवृत्तावरच्या एकाच ठाम बिंदूपासून होते.

वसंतसंपातबिंदूपासून किंवा स्थूल मानाने सांप्रतच्या उ. भाद्रपदांपासून जे ३०–३० अंशांचे अंतर, त्यालाही राशी असेच नाव आहे. मात्र हा वसंत संपातबिंदू हळूहळू आपली जागा सोडून दर हजार वर्षांत सुमारे १३ अंश पश्चिमेकडे सरकत असतो. त्याच्या बरोबरच या ३०–३० अंशांच्या राशीही पश्चिमेकडे चळत जातात. म्हणून त्यांना सायन (गतियुक्त) राशी म्हणतात.

आपल्या पंचागांतून सायन राशी न वापरता निरयणच वापरतात. [पं. ज्यो. शा.; म. भा. उ.; भा. ज्यो. शा.]

राष्ट्रकूट राजवंश महाराष्ट्रात राज्य करणारा एक प्राचीन वंश. प्राचीन काळी राष्ट्रकूट या नावाची अनेक घराणी भारताच्या निरनिराळ्या भागांत उदयाला आली होती. त्यांचा परस्परांशी काही संबंध होता, असे निश्चयाने सांगता येत नाही. पूर्वी राष्ट्रकूट हे एक अधिकारपद होते. राज्याच्या मोठ्या विभागाला राष्ट्र म्हणत. उदा० गोपराष्ट्र. अशा अनेक राष्ट्रांचा मिळून महाराष्ट्र झाला होता. ज्याप्रमाणे ग्रामकूट म्हणजे ग्रामाचा मुख्य (पाटील), त्याचप्रमाणे राष्ट्रकूट म्हणजे राष्ट्र या विभागाचा प्रशासक होय. कालांतराने त्यांतील कांही राष्ट्रकूट प्रबळ होऊन त्यांनी स्वतंत्र राज्ये स्थापली. त्यामुळे त्यांची कुळे राष्ट्रकूट या नावाने प्रख्यात झाली. त्यांचे उल्लेख प्राचीन ताम्रपटांत आढळतात. देशमुख, देशपांडे, पेशवे, ही उपनामे जशी अधिकारपरत्वे प्रचलित झाली, तसेच राष्ट्रकूट हे नाव त्यानंतर काही कुळांना मिळाले. अशी घराणी लातूर, वेरूळ, सोलापूर, अचलपूर, इ. ठिकाणी स्थायिक झालेली होती.

मानपूरचे राष्ट्रकूट – सर्वांत प्राचीन राष्ट्रकूट घराणे इ. स.च्या ४ थ्या ५ व्या शतकात कृष्णा नदीच्या खोऱ्यात उत्कर्ष पावले. त्या घराण्यातील मानांक नामक पुरुषाने मानपूर हे नगर वसवून तिथे आपली राजधानी स्थापली. या राजवंशाचे ताम्रपट कोल्हापूरच्या व दौंडच्या जवळपास सापडले आहेत. या प्रदेशाचा अंतर्भाव प्राचीन कुंतल देशात होत असे. एका ताम्रपटात मानांकाला ' कुन्तलानां प्रशासिता ' असे म्हटले आहे. श्री. वा. वि. मिराशी यांच्या मते मानांक हा कुंतल देशावर राज्य करीत होता व त्याची राजधानी मानपूर म्हणजे सातारा जिल्ह्यातील माणगंगा नदीच्या काठावरील माणगाव असावे. मानांकाने अश्मक व विदर्भ हे प्रदेश जिंकले होते, असेही एका ताम्रपटात म्हटले आहे. वाकाटक व मानपूरचे राष्ट्रकूट यांची राज्ये जवळ जवळ असल्यामुळे त्यांच्यामध्ये नेहमी संघर्ष होत असावे आणि त्यांचाच उल्लेख वरील ताम्रपटात केलेला असावा. वाकाटक राजा विंध्यसेन व राष्ट्रकूट राजा मानांक हे समकालीन असावे, असे अनुमान श्री. मिराशी यांनी केले आहे. त्यावरून मानपूरचे राष्ट्रकूट घराणे इ. स.च्या ४ थ्या शतकाच्या उत्तरार्धात उदयाला आले, असे मानता येईल.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गानांकाचा मुलगा देवराज हा इ. स. च्या ५ व्या शतकाच्या आरंभी गादीवर आला. त्या वेळी चंद्रगुप्त द्वितीय (विक्रमादित्य) याचे विशाल साम्राज्य भारतात पसरले होते. वाकाटक व राष्ट्रकूट राजे त्याचे सामंत होते.

देवराजाला विभुराज, अविधेय व भविष्य असे तीन पुत्र होते. त्यांनी व भविष्याचा पुत्र अभिमन्यू यांनी मानपूर येथे



इंद्रसभा, जैन लेणे—वेरूळ

सुमारे १०० वर्ष राज्य केले असावे. वाकाटक नृपती हरिषण याच्या नंतर वाकाटकांची सत्ता नामशेष झाल्यामुळे राष्ट्रकूटांचे सामर्थ्य वाढले असावे. बेळगाव जिल्ह्यातील गोकाक या गावी राष्ट्रकूट राजा देज्जराज याच्या वेळचा एक ताम्रपट सापडला आहे. तो इ. स. ५३२–३३ या वर्षातला असावा, असे अनुमान करता येते. हा देज्जराज अभिमन्यूचा वंशज असावा. मात्र त्यानंतरच्या राष्ट्रकूट राजांची माहिती मिळत नाही. चालुक्य राजांनी ज्यांचा पराजय केला, त्यांत या राष्ट्रकूटांचा उल्लेख नाही. बहुधा मौर्य किंवा नळ राजांनीच राष्ट्रकूटांचा प्रथम पराभव करून त्यांचे राज्य घेतले असावे.

विदर्भाचे राष्ट्रकूट – विदर्भातील अकोला, नगरधन व मुलताई येथे सापडलेल्या ताम्रपटांवरून या राष्ट्रकूट घराण्याची माहिती मिळते. हे घराणे प्रथम कलचुरींचे मांडलिक म्हणून इ. स. च्या ६ व्या शतकात उदयाला आले. आरंभी त्यांची राजधानी नंदिवर्धन (रामटेक जवळचे नगरधन) येथे होती. नंतर ती अमरावती जिल्ह्यातील अचलपूर येथे गेली. पुढे पद्मनगर ही राजधानी झाली.

अकोला येथील ताम्रपट राष्ट्रकूट वंशातील नन्नराजाने दिलेला आहे. त्या ताम्रपटात दुर्गराज – गोविंदराज – स्वामिकराज – नन्नराज, अशी त्याची वंशावळ दिली आहे. हा ताम्रपट इ. स. ६९३ या वर्षातला आहे. नन्नराजाचा दुसरा ताम्रपट मुलताई येथे सापडला असून, तो इ. स. ७०९ मधील आहे. त्यावरून नन्नराज इ. स. ६९० च्या सुमारास गादीवर आला असावा. त्याचा पणजा दुर्गराज इ. स. ६५० च्या आगेमागे होऊन गेला असावा. इ. स. च्या ७ व्या शतकाच्या आरंभी कलचुरींची साम्राज्यसत्ता नष्ट होऊन चालुक्य उदयाला आले व विदर्भ चालुक्यांच्या साम्राज्यात समाविष्ट झाला. नन्नराज हा चालुक्यांचा मांडलिक होता.

इ. स. च्या ८ व्या शतकात चालुक्यांची सत्ता दुबळी झाल्यानंतर तिसरे राष्ट्रकूट घराणे प्रबळ झाले व विदर्भ त्या राष्ट्रकूटांच्या साम्राज्याचा भाग बनला. म्हणजे विदर्भातील राष्ट्रकूट घराणे त्या राष्ट्रकूटांचे मांडलिक झाले. इ. स. च्या १० व्या शतकाच्या आरंभी अचलपूर येथे राष्ट्रकूट राजा कर्कर सामंत म्हणून राज्य करीत होता. तो त्याच घराण्यातला असावा.

मान्यखेटचे राष्ट्रकूट – तिसरे राष्ट्रकूट घराणे इ. स. च्या ७ व्या शतकात उदयाला आले. त्याची राजधानी आरंभी मयूरखंडी ही असावी. नासिकजवळचे मोरखेड म्हणजेच मयूरखंडी, असे काही पंडितांचे मत आहे. या घराण्याचा मूळ पुरुष दंतिवर्मा हा इ. स. च्या ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात त्या प्रदेशाचा प्रशासक (राष्ट्रकूट) असावा. त्या प्रदेशावर त्या वेळी बादामीच्या चालुक्यांची सत्ता होती. सुमारे १२५ वर्षे हे घराणे चालुक्यांच्या सत्तेखाली नांदले. दंतिवर्म्यानंतर इंद्र (१ ला), गोविंद (१ ला), कर्क (१ ला), इंद्र (२ रा) व दंतिदुर्ग किंवा दंतिवर्मा (२ रा) हे प्रशासक त्या कालखंडात झाले. हे घराणे मूळचे लट्टलूरचे म्हणजे उस्मानाबाद जिल्ह्यातील लातूरचे असावे. तिथून त्या घराण्याचे लोक मयूरखंडीला प्रशासक म्हणून गेले असतील. चालुक्य राजा पुलकेशी (२ रा) याच्या मृत्यूनंतर काही काळ चालुक्यांची सत्ता डळमळीत होती, तेव्हा या राष्ट्रकूट घराण्यातील गोविंदराजाने स्वतंत्रपणे राज्यकारभार सुरू केला असावा. दंतिदुर्गाचा पिता इंद्र (१ ला) याच्या वेळी या घराण्याचा बराच उत्कर्ष झालेला दिसतो. चालुक्य घराण्यातील एका राजकन्येशी इंद्रराजाचा विवाह झाला होता. त्यांचा पुत्र दंतिदुर्ग याने चालुक्यांचा पराभव करून आपली सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली. याचे शिलालेख व ताम्रपट वेरूळजवळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सापडले आहेत. त्यावरून त्याची राजधानी त्या प्रदेशात कुठेतरी असावी, असे अनुमान केले जाते. दंतिदुर्गाच्या पूर्वजांचे कालखंड साधारणपणे पुढीलप्रमाणे असावे—दंतिवर्मा (इ. स. ६२० ते ६३०); इंद्र (१ ला) (इ. स. ६३०–६५०), गोविंद (१ ला) (६५०–६७०), कर्क (१ ला) (६७०–६९०), इंद्र (२ रा) (६९०–७१०).

दंतिदुर्ग (इ. स. ७१०–७५७) – आपल्या पूर्वजांप्रमाणे हा देखील प्रारंभी चालुक्यांचा सामंतच होता. चालुक्य राजा विक्रमादित्य (२ रा) याने इ. स. ७३८ मध्ये गुजरातवर स्वारी करून अरबी आक्रमकांचा फार मोठा पराभव केला. दंतिदुर्गाने त्या युद्धात भाग घेऊन मोठा पराक्रम केला. त्याचप्रमाणे चालुक्यांनी कांचीच्या पल्लवांचा इ. स. ७४३ मध्ये पराभव केला, त्याचेही बरेच श्रेय दंतिदुर्गाला दिले जाते. इ. स. ७४७ मध्ये चालुक्य विक्रमादित्य मरण पावल्यानंतर दंतिदुर्गाने उत्तरेकडे आक्रमण सुरू केले आणि नांदिपुरीच्या गुर्जरांचा पराभव करून तिथे आपला पुतण्या कर्क याला प्रशासक नेमले. नंतर त्याने मध्यभारतावर स्वारी करून तिथेही आपले वर्चस्व प्रस्थापित केले. उज्जयिनी येथे त्याने हिरण्यगर्भदानाचा समारंभ केला होता. अशा प्रकारे इ. स. ७५० पर्यंत दंतिदुर्गाने गुजरात व मध्यभारत हे दोन्ही प्रदेश व्यापले. चालुक्य सम्राट कीर्तिवर्मा (२ रा) याने दंतिदुर्गाच्या वाढत्या सत्तेला आळा घालण्यासाठी मोठे सैन्य पाठवले. पण खानदेशात दंतिदुर्गाने त्याचा पराभव केला. या विजयामुळे इ. स. ७५३ पर्यंत दंतिदुर्ग संपूर्ण महाराष्ट्राचा स्वामी झाला आणि त्याने महाराजाधिराज, परमेश्वर व परमभट्टारक या पदव्या धारण केल्या. वेरूळ येथील दशावतार लेण्यांतील शिलालेखात त्याने कांची, कोसल, कलिंग, श्रीशैल, मालव, टंक व लाट (गुजरात) यांच्या नृपतींचा पराभव केला, असा निर्देश आहे. त्या शिलालेखात आणि समानगड येथील ताम्रपटात दंतिदुर्गाने चालुक्य सम्राटाचा पराभव केल्याचाही उल्लेख आहे. तो ताम्रपट इ. स. ७५४ मधला आहे. त्यानंतर लवकरच दंतिदुर्ग मरण पावला असावा. तो जसा सेनानी व मुत्सद्दी होता तसाच दानशूरही होता. त्यानेच दशावतार लेणे निर्माण केले. इ. स. ७५८ मध्ये त्याचा चुलता कृष्ण (१ ला) हा राजा झाल्याचे कळते.

कृष्ण (१ ला) (इ. स. ७५८ – ७७३)—दंतिदुर्गाने चालुक्य सम्राटाचा पराभव केला असला, तरी त्याची सत्ता नष्ट झाली नव्हती. कर्नाटकात त्याचे राज्य चालू होते. कीर्तिवर्म्याने राष्ट्रकूटांचा बंदोबस्त करण्यासाठी पुन्हा सैन्याची जमवाजमव सुरू केली. पण कृष्णराजाने त्याचा असा दारुण पराभव केला, की त्यामुळे इ. स. ७६०पर्यंत चालुक्यांची राजसत्ता पूर्णतया नष्ट झाली. कृष्णराजाने म्हैसूरच्या गंग राजांवर स्वारी करून इ. स. ७७२ मध्ये मान्यपुरम ही त्यांची राजधानी जिंकली.



द्वारपाल, धुमार लेणे – वेरूळ

त्यानंतर युवराज गोविंद याने वेंगीचा चालुक्य राजा विष्णुवर्धन (४ था) याचा पराभव करून ते राज्यही राष्ट्रकूटांच्या सत्तेखाली आणले. विष्णुवर्धनाची राजकन्या शीलभट्टारिका हिचे गोविंदाचा धाकटा भाऊ ध्रुव याच्याशी लग्न झाले.

कृष्णराजाने राहप नामक राजाचा पराभव केल्याचा उल्लेख मिळतो. पण हा राहप राजा कुठला ते मात्र समजत नाही. कृष्णराजाने दक्षिण कोकणावरही सत्ता स्थापली व सणफुल्ल नामक शिलाहार पुरुषाला तिथला प्रशासक नेमले. तोच शिलाहारांचा मूळ पुरुष होय. मध्य प्रदेशातील मराठीभाषी सर्व प्रदेश राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात होता, असे भांडक येथील ताम्रपटावरून कळते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृष्णराज (१ ला) जसा उत्तम राज्यकर्ता, कुशल सेनानी व पराक्रमी होता, तसाच तो शिल्पकलेचा पुरस्कर्ताही होता. वेरूळचे कैलास लेणे त्याच्याच आज्ञेवरून खोदलेले आहे. त्याने शुभतुंग व अकालवर्ष या पदव्या धारण केल्या होत्या.

गोविंद (२ रा) (इ. स. ७७४–७७९)– कृष्णराजानंतर त्याचा ज्येष्ठ पुत्र गोविंद सिंहासनावर बसला. त्याने काही यशस्वी स्वाऱ्या करून साम्राज्य राखल्याचे उल्लेख आहेत. पण लवकरच भोगविलासात मग्न होऊन त्याने धाकटा भाऊ ध्रुव याच्यावर राज्यकारभार सोपवला. ध्रुवाच्या हाती सर्व सत्ता मिळाल्यानंतर त्याने गोविंद (२ रा) याला पदच्युत करून स्वत: सिंहासन बळकावले.

ध्रुव – हा इ. स. ७८० मध्ये सिंहासनावर बसला असावा. त्याने निरुपम कालीवल्लभ, धारावर्ष व श्रीवल्लभ या पदव्या धारण केल्या होत्या. दोघा भावांच्या संघर्षात ज्या राजांनी गोविंदराजाला साहाय्य केले होते, त्यांच्या विरुद्ध ध्रुवराजाने मग शस्त्र धरले. प्रथम त्याने गंगराजा श्रीपुरुषमुत्तरस याचा पराभव करून गंगवाडी राष्ट्रकूटांच्या साम्राज्यात समाविष्ट केली. त्यानंतर त्याने पल्लव राजा दंतिवर्मा व वेंगीचा चालुक्य राजा विष्णुवर्धन (४ था) यांच्यावर स्वाऱ्या केल्या. त्या दोघांनी ध्रुवराजाशी तह करून राष्ट्रकूटांचे प्रभुत्व मान्य केले. अशा प्रकारे द. भारतात राष्ट्रकूटांचे साम्राज्य प्रस्थापित झाले.

त्या वेळी उ. भारतात गुर्जर-प्रतीहार राजा वत्सराज आणि बंगालचा राजा धर्मपाल यांच्यांत कनौजच्या स्वामित्वासाठी युद्धे चालू होती. कनौजचा राजा इंद्रायुध हा गुर्जर-प्रतीहारांचा सामंत म्हणून राज्य करीत असताना धर्मपालाने कनौजवर इ.स. ७८६ मध्ये दुसरी स्वारी केली. तेव्हा कनौजच्या रक्षणासाठी वत्सराज मोठे सैन्य घेऊन दुआबात गेला. त्याच वेळी राष्ट्रकूट सम्राट ध्रुव मोठ्या सैन्यदलानिशी नर्मदा नदी पार करून व माळवा पादाक्रांत करून कनौजकडे निघाला. त्यामुळे वत्सराजाला आपले सैन्य दुआबातून मागे घेऊन ध्रुवाला प्रतिकार करण्यासाठी दक्षिणेला यावे लागले. झांशीजवळ दोघांचे घनघोर युद्ध झाले आणि वत्सराजाचा दारुण पराजय झाल्यामुळे तो राजस्थानात पळून गेला. नंतर ध्रुवाने धर्मपालावर स्वारी करून त्याचाही पराजय केला. तोही आपली शुभ्र छत्रचामरे रणांगणावर सोडून पळून गेला. त्यानंतर ध्रुवराजा इ.स. ७९० मध्ये दक्षिणेत परत आला. तो वृद्ध झाला होता आणि दीर्घ काळ उत्तर भारतात दिग्विजय करता करता थकला होता. त्यामुळे त्या वेळी त्याने कनौजवर स्वारी केली नाही.

ध्रुवराजाला अनेक पुत्र होते; त्यांतील चौघांची माहिती मिळते. ते सगळे उत्तम प्रशासक होते. ज्येष्ठ पुत्र स्तंभ रणावलोक गंगवाडीचा प्रशासक होता. गोविंद व इंद्र यांनी उ. भारतावरील स्वारीत मोठी कामगिरी केली होती. मात्र ध्रुवराजाने तिसरा पुत्र गोविंद यालाच युवराज नेमले आणि लवकरच सिंहासन सोडले.

गोविंद (३ रा) (इ. स. ७९३–८१३) – हा इ. स. ७९३ मध्ये सिंहासनावर बसला. त्याने जगत्तुंग, प्रभूतवर्ष, श्रीवल्लभ, जनवल्लभ, कीर्तिनारायण व त्रिभुवनधवल या पदव्या धारण केल्या होत्या. त्याचा सर्वांत थोरला भाऊ स्तंभ काही काळ स्वस्थ बसला. मात्र जेव्हा त्याला अनेक सामंत व मित्र राजांनी साहाय्य करण्याचे आश्वासन दिले, तेव्हा तो सम्राटाविरुद्ध बंड करून उठला. पण गोविंदराजाने त्या सर्वांचा पराभव करून भावाला कैद केले. मात्र त्याने उदार मनाने भावालाच पुन्हा गंगवाडीचा प्रशासक नेमले व तोही शेवटपर्यंत गोविंदराजाशी एकनिष्ठ राहिला.

गंग राजपुत्र शिवमार हा राष्ट्रकूटांच्या कारावासात होता. त्याला गोविंदराजाने मुक्त केले होते. पण मुक्त होताच तो गोविंदराजाविरुद्ध स्तंभाला जाऊन मिळाला. पुढे दोघा भावांचे सख्य झाल्यावर त्याने गंगवाडीवर ताबा मिळवला. तेव्हा गोविंदराजाने त्याच्यावर स्वारी करून त्याला पकडले व पुन्हा बंदिवासात ठेवले.

गंगा, दशावतार लेणे – वेरूळ

पुढे गोविंदराजाने पल्लव नृपती दंतिग यालाही नमविले. वेंगीचा विष्णुवर्धन हा गोविंदराजाचा मामे आजा असल्यामुळे त्याने सम्राटाविरुद्ध हालचाल केली नाही. अशा प्रकारे इ. स. ७९५ पर्यंत गोविंदराजाची सार्वभौम सत्ता दक्षिणेत प्रस्थापित झाल्यानंतर त्याने उ. भारताकडे मोर्चे वळवले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यापूर्वी धर्मपालाने कनोजवर स्वारी करून तिथे चक्रायुधाला आपला सामंत म्हणून ठेवले होते. पण गुर्जर–प्रतीहार नागभट्ट याने धर्मपाल व चक्रायुध यांचा पराभव करून कनोज परत जिंकून घेतले. गोविंदराजाचा धाकटा भाऊ इंद्र हा गुजरात व माळवा या प्रदेशांचा प्रशासक होता. त्याला गोविंदराजाने विंध्य पर्वतराजीतील मार्गांवर लक्ष ठेवण्याचे काम दिले. राष्ट्रकूटांचे मुख्य सेनादल कनोजकडे गुंतले असताना नागभट्टाच्या सैन्याने दक्षिणेवर स्वारी करू नये म्हणून ही व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे मध्य भारतातही गोविंदराजाने काही सेनाविभाग ठिकठिकाणी ठेवले होते. त्या भागातील राजांनी मधेच उठाव करून राष्ट्रकूट सैन्याचा व दक्षिणेचा संबंध तोडू नये हा त्याचा उद्देश होता. अशी पूर्ण तयारी करून मग गोविंदराजाने कनोजवर स्वारी केली; पण नागभट्टाने त्याला वाटेतच रोखले. बुंदेलखंडात त्यांचे युद्ध होऊन गोविंदराजाचा विजय झाला व नागभट्ट राजस्थानात पळून गेला. कनोजचा राजा चक्रायुध व बंगालचा धर्मपाल दोघेही गोविंदराजाला शरण आले. गोविंदराजाने आणखी काही राजांचा पराभव करून हिमालयापर्यंत सैन्य नेले. तिकडून परत येताना त्याने मालव, कोसल, कलिंग, वंग, डाहल, ओड्रक हे प्रदेश पादाक्रांत केले, असे संजाणच्या ताम्रपटात सांगितलेले आहे.

गोविंदराजाची ही विजयी स्वारी इ. स. ८०० पर्यंत संपली, असे मानले जाते.

इ. स. ७९९ साली वेंगीचा विष्णुवर्धन मरण पावला व त्याचा पुत्र विजयादित्य (२ रा) गादीवर आला. तो राष्ट्रकूटांचे वर्चस्व मानण्यास तयार नव्हता. पण गोविंदराजाने त्याचा पराभव करून त्याच्या धाकट्या भावाला इ. स. ८०२ मध्ये गादीवर बसवले. गोविंदराज उत्तर भारतात स्वारीवर गेला असताना इकडे पल्लव, पांड्य, केरळ व गंग राजांनी त्याच्या विरुद्ध एक संघटना उभारली होती; पण उत्तर भारतातून परत येताच गोविंदराजाने त्यांच्यावर स्वारी करून इ. स. ८०२ मध्ये त्यांचाही पराभव केला. राष्ट्रकूटांच्या या विजयामुळे लंकेचा राजा घाबरला आणि त्याने गोविंदराजाकडे नजराणा पाठवून त्याची कृपा संपादण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे गोविंदराज (३ रा) हा राष्ट्रकूट वंशातील सर्वश्रेष्ठ सम्राट ठरला. तो अत्यंत शूर, धाडसी व रणकुशल सेनापती होता, तसाच थोर मुत्सद्दीही होता. त्याने कनोजपासून लंकेपर्यंत राष्ट्रकूटांची सार्वभौम सत्ता प्रस्थापित केली.

अमोघवर्ष (इ. स. ८१४–८७८) गोविंदराजानंतर त्याचा पुत्र शर्व किंवा अमोघवर्ष सिंहासनावर बसला. त्याने नृपतुंग, महाराजशंड, वीरनारायण व अतिशयधवल या पदव्या धारण केल्या. त्या वेळी तो केवळ १३-१४ वर्षांचा होता. गोविंदराजाचा भाऊ इंद्र याचा पुत्र कर्क याने काही वर्षे राज्यकारभार चालवावा, असे गोविंदराजाने योजले होते. त्याप्रमाणे दोन–तीन वर्षे राज्यकारभार नीट चालला‌ही. पण इ. स. ८१७ मध्ये वेंगीचा राजा विजयादित्य (२रा) याने अनेक सामंत व सरदार यांच्या मदतीने त्याच्या विरुद्ध युद्धाची आघाडी उभारली. त्यांच्या संघटित सेनादलापुढे अमोघवर्षाला हार खावी लागली. पण लवकरच कर्क याने बंडखोरांचा बंदोबस्त केला आणि इ. स. ८२१ मध्ये अमोघवर्षाला पुन्हा सिंहासनावर बसवले. त्यानंतर अमोघवर्षाने आपल्या साम्राज्याच्या भिन्न भिन्न प्रांतांत पुन्हा आपली सत्ता प्रस्थापित केली आणि इ. स. ८३० साली वेंगीवर स्वारी करून विजयादित्याचा पराजय केला. तेव्हापासून १२–१३ वर्षे वेंगीचे राज्य राष्ट्रकूटांच्या ताब्यात होते. इ. स. ८४५ च्या सुमारास विजयादित्याच्या एका सेनापतीने वेंगी नगर परत जिंकून घेतले.

अमोघवर्षाच्या राजवटीच्या पहिल्या वीस वर्षांच्या कालखंडात त्याचा गंग राजाशी सतत संघर्ष चालू होता. अखेरीस गंग राजाने आपले बहुतेक सर्व राज्य राष्ट्रकूटांपासून मुक्त केले. अमोघवर्षाने तिथे आपले प्रभुत्व स्थापण्याचा प्रयत्न केला नाही. पुढे इ. स. ८६० मध्ये अमोघवर्षाने आपली कन्या चंद्रोबलब्बे हिचा विवाह बूटुग नामक गंग राजपुत्राशी लावून दिला आणि तेव्हापासून दोन्ही घराण्यांचे वैर नष्ट झाले.

शिरूरच्या ताम्रपटावरून कळते की अंग, वंग, मगध, मालव आणि वेंगी या देशांचे राजे अमोघवर्षाला मान देत होते. राष्ट्रकूट आणि प्रतीहार यांच्यामध्ये मालव देशावरील सत्तेसाठी संघर्ष झाले व शेवटी तो देश प्रतीहारांच्या ताब्यात गेला. त्याचप्रमाणे अंग, वंग व मगध या देशांसाठीही राष्ट्रकूट व पाल यांचा संघर्ष होत राहिला. काही काळ त्या देशांवर अमोघवर्षाची सत्ता चालू असावी.

अमोघवर्षाने मान्यखेट हे नवे नगर वसवले व तिथे आपली राजधानी स्थापली. त्यापूर्वी राष्ट्रकूटांची राजधानी कुठे होती ते निश्चित समजत नाही. सोलापूरच्या आग्नेय दिशेला ९० मैलांवर मालखेड हे गाव आहे, तेच पूर्वीचे मान्यखेट होय. हे गावं कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यात, गुलबर्गा शहरापासून २२ मैलांवर कागना व वेण्णीतोरा या नद्यांच्या संगमापाशी वसलेले आहे. ते आता अगदी खेडेच उरले आहे. त्याच्या भोवतालचा तट अजून बराच टिकून आहे. त्याच्या आत राष्ट्रकूटांच्या काळातला दगडी दुर्ग असून, त्याला एकामागे एक असे चार पाच दरवाजे आहेत. दुर्ग मात्र अगदी ढासळून गेला आहे. गाव ओसाड असला तरी, त्यात दोन मंदिरे आहेत. एक आहे महा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवाचे व दुसरे जैन मंदिर आहे. जैन मंदिरात पार्श्वनाथ, महावीर, इ. तीर्थकरांच्या सुरेख मूर्ती आहेत. गावापासून जवळच जयतीर्थ व अक्षोभ्यतीर्थ या वैष्णव स्वामींची वृंदावने आहेत. महाकवी पुष्पदंताचे वास्तव्य याच गावी होते.

अमोघवर्षाच्या राजवटीच्या उत्तरार्धात काही बंडे झाली आणि त्यांत त्याचा पुत्र युवराज कृष्ण यानेदेखील भाग घेतला

पार्श्वनाथ, जैन लेणे – वेरूळ

असावा, असे दिसते. पण अमोघवर्षाचा पराक्रमी सेनानी बंकेय याने सर्वांचा मोड केला. गोविंद (३ रा) याचा भाऊ इंद्र हा गुजरातचा प्रशासक होता. त्याचा पुत्र कर्क याने इ. स. ८२१ पर्यंत अमोघवर्षाचा पालक म्हणून साम्राज्याचे रक्षण केले. नंतर तो गुजरातेत परत गेला. तो इ. स. ८३० मध्ये मरण पावल्यानंतर त्याचा पुत्र ध्रुव प्रशासक झाला. पण त्याचे व सम्राट अमोघवर्षाचे सख्य राहिले नाही. ध्रुवाने गुजरातचे राज्य स्वतंत्रपणे चालवण्यास प्रारंभ केला. त्यामुळे अमोघवर्ष व ध्रुव यांच्यांत संघर्ष सुरू झाला. इ. स. ८४५ मध्ये ध्रुव एका युद्धात मारला गेला व त्याचा पुत्र अकालवर्ष गुजरातचा राजा झाला. त्यानेही सम्राटाशी संघर्ष चालू ठेवला. पण बंकेयाने त्याचा पराभव केला. अकालवर्षाच्या मागून त्याचा पुत्र ध्रुव (२ रा) गादीवर बसला. त्याने मात्र सम्राट अमोघवर्षाशी सख्य केले. त्या सुमारास गुर्जर-प्रतीहार राजा भोज याने राष्ट्रकूटांवर स्वारी करण्याचा बेत केला होता. पण ध्रुव आणि सम्राट अमोघवर्ष यांचे सख्य झाल्यामुळे त्याने मोठी स्वारी केलीच नाही. सरहद्दीवर केवळ काही चकमकी झाल्या. राष्ट्रकूटांनाही उत्तर भारतात जाऊन युद्ध करण्याची आकांक्षा त्या वेळी नव्हती.

इ. स. ८६७ पर्यंत ध्रुव (२ रा) याने गुजरातेत राज्य केले. त्याच्या नंतर त्याचा भाऊ दंतिवर्मा याने इ. स. ८८८ पर्यंत आणि त्यानंतर दंतिवर्म्याचा पुत्र कृष्णराज याने काही वर्षे तिथे राज्य केले. पण लवकरच राष्ट्रकूटांच्या त्या शाखेचे राज्य नष्ट झाले असे दिसते. त्या राज्याची उत्तर सीमा मही नदी ही होती. दक्षिणेकडे त्याचा विस्तार काही काळ तापी नदीपर्यंत होता; पण पुढे तो नर्मदेपर्यंतच राहिला.

अमोघवर्ष हा मोठा रणधुरंधर सेनानी नसला तरी, त्याने आपले दक्षिणेतले राज्य चांगल्या प्रकारे संभाळले. मात्र त्याची सार्वभौम सत्ता वेंगी व गंगवाडी या प्रदेशावर राहिली नाही. उत्तरेकडे त्याच्या सैन्याने काही विजय मिळवले असले, तरी शेवटी तिकडे त्याचे प्रभुत्व नष्ट झाले. तो विद्येचा पुरस्कर्ता आणि विद्वानांचा आश्रयदाता होता. आदिपुराणाचा कर्ता जिनसेन, गणितसारसंग्रह या ग्रंथाचा कर्ता महावीराचार्य व अमोघवृत्तीचा लेखक शाकटायन हे जैन व हिंदू पंडित त्याच्या पदरी होते. कविराजमार्ग हा काव्यशास्त्रावरील कन्नड ग्रंथ अमोघवर्षाने स्वतःच रचला असे म्हणतात. सर्व धर्मपंथांना त्याने समतेने आश्रय दिला होता. तो महावीराचा भक्त होता, तसाच महालक्ष्मीचाही उपासक होता. एकदा राज्यात एक भयानक अशी रोगाची साथ पसरली असता ती नाहीशी व्हावी म्हणून त्याने स्वतःचे एक बोट देवीला अर्पण केले होते. इ. स. ८६० नंतर मधून मधून तो राज्यकारभारातून लक्ष काढून धार्मिक कृत्यांत काही दिवस मग्न होत असे.

कृष्ण (२ रा) (इ. स. ८७८–९१४)–दीर्घ काल राज्य करून अमोघवर्ष इ. स. ८७८ च्या सुमारास मरण पावला आणि त्याचा पुत्र कृष्ण (२ रा) राजा झाला. त्यानेही कृष्ण (१ ला) या राजाप्रमाणेच शुभतुंग व अकालवर्ष या पदव्या धारण केल्या. कलचुरी राजा कोक्कल्ल (१ ला) याच्या कन्येशी त्याचा विवाह झाला होता. त्यामुळे त्याला कोक्कल्लाने पुष्कळ साहाय्य केले. त्याला अनेक युद्धे करावी लागली. त्यांतील वेंगीच्या चालुक्यांशी झालेले त्याचे संग्राम फार भीषण होते. विजयादित्य (३ रा) याने पूर्वीच राष्ट्रकूटांची सत्ता झुगारून दिली होती. कृष्णराज सिंहासनावर बसल्यानंतर त्याने नोळंब व गंग यांच्या राज्यांवर स्वारी करून त्यांचा पराभव केला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मग त्याने राष्ट्रकूटांच्या राजधानीवर स्वारी करून तिथे जाळपोळ केली. विदर्भापर्यंत त्याने विजयी आक्रमण केले. कृष्णराजाला कलचुरींचे साहाय्य मिळत असूनही त्याचा पराभव झाला. पण लवकरच त्याने आपले सामर्थ्य संघटित करून चालुक्य राजाचे आक्रमण परतवून लावले व भीम राजाला कैद केले. काही वर्षे बंदिवासात राहिल्यावर भीमाने राष्ट्रकूटांचे स्वामित्व मान्य केल्यामुळे कृष्णराजाने त्याला मुक्त केले. मग तो सामंत म्हणून वेंगी येथे राज्य करू लागला. काही वर्षांनंतर तो पुन्हा राष्ट्रकूटांच्या विरुद्ध उठला; पण त्यात त्याला पराभवच पत्करावा लागला.

प्रतीहार राजा भोज याच्याशी झालेल्या युद्धात कृष्णराजाचा पराभव झाला आणि राष्ट्रकूटांची लाट (गुजरात) देशातील शाखा नष्ट झाली.

कृष्णराजाच्या एका कन्येचा विवाह चोळ राजा आदित्य (१ ला) याच्याशी झाला होता व तिला एक पुत्र झाला होता. पण आदित्याच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र परांतक राजा झाला. तेव्हा राष्ट्रकूट कृष्णराज (२ रा) याने आपल्या नातवाला राज्य मिळावे म्हणून चोळ राज्यावर स्वारी केली. पण तिथेही त्याचा पराभव झाला. तो इ. स. ९१४ मध्ये मरण पावला. त्याचा जैन पंथाकडे कल होता.

इंद्र (३ रा) (इ. स. ९१४–९२२)– कृष्णराजाच्या मागून त्याचा नातू इंद्र (३ रा) राजा झाला. कारण त्याचा पिता जगत्तुंग आधीच मरण पावला होता. इंद्राने नित्यवर्ष, रट्टकंदर्प, कीर्तिनारायण व राजमार्तंड या पदव्या धारण केल्या. गोविंद (३ रा) याच्याप्रमाणेच हा विजिगीषू व मोठा योद्धा निघाला. त्याने प्रचंड सैन्यानिशी उत्तर भारतावर स्वारी केली आणि गुर्जर-प्रतीहार सम्राट महीपाल याचा पराभव करून कनौज जिंकले. महीपाल पळून गेला. त्या विजयामुळे राष्ट्रकूटांची प्रतिष्ठा खूपच वाढली.

इंद्रराजाने वेंगीवर स्वारी करून विजयादित्य (५ वा) याला ठार मारले, पण त्याचे राज्य मात्र घेतले नाही. इंद्र (३ रा) इ. स. ९२२ मध्ये मरण पावला व त्याचा पुत्र अमोघवर्ष (२ रा) गादीवर बसला. पण त्याचा धाकटा भाऊ गोविंद (४ था) याने कारस्थान करून त्याला पदच्युत केले व सिंहासन बळकावले. त्याची आई अमोघवर्षाला घेऊन वेंगीचा राजा अम्म (१ ला) याच्या आश्रयाला जाऊन राहिली.

म. म. मिराशी यांच्या मते इंद्र (३ रा) निदान इ. स. ९२६ पर्यंत राज्य करीत होता.

गोविंद (४ था) – हा लवकरच विलासी उपभोगात दंग झाला. त्याच्या जुलमी कारभाराला प्रजा तर विटलीच, शिवाय त्याचे मंत्री व सामंत–सरदारही त्रस्त झाले. मग त्यांनी राजाचा चुलता अमोघवर्ष याला राजपद स्वीकारण्याची विनंती केली. अमोघवर्ष अत्यंत नीतिमान पुरुष म्हणून प्रसिद्ध होता. त्याने कलचुरी राजाचे साहाय्य घेऊन मान्यखेटवर स्वारी केली; तेव्हा प्रजेने त्याचे स्वागतच केले. त्यामुळे गोविंदाला पदच्युत करून सिंहासनावर बसणे त्याला सहज शक्य झाले.

अमोघवर्ष इ. स. ९३६ मध्ये सिंहासनावर बसला. त्या वेळी तो ५० वर्षांचा होता. तो अत्यंत धार्मिक व शांत वृत्तीचा होता. पण त्याने आपल्या तीन वर्षांच्या कारकिर्दीत राज्यकारभाराकडे मात्र विशेषसे लक्ष दिले नाही. त्याचा पुत्र कृष्ण हाच सर्व कारभार चालवीत राहिला. त्याने गंगवाडीवर सैन्य पाठवून गंग राजा राजमल्ल याला पदच्युत केले व त्याचा धाकटा भाऊ बूटुग याला गादीवर बसवले. युवराज असतानाच कृष्णाने बुंदेलखंडावर स्वारी करून कालंजर व चित्रकूट हे किल्ले जिंकले. त्या स्वारीत त्याचा चेदीच्या राजाशी संघर्ष होऊन राष्ट्रकूट व कलचुरी घराण्यांचे सख्य नष्ट झाले.

कृष्ण (३ रा) (इ. स. ९३९–९६७)– अमोघवर्ष (३ रा) मरण पावल्यावर कृष्ण (३ रा) सिंहासनावर बसला. त्याने अकालवर्ष ही पदवी धारण केली. लवकरच त्याने दक्षिणदिग्विजय केला. त्याचा मेहुणा गंग बूटुग याने त्याला त्या स्वारीत साहाय्य केले. इ. स. ९४३ मध्ये त्यांनी कांची व तंजाऊर ही नगरे जिंकली; पण चोळ राजा परांतक याने लवकरच त्यांना मागे हटवले. मात्र तोंडमंडलम त्यांच्या हाती राहिले. इ. स. ९४९ मध्ये चोळांच्या सैन्याने अर्काट जिल्ह्यात शिरून राष्ट्रकूटांच्या तळावर हल्ला केला, पण तो अयशस्वी झाला. एवढेच नव्हे; तर बूटुग याने चोळ युवराज राजादित्य याला ठार मारले. कृष्णराजाने त्यानंतर रामेश्वरपर्यंत जाऊन तिथे आपला विजयस्तंभ उभारला. तिथून परत येऊन तो मेलपाडी येथे काही वर्षे राहिला. त्याने रामेश्वरजवळ कृष्णेश्वर व गंडमार्तंडादित्य यांची मंदिरे बांधली. तोंडमंडलम हे कृष्णराजाच्या राजवटीच्या अखेरपर्यंत राष्ट्रकूटांच्या सत्तेखाली होते. गंगराज बूटुग याने केलेल्या बहुमोल साहाय्याबद्दल कृष्णराजाने त्याला बनवासी १२०००, बेलवोल ३००, पुरिगेरे ३००, किन्सुकाड ७० व बेगनाड ७० या प्रदेशांचे राज्यपाल नेमले.

इ. स. ९६३ मध्ये कृष्णराजाने उ. भारतात दुसरी स्वारी केली. त्या वेळी गंगराजा मारसिंह याने त्याला मदत केली. तो प्रथम बुंदेलखंडावर चाल करून गेला आणि नंतर माळव्यात शिरला. तिथे परमार राजा सियक याचा पराभव करून त्याने उज्जयिनी नगरी जिंकली. त्यानंतर कृष्णराजाने वेंगीवर स्वारी करून अम्म (२ रा) याच्या जागी बाडप याला इ. स. ९५६

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्ये गादीवर बसवले; पण वाडपाच्या मृत्यनंतर अम्म राजाने वेंगीचे राज्य परत घेऊन राष्ट्रकूटांचे वर्चस्व नष्ट केले.

कृष्ण (३ रा) हा राष्ट्रकूट वंशातील एक महान नृपती ठरला. उत्तर भारतात तो विशेष यशस्वी झाला नसला, तरी तो 'सकल-दक्षिण-दिग्-अधिपति' झाला होता. चोळांच्या राज्यापैकी बराच मोठा भाग त्याच्या ताब्यात होता. रामेश्वर-पर्यंत त्याने दिग्विजय केला, तसा दुसऱ्या कोणत्याही राष्ट्र-कूट राजाने केला नाही.

खोट्टिग (इ.स. ९६७–९७२)—कृष्ण (३ रा) याला पुत्र नसल्यामुळे त्याच्या नंतर त्याचा धाकटा भाऊ खोट्टिग सिंहासना-वर बसला. तो त्या वेळी वृद्ध असून, त्याच्या अंगी पराक्रमही नव्हता. लवकरच परमार राजा सीयक याने दक्षिणेवर स्वारी केली व इ. स. ९७२ मध्ये मान्यखेट नगर जिंकले. त्याच्या सैनिकांनी तिथे खूप लुटालूट केली. त्या भीषण संकटामुळे खोट्टिग मनाने खचला व लवकरच मरण पावला.

कर्क (२ रा) (इ. स. ९७२–९९७)–खोट्टिगानंतर त्याचा पुतण्या म्हणजे निरुपमाचा पुत्र कर्क (२ रा) हा राजा झाला. त्या वेळी राष्ट्रकूटांची प्रतिष्ठा नष्ट झालेलीच होती आणि कर्कराजाचा राज्यकारभारही चांगला नव्हता. त्याचे मंत्रीही स्वार्थी व जुलमी होते. त्यामुळे उत्पन्न झालेल्या अंदाधुंदीचा फायदा घेऊन चालुक्य वंशातील तैल नामक सामंताने राष्ट्र-कूटांची सत्ता नष्ट करून स्वतःचे प्रभुत्व स्थापन केले. हा तैल चालुक्य विजापूर जिल्ह्यातील तडवाडी येथे राज्य करीत होता. कृष्णराजाच्या वेळेपासून इ. स. ९६५ पर्यंत तो राष्ट्रकूटांशी अगदी नमून वागला. तो स्वतःला बादामीच्या चालुक्यांचा वंशज मानत असून, आपले गत वैभव परत मिळवण्यासाठी गुप्तपणे प्रयत्नशील होता. इ. स. ९७३ मध्ये त्याने राष्ट्र-कूटांच्या विरुद्ध उघड युद्ध पुकारले. कर्काने त्याच्यावर स्वारी केली, पण कर्कचा पराभव झाला व तो कर्नाटकात पळून गेला. त्या प्रदेशात सोराब तालुक्यात एक लहानसे राज्य स्थापून तिथे तो इ. स. ९९१ पर्यंत राहिला. त्याने राष्ट्रकूटांची सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचे काम दुर्घट म्हणून सोडून दिले. मात्र गंगराजा मारसिंह याने आपला पुतण्या इंद्र म्हणजे कृष्णराज (३ रा) याचा नातू, याच्यासाठी एक प्रयत्न केला. पण तैलाने इ. स. ९७४ मध्ये त्याचा पराभव केला. इ. स. ९७५ पासून तैल चालुक्य हा दक्षिण भारताचा सम्राट झाला.

फ्लीट, रा. गो. भांडारकर, चिं. वि. वैद्य व म. म. मिराशी यांच्या मते राष्ट्रकूट हे महाराष्ट्रीय होते. डॉ. अ. स. अळतेकर मात्र त्यांना कानडी मानतात. इ. स. च्या ८ व्या शतकात चालुक्यांचा पराजय करून पुढे साम्राज्य स्थापणारे राष्ट्रकूट घराणे मूळचे लातूरचे होते. तिथून ते वेरूळच्या परिसरात जाऊन वसले आणि त्याने तिथे राज्य स्थापले. इ. स. च्या ९ व्या शतकात सम्राट अमोघवर्षाने हैद्राबादच्या जवळ मान्यखेट नगर वसवून तिथे आपली राजधानी स्थापली. मान्यखेट म्हणजे मालखेड हे कानडी प्रदेशात आहे. राष्ट्रकूटांची मातृभाषा कन्नड असून, त्यांचे अनेक कोरीव लेख त्याच भाषेत आहेत. त्यामुळे हे राष्ट्रकूट घराणे कर्नाटकीय गणले गेले. मात्र ते स्वतःला तसे मानीत नव्हते, असे दिसते. या घराण्यातील पहिला बलाढ्य राजा दंति-दुर्ग याच्या पराक्रमाचे वर्णन कित्येक ताम्रपटांत केलेले आहे. त्यांत असे म्हटले आहे, की इतरांना अजिंक्य असे कर्नाटकबल त्याने जिंकले. दंतिदुर्ग स्वतः कर्नाटकीय असता तर त्याने परा-जित केलेल्या चालुक्यांच्या सैन्याला कर्नाटकबल असे विशेषण लावले नसते, असे म. म. मिराशी म्हणतात. पण राष्ट्रकूटांचे मूलस्थान कोणते व त्यांची मूळ भाषा कोणती याला महत्त्व न देता, त्यांची कर्मभूमी कोणती, कोणत्या प्रदेशाला ते स्वराज्य मानीत होते या निकषांवरून निर्णय केला पाहिजे, असे डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी प्रतिपादले आहे. राष्ट्रकूटांचे अनेक कोरीव लेख व ताम्रपट महाराष्ट्रातील वेरूळ, वर्धा, दिंडोरी, सांगली, मयूरखंडी (नासिक), संजाना (ठाणे), तळेगाव ढमढेरे, भांदक (चांदा), पिंपेरी (खानदेश), तोरखेडे (खानदेश), अलास (कुरुंदवाड), खारेपाटण, सामनगड (कोल्हापूर), जवखेडा (खानदेश), मानोर (ठाणे), इ. ठिकाणी सापडले आहेत. त्यावरून महाराष्ट्र ही राष्ट्रकूटांची कर्मभूमी व दानभूमीही होती, असे दिसते.

प्रा. अळतेकरांनी आपल्या ग्रंथांत राष्ट्रकूटांच्या साम्राज्याचा नकाशा दिलेला असून, त्याचे दोन विभाग केले आहेत. त्यांतील मध्यवर्ती विभागाला राष्ट्रकूटांच्या राज्याची प्रकृती (मूळ प्रदेश) म्हटले असून, दुसऱ्या विभागाला त्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेश असे म्हटले आहे. राष्ट्रकूटांचा मूळ प्रदेश म्हणून जो विभाग दाखविला आहे, त्यात प्रामुख्याने महाराष्ट्राचा समावेश होतो. उत्तरेस नर्मदा–तापी दुआब व दक्षिणेस कृष्णा–तुंगभद्रा दुआब हे प्रदेश त्यात आहेत. त्यापलिकडचे प्रदेश म्हणजे त्यांचे साम्राज्य होते. यावरून अळतेकरांच्या मते राष्ट्रकूटांचे स्वराज्य महा-राष्ट्रातच होते. त्याच्या बाहेरच्या प्रदेशांवर स्वाऱ्या करून राष्ट्र-कूट राजांनी तिथल्या राजांना आपले मांडलिक केले किंवा तिथे आपले प्रशासक नेमले. पण अन्यत्र राज्य स्थापून त्यांनी महा-राष्ट्रावर राज्यपाल नेमला, असे कधीही झाले नाही. यावरून राष्ट्रकूटांची भाषा जरी कानडी असली, तरी कर्नाटक ही त्यांची स्वभूमी नव्हती. तिथे त्यांनी राज्यपाल नेमला होता. तिथली सत्ता नष्ट झाली, तरी राष्ट्रकूटांचे राज्य चालूच होते. महाराष्ट्रात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जेव्हा राष्ट्रकूटांची सत्ता नष्ट झाली, तेव्हाच त्या घराण्याचा अंत झाला, असे मानले जाते. यावरून ते घराणे महाराष्ट्रीयच होते, यात संशय नाही.

राज्यव्यवस्था – प्राचीन भारतीय परंपरेप्रमाणे राष्ट्रकूटांची राजसत्ता एकतंत्रीच होती. राजा सर्वसत्ताधीश असून महाराजाधिराज, परमभट्टारक, धारावर्ष, जगत्तुंग, इ. पदव्या धारण करीत असे. मात्र तो मंत्रिमंडळाच्या साहाय्यानेच राज्यशासन करी. साम्राज्याच्या वैभवाला शोभेल असेच ऐश्वर्य त्याच्या राजधानीत व दरबारात दिसत असे. राजपद आनुवंशिक असून, बहुधा ज्येष्ठ पुत्राला सिंहासन मिळत असे. मात्र क्वचित त्याच्या धाकट्या भावाला युवराज नेमल्याची उदाहरणे आढळतात. जुलमी व व्यसनी राजाला पदच्युत करून मंत्री, सामंत व सरदार हे दुसऱ्या समर्थ पुरुषाला सिंहासनावर बसवू शकत. राजाच्या मृत्युसमयी युवराज अल्पवयी असल्यास राजघराण्यातील दुसऱ्या समर्थ पुरुषाला राजपालक नेमण्याची प्रथाही होती.

साम्राज्याच्या काही भागांत सामंत राजे राज्य करीत होते, तर काही भागांवर प्रशासक नेमलेले होते. मात्र सामंतांप्रमाणेच प्रशासकांनाही बरीच स्वायत्तता होती. जे प्रदेश सामंतशासित नव्हते, त्यांत राष्ट्र व विषय असे विभाग पाडलेले असत. विषय म्हणजे जिल्ह्याएंवढा विभाग आणि राष्ट्र म्हणजे ४–५ जिल्ह्यांचा मिळून झालेला विभाग असे. विषयाच्या लहान भागांना भुक्ती म्हणत. राष्ट्राच्या प्रमुखाला राष्ट्रपती म्हणत. त्याच्याकडेच त्या विभागाची शासनव्यवस्था व सैन्यव्यवस्था सोपवलेली असे. भूमिकर गोळा करण्याचे काम त्याच्याकडे असे.



विषय व भुक्ती यांच्या प्रमुखांना विषयपती व भोगपती म्हणत. त्यांची नियुक्ती सम्राट करीत असे. कधी कधी ही अधिकारपदे एकाच घराण्यात चालत. भोगपतीच्या खाली नाडगावुंड ... ग्रामकूट ... गावाचा मुख्य, ... अधिकारी ... व्यवस्था पाहत ... विषयपती व भोगपती यांच्याप्रमाणे हे अधिकारपद कधी कधी एका घराण्याला मि... असे आणि त्या... गाव इनाम ... जाई.

राष्ट्रकूट राजां... प्रतीहार, पाल, चोल या ... राजांचा पराभव करून वि... साम्राज्य स्था... होते, त्यावरून त्यांचे सेनादल अत्यंत मोठे व संघटित ... पाहिजे. सैनिकांची निश्चित संख्या ज्ञात नाही; मात्र ती ... लक्षांपेक्षा कमी नसावी. राष्ट्रकूटांच्या सैन्यात घोडदळ व ... दळही होते. राष्ट्रकूट साम्राज्यातील सर्व गावांची ... सेनापथके असत आणि त्यांच्यामध्ये वारंवार चकमकी ... त्यामुळे गावांतील बहुतेक सर्व पुरुष सशस्त्र व युद्धकलेत ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असत. त्यांच्यांतूनच विषयपतींची सेनादले उभारली जात असत. तीच सेनादले राजालाही उपयोगी पडत. राजाच्या सेनादलातही कुशल सैनिकांची भरती होत असे. अरब लेखकांनी राष्ट्रकूटांच्या सैन्याची वर्णने केली आहेत. त्यावरून कळते, की त्या सैन्यात बरेच घोडे व हत्ती असले, तरी पायदळ खूप मोठे होते. राजांच्या जवळ भरपूर संपत्ती असून, सैनिकांना नियमित वेतन मिळत असे. गरुड हे राष्ट्रकूटांच्या ध्वजावरील चिन्ह होते.

देवधर्म – बहुतेक सर्व राष्ट्रकूट राजे शिवाचे उपासक होते व सनातन धर्माचे अभिमानी होते. दंतिदुर्गाने उज्जयिनीच्या महाकालेश्वराच्या साक्षीने हिरण्यगर्भदान केले होते. त्याचा चुलता कृष्णराज (१ ला) याने वेरूळ येथे निर्माण केलेले कैलास लेणे हे एक शिवमंदिरच आहे. त्याव्यतिरिक्त त्याने १८ शिवमंदिरे बांधली. तो परम-माहेश्वर होता. राष्ट्रकूटांच्या सर्व ताम्रपटांत प्रारंभी शिवाला वंदन केलेले आहे. वेरूळप्रमाणेच घारापुरी येथेही राष्ट्रकूट राजांनी कित्येक शिवकथाप्रसंग साकार केलेले आहेत. कृष्णराज (३ रा) याने रामेश्वराजवळ कृष्णेश्वराचे मंदिर बांधले, तेही शिवमंदिरच आहे. त्या काली यज्ञसंस्था मागे पडून भक्तिसंप्रदाय वाढीस लागला होता. राष्ट्र-



नटराज, कैलास लेणे– वेरूळ

कूट राजांनी यज्ञ केले नाहीत; पण त्यांनी दानधर्म मात्र पुष्कळ केला. त्यांची पुष्कळ दानपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यांत मंदिरे, पाठशाळा, तलाव यांसाठी दाने दिलेली आहेत.

राष्ट्रकूटांच्या राजवटीत जैन पंथाचाही खूप उत्कर्ष झाला. अमोघवर्ष (१ ला) याने त्या पंथाला आश्रय दिला होता. जीवनाच्या अखेरीस त्याने जिनदीक्षाही घेतली होती. आचार्य जिनसेन हे त्याचे गुरू होते. अमोघवर्षाने अनेक जैन मंदिरांना दाने दिली. त्याच्या सत्ताकालात जैन साहित्याचा बराच विकास झाला. अमोघवर्षाने जैन आचारधर्माविषयी पुस्तकही लिहिले होते आणि तो त्या आचारधर्माचे दक्षतेने पालन करीत असे. आदिपुराणातील शेवटचे पाच अध्याय रचणाऱ्या गुणभद्राला त्याने युवराज कृष्ण (२ रा) याचा गुरू नेमले होते. कृष्णराजाने मुळगुंद येथील जैन मंदिराला दान दिले होते. त्याच्याप्रमाणे इंद्र (३ रा) यानेही जैन संप्रदायाला आश्रय दिला होता. कृष्णराज (३ रा) याचा नातू म्हणजे गंग राजा मारसिंह याचा पुतण्या इंद्र (४ था) याने राष्ट्रकूटांचे राज्य मिळवण्यात अपयश आल्यानंतर, जैन दीक्षा घेऊन सल्लेखना पद्धतीने प्राणत्याग केला. राष्ट्रकूटांचे काही सामंत व अधिकारी जैन होते. सौंदत्तीचे रट्ट राजे जैन होते. बंकेय हा अमोघवर्षाचा सेनापती, त्याचा पुत्र लोकादित्य, इंद्र (३ रा) याचा सेनापती श्रीविजय यांनीही जैन पंथ स्वीकारला होता. वेरूळ येथील जैन लेणी अमोघवर्षाच्या प्रेरणेमुळेच निर्माण झाली असावी, असे वाटते.

राष्ट्रकूटांच्या वेळी असंख्य जैन मठ चालू होते व अनेक जैन मंदिरे बांधण्यात आली होती. ती मंदिरे शिव किंवा विष्णू यांच्या मंदिरांप्रमाणेच ऐश्वर्यसंपन्न होती. लोक महावीराची पूजा करीत होते. महावीराचा अंगभोग व रंगभोग यांसाठी दानपत्रे दिलेली आढळतात. त्या वेळी राज्यातले सुमारे एकतृतीयांश लोक महावीराचे भक्त झालेले असावे.

राष्ट्रकूट राजे परमतसहिष्णू होते. त्यांच्या राज्यात सर्व धर्मपंथांना उदार आश्रय मिळत होता. त्यांनी कोणत्याही धर्मपंथाला त्रास दिल्याचे उदाहरण नाही. ते मुसलमानांशी चांगले वागत, त्यांचे नीट संरक्षण करीत, त्यांना मशिदी बांधून देत व त्यांच्या धर्मगुरूंनाही मान देत, असे अरबी लेखकांनी लिहून ठेवले आहे.

शिल्पकला – पल्लव आणि बादामीचे चालुक्य यांच्या वेळी दक्षिणेत शिल्पकलेचा बराच विकास झाला. राष्ट्रकूटांच्या वेळी त्या कलेचा परमोत्कर्ष झालेला दिसतो. बादामी, ऐहोळ व पट्टदकल येथील चालुक्यकालीन मंदिरांच्या रचनेत हिंदू शिल्पकामाचे सुंदर रूप पाहायला मिळते. राष्ट्रकूटांनी चालुक्य व बौद्ध या दोन्ही शिल्पपद्धतींचे अनुसरण करून अलौकिक लेणी व मंदिरे निर्माण केली. बौद्ध गुंफांमध्ये साधारणपणे विस्तीर्ण सभामंडप आढळतात. त्यांत कडेला स्तंभ असून, मधली जागा मोकळी असते. राष्ट्रकूटांच्या लेण्यांत मात्र सर्व सभामंडपांत भव्य स्तंभांच्या रांगा असतात. वेरूळ येथील धुमार लेणे अशा प्रकारचे आहे. राष्ट्रकूट पद्धतीच्या स्तंभाची रचनाही बौद्ध लेण्यांतील स्तंभांपेक्षा वेगळी असते. राष्ट्रकूट पद्धतीचे स्तंभ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सामान्यतः चौकोनी असून त्यांचा माथा गिरदीसारखा दिसतो. राष्ट्रकूटांच्या लेण्यांना दर्शनी कमान नसते. वेरूळ येथील दशावतार लेणे अशा प्रकारचे आहे. ते राष्ट्रकूटांचा पहिला स्वतंत्र राजा दंतिदुर्ग याने निर्माण केलेले आहे. त्यांतील नंदिमंडपाच्या भिंतीवरील दंतिदुर्गाचा शिलालेख ऐतिहासिक महत्त्वाचा आहे. लेण्याच्या भिंतीत खोदलेली शैव आणि वैष्णव शिल्पे अत्यंत सुरेख आहेत. हे लेणे दुमजली असून, खालच्या मजल्यावरील सभामंडपाला १४ स्तंभ आहेत; तर वरच्या मजल्यात ५४ स्तंभ आहेत. हे सर्व स्तंभ अगदी साधे असून, त्यामुळे भिंतीवरील कोरीव मूर्तींचे सौंदर्य अधिकच खुलून दिसते. स्तंभांच्या पुढे दर्शनी भागात दोन भव्य द्वारपाल उभे आहेत.

रावण की खाई व रामेश्वर या गुंफा दशावतार लेण्याच्या आधी निर्माण झालेल्या असाव्या. धुमार लेणे (सीता की नहाणी) व घारापुरीचे लेणे यांत बरेच साम्य आहे. रावण की खाई व धुमार लेणे यांत द्वारपालांच्या भव्य मूर्ती आहेत, तर रामेश्वर गुंफेत गंगा-यमुनांच्या मूर्ती दिसतात. या सर्व लेण्यांत सुंदर मूर्ती पाहायला मिळतात.

वेरूळचे कैलास लेणे हे सर्व जगात अद्वितीय व अलौकिक शिल्पकाम मानले जाते. ते संपूर्ण शिवमंदिर अखंड खडकातून खोदून काढलेले आहे. त्याचे दोन मजले असून, दोन्ही मजल्यांवर राष्ट्रकूट शैलीचे प्रचंड स्तंभ आहेत आणि वरच्या मजल्याच्या तोंडाशी भव्य द्वारपाल आहेत. या लेण्यातील विलक्षण सुंदर कोरीव मूर्तींच्या रूपाने राष्ट्रकूट शिल्पकला परमोच्च बिंदूला पोचली आहे. या लेण्याच्या काही भागांत सुंदर चित्रे रंगवलेली दिसतात. पूर्वी हे मंदिर अंतर्बाह्य रंगवलेले असावे. त्यामुळेच त्याला रंगमहाल असे म्हणतात.

वेरूळ येथील जैन लेणी अमोघवर्ष (१ ला) याच्या काळातली असावी. तसा कोरीव लेख उपलब्ध नाही; पण त्या लेण्यांतील स्तंभ राष्ट्रकूटपद्धतीचे आहेत. तिथल्या इंद्रसभा व जगन्नाथसभा ह्या दोन गुंफा विशेष उल्लेखनीय आहेत. इंद्रसभेत इंद्र, इंद्राणी, शांतिनाथ व पार्श्वनाथ यांच्या भव्य मूर्ती आहेत. जगन्नाथसभेत महावीराची मूर्ती आहे. या लेण्यांतील कोरीव नक्षीकाम व मूर्ती अत्यंत सुंदर आहेत.

राष्ट्रकूटांची राज्यव्यवस्था उत्तम होती. त्यांच्या राज्यात लोकांना बरीच स्वायत्तता लाभली होती. प्रजा सुखी होती. व्यापार व उद्योगधंदे यांचा पुष्कळ विकास झाला होता. शिक्षण व साहित्य या क्षेत्रांत विशेष प्रगती झालेली दिसत नाही; मात्र त्यांना राजाश्रय पुष्कळ लाभत होता. धार्मिक क्षेत्रात राष्ट्रकूट राजे सहिष्णू व उदार होते. शैव, वैष्णव, बौद्ध, जैन, मुस्लिम या सर्वांना त्यांनी समभावाने मदत केली. ललित कलांच्या बाबतीत मात्र या राजांनी फारसे लक्ष घातलेले दिसत नाही. वेरूळचे कैलास लेणे हे शिल्पकलेच्या परमोत्कर्षाचे उदाहरण



जैन लेण्याचे प्रवेशद्वार– वेरूळ

असले, तरी राष्ट्रकूटांच्या राजवटीत इतर कलांचा विका[...] झाला नाही.

राष्ट्रकूट घराण्यांतील पुरुष प्रथम राष्ट्र नामक विभा[...] प्रमुख अधिकारी असले, तरी त्यांतील काही पुरुषांनी स्वप[...] क्रमाने राज्ये स्थापली. दंतिवर्म्याच्या घराण्याने तर विश[...] साम्राज्य स्थापले. या सम्राटांच्या वैभवाच्या काळातील द[...] पत्रांत त्यांचा संबंध यदुवंशाशी जोडण्यात आला आहे. इ.[...] च्या ९ व्या शतकातील एका ताम्रपटात श्रीकृष्णाचा सेना[...] सात्यकी याला तो मान दिला आहे. पराक्रमी राजांच्या द[...] बारातले कवी नेहमीच त्या राजांना श्रेष्ठ वंशातील पुरुष मा[...] आले आहेत. ते खरे खोटे कसेही असो, राष्ट्रकूट राजां[...] योग्यता इतर राजघराण्यांनी मानली होती आणि त्यांच्या[...] विवाहसंबंध जुळवले होते. चालुक्य, पल्लव, कलचुरी, गं[...] सर्व राजघराण्यांशी त्यांच्या सोयरिकी झाल्या होत्या.

थोर परंपरा–राष्ट्रकूट वंशात कर्तबगार राजपुरुषांची परं[...] निर्माण झाली आणि म्हणूनच त्यांचे वैभवशाली साम्राज्य सु[...] २२५ वर्षे टिकले. अनियंत्रित सत्ता व अमाप संपत्ती हाती आ[...] की राजे लोक बहुधा विलासमग्न व भ्रष्ट होतात. पण [...] राजवंशात ते दुर्गुण आढळत नाहीत. या वंशातील चौदा रा[...] पैकी नऊ राजे समर्थ व पराक्रमी निघाले, हे विरळा उदाह[...] होय. गोविंद (२ रा), (गोविंद ४ था) आणि कर्क हे तीन [...] विषयासक्त व नादान निघाले आणि आणखी दोघे दुबळे निघा[...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या घराण्याच्या प्रत्येक पिढीत वारशासाठी यादवी झाली, तरीही त्यांचे साम्राज्य दीर्घ काल चालू राहिले याचे श्रेय त्यातील महापराक्रमी पुरुषांना आहे. राष्ट्रकूटांच्या साम्राज्याएवढे विशाल साम्राज्य दुसऱ्या कोणत्याही वंशाने स्थापले नव्हते. पंजाब व सिंध हे दोन प्रांत सोडून सारा भारतवर्ष त्यांनी पादाक्रांत केला होता. त्यांनी हिमालयापासून रामेश्वरापर्यंत दिग्विजय केले होते. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, माळवा व आंध्र हे प्रदेश त्यांच्या प्रत्यक्ष सत्तेखाली होते. भारताच्या प्राचीन इतिहासात उ. भारतातील राजांनी दक्षिणेवर स्वारी करून आपले वर्चस्व स्थापलेले आढळते. पण राष्ट्रकूटांनी तीनदा उ. भारतावर स्वारी करून पाल व प्रतीहार या प्रबल राजांचा पराभव केला आणि कनोज ही प्रतीहारांची राजधानीही जिंकली. यावरून भारतीय सम्राटांमध्ये राष्ट्रकूट सम्राटच सर्वश्रेष्ठ ठरतात, असे म्हणावे लागते. [म. यु. भा.; मु. पू. म. २; संशोधन मुक्तावली, भाग २, ३ व ५; महाराष्ट्र संस्कृती– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, वसंत, मे १९६८; प्रा. भा. शा. प.; आ. ऑ. रा.; हिं. क इं. पी. ३ व ४; रा. दे. टा.]

राष्ट्रगीत 'जनगणमन' व 'वंदेमातरम्' ही भारताची दोन राष्ट्रगीते आहेत. त्यांपैकी पहिले प्रमुख असून, दुसरे दुय्यम आहे. कोणत्याही सरकारी समारंभाच्या वेळी पहिले गीत म्हटले जाते किंवा बँडवर वाजविले जाते.

राष्ट्रात एकत्वाची भावना उत्पन्न व्हावी, वाढीस लागावी व सदैव जागृत राहावी अशा उद्देशाने प्रत्येक राष्ट्र आपला ध्वज, आपले राष्ट्रीय प्रतीक किंवा राज्यमुद्रा आणि राष्ट्रगीत या गोष्टी ठरवीत असते. ही राष्ट्रीय प्रतीके मग त्या त्या राष्ट्राचे मानबिंदू ठरतात. राष्ट्रगीत हा एक असाच राष्ट्रीय मानबिंदू आहे. सबंध राष्ट्रातील लोकांच्या हृदयात राष्ट्राविषयी जो प्रेमादर वसत असतो, तो राष्ट्रगीत या प्रतीकाच्या द्वारे प्रभावीपणे प्रकट होत असतो. जनतेच्या मनावर एकदा ही राष्ट्रीयत्वाची भावना पूर्णपणे बिंबली, की मग ती पिढ्यान्‌पिढ्या कायम राहते आणि एखाद्या राष्ट्रीय संकटाच्या काळी लोकांत धैर्य व आत्मविश्वास निर्माण करण्यास कारणीभूत होते.

वर ज्या दोन भारतीय राष्ट्रगीतांचा निर्देश केला, त्यांपैकी 'वंदेमातरम्' या राष्ट्रगीताचा इतिहास असा–

'वंदेमातरम्' हे संस्कृतप्रचुर असे बंगाली भाषेतील गीत आहे. बंगीय साहित्यिक व देशभक्त श्री. बंकिमचंद्र चतर्जी यांनी हे लिहिले व इ. स. १८८० ते १८८२ या कालखंडात वंगदर्शन मासिकातून क्रमशः प्रसिद्ध झालेल्या आनंदमठ नामक कादंबरीत समाविष्ट केले. तथापि या गीताच्या निर्मितिकालाविषयी संशोधकांत मतभेद आहेत. काहींच्या मते हे गीत इ. स. १८७२ साली लिहिले गेले, तर काहींच्या मते इ. स. १८७५ साली. एक गोष्ट मात्र नक्की, की हे गीत आधी स्वतंत्रपणे रचले गेले व मगच ते आनंदमठ कादंबरीत समाविष्ट झाले.

इ. स. १७७२ साली बंगालमधील काही संन्याशांनी मुसलमान व इंग्रज शासकांच्या जुलमाविरुद्ध एक सशस्त्र उठाव केला होता. या उठावणीला समर्थ नेता लाभला नसला, तरी या उठावणीमागे स्वातंत्र्यप्रीतीचा व मातृभूमीच्या भक्तीचा उमाळा निश्चित होता. संन्याशांच्या या ऐतिहासिक घटनेभोवतीच आनंदमठ या कादंबरीचे कथानक गुंफलेले आहे. तथापि काहींच्या मते या गीतलेखनाची प्रेरणा बंकिमचंद्रांना इ. स. १८७९ साली महाराष्ट्रात घडून आलेल्या वासुदेव बळवंत फडके यांच्या क्रांतियुद्धावरून मिळाली. इ. स. १८८० मध्ये क्रांतिवीर वासुदेव बळवंत यांचे आत्मचरित्र बंगाली भाषेत प्रसिद्ध झाले व ते बंकिमबाबूंच्या वाचनात आल्यावर त्या भारावलेल्या मनःस्थितीतच त्यांनी 'वंदेमातरम्' हे गीत लिहून काढले. अर्थात ही हकीगत खरी मानायची, तर 'वंदेमातरम्'चा जन्मकाल आणखी पुढे म्हणजे इ. स. १८८० पर्यंत ओढावा लागेल. या हकीगतीशिवाय आणखीही दोन-तीन प्रकारच्या हकीगती वंदेमातरम्‌च्या जन्मकालाविषयी पुढे आल्या आहेत. एका उल्लेखानुसार या गीताची रचना बंकिमबाबू कलकत्त्याहून सुट्टी घेऊन स्वग्रामी जात असताना झाली. निदान त्याची मध्यवर्ती कल्पना तरी या प्रवासात निश्चित झाली. रेल्वेतून प्रवास करीत असताना त्यांना जन्मभूमीचे जे निसर्गसौंदर्यसंपन्न असे मनोरम दर्शन घडले, त्यातून या गीताचा जन्म झाला. दुसऱ्या एका माहितीप्रमाणे त्यांच्या एका कन्येच्या आग्रहावरून त्यांनी हे गीत लिहिले. तिसऱ्या एका ऐकीव कथेवरून असे सांगितले जाते, की बंकिमचंद्रांना हे क्रांतिकारक गीत झोपेत स्फुरले आणि नित्याच्या परिपाठाप्रमाणे ते स्वप्नात किंवा झोपेत जे बोलले ते त्यांच्या भाच्याने लिहून घेतले व अशा प्रकारे वंदेमातरम् हे गीत निर्माण झाले. काही असले तरी एक खरे, की हे गीत जन्मतःच प्रभावी मंत्रसामर्थ्य घेऊन अवतरले. खुद्द बंकिमचंद्रांनाही त्याची पुरेपूर कल्पना होती. या गीताच्या संदर्भात ते एकदा आपल्या भाच्याला म्हणाले, 'माझे सारे लिखाण गंगेत बुडविले तरी चालेल, परंतु हे एकच गीत शाश्वत उरेल. हे एक महान गीत होईल आणि देशाचे हृदय जिंकील. एक दिवस असा उजाडेल, वंगभूमी या गीताने वेडी होऊन नाचू लागेल. एकटा बंगालच काय, पण सारा देश एका सुरात हे गीत गाऊ लागेल. पण याला आणखी पंचवीस-तीस वर्षे जावी लागतील.'

बंकिमचंद्रांची ही भविष्यवाणी पुढे तंतोतंत खरी ठरली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आनंदमठ कादंबरीच्या पहिल्या खंडाच्या नवव्या प्रकरणात वंदेमातरम् गीत येते. तिथे भवानंद या संन्याशांच्या प्रमुखाची महेन्द्र नामक एका तरुणाशी भेट होते. दोघे जण संवाद-संभाषण करीत आनंदमठाच्या परिसरात पाऊल टाकतात आणि त्या क्षणीच भवानंद 'वंदेमातरम्' हे मातृभूमीचे महन्मंगल स्तोत्र गाऊ लागतो –

वन्दे मातरम् ॥
सुजलां सुफलां मलयजशीतलां सस्यश्यामलां मातरम् ॥
शुभ्रज्योत्स्नापुलकितयामिनीम्
फुल्लकुसुमितद्रुमदलशोभिनीम्
सुहासिनीं सुमधुरभाषिणीम् सुखदां वरदां मातरम् ॥
कोटिकोटि - कण्ठ - कलकल - निनाद - कराले ।
कोटिकोटिभुजैर्धृत - खर - करवाले
के बले मा तुमि अबले बहुबल - धारिणीं
नमामि तारिणीं रिपुदलवारिणीं मातरम् ॥
तुमि विद्या तुमि धर्म तुमि हृदि तुमि मर्म
त्वं हि प्राणाः शरीरे बाहु ते तुमि मा शक्ति
हृदये तुमि मा भक्ति तो मारइ प्रतिमा गडि
मन्दिरे मन्दिरे ।
त्वं हि दुर्गा दशप्रहरणधारिणी
कमला कमलदलविहारिणी
वाणी विद्यादायिनी नमामि त्वां
नमामि कमलां अमलां अतुलां
सुजलां सुफलां मातरम् । वन्दे मातरम् ।
श्यामलां सरलां, सुस्मितां भूषितां
धरणीं भरणीं मातरम् । वन्दे मातरम् ॥

अर्थ – माते मी तुला वंदन करतो. जलसमृद्ध आणि धन-धान्यसमृद्ध, तसेच दक्षिणेकडील मलय पर्वतावरून येणाऱ्या वायुलहरींनी शीतल होणाऱ्या आणि विपुल शेतीमुळे श्यामलवर्ण बनलेल्या, हे माते !

पांढऱ्याशुभ्र चांदण्यांमुळे तुझ्या रात्री प्रफुल्लित असतात, तर फुलांना बहर आल्यामुळे तुझी भूमी वृक्षराजीचे वस्त्र परिधान केल्यासारखी सुशोभित दिसते.

सदा हसतमुख आणि सर्वदा मधुर बोलणारी, वरदायिनी, सुखप्रदायिनी, अशा हे माते,

कोटि-कोटी मुखांतून भयंकर गर्जना उठत असताना आणि कोटि-कोटी हातांतील परजलेल्या खड्गांची पाती चमकत असताना हे माते, तू अबला आहेस, असे म्हणण्याचे धाडस कोण करील !

खरोखरी, माते, अपार सामर्थ्य तुझ्या ठिकाणी आहे. शत्रु-सैन्याच्या लाटा परतवून लावून आम्हां संतानांचे रक्षण करणाऱ्या हे माते, मी तुला नमस्कार करतो.

तूच आमचे ज्ञान, तूच आमचे चारित्र्य आणि तूच आमचे चैतन्य आहेस. आमच्या देहांतील प्राण खरोखरी तूच आहेस. आमच्या मनगटातील शक्ती तूच आणि आमच्या अंतःकरणातली कालीही तूच. मंदिरामंदिरातून आम्ही ज्या देवमूर्तींची प्राणप्रतिष्ठा करतो ती सर्व तुझीच रूपे होत.

आपल्या दाही हातांत दहा शस्त्रे धारण करणारी शत्रुसंहारिणी दुर्गा तूच आणि कमलपुष्पांनी भरलेल्या सरोवरात विहार करणारी कमलकोमल लक्ष्मी तूच. विद्यादायिनी सरस्वती तूच. तुला आमचा नमस्कार असो.

माते, मी तुला वंदन करतो. ऐश्वर्यदात्री, पुण्यप्रद ... पावन, पवित्र जलप्रवाहांनी आणि अमृतमय फळांनी समृद्ध ... हे माते, तुझ्या थोरवीला कशाचीच तोड नाही, कोणतीच ... नाही. हे माते, हे जननी, आम्ही तुला प्रणाम करतो.

माते, तुझा वर्ण श्यामल आहे, तुझे चारित्र्य धवल ... तुझे मुख सुंदर हास्याने विलसत आहे, तू सर्वाभरणांनी ... असल्याने किती सुंदर दिसतेस !

खरोखरी आम्हांला धारण करणारी तूच आणि ... भरणपोषण करणारीही तूच. माते, तुला आमचे ... प्रणिपात !

अशा प्रकारे हे गीत गाऊन झाल्यावर भवानंद ... स्पष्टच म्हणतो – हे आमच्या देशाचे वर्णन आहे, दु... नव्हे. आम्हांला एकच माता आहे – जन्मभूमी. आम्हांला ... आई नाही; पिता, बहीण, भाऊ, मुले, घर, संसार ... नाही. आमची माता एकच. सुजला, सुफला, मलयजशीतला ... देशमाता – महाजननी.

वंदेमातरम् या गीतात मातृभूमीचे व इथल्या निसर्गाचे ... वर्णन असले, तरी तेवढे वर्णन करणे एवढाच बंकिमचंद्रांच्या मनात हेतू नव्हता, तर या गीतातून स्फूर्ती घेऊन हिंदुस्थानातील लोकांनी राज्यक्रांतीला प्रवृत्त व्हावे व हा देश ब्रिटिशांच्या जुलमी जोखडातून मुक्त करावा, अशी त्यामागे त्यांची आकांक्षा होती. परंतु बंकिमचंद्रांच्या हयातीत तशा ... राज्यक्रांतीच काय, तिची पुसटशी कल्पनाही कोणाच्या ... उद्भवली नाही. त्यामुळे ते फार व्यथित झाले होते. बंकिमचंद्रांच्या हयातीत जरी नाही, तरी त्यानंतर काही वर्षांतच वंदेमातरम् गीताने आपले स्फोटक सामर्थ्य ... वासीयांच्या प्रत्ययाला आणून दिले व अल्पावधीतच वंदेमातरम् ही एक स्वातंत्र्याची रणघोषणा ठरली.

बंगालच्या विभाजनाला विरोध करण्यासाठी दि. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१९०६ रोजी बंगालमधील बारिसाल शहरी एक परिषद भरली होती. त्या परिषदेत वंदेमातरम् हे शब्द उच्चारण्यावर बंगालचा गव्हर्नर श्री. फुल्लर याने बंदी घातली. त्यामुळे संतापून जाऊन केवळ बंगालमधल्याच नव्हे; तर सबंध हिंदुस्थानातल्या लोकांनी सर्वत्र वंदेमातरम्चा जयघोष सुरू केला. तसाच जयघोष करीत करीत हजारो देशभक्त तुरुंगात गेले, शेकडो जणांनी फटक्यांच्या सजा भोगल्या, तर अन्य अनेकांनी लाठीमारापासून गोळीबारापर्यंत नाना प्रकारच्या शिक्षांना तोंड दिले. या काळात प्रत्येक सभेत वंदेमातरम् गीत गायिले जाऊ लागले. देशभक्त बिपिनचंद्र पालांनी या काळात नवे वृत्तपत्र काढले, त्याचे नाव त्यांनी वंदेमातरम् असेच ठेवले. वंदेमातरम्च्या उद्घोषाने जो जो सरकार चिडू लागले, तो तो भारतीय जनतेने वंदेमातरम्चा गगनभेदी जयघोष करून इंग्रजांना चिडवण्याचे आणि स्वातंत्र्यआंदोलन प्रखर करण्याचे धोरण अवलंबिले.

अशा या इतिहासात प्रसिद्ध असलेल्या 'वंदेमातरम्' गीतातील पहिली दोनच कडवी सध्या दुय्यम राष्ट्रगीत म्हणून मान्यता पावली आहेत. सभेमध्ये 'वंदेमातरम्' हे राष्ट्रगीत गाण्याचा प्रघात पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांनी सुरू केला. इ. स. १९१५ पासून दर वर्षी त्यांना राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनात हे राष्ट्रगीत गाण्यासाठी निमंत्रण येत असे. त्यांनी लावलेली काफी रागातली चाल विशेष लोकप्रिय झाली.

भारताचे सांप्रतचे सर्वमान्य राष्ट्रगीत 'जनगणमन' हे कविश्रेष्ठ रवींद्रनाथ ठाकूर यांनी रचले. दि. २० डिसेंबर १९११ या दिवशी ते राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर गायिले गेले. गांधीजींनी त्याला भारताचे भक्तिगीत म्हटले आहे. हे गीत आरंभी सम्राट पंचम जॉर्ज यांच्या स्वागतासाठी रचले गेले असल्याची एक कल्पना कुणीतरी लोकांत उठवून दिली. रवींद्रनाथ ठाकूर यांना हे समजले, तेव्हा त्यांना ती गोष्ट लागली. आपल्या एका मित्राला लिहिलेल्या पत्रात त्यांनी आपले हे दुःख व्यक्त करून पुढे या गीताची जन्मकथाच निवेदन केली. कविवर्य रवींद्रनाथ लिहितात – सरकारदरबारी प्रतिष्ठा पावलेल्या माझ्या एका मित्राने मला सम्राटांचे जयगान रचण्याबद्दल विशेषच आग्रह केला. ते ऐकून मी विस्मित झालो. विस्मयाबरोबरच माझ्या मनात क्षोभ उसळला. याच मनस्तापाच्या प्रबल प्रतिक्रियेच्या धक्क्यातून 'जनगणमन अधिनायक' या गीताचा जन्म झाला. पतन-अभ्युदयामुळे ओबडधोबड बनलेल्या मार्गावरून युगानुयुगे प्रवास करणाऱ्या यात्रिकांचा जो चिरसारथी, जनगणाचा जो अंतर्यामी व मार्गदर्शक अशा त्या भारतभाग्यविधात्याचा मी त्या गीतात जयघोष केला आहे.

रवींद्रनाथांचे जनगणमन हे संपूर्ण गीत पुढीलप्रमाणे आहे –

जनगणमन-अधिनायक जय हे भारत-भाग्यविधाता ।
पंजाब सिंधु गुजरात मराठा द्राविड उत्कल वंग ।
विंध्य हिमाचल यमुना गंगा उच्छल जलधितरंगा ।
तव शुभ नामे जागे । तव शुभ आशिस मागे ।
गाहे तव जय गाथा ।।
जनगणमंगलदायक जय हे भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।
अहरह तव आव्हान प्रचारित सुनि तव उदार वाणी ।
हिंदु बौद्ध सिख जैन पारसिक मुसलमान ख्रिस्तानी ।
पूरब पश्चिम आसे । तव सिंहासन पासे ।
प्रेमहार हय गाथा ।।
जनगणऐक्यविधायक जय हे भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।
पतनअभ्युदयबंधुर पंथा युग-युग धावित यात्री,
तुम चिर सारथि ! तव रथचक्रे मुखरित पथ दिन-रात्री,
दारुण विप्लव माजे । तव शंखध्वनि बाजे ।
संकट-दुःखत्राता ।
जनगण-पथ-परिचायक जय हे भारत-भाग्यविधाता ।
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।
घोरतिमिरघननिबिड निशीथे पीडित मूर्छित देशे,
जागृत छिल तव अविचल मंगल नत नयने अनिमेषे ।
दुःस्वप्ने आतंके । रक्षा करिले अंके ।
स्नेहमयी तुमि माता ।
जनगण-दुःख-त्रायक जय हे भारत-भाग्यविधाता
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे ।।
रात्र प्रभातिल उदिल रविच्छवि पूर्व-उदयगिरि-भाले ।
गाहे विहंगम पुण्य-समीरण नवजीवन-रस ढाले ।
तव करुणारुण रागे । निद्रित भारत जागे !
तव चरणे नत माथा !
जय हे, जय हे, जय हे, जय जय जय जय हे !
भारत-भाग्यविधाता

अर्थ – तू जनतेच्या हृदयाचा स्वामी आहेस. भारताचा भाग्योदय करणारा आहेस. पंजाब, सिंध, गुजरात, महाराष्ट्र, द्राविड, उत्कल, बंगाल या सर्वांना तुझा नामघोष जागृत करतो. विंध्याद्री व हिमाचल या ठिकाणी तुझे यशोगान ऐकू येते. गंगा-यमुनेच्या प्रवाह-संगीतात ते निनादित होते. उसळी मारणाऱ्या समुद्राच्या लाटाही तुझ्या नामाचा गजर करतात. हे सर्व तुजपाशी आशीर्वाद मागतात. तुझी कीर्ती गातात. तू सर्व लोकांचे मंगल करणारा आहेस. तुझा अनेकवार जयजयकार असो. हिंदू, बौद्ध, शीख, जैन, पारशी, मुसलमान, ख्रिस्ती या सर्वांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या सिंहासनापाशी एकत्र व्हावे, असे तू त्यांना अहोरात्र हाका मारून सांगतोस. पूर्व आणि पश्चिम तुझ्याजवळ एक होऊन तुझी प्रार्थना करतात आणि तुझ्या प्रेमाचा हार गुंफतात. तू लोकांचे ऐक्य करणारा आहेस, भारताचा भाग्योदय करणारा आहेस. तुझा अनेकवार जयजयकार असो! हे यात्रेकरू युगानुयुगे या चढउताराच्या मार्गावरून धावत आहेत. हे चिरसारथे, हा मार्ग तुझ्या रथचक्रांनी अहोरात्र निनादित केला आहे. दारुण संकटाच्या वेळी तुझ्या तुतारीचा ध्वनी गर्जत राहतो. तू दुःख – संकटापासून रक्षण करतोस, आम्हांला योग्य मार्ग दाखवतोस. तुझा अनेकवार जयजयकार असो! या रात्रीच्या घनदाट अंधकारात हा देश मूर्च्छेने पीडित झाला असताना व दुःस्वप्नात गढून गेला असताना तू आमची स्नेहमयी माता त्याला आपल्या मांडीवर घेऊन सदैव आपल्या आर्द्र नेत्रांनी त्याच्याकडे पाहत राहतेस व आपले प्रेमळ हात त्याच्या अंगाखांद्यावर ठेवतेस. आमचे दुःख निवारण करणाऱ्या तुझा अनेकवार जयजयकार असो! रात्र संपली आहे आणि उदयगिरीवर सूर्यकिरण दिसू लागले आहेत. पक्षी गाऊ लागले आहेत आणि सकाळचा हा झुळझुळ वाहणारा पवित्र वारा आमच्यांत नवजीवन ओतीत आहे. तुझे स्नेहपूर्ण करपल्लव या निद्रित भारताला जागृत करीत आहेत. हे मस्तक तुझ्या चरणांवर नम्र झाले आहे. हे भारत–भाग्यविधात्या, तुझा सतत जयजयकार असो!

दि. २४ जानेवारी १९५० या दिवशी भारतीय घटना परिषदेने 'जनगणमन' या गीतातील फक्त पहिल्याच कडव्याला राष्ट्रगीताची मान्यता दिली. स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषबाबूंनी या गीताचे हिंदी रूपान्तर करून ते आपल्या आझाद-हिंद सेनेचे राष्ट्रगीत म्हणून स्वीकारले होते. [भारतीय राष्ट्रगीते– ज. गं. करंदीकर, १९५२; आपला मान : आपला अभिमान–यदुनाथ थत्ते, १९६१; वंदेमातरम् – अमरेंद्र, १९७२]

राष्ट्रध्वज भारताचे एक राष्ट्रीय मानचिन्ह. भारताच्या राष्ट्रध्वजावर वरती गर्द केशरी, मध्ये पांढराशुभ्र व खाली गर्द हिरवा असे पट्टे आणि मधल्या पांढऱ्या पट्टयावर गडद निळ्या रंगात अशोकचक्र असते. या चक्राचा व्यास पांढऱ्या पट्टयाच्या रुंदीएवढाच असतो. या चक्राला २४ आरे असतात. या ध्वजाच्या लांबी–रुंदीचे प्रमाण ३:२ असे असावे, असा संकेत आहे.

राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राविषयीच्या भावना व्यक्त करणारे एक प्रतीक म्हणजे राष्ट्रध्वज होय. आपल्या राष्ट्रीय आशाआकांक्षा व आपले राष्ट्रीय आदर्श, यांचे नित्य स्मरण करून देणारे एक प्रभावी साधन म्हणून राष्ट्रध्वजाकडे पाहिले जाते. राष्ट्रध्वजात सामर्थ्य संचरते, ते राष्ट्रभक्तांच्या तपस्येमुळे व राष्ट्रासाठी आत्मबलिदान करणाऱ्या हुतात्म्यांच्या त्यागामुळे. राष्ट्रध्वजात राष्ट्राची प्रतिष्ठा सामावलेली असते. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा मान व प्रतिष्ठा जपणे, हे राष्ट्रातल्या सर्व नागरिकांचे कर्तव्य असते. पाहा–ध्वज. [आ. मा. आ. अ.]

राष्ट्रभक्ती ऋग्वेदात राष्ट्र हा शब्द राज्याचा भूप्रदेश या अर्थाने वापरलेला आढळतो. वरुणाला राष्ट्रांचा राजा म्हटले आहे (ऋ. ७.३४.११). तै. संहिता (७.५.१८.१) आणि वाज. सं. (२२.२२) यांत 'या राष्ट्रात राजा शूर, कुशल धनुर्धर व महारथी होवो' असा आशीर्वाद आहे, तिथेही राष्ट्र म्हणजे राज्याने व्यापलेला प्रदेश, असाच अर्थ आहे. अथर्ववेदात (१२.१.८,१०) पृथ्वीला माता असे संबोधून राष्ट्राला सामर्थ्य व तेज देण्याविषयी तिची प्रार्थना केली आहे.

राज्याङ्गानां च सर्वेषां राष्ट्राद् भवति सम्भवः।
तस्मात् सर्वप्रयत्नेन राजा राष्ट्रं समुन्नयेत् ॥

(कामन्द. नीति. ६.३)

अर्थ – राष्ट्रातूनच राज्याची सर्व अंगे उद्भवतात. म्हणून राजाने सर्वंकष प्रयत्न करून राष्ट्राची उन्नती करावी.

हीच कल्पना अग्निपुराणात (२३९.२) असून, राज्याच्या सर्व अंगांमध्ये राष्ट्र (भूप्रदेश) हेच अंग सर्वांत महत्त्वाचे होय, असे सांगितले आहे.

सध्याची राष्ट्रविषयक व्यापक कल्पना प्राचीन काळी उदयास पावलेली नव्हती. राष्ट्रीयत्वाची भावना त्या काळी ज्ञात नव्हती. स्मृती, सूत्रे व पुराणे या प्राचीन ग्रंथांत, स्वर्ग व मोक्ष यांच्या प्राप्तीसाठी श्रेष्ठ पुण्यभूमी व कर्मभूमी, असा भारतवर्षाचा गौरव धार्मिक दृष्टीने केलेला आहे. प्राचीन साहित्यात राष्ट्रीयत्वाचे विवेचन केलेले नसले, तरी वैदिक आर्यांनी भारतवर्षात एक संघटित राष्ट्र निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता, असे दिसते. पाच-सहा हजार वर्षांपूर्वी आर्य लोक भारतात आले. त्या वेळी भारतात शेकडो जमाती निरनिराळ्या भागांत वसलेल्या होत्या. द्रविड, असुर, राक्षस, वानर, दैत्य, दानव, दास, निषाद, किरात, पुलिंद, आंध्र, पणी, कांबोज, पारद, खस अशी त्यांची नावे प्राचीन संस्कृत वाङ्मयात सापडतात. आर्यांनी प्रथम सप्तसिंधुप्रदेशात वसाहती केल्या. नंतर ते गंगा-यमुनांच्या दुआवात जाऊन वसले. कालांतराने त्यांनी मध्यभारतात राज्ये स्थापली. त्यांचा व इथे पूर्वीच वसलेल्या आर्येतर टोळ्यांचा संघर्ष दीर्घ काल चालू होता.

वैदिक आर्यांनी उत्तर भारतात वर्चस्व प्रस्थापित करून तिथे आपल्या यज्ञधर्माचा प्रसार केला. त्यानंतर अगस्त्य, ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शरभंग, सुतीक्ष्ण, इ. वैदिक ऋषींनी दक्षिण भारतात आपले आश्रम स्थापून तिथल्या आर्येतर लोकांनाही यज्ञधर्माची दीक्षा दिली. वेद, यज्ञ व संस्कृत भाषा या त्रयीच्या साहाय्याने त्यांनी 'कृण्वन्तो विश्वमार्यम्' ही आपली प्रतिज्ञा पुरी केली. वैदिक आर्यांनी अनार्य लोकांशी विवाहसंबंधही जुळवले. श्रीकृष्णाच्या यादव कुलाने आर्य संस्कृतीच्या प्रसारार्थ मोठेच कार्य केले. त्यांनी राजस्थान, गुजरात, माळवा, या प्रदेशांत आपली सत्ता स्थापली आणि तिथल्या अनार्यांशी विवाहसंबंध केले. वैदिक आर्यांनी द्रविड, निषाद, किरात, इ. लोकांच्या देवतांचाही स्वीकार केला. सर्व समाज एकरूप व्हावा, या उद्देशाने प्राचीन काळी निरनिराळ्या प्रकारच्या कथा रचण्यात आल्या. त्या कथांत अनेक श्रेष्ठ ब्राह्मण व क्षत्रिय पुरुषांशी किंवा कुलांशी अनार्य जमातींचे सांस्कृतिक संबंध जोडून दाखवले आहेत.

अशा प्रकारे भिन्न भिन्न जाती-जमातींच्या संमिश्रणामुळे एक समान संस्कृतीचा समाज निर्माण झाल्यानंतर आर्य लोकांनी तो संघटित करण्याचा निश्चय केला. कोणताही समाज संघटित करायचा असेल, तर त्यासाठी काही संघटक तत्त्वांचा अवलंब करावा लागतो. प्राचीन काळी धर्म व वंश ही दोन तत्त्वे अत्यंत प्रभावी होती. त्यांतील धर्म हे तत्त्व आर्यांनी आपल्या संघटनेसाठी अंगिकारले होते. यज्ञ हा त्यांचा धर्म होता. तो त्यांचा उपास्यही होता. त्याच्या अनुष्ठानातून वैदिक संस्कृती विकसित झाली होती. म्हणून यज्ञाचे उपासक ते स्वजन व यज्ञाचे विरोधक ते शत्रू असा आपपरभाव वैदिक आर्यांच्या मनात निश्चित झालेला होता. आर्यांचे शत्रू पणी, दस्यू, हे यज्ञ न करणारे होते; त्यांचा नाश करण्याविषयी ते इंद्राची प्रार्थना करीत. वैदिक साहित्यात प्रारंभी या यज्ञप्रधान संस्कृतीचा विकास झालेला दिसून येतो. कालांतराने आर्यांची यज्ञनिष्ठा भूमीचा आश्रय करू लागली. यज्ञीय भूमी, असंख्य यज्ञांमुळे पुनीत झालेली भूमी ती आर्यभूमी, असे ते मानू लागले. यज्ञप्रधान संस्कृती जेवढ्या प्रदेशात पसरली तेवढ्या प्रदेशाला ते आर्यावर्त म्हणू लागले. त्यांच्या मनात यज्ञनिष्ठेच्या जोडीला भूमिनिष्ठा उदय पावली.

कालांतराने आर्य लोकांनी दक्षिण भारतात वसाहती केल्या आणि तिथल्या सर्व जमातींना आपल्या संस्कृतीमध्ये सामावून घेतले. हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व भूप्रदेशाला भारतवर्ष हे नाव मिळाले. ही सर्व भूमी पवित्र ठरली. गंगा-यमुनांप्रमाणेच गोदावरी, कावेरी, कृष्णा, तुंगभद्रा, इ. दक्षिण भारतातील नद्याही पवित्र ठरल्या. द. भारतातील पर्वत व नगरे ही पुण्यक्षेत्रे झाली.

वैदिक साहित्यात आर्यांची भूमिनिष्ठा अनेक जागी दिसून येते. अथर्ववेदातील पृथ्वीसूक्तात (अथर्व. १२.१) कवीने या भूमीच्या उज्ज्वल परंपरेवरील आपली भक्ती पुढील तेजस्वी शब्दांत प्रकट केली आहे–

यस्यां पूर्वे पूर्वजना विचक्रिरे यस्यां देवा असुरानभ्यवर्तयन्।
गवामश्वानां वयसश्च विष्ठा भगं वर्चः पृथिवी नो दधातु ॥
यो नो द्वेषत्पृथिवि यः पृतन्याद्योऽभिदासान्मनसा यो वधेन।
तं नो भूमे रन्धय पूर्वकृत्वरि ॥
यत्ते भूमे विखनामि क्षिप्रं तदपि रोहतु।
मा ते मर्म विमृग्वरि मा ते हृदयमर्पिपम् ॥
अहमस्मि सहमान उत्तरो नाम भूम्याम् ॥
दीर्घं न आयुः प्रतिबुध्यमाना वयं तुभ्यं बलिहृतः स्याम ॥

भावार्थ – ज्या ठिकाणी आमच्या पूर्वजांनी अद्‌भुत पराक्रम केले, ज्या ठिकाणी देवांनी असुरांचा विध्वंस केला, ती ही आमची जन्मभूमी आम्हांला ऐश्वर्य व तेज देवो (५). हे शत्रुमर्दिनी भूमाते ! जे आमचा द्वेष करतात, जे सेना घेऊन आमच्यावर आक्रमण करतात व आमचा नाश करण्यासाठी टपून बसलेले असतात, त्यांचा तू नाश कर (१४). हे भूमी ! मी जी जागा खणतो ती शीघ्र प्राणतत्त्वाने भरून जावो. माझ्या हातून तुझ्या मर्मांवर आघात न होवो. तुझ्या हृदयाला व्यथा न होवो (३५). मी आपल्या मातृभूमीसाठी व तिच्या दुःखविमोचनासाठी सर्व प्रकारचे कष्ट भोगावयास सिद्ध आहे (५४). आम्हांला दीर्घायुष्य असावे. जागृत असलेले आम्ही प्रसंगी आत्मबलिदान करण्यासही सिद्ध आहो (६२).

पुराणांतही भारतवर्षाबद्दलचा उत्कट अभिमान व्यक्त झालेला आहे. 'सहस्र जन्मांनंतर भारतवर्षात जन्म मिळतो आणि येथे जन्मलेल्यांनाच स्वर्ग व मोक्ष प्राप्त होतात' असे विष्णू व वायू या पुराणांत म्हटले आहे. ब्रह्म पुराणातील २७ व्या अध्यायाला भारतवर्षानुकीर्तनम् असेच नाव आहे. 'जे नरश्रेष्ठ भारतवर्षात जन्माला येतात ते धन्य होत. देवांना या भूमीत जन्म मिळावा, अशी फार इच्छा असते.' असा गौरव पुराणकाराने केला आहे. या भूमिनिष्ठेतूनच राष्ट्रनिष्ठेचा उगम होतो. मात्र धर्म, संस्कृती व मातृभूमीवरील निष्ठा या बंधनांमुळे एकरूप झालेल्या समाजाला एकछत्री राजसत्तेचा आश्रय प्राप्त झाल्यावाचून संघटित राष्ट्र निर्माण होत नाही. म्हणूनच श्रीकृष्णाने भारतीय युद्धानंतर पांडवांची सार्वभौम सत्ता अखिल भारतावर प्रस्थापित करण्यासाठी त्यांना सर्व प्रकारे साहाय्य केले. त्यामुळे भारतवर्षात एक राष्ट्र निर्माण झाले. पण ती सार्वभौम सत्ता दीर्घ काळ राहिली नाही. बुद्धपूर्वकाळात भारतात अनेक लहान लहान स्वतंत्र गणराज्ये व राज्ये नांदत होती. मात्र त्यांच्यांत राष्ट्रनिष्ठा पूर्णपणे जागृत होती. शिकंदराने जेव्हा भारतावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आक्रमण केले, तेव्हा सीमेवरील बहुतेक सर्व गणराज्यांनी त्याला कडवा प्रतिकार केला. त्या काळी भरतभूमीचा तीव्र अभिमान लोकांमध्ये दृढमूल झालेला होता. स्वभूमीविषयी नितांत भक्ती आणि आक्रमकाविषयी द्वेष ही राष्ट्रनिष्ठेची दोन प्रमुख अंगे होत. असे उत्कट रागद्वेष भारतीयांच्या मनात त्या वेळी होते. म्हणूनच त्यांनी मातृभूमीच्या संरक्षणासाठी निकराची झुंज दिली. त्यांचा पराजय झाला, नाश झाला, तरीही शिकंदराला इथून नामोहरम होऊन परत फिरावे लागले, हे विसरता कामा नये. सीमेवरील त्या शूर लोकांच्या बलिदानामुळेच भारताचे त्या काळी रक्षण झाले.

भारतीय लोकांमध्ये ही राष्ट्रनिष्ठा रुजविण्याचे कार्य ज्यांनी केले, त्या ब्राह्मण पंडितांचा ग्रीक ग्रंथकारांनी महान तत्त्ववेत्ते म्हणून गौरव केला आहे. त्यांच्या उपदेशामुळेच हजारो लोकांनी शिकंदराशी प्राणपणाने लढा दिला, असे इतिहास सांगतो. ब्राह्मणांचा हा अधिकार जाणूनच अशा कित्येक विद्वान ब्राह्मणांना शिकंदराने फाशी दिले.

पुढे आर्य चाणक्याचा तेजस्वी शिष्य चंद्रगुप्त मौर्य याने शिकंदराला प्रतिकार करणाऱ्या गणराज्यांतूनच आपले सेनादल संघटित केले आणि मगधाचे राज्य जिंकले. लवकरच चंद्रगुप्ताने अखिल भारतावर सार्वभौम सत्ता प्रस्थापित करून एक महान राष्ट्र निर्माण केले.

मौर्यांचे साम्राज्य शंभर वर्षे देखील टिकले नाही. त्यानंतर भारतावर शक, यवन, कुशाण, हूण, गुर्जर, इ. अनेक परकीय टोळ्यांनी आक्रमणे केली व राज्येही स्थापली. पण ते सर्व लोक येथे स्थायिक होऊन भारतीय समाजात मिसळून गेले. त्या कालखंडात सातवाहन, गुप्त, चालुक्य, राष्ट्रकूट, गुर्जर–प्रतीहार, इ. राजवंशांनी भारतात मोठी साम्राज्ये स्थापली. पण ती सर्व राजाधिष्ठित होती. लोकांची संघटना किंवा प्रजेची सत्ता त्यांच्या पाठीशी नव्हती. इ. स. च्या १७ व्या शतकात महाराष्ट्रात समर्थ रामदासस्वामींनी मराठी समाजाला जागृत करून त्यांची संघटना करण्याचे जे कार्य आरंभिले, ते या दृष्टीने अलौकिक म्हणावे लागेल. 'मराठा तितुका मेळवावा' हे नवे संघटनातत्त्व त्यांनी देशाला शिकविले.

पूर्वपरंपरा, मातृभूमी व भाषा यांच्या अभिमानाने एकरूप व संघटित झालेला समाज म्हणजे राष्ट्र होय. राष्ट्राच्या निर्मितीसाठी लोकशक्ती जागृत व संघटित केली पाहिजे, हे जाणूनच समर्थांनी वरील मंत्र महाराष्ट्राला दिला. याविषयी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी केलेले विवेचन असे –

या राष्ट्रकल्पनेचा उदय युरोपात नुकताच झाला होता आणि इग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली ही भिन्न राष्ट्रे तेथे उदय पावत होती. त्यांपैकी राष्ट्रतत्त्वावर प्रत्यक्ष समाजसंघटना करण्याचे साधले ते फक्त इंग्लिशांना. इतर देशांना एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत त्यात यश आले नव्हते. अशा या 'राष्ट्र' शक्तीचे दर्शन सतराव्या शतकातच समर्थांना झाले, यातच त्यांचे अलौकिकत्व आहे. 'सर्वही पेरणे विद्या लोकांमध्ये हळूहळू, नेणते-जाणते करणे कथानिरूपणे सदा', 'लोक हे राखिता राजी सर्व राजीच होतसे', 'जन हे बोळती तेथे अंतरात्माचि बोळला', 'जनी जनार्दन बोळला, मग काय उणे तयाला', 'जो मानिला बहुतांसी कोणी बोलो न सके त्यासी, धगधगीत पुण्यराशी महापुरुष' या वचनांमधून समर्थांना लोकशक्तीचा, राष्ट्रकल्पनेचा साक्षात्कार कसा झाला होता, हे ध्यानी येईल.

इस्लामी आक्रमणाचा निःपात करण्यात मराठ्यांना यश आले त्याचे हे कारण आहे. स्वराज्य व स्वधर्म यांचा संयोग समर्थ रामदास व छत्रपती शिवाजीमहाराज या दोघांनी घडवून आणलाच. पण त्याशिवाय मराठ्यांचे एक राष्ट्र घडवावे, या नव्या तत्त्वावर समाजाची संघटना करावी, असे प्रयत्न त्या दोन महापुरुषांनी केले. महाराष्ट्रात सतराव्या शतकात जी प्रचंड शक्ती निर्माण झाली, ती संघटनेच्या या नव्या तत्त्वातून निर्माण झाली, यात शंका नाही. त्या शक्तीचे प्रत्यंतर औरंगजेबाशी झालेल्या युद्धात लगेच आले. औरंगजेबासारखा अत्यंत बलाढ्य बादशहा आपल्या सर्व सामर्थ्यानिशी जातीने लढत असतानाही तो मराठ्यांना जिंकू शकला नाही.

पुढे पेशव्यांनी आपल्या पराक्रमाने मोगली सत्तेचा नाश करून हिंदू साम्राज्याची स्थापना केली. त्यांना अनेक थोर व शूर मराठा सरदारांनी बहुमोल साह्य केले हे खरे. पण समर्थ व शिवाजी महाराज यांच्या प्रेरणेने जी राष्ट्रनिष्ठा व धर्मनिष्ठा महाराष्ट्रात निर्माण झाली होती, ती लवकरच लुप्त झाली. स्वार्थ, दुही, यादवी, फितुरी, राष्ट्रनिष्ठेचा अभाव यांमुळे मराठेशाही बुडाली. इंग्रजांच्या संघटित सामर्थ्यापुढे मराठ्यांचा टिकाव लागला नाही.

पेढीवाले, सावकार, व्यापारी, सरदार, जमीनदार, ब्राह्मण, राजपूत हे सर्व लोक इंग्रजांचे राज्य यावे म्हणून आतुर झाले होते व त्यांना सर्व प्रकारे मदत करीत होते. त्यामुळे इंग्रजांना अल्पावधीतच सर्व भारतावर सत्ता स्थापणे सुलभ झाले. हे पेढीवाल्यांनी प्रत्येक लढाईच्या वेळी इंग्रजांना गुप्त माहिती पुरवून व द्रव्य देऊन आपल्या परनिष्ठेविषयी कंपनी सरकारकडून प्रशस्तिपत्रे मिळविली होती. खडकीच्या लढाईच्या वेळी पुण्याच्या काही ब्राह्मणांनी साहेबाच्या कल्याणासाठी अनुष्ठाने बसवली होती व नवसही केले होते. आचार्य जावडेकर यांनी आपल्या आधुनिक भारत या ग्रंथात हिंदूंच्या या स्वतंत्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वृत्तीचे तर्पशिलाने वर्णन केले आहे. अनेक इंग्रजांनी लिहून ठेवले आहे, की हिंदी लोकांना आत्मप्रत्यय वाटत नाही. त्यांच्यांत राष्ट्राभिमान नाही व ते एकजूट करू शकत नाहीत, हेच आपल्या साम्राज्याचे सामर्थ्य आहे.

पेशवाई बुडाल्यानंतर इंग्रजांनी सर्व भारतावर ब्रिटिश सत्ता स्थापली आणि हिंदी लोकांना इंग्रजी शिकवून पाश्चात्य ज्ञान द्यावला प्रारंभ केला. त्यामुळे लवकरच अनेक भारतीय नेत्यांना नवी दृष्टी प्राप्त झाली आणि राष्ट्रीयता, लोकशाही व विज्ञाननिष्ठा ही पाश्चात्यांच्या सामर्थ्याची रहस्ये त्यांना उमगली. या नवीन ज्ञानाच्या आधारे आपल्या समाजाची पुनर्घटना करण्यासाठी येथे सर्वांगीण क्रांती घडविणे आवश्यक आहे, हे त्यांच्या ध्यानात आले. अशा सर्वांगीण क्रांतीची बीजे पेरणारे पहिले थोर पुरुष म्हणजे राजा राममोहन राय हे होत. त्यांनी प्रथम रूढ हिंदू धर्मावर प्रखर टीका सुरू केली. कारण विकृत धर्मकल्पनांपासून समाज मुक्त झाल्यावाचून दुसरी कसलीही क्रांती होणे शक्य नव्हते. कर्मकांड, मायावाद, जातिभेद, स्त्रीदास्य, सतीची चाल या सर्वांचा त्यांनी कडाडून निषेध केला आणि त्याच वेळी भौतिक विद्यांची उपासना सुरू व्हावी असे प्रयत्न चालू केले. त्यांनी स्थापलेल्या ब्राह्म समाजाचे कार्य त्या दृष्टीने अत्यंत मोलाचे ठरले आहे.

गेल्या शतकातील दुसरे मोठे धर्मसुधारक म्हणजे न्या. रानडे हे होत. मानवी प्रतिष्ठेचे पुनरुज्जीवन हे त्यांच्या धार्मिक व सामाजिक तत्त्वज्ञानाचे आदिसूत्र होते. 'आपल्यावरची विवेकहीन धार्मिक बंधने हे आपल्या अधःपाताचे मुख्य कारण होय. आत्मसंयमामुळे येणारी मानवी प्रतिष्ठा आपल्याला कधीच आली नाही.' असे उद्गार त्यांनी सामाजिक परिषदेतील एका भाषणात काढले आहेत. कर्मकांडप्रधान जड आचारधर्माच्या जागी मानवी मनाची व बुद्धीची प्रतिष्ठा वाढवणारा तात्त्विक धर्म प्रस्थापित करणे हे त्यांचे धोरण होते. त्यांनी ब्राह्म समाजप्रमाणेच धर्मसुधारणा करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्रात प्रार्थना समाजाची स्थापना केली.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी आर्य समाजाची स्थापना करून अशाच प्रकारचे धर्मसुधारणेचे कार्य पंजाबात सुरू केले. त्यांना लाला हंसराज, स्वामी श्रद्धानंद, लाला लजपतराय, यांच्यासारखे थोर अनुयायी मिळाल्यामुळे पंजाबात धर्मक्रांतीची जी बीजे पेरली गेली, त्यांचा त्वरेने विकास झाला.

स्वामी विवेकानंदांनी, आत्मोद्धारासाठी भौतिकवादाचा आश्रय करणे अवश्य आहे, असे प्रतिपादले आहे. त्यामुळे जन्मनिष्ठ उच्चनीचता नष्ट होईल, बुद्धिप्रामाण्य निर्माण होईल व सुखी जीवनाची द्वारे सर्वांना खुली होतील, अशी त्यांना खात्री वाटत होती. त्यासाठीच त्यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना केली.

राजा राममोहन राय, रानडे, दयानंद, विवेकानंद यांना जी सर्वांगीण क्रांती अभिप्रेत होती व समाजरचनेचे जे नवे तत्त्वज्ञान सांगायचे होते, ते गेल्या शतकात भारतातील अनेक समाजसुधारकांच्या मनात उदय पावले होते. ते तत्त्वज्ञान पाश्चात्य विद्येमुळे सर्व प्रदेशांत प्रसृत झाले होते. ईश्वरचंद्र विद्यासागर, सुरेंद्रनाथ बानर्जी, केशवचंद्र सेन, स्वामी रामतीर्थ, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, आगरकर, पं. अयोध्यानाथ, ज्योतिबा फुले, लाला हंसराज, लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद, आनंदा चार्लू, सुब्रह्मण्य अय्यर, इ. असंख्य विचारवंत व कार्यकर्ते ते नवविचार लोकांच्या मनात ठसवण्याचा प्रयत्न करीत होते. समाजात आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्यासाठी त्यांनी ब्राह्म समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, महाजन सभा, भार्गव सभा, इ. अनेक संस्था स्थापल्या आणि अनेक वृत्तपत्रे काढून सर्व भारतभर नवविचारांचे एक प्रचंड आंदोलन सुरू केले.

हे समाजसुधारक जरी अंतर्मुख होऊन स्वसमाजावर प्रखर टीका करीत असले, तरी त्यांना भारताच्या प्राचीन वैभवाचा व पूर्वपरंपरेचा अभिमान होता. हिंदू समाजाच्या पुनर्घटनेसाठी जी तत्त्वे त्यांनी स्वीकारली ती वेद, उपनिषदे, महाभारत, गीता या ग्रंथांत सांगितलेलीच होती. पाश्चात्य विद्येमुळे व पाश्चात्य पंडितांच्या प्रेरणेने भारतीय पंडितांनी आपल्या प्राचीन ग्रंथांचा व इतिहासाचा अभ्यास नवीन दृष्टीने सुरू केला. त्यामुळे भारताचा वैभवशाली इतिहास आणि प्राचीन भारताची श्रेष्ठ संस्कृती यांचे ज्ञान त्यांना झाले आणि त्यांचा परंपराभिमान जागृत झाला.

या बाबतीत स्वामी विवेकानंदांनी केलेले कार्य असामान्य आहे. इ. स. १८९३ साली अमेरिकेत जी सर्वधर्मपरिषद भरली होती, त्या परिषदेत विवेकानंदांनी हिंदू धर्माचे श्रेष्ठत्व सर्व जगाला समजावून सांगितले. त्यांच्या भाषणामुळे सर्व देशांतले पंडित फार प्रभावित झाले आणि भारतीय लोकांनाही आपल्या धर्माची व संस्कृतीची थोरवी समजली. त्यामुळे त्यांचा पूर्वपरंपराभिमान व देशाभिमान अधिकच दृढ झाला. स्वामीजींनी स्थापन केलेल्या रामकृष्ण मिशनचे कार्य त्या दृष्टीने स्पृहणीय आहे.

त्याच काळात दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, सुरेंद्रनाथ बानर्जी, लाला लजपतराय, बिपिनचंद्र पाल, सुब्रह्मण्य अय्यर, वीर राघवाचार्य, इ. नेत्यांनी इंग्रजी राज्याचे काळे स्वरूप भारतीय जनतेला उघडे करून दाखविण्यास प्रारंभ केला होता. ब्रिटिशांनी चालवलेला अर्थशोष, भयानक अन्याय, अधिकाऱ्यांचा उद्दामपणा, ब्रिटिशांच्या घातक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आर्थिक धोरणामुळे उत्पन्न झालेले दारिद्र्य, दुष्काळ, रोगांच्या साथींचे निवारण करण्याच्या मिषाने गोऱ्या सोजिरांनी केलेले अत्याचार, मिशनऱ्यांचे धार्मिक आक्रमण या सर्व गोष्टींचे वर्णन वृत्तपत्रांत वाचून इंग्रज राज्यकर्त्यांविषयी कडवा द्वेष भारतीय लोकांच्या मनात उत्पन्न झाला. स्वदेश, स्वधर्म व पूर्वपरंपरा यांचा अभिमान ही राष्ट्रनिष्ठेची एक बाजू आणि आक्रमक सत्ताधारी राज्यकर्ते यांच्याबद्दल द्वेष ही दुसरी बाजू होय. नव्या क्रांतिकारक विचारांचा परिपाक होऊन भारतात राष्ट्रनिष्ठा कशी वाढेल, हे दादाभाईंनी इ. स. १८८० मध्ये केलेल्या एका भाषणात सांगितले, ते असे—सर्व वर्गांतल्या व थरांतल्या हजारो लोकांना आज जे शिक्षण मिळत आहे, त्यामुळे त्यांची मने एकाच मुशीतून घडत आहेत. त्या सर्वांच्या भावना, आकांक्षा व विचार समान होत आहेत. विशेषतः या जागृतीतून राजकीय संघटन व समभाव निर्माण होत आहे. कारण सर्वांनाच दारिद्र्याची झळ लागली असून, आपल्या देशाचा होत असलेला अधःपात व नाश स्पष्ट दिसत आहे. धर्म, वंश, पक्ष हे भेद या समाईक ध्येयात वितळून जात आहेत. देशाची अधोगती अशीच चालू राहिली, बहुजनांची सुखाची आशा नष्ट झाली, तर लोकांची राजनिष्ठा भंगेल आणि ब्रिटिश मालाबद्दलचा आजचा द्वेष ब्रिटिश सत्तेकडे वळेल.

दादाभाईंचे हे भाकित पुढील साठ-सत्तर वर्षांत लो. टिळक, म. गांधी, स्वा. सावरकर, पं. जवाहरलाल नेहरू, नेताजी, इ. पुढाऱ्यांनी खरे केले. लो. टिळक व म. गांधी यांनी राजकीय चळवळींचे लोण सामान्य जनतेपर्यंत पोचवून लोकशक्ती जागृत केली आणि अखिल भारताची राष्ट्रीय संघटना करून ब्रिटिश साम्राज्यशक्तीशी लढा देण्याचे सामर्थ्य भारतीय समाजात निर्माण केले. याविषयी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी जो निष्कर्ष काढला आहे, तो असा —

पाश्चात्य विद्येच्या प्रसारामुळे गेल्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात बुद्धिप्रामाण्य आले, ऐहिक उत्कर्षाच्या आकांक्षा निर्माण झाल्या, धर्मपरिवर्तनाला लोक सिद्ध झाले, विवेकनिष्ठेची महती त्यांना समजू लागली आणि या सर्व कारणांमुळे आमचे मनुष्यत्व मुक्त झाल्यामुळेच येथे राष्ट्रनिर्मिती शक्य झाली. इहवादाचे हेच फल आहे. त्याने मनुष्यत्व मुक्त होते.

ब्रिटिशांचे राज्य सुरू होण्यापूर्वी अनेक शतके येथील मानवाला प्रतिष्ठाच नव्हती. राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षाची जबाबदारी माझ्या शिरावर आहे, असे मानणाऱ्या व्यक्तींचा समाज म्हणजेच राष्ट्र. जेथे ही भावना नसते तेथले लोक म्हणजे राजाची प्रजा. परकीय आक्रमण, युद्धतंत्र, शिक्षण, शेतीचा विकास, औद्योगिक उत्कर्ष या राष्ट्रीय समस्यांचा विचार त्यांच्या मनाला शिवतही नसे; कारण या विचारांचा व्याप पेलण्याजोगे प्रगल्भ व समर्थ मनच येथे नव्हते. येथल्या अस्पृश्यांच्या व शूद्रांच्या जीवनाला कसलीही प्रतिष्ठा नव्हती. वैश्य व स्त्रिया यांच्याही जीवनाची प्रतिष्ठा धर्मशास्त्रज्ञांनी नष्ट केली होती. कलियुगात क्षत्रियांना अस्तित्वच नाही, असाही शोध त्यांना लागला होता. म्हणजे समाजातील नव्वद टक्के लोक शूद्र किंवा पापयोनी ठरले. शब्दप्रामाण्यामुळे मानवाच्या बुद्धीची हत्या होते; तर शूद्रत्वामुळे त्याच्या अस्मितेची हत्या होते. अशी अस्मिताशून्य माणसे राष्ट्र घडवू शकत नाहीत. राष्ट्र हे मुक्त मनुष्यांचे म्हणजे ज्यांच्या मनाला रग आहे, बल आहे, तेज आहे अशांचे असते. अशीच माणसे समाजाचे चिंतन करू शकतात, काही जबाबदारी घेऊ शकतात. आत्मबलिदान करूनही अन्यायाचा प्रतिकार करण्याचे नीतिधैर्य त्यांच्या ठायी असू शकते.

अत्यंत विषम समाज, अमंगळ भेदाभेद मानणाऱ्या मानवांचा समाजही राष्ट्र घडवू शकत नाही. संघटित समाजच राष्ट्रपदवीला जाऊ शकतो. आणि संघटनेला समता अवश्य असते. पण समाजातली ही समता हिंदुधर्मशास्त्राने जाणूनबुजून नष्ट करून टाकली होती. सर्व वर्ण, सर्व जाती इतरांना हीन व स्वतःला श्रेष्ठ ठरविण्यात धन्यता मानीत असत. हे श्रेष्ठत्व कर्तृत्वावर, गुणांवर अवलंबून नव्हते, तर जन्मावर होते. सामुदायिक संरक्षणाची भावना, समान ध्येय हिंदू समाजात कधीही नव्हते. संतांनी वैयक्तिक मोक्षाचा उपदेश केल्यामुळे सामूहिक उद्दिष्टाचा संभव पूर्ण नष्ट झाला. आपल्या बायकामुलांची चिंता करू नये अशी वृत्ती जोपासणारा समाज राष्ट्राच्या योगक्षेमाची चिंता कशी वाहणार !

समान ध्येयाप्रमाणेच समान इतिहास व समान पूर्वपरंपरा यांच्या अभिमानातून मिळणारी स्फूर्ती व प्रेरणा राष्ट्रसंघटनेला अवश्य असते. पण जातिभेद, वर्णभेद व वंशभेद यांमुळे सर्व समाजाला तसा अभिमान वाटणे अशक्य होते. गेल्या शतकात जी धार्मिक व सामाजिक क्रांती भारतात झाली ती जर झाली नसती आणि आर्थिक क्रांतीची आश्वासने जनतेला मिळाली नसती, तर येथे राष्ट्रनिष्ठा कधीच उदयाला आली नसती व भारताची राष्ट्रीय संघटना कधीच झाली नसती. सर्व धर्म-पंथ, सर्व वर्ण, सर्व जाती-जमाती आणि सर्व वर्ग यांना स्वातंत्र्यामुळे आपला उत्कर्ष होईल, अशी निश्चिती वाटल्या-वाचून स्वातंत्र्य-संग्रामात भाग घेण्यास ते तयार होत नाहीत आणि ही निश्चिती धार्मिक व सामाजिक क्रांतीवाचून, म्हणजे त्या क्षेत्रांतील विषमता नष्ट करून समता, स्वातंत्र्य, बंधुता या तत्त्वांची स्थापना झाल्यावाचून होणे शक्य नसते. राममोहन राय यांच्यापासून महात्माजींपर्यंत भारताच्या सर्व नेत्यांनी आधी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धर्मक्रांती करण्याचे धोरण अवलंबिले, याचे हेच कारण होय. रूढ धर्मतत्त्वे वैचारिक पातळीवर नष्ट करण्यात त्यांना पुष्कळच यश आले आणि स्वातंत्र्य, समता, बुद्धिनिष्ठा या तत्त्वांना काही प्रमाणात व्यवहारात आणता आले, म्हणूनच त्यांना येथे राजकीय क्रांती करणे शक्य झाले. त्या तत्त्वांमुळेच येथे राष्ट्रनिष्ठा रुजू शकली, जनशक्ती संघटित झाली आणि स्वातंत्र्याचा लढा यशस्वी झाला.

डॉ. हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना करून राष्ट्रसंघटनेचा जो प्रयत्न केला तो उल्लेखनीय आहे. धर्म, संस्कृती, देश, भाषा व इतिहास अशा साधर्म्यातून जी आत्मीयता हृदयात उचंबळून येते, तीच राष्ट्राचे अधिष्ठान असते. त्या दृष्टीने हिंदू समाज हाच राष्ट्रीय समाज असून, त्याला जागृत व संघटित केले पाहिजे, असे त्यांनी प्रतिपादिले आणि त्यासाठीच संघाची स्थापना केली. [हि. ध.; हि. क. इं. पी. १०; हि. स. सं. वि.]

राष्ट्रभृद्धोम एक होम. निरनिराळ्या कामनांसाठी निरनिराळ्या ठिकाणी हा होम करावा, असे म्हटले आहे. या होमाचे मंत्र तैत्तिरीय संहितेत (३.४.७) आहेत. या होमात राष्ट्रसमृद्धीची भावना प्रधान असल्याने याला राष्ट्रभृत असे म्हटले आहे.

या होमाचा विधी बौधायन श्रौतसूत्रांत (१४.१६) सांगितला आहे. यात निरनिराळ्या कामनांसाठी निरनिराळ्या काष्ठांच्या समिधा व परिधी घ्यायच्या असतात. होमाचे एकूण बारा मंत्र आहेत. प्रत्येक मंत्रात दोन दोन स्वाहाकार म्हणायचे असतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे.]

राष्ट्रमुद्रा भारताचे राष्ट्रीय प्रतीक. राष्ट्राचा राज्यकारभार राज्ययंत्रणेच्या द्वारे चालतो. त्यामुळे या राष्ट्रमुद्रेला राज्यमुद्रा अशीही संज्ञा आहे. या राज्यमुद्रेच्या रूपाने आपला राज्यकारभार कसा चालतो व कसा चालावा हे सूचित होते. लोकांच्या मनावर व आचरणावर राज्यमुद्रेची छाप पडावी म्हणून ती सर्व सरकारी कागदपत्रांवर उठवलेली असली तरच ती कागदपत्रे अधिकृत समजली जातात. राज्यकर्त्यांनीही मन मानेल तसा राज्यकारभार करू नये व केला तर राज्यमुद्रेची ही कसोटी ठरवून लोकांना त्याचे मूल्यमापन करता यावे, असा त्या मागे उद्देश असतो.

भारत स्वतंत्र झाल्यावर त्याला स्वतःच्या राज्यकारभाराचा आदर्श ठरवण्यासाठी व स्वातंत्र्य मिळाल्यामुळे राज्ययंत्रणेत झालेला बदल सूचित करण्यासाठी एक चिन्ह हवे होते. तसेच ते लोकांच्या अंतःकरणावर सद्भावनेचा संस्कार घडवणारे हवे होते. भारताच्या घटना-समितीच्या सदस्यांनी यावर खूप विचार केला व अखेर सारनाथ येथील अशोक-स्तंभाच्या शीर्षाची प्रतिकृती राज्यमुद्रा म्हणून घोषित केली. भारताचा राज्यकारभार अशोकाच्या राज्यकारभारासारखा आदर्श व्हावा, अशी प्रेरणा मिळावी, ही त्यामागची भूमिका आहे. ही राज्यमुद्रा पुढे वर्णन केल्याप्रमाणे आहे –

चार दिशांना तोंडे केलेले आणि पाठीला पाठ लावून उभे असलेले सिंह; त्या सिंहांच्या पायाखाली असलेल्या गोल पीठिकेवर हत्ती, सिंह, घोडा व बैल हे प्राणी आणि या दोन प्राण्यांच्या मधल्या जागेत एकेक धर्मचक्र. हे सिंह उग्र वाटत नाहीत; तर ते पुरुषार्थाचे आणि निर्भयतेचे प्रतीक वाटतात. सिंहांच्या या मूर्ती इतक्या जिवंतपणे शिल्पांकित केल्या आहेत, की त्यांची सगळी शान त्यांच्या अंगप्रत्यंगांतून प्रकट व्हावी. कोणत्याही एका बाजूने पाहिले, तर दर्शनी सिंहाचे पूर्ण-मुख आणि त्याभोवतालच्या दोन बाजूंच्या सिंहांची अंश-मुखे दिसतात. चौथा सिंह दिसतच नाही. पीठिकेवर अंकित केलेल्या प्राण्यांमध्ये गतिमानतेचा साक्षात्कार होतो. अशा या राज्यमुद्रेखाली ‘सत्यमेव जयते’ हे भारताचे बोधवाक्य लिहिलेले असते.

नाणी, सरकारी टपाल-तिकिटे, कार्डे, पाकिटे यांसारखी सरकारी कागदपत्रे, जाहीरनामे, हुकूम, सरकारच्या वतीने मिळणारी सन्मानपत्रे, प्रशस्तीपत्रे, दाखले, इत्यादींवर ही राष्ट्रमुद्रा उमटविलेली असते. त्याचप्रमाणे राष्ट्रपतिभवन, संसदभवन, सचिवालये; महामंत्री, राज्यपाल, मुख्य मंत्री यांची निवासस्थाने; सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालये इ. ठिकाणी या राष्ट्रमुद्रेची प्रतीके ठेवलेली असतात. राष्ट्राचा इतिहास, परंपरा, श्रद्धा, आशा-आकांक्षा या राष्ट्रमुद्रेने सूचित होतात. [आपला मान, आपला अभिमान – श्री. यदुनाथ थत्ते, १९६१; भारताचा राष्ट्रध्वज आणि अन्य राष्ट्रीय प्रतीके – श्री. बा. स. बर्वे, १९६५.]

राष्ट्रीय बोधवाक्य प्रत्येक राष्ट्राचे काही आदर्श असतात. हे आदर्श एखाद्या विशिष्ट बोधवाक्याने सूचित किंवा घोषित करण्याची प्रथा असते. ‘सत्यमेव जयते’ हे भारताचे राष्ट्रीय बोधवाक्य आहे. हे वाक्य मुंडकोपनिषदातून स्वीकारलेले आहे. याचा अर्थ, सत्याचाच विजय होतो, असा आहे. भारताला सत्याचाच मार्ग मान्य असून, भारताचे राज्यकर्ते व प्रजाजन तो अनुसरतील, अशी आकांक्षा या बोधवाक्यावरून सूचित होते. लोकांना सत्याचरणाची प्रेरणा मिळावी म्हणून हे वाक्य राज्यमुद्रेवर कोरले आहे. [आ. मा. आ. अ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राष्ट्रीय सभा (इंडियन नॅशनल कांग्रेस) भारतातील सर्वांत मोठी, देशव्यापी, राजकीय संघटना. या संस्थेची स्थापना इ. स. १८८५ च्या डिसेंबर महिन्यात झाली. तिची कल्पना कशी उगम पावली हे ध्यानात येण्यासाठी तत्पूर्वीच्या सुमारे पंचवीस वर्षांच्या इतिहासाचे सिंहावलोकन उपयुक्त ठरेल. इ. स. १८५७ मधील क्रांतियुद्धात इंग्रजांचा जय होऊन त्यांनी हिंदुस्थानातील सर्व विरोधी शक्तींचे कठोरपणे दमन केले. पण त्याच वेळी ब्रिटिश सरकारने ईस्ट इंडिया कंपनीकडून देशाचा कारभार काढून आपल्या हाती घेतला. राणीचा जाहीरनामा, विद्यापीठांची स्थापना आणि इ. स. १८६१ च्या कायद्यान्वये काही बिनसरकारी सभासदांची कायदेमंडळात नेमणूक यांमुळे सुशिक्षित लोकांच्या मनात राजनिष्ठेचे पुनरुज्जीवन झाले. लोकहितवादी, न्या. रानडे, वगैरे विचारवंतांना तर, ब्रिटिश राज्य हे भारताला ईश्वरी वरदान आहे, असे वाटू लागले होते.

इ. स. १८७१ पासून न्या. रानडे यांनी पुण्यातील सार्वजनिक सभेच्या कार्याला राजकीय चळवळीचे रूप दिले. त्यामुळे महाराष्ट्रात एक नवे चैतन्य निर्माण झाले व सनदशीर राजकारणाचा पाया घातला गेला. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हिंदी लोकांना समानतेने वागवून राजकीय हक्क द्यावे आणि हिंदी लोकांनी ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ राहावे, असे त्यांनी आपले राजकीय तत्त्वज्ञान मांडले. राणीच्या जाहीरनाम्याप्रमाणे आपल्याला प्रातिनिधिक राज्यपद्धती प्राप्त व्हावी आणि हिंदुस्थानाला ब्रिटिश छत्राखाली मांडलिकी स्वराज्य मिळावे, हे रानडेप्रभृती हिंदी नेमस्त प्रागतिक मुत्सद्यांचे अंतिम राजकीय ध्येय होते. पण चिपळूणकर, आगरकर व टिळक या तरुणांना ते मवाळ ध्येयधोरण मान्य होऊ शकले नाही. त्यामुळे ते जहाल समजले जाऊ लागले.

इ. स. १८७७ च्या जानेवारीत दिल्लीला एक मोठा दरबार भरला आणि त्या वेळी इंग्लंडच्या राणीला 'हिंदुस्थानची सम्राज्ञी' अशी पदवी अर्पण करण्यात आली. त्या दरबारात ब्रिटिश साम्राज्याचे वैभव आणि हिंदी प्रजेची राजनिष्ठा यांचे भरघोस प्रदर्शन करण्यात आले.

त्याच वेळी सार्वजनिक सभेने सम्राज्ञीला एक मानपत्र अर्पण केले आणि त्या मानपत्रात हिंदी जनतेचे हक्क व हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा, राजनिष्ठ पण स्पष्ट भाषेत राज्यकर्त्यांना सादर केल्या. त्याच वेळी तिथे जमलेल्या सर्व प्रांतांतील लोकप्रतिनिधींपुढे व राजेरजवाड्यांपुढे सार्वजनिक काकांनी एक भाषण करून, अखिल भारतीय ऐक्याची व हिंदी पार्लमेंटची कल्पना मांडली आणि निरनिराळ्या प्रांतांतून आलेल्या राजकीय कार्यकर्त्यांना राष्ट्रीय सभेची कल्पना दिली.

इ. स. १८७४ मध्ये विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी निबंधमाला सुरू करून आपले तेजस्वी राष्ट्रीय विचार प्रसृत करण्यास आरंभ केला. स्वधर्म, स्वदेश व स्वभाषा यांच्याविषयी अभिमान आणि इंग्रज राज्यकर्त्यांविषयी द्वेष निर्माण करणे हेच त्यांच्या निबंधांचे उद्दिष्ट होते. ते वाचून टिळक व आगरकर यांना स्वदेशसेवेचा मार्ग सापडला व त्यांनी लोकजागृतीचे व लोकशिक्षणाचे कार्य आरंभिले. या त्रयीने महाराष्ट्रात एक नवे युग सुरू केले. देशभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी निःस्वार्थपणे देशसेवा करण्याचे व्रत घेतले होते. आपले राजकीय पारतंत्र्य नष्ट झाल्यावाचून देशोन्नती होणे शक्य नाही, असे त्या तरुण देशभक्तांना वाटू लागले होते.

अशाच प्रकारचे विचार बंगाल, पंजाब व मद्रास या प्रांतांतल्या तरुणांच्या मनांतही त्या वेळी उगम पावले होते. श्री. सुरेंद्रनाथ बानर्जी यांनी इ. स. १८७६ मध्ये श्री. आनंदमोहन



सुरेंद्रनाथ बानर्जी

बोस यांच्या मदतीने इंडियन असोसिएशन नावाची एक संस्था स्थापन केली. लोकजागृती हेच तिचे उद्दिष्ट होते. त्यानंतर इ. स. १८७९ मध्ये सुरेंद्रबाबूंनी एक बंगाली वृत्तपत्र आपल्या हाती घेतले. इ. स. १८७८ मध्ये मद्रासमध्ये हिंदू या पत्राची स्थापना झाली. एम्. वीरराघवाचार्य, रंगय्या नायडू, जी. सुब्रह्मण्य अय्यर व एन्. सुब्बाराव पंतलू यांनी ते सुरू केले होते. त्यांच्या प्रेरणेने इ. स. १८८१ साली मद्रास महाजनसभा या नावाची संस्था स्थापन करण्यात आली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री. दादाभाई नौरोजी व न्या. रानडे यांचा ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या न्यायबुद्धीवर विश्वास असला, तरी त्यांनीच, ब्रिटिशांच्या घातक आर्थिक धोरणामुळे हिंदी लोकांचे रक्तशोषण कसे होत आहे, ते दाखवून दिले. राज्यकारभारात सुधारणा न झाल्यास लवकरच जनतेच्या दारिद्र्यातून व उपासमारीतून मोठा दंगा उद्‌भवेल आणि त्यात एक तर ब्रिटिश साम्राज्याचा अंत होईल किंवा हिंदुस्थान देशाचाच विनाश होईल, असा इशारा दादाभाईंनी राज्यकर्त्यांना दिला होता. त्यांच्या या स्पष्ट वक्तव्यातच जहाल राजकारणाची बीजे दिसून आली. जहाल पक्षाचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास नव्हता. अन्यायाचा व जुलमाचा प्रतिकार करणे, हे मनुष्याचे आद्य कर्तव्य होय, असे त्या पक्षाच्या नेत्यांना वाटत होते. लोकांत नुसती कायदे पाळण्याची वृत्ती पसरवण्याचा प्रयत्न करणे हेच पुढाऱ्यांचे काम नसून, त्यांची प्रतिकारवृत्ती व स्वातंत्र्याकांक्षा जागृत करणे हेही त्यांचे कर्तव्य आहे, असे चिपळूणकर, आगरकर व टिळक यांनी प्रतिपादले. मात्र हे लोकजागृतीचे काम कायदेशीर मार्गाने करण्यावर त्यांचा कटाक्ष होता.

इ. स. १८७७ साली दिल्ली येथे भरलेल्या दरबाराच्या निमित्ताने देशातील बड्या संस्थानिकांचे व नामांकित व्यक्तींचे जे संमेलन झाले ते पाहून, अशा प्रकारची एक राजकीय परिषद भरवावी, अशी कल्पना सुरेंद्रनाथ बानर्जी यांना सुचली होती, अशी काही लोकांची समजूत आहे. त्याच वेळी लॉर्ड लिटन याची प्रतिगामी कारकीर्द सुरू झाली व १८७८ चा प्रेस ॲक्ट पास करण्यात आला. त्यानंतर आलेल्या लॉर्ड रिपनने मात्र तो ॲक्ट रद्द केला. त्याने स्थानिक स्वराज्याच्या हक्कांची तरफदारी केली व इलबर्ट बिलाचा पुरस्कार केला. लॉर्ड रिपनच्या उदार धोरणामुळे तो बराच लोकप्रिय झाला.


ॲलन ह्यूम

पुढे १८८३ साली कलकत्ता येथे एक राजकीय परिषद भरली होती. त्या वेळी सुरेंद्रनाथ बानर्जींनी श्रोत्यांना दिल्लीच्या संमेलनाची आठवण करून दिली. इ. स. १८८५ च्या ३१ जानेवारीला मेथा, तेलंग व तय्यबजी यांनी बाँबे प्रेसिडेन्सी असोसिएशन स्थापन केली. या सर्व घटनांवरून अखिल भारतीय स्वरूपाची एखादी राजकीय संघटना असावी, असे बऱ्याच लोकांना वाटू लागले होते, असे दिसते. इ. स. १८८४ च्या डिसेंबरमध्ये मद्रास येथे भरलेल्या थिऑसॉफिकल कन्व्हेन्शननंतर काही मंडळींना राष्ट्रीय परिषदेची कल्पना सुचली, असेही म्हणतात. काँग्रेसची कल्पना मुळात कोणाला व कशी सुचली, हे निश्चित सांगता येत नाही. मात्र ती कल्पना वातावरणात पसरलेली होती व असल्या संघटनेची आवश्यकता लोकांना भासू लागली होती, यात काही संशय नाही.

त्याच काळात सशस्त्र क्रांतीचा मार्ग अनुसरणारे काही लोकही देशात निर्माण झाले होते. श्री. वासुदेव बळवंत फडके हे अशा क्रांतिकारकांपैकी एक प्रसिद्ध पुरुष होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे देशात सर्वत्र दंगेधोपे माजतील व राज्यसत्ता धोक्यात येईल, अशी भीती ब्रिटिश अधिकाऱ्यांनाही वाटू लागली होती. शेतकरी वर्ग जबर साऱ्यामुळे निर्धन होऊन सावकारी पाशात सापडला होता. त्यामुळे दुष्काळात तो दंगे करण्यास प्रवृत्त होणे साहजिक होते. लहानसहान उद्योगधंदेही नष्टप्राय झाले होते व व्यापारधंद्यांची भरभराट होण्याची आशा उरली नव्हती. त्यामुळे तो वर्गही असंतुष्ट होता. अशा असंतुष्ट लोकांचे नेतृत्व करून काही धाडसी सुशिक्षित देशभक्त तरुण स्वराज्यासाठी साहसी उठाव करतील, अशी शक्यता इंग्रज अधिकाऱ्यांना दिसू लागली होती. त्यामुळे अशा चळवळीला वेळीच आळा घालून तिला सनदशीर व कायदेशीर वळण लावणे, यातच ब्रिटिशांचे व हिंदी लोकांचे हित आहे, अशी त्यांची खात्री झाली. नेमस्त प्रागतिक पक्षाच्या नेत्यांना, राजकीय हक्कांची मागणी करण्यासाठी एखादी राष्ट्रीय संस्था स्थापन करावी, अशी इच्छा उत्पन्न झाली व त्या दृष्टीने त्यांचे प्रयत्नही चालू झाले. दादाभाई नौरोजी व न्या. रानडे हे त्या पक्षाचे अग्रणी होते. कलकत्त्याचे उमेशचंद्र बानर्जी, आनंदमोहन बोस, सुरेंद्रनाथ बानर्जी, मुंबईचे मंगळदास नथुभाई, नौरोजी फर्दुमजी, विश्वनाथ नारायण मंडलीक, काशीनाथ त्रिंबक तेलंग, फेरोजशहा मेथा, मद्रासचे एस्. सुब्रह्मण्य अय्यर, पी. रंगय्या नायडू, पी. आनंदचार्लू, इ. अनेक विद्वान मंडळी त्या पक्षात होती. पण तशी संस्था स्थापण्यासाठी पुढाकार मात्र कोणी घेतला नाही. अशा परिस्थितीत ॲलन ह्यूम, सर विल्यम वेडरबर्न व सर हेन्री कॉटन या सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकाऱ्यांनी पुढाकार घेऊन त्या कामाला चालना दिली. हे तिघेही मुत्सद्दी होते व साम्राज्यनिष्ठ होते; तसेच उदार व स्वातंत्र्यवादीही होते.

इ. स. १८८०–८४ या कालखंडात लॉर्ड रिपन हे व्हाइस-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रॉय असताना त्यांनी बरेच उदार धोरण अंगिकारल्यामुळे सनदशीर राजकारणाचे वारे देशात जोराने वाहू लागले.

सर विल्यम वेडरबर्न

स्थानिक स्वराज्यसंस्थांमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधींना स्थान मिळाल्यामुळे, हिंदी लोकांना राज्यकारभारात भाग घेता येईल, अशी आशा निर्माण झाली. वर्तमानपत्रांना फिरून स्वातंत्र्य मिळाले. इ. स. १८८२ मध्ये श्री. ह्यूम सेवानिवृत्त झाल्यावर त्यांनी राष्ट्रीय संस्थेची योजना आखली. तिचे स्वरूप मुख्यत: सामाजिक असावे अशी त्यांची पहिली कल्पना होती. पण लॉर्ड डफरिन यांनी ती राजकीय असावी असे सुचविले. मग ह्यूम यांनी इ. स. १८८४ साली 'इंडियन नॅशनल यूनियन' या नावाची एक संस्था स्थापली. त्या संस्थेने डिसेंबर १८८५ मध्ये पुण्यात एक परिषद भरवण्याचे ठरवले. भिन्न भिन्न प्रांतांतील राजकीय कार्यकर्त्यांचा परिचय व्हावा आणि पुढील वर्षी हाती घ्यायच्या राजकीय कार्याची रूपरेषा निश्चित करावी, हे त्या परिषदेचे उद्दिष्ट होते.

पुढे पुण्यात महामारीची साथ सुरू झाल्यामुळे ती परिषद मुंबईत भरली. मुंबईत प्रेसिडेन्सी असोसिएशन नामक संस्था नुकतीच बद्रुद्दिन तय्यबजी, का. त्रि. तेलंग व फेरोजशहा मेथा यांनी स्थापली होती. तिने त्या अधिवेशनाची व्यवस्था केली. त्या अधिवेशनाला एकंदर ७२ प्रतिनिधी उपस्थित होते. कलकत्याचे श्री. उमेशचंद्र बानर्जी हे त्या परिषदेच्या पहिल्या अधिवेशनाचे नियोजित अध्यक्ष होते.

हे पहिले अधिवेशन तीन दिवस चालले आणि एकंदर नऊ ठराव त्यात संमत झाले. राज्यकारभारात सुधारणा व्हावी आणि मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळांत लोकनियुक्त प्रतिनिधी घ्यावे, अशा मागण्या त्यात मुख्यत्वे केल्या गेल्या. याच अधिवेशनात संस्थेला 'इंडियन नॅशनल काँग्रेस' हे नाव देण्यात आले. अशा प्रकारे ह्यूम, वेडरबर्न हे सेवानिवृत्त ब्रिटिश अधिकारी आणि दादाभाई, रानडे, बानर्जी, बोस, तेलंग वगैरे हिंदी पुढारी यांच्या सहकार्याने साम्राज्यनिष्ठेच्या पायावर व सनदशीर चळवळी-साठी हिंदी राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

या राष्ट्रीय सभेचे दुसरे अधिवेशन कलकत्ता येथे श्री. दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली व तिसरे अधिवेशन मद्रास-मध्ये श्री. बद्रुद्दिन तय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली नीटपणे पार पडले. तिसऱ्या अधिवेशनात सरचिटणीस ह्यूम यांनी, सरकारला जागे करण्यासाठी चळवळ केली पाहिजे, असे सांगितले. त्यामुळे सरकार साशंक झाले व काहीसे बिथरलेही. मग त्यांनी राष्ट्रीय सभेच्या कार्याला विरोध दर्शवायला सुरवात केली, पण त्याचा परिणाम उलट झाला. सरकारच्या या विरोधामुळे राष्ट्रीय सभा अधिकाधिक लोकप्रिय होऊ लागली. तथापि ह्यूम व दादाभाई यांच्या म्हणण्याप्रमाणे जनतेत जागृती करण्या-साठी चळवळ कोणीही सुरू केली नाही. केवळ वार्षिक संमेल-

उमेशचंद्र बानर्जी

नाच्या स्वरूपातच ती संस्था चालू राहिली. इ. स. १८९२ मध्ये नव्या सुधारणांचा कायदा सरकारने केला. पण त्यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपला प्रतिनिधी निवडण्याचा हक्क लोकांना मिळाला नाही. फक्त स्थानिक स्वराज्यसंस्थांनी उमेदवार सुचवावे व ते सरकारने मान्य करावे, अशी पद्धत सरकारने आखली. ही सुधारणा अपुरी असली, तरी तिचा स्वीकार करावा असे राष्ट्रीय सभेने ठरवले आणि आपले वार्षिक संमेलने भरवण्याचे कार्य पुढील दहाबारा वर्षे सातत्याने चालवले. लवकरच देशात जहाल व मवाळ असे दोन राजकीय पक्ष अस्तित्वात आले; तसेच हिंदू–मुसलमानांचे दंगेही सुरू झाले. जहाल राजकारण व लोकजागृतीची चळवळ करणाऱ्या नेत्यांना नोकरशाहीच्या रोषाला बळी पडून राजद्रोहाच्या आरोपाखाली कारावास भोगावा लागला. मात्र त्यामुळे तो पक्ष अधिकच संघटित व प्रभावशाली बनला.

इ. स.१९०४ साली मुंबईत भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाचे अध्यक्षपद सर हेन्री कॉटन यांना देण्यात आले होते. त्यापूर्वी त्यांनी आपल्या 'न्यू इंडिया' नामक ग्रंथात हिंदुस्थानात अमेरिकेप्रमाणे एक संयुक्त लोकसत्ताक राज्य स्थापन करावे, या कल्पनेचा पुरस्कार केला होता. भारतातील तरुणांच्या व जहाल नेत्यांच्या सहकार्याने राष्ट्रीय सभा संघटित व प्रबळ बनवावी आणि ब्रिटिश राज्यकर्त्यांकडून राज्यव्यवस्थेत बऱ्याच सुधारणा करवून घ्याव्या, असे दादाभाई, ह्यूम, वेडरबर्न, वगैरे लोकांना वाटत होते. म्हणून त्यांनी नव्या पक्षाच्या पुढाऱ्यांना पत्रे पाठवून अधिवेशनात भाग घेण्याची विनंती केली. यापुढे राजकारणाच्या क्षेत्रात युद्ध करण्याचे राष्ट्रीय सभा हेच एक आपले शस्त्र आहे, असे दादाभाईंनी टिळकांना एका पत्रात लिहिले. ते लो. टिळकांना मान्य झाले. नव्या पक्षाने बहुमताच्या जोरावर राष्ट्रीय सभेला नवे धोरण द्यावे, पण तिला सोडून देऊ नये, असे लो. टिळकांचे मत होते. स्वराज्याचे युद्ध करण्यासाठीच राष्ट्रीय सभेचा जन्म झालेला असून, तीच ते करू शकेल अशीही त्यांची खात्री होती. म्हणून ते इ. स. १९०४ च्या अधिवेशनाला उपस्थित राहिले. त्या अधिवेशनात २२ ठराव मंजूर करण्यात आले. त्यांत, सामान्य जनतेच्या उन्नतीसाठी करांचा भार कमी करावा; लोकांना औद्योगिक, शास्त्रीय व शेतकी शिक्षण द्यावे; स्वदेशी कापडाच्या धंद्याला संरक्षण द्यावे; ब्रिटिश पार्लमेंटात आणि भारतमंत्री, व्हाइसरॉय व गव्हर्नर यांच्या कार्यकारी मंडळात हिंदी प्रतिनिधी असावे; मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात हिंदी प्रतिनिधींची संख्या वाढवून त्यांना अधिक अधिकार द्यावे; न्यायदान व अंमलबजावणी ही खाती वेगळी करावी; साम्राज्यवाढीसाठी होणारा लष्करी खर्च हिंदुस्थानावर लादू नये, अशा मुख्य मागण्या केलेल्या होत्या. त्याचप्रमाणे बंगालच्या फाळणीच्या योजनेचा निषेधही केला होता. या मागण्यांच्या मागे संघटित लोकशक्ती उभी राहिली पाहिजे आणि प्रचलित राज्यघटना आम्हांला असह्य झाली आहे, असे प्रत्यक्ष कृतीने लोकांनी सिद्ध केले पाहिजे, त्याखेरीज या मागण्या मान्य होणार नाहीत, अशी विचारसरणी लो. टिळक, श्री. बिपिनचंद्र पाल व श्री. लाला लजपतराय यांनी इ. स. १९०५ साली राष्ट्रीय सभेपुढे मांडण्यास सुरवात केली. त्या धोरणाने राष्ट्रीय सभेचे राजकारण चालवण्याचा प्रयत्न त्यांनी इ. स. १९०५ ते १९०७ या तीन वर्षांत केला. पण सर फेरोजशहा मेथा यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या जुन्या मवाळ पक्षाने त्यांना विरोध केला. इ. स. १९०५ पर्यंत इंग्रजांच्या न्यायबुद्धीवर पूर्ण विश्वास ठेवून सनदशीर मार्गानेच काँग्रेसची चळवळ चालू होती. भारतसेवक समाजाची स्थापना करून नेमस्त सनदशीर राजकारणाला महत्त्व देणारे ना. गोखले इ. स. १९०५ सालच्या राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष होते. त्यांनी आपल्या भाषणात वसाहतीचे स्वराज्य हेच अंतिम ध्येय असल्याचे जाहीर केले असले, तरी त्यांनी बंगालमधील विलायती मालाच्या बहिष्काराच्या चळवळीचे समर्थनच केले. स्वदेशीच्या चळवळीलाही त्यांनी पूर्ण पाठिंबा दिला.

दादाभाई नौरोजी

लो. टिळकांनी त्याच वेळी लाला लजपतराय व बिपिनचंद्र पाल यांच्या साहाय्याने नव्या निःशस्त्र क्रांतिकारक राष्ट्रीय

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पक्षाची स्थापना केली व त्याला बहिष्कारयोगाची दीक्षा दिली. बंगालमध्ये वंगभंगाच्या प्रतिकाराच्या निमित्ताने जी एक प्रचंड शक्ती निर्माण झाली होती, तिला निःशस्त्र क्रांतीचे रूप देऊन राष्ट्रीय सभेच्या राजकारणाला तिची जोड द्यावी, असे टिळकांचे धोरण होते. इ. स. १९०६ सालचे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन कलकत्ता येथे दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. त्यांनी लोकांना स्वराज्याचा मंत्र देऊन, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण, बहिष्कार व स्वराज्य या विषयांवरील ठराव मंजूर करून घेतले. त्यानंतर लो. टिळक व बिपिनचंद्र पाल यांनी संपूर्ण निर्भेळ स्वराज्य हे ध्येय व सत्याग्रह किंवा निःशस्त्र प्रतिकार हे आमचे साधन होय, असे जाहीर केले. पण त्यामुळे नेमस्त व जहाल पक्षांतील मतभेद विकोपाला गेले आणि १९०७ साली सुरत येथे भरलेले काँग्रेसचे अधिवेशन मोडले. त्यानंतर काँग्रेसची सूत्रे नेमस्त पक्षाच्या हाती राहिली असली, तरी नव्या पक्षाचे नेते लोकांमध्ये राष्ट्रीय भावना चेतवीत राहिले. त्यामुळे राज्यकर्ते संतापले आणि त्यांनी दडपशाही सुरू केली. लो. टिळकांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून खटला भरला गेला व त्यात त्यांना ६ वर्षांची शिक्षा झाली. सरकारने त्यांना मंडाले येथे काळ्या पाण्यावर पाठवले.

ब्रिटिश सरकारच्या दडपशाहीमुळे राष्ट्रीय भावना नष्ट न होता अधिकच उफाळून आली. परकीय सत्तेच्या अत्याचारांमुळे देशात वंगभंगनिषेधाची चळवळ इतकी जोरदार झाली, की इ. स. १९११ मध्ये सरकारला बंगालची फाळणी रद्द करावी लागली. इ. स. १९१४ मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले, तेव्हा सरकारने ते निमित्त साधून दडपशाही अधिक उग्र केली. त्याच वर्षी लो. टिळक सुटून परत आले व त्यांचे जहाल पक्षाचे राजकारण पुन्हा जोमाने सुरू झाले.

इ. स. १९१५ साली ना. गोखले व सर फेरोजशहा मेथा हे दोघे प्रागतिक नेमस्त पक्षाचे नेते कालवश झाले. त्या सालची राष्ट्रीय सभा मुंबईत भरली होती. तिथे नव्या जहाल पक्षाशी समेट करण्याचा ठराव संमत झाला. तसेच ऑ. इं. कॉं. कमिटी व मुस्लिम लीग या दोन्ही संस्थांनी मिळून स्वराज्याची योजना करावी, असेही ठरवण्यात आले. अध्यक्षांनी आपल्या खास अधिकारान्वये म. गांधींची विषयनियामक मंडळात नेमणूक केली. इ.स. १९१६साली लखनौ येथील अधिवेशनात लो. टिळकांच्या नेतृत्वाखाली त्यांचा जहाल पक्ष उपस्थित झाला आणि त्याने राष्ट्रीय सभेवर प्रभुत्व मिळवले. त्या वर्षी राष्ट्रीय सभेने स्वराज्याची मागणी ठरावरूपाने केली आणि त्या मागणीला मुस्लिम लीगचा पाठिंबा मिळविला. त्यासाठी काँग्रेसने मुसलमान पुढाऱ्यांशी करार घडवून आणला व हिंदू-मुस्लिमांचे ऐक्य केले. तो करार लखनौ करार म्हणून प्रसिद्ध आहे.

केवळ राष्ट्रीय सभेत ठराव पास करून स्वराज्याचे ... मिळणार नाहीत, तर त्यासाठी देशभर प्रचंड चळवळ ...

गो. कृ. गोखले

पाहिजे, असे टिळकांचे निश्चित मत होते. त्यासाठी ... होमरूल लीग म्हणजे स्वराज्यसंघ या नावाची स्वतंत्र ... स्थापन केली. डॉ. ॲनी बेझंट यांनी अशीच एक संस्था ... मध्ये सुरू केली. या चळवळीमुळे निर्माण होणारी लोक... ब्रिटिश सत्तेला मारक आहे, हे जाणून सरकारने ती चळ... नष्ट करण्यासाठी पुनश्च दडपशाही सुरू केली.

इ. स. १९१७मध्ये मद्रास इलाख्यात डॉ. बेझंट व मि. ... यांना डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखाली अटक करण्यात आ... मग लो. टिळक लोकांना निःशस्त्र प्रतिकाराचा व कायदेभं... उपदेश करू लागले. त्यामुळे स्वदेशी, बहिष्कार, कायदेमं... तील जागांचे राजीनामे, सरकारशी असहकार अशा प्रका... राजकीय चळवळींनी बळ धरले. पुढे लवकरच डॉ. बेझंट ... सुटका झाली आणि त्याच वेळी ब्रिटिश सरकारने पुढील ... जाहीर केल्या – (१) आम्ही हिंदुस्थानला हप्त्याह... स्वराज्य देणार आहो, (२) पहिला हप्ता महायुद्ध सं... नंतर देण्यात येईल व (३) पुढील हप्ते केव्हा द्यायचे ते ... पार्लमेंट वेळोवेळी ठरवील.

वरील जाहीरनामा हा मॉंटेग्यू-सुधारणा या नावाने प्र... आहे. या जाहीरनाम्यामुळे तापलेले वातावरण तात्पुरते ... झाले व राजकीय चळवळ काही काळ थंडावली.

त्याच वेळी म. गांधींनी चंपारण्यात नीळमळेवाल्यां...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सत्याग्रह करून कुळांवर होणारा अन्याय थांबवला. त्यांच्या या यशामुळे एका नवीन युगाला प्रारंभ झाला.

इ. स. १९१७ च्या राष्ट्रीय सभेने ब्रिटिश सरकारच्या वरील घोषणेचे स्वागत केले, पण तिचा तिसरा भाग अमान्य केला. हिंदुस्थानला पूर्ण स्वराज्य विशिष्ट कालमर्यादेत देण्यात येईल, असा कायदा ताबडतोब करावा आणि काँग्रेस व मुस्लिम लीग यांनी तयार केलेली सुधारणांची योजना स्वराज्याचा पहिला हप्ता म्हणून ताबडतोब मान्य करावी, अशी मागणी राष्ट्रीय सभेने केली. मिसेस बेझंट या तेव्हा अध्यक्ष होत्या. काँग्रेसचे अध्यक्षपद म्हणजे पुढील वर्षभर काम करण्याची जबाबदारी होय, असे त्यांचे मत होते व त्यांनी ती जबाबदारी पार पाडली.

इ. स. १९१७ मध्ये भरलेल्या ऑ. इं. कॉं. कमिटीच्या सभेत भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व मान्य करण्यात आले.

प्रागतिक पक्षाचे दुसरे मान्यवर नेते पं. मालवीय हे सुरेंद्रबाबूंच्या इतकेच नेमस्त होते. पण टिळकांच्या पक्षाने राष्ट्रीय सभेत आपले वर्चस्व स्थापले आहे व देशातील बहुमत आपल्या बाजूस वळवले आहे, तेव्हा त्या बहुमताला मान देणे हे आपले कर्तव्य होय, असे त्यांचे मत पडले. त्यासाठी त्यांनी प्रागतिक पक्षाला राष्ट्रीय सभा न सोडण्याचा आग्रह केला. पण हा आग्रह त्या पक्षाच्या इतर धुरीणांनी मानला नाही व 'आम्ही मॉंटेग्यू-सुधारणा स्वीकारून त्या नांदवणार' असा आग्रह धरला आणि प्रागतिक परिषद ही संस्था स्थापली.

त्यानंतर लवकरच मॉंटेग्यू–अहवालासंबंधी धोरण जाहीर करण्यासाठी मुंबईत काँग्रेसची खास सभा झाली व तीत डॉ. बेझंट, लो. टिळक व काही प्रागतिक पुढारी या सर्वांच्या संमतीने स्वराज्याच्या मागणीचा ठराव झाला. या बाबतीत आपले मत सविस्तर प्रतिपादण्यासाठी काँग्रेसने एक शिष्टमंडळही विलायतेस पाठवले. त्या शिष्टमंडळात लो. टिळकही होते. इकडे डिसेंबर १९१८ मध्ये दिल्ली येथे पं. मालवीय यांच्या अध्यक्षतेखाली काँग्रेसचे अधिवेशन भरले आणि त्यात मुंबईच्या सभेतला स्वराज्याच्या मागणीचा ठराव जहाल पुढाऱ्यांनी बदलून घेऊन, पूर्ण प्रांतिक स्वराज्य व मध्यवर्ती राज्यात समान भागीदारी ही स्वराज्याच्या पहिल्या हप्त्याची किमान मागणी मागावी, असा ठराव केला.

पुढे इ. स. १९१९ मध्ये हिंदुस्थान सरकारने रौलट ॲक्ट नावाचा कायदा केला. महायुद्ध संपताच डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट आपोआप रद्द होणार होता. म्हणून देशातील गुप्त कटांचा बंदोबस्त करण्यासाठी हा कायदा सरकारने केला. त्या कायद्यामुळे कोणालाही चौकशीविना तुरुंगात टाकण्याची सोय झाली होती. कायदेमंडळातील लोकप्रतिनिधींनी त्या काळ्या कायद्याचा अत्यंत कडक शब्दांत निषेध केला. पण सरकारने त्या निषेधाची दखल घेतली नाही. सनदशीर विरोध निष्फल होऊन लोकांवर जुलमी कायदा लादल्याबद्दल गांधीजींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. आणि तेव्हापासून गांधीयुग सुरू झाले. एप्रिलमध्ये गांधीजींना पकडण्यात आले तेव्हा अनेक ठिकाणी दंगल, जाळपोळ व लुटालूट झाली. गोऱ्या लोकांचे खूनही झाले. या अत्याचारांमुळे व्यथित होऊन गांधीजींनी सत्याग्रहाची मोहीम थांबवली. पण अमृतसर येथील जालियनवाला बागेत हजारो लोकांवर गोळ्या झाडण्यात आल्या आणि तेथील लष्करी कायद्याच्या अमदानीत लोकांचा अनन्वित छळ व उपमर्द करण्यात आला. त्याची चौकशी करण्यासाठी सरकारने एक हंटर–कमिटी नेमली. तशीच काँग्रेसनेही म. गांधींच्या अध्यक्षतेखाली स्वतःची समिती नेमली.

पण लवकरच नवीन सुधारणाकायदा चालू करण्याच्या निमित्ताने, लोकांनी सहकार करावा, असा बादशहाचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. लो. टिळकांनी सुधारणा कायद्याशी प्रतियोगी सहकारिता करण्याचे ठरवले. देशबंधू दास यांचा सहकारितेला विरोध होता. इ. स. १९१९ च्या डिसेंबरमध्ये मोतीलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली अमृतसर येथे राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले. त्यात लोकांनी केलेल्या अत्याचारांच्या निषेधाचा ठराव गांधीजींच्या आग्रहास्तव सभेने स्वीकारला. तसेच पंजाबातील हत्याकांडासंबंधी हंटर–कमिटीचा अहवाल बाहेर पडेपर्यंत सह-

पं. मोतीलाल नेहरू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कारितेचे धोरण सोडू नये, हे त्यांचे मतही सभेने मान्य केले.

त्यानंतर होमरूल लीगच्या पुण्याच्या परिषदेत ठरल्याप्रमाणे लो. टिळकांनी कांग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना केली. कांग्रेस-वर अढळ निष्ठा आणि लोकशाहीवर दृढ विश्वास या तत्त्वांवर तो पक्ष आधारलेला होता.

लवकरच हंटर-कमिटीचा अहवाल बाहेर पडला. त्यात सरकारी अधिकाऱ्यांनी जे अत्याचार केले होते, त्यांवर पांघरुणच घालण्यात आले होते. अमृतसर येथे कांग्रेसने ज्या मागण्या केल्या होत्या, त्यांच्याकडे सरकारने दुर्लक्षच केले. त्यामुळे सर्व नेते असंतुष्ट होते. युद्ध संपल्यानंतर तुर्की साम्राज्यातील खलिफाची सत्ता नष्ट करणार नाही, हे आपले आश्वासन ब्रिटिशांनी न पाळल्यामुळे भारतातील मुसलमानही संतापले होते. अशा परिस्थितीत गांधीजींनी असहकाराच्या आंदोलनाची घोषणा केली. सनदशीर राजकारणाचे युग आता संपले होते. लो. टिळकही म. गांधींच्या मार्गाने जाण्यास सिद्ध होते. पण लवकरच त्यांचा मृत्यू ओढवला.

सप्टेंबर १९२० मध्ये कलकत्ता येथे कांग्रेसचे खास अधिवेशन लाला लजपतराय यांच्या अध्यक्षतेखाली भरले, त्यात गांधीजींच्या असहयोगाचा प्रस्ताव स्वीकारण्यात आला. त्याच वर्षी नागपूरमध्ये विजयराघवाचारी यांच्या अध्यक्षतेखाली कांग्रेसचे वार्षिक अधिवेशन झाले आणि त्यात वरील ठरावावर मोठ्या बहुमताने शिक्कामोर्तब करण्यात आले.

नागपूरच्या अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकाराचा जो कार्यक्रम आखला, तो असा –

(१) सन्मानदर्शक पदव्या व अधिकार यांचा त्याग.
(२) सरकारी दरबार, उत्सव वगैरे समारंभांवर बहिष्कार.
(३) राष्ट्रीय शिक्षणसंस्थांची स्थापना.
(४) न्यायालयांवर वकिलांचा व अशिलांचा बहिष्कार.
(५) लष्करी व मुलकी नोकऱ्यांवर बहिष्कार.
(६) कायदेमंडळावर व मतदानावर बहिष्कार.
(७) परकीय मालावर बहिष्कार.

त्या अधिवेशनात राष्ट्रीय सभेने 'शांततेच्या व न्याय्य मार्गाने स्वराज्याची प्राप्ती' हे नवे ध्येय स्वीकारले.

त्या अधिवेशनापासून राष्ट्रीय सभेने म. गांधींचा सत्याग्रहाचा मार्ग अंगिकारला. इ.स. १९२०च्या अखेरीस मांटेग्यू-कायद्यान्वये कायदेमंडळाच्या पहिल्या निवडणुकी झाल्या, त्यावर सर्व पुढाऱ्यांनी बहिष्कार घातला. देशबंधू दास, पं. मोतीलाल नेहरू, इत्यादींनी वकिली बंद करून कोर्टावर बहिष्कार घातला.

या अधिवेशनानंतर कांग्रेसच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले आणि तिचे स्वरूपही पालटले. तत्पूर्वी ही संस्था म्हणजे मध्यम वर्गातील सुशिक्षित लोकांची अर्जविनंत्या करणारी संस्था होती. आता ती सर्व जनतेची प्रातिनिधिक संस्था बनली. देशातील लाखो खेड्यांमध्ये वसलेल्या गरीब लोकांमध्ये राजकीय जागृती होऊन ते चळवळीत भाग घेऊ लागले. कांग्रेसची दारे सर्वांसाठी उघडली गेली. गांधीजींनी स्वदेशी व चरखा यांचे मंत्र व तंत्र सांगून जनतेच्या मनात नवी आशा निर्माण केली. कांग्रेस ही एक लढाऊ संघटना झाली व गांधीजी तिचे नेते ठरले.

नागपूरच्या अधिवेशनापासून ३५० निवडक प्रतिनिधींची अखिल भारतीय कांग्रेस कमिटी व तिच्याही वरची पंधरा सभासदांची कांग्रेस वर्किंग कमिटी अस्तित्वात आली आणि कांग्रेस ही सतत वर्षभर संघटनात्मक कार्य करणारी संस्था झाली. असे कार्य करण्यासाठी कळकळीचे कार्यकर्ते आणि त्यांना पोसण्यासाठी व देशव्यापी चळवळीसाठी अमाप द्रव्यही हवे होते. म्हणून कांग्रेसने एक कोटी रुपयांचा टिळक स्वराज्यफंड गोळा करण्याचे ठरवले. टिळकांची थोरवी, म. गांधींची लोकप्रियता व राष्ट्रीय जागृती यांमुळे तो निधी अल्पावधीतच जमा झाला.

इ. स. १९२१ मध्ये सरकारने भाषणबंदी, सभाबंदी, जामीन मागणे वगैरे नागरिक हक्कांवर गदा घालणारे दडपशाहीचे धोरण स्वीकारले. त्या वर्षाच्या अखेरीस इंग्लंडचे युवराज हिंदुस्थानात आले. तेव्हा ते जातील त्या त्या गावी हरताळ, निषेधसभा, विलायती कपड्यांच्या होळ्या, इ. कार्यक्रम होऊ लागले. सरकारने बहुतेक राष्ट्रीय पुढाऱ्यांना व हजारो सत्याग्रही स्वयंसेवकांना पकडून तुरुंगात घातले.

व्हाइसरॉय लॉर्ड रीडिंग व म. गांधी यांच्यामध्ये काहीतरी तडजोड करण्याचा प्रयत्न मालवीयजींनी केला. पण तो यशस्वी झाला नाही. इ. स. १९२१ च्या डिसेंबरात अहमदाबाद येथे कांग्रेसचे अधिवेशन झाले, त्यात सामूहिक सविनय कायदेभंगाची योजना स्वीकारण्यात आली. मग म. गांधींनी बार्डोली तालुक्यात साराबंदीची मोहीम सुरू करण्याचे ठरवले. पण ५ फेब्रुवारी १९२२ ला उत्तर प्रदेशातील चौरीचुरा येथे कांग्रेसच्या स्वयंसेवकांनी पोलिस-चौकीला आग लावून एक फौजदार व काही पोलिस यांना जाळले. ही बातमी समजताच, आपली चळवळ हिंसेच्या मार्गाने जात आहे, हे पाहून म. गांधींनी ती बेमुदत स्थगित केली. मग १२ फेब्रुवारीला वर्किंग कमिटीची बैठक बार्डोलीस होऊन तिने कायदेभंगाची चळवळ बंद केली आणि कांग्रेसचे सभासद वाढवणे, चरख्याचा प्रसार, राष्ट्रीय शिक्षण, पंचायती स्थापणे, मद्यपानबंदी, अस्पृश्यतानिवारण, हिंदू-मुसलमानांचे ऐक्य, इ. विधायक कार्ये करण्याचे ठरवले. नंतर २४-२५ फेब्रुवारीस दिल्ली येथील ऑ. इं. कां. कमिटीच्या अधिवेशनात त्या धोरणाला मान्यता देण्यात आली. पण या कलाटणीमुळे पुढाऱ्यांत मतभेद

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुरू होऊन काहीजण म. गांधींवर टीका करू लागले. त्यामुळे लोकांच्या मनात गोंधळ निर्माण झाला आणि सरकारविरुद्ध चळवळ करण्याची लोकांची वृत्ती मंदावली. या परिस्थितीचा फायदा घेऊन सरकारने म. गांधींवर राजद्रोहाचा खटला भरला व त्यांना सहा वर्षांची शिक्षा देण्यात आली.

त्यानंतर कांग्रेसमध्ये कायदेमंडळ-बहिष्कारवादी व कायदेमंडळ-प्रवेशवादी असे दोन पक्ष झाले. पहिला पक्ष पूर्वीचे असहकारितेचे धोरण सोडण्यास तयार नव्हता, म्हणून त्याला सनातनी किंवा नाफेरवादी हे नाव मिळाले व दुसऱ्या पक्षाने फेरवादी म्हणजे नवमतवादी हे नाव घेतले. देशबंधू दास व पं. मोतीलाल नेहरू हे फेरवादी म्हणजे कायदेमंडळात जाऊन सरकारला विरोध करावा या मताचे होते. इ. स. १९२२ मध्ये गया येथील अधिवेशनात त्यांनी खूप प्रयत्न करूनही त्यांच्या मताला मान्यता मिळाली नाही. त्यांनी १९२३ साली कांग्रेसमध्येच पण वेगळा 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला. महाराष्ट्रातील टिळकांचे अनुयायीदेखील त्या पक्षात सामील झाले. इ. स. १९२३ च्या दिल्ली येथील खास अधिवेशनात राष्ट्रीय सभेने त्या पक्षाला कायदेमंडळात जाऊन कार्य करण्यास परवानगी दिली आणि वर्षअखेर झालेल्या निवडणुकीत तो पक्ष बहुमताने निवडून आला. काकीनाडा येथील नेहमीच्या अधिवेशनातही कौन्सिलप्रवेशाला मान्यता देण्यात आली.

इ. स. १९२४ च्या जानेवारीत म. गांधी तुरुंगात असतानाच अॅपेंडिसाइटिसच्या विकाराने आजारी पडले व त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली. त्यानंतर सरकारने त्यांची बिनशर्त सुटका केली. त्या वर्षी डिसेंबरमध्ये बेळगाव येथे कांग्रेसचे अधिवेशन झाले, त्याचे म. गांधी हे अध्यक्ष झाले. त्या अधिवेशनात, स्वराज्य पक्षाने कायदेमंडळात सनदशीर विरोधाचे काम करावे आणि राष्ट्रीय सभेने बाहेर संघटनात्मक विधायक कार्य करावे, असे ठरले. सरकार नमत नाही असे दिसून आल्यास व सत्याग्रह अपरिहार्य अटळ ठरल्यास स्वराज्य पक्षही बाहेर पडून त्या संग्रामात भाग घेईल, असे आश्वासन पं. मोतीलाल व देशबंधू दास यांनी दिले. सप्टेंबर १९२५ मध्ये ऑ. इं. कॉं. कमिटीची सभा पाटणा येथे झाली. त्या सभेत सर्व राजकीय कार्यक्रम स्वराज्य पक्षाकडे सोपवण्यात आले आणि कानपूरच्या अधिवेशनात त्याला मान्यता देण्यात आली.

हिंदुस्थानला स्वराज्याचा हप्ता कसा देता येईल, यासंबंधी शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने १९२७ मध्ये सायमन कमिशन नेमले व ते १९२८ साली भारतात आले. पण कांग्रेसची कोणतीही मागणी सरकारने पुरी न केल्यामुळे कांग्रेसने त्या कमिशनवर बहिष्कार टाकला. त्याच सुमारास कांग्रेसने भावी शासनव्यवस्थेची रूपरेखा ठरविण्यासाठी पं. मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. इ. स. १९२८ मध्ये कलकत्ता येथे कांग्रेसने त्या समितीचा अहवाल स्वीकारला आणि अशी घोषणा केली, की एक वर्षाच्या आत सरकारने त्या अहवालात सुचवल्याप्रमाणे व्यवस्था न केल्यास संपूर्ण स्वातंत्र्याच्या प्राप्तीसाठी करबंदी व अहिंसात्मक असहकारिता करण्याकरिता जनतेची संघटना उभारण्यात येईल. ब्रिटिश सरकारने त्या घोषणेकडे दुर्लक्ष केल्यामुळे १९२९ च्या डिसेंबरमध्ये लाहोर येथील कांग्रेस अधिवेशनात अध्यक्ष पं. जवाहरलाल नेहरू यांनी संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. यापुढे कांग्रेस आपल्या सर्व शक्तीनिशी शांततामय मार्गाने स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रयत्न करील, असा निश्चयही त्यांनी व्यक्त केला. नंतर २६ जानेवारी १९३० ला सर्व देशभर स्वातंत्र्याची प्रतिज्ञा घेतली गेली व स्वातंत्र्य-संग्रामाला प्रारंभ झाला. तेव्हापासून दरवर्षी हा दिवस प्रजासत्ताक-दिन म्हणून पाळला जाऊ लागला.

त्यानंतर देशात पुन्हा चैतन्य निर्माण झाले. लोकांमधली जागृती पाहून कांग्रेसने सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू करण्याचे ठरवले आणि म. गांधींना त्या कामी सर्वाधिकार दिले. म. गांधींनी मिठाचा सत्याग्रह सुरू करण्याचे ठरवून मार्च १९३० मध्ये त्यासाठी दांडीयात्रा सुरू केली. ५ एप्रिलला त्यांनी गुजरातेत दांडी येथे समुद्रकिनाऱ्यावर मीठ गोळा करून सरकारी कायद्याचा भंग केला. दि. ६ एप्रिलपासून असंख्य सत्याग्रही सर्वत्र मिठाचा कायदा मोडू लागले. जिथे मीठ होत नाही तिथे ताडाची झाडे तोडण्याचा सत्याग्रह करण्यात आला. दि. ४ मेला गांधींनी स्वतः ताडाचे झाड तोडले. आणि दि. ५ मे रोजी रात्री त्यांना पकडण्यात आले. त्यामुळे सबंध देशभर मीठ कायद्याचा भंग, दारूच्या व परदेशी कापडाच्या दुकानांवर निरोधन, इ. प्रकारांनी सत्याग्रहाची चळवळ पसरली. सरकारनेही अत्यंत कठोरपणे दडपशाही चालू केली. पण त्यामुळे चळवळीचा जोर कमी न होता वाढतच गेला. पावसाळा संपल्यानंतर काही ठिकाणी जंगल-सत्याग्रह करण्यात आला. या आंदोलनात हजारो पुढारी व स्वयंसेवक तुरुंगात डांबले गेले. पण तरीही चळवळ फोफावतच राहिली. लाखो लोकांनी सत्याग्रह केला. तुरुंगात गेलेल्यांची संख्या १ लाखावर होती. शेकडो सत्याग्रही मारले गेले व जखमी झाले. अहिंसेमुळे लोक निर्भय झाले होते.

मग सरकारने तडजोडीचा प्रयत्न म्हणून एक गोलमेज परिषद इंग्लंडमध्ये भरविली. पण कांग्रेसच्या पुढाऱ्यांनी तिच्यावर बहिष्कार टाकला. तेव्हा सरकारने आपले धोरण बदलून सर्व पुढाऱ्यांना मुक्त केले आणि वर्किंग कमिटी व ऑ. इंडिया कांग्रेस कमिटीवरील बंदी उठवली. मार्च १९३१ मध्ये म. गांधी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांच्यांत तडजोड झाली. नंतर कराची येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले. त्यात कराराला मान्यता देण्यात आली. ऑगस्टमध्ये म. गांधी कॉंग्रेसचे प्रतिनिधी म्हणून दुसऱ्या गोलमेज परिषदेसाठी विलायतेला गेले. पण लवकरच हिंदुस्थानचे व्हाइसरॉय श्री. आयर्विन परत गेले व लॉर्ड विलिंग्डन हे त्यांच्या जागी आले. त्यांनी दडपशाहीचे सत्र पुन्हा सुरू केले. गोलमेज परिषद अयशस्वी होऊन गांधीजी परत आले आणि लगेच सरकारने त्यांना पकडून तुरुंगात डांबले. त्यापूर्वीच जवाहरलाल नेहरू वगैरे अग्रगण्य पुढारी तुरुंगात गेले होते. त्यामुळे पुन्हा कायदेभंगाची चळवळ सुरू होऊन हजारो सत्याग्रही पकडले गेले व देशातले सारे तुरुंग या सत्याग्रह्यांनी भरून गेले. कॉंग्रेस ही संस्था तेव्हा बेकायदा ठरली होती.

ऑगस्ट १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधानांनी हिंदुस्थानातील अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याचे जाहीर केले. म. गांधींना ती गोष्ट मान्य झाली नाही. त्या गोष्टीचा निषेध म्हणून त्यांनी तुरुंगातच बेमुदत उपोषण सुरू केले. तेव्हा अनेक पुढाऱ्यांनी धावपळ करून डॉ. आंबेडकरांचे मन वळवले व येरवडा करार केला. त्यात अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदारसंघ नसून, त्यांना राखीव जागा देण्याचे मान्य करण्यात आले होते. ब्रिटिश पंतप्रधानांनी तो करार मानला व मग गांधींनी उपोषण सोडले. पण ८ मे १९३३ मध्ये त्यांनी आत्मशुद्धीसाठी पुन्हा उपोषण सुरू केले. तेव्हा सरकारने त्यांना सोडून दिले. त्यानंतर चळवळीचा जोर कमी होत आहे असे पाहून गांधीजींनी ती मागे घेतली. मात्र त्यांनी सामुदायिक सत्याग्रहाच्या जागी वैयक्तिक कायदेभंग करण्यास परवानगी दिली. तसा कायदेभंग त्यांनी १–८–१९३३ रोजी सुरू केला. तेव्हा त्यांना पकडून एक वर्षाची शिक्षा देण्यात आली. तुरुंगात हरिजनोद्धाराचे कार्य करण्यासाठी पूर्वीसारख्या सवलती आपल्याला मिळत नाहीत, म्हणून त्यांनी १५ ऑगस्टला उपोषण सुरू केले. मग सरकारने त्यांना सोडून दिले. त्यानंतर कायदेभंगाची चळवळ थांबली.

सप्टेंबर १९३३ मध्ये कलकत्ता येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले. ते बेकायदा असल्यामुळे तिथे पोलिसांनी लाठीहल्ला करून अनेक पुढाऱ्यांना पकडले व तुरुंगात डांबले. पुढे सरकारच्या अमानुष दडपशाहीमुळे कायदेभंगाची चळवळ चालू ठेवणे कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांना कठीण वाटू लागले. मार्च १९३४ मध्ये दिल्लीला डॉ. अन्सारी यांच्या अध्यक्षतेखाली एक सभा होऊन, जे कॉंग्रेसजन कायदेमंडळात जाण्यास उत्सुक असतील त्यांना तसे करण्यास अनुमती द्यावी व मदत करावी असे ठरले. अशा प्रकारे पूर्वीच्या स्वराज्य पक्षाचे पुनरुज्जीवन झाले व गांधीजींनी निवडणुकीला मान्यता दिली. मे १९३४मध्ये रांची येथे स्वराज्य पक्षाची परिषद होऊन निवडणुकीच कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यानंतर लवकरच पा येथे कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली आणि कायदेभं चळवळ तहकूब करून कायदेमंडळातील प्रवेशाला मान्य देण्यात आली.

इ. स. १९३४ मध्ये मुंबईत कॉंग्रेसचे अधिवेशन भ म. गांधींच्या विलक्षण प्रभावामुळे कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी अहिंसा ही तत्त्वे मान्य केली होती आणि चरखा, खादी, अ श्यतानिवारण, इ. गोष्टी स्वीकारल्या होत्या. पण त्यांच्या अनेकांचा त्यांवर संपूर्ण विश्वास नव्हता. म्हणून गांधीं कॉंग्रेस सोडण्याचा निर्णय घेतला.

इ. स. १९३४ च्या अखेरीस सरकारने सेंट्रल असेंब्ली निवडणुकी घेतल्या. त्यांत कॉंग्रेसने सर्व जागांकरिता उ उमेदवार उभे केले आणि त्यांतील बरेच निवडून आले. राज्य-घटना फेटाळणे आणि स्वयंनिर्णयाच्या तत्त्वावर परिषदेची व संपूर्ण स्वराज्याची मागणी करणे या मुद्यां कॉंग्रेसने निवडणुका लढवल्या होत्या. मुस्लिम लीगचे जे उमे असेंब्लीत निवडून गेले होते, ते अर्थात कॉंग्रेसच्या विरुद्ध सर सभासदांच्या बाजूने मतदान करतील असा संभव होता. १९३५ च्या प्रारंभी त्या वेळचे कॉंग्रेसचे अध्यक्ष राजेंद्र यांनी बॅ. जीनांशी वाटाघाटी करून कॉंग्रेस व लीग यां एकोपा घडवून आणण्याचे प्रयत्न केले; पण त्यांना यश नाही. त्याच वर्षी १९३५ चा सुधारणा कायदा पास झाला.

इ. स. १९३६ मध्ये खानदेशातील फैजपूर नामक खेड कॉंग्रेसचे अधिवेशन झाले. पं. जवाहरलाल नेहरू या अधिवेश अध्यक्ष होते. त्यानंतर झालेल्या निवडणुकांत कॉंग्रेसला प्रांतांत बहुमत मिळाले आणि मुंबई, बंगाल, आसाम व सरहद्द प्रांत या चार प्रांतांत निवडून आलेल्या सर्व पक्षांत हाच सर्वांत मोठा पक्ष होता. जुलै १९३७ मध्ये कॉंग्रेसने प्रांतांत आपली मंत्रिमंडळे स्थापली. त्यांनी लगेच राज सुटकेचा प्रश्न हाती घेतला. त्यानंतर त्यांनी दारूबंदी, शिक्षण, हरिजनांचा उद्धार, शेतकऱ्यांच्या अडचणींचे नि इ. अनेक कार्यक्रमही पुढे आणले. मंत्रिमंडळांच्या का गव्हर्नरने विनाकारण हस्तक्षेप करू नये, असे आश्वासन मिळवले होते.

इ. स. १९३७सालच्या अधिवेशनाचे अध्यक्ष पं. जवाह नेहरूच होते. गांधीजी कॉंग्रेसमध्ये नसले तरी ते कॉंग्रेसला दर्शन करीत होते. पण कॉंग्रेसचे संथ राजकारण व कार्यक्रम या गोष्टी देशातील सर्व तरुणांना आकर्षि शकत नव्हत्या. त्यापेक्षा जवळचा स्वातंत्र्याचा मार्ग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढण्यास देशातला तरुण वर्ग उतावीळ झाला होता. शेतकरी व जमीनदार यांच्यांतील झगडेही वाढू लागले होते. समाजवाद हळूहळू मूळ धरू लागला होता. अशा वेळी पं. जवाहरलाल व श्री. सुभाषचंद्र बोस हे दोन तरुण व तडफदार नेते काँग्रेसला लाभले. इ. स. १९३७च्या मार्च महिन्यात सुभाषबाबूंची तुरुंगातून सुटका झाली आणि १९३८ साली त्यांना हरिपुरा येथील काँग्रेसचे अध्यक्षपद मिळाले. मध्यवर्ती फेडरेशनला विरोध करण्याचे काँग्रेसचे धोरण त्यांनी अधिक जोमाने चालविण्याचे ठरवले. इ. स. १९३९मध्ये त्रिपुरीला काँग्रेसचे अधिवेशन झाले. त्या वेळी देखील श्री. सुभाषचंद्र हेच अध्यक्षपदी निवडले गेले. त्या वेळी निवडणूक बिनविरोध झाली नाही. डॉ. पट्टाभिसीतारामय्या हे अध्यक्षपदासाठी उभे होते व त्यांना गांधीजी, वल्लभभाई पटेल वगैरे श्रेष्ठींचा पाठिंबा होता. तरीही सुभाषबाबू विजयी झाले. डॉ. पट्टाभींचा पराजय म्हणजे आपलाच पराजय, असे गांधीजींनी बोलून दाखवले. इतर पुढाऱ्यांनाही सुभाषबाबूंसारखा तडफदार अध्यक्ष नको होता. त्यामुळे अंतर्गत विरोध वाढीस लागला आणि सुभाषबाबूंनी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पण बंगाल प्रांतिक काँग्रेसने त्यांना पाठिंबा देऊन प्रांतिक कमिटीचे अध्यक्ष केले. पुढे त्यांच्यावर शिस्तभंगाचा आरोप ठेवून त्यांचे काँग्रेसचे सभासदत्व तीन वर्षेपर्यंत रद्द करण्यात आले.

इ. स. १९३९ च्या सप्टेंबरमध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले तेव्हा ब्रिटिश सरकारप्रमाणे हिंदुस्थान सरकारनेही जर्मनीशी युद्ध जाहीर केले; पण तसे करताना काँग्रेसचा विचार घेतला नाही. हा काँग्रेसचा अपमान आहे, असे समजून सर्व प्रांतांतील काँग्रेस मंत्रिमंडळांनी राजीनामे दिले.

मार्च १९४० मध्ये बिहारमधील रामगडला काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन मौ. अब्दुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली झाले. संपूर्ण स्वातंत्र्याचे आश्वासन मिळाल्यावाचून आपण महायुद्धात सरकारला साहाय्य करू नये, असे तिथे ठरले. जून १९४० मध्ये वर्किंग कमिटीची बैठक झाली. तीत स्वातंत्र्याचा लढा अहिंसक मार्गाने चालू राहील, असा ठराव करण्यात आला. पण राजाजी, वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू या नेत्यांच्या मते परचक्रापासून संरक्षण करण्यासाठी गांधीजींचा शांततामय मार्ग निरुपयोगी होता. वरील नेत्यांच्या प्रभावामुळे वर्किंग कमिटीने गांधीजींना सर्व जबाबदारीतून मुक्त केले आणि नंतर असा ठराव केला, की जर ब्रिटिश सरकार हिंदुस्थानात मध्यवर्ती राष्ट्रीय सरकार स्थापन करीत असेल, तर आम्ही युद्धप्रयत्नांत सहकार्य करू व देशाच्या रक्षणार्थ सर्व शक्ती खर्च करू. जुलै १९४० मध्ये पुणे येथे काँग्रेसची सभा झाली, तीत तो ठराव संमत झाला.

त्या वेळी काँग्रेसमध्ये अनेक भिन्न गट होते. युद्धाला सशर्त पाठिंबा द्यावा असे म्हणणारा राजाजींचा गट; सशर्त नैतिक पाठिंबा द्यावा, असे म्हणणारे जवाहरलाल; बिनशर्त साहाय्य करावे असे म्हणणारा रॉय गट आणि बिनशर्त नैतिक पाठिंबा द्यावा असे म्हणणारे गांधीजी.. संकटाच्या प्रसंगी ब्रिटिशांच्या अडचणीत भर टाकण्याची गांधींची इच्छा नव्हती. पण ब्रिटिश सरकार बेपर्वा होते. त्याने कोणतीही मागणी मान्य केली नाही. उलट ऑक्टोबर १९४० मध्ये भाषण-लेखनबंदीचा वटहुकूम मात्र जारी केला. तेव्हा गांधीजींनी युद्धविरोधी घोषणांचा वैयक्तिक सत्याग्रह सुरू केला. वर्षअखेरपर्यंत शेकडो निवडक स्त्री-पुरुष असा सत्याग्रह करून तुरुंगात गेले. इ. स. १९४१मध्ये तर सबंध देशात हजारो लोकांनी असा सत्याग्रह केला व त्यांना शिक्षा झाल्या. डिसेंबर १९४१ मध्ये सर्व पुढाऱ्यांना व सत्याग्रहींना सोडून देण्यात आले. मग म. गांधींनी सत्याग्रह थांबवला.

इ.स. १९४२मध्ये जपानचे सैन्य पूर्वेकडून हिंदुस्थानकडे वेगाने येऊ लागले. ७ मार्च १९४२ रोजी रंगून पडले. त्यामुळे जपानी सैन्य हिंदुस्थानात घुसून काही प्रदेश जिंकण्याचा संभव निर्माण झाला. तेव्हा ब्रिटिश सरकारने सर स्टॅफोर्ड क्रिप्स यांना हिंदी पुढाऱ्यांशी चर्चा करण्यासाठी पाठवले. पण त्यांनी आणलेली कागदी योजना कोणालाही मान्य झाली नाही. मग ७ व ८ ऑगस्ट १९४२ रोजी अखिल भा. काँग्रेस कमिटीचे अधिवेशन मुंबईत भरले. त्या वेळी ब्रिटिश सरकारला भारतावरील सत्ता ताबडतोब सोडून जाण्याचा इशारा देण्यात आला. सरकारने दडपशाहीची पूर्ण तयारी केलेली होती. गांधीजींनी आपली अहिंसक चळवळ सुरू करण्यापूर्वीच सरकारने बहुतेक सर्व पुढाऱ्यांना पकडून तुरुंगात टाकले आणि काँग्रेस ही संस्था बेकायदा ठरवली.

सर्व नेते बंदिस्त झाल्यानंतर तरुण समाजवादी नेत्यांनी सर्व सूत्रे आपल्या हाती घेऊन देशात घातपाती कृत्ये सुरू केली. लोकांनी रेल्वेस्टेशने जाळली, रूळ उखडले, गाड्या पाडल्या, तारा तोडल्या व सरकारी खजिनेही लुटले. बहुतेक कार्यकर्ते भूमिगत होऊन चळवळीची सूत्रे हलवीत होते. त्यांना पकडण्यासाठी सरकारने उदंड प्रयत्न केले आणि चळवळ दडपून टाकण्यासाठी अनन्वित अत्याचारही केले. गांधीजींनी १४–८–४२ रोजी सरकारला पत्र पाठवून लोकांनी केलेल्या अत्याचारांचा निषेध केला. पण सरकारने सर्व अत्याचारांची जबाबदारी गांधीजींवर टाकली व त्यांच्यावर असत्य, हिंसा व जपानधार्जिणेपणा असे खोटे आरोप केले. तेव्हा फेब्रुवारी १९४३ मध्ये त्यांनी २१ दिवसांचे उपोषण केले. ते नीटपणे पार पडले.

ऑक्टोबर १९४३ मध्ये लॉर्ड लिन्लिथगो यांच्या जागी लॉर्

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेव्हेल व्हाईसरॉय म्हणून आले. गांधीजींनी त्यांच्या मुलाखतीची मागणी केली. पण 'देशातील अत्याचारांना कॉंग्रेस जबाबदार आहे हे कबूल करा, आठ ऑगस्टचा ठराव मागे घ्या आणि मग पुढे बोला' असे उत्तर त्यांना मिळाले. त्यांनी ते अमान्य केले. मे १९४४मध्ये गांधीजी फार आजारी पडल्यामुळे सरकारने त्यांना मुक्त केले. त्यांनी लगेच एक पत्रक काढून, आठ ऑगस्टचा ठराव आता अस्तित्वात नाही, मात्र त्यातील राष्ट्रीय मागणीचा भाग कायम आहे, असे जाहीर केले. त्यानंतर गांधीजींनी मुस्लिम लीगचे अध्यक्ष जीना यांच्याशी वाटाघाटी करून हिंदु-मुस्लिमांची एकी घडवून आणण्याचा प्रयत्न केला; पण तो यशस्वी झाला नाही.

त्या सुमारास युरोपातील युद्धात ब्रिटनची सरशी होऊ लागल्यामुळे ब्रिटिश सरकारचे धोरण थोडेसे बदलले आणि १५ जून १९४५ ला कॉंग्रेसच्या नेत्यांना मुक्त करण्यात आले. तत्पूर्वी जर्मनी शरण आल्यामुळे महायुद्ध संपले होते. त्यानंतर इंग्लंडमध्ये सार्वत्रिक निवडणुका होऊन मजूरपक्ष अधिकारावर आला. त्या पक्षाचे प्रमुख ॲटली हे पंतप्रधान झाले. हिंदुस्थानाला स्वातंत्र्य देण्यास ते अनुकूल होते. महायुद्ध चालू असताना नेताजी सुभाषचंद्र बोस अदृश्य झाले व गुप्तपणे पूर्वेकडील देशांत जाऊन त्यांनी जपानच्या ताब्यात असलेल्या हिंदी युद्धकैद्यांची आझाद हिंद सेना बनवली. त्यांनी भारतावर स्वारी करून इंफाळपर्यंत मजल मारली होती. पण तेवढ्यात दोस्तांचा जय झाला आणि जर्मनी व जपान दोस्तांना शरण गेले. पुढे सुभाषबाबूही अपघातात मरण पावले. मात्र त्यांच्या स्वारीमुळे ब्रिटिशांना पक्के कळून चुकले, की यापुढे हिंदी सैनिकांवर विसंबून हिंदुस्थानवर राज्य करणे अशक्य आहे. म्हणून मजूर मंत्रिमंडळाने लॉर्ड वेव्हेल यांना ताबडतोब लंडनला बोलावले. ऑगस्ट १९४५ मध्ये लॉर्ड वेव्हेल यांनी लंडनला जाण्यापूर्वी मध्यवर्ती व प्रांतिक निवडणुका घेण्याचे जाहीर केले आणि कॉंग्रेसवरील प्रतिबंध काढून घेतले. सप्टेंबरमध्ये कॉंग्रेस वर्किंग कमिटीची बैठक झाली. लवकरच मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळाच्या निवडणुका घेण्यात आल्या. लीगचे प्रांत सोडून बाकीच्या प्रांतांत कॉंग्रेस प्रचंड बहुमताने निवडून आली व त्या प्रांतांत कॉंग्रेसची मंत्रिमंडळे कारभार पाहू लागली.

मार्च १९४६ मध्ये लॉर्ड पेथिक लॉरेन्स, सर स्टॅफोर्ड क्रिप्स व होरेस अलेक्झँडर या तिघांचे शिष्टमंडळ स्वातंत्र्याची चर्चा करण्यासाठी भारतात आले. त्यांच्यापुढे स्वातंत्र्य, घटनापरिषद व हंगामी सरकार हे तीन प्रश्न विचारार्थ होते. पहिल्या प्रश्नाबद्दल फारशी अडचण नव्हती, कारण हिंदुस्थानला स्वातंत्र्य देण्याचे ब्रिटिश सरकारने ठरवले होते. ब्रिटिश शिष्टमंडळ तीन महिने भारतात राहून निरनिराळ्या नेत्यां[…] चर्चा करीत होते. पण त्याला त्या कामी यश आले नाही. […] त्या अवधीत जून १९४६ मध्ये घटना समितीच्या निवड[…] झाल्या. जूनअखेर शिष्टमंडळ परत गेले. कारण विविध प[…] कोणतीच एकवाक्यता झाली नाही. बॅ. जीनांना देशाची फा[…] करायची होती. त्यांनी ऑगस्ट १९४६ मध्ये बंगालमध्ये 'प्र[…]कृती' म्हणजे हिंदूंची कत्तल आरंभली. मुसलमानांनी […] दिवस हिंदूंवर भयानक अत्याचार केले. पुढे कॉंग्रेसने २ स[…] १९४६ ला हंगामी सरकार स्थापन केले. प्रारंभी मुस्लिम लीग[…] त्यात भाग घेतला नव्हता. पण १५ ऑक्टोबरला ती हं[…] सरकारात सामील झाली. मात्र वेगळ्या पाकिस्तानची [मा]गणी कायम होती. देशात दंगे चालूच राहिले होते. […] ३ जून १९४७ ला ब्रिटिश सरकारने देशाची फाळणी क[…] सत्तांतर करण्याची योजना जाहीर केली. त्यानंतर ४ जु[…] ब्रिटिश पार्लमेंटमध्ये तशा तरतुदीचे बिल मांडण्यात आ[…] 'इंडियन इंडिपेंडन्स ॲक्ट १९४७' पास झाला.

वरील कायद्याप्रमाणे १५ ऑगस्ट १९४७ पासून खंडित [हिंदुस्थान] स्वतंत्र झाला आणि स्वतंत्र पाकिस्तानही निर्माण करण्यात [आले.] त्याचप्रमाणे सुमारे ५६५ हिंदी संस्थानेही स्वतंत्र झाली. हं[गामी] सरकारचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्या वेळचे [गव्हर]नर जनरल लॉर्ड माउंटबॅटन यांच्याकडून सत्ता स्वीका[रली.] अशा प्रकारे कॉंग्रेसचे ध्येय सफल झाले. पण त्याच वेळी प[ाकि]स्तानातील हिंदूंची भयानक कत्तल सुरू झाली आणि ल[क्षावधी] हिंदू पूर्व व पश्चिम पाकिस्तानातून निर्वासित होऊन भा[रतात] आले. हिंदुस्थानची फाळणी हे त्या सर्व अनर्थाचे कारण [आहे] अशी कॉंग्रेसविरोधी लोकांची समजूत झाली. कॉंग्रेसने दे[शाच्या] विभाजनाला मान्यता दिली म्हणून कॉंग्रेसच त्या अनर्थाला ज[बाब]दार आहे, असेही त्यांनी ठरवले. गांधीजी हे कॉंग्रेसचे [व] राष्ट्राचे पिते म्हणून तेही त्या अनर्थाला जबाबदार ठरतात. […] ते मुसलमानधार्जिणे आहेत, असे मानून एका हिंदु धर्मा[…] अभिमान्याने ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांचा वध के[ला.]

भारताची घटनापरिषद ९ डिसेंबर १९४६ ला सुरू [झाली.] पहिले अध्यक्ष डॉ. सच्चिदानंद सिंह हे होते. त्यानंतर [डॉ.] राजेंद्रप्रसाद यांना कायमचे अध्यक्ष म्हणून निवडण्यात [आले.] जानेवारी १९४७ मध्ये पं. जवाहरलाल नेहरू यांनी '[भारत] हे सार्वभौम, स्वतंत्र गणराज्य आहे' असा ठराव मांडला [व तो] सम्मत झाला. त्यानंतर घटनापरिषदेने भारतीय राज्य[घटनेचा] मसुदा तयार करण्यासाठी एक समिति नेमली. त्या स[मितीने] घटनेचा अहवाल सादर केला व ही घटना २६ जा[नेवारी] १९५० पासून अंमलात आली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. स. १९४७ पासून आजतागायत भारताचे केंद्रीय शासन आणि काही अपवाद सोडून सर्व घटक राज्यांचे शासन राष्ट्रीय सभेकडेच आहे. भारतातील शेकडो संस्थाने भारतीय संघ-राज्यात विलीन झाली, त्याचे श्रेय त्या वेळचे गृहमंत्री श्री. वल्लभभाई पटेल यांनाच आहे.

इ. स. १९५२ साली नवीन घटनेला अनुसरून सर्व भारतात प्रथमच सार्वत्रिक निवडणुका झाल्या. सुमारे १९ कोटी स्त्री-पुरुषांना त्यात मतदानाचा अधिकार मिळाला. कॉंग्रेसने त्या निवडणुकीत भाग घेऊन मोठ्या बहुमताने विजय मिळवला.



सरदार वल्लभभाई पटेल

कॉंग्रेसने भारताच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनांची रूपरेखा निश्चित केली आणि लगेच प्रथम पंचवार्षिक योजना सुरू केली. इ. स. १९५५ साली आवडी येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले; त्यात 'समाजवादी समाज स्थापणे हे आपले ध्येय आहे' असे स्पष्टपणे ठरवण्यात आले. लोकतांत्रिक शासन व्यवस्थेवरच कॉंग्रेसने आपला दृढ-विश्वास व्यक्त केला.

इ. स. १९५७ मध्ये पुन्हा सार्वत्रिक निवडणुका झाल्या आणि लोकांनी कॉंग्रेसवरच आपला विश्वास प्रगट केला. लोकसभेत व बहुतेक राज्यांतील विधानसभांत कॉंग्रेसला बहुमत मिळाले. इ.स.१९६२, १९६७ आणि १९७१मध्येही केंद्रस्थानी कॉंग्रेसला बहुमत मिळाले. देशाला राजकीय स्वातंत्र्य मिळाले असले, तरी आर्थिक व सामाजिक स्वातंत्र्य मिळविणे हे अद्यापि साधायचे आहे आणि कॉंग्रेस त्यासाठी प्रयत्नशील आहे. आर्थिक व सामाजिक क्रांतीच्या प्रयत्नात बाधा आणणाऱ्या प्रतिगामी गटांना श्रीमती इंदिरा गांधींच्या पुरोगामी गटाने कॉंग्रेसमधून बाहेर घालवले आहे. त्यामुळे कॉंग्रेसचा मार्ग सुकर झाला आहे, असे वाटते. अर्थात अशी क्रांती घडवून आणण्यात कॉंग्रेस केव्हा यशस्वी होणार, हे भविष्यकाळच ठरवील. [आधुनिक भारत—आचार्य शं. द. जावडेकर, १९३८; कॉंग्रेसचा कल्पवृक्ष—श्री. वि. सा. हरप, १९४८; भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास—श्री. श्रं. र. देवगिरीकर, १९६९; हिं. वि. को.]

रासधारी

राजस्थानातील एक श्रेष्ठ लोकनाट्य. यात बहुधा संपूर्ण रामचरित्र दाखवितात. त्या व्यतिरिक्त कृष्णलीला, हरिश्चंद्र, मणिहारी, भर्तृहरी, इ. आख्यानेही दाखवितात. त्याचप्रमाणे राजे–महाराजे यांच्या संबंधीही काही आख्याने असतात.

या नाट्याला रंगमंचाची आवश्यकता नसते. भाट, मिरासी, ढोली, इ. धंदेवाईक मंडळी हे नाट्य करतात. स्त्रियांची कामेही पुरुषच करतात. नृत्यकार पुरुष लांब झगा, चुणीदार पायजमा व डोक्यावर मोठी पगडी घालतात. त्यांच्या हातांत भाले किंवा तिरकमठे असतात व कमरेला तलवारी असतात. स्त्रीपात्राला घोळदार घागरा असतो.

रासधारीतील अभिनय फारसा कठीण नसतो. पण त्यात निश्चित आणि नियंत्रित मुद्रा मात्र असतात. रासधारी आणि ख्याल यांच्या कथाप्रसंगांत साम्य असले, तरी शैलीत फरक असतो. ख्यालांच्या कलेत विशेष नैपुण्य लागत नाही. याउलट रासधारी कलाकारांना कौशल्याची गरज असते. हे प्रयोग संगीतप्रधान असून, त्यांतले संवादही पद्यात्मक असतात.

रासधारी मंडळ्या गावोगाव हिंडून आपले प्रयोग करतात. रासधारी नाट्याला प्रारंभ झाल्यानंतर जे कलावंत रास म्हणजे अभिनय करीत पुढे येतात, त्यांना रासधारी असे म्हणत असत. कालांतराने साऱ्या नाट्यालाच रासधारी हे नाव मिळाले. [लोककला त्रै.; रा. लो. ना.]

रासलीला

व्रज प्रदेशातील एक धार्मिक व संगीत नृत्यनाट्य. 'रसानां समूहः' = नव रसांचा समुदाय आणि 'रसः उत्पद्यते यस्मात्' = ज्याच्यापासून रस उत्पन्न होतो तो, अशा रास शब्दाच्या दोन व्युत्पत्ती सांगितलेल्या आहेत. रास शब्द प्राचीन संस्कृतात आहे, तसाच तो अपभ्रंश साहित्यातही आहे. डॉ. दशरथ ओझा यांच्या मते हा शब्द मुळात प्राकृत असून, संस्कृत भाषेने नंतर त्याचा स्वीकार केला आहे.

'रासोत्सवः संप्रवृत्तो गोपीमण्डलमण्डितः' = गोपींच्या समुदायाने शोभून दिसणारा रासोत्सव चालू झाला, असा भागवताच्या दशम स्कंधात रासाचा उल्लेख असून, त्याचा संदर्भ श्रीकृष्णाने गोपीमंडलात खेळलेल्या रासाशी लागतो.

रासक्रीडा हा वृंदावनविहारी मुरलीधर श्रीकृष्ण आणि गोकुळातल्या कृष्णलुब्ध गोपी यांच्या जीवनातला एक अमृत-मधुर प्रसंग आहे. भागवत पुराणाच्या दशम स्कंधातील २९ ते ३३ या अध्यायांत रासाचे वर्णन आलेले आहे. म्हणून या पाच अध्यायांना मिळून रासपंचाध्यायी असे म्हणतात. हे पाच अध्याय भागवताचे प्राणभूत मानलेले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या रासपंचाध्यायीत रासाचे वर्णन आले आहे, ते पुढीलप्रमाणे –

शरद् ऋतूतील पौर्णिमेची रात्र आली. वाटोळे चंद्रबिंब क्षितिजावरून वर येऊ लागले. थोडयाच वेळात त्याचे धवल चांदणे सर्वत्र पसरले. अशा वेळी श्रीकृष्णाला गोपबालांबरोबर क्रीडा करण्याची इच्छा झाली. त्याने आपली बासरी अधरावर टेकवली आणि एक मधुर तान छेडली. ती तान साऱ्या व्रजमंडळात घुमली. व्रजातल्या गोपींनी बासरीचे ते मधुर स्वर ऐकले मात्र; त्यांचे भान हरपले. हातातले काम तसेच टाकून त्या उठल्या. त्यांना आपल्या वस्त्राभरणांचीही शुद्ध राहिली नाही. आई-बाप, बंधू किंवा पती यांच्या विरोधाला न जुमानता त्या वृंदावनात यमुनातीरी उभा असलेल्या कृष्णाकडे धावल्या. त्यांना पाहून कृष्ण म्हणाला. 'तुम्ही रात्रीच्या वेळी इथे कशाला आलात ? आपल्या पतींना व मुलांना सोडून तुम्ही इथे आलात, हे तुम्ही योग्य केले नाही. तेव्हा तुम्ही आलात तशा परत जा.'

कृष्णाच्या मुखातून ही कठोर भाषा ऐकल्यावर गोपी उदास झाल्या. त्या कृष्णाला म्हणाल्या. 'तू आमच्या मनातला भाव जाणतोस. तुझ्या अशा बोलण्याने आम्हांला दुःख होते. आम्ही परत जाणार नाही. आम्हांला तुझ्याशी क्रीडा करायची आहे.'

गोपींची ही अनन्यभक्ती पाहून कृष्ण प्रसन्न झाला आणि त्याने त्यांची इच्छा पूर्ण करायचे ठरवले. मग यमुनेच्या वाळवंटात त्या रात्री रासलीलेला प्रारंभ झाला. गायनवादनाच्या साथीवर नृत्य झाले आणि विविध शृंगारचेष्टाही झाल्या. गोपींच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्यांना आपल्या भाग्याचा गर्व झाला आणि इथेच सर्व बिनसले. कृष्णाने त्यांचा गर्वभार उतरवण्याचे ठरवले. तो एकाएकी अंतर्धान पावला.

कृष्ण कुठे दिसत नाही, हे पाहून गोपी व्याकुळ झाल्या आणि त्याला शोधू लागल्या. प्रत्येक वन त्यांनी पालथे घातले. तिथल्या वृक्षवल्लरींकडे व पशुपक्ष्यांकडे त्यांनी कृष्णाची चौकशी चालवली. पण कृष्णाचा पत्ता लागेना. दीनवाण्या होऊन त्या विलाप करू लागल्या. कृष्णाबरोबर केलेल्या लीलांचे त्यांना स्मरण होऊ लागले. मग त्या कृष्णाच्या निरनिराळ्या लीलांचे अनुकरण करू लागल्या. एक गोपी कृष्ण बनली. दुसऱ्या काहीजणी त्याच्या सवंगडी बनल्या आणि त्यांनी कृष्णाचे विविध खेळ मांडले. खेळत खेळत त्या वृंदावनात फिरू लागल्या.

फिरता फिरता एके ठिकाणी त्यांना कृष्णाची पदचिन्हे दिसली. जवळच एका स्त्रीचीही पावले उमटलेली होती. त्यावरून कृष्ण आपल्या आराधिकेसह एकांतात क्रीडा करण्यासाठी गेला असावा, हे त्यांनी ताडले. सर्व गोपी त्या पदचिन्हांचा मागोवा घेत निघाल्या. एका ठिकाणी त्यांना ती भाग्यशाली कृष्णप्रिया भान हरपलेल्या स्थितीत पडलेली आढळली. तिला कृष्णासंबंधी विचारले असता, आपल्याला आपल्या भाग्याचा गर्व झाला, म्हणून कृष्ण आपल्याला सोडून निघून गेला, असे तिने सांगितले. पुन्हा गोपी विलाप करू लागल्या. कृष्णाचे स्मरण व अनुकरण करता करता त्या कृष्णमय होऊन गेल्या. त्यांच्या मनातला गर्व कुठल्याकुठे नाहीसा झाला. तेव्हा कृष्ण सस्मित वदनाने पुन्हा त्या ठिकाणी प्रगट झाला. कृष्णाला असा अचानक प्रगटलेला पाहून गोपी अत्यंत हर्षभरित झाल्या. कृष्ण मग त्यांना घेऊन यमुनेच्या वाळवंटात गेला.

तिथे गोपींनी फेर धरला. कृष्णाने आपली एकाची अनेक रूपे केली. दोन गोपींच्या मध्ये एक कृष्ण असे ते महावर्तुळ निर्माण झाले. या वर्तुळाच्या मध्यभागी उभा राहून मुरली वाजवायला आणखीही एक कृष्ण निर्माण झाला आणि एवढा सगळा थाट जमल्यावर उत्फुल्ल मल्लिकांच्या सुगंधाने धुंद झालेल्या त्या शरद् ऋतूतल्या पौर्णिमेच्या चांदण्या रात्री कृष्णाने गोपींसह रासोत्सव मांडला. दिशाप्रकाशापर्यंत तो अविच्छिन्न चालला. अशी ही कृष्णाच्या रासक्रीडेची कथा आहे.

त्यानंतर थोडयाच काळात श्रीकृष्णाने मथुरेला प्रयाण केले. तो गोकुळातून एकदा गेला तो कायमचा गेला; पुनश्च एकदाही गोकुळाकडे परत वळला नाही. पुढे राजकारणाच्या आखाड्यात उतरून पांडवांचे प्रिय करण्यासाठी त्याने कंबर कसली. गोकुळातल्या गोपींच्या जीवनातून तो निसटला, तो कायमचा. त्यांच्या हृदयसंपुटात शिल्लक उरली ती त्याच्या बरोबर खेळलेल्या रासाची मधुर स्मृती. त्या स्मृतीला आंजारीत गोंजारीत त्यांनी आपले विरहदग्ध जीवन कसेबसे व्यतीत केले.

रासनृत्य – रासाचे नित्य रास, अवतरित रास व अनुकरणात्मक रास असे तीन प्रकार मानलेले आहेत. व्रज-वृंदावनात कृष्ण आपल्या आनंदप्रसारिणी शक्तींसह नेहमी रासक्रीडेत मग्न असतो, असे कृष्णसंप्रदायी मानतात. भगवंताची ही क्रीडा अनादी व अनंत आहे. हिलाच नित्य रास असे नाव आहे. श्रीकृष्णाने द्वापर युगात, आपल्या आनंदशक्तींसह रसात्मक रूपात अवतार घेतला आणि जी रासक्रीडा केली, तिला अवतरित रास असे म्हणतात. व्रजातील भक्तमंडळी कृष्णाच्या रासलीलेचे जे अनुकरण करतात, त्याला अनुकरणात्मक रास असे म्हणतात.

रासलीलेतील मुख्य पात्रे म्हणजे भगवान श्रीकृष्ण, राधा, श्रीदामा व ललितादी व्रजांगना ही होत. कृष्ण व राधा यांच्या सेवेसाठी अनेक सख्या होत्या. त्यांपैकी ललिता, विशाखा, सुचित्रा, चंपकलता, रंगदेवी, सुदेवी, तुंगविद्या व इंदुरेखा या मुख्य होत्या. या प्रत्येक सखीचा एकेक यूथ म्हणजे संच होता. आपापला यूथ घेऊन यूथेश्वरी या रासात सामील होत असे.

रासक्रीडेचे आध्यात्मिक माहात्म्य सांगताना व्याख्यातां

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भागवत पुराणात म्हटले आहे, ते असे—

विक्रीडितं व्रजवधूभिरिदं च विष्णोः
श्रद्धान्वितोऽनुश्रृणुयादथ वर्णयेच्च ।
भक्तिं परां भगवति प्रतिलभ्य कामं
हृद्रोगमाश्वपहिनोत्यचिरेण धीरः ॥

अर्थ—जो कोणी श्रद्धायुक्त होऊन व्रजबालांबरोबर भगवान कृष्णाने केलेल्या क्रीडांचे श्रवण व कीर्तन करील, त्याची भगवंताच्या ठिकाणी श्रेष्ठ भक्ती जडेल आणि तो हृद्‌रोगरूपी कामापासून त्वरित मुक्त होईल.

शुकसनकादी ब्रह्मनिष्ठ महामुनींना ब्रह्मानंदापेक्षाही अधिक असा अलौकिक आनंद द्यावा, या हेतूने भगवंताने कृष्णावतार घेतला आणि गोपींबरोबर रासक्रीडा करून तो आनंद त्यांना दिला, असे अन्यत्र म्हटले आहे.

श्रीकृष्णाने व्रजातील गोपींबरोबर जी रासक्रीडा केली, ती कामक्रीडा होती, असे काही टीकाकारांचे म्हणणे आहे. पण या टीकेला आधार नाही. रासक्रीडेच्या प्रसंगी कृष्णाचे वय अवघे दहा वर्षांचे होते. या वयात त्याच्यावर स्त्रीसंगाचा आरोप करणे, हे तर्कसंगत नाही. पण कृष्णाविषयी असे विकल्प व प्रवाद निर्माण व्हायला स्वतः भागवतकार आणि त्यांच्या आधारे शृंगारप्रधान रचना करणारे कवी कारणीभूत झाले आहेत. भागवताच्या रासपंचाध्यायीतील रासक्रीडावर्णनात, अनंगवर्धन म्हणजे कामोद्दीपक गीते ऐकल्यामुळे गोपी कृष्णाकडे धावल्या, असे वर्णन आहे. पती, पिता, भाऊबंद यांनी निवारण केले, तरी त्या परत फिरल्या नाहीत—

तमेव परमात्मानं जारबुद्ध्यापि सङ्गताः ।
जहुर्गुणमयं देहं सद्यः प्रक्षीणबन्धनाः ।।
(भाग. पु. १०.२९.११)

अर्थ—आपला जार म्हणून गोपी कृष्णपरमात्म्याशी रमल्या असल्या, तरी त्यांचे सर्व बंध क्षीण होऊन त्या तत्काळ त्रिगुणात्मक देहापासून मुक्त झाल्या.

मत्कामा रमणं जारमस्वरूपविदोऽबलाः ।
ब्रह्म मां परमं प्रापुः सङ्गात् शतसहस्रशः ॥
(भाग. पु. १०.२९.१३)

अर्थ—ईश्वरस्वरूपाचे ज्ञान नसणाऱ्या त्या गोपींनी माझ्या विषयीच्या कामभावनेने, मला जार व रमण समजून नाना प्रकारांनी माझ्याशी संग केला व त्यामुळे त्यांना माझी प्राप्ती झाली. या श्लोकांतील जार व रमण या शब्दांचा आधार सापडल्यावर कविकल्पनांना बहर आला व कवींनी कृष्णाच्या आणि राधेसह गोपींच्या शृंगारिक क्रीडांचे वर्णन केले.

पण सूरदास, नंददास, इ. कवींनी रासक्रीडा निर्दोष आहे, असे प्रतिपादन केले आहे. ज्यांची बुद्धी भ्रममुक्त आहे, अशा भाविकांनाच या क्रीडेचा आस्वाद घेता येतो, असे सूरदासाने म्हटले आहे. कृष्ण हा नर नसून, नित्य आत्मानंद व एकरस असा अंतर्यामी आहे. तो कामवश नाही; त्याचे स्वरूप जसे उज्ज्वल आहे, तशीच त्याची रासक्रीडाही उज्ज्वल आहे, असे नंददासाने सांगितले आहे.

भागवतातील रासपंचाध्यायीवर आजवर अनेक भाष्ये व टीका लिहिल्या गेल्या आहेत. रासक्रीडा म्हणजे कृष्णाने कामदेवावर मिळवलेला विजय होय, असे कोणी सांगितले आहे; तर कोणी तिला भगवंताचा दिव्य विहार, असे म्हटले आहे. कोणी रासक्रीडेचा आध्यात्मिक अर्थ लावण्याचा प्रयत्न केला आहे. श्रीकृष्ण हा परमात्मा असून, गोपी या जीवात्मरूप आहेत. रासक्रीडा म्हणजे या आत्म्यांचे आणि परमात्म्याचे मीलन होय. ज्याप्रमाणे बालक आपल्या प्रतिबिंबाबरोबर क्रीडा करते, त्याप्रमाणे कृष्ण आपल्या बहुधा विभक्त आत्मरूपिणी व्रजगोपींसह रासक्रीडा करतो. भगवान मुरली वाजवून प्रत्येक व्यक्तीला रासासाठी निमंत्रण देतो आणि जो कोणी अहंकार टाकून या लीलेत भाग घेतो, त्याला परमानंदाची प्राप्ती होते, असे या रासक्रीडेचे आध्यात्मिक स्पष्टीकरण आहे.

आजही व्रजप्रदेशात रासलीलेचे प्रयोग होत असतात. वृंदावनातील यमुना नदीच्या तीरावर वाळवंटात कृष्णाने गोपींबरोबर रासक्रीडा केली, त्या गोष्टीला हजारो वर्षे झाली. पण आजही भांडीरवट, आनंदमयी मांचा आश्रम, श्रौत मुनिनिवास, हरिमिलाप, टोपीकुंज, इ. ठिकाणीं होणारी रासलीला पाहून प्रेक्षकांना भागवतातल्या वर्णनांची आठवण होते. तिथल्या काही भाविकांची तर अशी श्रद्धा आहे, की अजूनही रात्रीच्या वेळी कुंज-कुटिरात श्रीकृष्ण स्वतः गोपींबरोबर रासक्रीडा करीत असतो. हरियाली तीज ते शरद पौर्णिमा या काळात इथे अनेक ठिकाणी सकाळपासून रात्रीपर्यंत रासलीला चालू असते.

सांप्रत रासलीला दोन भागांत दाखवतात. त्यांना अनुक्रमे नित्य रास व लीला अशी नावे आहेत. सुमारे साडेचारशे वर्षांपूर्वी नारायणभट्टाने रासाच्या मूळ रूपावर परिष्कार करून त्याला शास्त्रीय रूप दिले व तेच आजतागायत टिकून आहे.

नित्य रास—यात नृत्याचा अंतर्भाव असतो. या नृत्याचा प्रकार परंपरेने चालत आलेला आहे. रास सुरू होण्यापूर्वी शृंगारकक्षात कृष्णाच्या मस्तकावर मुकुट चढवतात आणि त्याला धूप, दीप व नैवेद्य दाखवून त्याची पूजा करतात. कृष्ण विडा खाऊन रंगमंचावर प्रवेश करतो. तिथे तो राधेसह सिंहासनावर बसतो. गोपीही रंगमंचावर त्यांच्या आजूबाजूला बसतात किंवा उभ्या राहतात. रासमंडळीचा स्वामी या सर्व पात्रांची पूजा करतो. मग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वामी व सर्व समाजी म्हणजे वाद्यवादक प्रार्थना गातात. त्यानंतर एक गोपी राधा-कृष्णांची आरती करते. मग गोपी नित्य रासाची वेळ झाली, असे राधेला सुचवतात. कृष्ण व राधा एकमेकांची स्तुती करून परस्परांना रासमंडलात उतरण्याची विनंती करतात. मग कृष्ण व राधा एकमेकांच्या गळ्यात हात घालून नृत्यासाठी उभे राहतात. गोपीही उठून उभ्या राहतात. लगेच स्वामी व समाजी गीतगायन सुरू करतात, ते असे –

नांचत रास में रास-बिहारी । नॅचवत हैं ब्रज की सब नारी ।
तादीम-तादीम तत-तत थेई-थेई । थुंगन-थुंगन देत गति न्यारी ।
ततत्ता थेई ततत्ता थेई ततत्ता थेई । तिटक तिटक धिलांग ।
धिकतक, तोदीम धिलांग, तकतो ।
ता धिलांग, धिग धिलांग, धिकतक ।
तोदीम तोदीम, धेताम धेताम ।
धिलांग धिलांग धिलंग, तक गदगिन थेई ।
ततत्ता थेई, ततत्ता थेई, ततत्ता थेई ॥

गीत सुरू झाले, की त्याला वाद्यांची साथ मिळते आणि कधी कृष्ण, कधी राधा, तर कधी गोपी त्या तालावर नृत्य सुरू करतात. हे नृत्य साधारण कथकप्रमाणे वाटते. काही वेळा राधा, कृष्ण व गोपी मंडलाकार उभे राहून नृत्य करतात. नृत्य संपल्यावर राधा-कृष्ण सिंहासनावर विराजमान होतात.

त्यानंतर स्वामी दुसरे एखादे गीत गायला सुरुवात करतो. त्याबरोबर कृष्ण सिंहासनावरून खाली उतरून मंडलाकार फिरतो व हळूहळू पावले टाकीत सिंहासनावर बसलेल्या राधेच्या समोर येऊन उभा राहतो आणि तिचा मुकुट, साडी, माला, कुंडल वगैरे व्यवस्थित करतो. गीत संपल्यावर राधेला नमस्कार करून तो आपल्या जागेवर बसतो.

यानंतर स्वामी व वाद्यवादक क्रमाक्रमाने भक्तिपूर्ण असे दोहे, कवित्त, सवैया वगैरे गातात व तोपर्यंत नर्तकगण विश्रांती घेतो. त्यानंतर सामूहिक गायन व रासनृत्य होते. या वेळी कधी कधी टिपऱ्यांचे, तर कधी गोफ गुंफण्याचे नृत्य होते.

कृष्णाच्या नृत्याच्या वेळी सख्या पुढील गीत गातात–

नांचै छबीलौ ब्रजराज छूम छन न न न न न न ।
ना ता थेई, ता ता थेई, चरन चपल आली ॥
सजनी रजनी सरद, सरद ऋतु आज सुफल आली ॥

राधेच्या नृत्याच्या वेळी 'नांचै छबीली राधिका' असे शब्द घालून वरचेच गीत गातात.

शेवटी राधा, कृष्ण व गोपी मिळून एका ओळीत उभे राहतात व गीत गाऊन नृत्य करतात. यानंतर प्रेक्षक लोक 'लाडिली लाल की जय' व 'बलिहार, बलिहार' असा जयघोष करतात व एवढे झाल्यावर नित्य रास समाप्त होतो.

व्रजप्रदेशात गुजरिया, मयूर, ताली, डंडा, पद, चरकला, इ. रास फार प्रसिद्ध आहेत.

कालांतराने रासाचा प्रसार गुजरात, राजस्थान व मणिपूर या प्रदेशांतही झाला.

रासलीला – रासनृत्यानंतर लीलेला प्रारंभ होतो. श्रीकृष्णाच्या जीवनातील काही रोचक प्रसंगांना लीलांचे रू[illegible] दिलेले आहे. कृष्णजन्म, पूतनाउद्धार, कालियादमन, गोवर्धनधारण, कंसवध, उद्धवसंवाद, इ. लीला भागवतादी पुराणांवर आधारलेल्या आहेत; तर अन्नप्राशन, चंद्राचे खेळणे, स्याम-सगाई, इ. लीला सूरदास, नंददास यांसारख्या कवींच्या काव्या-वर रचलेल्या आहेत.

रासलीलेचा रंगमंच खुला असतो. रंगमंचावर सिंहासन [illegible] खुर्च्या किंवा चौरंग मांडलेले असतात. पुरुषच स्त्रियांच्या भूमिका करतात. लहान लहान कुमार कृष्णाची व गोपींची कामे करतात. त्यांना संस्कृतप्रचुर ब्रज भाषेतील मोठे मोठे संवाद, पदे व रसिया पाठ असतात. कृष्णाच्या मस्तकी मोरमुकुट, कपाळा-वर चंदनतिलक, गळ्यात माळा व कानांत कुंडले असतात. तो अंगरखा घालतो व पीतांबर नेसतो. राधेच्या व गोपींच्या मस्तकांवरही मुकुट असतात आणि गळ्यांत, कानांत, हातांत अलंकार असतात. त्यांची वस्त्रे झुळझुळीत असतात. इतर पात्रे फारसा शृंगार करीत नाहीत. यशोदा, रोहिणी यांसारखी स्त्री-पात्रे अंगावर एक शाल पांघरून रंगमंचावर येतात. त्यांची वस्त्रे पांढरी असतात. काही पात्रे समाजीतून म्हणजे वृंदवादक-तूनच निवडतात.

समाजी हे रासलीलेचे महत्त्वाचे अंग आहे. हार्मोनियम, सारंगी, मृदंग, झांज, बासरी व तंबोरा एवढी वाद्ये समाजी वाजवतात. रासमंडलीचा स्वामी दोहा, रसिया, कवित्त, सवैया इ. पदे गातो व रासलीलेचे निर्देशन करतो. रासलीला ही संगीतप्रधान असल्यामुळे शास्त्रीय संगीत जाणणारा व मधुर आवाज असलेला स्वामी लोकांवर प्रभाव पाडतो. रासलीलेत गद्यसंवाद कमी असतात आणि जे असतात तेही पद्याच्या [illegible] वर म्हणतात. रंगमंचावरचे राधा-कृष्णांचे सिंहासन [illegible] प्रकारे सजवलेले असते. रासलीलेत फक्त एकच पडदा [illegible] दोन व्यक्ती, पाहिजे तेव्हा रंगमंचावरील पात्रांसमोर तो [illegible] धरतात. सर्व पात्रे रंगमंचावरच बसलेली असतात.

रासलीलेचे कथानक एखाद्या नाटकाप्रमाणेच असते. [illegible] त्याचा कथाभाग सांगण्यासाठी सूरदासादी अष्टछाप कवींचे [illegible] व्रजमंडळातील कवींची सरस पदे, सवैये, कवित्त, इ. रचनांचा उपयोग करतात. पदे गायिली जातात, तेव्हा त्यांचा अर्थ [illegible] भाषेत सांगतात. कथानकातील प्रसंगांची सांधेजोड करण्या[illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही तिथे घातलेली पद्ये असतात.

व्रजप्रदेशात आजमितीला अनेक रासमंडळ्या आहेत. या मंडळ्या वृंदावनात आणि इतर मोठ्या शहरांतही रासलीलांचे प्रयोग दाखवतात. या मंडळ्यांपैकी वृंदावनातील स्वामी कुंवरपाल शर्मा, स्वामी रामस्वरूप शर्मा व स्वामी हरगोविंद यांच्या मंडळ्या प्रसिद्ध आहेत. बहुतेक स्वामींनी पैतृक परंपरेने आलेला हा व्यवसाय स्वीकारला आहे. हे सर्व ब्राह्मण आहेत. रासलीलेत भाग घेणारे किशोरही ब्राह्मणच असतात आणि ते बहुधा रासधारी स्वामींच्या परिवारातलेच असतात. सात ते आठ वर्षांची होताच मुले रासलीलेत अभिनय करू लागतात आणि साधारण बारा वर्षांची झाली, की अभिनय करणे सोडून देतात. कृष्ण, राधा व गोपी या भूमिका अत्यंत पूज्य व पवित्र असल्याकारणाने शुद्ध विकारहीन अशा बालकांनीच त्या कराव्या, अशी धारणा असते. रासातील कलाकारांनी गळ्यात जानवे व माला घातली पाहिजे, असाही नियम आहे. तसेच शुद्ध भोजन आणि अध्ययन या गोष्टीही त्यांच्यासाठी आवश्यक मानलेल्या आहेत.

कलात्मक दृष्ट्या सांप्रत रासलीलेचा दर्जा घसरत चालला आहे. नृत्य शिकण्यासाठी खूप परिश्रम करण्याची आवश्यकता असते; पण सध्याच्या मुलांत परिश्रम करण्याची वृत्ती कमी झालेली आढळते. तसेच, त्यांना शिकवणारे स्वामीही पूर्वीच्या स्वामींइतके नृत्यनिपुण नसतात. या ऱ्हासाचे मुख्य कारण म्हणजे या मंडळींना आता कोणी आश्रयदाता उरला नाही. पूर्वी या मंडळ्या मंदिरांच्या आश्रयाने राहत, तिथेच त्यांतील कलाकारांचे शिक्षण होई आणि नियमितपणे त्या मंदिरांत रासलीलांचे प्रयोगही करून दाखवीत. आता मंदिरांचेच उत्पन्न घटल्यामुळे रासधारींना उपजीविकेसाठी व्रजाबाहेर जाऊन मोठ्या शहरांत प्रयोग करावे लागतात. तिथे लोकांच्या मनोरंजनासाठी रासलीलेत त्यांना हास्यविनोद, सवंग गीते व साधारण काव्य यांचा समावेश करावा लागतो. त्यामुळे मूळच्या भावगंभीर रासलीलेपासून सध्याचे हे प्रयोग दूर जाऊ लागले आहेत.

[व्र. सां. इ.; भागवतदर्शन; रा. रा. का.; भा. सं. ए.; गुजरात; हिं. कृ. पु. प्र.; धर्मयुग, ३ ऑक्टो. १९७१]

रासो काव्ये अपभ्रंश भाषेतला एक काव्यप्रकार. हिंदी काव्यात रासाच्या दोन वेगवेगळ्या परंपरा अपभ्रंशकालापासूनच मिळू लागतात. त्यांतली एक परंपरा नृत्यगीतपरक रासोची व दुसरी छंदवैविध्यपरक रासोची आहे. पहिली परंपरा प्रामुख्याने जैन धर्मासंबंधीची आहे. या परंपरेत जैन साधू, संघपती व तीर्थोद्धारकर्ते यांची चरित्रे व धर्मोपदेश या गोष्टी मुख्यत्वे आढळतात. दुसऱ्या परंपरेत विविध छंद आणि काव्यगुण यांचा आढळ होत असून, तिच्यात वर्णिलेली चरित्रे ही जैनेतर वीरपुरुषांची आहेत.

अपभ्रंशाच्या बहुतेक सर्व छंदपंडितांनी रासो छंदाचे लक्षण सांगितले आहे व रासक किंवा रासाबंध नावाने प्रचलित असलेल्या काव्यरूपाचेही लक्षण सांगितले आहे. विरहांक लिहितो–

अडिलाहिं दुवहएहिं व मत्तारड्डहि तहअ ढोसाहिं ।
बहुएहिं जो रइज्जइ सो भण्णइ रासओ णाम् ।।
(वृत्तजातिसमुच्चय ४.३९)

अर्थ – ज्यामध्ये अडिला, ढोसा, मात्रा, रड्डा व दोहा हे छंद बहुतांशी आढळतात, अशा काव्याला रासक म्हणावे.

स्वयंभूने रासाबंधाचे लक्षण सांगितले आहे, ते असे –

धत्ता छड्डणिआहिं पद्धडिया सु अण्णरूएहिं ।
रासा बंधो कव्वे जणमण अहिरामो होइ ।।
(स्वयंभू छंद ८.४९)

अर्थ – धत्ता, छप्पय, पद्धडी व इतर अन्य रूपके यामुळे रासाबंध काव्य लोकांना मनोरम होते.

रासो रचनांचा रचनाकाल सामान्यपणे इ. स. च्या १० व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत आहे. गीत-नृत्यपरक रासो परंपरेतील काही प्रमुख रासो रचनांची नावे अशी –

(१) उपदेश रसायन – कर्ता जिनदत्त सूरी. ही रचना ३२ छंदांची असून, तिच्यात जैनधर्मविषयक उपदेश आहेत.

(२) भरतेश्वर-बाहुबली रास – कर्ता शालिभद्र सूरी. या रचनेत २०३ छंद आहेत व ऋषभदेवाचे दोन पुत्र भरतेश्वर व बाहुबली यांच्या मधल्या सत्तासंघर्षाची कथा आहे. या रासातले काही छंद असे –

चलीय गयवर, चलीय गयवर, गडीय गज्जंत,
हूं पत्तउ रोसभरि हिणहिणंत हय थट्ट हल्लीय ।
रह भय भरि टलटलीय मेरु, सेसु मणि मउड खिल्लीय ।
सिउं मरुदेविहिं संचरीय, कुंजरी चडिउ नरिंद ।
समोसरणि सुरवरि सहिय, वंदिय पढम जिणंद ।।
पढम जिणवर, पढम जिणवर-पाय पणमेवि ।
आणंदिहिं उच्छव करीय, चक्करयण वलिवलिय पुज्जइ ।
गडयडंत गजकेसरीय, गरुय नहि गजमेह गज्जइ ।
बहिरीय अंबर तूर-रवि, वलिउ नीसाणे घाउ ।
रोमंचिय रिउरायवरि, सिरि भरहेसर राउ ।।

भावार्थ – बलवान हत्ती गंभीर गर्जना करीत चालले. घोडदळ त्वेषात येऊन हिंकार करीत निघाले. भरतेश्वर आपली आजी मरुदेवी (ऋषभदेवाची माता) हिला बरोबर घेऊन निघाला. मस्तकावर मणिमुकुट धारण करून राजा हत्तीवर चढला. त्या वेळी त्याच्या प्रभावाने मेरू पर्वत भयभीत होऊन कंपायमान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाला. भरतेश्वराने ऋषभदेवाच्या दरबारात जाऊन दरबारी देवतांसह जिनेंद्र वृषभदेवाला प्रणाम केला.

(३) बुद्धिरास – कर्ता शालिभद्र सूरी. या रासाचे ६३ छंद असून, त्यात जैन धर्माचा उपदेश आहे. जल्हकविकृत आणखीही एक बुद्धिरासो आहे आणि त्यात चंपावतीच्या राजकुमाराची प्रेमकथा आहे.

(४) जीवदया रास – कर्ता आसगू. या काव्यात दयाधर्माचा उपदेश आहे.

(५) चंदनबाला रास – कर्ता आसगू. विषय-चंदनबालेची धार्मिक कथा. या रासाचे ३५ छंद आहेत.

(६) जंबूस्वामी रासा – कर्ता धर्मसूरी. विषय-जंबूस्वामी यांचे चरित्र.

(७) रेवंतगिरी रासू – कर्ता विजयसेन सूरी. यात गिरनार येथील जैन मंदिरांच्या जीर्णोद्धाराची कथा ७२ छंदांमध्ये सांगितली आहे. प्रस्तुत रासातले गिरनार पर्वताचे वर्णन असे –

जिम जिम चडइं तडि कडणि गिरनारह
तिम तिम उडइं जण भवणसंसारह
जिम जिम सेउ–जलु अंगि पालाट ए,
तिम तिम कलिमलु (?) सयलु ओहट्ट ए ॥
जिम जिम वायइ वाऊं तहि निज्झर-सीयलु ।
तिम तिम भव दुह दाहो तरक्कणि तुट्टइ निच्चलु ॥

अर्थ – जसजसे भक्त गिरनार पर्वताच्या शिखरावर चढायला लागतात, तसतसे सांसारिक वासनांतून हळूहळू मुक्त होत जातात. जसजसे शीतल जल त्यांच्या अंगावरून वाहत जाते तसतसे कलियुगाचे मालिन्य कमी कमी होत जाते. जसजसा शीतल वायू निर्झरांना स्पर्श करून पुढे वाहत जातो, तसतसा त्याच क्षणी भवदुःखाचा दाह नाश पावतो.

(८) नेमिजिणंद रासो – कर्ता पाल्हण.

(९) गयसुकुमाल रास – कर्ता देल्हणी. विषय-गयसुकुमाराचे चरित्र. एकूण ३४ छंद.

(१०) सप्तक्षेत्री रासू – कर्ता अज्ञात. यात मंदिर, प्रतिमा, ज्ञान, साधू, साध्वी, श्रावक व श्राविका या सात जैनक्षेत्रांचे ११५ छंदांत वर्णन आहे.

(११) पेथड रास – कर्ता मंडलिक. यात ६५ छंदांमध्ये संघपती पेथडाचे चरित्र वर्णिले आहे.

(१२) कच्छूली रास – कर्ता अज्ञात. यात ३५ छंदांमध्ये कच्छूली गावाचे वर्णन आहे.

(१३) समरा रासू – कर्ता अंबदेव सूरी. यात संघपती समराचे चरित्र ११० छंदांमध्ये वर्णिले आहे.

(१४) बीसलदेव रास – कर्ता नरपती नाल्ह. यात बीसलदेवाच्या प्रवासाची व विवाहाची कथा वर्णिली आहे. या काव्याचे ५०० हून अधिक छंद मिळत असले, तरी त्यांपैकी १२८ छंदच प्रमाणभूत मानले जातात.

गीत-नृत्यपरक रासो परंपरेत बीसलदेव रास हाच एक जैनेतर रास आढळतो.

पंचपंडवचरितरासु – कर्ता शालिभद्र सूरी. याच्यात ७९० छंद असून त्यांत पांडवांचे चरित्र वर्णिलेले आहे.

छंदवैविध्यपरक रासो काव्यांची परंपरा अशी –

(१) मुंजरास – कर्ता हेमचंद्र. यात माळव्याचा राजा मुंज याचे चरित्र वर्णित आहे.

(२) संदेशरासक – कर्ता अब्दुर्रहमान. यात २२३ छंदांच्या द्वारे एका विरहिणीचा विप्रलंभ शृंगार वर्णिलेला आहे. या विरहिणीला एक पथिक भेटला असता ती आपल्या दूरदेशी गेलेल्या प्रियकराला त्याच्याबरोबर एक संदेश पाठविते. विरहावस्थेने आपली स्थिती किती दयनीय झाली आहे, याचे वर्णन करताना ती म्हणते (१०७–१०९)–

आसजलसंसित्त विरहउन्हत्त जलंतिय,
णह्हु जीवउ णह्हु मरउ पहिय ! अच्छउ धुक्खंतिय।
इत्थंतरि पुण पुणवि तेणि पहिय धरेवि मणु,
फुल्लउ भणियउ दीहरच्छि णियणयण फुसेविणु ॥
सुन्नारह जिम मह हियउ, पिय उक्खिख करेइ।
विरहहुयासि दहेवि करि, आसाजलि सिंचेइ ॥
पहिउ भणइ पहि जंत अमंगलु मह म करि,
रुयवि रुयवि पुणरुत्त, धाह संवरिवि धरि।
पहिय ! होउ तुह इच्छ अज्ज सिज्झउ गमणु
मह न रुन्नु विरहग्गिधूम लोयणसवणु ॥

अर्थ – प्रियकर परत येईल या आशेच्या जलाने मी सर्वांग भिजत असते आणि विरहाग्नीत जळत असते. तरीही मी अजून जिवंत आहे, मेले नाही. मात्र धगधगत्या त्या आगीसारखी नुसती पडून राहिले आहे. त्यानंतर मनात धैर्य धरून आणि दोन्ही डोळे निपटून प्रसन्न होत तिने पुन: म्हटले. ' हे प्रियकरा, माझे हृदय सोनारासारखे आहे. ज्याप्रमाणे सोनार अभीष्ट लाभाच्या इच्छेने सोने आगीत तापवतो आणि लगेच ते पाण्यात बुडवतो, त्याचप्रमाणे मी शरीररूपी सुवर्णाला प्रियविरहाच्या आगीत तापविते आणि फिरून लगेच मीलनाच्या आशारूपी जलात त्याला भिजवते. त्यावर पथिक तिला म्हणाला. ' हे विरहिणी, माझ्या प्रवासाच्या वेळी रडून रडून तू मला अपशकुन करू नकोस. अश्रूंना आवरून धर. ' त्यावर ती रमणी म्हणते. ' हे पथिका, तुझ्या मनासारखे होऊ दे. आज तुझा प्रवास होऊ दे. मी रडणार नाही. (मी मुद्दाम रडत नाही) विरहाग्नीचा धूर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डोळ्यात फार गेल्याने माझे डोळे पाणी गाळीत आहेत.

(३) पृथ्वीराज रासो – कर्ता चंदवरदाई. यात पृथ्वीराज चौहान याचे चरित्र वर्णिलेले आहे.

(४) हम्मीर रासो – याचा कर्ता अज्ञात आहे. यात हम्मीर नामक एका वीर पुरुषाचे चरित्र दिलेले आहे.

(५) राउ जैतसी रो रासो – कर्ता अज्ञात. यांत ९० छंदांमध्ये बीकानेरचा महाराजा राव जैतसी याने कामरान नामक मुसलमान सरदाराला युद्धात पराजित केल्याची कथा वर्णित आहे. या काव्याची भाषा डिंगल आहे.

(६) विजयपाल रासो – कर्ता नल्हसिंह भाट. यात ४२ छंदांमध्ये विजयपालाच्या दिग्विजयाची कथा वर्णित आहे.

(७) राम रासो – कर्ता माधवदास चारण. यात १६०० छंदांमध्ये रामकथा वर्णिली आहे.

(८) राणा रासो – कर्ता दयाराम. यांत ८७५ छंदांमध्ये राजस्थानातल्या शिसोदिया वंशातल्या प्रमुख राजांच्या पराक्रमांचे वर्णन आहे.

(९) रतन रासो – कर्ता कुंभकर्ण. यात रतलामच्या रतनसिंह राजाचे चरित्र वर्णित आहे.

असे आणखी कितीतरी लहान मोठे रास आहेत. रासकाव्यांना रास, रासा, रासक, रासू किंवा रासो असे म्हणतात. जैनरासांची भाषा सामान्यपणे अपभ्रंशबहुल आहे. जैनेतर रासांची भाषा मात्र आधुनिक बोलचालीची भाषा राहिली आहे. गीतनृत्यपरक रासांची रचना प्राय: पश्चिम राजस्थान व गुजरातमध्येच झाली आहे; तर छंदवैविध्यपरक रासकांची रचना हिंदी प्रदेशात झाली आहे. पहिल्या परंपरेत धार्मिक दृष्टिकोन महत्वाचा आहे; तर दुसऱ्या परंपरेत शुद्ध साहित्यिक दृष्टी महत्वाची आहे. [हि. सा. खंड २.; रा. रा. का.]

राहुल सांकृत्यायन (इ. स. १८९३ – १९६३) एक महापंडित. यांचा जन्म उत्तर प्रदेशातल्या आजमगड जिल्ह्यात कनैला या गावी गंगातटाकी एका ब्राह्मणकुळात झाला. या घराण्याचे नाव पांडे असे होते. यांच्या वडिलांचे नाव गोवर्धन व आईचे नाव कुलवंती होते. चार भावांत राहुलजी हे मोठे होते. वडिलांनी केदारनाथ असे त्यांचे नाव ठेवले होते. वयाच्या १५ व्या वर्षी उर्दू मिडल स्कूलची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर राहुलजी घरातून पळून गेले. त्या पूर्वीही एक-दोनदा ते घरातून पळून गेले होते आणि त्यांच्या वडिलांनी कलकत्त्याहून त्यांना पकडून आणले होते. वयाच्या ११ व्या वर्षीच वडिलांनी त्यांचे लग्न केले होते. हे लग्न अबोध अवस्थेत झालेले असल्याने राहुलजींनी त्याचे बंधन मानले नाही.

वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनी वाराणसीला जाऊन दयानंद हायस्कुलात आपले नाव दाखल केले. तिथेच त्यांनी संस्कृत भाषेचे आणि भारतीय दर्शनांचे प्रगाढ अध्ययन केले. मात्र केवळ विद्वान होणे एवढाच त्यांचा हेतू नव्हता. त्यांना साधू व्हायचे होते. ही त्यांची वृत्ती आणि विरक्ती पाहून छपरा गावच्या एका महंताने त्यांना वैष्णव धर्माची दीक्षा दिली व दामोदरदास असे त्यांचे पर्याय नाव ठेवले. राहुलजी वैष्णव साधू बनले. काही काल मठपती म्हणून त्यांनी तिथल्या मठाची व्यवस्थाही पाहिली; पण तियेही त्यांचे मन रमले नाही. त्यांनी छपरा गाव सोडले आणि दक्षिणेचा रस्ता धरला. द. भारतातील सर्व तीर्थक्षेत्रे त्यांनी धुंडाळली. सबंध भारताचाही त्यांनी अनेक वेळा प्रवास केला. भारतीय जीवनातील विविधता त्यांनी समरस होऊन पाहिली. हे सर्व पाहता पाहता त्यांच्या अंतरातही अनेक परिवर्तने घडली. जी जी वस्तू त्यांना आकृष्ट करी, त्या त्या वस्तूकडे ते उत्कटपणे धाव घेत. उत्कटता हाच त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव होता.

एकदा त्यांना देवीची भक्ती जडली. ते तिच्या दर्शनासाठी उपासना करू लागले. ‘देवीने दर्शन दिले नाही, तर मी प्राणत्याग करीन’ असा त्यांनी निर्धार केला. देवी आपल्याला दर्शन देत नाही, असे दिसल्यावर त्यांनी प्राणत्याग करण्याच्या उद्देशाने धोतऱ्याच्या बिया वाटून खाल्ल्या. पण ते विष उलटून पडले आणि राहुलजी बचावले.

यात्रा थांबवून ते अयोध्येत आले आणि एका पाठशाळेत राहून वेदान्ताचा अभ्यास करू लागले. इथेच त्यांचा आर्यसमाजाशी परिचय झाला. मग त्यांनी दयानंद सरस्वतींच्या सत्यार्थ–प्रकाशाचे खोल अध्ययन केले. त्यामुळे त्यांच्यावर आर्यसमाजाच्या विचारांचा खूप प्रभाव पडला. अयोध्येहून ते आग्र्याला गेले आणि तिथल्या आर्यसमाजी मुसाफिर विद्यालयात दाखल झाले. ख्रिस्ती मिशनरी आणि मुसलमान मुल्ला-मौलवी आपला धर्म वाढविण्यासाठी सतत प्रयत्न करतात आणि हिंदू धर्मावर आघात करतात, हे त्यांना आवडले नाही. हे आघात परतवून लावण्यासाठी त्यांनी विद्वान, विरक्त व संघटक असे तरुण हिंदू मिशनरी निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

इ. स. १९१७ मध्ये रशियात क्रांती झाली. त्या क्रांतीच्या वार्ता भारतातही येऊ लागल्या. राहुलजी त्या क्रांतीकडे आणि साम्यवादाच्या तत्त्वज्ञानाकडे आकृष्ट झाले. त्यांनी साम्यवादी तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून बाइसवी सदी या नावाचा एक ग्रंथच लिहिला. यानंतर ते पक्के कम्युनिस्ट आणि साम्राज्यविरोधी बनले. मार्क्सवादाचा त्यांनी प्रचारही केला; मात्र त्या प्रचारात त्यांची ऐतिहासिक दृष्टी विशुद्ध राहिली.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याच काळात त्यांचे मन बौद्ध धर्माकडे झुकू लागले. बौद्ध भिक्षूंच्या त्यागी व साहसपूर्ण जीवनाचा त्यांच्यावर प्रभाव पडला. ते पाली भाषा शिकून बौद्ध धर्माच्या व तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाकडे वळले. मार्क्संचा साम्यवाद आणि बुद्धाचा शून्यवाद यांत बरेच साधर्म्य आहे, असे कळून आल्यावर तर त्यांनी समग्र बौद्ध इतिहासाचे प्रगाढ परिशीलन सुरू केले.

त्या काळी लखनौ येथे बोधानंद नावाचे एक बौद्ध भिक्षू राहत होते. त्यांचा परिचय झाल्यावर राहुलजींनी त्यांच्या समवेत भारतातील अनेक बौद्ध तीर्थक्षेत्रे पाहिली. या क्षेत्रांत त्यांना काही विदेशी बौद्ध भिक्षूही भेटले. त्यांच्या संपर्कात आल्यामुळे राहुलजींची बौद्ध धर्माविषयी जिज्ञासा वाढतच गेली. भारताबाहेर बौद्ध धर्माचा प्रभाव बराच आहे, हे समजून आल्यावर ते विदेशी भाषा व लिप्या यांच्या अभ्यासाकडे वळले. हिंदी, उर्दू,



पं. राहुल सांकृत्यायन

पाली, संस्कृत, अरबी, फारसी, इंग्रजी, फ्रेंच, तमिळ, कन्नड, इ. अनेक भाषा त्यांनी अवगत करून घेतल्या आणि या सर्व भाषांतले बौद्ध तत्त्वज्ञान अभ्यासून ते पक्के बौद्ध बनले. श्री. वि. स. बापट लिहितात – बौद्ध साहित्याने त्यांना क्रांतिकारी जीवनदृष्टी दिली. मार्क्सवाद अभारतीय असला, तरी त्याची सांगड बौद्ध विचारांशी बसत होती. नव्या युगातील नवीनतम भौतिकवादी विचार आणि मार्क्सवाद व बुद्धाचा अभौतिकवादी प्रखर बुद्धिवाद या दोन्हींच्या संयोगामुळे राहुलजींचे विचार उत्तरोत्तर अधिक समतोल आणि अधिकाधिक तेजस्वी बनत गेले. इ. स. च्या १९ व्या शतकातील क्रांतिकारी विचारकासारखाच प्राचीन भारतातही एक महान क्रांतिकारी विचारक झाला, त्याचा प्रभाव जगाच्या अधिकांश भागावर पडला आणि तो आजही जिवंत व जागृत आहे, हे पाहून त्यांना फार आश्चर्य वाटले. सनातन धर्माकडून आर्य समाजाकडे, तिथून बौद्ध धर्माकडे व तिथून मानवधर्माकडे असा राहुलजींच्या वैचारिक विकासाचा क्रम आढळतो.

राहुलजी क्रियावान पंडित होते. कुठल्याही साहसात उडी घ्यायला ते कचरत नसत. कुठल्याही उद्योगात झटून काम करणे हा त्यांचा स्वभावधर्म होता. ब्रिटिश साम्राज्याबद्दल त्यांना अत्यंत चीड होती. म्हणूनच म. गांधींनी जेव्हा या देशात असहकारितेचे आंदोलन सुरू केले, तेव्हा राहुलजींनी त्यात सक्रिय भाग घेतला. इ. स. १९२२ साली सहा महिने आणि १९२५ साली दोन वर्षे त्यांनी कारावास भोगला. ग्रंथलेखन करून त्यांनी हा कारावास सार्थकी लावला. इ. स. १९२७ साली बौद्ध धर्माचा विशेष अभ्यास करण्यासाठी ते श्रीलंकेत गेले. लंकेतच १९३० साली त्यांनी विधियुक्त बौद्धधर्माची दीक्षा घेतली आणि राहुल सांकृत्यायन असे नवे नाव धारण केले. सांकृत्यायन हे उपनाम त्यांनी पैतृक गोत्रावरून आपल्या नावापुढे लावले. याच नावाने ते पुढे ओळखले जाऊ लागले.

पुढे बौद्ध धर्माच्या प्रचारासाठी ते युरोपात गेले. तिथून भारतात आल्यावर ते लडाखला पोचले. त्याच मुक्कामात त्यांनी मज्झिमकाय या ग्रंथाचा हिंदीमध्ये अनुवाद केला.

बौद्ध धर्माचा विशेष अभ्यास करता करता त्यांना समजले, की कित्येक बौद्ध ग्रंथ भारतात नामशेष झाले असून, ते मूळ रूपात तिबेटमध्ये सुरक्षित आहेत. हे समजताच वाटेल ती संकटे सोसून ते ग्रंथ हस्तगत करण्याचे त्यांनी ठरवले. इचेरबास्की या रशियन व तूची या इटालियन संशोधकांनी तिबेटातली ही ग्रंथसंपदा हस्तगत करण्यासाठी जंग जंग पछाडले; पण त्यांना या कामी यश लाभले नाही. त्या काळी तिबेटात कोण्याही परकी माणसाला प्रवेश मिळत नव्हता. तिकडे जाणे जिवावर बेतेल इतक्या धोक्याचे होते. पण राहुलजींनी ते साध्य करण्यासाठी कंबर कसली. नाना वेषांनी, एकदा नव्हे तर तीनदा, ते तिबेटात गेले व तिथल्या लामांच्या मठात गुप्तपणे राहिले. तिबेटी बौद्ध भिक्षूंची मर्जी संपादन करून त्यांनी आपल्या कामाला प्रारंभ केला. त्यांनी कित्येक ग्रंथ नकलून घेतले. या प्रयत्नांत त्यांना प्रमाणवार्तिक आणि योगाचारभूमी हे दोन मूळ आणि महत्त्वाचे बौद्ध ग्रंथ मिळाले. धर्मकीर्ती, प्रज्ञाकर गुप्त, ज्ञानश्री, नागार्जुन, असंग, सुबंधू व रत्नाकर शांती या बौद्ध आचार्यांचे कितीतरी अमोल ग्रंथ त्यांना तिथे सापडले. पन्नास

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हजार श्लोक. त्यांनी स्वहस्ते उतरून घेतले व सुमारे १।। लाख ग्रंथांची छायाचित्रे घेतली. ही सर्व ग्रंथसंपदा खेचरांच्या पाठीवर लादून त्यांनी भारतात आणली. युआन च्वांग, फाहियान, इ. चिनी प्रवाशांनी जेवढे बौद्ध वाङ्मय भारताबाहेर नेले, त्याहून अधिक राहुलजींनी आपले प्राण धोक्यात घालून भारतात आणले. पुढे हा सर्व ग्रंथसंग्रह त्यांनी पाटणा येथील जायस्वाल संशोधन-मंडळाला देऊन टाकला.

नंतर त्यांनी ब्रह्मदेश, थायलंड, कोरिया, जपान, नेपाळ, रशिया, चीन, इराण, इ. परदेशांच्या यात्रा केल्या. लेनिनग्राडच्या प्राच्य-संस्थानात काही काल ते प्राध्यापक म्हणून राहिले. त्या विभागाची सेक्रेटरी एलेना नावाची एक रशियन तरुणी होती. तिचे व राहुलजींचे प्रेम जडले व त्यांनी लग्न केले. त्या दंपतीला इगोरराहुलोविच नावाचा एक पुत्रही झाला. राहुलजींनी रशियाचा दोनदा प्रवास केला. या प्रवासात त्यांनी बरेचसे रशियन साहित्य गोळा करून ते भारतात आणले. पुढे भारतात येऊन ते मसुरी इथे राहिले. त्या वेळी कमला नावाची एक युवती सेक्रेटरी म्हणून त्यांच्याकडे आली आणि तीच पुढे त्यांची पत्नीही बनली.

राहुलजींची ग्रंथसंपदा – लघुकथा, कादंबऱ्या, तत्त्वज्ञान, राजकारण, इतिहास, चरित्र, टीका, विज्ञान, धर्म, इ. विविध शाखांतून त्यांनी विपुल लेखन केले आहे. एकूण पस्तीस हजार पृष्ठांची त्यांची लेखनसंपदा आहे. त्यांनी १५० हून अधिक ग्रंथ लिहिले. ऋग्वेदिक आर्य या ग्रंथात त्यांनी वेदकालीन समाज-स्थितीवर विवेचन केले आहे. दहा हजार वर्षांपूर्वी या देशात कोण लोक राहात होते, ते कशा प्रकारचे जीवन जगत होते आणि त्यांचे स्वभावधर्म कसे होते, या गोष्टीवर व्होल्गा ते गंगा ही कादंबरी लिहून त्यांनी प्रकाश टाकला आहे. व्हिन्सेंट स्मिथच्या भारतेतिहासाचा त्यांनी अनुवाद केला आहे; मध्य आशियाचा इतिहास लिहिला आहे; हिमालय–परिचय घडविला आहे; कुराणाचे भाषांतर केले आहे; राज्यकारभारासाठी उपयुक्त असा शासनशब्दकोश लिहिला आहे; तिबेटी शब्दकोश रचला आहे; भोजपुरी लोकगीतांवर पुस्तक लिहिले आहे; मार्क्स, स्टॅलिन, लेनिन–व माओत्से-तुंग यांची चरित्रे लिहिली आहेत. त्यांनी बौद्धांच्या महायान पंथावर संशोधनपर ग्रंथ लिहिला आहे; दर्शन-दिग्दर्शन नावाचा प्राच्य व पाश्चात्य दर्शनांवर विवेचक ग्रंथ रचला आहे. असेच त्यांचे आणखी कितीतरी ग्रंथ आहेत. सिल्व्हाँ लेवी हा पाश्चात्य पंडित राहुल-जींच्या प्रकांड पांडित्याने भारावून गेला होता. तो राहुलजींना विद्यमान बौद्ध विद्वानांत सर्वश्रेष्ठ समजतो. श्रीलंका, तिबेट, रशिया, इ. विदेशांत त्यांना खूप मानसन्मान मिळाले. भारतात यांना डॉक्टरेट आणि साहित्य अकादमीचा पुरस्कार दिला गेला. भारत सरकारने त्यांना पद्मभूषणही केले. हिंदी भाषेवर त्यांचे अगाध प्रेम होते. त्या भाषेचा गौरव त्यांनी खूप वाढविला आहे.

हा विश्वविख्यात महापंडित खाजगी जीवनात साधा, सरळ आणि अत्यंत विनम्र होता. एवढे मान-सन्मान मिळून आणि एवढी ग्रंथसंपदा निर्माण करूनही ते आजन्म आर्थिक हलाखीतच राहिले. अखेर त्यांना स्मृतिभ्रंशाचा विकार जडला. त्याच आजारात त्यांचे दि. १४ एप्रिल १९६३ रोजी दार्जिलिंग येथे निधन झाले.

राहू नवग्रहांतला आठवा ग्रह. विप्रचित्ती व सिंहिका यांचा मुलगा. भागवताच्या मते कश्यप व दनू यांचा पुत्र (६.६.३०). आकाराने वाटोळा (म. भा. भीष्म. १९). राहू व केतू मिळून मुळात एकच पुरुष होता. त्या एकाचेच दोन झाले. देव-दानवांनी केलेल्या समुद्रमंथनातून अमृत बाहेर निघाले. मोहिनीरूप विष्णू ते अमृत देवांना वाटीत असता हा देवांच्या पंक्तीत चोरून येऊन बसला. सूर्य-चंद्रांनी हे त्याचे कपट उघड केले असता विष्णूने त्याचे शिर तोडले. धडाचा झाला राहू व शिराचा झाला केतू. त्या दोघांनी सूर्य-चंद्रांविषयी राग धरला. त्या रागाने अद्यापि पर्वकाळी राहू-केतू सूर्य-चंद्रांना गिळू पाहातात. त्यालाच आपण ग्रहण म्हणतो.

वेदांत याला स्वर्भानू म्हटले आहे. देवांनी अत्रीकडून स्वर्भानूला मारवले व सूर्याचे ग्रहण दूर केले (तै. ब्रा. १.८१.२). याची कन्या प्रभा किंवा सुप्रभा या नावाची होती. ती त्याने नमूची दैत्याला दिली. जालंधराचे शंकराशी युद्ध चालू असता राहू जालंधराच्या वतीने शंकराकडे शिष्टाई करण्याकरिता गेला होता; पण शंकराच्या क्रोधाला भिऊन त्याने पळ काढला.

राहू तमोगुणी असून, नैर्ऋत्य दिशेचा स्वामी आहे. ग्रहशांतीत 'कया नश्चित्र' या ऋग्वेदातील मंत्राने राहूच्या प्रीत्यर्थ दर्भांचे हवन करतात. ग्रहशांतीत राहूचे गोत्र पैठीनस सांगितले आहे. बृहत्पाराशरी होरा या ग्रंथात त्याला चांडाल जातीचा म्हटला आहे. बर्बर देशावर त्याची सत्ता चालते. याचे वाहन काळा सिंह आहे. काही विद्वान घोडा हे त्याचे वाहन मानतात. शिसे हा त्याचा धातू, गोमेद हे रत्न व तीळ हे धान्य आहे. नील वस्त्र व कृष्ण पुष्प या त्याच्या दानवस्तू होत.

हा ग्रह पूर्वजन्मींच्या कर्माचा बोध करतो. त्यामुळे या जन्मी कोणत्या दोषांमुळे मनुष्याचे विशिष्ट प्रकारचे सौख्य नष्ट होईल, त्या संबंधीचे विवेचन बृहत्पाराशरी होरा (पूर्व खंड अ. १६) या ग्रंथात केलेले आहे. हा ग्रह अनिष्ट स्थानी पडला असता पिशाचबाधा होते; असे सर्वार्थचिंतामणी म्हटले आहे. राहू अनिष्ट असता संततिनाश हे फल सांगितलेले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंग्ल ज्योतिषी विल्यम लिली राहूबद्दल म्हणतो – राहू हा पुरुषप्रकृतीचा असून, तो गुरु-शुक्रांच्या स्वभावधर्मांचा व भाग्य-वृद्धी करणारा आहे. तो गुरु-शुक्रांप्रमाणे शुभ फलदायी आहे. हा जेव्हा इतर अशुभ ग्रहांबरोबर असतो, तेव्हा तो त्यांचे अशुभ धर्म कमी करतो. जेव्हा तो शुभ ग्रहाने युक्त होतो, तेव्हा त्याच्या शुभ धर्मांची वृद्धी करतो.

राहू

पाश्चात्य ज्योतिषग्रंथांत राहू-केतूंना सर्पाकार मानले आहे. राहूच्या उच्च-नीच व स्वक्षेत्र या संबंधात एक-वाक्यता नाही. बृहत्पाराशरीमध्ये वृषभ राशी ही त्याची उच्च राशी व कन्या ही स्वगृह राशी सांगितली आहे. प्रवासाची वेळ, सर्प, रात्र, द्यूत, यश, प्रतिष्ठा, छत्रचामरादी राजयोग, यांचा राहू कारक आहे.

वस्तुत: राहू आणि केतू हे दोघे इतर ग्रहांप्रमाणे दिसणारे ग्रह नाहीत. किंबहुना त्यांना व्यक्तित्वच नाही. हे दोघे आहेत दोन संपात बिंदू. ज्या वर्तुळ-मार्गाने पृथ्वीभोवती चंद्र फिरतो, तो मार्ग आणि ज्या मार्गाने पृथ्वी सूर्याभोवती फिरते, तो मार्ग, हे दोन मार्ग अवकाशात परस्परांना ज्या दोन भिन्न स्थळी छेदितात, त्यांपैकी एका छेदन-बिंदूला राहू आणि दुसऱ्या छेदनबिंदूला केतू म्हणतात. या दोन्ही छेदनबिंदूंना गती आहे. म्हणून त्यांना फलज्योतिष्यांनी स्वतंत्र ग्रह मानून त्यांची स्थाने एकमेकांसमोर म्हणजे १८० अंशांवर कल्पिली आहेत. मेषादी राशींत ते पुढे पुढे जात नसून मागे मागे येत असतात. सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करायला त्यांना १८ वर्षे लागतात.

दोसाद व धनगर हे राहूला देव मानून त्याला भजतात. खड्ड्यात निखारे भरून त्यावरून चालत गेल्याने राहू प्रसन्न होतो, अशी त्यांची समजूत आहे.

मांग समाजात राहूविषयी कथा आहे, ती अशी – राम वन-वासाहून परत आल्यावर त्याने जेवणावळ घातली. त्या वेळी एक मांग मुलगा पंक्तीत जेवत असलेला पाहून रामाने त्याचे शीर तोडले. त्याची आई ते शीर टोपलीत ठेवून हिंडत असते. ग्रह-णाच्या वेळी सूर्य-चंद्रांवर तिचीच सावली पडते.

राहूविषयी लंकेतली लोककथा अशी – महाविष्णूला पृथ्वी निर्माण करायची होती. तो राहूकडे विचारासाठी गेला. राहूने त्याला कमलाचे बी दिले. विष्णूने ते समुद्रात पेरले. त्याच्या-पासून कमळनाल बनले. त्याला धरून राहू समुद्राच्या तळाशी गेला व चिमुटभर माती घेऊन वर आला. तिचीच पुढे पृथ्वी बनली. [जातकमार्गोपदेशिका – य. के. प्रधान; लो. सा. इ.;

राक्षस देव आणि मानव यांच्यामधली एक अनार्य जात. राक्षस म्हणजे आर्यविरोधक अशी भारतातली एक आदिवासी जमात, असे संशोधक मानतात. दैत्य, दानव, असुर व राक्षस हे सर्व मिळून राक्षससंघ बनतो. वैदिक आर्यांना ही जात भेटली होती आणि तिचा त्यांना उपद्रवही होत होता, हे ऋग्वेदातील राक्षोघ्न सूक्तांवरून कळते. ऋग्वेदात एका राक्ष-सीचा उल्लेख असून, तिला भोसकून ठार मारण्याविषयी बृह-स्पतीची प्रार्थना केलेली आहे (ऋ. १०. १५५.२). निर्ऋती ही मृत्युदेवता ऋग्वेदात राक्षसच मानली आहे. देवांनी राक्ष-सांना असुरांपासून फोडले व मग असुरांचा पराभव केला आणि त्यानंतर राक्षसांनाही हाकलून लावले, अशी कथा तैत्तिरीय संहितेत आली आहे (२.४.१). वेदांत सर्वत्र राक्षसांचा उल्लेख देवांचे शत्रू म्हणून होतो. ऋग्वेदातील राक्षसांचे वर्णन असे –

राक्षस हे सूक्ष्म व मायावी आहेत. ते अद्भुत व विकृत आहेत; देवा-मानवांचे द्वेष्टे, दस्यू व दास यांच्यापेक्षाही विकृत; दुष्कृत (दुष्ट कर्म करणारे), द्वयू (आत एक व बाहेर एक असे), अत्री (खादाड), क्रव्याद (कच्चे मांस खाणारे), दुर्… (दुर्जय), द्रुह (छळ करणारे), यातुमत् (जादुगिरी करणारे), रेभ (मोठमोठ्याने ओरडून व किंकाळ्या फोडून प्राण्यांना घाबरविणारे), हविर्मथी (यज्ञातील हवीवर झडप घालणारे), शफारुज (तीक्ष्ण नखांनी ओरबाडून प्राण्यांचा जीव काढणारे), अघशंस (पाप कृत्याचे प्रशंसक), ब्रह्मद्विष (ब्रह्म-द्वेष्टे), कोणत्याही प्राण्याचे रूप घेणारे, स्त्रीच्या गर्भात शिरून तिच्या पतीनें विसर्जित केलेले वीर्य चाटून फस्त करणारे, स्त्रीच्या गर्भाचा किंवा नवजात बालकाचा घात करणारे, तिच्या भावाचे किंवा पतीचे रूप घेऊन जवळ येणारे आहेत.

म्हणूनच ऋग्वेदातील राक्षोघ्न सूक्तांत त्यांचा नाश करण्या-बद्दल देवतांची प्रार्थना केलेली आहे. अग्नी हा राक्षसांचा विध्वंसक असेही म्हटले आहे.

राक्षसींविषयी महाभारतात सांगितले आहे, ते असे –

सद्यो हि गर्भान् राक्षस्यो लभन्ते प्रसवन्ति च।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कामरूपधराश्चैव भवन्ति बहुरूपिका: ।
(म. भा. आदि. १५५.३६)

अर्थ – राक्षसी गर्भधारणा होताच लगेच अपत्यांना जन्म देतात. त्या इच्छेनुसार रूपे धारण करतात व रूपे बदलतात.

राक्षस हे काश्यप व खशा यांची संतती होत. ते जन्माला आले तेच मुळी बुभुक्षित होऊन. यक्षांना बरोबर घेऊन ते सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवालाच खायला निघाले. ब्रह्मदेव घाबरला व त्यांना म्हणाला –

देवस्तानाह संविग्नो मा मां जक्षत रक्षत ।
अहो मे यक्षरक्षांसि प्रजा यूयं बभूविथ ॥
(भाग. पु. ३.२०.२०)

अर्थ – देव त्या यक्ष-राक्षसांच्या समुदायाला म्हणाला, 'तुम्ही मला खाऊ नका, माझे रक्षण करा. अहो तुम्ही यक्ष आणि राक्षस या नावाच्या माझ्या प्रजाच आहां.

राक्षसांच्या उत्पत्तीच्या आणखी दोन कथा आहेत, त्या अशा –(१) राक्षस हे पौलस्त्यापासून उत्पन्न झाले. (२) ब्रह्मदेवाने उदके निर्मिली व त्यांच्या रक्षणासाठी राक्षस निर्मिले.

सप्त पाताळे हे अधोलोक होत. त्या लोकांत राक्षसांची वस्ती आहे. ते लोक स्वर्गापेक्षाही समृद्ध व सुंदर आहेत.

राक्षसांच्या अस्तित्वाची प्राथमिक कल्पना आर्यांना होती. पण पुढे आर्यांच्या कल्पनांमध्ये आर्येतर कल्पनाबंध मिसळले व राक्षसकथांची वाढ झाली. पुराणांनीही राक्षसांच्या कथा वर्णिल्या आहेत. त्यांत राक्षसांची संख्या, शक्ती आणि कृती यांच्याविषयी भरपूर अतिशयोक्ती आहे. महाभारतकाळापर्यंत राक्षसयोनी हळूहळू क्षुद्रदेवतांच्या स्वरूपाप्रत पोचलेली दिसते. जरा नावाची एक राक्षसी त्या काळी बालरक्षक देवता म्हणून पूजली जात होती. लोकसाहित्यामध्ये राक्षसविषयक अनेक कल्पना आढळतात.

राक्षसांचे सामर्थ्य – राक्षस हे स्मशानात किंवा अरण्यात राहतात. ते प्रवाशांना भ्रमात पाडतात. ! दिवा बघून पळून जातात. ते वृक्षांवर राहतात आणि त्यांच्या निवासस्थानाजवळून जाणाऱ्या माणसांना वांत्या, अपचन वगैरे उपद्रव निर्माण करतात. जेवताना दिवा विझला तर त्यानंतर पात्रातले अन्न जेवायचे नसते, कारण त्या अन्नावर राक्षस झडप घालतात. सांजवात लावून ती घरभर हिंडवल्याने गुप्त रूपाने घरात वावरणारे राक्षस पळून जातात. त्यांना आपला हात हवा तेवढा लांब करता येतो. त्यांना नरमांस फार आवडते. त्यांचा आहार प्रचंड असतो. महाभारतातल्या बकासुराची गोष्ट याविषयी प्रसिद्ध आहे. दुष्ट ब्राह्मण मेल्यावर ब्रह्मराक्षस होतात आणि ते सामान्य राक्षसांपेक्षा महाभयंकर असतात.

राक्षसविषयक समजुती – राक्षस धनाचा खूप संचय करतात; पण ते त्या धनाचा स्वतः उपभोग घेत नाहीत व इतरांनाही भोग घेऊ देत नाहीत. ही कथा इस्लाम जातकात आहे. भारतीय लोकसाहित्यात राक्षसांच्या कथा खूपच आहेत. त्या कथा ज्या बीजांभोवती रचलेल्या असतात, त्यांतली मुख्य बीजे खाली दिली आहेत –

(१) राक्षसांच्या घरी विस्तव असतो. (२) राक्षसांना मुली असतात. नसल्यास ते कोणाच्या तरी पळवून आणतात आणि त्यांना आपल्या वाड्यात कोंडून ठेवतात. (३) राक्षसी पिठे कांडतात. (४) राक्षसी क्वचित प्रसंगी माणसांबरोबर लग्नही करतात. याविषयीचे रामायणातले शूर्पणखेचे उदाहरण प्रसिद्ध आहे. तिला रामाशी लग्न करण्याची इच्छा उत्पन्न झाली होती. दुसरे उदाहरण महाभारतातल्या हिडिंबेचे. तिने भीमाशी लग्न केले होते. रामायण-महाभारतांतल्या उदाहरणांवरूनच लोककथांमध्ये हे बीज आलेले आहे. (५) राक्षस कितीही बलाढ्य असला तरी एखादा शूर, वीर नायक युक्तीने त्याचा काटा काढतो व त्याने कोंडून घातलेल्या मुलीला सोडवतो. (६) कित्येक राक्षसांचा प्राण त्यांच्या देहाबाहेर कुठेतरी किंवा कोणत्यातरी प्राण्यामध्ये लपवून ठेवलेला असतो. त्या प्राणप्रतीकाचा नाश करताच तो राक्षस मरून पडतो.

निरनिराळ्या बांधकामांशीही राक्षसांचा संबंध लावलेला आढळतो. काही हेमाडपंती मंदिरे राक्षसनिर्मित असल्याचे सांगतात. रामटेकवरचे एक देऊळ राक्षसांनी बांधले, अशी दंतकथा आहे. उत्तर भारतातला विजयगडचा संपूर्ण किल्ला व त्याच्या जवळचा कुंडकोटचा किल्ला हे राक्षसनिर्मित आहेत, अशी समजूत आहे. मध्य प्रदेशातील मिर्झापूरचा करसोटा तलाव राक्षसनिर्मितच आहे, असे म्हणतात.

ऐतिहासिक विवेचन –राक्षस हे अतिमानवी योनीतले नसून, ते मानवच होते. दक्षिणेतल्या काही नरमांसभक्षक व आडदांड जातींना राक्षस म्हटले आहे. आर्य लोक जेव्हा विंध्य पर्वत ओलांडून दक्षिण भारतात उतरले, तेव्हा त्यांचा व राक्षसांचा संपर्क आला. आर्यांचे हे आक्रमण राक्षसांना आवडले नाही आणि ते आर्यांचे कट्टर शत्रू बनले. रंग, रूप आणि आकार यांत वेगळे असल्यामुळे आर्य लोकांनी त्यांना दुष्ट योनीचे मानले. काही विद्वान भारतातल्या आदिद्रविडांना राक्षस मानतात. हे राक्षस धनवैभवसंपन्न होते, त्यांची राज्ये होती, राज्यव्यवस्था होती आणि वेगळी अशी संस्कृतीही होती.

राजनैतिक दृष्ट्या आर्य व राक्षस यांच्या परस्पर संघर्षाचे विस्तृत विवरण पहिल्या प्रथम रामायणातच मिळते. महाभारत व पुराणे यांत राक्षसांचे उल्लेख आले असले, तरी सांस्कृतिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दृष्टया ते विशेष महत्त्वाचे नाहीत. महाभारतकाळी राक्षसांची शक्ती जवळजवळ संपुष्टात आली होती. रामायणात मात्र राक्षसांचा परम उत्कर्ष व अवनती या दोन्ही गोष्टी दिसून येतात.

रामायणात राक्षसांच्या तीन शाखा स्पष्टपणे दिसून येतात. प्रत्येक शाखेचा वंशवृक्ष वेगळा आहे. त्यांमधली पहिली विराध-शाखा होय. ही शाखा दंडकारण्याच्या उत्तर भागात राहत होती. विराध हा त्या शाखेचा पुढारी होता. जव आणि शतह्रदा यांच्यापासून हा उत्पन्न झाला होता. विराध वनवासी राम-लक्ष्मणांवर चालून आला असता त्यांनी त्याचा वध केला. दुसरी शाखा दानव या नावाने प्रसिद्ध होती. ती दनूची संतती होय. तिचा पुढारी कबंध नामक राक्षस होता. तो भयानक आणि नरमांसभक्षक होता. राम-लक्ष्मणांच्या हस्ते तोही मारला गेला. तिसरी शाखा राक्षस या नावाने विख्यात असून, ती सर्वांत अधिक क्रूर व बलाढ्य होती. लंकेतले लोक या राक्षस जातीचे गणले जात होते. ही शाखा पुलस्त्य व दिती यांच्यापासून निर्माण झाली होती आणि रावण हा तिचा पुढारी होता.

पौराणिक कथासंबंध – या राक्षसशाखेत विद्युत्केश नावाचा एक राजा झाला. संध्येची कन्या सालकटंकटा हिच्याशी त्याने विवाह केला. तिला सुकेशी नावाचा मुलगा झाला; पण सालकटंकटेने जन्मतःच त्याचा त्याग केला. शिव-पार्वतीने कृपा करून सुकेशीचे संरक्षण केले, त्याला दीर्घायुष्य दिले व एक विमानही वहाल केले. सुकेशीला माली, सुमाली आणि माल्यवान नावाचे तीन मुलगे झाले. ते महाक्रूर आणि बलदर्पित होते. त्यांनी सुर व असुर या दोघांनाही त्यांच्या त्यांच्या स्थानांतून हुसकून लावले. नंतर ते आपल्या अनुयायांसह लंकेच्या दुर्भेद्य किल्ल्यात जाऊन बसले. राक्षसपीडित देवांनी मग विष्णूची करुणा भाकली. विष्णूने राक्षसांना लंकेतून उखडून लावले, तेव्हा ते सर्व राक्षस लंका सोडून रसातलात शिरले आणि तिथे त्यांनी वस्ती मांडली.

काही कालानंतर सुमाली रसातल सोडून भारताच्या मैदानी भागात आला. त्याला कैकसी नावाची एक कन्या होती. तिने विश्रवा मुनीकडे संततीची याचना केली. विश्रव्यापासून तिला रावण, कुंभकर्ण, बिभीषण व शूर्पणखा नावाची चार मुले झाली. रावणाने दीर्घ काल कठोर तपश्चर्या करून, आपण अजिंक्य व्हावें, असा ब्रह्मदेवाकडून वर मिळवला. त्याचा आजा सुमाली लंकेतून उठून गेल्यावर यक्षाधिपती कुबेराने तिथे आपले राज्य स्थापले होते. रावणाने कुबेराला तिथून हाकलले आणि तेव्हापासून लंका ही राक्षससाम्राज्याची राजधानी बनली. रावणाने भारताच्या सागरी प्रदेशावरही आपला अधिकार प्रस्थापित केला (रावण पाहा). रावणाने रसातलही जिंकून घेतले. त्याने पंचवटीजवळच्या जनस्थानात आपली उत्तरसीमान्त चौकी स्थापित केली. खर-दूषण यांच्या आधिपत्याखाली १४ हजार राक्षसांचे सैन्य त्याने तिथे उभे केले. तिथून हे राक्षस गंगा-यमुनांच्या प्रदेशापर्यंत अधून मधून हल्ले करीत राहिले. उत्तर भारतातल्या काही प्रदेशांवर राक्षसांचे आधिपत्यही प्रस्थापित झाले. रावणाचा पुतण्या लवणासुर याने मथुरेवर कबजा मिळवला. मारीच राक्षसाने शोण व गंगा या नद्यांच्या मधल्या प्रदेशावर अधिकार प्रस्थापित केला. रावणाने तर उत्तर भारतातल्या अनेक राजांचा पराभव केला. दुष्यंत, सुरथ, गाधी, गय, पुरूरवा, इ. राजे रावणापुढे नतमस्तक झाले. अयोध्येवरही रावणाने एके वेळा हल्ला केला. फक्त माहिष्मतीचा राजा कार्तवीर्य अर्जुन व किष्किंधेचा वाली या दोघांनीच त्याची मस्ती जिरवली होती. रावणाच्या बलाचे वर्णन वाल्मीकीने केले आहे, ते असे –

रावण येत असलेला पाहून सूर्य आपला ताप कमी करीत होता, वाऱ्यांचा वेग मंद होत होता, समुद्र गर्जना थांबवीत होता, नद्या मंद मंद वाहत होत्या आणि पर्वत आपली दृढता विसरून जात होते.

आर्य व राक्षस यांच्या परस्पर शत्रुत्वाचे मुख्य कारण हे होते की राक्षस आर्यांच्या प्रदेशावर प्रभुत्व मिळवू पाहत होते, तर आर्यांनी द. भारतात आपल्या सत्तेचा आणि संस्कृतीचा विस्तार करण्याचा विडा उचलला होता. त्यामुळे आर्य व राक्षस यांच्यामध्ये नेहमीच कुठे ना कुठे लढाया चालू असत. आर्यांची वस्ती दंडकारण्य व्यापून जनस्थानापर्यंत येऊन भिडली होती आणि राक्षसांची सीमारक्षक चौकी जनस्थानाच्या जवळच होती. त्यामुळे रामाच्या काळात जनस्थान हे या संघर्षाचे प्रमुख केंद्र बनले होते. चित्रकूट पर्वतापासून पंपा सरोवरापर्यंत राक्षसांनी घुमाकूळ घातला होता. दशरथ राजाही रामाच्या आधी राक्षसांच्या सामन्याला कित्येकदा उभा राहिला होता. पण तत्कालीन कोण्याही धुरंधर राजाला राक्षसांचा निःपात करणे शक्य झाले नव्हते. तत्कालीन सर्व राजे राक्षसांना भिऊन वागत होते. या सर्व राक्षसांचा संहार करणारा महाप्रतापी पुरुषोत्तम एकच जन्माला आला आणि तो म्हणजे कोदंडधारी राम हा होय. लंकेच्या युद्धात त्याने रावणाचा वध केल्यानंतर भारताच्या राजकारणातील राक्षसांचे महत्त्व संपुष्टात आले, किंबहुना कायमचे नष्ट झाले.

राक्षसांच्या सांस्कृतिक प्रथा – राक्षसांमध्ये मानेवरून ... चालत होता. राक्षस हे शिष्टाचार व लोकव्यवहार यांत प्रायः आर्यांचेच अनुकरण करीत होते. कुंभकर्ण लढाईला निघताना आपला मोठा भाऊ रावण याला प्रदक्षिणा व अभिवादन करून निघाला होता. रावण जेव्हा रणभूमीवर निघा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेव्हा त्याच्या पुरोहितांनी मंत्रघोष करून त्याच्यासाठी मंगल कामना केली होती. मारीचाच्या आश्रमात रावण गेला असता, मारीचाने पाद्य, अर्घ्य, आसन आणि सुग्रास भोजन या उपचारांनी त्याचा सत्कार केला होता. या सर्व सांस्कृतिक प्रथा आर्य व राक्षस यांच्यामध्ये समान होत्या. राक्षसांचे विवाहही अग्निसाक्षिक होत. रावणाने अग्नी प्रज्वलित करूनच मंदोदरीचे पाणिग्रहण केले होते. मात्र बायका पळवून आणून त्यांच्याशी विवाह करण्याची पद्धती राक्षसांमध्ये होती.

राक्षसांमध्ये स्वस्त्ययन नामक मांगलिक क्रिया प्रचलित होती. कोणत्याही मोठ्या कार्याला निघण्याच्या आधी ते स्वस्त्ययन करीत. आर्यांप्रमाणेच राक्षसांनाही तपस्येची आवड होती. फरक एवढाच, की आर्य ऋषी पुण्य आणि परलोक यांच्या प्राप्तीसाठी तप करीत, तर राक्षस हे भौतिक शक्तीसाठी ते आचरीत. कठोर नियम पाळण्यात राक्षस हे आर्यांपेक्षाही श्रेष्ठ होते. आर्यांचे पाहून राक्षसही यज्ञयाग करू लागले होते; पण त्यांमध्ये प्रामुख्याने अथर्ववेदीय यातुक्रियाच केल्या जात. या यातुक्रियांचा अवलंब करून ते अजिंक्य बनण्याची व रहस्यमय शक्ती मिळविण्याची कामना धरीत. रावण स्वत: एक श्रेष्ठ याज्ञिक व अग्निहोत्री होता. त्याच्या अग्निहोत्राच्या अग्नीनेच त्याची चिता प्रज्वलित केली गेली होती. निकुंभिला ही राक्षसांची कुलदेवता होती. लंकेत तिच्या नावाचे एक उद्यानच निर्माण केले गेले होते. राक्षस स्त्रिया मद्यप्राशन करून बेभानपणे निकुंभिलेच्या पुढे नृत्य करीत. इंद्रजिताने युद्धावर जाण्यापूर्वी जे होमहवन मांडले होते, ते निकुंभिला देवीच्या कृपेसाठीच. गुप्त व रहस्यमय क्रियाकलाप आचरणारे असूनही कित्येक राक्षस सुशिक्षित होते. त्यांच्यामध्ये वेदविद्येचाही प्रचार झाला होता. मारुती लंकेत पोचला, तेव्हा त्याला वैदिक मंत्रांचा घोष ऐकू आला होता आणि वेदाभ्यास करणारे राक्षसही दिसले होते. वेद आणि यज्ञ यांचे अनुष्ठान करणारे जे राक्षस होते, ते ब्रह्मराक्षस या नावाने ओळखले जात. मारुतीला लंकेत वेदवेत्ते ब्राह्मणही दिसले होते. रावणाचा कनिष्ठ पुत्र अतिकाय हा वेदपारंगत आणि शास्त्र जाणणारा होता. आर्यांचे चतुर्विध पुरुषार्थही राक्षसांना मान्य होते. महोदन नामक राक्षसाने रावणाच्या राजसभेत त्यांचे विवेचन केलेले आढळते. राक्षस संस्कृत भाषाही बोलत असत. ते शास्त्रानुशीलनाबरोबरच भिन्न भिन्न कलांचाही आस्वाद घेत असत. रावणाने सर्वज्ञ व बुद्धिमान असे राक्षस आपले अमात्य नेमले होते. त्याच्या दरबारात शिस्त आणि शिष्टाचार यांचे कटाक्षाने पालन केले जाई. लंकेतली राक्षसांची घरे प्रशस्त, समृद्ध आणि अलंकृत असत. घरातले वातावरण सुगंधित असे. राक्षसांना उद्याने निर्माण करण्याचाही छंद होता.

राक्षस हे क्रूर योद्धे होते. गनिमी पद्धतीने ते शत्रूवर छापा घालीत. शत्रूवर अग्नी, विष व जादूटोणा यांचेही प्रयोग ते करीत. ते आपल्या सेनापतीच्या आज्ञेत आपापली कामे करीत. त्यांच्या सैन्यात हेरगिरीचाही एक विभाग होता. राम व सुग्रीव यांच्या मैत्रीत बिघाड निर्माण करण्यासाठी रावणाने शुक नामक एक गुप्तचर किष्किंधेत पाठवला होता.

एवढे सगळे असूनही आर्यांच्या पुढे राक्षसांना हार खावी लागली. याचे कारण ते लोक युद्धसाधने आणि युद्धसंचालन यांमध्ये आर्यांएवढे प्रवीण नव्हते. त्यांचे धनुर्विद्यानैपुण्यही आर्यांच्या तोडीचे नव्हते. व्यक्तिश: आर्यांपेक्षा एक एक राक्षस अधिक बलदंड होता; पण त्यांच्यामध्ये व त्यांच्या सैन्यामध्ये संघटितपणा नव्हता. त्यांच्या झुंडीच्या झुंडी शत्रूला भिडत आणि संघटित आर्यांकडून मार खात. जनस्थानात खर-दूषणांनी रामाशी केलेली लढाई ही झुंडीची लढाई होती. त्यामुळेच रामाकडून त्यांना मार खावा लागला.

शांतिप्रिय आर्य ऋषि-मुनींच्या लेखी राक्षस हे नावच कुविख्यात ठरले होते. राक्षसांची हिंसावृत्ती हेच त्याचे मुख्य कारण होते. ऋषि-मुनींच्या यज्ञाचा विध्वंस करणे हाच राक्षसांचा छंद होता. एखाद्या ठिकाणी यज्ञ सुरू झाला आहे, असे समजताच राक्षस लोक तिथे जाऊन यज्ञमंडपावर हल्ला चढवीत, यज्ञसामग्री नष्ट करीत, पेटलेले यज्ञकुंड पाण्याने विझवीत आणि त्यावर रक्तवर्षावही करीत. कित्येक वेळा ते यज्ञकर्त्या ऋषींना ठार मारण्यासही कमी करीत नसत. रावण हा त्यांतलाच होता. त्याला ब्रह्मघ्न हेच नाव मिळाले होते. त्याने माहेश्वरयज्ञासाठी जमलेल्या ऋषींना ठार मारून त्यांचे रक्त प्राशन केले, असे रामायणात म्हटले आहे. (वा. रा. ७.१८.१९).

पुराणांतील वर्णनांवरून राक्षसांसंबंधी सर्वसाधारण कल्पना अशी झालेली आहे की, अक्राळविक्राळ, काळा देह, लोंबणारी जीभ, मोठे दात, पुढे आलेली हनुवटी, लाल डोळे, राठ मोकळे केस असे त्यांचे रूप भयानक असते. पण सर्व राक्षस तसे नव्हते. ते वर्णाने काळे असले तरी, सगळे कुरूप नव्हते. ते सामान्य मानवासारखेच होते. मात्र त्यांची देहयष्टी मोठी होती. कित्येक राक्षसी सुंदर व नीटस होत्या, असे वर्णन रामायणात आहे. मारुतीला लंकेत कुरूप व सुरूप, दोन्ही प्रकारचे स्त्रीपुरुष दिसले. सीतेभोवती पहारा करणाऱ्या राक्षसी भेसूर होत्या, त्या मुद्दामच निवडलेल्या होत्या. राक्षस हे मानव जातीचे शत्रू ठरल्यामुळे नंतरच्या काळात त्यांच्यावर भयानक रूपाचा आरोप करण्यात आला असावा. त्यांच्या नरमांसाशनाच्या प्रवृत्तीमुळेही ती कल्पना दृढ झाली असेल.

एवढ्या सगळ्या राक्षसविषयक गोष्टी रामायणावरून ज्ञात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होनात, पण तरीही राक्षस हे खरेखुरे कोण होते, याविषयी विद्वानांत मतभेद आहेत. रामायणकालीन आर्यांच्या दृष्टीने जे धर्मभ्रष्ट होऊन जातिवहिष्कृत होत, ते राक्षसश्रेणीत जात, असे दिसते. या विधानाला पोषक अशी काही उदाहरणेही मिळतात. ताटका आरंभी एक यक्षिणी होती; पण ती अगस्त्याच्या शापाने नरभक्षक राक्षसी बनली. तिचा पुत्र मारीच राक्षसच ठरवला गेला (वा. रा. १.२५.१२). उत्तरकांडातली कल्माषपाद राजाची कथाही अशीच आहे. त्याने वसिष्ठाला श्राद्धात चुकून नरमांस वाढले म्हणून वसिष्ठाने क्रुद्ध होऊन त्याला नरमांस-भक्षक राक्षस बनण्याचा शाप दिला. यावरून असे वाटते की, एखादा आर्य मनुष्यही घृणित अपराध केल्याचा दंड म्हणून राक्षसयोनीत पतित होत असे.

वरील गोष्टीवरून आणि राक्षसांमध्ये वैदिक कर्मकांड प्रचलित असल्याचे जाणून काही विद्वानांचे असे मत बनले आहे की, राक्षस जाती ही मुळात आर्यांचीच एक शाखा होती. ही शाखा द. भारतात कोणत्या तरी सुपीक प्रदेशात जाऊन तिथे

राक्षसाचा पुतळा — यवद्वीप

प्रस्थापित झाली. तिने त्या प्रदेशात आपली एक विशिष्ट संस्कृती स्थापली आणि ती शक्तिशाली व वैभवसंपन्न जात बनली. खुद्द रावण हा प्रजापतीच्या वंशातल्या विश्रवा मुनीचा पुत्र होता, ही गोष्टही राक्षस जातीच्या मूळ आर्यत्वाची सूचक [...]. पण या शाखेचा आपल्या मूळ संस्कृतीशी असलेला संबंध तु[...] ती दूर जाऊन पडली आणि क्रूरता व स्वच्छंद विलास या गु[...]णांचा स्वीकार करून अनार्यत्वाला गेली.

दुसरे एक मत असे आहे, की राक्षस लोक द. भारत व [...] यांचे मूलनिवासी होते. आपल्या रानटी अवस्थेतून वर [...] येता रामायणकालात ते अर्धवट रानटी आणि अर्धवट [...] अशा अवस्थेला पोचले. वंशाच्या दृष्टीने पाहता ते ऋग्वेदा[...] आर्यशत्रू दस्यू यांच्याशी मिळते-जुळते होते. श्री. दीक्षि[...] यांच्या मते राक्षस हे दक्षिणेतील तिरंदाज आणि कोळी[...] आदिवासींचे वंशज होत. त्यांची संख्या वाढल्यावर [...] स्वतःचे राज्य निर्माण केले. कालांतराने ते आर्यांच्या सं[...] आले आणि त्याचा परिणाम म्हणून राक्षसांनी ब्राह्मणत्वा[...] स्वीकार केला. जे राक्षस ब्राह्मणधर्मी बनले, ते ब्रह्मरा[...] या नावाने प्रसिद्ध झाले. ब्रह्मराक्षसांनी वैदिक कर्मकांड[...] आचरणासाठी संस्कृत भाषाही आत्मसात केली.

एक गोष्ट निश्चित आहे, की रामायणकाली भारत[...] दक्षिण टोकाजवळच्या लंकेमध्ये क्रूर आणि रक्तपिपासू [...] एक मानवजाती वास्तव्य करीत होती. आर्यांचा दक्षिणेत [...] तिला मान्य नव्हता. हेच लोक आर्यांच्या यज्ञयागांत विघ्न [...] करीत होते. त्यांची ही विध्वंसक प्रवृत्ती हिंदी महासागरा[...] बेटांपर्यंत पसरली होती. आर्यांचे दक्षिणेवर प्रभुत्व स[...] होण्याच्या आधी या जातीने तिथे खूप धुमाकूळ घातला [...] या आदिम राक्षस जातीचे अवशेष आजही जावा बेटात व[...] मिळतात. हे लोक काळेकुट्ट आणि कुरळ्या केसांचे होते. ते [...] चांदीचे खूप दागिने वापरीत. डॉ. फ्रेझरच्या मते लंकेत आ[...] राक्षसांच्या पूर्वी एक काळीकभिन्न मानवजात समृद्ध [...] शक्तिशाली होती. द. भारतातल्या द्रविड जाती लंकेतल्या [...] आदिम कृष्णवर्णी मानववंशापासूनच निघाल्या आहेत. [...] आर्यांचे प्रभुत्व प्रस्थापित झाल्यावर त्यांनी या मूळ [...] हुसकावून लावले. मलेशियातले आजचे लोक त्या मूळ [...] प्रतिनिधी होत. [ऋ. द.; रा. का. स.; लो. सा. रू.; [...] मॉ. हि.; ओ. इ. इं.; वाल्मीकि-रामायण-परीक्षण, [...] वैद्य, १९२०; पॉ. रि. फो. नॉ. इं.]

राक्षसपूजा शानार या दक्षिणेतील जमातीत रा[...] प्रचलित आहे. राक्षस हे रुधिरप्रिय, न[...] भक्षक आहेत, या समजुतीने त्यांच्या अवकृपेपासून [...] मिळावे, हा या पूजेचा हेतू आहे.

राक्षसांच्या प्रसन्नतेसाठी त्यांना कोंबडी व बकरी [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बळी विधिपूर्वक दिला जातो. बळीला देवासमोर नेऊन त्याचे एकाच घावाने डोके उडवितात. एका घावात मुंडके न उडाल्यास देवाला बळी पोचला नाही, असे समजतात.

राक्षसभुवन एक प्राचीन गणेशस्थान. हे बीड जिल्ह्यातील जालन्यापासून पश्चिमेस ३६ मैलांवर गोदावरीच्या दक्षिण तीरावर वसलेले आहे. इथल्या गणेशाला विज्ञानगणेश असे म्हणतात.

या ठिकाणी गजानन हा गणेश या नावाने अवतरला. देवांतक आणि नरांतक या दोन दैत्यांना त्याने या ठिकाणी मारले. श्री दत्तात्रेयाला याच ठिकाणी आपल्या पूर्ण स्वरूपात त्याने दर्शन दिले. सूर्यपुत्र शनीने पत्नीशापापासून मुक्त होण्यासाठी गजाननाची उपासना केली, ते ठिकाणही हेच होय.

हल्ली या ठिकाणी जी गणेशमूर्ती आहे, ती पूर्वी एका गुहेत होती. सुमारे २०० वर्षांपूर्वी शंकरबुवा मंगलमूर्ती नावाच्या एका गणेशभक्ताला गुहेतील मूर्ती बाहेर काढण्याबद्दल दृष्टान्त झाला व त्याने ती मूर्ती बाहेर काढून तिची स्थापना उघड्या जागेत केली. त्याच्याच शिष्यपरंपरेने तिथल्या पूजेअर्चेची निरंतर व्यवस्था ठेवली आहे. ज्येष्ठ शु. चतुर्थीला गणेशाने दत्तात्रेयाला साक्षात दर्शन दिले, म्हणून तोच येथील उत्सवाचा मुख्य दिवस ठरला आहे. या दिवशी गणेशाचा जन्मोत्सव साजरा होतो. या देवस्थानाला पेशव्यांनी काही उत्पन्न लावून दिले होते, असे सांगतात.

इ. स. १७६३ साली या ठिकाणी निजाम व थोरले माधवराव पेशवे यांची मोठी लढाई झाली व पेशव्यांनी निजामाचा पूर्ण पराभव केला. [श्रीगणेशकोश]

राक्षसविवाह अष्टविध विवाहप्रकारांपैकी सातवा प्रकार. या प्रकारात नवरा मुलगा वधूची किंवा वधूपित्याची संमती न घेता वधूचे बलपूर्वक हरण करतो आणि तसे करताना वधूसह तिच्या संबंधितांना मारझोडही करतो. याचे लक्षण मनूने सांगितले आहे, (मनु. ३.३३) ते असे–

हत्वा छित्त्वा च भित्त्वा च क्रोशन्तीं रुदतीं गृहात् ।
प्रसह्य कन्याहरणं राक्षसो विधिरुच्यते ॥

अर्थ– रडणाऱ्या व आक्रोश करणाऱ्या वधूला (व तिच्या संबंधितांना) मारून, पिटून व त्यांची डोकी फोडून बलात्काराने कन्येला घरातून पळवून नेणे याला राक्षसविवाह म्हणतात.

हा प्रकार प्राचीन काळी युद्धप्रिय जमातींत प्रचलित होता. त्या समाजात मुलींवरून युद्धे होत व मुली बळजबरीने पळविल्या जात. पुढे क्षत्रिय लोक युद्ध जिंकल्यानंतर जी लटमार करीत, त्यात तरुण व सुंदर मुलींना पळवून नेणे, त्यांच्याशी बळजबरीने लग्न करणे किंवा त्यांचा बलात्काराने उपभोग घेणे, असे प्रकारही करू लागले. क्षत्रिय वीरांना हे कृत्य भूषणावह समजले गेले. म्हणून अशा विवाहाला क्षात्रविवाह असे दुसरे नाव स्मृतिकारांनी दिले आहे.

आदिम समाजात असे विवाह प्रचलित होते, याची साक्ष आजही काही जमातींत दिसून येते. महाराष्ट्रात मराठे व इतर अनेक जाती यांच्यामध्ये नवऱ्या मुलाच्या हातात कटचार दिलेली असते. ती हातात घेऊनच नवरा मुलगा लग्नाला उभा राहतो. हा राक्षसविवाहाचा अवशेष समजायला हरकत नाही. गोंड, बिर्होर, इ. जमातींच्या लग्नात नवऱ्या मुलीने पळून जायचे आणि वराने तिला पकडून आणायचे, असे नाटक आजही केले जाते.

राक्षसविवाह हा क्षत्रियांना भूषणावह असला, तरी ब्राह्मणांच्या अशा विवाहाला धर्मशास्त्राने संमती दिलेली नाही. वैश्य-शूद्रादी वर्णांना मात्र अशा विवाहासाठी सवलत ठेवलेली आहे. पण मनू, याज्ञवल्क्य, इ. सर्वच स्मृतिकारांनी असे बळजबरीचे विवाह सदोष मानले आहेत. अशा विवाहांमुळे निर्माण होणारी संतती वैगुण्ययुक्त होऊ शकते, असे त्यांना वाटते. धर्मशास्त्रात तर हाणामारी करून मुलीला पळवून नेणे हा अपराध दंडार्ह मानला आहे. अशा अपराधांना दंडापासून देहान्तापर्यंत तारतम्य विचारात घेऊन त्रिविध शिक्षा सांगितल्या आहेत (याज्ञ. २.२८७).

क्षत्रियांच्या बाबतीत अशा विवाहांना सवलत असली, तरी इ. स. च्या तिसऱ्या शतकापासून अशा प्रकारचे विवाह सुबुद्ध व सुजाण अशा क्षत्रियांनीही निषिद्ध ठरवले, असे दिसते. [पो. वी. हिं. सि.; ए. हिं. इं. ब्रा.; हिं. सं.]

राक्षसी वेला एक अशुभ काल. प्रातः, संगव, मध्याह्न, अपराह्ण व संध्या या कालांच्या प्रारंभीच्या तीन नाडिका (२४ मिनिटे=१ नाडिका) एवढ्या कालाला राक्षसी वेला म्हणतात. या कालात कोणतेही संस्कार किंवा शुभ कृत्ये करू नयेत, असे सांगितले आहे.

राशीस्नापन काश्मीरातील एक व्रत. चैत्र वद्य अष्टमीला या व्रताला प्रारंभ करतात. काश्मीरची भूमी ही चैत्र वद्य पंचमीपासून तीन दिवस रजस्वला असते, असे मानतात. या व्रतात तिला शुद्ध करायचे असते. त्यासाठी अष्टमीच्या दिवशी सौभाग्यवती स्त्रिया आपापल्या घरातील भूमी सारवून तिच्यावर गंधफुले वाहतात आणि ती शुद्ध करतात. मग ब्राह्मणाकरवी सर्वौषधीयुक्त जलाने ती पुनश्च शुद्ध करतात. नंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोक वीणेवरील संगीत श्रवण करून व्रतविधी समाप्त करतात.

काही ठिकाणी, हे व्रत फाल्गुन वद्य पंचमीपासून अष्टमी-पर्यंत करतात. पृथ्वी ही सूर्यपत्नी आहे, म्हणून या व्रताला राज्ञीस्नापन हे नाव मिळाले आहे. [हि. ध.]

रीतिसंप्रदाय

साहित्यशास्त्रातला एक संप्रदाय. काव्यालंकारसूत्राचा कर्ता वामन हा या संप्रदायाचा पुरस्कर्ता आहे. त्याच्याही पूर्वी रीती हा शब्द अस्तित्वात होता. पण त्याचे विवेचन फारसे झालेले नव्हते. दंडीने रीतिविवेचनावर भर दिलेला असला, तरी गुण व अलंकार यांना एकत्र धरून रीतीचे विवेचन केले होते. वामनाचा विशेष हा, की त्याने गुण व अलंकार यांची पृथक् सत्ता मानून रीतीचे विवेचन केले. गुण व अलंकार यांतील भेद सांगताना तो आपल्या ग्रंथात लिहितो–

काव्यशोभायाः कर्तारो धर्माः गुणाः ।
तदतिशयहेतवस्त्वलङ्काराः ।
पूर्वे नित्याः । तैर्विना काव्यशोभानुपपत्तेः ।
(काव्यालंकारसूत्र ३.१.१-३)

अर्थ– काव्याची शोभा उत्पन्न करणारे ते गुण व त्या शोभेची वाढ करणारे ते अलंकार होत. यांतील गुण हे नित्य आहेत. कारण त्यांच्यावाचून काव्यामध्ये शोभा उत्पन्न होणारच नाही.

वामनाने १० काव्यगुण सांगितले आहेत, ते असे– (१) ओज (२) प्रसाद (३) श्लेष (४) समता (५) समाधी (६) माधुर्य (७) सौकुमार्य (८) उदारता (९) अर्थव्यक्ती (१०) कांती.

रीतीचे महत्त्व सांगताना वामन म्हणतो–

रीतिरात्मा काव्यस्य । विशिष्टपदरचना रीतिः ।
(काव्यालंकारसूत्र १.२.६-७)

अर्थ– रीती हा काव्याचा आत्मा आहे. विशिष्ट पदरचनेला रीती म्हणावे.

रीती तीन प्रकारच्या आहेत, त्या अशा–(१) वैदर्भी (२) गौडी व (३) पांचाली. जिच्यात समास कमी ती वैदर्भी. जिच्यात समासांचे आधिक्य ती गौडी व जिच्यात मध्यम मार्ग अनुसरला गेला आहे ती पांचाली समजावी.

वर उल्लेखिलेले दहाही गुण वैदर्भी रीतीत दिसतात. कालिदासाचे काव्य हे वैदर्भी रीतीचे समजले जाते. गौडी रीतीत ओज गुण विशेषत्वाने आढळतो. भवभूतीची नाटके गौडी रीतीची समजतात. पांचाली रीतीत माधुर्य व सौकुमार्य या गुणांचे आधिक्य असते. अमरुशतक हे पांचालीचे उदाहरण होय.

रुद्रटाने लाटी ही एक चौथी रीती सांगितली आहे; तर भोजदेवाने सरस्वतीकंठाभरणात आवंती व मागधी अशा आ[णखी] दोन रीतींचा निर्देश केला आहे. या सगळ्या मिळून सहा री[ती] होतात. [सं. सा. इ.–कीथ; महाकवी मतिराम; हिं. सा. बृ. इ.]

रुंजा

एक प्राचीन आनद्ध वाद्य. हे लाकडाचे अथवा धा[तूचे] बनवितात. याची लांबी सुमारे अठरा अंगुळे अस[ते]. दोन्ही तोंडे पातळ कातड्याने मढवून ते कातडे दोरीने ताणता[त]. दोऱ्या ताणण्यासाठी कड्यांचा उपयोग केलेला असतो. रुंजाच्या उजव्या तोंडावर एक वाकडी काठी घासून आवाज काढ[तात] आणि डाव्या बाजूवर बोटांनी आघात करतात. संगीतरत्नाकर, संगीतराज, यशस्तिलक, इ. ग्रंथांतून याचे उल्लेख आढळ[तात]. प्राचीन काळी मुख्यत्वे युद्धाच्या प्रसंगी हे वाद्य वाजवीत. इ[ति]हासकाळातही याचा वापर होत असे.

काकतीय राजांच्या कारकिर्दीत ही वाद्ये तयार करणाऱ्यां[ची] एक स्वतंत्र जातच बनली होती आणि तिला 'रुंजा' असेच ना[व] पडले होते. [परिषद–पत्रिका, जानेवारी, १९६८]

रुई

एक लहान वनस्पती. हिला सूर्यकन्या असे म्हणता[त]. ग्रहयज्ञात सूर्याच्या हवनासाठी रुईच्या समिधा वापरता[त]. देवपूजेच्या पत्रीत हिचा समावेश आहे. स्त्रिया हरितालिके[च्या] उपवासात रुईचे पान चाटतात व उपास सोडतात. श[नि]शनिवारी मारुतीला रुईच्या अकरा पानांची माळ वाहतात. [त्या]मुळे शनीची बाधा दूर होते. विवाहप्रसंगी वधूने वराला घाल[ावयाची] माळ रुईच्या फुलांची करण्याची प्रथा काही ठिकाणी आढ[ळते].

पुरुष पहिल्या दोन बायका मेल्यानंतर तिसरी करण्या[पूर्वी] प्रथम रुईशी लग्न लावतो (अर्कविवाह पाहा).

एखाद्या विधवेचे प्रथम वराशी लग्न व्हायचे असेल, तर [ति]ला आधी रुईशी विवाह करावा लागतो. त्यामुळे तो वि[धुर] अथवा विधुर होतो, अशी समजूत आहे. रुईशी लग्न लाव[ल्या]मुळे विधवेचा पहिला पती या नवीन जोडप्याला त्रास देत [नाही] असेही समजतात.

पत्नीला मूल होऊन ते जगत नसल्यास नवरा रुईशी [लग्न] लावतो. असे केल्याने मूल जगते, अशी कातकऱ्यांची [समजूत] आहे. अनेक आदिवासी जातींत केवळ विवाहित पुरुषाचे[च दहन] करतात. एखादा पुरुष विवाहापूर्वी मेला, तर त्याचे [प्रथम] रुईशी लग्न करतात आणि मग त्याला जाळतात.

गावात रोगाची साथ पसरली असता आणि एखाद्या[च्या] अंगातून भूत काढायचे असता मारुतीची पूजा करून [त्याच्या] गळ्यात रुईच्या एकशे आठ पानांची, फुलांची किंवा [फळांची] माळ घालतात. [लो. दं.; म. लो. मा. ४.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रुक्म एक प्राचीन अलंकार. हा सोन्याचा बनवीत. याचा आकार गोल असावा. कारण अनेक ठिकाणी याचे वर्णन सूर्यसदृश असे केलेले आढळते. शतपथ ब्राह्मणात याचे वर्णन सोन्याचे ताट असे केलेले आहे (३.५.१.२०;४.२.१.२१). हा दागिना सामान्यतः गळयात घालीत असत. चयनामध्ये यजमानाच्या गळयात एकवीस ठिपके उठवलेले एक सुवर्णपदक (रुक्म) बांधायचे असते. त्याचप्रमाणे दशपेय यागात यजमानाने होत्याला रुक्म नावाचा सोन्याचा अलंकार द्यावा, असे म्हटले आहे (आ. श्रौ. ३.३.४). ऋग्वेदातही अनेक ठिकाणी याचे उल्लेख आढळतात. [म. ज्ञा. को.; वे. इं.]

रुक्मिणीअष्टमी (१) एक काम्य व्रत. मार्गशीर्ष वद्य अष्टमीला या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी सात वर्षे. व्रत करणाऱ्या स्त्रीने पहिल्या वर्षी चिकण मातीचे एक लहान घर करावे. त्याला एक दरवाजा करावा आणि त्या घरात प्रपंचाला लागणाऱ्या डाळ, तांदूळ, तूप, गूळ, इ. सर्व वस्तू ठेवाव्या. त्याचबरोबर कृष्ण व रुक्मिणी, बलराम व रेवती प्रद्युम्न व याची पत्नी, अनिरुद्ध व उषा आणि वसुदेव व देवकी, यांच्या लहान मूर्ती त्या घरात ठेवून त्यांची पूजा करावी. सूर्योदयाच्या वेळी चंद्राला अर्घ्य द्यावे. दुसऱ्या दिवशी सकाळी ते घर एका कुमारिकेला दान द्यावे. दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या, इ. वर्षी क्रमाने अधिकाधिक दालनांची घरे करून तीही कुमारिकेला दान द्यावी. फल — पुत्रपौत्रांना दीर्घायुष्य व सुखसंपदा यांचा लाभ. [हि. ध.; व्र. प.]

(२) एक जैनव्रत. भाद्रपद शुद्ध सप्तमीला याला प्रारंभ करतात. व्रतावधी आठ वर्षे. सप्तमीपासून पौर्णिमेपर्यंत एक उपवास व एक पारणे याप्रमाणे प्रतिवर्षी चार उपवास, चार पारणी व एक धारणा करून व्रतसमाप्ती करतात. [जै. व्र. वि. सं.]

रुक्मिणीमंगल मंगल काव्ये. भागवताच्या दशम स्कंधाच्या उत्तरार्धात व हरिवंशात कृष्ण-रुक्मिणी यांच्या विवाहाची कथा आहे. कृष्णावरच्या रुक्मिणीच्या आत्यंतिक प्रेमामुळे, तिने कृष्णाला पाठवलेल्या प्रेमपत्रामुळे व कृष्णाने राजमंडळाचा पराभव करून रुक्मिणीला पळवून नेल्यामुळे त्या कथेला अद्भुतता व अवीट गोडी आली आहे.

भक्तियुगातल्या सूरदास व नंददास या कृष्णभक्त कवींनी या प्रसंगावर काव्यरचना केली. रीतियुगात रुक्मिणीपरिणयाची कथा शृंगारी कवींना विशेषच आकर्षक वाटली.

एकोणिसाव्या शतकापर्यंत या कथेवर काव्यरचना होत राहिली. नवलसिंह, रामलाल, मिह्रिरचंद, पदमगत, विष्णुदास, इ. कवींनी रुक्मिणीमंगल याच नावाची काव्ये लिहिली आहेत. याव्यतिरिक्त रुक्मिणीपरिणय, रुक्मिणीहरण, रुक्मिणीस्वयंवर, रुक्मिणीविवाहलो, रुक्मिणीविलास, इ. नावांची याच प्रसंगावर रचलेली अनेक कवींची काव्ये आढळतात. तेलुगू, असमिया, गुजराती, मराठी, इ. अनेक भाषांत रुक्मिणीस्वयंवर काव्यांची एक परंपरा चालत आलेली आहे. [हि. सा. को. २]

रुखवत लग्नविधीतला एक सोपस्कार. नवरा मुलगा लग्नमंडपात येण्यापूर्वी त्याच्या जानवशात जाऊन वधूपक्षाकडील मंडळी त्याला जे भोजन वाढतात, त्याला रुखवत असे नाव आहे. वराने भोजन करूनच कन्येचे ग्रहण करावे, असा विधिनियम असल्यामुळे, हे रुखवत वाढण्याची चाल पडली आहे. रुखवतात करंज्या, अनरसे, चिरोटे, तारफेण्या, लाडू, इ. पदार्थ असतात. याव्यतिरिक्त एका विशिष्ट प्रकारचे लाडू रुखवतासाठी न्यावे लागतात. सुपाऱ्या, हळकुंडे, खारका, बदाम, शेवखंडे या वस्तू २५ संख्येने घेऊन, प्रत्येकी पाच वस्तूंचे पाच लाडू गुळाच्या पाकात बांधून व त्यांवर कच्च्या सुताचे आडवेउभे वेष्टन देऊन हे लाडू बनवायचे असतात. त्याचप्रमाणे डाळे व चुरमुरे यांचेही लाडू बनवतात.

हे सर्व रुखवत दुरड्यांतून भरून वाजतगाजत वराकडे नेतात. तिथे पाट-रांगोळ्या करून, पाने मांडून व उदबत्त्या लावून वर, वराची बहिण व इतर मंडळी यांना ते वाढतात. मुलीची आई या प्रसंगी वराच्या हातावर तुपाची आपोष्णी घालते. वराने रुखवताचे भोजन केल्यावर त्याच्या पानातला एखादा उष्टा पदार्थ वधूसाठी घेऊन जातात. ही ब्राह्मणी पद्धत आहे. मराठा वगैरे समाजांत हे रुखवत गावचा न्हावी वाहून नेतो आणि वराच्या समोर हारीने मांडून ठेवतो. [ल. वि. सो.]

रुखार शैवपंथी साधू. हे उत्तर भारतात भटकत असतात. आपण अघोर पंथाचे अनुयायी आहो, असे हे सांगतात. गोरक्षनाथाच्या ब्रह्मगिरी नामक शिष्याने गुजरातमध्ये हा पंथ स्थापन केला, अशी आख्यायिका आहे. ब्रह्मगिरीने आपल्या पंथाच्या रुखार, सुखार, भुखार, कुकार आणि गुदार अशा पाच शाखा स्थापन केल्या. या शाखांपैकी पहिल्या दोन शाखांचे साधू सर्वत्र आढळतात. रुखार व सुखार साधू आपल्या दोन्ही कानांत भिकबाळ्या घालतात. रुखारांच्या भिकबाळ्या तांब्याच्या अथवा जस्ताच्या असतात आणि सुखारांच्या रुद्राक्षाच्या असतात. सुखारांच्या हातांत एक लहानसा दंडा असतो. ते अंगाला भस्म फासतात, कफनी घालतात आणि डोक्यावर टोपी घालतात. रुखारांच्या हातांत मात्र दंडा नसतो. गुदार साधू एकाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कानात शिंकवाळी घालतात. दुसऱ्या कानात तांब्याचे तकट घालतात. या तकटावर गोरक्षनाथाच्या पायाच्या मुद्रा असतात.

या दोन्ही शाखांचे साधू भिक्षा मागताना आलख असा पुकारा करतात. तत्क्षणी भिक्षा मिळाली नाही, तर ते पुढच्या घरी जातात. पाहा – उखार. [एन्सा. रि. ए.]

रुद्र एक वैदिक देवता. रुद्र शब्द यास्काने रु = रडणे व द्रु = धावणे या दोन धातूंपासून व्युत्पादिला आहे. रडणारा, रडविणारा किंवा रडत रडत धावून जाणारा, तो रुद्र असा यास्काच्या व्युत्पत्तीचा अर्थ होतो. 'यदरोदीत् तद्रुद्रस्य रुद्रत्वम्' = रुद्र रडला ते त्याचे रुद्रत्व होय, या तैत्तिरीय श्रुतीला (१.५.१.१) धरून यास्काची ही व्युत्पत्ती आहे. सायणाचार्यांनी याची व्याख्या दिली आहे, ती अशी –

रोदयति सर्वमन्तकाले इति रुद्रः ।

अर्थ – सर्वांना अंतकाली रडवतो, म्हणून रुद्र होय.

वेदोत्तर वाङ्मयात रुद्र शब्दाच्या अध्यात्मपर अशाही काही व्याख्या दिल्या आहेत, त्या अशा –

रुत् संसाराख्यं दुःखं तत् द्रावयति अपगमयति विनाशयति इति रुद्रः ।

अर्थ – रुत् म्हणजे संसाररूप दुःख होय. ते पळवून लावतो, दूर करतो किंवा नष्ट करतो, तो रुद्र होय.

रुत् शब्दरूपा उपनिषदः ताभिर्द्रूयते गम्यते प्रतिपाद्यते इति रुद्रः ।

अर्थ – रुत् म्हणजे शब्दरूप उपनिषदे होत. त्यांनी जाणला जातो किंवा प्रतिपादला जातो, तो रुद्र होय.

रुत् शब्दात्मिका वाणी तत्प्रतिपाद्या आत्मविद्या वा तामुपासकेभ्यो राति ददाति इति रुद्रः ।

अर्थ – रुत् म्हणजे शब्दरूप वाणी किंवा तत्प्रतिपाद्य आत्मविद्या. ती उपासकांना देतो, म्हणून रुद्र होय.

रुद्र कसा उत्पन्न झाला याविषयी एक वैदिक कथा आहे, ती अशी – एकदा प्रजापती आपल्या कन्येवर आसक्त झाला. त्याने मृगाचे रूप घेऊन तिच्याशी समागम केला. सर्व देवांना प्रजापतीचे हे कृत्य निंद्य वाटले. पण प्रजापतीला शासन करील असा कोणीही देवांमध्ये नव्हता. म्हणून सर्व देवांनी त्यांच्या ठिकाणी जी उग्र शरीरे होती, ती सर्व एकत्र करून, त्या सर्वांचे मिळून एक शरीर बनवले. तोच हा रुद्र होय. देवांनी त्याला सांगितले, की 'तू प्रजापतीचा वध कर.' रुद्र म्हणाला, की 'मी ती गोष्ट करीन; पण सर्व पशूंचे आधिपत्य माझ्याकडे असावे, असा वर तुम्ही मला द्या.' देवांनी ती गोष्ट मान्य केली. मग रुद्राने शरप्रहार करून प्रजापतीचे विंधान केले (ऐ. ब्रा. ३.१३.९).

विष्णुपुराणात रुद्राच्या उत्पत्तीची दुसरी कथा दिली आहे, ती अशी – सनंदनादी मुनी ब्रह्मदेवाचे पुत्र होते. ब्रह्मदेवाने त्यांना प्रजोत्पादन करण्याची आज्ञा केली; पण त्यांनी ती मानली नाही. त्यामुळे ब्रह्मदेवाची भृकुटी वक्र झाली व तिच्यापासून रुद्र झाला. अशीच आणखीही काही कथाबीजे आढळतात.

ऋग्वेदात रुद्राला मध्यम श्रेणीची देवता मानले आहे. तिथे त्याची स्तुती करणारी केवळ तीन पूर्ण सूक्ते आहेत (ऋ. १.११४; २.३३; व ७.४६). याव्यतिरिक्त ऋग्वेदाच्या १.४३ या सूक्तातल्या पहिल्या सहा ऋचा रुद्रस्तुतिपर आहेत; व ६.७४ या सूक्तात रुद्र व सोम यांचे एकत्र स्तवन केलेले आहे.

रुद्राचे स्वरूप व स्वभाव – रुद्र हा शरीराने सुदृढ असून, वज्रबाहू आहे. त्याचे ओठ सुंदर, वर्ण पिंगट किंवा तांबडा आणि शरीर देदीप्यमान आहे. त्याच्या मस्तकावर सुंदर मुकुट असून, तो जटाधारीही आहे. त्याला तीन डोळे असून, तो सुवर्णालंकार व कातड्याची प्रावरणे धारण करतो.

रुद्र हा मरुतांचा पिता असून, तो पर्वतावर निवास करतो. त्याच्या हाती धनुष्य व त्रिशूळ असतो. तो सर्वश्रेष्ठ वैद्य आहे. त्याच्या अंगी सर्व रोग बरे करण्याची शक्ती आहे. तो आपल्या ओषधींनी वीरांना सजीव करतो. त्याचे विशेष अस्त्र धनुष्य हे आहे. त्या धनुष्यापासून तो जे बाण सोडतो, त्या बाणांनी मनुष्यांचा व पशूंचाही संहार होतो (ऋ. २.३३.१०; ७.४६.१).

ऋग्वेदातले रुद्राचे स्वरूप व स्वभाव लक्षात घेऊन रुद्र हा कोणत्या भौतिक शक्तीची देवता असावी, याविषयी अनेक पंडितांनी अनेक मते मांडली आहेत. काही पाश्चात्य पंडितांच्या मते रुद्र हा सृष्टीतल्या झंझावाताचे प्रतीक आहे. जर्मन विद्वान प्रा. वेबर याच्या मते तो वादळी वाऱ्याच्या आवाजाचे प्रतीक आहे. ऋग्वेदात काही ठिकाणी रुद्र व अग्नी यांचे साधर्म्य पाहून ... मॅक्डोनेल त्याला वादळी वाऱ्यातल्या विजेच्या लोळांचे प्रतीक मानतो. काही विद्वानांनी रुद्राच्या घातक बाणांचे स्मरण ठेवून त्याला मृत्यूची देवता मानले आहे. सुप्रसिद्ध वेदसंशोधक ... रा. ना. दांडेकर यांनी रुद्राचा मृत्यूशी संबंध जोडून जे विवेचन केले आहे, ते असे –

रुद्राची शस्त्रे ही पशुहत्या व मनुष्यहत्या करणारी आहेत, असे ऋग्वेदात म्हटले आहे (ऋ.१.११४.१०). रुद्र हा आपल्या शत्रूंना ताप, कफ, इ. विकार जडवतो व मारतो, असे अथर्ववेदात म्हटले आहे (११.२.२२; ६.९०). एकूण वैदिक ... रुद्राच्या या संहारक रूपाला घाबरत असलेले दिसतात. म्हणून ते रुद्राची कळवळून प्रार्थना करतात, ती अशी –

मा नस्तोके तनये मा न आयौ

मा नो गोषु मा नो अश्वेषु रीरिषः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वीरान् मा नो रुद्र भामितो वधी–
हविष्मन्तः सदमित् त्वा हवामहे ॥
(ऋ. १.११४.८)

अर्थ – आमच्या मुलावाळांना, भृत्यवर्गाला, धेनूंना आणि घोड्यांना तू मारू नकोस. हे रुद्रा; तू क्रुद्ध होऊन आमच्या वीरांना मारू नकोस. आम्ही हवी अर्पण करून सदैव तुझे पूजन करीत असतो.

रुद्राने रोगपरिहार करावा व मृत्यू टाळावा म्हणून त्याच्यासाठी होम करावा, असे आश्वलायनगृह्यसूत्रात (८.४०) व कौशिकश्रौतसूत्रात (५.१.७) सांगितले आहे. कुत्रे व लांडगे हे रुद्राचे पशू असल्याचा उल्लेख अथर्ववेदात आढळतो (११.२.२). प्राचीन लोक वरील पशूंना मृत्युदूतच समजत असत.

रुद्रकल्पनेची यजुर्वेदात बरीच वाढ झाली असून, तिथे त्याचे रंगरूप स्पष्ट व निश्चित झाले आहे. ऋग्वेदातले रुद्राचे संहारक स्वरूप यजुर्वेदातही आढळते; पण तद्विरुद्ध असे दुसरे स्वरूपही दिसते. रुद्र हा उदार, दयाशील व मंगलकारक असल्याचे यजुर्वेदात सांगितले आहे. त्याची कृपा कुमारिकांना पतिप्राप्ती करून देते, हे विशेष सांगितले आहे.

अथर्ववेदातल्या रुद्रवर्णनावरून रुद्र ही देवतामंडलातल्या इंद्र, अग्नी, इ. देवतांप्रमाणे श्रेष्ठ प्रतीची देवता नसून, ती सामान्य जनांना श्रद्धाविषय असलेली एक लोकदेवता होती. सामान्य जनांच्या मते रुद्र हा प्रचंड शक्तिमान असून, त्याचा क्रोध हा फार भयानक होता. त्याच्या या सर्वसंहारक शक्तीमुळेच त्याचे महत्त्व आदराने नव्हे; तर भीतीमुळे हळूहळू वाढू लागले व त्याला महादेव अशी संज्ञा दिली गेली. अथर्ववेदातल्या एका मंत्रात रुद्राला सहस्राक्ष असे म्हटले आहे (११.२.७). ऋग्वेदात सहस्राक्ष हे विशेषण सामान्यपणे ऋतरक्षक वरुणाला व अथर्ववेदात वरुणाच्या गुप्तचरांना दिलेले आढळते. रुद्राला ही उपाधी दिली गेली, त्यावरून अथर्ववेदाच्या काळात रुद्र हा प्राणिमात्रांच्या बऱ्या-वाईट कर्मांचा निरीक्षक समजला जाऊ लागला होता, असे दिसते.

अथर्ववेदात रुद्राचा विविध अंगांनी विकास होण्याची प्रक्रिया सुरू झाली आणि शेवटी पौराणिक काळात शिवाच्या स्वरूपात त्याचा पूर्ण विकास झाला. अन्य दुय्यम देवतांना आपल्यात समाविष्ट करून घेऊन आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व पूर्णपणे आत्मसात करून, म्हणजे अनेक देवतांना आपल्यात विलीन करून घेऊन एखादी देवता श्रेष्ठ होत असते. अथर्ववेदात भव आणि शर्व या दोन देवतांचा उल्लेख आढळतो. या दोन देवता लहान असल्या, तरी त्या स्वतंत्र होत्या; पण काही अन्य मंत्रांत त्यांचे स्पष्टपणे रुद्राशी तादात्म्य दाखवून भव आणि शर्व ही रुद्राचीच नावे होत, असे पुढे अथर्ववेदातच म्हटले आहे (६.४).

अथर्ववेदाच्या १५ व्या मंडलात रुद्राचा व्रात्याशी संबंध दाखवला आहे. डॉ. यदुवंशी म्हणतात – अथर्ववेदाचे हे मंडल वैदिक साहित्यातली एक समस्या आहे व तिचे आजपर्यंत योग्य समाधान झालेले नाही. व्रात्याला देवकोटीत घातलेले आहे. पण हा व्रात्य कोण होता, हे रहस्य अजून कायम आहे.

अथर्ववेदातल्या रुद्रस्वरूपाच्या संदर्भात आणखी एका गोष्टीचा विचार करावा लागतो. यज्ञामध्ये आहुतीच्या स्वरूपात रुद्राला जे पाच प्राणी समर्पित केले गेले, त्यात एक मनुष्य आहे. यावरून असे अनुमान करायला हरकत नाही, की रुद्राला कधी कधी नरबलीही दिला जात असावा. नरमेधाची ही प्रथा प्राचीन काळी केवळ आर्यांमध्येच नव्हे; तर आर्येतर जातींमध्येही प्रचलित होती. प्राचीन ग्रीक, रोमन आणि पर्शियन या लोकांतही नरमेधाची उदाहरणे मिळतात. यजुर्वेदातला पुरुषमेध आणि ऐतरेय ब्राह्मणातील शुनःशेपाची कथा ही वैदिक आर्यांतील नरबलीप्रथेची उदाहरणे म्हणून सांगितली जातात. सर्वसामान्यपणे रुद्राला नरबली संततिप्राप्तीसाठी दिला जात असावा, असे वाटते. जरासंधाने नरबली देऊन शिवाला संतुष्ट करण्याचा प्रयत्न केला, असे महाभारतात म्हटले आहे. हा वरील प्रथेचा एक अवशेष समजला पाहिजे.

कृष्ण व शुक्ल यजुर्वेदांत दोन सूक्ते अशी आढळतात, की त्यांत रुद्राचे एक निराळेच रूप आढळते. त्र्यंबकहोम व शतरुद्रीय ही ती दोन सूक्ते होत. त्र्यंबकहोमात रुद्राची पशुपती व वैद्य ही दोन रूपे दिसतात आणि त्याचे वास्तव्यस्थान उत्तरेकडील पर्वतात आहे, असेही कळते. यजुर्वेदातच रुद्राची सहचरी या नात्याने अंबिका नामक एका स्त्रीचाही उल्लेख आहे. ही अंबिका रुद्राची बहीण असल्याचे तिथे सांगितले आहे. त्यावरून असे वाटते, की उत्तरेच्या पर्वतीय विभागात एक स्त्री देवता अशी होती, की रुद्राबरोबर तिचीही पूजा होत असे. ऋग्वेदात व अथर्ववेदात तिचा उल्लेख नाही; पण यजुर्वेदात तो आहे. त्यातील त्र्यंबकहोमात रुद्राबरोबर तिलाही हवी अर्पण करावा, असे सांगितले आहे. यजुर्वेदाच्या निर्माणकाळी अंबिका ही एक आर्येतर देवता रुद्राशी जोडली गेली, असे दिसते. हिमाचलाच्या निम्नश्रेणीत वास्तव्य करणाऱ्या किरात व तत्संबंधी जाती यांची ती देवता असणे शक्य आहे.

वैदिक आर्यांच्या वास्तव्यप्रदेशाच्या जवळ हा किरात प्रदेश होता. त्या जातीत पूजल्या जाणाऱ्या कोणत्या तरी स्त्री देवतेचा वैदिक रुद्राशी संबंध जोडून रुद्राचे जे स्वरूप निर्माण झाले, तेच यजुर्वेदातल्या त्र्यंबकहोमात दिसून येते.

रुद्र या देवतेसंबंधी डॉ. रा. मा. दांडेकर यांनी केलेले विवेचन–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वैदिक आर्य भारतात येण्यापूर्वी येथील मूळ रहिवासी असलेल्या जाती-जमाती रुद्राची उपासना करीत असत. निरनिराळ्या लोकांनी रुद्राच्या व्यक्तिमत्त्वाच्या निरनिराळ्या पैलूंवर भर दिला होता. मूळ द्रविड त्याला लाल रंगाचा मानीत. सिंधु-संस्कृतीतले लोक रुद्राला पशुपती योगीश्वर म्हणत. काही लोकांनी त्याला मातृसंप्रदायातला सर्वश्रेष्ठ पुरुषदेव मानले होते. काही जाती-जमाती त्याला प्रजा व समृद्धी देणारा समजत; तर काही त्याला कृषिदैवत मानीत. काही भटक्या लोकांनीही त्याला आपला देव मानले होते. आर्येतरांच्या मते तो सृष्टिकर्ता व सृष्टिसंहर्ताही होता. रानावनात व डोंगरावर त्याचे वास्तव्य असल्याचे ते मानीत. वैदिक रुद्राच्या ठिकाणीही यांपैकी बरेच गुण दिसून येतात. निरनिराळ्या भागांतले लोक त्याला निरनिराळ्या नावांनी संबोधीत. पूर्व भारतातील लोक त्याला शर्व म्हणत. वैदिक आर्यांचा या प्राच्य, वाहीक, व्रात्य, मूळ द्रविड, इ. लोकांशी संबंध आला, तेव्हा त्यांच्या रुद्र देवतेशीही त्यांचा परिचय झाला. पुढे आर्यांना आपल्या वैदिक धर्मात या रुद्र देवतेचा समावेश करणे भाग पडले असावे. पण आपल्या दैवतसमूहात रुद्राचा अंतर्भाव करताना वैदिक सूक्तकर्त्यांनी त्याच्या अंगच्या काही गुणधर्मांचा उल्लेख मुद्दामच टाळला व त्याच्यासंबंधीचे काही विधी बदलले. मात्र सूक्तकर्त्यांचा हा प्रयोग काही अंशीच यशस्वी झाला आहे. कारण ऋग्वेदातही रुद्राच्या मूळ स्वभावाचे उल्लेख आढळतात.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते रुद्र हा मूळ अवैदिकांचाच देव आहे, हे सिद्ध होणे फार कठीण आहे. ते म्हणतात– फार तर असे म्हणता येईल, की तो वैदिक लोकांचा त्यांच्या रानटी पशुपालक अवस्थेपासून चालत आलेला देव असावा. त्याचा व अवैदिक लिंगदेवाचा संगम वैदिकांनी घडवून आणला, असे म्हणता येईल. ऋग्वेदातील रुद्रसूक्तात रुद्र हा मरुतांचा पिता म्हणून वर्णिला आहे. मरुत देव इंद्राचे नित्य सहकारी आहेत. मरुतांनासुद्धा रुद्र किंवा रुद्रीय असे त्यात म्हटले आहे. रुद्राला वरुण, अग्नी व सविता यांच्याप्रमाणे असुर हे अत्यंत प्राचीन देवतांचे विशेषण दिले आहे (ऋ. ५.४२.११). त्यास ईशान व शिव असेही म्हटले आहे (ऋ १०.९२.९). रुद्र हा सुंदर, नित्य तरुण, दृढ अवयवांचा, शोभन हनुवटीचा, तेजस्वी, लाल–गोरा असा ऋग्वेदात (२.३३.५–१०) वर्णिला आहे. त्याची कांती व अवयव सोन्यासारखे देदीप्यमान म्हणून वर्णिले आहेत. सूर्यासारखा व हिरण्यासारखा तो चमकतो. तो मेधपती आहे. सुशिप्र व बभ्रू ही इंद्राची विशेषणे रुद्रालाही लावली आहेत. ऋग्वेदातील त्याचे हे रूप व ही विशेषणे तो अनार्यांचा देव होता, या अनुमानास पोषक नाहीत. लहरी, भयंकर, पशुपालक, रोगकारक, इत्यादी लक्षणे आर्य व अनार्य या सर्वांना पटणाऱ्या देवाची लक्षणे आहेत. वैदिकांच्या आणि रानटी अवस्थेतला सर्वांत प्राचीन असा हा देव असावा. यजुर्वेद संहितेच्या काळी तो आर्य व अनार्य या सर्वांचा देव आहे, या गोष्टीला मान्यता प्राप्त झाली होती. म्हणून चर्म नेसणारा व विचित्र तनूंचा, असे त्याचे वर्णन आले आहे. वनांचा पती, स्तेनांचा पती, तस्करांचा पती, ही त्याची विशेषणे अनार्यांचाही तो देव होता, याची जाणीव दर्शविणारी आहेत. अनार्यांचे विविध देव ही त्याची विविध रूपे होत, असे 'नमो विरूपेभ्यः, विश्वरूपेभ्यश्च वो नमः' (तैत्ति. सं. ४.५.४.१) या नमस्कारावरून अनुमित होते. कपर्दी म्हणजे जटाधारी व व्युप्तकेश म्हणजे श्मश्रू केलेला, असे दोन प्रकार क्रमाने रानटी आणि बिन-रानटी स्थितीतल्या देवांचे दर्शक आहेत. तात्पर्य असे, की वेदपूर्व कालापासून चालत आलेला रुद्र हा देव वैदिक व अवैदिक या सर्वांचा देव वैदिक कालातच झाला होता. म्हणून अनार्यांचा देव वैदिकांनी पत्करला, अशी कल्पना करण्यापेक्षा वैदिक व अवैदिक देवांचा संगम होऊन शिव महादेव झाला, असे म्हणणे अधिक युक्त ठरेल. लिंगपूजा अनार्यांपासून वैदिकांनी वेदकाली स्वीकारली असावी. आर्य व अनार्य यांच्यांत शिव सारखाच मान्य होता. त्याच्यातील अनार्य अंशामुळे यज्ञात त्याच्या विसर्जनानंतर शुद्धिविधी करीत असावे.

यजुर्वेदातल्या रुद्राध्यायात रुद्राचे अधिकारक्षेत्र खूप वाढलेले दिसते. त्याला त्या अध्यायात शिव, शिवतर, शंकर, कपर्दी, नीलग्रीव, गिरीश, गिरिचर, क्षेत्रपती, इ. नावे मिळालेली दिसतात. त्याला स्तेनांचा पती (चोरांचा सरदार), स्तायूंचा पती (ठगांचा सरदार), व्रातपती, तक्षक, रथकार, कुलाल, कर्मार, निषाद, पुंजिष्ठ, कुत्री पाळणारा, व्याध अशाही उपाधी लागलेल्या दिसतात. यावरून असे निश्चित होते, की यजुर्वेदकाळापर्यंत हे सर्व गण व कारुनारू हे रुद्रपूजक बनले असून वैदिकांनी इथवरची रुद्राची व्याप्ती जाणून घेतली होती. जातिवर्ग ज्या एका देवाचे उपासक होते, तो देव रुद्रात विलीन केला होता.

रुद्राचे त्र्यंबक हे नाव यजुर्वेदातच पहिल्या प्रथम आढळते. त्र्यंबक शब्दाची व्याख्या यजुर्वेदात नाही व ब्राह्मणग्रंथांतही नाही. त्र्यंबक हा बहुव्रीही समास असून, तीन डोळे असलेला असा त्याचा अर्थ वेदोत्तर कालात लावला गेला. पण प्रारंभी त्र्यंबक शब्दाचा अर्थ वेगळा होता. वैदिक साहित्यात अंबक शब्दाचा अर्थ बाप असा आहे. या अर्थाला धरून त्र्यंबक शब्द लावला तर रुद्र हा तीन बाप असलेला म्हणावा लागेल. इथे अग्नीशी रुद्राचा संबंध लागतो. अग्नीची पितृस्थाने पृथिवी, आकाश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

द्यौः अशी तीन सांगितली आहेत. रुद्राचे अग्नीशी तादात्म्य कल्पिल्यामुळे त्यालाही तीन बाप असलेला ही उपाधी मिळाली. पण कालांतराने अंबक शब्दाचा मूळ पितृवाचक अर्थ लोक विसरले आणि त्या शब्दाचा नेत्र हा अर्थ घेऊन त्याची व्याख्या करू लागले. पौराणिक शिवाचे त्रिनेत्र हे रूप यातूनच पुढे आले व शिवाच्या या तिसऱ्या नेत्राशी संबद्ध कथा रचल्या गेल्या.

वेदांनंतर ब्राह्मणांच्या काळात रुद्राचे पद अधिक उंच झालेले दिसून येते. ब्राह्मणात रुद्राचे भयंकर रूप अतिभयंकर झाले आहे. अन्य देवताही त्याला घाबरून असतात (श. ब्रा.९.१.१.५). रुद्र हा पशुपती असला आणि सर्व पशू त्याच्या नियंत्रणाखाली असले, तरी ब्राह्मणांत त्याची कल्पना पशुहन्ता या स्वरूपातच केली गेली आहे (तांड्य ब्रा. ७.९.१६–१८). एका ठिकाणी एक स्तोत्रकर्ता म्हणतो, की आपले पशू रुद्राच्या संपर्कात कधीही न येवोत (कौषी. ब्रा. ३.४). ब्राह्मणग्रंथांत रुद्राला स्पष्ट रूपाने घोर व क्रूर म्हटले आहे. उत्तर किंवा ईशान्य या दिशेला रुद्राचा निवास असतो, असे सांगितले आहे. उत्तर दिशेकडून येणारा एक विचित्र पुरुष असे त्याचे वर्णन केले आहे (ऐतरेय ब्रा. ५.२२.९). रुद्राचे स्वरूप आणि त्याची उपासना यांच्यामध्ये आर्येतर अंश मिश्रित झाल्याकारणाने रुद्र व अन्य देवता यांच्यामध्ये जे अंतर येऊ लागले होते, त्याचेही संकेत ब्राह्मणग्रंथांत मिळतात. गवेधुक होमात सांगितले आहे, की ज्या वेळी अन्य देव स्वर्गात गेले त्या वेळी त्यांनी रुद्राला मागे सोडले. त्यामुळे रुद्राचे नाव वास्तव्य (घरीच राहणारा) असे पडले (श. ब्रा. १.७.३.१–८). दुसरी एक गोष्ट आहे, ती अशी– जेव्हा देवांनी सर्व पशू आपसात वाटून घेतले, तेव्हा त्यांनी रुद्राला वगळले; पण लगेच त्यांच्या मनात आले, की रुद्राला जर आपण काहीच दिले नाही तर त्याच्या क्रोधाने सृष्टीचा विनाश होईल. म्हणून त्यांनी त्याला मूषक हा पशू दिला (तांड्य ब्रा. ७.९.१६). त्र्यंबक होमात रुद्राचे विशेष वाहन मूषक सांगितले आहे, त्या गोष्टीचे समाधान वरील कथा रचून ब्राह्मणांनी केले.

वरील सर्व गोष्टींवरून असे दिसते, की ब्राह्मणग्रंथांच्या कालापर्यंत रुद्र हा अन्य देवतांहून वेगळा आणि विशेष समजला जाऊ लागला होता. रुद्राचे हे वेगळेपण रुद्राच्या विकासात व रुद्रोपासनेच्या इतिहासात फार महत्त्वाचे आहे. ब्राह्मणकालात वैदिक कर्मकांड अत्यंत प्रौढावस्थेला पोचले होते आणि तितकेच जटिलही झाले होते. त्या काळी बऱ्याचशा वदिक देवतांचे व्यक्तिमत्त्व फिके पडले होते. स्तोत्याने हविर्ग्रहणासाठी आवाहनमंत्राने बोलावताच सर्व देवता धावत पळत यज्ञमंडपात दाखल होत असत. अपवाद फक्त एका रुद्राचा. रुद्र तेवढा या कर्मकांडात कधीही जखडला गेला नाही. म्हणजेच रुद्र हा कधीही विशुद्ध रूपाने कर्मकांडाची देवता बनला नाही. म्हणून त्या काळात धर्मसुधारक आणि कर्मकांडाला गौण मानणारे जे लोक या जटिल कर्मकांडातून बाहेर पडण्याचा विचार करू लागले, त्यांनी साहजिकच कर्मकांडाच्या बाहेर असलेल्या रुद्राचा स्वीकार केला. अशा प्रकारची रुद्राची उपासना वैदिक आर्यांच्या श्रेष्ठ व सुसंस्कृत अशा वर्गांत प्रविष्ट झाली. त्यामुळे रुद्राचे स्थान आपोआपच अधिक उन्नत झाले. नीती आणि सदाचार यांच्या कल्पनाही रुद्राशी जोडल्या गेल्या. हळूहळू रुद्र हा ऋताचा म्हणजे विश्वनियामक तत्त्वाचा देव बनला. यज्ञसंस्थेच्या उतरत्या काळात जेव्हा अन्य देवता क्षीण झाल्या, त्याच काळात रुद्राचे स्थान अन्य देवतांहून उंच झाले. रुद्र केवळ नावानेच नव्हे, तर सामर्थ्यानेही महादेव बनला. इतकेच नव्हे; तर ब्राह्मणग्रंथाच्या काळापर्यंत रुद्र हा आर्य धर्माचे एक प्रधान दैवत बनला.

पौराणिक शिवाचे स्वरूप व उपासना यांतले बरेचसे अंश वैदिक रुद्राचे स्वरूप आणि त्याची उपासना यांतून घेतले गेले आहेत. शिव हे रुद्राचे प्रसिद्ध नाव यजुर्वेदातून आले आहे. नीलशिखंड किंवा नीलग्रीव या उपाधीत शिवाच्या विषप्राशनाच्या कथेचे बीज आढळते. कपर्दी या विशेषणावरून पौराणिक शिवाच्या जटाधारी स्वरूपाची कल्पना केली गेली. केशी या विशेषणावरून केशी व मुनी यांच्याशी असलेले वैदिक रुद्राचे प्राचीन साहचर्य लक्षात घेतले गेले. त्यावरूनच पौराणिक शिवाचा योगाभ्यासाशी संबंध जोडला जाऊन त्याला महायोगी ही उपाधी मिळाली. रुद्राचे निवासस्थान उत्तरेकडील पर्वतीय प्रदेशात असल्याचे यजुर्वेदात सांगितले आहे. त्यावरून पौराणिक कालात हिमालयाचे कैलास हे उच्च शिखर त्याचे निवासस्थान मानले गेले. कृत्तिवास ही रुद्राची वैदिक उपाधी लक्षात घेऊन पौराणिक शिव गजचर्म पांघरतो, अशी कल्पना रूढ झाली. पाहा –– शिव. [वै. सं. वि.; रुद्र इन् दि वेद, डॉ. रा. ना. दांडेकर; शैवमत; प्रा. च. को.]

रुद्रकवी (इ. स. चे १६ वे शतक) एक तेलुगू कवी. हा कंसाली रुद्रय्या या नावानेही प्रसिद्ध होता. त्याचा जन्म नेलोर जिल्ह्यातील कुंदकूर नामक गावात झाला. हा जातीने सोनार होता, म्हणून त्याला कंसाली हे व्यावसायिक नाव मिळाले. पेदलिंगाचार्य हे त्याच्या वडिलांचे नाव असून, त्याच्या गुरूचे नाव गुरवराचार्य असे होते.

गोवळकोंड्याच्या इब्राहिम कुतुबशहाने रुद्रकवीला चिंतलपालेम नावाचे गाव इनाम दिले होते, असे एक मत आहे.

प्रस्तुत कवीने कुंदकुरीजनार्दनाष्टकमू, सुग्रीवविजय आणि निरंकुशोपाख्यान या नावांची तीन काव्ये रचली. जनार्दनाष्टकमू हा त्याच्या भावकाव्यांचा संग्रह आहे. सुग्रीवविजय हे यक्षगान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असून, उपलब्ध तेलुगु साहित्यातील हे पहिलेच यक्षगान होय. निरंकुशोपाख्यान हे प्रबंधकाव्य असून, ते त्याने शंभेश्वरशिवाला अर्पण केले आहे. [ते. सा. इ.; हिं. ते. म. रा. तु. अ.]

रुद्रगण रुद्राचा पार्षद संघ. हे एक कोटी असल्याचे सांगितले आहे. भूत, वेताळ, उच्छुष्म, प्रेतपूतन, कुभांड व यातुधान हे रुद्राने उत्पन्न केलेले गण होत. रुद्रगण हे रुद्रासारखाच वेष धारण करतात, स्वर्गात वास्तव्य करतात, पापी लोकांचा नाश करतात, धार्मिकांचे पालन करतात, पाशुपतव्रत धारण करतात, योगिजनांची विघ्ने दूर करतात आणि शिवाची सदैव सेवा करतात. रुद्राच्या कानातून त्यांची उत्पत्ती झाली आहे. [कालिकापुराण २९; वराहपुराण]

रुद्रगण श्राद्ध अंत्यकर्मातील एक श्राद्ध. हे एकादश रुद्रांच्या उद्देशाने किंवा रुद्ररूप प्रेताच्या उद्देशाने पहिल्या पक्षी सव्याने व दुसऱ्या पक्षी अपसव्याने करावे, असे सांगितले आहे. या रुद्रगणांची नावे अशी–अजैकपाद, अहिर्बुध्न्य, कपाली, वृषाकपी, शंभू, कपर्दी, रैवत, हर, बहुरूप, त्र्यंबक व अपराजित. यात रुद्रगणांना उद्देशून ११ ब्राह्मणांना भोजन व दक्षिणा द्यावी किंवा तेवढ्या अर्थशक्तीच्या अभावी एका ब्राह्मणाला भोजन व दक्षिणा द्यावी, असे सांगितले आहे. अग्नौकरण व विकिर यांचा यात अभाव असतो. [ऋ. ब्र. स.]

रुद्र गायत्री ऋग्वेदातील गायत्रीमंत्राप्रमाणे रुद्राचाही एक गायत्रीमंत्र सांगितला आहे, तो असा–

तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि । तन्नो रुद्रः प्रचोदयात् ॥
(त. आ. १०.१)

रुद्राची पूजा वरील मंत्राने करावी व त्याचे ध्यानही याच मंत्राने करावे, असे शैव पुराणात सांगितले आहे. या गायत्रीसंबंधी लिंगपुराणात (१.१५.१८) एक कथा आहे, ती अशी–

पीतवात नावाच्या ३१ व्या कल्पात पिवळी वस्त्रे परिधान करून ब्रह्मदेव ध्यान करीत होता. त्याच्या पुढे पिवळी वस्त्रेच परिधान केलेला एक युवक उभा राहिला. तो महेश्वर आहे, असे समजून ब्रह्मदेव त्याला शरण गेला. एवढ्यात एक गाय तिथे प्रगटली. तिला हस्तपादादी सर्व अवयव चार चार या संख्येने होते. तिला पाहून रुद्र म्हणाला. 'गायत्री इकडे ये. योगबलाने विश्व व्यापून टाक. तुला लोक रुद्राणी म्हणतील व तू सर्व वर्णांचे हित करणारी होशील.' मग ही गाय (गायत्री) रुद्राने ब्रह्मदेवाला दिली. तिच्या आधारे रुद्राचे ध्यान करून ब्रह्मदेवाने रुद्रप्राप्ती करून घेतली. [हिं. ध.; पु. वै. सा. स. अ.]

रुद्रचंडी एक तांत्रिक देवता. 'नमश्चण्डिकायै' हा तिचा मंत्र असून, रुद्रयामलतंत्रात हिचे माहात्म्य वर्णिले आहे. चंडीजपाची फलश्रुती सांगताना तिथे एक श्लोक लिहिला आहे, तो असा–

यद्यन्मनोरथान् दुर्गे करोति धरणीतले ।
रुद्रचण्डीप्रसादेन किं न सिध्यति भूतले ॥

अर्थ – हे दुर्गे, जो मनुष्य या धरणीतलावर जे जे मनोरथ करील, ते ते रुद्रचंडीच्या प्रसादाने साध्य होतील. या भूतलावर रुद्रचंडीला असाध्य असे काहीही नाही.

रुद्रट (इ. स. ८००–८५०) एक संस्कृत साहित्यशास्त्रकार. हा भट्टवामुकाचा मुलगा असून, त्याला शतानंद असे दुसरे नाव होते. हा काश्मीरी सामवेदी ब्राह्मण होता. त्याने काव्यालंकार नावाचा एक ग्रंथ रचला आहे, त्यात साहित्यशास्त्राच्या सर्व अंगांचे विवेचन आहे. बहुंशी आर्या वृत्तात रचलेला, ७३४ श्लोकांचा हा ग्रंथ सोळा अध्यायात विभागलेला आहे. त्यातील सर्व उदाहरणे रुद्रटाने स्वतः रचलेली आहेत, हेच या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे.

ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात काव्याचे प्रयोजन, काव्यकारण व कवीला आवश्यक असणारे गुण हे विषय आहेत. अखेरचा अध्याय काव्यप्रकारांचे वर्णन करणारा आहे. उरलेल्या चौदा अध्यायांचे तीन विभाग पडतात. त्यांपैकी २ ते ६ या अध्यायांत शब्द, शब्दालंकार, शब्ददोष, इ. विषय आहेत व ७ ते ११ या अध्यायांत अर्थ, अर्थालंकार, अर्थदोष, इत्यादींचे विवेचन असून, त्यापुढील अध्यायांत शृंगार आणि इतर रस व नायक-नायिका भेद यांचे निरूपण आहे.

रुद्रटाने प्रथमच काही तत्त्वांच्या आधारावर वास्तव, औपम्य, अतिशय व श्लेष या चार वर्गांत अलंकारांचे वर्गीकरण केले. या पद्धतीमुळे काही अलंकार द्विरुक्त झाले आहेत. त्याच्या अलंकारविवेचनात काही अलंकारांची नावे बदलली आहेत आणि काही नावे जुनी असली, तरी त्यांची स्वरूपे बदलली आहेत.

अलंकाराच्या ग्रंथात रसाचे सविस्तर निरूपण करणारा रुद्रट हाच पहिला, असे म्हटले जाते. त्याने शांत व प्रेयान यांसह दहा रस मानले आहेत. यापुढे जाऊन तो म्हणतो, की आस्वाद्यतेच्या अवस्थेला जाऊन पोचणारा कोणताही भाव रस होऊ शकतो. या विवेचनामुळे रसांची संख्या कमीत कमी एक्केचाळीसपर्यंत जाते. रसनिर्मिती करताना कवीने जगाकडे पाठ फिरवू नये, अशी महत्त्वाची सूचना त्याने दिली आहे.

रुद्रटाने वैदर्भी, गौडी, पांचाली व लाटी अशा चार रीती सांगितल्या आहेत. त्यांपैकी पहिल्या तीन रीतींचे वामनाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रीतींशी नावापलिकडे कोणतेही साम्य नाही. समासांची दीर्घता एवढेच रुद्रटाच्या रीतींचे स्वरूप आहे.

रुद्रटाने आपल्या ग्रंथात कोणत्याही ग्रंथकाराचा स्पष्ट उल्लेख केला नाही; पण भरताचे नाट्यशास्त्र व मयूरकवीचे सूर्यशतक यांचा उल्लेख अनुक्रमे 'आचार्यैः' (१२.४) व रोगविमुक्तिः (१.९) या शब्दांनी केलेला आहे, असे म्हणतात. हा रुद्रट आणि शृंगारतिलककर्ता रुद्रभट्ट हे दोन्ही ग्रंथकार एकच होत, असे वेबर, बुल्हर, पिशेल, इ. काही पाश्चात्य पंडितांचे मत आहे. परंतु डॉ. काणे, पं. दुर्गाप्रसाद व डॉ. याकोबी यांच्या मते या भिन्न व्यक्ती आहेत.

काव्यालंकारावर नमिसाधु, आशाधर, गोपालभट्ट, इ. टीकाकारांच्या टीका आहेत. नमिसाधू या श्वेतांबर जैन साधूची व्याख्या फार प्रसिद्ध आहे. ती काव्यमालेत मूळ ग्रंथासह छापलेली आहे. [सं. सा. शा. इ.; भा. सा. शा.; काव्यप्रकाश–संपा.– श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर]

रुद्रदुर्गा एक तांत्रिक देवता. हिचे रूपवर्णन श्रीविद्यार्णवतंत्रात केलेले आहे, ते असे – सिंहावर आरूढ. पुढे वाघ. खड्गचर्म धारण करणाऱ्या चार सख्यांनी वेष्टित. अष्टभुज, त्रिनेत्र व चंद्रकलाधारिणी.

रुद्रधर उपाध्याय (इ. स. चे १५ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा मिथिलेचा रहिवासी होता. हा म. म. लक्ष्मीधराचा पुत्र आणि हलधराचा सर्वांत धाकटा भाऊ होय. याने श्राद्धविवेक, पुष्पमाला, वर्षकृत्य, व्रतपद्धती, शुद्धिविवेक, इ. ग्रंथ संस्कृतात रचले आहेत. याचा श्राद्धविवेक हा ग्रंथ फार प्रसिद्ध असून, तो चार परिच्छेदांत विभागलेला आहे. श्राद्धाची व्याख्या, श्राद्धप्रकार, क्रियापद्धती, त्या वेळी म्हणायचे मंत्र, श्राद्धाचे स्थलकाल, इ. अनेक विषय यात विवेचिले आहेत. शुद्धिविवेक ग्रंथातेही तीन परिच्छेद असून, त्यात जननमरणाशौच, अन्नशुद्धी, जलशुद्धी, रजस्वलेची शुद्धी, इ. विषय आहेत. वडिलांनी व बंधूने उत्तेजन दिल्यामुळे आपण हा ग्रंथ रचायला प्रवृत्त झालो, असे त्याने म्हटले आहे. संस्कृत भाषेव्यतिरिक्त याने मैथिली भाषेत काही पदेही रचली आहेत. [हिं. ध.; हिं. सा. बि.]

रुद्रप्रयाग हिमालयातील एक शिवस्थान. उत्तर प्रदेशातील गढवाल भागात हे स्थान आहे. श्रीनगरहून मोटारमार्गे इथे जाता येते. अलकनंदा व मंदाकिनी यांच्या संगमावर हे क्षेत्र आहे. इथूनच केदारनाथ व बदरीनाथ यांचे मार्ग भिन्न होतात. देवर्षी नारदाने संगीतविद्येच्या प्राप्तीसाठी इथे शिवाची आराधना केली होती, असे म्हणतात. या ठिकाणी पितरांना पिंडदान केले असता ते रुद्रलोकी जातात, असे केदारखंडात म्हटले आहे. इथून जवळच अलकनंदेच्या उजव्या तीरावर कोटेश्वर महादेवाचे स्थान असून, तिथे एका गुंफेत शिवलिंग आहे. [कल्याण-तीर्थांक; तीर्थयात्राप्रबंध]

रुद्रभट (इ. स. चे १२ वे शतक) एक कानडी वैष्णव कवी. याने विष्णुपुराण, महाभारत व भागवत यांतील कृष्णकथेच्या आधारावर जगन्नाथविजय नावाचे एक महाकाव्य रचले आहे. त्यात कृष्णजन्मापासून शाल्वविजयापर्यंतचे कथानक आहे. हा स्मार्त वैदिक ब्राह्मण हरिहरांत अभेद मानणारा असावा, असे प्रा. मुगळींचे मत आहे.

श्रीकृष्ण हा याच्या महाकाव्याचा नायक असून, त्याची भक्ती मोठ्या भावुकतेने यात गायली आहे. काव्याचा उद्देश स्पष्ट करताना रुद्रभटाने प्रारंभीच म्हटले आहे, की 'परंज्योती मुकुंदाला हृदयात स्थापन करून त्याच्या निर्मल तत्त्वाचा बोध घेण्यासाठीच हे काव्य रचायला मी तयार झालो.' त्याच्या या तन्मयतेचा प्रत्यय पदोपदी दिसून येतो. हे काव्य प्रौढ कन्नड भाषेत व चंपूशैलीत असल्याने त्याची गणना एका महान कलाकृतीत केली जाते. [हिं. क. भ. तु. अ.; हे. क.]

रुद्रलक्षवर्तिव्रत एक काम्य व्रत. कापसाच्या एक लक्ष रुद्रवाती करून त्या गाईच्या तुपात भिजवून त्यांनी शिवाला नीरांजन करणे, हा या व्रताचा प्रमुख भाग आहे. या व्रताचा प्रारंभ कार्तिक, माघ, वैशाख किंवा श्रावण यांपैकी कोणत्याही महिन्यात करून त्याच महिन्यात त्याची समाप्ती व उद्यापन करतात. व्रतदीक्षा घेतल्यावर दररोज एक हजार व शेवटच्या दिवशी एकाहत्तर वाती लावाव्या; अथवा रोज तीन सहस्र व अखेरीला तेरा सहस्र वाती लावाव्या किंवा एकाच दिवशी लक्ष वाती लावाव्या, असे या व्रताचे पर्याय आहेत.

उद्यापनाच्या दिवशी दोन वस्त्रांनी गुंडाळलेले एक ताम्रपात्र घेऊन त्यात नंदीची रुप्याची आणि शिव-गौरीची सोन्याची प्रतिमा स्थापन करतात. मग यथाविधि पूजा, कथाश्रवण व रात्री जागरण करतात. दुसऱ्या दिवशी नदीवर स्नान करून अकरा ब्राह्मणांना बोलावून होम करतात. पूर्णाहुतीनंतर ब्राह्मणांना वस्त्रालंकार, भोजन व दक्षिणा देतात. फल – दुःखनाश आणि संतती, संपत्ती व शिवलोक यांची प्राप्ती.

या व्रतासंबंधीची एक कथा शिवाने नारदाला सांगितली आहे, ती अशी – क्षिप्रा नदीच्या काठी सुगंधा नावाची गणिका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होती. वसिष्ठ मुनींच्या सांगण्यावरून तिने प्रयाग येथे हे व्रत केले व तिला शिवलोक प्राप्त झाला. [हि. ध.; व्रतराज]

रुद्रवीणा एक तंतुवाद्य. याचा प्रचार दक्षिणेत आहे. तानपुऱ्याप्रमाणेच रुद्रवीणेला भोपळा, दांडी, खुंट्या, अटी, घोडी, तारदाने, इ. सर्व अवयव असतात. दांडीचे वरचे टोक वळवून ते पाठीकडे नेतात. सुसर किंवा सर्प या प्राण्याचे मुख कोरून ते दांडीचे टोक शृंगारतात. दांडीवर मेणात चांदीचे किंवा पितळेचे पडदे बसविलेले असतात.

भोपळ्याच्या ऐवजी त्या आकाराचे लाकूड कोरून त्याला दांडी बसवितात. लाकडी भोपळ्याचे बाहेरचे अंग खरबुजाच्या आकाराचे करतात. अटीपासून दोनतीन बोटांवर एक वाटोळा लहानसा भोपळा काढता घालता येईल अशा प्रकारे स्क्रू दांडीच्या खालच्या अंगाला बसवितात. या लहान भोपळ्यामुळे वाद्याचा ध्वनी जोरकस निघतो. अटीच्या वर दांडीच्या दोन्ही अंगांना दोन दोन खुंट्या बसवितात. तानपुऱ्याच्या तारांप्रमाणे चार तारा अटीतून घोडीवर चढवून तारदानात बसवितात. आणखी तीन तारा दांडीच्या बाजूला अंगठ्याच्या जागी बसवून त्या खुंट्या वर आवळतात. मूळच्या चार तारा पडद्यावर डाव्या हाताची तर्जनी व मध्यमा यांनी दाबून, उजव्या हाताच्या तर्जनीने त्या तारांवर आघात करून हे वाद्य वाजवतात. उजव्या हाताची तर्जनी, अनामिका व करांगुली या तीन बोटांत तारेची नखी घालतात. पडद्यांची संख्या २४ असते. मुख्य बाजाच्या चार तारा सा, प, सा, म या स्वरात मिळविलेल्या असतात व बाकीच्या तीन तारा प, सा, सा (दुपटीचा) अशा ठेवतात. रुद्रवीणेचे वादन स्वतंत्रपणे होते. [म. ज्ञा. को.]

रुद्रव्रत (१) एक काम्य व्रत. ज्येष्ठ महिन्याच्या शुद्ध व वद्य पक्षातील षष्ठीला किंवा चतुर्दशीला एकूण चार दिवस हे व्रत करतात. रुद्र ही या व्रताची देवता होय. व्रतधारी व्यक्तीने सायंकाळी पंचाग्निसाधन करावे आणि सकाळी सोन्याची एक गाय दान द्यावी, असे सांगितले आहे. फल – शिवलोकप्राप्ती.

(२) एक संवत्सरव्रत. व्रत करणाऱ्याने एक वर्षभर एकभुक्त पद्धतीने राहावे. उद्यापनाच्या वेळी सोन्याचा बैल आणि तिलधेनू दान द्यावी. फल– पापनाश व शिवलोकप्राप्ती.

(३) कार्तिक शुद्ध तृतीयेला या व्रताला प्रारंभ करतात. रुद्र व गौरी ही या व्रताची देवता होय. व्रतावधी एक वर्ष. हे संवत्सरव्रत असून, यात संपूर्ण वर्षभर गोमूत्र व यव यांवर नक्त पद्धतीने निर्वाह करायचा असतो. उद्यापनाच्या वेळी एक गाय दान द्यायची असते. फल– एक कल्प गौरीलोकप्राप्ती. [हि. ध.]

रुद्र संप्रदाय एक वैष्णव संप्रदाय. विष्णुस्वामी हा याचा प्रवर्तक होय. विष्णुस्वामीने भगवंताच्या प्रत्यक्ष दर्शनासाठी घोर तपश्चर्या केली. अखेरीस भगवंताने बालकृष्णस्वरूपात त्याला दर्शन दिले व उपदेशही दिला. हा संप्रदाय शुद्धाद्वैतवादी आहे. शंकराचार्यांनी मायायुक्त ब्रह्माला जगताचे कारण मानले, तर विष्णुस्वामीने मायारहित शुद्ध ब्रह्मालाच जगताचे कारण मानले आहे. शंकराचार्यांच्या अद्वैताहून आपल्या अद्वैताचे भिन्नत्व दर्शविण्यासाठी विष्णुस्वामीने अद्वैत या शब्दामागे शुद्ध हे विशेषण जोडले.

पुढे वल्लभाचार्य या संप्रदायाचे अनुयायी बनले. रुद्र संप्रदायाला नवी स्फूर्ती आणि शक्ती वल्लभाचार्यांनीच मिळवून दिली. त्यांच्या कर्तृत्वामुळेच या संप्रदायाचे मूळचे नाव मागे पडून तो वल्लभसंप्रदाय या नावानेच प्रसिद्धी पावला. पाहा– वल्लभसंप्रदाय. [रा. अ. ग्रं.; भागवत दर्शन]

रुद्रसावर्णी बारावा मनू. हा रुद्रपुत्र आहे. देवीभागवतात मात्र याला तेरावा मनू म्हटले आहे. वायुपुराणानुसार हा चाक्षुष मन्वंतरात जन्मला (२.३८.४२). याला चवथा मेरुसावर्णी असेही म्हटले आहे.

विष्णुपुराणान्वये प्रस्तुत मन्वंतरात ऋतुधामा हा इंद्र असतो. दहा-दहा देवतांचा एक असे हरित, लोहित, सुमना, सुकर्मा, आणि सुराप असे पाच देवगण असतात; तसेच तपस्वी, सुतपा, तपोमूर्ती, तपोरती, तपोधृती, तपोद्युती व तपोधन हे या मन्वंतरातील सप्तर्षी असतात. [प्रा. च. को.; पु. इं.]

रुद्रस्वाहाकार रुद्राप्रीत्यर्थ केला जाणारा एक याग. या यागात निरनिराळ्या कामनांच्या पूर्तीसाठी रुद्राध्याय करून विविध हविर्द्रव्यांचे अग्नीत हवन करतात. पाहा– रुद्रानुष्ठानपद्धती.

रुद्रहृदयोपनिषद् एक शैव उपनिषद. हे कृष्ण यजुर्वेदात असून, त्यात अनुष्टुप छंदातले ५२ श्लोक आहेत. या उपनिषदाच्या प्रारंभी शुकाने व्यासाला प्रश्न विचारला, की 'सर्व देवांत वास करणारा देव कोण आणि कोणाची पूजा केली असता इतर सर्व देव संतुष्ट होतात?' या प्रश्नाला व्यासांनी उत्तर दिले, की 'रुद्र हा सर्व देवांचा आत्मा आहे. त्याची पूजा केली असता सर्व देव संतुष्ट होतात.'

या उपनिषदात शैव आणि वैष्णव संप्रदायांचे ऐक्य प्रस्थापित केले आहे. जे रुद्राचे स्वरूप ओळखत नाहीत, त्यांना केशवाचे स्वरूपही समजत नाही; तसेच जे शंकराचा द्वेष करतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ते जनार्दनाचाच द्वेष करतात, असे यात सांगितले आहे. त्यापुढे जे तत्त्वज्ञान सांगितले आहे ते असे – स्थावरजंगमात्मक हे सर्व जगउमा-महेश्वररूप आहे. प्रत्येक शरीरात जीव व ईश असे दोन पक्षी असून, जीव कर्माचे फळ भोगतो, तर ईश हा निराहार असा केवळ साक्षी असतो. तत्त्वत: जीव-शिवांचे ऐक्यच असते. पण मायेच्या आवरणात असणाऱ्यांना हे सत्य समजत नाही. गुरूच्या साहाय्याने हे ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेता येते आणि मुक्तीचा लाभ होतो. [श्री. सी. ग. देसाई]

रुद्रा एक तांत्रिक देवता. ही चंद्रकलाधारिणी, त्रिनेत्र, दशभुज, रक्तवस्त्र, कपालमालाधारिणी व शवरूपी सिंहासनावर बसणारी आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

रुद्राणी एक तांत्रिक देवता. ही रुद्राची पत्नी आहे, असेही म्हटले आहे. ही द्विभुज असून, पद्म व चामर धारण करणारी आहे. ती कमळात व्याघ्राजिन घालून बसते. पूजेसाठी हिची सोन्याची किंवा इतर धातूची, दगडी किंवा लाकडीही मूर्ती करतात. हिची पूजाही तांत्रिक पद्धतीने केली जाते. या पूजेत बरेच संस्कार आणि गूढविधी असतात. पूजेतला सर्वांत मोठा उपचार बलिदानाचा असतो. कालिकापुराणात तिला बळी दिला जाणाऱ्या पशूंची मोठी यादी आहे. प्राचीन काळी हिला नरबलीही दिला जाई. रुद्राणीला एक नरबळी दिला, तर ती एक हजार वर्षेपर्यंत आणि तीन नरबळी दिल्यास एक लक्ष वर्षेपर्यंत संतुष्ट राहते, असे कालिकापुराणात सांगितले आहे. हा नरबळी स्मशानात द्यावा, असेही सांगितले आहे.

रुद्राणीच्या पूजेत त्रिकोण, न्यास, मंत्र, तंत्र व मुद्रा यांचाही विनियोग सांगितला आहे. नृत्य-वाद्य हाही एक पूजेचा अभिन्न असा भाग असे. [श्री. डी. के. बारुआ – पी. के. गो. को. व्हॉ.]

रुद्राध्याय कृष्ण यजुर्वेदाच्या तैत्तिरीय संहितेच्या ४ थ्या कांडात हा मंत्रसमूह आलेला आहे. याला रुद्र किंवा शतरुद्रीय असेही म्हणतात. रुद्राचे नमक विभाग व चमक विभाग असे दोन भाग असून, प्रत्येकात ११ अनुवाक आहेत. पहिल्या विभागात 'नमः' शब्द वारंवार येत असल्यामुळे त्याला नमक असे म्हणतात व दुसऱ्यात 'च मे' हे शब्द वारंवार येत असल्यामुळे त्याला चमक असे म्हणतात. रुद्राध्यायाला पुढील शांतिमंत्राने प्रारंभ होतो –

ॐ इडा देवहूर्मनुर्यज्ञनीर्बृहस्पतिरुक्थामदानि श ꣳ सिषद् विश्वे देवाः सूक्तवाचः पृथिवि मातर्मा मा हि ꣳ सीर्मधु मनिष्ये मधु जनिष्ये मधु वक्ष्यामि मधु वदिष्यामि मधुमतीं देवेभ्यो वाचमुद्यास ꣳ शुश्रूषेण्यां मनुष्येभ्यस्तं मा देवा अवन्तु शोभायै पितरोऽनुमदन्तु ।। ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ।।

(तैत्ति. सं. ३.३.२)

अर्थ – इडा = ब्रह्मरूपिणी विद्या, देवहू = देवांना बोलावणारी, मनुर्यज्ञनीः = यज्ञाला प्रवृत्त करणारी मंत्ररूप वाग्देवता. बृहस्पतिः = कर्मसाक्षी परमेश्वर. हा परमेश्वरच उक्थामदानि = कर्मजन्य सुखे प्राप्त करून देतो. (आणि) हे शुभ वाणीच्या विश्वेदेवांनो, तुम्ही माझी हिंसा होणार नाही, याकडे लक्ष द्या. हे धरणीमाते, तू माझी हिंसा करू नकोस; (यासाठी) मी तुझ्या मधुर रूपाचे चिंतन करतो, तुझे मधुर स्तवन करतो. मी मधुर बोलेन, मी संबंधी लोकांशी मधुर व्यवहार करीन, देवांना उद्देशून मधुर बोलेन. मी मनुष्यांशी त्यांना श्रवणसुख होईल असे बोलेन. असे माझे देव रक्षण करोत. (आणि) माझी कीर्ती वाढावी म्हणून माझे पूर्वज माझ्या कर्मांवर संतुष्ट होवोत.

रुद्राध्यायाला ही शांती म्हणावी असे वेदांत सांगितलेले नाही. परंतु रुद्रानुष्ठान सांगणाऱ्या नंतरच्या ग्रंथांत या शांतिमंत्राचा उल्लेख केलेला आहे. हा रुद्राध्याय कृष्णयजुर्वेदाच्या इतर संहितांमध्येही पठित आहे. त्याचप्रमाणे शुक्ल यजुर्वेदातही हा अध्याय आढळतो.

रुद्राचा पहिला अनुवाक 'नमस्ते रुद्र०–' या मंत्राने सुरू होतो. या अनुवाकात १५ मंत्र आहेत. यात रुद्राच्या क्रोधाला नमस्कार असून, रुद्राने आपल्या कल्याणप्रद तनूने अज्ञान दूर करावे, अशी प्रार्थना आहे. 'तुझ्यासाठी आम्ही चांगल्या शब्दांनी तुझी प्रार्थना करतो' असे तिथे म्हटले आहे. यात रुद्राला नीलग्रीव, सहस्राक्ष, इ. नावांनी आळवले आहे. तसेच त्याच्या शस्त्रांचेही वर्णन केले आहे.

दुसरा अनुवाक नमकाने सुरू होतो. यापुढच्या अनुवाकांत रुद्राला विविध नामांनी नमन केलेले आहे. यातले 'नमः' शब्द दोन प्रकारचे आहेत. काही अनुवाकांत 'नमः' शब्द मंत्राच्या आरंभी व अंती असा दोन्ही वेळा येतो. काही ठिकाणी तो मंत्राच्या आरंभीच येतो. दुसऱ्या अनुवाकात सूत, स्थपती, मंत्री वणिज, इ. स्वरूपांत रुद्राचे नमन आहे.

तिसऱ्या अनुवाकात तस्करांचा (चोर) पती, आरण्यांचा पती, रात्रिचरांचा पती, इ. स्वरूपांत रुद्राला प्रणाम आहे.

चौथ्या अनुवाकात वैद्य, व्रात, गण, विरूप, महान, शुल्लक, रथकार, कुलाल, निषाद, पारधी, इ. गणांचा पती व कारुनारूंचा पती या स्वरूपांत रुद्राचे नमन आहे.

पाचव्या अनुवाकात रुद्राची भव, शर्व, रुद्र, पशुपती, इ. नावे सांगितली आहेत.

सहाव्या अनुवाकात ज्येष्ठ, कनिष्ठ, श्रेष्ठ, जघन्य अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपांत रुद्राचे वर्णन करून पुढे त्याचा रथ, कवच, शिरोवेष्टण, इ. गोष्टींचे उल्लेख केले आहेत.

सातव्या अनुवाकात निसर्गात रुद्राची स्थाने कुठे कुठे आहेत, ते सांगितले आहे.

आठव्या व नवव्या अनुवाकात सोम, उग्र, ताम्र, भीम, शिव, इ. नावे उल्लेखिली आहेत.

दहाव्या अनुवाकात रुद्राचे सर्वव्यापित्व सांगून स्वतःला, कुटुंबियांना, मुलांना व गुराढोरांना त्याने मारू नये, अशी त्याची प्रार्थना केलेली आहे.

अकराव्या अनुवाकांत विविध ठिकाणी राहणाऱ्या विविध रुद्रांचे वर्णन केलेले आहे.

चमकाच्या पहिल्या सहा अनुवाकांत मला अन्न मिळो, मला धान्ये मिळोत, मला सत्ता मिळो, मला वैभव मिळो, भूमी मिळो, पर्वत मिळोत, इंद्रादी देव अनुकूल होवोत, अशी याचना आहे. सात, आठ व नऊ या अनुवाकांत सगळे यज्ञप्रक्रियेतले शब्द आले आहेत आणि शेवटी माझी इंद्रिये, प्राण, मन किंबहुना सर्व जीवनच यज्ञमय होवो, अशी प्रार्थना केली आहे. तो मंत्र असा –

आयुर्यज्ञेन कल्पतां प्राणो यज्ञेन कल्पतामपानो यज्ञेन कल्पतां व्यानो यज्ञेन कल्पतां चक्षुर्यज्ञेन कल्पता ँ श्रोत्रं यज्ञेन कल्पतां मनो यज्ञेन कल्पतां वाग्यज्ञेन कल्पतामात्मा यज्ञेन कल्पतां यज्ञो यज्ञेन कल्पताम् ।

अर्थ – माझे आयुष्य, प्राण, अपान, व्यान, नेत्र, कर्ण, मन, वाणी, आत्मा यज्ञरूप होवोत व यज्ञही यज्ञरूप होवो.

अकराव्या अनुवाकात एकापासून अठ्ठेचाळीसांपर्यंत काही सम व काही विषम अशा संख्या सांगितल्या असून, शेवटी रुद्राच्या कृपेने आपल्याला अन्न, प्रजा, यज्ञ, इ. गोष्टी प्राप्त होवोत, अशी पुनश्च आकांक्षा व्यक्त केली आहे.

रुद्राध्यायाचा प्रथम विनियोग यज्ञातील चयनप्रकरणात झाला, त्यामुळे तो एक यज्ञीय अंग ठरला. त्याविषयी सायणाचार्य म्हणतात –

रुद्राध्याये पञ्चमे तु चित्यग्नौ होम उच्यते ।

अर्थ – (चौथ्या कांडातील) पाचव्या रुद्राध्यायाने चित्यग्नीवर होम करायचा असतो.

कर्मकांडात या अध्यायाचा समावेश केल्यामुळे त्याला कर्मांगत्वही आले, असे मानून सायणाचार्यांनी या अध्यायाचे कर्मपरच विवेचन केले आहे. मात्र ते हेही मान्य करतात, की रुद्राची अनेक ऋषींनी अनेक प्रकारे जी प्रशंसा केली आहे, तिच्यामुळे रुद्राचे महत्त्व केवळ यज्ञातील विनियोगापुरतेच नसून, व्यापक अशा तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनेही त्याला महत्त्व प्राप्त आहे. याविषयी पं. श्रीपादशास्त्री किंजवडेकर म्हणतात, ते असे –

कल्पसूत्रकारांनी रुद्रसूक्त हे यज्ञाचे अंग म्हणून सांगितले, तसेच उपनिषत्कारांनी रुद्रसूक्त हे उपासनेचेही महत्त्वाचे अंग म्हणून रुद्राचा प्रामुख्याने निर्देश केलेला आहे. कैवल्योपनिषद, जाबालोपनिषद, रुद्रोपनिषद वगैरे उपनिषदांतून या संबंधीचे विवेचन आढळेल. प्रथम यज्ञात विनियुक्त झालेले हे रुद्रसूक्त पुढे ज्ञानमार्गातही अत्यंत उपकारक ठरले. 'अत्याश्रमी जपेत्' –संन्याशाने जप करावा, असे मुद्दाम या रुद्राच्या बाबतीत सांगितले आहे. कर्ममार्ग आणि ज्ञानमार्ग या दोन्ही मार्गांत फारच उपयुक्त ठरणारे हे रुद्रसूक्त म्हणूनच एकजात सर्वांच्या प्रशंसेस पात्र ठरले आहे.

वायू, कूर्म, लिंग ही पुराणे; आश्वलायन व बौधायन ही गृह्यसूत्रे; हरिवंश, आगम, इ. ग्रंथ यांतून रुद्रासंबंधी उद्‌बोधक वर्णन आहे. शंख, याज्ञवल्क्य, अत्री व आंगिरस या स्मृतिकारांनी रुद्राध्याय हा सकल पातकांचा नाश करतो, असे म्हटले आहे.

शैव परिवारातील देवतांच्या महाभिषेकाच्या वेळी रुद्राध्याय म्हणतात. शैव संप्रदायांत महत्त्व पावलेला हा रुद्राध्याय पुढे वैष्णवांनीही स्वीकारला. त्याच्या जपाने विष्णुलोकाची प्राप्ती होते, असे स्कंदपुराणाच्या रेवाखंडात (११.७१) सांगितले आहे. पाहा – शतरुद्रीय. [रुद्रार्थदीपिका; पु. वे. सा. स. ग्रं.]

रुद्रानुष्ठानपद्धती

तैत्तिरीय संहितेच्या चवथ्या कांडातील पाचव्या प्रपाठकाला रुद्राध्याय ही संज्ञा आहे. चयनप्रकरणामध्ये सर्व इष्टका (विटा) मांडून झाल्यावर शेवटच्या इष्टकेवर या रुद्राध्यायाने होम करावा असे सायणाचार्यांनी सांगितले आहे. हा होम शेळीच्या दुधात रुईच्या पानाने करायचा असतो. कर्त्याने प्रथम गुडघ्याजवळ नंतर नाभीजवळ आणि नंतर मुखाजवळ पान धरून होम करायला सांगितले आहे. त्यासाठी रुद्राध्यायाचे तीन भाग करावे लागतात. याला शतरुद्रीय होम असेही म्हणतात (आप. श्रौ. सू. १७.११.३-४).

होमाप्रमाणेच रुद्राच्या जपाचे महत्त्व भट्टभास्करमिश्रांनी तै. सं. च्या भाष्यामध्ये विशद करून सांगितले आहे. रुद्राध्यायाचा जप करणारा ब्रह्महत्या, मद्यपान, चोरी, इ. अनेक प्रकारच्या पापांपासून मुक्त होतो, असे कैवल्योपनिषदात सांगितले आहे. अनेक स्मृतिकारांनीही रुद्रजपाचे माहात्म्य वर्णिले आहे.

रुद्राध्यायाची देवता रुद्र होय. रुद्राची घोर आणि शिव अशी दोन स्वरूपे आहेत. शतरुद्रियाने हवन केल्यावर रुद्राचे घोर स्वरूप शांत होते आणि वसोर्धारेने हवन केल्यावर त्याचे शिव स्वरूप शांत होते, असे सांगितले आहे. नमकाला शतरुद्रीय असे म्हणतात आणि चमकाला वसोर्धारानुवाक असे म्हणतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(तै. सं. ४.७; वाज. सं. १८) हे दोन्ही अध्याय मिळून रुद्र होतो. रुद्राध्यायाचा जप सांगितला असल्यामुळे जपानंतर दशांशाचे हवनही करावे लागते. रुद्र अकरा आहेत, असे श्रुतिवचन असल्यामुळे रुद्रानुष्ठानपद्धतीत अकरा या संख्येला महत्त्व आहे. रुद्राचा जप आणि हवन यांचे विधान बौधायनधर्मसूत्रांत (४.६.३-४) सांगितले आहे.

श्रौतसूत्रे आणि पुराणे यांनी रुद्रहोमाला असे महत्त्व दिल्यामुळे रुद्रानुष्ठानपद्धती या नावाने निरनिराळे प्रयोग सांगितले आहेत. त्यांत रुद्रस्वाहाकाराचे विस्तृत विधान आढळते.

रुद्रस्वाहाकार – योग्य दिनशुद्धी पाहून व कामनेचा उल्लेख करून संकल्प करतात. गणपतिपूजन, पुण्याहवाचन, इ. विधी झाल्यावर ऋत्विजांची योजना करतात. ऋत्विज रुद्राच्या जपाला प्रारंभ करण्यापूर्वी रुद्रन्यास करतात. हवन पुष्कळ असेल, तर त्याच्या प्रमाणात कुंडमंडपविधीमध्ये सांगितल्याप्रमाणे मंडप घालतात व त्यात कुंडे तयार करतात. मंडपात यजमानासह ऋत्विजांनी प्रवेश केल्यावर एका कुंडात वास्तुहोमासाठी अग्नीची स्थापना करतात. मग वास्तुदेवतांचे यथाविधि स्थापन – पूजन करतात. स्वाहाकाराचे मंडपतंत्र असेल, तरच वास्तुदेवतांचे स्थापन आणि त्यांच्यासाठी प्रधान होम, बलिदान, इ. विधी करायचे असतात. दुसऱ्या कुंडात अग्निस्थापना करून ग्रहमंडलावर नवग्रहांचे आवाहन करतात. मग त्यावर धान्यराशी पसरून सर्वतोभद्रदेवतांचे त्यावर स्थापन-पूजन करतात.

त्यांच्या जवळच रुद्रपीठ किंवा रुद्रयंत्र तयार करून त्यावर निरनिराळ्या सव्वाशे देवता मांडतात. कोणती देवता कुठे मांडायची, याची माहिती स्कंदपुराणात दिली आहे. या रुद्रपीठाचे माहात्म्य तिथे सांगितले आहे, ते असे –

रुद्रपीठमिदं सर्वं रुद्रकल्पेषु विश्रुतम् ।
शम्भुना स्वयमाख्यातं भक्तानुग्रहकाम्यया ॥
नाग्निचोरभयं तत्र न च राजभयं क्वचित् ।
यत्रैवं लिखितं यन्त्रं पूज्यते विधिवत् सदा ॥

अर्थ – हे सर्व रुद्रपीठ रुद्रकल्पामध्ये प्रसिद्ध असून, भक्तांच्यावर कृपा करण्याच्या बुद्धीने शंकराने ते (स्कंदाला) स्वतः सांगितले. ज्या ठिकाणी हे यंत्र काढून त्याचे यथाविधि पूजन केले जाते, तिथे अग्नीपासून, चोरापासून व राजापासून भय उरत नाही.

या रुद्रपीठावर मध्यभागी सुवर्णप्रतिमा ठेवतात आणि तिच्यावर रुद्राचे आवाहन करतात. मग रुद्रासह सर्व पीठदेवतांची यथाविधि पूजा करून अग्निमुखातील विधीप्रमाणे प्रधानहोमापर्यंतचे कर्म करतात.

प्रधानहोम रुद्राध्यायाने करायचा असतो. त्या अध्यायाचा मंत्रविभाग कसा करावा, यासंबंधी निरनिराळे पक्ष सांगितले आहेत. नमकाच्या एकशे एकूणसत्तर आहुती, हा पक्ष बराचसा रूढ आहे. अठ्ठेचाळीस, सोळा, सहा, तीन अशा निरनिराळ्या आहुतिसंख्या करता येतात. त्यासाठी मंत्रभाग वेगळा असतो. प्रधानहोमासाठी तिल व आज्य ही हविर्द्रव्ये आहेत. पण कामनेनुसार दूर्वा, चरू, अशी निरनिराळी हविर्द्रव्येही सांगितली आहेत. रुद्रयंत्रामधील देवता, नवग्रह, सर्वतोभद्र देवता, वास्तुमंडलदेवता, इ. आवाहित देवतांच्यासाठीही आहुती द्यायच्या असतात. स्विष्टकृदादी अवशिष्ट कर्म अग्निमुखाप्रमाणे केल्यावर स्थापित देवतांची उत्तरपूजा करतात. सर्व देवतांना उडीद व दीप यांसह भाताचा बली देतात. जप करणाऱ्या ब्राह्मणांना दक्षिणा देऊन यजमान त्यांच्याकडून आशीर्वाद घेतो. मग निरनिराळ्या कलशांमधील पाणी घेऊन ऋत्विज यजमानाला अभिषेक करतात. नंतर ब्राह्मणांना भोजन घातल्यावर रुद्रानुष्ठानाचा विधी संपूर्ण करतात.

रुद्रजपाचे अनेक प्रकार संभवत असल्यामुळे लहान–मोठे अनुष्ठान करता येते. नुसता जप, नुसता होम आणि जप व होम, असे रुद्रानुष्ठानाचे प्रकार आहेत. कामना एकच असली, तर ती पुरी होण्याचे दृष्टीने लहान अनुष्ठान कारणीभूत होते. अनुष्ठान यथासांग केले, तर फल लवकर मिळते. वेदांत रुद्राचे अग्नीशी तादात्म्य सांगितले असल्यामुळे अग्नीत रुद्रासाठी हवन केल्याने तो अग्निरूप रुद्र यजमानाला ऐश्वर्य मिळवून देतो, असे तैत्तिरीय संहितेत (५.४.३) सांगितले आहे.
[श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

रुद्राक्ष एक वृक्ष. याच्या फळांनाही रुद्राक्ष म्हणतात. हे वृक्ष भारताच्या बऱ्याच भागांत आढळतात. शिवोपासक लोक भस्मधारणाइतके रुद्राक्षधारणालाही महत्त्व देतात. रुद्राक्ष हा शब्द रुद्र + अक्ष यापासून बनला आहे. शिवाचा नेत्र, असा त्याचा अर्थ होतो. या तृतीय नेत्राला जगताच्या आध्यात्मिक तेजोबलाचे प्रतीक मानण्यात येते. म्हणून रुद्राक्षाला सर्वश्रेष्ठ मानतात. रुद्राक्ष-जाबालोपनिषदात याच्या उत्पत्तीसंबंधी एक कथा सांगितली आहे, ती अशी–

त्रिपुरासुराला ठार मारण्यासाठी कालाग्निरुद्राने प्रथम ध्यानार्थ डोळे मिटून घेतले, तेव्हा त्यांतून जे अश्रुबिंदू जमिनीवर पडले त्यांचे रुद्राक्षमणी बनले.

प्रवाळ, मौक्तिक, स्फटिक, शंख, रजत, सुवर्ण, चंदन, इ. वस्तूंपासूनही रुद्राक्षमणी तयार करता येतात, असे अक्षमालिका उपनिषदात म्हटले आहे. रुद्राक्षाचे आकारही बरेच असतात. देवी भागवतानुसार आवळ्याच्या आकाराचा रुद्राक्ष सर्वश्रेष्ठ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होय. बोराएवढा रुद्राक्ष मध्यम आणि चण्याच्या आकाराचा रुद्राक्ष कनिष्ठ होय. याच्या मण्याला खरबुजाच्या फाकेप्रमाणे रेषात्मक भाग असतात, त्यांना मुख अशी संज्ञा आहे. या मण्यांना एकापासून चौदापर्यंत मुखे असू शकतात. योगसारात या मुखांना विविध देवतांची प्रतीके मानली आहेत. एकमुखी रुद्राक्ष शिवाला प्रिय असतो. द्विमुखी रुद्राक्ष शिव आणि त्याची शक्ती यांना प्रिय असतो. त्याचप्रमाणे त्रिमुखी अग्नीला, चारमुखी ब्रह्मदेवाला, पाचमुखी कालाग्निरुद्राला, सहामुखी कार्तिकेयाला, सातमुखी आदिशेषाला, अष्टमुखी गणेशाला, नवमुखी भैरवाला, दशमुखी विष्णूला, एकादशमुखी एकादशरुद्राला, बारामुखी सूर्याला, तेरामुखी कामदेवाला आणि चौदामुखी रुद्राक्ष शिवाला प्रिय असतो.

रुद्राक्ष चार रंगांचे असतात. पांढरा रंग सर्वांत श्रेष्ठ असतो. त्याखालोखाल तांबडा आणि त्यानंतर पिवळा. काळा रुद्राक्ष सर्वांत हीन होय. पांढरे व पिवळे रुद्राक्ष सहसा आढळत नाहीत. तांबडे व काळे रुद्राक्ष सर्वत्र आढळतात.

योगी व शैव लोक रुद्राक्षाच्या माळा अंगावर धारण करतात. तंत्रशास्त्रानुसार ही माला जपकार्यात विशेष फलदायिनी असते. गळ्याभोवती बत्तीस किंवा सत्तावीस मण्यांची माला, मस्तकावर चाळीस, एकेका कानात सहा सहा, मनगटावर बारा, आणि दंडांमध्ये सोळा सोळा मण्यांची माळ करून घालण्याची काही शैव लोकांत पद्धत आहे. मंत्रजपासाठी लागणारी माळ बहुधा एकशे आठ मण्यांची असते.

जपमालेसाठी लागणारे मणी पंचमुखी व नैसर्गिक छिद्रांचे असल्यास उत्तम मानतात. माळेसाठी सर्व रुद्राक्ष सारखे, तेजस्वी आणि काट्यांनी युक्त असावे; किड्यांनी खाल्लेले व फुटलेले असू नयेत. माला करताना प्रत्येक रुद्राक्षाचे मुख दुसऱ्या रुद्राक्षाच्या मुखाशी मिळवावे. मेरुमणी ऊर्ध्वमुखी ठेवून त्यावर गाठ मारावी, असे सांगितले आहे.

एकमुखी रुद्राक्ष फार शुभ मानतात. घरात हा रुद्राक्ष असेल तर, तिथे लक्ष्मीचा स्थिर निवास असतो, अशी समजूत आहे. ज्याच्या गळ्यात एकमुखी रुद्राक्ष असतो, त्याच्यावर शस्त्र चालत नाही, अशीही समजूत आहे. एकमुखी रुद्राक्षाप्रमाणे एकादशमुखी रुद्राक्षही पवित्र मानतात.

रुद्राक्षाचे आयुर्वेदीय उपयोगही बरेच सांगितले आहेत. ही माळ गळ्यात धारण केली असता प्राणतत्त्व नियमित राहते, असे म्हणतात. [क्रि. स्ट. ले. उ.; एन्सा. रि. ए.]

रुद्राक्ष-जाबालोपनिषद

एक शैव उपनिषद. हे सामवेदाशी संबद्ध आहे. यात प्रारंभी अनुष्टुप छंदातले १९ श्लोक आहेत. नंतरचा भाग गद्यात असून, तो अर्थवादात्मक आहे. भुसुंड मुनी कालाग्निरुद्राला रुद्राक्षांच्या उत्पत्तीविषयी माहिती विचारतो, असा या उपनिषदाचा प्रारंभ असून, सर्व उपनिषद रुद्राक्षनिर्मिती व रुद्राक्षप्रभाव या विषयावर वाहिलेले आहे. त्रिपुरासुराला मारण्याच्या वेळी कालाग्निरुद्राने जेव्हा ध्यानार्थ डोळे मिटले, तेव्हा त्याच्या डोळ्यांतून जे अश्रु ओघळले, ते रुद्राक्ष झाले आणि मग त्याने जेव्हा डोळे उघडले तेव्हा त्यांतून ओघळलेल्या अश्रूंपासून रुद्राक्षांची झाडे उगवली असे यात सांगितले आहे. यानंतर रुद्राक्षांची इतर माहिती दिली आहे, ती अशी –

धात्रीफळाएवढा रुद्राक्ष श्रेष्ठ, बोराएवढा मध्यम व चण्याएवढा कनिष्ठ होय. उत्तम रुद्राक्ष निकषावर घासला असता, सोन्याप्रमाणे त्याची रेघ उठते.

रेशमी धाग्यात उत्तम रुद्राक्ष गुंफून ते शरीरावर धारण करावे. शेंडीच्या किंवा जटेच्या टोकाला एक रुद्राक्ष, मस्तकावर ३००, मानेवर ३६, दोन्ही दंडांवर प्रत्येकी ३२, प्रत्येक मनगटावर १२ व खांद्यांवर १००० रुद्राक्ष धारण करावे. मस्तकावर रुद्राक्ष धारण करताना ईशान मंत्र म्हणावा, मानेवर धारण करताना तत्पुरुष मंत्र जपावा, तर गळ्यावर धारण करताना अघोर मंत्र म्हणावा. रुद्राक्षांच्या माळेला तीन, पाच किंवा सात पदर असावे. प्रत्येक रुद्राक्ष मूलमंत्राने संस्कारित करावा. एकमुखी रुद्राक्ष परतत्त्वनिदर्शक, द्विमुखी अर्धनारीनटेश्वररूप, त्रिमुखी तीन अग्नींचा निदर्शक, चतुर्मुखी ब्रह्मदेवाच्या चार मुखांचा, पंचमुखी शिवाच्या पंच ब्रह्मरूपांचा व षण्मुख कार्तिकेयाचा निदर्शक असे समजावे.

रुद्राक्ष धारण करणाऱ्याने मद्य, मांस, कांदा, लसूण, इ. पदार्थ सेवन करू नयेत.

हे उपनिषद प्रतिदिन वाचणाऱ्याला महत्पदाची प्राप्ती होते. तसेच याचे सकाळ-संध्याकाळ वाचन केल्याने सहा लक्ष गायत्री जपाचे पुण्य लाभते, अशी फलश्रुती या उपनिषदाच्या शेवटी सांगितली आहे. [श्री. सी. ग. देसाई]

रुद्रोपनिषद

एक शैव उपनिषद. पंचाक्षर मंत्राचा अनुयायी असणारा व शिवपूजेत मग्न असणारा तो चांडाळ असला तरी खरा ब्राह्मण असून, शिवभक्ती न करणारा तो चांडाळ होय असे यात प्रतिपादन केले आहे. शिवलिंगाची पूजा करणारा चांडाळ, पूजा न करणाऱ्या ब्राह्मणापेक्षा श्रेष्ठ होय, असे यात सांगितले आहे.

शिव हा विश्वव्यापी विश्वपुरुष आहे. तोच प्राप्तव्य आहे. शिव हाच गुरू असून, तो संरक्षकही आहे. शिवलिंगावर ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अभिषेकाचे तीर्थ, त्याच्यावर वाहिलेल्या फुलांचा निर्माल्य व महेश्वराच्या चरणांचे तीर्थ ही जन्माचे मालिन्य धुवून टाकतात; त्यामुळे शिवस्वरूपाशी ऐक्य होते, असे या उपनिषदात म्हटले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

रुनकता उत्तर प्रदेशातील एक पवित्र क्षेत्र. हे मथुरेपासून सुमारे दहा मैलांवर आहे. याला रेणुकाक्षेत्र असेही म्हणतात. इथे जमदग्नीचा आश्रम होता, असे सांगतात. इथे एका उंच टेकडीवर जमदग्नीचे मंदिर असून,त्यात जमदग्नी व रेणुका यांच्या मूर्ती आहेत. टेकडीच्या पायथ्याजवळ लक्ष्मीनारायण व परशुराम यांची मंदिरे आहे. दसहरा, परशुरामजयंती व सोमवती अमावास्या, या वेळी इथे मोठी यात्रा भरते. महाकवी सूरदासाचे वास्तव्य बराच काळ इथे होते. [कल्याण—तीर्थांक]

रुपे एक खनिज धातू. रुप्याचा रंग शुभ्र असून, ते प्रसरणशील, लवचिक, उष्णतावाहक व विद्युद्वाहक असते. त्याचा नाद मधुर असतो. रुप्याचा रुक्म किंवा रजत असा उल्लेख तैत्तिरीय संहिता व अथर्ववेद या ग्रंथांत आला आहे.

रुपे हे शिवाच्या नेत्रातून उत्पन्न झाले, असे मत्स्यपुराणात (२७) सांगितले आहे. पितृकार्यात रुप्याची पात्रे प्रशस्त मानलेली आहेत.

लौकिक मराठी भाषेत अशुद्ध चांदीला रुपे म्हणतात. पाय अधू असता किंवा पायात काही व्यंग असता, पायात चांदीचा तोडा घालतात. दृष्ट लागू नये म्हणून चांदीचे वाळे, तोरड्या, बांगड्या, माळा, इ. दागिने घालण्याची पद्धत आहे. चंद्र हा ग्रह अनिष्ट असता चांदीचा चंद्र बनवून अंगावर धारण करतात. संतानप्राप्तीसाठीही चांदीच्या आंगठ्या वापरण्याची प्रथा आहे. रोगमुक्ती व्हावी व अपत्यप्राप्ती व्हावी, म्हणून देवाला चांदीचे डोळे व मिशा अर्पण करण्याचा नवस बोलतात.

नववधू घरी येणे म्हणजे लक्ष्मी घरी येणे, असे समजतात. परंतु लक्ष्मी ही अतिशय चंचल असते. म्हणून तिला स्थिर करण्यासाठी नववधूच्या पायात चांदीच्या साखळ्या घालतात. वधूने नेहमीच चांदीचे काही अलंकार वापरावे, असा संकेत आहे. रुद्र देवतेला आवाहन करण्यासाठी चांदीचा उपयोग करतात. मूळ, मघा किंवा आश्लेषा नक्षत्रावर जन्मलेल्या बालकाचा पिता नक्षत्राच्या चांदीच्या मूर्तीची पूजा करतो. असे केल्याने त्या नक्षत्राचा दोष नष्ट होतो, असे समजतात. [श. क.; की. पों.]

रुय्यक (इ. स. चे १२ वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रकार. त्याला रुचक असे दुसरे नाव होते. हा काश्मीरचा रहिवासी असून, राजानक तिलकाचा मुलगा होता. त्याने काव्यशास्त्राचे अध्ययन आपल्या पित्याजवळच केले. रुय्यकाने अलंकारसर्वस्व नावाचा अलंकारशास्त्रावरील एक प्रमाणभूत ग्रंथ रचला आहे. ही त्याची सर्वोत्तम रचना मानली जाते. हा ध्वनिमताचा कट्टा अनुयायी होता.

अलंकारसर्वस्वाचे सूत्रे, वृत्ती व उदाहरणे असे तीन भाग पडतात. सूत्रे गद्यमय असून, त्यांत अलंकारादिकांच्या व्याख्या, वृत्तीत त्यांचे स्पष्टीकरण व अखेरीला उदाहरणे असा क्रम आहे. या ग्रंथात सहा शब्दालंकार व पंचाहत्तर अर्थालंकार असून, त्या सर्वांचे वर्गीकरण केलेले आहे. रुय्यकाचे अलंकारविवेचन मम्मटाहून अधिक व्यापक आहे. मम्मटाने अलंकारांची लक्षणे दिलेली नाहीत; पण इतरांनी जे अलंकार सांगितले आहेत, त्यांची लक्षणे रुय्यकाने दिली आहेत. त्याव्यतिरिक्त विकल्प व विचित्र हे सर्वस्वी नवे अलंकारही त्याने सांगितले आहेत. काही ठिकाणी त्याने मम्मटाच्या मताला विरोधही दर्शविला आहे. एखादा अलंकार हा शब्दालंकार की अर्थालंकार हे ठरविण्यासाठी त्याने आश्रयाश्रयीभाव हा निकष सांगितला आहे, तर मम्मटाने अन्वय व्यतिरेक हा त्याचा निकष मानला आहे. रुय्यकाच्या अलंकारनिरूपणाची छाप त्याच्या उत्तरकालीन ग्रंथकारांवर पडलेली आहे. साहित्यदर्पणकार विश्वनाथ आणि कुवलयानंदाचा कर्ता अप्पय्य दीक्षित यांनी आपापल्या ग्रंथांच्या रचनेत रुय्यकाची मदत घेतली असावी.

अलंकारसर्वस्वाच्या दाक्षिणात्य परंपरेत असा एक समज रूढ आहे, की या ग्रंथातील सूत्रे रुय्यकाची आणि त्यावरील वृत्ती ही त्याचा शिष्य मंख याची आहे. परंतु या मताचे खंडन म. म. पां. वा. काणे यांनी केले आहे.

अलंकारसर्वस्वावर काश्मीरातल्या जयरथाची विमर्शिनी नावाची एक पांडित्यपूर्ण टीका आहे. याव्यतिरिक्त केरळातल्या समुद्रबंधाची आणि गुजरातच्या चक्रवर्तीची अशा आणखी दोन टीका आहेत. यांत जयरथाची टीका सर्वमान्य झाली आहे.

रुय्यकाने आणखी बरेच ग्रंथ रचले आहेत, त्यांची नावे अशी – अलंकारानुसारिणी, काव्यप्रकाशसंकेत, नाटकमीमांसा, व्यक्तिविवेकविचार, श्रीकंठस्तव, सहृदयलीला, साहित्यमीमांसा व हर्षचरितवार्तिक. या सर्व ग्रंथांपैकी सहृदयलीला, व्यक्तिविवेकविचार व काव्यप्रकाशसंकेत हे तीनच ग्रंथ आज उपलब्ध आहेत. सहृदयलीला या लहानशा ग्रंथात स्त्रियांच्या नैसर्गिक व कृत्रिम अलंकारांचे वर्णन आहे. काव्यप्रकाशसंकेत ही मम्मटाच्या काव्यप्रकाशावरील टीका असून, ती बहुधा त्या ग्रंथावरील पहिलीच टीका असावी. [सं. सा. शा. इ.; भा. सा. शा.; काव्यप्रकाश – संपा. श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रुस्तम (इ. स. चे १७ वे शतक) एक जसनाथी सिद्ध आणि संत. याच्या चरित्रासंबंधीची निश्चित माहिती अजून उपलब्ध नाही. राजस्थानच्या चूरू जिल्ह्यातील लिखमा देसर गावी गोरखनाथाच्या दृष्टांतानुसार त्याने धनराज नामक सिद्धाकडून दीक्षा घेतली आणि त्याच जिल्ह्यातील छाजुसर या गावी हा मरण पावला, असे सांगतात. यावरून तो चुरू जिल्ह्यातील रहिवासी असावा, असे वाटते. रुस्तमाला पीर, अवलिया, अशी विशेषणे लावलेली आढळतात. त्यावरून काहीजण त्याला मुसलमान ठरवतात. परंतु काहींच्या मते हा छतरी किंवा चौहान असावा. तो मुसलमान चौहान होता, असेही एक मत आहे.

औरंगजेब बादशाहाला त्याने आपल्या चमत्कारांनी प्रभावित केले होते, असे म्हणतात. बीकानेर व जोधपूर भागात जसनाथी अग्निनृत्य या नावाचे एक नृत्य होते. त्या वेळी जळत्या निखाऱ्यांतून काही लोक चालत जातात. काहीजण ओंजळीत व तोंडातही निखारे घेऊन चालतात. रुस्तमच्या आशीर्वादाने आपणांस अग्नीपासून त्रास होत नाही, असे ते लोक सांगतात.

रुस्तमची क्रिसन ब्यावलो या नावाची राजस्थानी हिंदीतील एक रचना प्रसिद्ध आहे. याशिवाय त्याने विविध रागदारीत अनेक पदे रचली आहेत.

जसनाथी संप्रदायाच्या उभारणीत याचा फार मोठा वाटा आहे. या संप्रदायातील लोक जसनाथाच्या खालोखाल याला मान देतात. पाहा – जसनाथी अग्निनृत्य. [वरदा, जाने. १९६५]

रूपक एक नाट्यप्रकार. रूप धातूवरून रूपक शब्द बनला आहे. कुठे कुठे रूपकाऐवजी रूप शब्दच आढळतो. नाट्य या अर्थी रूपक शब्द प्राचीन कालापासून वापरला जातो. संस्कृत साहित्यात रूपक व उपरूपक असे दोन भेद आढळतात. पहिला नाट्यभेद असून, दुसरा नृत्यभेद आहे. रूपकांची संख्या किती याविषयी नाट्याचार्यांमध्ये मतभेद आहेत. भरताच्या नाट्यशास्त्रात रूपकाचे पुढील दहा प्रकार सांगितले आहेत– (१) नाटक (२) प्रकरण (३) अंक (४) व्यायोग (५) भाण (६) समवकार (७) वीथी (८) प्रहसन (९) डिम व (१०) ईहामृग. अग्निपुराणात दहा रूपके व सतरा उपरूपके सांगितली आहेत (३३८.१–४). संस्कृत नाट्यशास्त्रात रूपकांच्या संख्येविषयी मतभेद असला, तरी रूपकाचे दहा भेद प्राय: सर्वांना मान्य आहेत. पाहा – दशरूपक.

रूप गोस्वामी (इ. स. १४९२–१५९१) एक महान साधू, वृंदावनातील सहा चैतन्यमतानुयायी गोस्वामींपैकी एक संत, उत्तम कवी आणि संस्कृत साहित्यशास्त्रकार. हा भारद्वाजगोत्री यजुर्वेदी ब्राह्मण होता. कुमारदेव व रेवती यांचा हा पुत्र. बंगालमधील रामकेली नामक गावी हे कुटुंब राहात होते. प्रसिद्ध वैष्णव सनातन गोस्वामी हा याचा मोठा बंधू होय. परंतु रूप गोस्वामीला चैतन्यांचा अनुग्रह प्रथम मिळाला म्हणून या संप्रदायात याला वडिलकीचा मान लाभला.

रूप गोस्वामी तरल बुद्धीचा, प्रतिभावंत व अभ्यासू होता. शिरोमणी विद्यावाचस्पतींच्याकडे त्याचे सारे अध्ययन झाले आणि तो सर्व शास्त्रांत पारंगत बनला. त्यानंतर बंगालचा बादशहा हुसेनशाहा याच्या दरबारात त्याला मानाची नोकरी मिळाली. त्याच्या कर्तबगारीवर खूष होऊन राजाने त्याला साकरमल्लिक अशी उपाधी दिली.

रूप गोस्वामीच्या घराण्यात राधा–कृष्णांची उपासना होती. त्यामुळे त्याचे मन भक्तिप्रवण बनले होते. सवड मिळताच तो सत्संग, शास्त्रचर्चा आणि हरिचिंतन करीत असे. चैतन्यांचे नाव त्याच्या कानावर येताच त्याला त्यांच्या दर्शनाची ओढ लागली.

पुढे रामकेली येथे त्याची व चैतन्यांची भेट झाली. नंतर चैतन्यांची कृपा होऊन तो संन्यासी बनला. महाप्रभूंच्या आदेशानुसार तो भक्तितत्त्वाचा प्रसार करण्यासाठी वृंदावनात राहावयास गेला. तिथल्या प्राचीन तीर्थांचा त्याने शोध घेतला. तिथे तो कधी ब्रह्म कुंडानजीक तर कधी नंदग्रामाजवळ राहत असे.

वृंदावनात गोमाटीला नावाच्या एका टेकडीवर रूप गोस्वामीला गोविंदाची मातीत गाडलेली मूर्ती सापडली. त्याने त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून तिची पूजा सुरू केली. पुढे राजा मानसिंहाने सहस्रावधी रुपये खर्चून त्या गोविंदाचे मंदिर बांधले.

रूप गोस्वामी हा भक्तितत्त्वाचा व रसशास्त्राचा महान पंडित होता. त्याने उज्ज्वलनीलमणी व भक्तिरसामृतसिंधू या ग्रंथांत भक्तिरसाचे शास्त्रीय विवेचन केले आहे. उज्ज्वलनीलमणीचे प्रयोजन सांगताना तो म्हणतो – शांत, प्रीती, प्रेय, वत्सल व उज्ज्वल या मुख्य रसांपैकी, भक्तिरसाचा राजा मधुर रस त्याचे विवेचन या ग्रंथांत केले आहे. उज्ज्वल रस म्हणजे त्याच्या मते मधुराभक्ती होय. म. म. काणे यांनी या ग्रंथासंबंधी म्हटले आहे की, या ग्रंथाचे दोन प्रकारांनी वैशिष्ट्य आहे. एक, याचा विषय कृष्णभक्ती हा असून, इतर साहित्यशास्त्रीय ग्रंथांत ज्याचे विवेचन आढळत नाही, ते यात आहे. दुसरे, यातील सर्व उदाहरणे श्रीकृष्णाला व त्याच्या चरित्राला अनुलक्षून आहेत. इतर साहित्यशास्त्रीय ग्रंथांत जी परिभाषा शृंगाररसाच्या संबंधाने वापरलेली आहे, ती या ग्रंथात जशीच्या तशी भक्तिरसाला लावलेली आहे.

या ग्रंथात १४५३ श्लोक असून, पंधरा प्रकरणे आहेत. नायिका, नायकभेद, सहायभेद, श्रीहरिप्रिया, श्रीराधा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दूतीभेद, सखीभेद, इ. पंधरा विषय आहेत. ग्रंथातील बरीचशी उदाहरणे रूप गोस्वामीने आपल्याच अन्य ग्रंथांतून घेतली आहेत. या ग्रंथावर जीव गोस्वामीची लोचनरोचिनी आणि विश्वनाथ चक्रवर्तीची आनंदचंद्रिका अथवा उज्वलनीलमणीकिरण म्हणून टीका आहे.

भक्तिरसामृतसिंधूत २१४१ श्लोक आहेत. पूर्व, पश्चिम, उत्तर व दक्षिण असे या ग्रंथाचे चार विभाग असून, त्यात भक्तिरसाचे सर्वांगीण विवेचन आहे. या ग्रंथामुळे भक्तिरसाला रसरूपाने प्रतिष्ठा लाभली, असे म्हणतात. यावर जीव गोस्वामीची दुर्गमसंगमनी, मुकुंददासाची अर्थरत्नाल्पदीपिका आणि विश्वनाथ चक्रवर्तीची भक्तिसारप्रदर्शिनी अशा तीन टीका आहेत.

या वाङ्मयाव्यतिरिक्त रूप गोस्वामीने विदग्ध माधव व ललित माधव ही दोन नाटके; लघुभागवत, नाटकचंद्रिका, दानकेलीकौमुदी, हंसदूत, उद्धवसंदेश, श्रीराधाकृष्णगणोद्देशदीपिका, स्मरणमंगलस्तोत्र, निकुंजरहस्यस्तव, पद्यावली व मथुरामहिमा हे ग्रंथ रचले आहेत. त्याचे हे वाङमय बंगालपासून व्रजमंडळापर्यंत चैतन्यमताच्या प्रसाराला कारणीभूत झाले आणि या संप्रदायाला तात्त्विक व वाङ्मयीन अधिष्ठान लाभले. मीराबाईने याच्याकडून दीक्षा घेतली होती, असा एक समज आहे. [चैं. म. व्र. सा.; भा. सं.; भा. सं. म.; सं. सा. शा. इ.; म. च. को.; हिं. वि. को.]

रूपचंद (इ. स. चे १७ वें शतक) एक जैन भक्तकवी व पंडित. हा अग्रवालवंशी, गर्गगोत्री होता. भगवानदास हे त्याच्या वडिलांचे व चाचो हे आईचे नाव होते. कुहा भागातील सलेमपूर नावाच्या गावी याचा जन्म झाला. ज्ञानप्राप्तीसाठी हा काशीला गेला आणि तिथे विद्वान बनून दरियापूरला परतला. नंतर आग्रा येथे जाऊन हा प्रवचने करू लागला. प्रसिद्ध कवी बनारसीदास हे त्याच्या प्रवचनांमुळे खूप प्रभावित झाले. त्यांनी आपल्या आत्मचरित्रात जैन धर्मीचा एक मोठा विद्वान म्हणून रूपचंदाचा गौरव केला आहे.

याने रूपचंदशतक, पंचमंगल, नेमिनाथरास व वणजारारासा या ग्रंथांची रचना केली आहे. याव्यतिरिक्त याने स्फुट पदेही रचली आहेत. रूपचंदशतकातील दोहे हे अध्यात्मपर आहेत. [म. ज्ञा. को.; हिं. सा. २.]

रूपड एक उत्खनित स्थान. हरियाणा प्रदेशातील अंबाल शहराच्या उत्तरेला साठ मैलांवर सतलज नदीच्या उत्तर तीरावर हे स्थान आहे. या स्थानाच्या नावासंबंधी एक आख्यायिका प्रचलित आहे. ती अशी–

प्राचीन काली या ठिकाणी एक नगर होते. मुसलमानांची आक्रमणे येण्यापूर्वी इथे रोकेश्वर नावाचा राजा राज्य करीत होता. त्याने रूपसेन नावाच्या आपल्या मुलाच्या नावावरून याला रूपनगर असे नाव दिले.

इथे भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याने इ. स. १९५३–५५ या कालखंडात उत्खनन केले. त्या उत्खननात मातीची भांडी, दगडी सुरे, तांब्याची उपकरणी व भांडी, मणी, भाजक्या विटा, बांगड्या, इ. वस्तू सापडल्या. या सर्व वस्तू हडप्पा व मोहेंजोदडो येथील वस्तूंसारख्या आहेत. इथे एक लहानसा शिक्का सापडला असून, तो हडप्पाच्या उत्खननात सापडलेल्या शिक्क्यासारखाच आहे. या वस्तूंचा काल सनपूर्व २००० ते १४०० वर्षे इतका मानला जातो.

या जागी केलेल्या उत्खननात निरनिराळ्या थरांत सहा भिन्न भिन्न कालखंडांतील संस्कृतींचे अवशेष सापडले आहेत. त्यांतील दुसरा कालखंड स. पू. ११००–७०० हा असून, तिसरा कालखंड स. पू. ६००–२००, चौथा कालखंड स. पू. २०० इ. स. ६०० व पांचवा कालखंड इ. स. ९००–१२०० हा आहे. सहावा कालखंड त्यानंतर सुरू होतो.

या उत्खननाच्या आधारे अभ्यासकांनी असा निष्कर्ष काढला आहे की, सिंधु–संस्कृतीचे निर्माते सिंधूच्या खोऱ्यातून उत्तरेकडे गेले व सतलजच्या काठाने रूपडला पोचले. यावरून सिंधु–संस्कृती पूर्वेकडे यमुनेपर्यंत पसरली होती, असे अनुमान करता येते. [मार्च ऑफ इंडिया, जाने.– फेब्रु. १९५४; हिं. वि. को.]

रूपनवमी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष नवमीला या व्रताला प्रारंभ करतात. चंडिका ही या व्रताची देवता आहे. याचा विधी असा– नवमीला उपवास, नक्त किंवा एकभुक्त करावे. कणकेचा त्रिशूळ करावा. रुप्याचे कमळ करून त्यात सुवर्णाचा बीजकोश करावा. नंतर या सर्व वस्तू दुर्गेला अर्पण कराव्या. पौष व त्याच्या पुढील महिन्यांत निरनिराळे प्राणी करून निरनिराळ्या पात्रांत ठेवून त्यांचे दान करावे. उदा० पौष महिन्यात सोन्याचा, चार दात असलेला हत्ती, माघ महिन्यात सोन्याचा मेंढा, फाल्गुनात कणकेचा मोर, इत्यादी. फल– चंद्रलोकप्राप्ती, अघोरपापनाश.

कृत्यकल्पतरूमध्ये या व्रताला ज्येष्ठ मासात प्रारंभ करावा, असे म्हटले आहे. [हिं. ध.; कृ. क. त.]

रूपपरिवर्तन काही ठराविक काळासाठी आपले मूळचे रूप सोडून दुसरे रूप धारण करणे, याला रूपपरिवर्तन असे म्हणतात. हे रूपपरिवर्तन प्रासंगिक असते. उद्दिष्ट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कार्य पूर्ण होताच ती व्यक्ती पुनश्च मूळ रूप धारण करते. या परिवर्तनामागे स्वेच्छा, शाप, सूडबुद्धी, भीती, इ. प्रवृत्ती आढळतात. मनुष्याचे पशुपक्षी होणे, पशु-पक्ष्यांचे मनुष्य होणे, एका माणसाने दुसऱ्या माणसाचे रूप धारण करणे, इ. गोष्टींचा यात समावेश होतो. स्वेच्छेने केलेल्या रूपपरिवर्तनात भोगेच्छा, दुसऱ्यांच्या कल्याणाची चिंता, इ. बाबी प्रधान असतात. इंद्राने केवळ अहल्येच्या प्राप्तीसाठीच गौतमाचे रूप घेतले होते (वा. रा. बाल. ४८). अर्जुनाच्या भल्याची इच्छा करणारा इंद्र ब्राह्मण-वेष घेऊन कर्णाकडे कवच-कुंडलांची मागणी करण्याकरिता आला होता (म. भा. वन. २००). सूर्यपत्नी संज्ञा हिने पतीचे तेज सहन होईना म्हणून घोडीचे रूप घेतले; परंतु सूर्याला ते कळताच त्यानेही घोड्याचे रूप घेऊन तिच्या ठायी अश्विनी-कुमारांची निर्मिती केली, अशी कथा मार्कंडेय पुराणात आहे (७७-७८). आपल्या साऱ्या सैन्याचा नाश होत आहे हे पाहून महिषासुराने क्रमाने महिष, सिंह, पुरुष, हत्ती आणि फिरून महिष अशी रूपे घेतल्याची कथा दुर्गासप्तशतीत आढळते (मार्कं. पु. ८३).

दमयंतीचे नलावर प्रेम आहे, असे समजल्यावर तिच्या अभिलाषेने इंद्र, अग्नी, यम व वरुण हे चार देव नलाचे रूप घेऊन तिच्या स्वयंवरमंडपात आले, अशी कथा महाभारतात आहे.

यक्ष, राक्षस, इ. अतिमानवी योनींचे तर रूपपरिवर्तन हे एक खास वैशिष्ट्य आहे. रामायणातील रामाकडे आलेली ताटका, महाभारतातील भीमाकडे आलेली हिडिंबा आणि भागवतातील कृष्णाकडे आलेली पूतना ही या संदर्भातील ठळक उदाहरणे होत. आपणास हवे ते रूप घेऊन वाटसरूंना मारणारे यक्ष अपण्णह जातकात पाहायला मिळतात.

रूपपरिवर्तन ही एक अतिमानवी व अद्‌भुत शक्ती मानलेली आहे. या घटनेतून पुराणांत तशाच लोकसाहित्यातही अनेक कथा निर्माण झालेल्या आहेत. (लिंगपरिवर्तन पाहा)

यातुविद्या हे रूपपरिवर्तनाचे एक साधन आहे. सुमित्र नामक एका व्यक्तीने दोन उंटिणींच्या डोळ्यांत अंजन घातल्यामुळे त्या दोन्ही उंटिणी सुंदर मुली बनल्या, अशी कथा जैनांच्या कथाकोशात आली आहे.

भक्तांवर आलेली संकटे निवारण करण्यासाठी देवही रूपपरिवर्तन करतो, अशी भक्तांची श्रद्धा असते. संत दामाजीवर आलेले दारुण संकट दूर करण्यासाठी विठ्ठलाने महाराचे रूप घेतले होते, अशी कथा महिपतीने भक्तिविजयात सांगितली आहे.

नामदेव, एकनाथ, निळोबा, इ. मराठी संतकवींनी रूपपरिवर्तनाचा आधार घेऊन कृष्णाच्या बाललीला वर्णिल्या आहेत. निळोबाने तर, कंसाच्या दरबारात श्रीकृष्णाच्या नाशाचा विडा उचलून रिठ्याच्या रूपात आलेला रिठासुर, हरळीचे रूप घेतलेला तृणावर्त, पाडस होऊन आलेला वत्सासुर, कावळा झालेला कागासुर आणि यमुनेच्या तीरी कृष्णघातासाठी टपून बसलेला बकासुर या सर्वांची रूपपरिवर्तनात्मक वर्णने केलेली आहेत.

रूपरसिक (इ. स. चे १८ वे शतक) निंबार्क संप्रदायाचा एक अनुयायी आणि भक्त. या संप्रदायाच्या रसिक भक्तांमध्ये याचे स्थान मोठे मानतात. हा मोठा दार्शनिक व धर्मप्रचारक होता. मात्र याचा जीवनवृत्तान्त फारसा मिळत नाही. हरिव्यास हा याचा गुरू आणि हरिजनदास हा याचा मुलगा होता एवढेच कळते.

रूपरसिकाने बृहदोत्सवमणिमाल, हरिव्यासयशामृत, नित्यविहारपदावली व लीलाविंशती असे चार ग्रंथ रचले आहेत. त्यांतील केवळ बृहदोत्सवमणिमाल हा ग्रंथ अप्रकाशित आहे. महावाणी नावाचा ग्रंथ त्याला हरिव्यासाने स्वप्नात दिला आणि श्रीभट्टाच्या युगल शतकाचे संपादन याने केले असे म्हणतात.

बृहदोत्सवमणिमालात १९२४ पदे असून, त्यात या संप्रदायातील उत्सवांची वर्णने आहेत. हरिव्यासयशामृतात हरिव्यासाचे गुणगान आणि रसिकसाधनेच्या सिद्धान्तांची चर्चा आहे. लीलाविंशती या प्रौढ ग्रंथात निकुंजलीला आणि तिची साधनापद्धती वर्णिली आहे. या संप्रदायाच्या उपासनापर साहित्यात या ग्रंथाला मोठा मान आहे. श्यामा व श्याम यांच्या एकांतातील लीलांचे भावपूर्ण चित्रण हा नित्यविहारपदावलीचा विषय असून, त्यात ७२ पदे आहेत.

राधा-कृष्ण हे प्रस्तुत कवीचे उपास्य असून, वृंदावन ही त्यांची राजधानी असल्याचे सांगितले आहे.

रूपरसिकाचे सारे ग्रंथ व्रज भाषेत असले, तरी तीत राजस्थानीचे व पंजाबीचे मिश्रण आहे. दोहा हा त्याचा आवडता छंद आहे. पण अरिल्ल, सवैय्या, इ. छंदही त्याच्या रचनेत पाहायला मिळतात. त्याच्या काव्यात भाषेपेक्षा भक्तीचाच प्रभाव अधिक दिसतो. [व्र. कृ. मा. भ.; त. प्र. हिं. कृ.; अ. श. व्र. प्रे.]

रूपसंक्रांतिव्रत • एक काम्य व्रत. संक्रांतीच्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. व्रतधारी व्यक्तीने प्रथम अंगाला तेल लावून स्नान करावे; नंतर एका सोन्याच्या भांड्यात तूप व सोने ठेवून त्यात आपले मुखावलोकन करावे. मग ते भांडे तसेच ब्राह्मणाला दान द्यावे. त्या दिवशी एकभुक्त करून सूर्याची पूजा करावी. उद्यापनाच्या वेळी सुवर्णासह दक्षिणेसह एक गाय दान द्यावी.

फल–एक हजार अश्वमेधांचे पुण्य आणि रूप, यौवन, सौं…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आयुरारोग्य व स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.; व्रतराज; व्र. प.]

रूपसत्र एक काम्य व्रत. फाल्गुन वद्य अष्टमीला मूळ नक्षत्र असेल, तर त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. याचा विधी असा – मूळ नक्षत्र, त्याचा अधिपती वरुण, चंद्र व विष्णू यांची पूजा करून होम करावा. गुरूचा सन्मान करावा. दुसऱ्या दिवशी उपवास करून विष्णूच्या पायापासून डोक्यापर्यंतच्या निरनिराळ्या अवयवांवर व केसांवर निरनिराळ्या नक्षत्रांची कल्पना करून पूजा करावी. सत्राचा शेवट चैत्र मासातील शुद्ध पक्षाच्या शेवटी करावा. उद्यापनाच्या वेळी विष्णूची पूजा व 'तद् विष्णोः परमं पदम्' या ऋग्वेदीय मंत्राने होम करावा (ऋ १.२२.२०). त्यानंतर गुरूला दक्षिणा द्यावी व ब्राह्मणभोजन घालावे. फल – स्वर्गप्राप्ती आणि स्वर्गातून परत आल्यावर राज्यप्राप्ती. [हि. ध.]

रूपावाप्ती एक मासव्रत. फाल्गुन वद्य प्रतिपदेपासून चैत्र पौर्णिमेपर्यंत हे व्रत करतात. शेषशायी विष्णूची पूजा हा या व्रताचा प्रधान विधी आहे. व्रतकालात एकभुक्त राहावे, जमिनीवर निद्रा घ्यावी, अखेरचे तीन दिवस उपवास करून पौर्णिमेला पूजा करावी आणि रुपे व वस्त्रांची एक जोडी दान द्यावी, असे सांगितले आहे. कोणत्याही पंचमीला दहा विश्वेदेवांची पूजा करावी, असाही या व्रताचा एक पर्यायआहे. फल – स्वर्ग व सौंदर्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

रूपेश्वरी एक देवता. हिचे वर्णन असे – वृषभावर आरूढ, जटा-मुकुट, चंद्र, त्रिशूल व सर्प धारण करणारी, रत्ने व मोती यांनी सुशोभित. श्वेतचंदनचर्चित. हिची पूजा प्रभवादी साठ वर्षांतल्या एकविसाव्या वर्षी केली असता ती सर्वकामफलप्रद होते, असे देवीपुराणात सांगितले आहे.

रेंग्मा नागा नेफामधील एक जमात. यांच्यांत उत्तर आणि दक्षिण असे दोन गट असून, त्यांची भाषादेखील भिन्न आहे. मात्र त्या दोहोंत सर्व सामाजिक व्यवहार होतात. दक्षिण गटामध्ये दोन कुळे असून, उत्तर गटात सहा कुळे आहेत. समाजपद्धती पितृसत्ताक आहे.

रेंग्मा नागांचा चेहरा पसरट असतो. त्यांचे केस काळे आणि सरळ असतात. हे लोक डोक्याची हजामत करतात. मुलींची लग्ने होईपर्यंत त्यांचे केस कापतात. यांचे डोळे करडे आणि कलते असतात. डोके वाटोळे असते. नाक जरा मोठे असते. शरीराचा बांधा सुदृढ असतो.

रेंग्मा नागा डोंगरी शेती करतात. त्यांची बहुतेक शेते टेकडीच्या पायथ्याशी असतात. भात मुठीने पेरतात व त्याच्यावर चमच्यासारख्या खुरप्याने माती टाकतात. हे लोक पेरणीपूर्वी नगदा नावाचा उत्सव करतात. कुदळ, कोयता, भाला व धनुष्यबाण ही यांची आयुधे होत. हे नेहमी हातात सोटा बाळगतात.

हे लढाऊ प्रवृत्तीचे आहेत. युद्धानंतर हे लोक शत्रूची मुंडकी कापून आणतात व ती झाडाला टांगून ठेवतात.

बांबूची बासरी हे यांचे आवडते वाद्य होय. ते शेजारी वसणाऱ्या अंगामी नागांकडून काही कलाकुसर शिकले आहेत. यांच्यांत निश्चित अशी सामाजिक व्यवस्था नाही. वस्तीत त्यांचा एक टोळीप्रमुख असतो; संघटना लोकशाहीप्रधान असते; पण शिस्त अजिबात नसते.

रेंग्मा नागांना दगडी स्मृतिस्तंभ उभारण्याची आवड असते. हे स्तंभ दोन प्रकारचे असतात. पहिल्या प्रकारात एक चौकोनी दगड एका वाटेवर ठेवतात आणि त्या दगडावर आणखी एक लहान दगड ठेवतात. एखाद्या नागाची बायको व मूल मेले असेल, तर त्यांच्या नावाने तो हे शिलास्मारक उभारतो. खालचा मोठा दगड बायकोसाठी व वरचा लहान दगड मुलासाठी असतो. एखाद्याचे शेत वर्षानुवर्षे नापीक राहिले, तर असा माणूस ती आपल्या मृत पित्याची अवकृपा समजून त्याच्या नावाने वरील प्रकारचे शिलास्मारक उभारतो. दुसऱ्या प्रकारचे स्मारक १८ दगडांचे असते. संततिहीन माणूस आपल्या नावाने हे स्मारक उभारतो व त्या वेळी दानधर्मही करतो. कित्येक वेळा रस्त्याच्या बाजूला ते वाटोळी किंवा अर्धवर्तुळ अशी दगडी आसनेही उभारतात.

ज्याने जमातीला बऱ्याच जेवणावळी घातलेल्या असतात, तो लाल पांढऱ्या रेषांची किनार असलेली निळी वस्त्रे वापरतो.

त्यांच्या काही समजुती अशा – सूर्य हा पुरुष व चंद्र ही स्त्री होय. पूर्वी सूर्याप्रमाणेच चंद्राचाही प्रकाश दाहक होता. पण देवाने चंद्रावर उरेंबी नावाचे झाड लावले आणि त्यामुळे चंद्रप्रकाश शीतल झाला. पृथ्वी ही आकाशाची बायको असून, त्या दोघांचा संयोग होतो, तेव्हा भूकंप होतो. एखादा मोठा माणूस मरण पावतो, तेव्हा सूर्याला ग्रहण लागते.

मृतिकप्रथा – हे लोक आपल्या खेड्यातच प्रेते पुरतात. एखाद्याने आपले प्रेत खेड्याबाहेर पुरावे, असे सांगितले असल्यास त्याला खेड्याबाहेर पुरतात. त्यानंतर खड्डा बुजवून त्यावर सपाट दगड ठेवतात. मृताचा आत्मा नगदाचा उत्सव होईपर्यंत वस्तीत राहतो व नंतर परलोकी जातो. फार थोडे लोक स्वर्गात जातात आणि बाकीचे सगळे भूमीखालच्या लोकात (अधोलोक) जातात अशी यांची समजूत असते. [से. इं. १९३१]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रेडा एक पशू. याला यमाचे वाहन असे मानतात. यमाबरोबर याची मूर्ती कोरतात. त्याचप्रमाणे दुर्गेच्या पायाखालीही याची आकृती असते. देवीने केलेल्या महिषासुराच्या वधाचे हे प्रतीक आहे, असे समजतात. देवीबरोबरच्या युद्धात महिषासुर देवीशी अनेक रूपांत लढला; पण महिषरूपातच देवीने त्याला मारले.

आश्विनातल्या नवरात्रात देवीपुढे रेड्याचा बळी देण्याची प्रथा आहे. त्याचप्रमाणे दक्षिणेत काही ग्रामदेवतांनाही रेड्याचा बळी दिला जातो. हा रेडा आधी वर्षभर मोकळा सोडतात, त्याला भरपूर खायला-प्यायला घालून वाढवतात आणि मग ठरलेल्या दिवशी त्याला देवीपुढे आणून त्याचे मुंडके तोडतात. हे काम सर्वत्र पूर्वास्पृश्य जातीचे लोकच करतात.

द्राविड पूजापद्धतीत महिषबळीला विशेष महत्त्व आहे. ते लोक नियोजित रेड्याचे मुंडके तर तोडतातच; शिवाय त्याची एक तंगडी तोडून ती त्याच्या तोंडात आडवी कोंबतात. आणि त्याच्या पोटातली आतडी काढून त्याच्या डोळ्यांवर पसरतात. दक्षिण भारतात ही बलिप्रथा कशी उगम पावली, त्याविषयी एक कथा आहे, ती अशी–

प्राचीन काळी एका अग्रहारात एक विद्वान ब्राह्मण राहत होता. एकदा परिया जातीचा एक अस्पृश्य तरुण त्याच्याकडे ब्राह्मणाच्या रूपाने आला आणि विद्या शिकण्यासाठी राहिला. तिथे तो सर्व शास्त्रे शिकला. त्या अवधीत त्या ब्राह्मणाच्या मुलीचे त्याच्यावर प्रेम जडले. दोघांचा विवाह झाला. त्यांना मुलेबाळेही झाली. काही दिवसांनी त्या पुरुषाची आई त्याच्याकडे राहायला आली. मुलाने तिला सोवळी करून घरात ठेवले. पुढे एक दिवस सुनेने शेवया केल्या. त्या पाहून म्हातारी म्हणाली, की हा पदार्थ जनावरांच्या आतड्यासारखा दिसतो. सून हे ऐकून मनात चरकली. तिने सारी चौकशी करून नवऱ्याच्या कपटाचा छडा लावला. खरी गोष्ट कळल्यावर तिला दुःख झाले. तिने माहेरी जाऊन वडिलांना विचारले. 'बाबा, एखादे भांडे विटाळले तर काय करावे ?' वडील म्हणाले. 'अग्नीत शुद्ध करावे.' ती समजली. तिने चिता पेटवून स्वतःला जाळून घेतले. पुढे तिचा आत्मा त्या गावात लोकांना त्रास देऊ लागला. लोकांनी तिला विचारले, की 'तुझे समाधान कशाने होईल ?' तिने सांगितले. 'माझ्या नवऱ्याचे माझ्यापुढे मुंडके तोडा, त्याचा एक हात तोडून त्याच्याच तोंडात आडवा कोंबा; त्याच्या पोटातली आतडी काढून ती त्याच्या डोळ्यांवर पसरा आणि त्याच्या डोक्यावर दिवा लावा.' लोकांनी तसे केले. मग तिची मुले तिच्यापुढे आली. अस्पृश्याच्या बीजाची मुले म्हणून तिने त्यांनाही मारायला सांगितले. पुढे तो नवरा दुसऱ्या जन्मी रेडा झाला आणि दरवर्षी त्या देवतारूप स्त्रीसाठी बळी जाऊ लागला. या कथेचे अन्यही काही पर्याय आढळतात.

रेड्यांच्या झुंजी लावणे हे प्राचीन मनोरंजनाचे एक साधन होते. राजे लोक यासाठी खास रेडे सांभाळून त्यांना तयार करीत. पंजाब, काठीयावाड, इ. प्रदेशांतील रेडे झुंजीसाठी प्रसिद्ध होते. ज्या रेड्यांच्या झुंजी लावायच्या त्यांना प्रथम चिन्हांनी माखीत, त्यांच्या गळ्यांत कडुनिंबाच्या पानांच्या माळा घालून त्यांना समोरासमोर उभे करीत. मग आरडाओरड करीत. लगेच रेडे एकमेकांना टक्कर देऊन लढू लागत. जो रेडा मैदान सोडून पळून जाईल, तो हरला असे समजत.

काही आदिवासी समाजांत रेड्यांना फार महत्त्व असते. गोंड लोकांत एखादा माणूस मरण पावला, तर ते परधानांना रेडा दान देतात. रेडा हे परधान जातीचे कुलचिन्ह आहे. काही ठिकाणी गावात रोगाची साथ उद्‌भवली, तर रेड्याची पूजा करतात. रेडा हे यमाचे वाहन आहे, ही समजूत या पूर्वभागांत असते. पाहा – महिष, महिषासुरमर्दिनी, यम, भैंसासुर, माहिष्मती.
[प्रा. भा. म.; द्र. गॉ. मॉ. हिं.; दि परधान्स ऑफ दि अप्पर नर्मदा व्हॅली–श्री. शामराव हिवाळे; लो. दं.; की. पॉ.]

रेड्डी आंध्र व म्हैसूर प्रदेशातील शेतकऱ्यांची एक जात. रट्ट म्हणजे राजा या शब्दाचा रेड्डी हा अपभ्रंश असून रेड्डींचा संबंध राष्ट्रकूटांशी जोडतात.

रेड्डींचे पुष्कळ पोटभेद असून, त्यांपैकी वेलनाटी, पाकनाटी, मोट्टी, कम्प, कापू, पेडकाना, येल्लम्म, कोडटी, हे प्रमुख आहेत.

शेती हा रेड्डींचा परंपरागत व्यवसाय आहे. बहुतेकांना सरकारकडून जमिनी मिळालेल्या आहेत. बाकीचे जमीनदारांकडून जमीन घेऊन ती अर्धेलीने कसतात. ज्वारी, तांदूळ, ऊस, नाचणी इ. पिके ते काढतात. शेतीशी संबंधित अशी त्यांची काही विधाने आहेत, ती पुढीलप्रमाणे–

पेरणीच्या हंगामात ते गोरूं देवरूची पूजा करतात. तयार होणाऱ्या पिकाला दृष्ट लागू नये, म्हणून ते पिकावर चुलीतली राख वगैरे शिपडतात. पीक भरघोस यावे म्हणून भाद्रपद शु. अष्टमीला जोकुमार किंवा कन्नेमंत या देवतेला मिष्टान्नाचा नैवेद्य दाखवतात. त्यासाठी एका विहिरीजवळ पांडवांचे प्रतीक म्हणून ते पाच खडे ठेवतात व त्यांची पूजा करतात. तसेच गंगम्म देवतेसाठी एक खण ठेवतात. मग त्या खणाने एखाद्या कुमारिकेची ओटी भरतात.

तेलुगू ही रेड्डींची मातृभाषा आहे. जे लोक म्हैसूर प्रदेशात पिढ्यान्‌पिढ्या राहिले आहेत, ते किंवा लिंगायत रेड्डी कन्नड भाषाच बोलतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहप्रथा– पुरुषाला आपल्या मोठ्या वहिणीच्या, मामाच्या किंवा आत्याच्या मुलीशी लग्न करता येते. रेड्डींच्या सर्व पोट-जातींचा विवाहविधी जवळजवळ सारखाच आहे. फक्त काही किरकोळ बाबतीत फरक आहे. लिंगायत रेड्डी जंगम पुरोहिताला बोलावतात, तर इतर रेड्डी ब्राह्मण पुरोहिताला बोलावतात. मुलामुलींची लग्ने त्यांचे आईबाप ठरवतात. लग्ने माघापासून पुढे पाच महिन्यांत होतात.

लग्नापूर्वी साखरपुडा होतो. त्यासाठी मुलाचे आईबाप आपल्या नातलगांसह मुलीच्या घरी जातात. ते आपल्या बरोबर मुलीला साडीचोळी, दागिने, अष्टमांगल्य आणि सुखमंचीच्या वस्तू घेतात. ६४ किंवा ५०० शेर तांदूळ, १६ किंवा ८० शेर डाळ, ५ किंवा १६० शेर तूप, ५ शेर गूळ, १० किंवा २० शेर सुपाऱ्या आणि वरीचशी विड्याची पाने एवढ्या वस्तू सुख-मंचीत येतात. मुलीच्या घरी जाताना वाटेत ते शुभ शकुन पाहतात. तसेच मुलीच्या घरात गेल्यावरही देवापुढे दिवा लावतात. तो संथपणे तेवत राहिला आणि पालीचे चुकचुकणे ऐकू आले, तर मुलाचा बाप आपल्या येण्याचे प्रयोजन जाहीर करतो. मुलीच्या बापाला जर हा संबंध पसंत असला, तर तो पुरोहिताला आणि आपल्या आप्तेष्टांना बोलावतो. मग मुलाची व मुलीची पत्रिका जुळते की नाही ते पाहतात. ती जुळली, तर मुलाचा बाप मुलीला साडीचोळी व दागिने देतो. मुलगी स्नान करून व दिलेले कपडे आणि दागिने घालून गणेशाची पूजा करते. नंतर मुलाची आई तिची ओटी भरते. मग सुखमंचीच्या सर्व वस्तू घोंगडीवर मांडून त्यांची पूजा करतात आणि त्या मुलीच्या बापाला देतात. मग लग्न पक्के ठरले असे समजतात. त्यानंतर दोन कागदांवर वधू-वरांची नावे व विवाहमुहूर्त लिहून पुरोहित त्यांची पूजा करतो आणि ते दोन्ही पक्षांना देतो. मग सर्वांना पानसुपारी देतात. रात्री किंवा दुसऱ्या दिवशी मुलीचे आईबाप मुलाकडच्या मंडळींना भोजन घालतात.

लग्न बहुधा मुलीच्या घरी होते. त्या आधी दोन-तीन दिवस वधू-वरांना आपल्या घरी तेल-हळद लावून स्नान घालतात. लग्नापूर्वी घराच्या दारात बारा खांबांचा मांडव उभारतात. त्यातला दूधखांब किंवा आदिकंभ हा जांभूळ अथवा अंजीर या वृक्षाचा असतो. मुलीचा मामा प्रथम त्या वृक्षाची पूजा करतो आणि मग लाकूड तोडतो. त्यानंतर समारंभपूर्वक खांब घरी आणतात. तो पुरण्यासाठी खणलेल्या खड्ड्यात थोडे दूध, नऊ प्रकारची धान्ये वगैरे घालतात आणि मग खांब रोवतात. या खांबाजवळच वधू-वरांना कंकण बांधतात आणि प्रत्येक विधी-नंतर वधू-वर त्याला नमस्कार करतात.

खांब पुरल्यानंतर ऐरणे नामक एक विधी होतो. गावच्या कुंभाराला पाच ते वीस मापांची भांडी करायला सांगितलेली असतात. ती तो गावातल्या देवळात किंवा आपल्या घरात ठेवतो. मग काही सुवासिनी पायघड्यांवरून ती भांडी आणण्यासाठी

रेड्डी पुरुष

जातात. त्या आपल्या बरोबर एक कलश, आरसा, थोडे तांदूळ, डाळ व गूळ एवढे साहित्य घेऊन जातात आणि ते कुंभाराला देतात. नंतर भांड्यांची पूजा करून त्या ती घेऊन येतात. त्या दिवशी त्या उपवास करतात.

यानंतर काही सुवासिनी वाजत-गाजत विहिरीवर किंवा नदीवर जातात आणि गंगा म्हणून तिथल्या पाण्याची पूजा करतात व त्या पाण्याने घागरी भरून आणतात.

लग्नाच्या दिवशी वधू व वर आपापल्या मातेसह स्नान करतात. नंतर नवीन पोषाख करून व हातात कट्यार घेऊन नवरा मुलगा लग्नमंडपात जातो.

वेलनाटी रेड्डी लोकांत नवरा मुलगा एका टोपलीत उजवा पाय ठेवून उभा राहतो. नवरी मुलगीही तशीच उभी राहते आणि त्या दोघांच्या मध्ये अंतरपाट धरतात. नंतर वधू आणि वर एकमेकांच्या मस्तकावर जिरे व गूळ टाकतात. मग अंतर-पाट दूर करतात आणि वधू-वर प्रथमच एकमेकांना पाहतात. लिंगायत पाकनाटी रेड्डी अंतरपाटावर बैलाचे चित्र काढतात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि मुहूर्ताच्या वेळी त्या चित्राच्या जागी एक फट करतात. आणि त्या फटीतून वधू-वरांनी एकमेकांकडे पाहायचे असते. नंतर नवरा मुलगा वधूच्या गळयात शंभर धाग्यांनी बनविलेली व हळदीने रंगवलेली ताळी बांधतो.

यानंतर धारे हा विधी होतो. यासाठी वर हातांची ओंजळ करतो आणि पुरोहित तिच्यात एक नारळ ठेवतो. वराच्या ओंजळीखाली वधू आपली ओंजळ धरते. पुरोहित नारळावर दूध व पाणी ओततो. ते वधूच्या ओंजळीत झिरपते. वधूचे आईबाप व निकटचे आप्तही नारळावर दूध व पाणी ओततात. यालाच धारे असे म्हणतात. नंतर वधू-वर अरुंधतीच्या ताऱ्याचे दर्शन घेतात. त्यानंतर ते केळीच्या पानावर पसरलेल्या तांदुळावर ठेवलेल्या पाच नारळांची पूजा करतात. या वेळी नातेवाईक त्यांना अहेर करतात. त्यानंतर वधू-वर दूधखांब, ऐरणे, भांडी व कुलदेवता यांना नमस्कार करतात. कुलदेवतेला नमस्कार करायला घरात जातेवेळी वराची बहीण दार अडवते आणि त्याला होणारी पहिली मुलगी आपल्या मुलासाठी मागते. त्याने तसे कबूल केल्यावर ती दारातून बाजूला होऊन त्याला वाट देते.

यानंतर पुढे चार दिवस जेवणावळी व काही लौकिक विधी होतात. पाचव्या दिवशी सकाळी नवरा मुलगा आपल्या वधूसह वारुळ असलेल्या ठिकाणी जाऊन, त्याची माती खणतो व वधू ती माती घरी आणते. नवरा मुलगा त्या मातीचे गोळे करून लग्नमंडपाच्या प्रत्येक खांबाशी ठेवतो. वधू त्या गोळयांना नैवेद्य दाखवते आणि दोघेही दूधखांबाला नमस्कार करतात. त्यानंतर तो खांब उखडतात. त्याच दिवशी दुपारी जातीच्या अधिकारसूचक अशा सिंहासनाची ते पूजा करतात. त्यानंतर वरात वरगृही जाते.

लग्नानंतर चौथ्या किंवा पाचव्या दिवशी मांडवाल किंवा गावाबाहेर नवरा मुलगा लुटुपुटीची नांगरणी करतो व पत्नीने दिलेले बी पेरतो. हा विधी त्यांच्या व्यवसायाचा सूचक आहे.

वेलनाटी रेड्डींखेरीज सर्व रेड्डी देज देतात. वेलनाटी रेड्डी देजाऐवजी सुखमंचीच्या वस्तु देतात.

मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली, की तिला तीन ते सोळा दिवस एका झोपडीत किंवा घरातल्या एका स्वतंत्र खोलीत ठेवतात. झोपडीच्या किंवा खोलीच्या दारात एक केरसुणी व वहाणा ठेवतात. त्यामुळे तिला भुताखेतांची बाधा होत नाही, अशी समजूत आहे. ती मुलगी रोज स्नान करते आणि गावच्या धोब्याने दिलेले कपडे घालते. या काळात रोज तिला गोडधोड जेवायला वाढतात. पहिल्या दिवशी संध्याकाळी तिची आई तिची ओटी भरते आणि नंतरच्या दिवसांत नातेवाईक स्त्रिया ओटी भरतात. दररोज संध्याकाळी सुवासिनी तिच्या भोवती जमतात व गीते गातात. मुलीचे लग्न झालेले असेल, तर गावचा धोबी तिच्या सासरी ही वार्ता कळवतो. मग तिचे सासूसासरे मुलीच्या माहेरी येतात व सासू तिची ओटी भरते. चौथ्या किंवा अकराव्या दिवशी मुलगी स्नान करते. परंतु तिला स्वयंपाकघरात किंवा देवघरात जाता येत नाही. सोळाव्या दिवशी तिच्यावर तीर्थ शिंपडतात आणि ती पूर्णपणे शुचिर्भूत होते. त्यानंतर ती राहत असलेली झोपडी जाळून टाकतात व तिने वापरलेली मातीची भांडी फोडून टाकतात.

मुलीचे लग्न झालेले असल्यास सोळा दिवसांनंतर मुलगी सासरी नांदायला जाते.

प्रसूतिप्रथा – लिंगायत रेड्डी जननाशौच पाळीत नाहीत. कम्म रेड्डी ते तीन दिवस पाळतात. स्त्रीची पहिली दोन बाळंतपणे बहुधा माहेरी होतात. नवजात अर्भकाच्या बेंबीभोवती डाग देऊन मग नाळ कापतात. घरासमोर खड्डा खणून त्यात वार पुरतात. सातव्या, नवव्या किंवा अकराव्या दिवशी यात खड्ड्यावर बसून बाळंतीण आंघोळ करते. तिच्या स्नानासाठी घागरभर पाणी, रिठे, हळद वगैरे वस्तू गावातल्या रेड्डी कुटुंबातून मिळतात. तिच्या स्नानानंतर त्याच जागी बाज उलटी करून धुतात व तिची पूजा करतात. त्यानंतर बाज घरात नेतात व बाळंतीण तिच्यावर झोपते. या वेळी जमलेल्या सर्व लहान मुलांना स्नान घालतात व पोहे वाटतात. तसेच, जमलेल्या स्त्रियांना हळदकुंकू व विडे देतात. नंतर दुसऱ्या घरचा पाळणा मागून आणतात व त्यात मुलाला झोपवतात.

त्याच दिवशी किंवा महिना पुरा होण्याच्या आत कुठल्याही दिवशी मुलाचे नाव ठेवतात. मुलाचा मामा मुलीचे नामकरण करतो. सर्वसाधारणपणे ग्रामज्योतिष्याच्या सल्ल्याने नाव ठेवतात. तो बहुधा वाडवडिलांपैकी एखाद्याचे किंवा कुलदेवतेचे नाव सुचवतो.

तिसऱ्या, सातव्या किंवा बाराव्या महिन्यात मुलाचे जावळ करतात. त्यासाठी वृक्षराजीत किंवा डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या मुनीश्वराची पूजा करतात व त्याला नैवेद्य दाखवतात. काही वेळा त्याला पशुबळीही देतात.

बहुतेक सर्व रेड्डी लोकांत जातिनियमांविरुद्ध वर्तन करणाऱ्या लोकांना शासन करण्यासाठी कट्टेमणे किंवा कोर्ट असतात. त्यांच्या अध्यक्षाला यजमान असे म्हणतात. त्याच्या हाताखाली भंडारी नामक एक नोकर असतो. कोडाटी रेड्डींच्या कट्टेमणे प्रमुखाला गौड असे नाव आहे.

देवधर्म – कम्म रेड्डी हे वैष्णव असून, वेलनाटी हे लिंगायत आहेत. बाकीचे सर्व रेड्डी शैव व वैष्णव अशा दोन्ही देवतांना भजतात. त्याव्यतिरिक्त वेंकटरमण, येल्लम्म, मल्लम्म, मुनिश्वर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुरुमूर्ती, सूर्य, इ. अनेक अन्य देवतांनाही ते भजतात.

मर्तिकप्रथा – लिंगायत पाकनाटी रेड्डी आणि रेनाटी रेड्डी हे प्रेते पुरतात. ते प्रेत हातांवरून वाहून स्मशानात नेतात. ते मृताशौच पाळीत नाहीत. तिसऱ्या आणि अकराव्या दिवशी ते मृतात्म्याला अन्न अर्पण करतात.

लिंगायत नसलेले पाकनाटी रेड्डी हे प्रेते जाळतात किंवा पुरतात. कर्तबगार स्त्री-पुरुष वृद्धापकाळात मेले असता; त्यांना जाळतात आणि बाकीच्यांना पुरतात. अविवाहित स्त्री-पुरुषांना पालथ्या स्थितीत पुरतात. जाळलेल्या व्यक्तीच्या अस्थी एखाद्या झाडाखाली पुरतात. अकराव्या दिवशी मृताचे श्राद्ध करतात.

वेलनाटी रेड्डी मृतांना जाळतात आणि शूद्रकमलाकर या ग्रंथात सांगितल्याप्रमाणे अंत्यक्रिया करतात.

क्रम्म रेड्डी विवाहित मृतांना जाळतात व इतरांना पुरतात. मृताशौच दहा ते पंधरा दिवस पाळतात. जे लोक दहा दिवस मृताशौच पाळतात, ते बाराव्या दिवशी वेंकटरमणाच्या मंदिरात जाऊन त्याची पूजा करतात आणि लोण्याचे तीन गोळे मंदिराच्या दारावर फेकतात. त्या वेळी ते म्हणतात, की 'पूर्वी मृताने तुला दगड मारले होते, त्याचे प्रायश्चित म्हणून आम्ही तुला लोण्याचे गोळे अर्पण केले.' नंतर ते पुजाऱ्याला स्वर्गाची दारे उघडण्याची विनंती करतात.

मंगळवारी किंवा शुक्रवारी व्यक्ती मरण पावली असता, तिच्या बरोबर कोंबडीचे एक पिल्लू पुरतात. तसेच, सवाष्ण स्त्रीचा मृत्यू झाला असता, तिची ओटी भरतात आणि ओटीचे सामान तिच्या बरोबर पुरतात.

सर्व रेड्डी नववर्षदिनी, भाद्रपद वद्य पक्षात, दीपावलीच्या दिवशी किंवा महानवमीला सर्व पितरांचे श्राद्ध करतात.

काही रेड्डी पूर्वीच्या म्हैसूर संस्थानातून विजापूर, धारवाड व बेळगाव या जिल्ह्यांत येऊन स्थायिक झाले आहेत. फार पूर्वी त्यांनी हे स्थलांतर केल्यामुळे मूळच्या म्हैसूर प्रदेशातील रेड्डींपेक्षा यांचे रीतिरिवाज वेगळे आहेत. रेड्डींच्या अनेक शाखांपैकी नामद रेड्डी या भागात राहतात.

नामद रेड्डी – नामद रेड्डींत छत्तीस बेडगू म्हणजे पोटविभाग आहेत. एकाच बेडगूतील स्त्रीपुरुषांचा विवाहसंबंध होत नाही. शेती हा यांचा परंपरागत व्यवसाय असून, काही लोक मात्र शेतमजुरी व इतर काही व्यवसाय करतात. बहुतेकांच्या स्वतःच्या जमिनी आहेत. शेतीसंबंधीचे त्यांचे अनेक उत्सव असतात. पावसाळ्यात पेरणी करण्याच्या दिवशी किंवा त्याच्या आदल्या दिवशी ते नांगरांची पूजा करतात. पेरणीचा दिवस ग्रामजोशी काढून देतो. घराच्या अंगणात किंवा शेतात नांगराची पूजा करतात. अंगणात पूजा करण्यापूर्वी नांगर स्वच्छ धुतात व त्याला लक्ष्मीचे प्रतीक समजून लुगडे-चोळी नेसवतात. काही वेळा त्याच्यावर लक्ष्मीचा मुखवटा चढवतात. नांगर शेतात नेताना वाटेत भूताखेतांना संतुष्ट करण्यासाठी नारळ फोडून खोबऱ्याचे तुकडे डावी-उजवीकडे टाकतात. पेरणीला सुरवात करण्यापूर्वी क्षेत्रपालाची पूजा करतात. तसेच बैलांना नांगराला जुंपण्यापूर्वी त्यांच्या कपाळाला विभूती लावून त्यांना नमस्कार करतात. मग त्यांना गोडधोड खाऊ घालतात आणि त्यांच्यावरून भाकरीचा तुकडा ओवाळून टाकतात.

भाद्रपद अमावास्येला ते करगपूजा म्हणजे लक्ष्मीची पूजा करतात. त्या दिवशी ते स्वयंपाक करून शेतात नेतात आणि चार दिशांना त्यांतला थोडा भाग टाकून, उरलेला घरातील सर्वजण जेवतात.

आश्विन पौर्णिमेला त्यांचा सिगी हुन्नवी हा विधी असतो. त्याच्या आधी दसऱ्याला काही सुवासिनी तांब्याच्या ताम्हनात थोडी ज्वारी घेऊन गावातल्या कुंभाराच्या घरी जातात आणि ज्वारीच्या बदल्यात त्याच्याकडून सहा ते आठ इंच उंचीचे मातीचे दोन शंकू व दोन इंच उंचीचे पाच शंकू घेऊन घरी येतात. मोठे शंकू हे घरातील माता-पिता व लहान शंकू म्हणजे त्यांची मुले यांची प्रतीके होत. या शंकूंची कोनाडयात स्थापना करून पूजा करतात व त्यांना नैवेद्य दाखवतात. पौर्णिमेच्या दिवशी शंकूंच्या अंगावर एका आड एक असे चुन्याचे व शेंदराचे पट्टे ओढतात आणि त्यांची पूजा करतात. दुपारी जेवण घेऊन शेतात जातात व तिथे भोजन करतात. त्यापूर्वी घरून आणलेल्या चार लहान शंकूंची ते शेतात स्थापना करतात आणि त्यांना नैवेद्य दाखवतात. दुसऱ्या दिवशी सुवासिनी उरलेल्या शंकूंचे नदीत किंवा तळयात विसर्जन करतात.

धान्याचे खळे तयार झाले, की त्यात एक खांब पुरतात व त्याची पूजा करतात. संध्याकाळी बैल जुंपून खळयात मळणी करतात. त्या वेळी ते डांगोरा नामक गीते गातात.

विवाहप्रथा – रेड्डींना आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. मुलीचे आईबाप सधन असल्यास ते मुलाला हुंडा देतात. गरीब मुलाचे आईबाप मुलीच्या आईबापांना देज देतात. लग्न ठरले, की मुलीच्या घरी साखरपुडा होतो. त्या वेळी मुलाचा बाप मुलीला साडीचोळी व एखादा दागिना देतो. मग मुलीची खारका, सुपाऱ्या, हळकुंडे, विडयाची पाने व केळी यांनी ओटी भरतात. नंतर मुलीचा बाप 'माझ्या मुलीचे तुझ्या मुलाशी लग्न ठरले', असे म्हणून वरपित्याच्या उपरण्यात एक सुपारी बांधतो. वरपिताही तसेच करतो.

लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण पुरोहित काढून देतो. लग्नाच्या आधी दोन-तीन दिवस वधूच्या व वराच्या घरी देवकार्य होते. लग्नाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आदल्या दिवशी वराला हळद लावतात व ऐरणे नामक एक विधी करतात. त्यासाठी एका चौकोनाच्या चारही कोपऱ्यांवर पाण्याने भरलेले चार घडे ठेवतात व त्यांच्या भोवती सुताचे काही वेढे देतात. त्या चौकोनात नवरा मुलगा, त्याचे आईबाप व दोन सुवासिनी बसतात आणि काही सुवासिनी त्यांना गरम पाण्याने स्नान घालतात. नंतर त्यांना वाकायला सांगतात व नथ असलेले ताम्हन त्यांच्यावर धरून, त्या नथीवर पाणी ओततात. मग घड्यांभोवतीचे सूत सोडवतात व लग्नमंडपाच्या एखाद्या खांबाला बांधतात. त्यानंतर काही सुवासिनी उरलेली हळद घेऊन वाजतगाजत मुलीच्या घरी जातात आणि मुलीलाही मुलासारखेच स्नान घालतात.

रेड्डी स्त्री

लग्नाच्या आदल्या रात्री वरपक्षाकडील व वधूपक्षाकडील काही लोक एखाद्या देवळात जमतात आणि एकमेकांवर अबीर किंवा बुक्का उधळतात. वधूपिता वराचे पाय धुतो व त्याला पोषाख देतो. मग नवरा मुलगा घोड्यावर बसून मिरवीत घरी जातो. हा सीमान्तपूजनाचाच एक प्रकार होय.

लग्नाच्या दिवशी सकाळी रुईची एक फांदी आणून देवळात ठेवतात. मग स्त्री–पुरुष देवळात जाऊन तिची पूजा करतात आणि ती घरी आणून लग्नमंडपाच्या एका खांबाला बांधतात. याला हालकंब विधी असे म्हणतात.

लग्न मुलीच्या घरी होते. अंतरपाट बाजूला केल्यावर नवरा मुलगा वधूच्या मस्तकावर अक्षता टाकतो व तिच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो. लग्नातील हा आवश्यक विधी होय. संध्याकाळी जमलेल्या लोकांना जेवण घालतात.

विधवेचा विवाह मंगळवार वगळून कुठल्याही शुभ दिवशी होतो. वधू-वर प्रथम एकमेकांच्या गळ्यात फुलांचे हार घालतात व नंतर नवरामुलगा वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो.

देवधर्म – नामद रेड्डी हे वैष्णव असून, व्यंकटेश हा त्यांचा कुलदेव आहे. याशिवाय ते येल्लम्म, ग्रामव्व, केरेव्व, मारम्मा, इ. देवतांनाही भजतात. ते तिरुपतीची यात्रा करतात.

मर्तिकप्रथा -- हे लोक विवाहित मृताला जाळतात. अविवाहित मृताला मात्र बसलेल्या स्थितीत पुरतात. विवाहित मृताचे प्रेत तिरडीवरून स्मशानात नेतात. प्रेतावर गुलाल व विड्याची पाने उधळतात. प्रेत जाळायचे असेल, त्या ठिकाणी मृताचा उत्तराधिकारी पाच पैसे पुरतो. नंतर त्या जागी चिता रचून, तिच्यावर प्रेत ठेवतात. जमलेले लोक प्रेतावर दूर्वा वाहतात आणि मृताचा उत्तराधिकारी चितेला अग्नी देतो. त्या वेळी मंत्र व टाळ्या वाजवतात आणि मृत मनुष्य स्वर्गात गेला, असे म्हणतात. प्रेत जळल्यावर सर्वजण स्नान करून घरी परततात. संध्याकाळी मृताच्या घरी, तिरडी धरलेल्या लोकांना जेवण देतात. तिसऱ्या दिवशी मृताच्या अस्थी गोळा करून नदीत टाकतात. प्रेत जाळलेल्या जागी मृताची मातीची प्रतिमा करून स्थापतात व त्याच्या आवडीचे पदार्थ करून प्रतिमेपुढे ठेवतात. नवव्या, नवव्या किंवा अकराव्या दिवशी मृताचे कपडे व दागिने धुतात आणि घरातल्या देवापुढे ठेवतात. त्याच वेळी भात आणि पुरणपोळी या पदार्थांचा नैवेद्य देवांना दाखवतात. माणूस मेल्यानंतर महिन्याच्या आत त्याचा टाक घरातल्या देवांत ठेवतात व त्याची पूजा करतात.

दर महिन्यात मृत्युतिथीला भुताखेतांना अन्न अर्पण करणे असे वर्षभर करतात. हे लोक श्राद्ध मात्र करीत नाहीत. पाहा- कम्म, कापू. [ट्रा. का. बाँ.; मै. ट्रा: का.]

रेण (इ. स. १७४१—१८७१) उदासी संप्रदायाचा एक अनुयायी. याचा जन्म काश्मीरमध्ये झाला. सावित्री व हरिवल्लभ यांचा हा एकुलता एक मुलगा होय. हा जातीने गौड ब्राह्मण होता. याचे संस्कृतचे सर्व शिक्षण घरीच झाले. शिक्षण झाल्यावर याचे मन घरात रमेना. म्हणून एक दिवस हा घर सोडून लाहोरला गेला. तिथे काही काळ राहून तो पंजाबातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माळवा भागाकडे निघाला. वाटेत त्याची आणि उदासी साधू बाबा साहिबदासाची भेट झाली. साहिबदासाने त्याला रामनामाचा मंत्र दिला. साहिबदास भूदन गावी राहत होता. त्याच्या मृत्यनंतर रेणही त्याच गावी राहू लागला.

गुरूच्या सान्निध्यात असतानाच रेणच्या धार्मिक शिक्षणाबरोबर त्याच्या काव्यकलेचाही विकास झाला. माळवा भागात काही काळ राहिल्यावर तो गुर्वाज्ञेने उदासी मतप्रचारासाठी बाहेर पडला. त्याने सिंध, पंजाबातील गुजराणवाला जिल्हा, व महाराष्ट्राच्या अकोला जिल्ह्यातील बाळापूर या ठिकाणी अनेक डेरे स्थापन केले. गुजराणवाला डेऱ्यात याची व रणजितसिंहाची भेट झाली होती. या भेटीत रेणाच्या धर्मविचाराने रणजितसिंह प्रभावित झाला आणि त्याने त्या डेऱ्याच्या खर्चासाठी दोन गावांचे दान दिले. उदासी अनुयायांना संघटित करण्यासाठी रेण याने उदासी बडा आखाडा व पंचायती आखाडा असे आखाडे स्थापन केले. या आखाड्यांची नियमावली रेणानेच तयार केली होती. त्याने मद्रास, उत्तर प्रदेश, नेपाळ, बलुचिस्तान, इ. अनेक प्रदेशांच्या यात्रा केल्या. तो कुंभमेळ्यासाठीही उपस्थित राहत असे.

रेणाने उदासीस्तोत्र, गुरुनानकविजय, मनप्रबोध, वचनसंग्रह अथवा अमृतसागर, उदासीबोध व नानकबोध हे ग्रंथ रचले आहेत. यांतील मनप्रबोध व वचनसंग्रह हे दोन ग्रंथ श्री संत रेण ग्रंथावली म्हणून प्रकाशित झाले आहेत. सर्व ग्रंथांची भाषा व्रज असून लिपी गुरुमुखी आहे.

गुरुनानकविजय हा याचा सर्वांत मोठा ग्रंथ होय. यात प्राधान्याने गुरू नानकाचे चरित्र आहे. या ग्रंथात ३४७ अध्याय आणि २४३८२ छंद आहेत. याच्या निर्मितीसंबंधी भूदन गावी एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी –

वयाची शंभरी उलटल्यावर रेण देहत्यागासाठी नदीवर चालला असता महर्षी वाल्मीकीने त्याला अडवले आणि म्हटले. 'तू देहत्याग न करता परत जा आणि गुरुनानकविजयाची रचना कर.' या आख्यायिकेचा उल्लेख त्याच्या ग्रंथातही पाहायला मिळतो.

मनप्रबोधाचा विषय मनाला बोध असा आहे. उदासी – बोधात वेदान्ताची चर्चा आहे. शिष्य प्रश्न विचारतो आणि गुरू त्याचे शंकानिरसन करतो, असे या ग्रंथाचे स्वरूप आहे. या ग्रंथाला प्राणसंगली नामक ग्रंथाचा आधार आहे. प्राणसंगली हा ग्रंथ गुरु नानकाचा आहे असे म्हणतात.

रेण बाळापूरच्या डेऱ्यात राहत असताना मराठी शिकला असावा, कारण त्याची काही मराठी स्फुट कविताही मिळते. रेणाचे अखेरचे दिवस भूदन गावी गेले. तिथेच त्याची समाधी आहे. या गावात त्याच्या तपस्वी जीवनाशी आणि काव्याशी निगडित असलेल्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

पहा – उदासी संप्रदाय. [उ. सं. सं. रे.]

रेणुका एक देवता. जमदग्नीची पत्नी व परशुरामाची आई. हिचे चरित्र ही एक गूढ समस्याच आहे. रेणुका-माहात्म्य ग्रंथात हिच्यासंबंधी पुढील माहिती आहे –

प्राचीन काळी कान्यकुब्ज देशात इक्ष्वाकुवंशीय रेणू नावाचा एक राजा राज्य करीत होता. त्याला प्रसेनजित असे दुसरे नाव होते. रेणूने कन्याकामेष्टी केली असता ही कन्या यज्ञाग्नीतून वर आली म्हणून त्याने तिचे नाव रेणुका असे ठेवले. कामली हे तिचे पाळण्यातले नाव आहे. कामली मोठी झाल्यावर रेणूने भागरथीक्षेत्री तिचे स्वयंवर मांडले. स्वयंवरात तिने जमदग्नीला वरले. हिची उत्पत्ती कमळापासून झाली असून, रेणू हा तिचा भ्राता आणि सोमप हा पिता असल्याचे महाभारतामध्ये सांगितले आहे. याच ग्रंथात अन्यत्र प्रसेनजित हा तिचा बाप असल्याचे म्हटले आहे. रेणुका ही विदर्भ देशाच्या राजाची मुलगी होती, असे कालिका पुराणात म्हटले आहे. रेणुका व जमदग्नी या जोडप्याला रुमावंत, सुषेण, वसू, विश्वावसू व परशुराम असे पाच मुलगे झाले.

स्कंद पुराणातल्या सह्याद्रिखंडानुसार तिची कथा अशी – शिवाचा वर मिळवून ती पृथ्वीवर उतरली आणि रेणूच्या यज्ञातून प्रकटली. तिच्या स्वयंवराच्या वेळी अनेक राजे लग्नमंडपात उपस्थित होते. सर्वांना डावलून तिने जमदग्नीला वरले. हा अपमान समजून अन्य राजांनी रेणूवर हल्ला केला. त्या वेळी जमदग्नीने प्रतिहल्ला करून सर्वांना पळवून लावले आणि मग मोठ्या समारंभाने त्यांचा विवाह झाला. या पुराणात पुढे रेणुकेची व चित्ररथ गंधर्वाची प्रसिद्ध कथा सांगितली आहे.

राजकन्या, ऋषिभार्या व वीरमाता या त्रिविध भूमिकेसाठी रेणुका प्रसिद्ध असली, तरी तिच्या मूल स्वरूपासंबंधी आजवर पुष्कळ वैचारिक मंथन झाले आहे.

कर्नाटकात रेणुकेची पूजा यल्लम्मा या नावाने होते. ही यल्लम्मा आदिशक्ती भूमीतून निर्माण झाली अशी श्रद्धा आहे. श्री. शं. बा. जोशी या संबंधात म्हणतात, की कर्नाटकात रूढ असलेल्या यल्लम्माच्या पूजाप्रकारावरून या उत्सवात रेणुकेपेक्षा भूमातेचीच पूजा अभिप्रेत दिसते. चैत्रपौर्णिमेला होणाऱ्या उत्सवात ही देवी सुवासिनी होते आणि मार्गशीर्षपौर्णिमेला ती विधवा होते, अशी समजूत आहे. मार्गशीर्षात पिकांची कापणी होऊन भूमीचे सौभाग्य नष्ट होते; तर चैत्रमासापासून वसंत–ऋतूत झाडांना पालवी फुटते. यात ऋतूंची, निसर्गाची पूजाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुळात असावी असे दिसते आणि या ऋतूंच्या पूजेचा आरोप या देवीवर केलेला दिसतो.

श्री. रा. चिं. ढेरे म्हणतात– रेणुका ही मूळची दक्षिणेतील यल्लम्मा किंवा यमाई. तिकडच्या 'सात–बहिणी' म्हणून गाजलेल्या ग्रामदेवतांपैकी एक. ती मूळची भूमिदेवता. वारूळ हे तिच्या उपासनेचे प्रतीक. नागफणी आणि राजदंड हे दोन्ही भूमिपालक असल्यामुळे त्यांनाही तिच्या उपासनेत विशेष प्रतिष्ठा आहे. वारूळ हे रेणुमय असल्यामुळे या दक्षिणी ग्रामदेवतेचे रेणुका हे संस्कृत नाव साधले गेले आणि पूर्वप्रसिद्ध रेणुकेचे, परशुरामाची माता व जमदग्नी ऋषीची पत्नी असलेल्या रेणुकेचे चरित्र या देवीला चिकटवून दिले गेले.

रेणुराजाची मुलगी म्हणून रेणुका हा संबंध उत्तरकालीन असावा, अशी शंका श्री. चिं. ग. कर्वे व श्री. गस्टाव ऑपर्ट यांनी व्यक्त केली आहे. रेणुका ही द्राविड वंशातली असावी, असे श्री. ना. गो. चापेकरांनी म्हटले आहे. द्राविड लोकदेवतांच्या पूजापद्धतीत मद्य–मासांचा विनियोग असतो. रेणुकेच्या पूजापद्धतीतही मद्य–मांस उपयोजिले जात असे, असे लीळाचरित्रातील उल्लेखावरून कळते.

परशुरामाने माहूरक्षेत्री जमदग्नीचा अग्निसंस्कार केला आणि रेणुका तिथे सती गेली, म्हणून माहूर हे रेणुकेचे प्रमुख स्थान मानतात. या तिच्या स्थानाला मूळपीठ असे म्हणतात. इथे या देवीचा तांदळा आहे. तिचा प्रसाद म्हणून विड्याची पाने कुटून देण्याची पद्धत आहे. याशिवाय कर्नाटकात व महाराष्ट्रात तिची बरीच ठिकाणे आहेत. त्यांत बेळगाव जिल्ह्यातील सौंदत्तीचे व कार्ले लेण्याजवळचे एकवीरेचे ठाणे ही प्रसिद्ध आहेत.

एकवीरा हे रेणुकेचेच एक नाव आहे. यल्लम्मानंतरचे हे संस्कृतिकरण असावे, असे श्री. शं. बा. जोशी यांचे मत आहे. संत एकनाथांची ही कुलदेवता होती. यमाई हे रेणुकेचेच एक पर्यायनाम आहे. रामानंद, विष्णुदास यांसारख्या अनेक भक्तांनी तिचा महिमा खूप वाढविला. विष्णुदासांनी तर तिच्यासंबंधी शेकडो पदे लिहिली आहेत. तिच्या दर्शनाची ओढ व्यक्त करणारे त्यांचे एक पद असे–

अंबे तुझ्या भेटीसाठी । धीर धरवे ना पोटी ॥
तुझ्या पाहता रूपाला । जीव माझा वारा प्याला ॥
उभा राहिलो अंगणी । तुझी लागली जोगणी ॥
अंबे सांडिले घरदार । झालो जिवावर उदार ॥
प्रावर्णाच्या केल्या चिंध्या । सोडिली मी स्नानसंध्या ॥
यज्ञयागादि तर्पण । पायी तुझ्या समर्पण ॥
विष्णुदास हेचि म्हणे । पाय पाहू दे चिमणे ॥

गोंधळी, जोगती–जोगतिणी, भुत्ये हे रेणुकेच्या उपासक वर्गांपैकी होत. त्यांच्या मुखी सदैव या देवीची गाणी असतात. पाहा – एकवीरा, मातंगी, जोगती–जोगतीण, मरीआई, माहूर, यल्लम्मा. [देवीकोश खंड २; या. का. म.; सह्याद्रि; म. लो. उ.; चित्पावन; म. सं.; प्रा. च. को.; गा. दै.]

रेणुकाचार्य वीरशैवांचा एक आचार्य. याच्याविषयीच्या आख्यायिका अशा– याने अगस्त्याला वीरशैव मत उपदेशिले, लंकेत जाऊन बिभीषणाची पूजा स्वीकारली व त्याच्या पुढे एकाच वेळी तीन कोटी रूपे धारण केली. त्याने उज्जयिनीच्या विक्रमाला दिव्य खड्ग दिले; आद्य शंकराचार्यांना 'चंद्रमौलीश्वर' नामक लिंग दिले; गोरक्षाचे गर्वहरण केले; कांची क्षेत्रातील वरदराज नामक विष्णुमूर्तीचे हालते मस्तक स्थिर केले; चोलराजाला शिष्य केले; नीलगल चक्रवर्तीची सत्त्वपरीक्षा करून त्याला मोक्ष दिला. चौदाशे वर्षे जगून व ए… मुनीला आपला उत्तराधिकारी करून कुल्यपाक क्षेत्रातल्या शिव-लिंगात याने स्वतःला विलीन केले. [वीरशैवरहस्य]

रेणुकातीर्थ हे तीर्थ हिमालयाच्या खालच्या श्रेणीत आहे. सिमल्याहून ददाहूला जायचे आणि तिथून ए… नदी उतरायची. पलिकडे एका हाकेच्या अंतरावर रेणुका नावाचे एक कुंड व परशुराम तलाव आहे. तिथे त्या दोघांची मंदिरेही आहेत. जवळच जमदग्नी पर्वत आहे. कार्तिक शु… अष्टमीला तिथे मोठी यात्रा भरते. [कल्याण–तीर्थांक]

रेणुकाशबरी–विद्यामंत्र सद्यः फलप्राप्ती करून देणारा … मंत्र. यात ॐ, श्रीं, ह्रीं, … ही पंचबीजाक्षरे असतात. याचा ऋषी भैरव, छंद पंक्ती … देवता रेणुकाशबरी ही आहे. मंत्रातील पंचाक्षरांनी षडंगन्यास केल्यावर, पीठदेवतांची पूजा केलेल्या पीठावर जया, विजया, अजिता, अपराजिता, नित्या, विलासिनी, दोग्ध्री, अघोरा … मंगला या पीठशक्तींची पूजा करतात. पूजेनंतर पाच लक्ष … करतात. जपसंख्येच्या दशांशाने बिल्वकाष्ठांनी प्रज्वलित केलेल्या … अग्नीत बिल्वफळांचे हवन करतात. अशा प्रकारे मंत्र … झाल्यावर इष्टप्राप्तीसाठी त्याचा प्रयोग करतात. [मं. म.]

रेभ एक सूक्तद्रष्टा. हा कश्यप वंशातील अवत्साराचा … मुलगा होय. त्याला निध्रुव नावाचा एक भाऊ हो… आणि तोही सूक्तद्रष्टा होता. (निध्रुव काण्व पाहा) रे… संबंधीची बरीच माहिती ऋग्वेदात विखुरलेली आहे, ती अशी … रेभाला असुरांनी विहिरीत टाकले होते (१.११२.५)…

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवस आणि दहा रात्रीपर्यंत असुरांनी दोरखंडांनी करकचून बांधून विहिरीत बंदिस्त केलेल्या या ऋषीची अश्विनौ देवांनी मुक्तता केली (१.११६.२४). त्याच्या दुष्ट शत्रूंनी त्याचे अवयव छेदून त्याला पाण्यात टाकले असता, अश्विनौ देवांनी विच्छिन्न झालेल्या त्याला पाण्यावाहेर काढून त्याचे शरीर पूर्ववत केले (१.११७.४) आणि गुहेत बंदिवान केलेल्या त्याची मुक्तता केली (१०.३९.९).

प्रस्तुत ऋषीने आठव्या मंडलातील सत्याण्णवावे सूक्त रचले आहे. इंद्रस्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. त्यातील एक ऋचा अशी–

तन्म ऋतमिन्द्र शूर चित्र पात्वपो
न वज्रिन् दुरितांति पर्षि भूरि ।
कदा न इन्द्र राय आ दशस्ये–
र्विश्वप्स्न्यस्य स्पृहयाय्यस्य राजन् ॥

(ऋ. ८.९७.१५)

अर्थ – हे अद्भुत, शूर, वज्रधारी आणि भक्तरक्षक इंद्रा, आपले सत्य स्वरूप प्रकट करून तू आम्हांला संकटमुक्त कर. आपली स्पृहणीय संपत्ती तू आम्हांला केव्हा देशील ?

रेभाच्या एकूण चरित्रावरून तो बराच दुर्दैवी ऋषी असावा, असे वाटते. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

रेणू एक सूक्तद्रष्टा. हा विश्वामित्राचा मुलगा होता. याने ऋग्वेदाच्या ९ व्या आणि १० व्या मंडलातील अनुक्रमे ७० व ८९ ही दोन सूक्ते रचली आहेत. पवमान सोम हा ७० व्या सूक्ताचा विषय असून, त्याच्या पहिल्याच ऋचेत सोमासाठी एकवीस गायींचे दोहन केल्याचा उल्लेख आहे. हा उल्लेख रूपकात्मक आहे, असे तै. संहितेत म्हटले आहे (५.४. १२.२). याव्यतिरिक्त याच ऋचेत चार भुवनांचा उल्लेख आहे. त्रैलोक्याच्या जोडीला विश्वामित्राने निर्माण केलेल्या प्रतिसृष्टीचा निर्देश इथे अभिप्रेत दिसतो, असे श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव यांचे मत आहे.

एकुणनव्वदाव्या सूक्तात इंद्र व सोम यांची स्तुती आहे. प्रस्तुत सूक्त म्हणजे ऋग्वेदातील उत्कृष्ट इंद्रसूक्तांपैकी एक असे म्हणतात. त्यातील दोन ऋचा अशा –

जघान वृत्रं स्वधितिर्वनेव रुरोज पुरो अरदन्न सिन्धून् ।
बिभेद गिरिं नवमिन्न कुम्भमा गा इन्द्रो अकृणुत स्वयुग्भिः ।

(ऋ. १०. ८९. ७).

अर्थ – अरण्यच्छेदक लाकूडतोड्याप्रमाणे वृत्रवध करणाऱ्या नदीविमोचक व मरुत्सहाय इंद्राने पर्वतांचा आणि शत्रुनगरांचा ठिसूळ मृत्तिकेप्रमाणे भेद केला.

शुनं हुवेम मघवानमिन्द्रमस्मिन् भरे नृतमं वाजसातौ ।
शृण्वन्तमुग्रमूतये समत्सु घ्नन्तं वृत्राणि संजितं धनानाम् ॥

(ऋ. १०. ८९. १८).

अर्थ – अन्नसमृद्धिदाता, शत्रुसंहारक, धनजेता, धनसंपन्न, भक्तवत्सल, उग्र आणि वीर अशा इंद्राला सुखसमृद्धीसाठी, तसेच साहाय्यासाठी आम्ही पाचारण करतो. [सी. ऋ.; प्रा. च. को.; ऋ. म. भा.; म. ज्ञा. को.]

रेय दिल्लीच्या आसपास राहणारी एक लहानशी हिंदू जात. हे मूळचे राजपूत; पण त्यांनी पुनर्विवाहपद्धती स्वीकारल्यामुळे त्यांना जातिबहिष्कृत करण्यात आले आणि त्यांची वेगळी जात बनली. जाटांबरोबर त्यांचा रोटीव्यवहार होतो, पण बेटीव्यवहार होत नाही. दिल्ली भागात रेयांच्या मालकीची नऊ खेडी आहेत. कुतुबमिनारजवळील मऱ्हौली हे रेयांचे मूलस्थान होय. [पं. का.]

रेवणसिद्ध एक वीरशैव आचार्य. हा जंगम होता. याचे रेवगी या गावी वास्तव्य होते. त्याने परमरहस्य नावाचा ग्रंथ लिहिला आहे. याची समाधी महाराष्ट्रात रेणावी या गावी आहे.

सांगली जिल्ह्यातील विटे गावाजवळच एका डोंगरात रेवणसिद्धाचे स्वयंभू स्थान आहे. त्याच्या पूर्व बाजूस उरुळसिद्ध व पश्चिम बाजूस भुयारात विश्वाराध्य आहे. त्या डोंगराला रेवणी डोंगर असे म्हणतात. डोंगरातील पांढऱ्या खड्यांचा भस्माप्रमाणे उपयोग करतात. तालमीसाठी लागणाऱ्या तांबड्या मातीच्या खाणी या डोंगरावर आहेत. प्राचीन काळी या डोंगरात ८४ तीर्थे होती, असे वीरशैवांच्या ग्रंथांवरून कळते.

रेवणसिद्धाचे भक्त कर्नाटक व महाराष्ट्र या दोन्ही राज्यांत आहेत. [म. च. को.; म. जि.– सांगली]

रेवंत सूर्य व संज्ञा यांचा पुत्र. हा अश्वारूढ व मृगयेच्या पवित्र्यात असतो. याला गुह्यकांचा राजा म्हणतात. हा अरण्ये व निर्जन प्रदेश यांत सापडलेल्या माणसांची संकटे दूर करतो व भक्तांना सुख, समृद्धी, बुद्धी, आरोग्य व कीर्ती यांचा लाभ करून देतो. भविष्यपुराणात याला घोड्यांचे आधिपत्य दिले आहे (ब्राह्म. ७९–१२४). याची शिकारीच्या वेषातील अनेक शिल्पे उपलब्ध आहेत. घटनगर (दिनाजपूर) येथे रेवंताची हरितकृष्ण पाषाणाची एक मूर्ती सापडली असून, ती सांप्रत राजशाही संग्रहालयात आहे. सूर्यासारखेच या रेवंतमूर्तीच्या पायात बूट आहेत. तो हातात चाबूक घेऊन घोड्यावर बसलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. एका सेवकाने त्याच्या मस्तकावर छत्र धरले असून, त्यांच्या मागेपुढे काही पुरुष सेवक आहेत.

रेवंत–नालंदा येथील मूर्ती

पूर्व भारतात व गुजरातेत प्राचीन काळी याची पूजा प्रचलित होती. वल्लभराज या कलचुरींच्या एका सामंताने विकर्णपूर (सांप्रतचे कोटगड) येथे याचे मंदिर बांधले होते व ते सुंदर शिल्पाने सजवले होते. त्याचे अवशेष अद्यापि कोटगड येथे पाहायला मिळतात. [डे. हिं. इ.; क. नृ. का.]

रेवती अश्विन्यादी गणनेतील २७ वे अर्थात शेवटचे नक्षत्र. हे मीन राशीत येते. या नक्षत्रपुंजात एकही ठळक तारका नाही. उत्तरा भाद्रपदातल्या दक्षिण तारकेच्या खाली सुमारे दहा अंशांवर मंदप्रभ तारकांची पूर्व–पश्चिम पसरलेली एक ओळ दिसते. त्या सर्वांना मिळून रेवती म्हटले आहे. ज्योतिषग्रंथात रेवतीच्या तारकांची संख्या ३२ सांगितली असून, त्यांचा आकार मृदंगासारखा मानलेला आहे. हे नक्षत्र मृदु-मैत्र, तिर्यङ्मुख व अंधलोचन असून, पूषा ही त्याची देवता आहे. हे शुभ नक्षत्र असून, सर्व ग्रह या नक्षत्रात बलवान असतात. पशुधनाचे भोक्ते असलेले वैदिक ऋषी रेवती व पूषा यांची प्रार्थना करतात, ती अशी –

क्षुद्रान् पशून् रक्षतु रेवती नः। गावो नो अश्वाँ अन्वेतु पूषा।
(तै. ब्रा. ३.१.२.१०)

अर्थ – रेवती नक्षत्र आमच्या लहान लहान पशूंचे रक्षण करो. आमच्या गाईंना आणि घोड्यांना अनुलक्षून पूषा (त्यांचे रक्षण करण्याकरिता) येवो.

हे नक्षत्र देवगुणी व सर्वथा सुखदायी मानलेले आहे. या नक्षत्रावर जन्म घेणारा पुरुष कसा होतो, ते कोष्ठीप्रदीपात पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

चारुशीलविभवो जितेन्द्रियः। सत्कुलः स्वभवनैकमानसः॥
मानवो ननु भवेन्महीपती। रेवती भवति यस्य जन्मभम्॥

अर्थ – रेवती हे ज्याचे जन्म नक्षत्र आहे असा पुरुष सच्छील, वैभवशाली, जितेंद्रिय, राजा, सत्कुलाचा व आपल्या घरावर अत्यंत प्रेम करणारा असा होतो.

मार्कंडेयपुराणात (७३) रेवतीची कथा दिली आहे, ती अशी– ऋतवाक नावाचा एक मुनी होता. त्याचा पुत्र उनाड व अभद्रवी निघाला. त्याच्या चिंतेने ऋतवाक झुरू लागला. एके दिवशी त्याने गर्गमुनीला आपली व्यथा सांगितली. गर्ग म्हणाला. 'तुझा मुलगा रेवती नक्षत्रावर जन्मला त्याचे हे फल!' ऋतवाकाला ते ऐकून क्रोध आला. त्याने शाप देऊन रेवतीला गगनमंडळातून स्थानभ्रष्ट केले. रेवती एका पर्वतावर पडली. त्या धक्क्याने तिथे एक सरोवर निर्माण झाले. त्या सरोवरात जलरूप होऊन ती आपले शापित जीवन जगू लागली.

पुढे तिला तिथेच एक मुलगी झाली. प्रमुच नावाच्या मुनींना ती मुलगी दिसली. तो तिला आपल्या आश्रमात घेऊन गेला. त्याच्या आश्रमात ती वाढली. दुर्गम नावाच्या एका राजकुमाराला ती मुलगी द्यावी, असे प्रमुचाने ठरवले. उत्तरा भाद्रपदा नक्षत्रावर तिचा विवाहमुहूर्त धरला. पण मुलगी हट्ट धरून बसली, की 'माझे लग्न रेवती नक्षत्रावर होऊ दे.' या हट्टाचे कारण काय, असे खोदून खोदून विचारल्यावर मुलगी प्रमुचाला म्हणाली. 'रेवती ही माझी आई आहे आणि सांप्रत ती स्थानभ्रष्ट होऊन सरोवरात पडली आहे. तुम्ही तिचा उद्धार करावा, असे माझे मागणे आहे.' प्रमुच मुनीने तिचा हट्ट पुरवला. त्याने रेवतीला उःशाप दिला, की 'माझ्या तपःसामर्थ्याने तू पुन्हा स्वस्थानी जा.' त्यासरशी एक प्रचंड ध्वनी उमटला व तेजःपुंज रेवती सरोवरातून आकाशात उडाली आणि स्वस्थानी आरूढ झाली. पुढे त्या मुलीला रेवत नावाचा एक पुत्र होऊन तो मन्वंतराधिपती झाला. [नक्षत्रलोक]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रेवासर एक पवित्र सरोवर. हे पंजाबात आहे. पठाणकोट-पासून बैजनाथ-पपरोला लोहमार्गावर ज्वालामुखी-रोड नावाचे स्टेशन आहे. तिथून हे सरोवर ५५ मैल दूर आहे. हे एक मोठे सरोवर आहे. त्याच्या नैर्ऋत्येस मानीपानी नावाचे बौद्ध मंदिर आहे. जवळच एक धर्मशाळा आहे. शंकर, लक्ष्मी-नारायण व ध्वजाधारी (लोमशऋषी) यांची मंदिरे इथे आहेत. जवळच दोन वृषभमूर्तीही आहेत.

रेवा सरोवराच्या पश्चिमेकडील टेकडीवरही अन्य सात सरोवरे आहेत. हे लोमशऋषीचे तपःस्थान आहे. सरोवराच्या पूर्वेस एक गुरुद्वारा आहे. इथे शीखांचे गुरू गोविंदसिंह यांनी तपस्या केली होती, असे सांगतात. वैशाख पौर्णिमा, माघ शु. सप्तमी व फाल्गुन शु. सप्तमी या तिथींना इथे मोठ्या यात्रा भरतात. [पं. जी. सा.; कल्याण–तीर्थांक]

रेव्हेलगंज एक नगर. हा गाव विहार प्रदेशाच्या सारण जिल्ह्यातील गोग्रा नदीच्या काठी आहे. पूर्वी इथे गोग्रा व गंगा यांचा संगम होता; पण सांप्रत हे संगमस्थान दूर पूर्वेकडे गेले आहे. गोदना हे या गावाचे प्राचीन नाव असले, तरी अलिकडे दोन शतकांत याला रेव्हेलगंज म्हणूनच ओळखतात. हे नाव पडण्याचे कारण असे, की इथे ईस्ट इंडिया कंपनीचा रेव्हेल नावाचा एक कस्टम–कलेक्टर राहत होता. त्याने अमाप लोकप्रियता मिळविली होती. म्हणून तो मेल्यावर लोकांनी त्याचे स्मारक म्हणून एक थडगे बांधले. पुढे संकटकाळी लोक त्याची प्रार्थना करू लागले व त्याला नवसही करू लागले. त्याच्या नावाने यात्राही भरू लागली.

गोदना या मूळ गावासंबंधी काही गोष्टी कळतात, त्या अशा– न्यायदर्शनाचा कर्ता गौतम याचा आश्रम इथे होता. अहल्येचा पती गौतम याचाही आश्रम इथेच होता. जनकपूरला जात असता रामाने इथे येऊन अहल्येचा उद्धार केला. गौतमाचे स्मारक म्हणून या ठिकाणी त्याचे मंदिर बांधण्यात आले आहे. त्याव्यतिरिक्त इथे एक संस्कृत पाठशाळाही आहे. त्या पाठशाळेत न्यायदर्शनाचे अध्यापन चालते.

रेव्हेलगंजला कार्तिक पौर्णिमेला यात्रा भरते. त्या वेळी जनावरांचा बाजार भरतो व मोठी उलाढाल होते. या भागातील ही एक मोठी व्यापारपेठ आहे. [सारण गॅझे.]

रैक्व एक जीवन्मुक्त ज्ञानी ब्राह्मण. छांदोग्य उपनिषदात याचा उल्लेख आहे (४.१.३). याला सुबाल व अध्यात्म उपनिषद यांचे ज्ञान घोर आंगिरसाकडून मिळाले. नंतर त्याने ते रामाला सांगितले. हा सदैव बैलगाडीखाली राहत असे. रैक्वा-संबंधी छांदोग्य उपनिषदात एक कथा आली आहे ती अशी – जानश्रुती पौत्रायण म्हणून एक उदार राजा होऊन गेला. त्याला आपल्या दानशूरपणाचा अहंकार झाला होता. आपल्यापेक्षाही श्रेष्ठ असलेल्या रैक्वाची माहिती त्याने दोन हंसांच्या तोंडून ऐकली. तेव्हा राजा त्याला शोधायला निघाला. रैक्व एका गाडीखाली खरूज खाजवीत बसलेला आढळला. जानश्रुतीने या पहिल्याच भेटीत त्याला बरीच दक्षिणा दिली. पण रैक्वाने ती न स्वीकारता उलट त्याला आपली गाडी देऊन टाकली. काही दिवसांनी राजा पुनः त्याच्या भेटीला गेला. त्या वेळी त्याने रैक्वाला आपली मुलगी व पुष्कळ दक्षिणा दिली आणि एक गावही दान दिले. मग रैक्वाने राजाला तत्त्वज्ञान सांगितले. हे तत्त्वज्ञान संवर्गविद्या म्हणून प्रसिद्ध आहे.

गीतेच्या सहाव्या अध्यायाच्या पठनाने याला शांती मिळाली होती, म्हणून याने राजा जानश्रुतीलाही त्याचे पठण करायला सांगितले. जानश्रुतीने तसे केले. त्याने रैक्वाला दिलेले गाव महावृष देशात रैक्वपर्ण नावाने प्रसिद्ध झाले. पाहा – संवर्गविद्या. [प्रा. च. को.; क्रि. स्ट. ले. उ.; वैं. सा.]

रैवतक सौराष्ट्रातील एक पर्वत. सांप्रतच्या द्वारकेजवळ हालार नावाची एक टेकडी आहे, तोच प्राचीन रैवतक होय, असे पार्जिटरचे मत आहे. तो द्वारकेच्या अगदी जवळ होता, द्वारकेतल्या लोकांचे क्रीडास्थल होता आणि द्वारकावासी जन हजारोंच्या संख्येने त्या पर्वतावर चढून गिरिमह नामक उत्सव करीत, अशी वर्णने पुराणांत आहेत.

पण सांप्रतची द्वारका ही कृष्णाने वसवलेली द्वारका नसून, कृष्णनिर्मित द्वारका गिरनार पर्वताच्या पायथ्याशी होती आणि गिरनार म्हणजेच रैवतक पर्वत होय, असे अलिकडील काही संशोधकांनी सिद्ध केलेले आहे व त्याला आधारही दिले आहेत.

सोमवंशात आनर्त नावाचा एक पुरुष होऊन गेला. त्याने सौराष्ट्राच्या दक्षिण भागात स्वतःच्या नावाचा देश वसवला. या आनर्त देशात रैवतक पर्वत आहे, असे महाभारतात म्हटले आहे. आनर्ताचा रेवत नावाचा एक पुत्र होता. त्याने या पर्वताच्या पायथ्याशी कुशस्थली नावाची नगरी वसवली. रेवताच्या नावावरूनच या पर्वताला रैवतक असे नाव मिळाले. जरासंधाच्या भयाने श्रीकृष्ण जेव्हा यादवांसह सौराष्ट्रात आला, तेव्हा त्याला रैवतकाच्या पायथ्याशी कुशस्थली हे गाव आढळले आणि त्याच जागी त्याने द्वारका नावाचे नवे शहर वसवले. जवळच्या रैवतक पर्वतावर कृष्णाने एक किल्लाही बांधला. गिरनारच्या शिखरावर आजही एक जुना कोट दिसतो. त्या किल्ल्याला उग्रसेनगड असे म्हणतात. कंसाचा बाप उग्रसेन हा कृष्णाबरोबर सौराष्ट्रात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाला होता आणि तो द्वारकेच्या गणराज्याचा एक वयोवृद्ध प्रमुख होता. अशा अनेक गोष्टी लक्षात घेऊन व शिलालेख पाहून गुजरातमधले एक संशोधक श्री. दुर्गाशंकर केवलराम शास्त्री यांनी गिरनार म्हणजेच रैवतक हे सिद्ध केले आहे. पाहा – गिरनार, द्वारका. [हि. ध.; मा. पु. सां. अ.; भा. प्रा. जै. ती.]

रैवतकमह एक प्राचीन लोकोत्सव. महाभारताच्या आदी आणि अश्वमेध या पर्वांत या उत्सवाचे वर्णन आहे. द्वारकेतल्या वृष्णी, अंधक व भोज या गणांचा हा उत्सव होता. त्या निमित्त रैवतक पर्वतावर रोषणाई करून ध्वजपताका लावीत. द्वारकेतले लोक त्या दिवशी या पर्वतावर जाऊन नृत्य व गायन करीत आणि मद्यही प्राशन करीत. [हृ. प्रा. लो.]

रोगचिकित्सा शरीर व मन यांच्यामध्ये जो बिघाड होतो त्याला रोग म्हणतात व रोगाचा प्रतिकार करणे, रोग दूर होण्याची उपाययोजना करणे याला चिकित्सा म्हणतात. जोवर रोगांची भौतिक कारणे लोकांना माहीत नव्हती, तोवर रोग हे भुते-खेते, राक्षस, यक्ष, गंधर्व, अप्सरा आणि देव यांच्यापासून उत्पन्न होतात; किंबहुना वरील अतिमानवी योनीतील व्यक्तींच्या कोपामुळेच रोग उद्भवतात अशी सामान्य जनांची धारणा होती. आजही अडाणी, अशिक्षित, खेडवळ लोकांत हीच समजूत प्रचलित आहे. त्यामुळे त्यांच्यांतील एखाद्या माणसाला काही विकार उत्पन्न झाला, तर त्याचे आप्तेष्ट वैद्य-डॉक्टरांकडे न जाता देवऋषी, भगत किंवा मांत्रिक यांच्याकडे जातात आणि ते सांगतील त्याप्रमाणे गंडे-दोरे, ताईत, पशुबली, इ. प्रकार करतात.

ऋग्वेदात देवताप्रकोप हे रोगाचे एक कारण मानले असले आणि तो रोग दूर होण्याबद्दल देवतांची प्रार्थना सांगितली असली, तरी औषधि-वनस्पती या रोगनाशक असल्याची कल्पना ऋग्वेदात आहे. पुढच्या काळातील ओषधिविज्ञानाची बीजे ऋग्वेदात आढळतात. ओषधींचे प्रयोग करून रोग दूर करणाऱ्या वैद्यांचे उल्लेखही ऋग्वेदात आढळतात. ऋग्वेदातला सर्वश्रेष्ठ वैद्य म्हणजे रुद्र होय. त्याच्या जवळ जलाष नावाचे हुकमी औषध असल्याचे सांगितले आहे. हे जलाष म्हणजे गोमूत्र होय, असे वेदावरून कळते. गोमूत्र हे वैदिक आर्य लोकांचे फार प्राचीन औषध आहे. पारश्यांच्या अवेस्तामध्येही त्याचा उल्लेख आढळतो. अश्विनौ देव हे देवांचे वैद्य म्हणून ऋग्वेदात उल्लेखित आहेत. त्यांनी च्यवनाला त्याचे तारुण्य आणि ओज मिळवून दिले आणि ऋज्राश्वाचे अंधत्वही दूर केले (ऋ. १.११६.१६).

ऋग्वेदात वरुणाचा रोगाशी व औषधांशी संबंध जोडण्यात आला असून, त्याच्याजवळ शेकडो, हजारो औषधे असल्याचे म्हटले आहे (ऋ. १.२४.८-९). विशेषतः जलोदर हा रो[ग] वरुणाच्या अवकृपेने होतो, असे सांगितले आहे. वरुण हा जला[चा] अधिपती असल्यामुळे जलोदराशी त्याचा संबंध जोडला [गे]ला असावा. आदित्य हा विशेषतः हृद्रोग व कावीळ यांच्यापा[सून] मानवाला मुक्त करतो, असे एका मंत्रात म्हटले आहे.

हृद्रोगं मम सूर्य हरिमाणं च नाशय।

(ऋ. १.५०.११)

अर्थ – हे सूर्या, तू माझा हृद्रोग व कावीळ हे रोग नष्ट क[र].

ऋग्वेदात पाण्याला सर्व रोगांवरचे औषध मानले असून, [...] सूक्तात त्याची खूप प्रशंसा केली आहे.

आपः सर्वस्य भेषजीस्तास्ते कृण्वन्तु भेषजम्।

(ऋ. १०.१३७.६)

अर्थ – जल हे सर्व रोगांचे औषध आहे. ते तुला औषध [...] (तुझा रोग दूर करो.)

ऋग्वेदात काही सामान्य रोग आणि राजयक्ष्मा म्हणजे [...] रोग यांचाही उल्लेख आहे. कानाचे दोष, लंगडेपणा [...] कमी होणे या रोगांचाही उल्लख आहे. शरीराच्या कोपकोप[...] भागांत रोग होऊ शकतात, त्याची एक यादीच 'अक्षीभ्यां नासिकाभ्यां' (ऋ. १०.१६३) या सूक्तात दिली आहे. [...] रोग बरा करण्यासाठी अश्विनौ देवांनी ताईत मंत्रून दिल्याचा ऋग्वेदात निर्देश आहे.

रोग आणि त्यावरील उपचार यासंबंधात विस्तृत [...] कुठे मिळत असेल, तर ती अथर्ववेदात होय. अथर्ववे[दातील] रोगहारक मंत्र हे भारतीय वैद्यकशास्त्राच्या विशाल वृक्षाचे [...] बीजे आहेत. अथर्ववेदात शारीरशास्त्राचे सर्वसामान्य [...] दिले आहे. शरीराच्या अंतर्बाह्य अवयवांची नावे त्यात [...]तली आहेत (२.३३; ९.८; १०.२; ११.८). रक्तवाहि[न्या] शिरा यांच्यामधील स्थूल भेद, मोठी आतडी, लहान [...] स्त्रीचे जननेंद्रिय, इ. शरीरावयवांचेही निर्देश आहेत.

दानव किंवा राक्षस हे रोग निर्माण करतात, [...] म्हटले आहे. हे दानव आणि राक्षस म्हणजे शरीरात [...] उत्पन्न करणारे सूक्ष्म जंतू होत, असे पं. सातवळेकरांचे [...] काही फोडांचे रोग स्वतःच्या इच्छेनुसार हवेतून उड[...] हव्या असलेल्या माणसांना जडत असतात, असे जे म्हटले [...] ते सूक्ष्म जंतूंचाच निर्देश करणारे विधान म्हटले पाहिजे. [...] साराचा संबंध पर्जन्याच्या व अग्नीच्या बाणांशी [...] आला असून, ताप, कफ व कपाळशूळ हे रोगही त्यां[...] उद्भवतात, असेही म्हटले आहे.

चिंता किंवा शोक हे रक्तदाब व हृदयविकार यांना [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भूत होतात, असे आधुनिक वैद्यकशास्त्रातील सर्वमान्य मत आहे. हेच मत अथर्ववेदात फार प्राचीन काळी सांगितले आहे –

मा गतानामा दीधीथा ये नयन्ति परावतम्।

(अथर्व. ८.१.८)

भावार्थ – शोक करण्याने आयुष्याचा नाश होतो. कित्येक माणसे मेलेल्या वृद्ध मनुष्याचे स्मरण करीत शोक करण्यात दिवस घालवतात. त्यांची इथे अवनती तर होतेच; आणि त्या-बरोबर आयुष्यही क्षीण होते.

माणसाला सूर्यप्रकाश हा दीर्घायुष्य देण्यास कारणीभूत होतो, असेही एका मंत्रात (अथर्व. ८. १.१) सांगितले आहे –

सूर्यस्य भागे अमृतस्य लोके।

अर्थ –अमृतस्थानात म्हणजे सूर्याच्या प्रकाशित भागात राहा. दीर्घायुष्याच्या प्राप्तीसाठी अथर्ववेदात औषधींचे सेवनही सांगितले आहे. एक वैद्य म्हणतो –' मी या रोग्याच्या सुखाचा विस्तार करण्यासाठी जीवन देणारी, कधीही हानी न करणारी, रक्षण करणारी, रोग दूर करणारी आणि बल वाढविणारी जीवंती नावाची औषधी (तुला) देतो (अथर्व. ८. २. ६).

देवप्रीत्यर्थ हवन करणे हाही दीर्घायुष्याचा एक उपाय सांगितला आहे (अथर्व. ३.११). खोकला, कफ-क्षय, गळवे, फोड, गजकर्ण, कफातून रक्त पडणे, गाठी उत्पन्न होणे, हे सर्व रोग चीपुद्रू नावाच्या ओषधीने दूर होतात, असे सांगितले आहे (६. १२७. १-२). सूर्य हा आरोग्यदाता असून तो शरीराच्या प्रत्येक अंगात तेजाच्या रूपाने राहतो, म्हणून सूर्याच्या तेजाने स्वतःचे तेज वाढवावे, असेही सांगितले आहे (१. १२. १-२). साप किंवा विंचू यांचे विष नाहीसे करण्यासाठी मधुनामक वन-स्पतीचा उपयोग करण्यास सांगितले आहे (७. ५६. २). सोम-पानानेही विषदोष दूर होतात, असे म्हटले आहे. याच विषांवर वचा व वरणा या दोन वनस्पतींचा उपयोग सांगितला आहे (४.७.१). तापाची लक्षणे, एक दिवसाआड येणारा ताप, दोन दिवसांआड येणारा ताप व ज्याच्या येण्याला काही नियमच नाही असा ताप, असे तापाचे प्रकार सांगितले आहेत. हे ताप जाण्यासाठी अग्नीत हवन, संयम, ब्रह्मचर्य, इ. उपाय सांगितले आहेत. श्यामा नावाच्या वनस्पतीने कुष्ठरोग दूर होतो व शरीराचा रंग सुधारतो, असे म्हटले आहे (१. २४.४). रामा, कृष्णा आणि असिक्नी या ओषधीही श्वेतकुष्ठावर सांगितल्या आहेत. गंडमाळांचेही पुष्कळ प्रकार असून, त्यांवर मुनी नामक मुळांचा वापर करावा, असे सांगितले आहे. कृमींचे वर्णनही पुष्कळ असून, सूर्यकिरणांनी व अजशृंगी, गुग्गुलू, पीलू, सीमा, औक्षगंधी आणि प्रमोदिनी या औषधींनी कृमी नाहीसे होतात, असे म्हटले आहे (४. ३७. २-३). दशवृक्ष नावाची वनस्पती संधिवात दूर करते असे सांगून पुढे म्हटले आहे – पृथ्वीवर औषधे पुष्कळ आहेत. ती कशी घ्यावी, त्यांचे प्रयोग कसे करावे, हे सगळे दिव्य गुणांनी युक्त असलेला ब्रह्मज्ञानी वैद्य जाणतो. जो हे चिकित्सेचे कार्य करीत राहतो, तोच त्यातील प्राविण्य टिकवू शकतो. जो प्रारंभी सामान्य वैद्य असतो तो वारंवार चिकित्सा करीत राहिल्याने श्रेष्ठ धन्वंतरी होऊ शकतो. असे श्रेष्ठ धन्वंतरी दुसऱ्या वैद्यांच्या संमतीने उत्तम प्रकारे चिकित्सा करू शकतात (२. ९. ३-५).

औषधांचा परिणाम निव्वळ वनस्पतींच्या गुणधर्मावरच अव-लंबून नसून, ती तयार करण्याच्या आणि उपयोगात आणण्याच्या पद्धतीवर तो अवलंबून असतो. औषधे देताना ती शुचिर्भूतपणे दिली पाहिजेत. तशीच ती देताना देवाची प्रार्थना केली पाहिजे. औषधे देताना ती शिंपल्यातून किंवा गायीच्या शिंगातून किंवा तांब्याच्या भांड्यातून द्यावी. ती मुसळाने किंवा बैलाच्या जुवाने कुटावी. औषधनिर्मितीची स्थाने संगम, चव्हाटा किंवा खंदक ही असावी. रोग्याची बसण्याची जागा, कपडे आणि अन्न ही पथ्यकर असावी. सकाळी नक्षत्रे लुप्त होतात, तो मुहूर्त औष-धाच्या सेवनासाठी घ्यावा. ज्या अर्थी रोगांचा प्रादुर्भाव एखाद्या राक्षसामुळे होतो, त्या अर्थी त्या राक्षसाची उचलबांगडी करणे हे वैद्याचे प्रथम कर्तव्य आहे. ते काम बळी देऊन, अन्न देऊन किंवा जादूटोणा करून करायचे असते. वरील गोष्टी अथर्ववेदात रोगचिकित्सेच्या बाबतीत विशेष सांगितल्या आहेत.

जलोपचारात आप्लवन (ओतणे) आणि अवसेचन (शिंप-डणे) या दोन पद्धती सांगितल्या आहेत. या दोन्ही पद्धतींत जल अभिमंत्रित करून ते रोग्याला प्यायलाही देत.

रोगदेवता – रोगपरिहारक देवतांना हे नाव आहे. या देवता सामान्यपणे क्षुद्र देवता असतात. रोगहारक मोठी देवता म्हणजे रुद्र होय. याव्यतिरिक्त वरुण, सूर्य, इ. काही देवता विविध रोगांच्या देवता असल्याचे वैदिक वाङ्मयात सांगितले आहे.

सर्वसामान्य जनता अनेक क्षुद्र देवतांना रोगनिवारक मानून त्यांची आराधना करते. भारतभर असे अनेक रोगनाशक देव आहेत. ज्वरहरेश्वर हा हिवतापाचा देव आहे. याचे स्थान काशीत असून, ताप जाण्यासाठी याला दूध-भांगेचा नैवेद्य दाखव-तात. आदिवासींचे गोहेम, चोंडू, नेग्रा व डिचली हे देव अनुक्रमे महामारी, खाज, अपचन व मृत्य दूर करतात. होशंगाबादच्या बाजूला विजयसेनाचा गंडा बांधतात. अशीच एक अत्येरी नावाची देवता आहे. तिच्या नावाने तांबडे कपडे घातले आणि तांबडा दोरा गळयात बांधला, की माणसाचे थंडीतापापासून संरक्षण होते. दीर्घ काळ रोग अंगात राहिल्यास घंटाकर्णाच्या नावाने एका जलपात्राची पूजा करतात. मुतुन ही कोरकू आदिवासींची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवता आहे. सांसर्गिक रोगांच्या निवारणार्थ हिला डुकराचा बळी देतात. मरीआई ही पटकीची देवता आहे. शीतळा ही देवी कांजिण्या, इ. रोगांची देवता समजतात. भैरोबा हा विषहर म्हणून प्रसिद्ध आहे. एखाद्याला साप चावल्यास त्याला विष उतरण्यासाठी भैरोबाच्या देवळात नेऊन ठेवतात. उ. प्रदेशात लाला हरदौल हा महामारी दूर करणारा देव मानला जातो. उ. भारतात अनेक पुरुषदेवता आणि द. भारतात अनेक स्त्रीदेवता यांना साथीचे रोग नाहीसे करण्यासाठी पूजा व बलिदान करण्याची पद्धत आहे.

रोग निवारण्याचे तांत्रिक उपाय – एखादे भूत अंगात शिरल्यास देवऋषीला बोलावून आणतात. तो रोग्याला पुढे बसवून धूप जाळतो. तेवढ्याने त्या माणसाच्या अंगात भुताचा संचार होतो. मग देवऋषी वेताची छडी व मोरपिसांचा कुंचा जमिनीवर आपटून भुताला त्या माणसाच्या अंगातून जायला सांगतो. भुताने जर देवऋष्याचे म्हणणे ऐकले नाही तर तो भूतवाल्या माणसाला छड्याही मारतो. आणि तो माणूस गयावया करायला लागला, की भूत गेले असे सांगतो.

दीर्घकालीन रोग घालविण्यासाठी शेणाची पणती करतात. तिच्यात चार काळ्या वाती पेटवतात. चार लाल मिरच्या देठ खाली करून त्या पणतीत बसवतात. मग एक इसम पुढे येऊन तो दिवा उचलतो व रोग्याभोवती ओवाळतो, आणि मग गावाबाहेर जाऊन एखाद्या ठिकाणी तो ठेवतो; तिथे घागरभर पाणी ओततो व मौन धरून परत येतो.

रोग्याच्या अंगावरून नारळ ओवाळून तो दुसऱ्याला खायला देतात. अंडी, पीठ, भाकर, तेल वगैरे जिन्नस रोग्यावरून ओवाळून चवाठ्यावर नेऊन ठेवतात. एकाच्या अंगातून रोग काढून तो दुसऱ्याच्या अंगात घालण्याचेही अनेक तांत्रिक उपाय आहेत. त्यांना रोगपरिवर्तनाचे उपाय असे म्हणतात.

रोगपरिवर्तन – कित्येकदा एका कागदाच्या तुकड्यावर रोगाचे नाव व काही शिव्या लिहून तो तुकडा रात्री शेजाऱ्याच्या घराला काट्याने टोचून ठेवतात. जो कोणी त्या शिव्या वाचतो तो आजारी पडतो व मूळ रोगी बरा होतो असे म्हणतात.

रोग हा एका माणसावरून दुसऱ्या माणसावर किंवा जनावरावर किंवा प्राण्यावर घालविण्याचे तोडगे असतात. 'शुकेषु मे हरिमाणं रोपणाकासु दध्मसि' (ऋ. १.५०.१२).='माझी कावीळ पोपटाच्या ठिकाणी व रोपणाकांच्या ठिकाणी ठेव' हा मंत्रही रोगपरिवर्तनाचाच सूचक आहे. अथर्ववेदातही असे अनेक तोडगे सांगितले आहेत.

लोकसमाजात रोगपरिवर्तनासाठी असे तोडगे पुष्कळच रूढ आहेत. त्यांपैकी काही असे – एका भांड्यात तांदूळ आणि फुले घालून ते भांडे वाटेवर पुरतात. त्याच्यावर झाकण म्हणून एक दगड ठेवतात. जाणाऱ्यायेणाऱ्यांपैकी जो कोणी त्याला स्पर्श करील, त्याच्या अंगात आधी आजारी असलेल्या माणसाचा रोग उतरतो. सकाळच्या वेळी रस्त्यावर मातीचा ढीग करतात. त्या ढिगात देवी आलेल्या माणसाच्या खपल्या ठेवतात; त्यांवर फुले वाहतात. जो कोणी त्या ढिगाला स्पर्श करील, त्याला देवीची बाधा होते व पहिला रोगी बरा होतो. चौकात एक कुं... पुरतात. त्याच्या जवळ काही औषधे व धान्यही पुरतात. ज्या... ळ्यांनी ते धान्य उकरले, की रोग्याला आराम पडतो व ... ळ्यांना तो रोग जडतो. गावात महामारीची साथ आली, ... मरीआईचा गाडा ओढून आणून दुसऱ्या गावाच्या सीमेत नेतात. कित्येक लोक देवीवरून कोंबडे उतरून टाकून ते वेशीबाहेर टाकतात. असे केल्याने तो रोग या गावातून त्या गावात जातो असे समजतात.

रोगमुक्ती – रोगमुक्तीचे कित्येक उपाय पुराणांत व हेमाद्रीच्या व्रतखंडात सांगितले आहेत, त्यांपैकी काही असे –

रुग्णाच्या कुंडलीत जे ग्रह अशुभ असतील, त्यांना प्रिय असे दाने द्यावी. ग्रहयज्ञ करावा. ग्रहांचा जप करावा. चंडीपाठ करावा. स्कंद, रुद्र व यम यांच्या गणांची पूजा करावी. रविवारी ... फल्गुनी नक्षत्र असल्यास सूर्यमूर्तीची रुईच्या फुलांनी पूजा करावी. शनिवारी एकभुक्त करावे. मारुतीला तेल व रुईच्या पानांची माळ घालावी. गुरुचरित्राचे पारायण करावे. शंकराला अभिषेक करावा. एका परातीत तूप घालून त्यात रोग्याने आपले प्रतिबिंब पाहावे व ती परात तुपासह ब्राह्मणाला दान द्यावी, इत्यादी. [हि. ध.; एन्सा. रि. ए.; पॉ. रि. फो. नॉ. ...

रोटक

एक काम्य व्रत. याला बिल्व-रोटक असेही नाव आहे. पुरुष व स्त्रिया अशा दोघांनाही हे व्रत करता येते. श्रावण मासाच्या शुद्ध पक्षातील पहिल्या सोमवारी किंवा ... शुद्ध प्रतिपदा सोमवारी आल्यास त्या तिथीला व्रताचा प्रारंभ करतात. व्रतावधी साडेतीन महिने. व्रताची देवता शिव. ... विधी असा – प्रथम संकल्प करावा. नंतर शिवाची पूजा, ... श्रवण व भोजन करावे. हा कार्यक्रम कार्तिक शुद्ध त्रयोदशीपर्यंत चालवावा. पूजेच्या वेळी रोज शिवाला सात, पाच निदान ... तरी बिल्वदले वाहावी. चतुर्दशीला उपवास करावा. ... एक कोरा घट आणून त्याची स्थापना करावी. तो स्वच्छ पाण्याने भरावा. त्यात पंचरत्ने घालावी. घटाला पांढऱ्या वस्त्राने ... अलंकार घालावे. वर पूर्णपात्र ठेवावे. त्यावर अष्टदल ... मग त्यावर उमेसह शिवाची स्थापना करावी. रात्री ... पंचामृताने पूजा करावी. पाच रोटक (कणकेचे रोडगे) ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचा नैवेद्य दाखवावा. हे रोटक लोखंडाच्या तव्यावर किंवा खापरावर भाजलेले असावे. पाच रोटकांपैकी दोन रोटक ब्राह्मणाला, एक नैवेद्याला आणि उरलेले दोन स्वतःसाठी ठेवावे. अशा प्रकारे हे व्रत पाच वर्षे करावे.

उद्यापनाच्या वेळी सोन्याचे वा रुप्याचे दोन रोटक करून ते दान द्यावे. त्याचप्रमाणे सोन्याचे बेलाचे पान शिवाला अर्पण करावे. बेलाची पाने व तूप या वस्तूंचा १०८ किंवा २८ किंवा ८ या संख्येने होम करावा. मग व्रताची पूर्णता करावी. या व्रताची कथा अशी –

प्राचीन काळी सोमपुरामध्ये सोमशर्मा नावाचा एक विद्वान ब्राह्मण राहत होता. तो सोमेश्वराचा भक्त होता. त्याची पत्नीही पतिव्रता होती. सोमशर्म्याला दिवसभर कष्ट करूनही पोटभर अन्न मिळत नसे. एकदा तो खिन्न होऊन सौम्य नामक सरोवराच्या काठी बसला असता, शिवाने एका वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन त्याला रोटक व्रत करायला सांगितले. सोमशर्म्याने ते केले आणि त्याची सर्व आपदा दूर झाली. [हि. ध.; व्रतराज]

रोण एक जात. यांची वस्ती ओडिसाच्या डोंगराळ भागात आढळते. ओडिसातील मोठा योद्धा रणजित याचे आम्ही वंशज आहो, असे हे सांगतात.

रोणांच्या सजातीय विवाह करणाऱ्या चार पोटजाती आहेत, त्यांची नावे अशी– (१) रोण पैको (२) ओदीय पैको (३) कोतिय पैको व (४) पत्तीय पैको. या चारांच्याही उत्पत्तिकथा वेगवेगळ्या आहेत व त्यांच्यांत उच्च-नीच भेदही आहे.[1]

रोण लोक उडिया भाषा बोलतात. यांच्यांतील काही जण शेती करतात; तर काही सैनिकी पेशात जातात. काही व्यापारीही आहेत. यांचा सामाजिक दर्जा क्षत्रियाहून थोडा कमी व पैरोजहून थोडा श्रेष्ठ आहे, असे समजतात.

रोण मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाल्यावर पुरुषांच्या दृष्टीला न पडेल अशा ठिकाणी घरात एका बाजूला तिला ठेवतात. तिच्या भोवती दोरीने बांधलेला सात बाणांचा पिंजरा उभारतात. सातव्या दिवशी मुलीला स्नान घालून नवे वस्त्र देतात.

विवाहप्रथा – यांच्यांत चुलत बहिणीशी लग्न करण्याची चाल आहे. विवाहाच्या आदल्या दिवशी नवऱ्याकडील लोक एक बकरे, मेंढी, तांदूळ व एक लुगडे घेऊन नवरीच्या घरी जातात. लुगड्यावर काही पैसे असतात. ते वस्त्र व पैसे वधूची आई घेते. मग वराकडील लोकांना मेजवानी देतात. दुसऱ्या दिवशी वराच्या घरापुढे घातलेल्या लग्नमंडपात वधू येते. त्या मंडपाला नऊ खांब असतात. मुहूर्ताच्या वेळी नवरा-नवरींमध्ये अंतरपाट धरतात. देसारी हा त्यांचा पुरोहित त्यांच्या नव्या वस्त्रांच्या टोकाला गाठी मारतो. या गाठीत काही पैसे विड्याची पाने, सुपाऱ्या व तांदुळाचे सात दाणे असतात. अंतरपाट दूर केल्यावर हे नवदांपत्य हातांत हात घालून घरात जाते.

तिसऱ्या दिवशी हळदीच्या पाण्याने त्यांना स्नान घातल्यावर विवाहविधी संपतो.

यांच्यांत विधवाविवाहाला मान्यता आहे. विधवा स्त्री धाकट्या दिराबरोबर विवाह करू शकते.

सूर्य, वाघ, नाग, अस्वल व मासा अशी रोणांची देवके आहेत. हे ठाकुराणी नावाच्या देवतेला भजतात. ते गळ्यात जानवे व तुळशीच्या माळा घालतात. रोण पैको हे मांसाहार करतात; पण त्यांना गोमांस व डुकराचे मांस चालत नाही. ओडिया ब्राह्मण किंवा वैष्णव ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात. नायको ही या जातीची पदवी आहे.

जातपंचायत – यांच्यांत जातपंचायत आहे. तिच्यासमोर विवाह-विच्छेद, मारहाण, कनिष्ठ लोकांकडील अन्नसेवन व दिवाणी स्वरूपाचे तंटे, इ. दावे चालतात. भथो नायक हा जातिप्रमुख त्या दाव्यांचे निवाडे करतो. [का. ट्रा. स. इं.]

रोफ काश्मीरमधील मुसलमान स्त्रियांचे एक लोकनृत्य. विवाह, ईद, रमजान, इ. प्रसंगी याचे कार्यक्रम होतात. या नृत्यासमवेत जी गाणी गायिली जातात, त्यांना रोफ गीते असे म्हणतात. स्त्रिया हातांत हात घालून समोरासमोर तोंडे करून नाचत असतात. नाचताना पाय मागे-पुढे घेतात. नृत्याची लय वाढत असता समोरासमोरच्या दोन स्त्रिया एकमेकींचे हात धरून व पायाला पाय लावून आपले शरीर मागे झोकून देतात आणि वर्तुळाकार फिरतात. त्यांच्या फेऱ्याची गती जसजशी वाढत जाते तसतसे गीतगायन कमी होत जाते आणि त्यानंतर नृत्य थांबते. [भा. लो. नृ.; म. क.]

रोमहर्षण एक सूतकुलोत्पन्न मुनी. याला लोमहर्षण असेही म्हणत. हा एका क्षत्रियापासून ब्राह्मण स्त्रीच्या उदरी जन्मला. याला रोमहर्षण हे नाव कसे पडले, याविषयी वायुपुराणात एक श्लोक आहे, तो असा –

लोमानि हर्षयांचक्रे श्रोतॄणां यत्सुभाषितैः ।
कर्मणा प्रथितस्तेन लोकेऽस्मिंल्लोमहर्षणः ॥

(वायुपु. १.१.१६)

अर्थ – हा आपल्या चांगल्या वक्तृत्वाने श्रोत्यांच्या अंगावर रोमांच उभे करीत असे. त्या गोष्टीमुळे तो लोमहर्षण (रोमहर्षण) म्हणून प्रसिद्ध झाला.

हा व्यासांचा पाचवा आणि आवडता शिष्य होता. म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Funding by MoE-IKS

व्यासांनी याला इतिहास व पुराणे समग्र शिकविली. त्यांत याने चांगले प्रावीण्य मिळविले. तो पुराणिक किंवा पौराणिकोत्तम म्हणून विद्वानांमध्ये मान्यता पावला. याने सहा पुराणसंहिता केल्या. सुमती, अग्निवर्चा, मित्रेयू, शिंशपायन, कृतव्रत व सावर्णी असे याचे सहा शिष्य होते (अग्निपु. २७१. ११–१२). या सर्वांनीही पुराणसंहिता रचल्या. व्यासाचे मोठे आदिपुराण याने आपला पुत्र उग्रश्रवा याला शिकविले. श्री. चित्रावशास्त्री म्हणतात, की "व्यासाने आदिपुराणाची सुरुवात केली असावी आणि हा व याचे शिष्य ह्यांनी ते संपविले असावे." रोमहर्षणाने साडेदहा पुराणे निर्माण केली व त्याच्या मृत्यूनंतर उग्रश्रव्याने साडेसात निर्माण केली आणि अशा प्रकारे पुराणांची १८ ही संख्या पूर्ण झाली, असे पद्मपुराणात म्हटले आहे (उत्तर १९८).

रोमहर्षण हा साक्षात व्यासशिष्य असल्यामुळे कुरुक्षेत्रातील दीर्घसत्रात तो आला असता ऋषि–मुनींनी त्याचा गौरव केला. पुढे नैमिषारण्यात हा अग्निष्टोम करीत असता, शौनकादी साठ हजार ऋषी त्याच्या दर्शनासाठी तिथे आले. त्या ठिकाणी नारदाने सनत्कुमाराला सांगितलेले नारदपुराण याने सांगितले व गरुडपुराणही सांगितले. सौती (उग्रश्रवा) त्याच्या सिद्धाश्रमातून बदरीनारायण क्षेत्री जात असता रोमहर्षणाने त्याला ब्रह्मवैवर्तपुराण सांगितले. कुरुक्षेत्रातल्या एका दीर्घसत्रात याने वायू व ब्रह्मांड ही पुराणे सांगितली. दुसऱ्या एका द्वादशवार्षिक सत्रात याने ब्रह्मपुराण सांगितले. अशा प्रकारे याने आपल्या अनेक शिष्य–प्रशिष्यांच्या द्वारे लोकांत निरनिराळ्या पुराणांचा खूप प्रचार केला.

रोमहर्षणाच्या मृत्यूची कथा भागवतपुराणात सांगितली आहे, ती अशी –

एकदा नैमिषारण्यात रोमहर्षणाच्या नेतृत्वाखाली एक सत्र चालू होते. तिथे त्याच्याच अध्यक्षतेखाली पुराणचर्चाही होत असे. अशा एका प्रसंगी बलराम तीर्थयात्रा करीत त्या ठिकाणी आला. सर्वांनी त्याला उत्थापन दिले; पण रोमहर्षण व्रतस्थ असल्यामुळे तो मात्र उठला नाही. त्या गोष्टीचा बलरामाला राग आला. तो म्हणाला. 'हा ब्राह्मणाहून नीच व प्रतिलोमज असूनही एवढा गर्विष्ठ झाला काय ? याला मी शासन घडवितो'. असे म्हणून बलरामाने त्याला तिथल्या तिथे ठार मारले. ऋषींना त्या गोष्टीचे फार दुःख झाले. त्यांनी बलरामाला विचारले, की 'यापुढे आम्हांला पुराणे कोण सांगेल ?' यावर बलराम म्हणाला. 'याचा पुत्र उग्रश्रवा यापुढे तुम्हांला पुराणे सांगेल' (भाग. पु. ७८–७९).

आषाढ शुद्ध द्वादशी ही रोमहर्षणाची मृत्यतिथी होय. पुराणिक ही तिथी पुण्यतिथी म्हणून पाळतात व कोणत्याही द्वादशीस पुराण सांगत नाहीत. पाहा – पुराणे, सूत. [प्रा. ब. को.]

रोमिक एक प्राचीन जात. मल्ल पुरुष व आवर्तक स्त्री यांची ही संतती होय. सांप्रत यांना लोणारी असे म्हणतात. पाहा – लोणारी. [हि. ध.]

रोहिणी (१) अश्विन्यादी गणनेतले ४ थे नक्षत्र. हे वृषभ राशीत येते. ब्रह्मा हा याचा स्वामी आहे. हे नक्षत्र ध्रुव व स्थिर असून, ऊर्ध्वमुख आणि अंधलोचन आहे. मृगाचे मुख आणि कृत्तिकांचा पुंज यांना जोडणारी एक काल्पनिक रेषा काढली तर ती रोहिणीवरून पुढे जाते. रोहिणीपुंजातल्या पाच तारकांनी मिळून शकटाकृती बनवली आहे, असे आर्य ज्योतिर्विद सांगतात. शनीने आपल्या भ्रमंतीत या शकटाचा भेद केला तर जगावर अरिष्ट ओढवते, असा ज्योतिर्विदांचा ठोकताळा आहे. वस्तुतः रोहिणीच्या शकटाकृतीपेक्षा तिचा समभुज त्रिकोण चटकन डोळ्यांत भरतो. या त्रिकोणाचा शिरःकोन पश्चिमेला आहे. पुंजातली ठळक तारका म्हणजेच रोहिणी हे त्या त्रिकोणाच्या दक्षिण भागाचे टोक होय. ती पृथ्वीपासून ५३ प्रकाशवर्षांच्या अंतरावर आहे. विषुववृत्ताच्या उत्तरेस सुमारे १६ अंशांवर असलेली ही तारका फार सुंदर दिसते. तिच्या केशरी वर्णात आरक्त झाक आहे. या तिच्या सौंदर्याने मुग्ध होऊन वैदिक ऋषींनी तिचे फार कौतुक केले आहे —

> रोहिणी देव्युदगात् पुरस्तात् ।
> विश्वा रूपाणि प्रतिमोदमाना ।
> प्रजापतिं हविषा वर्धयन्ती ।
> प्रिया देवानामुपयातु यज्ञम् ॥
>
> (तै. ब्रा. ३.१.१.

अर्थ – अनेक रूपांनी सर्वांना आनंद देणारी आणि प्रजापतीला हविर्द्रव्याने पुष्ट करणारी रोहिणी देवी पूर्वेकडे उदय पावली आहे. देवांना आवडती अशी ही आमच्या यज्ञाकडे इकडे येवो.

तैत्तिरीय ब्राह्मणातल्या उल्लेखावरून रोहिणी ही भूलोकातून वर गेली आहे, असे दिसते. प्रजापतीने 'विराट' नावाची स्त्री उत्पन्न केली; पण तिला यज्ञात भाग न मिळाल्यामुळे ती रुसली आणि अंतरिक्षात उडून गेली. रोहिणी म्हणजे वर जाणारी या अर्थाने मग हेच तिचे नाव पडले.

रोहिणी नक्षत्रासंबंधी पुराणात एक कथा आहे, ती अशी. सत्तावीस नक्षत्रे या दक्ष प्रजापतीच्या कन्या. त्या त्याने चंद्राला दिल्या. त्या सर्वांत रोहिणीवर चंद्र जास्त प्रेम करू लागला. ते पाहून इतर स्त्रिया मत्सरग्रस्त झाल्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पित्याकडे तक्रार केली. दक्ष प्रजापतीने चंद्राचा हा पक्षपात एकून त्याला शाप दिला, की 'तू क्षयरोगी होशील.' चंद्र घाबरला आणि त्याने मोठ्या मिनतवारीने दक्षाकडून उःशाप मिळवला, की 'पंधरा दिवस तुझा क्षय होईल व पंधरा दिवस तुझी वृद्धी होईल.' आकाशात चंद्र व रोहिणी यांची जवळिकेची युती आणि वद्य व शुक्ल पक्षांत चंद्रकलांची होणारी क्षय-वृद्धी या साक्षात्कारावर ही कथा आधारलेली आहे.

रोहिणी नक्षत्र हे शुक्राचे स्वगृह व चंद्राचे उच्च स्थान आहे. या ग्रहांचे गुणधर्म या नक्षत्रात उत्कर्ष पावतात. या नक्षत्रावर जन्मलेल्या मुली गोऱ्यागोमटघा व कलाचतुर निपजतात, असे जातकशास्त्रात सांगितले आहे. [नक्षत्रलोक]

(२) जैनांची विद्यादेवी. ही विशेषेकरून संगीतविद्येचे आधिपत्य करते. [जै. इ.]

(३) वसुदेवाची पत्नी व बलरामाची माता. कंसाच्या कारागृहात असलेल्या देवकीच्या सातव्या गर्भाला योगमायेने रोहिणीच्या गर्भात प्रविष्ट केले. मग रोहिणीला जो पुत्र झाला तोच बलराम होय. [प्रा. च. को.]

रोहिणी अष्टमी एक काम्य व्रत. श्रावण वद्य अष्टमीला रोहिणी नक्षत्र असेल तर त्या तिथीला जयंती म्हणतात. कारण रोहिणीयुक्त अष्टमीला श्रीकृष्णाचा जन्म झाला होता. या तिथीला उपवास करून कृष्णाची पूजा करावी, असे सांगितले आहे. फल—पापनाश व विष्णुलोकप्राप्ती.

रोहिणी-चंद्रशयन एक काम्य व्रत. पौर्णिमेला सोमवार असेल किंवा रोहिणी नक्षत्र असेल तर त्या दिवशी विष्णूची पूजा करावी आणि सोमाच्या 'आ प्यायस्व...' (ऋ. १.९१.१६) या मंत्राचा १०८ वेळा जप करावा; रोहिणीची प्रार्थना करावी; नंतर गोमूत्र प्राशन करून, मग २८ घास एवढे अन्न सेवन करावे, असा याचा विधी आहे. व्रतावधी एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी चंद्र व रोहिणी यांच्या सुवर्णमूर्ती एका पलंगावर ठेवून तो पलंग दान द्यावा. फल — सौंदर्य, आरोग्य, दीर्घायुष्य व चंद्रलोक यांची प्राप्ती. [हि. ध.]

रोहिणीद्वादशी एक काम्य व्रत. स्त्री-पुरुषांना विहित. श्रावण वद्य द्वादशीला हे व्रत सुरू करतात. व्रतावधी एक वर्ष. याचा विधी असा — जलाशयाजवळ गोमयाने सारवून एक मंडल तयार करावे. त्यावर चंद्र व रोहिणी यांच्या आकृती काढून त्यांची पूजा करावी. नैवेद्य दाखवून तो ब्राह्मणाला द्यावा. मग जलाशयात प्रवेश करावा. पाण्यात उभे राहून चंद्र व रोहिणी यांचे ध्यान करावे. उडदाच्या पिठाच्या शंभर लहान गोळ्या व तूप लावलेले पाच मोदक यांचे जलाशयातच भक्षण करावे. मग बाहेर येऊन ब्राह्मणाला भोजन घालावे व वस्त्रे द्यावी. फल — सौंदर्य व आरोग्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

रोहिणीव्रत एक नक्षत्रव्रत. रोहिणी हे कृष्णाचे जन्मनक्षत्र आहे. ज्या दिवशी पंचांगात ते नक्षत्र असेल त्या दिवशी हे व्रत करतात. व्रतविधी असा — रोहिणीची सुवर्णमूर्ती करावी. ती पंचरत्नांनी अलंकृत करावी. मग तिची स्थापना व पूजा करावी. त्या दिवशी नक्त भोजन करावे. दुसऱ्या दिवशी ती मूर्ती एका विद्वान ब्राह्मणाला दान द्यावी. फल—सौंदर्य, सौभाग्य व विष्णुलोक यांची प्राप्ती. [हि. ध.]

रोहिणीस्नान एक नक्षत्रव्रत. याचा विधी असा — आदल्या दिवशी कृत्तिका नक्षत्रावर कर्ता व पुरोहित यांनी उपवास करावा. रोहिणी नक्षत्राच्या दिवशी तांदुळांची रास करावी. ती गंध, प्रियंगू व पांढरी फुले यांनी, तसेच चीक गळत असणाऱ्या फांद्यांनी अलंकृत करावी. मग तिच्यावर उभे राहून स्नान करावे. नंतर विष्णू, चंद्र, वरुण, रोहिणी व प्रजापती यांची पूजा करावी. पुरोहिताने या देवतांच्यासाठी तूप व विविध प्रकारची बीज यांचा होम करावा. फल — पुत्र, ऐश्वर्य व कीर्ती यांची प्राप्ती. [हि. ध.]

रोहित एक चर्मकार जात. या लोकांची वस्ती सुरत जिल्ह्यात आढळते. हे खालपा व छडिया या नावांनीही प्रसिद्ध आहेत. यांच्यांत छावडा, चौहान, दभी, दांतिया, गोहेल, जाधव, पांडिया, रावा सलोंझा, झाला, विस्मिया, इ. आडनावे आहेत. या जातीत सहा पोटभेद आहेत.

विवाहप्रथा — रोहितांच्या पोटभेदात लग्नसंबंध होत नाहीत. विवाहसमारंभात गरोडा पुरोहित वधू-वरांना जवळ बसवून एकमेकांचे हात धरायला सांगतो, त्यांच्या वस्त्रांची गाठ मारतो, त्यांच्यावर अक्षता टाकतो आणि त्यांना अग्नीला सात प्रदक्षिणा करायला सांगतो. एवढे केले की विवाहविधी पूर्ण होतो.

मृतिकप्रथा — हे लोक मृतांना जाळतात किंवा पुरतात. जाळण्यापूर्वी प्रेत ताटीसह चितेभोवती पाच वेळा फिरवतात आणि नंतर त्याला अग्नी देतात. राख त्याच दिवशी किंवा तिसऱ्या दिवशी नदीत टाकतात. ज्या जागी मृत्यू झाला असेल, त्या जागी रात्री एक पणती लावतात. बाराव्या दिवशी पुरोहिताला बोलावून पिंडाची पूजा करतात. मग सर्वजण त्या पिंडावर पाणी ओततात. नंतर कणकेचा एक दिवा लावून तो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एका मडक्याजवळ ठेवतात. त्या मडक्यात उसाचे कांडे ठेवून त्याला फुलांची एक माळ घालतात. ही माळ त्या दिव्यावर लोंबती ठेवतात. मग त्या मडक्याची पूजा करतात. दुसऱ्या दिवशी या सर्व वस्तू गोळा करून गावाच्या सीमेपार नेऊन टाकतात. पाहा – खालपा. [सुरत गॅझे.]

रोहिदास (इ. स. १४१४ – १५४०) एक संत व कवी. याला रविदास किंवा रैदास असेही म्हणतात. महाराष्ट्रात मात्र तो रोहिदास याच नावाने प्रसिद्ध आहे. हा चर्मकार जातीत जन्मला. त्याच्या वडिलांचे नाव रघू आणि आईचे करमा असे होते. काहींच्या मते ते घुरवानिया असे होते.

रोहिदासाचा जन्म राजस्थानात, गुजरातेत, पंजाबात व मांडवगड येथे झाला, अशी अनेक मते आहेत. काशीपासून जवळच मंडूर नावाचे एक खेडे आहे. या गावाला पूर्वी मडुआडीह असे म्हणत. प्राचीन काळी तिथे चर्मकारांची मोठी वस्ती होती. या गावीच रोहिदासाचे पूर्वज राहत म्हणून इथेच त्याचा जन्म झाला, असे तिथले लोक मानतात. ही त्या लोकांची समजूत खरी मानायला पुष्कळच जागा आहे, असे प्रा. अशोक कामत यांनी म्हटले आहे. या गावी जो तलाव आहे, त्याला रोहिदासाचा तलाव असे म्हणतात. मात्र जन्म कुठेही झाला असला, तरी त्याचे वास्तव्य मात्र काशीमध्येच झाले.

रोहिदासाला लहानपणापासूनच ईश्वरभक्ती जडली. तो दिवसरात्र हरिभजनात रंगून राहू लागला. मेलेल्या गुराढोरांची कातडी कमावणे हा त्याच्या बापाचा पिढीजात धंदा. पण हा त्या धंद्यात बापाला काहीच मदत करीना. आईबापांना वाटले, की हा जर असा देवलसी झाला तर आपले कसे होणार आणि याचे तरी कसे होणार ? त्यांनी रोहिदासाला परोपरीनी समजावून पाहिले, पण त्याचा काही उपयोग झाला नाही.

शेवटी आईबापांनी त्याचे लग्न करायचे ठरवले. कदाचित बायकोच्या रूपाने संसार गळ्यात पडला, म्हणजे तरी हा सुधारेल, अशी त्यांची कल्पना. त्याप्रमाणे थोड्याच दिवसांत त्यांनी रोहिदासाचे लग्न करून टाकले. त्याच्या पत्नीचे नाव लोना असे होते. लोना पत्नी म्हणून घरात आली; पण तरीही रोहिदासाचे मन संसारात रमेना. शेवटी आईबापांनी त्याला घरातून वेगळे काढले. त्याने आपल्या घराच्या मागील दारी स्वतःचे बिऱ्हाड थाटले. तिथे व्यवसायाऐवजी त्याने भजन-पूजनच सुरू केले. साधुसंत रोहिदासाच्या घरी येऊ लागले. भक्त म्हणून, संत म्हणून जवळपासचे लोक त्याला थोडी बहुत शिधासामग्री देत असावे. तेवढ्यावरच तो आपली गुजराण व आल्यागेल्याचे आतिथ्य करू लागला. उत्तर प्रदेशातील चर्मकार त्याच्या पत्नीविषयी अतीव आदर बाळगतात. तिची देवी म्हणून काही ठिकाणी पूजाही होते. आपत्प्रसंगी चर्मकार स्त्रिया लोनादेवीची करुणा भाकतात.

रोहिदासाचे अधिकृत चरित्र फारसे उपलब्ध नाही. आख्यायिका मात्र पुष्कळ आहेत. त्यांपैकी त्याच्या संतपणावर प्रकाश पाडतील अशा दोन आख्यायिका पुढीलप्रमाणे –

रोहिदासाची सांसारिक ओढगस्त पाहून देवाला त्याची दया आली. देवाने एका साधूचे रूप घेऊन रोहिदासाच्या झोपडीत प्रवेश केला. 'हा घे तुला देवाचा प्रसाद' असे म्हणून मोहरांची एक बंद पिशवी रोहिदासाच्या हाती देऊन तो अदृश्य झाला. रोहिदासाने थैली उघडली. पाहतो तो तिच्यात खऱ्याच सुवर्णमुद्रा. पण संसाराला नितांत गरज असूनही त्याने त्या मोहरा घरात वापरायच्या नाहीत, असे ठरवले. त्या द्रव्याने त्याने काशीत एक मंदिर बांधले आणि एका ब्राह्मणाची देवपूजेसाठी नेमणूक केली. पण काशीतल्या ब्राह्मणांना, एका चांभाराने ब्राह्मण पुजारी नेमावा, या गोष्टीचे वैषम्य वाटले. ते रोहि-

संत रोहिदास

दासावर चिडले. त्यांनी बादशहाकडे कागाळी केली. बादशहाने रोहिदासाला पकडून आणले. पण त्याच्या मुखावरचे तेज पाहिल्यावर आणि त्याची अमृतोपम वाणी ऐकल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला शिक्षा करण्याऐवजी तो त्याचा शिष्यच बनला.

संत रोहिदास हा मीराबाईचा गुरू होता. तिने रोहिदासाकडून उपदेश घेतला आणि ती त्याची सेवा करू लागली. मीराबाईने चितोडगडावर रोहिदासासाठी कुंभश्यामाचे मंदिर बांधले. रोहिदास तिथे राहू लागला; पण मीरेने एका चांभाराला गुरू करणे व चांभाराने देवमंदिरात वास्तव्य करणे हे तिथल्या लोकांना मुळीच आवडले नाही. ते रोहिदासाचा द्वेष करू लागले. एके दिवशी त्यांनी रोहिदासाला छेडायचे ठरवले. ते म्हणाले. 'तुझ्या खांद्यावर जानवे आहे का? नाही ना? मग तुला देवपूजा करण्याचा काय अधिकार?' ते ऐकून रोहिदासाने त्या लोकांना एक चमत्कार दाखवला. त्याने लगेच जानव्याच्या जागेवर आपले कातडे चिरले. लोक पाहतात, तर कातडीखाली जानवे होते. साधे नव्हे; तर सुवर्णासारखे तेजस्वी. ते पाहता पाहता त्या दांभिक लोकांचे डोळे दिपले. ते मग रोहिदासाला शरण गेले.

रोहिदास कोणत्याही पाठशाळेत शिकला नव्हता. वर्णबाह्य असल्यामुळे तशी त्याला संधीच मिळणे शक्य नव्हते. पण तो साधुसंतांच्या संगतीत पुष्कळ शिकला. त्याने साधुसंतांकडून अध्यात्म ऐकले आणि ते आपल्या वृत्तीत मुरवून टाकले. त्याच्या काव्यात त्याची पारमार्थिक उंची स्पष्ट दिसून येते. रोहिदासाने बरीचशी पदे रचली आहेत. गुजरात व राजस्थान या प्रदेशांत ती हस्तलिखित स्वरूपात आढळतात व मौखिक परंपरेने गायिली जातात. त्याची सर्व पदे एकत्र करून ती छापण्यात आली आहेत. 'रैदासजीकी बानी' या नावाने तो पद्यसंग्रह प्रसिद्ध आहे. त्या संग्रहात ६ साख्या आणि ८७ पदे आहेत. शिखांच्या गुरुग्रंथातही रोहिदासाची सुमारे ४० पदे आढळतात. दादूपंथाच्या पंचवाणी आणि सर्वांगी या नित्यपाठाच्या पुस्तकातही रोहिदासाची पदे समाविष्ट आहेत.

रोहिदासाची वाणी भक्तिभावाने नटलेली आहे. तिच्यात एक प्रकारची व्याकुळताही आहे. ईश्वर अजून आपला उद्धार करीत नाही, ही व्यथा त्याच्या पुढील पद्यात आढळते –

इह अँदेस सोच जिय मेरे।
निसिबासर गुन गाऊँ तोरे ॥ टेक ॥
तुम चितत मेरो चितहु जाई।
तुम चिंतामनि हो इक साईं ॥
भगति हेत का का नहिं कीन्हा।
हमरी बेर भये बलहीना ॥
कह रैदास दास अपराधी।
जेहि तुम द्रवौ सो भगति न साधि ॥

भावार्थ – तू माझा उद्धार करशील की नाही, असा मला संभ्रम झाला आहे. म्हणून हे परमेश्वरा, मी तुझे रात्रंदिवस गुणगान करतो आहे. जर तू माझा प्रेमाने विचार करशील, तर माझी चिंता दूर होईल. कारण तू साक्षात चिंतामणी आहेस. भक्तांच्या कल्याणासाठी तू काय बरे केले नाहीस? आणि मग आमच्या उद्धाराच्या वेळीच असा का उदासीन होतोस? स्वतःला अपराधी समजून हा तुझा दास रोहिदास म्हणतो– ज्या योगे तू कृपेचा वर्षाव करावास, अशी भक्तीच अजून माझ्या हातून झाली नसावी.

रोहिदासाचे परमार्थविषयक विचार असे – तर्क-वितर्कांच्या द्वारे प्राप्त होणाऱ्या ज्ञानापेक्षा सत्याच्या अनुभूतीलाच परमार्थात प्राधान्य आहे. जोवर साधकाला परम वैराग्य प्राप्त होत नाही, तोवर भक्तीच्या नावाखाली केल्या जाणाऱ्या सर्व साधना व्यर्थ आहेत. जोवर नदी समुद्रात विलीन होत नाही, तोवर तिच्या ठिकाणी खळाळ असतो. विलीन झाल्यावर तो संपतो. सत्य व राम ही दोन्ही एकच आणि अनिर्वचनीय आहेत. या सत्याच्या प्राप्तीसाठी साधकाने अहंकाराचे पूर्ण विसर्जन करून एकांत निष्ठा धारण केली पाहिजे.

रोहिदासाचे बहुसंख्य अनुयायी उ. प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान व पंजाब या प्रदेशांत आढळतात. गुजरातेतले चर्मकार रविदासी म्हणून ओळखले जातात. काठियावाडात जुनागडाच्या जवळ रविदासकुंड नावाचे एक कुंड आहे. त्याच्या आसपास रोहिदासाच्या अनुयायांची वस्ती आहे, असे म्हणतात. राजस्थानमध्येही त्याच्या नावाचे एक कुंड आहे. दक्षिणेतील तिरुपतीच्या पर्वताखाली वैकुंठकोल नावाचे एक स्थान असून, तिथे रोहिदासाची एक गादीही आहे.

रोहिदासाच्या निर्वाणस्थानाबद्दलही मतमतांतरे आहेत. काही लोक तो चितोडच्या कुंभश्याम मंदिरातून निजधामाला गेला, असे मानतात; तर काशी क्षेत्रातच शंभराच्या वर आयुष्य उपभोगून तो सदेह परलोकी गेला, असे दुसरे काही लोक मानतात. [श्रीसंत रोहिदास – प्रा. अशोक कामत; हिं. वि. को.]

रौद्र रस

वाङ्मयीन नवरसांपैकी एक रस. काव्यगत रसांत या रसाला महत्त्वाचे स्थान आहे. भरताने शृंगार, रौद्र, वीर व बीभत्स या चार रसांनाच प्राधान्य दिले आहे. अन्य रसांची उत्पत्ती या चार रसांतूनच होते, असे तो म्हणतो (नाट्यशास्त्र ६.३८). करुण रसाची उत्पत्ती रौद्र रसातून होते–

रौद्रस्यैव च यत्कर्म स ज्ञेयः करुणो रसः।

(ना. शा. ६.३९.४१)

अर्थ – रौद्र रसाचे कर्मच करुण रसाला जन्म देते.

रसतरंगिणीत याचा स्थायी भाव सांगितला आहे, तो असा–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परिपूर्णः क्रोधो रौद्रः सर्वेन्द्रियाणामौद्धत्यं वा ।
वर्णोऽस्य रक्तो दैवतं रुद्रः ।

अर्थ – पूर्णतया प्रस्फुट असा क्रोध किंवा सगळ्या इंद्रियांनी उद्धत स्वरूप धारण करणे हा रौद्र रसाचा स्थायी भाव होय. या रसाचा रंग लाल असून, रुद्र हे त्याचे दैवत आहे.

लाल रंग मानण्याचे कारण हे, की कोपाविष्ट दशेत मनुष्याचा चेहरा लाल होतो. या रसाचे विभावानुभाव असे–

शत्रू हा आलंबन विभाव. शत्रूने केलेल्या अपकाराच्या कृत्यांनी क्रोधभावना प्रदीप्त होते म्हणून ती कृत्ये हा उद्दीपन विभाव. मुष्टिप्रहार करणे, शत्रूला आपटणे, झोडणे, लोळवणे, विद्रूप करणे, इ. प्रकारही उद्दीपन विभावातच मोडतात. केस ताठ होणे, भुवया वक्र होणे, ओठ चावणे, चर्या लालबुंद होणे, इ. या रसाचे अनुभाव म्हणजे शरीरावर दिसणारे दृश्य परिणाम होत. उग्रता, असूया, मोह, इ. या रसातले व्यभिचारी भाव समजावे.

याचे उदाहरण म्हणून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या श्रीबंदावीर या काव्यातील काही पंक्ती खाली दिल्या आहेत–

क्रूर लोह–पंजरांत या निर्दयशा
तीक्ष्ण सुळे !–लोहाचे दांत रक्तपी
तेवी शिवशिवत अहा वेतिना मुळी
अल्प वळायातेही तनुसि तयाच्या !
पीत रक्त लोह–सुळे टोंचटोंचुनी
देहाची जाळी ज्या जाहली असा
निजरक्ती न्हालेला कवण हाय हा
पंजरांत बंदिवान ? सिंह की जसा !
पंजरस्थ सिंहाच्या श्वान शिकारी
भंवति जसे भीत–धीट रक्तपिपासू
भुंकति बहु टपत तया भक्षु फाडुनी
शत्रूचे तेवि मुक्त खड्ग हे थवे
भुंकत त्या पंजरासि ढकलिती पुढे ।

भीमाने कीचकाचा वध करून त्याचा लोळागोळा केला, दुःशासनाने भर सभेत द्रौपदीची विटंबना मांडली, अश्वत्थाम्याने अचानक घाला घालून द्रौपदीच्या पाचही पुत्रांची शिरे तोडली, विश्वामित्राने हरिश्चंद्राचा मुलगा रोहिदास याच्या प्रेताची आतडी बाहेर काढली, औरंगजेबाने संभाजीला हालहाल करून मारले, इ. उदाहरणे ही रौद्र रसाचीच आहेत. सूडाच्या भावनेने भरलेली आणि राक्षसी वृत्तीची कृत्ये ही रौद्र रसाला वर्ण्य विषय होतात.

वीर व रौद्र या रसांतला फरक हा, की वीर रस पराक्रमी असतो, तर रौद्र रस हा क्रूर कृत्यांचा असतो. उदा॰ तानाजी उदयभानूशी लढला हे वीर रसाचे कृत्य; तर तो मरून पडल्यावर उदयभानूने त्याच्या डोक्यावर लत्ताप्रहार केला, ते रौद्र रसाचे कृत्य समजावे. [हिं. सा. को.; सुलभ काव्यशास्त्र]

रौप्याचलदान दश पर्वतदानांतील एक दान. याचा विधी असा – रुप्याचे पर्वत करावे. त्यांत निदान वीस पलभारांचा मेरुपर्वत असावा. त्याच्या $\frac{1}{4}$ इतक्या वजनाचे रुप्याचे पर्वत चारही बाजूंना रचावे. फल –पापनाश, दहा सहस्र गोदानांचे फल आणि सोमलोकनिवास. [दा. चं.]

रौरव अठ्ठावीस नरकांपैकी एक. हा भूमीच्या खाली आणि सदैव प्रज्वलित असतो. याच्या बृहद्रूपाला महारौरव असे म्हणतात. रौरवाला अग्नीच्या घोर रूपाचे अथवा तामस कृष्ण रूपाचे प्रतीक मानतात. जो माणूस नेहमी स्वार्थाचाच विचार करतो आणि दुसऱ्याला लुबाडून धन मिळवितो, त्याला या नरकातील यातना भोगाव्या लागतात. विशेषतः सर्पाहूनही भयंकर असणाऱ्या रुरू नामक प्राण्याकडून या यातना दिल्या जातात. याशिवाय खोटी साक्ष देणारे, असत्य बोलणारे, पक्षपात करणारे, भ्रूणहत्या करणारे व घरांना आगी लावणारेही या नरकात पिचत पडतात. पाहा – महारौरव. [पु. इ.; मा. पु. सां. अ.]

लंका एक प्राचीन नगरी व द्वीप. ही लंका म्हणजे एक दुर्भेद्य दुर्गच होता. दक्षिण समुद्राच्या तीरावर त्रिकूट पर्वताच्या माथ्यावर हा दुर्ग होता. या लंकादुर्गाची वैशिष्ट्ये रामायणाच्या युद्धकांडात सांगितली आहेत, ती अशी– किल्ल्याच्या सभोवती भक्कम तटबंदी होती. तटबंदीच्या बाहेरच्या बाजूला खंदक खणलेला होता. तो पाण्याने भरलेला होता. त्यात मासे व सुसरी होत्या. किल्ल्याचा तट सोन्याचा होता आणि त्याच्यावर चढणे कठीण होते. तटाचा अंतर्भाग हिरेमाणकांनी सुशोभित केलेला होता. तटाला चार दिशांना चार दरवाजे होते. शत्रूला रोखण्यासाठी दरवाज्यावर शतघ्नी व उपलयंत्रे बसविलेली होती. तसेच चारही दरवाज्यांवर सशस्त्र राक्षस सैनिकांचा जागता पहारा होता. किल्ल्यातही हत्ती, घोडे, शस्त्रे व राक्षस सैन्य ठेवलेले होते.

दूरचे निरीक्षण करण्यासाठी किल्ल्यात ठिकठिकाणी हर्म्ये उभारलेले होते. किल्ल्याच्या मध्यभागी राजवाडा होता.

रामायणात लंकानगरीचे वर्णन केले आहे, ते असे–

किल्ल्याच्या आत असलेली लंकानगरी विश्वकर्म्याने निर्माण केली होती. ही नगरी वीस योजने लांब व दहा योजने रुंद होती. सोन्याचे उंच प्रासाद तिला सुशोभित करीत होते. नगरी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मार्गांची व्यवस्थित आखणी केलेली होती. केंद्रीय राजमार्गांवर फुलांनी व फळांनी बहरलेले वृक्ष होते आणि सुंदर उद्याने होती. ते वृक्ष राजमार्गांवर नित्य फुलांची पखरण करीत. रात्री स्तंभांवरील दिव्यांनी ते उजळून निघत. चौकांत आणि इतरही ठिकाणी वेदिका व सभास्थाने बनवलेली होती. नगरातील इमारती सात-आठ मजल्यांच्या होत्या. घरे तोरणांनी सुशोभित केलेली होती. घरांना सुरेख जाळ्या होत्या. राक्षसांची भवने निरनिराळ्या वर्णांची व आकाराची होती. राक्षस सरदारांचे महाल मोठमोठी दालने, चंद्रशाला, क्रीडागृहे, निशागृहे व चित्रगृहे यांनी युक्त होते. महालाच्या जवळच प्रमदवन असे, तर सर्वसामान्य घरांभोवती बाग असे. नगरात चित्रविचित्र रंगांचे ध्वज फडकत असत आणि त्यामुळे लंकानगरी नेहमी उत्सवमग्न असल्यासारखी दिसे.

सुकेश राक्षसाचा पुत्र माल्यवान आपल्या बंधूंसह या नगरीत बराच काळ राहिला होता. पण विष्णूच्या भयाने त्याला ती जागा सोडून पाताळात जाऊन राहावे लागले. तेव्हापासून ती नगरी काही काळ ओस पडली होती. पुढे विश्रवा ऋषीच्या आज्ञेने त्याचा पुत्र कुबेर तिथे राहू लागला. रावण हा कुबेराचा भाऊ. तो बलदंड झाला आणि कुबेराला तिथून घालवून देऊन लंकाधिपती बनला. रावणाच्या मृत्यूनंतर त्याचा भाऊ बिभीषण लंकेत राहून तियले राज्य करू लागला.

रामायणातील ही लंका म्हणजे भारताच्या दक्षिणेला हिंदी महासागरात असलेले सांप्रतचे सिलोन बेट होय, अशी सर्वसाधारणपणे लोकांची व अनेक विद्वानांची समजूत आहे. पण काही विद्वानांनी लंकेचे स्थान सांप्रतच्या सिलोन बेटापेक्षा अन्य ठिकाणी दाखवण्याचा साधार प्रयत्न केला आहे.

सरदार माधवराव किबे म्हणतात, की विंध्य पर्वतातील अमरकंटक शिखराजवळचा छत्तीसगड विभाग आणि रेवा संस्थान यांच्या सीमारेषेवर रावणाची लंका वसली होती. आपल्या या मताच्या सिद्धीसाठी त्यांनी वाल्मीकिरामायणातूनच पुरावे गोळा केले आहेत, ते असे –

रामायणातील रामाची राजधानी असणारी अयोध्या व रामायणात उल्लेखिलेला चित्रकूट पर्वत ही स्थाने सांप्रतही जिला अयोध्या म्हणतात व ज्याला चित्रकूट म्हणतात, तीच स्थाने होत. सुग्रीवाची राजधानी किष्किंधा नगरी ही विंध्याद्रीच्या उत्तरेला, गंगायमुनांच्या पश्चिमेला आणि चित्रकूटाच्या नैर्ऋत्येला असली पाहिजे, असे वाल्मीकिरामायणातील रामाच्या प्रवासमार्गावरून दिसते.

चित्रकूटाहून किष्किंधेचे अंतर ९४ मैल होते. या अंतरावरच विंध्याद्रीही आहे. सीतेच्या शोधासाठी हनुमंताच्या आधिपत्याखाली एक टोळी दक्षिण दिशेला सुग्रीवाने पाठवली होती. या टोळीने एक महिना विंध्य पर्वतावरच सीतेचा शोध करण्यात घालवला. या ठिकाणी त्यांना एक दरी लागली. ती वृक्षांनी गच्च भरलेली असून, तिच्यातून पाणी वाहत होते. या जागी वानर रस्ता चुकले. मग तिथे राहणाऱ्या स्वयंप्रभा नामक एका मुलीने वाट दाखवून त्या दरीतून त्यांना बाहेर आणले. ती त्यांना विंध्याद्रीच्या पायथ्याशी असणाऱ्या समुद्राच्या किनाऱ्यावर घेऊन आली. तिथे त्यांना जटायूचा भाऊ संपाती भेटला. त्याने सांगितले, की या समुद्रात काही अंतरावर बेट आहे, त्यावर रावण व सीता ही दोघे आहेत. इथून ते द्वीप शंभर योजने अंतरावर आहे व इथून मला ती दोघे दिसत आहेत.

वास्तविक विंध्याच्या दक्षिणेला समुद्र नाही. तेव्हा संपातीने समुद्र म्हणून ज्याचा उल्लेख केला, ते एखाद्या नदीचे विस्तीर्ण पात्र असावे किंवा ते एखादे मोठे सरोवर असावे. त्याचा पलिकडचा किनारा स्पष्ट दिसत नव्हता व तो कोणीही पाहिला नव्हता म्हणून त्याला समुद्र असे नाव देण्यात आले असावे. हनुमंताने दोनच उड्डाणांत त्याचा पैलतीर गाठला होता.

लंकेला जरी बेट म्हटले असले, तरी वाल्मीकिरामायणात कुठेही तिच्या समुद्रकिनाऱ्याचे वर्णन आलेले नाही आणि त्यात रामेश्वराचाही उल्लेख नाही. तेव्हा लंका ही विंध्य पर्वतातच असली पाहिजे. विंध्याच्या दक्षिणेकडील गोंडवनात राहणाऱ्या गोंडांपैकी काही गोंड आपल्याला रावणवंशी समजतात, हाही एक विचारात घेण्याजोगा पुरावा आहे. हा झाला श्री. किबे यांच्या प्रतिपादनाचा निष्कर्ष.

लंका ही विंध्य पर्वतात आहे असे मानले, तर रामायणात गोदावरीचा उल्लेख आहे, तो या मताच्या विरुद्ध जातो. कारण सांप्रत आपल्याला ज्ञात असलेली गोदावरी नदी विंध्य पर्वताच्या दक्षिणेला आहे. ती नासिकजवळ त्र्यंबकेश्वर या ठिकाणी उगम पावते आणि पूर्वेला आंध्र प्रदेशाकडे वाहत जाते. याच गोदावरीच्या तीरी नासिकजवळ पंचवटी होती आणि तिथूनच रावणाने सीतेला पळवून नेले, असे काही विद्वानांनी मानले आहे; आणि पंचवटीच्या दक्षिणेकडे राम सीतेच्या शोधासाठी निघाला असेही सांगितले आहे. पण डॉ. हिरालाल यांनी ही गोदावरी नदी दुसरी असून, ती चित्रकूट पर्वताच्या दक्षिण दिशेला अकरा मैलांवरून वाहते, असे सिद्ध केले आहे. सांप्रत या नदीचा प्रवाह सरस्वती नदीप्रमाणे एका कुंडात लुप्त झाला आहे, असेही त्यांनी प्रतिपादले आहे.

डॉ. ह. धी. सांकलिया यांच्या मतेही लंका विंध्य पर्वतात होती. हनुमंताने ज्या सागराचे उल्लंघन केले तो सागर शंभर योजने विस्तीर्ण होता, असे रामायणात सांगितले आहे. योजन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शब्दाचा एक अर्थ साडेचार मैल असा आहे. तेव्हा सध्याची श्रीलंका म्हणजे जर प्राचीन लंका असे मानले, तर श्रीलंका आणि रामेश्वर यांमधील अंतर ४५० मैल असायला पाहिजे. पण तितके ते नाही. योजन शब्दाचा दुसरा एक अर्थ २०० वार (यार्ड) असाही आहे. तेव्हा हे माप ग्राह्य धरल्यास १०० योजने अंतर हनुमान पोहून जाण्याची शक्यता वाटते.

वाली आणि रावण यांची निवासस्थाने वनात होती, असे त्यांच्याच तोंडून रामायणात सांगितलेले आहे. ही वने कुठल्या भागात होती, तेही रामायणातील पुराव्यांवरूनच ठरवता येते. रामायणात साल वृक्षांचा वारंवार उल्लेख येतो. सुग्रीवाने रामाच्या पराक्रमाची परीक्षा घेण्यासाठी त्याला एका बाणात सात साल वृक्षांचा वेध करायला सांगितले होते. तसेच, राम, लक्ष्मण आणि वानरसेना यांची रावणाशी व राक्षसांशी लढाई झाली, त्या वेळी वानर व राक्षस हे अनेकदा साल वृक्ष उपटून घेऊन लढत. ही साल वृक्षांची घनदाट अरण्ये सांप्रतही मध्य प्रदेशातील पूर्व भागात अमरकंटकाच्या पठारावर व छोटानागपूर प्रदेशात आढळतात. मुंड, कोरकू, इ. वन्य जमाती या छोटानागपूरच्या आजूबाजूच्या भागात वस्ती करून आहेत. कोरकू लोकांत रावणाबद्दल आदर आढळतो. तेव्हा याच भागात कुठेतरी रावणाची लंका असली पाहिजे.

डॉ. सांकलिया यांच्या विवेचनाचा हा निष्कर्ष.

श्री. परमशिव अय्यर यांनी संशोधन करून मूळ लंका ही जबलपूरच्या उत्तरेला १५ मैलांवर इंद्राणा नावाच्या डोंगरावर होती, असे प्रतिपादन केले आहे.

डॉ. रामदास यांनी रावण हा मध्य प्रदेशातील एका आदिम जातीचा होता, असे मत मांडले आहे. डॉ. हिरालाल यांच्या मते रावण हा गोंड जातीचा होता आणि गोंड लोक अद्यापही आपणाला रावणाचे वंशज म्हणतात. या गोंडांच्या एका राजाने आपल्या राज्यात सुवर्णमुद्रा चालू केल्या होत्या. त्याच्या मुद्रांवर 'संग्रामशाह पौरस्त्यवंश' असे लिहिलेले आढळते.

श्री. नाडकर्णी यांनी लंकेच्या बाबतीत एक निराळेच मत मांडले आहे. त्यांच्या मते वाल्मीकिरामायणातील घटना घडल्या, तेव्हा श्रीलंका ही बेटाच्या रूपाने भारतापासून अलग झालेली नव्हती; तर तो भारताच्या भूमीचा एक सलग भागच होता. सांप्रतची लखदीव-मालदीव बेटे म्हणजे प्राचीन लंका होय. लखदीव बेटांजवळच्या समुद्राचा जो अभ्यास शास्त्रज्ञांनी केला आहे, त्याच्या आधारे श्री. नाडकर्णी यांनी हे प्रतिपादन केलेले आहे. पूर्वी या बेटांची नावे लंकाद्वीप व मलयद्वीप अशी होती, असेही ते म्हणतात.

आपल्या या मताला त्यांनी रामायणातील एक श्लोक पुरावा म्हणून उद्धृत केला आहे. मारुतीने जेव्हा समुद्र पार करून लंकेत प्रवेश केला, तेव्हा लंका त्याला दिसली ती अशी –

> ददर्श च पतन्नेव विविधद्रुमभूषितम् ।
> द्वीपं शाखामृगश्रेष्ठो मलयोपवनानि च ।
>
> (वा. रा. सुंदर. १. २०५)

अर्थ – वानरश्रेष्ठ हनुमानाने लंकेत उडी मारताक्षणीच त्याला विविध वृक्षांनी सुशोभित दिसणारे द्वीप व मलयावरील उपवने दिसली.

या श्लोकावरून लंका व मलय ही द्वीपे एकमेकांच्या निकट होती, हे कळून येते.

रामायणाच्या टीकाकारांना वरील श्लोकातील मलयाचा संबंध लंकेशी कसा जोडायचा हा एक पेचच पडला होता. रामायणतिलकात, 'मलयोपवनानि' या शब्दावर टीका लिहिताना 'उत्तर तीराप्रमाणे दक्षिण तीरावरही मलय नामक पर्वत होता असे कळते' असे म्हणून या पेचातून कसातरी मार्ग काढला आहे.

वरील श्लोकात उल्लेख केलेले मलय हे नाव मलयद्वीपाचे मूळ नाव असून, मालदीव हा त्याचा नंतरचा अपभ्रंश आहे. मुळात मलयद्वीप किंवा लंकामलय, हे एकच मोठे बेट असावे आणि नंतर कदाचित त्याचे दोन भाग होऊन त्या भागांना लंकाद्वीप व मलयद्वीप अशी नावे मिळाली असावी.

सिलोनची भूमी पूर्वी भारताला जोडलेली होती आणि नंतरच्या काळात ती समुद्राने वेगळी केली; त्याचा सखल भाग पाण्याखाली गेला व उंच अशी पर्वतशिखरे तेवढी पाण्याच्या वर राहिली, असे श्री. नाडकर्णी यांचे प्रतिपादन आहे.

लंकेविषयी ही अशी मतमतांतरे आहेत. त्यांतले खरे कोणते ते निश्चित सांगणे कठीण आहे. [रा. का. सं.; रामायण ॲं लंका – श्री. टी. परमशिव अय्यर, १९४०; लोकेशन ऑफ लंका – श्री. एम्. व्ही. किबे, १९४७; वाल्मीकि रामायणपरीक्षण – चि. वि. वैद्य, १९२०; डॉ. ह. धी. सांकलिया, पुरातत्त्वद्वारा रामायणावर नवा प्रकाश – प्रसाद, डिसें. १९७

लंकादहन सारंग

सारंग रागाचा एक प्रकार व काफी थाटाचा जन्य राग. याच्या आरोहावरोहात धैवत स्वर वर्ज्य आहे. म्हणून याची जाती षाडव-षाडव आहे. याचा वादी स्वर ऋषभ व संवादी स्वर पंचम आहे. गानसमय मध्याह्न. हा राग देसी रागासारखा भासतो; देसी रागाच्या आरोहात गांधार व धैवत हे दोन स्वर वर्ज्य आहेत आणि अवरोह संपूर्ण आहे. त्यामुळे हे दोन राग एकमेकांपासून भिन्न राहू शकतात. [सु. वि. को.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लंकावतारसूत्र महायानी बौद्धांच्या विज्ञानवादाच्या सिद्धान्तांचे मूलगामी प्रतिपादन करणारा एक ग्रंथ. या ग्रंथात एकूण दहा परिच्छेद आहेत. त्यांपैकी पहिल्या परिच्छेदात या ग्रंथाला हे नाव का मिळाले आणि हा ग्रंथ का लिहिला, त्याची कारणे दिलेली आहेत. भगवान बुद्धाने लंकेत जाऊन रावणाला सद्धर्माचा उपदेश केला, म्हणून या ग्रंथाला लंकावतारसूत्र असे नाव मिळाले. पुढे दोन ते नऊ या परिच्छेदांत मूल सिद्धान्ताशी संबंधित अशा निर्वाण, संसारबंधन, मुक्ती, आलयविज्ञान, मनोविज्ञान, शून्यता, इ. विषयांवर विवेचन केलेले आहे. ग्रंथाच्या शेवटच्या परिच्छेदाला सगाथकम असे नाव असून, त्यातील ८४४ गाथांत विज्ञानवादाबद्दल विस्तृत विवेचन आहे. यातील सिद्धान्त आधाराला घेऊनच मैत्रेयाने आपल्या धर्मधर्मताविभंग, अभिसमयालंकारकारिका, इ. ग्रंथांची रचना केली आहे. [बौ. द. मी.; बौ. ध. द.]

लंगडी लहान मुलांचा एक सांघिक खेळ. प्रथम खेळात भाग घेणाऱ्या मुलांचे दोन समान संघ करतात. खेळण्यासाठी सुमारे ३० फूट व्यासाचे एक वर्तुळ काढतात. खेळणारे गडी त्या गोलात उभे राहतात. मग एक गडी एका पायावर लंगडत गोलातील गड्यांना शिवण्याचा प्रयत्न करतो. खेळणारे गडी त्याचा स्पर्श न होईल या पद्धतीने त्याला चकवीत रिंगणात पळत राहतात. शिवणारा गडी दुसरा पाय न टेकवता जितक्या गड्यांना शिवेल तितके गडी बाद होतात. शिवणाऱ्या गड्याने दुसरा पाय अथवा शरीराचा कोणताही भाग जमिनीवर टेकवला, तर तो स्वतः बाद होतो. त्याचप्रमाणे पळणाऱ्या गड्यांपैकी कोणीही आखलेले वर्तुळ सोडून बाहेर गेला तर तोही बाद होतो. शिवणाऱ्या गड्याने पाय टेकविल्यावर दुसरा गडी रिंगणात येऊन खेळणे पुनः सुरू करतो. याप्रमाणे दोन्ही संघाचे सारखे डाव झाल्यावर ज्यांचे गडी अधिक बाद झाले असतील, तो संघ पराभूत झाला, असे समजतात.

लंगडीचे लमाण लंगडी, सोलापुरी लंगडी, इ. प्रकार आहेत. [व्या. ज्ञा. को.; स. म. खे. पु.; सु. वि. को.; सुरत गॅझे.]

लंगा एक गाणारी जात. हे मुसलमान असून, यांची वस्ती सिंध व राजस्थान यांच्या सीमाभागात आढळते. बंटी ही यांची एक प्रसिद्ध पोटजात आहे. यांच्यांत दोन वर्ग असून, त्यांतील प्रत्येक वर्ग स्वतःला श्रेष्ठ समजतो.

लंगा लोक केवळ चौहानांच्याकडेच गाणी गातात. इतरांच्याकडे गाणी गाणे हे त्यांना कमीपणाचे वाटते. मांड गायकीची परंपरा यांनी सुरक्षित ठेवली आहे. यांना शास्त्रीय संगीताचेही ज्ञान असते. हे सकाळी लाखा फुलानी व कागा कोटगा गातात. दुपारी कमचा वाजवितात. कमचा हे सारंगीसारखेच एक वाद्य आहे. सायंकाळी हे कल्याण गातात. या क्रमानेच आपले गाण्याचे कार्यक्रम करण्याचा त्यांचा सामाजिक संकेत आहे. गाण्याशिवाय हे लोक शेतीही करतात. [लोककला त्रै.]

ल य वर्गातील तिसरा व व्यंजनांतील अठ्ठाविसावा वर्ण. या वर्णाची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील लेखात, दुसरी कुशाणवंशी राजांच्या वेळच्या मथुरा येथील लेखात (इ. स. चे १ ले २ रे शतक), तिसरी झालारपाटण



लच्या रूपाचा विकासक्रम

येथील राजा दुर्गगणाच्या लेखात (इ. स. ६८९) व शेवटची ओरिया लेखात (इ. स. १२०८) दिसून येते.

कामधेनुतंत्रात या वर्णाचे स्वरूप वर्णिले आहे, ते असे –

लकारं चञ्चलापाङ्गि कुण्डलीत्रयसंयुतम् ।
पीतविद्युल्लताकारं सर्वरत्नप्रदायकम् ॥
पञ्चदेवमयं वर्णं पञ्चप्राणमयं सदा ।
त्रिशक्तिसहितं वर्णं त्रिबिन्दुसहितं सदा ।
आत्मादितत्त्वसहितं हृदि भावय पार्वति ।

अर्थ – हे चंचलापांगी पार्वती, ल हा वर्ण कुंडलीत्रययुक्त, पीतविद्युल्लताकार, सर्वरत्नप्रदायक, पंचदेवमय, पंचप्राणमय व त्रिशक्ती, त्रिबिंदू आणि आत्मादी तत्त्व यांनी युक्त आहे. तू त्याचे मनात चिंतन कर.

दंत हे याचे उच्चारणस्थान आहे. [श. क.; म. ज्ञा. को.]

लक्कुंडी एक जैन क्षेत्र. म्हैसूर राज्यातल्या गदगपासून आग्नेयेस ७ मैलांवर हे गाव आहे. इथे दोन सुंदर जैन मंदिरे आहेत. यांतल्या मोठ्या मंदिरात इ. स. ११७२ चा एक शिलालेख आहे. हे मोठे मंदिर ऐहोळ व पट्टदकल येथील मंदिरांप्रमाणे विशाल पाषाणखंडांनी निर्मिलेले आहे. चुना किंवा सिमेंट न वापरता दगडांना खाचा करून ते एकमेकांत बसवून मंदिराची उभारणी केलेली आहे. याचे शिखर अनेक भूमिकांचे असून, ते द्राविड पद्धतीचे आहे. एकावर एक उठणाऱ्या भूमिकांच्या कपोतपालिका सूक्ष्म व लालित्यपूर्ण आहेत. शिखराच्या स्तूपिकेची बनावट विशेष संतुलित आहे. भिंतींवर चित्रकारीही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. मंदिरावर कीर्तिमुख व पद्मासनस्थ जिनमूर्ती कोरलेल्या आहेत. मंदिराच्या भिंती स्तंभाकृतींनी विभाजित आहेत. हे



जैनमंदिर – लकुंडी

मंदिर दुमजली असून, मंदिराच्या गर्भगृहात व वरच्या मजल्यावरच्या गर्भगृहातही तीर्थंकरांच्या मूर्ती आहेत. या मंदिराला दोन सभामंडप आहेत. लकुंडीच्या या जैन मंदिराने द्राविड वास्तुशिल्पाला प्रभावित केले आहे. [भा. सं. जै. यो.]

लकुलीश पाशुपत (इ. स. चे १ले शतक) एक शिवावतार. याला नकुलीश असेही म्हणतात. शिवाचे जे १८ अवतार झाले, त्यांतला लकुलीश हा पहिला अवतार होय. हा अवतार कायारोहण क्षेत्रात झाला. हे क्षेत्र बडोद्याजवळ असून, ते हल्ली कारवान म्हणून प्रसिद्ध आहे. तिथे स्मशानातील एका मृत शरीरात ब्रह्मचारी शिवाने प्रवेश करून लकुलीश या नावाने अवतार धारण केला (वायुपु. २३; लिंगपु. २४). लकुल म्हणजे काठी, दंड किंवा लाकूड. ते हातात धारण करतो, तो लकुलीश होय. भारतात एकूण अठ्ठावीस योगाचार्य प्रसिद्ध आहेत. श्वेताचार्य हा त्यांतला पहिला व लकुलीश हा शेवटचा होय. कलियुगात शैवमताच्या प्रचाराचे कार्य या योगाचार्यांनी केले. लकुलीशाचे कुशिक, गर्ग, मित्र व कौरुष्य असे चार शिष्य होते. त्यांना पाशुपत अशी संज्ञा होती. त्यावरून लकुलीशाने प्रतिपादिलेल्या शास्त्राला पाशुपतदर्शन किंवा लकुलीशदर्शन असे म्हणू लागले. लकुलीश्वरआगम किंवा लाकुलागम अशीही त्या दर्शनाला अन्य नावे आहेत.

लकुलीशाच्या सर्व मूर्ती भारतभर, विशेषतः कुमाऊं प्रदेशात आढळतात. विश्वकर्मावतार वास्तुशास्त्रामध्ये लकुलीशाची मूर्ती कशी करावी, याविषयी श्लोक दिला आहे, तो असा–

न(ल)कुलीशं उर्ध्वमेढ्रं पद्मासनमुपस्थितम्।
दक्षिणे मातुलिङ्गं च वामे दण्डः प्रकीर्तितः॥

अर्थ – लकुलीश हा पद्मासनावर बसलेला व ज्याचे जननेंद्रिय उत्थित आहे, असा करावा. त्याच्या उजव्या हाती महाळुंग व डाव्या हाती दंड असावा.

काही ठिकाणी लकुलीशाच्या गुडघ्याभोवती पट्टबंध आढळतो. तशा अवस्थेत तो ध्यानस्थ आहे, असे समजायचे. महाळुंग हे शिवाने धारण केलेले फळ असल्यामुळे ते त्याच्या अवतारातही आले. सोटा धारण करणे हे मात्र लकुलीशाचे व्यवच्छेदक लक्षण होय. कारण शिवाच्या कुठल्याही मूर्तीत सोटा दाखवलेला आढळत नाही. ऊर्ध्वमेढ्र (उत्थितलिंग) हेही शिवाचेच लक्षण आहे. लकुलीशाची मूर्ती नग्न असल्यामुळे त्याचे ऊर्ध्वमेढ्र ठळकपणे दिसते. बंगाल, बिहार आणि ओडिसा या प्रांतांतल्या प्राचीन शिवमूर्ती नग्नच आढळतात. मोहेंजोदडो येथे झालेल्या उत्खननात सापडलेल्या काही शिक्क्यांवरही नग्न पुरुषाकृती आहे. श्री. मार्शल याने त्या मूर्तीला पशुपती म्हटले आहे. डॉ. भांडारकर व प्रा. नीलकंठशास्त्री यांच्या मते शिक्क्यावरची ती नग्न मूर्ती लकुलीशाची असणे शक्य आहे.

पुराणांत रुद्राचा नग्न व ऊर्ध्वलिंग म्हणून उल्लेख आढळतो. तो ऊर्ध्वलिंग का झाला याचा खुलासा ब्रह्मांडपुराणात केलेला आहे, तो असा –

ब्रह्मदेवाने रुद्राला प्रजोत्पादनाची आज्ञा केली, तेव्हा तो ऊर्ध्वलिंग झाला. पण ब्रह्मदेवाला मरणधर्मी प्रजा हवी होती. रुद्राने तशी प्रजा उत्पन्न करायला नकार दिला. मात्र तेव्हापासून तो ऊर्ध्वलिंग अवस्थेत तसाच राहिला.

वरील कथेला अनुसरून लकुलीश हा ऊर्ध्वमेढ्र अवस्थेत दाखवला जाऊ लागला. त्याच्या मूर्तींची आणखी काही वैशिष्ट्ये अशी– त्याचे केस कुरळे असतात. कानाच्या पाळ्या लांब असून, त्यात रुद्राक्ष असतात. डोळे काचेसारखे असतात. कर्णरेषेत डाव्या खांद्यावरून उजव्या नितंबापर्यंत गेलेली वस्त्राची किनार असते. या सर्व खुणांवरून लकुलीशाची मूर्ती ओळखता येते. लकुलीशाच्या प्राचीन मूर्तींपैकी एक मूर्ती इ. स. च्या चौदाव्या शतकातली आहे. ती एका गुप्तकालीन शिलालेखाच्या वर एका चौरस खांबावर उभी कोरली आहे. दुसरी मूर्ती वेरूळच्या लेण्यात पद्मासनस्थ आहे. मथुरा येथील पुराणवस्तुसंग्रहालयात असलेली मूर्ती सर्व चिन्हांनी युक्त आहे. सौराष्ट्रात अतिदूर सापडलेली आणखी एक मूर्ती प्रभासपट्टण येथील सिद्धनाथ मंदिराच्या आवारात आहे. या मूर्तीत लकुलीशाच्या मस्तकावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचे सात शिष्यही दाखवले आहेत. ही मूर्ती इ. स. च्या १० व्या शतकातली असावी.

लकुलीश शिवमूर्ती – वेरूळ

लकुलीश दर्शन– लकुलीशाने जे तत्त्वज्ञान प्रतिपादले, त्याचे वर्णन सर्वदर्शनसंग्रहात दिलेले आहे. या दर्शनाचे सार असे–

जीव हा पशु असून, शिव हा पशुपती आहे. पशुपतीने कोणत्याही साधनाचा अवलंब न करता हा विश्वपसारा निर्माण केला. म्हणूनच तो स्वतंत्र कर्ता आहे. जीवांच्या कर्मांचा मूळ तोच आहे. किंबहुना पशुपती हा सर्व कार्यांचे कारण आहे.

मुक्ती दोन प्रकारची आहे–(१) सर्व दुःखांची आत्यंतिक निवृत्ती व (२) पारमैश्वर्य प्राप्ती. पारमैश्वर्यही दोन प्रकारचे आहे–(१) दृक् शक्तीची प्राप्ती व (२) क्रियाशक्तीची प्राप्ती. पहिलीने सर्वज्ञता मिळते व दुसरीने इच्छित गोष्ट त्वरित घडून येते. या दोन शक्तींची सिद्धी म्हणजेच पारमैश्वर्य मुक्ती होय. भगवंताचे दास होणे ही मुक्ती नसून बंधन आहे.

धर्मार्थसाधक व्यापाराला विधी म्हणतात. व्रत व द्वार असे विधीचे दोन प्रकार आहेत. भस्मस्नान, भस्मशयन, जप, प्रदक्षिणा व षडंगोपहार हे विधी म्हणजे व्रत होय. शिवाचे नाव घेऊन हा हा असे हसणे, गाल वाजविणे, गाणे, नाचणे, हुडुक्कार व नमस्कार हे षडंगोपहार होत. हे व्रतविधी एकांतात केले पाहिजेत. क्राथन (जागेपणीही निद्रालुत्व दाखविणे), स्पंदन (पक्षाघात झाल्याप्रमाणे शरीर हालवीत राहणे), मंदन (पाय व शरीरावयव पंगू झाले आहेत असे समजून त्यांची मंद व गळल्यासारखी हालचाल दाखविणे), शृंगारण (एखादी सुंदर स्त्री पाहिल्यावर जणू आपण तिच्यावर प्रेम करतो अशा भावनेने कामुकतेचे प्रदर्शन करणे), अवितत्करण (इतरांनी निषिद्ध मानलेल्या गोष्टींचे आचरण करून जणू आपण विधिनिषेधांच्या पलिकडे आहोत, असे दाखविणे) व अवितद्भाषण (मूर्खासारखी बेताल बडबड करणे), ही सहा कर्मे द्वार या विधीत येतात. वरील विधींमुळे दुःखाचा अंत होऊन साधकाला सर्वज्ञत्व व सर्वकर्तृत्व अशी उभयविध मुक्ती मिळते, असे लकुलीश दर्शनात सांगितले आहे.

लकुलीशपंथाचा इतिहास– लकुलीशाची खास पाशुपतपद्धती फार प्राचीन काळी गुजरातेतील लाट मंडळात उगम पावली व इ. स. च्या ७ व्या शतकामध्ये किंवा त्याच्याही पूर्वी या संप्रदायाच्या तात्त्विक साहित्याचा गुजरातेतच विकास झाला. सातव्या शतकापासून प्रस्तुत पंथ उत्तरेस राजस्थानापासून दक्षिणेस म्हैसूरपर्यंत पसरला. डॉ. भांडारकर यांनी लकुलीशपंथाचे पाशुपतपंथाशी साधर्म्य दाखवले आहे व लकुलीशपंथ इ. स. च्या पहिल्या शतकात उदयास आला, असा निष्कर्ष सांगितला आहे. लकुलीशाच्या वर उल्लेखिलेल्या चार शिष्यांनी सबंध भारतभर हिंडून आपल्या गुरूच्या तत्त्वांचा प्रचार केला. लकुलीशाच्या कुशिक या शिष्याची शिष्यशाखा उत्तरेस मथुरेपर्यंत पोचली. मथुरेत इ. स. ३८०चा एक शिलालेख मिळाला असून, त्यात कुशिकापासून दहावा शिष्य उदिताचार्य याने तिथे उपमितेश्वर आणि कपिलेश्वर नामक शिवलिंगांची स्थापना केली, असे लिहिले आहे.

गर्ग या शिष्याने गुजरातमध्ये बरेच अनुयायी जोडले. गुजरातेत गर्गशाखा प्रभावी ठरली. अनहिलपट्टण येथे सोळंकी राजवटीत जी देवळे व मठ निर्माण झाले, त्यांचे निर्माते व आचार्य गर्गशाखेचेच होते.

लकुलीशाच्या जन्मानंतरचा सुमारे नऊ शतकांचा इतिहास उपलब्ध नाही. इ. स. च्या ११ व्या शतकात सोळंकी राजवटीपासून या पंथाचा इतिहास उपलब्ध होऊ लागतो. त्या राजवटीत प्रस्तुत पंथाचे आचार्य कनोजहून गुजरातेत आले व तिथे स्थायिक झाले. सिद्धराज आणि कुमारपाल हे दोघे सोळंकी राजे कट्टर पाशुपत होते. त्या दोघांनी पाशुपतमताच्या प्रचारासाठी फार मोठा हातभार लावला. चौलुक्य राजांची दानपत्रे याला साक्षी आहेत. त्यांच्या राज्यात गुजरातमध्ये या पंथाचे चांगले बस्तान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसले. त्या पंथाला राजमान्यता व लोकमान्यताही मिळाली.

प्रस्तुत पंथात भावबृहस्पती नावाचा एक मोठा आचार्य होऊन गेला. हा कान्यकुब्ज ब्राह्मण असून, त्याचा जन्म वाराणशीत झाला होता. त्याने लहान वयातच पाशुपतपद्धती आत्मसात केली. त्याने भारतभर फिरून अनेक राजे-रजवाड्यांना या पंथाची दीक्षा दिली. पुढे घारापुरी येथे येऊन तप केले. काशी, माळवा आणि गुजरात या प्रदेशांतील राजांनी पंथाचा सर्वश्रेष्ठ आचार्य म्हणून त्याला मान्यता दिली व त्याचा गौरवही केला. भावबृहस्पतीच्या काळात सोमनाथाचे मंदिर जीर्ण झाले होते. त्याने सिद्धराजाला त्याच्या जीर्णोद्धाराची आज्ञा केली. सिद्धराजाने त्या कार्याला प्रारंभ केला व त्याचा वारस कुमारपाल याच्या राजवटीत ते कार्य पुरे झाले.

भावबृहस्पतीला गंड ही पदवी मिळाली होती. गंड ही शिवाची उपाधी आहे. त्याला गंडसर्वेश्वर म्हणतात. या उपाधीने भावबृहस्पतीची शिवाशी तुलना केली गेली.

भावबृहस्पतीने आपली कन्या प्रतापदेवी वाराणशीच्या विश्वेश्वरराशीला दिली होती. भावबृहस्पतीच्या नंतर अजयपाल राजाने भावबृहस्पतीचा वारसदार म्हणून विश्वेश्वरराशीची नियुक्ती केली व त्याला गंडतीर्थेश्वर अशी उपाधी दिली. त्याच्या नंतर दुर्वासू हा तियला पंथप्रमुख बनला. त्याच्या नंतर त्रिपुरांतक हा पंथाचार्य झाला. त्यानंतर विमलमुनी, गंडश्री-वीरभद्र, विद्याराशी, ओंकारराशी, परबृहस्पती, त्र्यैलोक्यराशी, धर्मराशी, वादिरुद्र-पंडित असे आणखी काही विद्वान आचार्य या पंथाला लाभले.

लकुलीश – मुखलिंगम

सौराष्ट्रामध्ये लकुलीशसंप्रदाय अस्तित्वात असल्याचा पुरावा कुमारपालाच्या राजवटीतील एका शिलालेखात सापडतो. हा शिलालेख इ. स. १३०३ चा आहे.

म्हैसूर राज्यात वेलगामी येथे लकुलीशपंथाचे महत्त्वाचे केंद्र होते. त्या भागातले कालामुखपंथाचे लोक लाकुलागमामध्ये अत्यंत पारंगत होते, असे तिथल्या एका लेखात म्हटले आहे.

मुत्तगे संगमेश्वर देवालयातील शिलालेखात (इ. स. ११४७) माहिती दिली आहे, ती अशी– वाणी ही विजापूर येथे काश्मीरमुनीजवळ राहायला आली. काश्मीरमुनीचा शिष्य कालभैरवदेव हा वादकुशल आणि वेदान्तात प्रवीण होता. त्याच्या वंशावळीत शेवटचा लकुलीश हा शिवतत्त्वज्ञ झाला. ही वंशावळ अशी – भुजंगदेव →त्रिलोचनदेव →त्रलिसूर्यमुनी→ काश्मीरपंडितदेव →कालभैरव पंडितदेव→अचलेश्वर अर्थात वरेश्वरदेव →योगीश्वर देव →लकुलीश देव. या शिलालेखात लकुलीशाला भक्तांमध्ये शिरोरत्न आणि लाकुलागम या अमृतसागरातला चंद्र म्हटले आहे.

द. भारतात या पंथाच्या जुनी व नवी अशा दोन शाखा होत्या, असे म्हैसूर राज्यातील गोळकेरी येथील शिलालेखावरून (इ. स. १२८५) दिसते. या लेखात लाकुलपंथाला देणग्या देऊन साहाय्य करणाऱ्यांचा उल्लेख आहे. पाहा – पाशुपत संप्रदाय. [एम्. आर. मुजुमदार–पी. के. गो. को. व्हॉ.; श्री. वि. भि. कोलते – विदर्भ सं. मंडळ वार्षिक, १९६९; हिंदुत्व; रि. इं.]

लक्कण्ण दंडेश (इ. स. चे १५ वे शतक) एक वीरशैव ग्रंथकार. याचे चरित्र फारसे उपलब्ध नाही. हा प्रौढदेवराय याचा प्रधानमंत्री होता, एवढेच कळते. त्याच्या काळापर्यंत वीरशैवमताचे प्रतिपादक असे अनेक ग्रंथ निर्माण झाले होते. पण लक्कण्णाने शिवतत्त्वचिंतामणी नावाचा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहून वीरशैववाङ्मयात मोलाची भर घातली. या ग्रंथाचे ५५ अध्याय असून, वार्धिकषट्पदी नामक छंदात तो लिहिलेला आहे. या ग्रंथात शिवतत्त्वाचे मूलग्राही प्रतिपादन तर आहेच; आणि त्याव्यतिरिक्त लिंगधारण, शिवपूजा, शिवशरणचरित्र, शिवाधिक्य, शिवलीला, इ. अनेक विषयांचे वर्णन आहे. प्रस्तुत ग्रंथावरून कवीच्या प्रतिभेचा व शिवभक्तीचा परिचय होतो. [हिं. क. भ. तु. अ.]

लक्खण (इ. स. चे १३ वे शतक) एक जैन कवी. जैता व साहुल ही त्याच्या माता-पित्यांची नावे होती. हा कवी प्रथम त्रिभुवनगिरी येथे राहत होता. कोण्या म्लेच्छ राजाने त्रिभुवनगिरीवर स्वामित्व मिळविल्यावर लक्खण तिथून उठून विल्लरामिपूर येथे राहायला गेला. हे स्थान उ. प्रदेशाच्या इटा जिल्ह्यात याच नावाने प्रसिद्ध आहे. लक्खणाने तिथे कोण्या श्रीधर नामक गृहस्थाच्या आश्रयाला राहून त्याच्याच प्रेरणेने जिनदत्तचरित नावाचे एक खंडकाव्य अपभ्रंश भाषेत लिहिले. या काव्यात ११ संधी आहेत. जिनदत्त हा मगधाचा राजपुत्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. या काव्यात जिनदत्ताचे तीन विवाह वर्णिलेले आहेत. हा ग्रंथ अजून अप्रकाशित असून, त्याची एक प्रत राजस्थानातील आमेरच्या शास्त्रभांडारात सुरक्षित आहे.

याचा दुसरा ग्रंथ अणुवय रयण पईउ (अणुव्रत रत्न प्रदीप) हा असून, त्याचे आठ संधी आहेत. या ग्रंथात जैन श्रावकांना आचरण्यास योग्य अशी अनेक व्रते सांगितली आहेत. यात जागजागी गृहस्थधर्माचेही प्रतिपादन केले आहे. [अ. सा.]

लखुबाई एक देवता. लखुबाई हे लक्ष्मीचे किंवा रुक्मिणीचे अपभ्रष्ट रूप आहे. हिचे स्थान पंढरपूर क्षेत्रात रगडी पुलाजवळ आहे. इथे या देवीचे प्राचीन मंदिर असून, मंदिराला गाभारा व मंडप आहे. गाभाऱ्यात लक्ष्मीची चतुर्भुज मूर्ती आहे. या मूर्तीसमोर शेंदूर फासलेला एक तांदळा असून, त्याबरोबर त्याचीही पूजा होते. जोगेश्वरीचे स्थान हेच होय. लखुबाईच्यासमोर भीमा नदीत लक्ष्मीतीर्थ म्हणून एक तीर्थ आहे. या तीर्थात स्नान करून लक्ष्मीची पूजा केली असता अखंड लक्ष्मी प्राप्त होते, अशी लोकांची श्रद्धा आहे.

नवरात्रात या देवीचा मोठा उत्सव होतो. तुळजापूरच्या यात्रेला जाताना, ती यात्रा निर्विघ्नपणे पार पडावी म्हणून यात्रेकरू एक दिवस इथे राहून मग पुढे जातात. पाहा – पंढरपूर, रखुमाई. [पंढरी-माहात्म्य; पंढरी-वर्णन]

लगध ऋग्वेदज्योतिषाचा आचार्य. याचा ग्रंथ वेदांग ज्योतिष या प्रसिद्ध ग्रंथाचा एक भाग असून, तो वैदिकांच्या म्हणण्यात आहे. यात छत्तीस श्लोक आहेत. या ग्रंथात तिथी व नक्षत्रे काढायच्या म्हणजे सूर्य-चंद्रांचे गणित करण्याच्या तोंडी हिशोबाच्या पद्धती दिल्या आहेत. या रीती ध्यानात येण्यापूर्वी काही शतके सूर्यचंद्रांच्या गतीचे अवलोकन होऊन चैत्रादी मासंसंज्ञा प्रचारात आल्या होत्या. भारतात गणितशास्त्राची वाढ अवलोकन, तोंडी गणित, लेखी गणित, या क्रमाने झाली. त्यापैकी लगधाची गणना तोंडी गणित करणाऱ्या प्राचीन ज्योतिष्यांत करावी लागते.

वेदांग ज्योतिषाच्या कालासंबंधी पौर्वात्य व पाश्चात्य पंडितांत खूप मतभिन्नता आहे. श्री. माक्स म्यूलर याचा काल सनपूर्व ३ रे शतक मानतात व श्री. वेबर सनपूर्व ५ वे शतक हा मानतात. श्री. शं. बा. दीक्षितांच्या मते याचा काल सनपूर्व १४०० असा आहे.

लगधाच्या चरित्रासंबंधीची माहिती अजून मिळाली नाही. श्री. दीक्षितांच्या मते याचे जन्मस्थल ३४/३६ किंवा ३४/५५ अक्षांशांवर असावे. [प्रा. च. को.; म. च. को.]

लगोऱ्या महाराष्ट्रातील मुलांचा एक खेळ. हा खेळ पाचसहाशे वर्षांपूर्वीपासून प्रचलित आहे. एकनाथांच्या गाथेत त्याचा उल्लेख आहे. पेशवाईच्या काळात मोठे लोकही हा खेळ घोड्यावर बसून खेळत, असे म्हणतात. सांप्रत मात्र तरुण मुलेच हा खेळ खेळतात. लाकडाचे चपटे, गोल ठोकळे किंवा दगड एकावर एक रचून ठेवायचे आणि दुरून चेंडू फेकून ती उतरंड पाडायची, अशा प्रकारचा हा खेळ आहे. त्यासाठी वापरलेल्या ठोकळ्यांना लगोऱ्या म्हणतात. ६ चपटे, गोल ठोकळे व एक कळस मिळून ७ लगोऱ्या असतात. सर्वांत खालचा ठोकळा ५ ते ६ इंच व्यासाचा असतो व कळसाच्या तळाचा व्यास २ ते ३ इंच असतो. प्रत्येक ठोकळा १ ते १।। इंच जाड व कळस २ ते ३ इंच उंच असतो. प्रत्येक लगोरी कळसाकडे निमुळती होत जाते व कळस सोंगटीसारखा असतो. लगोऱ्या पाडण्यासाठी ३ इंच व्यासाचा लाकडी, कापडाचा किंवा रबरी चेंडू वापरतात.

जिथे लगोऱ्या रचून ठेवायच्या, तिथे मध्यबिंदू कल्पून, त्याच्या भोवती दोन वर्तुळे आखून घेतात. लहान वर्तुळाचा व्यास ६ फूट व बाहेरील मोठ्या वर्तुळाचा व्यास १०० फूट असतो. वर्तुळांच्या मध्यरेषेपासून सुमारे २५ फूट अंतरावर एक समांतर रेषा काढतात, तिला नेमरेषा म्हणतात.

या खेळात दोन पक्ष भाग घेतात. प्रत्येक बाजूला ५–१० खेळाडू असतात. एका पक्षातील मुले चेंडू फेकून लगोऱ्यांची उतरंड पाडण्याचा प्रयत्न करतात व ती पडल्यावर पुन्हा रचण्याचा प्रयत्न करतात. त्यांना खेळणारे किंवा रचणारे म्हणतात. चेंडू फेकताना नेमरेषेच्या पलिकडे उभे राहायचे असते. दुसऱ्या बाजूचे खेळाडू समोरच्या बाजूला, लहान वर्तुळाच्या बाहेर उभे राहून चेंडू झेलण्याचा प्रयत्न करतात. त्यांना झेलणारे म्हणतात. चेंडू लगोरीला न लागता जमिनीवर पडून उडाल्यावर पुन्हा खाली पडण्यापूर्वी झेलला गेला, तर चेंडू फेकणारा बाद होतो. चेंडू झेलला गेला नाही, तर प्रत्येकाला तीन वेळा फेकता येतो. लगोऱ्या न पडता सर्वांची चेंडूफेक संपली तर डाव पुरा होतो.

खेळणाऱ्या पक्षातील खेळाडूने चेंडू अचूक मारून लगोऱ्या पाडल्या की लगेच विरुद्ध पक्षातील मुले सर्व लगोऱ्या विखरून टाकतात. मात्र तसे करताना कोणतीही लगोरी लहान वर्तुळाच्या बाहेर जाऊ द्यायची नसते. आणि खेळणारे लगोऱ्या पुन्हा रचू लागण्यापूर्वी एकदाच हे काम करायचे असते. खेळणारे पडलेल्या लगोऱ्या रचून ठेवीत असताना, दुसऱ्या बाजूचा एक खेळाडू चेंडू पकडून व लहान वर्तुळात उभा राहून रचणाऱ्यांपैकी कोणालाही चेंडू मारतो. तो चेंडू जमिनीला न लागता रचणाऱ्यांपैकी कोणाच्याही अंगाला लागला, तर ज्याच्या नेमामुळे लगोरी पडली असेल तो बाद होतो. मग दुसरा खेळाडू चेंडूफेक करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लगोऱ्या पाडणाऱ्या पक्षाने लगोऱ्या पडल्यानंतर चेंडूला हात लावायचा नसतो व मोठ्या वर्तुळाच्या बाहेर जायचे नसते. तसे करणारा खेळाडू बाद होतो. विरुद्ध पक्षातील मुलाने मारलेला चेंडू चुकवीत खेळणाऱ्या पक्षाने सर्व लगोऱ्या कळसापर्यंत नीट रचल्या की डाव पुरा होतो.

डाव सुरू करताना खेळणारे वर्तुळाच्या अर्ध्या भागात उभे राहतात व झेलणारे दुसऱ्या अर्ध्या भागात उभे राहतात. लगोरी पडेपर्यंत किंवा डाव संपेपर्यंत खेळाडूंनी विरुद्ध बाजूच्या अर्धवर्तुळात पाऊल टाकायचे नसते. लगोरी पडल्यानंतर मात्र ती रचली जाईपर्यंत किंवा नेम मारणारा बाद होईपर्यंत कोणाही खेळाडूला क्रीडांगणाच्या (मोठ्या वर्तुळाच्या) कोणत्याही भागात जाता येते.

प्रत्येक पक्षाला दोन किंवा तीन डाव खेळता येतात. लगोरी पाडण्याबद्दल खेळणाऱ्या पक्षाला १० गुण मिळतात व ती पुन्हा रचण्याबद्दल ५ गुण मिळतात. झेलणाऱ्या पक्षाने मारलेल्या प्रत्येक खेळाडूबद्दल त्या पक्षाला ५ गुण मिळतात. प्रत्येक नियमोल्लंघनाबद्दल ५ गुण कमी केले जातात. सर्व डावांत मिळालेले गुण मिळून ज्या पक्षाचे गुण जास्त होतील, तो पक्ष विजयी ठरतो. [म. ज्ञा. को.; लं. ल. वि.]

लग्न (१) नियोजित वधू आणि वर यांना प्रति-पत्नी या नात्याने बद्ध करण्यासाठी कन्यादान, विवाहहोम, इ. धार्मिक संस्कार आणि काही लौकिक विधी केले जातात, तेव्हा त्या समारंभाला लग्न समारंभ असे म्हणतात. अलिकडे नोंदणी पद्धतीनेही लग्न होते. त्यासाठी वधू-वर एका करारावर पति-पत्नी म्हणून सह्या करतात. या नोंदणी समारंभालाही लग्न असे म्हणतात. पाहा–विवाहसंस्कार.

(२) जन्मकाली, प्रश्नकाली किंवा मुहूर्तकाली त्या, त्या स्थळाच्या पूर्व क्षितिजावर क्रांतिवृत्ताचा जो राशिविभाग उदित असेल, त्या राशीला त्या कालाचे लग्न असे म्हणतात. कुंडली मांडण्यासाठी प्रथम त्या काळचे लग्न कोणते, ते ठरवावे लागते. लग्नाचे राशी, अंश, कला हे विभाग गणिताने काढावे लागतात. कुंडलीत लग्न हे प्रथम स्थानी म्हणजे सर्वांत वरच्या कोठ्यात मांडतात व पुढे दोन, तीन, इ. ठिकाणी अनुक्रमे लग्नाच्या पुढील राशींचे आकडे लिहून राशिचक्र पूर्ण करतात. जन्मकुंडलीत लग्न हे महत्त्वाचे स्थान मानलेले आहे. जन्मलेल्या व्यक्तीचे एकंदर जीवन कसे घडेल त्याचा फलादेश मुख्यत्वे लग्नावरून सांगतात. एखाद्या व्यक्तीने काही प्रश्न केल्यास तत्कालीन लग्न पाहून ज्योतिषी कुंडली मांडतात व पृच्छकाच्या प्रश्नाचे शुभाशुभ उत्तर देतात. [बालबोध ज्योतिष भाग १ श्री. य. के. प्रधान, १९५९]

लग्नघटीस्थापन विवाहाचा घटिकात्मक मुहूर्त साधण्यासाठी सूर्यबिंब अर्धे वर आल्यावर एका जलपूर्ण पात्रात सच्छिद्र असे एका ताम्रपात्र ठेवतात, त्या विधीला हे नाव आहे. पाहा – घटिकापात्र.

लघिमा अष्टमहासिद्धींपैकी चौथी. ही सिद्धी प्राप्त झाल्याने योग्याचे शरीर कापसाप्रमाणे हलके होते. या सिद्धीने शरीर हवे तेवढे लांब करता येते, शीघ्र गतीने गमन करता येते व उडताही येते. पाहा – योगदर्शन.

लघुन्यास शिवपूजेत महाभिषेकाच्या प्रारंभी ज्या वेळी महान्यास करीत नाहीत, त्या वेळी लघुन्यास करतात. महान्यासापेक्षा हा सुटसुटीत आहे. यात निरनिराळ्या देवतांची निरनिराळ्या अवयवांवर स्थापना करायची असते. उदा. ‘प्रजनने ब्रह्मा तिष्ठतु, पादयोर्विष्णुस्तिष्ठतु, हस्तयोर्हरस्तिष्ठतु’ इत्यादी.

यात पुढे स्वतःला अमृतरूपाच्या ठिकाणी स्थापून, अमृत ब्रह्माच्या ठिकाणी स्थापण्यात येते. उदा०

अग्निर्मे वाचि श्रितः ॥ वाग्हृदये हृदयं मयि ॥ अहममृते ॥ अमृतं ब्रह्मणि ॥

अर्थ – अग्नी हा माझ्या वाणीच्या ठिकाणी आश्रित आहे. वाणी हृदयाच्या ठिकाणी, हृदय माझ्या ठिकाणी, मी अमृताच्या ठिकाणी व अमृत ब्रह्माच्या ठिकाणी आश्रित आहे.

नंतर सर्व शरीराला स्पर्श करून रुद्ररूप परमात्म्याचे ध्यान करायचे असते. मोठ्या अनुष्ठानांच्या वेळी महान्यास आणि नित्याच्या लहानसहान पूजाकर्मांत लघुन्यास करतात. पाहा – करन्यास, महान्यास. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

लछिमन रसिक रामभक्तिशाखेचा एक कवी. याचे चरित्र उपलब्ध नाही. याने सियारामचरणचंद्रिका नावाचा एक ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात कवीने राम–सीता यांच्या युगलचरणांचे दिव्य सौंदर्य वर्णिले आहे. तो म्हणतो –

राम–सीतेच्या धवल कांतीने परिवेष्टित अशा चरणकमलांवर सरस्वती विराजित आहे. या चरणांच्या ठिकाणी गंगा व अमृत यांचा निवास आहे. या चरणकमलांवर देवकन्या ताऱ्यांच्या ओंजळींचा वर्षाव करतात. किन्नरी आनंदमग्न होऊन त्यांच्या शोभेचे मंगलगान करतात. नागपत्न्या श्रद्धायुक्त अंतःकरणाने त्या चरणकमलांना लवून प्रणाम करतात आणि अभय प्राप्त करतात. हे युगलचरण म्हणजे भक्तांचे प्राण आणि जगताचे आधार आहेत. [रा. भ. शा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लछिराम (इ. स. १८४१ – १९०४) या नावाचे सात कवी हिंदीमध्ये आहेत. या सर्वांत अयोध्येचा रहिवासी लछिराम हा प्रसिद्ध आहे. याच्या कुलात कवींची परंपरा होती. याने ईश नावाच्या एका पंडिताजवळ ५ वर्षे साहित्यशास्त्राचे अध्ययन केले. पुढे अयोध्येचा राजा मानसिंह याने त्याला आश्रय देऊन कविराज अशी उपाधीही दिली. बस्तीचा राजा शीतलाबक्ष सिंह याने लछिरामाला घर बांधण्यासाठी चरथी नावाचे गाव दान दिले. लछिरामाचे वंशज आजही त्या गावी राहतात. प्रस्तुत कवीने निरनिराळ्या राजांकडून द्रव्य मिळवून अयोध्येत एक पाठशाला, रामजानकीमंदिर व स्वतःच्या वास्तव्यासाठी घर एवढ्या वास्तू निर्माण केल्या.

लछिराम हा रीतिबद्ध परंपरेचा प्रतिभासंपन्न कवी होता. त्याची रचना प्रसादमय व रमणीय होती. त्याने ब्रजभाषेत अनेक ग्रंथ लिहिले. त्यांतले काही असे – मुनीश्वरकल्पतरू, महेंद्रप्रतापरसभूषण, रघुवीरविलास, लक्ष्मीश्वररत्नाकर, प्रतापरत्नाकर, रामचंद्रभूषण, सियारामचरणचंद्रिका, इत्यादी. लछिरामाची सर्व रचना प्रसादगुणयुक्त आहे. [हिं. वि. को.]

लजपत राय, लाला (इ. स. १८६५–१९२८) स्वातंत्र्यसंग्रामातील एक श्रेष्ठ नेते. यांचा जन्म पंजाबातील फीरोजपूर जिल्ह्यामधील ढुडेकी नामक लहानशा खेडेगावात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव राधाकिसन होते. त्यांचे घराणे अग्रवाल वैश्य असून, लजपत रायांचे आजोबा जैन पंथाचे अनुयायी होते. राधाकिसन यांचे शिक्षण एका मौलवीच्या हाताखाली झाले. त्याच्या प्रभावामुळे राधाकिसन हे आचारविचाराने जवळजवळ मुसलमान बनले होते. पण त्यांची पत्नी शीख घराण्यातली असून, अत्यंत धार्मिक वृत्तीची होती. तिच्यामुळेच राधाकिसन स्वधर्मत्याग करू शकले नाहीत. ते ढुडेकी येथील सरकारी शाळेत शिक्षक होते. उर्दू व फारसी या भाषांचे त्यांना उत्कृष्ट ज्ञान होते.

बाळपणी मातेच्या सान्निध्यात लालाजींना धार्मिक शिक्षण मिळाले आणि पुढे स्वामी दयानंद सरस्वती यांच्या भाषणांमुळे ते प्रभावित झाले. वडिलांजवळ त्यांनी उर्दू व फारसी या भाषांचा बराच अभ्यास केला. पुढे इ. स. १८८३ मध्ये ते वकिलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी प्रथम काही दिवस हिस्सार येथे व नंतर लाहोरमध्ये वकिली केली. हिस्सार येथील सुमारे ६ वर्षांच्या वास्तव्यात त्यांनी उत्तम वकील म्हणून कीर्ती मिळविली व पुष्कळ द्रव्यही मिळवले. त्या काळात त्यांनी असंख्य ग्रंथ वाचले व संस्कृत भाषेचेही अध्ययन केले. त्यांच्या बुद्धिमत्तेमुळे त्यांना मोठी सरकारी नोकरी मिळत होती; पण ती त्यांनी स्वीकारली नाही. त्यांनी आर्यसमाजाचे कार्य अंगावर घेऊन, दयानंद अँग्लो वैदिक कॉलेजला विपुल आर्थिक साहाय्य केले. पुढे ते लाहोर येथे गेले व तिथे त्यांनी वकिलीचा व्यवसाय सुरू केला.

लालाजींचा विवाह त्यांच्या वयाच्या बाराव्या वर्षीच झाला होता. हिस्सार येथे असतानाच त्यांना एक मुलगा व एक मुलगी अशी दोन अपत्ये झाली.

विद्यार्थिदशेत असतानाच लालाजी समाजसेवा करू लागले होते. लाहोरला गेल्यावर तर त्यांचे सर्व जीवन सार्वजनिक कार्यांने व्यापून गेले. जनतेत देशाभिमान उत्पन्न करण्याच्या उद्देशाने त्यांनी श्रीकृष्ण, शिवाजीमहाराज, दयानंद सरस्वती, मॅझिनी, इ. थोर पुरुषांची चरित्रे अत्यंत प्रभावी भाषेत लिहिली. अस्पृश्योद्धार व दुष्काळनिवारण यांसाठी त्यांनी अतोनात परिश्रम केले व द्रव्यसाहाय्यही केले. दुष्काळामुळे गांजलेले हजारो लोक ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या भूतदयेमुळे त्यांच्या जाळ्यात सापडू लागले होते. म्हणून आर्यसमाजाने अनेक अनाथालये उघडून हजारो स्त्रियांना व मुलांना त्यांत आसरा दिला. लालाजींनी मिशनऱ्यांच्या या कारवायांना विरोध केल्यामुळे ते लोकप्रिय झाले, पण त्याचमुळे ते सरकारला मात्र अप्रिय झाले. इ. स. १९०२ मध्ये सरकारने दुष्काळ चौकशीसमिती नेमली. त्या समितीपुढे साक्ष देताना लालाजींनी सरकारी धोरणावर कडक टीका करून दुष्काळाची जबाबदारी सरकारवर टाकली.

काँग्रेसचे अधिवेशन अलाहाबाद येथे भरले तेव्हा लालाजी काँग्रेसचे सदस्य बनले. राष्ट्रीय सभेच्या सामाजिक कार्याकडे त्यांचे अधिक लक्ष होते. मात्र ते स्वातंत्र्यवादी असल्यामुळे जहाल पक्षाला मिळाले. इ. स. १९०५ साली ते राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला गेले होते. त्यानंतर त्यांनी पंजाबात स्वदेशीची व बहिष्काराची चळवळ जोरात सुरू केली. सरकारच्या अन्यायी कायद्यांविरुद्धही त्यांनी लेख लिहिले. त्यांच्या या अशा कृत्यांमुळेच हिंदुस्थानात लोकक्षोभ निर्माण होतो, असे ठरवून सरकारने लालाजींना पकडले व मंडाले येथे बंदिवासात ठेवले. पुढे लॉर्ड कर्झनच्या जागी लॉर्ड मिंटो व्हाइसरॉय म्हणून आले. लालाजींसारख्या लोकप्रिय नेत्याला विनाचौकशी डांबून ठेवणे त्यांना बरे वाटले नाही. म्हणून त्यांनी नोव्हेंबर १९०७ मध्ये लालाजींना मुक्त केले.

त्या वेळी ‘लाल-पाल-बाल’ ही त्रिमूर्ती तरुणांना स्फूर्ती देऊन हिंदी राजकारणाला जहाल वळण लावीत होती. त्यांच्या स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण, इ. विचारांनी जनता उत्तेजित झाली होती; पण मवाळ पक्षाला या त्रिमूर्तीचे हे विचार मान्य नव्हते. सर फेरोजशहा मेथा हे मवाळ पक्षाचे अध्वर्यू होते. त्यांनी काँग्रेसचे अधिवेशन सुरत येथे भरवण्याचे ठरवले व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री. रासबिहारी घोष यांना त्या अधिवेशनाचे अध्यक्ष निवडले. उलट जहाल पक्षाने लालाजींना अध्यक्ष करण्याचे ठरवले.

लाला रजपत राय

उभय पक्षांतील या द्वंद्वयुद्धात सुरतेचे अधिवेशन मोडले आणि त्यामुळे कॉंग्रेस दुभंगली. लालाजींनी दोन्ही पक्षांत तडजोड करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश आले नाही. पुढे ते विश्रांतीसाठी इंग्लंडला गेले.

इ स. १९०९ मध्ये लालाजी भारतात परत आले. मग त्यांनी पंजाबात हिंदूंच्या संघटनेचे काम सुरू केले. तसेच अस्पृश्यांना व मागसलेल्या वर्गांना शिक्षण देण्याचे कामही त्यांनी आरंभिले. इ. स. १९१२ साली कराचीला शुद्धिसभेचे अधिवेशन लालाजींच्या अध्यक्षतेखाली झाले. त्या वेळी त्यांनी राष्ट्रहिताच्या व माणुसकीच्या दृष्टीने अस्पृश्यता नष्ट केली पाहिजे, असे प्रतिपादले. इ. स. १९१४ मध्ये लालाजी कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाचे एक सभासद म्हणून विलायतेत गेले. ते शिष्टमंडळ परत आले, पण लालाजी मात्र परत न येता तिकडेच राहिले.

पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर लवकरच कोमागोटामारू नामक प्रकरण उद्भवले. लाला हरदयाळ यांनी अमेरिकेत गदर पक्ष स्थापला होता. त्या पक्षाने कोमागोटामारू नावाची जपानी बोट भाड्याने घेतली. त्या बोटीतून हिंदुस्थानात उठावणी करण्यासाठी काही क्रांतिकारक पाठवण्याचा त्या पक्षाचा विचार होता. लाला लजपत राय यांनी त्याविषयी काही पत्रे ब्रिटिश वृत्तपत्रांत लिहिली. त्यावरून हिंदुस्थान सरकारने त्यांना हिंदुस्थानात येण्यास बंदी केली. तेव्हा ते अमेरिकेत जाऊन राहिले. तिथेही त्यांच्यावर पोलिसांची नजर होतीच. त्यामुळे त्यांचे फार हाल झाले. मात्र तिथे त्यांनी अनेक व्याख्याने देऊन भारताविषयी तिथल्या लोकांना माहिती करून दिली. इंडिया नावाचे एक साप्ताहिकही त्यांनी तिथे सुरू केले. त्याव्यतिरिक्त अभिनव भारत, अमेरिकेतील संयुक्त संस्थाने व हिंदुस्थानचे इंग्लंडवरील ऋण ही तीन पुस्तके त्यांनी तिथे लिहिली. त्यांचे इंडिया ए ग्रेव्हयार्ड हे पुस्तक तर जगप्रसिद्ध झाले व त्याची अनेक युरोपीय व हिंदी भाषांत भाषांतरे झाली. लालाजींनी अमेरिकेत इंडियन होमरूल लीग व इंडियन इन्फर्मेशन नावाच्या दोन संस्था स्थापल्या. त्याचप्रमाणे हिंदी मजूर संघही स्थापला.

इ. स. १९२० साली लालाजी भारतात परत आले, तेव्हा त्यांचे अभूतपूर्व स्वागत झाले. अनेक सार्वजनिक संस्थांनी त्यांचा सत्कार केला. कलकत्ता येथे राष्ट्रीय सभेचे जादा अधिवेशन झाले, त्याचे अध्यक्षपदही लालाजींनाच देण्यात आले.

नागपूरच्या अधिवेशनात राष्ट्रीय सभेने असहकारितेचा ठराव संमत केला. त्यानंतर लालाजींनी त्या चळवळीसाठी जागोजागी व्याख्याने देऊन व लेख लिहून सारा पंजाब हालवून सोडला. राजकीय चळवळीला स्थैर्य यावे या हेतूने त्यांनी इ. स. १९२१ मध्ये लाहोर येथे सर्व्हंट्स ऑफ दि पीपल सोसायटी ही संस्था स्थापली. राजनीतिशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, वृत्तपत्रशास्त्र, इ. विषयांचा अभ्यास करणे व राजकीय चळवळीसाठी तरुण तयार करणे हे त्या संस्थेचे ध्येय होते. त्यासाठी त्यांनी पीपल नावाचे एक साप्ताहिकही सुरू केले.

इ. स. १९२१ मध्ये जो असहकारितेची चळवळ झाली तीत लालाजींना दोनदा तुरुंगवास घडला; पण त्यांची प्रकृती फारच बिघडल्यामुळे सरकारने त्यांना ऑगस्ट १९२३ मध्ये मुक्त केले. त्यानंतर निवडणुकी झाल्या. तेव्हा लालाजी प्रांतिक कायदेमंडळात निवडून आले. पुढे त्यांना प्रकृतिस्वास्थ्यासाठी युरोपात जावे लागले. बरे वाटल्यावर इ. स. १९२५ च्या आरंभी ते परत आले. नंतर त्यांनी प्रांतिक कायदेमंडळाचा राजीनामा दिला व ते १९२६ मध्ये वरिष्ठ कायदेमंडळात निवडून गेले. मग सरकारने त्यांना जिनीव्हा येथील आंतरराष्ट्रीय मजूरपरिषदेसाठी पाठविले.

पुढे लजपत राय यांनी स्वराज्य पक्ष सोडला व ते पं. मदन मोहन मालवीय यांच्या नॅशनॅलिस्ट पक्षात सामील झाले. त्या पक्षाचे ते अध्यक्षही झाले.

लालाजी युरोपातून परत आल्यानंतर कलकत्ता येथे हिंदु महासभेचे आठवे अधिवेशन त्यांच्याच अध्यक्षतेखाली झाले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

त्या वेळी त्यांनी विशुद्ध राष्ट्रवादी भूमिकेवरून भाषण केले. कायदेमंडळातही त्यांनी हिंदूंच्या हिताला जपण्याचा आटोकाट प्रयत्न केला. हिंदुसंघटनेचे कार्य त्यांनी आमरण अत्यंत निष्ठेने चालवले. हे सर्व जाणूनच भाई परमानंद यांनी लालाजी हे पंजाबचे राजकीय गुरू आहेत, असे म्हटले होते. लालाजी हेच हिंदूंच्या संघटनेचे मूळ प्रवर्तक होत.

इ. स. १९२८ मध्ये सायमन कमिशन हिंदुस्थानात आले. त्याच्यावर सर्व ठिकाणी बहिष्कार घालण्यात आला. दि. ३० ऑक्टोबर १९२८ ला कमिशन लाहोरला गेले, तेव्हा त्याच्या निषेधार्थ मोठी मिरवणूक निघाली. लालाजी तिचे नेते होते. मिरवणूक शांतपणे चालली होती, तरी पोलिसांनी अचानक तिच्यावर लाठीहल्ला सुरू केला. त्यात लालाजींना छातीवर व [illegible] जबर मार बसला. त्या मारामुळेच ते १७ नोव्हेंबरला मृत्यू पावले. अशा प्रकारे मायभूमीसाठी लढत असतानाच त्यांना वीरमरण लाभले.

लाला लजपतराय पंजाबकेसरी या नावाने प्रसिद्ध होते. राष्ट्रीय जागृती करणाऱ्या प्रमुख पुरुषांमध्ये त्यांची गणना केली जाते. राष्ट्रनिष्ठा, अतुलनीय त्याग आणि देशासाठी देह झिजविण्याची पराकाष्ठा यांमुळे त्यांचे नाव वंदनीय ठरले आहे. स्वाभिमान, निर्भयपणा व संघटनाचातुर्य या गुणांमुळे ते अत्यंत लोकप्रिय झाले. ते प्रभावशाली वक्ते व सिद्धहस्त लेखक होते. इंग्रजी व उर्दू या दोन्ही भाषांमध्ये त्यांनी कित्येक पुस्तके लिहिली. दि आर्य समाज हे त्यांचे पुस्तक फार लोकप्रिय झाले. मिस मेयोच्या ‘ मदर इंडिया ’ या विकृतीने बरबटलेल्या पुस्तकाला प्रत्युत्तर म्हणून त्यांनी लिहिलेले ‘ अनहॅपी इंडिया ’ हे पुस्तक बरेच गाजले. पोलिटिकल फ्यूचर ऑफ इंडिया, दि प्रॉब्लेम ऑफ नॅशनल एज्युकेशन इन इंडिया, इंडियाज विल टू फ्रीडम व स्टोरी ऑफ माय डिपोर्टेशन ही त्यांची पुस्तकेही अत्यंत उद्‌बोधक ठरली आहेत. [पं. ला. स.; हिं. वि. को.]

लज्जागौरी एक देवता. या देवीचे मंदिर विजापूर जिल्ह्यातील नंदिकेश्वर नावाच्या गावी आहे. हिला लज्जागौरी हे नाव का प्राप्त झाले, यासंबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी – एकदा इथे असलेल्या जलाशयात शिव पार्वती क्रीडा करीत असता एक भक्त त्यांच्या दर्शनासाठी तिथे आला. त्याला पाहताच दोघांनाही लज्जा वाटली. शिव मंदिरात पळाला आणि शिवलिंगात गुप्त झाला. पार्वती त्या जलाशयातच गुप्त झाली. अकल्पितपणे आलेल्या या अनवस्था प्रसंगामुळे पार्वती ओशाळली व त्यामुळे तिला लज्जागौरी हे नाव मिळाले. हे सरोवर शिवाच्या घामापासून उत्पन्न झाले, अशीही दंतकथा आहे. वांझ स्त्रिया संततीच्या प्राप्तीसाठी या देवीला नवस करतात. लज्जागौरीच्या मंदिराशिवाय इथे महाकूट व महादेव यांचीही मंदिरे आहेत. [देवी–कोश ३]

लडाख भारताच्या जम्मू व काश्मीर राज्याचा पूर्वेकडील एक जिल्हा. लडाख जिल्ह्याचे क्षेत्रफळ ९७,७७६ वर्ग किलोमीटर असून, त्याची लोकसंख्या ८८,६५१ (१९६१) आहे. याच्या उत्तरेला चीन आणि पूर्वेला तिबेट आहे. चीन आणि तिबेट यांच्या सीमेवर असल्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने या भागाला फार महत्त्व आहे. लडाखच्या उत्तरेला काराकोरम पर्वतमाला, तिच्या खाली दक्षिणेला लडाख नावाचीच एक पर्वतश्रेणी आणि तिच्या दक्षिणेला झास्कर पर्वतश्रेणी आहे. लडाखचा प्रदेश समुद्रसपाटीपासून नऊ हजार ते वीस हजार फूट उंचीवर वसलेला आहे. के २ हे या भागातले सर्वांत उंच पर्वतशिखर असून, त्याची उंची २८,२५० फूट आहे. लडाखमधे पाऊस अत्यल्प म्हणजे तीन ते पाच इंच पडतो. सिंधू, शियोक व नूब्रा या इथल्या प्रमुख नद्या होत. या नद्यांच्या जवळपास लोकवस्ती आहे. इथे काही सरोवरेही आहेत. पांगांग हे इथले फार मोठे सरोवर आहे, पण त्याचे पाणी खारे आहे.

या नद्यांच्या व नाल्यांच्या आसपास जिकडे तिकडे हिरवेगार दिसते. त्यांच्या पलिकडे मैलोगणती कच्च्या–पक्क्या अशा मोठमोठ्या शिळांचे उघडे–बोडके करडे पहाड पसरलेले आहेत. त्यांच्यावर गवत किंवा झुडपे काहीही उगवत नाही आणि उंच पर्वतशिखरे बाराही महिने पांढऱ्या बर्फाने झाकलेली असतात.

उंचीवर असल्यामुळे लडाखच्या हवेत प्राणवायू खूप कमी आहे. एखादा माणूस नव्यानेच या प्रदेशात गेला, की त्याला श्वास घ्यायचा त्रास होतो; त्याचे डोके भयंकर दुखते आणि त्याची अन्नावरची वासना उडते. तसेच, त्याच्या अंगात उभे राहण्याचीदेखील ताकद उरत नाही. पण चार-सहा दिवस विश्रांती घेतल्यावर तो इथल्या हवेशी जुळवून घेऊ लागतो.

इथली हवा शुष्क व विषम आहे. थंडीच्या दिवसांत इथे पुष्कळ बर्फ पडते व नदीनाले गोठून जातात. चुशूल, द्रास, चांगला या भागांत तर तपमान शून्याखाली कितीतरी अंश उतरते. झोंबणारे वारे व थंडी हाडांपर्यंत जाऊन भिडते, त्यामुळे इथल्या लोकांना जाड जाड गरम कपडे घालावे लागतात. उन्हाळ्यात इथे ऊन कडक असते व तपमान २० ते ३० अंश सेल्शियसपर्यंत चढते. पण उन्हाळ्यातल्या रात्री थंडगार असतात.

इथले याक व बकऱ्या यांच्या अंगावर खूप केस असतात. त्यामुळे त्यांचे थंडीपासून रक्षण होते. इथले लोक खेचरे व तट्टे यांचा सामान वाहून नेण्यासाठी उपयोग करतात. दुर्गम, उंची-

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरच्या आणि वेडयावाकडया घातक वळणांनी भरलेल्या रस्त्यां-वर या प्राण्यांचा उपयोग लोक शतकानुशतके करीत आहेत.

लडाखचे लडाख, स्कारडू व कारगिल हे तालुके असून, लेह ही या प्रदेशाची राजधानी आहे. ती समुद्रसपाटीपासून अकरा हजार पन्नास फूट उंचीवर वसलेली आहे. इथली लोकसंख्या सुमारे पाच हजार आहे. श्रीनगरपासून हे नगर १६२ मैल दूर आहे. श्रीनगर ते लेह अशी विमानसेवा उपलब्ध आहे. काश्मीर-मधून लडाखप्रदेशापर्यंत एक मोठी सडक बांधलेली आहे. लेह-पासून नुबरा, चुशूल व झास्कर दरीपर्यंतही रस्ते बांधलेले आहेत.

इतिहास – अनेक ठिकाणी सापडलेल्या शिलालेखांवरून सनपूर्व ३०० वर्षांपासून लडाख हा भारताचाच एक अविभाज्य भाग आहे, हे सिद्ध होते. काश्मीरच्या इतिहासाशी लडाखचा इतिहास संबद्ध आहे. लडाखचा प्रथम उल्लेख चिनी यात्रेकरू फाहियान (इ. स. ४००) याने केला आहे. काश्मीरचा राजा ललितादित्य याने लडाख व तिबेट यांवर आक्रमण करून ते प्रदेश आपल्या राज्याला जोडले होते, असे कल्हणाच्या (इ. स. चे १२ वे शतक) राजतरंगिणीवरून कळते.

इ. स. च्या १४ व्या शतकात लडाखचा एक राजकुमार रेंचन

लडाखी व्यापारी

हा काश्मीरमध्ये गेला आणि त्याने तिथल्या कोटा राणीकडे नोकरी धरली. पुढे चढत चढत त्याने काश्मीरच्या सिंहासना-चाही ताबा घेतला. काश्मीरमधील एक मुसलमान फकीर बु-बुलशाह याच्या प्रेरणेने त्याने इस्लाम धर्म स्वीकारला आ-सुलतान सदरुद्दीन हे नाव धारण केले.

पुढे इ. स. १५८६ मध्ये काश्मीरबरोबर लडाखही मोगलां-ताब्यात गेला. इ. स. च्या १७ व्या शतकात कलंपा नामक ए-मंगोलशाखेच्या लोकांनी लडाखवर आक्रमण केले. त्या वे-लडाखच्या राजाने शहाजहानची मदत मागितली आणि बदल्यात त्याने काश्मीरच्या राजाला लोकरीच्या व्यापार-मक्ता दिला. पण मोगल सैन्य परत गेल्यावर मंगोल लो-पुन्हा लडाखवर हल्ला केला. त्या वेळी लडाखचा शासक -भूत झाला आणि त्याने मंगोल लोकांना कर देण्याचे मान्य इ. स. १६६५ मध्ये औरंगजेब काश्मीरला गेला असता -लडाखवर आक्रमण करण्याची धमकी दिली. तेव्हा लडाख-शासकाने त्याला वार्षिक कर देण्याचे मान्य केले.

मोगलांचे साम्राज्य नष्ट झाल्यावर काश्मीर पठान-ताब्यात गेले आणि लडाख स्वतंत्र झाला. इ. स. १८३४ -काश्मीरचा राजा गुलाबसिंह याने आपला सेनापती जोरा-सिंह याला लडाखवर हल्ला करण्यासाठी पाठवले. जोराव-सिंहाने लडाख पुरता आपल्या ताब्यात आणला. पुढे गुला-सिंहाने तिबेटवरही सैन्य पाठवले. त्या युद्धात आपली हानी आहे, हे ध्यानात येताच तिबेटी सरकारने गुलाबसिंहाबरोबर केला व त्याचे लडाखवरील प्रभुत्व मान्य केले. दोघां-एकमेकांना व्यापाराच्या काही सवलती दिल्या. चीनने ति-गिळंकृत करीपर्यंत या परस्पर सवलती चालू राहिल्या हो-

इ. स. १९४७ साली भारत व पाकिस्तान अशी दोन -अस्तित्वात आल्यापासून लडाखचे सामरिक दृष्ट्या महत्त्व आहे. गुमरी, द्रास व कारगिल या भागात पाकिस्तानी घुसखो-भय निर्माण झाले आहे. तसेच १९६२ साली चीनने लड-हल्ला करून लडाखचा एक भाग अक्साई चीन हा कित्येक -चौरस मैल प्रदेश बळकावला आहे. तेव्हापासून लडाखच्या -दुर्गम अशा उंच पहाडी प्रदेशात व अत्यंत प्रतिकूल हवा-आपले सैनिक ठाण मांडून बसले आहेत व ते डोळ्यात -घालून तिथे पहारा करीत आहेत.

लोक —लडाखमध्ये सर्व प्रथम उत्तर भारतातून मोन -लोक येऊन राहिले. त्यानंतर बाल्टिस्तानातून दर्द लोक -शेवटी इ. स. च्या दहाव्या शतकात मंगोल लोक -लडाखमधील सध्याचे रहिवासी हे या तीन्ही जातींच्या -तून उत्पन्न झाले आहेत. दर्द लोक बहुधा मुसलमानी -असून, त्यांच्यापैकी बरेचसे सुन्नी पंथाचे आहेत. कार्गि-मुसलमान वस्ती जास्त आहे. बाकीचे लोक बौद्धधर्मी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इथला बौद्ध धर्म हा तांत्रिक बौद्ध धर्म आहे. लडाखी लोकांत धर्माबद्दल अभिनिवेश नाही. मुसलमान व बौद्ध लोकांत आप-

लडाखी स्त्री

सांत रोटीबेटीव्यवहार होतो. त्यामुळे एकाच कुटुंबात बौद्ध व इस्लाम धर्माचे लोक आढळतात. प्रत्येकाला आपल्या धर्माचे आचरण करायला पूर्ण मोकळीक असते. बौद्ध व मुसलमान एक-मेकांच्या धार्मिक व सामाजिक समारंभांतही आत्मीयतेने भाग घेतात. बौद्धांच्या गोम्पांत (विहार) मुसलमान सहजपणे जाऊ शकतात. इतकेच नव्हे, तर काही मोठ्या गोम्पांतील धर्म-शाळांची व्यवस्था पाहण्यासाठी अनेक मुसलमान कर्मचारीही नेमलेले आहेत.

लडाखी लोक बोधी भाषा बोलतात. ही भाषा संस्कृत व तिबेटी या भाषांच्या मिश्रणाने बनली आहे. यांची लिपी म्हणजे देवनागरीचाच एक प्रकार आहे. कविता आणि गाथा या स्वरू-पात इथे बरेच लोकसाहित्य आढळते.

लडाखी लोक ठेंगणे असतात. त्यांचा चेहरा मंगोल लोकां-प्रमाणे असतो. त्यांच्या गालांची हाडे वर आलेली असून, त्यांच्या खाली चेहऱ्याची रुंदी कमी होत जाते. त्यांची हनुवटी फार लहान असते. त्यांच्या नाकाचा पुढचा भाग रुंद व मुळातला भाग चपटा असतो. डोळे म्हणजे जणू लांब खाचाच असतात.

हे लोक भोळे, पापभीरू, आनंदी व आतिथ्यशील आहेत. त्यांचे जीवन फार कष्टाचे असते. दारिद्र्यही त्यांच्या पाचवीला पूजलेले आहे. तरी ते नेहमी प्रसन्न असतात व अवसर मिळाला की नाचगाण्यात रंगून जातात.

वेषभूषा – लडाखी पुरुष विजार घालतात आणि वर गरम कापडाचा लांब बाह्यांचा पायघोळ अंगरखा घालतात. कमरेला ते पट्टा बांधतात. लोकरीची किंवा रजईसारखी कापडाची टोपी ते घालतात. या विशिष्ट टोपीने डोक्याबरोबरच त्यांचे कानही झाकले जातात. चामड्याचा तळ असलेले लोकरी कापडाचे जोडे ते वापरतात. स्त्रियाही गुडघ्यापर्यंत पोचणारा सैलसर लोकरी अंगरखा घालतात. काही स्त्रिया त्याच्यावर बिनबाह्यांचा कोट घालतात; तर काही बकऱ्याच्या केसाळ कातड्याची शाल पांघरतात. त्यांच्या टोप्याही पुरुषांच्या टोप्यांसारख्या उभट असून, त्यांवर शुभ चिन्हांच्या आकृत्या विणलेल्या असतात. काही मुलींच्या टोप्यांवर मौल्यवान खडे व चांदीची पदके बसवलेली असतात. स्त्रिया कानांत कुंडले व गळ्यांत मण्यांच्या माळा घालतात.

हे लोक ग्रिम नामक एक प्रकारचे जव दळून त्याच्या पिठाच्या रोट्या करून त्या चहा व लोणी यांच्यावरोबर खातात. काही

लडाखी तरुणी

वेळा ते पीठच चहात कालवून खातात. मांस, भाज्या व फळेही त्यांना कधीमधी मिळतात. जवांपासून ते छंग नामक मद्य बनवून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पितात. धार्मिक पूजापाठाच्या किंवा अन्य महत्त्वाच्या समारंभाच्या प्रसंगी छंग अत्यावश्यक मानले जाते.

लडाखी लोकांची घरे बहुधा दुमजली असून, ती दगड व माती यांची असतात. कडाक्याच्या थंडीपासून बचाव होण्यासाठी काही लोक घरांना खिडक्यांऐवजी झरोके ठेवतात. काही लोक खालच्या मजल्यावर आपली जनावरे बांधतात.

उद्योगधंदे – शेती हा इथल्या लोकांचा प्रमुख उद्योग आहे. भूमी नऊ हजार ते तीस हजार फूट उंचीवर आहे. इथली जमीन अत्यंत खडकाळ आहे. त्यामुळे जेमतेम एकदशांश भूमीवर शेती होऊ शकते. पाऊस वर्षभरात सुमारे तीन इंचच पडत असल्यामुळे नदीच्या आणि वितळलेल्या बर्फाच्या पाण्यावरच त्यांची शेती अवलंबून असते. लडाखच्या खोऱ्यात गहू, जव, बाजरी, वाटाणा, घेवडा, इ. धान्ये व सफरचंद, जरदाळू, अक्रोड, इ. फळे पिकतात. उन्हाळ्यात इथे दुबार पिके घेता येतात. मात्र शेती पिकवण्यासाठी इथल्या शेतकऱ्यांना फार शारीरिक मेहनत करावी लागते.

सफेदा, वेत, सफरचंद, अक्रोड, तुती, इ. झाडे इथे दऱ्याखोऱ्यांत व नदी-नाल्यांच्या परिसरात वाढतात; पण इथे जे काही पिकते, ते इथल्या लोकांना वर्षभर पुरण्यासारखे नसते.

काही लडाखी लोक उंच पहाडी प्रदेशात राहून मेंढ्या व संकरित याक ही जनावरे पाळण्याचा व्यवसाय करतात.

गेली अनेक शतके लडाख हे भारत व मध्य आशिया यांच्या मधले एक व्यापारी केंद्र होते. तिबेटी, चिनी, अफगाण, रशियन, इ. व्यापारी लोकांचे तांडे आपल्या व्यापारी सफरीत लेह शहरात थांबत. भारतीय व्यापारी इथून लोकर, कापूस, रंग, मसाल्याचे पदार्थ, इ. जिन्नस घेऊन चीनमध्ये यारकंद आणि काशगरपर्यंत जात व येताना रेशीम, चहा, गालिचे, इ. वस्तू घेऊन येत. तिबेटी व्यापारी शाली बनवण्यासाठी लागणारी पश्म लोकर व सुकी फळे इथे घेऊन येत आणि इथून चहा, तंबाखू, साखर, अन्नधान्य वगैरे घेऊन जात. या व्यापाऱ्यांना खायलाप्यायला देऊन काही लडाखी लोक पैसे मिळवीत. पण चीनच्या आक्रमणापासून हे तांडे येणे बंद झाले व लडाखी लोकांचे वस्तू विकून मिळणारे उत्पन्नही बंद झाले.

विवाहप्रथा – विवाह ठरला, की मुलीच्या घरी साखरपुडा होतो. त्या वेळी नवरा मुलगा छंग मद्याचा घडा घेऊन मुलीकडे जातो. लग्नाच्या दिवशी सकाळी मुलाचा मामा काही लोकांसह, घोड्यांवर देजाच्या वस्तू लादून मुलीच्या घरी जातो. त्यात सुईपासून झाडूपर्यंत अनेक वस्तू असतात. या व्यतिरिक्त वधूला द्यायचे दागिने मात्र एका सजवलेल्या घोड्यावरून वराचे आईबाप वधूच्या घरी पाठवतात. सर्व वस्तू नीट मिळाल्यानंतरच मग वधूकडील लोक लग्नासाठी वरगृही जातात.

विवाहाची सारी व्यवस्था मुलाचा मामा करतो. पाहुण्यांना लग्नाचे निमंत्रण देणे, घर सजवणे, पुरोहिताला बोलावणे, इ. सर्व कामे तो करतो. लग्नात आपल्या देवतांसमोर पुरोहिताच्या साक्षीने वर आणि वधू सदैव एकत्र राहण्याची शपथ घेतात. नंतर होम होतो. लग्नातील हा एवढाच आवश्यक विधी होय. मग पुरोहित वधू-वरांना आशीर्वाद देतो आणि होमातील रक्षा एका मौल्यवान पेटीत घालून विवाहाची स्मृती म्हणून त्यांना देतो. त्याबद्दल वधूचा व वराचा मामा पुरोहिताला दक्षिणा देतो.

विवाहानंतर वधू-वर वाजतगाजत वधूच्या घरी जातात. तिथे सर्वांना मेजवानी मिळते. एक आठवडा नवरा मुलगा वधूच्या घरी राहतो आणि नंतर वधूसह आपल्या घरी जातो. विवाहानंतर एका वर्षाने वधू पुन्हा आपल्या माहेरी जाते. त्या वेळी पुन्हा आप्तेष्ट जमतात आणि नाचगाण्याचा कार्यक्रम करतात.

पूर्वी लडाखी लोकांत बहुपतित्वाची प्रथा प्रचलित होती. घरातील सर्वांत मोठ्या मुलाचा विवाह करीत आणि त्याची बायको ही त्याच्या खालच्या दोन भावांचीही आपोआप पत्नी बने. याशिवाय, स्त्रीला आपल्या आवडीच्या एखाद्या पुरुषाला ज्येष्ठ पतीच्या अनुमतीने घरात आणून ठेवता येत असे. त्या पुरुषाला उपपतीचा दर्जा मिळत असे. कुटुंबातील लहान भावांना मात्र अविवाहित राहावे लागे. त्यांपैकी काही बौद्ध भिक्षू बनून गोम्पात राहायला जात. कुटुंबातील काही मुलीही भिक्षुणी बनत व त्याही गोम्पात जाऊन राहत.

पित्याच्या मृत्यूनंतर सर्व संपत्ती मोठ्या मुलाला मिळे. त्याला आपल्या अविवाहित बहिणींचे आणि आईचे पालनपोषण करावे लागे. कुटुंबात मुलगा नसल्यास सर्वांत मोठी मुलगी संपत्तीची वारस होत असे. अशा वेळी ती दुसऱ्या कुटुंबातील एखाद्या धाकट्या मुलाशी लग्न करून त्याला आपल्या घरी राहायला आणी. अशा पुरुषाला मगपा असे म्हणत. मगपाचा त्या घरात फारसा अधिकार नसे. त्याची पत्नी त्याला केव्हाही घटस्फोट देऊन बाजूला करू शकत असे.

ज्येष्ठ पतीच्या मृत्यूनंतर जर स्त्रीने प्रिय पतीला घरात आणले, तर तिच्या घरातील अधिकारांत काही बदल होत नसे व पहिल्या पतीच्या सर्व संपत्तीची तीच मालक होत असे.

पण इ. स. १९४१ मध्ये बहुपतित्वाच्या या चालीला कायद्याने बंदी करण्यात आली आहे.

प्रसूतिप्रथा – मूल जन्मल्यावर हे लोक आनंदोत्सव करतात. मुलाचे आप्तेष्ट नवे कपडे घालतात, गोडधोडाचे जेवण करतात आणि गाणे गाऊन, नाचून आनंद व्यक्त करतात. मूल ... दिवसांचे झाले, की नातेवाईक बाळंतिणीला पैसे, कपडे, इ. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देतात. मग जेवणावळ होते. शेवटी सर्वांना छंग मद्य वाटतात.

मुलगा वर्षाचा झाला, की त्याचा नामकरण विधी करतात. त्यासाठी मुलाला कुशक लामाकडे नेतात किंवा कुशक लामाला घरी बोलावतात. तो मुलाचे नाव ठेवतो. त्याबद्दल त्याला काही पैसे व गहू, जव, इ. धान्ये दक्षिणा म्हणून देतात.

मर्तिकप्रथा – धनवान व प्रतिष्ठित व्यक्तीचा मृत्यू झाला असता, त्याचा दाहसंस्कार पंधरा-वीस दिवसांनी करतात. तो-पर्यंत लामा त्याच्या आत्म्याला शांती मिळावी म्हणून मंत्रपाठ करीत असतात. या मंत्रपाठकांना घरातल्या लोकांनी चहा व जेवण द्यायचे असते.

दाहसंस्कार झाल्यावर लामांना कपडे, भांडी व पैसे देऊन संतुष्ट करतात. गरीब माणसाचा दाहसंस्कार मृत्यूनंतर चार पाच दिवसांनी करतात. घरात मृत्यू झाल्यावर, घराच्या पुढील दरवाज्यावर शोकनिदर्शक असे काळे कापड बांधून ठेवतात.

ग्यालपो म्हणजे राजा किंवा तत्सदृश एखाद्या शासकाचा मृत्यू झाला असता, त्याचेही पंधरा-वीस दिवसांनी दहन करतात. तोपर्यंत शेकडो लामा रात्रंदिवस मंत्र म्हणत असतात. मृताची रक्षा गोळा करून त्याची प्रतिमा बनवतात आणि दाहस्थानावर एक स्मारक उभारतात.

प्रमुख लामा मरण पावला, की त्याचे शरीर उंची कपड्याने झाकतात आणि त्याला तक्क्याला टेकवून बसवतात. त्या स्थितीत त्याला दाहसंस्कारासाठी नेतात. त्याच्या तिरडीवर त्याची वाटवाटी, प्रार्थनेचे कागद, धान्य; तसेच बुद्ध, धुव्या, इत्यादींच्या मूर्ती व त्याची स्वतःची प्रतिमाही ठेवतात. दाहस्थळी स्मारक उभारतात. तिथेही मृतासाठी भोजन व पाणी ठेवतात आणि रात्री दिवा लावतात.

रुकचू आणि चांग-थांग या प्रदेशांत प्रेतवहनासाठी लाकडे मिळत नसल्यामुळे प्रेत पहाडांवर ठेवून देतात आणि रानटी कुत्रे ते खाऊन टाकतात.

चंगपा बौद्धांत एक विचित्र प्रथा प्रचलित आहे, ती अशी-- जेव्हा एखादा चंगपा आसन्नमरण होतो, तेव्हा एक मोठा खड्डा खणून त्यात त्याला ठेवतात. त्यावर एक तंबू उभारतात. दोन-- तीन लोक रात्रंदिवस त्या रुग्णाची देखभाल करतात. जर तो मरण पावला, तर त्या खड्ड्यातच त्याला पुरतात आणि जर तो बरा झाला, तर त्याला परत घरी आणतात.

लडाखी गोम्पा – जेव्हा लडाखी कुटुंबात साधारणपणे तीनपेक्षा अधिक मुले व मुली असतात, तेव्हा आईबाप आपला एखादा मुलगा बौद्ध संघाला अर्पण करतात. हा मुलगा साधारणपणे आठ-दहा वर्षांचा झाला, की त्याला जवळपासच्या गोम्पात पाठवतात. तिथे लामा त्याला योग्य ते शिक्षण देतात आणि मग धार्मिक संस्कार करून त्याला लामा बनवतात. गोम्पाचा प्रमुख लामा त्याला नवे नाव देतो. त्या वेळी त्याचे मुंडन करतात आणि त्याला लामाचा वेष देतात. एखादी मुलगी जेव्हा भिक्षुणी बनते, तेव्हा तिला नवे नाव देताना तिचेही मुंडन करतात आणि मग तिला भिक्षुणीचा वेष देतात. भिक्षुणीला चोमो असे म्हणतात. चोमोंसाठी गोम्पात लामांपेक्षा निराळी निवासस्थाने असतात.

लडाखी लामांचे गोम्पे (विहार) खूप विशाल, समृद्ध व सुंदर असतात. लोकवस्तीपासून दूर आणि उंच पहाडावर किंवा डोंगराच्या उतरणीवर ते बांधलेले असतात. त्यांच्या जाण्या-येण्याच्या मार्गांवर दगडांच्या भिंती उभारलेल्या असतात, त्यांना मणिभिंती असे म्हणतात. या भिंती खूप लांब असतात. त्यांचा वरचा थर सपाट शिळांचा असतो आणि त्या शिळांवर ' ओं मणिपद्मे हुम् ' व ' ओं आ हुम् ' असे मंत्र कोरलेले असतात. काही वेळा मंत्रांऐवजी बुद्धाची आकृती कोरलेली असते. हे कोरीव कामही लामाच करतात. प्रत्येक गावाच्या सुरवातीला व शेव-टीही अशाच दगडी भिंती उभारलेल्या असतात.

मोठ्या गोम्पात शेकडो लामा राहतात. त्यांचा निवास, भोजन, शिक्षण, इ. बाबींची सर्व व्यवस्था गोम्पात होते. लामांना बौद्ध धर्म, दर्शन, ज्योतिष, वैद्यक, इ. शास्त्रांचे शिक्षण देतात.

गोम्पातील एका खोलीत भगवान बुद्ध व मैत्रेय बुद्ध यांच्या, सोन्याचांदीचा मुलामा दिलेल्या मोठ्या मूर्ती असतात. रोज या मूर्तींची पूजा करतात. लोण्याचा दिवा या खोलीत अखंड तेवत असतो. विशेषप्रसंगी अनेक लामा या खोलीत बसून धर्मग्रंथ वाचतात. प्रत्येक मोठ्या गोम्पात एक वार्षिक उत्सव साजरा होतो. त्या वेळी लामा मंडळी नृत्य करतात. हेमिस गोम्पाचा वार्षिक उत्सव जूनमध्ये असतो. त्या वेळी सर्व लडाख मधून हजारो लोक तिथे जमतात. त्या वेळी वेगवेगळे भयंकर मुखवटे घालून लामा लोक पिशाच नृत्य करतात. ते इथल्या लोकांना फार आवडते.

गोम्पांची व्यावहारिक व धार्मिक बाजू संभाळण्यासाठी वेग-वेगळे लामा नेमलेले असतात. लामांचे भोजन, कपडे आणि मूर्तींची पूजाअर्चा या सर्व खर्चासाठी गोम्पांना राजांनी जमिनी लावून दिलेल्या आहेत.

लामांचे डुकपा व सेरपोंगोन असे दोन मुख्य भेद आहेत. डुकपा लामा लाल टोपी व सेरपोंगोन पिवळी टोपी घालतात. बाकीची वस्त्रे दोघांचीही लालच असतात. डुकपा प्रायः मद्य-मांस निषिद्ध मानीत नाहीत. सरपोंगोन मात्र ती दोन्ही वर्ज्य मानतात. गोम्पाच्या मुख्य लामाला कुशक असे नाव आहे. कुशक हा बोधिसत्व असतो, अशी समजूत आहे. त्यामुळे लोकांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्याविषयी अतीव आदर वाटतो. पूर्वी दलाई लामा कुश-काची नेमणूक करीत असे. कुशक मृत्यू पावला, की ती बातमी



लामा–नृत्यातील भेसूर लाकडी मुखवटा

ल्हासा येथील दलाई लामाला कळवली जाई. मग दलाई लामा त्या मृत कुशकाचा पुनर्जन्म कोणत्या घरात झाला असेल, त्या-संबंधी अंदाज वर्तवी. नंतर लामा त्याचा शोध करून त्याला गादीवर बसवीत आणि त्याच्या शिक्षणाची व्यवस्था करीत. तसेच दहा पंधरा वर्षे त्याला ल्हासा येथे शिक्षणासाठी पाठवीत. तिबेट चीनच्या ताब्यात गेल्यापासून या सर्व गोष्टी आता बंद झाल्या आहेत.

हेमिस, शांकर, ठिस्के, बितुक, चेदे, ट्रापक, इ. लडाखमधील प्रमुख गोम्पा होत. त्यांपैकी हेमिस हा सर्वांत मोठा, प्राचीन व श्रीमंत गोम्पा आहे. प्रत्येक बौद्धधर्मी माणसाने आयुष्यात एकदा तरी हेमिस गोम्पांत गेले पाहिजे, असा नियम आहे. लेहपासून हा गोम्पा बावीस मैलांवर असून, आता तिथे जाण्यासाठी रस्ता तयार झाला आहे.

लडाखमध्ये आबालवृद्ध सर्वांना नृत्य करता येते. कारण नृत्य हे त्यांच्या सामाजिक व धार्मिक जीवनाचे एक अंगच असले. त्यांच्या प्रत्येक सणात व उत्सवात नृत्य असतेच. विवाहसमा-रंभातही वधू आणि वर डोक्याला पांढरा रुमाल बांधून नृत्य करतात आणि इतर लोकही त्यांच्या नृत्यात सहभागी होतात. या नृत्याला ढोल, सनई, इ. वाद्यांची साथ असते. एखाद्याच्या घरी मुलगा झाल्यावर लोक तिथे नृत्यासाठी जमतात. त्यांना प्रथम छंग पाजतात आणि लोक मग त्या धुंदीत रात्रभर नाचतात.

लडाखी लोक कलात्मक प्रवृत्तीचे आहेत. गोम्पांच्या आतल्या भिंती ते चित्रांनी सजवतात. चित्रकलेप्रमाणे शिल्पकलेतही ते प्रवीण आहेत. उंच जागी बांधलेले अनेकमजली विहार आणि बुद्धाच्या मूर्ती या त्यांच्या शिल्पकलेतील कौशल्याच्या साक्षी आहेत. मुलबेख गावाच्या जवळ शयन अवस्थेत मैत्रेय बुद्धाची एक मूर्ती आहे. ती एकाच शिळेतून घडवलेली आहे. तसेच लेह-मधील एका गोम्पात दोन मजल्यावर मिळून एक बुद्धप्रतिमा तयार केलेली आहे. लेहपासून आठ मैल अंतरावर धातूची एक विशालकाय बुद्ध-प्रतिमा आहे. तिची मुखमुद्रा प्रसन्न व आकृती घाटदार आहे. काही गोम्पांत सोन्याचांदीच्या रत्नजडित बुद्ध-मूर्तीही आढळतात.

लेह येथे डोंगराच्या उतारावर पाचशे वर्षांपूर्वी एक राज-वाडा बांधलेला आहे. त्याला कित्येक मजले असून, त्यांत शंभर खोल्या आहेत. त्या राजवाड्यापेक्षाही उंच जागेवर एक गोम्पा आहे. या इमारती त्यांचे बांधकामातील कौशल्य दर्शवितात.

इ. स. १९६२ मध्ये चीनने लडाखवर हल्ला केल्यापासून या भागाच्या प्रगतीकडे भारत सरकार अधिक लक्ष पुरवीत आहे. पूर्वी या भागात कच्च्या सडका होत्या. पण आता महत्त्वाच्या स्थळांना जोडणाऱ्या पक्क्या सडका तयार केल्या गेल्या आहेत. लहानमोठे ६७ पूलही बांधले आहेत.

शैक्षणिक क्षेत्रातही प्रगतीची घोडदौड चालू आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळा, पाठशाळा, शिक्षकांसाठी प्रशिक्षण केंद्रे, प्रौढां-साठी साक्षरताकेंद्रे व सामाजिक केंद्रे, अशी शिक्षणाची अनेक केंद्रे लडाखमध्ये निर्माण झाली असून, अनेक मुलेमुली व प्रौढ त्या केंद्रांतून शिक्षण घेत असतात. लेह, कारगिल व द्रास गावांत शाळांसाठी पक्क्या व सुंदर इमारती बांधलेल्या आहेत.

शेतीच्या क्षेत्रातही आता पुष्कळ प्रगती झाली असून, सध्या लडाखमध्ये ४० हजार एकरांत शेती होते. इथे पाऊस कमी पडत असल्याकारणाने हिमयुक्त नदी-नाल्यांना कालवे काढून शेतीला पाणी पुरविले जाते. याशिवाय काही धरणेही बांधण्यात येत असून, त्यांतून वीज निर्माण केली जाणार आहे. सध्या लेह व कारगिल या शहरांत डिझेलवर वीज निर्माण करतात. तसेच तिथे चार कृषिसंशोधन केंद्रेही स्थापन झाली आहेत. पशूंच्या पशुधनाच्या वृद्धीसाठी पशुप्रजनन केंद्रे उघडली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक चिकित्सालयही स्थापले आहे. माणसांसाठी अनेक दवाखाने व इस्पितळे व फिरती औषधालये यांची सोय केलेली आहे.

लडाखमध्ये सैन्याचा तळ असल्यामुळे इथल्या लोकांना नोकऱ्या व मजुरीची कामे मिळत आहेत. त्यामुळे पूर्वी दरिद्री असलेल्या या लोकांची सांपत्तिक स्थिती आता पुष्कळच सुधारली आहे. [म. क.; लद्दाख – त्रिलोक 'दीप', १९७१; योजना, जाने.–फेब्रु. १९६०; नॅशनल जिऑग्राफिक, मे १९६३; साप्ता. हिंदुस्थान, २४ मे १९६४ व ३० जाने. १९६६]

लडोथम्मा द. भारतातील एक ग्रामदेवता. हिला देवतास्वरूप कसे प्राप्त झाले, यासंबंधीचा इतिहास असा– ही एका रेड्डीची लाडकी मुलगी होती. वयाच्या सहाव्या वर्षीच ती मरण पावली. एकदा काही मुले अंगणात खेळत असता अचानकपणे त्या मुलांमध्ये ती प्रकट झाली. मुलांनी तिच्या आई-बापांना बोलावले. परंतु त्यांना मात्र ती दिसेना. त्यांनी तिचे दर्शन व्हावे म्हणून खूप प्रयत्न केला; परंतु त्यात यश आले नाही. अखेर वडिलांनी तिच्यासाठी एक देऊळ बांधले आणि तिथे तिच्या नावाने एक मूर्ती बसविली. हळूहळू ती देवता बनली. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

लतीफशाह (इ. स. चे १६ वे शतक) एक संतकवी. हा धर्माने मुसलमान असला तरी नेहमी रामभजनात निमग्न राहत असे, असे महिपतीबुवांनी आपल्या भक्तविजयात सांगितले आहे. त्या ग्रंथात लतीफचे समग्र चरित्र काही हाती लागत नाही. काही चमत्कारांच्या कथा मात्र आहेत. त्यांपैकी एक कथा पुढीलप्रमाणे —

लतीफशाह इस्लामच्या विरुद्ध वागून हिंदू दैवताचे भजनपूजन करीत आहे, अशी कागाळी काही मुसलमानांनी बादशहाकडे केली. ती ऐकून बादशहाने आपल्या दूतांना फर्मावले, की 'तुम्ही ताबडतोब जाऊन लतीफचा आश्रम उद्ध्वस्त करा.' त्याप्रमाणे बादशहाचे दूत गेले; पण लतीफला पाहताच त्याच्या दैवी तेजाने प्रभावित होऊन ते त्याचे अनुयायीच बनले.

बादशहाला हे समजल्यावर तो स्वतःच लतीफच्या आश्रमात आला. त्या वेळी लतीफ आपल्या अंगणात भागवत वाचीत बसला होता. त्याच्या समोर तुळशीवृंदावन होते. त्यावर कृष्णाला विडा देत असलेल्या राधेचे चित्र काढलेले होते. बादशहाने लतीफला विचारले, की 'तुझा हा कृष्ण राधेच्या हातचा विडा का खात नाही? तो तू कृष्णाला खायला लावलास, तरच तू खरा देवभक्त.' ते ऐकून लतीफ उठला आणि त्याने कृष्णाजवळ जाऊन त्याला विडा स्वीकारण्याबद्दल प्रार्थना केली. त्यासरशी चित्रातल्या कृष्णाने राधेच्या हातचा विडा खाल्ला. मग मात्र बादशहाला लतीफचे दैवी सामर्थ्य कळले.

लतीफ हा परम रामभक्त होता. सर्व चराचरात श्रीराम भरून राहिला आहे, असा त्याने अनुभव घेतला होता. आपला हा अनुभव त्याने पुढील अभंगात लिहून ठेवला आहे –

आतां पूजा कोठें वाहूं । पाहतां देहीच जाला देवु ।।
भावें पूजन करितां । देहीं देव जाला तत्त्वतां ।।
तोडूं गेलों तुळसीपान । तेथें अवघा मधुसूदन ।।
अन्न गंध पुष्प धूप । अवघे विठ्ठलस्वरूप ।।
फल तांबूल नैवेद्य । पाहता अवघाचि गोविंद ।।
म्हणे लतीफ ब्रह्मज्ञानीं । अवघा पाहता चक्रपाणी ।।

मंगळवेढे येथे लतीफशाहाची समाधी आहे. बादशहाने लतीफशहाला दिलेले इनाम आजही त्याच्या समाधीचे सेवक उपभोगतात. [मु. म. सं. क.]

लपंडाव लहान मुलांचा एक खेळ. प्रथम मुले एकत्र जमतात आणि चकतात. या चकण्यात जो अनुत्तीर्ण राहील, त्या मुलावर राज्य देतात. याच वेळी एखादा खांब, झाड किंवा व्यक्ती याला भोज्या म्हणून ठरवतात. ज्याच्यावर राज्य आलेले असेल, त्याचे डोळे बांधतात. मग इतर मुले लपतात. सगळ्यांचे लपणे झाल्यावर कुणी तरी 'सुटपो ऽऽ' असे ओरडतो. मग राज्य आलेला मुलगा डोळ्यावरचे आवरण दूर करतो आणि लपलेल्या मुलांना शोधायला जातो. लपलेल्या मुलांनी पकडायला येणाऱ्या मुलाला चकवून भोज्याला शिवायचे असते. भोज्याला शिवण्यापूर्वी जो मुलगा पकडला जातो, तो बाद होतो व त्याच्यावर राज्य येते. अशी अनेक मुले पकडली गेल्यास राज्य कोणावर द्यायचे ते ठरविण्यासाठी एक युक्ती योजतात. संघाचा नायक त्या पकडल्या गेलेल्या प्रत्येक मुलाला चंद्र, सूर्य, गंगा, यमुना असे कोणते तरी नाव गुप्तपणे देतो. मग संघनायक पुढे येऊन राज्य घेतलेल्या मुलाला विचारतो. 'तुला चंद्र पाहिजे, सूर्य पाहिजे, गंगा पाहिजे का यमुना पाहिजे?' पकडणारा मुलगा जी नावे हवी म्हणेल, त्या नावांची मुले सुटतात व उरलेल्या मुलावर मग राज्य येते. अशा प्रकारे हा खेळ हवा तेवढा वेळ चालू ठेवता येतो.

लपंडावाचा दुसरा एक प्रकार गुजरातेत प्रचलित आहे, त्याला टीऽलिलो असे म्हणतात. सामान्यपणे १६ ते २० मुले हा खेळ खेळतात. प्रथम जमलेल्या मुलांचे दोन संघ करतात. एक संघ लपण्याचे व दुसरा संघ शोधून काढण्याचे काम स्वीकारतो. खेळ सुरू करण्यापूर्वी खेळाची हद्द ठरवितात. त्या हद्दीबाहेर कोणी जायचे नसते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

लपणाऱ्या संघाचा नायक दुसऱ्या संघाला एखाद्या झाडाचा पाला आणायला सांगतो. तो संघ त्या कामासाठी गेला म्हणजे तेवढ्या वेळात लपणाऱ्या संघाचे सर्व गडी लपतात. आणलेला पाला शोधणाऱ्या सर्व गड्यांच्या हाती दिला जातो. शोधणारा गडी सापडलेल्या गड्याला तो पाला हुंगायला लावतो. पकडणारा गडी आपल्या पुढून गेला, की लपणारी मुले 'आटी लागे पाटी लागे बोल बेटा टी ऽ लिलो' असे ओरडतात.

त्यामुळे गडी कुठे लपले आहेत, ते समजून पकडणारे गडी तिकडे पळतात. लपणारे गडी तिथून दुसरीकडे पळतात. त्यात काही गडी सापडतात. अशा प्रकारे सर्व गड्यांना शोधून काढून त्यांना पाला हुंगायला लावला, की शोधणाऱ्या संघाचे काम संपते. मग पकडणारा संघ लपायला जातो व लपणारा संघ शोधायला निघतो. [सु. वि. को.; व्या. ज्ञा. को.]

लव ऐंद्र एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील ११९ वे सूक्त याने रचले आहे. या सूक्ताची देवता आत्मस्तुती असून, छंद गायत्री आहे. बृहद्देवतेच्या अन्वये लव ऋषीच्या रूपाने सोम पिणाऱ्या इंद्राला अन्य ऋषींनी पाहिले. सोमपानाने मदोन्मत्त झालेल्या शरीरस्थितीचे आणि पराक्रमाचे वर्णन त्याने या सूक्तात केले आहे. त्यातील एक ऋचा (ऋ. १०. ११९. १) पुढे दिली आहे –

इति वा इति मे मनो गामश्वं सनुयामिति ।
कुवित् सोमस्यापामिति ।।

अर्थ – भक्तांना धेनू व अश्व यांपैकी काय द्यावे याविषयी माझे मन दोलायमान झाले आहे. कारण मी विपुल सोम प्राशिला आहे.

'कुवित्सोमस्यापामिति' हे या सबंध सूक्ताचे पालुपद आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

लब्धिविधानव्रत एक जैन व्रत. भाद्रपद अमावास्येला या व्रताला प्रारंभ करतात. या दिवशी एकाशन करायचे असते. नंतर प्रतिपदा, द्वितीया व तृतीया या तिथींना उपवास करायचा आणि चतुर्थीला पुनश्च एकाशन करायचे. व्रतकालात 'ॐ ह्रीं श्रीं महावीरस्वामिने नमः' या मंत्राचा त्रिकाल जप करतात. अशा प्रकारे दरवर्षी भाद्रपद, माघ आणि चैत्र या महिन्यांत हे व्रत करतात. तीन वर्षांनंतर उद्यापन करतात.

वाराणसीच्या विश्वसेन नामक राजाची पत्नी विशालनयना आणि तिच्या दासी यांनी हे व्रत केल्याची कथा प्रचलित आहे. फल – मोक्षप्राप्ती. [जै. व्र. वि. सं.; व्र. ति. नि.]

लब्बाई दक्षिणेतील एक मुसलमान जमात. तमिळनाडमधल्या मदुरा, तंजाऊर या जिल्ह्यांत व म्हैसूरच्या काही भागात यांची वस्ती आढळते. लब्बाई या शब्दाचा अर्थ दास असा आहे. या जमातीचे लोक संख्येने अल्प असल्यामुळे मुसलमान व हिंदूही त्यांना सेवकभावाने वागवीत व त्यांच्याकडून हक्काने कामे करून घेत. इतर लोक त्यांना लब्बाई म्हणत असले, तरी ते मात्र स्वतःला राऊतार असे म्हणवतात.

लब्बाई जमातीच्या उत्पत्तीविषयी दोन कल्पना प्रचलित आहेत – पूर्वी या लोकांना सोनागर असे म्हणत. त्याचा अर्थ सोनागमचे (अरबस्तान) रहिवासी असा आहे. त्यावरून काही लोक यांना अरब व्यापाऱ्यांचे वंशज समजतात. अरब हे दक्षिण भारताच्या समुद्रकिनाऱ्यावर व्यापारासाठी उतरले आणि त्यांनी इथल्या स्थानिक स्त्रियांशी लग्ने केली व त्या विवाहसंबंधापासून जी संतती निर्माण झाली, तीच लब्बाई जमात बनली. दुसऱ्या काहींच्या मते टिपू सुलतान किंवा त्याच्याही पूर्वी दक्षिणेवर आक्रमण करणारे मुसलमान यांनी बाटविलेले हे लोक आहेत. इस्लामच्या हनफी पंथाचे हे अनुयायी असले, तरी भाषा, पेहराव, आचार-विचार, गृह्यसंस्कार, इ. बाबतीत ते जवळजवळ हिंदू आहेत. हिंदूंशी ते सलोख्याने वागतात. पळणी येथील सुब्रह्मण्यम्च्या देवळात जाऊन देवाला पूजोपचार अर्पण करण्याची त्यांना मोकळीक आहे. तिरुप्परनकुंड्रम् या टेकडीवर लब्बाईंचा एक दर्गा आहे. त्या दर्ग्यात उरूस होतो, त्या वेळी मुसलमानांच्या बरोबरीने हिंदूही त्यात भाग घेतात.

सांप्रत लब्बाई हे समृद्ध व संपन्न लोक आहेत. ते बागायतदार आहेत, तसेच धाडसी व्यापारीही आहेत. तमिळनाडमधल्या नद्यांच्या काठी त्यांच्या पोफळीच्या व इतर फळझाडांच्या मोठमोठ्या बागा आहेत. त्यांचे मोठमोठे पानमळेही असतात. कातडी कमावणे हा धंदा तर तिकडे त्यांच्याच हाती आहे. ते लोकांना कॉफी व इतर अनेक वस्तू यांचा घाऊक व्यापार करतात. त्यांचे व्यापारविषयक कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. ते राहतात त्या भागात त्यांनी आपले आर्थिक वर्चस्वही प्रस्थापित केले आहे.

चांगले प्रशस्त घर ही लब्बाईंची आवडती वस्तू आहे. घर बांधताना प्रथम ते स्वतःसाठी भरभक्कम पायावर पक्के घर बांधतात. मोडकळीस आलेल्या घराची मात्र ते मुळीच डागडुजी करीत नाहीत. उत्तम पेहराव करणे हा त्यांचा आणखी एक आवडता छंद आहे. ते कमरेला लुंगी व अंगात जाकिट वापरतात. डोक्यावर कधी रंगीत गवती टोप्या, तर कधी पागोटीही घालतात. तिकडील शूद्र स्त्रियांप्रमाणे त्यांच्या बायकांचा पेहराव असतो. ते तमिळ भाषा बोलतात.

विवाहप्रथा – लब्बाई लोक आपल्याच जमातीत सगोत्र

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करतात. लग्नाच्या वेळी मुली वयात आलेल्या असतात. लग्नात मुहूर्तमेढ रोवतात व कुराणातला काही भाग वाचतात. वराने वधूच्या गळ्यात ताळी बांधणे हाही प्रकार असतो. लग्नसमारंभात स्त्रिया मात्र भाग घेत नाहीत. त्या घरात पडदानशीन असतात. यांच्या लग्नातल्या इतर चालीरीती मात्र हिंदूंप्रमाणेच असतात. [मदुरा गॅझे.; मै. ट्रा. का.]

लमाण भारतभर आढळणारी एक भटकी जमात. यांना वंजारी, ब्रिंजारी, लंबाडोळू, लंबाडी, सुकलीर, इ. अन्यही नावे आहेत. पाहा–बंजारा.

लयतत्त्व हे एक गूढ असे तत्त्व आहे. प्रमाण दाखवणे व माप सांगणे हे लयीचे कार्य आहे. संगीतात समांतर आघाताला लय असे म्हणतात. क्रिया व विराम यांच्या सातत्याने या लयतत्त्वाचा अनुभव येतो. क्रिया व विराम यांच्यांत समप्रमाण किंवा समकालिकता असल्यावाचून मानवाचे चित्त त्या गोष्टीकडे विशेषत्वाने वेधू शकत नाही. नियत विराम हा मानवाच्या या अनुभवाचा एक विशेष होय. सृष्टीतल्या व मानवी जीवनातल्या या अखंड नियत विरामामध्ये गतीचा अनुभव अनुस्यूत आहे. म्हणून लयीचा असाधारण धर्म गती हा आहे. गती जेव्हा कालकृत नियत विरामांनी प्रकट होते, तेव्हा येणाऱ्या संकलित अनुभवाला लय म्हणतात. सृष्टी आणि मानवी जीवित यांमध्ये लयतत्त्व भरून राहिले आहे. अंतराळात विलक्षण वेगाने फिरणाऱ्या आद्य तेजोमेघापासून पृथ्वीचा उपग्रह असलेल्या चंद्रापर्यंत; तसेच हृदयाच्या अविरत स्पंदनापासून मानवाने स्वतःच निर्माण केलेल्या एखाद्या यंत्रापर्यंत मानवाचा गतीशी अखंड संबंध राहिलेला आहे. गतीच्या विशिष्ट अवस्थेत तिच्याच द्वारे लयीचा प्रत्यय येत असतो.

लय ही प्राणिमात्रामधील नैसर्गिक प्रवृत्ती व सर्वव्यापी शक्ती आहे. पृथ्वीच्या सूर्याभोवती होणाऱ्या वार्षिक प्रदक्षिणेपासून रक्ताभिसरणाची क्रिया दर्शविणाऱ्या हृदयाच्या ठोक्यापर्यंत सर्व व्यापारांत लयीचे अस्तित्व प्रकट होते. याचे कारण हे, की हे सर्व व्यापार समांतर कालाने होत असतात. पृथ्वीचा सूर्याभोवती व स्वतःभोवती प्रत्येक फेरा ठरलेल्या काळातच पुरा होतो म्हणून वर्ष, महिने, इत्यादींपासून सेकंदापर्यंतच्या कालाचे सूक्ष्म मापन करणे शक्य झाले आहे. प्राणिमात्राच्या नाडीत, श्वासोच्छ्वासात व चालण्यातदेखील ही विश्वव्यापी समांतरता निसर्गसिद्धच असते. त्यासाठी माणसाला प्रयास करावे लागत नाहीत. या समांतरतेत बिघाड झाला, की मग माणसाचे स्वास्थ्य बिघडले, असे समजतात.

पृथ्वीचे सूर्याभोवती भ्रमण, तिचे स्वतःभोवतीचे भ्रमण, चंद्राचे पृथ्वीभोवती भ्रमण किंवा त्यांच्या गतीचे पोटविभाग हे सर्व जसे कालवाचक मूल्ये ठरविण्याच्या कामी उपयोगी पडतात; त्याचप्रमाणे नृत्यात व संगीतात होणारे लयीचे समांतर क्रिया–विराम स्वरक्रियेची सौंदर्यवाचक मूल्ये मापण्याच्या कामी उपयुक्त होतात. कलेचे पहिले व महत्त्वाचे कार्य सौंदर्यनिदर्शन हे आहे. आणि लयीच्या आधारावर व प्रभावावरच ते पुष्कळसे साधता येते. ललित कलांमध्ये व्यक्त होणारी लय ही काल आणि दिक् या कल्पनांशी अनुबंधी असलेली दिसते. काल आणि दिक् या कल्पनांचा मेळ जेव्हा श्रुती, दृष्टी आणि स्पर्श या संवेदनांशी घातला जातो, तेव्हा संगीत, चित्रकला व शिल्पकला या कलांची निर्मिती होते व त्यांच्यामधून आनंदाचाही अनुभव घडतो. पंच ज्ञानेंद्रियांपैकी या तीनच इंद्रियांनी होणाऱ्या संवेदना अशा निर्मितीचा आनंद देऊ शकतात. या आनंदात लयतत्त्वाचा भाग फार मोठा आहे.

प्रत्येक कलेचे प्रारंभिक गृहीत वेगवेगळे असले, तरी मानवी बुद्धीमध्ये त्यांचे संभरण होते, ते लयतत्त्वाच्या आधारे होते. असे संभरण ही मानवी जीविताची त्या त्या विषयापुरती सार्थकता असते.

लयतत्त्वाचा संगीताशी अतिप्राचीन काळापासून संबंध आहे. लयीवाचून संगीताची कल्पनाच करता येत नाही. लयहीन स्वर हे बिनहिशेबी समजावे. त्यांच्या द्वारे संगीताच्या आनंदाचा किंवा सुबद्धतेचा ऐनजिनसी प्रत्यय येऊ शकणार नाही. वस्तुतः संगीत व नृत्य या दोन कला स्वतंत्र आहेत. परंतु लयीच्या बंधक सूत्रामुळे त्या सहचरी झालेल्या आहेत.

गतिरूपाने व्यक्त होणाऱ्या लयीचा आल्हादकारक प्रत्यय आल्यावर मानवाने त्या लयीचा मेळ नृत्य, गायन व वादन यांच्याशी घालून आपली असामान्य कल्पकता प्रकट केली. बाह्य सृष्टीत जी लय प्रत्ययाला येते, तिचा मेळ निर्मितिक्षम अशा इतर कलांशी घालताना मानवाला फार मोठे क्षेत्र सापडले. विशिष्ट संकेतांचा आधार घेऊन या लयकल्पनेचे त्याने अनेक प्रकार केले व तिला पैलूही पाडले. [छंद, मे-जून १९५६; कल्पनासंगीत]

लययोग वृत्तीच्या सर्व अवस्थांचा एका विशिष्ट ठिकाणी लय करायचा त्याला लययोग म्हणतात. श्रीशंकराचार्यांनी योगतारावली, मनोलय व नादानुसंधान या स्फुट प्रकरणांतून लययोगाचा पुरस्कार केलेला आहे. लययोगाचे सव्वा लक्ष प्रकार असल्याचे योगतारावलीत (२) व ते सव्वा कोटी असल्याचे हठयोगप्रदीपिकेत (४.६६) सांगितले आहे.

वासनांवर आवर घालून त्यांचा क्षय करता करता वृत्तीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्व अवस्थांसह त्यांचा आत्मस्वरूपात लय करणे, हे लययोगाचे साध्य आहे. नादानुसंधान, प्रकाशानुसंधान व प्रणवजप करीत असता प्रणवाच्या मात्रांच्या ठिकाणी मनाचा लय, अहंभावाचा लय, कुंडलिनी जागृत झाल्यानंतर सहस्रदलकमलात प्रकृति-पुरुषांच्या द्वैत भावाचा लय, इ. अनेक प्रकारे लययोग साध्य केला जातो. लययोगी हा ज्ञानाच्या सप्तभूमिका सहज ओलांडू शकतो, एवढे या योगाचे सामर्थ्य आहे. म्हणूनच जपाहून शतपटीने ध्यान व ध्यानाहून शतपटीने लय श्रेष्ठ होय, असे म्हटले आहे. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध, ललना, आज्ञा, ब्रह्मरंध्र व सोम या शरीरांतर्गत नवचक्रांवर वृत्तीच्या सर्व अवस्थांचा लय करावा, असे व्यासांनी म्हटले आहे व त्यापासून अनेक सिद्धी प्राप्त होऊन शेवटी साधकाला मुक्ती मिळते, असेही सांगितले आहे. शांभवी, खेचरी, इ. मुद्रांच्या अभ्यासाने किंवा भ्रामरी प्राणायामाच्या योगाने लय साधतो, असे घेरंडसंहितेत (७.५) सांगितले आहे. पाहा–योगदर्शन. [योगविद्या]

लयराई गोमंतकातील एक शक्तिदेवता. हिचे ठाणे शिरगावला आहे. या देवीची मूळ मूर्ती तांदळास्वरूपाची असून, तिची उत्सवमूर्ती चतुर्भुज आहे. हिला वैष्णवी मायेचा अवतार समजतात. हिच्यासंबंधी रचलेल्या पदांवरून असे वाटते, की हिचे मूळ स्थान डोंगरावर असावे आणि नंतर कोण्या भक्ताने तिची पायथ्याला स्थापना केली असावी. सप्तमातृकांत वैष्णवी नावाची एक मातृका आहे, तीच ही असावी.

वैशाख शुद्ध पंचमीला इथे मोठी यात्रा भरते. या यात्रेचा विशेष म्हणजे या मंदिराच्या परिसरातील एका वडाच्या झाडाखाली मोठे होमकुंड पेटवतात आणि देवीचे भक्त त्यावरून चालत जातात. तसे करताना त्यांना काहीही इजा होत नाही, असे सांगतात. हे एक जागृत देवस्थान आहे, अशी लोकांची भावना आहे. [देवीकोश खंड २]

लयसंघ कलाकारांचा व्यापारी निगमासारखा एक संघ. मणिपूरमध्ये असे अनेक लयसंघ आजही अस्तित्वात आहेत. लयसंघ हा शब्द फार प्राचीन आहे. अर्थशास्त्रातही त्याचा उल्लेख आहे. प्राचीन काळी मणिपुरात व्यापारी लयसंघ होते, त्याचप्रमाणे कला व संस्कृती यांचेही लयसंघ होते. कलेच्या विशिष्ट प्रकारावर त्यांचा अधिकार असे. त्या त्या कलेचा विकास आणि प्रगती याविषयी त्यांचे नित्य विचार चालत. परंपरेनुसार स्थानिक राजे या लयसंघाचे अध्यक्ष असत. जो कलाकार या लयसंघाचा सदस्य नसे किंवा जो या संघाशी संबंध ठेवीत नसे, असा कलाकार केवढाही नामांकित असला, तरी गुरु म्हणून त्याला कोणी मान देत नसत.

पंडितलयसंघ नावाचा विद्वानांचा एक लयसंघ आजही तिथे विद्यमान आहे. मेंतिगू नोंग्ता तैरे पखंबा या राजाच्या कारकिर्दीत त्याला अमैबासंघ म्हणत. इ. स. ३५ मध्ये लेंगुथारुक असैंबा हा मणिपूरचा राजा झाला. त्याच्या कारकीर्दीत दोन विद्वान पुरुषांनी मिळून माइबा संगलेन या लयाची स्थापना केली. पुढे महाराजा खगैंबा याच्या कारकिर्दीत ताखेल खुनाओ याने वरील लयसंघाला अभिनव रूप दिले. माईबी नामक एक अधिकारी पुरुष या संघाच्या सर्व कार्यात नेहमी भाग घेत असतो. म्हणून वरच्या संघाला सांप्रत माईबी लयसंघ असे नाव पडले आहे. अमैबा व अमैबी असे त्याचे दोन विभाग आहेत. असैंबा, अमैबा व योईरेल असे अमैबीचे तीन उपभाग आहेत. संगलेन, लंगमेयी व फुरा असे अमैबाचे तीन उपविभाग आहेत. या विभागांतील संगलेन हा पखंबा देवाच्या आश्रयाखाली आहे. यमुजाओ लैरोबी ही लंगमेयीची अधीश्वरी आहे. फुराचा संबंध लनिंगथाओ लोंगसाबा या देवाशी आहे. हे तीन्ही अमैबी संघ जनतेसाठी ईश्वरी संदेश आणण्याचे काम करत. अमैबा संगलेन विधि-विधानांचे संपादन करतो, सामाजिक नीति-नियम बनवितो व मृत्यूसंबंधीच्या घटनांचे निवारण करतो.

इ. स. १७०४ मध्ये मणिपूरवर चाराईरंगबा हा राजा राज्य करीत होता. त्याच्या कारकिर्दीत गोपालदास नामक एका संताने मणिपूरमध्ये श्रीकृष्णाची एक प्रतिमा आणली आणि सर्वेश्वर प्रभू या रूपात तिची आराधना सुरू केली. त्याच वेळी त्याने तिथे बंगदेशपाल नावाच्या एका कीर्तनिया दलाचीही स्थापना केली. या दलालाच सांप्रत आरिबापाल म्हणतात. इ. स. १७७९ मध्ये मणिपूरवर भाग्यचंद्र नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या काळात श्रीगोविंदाची प्रतिमा तिथे स्थापली गेली. त्यानंतर पाललयसंघ व ब्रह्मसभा अशा दोन संस्था तिथे उदयाला आल्या. पाललयसंघ हा नृत्य व संगीत यांचे व्यवहार पाहू लागला. ब्रह्मसभा धार्मिक रीतिरिवाजांवर देखरेख ठेवू लागली.

इ. स. १८५० मध्ये चंद्रकीर्ती राजाच्या कारकिर्दीत तिथल्या नृत्यकारांनी जोगिसभा नामक एका लयसंघाची स्थापना केली. मणिपूरमध्ये आजही हा लयसंघ नृत्यविषयक कार्याची देखरेख करीत आहे.

हे सर्व लयसंघ आपली कला जनता व जनार्दन यांच्या सेवेला समर्पित करतात. गोविंदजीच्या मंदिरात व लोकोत्सवात हे संघ नृत्य व कीर्तन करतात. हे संघ जरी कलाविषयक व्यवहार पाहत असले, तरी त्या काळी कला शिक्षणाच्या संस्था नव्हत्या. अशा शिक्षणाची काही तरी चांगली सोय व्हायला हवी होती. म्हणून १९५४ साली तत्कालीन राजा बोधचंद्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याने अनेक लयसंघांच्या प्रसिद्ध गुरूंच्या सहकार्याने श्रीगोविंद नर्तनालय ही नवी संस्था स्थापिली. ही संस्था सांप्रत तिथल्या मुला-मुलींना योग्य प्रकारे नृत्यशिक्षण देत असते. चार वर्षे शिक्षण पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्याला नर्तनविशारद व सहा वर्षे नृत्याभ्यास करणाऱ्याला नर्तनाचार्य अशी पदवी दिली जाते.

ललकदास (इ. स. चे १८-१९ वे शतक) एक रीतिकालीन रसिक रामोपासक कवी. हा लखनौचा रहिवासी असून, रामानंदी संप्रदायाचा अनुयायी होता. याचा शिष्यपरिवार मोठा होता. आपल्या शिष्यांसह हा सदैव यात्रा करीत असे. ललकदास काव्यशास्त्रांचाही जाणकार होता. याचे सत्योपाख्यान व भाषाकोशलखंड असे दोन ग्रंथ आहेत. हे दोन्ही ग्रंथ त्याच नावाच्या संस्कृत ग्रंथांचे पद्यबद्ध अनुवाद आहेत. रामाच्या विलासी क्रीडांचे विस्ताराने वर्णन करणे हा सत्योपाख्यानाचा उद्देश आहे. या ग्रंथात रामजन्मापासून त्याच्या विवाहापर्यंतचा कथाभाग वर्णन केला आहे. हा ग्रंथ पुराणशैलीत व सूत-शौनकसंवादात असून, दोहा व चौपाई छंदांत रचलेला आहे. [हिं. सा. इ.; हिं. सा. को.]

ललितकला अकादमी साहित्य अकादमीच्या अंतर्गत अशी एक स्वायत्त संस्था. हिची स्थापना १९५४ साली झाली. ही एक केंद्रीय संघटना असून, ललितकलांच्या क्षेत्रात कार्य करण्यासाठी निर्माण झाली आहे. कलाप्रदर्शने भरविणे, कलाविषयक पुस्तके प्रकाशित करणे, सर्वेक्षण करणे, परिसंवाद आयोजित करणे, देशातील कलासंस्थांच्या कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे, परदेशांतही भारतीय कलाकृतींची प्रदर्शने भरविणे, कलाकारांच्यासाठी शिबिरे भरवणे, इ. कार्यक्रम ही संस्था करते. पाहा — अकादमी. [हिं. वि. को.]

ललितकांता एक देवता. आसाममध्ये व बंगालमध्ये ही मंगलचंडी या नावाने पूजिली जाते. ही द्विभुज असून, तिचा एक हात वरद मुद्रेत व दुसरा अभय मुद्रेत असतो. ही गौरवर्ण असून, रक्तकमलावर बसते. हिचे वस्त्रही लाल रेशमी असते. हिच्या मस्तकी मुकुट असतो. ही हसतमुख, सुंदर व तारुण्यसंपन्न असते. पाहा — मंगलचंडी.

ललितकिशोरी (इ. स. १८२५-१८७३) एक चैतन्यमतानुयायी भक्तकवी. याचे मूळ नाव शाह कुंदनलाल असे होते. लखनौ गावी एका अत्यंत धनाढ्य अशा अग्रवाल वैश्य कुळात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव शाह गोविंदलाल असे होते. याच्या धाकट्या भावाचे नाव शाह फुंदनलाल असे होते. पण त्याने काव्यातले टोपणनाव ललितमाधुरी असे घेतले होते. दोघा भावांचे एकमेकांवर फार प्रेम होते आणि ते शेवटपर्यंत तसेच टिकले.

सुरुवातीला दोघेही भाऊ फारसी भाषा शिकले. ललितकिशोरीच्या मनात त्यानंतर संस्कृत भाषा शिकावी, असे आले; पण तो वैश्य असल्यामुळे पंडितांनी त्याला संस्कृत शिकवायला नकार दिला. त्यामुळे रागावून त्याने चातुर्वर्ण्यविवेक नामक एक पुस्तिका लिहिली. नंतर त्याने अनेक भाषांचा अभ्यास केला. गायन, वादन, नृत्य, नाट्य, इ. कलाही त्याने अभ्यासिल्या. लहानपणापासूनच तो काव्यरचना करीत होता. भक्तिमार्गाकडेही बालपणापासून त्याचा ओढा होता.

चोवीस वर्षांचा असताना तो एकदा व्रज प्रदेशात गेला. तिथली श्रीकृष्णाची लीलास्थळे पाहून त्याचे मन वृंदावनात रमले आणि त्याला घरी परतावेसेच वाटेना. परंतु त्या वेळी त्याला वृंदावनात राहणे शक्य नव्हते. पुढे १८५६ साली मातापित्यांच्या मृत्यूनंतर व घरच्या संपत्तीची वाटणी झाल्यावर तो आपल्या सर्व परिवारासह वृंदावनात राहण्यासाठी गेला.

तिथे गेल्यावर गोस्वामी राधागोविंद यांना त्याने आपले गुरू केले. इ. स. १८६८ मध्ये त्याने वृंदावनात श्रीकृष्णाचे एक विशाल संगमरवरी मंदिर बांधले आणि ललितनिकुंज असे त्याचे नाव ठेवले. सांप्रत ते मंदिर, शाह जी के मंदिर या नावाने प्रसिद्ध असून, वृंदावनातील उत्कृष्ट मंदिरांत त्याची गणना होते.

तिथे राहून ललितकिशोरी अनन्यभावाने राधारमणाची सेवा करू लागला. या वेळी त्याने भक्तिपूर्ण काव्यरचना करायला सुरुवात केली. त्याची वृंदावनावर अत्यंत निष्ठा होती. तो पायात वहाणा घालून वृंदावनाच्या भूमीवर कधीच फिरला नाही. एकदा वृंदावनात राहायला गेल्यावर तो कधीच वृंदावनाच्या बाहेर गेला नाही.

ललितकिशोरी रसिक व विद्वान होता. त्यामुळे त्याच्या काव्यात एक आगळाच ढंग आढळतो. ललितमाधुरीने त्याच्या काव्याचे संकलन केले आहे. अभिलाषमाधुरी या त्याच्या प्रकाशित ग्रंथात विनयशृंगारशतक, जुगलविहारशतक, बाराखडी, बारामासी, इ. रचना व त्याच्या सिद्धान्तासंबंधी काही स्फुट पदे आहेत. त्याचे आणखीही काही ग्रंथ प्रकाशित आहेत. अप्रकाशित रचनांमध्ये रसकलिका हा ग्रंथ प्रमुख आहे. [चै. म. ब्र. सा.]

ललितलडैती (इ. स. चे १९ वे शतक) एक चैतन्यमतानुयायी संत. याचे मूळ नाव इंद्रभान असे होते. मुन्शी टिक्कनलाल हे त्याच्या वडिलांचे नाव. ललितलडैती हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पंजाबमधील गाजीखां गावी राहत होता. तिथूनच त्याने वृंदावनाशी निकट संपर्क ठेवला होता. गोस्वामी शामदासाच्या परिवारातील बालमुकुंद हे ललितलडैतीचे गुरू होते. याने दंपतीविलास या बृहत्काव्यग्रंथाची रचना केली. ग्रंथरचनेची प्रेरणा कवीला त्याच्या गुरूकडून मिळाली. हा ग्रंथ ब्रजभाषेत आहे. अनेक राग–रागिण्यांतील हा ग्रंथ पाच भागांत पुरा झाला आहे. कवीची रचना सरस असून, अनेक प्राचीन संतांच्या काव्यांचा त्याला आधार आहे. ग्रंथात अधून मधून वार्तिकांच्या स्वरूपात गद्यही आहे. [चं. म. ब्र. सा.]

ललितविस्तर बौद्धांच्या महायान संप्रदायाचा एक पवित्र ग्रंथ. याला वैपुल्यसूत्र अशीही संज्ञा आहे. भगवान बुद्धाने या पृथ्वीतलावर ज्या क्रीडा (=ललित) केल्या, त्याचे वर्णन यात असल्यामुळे या ग्रंथाला हे नाव मिळाले. गौतम बुद्धाच्या जन्मापासून धर्मचक्रप्रवर्तनापर्यंतचे त्याचे चरित्र या ग्रंथात मिळते. महावस्तू, अश्वघोषकृत बुद्धचरित, निदानकथा, धर्मगुप्ताचे अभिनिष्क्रमणसूत्र व ललितविस्तर ही बुद्धाची प्राचीन चरित्रे होत. त्या सर्वांत ललितविस्तर हे व्यवस्थित आहे. त्याची गंभीर व ध्वन्यात्मक रचना फारच सहृदयतेने करण्यात आली आहे. भगवान बुद्धाविषयीची श्रद्धा आणि भक्ती यांचे मनोज्ञ दर्शन घडविण्यात प्रस्तुत ग्रंथ यशस्वी ठरला आहे.

मुळात हा ग्रंथ हीनयानी पंथातल्या सर्वास्तिवादी निकायाचा होता. पण कालांतराने त्याला महायानी स्वरूप मिळाले व त्याचा आकारही वाढला. प्रस्तुत ग्रंथ गद्यपद्यात्मक आहे. कथाभाग प्रायः गद्यामध्ये असून, मधेमधे पद्यात्मक गाथांचा समावेश केलेला आहे. या गाथा म्हणजे सुंदर ग्रामगीतेच आहेत. सुत्तनिपातातल्या गाथांप्रमाणेच याही गाथा अतिप्राचीन असल्याचे संशोधक सांगतात.

प्रस्तुत ग्रंथात प्राचीन परंपरेला धरून बुद्धकथा वर्णित आहेत. ललितविस्तराच्या विषयसामग्रीमध्ये अशी काही वैशिष्ट्ये आहेत, की जी पाली ग्रंथांत आढळत नाहीत. उदा० बालक बोधिसत्वाला त्याची सावत्र आई देवमंदिरात घेऊन गेली व तो तिथे जाताच तिथल्या सर्व देवतांच्या मूर्ती सजीव होऊन गौतमाची म्हणजेच भावी बुद्धाची स्तुती करू लागल्या.

प्राचीन पाली परंपरेत ही कथा उपलब्ध नाही. या व्यतिरिक्त आणखी एक गोष्ट ही, की बुद्धानंतर कित्येक शतकानंतरच्या कथांचाही समावेश ललितविस्तरात केलेला आहे. बुद्धकथेचा विकास कसकसा झाला, याचा इतिहास ललितविस्तरावरून जाणून घेता येतो. वाङ्मयीन दृष्टचाही प्रस्तुत ग्रंथ श्रेष्ठ आहे. जरी पाणिनीचे सर्व नियम ग्रंथाच्या भाषेला लागू होत नसले, तरी त्यातले भाषासौंदर्य सहजपणे प्रत्ययाला येते. ललितविस्तरातल्या गाथा आणि कथा यांच्या आधारावरच पुढे अश्वघोषाने बुद्धचरित नावाचे एक सहजसुंदर महाकाव्य रचले.

प्रस्तुत ग्रंथाचे परिवर्तन या नावाने २७ अध्याय आहेत. सर्व अध्याय सारख्या परिमाणाचे नाहीत. या ग्रंथात बुद्धाला तुषित लोकी वास्तव्य करणाऱ्या सम्यक् संबुद्धाचा अवतार मानलेले आहे. या ग्रंथातले बुद्धचरित्र तो अवतारी पुरुष आहे, असे गृहीत धरूनच वर्णिलेले आहे. त्याकडे पाहता प्रस्तुत ग्रंथावर वैष्णव अवतारवादाची छाप स्पष्ट दिसून येते. अवताराचे हेतूही दोन्ही ठिकाणी बऱ्याच अंशी सारखे आहेत. गीतेत भगवंताचे अवतरित रूप मायिक मानले गेले आहे (४.६-७). त्याच प्रमाणे ऐतिहासिक बुद्धही नित्य लोकातून अवतरित होणारे मायिक रूप आहे. ललितविस्तराच्या प्रारंभीच म्हटले आहे, की सम्यक् संबुद्ध सर्व देवांचा गुरू आहे आणि भगवान आहे. सर्व लोकांच्या दुःख व अज्ञान यांचा नाश करणारा असे समजतात. विष्णूच्या अवतारग्रहणाच्या वेळी देव आणि मनुष्य त्याची अवतार घेण्याविषयी प्रार्थना करतात; त्याचप्रमाणे भिक्षू, गृही, देव, इ. सर्व लोक बुद्धाला तशीच प्रार्थना करतात.–'हे बुद्ध तू त्रिरत्नांचा ज्ञाता आणि माराचा संहारक आहेस. तू अवतार घेऊन जिन व मार यांना नष्ट कर. तू देव आणि ब्राह्मण यांच्यावर कृपा करण्यासाठी अवतरित हो.'

वरील मंगलाचरणावरून एक गोष्ट जाणवते, की ललितविस्तराची अवतारपरंपरा महाकाव्यातील वैष्णव अवतारवादाशी बरीचशी मिळती जुळती आहे. प्रस्तुत ग्रंथात बुद्धाच्या ठिकाणी ज्या ८४ गुणांचा उल्लेख केलेला आहे, त्यांमधले कित्येक गुण पौराणिक अवतारांच्या कोटीतले आहेत.

तिसऱ्या अध्यायात बुद्धाच्या विशिष्ट काल, देश, स्थान आणि जाती यांमध्ये होणाऱ्या अवतारकारणांवर प्रकाश टाकलेला आहे. तिथे म्हटले आहे, की बुद्ध हा सृष्टीच्या प्रत्येक परिवर्तनकालात केवळ जंबुद्वीपातच अवतार घेतो. मध्य देश हे त्याच्या अवताराला उपयुक्त असे स्थान आहे. तिथे तो ब्राह्मण किंवा क्षत्रिय कुलातच अवतरतो. त्याचे आईबाप हे दिव्य गुणांनी युक्त असतात. वैकुंठातून अवतीर्ण होण्यापूर्वी विष्णू ज्याप्रमाणे स्वर्गीय देवांशी विचारविनिमय करतो, त्याचप्रमाणे बुद्धही अवतीर्ण होण्यापूर्वी तुषित लोकात सर्व देव, नाग, बोधिसत्व, अप्सरा, इ. गणांशी संभाषण करून त्यांना आपल्या अवताराची कल्पना देतो. ज्याप्रमाणे विष्णूचा अवतार झाल्यावर भूलोकीचे वातावरण मनोरम, चैतन्यमय आणि सुखमय होते, त्याचप्रमाणे बुद्धाच्या अवताराच्या वेळीही घडते. बुद्ध अवतीर्ण होताच, देव त्याला अभिषेक करतात आणि मनुष्यांना स्वर्ग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होण्याबद्दल त्याला प्रार्थितात. प्राणिमात्रावर दया आणि कृपा या कृत्यांव्यतिरिक्त धर्मप्रवर्तन हे बुद्धाच्या अवताराचे एक प्रमुख प्रयोजन असते. 'धर्मसंस्थापनार्थाय सम्भवामि युगे युगे' या गीतोक्तीसारखेच हे प्रयोजन दिसते.

ललितविस्तरात कित्येक ठिकाणी बुद्धाला नारायणाचा अवतार व नारायणाच्या शक्तीने युक्त मानलेले आहे. बुद्धाचे शरीर नारायणाच्या शरीराप्रमाणेच अच्छेद्य व अभेद्य आहे. यावरून ललितविस्तराच्या निर्मितीच्या वेळी नारायणाचे अवतारी रूप व्यापक प्रमाणात प्रचलित झाले होते, हे कळून येते. नारायणाची सर्व गुणवत्ता व शक्तिसंपन्नता बुद्धाच्या अंगी मानली गेली आहे. यावरून बौद्ध अवतारवादावर पौराणिक वैष्णव अवतारवादाचा प्रभाव परिलक्षित होतो. [बौ. ध. द.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६; ललितविस्तर–संपा. श्री. प. ल. वैद्य; म.सा. अ.]

ललितसखी (इ. स. चे १८ वे शतक) एक चैतन्यमतानुयायी संत व कवी. ललितसखी हे कवीचे पंथिपर नाव आहे. त्याचे मूळ नाव कोणते, तो कुठे राहत होता, इ. गोष्टी अज्ञात आहेत. हा मुरलीधर भट्टाचा शिष्य होता. याने कुँवरि–केली व कहानी–रहसी असे दोन ग्रंथ रचले आहेत. त्याने आपल्या काव्यात ललितसखी, ललितसखी–मुरलीधर व मुरलीधर या मुद्रा वापरल्या आहेत. काव्याच्या दृष्टीने कहानी–रहसी हा लघुग्रंथ सामान्य प्रतीचा आहे. कुँवरि–केलीमध्ये दोहा, कवित्त, सवैया, छप्पय्य, इ. छंद आढळतात. हा ग्रंथ सुरस आहे. दोन्ही ग्रंथांची भाषा व्रज असून, ते प्रकाशित झालेले आहेत. [चै. म. व्र. सा.]

ललिता (१) एक देवता. हिला भद्रा, पद्मा, शामला अशीही अन्य नावे आहेत. ललिता हे राधेचेच एक दुसरे रूप मानलेले आहे. वंशीअली नावाच्या एका संतकवीने राधा-सिद्धान्तम् नावाचा एक ग्रंथ लिहून त्यात राधा व ललिता यांचे ऐक्य प्रतिपादिले आहे. [अ. श. व्र. प्रे.]

(२) भंडासुराचा नाश करणारी एक देवता. या देवीने प्रकट व्हावे म्हणून ब्रह्मदेवाने यज्ञ केला आणि त्या यज्ञातून ही प्रकट झाली. त्यामुळे तिला ब्रह्मदेवाची मानसकन्या समजतात. पुढे ब्रह्मदेवाने तिचा विवाह शंकराच्या कामेश्वरस्वरूपाशी लावून दिला आणि म्हणूनच ती कामेश्वरी बनली.

नैमिषारण्य व श्रीनगर या ठिकाणी या देवीची स्थाने आहेत. ललितेची मूर्ती चतुर्भुज असते. तिच्या चार हातांत आरसा, शंख, फळ आणि काजळाची डबी असते. तिच्या अंगावर खूप अलंकार असतात व ती नेहमी उभी असते.

ललितासहस्रनाम, ललिताहृदय, इ. तिची स्तोत्रे प्रसिद्ध आहेत. शंकराचार्यांनी ३०० श्लोकांचे तिचे एक स्तोत्र रचले असून, ते त्रिशती स्तोत्र या नावाने प्रसिद्ध आहे. [दे. को. २]

(३) उ. भारतातील एक देवी. कालीची बहीण. हिचे दात फाळासारखे असतात. ही दुष्ट स्वप्ने पाडते व तिला जे भजत नाहीत त्यांची शरीरे फुगवते, अशी तिकडच्या लोकांची समजूत आहे. [पॉ. रि. फो. लो. नॉ. इं.]

(४) एक तांत्रिक देवता. ही प्रकाश-शिवाची विमर्श-शक्ती आणि विश्वविग्रहा आहे. हिला आद्या, नित्या व त्रिपुरसुंदरी अशी अन्य नावेही आहेत. हिची स्थूल, सूक्ष्म व पर अशी तीन रूपे असतात. ती रक्तवर्ण व चतुर्भुज असून, तिच्या हातांत धनुष्य, बाण, पाश व अंकुश ही आयुधे असतात. ती कामेश्वराशी संयुक्त अशा स्थितीत बसलेली असते. हिचा पंचमहाभूतांशी व तीन गुणांशी संबंध आल्यामुळे तिच्यापासून पंधरा नित्या देवता उत्पन्न होतात, असे तंत्रराज तंत्र या ग्रंथात सांगितले आहे. श्रीयंत्र हे हिचे प्रतीक आहे. हिची पूजा कायिक, वाचिक व मानस अशा तीन प्रकारांनी केली जाते. त्या पूजेत श्रीयंत्राला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. पाहा – त्रिपुरसुंदरी. [तं. तं. शॉ. अ.]

ललितापंचमी आश्विन शुद्ध पंचमीला हे नाव आहे. या दिवशी उपांगललिता नावाच्या देवीची पूजा व व्रत करतात. पाहा – उपांगललिता.

ललिताषष्ठी स्त्रियांचे एक काम्य व्रत. भाद्रपद शुद्ध षष्ठीला या व्रताचा प्रारंभ करतात. याचा विधी असा– नदीतील वाळू एका बांबूच्या टोपलीत भरून आणावी, त्या वाळूचे पाच भाग करावे आणि त्यांवर ललितादेवीची पूजा करावी. पूजेसाठी निरनिराळी अठ्ठावीस किंवा एकशेआठ फुले व फळे घ्यावी. विविध खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवावा. रात्री मैत्रिणींसह डोळे न मिटता जागर करावा. सप्तमीला सर्व नैवेद्य एका ब्राह्मणाला द्यावा आणि कुमारिकांना व पाच किंवा दहा सुवासिनींना भोजन घालावे. मग ललितादेवी मजवर संतुष्ट होवो, असे म्हणून त्यांना निरोप द्यावा. फल – अखंडसौभाग्यप्राप्ती.

हे व्रत गुजरात प्रदेशात अधिक प्रचलित आहे. [हि. ध.]

लल्ल (इ. स. चे ७ वे शतक) एक ज्योतिष – ग्रंथकार. याच्या चरित्रासंबंधीची निश्चित माहिती उपलब्ध नाही. हा त्रिविक्रम भट्टाचा मुलगा असून, आर्यभटाचा प्रधान शिष्य होता, असे म्हणतात. परंतु हा आर्यभटानंतर झाला, असे श्री. शं. बा. दीक्षित यांनी म्हटले आहे. याने धीवृद्धितंत्र हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गणितग्रंथ आणि रत्नकोश नावाचा मुहूर्तग्रंथ रचला. जातकावरही याचा एक ग्रंथ असावा, असे मीनराजजातकातील उल्लेखावरून कळते. धीवृद्धितंत्राचा सखोल अभ्यास करून भास्कराचार्यांनी आपला सिद्धांतशिरोमणी नावाचा मोठा ग्रंथ रचला. या ग्रंथात त्यांनी लल्लाच्या सिद्धांतांचे खंडन केले आहे. लल्ल हा स्वतः वेध घेणारा शोधक होता. श्रीपतीने याच्या रत्नकोशाच्या आधारेच रत्नमाला नावाचा ग्रंथ लिहिला.

श्री. द्विवेदींच्या मते लल्लाने फलज्योतिषावरही एक ग्रंथ रचला आहे. [भा. ज्यो. शा.; गु. सा. इ.]

लल्लूलाल (इ. स. १७६३–१८३५) एक महान ग्रंथकार. हा औदीच्य ब्राह्मण असून, आगरा येथे राहत असे. याचे वडील लोकांचे पौरोहित्य करून कशीबशी गुजराण करत. त्यामुळे स्वतःचा उदरनिर्वाह कुठे चालेल ते पाहण्यासाठी लल्लूला खूप भटकावे लागले. या भ्रमंतीत तो मुर्शिदाबाद येथे पोचला. तिथे गोस्वामी गोपालदास यांच्याशी आणि त्यांच्याच द्वारे नवाब मुबारक-उद्दौला याच्याशी त्याचा परिचय झाला. नबाबाने सात वर्षे लल्लूला आश्रय दिला. पुढे गोपालदासांचा मृत्यू झाला आणि त्यामुळे लल्लूला मुर्शिदाबादचे वास्तव्य उदास वाटू लागले.

लल्लू मग तिथून निघाला आणि कलकत्त्याला गेला. तिथे त्याला राजा रामकृष्ण यांचा आश्रय मिळाला. रामकृष्ण राज्यावर आल्यावर लल्लू त्याच्याबरोबर नाटोर येथे गेला. थोड्याच काळात राज्यात उपद्रव सुरू झाला. राजा रामकृष्ण कैद केला गेला, तेव्हा लल्लू नाटोरहून परत कलकत्त्याला आला. पण तिथे त्याला कुणी आश्रयदाता भेटला नाही. तिथून तो जगन्नाथपुरीला गेला व तिथून पुन्हा कलकत्त्याला आला.

लल्लूला उत्तम पोहता येत असे. त्याने एके दिवशी गंगेत उडी घेऊन एका बुडत्या इंग्रज इसमाला वाचवले. त्या इंग्रजाने कृतज्ञ राहून लल्लूला पुष्कळ मदत केली. त्याला एक छापखानाही घालून दिला. पुढे आणखी काही इंग्रज अधिकाऱ्यांच्या संपर्कात आल्यावर इ. स. १८०० साली फोर्ट विल्यम कॉलेजात प्राध्यापक म्हणून त्याची नियुक्ती झाली. हिंदी भाषेत गद्य रचना करण्याचे काम त्याला देण्यात आले. ते काम त्याने मनापासून केले. प्रथम त्याने सिंहासनबत्तीशी, वेताळपच्चीसी, शाकुंतल नाटक व माधोनल या ग्रंथांचा खडी बोलीत अनुवाद केला. पुढे सभाविलास, माधवविलास, लतायफे हिंदी, लाल चंद्रिका, व्रजभाषा व्याकरण, इ. अनेक गद्य ग्रंथ त्याने निर्माण केले.

त्याच्या या सर्व ग्रंथांत प्रेमसागर हा ग्रंथ उत्कृष्ट ठरला आहे. तो भागवताच्या दशम स्कंधावर आधारलेला आहे. त्याची भाषा व्रजमिश्रित खडी बोली आहे. ग्रंथात अधून मधून काही दोहे [व] चौपायाही आहेत. हिंदी भाषेत या ग्रंथाचे खूप स्वागत झाले. [हा] ग्रंथ जनमानसात प्रिय व आदरणीय ठरला. त्या ग्रंथावरू[न] लल्लू हा आधुनिक हिंदी गद्याचा जनक मानला गेला.

त्याने विविध विषयांवर फुटकळ पद्येही रचली आहे[त]. [हिं. सा. को. २; क. कौ. २; हिं. सा. इ.]

लल्लेश्वरी (इ. स. चे १४ वे शतक) एक संत कवयि[त्री]. हिला लल्लयोगीश्वरी, लालदीदी किंवा लाल[...] असेही म्हणत. इ. स. च्या १४ व्या शतकापासून १६ व्या श[त]काच्या अखेरीपर्यंत भारतात अनेक कवी, संत, आचार्य व र[...] वादी महापुरुष उत्पन्न झाले व त्यांनी जनजीवनावर [...] जनांच्या विचारांवर खूप प्रभाव पाडला. लल्ला या सर्वां[...] पूर्वीची आहे. काश्मीरवर तिचा आजही विलक्षण प्रभाव [...]

एका मध्यमवर्गीय काश्मिरी पंडिताच्या घराण्यात [ति]चा जन्म झाला. त्या काळी काश्मीरवर सुलतान अलाउद्दीन (१[...]) राज्य करीत होता. लल्लाचे आई-वडील श्रीनगरजवळ[...]ठण या गावी राहत होते. लल्लाच्या बालपणातली [...] फारशी मिळत नाही. एवढेच कळते, की तिचे प्रारंभिक [शि...] सिद्ध श्रीकंठ नामक एका शैव आचार्याकडे झाले. त्याने लल्ला[ला] शैवदर्शनाचे सखोल ज्ञान दिले. बालपण संपण्याच्या सुमा[रास] तिचा विवाह ताम्पूर गावच्या एका ब्राह्मण तरुणाशी [...] घरात तिला सावत्र सासू होती. तिने लल्लाचा छळ सुरू [...] नवरा आईच्या आज्ञेत असल्याने त्यानेही तिच्या छळा[त भर] घातली. नवऱ्याचे आणि तिचे कधीच जमले नाही.

सासरी असे दुःख भोगीत असता लल्लाला वैराग्य [...] झाले. एके दिवशी तिने घर सोडले आणि ती सिद्ध श्रीकं[ठा...] गेली. त्याने लल्लाच्या वैराग्याची तीव्रता पाहिली आणि [...] आत्मज्ञानाच्या साधनाचा मार्ग दाखवला. शैवयोगाची [...] करीत असता एक दिवस ती पूर्ण योगिनी बनली. योग[...]तून तिने आत्मसाक्षात्कार करून घेतला. याविषयीचे [...] उद्गार पुढीलप्रमाणे आहेत –

दमा दम करमस दमन हलि प्रजल्योम दीप ननेयम् [...]
अन्वर्युम प्रकाश न्यबर छोटुम गरि रोटुम करमस [...]

अर्थ – मी मोठ्या प्रयत्नाने प्राणांवर विजय मि[ळविला] [...] माझ्या हृदयातला आत्मदीप प्रज्वलित होऊन उठला. [...] आत्मस्वरूपाचे ज्ञान झाले. मी आंतरिक ज्योत बाहेर [...] केली आणि माझ्या प्रियतमाला बांधून ठेवले.

त्याच वेळी तिच्या अंतरात कवित्वाचा कोंभही उ[...] ती पदे रच लागली आणि ती स्वतःच गात हिंडू लागली. [...]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या काळात काश्मीरमध्ये सूफी मताचा प्रचार खूपच होता. अनेक सूफी संत आपण प्रियकर व ईश्वर प्रियतमा असे नाते जोडून आध्यात्मिक विरहगीते गात हिंडत होते आणि आपल्या मताचा प्रचार करीत होते. लल्ला या सूफी संतांशीही परिचित होती. पण तिने सूफीमत ग्रहण केले नाही. केवळ त्या मतातले प्रेम तिने स्वीकारले आणि शैवदर्शनातल्या ज्ञानाशी त्याची सांगड घातली.

प्रेमोन्मत्त होऊन हिंडत असता तिच्या देहावरचे वस्त्रही गळून पडले, पण तिने त्या गोष्टीची पर्वाच केली नाही. पुढे ती नग्नावस्थेतच हिंडू लागली.

कोणी तरी लल्लाला विचारी, 'लल्ले, तू सदैव नग्न का हिंडतेस?" त्यावर ती उत्तर देई, " अरे, तुमच्यामध्ये पुरुष आहेच कोण, की ज्याची मला लाज वाटावी !"

पण एक दिवस एक तरुण पुरुष घोड्यावर बसून समोरून येताना तिने पाहिला आणि तेव्हा मात्र ती एकदम लाजली. ती लगेच एका कापडाच्या दुकानात शिरली आणि तिने एक कापडाचा तुकडा दुकानदाराकडे मागितला. पण त्याने तो तिला दिला नाही. मग ती दुसऱ्या दुकानात गेली. तिथे मात्र तिला वस्त्र मिळाले.

तिने पाहिलेला तरुण पुरुष शाह हमदान नावाचा होता. तो मोठा संत होता आणि लोकांत आदरणीय होता. आजही त्याच्या दर्ग्यात हजारो लोक त्याची पूजा करायला जातात.

लल्लाच्या काळात काश्मीरमध्ये हिंदू व मुसलमान यांच्यांत धार्मिक तणाव फ़ार होता. मुसलमान राज्यकर्त्यांनी हजारो काश्मिरी हिंदूंना बाटवले होते आणि हे नवदीक्षित मुसलमान हिंदूंवर अत्याचार करू लागले होते. धार्मिक श्रद्धा, रीतीरिवाज, इ. सर्व क्षेत्रांत हिंदु-मुसलमानांत संघर्ष उत्पन्न झाला होता. हिंदू व मुसलमान हे एकाच परमेश्वराचे पुत्र. पण त्या ईश्वराच्या नावावरच ते आपसांत लढत होते, रक्ताच्या नद्या वाहवीत होते. काश्मिरी जनता या संघर्षाने व्याकुळ झाली होती. तिला ऐक्य आणि खरा धर्म उपदेशिण्यांसाठीच जणू लल्लेश्वरीचा अवतार झाला होता. तिने हिंदु-मुस्लिम ऐक्यावर जोर दिला. ती लोकांना सांगू लागली–

शिव छुई थलि–थलि रोज़ान,
मो ज़ान ह्योन ह्योवं त मुसलमान।
त्रुखई छुक पननूई पान परज़ान
सोई छय साहिबस सीत असली ज़ान।

अर्थ – शिव सर्वत्र आहे; त्याने सर्व चराचर सृष्टी व्यापली आहे. हिंदू आणि मुसलमान या सर्वांच्या ठिकाणी तो आहे. त्यांच्यामध्ये भेद आहे, असे मानू नका. तुम्ही आधी स्वतःला जाणून घ्या. कारण स्वतःला जाणणं म्हणजेच शिवाला जाणणे होय.

पर तु पान येम्य सोमुय मोन
येम्य ह्युवुय मोन ध्यन क्योह राय।
येम्य सुय मन अछय सोंपुन
तमी ड्युठ्यु सुर गुरु नाथ॥

अर्थ– ज्याने आपला व परका, दिवस आणि रात्र या सर्वांना समान मानले, ज्याच्या मनात भेदभाव मुळीच राहिला नाही, त्यालाच ईश्वराची प्राप्ती झाली आहे, असे समजावे.

लल्ला आपल्या उपदेशातून आपल्याच आध्यात्मिक अनुभूतीचे वर्णन करताना दिसते. तिच्या अशा एका पद्याचा हिंदी अनुवाद असा–

आवेशाकुल, नेत्रों में प्यास भरे –
खोजती हूं दिन रात चहुं ओर हेरती।
किया है साक्षात्कार मैंने सत्य का, बुद्ध का –
अपने ही भीतर, नेत्र सफल हुए।

अर्थ – तृषार्त आणि आवेशाकुल नेत्रांनी मी शोधते आहे. रात्रंदिवस चहूकडे हेरते आहे. मी सत्याचा, बुद्धाचा, साक्षात्कार स्वतःच्या ठिकाणी करून घेतला. माझे नेत्र सफल झाले.

सत्याचा मागोवा घेत घेत खोल जाताना ती उपनिषदातल्या ऋषींच्या किती जवळ जाऊन पोचली आहे !

तुम हो स्वर्ग और तुम हो पृथ्वी
तुम्हीं हो दिन और रात और पवन।
तुम स्वयं हो जीव और आत्मा
तुम ही हो फूलों की भेंट॥

अर्थ – स्वर्ग तूच आहेस आणि पृथ्वीही तूच आहेस. रात्र, दिवस आणि वारा तूच आहेस. जीव आणि परमात्मा तू स्वतःच आहेस. फुलांची भेटही तूच आहेस.

लल्लेश्वरीच्या कित्येक पदपंक्ती नीतिवाक्ये बनून राहिल्या आहेत. हिंदू आणि मुसलमान या दोन्ही समाजांत ती आदरणीय ठरली आहेत. लल्लेश्वरी जरी शैव दर्शनात सिद्धज्ञानी होती, तरी तिने एखाद्या आचार्याप्रमाणे शैवसिद्धान्ताचे विवेचन किंवा विवरण केले नाही. तिने आपल्या रहस्यमय अनुभूतीतून प्राप्त झालेल्या विचारांचाच सर्वांना उपदेश केला.

सर रिचर्ड टेंपल याने लल्लेश्वरीच्या काव्यावर एक पुस्तक लिहिले आहे. त्याव्यतिरिक्त रॉयल एशिआटिक सोसायटीने 'लल्लवाक्यानि' किंवा 'लाल देद की वाणी' या नावाचा एक प्रबंध प्रकाशित केला आहे.

लल्लेश्वरीने श्रीनगरजवळच्या व्रजविहार नामक गावी जुम्मा मशिदीच्या समोर आपला देह सोडला. स्थूल देहाचा त्याग करून ती काश्मीरमधल्या प्रत्येक व्यक्तीच्या हृदयामध्ये आत्मरूपाने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जाऊन बसली. [म. क.; पू. प. सं. म; अजंता, मे १९५७]

लवणदान एक काम्य व्रत. मार्गशीर्ष पौर्णिमेला मृगशीर्ष नक्षत्र असेल, तर त्या दिवशी हे व्रत करतात. या व्रतात चंद्रोदयाच्या वेळी, मध्यभाग सोन्याचा असलेल्या एका भांड्यात एक प्रस्थ दळलेले मीठ घालून ते पात्र ब्राह्मणाला दान द्यायचे असते. फल – सौंदर्य व सौभाग्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

लवणदुर्गा एक शाक्त देवता. ही रक्तवर्ण, त्रिनेत्र व चतुर्भुज आहे आणि तांबडे कमळ हे तिचे आसन असते, असे श्रीविद्यार्णवतंत्र या ग्रंथात सांगितले आहे.

लवणधेनुदान एक काम्य व्रत. याचा विधी असा–गोमयाने जमीन सारवून तिच्यावर दर्भ पसरावे. मग त्यावर शेळीचे कातडे अंथरावे. त्यावर मिठाची धेनू करून ती पूर्वाभिमुख ठेवावी. मग तिची पूजा करून ती ब्राह्मणाला दान द्यावी. दानोदक सोडल्यावर कुटुंबियांसह त्या गाईला प्रदक्षिणा घालावी. दक्षिणा देऊन दानविधी समाप्त करावा. फल – सर्व पापांचा नाश व विष्णुप्रीतीचा लाभ. [दा. चं.]

लवणसंक्रांतिव्रत एक काम्य व्रत. संक्रांतीच्या दिवशी हे व्रत करतात. या दिवशी स्नान करून केशरी गंधाने अष्टदल कमळ काढतात. त्या दलांवर पूर्वेकडून प्रारंभ करून भास्कर, रवी, विवस्वान, पूषा, आदित्य, तपन, मार्तंड, भानू आणि बीजकोशावर विश्वात्मा यांची स्थापना करून त्यांची पूजा करतात. नंतर त्या अष्टदल पद्मापुढे एका पात्रात मीठ (लवण) व गूळ भरून ठेवतात. मग 'पूजितोऽसि यथाशक्ति प्रसीद मम भास्कर' हा मंत्र म्हणून ते पात्र ब्राह्मणाला दान देतात. याप्रमाणे वर्षभर प्रतिमासी संक्रांतीला विधान करतात. उद्यापनाच्या वेळी सूर्याची सुवर्णप्रतिमा करून, ती लवणपात्रासह दान देतात. गोप्रदानही करतात. फल – सूर्यलोकप्राप्ती. [हि. ध.; व्रतराज]

लहरा एक नृत्यप्रकार. बकरीच्या चामड्यापासून बनविलेल्या बीन नामक वाद्यावर एक प्रकारची धून वाजविली जाते, त्या धुनीलाच लहरा असे म्हणतात. या धुनीच्या अनुषंगाने ढोलक हे वाद्य वाजवले जाते. नर्तिका गुडघे मोडून खाली बसतात. त्या आपला लहंगा चारही दिशांना पसरवून गोल फेर धरतात. बुरख्यातून आपले मुख बाहेर काढून व ते मागे झुकवून, कमरेपासून शरीराचा वरचा भाग लहराच्या अनुषंगाने त्या फिरवीत असतात. यानंतर एक गुडघा वर उचलून पाय टाच त्या लहराच्या अनुरोधाने जमिनीवर आपटतात. या नृत्य भैरव नृत्य असेही म्हणतात. काही वेळा या नृत्यात नर्तकी बु काढून टाकून ओढणीची दोन्ही टोके दोन्ही हातांनी डोक्य धरतात व तोंडाने सूं सूं असा आवाज करतात. त्याच वेळी आपली मान लहराच्या अनुरोधाने वळवीत राहतात. तेव्हा नृत्याला बरुआवैन किंवा नागनृत्य म्हणतात. [कृ. जी. द.]

ललित एक प्राचीन मराठी नाट्यप्रकार. महाराष्ट्र कोशात ललित शब्दाचे पुढीलप्रमाणे स्पष्टी दिले आहे –(१) नवरात्रादी उत्सवाच्या शेवटच्या रात्री देवता सिंहासनाधिष्ठित झाली असे समजून वासुदेव, दां इ. ईश्वरभक्तांची सोंगे आणतात व ती सोंगं स्वसंप्रदाय देवतेला प्रसाद मागून मग तो सभासदांना वाटतात. (२) प्रसंगी सोंगे आणून नाटकाच्या प्रवेशाप्रमाणे खेळ करत

डॉ. आनंद कुमारस्वामी यांच्या मते ललित शब्द शब्दावरून बनला असावा. ते म्हणतात– महाराष्ट्रात कृष्णलीलेचे अभंग गायिले आहेत. त्यापूर्वीची महान पराही पूर्ण कृष्णभक्तीचीच आहे. त्यावरून उत्सवा ललित करण्याची प्रथा फार प्राचीन दिसते. महाराष्ट्र शिल्पातील कृष्णलीलेच्या दर्शनावरून ललितात कृष्ण सोंगे केली जात असावी, असे वाटते.

मथुरेची व्रजविहारपरंपरा, बंगालची कृष्णलीला कर्नाटकी भागवत नाटके व महाराष्ट्राची ललिते यांत पु साम्य असल्याचे दिसून येते.

प्राचीन काळी ललिते कशी केली जात, याची मिळत नाही. ललिताचा मूळ उद्देश वेदान्तोपदेश हा त्यात करमणुकीसाठी काही सोंगे आणण्यात येत. धार्मि वाच्या शेवटी हौशी मंडळी हा कार्यक्रम करीत. त्यात म्हणून छडीदार, भालदार, चोपदार, वासुदेव, गोंधळी, वाघ्या-मुरळी, बहिरा, मुका, आंधळा, इ. पंच सोंगे आणीत. त्याचप्रमाणे दशावतारांची लीलाही ललिताचा शेवट सामान्यतः रामाकडून रावणाचा वध होई. पात्रांची सजावट अर्थातच ओबड धोबड असे. सरकी घालून किंवा मशाली पेटवून त्याच्या उजेडात होत. एकोणिसाव्या शतकाच्या आरंभी विष्णुदास भावे सुरू केलेली नाटके पुष्कळशी ललिताशी जुळणारी होती वरून असे म्हणता येईल. की आधुनिक मराठी रंगभूमी ललितातूनच झाला असावा.

ललिताचा रंगमंच सामान्यपणे १–१॥ फूट उंचीचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर फळ्या टाकून बनविलेला असे. त्याचा आकार सुमारे १२×१८ फूट असा असे. या रंगमंचाला पडदा मुळीच नसे. रंगमंचाच्या एका बाजूला साथवाले बसत. सूर धरणारी मुले मागे बसत. पात्रांची ये-जा दुसऱ्या बाजूने होई.

याचा प्रयोग असा – प्रथम मुले छरुपद गातात. नंतर सूत्रधार व पारिपार्श्वक येतात. ते गणपतीचे स्तवन करतात. मध्येच विदूषकाचे पात्र येते. सूत्रधाराशी थोडा विनोदी संवाद करून ते निघून जातं. सूत्रधार मग एक पद म्हणतो. ते झाल्यावर त्याची बायको प्रवेश करते. तो तिला सांगतो. 'आज ललित करायचे आहे. त्यासाठी मला तुझी मदत हवी.' ती त्याला एका गीतातच उत्तर देते व मदत करण्याचे आश्वासन देते. मग दोघांचे एक द्वंद्वगीत होते. नंतर सूत्रधार परत गणेशस्तवन करतो व ललिताचा प्रथम प्रवेश संपतो.

सूत्रधार, नटी, पारिपार्श्वक इत्यादींचे पोशाख फारसे वैशिष्ट्यपूर्ण नसतात. विदूषकाच्या अंगात मात्र पायघोळ काळा अंगरखा, सलवार, पायात घुंगुर, हातात आरसा, उंच टोपी व कपाळावर मोठा टिळा असतो.

यानंतर ललितातील मुख्य पात्रे रंगमंचावर प्रवेश करतात. प्रथम येतात चोपदार व पाटील. चोपदाराची सुरवार, अंगरखा व पगडी ही सर्व लाल रंगाची असतात. उलट पाटलाची सुरवार, अंगरखा, पिळाची पगडी, उपरणे हे सर्व पांढऱ्या रंगाचे असते. चोपदाराच्या हाती छडी व कमरेला पट्टा असतो. पाटील व चोपदार हे दोघेही हिंदीत बोलतात. ललिताची काही आख्यानेही हिंदीतच आहेत. अभंग, दोहे, भारुडे यांतही अधूनमधून हिंदी शब्द वापरलेले असतातच.

श्री. वि. कृ. जोशी यांच्या मते ललितातली ही सोंगे परप्रांतात विशेषतः उत्तर हिंदुस्थानात करून दाखविण्यात येत असावी व त्यांच्या सोईसाठी संवाद जे एकदा हिंदीत सुरू झाले, ते तसेच ठेवण्यात आले असावे. तथापि, हे म्हणणे बरोबर वाटत नाही. हिंदी-भाषी प्रदेशात ही सोंगे केल्यामुळे ललिताची भाषा हिंदी वळणाची झाली नाही, तर ती इस्लामी राजवटीच्या प्रभावामुळे तशी झाली. कारण ललिताची ही भाषा निर्भेळ हिंदी नाही, तर तीवर उर्दू-फारसीचाही प्रभाव आहे.

चोपदार आणि पाटील यांचा रंगमंचावर प्रवेश झाल्यानंतर त्यांचा पुढीलप्रमाणे संवाद होतो –

चोपदार – दौलतजादा दशरथनंदन रामचंद्रमहाराज साहेब, गरीबनिवाजपर निगा रखो, सरदार, मानकरी, मुकादम, पटेल, पटवरी, हाली, मोहाळी, देशमुख, देसाई, सब रय्यतपर निगा रखो, मेहरबान सलाम, रामराजे के भजन से दौलत बढती रहे।

पाटील – तुम कौन है ?

चोपदार – हम तो चोपदार, हमारे ऊपर शिवशंकर का प्यार. मैं पार्वती के गले का हार. छडी रुपेकी गुलजार. दिया पोषाख जडित जरतार, और बांधू पांचू हतियार. मुख में बीडा मसालेदार. तोडे मकोडसे तयार. खडे रामराजा के दरबार... हम रामचंद्रमहाराज के जुगजुग के नोकर कहलाते हैं।

यानंतर पाटील चोपदाराला प्रश्न विचारतो आणि चोपदार चारही युगांची वर्णगणना, त्यांत झालेले राजे व अवतार इत्यादींची माहिती देतो. मग चोपदार व पाटील यांच्यांत पुनश्च प्रश्नोत्तरी झडते –

पाटील – तुम नौकरी करोगे ?

चोपदार – नोकरी करेंगे।

पाटील – क्या दरमाह लेवोगे ?

चोपदार – तुम क्या देवोगे ?

पाटील – सौ देयेंगे।

चोपदार – सौ के तो पान लगते हैं।

पाटील – दो सौ देयेंगे।

चोपदार – दो सौ की सुपारी लगती है !

पाटील – फिर आप क्या लेवोगे ?

चोपदार – किस लंडीने क्या देना और किस लंडीने क्या लेना। हम भगवान के पांव के पास नोकरी करेंगे।

यानंतर तो दोन तीन गाणी म्हणतो व परत जातो. इथे ललिताचा एक भाग संपतो.

मग राजभाट, पाटील व गावभाट यांचा प्रवेश सुरू होतो. राजभाटाने मावळी पद्धतीचा वेष केलेला असतो. धोतर, अंगरखा, घोंगडी, पागोटे, कानात बाळ्या, कपाळी गंधाचा टिळा, हातात सोटा व ओठावर मिशा असा तो वेष असतो. त्याच्या पायात घुंगुर असतात व ताल धरण्यासाठी तो त्यांचा उपयोग करतो. प्रथम पाटील व राजभाट यांचा संवाद होतो –

पाटील – तुम कौन हो ?

राजभाट – हम निरंजनपूर के भाट हैं।

पाटील – हमारे भी गावका भाट है।

राजभाट – उसे बुलाव।

पाटील – तुम्हारे सब कपडे छीन लेगा।

राजभाट – हम भी छप्पन देश जीत के आये हैं। उनकू बुलाव।

पाटील – अरे, सरज्या, सरज्या।

गावभाट – (आतून) कारे लेका, नानावटीच्या गिरज्या !

पाटील – अरे तुझ्या गावात भाट आला आहे, लौकर ये.

गावभाट – भात आले आहे, तर गडी लावून भरडून टाक.

पाटील – अरे, भात नाही, भाट आला आहे, भाट.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गावभाट – तर दोन–चार बिगारी लावून उपसून टाक.
पाटील – अरे, ते नाही. भाट गाव मागायला आला आहे.
गावभाट – गाव मागतो तर तुझा गाव पुढे कर.
पाटील – अरे, लौकर लौकर ये. तिथेच काय करतोस ?
गावभाट – आता मला वेळ नाही, मोठे काम करीत आहे.
पाटील – अरे वेड्या ते राहू दे. भाट आला आहे, लौकर ये.

मग गावभाट गाणे म्हणत म्हणत येतो. आपल्या पराक्रमाची फुशारकी मारतो. स्वतःच्या बायकोचे विनोदी वर्णन करून श्रोत्यांना हसवतो. नंतर त्याची व राजभाटाची चांगलीच शाब्दिक झटापट होते व त्यात राजभाट हरतो आणि निघून जातो. आपल्या भाटाने बाहेरच्या भाटाला पळवून लावल्याचे पाहून गावकरी खूष होतात.

यापुढे जंगमाचे सोंग येते. हा कानडी असून, त्याच्या दोन्ही बायका घरातून नाहीशा झाल्यामुळे, तो त्यांचा शोध करीत भटकत या पाटलाच्या गावी येतो. मग पाटलाची व जंगमाची बोलाचाली होते. पाटील मराठीत व जंगम कानडीत बोलत असल्यामुळे व त्यांचे बोलणे परस्परांना न समजल्यामुळे त्यांच्या बोलण्यातून अभावित विनोद होतात. प्रेक्षकांत हशा–टाळ्यांचा कल्लोळ होतो.

यानंतर ब्राह्मण, काशीकापडी, वाघ्यामुरळी यांची सोंगे क्रमाक्रमाने रंगमंचावर येतात व त्यांचे पाटलाशी जे संवाद होतात, त्यांतून एकसारखी हास्याची कारंजी उडत राहतात.

अशा प्रकारे मध्यरात्री सुरू झालेले ललित कोंबडा आरवू लागेपर्यंत रंगते. ललितात एकनाथांची भारुडे साभिनय म्हणूनही विनोद उत्पन्न केला जातो. [लो. ना. प.]

लक्षणपंक्तिव्रत एक जैन व्रत. या व्रताला कोणत्याही महिन्यात प्रारंभ करतात. हे व्रत ४०८ दिवसांत पुरे करायचे असते. त्यात २०४ उपवास आणि २०४ पारणी करतात. एक उपवास आणि एक पारणे या क्रमाने हे व्रत पुरे करायचे असते. [जै. व्र. वि. सं.]

लक्षणा एक शब्दवृत्ती. शब्दाचा लक्ष्यार्थ किंवा लाक्षणिक अर्थ हे शब्द लक्षणा या वृत्तीवरूनच आले आहेत. लक्षणेचे लक्षण मम्मटाने केले आहे, ते असे–

मुख्यार्थबाधे तद्योगे रूढितोऽथ प्रयोजनात् ।
अन्योऽर्थो लक्ष्यते यत् सा लक्षणारोपिता क्रिया ।।

अर्थ – मुख्यार्थाचा बाध करून पण मुख्यार्थाशी संबंधित असा, रूढीमुळे किंवा प्रयोजनामुळे अन्य अर्थ लक्षित होतो, ती लक्षणा होय. लक्षणा ही आरोपित क्रिया असते.

वरील श्लोकाचे स्पष्टीकरण असे– लक्षणा हा व्यापा[र] घडण्यासाठी (१) प्रथम मुख्य अर्थ बाधित म्हणजेच गैरला[गू] व्हावा लागतो (२) या व्यापाराने अखेर ज्या दुसऱ्या अर्थाचा बोध व्हायचा, त्याचा मुख्यार्थाशी संबंध असावा लागतो आणि (३) विशिष्ट शब्द मुख्यार्थाहून अन्य अर्थी योजिण्यात रूढीचे अनुसरण अथवा काही विशेष फल यांपैकी एखादे निमि[त्त] असावे लागते. अशा परिस्थितीत एखादा शब्द मुख्यार्था[हून] भिन्न अर्थाचा निर्देश करतो. या भिन्नार्थालाच लक्षणा म्हणतात. लक्षणा ही आरोपिता क्रिया असते. अभिधा या व्यापाराप्रमाणे लक्षणा हा व्यापार सहज अर्थात स्वाभाविक नाही; तर ... व्यापार आरोपित अर्थात कृत्रिम असतो. संकेतावाचून शब्दा[ला] शब्दत्वच येत नाही. अशा संकेतावर अधिष्ठित असलेला अभि[धा] व्यापार हा शब्दाचा सहज व्यापार होय. याउलट लक्षणा ... व्यापार रूढीला अथवा प्रयोजनाला अनुलक्षून वक्त्याने शब्दा[ला] चिकटविलेला असतो. म्हणून तो व्यापार आरोपित ... आगंतुक समजावा.

संस्कृत साहित्यशास्त्रात रूढी व प्रयोजन यांना ... 'कर्मणि कुशल :' (= कर्म करण्यात तरबेज) व ... घोष : (= गंगेत गौळवाडा) ही दोन उदाहरणे ... म्हणून सांगितली आहेत. 'कर्मणि कुशलः' यातील कु[शल] या शब्दाचा आपण चतुर असा अर्थ करतो; पण हा ... शब्दाचा मुख्यार्थ नव्हे. कुशल म्हणजे (कुशान् ... इति =) कुश तोडणारा म्हणजेच दर्भ वाईट असतील[ते] टाकून चांगले असतील तेवढे निवडून तोडणारा, असा ... या क्रियेला फार चातुर्य लागते. म्हणून हा शब्द चतुर या ... वापरायला सुरुवात झाली असावी; पण पुढे मुख्यार्थाचा ... करून रूढीने चतुर या अर्थी तो शब्द प्रसिद्ध झाला. 'गङ्[गायां] घोष : = गंगेत गौळवाडा आहे, असा अभिधा वृत्तीने ... अर्थ होऊ शकेल, पण प्रवाहात गौळवाडा असणे संभवनीय नाही. त्यामुळे मुख्य अर्थ बाधित होतो; पण त्याच वेळी ... प्रवाह म्हणजे गंगातीर असा दुसरा अर्थ मुख्यार्थाच्या संबं[धाने] उपस्थित होतो.

प्रा. अर्जुनवाडकर व प्रा. मंगरूळकर या मुद्याचे स्पष्टी[करण] करतात, ते असे – 'गंगातीरी गौळवाडा आहे' असे ... म्हटले असता तीराच्या ठिकाणचे वातावरण विशेष ... आणि पवित्र आहे, हे ऐकणाऱ्याला कळणार नाही. ते ... कळावे या उद्देशाने बोलणारा म्हणतो, 'गंगेवर गौळ[वाडा] आहे.' हे वाक्य ऐकताच शीतलता व पवित्रता हे गंगा[प्रवा]हाशी नित्यसंबद्ध असलेले धर्म त्या प्रवाहाला लागूनच ... तीरातही विशेषेकरून असले पाहिजेत, हे ऐकणाऱ्याला ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चुकते. अर्थात तसे त्याला कळावे हाच गंगातीर ऐवजी गंगा पद योजण्यात बोलणाऱ्याचा हेतू असतो.

तात्पर्य, लक्षणेचे निमित्त रूढी हे तरी असले पाहिजे किंवा प्रयोजन तरी असले पाहिजे. रूढी ही लोकव्यवहाराला तर धरून असतेच; पण प्रयोजनसुद्धा श्रोत्याच्या लक्षात सहज येईल, असे असते. म्हणून लक्षणेचा व्यापार करताना कवीला मुक्त स्वातंत्र्य घेता येत नाही. काही लक्षणा अगोदरच रूढ झालेल्या असतात, तर काही नव्यानेही बनवल्या जाऊ शकतात. मात्र त्यांच्या ठिकाणी वृद्ध व्यवहाराने किंवा वक्त्याच्या अभिप्रायामुळे अभिधा शक्ती असावी लागते. जिथे अशी अभिधा शक्ती असू शकत नाही किंवा ती ओढूनताणून आणावी लागते, तिथे लक्षणा होऊच शकत नाही. [काव्यप्रकाश –प्रा. कृ. श्री. अर्जुनवाडकर व प्रा. मंगरूळकर; भा. सा. शा.].

लक्षणादेवी एक देवता. हिमाचल प्रदेशात रावी–चंबा खोऱ्यातील चंबा नावाच्या शहरापासून सुमारे पंचवीस मैलांवर ब्रह्मौर नावाचे गाव आहे. या ठिकाणी आठव्या शतकात मरुवर्मा या राजाने लक्षणादेवीचे लाकडी मंदिर बांधले. ही देवी म्हणजे महिषासुरमर्दिनी असून, ती चतुर्भुज आहे. तिने उजव्या वरच्या हातातील त्रिशूळ महिषाच्या मस्तकात खुपसलेला आहे. डावीकडील वरच्या हाताने महिषाची शेपटी धरली आहे. देवी रेड्यावर स्वार आहे. रेडा आपले पुढचे दोन पाय वाकवून जमिनीकडे झुकला आहे. देवीचा उजवा पाय रेड्याच्या तोंडावर आहे. या महिषासुरमर्दिनीला लक्षणा हे नाव का मिळाले, हे मात्र सांगता येत नाही. [दे. को. ३; डे. हिं. इ.]

लक्षणार्द्राव्रत एक काम्य व्रत. भाद्रपद वद्य अष्टमीला आर्द्रा नक्षत्र असेल त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. यात उमा–महेश्वरांच्या सुवर्णमूर्तीला पंचामृताचे स्नान घालून त्यांची पूजा करतात. मग कणकेमध्ये पंचामृत घालून ती मळतात व तिच्यापासून मासा वगैरे प्राण्यांच्या आकाराचे बत्तीस खाद्यपदार्थ करून त्यांचा नैवेद्य दाखवतात. मग त्या सुवर्णमूर्ती व खाद्यपदार्थ एका ब्राह्मणाला दान देतात. फल–पापनाश; संपत्ती, दीर्घायुष्य व कीर्ती यांची प्राप्ती. [हि. ध.]

लक्षद्वीप भारताच्या पश्चिमेला, मलबारच्या समुद्रतीरापासून सुमारे २०० मैल अंतरावर समुद्रात असणाऱ्या १९ बेटांना लक्षद्वीप असे म्हणतात. ही बेटे दक्षिणोत्तर पसरलेली आहेत. लक्षद्वीप हा संस्कृत शब्द आहे. त्याचा अर्थ लाख द्वीपांचा समूह असा होतो. अर्थात या संख्येचा व आजच्या बेटांच्या संख्येचा मेळ बसत नाही. या द्वीपांचे एकूण क्षेत्र ११ चौरस मैल आहे. या द्वीपमालेच्या दक्षिण टोकाला मिनिकॉय हे बेट असून, उत्तर टोकाला चेत्तिलात्तू हे बेट आहे. बाकीची बेटे या दोहोंच्यामध्ये पसरलेली आहेत. ही बेटे इतकी छोटी आहेत, की कोणत्याही बेटाची लांबी एक मैलापेक्षा जास्त भरत नाही. बेटांची समुद्रसपाटीपासून उंची १० ते १५ फूट एवढीच आहे. आश्चर्य हे, की प्रत्येक बेट अर्धचंद्राकार आहे.

या बेटांपैकी फक्त १० बेटांवरच मनुष्यवस्ती आहे. त्यांची नावे अशी – मिनिकॉय, कल्पेनी, अंद्रोत्तू, कवरत्ती, आक्कत्ती, अम्मेनी, किल्तान, कडुमम्, चेत्तिलात्तु व बित्तिरी. या बेटांमधले परस्पर अंतर २० मैलांपासून ११४ मैलांपर्यंत आहे. सगळ्या बेटांतून माप्पिळा (मलबारमधले मुसलमान) लोक राहतात. त्यांची मातृभाषा मलयाळम आहे. कित्येक शतकांपूर्वी या लोकांच्या पूर्वजांनी केरळातून तिकडे जाऊन ही बेटे वसवली. इ. स. च्या तेराव्या शतकात अरबस्तानमधल्या एका फकिराने या सर्व लोकांना मुसलमान बनवले.

इथले लोक धाडसी दर्यावर्दी आहेत. मासळी पकडणे हा त्यांचा मुख्य धंदा आहे. हे लोक लहानमोठ्या नौका बांधण्यातही मोठे कुशल आहेत. आपल्या नावांमध्ये बसून हे दूरदूर जातात. इथे मोठ्या बोटी चालत नाहीत, कारण या बेटांच्या आसपास समुद्रात मोठमोठे खडक आहेत. त्यामुळे या लोकांची मोठी कुचंबणा होते. यांना केरळात जायचे तर लहान लहान होड्यांमधूनच यावे-जावे लागते. पावसाळ्यात पश्चिम सागर विलक्षण खवळतो आणि या लोकांच्या छोट्या नावाही समुद्रावर चालत नाहीत.

दीर्घ कालपर्यंत ही बेटे उपेक्षितच राहिली. इ. स. १९५६ साली राज्यविभागणी झाली, तेव्हा लक्षद्वीपांचा प्रदेश हा केंद्रशासित बनला. त्याच वर्षी भारताचे राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी या बेटांना भेट दिली. त्या वेळी त्यांना तियल्या लोकांचे मागसलेपण कळून आले. तेव्हापासून भारत सरकारचे लक्ष लक्षद्वीपाकडे वेधले आणि त्या बेटांचे जीवन सुखी व सुस्थित बनवण्याचे प्रयत्न चालू झाले. इथे कुठलेही धान्य पिकत नाही. ते बाहेरून आणून लोकांना आपली गरज भागवावी लागते. पण अलिकडे काही विशिष्ट बेटांतून धान्याची शेतीही सुरू झाली आहे.

नारळ हे इथले मुख्य उत्पन्न होय. इथे सुमारे ६५०० एकर क्षेत्रात नारळीच्या बागा उभ्या आहेत. याशिवाय चिंच, लिंबू व केळी ही फळेही या भागात पिकतात. इथे जंगली हिंस्र प्राणी आढळत नाहीत. सापही नाहीत. उंदरांचा मात्र इथे सुळसुळाट आहे. ते इथल्या नारळीच्या बागांचे फार नुकसान करतात. इथली नारळांची बागायत वैज्ञानिक पद्धतीने केली जावी, त्या बागांवरची रोगराई दूर व्हावी व त्यांना योग्य ती खते सुलभ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

णे मिळावी, यासाठी आता भारत सरकारने प्रयत्न चालविले आहेत. त्यांच्या मच्छिमारी–पद्धतीतही आता सुधारणा झाल्या आहेत. ते आता यंत्रचलित नौकांमधून मासळी पकडतात. नारळाच्या दोऱ्या, चटया, इ. वस्तू बनवणे; गूळ, तेल, साबण, विणकाम, इ. घरगुती उद्योग निर्माण करणे यासाठी आता तिथे सहकारी समित्या निर्माण झाल्या आहेत.

राष्ट्रपतींचे प्रशासन सुरू होण्यापूर्वी या बेटांवर फक्त नऊ प्राथमिक शाळा होत्या. आज कितीतरी नव्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तिथे निर्माण झाल्या आहेत. इथले शिक्षण निःशुल्क आहे. विश्वविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाते. पूर्वी मुली शाळेत जात नसत. आता त्या मोठ्या संख्येने शालेय शिक्षण घेऊ लागल्या आहेत.

इ. स. १९५६ सालपर्यंत या बेटांमध्ये लोकांना पिण्यासाठी स्वच्छ पाणीच मिळत नसे. त्यामुळे लोकांचे आरोग्य ठीक राहत नसे. पण आता त्यांना स्वच्छ पाणी मिळण्याची सोय झाली आहे. हत्तीपाय व कुष्ठरोग हे तिथले प्रमुख रोग होत. पण आता त्यांच्या निराकरणासाठी वैद्यकीय योजना सुरू झाल्या आहेत. इथे लोकांना औषधपाणी मोफत आहे. ज्यांच्या रोगांवर तिथे उपचार होऊ शकत नाहीत, अशा रोग्यांना भारताच्या भूमीवर एखाद्या रुग्णालयात पाठवले जाते व तिथे त्यांच्यावर उपचार केले जातात. कावरत्ती बेटावर कुष्ठरोग्यांसाठी एक स्वतंत्र रुग्णालय उघडले गेले आहे. काही बेटांवर कुष्ठरोग्यांच्या स्वतंत्र वसाहतीही उभारण्यात आल्या आहेत.

लक्षद्वीपातले लोक बराच काळ अशिक्षित राहिल्यामुळे आणि त्यांचा नव्या ज्ञानाशी कधी संबंधच न आल्यामुळे ते इतकी वर्षे जुने-पुराणे रीतिरिवाज आणि अंधश्रद्धा यांतच गुरफटून राहिले. बालविवाह, बहुविवाह, पडदाप्रथा, या गोष्टी त्यांच्यामध्ये कडकपणे पाळल्या जात. अजूनही त्या चालू आहेत. त्या नष्ट होण्यासाठी शिक्षण, प्रचार आणि विज्ञानाशी संबंध या गोष्टींची फार जरुरी आहे.

लक्षद्वीपे आणि भारताची मुख्य भूमी यांच्या मधले जाणे-येणे वाढावे म्हणून भारत सरकार आता प्रवासी साधनांची वाढ करीत आहे. पोस्टाच्या कचेऱ्या, बिनतारी संदेश–यंत्रणा आणि वीज–निर्मिती–केंद्रे या गोष्टीही त्या बेटांतून उभारल्या जात आहेत. [युगप्रभात, १६ मार्च व १६ एप्रिल १९६४ आणि १६ ऑक्टोबर १९६९; हिं. वि. को.]

लक्षधीर (इ. स. चे १७ वे शतक) एक महानुभाव मराठी कवी. याचा जन्म साल्हेर येथे सोमवंशी कुळात झाला. मुरारीमल्ल हा याचा गुरू व गोपाळदास हा गुरुबंधू होता. याने रुक्मिणीस्वयंवर, महाराष्ट्रकाव्यदीपिका, ज्ञानमार्तंड व ज्ञानदर्पण असे चार ग्रंथ लिहिले आहेत. शेवटचा ग्रंथ कवीने आपला मुलगा मल्लिनाथ याला ज्ञान व्हावे म्हणून लिहिला. याचे सहा उल्लास असून, त्यांत ७२९ ओव्या आहेत. या ग्रंथात अनुक्रमे बालत्वादिआख्यान, तारुण्यवृद्धत्वनिरूपण, नरकव्यवस्था, अभेदवाद, शृंगार, भक्तिभेद, ज्ञान-वैराग्य आणि मुक्ती यांचे वर्णन केलेले आहे. आपल्या ग्रंथाविषयी कवी म्हणतो –

तुमचे लाधौनि प्रसन्नत्व । करेन अपूर्व ग्रन्थकर्तृत्व ॥
जो अभ्यासिता ये व्युत्पन्नत्व । कळाकौशल्य ॥
हा ज्ञानार्पण ग्रंथ । पाहिन तो दिसे पदार्थ ॥
साहित्य शृंगार परमार्थु । सांग विचक्षणा ॥
इये ग्रंथीचा भक्तिरसभेदु । सांघो अनुछिष्ट अनुवादु ॥
जो साहित्यवल्लीचा कंदु । फुलला ख पुष्पीं ॥
जेविला मकरंदरती । विचक्षण भ्रमरांचा हातीं ॥
लागलेया होय तृप्ती । डुलती आनंदें ॥
सरळु आणि अर्थगर्भु । ग्रंथ हा अति दुल्लभु ॥
आइकता न करावा विलंबु । म्हणे लक्ष थोर ...॥

प्रस्तुत कवीने कविलक्षणनिर्णय नावाचे १३ ओव्यांचे पद्य लिहिले आहे. त्यात त्याने कवींचे १० प्रकार वर्णिले आहेत ते असे – (१) देशवळू (२) अरिख (३) अरज (४) ... (५) सरळ (६) बरळ (७) हीनोत्तम (८) तस्कर (९) सामान्य व (१०) कविराज. [म. वा. इ. २.; म. सा. इ.]

लक्षनमस्कारव्रत एक चातुर्मास्य व्रत. याचा विधी असा: आषाढ शुद्ध एकादशीला विष्णूला ... लक्ष नमस्कार करण्याचा संकल्प करावा आणि कार्तिक पौर्णिमेपर्यंत हे नमस्कार पुरे करावे. रोज 'अतो देवा अवन्तु नो' या ऋग्वेदातील सूक्ताने विष्णूची पूजा करावी. [हि. ध.]

लक्षपद्मव्रत एक काम्य स्त्रीव्रत. कोणत्याही महिन्याच्या ... पक्षात गुरुशुक्राचा अस्त नसेल अशा दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. रांगोळीने नियत संख्येने पद्मे काढून, त्यावर सूर्यासह विष्णूची शुभ अक्षतांनी पूजा करणे ही या व्रतातील प्रमुख विधी आहे. लक्षसंख्या पुरी होईपर्यंत ही ... करायची असते. उद्यापनाच्या वेळी सूर्याची प्रतिमा करून ... पूजा व एका सुवर्णकमळाचे दान करतात. फल – इष्टकार्य सिद्धी, दुःखपरिहार आणि संतानसुखाची प्राप्ती. [व्रतराज]

लक्षपूजाव्रत एक काम्य व्रत. कोणत्याही महिन्याच्या ... चतुर्दशीला या व्रताला प्रारंभ करतात. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लक्षपूजा करताना मालती, केतकी, चमेली, पलाश, पाटल कदंब, इ. फुले प्रत्येकी एक लक्ष किंवा सगळी मिळून एक लक्ष 'ॐ नमः शिवाय' या मंत्राने शिवाला वाहतात. दहा हजार फुले वाहून झाल्यावर एक सुवर्णपुष्प अर्पण करावे, असे सांगितले आहे. याप्रमाणे एक, दोन किंवा तीन दिवसांत लक्ष पुरा करायचा असतो. लक्ष वाहून झाल्यावर एक सोन्याचे बिल्वपत्र शिवाला आणि एक सुवर्णपुष्प उमेला वाहतात. अशीच लक्षपूजा विष्णूचीही करतात. विष्णुपूजेत विष्णुसहस्रनामाचा उपयोग करतात. उद्यापनाच्या वेळी हवन करतात. फल — गोहत्या, ब्रह्महत्या, इ. पापांपासून मुक्तता. [व्र. प.]

लक्षप्रदक्षिणाव्रत आषाढ शुद्ध एकादशी, द्वादशी किंवा पूर्णिमा या दिवशी या व्रताला आरंभ करतात. अग्नी, गाय, ब्राह्मण, औदुंबर, गुरुचरित्र, अश्वत्थ, तुळस किंवा मारुती यांना वेगवेगळ्या कामनांसाठी लक्ष प्रदक्षिणा घालण्याची पद्धत आहे. व्रताचा संकल्प करून गुरूला व गणपतीला नमस्कार केल्यावर प्रथम अग्नीला प्रदक्षिणा घालाव्या. तो लक्ष पुरा झाल्यावर मग गोलक्ष प्रदक्षिणा पुऱ्या कराव्या. तदनंतर ब्राह्मण व मग हनुमंत यांच्या प्रत्येकी लक्ष प्रदक्षिणा पुऱ्या कराव्या. नंतर चारही प्रदक्षिणांचे उद्यापन एकदम करावे. उद्यापनाच्या वेळी चौघांच्याही सोन्याच्या प्रतिमा करून, सर्वतोभद्र मंडलावर कलश ठेवून त्यावरील पूर्णपात्रात त्यांची स्थापना करावी. नंतर पायसान्नाचे हवन करावे. प्रतिमादान करून यथाशक्ति ब्राह्मणभोजन घालून व्रताची समाप्ती करावी.

पिंपळ, वड, इ. वृक्ष यांनाही अशाच प्रकारे लक्ष प्रदक्षिणा करण्याची प्रथा आहे.

विष्णूलाही एक लक्ष प्रदक्षिणा घालतात. या व्रताला आषाढ शुद्ध एकादशीला प्रारंभ करून कार्तिक शुद्ध एकादशीला त्याची समाप्ती करतात. नित्य 'कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने' किंवा 'केशवाय नमः' या मंत्राचा उच्चार करीत प्रदक्षिणा घालायच्या असतात. ब्राह्मणभोजन घालून व्रताचे उद्यापन करतात. फल — पापनाश व सुखप्राप्ती. [हि. ध.; व्रतराज; व्र. प.]

लक्षवर्तिदानव्रत एक काम्य व्रत. कोणत्याही महिन्यात या व्रताला प्रारंभ केला तरी चालतो. व्रतविधी असा — व्रताच्या दिवशी नक्त करावे. कापसाच्या एक लक्ष वाती करून त्या तेलात भिजवाव्या आणि एका दिव्यात एक याप्रमाणे ठेवून शिव, विष्णू अथवा हनुमान यांच्यापैकी कोणच्याही मंदिरात त्या प्रज्वलित कराव्या. एक, तीन किंवा पाच हप्त्यांत लक्ष पुरा केला तरी चालतो. त्यानंतर व्रताचे उद्यापन करावे. फल — देवलोकप्राप्ती. [व्र. प.]

लक्षवर्तिव्रत एक काम्य व्रत. हे व्रत विशेषतः स्त्रिया करतात. पण पुरुषांनाही ते विहित असल्याचे शास्त्रकार सांगतात. कार्तिक, माघ किंवा वैशाख या महिन्यातील पूर्णिमेला समाप्ती करता येईल, या बेताने तीन महिने अगोदर व्रताला प्रारंभ करतात. या सर्व महिन्यांमध्ये वैशाख मास अधिक प्रशस्त मानतात. याचा विधी असा —

दैनंदिन नित्यकर्म आटोपल्यावर विष्णु-लक्ष्मी, ब्रह्मा-सावित्री आणि उमा-महेश्वर यांची पूजा करून त्यांना तेल, तूप वा अन्य स्निग्ध द्रव्यात भिजविलेल्या एक सहस्र वाती प्रज्वलित करून त्यांनी ओवाळावे. याप्रमाणे लक्ष वाती पूर्ण होईपर्यंत प्रतिदिन पूजा करावी. उद्यापनाच्या वेळी तुपाने भरलेल्या कांस्यपात्रात एक सोन्याची वात ठेवून ते ब्राह्मणाला दान द्यावे. त्याव्यतिरिक्त एक सवत्स धेनूही ब्राह्मणाला दान देऊन व्रतसमाप्ती करावी. फल — ब्रह्महत्या, बालहत्या, पतिहत्या, गोवध, चोरी, इ. पापांपासून मुक्ती. [हि. ध.; व्रतराज]

लक्षहोम ही एक शांती आहे. गृहबलीच्या तीन प्रकारांपैकी हा एक प्रकार आहे. यात विष्णुप्रीत्यर्थ लक्षसंख्येने हवन करायचे असते. अनुष्ठान अयुत होमाप्रमाणेच असून, फक्त गरुडपूजा हा विशेष आहे. नृसिंहपुराणात याचे विधान दिले आहे. फल—इच्छापूर्ती व निरपेक्षपणे केल्यास ब्रह्मप्राप्ती.

लक्षादिदीपदान एक काम्य व्रत. शिवाच्या मंदिरात रोज अकरा दिवे लावणे, हा या व्रताचा प्रमुख विधी आहे. हे व्रत यथाशक्ति सहा महिने, एक वर्ष किंवा दोन वर्षेपर्यंत करावे. कार्तिक मासात पन्नास हजार, एक लक्ष किंवा दोन लक्ष दिवे लावणे, या व्रतालाही दीपदानव्रत म्हणतात. व्रत करणाऱ्याच्या मनात जशी कामना असेल, तिला अनुसरून तीळ, यव वा अन्य प्रकारचे तेल दिव्यासाठी वापरावे. दीपांची अपेक्षित संख्या पुरी झाल्यावर उद्यापन करावे. त्या दिवशी उपवास करावा. रात्री उमा-महेशांची पूजा करून जागर, कथाश्रवण, इ. कार्यक्रम करावे. दुसऱ्या दिवशी तीळ, यव, चरू व बेलाची पाने या द्रव्यांचे यथाशक्ति हवन करावे. मग उमा-महेश्वरांच्या प्रतिमेचे दान, धेनुदान व ब्राह्मणभोजन या गोष्टी करून व्रताची समाप्ती करावी. फल—इष्टकामनसिद्धी. [व्रतराज]

लक्षुंबाईचा खेळ लहान मुलींचा एक खेळ. मुलेही यात भाग घेतात. प्रथम आठ-दहा मुली एका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

मांडवात जमून चकतात. एकीवर राज्य आल्यानंतर इतर मुली मांडवाचा एकेक खांब धरतात. खांबांच्या संख्येपेक्षा मुलींची संख्या एकाने अधिक असते. मुली या खांबाकडून त्या खांबाकडे पळत असतात. दरम्यानच्या काळात जिच्यावर राज्य असते तिने मोकळा खांब पकडला, तर तिच्यावरचे राज्य जाऊन जिला खांब मिळाला नाही, तिच्यावर राज्य येते. राज्य घेणारी मुलगी 'लक्षुंबाई ताक दे, डेरा फुटला मडकं दे.' हे पालुपद म्हणत फिरत राहते व खांब मोकळा मिळाला की तो पकडते.

लक्ष्मण (१) दशरथ आणि सुमित्रा यांचा पुत्र. रामाचा धाकटा सावत्र भाऊ. रामाबरोबरच याचेही धनुर्विद्येचे शिक्षण झाले. विश्वामित्राच्या यज्ञरक्षणासाठी रामाबरोबर हाही गेला होता. सीरध्वज जनकाची कन्या ऊर्मिला ही याची पत्नी होय. राम-सीता वनवासाला निघताच हादेखील त्यांच्या संगे निघाला. त्याने रामाला म्हटले.' मी धनुष्यबाण व कुदळखोरे घेऊन तुझ्या पुढे चालेन. तुला मार्ग दाखवीन. कंदमुळे, फळे व होमद्रव्ये तुला आणून देईन. जागेपणी व निजल्यावरही तुझी सेवा करीन.' (वा. रा. अयोध्या. ३१.२५–२७).

खर–दूषणादी राक्षसांशी रामाचे युद्ध झाले, त्या वेळी हा सीतेला घेऊन एका गुहेत जाऊन बसला. रामाला यमुनेत उतार मिळेना, तेव्हा याने झाडांच्या फांद्या तोडून तराफा बनवला व रामसीतेला नदीपार नेले. चित्रकूट व पंचवटी येथे रामासाठी पर्णशाला यानेच बांधल्या. बारा वर्षे हा आहार–निद्राविरहित होता, असे आनंद रामायणात म्हटले आहे. रावणपुत्र इंद्रजित याचा अशा माणसाकडूनच मृत्यू व्हायचा होता. राम–रावणयुद्धप्रसंगी इंद्रजिताने निकुंभिलेच्या मंदिरात देवीसाठी होम मांडला होता. ते विधान त्याच्या हातून पुरे झाले असते, तर इंद्रजित अनाटोप झाला असता. म्हणून लक्ष्मणाने बिभीषणाचे साह्य घेऊन त्याआधीच त्याला ठार केले. त्याचप्रमाणे त्याने विरूपाक्ष व अतिकाय या दोन महान राक्षसांनाही मारले. कुंभकर्णाला लक्ष्मणाने मारले अशी कथा महाभारतात आहे (वन. २८७). पण रामायणानुसार कुंभकर्ण रामाकडूनच मारला गेला. रावणाने शक्ती फेकून लक्ष्मणाला मूर्च्छित केले. पण सुषेण वैद्याने विशिष्ट वनस्पती आणून त्याला सावध केले. इंद्रजितवधाच्या पापाची निष्कृती करण्यासाठी त्याने हिमालयाच्या पायथ्याशी दहा सहस्र वर्षे वायुभक्षण करून तप केले. शेवटी त्याने शरयू नदीत देहविसर्जन केले.

लक्ष्मणाला अंगद व चंद्रकेतू असे दोन पुत्र होते. रामाने अंगदाला अंगदीया नगरी व चंद्रकेतूला चंद्रकांतनगर अशा दोन राजधान्या निर्माण करून दिल्या व त्या प्रदेशांचे राज्यही दिले.

लक्ष्मणाचा स्वभावविशेष – सीता अशोकवनात मारुतीजवळ लक्ष्मणाचे वर्णन करताना म्हणते –

वृद्धोपसेवी लक्ष्मीवान् शक्तो न बहुभाषिता ॥

(वा. रा. सुंदर. ३८.६१)

अर्थ – लक्ष्मण हा वृद्धांची सेवा करणारा, सुंदर, समर्थ व मितभाषी असा आहे.

मात्र रामाचे हितसंबंध जिथे बाधित होतात असे वाटले, त्या ठिकाणी तो विलक्षण संतापत असे. रामाला अन्यायाने वनवासाला धाडले आहे, असे दिसून येताच लक्ष्मण दशरथावर विलक्षण खवळला. तो रामाला म्हणाला. 'या स्त्रीलंपट व म्हातारचळ लागलेल्या दशरथाला कैदेत टाकून तू यौवराज्याचा अभिषेक करून घे.' वालिवधाचे मित्रकार्य रामाने केले; पण सुग्रीव मात्र सीतेच्या शोधाचे कार्य करण्याविषयी उदासीन राहिला आहे, अशी कल्पना झाल्यावर लक्ष्मण सुग्रीवावरही खवळला होता. पण जेव्हा सुग्रीवाने ते काम सुरू केले आहे असे याला कळले, तेव्हा त्याने मोठ्या मनाने त्याची क्षमाही मागितली. रागीट पण ऋजुस्वभावी अशीच लक्ष्मणाची वृत्ती होती. दुर्धरप्रसंगी तो शांत व गंभीर राहत असे, हे त्याचे आणखी एक वैशिष्ट्य ! पुढील दोन उदाहरणे त्याच्या या वृत्तीची साक्ष देणारी आहेत–

सीताविरहाच्या प्रसंगी रामाची अवस्था शोचनीय झाली होती. सीता कुठेच दिसत नाही, असे पाहिल्यावर राम अत्यंत क्षुब्ध होऊन त्रैलोक्य दग्ध करायला निघाला. त्या वेळी शांतचित्त लक्ष्मणानेच त्याला आवरले. तो म्हणाला –

संस्तम्भ राम भद्रं ते मा शुचः पुरुषोत्तम ।
नेदृशानां मतिर्मन्दा भवत्यकलुषात्मनाम् ॥
स्मृत्वा वियोगजं दुःखं त्यज स्नेहं प्रिये जने ।
अतिस्नेहपरिष्वङ्गाद्वर्तिरार्द्रापि दह्यते ॥

(वा. रा. किष्किंधा. १.११७–११८)

भावार्थ – हे रामा, स्वतःला आवर घाल. शोक करू नको. तुझ्यासारख्या विशुद्धात्म पुरुषाची मती अशी मंद होता कामा नये. वियोगदुःख विसरण्यासाठी तू प्रिय जनाचा स्नेहच मनातून काढून टाक. अतिप्रेम हे केव्हाही वाईटच. हे पहा, अतिस्नेहाचा (किंवा स्निग्ध तेलाचा) संपर्क झाल्यामुळे वात ओली असती तरी ती जळते.

एकदा कालपुरुष रामाच्या भेटीसाठी आला आणि त्याने रामाची एकान्तभेट मागितली. तो रामाला म्हणाला. 'आपल्या भेटीत जो व्यत्यय आणील त्याचा तू वध करावास.' रामाने ते मानले व लक्ष्मणाला दारावर उभे करून कोणालाही आत न पाठवण्याबद्दल त्याला बजावले. लक्ष्मण पहारा करीत दारावर

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उभा असता दुर्वास मुनी तिथे आला. लक्ष्मणाने त्याला अडवताच त्याने, रामलक्ष्मणांसह सर्व अयोध्या शापून भस्म करीन, अशी धमकी दिली. लक्ष्मणाने मनात विचार केला, की दुर्वासाच्या शापाने सर्व रघुकुलाचे मरण ओढवण्यापेक्षा रामाच्या हातून माझ्या एकट्याचा वध झालेला पुरवला. म्हणून त्याने आत जाऊन दुर्वासमुनी आल्याचे रामाला सांगितले.

नंतर जेव्हा हा प्रसंग विचारार्थ पुढे आला, तेव्हा राम मोठ्या पेचात सापडला. लक्ष्मणाचा वध करावा तर एक चांगला बंधू गमावतो, न करावा तर वचनाला बाध येतो. रामाचा हा पेच सोडवण्यासाठी लक्ष्मण पुढे होऊन त्याला बोलला—

न सन्तापं महाबाहो मदर्थं कर्तुमर्हसि ।
पूर्वनिर्माणबद्धा हि कालस्य गतिरीदृशी ।।
जहि मां सौम्य विस्रब्धं प्रतिज्ञां परिपालय ।
हीनप्रतिज्ञाः काकुत्स्थ प्रयान्ति नरकं नराः ।।
(वा. रा. उत्तर. १०६.२-३)

भावार्थ – हे महाबाहो, प्रसंग माझ्यावर आहे म्हणून तू तुझ्या मनाला ताप देऊ नकोस. कालमर्यादेचे अतिक्रमण कोणालाही करता येत नाही. केलेली प्रतिज्ञा पार पाडण्यासाठी तू स्थिर चित्ताने माझा वध कर. भ्रष्टप्रतिज्ञ लोक नरकात जातात.

शेवटी रामाने वसिष्ठाचा सल्ला घेतला आणि त्याग हा वधाचाच पर्याय आहे, असे समजल्यावर रामाने लक्ष्मणाचा परित्याग केला. ही शिक्षा ऐकताच रामवियोगाच्या कल्पनेने लक्ष्मणाच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि तो तिथून तडक शरयू नदीवर गेला. नदीच्या पात्रात उभे राहून त्याने सर्व इंद्रिये आवरून घेतली व प्राणत्याग केला.

लक्ष्मणाच्या हृदयाची उदात्तता वरील दोन प्रसंगांत फारच उठून दिसते. लक्ष्मणाचा हा विलोभनीय स्वभाव रामाला चिरपरिचित होता. म्हणूनच एका प्रसंगी रामाने त्याच्याविषयी पुढील उद्गार काढले आहेत –

जगात सीतेसारखी दुसरी स्त्री मला मिळू शकेल, पण योग्य सल्ला देणारा लक्ष्मणासारखा धुरंधर बंधू मात्र त्रैलोक्यात दुसरा मिळणार नाही. [प्रा. च. को.; वाल्मीकिरामायण – व्याख्याने -श्री. बाळशास्त्री हरदास]

(२) (इ. स. १७००–१७८०) एक तेलुगू कवी. हा तिम्म कवीचा पुत्र होता. याच्या कुलात पांडित्याची परंपरा होती आणि त्याबद्दल त्याला अभिमान होता. या घराण्याचा मूळ पुरुष पैडिपाटी सिंगण्णा नावाचा होता. त्या वंशातल्या जलपालामात्य नामक पुरुषाने पेद्दापुरम राज्याचा राजा गजपती याच्याकडून हत्ती बक्षीस मिळवला होता. तेलुगूत हत्तीला एनुगू म्हणतात. तेव्हापासून त्या वंशाचे पैडिपाटी हे उपनाम बदलून ते एनुगू झाले. या गोष्टीचा उल्लेख कवीने आपल्या सुभाषितरत्नावलीच्या अवतरणिकेत केला आहे. याने रामेश्वरमाहात्म्य, गंगामाहात्म्य, गीर्वाणसूर्यशतक, रामविलास, इ. नऊ ग्रंथ लिहिले आहेत. या सर्व ग्रंथांत सुभाषितरत्नावली हा ग्रंथ विशेष उल्लेखनीय आहे. पहिला ग्रंथ भर्तृहरीच्या शतकत्रयाचा सरस अनुवाद आहे. [ते. सा. इ.]

लक्ष्मणभट्ट (इ. स. चे १७वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा निर्णयसिंधुकार कमलाकराचा धाकटा भाऊ आणि रामकृष्णभट्टाचा पुत्र होय. लक्ष्मणाचे सारे अध्ययन कमलाकरापाशी झाले. याने धर्मशास्त्राशी संबंधित असलेले आचाररत्न, आचारसार आणि गोत्रप्रवररत्न असे तीन ग्रंथ रचले. याव्यतिरिक्त त्याने नैषधचरितावर गूढार्थप्रकाशिका नावाची टीका लिहिली व पद्यरचना नामक एक लघुग्रंथही रचला. [का. सा. सा.; शि. नि., भाग १ ला]

लक्ष्मणसेन शक एक कालगणना. हा काल बंगालच्या सेन वंशातील राजा बल्लाळसेन याचा मुलगा लक्ष्मणसेन याच्या राज्याभिषेकापासून सुरू झाला, असे सामान्यतः समजतात. डॉ. कीलहॉर्न याने या कालगणनेतील सर्व निर्देश तपासून, कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १०४१ किंवा ७ ऑक्टोबर १११९ हा या कालगणनेचा आरंभदिन मानला आहे. लक्ष्मणसेन शकात १११८ किंवा १११९ मिळवले असता इसवी सन येतो. आरंभी ही कालगणना बंगाल, बिहार व मिथिला या प्रदेशांत प्रचलित होती. सांप्रत फक्त मिथिलेतच या शकाचा थोडासा प्रसार आहे. तिथे त्याचा आरंभदिन माघ शुद्ध प्रतिपदा हा मानतात. या कालगणनेचा निर्देश करणारे फक्त चार लेख उपलब्ध आहेत. [सं. मि.]

लक्ष्मी विष्णुपत्नी. हिला विष्णूची शोभा आणि कांती मानलेले आहे. देव–दैत्यांनी क्षीरसागराचे मंथन केले त्यावेळी सागरातून लक्ष्मी वर आली. ही उत्पन्न होताच देवांचे तेज वाढले. तिचे रूपलावण्य पाहताच देव, असुर, यक्ष, गंधर्व, किन्नर विद्याधर, इ. सारे लोक तिच्यावर भाळले. ही रूपवती स्त्री आपल्याला मिळावी, अशी सर्वांनाच इच्छा झाली. पण तिने सर्वांना डावलून विष्णूच्या गळ्यात वरमाला घातली आणि ती विष्णुपत्नी झाली (भाग.पु. ८.८).

लक्ष्मी हा शब्द लक्ष्म = चिन्ह यावरून बनलेला आहे. हे लक्ष्मीवाचक चिन्ह कोणते, कोणत्या चिन्हांवरून लक्ष्मीचा बोध होतो, ते निश्चित सांगता येत नाही. लक्ष्मीचाच दुसरा पर्याय–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शब्द श्री हा होय. त्याचा अर्थ शोभा, कांती असा आहे. श्री हे अक्षर स्वस्तिकापासून बनले आहे. त्यावरून लक्ष्मीचे जे लक्ष्म किंवा चिन्ह ते स्वस्तिकच असावे, असे वाटते.

श्री व लक्ष्मी हे दोन्ही शब्द ऋग्वेदात येतात. ऋग्वेदाचे एक परिशिष्ट श्रीसूक्त याच नावाने प्रसिद्ध आहे. श्रीसूक्तानेच लक्ष्मीची उपासना करतात.

श्री व लक्ष्मी ही सांप्रत एकाच देवतेची नावे असली, तरी त्या मुळात दोन वेगळ्या देवता होत्या. त्या दोघी विष्णुपत्नी अर्थात सवती होत्या. श्री ही लक्ष्मीच्याही पूर्वीची देवता होती. मोहेंजोदडो येथील उत्खननात टोकदार मुकुट धारण करणाऱ्या एका देवतेची मृण्मय मूर्ती आढळली आहे. ही देवी कदाचित श्रीदेवीच असावी.

श्रीप्रमाणेच दुसरी एक माया नावाची देवी होती. तिची परंपरा श्री देवीहूनही प्राचीन असण्याची शक्यता आहे. शतपथ ब्राह्मणात माया हा असुरविद्येचा पर्याय मानलेला आहे (११.४.३.११). माया ही असुरांची वैभवदात्री देवता असावी. जेव्हा असुर व आर्य यांच्या संस्कृती एकमेकांच्या संपर्कात आल्या आणि त्यांच्यांत कल्पनांची देवघेव सुरू झाली, अशा कोणत्या तरी काळात या माया देवीला आर्यांची मान्यता प्राप्त झाली असली पाहिजे. ही देवी तेज, कांती, ऐश्वर्य यांची देवता असल्यामुळे आर्यांच्या अंतरात तिने प्रतिष्ठेचे स्थान मिळवले. लक्ष्मीचे एक नाव मा असे आहे. हे नाव माया या शब्दाचेच सूचन करते. प्राकृत भाषांतही मा हा लक्ष्मीवाचक शब्द आहे. ही माया किंवा मा हळुहळू आर्यांच्या श्री देवीशी मिळून जुळून गेली. भरहूत येथे एक देवीमूर्ती आढळली असून, तिच्या खाली सिरिमा देवता असे लिहिले आहे. सिरिमा म्हणजेच श्रीदेवीशी मीलन झालेली मा किंवा माया होय, असे काही पंडितांचे मत आहे.

श्रीदेवी–अमरावती येथील कोरीव शिल्प

पुढच्या काळात, विशेषतः पुराणांच्या उत्कर्षकालात लक्ष्मी हे नाव विशेष पुढे आले आणि प्रतिष्ठा पावले. या रूपात मायादेवीसह श्री देवी विलीन झाली. पुढे अनेक छोट्या मोठ्या देवी आपले स्वतंत्र रूप टाकून लक्ष्मीमध्ये अंतर्धान पावल्या. वायु-पुराणात लक्ष्मीच्या ५६ नावांचे परिगणन केले असून, त्यात षष्ठी, भद्रा, रेवती, एकानंशा, महिषमर्दिनी, कात्यायनी, उमा, हैमवती, गौरी, इ. नावांचा समावेश आहे (९.८५.९७–९८).

जेव्हा मनुष्य जन्म घेतो, तेव्हा शंभर लक्ष्म्या त्याच्याबरोबर उत्पन्न होतात. त्या पापयुक्त व शिव अशा दोन प्रकारच्या असतात. ज्या पापयुक्त असतात, त्यांना मनुष्य आपल्यापासून दूर ढकलतो आणि ज्या कल्याणरूप असतात, त्यांना आपल्या जीवनात आश्रय देतो, असे अथर्ववेदात म्हटले आहे (७.११५.३). या सर्व शिव आणि अशिव देवता मुळात एकाच देवीची रूपे आहेत, अशी सार्वत्रिक समजूत आहे. भारतात भागवत धर्माचा उत्कर्ष झाल्यानंतर असंख्य बऱ्यावाईट देवतांना आपल्या पोटात सामावून घेणारी लक्ष्मी ही विष्णुपत्नी म्हणून एक आदर्शभूत उपास्य देवता ठरली. पुराणांत असे म्हटले आहे, की जेव्हा जेव्हा विष्णू अवतार घेतो तेव्हा तेव्हा लक्ष्मीही अवतरून त्याची पत्नी होते. उदा०– रामाची सीता, कृष्णाची रुक्मिणी इत्यादी.

लक्ष्मीचे रूप प्रतिष्ठित झाल्यावर तिच्याशी काही वस्तू निगडित केल्या गेल्या. कमळ, गज, सुवर्ण आणि बिल्वफळ या त्या वस्तू होत. या सर्वांसह लक्ष्मीचे वर्णन श्रीसूक्तात आले आहे, ते असे–

ती हत्तीच्या शब्दाने जागी होते. बिल्व हा तिचा वृक्ष आहे. ती सुवर्णवर्णाची आहे. ती सोन्या-रुप्याच्या माला गळ्यात घालते. ती आल्हाददायक आहे, यशाने दीप्यमान आहे. ती देवसेवित, उदार, तृप्त आणि तृप्ती देणारी आहे. तिचा वर्ण कमलासारखा असून, ती कमलावरच बसलेली आहे.

श्रीसूक्ताच्या फलश्रुतीत लक्ष्मीची प्रार्थना करताना तिचे काव्यमय वर्णन केलेले आहे, ते असे–

सरसिजनिलये सरोजहस्ते धवलतरांशुकगन्धमाल्यशोभे।
भगवति हरिवल्लभे मनोज्ञे त्रिभुवनभूतिकरि प्रसीद मह्यम्॥

अर्थ – कमलात वास्तव्य करणाऱ्या, कमल हाती धरणाऱ्या, अतिधवल वस्त्र, शुभ्र चंदन आणि शुभ्र पुष्पे यांनी शोभणाऱ्या, विष्णूची प्रियवल्लभा असणाऱ्या, सुंदर आणि त्रैलोक्याची समृद्धी करणाऱ्या हे भगवती लक्ष्मी, मजवर प्रसन्न हो.

तैत्तिरीय उपनिषदात लक्ष्मी ही वस्त्र, भोजन, पेय, धन इ. गोष्टींची प्रदात्री या रूपात दिसते. बिल्वफलालाच श्रीफळ म्हटले आहे. ज्याला संपत्तीची कामना असेल त्याने बिल्ववृक्षाचा शाखासहित यूप बनवावा, असे ऐतरेय ब्राह्मणात विधान आहे.

लक्ष्मी ही सर्व प्रकारचे ऐश्वर्य देणारी ठरल्यामुळे तिची पुढील आठ रूपे कल्पिली गेली– (१) धनलक्ष्मी (२) धान्यलक्ष्मी (३) धैर्यलक्ष्मी (४) शौर्यलक्ष्मी (५) विद्यालक्ष्मी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(६) कीर्तिलक्ष्मी (७) विजयलक्ष्मी व (८) राज्यलक्ष्मी. ही आठही रूपे या ना त्या स्वरूपात पूजनीय ठरली आहेत.

बल व उन्माद हे लक्ष्मीचे दोन पुत्र होत. पण हे पुत्र भावात्मक असावे. कारण ज्याच्या घरी लक्ष्मी येते, तो बलवान होतो व पुष्कळदा उन्मत्तही होतो, असा अनुभव आहे. आनंद, कर्दम, श्रीद व चिक्लीत असे तिचे चार पुत्र असल्याचे श्रीसूक्तात म्हटले आहे.

ब्रह्मदेवाने तिला विष्णूला अर्पिले, असे पद्मपुराणात म्हटले आहे. तेव्हापासून लक्ष्मी ही क्षीरसागरात अनंतशयन विष्णूचे पादसंवाहन करते, वैकुंठात विष्णूसह विराजित होते आणि भक्तांच्या घरीही वास्तव्य करते. 'तुझे वास्तव्यस्थान कोणते' असा प्रश्न केला असता लक्ष्मीने उत्तर दिले, ते असे–

'मी प्रयत्नात राहते. प्रयत्नाच्या फलात राहते. मी उद्योगरूप आहे. मी साक्षात समृद्धी आहे. धर्मात्मे आणि सत्यवादी पुरुष यांच्या घरी माझे वास्तव्य असते. जोवर असुर सत्याला स्मरून वागत होते, तोवर मी त्यांच्या घरी राहिले. त्यांची बुद्धी भ्रष्ट होताच मी त्यांचा त्याग करून देवेंद्राच्या राज्यात दाखल झाले आणि स्वर्ग भरभराटीला आणला. शांती, प्रेम, दया, सलोखा, न्याय-नीती, औदार्य हे सद्गुण प्रकर्षाने जिथे दिसतात, तिथे मी आकृष्ट होते' (म. भा. शांति. २१; अनु. ८२).

श्रीलक्ष्मी–तेर येथे सापडलेली हस्तिदंती मूर्ती

भारताप्रमाणेच बृहत्तर भारतातही लक्ष्मीची उपासना चालते. बालिद्वीपात लक्ष्मीविषयी एक कथा आहे, ती अशी–

इंडोनेशियाच्या राजांची लक्ष्मी ही त्यांच्या राण्यांच्या रूपात राहात असे. पण जेव्हा एका राणिरूपी लक्ष्मीचे विष्णूवर प्रेम जडले, तेव्हा त्या प्रेमामुळे तिला मृत्यू आला. मग त्या राणीचे प्रेत जमिनीत पुरले गेले. काही कालाने त्या पुरल्या जागी तिच्या विविध अवयवांतून विविध औषधी उगवल्या. त्यांत भाताचे रोप तिच्या नाभीतून उत्पन्न झाले आणि त्यामुळे ते सर्वश्रेष्ठ ठरले.

लक्ष्मी ही स्वर्गातून पृथ्वीवर येते आणि भात उत्पन्न करते, असे मूदानमधले लोक समजतात. ते लोक तिचा पाण्याशीही संबंध मानतात. यवद्वीपामधल्या प्राचीन सुवर्णालंकारांवर श्री शब्द कोरलेला असतो.

अशा प्रकारे भारतातील लोकसमाजात आणि बृहत्तर भारतातही लक्ष्मी पूजनीय ठरली असली, तरी बौद्ध संप्रदायात मात्र तिच्याविषयी श्रद्धा आढळत नाही. दीघनिकायाच्या ब्रह्मजाल सुत्तात लक्ष्मीची उपासना वर्जित ठरविली आहे. जैनांमध्ये ती यक्षिणी या स्वरूपात काही अंशी पूज्य आहे.

लक्ष्मीमूर्ती – हिंदू, बौद्ध व जैन या तीन्ही धर्मांत गजलक्ष्मीला मात्र मान्यता मिळाली आहे. वरील धर्मांच्या शिल्पसंभारात गजलक्ष्मी अंकित झालेली दिसते. या गजलक्ष्मीचे स्वरूप दोन प्रकारचे आहे –

(१) खाली मोठा घडा. त्यात एक कमलनाल दोन्ही बाजूंनी पसरले आहे. मध्ये उत्फुल्ल कमळ. त्यावर लक्ष्मी बसली आहे. तिच्या उजव्या हातातही कमळ आहे. तिच्या दोन बाजूंना आणखी दोन कमळे असून, त्यांवर दोन हत्ती समोरासमोर उभे आहेत. दोघांच्याही सोंडेत पालथे कलश असून, त्यांतून लक्ष्मीच्या मस्तकावर अभिषेक होत आहे. (सांची – फलक ४१).

(२) उत्फुल्ल कमळात लक्ष्मी उभी आहे, पण तिच्या हातात कमळ नाही. वरच्या सारखेच दोन हत्ती तिच्या मस्तकावर आपल्या सोंडांची कमान करून उभे आहेत (सांची-फलक ११).

सांची, भरहूत, मथुरा, इ. ठिकाणी गजलक्ष्मीच्या अनेक मूर्ती आढळतात. अजंटा, वेरूळ, इ. ठिकाणी, तसेच त्यानंतरच्या अनेक मंदिरांच्या मूर्तिशिल्पांत गजलक्ष्मीचे रूप विपुल प्रमाणात आढळते. ग्रामीण लोकसमाजात ही परंपरा अविच्छिन्न चालत आली आहे. उ. भारतात दिवाळीमधल्या लक्ष्मीपूजनाच्या दिवशी मृण्मय गजलक्ष्मीच्या मूर्ती लाखो संख्येने बनतात आणि घरोघरी त्यांची पूजा होते. गेली अडीच हजार वर्षे नागरशिल्प व लोकशिल्प या दोन्ही शिल्पांत गजलक्ष्मीच्या मूर्ती बनत आल्या आहेत. राजा रविवर्म्याने गजलक्ष्मीचे एक चित्र रंगवले असून ते सांप्रत, अनेक घरांतून पाहायला मिळते.

श्री. कुमारस्वामी यांनी लक्ष्मीच्या मूर्ती तीन प्रकारच्या सांगितल्या आहेत– (१) पद्मावस्थेत (कमळावर बसलेली), (२) पद्मग्रह (कमळ हातात घेतलेली) व (३) पद्मवत्स (कमलांनी घेरलेली). कुशाण व शुंग कालातील लक्ष्मीमूर्तीचे स्वरूप असे – देह सुंदर, केशविन्यास कमलांनी सजविलेला, हातांत अंकुश, परशू, ध्वज, दर्पण, नागमुद्रा, श्रीवत्स, इ. मांगलिक चिन्हे आणि शरीरावर विविध आणि विपुल अलंकार. या प्रकारची एक अतिभव्य मूर्ती कौशांबी येथे सापडली असून, ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सांप्रत ऑक्सफर्ड येथील इंडिया म्युझियममध्ये सुरक्षित आहे.

लक्ष्मीची मूर्ती कशी बनवावी, याविषयी विष्णुधर्मोत्तर पुराणात पुढील नियम सांगितले आहेत – लक्ष्मी जेव्हा विष्णूच्या

लक्ष्मीदेवी – राजा रविवर्म्याचे चित्र

शेजारी दाखवायची असेल, तेव्हा ती द्विभुज असावी. स्वतंत्र बनवायची असेल तेव्हा चतुर्भुज बनवावी. ती सुंदर, तरुण व सर्वाभरणभूषित असावी. अष्टदल कमल हे तिचे आसन असावे. तिच्या खालच्या उजव्या हातात कमल, खालच्या डाव्या हातात अमृतघट आणि वरच्या दोन हातांत श्रीफल व शंख या दोन वस्तू असाव्या.

लक्ष्मीमूर्तीचे आणखीही काही प्रकार आढळतात, ते असे – (१) लक्ष्मी आपल्या हाताने संपत्तीचा वर्षाव करीत आहे. अशी एक मूर्ती गुप्तकालीन नाण्यांवर आढळते. (२) उजव्या हाती कमल व डाव्या हाती उत्कर्षसूचक शिंग. (३) उजव्या हाती कमल व डावा हात लोंबता. अशी मूर्ती उभी असते. (४) गवताच्या चौरंगावर बसलेली, उजव्या हातात आगवळ व डाव्या हातात कमल घेतलेली अशीही मूर्ती कुठे कुठे दिसते.

लक्ष्मीची पुष्कळशी रूपे यौवनसंपन्न दाखवली गेली आहेत. त्यांत तिची वक्षस्थळे कुंभाप्रमाणे पुष्ट व उन्नत आणि पोट उघडे दाखवतात.

भारतीय इतिहासातला गुप्तसाम्राज्याचा काल हा पुराणांच्या उत्कर्षाचा काल होय. या कालात लक्ष्मीच्या पूजेला असामान्य महत्त्व मिळाले. गुप्त सम्राटांना आपल्या साम्राज्याचा विस्तार करायचा होता. उत्पादन, व्यापार यांच्या द्वारे संपत्तीचा संचय करायचा होता. साहित्यात, ललित कलांच्या क्षेत्रात, इतकेच नव्हे, तर जीवनाच्या सर्व अंगांत सौंदर्य आणि समृद्धी आणायची होती आणि याच हेतूने त्या काळचे राजे, वाणी, व्यापारी सारे लक्ष्मीची उपासना करीत होते. गुप्त सम्राटांच्या शिक्क्यावरही लक्ष्मीचीच मूर्ती ठसवलेली असे. उज्जयिनी येथे सापडलेल्या राजमुद्रांवरही लक्ष्मीचे चित्र दिसते.

लक्ष्मी ही शैव व वैष्णव या दोन्ही संप्रदायांच्या अनुयायांना उपास्य देवता ठरली आहे. शैव मंदिरांतून विष्णूची मूर्ती आढळत नाही; पण लक्ष्मीच्या मूर्ती मात्र आढळतात. [प्रा. च. को.; प्रा. भा. लो. ध.; हिं. वि. को.]

लक्ष्मींकरा (इ. स. चे ८ वे शतक) एक तांत्रिक बौद्ध स्त्री. ८४ सिद्धांपैकी एक. ही वज्रयानी सिद्ध इंद्रभूती याची बहीण होती. एका राजकुलात तिचा जन्म झाला होता; पण राजभोगांकडे पाठ फिरवून तिने तंत्र आणि योग यांचा मार्ग धरला. या दोहोंत ती अत्यंत निष्णात झाली. तिने अद्वय-

लक्ष्मींकरा

सिद्धी नावाचा एक ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ रचून तिने एका नव्या अद्वैतवादी सहजयानाचे प्रवर्तन केले. तिने आपल्या ग्रंथात धार्मिक शिष्टाचार, मूर्तिपूजा, इ. गोष्टींचे खंडन केले असून, तर्क

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवतांचे आश्रयस्थान असलेल्या आत्मशरीरावरच विशेष ध्यान देण्यास सांगितले आहे. इतरांच्या ठिकाणी दिसणारा स्त्रियांविषयीचा घृणित भाव लक्ष्मींकरेला पसंत नाही. तिच्या उपदेशाचे सार अद्वयसिद्धीमधील पुढील श्लोकांतून व्यक्त झाले आहे.

न कष्टकल्पनां कुर्यात् नोपवासो न च क्रियाम् ।
स्नानं शौचं न चैवात्र ग्रामधर्मविवर्जनम् ॥
न चापि वन्दयेद्देवान् काष्ठपाषाणमृण्मयान् ।
पूजामस्यैव कायस्य कुर्यान्नित्यं समाहितः ॥।
गम्यागम्यविकल्पं तु भक्ष्याभक्ष्यं तथैव च ।
पेयापेयं तथा मन्त्री कुर्यान्नैव समाहितः ॥
सर्ववर्णसमुद्भूता जुगुप्सा नैव योषितः ।
सैव भगवती प्रज्ञा संवृत्या रूपमाश्रिता ॥
आचार्यात् परतरं नास्ति त्रैलोक्ये सचराचरे ।
यस्य प्रसादात् प्राप्यन्ते सिद्धयोऽनेकधा बुधैः ॥

भावार्थ – उपवासादी क्रियांनी शरीराला कष्ट देऊ नयेत. स्नान, शौच, इत्यादींची गरज नाही. स्त्री-पुरुष संबंधही वर्जित नाही. काष्ठ, पाषाण किंवा माती यांच्या देवमूर्तींना वंदन करण्याची गरज नाही. त्या ऐवजी आत्मदेहाचीच तत्परतेने पूजा करावी. गम्यागम्य, भक्ष्याभक्ष्य, यांचाही विधि-निषेध नाही. कोणत्याही वर्णात उत्पन्न झालेल्या स्त्रीची जुगुप्सा करू नये. सर्व स्त्रिया भगवती प्रज्ञेचे अवतार आहेत. या चराचर विश्वात गुरूहून श्रेष्ठ काही नाही. गुरूच्या प्रसादाने विद्वानांना अनेक सिद्धी प्राप्त होतात.

डॉ. विनयतोष भट्टाचार्य यांच्या मते लक्ष्मींकरेने प्रवर्तित केलेले सहजिया मत आजही बंगालमध्ये नाढा-नाढी व बाऊल या पंथांमध्ये प्रचलित आहे. [आर्य संस्कृती – श्री. बलदेव उपाध्याय, १९५३; तां. बी. सा. सा.]

लक्ष्मीगणेश एक तांत्रिक गणेश. श्रीविद्यार्णवतंत्रानुसार याचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे – कमलाधिष्ठित. पीतांबरधारी. चतुर्भुज. तीन हातांत चक्र, शंख व दंत ही आयुधे. एक हात अभयमुद्रेत. त्रिलोचन. हा सोंडेने सुवर्णपात्र धारण करतो. डाव्या हातात कमळ असलेली व उजव्या हाताने गणपतीला आलिंगन देणारी लक्ष्मी याच्या डाव्या मांडीवर बसलेली असते. याचा एक मंत्रही आहे. (गणपती पाहा.)

कोकणातील हेदवी गावी लक्ष्मीगणेशाचे एक स्थान आहे. पण हा गणपती दशभुज आहे. गणेशाची मूर्ती साडेतीन फूट उंचीची आणि संगमरवरी आहे. मांडीवर लक्ष्मी आहे. ही मूर्ती काश्मिरातल्या शिल्पकारांनी घडविली असे म्हणतात. माघ वद्य चतुर्थीला इथे उत्सव होतो व यात्राही भरते. [महाराष्ट्रातील महागणपती – श्री. सदानंद चेंदवणकर]

लक्ष्मीजागर एक लौकिक व्रत किंवा सण. याला लक्ष्मीपूजा असेही म्हणतात. परंतु दिवाळीतल्या लक्ष्मीपूजेशी तिचा संबंध नाही. मध्यप्रदेशातल्या बस्तरमधील व ओडिसातील भत्रा लोक हा सण करतात.

कार्तिक महिन्याच्या शुद्ध पक्षात प्रारंभ करून ही पूजा तीन, पाच, सात किंवा नऊ दिवस चालवायची असते. पूजा करणाऱ्याने त्या दिवसांत रात्री झोपायचे नसते. एकदा ही पूजा केली, की किमान तीन वर्षे तरी सतत ती करावी लागते.

या सणासाठी घरात पूर्वेकडील भिंतीवर तांदुळाची पिठी व कोळशाची पूड यांनी एक चौकोन काढतात व त्याच्या चारही बाजू आकृत्यांनी सजवतात. मग चौकोनात लक्ष्मीनारायणाचे चित्र चिकटवितात. त्याच्या समोर बांबूची एक लहान मंडपी करून तिच्यावर लाल फडके टाकतात. मग ती मंडपी आंब्याच्या डहाळ्यांनी सजवितात. ग्रामदेवता व कुलदेवता यांची प्रतीके म्हणून भिंतीच्या कडेला लोखंडाच्या छऱ्या उभ्या करून ठेवतात. जमिनीवर रांगोळ्या काढतात. दोन छऱ्यांच्या मधोमध मातीच्या घड्यात साळी भरून त्यांवर आंब्याची पाने ठेवतात. घड्यापुढे तांदुळांनी अर्धी भरलेली दोन मापे ठेवतात. त्या मापांची तोंडे लाल फडक्यांनी बांधतात. या मापांना लक्ष्मीनारायण असे म्हणतात. भत्रा लोकांची अशी श्रद्धा असते, की पूजेनंतर ही मापे धान्याने भरून जातात.

देवीची आरती झाल्यावर सर्व लोक तिची गीते गातात आणि तिला तांदूळ व नारळ अर्पण करतात. रात्री लक्ष्मीची कहाणी ऐकतात. मुलेमुली रात्री गीते गातात व नृत्य करतात. सकाळी होम करतात. पूजेच्या अखेरच्या दिवशी मापांवर बांधलेली फडकी सोडून त्यांतले तांदूळ घरात ठेवतात. मग जलकामिनी या देवतेला अंडी अर्पण करून, अन्य पूजासाहित्य नदीत विसर्जन करतात.

भत्रांच्या गीतांतून लक्ष्मीची कथा आढळते, ती अशी—

एकदा मेघाची पत्नी समुद्राचे पाणी आणायला गेली आणि समुद्रात पडली. ती घरी परत आली तेव्हा तिला आपण गरोदर असल्याचे ध्यानात आले. यथाकाली ती प्रसूत झाली आणि तिला मुलगी झाली. लक्ष्मी असे तिचे नाव ठेवले गेले. बारा वर्षांची झाल्यावर तिचे यमपुरीचा राजा नारायण याच्याशी लग्न झाले. नारायणाला लक्ष्मीशिवाय आणखी सहा बायका होत्या. त्यामुळे नवऱ्याच्या घरी तिला फार कष्ट उपसावे लागले. पण नंतर ती नारायणासह एका स्वतंत्र राजवाड्यात राहू लागली. एकदा ती माहेरी गेली असता एका ब्राह्मणाच्या विहिरीत पडली. ब्राह्मणपत्नीने तिला घरी आणून तिचे पोटच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुलीप्रमाणे संगोपन केले. नारायण तिचा शोध घेत तिथे आला आणि त्याने तिला आपल्या घरी नेले. मग नारायणाने तिच्याशी पुन्हा लग्न लावून इतर सहा जणींना हाकलून दिले. नंतर त्यांचा संसार सुखाने सुरू झाला. [फोक लोअर, मार्च १९६६]

लक्ष्मीदास (इ. स. चे १५ वे शतक) एक ज्योतिषग्रंथकार. याच्या पित्याचे नाव वाचस्पतिमिश्र असे होते. उपमन्यू हे त्याचे गोत्र होय. भास्कराचार्यांच्या सिद्धान्तशिरोमणी-तील गणिताध्याय व गोलाध्याय यांवर त्याची गणिततत्त्व-चिंतामणी नामक टीका आहे. ही टीका आठ हजार पाचशे श्लोकांची आहे. तीत उपपत्त्या आणि उदाहरणे दिलेली आहेत. ग्रहणाचे उदाहरण शके १४२० या वर्षातले आहे. लक्ष्मीदास जसा ज्योतिषी तसाच कवीही होता, असे शं. बा. दीक्षित यांनी म्हटले आहे. [भा. ज्यो. शा.; म. च. को.]

लक्ष्मीधरभट्ट (इ. स. चे १२ शतक) एक धर्मशास्त्रकार. याच्या पित्याचे नाव हृदयधर असे होते. हा कनोजच्या गाहडवाल गोविंदचंद्र या राजाच्या दरबारात महा-संधिविग्राहक होता. त्याने वेद, स्मृती, मीमांसा, पुराणे, इ. शास्त्रांचे सखोल अध्ययन केले होते. याचा कृत्यकल्पतरू नावाचा एक ग्रंथ आहे. हा ग्रंथ म्हणजे धर्मशास्त्राला मिळालेली एक मोठी देणगीच समजतात. या ग्रंथाचा विहार, बंगाल; उत्तर भारत व पश्चिम भारत या प्रदेशांत चांगला प्रभाव आहे. पाहा – कृत्यकल्पतरू. [म. च. को.; भा. रा. प्र.]

लक्ष्मीनाथ परमहंस (इ. स. १७८८–१८७२) एक योगी व कवी. याचा जन्म बिहार प्रदेशातील परसरमा नावाच्या गावी झाला. याच्या पित्याचे नाव बच्चा झा असे होते. बालपणीच गाई चारण्यासाठी जंगलात गेल्यावर तिथे हा हठयोगाचा अभ्यास करीत असे. मुंज झाल्यावर पित्याने याला पं. श्रीरत झा यांच्याकडे अध्ययनाला पाठविले. तिथे याने ज्योतिष व वेदान्त यांचा अभ्यास केला. अध्ययन संपल्यावर त्याचे लग्न झाले. पत्नी गरोदर असतानाच हा विरक्त झाला आणि घर सोडून पशुपतीच्या दर्शनाला गेला. तिथे भटकत असताना याची लंबानाथ नावाच्या नाथपंथी योग्याशी भेट झाली. त्या योग्याजवळ राहून त्याने नऊ वर्षे हठयोगाचे पाठ घेतले. मग हा तिथून निघन दरभंगा जिल्ह्यातील चरबरल रहुआ या गावी राहायला गेला. या गावीच त्याला सिद्धी प्राप्त झाली. नंतर त्याने अनेक ठिकाणी मंदिरे बांधली. त्याची प्रसिद्धी ऐकून पुष्कळ लोक त्याचे शिष्य बनले.

लक्ष्मीनाथ हा उत्तम कवी होता. नवी नवी गीते रचून ती रागदारीवर म्हणून घेणे हा त्याचा एक आवडता छंद होता. त्याच्या पदांवर सूरदास व तुलसीदास यांची विशेष छाप आहे. याने श्रीरामगीतावली, श्रीकृष्णगीतावली, श्रीकृष्णरत्नावली, रामरत्नावली, इ. दहा ग्रंथ रचले आहेत. या ग्रंथांची भाषा प्रामुख्याने खडीबोली, अवधी, व्रज व मैथिली आहे. [हि. सा. त्रि.]

लक्ष्मीनारायणव्रत एक तिथिव्रत. फाल्गुन मासातल्या पौर्णिमेला याचा प्रारंभ करतात. व्रता-वधी एक वर्ष. याचे विधान असे – एका वर्षाचे तीन भाग करावे. फाल्गुन पौर्णिमेपासून चार महिने लक्ष्मीनारायण, आषाढा-पासून पुढे चार महिने श्री व श्रीधर आणि कार्तिकापासून पुढे चार महिने भूती व केशव या नावांनी ही पूजा करावी. प्रत्येक पौर्णिमेला रात्री चंद्राला अर्घ्य द्यावे आणि प्रत्येक कालविभागात शरीरशुद्धीसाठी पंचगव्य, कुशमिश्रित जल व सूर्याच्या उष्णतेने तापविलेले पाणी घ्यावे. उद्यापनाच्या वेळी लक्ष्मीनारायणांची मूर्ती दान द्यावी. रात्री जागर करावा.

मार्गशीर्ष पौर्णिमेला या व्रताला प्रारंभ करून कार्तिकात त्याचे उद्यापन करावे, असाही एक पर्याय आहे. फल-सर्व कामनांची पूर्ती. [हि. ध.; व्र. प.]

लक्ष्मीपुराण स्वांग एक लोकनाटय. मार्गशीर्ष महिन्यातल्या पहिल्या गुरुवारी ओडिसामध्ये लक्ष्मी-पूजनाचा उत्सव होत असतो. या दिवशी घराची साफ-सफाई करतात व रांगोळ्या वगैरे घालून ते सुशोभित करतात. ही सर्व कृत्ये स्त्रियाच करतात. एवढे सगळे झाल्यावर नवांकुरित धान्याच्या पेंड्या व धान्य मोजायचे माप यांच्या स्वरूपात लक्ष्मीची पूजा करतात.

याच दिवशी एक लोकनाटय सादर केले जाते. महाकवी बलरामदासाने ते लिहिले आहे. त्याला लक्ष्मीपुराण स्वांग म्हणतात. गेली चार शतके ओडिसाच्या जनतेच्या मनावर त्याने असामान्य छाप टाकली आहे. या लोकनाटयानेच या उत्सवाला ओडिसात राष्ट्रीय महत्त्व प्राप्त करून दिले. या लोकनाटयाचा लक्ष्मीचा संबंध असून, गृहिणीचे घरातील स्थान कशा प्रकारचे असावे, याचा आदर्श त्यात दाखवला आहे. [हि. ओ. लि.]

लक्ष्मीपूजन (१) एक पूजाविधान. हे आश्विन महिन्यातल्या अमावास्येच्या दिवशी प्रदोषकाळी करतात. याचा विधी पुढे दिल्याप्रमाणे असतो –

एक चौरंग मांडावा. त्यावर स्वस्तिक काढावे. त्यावर ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूप लक्ष्मी ठेवावी. कलशावर कुबेरप्रतिमा ठेवावी. जवळच दिवा लावून ठेवावा. स्नान करून पूजेचा संकल्प करावा. मग श्रीसूक्ताने षोडशोपचार पूजा करावी. धणे, गूळ, साळीच्या लाह्या, बत्तासे व चवळीच्या शेंगा लक्ष्मीला वाहाव्या. वेलदोडा, लवंग व साखर यांनी मिश्रित केलेले गाईचे दूध व लाडू यांचा नैवेद्य दाखवावा. पुष्पांजली अर्पण केल्यावर पुढील मंत्राने लक्ष्मी व कुबेर यांची प्रार्थना करावी —

कमला चपला लक्ष्मीश्चला भूतिर्हरिप्रिया ।
पद्मा पद्मालया सम्पदुच्चैः श्रीः पद्मधारिणी ॥
नमस्ते सर्वदेवानां वरदासि हरिप्रिये ।
या गतिस्त्वत्प्रपन्नानां सा मे भूयात् त्वदर्चनात् ॥
धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च ।
भवतु त्वत्प्रसादान्मे धनधान्यादिसम्पदा ॥

लक्ष्मी व कुबेर यांच्या बरोबरीने लेखनसाहित्यासह पुढील वर्षाच्या जमाखर्चाच्या वह्या मांडून त्यांचीही पूजा करण्याचा प्रघात व्यापारी, सावकार वगैरे लोकांत आहे.

लक्ष्मीपूजन झाल्यावर शुभ्र वस्त्रे परिधान करून व अलंकार घालून ब्राह्मण व आप्तेष्ट यांच्यासह भोजन करावे. रात्री घरात व घराबाहेर दिवे लावून जागरण करावे. अर्धी रात्र उलटल्या-वर स्त्रियांनी सुपे व ढोलके वाजवून आपल्या घरातल्या अल-क्ष्मीची हकालपट्टी करावी. पहाटे दिव्याच्या प्रकाशात भावांनी व आप्तेष्टांनी एकमेकांचे क्षेमकुशल विचारावे. या दिवशी पितरांना उद्देशून पार्वणश्राद्ध करावे, असेही सांगितले आहे.

लक्ष्मीपूजन केल्याने पूजकाच्या घरी लक्ष्मी सदैव वास करते आणि त्याला दुःख-दारिद्र्यांची बाधा कधीही होत नाही, असे त्याचे फल सांगितले आहे.

या रात्री बळीच्या कारागृहातून विष्णूने लक्ष्मीसह सर्व देवांची मुक्तता केली व तो क्षीरसागरात जाऊन सुखाने झोपला, अशी पौराणिक कथा आहे.

लक्ष्मीपूजनाचे अन्य काही प्रकार — चैत्र शुद्ध पंचमीला लक्ष्मी ही विष्णूच्या आज्ञेने ब्रह्मलोकाहून मृत्युलोकी आली. यास्तव त्या दिवशी तिची पूजा करावी. फल — घरात लक्ष्मीचा नित्य निवास (निर्णयसिंधू).

काही ठिकाणी लक्ष्मीची मृण्मय मूर्ती बनवतात. मग चंदनाने अष्टदळ काढून त्यावर तिची स्थापना करतात. लाल वस्त्रे व कमलमाला यांनी तिला सजवतात. मग तिची पूजा करतात. पुढे स्वस्तिक काढून त्यावर दक्षिणा ठेवतात. तिच्या बरोबर इंद्र व कुबेर यांचीही पूजा करतात.

उ. भारतात गंधाची गजलक्ष्मीची मूर्ती करून ती घरातल्या एका खोलीत काही दिवस ठेवतात. मग तिचा पूजोत्सव कर-तात. नंतर ती मूर्ती पाण्यात मिसळून ते तीर्थ घरभर शिंपडतात.

काही कुटुंबांमध्ये लक्ष्मीच्या ऐवजी श्रीयंत्र काढून त्याची पूजा करण्याची प्रथा आहे.

काही ठिकाणी भिंतीवर लक्ष्मीचे चित्र काढतात. त्याच्या खाली राजा व राणी सोंगट्या खेळत आहेत व त्यांच्या खाली त्या दोघांचे सात पुत्र खेळत आहेत, असे चित्रण करतात. ही चित्रकारी झाल्यावर त्या लक्ष्मीची पूजा करतात.

काही ठिकाणी मृण्मय मुखवटा करून तो पूजेसाठी ठेवतात. खालचे अवयव वस्त्राचे बनवतात. अशा दोन मूर्ती करतात. एक छोटी व एक मोठी. या दोघींना मंगल राजाच्या दोन राण्या चिल्लदेवी व चोलदेवी असे समजतात. त्यांची पूजा भाद्रपद शु. अष्टमीपासून त्याच महिन्याच्या कृष्णाष्टमीपर्यंत करतात. [व्रतराज]

(२) नववधूच्या गृहप्रवेशाच्या अंगभूत असे एक कृत्य. वधूवर घरी आल्यावर त्या दोघांच्या करवी लक्ष्मीपूजनाचा संकल्प करतात. प्रथम गणपतिपूजन व पुण्याहवाचन करून एका कांस्यपात्रात किंवा चांदीच्या तबकात पांढरे तांदूळ पसरतात. ते ताट वर आपल्या उजव्या मांडीवर घेतो. मग सोन्याच्या लेखणीने (किंवा अंगठीने) त्या तांदुळांत प्रथम कुलदेवतेचे व नंतर वधूला सासरचे जे नाव ठेवायचे ठरले असेल ते त्याखाली लिहितो. नंतर 'तदस्तु मित्रा०' व 'गृहा वै प्रतिष्ठा०' या मंत्रांनी पुरोहित त्या तबकावर अक्षता टाकतो. मग वर त्या नावाची पूजा करतो. नंतर ते नाव सर्वांना ऐकू येईल इतक्या मोठ्याने वाचतो. नंतर नाव ठेवल्याची साखर वाटली जाते.

महाराष्ट्रात काही कुटुंबांत यानंतर आणखी एक सोपस्कार केला जातो, तो पुढीलप्रमाणे —

लक्ष्मीच्या पुढे तांदुळाच्या काही राशी घालतात. त्यांपैकी एका राशीत एखादा दागिना लपवितात. मग वधू तो दागिना शोधून काढते. त्यावर सासू तिला विचारते. 'काय सापडले ?' वधू उत्तर देते. 'रत्नहार सापडला.' मग वरमाता वराला चांदीच्या वाटीत साखर घातलेले दूध प्यायला देते व विचारते. 'बाबा घाला ?' वर उत्तर देतो. 'लक्ष्मी घेऊन घरा आला.' मग तोच प्रश्न ती वधूला विचारते. 'बाई धाली?' ती उत्तर देते. 'सोन्याच्या पावलीं घरी आली'. [ऋ. ब्र. स.; स्त्र. वि. सो.]

लक्ष्मीप्रद व्रत

कृच्छ्रव्रतांपैकी एक व्रत. कार्तिक वद्य सप्तमी ते दशमीपर्यंत दूध, बिल्वपत्रे, कमळे आणि कमळांचे तंतू सेवन करणे, एकादशीला उपवास आणि त्या पाच दिवसांत केशवाची पूजा करणे, असा याचा विधी आहे. फल — विष्णुलोकाची प्राप्ती. [हि. ध.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लक्ष्मीवल्लभ (इ. स. चे १८ वे शतक) एक जैन भक्तकवी. हा खरतर गच्छाचा अनुयायी होता. याचे मूळ नाव हेमराज असे होते. लक्ष्मीकीर्ती नावाच्या गुरूजवळ याने अध्ययन केले. गुरूने त्याचे नाव लक्ष्मीवल्लभ असे ठेवले. पुढे हा मोठा व्युत्पन्न पंडित म्हणून प्रसिद्ध झाला. संस्कृत, हिंदी, राजस्थानी व गुजराती या भाषांवर त्याचे सारखेच प्रभुत्व होते. हा काशीत राहत असे.

लक्ष्मीवल्लभाचे एकूण ७८ ग्रंथ आहेत. त्यांत कल्पसूत्र व उत्तराध्ययन सूत्र या प्राकृत ग्रंथांवरील टीका फार प्रसिद्ध आहेत. कालज्ञानवैद्यक भाषाबंध, भावनाविलास, चौबीसी, सवैया, इ. आठ ग्रंथ त्याने हिंदी भाषेत रचले आहेत. त्याची काही स्फुट पदे सिंधी भाषेतही मिळतात.

लक्ष्मीवल्लभाच्या भाषेवर संस्कृताचा अधिक प्रभाव आढळतो. त्याचे बरेचसे काव्य नीतिकल्पनांनी प्रेरित आहे. [हिं. सा. २; जै. भ. हिं. क.; हिं. नी. वि.]

लक्ष्मीव्रत एक काम्य व्रत. प्रत्येक पंचमीला उपवास आणि लक्ष्मीची पूजा हा या व्रताचा प्रधान विधी आहे. व्रतावधी एक वर्ष. उद्यापनाच्या वेळी सोन्याचे एक कमळ व एक गाय दान द्यायची असते. फल – प्रत्येक जन्मात धनप्राप्ती व विष्णुलोकप्राप्ती.

या व्रताचा दुसरा पर्याय पुढीलप्रमाणे आहे– चैत्र शुद्ध तृतीयेला याचा प्रारंभ करतात. व्रतविधी असा– तृतीयेच्या दिवशी तूप-भात खाऊन निर्वाह करावा. चतुर्थीला कमळे असलेल्या तलावात स्नान करावे आणि लक्ष्मीला कमळात ठेवून तिची पूजा करावी. पंचमीला श्रीसूक्त म्हणून लक्ष्मीला कमळ अर्पण करावे. पुढे प्रत्येक पंचमीला वरीलप्रमाणे स्नान करावे आणि श्रीसूक्त म्हणून तिला कमळ वहावे आणि सुवर्णदान द्यावे. व्रतावधी एक वर्ष.

या व्रताचा आणखी एक पर्याय असा – मार्गशीर्ष महिन्यातल्या प्रत्येक गुरुवारी हे व्रत करायचे असते. लक्ष्मी-नारायणाची पूजा, पक्वान्नांचा नैवेद्य आणि दानदक्षिणा असा याचा विधी आहे. या व्रताची कथा अशी –

सौराष्ट्र देशात भद्रश्रवा नावाचा राजा होता. त्याला सुरतचंद्रिका नावाची राणी होती. राजाला सात पुत्र व एक कन्या अशी आठ अपत्ये होती. एके दिवशी लक्ष्मीला भद्रश्रव्याच्या राजवाड्यात जाऊन राहायची इच्छा झाली. ती वृद्ध ब्राह्मणीचे रूप घेऊन तिथे आली. तिला द्वारपालिकेने अडवले; तेव्हा ती म्हणाली. ' मला राणीला भेटायचे आहे. तिने गेल्या जन्मी लक्ष्मीव्रत केले होते, म्हणून तिला हे वैभव मिळाले आहे. पण या जन्मी तिला या व्रताचा विसर पडला आहे. म्हणून मी तिला त्याची आठवण देण्यासाठी आले आहे. ' मग राणीची व तिची भेट झाली. राणी गर्वाने फुगली होती. तिने ब्राह्मणीचा अपमान केला आणि तिला मारझोडही केली. ब्राह्मणीचे रूप घेतलेली लक्ष्मी तियून रडत रडत परत निघाली. राजकन्या श्यामबाला हिने तिला पाहिले. तिने ब्राह्मणीला सगळे वर्तमान विचारले. तिच्याकडून लक्ष्मीव्रत ऐकले व त्याप्रमाणे चार गुरुवारी ते केले. तिला लक्ष्मी प्रसन्न झाली. पुढे तिचा मालाधर नामक राजपुत्राशी विवाह झाला. इकडे भद्रश्रव्याची संपत्ती जाऊन त्याला दैन्य आले. तो आपल्या मुलीकडे याचनेसाठी गेला व नगराबाहेरच्या तळ्याच्या पाळीला बसला. हे वर्तमान श्यामबालेला समजले. तिने बापाला बोलावून घेतले व त्याला खूप द्रव्य देऊन परत पाठवले. पण राजा घरी येऊन पाहतो, तो त्या द्रव्याचे कोळसे झाले होते. मग तिची आई मुलीकडे गेली. त्या दिवशी मुलीचे लक्ष्मीव्रत होते. मुलीने आईकडूनही ते व्रत करविले. त्या व्रताच्या पुण्याने राणीला गेलेले सर्व वैभव परत मिळाले.

लक्ष्मीश (१७ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक कन्नड कवी. याचा जन्म कर्नाटकाच्या मलेनाडू भागात कबूर गावी झाला. हा ब्राह्मण कुलात जन्मला होता. विद्या आणि सत्संग या दोन्ही गोष्टी त्याला लाभल्या होत्या. त्यामुळे तो सुसंस्कृत आणि ईश्वरभक्त बनला होता.

जैमिनीभारत या संस्कृत ग्रंथाच्या आधारावर याने कन्नड भाषेत त्याच नावाने एक प्रबंध काव्य रचले आणि त्यामुळे तो कर्नाटकात अत्यंत लोकप्रिय झाला. हे काव्य कन्नड भाषेत असले, तरी त्याच्यावर संस्कृत भाषेची फार मोठी छाप आहे. या काव्यातील एक कथाप्रसंग असा –

कृतयुगात कृतव्रण नावाचा एक ब्राह्मण फिरत फिरत एका सरोवराच्या काठी आला. पाण्यात उतरून तो वरुणमंत्राचा जप करू लागला. त्या सरोवरात एक सुसर होती. तिने ब्राह्मणाचा पाय धरला. काही केल्या तिच्या जबड्यातून त्याचा पाय निघेना. मग त्याने आपले तपोबल वापरून स्वतःची सुटका करून घेतली. नंतर तो तळ्याच्या बाहेर आला आणि त्याने त्या तळ्याला शाप दिला, की ' आजपासून जो कोणी या सरोवराचे जल प्राशन करील, तो क्रूर वाघ बनेल ! '

त्या दिवसापासून कोणी त्या तळ्याकडे फिरकेनासा झाला. धर्मराजाने अश्वमेधासाठी घोडा सोडला होता. अर्जुन त्याच्या रक्षणार्थ त्याच्या मागे निघाला होता. हा यज्ञाश्व फिरत फिरत त्या सरोवरावर आला आणि त्यातले पाणी प्याला. तावडतोब एका वाघामध्ये त्याचे रूपांतर झाले. अर्जुनाला मोठे आश्चर्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…अर्जुन शरसंधान करून त्या वाघाला मारू शकत होता. …ते केले असता धर्मराजाचा यज्ञ अपुरा राहिला असता. …अनिवार्य आहे, असे जाणून अर्जुनाने श्रीकृष्णाचा धावा …ता –

भयनिवारण सकलसृष्टिकारण
…जनार्दन दुष्टदैत्यमर्दन
…धराधर कमलसंभवोदर
घनश्याम यदुकुलललाम ॥
…पुण्य नामनिर्जित
…विरजित सर्वलोकपूजित
…कृपाकर कृष्ण बिडिसु भीकर
…र्जुनं घोषिसिदनु ॥

…र्थ – हे भयनिवारक, सकलसृष्टिकारक जनार्दना, हे …र्दना, हे ब्रह्मदेवाच्या जनका, हे घनश्यामा, यदुवंश- … तुझे नाव सर्व प्रकारची बंधने नष्ट करणारे आहे. हे …जिता, तुझ्या चरणयुगुलाला नमस्कार. हे कृष्णा, तू …न मला वाचव.

…भारत हे काव्य रसार्द्र, सुंदर आणि मधुर आहे. भाषा … या दोन्ही दृष्टींनी त्याला महत्त्व आहे. कन्नड साहि- …क श्रेष्ठ भूषण आहे. त्याच्या प्रत्येक प्रसंगात कृष्णाचे … त्याचे भक्तवात्सल्य आणि त्याचे महागुण यांचा …; त्याचबरोबर लक्ष्मीश हा परम वैष्णव होता, हेही … [इ. क. भ. तु. अ.; एन रंगनाथ–अजन्ता, फेब्रु. १९५७]

…खी (इ. स. १८४० – १९१३) सखीसंप्रदायाचा एक अनुयायी आणि भक्तकवी. याचा जन्म …च्या सारण जिल्ह्यातील अमनौर गावी एका कायस्थ …ला. मुंशी जगमोहन हे त्याच्या वडिलांचे नाव होते. … हे त्याचे पाळण्यातले नाव होते. बालपणापासूनच तो … होता. कोणा औघडपंथी साधूकडून त्याने प्रथम दीक्षा … नंतर तो गुरूला सोडून शाळिग्राम नदीकाठच्या टेरूआ …ऊन राहिला. अखेरपर्यंत तिथेच त्याचा निवास … वास्तव्यात त्याला ईश्वराचा साक्षात्कार झाला … निरक्षर असूनही त्याने काव्यरचनेला प्रारंभ केला. …दांत आणि रागांत त्याने अमरविलास, अमरफरास, …नी व अमरसीढी या चार ग्रंथांची रचना केली. … हा त्याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ असून, त्यावर रहस्यवादाची …. योगसाधनेचेही उल्लेख त्यात आढळतात. याशिवाय … विवाह-गारी व कजली हे त्याचे लहान ग्रंथ आहेत. …चे सर्व काव्य भोजपुरी भाषेत असून, ते प्रौढ आणि काव्यगुणांनी संपन्न आहे. सखीसंप्रदायात त्याच्या चारही ग्रंथांना मोठा मान आहे. संप्रदायाचे लोक त्या ग्रंथांची पूजा करतात. हे चारही ग्रंथ ग्रंथरामजी या नावाने ओळखले जातात. [भो. उ. सा.; भो. क. का.]

लक्ष्मीसरा बंगाली लोकांचा एक आचारविशेष. प्रत्येक बंगाली हिंदू कुटुंबात हा आचार आवर्जून पाळला जातो. लक्ष्मीसरा या नावाचा एक घट प्रत्येक घरी ठेवतात. दर गुरुवारी त्याची पूजा करून त्यात यथाशक्ति द्रव्य टाकतात. पूजेच्या वेळी पान, सुपारी, नारळ, इ. वस्तू लक्ष्मीला अर्पण करतात. [स्त्री – बंगाल अंक, फेब्रु. १९६१]

लक्ष्मी–सीताष्टमी एक व्रत. याचा विधी असा – फाल्गुन शुद्ध अष्टमीला एका चौरंगावर लाल वस्त्र आंथरून त्यावर अक्षतांनी अष्टदल कमल काढावे. त्यावर लक्ष्मीची किंवा सीतेची सोन्याची मूर्ती स्थापावी. मग तिची पूजा करावी. संध्याकाळी एक हजार किंवा यथाशक्ति दिवे लावावे. मग ब्राह्मण व आप्तेष्ट यांच्यासह भोजन करावे. दुसऱ्या दिवशी पूजासाहित्य दोन ब्राह्मणांना दान द्यावे. [व्र. प.]

लांगलयज्ञ कृषिविषयक एक याग. लांगल म्हणजे नांगर. प्राचीन काळी जमीन नांगरायला प्रारंभ करण्यापूर्वी जो याग करीत, त्याला लांगलयज्ञ अशी संज्ञा आहे. निरनिराळ्या सूत्रग्रंथांत हा याग सांगितलेला आहे. गोभिल-गृह्यसूत्रांतील याचे वर्णन असे –

शुभ नक्षत्री यजमानाने स्थालीपाक करून इंद्र, मरुत, पर्जन्य, अशनी व भग यांना चरूच्या आहुती द्याव्या आणि सीता, आशा, आर्द्रा व अनघा यांना घृताच्या आहुती द्याव्या. खळे तयार करताना, पेरणी, कापणी आणि धान्याची साठवणी करतानाही वरीलप्रमाणेच आहुती द्याव्या.

मानव, आश्वलायन, सांख्यायन, पारस्कर, इ. गृह्यसूत्रांतही शेतीविषयक कामाला प्रारंभ करायच्या वेळचे निरनिराळे याग सांगितले आहेत.

कौशिकगृह्यसूत्रांत नांगरणीच्या विधीचे वर्णन केले आहे, ते असे – यजमानाने शेतात जावे व ‘सीरा युञ्जन्ति कवयो’ (अथर्व ३.१७) हे मंत्र म्हणून नांगर शेतात ठेवावा. नंतर एक बैल नांगराच्या उजव्या जोखडाला जुंपावा व दुसरा डाव्या जोखडाला जुंपावा. मग नांगरट करणाऱ्याने आणखी चार बैल जुंपावे. नांगराच्या फाळाला अपूप अर्पण करावे. यजमानाने वरील मंत्र म्हणण्याच्या काळात स्वतः शेत नांगरावे. नंतर नांगर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नांगऱ्याच्या हाती द्यावा. मग ' पर्जन्यवृष्टी होवो, पीक चांगले येवो, भरपूर धान्य मिळो, आम्हांला चांगले आरोग्य लाभो, ' या शुभ शब्दांचा उच्चार करीत शताच्या पूर्व भागात नांगराने तीन तास (नांगरट) काढावे. त्यांपैकी उत्तरेकडील तासात इंद्राला पुरोडाश द्यावा. त्याचप्रमाणे आश्विनौ देवांना स्थाली-पाक द्यावा. उरलेल्या आहुती जलपात्रात टाकाव्या. त्याचबरोबर मोड आलेले धान्य आणि तूपही पाण्यात मिसळावे. नंतर त्या पाण्याने नांगराला अभ्यंग स्नान घालावे.

नंतर पत्नीने यजमानाला विचारावे. ' तुम्ही शेत नांगरले काय ? ' यजमानाने उत्तर द्यावे. ' आम्ही शेत नांगरले. ' नंतर त्याने तिला विचारावे. ' तू काय आणले आहेस ? ' तिने उत्तर द्यावे. ' लाभ, धन, उत्कर्ष, संतती, गोधन, खाद्य पदार्थ आणि खाद्य पदार्थांचा आनंद आणला आहे. ' त्यानंतर आणखीही काही कृत्ये करून याग समाप्त करावा. [इं. वे. क. सू.]

लांगूलोपनिषद एक नव्य उपनिषद. हे अथर्ववेदाशी संबद्ध असून, संपूर्ण गद्यात्मक आहे. हे उपनिषद तंत्रविद्येचे आहे. हनुमंताची कृपा संपादन करण्यासाठी याचा विनियोग सांगितला आहे. यात हनुमंताच्या अनेक पराक्रमांचे वर्णन असून, शत्रुनाश, आरोग्य, दुःखनाश, विषनाश, भूतप्रेत-बाधापरिहार, इ. गोष्टींसाठी हनुमंताची प्रार्थना सांगितलेली आहे. हे उपनिषद नित्य तीन वेळा वाचावे, असे या उपनिषदाच्या शवटी म्हटले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

लांघणज उत्तर गुजरातेतील एक स्थान. इ. स. १९४४ ते १९६३ या काळात इथे उत्खनन करण्यात आले. त्या उत्खननात दगडाची अनेक लहान लहान हत्यारे, दगडाचे कपचे, धारदार छिलके, हाडे, मातीच्या भांड्यांची खापरे, शंख, शिंपा, मानवी सांगाडे, इ. अनेक वस्तू सापडल्या आहेत. इथे राहणाऱ्या लोकांनी जवळपास मिळणाऱ्या पाषाणांपासून ही हत्यारे बनवलेली आहेत. इथे सापडलेल्या खापरांवरून हे लोक बहुधा हातानेच मातीची भांडी बनवीत असावे, असे वाटते. काही भांड्यांसाठी मात्र चाकाचा उपयोग केलेला दिसतो. ही भांडी पक्क्या भाजणीची नाहीत. भांडी करण्यासाठी वापरलेल्या मातीत रेतीचे कण आढळतात. काही खापरांवर नक्षी कोरलेली दिसते. पण एकंदरीत या मातीच्या भांड्यांच्या बनावटीत सफाईदारपणा आढळत नाही.

इथे धातूची मात्र दोनच हत्यारे सापडली आहेत. एक लोखंडी बाणाचे टोक व दुसरे तांब्याचे धारदार पाते.

इथे राहणारे लोक शिकार व मच्छिमारी करीत. शिकारीत मारलेल्या जनावरांचे मांस खरडन काढण्यासाठी ते धारदार दगडी हत्यारे वापरीत.

लांघणज येथे किंवा उत्तर गुजरातमधील इतर ठिकाणी सापडलेल्या लघुअश्मयुगीन संस्कृतीचा काळ सनपूर्व २५०० ते सनपूर्व २००० असावा, असे विद्वानांचे मत आहे. पाहा - उत्खनित संस्कृती. [श्री. ह. धी. सांकलिया एक्स्कॅव्हेशन्स ॲट लांघणज, १९४४–६३, पार्ट १, आर्किऑलॉजी.]

लाइहरोबा मणिपूर प्रदेशातले एक प्राचीन लोकनृत्य. हे स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य आहे. यात कितीही लोक भाग घेऊ शकतात अथवा एक नर्तकही हे नृत्य करू शकतो. याच्या मागे काही लोककथात्मक संकेत आहेत. पाहा - मणिपुरी नृत्ये. [ए. हो. रा.; भा. लो. नृ.]

लाकिनी एक तांत्रिक देवता. हिचे वर्णन असे - दहा पाकळ्या असलेल्या नाभिकमळावर मणिपूर चक्रात बसलेली, मांसात वस्ती करणारी, तीन तोंडाची, प्रत्येक तोंडाला तीन डोळे असलेली, कृष्णवर्ण, चतुर्भुज, डामरी वगैरे देवता व दहा मरीची भोवती असलेली, गुडान्न भक्षण करणारी, तेजस्वी, कपाल व शूल धारण करणारी आणि वाकलेली. ड ते फ हे तिचे वर्ण होत. सौभाग्यरत्नाकराप्रमाणे ही षड्भुजा आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

लाखेर एक वन्य जमात. या जमातीचे खरे नाव मरा असे आहे. लुशाई नावाचे टोळीवाले त्यांना लाखेर या नावाने ओळखतात. म्हणून तेच नाव आता सर्वत्र रूढ झाले आहे. लाखेरांची वस्ती पूर्वीच्या आसाम प्रदेशातल्या लुशाई टेकडी जिल्ह्याच्या आग्नेय भागात, चीन टेकड्यांच्या हका नामक पोट-विभागात आणि आराकान टेकड्यांच्या उत्तर टोकाला आढळते. बहुतेक सर्व लाखेर खेडी कोलोडाइन नदीच्या वळणावर वसलेली आहेत. काही खेडी कोलोडाइन नदी आणि लुंग्लेह नदी यांच्या दुआबात आहेत. या जमातीचे अभ्यासक असे म्हणतात, की हे लोक उत्तरेकडून या ठिकाणी आले.

लाखेरांमध्ये टलांगसई, झिडहूनंग, सबेऊ, हवथाई, लिअतई व हैमा या पोटजाती आहेत. या पोटजातींतही अनेक कुळे आहेत. या कुळांची वर्गवारी राजकुळे, खानदानी कुळे व सामान्य कुळे अशी आहे. त्यांच्या कुळांमध्ये श्रेष्ठकनिष्ठता फार आहे. वरिष्ठ कुळाच्या स्त्रीची किंमत कनिष्ठ कुळाच्या स्त्रीहून कितीतरी अधिक असते.

लाखेर ही एक लढाऊ जमात आहे. इंग्रजांशी त्यांचा पहिला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

…ओळखत होता तो बंडखोर म्हणून. इंग्रज त्यांना शेंडू म्हणून ओळ- …होते. इंग्रजांनी थोड्याच काळात त्यांचा बंदोबस्त केला. इ. स. १८९१ नंतर ते बरेच दिवस शांत होते. पण पुन्हा त्यांनी …करायला प्रारंभ केला. अखेर त्यांच्यावर पोलिसकार- …करून ब्रिटिशांनी त्यांना आपल्या अंमलाखाली आणले.

शारीरिक ठेवण – हे लोक सुंदर नाहीत; पण दणकट मात्र …. त्यांचा वर्ण निमगोरा असतो. त्यांचे नाक पसरट, …ची हाडे वर …आणि डोळे … असतात. …नंतर स्त्रिया …त्या शरीराची … काळजी घेत …; म्हणून त्या … म्हाताऱ्या … वागतात. हे … नियमाने … करीत … त्यामुळे ते … असतात. …हि त्यांतून …चित सहा … एखादे …ना पाण्याचा …होतो.

…खेर माणूस …गाठीचा …. त्याचा … सहसा कळत …. हे लोक इतर …चा फारसा …कार करीत …. त्यांच्यांत …चाही अभाव ….

लाखेर तरुणी

वेषभूषा – लाखे- …कपडे दोन …असतात. एक नेहमी वापरायचे आणि दुसरे सणा- …वापरायचे. रोजचे वस्त्र हा एक सलग कपडा असतो व …धोतरासारखा सर्वांगावरून वापरतात. त्यांच्या पगड्याही रोजच्या व ठेवणीतल्या अशा दोन प्रकारच्या असतात. प्रत्येका- जवळ कशिदा काढलेली एक लहान पिशवी असते. ती तो डाव्या खांद्याला अडकवितो. तिच्यात चिलीम, तंबाखू, काड्याची पेटी व निकोटिनचे पाणी या वस्तू असतात.

स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक कपडे वापरतात. पूर्वी त्या झाडांच्या साली नेशीत. पण आता त्या गडद निळ्या रंगाचा लांब घागरा घालतात. घागऱ्याच्या खालच्या भागावर रेशमी कशिदा असतो. या घागऱ्यावर त्या आणखी एक आखूड घागरा घालतात. त्यामुळे आतल्या घागऱ्यावरचा कशिदा झाकला जात नाही. त्या अंगात जाकिट घालतात.

श्रीमंत किंवा टोळीप्रमुखाच्या घराण्यातील स्त्रिया भारी कपडे वापरतात. त्यांवर अनेक पट्टे असतात. या पट्ट्यांवरून त्यांच्या श्रीमंतीची ओळख पटते.

लाखेर स्त्रिया मानेवर केसांचा अंबाडा घालतात. नवव्या वर्षापर्यंत मुलांचे केस कापतात. त्यानंतर कापीत नाहीत. ज्याचे केस पुन्हा कापले जातात, त्याला खझंगपिना नामक बलिदानाच्या विधीत भाग घेता येत नाही. लाखेरांना आपल्या फण्या दुसऱ्यांनी वापरलेल्या चालत नाहीत.

लाखेर स्त्री-पुरुष पावसाळ्यात लखू नावाची टोपी वापर- तात. ही टोपी बांबू व वाळलेली पाने यांची असते. टोळी- प्रमुखाच्या घरच्या मुली लग्नाच्या वेळी लखांग नावाचे शिर- स्त्राण वापरतात आणि नंतर ते आपल्याबरोबर सासरी नेतात. स्त्री घटस्फोट घेऊन बापाकडे परत आली, तर ती आपले लखांग बरोबर घेऊन येते.

पमटेकचा हार हा या स्त्रियांचा एक आवडता अलंकार आहे. त्या विविध मण्यांचे हार वापरतात व थंग्राहेऊ नावाची

पमटेकचा हार

कर्णभूषणे घालतात. ही कर्णभूषणे लाकडाची असतात; याशिवाय त्या सलकडीही वापरतात.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घरे – लाखेरांची घरे टेकडीच्या उतरणीवर, सहजपणे शत्रूला तोंड देता येईल अशा ठिकाणी असतात. नवे खेडे वसविताना ती जागा चांगली की वाईट, हे शकुन पाहून ठरवितात. त्यासाठी काही वृद्ध लोक दोन कोंबडे घेऊन नव्या जागी जातात. निवडलेल्या जागेच्या वरच्या बाजूला एक व खालच्या बाजूला एक असे कोंबडे कोंडून ठेवतात. त्या दोन कोंबड्यांच्या मध्ये त्या रात्री तिथे झोपतात. वरचा कोंबडा प्रथम आरवला आणि खालच्या कोंबड्याने त्याला साथ दिली, तर ती जागा शुभ मानतात. नवे खेडे वसविले, की तिथे नवा विस्तव लागतो. तो खेड्याच्या मध्यभागी पेटविला जातो. जुन्या खेड्यातला विस्तव आणला तर, तो आपल्याबरोबर रोगराईही आणतो, अशी त्यांची समजूत आहे.

जुन्या काळी प्रत्येक लाखेर खेड्याभोवती तटबंदी असे. लाखेरांची खेडी अस्वच्छ असतात. त्यांची घरे जमिनीपासून तीन-चार फूट उंचीवर बांधलेली असतात. लाकूड व बांबू यांचा घरबांधणीसाठी उपयोग करतात. घरातील जमीन व घराच्या भिंती बांबूच्या चटयांच्या असतात. छप्पर ताडाच्या पानांचे असून, ते बांबूच्या चटयांनी झाकतात. या साध्या सामुग्रीनेही ते अशी भक्कम घरे बांधतात, की तिथे नेहमी होणाऱ्या वादळातही ती टिकून राहतात. लाखेरांच्या नायकाचे घर खेड्याच्या मध्यभागी असते. खेड्यावर कोणाचा हल्ला झाला, तर नायकाच्या घराचे संरक्षण व्हावे हा हेतू त्यात असतो. नायकाच्या घराच्या पडवीत त्याने शिकारीत ठार केलेल्या जनावरांच्या कवटया जयचिन्हे म्हणून ठेवलेल्या असतात. घराचे तीन भाग केलेले असतात. पहिल्या दोन भागांत नायकाच्या कुटुंबातली माणसे झोपतात. प्रत्येक जोडप्याची वेगळी चूल त्याच्या खोलीत असते. नायक आणि त्याची मुले शेवटच्या खोलीत असतात. त्याच्या घरासमोर एक मोठे आवार असते. आवाराच्या एका बाजूला लाकडी किंवा बांबूचे व्यासपीठ असते. भोजनपंक्तीसाठी किंवा गप्पांसाठी त्याचा उपयोग करण्यात येतो.

बांबूच्या विणलेल्या विविध प्रकारच्या टोपल्या व वस्तू

लाखेरांच्या घरात फार सामान नसते. बांबू आणि वेत यांच्या टोपल्या, मातीच्या पराती, भोपळ्याच्या पळ्या आणि विणण्याची व शेतीची अवजारे एवढाच त्यांचा संसार असतो.

उद्योगधंदे – हे लोक झूम पद्धतीची शेती करतात. ही शेती एका ठिकाणी एकच वर्ष करतात आणि नंतर ती जागा सात-आठ वर्षे पडिक ठेवतात. शेतीच्या जागेची निवड झाली, की तिच्यासंबंधी शकुन–अपशकून पाहतात. शुभ स्वप्ने पडली, तर ती जागा चांगली असे मानतात आणि अशुभ स्वप्ने पडली, तर ती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…सोडून ते दुसरीकडे जातात. शेतीत ते भात, कापूस, मका, …धान्ये, भाजीपाला, इ. पिके काढतात. कापणीला व खळ्याला सुरवात करण्यापूर्वी कोंबड्याचा बळी देतात. याशिवाय ते …काम, वेतकाम; बांबूची कामे, मच्छीमारी, इ. व्यवसायही करतात. यांच्या स्त्रिया विणकाम करतात. कपडे रंगविण्याचे कामही केवळ स्त्रियाच करतात. जो पुरुष कपडे रंगविण्याचे काम करतो, त्याचा शिकारीत नेम साधत नाही आणि तो क्षयाने मरतो, अशी त्यांची समजूत आहे.

लाखेर लोक शिकारही करतात. शिकारीसंबंधी त्यांचे काही नियम ठरलेले आहेत. शिकार चांगली मिळावी म्हणून हे प्रथम कोंबड्याचा बळी देतात. हा बळी गावाबाहेर दिला जातो. त्याचे …बळी देणारा आणि त्याच्या कुटुंबातले लोक खातात. या विधानकर्त्यांची नेमणूक दर वर्षी नव्याने करतात. ज्या दिवशी बळी देण्याचा कार्यक्रम असतो, त्या दिवशी गावकरी कोणतेही …करीत नाहीत. स्त्रिया सूतही कातीत नाहीत. कारण …त्यांच्या आत्म्यांना कापसाची भीती वाटते व ती पळून …, अशी यामागे समजूत आहे.

लाखेराने वाघाची शिकार केली, तर ते चाकेइ इया नावाचा …करतात. हा विधी शत्रूच्या मुंडक्यांची पूजा करण्याच्या सारखा असतो. ही पूजा केली नाही, तर वाघ रोगराई …करतो असे समजतात. सहसा हे वाघाची शिकार करीत …. कारण त्याला आत्मा असतो, असे ते समजतात.

…, डुकरे, कुत्री, मिथुन, कोंबड्या, कबुतरे, ही त्यांची …जनावरे होत. त्या सर्वांत मिथुन हे मोलाचे जनावर …लग्नात मुलीची किंमत ते मिथुनांमध्ये देतात. त्याच्या …मात्र ते उपयोग करीत नाहीत.

लाखेर तांदुळापासून सहम नावाची दारू बनवितात. दारूचे …मिथुनांच्या शिंगांचे असतात. पण हे पेले केवळ टोळीप्रमुख …खानदानी लोकच वापरतात. सामान्य लोक दारू पिण्यासाठी …च्या नळ्यांचा उपयोग करतात. त्यांच्या स्त्रिया व पुरुष …टिनचे पाणी पितात. लाखेर स्त्री-पुरुषांना धूम्रपानाचे …व्यसन असते.

आहार – भात हे त्यांचे मुख्य अन्न आहे. त्याशिवाय ते …, माज्या व अनेक प्रकारच्या प्राण्यांचे मास खातात. …प्रकारचे सापही ते खातात. फिपारिया नावाचा पांढरा …त्यांना फार आवडतो. त्यांच्या स्त्रिया कुत्री व शेळ्या यांचे …खात नाहीत आणि पुरुषांना घोडा, वाघ, चित्ता व मांजर …मांस चालत नाही.

…यांत गुलामगिरीची पद्धत फार मोठ्या प्रमाणात होती. …कैद्यांना गुलाम बनवीत असत. काही गुलाम विकतही घेत असत. लग्नात वधूची किंमत म्हणूनही गुलाम देण्याची प्रथा होती.

विवाहप्रथा – लाखेरांमध्ये समान कुळांत विवाह होऊ शकतो. त्याचप्रमाणे एकाच स्त्रीला दोन नवऱ्यांपासून झालेल्या सावत्र संततीतही विवाह होतात. पण आतेबहिणीशी मात्र लग्नसंबंध होत नाही. शक्यतो जवळच्या नात्यातले विवाह ते टाळतात. कारण त्या शरीरसंबंधातून निर्माण होणारी प्रजा वेडी होते, अशी त्यांची समजूत आहे. मामाच्या मुलीशी होणारा विवाह हा सर्वांत चांगला असे समजतात.

त्यांचे विवाह प्रौढपणी होतात. पुष्कळसे विवाह हे प्रेम-विवाह असतात. पण सामान्यपणे मुलाचे आई-बापच लग्ने ठरवितात. मुलाच्या आई-बापांनी मुलगी हेरली, की ते आपल्या नात्यातल्या एका स्त्रीला मुलीच्या बापाकडे पाठवून, तो मुलगी द्यायला तयार आहे की नाही, याचा तपास घेतात. त्याची तयारी असेल तर, मुलाचे आई-बाप एका मध्यस्थामार्फत मुलीच्या आई-बापांकडे डाओ नामक एक शस्त्र पाठवितात. डाओ हे शुभ स्वप्नाचे प्रतीक असते. डाओ स्वीकारल्यावर मुलीच्या आई-बापांना तशीच शुभ स्वप्ने पडली, तर ते मुलाचे स्थळ पसंत करतात आणि वाईट स्वप्ने पडली, तर ते स्थळ नाकारतात.

विवाहाच्या पहिल्या दिवशी वधूच्या आणि वराच्या घरी मद्यपानाने विवाह-विधीला सुरुवात होते. दोन्ही पक्ष आपापल्या घरी डुकरे कापतात. मग त्यांच्या शिजविलेल्या आणि कच्च्या मांसांची अदलाबदल करतात. या वेळी जितकी अधिक डुकरे कापली जातात, तितका विवाहसोहळा मोठा असे मानले जाते. हा विधी संपल्यावर वधूची वरात वराच्या घरी येते. वधूला आणायला पाठविलेला मध्यस्थ तिथल्या म्हाताऱ्या माणसाला प्रथम दारू देतो आणि तो वधूला व तिच्या आत्याला वराकडे येण्याचे निमंत्रण देतो. ही वरात घरी आल्यावर वधू-वरांना दारूच्या पात्राशेजारी बसवितात. एक माणूस दारूचा द्रोण घेऊन त्यात केसात घालायचा आकडा बुडवतो आणि ती दारू त्यांना प्यायला देतो. या विधीला टिपाणी असे म्हणतात. टिपाणी हा विधी कोंबड्याने बांग देण्यापूर्वी पार पाडावा लागतो. तोपर्यंत वधूने दारू प्यायची नसते किंवा धूम्रपानही करायचे नसते. हा कार्यक्रम झाला की, नवरा-नवरी एकत्रित मद्यपान करतात आणि सर्व लोकांत सामील होऊन नाच-गाण्यात भाग घेतात. शेवटी वधू बापाच्या घरी जाते. लग्नानंतर कमीत कमी एक महिना त्या दंपतीला एकांत करता येत नाही.

हा सर्व विधी संपल्यावर एक मोठी मेजवानी होते. ती सतत तीन दिवस चालते. हा कार्यक्रम खर्चाचा असल्यामुळे कधीकधी विवाहितांना दोन मुले झाल्यावर देखील ही जेवणावळ करतात.

लाखेरांमध्ये बालविवाहही होतात. यात कधी नवरा मोठा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर कधी नवरीही मोठी असते. दोन बहिणींचे लग्न साधारण एकाच वेळी झाले असता त्यांना जर परस्परांचे नवरे आवडले तर त्यांना त्यांची अदलाबदलही करता येते. पण हा बदल होण्यापूर्वी त्यांचा शरीरसंबंध घडलेला असता कामा नये.

लाखेर रखेल्याही ठेवतात. सामान्यपणे विवाहानंतर रखेल्या ठेवण्याची पद्धत आहे. शेतीसाठी त्यांचा उपयोग होतो. कधी कधी विवाहापूर्वीही रखेल्या ठेवतात. या रखेल्या कनिष्ठ कुळातल्या असतात आणि त्या कमी पैशात मिळतात. पुरेसे पैसे जमले, की ते उच्च कुळातल्या मुलीशी विवाह करतात. रखेल्या ठेवण्याचा विधी वराच्या घरी न होता त्याच्या नातेवाईकांकडे होतो. परंतु या विधियुक्त रखेलीचा दर्जा धर्मपत्नीहून कमी असतो. रखेलीला विशिष्ट समारंभात व बळीच्या विधीत भाग घेता येत नाही. तिला खाटेवर झोपायला बंदी असते. काही रखेल्यांना तर घरात प्रसूतही होता येत नाही.



लाखेरांचा एक प्रमुख

यांच्यांत घटस्फोटाची चाल आहे. पण स्त्रिया शक्यतो घटस्फोट घेण्याचे टाळतात. यांच्यांत विधवाविवाहही होतात. अशा विवाहानंतर तिची पूर्वीची मुलेही नव्या घरी जातात. पण त्यांच्यावर तसे बंधन मात्र नसते. एखाद्या विधवेचे तीन पुनर्विवाह झाले आणि तिचे तीन्ही नवरे मेले तर, तिच्याशी पुन्हा कोणी लग्न करीत नाही.

दीर व विधवा भावजय यांचा पुनर्विवाह हा सर्वपरिचित आहे. पण यांच्यांत सासराही विधवा सुनेशी विवाह करू शकतो. विधवेने दिराशी लग्न केले तर, त्याला तिच्या माहेरच्या नातेवाईकांना नवरीची काही किंमत द्यावी लागते. विधवा अपत्यहीन असेल तर, तिची मालमत्ता तिच्या दिराकडे जाते. मात्र हा दीर धाकटा असावा लागतो. जर मयत माणूस तीन भावांपैकी सर्वांत मोठा असला आणि त्याच्या विधवेने मधल्या दिराशी लग्न केले तर, त्याची मालमत्ता धाकट्या भावाला मिळते.

देवधर्म – लाखेर लोक आपल्या देवाला खझंगपा म्हणतात. खझंगपा याचा अर्थ सर्वांचा पिता असा आहे. तो आकाशात किंवा खिसांग नावाच्या पर्वतावर राहतो. खझंगपाचे दुसरे नाव पछपा असून, त्याचा अर्थ वृद्ध असा होतो. हा देव माणसासारखाच असतो आणि माणसाचे सर्व गुणधर्म त्याच्यात असतात. त्याला बायकामुलेही असतात; पण त्यांची नावे मात्र लाखेरांना माहित नसतात. हा देव दयाळू व निःपक्षपाती असतो. प्रत्येकाच्या गुन्ह्याप्रमाणे तो त्याला शिक्षा देतो. ते झंग नावाचा आणखी एक देव मानतात. झंग संतुष्ट झाला तर संतती, संपत्ती व दीर्घायुष्य देतो आणि कोपला तर संकटे आणतो. याचे स्त्री व पुरुष असे भेद असतात. हा देव तरुणतरुणींच्या मध्ये आकर्षण निर्माण करतो. ल्युरान्हिपा नावाचा देव दुष्ट असतो. त्याला बलिदानाने प्रसन्न करावे लागते. या देवांची आपापसांत भांडणे होतात. त्यांची भांडणे जुंपली की वादळ होते, असे हे लोक समजतात. जन्म, मृत्यू, विवाह, पेरणी, इ. प्रसंगी ते भुतांना बळी देतात. आजारी माणसाला औषध देण्यापेक्षा ते मंत्रतंत्रच अधिक करतात.

माणसाला आत्मा असून, त्याचा आकार माणसासारखा असतो, अशी त्यांची श्रद्धा आहे. पण हा आत्मा अदृश्य असतो. दिवसा तो शरीरात राहतो आणि रात्री बाहेर भटकतो. तथापि तो माणसांपासून दूर जात नाही. ह्रू नावाच्या एका अदृश्य दोरीने तो माणसाच्या शरीराशी संलग्न असतो. तो रात्री भटकत असताना त्याला ज्या घटना दिसतात, त्या तो स्वप्नरूपाने माणसाला सांगतो. आत्म्याचे थलपा व थलाछी असे दोन भेद आहेत. सामान्य माणसांच्या आत्म्याला थलपा म्हणतात आणि जे आत्मे त्रास देतात, त्यांना थलाछी म्हणतात.

चालीरीती – लाखेरांत सामुदायिक शयनगृहांची पद्धत नाही. पण तरुण मुले आपल्या घरी किंवा नायकाच्या घरी न झोपता त्यांच्या मनात भरलेल्या मुलीच्या घरी झोपतात. या प्रकाराबद्दल त्यांना कोणी विचारीत नाही. काही वेळा दोन किंवा तीन तरुणही एकाच मुलीच्या घरी झोपायला जातात. ते सर्व एका खोलीत झोपतात व मुलगी निराळ्या खोलीत निजते. पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…च्या वेळी एकच तरुण आला असता, मुलगी आपल्या इच्छे-…सार त्याला शय्यासोबत करते. मात्र ती दोघे, आईबाप घरी …सताना, मुलीच्या आईबापांच्या अंथरुणावर झोपलेली आढ-…ळी, तर मुलाला मुलीच्या आई-बापांना दंड म्हणून एक डुक्कर व एक कोंबडा द्यावा लागतो. मग त्या दोन्ही प्राण्यांचा बळी देऊन बिछाना शुद्ध करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मयताला पुरतात. मयताचे नातेवाईक



लाखेरांचे स्मृतिस्तंभ

…ला गरम पाण्याने स्नान घालून व केसांना तेल लावून मग …वे कपडे घालतात. प्रेत बांबूच्या तिरडीवर बांधून ती घरा-…च्या भिंतीला उभी करतात. प्रेताच्या डोक्यावर एक लहान …ळे टांगून ठेवतात आणि तिच्यावर भात व उकडलेली अंडी …तात. प्रेतावर माशा बसू नयेत, अशी खबरदारी घेतात. …च्या आत्म्याला जनावरांच्या प्राणांची सोबत व्हावी म्हणून …बरोबरीच जनावरे मारतात आणि रात्रभर इष्टमित्रांसह जागर …तात. प्रेत दोन किंवा तीन दिवस घरात ठेवतात. रोज त्याच्या …त दारू, मांस व भात घालतात. या सर्व रात्री जागरण …तात. जागरणात ढोल वाजवून नृत्य करतात. मयताचा आत्मा …धनाने अथिखीला म्हणजे स्वर्गात जावा हा त्यातला हेतू …सतो.

यांचा अंत्यविधी नेहमी सायंकाळी होतो. प्रेत मयताच्या …समोर किंवा रस्त्यावर पुरतात. त्याला गडद निळ्या रंगाचे …त गुंडाळलेले असते. प्रेत पुरण्यापूर्वी ते खड्ड्याच्या कडेवर …तात. मयताची पत्नी किंवा पती प्रेताच्या तोंडावर हात …न म्हणतो. 'तू आमची काळजी करू नको. सुखाने अथि-…ला जा.' नंतर प्रेताच्या तोंडात थोडी दारू घालतात. …गावातल्या तरुणांनी खड्डा खणायचा असतो आणि प्रेत …ड्ड्यात ठेवायचे असते. मर्तिकाच्या कामात मामाला बरेच …न असते. प्रेत खड्ड्यात ठेवताना मामा त्याला स्पर्श करतो.

हे लोक मयताचे स्मृतिस्तंभ उभारतात. स्तंभ उभा करी-पर्यंत तिथे जेवण ठेवतात. तसाच तिथे फांद्या असलेला एक खुंट पुरतात. त्या फांद्यांवर ऊस, लिंबू व इतर फळे टांगतात. शिवाय निकोटिनच्या पाण्याने भरलेला एक भोपळाही दगडावर ठेवतात. या खुंटाशेजारी दुसरा एक खुंट पुरून त्यावर मयता-साठी मारलेल्या जनावरांची मुंडकी टांगतात.

टोळीप्रमुख मरण पावला तर सबंध गावाला सामान्यतः तीन महिने सुतक पाळावे लागते. या काळात मयताचे नातेवाईक स्नान करीत नाहीत किंवा केसांना तेल लावीत नाहीत.

यांचे स्मृतिस्तंभ म्हणजे एक साधी लाफ असते. श्रीमंतांचे स्तंभ मात्र मनोऱ्यासारखे असतात. हे स्तंभ उभे करण्याचा एक समारंभ असतो. त्या समारंभाला मृताचे सर्व नातेवाईक हजर असतात. त्या वेळी मेजवानी होते. या प्रसंगी मिथुन किंवा डुकरे मारतात आणि दारू तयार करतात. स्मृतिस्तंभावरून मयताचा दर्जा ठरविला जातो. [दि लाखेर्स– एन्. इ. पॅरी, १९३२]

लाखेरी लाखेचा व्यवसाय करणारी एक जात. मारवाड हे त्यांचे मूलस्थान होय. तिथे त्यांना लखेरा असे म्हण-तात. परंतु आता त्यांची वस्ती महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात या प्रदेशांतही आहे. हे लोक आपणाला राजपूत व कायस्थ



लखेरा पुरुष

म्हणवितात. त्यांची कुलनावे पशू, पक्षी व झाडे यांवरून पडली आहेत. लाखेरी लोकांत पोटशाखा नाहीत. हे स्मार्त असून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बालाजी, भवानी, गणपती व राम यांना भजतात.

मारवाडातील लखेरांमध्ये हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांचे लोक आहेत. लखेरा स्त्रिया फक्त लाखेच्या बांगडया घालतात, काचेच्या किंवा हस्तिदंताच्या वापरीत नाहीत. अन्य हिंदू स्त्रियांप्रमाणे या नाक टोचून घेत नाहीत. मुसलमान लखेरा पूर्वी राजपूत होते. सांप्रत ते सुन्नी पंथाचे आहेत.

लाखेच्या बांगड्या बनविणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. त्यांच्यांत झाडावर लाख पेरण्याचा एक स्वतंत्र विधी असतो. हा ते बहुधा आश्विनात करतात. लाखेरी माणूस रात्री नग्नावस्थेत एका द्रोणात लाखेचे किटक घेऊन ते एका झाडावर पेरतो. मग त्या झाडाला कुंपण घालून त्याला कोणाला स्पर्श करू देत नाही. एखाद्या विधवेला जर लाख पेरायची असेल, तर ती आपल्या मुलाला कडेवर घेऊन तो द्रोण त्याच्या डोक्यावर ठेवते आणि काडीने ते कीटक झाडाला लावते. हे लोक पाय रंगविण्यासाठी लाखेत भिजविलेला कापूस विकतात. या कापसाला माहुरकी गुलेली असे म्हणतात. याशिवाय हे कडदोरे, राख्या व अनंताचे दोरे विकतात.

लाखेरी लोकांत जननाशौच व सटवीची पूजा नसते. मुलाच्या जन्मानंतर नवव्या दिवसापासून तेराव्या दिवसापर्यंत हे केव्हाही त्याचे नाव ठेवतात.

मर्तिकप्रथा – लाखेरी लोक मृताला जाळतात. त्यानंतर बारा दिवस सुतक पाळतात. बाराव्या दिवशी पाण्याने भरलेले बारा घडे पुढच्या दारात ठेवून त्यांची पूजा करतात. [म. ज्ञा. को.; रा. जा.; पूना गॅझे.]

लाचहौर एक जैन क्षेत्र. हे गाव बिहार राज्यातील मोंघीर जिल्ह्यात आहे. भगवान महावीर याची ही जन्मभूमी असल्याचे काही जैन मानतात. या गावापासून तीन मैलांवर असलेल्या दोन टेकडयांच्या मध्ये दोन मंदिरे असून, दोहोंतही महावीराच्या मूर्ती आहेत. इ. स. च्या १६ व्या शतकाच्या अखेरीस राजा पुरणमल याने ही मंदिरे बांधली, असे म्हणतात.

लाचहौरच्या नजीकच एक कालीमंदिर आहे. या देवीच्या वार्षिकोत्सवाच्या वेळी इथे मोठी यात्रा भरते. [मोंघीर गॅझे.]

लाजाव्रत एक काम्य व्रत. आश्विनी पौर्णिमेला तुपात भिजविलेल्या लाह्या विष्णूला अर्पण करून ब्राह्मणाला दान देणे, असा या व्रताचा विधी आहे. फल–विष्णुलोकप्राप्ती.

लाटण्यांचा खेळ स्त्रियांनी किंवा मुलींनी खेळायचा एक खेळ. दोघींनी अथवा चौघींनी हातांत एकेक लाटणे घ्यायचे, किंचित वाकायचे, एकाच वेळी दोन्ही पायांवर थोडी उडी मारून पुढे जायचे आणि आपल्या हातातील लाटणे दुसरीच्या लाटण्यावर मारायचे, अशा प्रकारे हा खेळ चालतो. हा खेळ खेळताना गाणे म्हणतात, ते असे –

लाटया बाई लाटया चंदनी लाटया।
मामांनी दिल्या मला सारंगी पेटया ।।
कृष्ण गुजरी हरि गुजरी ।
खुंटीवरचा हार माझा सोळा पदरी ।

खेळाची गती जसजशी वाढते, तसतसा हा खेळ रंगतो. हा खेळ खेळताना काही मुली तोंडाने पकवाही घालतात. [म. लो. मा. पुष्प १, ९.; मराठीतील स्त्रीधन]

लाट्यायन ब्राह्मण ब्राह्मणांतील एक पोटभेद. या ब्राह्मणांना लाड ब्राह्मण असेही नाव आहे. लाटचायन किंवा लाड ब्राह्मणांची पूर्वपीठिका फार प्राचीन आहे. लाड हा शब्द लाटपासून बनलेला आहे आणि लाट हा शब्द लाटचायन या शब्दाचा अपभ्रंश आहे. सामवेदाच्या राणायणी शाखेचे लाटचायन नामक एक सूत्र आहे. या राणायणी शाखेचे अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांना लाटचायन हे सूत्रवाचक नाव पडले. कालांतराने लाटचायनाचे लाट एवढेच नाव अस्तित्वात आले. यांची वस्ती दक्षिण गुजरातमध्ये होती. म्हणून त्या भागाला लाटदेश असे नाव मिळाले.

इ. स. ७१२ मध्ये महंमद कासीमने सिंधवर स्वारी केली व तो प्रांत जिंकला. सिंधप्रमाणेच गुजरातवरही मुसलमानांची आक्रमणे होतील, या भीतीने तिथले पुष्कळसे लोक महाराष्ट्र, कर्नाटक व पांडच (तमिळनाडू) या देशांत जाऊन राहिले. सावकारी करणाऱ्या लाड ब्राह्मणांबरोबर इतरही अनेक जातींचे लोक लाट देशातून बाहेर पडले. लाड पानारी (पानमळयाचा धंदा करणारे), लाड सोनार, लाड क्षत्रिय. लाड चव्हाण, लाड वैश्य, लाड साळी, लाड मराठे, लाड वंजारी, लाड कलाल, लाड तेली, लाड दस्सा, लाड सुलेमानी मुसलमान कसाब, लाड गौड सारस्वत ब्राह्मण, इ. त्यांपैकी काही लोक होत.

लाड गौड सारस्वत ब्राह्मण हे महाराष्ट्रात अनेक शतके नांदत असून, त्यांनी भाषा, पोषाख, विवाहपद्धती, इ. सर्व गोष्टी महाराष्ट्रीयांच्याच उचलल्या आहेत.

लाट देशातून येऊन लाड ब्राह्मणांनी धाराशिव (सांप्रतचे उस्मानाबाद) या गावी वसती केली. त्यांच्यापैकी काही लोक तमिळनाडू व कर्नाटक या प्रदेशांत गेले. कर्नाटकात गेलेल्या लोकांपैकी दहा–बारा घराणी हल्ली बंगलोरला आहेत व ती चांगली सधन झालेली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

धाराशिव येथे लाड ब्राह्मण सुमारे दोनशे वर्षे राहिले. हे लोक धनाढ्य होते. त्यांच्या स्त्रिया सुंदर होत्या. धाराशिवच्या राजाने त्यांच्यांतील एका लावण्यवती स्त्रीवर डोळा ठेवला; पण त्याची पापवासना पूर्ण न झाल्यामुळे त्याने या लोकांचा खूप छळ केला व त्यांचे द्रव्यही हरण केले. राजाच्या या छळाला कंटाळून या लोकांनी देशत्याग केला व इ. स. १०५८ मध्ये ते फत्तेखेर्डा येथे जाऊन राहिले. या गावी जाऊन राहण्याचे कारण म्हणजे तिथे सत्पुरुष श्रीपळसिद्धेश्वरमहाराज यांचे वास्तव्य होते, हे होय. नंतर तिथून हे लोक वऱ्हाड, नागपूर, खानदेश या भागांत पसरले. त्यांच्या बरोबर त्यांचे शतकानुशतकांचे उपाध्याय गौड गुर्जर ब्राह्मणही होते. गुर्जर ब्राह्मण त्यांची सर्व धार्मिक कृत्ये वैदिक सूत्रोक्त पद्धतीने करीत असत.

पण लाड ब्राह्मणांचे उपनयनसंस्कार मध्यंतरी बंद पडले. त्यांच्याकडची धार्मिक कृत्ये वैदिक सूत्रोक्त पद्धतीने न होता पौराणिक पद्धतीने होऊ लागली आणि शेवटी लाड ब्राह्मणांना आपल्या ब्राह्मण्याचाच विसर पडला. याची कारणे अशी–

पहिले कारण असे, की लाड ब्राह्मण महाराष्ट्रात आल्यावर त्यांनी आपले पूर्वीचे सावकारी व व्यापार हे व्यवसाय चालू ठेवले व त्यांत त्यांनी अगणित संपत्ती मिळवली. ही वैश्यांची वृत्ती स्वीकारून संपत्ती मिळविण्यात ते इतके गढून गेले, की मूळात आपण ब्राह्मण आहो, याचाच त्यांना विसर पडला.

दुसरे कारण असे, की मुसलमानांच्या आत्यंतिक जुलमामुळे विदर्भातील लाड ब्राह्मणांवर बाटून मुसलमान होण्याचा प्रसंग गुदरला होता. पण सुदैवाने त्यांची नुसती जानवीच काढून घेण्यात आली. इ. स. १७२४ मध्ये निजाम व मोगल यांच्यांत लढाई झाली व त्यानंतर वऱ्हाड प्रांत निजामाच्या ताब्यात गेला. त्यानंतर तिथे मुसलमानांची जुलूमजबरदस्ती सुरू झाली.

तिसरे कारण म्हणजे लाड ब्राह्मणांनी आपल्या बरोबर आणलेल्या गौड गुर्जर उपाध्यायांचा अनुदारपणा हे होय. मुसलमानांनी जुलमाने त्यांची जानवी हिसकावून घेतली, तरी गौड गुर्जर ब्राह्मणांनी पुनश्च त्यांचा यज्ञोपवीतसंस्कार करून, वैदिक सूत्रोक्त पद्धतीने त्यांची धर्मकृत्ये करायला काहीच हरकत नव्हती. कारण वेदांचा अधिकार ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तिघांनाही आहे. पण महाराष्ट्रातील ब्राह्मणांनी, वेदांचा अधिकार फक्त ब्राह्मणांनाच आहे, असा गैरसमज पसरवला व गौड गुर्जर ब्राह्मण त्याला बळी पडले. त्यामुळे त्यांनी लाड ब्राह्मणांची धार्मिक कृत्ये पौराणिक पद्धतीने करायला सुरुवात केली.

लाड ब्राह्मणांचा हा विस्मृतीचा काल नक्की किती वर्षांचा होता, हे निश्चयाने सांगता येत नाही. पण इ. स. च्या १९ व्या शतकाच्या अखेर, यांच्यापैकी काही लोकांना आत्मसंशोधनाची स्फूर्ती झाली व त्यांनी आपल्या समाजाची माहिती गोळा करायला सुरुवात केली. विदर्भातील मलकापूर येथील काही मंडळी व विष्णू मोतीराम देऊळगावकर यांना स्वतःच्या ब्राह्मणत्वाची जाणीव झाली आणि त्यांनी ती स्वबांधवांना पटवून दिली.

त्यानंतर १९२६ च्या मे महिन्यात मेहकर या गावी या लोकांची सभा झाली व त्या सभेत दक्षिणी ब्राह्मणांना वेदोक्त पद्धतीने त्यांचे सर्व संस्कार व धर्मकर्मे करण्याबद्दल विनंती करण्यात आली. त्याप्रमाणे फत्तेखेर्डा येथील गुर्जर गौड ब्राह्मणांनी ती विनंती मान्य केली.

एखादा समाज ब्राह्मण आहे की नाही, हे ठरविण्यासाठी श्री. महादेवशास्त्री दिवेकर यांनी आपल्या 'ब्राह्मणांतील पोटजातींचे एकीकरण' (पूर्वार्ध) या पुस्तकात पुढील पाच गमके दिली आहेत–(१) ब्राह्मण आईबापांपासून झालेली संतती. (२) गोत्र, प्रवर, संस्कार, कुलधर्म, कुलाचार, उत्सव, सण, व्रतवैकल्ये यांची परंपरा. (३) पौरोहित्याची वृत्ती व जातीत अग्निहोत्राची दीक्षा यांची सप्रमाण माहिती. (४) स्वतःला ब्राह्मण समजणे व इतर जातींनी त्यांना अब्राह्मण न समजणे. (५) समाजात सर्वत्र शाकाहार प्रचलित असणे.

ही सर्व गमके लाड ब्राह्मणांना लागू पडतात. मार्को पोलो हा प्रवासी इ. स. १२८० च्या सुमारास हिंदुस्थानात आला होता. त्याने इ. स. १३०० च्या सुमारास आपले प्रवासवर्णन लिहिले. त्यात त्याने लाड ब्राह्मणांविषयी जे लिहिले आहे, त्यावरून चिं. वि. वैद्य यांनी 'मध्ययुगीन भारत' (भाग ३) या पुस्तकात त्यांच्या संबंधी काही विवेचन केले आहे, त्याचा निष्कर्ष असा –

लाड ब्राह्मण हे व्यापारी ब्राह्मण होते. त्यांच्या गळ्यात यज्ञोपवीत असे. व्यापारानिमित्त गोदातीरापासून रामेश्वरापर्यंत ते फिरत असत. ते हिऱ्यामोत्यांचा व्यापार करीत. या व्यवसायात ते कोट्याधीश बनले होते. ते शाकाहारी होते. त्यांचा मूळचा देश लाट (द. गुजरात) असून, त्यांची भाषा लाटी नावाची होती. सध्या हे ब्राह्मण त्यांच्या मूळच्या देशात नाहीत.

लाड ब्राह्मण हे मूळचे सामवेदी राणायणी शाखेचे होते. पण देशांतर, गुरूच्या अभावी अध्ययनानुपपत्ती व औधेय (गुजराती) ब्राह्मणांचा सहवास या गोष्टींमुळे त्यांना सामवद सोडून औधेयशाखाध्यायी व्हावे लागले. पण औधेय संहिता नष्ट झाल्यामुळे सांप्रत त्यांना माध्यंदिन संहिता पठण करावी लागते. सारांश, सध्या लाड ब्राह्मण वाजसनेय शुक्लयजुर्वेदान्तर्गत माध्यंदिन शाखाध्यायी झाले आहेत. त्यांची सर्व धार्मिक कृत्ये पारस्कर गृह्यसूत्रोक्त व कात्यायन परिशिष्टोक्त विधीप्रमाणे होतात. यांची गणना पंच द्राविड ब्राह्मणांत होते. यांच्यांत मध्यंतरी लोप पावलेला उपनयन संस्कार पुन्हा सुरू झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. यांचे पोशाख, भाषा राहणी, चालीरीती वगैरे सर्व महाराष्ट्रीय ब्राह्मणांप्रमाणेच आहे. [लाटचायन अर्थात लाड ब्राह्मणांचा इतिहास – संपा. डॉ. कृ. दा. वऱ्हाडपांडे, १९२८]

लाट्यायन सूत्र एक श्रौतसूत्र. हे सामवेदाच्या कौथुम शाखेच्या अंतर्गत आहे. पंचविंश ब्राह्मणातली बरीचशी वाक्ये याच्यात आली आहेत. याच्या पहिल्या सात प्रपाठकात सोमयागाचे साधारण नियम दिले आहेत. आठव्या व नवव्या अध्यायात एकाहयागांचे विवरण आहे. नवव्या अध्यायातच बरेच दिवस चालणाऱ्या यज्ञाचे व दहाव्यात सत्रांचे वर्णन आहे. यावर रामकृष्ण दीक्षित, सायण व अग्निस्वामी यांची भाष्ये आहेत. [हिंदुत्व; वै. सा.]

लाठी वांबूचे एक दांडके. हिला काठी, दंड, यष्टी, इ. नावे आहेत. लाठी हे अमुक्त प्रकारातले एक शस्त्र आहे. हे आघात व संरक्षण करण्यासाठी उपयोगी पडते. लाठी दोन अंगुळे जाड व चार हात लांब असते. याहून थोडया कमी जाडीच्या आणि कमी लांबीच्या लाठीला यष्टी म्हणतात. शस्त्र म्हणून वापरायच्या लाठीसंबंधीचे श्लोक असे–

करेणादाय लगुडं दक्षिणाङ्गुलकं नवम् ।
उद्यम्य पातयेत् तेन नाशस्तस्य रिपोर्ध्रुवः ॥
उभाभ्यामथ हस्ताभ्यां कुर्यात्तस्य निपातनम् ।
अक्लेशेन हि तत् कुर्वन् वधे सिद्धिमवाप्नुयात् ॥

अर्थ – उजव्या हातात नवी दणकट काठी घेऊन ती वर उचलून शत्रूला मारावी, म्हणजे त्याचा घात होतो. दोन्ही हातांनी त्याला खाली पाडावे. सहजतेने हे करणारा शत्रूचा वध करण्याच्या बाबतीत सिद्धी प्राप्त करून घेतो.

लाठी दोन्ही हातांनी फिरविता येणे आवश्यक असते. कारण शत्रूने केलेल्या आघाताने एक हात निकामी झाला, तर दुसऱ्या हाताने ती फिरवायला यावी लागते. दोन्ही हातांनी बराच वेळ कुशलतेने आणि वेगाने लाठी फिरवणाऱ्या व्यक्तीला सव्यसाची असे म्हणतात.

लाठी भरीव असावी. हे हत्यार सहजतेने सर्वांना मिळण्यासारखे असते. ते कुठेही ठेवता येते आणि केव्हाही वापरता येते. लाठी झिजू नये म्हणून तिच्या दोन्ही टोकांना मायऱ्या अथवा शेंब्या बसवितात. ती फुटू नये म्हणून तिला तार गुंडाळतात. अशा लाठीचा मार जोरात बसतो. पाहा – दंड. [प्रा. यु. वि.]

लाड (१) कर्नाटकात आढळणारी एक जात. हे लोक स्वतःला क्षत्रिय म्हणवतात, जानवे घालतात व मुख्यत्वे घोडेस्वाराची नोकरी करतात. हे मूळचे राजपूत असावे. यांच्यात १४ गोत्रे व ९ पोटभेद आहेत. हे लोक शक्तीचे उपासक आहेत. ते चोरासी नावाची भाषा बोलतात. [म. ज्ञा. को.]

(२) ब्राह्मणांतील एक पोटजात. (लाटचायन ब्राह्मण पाहा.)

लाड, भाऊ दाजी (इ. स. १८२४–१८७४) एक निष्णात डॉक्टर, व्यासंगी प्राच्यविद्यापंडित, संशोधक आणि परोपकारी समाजसेवक. यांचा जन्म त्यांच्या आजोळी म्हणजे गोव्यातील पेडणे तालुक्यातील मांजरे गावी झाला. त्याच तालुक्यातील पार्से हे त्यांचे गाव होय. हे वत्सगोत्री सारस्वत ब्राह्मण होते. रामकृष्ण विठ्ठल लाड हे त्यांचे मूळ नाव; पण पुढे ते भाऊ दाजी या नावाने प्रसिद्ध झाले. त्यांच्या पत्नीचे नाव पार्वतीबाई होते. त्यांना विठ्ठल व द्वारकानाथ या नावांचे दोन पुत्र होते.

भाऊंचे वडील आपल्या दोघा मुलांना घेऊन मुंबईला आले. भाऊंची बुद्धी बालपणापासून कुशाग्र होती. इ. स. १८३६ साली शालान्त परीक्षा उत्तीर्ण होऊन ते एल्फिन्स्टन कॉलेजात गेले. या वर्षीच ते कॉलेजमधील स्कॉलरशिपच्या परीक्षेला बसून उत्तीर्ण झाले. या परीक्षेतील इतिहास, भूगोल व रसायनशास्त्र या विषयांवरचे प्रश्न आणि त्यांना भाऊंनी दिलेली उत्तरे ही कॉलेजच्या अहवालात छापली गेली. पुढे त्यांची असिस्टंट स्कॉलर म्हणून तिथे नेमणूक झाली.

इ. स. १८४३ साली भाऊंची एल्फिन्स्टन शिक्षणसंस्थेत शिक्षक म्हणून नेमणूक झाली. त्यांनी तीन वर्षे शिकविण्याचे काम केले आणि उत्तम शिक्षक म्हणून नावलौकिक मिळविला. त्या वेळी एल्फिन्स्टन संस्थेत संस्कृत विषय शिकविण्याची सोय नव्हती. म्हणून भाऊंनी खाजगी रीतीने संस्कृत शिकायला प्रारंभ करून त्यात प्रावीण्य संपादिले. याच सुमाराला त्यांचे वडील मरण पावले व संसाराचा भार त्यांच्या शिरावर पडला. पण त्यांनी याच काळात एका स्पर्धेसाठी कच्छ, काठियावाड, इ. गुजराती भागांत प्रचलित असलेल्या बालकन्याहत्येच्या प्रथेवर इंग्रजी व गुजराती भाषेत निबंध लिहिला आणि सुदैवाने त्या स्पर्धेत त्यांना सहाशे रुपयांचे पहिले बक्षीस मिळाले. हेच त्यांचे पहिलेवहिले लेखन असून, त्यात त्यांच्या चिकित्सक व अभ्यासू वृत्तीचा प्रत्यय येतो. डॉ. जॉन विल्सन यांनी याच विषयावर एक ग्रंथ लिहून त्यात भाऊंच्या निबंधातील मोठमोठे उतारे घेतले आहेत.

इ. स. १८४५ मध्ये मुंबईत ग्रँट मेडिकल कॉलेज सुरू झाल्याबरोबर भाऊंनी शिक्षकाची नोकरी सोडली आणि त्या कॉलेजात प्रवेश घेऊन आंग्ल वैद्यक शिकायला प्रारंभ केला. या कॉलेजात शिष्यवृत्तीसाठी स्वतंत्र परीक्षा होत असे. भाऊंनी ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परीक्षा देऊन फॅरिश शिष्यवृत्ती मिळविली. शिवाय या कॉलेज-मध्ये त्यांना ग्रंथपाल म्हणूनही काम मिळाले. आपल्याला पगार मिळतो; तेव्हा आपण शिष्यवृत्तीचा उपयोग करणे योग्य नव्हे, अशा भावनेने ते स्वतःच्या शिष्यवृत्तीचे पैसे उदार मनाने मित्रांना देत असत. इ. स. १८५१ साली त्या कॉलेजचा पहिला पदवीदान समारंभ झाला, तेव्हा भाऊ दाजींना पदवी मिळाली. मेडिकल कॉलेजची पदवी घेऊन बाहेर पडल्यावर त्यांना असिस्टंट सर्जन म्हणून सरकारी जागा मिळाली. परंतु लवकरच त्यांनी स्वतंत्र व्यवसायाला प्रारंभ केला. अचूक निदान व कुशल शस्त्रक्रिया या गुणांमुळे त्यांना वैद्यकीय व्यवसायात खूप यश मिळाले. त्यामुळे लोक त्यांना अश्विनीकुमार असे म्हणू लागले. पण कीर्तीच्या शिखरावर असतानाही त्यांनी गरीब रोग्यांकडे दुर्लक्ष केले नाही. ते गरिबांचे डॉक्टर म्हणूनच प्रसिद्ध झाले. गोकुळदास... भाई या श्रीमंत पारशी गृहस्थाच्या मदतीने त्यांनी पाय-धुणीनजीक एक धर्मार्थ दवाखाना उघडून, तो आपल्या नारायण नामक धाकट्या बंधूच्या मदतीने चालविला होता. त्या दवा-खान्यात ते बहुधा देशी औषधे वापरीत असत. मुंबईत देवी टोचण्याची पद्धत लोकप्रिय करण्यात त्यांचा बराच वाटा होता. त्यांनी कुष्ठरोगावर एक रामबाण देशी औषध शोधून काढले होते.

आपला वैद्यकीय व्यवसाय सांभाळून भाऊ देशजागृतीची अनेक कामे करीत. या देशातले अज्ञान, दारिद्र्य व अनारोग्य दूर करण्यासाठी त्यांनी शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, इ. क्षेत्रांत प्रगती घडवून आणण्याचा खूप प्रयत्न केला. लोकांच्या अडीअडचणी व दुःखे दूर व्हावी, सरकारचा कारभार नीट चालावा, इ. उद्देशांनी मुंबईत बॉंबे असोसिएशन नावाची संस्था निर्माण झाली. श्री. जगन्नाथ शंकरशेट हे या संस्थेचे अध्यक्ष आणि भाऊ दाजी हे दोन चिटणीसांपैकी एक चिटणीस होते. या संस्थेने ब्रिटिश पार्लमेंटला पाठवायचा पहिला एकतीस कलमी अर्ज तयार केला. हा अर्ज भाऊंनी लिहिला होता. त्यात इंग्रजी सरकार करीत असलेला दुजाभाव, उधळेपणा व अन्य काही दोष स्पष्ट रीतीने व मुद्देसूदपणे दाखविलेले होते. त्यामुळे हा अर्ज इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये खूप गाजला. लंडनमधील वृत्त-पत्रांत त्याला चांगली प्रसिद्धी मिळाली.

भाऊ दाजी एका गृहस्थाच्या मदतीने हिंदुस्थानच्या राज्य-कारभारविषयक सुधारणांची पुस्तके लिहून ती इंग्लंडमध्ये प्रसिद्ध करण्याचा विचार करीत होते. त्यांचा हा विचार चालू असतानाच तिकडे दि इंडिया रिफॉर्म सोसायटी नावाची एक संस्था स्थापन झाली. तिने हे काम पत्करले म्हणून भाऊंनी त्यांनाच मदत करायचे ठरविले. त्याचप्रमाणे दादाभाई नवरोजींनी इंग्लंडमध्ये ईस्ट इंडिया असोसिएशन नावाची संस्था स्थापन केली होती. तिच्या मुंबईच्या शाखेचे अध्यक्ष भाऊ दाजी झाले.

इ. स. १८५९ साली इंग्रज सरकारने व्यापार व व्यवसाय यांच्यावर कर बसविण्यासाठी लायसेन्स बिल तयार केले. मुंबई-तील युरोपियन व देशी व्यापाऱ्यांनी या बिलाविरुद्ध खूप ओरड केली. या बिलाचा विचार करण्यासाठी भरलेल्या सभेत भाऊ

डॉ. भाऊ दाजी लाड

दाजी म्हणाले, "जर कधी असे घडून आले की, माझ्या देशात सुधारणा आणि ज्ञान यांची वृद्धी होऊन तो आपली राज्य-व्यवस्था आपण करण्यास योग्य झाला, तर दिवसेंदिवस मानुष-धर्म वृद्धी पावत चालला आहे, त्यावरून मला भरवसा वाटतो की, इंग्लंड देश ती गोष्ट कबूल करून उदारपणे आपणास साम्राज्याच्या ओझ्यातून मुक्त करून घेण्यास राजी होईल आणि माझ्या स्वदेशीय जनांस विद्या शिकवून त्यांचे एक स्वतंत्र लोकांचे राज्य केल्याचे जे यश त्यास प्राप्त होईल तितक्यातच संतोष मानून राहील."

या भाषणातून भाऊंच्या मनातील स्वातंत्र्याची लालसा स्पष्ट झालेली दिसते. भाऊंचे औद्योगिक सुधारणांकडेही भरपूर लक्ष होते. मुंबईत कागदाची व कापसाची गिरणी काढण्याच्या प्रय-त्नात ते अग्रेसर होते. या सुधारणांबरोबरच शेतीचीही सुधारणा झाली पाहिजे, असे त्यांचे मत होते. इ. स. १८५४ मध्ये दि वेस्टर्न इंडियन कॅनॉल अँड इरिगेशन कंपनीची स्थापना झाली होती. भाऊ या कंपनीचे एक डायरेक्टर होते.

एका गुजराती शाळेच्या बक्षिससमारंभात त्यांनी गुजरातीत भाषण केले. त्यात त्यांचा आधुनिक शिक्षणाबद्दलचा मूलगामी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विचार स्पष्ट झाला आहे. त्यातील एक परिच्छेद असा –

" ज्यांना ज्ञानाचे माधुर्य कळत नाही त्यांनाच आपल्या मुलामुलींना ज्ञान मिळावे याची इच्छा नसते. परंतु ज्यांना घुबडाप्रमाणे प्रकाश सोसत नाही म्हणून जे प्रगत ज्ञानाच्या प्रकाशास विरोध करतात, त्यांचा मी धिक्कार करतो. अशिक्षितांना या बाबतीत क्षमा करता येते; परंतु जे सुशिक्षित म्हणून मिरवितात तेही शिक्षण व शिक्षित यांची गुप्तपणे निंदा करतात, त्यांना क्षमा करणे योग्य नाही."

आधुनिक ज्ञानाची महती त्यांनी पुरेपूर जाणली होती. परदेशात जाऊन ज्ञान संपादन करावे, असे ते म्हणत असत. श्री. वि. ना. मंडलिकांना लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, " राजकीय व सामाजिक क्रांती घडून येईल अशी काही तजवीज करण्याकरिता विलायतला जाण्याचा विचार माझ्या मनात येऊन दिवसेंदिवस तो बळावत चालला आहे. "

भाऊ स्त्रीशिक्षणाचे पुरस्कर्ते होते. रूढिनिष्ठांचा या संदर्भातला विरोध न जुमानता त्यांनी या बाबतीत केलेले कार्य फार मोलाचे आहे. स्त्रीशिक्षणासाठी त्यांनी अनेक वर्षे आर्थिक झीज सोसली. लोहारचाळ या कन्याशाळेच्या खर्चासाठी ते दरमहा चाळीस रुपये देत असत. याच शाळेला पुढे डॉ. भाऊ दाजी गर्ल्स स्कूल हे नाव मिळाले.

मुंबईतल्या स्टुडंटस् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी या स्त्रियांना शिक्षण देणाऱ्या संस्थेचे ते दहा वर्षे अध्यक्ष होते. परंतु आजारी पडल्यानंतर त्यांनी हे पद सोडले. त्यापूर्वी या संस्थेचे अध्यक्षपद युरोपियन माणसांकडे असे. भाऊ दाजी हेच या संस्थेचे पहिले भारतीय अध्यक्ष होत.

डॉ. भाऊ दाजी कर्ते समाजसुधारक होते आणि सुधारणेचा शुभारंभ त्यांनी स्वतःपासूनच केला होता. लग्नमुंजीसारख्या समारंभांत कलावंतिणीचा नाच करणे ही एक त्या काळी बहुमान्य प्रथा होती. परंतु ही प्रथा टाकून त्यांनी आपल्या मुलाच्या मुंजीत खानदानी गाण्याचा कार्यक्रम ठेवला. एका वल्लभपंथीय महाराजांच्या बुवाबाजीविरुद्ध त्यांनी कोर्टात साक्ष दिली. मादक पदार्थांच्या सेवनाविरुद्ध तर त्यांनी मोहिमच काढली होती. त्यासाठी बॉम्बे टेंपरन्स युनियन नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. भाऊ तिचे क्रियाशील सभासद होते. देवकुवर नावाच्या स्त्रीने केलेल्या पुनर्विवाहाला ते स्वतः उपस्थित राहिले होते. धर्मशास्त्रातील समुद्रप्रवासाचा निषेध न मानता भारतीय तरुणांनी परदेशात जाऊन ज्ञान मिळवावे यासाठी ते प्रयत्नशील होते, गरिबांवरील अन्याय दूर करण्यास भाऊ दाजी सदैव तत्पर असत.

मुंबईतल्या मोठमोठ्या संस्था स्थापन करण्यात अनेकांबरोबर भाऊंनी पुढाकार घेतला होता. बॉंबे असोसिएशनच्या वतीने भाऊंनी मुंबई विद्यापीठाची मागणी केली आणि त्या मागणीनुसार विद्यापीठाची स्थापना झाली. वनस्पती व पुराणइतिहास यांच्या अभ्यासाची साधने एकत्रित मिळावी म्हणून त्यांनी राणीचा बाग व म्युझियम स्थापन करण्यात पुढाकार घेतला. त्याचप्रमाणे नेटिव जनरल लायब्ररी, डेव्हिड ससून लायब्ररी, पेटिट इन्स्टिटयूट, फोर्ब्स गुजराती सभा, इ. ग्रंथालये स्थापन करण्यात ते आघाडीवर होते. भाऊंच्या काळात नाटयव्यवसायाला प्रोत्साहन देणे अशिष्ट व अनैतिक मानले जात होते. परंतु भाऊंनी या व्यवसायाला सक्रिय उत्तेजन दिले.

डॉ. भाऊंनी वाङ्मय व संशोधन या क्षेत्रात केलेली कामगिरी फार प्रशंसनीय आहे. त्या कामगिरीमुळे त्यांची भारतात व भारताबाहेरही प्रसिद्धी झाली. बरेच इंग्रज पंडित इतिहासाच्या अनेक साधनांसाठी त्यांच्याकडे येत असत. त्यांनी घेतलेले शिलालेखांचे ठसे आणि हस्तलिखिते, सुंदर प्राचीन चित्रे, शस्त्रे, यंत्रे, इ. वस्तूंचा संग्रह खूप मोठा होता. हा संग्रह उभा करण्यासाठी भाऊंनी बहुतेक साऱ्या भारताचा प्रवास केला. त्यात काश्मीर, राजस्थान, गुजरात, म्हैसूर, मद्रास, बंगाल, बिहार, ओडिसा, इ. प्रांत होते. संशोधनयात्रेला ते कधी एकटे जात, तर कधी इंग्रज अभ्यासकांबरोबर जात. काही वेळा ते पं. भगवानलाल इंद्रजी यांना पाठवून शिलालेखांचे ठसे आणवीत. त्यांचा हा शिष्य म्हणजे प्राच्यविद्येला लाभलेली एक मोठी देणगी होय, असे म्हणतात.

भाऊंचा हा प्रचंड उद्योग पाहून प्रसिद्ध प्राच्यविद्यापंडित माक्स म्यूलर व रा. गो. भांडारकर यांनी भाऊंची मुक्त कंठाने स्तुती केली आहे. त्यामुळे देशातल्या व परदेशातल्या अनेक मान्यवर संस्थांनी त्यांना आपले सभासद करून घेतले. मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीचे तर ते पहिले हिंदी उपाध्यक्ष होते. आरंभी या सोसायटीत देशी लोकांना प्रवेशच नव्हता.

भाऊंच्या संशोधनविषयक लेखनाचे स्थूल मानाने तीन विभाग करता येतात– (१) शिलालेख, ताम्रपट, नाणी व लेणी यांवरील लेख. (२) ग्रंथ व ग्रंथकार यासंबंधीचे निबंध. (३) विविध टिपणे. कालिदासाचा कालनिर्णय या निबंधाने त्यांच्या संशोधनविषयक कार्याला प्रारंभ झाला. आद्य मराठी कवी मुकुंदराज, हेमाद्री, हेमचंद्र, माधव व सायण. या विषयांवर त्यांनी वाचलेले निबंध व टिपणे, कोरीव लेण्यांतील संस्कृत संख्यावाचक शब्दांचा अर्थ आणि नाण्यांच्या साहाय्याने क्षत्रप राजवंशासंधी मिळवलेली काही माहिती, हे त्यांचे निबंध आजही अभ्यासकांना उपयुक्त वाटतात.

गिरनार पर्वतावरील रुद्रदामनाचा शिलालेख आणि त्याच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

...शिलालेखावरील गुप्त-राजवंशाचे शिलालेख त्यांनी वाचले आणि त्यांनी त्या लेखांच्या वाचनात केलेल्या चुका दुरुस्त केल्या. रुद्रदामन हा चस्टनचा मुलगा होता, असे प्रिन्सेपने प्रतिपादिले होते. पण भाऊंनी रुद्रदामन हा त्याचा मुलगा नसून नातू होता असे दाखविले. गुप्तांचे शिलालेख वाचताना गुप्तशकाचा सार्वत्रिक असलेला प्रसार हा प्रथम त्यांच्याच ध्यानी आला. याशिवाय त्यांनी कालिदासाचे कुमारसंभव हे काव्य संपादित केले आहे. मेरुतुंगाचार्यांचा प्रबंधचिंतामणी हा त्यांनी संपादन करून ठेवलेला संस्कृत ग्रंथ मुंबईच्या एशियाटिक सोसायटीच्या हस्तलिखित ग्रंथसंग्रहात आहे. हिंदुस्थानचा इतिहास लिहावा या उद्देशाने त्यांनी खूप टिपणे तयार केली होती. पण त्यांची ही इच्छा अपुरी राहिली. श्री रामचंद्र घोष नामक व्यक्तीने भाऊंचे वाङ्मय 'दि लिटररी रिमेन्स ऑफ भाऊ दाजी' या नावाने इ.स. १८८० साली कलकत्त्यात ग्रंथरूपाने प्रकाशित केले आहे. भाऊंना दीर्घायुष्य लाभले नाही. इ. स. १८७३ च्या जानेवारीत त्यांना पक्षघाताने गाठले आणि त्यातच मुंबईमध्ये त्यांचा अंत झाला. भाऊ आजारी आहेत हे समजताच हैद्राबादचे दिवाण सालारजंग यांनी भाऊंना दरमहा १०० रु. निवृत्तिवेतन दिले होते, असे म्हणतात. भाऊंच्या मृत्यूनंतर त्यांचे उचित स्मारक व्हावे यासाठी एक स्मारक समिती निर्माण झाली होती. अपेक्षेप्रमाणे पैसा जमला नाही म्हणून बी. ए. च्या परीक्षेत संस्कृत विषयात पहिला येणाऱ्याला डॉ. भाऊ दाजी पारितोषिक देऊन या समितीला स्मारकाची आकांक्षा तेवढ्यावरच भागवावी लागली. [डॉ. भाऊ दाजी लाड – श्री. ना. कर्नाटकी, १९७१; डॉ. भाऊ दाजी – अ. का. प्रियोळकर, १९७१]

लाडशाखी वाणी यांना लाडशिक्के किंवा राव असेही म्हणतात. यातील लाड शब्द देशवाचक आहे. लाड म्हणजे लाट देश होय. दक्षिण गुजरातला व महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील उत्तरेच्या पट्टीला प्राचीन काळी लाट देश म्हणत. लाडशाखी वाणी खानदेश व नासिक जिल्ह्यांत बहुसंख्येने आढळतात. महाराष्ट्रात यांची वस्ती इ.स. च्या नवव्या किंवा दहाव्या शतकात झाली असावी. यांची मातृभाषा अहिराणी असून, ती संस्कृतप्रचुर आहे. मात्र ळ च्या ऐवजी ण प्रामुख्याने वापरला जातो. पुरुष बाहेर मराठी व घरात अहिराणी बोलतात. बायका मात्र घरीदारी अहिराणीच बोलतात.

लाडशाखी वाणी उच्चवर्णियांत गणले गेले आहेत. त्यांचे आचार-विचार ब्राह्मण व मराठे यांच्यासारखे दिसतात. मात्र ते शाकाहारी आहेत. या समाजातील बहुसंख्य स्त्रिया अजूनही अशिक्षित आहेत. त्या डोक्यावरून पदर घेतात. समाजात श्रीमंत लोक पुष्कळ आहेत. हे लोक बहुतेक खेड्यापाड्यांत राहतात, त्यामुळे प्रगतीच्या दृष्टीने त्यांची वाटचाल मंदच आहे. यांच्यांत नेर, अलई, ततार, महाजन, कोठावदे, ब्राह्मणकार, येवला, लोखंडे, मुसळे, इ. बरीच कुळे आहेत. खालप, काश्यप, मांडव, गहिलम, मुमुक्ष, इ. गोत्रे यांच्यांत आहेत.

विवाहप्रथा – प्रथम वधूकडील लोक मुलगा पाहायला येतात. मग वरपक्षाच्या लोकांना वधू पाहण्यास बोलावतात. उभयपक्षी पसंती झाल्यावर हुंड्याची बोलणी होऊन साखरपुडा होतो. हुंड्याची रक्कम कितीही जास्त असली, तरी यादीत तिचा आकडा ४०१ एवढाच असतो. त्यानंतर वराकडून वधूला चोळी-परकर पाठवला जातो. मुलीचे लग्न सामान्यपणे पंधरा वर्षांच्या आतच करतात. त्यापुढे वय वाढल्यास मुलीला वर मिळणे कठीण जाते. लग्नाच्या दिवशी वधू-वर हळदीने माखलेले पीत-वस्त्र नेसतात. लग्न वधूच्या घरी होते. लग्नात वऱ्हाडणीचे (वराची बहीण किंवा भाची) बरेच प्रस्थ असते. लग्नाच्या अगोदर देव-दिवाळी हे कृत्य करतात. त्यात मांडव घालून देवांचे लग्न लावतात व रात्री लोकांना पानसुपारीसाठी बोलावतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधूला दिवसभर ब्राह्मणाकडे ठेवतात व नंतर तिला वराचा पोषाख देऊन घोड्यावरून वाजत-गाजत आणतात. या सोहळ्याचे नाव निमकारली असे आहे. शेज भरणे या कार्यक्रमात वराकडील कुलदेवतेच्या मूर्ती तांदुळाच्या राशीत बुजवतात. विधवांना पुनर्विवाह निषिद्ध असतो. त्यामुळे या समाजात विधवांचे प्रमाण बरेच आहे.

चालीरीती – सणावारी गोड पोळ्या करतात. पितृपक्षात पित्तरपाटाच्या वेळी खीर किंवा बासुंदी करतात. नववधूने लग्नानंतर श्रावणमासात नऊ दिवस पिंपळाची पूजा करायची असते. हे व्रत सतत नऊ वर्षे चालते. लग्नानंतर येणाऱ्या अधिक मासात नवीन लग्न झालेले जोडपे परस्परांचे मुखदर्शन करीत नाही. [श्री. दा. गो. बोरसे – 'म. लो. मा. ३, १९५९]

लाडिलीदास (इ. स. चे १९ वे शतक) राधावल्लभ संप्रदायाचा एक अनुयायी. हा घनश्यामलाल याचा शिष्य असून, विद्वान व कवी होता. याने सुधर्मबोधिनी, प्रश्नोत्तरी, पदावली आणि कामवनविलास, इ. ग्रंथ रचले आहेत. सुधर्मबोधिनी या ग्रंथात राधावल्लभ संप्रदायाच्या सिद्धान्तांचे विवरण आहे. त्यामुळे या संप्रदायात या ग्रंथाला महत्त्व प्राप्त झाले आहे. कामवनविलासात ब्रजमंडलातील राधा-कृष्णांच्या लीलास्थानांचे वर्णन आहे. याव्यतिरिक्त संप्रदायातील काही ऐतिहासिक घटनांचेही वर्णन यात आढळते. [ब्र. ध्र. इ.]

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लाभपंचम कार्तिक शुद्ध पंचमीचे नाव. गुजरातेत व्यापारी लोक हा दिवस खरेदीविक्रीसाठी शुभ समजतात. त्या दिवशी पुढील वर्षाच्या उलाढालीची योजना आखून त्याप्रमाणे व्यवसायाला सुरुवात करतात. [सुरत गॅझे.]

लामानृत्य लडाख भागातल्या लामा लोकांचे एक नृत्य. हे लोक तोंडावर मुखवटे चढवून गोंपाच्या समोर एक प्रकारचे नृत्य करतात. या नृत्यातून प्राधान्याने दुष्ट प्रवृत्तीवर सुष्ट प्रवृत्तीचा होत असलेला विजय दाखविण्यात येतो. या नृत्याचे विषय बहुधा बौद्ध जातकातील कथानकांवर आधारलेले असतात. तिबटमध्ये होणाऱ्या असुरनृत्यांची व धार्मिक नृत्यांची छाप या नृत्यावर आहे, असे म्हणतात. तियेही तोंडावर मुखवटे लावूनच नाचण्याची पद्धत आहे. [ए. हो. रा.]

लालचंद लब्धोदय (इ. स. चे १७ वे शतक) एक जैन भक्तकवी. हा खरतरगच्छाचा अनुयायी असून, मेवाडचा राजा जगतसिंह याच्या आश्रयाला होता. ज्ञानराजमणी हे त्याच्या गुरूचे नाव होय. हा वैयाकरणी, छंद :-शास्त्रज्ञ व साहित्यशास्त्रज्ञ होता. त्याने पद्मिनीचरित्र, मलयसुंदरी व गुणावली चौपाई असे तीन ग्रंथ रचले आहेत. पद्मिनीचरित्रात वीर व शृंगार या रसांना प्राधान्य लाभले आहे. त्यात राजा रतनसेन व पद्मावती यांची कथा वर्णित आहे. यातील काही घटना वगळता उर्वरित काव्य जायसीच्या पद्मावतासारखे आहे. गुणावलीत ज्ञानपंचमीची कथा आहे. सीमंधर स्तवन असेही त्याचे एक काव्य असून, त्यात भगवान सीमंधराचे स्तवन आहे. [हिं. जै. भ. क.]

लालचदास (इ. स. चे १५ वे शतक) एक वैष्णव कवी. याचा जन्म उत्तर प्रदेशाच्या रायबरेली ज़िल्ह्यातील डलमाऊ नावाच्या गावी झाला. परंतु याने आपले बहुतेक जीवन बिहार राज्यातील दरभंगा जिल्ह्यात घालविले. या जिल्ह्यातील रोसडा नामक गावी एका मंदिरात हा राहत होता. लालचदासाने हरिचरित्र व विष्णुपुराण नावाचे दोन ग्रंथ रचले आहेत. हरिचरित्र म्हणजे भागवताच्या दशमस्कंधाचा हिंदी अनुवाद असून, दुसरा ग्रंथ विष्णुपुराणाचा सारांश आहे. हे दोन्ही ग्रंथ अवधी भाषेत व दोहा – चौपाई वृत्तांत आहेत. तुलसीदासांच्या रामचरितमानसापूर्वी शंभर वर्षे आणि जायसीच्या पद्मावतापूर्वी सुमारे पाऊणशे वर्षे या ग्रंथांची रचना झाल्यामुळे हिंदी वाङ्मयीन जगात भाषेच्या दृष्टीने या ग्रंथांना आगळे मोल प्राप्त झाले आहे. [हिं. सा. इ.; हिं. वं. वै. क.; हिं. सा. बि.]

लालचेर (इ. स. चे १ ले शतक) एक पराक्रमी व धार्मिक राजा. याला शेंगट्टुवन असेही म्हणत. चोळ राजा कारिकल याच्या मृत्यूनंतर हा चोळ देशाचा (तमिळनाडू) राजा झाला. हा गादीवर येण्यापूर्वी याच्या चुलत्याने कोंगू देश (केरळच्या पश्चिम किनाऱ्यावरचा कोइंबतूर व तिरुचिरापल्ली यांमधला प्रदेश) जिंकला होता.

यान पश्चिम समुद्रावर आपली सत्ता स्थापून तिथे चालत असलेली चाचेगिरी बंद पाडली. त्या काळी कडंबू किंवा कदंब या नावाची एक जात समुद्रावर चाचेगिरी करीत असे. लालचेरने या जातीचा पुरा मोड करून पश्चिम समुद्र व्यापारी वाहतुकीसाठी सुरक्षित केला. तसेच याने सिंहलदेशचा राजा गजबाहू याच्याशी युद्ध करून त्याचा पराभव केला आणि त्याचे सुमारे बारा हजार सैनिक कैद केले.

वंजी येथे लालचेरची राजधानी होती. तिथे त्याने पट्टिनी देवीचे मंदिर बांधले व अनेक यज्ञ केले. तमिळ साहित्याला याने उदार आश्रय दिला होता. तमिळ साहित्यातला तिसरा संघम् याच्याच आश्रयाखाली उदयास आला. या संघम्‌मध्ये अनेक लेखक व कवी प्रसिद्धीस आले. यांपैकी कवी परणर हा लालचेरचा समकालीन होता. या कवीने आपल्या आश्रयदात्या राजाची कीर्ती काव्यरूपाने अमर केली आहे. [भा. इ. रू.]

लालदास (इ. स. १५३९–१६४७) एक संत व संप्रदायप्रवर्तक. पंजाबातील धौली धूप या गावी याचा जन्म झाला. हा मेव जातीचा होता. हे लोक एके काळी लुटारू व हिंसक म्हणून प्रसिद्ध होते. लालदासाचे आई-वडील गरीब होते. त्यामुळे लालदासाला लहानपणापासून पोटासाठी काम करावे लागे. तो जंगलात जाऊन लाकडे तोडी आणि ती गावात आणून विकी. थोड्याच दिवसांत त्याला साधुसंगती घडली आणि तो हळूहळू वीतराग बनला. परमार्थमार्गात त्याची थोड्याच काळात बरीच प्रगती झाली. हळूहळू त्याची कीर्ती पंजाबात सर्वत्र पसरली. तो हिंदू व मुसलमान या दोन्ही धर्मांच्या लोकांना उपदेश करू लागला.

काही कालाने फकीर गदन चिश्ती या संताची व त्याची भेट झाली. फकिराच्या सांगण्यावरून त्याने आपले गाव सोडले व तो तिथून जवळच रामगढ परगण्यातल्या बांदोली गावी जाऊन राहिला. तिथे त्याने लोकसेवेचे कार्य सुरू केले. दीन व असहाय रोग्यांची तो सेवा-शुश्रूषा करू लागला. त्याच्या या आचरणाचा लोकांवर फार प्रभाव पडला आणि कित्येक लोक त्याचे शिष्य बनले. या शिष्यांत काही शिष्य दांभिक, स्वार्थी व दुराचारीही होते. अशा शिष्यांच्या संगतीतून आपली व आपल्या संप्रदायाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…इका व्हावी या हेतूने त्याने तत्कालीन राज्यसंस्थेचे साहाय्य …तीव लफंग्या शिष्यांना हाकलून लावले.

हे लोक पुढे लालदासाचे शत्रू बनले. एकदा तर लालदासा-…र या लोकांनी एका स्त्रीची हत्या केल्याचा आरोप केला. …वित्या फौजदाराने त्याला आपल्यापुढे बोलावले. लालदासा-…बरोबर त्याचे हिंदू-मुसलमान शिष्यही फौजदारापुढे उपस्थित …झाले. फौजदार आश्चर्यचकित झाला. त्याने लालदासाला …विचारले. 'तू कोण आहेस आणि काय आहेस?' त्यावर लाल-…दासाने उत्तर दिले. 'मी खरा कोण आहे याचा माझा मलाच …ता नाही. मला एवढेच माहीत आहे की, माझ्या आत्म्याने हे …शरीर मेव जातीत मिळवले आहे.'

फौजदाराला त्याचा काही अर्थबोध झाला नाही. त्याने सग-…ळ्यांना प्रत्येकी पाच रुपये दंड केला. लोक म्हणाले, की 'दंड …भरायला आमच्या जवळ पैसेच नाहीत.' फौजदार रागावला. …तेथे एक विहीर होती आणि तिचे पाणी विषारी बनले …. फौजदाराने ते पाणी त्यांना प्यायला लावले; पण त्यांपैकी …कोणालाही त्या पाण्यातले विष बाधले नाही. याउलट ते पाणी …त्यांचे गोड आणि निर्मळ झाले, असे सांगतात.

नंतर लालदासाने बांदोली गाव सोडले आणि तो गुडगाव …तल्या टोडी गावी गेला. त्याच्या शत्रूंनी तिथेही त्याला …त्रास सुरू केल्यामुळे तो टोडीहून रसगावला गेला.

लालदास विवाहित होता आणि त्याला पहाड नावाचा एक …मुलगा व स्वरूपा नावाची एक मुलगी होती. ही भावंडेही पुढे …संत बनली. एकशे आठ वर्षांचे दीर्घायुष्य भोगून लालदास मरण …पावला. नगला गावी शिष्यांनी त्याची समाधी बांधली. …लालदासी पंथाचे लोक आजही त्या स्थानाच्या दर्शनाला जातात.

…इतर अनेक संतांप्रमाणे लालदासानेही अनेक चमत्कार …केल्याचे सांगतात. वेगवेगळ्या प्रसंगी लालदासाने ज्या कविता …रचल्या, त्या 'लालदास की चेतावणी' या नावाने जयपूर …मधील एका ग्रंथालयात हस्तलिखित स्वरूपात सुरक्षित आहेत.

…लालदासाच्या तत्त्वज्ञानावर व उपदेशावर कबीर व दादू दयाळ …यांचा प्रभाव आहे. लालदासाने मुख्यत्वे अंतःकरणाचा निर्मळ-…पणा आणि सदाचार यांचाच उपदेश केला. तो म्हणतो –

हक खाइये हक पीइये, हक की करो फरोह।
इन बातों साहिब खुशी बिरला बरते कोय ॥

…अर्थ – सत्य खावे, सत्य प्यावे, सत्याचीच विवंचना करावी. …या गोष्टींने भगवान प्रसन्न होतो. पण असे सत्यान्वेषी लोक …फारच थोडे असतात.

भगत भीख न मांगिये, मांगत आवे शरम।
घर घर टांडत दुःख है, क्या बादशाह क्या हरम।
साधु ऐसा चाहिए, धन कमाकर खाय।
हिरदे हर की चाकरी, पर–घर कभूं न जाय ॥

भावार्थ – कोणत्याही भक्ताला राजा–राणीकडेही भीक मागायला लाज आणि दुःख वाटले पाहिजे. आदर्श साधू तो, की जो स्वतः कष्ट करून मिळवतो आणि खातो. आपले हृदय भगवद्भक्तीत लीन करणारा आणि स्वार्थासाठी कोणाच्याही घरी न जाणारा पुरुष हा आदर्श साधू समजावा.

लालदासाचे असे हे सगळे नैतिक उपदेश आहेत. त्याने ज्या पंथाची स्थापना केली, त्याला लालपंथ म्हणतात. [उ. भा. सं. प.]

लालपंथ

याची स्थापना संत लालदास याने केली. पंजाबातल्या अलवार जिल्ह्यात व सभोवतीच्या मेव जातीत या पंथाचे अनुयायी आढळतात. हे सर्व लोक मुसलमान असले तरी, त्यांचे आचार–विचार, रीति–रिवाज हिंदूंप्रमाणेच आहेत. हे लोक ब्रह्म या नावाने रामाची पूजा करतात; रामनामाचा जप व रामगुण-संकीर्तन यांना प्राधान्य देतात. हे लोक आपले मोठेपण मिरवीत नाहीत किंवा कसले चमत्कारही करीत नाहीत. लालदासाचा त्यांना तसा आदेश आहे. आचारशुद्धी, विचारांची पवित्रता आणि संयमपूर्ण जीवन या गोष्टींना या पंथात फार महत्त्व दिलेले आहे. पाहा– लालदास [उ. भा. सं. प.]

लालबहादुर शास्त्री

(इ. स. १९०४–१९६६) एक थोर देशसेवक व भारताचे दुसरे पंतप्रधान. यांचा जन्म श्रीवास्तव आडनावाच्या एका कायस्थ-कुलात झाला. उत्तर प्रदेशातले मोगलसराई हे त्यांचे जन्मस्थान होय. यांचे बालपण रामनगर येथे गेले. रामनगर हे गाव काशीजवळ, गंगा नदीच्या पैलतीरावर आहे. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांना गंगेचा निर्मळ सहवास घडला. त्यांनीही गंगेसारखेच शुद्ध, निर्मळ व पवित्र जीवन व्यतीत केले. शास्त्रीजींचे वडील श्री. शारदाप्रसाद हे लालबहादुर दीड वर्षांचे असतानाच निवर्तले. त्यांच्या मातुःश्री रामदुलारी देवी मात्र शास्त्रीजींच्या निधनानंतर वयाच्या ८४ व्या वर्षी निधन पावल्या.

शारदाप्रसाद हे सुरवातीला एक प्राथमिक शिक्षक होते. नंतर ते एका सरकारी कचेरीत कारकून झाले. त्यामुळे त्यांची कौटुंबिक स्थिती ओढगस्तीचीच राहिली.

शास्त्रीजींचे घरगुती नाव नन्हे असे होते. नन्हे म्हणजे लहान. शास्त्रीजी मोठे झाले तरी नन्हेच राहिले. त्यांची उंची अवघी पाच फूट होती. कृशत्व आणि ठेंगूपणा या दोन्ही गोष्टींनी ते कोणाच्या डोळ्यातच भरत नसत.

या नन्हेपणाच्या संबंधात शास्त्रीजींना गुरू नानक यांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक दोहा नेहमी आवडायचा. तो दोहा पुढीलप्रमाणे आहे –

नानक नन्हें हो रहो, जैसे नन्हीं दूब ।
और रूख सूख जाएंगे, दूब खूब की खूब ॥

अर्थ – हे नानक, तू लहानच राहा. अगदी हरळीसारखा लहान राहा. बाकीची झाडे सुकून जातील; पण हरळी मात्र नेहमीच टवटवीत राहील.

नन्हे सहा वर्षांचा असतानाची एक गोष्ट. एकदा तो आपल्याच वयाच्या मुलांबरोबर एका फळबागेत गेला. मुलांना त्या बागेतली फळे चोरायची होती. त्यांचे ते काम चालू असता बागेचा माळी तिथे आला. त्याला पाहून सगळी मुले पसार झाली आणि नन्हे तेवढा माळ्याच्या हाती सापडला. माळी नन्हेला चोप देऊ लागला. नन्हेला तो मार असह्य झाला. तो कळवळून माळ्याला म्हणाला. 'मी गरीब आहे, मला बाप नाही; तू मला मारू नकोस.' ते ऐकून माळ्याने हात आवरला आणि म्हटले. 'तुला बाप नाही ना? म्हणूनच पोरा, तू जास्त चांगले वागले पाहिजेस.' ते शब्द नन्हेच्या कोवळ्या काळजावर कोरले गेले. त्याच क्षणी त्याने निर्धार केला, की 'माझा बाप जिवंत नाही; म्हणून मला इतरांपेक्षा चांगले वागले पाहिजे.'

लालबहादुर शास्त्री आपल्या या नन्हेपणाची स्वतःच कित्येकदा जाहीरपणे चेष्टा करीत.

पतिनिधनानंतर त्यांच्या मातुःश्री नन्हे आणि दोन मुली यांना बरोबर घेऊन माहेरी गेल्या. हजारीलाल हे त्यांच्या आजोबांचे नाव. नन्हेवर त्यांचे विशेष प्रेम जडले. वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत नन्हे आपल्या आजोबांच्या घरी राहिला; नंतर वाराणसी येथे आपल्या मावशीकडे पुढील शिक्षणासाठी गेला. तिथल्या हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये त्याचे नाव दाखल करण्यात आले. रघुनाथप्रसाद हे नन्हेच्या मावशीच्या यजमानांचे नाव. ते शिस्तप्रिय आणि चारित्र्यसंपन्न होते. ते निष्काम कर्मयोगीच होते. नन्हेच्या बालबुद्धीवर त्यांच्या आचरणाचा खूप प्रभाव पडला.

शास्त्रीजींच्या लहानपणाविषयी त्यांच्या भगिनी सुंदरीदेवी यांनी काही उद्बोधक आठवणी लिहून ठेवल्या आहेत, त्यांपैकी काही पुढे दिल्या आहेत –

(१) माझा दादा लहानपणापासून स्वभावाने शांत आणि सौम्य होता. त्याची वागणूक अगदी साधी असे. त्याने स्वतःसाठी दोहोंपेक्षा अधिक सदरेही कधी शिवले नाहीत. एकदा माझ्या छोट्या आत्याचे लग्न होते. मी दादाबरोबर बसून जेवत होते. जेवता जेवता मांसपदार्थांतल्या एका हाडकावरून आम्हां दोघांचे भांडण जुंपले. माझे-मामा माझ्या जवळच बसले होते. ते म्हणाले. 'माणसे कधी हाडकासाठी भांडतात का रे पोरांनो!' मामांच्या बोलण्याचा आम्हां दोघांवर एवढा परिणाम झाला, की त्या दिवसापासून आम्ही बहीण-भाऊ पूर्णपणे शाकाहारी बनलो.

(२) आमच्या मावशीचे घर दारानगरला होते. तिथून दादा हरिश्चंद्र विद्यालयात जात असे. दिवसभर विद्यालयातले शिक्षण झाल्यावर सायंकाळी तो शिकवण्या करी. रात्री त्याला परत यायला बारासुद्धा वाजत. मला आठवते, की थंडीच्या दिवसांत दादा परत येईनो मी कधीही रजई अंगावर घेत नसे. न जाणो, मला कदाचित झोप लागायची आणि मी झोपलेली पाहून दादा उपाशीच निजायचा. तेवढ्या रात्री चूल पेटवून मी रोटी बनवीत असे. मग आम्ही दोघेही जेवत असू.

(३) एकदा तर दादाने दोन वर्षे जोडेच वापरले नाहीत. रोजच्या खर्चाची ओढाताण, तिथे जोडे कुठले! पण अनवाणी चालल्यामुळे दादाच्या पायांना चांगलेच फोड आले आणि त्याची ही अवस्था पाहून मला रडू आले.

(४) एकदा आमच्या एका नातलगांकडे पुत्रोत्सव होता. मी दादाबरोबर तिथे गेले होते. लोक गाणे-बजावणे ऐकण्यात तल्लीन झाले होते. मी पळतच घरात गेले आणि तिथला एक लाडू आणून दादाला दिला. हे एका नातेवाइकाने पाहिले व त्या गोष्टीचा बभ्रा झाला. मी बरेच लाडू दादाला खायला घातले, असा त्या मंडळींनी माझ्यावर आळ घेतला. दादाला हे कळले. तो गंभीर झाला. त्याने माझ्या डोक्यावरून प्रेमळपणे हात फिरवला. तो काही बोलला नाही, पण त्या घटनेचा त्याच्या मनावर खोल परिणाम झाला. त्या दिवसापासून एक वर्षभर त्याने सकाळची न्याहारीच सोडून दिली.

शाळेत लालबहादुर हे एक सामान्य विद्यार्थी होते; पण त्यांना शिक्षकांचे प्रेम लाभले होते. त्यांचे अंकगणित कच्चे होते; पण इंग्रजी पक्के होते. भाषा आणि इतिहास हे त्यांचे आवडते विषय होते.

एकदा लो. टिळक वाराणसीला गेले होते. पन्नास मैलांवरून शास्त्रीजी लोकमान्यांचे दर्शन घेण्यासाठी वाराणसीला गेले. त्या सभेत लोकमान्य म्हणाले 'आपल्या शत्रूची अडचण ही आपली संधी.' हे वाक्य त्यांच्या मनात ठसले. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांना वाराणसी येथेच म. गांधींचे प्रथम दर्शन घडले. या दोन्ही महापुरुषांच्या दर्शन-श्रवणाचा त्यांच्या मनावर जो परिणाम झाला, तो आमरण टिकला.

शास्त्रीजी हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये मॅट्रिकच्या वर्गात असतानाच १९२१ साल उजाडले. त्या साली महात्माजींनी देशभर असहकाराची चळवळ सुरू केली. 'सरकारशी असहकार करा आणि कोर्टं, कचेऱ्या, शाळा, महाविद्यालये व परकीय व्यापार यांवर बहिष्कार घाला' ही त्या चळवळीची घोषणा होती. त्या देशव्यापी चळवळीने शास्त्रीजींच्या हृदयात देशभक्तीचा आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...गाचा अंगार फुलवला. त्यांनी शाळेवर बहिष्कार ...ला आणि ते मिरवणुकीत सामील झाले. त्यांची ही कृती ...आप्तेष्टांना आवडली नाही. त्यांच्या आईने तर धसकाच ...ता. एकुलता एक मुलगा आणि कुटुंबाचा आधारस्तंभ. तोच ...भलत्या मार्गाला गेला, तर कुटुंबाचे काय होणार, या ...तिचे मन ग्रासले. पण शास्त्रीजींचा निर्धार साधक-...विचार करून पक्का झाला होता. मिरवणुकीत भाग ...बद्दल सरकारने शास्त्रीजींना पकडले; मात्र त्यांना त्या ...शिक्षा न देता सोडून दिले. आता त्यांना हरिश्चंद्र विद्या-...मार्ग बंद झाला होता; पण शिक्षण तर सोडायचे नव्हते. ...त्यांनी काशी विद्यापीठ या राष्ट्रीय शिक्षण देणाऱ्या ...नाव दाखल केले. चार वर्षे तिथे उच्च शिक्षण घेऊन ...त्याच विद्यालयाची 'शास्त्री' ही पदवी प्रथम श्रेणीत ...होऊन मिळवली. हीच पदवी पुढे आडनावासारखी ...नावाला चिकटली. त्या पदवीसाठी त्यांनी तत्त्वज्ञान हा ...घेतला होता. डॉ. भगवानदास हे तत्त्वज्ञानाचे प्रकांड ...त्यांना अध्यापक म्हणून लाभले होते.

...जी आपल्या राजकीय आयुष्यात नेहमी समन्वयवादी ...याचे कारण त्यांच्या मनावर झालेला डॉ. भगवान-...प्रभाव हे होय.

...भगवानदास व गोपालशास्त्री या दोन अध्यापकांच्या ...शास्त्रीजींना पुरोगामी विचारांची दीक्षा मिळाली. ...अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे आणि अस्पृश्यांना ...ची वागणूक मिळाली पाहिजे, ही प्रेरणा त्यांना तत्त्व-...अभ्यासातूनच मिळाली. पदवी घेऊन बाहेर पडताच ...रावेच कार्य करायचे असे त्यांनी ठरवले. ते त्यासाठी ...र जिल्ह्यात जाऊन राहिले. त्याच काळात महर्षी ...दास टंडन यांच्याशी त्यांचा परिचय झाला. निष्ठा, ...हालअपेष्टा सोसण्याची तयारी आणि सौजन्यपूर्ण वर्तन ...जींचे गुण टंडनजींच्या प्रत्ययाला आले. टंडनजींची ...र विशेष मर्जी बसली. त्याच काळात लाला लजपतराय ...ऑफ दि पीपल सोसायटी या नावाची संस्था स्थापन ...ली. ही संस्था म्हणजे त्यागी, निर्भय सच्छील कार्यकर्त्यांचे ...होते. त्या संस्थेचे सभासदत्व मिळणे या गोष्टीला ...पदवीइतकेच महत्त्व होते. टंडनजींनी शास्त्री-...त्या सोसायटीचे आजीव सभासद होण्याची शिफारस ...आणि शास्त्रीजींनी ती मानली. ते त्या संस्थेचे आजीव ...होऊनच अलाहाबादला गेले.

...कार्य करीत असता त्यांचा पं. जवाहरलाल नेहरू ...संबंध आला. नेहरूंची तडफ, त्यांचे विलोभनीय व्यक्तिमत्त्व, त्यांचे तळमळीचे वक्तृत्व या गुणांवर शास्त्रीजी मुग्ध झाले. नेहरूंना त्यांनी गुरुस्थानीच मानले. हळूहळू ते नेहरूंच्या निकट परिचयात आले व त्यांचे प्रमुख सहकारी बनले. इतकेच नव्हे तर पुढे ते नेहरू कुटुंबातलेच एक झाले. पंडितजींनी त्यांना काँग्रेसच्या राजकारणात खेचले. ते काँग्रेस संघटनेतील एकेक जबाबदारी शास्त्रीजींवर सोपवू लागले आणि शास्त्रीजीही ती चिकाटीने आणि कौशल्याने पार पाडू लागले.

वयाच्या तेविसाव्या वर्षी ललितादेवींशी त्यांचा विवाह झाला. कायस्थ समाजात त्या वेळी हुंड्याचे प्रस्थ फार होते. शास्त्री-जींच्या सासऱ्याने त्यांना विचारले, की 'हुंडा काय घेणार?' शास्त्रीजी चटकन उत्तरले. 'एक चरखा व खादीच्या सुताची लडी, एवढे दिले की पुरे.'

त्यांच्या या उत्तराने वधूपक्षाची मंडळी आश्चर्यचकित झाली. 'अहो! अधिक काहीतरी मागा ना!' असा त्यांच्या जवळच्या मंडळींनी आग्रह चालवला. तेव्हा शास्त्रीजी उत्तरले. 'या दोन वस्तू आणि मुलगी यांच्या खेरीज मला काही नको आणि बळेच देणार असाल, तर हा मी निघालो.'

लोकांनी त्यांना थोपवून धरले आणि मग त्यांचे लग्न झाले. ललितादेवींच्या रूपाने एक महान पतिव्रता शास्त्रीजींच्या घरात आली. शास्त्रीजींच्या विशाल जीवनात त्यांनी आपले जीवन विलीन करून टाकले. शिवाची अनन्य उपासना आणि पतीची एकनिष्ठ सेवा यांत त्यांनी आपला देह झिजवला.

मार्च १९३० मध्ये म. गांधींनी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली आणि लवकरच त्यांनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला. सर्व देशभर त्या चळवळीचा वणवा पेटला. अलाहाबाद येथील या चळवळीचे नेतृत्व शास्त्रीजींनी स्वीकारले. लगेच त्यांना अटक होऊन अडीच वर्षांची सजा देण्यात आली. इ. स. १९३० पासून १९४७ पर्यंत सात वेळा त्यांना शिक्षा झाल्या आणि नऊ वर्षे त्यांनी तुरुंगात काढली. तुरुंगातच कांट, हेगेल, लास्की, रसेल व हक्सले यांच्या ग्रंथांचे त्यांनी परिशीलन केले. मादाम क्यूरी यांच्या चरित्राचा त्यांच्यावर विशेष प्रभाव पडला. त्यांनी त्या चरित्राचा हिंदी अनुवादही करून टाकला.

नैनीच्या तुरुंगात असता त्यांची मुलगी अतिशय आजारी पडली. शास्त्रीजींना तिच्या भेटीसाठी सशर्त परवानगी मिळत होती. मात्र त्यांनी परत जेलमध्ये येण्याबद्दल लेखी हमीपत्र द्यायला हवे होते. शास्त्रीजींनी त्या गोष्टीला साफ नकार दिला. अखेर वरिष्ठ पातळीवर 'भवति न भवति' होऊन त्यांना हमी-पत्राविना तुरुंगाबाहेर जाण्याची परवानगी मिळाली. पण या प्रकरणी बराच कालापव्यय झाला होता. ते ज्या दिवशी घरी पोचले त्याच दिवशी त्यांची कन्या इहलोक सोडून गेली. दुसरा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

प्रसंग मुलाच्या आजारीपणाचा. मुलाला विषमज्वर झाला होता. त्या वेळी मात्र एका आठवड्याच्या मुदतीसाठी हमीपत्र न घेता त्यांची मुक्तता करण्यात आली. ज्या दिवशी मुदत भरली, त्या दिवशी मुलाचा ताप खूप वाढला. 'बाबा, जाऊ नका' असा त्याने आक्रोश मांडला. पण शास्त्रीजींनी मन घट्ट केले आणि तुरुंगाची वाट धरली. हरिश्चंद्राच्या सत्त्वाला ते जागले.

दि. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईला अखिल भारतीय काँग्रेसची सभा भरली होती. त्या बैठकीत 'भारत छोडो' हा क्रांतिकारक ठराव मंजूर झाला. अधिवेशन संपल्यावर शास्त्रीजी अलाहाबादला जायला निघाले. मात्र त्यांनी या वेळी काही काळ भूमिगत राहून संघटना बलिष्ठ करण्याचे ठरवले. पण त्यांच्या भोवतीही पाश आवळले जात होते. हे जाणून एके दिवशी ते प्रगट झाले आणि 'छोडो भारत'च्या घोषणा देऊन इंग्रज सरकारचे बंदी झाले.

इ. स. १९३३ साली संयुक्त प्रांतातील शेतजमिनीची पाहणी करण्यासाठी तिथल्या प्रदेश काँग्रेसने शास्त्रीजींच्या प्रमुखत्वाखाली एक समिती नेमली. शास्त्रीजींनी सदर विषयासंबंधीचे सर्व उपलब्ध वाङ्मय वाचले. या समितीचा जो अहवाल बाहेर पडला, त्यामुळे काँग्रेसचे पुढारीच नव्हेत, तर सरकारी अधिकारीही आश्चर्यचकित झाले. हा अहवाल इतका परिपूर्ण व उपयुक्त होता, की १९३७ साली ज्या वेळी काँग्रेसने अधिकारग्रहण केले, त्या वेळी या अहवालाच्या आधारेच तिने भूविषयक कायदा केला.

काँग्रेसच्या या मंत्रिमंडळात शास्त्रीजींनाही स्थान मिळाले होते. इ. स. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाले आणि काँग्रेस मंत्रिमंडळाने राजिनामे दिले. इ. स. १९४५ साली हे महायुद्ध संपले आणि पुनः निवडणुका घेण्याची वेळ आली. काँग्रेसने या निवडणुका लढवायचे ठरवले. या कामात शास्त्रीजींनी आपल्या संघटनाचातुर्याची प्रचीती आणून दिली. त्यांच्या चौफेर प्रयत्नांनी काँग्रेसला निवडणुकीत घवघवीत यश मिळाले. पं. गोविंद वल्लभपंत हे संयुक्त प्रांताचे मुख्य मंत्री होताच त्यांनी शास्त्रीजींना आपल्या मंत्रिमंडळात घेतले आणि पोलिस व दळणवळण ही खाती त्यांच्याकडे सोपवली. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या निवडणुकीची जबाबदारीही शास्त्रीजींवर येऊन पडली. निवडणूक जिंकल्यावर संसदेचे अधिवेशन भरले, त्या वेळी कार्यकर्त्यांच्या आग्रहावरून ते राज्यसभेच्या निवडणुकीला उभे राहिले. नेहरूंच्या मंत्रिमंडळात रेल्वे व वाहतूक मंत्री म्हणून त्यांची नियुक्ती झाली.

इ. स. १९५६ साली ते रेल्वेमंत्री असताना दक्षिण भारतातील ऐय्यालूर येथे रेल्वेचा एक मोठा अपघात झाला. त्यात १४४ लोक ठार झाले. या अपघाताची जबाबदारी मंत्री या नात्याने शास्त्रीजींनी स्वीकारली. केवळ शिस्तीसाठी व पुढच्यांना आदर्श घालून देण्यासाठी त्यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजिनामा दिला.



लालबहादुर शास्त्री

इ. स. १९६१ साली पं. पंतांचे निधन झाल्यावर शास्त्रीजींच्याकडे गृहमंत्रिपद ओघानेच आले. त्याच साली आसामात भाषेच्या प्रश्नावरून दंगली सुरू झाल्या. शास्त्रीजींच्या पुढे मोठीच समस्या निर्माण झाली. पण मोठ्या कौशल्याने सर्व पक्षांचे समाधान करून त्यांनी शांतता प्रस्थापित केली. त्याच वर्षी मास्टर तारासिंगांनी अकाली चळवळ सुरू केली. त्यांना स्वतंत्र पंजाबी सुभा म्हणजे शिखांचे राज्य हवे होते. ही चळवळ तीव्र करण्यासाठी तारासिंगांनी सभा, मोर्चे व निदर्शने सुरू केली. अखेरीस ते प्राणांतिक उपोषणास बसले. या प्रकरणाला मात्र शास्त्रीजींनी खंबीरपणे तोंड दिले. तारासिंगांच्या उपोषणाला त्यांनी भीक घातली नाही. चाळीस दिवसानंतर कोणतेही आश्वासन न मिळवता तारासिंगांना उपोषण सोडावे लागले. अकाली लोकांतही फूट पडली. संत फत्तेसिंगांचा नवा गट पुढे आला आणि त्याने तारासिंगांचे नेतृत्व झुगारून दिले. अशा प्रकारे शास्त्री-

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...या पोलादी निर्धारामुळे अकाली चळवळ थंडावली.

सरकारच्या कारभारात इंग्रजीऐवजी हिंदीचा वापर व्हावा, ... दाक्षिणात्यांना मंजूर नव्हते. कारण त्यामुळे त्यांच्या प्रगतीला ...बंद बसला असता. त्यांची ही तक्रार रास्त होती म्हणूनच ...स्त्रीजींनी ती निःसंकोच मान्य केली. मात्र या भाषिक वादा-...तून सुरू झालेल्या द्रविड मुन्नेत्र कळघम या चळवळीला त्यांनी ...खंबरपणे तोंड दिले. कळघमची चळवळ राष्ट्रविरोधी आणि ...फुटीरपणाची आहे, हे कळल्यावर त्या चळवळीचे नेते श्री. अण्णा ...दुराई यांना त्यांनी स्पष्टपणे बजावले, की 'तुमच्या राष्ट्रविरोधी ...चळवळीची कधीही गय केली जाणार नाही.'

...त्याच काळात नेपाळ पाकिस्तानकडे किंवा चीनकडे झुकतो ...की काय अशी शंका येऊ लागली होती. असे काही घडू नये ...म्हणून १९६३ मध्ये शास्त्रीजींनी नेपाळयात्रा केली. त्यांनी ...तेथल्या नेत्यांशी मित्रत्वाची बोलणी करून व त्यांना विश्वा-...सात घेऊन सांगितले, की 'तुमच्याकडून भारताला मैत्रीहून ...कशाचीही अपेक्षा नाही.'

...इ. १९६३ साली देशात कामराजयोजना अंमलात आली. ...तेव्हा शास्त्रीजी आणि इतर पाचजणांनी आपले राजिनामे ...नेहरूंकडे सादर केले. त्यानंतर शास्त्रीजींनी काँग्रेससंघटनेच्या ...कामाला स्वतःला वाहून घ्यायचे ठरविले; पण थोड्याच दिवसांत ...नेहरूंनी शास्त्रीजींना परत आपल्या मंत्रिमंडळात बिनखात्याचे ...मंत्री म्हणून घेतले. दि. २६ डिसेंबर १९६३ रोजी शास्त्रीजींच्या ...कसोटीचा एक महान प्रसंग उभा राहिला. श्रीनगर येथील ...हजरतबाल मशिदीतून महंमद पैगंबर यांचा केस चोरीला गेला. ...त्यामुळे काश्मिरात सर्वत्र खळबळ माजली. पाकिस्तानचे बगल-...बच्चे शेख अब्दुलांचे पक्षपाती आणि बक्षी गुलाम महंमद यांच्या ...गटाचे विरोधक यांनी या प्रकरणी गदारोळ उठवला. त्यांनी ...परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी एक कृतिसमिती स्थापली. बक्षींचे ...मंत्रिमंडळ उखडून टाकणे, शेख अब्दुल्लांची मुक्तता करणे आणि ...काश्मिरात सार्वमताची मागणी करणे, असे तिहेरी उद्दिष्ट त्या ...समितीचे होते. पण शास्त्रीजींचे घटना हाताळण्याचे कौशल्य ...व भारत सरकारच्या गुप्तचर खात्याचा शोध यामुळे अवघ्या ...दिवसांत तो पवित्र केस सापडला. ज्यांनी चोरला होता, ...त्यांनीच तो परत मूळच्या जागेवर नेऊन ठेवला. शास्त्रीजींनी ...तेथले मुख्य मोलवी व पीर मिळून सतरा जणांना तो केस ...दाखवला. त्या धर्मप्रमुखांनी तो लक्षपूर्वक पाहून केस अस्सल ...असल्याचा निर्णय दिला. हा निर्णय जाहीर होताच सर्वांचे ...समाधान झाले व भारतसरकारची प्रतिष्ठाही वाढली. हे प्रकरण ...यशस्वीपणे तडीस नेऊन शास्त्रीजींनी काश्मिरी जनतेचे प्रेम व ...विश्वास संपादन केला.

दि. २७ मे १९६४ या दिवशी पं. जवाहरलाल नेहरू इह-लोक सोडून गेले. पंतप्रधानपद ही पहिल्या प्रतीची सत्तेची जागा. ते पद आपल्याला मिळावे या अपेक्षेने खटपट व कारवाया करणारे बरेच मातबर पुढारी काँग्रेसमध्ये होते. पण काँग्रेसचे अध्यक्ष श्री. कामराज यांच्या डोळ्यांपुढे मात्र शास्त्रीजीच एकटे होते. त्यांनी अनेक पुढाऱ्यांच्या गाठी-भेटी घेतल्या व त्यांच्याशी चर्चा केल्या. त्या कामी त्यांनी जिवाचे रान केले. अखेर कामराजांच्या प्रयत्नांना यश येऊन भारताच्या पंतप्रधानपदी शास्त्रीजींची बिनविरोध निवड झाली. दि. ११ जुलै १९६४ रोजी आकाशवाणीवरून भाषण करून पंतप्रधान शास्त्रीजींनी आपले अंतःकरण जनतेपुढे खुले केले. आपल्यापुढे असलेल्या अनेक समस्यांचा ऊहापोह करून शेवटी ते म्हणाले –

माझ्यापुढे असलेले प्रचंड काम आणि माझ्या देशातील जन-तेच्या सेवेची मजवर पडलेली जबाबदारी यांची मला पुरेपूर जाणीव आहे. सौजन्य आणि माझ्या देशबांधवांबद्दल मला वाटत असलेले प्रेम व आदर यांमुळेच मी हे करू शकेन, असा मला विश्वास वाटतो. माझ्या शक्त्यनुसार मी सेवा करीन. आपल्या दिवंगत नेत्याची स्मृती सदैव ताजी राहील. गांधीजींनी सुरू केलेले युग जवाहरलालजींबरोबर संपले. त्यांनी घातलेल्या पाया-वर आपल्याला मंदिर उभारायचे आहे. चला, आपण कामाला लागू या. स्वतंत्र, वैभवसंपन्न आणि सुदृढ असा भारत, तसेच शांत आणि युद्धविरहित जग हीच गांधीजी आणि जवाहरलाल यांची उचित अशी स्मारके होतील.

इ. स. १९६५ च्या एप्रिलमध्ये कच्छमधील छाड बेटावर पाकिस्तानने हल्ला करून भारतावरील आक्रमणाची नांदी केली. त्या सालच्या ऑगस्ट महिन्यात पाकिस्तानने प्रथम काश्मीर-मध्ये छुपे हल्लेखोर घुसवले. पाकिस्तानचे असे अनेक अपराध आजवर भारताने पोटात घातले होते. जागतिक शांतता धोक्यात येऊ नये, शेजारी राष्ट्रांमध्ये मैत्री टिकावी, वाढावी आणि उभय राष्ट्रांमधले प्रश्न वाटाघाटींनी व समजूतदारपणाने सोडवले जावे, अशा उदात्त हेतूने भारताने वेळोवेळी पाकिस्तानची गय केली होती. पण भारताचा संयम हे भारताचे दौर्बल्य आहे, अशी कल्पना करून घेऊन पाकिस्तानचे अध्यक्ष श्री. आयुबखान यांनी भारताविरुद्ध सरळ सरळ युद्धच पुकारले. पाकिस्तानचे हे आव्हान शास्त्रीजींनी स्वीकारले. त्यावेळी राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणात शास्त्रीजी म्हणाले –

भारतावर हे युद्ध पाकिस्तानने लादले आहे. भारताच्या भूमीवर आक्रमण करणाऱ्यांपासून भारताचे स्वातंत्र्यरक्षण करण्यासाठीच नाइलाजाने भारताला युद्ध करावे लागत आहे. आक्रमक पाकिस्तान आहे. भारत त्याचा प्रतिकार करीत आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वास्तविक पाकिस्तानच्या जनतेशी भारताचे काहीच वैर नाही. तिची भरभराट व्हावी व तिने शांतिपूर्ण जीवन जगावे, अशीच एक शेजारी म्हणून भारताची इच्छा आहे. पण पाकिस्तानचे राज्यकर्ते युद्धाच्या खुमखुमीने भारलेले आहेत. भारत आपल्या आक्रमकांचा बीमोड केल्याशिवाय राहणार नाही.

शास्त्रीजींच्या या बाणेदार व आत्मप्रत्ययी भाषणामुळे सर्व राष्ट्रात नवचैतन्य संचरले. आपले सर्व भेद विसरून सारी भारतीय जनता देशरक्षणासाठी सिद्ध झाली. सारे राष्ट्र एकात्मतेच्या भावनेने उजळून निघाले. सत्ता आणि जनता भारतीय जवानांच्या मागे विजयाच्या निर्धाराने उभी ठाकली. आपल्या जवानांनीही पराक्रमाची शर्थ केली. त्यांनी पाकिस्तानच्या ताब्यातली अनेक ठाणी काबीज केली. लाहोरवरही मोर्चे लावले. शत्रूचा दारूगोळा व शस्त्रास्त्रांचा भला मोठा साठा हस्तगत केला. पाकिस्तानची अनेक विमाने पाडली. विमानतळ नष्ट केले. त्यांच्या महाप्रचंड रणगाड्यांचाही धुव्वा उडवला. अखेर शत्रू गर्भगळित होऊन पळाला. भारताने लढाई जिंकली. भारतीय जनतेने या विजयाचे श्रेय शास्त्रीजींना बहाल केले. शास्त्रीजी भारताचे कंठमणी ठरले. शास्त्रीजी सत्तेच्या सिंहासनावर होतेच; पण आता ते जनतेच्या हृदयसिंहासनावर आरूढ झाले.

त्यानंतर भारत व पाकिस्तान यांच्यामध्ये शांततेचा करार झाला. हा करार करून शास्त्रीजींनी भारताच्या स्वातंत्र्याला आणि स्वाभिमानाला उणेपणा न आणता आपल्या राष्ट्राच्या शांततावादी परराष्ट्र धोरणाची साऱ्या जगाला ग्वाही दिली. त्यामुळे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचा एक श्रेष्ठ मुत्सद्दी म्हणून शास्त्रीजींचे नाव जगभर गाजले. दि. १० जानेवारी १९६६ रोजी ताश्कंद येथे सोव्हिएट युनियनचे पंतप्रधान श्री. कोसिजिन यांच्या साक्षीने शास्त्रीजी व आयुबखान यांनी शांतता करारावर सह्या केल्या. एक उद्दिष्ट सफल झाले, या समाधानात ते ताश्कंद येथील आपल्या निवास स्थानी आले.

तोवर त्यांची प्रकृती ठीक होती. त्या रात्री दूरध्वनीवरून आपण उद्या दिल्लीत येत असल्याचे त्यांनी घरच्या लोकांना कळविले. पण त्यानंतर थोड्याच वेळात त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. यापूर्वी दोन झटके येऊन गेले होते व आताचा हा तिसरा होता. ते लगेच बेशुद्ध झाले. नामांकित डॉक्टरांनी त्यांच्यावर तऱ्हेतऱ्हेचे उपचार केले; पण शास्त्रीजींच्या आयुष्याची दोरी तुटली होती. त्या बेशुद्धीतच त्यांचे प्राणोत्क्रमण झाले. तो अशुभ दिवस ११ जानेवारी १९६६ हा होता. भारताला बसलेला हा जबरदस्त तडाखा होता.

त्यांचे शव विमानाने दिल्लीस आणण्यात आले. लाखो लोकांनी त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांना भारतरत्न हा किताब देऊन त्यांचा मरणोत्तर सन्मान केला.

शास्त्रीजींचे गुणविशेष – शास्त्रीजींचे मन फुलासारखे कोमल होते, पण प्रसंगी ते वज्राहूनही कठीण होई. इ. स. १९६३ सालपर्यंत दिल्लीत असणारे अमेरिकेचे भारतातील वकील प्रो. गालब्रेथ म्हणतात – शास्त्रींच्या चेहऱ्यावर जितका कणखरपणा दिसतो, त्यापेक्षा कितीतरी पटीने त्यांचे मन कणखर आहे. प्रत्येक गोष्टीचा साधक-बाधक विचार करून त्याप्रमाणे ते निर्णय ठरवितात आणि एकदा निर्णय ठरला म्हणजे ती काळ्या दगडावरची रेघ. म्हणूनच तर त्यांच्यावर इतरांचा विश्वास आहे.

ते कोणत्याही प्रश्नाच्या मुळाशी जाऊन नि:पक्षपातीपणे विचार करीत. मृदुता आणि नम्रता हे गुण सहसा राजकारणी लोकांत आढळत नाहीत; पण शास्त्रीजींजवळ ते अभिजात होते. त्यांची राजकीय निदाने अचूक असत. आणि कोणत्याही प्रश्नातला गुंता ते लगेच सोडवू शकत. श्री. पुरुषोत्तमदास टंडन एकदा त्यांच्याबद्दल म्हणाले होते. ' मूल्यमापन करणे, अडचणीतून मार्ग काढणे व समेट घडवून आणणे यांत शास्त्रीजींचा हातखंडा आहे. या गोष्टी ते मृदुतेने पार पाडतात. पण त्यांच्या या मार्दवामागे खंबीरपणाचा पहाड उभा आहे हे विसरून चालणार नाही.'

पं. नेहरूंनी त्यांच्याविषयी पुढील गौरवोद्गार काढले आहेत –

सरकारातच नव्हे तर कॉंग्रेस संघटनेतही मला लालबहादुरांचे सहकार्य व मदत मिळाली हे मी माझे भाग्य समजतो. कोणत्याही कार्यात त्यांच्यापेक्षा अधिक लायक स्नेही किंवा सहकारी मिळणार नाही. निष्ठा, ध्येयवाद, चिकाटी, सदसद्विवेकबुद्धी आणि कष्टाळूपणा हे त्यांचे गुण असीम आहेत. त्यांच्यापेक्षा अधिक चांगला माणूस मिळणारच नाही. आपल्याला नेमून दिलेल्या कामात कसलीही चूक झाली तरी त्याची खंत वाटण्याइतकी सदसद्विवेक बुद्धी त्यांच्याजवळ आहे. मला त्यांच्याबद्दल अतीव आदर आहे.

त्यांच्या नि:स्वार्थवृत्तीबद्दल तर कितीतरी गोष्टी सांगता येतील. ते दरिद्री होते; पण दारिद्र्याची त्यांना खंत नव्हती. म. गांधींच्या अनुयायांत खरा दरिद्रीनारायण एकच होता आणि तो म्हणजे लालबहादुर शास्त्री. मरणाच्या वेळी ते अकिंचन होते. कुठल्याही बँकेत त्यांचे खाते नव्हते. त्यांच्या मालकीचा बोटभर जमिनीचा तुकडाही पृथ्वीवर कुठे नव्हता. त्यांच्या मालकीचे घरही नव्हते. एका काळचा हा उत्तर प्रदेशाचा गृहमंत्री जन्मभर गृहहीनच राहिला. मृत्यूपूर्वी ते लाला लजपतरायांच्या सर्व्हंट्स ऑफ् दि पीपल सोसायटीचे अध्यक्ष होते. ज्या वेळी ते मंत्री नसत, त्या वेळी त्यांना त्या संस्थेकडून महिना अडीचशे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

... निर्वाहवेतन मिळे आणि जेव्हा ते मंत्री होत, तेव्हा त्या ...कडून घेतलेल्या रकमेची ते परतफेड करीत.

...शास्त्रीजी पूर्ण शाकाहारी होते. मद्यपान आणि धूम्रपान ...नी कधी केले नाही. त्यांना चहा मात्र फार आवडायचा. १९५६ साली ज्या दिवशी त्यांनी रेल्वेमंत्रिपदाचा राजीनामा ...ला, त्या दिवशी ते सरकारी मोटारीतून घरी परत न येता ...लगून आले. घरी आल्यावर त्यांनी ललितादेवींना सांगितले. ...उद्यापासून आपल्या घरात एकच भाजी करायची!' पंतप्रधान ...म्हणून निवड झाली त्या दिवशी ते एका लहानशा खोलीत ...लहान्या-मोठ्यांच्या घोळक्यात झोपले होते. सकाळी ते लवकर ...उठले. त्यांनी थंड पाण्याने आंघोळ केली आणि नंतर ते शपथ-...विधीसाठी राष्ट्रपतिभवनात गेले.

...भारतीय परंपरेचा पंतप्रधान – आपल्या वर्तनाने, चरित्राने ...व चारित्र्याने शास्त्रीजींनी भारतीय परंपरा समृद्ध केली. ...सामान्य माणसाच्या मनाला शास्त्रीजींचे जे आकर्षण वाटले ते ...त्यांच्या वागण्यातील, विचारातील आणि वृत्तीतील भारतीय-...त्वामुळे होते. सर्वसामान्य भारतीय नागरिकाच्या गुण-दोषांशी ...त्यांचे जातक उत्तम प्रकारे जमून जाई. त्यांचे साधेपण ...व त्यांचे साधुत्व ही दोन्ही भारतीय परंपरेला साजेशीच ...होती. बोलणे मोजके व करणे नेमके, यामुळे त्यांच्याविषयी ...जनतेला असीम आदर वाटे. गंभीर चिंतन हा भारतीय ऋषींचा ...गुण त्यांच्या ठिकाणी प्रकर्षाने दिसे. भारतीय जनतेशीच ...नव्हे तर भारताच्या शेजारच्या राष्ट्रांशी वागतानाही त्यांनी ...भारतीय परंपरा सोडली नाही. परदेशात गेल्यावेळीही ...त्यांनी आपल्या जीवनपद्धतीत बदल केला नाही. परदेशातही ...त्यांनी पाश्चात्य पेहराव अंगावर चढवला नाही. जे आपले ...आहे, जे चांगले आहे, जे आपल्याला जमते, योग्य वाटते, ते ...कधीही केव्हाही त्यागू नये, असा शास्त्रीजींचा बाणा होता. ...त्यांच्या या भारतीय परंपरा टिकवून धरण्याच्या वृत्तीबद्दल ...लेखक असे लिहितात–

...शस्त्राने देश जिंकण्यापेक्षा स्नेहभावनेने जग जिंकणे परिणामी ...श्रेष्ठ असते, याची जाणीव त्यांना होती. भारतीय परंपरेमध्ये ...चिरकालीन द्वेषाची भावना बसणारी नसून, शत्रूलाही मित्र करून ...घेण्याच्या वृत्तीलाच तीत मान आहे. पाकिस्तानबरोबर लढाई ...करून त्याला व सर्व जगाला भारताच्या लष्करी सामर्थ्याची ...व उज्ज्वल शौर्याची चुणूक दाखवून दिल्यानंतर शास्त्रीजींनी ...ताश्कंद येथे जाऊन प्राणपणाने प्रयत्न करून ताश्कंद-करार केला, ...याचे कारण हेच आहे. शस्त्राचा जरूर तेथे आणि तेवढा वापर ...करून शत्रू पराभूत झाला, की भारतीय परंपरेप्रमाणे शत्रुत्व संपते. ...शास्त्रीजींनी जो ताश्कंद – विजय मिळवला, तो त्यांचा भारतीय परंपरा समृद्ध करण्याचा सर्वांत तेजस्वी प्रयत्न होय.

जय जवान, जय किसान – भारतातल्या एकेका महापुरुषाच्या लहानश्या घोषणेने या देशातील कोट्यवधी लोकांच्या जीवनात क्रांती घडवून आणलेली आहे. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे; आणि तो मी मिळवीनच!' ही लो. टिळकांची घोषणा. तिने ब्रिटिशांच्या साम्राज्यसत्तेला जबरदस्त हादरा दिला. त्यानंतर 'छोडो भारत' ही म. गांधींची घोषणा. या घोषणेने भारताचे स्वातंत्र्य जवळ आणले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांची 'चलो दिल्ली' ही क्रांतिकारक घोषणा. त्या घोषणेने गांधीजींच्या 'छोडो भारत' या घोषणेला तुफानी सामर्थ्य मिळवून दिले. स्वातंत्र्याच्या काळात 'आराम हराम है' ही पं. जवाहरलाल नेहरू यांची घोषणा. या घोषणेने स्वातंत्र्य सुदृढ करण्यासाठी लोकांनी झटून काम करायला हवे, ही प्रेरणा दिली. आणि नेहरूंच्या पाठीमागून आलेल्या शास्त्रीजींनी घोषणा दिली, ती 'जय जवान, जय किसान!' भारताच्या उद्धाराची आणि संरक्षणाची ही अमर घोषणा आहे. त्याबद्दल शास्त्रीजींच्या द्रष्टेपणाचे आणि प्रतिभेचे जेवढे कौतुक करावे, तेवढे थोडेच आहे.

या घोषणेतला जय जवान हा भाग भारताच्या स्वातंत्र्याचे प्राणपणाने रक्षण करणाऱ्या जवानाचे महत्त्व सूचित करतो. देशाचे स्वातंत्र्य अबाधित ठेवायचे तर लक्षावधी शूर, वीर आणि देशभक्त जवानांची लढाऊ आघाडी सदैव सिद्ध ठेवायला हवी. देशाच्या संरक्षणाइतकाच अन्नधान्यनिर्मितीचा प्रश्नही राष्ट्रीय महत्त्वाचा आहे. अन्नधान्याच्या दृष्टीने स्वयंपूर्ण, स्वावलंबी आणि समृद्ध झाल्याखेरीज भारताचा जगात निभाव लागणार नाही व त्याची मान ताठ राहणार नाही. म्हणूनच जय जवान बरोबरच जय किसान ही घोषणाही तितक्याच जिद्दीने अंमलात आणली गेली पाहिजे. देशाचे रक्षण जवानांनी करायचे आणि देशाचे पोषण किसानांनी करायचे. याचा अर्थ जवानांच्या पराक्रमाला किसानांच्या श्रमांची जोड मिळणे अत्यावश्यक आहे.

राष्ट्राच्या स्वातंत्र्यरक्षणाचे आणि लोकपोषणाचे हे महान रहस्य शास्त्रीजींनी प्रथम ओळखले आणि म्हणूनच त्यांनी 'जय जवान, जय किसान' हा राष्ट्रोद्धाराचा महामंत्र देऊन नव्या युगाचे रणशिंग फुंकले. [लालबहादुर शास्त्री – श्री. दि. रा. मंकेकर, १९६९; श्री. राजा मंगळवेढेकर, १९६७ व श्री. महावीर अधिकारी, १९६७; इतका लहान, एवढा महान – आचार्य प्र. के. अत्रे व विनायक भावे, १९६६]

लालाबाबू

(इ. स. च्या १९ व्या शतकाचा पूर्वार्ध) व्रजमंडलातला एक महान भक्त आणि मोठा दाता. कृष्णचंद्र सिंह हे त्याचे नाव असून, तो कायस्थ होता. हा मूळचा

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बंगालमधील मोठा जमीनदार होता. ऐन तारुण्यात त्याच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले आणि तो आपले गाव सोडून व्रजमंडलात वास्तव्याला आला. इथे तो भिक्षा मागून आपला निर्वाह करीत असे. त्या वेळी व्रजमंडलात कृष्णदास नावाचा एक प्रसिद्ध साधू होता. तो सिद्धबाबा म्हणून ओळखला जाई. लालाबाबूने त्याच्याकडून दीक्षा घेतली आणि तो गुरुसेवेसाठी गोवर्धनात राहू लागला.

लालाबाबूने वडिलोपार्जित धनापैकी सुमारे २५ लाख रुपये खर्च करून वृंदावनात एक कृष्णमंदिर बांधले. हे मंदिर लालाबाबूचे मंदिर म्हणून आजही प्रसिद्ध आहे. त्याचप्रमाणे त्याने अनेक धर्मशाळा बांधल्या, अन्नछत्रे सुरू केली, राधाकुंडाला पक्के घाट बांधले आणि अनेक जमिनी खरेदी करून त्यांचे उत्पन्न मंदिराच्या व्यवस्थेसाठी लावून दिले.

गोवर्धनात एका घोड्याची टाच लागून या भक्ताचा मृत्यू झाला. त्याच्या अंतिम इच्छेनुसार त्याचे शव वृंदावनात आणून यमुनेत सोडून देण्यात आले. [ब्र. सां. इ.]

लाव पिशाचयोनीतील एक स्त्रीरूप. लाव स्मशानात राहते व मृत माणसांची आतडी खाते; ती मांजर, कुत्री व शेळी या स्वरूपात हिंडते व एकदम स्त्रीरूप घेऊन मुलांना भेडसावते, अशी समजूत आहे. लावेची बाधा झाली, असे समजल्यावर मांत्रिकाकडून तिच्यावर उपचार करून घेतात. काही लोक लावेला जलदेवता मानतात. [दे. को. ३]

लावणी गायनानुकूल गीतरचनेचा एक प्रकार. लावणी या शब्दाच्या व्युत्पत्तीविषयी अनेक मतामतांतरे आहेत. लावणी म्हणजे एक प्रकारचे ग्राम्यगीत असा अर्थ व्युत्पत्तिकोशात दिला आहे. यात ग्राम्य या शब्दाने लावणीतल्या शृंगारप्राधान्याकडे लक्ष वेधले आहे. तथापि, लावणी ही केवळ शृंगारप्रधानच असते असे नाही. पुष्कळ वेळा ती अध्यात्मपरही असते. त्यामुळे व्युत्पत्तिकोशातले मत सर्वमान्य होणारे नाही.

डॉ. म. वा. धोंड यांनी लावणीची एक सर्वसमावेशक व्याख्या बनवली आहे, ती अशी – 'सर्वसामान्य जनांच्या मनोरंजनाकरिता त्यांना रुचतील अशा लौकिक, पौराणिक किंवा आध्यात्मिक विषयांवर रचलेली, कडे किंवा ढोलकी यांच्या तालावर विशिष्ट ढंगाने म्हटली जाणारी, खटकेबाज व सफाईदार पद्मावर्तनी अथवा भृंगावर्तनी जातिरचना म्हणजे लावणी.'

हृदयाला चटका लावते, ती लावणी असे अ. ब. कोल्हटकर म्हणतात. शेतात लावणी करताना म्हटले जाते त्या गीताचे नाव लावणी, अशी एक व्युत्पत्ती सांगितली जाते. परंतु डॉ. धोंड यांना ती मान्य नाही. त्यांचे म्हणणे शेतात लावणी करताना या स्वरूपाचे गीत गायिले जात नाही. लावणी हे लोकगीत असले, तरी कृषिगीत खासच नाही. श्रीमती दुर्गा भागवत मात्र त्यांच्या या मताशी सहमत नाहीत, त्या म्हणतात –

लोकसाहित्यात समाविष्ट झालेला हा लावणीचा घाट उपलब्ध असलेल्या लावणीच्या घाटात सर्वांत जुना वाटतो. लावणीचा हा प्रकार मला कोकणातल्या रत्नागिरी विभागातल्या महारांत आढळला. वास्तविक या लावण्यांचे प्रयोजन भौतिक मनोरंजनाचे नव्हे. शेतात लावणी, कापणी वगैरे कार्ये होतात, त्या प्रसंगी या म्हणण्यात येतात. लावणी हा शब्द शेतातल्या लावणीच्या क्रियेशी श्लेष साधतो, हे विसरून चालणार नाही.

श्री गो. कृ. मोडक यांच्या मते लवण म्हणजे सुंदर आणि त्यावरून लावण्य या भाववाचक नामाप्रमाणे लावणी हेही सौंदर्य या अर्थी भाववाचक नाम संभवते. लावणीत सौंदर्याचे, विशेषतः स्त्रीसौंदर्याचे वर्णन असल्यामुळे तिला सौंदर्य या अर्थी लावणी हे नाव दिले असावे.

श्री. भ. श्री. पंडित यांच्या मते लावणीचा उद्गम हिंदी भाषेतून झाला असावा. ते म्हणतात – शाहीर, इश्क, तमाशा, लावणी हे शब्द मराठी नाहीत. हिंदीतही लावणी हा काव्यप्रकार असून, तो मराठीप्रमाणेच शृंगारिक आहे. ताटकाप्रमाणे ३० मात्रांचा हा छंद असून, १६ व १४ वर विराम आहेत. मराठीप्रमाणेच क्वचित गुरुवर्णाचा लघू व लघूचा गुरू उच्चार करावा लागतो. त्यामुळे लावणी हा काव्यप्रकार हिंदीतून आला असेच म्हटले पाहिजे.

लावणीविषयीची ही सर्व मतमतांतरे विचारात घेऊनही या गीतप्रकाराचे नाव लावणी कसे पडले, हा प्रश्न उरतोच. श्री. धोंड या प्रश्नाचे उत्तर देतात, ते असे – लावणी हा काव्यप्रकार शुद्ध मराठी मानला म्हणजे लावणी या शब्दाची शुद्ध मराठी व्युत्पत्ती सुचविता येते. लावणे या क्रियापदाचे मांडणी करणे, रचना करणे असे अर्थ रूढ आहेत. उदा० पुस्तके लावणी म्हणजे पुस्तके व्यवस्थित रचली. या लावले क्रियापदापासून रचना या अर्थी लावणी हे नाम सहजच सिद्ध होते. लावणीवाङ्मय उत्पन्न होण्यापूर्वीपासूनच रचना या अर्थी लावणी हा शब्द रूढ असावा आणि त्याच अर्थी लावणीकारांनी आपल्या काव्याचे वैशिष्ट्य दाखविण्यासाठी तो योजिला असावा. शोभिवंत किंवा सुभग रचना याच अर्थाने शाहिरांनी आपल्या काव्यास लावणी हा शब्द योजिला असावा, या तर्कास लावण्यांच्या वाचनाने बळकटी येते. आपल्या काव्याबद्दल गौरवाचे उद्गार काढताना प्रत्येक शाहिराने जर आपल्या कोणत्या विशेष गुणांचा आत्मप्रौढीने निर्देश केला असेल, तर तो पदरचनेचा. उदा० प्रभाकर म्हणतो,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'करी जडण घडण नवे नित्य प्रभाकर खासी'; तसेच, 'प्रभा-कराची जडण घडण जणू बऱ्हाणपुरी रंगीत ठसा.' होनाजी म्हणतो, 'होनाजी बाळा गुणा आगळा कवीची जडणी.' अनंतफंदी म्हणतो, 'अनंतफंदीचे छंद जसे कटिबंद जडन नवी झनानी.' तात्पर्य लावणी म्हणजे सुरेख, नेमक्या आणि आशयघन शब्दांची गुंफण करून किंवा कलात्मक शब्दांची मांडणी करून तयार केलेले कवन.

लावणीचे मुख्य प्रकार दोन आहेत – (१) शृंगारिक व (२) भेदिक किंवा आध्यात्मिक. याशिवाय, आणखीही काही प्रकार आहेत, ते पुढीलप्रमाणे –

(१) डफ-तुणतुण्यावर म्हणायची, ती शाहिरी लावणी.

(२) तबला-पेटीच्या साथीवर नायकिणी व कलावंतिणी गुणतात, ती बैठकीची लावणी. ती रागदारीत बसवलेली असते ठुमरीच्या ढंगाने गायिली जाते. लावणीचा हा प्रकार होनाजीने सुरू केला.

(३) तमासगीरांच्या फडात म्हटली जाणारी व नाची, ...डया, इ. कलावंतांच्या नृत्याभिनयाने रंगणारी, ती तमा-...ची लावणी.

...शातली लावणी व शाहिरी लावणी ही अनेकदा सारखी ... दोन्हीकडे वाद्ये वाजवणारे आणि मागे सूर धरणारे ...-वादक असतात.

प्रो. नामदेव व्हटकर लावणीचे आणखी काही प्रकार सांग-...ते असे – (१) तमाशातील करणीवरून पडलेला, (२) ...कूल चालीवरून आलेला व (३) शब्दरचनेच्या वैशिष्ट्या-...किंवा वृत्तामुळे निर्माण झालेला.

...शातील करणीवरून आलेल्या लावणीच्या प्रकारात एक ...ा जोष आणि आवेश असतो. ही लावणी संवादात्मक ...; परंतु त्यातली प्रश्नोत्तरे ही नुसती प्रश्नोत्तरे नसतात. ... शब्दांची आणि कल्पनांची गुंफण अशा कौशल्याने केलेली ..., की लावणी सादर होत असताना एक जिवंत समरप्रसंग ...ल्याचा आनंद मिळतो. परस्परांना चीत– पराजित कर-...ा अहमहमिकेने केलेले ते एक सरळसोट भांडणच असते. ...डा किंवा सवाल-जवाब या नावाने हा प्रकार सर्वपरिचित ... यातल्या लावणीचे शब्द ठोसर-कणखर असतात, चालीत ...तरपणा असतो आणि ती सादर करण्यात एक प्रकारचा ...का किंवा ठसका असतो. वाद्येसुद्धा या वेळी गतिमानतेने व ...शाने वाजवली जातात. श्री. नामदेव व्हटकर लिहितात – ...शी कधी नुसत्या एकेका तोकड्या ओळीने झरंकन मागे पुढे ... जेव्हा हा झगडा दाखवतात, तेव्हा ढोलक्या, सुरते, गायक, ...डया व नाची यांच्यासह सवंध फडच दोन फळ्यांनी पर-स्परांशी झुंजत असल्याचे दृश्य प्रत्ययाला येते. त्यामुळे नुसती लावणी रचणे किंवा ती उत्तम प्रकारे सुरात गाणे एवढेच यशस्वी लावणीच्या संदर्भात पुरेसे नसते; तर ती साभिनय व सावेश सादर करणे हेही अगत्याचे असते. उदा०नाची सरंकन पुढे होऊन रागीटपणे म्हणते –

अरे हद्द् मागे दुष्टा,...

याच वेळी तो वेगात पुढे येऊन म्हणतो.

अग नको घेऊं कष्टा, नको घेऊं कष्टा, नारी पुरे आता चेष्टा, जाऊं दोघं थाटाऽत दूर, दूर, दूर !

चालीवरून जो लावणीचा प्रकार आला आहे, त्याचे आणखी सहा पोटप्रकार पडतात. त्यांची नावे व विवेचन पुढीलप्रमाणे – (१) वगाची, (२) बालेघाटी, (३) छक्कड, (४) जुन्नरी, (५) धावती किंवा झडती आणि (६) हौद्याची.

वगाची चाल असलेली लावणी कथाप्रधान असून, ती कथा सांगत पुढे जाते. उदा० –

कुणा देशात अमुक शहर, तिथे राज्य करी तमका नरवीर, हत्ती-घोड्यांचं लावलष्कर – सेना मोठी – पर सेनापति कपटी.

बालेघाटी लावणी दुःखाची व विरहाची भावना आळवते. छक्कड लावणी शृंगाराचा रसरंग उधळते. जुन्नरी लावणीत गद्य घाईने म्हणावे अशी धावती चाल व त्या प्रकारचे वर्णन असते. हौद्याची चाल असलेल्या लावणीत मोठमोठे गेय संवाद धुमाळीने वठवून पूर्वपक्ष-उत्तरपक्ष केले जातात.

शब्दरचनेवरून किंवा वृत्तवैशिष्ट्यावरून जो लावणीचा प्रकार सांगितला जातो, त्यात कटाव, फटका, पद, आर्या, इ. प्रकार दिसतात. फटक्याच्या लावणीत किंवा कटावाच्या लावणीत अक्षरजुळणीची गंमत दृष्टोत्पत्तीस येते. अनंतफंदीचा 'बिकट वाट वहिवाट नसावी' हा फटका त्यातल्या शब्दरचनेमुळे चटकन लक्ष वेधून घेतो. कटावात अनेक वेळा एखाद्या गोष्टीचे तपशीलवार वर्णन असते. पद, आर्या हे प्रकार शाहिरांनी कीर्तन-कारांकडून मिळवले व त्यांच्या चाली मात्र लावणीढंगाच्या बसवल्या.

गेल्या शे-दोनशे वर्षांत महाराष्ट्रात लावणी-गायनाचा अस्सल ढंग मुख्यतः महार जातीने टिकवून धरला आहे. त्याचप्रमाणे लावणीरचनेचे सातत्यही महारांनीच टिकवून ठेवले आहे

आज आपल्याला सर्वपरिचित असणारी लावणी केव्हा निर्माण झाली, हे निश्चित सांगता आले नाही, तरी तिचा परमोत्कर्ष पेशवाईच्या उत्तरार्धात झाला हे निर्विवाद होय. कारण हा काळ पूर्वीइतका धामधुमीचा नव्हता. खुद्द पेशवेच ख्यालीखुशालीत व विलासात दंग होते. त्या कालखंडात रामजोशी, होनाजी, परशराम, सगनभाऊ, प्रभाकर, अनंतफंदी यांसारखे लावणीकार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकापाठोपाठ पुढे आले आणि त्यांनी सबंध महाराष्ट्रभर शृंगाराचा रसरंग उधळून दिला. त्यांनी आपल्या लावण्यांतून केलेली स्त्रीदेहाच्या अंगप्रत्यंगाची व शृंगारक्रीडांची तपशीलवार वर्णने ऐकून समस्त मराठी जनता एक प्रकारच्या मोहनिद्रेत धुंद होऊन गेली. शृंगारवर्णनाप्रमाणेच या शाहिरांनी आपल्या लावण्यांतून तुळजापूर-पंढरपूर यांसारख्या क्षेत्रांतील यात्राजत्रांची; तसेच पुणे, कोल्हापूर, सोलापूर, इ. शहरांची; दुष्काळांची व रंगपंचमीसारख्या सणांची वर्णनेही बहारदारपणे केली.

रामजोशी, प्रभाकर, अनंतफंदी हे प्रमुख शाहीर सुसंस्कृत ब्राह्मण असले, तरी बाकीचे शाहीर फारसे न शिकलेले किंवहुना अशिक्षितच होते. एक गोष्ट मात्र खरी, की ते विद्वान नसले तरी प्रतिभावंत होते. वर्णनातला वारकावा व मांडणीतली कलात्मकता, तसेच कल्पनेची भरारी हे त्यांचे काव्यगुण श्रेष्ठ प्रकारचे होते. त्यांच्या ठायी विनोदबुद्धीही बऱ्यापैकी होती. परशराम शाहिराने आपल्या एका लावणीत लढाईवरून पळून आलेल्या एका शेंदाडशिपायाची कथा वर्णन केली आहे, ती या दृष्टीने पाहण्यासारखी आहे. अशा प्रकारे शृंगाराची लयलूट केल्यानंतर नरदेहाचे सार्थक करून घेण्याचा अध्यात्मपर उपदेशही शाहिरांनी आपल्या लावण्यांतून केला आहे व तोही विषय ठसठशीतपणे मांडून आपल्या कवित्वाचे सव्यसाचित्व सिद्ध केले आहे. शाहिरांच्या या सामर्थ्याची चुणूक दाखविणाऱ्या काही लावण्यांचे तुकडे पुढे दिले आहेत –

प्राप्त झालेल्या नरजन्माचे सार्थक करून घेण्यासाठी काय करावे, हे सांगताना रामजोशी म्हणतो –

नरजन्मामधिं नरा करुनि घे नरनारायण गडी ।
तरिच हे सार्थक मानवकुडी ॥
बा चौऱ्यांशी लक्ष वेळ संसार पडला गळां ।
चितेचा पिकला मळा ॥
दारधनाचा लोभ टाकुनी झटकन हो वेगळा ।
हा कसा उकलिशी पिळा ॥
धनानिमित्तें जनापुढें तूं दाविसि नाना कळा ।
किति तुला मुलांचा लळा ॥
तूं पडूं नको यांचे भरीं । तुझ्या हें खापर फुटतें शिरीं ।
तुला मी गोष्ट सांगतों खरी ।
आतां कर तांतडी । ही पुन्हा न ये बा घडी ।
तरिच हे सार्थक मानवकुडी ॥

स्त्रीदेहाचे तपशीलवार सौंदर्यवर्णन करणाऱ्या एका लावणीत शाहीर होनाजी म्हणतो –

गोल तुझ्या शरिराचा डौल वर गोरा रंग नौती कवळी ।
वय नूतन हातीं निऱ्या चालणे चपळ जशी नागिण सळ्ळी ।
अधरपुटीं बतीस हिरकण्या एक वळीने विराजिती ।
ओठ शुद्ध पवळ्याचा रंग नासाग्रीं पाहून रावे रिझती ।
कुच संगिन पाहून परस्परे चक्रवाक पक्षी थिजती ।
मंजुळ स्वर ऐकून कोकिळा वृक्षीं बसुन मनीं गजबजती ।
कटि पाहुन या सिंह राहुन वनीं मनी आपल्या तुज भजती ।
स्थिर गमती गज मस्तकात धूळ घालितसे पाहून घजती ।
जानुजंघ सुकुमार पोटऱ्या अति नाजुक ग कवळी ॥

पंढरीच्या पांडुरंगाचे वर्णन करताना शाहीर प्रभाकराच्या रसवंतीला कसा बहर येतो, ते पुढील कडव्यावरून कळेल –

चंद्रभागेच्या तिरीं विटेवर कटि कर ठेवुनि उभा ।
भक्तांचा कैवारि सांवळा त्रैलोक्याचा सुभा ॥
ध्वजा पताका सोडुनि साधू नाचताति देवळीं ।
चरणी रुळ करिं चिपळ्या वदती मुखानें नामावळी ।
पीत वसन कासेस कसुन वर शालजोडि पिवळी ।
तुळशिहार शुभ अपाद मिरवे तनु सुंदर कोंवळी ।
धर्माधरिं जो कांहि हाताने उच्छिष्ट पत्रावळी ।
तोच मूर्त ही विटेवर नटली घनःशाम सांवळी ॥

पेशवेकालीन लावणीकारांच्या प्रभावळीतला शेवटचा शाहीर म्हणजे प्रभाकर. त्यानंतर इंग्रजी अमदानीत निरनिराळे लावणीकार उदयाला येतच होते. शाहीर हैबती, दगडू बाबा साळी, पठ्ठे बापूराव, लहरी हैदर, इ. नावे या संदर्भात महत्त्वाची आहेत. मध्वमुनीश्वर, अमृतराय, देवनाथ, दयाळनाथ, विष्णुदास माहूरकर, इ. संतांनीही काही उत्तम अध्यात्मपर लावण्या लिहिल्या आहेत. अलिकडच्या काळात तमाशातली लावणी चित्रपटातही वाजू-गाजू लागली. त्यामुळे श्री. ग. दि. माडगूळकर, कवी संजीव, पी. सावळाराम, जगदीश खेबुडकर, इ. चित्रपटगीतकारांनीही काही सुंदर लावण्या लिहून मराठीचे लावणी भांडार समृद्ध केले आहे. 'हाय ऽ बुगडी माझी सांडली ग ऽ', 'चोळी माझी पाठीवर उसवली', इत्यादी ग. दि. माडगूळकरांच्या; 'अत्तराचा फाया तुम्ही मला आणा राया', 'दुधाचा भाव माझ्या ताकाला' या कवी संजीव यांच्या लावण्या व 'माळ्याच्या मळ्यामंदी कोण ग ऽ उभी', 'मला हो म्हणतात लवंगी मिरची' या जगदीश खेबुडकरांच्या लावण्या या दृष्टीने उल्लेखनीय आहेत. [मऱ्हाटी लावणी – श्री. म. वा. धोंड, १९५६; म. लो. त.; तं. त. शा.; होनाजी बाळाकृत लावण्या, चित्रशाळा, १९२४; म. जी. २; संचय – श्री. भ. श्री. पंडित, १९६६]

लावण्यगौरीव्रत एक काम्य व्रत. हे मासव्रत असून, याचा प्रारंभ कार्तिक वद्य प्रतिपदेपासून करावा. प्रद्युम्नाच्या मूर्तीची किंवा वस्त्रावर काढलेल्या त्याच्या चित्राची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...जा, हा या व्रताचा प्रधान विधी आहे. व्रतकालात नक्त पद्धतीने ...हावे, मार्गशीर्ष महिन्याला सुरुवात झाली, की तीन दिवस ...उपवास करावा आणि प्रद्युम्नाची पूजा व होम करावा, असेही ...सांगितले आहे. उद्यापनाच्या वेळी ब्राह्मणांना लवणयुक्त पदा-...र्थांचे भोजन घालावे. त्याव्यतिरिक्त एक प्रस्थ दळलेले मीठ, ...वस्त्रे, सुवर्ण, घंटा, इ. वस्तू ब्राह्मणाला दान द्याव्या. फल – ...सौंदर्य व स्वर्ग यांची प्राप्ती. [हि. ध.]

...लावण्यसमय (इ. स. १४६४–१५३२) गुजरात प्रदेशातला एक जैन भक्तकवी. याच्या पित्याचे ...नाव श्रीधर आणि मातेचे नाव झमकलदेवी असे होते. हा ...जातीचा श्रीमाळी होता. अजदपूर नावाच्या गावी याचा जन्म ...झाला. लघुराज हे त्याचे बालपणीचे नाव होते. मुनी समय-...रत्नाने लघुराजाची जन्मवेळ पाहून हा पुढे मोठा साधू व विद्वान ...होईल, असे त्याचे जातक वर्तविले. लघुराज आठ वर्षांचा ...झाल्यावर तपागच्छीय लक्ष्मीसागरसूरीने त्याला जिनदीक्षा ...देऊन लावण्यसमय असे त्याचे नाव ठेवले.

...सरस्वतीच्या कृपेने वयाच्या सोळाव्या वर्षापासून हा कवित्त, ...इ. छंदांत आणि विविध राग-रागिण्यांमध्ये कविता ...लागला. सिद्धांत चौपाई, नंदवत्तीसी, विमजरास, हे त्याचे ...ग्रंथ होत. याशिवाय आणखीही काही ग्रंथ त्याच्या नावा-...वर आहेत. त्याच्या काव्याची भाषा हिंदी आहे. [हिं. जैं. भ. क.]

...वरा नृत्य महाराष्ट्रातले एक लोकनृत्य. या नृत्यात भाग घेणारे लोक एकामागे एक असे ओळीने उभे ...राहतात. प्रत्येकजण पुढच्याची कंबर धरतो. मग ते नागमोडी ...पद्धतीने नाचतात. यात लावरा पक्ष्याची नक्कल असल्यामुळे ...याला लावरा नृत्य असे नाव मिळाले आहे. [भा. लो. नृ.]

...ली बगावली हिमाचल प्रदेशातले एक मोहक नृत्य. विवाह, शेताची कापणी, इ. आनंदाच्या ...प्रसंगी या नृत्याचे कार्यक्रम होतात. याला शहनाई, करताल, ...नर्रसिंगा, इ. वाद्यांची साथ असते.

...नृत्यात भाग घेणारे लोक प्रथम एक पाय पुढे टाकतात व मग ...तो पाय मागे घेतात. नंतर शरीर थोडे खालीवर करतात आणि ...गिरकी घेत वर्तुळाकार नाचतात. नृत्याची लय वाढली म्हणजे ...सगळे धुंद होऊन नाचण्याच्या बेतात येतात. [भा. लो. नृ.]

...लास्य एक नृत्यप्रकार. भाव, ताल व लय यांचा आश्रय करून होणारे नृत्य, ते लास्य होय. हे स्त्रीनृत्य आहे. याविषयी संगीतनारायण या ग्रंथातला अर्धश्लोक असा –

पुंनृत्यं ताण्डवं प्राहुः स्त्रीनृत्यं लास्यमुच्यते ।

अर्थ – पुरुषनृत्याला तांडव व स्त्रीनृत्याला लास्य म्हणतात.

लास्य हे मृदू नृत्य आहे. लास्याचे प्रयोग भाण या नाटक-प्रकाराप्रमाणे करायचे असतात. काही प्रकारांत नाटकातल्या-प्रमाणे प्रवेशसंधीही सांगितले आहेत. संगीतरत्नाकरात याची दहा अंगे सांगितली आहेत, ती अशी –

(१) चाली – यात कोमल विलास असतात. पाय, मांड्या, कटी व बाहू यांचे एकाच वेळी चलन असते आणि ते मध्यम लयीत केले जाते.

(२) चालिवड – यात नर्तकी गिरकी घेऊन तावडतोब प्रेक्षकांसन्मुख होते.

(३) लढी – यात कटी व बाहू यांचे एकाच वेळी चालन केले जाते.

(४) सूकम् – हे शृंगारभावदर्शक असून, यात नाक, डोळे, भवया व मान यांचे संचालन असते.

(५) उरोंगणम् – यात कधी विलंबाने तर कधी झटक्यात कुच, भुज व शीर्ष यांचे तिरके आणि ललित असे चलन असते.

(६) धसक – यात ढंगदारपणे स्तन खाली वाकवतात.

(७) अंगहार – यात वरचे शरीर धनुष्याप्रमाणे वाकवतात.

(८) ओयारक – यात मस्तक किंचित तिरके व किंचित खाली केले जाते.

(९) विहसी – यात शृंगारदर्शक मंदस्मित केले जाते.

(१०) मन – यात गीत, वाद्य व नृत्य ही तीन्ही ठाय लयीत केली जातात. [श. क.; संगीतरत्नाकर]

लिंग एखाद्या वस्तूचे किंवा भावनेचे चिन्ह किंवा प्रतीक. परब्रह्माचे ज्ञापक स्वरूप. मेदिनीकोशात लिंग शब्दाचे अर्थ पुढीलप्रमाणे सांगितले आहेत –

लिङ्गं चिन्हेऽनुमाने च साङ्ख्योक्तप्रकृतावपि ।
शिवमूर्तिविशेषे च मेहनेऽपि नपुंसकम् ।।

अर्थ – चिन्ह, अनुमान, सांख्यशास्त्रातली प्रकृती, शिवमूर्ति-विशेष व शिश्न अशा अर्थी लिंग शब्द असून तो नपुंसक आहे.

पण लिंग शब्दाने सामान्यपणे शिवाचे प्रतीक असाच बोध होतो. लिंग शब्दाची व्याख्या सुप्रभेदागमात दिली आहे, ती अशी–

लयं गच्छन्ति भूतानि संहारे निखिलं यतः ।
सृष्टिकाले पुनः सृष्टिं तस्माल्लिङ्गमुदाहृतम् ।।

अर्थ – प्रलयकाली भूतांसह हे सर्व जगत लिंगाच्या ठिकाणी लय पावते व सृष्टिकाली पुनश्च त्यातूनच आकाराला येते, म्हणून त्याला लिंग असे म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिंगोत्पत्ती – शिवलिंग कसे उत्पन्न झाले, याविषयी पुराणांतून विविध कथा दिलेल्या आहेत. त्यांपैकी काही अशा –

(१) कल्पांती सर्व चराचर सृष्टीचा प्रलय होऊन चहूकडे जलमय झाले. त्या एकार्णवात नारायण शेषशय्येवर निद्रित होता. त्याच्या नाभिकमलातून ब्रह्मा उत्पन्न झाला. तो उपजताच मायामोहित झाला. त्याने उद्धटपणे निद्रिस्त नारायणाला हालवून जागे केले. त्यावर नारायण ब्रह्मदेवाला बोलला. 'वत्सा, तू आलास हे बरे झाले.' त्यावर ब्रह्मा म्हणाला. 'एखाद्या शिष्याला संबोधावे तसा तू मला वत्स शब्दाने संबोधतोस. मी तर सर्व जगाचा कर्ता व प्रकृतीचा प्रवर्तक आहे.' विष्णू म्हणाला. 'तुझे सांगू नको. विश्वाचा कर्ता, धर्ता मीच. तूही माझ्या अंगापासून उत्पन्न झाला आहेस. तू ही गोष्ट विसरलास त्या अर्थी तू मायामोहित झाला आहेस.' त्यावरही विधाता स्वस्थ बसला नाही. 'तू मोठा की मी मोठा' अशी त्या दोघांत स्पर्धा सुरू झाली.

त्या दोघांना आत्मबोध व्हावा म्हणून मग त्यांच्यापुढे अनाद्यनंत व त्रिभुवनव्यापक असे लिंग प्रकट झाले. ते लिंग म्हणजे तेजाचा एक स्तंभ होता. त्यामुळे ब्रह्मा-विष्णूंचे डोळे दिपले. मग ते दोघे म्हणाले. 'आपण याचा शोध घेऊ.' ब्रह्मा हंसरूप घेऊन त्या लिंगाचे शिखर शोधण्यासाठी ऊर्ध्व लोकात गेला. विष्णू वराहरूप घेऊन पाताळात घुसला. दोघांनीही सहस्र वर्षे शोध केला. पण त्यांपैकी कोणालाही त्या लिंगाचे ताळमूळ गवसले नाही. अखेर दोघेही थकले. त्यांच्यांतली मोठेपणाची स्पर्धा संपली. आणि मग ते लीन होऊन त्या लिंगाला शरण गेले.

चतुर्मुखी शिवलिंग – कनोज
(इ. स. चे ७ वे ८ वे शतक)

(२) एका शंकरावाचून इतर सर्व देव स्त्रैण होते. ब्रह्मा, विष्णू, दक्ष, इ. देवांनी व प्रजापतींनी तप करून कालिका देवीला प्रसन्न केले. देवी प्रकट होऊन 'वर मागा' म्हणाली. देवांनी तिला म्हटले, की 'तू दक्षकन्या बनून शिवाला मोहित कर.' देवीने 'तथास्तु' म्हटले. ती दक्षाची कन्या बनली. तिचे नाव सती ठेवले गेले. देवांनी तिचे शिवाशी लग्न लावले. त्या दोघांच्या संयोगाने दोघांचेही तेज भूमीवर पडले. तेच योनिसहित लिंग या रूपाने आविष्कृत झाले.

(३) एकदा दारुक वनात शिव नग्नपणे भिक्षेसाठी हिंडत होता. तेव्हा शिवाचे लिंग पाहून ऋषिस्त्रिया कामविव्हल झाल्या. त्या लाज सोडून शिवाशी लगट करू लागल्या. ते दृश्य पाहून भृगुऋषी क्रोधाने संतप्त झाला. त्याने शिवाला शाप दिला, की 'तुझे लिंग गळून पडू दे!' त्यासरशी शिवाचे लिंग गळून पडले. तेव्हा चोहोकडे हाहाःकार झाला. भृगूलाही पश्चात्ताप झाला. त्याने शिवाची करुणा भाकली. नंतर ते गळून पडलेले लिंग धारण करण्यासाठी त्याने पार्वतीची प्रार्थना केली. तिने ते लिंग आपल्या योनीत धारण केले. तेव्हापासून शिवाच्या आज्ञेने त्याची पूजा सयोनिलिंगरूपात सुरू झाली.

ही कथा थोड्याफार फरकाने बहुतेक पुराणांत सांगितली आहे. लिंगपुराणात सयोनिलिंगाचे वर्णन आले आहे, ते असे-

मूले ब्रह्मा तथा मध्ये विष्णुस्त्रिभुवनेश्वरः ।
रुद्रोपरि महादेवः प्रणवाख्यः सदाशिवः ॥
लिङ्गवेदी महादेवी लिङ्गं साक्षान्महेश्वरः ।
तयोः सम्पूजनान्नित्यं देवी देवश्च पूजितौ ॥

अर्थ – लिंगाचा मूळ भाग म्हणजे ब्रह्मा, मध्यभाग म्हणजे विष्णू व ऊर्ध्वभाग म्हणजे प्रणवरूपी महादेव होय. लिंगवेदी अर्थात शाळुंका म्हणजे पार्वती व लिंग म्हणजे साक्षात महेश्वर होय. त्यांच्या पूजनाने शिव-पार्वतींची पूजा केल्यासारखी होते.

वेदी म्हणजे शाळुंका कशी निर्माण करावी, याविषयी सुप्रभेदागमात काही नियम सांगितले आहेत. शाळुंकेच्या घेराचे तीन प्रकार मानलेले आहेत. लिंगाच्या घेराच्या तिप्पट तो अधम. दीडपट तो मध्यम व चौपट तो उत्तम. शाळुंकेची उंची लिंगाच्या विष्णुभागाइतकी असावी. तिचा आकार चतुष्कोण, षट्कोण, अष्टकोण, द्वादशकोण, षोडशकोण किंवा गोल असावा. अभिषेक हा शिवाचा मुख्य उपचार असल्यामुळे शाळुंकेला जलमार्ग ठेवणे आवश्यक आहे. तो पन्हळीसारखा करावा. लिंग वेदीत स्थापन करताना त्याचे ब्रह्मभाग व विष्णुभाग हे जमिनीत जायला हवे. वरचा रुद्रभाग तेवढाच वर असावा. लिंगाची पूजा रुद्रभागावरच करावी.

लिंगप्रकार – लिंगाचे चल व अचल असे दोन मुख्य प्रकार होतात. चल लिंग विशिष्ट पूजेपुरते निर्माण केले जाते व ते हालवता येते. अचल लिंग हे स्थापित असते.

ज्योतिर्लिंगे – ही संख्येने बारा आहेत. ती तेजःस्वरूपात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रादुर्भूत झाली. याविषयीची आख्यायिका अशी – विष्णूने ज्या वेळी मोहिनीरूप घेऊन देवांना अमृत वाटले, त्या वेळी शिव त्या मोहिनीला भुलला. ती पळत सुटली, तेव्हा शिवाने तिचा पाठलाग केला. या धावपळीत शिवाचे वीर्य बारा ठिकाणी पडले आणि जिथे जिथे ते पडले, तिथे तिथे शिवलिंग निर्माण झाले. (ज्योतिर्लिंग पाहा.)

स्वयंभू लिंगे – ज्योतिर्लिंगांच्या खालोखाल यांना महत्त्व आहे. ही लिंगे यदृच्छेने आपोआप निर्माण होतात व कोणाला तरी त्यांचा साक्षात्कार झाल्यानंतर त्यांची पूजा-अर्चा सुरू होते.

मानुष लिंगे – पार्वती, भक्त, सिद्धपुरुष, अवतार व अन्य देवी यांनी जी लिंगे घडवली व स्थापली, त्यांना मानुष लिंगे म्हणतात. स्कंदपुराणाच्या अवंतीखंडात चौऱ्यायंशी शिवलिंगांच्या स्थापनेच्या कथा आहेत. त्यांत कोणाकडून तरी पाप घडावे, त्याच्या क्षालनार्थ त्याने ऋषींच्या आदेशावरून लिंग स्थापावे, त्याच्या उपासनेने मुक्त व्हावे व मग ते शिवलिंग त्या त्याच्या तपस्येचे स्थान म्हणन प्रसिद्ध व्हावे, अशा प्रकारची कथा आहेत. काशीमध्ये अशी वेगवेगळ्या भक्तांनी स्थापलेली



वेदीयुक्त शिवलिंग

असंख्य लिंगे आहेत. मानुष लिंगाचे दहा प्रकार सांगितले आहेत, ते असे – (१) सार्वदेशिक (२) सर्वसम (३) वर्धमान (४) शैवाधिक (५) स्वस्तिक (६) त्रैराशिक (७) अध्य (८) नागर (९) द्रविड व (१०) बेसर.

मुखलिंगे – काही वेळा लिंगाला मुखे बनवली जातात. त्यात एक मुख असेल तर ते ब्रह्मप्रतीक, त्रिमुख ते त्रिगुणप्रतीक आणि चतुर्मुख ते चतुर्दिशांचे प्रतीक समजावे. जेव्हा लिंगाच्या चार दिशांना चार व मस्तकावर एक मुख असेल, तेव्हा ती मुखे सद्योजात, वामदेव, अघोर, तत्पुरुष व ईशान अशी शिवाच्या पाच रूपांची प्रतीके समजावी. एकमुखी, त्रिमुखी व चतुर्मुखी लिंगे भारतात सर्वत्र आढळतात.

पंचभूतलिंगे – द. भारतात पंचमहाभूतांची पाच लिंगे आहेत, ती अशी – पृथ्वी–शिवकांची, जल – जंबुनाथ, तेज – अरुणाचलम, वायू–कालहस्ती व आकाश–चिदंबरम.



पंचमुखी शिवलिंग–पाटण (गुजरात)
इ. स. ११ व्या शतकातील कांस्यमूर्ती

अष्टोत्तर शत व सहस्रलिंग – रुद्रभागावर उभ्या-आडव्या समांतर रेषा कोरून एकशे आठ किंवा हजार चौकोन तयार केल्याने वरील नावांची लिंगे होतात.

धारालिंग – विष्णुभागावर ५ पासून २८ पर्यंत खोलगट उभे कंगोरे तयार केल्याने हे लिंग बनते. या कंगोऱ्यांमुळे अभिषेकजल सहजपणे वाहून जाते.

प्राचीन नाणी व मुद्रा यांवर शिवलिंग आढळते, त्यावरून असे अनुमान केले जाते की, शिवलिंगपूजा भारतात प्राचीन काळापासून प्रचलित आहे. कुशाण सम्राट हुविष्क याच्या एका सुवर्णाच्या नाण्यावर ऊर्ध्वलिंग शिवमूर्ती दिसते. त्यापूर्वीच्या उज्जयिनी व तक्षशिला येथील काही नाण्यांवर शिवमूर्ती दिसते, तर काही नाण्यांवर शिवलिंग दिसते. मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननात पाषाणाची लहानमोठी कडी सापडली आहेत; ती मार्शलच्या मते योनीची म्हणजे स्त्रीच्या जननेंद्रियाची प्रतीके आहेत. त्या जागी अगणित शिश्नाकृतीही सापडल्या आहेत. त्या वेळी योनी व शिश्न यांची पूजा स्वतंत्रपणे केली जात असावी. योनीमध्ये लिंग ही रचना नंतरच्या काळातली आहे.

सिंधुसंस्कृतीत लिंगपूजा रूढ होती. ती वैदिक आर्यांना प्रथम पसंत पडली नाही. त्यामुळे वैदिक वाङ्मयात तिचे वर्णन केलेले नाही. महाकाव्यांत प्रथमच तिचे वर्णन केलेले आढळते. पुढे शिवलिंगपूजा इतकी प्रसृत झाली की, शिवमंदिराच्या गाभाऱ्यात शिवलिंगाचीच स्थापना होऊ लागली. लिंगायत पंथाचे अनुयायी शिवलिंगाचीच पूजा करतात.

सिद्धान्तशेखरात अनेक भिन्न देवतांच्या लिंगांचा उल्लेख

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. विष्णुलिंगाला शंखाकृती शिखर असते. ब्रह्मलिंग कमळासारखे दिसते. अग्निलिंगाला दोन शिखरे असतात. इंद्रलिंग छत्रासारखे दिसते. यमलिंग त्रिपाद असते. निर्ऋतिलिंग खड्गासारखे दिसते. वरुणलिंग कलशासारखे असते. वायुलिंग ध्वजासारखे व ईशानलिंग त्रिशूळासारखे असते. कुबेराचे लिंग गदेप्रमाणे असते. [शिवलिंगोपासना; भा. प्र. वि.; डे. हि. इ.; वै. शै .म. व.]

लिंगनाथ योगी

(इ. स. चे १८ वे शतक) एक नाथसंप्रदायी मराठी संतकवी. हा तमिळनाड राज्यातल्या तंजाऊर भागात होऊन गेला. त्याने अमृतसार नावाचा योगशास्त्रविषयक एक ग्रंथ कावेरीच्या काठी राहून लिहिला. त्या वेळी तिथे शरभ नावाचा राजा राज्य करीत होता. हा शरभ म्हणजे सरफोजी भोसले असावा. लिंगनाथाने आपल्या ग्रंथात शरभाचे साक्षात शिवमूर्ती, भक्तवत्सल, कैवल्यपदींचा दातार, मौनव्रती, वेदश्रुती, इ. विशेषणे लावून अतिशयोक्त वर्णन केले आहे. कोनेरीनाथ हा या कवीचा गुरू होय. कोनेरीनाथानेच त्याचे लिंगनाथ हे नाव ठेवले. त्यावरून त्याचे मूळचे नाव निराळे असावे असे वाटते. हा कवी सोपानदेवाच्या परंपरेतला आहे.

अमृतसार ग्रंथाची ओवीसंख्या १४०० आहे. योगशास्त्र आणि परमार्थ हे या ग्रंथाचे मुख्य विषय आहेत. त्याच्या योगशास्त्राचे विवेचन असलेल्या काही ओव्या अशा –

कोण्ही चारी मुद्रेच्या साधनी । अर्धोन्मिलित वृष्टि करुनी ।
लक्ष साधिती गगनीं । नानारूप नयनीं अवलोकिती ।
सूर्य चंद्र उगवले जैसे । तैसे गगनगर्भी तेज भासे ।
किंवा तारांगणे उदेलीसी दिसे । साधक उल्हासे पाहती ।
मुक्ताफळांचिया पंगती । लखलखीत भासों लागती ।
सोनियाचे चूर दिसती । तार उठती प्रकाशाचे ॥
कां उजळले रत्नदीपक । झळझळीत जैसा मयंक ।
तैसे तेज निष्कलंक । भक्त भाविक अनुभविती ॥
जैसा चांदण्यांचा गोंधळ । उगवला दिसे सोज्वळ ।
तैसा प्रकाश भासे निर्मळ । नाही मळ प्रपंचाचा ॥

कवीच्या या विवेचनावर ज्ञानेश्वरीच्या सहाव्या अध्यायाची बरीच छाप आहे, असे वाटते. त्याची भाषा साधी पण काव्यमय आहे. [म. क. च. ५; गो. च. प.]

लिंगपुराण

अठरा महापुराणांपैकी अकरावे पुराण. यात शिवाने अग्निलिंगात प्रवेश करून जीवन, सद्गुण, संपत्ती, सुख, मोक्ष, इ. गोष्टींचे विवरण केलेले असल्यामुळे याला लिंगपुराण हे नाव मिळाले आहे. प्रस्तुत पुराणाचे ११ हजार श्लोक असून, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे त्याचे दोन भाग आहेत. पूर्वार्धाचे १०८ अध्याय असून, उत्तरार्धाचे ५५ आहेत. नारदपुराणसूचीप्रमाणे यात सर्व विषय आहेत. पुराणाची पंचलक्षणे यालाही लागू पडतात.

यातील विषय – ब्रह्मांडरूपी लिंगाची उत्पत्ती. अलिंग म्हणजे निर्गुण, हाच शिव होय. तो लिंगाचे मूळ आहे. अव्यक्त किंवा प्रकृती म्हणजे लिंग. गुणविवर्जित, ध्रुव, अक्षय्य, अलिंग हे शिवाचे लक्षण होय. गुणयुक्त, सर्व जगाची योनी व जगाचे स्थूल व सूक्ष्म शरीर हे लिंगाचे लक्षण समजावे. अलिंगापासून लिंगाचा संभव झाला. मायेच्या योगाने त्या लिंगाचे २६ प्रकार बनले. त्यांपैकी शिवात्मक असे तीन प्रधान देव झाले. त्यांनी जगाची उत्पत्ती, स्थिती व लय ही कार्ये स्वीकारली. शिव हा स्वभावतः नित्य, बुद्ध, शुद्ध व ब्रह्म आहे. तोच या जगाचे कारण आहे. शिवाने प्रकृतीकडे पाहिले आणि त्या क्षणी ती शैवी झाली. पूर्वी अव्यक्त होती, ती सृष्टीच्या प्रारंभी गुणयुक्त झाली.

पुढे ब्रह्मांड व ब्रह्मांडरूपी लिंगाची उत्पत्ती सांगून ब्रह्मदेवाची कालगणना सांगितली आहे. नंतर अष्टांग योगाचे वर्णन करून त्या मार्गानेच शिवकृपा लाभते व शिवकृपेनेच मोक्ष मिळतो, असे म्हटले आहे. इथे मोक्ष शब्दाने शिवस्थान अभिप्रेत असून, त्या स्थानाची प्राप्ती ज्ञानाने होते, असे सांगितले आहे. ज्ञानासाठी इंद्रियनिग्रहरूप शिवोपासनेची आवश्यकता आहे. त्यामुळेच पापक्षय होऊन शिवनिर्वाण लाभते.

पूर्वार्धातील २७ व्या अध्यायात लिंगार्चनाचा विधी तपशीलवार वर्णिला आहे. त्याचप्रमाणे ३५ व ३६ या अध्यायांत दधीच व क्षुप यांची कथा दिली आहे. तिचा सारांश असा –

ब्रह्मपुत्र क्षुप व च्यवनपुत्र दधीच यांची मैत्री होती. क्षुप क्षत्रिय व दधीच ब्राह्मण होता. एकदा त्या दोघांत क्षत्रिय मोठा का ब्राह्मण मोठा असा वाद सुरू झाला. क्षुप म्हणाला. 'मी राजा आहे आणि म्हणूनच विष्णूचा अंशरूप आहे. यासाठी तू मला पूज्य मानले पाहिजेस.' दधीचाला हे बोलणे आवडले नाही. त्याने क्षुपाच्या डोक्यावर एक ठोसा हाणला. क्षुपाला त्यामुळे भयंकर क्रोध आला. त्याने वज्र फेकून दधीचाचे तुकडे केले. प्राण जाण्यापूर्वी दधीचाने शुक्राचे स्मरण केले होते. त्यामुळे शुक्राने संजीवनी मंत्र जपून दधीचाच्या शरीराचे तुकडे सांधले व त्याला जिवंत केले. मग शुक्राने दधीचाला 'त्र्यम्बकं यजामहे ...' हा शिवमंत्र दिला. त्या मृत्युंजय मंत्राचा जप करून दधीचाने शिवाला संतुष्ट केले. शिवप्रसादाने तो अमर झाला.

पण क्षुपाविषयीचा राग अजून दधीचाच्या मनात होताच. म्हणून तो तडक क्षुपाकडे गेला आणि त्याने क्षुपाच्या मस्तकावर लाथ मारली. क्षुपाने दधीचावर पुन्हा वज्र फेकले. पण आता ते व्यर्थ ठरले. दधीचाचा हा प्रभाव पाहून क्षुप विष्णूला शरण गेला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्णूने क्षुपासाठी दधीचावर सुदर्शन फेकले; पण त्याचाही काही उपयोग झाला नाही. त्या वेळी दधीच विष्णूला व क्षुपाला म्हणाला, 'मी शिवभक्त आहे. शिवभक्ताला कोणाचेही भय नाही.'

त्यानंतर दुसरी कथा नंदीची दिलेली आहे, ती अशी – शिलादाने एक हजार वर्षे तप करून शिवाकडून पुत्र मिळविला. त्याचे नाव नंदी ठेवले. हा सात वर्षांचा झाला, तेव्हाच त्याला शास्त्रे अवगत झाली. पण ज्योतिषी म्हणाला, की हा अल्पायू आहे. ते ऐकून सर्वांना दुःख झाले. मग शिव प्रकट होऊन म्हणाला, 'नंदीला मी आपला पुत्र मानले आहे. तेव्हा त्याला मृत्यूचे भय नाही.'

वरील दोन्ही कथा शिवकृपा व शिवमंत्र यांचे सामर्थ्य दाखविण्यासाठी दिलेल्या आहेत.

बाणवाव्या अध्यायात काशी व तिच्यातली नाना तीर्थे यांचे सविस्तर विवरण दिलेले आहे. काशीची भौगोलिक स्थिती समजण्याच्या दृष्टीनेही हे विवरण उपयोगी आहे. काशीतल्या उद्यानांचे वर्णन नाना छंदांत व साहित्यिक भाषेत केलेले आहे. प्रस्तुत पुराण रचले गेले त्या काळात काशी हे पाशुपतांचे केंद्र होते. पाशुपत शैवांच्या संप्रदायातच या पुराणाचा विस्तार झाला आहे. शैवांची व्रते व अनुष्ठाने यांच्या माहितीसाठी लिंगपुराण अत्यंत उपयुक्त आहे. याच्या उत्तरार्धाचे कित्येक अध्याय गद्य आहेत व त्यांवर तांत्रिक प्रभाव स्पष्ट जाणवतो. यांत शिवाच्या अष्टमूर्तींचा निर्देश आहे. या आठही शिवरूपांना एक पत्नी व एक पुत्र असल्याचे सांगितले आहे.

लिंगपुराण इ. स. च्या ७ व्या किंवा ८ व्या शतकात निर्माण झाले असले पाहिजे. याविषयी काही पुरावेही पुराणातच सापडतात. अवतारांत बुद्ध व कल्की यांची नांवे निर्दिष्ट आहेत. म्हणून याची रचना ७ व्या शतकाच्या पूर्वी जाऊ शकत नाही. पूर्वार्धाच्या ९ व्या अध्यायामध्ये, योगसाधनेत जे अंतराय निर्माण होतात, त्यांचे समग्र वर्णन आहे. हे वर्णन आणि व्यासभाष्य या ग्रंथातले वर्णन यांच्यांत विलक्षण साम्य आहे. व्यासभाष्याचा काल ६ व्या शतकाच्या पुढे जाऊ शकत नाही. त्यावरून हे निश्चित होते, की पुराणकर्त्याने व्यासभाष्यावरूनच आपला योग विषय सजवला आहे.

प्रस्तुत पुराण शिवमहिमा वाढविण्यासाठी आहे. वैष्णव पुराणात जे कार्य व सामर्थ्य विष्णूचे असते, तेच शैव पुराणात शिवाचे असते. वैष्णव पुराणांनी विष्णूचे २४ अवतार सांगितले आहेत; तर लिंगपुराणात शिवाच्या २८ अवतारांचा निर्देश आहे. यांत तंत्रविद्येलाही बरेच स्थान मिळाले आहे. हे पुराण हा लिंगायतांचा प्रमुख धर्मग्रंथ आहे. यात योगमार्ग, मूर्तिपूजा, शिवदीक्षा, मंत्रमाहात्म्य, लिंगमहिमा, इ. अनेक गोष्टी सांगितल्या आहेत. हे पुराण अद्वैतमार्गी आहे. [लिंगपुराण – श्री. गं. वा. लेले, १९१२; श्री. बा. मो. कानिटकर– सा. स्वराज्य, १ ऑक्टो. १९६६; पु. वि.; पु. नि.]

लिंगम एक वन्य जमात. यांची वस्ती आसाम प्रदेशातल्या खासी डोंगराच्या पश्चिम भागात आहे. खासी जमात व गारो जमात यांच्या संकरातून ही जमात निर्माण झाली, असे वंशशास्त्रज्ञांचे मत आहे. या दोन्ही जमातींपैकी गारोंची वैशिष्ट्ये या लोकांमध्ये आढळतात.

हे लोक वर्णाने काळे आणि खुजे असतात. त्यांचा तोंडवळा तिबेटी–ब्रह्मी लोकांप्रमाणे म्हणजे मंगोलियन छापाचा असतो. हे शरीराने दणकट नसतात. कारण त्यांच्या वस्तीच्या भागात सदैव तापाची साथ असते. पुरुष अंगात बिनबाह्यांचा कोट घालतात आणि रुंद लंगोटी नेसतात. ते लोकरीची टोपी किंवा पागोटे घालतात. स्त्रिया फक्त कमरेला एक रंगीत फडके गुंडाळतात. त्या गळ्यात निळ्या मण्यांच्या अनेक माळा आणि कानांत जड कडी घालतात. पुरुषही कानांत व हातांत कडी घालतात. ज्याच्याजवळ थाळीसारख्या अनेक घंटा असतात, त्याला हे श्रीमंत समजतात.

शेती हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. जंगले तोडून व ती जाळून हे त्या जागी शेती करतात. दर दोन वर्षांनी शेतीसाठी हे नवीन जागा शोधतात. त्यामुळे त्यांचे एका ठिकाणी स्थायिक राहणे नसते. शेतीची मशागत करणे हे त्यांना माहीत नाही. ते भात व कडधान्ये पिकवितात. त्याशिवाय मिरची, हळद, रताळी, आले, वांगी, ही पिकेही ते काढतात. लाख पिकवण्याचा व्यवसाय ते मोठ्या प्रमाणावर करतात. शेतीचे धान्य उदरनिर्वाहापुरतेही होत नसल्याने, ते रानकेळी, बांबू व वेत यांचे कोवळे कोंब खातात. ते खड्डे करून त्यात जनावरे पकडतात; पाण्यात विषारी वनस्पती टाकून मासेमारी करतात.

यांची घरे बांबूची पण भक्कम असतात. ती टेकडीच्या उतारावर असल्याने त्यांची एक बाजू जमिनीवर आणि दुसरी बाजू बांबूच्या आधारावर असते. घराच्या जमिनी बांबूच्याच असतात. ते जमिनीवर किंवा चटईवर झोपतात आणि झाडाच्या सालीपासून बनविलेले पांघरुण वापरतात.

विवाहप्रथा – हे एकाच घराण्यातील मुला-मुलींची लग्ने करीत नाहीत. गारो जातीशी यांचा लग्नसंबंध होतो. कोंबडी व डुकरे मारून ती खाणे आणि भरपूर दारू पिणे हाच यांचा प्रमुख लग्नविधी होय. यांच्यांत देजाचीही तुरळक पद्धत आढळते. कधी मुलीला पळवूनही लग्न लावले जाते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांची कुटुंबपद्धती मातृसत्ताक असून, वारसापद्धत खासी लोकांप्रमाणे आहे.

देवधर्म – पूर्वजांची, भुताखेतांची व देवतांची पूजा हा यांचा धर्म होय. त्यांना पुरोहिताची आवश्यकता नसते. मूळ स्त्री, कृषिदेवता आणि जंगलातील सैतान यांना संरक्षण, समृद्धी व रोगनिवारण या गोष्टीसाठी पशुपक्ष्यांचा बळी देणे, हा यांचा धार्मिक कार्यक्रम होय.

मृतिकप्रथा – हे लोक मृतांचे दहन करतात. ते करण्यापूर्वी एक बैल मारून त्यांना गावजेवण द्यावे लागते. बैल मिळणे कठीण असल्याने तो मिळेपर्यंत प्रेत घरात सहा-सहा महिने कुजत पडले तरी त्याचे त्यांना काही वाटत नाही. मृताच्या अस्थी त्याच्या घरासमोरच खड्डा करून त्यात पुरतात आणि स्मारक म्हणून त्यावर एक दगड ठेवतात. [दि खासीज्]

लिंगम्मा

द. भारतातील एक ग्रामदेवता. ही देवता कशी बनली, याचा इतिहास असा – लिंगम्मा एका गरीब शूद्राची पत्नी होती. ती एका श्रीमंताच्या घरी काम करीत असताना एकदा तिच्यावर चोरीचा आळ आला. हा आपल्या सत्त्वावर घाला आहे, असे समजून तिने विहिरीत जीव दिला. पुढे तिने भूत बनून मालकाला त्रास द्यायला प्रारंभ केला. एके दिवशी ती त्याच्या स्वप्नात येऊन त्याला म्हणाली. 'माझे एक मंदिर बांध.' परंतु मालकाने ही गोष्ट मनावर घेतली नाही. त्यामुळे गावात पटकी सुरू झाली. मग सर्व लोकांनी घाबरून तिचे मंदिर बांधले. हिची गणना पेरंतलू देवतांत केली जाते. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

लिंगव्रत

एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध चतुर्दशीला या व्रताचा प्रारंभ करतात. यात शिवलिंगाची पूजा व नक्त भोजन करायचे असते. शिवलिंग तांदुळाच्या पिठाचे करावे व पुढे प्रत्येक शुद्ध चतुर्दशीला वेगवेगळ्या वस्तूंचे लिंग बनवून व वेगवेगळे गंधनैवेद्यादी उपचार समर्पून त्याची पूजा करावी, असे सांगितले आहे. फल – रुद्रलोकप्राप्ती. [हि. ध.]

लिंगायत

एक जात व तन्निष्ठ संप्रदाय. या संप्रदायाचे लोक शरीरावर लिंग धारण करीत असल्यामुळे त्यांना लिंगायत, लिंगांगी व लिंगवत अशीही नावे मिळाली आहेत. कट्टर शिवोपासक असल्यामुळे यांना वीरशैव व शिवशरण असेही म्हणतात. या लोकांची वस्ती मुख्यत्वे कर्नाटकात व त्यानंतर दक्षिण महाराष्ट्रात आहे. पुष्कळसे लिंगायत व्यापार-उद्योगात पुढारलेले आहेत. याशिवाय शेतकरी व इतर कारू-नारू लोकांचाही लिंगायतांत भरणा आहे.

लिंगायत संप्रदायाचा पुरस्कर्ता बसवेश्वर हा जातिभेदांच्या विरुद्ध होता. लिंगधारक तेवढा समान दर्जाचा, अशी त्याची शिकवण होती. त्यामुळे पूर्वी या लोकांत जातिभेद नव्हता; पण सांप्रत तो शिरला आहे. सांप्रत यांच्यांत अनेक पोट जाती निर्माण झाल्या असून, रोटीबेटीचे निषेधही आले आहेत. ब्राह्मणांचे वर्णश्रेष्ठत्व नाकारणे किंवा कमी करणे हा बसवेश्वराच्या अनेक उद्देशांपैकी एक उद्देश होता. काही काळ तो सफळ झाला. पण सांप्रत लिंगायतांमधल्या उच्च वर्गामध्ये अनेक ब्राह्मणी पद्धतीचे विधिविधाने आली आहेत.

लिंगायतांत मुख्य तीन वर्ग आहेत, ते असे –

(१) पंचमसाळी. या वर्गाला अष्टावरणांचा अधिकार आहे. अय्या अथवा जंगम या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या उपाध्यांचा यात समावेश होतो. बंजिग या नावाचा प्रमुख व्यापारी वर्गही यातच येतो. हे लोक स्वतःला सर्व लिंगायतांत श्रेष्ठ मानतात. संप्रदायाची ज्यांनी प्रथम दीक्षा घेतली, त्यांच्याशी संबद्ध असा हा वर्ग असण्याची शक्यता आहे. नंदी, भृंगी, वृष, वीर व स्कंद अशी या वर्गाची पाच गोत्रे आहेत. या सर्व पोटभेदांत रोटी व्यवहार चालतो; पण लग्नसंबंधावर मात्र काही निर्बंध आहेत. या वर्गाला शुद्ध लिंगायत असे म्हटलेले आहे. हा वर्ग आर्थिक व सामाजिक दृष्ट्या उच्च आहे.

लिंगायत जंगम

(२) पंचमसाळ्यांच्या बाहेरचे कोष्टी, तेली, गवंडी, धनगर, शेतकरी, इ. व्यावसायिक लोक या वर्गात येतात. यांच्यांत सत्तर पोटभेद निर्माण झाले असून, त्यांच्यांत रोटीबेटीव्यवहार होत नाही. ज्यांनी उशीरा पंथात प्रवेश

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता, असे हे लोक असावे. यांना संलग्न लिंगायत असे म्हटले आहे. म्हैसूर प्रदेशाच्या काही भागात हे लोक इतर पंथांतल्या मुलींशी लग्ने करतात; पण सासरी आल्यावर अशा मुलींना लिंग धारण करावे लागते.

(३) धोबी, चांभार, कोळी, इ. कनिष्ठ थरातल्या लोकांचा यात समावेश होतो. यांना अष्टावरणाचा अधिकार नाही. या वर्गातल्या लोकांना उच्च वर्गातले लोक लिंगायत समजतच नाहीत; तर त्यांचे सेवक समजतात. म्हणून त्यांना अर्धलिंगायत असे म्हटले आहे.

लिंगायतांत सामान्य, विशेष व निराभारी असे आणखी तीन वर्ग आहेत. याशिवाय भक्त व माहेश्वर असेही आणखी दोन वर्ग आहेत. भक्त हा शिष्यवर्ग असून, माहेश्वर हा गुरुवर्ग आहे.

लिंगायत कन्नड भाषा बोलतात. त्यांचे बरेचसे वाङ्मय कन्नड भाषेतच आहे. हा पंथ कर्नाटकातच जन्मला व तिथेच वाढला, विस्तारला.

लिंगायतांचे ब्राह्मणांशी व माध्वांशी मुळापासून वितुष्ट आहे. वैदिक धर्मातल्या यज्ञयाग, उपास-तापास या गोष्टींना या पंथात स्थान नाही. त्यांना विष्णुपूजाही मान्य नाही. हे लोक जनना-मृताशौच व रजस्वलादोष मानीत नाहीत आणि अन्य लोकांचे अन्नोदक घेत नाहीत. यांच्यांतले सगळे स्त्री-पुरुष अंगावर लिंग बाळगतात. लिंग पाषाणाचे असते व ते चांदीच्या डबीत ठेवून रेशमी दोऱ्याने गळयात बांधतात. सकाळी उठून स्नान व लिंगस्पर्श केल्यावर मगच हे अन्नोदक घेतात.

लिंगायत लोक शिव हा प्रमुख देव आणि परम आराध्य मानतात; तोच निर्माता, कर्ता, धर्ता, संहर्ता, असे समजतात; त्याचे प्रतीक म्हणून लिंगाची व त्याचे वाहन म्हणून नंदीची पूजा करतात. हनुमान, गणपती व यल्लम्मा यांनाही ते भजतात.

अष्टावरण – लिंगायतांचा हा एक महत्त्वाचा आवश्यक असा धार्मिक संस्कार आहे. जीव हा मूलतः शिवरूप आहे. पण मायेच्या आवरणाखाली तो झाकलेला किंवा बद्ध राहतो. त्याला शिवैक्य प्राप्त करण्यासाठी अंगाच्या गुणांपासून मुक्त होऊन लिंगत्व प्राप्त करावे लागते. त्यासाठी जी साधना करावी लागते, तिला साहाय्यक अशा आठ गोष्टी मानलेल्या आहेत. बद्धावस्थेत एखाद्या कवचाप्रमाणे या गोष्टी जीवाची रक्षा करतात. या साहाय्यक गोष्टी आठ असल्यामुळे त्यांना अष्टावरण अशी संज्ञा आहे. त्यांची नावे व कार्य असे –

(१) गुरू – लिंगायतांच्या लिंगोपासनेत गुरूला महत्त्वपूर्ण स्थान आहे. गुरू हाच जीवाला लिंगसाधनेच्या कामी प्रवृत्त करतो. शिष्याच्या हाती लिंग देऊन गुरू त्याला दीक्षा देतो. या दीक्षेच्या द्वारेच शिष्याला धर्माचे रहस्य ज्ञात होते. म्हणूनच लिंगसाधकांनी गुरूला शिवस्वरूप मानावे, असे सांगितले आहे.

(२) लिंग – लिंग म्हणजे साक्षात परतत्त्व होय. भावलिंग, प्राणलिंग व इष्टलिंग असे लिंगाचे तीन प्रकार आहेत. दीक्षा देतेवेळी गुरू या तीन्ही लिंगांची स्थापना शिष्यांच्या अनुक्रमे कारण, सूक्ष्म व स्थूल शरीरांत करतो. या वेळी भक्त हा इष्टलिंग आपल्या डाव्या हातावर ठेवून त्याची पूजा करतो. या पूजेच्या वेळी भक्ताने अशी धारणा करायची असते, की यद्यपि मी शिवा-पासून अलग असलो, तरी मी स्वतः शिवाचे अंगच आहे.

(३) जंगम – हे जीवन्मुक्तच असतात व भक्तांच्या आध्या-त्मिक साधनेला मदत करण्यासाठी जगात फिरत असतात. जंगम हे गुरूप्रमाणेच पूज्य आहेत. स्थिर, चर व पर असे जंगमांचे तीन प्रकार आहेत.

(४) पादोदक – गुरू व जंगम यांचे चरणजल म्हणजे पादो-दक होय. पादोदक हे सर्व तीर्थांचे प्रतीक असल्यामुळे ते देह, मन व भाव यांची शुद्धी करते. यासाठी प्रत्येक लिंगायताने पादोदकाचे सेवन करायचे असते.

(५) प्रसाद – गुरू किंवा जंगम यांचे उच्छिष्ट म्हणजे प्रसाद होय. याच्या सेवनाने चित्ताची शुद्धी होऊन कर्मसंस्का-राचा नाश होतो. म्हणून प्रत्येक शिवशरणाने, आपण जे काही खातो तो गुरुप्रसाद आहे, असे समजले पाहिजे.

(६) विभूती – भस्माला विभूती म्हणतात. शिव भस्म धारण करीत असल्यामुळे ते परम पवित्र आहे. ज्याप्रमाणे शिवाने कामदहन करून त्याचे भस्म अंगी लावले, त्याचप्रमाणे शिव-भक्तांनी लावायचे असते. कामक्रोधादी षड्रिपू जिंकण्यास भस्माची मदत होते. ज्याच्या शरीरावर भस्म असते, त्याला पाप स्पर्श करू शकत नाही, असा लिंगायतांचा विश्वास आहे.

(७) रुद्राक्ष – लिंगायताने रुद्राक्षांची माळ धारण करायला हवी. रुद्राक्षांमुळे शिवभक्तांचे ध्यान स्थिर होण्यास मदत होते. गुरू किंवा जंगम हा लिंगायताला रुद्राक्षमाला देतो. रुद्राक्ष धारण केल्याने आपल्याला सर्व बाजूंनी शिवाचे रक्षण प्राप्त होते, असे लिंगायत मानतात.

(८) मंत्र – 'ॐ नमः शिवाय' हा लिंगायतांचा षडक्षरी मंत्र आहे. लिंगायताला दीक्षा देण्याच्या वेळी गुरू त्याला या मंत्राचा उपदेश देतो. लिंगायतांच्या मते हा मंत्र शिवभक्तांच्या शरीरात सर्वत्र व्याप्त आहे. म्हणूनच ते शरीराला सदा पवित्र मानतात व नरजन्माला हरजन्म म्हणतात.

अष्टावरणाचे संक्षेपात व्यावहारिक स्वरूप असे –

घरात मूल जन्माला आले, की त्या घराण्याचा जो गुरू असेल त्याला पाचारण करतात. हा गुरू पंचाचार्यांच्यापैकी एखाद्याचा प्रतिनिधी असतो. तो मुलाच्या गळयात लिंग बांधतो व त्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विभूती लावतो. मग 'ॐ नमः शिवाय ' हा मंत्र मुलाच्या कानात उपदेशितो. नंतर त्या मुलाला जंगमाच्या वतीने शिवाला अर्पण केले जाते. त्या कामासाठी जंगम आला, की मुलाचे आई-बाप त्याचे पाय धुतात. त्या पादोदकाला शिवाचे चरणतीर्थ समजतात. त्या तीर्थाचा मुलाच्या अंगावरील लिंगाला अभिषेक केला जातो. मग आई-बाप जंगमाला जेवायला वाढतात आणि त्याच्या पानातले अन्न प्रसाद म्हणून मुलाच्या ओठाला लावतात. मूल आठ किंवा दहा वर्षांचे झाले, की याच विधीची थोडयाफार फरकाने पुनरावृत्ती करतात.

लिंगवंजिग पुरुष

पंचाचार – अष्टावरणाइतकेच लिंगायतांमध्ये पंचाचारालाही महत्त्व आहे. सदाचार, गणाचार, नित्याचार, शिवाचार व लिंगाचार असे हे पंचाचार आहेत. शुद्ध नैतिक जीवन जगणे याला सदाचार म्हणतात. सत्य व धर्म यांचे रक्षण करणे याला गणाचार म्हणतात. लिंगपूजा, पाठ, ध्यान, व्रत, इ. गोष्टी नेमाने करणे याला नित्याचार म्हणतात. जे जे लिंगधारक असतील, ते ते शिवस्वरूप मानून त्यांचा आदर करणे, याला शिवाचार म्हणतात. आणि श्रद्धापूर्वक लिंग धारण करून नित्यनेमाने त्याची पूजा करणे याला लिंगाचार म्हणतात.

मठ – लिंगायतांच्या वस्तीत त्यांचे मठ असतात. हे मठ पंचाचार्यांपैकी एखाद्या आचार्याच्या परंपरेतले असतात व त्या त्या आचार्यांचे अनुयायी त्या मठांशी संलग्न असतात. लिंगायतांचे पाच प्रमुख आचार्य असून, ते वीरशैव धर्माचे पुरस्कर्ते मानले जातात. त्यांची नावे व मुख्य मठ पुढीलप्रमाणे –

आचार्य	मठ
(१) रेणुकाराध्य	रंभापुरी अथवा बाळेहळ्ळी (कोल्लपाक)
(२) मरूळाराध्य	उज्जैन (वटक्षेत्र)
(३) एकोराम	श्रीशैल (द्राक्षारामम्)
(४) पंडिताराध्य	केदार (सुधाकुंड)
(५) विश्वाराध्य	वाराणसी.

सांप्रत हे पाचही मठ विद्यमान आहेत. या मठांच्या आचार्यांच्या नावांवरून लिंगायतांची गोत्रेही चालतात. लिंगायतांचे पुरोहित स्वतःला वरील पाच मठांपैकी कोणत्यातरी मठाच्या अंतर्गत मानतात. मुख्य आचार्य तो जगद्गुरू. त्याच्या अधिकाराखाली मठ, मठपती, स्थावर, गणाचार्य व देशिक असे पाच उपाचार्य असतात. मठांना श्रेष्ठी व महाजन यांची मदत असते. हे मठाधिकारी काषायवस्त्रे परिधान करतात.

दोन मिरवणुका – लिंगायतांच्या दोन धार्मिक मिरवणुका वैशिष्टयपूर्ण असतात. एकीचे नाव नंदीकोडू म्हणजे नंदीशृंग व दुसरीचे नाव व्यासंतोल म्हणजे व्यासहस्त. नंदीच्या शिंगासंबंधी एक कथा प्रचलित आहे, ती अशी – एकदा एका दैत्याशी लढता लढता नंदीचे एक शिंग तुटून पडले. त्याच्या अनुयायांनी ते शिंग शोधून काढले आणि त्याची मिरवणूक काढली. त्याची स्मृती म्हणून सांप्रत अशी मिरवणूक श्रावण महिन्यात काढतात. शिंग म्हणून एक लांब बांबू घेतात आणि त्याला रंगीत कापडाच्या पट्टया गुंडाळतात. बांबूच्या वरच्या टोकावर एक गोल व त्याच्यावर कोनाकृती बसवतात. बांबूच्या मध्यभागी दोन फळया बसवतात आणि त्यांच्यावर दोन पितळी नंदी स्थापतात. नंतर त्या बांबूची प्रमुख रस्त्यांतून मिरवणूक काढतात.

व्यासंतोल मिरवणुकीसाठी व्यासमुनींचा चिंध्यांचा एक हात बनवतात, तो नंदीच्या शिंगाला बांधतात आणि त्याची मिरवणूक काढतात.

विवाहप्रथा – लिंगायतांमध्ये बाल व प्रौढ अशा दोन्ही विवाहपद्धती आहेत. अर्थात कालमानाला अनुसरून प्रौढविवाहांची प्रथा अलिकडे रूढ होत चालली आहे. समान कुल-गोत्रांत लग्ने करीत नाहीत. मावसबहीण किंवा मोठ्या बहिणीची मुलगी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…शी लग्न करता येते. घटस्फोट व पुनर्विवाह यांना मान्यता …हे. वारसाहक्काचा कायदा इतर हिंदूंच्या कायद्याप्रमाणे आहे. परंपरेप्रमाणे लग्न करायचे झाल्यास ते पुढीलप्रमाणे होते – वरपिता वधूपित्याकडे जाऊन मुलीला मागणी घालतो. तो

लिंगवंजिग स्त्री

…उभयपक्षी संमत ठरल्यास ज्ञातिबांधवांसमक्ष सोयरीक …करतात. मग वधू-वरांस पोषाख देतात. उभयपक्षी विडे …जातात. यांना साक्षीविडे म्हणतात. लग्नाच्या आधी वधू-…वरपक्षाला मेजवानी व पोषाख देतो. या कृत्याला बाशनगी …. लग्नाआधी गुग्गुळविधी असतो. (गुग्गुळ पाहा) …अरशन, देवकार्य, गुरूची पाद्यपूजा, इ. कृत्ये होतात. …वरपुढ्यासाठी जंगमाला घेऊन वधूच्या घरी जातात. …साडी-चोळी, दोन नारळ, पाच हळकुंडे, पाच लिंबे आणि …एवढे साहित्य बरोबर घेतात. वधूसाठी कांबळे आंथर-…त्यावर तांदूळ घालतात. वधू फुलांचा मुकुट घालून त्या

कांबळ्यावर बसते. मग आणलेल्या वस्तूंनी तिची ओटी भरतात. सुवासिनी घोंगडीवरचे तांदूळ घेऊन ते वधूचे गुडघे, खांदे व मस्तक यांवर तीन वेळा टाकतात. मग साखर व विडे वाटतात. वधूकडचा एखादा मोठा माणूस नियोजित वराला वधू दिल्याची घोषणा करतो. त्यावर वरपक्षाकडून स्वीकाराची घोषणा होते.

लग्नसमारंभ सामान्यपणे चार दिवस चालतो. पहिल्या दिवशी पितरांची पूजा होते. दुसऱ्या दिवशी तेल व तांदूळ मठाकडे पाठवतात व नातेवाईकांनाही देतात.

तिसरा दिवस सर्वांत महत्त्वाचा असतो. त्या दिवशी पाच मुख्य आचार्यांची प्रतीके म्हणून पाच कलश देवघरात स्थापतात. चार कोपऱ्यांना चार व मध्ये एक अशी त्यांची मांडणी असते. त्यांवर नारळ, खजूर, विडा आणि रुमालात बांधून एक पैसा ठेवतात. या पाचांच्या साक्षीनेच लग्नविधी व्हायचा असतो.

लग्नासाठी बोहले घालतात. त्याच्या चारही बाजूंना सूत्रवेष्टित असे चार कलश मांडतात. वराला बोहल्यावर बसवून पाच सुवासिनी त्याला तेलहळद लावतात. मग कुटुंबातली प्रौढ स्त्री आदल्या दिवशी पितरांच्या नावाने काढून ठेवलेली वस्त्रे वधूवरांना नेसायला देते. मग वधू-वरांना सजवले जाते. वर बैलावर बसून देवदर्शनाला जातो. तिथे देवळात त्याला बाशिंग बांधतात.

लग्नात अंतरपाट नसतो. वर गुरूच्या पुढे बसतो. वधू वराच्या डाव्या बाजूला बसते. गुरू त्या दोघांचे हात दर्भांनी बांधतो आणि त्यांवर पाणी घालून फुले व बिल्वपत्रे वाहतो. मग त्या दोघांच्या मनगटांत तो सूत्रबंधन करतो व 'सुमुहूर्त सावधान' म्हणतो. उपस्थित असलेले स्त्री-पुरुष वधूला स्पर्श करून उभयतांना आशीर्वाद देतात. वराने वधूच्या गळ्यात मंगळसूत्र बांधल्यावर सर्व मंडळी वधू-वरांवर अक्षता टाकतात. वधू-वर एकमेकांच्या कपाळी जिरे व गूळ लावतात. मग वधू-वरांच्या वस्त्रांची गाठ मारतात. वधू वराच्या पाया पडते. वर तिच्या डोक्यावर अक्षता टाकतो. मग हे नवे जोडपे पाच जंगमांना फळे व एकेक पैसा देते. त्यानंतर वधू-वरांचे पाय धुवून त्यांना अहेर करतात व इष्टमित्रांना भोजन घालतात.

चौथ्या दिवशी बैलावरून वरात काढतात. वरात परत फिरताना वधू-वर एकमेकांवर सुवासिक गुलाल उधळतात. नंतर मेजवानी होते. या मेजवानीला फक्त नातेवाईकांना बोलावतात. मग वधू-वर आपल्या मनगटांचा सूत्रबंध सोडून तो उंबरठ्यावर ठेवतात. त्याच वेळी पाच सुवासिनींचा सत्कार करतात.

मर्तिकप्रथा – मनुष्य आसन्नमरण झाला, की विभूतिवेळाई नावाचा विधी करतात. त्यासाठी रुग्णाला स्नान घालून त्याला जंगमाचे पादतीर्थ देतात. जंगमाला दक्षिणा देतात. नंतर सर्वांना भोजन वाढतात. माणूस मरण पावला, की त्याचे प्रेत आसनावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसवतात. जंगम आपला डावा हात प्रेताच्या उजव्या मांडीवर ठेवतो. मृताला सुगंधलेपन करून वस्त्रालंकार घालतात. उपस्थित लोक प्रेताला नमस्कार करतात. प्रेताला स्मशानात नेल्यावर सहा हात लांबीरुंदीचा खड्डा खणतात. उत्तरेकडे तोंड करून प्रेत त्यात बसवतात. त्या जागी एक कोनाडा करतात. प्रेताच्या गळयात एक चिठ्ठी बांधतात. 'हे शिवा, तू आपल्या भक्ताला कैलासात स्थान दे' असा तिच्यात मजकूर असतो. कुटुंबियां-कडून दक्षिणा मिळाल्यावर गुरु त्या चिठ्ठीवर सही करतो. प्रेताच्या डाव्या हाती लिंग देतात. प्रेताच्या भोवती नारिंगी वस्त्र गुंडाळतात. प्रेत बसलेल्या स्थितीतच पुरतात. मृत अविवाहित असल्यास त्याचे प्रेत कलते ठेवून पुरतात. खड्डा बुजवल्यावर जंगम ठरलेले दान घेऊन खड्ड्यावर उभा राहतो व मृत इसम कैलासाला गेल्याचे जाहीर करतो. एवढ्याने अंत्यविधी संपतो. लिंगायत प्रेताचे क्रियाकर्मांतर करीत नाहीत. काही लोक मात्र श्राद्ध तेवढे करतात. पाहा – वीरशैव संप्रदाय. [हिं. क. भ. तु. भ.; प्रा. म. धा. इ.; संस्कृति–सुगंध — संपा. पं. वेंकटेश-शास्त्री जोशी, १९७०; द्रा. का. बां.]

लिंगार्चन व्रत एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध त्रयोदशीला शनिवार असेल, तर त्या दिवशी हे व्रत करतात. शिवाच्या शंभर नावांचा जप आणि प्रदोषसमयी लिंगाला पंचामृताचे स्नान घालून त्याची पूजा, हा या व्रताचा मुख्य विधी आहे. फल – इष्टकामनापूर्ती. [हि. ध.]

लिंगोद्भवमूर्ती एक शिवमूर्तिप्रकार. एकदा ब्रह्मा व विष्णू यांच्यामध्ये श्रेष्ठ कोण याविषयी कलह चालला असता तिथे एकाएकी एक अग्निस्तंभ उत्पन्न झाला. तेव्हा त्या स्तंभाचे आदि–अंत शोधून काढील, तो श्रेष्ठ असे ठरले. ब्रह्मदेव शिखराचा शोध घेण्यासाठी हंसरूपाने आकाशात उडाला व विष्णू वराह बनून मूळ शोधण्यासाठी पाताळात गेला. पण दोघांनाही त्या कामी यश आले नाही. शेवटी ते थकले व त्यांनी त्या अग्निस्तंभाची प्रार्थना केली. तेव्हां तिथे लिंगोद्-भवरूपात शिव प्रकट झाला व त्याने, तुम्ही दोघेही आपापल्या अधिकारात श्रेष्ठ आहात, अशी त्या दोघांची समजूत घातली.

ही मूर्ती कशी करावी हे सुप्रभेदागम नामक ग्रंथात सांगितले आहे, ते असे – लिंगामध्ये मुकुट व पाय लुप्त झालेले, वरच्या बाजूला हंस, खालच्या बाजूला वराह, पाठीमागे ब्रह्मदेव व विष्णू मूळ स्वरूपात उभे.

या प्रकारच्या मूर्ती अंबरमागाळम्, तंजाऊर व वेरूळ या ठिकाणी दिसतात. वेरूळच्या लेण्यातला लिंगोद्भव शिव हा सांग सपरिवार असून, तो ज्वालायुक्त स्तंभावर काढलेल्या एका लंबवर्तुळात आहे. तंजाऊर येथील बृहदीश्वर मंदिरातील



लिंगोद्भवमूर्ती – बृहदीश्वरमंदिर, तंजाऊर

लिंगोद्‌वमूर्ती ही चोळ राजांची शिल्पकृती आहे. तिच्यातला शिव चतुर्भुज असून, त्याच्या एका हाती परशू व एका हाती मृग आहे आणि एक हात अभय मुद्रेत व दुसरा कटयवलंबित अवस्थेत आहे. ही शिवमूर्ती एका स्तंभावरील लंबवर्तुळाकार खोबणीत कोरलेली आहे. तिच्या वरच्या बाजूला ब्रह्मदेव वर जाताना दिसत असून, खालच्या बाजूला वराहरूपी विष्णू भूमीत सोंड खुपसताना दाखविला आहे.

वेरूळ येथील दशावतार लेण्यातील शिल्पात अग्निस्तंभाच्या बाजूला ब्रह्मा व विष्णू लिंगपूजा करताना दिसतात. उत्तर भार-तात अशा मूर्ती फारशा आढळत नाहीत. [मू. वि.; डे. हिं. इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोपनिषद एक नव्य उपनिषद. हे अगदी छोटे असून, गद्य आहे. यात लिंग म्हणजे शिवाचे जननें-परमेश्वराचे मूर्त स्वरूप, स्थूल देहाचे लिंगदेहरूप, असे विविध अर्थ सांगून, लिंगपूजेचे माहात्म्य वर्णिले आहे. ...नुसार जे लिंग धारण केले जाते, ते श्रौत व जे अमंत्रक ...केले जाते ते अश्रौत होय. लिंगधारण हा संन्यासाच्याही ...म्हणजे पाचवा आश्रम होय. मोक्ष म्हणजेच लिंगधारण ...समजावे. [श्री. सी. ग. देसाई]

...न्हाण काही जातींतली लग्नाच्या आधीची एक प्रथा. मुलगा लग्नाला निघण्यापूर्वी त्याला त्याच्या ...(बापाची आई) मांडीवर बसवून तिला न्हाऊ घाल-...रिवाज आहे. त्या वेळी तांदुळाच्या पिठाच्या लहान गोळ्या ...व आजी न्हायला बसली, की तिच्या डोक्यावर एक ...धरून तिच्यावर त्या गोळ्या ओततात. पितळी ...ल्यावर पुन्हा तिच्या व नवऱ्या मुलाच्या डोक्यावर ...यांतले थंड पाणी ओततात. हे पाणी पाच सुवासि-...गाजत तळ्यावरून अथवा विहिरीतून आणलेले ...स्नानानंतर आजी व नातू गरम पाण्याने स्नान कर-...जी विधवा असली तरीदेखील तिला हे न्हाण घाल-...जी नसली तर मानलेली आजी स्नानाला बसवितात. ...गोळ्यांना लिंबोट्या असे म्हणतात. त्यावरून या ...लिंबन्हाण हे नाव मिळाले असावे.

...णे मुलीच्या आजीलाही लिंबन्हाण घालतात. हे ...च्या मांडवात होते. पण ते लग्नानंतर मुलगी नव-...री जाते त्या दिवशी होते. अनेक जातींत ही चाल ...मिळते. कुंभार लोकांत मुलाच्या आंघोळीच्या वेळी ...आई, आजी, मावशी व आत्या यांचेही न्हाण होते. हे ...वर मग मुलाला बाशिंग बांधतात. [रज:कण]

...वी मुलीला न्हाण आले की करायचा एक विधी. याला कुवाराचा लिंब असे म्हणतात. ही चाल ...पट्टीत काही जातींमध्ये होती. परंतु आता ती नष्ट ...आहे. हा विधी असा – मुलगी प्रथम रजस्वला झाली, की ...ने ओटी भरतात. तिच्या हातात लिंबाच्या डहाळ्या ...तिला मामाच्या कडेवर बसवून मिरवीत नदीवर ...नेतात. तिथे मामा हातात तोरणीची काठी घेऊन व नग्न ...मुलीला मांडीवर घेतो. मग त्या दोघांनाही घोंगडीने ...नंतर त्या लिंबाचे व तोरणीच्या काठीचे नदीत विस-...र्जन. कुमारिकेचा कौमार्यभंग मामाने करायचा ही कल्पना यात अभिप्रेत असावी, असे श्रीमती दुर्गा भागवत यांचे मत आहे. ही प्रथा भारतात अन्यत्र कुठेही पाहायला मिळत नाही. परंतु हा लिंबविधी ग्रीक परंपरेत, भूमध्य-संस्कृतीत व आफ्रिकन जमातींत आढळतो.

कुवारलिंबाची चाल लुप्त झाली असली, तरी त्या चाली-विषयीची काही गीते अजून रेंगाळत राहिली आहेत. या गीतां-मध्ये आर्तवाला मृगसरीची उपमा दिलेली आहे. लोकसंस्कृतीत मृग नक्षत्राच्या आणि आर्तवाचा निकट संबंध मानलेला आहे. हे नक्षत्र लागले आणि मृगाचे लाल इंद्रगोप किडे फिरू लागले, की पृथ्वी ऋतुस्नात झाली, अशी शेतकऱ्यांची समजूत असते. त्या काही दिवसांत ते शेतीची कोणतीही कामे करीत नाहीत; जमीनही नांगरीत नाहीत. लिंबाच्या गाण्यातले एक गीत असे –

आभा गडाडे आभावरी आला पाऊस मिरगाचा
थेंब पडतो मोतीयाचा काढाया काढाया तोरणीच्या
कुठे लिंबा तुरे जाशी लिंब जातो तो नदीवरी
लिंब जातो तो मावळ्याच्या मांडीवरी

भारतात अनेक ठिकाणी लिंबाचा पावसाशी संबंध जोडलेला आहे; तसेच त्याचे लैंगिकतेशी नाते आहे. [म. जी. २]

लिखित एक स्मृतिकार. प्रसिद्ध वीस स्मृतिकारांपैकी हा एक आहे. याच्या स्मृतीत ब्राह्मणांची कर्तव्ये, इष्टापूर्त, श्राद्ध, द्विजाचार, प्रायश्चित्तविधी, इ. विषय आलेले आहेत. पुढच्या धर्मशास्त्रकारांनी, विशेषतः, विज्ञानेश्वर आणि अपरार्क यांनी लिखितस्मृतीचा उल्लेख केला आहे.

शंखलिखितस्मृती नामक एक स्मृतिग्रंथ उपलब्ध आहे. शंख आणि लिखित या दोघांनी मिळून ती लिहिली असावी, असे वाटते. शंख हा लिखिताचा भाऊ होता, असे महाभारतात (शांति. २३) सांगितले आहे. [हिंदुत्व; कं. सं. लि.]

लिच्छवी बुद्धकाली अस्तित्वात असलेला एक प्राचीन गण. पूर्व भारतातली ही एक प्रसिद्ध व प्रबल जमात होती. लिच्छवी शब्दाची लिच्छिवी, लेच्छई, निच्छवी, इ. विभिन्न रूपे आढळतात. पाली ग्रंथांमध्ये प्राय: लिच्छवी असा शब्द येतो. पण बौद्ध अवदान ग्रंथांत लेच्छवी असे त्याचे रूप आढळते. प्राचीन जैन ग्रंथात लेच्छई असा पर्याय आहे. अर्थ-शास्त्रात लिच्छिविक असे रूप आढळते.

शूर, धाडसी, उत्सवप्रिय व भूमीवर प्रेम करणारे असे लिच्छवी जनांचे वर्णन सर्वत्र केलेले आढळते. निळा रंग हा त्यांचा राष्ट्रीय रंग होता. त्यांचे घोडे, रथ, वस्त्र, प्रावरणे हे सरे नळपा रंगाचे होते. शिकार करणे, हत्ती पकडणे, असे मर्दानी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खेळ त्यांना आवडत. विद्याकलांचे ते लोक भोक्ते होते.

वैशालीच्या साम्राज्याच्या प्रारंभापासूनच लिच्छवी वंशाचे राजे ब्राह्मणांच्या दृष्टीने पतित किंवा व्रात्य समजले जात होते. लिच्छवी लोक जैन व बौद्ध यांचे प्रमुख पुरस्कर्ते होते, हे त्याचे कारण असावे. ते स्वतःला मात्र क्षत्रिय समजत. जेव्हा वैशालीच्या लिच्छवींनी बुद्धाचे निर्वाण झाल्याचे ऐकले, तेव्हा त्यांनी मल्लांना निरोप पाठवला. ' भगवान बुद्ध क्षत्रिय होते. आम्हीही क्षत्रिय आहो. तेव्हा बुद्धाचा रक्षावशेष आम्हांलाही मिळाला पाहिजे '. महाली नामक एक लिच्छवी राजा म्हणतो. ' जसा बुद्ध क्षत्रिय आहे, तसाच मीही क्षत्रिय आहे. जर बुद्धाला ज्ञानप्राप्ती होऊन तो सर्वज्ञ बनू शकतो, तर मी का म्हणून तसा होऊ शकणार नाही ! ' चेतक नावाचा एक वैशालीचा राजा होता. त्याची बहीण त्रिशला भगवान महावीराची आई होती. तिला सर्व ठिकाणी क्षत्रिय स्त्री असेच म्हटले आहे. ज्या शाक्य वंशात बुद्धाचा जन्म झाला, तो वंश तीन विभागांत विभाजित होता. महाशाक्य, लिच्छवी शाक्य व पर्वतीय शाक्य असे ते तीन विभाग होत. हे सर्व विभाग स्वतःला क्षत्रिय समजत.

शाक्य वंश हा वसिष्ठगोत्री समजला जात होता. जेव्हा वैशालीतली महामारी दूर करण्यासाठी बुद्ध वैशालीला गेला, तेव्हा त्याचे वसिष्ठ म्हणून तियल्या लोकांनी स्वागत केले (महावस्तू १.२८३). नेपाळ-वंशावळीत लिच्छवींना सूर्यवंशी म्हटले आहे. त्यावरून लिच्छवी हे वसिष्ठगोत्री क्षत्रिय होते, हे सिद्ध होते. मनूने मात्र लिच्छवींना झल्ल, मल्ल, नट, करण यांच्यावरोबर क्षत्रियांतले व्रात्य म्हटले आहे (१०.२२). पण सर्व बौद्ध साहित्यात त्यांना उत्तम क्षत्रियच म्हटले आहे.

वैशाली नगरीत लिच्छवींचे राज्य होते. लिच्छवींची उत्पत्ती कशी झाली व वैशालीचे राज्य त्यांना कसे मिळाले, याविषयी बौद्ध टीकाकारांनी एक दंतकथा निर्माण केली आहे, ती अशी–

वाराणसीच्या राणीला अपत्य म्हणून एक मांसपिंड झाला. तिने तो एका लाकडी पिंजऱ्यात घातला आणि त्याच्यावर मोहर करून तो गंगेत लोटून दिला. एका संन्याशाला तो पिंजरा सापडला. त्याने तो मांसपिंड काढून घेतला आणि त्याची नीट जोपासना केली. थोड्याच दिवसांनी त्यातून एक जुळे जन्माला आले. एक मुलगा आणि एक मुलगी. त्या दोघांची त्वचा इतकी पारदर्शक होती, की त्यांच्या पोटात जाणारा पदार्थ स्पष्ट दिसत असे. त्यांना जणू त्वचा नाहीच (निच्छवी) असे वाटे. जेव्हा हे जुळे मोठे होऊ लागले, तेव्हा ते अत्यंत खोडकर आणि भांडखोर बनले. त्यामुळे अन्य कोणी त्यांच्याशी खेळायला येईनात. त्यावरून त्या दोघांना वर्जित (वज्जी) समजले जाऊ लागले. वयात आल्यावर त्या दोघांनी परस्पर–विवाह केला. त्यांच्यासाठी गावातल्या लोकांनी राजाकडून भूमी मिळवली. त्या भूमीवर त्या दोघांनी नगर वसवले. या नगराचा वारंवार विस्तार करून ते विशाल बनवावे लागले. त्यामुळे त्या नगराचे वैशाली असे नाव पडले. तिथे त्यांनी आपले राज्य मांडले.

ही दंतकथा सोडली तर लिच्छवी हे संभवतः पुराणे व महाकाव्ये यांत उल्लेखिलेले ऋक्ष असावे. हे लोक पहाडी होते व ते नेपाळ व तिबेट यांच्या सखल भागात राहत होते. ऋक्षचाच अपभ्रंश पुढे लिच्छ झाला आणि त्या वंशाच्या लोकांना लिच्छई किंवा लिच्छवी म्हणू लागले. सिंह हे लिच्छवींचे जातीय चिन्ह होते. लिच्छवींनंतर शिशुनाग व गुप्त या राजांनीही ते स्वीकारले. लंकेचे सिंहल हे नावही सिंहावरूनच पडले आहे (दीपवंश ९.१). प्राचीन काली तृणबिंदूच्या कारकिर्दीत वैशालीच्या लोकांनी लंकेत आपली वसाहत स्थापली होती, असा इतिहास सापडतो.

लिच्छवींचे राज्य हे गणराज्य होते. ते कधी स्थापन झाले, हे निश्चित सांगता येत नाही. विदेह राजवंशाचे पतन झाल्यानंतर हे गणराज्य स्थापन झाले असावे. विदेहांचे राज्य लिच्छवींच्या शेजारीच होते. लिच्छवींचे गणराज्य महाशक्तिशाली होते. लिच्छवी लोक राजप्रमुखाला राजा म्हणत. लिच्छवींचे बळ त्यांच्या संघटित ऐक्यात होते. ते कोणालाही कनिष्ठ वा वरिष्ठ लेखीत नसत. जातकांमधून त्यांच्या गणराज्याचे संविधान आढळते, ते असे –

राजा, उपराज, सेनापती व भांडागारिक हे त्या राज्याचे प्रधान अधिकारी असत. लिच्छवींची लोकसंख्या १,६८,००० होती. लिच्छवी लोक राज्य करण्यासाठी ७,७०७ लोकांची निवड करीत. वरील चार अधिकारी त्यांतूनच निवडले जात. त्या राज्यात राजा, उपराज व सेनापती यांनी एकमताने निर्णय दिल्याशिवाय कोणालाही अपराधी ठरविले जात नसे. त्यांच्या न्यायसभेत अष्टकुल (ज्यूरी) पद्धतीही प्रचलित होती. बुद्धाने आपल्या संघाची व्यवस्था लिच्छवींच्या राज्यपद्धतीला धरून केली होती. यावरून तत्कालीन लोकांत या गणराज्याचा बोलबाला केवढा होता, ते कळून येईल.

बौद्ध वाङ्मयात लिच्छवींचा गौरव आहे. बुद्धाने लिच्छवींना आळस व कष्टाळू म्हटले आहे. तो म्हणतो, की लिच्छवींना मऊ गाद्या-विलासिता अजिबात ठाऊक नाही. त्यांना झोपायला मऊ गाद्या-उशा लागत नाहीत. ते लाकडी फळकुटावरही सुखाने झोपतात.

लिच्छवी व विशाला नगरीचे राज्यकर्ते मागध यांचे विरुद्ध होते. गंगा नदीच्या तीरावर एक योजनमात्र क्षेत्र असे होते, की त्याच्या अर्ध्या भागावर लिच्छवींचे व अर्ध्या भागावर मगध अजातशत्रूचे शासन चालत होते. त्याच्या जवळच एका डोंगरात बहुमूल्य रत्नांची एक खाण होती. लिच्छवी लोक वारंवार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…धाण लुटीत व अजातशत्रूला अनेक प्रकारे त्रास देत. शेवटी अजातशत्रूने लिच्छवींचा बीमोड करण्यासाठी मोठी योजना आखली. मागध सैन्य विशाला नगरीतून नौकांत बसून वैशालीकडे निघाले. पण लिच्छवी त्या वेळी मस्तीत होते. त्यांनी चालून येणाऱ्या शत्रूची दखलच घेतली नाही. त्यामुळे अजातशत्रूचे सैन्य नौकांतून उतरून सुखेनैव वैशाली नगरीत घुसले आणि लिच्छवींना मग काहीही करता आले नाही. अजातशत्रूने आपला विजय घोषित केला व लिच्छवींना मागधांचे आधिपत्य स्वीकारणे भाग पाडले. ज्या लिच्छवींना अजातशत्रूचे आधिपत्य मान्य झाले नाही, ते वैशालीतून पळाले आणि नेपाळात गेले.

इ. स. च्या २ ऱ्या व ३ ऱ्या शतकांत लिच्छवी नव्याने राजकीय क्षितिजावर उदय पावले. त्या काळी गुप्तराजांचेही वर्चस्व वाढत होते. गुप्त आणि लिच्छवी या दोन शक्ती एकाच वेळी उदय होऊ लागल्या होत्या आणि त्यांच्यामध्ये राज्यविस्ताराच्या बाबतीत स्पर्धा निर्माण झाली होती. पण महाराज घटोत्कच याच्या कालापर्यंत लिच्छवींना गुप्तांचे काहीही वाकडे करता आले नाही.

घटोत्कचाचा पुत्र चंद्रगुप्त होय. त्याने विचार केला, की लिच्छवींच्या राज्याशी शत्रुत्व वाढवून आपल्या शक्तीचा व्यय करण्यापेक्षा त्यांच्याशी सख्य करणे हितावह ठरेल. म्हणून चंद्रगुप्ताने लिच्छवींशी मैत्रीचा तह केला व तो दृढ होण्यासाठी त्याने लिच्छवींच्या राजकन्येशी लग्नही केले. हा विवाहसंबंध गुप्तांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण होता; म्हणून गुप्तांनी त्याचे स्मारक म्हणून अशी नाणीही पाडली. समुद्रगुप्त हा चंद्रगुप्ताचा पुत्र होता. त्याला आपण लिच्छविदौहित्र (लिच्छवी राजकन्येचा पुत्र) असे म्हणून घेण्यात अभिमान वाटे. या विवाहसंबंधाने गुप्तांच्या राज्यात लिच्छवींचा हात शिरला. त्यामुळे तिथे गुप्त व लिच्छवी अशा दोघांची द्वैराज्यप्रणाली जन्माला आली.

गुप्त व लिच्छवी यांचा राजनैतिक संबंध प्रस्थापित झाल्यामुळेच चंद्रगुप्त (१ ला) महाराजाधिराज बनू शकला. समुद्रगुप्ताचा दिग्विजयही त्यामुळेच शक्य झाला. दिग्विजययात्रेत लिच्छवींनी त्याला साथ दिली. लिच्छवी महत्त्वाकांक्षी होते, तसा समुद्रगुप्तही होता. त्यामुळे पुढे थोड्याच कालात त्या दोघांचे बिनसले. समुद्रगुप्त लिच्छवींना हळूहळू कमी लेखू लागला. लिच्छवींना हे कळून येताच ते बिथरले आणि समुद्रगुप्ताचे विरोधी बनले. पण दिग्विजयामुळे समुद्रगुप्ताची ताकद भरपूर वाढली होती. त्याने लिच्छवींशी सरळ सरळ सामना दिला आणि त्यांचे उन्मूलन केले.

या प्रकरणाने लिच्छवींत दोन गट पडले. त्यांपैकी एका गटाने गुप्तांचे आधिपत्य स्वीकारले. दुसरा गट जहाल होता त्याने मगधातून पळ काढला आणि तो नेपाळात आश्रयाला गेला.

पुढे लिच्छवींनी नेपाळात आपले राज्य स्थापन केले. वृषदेव, शंकरदेव व धर्मदेव ही अनुक्रमे नेपाळच्या मूळ लिच्छवी नरेशांची नावे होत. पण त्यांची विशेष माहिती मिळत नाही.

धर्मदेवाचा पुत्र मानदेव. तो राज्यावर आल्यानंतर मल्ल लोक लिच्छवींच्या विरुद्ध बंड करून उठले होते. पण मानदेवाने त्यांचे दमन करून नेपाळात शांती प्रस्थापित केली. मानदेवाने नेपाळवर सुमारे ४१ वर्षे राज्य केले. त्याने आपली नाणी पाडली व त्यांवर आपले ' मानांक ' हे बिरुद उठवले.

मानदेवाच्या पश्चात वसंतदेव हे नाव येते. त्याने २६ वर्षे राज्य केले.

वसंतदेवाच्या पश्चात रामदेव गादीवर आला. त्याचे फक्त दोनच अभिलेख मिळाले आहेत. त्याच्या पश्चात गणदेव राजा झाला. हे दोन्ही राजे फारसे प्रभावशाली नव्हते. त्यामुळे राज्यात आभीरांचा प्रभाव वाढला आणि लिच्छवींच्या सत्तेला गौणत्व आले. पुढे तर भौमगुप्त या आभीर पुरुषाने लिच्छवींचा पाडाव करून नेपाळवर स्वामित्व मिळवले.

भौमगुप्ताचा प्रभाव इ. स. ५६८ पर्यंत होता. त्या कालखंडात लिच्छवी शासक खालच्या मानेने राहिले होते. भौमगुप्ताची राज्यावरची पकड ढिली होत आहे, असे दिसताच शिवदेव नावाच्या एका पुरुषाने उठावणी केली. त्याला 'लिच्छविकुलकेतू' असे म्हटले आहे. त्याने आपला जावई अंशुवर्मा याच्या मदतीने आभीरांच्या तावडीतून नेपाळला मुक्त केले. शिवदेव हाच नेपाळचा अंतिम लिच्छवी राजा ठरला. त्याच्या मृत्यूनंतर सर्व सत्ता अंशुवर्म्याच्या हाती गेली. पाहा– नेपाळ. [प्रा. मौ. वि.; हिं. वि. को.; जा. का. भा. सं.; रा. ले. सं.; ज. स्मा. ग्रं.; प्रशांत कुमार जायसवाल – परिषद पत्रिका एप्रिल, १९६६]

लिपी

वर्ण किंवा ध्वनी यांचे लेखन करण्यासाठी ज्या चिन्हांचा उपयोग करतात, त्या चिन्हसमूहाला लिपी असे नाव आहे. एका चिन्हापासून जेव्हा एकाच ध्वनीचा बोध होतो, तेव्हा लिपीचा उद्देश सफल होतो.

आजची लिपी ही मानव बोलायला शिकल्यापासून हळूहळू परिणत झाली आहे. मानवाची संस्कृती जेवढी प्राचीन, तेवढीच लिपीही प्राचीन आहे.

प्रारंभी मनुष्य आपले विचार साध्या उभ्या-आडव्या रेघोट्या काढून व्यक्त करीत असे. रेघोट्या मारता मारताच चित्रे काढण्याइतकी त्याची प्रगती झाली. त्या चित्रांतून तो आपला आशय व्यक्त करू लागला. सूर्य, वृक्ष, साप, बकरी, इ. चित्रांनी त्या त्या वस्तूंचा व प्राण्यांचा बोध होऊ लागला. प्राचीन गुहा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निवासी माणसांनी कोरलेली चित्रे अलिकडे सापडली आहेत.

प्राचीन काळी इजिप्त व मेसापोटेमिया या देशांतही भावाची अभिव्यक्ती चित्रांच्या द्वारेच होत असे. पण इजिप्तमध्ये ही चित्रे प्रायः दगडांवर खोदीत आणि मेसापोटेमियात ती मातीच्या विटांवर खिळ्यांनी कोरीत. विटांचा पृष्ठभाग मऊ असल्यामुळे त्यांवर केवळ रेघाच ओढता येत; गोलाकार काढता येत नसत. उदा० तीनचार रेघा ओढून विटांवर माशाचे चित्र काढीत. त्यामुळे आरंभापासूनच ही चित्रे संकेतात्मक झाली. याच संकेतात्मक चित्रांतून पुढे इराणी लोकांनी अक्षरे बनविली. चित्रलिपी हा लिपीच्या विकासातील एक टप्पा होय.

वैदिक लोकांनी गणन व लेखन या बाबतीत बरीच प्रगती केली होती. भारतात प्रारंभी ब्राह्मी लिपीचा उपयोग केला जात असे. पण ती निश्चित केव्हा प्रचारात आली, ते सांगता येत नाही. मात्र ती सनपूर्व पाचव्या शतकात प्रचारात होती, एवढे निश्चितपणे म्हणता येते.

सनपूर्व चौथ्या शतकापूर्वी लिपी हा शब्द प्रचारात होता. पाणिनीच्या अष्टाध्यायीत लिपी, लिबी व ग्रंथ या शब्दांचा वापर केलेला आहे. तसेच त्याने लिपिकर व यवनानी हे शब्द बनवण्याचे नियम दिले आहेत. कात्यायन व पतंजली यांनी यवनानी शब्दाचा अर्थ यवनांची लिपी असा दिला आहे. त्यावरून त्या काळी यावनी लिपी प्रचारात होती, असे समजते.

ब्राह्मी, राठोडी, देवनागरी, इ. लिप्या डावीकडून उजवीकडे लिहितात, तर उर्दू, फारसी, अरबी, इ. लिप्या उजवीकडून डावीकडे लिहितात.

सांप्रत भारतात अनेक लिप्या प्रचलित आहेत. चांगल्या लिपीचे काही निकष पुढीलप्रमाणे आहेत –

(१) निश्चितता – एका वर्णाचा एकच ध्वनी असणे.

(२) जसे लिहिले असेल, तसेच वाचता येणे, म्हणजे उच्चाराच्या बाबतीत संदेह नसणे. उदा० कमल हा शब्द आपण जसा लिहितो, तसाच त्याचा उच्चार करतो आणि तसाच तो वाचतो.

(३) शब्दातील प्रत्येक अक्षराचा उच्चार करावा लागणे.

(४) एकाच ध्वनीची अनेक लिपिचिन्हे नसावी. नाहीतर कोणत्या वेळी कोणते लिपिचिन्ह योजावे, त्याबद्दल गोंधळ होईल.

(५) लिपी दिसण्यात आकर्षक असावी.

(६) लिपी जलद गतीने लिहिता यावी.

(७) ती मुद्रणसुलभ असावी.

सांप्रत वर्णमालायुक्त लिपीचा प्रचार जगातील बहुसंख्य देशांत असला, तरी चित्रलिपीचा वापरही काही देशांत चालू आहे. चिनी, जपानी व भारताच्या पूर्वेकडील देशांतील काही भाषा यांची लिपी ही चित्रलिपीच आहे. फक्त ती प्रगत चित्रलिपी आहे. चित्रांच्या साहाय्याने संदेश देण्याची पद्धत तर जगात सर्वत्र प्रचलित आहे. 'स्त्रियांसाठी' व 'पुरुषांसाठी' हे शब्द न वाचता येणाऱ्या प्रवाशांसाठी रेल्वेस्टेशनवरच्या शौचस्थानावर स्त्री व पुरुष यांची चित्रेच लावलेली असतात. 'या मार्गाने जावे' हे बाणाचे चित्र काढून दाखवलेले असते.

भारतात अनेक भाषा व त्यांच्या अनेक लिप्या प्रचलित आहेत. या सर्व भाषांसाठी जर एकाच राष्ट्रीय लिपीचा स्वीकार केला गेला, तर या भाषा शिकण्याचे काम सुकर होईल, असे विद्वानांचे मत आहे. [दे. लि. स्व. वि. स.; सा. भा. वि.; म. ज्ञा. को.; प्रा. ना. बा. मराठे, नवभारत, डिसेंबर १९६६]

लीलापा

(इ. स. च्या ८ व्या शतकाचा पूर्वार्ध) चौऱ्यायंशी सिद्धांतला दुसरा सिद्ध. याला लीलावज्र असे दुसरे नाव आहे. हा मगध देशाचा रहिवासी असून, कायस्थ जातीचा

लीलापा

होता. सरहपा हा याचा गुरू होय. श्री. विनयतोष भट्टाचार्यांनी लीलावज्र नावाच्या एका सिद्धाची चर्चा करून असे म्हटले आहे, की लीलापा हा भगवती लक्ष्मींकर व विलासवज्र यांचा शिष्य आहे. दारिकपा आणि प्रसिद्ध कवी करुणाचल हे याचे शिष्य होत.

भट्टाचार्यांनी चर्चिलेला लीलावज्र हा खरोखरीच लीलापा असेल तर तो एक वज्राचार्य म्हणून प्रसिद्ध होता आणि त्याने अनेक ग्रंथ रचले आहेत, असे म्हणावे लागते. त्याच्या सुमारे नऊ ग्रंथांचा अनुवाद तंजूरमध्ये आहे. त्यांत विकल्पपरिहारगीती हा एकमेव ग्रंथ प्राचीन हिंदीत आहे. [हिं. सा. बि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लीळाचरित्र मराठी भाषेतील पहिला गद्य ग्रंथ. हा ग्रंथ म्हाइंभट नामक महानुभाव पंडिताने इ. स. १२८३ च्या सुमारास रचला. यात महानुभाव पंथाचा संस्थापक श्रीचक्रधर याचे सविस्तर चरित्र छोटचा छोटचा आठवणींच्या रूपाने सांगितले आहे. चक्रधराचा संचार गोदावरीच्या उभय तीरांवर आणि समाजाच्या सर्व थरांत होता. त्यामुळे म्हाइंभटाच्या हातून चरित्राच्या अनुषंगाने तत्कालीन समाजाचे चित्रही रंगविले गेले आहे. त्यात त्या समाजाच्या चालीरीती, सणवार, व्रतवैकल्ये, व्यापार, उद्योगधंदे, जाती, गुन्हे, शिक्षा, वेषभूषा, शेती, आहारविहार, विटाळचांडाळ, वजने–मापे, संस्कार, समजुती, विविध रोग व त्यांवरील उपचार, इ. अनेक सांस्कृतिक बाबी ओघाने आल्या आहेत

यादवकालीन समाजाच्या सांस्कृतिक गोष्टींचे व समाजजीवनाचे अध्ययन करणाऱ्याला हा ग्रंथ आधारभूत ठरला आहे. शिवाय चक्रधराची वाङ्मयी मूर्ती म्हणूनही या ग्रंथाचे विशेष महत्त्व आहे.

या ग्रंथातल्या सर्व आठवणी दैनंदिन व्यावहारिक भाषेत लिहिलेल्या असल्याने तत्कालीन भाषेची मोडणी समजण्याचे हे उत्तम साधन आहे.

एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध अशी या ग्रंथाची विभागणी आहे. तीन भागांत मिळन सुमारे साडेनऊशे लीळा आहेत. परंतु श्री. ल. भावे व श्री. य. खु. देशपांडे यांच्या मते या लीळांची संख्या १५०९ इतकी आहे. या ग्रंथाचा उत्तरार्ध अगोदर, पूर्वार्ध नंतर आणि सर्वांत शेवटी एकांक रचला गेला.

निर्मितीची पार्श्वभूमी – चक्रधराचे निर्याण झाल्यावर त्यांचे शिष्यमंडळी रिद्धपूरला गोविंदप्रभूच्या आश्रयाला गेले. प्रारंभी त्यांना चक्रधराच्या वियोगाचे दुःख अनावर होते. त्यामुळे त्याच्या आठवणींना उजळा देत देत जीवन कंठणे हाच सर्व शिष्यांच्या विसाव्याचा व्यवसाय झाला होता. त्यातूनच लीळाचरित्राची कल्पना स्फुरली आणि त्याची उभारणी झाली. म्हाइंभटाने अपार कष्ट घेऊन मोठ्या सांक्षेपाने आठवणी जमा केल्या. त्याच्या साक्षेपाची जाणीव स्मृतिस्थळांतील पुढील लीळेवरून दिसून येते –

म्हाइंभटा लीळाश्रवणें भटी लीळाशोधनानुज्ञाः ।। मग म्हाइंभटीं भटोबासांपुढां अवघे सांधीतलें: गोसावियांचीया लीळा शोधुनि आणिलियाः तिया संवादिलीयाः होयें ते भटोबास म्हणतिः नव्हे तेथ म्हणतिः हे श्रीमुखीचे सब्द नव्हेतिः हे होतिः मग म्हाइंभटांते म्हणितलेः उपाध्याचियें अनुभवीचीया त्या त्याते पुसावीयाः नाथोवीयाः नाथोचीयें अनुभवीचीया तिया त्यातें पुसावीयाः साधांचीयें अनुभवीचीया तिया साधांते पुसावीयाः मग यैसीयाचिपरी ज्याचीयें अनुभवीचीया त्या त्यातेचि पुसावीयाः यैसें भटोबासीं म्हाइंभटातें विहीलें: मग म्हाइंभटबासीं तैसेचि करूनि मागीलाचिपरी भटोबासीं संवादिलीयाः मग उत्तरार्ध–पूर्वार्ध दोनि विभाग केले:

नागदेवाचार्य हा चक्रधराचा अंतरंग शिष्य व मोठा अधिकारी असल्याने साहजिकच प्रत्येक लीळा त्याला विचारून घेतली जाणे हे स्वाभाविक होते. त्यातूनच या ग्रंथाला प्रामाण्य प्राप्त झाले.

निर्मितीचा इतिहास – लीळाचरित्र लिहून पुरे झाल्यावर थोड्याच काळात दक्षिणेत मुसलमानांच्या स्वाऱ्या सुरू झाल्या. अशाच एका स्वारीमुळे अनेक महानुभावीयांची पळापळ झाली. त्या धांदलीत लीळाचरित्राची मूळ प्रत हरवली. त्यामुळे हा ग्रंथ पुन्हा लिहिणे भाग पडले.

सुदैवाने ग्रंथातील सर्व लीळा पाठ असणारी हिराइसा किंवा हिरांबा हिच्यासारखी काही माणसे तेव्हा हयात होती. हिराइसाने सांगितलेल्या लीळांच्या आधारे परशरामबासाने हा ग्रंथ पुन्हा लिहून काढला. त्या वेळी त्याला हिराइसाप्रमाणे आणखीही काही लोकांची मदत झाली. त्या सर्वांची मते (वासना) एकत्रित करून या संहितेचा पाठ त्याने तयार केला. त्यालाच पिढीपाठ असे म्हणतात. परशरामबासाप्रमाणेच अचळमुरारीचा शिष्य शिवबास यानेही या चरित्राची शोधनी करून पिढीपाठाची नवीन प्रत तयार केली. तीदेखील पंथीयांमध्ये पिढीपाठ म्हणूनच मान्यता पावली. शिवबासाप्रमाणेच पारमांडल्य आम्नायातील नागनायबासानेही चरित्राचा आणखी एक पाठ तयार केला. शिवबास व नागनाथ या दोघांच्याही पाठांना या पंथात प्रामाण्य होते. याशिवाय दत्तोबास तळेगावकर व वाइंदेशकर यांनीही लीळाचरित्राचे पाठ तयार केले. पण या पाठांना पंथात प्रतिष्ठा लाभली नाही. इतकेच नाही; तर ते पाठ अप्रमाण म्हणून मानले गेले.

वर लीळाचरित्राचा रचनाकाल आणि कर्ता हे दोन्ही दिले असले तरी, या संदर्भात मतमतांचा गलबला खूपच आहे.

लीळाचरित्रातून सूत्रपाठ, दृष्टांतपाठ, यासारखे ग्रंथ निर्माण झाले आहेत. केशिराजबासाच्या रत्नमाला स्तोत्रात चक्रधरांच्या काही लीळांचा संस्कृत अनुवाद पाहायला मिळतो. त्यामुळे मराठीचा संस्कृत अनुवाद होण्याचा पहिला मान लीळाचरित्राला मिळाला आहे. पाहा – महींद्रव्यास, नागदेवाचार्य, केशवव्यास, मराठी भाषा व साहित्य. [म. सा. आवृत्ती ५ वी; एकांक– श्री. शं. गो. तुळपुळे; स्मृतिस्थळ– श्री. वा. ना. देशपांडे; चक्रधर चरित्र–श्री. वि. भि. कोलते; या. का. म.; प्रवास –श्री. शं. गो. तुळपुळे.; म. वा. इ.; प्रा. म. वा. इ. भाग १]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लुंबिनी एक वन व बौद्ध क्षेत्र. हे नेपाळच्या तराईत भारतीय सीमेपासून चार मैल आत आहे. प्राचीन काळी हे ठिकाण कोसल देशात मोडत होते. इथे त्या काळी शालवन होते. गौतम बुद्धाची माता मायादेवी हिचे माहेर देवदहनामक नगरात होते. ती आसन्नप्रसव अवस्थेत असताना आपल्या पतीला म्हणजे शुद्धोदन राजाला म्हणाली. 'महाराज, मी माहेरी जाऊ इच्छिते.' राजाने तिला अनुमती दिली आणि कपिलवस्तू नगरापासून देवदहपर्यंतचा मार्ग केळी, पूर्णघट, ध्वजपताका, इ. मांगलिक वस्तूंनी सुशोभित केला. मग मायादेवीला सोन्याच्या पालखीत बसवून त्याने सेवक-सेविकांसह माहेरी पाठवून दिले.

मायादेवीला मार्गात लुंबिनी वन लागले. त्या वनाचे सौंदर्य व ऐश्वर्य पाहून त्यात तिला थोडा वेळ संचार करण्याची इच्छा झाली. फिरता फिरता एका शालवृक्षाखाली ती आली. त्या वृक्षाची एक फांदी मोठ्या परिश्रमाने हात लांब करून तिने पकडली. एवढ्यात तिला प्रसववेदना सुरू झाल्या. परिचारिकांनी तिथल्या तिथे तिच्या प्रसूतीची तयारी केली. थोड्याच वेळात तिने एका पुत्ररत्नाला जन्म दिला. हाच पुत्र पुढे सिद्धार्थ गौतम बुद्ध झाला.

लुंबिनी वन म्हणजे नक्की कोणते ठिकाण, हे लोकांना कित्येक शतके ठाऊक नव्हते. परंपरागत ज्ञान खंडित झाल्यामुळे विद्वान व संशोधक ते स्थान म्हणून अनेक ठिकाणे दाखवीत होते. बौद्ध ग्रंथांतली लुंबिनीची वर्णने म्हणजे केवळ कविकल्पनाच होत्या.



अशोकस्तंभ – लुंबिनी

इ. स. १८९६ सालापर्यंत ही परिस्थिती होती. त्या साली नेपाळच्या पश्चिम विभागात त्या बुटवल जिल्ह्यात रुम्मिनदेई नामक एका निर्जन स्थानी डॉ. फ्युहरर याला एक अशोकस्तंभ सापडला आणि त्यामुळे खऱ्या लुंबिनीचा शोध लागला. या स्तंभाचा उल्लेख युआन च्वांग या चिनी प्रवाशाने केला होता. हा स्तंभ तिथल्या रुम्मिनदेईच्या मंदिराच्या पश्चिमेस असून, त्याची उंची १३ फूट व परीघ ७ फूट ३ इंच आहे. स्तंभाचा सुमारे १० फूट भाग भूमीत गाडला गेला आहे. या भूमिगत भागावरच अशोकाचा लेख आहे. हा लेख ब्राह्मी लिपीत असून, तो पाच ओळींचा आहे. या लेखातील मजकूर असा –

१. देवानं पियेन पियदसिन लाजिन वीसतिवसाभी सितेन
२. अतन अगाच महीयिते। हिदबुद्धे जाते सक्यमुनीति
३. सिला विगडभीचा कालापित सिलायभेच उसपापिते।
४. हिदभगवं जातेति लुम्मिनिगामे उबालिके कटे
५. अठ भागियेच ।

भावार्थ – देवांना प्रिय, प्रियदर्शी (अशोक) राजाने राज्याभिषेकानंतर वीस वर्षांनी इथे येऊन या स्थानाची पूजा केली. इथे शाक्यमुनी बुद्धाचा जन्म झाला होता. म्हणून त्याने इथे दगडाची एक चौफेर इमारत बांधली व एक दगडी स्तंभ उभा केला. इथे भगवान बुद्धाने जन्म घेतला म्हणून त्याने लुंबिनी गाव करमुक्त केले आणि पिकाचा आठवा भाग जो राजाला मिळायचा, तो या गावाला लावून दिला.

अशोकाच्या या लुंबिनीयात्रेचे मनोज्ञ वर्णन दिव्यावदान वगैरे बौद्ध ग्रंथांत वाचायला मिळते.

सांप्रत हा स्तंभ उभा दुभंगलेला दिसतो. त्यावरून संशोधकांनी असे अनुमान केले आहे, की वीज पडून किंवा बौद्ध धर्माचे विरोधक असलेल्या जनांकडून या स्तंभाची अशी दशा झाली असावी. युआन च्वांग याने मात्र हे पाप नागांच्या माथी मारले आहे. अशोकाच्या बहुतेक स्तंभशीर्षांवर सिंहाची किंवा अन्य कोणत्यातरी पशूची आकृती कोरलेली असते. या स्तंभाचा शिरोभाग सापडत नाही. पण युआन च्वांगच्या वर्णनावरून त्यावर सुंदर अश्वमूर्ती कोरलेली होती, असे कळून येते. सांप्रत नेपाळ सरकारने या स्तंभाच्या दक्षिणोत्तर दोन स्तूप बनवले आहेत.

तिथल्या मंदिराच्या समोर वृक्षांच्या छायेत एका प्राचीन विहाराचे भग्नावशेष दिसतात. इथे उत्खनन झाले आहे, त्यात कोणत्याही कलात्मक वस्तू किंवा बुद्धमूर्ती मिळाल्या नाहीत. गणेश, तारा व अवलोकितेश्वर यांच्या काही खंडित मूर्ती तेवढ्या आढळल्या.

लुंबिनी येथे अशोकस्तंभाजवळच पक्क्या पायऱ्या बांधून काढलेली एक छोटी पुष्करणी दिसते. सिद्धार्थ जन्मल्यानंतर या पुष्करणीच्या जलाने त्याला स्नान घातले, अशी बौद्धांची समजूत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. सांप्रत मात्र या पुष्करणीची देखभाल कोणीही करीत नाही.

इथले आणखी एक दर्शनीय स्थान म्हणजे रुम्मिनदेईचे मंदिर होय. लुंबिनी हे नाव रुम्मिनदेईचेच अपभ्रष्ट रूप आहे. लोक या देवीला कालीमूर्ती समजून भजतात. मूर्ती अस्पष्ट असली, तरी ती मायादेवीची मूर्ती आहे, हे कळून येते. कारण तिच्या हाती वाकवलेली शालवृक्षाची शाखा आहे व तिच्या उजव्या हाताला नवजात सिद्धार्थ उभा आहे. या देवीचे मंदिर पुरुषभर उंचीच्या चौथऱ्यावर उभारलेले आहे. अशोकानेच हे मंदिर बांधले, असे लोक सांगतात. पण त्याचा जीर्णोद्धार एका नेपाळी गृहस्थाने काही वर्षांपूर्वी केला आहे.

नेपाळ सरकारने लुंबिनीच्या व्यवस्थेसाठी एक धर्मोदय सभा निर्माण केली आहे आणि यात्रेकरूंच्या निवासासाठी एक धर्मशाळाही बांधली आहे.

लुंबिनीला जाण्याचे कित्येक मार्ग आहेत. नौतनवां गावापासून लुंबिनी दहा मैल पश्चिमेला आहे. तिथून एखाद्या वाहनाने लुंबिनीला जाता येते. नौगडवरूनही एक मार्ग आहे. भैरहवा बाजारापासून लुंबिनी बारा मैल दूर आहे. [कपिलवस्तु–लुंबिनी–दिग्दर्शन, श्री. विजय श्रीवास्तव, १९५४]

लुइपा

(इ. स. चे ८ वे शतक) चौऱ्यांयशी सिद्धांतील एक सिद्ध. हा लुइपाद, लूहिपा व मत्स्यांत्राद या नावांनीही परिचित आहे. स्तन ग्युर्‌मध्ये त्याला बंगलदेशवासी म्हटले आहे. त्या आधारावर हा बंगाली होता (राधदेशनिवासी), असे म. म. हरप्रसादशास्त्री व डॉ. विनयतोष भट्टाचार्य यांनी म्हटले आहे. परंतु पंडित राहुल सांकृत्यायनांच्या मते हा मगधदेशवासी असून, पाल राजाच्या दरबारात लेखकाचे काम करीत होता. हा जातीने कायस्थ होता. शबरपा हा याचा गुरू होता. ओडिसाचा राजा दारिकपा व त्याचाच मंत्री डोंगीपा हे लुइपाचे प्रमुख शिष्य होत. लामा तारानाथ याला च योगिनी–सहचर्याचे प्रवर्तक मानतात. लुइपाने बरेच वाङमय रचले आहे. तंजूरमध्ये त्याचे सात

लुइपा

अनुवादित ग्रंथ आहेत. त्यांतील अपभ्रंश अथवा प्राचीन हिंदीतील पाच ग्रंथांची नावे अशी – (१) अभिसमय विभंग, (२) तत्त्वस्वभाव दोहाकोष, (३) बुद्धोदय, (४) भगवदभिसमय आणि (५) लुइपादगीतिका.

लुइपाद महासुखालाच परमसुख म्हणतो. त्याच्या मते चित्ताचे अविचल स्वरूप हेच महासुखाचे खरे रूप आहे. चंचल चित्तामुळे जगतात सुख-दुःखाची निर्मिती होते. शून्याचे ज्ञान प्राप्त करून घेणे म्हणजेच महासुखाची प्राप्ती करून घेणे होय. या महासुखामुळेच जीव अमर होतो. हे महासुख भावाभावाच्या अतीत असते. हे जगत पाण्यात पडलेल्या चंद्राच्या प्रतिबिंबाप्रमाणे न सत्य न मिथ्या असे आहे.

लीळाचरित्रात लुइपाचा लुइपाई म्हणून उल्लेख केला आहे. [पु. त. नि.; हिं. सा. बि.; सि. सा.; तां. बौ. सा. सा.;]

लुचिकपा

(इ. स. चे ११ वे शतक) चौऱ्यांयशी सिद्धांतील छप्पन्नावा सिद्ध. हा भंगलदेशचा (भागलपूर) रहिवासी होता. याच्या गुरूचे अथवा शिष्याचे नाव उपलब्ध नाही. याने अपभ्रंश अथवा प्राचीन हिंदीत चंडालिकाबिंदुप्रस्फुरण नावाचा ग्रंथ रचला आहे. [हिं. सा. बि.]

लुश धानाक

एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ३५, ३६ व ३८ ही तीन सूक्ते याने रचली आहेत. ऋग्वेदाच्या सर्वानुक्रमणीत ३८ व्या सूक्ताचा ऋषी मुष्कवत् इंद्र दिला असला, तरी त्या सूक्तातील संदर्भावरून तो लुश धानाकच असला पाहिजे, असे निश्चित होते. याच सूक्तातील पाचव्या ऋचेत कुत्स नावाच्या एका इंद्रभक्ताने इंद्राचे वृषण बांधून ठेवल्याचा उल्लेख आहे. लुश हाही इंद्रभक्त होता. या दोघांनीही इंद्राला एकाच वेळी बोलावले. इंद्र कुत्साच्या घरी गेला. इंद्राने लुशाच्या घरी जाऊ नये म्हणून कुत्साने इंद्राचे वृषण चामड्याच्या शंभर वाद्यांनी बांधून ठेवले. परंतु ही बंधने तोडून इंद्र लुशाच्या घरी गेल्याची कथा ब्राह्मण साहित्यात आढळते (पं. ब्रा. ९. २. २२; जै. ब्रा. १. १२८).

पहिल्या दोन सूक्तांमध्ये विश्वेदेवांची स्तुती आहे. त्यांतली एक ऋचा अशी –

सनेम तत् सुसनिता सनित्वभिर्वयं जीवा जीवपुत्रा अनागसः ।
ब्रह्मद्विषो विष्वगेनो भरेरत तद् देवानामवो अद्या वृणीमहे ।
(ऋ. १०.३६.९)

अर्थ – आम्हां दीर्घायुषी, पुत्रयुक्त, देवसेवक आणि निरपराधी भक्तांची सर्व पापे नास्तिकांप्रत जावोत. त्या देवकृत रक्षणाची आज आम्ही याचना करतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

३५ व ३६ ही दोन्ही सूक्ते विश्वेदेवांची पालुपद असलेली सूक्ते आहेत. [प्रा. च को ; ऋ. म. भा.]

लुशाई निरनिराळ्या टोळ्यांची बनलेली एक जमात. या लोकांची वस्ती आसामातील लुशाई नामक टेकड्यांत आहे. या टेकड्यांतील बहुतेक सर्व जमातींवर त्यांचा प्रभाव पडलेला आहे. लाखेर खेडी वगळता त्या भागातील बहुतेक सर्व शाळाही लुशाईच्या भाषेतच चालतात.

शारीरिक ठेवण – हे लोक बंगाली लोकांहून गोरे असून, सामान्यतः साडेपाच फूट उंचीचे असतात. त्यांचे डोके लांब, भुवया जाड, जिवणी मोठी, नाक बसके आणि केस भुरे असतात. त्यांचा पोषाख म्हणजे उजव्या हाताखालून डाव्या खांद्यावर टाकलेले एक फडके एवढाच असतो.

ज्या टोळ्यांची ही जमात बनलेली आहे, त्या टोळ्यांमधील लोक त्यांच्या केशरचनेवरून ओळखता येतात. त्यांना दागिन्यांची फारशी आवड नसते. ते गळ्यात वाघाचा दात आणि कानांत मणी एवढेच दागिने घालतात. वाघाच्या दातामुळे दुष्ट शक्तीपासून शेतीचे संरक्षण होते, अशी त्यांची समजूत आहे.

हे लोक एकाच कुळात विवाह करीत नाहीत. पूर्वी साइलो कुळातले लोक आपल्याच कुळातील मुलीशी विवाह करीत. अलिकडे ते कोणत्याही कुळातल्या मुलीशी विवाह करतात.

लुशाईंचे प्रत्येक खेडे म्हणजे एक स्वतंत्र संस्थानच असते. त्यावर साईलो कुळाचा राजा राज्य करतो. त्या कुळातील मुलाचे लग्न झाले, की त्याच्याबरोबर काही लोक देऊन त्याला नवीन खेडे बसविण्यासाठी पाठविले जाते. त्याला राज्यकारभारात मदत करण्यासाठी वृद्ध लोकांचे एक मंडळ असते. त्या शिवाय झूम शेतीची जागा ठरविणारे अधिकारी, दवंडी पिटणारा, एक लोहार आणि एक चतुर माणूस प्रत्येक खेड्यात असतो.

सामाजिक व्यवस्था – पूर्वी जे लोक थांगछुहा नावाच्या मेजवान्या देत असत, त्यांची गणना खानदानी वर्गात होत असे. या वर्गातील लोकांचा पोषाख इतरांहून निराळा म्हणजे पट्ट्यापट्ट्यांचा असतो. त्यांची पगडी पिसांची असते. त्यांच्या घरांना खिडक्या असतात व पडवी असते. लुशाईंचे टोळीप्रमुख साईलो कुळाचे असतात. म्हणून त्या कुळातील लोकांची गणनाही उच्च वर्गात होते. त्यांच्या मुलींच्या किंमती इतर मुलींहून अधिक असतात. साईलोला ते थांगुराचा पणतू आणि आपला आद्य पूर्वज मानतात. हे टोळीप्रमुख मोठे पराक्रमी होते. त्यांचा सर्वांत लहान मुलगा बापाच्या संपत्तीचा वारसदार होत असे. ते इतर कुळांतल्या मुली रखेल्या म्हणून ठेवीत. त्यांना औरस संतती नसल्यास त्यांचा अनौरस मुलगा हा वारसदार होत असे.

घरे – लुशाई लोक आपली घरे बांबू, लाकूड, वेत आणि ताडांच्या झावळ्या यांपासून बांधतात. भिंतीसाठी ते दगड किंवा माती यांचा उपयोग करीत नाहीत; बांबूच्या तट्ट्या वापरतात. त्यांच्या घराच्या पायऱ्या लाकडी ओंडक्यांच्या असतात. अलिकडे हे लोक घरांसाठी लोखंडाचे पत्रे वापरू लागले आहेत.

व्यवसाय – भातशेती हा लुशाईंचा प्रमुख व्यवसाय होय. पूर्वी ते झूम पद्धतीची शेती करीत. अलीकडे स्थायिक शेती करतात.

लुशाई लोकांच्या भाषेला लुशेई आणि दलिएन तोंग अशी नावे आहेत. या भाषेच्या डेब्ले व फन्नै या पोटभाषा आहेत. श्री. ब्रजनाथ शहा, जे. हर्बर्ट लोरेन आणि फे डब्ल्यू सॅव्हिज यांनी लुशेईची व्याकरणे लिहिली आहेत. याशिवाय सॅव्हिजने लुशेई-इंग्रजी व इंग्रजी-लुशेई असे शब्दकोशही तयार केले आहेत. लुशेई भाषेचा प्राचीन कुकिचित भाषेशी निकटचा संबंध आहे. या भाषेचे वाङ्मय उपलब्ध नाही; परंतु काही कथा व गाणी मात्र आहेत.

लुशाई युवती

काही लुशाई लोकांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केला आहे.

समजुती – लुशाईंच्या मते सूर्य हा स्त्री आहे आणि म्हणून त्याला रात्री फिरण्याची भीती वाटते. उलट चंद्र हा पुरुष असल्याने तो रात्री फिरू शकतो. चंद्रावर मोठा वड आहे. त्याच्या तोंडावर जे डाग दिसतात, ते त्या वडाच्या फांद्या असून, एका फांदीवर एक माकड बसलेले असते. या माकडाला डोके नसते. हे माकड कोणी पाहिले तर पाहणारा खात्रीने मरतो, म्हणून ते चंद्राकडे बघण्याचे टाळतात. चंद्रसूर्याला आषक नावाच्या जनावरामुळे ग्रहण लागते. आषक हे पोई नावाच्या राजाचे भूत असून, ते चंद्राला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाऊ पाहते. या ग्रहणकालात हे लोक आपत्काला पळवून लावण्या-साठी घंटा व ढोल वाजवितात. त्याने चंद्र सूर्याला गिळून टाकले तर पृथ्वीवर अंधार होईल आणि माणसांची माकडे बनतील, असे ते समजतात. हे लोक इंद्रधनुष्याला छिशाल म्हणतात. एक मोठे भूत जेव्हा पाणी पिण्यासाठी नदीच्या काठावर ओणवे होते, तेव्हा इंद्रधनुष्य दिसते, असे ते म्हणतात. भूकंपासंबंधी त्यांची समजूत अशी, की पृथ्वी व आकाश यांचा जेव्हा संयोग होतो, तेव्हा भूकंप होतो.

लुशाईंना जादूटोण्याची फार भीती वाटते. त्यांच्या काही स्त्रियांच्या अंगात अवसर येतो, त्या वेळी त्या खुआवांग या देवाशी संधान साधून काही संदेश घेतात, अशी समजूत आहे.

हे लोक पांथियन नावाच्या देवाला सृष्टीचा निर्माता मानतात. तो कनवाळू असला तरी मानवाच्या प्रश्नांशी त्याचा काही संबंध नसतो. खुआवांग नावाचा देव पांथियनच्या अंकित असतो. त्याच्या दुष्ट प्रभावामुळे माणसे आजारी पडतात. हे लोक माणसाला दोन आत्मे आहेत असे समजतात. एक चतुर आणि दुसरा मूर्ख. एक चांगला आणि दुसरा वाईट. प्रत्येक घराचा एक देव असतो. त्याला साखुआ म्हणतात.

पटकीसारख्या रोगाचा प्रादुर्भाव झाला, तर ते दुसऱ्या लोकांना गावात येऊ देत नाहीत. गावाची दारे बंद करतात. गावाबाहेर रस्त्यावर फाटक उभारून त्याच्या भोवती बुजगावणी उभी करतात. त्यामुळे साथ उत्पन्न करणारे दानव पळून जातात, अशी त्यांची समजूत आहे.

अंत्येष्टिप्रथा – हे प्रेते घरासमोर पुरतात. प्रेत खड्ड्यात ठेवण्यापूर्वी त्याला काळे कापड लपेटतात. त्याचप्रमाणे प्रेताबरोबर दाव, बटवा, चिलीम, इ. दैनंदिन वापराच्या वस्तूही पुरतात. एखाद्या स्त्रीचा नवरा मरण पावला, तर तिला सतत तीन महिने आपल्या जेवणातील थोडे अन्न नवऱ्यासाठी काढून ठेवावे लागते. या कालावधीत तिचे पाऊल वाकडे पडले, तर तिला व्यभिचारी स्त्री म्हणून शिक्षा करतात. लुशाई शेतकरी आपल्या मृत आई-बापांच्या नावाने नव्या धान्यातील थोडे धान्य बाजूला काढून ठेवतो.

लुशाई माणूस अपघाताने किंवा रोगाने मेला अथवा एखादी स्त्री बाळंतपणात मेली तर त्यांची प्रेते गावाबाहेर पुरतात. त्याचप्रमाणे कुटुंबातले पहिले मूल जन्मताच मेले, तर त्याला मातीच्या मडक्यात ठेवून, ते घराच्या वळचणीखाली पुरतात. त्यांच्यात प्रेतदहनही निषिद्ध नाही. पण ती बाब फार खर्चाची असल्याने टोळीप्रमुखांशिवाय इतरांना प्रेतदहन परवडत नाही. हे लोक मृतांची स्मारके उभी करतात. ही स्मारके लाकडी खांबांची असतात. त्यांच्यांत दगडी स्मारकांची पद्धत होती, असे कोणी म्हणतात. टोळीप्रमुखाचे स्मारक मात्र आजही दगडाचे असते. त्याचप्रमाणे ज्यांनी ज्यांनी माणसांच्या मुंडक्यांची शिकार केलेली आहे. त्यांचीही स्मारके दगडीच असतात. हे स्मारक म्हणजे दगडांचा एक गडगा अथवा उभा केलेला एक दगड असतो. उभ्या दगडावर जनावरांची डोकी, घंटा, बंदूक यांची चित्रे कोरलेली असतात. त्यावरून ज्याच्यासाठी हे स्मारक असते, त्याने किती प्राणी मारले, त्याच्या जवळ किती बंदुका व किती घंटा होत्या, हे समजते. दगडी स्मारके सर्वसामान्यपणे रस्त्याच्या कडेला असतात. [से. इं. १९३१; एन्सा. रि. ए.]

लुहुपा एक जमात. यांची वस्ती आसामच्या पूर्व भागात आहे. हे लोक बलाढ्य व लढाऊ म्हणून प्रसिद्ध आहेत. ते नेहमीच युद्धाच्या तयारीत असतात. ते जेव्हा शत्रूशी लढत नाहीत, तेव्हा ते आपसांत लढत राहतात. लांब भाले आणि ढाली ही त्यांची प्रमुख हत्यारे होत. त्याशिवाय धनुष्य आणि विषारी बाण यांचाही ते वापर करतात. लुहुपांनी ठार केलेल्या स्त्रियांच्या वेण्या त्यांच्या शिरस्त्राणात असतात.

जेव्हा मोठ्या मुलाचे लग्न होते, तेव्हा मुलाचे आईबाप व इतर मंडळी घरातून बाहेर पडतात आणि दुसरीकडे राहायला जातात. प्रत्येक मुलाच्या लग्नात आईबाप दुसरे घर शोधतात. [इं. स्ट. पा. प्रे. जानेवारी १९६०]

लेख रैवत मन्वंतरातील देवगण. यात ध्रुव, ध्रुवक्षिती, प्रभास, प्रचेतस्, बृहस्पती, मनोजव, महायशा व युवना असे आठ देव अंतर्भूत आहेत (ब्रह्मांड पु. २.३६.७६). चाक्षुष मन्वंतरातील देवगणालाही लेख असेच नाव आहे. [प्रा. च. को.]

लेखनकला लेखनकला नेमकी कोणत्या काळी अस्तित्वात आली, हे निश्चयाने सांगता येत नाही; पण वैदिक काळी लेखनकला प्रचारात असावी, एवढे नक्की म्हणता येते. ऋग्वेदात (१०.६२.७) कानांवर आठ हा आकडा धारण करणाऱ्या गायींचा उल्लेख आहे. अथर्ववेदात (७.५०.५) एका हस्तलिखिताचा निर्देश आढळतो. शुक्ल यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेत 'ग्रामण्यं गणकमभिक्रोशकं तान्महसे' (३०.२०) या मंत्रात गणकाचे वर्णन आहे व त्यात एकापासून परार्धापर्यंत संख्या आलेली आहे. तैत्तिरीय संहितेतही अशा प्रकारच्या संख्येचे वर्णन आहे (४.४.११.४).

वेदांसारखे अत्यंत महत्त्वाचे आणि जटिल पद्धती व प्रमेये यांनी भरलेले वाङ्मय, त्याचप्रमाणे त्याचा अर्थ लावण्यासाठी निर्माण झालेल्या ध्वनिशास्त्र, छन्दःशास्त्र, खगोलशास्त्र, इ.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शास्त्रांचे गद्य ग्रंथ हे लेखनकलेचे ज्ञान असल्यावाचून निर्माण होणे शक्य नाही. एखाद्या भाषेचे व्याकरण सूत्ररूपाने लिहून प्रचलित भाषेवर संस्कार करणे, हेही त्या भाषेत लिखित स्वरूपात ग्रंथ असल्यावाचून संभवत नाही. प्राचीन वाङ्मयातील अक्षरांची गणना, परार्धपर्यंतच्या संख्येचा गुणाकार व भागाकार किंवा अनेक आचार्यांच्या मतांचे उल्लेख, या सर्व गोष्टी वैदिक कालातील लेखनकलेच्या प्रचाराच्याच द्योतक आहेत.

लेखनासाठी प्राचीन काळापासून निरनिराळी माध्यमे वापरलेली आढळतात. फार प्राचीन काळापासून भूर्जपत्र आणि ताडपत्र यांचा लेखनासाठी उपयोग करीत असत. भूर्ज वृक्षाची आतली साल काढून ती घोटून तुळतुळीत करीत व तिच्यावर लिहीत. काश्मीरमध्ये भूर्जपत्रांचा फार वापर करीत. ताडपत्रांचाही लेखनासाठी मोठ्या प्रमाणावर उपयोग केलेला आढळतो. त्यांच्यावर टोकदार साधनाने कोरून लिहीत. ताडपत्रांवरूनच सांप्रतही आपण लेखनासाठी केलेल्या कागदाच्या सुट्या तुकड्यांना पत्रे म्हणजे पाने म्हणतो.

कापसाचे तलम कापड हेही लेखनाचे एक जुने माध्यम होते. वैयक्तिक व सरकारी कामकाजासाठी हा पट, पटिका किंवा कार्पासिक पट वापरीत. कर्नाटकातील काही व्यापारी आपल्या खतावण्या अजूनही कडतम नावाने प्रसिद्ध असलेल्या कापडावर लिहितात.

याशिवाय लाकडी फळे, शिळा, ताम्रपत्रे, सुवर्णपत्रे, विटा, इ. साधनांचाही लेखनासाठी उपयोग करीत. अशोकाचे बरेच लेख शिलांवर कोरलेले आहेत. काही श्रीमंत लोक सुवर्णाच्या पत्र्यावर दानपत्रे कोरून देत. पण दानपत्रे देण्यासाठी ताम्रपटांचाच वापर सर्रास होत असे.

भूर्जपत्र व ताडपत्र यांवर लिहिण्यासाठी शाई वापरीत. शाईला मषी असे नाव होते. कोळशाची वस्त्रगाळ पूड करून तिच्यात पाणी, डिंक व साखर घालून ते मिश्रण लेखनासाठी घेत. तसेच दिव्याच्या ज्योतीच्या काजळात डिंक, साखर, इ. पदार्थ घालून शाई बनवीत. हिरड्याचा कोळसा करून त्याचीही शाई तयार करीत. शाई ठेवलेल्या पात्राला मषीपात्र, मषीभांड किंवा मषीकूपिका असे म्हणत. लोखंडाची सळई शाईत बुडवून तिने ताडपत्रावर लिहीत, तर बोरूने भूर्जपत्रावर लिहीत.

मुद्रणकला अस्तित्वात येण्यापूर्वी ग्रंथ वगैरे लिहून काढणाऱ्या व्यक्तीला लेखक अशी संज्ञा होती. उत्तर भारतात त्याला लिपिक किंवा लिपिकार असे म्हणत. शूद्रकाने लेखकाची जात कायस्थ मानली आहे. कायस्थाबरोबरच लेखनाची वृत्ती करणारी करण नामक एक जात शिलालेखांतून उल्लेखली जाते. याशिवाय लेखकाला शासनिक आणि धर्मलेखा अशीही नावे दिलेली आढळतात. हे धर्मलेखा किंवा शासनिक मजकुराची प्रत तयार करून शिलेवर कोरणाऱ्या माणसाकडे देत. शिलेवर कोरणाऱ्यांना सूत्रधार, शीलकूट, रूपकार, शिल्पी, इ. नावे होती.

लेखक केवळ नकलाच करीत असे नाही, तर ग्रंथकाराच्या मुखाने प्रकट होणाऱ्या ग्रंथाचे प्रथम लेखनही करीत. ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीचा लेखक सच्चिदानंदबाबा झाला, हे प्रसिद्ध आहे. ग्रंथांची आद्य प्रत तयार झाल्यावर पुढे काही वाचकच स्वतः लेखक बनून आपल्या उपयोगासाठी त्याची प्रत तयार करून घेत.

कागदाचा शोध लागून त्याचा प्रसार झाल्यावर बहुतेक सर्व लेखन कागदावरच होऊ लागले. पुढे मुद्रणकलेचा शोध लागताच लेखनकलेचा खूप प्रसार झाला. तोपर्यंत ही कला काही थोड्या लोकांच्याच हाती होती. छापखान्यात पुस्तके भराभर छापली जाऊ लागली आणि माफक किंमतीत ती अनेक लोकांच्या हातांत पडू लागली. त्यामुळे मानवाने एका नव्या बौद्धिक युगात प्रवेश केला. पाहा– ग्रंथ. [गंगाजळी; भा. प्रा. रा.; दे. लि., स्व. वि. स.; श्री. ना. बा. मराठे–नवभारत, नोव्हेंबर १९६७; क. म.]

लेझीम एक खेळ व त्या खेळाचे साधन. लेझम या फारसी शब्दावरून हा शब्द तयार झाला असावा. लेझिमीला योगचाप असेही म्हटले जाते. सुमारे पंधरा ते अठरा इंच लांबीचा लाकडाचा एक दांडा घेऊन त्याच्या दोन्ही टोकांना लोखंडी कोयंडे बसवितात. त्या कोयंड्यांतून तीनचार चकत्या असलेल्या कड्या अडकवितात. कड्यांच्या मधोमध एक लोखंडीमूठ असते. लाकडाचा दांडा सामान्यतः बाभळीचा असतो. तो लवकर मोडत नाही आणि फारसा जडही असत नाही. जड लाकडाचा दांडा केला, तर लेझीम सहजतेने वापरता येत नाही. लाकडी दांड्याला निरनिराळे रंग दिलेले असतात. लेझीम खेळताना तिचा लाकडी दांडा डाव्या हातात आणि लोखंडी मूठ उजव्या हातात असते.

लेझिमीचा खेळ हा एक वीरनृत्याचा प्रकार आहे. महाराष्ट्र, गुजरात, इ. प्रदेशांमध्ये हे नृत्य प्रचलित आहे. या नृत्यात विविध प्रकारचे अंगसंचालन असते. त्यात पुढे जाणे, मागे येणे, उड्या मारणे, खाली वाकणे, गिरक्या घेणे, इ. प्रकार असतात. या नृत्याला ढोल, झांजा, ताशा, यांची साथ असते. खेळगडी ढोलाच्या आवाजात बेभान होऊन नाचत असतात. देवतांच्या पालख्या, मिरवणुका, खेड्यांतल्या जत्रा, उरुस यांच्या पुढे लेझीम खेळणारे ताफे असतात. या नृत्यामुळे अथवा खेळामुळे चांगला व्यायाम होतो. म्हणून सांप्रत शाळांतून लेझिमीचे खेळ बसवितात.

या खेळाला कुठे आणि केव्हा प्रारंभ झाला, ते सांगणे कठीण आहे. काहींच्या मते हा खेळ खास महाराष्ट्राचा असून, तो पेश-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…ईच्या पूर्वकाळी सुरू झाला असावा. [भा. लो. नृ.; म. लो. त.]

…डोंगरातील खडक खोदून तयार केलेली गुहागृहे. प्राचीन लेणी काळी बौद्ध भिक्षू वर्षावासासाठी अशा गुहागृहांतून …हत. आरंभी या गुहा अनलंकृत असाव्या; परंतु पुढे त्यांमध्ये …िल्पे व मूर्ती खोदण्यात आल्या. तसेच भिंतींवर विविध- …ती चित्रे रेखून त्या सुशोभितही करण्यात आल्या. अशा प्रकारे …शी ओक्याबोक्या वाटणाऱ्या या गुहांवर ही चित्रांची व …ल्पांची लेणी चढवली गेली. बौद्ध लोक या गुहागृहांना लेण …शब्दाने संबोधीत. बहुतेक प्रत्येक लेण्यात, ते लेणे ज्याने खोद- …ले त्याचा नामनिर्देश असतो. नासिकजवळच्या पांडवलेण्यात …ण हा शब्द प्रथम आलेला दिसतो. तिथे म्हटले आहे, की



लेणे क्र. १९चा दर्शनी भाग – अजंटा

…े लेण महादेवी महाराज मातामहाराज पतामही ददाति …स महावनीयान भिक्षु संघस.' लेण हा शब्द संस्कृत …े = गृह या शब्दावरून आला आहे.

लेण्यांना शैलगृहे व शिलामंदिरे अशीही अन्य नावे आहेत.

सबंध भारतात आज ज्ञात असलेली सुमारे एक सहस्र लेणी असून, त्यांपैकी शंभर लेणी ब्राह्मणी व जैन आहेत. उरलेली नऊशे लेणी बौद्धांची आहेत. एकूण लेण्यांपैकी सुमारे नऊशे लेणी महाराष्ट्रात आहेत. कारण लेणी खोदण्यासाठी आवश्यक असणारा एकसंधी व कणखर असा दगड महाराष्ट्रातला सह्याद्री व त्याचा परिसर याव्यतिरिक्त अन्यत्र क्वचितच आढळतो. महाराष्ट्रातच अधिक लेणी खोदली जाण्याची आणखीही अनेक कारणे आहेत. श्री. स. आ. जोगळेकर त्यांचे स्पष्टीकरण करतात, ते असे –

"हिंदुस्थानात लेणी खोदण्याची प्रथा प्रस्थापित किंवा प्रसृत झाली, तेव्हा आणि प्रचलित होती तोवर प्रबल, स्वतंत्र व संपन्न अशा सत्ता महाराष्ट्रातच अस्तित्वात होत्या, हे याचे राजकीय कारण. मौर्यांच्या सत्तेला उतरती कळा लागली त्या सुमारास महाराष्ट्रात सातवाहनांची सत्ता प्रस्थापित झाली आणि काही कालपर्यंत तरी भारताचे चक्रवर्तिपद सातवाहनांच्या हाती होते. सातवाहन, वाकाटक, चालुक्य व राष्ट्रकूट या महाराष्ट्री सत्तांनी व त्यांच्या सामंतांनी या प्रथेचा पुरस्कार केल्याचे पुरावे येथील लेण्यांतील शिलालेखांत जागोजाग आढळून येतात. या कालखंडात हिंदुस्थानचा परदेशांशी चालणारा व्यापार महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावरील बंदरांमार्फत चालत असे व त्यामुळे येथील व्यापाऱ्यांची भरभराट होती, हे याचे आर्थिक कारण. वैजयंतीचा (आधुनिक वनवासी, उत्तर कानडा जिल्हा) व्यापारी भूतपाल याने कार्ल्याचे लेणे उभारले, असा निर्देश तेथील शिलालेखात करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील बहुजनसमाजाचे सहकार्य हे याचे सामाजिक कारण. महाराष्ट्रातील औद्योगिक संघांनी आणि ठिकठिकाणच्या धनाढ्य कारागिरांनी व सामान्य नागरिकांनी दिलेल्या देणग्यांचे उल्लेख अनेक लेण्यांतील शिलालेखांत आढळतात. कोणी एका खांबाच्या खोदाईचा खर्च केलेला आहे, तर कोणी पाणपोईचा. सामान्य जनतेने वर्गणी गोळा करून धर्मकृत्ये करण्याची परंपरा महाराष्ट्रात इतकी प्राचीन आहे. आणि महाराष्ट्राची धार्मिक सहिष्णुता हे याचे सांस्कृतिक कारण किंवा आदिकारण. इथली बहुसंख्य प्रजा आणि इथले राजे धर्माने जैन किंवा बौद्ध नसूनही त्यांनी जैन-बौद्ध लेण्यांच्या उभारणीला विरोध तर केला नाहीच; परंतु भरभरून साहाय्य केले."

जैन आणि बौद्ध लेणी सामान्यतः एकाच काळात खोदली गेली. ब्राह्मणी लेणी मात्र त्यानंतर बऱ्याच उशीरा निर्माण झाली. बौद्ध लेण्यांत आढळणारी विविधता जैन लेण्यांत आढळत नाही. त्यांच्या धार्मिक विधींना स्तूपाची किंवा सभा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुहांची आवश्यकता नसल्यामुळे त्यांनी बौद्धांप्रमाणे विस्तीर्ण चैत्यगृहे खोदली नाहीत.

लेण्यांचे मुख्य वर्ग दोन – ऐहिक व धार्मिक. भारतात ऐहिक लेणी फारच थोडी आहेत. महाराष्ट्रात तर अवघे एकच ऐहिक

इतिहास व पुराणे यांत वर्णिलेल्या देवदेवतांच्या व त्यांच्या अवतारकृत्यांच्या प्रतिमा ज्यांत खोदलेल्या आहेत, अशा लेण्यांना अनुलक्षून ब्राह्मणी लेणी म्हटले जाते. ब्राह्मणी लेणी मुख्यतः महाराष्ट्रात घारापुरी व वेरूळ येथे आणि तमिळ-



विश्वकर्मा गुंफेचे प्रवेशद्वार – वेरूळ

लेणे आहे व ते म्हणजे नाणेघाटातील सातवाहनांचे देवकुल. देवकुल म्हणणे कीर्तिमंदिर, पूर्वजांच्या प्रतिमांचे मंदिर.

धार्मिक लेण्यांचे वर्ग तीन – बौद्ध, जैन आणि ब्राह्मणी.

नाडूमध्ये महाबलिपुरम येथे आहेत. जैन लेणी महाराष्ट्रात वेरूळ येथे व ओडिसात भुवनेश्वरजवळ आहेत. बौद्ध लेणी मात्र विहार प्रांतात राजगृहाजवळ बराबर टेकड्यांत व नागार्जुनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पर्वतात आहेत, तशीच ती महाराष्ट्रात खूप ठिकाणी आहेत. बिहारमधली लेणी सर्वांत प्राचीन (सनपूर्व तिसऱ्या शतकाचा उत्तरार्ध) समजली जातात. ती तिथे सातघर या



लेण्याचा दर्शनी भाग – धारापुरी

नावाने सर्वपरिचित आहेत. मौर्यकालीन शिल्पकृतींना असलेली विशिष्ट प्रकारची झिलई त्यांच्या भितींवर चढवलेली आहे. सातघर लेण्यांपैकी सुदाम व लोमश नामक लेणी ऐतिहासिक व कलेच्या दृष्टीने फार महत्त्वाची समजली जातात. सुदाम ऊर्फ न्यग्रोध लेण्यात अशोकाच्या राजवटीच्या बाराव्या वर्षीचा शिलालेख आहे. या लेखावरून कळते, की त्याने हे लेणे आजीवक पंथाला अर्पण केलेले आहे. अशोकाचा नातू दशरथ याचे लेख नागार्जुनी पर्वतातील लेण्यांत खोदलेले असून, त्यांची खोदाई वैशिष्ट्यपूर्ण आहे. सुदाम लेण्याचा आकार गोल आहे. लोमश लेण्याची दर्शनी कमान स्तूपाकार आहे.

कालमानानुसार लेण्यांचे तीन वर्ग कल्पिले आहेत, ते असे – (१) सनपूर्व दुसऱ्या शतकापासून इ. स. च्या दुसऱ्या शतकाच्या अखेरीपर्यंत, (२) पाचव्या शतकाच्या मध्यापासून सातव्या शतकाच्या मध्यापर्यंत आणि (३) सातव्या शतकाच्या उत्तरार्धापासून दहाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत.

बौद्ध लेणी हीनयान आणि महायान या दोन्ही पंथांची असून, त्यांतला वेगळेपणा स्पष्टपणे ध्यानी येणारा आहे. अगदी पहिल्या कालखंडात निर्माण झालेली बौद्ध लेणी ही हीनयान पंथाची होत. या लेण्यांत बुद्धमूर्ती आढळत नाहीत; कारण त्या काळात बुद्धाला देवत्व प्राप्त झालेले नव्हते. भाजे, कोंडाणे, पितळखोरे, अजंटा (क्र. १०), बेडसे, अजंटा (क्र. ९), नासिक व कार्ले ही लेणी हीनयान पंथाची असून, ती याच क्रमाने खोदण्यात आली असावी, असा श्री. स. आ. जोगळेकर यांचा अंदाज आहे.

महायान पंथाचे व शिल्पपद्धतीचे प्रभुत्व असलेली लेणी मुख्यत्वे अजंटा, वेरूळ, औरंगाबाद, इ. ठिकाणी आहेत. बौद्ध लेण्यांत सामान्यतः चैत्य आणि विहार हे दोन प्रकार दिसून येतात. चैत्य म्हणजे बौद्ध भिक्षूंचे प्रार्थनामंदिर व विहार म्हणजे त्यांचे निवासस्थान. चैत्यगृहात बुद्धाच्या अवशेषांवर उभारलेला स्तूप किंवा बुद्धाच्या दंतादी अवयवांवर उभारलेला दागोबा असतो.

काही चैत्यगृहांतून स्तूप अथवा दागोबा यांच्याऐवजी बुद्धाच्या मूर्ती आहेत. या मूर्ती बुद्धाला देवत्वप्राप्त होऊन त्याची पूजाअर्चा सुरू झाली, त्या काळातील आहेत. चैत्यगृहात चालणाऱ्या पूजापाठाचे वर्णन पर्सी ब्राऊन यांनी केले आहे ते असे – चैत्यगृहातील कार्यक्रमाला आरंभ प्रातःकाळी होतो. चैत्याच्या नगारखान्यात चौघडा झडू लागतो व सनई वाजू लागते. त्यांचा प्रतिध्वनी पहाडा-पहाडांतून उमटतो. तो ऐकून भिक्षु-भिक्षुणी विहारांतून बाहेर पडतात व चैत्यगृहाकडे जाऊ लागतात. भिक्षूंनी पीतवस्त्र परिधान केलेले असते. धूपाचे लोट सर्वत्र पसरत असतात. भिक्षू स्तूपाला प्रदक्षिणा घालतात व मग मंडपात ज्या चटया पसरलेल्या असतात त्यांवर जाऊन बसतात. स्तूपाच्या उजव्या अंगाला एक लाकडी व्यासपीठ ठेवलेले असून,



विहाराचा दर्शनी भाग – अजंटा

त्यावर मुख्य भिक्षू किंवा आचार्य अधिष्ठित होतो. मग प्रार्थना, पोथीवाचन, मंत्रपठण वगैरे कार्यक्रम सुरू होतो. या वेळी वाद्यांचा घोष चालू असतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विहार म्हणजे आश्रम किंवा मठ. विहाराच्या मध्यभागी एक चौक व भोवताली खोल्या अशी रचना असते. काही विहार अगदी साधे असतात. त्यांत चौक न ठेवता ओळीने चार-पाच खोल्या खोदून काढलेल्या असतात.

भारतातील लेण्यांचे रचना-वैशिष्टय सांगताना श्री. स. आ. जोगळेकर लिहितात –

भारतातील सर्वांत प्राचीन लेणी वर्तुळाकार आहेत; जणू स्तूपासाठी एखादा साचा करावा अशा प्रकारची आहेत व त्यांचे घुमट अर्धवर्तुळाकार आहेत. कोंदिवटे लेणे वर्तुळाकार आहे; पण त्याचे छत सपाट आहे. यांपैकी कोणत्याही लेण्यात खोदीव स्तूप नाहीत. बांधीव असावे; परंतु आज नष्टप्राय झाले आहेत. ब्राह्मणी देवळात गाभाऱ्यानजिक सभामंडप असतो, त्याप्रमाणे या वर्तुळाकार लेण्यांलगत चौकोनी दर्शनी लेणी खोदलेली आहेत. सुदामजवळच्या दर्शनी लेण्याची रचना कोल्हाटी किंवा तोड यांसारख्या आदिवासी लोकांच्या बांबूच्या झोपडयांसारखी



लेण्याचा दर्शनी भाग– कोंडाणे

अर्धवर्तुळाकार आहे. लोमशनजीकच्या लेण्याची मांडणी गवताच्या गंजीसारखी किंवा दुपाखी पडळीसारखी आहे. त्याचा दर्शनी भाग बंदिस्त असून, त्यावर सुतारी किंवा बुरुडी कामाच्या धर्तीवर व स्तूपाच्या आकारावर कमानी खोदलेल्या आहेत. या लेण्याचे हे वैशिष्टय अद्वितीय आहे. ही लेणी खोदून झाल्यावर सुमारे शंभर वर्षांनी सह्याद्रीत लेणी खोदण्यास सुरुवात झाली. प्रथम विहार व नंतर चैत्यगृहे. बौद्ध चैत्यगृहाचा आकार एकदा निश्चित झाल्यावर सामान्यतः त्यात कुठे बदल झाला नाही. दीर्घचतुरस्र दालनाला जोडलेला अर्धवर्तुळाकार गाभारा, गाभाऱ्यात स्तूप (किंवा बुद्धमूर्ती), दालनाच्या दोही बाजूंना व स्तूपाच्या मागून प्रदक्षिणामार्ग, त्याच्या आतल्या अंगाला स्तंभांची रांग आणि अर्धवर्तुळाकार छत, अशी या चैत्यगृहाची मांडणी असते. सह्याद्रीतील लेण्यांमध्ये कालमानाने आद्यस्थान दिले पाहिजे कोंडाणे येथील चैत्याला आणि शिल्पकौशल्याच्या दृष्टीने अग्रस्थान दिले पाहिजे कार्ले येथील चैत्याला.

लेणी ही जरी प्राधान्याने बौद्ध भिक्षूंच्या निवासासाठी आणि त्यांच्या पूजा–प्रार्थनेसाठी खोदली असली, तरी ती जास्तीत जास्त देखणी व्हावी, आपल्या शिल्पकलेचे सर्वोच्च वैशिष्टय त्यांत व्यक्त व्हावे, हा हेतू अंतरात बाळगूनच त्यांच्या निर्मात्यांनी आपली छिन्नी चालवली. एकेक खांब, एकेक कमान, एकेक मूर्ती अशा कलाकुसरीने व उठावदारपणाने त्यांनी निर्मिली, की त्यांच्या कौतुकाला शब्द अपुरे पडावे. दगडाच्या भिंतींतून केवळ मूर्ती खोदून व कोरूनच या कलावंतांचे जेव्हा समाधान झाले नाही, तेव्हा त्यांनी त्या भिंतींवर इतिहास–पुराणांतले प्रसंग रेखाटण्यास व रंगवण्यास सुरुवात केली. ही चित्रेही त्यांनी अशी सजीवपणे रेखाटली, की त्यांतली माणसे पटकन उठून आपल्याशी संभाषण करू लागतील असे वाटावे. या चित्रांचे रंग तर आजही त्या काळाइतकेच ताजे आणि टवटवीत आहेत.

सचित्र लेण्यांचे आद्यस्थान म्हणजे छत्तीसगडजवळचे जोगीमारा लेणे. सनपूर्व पहिले शतक हा या लेण्याच्या निर्मितीचा काळ असावा, असा संशोधकांचा तर्क आहे. अजंटा, बाघ, येथील भित्तिचित्रेही अशीच मोहक व आकर्षक आहेत.

चालू शतकात महाराष्ट्रात अनेक नवीन लेणी सापडती आहेत. ती लेणी लहान व साधी असली तरी, प्राचीन काळातील व्यापारी मार्ग निश्चित करण्यासाठी त्यांचा बराच उपयोग होतो. कारण व्यापारी मार्गावर विसावा घेण्यासाठी जागोजागी अशी शिलागृहे निर्माण करण्यात आली होती.

लेण्यांवरून व त्यांतील लेखांवरून त्या त्या प्रदेशाचा राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास आपल्याला ज्ञात होतो, हे लेण्यांचे मोठे देणे आहे. भारतातील स्थापत्यकलेची उत्क्रांती कसकशी होत गेली, हेही या लेण्यांवरून आपल्याला कळून येते. त्या त्या काळच्या वस्त्रप्रावरणांच्या आणि अलंकारांच्या पद्धती या लेण्यांतील मूर्तींवरून व चित्रांवरूनच समजून येतात. तात्पर्य, लेणी ही केवळ शिल्पसौंदर्याच्या दृष्टीनेच नव्हे; तर अनेक दृष्टींनी भारताची लेणी (अलंकरणे) ठरली आहेत, यात शंका नाही. पाहा – चैत्यगृह, विहार, स्तूप.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

[सह्याद्रि; मु. पू. म. २; संशोधनमुक्तावली सर २ रा]

लेण्याद्री महाराष्ट्रातील एक गणेशस्थान. याची गणना अष्टविनायकांत होते. हे पुणे जिल्ह्यातील जुन्नरपासून सुमारे तीन मैलांवर आहे. हे स्थान लेण्यात आहे म्हणून याला लेण्याद्री असे नाव मिळाले. गणेशपुराणात या ठिकाणाचा उल्लेख जीर्णापूर व लेखनपर्वत या नावाने आढळतो. इथल्या गणेशाचे मूळ नाव गिरिजात्मक असे असून, त्यासंबंधी एक पौराणिक कथा आहे, ती अशी –

पार्वतीला गजानन हा आपला मुलगा व्हावा असे वाटत होते. त्यासाठी तिने इथल्या एका गुहेत उग्र तप केले. तपश्चर्येत मन एकाग्र व्हावे म्हणून तिने गजाननाची एक काल्पनिक मातीची मूर्ती केली आणि ती त्या मूर्तीची अनन्यभावे सेवा करू लागली. तिची तपश्चर्या फलद्रूप झाली. त्या मातीच्या मूर्तीतून भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश पुत्ररूपाने पार्वतीपुढे उभा राहिला. म्हणून त्याला गिरिजात्मज असे नाव मिळाले. गौतम मुनीने गिरिजात्मजाची सातव्या वर्षी मुंज केली. या बालगणेशाने या परिसरात अनेक लीला करून बालासुर, व्योमासुर, त्याची धोकेबाज बहीण शतमहिषा, कमलासुर, मंचकासुर, इ. अनेक असुरांचा नाश केला.

डोंगरावर दगडाने बांधलेल्या पायऱ्या चढून गेल्यावर एक मंदिर लागते. ते दक्षिणाभिमुख आहे. मुख्य देवालयासमोर सभामंडप आहे. त्याच्या उजव्या बाजूला बऱ्याच ओवऱ्या कोरलेल्या आहेत. मुख्य मंदिर मात्र लहान आहे. तिथून जवळच दगडांचा एक स्तूप आहे. भाविक लोक त्याला भीमाची गदा म्हणतात. या स्तूपावर वाघ-सिंहांची मुखे कोरलेली आहेत.

गिरिजात्मजाची मूर्ती ओबडधोबडच आहे. त्याच्या डाव्या-उजव्या अंगाला हनुमान, गणेश व शंकर यांच्या मूर्ती आहेत. या गणेशाची मुखपूजा होत नसून पृष्ठपूजा होते. कारण पार्वतीने या गुहेत तप केले, त्याच्या बरोबर मागे एका गणेशभक्ताने ही मूर्ती कोरली असा समज आहे. नाना फडणिसांनी या गणेशाचे मुखदर्शन व्हावे म्हणून डोंगरमाथ्यावरून चढून जाण्याचा प्रयत्न केला असता भुंगे व मधमाशा यांनी तो सफल होऊ दिला नाही, अशी दंतकथा आहे.

भाद्रपद व माघ मासांत गिरिजात्मजाचे मोठे उत्सव होतात. लेण्याद्रीच्या माथ्यावर एक शिवस्थान असून, पूर्व बाजूला भीमाची न्हाणी म्हणून एक गुंफा दाखवितात. इथून शिवनेरी किल्ला दिसतो.

लेण्याद्री येथील गणपतीसंबंधी श्री. स. आ. जोगळेकर एक वेगळा विचार लिहितात तो असा – लेण्यातील गणपतीची स्थापना निःसंशय मध्ययुगीन आहे. हे लेणे मूळचे बौद्धांचे. भिंतीवर अर्ध्या उठावात खोदलेल्या चैत्यालाच गणपतीचे रूप देण्यात आले असले पाहिजे. [ग. को.; अष्टविनायक– श्री. सदानंद चेंदवणकर, १९६४; सह्याद्रि]

लेपचा एक जमात. या लोकांची वस्ती पश्चिम भूतान, पूर्व नेपाळ आणि सिक्किम, या प्रदेशांत आहे. रोंग आणि खांब असे यांचे दोन पोटभेद आहेत. अस्सल लेपचांना रोंग म्हणतात. खांबांमध्ये राजघराण्यातील लोक आणि त्यांचे वंशज यांचा अंतर्भाव होतो.

सुमारे अडीचशे वर्षांपूर्वी सिक्किममध्ये भूतिया आणि लेपचा या लोकांत बराच काळपर्यंत यादवी युद्ध सुरू होते. त्यामुळे तिथली शासनसंस्था मोडकळीला आली होती. दोन्ही जमातींना एकमेकांचा राजा पसंत नव्हता. म्हणून त्यांनी तिबेटमधील आपला धर्मगुरू जो लामा, त्याच्याशी सल्लामसलत करून एका परकी राजाची सत्ता पसंत केली. हा राजा तिबेटातील खांब प्रांतातला होता. लामांची एक तुकडी राजाच्या शोधार्थ खांब प्रांतात गेली असता, त्यांना तिथे एक राजा होण्यालायक तरुण आढळला. त्याच्या कुंडलीतही राजा होण्याचा योग होता. लामांनी त्याला सिक्किमचे सिंहासन देऊ केले. त्यानेही त्यांच्या प्रस्तावाचा स्वीकार केला व आपल्या घराण्यातील काही लोकांसह तो लामांबरोबर सिक्किमला गेला. तिथे मग तो सिक्किमचा राजा झाल्याची दवंडी पिटण्यात आली.

लेपचा लोक अस्सल मंगोलियन वंशाचे आहेत. हे ठेंगणे असून, त्यांची उंची सर्वसामान्यपणे पाच फुटांच्या आत असते. त्यांचा वर्ण पिवळसर असतो. त्यांचा चेहरा रुंद व चपटा, नाक बसके आणि डोळे तिरकस असतात. पुरुषांना दाढीमिशा जवळजवळ नसतातच. पुरुष डोक्यावरचे केस वाढवतात आणि त्यांचा अंबाडा बांधतात. वृद्ध पुरुष केसांच्या वेण्या घालतात. स्त्रिया केसांच्या वेण्या घालतात व त्यांच्या टोकांना रेशमी गोंडे बांधतात.

वेषभूषा – स्त्री व पुरुष यांचा पोषाख सारखाच असतो. जाडयाभरड्या रेशमी कापडाचा सैलसर लांब अंगरखा व त्यावर लोकरीचे जाकिट एवढाच त्यांचा पोषाख असतो. जाकिटावरून ते कमरेला एक चांदीच्या साखळ्यांचा पट्टा बांधतात. वाढवलेले केस आणि सारखा पोषाख, यांमुळे पाठीकडून पाहताना एखादी व्यक्ती स्त्री आहे का पुरुष आहे, ते कळत नाही.

लेपचा लोक घाणेरडे असतात. आपण होऊन ते क्वचितच स्नान करतात. पण पावसाळ्यात कामासाठी त्यांना बाहेर हिंडावे लागत असल्यामुळे त्या दिवसांत त्यांची आपोआपच आंघोळ होते.

हे लोक स्वभावाने प्रेमळ, आनंदी व खिलाडू वृत्तीचे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

ते प्रामाणिक आहेत. अन्यायाचा प्रतिकार करणे हे त्यांना ठाऊकच नाही. घोडयांच्या शर्यती, धावण्याच्या शर्यती, कुस्त्या, उडया

लेपचा पतिपत्नी

मारणे, इ. खेळ त्यांना आवडतात. ते विनोदी व कोटिबाज असतात. आळस हा त्यांचा मोठा दुर्गुण आहे.

उद्योगधंदे – हे लोक भटके आहेत. तीन वर्षांपेक्षा अधिक काळ ते एका ठिकाणी राहत नाहीत. नवीन जागा निवडली, की तिथे प्रथम ते आपली झोपडी बांधतात. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. जंगल तोडून व झाडे जाळून पावसाळयाच्या सुरवातीला त्या जागेवर ते बी पेरतात. भात, मका, गहू, जव, इ. धान्ये व भाजीपाला ते पिकवतात. त्यांच्याजवळ नांगर वगैरे शेतीची अवजारे नसतात. कुदळ व खुरपे याच अवजारांनी ते पेरणीचे काम करतात व साधारणपणे उपजीविकेला आवश्यक तेवढेच धान्य पिकवतात. ते संपले, की जंगलातील फळे, कंदमुळे आणि शिकार यांवर ते जगतात. धनुष्यबाण आणि मोठा सुरा या आयुधांनी ते जंगली श्वापदांची शिकार करतात.

अन्न – हे लोक सर्व प्रकारचे मांस खातात. डुकराचे मांस त्यांना अत्यंत प्रिय आहे. त्यानंतर गोमांस व बकऱ्यांचे मांस यांचा क्रम लागतो. याशिवाय मका आणि मुरवा धान्यापासून बनवलेली दारूही त्यांना फार आवडते. शाकाहारात भात त्यांना अधिक आवडतो. त्यानंतर गहू, जव, मका व कडधान्ये यांचा क्रम लागतो.

विवाहप्रथा – मुलामुलींचे विवाह मोठेपणी होतात. मुलीसाठी चाळीस ते शंभर रुपये देज द्यावे लागते. एवढे पैसे जमेपर्यंत पुरुषाला थांबावे लागते.

एखादा गरीब तरुण कर्जाऊ पत्नी मिळवतो; म्हणजे वधूची किंमत फिटपर्यंत त्याला तिच्या बापाच्या घरी नोकरी करावी लागते. विवाहपूर्व लैंगिक संबंधाकडे दुर्लक्ष केले जाते.

विवाहविधी प्रथम वधूच्या आणि नंतर वराच्या घरी होतो. तो अगदा साधा असतो. वधू-वर एका गालिच्यावर बसतात. मग लामा प्रथम त्या दोघांच्या गळ्याभोवती लोकरीचे गळपट्टे बांधतो. नंतर ते सोडून त्यांची अदलाबदल करतो व पुन्हा ते त्यांच्या गळ्याभोवती बांधतो. मग वधू-वरांच्या मस्तकांवर अक्षता टाकतो. नंतर वधू-वर एकाच पानात जेवतात व एकाच पेल्यातून दारू पितात. मग जमलेल्या लोकांना मेजवानी देतात.

विधवेला पुनर्विवाह करता येतो. धाकटया दिराशी केलेला पुनर्विवाह अधिक प्रशस्त मानतात. सापत्य विधवेने पतीच्या कुटुंबाबाहेर विवाह केल्यास, तिची मुले धाकटया दिराकडे राहतात. तोच त्यांचे पालनपोषन करतो.

एखाद्या पतिपत्नीचे पटत नसल्यास ज्या लामाने त्यांचे लग्न लावले असेल, तोच त्यांचा विवाह-विच्छेद करतो. घटस्फोटित स्त्रीला पुनर्विवाह करता येतो.

देवधर्म – बहुतेक लेपचा बौद्ध धर्माचे अनुयायी आहेत. पण बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी ते निसर्गधर्मी होते. त्या धर्माचे अवशेष त्यांच्यांत अजूनही आढळतात. ते निरनिराळ्या निसर्गशक्तींना भजतात. काही शक्ती दुष्ट तर काही चांगल्या असतात, असे ते मानतात. हिमाच्छादित कांचनगंगा पर्वत हे त्यांचे प्रमुख दैवत आहे. हा देव कोपला असता हिमवादळे घडवतो, गारांचा वर्षाव करतो आणि कडे कोसळवून माणसांचा घात करतो; असे ते समजतात. बौद्ध धर्म स्वीकारण्यापूर्वी ते महादेव व उमा यांची पूजा करीत असत. फळे, फुले, धूपदीप यांशिवाय देवांना ते मद्य-मांसही अर्पण करतात. देवतांच्या पुजाऱ्यांना ते बिजुआ म्हणतात.

तिबेटी लामा लेपचांचे पौरोहित्य करतात. काही लेपचा घरी शिक्षण घेऊन लामा बनतात, तर काही मठात राहून. घरी शिक्षण घेतलेल्या लामांना विवाह करता येतो. बरेच लेपचा मांत्रिक किंवा भगत बनतात. देवतांवर आणि मृतात्म्यांवर त्यांचा मोठा प्रभाव असतो.

मृतकप्रथा – उच्चवर्णीय खांब लेपचा प्रेते जाळतात व त्यांची

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…त्या नदीत टाकतात. बाकीचे लेपचा प्रेताला कपडे घालून बस-लेल्या स्थितीत पुरतात. पुरण्यापूर्वी तीन दिवस प्रेताला आस-नस्थ स्थितीत ठेवतात व त्याच्या समोर भोजन वाढून ठेवतात. …त पुरलेल्या जागी दगडी थडगे उभारतात व त्यावर एक झेंडा …वतात. रोंग लेपचा मृत्यूनंतर महिन्याने मांत्रिकाच्या हस्ते …आत्म्याला आहुती देतात. त्या प्रसंगी गाय किंवा बकरा काप…तात व जमलेल्या लोकांना पुष्कळ मद्य पाजतात.

…हे मृताचे वर्षश्राद्ध करतात. सुगीच्या सुरुवातीला हे पितरांना …तुष्ट ठेवण्यासाठी त्यांना विविध पक्वान्ने, भात व मद्य अर्पण …करतात. [मे. इं. वॅं. १९५१; इं. स्ट. पा. प्रे., जाने. १९६०].

लेपभाज पितरांपैकी एका वर्गाची संज्ञा. श्राद्धाच्या वेळी पिंडदान करताना हाताला जे अन्नकण चिकटलेले …असतात त्यांना लेप म्हणतात. पणजोबाच्या पूर्वीचे जे पितर अस…तात ते या लेपावरच संतुष्ट होतात; म्हणून त्यांना लेपभाज …वा लेपभुज असे म्हटले आहे (मत्स्य पु. १८.२९, पद्म पु. …सृ. १०.३४-३५). पिंड दर्भावर ठेवल्यानंतर हाताला लाग…लेले अन्न व जल दर्भाला पुसावे, कारण ते अन्न व जल पित…रांना मिळते, असे मनुस्मृतीत म्हटले आहे (३.२१६). [हि. घ.]

लेपाक्षी आंध्र प्रदेशातील एक कलाक्षेत्र. लेपाक्षी हे लहानसे गाव अनंतपूर जिल्ह्यातील हिंदुपूरच्या पूर्वेला नऊ …अंतरावर वसलेले आहे. इथले वीरभद्राचे मंदिर प्रसिद्ध असून, ते …कूर्मशैल नामक एका टेकडीवर बांधलेले आहे. विजयनगर शैली-



नाटयमंडप, वीरभद्रमंदिर – लेपाक्षी

…तील हे मंदिर, कृष्णदेवरायाच्या राजवटीत त्याचा कोशाध्यक्ष …विरुपण्ण याने इ. स. १५३८ मध्ये बांधले.

…या गावाला लेपाक्षी हे नाव का पडले, त्यासंबंधी एक आख्या…यिका सांगतात, ती अशी –

विरुपण्ण हा व्यापारीसंघाचा प्रमुख आणि विजयनगरच्या कृष्णदेवरायाचा कोशाध्यक्ष होता. ज्या ठिकाणी वीरभद्राची मूर्ती सापडली होती, त्या ठिकाणी त्याने मंदिर बांधायचे ठरविले आणि त्याप्रमाणे बांधकामाला सुरुवातही केली. मंदिराच्या



नागलिंग – लेपाक्षी

कामासाठी त्याने राजाच्या खजिन्यातील पैसा वापरला आणि खजिना रिकामा केला. मंदिर जवळजवळ पूर्ण होत आले होते. कल्याणमंडप तेवढा अर्धवट राहिला होता. कृष्णदेवरायाला जेव्हा आपला खजिना रिकामा झाल्याचे समजले, तेव्हा तो फार रागावला आणि त्याने विरुपण्णाचे डोळे काढण्याची शिक्षा दिली. तेव्हा विरुपण्णाने स्वतः आपले डोळे कल्याण मंडपाजवळच्या भिंतीवर घासले. त्याच्या खुणा अजूनही त्या भिंतीवर दाखवतात. म्हणून त्या गावाला लेप + अक्षी म्हणजे अंध डोळयांचे गाव असे नाव पडले.

इथे एकाच मंदिरात पापनाशेश्वर, राम, वीरभद्र, दुर्गा, शिव, विष्णू, इ. अनेक देवतांच्या देवळया आहेत. मंदिराभोवती मजबूत भिंत बांधलेली आहे. मंदिरातील नाटयमंडप आणि अर्धमंडप हे इथले उत्कृष्ट भाग आहेत. नाटयमंडपाला सत्तासष्ट स्तंभ असून, त्यांच्यावरील नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. मध्यभागी असलेल्या स्तंभावर नर्तक व वादक यांच्या पूर्ण आकृती कोरलेल्या आहेत. त्यांमध्ये ब्रह्मा मृदंग वाजवताना, तुंबरू वीणावादन करताना आणि शिव व रंभा नृत्य करताना दाखवले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाट्यमंडपाच्या मागे वीरभद्राचे मुख्य मंदिर असून, त्याच्या पूर्वेला शिवमंदिर आहे व पश्चिमेला अपूर्ण स्थितीत कल्याण-



नंदी – लेपाक्षी

मंडप आहे. त्याच्या दक्षिणेला खूप मोठे नागलिंग असून, लिंगावर सप्तमुखी प्रचंड नागफणा उभारलेली आहे.

मंदिराच्या पूर्वेला दोनशे यार्डांवर एक प्रचंड नंदी आहे. तो एकाच दगडातून खोदलेला असून, त्याची उंची वीस फूट व लांबी तीस फूट आहे. भारतातील हा सर्वांत मोठा नंदी होय.

रंगीत भित्तिचित्र – वीरभद्रमंदिर – लेपाक्षी

इथल्या मंदिरात असंख्य मूर्ती व चित्रे असून, इतके तऱ्हेतऱ्हेचे नक्षीकाम आहे, की हे चित्र व शिल्प या कलांचे भांडारच म्हणावे लागेल. इथे अनेक पौराणिक प्रसंग दगडांत कोरलेले आहेत.

वीरभद्राच्या गर्भगृहाच्या भिंतींवर, रंगमंडपाच्या व मुखमंडपाच्या छतांवर व इतरही काही ठिकाणी विजयनगरच्या राजांच्या कारकिर्दीतील अनेक रंगीत चित्रे आहेत. ही सर्व चित्रे पौराणिक कथानकांवर काढलेली आहेत. त्यांतील शिवपार्वतीविवाह, किरातार्जुनीयकथा, दक्षिणामूर्ती शिव, राम, वटपत्रशायी कृष्ण, मार्कंडेयकथा, भिक्षाटन शिव, गौरीप्रसादक गंगाधर शिव, चंडीशानुग्रहमूर्ती शिव, दशावतार; तसेच यक्ष, गंधर्व, स्त्री-पुरुष, इ. अनेक चित्रे सुंदर आहेत. या चित्रांतील रेषांचे लालित्य व वेग या गोष्टी वाखाणण्याजोग्या आहेत. विशाल नेत्र हे या चित्रांचे वैशिष्ट्य होय.

हे मंदिर प्रसिद्ध असून, शिवरात्रीला इथे मोठी यात्रा जमते. [टॅ. ली. आं. प्र.; अजंता, एप्रिल १९५४; ए. व्ही. शंकरनारायण राव–इलस्. वीक्ली ऑफ इंडिया, २९ सप्टें. १९५७]

लेवा गुजरातमधील कुणब्यांचा एक भेद. हे लोक गुजरातेत सर्वत्र आढळत असले, तरी आनंद, नडियाद व बोरसद या भागांत यांची वस्ती विशेष आहे. कच्छमध्येही यांच्यापैकी काही लोक असून, तिथे त्यांना हलाई व वाघदिआ अशी नावे आहेत. गुजरातेत यांचे पाटीदार व कणबी असे दोन वर्ग आहेत. पाटीदार हे कणब्यांच्या मुली करतात; पण त्यांना मात्र आपल्या मुली देत नाहीत. पाटीदारांत पुन्हा कुळी व अकुळी असे भेद आहेत. कुळी हे अकुळांना मुली देत नाहीत. यांच्यांत लग्नासाठी गोल (खेड्यांचे समूह) केलेले असून, एकाच गोलात लग्नव्यवहार होतो. पूर्वी यांच्यांत लग्नाचा काळ बारा वर्षांनी एकदा येत असे व तो तीनच दिवस असे. या तीन दिवसांत ते सर्व मुलींची लग्ने उरकून घेत. त्यामुळे कित्येक लेवा मुलींची लग्ने त्या पाळण्यात असतानाच होत. ही प्रथा आता नामशेष झाली आहे. तसेच पूर्वी हे लग्नात अतिशय खर्च करून कर्जबाजारी होत, तेही आता कमी झाले आहे.

पूर्वी कुळी पाटीदार सरकारतर्फे शेतकऱ्यांकडून कर वसूल करीत. त्या वेळी ते शेतकऱ्यांना फार त्रास देत.

पूर्व खानदेशात व वऱ्हाडातही लेवा नावाचे काही लोक आहेत; पण हे लेवा गुजरातच्या लेवा पाटीदार लोकांपैकी नसून उत्तरेकडच्या गुजरांपैकी असावे, असे वाटते. गुजर लोकांत लेवा गुजर व बड गुजर अशा पोटजाती आहेत. त्यांपैकी लेवा ही एक मोठी पोटजात असावी. हे लोक शेती करतात व त्यांच्या बायका दूधदुभत्याचा धंदा करतात. हे लोक हुशार व कष्टाळू आहेत. चौधरी, महाजन, इ. आडनावे यांच्यांत आढळतात. [म. शा. को.; पो. वी. हिं. सि.; म. लो. सं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोंकासा (इ. स.चे १५ वे शतक) जैनांच्या एका उपपंथाचा प्रवर्तक. त्याच्या चरित्रासंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही. श्री. अगरचंद नाहटांच्या मते याचा जन्म पोरवाल जातीत झाला. काहींच्या मते तो श्रीमाळी जातीचा होता. त्याच्या माता-पित्यांच्या नावांसंबंधीही अभ्यासकांत बरीच मतभिन्नता आढळते. लोंकासाचे वास्तव्य अहमदाबाद येथे होते. तो जैन धर्मग्रंथांच्या नकला करीत असे. एकदा ज्ञानर्जी नावाच्या एका श्वेतांबर साधूने सांगितलेल्या ग्रंथांच्या नकला करीत असता, त्याला त्या ग्रंथांत मूर्तिपूजेचा उल्लेख आढळला. लोंकासाला मूर्तिपूजा मान्य नव्हती. म्हणून त्याने ती गोष्ट जैन साधूच्या निदर्शनाला आणली. पण त्या साधूला त्याचे म्हणणे पटले नाही. त्यातून वादविवाद सुरू झाला आणि परिणामी लोंकासाने एक नवा संप्रदाय स्थापन केला. हा संप्रदाय लोंकागच्छ म्हणून प्रसिद्धीला आला.

थोड्याच कालात पुढे या संप्रदायात आणखी वैचारिक मतभेद निर्माण झाले आणि त्यांतून दोन नवे संप्रदाय उगम पावले. पहिल्याचे नाव विराजी पंथ आणि दुसऱ्याचे स्थानकवासी पंथ होय. विराजी पंथाचा संस्थापक विराजी नामक श्रमण होता. त्याच्या मते श्रमणांचे दैनंदिन जीवन हे अधिक कष्टमय असायला हवे. स्थानकवासीयांना श्वेतांबर पंथातली अंगे व उपांगे मान्य आहेत; परंतु छेदसूत्रे, प्रकीर्णके व मूलसूत्रे मान्य नाहीत. त्यांतही ... ग्रंथ हा त्यांना अजिबात त्याज्य वाटतो. ज्यांना स्थानकवासी पंथाबद्दल सहानुभूती आहे, त्यांनीही छेदसूत्रे वाचू नयेत, असा त्यांचा प्रचार असतो.

आज लोंकासामताचे अनुयायी फारसे दिसत नाहीत. इतकेच नव्हे; तर त्यांच्यांतील काहींनी मूर्तिपूजेचाही स्वीकार केला आहे. [हि. जै. मो.; जै. सि. भा.: भाग ४, जून १९३७]

...री एक जात. या लोकांची वस्ती महाराष्ट्रातल्या भंडारा जिल्ह्यात आढळते. हे लोक उत्तर भारतातून इकडे आले असावे, असे म्हणतात. कारण यांच्या स्त्रिया उत्तरेतील स्त्रियांसारखा पोषाख करतात. त्या घरांत हिंदी बोलतात. लग्नाच्या वेळी वधू-वरांनी मंगलस्तंभाला प्रदक्षिणा घालणे, ही त्यांच्यातली प्रथादेखील उत्तर भारतीयच आहे.

... विधवा पुनर्विवाह करते, तेव्हा ती आपल्या नव्या ... तलवारीची पूजा करते. यांच्यांत हीन जातीच्या ... शरीरसंबंध ठेवणाऱ्या पुरुषाला अग्निदिव्य करून शुद्ध ... लागते. त्यासाठी त्याच्या भोवती ज्वारीची ताटे ठेवून ती ...; मात्र त्याला त्यांतून लगेच बाहेर पडण्याची मुभा ... या विधीला 'अग्निकाष्ट' म्हणतात. [ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

लोक विश्वाचा विभाग. स्वर्ग, पृथ्वी व पाताळ हे त्रिलोक सर्वश्रुत आहेत. काही पंडित पाताळाऐवजी नरक हा त्रिलोकांतील एक लोक मानतात. भूर्भुवःस्वः हे त्रिलोक असेही एक मत आहे. सूर्य, विष्णू व शिव या तिघांनाही त्रिलोकेश म्हटले आहे. पाताळ म्हणजे अधोलोक. त्याव्यतिरिक्त सात लोक मानलेले आहेत, ते असे – (१) भूर्लोक – पृथ्वी (२) भुवर्लोक – पृथ्वी व सूर्य यांच्या मधला अंतराळ प्रदेश (३) स्वर्लोक – इंद्राचा स्वर्ग, अर्थात सूर्य व ध्रुवतारा यांच्या मधला भाग (४) महर्लोक – भृगू इ. महर्षी व ब्रह्मा यांचे निवासस्थान (५) जनलोक – ब्रह्मयाचे पुत्र सनक, सनंद व सनत्कुमार यांचे निवासस्थान (६) तपोलोक – वैरागी नामक देवतांचे निवासस्थान (७) सत्यलोक किंवा ब्रह्मलोक – ब्रह्मयाचे निवासस्थान. हा लोक प्राप्त झाला, की मनुष्य जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतो.

प्रत्येक कल्पाच्या अंती पहिले तीन लोक नष्ट होतात आणि शेवटचे तीन लोक ब्रह्मयाच्या आयुष्याच्या अंती नष्ट होतात. महर्लोकही तोपर्यंत शाश्वत असतो; पण पहिले तीन लोक जळत असतात, तेव्हा त्याच्या उष्णतेमुळे महर्लोकात निवास करता येत नाही.

पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, मध्यविभाग, जन्मस्थान, पुण्यप्रासाद व सत्यलोक अशीही सप्तलोकांची भिन्न नावे आढळतात. त्यांतील सहाव्या लोकात ब्रह्मयाचे पुत्र राहतात आणि प्रलय काली नष्ट झालेले जीव पाचव्या लोकात पुन्हा जन्म घेतात, असे सांगितले आहे.

सांख्य व वेदान्त दर्शनांत आठ लोक मानलेले आहेत. त्यांची नावे अशी – (१) ब्रह्मलोक – श्रेष्ठ देवतांचे स्थान (२) पितृलोक (३) सोमलोक – चंद्रादी ग्रहांचा विभाग (४) इंद्रलोक – इंद्रादी देवतांचा (५) गंधर्व लोक (६) राक्षसलोक (७) यक्षलोक व (८) पिशाचलोक. [क्ला. डि. हिं. मा.]

लोककला सर्वसाधारणपणे ग्रामीण भागात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची परंपराप्राप्त कला, ती लोककला होय. शास्त्रीय कलांप्रमाणेच बऱ्याचशा लोककलाही ईश्वरभक्तीच्या आणि धर्माच्या अनुषंगानेच निर्माण झाल्या आणि विस्तार पावल्या. लोककलांचे तीन मुख्य भेद सांगता येतील ते असे – धार्मिक, व्यवहारोपयोगी आणि वैयक्तिक.

धार्मिक किंवा कर्मकांडात्मक कला – मूर्तिपूजा हे आपल्या धर्माचे एक प्रमुख अंग आहे. शिवपार्वती, लक्ष्मीनारायण, रामसीता, राधाकृष्ण, काली, दुर्गा, सरस्वती, सटी, इ. अनेक देवदेवतांची लोक पूजा करतात. त्यासाठी घरच्या देव्हाऱ्यातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नित्य पूजेच्या आणि मंदिरांत स्थापण्याच्या देवादिकांच्या मूर्ती कुशल कारागीर तयार करतात. पण या देवतांच्या उत्सवप्रसंगी

लक्ष्मीचित्रांकित मातीची थाळी

गावातील कुंभार किंवा इतर कारागीर खेळणी म्हणूनही त्या त्या देवतांच्या शेकडो मूर्ती तयार करतात. रामनवमीच्या वेळी रामाच्या मंदिराभोवती रामसीतेच्या मातीच्या असंख्य मूर्ती विकायला आलेल्या दिसतात. गणपतीच्या विधियुक्त पूजेसाठी केल्या जाणाऱ्या मूर्तींच्या बरोबरच शाडूमातीच्या, साच्यांत घालून तयार केलेल्या लहान मूर्ती, मुलांना पूजण्यासाठी तयार केल्या जातात. बंगालमध्ये दुर्गापूजेच्या किंवा सरस्वतीपूजेच्या प्रसंगी दुर्गा, सरस्वती, कालिका, शिव, राधाकृष्ण, गोपाल, इ. अनेक देवतांच्या मातीच्या मूर्ती कारागीर बनवतात. या मूर्ती फार सुंदर असतात.

मुर्शिदाबाद व कलकत्ता या शहरांतले कारागीर हस्तिदंताच्या लहान लहान मूर्ती बनवतात. यांत देवदेवतांच्या मूर्ती अधिक असतात; पण शोभेसाठी ते पशुपक्ष्यांच्या मूर्तीही बनवतात.

पूजेसाठी दुर्गा, सरस्वती, इ. मूर्तींची स्थापना केल्यावर त्यांच्या मागच्या पृष्ठभूमीवर बंगालमधील चित्रकार पौराणिक कथा व देवदेवतांच्या आकृती चित्रित करतात. अशा चित्रांना बंगालमध्ये चालचित्र असे नाव आहे. ही चित्रे मोठ्या कौशल्याने रेखाटलेली असतात. प. बंगालमध्ये पटुवा नामक एक जात आहे. हे लोक कापडावर मध्यभागी देवदेवता व त्यांच्या सभोवती पशुपक्षी, पानेफुले, अशी चित्रे रेखाटतात. हे कुशल चित्रकार असून, त्यांनी काढलेल्या चित्रांचे रंग ताजे व सजीव वाटतात. पटुवांची ही चित्रकारी म्हणजे लोककलाच आहे, कारण चित्रकलेचे ज्ञान त्यांना परंपरेने घरातच मिळते. त्यासाठी त्यांना एखाद्या कलासंस्थेत शिक्षण घेण्यासाठी जावे लागत नाही.

गुजरातमधील रथवार आदिवासी भिंतीवर पौराणिक देवदेवतांची चित्रे काढतात आणि ती रंगवतात. मधेमधे अभ्रकाचे तुकडे बसवतात. त्यामुळे ती चित्रे सूर्यप्रकाशात चकाकतात.

कुमाऊँ प्रदेशातील स्त्रिया चित्रे काढणे, मूर्ती बनवणे, रांगोळ्या काढणे, करडे रंगवणे, इ. कलांमध्ये निपुण आहेत. त्यांची चित्रकला व्रतवैकल्यांशी निगडित आहे. कृष्णजन्माष्टमी, ऋषिपंचमी, हरतालिका, इ. व्रतांच्या कथा त्या चित्ररूपाने भिंतीवर अंकित करतात. सांप्रत कागदावरही तशी चित्रे काढतात. याशिवाय विवाह, उपनयन, इ. संस्कारांच्या प्रसंगीही त्या भिंतींवर किंवा कागदांवर अनेक प्रकारची रंगीत चित्रे काढतात. या चित्रांभोवती आकर्षक वेलबुट्टी असते व अशा विविध चित्रांची शैली आकर्षक असते.

कुमाऊँतील स्त्रिया श्रावण महिन्यात गणपती, कार्तिकेय व शिवपार्वती यांची पूजा करतात. त्यासाठी त्या स्वतः माती कुटून तिच्यापासून या मूर्ती घडवतात, त्यांना रंगवतात, वस्त्रे नेसवतात आणि मग त्यांची पूजा करतात. प्रत्येक घरी हा उत्सव होतो. भोजपुरी स्त्रियाही भिंतींवर चित्रे काढण्यात कुशल आहेत. विवाहानंतर वधू-वर घरातील ज्या खोलीत एकत्र येतात, त्या खोलीच्या भिंतीवर चित्रे काढण्याची पद्धत त्यांच्यांत आहे. प्रथम भिंतीला चुन्याचा किंवा पिवळ्या मातीचा लेप देतात. मग

लाकडी वाडग्यावर पितळी नक्षीकाम

तांदुळाच्या पिठात पाणी व हळद मिसळतात आणि बांबूच्या ब्रशाने किंवा बोटाने भिंतीवर चिमण्या, हंसमिथुन, कमळ,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पालखी, घोडा, हत्ती, मोर, सूर्य, चंद्र, इ. आकृत्या रेखाटतात. मग त्या काजळ, गेरू, सिंदूर, इ. रंगांनी रंगवतात. वरील आकृत्या या समृद्ध गृहसौख्य व आयुरारोग्य यांची प्रतीकं असल्यामुळे त्या नववधू पत्याच्या खोलीत चितारल्या जातात.

मानीचे भांडे – बंगाल

रांगोळ्या काढणे ही भारतीय स्त्रियांची खास कला आहे. मंगलप्रसंगी आणि सण, उत्सव व समारंभ या प्रसंगी दारापुढे, देवापुढे व भोजनाच्या ताटांभोवती सुंदर रांगोळी काढण्याची आपल्याकडे प्रथा आहे. अंगणात रांगोळी काढायच्या आधी अंगण झाडून सारवून स्वच्छ करतात. काही ठिकाणी रांगोळी काढायची जमीन गेरूने किंवा लाल मातीने सारवतात. नंतर रांगोळीने, तांदुळाच्या पिठीने किंवा आटयाने तिच्यावर विविध आकृत्या काढतात. प्रांतपरत्वे या रंगवल्लीला निरनिराळी नावे आहेत. काही ठिकाणी विशिष्ट उत्सवाच्या वेळी विशिष्ट प्रकारची रांगोळी काढण्याची पद्धत आहे. विवाहाच्या वेळी बंगालमध्ये सर्व अंगणभर रांगोळी काढतात, तिला बहुछत्र असे नाव आहे. लक्ष्मीपूजेच्या वेळी बंगाली स्त्रिया कमळ व लक्ष्मीची पावलं रांगोळीने रेखाटतात. केरळमध्ये ओणम सणाच्या वेळी फुलांची शोभिवंत रांगोळी काढतात.

गुजरातेत अंगण सजविण्याची एक वेगळीच पद्धत आहे. गडद रंगाच्या किंवा पांढऱ्या कापडाच्या चौकोनी तुकड्यांवर निरनिराळे पशुपक्षी व त्रिकोण तिथल्या स्त्रिया रेशमाने भरतात, त्यात मधूनमधून आरसे बसवतात आणि हे तुकडे उत्सवप्रसंगी अंगणात मांडतात व भिंतीवरही टांगतात. कच्छ व सौराष्ट्र भागांत निरनिराळ्या रंगीत मण्यांनी कापडाच्या चौकोनांवर वेगवेगळ्या आकृत्या काढतात व त्यांनी अंगण सजवतात.

अंगणात जशी रांगोळी काढतात, तसे घराच्या भिंतींवर चित्रे काढण्याची प्रथा कोकणात आहे. गणेशचतुर्थी हा कोकणातील मोठा सण. त्याच्या आधी दाराच्या चौकटीभोवतीची जागा शेणाने सारवतात. मग तांदुळांचे पीठ किंवा चुना पाण्यात कालवून घेऊन तिथे तुकड्याने तिच्यावर सुंदर वेलबुट्टी काढतात. बुंदेलखंडातील स्त्रिया दिवाळीच्या वेळी भिंतींवर गेरूच्या रंगाने ज्या आकृत्या काढतात, त्यांना सुराती असे नाव आहे. त्यांत दासी, लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती असलेले मंदिर, नाग-नागीण, सूर्य, सप्तर्षी, चंद्र, तुळस, आकाशदिवा, सोंगट्यांचा पट, इ. अनेक आकृत्या असतात. त्यांतल्या काही आकृत्यांशी काही कथा निगडित आहेत. दिवाळीच्या दिवशी रात्री स्त्रिया या सुरातींची पूजा करतात आणि त्यांवर गुळाने पैसे चिकटवतात.

माळव्यातील शेतकऱ्यांच्या घराच्या बाहेरच्या भिंतीवर नांगराचे व नांगर धरणाऱ्या माणसाचे चित्र काढलेले असते. ही चित्रे लाल रंगात असतात आणि दसरा-दिवाळीच्या वेळी शेतकरी त्यांची पूजा करतात. त्याचप्रमाणे माळव्यातील कुमारिका पितृपक्षात भिंतीवर एक चौकोन शेणाने सारवतात आणि त्यात शेणानेच काही ठिपके व चंद्रसूर्याच्या आकृत्या काढतात. मग

माघमंडल व्रत – अलिपना

त्यांवर रंगीबेरंगी फुलांच्या पाकळ्या, मणी, काड्या किंवा धान्याचे दाणे चिकटवतात. याप्रमाणे सोळा दिवस निरनिराळ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आकृत्या काढतात. त्यांना सांझी किंवा संजा असे नाव आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील महालक्ष्मीच्या सणाच्या वेळी आणि खानदेशातील कानबाईच्या उत्सवाच्या वेळी स्त्रिया पांढऱ्या

मातीचे पानदान

मातीने भिंती सारवतात आणि त्यांच्यावर गौरीची व कानबाईची चित्रे काढतात. त्यांच्या भोवती पानाफुलांची वेलबुट्टी काढून चित्रांना उठाव आणतात.

महाराष्ट्रात चैत्रातील गौरीच्या हळदीकुंकवाच्या वेळी आणि श्रावणातील मंगळागौरीच्या वेळी घरातील गृहिणी निरनिराळी पाने, फुले व फुलांचे हार यांनी देवीची कलात्मक सजावट करतात. चैत्रगौरीपुढे तर निरनिराळी खेळणी, फराळाचे जिन्नस आणि मनोहर आकारात कापलेली टरबुजे, खरबुजे, कलिंगडे वगैरे फळे मांडून आरास करतात.

व्यवहारोपयोगी कला – यात कुंभाराने घडवलेली मातीची गाडगीमडकी, मातीची खेळणी, बुरुडकाम, हातमागावर विणलेली वस्त्रे, इ. कलांचा समावेश होतो. कुंभार सर्वसामान्य लोकांच्या उपयोगासाठी साधी गाडगी, मडकी, माठ, इ. भांडी बनवतो. पण काही विशेष प्रसंगासाठी जेव्हा तो घट, कलश, सुरया, थाळ्या पानदाने वगैरे भांडी तयार करतो, तेव्हा तो त्या भांड्यांवर आणि त्यांच्या झाकणांवर पांढऱ्या, पिवळ्या किंवा लाल रंगाने काही नक्षी चित्रित करतो. त्या नक्षीत विविध प्रकारची फुले, पाने, वेली, कमळ, लक्ष्मीची पावले यांबरोबरच स्त्री-पुरुषांच्या आकृत्याही असतात. विवाहाच्या वेळी मंडपात स्थापन करायच्या कलशांवर तो देवदेवतांच्या आकृत्या चितारतो. या सर्व प्रकारच्या नक्षीत त्याचे कलाचातुर्य प्रगट होते.

प्राचीन कालापासून मातीच्या बाहुल्या, मुखवटे, देवादिकांच्या मूर्ती व खेळणी बनविण्याचे कामही कुंभारच करीत आलेले आहेत. बंगालमधील कृष्णनगर, घुरनी व नदिया येथील मातीच्या बाहुल्या फार प्रसिद्ध आहेत. तसे पाहिले तर भारतात अनेक ठिकाणी मातीच्या सुरेख रंगीत बाहुल्या, खेळणी व मूर्ती तयार होतात. प्रांतपरत्वे त्यांच्या वेषभूषेत तेवढा फरक असतो.

काही कारागीर लाकडाच्या बाहुल्या, बोळकी, वाडगे, करंडे व खेळणी बनवतात. ही खेळणी तशी साधीच असतात. पण थोडे भडक रंग दिल्यामुळे मुलांना ती फार आवडतात.

दोरीचे विणलेले सुंदर शिंके

तिरुपती आणि तंजोर येथील लाकडी बाहुल्या प्रसिद्ध आहेत. आंध्रातील कोंडापल्ली येथे निरनिराळ्या देवतांचे लाकडी वाहन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...वू तयार करतात. महाराष्ट्रातील सावंतवाडी येथील लाकडी ...ळणी व रांध्याची फळे फार लोकप्रिय आहेत. लखनी येथील ...ागीर मातीचे सुंदर पशुपक्षी, बाहुल्या व फळे करतात. हे ...ंतील पक्षी मनमोहक असतात; तर फळांना दिलेल्या तजेल... ...ार रंगांमुळे ती कृत्रिम न वाटता खरी वाटतात.

काही लोक बांबू व वेत यांच्यापासून निरनिराळ्या आका... ...राच्या टोपल्या, करंडया, सांबळया, चटया, शिंकी, पडदे,

मातीच्या भांडयांवर रंगीत नक्षीकाम

...ा वगैरे वस्तू तयार करतात. बांबूच्यांच पट्टया हिरव्या, ...ंडया, गुलबक्षी वगैरे रंगाने रंगवून विणताना त्यांच्या ...्याने ते आकृतिबंध तयार करतात. काश्मीरमधील विलो ...च्या फांद्यापासून बनवलेल्या करंडया प्रसिद्ध आहेत. ...बंगालमधील मेदिनीपूरच्या चटया उत्कृष्ट म्हणून ख्याती ...ावल्या आहेत. कोमिल्ला, नोआखली व सिल्हेट या ठिकाणी ...शीतलपाटी नावाच्या एक प्रकारच्या चटया तयार करतात. त्या ... मुलायम असुन, नावाप्रमाणेच शीतल असतात. ...उन्हाळ्याच्या दिवसांत त्यांचा अंथरूण म्हणून उपयोग करतात. ...मिथिला प्रदेशातील लोक सिकी नामक एका विशिष्ट गवता... ...ने हत्ती, मुसर, कासव, इ. सुंदर प्राणी बनवतात.

बऱ्याच आदिवासी जमाती बांबू व वेत यांच्यापासून त्यांना लागणाऱ्या चटया, टोपल्या, करंडया, पाटया वगैरे वस्तू विणण्यात फार प्रवीण आहेत. विणताविणताच ते लोक त्यांवर कलाकुसरही करतात.

आसाम व नेफा या भागांतील आदिवासींच्या स्त्रिया हातमागावर कापड विणण्यात कुशल आहेत. कापडांवर त्या रंगीबेरंगी धाग्यांनी सुंदर नक्षी विणतात आणि मग त्यांचे कपडे शिवतात. पंजाबमधील जाट मुली व स्त्रिया जमिनीवर अंथरण्यासाठी जाड सतरंज्या विणतात. त्यांत विविध आकृत्या असतात.

बंगालमध्ये हातमागावर साडया, धोतरे व कापड विणणारे पुष्कळ विणकर आहेत. अत्यंत तलम कपडा विणण्याविषयी त्यांची प्रसिद्धी आहे. त्यांनी विणलेल्या साडयांच्या किनारी तऱ्हेतऱ्हेच्या व आकर्षक असतात. बंगालमधील श्रीमंत स्त्री-पुरुष शांतिपूर, टंगाईल, चंद्रकोना, फराशडांगा, इ. ठिकाणी तयार झालेल्या हातमागावरच्या साडया व धोतरे आवडीने नेसतात.

मातीचा बाहुला

म्हैसूरच्या रेशमी साडया, मध्यप्रदेशातील चंदेरी येथील अत्यंय तलम साडया, महाराष्ट्रातील पैठण येथील पैठण्या, वाराणसी येथील जरीच्या साडया, शालू व किनखाबाचे कापड, कांजीवरम येथील रेशमी साडया, राजस्थानमधील बांधणी साडया, गुजराथमधील पाटोला साडया या सर्व भारतभर प्रसिद्ध आहेत.

आंध्र व तमिळनाड या प्रदेशांतही हातमागावर साडया, कापड, शाली, इ. वस्त्रे विणणारे अनेक विणकर आहेत.

वैयक्तिक कला – काही कला वैयक्तिक बुद्धिमत्ता, कलाचातुर्य व कलात्मक प्रवृत्ती यांवर अवलंबून असतात. बंगालमधील स्त्रिया कंथा नामक गोधडीसारखे एक पांघरूण तयार करतात. रंगीबेरंगी कापडाचे तुकडे कापून, त्यांपासून कंथेवर त्या मनुष्य,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पशुपक्षी, पानेफुले, वेली, इ. आकर्षक आकृत्या तयार करतात.

बिहारमधील स्त्रियाही अशाच प्रकारची एक गोधडी तयार



वेत व कवड्या यांनी विणलेली टोपली

करतात. तिला सुजनी असे नाव आहे. निरनिराळ्या रंगीत धाग्यांनी तिच्यावर मोर, पोपट, चिमणी, इ. पक्षी व पानेफुले भरतात.

मातीचा मुखवटा – मैमनसिंग

हातापायांना मेंदी लावणे, हीही एक वैयक्तिक स्वरूपाची कला आहे. काही स्त्रिया त्यात विशेष निपुण असतात. मेंदीने त्या तळहातावर अतिशय नाजुक आकृत्या काढतात.

कच्छमधील भरतकाम, तसेच रेशमी कापडावरील नाचणारा मोर, फुले असलेली झुडपे, नृत्य करणाऱ्या स्त्रिया इ. आकृत्या असलेले कच्छी भरतकाम आणि पंजाबमधील बाघ आणि फुलकारी काम ही फार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. हिमाचल प्रदेशातील डोंगरी भागातील स्त्रिया दोन्ही बाजूंना भरतकाम दिसणारा एक मोठा रुमाल तयार करतात. तो चंबा रुमाल म्हणून प्रसिद्ध आहे.

याप्रमाणे फुलांच्या माळा, गजरे व वेण्या करणे, घराच्या दारावर बांधण्यासाठी काचेच्या नळ्या व मणी यांची तोरणे बनविणे, मुलांच्या पाळण्यावर बांधण्यासाठी चिमणाळी तयार करणे, इ. अनेक नावे वैयक्तिक कलेच्या क्षेत्रात सांगता येतील.



कंथा – बंगाली लोककला

लोककलांचे क्षेत्र हे फार व्यापक आहे. लोकजीवनाच्या बहुतेक सर्व क्षेत्रांत लोककलांचे दर्शन होते. [संमेलन पत्रिका, कला अंक १९५८ व लोकसंस्कृति विशेषांक १९५४; विंध्यभूमि लोकसंस्कृति–अंक, ऑगस्ट १९५५; फोकलोअर, ऑगस्ट १९६२; इं. फो. आ. का.]

लोकनाट्य बहुजनांचे विषय घेऊन, बहुजनांच्या मनोविनोदनासाठी, बहुजनांतील काही कलावंतांनी सादर केलेले सहजसुलभ नाट्य म्हणजे लोकनाट्य होय. ते शास्त्रीय आणि अभिजात अशा नागरी रंगभूमीपेक्षा कनिष्ठ श्रेणीचे असले, तरी ते बहुजनांच्या आनंदप्रदर्शनाचे प्रभावी माध्यम आहे. शास्त्रीय लोकनाट्याची परंपरा सहस्रावधी वर्षांइतकी जुनी आहे. अंती आणि अभिजात रंगभूमीचाही मूलस्रोत लोकनाट्यच आहे, असे म्हणता येते. श्री. शाम परमार याचे स्पष्टीकरण करतात, ते अंत-

भरताच्या नाट्यशास्त्रात नाटकाला पंचमवेद म्हटले असून, तो शूद्रांच्या मनोरंजनासाठीही असल्याचे सांगितले आहे. शूद्र म्हणजे वस्तुतः सर्वसामान्य लोक. नाट्यशास्त्रात विकृष्ट, चतुरस्र आणि त्र्यस्र असे जे तीन रंगमंच सांगितले आहेत, त्यांपैकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असा हा त्रिकोणात्मक रंगमंच असून, तो मुख्य रस्त्यावर किंवा चौकात उभारला जात असे व तो सामान्य जनांसाठी असे. यावरून लोकनाट्याची प्राचीनता स्पष्ट होईल.

लोकनाट्याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते कमीत कमी खर्चात, जास्तीत जास्त आकर्षक व परिणामकारकरीत्या सादर केले जाते. लोकनाट्यासाठी खास रंगमंच उभारावा लागत नाही. एखाद्या झाडाचा प्रशस्त पार, देवळाचा उंच कट्टा, ओटा किंवा चौथरा त्यासाठी पुरेसा असतो. क्वचित जुजबी, फळकुटांचा रंगमंचही उभारतात. रंगमंचावर कुठेही पडदे नसतात. रंगभूषा किंवा वेषभूषा करण्यासाठी आडोसा हवासा वाटलाच, तर एखाद्या झाडाच्या आड किंवा देवळाच्या भिंतीपलिकडे जातात. रंगभूषेसाठी काजळ, कुंकू, खडू, पिवडी, इ. गावठी रंगांचाच वापर करतात. जी गोष्ट रंगांची, तीच कपड्यांची. कपडे नवे, नेहमीच्या वापरातले असले तरी चालतात. कवड्या आणि काचेचे मणी यांच्या माळा व दागदागिने बनवून त्यांचा वापर करतात. स्त्रियांची कामेही पुरुषच करतात. क्वचित लहानसहान मुलांनाही घेतात. सगळा जोर अभिनयावर, पल्लेदार आवाजावर व समयोचित संवाद-संभाषणांवर असल्यामुळे बाह्य आकर्षणांवर भर देण्याचे कारणच पडत नाही. किटसन्च्या वत्त्या किंवा मशाली पाजळून प्रकाशयोजना करतात.

लोकनाट्याची भाषा सरळ, ठोस, सर्वांना समजेल अशी व रांगडी असते; संवाद छोटे व चटकदार असतात; विनोद ढोबळ स्वरूपाचा असतो; कथानक प्रायः पौराणिक, ऐतिहासिक, लौकिक किंवा क्वचित सामाजिकही असते.

राम आणि कृष्ण हे कोटयवधी भारतीयांचे आदराचे विषय. स्वाभाविकच त्यांचे जीवनप्रसंग काव्य, नृत्य, नाटय, संगीत, कथा, कीर्तनें, प्रवचनें-पुराणे यांतून लोकमानसापुढे सतत येणारे असतात. लोकनाट्यातही ते तसेच येतात. उ. भारतात रामकथेचा प्रचार रामानंदांनी केला असला, तरी रामकथा घरोघर नेऊन पोचवली, ती गोस्वामी तुलसीदासांनी. त्यांनी काशीमध्ये सर्वप्रथम रामलीला या लोकनाट्याचा प्रयोग केला. रामलीला जशी रामाची, तशी रासलीला कृष्णाची. चैतन्य महाप्रभूंनी कीर्तनिया नावाच्या लोकनाट्याला जन्म देऊन बंगालमध्ये कृष्णलीला बहर आणला.

लोकनाट्याचा लोकजीवनाशी घनिष्ठ संबंध असतो. त्यामुळे सर्वसाधारण लोकांच्या उत्सवांचे, सणांचे व मांगलिक कार्यांचे निमित्त साधून जशी लोकनाट्ये सादर केली जातात, तशीच ती होळी, वर्षाकाल, वसंतागम या निमित्तानेही होतात. उत्तर भारतातील काही गावांत विवाहप्रसंगी सोंगे नाचविण्याची प्रथा आहे. ही सोंगे म्हणजेच स्वांग नावाचे लोकनाट्य होय. वरात घरी येण्याच्या वेळी वरातीतील काही स्त्रिया नाना प्रकारची सोंग घेऊन वरगृही जातात. भोजपुरी प्रदेशात या लोकनाट्याला डोमकच्छ असे म्हणतात.

माळव्यातले माच, उ. प्रदेशातले नौटंकी, आग्र्याचे भगत, बंगालांतले शैव नाटक गंभीरा व वैष्णव नाटक कीर्तनिया, आसामातले अंकिया, गुजरातमधले भवाई, राजस्थानातलं ख्याल, रम्मत, गवरी, इ. नाट्ये, महाराष्ट्रातली दशावतार, ललित, खेळे, कठपुतळी, तमाशा, इ. नाट्ये हे सारे लोकनाट्याचे प्रकार होत. याशिवाय, यात्रकळी, यक्षगान, हरिकथा, बुर्रकथा, भागवतमेळा, वीथिभागवतम हेही काही लोकनाट्याचे प्रकार दक्षिणेत प्रचलित आहेत. [भा. लो. सा.; हिं. ना. उ. वि.; लो. सा. वि.; हिं. वि. को.; हिं. सा. बृ. इ.]

लोकनाथ

(१) ओडिसा प्रदेशातला एक देव. त्याच्या नावावरून हा लोकदेव असावा, असे वाटते.

लोकनाथ अवलोकितेश्वर – बिसुनपूर (गया)

परंतु पंडितांच्या मते लोकनाथ म्हणजे पुरीचा प्रसिद्ध जगन्नाथच होय. तिथल्या लोकांची अशी समजूत आहे, की त्याला पिकलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केळी अर्पण केली म्हणजे तो सर्व पाप-ताप दूर करतो. तो नवसालाही पावतो. नवस पुरवला नाही आणि त्याचा विसर पडला, तर तो नवस करणाऱ्यांचा नाश करण्यासाठी सापांची योजना करतो. पुन्हा त्याला नैवेद्य अर्पण केला म्हणजे सर्व काही ठीक होते. [स्ट. ओ. फो.]

(२) बौद्धांच्या महायान पंथाचा प्रमुख देव अवलोकितेश्वर याचे एक रूप. साधनमालेत याचे वर्णन केलेले आहे, ते असे – हा श्वेत वर्णाचा असून, चंद्राप्रमाणे शांत व तेजस्वी आहे. ह्रीः या अक्षरातून हा उद्भवलेला असून, त्याच्या मस्तकी जटामुकुट आहे. त्या जटामुकुटात वज्रधर्माची प्रतिमा आहे. याचा उजवा हात वरद मुद्रेत असतो व याच्या डाव्या हातात कमळ हे त्याचे अभिज्ञान चिन्ह असते. हा सर्व रोगांचा परिहार करणारा आहे. तो ललितासनात बसलेला असतो. त्याच्या उजव्या बाजूला तारा व डाव्या बाजूला हयग्रीव हे सहचर असतात.

काही वेळा लोकनाथ एकटाच असतो, असे साधनमालेत म्हटले आहे. एका साधनेत लोकनाथमंडलाचे वर्णन केलेले आहे. त्यात आठ बोधिसत्त्व, चार शक्ती व चार द्वारपाल असतात. बहुधा याची एकट्याची मूर्ती केलेली आढळते. काही प्रतिमांत लोकनाथ उभा असतो. अशा मूर्ती सारनाथ येथे व नेपाळमध्ये सापडल्या आहेत. महोबा येथील मूर्ती सर्वांत सुंदर व कलात्मक आहे. बिसुनपुर येथील मूर्ती पाटणा संग्रहालयात आहे, तीही चांगली आहे. [इं. बु. इ.]

लोकनाथ चक्रवर्ती

(जन्म इ. स. १४८५) चैतन्य महाप्रभूचा एक सहकारी व भक्त. हा यशोहर तालगौडचा रहिवासी होता. पद्मनाभ चक्रवर्ती हे त्याचे वडील आणि सीतादेवी ही आई होय. लोकनाथ चैतन्यांचा सहाध्यायीही होता. अद्वैताचार्य हे त्याचे गुरू होते.

चैतन्यांनी नवद्वीपात कृष्ण-कीर्तनाचा प्रसार केला. त्यामुळे तिथले लोक वृंदावनाकडे आकर्षित झाले. परंतु त्या वेळी वृंदावन घोर जंगलात सापडून लुप्तप्राय झाले होते. त्याचा शोध घेऊन कृष्णाची दुर्गम लीलास्थाने भक्तजनांना सुगम करण्यासाठी महाप्रभूने लोकनाथाला तिकडे पाठवले. भूगर्भाला बरोबर घेऊन लोकनाथ कृष्णाच्या विविध स्थानांचा शोध घेत हिंडला; पण त्यात त्याला फारसे यश आले नाही. म्हणून तो परत चैतन्यांच्या दर्शनाला गेला. पुढे रूप-सनातन गोस्वामी कायमच्या वास्तव्यासाठी वृंदावनात गेले असता त्यांच्या बरोबर हाही तिथे गेला.

वृंदावनातील गोविंददेवाचे पुजारीपणही त्याने काही काळ केले. तो परमविरागी भक्त होता. नरोत्तमदास ठाकुर हा राजकुमार त्याच्याकडून दीक्षा घेऊ इच्छीत होता; पण तो राजकुळातला आहे म्हणून लोकनाथ त्याला दीक्षा देण्याचे टाळीत होता. पुढे नरोत्तमदास जीव गोस्वामीच्या संगतीत राहून भक्तिग्रंथाचे अध्ययन करू लागला. पुढे त्याच्या शिफारशीने नरोत्तमदासाला लोकनाथाकडून दीक्षा मिळाली.

लोकनाथाची समाधी वृंदावनात गोकुलानंदमंदिरानजिक आहे. [चै. म. ब्र. सा.; ब्र. ध. इ.]

लोकनृत्य

शिक्षित नसलेला बहुजन समाज, ग्रामीण जनता व आदिवासी जाती-जमाती विविध प्रसंगी नृत्य करून हर्षोल्लास अनुभवतात, त्या नृत्याला लोकनृत्य म्हणतात. नृत्यकला ही फार प्राचीन आहे. आदिमानवापासून तिचा प्रारंभ होतो. आदिमानवाने प्रथम हावभाव करूनच आपल्या भावना व्यक्त केल्या. त्या हावभावांनाच पुढे लयबद्ध स्वरूप आले. त्यातूनच आवेग उत्पन्न झाला. हा उत्स्फूर्त आवेग हळूहळू कमी होऊन त्यात सुसूत्रपणा येऊ लागला. त्याला विशिष्ट हेतू चिकटले आणि अशा प्रकारे लोकनृत्ये अस्तित्वात आली.

केवळ लयबद्ध आणि आवेगात्मक हालचाल आणि परिष्कृत नियमबद्ध शास्त्रीय नृत्ये या दोघांच्यामध्ये लोकनृत्ये येतात. लोकनृत्यांत क्वचित उद्देशहीन अशी लयबद्ध हालचाल आढळते; त्याचप्रमाणे प्रसंगी शास्त्रीय नृत्यातील सुसूत्रपणाही आढळतो.

सांप्रत जी लोकनृत्ये प्रचलित आहेत, त्यांचे दोन प्रकार दिसून येतात, ते असे –

(१) आदिवासींचे नृत्य – यात संगीत, वेषभूषा आणि अंगविक्षेप यांमध्ये भडकपणा दिसून येतो. वन्य जमातींच्या या नृत्यात पशु-पक्ष्यांचेही अनुकरण असते. चिमण्यांचे दाणे टिपणे, हरणांचे झेपावणे, हत्तींचे डुलत चालणे, इ. गोष्टींचे त्यांच्या नृत्यात अनुकरण आढळते. वन्य जमातींत गिधाडांचेही एक नृत्य असते. या नाचात एक मुलगी प्रेतवत पालथी पडून राहते आणि बाकीचे लोक तिचे लचके तोडण्याचा अभिनय करतात. ओडिसातील भुइया लोकांचे एक सर्पनृत्यही आहे. यात काही मुलींना मानेपासून खाली कापडांनी गुंडाळतात. या मुली सरपटत पुढे जातात व ताशेवाल्यांना दंश करतात. गोंड लोकांतही एक सर्पनृत्य आढळते. यात नर्तकांची एक मोठी रांग तालावर सर्पगतीने नाचत असते. ओळीचे एक टोक म्हणजे सर्पाचे एक तोंड व दुसरे टोक म्हणजे त्याची शेपटी. मुखाचे टोक शेपटीला चावा घेण्याचा प्रयत्न करते आणि शेपटी तो चावा चुकविण्याचा प्रयत्न करते.

(२) ग्रामीण जनतेचे नृत्य – हे वरील नृत्याहून सर्व बाबतींत भिन्न व सौम्य असते. त्यात निसर्गाच्या हालचालींचे, कृषिविषयक कलापांचे व क्वचित देवदेवतांच्या लीलांचे अनुकरण असते. गावे व शहरे यांत सामान्यरूपाने ते केले जाते. अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकनृत्यांमध्ये जी सरलता असते, ती प्रयत्नविहीन असते. जेव्हा लोक नाचतात, तेव्हा ताल, लय आणि अंगविक्षेप हे जणू समरस होऊन अभिव्यक्त होतात. नृत्यकारांच्या अंगात हे गुण स्वभावगतच असल्यासारखे वाटतात. कथक नृत्याप्रमाणे त्यात तालाची सम पकडण्यासाठी मात्रा मोजाव्या लागत नाहीत किंवा घामही गाळावा लागत नाही. यांना लोकनृत्य हे नाव देण्याचे कारण, की ती आमजनतेची नृत्ये असतात, तो साधी असतात, आणि जनजीवनाचे आनंद आणि उल्लास हे त्यांच्याशी निगडित असतात.

लोकनृत्ये ही केवळ ग्रामीण वातावरणातच उत्पन्न व विकसित होतात असे नव्हे; तर ती शहरांतही उत्पन्न व विकसित होऊ शकतात. त्यामुळे गावांत जी नाचली जातात तीच तेवढी लोकनृत्ये व शहरांत उत्पन्न होतात ती लोकनृत्ये नव्हेत, असे म्हणता येणार नाही. सांप्रत गाव आणि शहर हा भेद कमी कमी होत चालला आहे. गावे व शहरे एकमेकांच्या जवळ येत आहेत. त्यामुळे एकच गोष्ट दोन्ही ठिकाणीं समान रूपात आढळून येऊ शकते. लोकनृत्यालाही ही गोष्ट लागू आहे.

लोकनृत्याची वैशिष्ट्ये — लोकनृत्ये सरळ, सुबोध व सर्वसुलभ असतात. हे तीन्ही गुण त्यांच्या व्यावसायिक स्वरूपातही असतात. त्यांच्या सर्वसुलभतेची कसोटी ही, की त्याचे कोणाला शिक्षण घ्यावे लागत नाही. पाहून पाहून ती लोकांना आत्मसात होतात. पूर्वीचे संस्कार आणि अनुकूल वातावरण या गोष्टींमुळे मुलांनाही सहजपणे त्यांचे शिक्षण मिळते. विवाहादी मंगलकार्यात ग्रामीण स्त्रिया जे नृत्य करतात, ते त्या कुठेही शिकलेल्या नसतात त्यांना ते सहजगत्या येत असते. लोकनृत्यांचा व्यवसाय करणाऱ्या लोकांची मुले तर पाहून पाहून ते शिकून घेतात. राजस्थानातले भवाई नृत्य हे एक चमत्कारिक लोकनृत्य आहे; पण भवाईच्या घरी जन्म घेणाऱ्या मुलाला त्याचे पाठ घ्यावे लागत नाहीत.

लोकनृत्ये ही बनवली जात नाहीत, तर ती आपोआप बनत असतात. त्यांच्यावर कोण्या व्यक्तीची छाप नसते, तर साऱ्या समाजाची असते. लोकनृत्यात जनजीवनाची परंपरा, त्याचे संस्कार आणि लोकांचा आधिदैविक विश्वास या गोष्टी आढळून येतात. ज्याने स्थल, काल व परिस्थिती यांचे बदल अनुभवूनही आपले अस्तित्व टिकवले अशा नृत्यालाच लोकनृत्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. त्यांना धार्मिक महत्त्वही येते.

जवळजवळ बहुतेक लोकनृत्ये सामूहिक असतात. त्यांतला आनंद, लाभ आणि प्रतिष्ठा या गोष्टी वैयक्तिक नसून सामुदायिक असतात. व्यावसायिक लोकनर्तकांतही सामूहिक भावना असते. प्रत्येक पर्वणी, उत्सव-समारंभ, सण व संस्कार हे लोकनृत्याचे प्रसंग असतात. काही काही ठिकाणी तर अशा पर्वांच्या वेळी नृत्य झाले नाही, तर ते अशुभ समजतात. आत्मानंद, सामाजिक कर्तव्य आणि धार्मिक भावना यांचे सुंदर संमिश्रण लोकनृत्याशिवाय अन्यत्र दुर्मिळ आहे.

लोकनृत्ये ही शास्त्रीय नियम आणि विधि-निषेध यांच्या पलिकडे असली, तरी ती प्राथमिक किंवा अपरिपक्व आहेत, असे म्हणता येणार नाही. कारण त्यांचाच विकास होता होता त्यांना शास्त्रीय नृत्याची प्रतिष्ठा प्राप्त होते. शास्त्रीय नृत्यात जेवढी कला, जेवढी आनंददायक शक्ती आणि जेवढे रचनाकौशल्य आढळते, ते काही अंशी लोकनृत्यातही आढळते. सौराष्ट्रातली रास-गरबा, राजस्थानातली घूमर व भवाई, गरासियांचे वालर, भिल्लांचे भूमरा व मणिपूरचे लाइहरोबा ही नृत्ये वरील सर्व गुणांमध्ये शास्त्रीय नृत्यांची बरोबरी करू शकतात.

पंजाब व काही अंशी राजस्थान या प्रदेशांतले नृत्य मोगली राजवटीमुळे व सामंत-सरदारी प्रथेमुळे बिघडले व नृत्यकलेतला धार्मिक आशय नष्ट झाला. मागच्या चारशे-पाचशे वर्षांमध्ये नृत्यकला हा सांस्कृतिक जीवनाचा एक भाग आहे, ही कल्पना नष्ट होऊन, ती केवळ विलासाचे साधन समजली गेली. धार्मिक समारंभ व सामाजिक पर्वे यांमधले ते नृत्याचे महत्त्व लुप्त झाले. होळीसारखा सण व विवाहमंगल एवढ्यापुरतीच त्यांना मर्यादा प्राप्त झाली. होळीची नृत्येही शृंगारिक हावभावांनी बिघडून गेली व त्यांतले पावित्र्य संपले. म्हणूनच आजही राजस्थान व पंजाब या प्रदेशांत स्त्रिया पुरुषांबरोबर नृत्य करीत नाहीत. जेव्हा स्त्रियांची आवश्यकता असते, तेव्हा पुरुषच स्त्रीरूप नटतात. त्यामुळे पंजाबात जवळ जवळ लोकनृत्य ही चीजच उरली नाही. राजस्थानातही आदिवासींची नृत्ये वगळता धार्मिक व सामाजिक लोकनृत्यांची उणीव आहे. स्त्री-पुरुषांच्या संमिश्र लोकनृत्यावर अशा प्रकारे समाजाचे बंधन आल्यावर तिथे व्यावसायिक लोकनृत्यांचा अधिक विकास झाला. समाजाने असल्या व्यावसायिक नर्तकांनाही हीनच लेखले. भवाईंना तर त्यांच्या मूळ जातीतून बहिष्कृतच करण्यात आले.

द. भारतात मात्र असे घडले नाही. तिकडे विधर्मी व विदेशी प्रभाव न पडल्यामुळे तिथल्या कलांवर हिंदू धर्माची उदात्त व पवित्र भावना कायम राहिली आहे. दक्षिणेत नृत्य व संगीत यांच्यावर प्रायः कोणतेही सामाजिक बंधन नाही. तिथल्या कलांच्या मागे धार्मिक व सामाजिक भावना स्पष्ट दिसून येतात. म्हणूनच तिकडे समाजाच्या सर्व थरांत नृत्याविषयी सद्भावना आहे. केरळात तर नृत्य हे नंपूतिरी ब्राह्मणांच्या घरांतही प्रतिष्ठा मिळवून बसले आहे. तिथले ब्राह्मण नृत्य अपवित्र होऊ नये म्हणून शूद्रांना त्यांच्यापासून दूर ठेवतात. याच्या उलट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजस्थानात उच्च जाती भ्रष्ट होऊ नयेत म्हणून त्याला नीच जातींत ढकलून दिलेले आढळते. त्यामुळेच राजस्थानात लोकनृत्ये करणाऱ्या स्वतंत्र जाती निर्माण झाल्या; पण दक्षिणेत त्या तशा निर्माण झाल्या नाहीत. दक्षिणेत कला ही प्रत्येक घराची शोभा बनली. तिथली लोकनृत्येच इतकी व्यवस्थित व सुश्लिष्ट बनवली गेली, की हळूहळू त्यांनीच परिष्कृत रूप धारण केले. कथकळी व कुचिपुडी ही नृत्ये एके काळी लोकशैलीतली होती; पण सांप्रत तीच उच्च दर्जाची शास्त्रीय नृत्ये बनली आहेत.

निराळ्या दृष्टीनेही दक्षिणेतल्या लोकनृत्यांचे विश्लेषण करता येणे शक्य आहे. तिकडे हवेत उष्मा अधिक असल्यामुळे लोक कपडे कमी वापरतात. म्हणूनच तिकडचे नर्तकही उघड्या अंगाने नाचतात. कपड्याची उणीव भासू न देण्यासाठी मग ते गळ्यात कंठे घालतात, छातीवर व बाहूंवर चंदन व अन्य रंग लावतात आणि कपाळी उभे आडवे गंध रेखतात. शरीर उघडे असल्यामुळे त्यांच्या नृत्यांत अंगविक्षेपांना अधिक प्राधान्य आलेले आहे.

बंगाल व मणिपूर या प्रदेशांतल्या लोकनृत्यांमध्ये धार्मिक भावनांचे प्राबल्य आहे. तिथली लोकनृत्ये धार्मिक समारंभ साजरे करण्यासाठी केली जातात. ती बहुधा मंदिरे व देवस्थाने यांत होतात. सामाजिक बंधन नसल्यामुळे स्त्रियाही पुरुषांच्या बरोबर मिळूनमिसळून नाचतात. नृत्यांत कुठेही विलास, शृंगार आणि हीन अभिरुची या गोष्टी आढळत नाहीत. तिकडील लोकही आदराने व धार्मिक भावनेनेच ती नृत्ये पाहतात.

भारतातल्या काही प्रसिद्ध लोकनृत्यांची माहिती–.

काश्मीर – सांप्रत काश्मिरात इस्लामी संस्कृतीचे वर्चस्व असले, तरी प्राचीन काळी तिथे हिंदू संस्कृती नांदत होती. कल्हणाचा राजतरंगिणी हा ग्रंथ आणि तेथील भग्नावशेष यांच्यावरून ही गोष्ट कळून येते. मुसलमानी आक्रमणामुळे तिथल्या अनेक परंपरा नष्ट झाल्या, तशीच नृत्यपरंपराही नष्ट झाली. सांप्रत तिथे जी लोकनृत्ये प्रचलित आहेत, ती मुसलमानी पद्धतीची आहेत.

बच्चनग्म–हे काश्मिरातले सर्वांत अधिक प्रसिद्ध असे लोकनृत्य आहे. सुगीच्या दिवसांत गावोगावी व गल्लोगल्ली मिसरूड न फुटलेली तरुण मुले स्त्रीवेष करून हे नृत्य करतात. नृत्यात फारसी किंवा हिंदुस्थानी भाषेतली गीते, नग्मे किंवा गझला गातात. गीतांना संतूर, सारंगी, ढोलकी अशा वाद्यांची साथ असते.

डुम्हल– हे तिकडील वातल जातीत प्रचलित आहे. हे फक्त पुरुषांचे नृत्य असते. पुरुष रंगीबेरंगी पोषाख करून, डोक्यावर शंकूसारखी टोपी घालून व हातात झेंडे घेऊन हे नृत्य करतात. नृत्याला ढोलाची साथ असते.

पाथेर– हे भांड लोकांचे नृत्य आहे. हे फक्त पुरुषच करतात.

छज्जा– हे थंडीच्या दिवसांतले नृत्य आहे. रंगीत कागदाचा मोर बनवून मधे ठेवतात आणि त्याच्या भोवती फेर धरून सर्व नर्तक नाचतात.

गद्दी–वासुकी नागाच्या प्रीत्यर्थ कैलास सरोवरावर भरणाऱ्या जत्रेत हे नृत्य होते. गद्दी म्हणजे धनगर होत. या नृत्यात जी गीते गायिली जातात, ती गद्दींच्या जीवनावरची असतात. नाचताना नर्तक टाळ्या वाजवतात व वासुकी नागाचा जयजयकार करतात.

पंजाब–पंजाबचे भौगोलिक दृष्ट्या कुलूघाटी व मैदानी प्रदेश असे दोन विभाग पडतात. त्यांत पुढील नृत्ये होतात.

कौलरी दियाली – हा मार्गशीर्ष मासातला दिवाळीसारखा सण असतो. त्या प्रसंगी स्त्री-पुरुष एकत्र जमून हिडमा देवीच्या प्रीत्यर्थ गाणी गात संथ गतीने फेर धरून नृत्य करतात.

लाहलडी–थंडीच्या दिवसांतले तरुण–तरुणींचे नृत्य. तरुणींचा एक व तरुणांचा एक असे दोन गट करून सवाल-जबाबांनी हे नृत्य होते. या नृत्यात प्रणयभावनेचा आविष्कार असतो.

नाटी–हे नृत्यही लोकप्रिय आहे. यात पुरुष नर्तक प्रथम भिन्न गतीने नाचून शेवटी फेर धरतात.

झूमर – हे चांदण्या रात्रीचे नृत्य आहे. वाऱ्याच्या झुळकेने गव्हाची शेते डोलावी, त्या पद्धतीने हे नृत्य केले जाते. या नृत्यात पुरुषांबरोबर फक्त विवाहित स्त्रियाच भाग घेऊ शकतात. यातील संगीत सौम्य व मंजुळ असते.

भांगडा – सर्वांत लोकप्रिय नृत्य. मूळचे हे कृषिनृत्य आहे. अलिकडे कोणत्याही आनंदाच्या प्रसंगी हे केले जाते. ढोलकी वाजवणारे वादक मध्ये उभे राहतात व भडक पोषाख केलेले नर्तक त्यांच्या भोवती फेर धरून, उड्या मारून नाचतात. (भांगडा नृत्य पाहा) याच्यासारखेच स्त्रियांचे एक नृत्य असते, त्याला गिद्धा म्हणतात.

हिमाचल प्रदेश – हिमालयाच्या कुशीत राहणाऱ्या लोकांचे जीवन अतिशय कष्टमय असते. म्हणून फुरसतीचा वेळ ते लोक नाचून–गाऊन सार्थकी लावतात. आधुनिक साधने उपलब्ध नसल्यामुळे नृत्य-गायन हेच त्यांचे मनोरंजनाचे प्रमुख साधन ठरते. जागजागी भरणाऱ्या जत्रा व बाजार या प्रसंगी हे लोकनृत्याचे आयोजन करतात. ती जातीय व सामूहिक अशी उभयविध असतात.

संगला – हे त्या प्रदेशातले उल्लेखनीय नृत्य होय. त्या नावाच्या गावावरून त्याला हे नाव मिळाले आहे. हे स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य असून, ते स्थानिक देवतेला प्रसन्न करण्यासाठी करतात. बाक्यांग, डाक्यांग व काय्यांग असे त्याचे तीन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकार असतात. यात स्त्री-पुरुषांच्या स्वतंत्र रांगा समोरासमोर उभ्या राहतात, गातात आणि सवाल-जबावही करतात. नृत्याला स्थानिक वाद्यांची साथ असते.

खेडा – हे सुगीच्या दिवसांत करतात. स्त्री-पुरुष गात गात समोरासमोर येतात, मग जोड्या जमवतात व अर्धगोलात नाचतात.

झांझर – हे चंबा जिल्ह्यातले नृत्य आहे. यात स्त्री-पुरुष भाग घेतात. पावसाळ्यानंतर येणाऱ्या सर्व सणासुदींना हे नृत्य करतात.

दीपक – हे चंबा व कांगडा येथील गद्दींचे (धनगर) नृत्य असते. यात स्त्री-पुरुष वेगवेगळे फेर धरून नाचतात. छींजोती नावाचे गीत गातात. नृत्याला ढोलाची साथ असते. याशिवाय दसरा-दिवाळीच्या दिवसांत घुमाटी व श्रीखंडन ही नृत्येही प्रचलित आहेत.

उत्तर प्रदेश – कुमाऊँमध्ये दसरा व उत्सव या प्रसंगी छपेदी नृत्य करतात. हे नृत्य प्रेमिकांचे असून, स्त्री-पुरुष एका हाती आरसा व दुसऱ्या हाती रुमाल घेऊन जोडीने नाचतात. याच नावाची गीते त्या वेळी गातात.

चांचरी – हे संमिश्र नृत्य असून, त्यात फेर धरून नाचतात.

झोडा – हे नृत्यही स्त्री-पुरुषांचे संमिश्र आहे. हातांत हात गुंफून सर्वजण फेर धरतात. या नृत्यात एकाच वेळी कितीही लोक भाग घेऊ शकतात. प्रेम आणि विरह या विषयांवरची गीते या प्रसंगी गायली जातात.

गढवालमध्ये झुमइलो, चौफुला, छोपती, तांदी, ठाडया, चापण, जागर, इ. लोकनृत्ये प्रसिद्ध आहेत.

छोपती – हे नृत्य रवाई व जोनपूर विभागातले संमिश्र नृत्य आहे. यात मुख्यतः प्रणयभावना अभिव्यक्त केली जाते. गीते सवाल-जबाबांची असतात. छोपतीची असंख्य गीते आहेत.

चापण – या नृत्यात प्रणयभावनेचा आविष्कार व प्रेमाचा उच्च आदर्श दाखवणारी गीते असतात.

जागर – पिशाचबाधा होऊ नये म्हणून हे नृत्य करतात. स्त्री-पुरुष अंगात संचार झाल्याप्रमाणे बेहोष होऊन नाचतात. ढोल, दमामा, डौंर व काशाचे ताट या वाद्यांनी त्याला साथ असते.

बराडी नटी – भडक पोषाख केलेले स्त्री-पुरुष वर्तुळ करून उभे राहतात आणि नाचताना सवाल-जबाब करतात.

विजयनृत्य – हे वीरांच्या स्मृत्यर्थ केले जाते. यातले नर्तक तलवारीचे हात करतात. ढोल, झांज, तुतारी, रणशिंगे, इ. वाद्ये साथीला असतात.

बिहार – मिथिला ही या प्रदेशात येते. इथली लोकनृत्ये बहुतेक धार्मिक स्वरूपाची आणि विशेषतः कृष्णलीलेशी संबद्ध असतात. रामलीला, कीर्तनिया, कुंजवासी, भगता, विदापत, बरवो, व्रजवासी, वंशीलीला, कदंबलीला, नागलीला, इ. त्यांची नावे आहेत.

बराडी नटी नृत्य– उ. प्रदेश

जदुर – हे नृत्य संथाळ लोक वैशाख महिन्यात करतात. या नृत्यात स्त्री व पुरुष एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून अर्धवर्तुळात नाचतात, मग्ने गोल करतात व तो मोडून रांगा बनवतात. रात्रभर धुंद होऊन नाचतात. दुसऱ्या दिवशी नर्तक-नर्तिका नाचत नाचत गावात सर्वांच्या घरी जातात आणि घरापुढे फुले लावतात.

सरहुल – हे उरांव लोकांचे सुप्रसिद्ध नृत्य आहे. सरहुल नावाच्या उन्हाळ्यात येणाऱ्या सणाच्या वेळी हे नृत्य करतात. हे संमिश्र नृत्य असून, ते कित्येक आठवडे चालते. यात स्त्री-पुरुषांच्या स्वतंत्र रांगा करतात व मागेपुढे सरकत नाचतात. यातल्या पुरुषांच्या हालचाली जोमदार असतात. स्त्रिया पाठ वळवीत नाहीत; पुरुष वळवतात. 'हो हो हो' अशा आरोळ्यांनी नृत्याला प्रारंभ होतो.

करमा – मुंड लोकांचे हे नृत्य भाद्रपदात केले जाते. प्रथम करम वृक्षाची फांदी तोडून आणून ती जमिनीत रोवतात व तिची पूजा करून तिच्यापुढे नाचतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इंदैल – हे रांची जिल्ह्यातील खाडिया जातीचे नृत्य आहे. लहमुआ व खोयल ही त्याचीच विभिन्न रूपे होत. यात स्त्री–पुरुष एकमेकांचा हात धरून ठेक्यावर नाचतात. शेवटी उड्या मारून नृत्य संपवतात. हिवाळ्याच्या दिवसांत हे नृत्य होते.

छाऊ – छाऊ याचा अर्थ मुखवटा असा आहे. हे नृत्य मुखवटे घालून केले जाते. याला गाण्याची साथ नसते. हे उत्स्फूर्त, गतिमान व तालबद्ध असते. हावभाव व अंगविक्षेप यांनी या नृत्यातली कथा सादर केली जाते. वीणा, बासरी व नगारा ही वाद्ये साथीला असतात.

बंगाल – या प्रदेशात युद्धनृत्ये, कीर्तननृत्ये व धार्मिक नृत्ये बऱ्याच प्रमाणात आहेत.

ढाली व राईबन्शे – यात लुटुपुटीची लढाई असते. या नृत्याचे मूळ बंगालच्या मध्ययुगीन इतिहासात आहे. त्या काळात ढाली लोकांची स्वतंत्र फौज असे. त्यांच्या त्या लढाऊ वृत्तीचा अवशेष त्या नृत्याच्या स्वरूपात शिल्लक राहिला आहे.

काठी – हे नृत्य हातात छोटी छोटी दांडकी घेऊन करतात. यातले पदन्यास लयबद्ध असतात. यात फेर धरून नाचतात.

झूमर बोला – हे केवळ पुरुषांचे नृत्य आहे. दुर्गापूजा व इतर उत्सव या वेळी हे करतात. झांज व मांदळ हे साथीला असतात. नृत्य करताना भजने गातात.

बाउल – हे वैराग्यांचे नृत्य आहे. यात चैतन्यप्रभूंची गीते एकतारीच्या साथीवर गातात.

आसाम – हा प्रदेश म्हणजे लोकनृत्यांचे माहेरघरच समजायला पाहिजे. येथील नागा लोकांत जितकी लोकनृत्ये प्रचलित आहेत, तितकी ती अन्य प्रदेशात क्वचितच पाहायला मिळतील.

बिहू – हे नृत्य बिहू लोकोत्सवात केले जाते. याचे अनेक प्रकार आहेत. हे फार लोकप्रिय आहे.

नोङ्ग क्रोम – हे खासी लोकांचे नृत्य आहे. हे नागदेवतेच्या उत्सवप्रसंगी केले जाते. यात खासी स्त्रिया समूह करून उभ्या राहतात व पुरुष याक बैलाच्या शेपट्या हातात घेऊन त्यांच्या सभोवती नाचतात.

बोई सांखू व मोसांगलांग नाई – ही बोंडो आदिवासींची संमिश्र नृत्ये आहेत. यात पुरुषांच्या हातात ढाल-तलवार असते. या नृत्यांना ढोल, सारंगी व बासरी या वाद्यांची साथ असते.

खुल्लाम – हे मिझो आदिवासींचे नृत्य आहे. हे संमिश्र नृत्य असून, यजमानाच्या घरी उत्सवप्रसंगी याचे प्रयोग करतात. नर्तक एखाद्याकडे पाहुणे म्हणून जाताना वाटेत नाचत नाचत जातात.

सुत्तलाम – हे मिझो व कुकी लोकांचे नृत्य आहे. यःसाठी बांबूचा चौकोन तयार करतात. नर्तक त्याच्या आतबाहेर जात असतात. या नृत्यात कसरतीचे प्रयोगही होतात. नृत्याला ढोलाची साथ असते.

बिहू नृत्य – आसाम

खाम्बालिम व ब्रूदूरा लिम – ही झेमी नागांची नृत्ये आहेत. यात पशुपक्ष्यांच्या आवाजाच्या नकला केल्या जातात. कोंबड्यांच्या झुंजीचाही अभिनय केला जातो.

दिमासा काचारी – ही एक जमात आहे. या लोकांच्या धार्मिक व सामाजिक उत्सवांच्या वेळी जी नृत्ये करतात, ती जमातीच्या नावानेच ओळखली जातात. स्त्री-पुरुष संमिश्रपणे ढोलाच्या साथीवर नाचतात. यात घर बांधणे, सूत कातणे, इ. गोष्टींचा अभिनय करतात.

रेंगमा नागांमध्ये आखू उत्सवाच्या वेळी डोक्यावर पिसे लावून व कवड्यांनी विणलेले वस्त्र नेसून पाच दिवस नृत्य चालते. अंगामी नागांत ' के दोहोइ ' नावाचे युद्धनृत्य करतात. आओ नागा अंगामलू नावाचे मत्स्यनृत्य करतात. नागांच्या सर्व पोटविभागांमध्ये अशी अनेक नृत्ये प्रचलित आहेत.

हुचारी – आसाममधील खेड्यापाड्यांतून देवाची कृपा राहावी म्हणून वर्षारंभी हे नृत्य केले जाते. याला ढोलाची साथ असते. यात देवादिकांची गाणी गात फेर धरून नाचतात.

मणिपूर – प्राचीन काळी या प्रदेशावर गंधर्वांचे वर्चस्व होते, अशा कथा आहेत. गंधर्व हे नृत्य-गायननिपुण असल्यामुळे मणिपुरात त्यांची परंपरा चालू झाली. मणिपुरी लोकांइतके कलाकार व कलानिपुण लोक अन्यत्र क्वचितच आढळतील.

मारनमाहून – मणिपूरच्या तंगफुल नागांमध्ये हे नृत्य प्रचलित आहे. लढाईत किंवा शिकारीत यश लाभल्यावर त्या वीर नागांच्या सन्मानार्थ जी मेजवानी दिली जाते, त्या प्रसंगी हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नृत्य करतात. नर्तक शिकाऱ्याचा वेष करतात, हातात पांढरी व तांबडी फुले घेतात आणि शिकारीचाच अभिनय करतात.

काबुई – ही नागा लोकांचीच एक शाखा आहे. त्यांच्यांत हुनतेन्गाय व हेंगनागातूना ही संमिश्र नृत्ये असून, ग्लानलम हे पुरुषांचे नृत्य आहे. हे लोक डोक्यावर शिंगे बांधून व हातांत भाले-बरच्या घेऊन नाचतात. बायका लाल व काळ्या घोंगड्या नेसून नृत्यात भाग घेतात. या नृत्यात विलक्षण जोम असतो.

पाटनजागोइ – हे मेइथेइ लोकांचे नृत्य असते. वर्षसणाच्या वेळी हे नृत्य करतात. हे नृत्य मेइबा (पुजारी) व मेइबी (पुजारीण) मिळून करतात.

लाइहरोबा – मणिपूरचे सर्वाधिक लोकप्रिय नृत्य. लाइहरोबा मुळात शिव-पार्वतीने केले व तेच पुढे लोकांनी उचलले, अशी कथा आहे. पेरणीपूर्वी १५ दिवस हे चालू असते. ढोल, वासरी, इ. वाद्यांची त्याला साथ असते.

राखाल – गुराखी मुले या नृत्याच्या द्वारे कृष्णलीला दाखवतात.

गरिया – त्रिपुरा प्रदेशातील शेतकऱ्यांचे हे प्राचीन सामाजिक नृत्य होय. सर्व प्रमुख उत्सवांच्या प्रसंगी हे नृत्य करतात. तरुण पुरुष नाचतात व वृद्ध लोक पौराणिक किंवा अन्य स्वरूपाची गाणी गातात.

रिआंग – रिआंग नामक जातीचे हे स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य हावभावांचे असते.

ओरिसा – या प्रदेशात बैगा, बंजारा, बिरहोर, बोंडो, संताळ, इ. अनेक आदिवासी व वन्य जमाती वसलेल्या आहेत.

बुरु – हे नृत्य भुइया लोक, वुरु बोंगा या देवतेच्या प्रसन्नतेसाठी करतात.

छाऊ – हे विविध विषयांतून अभिव्यक्त होणारे नृत्य आहे. (छोटा ढोल) घेऊन गोल किंवा अर्धगोल करून हे नृत्य करतात. एक पुरुष हातात मोरपिसे घेऊन नृत्याचे दिग्दर्शन करतो.

पाइक – हे वीरांचे युद्धनृत्य आहे. शेकोटीभोवती याचे प्रयोग होतात.

मध्य प्रदेश – या प्रदेशात गोंड आदिवासींची खूप वस्ती आहे. त्यांच्यात विविध लोकनृत्ये आहेत.

सुरिया – हे स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य असून यात नर्तकांची संख्या २० ते २४ पर्यंत असते. सुगी संपल्यावर फुरसतीच्या वेळी हे नृत्य होते. याच्या स्पर्धा ठेवल्या जातात. मध्यभागी वादक व त्यांच्या भोवती फेर धरून नर्तक अशी याची रचना असते.

करमा – उरांव जमातीचे लोक याच नावाच्या सणाच्या वेळी हे नृत्य करतात. हे संमिश्र नृत्य असते. नाचताना निसर्गदेवतेच्या प्रार्थनेची गाणी गातात.

गौड – वस्तर जिल्ह्यातील माडिया लोकांचे हे नृत्य आहे. गौड नावाच्या वनगायीवरून या नृत्याला हे नाव मिळाले आहे.

रिआंग नृत्यातील वादक – त्रिपुरा

हे स्त्री-पुरुषांचे संमिश्र नृत्य आहे. नाचाच्या वेळी गायीची शिंगे व मोराची पिसे मस्तकावर बांधतात. बायका डोक्यावर तांब्याचा मुकुट व गळ्यांत मण्यांच्या माळा घालतात. पुरुष मंडळी बैलांच्या टकरीचा अभिनय करतात; तर बायका गायी-म्हशींचा कळप हाकण्याचा अभिनय करतात.

लक्ष्मीजागर – हे वस्तरमधले संमिश्र नृत्य आहे. यात वृक्षाखाली लक्ष्मीची मूर्ती स्थापून तिच्यापुढे अविवाहित तरुण-तरुणी हे नृत्य करतात.

लांगीनृत्य – हे वंजारा लोकांचे नृत्य असून, ते वर्षातल्या अनेक उत्सवप्रसंगीं चालते. हे वीरनृत्य आहे.

राजस्थान – याच्या डोंगराळ विभागात भिल्ल, मीन, बंजारा, काळवेलिया, गरासिया वगैरे आदिवासी लोक राहतात. गैर, घूमर, नेजा, गौरी वालर, चंग, शंकरिया, गींदड, पणिहारी, इ. लोकनृत्ये या आदिवासींमध्ये प्रचलित आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गौरीनृत्य – हे भिल्लांचे सुप्रसिद्ध लोकनृत्य होय. आश्विन मासात शिवाच्या प्रसन्नतेसाठी हे नृत्य करतात. मांदळ आणि थाळी या वाद्यांच्या तालावर शिव-पार्वतींच्या विविध कथा या नृत्यात दाखवल्या जातात. त्यात भैरव गौरीचे रक्षण करतो, ही घटना प्रमुख असते. हे नृत्य महिनाभर सकाळपासून संध्याकाळपर्यंत चालते. यात स्त्रियांची कामे पुरुषच स्त्रीवेष धारण करून करतात.

गींदड – हे होळीच्या वेळचे नृत्य आहे उच्च-नीच सर्व जातींचे लोक या नृत्यात भाग घेतात. यात लहान लहान टिपऱ्यांनी ताल धरून फेरावर नाचायचे असते. हे फक्त पुरुषांचे नृत्य असते.

गुजरात – या प्रदेशातली लोकनृत्ये सामाजिक व धार्मिक अशा संमिश्र स्वरूपाची आहेत. खेड्यात तशीच शहरातही ती चालतात.

रास-दंडिया – गुजरातमधील महत्त्वाचे लोकनृत्य. सामान्यपणे पुरुष हे नृत्य करतात. कधी कधी स्त्रियाही त्यात भाग घेतात. हे नृत्य रासलीलेशी संबंधित आहे. हे निरनिराळ्या उत्सवांत केले जाते. प्रत्येक नर्तकाच्या हातांत दोन दंडे असतात; त्यांच्या साहाय्याने ते नृत्याचा ताल धरतात. नाचताना गीत गातात. त्याला ढोल व सनईची साथ असते.

गरबा– गुजराती स्त्रियांचे हे नृत्य असून गरबी हे पुरुषांचे नृत्य आहे. गरबा-गरबी जगदंबेच्या प्रसन्नतेसाठी केली जातात. गरबा म्हणजे गर्भदीप होय. त्याच्या भोवती बायका फेर धरून नाचतात.

कुछाडी – हे माहीर जातीच्या शेतकऱ्यांचे नृत्य आहे. हे

रास-दंडिया नृत्य – गुजरात

गरब्यासारखेच असते. होळी व नवरात्र या प्रसंगी हे नृत्य करतात. लाल फेटा, पांढरा चुणीदार पायजमा व पांढराच अंगरखा, असा या नृत्यातील नर्तकांचा सुंदर पोशाख असतो.

पांधर – हे सौराष्ट्रातील कोळ्यांचे नृत्य आहे. यात नर्तक वर्तुळ करून बसतात, गाणी गातात व होडी वल्हवण्याचा अभिनय करतात.

महाराष्ट्र – महाराष्ट्रातील स्त्रिया व मुली नागपंचमी, मंगळागौर, ज्येष्ठागौर, महालक्ष्मी या व्रतोत्सवांच्या प्रसंगी फुगडी, झिम्मा, आगोटा-पागोटा, गोफ, पिंगा, घागरी फुंकणे, इ. प्रकारची नृत्ये करतात.

कोळी नृत्य – नारळी पौर्णिमेला कोळी स्त्री-पुरुष नृत्य करून तो सण साजरा करतात. गोकुळाष्टमीच्या काल्याच्या दिवशी कोकणातले पुरुष गोविंदा, गोविंदा म्हणून गावभर नाचतात, दहीहंडी फोडतात आणि पोह्यांचा प्रसाद खातात.

गजा – धनगर लोक बिरोबाच्या प्रसादासाठी गजा नावाचे नृत्य करतात. त्या वेळी जोरजोराने ढोल वाजवतात. नर्तक वर्तुळ करून रंगीत रुमाल किंवा पटक्याचा शेमला उडवीत, डाव्या-उजव्या बाजूला वळत तालबद्ध नाचतात.

लेझिम – हा एक जोमदार नृत्यप्रकार आहे. खेड्यांमध्ये लग्नाच्या वरातीपुढे, मिरवणुकीपुढे किंवा एखाद्या उत्सवप्रसंगी तरुण पुरुष व मुले लेझिम हातात घेऊन हलगीच्या तालावर नाचतात.

काठ खेळ – हे कोकणातले नृत्य आहे. या नृत्यात टिपरीसारख्या काठ्या वापरतात. मात्र टिपरीनृत्यापेक्षा यात अधिक जोम असतो व गती देखील द्रुत असते.

धुसादी किंवा धांदरी – भूत पळवून लावण्यासाठी केले जाणारे हे आदिवासी लोकांचे नृत्य आहे. दिवाळीत व कापणीच्या हंगामात हे नृत्य करतात.

गोफ – हे नृत्य कोकणात पाहायला मिळते. यात स्त्रिया किंवा पुरुष वर्तुळात उभे राहतात. मध्यभागी लांबलचक कापडी पट्ट्यांचा झुबका वरच्या आढ्याला बांधलेला असतो. नर्तक एकेका पट्टीचे खालचे टोक पकडतात. दुसऱ्या हाती टिपरी घेतात. मग अशा पद्धतीने मागेपुढे होऊन व जागा बदलून नाचतात, की त्यामुळे त्या पट्ट्यांचा एक सुंदर गोफ विणला जावा.

याशिवाय, कोकणात गौरी-गणपतीच्या सणात स्त्री-पुरुष स्वतंत्रपणे फेर धरून गाणी गात नृत्य करतात. आदिवासी जमातींमध्ये ढोलाचा नाच, तंबोरीचा नाच, तारपीचा नाच, इ. नाच प्रचलित आहेत. शिमग्याच्या वेळी नकटा नाच होत असतो, तोही मुख्यत्वे कोकणातच. यात कोळी, कोळीण व नकटा अशी तीन पात्रे असतात.

गोमंतक – गोमंतकात हिंदू आणि ख्रिस्ती यांचे वेगवेगळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रचलित आहेत. ख्रिस्ती गावडे जागर नावाचे नृत्य करतात. विवाय तियात्र नावाचा एक नाटच-नृत्य प्रकार ख्रिस्त्यांचाच असतो.



लमाणी नृत्य – सौराष्ट्र

रोमट – हे एक वीरनृत्य आहे. शिमग्याच्या सणात ढोल, वाजवून खेळगडी हे नृत्य करीत गावात येतात. नर्तकांच्या हाती काठ्या किंवा खोट्या तलवारीही असतात. गावात प्रत्येकाच्या अंगणात ते खेळतात. मग यजमान त्यांना देतो. तळीमध्ये नारळ, तांदूळ, केळी व पैसे इतक्या वस्तू असतात.

राधानृत्य – हेही शिमग्यातच करतात. एक पुरुष स्त्रीवेष करून राधा बनतो व दुसरा कृष्ण बनतो. हे दोघे नाचतात व घुमटाच्या साथीवर लावण्या म्हणतात.

धालो – हे केवळ स्त्रीनृत्य आहे. कुणबी, भंडारी, नाईक, गावडा, इ. जातींच्या स्त्रिया त्यात भाग घेतात. पौष महिन्यात ७ किंवा १० दिवस रात्रीच्या वेळी हे नृत्य चालते. समई पेटवून ठेवतात व तिच्या दोही अंगीं बायका एकमेकींच्या कमरेत हात अडकवून मागे-पुढे करीत व गाणी म्हणत नाचतात.

आंध्र – आंध्रात जशी लोकनृत्ये आहेत, तशीच शास्त्रीय नृत्येही आहेत. कुचिपुडी व भरतनाटचम ही आंध्र व तमिळनाडू या प्रांतांतील शास्त्रीय नृत्ये होत. आंध्रमध्ये आदिवासी जमातीही बऱ्याच आहेत. या सर्व जमातींत कोणते ना कोणते नृत्य असतेच. वंजारा लोकांमध्ये होळीच्या वेळी काम व रती यांच्या मृण्मय मूर्तींची पूजा करून त्यांच्यापुढे नृत्य करण्याची प्रथा आहे.

डप्पुवाद्यम – हे आंध्रामधील पूर्वास्पृश्य लोकांचे नृत्य आहे; डप्पू हे मृदंगासारखे वाद्य असते. लहान लहान काठ्यांनी ते वाजवून त्यांच्या तालावर पुरुष हे नृत्य करतात. त्याचप्रमाणे तिकडील सिद्दी लोक युद्धनृत्य करतात, तेही उल्लेखनीय असते.

माधुरीनृत्य – हे मंगल प्रसंगी करण्याचे नृत्य आहे. स्त्री-पुरुष वेगवेगळे गट करून टिपऱ्या व टाळ्या वाजवीत नाचतात.

बळीनृत्य – कोंड आदिवासींचे हे नृत्य आहे. ग्रामदेवतेला रेड्याचा बळी दिल्यावर त्याच्या भोवती फेर धरून हे नृत्य करतात. नर्तकांच्या हाती झाडाची फांदी किंवा चाकू असतो. लोक ओरडत, किंचाळत धुंद होऊन नाचतात.

मयूरनृत्य – हे फक्त पुरुषांचे नृत्य आहे. नर्तक पागोट्यात मोराची पिसे खोवतात व मोर-लांडोर यांच्या प्रेमाची गीते गाऊन नाचतात.

कर्नाटक – येथील काही नृत्ये सामाजिक असतात, तर काही धार्मिक असतात. दुसरा प्रकार अधिक प्रमाणात आढळतो.

बालकत – डोडावा जातीचे लोक सुगीच्या वेळी आणि इतर उत्सवांच्या प्रसंगी हे नृत्य करतात. नर्तक रंगीबेरंगी पोषाख घालून तालबद्ध अंगविक्षेप करीत नाचतात.

पूजाकुलित – मरिअम्म देवीच्या वार्षिक उत्सवात हे नृत्य करतात. एक नर्तक देवीची मूर्ती आपल्या डोक्यावर घेतो आणि अन्य लोक त्याच्या भोवती फेर धरून नाचतात. नर्तकांच्या हाती रंगीत कापड गुंडाळलेल्या उंच काठ्या असतात.

भूतनृत्य – हे दक्षिण कर्नाटकात प्रचलित आहे. हे नृत्य विशिष्ट भूतदेवतेचा पुजारी करीत असतो. नर्तकाची वेषभूषा व त्याचे हातवारे भय उत्पन्न करणारे असतात.

तमिळनाडू – भरतनाटचम हे तमिळनाडूचे शास्त्रीय नृत्य आहे. त्याच्या अनुषंगाने शास्त्रीय पद्धतीकडे झुकणारी अनेक नृत्ये तमिळनाडूमध्ये प्रचलित आहेत. शास्त्रीय असोत किंवा लोकनृत्ये असोत, बहुधा ती सर्व देवदेवतांच्या प्रसन्नतेसाठी असतात.

करगम – फुलांनी सजवलेले पितळी हंडे डोक्यावर ठेवून तुतारी व ढोल यांच्या तालावर हे नृत्य करतात. यात नाचताना डोक्यावरच्या करगमला हात लावायचा नसतो. करगम खाली पडू न देता वेगवेगळ्या गतींत नाचणे हे यातले कौशल्य होय. मरिअम्मेच्या कृपाप्रसादासाठी याचे प्रयोग होतात.

ओयिल आट्टम – हे देवालयापुढे करायचे नृत्य आहे. यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरुष रंगीबेरंगी पोषाख करून, तसेच एका हातात टिपरी व दुसऱ्या हातात रुमाल घेऊन फेरामध्ये नाचतात.

चिंडू – हे भटक्या पारधी लोकांचे नृत्य आहे. यात सहा पुरुष भाग घेतात व नाचताना चिमण्या पकडण्याचा अभिनय करतात. नृत्यगीतातूनही पारध्याचेच वर्णन असते.

आदिवासी नर्तक – छोटानागपूर

पिन्नल आट्टम – पांडेचरीमधले शेतकरी पीक चांगले येण्यासाठी हे नृत्य करतात. हे संमिश्र नृत्य आहे. याला अनेक वाद्यांची साथ असते.

केरळ — कथकळी हे केरळाचे शास्त्रीय नृत्य होय. त्यातूनच युळ्ळल नामक लोकनृत्य निघाले. देवालयातल्या प्रमुख उत्सवांच्या प्रसंगी ही होतात.

कळियाट्टम् – हे धार्मिक नृत्य आहे. याचे अनेक भाग आहेत. नर्तक नृत्यापूर्वी गीत गाऊन नृत्याचा विषय स्पष्ट करतात व नंतर संथ व द्रुत लयीने नाचतात.

वेलकळी – हे युद्धनृत्य आहे. पद्मनाभस्वामीच्या उत्सवप्रसंगी नायर लोक हे करतात. यात कौरव-पांडवांची लुटुपुटीची लढाई दाखवतात.

कोलकळी– हे मापिळ्ळा मुसलमानांचे नृत्य आहे. मध्यभागी एक उंच समई तेवत ठेवून तिच्या भोवती सर्वजण फेर धरून नाचतात. नर्तकांच्या हातात दांडकी असतात. एक नृत्य संपले, की दिव्याला नमस्कार करून दुसरे नृत्य सुरू करतात.

अशा या सर्व लोकनृत्यांची वैशिष्ट्ये सांगताना सौ. सविता जाजोदिया यांनी लिहिले आहे, ते असे–

लोकनृत्यातील अभिनयाचे सर्वांत ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील साधेपणा हा होय. गुंतागुंतीच्या हस्तमुद्रा, पादमुद्रा किंवा डोळे, भुवया व मान यांच्या लयबद्ध हालचालींतून अर्थाभिव्यक्ती या गोष्टी लोकनृत्यातून फारशा आढळत नाहीत. त्याऐवजी शारीरिक खेळाशी थोडे फार साम्य असलेला अभिनय लोकनृत्यातून अधिक आढळतो. शास्त्रीय नृत्यांत भरतनाट्यम, कथकळी, मणिपुरी, कथ्थक व ओडिसी असे प्रकार आहेत. त्यांची छाप त्या त्या प्रदेशातील लोकनृत्यांवर क्वचित आढळत असली, तरी या शास्त्रीय नृत्यप्रकारांना अनुसरून काही लोकनृत्यातील नृत्यप्रकार ठरविता येत नाहीत. लोकनृत्याचे नृत्यप्रकार त्यांतील अभिनयाचा साधेपणा लक्षात घेऊन ठरविता येतील–(१) गोल फेर धरून नृत्य करण्याची पद्धत, (२) शिपायाप्रमाणे मागे पुढे पावले टाकीत कवायत करण्याची पद्धत, (३) मिरवणुकीच्या पद्धतीने नाचत जाण्याची पद्धत आणि (४) उन्मुक्त उत्साहात वाटेल तशा शारीरिक कसरतीवजा हालचाली करून नृत्य करण्याची पद्धत. या चारही प्रकारांत पुन्हा संथ व द्रुत अशा दोन्ही तऱ्हा असतात.

यांपैकी पहिल्या प्रकारात रास, गरबा, पिन्नल कोलाट्टम, घूमर, काठखेळ, गोफ इत्यादींचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारांत करमा नृत्यासारखी नृत्ये येतात. तिसरा प्रकार दिंडी, नगरकीर्तन, इ. नृत्यांमध्ये आढळतो आणि चौथ्या प्रकारचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे भांगडा नृत्य होय.

लोकनृत्यांचे दुसरे वैशिष्ट्य म्हणजे नृत्याबरोबर गायिल्या जाणाऱ्या लोकगीतांची चाल साधी असते. जी वाद्ये वाजविण्यात येतात ती देखील साधीच असून, त्यांतील नाद व तालांचे तुकडे गुंतागुंतीचे नसतात. वाद्यांमध्ये डफ, नगारा, ढोलकी, मृदंग वा मांदळ हे वाद्य ताल धरण्यासाठी बहुतेक असतेच. तबला सहसा नसतो. शिवाय, झांज, बांसरी, सनई, तुतारी आणि विशिष्ट लोकांची विशिष्ट देशी वाद्ये असतात.

अभिनय, गीत, नाद व ताल या सर्वांमध्ये साधेपणा असल्यामुळे नाचणाऱ्यांना महत्प्रयासाने सम साधावी लागत नाही, की ताल धरणाऱ्याला नाचणाऱ्यांची पावले पाहून त्याप्रमाणे ठेका जुळवून घ्यावा लागत नाही. नाचताना आपोआपच सहजपणे तालबद्ध क्रिया होतात. [भा. लो. नृ.; डा. इं.; ए. हो. रा.; उ. प्र. लो. नृ.; सम्मेलन पत्रिका–लोकसंस्कृति विशेषांक, १९५४]

लोकपाल

लोकांचे पालक असे देव. यांना दिक्पाल असेही म्हणतात. त्यांची नावे व दिशा अशा–

इंद्र – पूर्व	वरुण – पश्चिम
अग्नी – आग्नेयी	वायू – वायव्य
यम – दक्षिण	कुबेर – उत्तर
निर्ऋती – नैर्ऋत्य	शिव किंवा ईशान – ईशान्य

ही लोकपालकल्पना उत्तर वैदिक कालातली आहे. तत्पूर्वी वेदांनी त्या त्या देवतांचे स्वभाव, स्वरूप आणि कार्य या गोष्टी लक्षात घेऊन त्यांची स्थाने ठरविली होती, ती अशी– कृषिदेवता आणि अग्नी या देवता भूमीवर राहतात; प्रजापती, रुद्र, मरुत्, इ. देवता मध्यस्थानी निवास करतात आणि इंद्र, आदित्य, इ. देवता द्युलोकात वास्तव्य करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढे जेव्हा भारतात विशाल साम्राज्ये निर्माण होऊ लागली, तेव्हा सम्राटांना आपले प्रतिनिधी म्हणून साम्राज्याच्या चारही दिशांना राज्यपाल नेमणे भाग पडू लागले. त्यातूनच पुराणांनी देवांच्या स्वर्गीय साम्राज्याची कल्पना केली. देवसाम्राज्यालाही अष्टदिशांचे संरक्षक असे दिक्पाल किंवा लोकपाल असले पाहिजेत, या कल्पनेने जोर धरला आणि वर दिल्याप्रमाणे इंद्रादी देवतांची त्या त्या दिशेचे संरक्षक म्हणून स्थापना झाली. बौद्धांनी आठाऐवजी चारच लोकपाल मानले असून, त्यांच्या दिशा व नावे अशी –

धृतराष्ट्र – पूर्व विरूपाक्ष– पश्चिम
विरूदक – दक्षिण कुबेर – उत्तर.

बौद्धशिल्पात स्तूपाचे संरक्षक म्हणून चार दिशांना चार लोकपाल उभे करण्याची पद्धत होती. यांतील धृतराष्ट्र हा वीणावादक असतो, विरूदक हा एका दैत्याला पायाखाली तुडवीत असतो, विरूपाक्ष हा उजव्या हातात रत्न व डाव्या हातात नाग घेऊन उभा असतो आणि कुबेराच्या उजव्या हातात पताका व डाव्या हातात छोटा स्तूप असतो.

लोकपालांच्या नावांमध्ये काही फरकही आढळतात. नैर्ऋत्येच्या निर्ऋतीच्या स्थानी सूर्य व ईशान्येच्या शिवाच्या स्थानी सोम अशीही नावे आढळतात.

लोकपालांना परमेश्वराचे अंश मानले आहे. ग्रहयज्ञात त्यांना ग्रह हवनानंतर आहुती दिल्या जातात. वापी, कूप व तडाग खोदताना किंवा बाग निर्माण करताना जो होम केला जातो, त्यातही लोकपालांना आहुती असतात. लोकपालांचे कार्य कल्पांतापर्यंत चालू राहते. [गॉ. नॉ. बु.; श. क.; पु. इं.]

लोकभ्रम लोकमानसातील परंपरागत भ्रामक समजुती. भुतेखेते, शकुन-अपशकुन, मंत्रतंत्र, ग्रहयोग, दैव, जादू, किमया यांवर बहुतेक लोकांचा दृढ विश्वास असल्यामुळे अनेक विचित्र कल्पना समाजात रूढ झालेल्या आहेत. अडाणी व असंस्कृत माणसांप्रमाणे काही सुशिक्षित व सुसंस्कृत माणसेही अंधश्रद्धेमुळे अशा कल्पना खऱ्या मानून त्याप्रमाणे वागतात.

भुताखेतांच्या अस्तित्वाबद्दल काही विद्वानांच्या मनात संशय असला, तरी सामान्य माणसाला त्याबद्दल मुळीच शंका नसते व त्यांच्या भीतीमुळे मनुष्याचे जीवन ग्रासलेले असते. भूतखेतांविषयी असंख्य कथा सांगितल्या जातात आणि त्यांची बाधा होऊ नये म्हणून किंवा झाल्यास ती दूर व्हावी म्हणून अनेक प्रकारचे उपाय केले जातात. आजपर्यंत भूत कोणीही पाहिलेले नाही आणि भुतांच्या खरेपणाचा निर्णायक पुरावा उपलब्ध झालेला नाही. भुताखेतांच्या ज्या कथा सांगोवांगी पसरलेल्या आढळतात, त्या सर्व काल्पनिक व अविश्वसनीय असतात.

भुते फक्त अंधारात दिसतात, ती वाटेल ते रूप घेऊ शकतात, ताडमाड उंच होऊ शकतात, त्यांच्या ठायी विलक्षण सामर्थ्य असते, ती झाडावर, ओसाड जागेत किंवा मसणवटीत राहतात, अशा समजुती आहेत. वास्तविक भुतांना देह धारण करता येत असेल, तर दिवसा उजेडी त्यांना प्रकट होण्यास काही अडचण असू नये. ती महाबलवान असती तर त्यांनी माणसांचा खूप नाश केला असता. पण तसे काही ऐकिवात नाही. भूत-चेष्टांचा उपद्रव काही थोड्या लोकांना झालेला ऐकू येतो आणि तोही किरकोळ प्रमाणात असतो. खंबीर मनुष्याला तर त्यांच्यापासून कधीच त्रास होऊ शकत नाही. लाखो लोक भुताखेतांच्या अंधपरंपरेने चालत आलेल्या गोष्टी सांगतात, म्हणून त्या खऱ्या मानता येत नाहीत. अशा लोकांपैकी बहुतेक लोक भोळसर व अडाणी असतात; तर काही लबाड असतात. या सर्व दंतकथा अज्ञान व अपक्व मनाला झालेल्या भासांतून उगम पावतात. भीतीमुळे किंवा मादक पदार्थांच्या सेवनाने आलेल्या गुंगीमुळे असे भास होतात. 'भित्यापाठी ब्रह्मराक्षस' अशी म्हणही त्याच कारणाने पडली आहे. भुतेखेते हे सारे कल्पनेचे खेळ आहेत. तुकाराम, रामदासादी संतांनीही हे सर्व थोतांड आहे, असे म्हटले आहे.

शकुन–अपशकुनांचे खूळही सर्व जगातील लोकांत आढळते. पशुपक्ष्यांची गती, त्यांचे आवाज, मनुष्याचे भिन्न अवयव स्फुरणे, काही विचित्र घटना यांवरून भविष्य काळातील शुभाशुभ गोष्टींची सूचना मिळते, अशी समजूत आहे. ग्रहांचे निरनिराळे योगही शभ किंवा अशुभ मानले जातात. मांजर आडवे जाणे, विधवेचे दर्शन, इ. गोष्टी अशुभसूचक मानतात. वाटेने जाताना कोणी शिंकणेही अशुभ असते. याच्या उलट सकाळी कोल्ह्याचे तोंड दृष्टीस पडणे, स्त्रीचा डावा डोळा लवणे, उजवा बाहू स्फुरणे प्रेत-यात्रा समोरून येणे, हे शुभशकुन मानले जातात. घरातून बाहेर पडताच सवाष्ण स्त्री पाण्याची घागर घेऊन सामोरी येणे हे फारच शुभ होय. या सर्व शुभाशुभसूचक घटनांमुळे प्रत्येक वेळी खरोखरच काही शुभ किंवा अशुभ घडते असे कोणीही ठामपणे सांगू शकत नाही. आणि असा शकुन किंवा अपशकुन एकाच वेळी अनेक व्यक्तींना दिसला, तर सर्वांनाच त्याचे सारखे प्रत्यंतर येईल, असेही म्हणता येत नाही. प्रत्येकाचा कर्मभोग वेगळा असतो. आणि तो टाळण्यासाठी काहीतरी खटाटोप करणे हास्यास्पद आहे. जे अटळ मानले जाते, ते आधी समजून काही उपयोग नाही. मांजर आडवे जाणे, घुबडाचा आवाज ऐकू येणे, अशा क्षुल्लक गोष्टींचा संबंध आपल्या जीवनातील महत्त्वाच्या घटनांशी जोडणे हे निरर्थक आहे. विश्वाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यापारात अशा कोटचवधी घटना घडत असताना, काही गोष्टींचाच विचित्र संबंध जोडीत बसणे हा निव्वळ वेडेपणा होय. तथापि, गतानुगतिक लोक अशा शकुनांवर श्रद्धा ठेवतात. पशुपक्ष्यांदिकांचे शकुन मानण्यामुळे विशेष त्रास कोणाला होण्याचा संभव नसतो. पण विधवा स्त्री, अस्पृश्य मनुष्य यांचे दर्शन अशुभ मानणे हे अत्यंत निंद्य आहे.

ग्रहयोगावरून फलज्योतिष ही कल्पनाही जगात सर्वत्र दृढमूल झालेली आहे. अंतरिक्षातील ग्रहांच्या गतींवर इहलोकातील घटना अवलंबून आहेत, या समजुतीने बहुसंख्य लोक पछाडलेले आहेत. सूर्याला व चंद्राला ग्रहण कसे लागते हे माहीत नव्हते, तेव्हा ग्रहण हे फारच अमंगल मानले जाणे, हे ठीक होते. पण आता खगोलाचे यथार्थ ज्ञान झाल्यावरही तसे मानणे हास्यास्पद आहे. अजूनही अडाणी लोक तसे मानतात आणि ग्रहणप्रसंगी दानधर्म करतात. प्राचीन काळापासून ग्रहनक्षत्रांच्या शुभाशुभत्वावर लोकांचा पक्का विश्वास होता. पुढे हळूहळू धर्मात व लोकव्यवहारात ज्योतिषाचा शिरकाव होऊन वरील विश्वास अधिकच बळकट झाला. वास्तविक ग्रहयोग आणि पृथ्वीवरील घटना यांचा परस्पर संबंध जोडण्याला काहीही आधार नाही. तो तसा जोडला तरी त्याचा खरेखोटेपणा समजण्याला काही मार्ग नाही. असे ठोकताळे नेहमी बरोबर येतातच असे नाही. एकाच ग्रहयोगावर हजारो मुले जन्माला येतात. त्या सर्वांचे भविष्य सारखेच नसते; ते अशक्य आहे. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे जो तो सुखदुःख भोगतो, या कर्मवादाशीही ते विसंगत होईल. जन्मपत्रिका, वर्षफल, मुहूर्त, प्रश्न, वगैरे ज्योतिषाचे जे विविध प्रकार आहेत, त्यांचा प्रत्यय सर्वांना बरोबर येत नाही. काही थोडयांना यदृच्छेने ग्रहयोगाचा प्रत्यय आला, तरी तसा नियम ठरवता येत नाही. ज्योतिषविद्येमुळे पुढे होणाऱ्या गोष्टी कळतात व त्या संकटातून मुक्त होण्याचा उपायही सांगता येतो, हे जर खरे मानले, तर निदान ती विद्या आत्मसात केलेले ज्योतिषी तरी सर्व विपत्तींपासून मुक्त असायला हवेत. पण तसे आढळत नाही. तरीही भोळे व भाविक लोक अशा ज्योतिष्यांनी वर्तवलेल्या भविष्यावर श्रद्धा ठेवतात आणि त्यांच्या सांगण्याप्रमाणे उपायही करतात.

नवस करण्याची प्रथाही भ्रामक समजुतीवर आधारलेली आहे. एखाद्या देवतेला काहीतरी वस्तू देण्याचे मान्य केले, की ती प्रसन्न होऊन आपली इच्छा पूर्ण करते, अशी भोळ्या लोकांची समजूत आहे. यात त्या देवतेच्या सामर्थ्याविषयी केलेली कल्पना अवास्तव असते. एवढेच नव्हे; तर तिला काही तरी देऊन वश करता येते, ही कल्पनाही खुळचट आहे; कारण देवकृपा अशी सुलभ नसते. पण निरनिराळ्या देवतांना असंख्य प्रकारचे नवस बोलले जातात आणि ते फेडले जातात.

खेड्यापाड्यांत रोगराईच्या उत्पत्तीसंबंधी जी समजूत आहे ती अशीच भ्रममूलक आहे. विशिष्ट देवाच्या किंवा देवीच्या कोपामुळे विशिष्ट रोग होतो, असे मानून, तो रोग बरा होण्यासाठी त्या त्या देवतेला शरण जायचे, निरनिराळे पदार्थ व वस्तू वाहायच्या, पशुपक्षी बळी द्यायचे ही प्रथा दोन हजार वर्षांपूर्वीपासून प्रचलित आहे. अजूनही अशा दैवतांचा पगडा ग्रामीण जनतेवर कायम आहे. त्या कामी तिथले भगत लोकांना बरीच मदत करतात. निरनिराळी दैवते किंवा भुते अशा भगतांच्या अंगात संचार करून रोगाचे किंवा संकटाचे कारण सांगतात, त्यावर उपायही सांगतात आणि भगत लोक मंत्रतंत्राच्या योगाने रोग बरे केल्याचे भासवून स्वतःचा लाभ करून घेतात. लोक त्यांना फार मानतात. त्यांच्या शब्दाप्रमाणे सर्व गोष्टी केल्या जातात. कारण देवीच्या कोपाची भीती ते लोकांना सतत दाखवीत असतात. ती भीती व्यर्थ असूनही भाबडे लोक देवीला संतुष्ट करण्यासाठी सर्व काही करतात.

धर्मभीरू लोक वड, पिंपळ, इ. वृक्षांची आणि गाय व नाग यांचीही पूजा करतात. ही सर्व जागृत दैवते आहेत, अशी त्यांची भ्रांत समजूत असते. अशा कल्पना उराशी बाळगून आपणच आपल्या धर्माची विटंबना करतो, हे त्यांच्या ध्यानात येत नाही. वड किंवा पिंपळ कितीही जुना व धोकादायक असला, तरी तो तोडणे हे पाप आहे, असे त्यांना वाटते. गायीला किंवा नागाला मारायचे नाही ही धार्मिक भावनाही अशाच प्रकारची आहे. अहिंदू लोकांनी वड-पिंपळ तोडले, गाय मारून खाल्ली किंवा नागाला ठेचून टाकले तरी त्यांना काही त्रास होत नाही किंवा पाप लागत नाही. मग हिंदूनाच पाप का लागावे हे समजणे कठीण आहे.

प्राचीन साहित्यात अशा असंख्य लोकभ्रमांचा व प्रथांचा उल्लेख आढळतो. बौद्ध व जैन पंथांच्या धुरीणांनी प्रारंभी त्यांना विरोध दर्शविला असला, तरी ते भ्रम नष्ट झाले नाहीत. बौद्ध व जैन साहित्यांत तशा अनेक कथा आहेत. त्यावरून सर्व लोकांवर अशा प्रकारच्या भ्रांत समजुतींचा पगडा तेव्हाही होता, असे ध्यानात येते. आता विज्ञानयुग सुरू झाले असले आणि मानवाने चंद्रावर पदार्पण केले असले, तरी पृथ्वीवरील असंख्य माणसे अद्याप अज्ञानांधकारातच बुडालेली असून, त्यांच्या जीवनात अंधश्रद्धेला फार मोठे स्थान असते.

या बाबतीत विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी आपल्या निबंधात निरनिराळ्या लोकभ्रमांची सांगोपांग चर्चा करून जे विवेचन केले आहे, ते असे– कोणत्याही गोष्टीच्या खरेपणाविषयी खात्री होण्यास तीन प्रकार लागतात. एक तिची संभाव्यता, दुसरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

प्रत्यक्ष प्रमाण आणि तिसरे विश्वासपात्र मनुष्याचे भाषण किंवा लेख. भुतेखेते, शकुन, ग्रहयोग, नवस, इ. समजुतींचा विचार करता हे ध्यानात येते, की हा शुद्ध भ्रांतीचा प्रकार आहे. त्यात तथ्य पाहू जाता बिलकुल सापडणार नाही. त्यापासून अनर्थ मात्र अनेक होतात. हे भ्रम मनास चिकटल्याने त्याला दुर्बलता येते; सदसद्विवेचनरूप जी शक्ती परमेश्वराने मनुष्याचे ठायी ठेवली आहे, तिचा व्यापार अशा अज्ञानजन्य भ्रमाने काहीसा कुंठित होतो. व्यवहारात त्याच्या योगाने अनेक हानी झाल्या आहेत व होत आहेत. त्यामुळे लबाडांचे फावते व लोकांचे फार नुकसान होते. याचकरिता लोकशिक्षणाचा जेवढा फैलाव होईल तेवढा देशाला हितावहच होतो. त्याच्या योगाने लोकांचे भ्रमजाल तुटून सत्यासत्याची निवड करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी येऊ लागते. पण याचा प्रसार जेथे झालेला नसतो तेथे अर्थातच गतानुगतित्वाचाच न्याय लागू होतो. तेथे प्रमाणे कसली आणि अनुभव कसला ! [निबंधमाला– वि. कृ. चिपळूणकर, १९१७; भा. सा. इ.; भा. री. प.; स. सा. वा.]

लोकर मेंढ्यांच्या अंगावरील केसांना लोकर असे म्हणतात. वैदिक कालातील लोकांना लोकरीची माहिती होती. वैदिक वाङ्मयात लोकरीला ऊर्णा असे म्हटलेले आहे व मेंढीला ऊर्णावती असे नाव दिलेले आहे. वैदिक काळी गंधार देश मेंढ्यांसाठी व परुष्णी देश लोकरीसाठी प्रसिद्ध होता. मरुद्गण परुष्णी देशात बनवलेली रंगीत लोकरी वस्त्रे नेसत, असा उल्लेख ऋग्वेदात (५.५२.९) आहे. सप्तसिंधूच्या शीत भागात राहणारे लोक लोकरी वस्त्रे वापरीत असत. वैदिक वाङ्मयात ऊर्णा या शब्दाबरोबर ऊर्णसूत्राचाही उल्लेख अनेकदा आला आहे. वेदीवर अग्नीची स्थापना करताना तिच्यावर जे संभार (पदार्थ) टाकतात, त्यात लोकरीचा उल्लेख आहे. सोमरस गाळण्याकरिता लोकरीचे गाळणे करीत असत, असे ऋग्वेदात सांगितले आहे. वैश्याचे जानवे लोकरीचे असावे, असे गृह्यसूत्रांत व स्मृतींत सांगितले आहे. कांबोज देशातील लोकांनी राजसूय यज्ञाच्या वेळी युधिष्ठिराला सुंदर नक्षी काढलेली लोकरीची वस्त्रे भेट दिली होती, असा उल्लेख महाभारतात आहे.

लोकर फार शुद्ध समजतात. त्यामुळे धार्मिक विधी करताना व जेवताना काही लोक लोकरीची धावळी नेसतात. श्राद्धाच्या वेळी लोकरीचे वस्त्रच नेसले पाहिजे, असा वैष्णव लोकांत नियम आहे.

सांप्रत थंडीचे निवारण व्हावे, म्हणून लोक लोकरीचे कपडे वापरतात. पश्म लोकरीपासून बनवलेल्या काश्मिरातील शाली सुप्रसिद्ध आहेत. [वे. इं.; वै. सा. सं.; म. ज्ञा. को.]

लोकव्रत एक काम्य व्रत. चैत्र शुद्ध पक्षात याचा प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. याचा विधी असा – व्रताला सुरुवात केल्यापासून सात दिवस अनुक्रमे गोमूत्र, गोमय, दूध, दही, तूप व कुशमिश्रित जल यांवर निर्वाह करावा. सातव्या दिवशी उपवास करावा आणि महाव्याहृतींचा उच्चार (भूः, भुवः, स्वः) करून तिळांचा होम करावा.

उद्यापनाच्या वेळी एक वस्त्र, कासे व गायी दान द्याव्या. फल – सम्राटपदाची प्राप्ती. [द्वि. ध.]

लोकसत्ता लोकायत्त शासनव्यवस्था. सन पूर्व ६०० ते इ. स. ४०० हा भारतातील लोकराज्यांचा काळ मानला जातो. त्या काळात उ. भारतात अनेक गणराज्ये नांदत होती. आणि त्याच्याही पूर्वीच्या वेदकालात या प्रकारच्या लोकायत्त शासनाची पूर्वचिन्हे दृष्टोत्पत्तीस येत होती. त्या काळात सर्वत्र राजसत्ता प्रचलित असली, तरी ती सर्वस्वी अनियंत्रित नव्हती. समिती नामक लोकसभेसारखी एक संस्था तेव्हा अस्तित्वात होती आणि राजसत्तेवर तिचे पुष्कळ नियंत्रण होते. समिती-प्रमाणेच सभा नावाची दुसरी लोकायत्त संस्था त्या काळी होती. दोन्ही संस्थांचे सभासद राज्यकारभारातील जमाबंदी, न्याय, धर्म, विद्या, इ. अनेक विषयांवर चर्चा करीत व त्या त्या व्यवहाराच्या नियंत्रणाविषयी आपली मते सांगत. राज्य-व्यवस्थेवर त्या मतांचा बराच प्रभाव पडत असे. ही प्रजातंत्राची पूर्वचिन्हेच म्हणावी लागतील. श्रीकृष्ण हा सर्वसत्ताधारी राजा नसून, अंधकवृष्णी संघाचा अध्यक्ष होता, असे महाभारतातील काही वचनांवरून ध्यानात येते.

सनपूर्व ६००च्या सुमारास भारतात जी गणराज्ये निर्माण झाली, त्यांत प्रतिनिधी निवडण्याची प्रथा नव्हती. सभासद-त्वाच्या योग्यतेचे जे गुण आवश्यक ठरलेले होते, त्या गुणांनी युक्त असे सर्व लोक लोकसभेचे सभासद होत आणि सहविचा-राने राज्य करीत. त्यामुळे प्रत्येक गणराज्याच्या विधिमंडळात हजारो सभासद असत. त्या सर्वांना अभिषेक होत असे व राजा ही पदवी मिळत असे. शासनव्यवस्थेसाठी या लोकसभा अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री व सेनापती यांची निवड करीत. अध्यक्षांना स्वतःचे मंत्रिमंडळ निवडण्याचा अधिकार नसे; तो लोकसभेला असे. त्या प्राचीन लोकसभा बहुतेक सर्व सत्ता आपल्या हाती राखून ठेवीत. ही सर्व गणराज्ये लहान असल्या-मुळेच ही व्यवस्था व्यवहार्य ठरे.

प्राचीन प्रजातंत्रातील या लोकसभांचे कामकाज पुष्कळसे सध्याच्या पद्धतीनेच चालत असे. सभासद सभेपुढे ठराव मांडीत; मग त्यांवर चर्चा होई आणि बहुमताने निर्णय घेतला जाई.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

महाभारत, कौटिलीय अर्थशास्त्र, इ. प्राचीन ग्रंथांत लोकसत्ताक शासनाचा उपहास केलेला आहे. या पद्धतीत सर्वजण स्वतःला शहाणे व बरोबरीचे समजत असल्यामुळे कोणी कोणाच्या आज्ञा पाळीत नाही आणि त्यामुळे कलह व दुही माजून समाज दुबळा बनतो, असा त्या ग्रंथांतील टीकेचा मथितार्थ आहे. प्रजातंत्राचे हे मूलभूत दोष आहेत, हे सर्वमान्य आहे आणि प्राचीन गणराज्ये नष्ट होण्याचे हेही एक कारण आहे.

या प्राचीन गणराज्यांना समाज संघटित ठेवता आला नाही व त्यामुळे त्यांचा नाश झाला, हे खरे; पण तरीही त्यांच्या उत्कर्षाच्या काळात ती पुष्कळ बलाढ्य व समृद्ध होती. त्या काळी जी लहान लहान नृपशासित राज्ये होती, त्यांची शौर्य व संपन्नता या बाबतीत गणराज्यांहून अधिक चांगली स्थिती होती, असे म्हणता येत नाही. मात्र राजसत्तांना पुढे आपला विकास व विस्तार करता आला, तसा या प्रजासत्ताकांना प्रत्यक्ष शासनपद्धतीमुळे करता आला नाही. थोर व समर्थ राजांनी आपल्या राज्यांची साम्राज्ये केली आणि त्यांच्या सामर्थ्यापुढे लहान प्रजातंत्र गणराज्यांना नमावे लागले. तथापि प्राचीन काळी असंख्य समर्थ व समृद्ध लोकसत्ताक राज्ये भारतात नांदत होती, हे लक्षात ठेवणे भाग आहे.

ग्रामपंचायती – प्राचीन काळातील त्या लोकायत्त राज्यांचा एक उल्लेखनीय विशेष म्हणजे त्यांतील ग्रामपंचायती हा होय. लोकशासन त्या काळी केवळ नगरांतूनच होते असे नाही; तर खेड्यांतही ते चालू होते व दृढमूल झालेले होते. लोकसत्ताक राज्यांत जशा स्थानिक स्वराज्य संस्था होत्या, तशा त्या नृपशासित राज्यांतही होत्या. मात्र एक गोष्ट उल्लेखनीय ठरते ती ही, की ही सर्व गणराज्ये उ. भारतात होती. द. भारतात एकही प्रजातंत्र राज्य असल्याचे दिसत नाही. पण तरीही द. भारतात ग्रामपंचायती स्वायत्तपणे कारभार करीत होत्या असे कळते. कालांतराने केंद्रीय लोकसभांचा लोप झाला आणि मोठाली राज्ये व साम्राज्ये प्रस्थापित झाली, तरी ग्रामपंचायतींचे महत्त्व कमी झाले नाही. सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्त्व त्या सम्राटांनाही मान्य होते आणि त्याप्रमाणे त्यांनी जिल्हे, नगरे व ग्रामे यांना स्वायत्तता दिलेली होती. डॉ. अळतेकर म्हणतात – गुप्त साम्राज्यात तर स्थानिक संस्थांचे अधिकार इतके विस्तृत होते, की सरकारला स्वतःची पडिक जमीन विकावयाची असली, तरी स्थानिक संस्थेची परवानगी घ्यावी लागे. त्या संस्था केंद्रसरकारचे कर वसूल करीत. गावातील विहिरी, धर्मशाळा, शाळा, रुग्णालये यांची व्यवस्था त्यांच्याकडेच असे. त्यांना न्यायदानाचा अधिकारही होता. अत्यंत घोर अपराध वगळून इतर सर्व तंट्यांचा निवाडा ग्रामपंचायतीच करीत.

स्वायत्त संघ – भिन्न भिन्न जीवनक्षेत्रांतील अंतर्गत कारभारही त्या काळी बहुतांशी स्वायत्तपणे चालत असे. धर्म, विद्यादान व व्यापार या क्षेत्रांत स्वयंशासनच चालू होते. बौद्ध जातकांवरून हे स्पष्ट दिसते, की बौद्धांचे धर्मसंघ पूर्ण स्वतंत्र असून, त्यांची घटना लोकायत्त होती. विनयपिटकात त्यांच्या स्वायत्त कारभाराची माहिती दिलेली आहे, ती अशी –

या धर्मसंघाच्या सभा वरचेवर भरतात. ते आपली कार्ये मतैक्याने व सहकार्याने करतात. सभासद संघाच्या नियमांचे पालन अत्यंत दक्षतेने करतात, ते कधी मोहवश होत नाहीत. 'असे आहे तोपर्यंत या संघांचा कधीही विनाश होणार नाही, सदैव उत्कर्षच होत राहील' असे उद्‌गार बुद्धाने काढल्याचा उल्लेख बौद्ध वाङ्‌मयात आहे.

या धर्मसंघांप्रमाणेच अंतर्गत स्वायत्तता असलेले व्यापारी संघही होते. त्यांना श्रेणी, पूग, निगम, गण, व संघ अशा संज्ञा दिलेल्या आढळतात. ते संघ चांगले बलिष्ठ व संघटित होते. ते प्रतिष्ठित पेढ्यांचा देवघेवीचा व्यवहार करीत आणि आत्मरक्षणासाठी सुसज्ज सेनाही बाळगीत. विद्येच्या क्षेत्रातही त्या काळी स्वायतता होती. तक्षशिला, नालंदा, इ. विद्यापीठे संपूर्णपणे स्वयंशासित होती. त्यांना राजाश्रय असला, तरी त्यांच्यावर सरकारचे नियंत्रण नसे.

लोकशाहीचा उदय – प्राचीन भारतीय गणराज्यांचा विचार करता भारतात लोकसत्ता स्थूलरूपाने पूर्वी अवतरली होती, यात काही संदेह नाही. पण तेवढ्यावरून लोकशाहीचा उदय भारतात प्रथम झाला, असे म्हणता येईल काय, या प्रश्नाचा ऊहापोह डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी केला आहे, त्याचा सारांश असा –

(१) समता हा लोकशाहीचा मूलाधार होय. पण भारतात चातुर्वर्ण्य व जातिभेद ही जन्मनिष्ठ विषमता दृढमूल झालेली असल्यामुळे, भारतीय समाजात लोकशाही अवतरली होती, असे म्हणता येत नाही.

(२) आपल्या काळच्या समाजाची शासने आपणच ठरविण्याचा अधिकार, हे लोकशाहीचे मुख्य लक्षण मानले जाते. पण प्राचीन गणराज्यांतील लोकसभांना कायदे करण्याचा अधिकार मुळीच नव्हता. त्यामुळे त्यांच्या सत्तेला लोकसत्ता म्हणणे योग्य होणार नाही.

(३) व्यक्तित्व हा लोकशाहीचा आत्मा होय. निवडणुकी, मतदान, पंचायती ही सर्व जड यंत्रणा आहे; ती म्हणजे लोकशाही नव्हे. व्यक्तीचा गुणविकास, तिचे सुख, तिची मानसिक व बौद्धिक उन्नती, हे समाजाचे अंतिम ध्येय आहे. व्यक्ती ही समाजासाठी नसून, सर्व समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था व्यक्तीसाठीच असली पाहिजे, हा लोकशाहीचा मूळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धांत आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य ही मूळ सिद्धांताला पोषक अशी तत्त्वे आहेत. वैदिक साहित्य, बौद्ध साहित्य व महाकाव्ये हे प्राचीन वाङ्मय सागरासारखे विशाल आहे, तरी त्यात व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वज्ञानाचा निर्देश केलेला आढळत नाही. भारतात प्राचीन काळी राजकीय क्षेत्रात व्यक्तिस्वातंत्र्याचे तत्त्वज्ञान उदित झाले असल्याचे कोणत्याही प्राचीन ग्रंथांवरून दिसत नाही. आणि त्यामुळे इथे लोकशाहीचा उदय प्रथम झाला असे म्हणणे सयुक्तिक वाटत नाही.

(४) सर्व गणराज्यांच्या इतिहासात लोकसत्तेसाठी, व्यक्तिस्वातंत्र्यासाठी, समतेसाठी व मानवाच्या मूलभूत हक्कांसाठी कधीही व कुठेही संग्राम झालेला नाही. आणि आपल्या मनुष्यत्वाच्या प्रस्थापनेसाठी बहुजनसमाज किंवा पीडित जनता लढा करीत नाही, तोपर्यंत लोकशाहीचा उदय झाला, या म्हणण्याला काही अर्थ नाही.

(५) भारतात लोकायत्त शासनाचे जे कोणते घटक सिद्ध झाले होते, त्यांची परंपरा पुढे चालू राहिली नाही. राजकीय लोकसत्तेची जड यंत्रणा येथे निर्माण झाली होती आणि धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान व कला या क्षेत्रांत लोकांना अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्य मिळाल्यामुळे भारतीय संस्कृतीचा अतिशय विकास झाला होता. पण प्राचीन वाङ्मयात त्या लोकायत्त शासनपद्धतीचे विवेचन आढळत नाहीत. ती परंपरा न टिकण्याचे हे मूळ कारण होय. राजसत्तेच्या पुरस्कर्त्यांनी आपल्या ग्रंथांत राजसत्तेची महती गायली आहे व अराजकाचा निषेध केला आहे. प्रजासत्ताकाच्या पुरस्कर्त्यांनी मात्र आपले व्यक्तिस्वातंत्र्याचे, समतेचे तत्त्वज्ञान लिहिले नाही. ते त्यांनी लिहिले असते, तर गणराज्यांचा नाश झाल्यानंतरही कालांतराने त्यांचे पुनरुज्जीवन होऊ शकले असते. तत्त्वज्ञानाच्या अभावी केवळ जड यंत्रणेचे ज्ञान परंपरेचे जतन करण्यासाठी उपयोगी पडत नाही.

मध्ययुगात भारतीय लोकांचे सर्व कर्तृत्व लोप पावले आणि इंग्रजांच्या आक्रमणापुढे त्यांचा निभाव लागला नाही. गेल्या शतकात भारतीय समाज जागृत झाल्यानंतर इतर क्षेत्रांतील प्राचीन परंपरांच्या स्मृतीने व अभिमानाने त्याच्या अंगी चैतन्याचा संचार होऊ शकला. पण लोकसत्तेची परंपरा नष्ट झालेली असल्यामुळे त्या क्षेत्रात त्याला श्रीगणेशापासून सर्व विद्या पाश्चात्यांकडून घ्यावी लागली. आज भारतात लोकसत्ता प्रस्थापित झालेली आहे, ती प्राचीन परंपरेतून उद्भवलेली नसून, तिची प्रेरणा पाश्चात्यांकडून मिळालेली आहे.

अशीही पूर्वपरंपरा नसताना भारतीय लोकांनी स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतरच्या पाचसहा वर्षांत लोकसत्ता प्रस्थापित करून ती टिकवून दाखविली, ही एक अलौकिक घटना आहे. त्या वेळी भारताची लोकसंख्या ३५–३६ कोटी होती. एवढी प्रचंड लोकसंख्या असलेला देश लोकायत्त शासनाच्या अधीन झाल्याचे जगातले हे पहिलेच उदाहरण होय.

आधुनिक लोकशाही – लोकशाहीची सर्वमान्य व्याख्या करणे कठीण आहे. पण लोकांची, लोकांसाठी व लोकांनी चालवलेली शासनव्यवस्था म्हणजे लोकशाही असे मानले जाते. लोकशाहीत जनतेचा उत्कर्ष हे ध्येय व जनतेच्या संमतीने कारभार म्हणजेच जनतेची सत्ता हा व्यवहार. एखाद्या विवक्षित वर्गाचे किंवा जातीचे कल्याण हे लोकशाहीचे उद्दिष्ट नसून, सर्व राष्ट्राचे कल्याण हे ध्येय असते. मात्र लोकशाही ही केवळ एक विशिष्ट प्रकारची शासनव्यवस्था नसून, ती एक विशिष्ट प्रकारची राजकीय, सामाजिक व आर्थिक संघटना असते. मानवाच्या संपूर्ण जीवनाला व्यापणारी अशी ती कार्यपद्धती असते. समता हा लोकशाहीचा पाया आहे. धर्म, वर्ण, जात, वंश, लिंग, धन यांवरून व्यक्तीची उच्चनीचता ठरत नसून, सर्वांना सारखेच अधिकार व हक्क असले पाहिजेत आणि प्रत्येकाला आपल्या गुणांचा उत्कर्ष करण्याची योग्य संधी मिळाली पाहिजे, असा समतेचा अर्थ आहे. एखाद्या वर्गालाच विशेषाधिकार असणे लोकशाहीला संमत नाही. आर्थिक विषमता व एका व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीचे शोषण करणे, हेदेखील लोकशाहीच्या तंत्रात बसत नाही. समाजातील एक वर्ग अगदी निर्धन आणि दुसरा वर्ग फार संपन्न असेल, तर त्या समाजात लोकशाहीची प्रस्थापना होण्याची शक्यता नाही. लोकशाहीमध्ये सर्वांना विचारस्वातंत्र्य, विवादस्वातंत्र्य व कृतिस्वातंत्र्य असावे लागते. मानवाच्या व्यक्तित्वाला लोकतंत्र समाजात विशेष मान मिळणे आवश्यक असते.

लोकतंत्र शासनव्यवस्थेचे दोन प्रकार आहेत – (१) प्रत्यक्ष लोकसत्ता – अशा व्यवस्थेत सर्व लोक राज्यकारभारात भाग घेतात. पूर्वी लहान लहान प्रजासत्ताक राज्यांत अशी शासनव्यवस्था प्रचलित होती. (२) प्रातिनिधिक लोकसत्ता – अशा व्यवस्थेत लोकांचे भिन्न भिन्न गट आपले प्रतिनिधी बहुमताने निवडून देतात आणि ते राज्य चालवतात.

आधुनिक युगात लोकतंत्राच्या विकासासाठी मानवांच्या अधिकारांचे व कर्तव्यांचे संविधान; वयात असलेल्या व्यक्तीला मताधिकार; स्थानिक स्वायत्त शासनाचा विस्तार; स्वतंत्र व निष्पक्ष न्यायालयांची स्थापना; विचार, भाषण व मुद्रण यांचे स्वातंत्र्य; विधिसंमत शासनाला मान्यता; बलप्रयोगाऐवजी चर्चा करून प्रश्न सोडवण्याची प्रथा; इ. अनेक आचारविचार सुरू झाले आहेत. मात्र ते दृढमूल होण्यासाठी लोकशिक्षणाची नितांत आवश्यकता आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकशाहीच्या पद्धतीवर काही आक्षेप घेतले जातात, ते असे – (१) सांप्रत राज्यतंत्र अतिशय गुंतागुंतीचे व कठीण झाले असून, सामान्य अज्ञ लोकांना त्यातले काही कळत नाही; म्हणून लोकसत्ताक शासनाला अर्थ नाही. (२) राज्यकारभार करण्यासाठी तज्ज्ञांची आवश्यकता असते. पण ते निवडणुकीसाठी पुढे येत नाहीत व राज्यकारभार अतज्ज्ञांच्या हाती जातो. (३) सामान्य लोकांना दूरदृष्टी नसते. त्यांना तात्पुरते हितच तेवढे समजते व तेच मिळायला हवे असते. त्यामुळे लोकांच्या प्रतिनिधींना दूरदृष्टीने खऱ्या लोकहिताच्या गोष्टी मतदारांच्या मनाविरुद्ध करता येत नाहीत. पुन्हा निवडून येण्यासाठी ते आपल्या मतदारांच्या कलानेच वागतात.

या दोषांमुळे लोकशाहीपेक्षा एकतंत्री सत्ता अधिक हितकारक होय, असे प्रतिपादन काही पंडित करतात. एकतंत्री सत्तेमुळे लोकांचा उत्साह व जोम वाढतो, नियोजित कार्यक्रम वेगाने व व्यवस्थित पार पाडले जातात, सर्वाधिकारी स्वतःच्या बुद्धीने ठरवील ती प्रगती होऊ शकते, असे समर्थन ते करतात. लोकशाहीविरुद्ध घेण्यात आलेले वरील आक्षेप काही अंशी खरे असले, तरी ते दूर करण्याचा उपाय म्हणजे सर्वाधिकारी सुलतान निर्माण करणे हा नसून, जनता सुशिक्षित व सुबुद्ध व्हावी यासाठी प्रयत्न करणे हा आहे, असे अन्य पंडितांचे मत आहे.

भारतात लोकसत्तेचा विकास कसा झाला, या विषयी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी केलेले विवेचन असे–

सामुदायिक जीवन – लोकसत्तेच्या विकासासाठी सामुदायिक जीवनाची नितांत आवश्यकता असते. सर्व समाजाचे हिताहित एक असून, समाजातील सर्व व्यक्तींच्या सहकार्याने समाजाची उन्नती केली पाहिजे, या जाणिवेने जेव्हा जनसमूहातील सर्व घटक कार्यप्रवृत्त होतात, तेव्हा त्या समूहात सामुदायिक जीवन निर्माण झाले, असे म्हणता येते. त्यावाचून लोकशाहीच्या प्रवृत्ती निर्माण होणे शक्य नसते. समाजातील भिन्न भिन्न संस्था, वृत्तपत्रे व नियतकालिके ही अशा सार्वजनिक जीवनाची दृश्य प्रतीके होत. गेल्या शतकात पाश्चात्य विद्येच्या प्रसारामुळे भारतातील अनेक पुरुषांनी समाजाच्या भवितव्याचे चिंतन व तत्त्वमंथन करण्यास प्रारंभ केला आणि समाजाला वळण लावण्याच्या हेतूने शेकडो संस्था निर्माण केल्या. त्याचप्रमाणे देशात अनेक वृत्तपत्रांचाही उदय व विकास झाला.

मानवत्वाची प्रतिष्ठा – समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाला स्वतंत्र महत्त्व आहे; एक स्वतःसिद्ध मानव या दृष्टीने तिच्याकडे पाहिले पाहिजे आणि त्या मानवाचे सुख, त्याचा गुणविकास, त्याच्या व्यक्तित्वाचा उत्कर्ष हेच ध्येय ठरवून, त्याला अनुसरून समाजरचनेची तत्त्वे ठरविली पाहिजेत, हा लोकशाहीचा मुख्य सिद्धान्त आहे. मानवाच्या जीविताला एक विशेष प्रतिष्ठा आहे, अशी जाणीव उत्पन्न झाल्यावाचून या सिद्धान्ताला कोणी मान देत नाही. म्हणूनच न्या. रानडे, यांनी 'मानवी प्रतिष्ठेचे पुनरुज्जीवन' हे सर्व सुधारणांचे आद्यसूत्र ठरवले होते. ब्रिटिश राज्य सुरू होण्यापूर्वीच्या हजार वर्षांच्या कालखंडात येथे समाजरचनेची जी तत्त्वे मान्य व रूढ झाली होती, ती सर्व मानवी प्रतिष्ठेला घातक अशी होती. जन्मनिष्ठ उच्चनीचता, दैववाद, संसाराविषयी उपेक्षाबुद्धी, तर्काची अवहेलना, शब्दप्रामाण्य, इ. तत्त्वे आणि त्यांच्या आधाराने उभारलेले कर्मकांड या सर्वांमुळे मानवाच्या स्वत्वाची पायमल्ली झाली होती. अशा बंधनांनी जखडलेल्या समाजात लोकसत्तेचा विकास होणे अशक्यप्राय असते. म्हणूनच सर्वश्री राममोहन राय, केशवचंद्र सेन, ईश्वरचंद्र विद्यासागर, पं. सीतानाथ, दादोबा पांडुरंग, लोकहितवादी, ज्योतिबा फुले, रानडे, भांडारकर, स्वामी दयानंद, लाला हंसराज, आगरकर, विवेकानंद, इ. गेल्या शतकातील सर्व समाजसुधारकांनी त्या कर्मकांडप्रधान जड धर्मावर प्रथम आघात केला. मानवाच्या मनाभोवती असलेल्या शृंखला तुटून पडल्यावाचून ते मन लोकायत्त शासनाची अवघड जबाबदारी पेलण्यास समर्थ होऊ शकत नाही. त्या शृंखलांपैकी जड आचारधर्माची शृंखला अत्यंत जाचक असते. भारतीय समाजधुरीणांनी त्या शृंखलेवर प्रथम घणाघात करून मानवाच्या मानवत्वाची प्रतिष्ठा वाढवली व भारतीय लोकसत्तेचा पाया घातला.

समता – कर्मकांडाइतकीच आपल्या समाजातील जन्मनिष्ठ विषमता मानवतेच्या प्रतिष्ठेला बाधक असते, हे जाणून समाजधुरीणांनी ती नष्ट करण्याचे प्रयत्नही सुरू केले. या बाबतीत पहिला संघटित प्रयत्न महाराष्ट्रात दादोबा पांडुरंग यांनी केला. भारतीय समाजातील जन्मनिष्ठ विषमता नष्ट करून समतेच्या पायावर त्याची पुनर्घटना केली पाहिजे, हा विचार राजा राममोहन राय यांनीही सांगितला. लोकहितवादींनी तर लोकशाहीचे तत्त्व प्रतिपादून, त्यासाठी जातिभेदाचे निर्मूलन व समतेची प्रस्थापना यांचे महत्त्व वर्णिले आहे. समतेचे तत्त्व तितक्याच आग्रहाने सांगणारे दुसरे समाजसुधारक म्हणजे विष्णुबुवा ब्रह्मचारी हे होत. ते लोकशाहीचे पुरस्कर्ते तर होतेच; पण त्यांनी साम्यवादाचाही पुरस्कार करून समतेची पराकोटी गाठली. म. ज्योतिराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना हे फार मोठे कार्य केले. हिंदूंच्या विषमतेवर आधारलेल्या वर्णजातिभेदाविरुद्ध असंतोष निर्माण करून त्याविरुद्ध खेड्यापाड्यांतील सर्व खालच्या वर्गापर्यंत बंडाची वृत्ती पसरून देण्याचे काम त्या समाजाने केले. समतेचा मंत्र जपून विषमता नष्ट करण्याच्या बाबतीत स्वामी दयानंद यांनी स्थापलेल्या आर्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाजाने पंजाबात जे कार्य केले तेही फार महत्त्वाचे आहे. जुन्या धर्मांने व रूढींनी स्त्रियांवर जी असंख्य बंधनें लादली होती, त्यांवरून स्त्री ही एक मानवी व्यक्ती आहे, हे त्यांना मान्य नव्हते असे दिसते. त्यामुळेही मानवी प्रतिष्ठेचा उपमर्द होतो, म्हणून गेल्या शतकातील समाजधुरीणांनी स्त्री–पुरुष विषमतेविरुद्धही मोहीम सुरू केली. स्त्रीचे व्यक्तित्व व तिचे स्वतंत्र स्थान त्या सर्वांना मान्य होते.

सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात समता निर्माण झाल्यावाचून लोकसत्तेला स्थिरता प्राप्त होत नाही. अशी समता निर्माण करण्याचे एक प्रभावी साधन म्हणजे भौतिक ज्ञान हे होय. सर्व प्रकारच्या दास्यात अज्ञानजन्य दास्य हे मानवी प्रतिष्ठेला अत्यंत घातक आहे. कारण त्यामुळे मानवी मनच प्रज्ञाहत होते. आणि मग प्रज्ञासंपन्न व प्रज्ञाहत असे दोन वर्ग होऊन विषमता निर्माण होते. लोकशाहीत सर्व माणसे समभूमीवर असली पाहिजेत. भोळेभावडे, अडाणी, निष्पाप, अशा लोकांना लोकायत्त शासनात कसलेही स्थान प्राप्त होणे शक्य नाही. म्हणूनच गेल्या शतकातील सर्व कार्यकर्त्यांनी ज्ञानप्रसारासाठी अमाप प्रयास केले. ज्ञान हीच संजीवनी, ज्ञान हेच सामर्थ्य व ज्ञानावाचून आपल्या समाजाची उन्नती होणे शक्य नाही, याविषयी त्यांना मुळीच संदेह नव्हता.

भौतिक अधिष्ठान – लोकायत्त शासन यशस्वी होण्यासाठी ते धर्मनिरपेक्ष असावे लागते. भारतात हिंदु, मुसलमान, ख्रिस्ती, इ. जे समाज आहेत, त्यांच्या जीवनाच्या सर्व अंगोपांगांवर धर्मांची सत्ता शेकडो वर्षे अप्रतिहतपणे चालू आहे. त्या भिन्न समाजांचा मिळून बनलेला जो भारतीय समाज, त्याचे राजशासन धर्मनिरपेक्ष करायचे असेल, तर त्या भिन्न समाजांच्या जीवनातील धर्माची सत्ता कमी करणे अत्यंत आवश्यक आहे. समाजाच्या जीवनापासून शासनसंस्था विलग करता येत नाही. म्हणून शासनसंस्थेचे स्वरूप बदलायचे असेल, तर त्या समाजाचे अधिष्ठानच बदलून टाकले पाहिजे. भारतातील धर्माधिष्ठित समाजांनी धर्मनिरपेक्ष लोकायत्त शासनाच्या अंकित रहावे, अशी इच्छा असेल, तर त्यांचे धर्म हे अधिष्ठान बदलून त्यांना भौतिक शास्त्रांचे अधिष्ठान दिले पाहिजे. तसे केले तरच शासनव्यवस्था धर्मनिरपेक्ष होऊन अंती लोकसत्ता दृढ व अभंग होईल. धर्मांचे अधिष्ठान बदलणे म्हणजे धर्माची अवहेलना करणे असे नाही. ऐहिक व्यवहारातील प्रत्येक क्षेत्रात चालणारी पारमार्थिक मोक्षधर्माची सत्ता नाहीशी करून, त्या जागी इतिहास, अनुभव, प्रयोग, अवलोकन यांच्या साहाय्याने नियमन करणे, एवढाच भौतिक अधिष्ठानाचा अर्थ आहे. भौतिक अधिष्ठानाचे पुरस्कर्ते पूर्वपरंपरेचा अभिमान धरीत नाहीत, ही समजूतही भ्रामक आहे. आगरकर, विवेकानंद, लो. टिळक यांना हिंदू धर्म व भारतीय संस्कृती यांचा अभिमान असूनही ते भौतिकवादाचा पुरस्कार करीत होते. भौतिकवादाच्या आश्रयाने कोणत्याही प्रकारची आध्यात्मिक, धार्मिक वा सांस्कृतिक अधोगती होण्याचा संभव नाही, हे त्यांनी जाणले होते.

मानवाची प्रतिष्ठा, समता व भौतिक अधिष्ठान या तत्त्वांचे प्रतिपादन करून राजा राममोहन राय, न्या. रानडे, आगरकर इ. समाजसुधारकांनी लोकसत्तेचा पाया घातला आणि लो. टिळक, म. गांधी व पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्यावर लोकशाहीचे मंदिर उभारले. लो. टिळक हे भारतीय लोकसत्तेचे आद्य प्रणेते आहेत. त्यांनाच प्रथम भारतीय जनशक्तीच्या सुप्त सामर्थ्याचे दर्शन घडले आणि त्या शक्तीला जागृत करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. लो. टिळकांनी आपले सर्वस्व भारत लोकसत्ताक व्हावा म्हणूनच खर्च केले. त्यांचे ध्येय केवळ स्वातंत्र्य हे नसून लोकसत्ताक स्वातंत्र्य हे होते. त्याला अनुसरूनच त्यांनी स्वातंत्र्याचे मार्ग आखले व संघटना उभारली. मजूर, काबाडकष्ट करणारे लोक, शेतकरी, कारागीर, कोष्टी, साळी, माळी, तेली, तांबोळी, भिल्ल, कातकरी यांच्या हिताची जपणूक व त्यांची उन्नती कशी होईल, ही चिंता ते अहर्निश करीत होते. लोकसत्तेवाचून स्वातंत्र्य व्यर्थ होय, लोकशक्ती हीच खरी शक्ती होय आणि श्रमिक जनता, शेतकरी, मजूर म्हणजेच लोक होत, हे लोकशाहीचे मूलभूत विचार प्रारंभी सांगून, मग ते विचार सर्व लोकांत प्रसृत करण्याचे कार्य त्यांनी सुरू केले. हजारो वर्षे या देशातील श्रमिक जनता अज्ञान, दारिद्र्य व दास्य यांत पिचत पडली होती. अन्याय, जुलूम व छळ सहन करणे हे तिच्या अंगवळणीच पडले होते. अन्यायाचा प्रतिकार हा तिच्या स्वप्नातही येत नव्हता. अशी जनता लोकशाही कधीच स्थापू शकत नाही. अन्यायाचा प्रतिकार हे लोकायत्त देशातील नागरिकांचे पहिले लक्षण असते. तेव्हा या देशातील लोकांना स्वत्वाची जाणीव करून देऊन प्रतिकाराला प्रवृत्त करावे, हे लो. टिळकांचे निश्चित धोरण होते.

लो. टिळकांनी जे लोकजागृतीचे कार्य केले, त्याचे दोन भाग पडतात. इ. स. १८९२ पासून १९०३ पर्यंतच्या कालखंडात कायदेशीर झगडा हे त्यांचे धोरण होते. पण १९०४ पासून ते कायदेभंगाच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करू लागले. बंगालच्या फाळणीमुळे निर्माण झालेल्या प्रक्षोभाचा फायदा घेऊन कायदेभंग, करबंदी, निःशस्त्र प्रतिकार, बहिष्कार यांच्या प्रसारास त्यांनी मोठ्या साहसाने प्रारंभ केला. त्यामुळेच त्यांना असंतोषाचे जनक ही पदवी प्राप्त झाली. इ. स. १९०७ मध्ये लो. टिळकांना अटक झाल्यामुळे त्यांचा बहिष्कारयोग तसाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राहिला. तो पुढे म. गांधींनी सिद्धीस नेला. सामान्य जनता हेच राष्ट्राच्या शक्तीचे मूलस्थान होय आणि ही शक्ती जागृत झाली म्हणजे राजे, सरदार, इ. जुनाट शक्तींना ती सहज नमवील याविषयी त्यांना अणुमात्र संदेह नव्हता. हीन, दीन, दलित जनतेतून स्वजनांसाठी आत्मबलिदान करणारे वीरपुरुष महात्माजींनी निर्माण केले.

लोकजागृती – निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींची सत्ता ती लोकसत्ता होय. पण हे लोकसत्तेचे केवळ बाह्य रूप आहे. आपल्या देशाची उन्नती, अवनती व स्वातंत्र्य याची चिंता प्रत्येक नागरिक ज्या शासनात वाहू लागतो, तेच शासन लोकसत्ता या अभिधानास पात्र आहे. अन्यायाचा प्रतिकार करण्याची वृत्ती ही अशी दिव्य संजीवनी आहे, की तिच्या सिंचनाने पशुतुल्य मानवांतही धैर्य, चिकाटी, त्याग, निष्ठा, बंधुभाव, इ. गुणांचा प्रादुर्भाव होतो आणि लोकसत्तेला आवश्यक असे लोक त्यांच्यांतून निर्माण होतात. लो. टिळकांनी भारतात असंतोष उत्पन्न केला. पण त्यांचे आवाहन मध्यम वर्गापर्यंतच पोचले होते. म. गांधींनी ते सर्व थरांत पोचवले आणि अखिल भारतीय जनतेला जागृत केले. भारतीय स्वातंत्र्याचा लढा चालविण्यासाठी गांधीजींनी शांततामय सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब केला. आणि तो प्रयोग यशस्वी करून भावी काळातील लोकायत्त देशांतील संग्रामांना त्यांनी एक आदर्श निर्माण करून ठेवला. मूलतः सत्याग्रह हा प्रेमाचा मार्ग असून, हळूहळू प्रतिपक्षाचा हृदयपालट घडविणे हे त्याचे अंतिम उद्दिष्ट असते. म. गांधींच्या सत्याग्रहामुळे प्रतिपक्षाचा हृदयपालट जरी झाला नाही, तरी भारतीय जनतेचा कायाकल्प निश्चित झाला आहे. शतकानुशतके पारतंत्र्यात पिचत पडलेला, गुलामगिरीची जाणीवही नसलेला, अज्ञान व दारिद्र्य यांनी ग्रासलेला हा समाज हळूहळू जागा झाला, प्रबुद्ध व संघटित झाला आणि परकीय सत्ता नष्ट करण्यासाठी आत्मबलिदानाला सिद्ध झाला, हा त्या सत्याग्रहाचाच प्रभाव होय.

भारतीय जनतेत निर्माण झालेल्या लढाऊ वृत्तीचा खरा आविष्कार १९३० सालच्या संग्रामात प्रथम प्रतीतीस आला. त्या वेळी एक ते सव्वा लक्षच लोक प्रत्यक्ष तुरुंगात गेले. पण निरनिराळ्या प्रकारे सरकारला आव्हान देऊन, कायदेभंग करून लाठी व गोळी खाण्याची सिद्धता ज्यांनी दाखविली त्यांची संख्या दसपट तरी असेल. त्याव्यतिरिक्त लक्षावधि कामगारांनी संप पुकारून सहानुभूती दाखविली ती निराळीच. याचाच अर्थ जनता जागृत होऊन प्रतिकारार्थ सिद्ध झाली. या जागृतीची जो अंतिम सीमा महात्माजींनी सांगितली होती, ती काही अंशी १९३० सालच्या चळवळीने गाठली होती. विधिमंडळे व न्यायालये यांवरील बहिष्कार, सरकारी नोकऱ्यांचा त्याग, कायदेभंग व करबंदी या पायऱ्यांनंतर पोलिस व लष्कर यांनी सरकारशी असहकार करणे ही शेवटची पायरी होय. परकीय आक्रमण नष्ट करण्यासाठी प्रारंभीच लष्करात क्रांती घडविणे हा मार्ग अयोग्य आहे. कारण त्यामुळे परकीय सत्ता नष्ट झाल्यावर तिथे लष्कराची सत्ता प्रस्थापित होते. पण जनता जागृत व संघटित असून, ती सैन्याचे नियंत्रण करण्यास समर्थ असेल, तर लोकसत्ताक क्रांती यशस्वी होऊ शकते. इ. स. १९३० साली या स्वाभाविक क्रमाने जागृती होऊन, लष्करापर्यंत असहकाराची लाट पोचल्याचे दिसून आले. सरहद्द प्रांतात गढवाली पलटणीतल्या सैनिकांनी खुदा-इ-खिदमत-गार या आपल्या निःशस्त्र बांधवांवर गोळी झाडण्याचे नाकारले. सैनिकांतली ही जागृती अगदी अल्परूप असली, तरी लोकसत्ताक क्रांतीच्या दृष्टीने तिचे महत्त्व मोठे आहे.

त्यानंतर स्वातंत्र्यसंग्रामातील मोठा लढा म्हणजे १९४२ साली झालेली भूमिगतांची कामगिरी हा होय. तो लढा म. गांधींच्या अहिंसात्मक पद्धतीने न होता, समाजवादी तरुणांनी त्याला घातपाताचे व दहशतवादाचे रूप दिले. म. गांधींच्या सत्याग्रह-पद्धतीने तो संग्राम झाला असता तर, तो अधिक प्रभावी ठरला असता. सत्याग्रहींची संख्या ४०-५० लाखांवर जाऊन शेवटी सैन्यात क्रांती झाली असती; पण तसे काही घडले नाही. मात्र नेताजी सुभाषबाबूंच्या उठावणीमुळे ते आंदोलन शेवटी यशस्वी झाले. लोकजागृतीच्या लाटा लष्करापर्यंत येऊन भिडल्या, हे ब्रिटिशांनी जाणले आणि ते शहाणे असल्यामुळे त्यांनी भारताला स्वातंत्र्य दिले.

भारतीय लोकसत्ता व समाजवाद – युरोप व अमेरिका या खंडांतील लोकसत्ताक राष्ट्रांचा इतिहास पाहता, हे ध्यानात येते, की लोकसत्ता यशस्वी होण्यासाठी बुद्धिप्रामाण्य, धर्मसुधारणा, समता, राष्ट्रनिष्ठा व समाजवाद या तत्त्वांचा अवलंब करून समाजाची पुनर्घटना करणे आवश्यक असते. भारतीय लोकसत्तेच्या गेल्या दीडशे वर्षांच्या इतिहासावरून हे दिसून येते, की भारतीय नेत्यांनी याच मार्गाने पावले टाकली आहेत. राममोहन, रानडे, आगरकर, विवेकानंद, दादाभाई, टिळक व म. गांधी यांनी युरोपात गेली तीनचारशे वर्षे जी तत्त्वज्ञाने रुजत होती व फुलत होती, तीच स्वीकारून भारतीय समाजाला अर्वाचीन युगात आणून सोडले. इ. स. १९३० पर्यंत पाश्चात्त्य देशांप्रमाणे उज्जीवन, धर्मसुधारणा, समता व राष्ट्रनिष्ठा या चार अवस्थांतून जाऊन आता भारतीय समाज समाजवादाकडे वळला आहे. राष्ट्रीय सभा प्रारंभापासून राष्ट्रवादाचाच पुरस्कार करीत आली आहे. पुढे समाजवादी विचार प्रसृत करून ते लोकप्रिय करण्याचे कार्य पं. जवाहरलाल नेहरू

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांनी काँग्रेसमध्ये राहूनच केले. (इ. स. १९४५ पर्यंत काँग्रेसचे नेतृत्व ज्यांच्याकडे होते त्यांच्या मनात, आर्थिक विषमता लोकसत्तेला घातक असते, हे तत्त्व दृढमूल झालेले होते, यात काही शंका नाही. पण त्यांनी आर्थिक समतेच्या प्रस्थापनेसाठी जे मार्ग निश्चित केले, ते अगदी भ्रांत, अव्यवहारी व फलशून्य असे होते. ते नेते अहिंसावादी व हृदयपरिवर्तनवादी होते. जमीनदार व भांडवलदार यांनी आपल्याजवळचे धन जनतेचे असून, आपण त्याचे केवळ विश्वस्त आहो, असे मानावे व त्याचा विनियोग श्रमिक जनतेच्या कल्याणासाठी करावा, असा उपदेश ते करीत. पण हळूहळू त्यांचाही कल समाजवादाकडे झुकू लागला आणि शेवटी राष्ट्रीय सभेने संपूर्ण समाजवादाला मान्यता दिली.

पुनर्घटना — स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाहीच्या मार्गावर भारताने जी वाटचाल केली आहे, तिचा विचार राजकीय पुनर्घटना, आर्थिक पुनर्घटना, सामाजिक पुनर्घटना व मानवपुनर्घटना या चार दृष्टींनी केला पाहिजे. सत्ताधिष्ठित काँग्रेसने भारतातील नागरिकांच्या ठायी व्यक्तिमत्त्वाची जागृती करून राजकीय समतेची प्रस्थापना करण्याचे पूर्वीचे धोरणच पुढे चालवले. त्याला अनुसरून सरकारने भारतातील संस्थाने स्वतंत्र भारतात विलीन करून मध्ययुगीन सरंजामी सत्तेचा नाश केला. संस्थानी प्रजेप्रमाणेच अस्पृष्ट जाती, गुन्हेगार जाती व आदिवासी जमाती यांनाही मानवतेचे मूलभूत हक्क मिळावे, अशी व्यवस्था काँग्रेस-सरकारने केली. संस्थानांतील पाच सहा कोटी प्रजा आणि दलित जाती-जमातींचे नऊ-दहा कोटी लोक एवढा मोठा समाज मानवतेच्या सामान्य हक्कांपासून वंचित होता, तो आता मानव म्हणून ओळखला जाऊ लागला.

राजकीय पुनर्घटनेच्या दृष्टीने काँग्रेसचे दुसरे महत्कृत्य म्हणजे भारताची घटना सिद्ध करून तिचा प्रत्यक्ष अंमल चालू करणे हे होय. सोळा लक्ष चौ. मैलांच्या खंडप्राय देशातील पस्तीस कोटी लोक धर्म, जाती, भाषा, इ. अनेक प्रकारचे भेदभाव विसरून समभूमीवर येणे आणि त्यांनी स्वयंशासन प्रस्थापित करणे ही घटना अभूतपूर्व आहे. भारतातील पहिल्या सार्वत्रिक निवडणुकी काँग्रेस सरकारने अत्यंत दक्षतेने व लोकशाहीचे संकेत व तंत्र सांभाळून पार पाडल्या.

जागृत समाजाची संघटना करून लोकशक्ती निर्माण करणे हे राजकीय पुनर्घटनेचे दुसरे अंग होय. या लोकशक्तीवाचून लोकसत्ता यशस्वी होणे शक्य नसते. या बाबतीत मात्र काँग्रेसला अपयश आले. महात्माजींच्या मृत्यूनंतर काँग्रेसमध्येच विघटना सुरू झाली. लोकांची संघटना करून सामर्थ्य निर्माण करण्याऐवजी ती संस्था स्वतःच दुबळी झाली. एवढेच नव्हे; तर स्वार्थ, हेवेदावे, सत्ताभिलाषा, इ. कारणांमुळे त्या संस्थेत भ्रष्टाचार सुरू झाला. पं. नेहरू, सरदार पटेल, इ. नेत्यांनी वेळोवेळी स्पष्ट व कठोर टीका केली तरीही त्या भ्रष्टाचाराला आळा बसला नाही. पण त्याचे कारण उघड आहे. भ्रष्टाचार हा केवळ काँग्रेसच्या अनुयायांत नसून, तो रोग सर्व समाजाला जडलेला आहे. काँग्रेस या सर्वांत मोठ्या पक्षातच दुही, स्वार्थीपणा व भ्रष्टाचार आहे असे नाही; तर सर्वच लहानमोठे पक्ष नीतिभ्रष्ट विघटित व सत्तालोलुप झाले आहेत. सर्व पक्ष स्वार्थापायी, जातिभेद व विषमता यांना प्रोत्साहन देत आहेत.

समृद्धीवाचून व आर्थिक समतेवाचून लोकसत्तेला मुळीच अर्थ नाही, हे मत आता सर्वमान्य झाले आहे व अनुभवाने सिद्ध झाले आहे. समृद्धीसाठी आर्थिक पुनर्घटना अत्यंत आवश्यक आहे. शेतीसुधारणा व औद्योगिक विकास ही त्या पुनर्घटनेची दोन अंगे आहेत. काँग्रेसने कृषिपुनर्घटनेच्या दृष्टीने प्रथम जमीनदारी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. पण नुकसानभरपाई देणे अशक्य असल्यामुळे ती योजना यशस्वी झाली नाही. आहे या स्थितीतच शेतीचे उत्पादन वाढविण्याच्या अनेक योजना सरकारने आखल्या आहेत. पण त्याही फारशा यशस्वी झालेल्या दिसत नाहीत. योजनांतील अदूरदर्शीपणा व चुका, सरकारी कर्मचाऱ्यांचा गलथानपणा व भ्रष्टाचार, लोकांचे अज्ञान व अडमुठेपणा, तसेच निसर्गाचा कोप या सर्व भिन्न भिन्न कारणांमुळे धान्याचे उत्पादन अपेक्षेप्रमाणे वाढले नाही. अजूनही धान्य परदेशातून आणावे लागते आहे. औद्योगिक विकासाचीही तीच गत झाली आहे. बहुतेक सर्व सरकारी उद्योग फार तोटयात चालले आहेत. आणि सरकारी जाचक नियंत्रणांमुळे खाजगी उद्योगधंदेही नीट चालत नाहीत. विजेच्या किंवा तेलाच्या टंचाईमुळेही उत्पादन नीट होऊ शकत नाही. दिवसेंदिवस त्यामुळे सर्व वस्तूंची टंचाई वाढत चालली आहे. दारिद्र्य, उपासमार, महागाई, बेकारी यांचे स्वरूप पूर्वीपेक्षाही भेसूर झालेले दिसते. लोकसंख्याही प्रतिवर्षी बेसुमार वाढते आहे.

सामाजिक पुनर्घटनेचा विचार करताना असे दिसून येते, की स्वातंत्र्यापूर्वीपेक्षा आता जातीयतेचे विष अधिकच उफाळून आले आहे, सर्वत्र पसरले आहे. पूर्वी राष्ट्रनिष्ठा, ध्येयवाद यांमुळे ते विष जरा दबून राहिले होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सत्ता हाती आली, की जातीयतेचा समूळ नाश करणे सहज शक्य होईल अशी आशा वाटत होती. पण येथे अगदीच विपरीत घडले. जातीयतेच्या साहाय्याने सत्ता मिळवावी व राखावी हा सोपा मार्ग सर्व राजकीय पक्षांनी अवलंबिला आहे. निवडणुकीच्या वेळी सर्व तत्त्वनिष्ठा सोडून वाटेल त्या जातीय गटाशी हातमिळवणी करण्याची त्यांची तयारी असते. सामान्य लोकांची वृत्तीही याबाबतीत मुळीच सुधारलेली नाही. कायद्याने अस्पृ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्यता नष्ट केलेली असली, तरी ग्रामीण भागात ती अजूनही भयानक स्वरूपात रूढ आहे. बहुजनसमाज अस्पृश्यांवर फार अत्याचार करीत आहे. हिंदू व मुसलमान यांच्यांतील झगडेही कमी झालेले नाहीत. धर्मांध लोक व गुंड मिळून जागोजागी मारामारी, जाळपोळ व लुटालूट करीत असतात.

लोकसत्तेच्या यशासाठी सर्वांगीण पुनर्घटना करायची, ती चार प्रकारची असते. त्यांतील चौथा प्रकार म्हणजे मानव-पुनर्घटना. अविवेक, अंधश्रद्धा, स्वार्थ, मोह, दैववाद, विघटनावृत्ती, इ. दुर्गुण नष्ट करून त्यांच्या जागी विवेक, त्याग, धैर्य, ध्येयनिष्ठा, इ. सद्गुणांचे संवर्धन करणे म्हणजेच मानवाची पुनर्घटना होय. हे सर्व आंतरिक धन मानवाच्या स्वाधीनच आहे. पण ते सुप्त आहे. मानवाची घडण बदलून ते धन प्रकट करणे आवश्यक आहे. कार्यक्षमता व नीतिमत्ता हे त्या धनाचे दोन भाग आहेत. स्वतंत्र भारताच्या कारभारात कार्यक्षमता क्वचितच आढळून येते. विषयाचे पूर्ण ज्ञान, पूर्वयोजना, जागरूकता, काम तडीला नेण्याची तळमळ, जबाबदारीची जाणीव, यांच्या अभावी कित्येक योजना फसल्या आहेत, असे सरकारी अहवालावरूनच कळते. आपल्या देशाच्या सार्वजनिक जीवनातील नीतिमत्ताही फार खालावली आहे, असे दिसते. लाचलुचपत, वशिलेबाजी, भ्रष्टाचार, हेवेदावे यांपासून एकही क्षेत्र मुक्त नाही. शिक्षणसंस्थांतही अनीती शिरली आहे.

समाजाच्या अंगच्या सत्त्वावर त्याचे यश अवलंबून असते; बाह्य उपकरणांवर नाही. समाजाच्या प्रगतीसाठी कर्त्या पुरुषांच्या बुद्धिमत्तेपेक्षा चारित्र्याची अधिक आवश्यकता असते. ध्येयनिष्ठा, सत्यनिष्ठा, निर्भय वृत्ती, दृढनिश्चय, समाजहितबुद्धी, बलिदानाची सिद्धता या गुणसंपदेला चारित्र्य म्हणतात. भारतीय समाजातून या चारित्र्याचा लोप झाला असल्यामुळे त्याचे सामर्थ्य क्षीण होत चालले आहे.

लोकसत्ता यशस्वी होण्यासाठी तिच्यामागे लोकशक्ती उभी राहिली पाहिजे. त्यासाठी विवेकनिष्ठा, त्याग, बुद्धिप्रामाण्य, सामाजिक प्रबुद्धता, व्यापक दृष्टिकोन, समाजहितबुद्धी, अन्यायाचा प्रतिकार करण्याची वृत्ती, सहिष्णुता या गुणांचे शिक्षण समाजाला देणे अवश्य असते. हे गुण अंगी बाणले तरच 'लोक' निर्माण होतात. जागरूक, प्रबुद्ध, विवेकशील व राष्ट्रनिष्ठ जनता म्हणजे लोक होत. ते निर्माण झाले तरच लोकशक्ती निर्माण होते. त्यासाठी लोकशिक्षणाची आवश्यकता असते. पण त्या दृष्टीने कसलेही प्रयत्न भारतात करण्यात आले नाहीत.

अशा परिस्थितीत लोकशाही पद्धतीने भारताचा उत्कर्ष साधेल की नाही, याबद्दल मनात संदेह उत्पन्न होतो. लोकशाहीमध्ये अन्न, वस्त्र, घर व शिक्षण हे प्रत्येक नागरिकाला पुरवण्याची जबाबदारी शासनाला घ्यावी लागते. त्यासाठी आजच्यापेक्षा सहस्रपट धन निर्माण करायला हवे. अशी धननिर्मिती अजूनपर्यंत कोणत्याही देशाने लोकशाही पद्धतीने केलेली नाही. ब्रिटनमध्ये आधी औद्योगिक क्रांती व धननिर्मिती, मग साम्राज्यविस्तार व त्यातून अमाप धनाचा लाभ आणि त्यानंतर लोकशाहीचा विकास झाला. धननिर्मितीच्या काळात तिथे अत्यंत मर्यादित अशी लोकशाही होती. रशिया व चीन या देशांत दंडसत्ता आहे. तिथे शेतकरी व कामकरी यांच्याकडून पंधरा-सोळा तास काम सक्तीने करून घेतले जाते व त्यांना पोटापुरतेच अन्न मिळते. मात्र देशाची संपत्ती अतोनात वाढली आहे. व्यवहार्य योजना व जनतेचे कष्ट हे त्याचे कारण आहे. भारतात शेतीचे व औद्योगिक उत्पादन न वाढण्याचे कारण निसर्ग हे नसून, इथला मानव हेच आहे. इथे कोणी खपून कष्ट करायला तयार नाही. प्रत्येकाकडून सक्तीने भरपूर काम करून घेणे लोकशाही मार्गाने अशक्य आहे. तसे कष्ट केल्यावाचून समृद्धी निर्माण होणार नाही. अशाही स्थितीत लोकशाही चालविण्याचा अट्टाहास केला तर दंगली, अराजक, संप, दुफळी, लूटमार, विध्वंस हाच लोकशाहीचा अर्थ निश्चित होईल.

इंग्लंड व अमेरिका या देशांव्यतिरिक्त जगातील कोणत्याही देशात लोकशाही यशस्वी झाली नाही. काही देशांत लोकसत्ताक शासने स्थापन झाली होती, पण अराजक, यादवी व बेबंदशाही यांमुळे लवकरच ती कोसळली व तिथे दंडसत्ता प्रस्थापित झाली. म्हणूनच भारताच्या लोकशाहीच्या भवितव्याविषयी विचारी लोकांना चिंता वाटू लागली आहे. पाहा– गणराज्य. [भारतीय लोकसत्ता– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, १९५४; हिं. वि. को.; धर्मशास्त्र विचार– म. म. पां. वा. काणे, १९३५; लोकसत्तेला दण्डसत्तेचे आव्हान– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, १९६२]

लोकसाहित्य

लोकमानसाचा वाङ्मयीन आविष्कार. हा तत्पुरुष समास आहे. त्याचा अर्थ लोकांचे साहित्य असा होतो. यातील लोक या शब्दाचा प्रथम विचार करायला हवा. शब्दकोशात लोक या शब्दाचे दोन अर्थ स्थान व जनता असे दिलेले आढळतात. प्रस्तुत विषयात दुसरा अर्थ घ्यायचा आहे.

भारतात वैदिक आर्यांचे आगमन झाल्यानंतर येथील आर्येतर जमातींशी त्यांचा संघर्ष झाला. हा संघर्ष दोन जमातींमधलाच नव्हे, तर दोन संस्कृतींमधला होता. त्याचा परिणाम म्हणून वेद आणि वेदबाह्य अशी स्थिती उत्पन्न झाली. वेद व मानणाऱ्या आर्येतर जमातींना वैदिक आर्य लोक या नावाने संबोधू लागले. वेद आणि लोक असा भेद करून आर्यांनी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेदाची प्रतिष्ठा राखलीच, शिवाय त्याबरोबर लोक या शब्दाचे स्वतंत्र महत्त्वही मान्य केले. जे वेदबाह्य वाङ्मय ते लोकवाङ्मय असे त्यांनी मानले. सांप्रत लोक हा शब्द वेदेतर संस्कृती अशा संकुचित अर्थातून वर उठला आहे, व्यापक झाला आहे. वैदिकाचार्याकडेच नव्हे; तर लोकांच्याकडेही स्वतःचे शब्द, स्वतःची भाषा आणि स्वतःची शैली आहे. जीवनाच्या सर्व साधनांमध्ये लोकांचे असे एक सामूहिक व्यक्तित्व आहे. ज्याला आपण संस्कृती म्हणतो, ती संस्कृती लोकांहून भिन्न नाही. लोक किंवा जनता हाच संस्कृतीचा झरा आहे. लोकांचे सार्वकालीन महत्त्व वेदव्यासांनी ओळखले आणि भगवान श्रीकृष्णानेही ओळखले. श्रीकृष्ण गीतेत म्हणतो, की ' मी पुरुषोत्तम लोक आणि वेद या दोहोंमध्येही प्रतिष्ठित आहे." ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तातही लोकसमाजाची एक विराट कल्पना केलेली आहे. नारायण ऋषी म्हणतो, की पुरुषरूप ईश्वर हजारो मुखे, हजारो नेत्र आणि हजारो पाय यांनी युक्त असून, सर्व व्यापून उरला आहे.

लोक म्हणजे धरतीच्या पाठीवर पसरलेला मानवसमाज होय. लोक हा शब्द वर्गभेदरहित व व्यापक अशा प्राचीन परंपरांनी युक्त आहे. भारतात नागर व ग्रामीण अशा दोन संस्कृतींचा उल्लेख केला जातो; पण लोक हा शब्द दोन्ही संस्कृतींत विद्यमान आहे. समाजाचे गतिशील अंग म्हणजे लोकच आहे. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल लिहितात –

लोक हा भारतीय जीवनाचा महासमुद्र आहे. त्याच्यामध्ये भूत, भविष्य, वर्तमान सर्व काही साठवलेले आहे. लोक हे राष्ट्राचे अमर स्वरूप आहे. ते संपूर्ण ज्ञान आणि समस्त शास्त्रे यांचे पर्यवसान आहे. अर्वाचीन मानवासाठी लोक सर्वोच्च प्रजापती आहे. लोक, लोकधात्री भू-माता आणि लोकांचे व्यक्त रूप असा मानव हेच आपल्या नव्या जीवनाचे अध्यात्मशास्त्र आहे. लोकांचे कल्याण हेच आपल्या मुक्तीचे द्वार आणि निर्मितीचे नवीन रूप आहे. लोक, भूमी आणि मानव या त्रिपुटीत जीवनाचे कल्याणमय रूप आहे.

लोकसंस्कृती – इंग्रजीत फोकलोअर असा जो शब्द निर्माण झाला, त्याचाच प्रतिशब्द म्हणून लोकवार्ता हा शब्द भारतात रूढ झाला. लोकवार्ता म्हणजे पर्यायाने लोकसंस्कृती होय. डॉ. सुनीतिकुमार चटर्जी म्हणतात, की पितृपरंपरागत जीवनाची पद्धती ज्या सामाजिक आचार, श्रद्धा, विचार आणि वाङ्मय यांच्यामधून अभिव्यक्त होते, तो इंग्रजी फोकलोअर शब्दाचा अर्थ समजावा. त्याला त्यांनी लोकायन असा आपला शब्द सुचविला आहे. काही विद्वान त्यालाच लोकविद्या व लोकसंस्कृती असेही म्हणतात.

श्री. गोमे या पाश्चात्य पंडिताने असे प्रतिपादन केले आहे, की लोकवार्ता किंवा लोकसंस्कृती हा एक इतिहासाचा स्वतंत्र विषय आहे आणि त्याचे स्वतःचे असे काही नियम आणि सिद्धान्त आहेत. श्री. मॅरेट यांनी सायकॉलॉजी अँड फोकलोअर या आपल्या ग्रंथात प्रतिपादन केले आहे, ते असे – लोकवार्तेचा केवळ समाजशास्त्राच्या अंगानेच विचार करणे हा एकांगी दृष्टिकोन आहे. मानसशास्त्राच्या दृष्टीनेही या विषयाचे अध्ययन आवश्यक आहे, कारण लोकवार्ता हे निर्जीव शास्त्र नाही. बाह्य रूपाने त्याचा अभ्यास जितका आवश्यक तितकाच आंतरिक रूपानेही आवश्यक आणि महत्त्वपूर्ण आहे. डॉ. वासुदेव शरण अग्रवाल यांनीही असेच विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते लोकवार्ता हे एक जिवंत शास्त्र आहे. लोकजीवनाइतकाच लोकसंस्कृतीचाही विस्तार आहे. डॉ. सत्येंद्र यांनी लोकसंस्कृतीत अंतर्भूत असलेल्या विषयांची यादी दिली आहे, ती अशी –

पृथ्वी, आकाश, वनस्पती, पशुपक्षी, मानव, मानवनिर्मित वस्तू, आत्मा, परलोक, शकुन, अपशकुन, भविष्यवाणी, आकाशवाणी, जादूटोणा, रोग, सामाजिक व राजनैतिक संस्था, व्यावसायिक उद्योग, सण, वार, व्रते, कहाण्या, गीते, म्हणी, वाक्प्रचार, इ. सर्व विषय लोकसंस्कृतीत येतात. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग आहे. स्त्रिया, पुरुष व मुले यांचे व यांच्यासाठीच निर्माण झालेले गद्य–पद्यात्मक वाङ्मय लोकसाहित्यात अंतर्भूत आहे. लोकसाहित्याची अनेकांनी अनेक लक्षणे केली आहेत. पण थोडक्यात त्याचे लक्षण पुढीलप्रमाणे सांगता येईल– व्यक्तिविशेषरहित व समान रूपाने समाजाच्या आत्म्याचा आविष्कार करणाऱ्या मौखिक अभिव्यक्ती म्हणजे लोकसाहित्य होय.

लोकसाहित्य हे कोणत्या ना कोणत्या स्वरूपात परंपरेला धरून असते. ज्याला अभिजात संस्कार, पांडित्य व शास्त्रदृष्टी प्राप्त झाली नाही आणि जो केवळ परंपरेच्या प्रवाहात जीवन जगतो, अशा वर्गाने निर्माण केलेले साहित्य ते लोकसाहित्य, असेही म्हणता येईल.

लोकसाहित्याचा अभ्यास – लोकसाहित्य हे इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत दुर्लक्षित व उपेक्षित असेच होते. त्या शतकाच्या शेवटच्या चरणात विद्वानांचे या विषयाकडे लक्ष गेले. कित्येक विद्वान स्वतंत्रपणे या विषयाच्या अभ्यासाला लागले. थोड्याच कालात अभ्यासाचा विषय म्हणून या विषयाला प्रतिष्ठा प्राप्त झाली. युरोपातल्या व भारतातल्याही संशोधकांनी आपापली जीवने या विषयाला वाहून टाकली. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, भाषाशास्त्र, इतिहास, समीक्षा, रसग्रहण, इ. अनेक अंगांनी लोकसाहित्याचे अध्ययन व परिशीलन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाले आहे. आजही त्याचा अभ्यास खंडित झालेला नाही. लोक-साहित्यावर जगभरच्या सर्व भाषांत विविध अंगाने लिहिलेले मोठमोठे ग्रंथ प्रसिद्ध झाले आहेत आणि आजही होत आहेत.

भारतीय लोकसाहित्याचा पाया कसा घातला गेला, याचा इतिहास श्रीमती दुर्गा भागवत यांनी सांगितला आहे, तो असा – भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना मिळाली ती भारतीय विद्येच्या अनुषंगाने. सर विल्यम जोन्स यांनी केलेले संस्कृत भाषेचे अध्ययन व तिचा त्यांनी केलेला प्रचार हा भारतीय विद्येचा मूलाधार गणला पाहिजे. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या प्रारंभी युरोपात तौलनिक भाषाशास्त्राच्या अध्ययनाला प्रेरणा मिळाली. त्याच्या मागोमाग तौलनिक दैवतशास्त्र व तौलनिक आचारशास्त्र आले. याप्रमाणे भारतीय विद्येचा क्षेत्रविस्तार व तिची विविध अंगे अभ्यासकांना ज्ञात झाली. इ.स.१७८४साली कलकत्त्याच्या एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली. आशियाचा इतिहास, पुरातन प्रथा, विज्ञान व वाङ्मय यांचा शोध करणे, हा या संस्थेचा उद्देश होता. पुढे१८०४ साली मुंबईला याच उद्देशाने लिटररी सोसायटीची स्थापना झाली. इ. स. १८२९ साली ग्रेट ब्रिटनमध्ये रॉयल एशियाटिक सोसायटीची स्थापना झाली आणि मुंबईच्या सोसायटीने त्या संस्थेचे नाव स्वीकारले. या संस्थेने एक नियतकालिकही सुरू केले होते.

पण लोकसाहित्याच्या अभ्यासाला खरी प्रेरणा मिळाली ती इंडियन अँटिक्वेरी या नियतकालिकामुळे. मुंबईत इ. स. १८७२ सालापासून त्याचे प्रकाशन सुरू झाले. इंडियन अँटिक्वेरीच्या उद्देश–पत्रिकेत इतिहास, वाङ्मय व शिल्प यांच्या बरोबरीचे स्थान लोकसाहित्याला दिले गेले. लोकसाहित्याच्या या दालनात दंतकथा, लोकगीते, खेळ व करमणुकीचे प्रकार यांचा, तसेच दैवतकथांचाही समावेश होत असे. या नियतकालिकाने लोकसाहित्याची बैठक पक्की केली यात शंका नाही. इ. स. १९३३ साली इंडियन अँटिक्वेरी हे नियतकालिक बंद पडले. पुढे १९३८ सालापासून न्यू इंडियन अटिक्वेरी नावाचे एक नियतकालिक पुण्यास निघू लागले. डॉ. प. कृ. गोडे हे त्याचे संपादक होते. हेही नियतकालिक अल्पजीवीच ठरले.

इंडियन अँटिक्वेरीच्या खालोखाल लोकसाहित्याला पोषक अशी कामगिरी बॉंबे अँथ्रॉपॉलॉजिकल सोसायटीच्या नियत-कालिकाने बजावली. इ. स. १८८६ साली या सोसायटीची स्थापना झाली. भारतीय लोकजीवनाची विविध अंगे मानून वंश-शास्त्राच्या पद्धतीने ती अभ्यासणे, हा या संस्थेचा उद्देश होता. त्या दृष्टीने वेगवेगळ्या जाती-जमातींच्या चालीरीतींचे निरी-क्षण करणे, हे काम त्या संस्थेने हाती घेतले. टेंपल, डाल्टन, क्रुक, रसेल, थर्स्टन, एंथोवेन, इ. ब्रिटिश सरकारच्या अनेक अधि-काऱ्यांनी या विषयात महत्त्वाची कामगिरी बजावली. या सर्वांत क्रुकची कामगिरी अद्वितीय आहे. त्याने भारतीय लोकसंस्कृतीचा मागोवा सूक्ष्मपणे व शोधकपणाने घेतला.

इ. स. १९२१ साली शरच्चंद्र राय यांच्या संपादकत्वाखाली 'मॅन इन् इंडिया' या नावाचे एक नियतकालिक सुरू झाले. मानववंशशास्त्राचा अभ्यास करणे हा त्याचा उद्देश असला, तरी लोकसाहित्याचे सर्व प्रकार या नियतकालिकात चर्चिले गेले.

लोककथा हे लोकसाहित्याचे प्रधान अंग होय. मेरी फ्रिअर या लेखिकेने १८६८ साली ओल्ड डेक्कन डेज या नावाने लोक-कथांचे एक संकलन प्रकाशित केले. इ. स. १८८० साली इंडियन फेअरीटेल्स या नावाने मिस् स्टोक्स या बाईने अयोध्या प्रांता-तल्या लोककथांचा संग्रह प्रकाशित केला. 'लीजंड्स ऑफ् पंजाब' हे पुस्तक सर रिचर्ड टेंपल या गृहस्थाने १८८३ मध्ये प्रसिद्ध केले. स्विनर्टनच्या 'राजा रसालूच्या कथा' त्याच सुमारास प्रसिद्ध झाल्या. त्यानंतर फ्लोरा एन. स्टीलचे 'दि वाइड अवेक स्टोरीज' हे पुस्तक प्रसिद्ध झाले.

सर रिचर्ड टेंपल यांनी लोककथांच्या संग्रहांची शास्त्रीय वर्गीकरणाला धरून छाननी करण्याचे पहिले कार्य केले. टेंपलचे हे वर्गीकरण आजही अभ्यासकाला मार्गदर्शन करण्यास समर्थ आहे. इ. स. १८६८ ते १९१६ या कालखंडात सर्वश्री सदाशिव काशिनाथ छत्रे, राजारामशास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळूण-कर, महादेव मोरेश्वर कुंटे, ए. एम. टी. जॅक्सन, वासुदेव गोविंद आपटे, इ. विद्वानांनी लोकसाहित्याचे व लोकांच्या चालीरीतींचे काही संकलन केल्याचे व त्या विषयी काही स्फुटलेखन केल्याचे दिसून येते. गाणी म्हणी, उखाणे व कहाण्या यांचे संग्रह धार्मिक वृत्तीचा परिपोष व भाषेचे शिक्षण या हेतूने प्रसिद्ध करण्यात आले. हा काल मराठी लोकसाहित्याच्या दृष्टीने धूसर असाच म्हणावा लागेल.

मराठी लोकसाहित्याच्या खऱ्या प्रतिष्ठापनेचा काल १९१६-१९३८ हा असून, हे महत्त्वाचे कार्य श्री. वि. का. राजवाडे यांनी केले. लोकसाहित्याच्या कक्षा, आधार आणि महत्त्व त्यांनीच लोकांच्या मनावर बिंबवले. लोकगीत हा शब्दही राजवाड्यांनीच रूढ केला व त्याला पूरक असा लोककथा हा शब्दही त्यांनीच वापरला. श्री. ना. गो. चापेकर यांनी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेत लोकसाहित्याचे अनेक प्रकार विपुल प्रमाणात प्रकाशित केले. चापेकरांची दृष्टी समाजशास्त्रीय होती. पुढे शं. ग. दाते यांनीही लोककथांचा एक संग्रह प्रकाशित केला व तो लोकांना खूप आवडला. भारत इतिहास संशोधन मंडळाने आपल्या वार्षिक इतिवृत्तांतून लोकगीतांचा भरगच्च आणि बहुमोल अस

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संग्रह प्रकाशित केला. श्री. वा. दा. मुंडले यांनी त्या कामी महत्त्वाची भर टाकली. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेनेही १९५७ सालापासून लोकसाहित्य हे आपले एक प्रमुख अंग मानले.

लोकसाहित्यातले संप्रदाय – जगभरच्या अनेक संशोधकांनी निरनिराळ्या दृष्टींनी लोकसाहित्याचा जो अभ्यास सुरू केला, त्यातून अनेक संप्रदाय निर्माण झाले. यांपैकी काही संप्रदाय असे–

(१) भाषाशास्त्रीय संप्रदाय – या संप्रदायाचा प्रारंभ जर्मन ग्रिमबंधूंनी केला आहे. त्यांनी लोकतत्त्वाच्या अध्ययनासाठी दैवतकथांवर विशेष लक्ष केंद्रित केले. म्हणून या संप्रदायाला मायथॉलॉजिकल संप्रदाय असेही म्हणतात. तौलनिक भाषाशास्त्राच्या आधारे काढलेले या संप्रदायाचे सिद्धान्त असे –

(अ) समान दैवतकथांचा उगम एकाच स्थानातून झाला.

(आ) समान कथांचा ज्या ज्या जातींत प्रचार आहे व त्या कथांना मान्यता आहे, त्या त्या जातींचे उगमस्थान एक आहे. त्या एका परिवारातल्या जाती आहेत.

(इ) कथा-गाथा या भाषाविकारामुळे उत्पन्न झाल्या आहेत. शब्दांचा मूळ अर्थ दुर्बोध झाला, की विकृत अर्थ शब्दांना चिकटतो. त्यामुळे कल्पना बदलतात. त्या कल्पनांच्या कथा होतात. दैवतकथांत अशा विकृतीचे प्राधान्य आढळते.

(ई) प्राकृतिक व्यापार हे अशा कथा-गाथांचे मूळ आहे. मॅक्स म्यूलरच्या मते सूर्यकथा हा तौलनिक दैवतकथाशास्त्राचा मूलाधार होय.

या संप्रदायाचा एक पुरस्कर्ता थिओडोर बेनफे याला ‘समान दैवतकथा असलेल्या जाती या मूळ एकाच परिवारातल्या आहेत,’ हे मत मान्य नव्हते. तो म्हणतो, की ‘या जाती निरनिराळ्या कुलांतीलही असू शकतील. त्यांच्यामधल्या समान दैवतकथांचे कारण हे, की त्यांनी त्या मूलस्रोतातून उचलल्या आहेत किंवा त्यांची उसनवारी केली आहे. बेनफेच्या मते दैवतकथांचे मूलस्थान भारत हे आहे. या कथा भारतातूनच जगभर पसरल्या. त्याने पंचतंत्राचे भाषांतर केले असून, त्याच्या भूमिकेत त्याने हा विचार मांडला आहे. भटक्या व व्यापारी ज्यू लोकांनी, स्पेनमधल्या मूर लोकांनी, पौर्वात्य राष्ट्रांशी संबंध आलेल्या लोकांनी व त्यानंतर धर्मयुद्ध करणाऱ्यांनी या कथा भारतातून युरोपात नेल्या, असे बेनफेचे म्हणणे आहे. युरोपातल्या अनेक कथांचा उगम भारतीय पंचतंत्रामध्ये आहे, असे तो म्हणतो. बेनफेच्या विचारांना खतपाणी घालून त्यांना सिद्धान्तरूप बनविण्याचे कार्य कॉसकिन या फ्रेंच विद्वानाने केले.

(२) निसर्गरूपकवादी संप्रदाय– या विषयीचे विवेचन श्रीमती दुर्गा भागवत यांनी पुढीलप्रमाणे केले आहे– दैवतकथांत निसर्गदृश्यांचीच विविध प्रतीके असतात, या विधानावर या संप्रदायाची उभारणी झालेली आहे. वैदिक कथांत वृत्र म्हणजे मेघ, सरमा म्हणजे वायूची झुळूक, अदिती म्हणजे आकाश, इत्यादी रूपके अभिप्रेत आहेतच; इतकेच नव्हे, तर इंद्र-वृत्रांचे युद्ध म्हणजे पर्जन्यकाळावर शरद् ऋतूने मिळवलेला विजयच आहे. नॉर्वेजियन सागामध्येही देवासुरांचे युद्ध म्हणजे हिवाळयावर वसंताने मिळवलेल्या विजयाचे रूपकच मानले आहे. ग्रीक पुराणकथांतही अशा रूपकांना तोटा नाही. उदाहरणार्थ सायकी म्हणजे फुलपाखरू, डिमिटर म्हणजे वासंतिक धान्यसमृद्धी, इत्यादी. अशा प्रकारे जगभरच्या लोकसाहित्यातील दैवतकथांत निसर्गरूपकांची रेलचेल आढळते.

निसर्गरूपकवादाच्या संप्रदायाचे जनकत्व सूर्यसिद्धान्ताच्या दृष्टीने मॅक्स म्यूलरला द्यायला हरकत नाही. निसर्गदृश्ये प्रच्छन्न अलंकारांच्या मागे दडलेली आहेत, हा या संप्रदायाचा जो मुख्य पाया, तो त्याच्याच वर उल्लेखिलेल्या सिद्धान्ताचा परिपाक आहे. परंतु या वादाचा उत्कृष्ट परिपोष अनेक वर्षांनी एऱ्हेन राइश या पंडिताच्या Die allgemeine Mythologie und irhe iethologischen Grundlagen (१९१०) या ग्रंथात झालेला आहे. सूर्यरूपकांनीच अमेरिकेत आढळलेल्या दैवतकथांना पुष्टी आलेली आहे, असे त्याचे म्हणणे. त्याच्या या विधानाला ग्रीक कथांचा पुरावा आहे.

(३) भ्रांतकल्पनावादी संप्रदाय– बानियर व लांब्रिअर हे या संप्रदायाचे पुरस्कर्ते होत. त्यांनी दैवतकथा हे आपले कार्यक्षेत्र ठरवले. त्यांच्या मते दैवतकथा म्हणजे अवास्तव किंवा भ्रांत कल्पनेचा ऐतिहासिक सत्याशी झालेला मिलाफ होय. श्रीमती दुर्गा भागवत म्हणतात– याच प्रमेयाच्या आधारे जेकब ग्रिमने आपल्या घरगुती कथांचे विश्लेषण केले. त्या भौतिककथा असल्या, तरी त्यांत जे अवास्तव आणि अतिरेकी असे त्याला आढळले, त्याच्यावरून त्याने असे अनुमान केले, की या भौतिक कथा हे मूळच्या सृष्टिरूपकांचे झालेले विकृत स्वरूप असले पाहिजे. मूळच्या कथा दैवतकथांतच समाविष्ट होत्या. परंतु मूळचा धार्मिक हेतू परिस्थित्यनुसार नष्ट झाल्यावर कथांचे एकमेकांशी असलेले दुवे नष्ट झाले, त्यांचा अर्थ पालटला आणि नंतर अवास्तवाने व अतिरेकाने भौतिककथांत प्रवेश केला.

(४) स्पष्टीकरणवादी संप्रदाय– दैवतकथा या मुख्यतः हेतुगर्भ असतात आणि त्यांत लोकोपयोगी आदेश दडलेला असतो, असे या संप्रदायाचे म्हणणे आहे. एखादी गोष्ट अशी का घडली तर त्याला अमुक तमुक कारण होते म्हणून, अशा तऱ्हेची मीमांसा त्यात असते. या संप्रदायाचे मत असे, की बहुतेक सृष्टीचे स्पष्टीकरण मानवी व पाशवी कोटीच्या अनुषंगाने करण्याची प्रेरणा दैवतकथांत दिसून येते. निसर्ग व संस्कृती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांच्या विकासावरचे भाष्य अशा कथांत आढळते.

(५) मानववंशशास्त्रीय संप्रदाय – इंग्रज विद्वान टायलर याने आपल्या प्रिमिटिव्ह कल्चर या ग्रंथात (१८७१) आपले नवे सिद्धान्त मांडले, ते असे–

प्रत्येक जातीने आपापल्या कथा-गाथांची निर्मिती आपापल्या क्षेत्रात स्वतंत्र रूपात केली आहे. अशा कथा-गाथा कोणत्याही जातीने कोणाकडून उधार घेतल्या नाहीत आणि त्या कोणत्याही एका उगमस्थानातून प्रसार पावल्या नाहीत.

मूळ आदिम मानवानेच संस्कृतीची मूळ बीजे निर्माण केली. त्याच्या त्या मूळ रूपांचे अवशेष आजही जगात विद्यमान आहेत. भूतात्मवाद (अ‍ॅनिमिझम) हे आदिम मानवाच्या धर्माचे मूळ आहे. मानववंशशास्त्राला अनुसरून टेलरने वरील सिद्धान्त मांडले व पुढे त्याला अ‍ॅन्ड्रयू लँग या पंडिताने साथ दिली.

(६) सजीवावशेषत्ववादी संप्रदाय – वर दिलेल्या मानववंशशास्त्र संप्रदायाला ज्या अनेक शाखा फुटल्या, त्यांतली ही मुख्य शाखा होय. टायलर व लँग हे या संप्रदायाचे प्रवर्तक होत. रानटी लोकांच्या दैवतकथांचा अभ्यास करून त्यांनी निष्कर्ष काढला, तो असा – मूळच्या कथा रानटी लोकांत आढळतात आणि त्यांचेच अनुच्छिन्न जिवंत अवशेष सुसंस्कृत लोकांच्या मागाहून बनलेल्या कथांत आढळून येतात. अशा प्रकारे ही अनुच्छिन्न किंवा टिकून राहण्याची प्रवृत्ती जुन्या व नव्या कथांना जोडून देते. ग्रिमच्या कथांत आढळून येणाऱ्या अनेक सरंजामी पद्धतीचे मूळ या विद्वानांना दूरदूरच्या रानटी जातींत आढळले. मूळ रानटी अवस्था एक होती. रानटी लोकांच्या समजुतीही सार्वत्रिक होत्या. नंतर जसजसा संस्कृतीत फरक पडला, तसतसे रानटी व सुसंस्कृत लोकांचे दळणवळण तुटले. या सिद्धान्ताप्रमाणे ' रानटी अवस्थेतून प्रगतीकडे ' हे सूत्र अस्तित्वात आले. कथांतही हेच सूत्र वरील विद्वानांना गोवलेले आढळते.

(७) ऐतिहासिक – भौगोलिक संप्रदाय – या पद्धतीचा पुरस्कर्ता जे. क्रोन हा फिनिश पंडित होता. हा संप्रदाय १८८१च्या सुमारास त्याने उद्‌घोषित केला. त्याच्या पूर्वी बरीच वर्षे त्याचा गुरू लोनरोट याने फिनलंडच्या पोवाड्यांचा एक मोठा संग्रह विवेचनासह प्रसिद्ध केला होता. क्रोनने तौलनिक पद्धतीने त्या पोवाड्यांतील कल्पनाबंध भौगोलिक दृष्ट्या अजमावून पाहिले; प्रत्येक कल्पनाबंधाचा ऐतिहासिक उगम मिळतो का, हेही तपासले आणि या अभ्यासानंतर त्याने असे प्रतिपादिले, की लोकसाहित्याच्या अभ्यासात ऐतिहासिक–भौगोलिक पद्धतीला असाधारण महत्त्व आहे. त्याचा मुलगा के. क्रोन याने ही पद्धत प्राणिकथांनाही लावली. या पद्धतीच्या महत्त्वाविषयी श्रीमती दुर्गा भागवत पुढील निष्कर्ष सांगतात – फिनिश पद्धत ही भारतीय लोकसाहित्याच्या दृष्टीने महत्त्वाची असून, जुन्या भारतमूलक सिद्धान्ताला पाठिंबा देणारी आहे. भारतीय कथांचे उगम व इतिहास यांची खरी शहानिशा याच पद्धतीने करावी लागेल. कारण भारताचा विस्तार, त्याच्या संस्कृतीची प्रगल्भता, प्राचीनता आणि जागतिक विस्तार लक्षात घेतल्यास या पद्धतीशिवाय सध्या तरी तरणोपाय नाही.

विस्तार – लोकसाहित्याचा विस्तार खूप मोठा आहे. सामान्य जनता ज्या शब्दांत हसते, रडते, खेळते, गाते, त्या सर्व शब्दांचा लोकसाहित्यात अंतर्भाव करता येतो. जन्मापासून तो अंत्यविधीपर्यंत जे प्रमुख संस्कार आचार्यांनी सांगितले आहेत, त्या सर्व संस्कारांच्या प्रसंगी त्या त्या भाषेत गीते गायिली जातात. मृत्यूच्या प्रसंगी म्हणायची सूक्ते ऋग्वेदात आहेत, त्याचप्रमाणे काही जाती-जमातींतही आहेत. ऋतूंच्या परिवर्तनामुळे लोकांच्या मनावर जो प्रभाव पडतो, त्याची अनुभूती व्यक्त करणारी ऋतुगीते आहेत. पेरणी, कापणी, या सर्व कामांच्या वेळी जो उल्हास आणि आनंद भरतो, तोही गीतांतून व्यक्त होत असतो. अशी कृषिगीते सर्वत्र आढळतात. महाराष्ट्रात अशा गीतांना भलरी असे म्हणतात. समाजात जे वीरपुरुष जन्माला येऊन एखादे लोकोपकारक वीरकृत्य करतात, त्याचा प्रभाव अनेक पिढ्यांपर्यंत जनतेच्या मनावर ठसलेला असतो. गीतरूपाने अशा वीरांची जी प्रशंसा लोक करतात, त्यांना गाथा किंवा पोवाडे म्हणतात. थंडीच्या दिवसांत शेकोटीजवळ बसून कथा सांगणे किंवा ऐकणे ही प्रथाही खेडोपाडी आढळते. अशा वेळी एखादा ग्रामवृद्ध एखादी छोटी किंवा मोठी गोष्ट सांगतो. पुष्कळ वेळा ही कथा गीतात्मकही असते. लहान मुलांना सांगितल्या जाणाऱ्या काऊचिऊच्या कथा छोट्या पण मनोरंजक असतात. लोक आपल्या बोलण्यात म्हणी व वाक्प्रचारही वापरतात. या म्हणी त्यांच्या अनुभवांतून उगम पावलेल्या असतात. मुला-मुलींचे कित्येक खेळही गीतांवरच आधारलेले असतात.

लोकसाहित्याचे विशेष गुण म्हणजे स्वाभाविकता, स्वच्छंदता व सरलता हे होत. जंगलात एखादे फूल सहजपणे उमलावे, गंगेचा प्रवाह सहजपणे वाहत जावा, तशा प्रकारचे हे साहित्य असते. लोकांच्या आशा-निराशा, हर्ष-खेद, लाभ-हानी, सुख-दुःख, जीवन-मरण, इ. साऱ्या गोष्टींच्या अभिव्यक्ती लोकसाहित्यात आढळतात. लोकसाहित्य हे लोकांमधल्याच कोणीतरी लोकांच्या भावना व्यक्त करण्यासाठी रचलेले असते.

वरील सर्व विवेचनावरून लोकसाहित्याचे पुढील चार स्थूल प्रकार मानता येतील – (१) लोकगाथा (२) लोकगीत (३) लोककथा आणि (४) प्रकीर्ण.

वरील प्रत्येक प्रकाराचे थोडक्यात विवरण असे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१) लोकगाथा – गाथा म्हणजे प्रशंसात्मक गीत. अशा गाथांची परंपरा भारतात प्राचीन काळापासून चालत आलेली आहे. ऋग्वेदात गाथेचा उल्लेख असून, तिथेही तिला पुराणी म्हणजे प्राचीन असे म्हटले आहे (ऋ. ९.९९.४).

ऐतरेय ब्राह्मणात ऋचा आणि गाथा यांचे वेगळेपण सांगताना म्हटले आहे, की ऋचा ही दैवी अर्थात देवस्तुतिपर असते, तर गाथा ही नाराशंसी अर्थात मनुष्याची प्रशंसा करणारी असते. वेदकाळी गाथा गाणारी अनेक कुळे असावी, असे अनुमान करता येते. गाथांमध्ये काही यज्ञ-गाथाही आढळतात आणि त्या यज्ञकर्त्यांच्या स्तुतिपर असतात. अश्वमेध यज्ञ करणाऱ्या एखाद्या राजाचे उदात्त चरित्र त्यांत संक्षेपाने वर्णिलेले असते. दुष्यंतपुत्र भरत व जनमेजय यांच्या प्रशंसात्मक गाथा ऐतरेय ब्राह्मणांत मिळतात (ऐ. ब्रा. ३९.९ १,२,३,५)

गद्यमय कथा आणि मग त्या कथेचे सारांश सांगणाऱ्या दोन पद्यमय ओळी असे गाथेचे स्वरूप जातकांत व जैन प्राकृतात आढळते.

गाथेचा नाराशंसी हा अर्थ घेऊन निरनिराळ्या भाषांत वीरांच्या स्तुतीचे जे पवाडे गायिले जातात, त्यांनाही गाथा या सदरातच अंतर्भूत करावे लागेल. लोकगाथा किंवा पवाडे यांच्यामध्ये कथानकाला प्राधान्य असते. हे पवाडे समुदायाने गायिले जातात. आल्हा-ऊदल, लोरकी, विजयमल, नयकवा-बनजारा, भरथरी-गोपीचंद, हीर-रांझा, ढोला-मारू, राजा रसालू, विजयसेन, तानाजी, बाजीप्रभू, इ. प्रेमिकांवर आणि वीरपुरुषांवर रचलेली दीर्घकाव्ये लोकगाथा या प्रकारची उदाहरणे होत. लोकगाथा गाणारे लोक संगीताच्या चालीवर आणि वाद्यांच्या तालावर हे पवाडे गातात. त्यांतली वीररसाची उदाहरणे पुष्कळदा अतिशयोक्त असतात. या गाथा मौखिक परंपरेने पिढ्यान् – पिढ्या चालत आलेल्या असतात. अनेक गाथांचे आलोडन करून डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी गाथेचे तीन प्रकार मानले आहेत, ते असे –

(१) प्रेमात्मक गाथा – हीर-रांझा, ढोला-मारू, नयकवा-बनजारा, इ. प्रबंधगीते या प्रकारांत येतात. अशा गीतांतून तरुण-तरुणींचे पराकोटीचे प्रेम आणि ते प्रेम सफल होण्याच्या कामी प्रणयी पुरुषाने केलेली अद्भुत साहसे व सोसलेली पराकोटीची दुःखे वर्णिलेली आढळतात.

(२) वीरकथात्मक गाथा – आल्हा-ऊदल, पाबूजी, गोगा, विजयमल, इ. प्रबंधकाव्ये या प्रकारात येतात. अशा गाथांतून त्या त्या वीरांचे साहसपूर्ण कृत्य वर्णिलेले असते. हे वीरपुरुष गोसंरक्षण, एखाद्या स्त्रीची अत्याचारातून मुक्तता, राजनिष्ठा, अन्यायाचा प्रतिकार, गुलामगिरीविरुद्ध लढा, अशासारखे कोणते तरी दिव्य–भव्य कृत्य करून अजरामर झालेले असतात.

(३) रोमांचकथात्मक गाथा – राजा भरथरी, सोरठी, विजयसेन, राजा रसालू यांच्यावरची प्रबंधगीते या प्रकारात येतात. अद्भुत घटनांचे वर्णन करून श्रोत्यांच्या शरीरावर रोमांच उभे करणे हे अशा गाथांचे वैशिष्ट्य होय. मराठीत तानाजीचा पवाडा व अफझुलखानाचा वध हे पवाडे शरीरावर रोमांच उभे करणारे ठरले आहेत.

लोकगीत – लोकसाहित्यात लोकगीतांना प्रमुख स्थान आहे. लोकगीताच्या व्याख्या अनेक विद्वानांनी अनेक प्रकारे केलेल्या आहेत. डॉ. स. कृ. फडके म्हणतात – ‘ शास्त्रीय नियमांची विशेषशी पर्वा न करता सामान्य लोकव्यवहाराच्या उपयोगासाठी माणसे आपल्या आनंदाच्या उल्लासात ज्या वाणीचा सहज आणि छंदोबद्ध आविष्कार करतात, ते लोकगीत समजावे. ’ प्रा. कुंजविहारीदास म्हणतात – ‘ सभ्य आणि शिष्ट जीवनापासून दूर आणि कमी-अधिक रांगड्या अवस्थेत असलेल्या लोकांची जीवनविषयक अभिव्यक्ती म्हणजे लोकगीत होय. ’ रचनेची द्रुत गती, भाषेचा साधेपणा, साहित्यिक कृत्रिमतेचा अभाव, देश-कालांचे स्थूल चित्रण आणि सार्वजनिक भावना ही लोकगीतांची लक्षणे होत, असे श्री. यदुनाथ सरकार सांगतात. नावे जोडण्याची प्रवृत्ती हे आणखी एक लक्षण श्याम परमार यांनी सांगितले आहे. ते म्हणतात – ही प्रवृत्ती प्राचीनतेची द्योतक आहे. दागिन्यांची नावे, कुटुंबियांची नावे, दैनंदिन व्यवहारातल्या वस्तूंची नावे कित्येक लोकगीतांत येतात आणि ती पुनरावृत्त होत असतात. या नावांमुळे गीतांच्या क्षेत्रांचे ज्ञान होते. यातली कित्येक नावे परंपरेतून आली म्हणून घेतली असाच प्रकार असतो. देशकालानुसार नव्या नावांचाही त्यात समावेश होत असतो.

लोकगीते ही सामान्यपणे समुदायाने गायली जातात. त्यांना एक आंतरिक लय असते. कित्येक लोकगीते नृत्य करीत असताना गायची असतात. त्यामुळे ती तालबद्धही असतात. गीत, नृत्य आणि संगीत अशा तीन प्रकारांनी लोकगीतांची अभिव्यक्ती होत असते.

लोकगीते ही कृषिकर्म, विवाहादी संस्कार, पुत्रजन्म, ऋतुपरिवर्तन आणि मनोरंजन या प्रसंगी गायिली जातात. भारतीय जीवनावर धर्माचा प्रभाव फार मोठा आहे. संस्कार, देवतांची उपासना, व्रतवैकल्ये सण-उत्सव या सर्व गोष्टींच्या मुळाशी धर्म हे प्रधान तत्त्व असते. त्यामुळे अशा प्रसंगी गायिल्या जाणाऱ्या गीतांना मंत्राएवढी प्रतिष्ठा असते.

नवरसांपैकी शृंगार, करुण, वीर, हास्य व शांत हे लोकगीतांचे प्रमुख रस होत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रथम रजोदर्शन, विवाह, डोहाळे, पुत्रजन्म, कजरी, झूमर, इ. प्रसंगी गायिल्या जाणाऱ्या लोकगीतांतून शृंगाराच्या छटा उमटतात. मुलीची पतिगृही पाठवणी, मुलाचे विद्याध्ययनासाठी दूर देशी जाणे, अर्थार्जनासाठी पती दूर देशी गेल्यामुळे त्याचा विरह; तसेच अभिमन्यू, श्रियाळ, चांगुणा, साबित्री यांच्या कथा, इ. गीतांतून करुण रसाचे पाझर वाहतात.

वीरकृत्ये वर्णन करणारी गीते वीर रसाचा परिपोष करतात. विवाहविषयक गीतांतून हास्य रसाची क्वचित उपलब्धी होते. व्रजमंडलात ढकोसले नावाचा एक गीतप्रकार आहे. ही गीते म्हणजे असंबद्ध प्रलाप असतात. ती ऐकताना हसू आल्यावाचून राहात नाही. भजन, निर्गुणी पदे, गंगा, तुलसी, पार्वती, यांची गीते आणि कौटुंबिक जीवनात आत्मसंतोष व्यक्त करणारी गीते ही शांत रसाची उदाहरणे समजावी.

अहीर, दुसाध, चर्मकार, कहार, गोंड, धोबी, कातकरी, धनगर, इ. जातींची जातिविशिष्ट अशी काही गीते आहेत आणि ती त्या जातींपुरतीच मर्यादित आहेत. अशा गीतांना जातिगीते असे म्हणता येईल.

नागपंचमी, मनसा, बहुला, पिडिया, छठीमाता, या देवतांच्या पूजेसाठी आणि स्तुतीसाठी रचलेली गीते ही व्रतगीते होत.

जात्यावरच्या ओव्या, भलरी गीते, ओझी वाहून नेताना समुदायाने गायली जाणारी गीते या सर्वांना श्रमगीते म्हणता येईल. अशा गीतांनी समाज आपले श्रम हलके करीत असतो.

लोकगीतांचे समालोचन – लोकगीतांचे महत्त्व प्रतिपादन करताना डॉ. हजारी प्रसाद यांनी पुढील विचार व्यक्त केले आहेत – ग्रामगीतांचे सारे महत्त्व केवळ त्यांच्या सौंदर्यापुरतेच मर्यादित नाही. आजवर जी एक विशाल सभ्यता विस्मृतीच्या समुद्रात बुडाली होती, तिचे उद्घाटन करणे हे एक फार मोलाचे कार्य आहे. आर्यांच्या आगमनापूर्वी बराच काळ आर्येतरांची एक समृद्ध सभ्यता भारतभर पसरलेली होती. तिच्याच बरोबर अन्य कित्येक छोटया-मोठ्या सभ्यता या विशाल भूभागावर पसरून राहिल्या होत्या. आर्यांनी राजनीतीच्या स्वरूपात भारतवर्ष जिंकून घेतला; पण ते सांस्कृतिक दृष्टया इथल्या मूळ लोकांच्याद्वारे प्रभावित झाले. इथली मूळ सभ्यता वैदिक सभ्यतेहून एकदम भिन्न होती. आजही लोकाचार, स्त्रियांचे आचार, पौराणिक परंपरा, इ. अनेक रूपांत ती विद्यमान आहे. ग्रामगीते या सभ्यतेचे वेद (श्रुती) आहेत. वेदही आपल्या प्रारंभिक काळात श्रुती या नावानेच ओळखले जात. तीही आर्यांच्या महान जातीची गीतेच होती. आणि ती ग्रामगीतांप्रमाणेच ऐकून, आठवून म्हटली जात होती. नंतर वेदांनी लिखित रूप धारण केले; परंतु आमची ग्रामगीते आजही श्रुतीत आहेत. ज्याप्रमाणे वेदांच्या द्वारे आर्यांच्या सभ्यतेचे ज्ञान होते, त्याचप्रमाणे ग्रामगीतांच्या द्वारे आर्यपूर्व सभ्यतेचे ज्ञान होऊ शकते. ग्रामगीतांचे महत्त्व मोहेंजोदडोपेक्षाही अधिक आहे. मोहेंजोदडो सारखे भग्न स्तूप ग्रामगीतांचे भाष्यकार म्हणून कामी येऊ शकतील.

संगीत – लोकसंगीतांची निर्मिती स्वाभाविक आहे म्हणून ते त्याच्यापुरते परिपूर्ण आहे. लोकसंगीतापासूनच शास्त्रीय संगीताची उत्पत्ती झाली, असे मानतात. लोकसंगीताचे विश्लेषण करून जेव्हा ते नियमबद्ध करण्यात येते, तेव्हा ते लोकसंगीत न राहता शास्त्रीय रूप धारण करते. अशा प्रकारे बनलेले शास्त्रीय संगीत हे स्वतः परिपूर्ण बनते. त्याच्या मूळ लोकरूपापेक्षा ते अधिक सुसंस्कृत व व्यवस्थित होते. लोकसंगीतातील स्वरांत कोणता ना कोणता राग लपलेला असतो. पण तो पाहण्यासाठी तशी दृष्टी असावी लागते. रागातील मूळ स्वर कोणते, ते जाणून घेऊन जेव्हा गायक त्यांना पूर्णता प्राप्त करून देतो, तेव्हा शास्त्रीय दृष्टया रागाचे रूप झळाळून निघते. यावरून, लोकसंगीतात लपलेल्या रागाचे विकसित स्वरूप म्हणजे शास्त्रीय राग होय, हे कळून येईल.

लोकसंगीतातील स्वर हे निसर्गनिर्मित असले, तरी त्यांना काही मर्यादाही आहेत. त्यामुळे त्यांच्यांत प्रगती होत नाही.

लोकसंगीताची काही वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे –

(१) साधारणपणे लोकगीतांचे संगीत हे चार-पाच स्वरांत मर्यादित असते. अगदी क्वचित त्यात सहा स्वर आढळतात.

(२) लोकगीते ही लयबद्ध असतात आणि त्यांत लयीचे अनेक प्रकार मिळतात. समान भागांची लय व असमान भागांची लयही त्यांत आढळते.

(३) लोकगीतांच्या संगीताचे स्वर समयानुकूल असतात. प्रातःकाल, मध्याह्न, सायंकाल व रात्र या समयाला साजेसे स्वर त्यांत असतात. शास्त्रीय संगीतातही या गोष्टीला महत्त्व दिलेले आहे आणि कालाला अनुरूप असे रागांचे विभाजन केलेले आहे.

(४) लोकगीतांचे स्वर बहुधा सरळ असतात. पण काही गीतांत संमिश्र रागांचे स्वर आढळतात. आणि हे जोडस्वर अत्यंत मधुर असतात. त्यांचे मिश्रण कलात्मक व अत्यंत स्वाभाविक असते.

(५) लोकगीतांतील स्वरांची रचना ही प्रसंगानुरूप असते. त्या प्रसंगाला अनुरूप असे भाव त्या स्वरांतून प्रगट होतात. उदा० मध्य प्रदेशातल्या काही गावांत बळी देण्याची पद्धत आहे. त्या वेळी जी गीते गातात, त्यांत बीभत्स भावाचा आढळ होतो. त्याचप्रमाणे झल्यावरील गीते गाताना झूल्याच्या आंदोलनाचा भाव त्या गीतांतील स्वरांत स्पष्टपणे प्रतीत होतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(६) काही ठराविक स्वरांत अनेक लोकगीते गायिली जातात. पण गीतांचे शब्द भिन्न असल्यामुळे आणि लय बदलल्यामुळे ते लक्षात येत नाही. स्वररचना केल्यानंतरच ते जाणवत येते.

भारताच्या बहुतेक सर्व राज्यांतील लोकसंगीत हे सरळ व स्वाभाविक आहे. बंगाल व महाराष्ट्र या राज्यांतील लोकगीतांत स्वरवैचित्र्य अधिक आढळते. बहुतेक लोकगीते सप्तकाच्या पूर्वांगात गायिली जातात. त्या मानाने उत्तरांगातील स्वरांचा प्रयोग कमी असतो.

लोककथा – एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत मौखिक परंपरेने चालत आलेल्या गोष्टींना लोककथा म्हणता येईल. अशा लोककथा प्रत्येक समाजात प्रचलित असतात. लोकसाहित्याच्या अध्ययनात लोककथांचे स्थान महत्त्वपूर्ण असून, विविधता आणि प्रचुरता यांच्या दृष्टीनेही त्यांचे मूल्य अधिक आहे. लोककथांचा अंत लागणार नाही. आजवर भारतातल्या प्रादेशिक भाषांमधले जे लोककथांचे संग्रह प्रकाशित झाले आहेत, ते सर्व एकत्र केल्यास महाभारताएवढा त्याचा ग्रंथ होईल. ज्यांचा संग्रह अद्याप झाला नाही, अशा कथांची संख्या कितीतरी अधिक भरण्याचा संभव आहे.

जगात कथेची निर्मिती ही प्रथम भारतातच झाली असे म्हणतात. भारतीय कथासाहित्याने जगातल्या विविध देशांच्या साहित्यावर खूप प्रभाव टाकला आहे. इसापनीती आणि अरेबियन नाइट्स या युरोपीय कथा वाचताना त्यावरचा भारतीय प्रभाव स्पष्ट दिसतो.

भारतातील कथापरंपरा अत्यंत प्राचीन आहे. वैदिक संहितेमध्ये अनेक कथांची बीजे उपलब्ध होतात. ब्राह्मणग्रंथांतल्या पुरूरवा, शुनःशेप, वृशपुरोहित, दध्यङ् आथर्वण या मुळातल्या लोककथाच ब्राह्मणांनी परिष्कृत करून घेतल्या आहेत. नचिकेता, अग्नी व यक्ष, इ. छोट्या छोट्या कथा उपनिषदांतही आढळतात. संहिता व उपनिषदे यांत ज्या कथांचा केवळ नामनिर्देश होतो, त्या कथांचे विस्तृत वर्णन बृहद्देवता व वेदार्थदीपिका यांत दिलेले आढळते. लोककथांचा सर्वांत प्राचीन आणि एकमेव विशाल संग्रह म्हणजे गुणाढ्याची बृहत्कथा हा होय. हा ग्रंथ पैशाची भाषेत लिहिला गेला होता. तो सांप्रत उपलब्ध नाही. त्याचेच अनुवाद बृहत्कथाश्लोकसंग्रह, बृहत्कथामंजरी व कथासरित्सागर या नावाने संस्कृतात उपलब्ध आहेत. पंचतंत्र या कथाग्रंथाचे स्थान तर कथासाहित्यात अद्वितीय आहे. जगातल्या अनेक कथांना पंचतंत्राकडून प्रेरणा मिळाली आहे. हितोपदेश, वेताळपंचविशी, सिंहासनबत्तिशी, शुकसप्तती, कथार्णव, पुरुषपरीक्षा हे संस्कृत भाषेतले आणखी कथासंग्रह होत. पाली भाषेतल्या जातककथा या मुळात लोककथाच होत्या. जैनांच्या चूर्णीकथा याही लोककथाच असून, त्यांना नंतर सांप्रदायिक रूप दिले गेले.

लोककथांची वर्गवारी अनेक पंडितांनी अनेक प्रकारे केली आहे. प्राचीन आचार्यांनी कथांचे वर्गीकरण कथा व आख्यायिका अशा दोनच भागांत केले आहे. कविकल्पनेतून निर्माण होते, ती कथा होय. उदा० बाणभट्टाची कादंबरी व दंडीचे दशकुमारचरित. आख्यायिका म्हणजे ऐतिहासिक घटनेवर आधारलेली कथा. बाणाचे हर्षचरित हे आख्यायिकेचे उत्कृष्ट उदाहरण होय. या आख्यायिकेची कथावस्तू वर्धनवंशाचा प्रसिद्ध पुरुष महाराज हर्ष याच्या जीवनाशी संबंधित आहे.

आनंदवर्धनाचार्यांनी कथेचे तीन विभाग सांगितले आहेत, ते असे –

(१) परीकथा – हिच्यात केवळ इतिहास निबद्ध असतो आणि हिच्यात रसाला विशेष स्थान नसते.

(२) सकलकथा – हिच्यात बीजापासून फलप्राप्तीपर्यंत समस्त कथेचा संनिवेश असतो.

(३) खंडकथा – ही एकदेशप्रधान असते. या कथेतील नायक राजकुलोत्पन्न नसतो; तर तो अमात्य, सार्थक (व्यापारी) किंवा द्विज असतो. कथांचा मुख्य सूर करुण असून, त्यात चार प्रकारचे विप्रलंभविरह, संकटे वगैरे आढळून येतात. त्यांपैकी खंडकथा असते ती कथेच्या मागोमाग जाते, तिचे अनुकरण करते. परंतु परीकथेवर कथा व आख्यायिका या दोन्ही प्रकारांचा प्रभाव आढळतो. या मिश्रणामुळेच तिला परिकथा असे म्हणतात.

हरिभद्राचार्यांनी एक नवे वर्गीकरण प्रस्तुत केले आहे, ते असे –

(१) अर्थकथा – हिच्यात अर्थप्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या बऱ्या-वाईट कृत्यांचे, तसेच साहसांचे व पराक्रमांचे वर्णन असते.

(२) कामकथा – हिच्यात स्त्री-पुरुषांच्या परस्पर प्रेमांचे व तदनुकूल कृत्यांचे वर्णन असते. अशा कथांची संख्या फार मोठी आहे.

(३) धर्मकथा – या प्रकारात धार्मिक आख्याने येतात. अशा कथा ऐकण्याची इच्छा असणाऱ्यांना हरिभद्राने श्रेष्ठ व धार्मिक म्हटले आहे.

(४) संकीर्ण कथा – या विभागात इहलोक व परलोक या दोन्ही कथांचा अंतर्भाव होतो. अशा कथांची इच्छा करणाऱ्या लोकांना हरिभद्राने मध्यम श्रेणीचे लोक म्हटले आहे.

डॉ. अलेक्झँडर क्राप या अमेरिकन प्राध्यापकाने तौलनिक धोरण व स्वतंत्र बाणा कायम ठेवून दि सायन्स ऑफ फोकलोअर या नावाचा ग्रंथ लिहिला आहे. लोकसाहित्याच्या शास्त्रीय विवेचनात या ग्रंथाचे स्थान फार वरचे आहे. लोकसाहित्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कोणत्याही अभ्यासकाला त्याचा फार उपयोग होतो. लोककथेचे (१) परीकथा किंवा अद्‌भुतकथा (२) नर्मकथा (Merry Tale) (३) प्राणिकथा (४) स्थानिक कथा व (५) भटकी कथा, असे पाच प्रकार त्याने सांगितले आहेत. यांतील पहिल्या विभागावरचे भाष्य श्रीमती दुर्गा भागवतांनी अनुवादिले आहे, ते असे –

परीकथेत नायक किंवा नायिका कथेतली मध्यवर्ती व्यक्ती असते. त्या व्यक्तीभोवती अनेक पराक्रमांची, चमत्कारांची किंवा प्रसंगांची उभारणी झालेली असते. या प्रसंगांच्याच सर्वांत लहान पण मूल घटकांना कथाबीजे म्हणतात. कथेतल्या किंवा गीतांतल्या आणि कलाकृतींतल्या या बीजरूप अंशाला शास्त्रीय परिभाषेत कल्पनाबंध (Motif) असे म्हणतात. अनेक कथाबीजांची कथावस्तू किंवा संविधानक तयार होते. या कथावस्तूलाच लोकसाहित्याच्या परिभाषेत कथाविशेष (Tale Type) म्हणतात.

प्रत्येक कथाविशेषात अनेक बदलणारी कथाबीजे एका ठराविक क्रमात गोवलेली आढळून येतात. कथाबीजे बदलली तरी अनुक्रम बदलत नाही आणि म्हणूनच गोष्ट एकच असते, पण तिचे पर्याय मात्र अनेक आढळून येतात.

अद्‌भुतकथा म्हणजे एक कृत्रिम करुण भावनाट्य असते. नायक-नायिका कितीही संकटातून गेली, तरी त्यांचा मृत्यू कथेत होत नाही. शेवटी खलनायकच मृत्यू पावतो व शेवटी नायक-नायिकांचे मीलन होते. अद्‌भुत कथेचे वातावरण गंभीर असून, त्यावर दैवाची छाया पसरलेली असते. नायक शूर असो, नाहीतर मूर्ख किंवा दीन असो, दैवाच्या अनेक अद्‌भुत शक्ती, अतिमानवी वनदेवतांच्या स्वरूपांत किंवा प्राण्यांच्या स्वरूपांत त्यांना मदत करताना दिसतात. नाग, कुत्रा, गाय, बैल, गरुड, पोपट, वगैरे प्राणी या कथांत नायक-नायिकांना नेहेमी साहाय्य करताना आढळतात.

अद्‌भुतकथा, नर्मकथा आणि प्राणिकथा या तीन्ही कथाप्रकारांतील सर्वांत मोठे साम्य हे, की पृथ्वीच्या कुठल्यातरी एकाच विशिष्ट ठिकाणी प्रथम कथा अस्तित्वात येते आणि मग तिचे संप्रसरण अनेक प्रदेशांत अनेक भाषांच्या द्वारे होते. बहुधा कथेचे उत्पत्तिकेंद्र अज्ञात ठिकाणी असते आणि ते हुडकून काढणे हे अतिशय दुष्कर कर्म असते.

डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी कथांच्या वर्ण्य विषयांना अनुलक्षून त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे –

(१) नीतिकथा – लोकसाहित्यात ज्या कथा उपलब्ध होतात, त्यांत मुख्यत: नीतिकथा असतात. नीतिकथांचा उद्देश मुख्यत्वे नीतीचा उपदेश करणे हा असतो. ब्राह्मणवाङ्मयात व उपनिषदांत अनेक नीतिकथा आढळतात. सत्यकाम जाबाल, नचिकेता, देव-मानव-दैत्यांना अनुक्रमे 'दम्यत, दत्त, दयध्वं' असा संदेश देणारा प्रजापती, या साऱ्या उच्च नीतितत्त्वांच्या कथा आहेत. महाभारतातही बऱ्याच नीतिकथा सांगितल्या आहेत. 'असंगाचा संग प्राणाशी गाठ' या म्हणींचे निदर्शन करणारे 'हंसकाकीय' आख्यान महाभारत, जातके, जैनसाहित्य, पंचतंत्र या सर्वांत उद्‌धृत केलेले आढळते. प्राणिकथांचा समावेशही नीतिकथांमध्येच करावा लागेल. महाभारतात कित्येक सुंदर प्राणिकथा, नीतितत्त्वे मनावर बिंबविण्यासाठी सांगितल्या आहेत. पंचतंत्र, हितोपदेश व इसापनीती यांतील प्राणिकथा या पर्यायाने नीतिकथाच आहेत. जातकट्ठकथेत अशा सर्व कथांना गुणकथा असे नामाभिधान केले आहे. हितोपदेशकर्ता तर प्रथमच सांगतो, की– 'कथाच्छलेन बालानां नीतिस्तदिह कथ्यते' (=कथेच्या मिषाने येथे बालांना नीती सांगितली जात आहे.)

(२) व्रतकथा – धर्म हे भारतीय जीवनाचे अविच्छिन्न अंग आहे. धार्मिक कृत्ये आणि विधि-विधाने यांनी भारतीय जीवन ओतप्रोत आहे. धार्मिक क्रिया-कलापामध्ये व्रतांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. प्रत्येक व्रताला कहाणी ही असतेच. कहाणी ऐकल्यावाचून व्रताची सांगता होऊच शकत नाही. व्रतकथा त्या त्या व्रताचे महत्त्व पटवणाऱ्या असतात. त्यामुळे व्रतकथांना पुण्यकथा असेही म्हणतात. व्रतकथेतही नीतीचा सामान्यपणे उपदेश असतो. 'उतू नको, मातू नको, घेतला वसा मोडू नको,' हे व्रतकथांचे मुख्य तत्त्व असते. व्रताच्या पुण्याने व्रतकर्त्याची सर्व संकटे दूर होतात आणि त्याच्या मनकामना पूर्ण होतात, असे व्रतकथांचे आश्वासन आहे. हिंदूंप्रमाणेच जैनांचा व्रतसंभारही फार मोठा आहे. त्यांच्याही प्रत्येक व्रताला कथा असतेच. कथेचा नायक कोणते तरी व्रत करतो आणि त्याच्या पुण्याने पुढील जन्मी राजकुळात किंवा धनिक कुळात जन्म घेतो.

(३) प्रेमकथा – या कथांचा मुख्य विषय प्रेम हा असतो. मातेचे अपत्यावरील प्रेम, भावा-बहिणींचे प्रेम, प्रियकर-प्रेयसीचे प्रेम, पति–पत्नींचे प्रेम आणि त्या प्रेमानिमित्त स्वार्थ-त्याग, हा अशा प्रकारच्या कथांचा विषय असतो. लोककथांमधले दांपत्यप्रेम हे विशुद्ध प्रेम असते. त्याला कामवासनेचा गंधही नसतो. बहुला गायीची कथा, शिवरात्रीव्रतातील हरिणीची कथा, या पराकोटीचे प्रेम व्यक्त करणाऱ्या कथा आहेत.

(४) मनोरंजक कथा – यांचा मुख्य उद्देश श्रोत्यांचे मनोरंजन करणे एवढाच असतो. त्यात नीती किंवा पुण्य यांच्या उपदेशाचा अभाव असतो. गुलबकावली परी, अरेबियन नाइट्स, शुकसप्तती, वेताळपंचविशी, बिरबल–बादशहाच्या कथा, भोजराज–कालिदास यांच्या कथा, तेनाली रामनच्या कथा, हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्व कथासंभार प्राधान्याने मनोरंजन करणारा आहे. धूर्तकथांचा समावेशही या सदरात करावा लागेल. भारतीय लोकसाहित्यात चतुर व धूर्त शर्विलक यांचे मजेदार मिश्रण तयार झाले आहे. कथासरित्सागर व पंचतंत्र यांत अनेक धूर्तकथा आढळतात. दुसऱ्याला ठकवून लुबाडणाऱ्या शर्विलकांच्या कथा त्यांतले साहस आणि विनोद यांच्यामुळे अत्यंत लोकप्रिय झालेल्या आहेत. ठकसेन राजपुत्राच्या कहाण्या सर्वजण चवीने ऐकतात. लहान मुलांना सांगितल्या जाणाऱ्या पारंपरिक कथाही बहुधा मनोरंजकच असतात.

(५) दंतकथा – परंपरेने चालत आलेल्या आख्यायिकांना दंतकथा असे म्हणतात. यांमध्ये इतिहास व कल्पना यांचे मिश्रण असते. या कथांची आधारभूमी इतिहासातली एखादी घटना असते; पण कथाकार त्या घटनेवर आपल्या कल्पनेचे आवरण घालून तिचे वास्तविक रूप झाकून टाकतो. राजा विक्रमादित्य आणि आल्हा–ऊदल या कथा अशा स्वरूपाच्या आहेत. त्या कथांना इतिहासाचा आधार आहे; पण त्यावर कल्पनेची अनेक पुटे चढविली गेली आहेत. सिंहासनबत्तिशी हे या प्रकाराचे एक उदाहरण होय. या कथा स्थानिक व भटक्या अशा उभयविध असतात. स्थानिक दंतकथा त्या त्या क्षेत्राच्या मर्यादित राहतात. उदा० विविध तीर्थांच्या व क्षेत्रांच्या कथा. भटकी दंतकथा ही एका देशातून दुसऱ्या, तिसऱ्या, चौथ्या अशा विविध देशांत भ्रमण करीत असते. या भ्रमंतीत तिचा पेहराव बदलला तरी आत्मा तोच राहतो. कथासरित्सागरातील चंद्रहासकथा ही भटकत भटकत जगभर पसरली आहे.

भारतातल्या तीर्थक्षेत्रांच्या कथाही दंतकथाच असून, त्या विपुल आहेत. त्याही स्थानिकच असतात. दुर्गा भागवत म्हणतात – इथे भीमाने नदीला बांध घातला, इथे रामाने वाळूचे लिंग स्थापले, इथे सीतेने तांदूळ धुतले, इथे गणपतीने रावणाला फसवून आत्मलिंग खाली टाकले, इथे शकुंतलेचे बाळपण गेले, इथे ऋष्यशृंग जन्मला, इथे अगस्त्यांचा आश्रम होता, वगैरे आख्यायिका जिथे जाल तिथे ऐकू येतील. एवढेच नव्हे, तर एकच आख्यायिका शंभर ठिकाणी चिकटलेली आढळेल.

(६) पौराणिक कथा–नल-दमयंती, हरिश्चंद्र, शिबी, दधीची, यांच्या कथा या मुळात लोककथाच होत्या. पुराणकारांनी त्या परिष्कृत करून आपल्या ग्रंथांत समाविष्ट करून घेतल्या. सृष्टीची उत्पत्ती आणि प्रलय या कथाही मुळात लोककथाच होत्या. पुराणकारांनी त्यांच्यावरही संस्कार केले. बहुतेक आदिवासी जमातींत उत्पत्ती-प्रलयाच्या कथा आढळतात. त्या अजून पुराणांच्या बाहेरच राहिल्या आहेत. दैवतकथा, नक्षत्रकथा, दैविकथा, यांचाही समावेश पौराणिक कथांत करता येईल. देवतांच्या हातांतील आयुधांच्याही कथा आहेत, त्याही पुराणकारांनी लोकांतूनच घेतल्या असल्या पाहिजेत.

लोककथांचे समालोचन–लोककथांमध्ये विशुद्ध प्रेमाचा आविष्कार दिसतो. या प्रेमाला वासनेचा गंध नसतो. मानवाच्या अभिजात प्रवृत्तीशी या कथांचे साहचर्य असते. त्या शाश्वत सत्याला सन्मुख असतात. लोककथांना लोकमंगलाची व लोककल्याणाची कामना असते. ‘ सर्वेऽत्र सुखिनः सन्तु ’ हे त्यांचे ध्येय असते. व्रतकथेच्या शेवटी असे वाक्य नेहमीच येते– ‘अमक्या तमक्याचे अमुक तमुक व्रत करून कल्याण झाले, तसे तुमचे आमचे होवो.’

प्रकीर्ण – लोकसाहित्याच्या या प्रकारात म्हणी, वाक्प्रचार, न्याय, कूटे, इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो. उखाण्यांचा प्रकार दैवतकथांप्रमाणे अत्यंत प्राचीन आहे. मात्र त्यांची बैठक केवळ धार्मिक व सांस्कृतिक नाही. तो एक साहित्यिक प्रकार मानला गेला आहे. ज्ञान व मनोरंजन हेच त्यांचे ध्येय. ब्रह्मोद्य, प्रश्न, कूट आणि प्रहेलिका हे उखाण्याला संस्कृत प्रतिशब्द आहेत. हिंदी व बंगालीमध्ये त्यांना पहेली असे म्हणतात; तेलुगूत विडिकथ व तमिळ-मलयाळम्‌मध्ये विडिकदै आणि विडिकदा असे म्हणतात. उखाण्याचा विस्तार प्रश्नोत्तरांतून होतो. प्रश्नात रूपकाच्या आश्रयाने एखादी गोष्ट लपविलेली असते. उत्तरात या गोपनाचा स्फोट करून मूलार्थ व्यक्त केला जातो. उखाण्यांची सांस्कृतिक पार्श्वभूमी विशाल व विविधतेनी भरलेली असते. उखाण्याचे ऋग्वेदातील (ऋ. १.१६४.२-३) एक उदाहरण असे–

प्रश्न – सातजण एक एकचाकी रथ फिरवतात. तो रथ एक सात नावाचा घोडा ओढतो. त्या चाकाला विनधावेच्या आणि फिरताना न थांबणाऱ्या अशा तीन आऱ्या आहेत. त्या चाकात सारे जीव राहतात.

उत्तर– सात पुरोहित यज्ञाच्या योगाने सूर्याचा रथ चालवतात. हा रथ सात घोडे ओढतात. सूर्यरथाच्या चाकाला तीन ऋतूंच्या तीन आऱ्या आहेत. या ऋतुचक्रात सारे जीव जगतात.

महाभारतातील यक्षप्रश्न हे एक प्रकारचे उखाणेच आहेत. असेच यक्षप्रश्न बौद्ध सुत्तनिपातात आहेत. त्यात सुचिलोमयक्ष बुद्धाला प्रश्न विचारतो आणि बुद्ध त्यांची उत्तरे देतो. विवाहप्रसंगी वधू-वर उखाण्यांतून एकमेकांची नावे घेतात. अनेक जातींत लग्नप्रसंगी वरपक्ष व वधूपक्ष हे एकमेकांना उखाणे घालून त्यांची फजिती उडविण्याचा प्रयत्न करतात. अशा उखाण्यांत सांकेतिक अश्लीलता, शिवराळपणा व भांडकुदळपणा हे दुर्गुण आढळतात. गर्भाधान, पुंसवन व नामकरण या संस्कारप्रसंगी, तसेच अन्य मंगल प्रसंगी स्त्रिया नवऱ्याचे नाव घेतात. गोंडांमध्ये मृताच्या अंत्यक्रियेतही उखाणे घालण्याची प्रथा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. शाहीरांमध्ये कलगी व तुरा असे दोन संप्रदाय असतात. कलगीवाले कवनातून एखादा उखाणा घालतात व तुरेवाले त्याचे कवनातूनच उत्तर देतात. (उखाणा पाहा)

म्हणी व वाक्संप्रदाय– मार्मिकपणे शक्य तितक्या मोजक्या शब्दांत सत्य प्रकट करणारे वचन म्हणजे म्हण होय. हे सत्य प्रकट करण्याच्या तीन तऱ्हा संभवतात–(१) अपूर्ण स्थितीचे दिग्दर्शन. उदा० गाढव गूळ हगते, तर डोंबारी भीक का मागते ? (२) अतिशयोक्तीचे वर्णन. उदा० मेल्या म्हशीला मणभर दूध. (३) रूपकाचा आश्रय. उदा० उडदामाजी काळे गोरे, काय निवडावे निवडणारे !

पद्यमय शैली व आखूड आकार असे म्हणीचे स्वरूप असते. म्हण ही एकाच व्यक्तीच्या विचारातून व उच्चारातून तयार होते. कोणती म्हण कोणी, कुठे व केव्हा उच्चारली, हे सांगणे कठीण असते. म्हण ही मुख्यतः सार्वत्रिक अनुभवावर आधारलेली असते. असे अनुभव समान संस्कृतीच्या पातळीवर अनेक लोकांना आलेले असल्यामुळे जगभर निरनिराळ्या लोकसमूहांत एकाच अर्थाच्या म्हणी सापडू शकतात. प्रांतोप्रांतींच्या समान म्हणींचा विचार करता बऱ्याचशा म्हणी हवामानावर आधारलेल्या दिसतात. पावसाची नक्षत्रे व त्यावर आधारलेला शेतकऱ्यांचा सामान्य अनुभव हा या सादृश्याचा मूलाधार असतो. पुढील तीन म्हणी या निरनिराळ्या प्रदेशांत उत्तरा नक्षत्राविषयी निर्माण झालेल्या आहेत.

(१) बरस लगे ऊतरा, अन्न न खावै कूतरा (उ. प्र.)
(२) जो बरसे ओत्रा, तो धान नही खाय कुत्रा (गुजरात)
(३) पडतील उत्तरा, तर अन्न न खाय कुत्रा.

एका हाताने टाळी वाजत नाही, या म्हणीचा उगम 'न ह्येकेन हस्तेन तालिका सम्पद्यते' या चाणक्याच्या उक्तीत असून, ही म्हण बहुतेक भारतीय भाषांत आढळते.

'सुनेच्या हातून भांडे फुटले, तर ते सोन्याचे; सासूच्या हातून फुटले, तर ते मातीचे.' या म्हणीचे पर्याय कानडी, गुजराती, तेलुगू व हिंदी या भाषांत सापडतात.

'ऊन पाण्याने घरे जळत नाहीत' या म्हणीचा गुजराती पर्याय असा –'उना पाणिए घेर नही बले'. 'उचलली जीभ लावली टाळ्याला' या म्हणीचा गुजराती पर्याय असा – 'उपाडी जीभ ने लगाडी तालवे'. 'कुणब्याची बेटी, गव्हाची रोटी, मळल्याने तिला चव येती' ही मराठी म्हण उत्तर प्रदेशात 'गेहूँ का आटा और अहीर का बेटा, जितना कूटा उतना मीठा' अशी येते.

सद्गुण आणि दुर्गुण, शहाणपणा व मूर्खपणा, निर्धनता व सधनता, धनी आणि चाकर, मित्र आणि शत्रू, सास्वा-सुनांचे संबंध, लेक आणि जावई, शारीरिक व्यंगे, स्त्रियांची वैशिष्ट्ये, त्याचप्रमाणे आळस, राग, इ. मनोविकार; तसेच नम्रता, विनय, गर्व, शौर्य, साहस, भीरुता, इ. विषयांवर सामान्यपणे म्हणी निर्माण झालेल्या आहेत.

प्रत्येक समाजाचे काही वैशिष्ट्य असते. त्याचे आचार, विचार, परस्परसंबंध नाती-गोती, कुटुंबव्यवस्था व सामाजिक चालीरीती यांना अनुसरून निरनिराळ्या लोकसमाजांत निरनिराळ्या म्हणी प्रचलित होतात. काही म्हणी जातिवैशिष्ट्ये दाखवणाऱ्या असतात. म्हणींचे महत्त्व विशद करताना श्री. य. रा. दाते लिहितात – 'म्हणी हा कोणत्याही समाजाचा आदर्श होय. त्यांत त्या समाजाचे पूर्णपणे प्रतिबिंब पडलेले आपल्या दृष्टीस पडेल इतके त्यांचे क्षेत्र व्यापक व सर्वांगपरिपूर्ण आहे. अशा दृष्टीने कोणत्याही देशाच्या वाङ्मयात त्या राष्ट्रात प्रचलित असलेल्या म्हणी हा त्या वाङ्मयाचा एक बहुमोल ठेवा असतो. तो अत्यंत पुरातन काळापासून परंपरागत चालत आलेला ठेवा नीट जतन करून तो पुढील पिढीच्या हवाली करणे हे त्या राष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे.'

वाक्संप्रदायांना वाक्प्रचार, सूक्ती किंवा लोकोक्ती असेही म्हणतात. भारतात लोकोक्तिवाङ्मय फार प्राचीन असून, ते आशयाने परिपूर्ण व साहित्यगुणांनी नटलेले आहे. त्यात भारतीय प्रज्ञेचे अत्यंत विकसित असे स्वरूप दिसते. सूक्तिसाहित्याविषयी श्री. विंटरनिट्झ यांचे मत श्रीमती दुर्गा भागवत यांनी नोंदवले आहे, ते असे – कथा-काव्यादिकांपेक्षा सुभाषितांत भारताने अद्वितीय असा आदर्श निर्माण करण्यात यश मिळवले आहे आणि जागतिक वाङ्मयाला कायमचे ऋणी करून ठेवले आहे. ऋग्वेदातही वाक्प्रचारांचा किंवा सूक्तींचा आढळ होतो. उदा० –

न वै स्त्रैणानि सख्यानि सन्ति । (ऋ. १०. ९५. १५)
अर्थ – स्त्रियांशी सख्य हे सख्य नव्हे.

अग्निनाग्निः समिध्यते । (ऋ. १. १२. ६)
अर्थ – अग्नीपासून अग्नी प्रदीप्त होतो.

न ऋते श्रान्तस्य सख्याय देवाः । (ऋ. ४. ३३. ११)
अर्थ मनुष्य कष्ट करून दमल्यावाचून देव त्याच्या साहाय्याला येत नाहीत.

कृतं मे दक्षिणे हस्ते जयो मे सव्य आहितः ।
(अथर्व. ७.५२. ८)
अर्थ – कृत म्हणजे कृतयुग किंवा प्रयत्न हा माझ्या उजव्या हातात असून, जय हा माझ्या डाव्या हातात आहे.

अदीनाः स्याम शरदः शतम् । (यजु. ३६. २४)
अर्थ – आम्ही दीन न होतां शंभर वर्षे जगू.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'चक्षुर्वै सत्यम्' हा वाक्प्रचार बृहदारण्यकात आला आहे (५. १४. ४) आणि तोच भारतात सर्वत्र रूढ झाला आहे.

मन एव मनुष्याणां कारणं बन्धमोक्षयोः ।
(मैत्री उप. ३५. ६. ३४)

अर्थ – मनुष्याच्या बंधाला आणि मोक्षाला मन हेच कारणीभूत आहे.

विद्ययामृतमश्नुते ।
(ईश. ११)

अर्थ – विद्येने अमृतत्वाचा लाभ होतो.

नायमात्मा बलहीनेन लभ्यः ।
(मुंडक. ३. २. ४)

अर्थ – बलहीन पुरुषाला आत्मलाभ होऊ शकत नाही.

अशा कितीतरी लोकोक्ती वेदांत व उपनिषदांत आढळून येतात.

मनःपूतं समाचरेत् ।
(मनु. ६. ४६)

अर्थ – मनाला पवित्र वाटेल त्याचे आचरण करावे.

यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः । (मनु. ३. ५६)

अर्थ – जिथे स्त्रियांचा आदर, सन्मान होतो, तिथे देवता रमतात.

बालादपि सुभाषितं ग्राह्यम् ।
(मनु. २. २३९)

अर्थ – चांगले बोल लहान मुलाने जरी उच्चारले असतील, तरी त्यांचा स्वीकार करावा.

अशा कितीतरी सूक्ती मनुस्मृतीत आढळून येतात. 'अनिर्वेदः श्रियो मूलम् ।' (=असंतोष हा समृद्धीचे मूळ होय). 'मृदुर्हि परिभूयते' (= मऊ लागले, की माणसे कोपराने खणतात). 'मरणान्तानि वैराणि' (=शत्रुत्व हे मरणाने संपते). 'कालो हि दुरतिक्रमः' (=कालगती कोणाला चुकत नाही).

'सन्तश्चारित्र्यभूषणाः ।' (=सज्जनांचे भूषण म्हणजे त्यांचे चारित्र्य). अशी वरीच सुभाषिते रामायणातही आढळतात.

महाभारत हे तर सूक्तींचे आगरच आहे. पुढील काही सूक्ती तिथे आढळतात – 'आचारप्रभवो धर्मः' (=धर्म हा आचारातून उत्पन्न होतो). 'राजा कालस्य कारणम्' (=राजा हाच काल निर्माण करणारा आहे). 'यः क्रियावान् स पण्डितः' (=जो ज्ञान आचरणात आणतो, तो पंडित होय). 'करोति यादृशं कर्म तादृशं प्रतिपद्यते' (=करावे तसे भरावे). 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते' (=या जगात ज्ञानासारखी पवित्र वस्तू नाही).

कित्येक वाक्प्रचारांचा पुराणांतील कथाप्रसंगांशी किंवा विशिष्ट ऐतिहासिक घटनांशी संबंध असतो. तो मूळ कथाप्रसंग किंवा ती घटना माहीत असली, तरच त्या लोकोक्तीचे मर्म समजते. त्याची काही उदाहरणे अशी–

अर्धचंद्र देणे (एखाद्याला हाकलून देणे) असा एक वाक्प्रचार प्रसिद्ध आहे. हा शब्दप्रयोग कथासरित्सागरातल्या एका उपकथेत आहे. त्या कथेत एका मूर्ख ब्राह्मणाला गणिकेच्या घरी जमलेल्या काही धूर्तांनी तर्जनी व अंगठा यांनी बनणाऱ्या अर्धचंद्राने म्हणजेच त्याच्या मानेवर तो अर्धचंद्र टेकवून हाकलून दिले.

'तेल गेले, तूप गेले, धुपाटणे हाती आले' हा वाक्प्रचारही कथासरित्सागरातल्या एका कथेवरून आला आहे. 'पडत्या फळाची आज्ञा' या वाक्प्रचारामागे पुढील कथा आहे. मारुती सीतेला शोधण्यासाठी अशोक वनात गेला आणि तिथे त्याला सीता दिसली. मारुतीला त्या वेळी खूप भूक लागली होती. आसपासच्या झाडावर खूप फळे होती. 'मी फळे खाऊ का ?' असे मारुतीने विचारले. सीता म्हणाली, 'हे वन रावणाच्या मालकीचे आहे. तेव्हा एखादे फळ पडलेले असेल, तर ते तू खा.' मारुतीने ठीक आहे म्हटले, वृक्ष गदगदा हालवून फळे पाडली व मग ती खाल्ली. या वाक्प्रचाराचा आशय असा, की एखाद्या लहानशा गोष्टीसाठी मोठ्यांची आज्ञा घ्यायची आणि मग आपल्या मनातल्या बऱ्याच गोष्टी करायच्या.

'सुताने स्वर्गाला जाणे' या वाक्प्रचाराचा उगम तै. ब्राह्मणामधल्या चित्रा व पुनर्वसू या नक्षत्रांच्या उत्पत्तिकथेत आहे.

'ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी' या वाक्प्रचाराविषयी श्रीमती दुर्गा भागवत लिहितात – या म्हणीचा संबंध मला कोकणातल्या कुणबी गोष्टीत आढळून आला. एका म्हातारीला तिची सून नीट खायला प्यायला घालीत नसे. मुलगा असायचा कामाला बाहेरगावी. सासूने भूक लागली म्हणून म्हटले, की सून म्हणायची, 'टाळ्या वाजवून नाच, गा, म्हणजे मग भाकरी देईन.

मग म्हातारी गाणे म्हणायची –

माळावरच्या पुता ऐक माझी कथा
भाकरीच्या तुकड्यासाठी सुंदरा नाचवता

असे नाचल्यावर तिला चतकोर भाकरी मिळायची. हे एकदा मुलाच्या कानी गेले. तेव्हा तो बायकोच्या न कळत घरी आला आणि माळ्यावर लपून बसला. आईने गाणे म्हटले व भाकरी घेतली, तेव्हा तो खाली उतरला. बायकोला त्याने दटावले व मारले. तेव्हापासून ती सासूला नीट जेवायला देऊ लागली. या कथेच्या काठियावाडी पर्यायात भाकरीऐवजी ताकासाठी सून सासूला नाचवी, असे वर्णन आहे.

'दोर कापून टाकणे' याचा अर्थ एखादी विशिष्ट गोष्ट करण्यावाचून अन्य मार्ग किंवा उपाय नसणे, म्हणजे तीच विशिष्ट गोष्ट करायला भाग पडणे. हा वाक्प्रचार एका ऐतिहासिक घटनेतून आला आहे. सिंहगडावरच्या युद्धात तानाजी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मालुसरे हा धारातीर्थी पडला. त्या घटनेमुळे मराठ्यांचे सैन्य कच खाऊन सैरावैरा पळू लागले. तानाजीचा भाऊ सूर्याजी. त्याला त्या लढाईचा मर्दुमकीने शेवट करायचा होता. म्हणून तो पळणाऱ्या सैनिकांना गर्जून म्हणाला. ' ज्या दोरावरून तुम्ही वर चढला, तो दोर मी आता कापून टाकला आहे. आता कड्यावरून उडचा घेऊन मरा आणि तसे मरायचे नसेल, तर शत्रूला प्राणपणाने टक्कर द्या. '

' जीवावरचे बोटावर निभावले '–मोठी हानी होणार होती, पण थोडक्या हानीवर निभावले, असा या वाक्प्रचाराचा अर्थ आहे. मोगल सरदार शाहिस्तेखान शिवाजीमहाराजांचे पारिपत्य करण्यासाठी दक्षिणेत आला असता पुण्याच्या लालमहालात त्याने मुक्काम केला. शिवाजीमहाराजांना ही वार्ता कळली आणि त्यांनी रात्रीच्या अंधारात लालमहालात घुसून खानाच्या पलंगापर्यंत मजल मारली. महाराजांच्या भयाने शाहिस्तेखान खिडकीतून पळू लागला. तो पसार होणार एवढ्यात महाराजांनी त्याच्यावर तलवारीचा वार केला; पण तो वार शाहिस्तेखानाच्या छातीवर होण्याऐवजी त्याच्या हातावरच बसला. त्याची बोटे तुटली व प्राण मात्र वचावले.

' अनागोंदी कारभार ' हा वाक्प्रचारही ऐतिहासिकच आहे. कोणाचा कोणाला मेळ नसणे, अवाच्या सव्वा खर्च होणे, जे एकाला द्यायचे ते दुसऱ्याला दिले जाणे अशा अस्ताव्यस्तपणाला उद्देशून हा वाक्प्रचार वापरतात. याचा उगम असा –

हंपीजवळ तुंगभद्रेच्या काठी आनेगुंदी नावाचे एक गाव होते. विजयनगरची स्थापना होण्यापूर्वी तिथे एक लहानसे राज्य होते. राज्य सामान्यच होते; पण राजाचा बडेजाव मोठा होता. आपण कोणीतरी खूप मोठे आहो, कुबेरासारखे धनपती आहो, हे दाखवण्यासाठी तो राजा पृथ्वीवरील सर्व देशांचा जमाखर्च आपला म्हणून मांडीत असे. म्हणजे तो सर्व देशांचे उत्पन्न आपल्या खजिन्यात जमा म्हणून दाखवी आणि तेच खर्च म्हणून त्या त्या देशाच्या नावे टाकी.

लोकसाहित्याचे समालोचन – लोकसाहित्याची प्रकृती सरस, सरल व अकृत्रिम असते. त्यात कोणत्याही रसाचा विभावानुभावांनी परिपोष झालेला नसतो; पण स्थायी भाव मात्र दृष्टिगोचर होत असतो. विशेषतः शृंगार व करुण हेच रस दिसतात. उपमा, रूपक, उत्प्रेक्षा व श्लेष हे अलंकार अधून मधून दिसतात; पण त्यांची जाणीवपूर्वक योजना केलेली नसते. प्रास व यमके बहुधा असतात. पुष्कळसे गीतसाहित्य छंद व यमक यांचा विधिनिषेध न बाळगता लिहिलेले असते. त्यात एक प्रकारची लय असते व त्यामुळे त्यातली संगीतात्मकता जाणवते. उपमा मुख्यत्वे गुणसादृश्यावर आधारलेल्या नसून, आकृतिसादृश्यावर आधारलेल्या असतात. पाठीला उपमा द्यायची तर ती धोब्याच्या पाठीची दिली जाते. कपोलांचा फुगीरपणा व मृदुता मालपुव्याच्या उपमेने दाखविली जाते. स्तनांना ते लहान असताना जंगली बोर, विकसित झाल्यावर वाटोळी कैरी व पूर्ण विकसित झाल्यावर सिंदूर ठेवण्याचे गोलाकार पात्र ही उपमाने योजिली जातात. उपमानांची निवड आवतीभवतीच्या सृष्टीतून केली जाते. त्यात सतीसाध्वीप्रमाणेच कर्कशा स्त्रियांचेही चित्र ठळकपणे रेखाटलेले असते. सासू, सून, आई, वहीण, वधू, नणंद, भावजय, जाऊ, ही स्त्रीची रूपे लोकसाहित्यात आढळतात. सास्वा-सुना व नणंदा-भावजया यांची नाती सामान्यपणे विरोधाचीच असतात. बहीण व आई यांची रूपे मात्र उदात्त व प्रेमळ अशी दिसतात. त्या त्या काळाचे समाजजीवन लोकसाहित्यात चमकून जाते.

लोकसाहित्यात इतिहासाचेही कण विखुरलेले असतात. ही गोष्ट लोककथांमध्ये विशेषत्वाने प्रत्ययास येते. ' पन्हाळ दुर्गी राजा भोज ' अशी एक मराठी लोककथा सुरू होते. इ. स. च्या पहिल्या शतकाच्या सुमारास यादववंशी भोज नामक राजा करवीर प्रदेशावर राज्य करीत होता, असे इतिहास सांगतो.

मोगलांच्या सत्ताकालात या देशात कशा प्रकारची अस्वस्थता आणि जुलुमजबरदस्ती पसरली होती, त्याचे चित्रण अनेक लोकगीतांत पाहायला मिळते. मोगल कसे स्त्रीलंपट होते व ते हिंदू स्त्रियांवर कसे अत्याचार करीत, ते कुसुमावतीच्या एका गीतावरून दिसते.इ.स.१८५७सालच्या स्वातंत्र्ययुद्धाचे पडसादही उमटलेले दिसतात. गोपीचंद या राजपुरुषाची गीते भारतात सर्वत्र आढळतात. पुष्कळ दिवसांपर्यंत गोपीचंद ही काल्पनिक व्यक्ती आहे, असे लोक समजत होते. पण डॉ. ग्रिअरसन यांनी अनेक सबळ पुराव्यानिशी गोपीचंद ही ऐतिहासिक व्यक्ती असल्याचे सिद्ध केले आहे. राजस्थानच्या लोकसाहित्यात अनेक ऐतिहासिक सत्ये आढळून येतात. पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, बंगाल, इ. प्रदेशांतल्या अनेक लोकगाथा ऐतिहासिक सामग्री उपलब्ध करून देतात. भारताच्या स्वातंत्र्यसंग्रामात बटोहिया, फिरंगिया, इ. लोकगीते निर्माण झाली. ती ऐकल्यावर इंग्रजांनी भारतीय जनतेवर कसकसे अन्याय व अत्याचार केले, त्याची झलक दिसून येते. महाराष्ट्रातल्या ओवीवाङ्मयातही इंग्रजी राज्यातल्या विपरीत परिस्थितीची ओझरती चित्रे आढळतात.

लोकसाहित्य म्हणजे काही भूगोलाचे वर्णन करणारी पुस्तके नव्हेत; पण तरीही लोकसाहित्यातून भूगोलविषयक कितीतरी सामग्री उपलब्ध होते.उत्तर प्रदेशातल्या पूर्वभागातून गंगा, यमुना, शरयू व शोण या नदी – नदांची नावे आणि काशी, प्रयाग, अयोध्या, मिर्झापूर, पाटणा, जनकपूर, ही नावे अनेकदा येतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ढोलामारूच्या प्रेमगीतांतून अनेक नगरांच्या परिस्थितीचा पत्ता लागतो. मराठी लोकसाहित्यात महाराष्ट्रातली तीर्थक्षेत्रे तर आढळतातच; शिवाय दक्षिणेच्या पांड्य राजांचाही उल्लेख येतो. कोणत्या देशांत कोणत्या वस्तू चांगल्या बनतात, तेही कळून येते. महाराष्ट्रातली वधू पैठणी किंवा बनारसी शालू नेसते. ती आपल्या साडीवर कर्नाटकी कशिदा काढायला सांगते. तिला शिंदेशाही तोडे, कोल्हापुरी साज आणि धारवाडी खण या वस्तू आवडतात. पूजासाहित्यासाठी मलयगिरीच्या चंदनाला विशेष महत्त्व असते. मराठी शिलेदार भीमथडी तट्टावर बसून अटकेवर झेंडा लावायला निघतो. उ. प्रदेशातले शौकिन लोक मघई पान खातात. लग्नात वऱ्हाडी माणसासाठी गोरखपुराहून हत्ती मागवला जातो व त्याची झूल पाटण्याहून मागवलेली असते.

लोकसाहित्यात रंगांचे वैचित्र्यही आढळून येते. रंगांचे उल्लेख सौंदर्यवृद्धी आणि अलंकारिक योजना यांच्यासाठी केले जातात. लाल, हिरवा, निळा, पिवळा, पांढरा आणि सावळा या रंगांची आवड दिसून येते. लाल रंग हा अन्य रंगांपेक्षा लोकमानसात विशेष प्रिय ठरला आहे. प्रियकर आपल्या प्रियतमेची चुनडी लाल रंगाने रंगवून घेतो. स्त्रियांना कुंकू लालभडक आवडते. प्रियतमेकडून प्रियकराला लाल पगडी पाठवली जाते. राजस्थानी स्त्रीला आपली देवी लाल शेंदरी वस्त्रांनी विभूषित केलेली आवडते. मैथिली स्त्रीला लाल वस्त्र नेसून नवजात शिशूला पाजावेसे वाटते. प्रियकराला आपल्या प्रेयसीने लाल पलंगावर शेज करावी असे वाटते. हिरवा रंग हा निसर्गाचा खास रंग आहे. सर्व भारतीय लोकसाहित्यात कृष्णाला पीतांबर नेसवलेला दिसतो. मैथिली लोकगीतांत कृष्णाची बांसरी हिरव्या वेळूची असते. त्याच्या कपाळी लाल चंदनाचा टिळा असतो. भोजपुरी लोकगीतांमध्ये लाल व कुसुंबी हे रंग आवडते असतात. पंजाबी स्त्रीला आसमानी रंगाचा घागरा विशेष आवडतो.

वृक्ष, वेली, फळे आणि फुले यांचेही उल्लेख लोकसाहित्यात आढळतात. आंबा, डाळिंब, महुआ, लिंब हे वृक्ष लोकजीवनाचे सहचर असतात.

लोकसाहित्यात जे समाजचित्रण आढळते, ते सामान्यपणे सत्य असते. माणसांची राहणी, आचार-विचार, खाणेपिणे, रीति-रिवाज यांचे वास्तव चित्र लोकसाहित्यात पाहायला मिळते. पुत्रजन्माचा आनंद दिसतो, तर मुलगी झाल्याबद्दल चिंता आणि विषाद दिसतो. मुलीच्या लग्नाची चिंता सर्व आई-बापांना ग्रासत असते. तरुण पुरुष आपले नशीब काढण्यासाठी दूर देशी गेलेले आणि त्यांच्या तरुण भार्या विरहाच्या आगीत जळत असताना आढळतात. नणंदा घरात आपल्या भावजयीला सुख लागू देत नाहीत. स्त्री आपल्या पतीबरोबर शेतीच्या कामात भाग घेते. पतीला शेतात न्याहारी पोचवण्याचे काम तिचेच असते. नागपंचमीच्या सणाला माहेरी जाण्याची नववधूला उत्कंठा असते. गोठ्यात गायी-बैल, पडवीवर राघू, परसात विहीर आणि घरात धान्याच्या कणग्या असे तिचे घर असते किंवा असे घर तिला हवे असते. त्या घरात सांजवात लागते आणि पै-पाहुणे ओसरीला येऊन टेकतात. धुण्या-पाण्यासाठी पाणवठ्यावर गेलेल्या ग्रामवधू एकमेकींजवळ सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असतात.

लोकसाहित्यात जनतेच्या धार्मिक भावनाही प्रतिबिंबित झालेल्या दिसतात. गंगा आणि तुळस या भारतीय स्त्रियांच्या आदरणीय देवता होत. लोकसाहित्यात त्यांचा नामनिर्देश सर्वत्र आढळतो; त्याचबरोबर अनेक देवदेवतांचे उल्लेखही असतात. महाराष्ट्रातल्या लोकसाहित्यात पंढरपुराबद्दल विशेष आस्था दिसून येते. काशीचे ब्राह्मण विद्वान व धार्मिक असतात, अशी लोकसाहित्याची धारणा आहे. लोकसाहित्यात नैतिक सदाचरणाला मान आहे, सत्याची प्रतिष्ठा आहे, स्वर्गमोक्षाची आकांक्षा आहे, पुनर्जन्मावर विश्वास आहे, ईश्वराच्या दयेबद्दल खात्री आहे आणि ‘लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु’ अशी विश्वमंगलाची कामना आहे. [ब्र. लो. सा. अ.; लो. सा. रू.; भारतीय लोकसाहित्य, श्याम परमार, १९५४; हिं. सा. बृ. इ. १६; लो. सा. वि.; महाराष्ट्र वाक्संप्रदाय कोश—य. रा. दाते, चिं. ग. कर्वे, १९४७; पृथिवीपुत्र; लोकसाहित्य की भूमिका—डॉ. कृष्णदेव उपाध्याय, १९५७; कुमार गंधर्व व महेश नारायण सक्सेना –संमेलनपत्रिका – लोकसंस्कृति विशेषांक, १९४४]

लोकाचार्य

(इ. स. चे १३ वे शतक) विशिष्टाद्वैताचा किंवा श्री संप्रदायाच्या तेंगलाई (दक्षिण) शाखेचा प्रवर्तक. याचे आडनाव पिल्लै असे असून, याच्या पित्याचे नाव वडक तिरुवीथी पिल्लै असे होते. लोकाचार्याने विशिष्टाद्वैताच्या तत्त्वज्ञानावर तमिळ भाषेत अठरा ग्रंथ किंवा रहस्ये लिहिली आहेत. मुमुक्षुपडी, प्रमेयशेखर, नवरत्नमाला, तनिप्रणव, द्वय, अर्थपंचक, सारसंग्रह, तत्त्वत्रय, संसारसाम्राज्यम्, तत्त्वशेखर इ. त्यांची नावे आहेत. त्यांपैकी अर्थपंचक, तत्त्वत्रय व तत्त्वशेखर हे ग्रंथ प्रमुख असून, त्यांची संस्कृतमध्ये भाषांतरे झाली आहेत.

अर्थपंचक हा ग्रंथ वैष्णव दैवतांविषयी आहे. तत्त्वत्रय हा ग्रंथ तत्त्वज्ञानात्मक असून, विशिष्टाद्वैताच्या चित्, अचित् व ईश्वर या तत्त्वांचे त्यात विवरण केलेले आहे. तत्त्वशेखर हा ग्रंथही पंथाच्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करणारा आहे. याची चार प्रकरणे असून, त्यांत विष्णूचे सर्वश्रेष्ठत्व सांगितले आहे; तसेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आत्मा व मोक्ष यांविषयीही विवरण केले आहे. प्रपत्तिद्वारा श्रीविष्णूचे कैंकर्य=संपूर्ण दास्य प्राप्त करून घेणे म्हणजे मोक्ष होय, असे लोकाचार्यांचे मत आहे. [श्री. रोमा चौधुरी – बी. सी. लॉ व्हॉल्यूम, भाग १, १९४५]

लोकेश्वर एक बोधिसत्त्व. याच्या मूर्ती अनेक ठिकाणी सापडल्या आहेत. बिहारमधील कहलगाव येथे लोकेश्वराची जी मूर्ती मिळाली आहे, ती पद्मासन घालून ध्यानावस्थेत बसलेली आहे. या मूर्तीचे दोन्ही हात मांड्यांवर ठेवलेले आहेत. तिच्या अंगावर विविध अलंकार असून, भोवतीची प्रभावळही अलंकृत आहे. तिचे मुखमंडल कोमल व सुंदर आहे. नालंदा येथे सहा हात असलेली लोकेश्वराची एक पाषाणमूर्ती सापडली आहे.

लोकेश्वराची पाषाणमूर्ती – बोधगया

बँकॉक येथील राष्ट्रीय संग्रहालयात लोकेश्वराच्या तीन मूर्ती ठेवलेल्या आहेत. त्यांपैकी एक करड्या रंगाच्या पाषाणाची आहे. ही मूर्ती बोधगया येथील आहे आणि तिचे पालकालीन शिल्पाशी साम्य आहे. दुसरी मूर्ती काळ्या ब्राँझची असून, उभी आहे. या मूर्तीच्या डाव्या हातात कमळ, गळ्यात रत्नहार, बाहूंवर बाजूबंद आणि मस्तकी मुकुट आहे.

पाल शैलीतील आणखी एक ब्राँझची मूर्ती त्या संग्रहालयात आहे. ही मूर्ती धड व शिर अशा स्वरूपात आहे. तिचे बाहूही खंडित आहेत. तिच्या गळ्यात अलंकार, बाहूंवर बाजूबंद व मस्तकावर केशकलाप आहे. मूर्तीचा चेहरा आकर्षक आहे. जावामध्ये बोरोबुदूरजवळ चंडी वनोनच्या मंदिरात लोकेश्वराची एक सुंदर मूर्ती आहे.

लोकेश्वर नावाचा मूर्तींचा दुसरा एक प्रकार आहे. बौद्ध देवता पद्मपाणी अवलोकितेश्वर आणि हिंदू देवता शिव, विष्णू व सूर्य याच्या संयोगाने शिल्पकारांनी शिवलोकेश्वर, लोकेश्वर विष्णू व सूर्यलोकेश्वर अशा संयुक्त देवता निर्माण केल्या आहेत. अशा प्रकारच्या मूर्ती पूर्व भारतात, विशेषत: बंगालमध्ये आढळतात. कलकत्त्याच्या आशुतोष संग्रहालयात शिवलोकेश्वराची पितळेची प्रतिमा आहे. ती द्विभुज असून, द्विदल पद्मावर, समपादस्थानक अवस्थेत उभी आहे. तिच्या उजव्या हातात कपाल व डाव्या हातात त्रिशूळ आहे. तिच्या अंगावर अलंकार अगदी मोजके असून, जटामुकुटावर ध्यानी बुद्ध अमिताभ याची लहानशी प्रतिमा आहे. त्याच संग्रहालयात एका भग्न शिल्पखंडावर सूर्यलोकेश्वराची प्रतिमा आहे. तिचा फक्त वरचा अर्धा भाग शाबूत आहे. मूर्तीच्या दोन हातांत पूर्ण विकसित कमळे असून, जटामुकुटावर ध्यानी बुद्ध अमिताभ याची लहान प्रतिमा आहे. बंगालमधील सुरोहोर येथे विष्णु-लोकेश्वराची एक मूर्ती सापडली आहे. ही मूर्ती चतुर्भुज असून, तिच्या दोन हातांत पूर्ण विकसित कमळे व बाकीच्या दोन हातांत गदा आणि चक्र आहे. तिच्या मस्तकावर सात नागफण्यांचे छत्र असून, मधल्या फणीवर ध्यानी बुद्ध अमिताभ याची लहान प्रतिमा आहे. मूर्तीच्या दोन्ही बाजूंना आयुधपुरुष (पद्म व शंख) उभे आहेत. ही मूर्ती इ. स. च्या १२व्या शतकातील असावी. अशा प्रकारच्या विष्णु-लोकेश्वराच्या मूर्ती आणखीही सापडल्या आहेत. त्यांतल्या काही मूर्ती षड्भुज आहेत, तर काही द्वादशभुज आहेत. [डे. हिं. इ.; भा. क. बि. दे.; क. सा. ई. ए.]

लोकेश्वराची पाषाणमूर्ती – जावा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोचन (इ. स. च्या १७ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक कवी आणि मध्यकालीन भारतीय संगीताचा जाणकार. हा दरभंगा जिल्ह्यातल्या उजान या गावी राहत असे. मिथिलेचा राजा महीनाथ ठाकूर व त्याचा धाकटा भाऊ नरपती ठाकूर यांचा हा आश्रित होता. त्याने संस्कृत भाषेचे सखोल अध्ययन केले होते. तो अभ्यास पुरा झाल्यावर याने प्राचीन व अर्वाचीन संगीताचा अभ्यास करून त्यात प्रावीण्य मिळविले. याने नरपती ठाकुराच्या आज्ञेने रागतरंगिणी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचे पाच तरंग असून, त्यांत अनेक राग-रागिण्यांची उत्पत्ती व त्यांच्याविषयींच्या अनेक कथा-वार्ता सांगितल्या आहेत. रागाची उदाहरणे म्हणून त्याने पूर्वकालीन व समकालीन मैथिली कवींच्या काव्यातले उतारे घेतले आहेत. याव्यतिरिक्त याचा संगीतसंग्रह नावाचा आणखी एक ग्रंथ असल्याचे उल्लेख मिळतात; पण ग्रंथ मात्र उपलब्ध होत नाही. [हिं. सा. बि.]

लोचनदास (इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्यमतानुयायी भक्त व ग्रंथकार. याने काही ठिकाणी सुलोचन किंवा त्रिलोचन असेही आपले नाव दिले आहे. बंगाल प्रदेशातल्या वर्धमान (बरद्वान) जिल्ह्यातील कोग्रामी याचा जन्म झाला. कमलाकरदास हे त्याचे वडील आणि सदानंदी ही माता होय. लोचनाच्या गुरूचे नाव नरहरी सरकार असे होते.

लोचनाने गुरूच्या आज्ञेवरून चैतन्यमंगल नावाच्या ग्रंथाची रचना केली. हा ग्रंथ सूत्रखंड, आदिखंड, मध्यखंड आणि शेषखंड अशा चार खंडांत विभागलेला आहे. त्यात पयार, लघुत्रिपदी, दीर्घत्रिपदी, मध्यतरजा, करुणा, इ. छंदांचा वापर केलेला आहे. काव्य म्हणून हा ग्रंथ श्रेष्ठ आहे. याव्यतिरिक्त लोचनाने दुर्लभसार नामक ग्रंथ लिहिला आहे व राय रामानंदाच्या संस्कृत जगन्नाथवल्लभ नाटकाचा समवृत्त अनुवाद केला आहे. याची बरीच पदे पदकल्पतरूत समाविष्ट आहेत. लोचनाने या पदांच्या रूपाने धामाली नामक एका नव्याच शैलीला जन्म दिला आहे. [हिं. वं. वै. क.; चै. म. ब्र. सा.]

लोचना एक बौद्ध देवता. ही तथागताच्या कुळातली असून, वैरोचन नामक ध्यानी बुद्धाची शक्ती आहे. तिच्या रूपध्यानाचे वर्णन अद्वयवज्रसंग्रहात केलेले आहे, ते असे — चंद्रमंडलावर आग्नेय कोनदलात, शुक्ल बीजाक्षरातून उद्भवणारी व शुभ्र वर्णाची अशी ही लोचना देवी आहे. चक्र हे तिचे अभिधान चिन्ह आहे. ती पृथ्विधातुस्वरूपा, तथागतकुलोद्भवा व मोहरक्ता आहे.

हिची चित्रे व मूर्ती दुर्मिळ आहेत. तिच्या तिबेटातील प्रतिमेचे एक नेपाळी चित्र तेवढे उपलब्ध आहे. [इं. बु. इ.]

लोचना – नेपाळी चित्रावरून काढलेले रेखाचित्र

लोटणषष्ठी एक काम्य व्रत. श्रावण महिन्यात षष्ठीच्या दिवशी मुले दीर्घायुषी व्हावी म्हणून बंगाली स्त्रिया हे व्रत करतात. यात षष्ठी देवीला लोटणांचा म्हणजे लाडवांचा नैवेद्य दाखवायचा असतो.

लोणार वऱ्हाडातील एक प्राचीन क्षेत्र. पुराणांत याला विरजक्षेत्र असे म्हटलेले आहे. एका थंड ज्वालामुखीच्या मुखाजवळ हे गाव वसलेले आहे. त्या ज्वालामुखीच्या मध्यभागी एक खारे तळे आहे. तिथे जवळच एका दरीत लवणासुर राहत असे. विष्णूने दैत्यसूदन नामक अवतार घेऊन त्याला ठार मारले. त्याची स्मृती म्हणून या गावी दैत्यसूदनाचे मंदिर बांधलेले आहे. मंदिराच्या दर्शनी भागावर सूर्याची प्रतिमा आहे. मंदिराचा गाभारा व मंडप हे दोन्ही तारकाकृती आहेत. गाभाऱ्यात मूर्तीसाठी चौथरा केलेला आहे. मंदिराच्या बाहेरच्या बाजूवर विपुल नक्षीकाम आहे; पण ते सुबक नाही. तिथे विष्णू, गणपती, ब्रह्मा, भैरव, सरस्वती, परशुराम, राम, कृष्ण, वराह, इ. देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आहेत. तलावाच्या काठी व आसपासही अनेक मंदिरे आहेत; पण ती सर्व भग्नावस्थेत आहेत. [वि. मुं. रा. प.; न्यू इं. अॅं., जुलै-डिसें. १९४७]

लोणारी महाराष्ट्रातील एक जात. या लोकांना कधी कधी गाढव लोणारी आणि रेडा लोणारी असे म्हणतात. मुळात हे लोक मराठा असावे. पण चुना आणि कोळसे तयार करण्याचे काम स्वीकारल्यापासून यांची वेगळी जात बनली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असावी. बेळगाव जिल्ह्यात यांचे मीठलोणारी आणि चुनेलोणारी असे दोन भेद आहेत. या दोन भेदांतील लोकांत रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. अहमदनगर, पुणे आणि सोलापूर या जिल्ह्यांत त्यांचे खुद्द लोणारी आणि कडू किंवा अकरमासे लोणारी असे दोन पोटभेद आहेत. यांच्यांतही रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही.

जातिविवेक या ग्रंथात या लोकांना मल्लट पुरुष व आवर्त स्त्री यांची संतती मानले आहे. संस्कृत भाषेत या लोकांना सौमिक असे नाव आहे. एके काळी ते मीठ तयार करण्याचा उद्योग करीत असावे, असे दिसते. महाभारतात लोणाऱ्यांचा उल्लेख असून, झाडे तोडून व जाळून ते कोळसा तयार करतात, असे तिथे म्हटले आहे. यावरून कोळसा तयार करणे, हाच त्यांचा मूळचा व्यवसाय होता, असे कळते.

पुणे जिल्ह्यातील लोणारी आपण माणदेशातून पुण्याला आलो व मूळचे आपण लिंगायत होतो, असे सांगतात.

उद्योगधंदे – लोणारी शब्दातील लोण = मीठ, यावरून या लोकांचा वंशपरंपरागत व्यवसाय मीठ तयार करण्याचा असावा, असे वाटते. बेळगाव जिल्ह्यातील लोणारी, अजूनही हाच धंदा करतात. पण बरेचसे लोणारी सांप्रत चुना व कोळसा तयार करतात. काही लोणारी शेतकरी असून, काही मजुरीही करतात.

हे लोक शेळ्या, मेंढ्या व कोंबड्या यांचे मांस आणि मासे खातात.

आडनावे – या लोकांत चोरगे, ढोणे, दणगेकर, राक्षे, बोंद्रे, करचे, तांबे, झाडगे, इ. आडनावे प्रामुख्याने आढळतात. पुणे जिल्हा सोडल्यास इतरत्र, समान आडनावाच्या लोकांत लग्नसंबंध होत नाही.

विवाहप्रथा – या लोकांत पुरुषाला आते किंवा मावस बहिणीशी लग्न करता येत नाही; मामे बहिणीशी मात्र करता येते. सर्वसाधारणपणे मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. हे काम जातीतील मध्यस्थामार्फत होते. मुलामुलींची पत्रिका पाहतात व ती जुळल्यास लग्न पक्के करतात. पत्रिका केलेल्या नसल्यास मुलामुलींचे नक्षत्र ठरवतात. त्यासाठी सत्तावीस नक्षत्रांना अनुसरून तांदुळाचे सत्तावीस पुंजके घालतात. प्रत्येक पुंजक्यावर पैसा व सुपारी ठेवतात व त्याला हळदकुंकू वाहतात. मग एका लहान मुलीला त्या पुंजक्यांवर ठेवलेल्या सुपाऱ्यांपैकी कोणतीही एक उचलायला सांगतात. ती ज्या पुंजक्यावरची सुपारी उचलील त्या पुंजक्याचे जे नक्षत्र, तेच मुलाचे नक्षत्र, असे ठरवतात. याप्रमाणेच, मुलीचेही नक्षत्र ठरवतात. आणि दोघांचीही नक्षत्रे जुळल्यास लग्न पक्के करतात. ब्राह्मण पुरोहित लग्नाचा मुहूर्त काढून देतो व लग्नात पौरोहित्यही तोच करतो. लग्न ठरल्यावर साखरपुडा करतात. देवक बसवणे, वरधावा म्हणजे नवऱ्या मुलाला वधूच्या घरी नेणे, सीमांतपूजन, कन्यादान, रुखवत, साडे व सप्तपदी हे लग्नातील प्रमुख विधी होत. लग्नाच्या वेळी वधूवरांना वांबूच्या शिप्तरात किंवा वधूला पाटावर आणि वराला दोराच्या वेटोळ्यावर उभे करतात. सप्तपदी हा लग्नातील आवश्यक विधी होय.

लग्नापूर्वी मुलीचा जातीतील पुरुषाशी संबंध आल्यास, त्याच्याशीच तिचे लग्न लावतात. त्यासाठी अशा पुरुषाला काही प्रायश्चित्त करावे लागते व पंचायतीला दंड भरून ज्ञातिभोजनही द्यावे लागते. अशा पुरुषाला कडू किंवा अकरमासे समजतात.

विधवाविवाह कोणत्याही महिन्याच्या वद्य पक्षात होतो. लग्नात ब्राह्मण पुरोहित पौरोहित्य करतो.

देवधर्म – हे लोक वारकरी, शैव किंवा वैष्णव पंथाचे आहेत. ते ब्राह्मणांच्या सर्व देवदेवतांना भजतात व त्यांचे सर्व सणउत्सव पाळतात. तसेच ते आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, काशी, इ. तीर्थक्षेत्रांच्या यात्रा करतात. पटकी आणि देवी यांच्या साथीच्या वेळी ते मरीआई आणि शीतलादेवी यांना पूजतात.

यांच्यांत जातपंचायत असून, जातीतील तंटे-बखेडे तिच्यामार्फत सोडवले जातात.

मृतिकप्रथा – हे लोक प्रेते पुरतात किंवा जाळतात. देवी आणि कुष्ठ रोग यांनी मेलेल्यांना आणि लहान मुलांना पुरतात. पुरताना मृताला खड्डयात बसल्या स्थितीत ठेवतात आणि मग त्याच्यावर माती लोटतात. माणूस मरण पावल्यावर लगेच त्याला गरम पाण्याने स्नान घालून, नव्या कपड्यात गुंडाळतात व तिरडीवर ठेवतात. सौभाग्यवती स्त्री मरण पावल्यास तिला नवी साडीचोळी नेसवतात व तिच्या कपाळी मळवट भरतात. स्मशानाच्या अर्ध्या वाटेत तिरडी खाली ठेवतात आणि त्या जागी एक लाडू व पैसा ठेवतात. प्रेत स्मशानात चितेवर ठेवल्यावर मृताचा उत्तराधिकारी क्षौरपूर्वक स्नान करतो; नंतर आपले उत्तरीय पाण्यात भिजवून ते मृताच्या तोंडात पिळतो. मग तो चितेला अग्नी देतो. चिता अर्धी जळल्यावर तो मातीचे मडके पाण्याने भरून खांद्यावर ठेवतो आणि चितेभोवती तीन प्रदक्षिणा घालतो. प्रत्येक फेरीच्या वेळी तो मडक्याला एक भोक पाडतो आणि तीन फेऱ्या पूर्ण झाल्यावर मडके पाठीमागे फेकून बोंब मारतो. तिसऱ्या दिवशी मृताच्या अस्थी व रक्षा गोळा करतात आणि दहनाच्या जागी गोमूत्र आणि शेणसडा शिंपडतात. नंतर स्मशानबली देतात. दहाव्या दिवशी दर्शपिंडी करतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात व दान देतात. चौदाव्या दिवशी, मृत स्त्री किंवा पुरुष असेल त्याप्रमाणे एका स्त्रीला किंवा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुरुषाला जेवायला घालतात. याप्रमाणे वर्षभर, दरमहा त्याच स्त्रीला किंवा पुरुषाला जेवायला बोलावतात. पितृपक्षात ते सर्व पितरांना उद्देशून श्राद्ध करतात. [ट्रा. का. बाँ.]

लोथल गुजरातमधल्या अहमदाबाद जिल्ह्यात, खंबायतजवळ असलेले एक स्थान. या स्थानाला आता पुराणवस्तु-संशोधकांच्या दृष्टीने बरेच महत्त्व प्राप्त झाले आहे. इ. स. १९५५पासून या ठिकाणी उत्खनन सुरू झाले असून, तिथे प्राचीन



चित्रांकित मुद्रा – लोथल

संस्कृतीचे असंख्य अवशेष सापडले आहेत. त्यांत एका सुबद्ध नगराची रूपरेखा दिसून येते. लहान-मोठे आखीव रस्ते, लहान-मोठी घरे, सांडपाणी वाहून जाण्यासाठी लहान-मोठे नळ, गटारे व कुंड्या अशी सगळी व्यवस्था तिथे आढळते. त्यावरून हडप्पा व मोहेंजोदडो येथील सिंधुसंस्कृतीसारखीच संस्कृती इथे नांदत असावी, असे अनुमान करता येते. लोथलमधील काही घरे कच्च्या विटांची, तर काही पक्क्या विटांची दिसतात. तिथे विटा भाजायची भट्टीही सापडली आहे.

लोथल येथे सापडलेल्या हजारो वस्तूंमध्ये खापरे, मणी, मुद्रा व सोन्याचे दागिने आहेत, त्याचप्रमाणे मण्यांना छिद्रे पाडण्यासाठी तांब्याचे साधन, शिप किंवा शंख यापासून बनवलेला कोळंबा, हाडाचा गुण्या ही उपकरणेही आहेत. त्या वस्तुसंभारात तांब्याची छिन्नी, गज, पस्तरे, कटचारी, बाणांची टोके, इ. वस्तूही मिळाल्या आहेत.

इथे सापडलेल्या मुद्रांवर काही अक्षरे दिसतात आणि एखाद्या प्राण्याचे चित्रही दिसते. इथे तयार झालेला माल दूर देशी पाठवताना त्याच्या गसडीवर छाप उठवण्यासाठी त्या मुद्रांचा उपयोग केला जात असावा. इथल्या कुंभारांनी विविध आकारांची गाडगी मडकी बनवली होती. त्यांच्या खापरांवर पशुपक्ष्यांची सुंदर चित्रे काढलेली दिसतात. त्या खापरांमध्ये काळी-तांबडी खापरेही मिळाली आहेत. अशी काळी-तांबडी खापरे हडप्पा व मोहेंजोदडो येथील उत्खननांत सापडलेली नाहीत. त्यावरून लोथल येथील संस्कृती निर्भेळ सिंधुसंस्कृती नसून, तिथे अन्य काही लोकांनीही वसाहती केलेल्या असाव्या, असे संशोधकांचे मत आहे.

इथल्या नगरात विटांचे ओटे बांधलेले दिसतात. ते ओटे होम हवनासाठी बांधलेल्या वेदी असाव्या, असे संशोधकांचे अनुमान आहे. गावाजवळच प्रेते पुरण्याची जागा सापडली आहे. त्या जागी अनेक मानवी सांगाडे सापडले असून, त्यांच्या जवळ मडकी, थाळ्या, कटोरे, इ. भांडीही ठेवलेली आढळतात.

नगराच्या बाहेर विटांचे एक बांधकाम आढळले. तो तलाव असावा, असे संशोधकांना प्रथम वाटले. पण त्याला पायऱ्या नव्हत्या. मग तो गोदीचा बंधारा आहे, असे ठरले. त्याची लांबी ७१० फूट व रुंदी १२० फूट आहे. भरतीच्या वेळी पाणी आत घेण्यासाठी त्याला पूर्वेकडे मोठा दरवाजा आहे व पाणी बाहेर काढण्यासाठी दक्षिणेला एक मार्ग ठेवलेला आहे. या गोदीत व्यापारी नौका आल्यानंतर त्या बांधून ठेवण्यासाठी दगडी खांब व छिद्रयुक्त दगडही तिथे आढळतात. यावरून लोथल हे प्राचीन काळी समुद्रापासून दूर नसावे, असे वाटते. त्या काळी साबरमती नदी लोथलच्या जवळून वाहत असावी. सांप्रत तिचे पात्र दूर गेले आहे. लोथलचे लोक नौकानयनात कुशल होते



गोदीचा बंधारा – लोथल

आणि तिथल्या बंदरातून परदेशांशी मोठा व्यापार चालत असे, असा निष्कर्ष संशोधकांनी काढला आहे.

लोथल येथील उत्खननाच्या पाच स्तरांत दोन भिन्न युगांतील अवशेष आढळले आहेत. अत्यंत प्राचीन काळातील ही नगरे खूप मोठी व समृद्ध असावी. महापुरामुळे ती नष्ट झाली असतील. कालांतराने तिथे पुन्हा वसाहती झाल्या. मात्र त्यांतील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नगरे लहान आहेत. त्या युगातले लोक समृद्ध नसावे, असे वाटते. पाहा – उत्खनित संस्कृती. [गुजरात]

लोदी राजघराणे (इ. सः १४५१–१५२६) दिल्लीच्या तख्तावरून राज्य करणारे शेवटचे सुलतान घराणे. हे लोदी अफगाण वंशाचे होते. या घराण्यातील काही लोक इ. स. च्या १० व्या शतकात मुलतानच्या आसपास येऊन वसले होते. इ. स. च्या १३ व्या शतकात दिल्लीवर तुर्कांची सत्ता असताना काही लोदी पुरुषांनी बल्बनच्या हाताखाली चाकरी केली होती. इ. स. १३४१ मध्ये लोदी घराण्यातील मलिक शाहू याने मुलतानवर स्वारी करून तिथल्या सुभेदाराला ठार मारले. पण मुहंमद तुघलुकने ताबडतोब तिकडे सैन्य पाठवून त्याचा बंदोबस्त केला. त्यानंतर मलिक शाहूच्या वंशजांनी व्यापार सुरू केला. मलिक शाहूचा नातू मलिक बहराम हा मुलतान येथे सुभेदार मलिक मर्दान दौलत याच्या पदरी नोकर होता. त्याचा मुलगा मलिक सुलतान शाह लोदी हा खिज्रखान सय्यद याचा सेनापती होता. खिज्रखानाचा शत्रू मल्लू इक्बाल खान याला सुलतान शाहाने ठार मारल्यामुळे खूष होऊन खिज्रखानाने त्याला इस्लामखान ही पदवी व सरहिंदची सुभेदारी दिली. मुबारक शाहा सय्यद याच्या कारकिर्दीत इस्लामखानाने खोखर व मोगल यांना प्रतिकार करताना मोठा पराक्रम गाजवला. त्याने आपला पुतण्या बुहलोल याला आपला वारस नेमल्यामुळे तो सरहिंदचा सुभेदार झाला.

बुहलोल लोदी पूर्वी घोड्यांचा व्यापार करीत होता. त्याने काही उत्तम घोडे सुलतान मुहंमदशाहाला विकले आणि त्यांची किंमत म्हणून बुहलोलला एक परगणा मिळाला. त्या परगण्यात सुलतानाविरुद्ध बंडाळी माजली होती. बुहलोलने त्या परगण्यावर स्वारी करून खूप लुटालूट केली व तो काबीज केला. सुलतानाने मग त्याला अमीर बनवले. इस्लामखानाच्या मृत्यूनंतर तो सरहिंदचा सुभेदार झाला आणि त्याने लवकरच पंजाबचा बहुतेक भाग आपल्या सत्तेखाली आणला. सुलतान मुहंमदशाह दुबळा असल्यामुळे त्याने बुहलोलची सत्ता मान्य केली. पुढे माळव्याचा सुलतान महमूद खिलजी याने दिल्लीवर स्वारी केली तेव्हा सुलतान मुहंमदशाहाने बुहलोल लोदीला आपल्या मदतीला बोलावले. बुहलोल ताबडतोब धावून गेला आणि त्याने खिलजीला पिटाळून लावले. त्यामुळे सुलतान खूष झाला आणि त्याने बुहलोलला आपला पुत्र मानले व खान-ए-खानान ही पदवी दिली.

पंजाबात लोदींचे बल खूप वाढल्यामुळे बुहलोल लोदीने इ. स. १४४३ साली दिल्लीवर स्वारी केली; पण त्याला त्या वेळी दिल्ली जिंकता आली नाही. इ. स. १४४५ मध्ये सुलतान मुहंमद शाह मरण पावला. नंतर त्याचा मुलगा अलाउद्दीन हा दिल्लीचा सुलतान झाला. पण तो नालायक असल्यामुळे तिथे अंदाधुंदी माजली. इ. स. १४४७ साली बुहलोल लोदीने पुन्हा दिल्लीवर स्वारी केली; पण तीही अपेशी ठरली. त्यानंतर सुलतान अलाउद्दीन बदायूंलां जाऊन विलासात मग्न झाला. त्याचा वजीर हमीदखान याने बुहलोल लोदीला बोलावून दिल्लीचे तख्त त्याला बहाल केले. बुहलोल नामधारी सुलतान बनेल व आपण स्वतःच सर्व सत्ता चालवू, अशी हमीदखानाची कल्पना होती. बुहलोल लोदी एप्रिल १४५१ मध्ये दिल्लीच्या तख्तावर बसला व त्याने बुहलोल शाह गाझी हे नाव धारण केले. पुढे लवकरच त्याने हमीदखानाला कपटाने कैद करून त्याला ठार मारले. सय्यद सुलतान अलाउद्दीन बदायूं येथेच राहिला व इ. स. १४७८ साली मरण पावला.

बुहलोल लोदी (इ. स १४५१–१४८९)–सय्यद सुलतानाच्या दुबळेपणामुळे दिल्लीच्या आसपासचे अमीर व सुभेदार स्वतंत्रपणे कारभार करू लागले होते. बुहलोलने त्यांच्यावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा उद्योग प्रथम सुरू केला. त्याने मेवात, संभल, कोइल, साकेत, इटावा, रपडी, भोंगाव व ग्वाल्हेर या परगण्यांवर स्वाऱ्या केल्या. तिथले सुभेदार त्याला शरण आले व त्यांनी बुहलोलला खंडणी दिली. त्याने मुलतान व माळव्यातील अल्हनपूर या परगण्यांवरही स्वाऱ्या केल्या; पण त्या मात्र निष्फळ ठरल्या. बुहलोलची सर्वांत मोठी कामगिरी म्हणजे जौनपूरची मोहीम ही होय. इ. स. १३९४ पासून शर्की घराण्याने तिथे स्वतंत्र राज्य स्थापले होते. त्या घराण्यातील पुरुष स्वतःला सय्यद सुलतानांचे वारस समजत होते. लोदी घराण्याने दिल्लीवर सत्ता स्थापलेली त्यांना सहन झाली नाही. म्हणून महमूद शर्कीने इ. स. १४५१ मध्ये प्रचंड सैन्यासह दिल्लीवर स्वारी केली. बुहलोल त्या वेळी मुलतानकडे निघाला होता; पण तो परत आला आणि त्याने नारेला येथे महमूदचा पराभव केला. पुढे महमूदशाह, त्याचा मुलगा मुहंमदशाह व त्याचा भाऊ हुसेन यांनी बुहलोलचा नाश करण्यासाठी सतत प्रयत्न केले. पण शेवटी बुहलोलच्या शौर्यामुळे व रणकौशल्यामुळे त्याचा जय होऊन जौनपूरचे राज्य इ. स. १४८६ मध्ये त्याच्या सत्तेखाली आले. त्याने आपला पुत्र बारबकशाह याला ते राज्य दिले. मृत्यूपूर्वी बुहलोल याने आपल्या राज्याचे विभाग करून ते नात्यातल्या पुरुषांना वाटले. त्यात राजपुत्र आलमखान याला माणिकपूर मिळाले व बुहलोलच्या बहिणीचा मुलगा काला पहाड याला भरइच मिळाले. नातू आझम हुमायूनला त्याने लखनौ व काल्पी ही शहरे दिली. खान जहान लोदीला बदायूं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि युवराज निजाम खान याला पंजाब, दिल्ली व गंगा-यमुनांचा दुआब हे प्रदेश दिले. अशा प्रकारे त्याने एक अफगाण ... देशात निर्माण केले.

इ. स. १४८९ मध्ये त्याने ग्वाल्हेरवर स्वारी करून राजा मानसिंह याच्याकडून खंडणी वसूल केली. त्या मोहिमेवरून परत जात असता साकेतपासून १५ मैलांवर मिलावली येथे आजारी पडून सुलतान बुहलोल लोदी मरण पावला. तो शूर योद्धा व कुशल सेनापती होता, तसाच प्रजाहितदक्ष व दयाळू शासक होता. तो चारित्र्यवान व धार्मिक वृत्तीचा होता, तसाच परधर्मसहिष्णूही होता. त्याचा शत्रू हुसेन शर्की व त्याची राणी यांना त्याने चांगल्या रीतीने वागवले.

बुहलोल लोदीला थाटामाटाची हौस नव्हती व आढयताही नव्हती. अफगाण अमीर व सरदार यांच्याशी तो बरोबरीच्या नात्याने वागे. सर्वांशी मिळूनमिसळून, मित्रत्वाने वागल्यामुळेच त्याला अफगाणांचे पूर्ण साहाय्य मिळाले व तो आपली सत्ता दृढ पायावर प्रस्थापित करू शकला.

सिकंदरशाह (इ. स. १४८९ – १५१७) – बुहलोलचा तिसरा पुत्र निजामखान याची आई एका हिंदू सोनाराची मुलगी होती. त्यामुळे त्याला सुलतानपद देणे काही अफगाण सरदारांना मान्य नव्हते. बुहलोलचा नातू आझम हुमायून किंवा पुत्र बारबक याला राज्य मिळावे असे त्यांना वाटत होते. पण निजामखानाच्या पक्षाचा जय होऊन तो सिकंदरशाह म्हणून तख्तावर बसला. बुहलोलच्या सर्व पुत्रांत तोच कर्तबगार होता. त्याने लगेच सर्व विरोधी गटांचा बंदोबस्त केला.

जौनपुरचा राजा बारबक याने आपली सत्ता मानून निष्ठापूर्वक राज्य करावे, अशी सिकंदरशाहाची इच्छा होती; पण बारबकने त्याची सत्ता मानली नाही. त्यामुळे सिकंदरशाहाने त्याच्यावर स्वारी करून त्याचा पराभव केला. पण त्याने बंधुप्रेमामुळे बारबकलाच जौनपूरच्या गादीवर पुन्हा बसवले. मात्र तिथली महत्त्वाची अधिकारपदे त्याने आपल्या मर्जीतल्या माणसांना दिली. पण बारबकला ते राज्य सांभाळता न आल्यामुळे शेवटी सिकंदरने ते आपल्या ताब्यात घेतले. हुसेन शर्की बिहारमध्ये जाऊन राहिला होता. त्याने आपले राज्य परत मिळवण्याचा पुन्हा प्रयत्न केला. पण सिकंदरने त्याचा दारुण पराभव केल्यामुळे तो बंगालमध्ये पळून गेला. बिहार प्रदेशावर सिकंदरची सत्ता प्रस्थापित झाली.

सिकंदरशाहाने आसपासच्या अनेक राज्यांवर स्वाऱ्या करून आपली सत्ता तिथे स्थापण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याला सर्व ठिकाणी यश आले नाही. ग्वाल्हेरचे राज्य त्याला जिंकता आले नाही. धोलपूरचा राजा विनायक देव याचा पराभव करून सिकंदरने इ. स. १५०२ मध्ये धोलपूर जिंकले. त्यानंतर त्याने मांड्रेल, उटगिर व नरवर ही राज्ये घेतली. इ. स. १५१० मध्ये त्याने चंदेरीचा किल्ला घेतला. त्याच वर्षी नागोरचा राजा मुहंमदखान याने सिकंदरची सत्ता मान्य केली. सिकंदराला माळव्यावर मात्र प्रभुत्व प्रस्थापित करता आले नाही.

दिल्ली ही जुनी राजधानी मोडकळीस आली होती आणि लष्करी दृष्टीने फारशी उपयुक्त राहिली नव्हती. म्हणून सिकंदरशाह इ. स. १४९९ मध्ये संभल येथे राहू लागला. तिथे चार वर्षे वास्तव्य केल्यानंतर त्याने इ. स. १५०४ साली आग्रा येथे नवे नगर वसवले व तिथे आपली राजधानी स्थापली. बयाणाचा अमीर सुलतान शरफ याने प्रथम सिकंदरशाहाला आग्रा व भोवतालचा प्रदेश देण्याचे मान्य केले होते; पण नंतर तो नाकबूल झाल्यामुळे सिकंदरने तो प्रदेश इ. स. १४९१ साली जिंकून घेतला.

सिकंदरशाह उत्तम प्रशासक होता. त्याने सर्व सत्ता स्वतःच्या हाती केंद्रित करून राज्यकारभारात शिस्त निर्माण केली. अफगाण सरदार व अमीर यांनी सुलतानापुढे नमून वागावे व त्याच्या आज्ञा पाळाव्या, असा आदेश त्याने दिला. त्यांच्या जमाखर्चावर नियंत्रण घालून, गैरहिशेबाबद्दल त्यांना जाब विचारण्याचीही व्यवस्था केली. मात्र वयोवृद्ध अफगाण अमीरांचा



सिकंदरशाह लोदी याची कबर

उपमर्द होऊ नये, अशी दक्षता तो घेत असे. त्यामुळे त्याच्या विरुद्ध कोणी उठले नाहीत. त्याने कार्यक्षम हेरखाते सुरू केल्यामुळे राज्यातील घडामोडीची माहिती त्याला लवकर मिळत असे. निःपक्षपाती न्यायदानावर त्याचा कटाक्ष होता. त्यासाठी तो स्वतः अनेक प्रकरणांत लक्ष घालीत असे. तो प्रजाहितदक्ष होता. त्याच्या राजवटीत शेतीची व व्यापाराची बरीच वाढ होऊन समृद्धी निर्माण झाली. तो गोरगरिबांना उदारपणे मदत करीत असे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिकंदर लोदी स्वतः चांगला कवी व पंडित असून, अनेक कलावंत व विद्वान त्याच्या आश्रयाला होते. संगीतकलेला त्याने विशेष प्रोत्साहन दिले. त्याचे आचरण शुद्ध असून, नादान लोकांची संगत त्याला आवडत नसे. तो उंच, बांधेसूद व देखणा होता. तो उत्तम योद्धा व कुशल सेनापतीही होता. मात्र तो हिंदूंचा फार द्वेष करीत असे. त्याने मांड्रेल, उटगिर व नरवर येथील अनेक मंदिरे उद्ध्वस्त करून तिथे मशिदी बांधल्या. त्याने हिंदूंवर काही जाचक निर्बंधही घातले होते. तथापि राज्यव्यवस्था, दानधर्म व न्यायदान या बाबतीत त्याने कधीही पक्षपात केला नाही. तो इ. स. १५१७ मध्ये आग्रा येथे मरण पावला.

इब्राहीम लोदी (इ. स. १५१७-१५२६) – सिकंदरशाहाच्या नंतर त्याचा पुत्र इब्राहीम हा तख्तावर बसला. सर्व अफगाण सरदारांनी त्याला पाठिंबा दिला. पुढे काही सरदारांच्या आग्रहावरून इब्राहीमने धाकटा भाऊ जलालखान याला जौनपूरचे राज्य देऊ केले; पण लवकरच त्याचे मन फिरले व त्याने आपला हुकूम मागे घेतला. त्यामुळे दोघा भावांत संघर्ष सुरू झाला. अनेक लढाया होऊन शेवटी जलाल इब्राहीमच्या हाती सापडला व इब्राहीमने त्याला ठार मारले.

जलालच्या धावपळीत त्याला ग्वाल्हेरच्या राजाने आश्रय दिला होता. ते निमित्त करून इब्राहीमने ग्वाल्हेरवर मोठे सैन्य पाठवले. राजा मानसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा पुत्र विक्रमजित राज्य करीत होता. सुलतानाच्या प्रचंड सैन्यबळापुढे आपला निभाव लागणार नाही हे जाणून विक्रमजित त्याला शरण गेला. सुलतानाने ग्वाल्हेर घेऊन विक्रमजिताला शमसाबाद येथे पाठवले. तो शेवटपर्यंत सुलतानाशी एकनिष्ठ राहिला.

सुलतानाने मेवाडवरही मोठे सैन्य पाठवले होते. पण राजा संग्रामसिंह याने त्याचा दारुण पराभव करून बऱ्याच सैनिकांची कत्तल केली.

इब्राहीमशाहाला बहुतेक सर्व अफगाण अमीरांबद्दल संशय वाटू लागला आणि त्याने सर्वांना नमवण्याचा निर्धार केला. सिकंदरशाहाप्रमाणेच त्याने सर्वांना सुलतानापुढे अदबीने वागण्याचा हुकूम दिला आणि त्याची अंमलबजावणी फार कडक पद्धतीने सुरू केली. त्यामुळे सर्व अमीर संतापले. तसेच ज्या सरदारांनी त्याला बहुमोल मदत केली होती, त्यांनाही नष्ट करण्याची मोहीम त्याने सुरू केली. ज्या आझम हुमायून सरवानीमुळे त्याला जलालखानाविरुद्ध जय मिळाला होता, त्याला सुलतानाने ग्वाल्हेरहून परत बोलावून कैदेत टाकले. त्याचप्रमाणे सिकंदरशहाच्या वेळेपासून वझीर म्हणून गाजलेल्या मिया भुवालाही त्याने कैद केले. त्यामुळे अनेक अमीर व सरदार बिथरले. आझम हुमायून सरवानीचा मुलगा इस्लामखान हा कडाचाचा सुभेदार होता. सुलतानाने त्याची सुभेदारी काढून घेतल्यामुळे तो चिडला आणि त्याने मोठे सैन्य घेऊन दिल्लीवर स्वारी केली. पण सुलतानाच्या सैन्याने त्याचा पराभव केला. त्या लढाईत हजारो अफगाणांची कत्तल झाली व इस्लामखानही मारला गेला.

या विजयामुळे सुलतान इब्राहीम शेफारला व अधिकच कठोर बनला. त्याने आझम हुमायून सरवानी व मियां भुवा यांना तुरुंगातच ठार मारले आणि चंदेरी येथे मियां हुसेन फार्मूली याच्यावरही मारेकरी घातले. त्यामुळे इतर अमीर सावध झाले. बिहारचा दर्याखान लोहानी मरण पावल्यावर त्याचा मुलगा बहारखान हा सुलतान मुहंमद शाह म्हणून गादीवर बसला आणि त्याने संभलपर्यंतच्या प्रदेशावर स्वतंत्रपणे राज्य सुरू केले. गाजीपूरचा सुभेदार नासीरखान लोहानी, आझम हुमायून सरवानीचा दुसरा मुलगा फत्तेखान व शेरखान सूर हे त्याच्या पक्षाला मिळाले.

सुलतान इब्राहीम पूर्वेकडील बंडखोर अमीरांचा बंदोबस्त करण्यात गुंतला असताना, पंजाबचा सुभेदार दौलतखान लोदी यानेही स्वातंत्र्य पुकारले आणि आपला मुलगा दिलावरखान याला काबूलला बाबराकडे मदत मागण्यासाठी पाठवले. त्याच वेळी इब्राहीमचा चुलता आलमखानही काबूलला गेला. इब्राहीमच्या जागी आलमखानला दिल्लीचा सुलतान करावे, असा काही अमीरांचा विचार होता. बाबर हिंदुस्थानवर स्वारी करायला उत्सुकच होता. ही संधी साधून त्याने इ. स. १५२४ मध्ये लाहोरवर स्वारी केली. दौलतखान लोदी त्या वेळी मुलतानकडे गेला होता. इब्राहीमचा सेनापती बहारखान लोदी याचा बाबरने पराभव करून पंजाब घेतला. पण त्याने दौलतखानाला लाहोरचा सुभेदार न नेमता आपला वेगळाच अधिकारी तिथे नेमला. त्यामुळे दौलतखान संतापला आणि त्याने आलमखानाला आपल्याकडे वळवून घेऊन दिल्लीवर स्वारी केली. पण इब्राहीमने त्याचा पराभव केला. इ. स. १५२५ मध्ये बाबराने भारतावर पाचवी स्वारी केली. सुलतान इब्राहीम लोदी एक लक्ष सैन्यानिशी त्याला प्रतिकार करण्यास निघाला. पानिपत येथे दोन्ही सेनादलांची इ. स. १५२६ मध्ये घनघोर लढाई झाली. इब्राहीमचे सैन्य मोगल सैन्यापेक्षा खूप मोठे असूनही बाबरच्या रणकौशल्यामुळे व तोफखान्यामुळे इब्राहीमचा पराभव झाला व तो मारला गेला. अशा प्रकारे लोदी वंशाची सत्ता नष्ट होऊन दिल्लीवर मोगल वंशाचे राज्य सुरू झाले.

सुलतान इब्राहीम लोदी शूर योद्धा व कुशल सेनापती होता. त्याचे आचरण शुद्ध व वृत्ती धार्मिक होती. तो मुस्लिम शास्

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

इंदांचा सन्मान करीत असे. प्रजेच्या हिताकडे त्याचे लक्ष होते. पण त्याने सर्व अफगाण अमीरांच्या स्वातंत्र्यावर निबंध घालून निरंकुश, एकतंत्री सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केल्यामुळे त्याच्या कडक धोरणामुळे सर्व अमीर खवळले आणि त्यांनीच त्याचा नाश केला. [हि. क. इं. पी. ६; दि. सु. इ.]

लोधा पश्चिम बंगालमधील एक जमात. यांची वस्ती मुख्यत: मिदनापूर व हुगळी या जिल्ह्यांत आहे. बिहारमधील सिंहभूम व ओडिसातील मयूरभंज या जिल्ह्यांतही यांची थोडी वस्ती आढळते. हे मध्य प्रदेशातून बंगालमध्ये गेले, अशी कल्पना आहे. प्राचीन सवरांशी संबंध जोडण्यात यांना अभिमान वाटतो; पण त्याला काही आधार उपलब्ध झालेला नाही. हे मुळात आदिवासी असावे, असे वाटते. पण ते स्वत:ला आदिवासी मानीत नाहीत. मुंड, संताळ, इ. आदिवासी लोकांच्या घरांत किंवा शेतात ते काम करीत नाहीत आणि त्यांच्याकडचे शिजवलेले अन्नही घेत नाहीत. हिंदूंच्या संपर्कामुळे यांनी हिंदूंचे सर्व आचारविचार व संस्कार अंगिकारले आहेत. हे स्वत:ला हिंदुच मानतात. हे लोक इतर जातींच्या लोकांशी फारसे मिसळत नाहीत व इतर लोकही यांना दूर ठेवतात. कारण यांच्यांत गुन्हेगारीची प्रवृत्ती आढळते. इतर लोक यांना छळतात व फुकट राबवून घेतात; त्यामुळेही हे लोक बिचकून दूर राहतात व त्यांच्याशी शत्रुत्व करतात.

लोधा ही एक गुन्हेगार जमात गणली जात असली, तरी मुळात हे लोक तसे नव्हते. यांच्यांतले अनेक लोक नीतीची चाड बाळगणारे आहेत. यांच्यांत गुन्हेगारींशी संबद्ध असे धार्मिक विधीही रूढ नाहीत. पण कमालीच्या हलाखीमुळे त्यांच्यांतले काही लोक चोऱ्यामाऱ्या करू लागले आणि ब्रिटिश सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे सबंध जातच गुन्हेगार ठरवली गेली. आता मात्र यांच्या कपाळावरचा तो शिक्का पुसून टाकण्यात आलेला असून, ही एक अनुसूचित जमात मानली जाते.

हे लोक बहुधा जंगली प्रदेशात राहतात. तिथे त्यांची वेगळी लहान लहान गावे असतात. इतर खेडेगावांतही त्यांची तुरळक वस्ती आढळते. यांच्या झोपड्या लहान असून, त्यांच्या भिंती बांबू किंवा झाडांच्या फांद्या वापरून केलेल्या असतात. त्यांच्यावर शेण-चिखल थापून गिलावा केलेला असतो. वरती बांबू किंवा जंगली लाकडे ठेवून त्यांवर गवताचे छप्पर बनवतात. अशा झोपड्यांना बहुधा खिडकी नसते. त्यांना एकच लहानसे दार असते, पण त्याला फळी नसते.

झोपडीत एकच खोली असते व तिथेच सर्व व्यवहार चालतात. चुलीजवळ एक मातीचा ओटा असतो त्याला ईसान म्हणतात. पितरांना अन्नपाणी अर्पण करण्यासाठी तो बांधलेला असतो.

काही सधन लोक मात्र दगडा-मातीच्या मोठ्या झोपड्या बांधतात. त्यांत अनेक खोल्या असून, त्यांना दारे व खिडक्याही असतात. अशा झोपड्या उंच चौथऱ्यावर बांधलेल्या असतात.

लोधा पुरुष

त्यांना मागेपुढे पडव्या असून, पुढच्या पडवीत एका बाजूला गुरे बांधतात आणि मागच्या पडवीत शेतीची औजारे ठेवतात.

उद्योगधंदे – जंगलातील लोधा लोक कंदमुळे गोळा करून व शिकार करून पोट भरतात. काहीजण शेतमजूर आहेत. काही थोड्या लोकांची मालकीची शेतजमीनही आहे. जंगलातील लाकुडफाटा गोळा करून विकणे हा बऱ्याच लोकांचा उद्योग आहे. काहीजण रेशमाचे कोश जमा करतात; तर काही लोक मासेमारी करतात. काही मध व मोहाची फुले गोळा करून विकतात; तर काही साप व कासवे पकडून विकतात. आता हे सर्व प्रकारची कामे करू लागले आहेत. काही सुतारकाम करतात, तर काही घरातली कामे करतात. शिकारीसाठी धनुष्यबाण, जाळी व सापळे वापरून हे लोक पक्षी व ससे पकडतात. भात हे त्यांचे मुख्य पीक आहे.

बंगाली, ओडिया व थोडे मुंडारी शब्द यांच्या मिश्रणाने बनलेली बोलभाषा हे लोक बोलतात. हे धष्टपुष्ट व काटक आहेत; पण उद्योगी व कष्टाळ नाहीत. त्यामळे बहुतेकजण

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दरिद्री असतात. यांच्या अंगावर कपडे फारसे नसतात. सात वर्षांची होईपर्यंत सर्व मुले उघडीनागडीच राहतात. मोठ्या माणसांजवळ दोनच जाडेभरडे कपडे असतात. ते क्वचितच धुतले जातात.

या लोकांचा संसार म्हणजे गाडगी-मडकी, लोखंडी किंवा ॲल्युमिनियमची भांडी व थाळचा एवढाच असतो. सधन लोकच पितळी भांडी वापरू शकतात. यांच्या स्त्रिया जर्मन सिल्वरच्या बांगड्या व काचेच्या मण्यांच्या माळा घालतात आणि दंडावर व छातीवर फुलांची नक्षी गोंदवून घेतात. सोन्या-चांदीचे दागिने यांच्याकडे क्वचितच आढळतात.

यांच्यांत अनेक घराणी किंवा कुळचा आहेत. प्रत्येक घराण्यात अनेक कुटुंबे असतात. त्या सर्वांचे एक देवक असते. चिर्का आलू, सालमासा, चंद्र, माणिक नामक पक्षी, वाघ, चांदा मासा अशी त्यांची देवके असतात. देवकांना ते फार पवित्र मानतात. कोनाल हे घराणे सर्वांत श्रेष्ठ मानले जाते. त्यातील लोक लग्नविधीत व धार्मिक कार्यात पौरोहित्य करतात. चंद्र हे त्या घराण्याचे देवक असल्यामुळे अमावास्येला कोनाल माणसे विटाळ पाळतात, जुनी मातीची भांडी फेकून देतात व दुसऱ्या दिवशी नवी भांडी आणतात.

हे लोक मुलांच्या शीलाला फार जपतात. मुलगी वयात आल्यावर आई तिच्यावर लक्ष ठेवते. मुलांना शिक्षणही दिले जाते. कोणत्याही वृद्ध स्त्रीपुरुषांना मान दिला जातो. यांच्यांत कृत्रिम स्नेहसंबंध जुळवण्याची पद्धत आहे. त्या प्रसंगी एक विधी केला जातो.

विवाहप्रथा – यांच्यांत मुली वयात आल्यानंतर त्यांचे लग्न करतात. आते, मामे, मावस भावंडांचे लग्न होत नाही. त्याचप्रमाणे एकाच घराण्यातील व एकच देवक असलेल्या कुटुंबांमध्येही लग्नसंबंध होऊ शकत नाही. हे लोक जातीबाहेर लग्नसंबंध बहुधा करीत नाहीत. सोयरीक बहुतेक आईबाप ठरवतात. मात्र तरुण-तरुणी प्रेमविवाह करू शकतात. आईबापही लग्नसंबंध ठरवताना मुलांची संमती घेतात. मुलीसाठी देज घेण्याची प्रथा आहे. एका कुटुंबातील बहीणभाऊ व दुसऱ्या कुटुंबातील भाऊबहीण यांची लग्ने होतात, तेव्हा मात्र देज घेत नाहीत. मंगळवार हा लग्नासाठी सर्वांत उत्तम दिवस मानतात.

मुलगी पसंत केल्यानंतर वराकडील मंडळी पाच हळकुंडे, पाच चमचे मोहरीचे तेल, एक नवा करगोटा व एक लाकडी मळघांची माळ घेऊन वधूच्या घरी जातात. तिथे त्यांना मेजवानी दिली जाते. त्याच वेळी लग्नाचा मुहूर्त वधूच्या आईबापांना कळवून तो निश्चित केला जातो.

लग्नापूर्वी पाच दिवस वधूवरांना आपापल्या घरी रोज तेल-हळद लावून स्नान घालतात. लग्न वधूच्या घरी होते. त्यासाठी मांडव घालून बोहले तयार करतात. बोहल्यावर पाण्याने भरलेले

नवविवाहित लोधा स्त्री

दोन घट ठेवून त्यांना लाल रंग लावतात व त्यांत आंब्याच्या डहाळचा ठेवतात. वधूवर लाकडी मण्यांच्या माळा घालतात व कमरेला लाल करगोटा बांधतात. त्यांना समोरासमोर बसवन त्यांच्यामध्ये अंतरपाट धरतात. मग संबर म्हणजे समारंभाचा प्रमुख (बहुधा वराच्या आतेचा पती) वराच्या पागोट्याचे व वधूच्या साडीचे टोक यांची गाठ बांधतो. वधूवर परस्परांच्या कपाळी लाल टिळा लावतात. देहेरी म्हणजे ग्रामपुरोहित कधी कधी या कार्यात संबराला मदत करतो. ते दोघे मिळून 'वधू-वर सुखी होवोत ' अशी देवाची प्रार्थना करतात. मग अंतरपाट दूर करून वधूला वराच्या डाव्या बाजूला बसवतात. एवढाच लग्नाचा मुख्य विधी असतो.

त्यानंतर दोघांना झोपडीत एका चटईवर पूर्वेला तोंड करून बसवतात व खीरभात खायला देतात. वराचे खाणे झाल्यानंतर त्याच्या थाळीतूनच वधू खीरभात खाते. रात्री दोघे झोपडीतच राहतात.

दुसऱ्या दिवशी वराकडील मंडळी वधूवरांसह आपल्या गावी परत जातात. तिथे पोचल्यावर खास पारमो नायाचा विधी होतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर एक वारू म्हणजे लोखंडी कडे घेऊन त्याने वधूच्या कपाळी व भांगात शेंदूर लावतो. मग वधूही ते कडे घेऊन त्याने वराच्या कपाळी शेंदूर लावते. असे तीनदा केल्यानंतर वर ते कडे वधूच्या हातात घालतो. त्यानंतर दोघांच्या वस्त्रांची गाठ सोडण्याचा विधी होतो आणि शेवटी गावजेवण होते. लोधांच्या लग्नसमारंभात नाच-गाणे नसते.

यांच्यांत पूर्वीपासूनच घटस्फोट रूढ आहे. स्त्रीने व्यभिचार केला तर नवरा घटस्फोट घेऊ शकतो. स्त्रीला मात्र घटस्फोट घेता येत नाही. पण सासरी होणाऱ्या छळाला किंवा पडणाऱ्या कष्टांना कंटाळून ती माहेरी जाऊन राहिली तर तिला घटस्फोट मिळू शकतो व ती पुन: लग्न करू शकते. अशा विवाहाला आणि विधवेच्या पुनर्विवाहाला सांगा म्हणतात. पुनर्विवाहासाठी ग्रामप्रमुखाची परवानगी घ्यावी लागते व ग्रामपंचायतीला देणगी द्यावी लागते. अशा विवाहात विधी मात्र होमहवनही करीत नाहीत.

प्रसूतिप्रथा – गरोदर स्त्रीने फार कष्टप्रद कामे करू नयेत, असा संकेत आहे. पण गरीब कुटुंबातील स्त्रीला कष्ट करावेच लागतात. टोपलीच्या सापळ्यात किंवा गळाने पकडलेले मासे गरोदरपणी खायचे नसतात. ते खाल्ल्यास त्या माशांना झालेला त्रास गर्भाला होईल, अशी समजूत आहे. गरोदर स्त्रीने सुईदोरा वापरून फाटके कपडे शिवू नये, स्मशानातून जाऊ नये, इ. नियम आहेत. स्त्रीचे व तिच्या गर्भाचे रक्षण व्हावे व सुखप्रसूती व्हावी म्हणून, ग्रामदेवतांना फळे, कोंबडा किंवा बकरा अर्पण करण्याची चाल आहे.

प्रसूतीच्या वेळी हाडी जातीची अस्पृश्य स्त्री सुईणीचे काम करते. विशेष कठीण प्रसंग आल्यास मांत्रिकाला बोलावतात. तो बराम देवाला कोंबडा किंवा बकरा देण्याचे कबूल करतो. प्रसूतीनंतर नाळ कापून एका मडक्यात ठेवतात व ते मडके खोलीच्या नैर्ऋत्य दिशेला जमिनीत पुरतात. एकवीस दिवस जननाशौच पाळतात.

मूल सहा महिन्यांचे झाले, की त्याचे जावळ व उष्टावण करतात. त्यासाठी मंगळवार हा शुभ दिवस मानतात. प्रथम जावळ करून मुलाला न्हाऊ घालतात. मग गावचा देहेरी म्हणजे लोधा जातीतला पुरोहित शीतला देवीला खिरीचा नैवेद्य दाखवतो. मग थोडी खीर मुलाच्या तोंडात घालून बाकीची सर्वांना देतात.

जंगलात आदिवासी लोकांच्या सान्निध्यात राहणारे लोधा लोक फारसे विधी करीत नाहीत. त्यांचे संस्कार साधे असतात. मैदानांत इतर जातींच्या सहवासात राहणारे लोधा मात्र हळूहळू मुंजामुंजीचे विधी करू लागले आहेत.

जातपंचायत – लोधा लोकांची जातपंचायत असते. सर्व मोठे पुरुष तिचे सभासद असतात. ते जातीच्या सर्व प्रश्नांचा विचार करतात व न्यायदानही करतात. व्यभिचार, चेटुक, जादूटोणा, रूढी मोडणे, पंचायतीची आज्ञा न मानणे, इ. अपराधांसाठी दंड केला जातो. काही प्रसंगी अपराध्यावर बहिष्कारही घालतात. धार्मिक सण व उत्सव, लग्नसंबंध जुळवणे, ज्ञातिभोजनाची व्यवस्था या संबंधी चर्चाही पंचायतीत केली जाते. ही कामे पार पाडण्यासाठी मुखिया, डाकुआ (निरोप्या) व परामानिक (आचारी) हे तीन अधिकारी नेमलेले असतात. परामानिक हा मोठ्या जेवणावळींच्या प्रसंगी अन्न शिजवतो.

लोधांच्या गावात धर्मकर्मासाठी काही अधिकारी नेमलेले असतात, त्यांची नावे अशी – (१) देहेरी – ग्रामपुरोहित (२) तलिआ – देहेरीचा मदतनीस (३) हंतकार – बळी देणारा

देहेरी – लोधांचा पुरोहित

(४) गुन्ती – मांत्रिक व वैदू (५) ब्यक्रा – भगत किंवा शमन याच्याप्रमाणे याच्या अंगात देवाचा संचार होतो. हा भविष्य वर्तवतो. भुतेखेते, चेटुक, यांवर लोधांची फार श्रद्धा असल्यामुळे मांत्रिक व भगत यांना बराच मान असतो. युगिनी, कुंद्रा, चिरगुनी, प्रेतासिनी, कालपुरुस, बाघोआ, गोमुआ अशी यांच्या भुतांची नावे असून, त्यांना हे लोक फार भितात.

देवधर्म – लोधा लोक भगवान हा सर्वश्रेष्ठ देव मानतात. त्याने सारे जग निर्माण केले, असे ते समजतात. तो केवळ प्रार्थना व सदाचार यांमुळे प्रसन्न होतो. लोधांच्यावर वैष्णव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मताचा बराच प्रभाव पडला आहे. वसुमाता (भूमाता), धर्मदेवता, शितळा, वराम, चंडी, मनसा या देवतांनाही ते भजतात.

वसुमातेची मूर्ती नसते व देऊळही नसते. फुले व एखादा पदार्थ तिला अर्पण करून तिची प्रार्थना करतात. लग्नकार्य व इतर धार्मिक विधी करण्यापूर्वी हिची पूजा केली जाते. हिला पशुबळी देत नाहीत.

धर्मदेवता ही सर्व प्राणिमात्रांवर नियंत्रण ठेवणारी देवता स्वर्गात असते. मनुष्याच्या कर्मानुसार त्याला तो बक्षीस किंवा शिक्षा देते. हिचे देऊळ नसते किंवा स्थानही ठरलेले नसते. वसुमातेप्रमाणेच या देवतेची पूजा प्रत्येक धार्मिक कार्याच्या प्रारंभी केली जाते. हिला कोणतीही वस्तू अर्पण करावी लागत नाही. लग्नकार्याच्या प्रसंगी तळयाच्या काठी ओल्या मातीचा किंवा वाळूचा ढीग करून त्याच्या जवळ पानसुपारी ठेवतात. हेच धर्मदेवतेचे प्रतीक होय.

शितळा ही रोगराईची देवी असून, तिच्या भयाने लोक तिची पूजा करतात व तिला बळी देतात. प्रत्येक गावात तिचे लहानसे देऊळ असते. त्यात एका ओटयावर पाण्याने भरलेली मडकी ठेवतात; हेच तिचे प्रतीक असते. त्याची पूजा करून त्याच्यापुढे बलिदान करतात. हिला तांदूळ, फळे, मिठाई, नारळ, दूध, पान-सुपारी वगैरे पदार्थ अर्पण करतात. वर्षातून दोनदा किंवा तीनदा तिची विशेष पूजा केली जाते. ही देवी रात्री मनुष्यरूपात काहीजणांना दर्शन देते, असे समजतात.

वराम हा संरक्षक देव मानला जातो. रानातील एखाद्या राईत याचे स्थान असते. हा हत्तीवर किंवा वाघावर वसतो, अशी समजूत आहे. याच्या हाती परशू असतो, अशीही कल्पना आहे. मात्र याची मूर्ती नसते. एखाद्या झाडाखाली जमीन सारवून तिथे तऊ लाल ठिपके काढतात. हे या देवाचे प्रतीक होय. मातीचा हत्ती देखील प्रतीक म्हणून ठेवतात. या देवाला मातीचे हत्ती किंवा घोडे वाहतात. प्रत्येक उत्सवाच्या आरंभी याची पूजा केली जाते. चैत्री अमावास्येला याच्या स्थानी, झाडावर याचा झेंडा लावतात.

चंडी ही एक उग्र व बलशाली देवी आहे. हिला पशुपक्षी बळी देतात. ही जंगलात एखाद्या झाडावर वास करते. हत्ती हे तिचे वाहन असते. या देवीलाही मातीचे हत्ती व घोडे वाहतात.

सण व उत्सव – लोधा लोक शितळा, चंडी, वराम, मनसा, इ. देवतांचे उत्सव वर्षातून अनेक वेळा साजरे करतात. त्या प्रसंगीं ते त्या त्या देवतांची पूजा करून विविध पदार्थांचे त्यांना नैवेद्य दाखवतात, तुपाचे हवन करतात, पशुपक्षी बळी देतात व आरती करतात. त्यानंतर संगीत व नृत्य होते आणि शेवटी देवतेचे विसर्जन करतात.

शितळा देवीचा उत्सव वैशाखात व पौष महिन्यात मकर संक्रांतीच्या दिवशी असा दोनदा असतो. त्या वेळी तिचे देऊळ सारवून अंगणीवर रांगोळी व भिंतीवर चित्रे काढतात. बाहेर लहानसा मांडव उभारून त्यावर केळीची व साल वृक्षाची पाने पसरतात. देवीचे प्रतीक म्हणून उंच गळयाची मातीची सुरई पाण्याने भरून देवळात मांडतात. तिच्या तोंडावर आंब्याची डहाळी व हिरवा नारळ ठेवतात. सुरईवर लाल पट्टे काढून तिला दूर्वांची दोरी बांधतात. मग तिला साडी नेसवून, तिच्या गळयात रंगीत कागदांची माळ घालतात. मग पूजा, होमहवन व बलिदान करून प्रसाद वाटतात. रात्री देवीची आरती करतात आणि मग विविध प्रकारची गीते गाऊन नृत्य करतात. त्याला चांगल म्हणजे डफ या वाद्याची साथ असते. उत्सवाच्या अखेरीस जवळच्या तलावात देवीचे विसर्जन करतात. त्यानंतर युगिनीची पूजा करून तिला पशुपक्षी बळी देतात.

वरामचा उत्सव पौष व चैत्र महिन्यांच्या शेवटच्या दिवशी करतात. याला मातीचे हत्ती व घोडे वाहतात. त्याला काळा कोंबडा चालत नाही, तर तांबडा कोंबडा बळी द्यावा लागतो. या देवाला खीरही हवी असते.

चंडीचा उत्सव वैशाखात करतात. हिचे देऊळ असते. हिला बकरा किंवा रेडा बळी देतात. दुर्गापूजेच्या वेळीही चंडीची पूजा केली जाते. मनसेची पूजा मांत्रिक लोक करतात.

बांदना हा उत्सव कार्तिक महिन्यात असतो. त्या वेळी पशूंची पूजा करतात. भगवती देवीची रूपे म्हणून त्यांना फुलांच्या माळा घालतात व गोडधोड खायला देतात. त्यानंतर नाच करतात.

तुसू हा एक सामाजिक समारंभ आहे. त्यात लोधा, महतो, कोरा, इ. जातींच्या स्त्रिया मिळून बाहुल्यांची लग्ने लावतात. रात्री खाणे-पिणे, मौज, गाणी असा कार्यक्रम असतो.

चैत्र संक्रांती हा यांच्या वर्षाचा शेवटचा दिवस असून, त्या दिवशी पितरांसाठी अन्न शिजवून ते इसानवर ठेवतात. त्या दिवशी हे लोक नवी भांडीकुंडी आणतात.

या लोकांना नृत्याची आवड आहे. मात्र फक्त पुरुषच उत्सवांत नृत्य करतात. त्याला चांगल व मांदळ या वाद्यांची साथ असते. चार–पाच पुरुष एका वक्र रेषेत उभे राहून मागेपुढे पावले टाकतात आणि सर्वजण गोलाकार फिरतात.

मृतकप्रथा– हे लोक प्रेते जाळतात. सर्पदंशाने, वाघाने मारल्यामुळे, पाण्यात बुडून किंवा अशाच अन्य अपघातामुळे मेलेल्या माणसांची प्रेते मात्र जंगलात नेऊन टाकतात. प्रेत जाळणे किंवा पुरणे हे आर्थिक स्थितीवर अवलंबून असते.

मनुष्य मेल्यावर त्याचे प्रेत एका चटईवर ठेवून त्यावर एक जुना कपडा टाकतात. प्रेताजवळ एक विळा ठेवतात. त्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृतात्म्याला त्रास होत नाही, अशी लोधांची समजूत आहे. नंतर मोहाच्या तेलात हळद कालवून ती मृतदेहाला लावतात. बांबूच्या तिरडीवर प्रेत एका विळ्यासह बांधून स्मशानात नेतात. बरोबर एक कुदळ व पाण्याचे मडके घेतात. गवताची एक पेंढीही पेटवून घेतात. घरातली गाडगी-मडकी जंगलात नेऊन टाकतात आणि घर व आंगण शेणखळा टाकून शुद्ध करून घेतात.

प्रेत वाहून नेताना बरोबरचे लोक 'हरिबोल' चा घोष करीत असतात. स्मशानात पोचल्यावर तिथे कुदळीने खड्डा खणून त्यात चटई पसरतात व तिच्यावर प्रेत, डोके उत्तरेकडे व तोंड वर करून, ठेवतात. ते जुन्या कपड्याने झाकतात. तिरडीचे बांबू प्रेतावर ठेवून मग माती लोटतात. खड्डा बुजल्यावर प्रेताच्या डोक्यावर राहील अशा बेताने पेटलेले गवत फेकतात आणि जवळच एका थाळीत भात ठेवतात.

परत जाताना स्मशानाच्या हद्दीवर काटेरी झुडपे आणून टाकतात व तिरडीला बांधलेले गवती दोर दोन झाडांना बांधतात. त्यामुळे मृताचा आत्मा अडविला जातो व तो गावात जाऊ शकत नाही, अशी समजूत आहे. शेवटी परतणारा मनुष्य पाण्याचे मडके फोडून टाकतो व मग काटे ओलांडतो. त्यानंतर सर्वजण आंघोळ करून 'हरिबोल' म्हणतात. मग सर्वजण एका शिरसाच्या झाडाला आलिंगन देतात व घरी जातात. तिथे दारासमोर एका खापरावर जळती लाकडे ठेवून, घरातील पुरुषांचे थोडे थोडे केस कापून घेऊन, ते त्या विस्तवावर टाकतात. सर्वजण त्या भोवती बसून हात शेकतात व तेच तोंडावर फिरवतात.

त्यानंतर घरातील स्त्रिया व शेजारीही स्नान करतात. ज्या मनुष्य जिथे मरण पावला असेल, त्या जागी विळा व कुदळ ठेवून त्यावर थोडे थोडे भाजलेले तांदूळ टाकतात व उरलेले स्वतः खातात.

हे लोक दहा दिवस सुतक पाळतात. रोज मृतासाठी साल वृक्षाच्या पानांवर भात व कढी वाढून इसानवर ठेवतात. प्रेत जाळले असेल, तर चौथ्या दिवशी स्मशानात जाऊन जळालेल्या चितेवर पाणी ओततात व अर्धवट जळालेली लाकडे बाजूला काढून, त्या जागी मातीची मानवी आकृती कोरतात. तिच्या डोक्यावर तुळशीचे एक रोप लावतात आणि चारही कोपऱ्यांत चार बांबू उभे करून त्यांवर एक नवा कपडा टाकून लहानसा मंडप तयार करतात.

दहाव्या दिवशी हे लोक मृतासाठी श्राद्ध करतात. त्यासाठी तळ्याच्या काठी जाऊन प्रथम सर्वजण क्षौर करतात. तिथे एका मडक्यात तांदूळ, एक मासा, क्षौर केलेले थोडे केस व मृताच्या तीन मुनांची नखे हे सर्व पदार्थ एकत्र शिजवतात. मग त्यात थोडी माती मिसळून दोन पिंड बनवतात. ते सालाच्या पानांवर ठेवतात. त्यांतील एक पिंड तिथे भाऊ मिळून पाण्यात टाकतात आणि दुसरा पिंड तिथी सुना पाण्यात टाकतात. मग सर्वजण स्नान करतात व नवे कपडे आणि लाकडी मण्यांच्या माळा घालतात. कमरेला लाल करगोटा बांधतात.

त्या दिवशी संध्याकाळी गूळपोहे वाटतात आणि रात्री प्रेतयात्रेत भाग घेणाऱ्यांना वरणभाताचे जेवण देतात.

अकराव्या दिवशी मृत मनुष्याचे नातेवाईक एखाद्या वैष्णवाच्या हस्ते घरात विस्तव पेटवून आंब्याच्या वाळलेल्या काटक्या व तूप यांचे हवन करतात. त्यानंतर नवी मडकी आणून त्यांत अन्न शिजवतात. ते अन्न प्रथम पितरांना अर्पण करतात व मग गावजेवण घालतात. दुसऱ्या दिवशी पितरांसाठी ईसानवर ठेवलेले अन्न ओढ्यात नेऊन टाकतात. [दि लोधाज् ऑफ् वेस्ट बेंगॉल– श्री. पी. के. भौमिक, १९६३]

लोधी एक जात. या लोकांची वस्ती महाराष्ट्रात व मध्य प्रदेशात आढळते. इ. स. च्या १८ व्या शतकाच्या अखेरीला ते पंजाबातील लुधियाना जिल्हा सोडून इकडे आले, असे म्हणतात. लोध हे त्यांचे खरे नाव आहे; पण ते सर्वत्र लोधी म्हणूनच ओळखले जातात. हिंदी ही त्यांची मातृभाषा आहे. 'आम्ही मूळचे राजपूत आहो' असे हे सांगतात. हे जानवे घालतात. हे लोक शरीराने धडधाकट असून, देखणेही असतात.

शेती, गुरे पाळणे, सावकारी, मजुरी, लाकडे विकणे, इ. व्यवसाय हे करतात. त्यांच्यांतील काहीजण जमीनदारही आहेत. जमीनदारांना ठाकूर म्हणून ओळखतात.

विवाहप्रथा–लोधींमध्ये वरिष्ठ व कनिष्ठ असे दोन वर्ग आहेत. प्रत्येक वर्गात अनेक उपजाती आहेत. वरिष्ठ वर्गातल्या उपजातींत विवाहसंबंध होत नाहीत. पण कनिष्ठ वर्गातल्या उपजातींत मात्र तसे विवाह होतात. मुलीचे लग्न बहुधा बालवयात होते. पण चांगल्या कुलशीलाचा वर मिळाला नाही किंवा हुंडा देण्याची ऐपत नसली, तर तिचे लग्न लांबते. विवाहानिमित्त मुलाचा मामा मुलाच्या घरी जेवण देतो. विवाहसमारंभ मुलीच्या घरी होतो. विवाहाच्या दिवशी वराच्या घरून जोडे, मेंदी, सुया, हिंगूळ, मुलीचे कपडे, पिवळी चादर, इ. वस्तू मुलीच्या घरी नेऊन देवापुढे ठेवतात. त्या वेळी मुलीची आई शितळा देवीची पूजा करते.

वराच्या घरी घरच्या देवापुढे पंचवीस घड्यांची एक उतरंड ठेवतात. वराला नवे कपडे घालून, बाशिंग बांधून व घोड्यावरून मिरवत वधूगृही नेतात. विवाहाच्या वेळी पुरोहित चौकोनी रांगोळी घालतो. त्या चौकोनात वधू-वरांना बसवितात. मग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुलाचे नातेवाईक मुलाला नवे कपडे व दागिने देतात. नंतर वधू-वर पळसाच्या फांदीला सहा प्रदक्षिणा घालतात. पण सातवी प्रदक्षिणा घालण्यापूर्वी त्यांना तिथे असलेल्या लोकांची परवानगी घ्यावी लागते. परवानगी मिळताच ते ती प्रदक्षिणा पुरी करतात. त्यानंतर पुरोहित सावधान असे म्हणतो. सायंकाळी जेवण झाल्यावर वधू पालखीतून आणि वर पायी चालत घरी जातो. तिथे वरपिता त्या दोघांना काही रुपये भेट म्हणून देतो. त्याचप्रमाणे तिथे तांदुळाची एक रास करतात. नवरामुलगा उजव्या पायाने पाच वेळा ती रास लाथाडतो.

मुलगी वयात आली, की तिला चार दिवस बाजूला बसवितात. पाचव्या दिवशी नवऱ्याच्या हातातली आंगठी घरात कुठेतरी लपवून ठेवतात. वधूला चार महिन्यांची मुदत देऊन ती शोधायला सांगतात. ज्या दिवशी आंगठी सापडते, त्या दिवशी गर्भाधान संस्कार करतात.

प्रसूतिप्रथा– मूल जन्मल्यावर बाळंतिणीच्या खोलीत थोडी जागा सारवून तीवर तांब्याचा वाळा, काळे सूत, टोपी व झबले ठेवतात. त्याच्या पुढे दिवा, दहिभात व फुले ठेवतात. जेवणानंतर ते कपडे मुलाच्या अंगात व वाळा पायात घालतात. त्या रात्री घराची दारे व खिडक्या उघड्या ठेवतात. आलेले पाहुणे रात्री वसतीला राहतात. दहा दिवस जननाशौच पाळतात. अकराव्या दिवशी घर धुतात. जन्मल्यापासून एक महिन्याच्या आत मुलाची आई मुलाला घेऊन जंगलात जाते आणि तिथे पाच खडे मांडून त्यांची पूजा करते. मग नव्या बांगड्या भरून घरी परतते. मूल तीन वर्षांचे होण्यापूर्वी त्याचे जावळ काढतात. जावळाच्या दिवशी सामिष भोजन असते.

वरिष्ठ वर्गातील लोधी विधवाविवाह करीत नाहीत. पण कनिष्ठ लोधींत तो रूढ आहे. शिवाय ते तीनच दिवस सुवेर-सुतक पाळतात. पण वरिष्ठ लोधी ते दहा-बारा दिवस पाळतात.

तुळजापूरची देवी व बालाजी ही त्यांची मुख्य दैवते आहेत. त्यांचे धार्मिक विधी परदेशी ब्राह्मण करतात. पण जन्म आणि मृत्यू या प्रसंगी मात्र त्यांना बोलावीत नाहीत.

त्यांच्यांत जातपंचायत असते. तिच्या वतीने सामाजिक प्रश्न सोडविले जातात. पंचायतीचे नियम मोडणाऱ्याला दंड म्हणून जातीला भोजन द्यावे लागते. हे भोजन देण्याची शक्ती नसणारा माणूस पंचांसमोर त्यांचे जोडे डोक्यावर घेऊन व हात जोडून उभा राहिला, की त्याला दंड माफ होतो.

मर्तिकप्रथा–एखादा माणूस मेला, की त्याच्या अंगावर गार पाणी टाकतात. नंतर त्याला उचलून बाजूला ठेवतात आणि जिथे त्याचा मृत्यू झाला असेल, ती जागा शेणाने सारवून पुन्हा त्याला पहिल्या जागी ठेवतात. मृताला स्मशानाकडे नेत असताना अर्ध्या वाटेवर ताटी खाली ठेवून मृताच्या उशाशी दोन खडे ठेवतात. मृताला जाळतात. प्रेत अर्धवट जळले की, त्याच्या डोक्यावर लोण्याने भरलेले मडके ठेवतात. मग स्नान करून सर्व मंडळी घरी परततात. मृताची पत्नी सर्व दागिने काढून ठेवते. स्मशानातून आलेले लोक त्या दागिन्यांवर पाणी शिंपडतात. दहाव्या दिवशी दहा पिंड देतात. अकराव्या दिवशी एक मोठा पिंड करून त्याचे पुन्हा अकरा भाग करतात. तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात.

गुजरात व काठियावाड या प्रदेशांतील लोधी लोकांत जरिया, पटरिया, जुनागडी, इ. पोटभेद आहेत.

विवाहप्रथा – मुलीचे लग्न बहुधा लहान वयात होते. गुजरातमधील लोधी लोकांत वरपिता मुलीच्या बापाला स्त्रीधन म्हणून काही रक्कम देतो. ज्योतिषी लग्नाचा मुहूर्त काढून देतो आणि ज्ञातिपुरोहित लग्नात पौरोहित्य करतो. नाग हे यांचे देवक असून, चौरंगावर त्याची आकृती रेखाटतात आणि लग्नाच्या आदल्या दिवशी त्याची पूजा करतात.

साखरपुड्यानंतर एक दिवस वधू गणपतीची पूजा करते आणि वधू-वरांचे पिते परस्परांना लग्नपत्रिका देतात. मग जमलेल्या मंडळींना सरबत वाटतात. लग्नमंडप उभारल्यावर त्यात एक बांबू पुरतात. त्याला शमीच्या फांद्या, हळकुंड व एक लोखंडी कडे अडकवतात. मग एक दिवस एक पांढरी काठी आणि गव्हाची ओंबी भिंतीला टेकवून उभी करतात. पुरोहित आपल्या उजव्या हाताचा पंजा कुंकवात बुडवतो आणि भिंतीवर काठीच्या वरच्या बाजूला त्याचा छाप उठवतो. या विधीला डरेची असे नाव आहे. लग्नाच्या आधी वधू-वरांना हळद लावतात. नवरा मुलगा लग्नासाठी मिरवत वधूगृही जातो. सप्तपदी हा लग्नातील आवश्यक विधी असतो.

देवधर्म – हे लोक वैष्णव पंथाचे आहेत; पण त्यांच्या कुलदेवता माता आहेत. हे लोक देवीला बकरा अर्पण करतात. तसेच, एखादी साथ उद्भवली असता ते देवीला बकरा व कोंबडा बळी देतात. रामानंदी पंथाचे आचार्य हे यांचे आध्यात्मिक गुरू होत.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. हे पितरांसाठी श्राद्ध व महालय करतात.

पूर्वीच्या निजामाच्या राज्यात म्हणजे हैदराबाद प्रदेशात काही लोधी लोक राहतात. तिथे त्यांना लोधे असेही म्हणतात. त्यांचे जरिया, पर्टरिया, सिंगोर, नथनिया, लोणिया, नवखंडवाले, इ. अनेक पोटभेद आहेत. त्यांच्यांत आपसांत लग्नसंबंध होत नाही. या सर्व लोकांचे काश्यप हे एकच गोत्र आहे.

विवाहप्रथा – मुलींचे विवाह लहानपणी किंवा मोठेपणी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होतात. लग्न ठरवताना ज्ञातिप्रमुख व पंचायत यांचा सल्ला घेतात. लग्न ठरल्यावर वराचे मातापिता वधूला एखादा दागिना व नवे कपडे देतात आणि वधूचे आईवडील मुलाला पाच रुपये व नवे कपडे देतात. कनोजिया ब्राह्मण लग्नाचा मुहूर्त काढून देतो. कन्यादान हा लग्नातील प्रमुख विधी असतो. तो झाल्यावर वधूवरांच्या वस्त्रांची गाठ मारतात आणि ती दोघे मांडवातील आंब्याच्या खांबाभोवती सात प्रदक्षिणा घालतात. मग नवरा मुलगा वधूच्या भांगात शेंदूर भरतो. जेवणावळ झाल्यावर लग्नसमारंभ संपतो.

विधवेने आपल्या धाकट्या दिराशी लग्न करावे, अशी अपेक्षा असते. विधवाविवाह वद्य पक्षातल्या एखाद्या रात्री होतो आणि त्याचा विधी अत्यंत साधा असतो. नवरा मुलगा वधूला एक नवी साडी देतो व तिच्या गळ्यात मंगळसूत्र बांधतो. नंतर ज्ञातिभोजन होते.

प्रसूतिप्रक्रिया – जननाशौच दहा दिवस पाळतात. मूल जन्मल्यावर पाचव्या दिवशी घरातील थोडी जागा शेणाने सारवतात आणि तिथे तांब्याचे वाळे, काळे कापड व मुलाचे कपडे ठेवून त्यांची पूजा करतात. दहीभाताचा नैवेद्य दाखवतात. मग नातेवाइकांना जेवायला घालतात. नंतर ते वाळे व कपडे मुलाला घालतात. रात्रभर घराची दारे व खिडक्या उघड्या ठेवतात आणि पहाटेपर्यंत जागरण करतात. दहाव्या दिवशी अंगणात एक लहानसा खड्डा खणून त्याच्या कडांवर चार लाकडे आणि पाण्याने भरलेला मातीचा घडा ठेवतात. त्या घड्याची पूजा केल्यावर बाळंतीण स्त्री सर्व दोषांपासून मुक्त होते.

देवधर्म – यांच्यापैकी बरेचसे लोक वैष्णव असून, ते बालाजी आणि कृष्ण यांना भजतात. याशिवाय ते कालिका, तुळजाभवानी, मरीआई व शीतलादेवी यांनाही पूजतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात. पण दहनासाठी लागणारी लाकडे वगैरे विकत घेण्याची ऐपत नसल्यास मृताला पुरतात. पुरताना मृताला उताण्या अवस्थेत व डोके दक्षिणेला ठेवून पुरतात. मृताशौच दहा दिवस पाळतात. दहाव्या दिवशी श्राद्ध करतात आणि तेराव्या दिवशी ज्ञातिभोजन घालतात. पितृपक्षात पितरांना जलांजली देतात. [पूना गॅझे.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.; ट्रा. का. बॉ.; का. ट्रा. नि. डो.]

लोपामुद्रा अगस्त्य ऋषीची पत्नी. ही विदर्भराजाची कन्या होती. एक मंत्रद्रष्टी म्हणूनही तिचा उल्लेख ऋग्वेदात (१.१७९.१-२) आहे. त्याच सूक्तात अगस्त्य व लोपामुद्रा यांचा संवाद आहे. पतीच्या ब्रह्मचर्यव्रताचा कंटाळा आल्यामुळे लोपामुद्रेने त्याला विनवणी केली. 'तुम्ही माझा उपभोग घ्या. माझ्याशी समागम करा. तसे केलेत तरी तुमच्या तपाला बाध येणार नाही. प्राचीन ऋषींना मुले झाली तरी त्यांच्या तपाचा भंग झाला नाही.' अगस्त्य ऋषीने तिची ही इच्छा तृप्त केली व तिला एक पुत्र झाला.

हिच्या जन्माविषयीची कथा महाभारतात सांगितलेली आहे, ती अशी – आपल्या पितरांना मुक्ती मिळावी म्हणून अगस्त्य ऋषीला एकदा विवाह करण्याची इच्छा झाली. पण त्याला योग्य अशी वधू सर्व जगात कुठेही सापडली नाही. तेव्हा त्याने आपल्या तपोबलाने एक सुंदर कन्या उत्पन्न केली. विदर्भराजा भीम त्या वेळी अपत्यप्राप्तीसाठी तप करीत होता. अगस्त्याने ती नवजात कन्या त्याला दिली. राजाने तिचे उत्तम प्रकारे पालनपोषण केले. तीच कन्या लोपामुद्रा या नावाने प्रसिद्ध झाली.

लोपामुद्रा वयात आल्यावर अगस्त्य मुनीने विदर्भराजाकडे तिची मागणी केली. त्याच्यासारख्या तपस्वी पुरुषाला आपली कन्या द्यावी, अशी राजाची इच्छा नव्हती. पण महर्षीच्या शापाच्या भयाने तो त्याला नकारही देऊ शकला नाही. पित्याची ही व्यथा जाणून लोपामुद्रेने स्वतःच अगस्त्य मुनीशी विवाह करण्याची तयारी दर्शविली. तेव्हा राजाने तिचा त्याच्याशी विवाह करून दिला. त्यानंतर तिने पतीच्या आज्ञेवरून उंची वस्त्रांचा व अलंकारांचा त्याग करून वल्कले परिधान केली. तपोमग्न पतीची सेवा करण्यात तिने आपले जीवन कृतार्थ केले.

लोपामुद्रेचा त्याग, इंद्रियनिग्रह व व्रताचरण पाहून अगस्त्य प्रसन्न झाला आणि त्याने तिच्याशी संभोग करण्याची इच्छा प्रकट केली. तेव्हा ती म्हणाली, 'या पर्णकुटीत व अशा तापसी वेषात कामविलास करणे मला पसंत नाही. राजप्रासादातल्या वैभवात राहून आपल्याशी समागम करणे मला आवडेल.' मग अगस्त्य मुनीने आपल्या तपःसामर्थ्याने इल्वलाकडून विपुल संपत्ती मिळवून पत्नीची वैभवेच्छा पूर्ण केली. त्याच्यापासून तिला एक महापराक्रमी पुत्र झाला. त्याचा गर्भ तिच्या उदरात सात वर्षे वाढत होता. त्या पुत्राचे नाव दृढस्यू किंवा इध्मवाह होय (म. भा. वन. ९४–९७).

हिच्याजवळ एक अक्षय्य स्थाली होती आणि त्या स्थालीतून तिला विपुल अन्न प्राप्त होत असे, अशी कथा आनंद रामायणात (विवाह. ५) सांगितलेली आहे. ही मलयध्वज नामक पांड्य राजाची कन्या होती, असे भागवत पुराणात म्हटले आहे. [वे. इं.; प्रा. च. को.; प्रे. वी. इं.]

लोमश एक दीर्घजीवी ऋषी. याच्या अंगावर केस भरपूर असल्यामुळे लोक त्याला लोमश म्हणू लागले. प्रत्येक कल्पात त्याचा एकेक केस गळत होता, असे स्कंदपुराणात सांगि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तले आहे (१.२.१३). एके दिवशी तो इंद्रलोकी गेला असता अर्जुन अस्त्रप्राप्तीसाठी तिथे आलेला त्याला दिसला. पुढे इंद्राच्या सांगण्यावरून तो काम्यक वनात आला आणि त्याने युधिष्ठिराला अर्जुनाचे कुशलवृत्त सांगितले. नंतर त्याने युधिष्ठिराला तीर्थयात्रेस प्रवृत्त केले. पांडवांच्या बरोबर त्यानेही सगळ्या तीर्थयात्रा केल्या. नंतर पांडवांना पुनश्च काम्यक वनात पोचवून तो तपस्येसाठी निघून गेला.

लोमशाने युधिष्ठिराला अगस्त्य, भगीरथ, ऋष्यशृंग, सुकन्या व मांधाता यांची चरित्रे कथन केली; तसेच दुर्दम राजाला देवीभागवत पाच वेळा ऐकवून त्याला रैवत नावाचा मन्वंतराधिपती पुत्र प्राप्त करून दिला.

लोमशसंहिता व लोमशशिक्षा या नावाचे दोन ग्रंथ लोमशाच्या नावावर आहेत. लोमशसंहिता हा रसिक संप्रदायाचा मान्य ग्रंथ आहे. लोमशशिक्षा हा सामवेदाचा शिक्षाग्रंथ असून, त्याचे आठ खंड आहेत. कश्यपसंहितेत लोमशाला ज्योतिषशास्त्रज्ञ मानले आहे. त्याच्या नावावर लोमशरामायण नावाचाही एक ग्रंथ उपलब्ध असून, त्याचे बत्तीस हजार श्लोक आहेत. त्यात दशरथ व कौसल्या ही पूर्वजन्मी राजा कुमुद व वीरमती होती, असे सांगितले आहे. भुशुंडी ऋषीला रामकथा लोमशाकडून ऐकायला मिळाली, असे तुलसीरामायणात म्हटले आहे.

राजस्थानात बुंदी शहराजवळ तिमाणा व पंजाबात रिवालसर या गावीं लोमशाचे आश्रम दाखवितात. [प्रा. च. को.]

लोलासन एक योगासन. याची प्रक्रिया अशी — प्रथम पद्मासन घालून बसावे. दोन्ही हात कंबरेच्या बाजूंना



लोलासन

समांतर ठेवावे. श्वास आत घेऊन सर्व शरीर हातांच्या आधाराने वर उचलावे. नंतर पाच वेळा श्वास आत घ्यावा व सोडावा. शरीर ताठ व स्थिर ठेवावे. नंतर शरीराच्या उचललेल्या भागाला झुल्याप्रमाणे झोके द्यावे.

या आसनाचा आणखी एक प्रकार आहे. त्यात दोन्ही पाय दोन्ही हातांच्या कोपरांच्या वरच्या बाजूंना टेकवतात, छातीचा भाग ताठ ठेवतात व सर्व शरीर स्थिर ठेवतात.

या आसनाने बोटे, हात व खांदे यांना जोर येतो आणि ढेकर व उचकी या विकारात लाभ होतो. पोटफुगी, पोटदुखी, अतिसार, धातुक्षय, इ. रोगांतही याचा उपयोग होतो. [उ. यो. द.]

लोलिंबराज (इ. स.चे १६वे शतक) एक मराठी संत कवी. हा जुन्नरचा रहिवासी असून, दिवाकरभट्टाचा मुलगा होता. याचे उपनाव जोगी. प्रारंभी हा फार स्वच्छंदी होता; पण पुढे तो सुधारला. हा स्वतःला कवी पातशाह म्हणवून घेत असे.

याचा वैद्यकीचा व्यवसाय असून, त्याने वैद्यजीवन नावाचा एक ग्रंथ संस्कृतात रचला आहे. भागवताच्या दशमस्कंधावरही याची मराठी टीका आहे.

लोलिंबराजाची रत्नकला नावाची एक सुंदर स्त्री होती. त्याने तिच्यावर रत्नकलाचरित्र नावाने ८५ श्लोकांचे एक काव्यही रचले आहे. पुढे रत्नकला मरण पावली आणि तिच्या विरहाने व्याकुळ झालेल्या कवीला उपरती झाली. तो म्हणतो—

मजविण घडि कोठें जासि ना तूं रसाळे।
न पुसत परलोका केंवि गेलीस बाळे।
विषय विषय करिता सर्व संसार गेला।
क्षणभरि परि नाहीं मुक्तिचा यत्न केला।

अखेर उरलेल्या आयुष्याचे सार्थक करण्यासाठी हा सप्तशृंगी देवीचा उपासक बनला आणि पुढे संत झाला.

याचे काव्य रसाळ असले तरी अश्लील आहे. याच्या अश्लीलपणासंबंधी महाराष्ट्र सारस्वतकार म्हणतात. ‘ उपलब्ध अशा सबंध मराठी वाङ्मयात याच्या तोडीचे बीभत्स काव्य दुसरे नाही.’ [म. सा.; म. वा. इ. २; प्रा. म. वा. स्व.]

लोल्ल लक्ष्मीधर (इ. स. चे १६ वे शतक) एक संस्कृत कवी. हा विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याच्या पदरी होता. त्यापूर्वी तो ओडिसाचा राजा वीररुद्र गजपती याच्या दरबारी राहिला होता. कृष्णदेवाने वीररुद्राचा पराभव करून या कवीला आपल्या दरबारी आणले. लोल्लाने संहिता, आगम, ज्योतिष आणि तत्त्वज्ञान या विषयांवर बरेच ग्रंथ लिहिले आहेत. [बि. स्मा. ग्रं.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एक अतिशय उपयुक्त धातू. यालाच लोखंड म्हणतात. लोह हा लोहखंड या शब्दाचा अपभ्रंश असावा. वैदिक आर्यांना हा धातू ज्ञात होता आणि ते या धातूची शस्त्रे वापरीत होते, असे काही विद्वानांचे मत आहे. मात्र लोह या शब्दाचा मूळ अर्थ लाल असा होता. कालांतराने एक धातू या अर्थाने हा शब्द वापरलेला आढळतो. पण शतपथ ब्राह्मण, छांदोग्य उपनिषद, जैमिनी उपनिषद ब्राह्मण, इ. ग्रंथांत त्याचा अर्थ तांबे असा आहे. लोखंड या अर्थाने लोह हा शब्द वैदिक वाङ्मयात कुठेही वापरलेला आढळत नाही.

वेदांत अयस हा शब्द अनेक वेळा आलेला आहे. निरनिराळ्या पंडितांनी त्याचा अर्थ लोह, तांबे किंवा कोणताही धातू असा निरनिराळा केला आहे. श्री. एम्. एन्. बानर्जी यांच्या मते अयस म्हणजे लोह हाच धातू असला पाहिजे; कारण लोहाचे सर्व गुण अयस या धातूच्या अंगी असल्याचे ऋग्वेदात सांगितले आहे.

अयस धातूच्या वस्तू बनवणाऱ्या कारागिराला ऋग्वेदात कर्मार म्हटले आहे. या नावाचे लोक अजूनही लोहारकाम करतात. यजुर्वेदाच्या वाजसनेयी संहितेत श्याम हा शब्द लोखंड या अर्थाने वापरलेला आहे. ब्राह्मणे व उपनिषदे या ग्रंथांत लोहितायस किंवा लोहायस आणि कार्ष्णायस किंवा कृष्णायस या दोन प्रकारच्या धातूंचा उल्लेख आहे. सामान्यपणे त्यांचा अर्थ अनुक्रमे तांबे व लोखंड असा होतो. पण कालांतराने लोह हा शब्द लोखंड या अर्थाने रूढ झाला. महाभारतात लोह शब्द त्या अर्थाने अनेकदा वापरलेला आढळतो. उद्योगपर्वात (१६०.९२) लोहाभिसार नामक एका विधीचा उल्लेख आहे. राजाने शस्त्रांपुढे दिवे ओवाळणे असा त्याचा अर्थ आहे.

लोह या धातूच्या उत्पत्तीविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी – लोह नावाच्या राक्षसाला मारून देवांनी त्याच्या देहाचे तुकडे केले आणि ते सर्वत्र विखरून टाकले. त्या तुकड्यांपासून पुढे लोखंड उत्पन्न झाले.

लोखंड हा धातू फार उपयुक्त असूनही लोक त्याला हीन व अमंगल मानतात. लोखंडाची वस्तू हातात असताना शिंक येणे हा अपशकुन समजला जातो. तीर्थात स्नान केल्यानंतर लोहस्पर्श वर्ज्य असतो. लोखंडाच्या वस्तूमुळे दुखापत झाली, तर ते फार अशुभ समजतात. ती वस्तू जमिनीला टेकवली, की मग काही अशुभ घडत नाही अशीही कल्पना आहे.

कोणत्याही देवतेची लोहमूर्ती तयार करीत नाहीत. याला अपवाद फक्त शनीचा. शनीची बाधा नाहीशी व्हावी म्हणून त्याची लोखंडी प्रतिमा तेलाने भरलेल्या लोखंडी भांड्यात ठेवून तिची पूजा करतात.

मंत्रतंत्रासाठी जी यंत्रे वापरतात, ती लोखंडाची करीत नाहीत. देवळाच्या गाभाऱ्यात नारळ फोडण्यासाठी लोखंड वापरीत नाहीत. देवघरात लोखंडी दिवे लावीत नाहीत आणि पूजेची उपकरणे लोखंडाची करीत नाहीत.

जादूटोणा व चेटुक यांपासून संरक्षण व्हावे म्हणून लोखंडाचा उपयोग होतो, अशी अनेक आदिवासी लोकांची समजूत आहे. त्यासाठी ते घराच्या उंबरठ्याला एक लोखंडी खिळा ठोकतात. बाळंतिणीच्या खोलीत लोखंडी दिवा ठेवतात किंवा बाजेखाली लोखंडी कोयता ठेवतात. काही लोक लोखंडी कडे किंवा अंगठी वापरतात.

शुद्ध लोह फारसे कठिण नसते; त्यामुळे शस्त्रे बनवण्यासाठी त्याचा उपयोग करता येत नाही. त्यात थोडासा कर्ब मिसळला असता पोलाद तयार होते. पोलाद बरेच कठिण असल्यामुळे त्याची शस्त्रे करतात. लोखंडात जास्त प्रमाणात कर्ब मिसळला, की बीड तयार होते. ते कठिण व पुष्कळ वजन पेलण्यास समर्थ असले, तरी ठिसूळ असते. त्याच्या वस्तू जोराचा धक्का लागताच किंवा खाली पडताच फुटतात.

प्राचीन भारतात लोहविद्येचा बराच विकास झाला होता. दिल्ली येथील प्रचंड लोहस्तंभ हे त्याचे उत्तम उदाहरण होय. पंधराशे वर्षांपूर्वी तो निर्माण करण्यात आला. उन्हापावसात उभा असूनही त्याला अजून गंज चढलेला नाही.

लोह हा धातू अत्यल्प प्रमाणात शरीराच्या आरोग्यासाठी आवश्यक असल्यामुळे विविध प्रकारच्या औषधांच्या रूपाने त्याचे सेवन प्राचीन काळापासून केले जाते. [वे. इं.; आ. ए. इं.; की. पॉ.; अगारिया; हि. ध.]

लोहडी

पंजाब प्रदेशातील एक लोकप्रिय सण. हा सण पौष महिनाभर साजरा करतात. या महिन्यातला अखेरचा दिवस हा या सणाचा महत्त्वाचा दिवस होय. या सणासंबंधी अनेक लोकगीतेही आहेत. पाहा—पंजाब. [पं. जी. सा.]

लोहयुग

मानवी संस्कृतीच्या विकासक्रमातील एक कालखंड. पाषाणयुगानंतर ताम्रयुग आणि कांस्ययुग सुरू झाले. सिंधु-संस्कृतीचा विकास कांस्ययुगात झाला. त्यानंतर भारतात वैदिक आर्यसंस्कृती विकास पावली. आर्य लोकांना लोहाचा उपयोग माहीत होता. मात्र लोहयुग केव्हा सुरू झाले, हे निश्चित सांगता येत नाही. कारण पुराणवस्तुसंशोधनावरून असे ध्यानात येते, की भिन्न भिन्न देशांतील मानवांना लोहाचा उपयोग एकाच वेळी माहीत झाला नव्हता. ताम्र–कांस्ययुगातच या धातूचा शोध लागला असावा आणि त्याचा उपयोग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अल्प प्रमाणात, बहुमोल वस्तू म्हणून किंवा जादूसाठी, अनेक शतके केला जात असावा. लोह दुर्मिळ असल्यामुळे याहून अन्य कारणासाठी त्याचा उपयोग होत नसावा. तांबे वितळविण्यासाठी जी भट्टी पूर्वी वापरीत, तिच्यात लोखंड वितळण्याइतके तपमान उत्पन्न करता येत नसे. त्यामुळे लोखंडाचा रस साच्यात ओतून निरनिराळ्या वस्तू बनवता येत नसत. मऊ झालेला त्याचा गोळा ठोकूनच त्याची हवी ती वस्तू बनवावी लागे. तसेच शुद्ध लोखंड कर्बयुक्त झाल्यावाचून त्याला कठिणपणा येत नाही. कालांतराने सुधारलेल्या भट्टीत लोखंड वितळवून त्यात कर्ब मिसळणे व तो रस ओतून वस्तू बनवणे शक्य झाले, तेव्हा लोहयुग सुरू झाले.

श्री. एन. आर. बानर्जी यांच्या मते आर्य लोकांना भारतात येण्यापूर्वीच लोखंडाचा उपयोग माहीत झाला होता. त्यांच्या जवळ लोखंडाची शस्त्रे होती. त्याचप्रमाणे त्यांच्या रथांना लोखंडाच्या धावा लावलेल्या असत. असे रथ व लोहयुगीन शस्त्रे यांमुळेच भारतातील कांस्ययुगीन द्रविड संस्कृतीवर त्यांना विजय मिळवता आला, असे श्री. स. का. दीक्षित यांचे मत आहे.

वैदिक आर्यांच्या आगमनापूर्वीच भारतातील आदिवासी लोकांना लोह या धातूचा उपयोग माहीत होता आणि त्यांच्याकडूनच आर्यांना लोहविद्या प्राप्त झाली, असे श्री. अ. ज. करंदीकर यांनी प्रतिपादले आहे. त्यांनी केलेले विवेचन असे-- ऐतरेय ब्राह्मणात अशी आख्यायिका आहे, की विश्वामित्राने आपल्या शंभर पुत्रांपैकी पन्नास पुत्रांना शाप दिल्यामुळे ते आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद, मूतिब झाले. म्हणजे ते पन्नास पुत्र त्या अनार्य लोकांच्या आश्रयाला गेले. त्या रानटी मानलेल्या टोळ्यांमध्ये तेव्हा अशोधित लोह शुद्ध करण्याची व पोलाद बनवण्याची विद्या प्रचलित होती. ती विद्या त्यांच्याकडून विश्वामित्राच्या पुत्रांना लाभली असली पाहिजे. या अनुमानाला संस्कृतकोशाचाही आधार आहे. संस्कृतात मुंड शब्दाचा अर्थ लोह असाही होतो. मुंड लोकांत लोहाचा वापर मोठ्या प्रमाणात होत असल्यामुळे मुंड म्हणजे लोह असा अर्थ प्रचलित झाला असावा. संस्कृतात लोहाला मुंडायसम् व मुंडलोहम् ही नामेही आहेत. या नामांवरून मुंड लोक लोहाशी किती तादात्म्य पावले होते, याची कल्पना येते. यावरून मुंड लोकांचे भारतात आगमन झाले, तेव्हापासून या देशात लोहयुगाचे प्रवर्तन झाले, असे म्हणता येते. लोहारांना वेदांत कर्मार ही संज्ञा दिली आहे, त्यावरून वैदिक आर्यांना लोहविद्येची रहस्ये मुंड द्रविड समाजातील कर्मार श्रेणीकडून लाभली असावीत, असे अनुमान निघते. तसे नसते, तर मराठीतील लोहाराप्रमाणे वैदिक संस्कृतीत लोहकार, अयस्कार असे शब्द भेटले असते. लोह आणि पोलाद करण्याची रहस्ये ज्यांना आर्यांच्या आधीच अवगत झाली होती, त्या लोकांचा वैदिक आर्यांनी तरवारींच्या साहाय्याने संहार केला, असे म्हणणे हास्यास्पद आहे. उलट वस्तुस्थिती अशी होती, की बहुसंख्य आर्यांना अल्पसंख्य मुंड सहज जिंकीत.

लोहयुगातील मानवाचे जीवन—चालू शतकात भारतात निरनिराळ्या जागी उत्खनन करून प्राचीन संस्कृतीचे जे अवशेष शोधून काढले गेले, त्यांवरून लोहयुगातील जीवनाची अंधुक कल्पना करता येते. त्या काळातील चित्रित राखी रंगाची खापरे विपुल प्रमाणात मिळाली आहेत. त्यांवरील नक्षीकाम सुंदर असून, त्यात स्वस्तिक हे प्रतीक अनेक जागी आढळते.

लोहयुगाच्या प्रारंभीच्या काळात मातीची घरे बांधण्याची चाल होती, असे दिसते. काही ठिकाणी उन्हात वाळवलेल्या मातीच्या विटा वापरलेल्या आढळतात. भाजलेल्या विटा थोड्याच सापडल्या आहेत. भिंतींना मजबुती आणण्यासाठी वेताचा वापर केलेला असून, गिलावा करताना मातीत भाताचे तूस मिसळलेले आढळते. वेत व गवत वापरूनच घरांची छपरेही बनवीत असावे, असे वाटते. शेती हा त्या काळातला प्रमुख उद्योग असून, तांदूळ हे मुख्य अन्नधान्य होते. मासे हे पूरक अन्न असावे. तांबे व लोखंड या धातूंच्या वस्तू व उपकरणे बनवणे हा व्यवसायही चांगला चालत होता. लाकूड व धातू यांवरील कोरीव कामाचा उद्योगही लोक करीत होते. त्या काळातील लोकांना काच बनवणे माहीत होते आणि काचेच्या बांगड्या हातात घालण्याची प्रथाही होती. निरनिराळ्या प्रकारचे मणी बनवून ते त्यांच्या माळा गळ्यात घालीत. बांबूच्या टोपल्या बनवण्यात ते लोक कुशल होते.

त्या काळातली थोडीशी नाणी सापडली असली, तरी बहुतेक सर्व व्यवहार वस्तुविनिमयानेच केला जात असावा.

त्यानंतरच्या काळात लोखंडाचा उपयोग अधिकाधिक प्रमाणात होऊ लागला आणि उद्योगधंद्यांची वाढ होऊन समृद्धी निर्माण झाली.

आर्यांच्या आगमनानंतर उ. भारतात लोहयुग सुरू झाले आणि काही शतकांनंतर ते द. भारतात सुरू झाले, असे श्री. एन. आर. बानर्जींनी प्रतिपादले आहे. स.पू. ४थ्या शतकापर्यंत सर्व भारतात शस्त्रे व उपकरणे बनवण्यासाठी लोखंडाचा उपयोग सुरू झाला होता, असे श्री. ह. धी. सांकलिया यांचे मत आहे. त्याच काळात अनेक नगरांची स्थापना झाली व दगडांच्या भक्कम पायावर विटांची घरे बांधली जाऊ लागली. [आ. ए. इं.; प्रा. भा. सं.; श्री. अ. ज. करंदीकर– म. सा. प., जुलै-ऑगस्ट, १९६७]

लोहाणा एक जमात. या लोकांना लुहाणा असेही म्हणतात. त्यांची बस्ती सिंध, काठियावाड, कच्छ, मुलतान,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बडोदा, इ. भागात आढळते. लोहाणांच्या उत्पत्तीसंबंधी बरीच मते प्रचलित आहेत. त्यांतील काही अशी –

(१) आम्ही रामपुत्र लवाचे वंशज आहो, असे हे सांगतात.

(२) डेपला जातीचे लोक एक दंतकथा पुढीलप्रमाणे सांगतात – लखो व दामो असे दोन भाऊ होते. ते फिरत फिरत काठियावाडमधील धांगध्र्याला आले. लखोपासून लोहाणा व दामोपासून डेपला या जमातींची उत्पत्ती झाली.

(३) एक परंपरा सांगते, की ही जमात राठोड राजपुतांपैकी आहे. कनोजचा राजा जयचंद याने त्यांचा फार छळ केला म्हणून त्यांनी राजाविरुद्ध शस्त्र उपसले आणि राजापासून आपला बचाव व्हावा म्हणून वरुणाची आराधना केली. वरुणाने प्रसन्न होऊन त्यांना न कळत एक लोखंडी किल्ला बांधला व त्यात त्यांना आश्रय घ्यायला सांगितले. किल्ल्याच्या आश्रयाने त्यांना विजय मिळाला. पुढे एकवीस दिवसांनी तो किल्ला अदृश्य झाला. तेव्हापासून त्यांनी राठोड हे नाव सोडून लोहाणा हे नाव धारण केले.

(४) ए. एम्. टी. जॅक्सन या आंग्ल पंडिताच्या मते लवण शब्दावरून लोहाणा हा शब्द तयार झाला असावा. कारण ते पूर्वी मिठाचा व्यापार करीत होते.

(५) श्री. बर्टन हा पंडित म्हणतो की, मुलतानजवळ लोहपूर नावाचे गाव आहे. तिथले हे लोक असावे.

इतिहास – त्यांच्या उत्पत्तीसंबंधी बरीच मतभिन्नता दिसत असली, तरी ते मूळचे राजपूत असून, राज्यकर्ते होते असे दिसते. अरबांची सिंधवर स्वारी होण्यापूर्वी अधम लोहाणा हा ब्राह्मणाबादचा राज्यपाल होता. तो लाखी व सम या प्रदेशांचा राज्यकारभार पाहत असे. त्याने आलारेच्या राजाची सत्ता मानली नाही म्हणून त्या राजाने लोहाणांवर स्वारी केली. अधम पळून गेला आणि त्याच्या मुलाने शरणागती पत्करली. तेव्हापासून त्यांचे राजकीय वर्चस्व व दर्जा इतका खालावला, की लोक त्यांना क्षत्रिय म्हणूनही ओळखीनासे झाले.

मुसलमानांच्या वारंवार होणाऱ्या स्वाऱ्यांच्या त्रासाला कंटाळून हे लोक मुलतान सोडून त्याच्या दक्षिणेला राजस्थानात आले. आणि इ. स. च्या चौदाव्या-पंधराव्या शतकात राजपुतांनी सौराष्ट्रावर स्वाऱ्या केल्या तेव्हा त्यांचे अनुचर म्हणून हे गुजरातमध्ये आले.

विवाहप्रथा – लोहाणांमध्ये बऱ्याच कुळया आहेत. समान देवकाच्या कुळांत लग्नसंबंध करीत नाहीत. विवाहसमारंभांत भुताखेतांना दूर ठेवण्यासाठी ते क्षेत्रपालाला बकऱ्याचा बळी देतात. त्यांच्यांत बालविवाह व पुनर्विवाह रूढ आहेत. सिंध प्रदेशातील विधवेला कोणाशीही पुनर्विवाह करायला मोकळीक असली, तरी दिराशी केलेला पुनर्विवाह हा उत्तम मानला जातो. गुजरातमध्ये घटस्फोट प्रचारात असला, तरी सिंधमध्ये तो नाही.

प्रसूतिप्रथा – सिंधी लोहाणा स्त्री प्रसूत झाल्यावर तिची वार एका मडक्यात घालतात आणि तिच्यावर सात लवंगा व सात वेलदोडे टाकतात. मग मडक्यावर लाल सात पट्टे ओढतात. नंतर ते मडके पाण्यात फेकून देतात.

देवधर्म – यांची १३६ देवके आहेत. देवकांची नावे पशुपक्षी व जड वस्तू यांच्यावरून घेतलेली आहेत. ज्या लोहाणांचे नाग हे देवक असते, त्यांना नागापासून भीती नसते, अशी त्यांची समजूत आहे. रांडेलमाता ही त्यांची कुलदेवता होय. काहीजण सिंधू नदीला दर्यापीर नावाची देवता समजून तिला भजतात. नरसिंगजी हेही त्यांचे एक दैवत आहे. यांच्यांत रामभक्ती विशेष आहे. रामनवमीला ते मोठा उत्सव करतात. त्या दिवशी घरोघर रामायणाचे वाचन होते. लोहाणांचे बहुतेक आचार भाटिया लोकांप्रमाणे असतात. सारस्वत ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

बहुतेक सर्व लोहाणा लोक नानकशाही पंथाचे अनुयायी आहेत. काही वल्लभपंथीही आहेत.

उद्योगधंदे – हे लोक फार धाडसी असून, व्यापारी आहेत. परंतु काही लोक गवंडी, शेतकरी किंवा शेतमजूरही आहेत.

जातपंचायत – कच्छ लोहाणांमध्ये जातपंचायत असते. शहरातल्या पंचायतीत तीनपासून बारापर्यंत पंच असू शकतात. परंतु खेड्यातल्या पंचायतीत केवळ दोनच लोक असतात. पंचायतीला अध्यक्ष नसतो. पंचायत बोलावण्याचे काम उपाध्याय करतो. पंचांना जन्म, विवाह व मरण या प्रसंगी देणग्या मिळतात. घटस्फोटाच्या वेळी ते नवरदेवाकडून एक हजार रुपये दंड घेतात. त्याशिवाय पंचांचे लक्ष व्यापाराकडेही असते. मोठमोठ्या व्यापारी पेठांच्या गावी ते कर वसूल करतात.

अलिकडे या जातीत बरीच जागृती होऊ लागली आहे. त्यांच्या सामाजिक परिषदा होऊन त्यांत जिव्हाळ्याच्या प्रश्नासंबंधी ठराव केले जात आहेत. सभेत संमत झालेले ठराव अंमलात आणण्यासाठी ते बहिष्कारासारखे उपायही योजतात.

मर्तिकप्रथा – सक्कर जिल्ह्यातील मागसलेल्या लोहाणांमध्ये एखादी स्त्री मरण पावली, तर तिच्या माहेरची माणसे तिच्या मृत्यूबद्दल शोक करताना सासरच्या लोकांना शिव्या-शाप देतात.
[सिं. क.; म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.]

लोहाभिसार

एक प्राचीन धार्मिक आणि लष्करी स्वरूपाचा विधी. राजे अथवा सेनापती युद्धात जय मिळावा म्हणून युद्धापूर्वी शस्त्रांची जी पूजा करीत, त्या पूजा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विधीला लोहाभिसार किंवा लोहाभिसारिक अशी नावे आहेत. या वेळी दुर्गेची सोन्याची, चांदीची अथवा चिकणमातीची मूर्ती करून तिचीही पूजा करतात.

हे कर्म आश्विन शुद्ध प्रतिपदेपासून अष्टमीपर्यंत करायचे असते. त्याचा विधी असा—पूर्वेकडे व उत्तरेकडे सखल होत गेलेल्या ठिकाणी सोळा हात लांबरुंद असा मंडप घालून तो लता-पल्लवांनी सजवावा. त्याच्या आग्नेय बाजूला एक हात लांबरुंद आणि तीन मेखलांनी युक्त असे पिंपळपानांच्या आकाराचे कुंड करावे. मग या मंडपात राजचिन्हे, शस्त्रे व अस्त्रे आणून त्यांचे अधिवासन करावे. नंतर ब्राह्मणाने त्या देवतेच्या लिंगांनी युक्त अशा ॐकारपूर्वक मंत्रांनी आज्यहोम करावा. शस्त्रास्त्रमंत्रांनी घृतयुक्त पायसाचा होम करावा. हुतशेष असेल ते अश्वांच्या राजाला (मुख्याला) द्यावे. जिन घातलेले घोडे व हत्ती अलंकृत करून वाद्यघोषासह नगरात फिरवावे. राजाने या कालावधीत प्रतिदिवशी स्नान करून पितर व देवता यांचे आणि राजचिन्हे व शस्त्रास्त्रे यांचे शास्त्रोक्त पूजन करावे.

लोहाभिसार कर्म बरेच प्राचीन आहे. भारतीय युद्धापूर्वी दुर्योधनाने पांडवांना जो निरोप पाठविला होता, त्यात याचा उल्लेख आहे (उद्योग १६०.९३) [नि. सि.; हि. ध.]

लोहार धंद्यावरून बनलेली एक जात. लोह म्हणजे लोखंड आणि त्याचे काम करणारे ते लोहार होत. प्राचीन काळी घडकाम करणाऱ्या वर्गाला कर्मार अशी संज्ञा होती. कर्मार शब्द वैदिक वाङ्मयात आढळतो (ऋ. १०.७२.२). अथर्ववेदात त्याला रथ तयार करणारा बुद्धिमान कारागीर म्हटले आहे (३.५.६). हा अशुद्ध धातूचा रस करतो आणि त्यापासून शुद्ध धातू बनवितो म्हणून त्याला ध्मातृ म्हटले जाते (ऋ. ५.९.५). वेदकाळी हा धातूची सोमपात्रे तयार करीत असे. (कर्मार पाहा)

आज लोहारांची वस्ती भारतात सर्वत्र आढळत असली, तरी ते एकत्रित असे कुठे आढळत नाहीत. कोणत्याही खेड्यात त्यांची दोन चार कुटुंबे असतात. श्री. रिस्ले या वंशशास्त्रज्ञाच्या मते, ही जात अनेक वंशांच्या आणि अनेक जमातींच्या लोकांची मिळून बनली आहे. त्यांच्या देवदेवता, धर्म, विवाह, चालीरीती, इ. बाबी गावानुसार बदललेल्या असतात.

त्यांच्यांत एवढी विविधता असली तरी, त्यांचा व्यवसाय मात्र सर्वत्र सारखा आढळतो. ते शेतीसाठी लागणारे नांगराचे फाळ, कुळवाची पास, गाडीच्या धावा, कणे, लोखंडी मोटा, कुदळी, टिकाव, कुऱ्हाडी, पहारी, खुरपी, विळे, वेळचा, घमेली, जात्याच्या खुंट्या, इ. वस्तू तयार करतात. त्याचप्रमाणे त्यांच्या दुरुस्त्या आणि त्यांना धार लावणे, इ. कामांचाही त्यात समावेश असतो.

महाराष्ट्रातल्या लोहारांमध्ये मराठा, पांचाळ, कन्नड, कोकणी व गुजराती अशा पाच पोटजाती आहेत. नाव व व्यवसाय याशिवाय त्यांच्यांत कोणतेही साम्य आढळत नाही. मराठा लोहार आपली उत्पत्ती विश्वकर्म्यापासून झाली असे सांगतात. आपण देवांचे शिल्पी आहो, अशी त्यांची समजूत आहे. सोलापूर भागातल्या लोहारांमध्ये सात पोटजाती असून, त्यांचे आपापसांत रोटी-बेटीव्यवहार होत नाहीत. या भागाखेरीज अन्यत्र असणाऱ्या लोहारांचे सर्व व्यवहार बहुधा जातीतल्या जातीतच होतात. त्यांच्यांत बालविवाहाची पद्धत रूढ आहे. त्यांच्यांत मामेबहिणीशी लग्न करता येते. सांडस, चिमटा, हातोडा व पंचपल्लव ही त्यांची देवके होत. काही ठिकाणी लग्नापूर्वी एक दोन दिवस नवरा मुलगा जानवे घालायला आरंभ करतो. लग्नाच्या वेळी वधू-वरांना बांबूच्या टोपलीत समोरासमोर तोंड करून उभे करतात व लग्न लावतात. त्यांच्यांत घटस्फोट आणि पुनर्विवाह रूढ आहेत.

मुलगी प्रथम ऋतुस्नात झाली, की तिला पंधरा दिवस गोडधोड खायला घालतात आणि सोळाव्या दिवशी तिची ओटी भरतात.

त्यांच्या बहुतेक चालीरीती मराठ्यांप्रमाणे आहेत. खंडोबा, भवानी, गणपती, भैरोबा, महादेव ही त्यांची दैवतें होत. काहींना मांस व मद्य चालते. काही मराठे लोहार लिंगायत आहेत. लिंगायत नसणारे काही लोहार धार्मिक विधीसाठी ब्राह्मणांना बोलावतात.

हे मृताला जाळतात किंवा पुरतात. माणूस मरायला लागला की त्याला भिंतीला टेकून घोंगड्यावर बसवितात आणि त्याच्या कानात रामनाम उच्चारतात.

कन्नड लोहारांना कम्मार असेही म्हणतात. त्यांनी सुतारकाम केल्यास त्यांना आचारी आणि लोखंडी काम केल्यास लोहार असे म्हणण्याची पद्धत आहे. हे सर्व लोक बहुतेक दक्षिण कोकण व गोवा या भागातले असावे, असे म्हटले जाते. त्यांच्यांत कुळे व गोत्रे आहेत. या लोकांत आते–मामे बहिणीशी लग्न करतात. अंकोल्याची कल्लम्मा ही त्यांची कुलदेवता होय. काहींचे उपाध्येपण ब्राह्मण करतात. हे लोक सामाजिक तंटे जातपंचायतीमार्फत सोडवतात.

हे लोक मृताला जाळतात आणि श्राद्धही करतात.

कोकणी लोहारांना धावड म्हणतात. त्यांच्यांतही अनेक पोटशाखा आहेत. त्यांचे बेटीव्यवहार जातीबाहेर होतात. कळंबाचे झाड हे त्यांचे देवक असून, त्यांचे बरेच आचार-विचार मराठा लोहारांसारखे आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

गुजराती लोहार आपली उत्पत्ती पीठवोपासून झाली असे सांगतात व त्यासंबंधी एक कथा सांगतात, ती अशी– शिवाला 'अंधार व ढंढकार या राक्षसांना मारायला शस्त्रे हवी होती. ती तयार करून देण्यासाठी पार्वतीने शिवाच्या पाठीवरील मळापासून या लोहारांना उत्पन्न केले. त्यांच्यांत भावनगरी, पांचाल, सिरोहिया, सुरती, खंबाती व पराजिया असे सहा भेद आहेत. या सहाही शाखांत रोटी-बेटी व्यवहार होत नाहीत. त्यांच्या काही शाखांत आतेमामे बहिणीशी लग्न होते. त्यांना पुनर्विवाह मंजूर नाही; पण तुरळक प्रमाणात विधवा स्त्रिया धाकट्या दिराशी लग्न करतात. काही गुजराती लोहार मांसाहारी आहेत. औदीच्य ब्राह्मण त्यांचे उपाध्येपण करतात. भवानीमाता ही त्यांची प्रमुख देवता होय.

हे लोक मृतांना जाळतात आणि त्याचे श्राद्धही करतात.

त्यांच्यांत प्रत्येक पोटजातीची जातपंचायत असते आणि ती बोलावण्याचे काम त्यांचा उपाध्याय करतो.

लोहार हा शेतीच्या कामातला एक महत्त्वाचा बलुतेदार आहे. तो हत्यारांना धार लावणे आणि काही किरकोळ दुरुस्तीची कामे बलुत्याच्या मोबदल्यात करतो. बलुत्यात न परवडणारे काम तो रोखीने करतो. काम बलुत्याचे असो किंवा रोखीचे असो, त्याला लागणारा कोळसा व लोखंड शेतकऱ्याने पुरवावे लागते. त्याचे बलुते ठरलेले नसते. शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याला बलुते देतो. काही ठिकाणी लग्नसमारंभात त्याला एक पागोटे आणि एक रुपया दक्षिणा मिळते. विदर्भात त्याला खाती म्हणतात आणि पागोट्याच्या ऐवजी शिधा देतात.

मध्य प्रदेशातल्या लोहारांना घिसाडी, पांचाळ व धाने ही नावे आहेत. धाने लोहारांचा सामाजिक दर्जा फार निकृष्ट आहे. घिसाडी लोक आपल्याला राजपुतांचे वंशज म्हणवितात आणि ओझा लोहार आपण ब्राह्मणांची संतती असल्याचे सांगतात. त्यांच्यांत विधवाविवाहाची प्रथा असून, तो विवाह बापाच्या घरी होतो.

दुल्हादेव व सोमलाई हे त्यांचे देव आहेत.

मृतिकाच्या अकराव्या दिवशी ते तांदुळाच्या पिठाची मयताची मूर्ती करतात आणि तिच्या तोंडात तांदूळ घालून म्हणतात. 'जा आणि मनुष्यजन्म घे.' मग त्या मूर्तीचे नदीत विसर्जन करतात.

राजस्थानात काही हिंदू आणि काही मुसलमान लोहार आहेत. हेन्री इलियटच्या मते कुरमी जातीचा पुरुष आणि एक बदफैली स्त्री यांची ही संतती आहे. विश्वकर्मा नावाच्या ऋषीपासून यांचा जन्म झाला, असे श्री. एम. ए. शेरिंग म्हणतो. इथल्या लोहारांच्या गाडी लोहार आणि मालविया लोहार अशा दोन पोटजाती आहेत. (गाडी लोहार पाहा).

मालविया सांगतात, की आम्ही माळव्यातून इकडे आलो, म्हणून आम्हांला हे नाव मिळाले. गाडी लोहारांत आणि यांच्यांत रोटी-बेटीव्यवहार होत नाही. मालविया सुतारी कामही करतात. हे लोक गाईच्या कातड्याचा भाता वापरतात म्हणून यांचा सामाजिक दर्जा खालचा मानला जातो. हे शक्तीची उपासना करतात.

मुसलमान लोहार सुन्नी असून, त्यांच्यांत मुलतानी व नागोरी असे भेद आहेत. मुलतानातून आलेले ते मुलतानी होत. हे उत्तम कारागीर आहेत.

पंजाबी लोहारांत मुसलमान, शीख व बौद्ध आहेत. हे लोहारी कामाशिवाय शेती आणि शेतमजुरीही करतात. इथल्या सुतारकाम करणाऱ्या लोहारांना तारखाँ अशी संज्ञा आहे.

भुवालिया नावाची लोहारांची एक भटकी जात इथे आहे. ते आपणाला तुंवर राजपूतांचे वंशज म्हणवितात. परंतु राजपूत त्यांचे म्हणणे मंजूर करीत नाहीत. भुवालिया असे सांगतात, की चितोडचा पाडाव झाल्यावर आमच्या पूर्वजांनी तो पुन्हा ताब्यात येईपर्यंत घरे न बांधण्याची आणि पागोटे न घालण्याची प्रतिज्ञा केली होती. यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट आहे. ते मारवाडी भाषा बोलतात आणि सदैव गावाबाहेर राहतात. आपल्या धंद्यात हे लोक निष्णात आहेत.

बिहार प्रदेशातले लोहार सामान्यतः बढई नावाने ओळखले जातात. त्याशिवाय काहींना लोहार व कामार असेही म्हणतात. बढई, लोहार व कामार हे तिथल्या आर्यवंशी लोहारांहून वंशाने वेगळे आहेत. आर्यवंशी लोहारांची कामाची पद्धतही वरील लोहारांहून भिन्न आहे. आर्य लोहार लोखंड वितळवण्याचे काम करीत नाहीत. त्यांचे भाते कातड्याचे नसतात. ते लोखंडाच्या अन्य वस्तूंप्रमाणे घोड्याचे व बैलाचे नाल तयार करतात. बढई लोहार घोड्याचे नाल बनवीत नाहीत. असुर व असुराणी यांच्यापासून आमची उत्पत्ती झाली, असे बढई व कामार लोहारांचे म्हणणे आहे.

छोटा नागपुरातील काही खेडुत लोहार आजही लोखंड वितळवून त्यापासून वस्तू बनवितात. त्यांच्या चालीरीती तिथल्या आदिवासी लोहारांप्रमाणे आहेत.

या लोहारांमध्ये घराणी अथवा कुळ्या आहेत. कुळ्यांची नावे मुंडांच्या कुळ्यांसारखी असून, त्यांत भणवार व तिरकी असे दोन भेद आहेत. भणवार लोहार स्वतःला इतरांहून श्रेष्ठ समजतात.

विवाहप्रथा – एकाच कुळीत हे लग्न करीत नाहीत. मुलाचे आई-बाप लग्न जमवितात. त्यांचा विवाहविधी मुंडांच्या विवाह-

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पद्धतीपेक्षा थोडा निराळा आहे. जिथे त्यात फरक आढळतो, तो भाग असा— सुश्या नावाचा तांबड्या छातीचा पक्षी ओरडला तर हे वाङ्निश्चय रद्द करतात. लग्नाची प्रारंभीची बोलणी झाल्यावर मागणीविधी होतो. त्या वेळी वरपक्षाकडील तीन, पाच अथवा सात लोक वधूच्या घरी जातात. तिथे त्यांचे पाय धुऊन त्यांना तेल लावले जाते. मग पाहुण्यांना कडब्यावर. बसवितात. घरातल्या वायका त्यांच्या समोर जोंधळ्याच्या पिठाची चौकोनी रांगोळी काढतात. रांगोळीवर एक पाट ठेवतात. पाटावर नवरीला बसवितात. तिच्या समोर पाण्याने भरलेले एक भांडे आणि आंब्याचे पान असते. नंतर एक न्हावी अथवा तो नसल्यास अन्य कोणीतरी वधूसमोर धूप, गूळ व तूप जाळतो. नवरी मुलगी समोरच्या फुलपात्रात तांदळाचे चार दाणे टाकून त्याला नमस्कार करते. नवरीच्या डाव्या-उजव्या हाताला तिचे वडील आणि सासरे बसलेले असतात. त्या दोघांच्या हातांत तांदूळ लावलेली आंब्याची पाने असतात. ते व्याही-व्याही ती पाने एकमेकांच्या अंगाला लावतात. मग ते एकमेकांच्या कानांत फुले खोवतात. फुले खोवून झाल्यावर ते उभे राहतात आणि एकमेकांच्या दंडाला धरतात. त्या वेळी वधूपिता वरपित्याला म्हणतो. 'हे बघा भाऊ, तुम्ही माझ्या दंडाला धरले आहे. आता हे लग्न तुम्ही मोडले तर मी तुमचा हात कापीन.' वरपिता उत्तरतो. 'ठीक आहे! तुमची मुलगी आंधळी-पांगळी कशीही असली तरी हे लग्न मी पार पाडीन.' मग ते एकमेकांना आलिंगन देतात आणि मागणीविधी पुरा होतो.

लोहार स्त्री

लग्नात बळी देण्याचा एक कार्यक्रम असतो. हा विधी ते पनहरकडून पार पाडतात. शिवाय पनहर बोहल्याच्या मध्यभागी पुरलेल्या खांबाभोवती माती आणून टाकण्याचे काम करतो. लग्नाच्या अखेरीला हरीबोल असे म्हणून ते हा समारंभ संपवितात.

काही वर्षांपूर्वी ते मुलाची नाळ बाणाने आणि मुलीची नाळ सुरीने कापीत. आता हा नियम ते पाळीत नाहीत. मुलाचे जावळ सहाव्या दिवशी काढतात आणि ते जावळ गवतात दडवून ठेवतात. तसेच ते या दिवशी सटीची पूजा करतात. सहाव्या दिवशी जमले नाही, तर ती बाराव्या दिवशी करतात. तिला बाढी असे म्हणतात. सटीच्या दिवशी सुईण मुलाला उकिरड्यावर नेऊन ठेवते आणि तिथून परतल्यावर म्हणते. 'हे मूल कोणाचे आहे ते पाहावे आणि ज्याचे असेल त्याने ते घेऊन जावे.' मग मुलाची आई, आजी अथवा मावशी येऊन मुलाला उचलून नेते.

यांच्यांत जातपंचायतही असते. पंचायतप्रमुखाला कर्ता आणि त्याच्या मदतनिसाला बंधरी म्हणतात.

बंगालमधील कर्मकार लोक अन्य लोहारांप्रमाणे सर्व लोहारी कामे करतात. ते पूर्वी खाणीतून लोखंड काढीत होते. पण आता बाजारात विपुल लोखंड मिळते म्हणून त्यांनी हे काम सोडून दिले. याशिवाय पहिल्या श्राद्धाच्या वेळी लागणारा लाकडी स्तंभही ते करतात. या स्तंभाशिवाय अन्य कोणतेच लाकडी काम ते करीत नाहीत. कर्मकार स्त्रिया नवऱ्याच्या कामात भाग घेत नाहीत. हे कारागीर आपले कोरीव कामदेखील हातोड्यानेच करतात.

देवधर्म — हे लोक पितरांची पूजा करतात. त्यांची पितरोपासना मुंडांप्रमाणे असते. ते सिङ्बोंगाला भगवान समजून त्याची पूजा करतात. प्रत्येक लोहाराने आयुष्यात एकदा तरी देवाला अथवा भुताला डुक्कर, बकरी, गाय अथवा बैल यांपैकी एकाचा तरी बळी देणे आवश्यक असते. बळीसाठी रेडा चालत नाही. काही सधन लोहार भुताला बैल अथवा गाय देण्याचा नवसही बोलतात. नवसाची आठवण म्हणून बळी दिलेल्या प्राण्याच्या रक्तात थोडा भात कालवून तो झोपडीत टांगून ठेवतात. बळी जाणाऱ्या पशूचा वध त्याच्या डोक्यात घण घालून गावाच्या हद्दीत कुठेही करतात. पशूवर घण घालण्याचे काम नवस बोलणारी व्यक्ती करीत नसते.

सणवार — सरहुल आणि जोमनाओआ हे दोन सण ते साजरे करतात. सरहुल सण चैत्र मासात येतो आणि तो मुंडांच्या बा परब सणासारखा असतो. या दिवशी ते पूर्वजांच्या नावाने गोठ्यात डुकराचा बळी देतात. तिथे मक्याचे पाच लहान लहान ढीग करून त्यावर डुकराचे रक्त शिंपडतात. मग पूर्वजांची नावे घेऊन, प्रार्थना करून ते म्हणतात, 'आम्हांला विपुल लोखंड मिळावे, आमची अवजारे चांगली व्हावी आणि आमच्या डोळ्यांना इजा होऊ नये.' नया खाणी नावाचा आणखी एक सण असतो. या सणातही पितरांच्या नावाने बळी दिला जातो. सणाच्या दिवशी स्नान करून ते कोणाच्या तरी शेतातून भात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि सोसोच्या झाडाची डहाळी आणतात. भात भाजून त्याचे पोहे करतात, त्यांचा पूर्वजांना नैवेद्य दाखवतात. मग ते पोहे सोसोच्या पानावर घेऊन खातात. त्याच पानांच्या द्रोणातून दारूही पितात. सोसो वृक्ष विषारी असल्याचे सांगतात. पण लोहारांचे म्हणणे असे, की या सणात त्याचे विष बाधत नाही.

मर्तिकप्रथा – पूर्वी हे लोक प्रेताचे दहन करीत. आता ते प्रेताला पुरतात. स्मशानातून परत आल्यावर घराचे दार हाताने न उघडता लाथेने उघडवात. मयताच्या नावाने घरी जमिनीवर पीठ आणि एका पाटावर थोडे अन्न पसरतात. त्यावर काही खूण उमटली नाही तर ते मयताला पुन्हा आवाहन करीत नाहीत. या बावतीत त्यांची अशी समजूत आहे, की मयताच्या छायेला कोण्या भुताने वाटेत अडवून ठेवले असावे. त्याचप्रमाणे दहाव्या दिवशी मयताच्या आत्म्याची आठवण देणारा छाई भिन्नेक नावाचा एक विधी ते पुढीलप्रमाणे करतात – सर्व लोक प्रथम स्नान करून येतात. मग घरमालक घराच्या अंगणापुढे एक लहानसा खड्डा खणतो; डुकराचा अथवा करड्या रंगाच्या कोंवडयाचा बळी देऊन त्यात त्याचे रक्त शिंपडतो; नंतर लोहसिन नावाचे लोखंडाचे सात तुकडे, कोंबड्याची चोच, पंख आणि पाय अथवा डुकराचे खूर, कान, जीभ व शेपटी आणि मक्याचे काही दाणे खड्डुचात टाकून तो बुजवितो; त्यावर एक दगडी स्मारक बांधतो व स्मारकाभोवती तेलाने थोडे सारवतो. नंतर मद्यपान व जेवणावळ होते. [म. ग्रा. को.; एन्सा. मुंडा.; वै. सा. सं.; म. ग्रा. स.; पूना गॅझे.; मुं. इ. जा.; रे. क. इं.; पं. का.; से. इं. १९५१, वे. वें.]

लोहार्गल राजस्थानातील एक तीर्थस्थान. या राज्यातील पश्चिम लोहमार्गाच्या फाटयावर नवलगढ नावाचे स्थानक आहे. तिथून सुमारे वीस मैलांवर हे स्थान आहे. याला लोहार्गल हे नाव का पडले, त्यासंबंधी एक कथा सांगतात, ती अशी – भारतीय युद्धात असंख्य मानवांची हत्या झाली, त्यामुळे पांडव दुःखी झाले. या पापातून मुक्त होण्याचा उपाय त्यांनी कृष्णाला विचारला. कृष्णाने सांगितले, की 'तुम्ही तीर्थयात्रा करा आणि ज्या तीर्थात भीमाची अष्टधातूची गदा वितळून जाईल तिथे स्नान करा, म्हणजे तुमचे पाप नष्ट होईल.' पांडव तीर्थयात्रा करीत या तीर्थाला आले. त्यांनी तिथे आपली शस्त्रे धुवायला प्रारंभ केला असता भीमाच्या गदेचे पाणी झाले. म्हणून या तीर्थाला हे नाव मिळाले.

लोहार्गलाला पौराणिक इतिहास आहे, असे सांगतात. ब्रह्महृद हे देवांचे आवडते तीर्थ होते. पापी लोकांच्या स्नानाने ते दूषित होईल, अशी देवांना शंका आली, म्हणून त्यांनी ब्रह्मदेवाला या तीर्थाच्या रक्षणाची विनंती केली. ब्रह्मदेवाच्या आज्ञेने हिमालयाने आपला मुलगा केतू याला तीर्थरक्षणासाठी तिथे पाठविले. केतूने तिथे आराधना करून तीर्थाच्या अधिदेवतेला प्रसन्न करून घेतले आणि त्या तीर्थाला आच्छादून टाकले. अशा प्रकारे हे तीर्थ पर्वताखाली लुप्त झाले. पण पुढे पर्वताखालून त्याच्या सात धारा वाहू लागल्या. या धारा अजूनही वाहतात, असे म्हणतात.

या तीर्थात अस्थी विसर्जित करण्यासाठी दूरून लोक येतात. थोडयाच वेळात त्या अस्थी जलरूप होतात, अशी लोकांची श्रद्धा आहे. इथे चैत्रात सोमवती अमावास्या आल्यास त्या दिवशी आणि भाद्रपद अमावास्येला मोठी यात्रा भरते. सूर्य ही इथली प्रमुख देवता आहे. याशिवाय इथे बरीच मंदिरे आहेत. त्यांत खाकीजीचे मंदिर मुख्य आहे. रामानंद संप्रदायाचे हे मोठे केंद्र आहे. [कल्याण–तीर्थांक]

लोहासुरी अगारिया लोकांची लोखंडाच्या भट्टीची एक देवता. हे लोक भट्टी पेटविताना प्रथम या देवतेची पूजा करतात. नंतर त्यांच्यांतील बैगा पुरोहित न व्यालेल्या बकरीचा देवीला बळी देतात आणि भट्टीवर एक भाकरी जाळतात. या विधीमुळे देवी प्रसन्न होते आणि भट्टीवर काम करणाऱ्या कामगाराला कोणतीही इजा होत नाही, अशी त्यांची समजूत आहे. पाहा – अगारिया. [देवीकोश ३]

लौगाक्षी (इ. स. चे १० वे शतक) एक शतशाखाध्यायी सामवेदी आचार्य. पौष्यंजी हा याचा गुरु होय. एक स्मृतिकार म्हणून आशौच आणि प्रायश्चित्त या विषयांवरचे याचे श्लोक मिताक्षरेत (याज्ञ. ३.१-२; २६०, २८९) दिलेले आहेत. संस्कार, वैश्वदेव, चातुर्मास्य, वस्तूंची शुद्धी, श्राद्ध, आशौच आणि प्रायश्चित्त या विषयांवरील याचे गद्य उतारे व श्लोक अपरार्कानेही उद्धृत केले आहेत. याने योग आणि क्षेम यांच्या व्याख्या केल्या असून, त्या दोहोंत अभिन्नत्व असल्याचे सांगितले आहे. याने आर्षाध्याय, उपनयनतंत्र, काठक गृह्यसूत्र, प्रवराध्याय व श्लोकदर्पण हे ग्रंथ लिहिले आहेत. [म. च. को.; हि. ध.]

लौगाक्षी भास्कर (इ. स. चे १७ वे शतक) एक पंडित. लौगाक्षी हे याचे आडनाव होय. याच्या पित्याचे नाव मुद्गल व गुरूचे नाव जयराम न्यायपंचानन असे होते. हा काशीत राहत होता. याने न्यायशास्त्रावर न्यायसिद्धान्तदीप व मीमांसाशास्त्रावर अर्थसंग्रह, असे दोन ग्रंथ लिहिले

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. शि. म. परांजपे यांनी अर्थसंग्रहाचे मराठीत भाषांतर करून ते प्रसिद्ध केले आहे. [म. च. को.; का. सा. सा.]

वंग प्राचीन लोक व देश. वंग या जमातीचा प्रदेश तोच वंग देश होय. ऐतरेय आरण्यकात (२.१.१) वंग व मगध या दोन जमातींचा उल्लेख एकत्र केलेला आहे. त्यावरून आर्य लोक त्या काळी वंग लोकांना अनार्य मानीत होते, असे वाटते. वंग हा बंगालचा एक भाग होता. बौधायनाने पुंड्र व सुम्ह यांच्या बरोबर वंग देशाच्या राजांचा उल्लेख केला आहे. आणि महाकाव्ये व पुराणे यांत त्यांचा उल्लेख पुंड्र, सुम्ह, अंग व कलिंग यांच्या बरोबर आलेला आहे. त्यावरून पुराणकाळी वंग, अंग पुंड्र व सुम्ह हे बंगालचे भाग असावे. कालिदासाने वंगांना गंगा व ब्रह्मपुत्रा या नद्यांच्या प्रवाहक्षेत्रात वसलेले लोक असे म्हटले आहे. वंग म्हणजे आताचा बांगला देश असावा, असे दिसते. पश्चिम बंगालला गौड हे नाव होते. युआन च्वांगच्या काळात बंगालमध्ये वंग व गौड ही दोन मुख्य राज्ये होती. इ. स. च्या आठव्या शतकापर्यंत ही दोन्ही राज्ये भिन्न होती. त्यानंतर केव्हातरी त्या दोन्ही प्रदेशांना मिळून बांगला हे नाव मिळाले व त्याचा इंग्रजी अपभ्रंश बेंगॉल असा झाला. [वै. सा.; द्रा. ए. इं.; म. यु. भा. १; का. भा.]

वंजारी या जातीचे लोक भारतात सर्वत्र आढळतात. निरनिराळ्या प्रदेशांत त्यांना निरनिराळी नावे आहेत, ती अशी — बंजारा, ब्रिंजारी, लमाणी, लंबाणी, लंवाडी, लमाण, मथुरिया, चारण, धारी, इत्यादी. पूर्वी यांचा मुख्य धंदा बैलावरून माल वाहून नेण्याचा होता. पण आता ते स्थायिक झाले असून, शेती, पशुपालन, लाकडे व गवत यांचा व्यापार, सावकारी, इ. उद्योग करू लागले आहेत. या जातीतले बरेच लोक पूर्वी चोऱ्या, घरफोडी व वाटमारी करून आपला गुजारा करीत. हे भवानी, बहिरोबा व खंडोबा यांचे उपासक आहेत. पाहा — बंजारा. [अस्पृष्टांचा प्रश्न; दे. को. ३]

वंजीगार एक जात. या लोकांची मूळ वस्ती मद्रासच्या परिसरात होती. परंतु आज ते कर्नाटक व आंध्र या प्रदेशांतही आढळतात. त्यामुळे त्यांना तेलुगू, तमिळ व कानडी या भाषा येतात. हे लोक काळे, उंच व बांधेसूद असतात. वंजीगार माणूस कधीही ताटात जेवत नाही. तो केळीच्या पानावर अथवा वडाच्या पत्रावळीवर जेवतो. या लोकांना मद्य व मांस चालते. हे लोक इमानी, कष्टाळू व हुशार असून, टापटिपीचे भोक्ते आहेत. त्यांचा मुख्य व्यवसाय व्यापार हा आहे. पण सांप्रत त्यांच्यापैकी काही लोक सावकारी व नोकरी करू लागले आहेत.

यांच्यांत अठरा पोटजाती असून, त्यांचा परस्परांशी रोटीबेटीव्यवहार होत नाही. लग्नाच्या दिवशी नवऱ्या मुलाची मुंज आणि लग्नाच्या चौथ्या दिवशी नागबली नावाचा कुलाचार ते करतात.

हे लोक आपली धर्मकृत्ये ब्राह्मणाकरवी करतात. अंगावर तप्त मुद्रा घेण्याची चाल त्यांच्यांत आहे. तिरुमल ताताचार्य हा त्यांचा धार्मिक गुरू असून, कांचीला त्याची गादी आहे. तो वैष्णवपंथी आहे म्हणून शंख, चक्र, गदा व पद्म या चार मुद्रा तो भक्तांच्या दंडावर उठवितो. या लोकांचा भुताखेतांवर विश्वास आहे.

यांच्यांत जातपंचायत आहे. समाजातील किरकोळ भांडणे पंचायतीमार्फत मिटवली जातात.

मर्तिकप्रथा— हे प्रेते जाळतात. अंत्यक्रिया सतानी जातीचा उपाध्याय करतो. प्रेताच्या दंडाला थोडावेळ बांबूचे शंख, चक्र बांधतात. नंतर ती सोडून पाच दिवस घरात ठेवतात. पाचव्या दिवशी राखेबरोबर त्यांचेही विसर्जन करतात. [म. ज्ञा. को.]

वंज्युलिव्रत एक काम्य व्रत. वंज्युली ही आठ महाद्वादशींपैकी एक द्वादशी आहे. जी द्वादशी एक पूर्ण दिवस म्हणजे एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत आणि दुसऱ्या दिवशीही असते तिला वंज्युली म्हणतात. पहिल्या दिवशीच्या द्वादशीला उपवास करतात व दुसऱ्या दिवशीच्या द्वादशीला पारणे करतात. नारायणाच्या सुवर्णमूर्तीची पूजा हा या व्रतातला प्रमुख विधी आहे. फल — सहस्र राजसूय यज्ञांच्या पुण्यापेक्षा अधिक पुण्य. [हि. ध.]

वंदन भक्ती नवविधा भक्तीतील सहावा प्रकार. भगवंताचे माहात्म्य जाणून त्याची स्तुती करणे व त्याच्यापुढे नतमस्तक होऊन त्याला नमस्कार करणे, याला वंदन भक्ती असे म्हणतात.

पादसेवन, अर्चन आणि वंदन हे भक्तीचे प्रकार भगवंताच्या सगुण रूपाशी संबद्ध आहेत. भागवतात सांगितले आहे, की भक्त लोक आपल्या इष्ट देवतेचे नामसंकीर्तन करतात, तेव्हा त्यांचे हृदय प्रेमरसात न्हाऊन निघते आणि ते उन्मत्ताप्रमाणे कधी रडतात, कधी हसतात, तर कधी नाचतात. ते आकाश, जल, वायू, अग्नी, पृथ्वी, चराचर प्राणी, दश दिशा, वृक्ष, इ. सर्वांना विराट पुरुष असलेल्या भगवंताचे शरीर मानतात आणि त्याला नमस्कार करतात. आळवार संतांपैकी कुलशेखराने आपल्याला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अशी प्रेमोन्मत्त दशा प्राप्त व्हावी, अशी कामना केली आहे. पेरियाळवाराने म्हटले आहे, की दिवसरात्र भगवंताचे ध्यान करणारे व त्याच्यापुढे नतमस्तक होऊन त्याला नमस्कार करणारे भक्त ज्या नगरात राहतात, तिथले लोक भाग्यवान होत. विष्णुपुराणात हरिवंदनाचे महत्त्व जागजागी वर्णिले आहे. जो कोणी भगवंताला वंदन करतो, त्याला यमदूत हात लावीत नाहीत, असे एके ठिकाणी म्हटले आहे (विष्णुपु. ३. ७.१८). हिंदी भाषेतील कृष्णभक्त कवींनीही वंदन भक्तीचे माहात्म्य वर्णिले आहे. [भा. द.; त. प्र. हिं. कृ.; हिं. कृ. पु. प्र.]

वंध्या अपत्याला जन्म देण्याची शक्ती नसणाऱ्या स्त्रीला वंध्या असे म्हणतात. या शारीरिक दुर्बलतेबरोबर, त्यात काही दैवी भागही असतो अशी समजूत आहे. गाईची व पाडसाची ताटातूट केली असता वांझपण येते, असे संस्कारकौस्तुभात वायुपुराणाचा हवाला देऊन म्हटले आहे.

स्त्रियांना वांझपण हा शाप वाटतो. ते त्यांच्या जीवनात सलणारे एक मोठे दुःख असते. कुटुंबात अशा स्त्रीबद्दल फारसा आदर असत नाही. क्वचित पतीही तिच्यासंबंधाने उदासीन होतो अथवा तो अपत्यासाठी दुसरी स्त्रीही करतो. महाभारतात तर वांझ स्त्रीशी समागमही निषिद्ध सांगितला आहे. अशा स्त्रीला कोणत्याही मंगल कार्यात भाग घ्यायला सहसा परवानगी नसते. इष्ट कामासाठी बाहेर निघाले असता तिचे प्रथम दर्शन झाले, तर ते अशुभ मानतात. वांझपणामुळे तिच्या आशा-आकांक्षा अतृप्त राहिलेल्या असतात, म्हणून अशा स्त्रीची दृष्ट लागते, अशी लेकुरवाळ्या स्त्रियांची समजूत असते. इतकेच नव्हे; तर तिच्या श्वासामुळे इतर स्त्रियांची मुले मरतात, अशीही एक समजूत आहे. वांझ स्त्रीच्या हातचे अन्नही काही लोकांना चालत नाही. त्यांना जनावरांच्या गोठ्यातही जाऊ देत नाहीत. अशा प्रकारच्या अनेक कारणांनी या स्त्रियांचे जीवन कष्टदायक होत असते. मग त्यातून अपत्यप्राप्तीसाठी नाना प्रकारचे उपाय, नवससायास, व्रत-वैकल्ये, जादूटोणा, इ. उपचार अशा स्त्रिया करतात. त्यांतील काही उपचार असे– मंत्राने भारलेली दोरी कमरेला बांधतात. बाळंतिणीच्या खाटेवर बसून तिला वाढलेल्यातले अन्न खातात. एखाद्या स्त्रीचे मूल जन्माला येताच त्याची नाळ खातात. सूर्याकडे तोंड करून शेवळ्याचा तुकडा खातात. गरोदर स्त्रीच्या ओटीतील तांदुळाची खीर शिजवून खातात. काळ्या कुत्र्याला भाकरी खाऊ घालतात. एखाद्या सत्पुरुषाचे प्रेत स्मशानात नेत असता त्याच्या तिरडीखालून जातात. रात्री नग्न होऊन गर्भवतीच्या घराच्या उंबरठ्याची पूजा करतात. काळ्या मातीच्या भांड्यात कोळसे व उडीद घालून ते भांडे तिवाठ्यावर नेऊन ठेवतात. मुलांच्या केसांची वट कापून जवळ ठेवतात. रजोदर्शनाच्या चौथ्या दिवशी उंबरठ्यावर बसून गूळ-खोबरे खातात. अकरा शनिवारी मारुतीची पूजा करतात. संतान गोपाळ स्तोत्राचे पठण करतात. बारा रविवारीं सूर्यपूजा करतात. सटवीची पूजा करतात. पिंपळाला प्रदक्षिणा घालतात. पौर्णिमेच्या रात्री खापरात दिवा ठेवून ते खापर डोक्यावर घेऊन चांदण्यात फिरतात. सतरा दिवसपर्यंत ब्रह्मचर्याने हरिवंशाचे पारायण करतात. सोन्याची गाय करून ती दान देतात. राम व कृष्ण यांच्या जन्मोत्सवप्रसंगी त्यांच्या मूर्ती (पाळण्यातले श्रीफल) आपल्या ओटीत घालायला लावतात. एखाद्या मुलाचा गुळाने तुलाभार करतात. नद्यांच्या संगमावर पति-पत्नी एकत्र स्नान करतात. अमावास्येच्या रात्री सात विहिरींच्या पाण्याने तिवाठ्यावर स्नान करून नग्नावस्थेत मारुतीला उलट्या प्रदक्षिणा घालतात. [की. पौं.; लो. दं.; रा. का. स.; म. भा. ना.; सं. कौ.]

वंश ब्राह्मण सामवेदाचे एक ब्राह्मण. हे ब्राह्मण अतिशय लहान असून, यात फक्त तीन खंड आहेत. सामवेदाच्या आचार्यांची वंशपरंपरा यात दिलेली असल्यामुळे याला वंश ब्राह्मण असे नाव दिलेले आहे. प्राचीन ऋषींचा इतिहास कळण्यासाठी या ब्राह्मणाचा उपयोग होतो. [वै. सा. सं.]

वंशसाहित्य वंशसाहित्य हे पाली साहित्याचे एक प्रमुख अंग आहे. छांदोग्य उपनिषदात ज्यांना इतिहास-पुराण असे म्हटले आहे, त्या ग्रंथांशी विषय आणि शैली या दृष्टींनी वंशग्रंथांचे साम्य आहे. पण पुराणांपेक्षा वंशसाहित्यात ऐतिहासिक माहिती जास्त प्रमाणात आढळते. वंशसाहित्यात प्रामुख्याने राजांच्या वंशावळींचे वर्णन केलेले आहे.

वंशसाहित्याची परंपरा बरीच प्राचीन आहे. बुद्धघोषयुगाच्या आधीपासून ती सुरू होते आणि इ. स. च्या १९ व्या शतकापर्यंत अविच्छिन्नपणे येऊन थांबते. पाली भाषेतील मुख्य वंशग्रंथ पुढीलप्रमाणे– दीपवंस, महावंस, चूलवंस, बुद्धघोसुप्पत्ती, सद्धम्मसंगह, महाबोधिवंस, थूपवंस, अत्तनगलुविहारवंस, दाठवंस, छकेसधातुवंस, गंधवंस व सासनवंस.

दीपवंस हा वंशसाहित्यातील पहिला ग्रंथ आहे. हा लंकाद्वीपाचा इतिहास आहे. (दीपवंश पाहा) महावंस हाही लंकेचा इतिहास सांगणारा ग्रंथ आहे. या ग्रंथाची शैली महाकाव्याला साजेशी आहे. त्यामुळे याला ऐतिहासिक महाकाव्य असे म्हणायला हरकत नाही.

महावंस हा ग्रंथ ३७ व्या परिच्छेदातील ५० व्या गाथेवर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समाप्त होतो. त्यात महासेनाच्या शासनकालाचे (इ. स. ३२५-३५२) वर्णन आले आहे. त्यानंतरचा आधुनिक कालापर्यंतचा लंकेचा इतिहास त्या ग्रंथाला जोडलेला आहे. या परिवर्धित अंशाला चूलवंस असे नाव आहे. हा इतिहास पाच व्यक्तींनी वेगवेगळ्या काळी लिहिलेला आहे.

बुद्धघोसुप्पत्ती (बुद्धघोषोत्पत्ती) या ग्रंथात बुद्धघोषाचे चरित्र वर्णिलेले आहे. महामंगल नामक एका सिंहली भिक्षूने (इ. स. चे १४ वे शतक) हा ग्रंथ लिहिला असून, त्यात ऐतिहासिक तथ्यांपेक्षा अलौकिक गोष्टींवरच अधिक भर दिलेला आहे.

सद्धम्मसंगह हा ग्रंथ गद्यपद्यमिश्रित असून, धर्मकीर्ती महास्वामी (इ. स. चे १४ वे शतक) नामक एका भिक्षूने तो रचला आहे. यात बुद्धाच्या आज्ञा व प्रारंभिक कालापासून इ. स. च्या १३ व्या शतकापर्यंतचा भिक्षुसंघाचा इतिहास दिलेला आहे.

महाबोधिवंस किंवा बोधिवंस हा ग्रंथ गद्य असून, सिंहली भिक्षू उपतिष्य याने तो रचला आहे. यात अनुराधपूर येथे लावलेल्या बोधिवृक्षाची कथा सांगितली आहे.

सिंहली भिक्षू वाचिस्सररचित थूपवंस या ग्रंथात तीन मुख्य भाग आहेत. पहिल्या भागात गौतम बुद्धापूर्वी होऊन गेलेल्या चौवीस बोधिसत्त्वांचे वर्णन आहे. दुसऱ्या भागात गौतम बुद्धाचे चरित्र सांगितले आहे. आणि तिसऱ्या भागात भगवान बुद्धाच्या शारीरिक अवशेषांवर निर्माण केलेल्या स्तूपांचे आणि त्यांच्या उत्तरकालीन इतिहासाचे कथन आहे.

अत्तनगलुविहारवंस किंवा हत्थवनगल्लविहारवंस हा ग्रंथ गद्यपद्यमिश्रित असून, इ. स. च्या १३ व्या शतकात रचलेला आहे. या ग्रंथात लंकाधिपती सिरिसंबोधी व त्याने निर्माण केलेले विहार यासंबंधी माहिती आहे. अत्तनगलू नामक स्थानी निर्मिलेला विहार अधिक प्रसिद्ध असल्यामुळे या ग्रंथाला हे नाव दिलेले आहे.

दाठवंस या ग्रंथाची रचना सिंहली भिक्षू महास्थविर धर्मकीर्ती याने इ. स. च्या १३ व्या शतकात केली. कलिंगाच्या राजकुमाराने बुद्धाचे दात लंकेत नेले आणि लंकेतील राजा, भिक्षू व लोक यांनी त्यांची पूजा केली, इ. विषय यात वर्णिले आहेत.

छकेसधातुवंस हा ग्रंथ एका ब्रह्मी भिक्षूने लिहिला असून, त्यात बुद्धाच्या सहा केसांवर बांधलेल्या स्तूपांचे वर्णन आहे. इ. स. च्या १९ व्या शतकात हा ग्रंथ रचलेला आहे.

गंधवंस (ग्रंथवंश) या ग्रंथाची रचना इ. स. च्या १९ व्या शतकात ब्रह्मदेशात झाली. पाली भाषेतील ग्रंथकारांचे आणि त्यांच्या ग्रंथांचे विवरण यात दिले आहे. पाली साहित्याचा इतिहास लिहिणाऱ्यांना हा ग्रंथ फार उपयुक्त आहे.

सासनवंस (शासनवंश) हा ग्रंथ ब्रह्मी भिक्षू पञ्ञसामी (प्रज्ञास्वामी) याने इ. स. च्या १९ व्या शतकात लिहिला. हा बुद्धशासनाचा इतिहास आहे. बुद्धकालापासून इ. स. च्या १९ व्या शतकापर्यंत बौद्ध धर्माचा विकास कसा झाला, त्याचे वर्णन यात आहे. विशेषतः ब्रह्मदेशात बौद्ध धर्माचा प्रसार कसा झाला आणि ब्रह्मी राजे व भिक्षुसंघ यांचे संबंध कसे होते, ही त्यातली माहिती महत्त्वपूर्ण आहे. [पा. सा. इ.]

वंशी अली

(इ. स. १७०८–१७६६) ललित संप्रदायाचा संस्थापक. मथुरा येथे वंशी अलीचा जन्म झाला. त्याचे पाळण्यातले नाव वंशीधर असे होते. वंशी अली हे त्याच्या सखीभावाचे साधनागत नाव आहे. त्याचा पिता प्रद्युम्न मिश्र याला दिल्लीचा बादशहा बहादुरशाह याच्या दरबारात बराच मान होता. तो पंडित असून, त्याने भागवताचे चांगले अध्ययन केले होते.

वंशी अली हा राधेच्या वंशीचा म्हणजे बासरीचा अवतार मानला जातो. लहानपणापासूनच त्याला राधेची भक्ती जडली होती. विवाह होऊन गृहस्थाश्रमी बनल्यावरही त्याची राधाभक्ती कमी झाली नाही. पुढे तिसाव्या वर्षी तो वृंदावनात गेला व तिथेच विरक्त वृत्तीने राहू लागला. पुढे वृंदावनातच तो निजधामाला गेला.

वंशी अलीने राधेला आपली उपास्य देवता मानले असून, ती सच्चिदानंदरूप आहे, असे सांगितले आहे. राधा ही सर्वोपरी असून, कृष्णही तिचा अनन्य भक्त आहे. तिच्या ललितादी सख्या तिला आपला पती मानतात. जोपर्यंत भक्ताच्या मनात ललितारतीचा आविर्भाव होत नाही, तोपर्यंत तो राधेच्या प्राप्तीसाठी अधिकारी होत नाही, असे वंशी अलीने सांगितले आहे. राधा हीच सर्वश्रेष्ठ असलेल्या एका वेगळ्या भक्तिपंथाची स्थापना त्याने केली होती. अशा एका महारासाची त्याने कल्पना केली आहे. त्यात त्याने श्रीकृष्णाला उच्च स्थान दिलेले नाही. तो म्हणतो–

सेव्य सदा श्री राधिका सेवक नंदकुमार ।
दूजे सेवक सहचरी सेवा विपुल विहार ।।

अर्थ – राधिका ही सदा सेव्य असून, नंदकुमार कृष्ण तिचा सेवक आहे. (ललितादी) तिच्या अन्य सहचरी या तिची सेवा करतात आणि तिच्या बरोबर विहार करतात.

श्रीकृष्णाच्या अभावामुळे हा रास प्रभावशून्य झाला आहे. या संप्रदायात सहचरीच्या इच्छेनुसार नित्यविहाराचे आयोजन होते. राधा, लाल, ललिता व वृंदावन यांमध्ये कोणताही भेद नाही, असे यात मानले आहे.

वंशी अली हा उच्च कोटीचा भक्त, संस्कृत पंडित व व्रजभाषेचा चांगला कवी होता. त्याने राधातत्त्वप्रकाश व राधा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सिद्धान्त हे दोन ग्रंथ संस्कृत भाषेत रचले आहेत. याव्यतिरिक्त रासपंचाध्यायी, हृदयसर्वस्व आणि इतर अनेक पदे त्याने व्रजभाषेत रचली आहेत. [श्री. परशुराम चतुर्वेदी– राजर्षि अभिनंदन ग्रंथ; ब्र. सां. इ.; अ. श. ब्र. प्रे.]

वंशीवदनदास (इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्य संप्रदायी बंगाली संतकवी. याचा जन्म नवद्वीपाजवळच्या कुलिया पहाड नामक गावी झाला. याच्या पित्याचे नाव छकडिचट्ट असे होते. हा चैतन्य महाप्रभूंचा एकनिष्ठ भक्त असून, चैतन्याने संन्यास घेतल्यावर याने स्वतःला चैतन्यपत्नी विष्णुप्रियेच्या सेवेला वाहून घेतले. याने दीपकोज्ज्वल आणि दीपान्विता या नावांचे दोन ग्रंथ रचले आहेत. पदकल्पतरू नामक कवितासंग्रहात याच्या नावावर पंचवीस व वंशीदास याच्या नावावर सतरा पदे मिळतात. वंशीवदनदास हा वंशीदास या नावानेही कधी कधी काव्यलेखन करीत असे, असे सतीशचंद्र राय यांचे मत असल्यामुळे, पदकल्पतरूतली पंचवीस + सतरा अशी बेचाळीस पदे वंशीवदनदासाचीच ठरतील. चैतन्याविषयीची याची पदे ऐतिहासिक महत्त्वाची मानली जातात. याची भाषा रसवती व रचना ओघवती आहे. [हिं. वं. वै. क.]

व देवनागरी वर्णमालेतील एकोणतिसावे व्यजन. सांप्रतचे स्वरूप प्राप्त होण्यापूर्वी या वर्णाला पाच अवस्थांतून जावे लागले आहे. याची पहिली अवस्था अशोकाच्या गिरनार येथील



व च्या रूपाचा विकासक्रम

शिलालेखात, दुसरी आणि तिसरी मथुरा येथील चार जैन लेखांत (सनपूर्व सुमारे पहिले शतक), चौथी अवस्था प्रतीहार बाउकाच्या जोधपूरलेखात (इ. स. ८३७) व शेवटची अवस्था राजा जाइकदेवाच्या दानपत्रात (इ. स. ९०४) आढळते.

या वर्णाचे स्वरूप कामधेनुतंत्रात पुढीलप्रमाणे वर्णिले आहे –

वकारं चञ्चलापाङ्गि कुण्डली मोक्षमव्ययम् ।
पञ्चप्राणमयं वर्णं त्रिशक्तिसहितं सदा ॥
त्रिबिन्दुसहितं वर्णं आत्मादितत्त्वसंयुतम् ।
पञ्चदेवमयं वर्णं पीतविद्युल्लतामयम् ॥
चतुर्वर्गप्रदं वर्णं सर्वसिद्धिप्रदायकम् ।

अर्थ – हे चंचलापांगी पार्वती, वकार हा कुंडली, मोक्षदायक, पंचप्राणमय, त्रिशक्तिसहित, त्रिबिंदुसहित, आत्मतत्त्वयुक्त, पंचदेवमय, पीतविद्युल्लतामय, चतुर्वर्गप्रद व सर्वसिद्धिदायक आहे.

दंत व ओष्ठ हे याचे उच्चारणस्थान. [श. क.; म. ज्ञा. को.

वक्रतुंड गणपतीचे एक रूप. वक्रतुंड गणेशाचे मंदिर मध्य प्रदेशातील पगारा या गावी आहे. हे गाव मांडवगडापासून दहा मैल अंतरावर आहे.

वक्रतुंड गणेशाची मूर्ती कशी करावी, ते विद्यार्णवतंत्रात पुढीलप्रमाणे सांगितले आहे – हा गणेश रक्तवर्ण, त्रिनेत्र, रक्तपद्मासनस्थ व चतुर्भुज असावा. त्याच्या वरच्या डाव्या हातात पाश व उजव्या हातात अंकुश असावा. त्याचा खालचा उजवा हात अभय मुद्रेत व खालचा डावा हात वरद मुद्रेत असावा.

'वक्रतुण्डाय हुं' हा याचा षडक्षरी मंत्र असून, त्याचे सहा लक्ष पुरश्चरण झाल्यावर अष्टद्रव्यांचे हवनही करावे, असे तिथे सांगितले आहे. [श्रीगणेशकोश]

वक्रतुंडचतुर्थी एक काम्य व्रत. माघ मासातील चंद्रोदयव्यापिनी वद्य चतुर्थीला वक्रतुंडचतुर्थी असे म्हणतात. याच महिन्यात या व्रताला सुरुवात करतात. सायंकाळी गणेशपूजा करणे आणि चंद्रोदयाच्या वेळी चंद्राची पूजा करून त्याला अर्घ्य देणे, हा या व्रतातला प्रमुख विधी आहे. प्रत्येक वद्य चतुर्थीला हे व्रत केले तरी चालते. फल – संकटनाश. [व्रतपरिचय.]

वक्रोक्तिसंप्रदाय संस्कृत साहित्यातील अलंकारशास्त्राचा एक संप्रदाय. कुंतक हा या संप्रदायाचा प्रवर्तक आहे. वक्रोक्ती हा काव्याचा आत्मा आहे, असे याचे मत आहे. त्यामुळेच त्याने आपल्या ग्रंथाचे नाव वक्रोक्तिजीवित असे ठेवले आहे. वक्रोक्ती शब्दाचा अर्थ वक्र + उक्ती म्हणजे सर्वसाधारण लोकांच्या कथनापेक्षा भिन्न व अलौकिक चमत्काराने युक्त असे कथन, असा आहे. कुंतकाने वक्रोक्तीला वैदग्ध्यभङ्गीभणिति (= चातुर्यपूर्ण शैलीने कथन) असे म्हटले आहे.

वक्रोक्तीची ही कल्पना कुंतकाने भामहाकडून घेतली आहे. भामहाने अतिशयोक्तीला वक्रोक्ती असे नाव दिले आहे. आणि तिच्यामुळेच काव्यात अलंकाराची निर्मिती होते, असे मानले आहे. तो म्हणतो –

सैषा सर्वत्र वक्रोक्तिरनयाऽर्थो विभाव्यते ।
यत्नोऽस्यां कविना कार्यः कोऽलङ्कारोऽनया विना ॥

अर्थ – वक्रोक्तीमुळेच अर्थ चांगल्या रीतीने प्रकट होतो. म्हणून कवीने वक्रोक्तीसाठी प्रयत्न करावा. वक्रोक्तीचा प्रयोग केल्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिवाय अलंकार कसा उत्पन्न होणार ?

दंडीनेही वाङ्मयाचे स्वभावोक्तिरूप व वक्रोक्तिरूप असे दोन प्रकार मानले आहेत. वक्रोक्तीत श्लेषाच्या द्वारे सौंदर्याची उत्पत्ती होते, असे त्याने म्हटले आहे. कुंतकानेही याच कल्पनेचा विचार करून वक्रोक्तीला काव्याचे जीवित मानले आहे.

वक्रोक्तीचे मुख्य पाच प्रकार आहेत – वर्णवक्रता, पदवक्रता, वाक्यवक्रता, अर्थवक्रता व प्रबंधवक्रता. याव्यतिरिक्त उपचार-वक्रता ही आणखी एक वक्रता मानलेली आहे. कुंतकाने ध्वनीच्या अनेक भेदांचा समावेश हिच्यात केला आहे. कुंतकाची वक्रोक्तीची कल्पना इतकी उदात्त, व्यापक व बहुमुखी आहे, की तिच्यात ध्वनीचे सर्व भेद सामावून जातात.

कुंतकाची विवेचन करण्याची पद्धती मोठी मार्मिक आहे. वक्रोक्तिजीवित हा त्याचा ग्रंथ अलंकारशास्त्रावरील मौलिक विचारांचे भांडार आहे. त्याच्या नंतरच्या आलंकारिकांनी मात्र त्याच्या वक्रोक्तिकल्पनेचा पाठपुरावा केला नाही. त्यामुळे पुढच्या काळात वक्रोक्ती हा केवळ एक शब्दालंकार मानला जाऊ लागला. [सं. सा. इ.; सं. सा. शा. इ.]

वग तमाशाच्या उत्तररंगातील कथानाट्य. वग हा शब्द ओघ या शब्दाचे ग्रामीण भाषेतील रूप आहे. ओघाओघाने आलेली गोष्ट किंवा कथानक म्हणजे वग होय. तमाशातील वग बघण्यासाठी प्रेक्षक फार उत्सुक असतात.

ऐतिहासिक, पौराणिक व सामाजिक वगांप्रमाणे काही तमासगीर जाईराणी, खापऱ्या चोर यांसारखे अघटित घटनांनी भरलेले वगही सादर करतात. पाहा – तमाशा.

वचनसाहित्य वीरशैव संतांचे कन्नड सूक्तिसाहित्य. या सूक्तींचा संग्रह ज्यात केला आहे, त्या ग्रंथाचे नाव वचनशास्त्र असे आहे. या सूक्तींतून वीरशैव संतांचे आत्मानुभवावर आधारित असे बोधपर विचार व्यक्त झाले आहेत. हे विचार अगदी मोजक्या शब्दांत व परखड भाषेत मांडले आहेत. त्यांतला आशय स्पष्ट आणि निःसंदिग्ध असतो. उदा०–

ओडुवात लेकनल्ल । बेडुवात भक्तनल्ल ।
ओडलागदु लेकन्नु । बेडलागदु भक्तनु ।
ओडनय्या बेडनय्या । कूडलसंगम देवा ॥

अर्थ – प्रसंगी पळून जातो, तो नोकर नव्हे. हात पसरतो, तो भक्त नव्हे. नोकराने पळता कामा नये. भक्ताने तोंड वेंगाडता कामा नये. हे कूडलसंगम देवा, मी पळतही नाही आणि मागतही नाही.

काही वचनकारांनी उपनिषदांचा, काहींनी शैवागमांचा, तर काहींनी पुराणांचा आधार घेऊन आपली वचने लिहिली आहेत. तथापि बहुतेकांचा भर आत्मानुभूतीलाच अनुसरण्याचा आहे. काही वचनकार तर अशी काही वचने उच्चारतात, की त्यांना लोकोक्तींचे किंवा वाक्प्रचारांचे मोल प्राप्त व्हावे. उदाहरणार्थ काही वचनांचा मराठी अनुवाद पाहा –

सापाची फणा पकडून कनवट खाजवू नको.

भुकेल्या पोटावर रोटीची मोटळी बांधून ठेवली, म्हणून भूक शमत नाही.

बर्फाच्या देवळावर उन्हाचा कळस चढवायला जाशील, तर देऊळच पाघळून जाईल.

वीरशैव संतमंडळीत नाना जातींचे व नाना वृत्तींचे संत आहेत. दासिमय्या पारधी होता, माचय्या धोबी होता, केतकय्या अंत्यज होता, अप्पंण्ण न्हावी होता, चौडय्या नावाडी होता, कण्णप्प तेली होता आणि चन्नय्य डोंब होता. या सगळ्यांनी आपापल्यां जाती-वृत्तींतील उदाहरणे देऊन वचनसाहित्य समृद्ध केले आहे. आतापर्यंत एकूण दोनशे तेरा वचनकारांची वचने उपलब्ध झाली आहेत. या वचनकारांनी एकूण १६० कोटी वचने लिहिली असल्याचे सांगतात; तथापि ते खरे नसावे. कारण उपलब्ध वचनांची संख्या तेवढी भरत नाही आणि हरवलेली वचने त्यात गृहीत धरली तरीही १६० कोटी ही वचनसंख्या पुरी होणे शक्य नाही. महाराष्ट्रात नामदेवांनी जसे शतकोटी अभंग लिहिल्याची कल्पना प्रचलित आहे, तशीच ही कन्नड कविकल्पना समजली पाहिजे.

वचनसाहित्याचा काळ सुमारे ७०० वर्षांचा आहे. देवरदासिमय्या हा पहिला वचनकार इ. स. च्या दहाव्या शतकात होऊन गेला आणि सर्वज्ञ हा शेवटचा वचनकार सतराव्या शतकात होऊन गेला. मधल्या काळात अल्लम्मप्रभू, बसवेश्वर, चेन्नबसव, अक्क महादेवी, इ. कन्नड साहित्याचे दिग्गज होऊन गेले व त्यांनी वचनसाहित्याला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. बसवेश्वराच्या काही वचनांचा मराठी अनुवाद असा –

आई-बापांना शिवीगाळ करतो, तो अस्पृश्य. परोपकारात विघ्न आणतो, तो चांडाळ. धनासाठी दुसऱ्याचे प्राण घेतो, तो मांग. परस्त्रीची कामना धरतो, तो धेड. कूडलसंगम देवा, असले हे अस्पृश्य लोक जर गावात आणि गावभर राहत असतील, तर महार-मांगांनाच गावाबाहेर काय म्हणून ठेवायचे ?

वेळीच ईश्वराला शरण जाऊन त्याची कृपा संपादन करण्याचा कळकळीचा उपदेश करताना बसवेश्वर सर्व मानवांना उद्देशून म्हणतो –

नॅरॅ कॅन्नॅगॅ, तॅरॅ गल्लकॅ शरीर गूडु होगद मुन्न, हल्लु होगि बेन्नु बागि, अन्यरिगॅ हंगागद मुन्न, काल मेलॅ कैयनूरि, कोलु

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिडियुव मुन्न, मुप्पिनिंदोप्पुवलिवद मुन्न, मृत्यु मुट्टद मुन्न पूजिसु कूडलसंगमदेवन ।

अर्थ – भरलेले पोट आणि भरलेले गाल सुरकुतून खपाटीला जाण्यापूर्वी, शरीर हाडांचा सापळा होण्यापूर्वी, दात पडण्यापूर्वी आणि कमरेत वाक येण्यापूर्वी, दुसऱ्यांना भार होण्यापूर्वी, गुडघ्यांवर हात टेकून काठीच्या आधाराने उठावे लागण्यापूर्वी, वृद्धपणामुळे शरीरसौंदर्य लोप पावण्यापूर्वी आणि मृत्यूचा स्पर्श होण्याअगोदर कूडलसंगमदेवाची मनोभावे पूजा कर.

वचनसाहित्य हे वीरशैव संप्रदायाच्या मुशीतून निघाले असले, तरी ते संप्रदायाच्या मर्यादा ओलांडून पलिकडे गेले आहे. त्याने विश्वमानवतेला स्पर्श केला आहे. वचनांमधले नैतिक उपदेश हे केवळ सांप्रदायिकांसाठी नसून, ते अवघ्या मानवजातीसाठी आहेत. वचने ही ज्ञानाचे आगर आहेत. ती दिव्यत्वाला कवटाळणारी अमृतवाणी आहे. म्हणूनच संप्रदायाच्या धुरीणांनी आपल्या अनुयायांना स्पष्ट आदेश दिला आहे, की शुद्ध आचाराच्या ज्ञानासाठी आणि स्वतःचे भ्रम-प्रमाद सुधारण्यासाठी वचनसाहित्याचे चिंतन-मनन करा. [संतों का वचनामृत – श्री. रं. रा. दिवाकर, १९६२; कर्नाटक; सं. प्रां.]

वज्र एक प्राचीन शस्त्र. हे इंद्राचे अत्यंत प्रभावशाली आयुध म्हणून प्रसिद्ध आहे. विश्वकर्म्याने दधीची ऋषीच्या अस्थींपासून हे वज्र निर्माण करून इंद्राला दिले आणि इंद्राने त्याचा प्रहार करून वृत्रासुराचा वध केला, अशी कथा पुराणात आहे. या कथेचा उगम ऋग्वेदात सापडतो. इंद्राचे वज्र लोहाचे असून, त्याला सहस्र धारा होत्या व शंभर अग्रे होती, असे पं. बाळशास्त्री हरदास यांनी म्हटले आहे. हे शुभ्र व तेजस्वी आयुध इतके प्रखर व भयंकर होते, की इंद्राने जेव्हा वृत्रासुरावर त्याचा प्रयोग केला, तेव्हा त्याच्या कडकडाटाने पृथ्वी भयाने थरथर कापू लागली (ऋ. २.११.९). या शस्त्रात पर्वत फोडण्याचे सामर्थ्य होते, असेही त्याचे वर्णन केलेले आहे.

अथर्ववेदात त्रिषंधी नामक वज्राचा उल्लेख आहे. या शस्त्राला तीन सांधे असल्यामुळे त्याला त्रिषंधी हे नाव मिळाले. ते पोलादाचे बनवलेले असावे.

मूर्तिकलेत अनेक देवतांच्या हाती हे आयुध दिसते. तीन अग्रे असलेले दोन भाग जोडून हे बनवलेले असते.



(१) एक अग्र असलेले वज्र (२) दोन अग्रे अललेले वज्र (३) तीन अग्रे असलेले वज्र
(४) चार अग्रे असलेले वज्र (५) पाच अग्रे असलेले वज्र (६) विश्व-वज्र

बौद्ध तंत्रशास्त्रात वज्र हे शून्याचे प्रतीक मानले जाते; कारण ते अभेद्य व अविनाशी असते.

वज्रशेखरसूत्र नामक ग्रंथात म्हटले आहे, की सर्व वस्तुजाताचे उगमस्थान जे शून्य ते वज्राप्रमाणे अभेद्य व अविनाशी असते.

इंद्राने आपल्या वज्राने बुद्धाच्या शत्रूंचा नाश केला व बुद्धाला इंद्राकडून वज्र हे आयुध मिळाले, असे एका बौद्ध दंतकथेत सांगितले आहे.

अनेक बौद्ध देवतांच्या हातांत वज्र असते. वज्रधर म्हणजे आदिबुद्ध हा बौद्ध देवतांमधला सर्वश्रेष्ठ देव होय. त्याच्या उजव्या हाती वज्र व डाव्या हाती घंटा असते. वज्रपाणी म्हणजे हातात वज्र धारण करणारा. हा एक बोधिसत्त्व आहे. वज्रसत्त्व हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाच ध्यानी बुद्धांचा आचार्य असून, त्याच्या हातांत वज्र व घंटा ही आयुधे असतात.

शाक्त पंथात पद्म हे स्त्रीच्या योनीचे व वज्र हे पुरुषेंद्रियाचे प्रतीक मानले जाते. एक अग्र असलेले वज्र व पुरुषेंद्रिय यात बरेच साम्य आढळते. अशा वज्राला चार बाजू असतात. त्या निमुळत्या होत जाऊन शेवटी तीक्ष्ण अग्र बनते. असे वज्र सांची येथील शिल्पात दिसते.

जपानमध्ये विविध प्रकारची वज्रे आढळतात. तिथल्या शिंगोन संप्रदायात एक, तीन व पाच अग्रे असलेले वज्र आणि स्तूपवज्र हे प्रकार प्रचलित आहेत. सात, आठ व नऊ अग्रांची वज्रेही क्वचित आढळतात.

एका अग्राचे वज्र धर्मधातूचें एकत्व दर्शविते. तीन अग्रे ही बुद्ध, धर्म व संघ या त्रिरत्नांची प्रतीके होत. अशी दोन वज्रे एकावर एक अधिक चिन्हाप्रमाणे ठेवली असता कर्मवज्र होते. याला विश्ववज्र असेही म्हणतात. शिवाच्या हातात विश्ववज्र असल्याचा उल्लेख आढळतो.

पाच अग्रांच्या वज्राची पाच अग्रे ही पंचमहाभूतांची किंवा वैरोचन, रत्नसंभव, अमिताभ, अमोघसिद्धी व अक्षोभ्य या पाच ध्यानी बुद्धांची द्योतक आहेत. [वे. रा. द.; पु. इं.; तां. बौ. सा. सा.; अ. सु. अ.; मुद्रा. ; इं. बु. इ.]

वज्रकृच्छ्र प्रायश्चिताचा एक प्रकार. यवाचे दाणे तुपावर परतून व गोमूत्रात शिजवून एक दिवस त्यांचे भक्षण करणे आणि अलंकृत अशा दहा दुधाळ गायी दहा ब्राह्मणांना दान देणे, असे याचे स्वरूप आहे. त्यामुळे सर्व पातकांचा नाश होतो. [प्रा. व्य. प्र.; हि. ध.]

वज्रगर्भ एक बोधिसत्त्व. निष्पन्नयोगावलीत याची दोन रूपे वर्णिलेली आहेत. याचे धर्मधातुवागीश्वरमंडलातील वर्णन असे– याचा वर्ण नीलकमलदलासारखा असून, त्याच्या उजव्या हातात वज्र व डाव्या हातात दशभूमिक नामक पुस्तक आहे. याचे दुर्गतिपरिशोधनमंडलातील वर्णन असे–

याचा वर्ण निळसर शुभ्र असून, याच्या उजव्या हातात नील कमल आहे व डाव्या हाताची मूठ कमरेवर ठेवलेली आहे. याच्या मूर्ती दुर्मिळ आहेत.

वज्रगर्भ लोकेश्वर हे बोधिसत्त्व अवलोकितेश्वराचे एक रूप आहे. त्याला एक मुख व दोन हात असतात. त्याच्या उजव्या हाती वज्र व डाव्या हाती कमळाचा देठ असतो.

याच्या मूर्ती दुर्मिळ आहेत. याचे एक नेपाळी चित्र मात्र उपलब्ध झाले आहे. [इं. बु. इ.]

वज्रगांधारी ध्यानी बुद्ध अमोघसिद्धी याच्या कुळातली एक देवी. साधनमालेत हिचे वर्णन आहे, ते असे– हिचा वर्ण निळा असून, हिला सहा मुखे व बारा हात आहेत. हिचे पिंगट रंगाचे केस वर उडत आहेत. ही प्रत्यालीढ अवस्थेत उभी असून, तिच्या उजव्या हातांत वज्र, वज्रघंटा, खड्ग, त्रिशूळ, बाण व चक्र आणि डाव्या पाच हातांत खट्वांग, अंकुश, धनुष्य, परशू व पाश, ही आयुधे आहेत. बाराव्या हाताची तर्जनी छातीजवळ धरलेली आहे. हिचे एक मुख निळे असून, इतर मुखे भिन्न व रंगी आहेत. हिच्या प्रत्येक मुखाला तीन नेत्र व कराल दाढा असल्यामुळे ती भयानक दिसते.

हिला योगिनी व भीष्मभगिनी अशी अन्य नावे असून, ही चंडवज्रपाणी नामक यक्षाची पत्नी मानली जाते. [इं. बु. इ.]

वज्रघंटपा चौऱ्यांयशी सिद्धांपैकी एक सिद्ध. हा लुईपाचा शिष्य होता. तारानाथांच्या मते हा ओडिसामधील एका राजघराण्यात जन्मला होता. उड्डियान देशात याची विलासवज्र नामक योगिनीशी भेट झाली. त्यानंतर याने एका अरण्यात बारा वर्षे तप केले. मद्यविक्री करणारी एक स्त्री याची मुद्रा म्हणून याच्या जवळ राहिली होती व तिच्या ठायी पद्मिनीची सर्व लक्षणे होती. सिद्धी प्राप्त झाल्यानंतर याने गुह्यतंत्राचा प्रचार सुरू केला आणि वज्रयानपंथाला बरेच अनुयायी मिळवले. [बु. इ. ओ.]

वज्रचर्चिका ध्यानी बुद्ध अक्षोभ्य याच्या कुळातली एक देवी. साधनमालेत हिचे वर्णन केलेले आहे, ते असे– ही एकमुख, त्रिनेत्र, षड्भुज, रक्तवर्ण व कृशांगी आहे. मोठ्या दातांमुळे ती भयानक दिसते. हिच्या गळ्यात नररुंडमाला असून, अंगावर हाडांचे अलंकार आहेत. ती पंचमुद्रा धारिणी आहे. तिच्या मस्तकी अक्षोभ्याची प्रतिमा आहे. तिचे केस मोकळे सुटलेले असून, तिने व्याघ्रचर्म परिधान केलेले आहे. तिच्या उजव्या

वज्रचर्चिका (चीनमधील मूर्तीवरून)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तीन हातांत वज्र, खड्ग व चक्र आहे; डाव्या तीन हातांत कपाल, माणिक व कमळ आहे. ती अर्धपर्यंकावस्थेत प्रेतावर नाचते आहे. हिच्या मूर्ती चीन देशात आढळतात. [इं. बु. इ.]

वज्रज्वालानलार्क ध्यानी बुद्ध अक्षोभ्य याच्या वज्रकुलातील एक देव. साधनमालेत याचे वर्णन आहे, ते असे–हा नीलवर्ण, चतुर्मुख व अष्टभुज असून, याच्या चार मुखांवर प्रेम, वीरता, तिरस्कार व दया हे भिन्न भाव दिसून येतात. याच्या उजव्या चार हातांत वज्र, खड्ग, चक्र व बाण आणि डाव्या चार हातांत घंटा, धनुष्य, पाश व खट्वांग ही आयुधे असतात. याचे पिंगट केस ज्वालेसारखे दिसतात. याच्या अंगावर विविध प्रकारचे अलंकार असतात. हा विष्णू व लक्ष्मी यांच्यावर आलीढ अवस्थेत आरूढ झालेला आहे. [इं. बु. इ.]

वज्रतारा एक बौद्ध देवता. ही ध्यानी बुद्ध रत्नसंभव याच्या कुळातली देवी आहे. निष्पन्नयोगावलीत हिचे वर्णन आहे, ते असे – ही सुवर्णपीत वर्णाची असून, चतुर्मुख आहे. हिचे मुख्य मुख पिवळे, उजव्या बाजूचे शुभ्र, मागील निळे व डाव्या बाजूचे लाल असते. ही अष्टभुज असून, तिच्या उजव्या चार हातांत वज्र, पाश, बाण व शंख आणि डाव्या तीन हातांत पीतोत्पल, धनुष्य, अंकुश आहे. चौथ्या हाताची तर्जनी मुद्रा आहे.

ही देवी भारताप्रमाणेच नेपाळातही अत्यंत लोकप्रिय आहे. हिच्या मूर्ती सर्वत्र आढळतात. हिचे वर्णन असे – एका अष्टदल कमलामध्ये ही देवी बसलेली आहे. कमळाच्या आठ पाकळ्यांवर अष्टमातृका आहेत. ही वज्रतारा चतुर्मुख व अष्टभुज असून, तिचा वर्ण सुवर्णासारखा आहे. ती सर्वालंकारभूषित, कुमारीच्या लक्षणांनी युक्त व उज्ज्वल आहे. ती वज्रसूर्याभिषकाच्या जलातून उत्पन्न झालेली आहे. तिच्या मस्तकी पाच ध्यानी बुद्धांच्या प्रतिमा आहेत. ती नवयौवनामुळे लावण्यवती दिसते. तिच्या कानांत कनककुंडले आहेत. ती विश्वपद्मावर विराजमान असून, रत्नप्रभाविभूषित आहे. तिच्या उजव्या हातांत वज्रांकुश, उत्पल व धनुष्य आहे. चौथ्या हाताची तर्जनी वर केलेली आहे. ती वज्रपर्यंकासनात बसलेली आहे.

साधनमालेत वज्रतारेच्या भोवती असलेल्या मातृकामंडलातील दहा देवतांची नावे दिलेली आहेत, ती अशी – पुष्पतारा, धूपतारा, दीपतारा, गंधतारा, वज्रपाशी, वज्रस्फोटी, वज्रघंटा, वज्रांकुशी, उष्णीषविजया (वर) व सुंभा (खाली).

वज्रतारेचा मंत्र 'ॐ तारे तुत्तारे तुरे स्वाहा' असा दशाक्षरी आहे. त्यांतील प्रत्येक अक्षरातून एक एक देवी उत्पन्न होते. या मंत्राच्या प्रभावाने सर्व संकटांपासून संरक्षण लाभते. वज्रतारेचे नाव घेताच कोणत्याही हिंस्र पशूचा नाश होतो. हिच्या मंत्राने १०८ कमळांच्या आहुती अग्नीला दिल्या असता कोणत्याही



वज्रतारा

स्त्रीला वश करता येते. कोंबड्याच्या पंखावर हा मंत्र बत्तीस वेळा लिहून शत्रूच्या घरात लपवून ठेवला, तर सात दिवसांत शत्रूचा नाश होतो. तात्पर्य, वज्रतारेच्या उपासकाला सर्वत्र यश मिळते, अशी समजूत आहे. त्यामुळेच वज्रयानी पंथात ही देवी अतिशय वंद्य व लोकप्रिय आहे. [इं. बु. इ.]

वज्रधर एक बौद्ध देवता. वज्रयान पंथाचे लोक आदिबुद्धाला सर्वश्रेष्ठ बुद्ध मानतात आणि त्या आदिबुद्धाच्या मानवी रूपाला वज्रधर म्हणतात. वज्रधर हा आदिबुद्धाचा अवतारच होय. म्हणून तो शून्याचे प्रतीक आहे. वज्रधर बुद्धमार्गाची स्थापना करण्यासाठी वारंवार मानवी अवतार घेतो, असे डाकार्णव तंत्रात म्हटले आहे. हेवज्र तंत्रानुसार तो स्वतः कर्ता, हर्ता, राजा व प्रभू आहे. मोक्षप्राप्तीसाठी याची उपासना करणे आवश्यक असते. तंत्रमार्गाचा प्रचार करून साधकांचा उद्धार करण्यासाठी तो अवतार घेतो.

याच्या दोन भिन्न प्रकारच्या मूर्ती आढळतात. एका प्रकारात तो एकटा, वज्रपर्यंकासनात बसलेला असतो आणि उंची वस्त्रे व रत्नालंकार यांनी सुशोभित असतो. त्याच्या एका हातात वज्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व दुसऱ्या हातात घंटा असते. तो दोन हातांनी वज्रहुंकारमुद्रा दर्शवतो. दुसऱ्या प्रकारच्या मूर्तीत तो यब्-युम अवस्थेत असतो, म्हणजे त्याची शक्ती प्रज्ञापारमिता हिला तो आलिंगन देत असतो. शक्तीची प्रतिमाही वस्त्रालंकारभूषित असते. तिच्या हातात कर्तरी व कपाल असतात. प्रज्ञापारमिता म्हणजे करुणा ही वज्रधररूपी शून्यात विलीन होत आहे, असे ही मूर्ती दर्शविते.

बौद्ध तांत्रिक ग्रंथांत वज्रधराची विविध रूपे वर्णिलेली आढळतात. निष्पन्नयोगावलीत त्याचे वर्णन केलेले आहे. ते असे– वज्रधर त्रिमुख व षड्भुज असून, त्याचा वर्ण तांबूस आहे. त्याचे उजवे मुख निळे व डावे मुख लाल आहे. त्याच्या एका हाती वज्र व दुसऱ्या हाती घंटा असून, या दोन हातांनी तो प्रज्ञेला आलिंगन देत आहे. त्याच्या उजव्या हातांत कृपाण व अंकुश आणि डाव्या हातांत कपाल व पाश आहेत. तो अर्धपर्यंक अवस्थेत तांडव नृत्य करीत आहे.

याच्या अनेक मूर्ती भारतात आणि तिबेट व नेपाळ या देशांत सापडल्या आहेत. [इं. बु. इं.; म. सा. अ.]

वज्रधर्म बोधिसत्त्व अवलोकितेश्वराचे एक रूप. साधनमालेत याचे वर्णन केलेले आहे, ते असे – याचा वर्ण तांबूस असून, हा पद्मराग रत्नाप्रमाणे तेजस्वी आहे. याच्या मस्तकी पाच ध्यानी बुद्धांच्या प्रतिमा आहेत. याचे नेत्र आनंदाने चमकत आहेत. याच्या डाव्या हातात सोळा पाकळ्यांच्या कमळाचा देठ असून, तो आपल्या उजव्या हाताने ते कमळ छातीजवळ धरून विकसित करीत आहे. तो चंद्रमंडलात मयूराच्या पाठीवर बसलेला आहे. वज्रधर्म लोकेश्वर म्हणून याचे आणखी एक प आहे, ते असे– एकमुख, द्विभुज कमळावर वज्रपर्यंकासनात बसलेला, उजव्या हाताची अभय मुद्रा व डावा हात मांडीवर, त्यात उत्पलाचा देठ. [इं. बु. इ.]

वज्रधर्म (नेपाळी चित्रावरून)

वज्रधातू (१) बौद्धांच्या योगाचार पंथात एका मंडलाचे दोन भाग कल्पून, त्यांना वज्रधातू व गर्भधातू ही नावे दिलेली आहेत. इथे वज्र याचा अर्थ रत्न असा आहे. वज्रधातू हा आध्यात्मिक विश्वाचा निदर्शक मानला जातो. पाहा – गर्भधातू. [गॉ. नॉ. बु.]

(२) ध्यानी बुद्ध वैरोचन याचे एक रूप. वैरोचन जेव्हा चतुर्मुख व अष्टभुज असतो, तेव्हा त्याला वज्रधातू म्हणतात. निष्पन्नयोगावलीच्या वज्रधातुमंडलात याचे वर्णन केलेले आहे, ते असे – याचा वर्ण शुभ्र असून, हा वज्रपर्यंकासनात बसला आहे. याची चार मुखे शुभ्र, पीत, रक्त व हरित या रंगांची आहेत. याने आपल्या दोन मुख्य हातांत वज्र धारण केलेले असून, त्यांनी धर्मचक्रमुद्रा दर्शवली आहे. दुसऱ्या दोन हातांनी हा ध्यानमुद्रा दर्शवतो. बाकीच्या चार हातांत माला. बाण, चक्र व धनुष्य ही आयुधे आहेत [इं. बु. इ.]

(३) एक बोधिसत्व. याला वज्रधातुलोकेश्वर म्हणतात. हा एकमुख व द्विभुज असून, कमळावर उभा आहे. याच्या डाव्या हातात कमळ असून, हा आपल्या उजव्या हाताने वरदमुद्रा दर्शवीत. [इं. बु. इ.]

वज्रधात्वीश्वरी (१) एक बौद्ध देवता. महायान पंथाचे अनुयायी हिला सर्वश्रेष्ठ सत्याचे मूर्तरूप मानतात. हिची तथता, शून्यता, प्रज्ञापारमिता इ. अनेक नावे आहेत. ही देवता पीतवर्णाची असून, रत्ने हे तिचे चिन्ह आहे. रत्नसंभव या ध्यानी बुद्धाची ही आत्मिक शक्ती होय. (२) मारीचीचे एक रूप. हिला सहा मुखे व बारा हात असतात. ही वैरोचनाच्या कुलातली आहे. [इं. बु. इ.]

वज्रधात्वीश्वरी (नेपाळी चित्रावरून)

वज्रपंजर उपनिषद एक नव्य उपनिषद. यात भस्मधारणेचे मंत्र व नवदुर्गेची प्रार्थना आहे. सर्वांगाला भस्म लावून झाल्यावर उरलेल्या भस्मात पाणी घालून त्याचा त्रिपुंड्र लावावा, असे यात सांगितले आहे. ही विभूतिधारणविषयक महाविद्या आहे. वज्रपंजर नावाचा उच्चार करून जो भस्म धारण करतो, तो सर्व भयांतून मुक्त होऊन शिवमय होतो. या भस्माने कपाळावर काढलेले त्रिपुंड्र दैव-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लिखित दुरक्षरेसुद्धा पुसून टाकतात, अशी या भस्माची महती या उपनिषदाच्या अंती सांगितलेली आहे. [श्री. सी. ग. देसाई]

वज्रपाणी एक बोधिसत्त्व. ध्यानी बुद्ध अक्षोभ्य आणि मामकी देवी यांचा आध्यात्मिक पुत्र. वज्र हे याचे प्रतीक असून, नीलकमल हे अभिज्ञानचिन्ह आहे.

हा नीलवर्ण आहे. याच्या प्रतिमा उभ्या किंवा बसलेल्या स्थितीत असून, त्याच्या हाती वज्रसहित कमल असते. केव्हा केव्हा तो एका हातात छातीजवळ वज्र धरतो.

वज्रपाणी (नेपाळ)

वज्रपाणी (तिबेट)

वज्रधर

सुजाता ही याची शक्ती असून, 'ॐ वज्रपाणि हुम्' हा याचा मंत्र आहे. जेव्हा बुद्धाचा उपदेश ऐकण्यासाठी नाग आले, तेव्हा बुद्धाने वज्रपाणीला गरुडापासून त्यांचे रक्षण करण्याची आज्ञा दिली, अशी कथा आहे. याने असुरांशी युद्ध करण्यासाठी अनेक उग्र रूपे धारण केली होती.

वज्रपाणिलोकेश्वर या नावाने याचे आणखी एक वेगळे रूप आढळते, ते असे – हा एकमुख व द्विभुज असून, कमळावर उभा असतो. तो आपल्या उजव्या हातात वज्र घेऊन ते मस्तकावर धरतो व डावा हात बेंबीजवळ धरतो. तो अर्धपर्यंक नृत्यावस्थेत आहे.

या बोधिसत्त्वाच्या बऱ्याच मूर्ती तिबेट व चीन या देशांत आढळल्या आहेत. [इं. बु. इ.; गॉ. नॉ. बु.]

वज्रमहाकालीव्रत ओडिसा प्रदेशातील एक लौकिक व्रत. या व्रताची कथा अशी – एका व्यापाऱ्याला सात मुलगे व सात सुना होत्या. सर्वांत धाकटी सून वज्रकालीच्या नैवेद्यासाठी लागणारे तांदूळ धूत होती. तिने अनवधानाने तांदुळाचे दोन दाणे तोंडात टाकले. त्यावरोबर काली प्रकट होऊन तिला म्हणाली, 'मी तुझे हे कृत्य तुझ्या सासूला सांगते.' सुनेने तसे न करण्याविषयी तिची विनवणी केली. त्यावर देवी म्हणाली, 'तुला झालेली मुले तू मला अर्पण केली पाहिजेस, तर मी हे मान्य करीन.' सुनेने देवीची अट मान्य केली. तिला ओळीने सात मुलगे झाले. प्रत्येक वेळी कालीमाता येऊन मुलाला घेऊन जात असे. शेवटच्या मुलाच्या वेळीही तसेच झालेले पाहून, तिच्या सासूने तिला घराबाहेर घालवून दिले. ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाहताच देवीने तिला आपल्या घरी नेले आणि दुसऱ्या दिवशी तिला सातही मुलांसह पालखीतून तिच्या घरी परत पाठवून दिले. तेव्हापासून संततीच्या दीर्घायुरारोग्यासाठी वज्रमहाकालीची पूजा सुरू झाली. [स्ट. ओ. फो.]

वज्रयान एक तांत्रिक बौद्ध संप्रदाय. मंत्रयान व वज्रयान यांचा निकटचा संबंध आहे. किंबहुना मंत्रयानाचीच परिणती वज्रयानात झाली आहे. त्याचा इतिहास असा –

मंत्र ही एक शक्ती आहे. पुरातन काळापासून मानवाला या शक्तीचा साक्षात्कार घडत आला आहे. मंत्र हे शब्दरूप असतात. या मंत्ररूप शब्दांत जारण, मारण, मोहन, उच्चाटन, इ. गोष्टींची अद्‌भुत शक्ती वास्तव्य करते, असे लोक मानतात. मंत्रांचा इतिहास पाहू जाता मनुष्य मंत्रांची सोबत घेऊनच सुसंस्कृतपणाच्या पायरीवर चढला आहे. भारतातच नव्हे, तर प्राचीन काळी बाबिलोनिया, असीरिया, मिस्र, इ. देशांतही मंत्राचे खूप माहात्म्य होते. भारतीयांच्या यज्ञसंस्थेत अनेक प्रकारचे श्रौषट्, वौषट्, इ. मंत्र प्रयुक्त होत असत. पुढे बौद्धांनी मंत्रांचे हे परंपरागत महत्त्व ओळखून मंत्रयान नावाचा एक संप्रदायच निर्माण केला.

पाली भाषेतल्या ब्रह्मजाल सुत्तांवरून कळते, की बुद्धाच्या काळी सुख, शांती व समृद्धी मिळवण्यासाठी कित्येक पूजाप्रकार प्रचलित होते. गांधारी विद्या या विशिष्ट मंत्रविद्येवरही लोकांची खूप श्रद्धा होती. बुद्धाने हे प्रकार आचरणाऱ्या लोकांना मिथ्याजीव म्हटले व या गोष्टींच्या नादी न लागण्याचा आदेश दिला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. बुद्धाचे शिष्यही ही विधिविधाने कवटाळून बसले.

बुद्धाच्या निर्वाणानंतर जितका अधिकाधिक काळ लोटत चालला, तितके तितके बुद्धाचे मानुष गुणही लोकांना अंधुक होत गेले. बुद्धाच्या ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाभोवती धुके पसरत चालले. त्यांच्या दृष्टीपुढून मानुष बुद्ध लुप्त झाला आणि त्या जागी दिव्य व अलौकिक गुणांनी संपन्न असे अनेक बुद्ध निर्माण झाले. बुद्धाच्या ऐतिहासिक चरित्राभोवती अलौकिक कथा-कहाण्या गुंफल्या जाऊ लागल्या. लोकांवर त्यांचा खूप प्रभाव पडला. पुढे बुद्धाच्या अंगीच्या या अलौकिक शक्तींचा वर्तमान काळातील माणसांना उपयोग होण्यासाठी बौद्ध आचार्यांनी एक उपाय शोधून काढला. ते लोकांना उपदेशू लागले, की 'बुद्धवचनांच्या पारायणाने तुम्हांला सुख व समृद्धी लाभेल, तुमचे रोग, भय, इ. विकार समूळ नष्ट होतील व भूत-प्रेत-पिशाचांची बाधाही नष्ट होईल.'

त्या काळी लोकांना भुता-खेतांची फार भीती वाटे. भुते वश झाली, तर ती अनेक कामे करू शकतात, अशीही समजूत होती. त्या समजुतीला खतपाणी घालण्यासाठी काही सूत्रांची रचना केली गेली. स्थविरवादी हे खरे म्हणजे मानुष बुद्धाचे पक्षपाती होते. पण इतरांच्या घोडदौडीत आपण मागे पडत आहोत, असे पाहिल्यावर त्यांनीही मानुष अर्थात ऐतिहासिक बुद्धाला सोडले व काल्पनिक बुद्धाचा स्वीकार केला. पुढे पुढे तर काही लोकांनी मानुष बुद्ध कधी काळी या लोकी जन्मला होता, हीच गोष्ट अमान्य करायला सुरुवात केली.

याचा परिणाम असा झाला, की सर्व प्राचीन बौद्ध संप्रदायांनी सूत्रांच्या ठिकाणी अद्‌भुत शक्तींची कल्पना केली आणि पठण-पाठणासाठी काही खास नवी सूत्रेही निर्माण केली. पण ही लांब लांब सूत्रे पारायणाला विलंब करतात, असे दिसून आल्यावर वैपुल्यवादी आचार्यांनी छोट्या छोट्या धारणी निर्माण केल्या. या धारणीही जपायला अधिक लांब होतात, असे कळल्यावर काही संप्रदायांनी विशिष्ट मंत्र निर्माण केले. 'ॐ मुने मुने महामुने स्वाहा,' 'ॐ आं हुं,' 'ॐ तारे तुत्तारे तुरे स्वाहा,' अशा प्रकारचे ते मंत्र होते. पुढे पुढे अक्षरांचे मूल्य वाढू लागले आणि एकाच मंत्राक्षराचा शोध सुरू झाला. नंतर 'ॐ' आणि 'स्वाहा' हे पल्लव लावल्याने कोणतेही अक्षर मंत्र होते, इथवर हा प्रयोग आला. या मंत्रसृष्टीचा विकासक्रम पुढीलप्रमाणे दिसतो –

(१) सूत्ररूपात मंत्र – सनपूर्व ४०० ते १००
(२) धारणी मंत्र – सनपूर्व १०० ते इ. स. ४००
(३) ॐ स्वाहा मंत्र – इ. स. ४०० ते ७००

मंत्रांचे माहात्म्य जसजसे वाढू लागले तसतसे लोक त्यांच्यासाठी धन व श्रम खर्च करू लागले. नंतर मंत्र विशेष लाभदायक करण्यासाठी त्यांच्या जपात काही यौगिक क्रिया समाविष्ट करण्याची कल्पना निघाली. योगप्रक्रियेने काही अद्‌भुत चमत्कार करता येतात आणि त्यामुळे लोकांची श्रद्धा अधिक वाढते, असे दिसून आल्यामुळे काही बौद्ध संप्रदाय त्या मार्गाला लागले. एका बाजूने त्यांनी योगाचाराने आपली मानसिक शक्ती वाढविणे सुरू केले आणि दुसऱ्या बाजूने भक्तांची आपल्यावर श्रद्धा बसावी म्हणून नाटकासारख्या काही हठयोगातील क्रियाही सुरू केल्या. मंत्रयोगाची वाढ अशा प्रकारे पराकाष्ठेला पोचली; त्याचबरोबर हजारो नव्या देव-देवताही निर्माण झाल्या.

बौद्धांतले काही लोक असे होते, की ते या साऱ्या गोष्टी आत्मशांतीसाठी व परहितासाठी करीत असत. पण अशा गोष्टींनी लोक आकर्षित होतात, असे पाहिल्यावर अनेक भोंदू बौद्ध स्वतःच्या स्वार्थासाठी या गोष्टी उघडपणे करू लागले. ही त्यांची भोंदूगिरी चांगलीच फळाला आली. लोक आपल्या मन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कामना पऱ्या करून घेण्यासाठी द्रव्याच्या राशी घेऊन त्यांच्या मागे लागले. अशा प्रकारे निरनिराळ्या बौद्ध मठांतून अमाप धनसंचय झाला.

मग या मंत्रयानी लोकांनी ठरवले, की या धनाचा आपण स्वच्छंद उपभोग घ्यायचा. उपभोगांत पहिली वस्तू म्हणजे स्त्री. तिथपासूनच या उपभोगांचा प्रारंभ झाला. हे बौद्ध आचार्य धर्माच्या नावाने स्त्रियांचा संग्रह करू लागले. या स्त्रियांच्या साहाय्याने त्यांनी भैरवी चक्राच्या उपासनेची एक नवीन टूम काढली. अशा प्रकारे मूळच्या बौद्ध धर्मात मंत्र, हठयोग व मैथुन या तीन गोष्टी क्रमाने प्रविष्ट झाल्या. जोवर पहिल्या दोन गोष्टीच आचरणात होत्या, तोवर त्यांचा संप्रदाय मंत्रयान या नावाने ओळखला जाई. मैथुन ही तिसरी गोष्ट त्यात प्रविष्ट होताच मंत्रयान हे वज्रयान या नावाने प्रसिद्ध झाले. इ. स. ८०० ते १२०० हा वज्रयानाच्या भरभराटीचा कालखंड होय.

मंजुश्रीमूलकल्प हा मंत्रयानाचा प्रमाणभूत ग्रंथ होय. त्यात मंत्र-तंत्राची अनेक विधाने आहेत. मात्र त्यात भैरवी चक्राचा अभाव आहे. लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की, मंत्रयानात सदाचाराच्या नियमांची अवहेलना केलेली नाही. यद्यपि बौद्ध धर्माचा उगम बिहारमध्ये झाला असला आणि त्याचा आरंभिक प्रचार उ. भारतापुरता मर्यादित असला, तरी मंत्रयान उ. भारतात जन्मला नाही. आंध्रमधील धान्यकटक व श्रीपर्वत या दोन क्षेत्रांत त्याचा जन्म झाला. मंजुश्रीमूलकल्प हा ग्रंथही याच प्रदेशात निर्माण झाला. इ. स. च्या सहाव्या-सातव्या शतकात श्री पर्वत हा मंत्र-तंत्रासाठी प्रसिद्ध होता. अनेक साधक मंत्रसाधनेसाठी त्या पर्वतावर जात असत. श्री पर्वत म्हणजे हल्ली ज्याला श्रीशैल म्हणतात, तोच होय. पुढे मंत्रयानाने वज्रयानाचे रूप धारण केले, तेही तिथेच. सिंहली भाषेतल्या निकायसंग्रह या ग्रंथात वज्रयानाला वज्रपर्वतवासीनिकाय म्हटले आहे. मूळचा श्री पर्वत वज्रयानाचे केंद्र ठरल्याकारणाने लोक त्यालाच वज्र पर्वत म्हणू लागले. वज्रयान पंथाच्या उगमाची ही घटना सामान्यपणे इ. स. च्या सातव्या शतकातली आहे, असे मानता येते.

निकायसंग्रहात याविषयी लिहिले आहे, ते असे– मतबल सेन (इ. स. ८४६–८६६) या राजाच्या कारकिर्दीत वज्रपर्वतवासी एक भिक्षू सिंहल देशात येऊन एका विहारात राहू लागला. त्याचा व राजाचा परिचय झाल्यानंतर राजाने त्याच्या मताचा म्हणजेच वज्रयानाचा स्वीकार केला. तिथून पुढे लंकेत रत्नकूट, इ. ग्रंथांचा प्रचार सुरू झाला. गुप्तपणे हा संप्रदाय लंकेत आचरला जाऊ लागला.

पुढे या वज्रयानातूनच ८४ सिद्ध जन्माला आले. या सर्व सिद्धांमध्ये सरहपा हा आदिसिद्ध आहे. तो भारताच्या पूर्व भागातला होता. त्याने तत्कालीन लोकभाषेत अनेक अद्‌भुत कविता रचल्या. त्याचे वागणे-चालणेही विचित्र होते. त्याने वज्रयानाला एक सार्वजनिक धर्म या योग्यतेला आणून सोडले. सरहपाच्या पूर्वी वज्रयानी साधना गुप्तपणे केली जात असे. सरहपाच्या प्रचारानंतर ती उघडपणे केली जाऊ लागली.

वज्रयानी या शब्दातला वज्र शब्द या संप्रदायाने अगदी वेगळ्या अर्थाने घेतलेला आहे. वज्र म्हणजे इंद्राचे एक अमोघ अस्त्र म्हणून वैदिक साहित्यात आढळते. पण वज्रयानी बौद्धांनी त्याला शून्यतेचे प्रतीक मानले आहे. सर्व वस्तुजाताचे उगमस्थान शून्य असून, ते वज्राप्रमाणे अभेद्य व अविनाशी असते. अद्वयवज्रसंग्रह या ग्रंथात याविषयी पुढील श्लोक आहे.

दृढं सारमसौशीर्यमच्छेद्याभेद्यलक्षणम् ।
अदाहि अविनाशि च शून्यता वज्रमुच्यते ॥

अर्थ – वज्र हे दृढ, सारभूत, कधीही न फुटणारे, अच्छेद्य, अभेद्य, न जळणारे व अविनाशी आहे. शून्यता म्हणजे वज्र होय.

वज्रयानी साधकांनी तथागत बुद्धाला श्रेष्ठ बुद्ध न मानता वज्रधर बुद्ध हा सर्वश्रेष्ठ मानला. त्याच्या बरोबरच वज्रसत्त्व नावाचा एक बोधिसत्त्वही निर्माण करून, त्या दोघांचा तादात्म्य संबंध कल्पिला. बौद्धांच्या शून्य सिद्धान्ताचे मानवीकरण म्हणजेच वज्रधर व वज्रसत्त्व हे होत. या वज्रसत्त्वालाच पुढे सहावा ध्यानी बुद्ध मानले गेले आणि तो सर्व बौद्ध देवतांचा आदिदेव ठरला. वज्र आणि वज्रसत्त्व म्हणजेच शून्यता व ज्ञानमात्रता यांच्या तादात्म्याने सिद्धी आपोआप मिळते, असा सिद्धान्त त्यांनी मांडला.

आधारग्रंथ – वज्रयानी पंथाचे आचार-विचार सांगणारे काही प्रमाण ग्रंथ आहेत, त्यांची नावे अशी –

गुह्यसमाजतंत्र – प्रस्तुत पंथाचे वज्रयान हे नाव प्रथमच या ग्रंथात आढळते. हीनयान व महायान या दोन्ही पंथांनी बुद्धत्वाची प्राप्ती ही अनेक जन्मांनी घडणारी गोष्ट मानलली होती. पण गुह्यसमाजतंत्रात, ती याच जन्मात स्वेच्छेने, विषयसुखे भोगता भोगताच प्राप्त होते, असे म्हटले आहे. प्रस्तुत ग्रंथात सामान्य व उत्तम अशा दोन सिद्धी सांगितल्या आहेत. अणिमा, लघिमा, इ. सिद्धी सामान्य असून, बुद्धत्वसिद्धी ही उत्तम सिद्धी आहे.

शरीराला कष्ट देणारे कठोर नियम व आचार यांची सिद्धीसाठी गरज नाही, असे प्रस्तुत ग्रंथात सांगितले आहे. (गुह्यसमाजतंत्र पाहा).

बौद्ध धर्मात शक्तितत्त्वाचा समावेश व उद्‌घोष याच ग्रंथाने केला. यात बुद्ध, अनेकबद्ध, ध्यानी बुद्ध व बोधिसत्त्व हे आपापल्या शक्तींनी युक्त आहेत, असे सांगितले असून, प्रत्येक–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुद्ध आणि बोधिसत्त्व हे शक्तिसहित उपास्य होत, असे म्हटले आहे. वज्रयानी साधकाला कुठल्याही प्रकारचे विधिनिषेध मानण्याचे कारण नाही; शून्यतेचा उपासक असल्यामुळे तो कोणत्याही विधिनिषेधाचे सुखेनैव उल्लंघन करू शकतो, असे त्या ग्रंथात म्हटले आहे.

वज्रयानमते स्त्रीचे जननेंद्रिय हे पद्मस्वरूप असून, पुरुषाचे जननेंद्रिय हे वज्रप्रतीक आहे. साधकाने आपल्या साधनेसाठी एखादी स्त्री पसंत करावी. ती चांडाली किंवा डोंबिण असावी –

चाण्डालकुलसम्भूतां डोम्बिकां वा विशेषतः ।
जुगुप्सितकुलोत्पन्नां सेवयन् सिद्धिमाप्नुयात् ॥

अर्थ – (वज्रयानी साधनेसाठी) चांडाली विशेषतः डोंबिका स्त्री निवडावी. जितकी ती निंद्य कुळातली असेल तितकी चांगली. अशा स्त्रीच्या सेवनाने सिद्धी प्राप्त होते.

प्रस्तुत ग्रंथाच्या अन्वये ध्यानाच्या एकाग्रतेसाठी मद्यपान, शरीरपुष्टीसाठी मांसभक्षण आणि बिंदुरक्षणासाठी स्त्रीसेवन अत्यंत आवश्यक आहे. याविषयी मतप्रदर्शन करताना श्री. रा. चिं. ढेरे लिहितात –

"प्रारंभिक वज्रयानी सिद्धांनी हठयोगातील नाड्यांना डोमिनी, राजकी, चंडाली आदि नावे कल्पिलेली दिसतात. पुढे या पारिभाषिक नावांतूनच अनर्थाचे विष फोफावले असणार. अमरवारुणी, गोमांस, डोमिनी, राजकी, चंडाली इत्यादी पारिभाषिक शब्दांचे अभिधामूलक अर्थ रूढ झाले आणि घोर अनाचाराची बेफाम वाढ होऊन साधनेला तामस रूप प्राप्त झाले. वज्रयानी साधकांनी उल्हासाने वाढविलेला हा विषवृक्ष लवकरच हिंदू साधनांतही प्रविष्ट झाला आणि वज्रयानी, शाक्त, कापालिक आदि तांत्रिक साधनांत अनाचाराची जणू चढाओढ लागून राहिली."

प्रज्ञोपायविनिश्चयसिद्धी – हा ग्रंथ अनंगवज्ररचित आहे. या ग्रंथात वज्रयानाचे दार्शनिक विवेचन बरेच आहे. प्रज्ञा, उपाय, संसार, निर्वाण, तत्त्वचर्या, गुरुशिष्यसंवाद, दीक्षा, मुद्रा, वज्राचार्यपूजा, इ. विषय यात विवेचिले आहेत. ग्रंथकार म्हणतो, की सांसारिक पदार्थांची व भवाची उत्पत्ती, मिथ्यासंकल्प आणि कल्पना यांतून होते. या दोहोंमुळेच दुःख, जन्म, मरण, इ. गोष्टी उत्पन्न होतात. म्हणून यांचा त्याग करणे आवश्यक आहे.

ज्ञानसिद्धी – हा इंद्रभूतीचा ग्रंथ असून, यात दार्शनिक व साधनात्मक विषयांचे विवेचन आहे. जो वज्रयान जाणत नाही, तो मूढ असून, त्याला संसारसागरात गटंगळ्या खाव्या लागतात. जो साधक सर्व प्रकारच्या संकल्पांनी वर्जित असून, सत्त्वसमारूढ आहे, त्याला या जन्मातच पराबोधी प्राप्त होते, असे सांगितले आहे. या संप्रदायात विधिनिषेधांना स्थान नाही. त्याला कोणतेही खाद्यपेय वर्जित नाही. उपभोगासाठी कोणतीही स्त्री त्याज्य नाही. त्याने कोणतेही पापाचरण केले, प्राणिहत्या केली, परद्रव्याचा अपहार केला, असत्य भाषण केले आणि परस्त्रीसमागम केला तरी त्याच्या साधनेला कसलीही बाधा होत नाही.

कर्मणा येन वै सत्त्वाः कल्पकोटिशतान्यपि ।
पच्यन्ते नरके घोरे तेन योगी विमुच्यते ॥

(ज्ञानसिद्धी १.१५)

अर्थ – ज्या कर्मांनी सामान्य प्राण्यांना कोटयवधी वर्षे घोर नरकात पिचत पडावे लागेल, त्याच कर्मांनी (वज्रयानी) योग्याला मुक्ती लाभते.

वज्र म्हणजेच शून्यता. हे स्त्रीरूप असून, बोधिचित्त तिच्या गाढ आलिंगनात सदैव बद्ध राहतो. हे युगलमीलन सार्वकालिक महासुख निर्माण करते. इडा व पिंगला यांच्या समीकरणातून कुंडलिनी शक्ती जागृत होते. षट्चक्रभेदन करून साधक जेव्हा आज्ञाचक्रावर आरूढ होतो, तेव्हा कुंडलिनी हळूहळू वर चढून सहस्रार चक्रात स्थित असलेल्या परतत्त्वाच्या आलिंगनात बद्ध होते. या दशेला युगलरूप असे म्हणतात. बौद्धांनी याच आनंदमयी दशेला निर्वाण, महासुख, महामुद्रा, इ. नावे दिली आहेत. या दशेत वायूचा निरोध होत असल्यामुळे साधकाचे मनही आपोआप निरुद्ध होते.

अद्वयवज्रसंग्रह – यात विभिन्न विचारधारांवर लिहिलेल्या छोट्या छोट्या रचनांचा संग्रह आहे. यात पारमितासाधनाला विशेष महत्त्व दिलेले आहे.

वज्रयान पंथाचे साहित्य विपुल आहे. या संप्रदायाच्या आचार्यांनी केवळ संस्कृतमध्येच नव्हे, तर लोकभाषेतही ग्रंथ लिहून, आपले सिद्धान्त सामान्य जनांपर्यंत पोचवले. वज्रयानाचा उदय आंध्रप्रदेशात श्रीपर्वतावर झाला असला, तरी त्याची वाढ मात्र मगधातील नालंदा व ओदंतपुरी येथील विहारांत झाली.

साधनापद्धती – वज्रयान संप्रदायात गुप्त यौगिक क्रियांवर विशेष भर दिलेला आहे. पण सद्वस्तूचे ज्ञान करून घेण्याचा तोच एकमेव मार्ग आहे, अशी त्यांची धारणा नाही. कारण तो देव–देवतांची पूजा, तदंगभूत अनुष्ठाने, मंत्र-तंत्रांचा प्रयोग आणि मुद्रा, मंडले, इ. अवांतर गोष्टी यांचाही आपल्या साधनेत समावेश करतो. हा संप्रदाय विश्वातल्या प्रत्येक वस्तूला वज्र मानतो. पूज्य-पूजक आणि पूजासाधने ही वज्ररूपच आहेत, अशी या लोकांची धारणा आहे. म्हणून त्यांच्या प्रत्येक मूर्तीवर वज्रचिन्ह कोरलेले किंवा काढलेले असते. वज्रधर व वज्रसत्त्व यांच्या संयुक्त रूपाला ते आदिबुद्ध मानतात. या आदिबुद्धाला पाच प्रकारचे ज्ञान असते. पंचप्रकारक ज्ञान हे त्याचे पाच गुण आहेत. या पाच गुणांपासून पाच प्रकार निघतात व या पाच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रकारांतून पाच देवता निर्माण होतात. या देवतांना ध्यानी बुद्ध असे म्हणतात. (१) वैरोचन, (२) रत्नसंभव, (३) अमिताभ, (४) अमोघसिद्धी व (५) अक्षोभ्य अशी त्यांची नावे आहेत. वज्रसत्त्व हा या सर्वांचा आदिदेव आहे. पाच ध्यानी बुद्ध हे पांच स्कंध अथवा पंचभूते यांच्या अधिदेवता असून, त्या प्रत्येकाची एकेक सहचरी शक्ती असते. लोचना, वज्रधात्वीश्वरी, पांडरा, तारा व मामकी अशी अनुक्रमे त्यांची नावे आहेत. ज्या देवाची पूजा करायची असेल, त्याचे ध्यान त्याच्या सहचरी शक्तीसह केले पाहिजे, असा त्यांचा आदेश आहे. ही शक्ती कामवासनेने प्रेरित होऊन आपल्या सहचर देवाला गाढालिंगन देते व अशा प्रकारे ती दोघेही महासुख अनुभवीत असतात, एवढी व्यापक कल्पना करून हे ध्यान करायचे असते.

संभोगकालात स्त्री-पुरुषांच्या ज्या ज्या शरीरावयवांचे परस्परांशी मीलन होत असते, ते ते तपशीलवार दाखविणाऱ्या अनेक स्त्री-पुरुषांच्या मूर्ती कोरीव लेण्यात पाहायला मिळतात. देवता आणि त्यांची शक्ती यांचे निर्द्वंद्व ऐक्य कळून यावे, यासाठी त्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

वज्रयानी साधनेत प्रथम पाचही ध्यानी बुद्धांसह वज्रसत्त्वाचे ध्यान करतात. मग त्यांना पुष्पांजली वाहतात. नंतर शक्तिसमवेत त्यांची विविध उपचारांनी पूजा करतात. नंतर काही गुह्य विधिविधाने करतात. त्यांत एक प्रार्थना असते. त्या प्रार्थनेत इष्ट देवतेपुढे आपल्या पापकर्मांचा उच्चार करून ‘आजपासून मी बुद्ध, धर्म व संघ या त्रिरत्नाचा आश्रय करीत आहे,’ असे म्हणतात. मग प्राणिमात्राचे कल्याण व मोक्ष साधण्यासाठी बोधिचित्त होण्याचा संकल्प करतात.

त्यानंतर हे चराचर जगत शून्य आहे, अशी कल्पना करून पुढील मंत्र म्हणतात –

प्रकृत्या सर्वधर्माश्च शुद्धाः सन्ति स्वरूपतः ।
शुद्धोऽस्म्यहं तथा चैव प्रकृत्या नास्ति संशयः ।।

अर्थ – सर्व धर्म हे स्वभावतःच शुद्धस्वरूप आहेत व त्याचप्रमाणे मीही (साधक) शुद्धस्वरूप आहे, यात संशय नाही.

साधक सर्वप्रथम नीच जातीतील एखाद्या सुंदर स्त्रीची निवड करतो. मग गुरूकडे जाऊन त्याच्या आदेशानुसार तिला तो आपली महामुद्रा बनवतो. त्यानंतर त्या साधकाची प्रत्येक साधना त्या महामुद्रेच्या सहवासात राहूनच चालते. या साधनेतून दोघांच्या मनोवृत्तींमध्ये पूर्ण साम्यावस्था आणण्याचे प्रयत्न केले जातात. नंतर आणखी काही विधी केल्यावर वज्रधर आदिबुद्ध व त्याच्या उभय पार्श्वभागी असणाऱ्या देवता यांना उद्देशन काही मंत्र म्हणून ध्यान करतात. [पु. त. नि.; तां. बौ. सा. सा.; हि. सा. बु. इ.; गो. च. प.]

वज्रयोगिनी ध्यानी बुद्ध रत्नसंभव याच्या कुळातली एक लोकप्रिय देवी. मात्र हिच्या मस्तकी कोणत्याही ध्यानी बुद्धाची प्रतिमा नसते. हिच्या मूर्तीचे दोन प्रकार आहेत. एका प्रकारात हिने आपले शिर कापून स्वतःच्या हातात धरलेले दिसते. या रूपात हिचे छिन्नमस्ता देवीशी साधर्म्य आहे. दुसऱ्या प्रकारात हिचे शिर नेहमीप्रमाणेच असून, तिची दोन रूपे आढळतात. तिच्या दोन्ही बाजूंना वज्रवैरोचनी व वज्रवर्णनी या योगिनी नेहमी असतात.

साधनमालेत हिच्या छिन्नमस्तक रूपाचे वर्णन केलेले आहे, ते असे – ही पीतवर्ण असून, तिने स्वतःचे मस्तक स्वतःच कापून डाव्या हातात धरलेले आहे. तिच्या उजव्या हातात कर्तरी (कात्री) आहे. ती नग्न असून, तिचा उजवा पाय सरळ व डावा पाय खाली वाकलेला आहे. ती आलीढ अवस्थेत उभी आहे. वज्रवैरोचनी व वज्रवर्णनी तिच्या उजव्या व डाव्या अंगी उभ्या आहेत.

हिच्या दुसऱ्या प्रकारातील दोन रूपांची वर्णने साधनमालेत केली आहेत, ती अशी –

(१) ही रक्तवर्ण असून, भयानक दिसते. ही स्मशानात आलीढ अवस्थेत प्रेतावर उभी आहे. हिचे शरीर तारुण्याने मुसमुसलेले असून, ती नग्न आहे. तिचे तीन नेत्र लाल व गोल आहेत, भुवया वाकड्या आहेत, जीभ लोंबणारी आहे व पोट मोठे आहे. तिच्या डाव्या हाती कपाल व उजव्या हाती वज्र आहे. तिच्या डाव्या खांद्याला खट्वांग अडकवलेले आहे.

(२) ही पीतवर्ण असून, तिच्या हाती कर्तरी व कपाल या वस्तू आहेत. अन्यथा हे रूप वरीलप्रमाणेच आहे. तिच्या हातातले कपाल देवासुरांच्या रक्ताने भरलेले असते.

वज्रयोगिनी ही हेरुक या देवाची प्रेयसी असून, त्याच्यासह यब्-युम् स्थितीत आढळते. हेरुक तंत्रात त्यांचे वर्णन केलेले आहे.

नेपाळात सांकू येथे वज्रयोगिनीचे एक मंदिर आहे. पण त्यात वज्रयोगिनीची मूर्ती नसून, महाचीनतारेची आहे. ती मूर्ती तिच्या भक्तांनी बंगालमधून तिकडे नेली, अशी समजूत आहे. तिबेटात वज्रयोगिनीच्या मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

वज्रराग बोधिसत्त्व मंजुश्री याचे एक रूप. साधनमालेत याचे वर्णन केलेले आहे, ते असे – हा शुभ्रवर्ण, एकमुख व द्विभुज आहे. तो दोन्ही हातांनी समाधिमुद्रा दर्शवतो. त्याच्या अंगावर राजपुरुषाला योग्य असे सर्व अलंकार आहेत. मात्र वैराग्याला शोभणारी पाच वस्त्रे त्याने परिधान केली आहेत. याच्या जिव्हेवर अमिताभाची मूर्ती आहे. ‘ॐ वाक्येदं नमः’ हा याचा जपमंत्र आहे. [इं. बु. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वज्रवाराही ध्यानी बुद्ध वैरोचन याच्या कुळातली देवी. हिला बुद्धडाकिनी व वज्रवैरोचनी अशी अन्यही नावे आहेत. ही हेरुक देवाची पट्टमहिषी आहे. हिच्या उजव्या कानामागे एक मोठे आवाळू असून, ते वराहीच्या मुखासारखे दिसते. म्हणून हिला वज्रवाराही हे नाव मिळाले आहे.

साधनमालेत हिच्या दोन भिन्न रूपांचे वर्णन केलेले आहे, ते असे – (१) ही एकमुख व द्विभुज असून, हिचा वर्ण डाळिंबाच्या फुलासारखा लाल आहे. हिच्या उजव्या हाती वज्र असून, तर्जनी उंच केलेली आहे; डाव्या हाती कपाल व खट्वांग आहे. हिला तीन नेत्र आहेत. ही मुक्तकेशा आहे. ही नग्न असून हिचे शरीर सहा शुभ मुद्रांनी अंकित आहे. ही पंचज्ञानात्मिका व सहजानंदस्वभावा आहे. ही प्रत्यालीढावस्थेत भैरव आणि कालरात्री यांच्यावर उभी आहे. ही मुंडमाला धारण करणारी व त्या मुंडक्यांतून गळणारे रक्त प्राशन करणारी आहे. ही ज्या कमळावर उभी आहे, त्याच्या चार पाकळ्यांवर डाकिनी, लामा, खंडरोहा व रूपिणी या देवता आहेत.

(२) हे रूप बहुतेक वरील रूपाप्रमाणेच आहे. मात्र हिच्या उजव्या हाती वज्राऐवजी कर्तरी आहे व खट्वांग डाव्या खांद्याला अडकवलेले आहे. तसेच ही एका प्रेतावर अर्धपर्यंकावस्थेत नृत्य करीत आहे.

हिचे आर्य-वज्रवाराही नामक जे रूप आहे, त्यात ती चतुर्भुज आहे. तिच्या उजव्या दोन हातांत वज्र व अंकुश असून, डाव्या हातांत कपाल व पाश आहेत. एका हाताची तर्जनी मुद्रा आहे. ती एकमुख व त्रिनेत्र असून, तिच्या भुवया वक्र आहेत. जीभ लांब, दात बाहेर आलेले व पोट मोठे आहे. त्यामुळे ती भयानक दिसते. ती आलीढावस्थेत प्रेतावर उभी आहे. तिच्या डाव्या खांद्याला खट्वांग अडकवलेले आहे.

ही मस्तकी विश्ववज्र धारण करते, असे साधनमालेत एका जागी म्हटले आहे.

हेरुक व वज्रवाराही यांच्या युगनद्ध म्हणजेच यब्-युम अवस्थेतील मूर्तीची पूजा चक्रसंवर तंत्रात सांगितलेली आहे. संवर म्हणजे हेरुक किंवा हेवज्र याचेच एक रूप होय. वज्रवाराही ही त्याची शक्ती असून, त्यांची यब्-युम मूर्ती आढळते. तिबेट व चीन या देशांत ही देवी अत्यंत लोकप्रिय आहे. तिथे तिच्या अनेक मूर्ती आहेत. [इं. बु. इ.]

वज्रवाहनिका एक प्राचीन विद्या. रणांगणात शत्रूला पराभूत करण्यासाठी या विद्येचा उपयोग करीत असत. त्यासाठी प्रथम यथाविधि एक वज्र तयार करीत. त्यावर " ॐ भूर्भुवःस्वः तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि धियो यो नः प्रचोदयात् ॐ फट् जहि हुं फट् च्छिन्धि, भिन्धि जहि हन हन स्वाहा " या मंत्राने अभिषेक करीत आणि वज्रावर हा मंत्र सोन्याच्या अक्षरांनी लिहीत. मग वरील मंत्राचा एक लक्ष जप करीत आणि वज्राकृती कुंडात हा मंत्र म्हणून तुपाच्या दहा हजार आहुती देत. अशा प्रकारे हे वज्र सिद्ध करून सुरक्षित ठेवीत. मग युद्धाच्या प्रसंगी ते राजाला देत. त्यामुळे राजाला जय प्राप्त होतो, अशी समजूत होती.

हिला वज्रेश्वरी विद्या असेही म्हणतात. प्राचीन काळी ब्रह्मदेवाने ही वज्रेश्वरी विद्या इंद्राच्या रक्षणासाठी मिळवली होती, अशी कथा लिंगपुराणात आहे (उत्तरार्ध अ. ५१). [पु. वि.]

वज्रविदारणी एक बौद्ध देवता. अक्षोभ्य या ध्यानी बुद्धाच्या कुळातली देवी. धर्मकोशसंग्रहात हिचे वर्णन केलेले आहे, ते असे – ही पंचमुख व दशभुज असून, उजव्या हातांत अंकुश, खड्ग, बाण, वज्र धारण करते व एका हाताची वरदमुद्रा असते आणि डाव्या हातांत पाश, चर्म, धनुष्य, ध्वज धारण करते व एका हाताची अभयमुद्रा असते. ही प्रत्यालीढासनात उभी आहे. [इं. बु. इ.]

वज्रशृंखला (१) ध्यानी बुद्ध अमोघसिद्धी याच्या कुळातली एक देवी. ही हेरुक देवाची एक प्रेयसी असून, कधी कधी त्या दोघांची युगनद्ध मूर्ती आढळते. साधनमालेत हिचे वर्णन आहे, ते असे – ही त्रिमुख व अष्टभुज असून, हिचा वर्ण हिरवा आहे. हिचे एक मुख स्मितयुक्त आहे. उजव्या बाजूचे मुख पिंगट असून, डोळेही पिंगट आहेत. डाव्या बाजूचे मुख रक्तवर्ण असून, वक्र भुवया व मोठे दात यांमुळे ते भयानक दिसते. हिच्या उजव्या तीन हातांत वज्र, वज्रशृंखला व बाण असून, चौथ्या हाताची अभयमुद्रा आहे. डाव्या तीन हातांत रक्तपूर्ण कपाल, पाश व धनुष्य असून, चौथ्या हाताची तर्जनी-मुद्रा आहे. ही ललितासनात बसलेली असून, हिच्या अंगावर मार्जारचर्माचे उत्तरीय आहे. हिच्या पिंगट जटामुकुटात अमोघसिद्धीची प्रतिमा आहे.

शृंखला हे या देवीचे अभिज्ञानचिन्ह आहे. हिचे दुसरे एक रूप आहे, त्यात ती त्रिमुख व षड्भुज आहे. हिच्या मूर्ती व चित्रे नेपाळात सापडतात. [इं. बु. इ.]

(२) जैनांची विद्यादेवी. तीर्थंकर अभिनंदननाथ याची शासनदेवता. दिगंबरपंथी हिचे वर्णन हंसवाहन, चतुर्भुज, हातांत सर्प, पाश, माला व फल धारण करणारी असे करतात. श्वेतांबरपंथी हिला कमलावर बसलेली, हातांत शृंखला, कमळ, वज्र धारण करणारी व एका हाताने वरदमुद्रा दाखवणारी मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वज्रसत्त्व सहावा ध्यानी बुद्ध. हा पाच ध्यानी बुद्धांचा पुरोहित मानला जातो पाच ध्यानी बुद्धांप्रमाणे याची वस्त्रे साधी नसून उंची असतात. याच्या देहावर सर्व अलंकार व मस्तकी मुकुट असतो. त्यामुळे हा एक बोधिसत्त्वच आहे, असे वाटते. अद्वयवज्रसंग्रहात याचे वर्णन केलेले आहे, ते असे –

हुँ या बीजाक्षरातून हा उत्पन्न होतो. हा एकमुख, द्विभुज व शुभ्र वर्णाचा आहे. याच्या दोन हातांत वज्र व वज्रघंटा ही आयुधे आहेत. हा तुरट रस, शरद ऋतू, य, र, ल, व ही अक्षरे आणि मध्यरात्रीपासून प्रभातकालापर्यंतचा अवधी यांचे प्रतीक आहे. याचे दुसरे नाव धर्मधातू असे आहे. हा पद्मासनात ध्यानस्थ



वरची ओळ – (१) वज्रगर्भ (२) वज्रासनबुद्ध (३) वज्रानंग. खालची ओळ– (१) वज्रराग (२) वज्रसत्त्व (३) वज्रवाराही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बसलेला असतो. याच्या शुभ्र वर्णावरून हा वैरोचनाच्या कुळातला असावा, असे वाटते.

याच्या एकट्याच्या मूर्ती उघड पाहायला मिळतात. युब्-युम अवस्थेतल्या म्हणजे वज्रसत्त्वात्मिका शक्तीला मिठीत घेतलेली आहे, अशा मूर्ती मात्र गुप्त स्थानी असतात. वज्रसत्त्वात्मिका ही शुभ्र व द्विभुज असून, तिच्या उजव्या हातात कर्तरी व डाव्या हाती कपाल असते. तिबेट व चीन या देशांत याच्या बऱ्याच मूर्ती आढळतात.

इतर ध्यानी बुद्धांप्रमाणे याच्या मूर्ती स्तूपांत नसतात; तर त्या स्वतंत्र मंदिरांत असतात. याची उपासना वज्रयानी लोकांपुरती मर्यादित असून, ती गुप्तपणे केली जाते. [इं. बु. इ.]

वज्रसूचिकोपनिषद एक नव्य उपनिषद. सामवेदसंबद्ध अशा या गद्य उपनिषदात वज्रसूचीसारखे अज्ञानभेदक तीक्ष्ण ज्ञान वर्णन केलेले आहे. ते ज्ञानचक्षूंचे भूषण आहे. चार वर्णांत ब्राह्मण मुख्य असे वेदवचन असून, स्मृतीही तसेच सांगतात. तेव्हा ब्राह्मण म्हणजे कोण ? जीव, देह, जाती, ज्ञान, कर्म की धार्मिक दाता ? ब्राह्मणाचे लक्षण किंवा धर्म कोणता ? ब्राह्मण म्हणजे जीव म्हणावा तर सर्व शरीरात एकाच जीवाचे कर्मवश एकच रूप असते. देह म्हणजे ब्राह्मण असे म्हणावे, तर चांडालादी सर्वांचा देह पंचमहाभूतात्मक म्हणजे सारखाच असतो. ब्राह्मण गोरा, क्षत्रिय लालबुंद, वैश्य पिवळा तर शूद्र काळा असा त्यांच्या शरीराच्या रंगाविषयी नियम नसतो आणि शरीर म्हणजे ब्राह्मण धरले तर पित्याचे शरीर त्याच्या मृत्यूनंतर दहन करणाऱ्या मुलाला ब्रह्महत्यादी दोष लागले असते. ब्राह्मणजाती म्हणजे ब्राह्मण असे म्हणावे, तर अन्य जातींत व जीवजंतूंतही अनेक महर्षी निर्माण झाले आहेत. ऋष्यशृंगाचा जन्म हरिणीपासून, कौशिकाचा कुश नावाच्या दर्भापासून, जांबूकाचा जंबूकापासून, वाल्मीकीचा वारुळापासून, व्यासांचा कैवर्तकन्येपासून, गौतमाचा सशाच्या पाठीपासून, वसिष्ठांचा उर्वशीपासून आणि अगस्त्याचा कलशातून जन्म झाला, हे प्रसिद्धच आहे. या सर्वांना ब्राह्मण जातीत जन्म न घेताही ज्ञानप्राप्ती झाली. तेव्हा ज्ञान म्हणजे ब्राह्मण म्हणावे तर अनेक क्षत्रियादीही परमार्थदर्शी आहेत. कर्म ब्राह्मण म्हणावे तर प्रारब्धसंचित असे कर्म सर्वांना प्रारब्धाच रीतीने कर्मप्रवण करते. थोर दाता म्हणजे ब्राह्मण असे म्हणावे, तर क्षत्रियादी इतरही हिरण्याचे दान करणारे पुष्कळजण आढळतात. तेव्हा ब्राह्मण या शब्दाचा खरा अर्थ तरी काय ? जो कोणी अद्वितीय, जातिगुणक्रियाहीन, षर्डूमिषड्भावसर्वदोषरहित, सत्यज्ञानानंदरूप असा आत्मा मी स्वतःच आहे, असे जाणतो आणि करतलामलकाप्रमाणे त्याचा साक्षात अनुभव घेतो, काम-रागदोषरहित, शमदमादिसंपन्न, भावमात्सर्यतृष्णा-आशा-मोहादिरहित, दंभ-अहंकार वगैरेंनी अस्पृष्ट असतो, तो ब्राह्मण, असा श्रुतिस्मृतिपुराणे व इतिहास यांचा अभिप्राय आहे; अन्यथा ब्राह्मणत्व सिद्ध नाही. स्वतःला सच्चिदानंद आत्मा अर्थात ब्रह्म असे जाणावे, हेच ब्राह्मणत्वाचे रहस्य होय. 'ब्रह्म जानाति असौ ब्राह्मणः' हे सत्य ओळखावे.

या उपनिषदाचा कर्ता कोण, ते समजायला साधन नाही. अश्वघोष (इ. स. चे २ रे शतक) हा याचा कर्ता आहे, अशी नेपाळातील परंपरा सांगते, तर आद्य शंकराचार्यांनी हे रचले, अशी महाराष्ट्रात समजूत आहे.

संत बहिणाबाईने या उपनिषदाचा अभंगांत अनुवाद केला आहे. [संतांच्या आत्मकथा; स्पर्शास्पर्श; श्री. सी. ग. देसाई.]

वज्रसूची बौद्ध पंडित अश्वघोष याचा एक ग्रंथ. यात जन्मजात जातिभेदावर तर्कमूलक चर्चा केलेली आहे. बौद्ध पंडित वेदवाक्य प्रमाण मानीत नव्हते आणि वैदिक विद्वान बुद्धवाक्य मानीत नव्हते. त्यामुळे अमक्या ग्रंथात अमुक आहे म्हणून ते खरे, हे पालुपद त्यांच्या वादविवादांत निरर्थक ठरत असे. युक्तिसंगत व बुद्धिनिष्ठ अशा वादविवादांची त्या काळातली जी उदाहरणे उपलब्ध आहेत, त्यांत अश्वघोषाच्या वज्रसूची या प्रबंधाची गणना करता येते. त्यात आधुनिक तर्कपद्धतीचा अवलंब सर्वार्थाने केलेला नसला, तरी त्या काळी चातुर्वर्ण्य या विषयासंबंधी जे अनुकूल-प्रतिकूल आक्षेप-प्रत्याक्षेप चालू होते, त्यांचा खल आजही अभ्यसनीय वाटावा इतक्या बुद्धिनिष्ठेने त्या ग्रंथात केलेला आहे. जातिभेदासंबंधी त्या काळातील मतमतांतरे समजून घेण्यासाठी उपयुक्त असा एक प्राचीन अधिकृत लेख म्हणून या ग्रंथाला महत्त्व आहे. त्यात जातिवर्णांची कल्पना खोटी असून, सर्व मानवांची जात एकच होय, असे प्रतिपादले आहे. [स. सा. वा. ३]

वज्रहुंकार ध्यानी बुद्ध अक्ष्योभ्य याच्या वज्रकुलातला एक देव. याची दोन रूपे आहेत. एक द्विभुज व दुसरे षड्भुज. साधनमालेत पहिल्या रूपाचे वर्णन केलेले आहे, ते असे- 'हुं' या बीजाक्षरातून याची उत्पत्ती झालेली असून, हा अत्यंत भयानक दिसतो. याचे रूप महारौद्र असून, याचे हास्यही भयंकर असते. त्यामुळे त्रिलोकांचा थरकाप होतो. याच्या दोन हातांत वज्र व घंटा असून, ते हात वज्रहुंकार मुद्रा दाखवितात. हा प्रत्यालीढ अवस्थेत भैरवावर नाचतो. हा नीलवर्ण व तेजस्वी आहे.

निष्पन्नयोगावलीत याचे दुसरे रूप वर्णिलेले आहे, ते असे-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हा त्रिमुख, षड्भुज व नीलवर्ण आहे. याच्या मुख्य दोन हातांत वज्र व घंटा असून, त्यांनी हा त्रैलोक्यविजयमुद्रा दर्शवतो आणि स्वतःच्या शक्तीला आलिंगन देतो. याच्या उरलेल्या उजव्या दोन हातांत अंकुश व पाश आणि डाव्या हातांत कपाल व खट्वांग आहेत.

वज्रहुंकाराच्या मूर्ती भारतात सापडत नाहीत; पण त्या चीनमध्ये मात्र आढळतात. [इं. बु. इ.]

वज्रहुंकारमुद्रा एका हातात वज्र व दुसऱ्या हातात घंटा ही आयुधे घेऊन, दोन्ही हात हृदयाजवळ फुलीप्रमाणे धरले असता ही मुद्रा होते. या मुद्रेत मुठी छातीकडे वळवलेल्या असतात. मुठी बाहेरच्या बाजूला वळविल्या, की ती त्रैलोक्यविजयमुद्रा होते. वज्रहुंकार ही मुद्रा वज्रधर बुद्धाचे अभिज्ञान आहे. [इं. बु. इ.; गॉ. नॉ. बु.]

वज्रांकुशा जैनांची विद्यादेवी. अनंतनाथ तीर्थंकराची शासनदेवता. श्वेतांबरांच्या मते ही श्वेतवाहना असून, हातांत खड्ग, खेटक, भाला व वज्र धारण करते. दिगंबरांच्या मते ही वायुरथारूढ असून, हातीं अंकुश व तुंदर धारण करते.

वज्रानंग बोधिसत्त्व मंजुश्री याचे एक रूप. ही बौद्ध संप्रदायातील एक प्रेमदेवता आहे. वज्रानंगाचे मदनाशी बरेच साधर्म्य आहे. हा चतुर्भुज किंवा षड्भुज असतो. तांत्रिक वशीकरण विधीत याची पूजा केली जाते. साधनमालेत याचे वर्णन केलेले आहे, ते असे – हा षड्भुज व पीतवर्ण आहे. दोन हातांनी हा फुलाचे धनुष्यबाण धरतो; उजव्या दोन हातांत खड्ग व दर्पण आणि डाव्या दोन हातांत कमळ व अशोकाची रक्तपुष्पयुक्त शाखा असते. याच्या जटामुकुटात अक्षोभ्याची प्रतिमा आहे. हा प्रत्यालीढ अवस्थेत उभा असून, यौवन व शृंगाररस यांनी युक्त आहे. [इं बु. इ.]

वज्रामृत ध्यानी बुद्ध अमोघसिद्धी याच्या कुळातला एक देव. निष्पन्नयोगावलीच्या वज्रामृत मंडलातला हा प्रमुख देव होय. याचे वर्णन निष्पन्नयोगावलीत आहे, ते असे – हा त्रिमुख व षड्भुज असून, याचे मुख्य मुख हिरवे आहे. इतर मुखे शुभ्र व लाल आहेत. हा सत्त्वपर्यंकावर बसलेला असून, दोन हातांत वज्र व घंटा धारण करतो आणि त्याच हातांनी आपल्या शक्तीला आलिंगन देतो. याच्या उजव्या दोन हातांत चक्र व खड्ग आणि डाव्या दोन हातांत पाश व अंकुश ही आयुधे आहेत. याच्या मूर्ती चीनमध्ये आढळतात. [इं. बु. इ.]

वज्रासन (१) एक अल्पश्रमसाध्य योगासन. या आसनाचा पहिला प्रकार असा – दोन्ही मांड्या व पोटऱ्या जवळ आणून गुडघे जमिनीला टेकवावे आणि दोन्ही पायांचे तळवे गुदाच्या मागे घेऊन त्यांवर बसावे. दोन्ही हात गुडघ्यांवर ठेवावे. छाती फुगवून व पोट आत ओढून घेऊन ताठ बसावे. डोळे उघडे ठेवावे. शरीर फार ढिले सोडू नये किंवा फार ताणू नये.

वज्रासन

या आसनाचा दुसरा प्रकार – पाय वरीलप्रमाणेच ठेवून हात पाठीमागे नेऊन कमरेवर ठेवावे व डोके जमिनीला लावावे. दोन्ही हातांची बोटे जुळवून ठेवावी. हे आसन योग्यांना सिद्धिदायक आहे, असे म्हटले आहे. या आसनामुळे शरीर वज्रासारखे सुदृढ व बलवान होते; जीर्णज्वर, अग्निमांद्य, मूत्रविकार, वीर्यदोष, इ. रोग नष्ट होतात व हृदयविकार कमी होतो, असे सांगितले आहे. तारुण्य कायम टिकवण्यासाठीही हे आसन उपयुक्त मानले जाते. [उ. यो. द.]

(२) मूर्तिकलेतील एक आसन. यात डावे पाऊल उजव्या मांडीवर व उजवे पाऊल डाव्या मांडीवर ठेवून ताठ बसायचे असते. तंत्रसारात या आसनाचे वर्णन केलेले आहे. त्यात पायाचे तळवे वर दिसतात व त्यांवर हात ठेवलेले असतात, असे म्हटले आहे. पद्मासन, ध्यानासन आणि वज्रपर्यंकासन या आसनांतही पायाची स्थिती वज्रासनाप्रमाणेच असते. [डे. हिं. इ.]

(३) बोधगया येथे बोधिवृक्षाखाली ज्या पाषाणखंडावर बसलेला असताना सिद्धार्थ गौतमाला ज्ञानप्राप्ती झाली, त्याला वज्रासन म्हणतात. तिथे उत्खनन करताना कनिंगहॅमला वालुकापाषाणाचे एक चमकदार आसन सापडले. ते सम्राट अशोकाने बनवलेले आहे, असे मानले जाते. भरहुत येथील स्तूपाच्या कठड्यावर वज्रासनमंदिराचे एक चित्र कोरलेले आहे. त्यात अशोकाने निर्माण केलेले हस्तिशिरोयुक्त गोल स्तंभ आहेत. हे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिर चार स्तंभांवर आधारलेले आहे. त्याच्यावर बोधिवृक्ष-देखील दाखवलेला आहे. [भा. क. बि. दे.]

वज्रासनबुद्ध गौतम बुद्ध शाक्यसिंह याचे एक रूप. महायान पंथाचे लोक याला मानुषी बुद्ध म्हणतात. साधनमालेत याचे अनेक प्रकारे वर्णन केलेले आहे. त्यांतील एक वर्णन असे – वज्रासनबुद्ध विश्वपद्मवज्रावर वज्रपर्यंकासनात बसलेला असून, तो उजव्या हाताने भूमिस्पर्शमुद्रा दर्शवितो. त्याचा डावा हात मांडीवर ठेवलेला असतो. त्याने काषाय वस्त्रे परिधान केलेली असतात. तो शांत व सर्व शुभ लक्षणांनी युक्त आहे. त्याच्या आसनाखाली चार रंगांचे चार मार असतात. त्याच्या उजव्या अंगाला मैत्रेय बोधिसत्त्व व डाव्या अंगाला लोकेश्वर बोधिसत्त्व असतो. मैत्रेय शुभ्र वर्णाचा, द्विभुज व जटा-मुकुटधारी आहे. लोकेश्वरही शुभ्र वर्णाचाच आहे. याच्या असंख्य मूर्ती भारतात आढळतात. [इं. बु. इ]

वज्री पाय घासण्यासाठी वापरायचे एक खरखरीत व कठीण साधन. वज्रीचा उपयोग कधी कधी अंगावरचा मळ काढण्यासाठीही करतात. प्राचीन काळी या वज्र्या दगड व खापराचे तुकडे यांपासून बनवीत असावेत. अशा प्रकारच्या अनेक वज्र्या मोहेंजोदडो, कौशांबी, मथुरा, इ. ठिकाणच्या उत्खननांत सापडल्या आहेत. महाराष्ट्रातील नेवासे येथेही या वज्र्या मिळाल्या आहेत. उ. भारतात अजूनही खापराच्या वज्र्या वापरण्याची प्रथा आढळते. इ. स. च्या १७ व्या १८ व्या शतकात ही वस्तू धातूची बनू लागली. वज्र्यांचा खालचा भाग पोकळ पेटी-सारखा असून, त्यात आवाजासाठी दोन



वज्री

चार खडे टाकलेले असतात. पोकळीच्या चारही बाजूंना जाळी असल्यामुळे खड्यांचा चांगला आवाज होतो. कातडी घासण्याची बाजू खवल्याखवल्यांची असून, हातात धरण्यासाठी वरच्या बाजूला मूठ असते. या मुठीवर हत्ती, वाघ, सिंह, मोर, पोपट, हंस, इ. विविध प्राण्यांची व स्त्री-पुरुषांची चित्रे कोरलेली असतात. पुण्यातील राजा केळकर संग्रहालयात विविध प्रकारच्या पितळेच्या शंभराहून अधिक सुंदर वज्र्या ठेवलेल्या आहेत.

अनेक श्रीमंत कुटुंबांत जुन्या वज्र्या आजही पाहायला मिळतात. एका काळी घरात वज्री असणे हे एक श्रीमंतीचे लक्षण मानले जात होते. महाराष्ट्रातील काही ठिकाणी लग्नसमारंभात वज्रीचा उपयोग मानाच्या देणगीसाठी केला जात असे. त्याच-प्रमाणे दिवाळीच्या दिवसांत स्नानाच्या वेळी हिचा उपयोग केला जात असे. [महाराष्ट्र टाइम्स, ८ जुलै १९६२.]

वज्रेश्वरी (१) एक देवता. हिचे एक स्थान महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्याच्या भिवंडी तालुक्यात आहे. ठाण्यापासून हे अंतर सुमारे सव्वीस मैल भरते. वज्रेश्वरी गावाचे मूळ नाव वडवली असे असून, आता ते देवीच्या नावानेच परिचित झाले आहे. या गावात उल्हास नावाची नदी असून, तिच्या तीरावरच्या एका टेकडीवर देवीचे देऊळ आहे.

या देवतेला वज्रेश्वरी हे नाव का मिळाले, त्यासंबंधी एक कथा सांगितली जाते, ती अशी –

उग्रासुर नावाचा एक शूर असुर होऊन गेला. त्याला सिंहमार व कलिकाल नावाचे दोन पराक्रमी मुलगे होते. त्यांनी शक्तीच्या बळावर सर्वत्र धुमाकूळ घातला. त्यामुळे ऋषींच्या यज्ञयागात खंड पडू लागला. या असुरांचा त्रास दूर होण्यासाठी देवीची कृपा संपादन करावी म्हणून ऋषींनी एक यज्ञ सुरू केला. त्या यज्ञाचे ऋत्विज वसिष्ठ ऋषी होते. यज्ञात सर्व देवतांना हविर्भाग मिळाला; पण इंद्राला तो दिला गेला नाही. त्यामुळे इंद्राने रागावून वसिष्ठावर आपले वज्र फेकले. पार्वतीने प्रकट होऊन ते वज्र गिळून टाकले म्हणून तिला वज्रेश्वरी हे नाव मिळाले.

टेकडीवरील देवीचे देऊळ पूर्वाभिमुख असून, त्याच्या भोवती मोठा कोट बांधलेला आहे. पहिले बाजीराव पेशवे वज्रेश्वरीचे भक्त होते व त्यांनीच हिचे देऊळ बांधले असे सांगतात. परंतु काही इतिहासपंडितांच्या मते हे देऊळ चिमाजीअप्पाने बांधले आहे. कारण वसईचा किल्ला काबीज करण्यासाठी इच्छा देवीनेच चिमाजीअप्पाला दृष्टांत दिला होता, असे त्यांचे म्हणणे आहे. किल्ला सर झाल्यावर देवीबद्दलच्या श्रद्धेने त्यांनी स्वतःच्या देखरेखीखाली हे देऊळ बांधले. सभामंडपाचा भाग श्रीमंत खंडेरावमहाराज गायकवाड यांनी आणि पायऱ्या व दीपमाळ नासिकचे प्रसिद्ध सावकार नाना चांदवडकर यांनी बांधल्या. मंदिरात दोन गाभारे असून प्रमुख गाभाऱ्यात पाच मूर्ती आहेत. त्यांत मध्यभागी वज्रेश्वरी, तिच्या उजव्या बाजूला सावित्री-सरस्वती आणि डाव्या बाजूला लक्ष्मी-भार्गव आहेत. दुसऱ्या गाभाऱ्यात गणपती, वेताळ, कालभैरव, इ. देव आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आश्विनातल्या व चैत्रातल्या नवरात्रांत इथे यात्रा भरते. चैत्र अमावास्येला भरणारी यात्रा मोठी असते. यात्रेच्या प्रसंगी पूर्वी लोक गळ टोचून घेत होते. पण अलिकडे ही प्रथा कायद्याने बंद झाली आहे.

वज्रेश्वरी गावाच्या परिसरात गरम पाण्याची अनेक कुंडे आहेत. हे पाणी आरोग्यदायक आहे, असे सांगतात. सरकारच्या वतीने इथे एक जलोपचार केंद्रही चालू करण्यात येणार आहे. नित्यानंदस्वामींचा एक आश्रम इथे आहे. अनेक भाविक त्यांच्या समाधीच्या दर्शनाला इथे येत असतात. [दे. को. २-३; आ. द. दे.; म. जि. – ठाणे]

(२) वज्रेश्वरीचे आणखी एक प्रसिद्ध स्थान पंजाबातल्या कांगडा जिल्ह्यात आहे. गझनीच्या महमुदाने या मंदिरातले अनेक मन सोने, चांदी व जडजवाहिर लुटून नेले, असे सांगतात. हे प्राचीन मंदिर इ. स. १९०५ च्या भूकंपात नष्ट झाले. आता त्या जागेवर पुन्हा नवे मंदिर उभारले आहे. साऱ्या पंजाबातून हिंच्या दर्शनाला लोक तिथे जात असतात. [पं. जी. सा.]

(३) एक शाक्त देवता. हिला वज्रप्रसारिणी असेही म्हणतात. हिचे वर्णन असे – ही रक्तवर्णा, रक्तवसना व त्रिलोचना आहे. तिच्या चार हातांमध्ये पाश, अंकुश, उसाचे धनुष्य व डाळिंबाच्या फुलांचा बाण, ही आयुधे आहेत. [श्रीविद्यार्णवतंत्र]

वज्रोली एक मुद्रा. हठयोगप्रदीपिकेत वर्णन केलेल्या दहा मुद्रांमध्ये हिची गणना होते. मूत्रमार्ग व वीर्यमार्ग शुद्ध व अधिक कार्यक्षम होण्यासाठी या मुद्रेचा अभ्यास करतात. ब्रह्मचर्यासाठी बिंदुनिरोध करणे आवश्यक असते. वैवाहिक जीवनातही ब्रह्मचर्य पाळण्यासाठी साधनमार्गात योग्यांना वज्रोलीचा उपाय सांगितला आहे. या मुद्रेमुळे स्त्रीसंग घडत असताना योगी स्त्रीरजासहित आपले वीर्य खेचून घेऊ शकतो आणि बिंदुजय साधतो, अशी समजूत आहे. [योगविद्या]

वटयक्षिणी वटवृक्षावर राहणारी यक्षिणी. ही रक्तांबरा व कृष्णवर्णा असून, तिच्या एका हातात सुपारी व दुसऱ्या हातात विड्याची पाने असतात.

ही देवता सर्व कामना पूर्ण करणारी आहे. हिला प्रसन्न करून घेण्यासाठी 'एह्येहि यक्षि यक्षि महायक्षि वटवृक्षनिवासिनि शीघ्रं मे सर्वसौख्यं कुरु कुरु स्वाहा ' या मंत्राची साधना करतात. या मंत्राचा ऋषी विश्रवा व छंद अनुष्टुप आहे. या मंत्रातील क्रमाने तीन, चार, चार, आठ सात व सहा अशी अक्षरे घेऊन प्रथम षडंगन्यास व नंतर अवयवन्यास करतात. नंतर वटवृक्षाखाली बसलेल्या यक्षिणीचे पुढील मंत्राने ध्यान करतात –

अरुणचन्दनवस्त्रविभूषितां सजलतोयदतुल्यतनूरुचम् ।
स्मर कुरङ्गदृशं वटयक्षिणीं क्रमुकनागलतादलयुक्कराम् ।।

अर्थ – रक्तचंदन व वस्त्रे यांनी विभूषित, सजल मेघाप्रमाणे कांती व हरिणीप्रमाणे नेत्र असलेल्या, सुपारी आणि विड्याची पाने हाती धारण करणाऱ्या वटयक्षिणीचे तू स्मरण कर.

नंतर पीठस्थापना करून त्यावर कामदा, मानदा, नक्ता, मधुरा, मधुरानना, इ. शक्तींची पूजा केल्यावर त्या पीठावर ठेवलेल्या पूजनयंत्रावर इष्ट देवतेची स्थापना करतात. कर्णिकेवर षडंगे, कमलदलांवर सुनंदा, चंद्रिका, इ. अष्टशक्ती, इंद्रादी दिक्पाल व त्यांची आयुधे यांची पूजा केल्यावर इष्ट देवतेची यथाविधि पूजा करतात. नंतर वटयक्षिणी मंत्राचा दोन लक्ष जप व त्यांच्या दशांश संख्येने बंधूक पुष्पांचे हवन करतात.

अशा रीतीने मंत्र सिद्ध केल्यावर त्याचा प्रयोग करतात. निर्मनुष्य अरण्यातील वडाच्या झाडाखाली बसून, रोज रात्री यक्षिणी मंत्राचा सहस्र जप करतात. सातव्या दिवशी तिथेच चंदनाचे मंडल करून त्यावर वटयक्षिणीची पूजा करतात. मध्यरात्रीपर्यंत जप केल्यानंतर साधकाला नूपुरांचा मंजुळ ध्वनी ऐकू येतो. नंतर प्रत्यक्ष देवी त्याच्याकडे सुरताची याचना करते. तिची इच्छा पूर्ण केल्यावर ती साधकाची कोणतीही अभिलाषा पूर्ण करते. [मं. म.; श्रीविद्यार्णवतंत्र]

वटवृक्ष एक पवित्र वृक्ष. संस्कृत भाषेत याला न्यग्रोध म्हणजे खाली खाली वाढणारा असे म्हटले आहे. कारण



प्रचंड वटवृक्ष – कलकत्ता

याच्या आडव्या फांद्यांपासून पारंब्या फुटून त्या जमिनीत शिरतात व झाडाचा विस्तार होतो. ऋग्वेदात याचे नाव नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पण अशा प्रकारच्या वृक्षाचे वर्णन मात्र ऋग्वेदात आढळते (१.२४.७.). यावरून हा वृक्ष त्या काळी ज्ञात असावा, असे वाटते. अथर्ववेदात (४.३७.४) व त्यानंतरच्या वाङ्मयात याचे उल्लेख आहेत. शतपथ ब्राह्मणात याच्या उत्पत्तीची कथा दिली आहे, ती अशी – कुरुक्षेत्रात देवांनी यज्ञ केला आणि त्या वेळी सोमचमसाचे मुख त्यांनी खालच्या बाजूला करून ठेवले. त्या सोमचमसाचाच मग वटवृक्ष बनला (श. ब्रा. १३.२.७.३).

हा यज्ञीय वृक्ष आहे. यज्ञपात्रे याच्याच लाकडाची बनवतात. सृष्टी निर्माण होण्यापूर्वी प्रलयकालीन जलात श्रीविष्णू बालरूपाने वटपत्रावर शयन करतो, असे सांगितलेले आहे. ब्रह्मदेव वडाच्या झाडावर राहतो, असे मानतात. खवीस, यक्ष आणि वेताळ हेही वटवृक्षांवर राहतात, अशी समजूत आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी सुवासिनी स्त्रिया याची पूजा करतात. सौभाग्य आणि संतती यांच्या प्राप्तीसाठी वडाला पार बांधून त्याची मुंज करावी व त्याचे दूर्वेशी लग्न लावावे, असे विधान आहे.

हा अंजिराच्या जातीचा वृक्ष आहे. रस्त्याच्या कडेला छायेसाठी हे वृक्ष लावतात. काही काही वड फार मोठे होतात. मध्य प्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यात वडचिचोली येथे एक वड अडीच एकर भूमीवर पसरलेला आहे. विहारमधील कमतौल येथील वड, गुजरातेतील नर्मदेच्या मुखाजवळील कबीरवट, कलकत्त्याच्या शिवपूर बोटॅनिकल बागेतील वड व अड्यार येथील वड हे वृक्षही प्रचंड असून, त्यांच्या छायेत चार-पाच हजार माणसे बसू शकतात, असे सांगतात.

कृष्णवट नावाचा एक वडाचा प्रकार आहे. त्याची पाने



कृष्णवटाची पाने

किंचित वाकलेली असल्यामुळे ती द्रोणासारखी दिसतात. एकदा गोपालकृष्ण गाईंना घेऊन रानात गेला असता, काही गोपी लोणी घेऊन तिथे गेल्या व त्यांनी ते लोणी कृष्णाला दिले. लोणी पुष्कळ होते म्हणून कृष्णाने ते सर्व गोपगोपींना वाटले. त्यासाठी त्याने जवळच असलेल्या एका वडाची पाने तोडून ती जराशी मुडपून घेतली. तेव्हापासून त्या वडाची पाने तशी द्रोणासारखी बनली आणि त्याच्या बीजापासून उत्पन्न झालेल्या वडांना तशीच पाने येऊ लागली, अशी आख्यायिका सांगतात. अशा वटवृक्षाला कृष्णवट म्हणतात.

प्रयाग येथील अक्षय वटाखाली राम, सीता आणि लक्ष्मण यांनी आसरा घेतला होता, असे एका दंतकथेत म्हटले आहे. या अक्षय वटापासून निघालेल्या दुसऱ्या वटवृक्षाची, अलाहाबाद किल्ल्याजवळच्या एका भुयारातील मंदिरात अजून लोक पूजा करतात. बडोद्यातील लालवदिया जमातीचे लोक फक्त वडाचीच पूजा करतात.

वटवृक्ष हे प्रेमिकांना सुरक्षित व सोईस्कर संकेतस्थान असल्याचा उल्लेख गाथासप्तशतीत आहे. [वे. इं.; मं. म.; वराद, रामेश बेदी, हिमालय वनस्पतिसंस्थान, गुरुकुल कांगडी, हरिद्वार]

वटसावित्रीव्रत सुवासिनी स्त्रियांनी सौभाग्यवृद्धीसाठी करायचे एक व्रत. हे ज्येष्ठपौर्णिमेला करतात. ज्येष्ठ शु. त्रयोदशीपासून पौर्णिमेपर्यंत हे त्रिरात्रव्रत करावे, असे सांगितलेले आहे. तीन दिवस उपवास करणे अशक्य असेल, त्यांनी फक्त पौर्णिमेच्या दिवशी उपवास करावा. सावित्रीसह ब्रह्मदेव ही या व्रताची मुख्य देवता असून, सत्यवान सावित्री, नारद व यमधर्म या उपांग देवता आहेत. या व्रताचा विधी असा– नदीकाठची वाळू आणून पात्रात भरावी. तिच्यावर सत्यवान आणि सावित्री यांच्या मूर्ती ठेवाव्या. मग त्यांची षोडशोपचार पूजा करावी. त्यानंतर पाच अर्घ्य द्यावे. मग पुढील मंत्राने सावित्रीची प्रार्थना करावी –

सावित्रि ब्रह्मसावित्रि सर्वदा प्रियभाषिणि ।
तेन सत्येन मां पाहि दुःखसंसारसागरात् ॥
अवियोगो यथा देव सावित्र्या सहितस्य ते ।
अवियोगस्तथाऽस्माकं भूयाज्जन्मनि जन्मनि ॥

पूजा झाल्यावर संध्याकाळी सुवासिनींसह सावित्रीची कथा श्रवण करावी.

या व्रतात सावित्रीच्या मूर्तीची पूजा सांगितलेली असली, तरी रूढी मात्र वेगळी आहे. सावित्रीचा पती सत्यवान वडाच्या झाडाखाली गतप्राण झाला आणि पुन्हा तिथेच सजीव झाला, या संकेताला अनुसरून स्त्रिया या दिवशी वडाचीच पूजा करतात. त्यासाठी त्या वटवृक्ष असेल त्या ठिकाणी जाऊन वडाच्या मुळांशी पाणी घालतात आणि त्याला प्रदक्षिणा घालून सुताचे वेष्टन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करतात; नंतर त्याची पूजा करतात; नंतर त्याच्या मुळाशी असलेल्या सावित्री-ब्रह्मदेव, सत्यवान-सावित्री, धर्मराज व नारद यांच्या प्रतिमांचे पूजन करतात व प्रार्थना करतात.

वड जवळपास नसेल, तर वडाची फांदी कुंडीत रोवून किंवा वटसावित्रीचे चित्र भिंतीवर चिकटवून त्याची पूजा करण्याचीही प्रथा आहे. पूजेनंतर सुवासिनींना सौभाग्यवायने देतात.

व्रताचे उद्यापन करताना ज्येष्ठ शुद्ध द्वादशीला अल्पाहार करतात. त्रयोदशीच्या दिवशी व्रताचा संकल्प करतात. वटवृक्षाच्या मुळाशी किंवा घरी चंदनाने काढलेल्या वटवृक्षाच्या मुळाशी सर्वतोभद्र मंडलावर कलश मांडतात आणि त्याच्यावर सात धान्यांनी भरलेले वेळूचे शिप्तर ठेवतात. त्याच्या जवळच चांदीचा वटवृक्ष, लाकडांचा भारा, कुऱ्हाड व चांदीचा रथ मांडतात. रथात चांदीचा पलंग मांडून त्याच्यावर ब्रह्मा, सावित्री, सत्यवान, त्याची पत्नी सावित्री, यमधर्म आणि नारद यांच्या सुवर्णाच्या प्रतिमा ठेवतात. सुवर्णाच्या प्रतिमा शक्य नसल्यास मातीच्या प्रतिमा ठेवतात व त्यांची पूजा करतात. रात्री सावित्रीचे चरित्रकथन, नृत्य, गीत, इ. कार्यक्रम करतात. चवथ्या दिवशी आचार्यद्वारा हवन व यथाशक्ति चोवीस, सोळा, बारा किंवा आठ दांपत्यांची पूजा करतात. गोदान, शय्यादान व प्रतिमादान देऊन आणि ब्राह्मणभोजन घालून व्रताची समाप्ती करतात.

या व्रताची कथा पुढीलप्रमाणे —

पूर्वी भद्र देशात अश्वपती नावाचा एक परम धार्मिक व प्रजापालनतत्पर असा राजा होऊन गेला. त्याला सर्व सुखे होती; पण पोटी संतान नसल्यामुळे तो फार दुःखी होता. त्याने उग्र तपश्चर्या करून ब्रह्मपत्नी सावित्रीला प्रसन्न करून घेतले. तिने राजाला 'तुला सर्वगुणसंपन्न, तेजस्वी व लावण्यवती कन्या होईल' असा वर दिला. त्याप्रमाणे राजाला कन्या झाली. सावित्रीच्या कृपाप्रसादाने झाली, म्हणून राजाने तिचे नाव सावित्री ठेवले. होता होता सावित्री मोठी झाली; पण तिच्या गुणसंपदेने व तेजस्वीपणामुळे दिपून जाऊन कोणी राजपुत्र तिला वरायला तयार होईना. तेव्हा राजाज्ञेने ती स्वतःच राजपुरोहिताबरोबर वरसंशोधनार्थ बाहेर पडली. शाल्व देशाचा राजा द्युमत्सेन याचा पुत्र सत्यवान याला तिने पसंत केले. द्युमत्सेन अंध होता व शत्रूंनी राज्यभ्रष्ट केल्यामुळे तो आपली पत्नी व एकुलता एक मुलगा सत्यवान यांच्यासह अरण्यात राहात होता.

सत्यवानाला मनाने वरून सावित्री घरी परतली, त्या वेळी नारदमुनी तिथे आलेला होता. सावित्रीने सत्यवानाची निवड केली, हे ऐकून नारदाला दुःख झाले. तो अश्वपतीला म्हणाला, 'सत्यवान अल्पायुषी असून, आजपासून एका वर्षाने त्याचा मृत्यू होणार आहे. तेव्हा सावित्रीने दुसरा वर निवडावा.' पण सावित्री आपल्या निवडीबाबत अढळ राहिली. तेव्हा तिला आशीर्वाद देऊन नारद निघन गेला.

त्यानंतर अश्वपतीने सावित्रीचा सत्यवानाशी विवाह करून दिला. सावित्रीने मग उंची वस्त्राभरणांचा त्याग केला व ती साधी वस्त्रे नेसून राहू लागली. सासूसासरे व पती यांची सेवा करण्यात ती आपला दिवस घालवू लागली. सत्यवानाचा मृत्यू चार दिवसांवर येऊन ठेपला, तेव्हा सावित्रीने त्रिरात्र सावित्रीव्रत करण्याचा संकल्प केला. व्रताचे तीन दिवस संपले व चौथा दिवस उजाडला. हाच सत्यवानाचा मृत्युदिन होता. त्या दिवशी सत्यवान दर्भ व काष्ठे आणण्यासाठी वनात गेला, तेव्हा सावित्रीही त्याच्या बरोबर गेली. सरपणासाठी लाकडे तोडीत असता एकाएकी सत्यवानाचे डोके दुखू लागले, म्हणून तो सावित्रीच्या मांडीवर डोके टेकून थोडा वेळ निजला. तेवढ्यात यमदूत त्याचे प्राण हरण करण्यासाठी तिथे आले. पण सावित्रीच्या तेजामुळे ते सत्यवानाचे प्राण हरण करू शकले नाहीत. तेव्हा यमधर्म स्वतः तिथे आला आणि सत्यवानाचे प्राण खेचून घेऊन जाऊ लागला. सत्यवानाच्या शवाला कोणी स्पर्श करू नये, म्हणून जरूर ती तजवीज करून सावित्रीही यमधर्माच्या मागून निघाली. यमधर्माने तिला परत जायला सांगितले, तरी ती परत फिरली नाही. हळूहळू यमाशी युक्तिवाद करून तिने सासऱ्याचे डोळे आणि गेलेले राज्य परत मिळवले; तसेच सत्यवानाचे प्राणही परत मिळवले. सर्वांना फार आनंद झाला. सावित्रीने यथाविधि पारणा व व्रताचे उद्यापन केले. त्यानंतर अनेक वर्षे राज्योपभोग, ऐश्वर्य, पुत्रप्राप्ती, इ. सुखे भोगून शेवटी ती दोघे स्वर्गाला गेली.

भरतखंडात अनेक पतिव्रता प्रसिद्ध आहेत; पण त्यांत सावित्री हीच आदर्श मानलेली आहे. एखाद्या सुवासिनीने दुसऱ्या स्त्रीला नमस्कार केला असता, ती 'जन्मसावित्री हो' असाच आशीर्वाद तिला देते. सावित्री हे भारतीय संस्कृतीत अखंड सौभाग्याचे प्रतीक ठरले आहे.

बंगालमध्ये वटसावित्रीव्रत करण्याची रीत थोडी वेगळी आहे. बंगाली सुवासिनी या दिवशी आपल्या पतीची पूजा करतात. त्या प्रसंगी पतीच्या अंगाला सुगंधी तेल व चंदनाची उटी लावतात, त्याच्या गळ्यात फुलांचा हार घालतात आणि त्याला नवीन वस्त्र देतात. याव्यतिरिक्त, त्या यमाचीही पूजा करतात आणि त्याला फुले, फळे व वडाची डहाळी अर्पण करतात. [हि. ध.; नि. सि.; व्रतराज; आ. स. प्रा. अ. इ.]

वटोलिआ गुजरातेतील एक जात. या लोकांना वरोडिया किंवा वंशफोड अशी अन्य नावे आहेत. बांबूच्या टोपल्या करणे हा त्यांचा परंपरागत धंदा आहे आणि त्यावरूनच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना ही नावे मिळाली असावी. सदरी, देसाई, चौधरी ही त्यांची कुळे आहेत. त्यांचा परस्परांत बेटीव्यवहार होतो.

विवाहप्रथा – यांचा विवाहसमारंभ वराच्या घरी होतो. विवाहाच्या वेळी वधू-वर उखळाजवळ बसून एकमेकांना द्रोणातून चहा देतात. मग त्यांच्या वस्त्राची गाठ मारून त्यांना बाहेर नेतात. तिथे नाच चालू असतो. नृत्य करणारे दोन नर्तक या दोघांना खांद्यावर घेऊन अंगणात पाच फेऱ्या मारतात. नंतर त्यांच्या वस्त्राची गाठ सोडली जाऊन ते नाचात सहभागी होतात. लग्नानंतर वधू आपल्या गळ्यात एक माळ व पायांत पितळी वाळे घालते.

यांच्यांत देजाची पद्धत आहे. देज देणे शक्य नसेल तर, नवऱ्या मुलाला सासऱ्याकडे पाच वर्षे नोकरी करावी लागते. घटस्फोट व विधवाविवाह रूढ आहेत.

वटोलियांना नृत्याची फार आवड आहे. त्यांच्या नाचाला दोहेडिआ, ववाडिआ, परनिआ अशी नावे आहेत. नाचाला बासरीची साथ असते.

यांचा जादूटोणा, चेटुक यांवर विश्वास असतो. त्यासाठी ते कोंबडा, बकरा यांचा बळीही देतात.

हे लोक मृतांना पुरतात. [सुरत गॅझे.]

वडनगर

गुजरातमधील एक प्राचीन क्षेत्र. मेहसाणाहून लोहमार्गाने वडनगरला जाता येते. इथले हाटकेश्वर महादेवाचे मंदिर प्रसिद्ध आहे. त्याव्यतिरिक्त इथे अनेक प्राचीन जैन मंदिरे आहेत.

वडनगरला अनेक नावे होती. सत्ययुगात त्याला चमत्कारपूर, त्रेतायुगात आनर्तपूर व द्वापरयुगात आनंदपूर असे म्हणत. वडनगर हे त्याचे कलियुगातले नाव आहे. त्याच्या चमत्कारपूर या नावाबद्दल एक कथा सांगतात, ती अशी –

आनर्त देशात चमत्कार नावाचा एक राजा राज्य करीत होता. कालांतराने त्याला कुष्ठरोग झाला आणि त्या रोगापासून सुटका व्हावी, म्हणून तो तीर्थयात्रा करू लागला. अनेक तीर्थक्षेत्रांत स्नान व देवपूजा करूनही त्याचा रोग हटेना. पुढे तो हाटकेश्वर क्षेत्रात गेला. जेव्हा चंद्र चित्रा नक्षत्रात होता, तेव्हा शुक्ल पक्षातील चतुर्दशीला राजाने तिथल्या शंख तीर्थात स्नान केले. तेव्हा त्याचा रोग बरा झाला. म्हणून राजाने तिथे चमत्कारपूर नामक एक नगर वसवले व ते ब्राह्मणांना दान दिले.

गुजरातचा शक क्षत्रप नहपान याचा जावई उपवदात याने वडनगर हे गाव नागर ब्राह्मणांना दान दिले. त्यांनी मग हाटकेश्वर हाच आपला उपास्य ठरवला. वडनगर येथील हाटकेश्वराचे मंदिर इ. स.च्या तिसऱ्या शतकात बांधलेले असावे.

कनकसेन नावाचा एक राजा इ. स. १४४–१४५ च्या सुमारास अयोध्येच्या परिसरातून इथे आला आणि त्याने वडनगर गाव वसवले, अशी एक कथा फोर्ब्सने उल्लेखिली आहे. हे एक वैभवशाली नगर होते, असे युआन च्वांगने म्हटले आहे.

वडनगर येथे वर्षातून अनेकदा यात्रा भरते. चैत्र शुद्ध चतुर्दशीला हाटकेश्वर महादेवाची प्रतिष्ठापना झाली, त्यामुळे त्या दिवशी इथे मोठी यात्रा भरते. त्याव्यतिरिक्त, श्रावणी सोमवार, नागपंचमी, कृष्णजन्माष्टमी, इ. प्रसंगींही इथे बरेच भाविक लोक जमतात. [भारती, ऑगस्ट १९५९]

वडवळसिद्ध नागेश

नागेश संप्रदायाचा प्रवर्तक. याला नागनाथ असेही दुसरे नाव आहे. त्यामुळे त्याच्या संप्रदायाला नागनाथ संप्रदाय, असेही म्हणतात. तो पूर्ण निःसंग असून, सर्वच वस्तू मंगल मानीत असे. त्याची काही पदे, काही अभंग आणि संकटहरणी शिवग्रंथ नामक सुमारे १०० ओव्यांचे एक प्रकरण एवढीच काव्यरचना उपलब्ध आहे. पाहा – नागेश संप्रदाय. [म. सा.; प्रा. म. सं. १]

वडादरा ब्राह्मण

गुजराती ब्राह्मणांची एक पोटजात. या लोकांची वस्ती पूर्वी अहमदाबादजवळच्या वडाद गावी होती. आता त्यातील बरेचसे लोक मेहमदाबादला आढळतात. खेडेगावात हिंडून भविष्य सांगणे हा त्यांचा प्रमुख व्यवसाय आहे. व्यवसायासाठी ते माळव्यापासून मुंबईपर्यंत भटकत असतात. वर्षातले आठ महिने ते बाहेर आणि चार महिने घरी असतात. ते जादूने तोंडातून कुंकू व सुपारी हे पदार्थही काढून दाखवितात. या ब्राह्मणांच्या अंगात देवी येते, अशी समजूत आहे. [वि. मुं. रा. प.]

वडार

एक जात. भारतात सर्वत्र यांची थोडीबहुत वस्ती असली तरी, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांत या लोकांची वस्ती प्रामुख्याने आहे. या लोकांना ओड, ओड्डे, वोड्डे, वड्डु, बेलदार, वड्डुर व ओर्ह अशीही नावे आहेत.

वडार लोकांचे मण्ण किंवा माती, भंडी किंवा गाडी, कल्ल किंवा दगडी, घट्टी किंवा डोंग किंवा टक्क, पाथरवट, जंती, भोज, इ. अनेक भेद आहेत. माती आणि दगड खणणे हा वडार लोकांचा वंशपरंपरागत व्यवसाय आहे. मण्ण वडार शेती व मातकाम करतात. ते विहिरी, तळी खणतात, रस्तादुरुस्ती करतात व मातीचा भराव घालणे, इ. कामेही करतात. भंडी वडार दगडाची खाण खोदून दगड वाहतात, विहिरी, तळी खोदतात व काही शेती करतात. कल्ल वडार जाती, उखळे, पाटे-वरवंटे, वगैरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तयार करतात. त्यांच्या बायका घरोघर हिंडून जाती व पाटे यांना टाकी लावतात. वडार लोकांचे दगड फोडण्याचे व ते वाहून नेण्याचे काम फार कष्टाचे असते. कामानिमित्ताने यांच्यापैकी बरेचसे लोक फिरत असतात. लहानमोठी धरणे, तलाव, मोठमोठ्या इमारती, रेल्वेरस्ते, इ. ठिकाणी त्यांच्या झोपड्या उभ्या राहिलेल्या दिसतात. काम संपेपर्यंत ते तिथे राहतात आणि नंतर दुसरे काम शोधण्यासाठी आपल्या कुटुंबासह फिरत राहतात. शहरांच्या वाढत्या विस्तारामुळे या लोकांना बहुधा कामे मिळतात. म्हणूनच शहरात या समाजाची वस्ती वाढत्या प्रमाणात आहे. पुरुषांबरोबर स्त्रियाही कष्टाची कामे करतात.

पूर्वी या लोकांची गुन्हेगार जमात म्हणून नोंद झालेली आहे. यांच्यापैकी मण्ण वडार घरफोडी, लहान लहान चोऱ्या, उभे पीक चोरणे, पेव फोडणे, इ. गुन्हे करीत. भंडी वडार पटाईत घरफोडे होते. घट्टी वडार दरोडे, जबरी चोरी, रस्तालूट, मेंढ्या चोरणे, इ. गुन्हे करीत. यात्रेत किंवा बाजाराच्या ठिकाणी यांची बायकापोरेही उचलेगिरी करीत.

हे लोक आपण क्षत्रिय असून, भगीरथाचे वंशज असल्याचे सांगतात. रासमाल या ग्रंथात यांच्याविषयी पुढील कथा सांगितलेली आहे –

गुजरातचा राजा सिद्धराज जयसिंग याने माळव्यातून अनेक वडार लोकांना पाटण येथील सहस्त्रलिंग तलाव खोदण्यासाठी बोलावून घेतले. त्यांच्या बरोबर त्यांच्या स्त्रिया व मुलेही होती. त्यांपैकी जस्मा नामक एका सुंदर तरुणीवर सिद्धराजाचे मन जडले. तिला आपल्या राजवाड्यात नेण्याची त्याने इच्छा प्रदर्शित केली; पण जस्माने ते मानले नाही. अब्रूच्या भयाने तिने पळून जायचा प्रयत्न केला. राजाने तिचा पाठलाग केला आणि त्यात अडथळे आणणाऱ्या अनेक वडार लोकांना ठार मारले. मग जस्माने आत्महत्या केली. त्यापूर्वी तिने राजाला शाप दिला, की 'तुझ्या तलावात कधीच पाणी साठणार नाही.' आणि आपल्या लोकांना उद्देशून ती म्हणाली, की 'यापुढे वडार स्त्रिया सुंदर निपजणार नाहीत.' वडार लोकांनी आजपासून तेल किंवा काजळ वापरू नये, असेही तिने बजावले.

स्थानपरत्वे वडार लोकांचे पुढील भेद आहेत –

मराठा व कानडी वडार – हे लोक उंच, काळे, सरळ नाकाचे व पिळदार शरीराचे असतात. त्यांचे ओठ पातळ व मान लांब असते. ते अत्यंत मेहनती असतात. पुरुष धोतर किंवा पायजमा, सदरा व उपरणे असा पोषाख करतात. ते चपला घालतात; पण जोडे घालीत नाहीत. जोडे घातल्यास त्यांना जातिबहिष्कृत व्हावे लागते. त्यांच्या स्त्रिया लुगडे नेसतात आणि त्याचा वरचा पदर डोके व छाती यावरून घेतात. त्या चोळी घालीत नाहीत; तसेच कुंकूही लावत नाहीत. उजव्या हातात बांगड्याही घालीत नाहीत. डाव्या हातात मात्र काशाच्या किंवा पितळेच्या बांगड्या घालतात. चोळी न घालण्यामागे त्यांच्यांत अनेक समज प्रचलित आहेत. वनवासात राहणाऱ्या सीतामाईचे आपण वंशज आहोत, असा एक समज त्यांच्यांत प्रचलित आहे. तसेच चोळीपायी व दागिन्यांच्या हव्यासापायी आपला पतीशी वियोग होईल, अशीही एक कल्पना त्यांच्यांत होती. म्हणून त्यांनी चोळी व इतर दागिने यांचा त्याग केला. त्यांच्या या समजुतींना ऐतिहासिक दृष्ट्या मात्र काहीही आधार नाही. त्यांच्यांतील वयस्क स्त्रिया वरील रूढीला धरून वागतात. पण सुशिक्षित मुली आता चोळी घालतात, कुंकू लावतात व इतरही अलंकार घालतात.

हे लोक घरी तेलुगू भाषा बोलतात आणि बाहेर मोडकीतोडकी मराठी किंवा कन्नड बोलतात.

गांजा, तंबाखू व दारू त्यांना अत्यंत प्रिय आहे. निरनिराळ्या प्रकारचे मांसही त्यांना आवडते.

विवाहप्रथा – पुरुषाला आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. वरपिता वधूपित्याला देज देतो. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मण किंवा ज्ञातिप्रमुख ठरवतो. यांची लग्ने गुरुवार, रविवार किंवा सोमवार या दिवशी सूर्यास्तसमयी होतात. पौर्णिमा किंवा अमावास्या या दिवशी लग्ने होत नाहीत. ज्ञातिवृद्ध लग्नात पौरोहित्य करतात. पुष्कळ ठिकाणी यांच्या लग्नात वाजंत्री, हळद, मंगळसूत्र व बाशिंग यांचा उपयोग करीत नाहीत.

स्थानपरत्वे यांच्या लग्नविधीतही थोडा भेद आढळतो.

अहमदनगरमध्ये मुलीच्या घरी कांबळ्याचे पाल उभारतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधूपिता वरपक्षाकडील मंडळींना घेऊन येतो. वरपक्षाकडील लोक त्या पालात राहतात. कुलदेवतेची पूजा झाल्यावर वराच्या कपाळी प्रथम चंदनाचा व मग पाच वेळा हळदीचा टिळा लावतात. तसेच टिळे वधूच्या कपाळी लावतात आणि सुवासिनी वधू-वरांना गरम पाण्याने स्नान घालतात. लग्न पालातच लागते. नवरा मुलगा वधूला हात धरून पालात आणतो. वधू-वर पूर्वेकडे तोंड करून उभे राहतात. सुवासिनी मंगलाष्टके म्हणतात आणि जमलेले लोक वधू-वरांवर अक्षता टाकतात. मग वधूवर कांबळ्यावर एकमेकांशेजारी बसतात. नंतर ती दोघे देवाला व मोठ्यांना नमस्कार करतात. त्यानंतर जेवणावळ होते.

दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी वधू-वर एकमेकांच्या हातावर पाच वेळा दुधाची धार ओततात. मग ती दोघे सुपारी लपवण्याचा खेळ खेळतात. जमलेले लोक त्यांना अहेर करतात. त्यानंतर मद्यमांससहित ज्ञातिभोजन होते व लग्नसमारंभ संपतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुण्यातील वडार लोकांत मुलीच्या व मुलाच्या घरी मांडव घालण्याची पद्धत आहे. मांडवाच्या एका खांबाला उंबराची डहाळी बांधतात आणि करवली तिची पूजा करते. वधू-वरांच्या हातात कंकण बांधतात. वराला हळद लावतात आणि उरलेली हळद वधूला लावण्यासाठी तिच्या घरी वाजतगाजत पाठवतात. लग्नासाठी नवरा मुलगा वधूच्या गावी जातो. प्रथम तो गावातील मारुतीच्या देवळात थांबतो आणि मग वधूगृही जातो. नंतरचा लग्नविधी अहमदनगरच्या वडारी लोकांच्या लग्नविधीसारखाच असतो.

बेळगावातील वडार लोकांत लग्नाच्या वेळी वधू-वरांना वधूच्या घरासमोर अंगणात एका घोंगडीवर बसवतात. दोन हळकुंडे व विडयाची पाने एका कपडयात गुंडाळून वधूच्या व वराच्या उजव्या हातात बांधतात. वधू आपल्या डाव्या हातात काचेची बांगडी घालते. नवरा मुलगा वधूच्या गळयात काळी पोत बांधतो. त्यानंतर जमलेले लोक वधू-वरांवर अक्षता टाकतात. दुसऱ्या दिवशी त्या दोघांना तीनदा हळद लावतात व लग्नसमारंभ संपतो.

धारवाड जिल्ह्यात, लग्नाच्या आदल्या दिवशी वधू-वरांना हळद लावतात आणि त्या रात्री त्यांना कांबळीच्या पालात झोपायला लावतात. त्या दोघांच्या मध्ये आठ-नऊ वर्षांच्या एका मुलीला झोपवतात.

कारवार व मंगळूर जिल्ह्यांत लग्नाच्या दिवशी सकाळीच साखरपुडा करतात. त्यानंतर ऐरणी नामक एक विधी होतो. त्यासाठी पाच सुवासिनी मातीचे घडे घेऊन विहिरीवर किंवा तळयावर जातात. तिथे त्या गंगेची मूर्ती करून तिची पूजा करतात. मग सुवासिनी घडयाला व आपल्या उजव्या हाताला कंकण बांधतात; नंतर घडे पाण्याने भरून घेऊन वधूगृही जातात. तिथे पुरुषांसाठी व स्त्रियांसाठी उभारलेल्या पालांत एकेक घडा ठेवतात आणि उरलेले तीन घरातील देवासमोर ठेवतात. नंतर वधू-वरांना हळद लावतात. मग एका खांबाला उंबराच्या व कडुनिंबाच्या डहाळया बांधतात आणि तो जमिनीत पुरतात. दोन पुरुष वधूला व वराला खांद्यावर घेऊन त्या खांबाला पाच प्रदक्षिणा घालतात. मग वधू त्या खांबासमोर उभी राहते आणि वर तिच्या गळयात मंगळसूत्र बांधतो. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. मग ज्ञातिभोजन होऊन समारंभ संपतो.

विधवेला आपल्या मामेभावाशी लग्न करता येते. आषाढ, भाद्रपद व पौष हे महिने वगळून कोणत्याही महिन्याच्या वद्य पक्षात विधवाविवाह होतो. कारवार व मंगळूर जिल्ह्यांत मात्र तो गुरुवारी व रविवारी होतो.

पतिपत्नींचे न पटल्यास किंवा पत्नीची वागणूक वाईट असल्यास पतीला घटस्फोट घेता येतो.

प्रसूतिप्रथा – मुलीला प्रथम ऋतुप्राप्ती झाली असता, ती सात किंवा नऊ दिवस मुद्दाम उभारलेल्या पालात राहते. तिला गूळखोबरे खायला देतात. ऋतुमती स्त्री सात दिवस घराबाहेर उभारलेल्या पालात राहते व आठव्या दिवशी स्नान करते.

प्रसूत झालेल्या स्त्रीच्या उशाशी, भुताखेतांची बाधा होऊ नये म्हणून, चाकू ठेवतात. तिची वार घराबाहेर पुरतात व तिच्यावर दगड ठेवतात. या दगडावर बाळंतीण स्नान करते व कपडे धुते. मुलाला पाचव्या दिवशी पाळण्यात घालतात. नाव केव्हाही ठेवले तरी चालते. जननाशौच बारा दिवस पाळतात.

देवधर्म – कारवार व मंगळूर जिल्ह्यांतील वडार वैष्णव आहेत. तिरुपतीचा व्यंकटेश, नरसोबा, महादेव, मारुती, जानाई, सटवाई, मुरुगव्व, नागम्म, येल्लम्म, इ. त्यांच्या कुलदेवता आहेत. ते पंढरपूर, तुळजापूर, तिरुपती, इ. क्षेत्रांची यात्रा करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात अगर पुरतात. तिसऱ्या दिवशी मृताला अन्न अर्पण करतात. मृताशौच बारा दिवस पाळतात. तिसऱ्या दिवसानंतर व पंधराव्या दिवसापर्यंत केव्हाही ज्ञातिभोजन घालतात.

चैत्र पाडव्याला, नवरात्रातील एखाद्या दिवशी किंवा एखाद्या शुभ दिवशी ते पितरांना कपडे, कोंबडी व बकरी अर्पण करतात.

गुजराती ओड किंवा वडार – हे लोक आपण दक्षिणेतून गुजरातेत आलो, असे सांगतात. त्यांच्यांत खुद्द व नत्राभाई असे दोन भेद आहेत. त्यांत रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही.

पुरुषाला आते, मामे किंवा मावस बहिणीशी लग्न करता येत नाही. मुलाचा बाप मुलीला मागणी घालतो. वरपिता वधूपित्याला देज देतो. जातीने एकशेवीस रुपये ही देजाची रक्कम ठरवलेली आहे. लग्नमंडपाला हे लोक पंचपालवींचे तोरण बांधतात. लग्नविधी त्यांच्या पातळीच्या इतर जातींत होतो, तसाच असतो.

काठियावाडमध्ये विधवेला धाकटया दिराशीच लग्न करावे लागते. पण गुजरातेत तशी सक्ती नाही.

घटस्फोट घेता येतो. त्याचा विधी अगदी साधा आहे. पुरुषाने चारचौघांसमक्ष पत्नीला आई किंवा बहीण म्हटले, की घटस्फोट मिळतो. घटस्फोटित स्त्रीला पुन्हा लग्न करता येते. स्त्रीने घटस्फोटाची मागणी करून घटस्फोट मिळवला व पुन्हा लग्न केले, तर तिच्या नव्या नवऱ्याने दोनशे रुपये दंड जुन्या नवऱ्याला द्यावा लागतो. त्यांतल्या काही पैशातून तो ज्ञातिभोजन घालतो.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवधर्म – हे लोक स्वामीनारायण, कबीर व रामदासी पंथाचे अनुयायी आहेत. ते शिवाला भजतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात. मृताचे मस्तक उत्तरेला करतात. अविवाहित आणि निपुत्रिक पुरुषाला पुरण्यापूर्वी त्याचे वासराशी लग्न लावतात.

सिंधी वडार – यांच्यांत राजपुतांप्रमाणे भट्टी, चौहान, परमार, राठोड, सोळंकी व तुंवर असे सहा पोटभेद आहेत. त्यांच्यांत लग्नसंबंध होत नाही. आईच्या बाजूने सात पिढ्यांच्या आत आणि जवळच्या आते, मामे, मावस वगैरे भावंडांत लग्ने निषिद्ध मानलेली आहेत. यांचा लग्नविधी सिंधमधील इतर जातींच्या लग्नविधीसारखाच असतो.

विधवेला पुनर्विवाह करता येतो. मात्र तो थोरल्या दिराशी व तो नसल्यास धाकट्या दिराशी करावा लागतो. दिराला वगळून दुसऱ्या पुरुषाशी विवाह केल्यास दोघांना जातिबहिष्कृत करतात.

देवधर्म – हे लोक प्रामुख्याने हिंगलाज देवीला भजतात. काहीजण रामदेवाला पूजतात. चैत्रात आणि नवरात्रात ते हिंगलाज देवीला पशुबळी देतात. सारस्वत किंवा पोकर्ण ब्राह्मण त्यांचे पौरोहित्य करतात.

मर्तिकप्रथा – हे लोक मृतांना पुरतात.

परदेशी वडार – औरंगजेबाच्या काळात आपण उ. भारतातून दक्षिणेत आलो, असे हे लोक सांगतात.

निजामराज्यातील वडार – पूर्वीच्या निजामाच्या हैद्राबाद प्रदेशातही अनेक वडार लोक राहतात. त्यांना तिथे ओडे, वाडू, रावलू, ओडेवांडलू, कलकोल, इ. नावे आहेत.

हे आपल्या उत्पत्तीविषयी पुढील कथा सांगतात – गुलपट्टण येथे ओडेराज राज्य करीत होता. त्याला बालनगू नामक एक सुंदर राणी होती. त्यांना रामुडी नावाचा एक पुत्र होता. एकदा राजा आपल्या भावांसह शिकारीला गेला होता. राणी दाराच्या उंबऱ्यात उभी होती. एक फकीर तिथे भिक्षा मागण्यासाठी आला. राणीच्या सौंदर्याने तो इतका मोहित झाला, की त्याने राणीला उचलून आपल्या दूरच्या गुहेत नेले. राजा शिकारीहून परत आल्यावर राणीच्या शोधार्थ निघाला. राणीने वाटेत टाकलेल्या मोत्यांचा मागोवा घेत घेत तो आपल्या बंधूंसह फकिराच्या गुहेजवळ पोचला. फकीर जादूगार होता. त्याने त्या सर्वांना दगड बनवले. रामुडीचा त्याच्या आत्यांनी प्रतिपाळ केला. मोठा झाल्यावर त्याला आपल्या आईवडिलांचा सर्व वृत्तांत समजला. तेव्हा त्याने आपल्या आईची मुक्तता करायचे ठरवले. तो मग गुपचूप फकिराच्या गुहेत गेला आणि त्याने फकिराला ठार मारून आईला मुक्त केले. फकिराकडे दोन जादूच्या काठ्या होत्या. एकीने तो माणसांना दगड बनवीत असे व दुसरीने त्यांना जिवंत करीत असे. त्या काठ्या रामुडीला मिळाल्या. त्याने दुसऱ्या काठीने आपल्या वडिलांना व चुलत्यांना जिवंत केले. नंतर रामुडीचा विवाह झाला व तो राज्यावर बसला. पुढे त्याला दुर्बुद्धी झाली. भेटेल त्या माणसाला तो दगड बनवू लागला आणि त्या दगडांनी तो स्वर्गात जाण्यासाठी शिडी बनवू लागला. त्या शिडीवरून तो वर जाऊ लागला. तेव्हा इंद्राला त्याचा राग आला. त्याने त्याला खाली ढकलून दिले व शिडीही मोडून टाकली. इंद्राने त्याला शाप दिला, की तू आणि तुझे वंशज दगड फोडण्याचे काम कराल.

रामुडीच्या चुलत्यांच्या बायकांनी मधल्या काळात हातातल्या काचेच्या बांगड्या काढून टाकल्या होत्या व चोळीही घालायचे सोडून दिले होते. त्याची स्मृती म्हणून पुढील काळात वडार स्त्रिया चोळी घालीनाशा झाल्या.

या लोकांत चिल्क किंवा कासी, कुंड, लागोल्ल, गोडंदल, माट्टी, बंडी किंवा गाडी, सतरवरू व उप्पार अशा आठ पोटजाती आहेत. चिल्क हे शेतकरी असून, इतर वडारांपेक्षा आपल्याला श्रेष्ठ समजतात. कुंड आणि बंडी हे दगड वाहतात व जाती बनवून विकतात. लागोल्ल हे मातीकाम करतात आणि विहिरी बांधतात. यांच्या झोपड्या गवती असून, त्या गाढवांवर लादून ते गावोगाव फिरतात. गोडंदल हे गोडली नामक हत्याराने माती उकरतात. माट्टी वडारही माती खणतात आणि विहिरी व तलाव खोदतात. वरील पोटजातींत रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही.

सतरवरू आणि उप्पार हे कुंडांची वेश्यांपासून झालेली संतती, असे समजतात. हे लोक दगड फोडतात आणि गवंडीकामही करतात. या दोन पोटजातींतही रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही.

विवाहप्रथा – यांचे विवाह शनिवारी संध्याकाळी सूर्यास्तानंतर होतात. नवरा मुलगा खंजीर हातात घेऊन इष्टमित्रांसह वधूगृही जातो. तो जेवणावळीसाठी एक डुक्करही बरोबर नेतो. वधूवर एका खांबाभोवती पाच प्रदक्षिणा घालतात व वर वधूच्या गळ्यात काळी पोत बांधतो. लग्नातील हा आवश्यक विधी होय. नंतर वधू-वरांना हळदीच्या पाण्याने स्नान घालतात व त्यांच्या हातांत कंकण बांधतात. नंतर ती दोघे एकाच ताटात जेवतात. जमलेल्या लोकांना जेवण दिले, की लग्नसमारंभ संपतो.

पूर्वी यांच्यांत अनेक बायका करण्याची पद्धत होती. तसेच, विधवाविवाह आणि घटस्फोट, या चालीही होत्या.

देवधर्म – यांच्यांत विभूतिधारी व तिरमनीधारी असे दोन भेद आहेत. गोराप्पा हा त्यांचा पालकदेव असून, दर गुरुवारी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला मिठाई व बकरा अर्पण करतात. बालनगू, पोचम्म व व्यंकटेश यांना सोमवारी व शनिवारी कोंबडी, बकरा बळी देतात. संक्रांतीच्या दिवशी ते एक डुक्कर बळी देतात आणि त्याचे मांस शिजवून घरातील सर्वजण खातात.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते पालथी पुरतात. तिसऱ्या दिवशी; शेतातील उंदीर व भात एकत्र शिजवून मृतात्म्याच्या थडग्या-वर अर्पण करतात. कावळे व इतर पक्षी यांनी तो खावा, अशी अपेक्षा असते. दहाव्या दिवशीही पक्ष्यांसाठी मटण ठेवतात. त्याच दिवशी मातंगी सर्व नातलगांवर कडुनिंबाच्या डहाळीने पाणी शिंपडते व मृताशौच संपून ते सर्व शुद्ध होतात. हे मृताचे श्राद्ध करीत नाहीत.

कालमानानुसार वडार लोकांच्या वेषभूषेत व राहणीत फरक पडला आहे. आपल्या समाजाच्या उन्नतीसाठी काही वडार लोक प्रयत्न करीत आहेत. त्यांच्यांत आता मुले व मुली शिक्षण घेऊ लागल्या आहेत. [ट्रा. का. बॉं.; गु. जा.; का. ट्रा. नि. डो.; श्री. शंकरराव खरात– स्त्री, मे, १९७१]

वडाळा मुंबईतील एक प्रसिद्ध स्थान. हे दादरपासून सुमारे पाऊण मैलावर, कात्रक रस्त्यावर आहे. तिथे एक विठ्ठलरखुमाईचे मंदिर आहे. दरवर्षी आषाढी एकादशीला इथे मोठी यात्रा भरते.

सध्या जिथे विठ्ठलमंदिर आहे, तिथे सुमारे १५० वर्षांपूर्वी एक झोपडी होती व त्या झोपडीत एक विठ्ठलभक्त राहत होता. तो वारकरी संप्रदायातील गुरू होता. तो दरवर्षी आषाढी एका-दशीला पंढरपूरला पायी जात असे. पुढे म्हातारपणामुळे त्याला वारीला जाणे कठीण होऊ लागले. तेव्हा एक सहयात्री त्याला म्हणाला. ‘ तुम्ही मोठे विठ्ठलभक्त, तर देवाला इकडे मुंबईलाच बोलवा. ’ त्यावर गुरू म्हणाला. ‘देवाची कृपा असेल, तर तसेही घडेल; बघू या आपण ! ’ त्या वर्षी सर्वजण नेहमीप्रमाणे यात्रेसाठी पंढरपूरला गेले असता, त्यांच्यापैकी एका भक्ताला चंद्रभागेत स्नान करताना विठ्ठलाची एक मूर्ती सापडली. ती त्यांनी मुंबईला आणली आणि तिची गुरूच्या झोपडीतच चैत्र शुद्ध त्रयोदशीला स्थापना केली. नंतर तिथे एक लहानसे देऊळ बांधण्यात आले. तेव्हापासून तिथल्या भक्तांनी पंढरपूरला जाणे बंद केले आणि वडाळ्यालाच यात्रा जमू लागली. इ. स. १९१९ साली त्या मंदिराचा प्रथम जीर्णोद्धार झाला. त्यानंतर काही वर्षांपूर्वी त्याची पुनर्रचना करण्यात आली. हे मंदिर पूर्वा-भिमुख असून, त्याची उंची ५० फूट आहे. त्याला एक सभा-मंडपही आहे. त्याच्यापुढे गरुडाची मूर्ती आहे. मंदिराभोवती एक भिंत बांधलेली आहे. त्या भिंतीच्या बाहेर प्रवेशद्वाराजवळ शनी व कालभैरव यांचे लहानसे देऊळ आहे. भिंतीच्या आत विठ्ठल-मंदिराजवळच दक्षिणेला गणपतीचे देऊळ व उत्तरेला महा-देवाचे देऊळ आहे. महादेवाच्या देवळासमोर काळ्या पाषाणाचा नंदी व जवळच शितळा देवी आहे. गणपतीच्या देवळात गण-पतीची डाव्या सोंडेची मूर्ती आहे; तर महादेवाच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला एका कोनाड्यात उजव्या सोंडेचा गणपती आहे. गरुडाच्या उत्तरेला एक दीपमाळ आहे व मागच्या बाजूला मारुतीचे देऊळ आहे.

मुख्य मंदिरात विठोबा-रखुमाईंच्या काळ्या पाषाणाच्या मूर्ती असून, त्यांच्या मागे एका देव्हाऱ्यात त्यांच्या चांदीच्या लहान मूर्तीही आहेत. यात्रेच्या प्रसंगी त्या मूर्ती वस्त्रालंकारांनी सजव-तात. हा विठोबा नवसाला पावतो असे म्हणतात. [फे. फे. म.]

वतनदारी वंशपरंपरेने प्राप्त अधिकार, हक्क, नेमणूक, उत्पन्न व मिळकत यांना वतन म्हणतात. वर्तन (=उप-जीविकेचे शाश्वत साधन) या संस्कृत शब्दापासून वतन हा शब्द आला असावा. उत्पन्नाची शाश्वती ही वतनदारी पद्धतीतली मूलभूत कल्पना आहे. गावाच्या वसुलावर, पिकांवर, देवळा-सारख्या धर्मादायावर किंवा गावकऱ्यांच्या संस्कारांवर व धर्म-कृत्यांवर ज्यांचा निरंतर हक्क असतो, ते सगळे वतनदार होत.

पूर्वी प्रत्येक जातीची पंचायत असे व तिच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी जातपाटील, जातचौगुला असे अधि-कारी असत. त्यांच्या हाताखाली वतनदार कामगार नेमलेले असत. हीच पद्धत ग्रामसंस्थांना उपयुक्त वाटल्यामुळे त्यांनीही गावकामगारांना वतने सुरू केली. चालुक्य व राष्ट्रकूट यांच्या वेळी ग्रामसंस्थांच्या कारभारात काही अधिकारपदे काही कुळां-कडे वंशपरंपरेने दिली जात आणि त्या कुळांना काही जमीन कायमची इनाम देण्याची प्रथा असे. त्यामुळे त्या त्या कुळा-तील अधिकारी आपापली कामे दक्षतेने करीत.

ग्रामसंस्थांचा कारभार नीट चालावा म्हणून राज्यकर्त्यांनी या वतनदारीला मान्यता दिली आणि मग राजेही आपल्या मर्जीतल्या व्यक्तींना गावे इनाम देऊ लागले. जे आपल्या हुशारीने किंवा पराक्रमाने राज्य मिळविण्यासाठी व त्याचे रक्षण करण्यासाठी राजांना मदत करीत, त्यांना अशी इनामे कायमची मिळू लागली. शासनव्यवस्थेत उच्च अधिकारपदांसाठीही अशी जमीन तोडून देण्याची प्रथा सुरू झाली. त्यामुळे ही वतनदारी स्थिर झाली. राजे किंवा सरदार हे देवालयांच्या योगक्षेमासाठीही जमिनी व गावे इनाम देऊ लागले. अशा प्रकारे ही पद्धती राजमान्य व धर्ममान्य ठरली.

वतनदारीचे दोन प्रकार आहेत. राजाला हवी असेल तेव्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चाकरी किंवा इतर मदत देण्याच्या अटीवर जी वतने दिली जात ती सरंजामी वतने होत आणि गावकामगारांना जी वतने गावकी-कडून मिळत ती ग्रामव्यवस्थेतल्या नेहमीच्या विशिष्ट कामांसाठी असत. तसेच बलुतेदार म्हणजे निरनिराळे कारागीर गावासाठी कामे करीत, त्यांना शेतकऱ्यांकडून ठराविक धान्य मिळे.

यादवकाळात वतनदारी पद्धत पूर्णपणे प्रस्थापित झालेली दिसते. ग्रामव्यवस्थेत पाटील हा सर्वांत मोठा वतनदार होता. तसा राज्यातला सर्वांत श्रेष्ठ वतनदार म्हणजे देशमुख किंवा देशग्रामकूट होय. पाटील हा जसा गावाचा राजा, तसा देशमुख हा आपल्या हाताखालच्या देशाचा नायकच असे. वतनाच्या अधिकाराचे महत्त्व मोठे असले, तरी कर्तव्यपालनाची इच्छा त्यापेक्षा अधिक असे. वतनदार हे लोकांचे प्रतिनिधी म्हणून लोकांच्या हितासाठी झटणारे असल्यामुळे लोक त्यांना मान देत. वतनदारांनाही आपल्या वतनाचा व अधिकाराचा फार अभिमान वाटे.

राज्यसत्ता बदलली, की राज्यातील अधिकारी बदलत; पण लोकव्यवहाराचा कणा बनलेले वतनदार मात्र कायम राहत. यादवांच्या राज्यातील सीमाभागावर परमार, होयसळ, इ. परकीय राजांची सत्ता मधून मधून येई व प्रसंगविशेषी त्यांना तो प्रदेश सोडावा लागे. तथापि स्थानिक कारभारात त्यामुळे अनागोंदी झालेली दिसत नाही. त्या काळी देशवहीत सर्व गोष्टींची नोंद करण्याची पद्धत होती व वतनी अधिकाऱ्यांनी ती अप्रतिहत चालू ठेवली होती.

मुसलमान राज्यकर्त्यांनी ही सर्व वतने चालू ठेवली, त्यामुळे ते वतनदार मुसलमानी सत्तेशी एकनिष्ठ राहिले. मराठेशाहीत काही वतनदार देशमुख स्वराज्यनिष्ठ होते, तसे काही शत्रूला वश झाले होते. रामचंद्रपंत अमात्यांनी आपल्या आज्ञापत्रात शत्रूशी संधान बांधणाऱ्या वतनदारांपासून सावध राहण्याचा इशारा दिला आहे. शिवाजीमहाराजांनी स्वराज्य स्थापण्याचा उद्योग आरंभला, तेव्हा असे वतनदार त्यांच्या विरुद्ध गेले होते. स्वराज्यात आपली वतने जातील, अशी धास्ती त्यांना वाटली. अनेक शतकांची परंपरा, राजमान्यता व लोकमान्यता यामुळे देशमुख, देसाई वगैरे वतनदारांना व जहागीरदारांना सामंतांची प्रतिष्ठा प्राप्त झाली होती व त्यांनाही लोकांवर प्रभुत्व गाजवण्याची सवय लागली होती. त्यामुळे त्यांच्यांत अहंकारही उत्पन्न झाला होता. मुसलमानी अंमलात वतनदारी पद्धतीमुळे जनता गांजलेली होती. सरकारला काही न देताच भूमीचा उपभोग घेण्याचा वतनदारांना हक्क होता. त्यामुळे सरकारला त्या प्रदेशाचे उत्पन्न मिळत नसे. म्हणून शिवाजीमहाराजांनी वतनदारांची ही मिराशी नष्ट करण्याचा प्रयत्न केला. वसूल गोळा करण्यासाठी त्यांनी देशमुख, देशपांडे या जुन्या वतनदारांवर विसंबून न राहता कमाविसदार, महालकरी, सुभेदार असे पगारी अधिकारी नेमले. त्यामुळे वतनदारांच्या शिरजोरीस दाब राहिला नाही. नवीन वतने न देण्याबद्दल महाराजांचा कटाक्ष होता. तथापि त्यांनी जुनी वतने काढून घेतली नाहीत; फक्त त्यांवर निर्बंध घातले. कारण मुलुखगिरी करणाऱ्यांना सरकारी खजिन्यातून पैसा देणे कठीण होते. त्यांचे वतनांवर परस्पर भागत असे.

त्यानंतरच्या राज्यकर्त्यांनी हे धोरण सोडले आणि सरंजामदारी सुरू केली. एखाद्या सरदाराने नवीन प्रदेश जिंकून घेतला, की त्यालाच तो जहागीर म्हणून मिळू लागला. त्यामुळे पेशवाईत मराठी साम्राज्याची स्थापना झाली, हे खरे; पण एकसूत्री राज्य राहिले नाही. मध्यवर्ती सत्ता दुर्बळ झाली आणि सरंजामदारांनी स्वतंत्र संस्थाने स्थापली.

ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यानंतर त्यांनी स्वतंत्र संस्थाने कायम केली. त्याचप्रमाणे खोती, इनामदारी, जहागिरी, देवस्थाने, इ. वतनेही चालू ठेवली. देशमुख–देशपांडे यांची सरंजामी वतने मात्र त्यांनी नष्ट केली. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर जशी सर्व संस्थाने विलीन झाली, तशी सर्व वतनेही नष्ट झाली. [गां. गा.; म. जी.; या. का. म.; पु. छ. शि.; भा. सां. इ.]

वत्स एक प्राचीन जनपद. सनपूर्व ६ व्या शतकाच्या प्रारंभी उ. भारतात सोळा महाजनपदे होती. त्यांतील मगध, कोसल आणि वत्स ही विशेष महत्त्वाची होत. वत्स प्रदेश अत्यंत समृद्ध असून, तो तलम सुती वस्त्रांसाठी प्रख्यात होता. कौशांबी ही त्या प्रदेशाची राजधानी होती. यमुनेच्या तीरावर प्रयागपासून ३० मैलांवर कोसाम नावाचे गाव आहे, तिथे ही प्राचीन नगरी होती, असे संशोधकांचे मत आहे.

काशीचा राजा दिवोदास याचा नातू वत्स याने आपल्या राज्याचा विस्तार करताना कौशांबीच्या भोवतालचा प्रदेश त्यात समाविष्ट केला व त्यामुळे या प्रदेशाला वत्सभूमी हे नाव मिळाले. भारतीय युद्धात काशीचा राजा पांडवांच्या पक्षात होता. वत्स प्रदेश काशीच्या राज्याचा भाग असल्यामुळे, त्याचे सैन्यही पांडवांच्या बाजूने लढले. त्यानंतर पौरव वंशातील निचक्षूच्या वेळी कुरू देशावर महान आपत्ती आल्या. गंगेच्या महापुरामुळे हस्तिनापूर ही त्याची राजधानी वाहून गेली आणि टोळधाडीमुळे दुष्काळ पडला. त्यामुळे तिथल्या लोकांनी स्थलांतर केले आणि ते वत्सभूमीत जाऊन स्थायिक झाले. तिथे त्यांनी राज्यही स्थापले. कौशांबी हीच त्यांची राजधानी होती.

त्या वंशातील उदयन हा गौतम बुद्धाचा समकालीन व महापराक्रमी होता. अवंतीच्या प्रद्योत राजाशी त्याचा जो संघर्ष

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाला, त्याविषयीच्या अनेक दंतकथा प्रचलित आहेत. त्याच्या दिग्विजयाचे वर्णन कथासरित्सागरात केलेले आहे.

कालांतराने हे राज्य मगध साम्राज्यात विलीन झाले. मगध-सम्राट शिशुनाग याने ते जिंकून घेतले. [हि. क. इं. पी. १ व २]

वत्स-आग्नेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे सत्याऐंशी क्रमांकाचे सूक्त याने रचले आहे. अग्निस्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. यातील एक ऋचा (ऋ. १०.१८७.३) अशी –

यो रक्षांसि निजूर्वत्य् अग्निस् तिग्मेन शोचिषा।
स नः पर्षदति द्विषः ॥

अर्थ – निर्मल तेजयुक्त, राक्षससंहारक आणि कामपूरक अग्नी आमच्या शत्रूंचा नाश करतो.

या सूक्ताची देवता अग्नी असून छंद गायत्री आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वत्स काण्व एक सूक्तद्रष्टा. हा कण्वाचा पुत्र होता. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील सहावे सूक्त याच्या नावावर आहे. इंद्र व तिरिंदर यांची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. तिरिंदरापासून आपल्याला धन मिळाल्याचा उल्लेख याने केला आहे (ऋ. ८.६.४६–४८). तिरिंदर किंवा पार्शव्य हा पर्शु-देशाचा म्हणजे इराणचा राजा होता. त्यामुळे भौगोलिक दृष्ट्या या सूक्ताला बरेच महत्त्व आहे, असे अभ्यासक म्हणतात. याच्या सूक्तातील एक ऋचा (ऋ. ८.६.९) अशी –

प्र तमीन्द्र नशीमहि रयिं गोमन्तमश्विनम्।
प्र ब्रह्म पूर्वचित्तये ॥

अर्थ – हे इंद्रा, तू आम्हांला धेनु-वृषभादी संपत्ती आणि अन्न देऊन सर्वांच्या आधी ज्ञानसंपन्न कर.

मेध्यातिथीने वत्स काण्वाला शूद्रपुत्र म्हटल्यामुळे वाद झाला होता; पण त्याने अग्निदिव्य करून आपली जातिविषयक शुद्धता सिद्ध केली (तां. ब्रा. १४.६.६). विष्णूने भूमी व आकाश धारण केले आहे, असे याने म्हटले आहे (नै. आ. १.८). हेमाद्रीने याचा उल्लेख केला आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वत्सप्री भालंदन एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील अडुसष्टावे आणि दहाव्या मंडलातील पंचेचाळीस व सेहेचाळीस ही दोन सूक्ते याने रचली आहेत. पहिले सूक्त पवमान सोमाच्या स्तुतीचे असून, दुसरी दोन्ही अग्निसूक्ते आहेत. त्याची एक ऋचा अशी –

स रोरुवदभि पूर्वा अचिक्रददुपारुहः श्रथयन्त्स्वादते हरिः।
तिरः पवित्रं परियन्नुरु ज्रयो नि शर्याणि दधते देव आ वरम् ॥
(ऋ. ९.६८.२)

अर्थ – हरितवर्णी, सोमवल्लीपासून पिळलेला, तसेच गाळण्यातून स्रवणारा, खळखळणारा, वेगवान, मधुर, दुष्टनिवारक आणि स्तुत्य असा सोम भक्तांना श्रेष्ठ धनप्रदान करो.

पंचविंश ब्राह्मणात वत्सप्री हा एका सामाचा द्रष्टा असल्याचा उल्लेख आहे (पं. ब्रा. १२.११.२५). त्याच्या सामाला वात्सप्र असे नाव असून, प्रजेच्या दीर्घायुष्यासाठी त्याच्या या सामाचे पठण केले जाते. याव्यतिरिक्त त्याचे अन्य उल्लेख तैत्तिरीय संहिता (५.२.१.६), काठक संहिता (१९.१२), मैत्रायणी संहिता (३.२.२), शतपथ ब्राह्मण (६.४.४.१), इ. ठिकाणीं आढळतात. [म. ज्ञा. को.; प्रा. च. को.; सी. ऋ.]

वन वृक्षवल्लींच्या समूहाला वन म्हणतात. विस्तीर्ण व घनदाट वनाला अरण्य किंवा कांतार म्हणतात. अटवी म्हणजे उपवन किंवा लहान वन होय. प्राचीन काळी ऋषी वनात राहून तप करीत म्हणून अशा वनांना तपोवने म्हणत. पुराणांत व महाकाव्यांत अशा अनेक तपोवनांची वर्णने आहेत. वैदिक संस्कृतीचा प्रसार करण्यासाठी कित्येक मुनी भरतखंडाच्या निरनिराळ्या भागांतील वनांत आश्रम स्थापून राहिले होते. राम वनवासासाठी दंडकारण्यात गेला, तेव्हा त्याला निरनिराळ्या वनांमध्ये असे अनेक मुनी भेटले. रामाने पंचवटी येथील वनात दीर्घ काल वास्तव्य केले असल्यामुळे ते एक महान पुण्यक्षेत्र मानले गेले आहे.

पांडवांनी खांडव वन जाळून तिथे इंद्रप्रस्थ नगरी वसवली. पुढे त्यांना बारा वर्षे वनवास भोगावा लागला आणि काम्यक, चैत्ररथ, द्वैत, नैमिष, कदली, सौगंधिक, इ. वनांत त्यांनी तो वनवासाचा काल घालवला. पांडवांच्या वास्तव्यामुळे ती वने ख्यातनाम झाली.

गोपालकृष्णाचे वास्तव्य व्रजमंडलात असताना मधुवन, वृंदावन, तालवन, महावन किंवा गोकुळ, इ. वने त्याच्या लीलांमुळे ख्याती पावली.

प्राचीन काळी राजे लोक मृगयेसाठी किंवा विहारासाठी वनांत जात, तसे सधन नागरिकही जात. बहुतेक लोक वृद्धपणी वनात जाऊन राहत. त्याला वानप्रस्थाश्रम असे नाव होते. अशा प्रकारे भारतीय संस्कृतीच्या इतिहासात वनांना बरेच महत्त्वाचे स्थान लाभले आहे.

प्राचीन साहित्यात स्वर्गातील नंदनवनाची सुंदर वर्णने केलेली आहेत. भूतलावरही तशी निसर्गसुंदर वने होती. ती पाहूनच कवींनी नंदनवनाची कल्पनारम्य वर्णने केली असावी.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वनदुर्गा एक शाक्त देवता. श्रीविद्यार्णवतंत्रात हिचे वर्णन केलेले आहे, ते असे – ही कृष्णवर्ण व त्रिनयन असून, सिंहावर बसलेली आहे. तिने एक पाय महिषासुराच्या शोक्यावर ठेवलेला आहे. तिला सोळा हात असून, त्यांत तिने चक्र, शंख, खड्ग, चर्म, शर, चाप, त्रिशूळ, कपाल, खड्ग, मुसल, कुंत, नंदक, गदा, भिंदिपाल व शक्ती ही आयुधे धारण केली आहेत. एका हाताने ती तर्जनीमुद्रा दाखवीत आहे.

ॐ ह्रीं दुं उत्तिष्ठ पुरुषि किं स्वपिषि भयं मे समुपस्थितं यदि शक्यं अशक्यं वा तन्मे भगवति शमय स्वाहा ।

असा या देवीचा मंत्र आहे. पंजाबात मैमनसिंग येथे हिचे एक मंदिर आहे. तिथले लोक हिला पशु-पक्षी बळी देतात व त्यांचे मांस प्रसाद म्हणून भक्षण करतात. [श्रीविद्यार्णवतंत्र; मंत्रशास्त्र; दे. को. ३]

वनदुर्गा उपनिषद एक अप्रकाशित शाक्त उपनिषद. ते गद्यपद्यमिश्रित आहे. हे उपनिषद प्रदीर्घ असून, त्याचे लहान लहान भाग केलेले नाहीत, तर ते सर्वच्या सर्व सलग आहे.

याची सुरुवात नवदुर्गामहामंत्राने झाली आहे. पुढे तिच्या वर्णनाचे सात श्लोक आहेत, त्यांपैकी एक असा –

सिंहारूढां श्यामकान्ति शङ्खचक्रधरां हुवा ।
दुर्गां देवीं तथा ध्यायेच्छरचापौ च बिभ्रतीम् ।।

अर्थ – सिंहारूढ, श्याम वर्णाची, शंख, चक्र व धनुष्यबाण धारण करणारी अशा दुर्गादेवीचे अंतःकरणपूर्वक ध्यान करावे.

त्यानंतर गोप्य टिकविण्यासाठी अक्षरक्रम उलट असलेल्या शब्दांचा उलट क्रमाने दिलेला एक मंत्र आहे. त्यानंतर विंध्य-वासिनी दुर्गादेवीने सर्व दिशांची द्वारे सुरक्षित ठेवावी, अशी प्रार्थना केलेली आहे. चोर व शत्रू यांना बंधन व्हावे आणि सर्व लोक वश व्हावे यासाठी वनदेवतेच्या मंत्राचा विनियोग सांगितला आहे.

यापुढील भागात सप्तशतीत असलेली 'सर्वमङ्गलमाङ्गल्ये' ही सुप्रसिद्ध प्रार्थना असून, नंतर अष्टदिक्पालांच्या शक्तींना नमस्कार केलेला आहे. त्यानंतर सर्व भूतांना वश करणाऱ्या मोहिनी महाविद्येचे वर्णन आहे.

एकंदरीत या उपनिषदाचे स्वरूप अत्यंत तांत्रिक आहे. त्यात सर्व नक्षत्रांची नावे आहेत व रुद्राची प्रदीर्घ प्रार्थना आहे. तसेच त्यात लक्ष्मी, सिद्धलक्ष्मी, गणपती, गणपतीचे तन्मात्रक स्वरूप, कामदेव वगैरेंचे मंत्र व प्रार्थना आहेत. यात दिलेली महाविद्या २१ दिवस शुचित्व पाळून जो आचरील आणि त्या उपासनेने अभिमंत्रित पान, फूल किंवा फळ कोणत्याही स्त्रीला किंवा पुरुषाला देईल, तर ती स्त्री किंवा पुरुष तत्काळ वश होईल, असे सांगितले आहे.

उरलेल्या भागात कात्यायनीचे मंत्र, तसेच नारायण किंवा गरुड यांचे मंत्र दिलेले आहेत. उपनिषदाच्या शेवटी, जो ही ब्रह्मविद्या नित्य सेवन करील, तो ऐहिक व पारलौकिक सौख्य प्राप्त करील, असा निर्वाळा दिलेला आहे. [श्री. सी. ग. देसाई]

वनदेवता वनाची देवता किंवा वनरूपी देवता. अशा देवतांचे उल्लेख प्राचीन साहित्यात आढळतात. जातक-कथांत, वनदेवता बुद्धाला अन्न व वस्त्रे देत, असे वर्णन आहे. वनदेवता दिलीप राजाची सेवा करीत, असे कालिदासाने रघु-वंशात सांगितले आहे. शकुंतलेचा दुष्यंताशी गांधर्वविवाह वन-देवतांच्या साक्षीने झाला आणि त्यांनीच शकुंतलेला त्या वेळी रेशमी वस्त्रे व अलंकार दिले, असे वर्णन शाकुंतल नाटकात आहे. सीता रामासह वनवासाला जायला निघाली तेव्हा, वन-देवता तिचे रक्षण करतील, असे आश्वासन तिला मिळाले होते.

आदिवासी लोकांत वनदेवतांची उपासना बरीच प्रचलित आहे. ते लोक अनेक देवतांना भजतात. त्यांतली वनस्पती माँ ही प्रमुख होय. दगडांचा ढीग करून त्यावर झाडांच्या फांद्या ठेवल्या, की ते या देवतेचे प्रतीक होते. तिचे भक्त जाता येता तिथे दगड व फांद्या टाकून तिचा मान राखतात. तसे न केल्यास ती कोपते आणि तिचे दूत असलेले वाघ त्या मनुष्याला ठार मारतात, अशी त्या लोकांची समजूत आहे. तिच्या जवळपास गाणे म्हटले किंवा शीळ घातली, तरी ती रागावते आणि तसे करणाऱ्याला वेडा बनवते, असे म्हणतात. मेंढपाळ, गुराखी, लाकुडतोडे यांना नेहमी रानात जावे लागते. ते या देवतेला कोंबडा, बोकड किंवा डुकराचे पिलू बळी देतात. मग ती त्यांचे व त्यांच्या पशूंचे रक्षण करते.

वनस्पती माँ ही देवता आंबा व महुआ या झाडांवर वसती करते, अशी समजूत ओडिसा प्रदेशात प्रचलित आहे. [ने. नॉ. इं.; पॉ. रि. फो. नॉ. इं.]

वनमाला वनात उत्पन्न झालेल्या फुलांची माला. ही माला श्रीकृष्णाच्या वक्षस्थळावर रुळते. हिचे लक्षण असे–

आजानुलम्बिनी माला सर्वर्तुकुसुमोज्ज्वला ।
मध्ये स्थूलकदम्बाढ्या वनमालेति कीर्तिता ।।

अर्थ – सर्व ऋतूंतल्या फुलांनी उज्ज्वल असणारी, मध्य-भागी मोठा पुष्पगुच्छ असणारी व गुडघ्यापर्यंत रुळणारी अशी पुष्पमाला म्हणजे वनमाला होय.

वनमाला गळ्यात सदैव धारण करणारा म्हणूनच कृष्णाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वनमाली हे नाव त्याच्या भक्तांनी दिलेले आहे. [ग. क.]

वनमाली मिश्र (१) (इ. स. चे १७ वे शतक) एक वेदान्ती. हा वृंदावनापासून सुमारे दोन मैलांवर असलेल्या त्रियुगपूर गावी राहत होता. भारद्वाज हे त्याचे गोत्र होय. वनमाली माध्व संप्रदायाचा आचार्य होता. त्याने वेदान्त-सिद्धान्तसंग्रह नावाचा एक ग्रंथ रचला आहे. हा ग्रंथ कारिका-स्वरूपात असून, त्यात या संप्रदायाची महत्त्वाची तत्त्वे सांगितली आहेत. त्यांतील काही तत्त्वांचा थोडक्यात परिचय असा –

विषयासक्तीमुळे दुःख निर्माण होते. दुःख आत्म्याला नसते. सुख हे त्याच्या विरुद्ध आहे. सर्व क्रिया स्वार्थी हेतूने घडत असतात. नित्यकर्मे केली नाहीत तर पाप लागते. ईश्वराच्या इच्छेमुळे चांगले किंवा वाईट गुण निर्माण होतात.

अविद्या ही सत्य व भावनात्मक असून, प्रत्येक व्यक्तीच्या ठायी भिन्न भिन्न असते. या अविद्येमुळे भ्रम होतो आणि त्या कारणानेच पुनर्जन्म घ्यावा लागतो. अहंभावनाही अविद्येनेच निर्माण होते. अविद्या मनाची व सुखदुःखाची निर्मिती करते. खोटी लालसा उत्पन्न होण्याचे कारणही अविद्याच आहे. त्यामुळे खरे सुख म्हणजे काय ते समजत नाही. शुद्ध आनंदाची अवस्था केवळ विदेही मुक्तच अनुभवू शकतात.

परमेश्वराने सर्व कर्मे निर्माण केली असता आपण त्यांचे कर्ते आहो, असे समजल्यामुळे दुःख निर्माण होते. पदार्थावरची आसक्ती उडाली, की परमेश्वर प्रसन्न होतो. भक्तीच्या निर्मिती-साठी श्रवणादी मार्ग आचरले पाहिजेत. या मार्गाचरणानेच ईश्वरप्राप्तीचा लाभ होतो व त्याचे दर्शन घडते. हे साक्षात्कार-दर्शन आपल्या आत्म्याचेच असते. या अवस्थेत अविद्येचा नाश होतो. अशा प्रकारे मोक्षावस्थेत सुखरूप आत्म्याचे ज्ञान झाले तरी त्याच्या गुणांचे ज्ञान होत नाही. मोक्षावस्था प्राप्त झाल्या-वर भक्ताचा ईश्वरात समावेश होतो.

ज्यांची अविद्या गळून पडलेली आहे, त्यांना जीवन्मुक्त म्हणतात. पण त्यांचेही प्रारब्ध कर्म नष्ट होत नाही. ईश्वराच्या कृपेनेच त्यांचे संचित व क्रियमाण नाहीसे होते.

आत्मा अणुस्वरूप असून, तो अहंप्रत्ययवेद्य आहे. जरी तो ईश्वरावर अवलंबून असला, तरी तो खरा कर्ता आहे. आत्मा अविद्येच्या परिणामाने कार्य करीत असतो. आत्म्याच्या सतत प्रत्ययाने त्याचे अस्तित्व सिद्ध होते.

जीव आणि ईश्वर यांच्यांत हा भेद आहे की, जीव अल्प-शक्तिमान, अल्पज्ञानी व परतंत्र आहे. पण ईश्वर सर्वशक्तिमान, सर्वव्यापक व स्वतंत्र आहे. जगाची निर्मिती करणे हे ईश्वराचे लीलाकैवल्य आहे. जग निर्माण करताना तो प्रकृतीची मदत घेतो. 'सर्वं खल्विदं ब्रह्म' हे उपनिषदांनी त्याचे केलेले वर्णन खरे आहे.

याव्यतिरिक्त याचे माध्वमुखालंकार, न्यायामृत-सौगन्ध्य, वेदान्तसिद्धान्तमुक्तावली, श्रुतिसिद्धान्तप्रकाश, विष्णुतत्त्वप्रकाश, तरंगिणीसौरभ, भक्तिरत्नाकर, प्रमाणसंग्रह, इ. ग्रंथही प्रसिद्ध आहेत. [हि. इं. फि. ३ ; भा. द. ; हि. द्वै. वे. लि. २]

(२) (इ. स. चे १७ वे शतक) भट्टोजी दीक्षिताचा एक पट्टशिष्य म्हणून हा प्रख्यात आहे. हा कृष्णदत्त मिश्र या नावा-नेही ओळखला जातो. पण या दोन्ही व्यक्ती एकच होत, असे निश्चित सांगता येत नाही. वनमालीने पुढील पाच ग्रंथ रचले आहेत–(१) कुरुक्षेत्रप्रदीप, (२) सर्वतीर्थप्रकाश, (३) संध्या-मंत्र व्याख्या, (४) वैयाकरणमतोन्मज्जना व (५) सिद्धान्त-तत्त्वविवेक. या ग्रंथातील वैयाकरणमतोन्मज्जना हा ग्रंथ म्हणजे भट्टोजीचा पुतण्या कोंडभट्ट याच्या वैयाकरणभूषण या ग्रंथावरील टीका होय. [स्ट. इं. लि. हि. ३]

वनस्पती अत्यंत प्राचीन काळी पृथ्वीच्या पृष्ठभागापैकी जलाशय, वाळवंटे आणि हिमाच्छादित प्रदेश वग-ळता बहुतेक सारा भूभाग घनदाट अरण्यांनी व्यापलेला होता आणि त्यांत असंख्य प्रकारच्या वनस्पती होत्या. शेवाळपासारख्या वनस्पतीपासूनच जीवसृष्टी उत्पन्न झाली, अशी कल्पना आहे. त्या जीवसृष्टीतून प्राणिसृष्टी उत्पन्न झाली. मानवजात ही त्या उत्क्रांतीची अंतिम अवस्था मानली जाते.

मानवी जीवन वनस्पतींवर बहुतांशी अवलंबून आहे, कारण निरनिराळ्या वनस्पतींपासून मिळालेल्या अन्नानेच मानवी शरीराचे भरण–पोषण होत असते. वाळलेल्या वनस्पतींचा इंधन म्हणून उपयोग होतो. घरे बांधण्यासाठी किंवा नावा बन-वण्यासाठी उपयुक्त असे खांब व फळ्या झाडापासूनच मिळतात. असंख्य वनस्पतींपासून मनुष्याला औषधी द्रव्ये मिळतात, तसेच सुगंधी द्रव्ये व रंगद्रव्येही मिळतात. लाकडापासून मनुष्य विविध प्रकारची उपकरणे व साधने बनवतो.

मानवी संस्कृतीचा जसजसा विकास होत गेला तसतसा मनुष्य वनस्पतिसृष्टीवर अधिकाधिक आक्रमण करू लागला आणि वनस्पतींचा फार नाश होऊ लागला. लोकसंख्या वाढ वाढल्यामुळे ग्रामे व नगरे वसवण्यासाठी अरण्ये नष्ट करण्यात आली. आता भूपृष्ठावर केवळ सोळा-शतांश भागावर अरण्ये उभी आहेत, असे तज्ञांचे अनुमान आहे. सांप्रत जी अनिर्बंध जंगलतोड चालू आहे, ती अत्यंत हानिकारक असून, तिच्यामुळे निसर्गाचा तोल पार बिघडला आहे, असे म्हणतात.

वनस्पतिशास्त्र– प्राचीन भारतीय लोक कृषिकर्मात आणि वनौषधिचिकित्सेत पारंगत असून, त्यांनी विविध वनस्पतींचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोन्ही दृष्टींनी अभ्यास केला होता. आयुर्वेद व कृषी यासंबंधी जे अनेक प्राचीन ग्रंथ उपलब्ध आहेत, त्यांत वनस्पतींची बरीच माहिती ग्रथित केलेली आढळते. त्याचप्रमाणे महाकाव्ये व पुराणे यांतही वनस्पतिविषयक ज्ञान विखुरलेले सापडते.

आयुर्वेदाची परंपरा अत्यंत प्राचीन आहे. मात्र तितके प्राचीन ग्रंथ उपलब्ध नाहीत. भरद्वाजाचा शिष्य पुनर्वसू आत्रेय हा अनेक ऋषींसह हिमालयावरील औषधि-वनस्पतींचे निरीक्षण करीत हिंडत असे. त्याचे व त्याच्या शिष्यांचे काही ग्रंथ उपलब्ध आहेत. तथापि वेदकाळी वनस्पतिशास्त्र विशेष प्रगत झालेले नसावे. ऋग्वेदात शर, कुश, दर्भ, सैर्य, मौंज, इ. गवतांचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे अश्वत्थ, पिंपळ, शमी, पलाश, शाल्मली, शिंशपा, खदिर, शिंबल, इ. वृक्षांची आणि काही वेलींची नावे आहेत. अथर्ववेदात मात्र वनस्पतींचे रूप व उपयोग यांवरून त्यांचे वर्गीकरण केलेले आढळते. बृहदारण्यकोपनिषदात वनस्पतींच्या अंतर्रचनेसंबंधी व जीवनासंबंधी थोडेसे विवेचन केलेले असून, वनस्पतींची तुलना मानवी शरीराशी केली आहे. न्यायदर्शनात वनस्पति-जीवनाची थोडी माहिती मिळते. उदयनाच्या मते वृक्षांना जन्म, मृत्यू, रोग, निद्रा, जागरण, प्रवृत्ती, निवृत्ती, इ. अवस्था आहेत.

विष्णुपुराण, भागवतपुराण, मत्स्यपुराण, इ. ग्रंथांत असंख्य वनस्पतींचे वर्णन व त्यांच्या पोषणाविषयी प्राप्त झालेले ज्ञान संकलित केलेले आहे. त्यात वृक्षांमध्ये रसांचे अभिसर्पण होते, या कल्पनेचा समावेश आहे. सुश्रुत, चरक, बृहत्संहिता, अग्निपुराण, इ. ग्रंथांत वनस्पतिशास्त्राचे सखोल अध्ययन केलेले आहे, असे दिसते. बीजातून अंकुर फुटण्यासाठी अनुकूल हवामान, पाणी व जमीन आवश्यक असते, असे सुश्रुतात म्हटले आहे. बृहत्संहिता व अग्निपुराण यांत, निरनिराळे वृक्ष लावण्यासाठी कोणती परिस्थिती योग्य असते, चांगली जमीन कोणती, खत कसे द्यावे, वनस्पतींच्या रोगांची चिकित्सा कशी करावी व त्यावर उपाय कोणते करावे हे सांगितलेले असून, रोपे लावण्याच्या भिन्न पद्धतीही दिल्या आहेत.

षड्दर्शनसमुच्चय या ग्रंथात मनुष्यजीवन व वनस्पतींचे जीवन यांत साधर्म्य दाखवलेले आहे. वनस्पती जमिनीतून आपले अन्न मिळवतात आणि ते योग्य किंवा अयोग्य असेल त्याप्रमाणे त्यांचे शरीर पुष्ट किंवा शुष्क होत जाते. वनस्पती सजीव असून, त्यांच्या काही हालचाली सजीव प्राण्यांप्रमाणे असतात, असे वर्णन महाभारतात केलेले आहे.

हारीतसंहिता व चरकसंहिता या ग्रंथांत, वनस्पतींमध्ये लिंगभेद असून, वंशवृद्धीसाठी नरमादीसंगम आवश्यक असतो, ही कल्पना सांगितलेली आहे. बुद्धघोषाने वनस्पतींचा वंशविस्तार पाच प्रकारे होतो, असे म्हटले आहे. ते प्रकार असे–(१) मूलबीज (२) खंडबीज (३) फलबीज (४) अग्रबीज व (५) बीजबीज.

वनस्पतींचे वर्गीकरण निरनिराळ्या काळी भिन्न प्रकारे करण्यात आलेले आहे. त्यांतील चरकाने केलेले वर्गीकरण विशेष उल्लेखनीय वाटते. त्याने (१) वनस्पती (२) वानस्पत्य (३) ओषधी व (४) वीरुध (लता व गुल्म) हे मुख्य भेद मानले असून, ओषधीचे विरेचक व कषाय असे पोटभेद केले आहेत. पहिल्या प्रकारची ६०० व दुसऱ्या प्रकारची ५०० नावे एका अध्यायात दिलेली आहेत. वनस्पती म्हणजे फुले न येताच फळे धारण करणारे वृक्ष; वानस्पत्य म्हणजे फुले व फळे धारण करणारे वृक्ष; ओषधी म्हणजे फळधारणेनंतर सुकून नष्ट होणारी झुडपे आणि वीरुध म्हणजे पसरत जाणाऱ्या वेली होत.

सुश्रुतानेही वनस्पतींचे असेच वर्गीकरण केलेले आहे. प्लव व उदुंबर ही वनस्पतींची उदाहरणे होत. आंबा, जांभूळ हे वृक्ष दुसऱ्या प्रकारची उदाहरणे होत. गहू, भात, डाळी या धान्यांची रोपे म्हणजे ओषधींचा एक प्रकार आणि दूर्वादिक तृणे हा दुसरा प्रकार होय.

याव्यतिरिक्त महाभारत, भागवत, इ. पुराणेतिहासग्रंथांतही वनस्पतींची थोडी माहिती प्रसंगानुसार सांगितलेली आढळते. एखादा विषय अधिक विशद किंवा रम्य करण्याकरिता वनस्पतिविषयक दृष्टान्त व उपमा यांचा उपयोगही त्यांनी केलेला आहे. त्यावरून कवींच्या वनस्पतिविषयक ज्ञानाची व सूक्ष्म अवलोकनशक्तीची कल्पना करता येते.

महाभारत व भागवत या ग्रंथांत वनस्पतींचे स्थूल वर्गीकरण केलेले आहे, ते असे–(१) ज्यांना पुष्पावाचून फळे येतात, त्या उंबर, वड, पिंपळ, इ. वनस्पती (२) एकदा फळे येऊन ती पिकल्यानंतर ज्यांचा नाश होतो अशा केळी, धान्ये, इ. ओषधी (३) ज्यांना वृक्षाचा किंवा अन्य आधार लागतो त्या लता, वेली (४) त्वक्सार म्हणजे ज्यांची साल कठीण असून, तीच विशेष उपयोगी असते, त्या वेळूसारख्या वनस्पती (५) वीरुत म्हणजे ज्यांना आधाराची गरज नसते अशा वनस्पती. उदा० वेत. आणि (६) द्रुम म्हणजे ज्यांना प्रथम फुले येऊन मग फळे येतात ते वृक्ष. उदा० आम्रवृक्ष.

प्राचीन काळी अनेक वनस्पतिकोश रचले गेले असून, त्यांना निघण्टू म्हणतात. ते केवळ वैद्यांच्या उपयोगाकरिता रचलेले असल्यामुळे, त्यांत वनस्पतींची वर्गवारी त्यांच्या औषधी गुणधर्मांनुसार केलेली आहे. त्यांत वनस्पतींच्या शरीररचनेविषयी माहिती नाही. तथापि, कृषी आणि वैद्यक यांच्या अनुषंगाने जी माहिती भारतीय लोकांनी मिळवलेली होती, ती काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ग्रंथांत आढळते. वनस्पतींच्या मूल, स्कंध व पर्णे या तीन मुख्य भागांची अनेक रूपे किंवा प्रकार असून, काही स्कंध मूलरूप, तर काही पर्णे स्कंधरूप असतात, हे त्यांना ज्ञात होते. फुलांचे सामान्यतः चार भाग असतात. देठ, पाकळ्या, पुंकेसर व स्त्रीकेसर अशी त्यांची नावे असून, ती प्राचीन वाङ्मयात आढळतात. पण त्यांचा परस्पर संबंध त्या काळी माहीत नव्हता. पुंकेसरातील पराग व स्त्रीकेसरातील बीज यांचाही उल्लेख क्वचित आढळतो. फल व बीज यांचा परस्पर संबंध प्राचीन हिंदूंना ज्ञात होता. तसेच बीजात अंकुर असून, त्या अंकुरात सूक्ष्म स्कंध व सूक्ष्म पर्णे असल्यामुळे अंकुर हे वृक्षाचे सूक्ष्म रूपच होय, हेदेखील त्यांना माहीत होते.

प्राचीन भारतीय पंडित वनस्पतींना सजीव सृष्टीचा एक अचर प्रकार मानून, उच्चनीच या दृष्टीने केलेल्या सृष्ट पदार्थांच्या वर्गवारीत प्राण्यांपेक्षा नीच मानीत. वनस्पतिशास्त्रातील जीवक्रियाविज्ञानात वनस्पतींच्या सर्व प्रकारच्या इंद्रियांच्या क्रियांविषयी विचार केलेला असतो. प्राचीन हिंदूंना बीज, कंद, डोळे असलेली पेरे, इत्यादींपासून वनस्पतींची पुनरुत्पत्ती होते, हे माहीत होते. परागाचा वृक्षांच्या सफलतेवर अनुकूल परिणाम होतो, हेही त्यांनी जाणले होते. वनस्पतींचे पोषण व आरोग्य याविषयी सामान्य माहिती असली, तरी पोषणक्रियेविषयी अल्प कल्पनाही नव्हती, असे दिसते.

शाङ्‌र्गधरपद्धती या ग्रंथात वृक्ष हे धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चार पुरुषार्थांचे साधन आहेत, असे सांगितले आहे. तसेच एक वृक्ष हा दशपुत्रसम मानला आहे. त्यामुळे प्राचीन काळी वृक्षारोपणाला फार महत्त्व आले होते. निरनिराळ्या वृक्षांच्या आरोपणांचे वेगवेगळे फलही सांगितलेले आहे, ते असे — दोन वटवृक्ष लावण्यामुळे शिवलोकात अप्सरांकडून सेवा घेत वास्तव्य करता येते. तीन निंबाची झाडे लावल्यास तीन अयुत वर्षे सूर्यलोकात वास होतो. चार प्लक्ष (उदुंबर) वृक्ष लावणाऱ्याला राजसूय यज्ञाचे फळ मिळते. तुळस लावली असता वैकुंठवास घडतो (शाङ्‌र्ग. २०८९). जो बिल्व वृक्ष लावतो त्याच्या घरात सदैव लक्ष्मी वास्तव्य करते (शाङ्‌र्ग. २०९०).

वृक्षारोपण हे एक पुण्यकर्म असल्यामुळे त्यासंबंधी अनेक प्रकारचे नियमही सांगितले आहेत. घराच्या पूर्वेला न्यग्रोध, दक्षिणेला उदुंबर, पश्चिमेला पिप्पल व उत्तरेला प्लक्ष (उदुंबर) वृक्ष लावणे शुभ मानलेले आहे. बदरी, कदली, दाडिम, पलाश, कांचनार, अर्जुन, क्षीर, नील, हरिद्रा, शाल्मली, कोविदार, देवदारू, इ. वृक्ष घराच्या परिसरात लावणे अशुभ मानले असून, त्यामुळे अकल्याण होते, असे म्हटले आहे.

प्रियंगू, अशोक, पुंनाग, निंब, चंपक, भल्लातक हे वृक्ष मंगलकारक असून, ते अवश्य लावावे, असे सांगितले आहे (शाङ्‌र्ग. २१५०). उत्तरा, रोहिणी, मृग, रेवती, चित्रा, अनुराधा, मूळ, विशाखा, पुष्य, श्रवण, अश्विनी, या नक्षत्रांवर वृक्षारोपण करणे चांगले, असे बृहत्संहितेत (५५.३१) व अग्निपुराणात (२८२.३–४) सांगितले आहे.

वृक्ष लावण्यापूर्वी ब्राह्मणांची पूजा करावी, असे अग्निपुराणात (२२८.३) सांगितले आहे. वृक्षारोपण करणाऱ्याने प्रथम स्नान करून स्वच्छ वस्त्र नेसावे; मग देवपूजा करून गुरूला वंदन करावे आणि ब्राह्मणांना धनदान करावे, असे शाङ्‌र्गधरपद्धती व बृहत्संहिता या ग्रंथांत सांगितले आहे.

वृक्षांचे चांगले पोषण होऊन ते वाढावे यासाठी अनेक उपाय शाङ्‌र्गधरपद्धतीत सांगितले आहेत. झाडांना भरपूर फुले व फळे येण्यासाठी तूप व थंड पाणी यांचे सिंचन करावे; मेंढ्याची विष्ठा, यवाचे पीठ, तीळ, गोमांस व पाणी सतत सात दिवस एकत्र ठेवून मग ते पाणी झाडांना घालावे, असे अग्निपुराणात म्हटले आहे. विष्णुधर्मोत्तरपुराणात निरनिराळ्या वृक्षांच्या विविध प्रकारच्या आवडी दिल्या आहेत. अशोक वृक्षाला सुंदर स्त्रीची लाथ आवडते, तर बकुल वृक्षाला सुंदर स्त्रीच्या मुखातील मद्य पोषक ठरते. माशांनी युक्त असे थंड पाणी आम्रवृक्षाला व द्राक्षवेलाला मानवते. बोरीच्या झाडाला ज्येष्ठमधयुक्त पाणी; सप्तपर्ण वृक्षाला दूध; कवठ व वेल या वृक्षांना गूळपाणी; खजूर, नारळ, वेळू, कदली यांना मीठयुक्त पाणी उपयुक्त असते. स्त्रीच्या आलिंगनामुळे कोरांटी, हस्तस्पर्शामुळे माकंद वृक्ष, मदरागामुळे चाफा, शब्दामुळे कर्णिकार, मुखानिलामुळे सिंधुवार, गाण्यामुळे प्रियाळू आणि हसण्यामुळे नमेरू वृक्ष फुलतो, असे शिवतत्त्वरत्नाकरामध्ये (६.११. ९५–९६) सांगितले आहे. शाङ्‌र्गधरपद्धतीतही झाडांना विपुल फळे व फुले यावी म्हणून अशा प्रकारचे विविध उपाय दिले आहेत. माणसांप्रमाणेच वनस्पतींचे रोगही कफ-वात-पित्त या त्रिदोषांमुळे उत्पन्न होतात. म्हणून त्या दृष्टीने रोगचिकित्सा करून उपचार करणे आवश्यक असते, असेही म्हटले आहे.

टोळ, उंदीर, पक्षी, मुंग्या, इत्यादींपासून झाडांना व पिकांना भय निर्माण झाले असता, एक मंत्र एकशेआठ वेळा जपून तो एका पानावर लिहावा आणि ते पान जमिनीत पुरावे, असे सांगितले आहे. त्या मंत्रात उंदीर, टोळ, इ. प्राण्यांना 'येथे राहू नका' अशी मारुतीची आज्ञा असून, 'राहिल्यास शरीरनिग्रहाची शिक्षा मिळेल' अशी धमकी आहे. मंत्राच्या अंती 'हुं फट् हुं' ही अपनिवारक अक्षरे आहेत; त्यावरून मंत्राचे यातुधर्मात्मक स्वरूप स्पष्ट होते.

प्राचीन संस्कृत व प्राकृत साहित्यात असंख्य वनस्पतींचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उल्लेख केलेला आहे. त्यावरून भारतातील वनस्पतींचा स्थूल परिचय होऊ शकतो. कालिदासाच्या काव्यात वनस्पतींची जी वर्णने आहेत, ती अतिशय रम्य आणि वास्तविक वाटतात. कालिदास वनस्पतिशास्त्रज्ञ नव्हता; तथापि त्याने दिलेली माहिती वनस्पतींचा शास्त्रीय अभ्यास करणाऱ्यालाही उपयुक्त ठरली आहे.

वराहमिहिराच्या बृहत्संहितेत वृक्षायुर्वेद नामक एक अध्याय आहे. त्यात वनस्पतींची बरीच माहिती दिलेली असून, उपवन-विषयसंबंधी शास्त्रीय प्रयोगांचा निर्देश केलेला आहे. वराह-मिहिराच्या मते, साधारण ऋतूंव्यतिरिक्त अन्य ऋतूंतही फळे उत्पन्न करण्याची क्षमता निर्माण करणे शक्य आहे.

डॉ. जगदीशचंद्र बसू यांनी स्वत: नवीन यंत्रे बनवून त्यांच्या साहाय्याने असे सिद्ध केले आहे, की वनस्पती या संवेदनाशील असून, प्राण्यांप्रमाणे त्या अन्नाचे पचन व शोषण करतात, झोपतात व उत्सर्जन करू शकतात. त्यांना तहान-भूकही लागते. सुख-दुःखाची जाणीवही त्यांना होते. [वैं. त्रि. भा. प.; प्रा. भा. सा. सं. भू.; म. ज्ञा. को.; पॉ. सा. ए. हिं.; वनश्रीदर्शन–डॉ. म. वि. आपटे, १९५५; डॉ. गणेश थिटे–नवभारत, नोव्हें. १९७३]

वन्नर धंद्यावरून बनलेली एक जात. या लोकांची वस्ती तमिळनाडमधील मदुरा जिल्हा आणि केरळ या भागात तुरळक प्रमाणात आढळते. हे लोक कपडे धुण्याचा व्यवसाय करतात. त्यांना हा व्यवसाय का प्राप्त झाला याबंधी एक दंतकथा सांगतात, ती अशी –

दक्षाच्या यज्ञात वीरभद्राने त्याचे बरेच लोक मारले. त्या पापाचे प्रायश्चित म्हणून शिवाने वीरभद्राला सर्व लोकांचे कपडे धुवायला सांगितले. त्याने ते काम केले व पुढे त्याच्या वंशाचा तो व्यवसाय ठरला. वन्नर हे वीरभद्राचे वंशज होत.

हे लोक स्वत:ला वीरवद्रन असेही म्हणतात. वन्नरांना शूद्र मानले जाते. ते प्रेतावरील कपडेही वापरतात. निरनिराळ्या जातींच्या लोकांचे कपडे धुण्यावरून त्यांच्या पोटजातीही बनल्या आहेत. पल्ल वन्नर हे पल्लरांचे धोबी, पुदर वन्नर हे परैयरांचे धोबी आणि तुलुक वन्नर हे मुसलमानांचे धोबी होत. या लोकां-मध्ये जे पांडव वन्नर आहेत, त्यांच्या जातिप्रमुखाला पेरिय-मनुषार म्हणजे मोठा माणूस असे म्हणतात. त्याला बरेच अधि-कार व हक्क असतात.

विवाहप्रथा – वन्नरांमध्ये मुलगी वयात आल्यावर तिचा विवाह करतात. आतेबहिणीशी लग्न करणे हा ते आपला हक्क समजतात. त्यांच्यांत देजाची पद्धत आहे. वराची बहीण वधूला ताळी बांधते आणि नंबी लग्नाचे पौरोहित्य करतो. यांच्यांत घटस्फोटही रूढ आहे. घटस्फोट घेतलेल्या स्त्री-पुरुषांना पुन्हा लग्न करता येते.

वन्नर शैवपंथी आहेत. गुरुनाथर ही त्यांची देवता आहे. या देवतेचा स्वतंत्र पुजारीवर्ग असतो.

मर्तिकप्रथा – हे प्रेतांना पुरतात किंवा जाळतात. सोळा दिवस सुतक पाळतात आणि सोळाव्या दिवशी मृताचे और्ध्व-देहिक करतात. [का. ट्रा. स. इं.; मदुरा गॅझे.]

वन्यजाती राना-वनांत व डोंगर-पहाडांत राहणारे आदिम जातीचे लोक. यांना आदिवासी म्हणजे भारतातले पहिले रहिवासी असेही म्हणतात. पाहा –आदिवासी.

वपाश्रपणी कोणत्याही पशुयागामध्ये पशुहनन झाल्यावर त्या पशूची वपा काढतात. पशूच्या कोथळयावर असलेल्या पातळ पापुद्र्याला वपा म्हणतात. गलोरीसारख्या एका लांब काठीवर ही वपा पसरून भाजतात. या लांब काठीला वपाश्रपणी असे म्हणतात. गलोरीसारखी एक व दुसरी सरळ अशा दोन वपाश्रपण्या असतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वप्पमंगल एक प्राचीन कृषिविषयक उत्सव. वर्षा ऋतूच्या प्रारंभी शेतात नांगर धरण्यापूर्वी क्षेत्रपालादी देवतांची पूजा करून त्यांना बली देणे आणि त्यांची प्रार्थना करणे, असे या उत्सवाचे स्वरूप असते. हा उत्सव वैदिक काळा-पासून चालत आलेला आहे. ललितविस्तर या ग्रंथात म्हटले आहे, की कपिलवस्तूचा राजा शुद्धोदन हा प्रतिवर्षी एक नांगर समारंभाने शेतकऱ्यांना देत असे. विष्णुपुराणात या कर्माला सीतायज्ञ असे म्हटले आहे. [ह. प्रा. लो.]

वम्र वैखानस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडला-तील नव्याण्णव क्रमांकाचे सूक्त याने रचले आहे. याच सूक्ताच्या बाराव्या ऋचेत त्याचा वम्रक असा उल्लेख आढळतो. इंद्रस्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. याची एक ऋचा (ऋ. १०.९९.१) अशी –

कं नश्चित्रमिषण्यसि चिकित्वान् पृथुग्मानं वाश्रं वावृधध्यै ।
कत् तस्य दातु शवसो व्युष्टौ तक्षद्वज्रं वृत्रतुरमपिन्वत् ।

अर्थ – हे वर्धिष्णू, धनदात्या, ज्ञानसंपन्न इंद्रा, कोणत्या दानाने प्रसन्न होऊन आपले वृत्रघातक वज्र तू सिद्ध करशील ?

या सूक्तातील सातव्या ऋचेत दिवोदास व शंबर यांच्यांत झालेल्या 'दस्युहत्य' नामक युद्धातील इंद्राच्या पराक्रमाचा निर्देश केलेला आढळतो. दाशराज्ञ युद्धाप्रमाणेच हे युद्धही त्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काळी महत्त्वाचे ठरले असावे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वरंगळ आंध्र प्रदेशातील एक नगर. इथे काकतीय वंशाची राजधानी होती. त्या वंशातील रुद्रदेव राजाने हे नगर इ. स. ११७० नंतर वसवले. तोपर्यंत काकतीय राजे अनमकोंडा किंवा हनमकोंडा या नगरातून राज्य करीत होते. पण ते लहान वाटू लागल्यामुळे रुद्रदेवाने तिथून चार मैलांवर वरंगळचा किल्ला बांधला. त्याविषयी एक दंतकथा प्रचलित आहे, ती अशी –

एक बैलगाडी एका खडकाला लागून उलटली. तिच्या धक्क्याने जमिनीत भेग पडली व तिथे एक स्वयंभू शिवलिंग सापडले. हा शुभ शकून मानून रुद्रदेवाने त्या जागी एक मंदिर उभारले व किल्लाही बांधला. नंतर तिथे त्याने नगर वसवले. शिवलिंग जिथे सापडले तो प्रचंड खडक अभंग पसरलेला आहे. तेलुगूत त्याला ओरुंगल्लू म्हणतात. त्याचे रूपांतर होऊन वरंगळ हे नाव त्या स्थानाला मिळाले. या क्षेत्राचे प्राचीन नाव एकशिला नगरी असे आहे.

रुद्रदेवाचा भाऊ महादेव याचा पुत्र गणपती (इ. स. ११९८-१२६१) याने आपली राजधानी हनमकोंडाहून वरंगळ येथे नेली. सध्या वरंगळमध्ये हनमकोंडाचा समावेश केला जातो. या नगराभोवती दोन तट होते. बाहेरचा मातीचा तट २५ मैल लांबीचा होता, असे म्हणतात. त्याचे काही अवशेष अजून पाहायला मिळतात. आतला तट दगडी असून, त्याला चार भक्कम दरवाजे आहेत. हे दोन्ही तट इ. स. च्या १३ व्या शतकात बांधले गेले.

हनमकोंडा येथें एक सहस्रस्तंभमंदिर आहे. इ. स. ११६२ मध्ये त्याची रचना सुरू झाली. परंतु ते पूर्ण झालेले नाही. तथापि ते चालुक्य शिल्पपद्धतीचे एक सुंदर उदाहरण मानले जाते. त्याच्या दर्शनी मंडपात सुमारे तीनशे खांब आहेत. आणि मंदिरासमोर एक नंदी आहे.

हनमकोंडापासून जवळच खडकात अनेक जैन तीर्थंकरांच्या आकृती खोदलेल्या दिसतात.

वरंगळ नगरात भद्रकाली, पद्माक्षी व सिद्धेश्वर यांची मंदिरे आहेत. त्यांतील भद्रकालीचे मंदिर सर्वांत प्राचीन आहे. ते नगरापासून एक मैल दूर एका टेकडीवर बांधलेले असून, त्याच्या जवळच एक मोठे सरोवर आहे. हे मंदिर बरेच मोठे असून, त्याच्या गाभाऱ्यातली देवीची मूर्तीही प्रचंड आहे. तिची उंची व रुंदीही ९ फूट आहे. ही अष्टभुजा देवी एका राक्षसाच्या देहावर बसलेली दिसते. ती काकतीय राजांची कुलदेवता होती. या मंदिराचा आता जीर्णोद्धार करण्यात आला आहे. जवळच एक शिवमंदिरही बांधण्यात आले आहे.

वरंगळ हे नगर अतिशय तलम सुती वस्त्रासाठी प्रसिद्ध आहे. मार्को पोलोने तिथल्या वस्त्रांची स्तुती केलेली आहे. [वरंगळचे काकतीय राजे, कृष्णाकुमार; हि. क. इं, पी.५; सा. इं. (म. आं.); कल्याण —तीर्थांक]

वरचतुर्थी एक तिथिव्रत. मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीला याचा प्रारंभ करतात. एक महिनाभर गणेशाची पूजा, हा या व्रताचा प्रधान विधी आहे. व्रतावधी चार वर्षे. व्रताच्या दिवशी क्षार व लवण न खाता एकभुक्त करावे, तसेच या चार वर्षांत दुसऱ्या वर्षी नक्त, तिसऱ्या वर्षी अयाचित आणि चौथ्या वर्षी उपवास करावा, असे सांगितले आहे. [हि. ध.]

वरदचतुर्थी एक तिथिव्रत. माघ शुद्ध चतुर्थीला हे व्रत करतात. या दिवशी वरदाची म्हणजे विनायकाची पूजा करणे आणि पंचमीला त्याचीच कुंदपुष्पांनी पूजा करणे हा या व्रतातला मुख्य भाग आहे. या पंचमीला श्रीपंचमी असे म्हणतात. भाद्रपद व मार्गशीर्ष या महिन्यांतील शुद्ध चतुर्थीलाही वरदचतुर्थी असे नाव आहे. [हि. ध.]

वरद मुद्रा मूर्तिकलेतील एक मुद्रा. या मुद्रेत हात लोंबता किंवा पुढ केलेला असून, हाताचा तळवा उताणा व बोटे जुळवलेली असतात. ही मुद्रा वरदानाची किंवा अनुग्रहाची सूचक मानतात. हाताच्या या स्थितीला वरदहस्त असेही नाव आहे. काही वेळा, या मुद्रेत तळव्यावर रत्न चिकटविलेले असते, तेव्हा तिला रत्नसंयुक्त वरदमुद्रा म्हणतात. हिचा अर्थ भक्ताला काहीतरी देणगी देणे, असा होतो. खदिरवनी ही बौद्ध देवता रत्नसंयुक्त मुद्रेत आहे. बहुतेक सर्व देवतांच्या अशा प्रकारच्या वरदमुद्रायुक्त मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

वरदराज (१) (इ. स. चे १६ वे शतक) मीमांसा दर्शनाच्या प्राभाकर मताचा अनुयायी आचार्य. याच्या पित्याचे नाव रंगनाथ व गुरूचे नाव सुदर्शन असे होते. द. भारतात शुका नदीच्या तीरावर हा राहत असे. भवनाथ मिश्रांच्या न्यायविवेक या ग्रंथावर याने दीपिका, अर्थदीपिका किंवा वरदराजी या नावाची टीका लिहिली आहे. ही टीका अत्यंत सरल व सुबोध आहे. हा ज्योतिष, आयुर्वेद व व्याकरण या शास्त्रांचाही विद्वान होता. [मी. द.]

(२) एक धर्मशास्त्रकार. याच्या कालाविषयी मतभेद आहेत. कोणी त्याला इ. स. च्या १२ व्या शतकातला मानतात; तर कोणी त्याचा काळ इ. स. १४५० ते १५०० हा समजतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यवहारनिर्णय हा याचा ग्रंथ प्रसिद्ध असून, तो द. भारतात प्रमाणभूत मानला जातो. हा ग्रंथ विचारपरिप्लुत असून, त्या-

वरदराज विष्णूची मूर्ती

वरून ग्रंथकाराची स्वतंत्र बुद्धी, स्वतंत्र विचारप्रणाली आणि मीमांसा व न्याय या दर्शनावरील त्याचे प्रभुत्व ध्यानात येते.

(३) एक वैयाकरण. याचे उपनाम दीक्षित असे होते. हा भट्टोजी दीक्षिताचा शिष्य असून, त्याच्या सिद्धान्तकौमुदी ग्रंथावरून याने मध्यसिद्धान्तकौमुदी व लघुसिद्धान्तकौमुदी असे दोन संक्षेपात्मक ग्रंथ लिहिले आहेत. याव्यतिरिक्त त्याने गीर्वाणपदमञ्जरी नामक एक ग्रंथ लिहिला असून, त्यात काशीच्या अनेक घाटांची नावे दिली आहेत. [कं. सं. लि.; का. सा. सा.]

वरदराजमूर्ती गजेंद्राला नक्राच्या तावडीतून सोडवून वर दिल्यामुळे विष्णूला वरदराज हे नाव पडले. वरदराजाची शिल्पे दक्षिणेत पुष्कळ आहेत. वरच्या दोन हातांत शंख व चक्र आणि खालचे दोन हात अनुक्रमे वरद व कटिहस्त असतील, तर त्या मूर्तीला वरदराज म्हणावे, असा संकेत आहे.

कांची येथे वरदराजाचे मोठे मंदिर आहे. अप्पय्य दीक्षिताने या वरदराजाच्या स्तुतिपर वरदराजस्तव नामक १०६ श्लोकांचे एक मनोहारी काव्य रचले आहे. वेदान्त देशिकानेही असेच एक काव्य लिहिले आहे. [मू. वि.; सं. सा. इ.]

वरदशंकरव्रत एक पूजाप्रधान काम्य व्रत. या व्रताला कालाचे बंधन नाही. आपल्या इच्छेप्रमाणे ते केव्हाही करता येते. शंकर ही या व्रताची प्रधान देवता असून, भवानी, विष्णू, लक्ष्मी, जया, सोम व नंदी या गौण देवता आहेत. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनाही हे व्रत करता येते. व्रतविधी असा –

व्रताच्या दिवशी उपोषण करून प्रदोषकाळी स्नान करावे. मग महाभिषेकासह शिवपूजा करावी. गव्हाच्या शिऱ्याचा नैवेद्य दाखवावा. नैवेद्यानंतर राजोपचार, कथाश्रवण, उत्तरपूजा आणि आणि ब्राह्मणपूजा हे विधी करावे. मग ब्राह्मणभोजन घालावे. फल – इच्छापूर्ती. या व्रताची कथा भविष्य पुराणातील व्रतखंडात आली आहे, ती अशी –

प्राचीन काली कल्पांत झाला असता सर्व स्थिरचराचा पसारा आवरून ईश्वर सागरात स्वस्थ पडून राहिला होता. त्यानंतर त्याला पुन्हा सृष्टी निर्माण करायची इच्छा झाली. त्याने प्रथम अहंशक्ती निर्माण केली. तिच्यापासून शेषशायी विष्णू आणि विष्णूच्या नाभीतून ब्रह्मदेव उत्पन्न झाला. ब्रह्मदेवाने सर्व जग जलमय झालेले पाहिले. त्यामुळे त्याला पुढे काय करावे हे सुचेना. तो विचार करीत असता विष्णूच्या कानातील मळापासून उत्पन्न झालेल्या मधू व कैटभ या दैत्यांनी ब्रह्मदेवाला पाहिले आणि ते त्याला मारायला धावले. ब्रह्मदेवाने शिवाची करुणा भाकली, तेव्हा आकाशवाणीच्या द्वारे शिवाने सांगितले, की 'तू वरदशंकराचे व्रत कर; म्हणजे तुझी मनीषा पूर्ण होईल'. ब्रह्मदेवाने व्रत करायचा मनाशी संकल्प केला. लगेच विष्णू योगनिद्रेतून जागा होऊन म्हणाला. 'मी दैत्यांचा नाश करतो.' मग विष्णूचे व दैत्यांचे मोठे युद्ध झाले; पण दैत्यांचा पराभव झाला नाही. उलट विष्णूनेच सागराचा आश्रय घेतला. दैत्यही त्याचा पाठलाग करीत तिथवर गेले. ते पाहून विष्णूने शिवाची प्रार्थना केली. शिव त्याला म्हणाला. 'दैवावाचून प्रयत्न पंगू असतात, म्हणून तू वरदशंकराचे व्रत कर.' शिवाने त्याला व्रतविधानही सांगितले. परंतु सारी सृष्टी जलमय असल्याने व्रतसाहित्याची उणीव होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यावर शिवाने पुन्हा सांगितले, की 'तू केवळ पाण्याने व्रत कर.' तदनुसार विष्णूने व्रत केले. ब्रह्मदेवाच्या तोंडातून बाहेर पडलेल्या वेदांनी कथा वाचली. मग शिवाने प्रसन्न होऊन विष्णूला सुदर्शन चक्र दिले. सुदर्शनाच्या साहाय्याने विष्णूने त्या दैत्यांचा नाश केला. उत्पन्न केलेल्या सृष्टीला स्थैर्य लाभावे म्हणून ब्रह्मदेवानेही हे व्रत करून आपली कामना पुरी करून घेतली. रावणाने हे व्रत करून कुबेराला पिटाळून लावले आणि लंकेचे राज्य व पुष्पक विमान मिळविले. नंतर कुबेराने हे व्रत केले आणि त्याला अलका नगरी मिळाली. अवंतीचा राजा जय याची दृष्टी गेल्यामुळे शत्रूंनी त्याचे राज्य जिंकले आणि तो पत्नीसह रानोमाळ भटकू लागला. त्यानेही या संकटातून पार होण्यासाठी हे व्रत केले आणि तो संकटमुक्त झाला.

वरदायिनी एक देवी. हिला कोणी रूपावती असेही म्हणतात. हिचे स्थान गुजरातमध्ये कलोलजवळ रूपाळ या गावी आहे. दुर्दम नावाच्या दैत्याचा वध करण्यासाठी व देवांना वर देण्यासाठी आदिशक्तीने हे रूप घेतले. हिच्याविषयी दोन आख्यायिका आहेत, त्या अशा –

रामाने वनवासात असता शृंगी ऋषीच्या सांगण्यावरून हिचे दर्शन घेतले. त्या वेळी हिने रामाला एक अजय बाण दिला. तो बाण रामाने रावणवधासाठी उपयोगात आणला.

पांडवांनीही आपल्या वनवासात या देवीचे दर्शन घेऊन तिला नवस केला, की 'आमचा अज्ञातवास निर्विघ्न पार पडला, तर आम्ही सोन्याच्या पळीने तुझ्या प्रीत्यर्थ हवन करू.' पांडवांचा अज्ञातवास देवीच्या कृपेने निर्विघ्नपणे पार पडला. मग त्यांनी या क्षेत्री जाऊन केलेला नवस फेडला.

ती सुवर्णाची पळी आजही त्या देवस्थानात पाहायला मिळते.

पाटणचा राजा सिद्धराज याच्यावर या देवीचा अनुग्रह होता. हिच्या कृपेनेच सिद्धराज पाटणच्या राजगादीवर बसला. पुढे हजारो रुपये खर्चून त्याने देवीच्या मंदिराचा जीर्णोद्धार केला.

रूपाळ येथील देवीची मूर्ती शुभ्र पाषाणाची व चतुर्भुज असून, तिच्या हाती लक्ष्मीच्या हातांतल्याप्रमाणेच आयुधे आहेत. नवरात्रात या देवीची मोठी यात्रा तिथे भरते. तिथल्या मंदिरासमोर एक विस्तीर्ण तलाव आहे. [दे. को. २]

वरधावा विवाहसोहळ्यातील एक लौकिक भाग. महाराष्ट्रात ब्राह्मणेतर जातींत, वरपक्षाकडील मंडळी वधूच्या गावी आल्यावर प्रथम सीमांतपूजन होते आणि मग वरपक्षाकडील मंडळी विश्रांतीसाठी मारुतीच्या देवळात अथवा सोयीच्या जागी जातात. त्यानंतर वराचा भाऊ किंवा आप्त वराच्याच घोड्यावर बसून वधूच्या घरी जातो आणि वराच्या आगमनाची वर्दी देतो. याला वरधावा असे म्हणतात. वधूचा पिता वराकडून आलेल्या या व्यक्तीला भोजन व शेलापागोटे देऊन त्याचा सन्मान करतो. नंतर सर्व मंडळी लग्नासाठी वधूगृही जातात. [कोल्हापूर गॅझे.; ल. वि. सो.]

वरनवमी एक तिथिव्रत. याला वरव्रत असेही नाव आहे. प्रत्येक नवमीला हे व्रत करायचे असते. व्रतावधी नऊ वर्षे. हे व्रत आयुष्यभर केले तरी चालते. प्रत्येक नवमीला अग्निस्पर्श नसलेले अन्न खावे, एवढाच याचा विधी आहे. फल-इहलोकात व परलोकात अक्षय्य सुखप्राप्ती. [हि. ध.]

वरबेडियूं गुजरातेतील सोनारांत नवरा मुलगा वधूच्या मांडवाशी आला, की वधूची बहीण डोक्यावर पाण्याचा तांब्या घेऊन त्याला सामोरी जाते. त्या तांब्याला वरबेडियूं असे म्हणतात. नवरा मुलगा त्यात रुपया टाकतो व मग ती बहीण परत येते. [ल. वि. सो.]

वररुची एक वैयाकरण. व्याकरणाच्या मुनित्रयात याची गणना होते. याच्या कालाबद्दल खूप मतभेद आहेत. कोणी त्याला इ. स. च्या ४ थ्या किंवा ५ व्या शतकामध्ये मानतात, तर कोणी त्याला सनपूर्व ५ व्या शतकापर्यंत मागे नेतात. पं. भगवद्दत्त याला इ. स. च्या १ ल्या शतकातला, तर श्री. विल्सन त्याला सनपूर्व १ ल्या शतकातला मानतात. सामान्यपणे पाणिनीच्या नंतर आणि पतंजलीच्या पूर्वी तो होऊन गेला, असे मानण्याकडे प्रवृत्ती आहे. डॉ. केतकर तर तो पाणिनीचा समकालीन असण्याची शक्यता सांगतात. याचे चरित्र कथासरित्सागरात वर्णिले आहे, ते असे –

शिव हा पार्वतीला एकांतात सात विद्याधरांची कथा सांगत असता, पुष्पदंत नावाच्या शिवगणाने ती चोरून ऐकली आणि घरी येऊन आपल्या बायकोला सांगितली. तिने ती परत पार्वतीला ऐकवली. आपला असा रहस्यभेद झालेला पाहून पार्वतीने पुष्पदंताला शाप दिला, की 'तू मनुष्यलोकी जन्म घेशील.' तो शाप ऐकून पुष्पदंताची बायको घाबरली आणि तिने पार्वतीचे पाय धरले. पार्वतीला दया येऊन ती उःशाप वदली. 'काणभूती नामक पिशाचाला जेव्हा हीच कथा पुष्पदंत ऐकवील, तेव्हा त्याचा हा शाप दूर होईल.'

पुढे पुष्पदंत कौशांबी नगरीत एका दरिद्री ब्राह्मणाच्या घरी जन्मला. बापाने त्याचे नाव वररुची असे ठेवले. तो वर्ष नावाच्या गुरूकडून विद्या शिकला. गुरूने त्याच्याकडे एक लक्ष सुवर्णमुद्रांची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गुरुदक्षिणा मागितली. वररुची ती दक्षिणा मिळवण्यासाठी मगधाच्या नंदराजाकडे जायला निघाला. व्याडी व इंद्रदत्त या आपल्या दोन सहाध्यायांना त्याने आपल्या बरोबर घेतले. वाटेतच त्यांना वार्ता कळली, की नंदराजा मरण पावला आहे. पण तरीही ते तसेच पुढे गेले. इंद्रदत्ताला परकायाप्रवेशाची विद्या येत होती. त्याने आपल्या शरीराचा त्याग करून नंद राजाच्या शरीरात प्रवेश केला. त्यामुळे नंदराजा जिवंत झाला.

व्याडी इंद्रदत्ताचे निश्चेष्ट शरीर राखीत रानातच राहिला. वररुची दक्षिणा मागण्यासाठी नंदराजापुढे गेला. आत्मा बदललेल्या योगनंद राजाने वररुचीला एक लक्ष सुवर्णमुद्रा देण्याबद्दल शाकताल नावाच्या प्रधानाला आज्ञा दिली. प्रधानाने तेवढे द्रव्य त्याला दिले; पण त्याला कपटाची शंका आली. म्हणून त्याने रानात शोध करून इंद्रदत्ताचे मृत शरीर जाळून टाकले. त्यामुळे इंद्रदत्ताचा आत्मा योगनंदाच्या शरीरात कायमचा कोंडला गेला.

योगनंदाने वररुचीला दक्षिणा तर दिलीच; शिवाय त्याला आपला अमात्य करून शाकतालाला बंदीत टाकले. आपल्या उपकोशा नामक पत्नीसह वररुची तिथे राहू लागला. पुढे एकदा योगनंदाच्या दरबारात पाणिनी व वररुची यांचा वाद होऊन वररुची पराभूत झाला. ते दुःख असह्य होऊन तो शिवाची आराधना करण्यासाठी हिमालयात गेला. शिवाने प्रसन्न होऊन त्याला माहेश्वर नामक व्याकरण दिले. नंतर तो परत आला. पुढे त्याचे व योगनंदाचे बिनसले. योगनंदाने त्याचा वध करायचे ठरविले. मध्यंतरीच्या काळात शाकताल बंदिवासातून सुटून राजदरबारी रुजू झाला असावा. शाकतालाने ती कामगिरी स्वतःकडे घेतली. त्याने वररुचीला लपवून ठेवून त्याचा वध झाल्याचे प्रसिद्ध केले. पण वस्तुस्थिती न कळल्यामुळे त्याच्या पत्नीने देहत्याग केला. कालांतराने योगनंद मरण पावला आणि चंद्रगुप्त राजा झाला. त्यामुळे वररुचीचा अज्ञातवास संपला. पण पत्नीचा वियोग असह्य झाल्यामुळ त्याला वैराग्य आले व त्याने संन्यास घेतला.

पुढे एके दिवशी दुर्गादेवी त्याला स्वप्नात दिसली. तिने त्याला विंध्य पर्वतात बोलावले. वररुची गेला. तिथे त्याला काणभूती पिशाच भेटला. वररुचीने स्वतःच्या शापाला कारणीभूत झालेली ती सात विद्याधरांची कथा काणभूतीला ऐकविली. त्यामुळे काणभूती उद्धरून गेला. पुढे वररुचीने उर्वरित आयुष्य बदरिकाश्रमात घालवले.

वररुचीने पाणिनीच्या सूत्रांवर वार्तिके लिहिली असून, त्यामुळे पाणिनीची अष्टाध्यायी समजण्याचा मार्ग सुकर झाला आहे. पतंजलीच्या महाभाष्यात आढळणाऱ्या त्याच्या वार्तिकांची एकूण संख्या ५०३२ आहे. कैयटाने त्याच्या आणखी ३४ वार्तिकांचा उल्लेख केला आहे. पाणिनी हा भारताच्या पश्चिम भागातला व वररुची हा पूर्व भागातला होता. या प्रदेशभेदामुळे आलेली संस्कृत भाषेतील विषमता वार्तिके रचून याने दूर केली. विमलसरस्वतीने उणादी सूत्रांचे कर्तृत्व यालाच दिले आहे. कातंत्रवृत्ती प्रकरण यानेच लिहिले, अशीही आख्यायिका आहे. ऐंद्र नामक एका प्राचीन व्याकरणशाखेचा हा अनुयायी होता, असे म्हणतात.

प्राकृतप्रकाश हा याचा आणखी एक महत्त्वाचा व्याकरणग्रंथ होय. सर्व प्राकृत व्याकरणांत हा ग्रंथ प्राचीन आहे. त्याच्यावर भामहादी अनेक विद्वानांच्या टीका आहेत. त्यावरून प्रस्तुत ग्रंथाची लोकप्रियता कळून येते. दक्षिणेतही याचा खूप प्रचार झाला. प्राकृत बोलींचे विस्तृत वर्णन करण्यात वररुची हा अग्रगण्य असून, त्याने पाणिनीला आदर्श मानून आपल्या व्याकरणाची रचना केली आहे. ग्रंथाचे १२ परिच्छेद आहेत. त्यांतील ९ व्या परिच्छेदात शौरसेनीची, १० व्यात पैशाचीची व ११ व्यात मागधीची लक्षणे त्याने सांगितली आहेत. बाराव्या परिच्छेदात शौरसेनीचे विवेचन आहे. पण शेवटचे तीन परिच्छेद वररुचीचे नाहीत, असे विद्वानांचे मत आहे.आपल्या ग्रंथात त्याने शौरसेनीला मुख्य प्राकृत असे म्हटले आहे आणि महाराष्ट्रीचा उल्लेखही केला नाही. यावरून वररुचीच्या काळापर्यंत महाराष्ट्रीचा उत्कर्ष झाला नव्हता, असे अनुमान निघते. पैशाची भाषेला शौरसेनी ही आधारभूत असून, शौरसेनीला संस्कृत भाषा आधारभूत आहे, असे वररुची म्हणतो. वररुची हा केवळ व्याकरणकार नसून कवीही होता, असे सांगतात.

वररुचीने आपल्या ग्रंथात स्वतःचे गोत्र कात्यायन असल्याचे सांगितले आहे. त्यावरून प्रातिशाख्य लिहिणारा कात्यायन व वार्तिककार वररुची हे दोघे एकच असल्याचे काही विद्वानांनी मानले आहे. पण संशोधनाअंती ते दोघे भिन्न असल्याचे सिद्ध झाले आहे. [प्रा. सा. इ.; प्रा. मौ. बि.; लो. सा. रू.]

वरलक्ष्मीव्रत

श्रावण महिन्याच्या शुद्ध पक्षातील शेवटच्या शुक्रवारी हे व्रत करतात. हे व्रत करावे किंवा नाही, यासंबंधी शास्त्रकारांनी एक आडाखा सांगितला आहे, तो असा – पूर्वी ज्याने हे व्रत केले असेल त्याच्या किंवा तिच्या परवानगीने सुपारी व बिनचुन्याचे नागवेलीचे पान खाऊन बारीक करावे. मग पानाचा तो गोळा आपल्या उत्तरीयात बांधून ठेवावा. दुसऱ्या दिवशी ते वस्त्र लाल रंगाचे झाले, तर हे व्रत करावे; अन्यथा करू नये.

व्रतविधी असा – शुक्र पूर्व दिशेला उगवल्यावर आपल्या घराच्या ईशान्येला एक मंडप घालावा. त्या मंडपात एक कलश ठेवावा. कलशावर वरलक्ष्मीचे आवाहन करावे. श्रीसूक्त म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवीची पूजा करावी. मग एकवीस अपूपांचा नैवेद्य दाखवावा. यथाशक्ति ब्राह्मण, सुवासिनी, यती व ब्रह्मचारी यांना वायन द्यावे. शेवटी कथा ऐकावी. ती कथा अशी –

एकदा कैलास पर्वतावर शिव-पार्वती सारीपाट खेळत असता, डाव कोणी जिंकला यासंबंधी त्यांच्यांत वाद निर्माण झाला. शिवाने चक्रनेमी नामक आपल्या गणाला वादाचा निर्णय करायला सांगितले. शिवगणाने शिवाच्या बाजूने निर्णय दिला. त्यामुळे पार्वतीने रागावून ' तू कुष्ठरोगी होशील ' असा शाप त्याला दिला. चक्रनेमीने खोटा निर्णय दिला नाही, असे सांगून शिवाने त्याच्या शापनिवृत्तीचा उपाय पार्वतीला विचारला. त्यावर पार्वती म्हणाली. ' एका सरोवराजवळ देवस्त्रिया वरलक्ष्मीचे व्रत करताना दिसतील. चक्रनेमीने त्यांना विचारून ते व्रत करावे. म्हणजे त्याचा कुष्ठरोग जाईल. ' नंतर चक्रनेमी त्या सरोवराजवळ आला. तिथे स्वर्गांगना वरलक्ष्मीचे व्रत करीत होत्या. त्यांना विचारून चक्रनेमीने यथासांग व्रत केले आणि लगेच त्याचा कुष्ठरोग नष्ट झाला.

दक्षिण भारतात आषाढ महिन्याच्या शुक्ल पक्षातील अखेरच्या शुक्रवारी हे व्रत करतात. तिरुवादी, तिरुवायुर व तिरुप्पुत्तुर येथील देवालयांत लक्ष्मीने स्वत: शिवाची पूजा केली, अशी लोकांची समजूत आहे. म्हणून ही मंदिरे या व्रताच्या पालनासाठी विशेष पवित्र मानली जातात. फल – व्याधिनाश, धन व पुत्र यांचा लाभ. [हि. ध. ; व्रतराज ; सा. इं. फे. ; दे. को. ३]

वरव्रत एक काम्य व्रत. ब्रह्मा ही याची देवता आहे. या व्रतात सात दिवस उपवास करून शेवटी तुपाने भरलेले पात्र दान द्यायचे असते. फल – ब्रह्मलोकप्राप्ती. [हि. ध.]

वराटिकासप्तमी एक व्रत. कोणत्याही सप्तमीला हे व्रत करतात. सूर्य ही या व्रताची देवता आहे. व्रतविधी असा – तीन वराटिका (कवड्या) देऊन जेवढे अन्न मिळेल तेवढ्यावरच निर्वाह करावा. मिळालेले अन्न खायला योग्य किंवा अयोग्य याचा विचार करू नये. [हि. ध.]

वराह एक रानटी पशू. याला रानडुक्कर म्हणतात. हा गावठी डुक्करासारखाच, पण बराच मोठा व बलवान असतो. याचे शरीर मागे लहान होत जाते. डोके त्या मानाने मोठे व तोंड सोंडेप्रमाणे पुढे आलेले असते. याला दोन अणकुचिदार सुळे असतात. याच्या मानेवर खूप दाट व राठ केस असतात. याची शेपूट लहान असते. हा प्राणी फार चपळ असून, त्याची मुसंडी अगदी सरळ आणि जबरदस्त असते.

वराह या प्राण्याबद्दल जगात परस्पर विरोधी भावना दिसून येतात. भारतात त्याला सामान्यपणे अपवित्रच मानले जाते.

वराह – रानडुक्कर

प्राचीन बाबिलोनियन, फिनिशियन, आर्मेनियन, इ. लोक वराहाला पवित्र प्राणी मानीत. उ. भारतात बाथेरमधील लोक वराहाला पवित्र समजतात. वडार लोक डुकराचे मांस खातात व त्यामुळे आपणांस भुताखेतांची बाधा होत नाही, असे सांगतात. प्राचीन काळी राजस्थानात वसंतोत्सव साजरा करताना डुकराची शिकार करीत. कारण, गौरी या त्यांच्या देवतेचा वराह हा शत्रू आहे, असे ते समजत. इस्लामी संस्कृतीत वराह हा निषिद्ध मानलेला आहे. [रि. इं. ; पशुपुराण ; पॉ. रि. फो. नॉ. इं.]

वराह अवतार विष्णूचा तिसरा अवतार. हा हिरण्याक्ष नामक असुराच्या वधासाठी उत्पन्न झाला. याचे दुसरे नाव यज्ञवराह असे आहे. वराहाचा उल्लेख ऋग्वेदात आढळतो. तिथे वराह आणि वृत्र एकरूप मानलेले दिसतात. इंद्राने उदकात दबा धरून बसलेल्या वराहाला अर्थात वृत्राला आपल्या वज्राने ठार मारले, असे तिथे म्हटले आहे (ऋ. १.१२१. ११). वैदिक साहित्यात वराह अवताराचा अस्पष्ट निर्देश आढळतो; पण तिथे तो विष्णूचा अवतार असल्याचे कुठेही सांगितले नाही; तर प्रजापतीने वराहरूप घेतल्याचे म्हटले आहे. ती कथा अशी –

पृथ्वी उत्पन्न होण्यापूर्वी प्रजापती वायूचे रूप धारण करून अंतरिक्षात फिरत राहिला होता. त्या वेळी त्याला दिसले, की

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

समुद्राच्या पाण्यात पृथ्वी बुडाली आहे. ते पाहून प्रजापतीने



वराहमूर्ती – उदयगिरी

वराहरूप घेऊन समुद्रात प्रवेश केला आणि पाण्यात बुडालेल्या पृथ्वीला वर काढले. नंतर त्याने पृथ्वीला पुसून स्वच्छ केले आणि तिच्यावर सृष्टीची निर्मिती केली (तै. सं. ७.१.५.१).

तै. ब्राह्मणात एक वेगळी कथा दिलेली आहे, ती अशी – ब्रह्म्याच्या नाभिकमलाच्या खालच्या भागी गाळ साचला होता. प्रजापतीने वराहरूप घेऊन तो गाळ वर काढला व नाभिकमलाच्या पानावर पसरला. कालांतराने त्याच गाळाची पृथ्वी बनली (तै. ब्रा. १.१.३).

बहुतेक पुराणग्रंथांत विष्णूच्या अवतारांची गणना वराहापासून सुरू होते. हिरण्याक्ष नावाचा एक असुर पृथ्वीचे हरण करून तिला पातालात घेऊन गेला. ते पाहून विष्णूने वराहरूप घेऊन पृथ्वीला आपल्या सुळ्याने उचलून पातालातून वर आणले. मग त्याने तिची स्थापना शेष नागाच्या मस्तकावर केली. नंतर त्याने हिरण्याक्षाचा वध केला. विष्णूचा हा अवतार वराहकल्पाच्या प्रारंभी झाला (वायुपु. २३.१००–१०९). चतुर्बाहू, चतुष्पाद, चतुर्मुख आणि चतुर्नेत्र असे वराहाचे वर्णन कित्येक पुराणांत केलेले आहे.

विष्णूच्या दहा अवतारांतले मत्स्य, कूर्म व वराह हे अवतार दिव्य अर्थात मनुष्यजातीच्या उत्पत्तीच्या पूर्वीचे मानलेले आहेत. विष्णूचे मानुष अवतार अर्धमनुष्याकृती नरसिंहापासून सुरू होतात. वैदिक वाङ्मयावरून वरील तीन्ही अवतार ही प्रजापतीची रूपे असल्याचे कळते. पुढे पुराणकालात विष्णुभक्तीचा प्रसार झाल्यावर प्रजापतीची ही तीन्ही रूपे विष्णूचे अवतार म्हणून गणली गेली.

वराहरूपी विष्णूने सनत्कुमाराला ऊर्ध्व पुंड्र उपदेशिला व ऋभूला वराहोपनिषद सांगितले.

वराह अवताराविषयी एक वेगळा विचार श्री. अ. ज. करंदीकर यांनी मांडला आहे, तो असा – दशावतारांत पृथू असे तिसरे नाव येते. त्याचा अर्थ वराह असा घेतलेला आहे; पण तो पृथू राजा असला पाहिजे. पृथुकुलाचे दैवत किंवा प्रतीक वराह असल्यामुळे त्या कुलाला ती संज्ञा लाभली असावी. वराह–विष्णूने पाण्यात बुडणाऱ्या पृथ्वीचा उद्धार केला, असे परंपरा सांगते. पृथूनेही पृथ्वीवरील खाचखळगे बुजवून ती समतल बनवली, असे पुराणे सांगतात. दलदलीचे प्रदेश भरून काढून पृथूने पृथ्वीचे दोहन करण्याचा मार्ग मानवांना मोकळा करून दिला.

वराह अवताराच्या मूर्ती भारतात बऱ्याच ठिकाणी पाहायला मिळतात. त्या मुख्यत्वे अर्धमानवी म्हणजे, धड माणसाचे व मस्तक वराहाचे अशा प्रकारच्या असतात. तोरमाण राजाच्या कारकिर्दीतली एक प्रचंड तांबड्या दगडाची वराहमूर्ती पाहायला मिळते. ती पूर्णरूप असून, त्या वराहाच्या सुळ्यावर पृथ्वी

वराहमूर्ती – ऐहोळ

दाखविलेली आहे. अशा पूर्ण वाराही मूर्ती उ. भारतात आढळ-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तात. विदिशेजवळच्या उदयगिरीवर चंद्रगुप्त विक्रमादित्याच्या काळातली वराहाची एक विशाल मूर्ती आहे. हा वराह पृथ्वीचा उद्धार करताना दिसतो. त्याचे धड माणसाचे व मुख वराहाचे असून, त्याच्या डाव्या पायाखाली शेषाची आकृती दिसते. ऐहोळ येथे एक सुंदर वराहमूर्ती असून, तिच्या सुळयावर स्त्रीच्या आकृतीची पृथ्वी आहे. कांची येथील शिल्पात वराहाने पृथ्वीला कडेवर घेतले आहे. गुप्त साम्राज्याच्या काळात विष्णूची वराह-रूपात पूजा करण्याची प्रथा निर्माण झाली असावी आणि कलचुरी राजांनीही ती चालू ठेवली असावी. कारीतलाई, मझोली, रीठी, बिल्हरी, पनागर, नोहटा, मदनपूर, हरदा, इ. ठिकाणी विशाल-काय वराहमूर्ती पाहायला मिळतात.

वैखानस आगमात यज्ञवराह व प्रलयवराह अशा दोन मूर्तींचे वर्णन आहे. यज्ञवराह हा सिंहासनावर, ललितासनात बसलेला



प्रलयवराहाची कांस्यमूर्ती – चोळ शैली

दाखवावा आणि त्याच्या दोन्ही अंगी श्रीदेवी व भूदेवी असाव्या, असे म्हटले आहे. प्रलयवराहाजवळ फक्त भूदेवी दाखवायची असते. धड वराहाचे आणि मुख मानवाचे अशा रूपाला नृवराह म्हणतात. अशा प्रकारच्या मूर्ती मात्र फारशा आढळत नाहीत.

वराहाची मूर्ती कशी करावी हे अभिलषितार्थचिंतामणीमध्ये सांगितले आहे, ते असे–त्याला दोन पाय असून, एक कासवाच्या पाठीवर व दुसरा शेषाच्या मस्तकावर असावा. त्याला चार हात असावे; एक हात कमरेवर, दुसऱ्या हातात गदा, तिसऱ्यात दाढेने उचललेली नीलोत्पलधारी पृथ्वी व चौथ्यात कमळ. त्याचे शरीर मोठे, तोंड डुकरासारखे व दाढा तीक्ष्ण असाव्या.

लखनौ येथील संग्रहालयात वराहाची एक मूर्ती आहे, तिचे वर्णन असे – हा वराह चार पायांवर उभा, तोंड किंचित वर, उजवा पाय थोडा पुढे; त्याच्या जवळच सात फण्यांचा शेष हात जोडून उभा; तिथेच चवरी घेतलेली स्त्री; सर्वांगावर निर-निराळ्या देवतांची रूपे, नाकाजवळ आणि सुळे व कान यांवर प्रत्येकी एक स्त्रीमूर्ती.

महाबलिपुरम येथील मूर्ती नृवराहाची आहे. त्याचा उजवा पाय शेषाच्या डोक्यावर असून, उजव्या कोपरावर भूदेवी बसलेली आहे. पाहा – एमुष; आदिवराह. [प्रा. च. को.; इं. हिं. इ.; रि. इं.; मू. वि.; क्रि. स्ट. ले. उ.]

वराह उपनिषद

एक नव्य उपनिषद. शांतिपाठानुसार हे उपनिषद कृष्ण यजुर्वेदीय आहे. या उप-निषदात एकूण पाच अध्याय असून, काही श्लोकबद्ध तर काही गद्य आहेत. यात वेदान्तज्ञानाची चर्चा आहे. वराहरूपी विष्णूने ऋभूला ब्रह्मविद्या सांगितली, ती या उपनिषदात आहे.

पहिल्या अध्यायात ९६ तत्त्वे सांगून, जो वराहरूप विष्णूला भजतो, तो जीवन्मुक्त होतो, असे म्हटले आहे.

दुसऱ्या अध्यायात ब्रह्मविद्येची विविध साधने कथन केली आहेत. वैराग्यादिचतुष्टय, नित्यानित्यविवेक, इहामुत्रविरागता, शमादिषट्कसंपत्ती, वगैरेंचा त्यात उल्लेख आहे. मनुष्यजन्म दुर्लभ आहे, म्हणून तो लाभला असता माणसाने आत्मस्वरूप जाणून घ्यावे, असे म्हटले आहे. यात समाधीचे लक्षण सांगितले आहे, ते असे –

सलिले सैन्धवं यद्वत्साम्यं भवति योगतः ।
तथाऽऽत्ममनसोरैक्यं समाधिरिति कथ्यते ॥

अर्थ – पाण्यात मीठ मिसळल्यानंतर ते दोन्ही पदार्थ एकजीव होतात, त्याप्रमाणे आत्मा व मन यांचे ऐक्य होणे याला समाधी म्हणतात.

या मार्गात सद्गुरूचे महत्त्व विशेष आहे. त्याने करुणा केल्या-वाचून शिष्याला विषयत्याग, तत्त्वदर्शन व सहजावस्था या गोष्टी दुर्लभ आहेत.

तिसऱ्या अध्यायात 'सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म' याचे स्पष्टीकरण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाले आहे. आनंदरूप झालेल्या मुक्त जीवाला जो अनुभव येतो, त्यासंबंधी एक श्लोक आहे, तो असा –

मेघा यथा व्योम न च स्पृशन्ति ।
संसारदुःखानि न मां स्पृशन्ति ॥

अर्थ – मेघ ज्याप्रमाणे आकाशात असूनही आकाशाला स्पर्श करीत नाहीत, त्याप्रमाणे संसार-दुःखे मला स्पर्श करीत नाहीत. ब्रह्मरूपस्थितीत जगातील सर्व गोष्टी लय पावतात. ज्याप्रमाणे पाणी हालले, की त्यात पडलेले सूर्याचे प्रतिबिंब हालते, त्याप्रमाणे अहंकारसंबंधाने आत्म्याला संसारी रूप येते. आत्मज्ञानी जगद्भावात निमज्जन पावत नाही.

चवथ्या अध्यायात जीवन्मुक्तीची लक्षणे सांगितली असून, शुभेच्छा, विचारणा, तनुमानसी, सत्त्वापत्ती, असंसक्ती, पदार्थभावना व तुरीयगा या सात जीवन्मुक्तांच्या भूमिका वर्णिल्या आहेत. जीवन्मुक्ताचे वर्णन पुढील श्लोकात केले आहे –

रागद्वेषभयादीनामनुरूपं चरन्नपि ।
योऽन्तर्व्योमवदच्छन्नः स जीवन्मुक्त उच्यते ॥

अर्थ – राग, द्वेष, भय, इ. विकारांना अनुरूप अशा प्रकारे आचरण करीत असताही जो अंतरात आकाशाप्रमाणे निर्लेप आहे, तो जीवन्मुक्त समजावा.

त्यानंतर मुक्तीचे विहंगममार्ग व पिपीलिकामार्ग असे दोन मार्ग सांगितले आहेत. पहिल्यात सद्योमुक्ती लाभते, तर दुसऱ्यात अनेक जन्मांच्या अभ्यासाने ती मिळते.

पाचव्या अध्यायात हठयोग व अष्टांगयोग यांचे विवरण केले आहे. शेवटी जो कोणी या उपनिषदाचे अध्ययन करतो, तो पंचपातकांतून मुक्त होऊन, विष्णूच्या परमपदापर्यंत जातो, असे सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

वराहतीर्थ हे क्षेत्र बंगालमध्ये त्रिवेणी नदीच्या तीरावर नाथपूर गावाजवळ आहे. इथेच वराहाने पृथ्वीचा उद्धार केला, असे सांगतात (पद्मपु. उ. खं. १६९). वराह पुराणात या क्षेत्राला कोकामुखक्षेत्र म्हटले आहे. [प्रा. च. को.]

वराहद्वादशी एक तिथिव्रत. माघ शुद्ध द्वादशीला हे व्रत करायचे असते. विष्णूचा अवतार वराह ही या व्रताची देवता आहे. व्रतविधी असा– एकादशीला व्रतसंकल्प व पूजा करावी. एका पात्रात सुवर्णाची, चांदीची अथवा तांब्याची नाणी व सर्व प्रकारची धान्यबीजे घालून, त्यांवर वराहाची सोन्याची मूर्ती ठेवावी आणि तिची पूजा करावी. रात्री जागर करावा. द्वादशीला पूजेतील वराहाची मूर्ती ब्राह्मणाला दान द्यावी. फल– सौभाग्य, संपत्ती, सौंदर्य व पुत्र यांची प्राप्ती. [हि. ध.]

वराहपुराण एक महापुराण. विष्णुपुराणातल्या सूचीप्रमाणे हे बारावे व देवीपुराणान्वये अकरावे आहे. हे पुराण वराह अवतारी विष्णूने पृथ्वीला सांगितले आहे. मूळ पुराण मानवकल्पापासून सुरू झाले होते. पण उपलब्ध प्रतीत मानवकल्पापासूनचा भाग आढळत नाही. याचा प्रारंभश्लोक असा –

नमस्तस्मै वराहाय लीलयोद्धरते महीम् ।
खुरमध्यगतो यस्य मेरुः खणखणायते ॥

अर्थ – लीलेने पृथ्वीचा उद्धार करणाऱ्या त्या वराहाला नमस्कार असो. त्याच्या पायांच्या मध्ये सापडलेला मेरू खणखण असा आवाज करतो.

प्रस्तुत पुराणात एकूण २१८ अध्याय आहेत. यात स्कंध, कांड, पर्व, इ. विभाग नसून, सरळ अध्यायक्रम आहे. पण बारकाईने पाहिल्यास याचे दोन भाग दिसून येतात. पहिला भाग अध्याय १ ते १९२ व दुसरा १९३ ते २१८. श्री. हरप्रसाद शास्त्री यांच्या मते याचे तीन विभाग पडतात– अध्याय १ ते ११२ हा पहिला, ११३ ते १९२ हा दुसरा व १९३ ते २१८ हा तिसरा. डॉ. हाजरा यांच्या मते याचे चार भाग पडतात–अध्याय १ ते ११२ हा पहिला, ११३ ते १९२ हा दुसरा, १९३ ते २१२ हा तिसरा आणि २१३ ते २१८ हा चौथा. डॉ. हाजरा यांची ही विभागणी सयुक्तिक वाटते; कारण या चार भागांमध्ये भिन्न भिन्न व्यक्तींत झालेले संवाद निरनिराळे सांगितले आहेत.

प्रस्तुत पुराणात २४००० श्लोक असल्याचे सांगितले आहे. पण कलकत्ता येथील संस्करणात केवळ १०,७०० श्लोकच आहेत. यावरून असे वाटते, की या पुराणाचा बराच मोठा भाग आजवर उपलब्ध झालेला नाही. यातला पुष्कळसा भाग इ. स. ८०० पूर्वीचा असावा. पण काही भाग इ. स. ११००च्या सुमाराचा, तर काही भाग १५ व्या शतकातला आहे. यावरून या पुराणाची रचना इ. स. ७०० ते १५०० यांच्या दरम्यान झाली असावी, असे अनुमान करता येते. श्री. बलदेव उपाध्याय इ. स. चे नववे, दहावे शतक हा याच्या निर्मितीचा काल मानतात.

नारदपुराणातील सूचीप्रमाणे बहुतेक विषय या पुराणात आहेत. त्याच सूचीवरून, याचा एक पाचवा भाग असावा, असे वाटते. त्या भागात पुलस्त्य व कुरुराज यांचा संवाद, तसेच अनेक तीर्थांचे माहात्म्य असावे. विविध धर्माख्याने व पुष्करपर्व हा भागही त्यात होता. पण तोही सांप्रत मिळत नाही.

हे महापुराण असले, तरी यात सर्गप्रतिसर्गादी पुराणलक्षणे आढळत नाहीत. प्रस्तुत पुराण हे वैष्णव पुराण आहे. विष्णूच्या उपासनेविषयी पुष्कळ कथा यात दिलेल्या आहेत. कोकामुख, कुब्जाम्रक, सौकर, हृषीकेश, रुरू या क्षेत्रांची माहात्म्ये यात सांगितलेली असून, शिव व देवी यांचे माहात्म्य सांगणाऱ्या काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कथाही दिलेल्या आहेत. प्रत्येक अवताराची द्वादशीमाहात्म्य-कथा यात आहे; तसेच अनेक व्रते व तीर्थे वर्णिलेली आहेत.

भूवराहस्वामी – कांची

मथुरामाहात्म्य जास्त विस्ताराने सांगितलेले आहे. पण ही मथुरा कोणती, असा संभ्रम पडतो. मथुरेच्या जवळ यमुना व सरस्वती यांचा संगम झाल्याचे या पुराणात म्हटले आहे. पण सांप्रतच्या मथुरेत यमुनाच आहे. कदाचित सरस्वती नावाची दुसरी कोणती तरी पूरक नदी असावी. यातले गोकर्ण हे कर्नाटकातले गोकर्ण नसून, ते नेपाळातले आहे. या सर्व तीर्थवर्णनावरून असे वाटते, की प्रस्तुत पुराणातला पहिला भाग उत्तर भारतात रचला गेला असावा आणि शेवटचा भाग नेपाळात तयार झाला असावा.

श्राद्धकल्प, सदाचार, वर्णाश्रमधर्म, प्रायश्चित वगैरे इतर पुराणांत आढळणारा भाग याही पुराणात आहे. दानमाहात्म्यात पर्वतदान व धेनुदान प्रशंसनीय मानलेले असून, प्रत्येक वस्तूचे पर्वत व धेनू बनवून दान करावे, असे यात सांगितले आहे. नचिकेताच्या आख्यानात यमलोक, स्वर्ग, नरक व पापपुण्य यांचे विशेष वर्णन आहे. मात्र कठोपनिषदातल्या याच आख्यानातली अध्यात्मदृष्टी यात आढळत नाही.

निबंधग्रंथांपैकी चतुर्वर्गचिंतामणी, दानसागर, इ. कित्येक ग्रंथांत वराहपुराणातील उतारे व वचने घेतलेली आहेत; तर कित्येक निबंधग्रंथांतील वचने वराहपुराणात आज्ञी आहेत. चातुर्मास; त्र्यंबक, भगवद्गीता, वेंकट इत्यादींची माहात्म्ये असलेल्या कित्येक पोथ्या वराहपुराणांतर्गत मानतात; पण उपलब्ध प्रतीत वरील माहात्म्ये आढळत नाहीत.

या पुराणाचे गौडीय व दाक्षिणात्य असे दोन पाठ आढळतात. या दोहोंत गौडीय पाठ विशेष प्रसिद्ध आहे.

वराहपुराणात रामानुजीय श्रीवैष्णव मताच्या सिद्धान्तांचे विस्तृत प्रतिपादन आढळते. नारायणाची आदिदेव या रूपाने प्रतिष्ठा, ज्ञानकर्मसमुच्चय, सृष्टिप्रकार, भुवनकोश, श्राद्धानुष्ठान, द्वादशीची विष्णुपूजा, नाना धातूंच्या विष्णुप्रतिमा, त्यांची प्रतिष्ठा, आराधनेचे प्रकार, पांचरात्रमताला दिलेले प्रामाण्य, इ. वराहपुराणात वर्णिलेले विषय रामानुजसंप्रदायाने स्वीकारलेले आहेत. पुराण व संप्रदाय या दोहोंतली ही समता विशेष लक्षणीय आहे.

या पुराणातील काही सुभाषिते खाली दिली आहेत-

सुरूपां परनारीं तु दृष्ट्वा चक्षुर्निमीलयेः ।
परद्रव्येषु मा लोभोऽन्यायोपार्जितेषु च ॥

(वराहपु. १३७.१९३)

अर्थ – सुंदर अशा परस्त्रीला पाहिल्यावर डोळे मिटून घ्यावे. अन्यायाने मिळवलेल्या व दुसऱ्याच्या धनाचा लोभ धरू नये.

सत्यमूलं जगत्सर्वं लोकाः सत्ये प्रतिष्ठिताः ।

(वराहपु. १३८ १५०)

अर्थ – सर्व जगत् हे सत्यमूलक असून, सर्व लोक हे सत्याच्या ठिकाणी प्रतिष्ठित आहेत.

चित्तं नाशो हि लोकस्य चित्तं मोक्षस्य कारणम्।

(वराहपु. १४२.२८)

अर्थ – चित्त हे माणसांना जसे नाशकारक तसेच मोक्षकारकही आहे.

मात्सर्यं सर्वनाशाय मात्सर्यं धर्मनाशकम् ।

(वराहपु. १४८.३५)

अर्थ – दुसऱ्याचा मत्सर करण्याने सर्वनाश होतो व धर्माचाही नाश होतो.

वित्तेनापि विहीनस्य कुटुम्बभरणं कुतः।

(वराहपु. १५२.५५)

अर्थ – माणूस द्रव्यहीन झाला की, त्याच्या हातून कुटुंबपोषण कुठून होणार !

पाहा – वराह अवतार. [डॉ. वा. मो. कानिटकर – स्वराज्य ८ ऑक्टोबर १९६६; पु. वि.; पु. नि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वराहमिहिर (इ. स. चे ६ वे शतक) एक प्रख्यात गणिती व ज्योतिषी. याने आपल्या बृहज्जातक नामक ग्रंथात स्वतःच्या पित्याचे नाव आदित्यदास असे दिले आहे. हा शाकद्वीपी ब्राह्मण असून, मगधातील कांपिल्ल म्हणजेच सध्याचे कालपी हे याचे जन्मस्थान होय, असे भट्टोत्पल या टीकाकाराने म्हटले आहे. परंतु बृहज्जातकातील एका श्लोकात, त्याला कापित्थक येथे सूर्याचा वरप्रसाद प्राप्त झाला, असे म्हटले आहे. कापित्थक म्हणजे माळव्यात उज्जयिनीपासून जवळच असलेले कायथा हे गाव होय. तिथेच वराहमिहिर जन्मला, असे काही पंडित मानतात. तिथे पित्याजवळ त्याने प्राथमिक ज्ञान मिळवले आणि मग तो उज्जयिनीच्या राजाच्या आश्रयाला गेला. तिथे त्याचे वास्तव्य दीर्घ काल झाले असावे.

याच्या पंचसिद्धान्तिका या करणग्रंथात शके ४२७ हे आरंभवर्ष मानलेले आहे. काही पंडितांनी तेच त्याचे जन्मवर्ष मानले आहे. पण त्या वर्षी तो ग्रंथ रचला असे मानले, तर त्यापूर्वी निदान १५-१६ वर्षे तरी त्याचा जन्म झाला असला पाहिजे. म्हणजे शके ४१२ किंवा इ.स. ४९० या वर्षी त्याचा जन्म झाला असावा, असे शं. बा. दीक्षितांचे मत आहे. शके ४२७ हा त्याचा कदाचित जन्मशक असेल, म्हणून त्याने ते वर्ष आरंभवर्ष मानले असेल, असेही संभवनीय आहे. शके ५०९ या वर्षी तो मृत्यू पावला, असे ब्रह्मगुप्तटीकाकार आमराज याने म्हटले आहे.

ज्योतिर्विदाभरण नामक ग्रंथात, उज्जयिनीचा राजा विक्रमादित्य याच्या नवरत्नांमध्ये वराहमिहिराचा अंतर्भाव केला आहे. पण सनपूर्व पहिले शतक हा विक्रमादित्याचा काल मानला जातो. त्यामुळे त्याच्या दरबारातील वराहमिहिर वेगळा असावा. बृहत्संहिताकार वराहमिहिर इ. स. च्या ६ व्या शतकात होऊन गेला, याविषयी दुमत नाही.

वराहमिहिराने गणित, जातक व संहिता या ज्योतिषाच्या तीन्ही शाखांवर ग्रंथ रचले आहेत. त्यांची नावे अशी – (१) लघुजातक (२) बृहज्जातक (३) विवाहपटल (४) योगयात्रा (५) बृहत्संहिता व (६) पंचसिद्धान्तिका.

दीक्षितांच्या मते याच्या ग्रंथांचा क्रम पंचसिद्धान्तिका, विवाहपटल, बृहज्जातक, लघुजातक, योगयात्रा व बृहत्संहिता असा असावा. पंचसिद्धान्तिका या ग्रंथात पितामह, वसिष्ठ, रोमक, पुलिश व सूर्य या पाच प्राचीन सिद्धान्तांचा सारांश दिलेला आहे. हे सिद्धांत सांप्रतच्या सूर्यादी पाच सिद्धान्तांहून भिन्न आहेत. पंचसिद्धान्तिकेतील सिद्धान्त वराहमिहिरकृत नसून, ते अपौरुषेय अर्थात अत्यंत प्राचीन मानले जातात. डॉ. गोरखप्रसाद यांच्या मते पंचसिद्धान्तिका हा एक करणग्रंथच आहे. करणग्रंथ म्हणजे कामचलाऊ किंवा सुगम गणना करण्याचे पुस्तक, असे त्यांनी म्हटले आहे. त्यात एक निकटचा दिवस घेऊन तिथपासून कालगणना केली जाते. ज्या ग्रंथात कलियुगाच्या आरंभापासून गणना करतात, त्याला सिद्धान्तग्रंथ मानतात. करणग्रंथातील आरंभकाल म्हणून ग्रंथकाराच्या रुचीप्रमाणे ग्रंथारंभाचा दिवस, ग्रंथकाराचा जन्मदिवस किंवा एखादा राजा सिंहासनावर बसला असेल तो दिवस, असा कोणताही दिनविशेष निवडला जातो. पंचसिद्धान्तिकेमधील रोमकसिद्धान्ताला अनुसरून अहर्गण बनविण्यासाठी शक वर्षातून ४२७ वजा करण्याचा आदेश ग्रंथकाराने दिला आहे. त्याचा अर्थ असा, की शके ४२७ हे आरंभवर्ष मानून अहर्गणादिकांचे गणित करावे. काही पंडित हे वर्ष वराहमिहिराचे जन्मवर्ष मानतात; तर काही ग्रंथारंभकाल मानतात.

पंचसिद्धान्तिका या ग्रंथात त्रैलोक्य-संस्थान नामक तेरावा अध्याय आहे. तो पाचांपैकी कोणत्याही सिद्धान्ताशी संबधित दिसत नाही. बहुधा तो वराहमिहिराने स्वतंत्रपणे स्वतःच रचला असावा. त्यात विश्वाची रचना आणि अन्य काही गोष्टी आहेत. पृथ्वीचा गोल अंतरिक्षात अधांतरी फिरत आहे व त्याला कशाचाही आधार नाही, हे वराहमिहिराला ज्ञात होते.

पंचसिद्धान्तिकेच्या 'छेदकयन्त्राणि' नामक १४ व्या अध्यायात वराहमिहिराने काही यंत्रांचे वर्णन केले आहे व काही रीतींची माहिती दिली आहे.

वराहमिहिराचा बृहत्संहिता हा ग्रंथ म्हणजे एक विशाल ज्ञानसागरच आहे. हा ग्रंथ छंदोबद्ध असून, त्याची भाषा सुंदर व काव्यमय आहे. पूर्वी, ज्योतिषाच्या सर्व शाखांचे विवेचन ज्यात आहे, त्या ग्रंथाला संहिता असे म्हणत. पण वराहमिहिराच्या वेळी गणित व होरा यांखेरीज तिसऱ्या शाखेला संहिता म्हणू लागले. वराहाच्या बृहत्संहितेत पहिल्या १३ अध्यायांत सूर्य-चंद्रादी ग्रहांच्या गती व त्यांची फले; तसेच अगस्ती, सप्तर्षी यांच्या उदयकालाची फले व ग्रहणे यांची माहिती दिलेली आहे. चौदावा कूर्माध्याय आहे. त्यात भरतखंडाचे नऊ विभाग व त्यांतले निरनिराळे देश, त्या विभागांवर असलेले भिन्न भिन्न नक्षत्रांचे आधिपत्य, नक्षत्रव्यूह आणि ग्रहांची युद्धे व समागमफले सांगितली आहेत. पुढे वर्षफलविचार केला आहे. त्यानंतर गृहशृंगाटक प्रकरण आहे. त्यांत रवीजवळ किंवा एखाद्या नक्षत्राजवळ काही ग्रह एका काळी धनुष्य, शृंग, इ. आकारांत दिसले; तर त्याची फले कोणती ते सांगितले आहे. पुढे पर्जन्यगर्भलक्षण, गर्भधारण, वर्षण, हे विषय आहेत. त्यात मार्गशीर्षादी मासांत पर्जन्यवृष्टी कशी होईल, याचे विवेचन केलेले आहे. या प्रकरणात पर्जन्य मोजण्याची रीतही दिली आहे. त्यानंतर रोहिणी, स्वाती, आषाढा व भाद्रपदा यांचा चंद्राशी योग होतो, त्याची फले दिली आहेत. मग संध्यासमयी आकाशात दिसणाऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रक्तिमा, दिग्दाह, भूकंप, उल्का, परिवेष (खळे), इंद्रधनुष्य, इ. सृष्टिचमत्कारांची चर्चा केली आहे. नंतर इंद्रध्वज, नीराजन, खंजन नामक पक्ष्याच्या दर्शनाचे फल, दिव्य, अंतरिक्ष व भौम या तीन प्रकारच्या उत्पातांचे वर्णन, इ. विषय आहेत. त्यानंतर वास्तुप्रकरण आहे. ते विस्तृत असून, त्यात गृहरचनेविषयी माहिती आहे. पुढे उदकार्गल या प्रकरणात भूगर्भातील जलाचा शोध कसा करावा, हे सांगितले आहे. त्यानंतर वृक्षायुर्वेद व प्रासादलक्षण ही प्रकरणे असून, मग वज्रलेप म्हणजे एक प्रकारचा चुना करण्याची माहिती आहे. नंतर देवप्रतिमानिर्मिती, वास्तुप्रतिष्ठा, पशुपक्षी व मनुष्य यांची लक्षणे, रत्नपरीक्षा, दीपलक्षण, दंतधावन, शकुन, तिथिनक्षत्रकरण यांची फले व गोचर ग्रहांची फले दिली आहे.

वराहाने जागजागी गर्ग, पराशर, असित, देवल, वृद्धगर्ग, कश्यप, भृगु, वसिष्ठ, बृहस्पती, मनू, मय, सारस्वत, इ. ऋषींची नावे देऊन, त्यानी सांगितल्याप्रमाणे अमुक विषय सांगतो, असे म्हटले आहे. त्यावरून त्यांचे ग्रंथ त्या वेळी उपलब्ध असावे.

वराहमिहिराचे विवाहपटल व योगयात्रा हे ग्रंथ सांप्रत उपलब्ध नाहीत. बृहज्जातक हा त्याचा होराशास्त्रावरील ग्रंथ बृहत्संहितेप्रमाणेच फार उपयुक्त आहे. जन्मकालाच्या ग्रहस्थितीवरून मनुष्याच्या सुखदुःखांविषयी भविष्य वर्तवण्यासाठी लागणारी राशी व ग्रह यांची कोष्टके, लग्नसारिणी, आयुर्दाय व दशाविपाक यांविषयी सोपी रीत, इ. विषय या ग्रंथात आहेत. हा ग्रंथ इतर जातकसंबंधी ग्रंथांपेक्षा सोपा व सयुक्तिक आहे. त्याचप्रमाणे नाभसयोग, चंद्रयोग, राजयोग, इ. प्रकरणांचा गोषवारा काढून, सर्वांचे सारांश फल कसे कल्पावे, याबद्दलची सुगम रीत या ग्रंथात दिली आहे. लघुजातक हा ग्रंथ म्हणजे बृहज्जातकाचाच संक्षेप आहे.

वराहमिहिराच्या ग्रंथांत यवनसिद्धान्तांचा उल्लेख आहे. त्यावरून काही विद्वानांची अशी समजूत झाली, की नवीन भारतीय ज्योतिष यवनांच्या ज्योतिषावर आधारलेले असावे. पण ती भ्रामक आहे. गुप्तकाली अनेक परदेशी लोक भारतात आले होते. त्यांच्या संपर्कामुळे वराहमिहिराला यवनज्योतिषाची माहिती मिळाली असावी. ती वराहमिहिराने आपल्या ग्रंथांत समाविष्ट केलेली असली, तरी त्याच्या ग्रंथांचे मूलाधार प्राचीन ज्योतिषग्रंथच आहेत. श्री. शं. बा. दीक्षितांनी वराहमिहिराचा गौरव पुढील शब्दांत केला आहे – 'ब्रह्मगुप्ताने पूर्व ज्योतिष्यांस दोष दिले आहेत, परंतु त्यात वराहमिहिरास कोठे दोष दिला नाही. भास्कराचार्यांनीही त्याची स्तुती केली आहे. सृष्टिज्ञानाच्या ज्योतिःशास्त्र या एका शाखेवर ग्रंथ करणारे पुष्कळ झाले; परंतु त्याच्या अनेक शाखांवर विचार करणारा ज्योतिषी दुसरा झाला नाही. याने प्रथम करणग्रंथ केला. परंतु पुढे त्याचे लक्ष फलज्योतिषाकडे, विशेषतः नाना प्रकारचे सृष्ट चमत्कार, पदार्थांचे गुणधर्म आणि त्यांचा व्यवहारात उपयोग याकडे फार लागले असावे, असे त्याच्या संहिताग्रंथावरून दिसते. इतक्या प्राचीन काळी असा मनुष्य आमच्या देशात झाला हे मोठे भूषण होय.'

जैन साहित्यात वराहमिहिराविषयी काही दंतकथा आढळतात. पण तो वराहमिहिर कदाचित वेगळा असावा, असे वाटते. [भा. ज्यो. शा.; भा. ज्यो. इ.; गु. सा. इ.; सार्थ बृहज्जातक-श्री. दे. अ. देशपांडे, १९५६; वि. स्मृ. ग्रं.]

वराहमूल काश्मीरमधील एक प्रेक्षणीय स्थान. याला सांप्रत बारामुल्ला म्हणतात. हे क्षेत्र झेलमच्या काठी काश्मीर दरीच्या पश्चिम मुखाशी आहे. म्हणून याला काश्मीरचे किंवा नंदनवनाचे द्वार म्हणतात. हे आदिवराहाचे स्थान असल्याचे राजतरंगिणीत (६. १८६) म्हटले आहे. [हि. ध.]

वरुण एक सर्वश्रेष्ठ वैदिक देवता. वृ = वेढणे, आच्छादणे, या धातूपासून वरुण शब्द सायणाचार्यांनी व्युत्पादिला आहे. पापी लोकांना बंधनामध्ये परिवेष्टित करतो किंवा त्यांना अंधाराप्रमाणे आच्छादित करतो तो वरुण होय. पण डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या मते वरुण शब्द UERU-N-OS म्हणजे बांधणारा, बंधनात ठेवणारा या युरो-भारतीय रूपाशी सदृश आहे. वरुणाचे पाश, किंबहुना वरुणाशी संबंध असलेल्या सर्व कल्पना या व्युत्पत्तीस पुष्टीच देतात, असे त्यांनी म्हटले आहे.

तुलनात्मक दृष्ट्या इंद्राच्या सूक्तांपेक्षा वरुणाची सूक्ते फार कमी असली, तरी वरुणाचे महत्त्व कमी नाही. ऋग्वेदात वरुणाच्या स्वरूपवर्णनापेक्षा त्याच्या नैतिक गुणांवर अधिक जोर दिलेला आढळतो. त्याचे वर्णन – वरुण हा सुमुख, अग्नीसारखा तेजस्वी, सुंदर; डोळ्यात पिवळी झाक असलेला, सूर्याच्या सहस्र नेत्रांनी मानवजातीला पाहणारा, चांगल्या हातांचा, टक्कल पडलेला व वृद्ध आहे. तो सुवर्णासारखे कांतिमान वस्त्र (द्रापी) नेसतो, (ऋ. १.२५.१३). त्याचा रथ सूर्याप्रमाणे चकाकतो. त्याचे निवासस्थान सुवर्णाचे आणि भव्य असून, त्याला हजार खांब व हजार दारे आहेत. हे घर द्युलोकात असून, वरुण त्या स्थानी बसून मानवांच्या सर्व कृत्यांचे अवलोकन करतो. याविषयी दोन ऋचा (ऋ. १.२५.१०–११) अशा –

निषसाद धृतव्रतो वरुणः पस्त्या स्वा। साम्राज्याय सुक्रतुः॥
अतो विश्वान्यद्भुता चिकित्वाँ अभिपश्यति।
कृतानि या च कर्त्वा॥

अर्थ – सामर्थ्यसंपन्न आणि नियमन करणारा (लोकपालक)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वरुण स्वगृही बसून (विश्वाचे) साम्राज्य चालवतो. आमची भूत आणि भविष्यकालीन, तसेच जाणीवपूर्वक किंवा अजाणता केलेली सारी कृत्ये यांचे सर्वज्ञ वरुण निरीक्षण करतो.

वरुणाच्या सामर्थ्याविषयी वैदिक ऋषींना फार आदर आहे. वरुण हा अदृश्य व अजिंक्य असल्याचे सांगणारी याच सूक्तातली पुढची ऋचा (१.२५.१४) अशी –

न यं दिप्सन्ति दिप्सवो न द्रुह्वाणो जनानाम् ।
न देवमभिमातयः ॥

अर्थ – हिंसक लोक वरुणाची हिंसा करू शकत नाहीत, मत्सरी लोक त्याचा द्रोह करू शकत नाहीत. साहसी लोक त्याच्याशी वैर करण्यास धजावत नाहीत.

वरुण जलांचे नियंत्रण करतो. तो जलांचे वस्त्र अंगावर घेतो. तो सागरजलातून मार्गक्रमण करतो. नद्या सतत समुद्राला मिळत असूनही समुद्र पूर्ण भरत नाही, हे वरुणाच्याच गूढ शक्तीचे सामर्थ्य होय (ऋ. ५.८५.६).

वरुण सर्वज्ञ आहे. नीतीचा शास्ता या नात्याने तो अन्य सर्व देवतांपेक्षा श्रेष्ठ आहे. मानवाच्या खऱ्या खोट्या सर्व गोष्टीही त्याला कळतात. त्याचे विधिनियम स्थिर असतात व ते देवांना-देखील मोडता किंवा उल्लंघिता येत नाहीत (ऋ. ५.६९.४). तसा कोणी प्रयत्न केल्यास वरुण क्रोधाविष्ट होऊन त्याला कडक शिक्षा करतो (ऋ. ७.८६.३). वरुणाचे पाश प्रसिद्ध आहेत. असत्य भाषण करणाऱ्याच्या भोवती ते सात किंवा तीन फेऱ्यांनी वेढले जातात. (अथर्व. ४.१६.६)

ऋग्वेदात पुष्कळदा मित्रावरुण हे जोडीने आढळतात. मित्र ही आदित्यदेवता आहे. त्यावरून प्रारंभी वरुण ही आकाशाची देवता मानली जात असावी. मित्र म्हणजे सूर्य याच्यापेक्षा आकाश फार मोठे आहे. त्यावरून वरुणाचे व्यापकपण कळून येते. सूर्य व आकाश यांचे निकटचे नाते सहजच लक्षात येण्याजोगे आहे. आकाशाचा नेत्र म्हणजे सूर्य ही कल्पना स्पष्ट आहे. आकाशाला केवळ दिवसाच नव्हे; तर रात्रीही चंद्र व तारे यांच्या डोळ्यांनी सर्वांकडे पाहता येते. वरुणाचे हजारो हेर असतात, असे म्हटले आहे. ते हेर म्हणज तारेच असावे. यावरून वरुण ही मुळात आकाशदेवता मानली गेली असावी, हे अनुमानिता येते.

पुढे ब्राह्मणकालात रात्रीच्या वेळचे आकाश हे वरुण शब्दाने सूचित होऊ लागले. मित्रावरुणांपैकी मित्र हा दिवसाचा स्वामी आणि वरुण हा रात्रीचा स्वामी, असे मानण्याची प्रवृत्ती तैत्तिरीय संहितेत दिसून येते (२.१.७:४). वरुणाच्या नैसर्गिक अधिष्ठानाची कल्पना लुप्त झाल्यामुळे अशी प्रवृत्ती झाली असावी. पुढे यज्ञ-संस्थेच्या विकासाच्या काळात प्रजापती हा सर्वश्रेष्ठ देव ठरला आणि वरुणाचे सत्ताक्षेत्र कमी होता होता वेदोत्तर काळात केवळ सागरावरची सत्ता तेवढीच त्याच्या वाट्याला उरली. सात नद्या एखाद्या मोठ्या खाईत पडाव्या, तशा वरुणाच्या मुखात पडतात (ऋ. ८.६९.१२) हे ऋग्वेदातले वरुणवर्णन त्याचे सागराधिपत्यच दाखवते.

वरुण या देवतेविषयी सर्वांगीण आणि मूलभूत असा विचार डॉ. रा. ना. दांडेकर यांनी केला असून, त्याचा सारांश असा –

ऋग्वेदात वरुणाचा वारंवार आणि अतिशय प्रामुख्याने 'असुर' या शब्दाने उल्लेख केला गेलेला आहे (१.३५.७; २.२७.१०; ७.६५.२; ८.४२.१). इतर ऋग्वेदीय देवतांनाही 'असुर' हे विरुद कधी कधी लावल्याचे आढळते. परंतु या सर्व उल्लेखांचा तौलनिक अभ्यास केला असता असे दिसून येईल, की 'असुर' ही वरुण देवतेचीच विशेष निविद आहे. वरुणासंबंधी ऋग्वेदातील दुसरा अतिशय महत्त्वाचा उल्लेख म्हणजे तो ऋताचे – वैश्विक धर्माचे, रक्षण करणारा आहे, हा होय, (१.२३.५). वरुणास 'ऋतस्य गोपा' किंवा 'ऋतावान्' असे म्हटलेले आहे. तो 'धृतव्रत' असून, त्याने अखिल विश्वाच्या योग्य प्रवर्तनासाठी घालून दिलेले नियम अबाध्य आहेत. वरुण हा सर्व उदकसमूहांचा शास्ता आहे (२.२८.४; ५.८५.६; ७.६४.२). किंबहुना सृष्टीतील सर्व घटनांचे प्रवर्तन आणि नियमन त्याच्याचकडून होत असते.

ज्या शक्तीच्या प्रभावाने वरुणास विश्वाच्या सर्व लहान मोठ्या घटकांवर अधिराज्य चालविता येते, त्या शक्तीस ऋग्-वेदात 'माया' असे म्हटले आहे. या मायेच्या प्रभावानेच वरुण हा देवांचा आणि मानवांचा (२.२७.१०; १०.१३२.४), सर्व जातमात्राचा, अखिल विश्वाचा (५.८५.३) 'सम्राट' गणला गेला आहे (१.२५.१०).

इंद्र व इतर वैदिक देवता यांच्या तुलनेने वेदांत वरुणविषयक पुराणकथा फारशा आढळून येत नाहीत. तसेच वैदिक कवींनी ज्या प्रमाणात इतर वैदिक देवतांवर मानवी स्वरूपांचा आरोप केलेला आहे, त्या प्रमाणात तो वरुण देवतेवर केलेला नाही.

असुर हा वैदिक शब्द सुर या संस्कृत शब्दापेक्षा फार प्राचीन आहे. एवढेच नव्हे; तर असुर हाच शब्द मूळचा आहे. तो असु आणि र या दोन शब्दांनी साधला आहे. र चा अर्थ स्वामित्व असणारा असा आहे. ज्याच्या जवळ विशेषत्वाने असु आहे, असा त्याचा अर्थ होतो. असु ही एक यात्वात्मक शक्ती आहे व ती रसमय आहे. देव, मानव, पशू आणि विश्वातील इतर वस्तू या सर्वांमध्ये हा यात्वात्मक रस असतो आणि त्यामुळेच त्या सर्वांचे धारण व व्यापार शक्य होतात. हीच यात्वात्मक रसशक्ती वरुणाची माया होय. ही माया म्हणजे योजनाप्रधान, निर्वाणा-त्मक, घटनात्मक व विरचनात्मक अशी वरुणाची शक्ती आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन आर्यांच्या मतानुसार असुर वरुणाचे सर्व विश्वावर अधिराज्य होते. इंद्रासह सर्व देवांमध्ये वरुणच श्रेष्ठ समजला जात होता. ही अवस्था ऋग्वेदाच्या काही भागांत आणि प्रकर्षाने अवेस्ता या ग्रंथात दृष्टीस पडते. पुढे विजिगीषू वैदिक आर्यांनी आपल्या महत्त्वाकांक्षेला आणि युयुत्सू वृत्तीला अनुसरून इंद्राचे वर्चस्व मान्य केले आणि त्याला आपली राष्ट्रीय देवता बनविले. त्यामुळे जुन्या वरुणाधिष्ठित आणि नव्या इंद्राधिष्ठित दैवतशास्त्रीय कल्पनांमध्ये विरोध निर्माण झाला व अखेरीस इंद्राचे वर्चस्व सुप्रतिष्ठित झाले. मात्र काही वैदिक आर्यांनी वरुणाधिष्ठित दैवतशास्त्रीय कल्पनाच साक्षेपाने उचलून धरली. अशा वैदिक आर्यांत वासिष्ठांचा प्रामुख्याने उल्लेख करायला पाहिजे. इंद्र आणि वरुण या दोन देवतांमध्ये नैसर्गिकपणेच निर्माण झालेला विरोध शक्य तितका नाहीसा करून त्यांच्यामध्ये समेट घडवून आणायचा प्रयत्न विशेषतः वसिष्ठ कुळातल्या ऋषींनी केला आहे. इंद्र हा जेता खरा; पण जित लोकांचा नियंता किंवा शास्ता वरुणच होय, अशी कल्पना वासिष्ठांनी मांडली आहे.

महाभारतात वरुणाला चौथा लोकपाल, कश्यप व अदिती



वरुणाची मूर्ती – चालुक्य शैली

यांचा पुत्र, जलाचा स्वामी व जलातच निवास करणारा असे मानले आहे. तो बारा आदित्यांपैकी एक आहे. वरुणाने अन्य देवतांसह विशाखयूप या क्षेत्रात तपश्चर्या केली आणि त्यामुळे ते स्थान पवित्र मानले गेले. देवतांनी त्याला जलेश्वरपदावर अभिषेक केला. सोमाची कन्या भद्रा हिच्याशी त्याचा विवाह व्हायचा होता; पण सोमाने आपली मुलगी उचथ्य ऋषीला दिली. त्यामुळे क्रुद्ध होऊन वरुणाने भद्रेचे अपहरण केले. पण उचथ्याने समुद्राचे सारे जल पिऊन टाकल्यामुळे वरुणाचा आश्रय तुटायची वेळ आली आणि त्याने भद्रेला उचथ्याच्या स्वाधीन केले. अग्नीने वरुणाला दिव्य धनुष्य, अक्षय भाते व कपिध्वज रथ या वस्तू बक्षिस दिल्या. वरुणाने अर्जुनाला पाश नामक अस्त्र दिले. त्याने ऋचीक मुनीला एक हजार श्यामकर्ण अश्व दिले. त्याने स्कंदाला यम व अतियम असे दोन पार्षद दिले. आपला पुत्र शतायुध याला त्याने गदा दिली. रावणाच्या बंदीतून सीता मुक्त झाल्यावर ती निष्कलंक असल्याचा निर्वाळा त्याने रामाला दिला.

वरुणाच्या ज्येष्ठ पत्नीचे नाव ज्येष्ठादेवी असे होते व ती शुक्राचार्यांची कन्या होती. तिला बल, अधर्म व पुष्कर नावाचे पुत्र झाले व सुरा नावाची एक कन्या झाली. बंदी नावाचा आणखीही एक मुलगा वरुणाला होता.

वरुणाने यज्ञोत्पन्न भृगूचाही पुत्ररूपाने स्वीकार केला होता. अगस्त्य व वसिष्ठ हे दोघे मित्रावरुणांचे पुत्र होत.

देवपूजेत कलशावर वरुणाचे आवाहन करतात. पुण्याहवाचन व इतर अनेक धार्मिक, याज्ञिक, शांतिक, पौष्टिक, इ. कृत्यांत प्रारंभी कलशस्थापना करून त्यावर वरुणाचे आवाहन व पूजन करण्याची प्रथा आहे.

पुराणांनुसार वरुण हा पश्चिम दिशेचा व नाग लोकांचा स्वामी आहे. वारुणी, ज्येष्ठा व शीततोया या त्याच्या भार्या आहेत. मानसोत्तर पर्वताच्या मागे त्याची निम्लोचनी नावाची नगरी आहे.

विष्णुधर्मोत्तरपुराणात त्याचे मूर्तिध्यान सांगितले आहे, ते असे – वरुण लंबोदर, चतुर्भुज, सात हंसांच्या रथात बसलेला असा करावा. त्याच्या उजव्या दोन हातांत कमळ व पाश असावे. डाव्या दोन हातांत शंख व रत्नकरंडक असावे. गौरी ही पत्नी त्याच्या डाव्या मांडीवर बसवावी. गंगा व यमुना या त्याच्या दोही अंगीं दाखवाव्या.

पण अशा वर्णनाच्या वरुणप्रतिमा बहुधा आढळत नाहीत. आढळतात त्या द्विभुज व मकरारूढ आहेत. भुवनेश्वर येथे राजराणीच्या मंदिरात वरुणाची एक सुरेख मूर्ती आहे. त्या शिल्पात वरुणाची उभे राहण्याची ढब डौलदार आहे. त्याच्या उजव्या हाती पाश असून, डाव्या हाताची वरदमुद्रा आहे. त्याच्या शरीरावरचे रत्नखचित मुकुट, कंठा, कमरबंद, मोत्यांचे यज्ञोपवीत, कर्णभूषणे, इ. सर्व अलंकार सुंदरपणे कोरलेले आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

[वैं. दे. अ. द.; प्रा. च. को. (हिंदी); वैं. दे. स्था. मं.; डे. हिं. इ.]

वरुणप्रघास चातुर्मास्ययागातील एक अंगभूत याग. या शब्दाची व्युत्पत्ती शतपथ ब्राह्मणात (२.५.२ १) दिली आहे, ती अशी – या यागात यवाची आहुती द्यायची असल्यामुळे आणि यवांवर वरुणाचे स्वामित्व असल्यामुळे या यागाला वरुणप्रघास (घास = खाणे) म्हणतात. पाहा – चातुर्मास्ययाग. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वरुणयक्ष जैन दैवतसमूहातला एक यक्ष. हा मुनीसुव्रताचा सेवक आहे. याचे वर्णन असे – बैलावर बसलेला, गोरा, त्रिनेत्र, चतुर्भुज, आठ तोंडांचा, प्रचंड आणि जटामुकुट धारण करणारा. याच्या चार हातांपैकी तीन हातांत ढाल, खड्ग व फल असते आणि चौथा हात वरद मुद्रेत असतो.

श्वेतांबरमते हा अष्टभुज असून, तो मातुलिंग, गदा, बाण, भाला, मुंगूस, कमल, धनुष्य व कुऱ्हाड धारण करतो. [जै. इ.]

वरुणव्रत एक काम्य व्रत. जो मनुष्य रात्रभर पाण्यात उभा राहून दुसऱ्या दिवशी सकाळी एक गाय दान देतो, त्याला वरुणलोक प्राप्त होतो, असे म्हटले काहे. त्यासाठीच हे व्रत करतात.

या व्रताचा दुसरा पर्याय असा – भाद्रपद शुद्ध प्रतिपदेपासून पौर्णिमेपर्यंत वरुणाची पूजा करावी आणि शेवटी जलधेनूसह छत्री, पादत्राणे व दोन वस्त्रे दान द्यावी. [हि. ध.]

वरु आंगिरस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील शहाण्णवावे सूक्त याने रचले आहे. या सूक्तात इंद्राच्या घोड्यांचे वर्णन आहे. ऐतरेय ब्राह्मणात या सूक्ताचा महासूक्त म्हणून गौरव केला आहे. याची एक ऋचा (ऋ. १०.९६.९) अशी –

स्रुवेव यस्य हरिणी विपेततुः शिप्रे वाजाय हरिणी दविध्वतः।
प्र यत् कृते चमसे मर्मृजद्धरी पीत्वा मदस्य हर्यतस्यान्धसः॥

अर्थ – इंद्राचे श्यामल नेत्र यज्ञपात्रीय स्रुव्याप्रमाणे सोमावर स्थिरावताच त्याचे हरिद्वर्णीय ओठ स्फुरण पावून तो अश्वांच्या साहाय्याने सोमावर तुटून पडतो. [प्रा. च. को.; ऋ. म. भा]

वरूथिनी एकादशी चैत्र वद्य एकादशीला हे नाव आहे. या एकादशीचे व्रत केल्याने ऐश्वर्य प्राप्त होते. मांधाता, धुंधुमार, इ. अनेक राजांनी हे व्रत करून ऐश्वर्य व स्वर्ग मिळविल्याची कथा पद्मपुराणात (उ. खं. अ. ४८) आहे.

वर्कल द. भारतातील एक तीर्थक्षेत्र. हे स्थान त्रिवेंद्रम्च्या उत्तरेला सव्वीस मैलांवर आहे. इथे जनार्दनाचे प्राचीन मंदिर आहे. म्हणून या क्षेत्राला जनार्दन या नावानेच ओळखतात. याशिवाय वर्कलला उदयमार्तंडपूर असेही एक नाव आहे. त्रावणकोरच्या एका राजाच्या नावावरून हे नाव मिळाले, असे म्हणतात. हे ठिकाण गयेसारखेच एक पुण्यक्षेत्र मानले जाते. या स्थानाला वर्कल हे नाव का प्राप्त झाले, त्यासंबंधी एक आख्यायिका आहे, ती अशी –

एकदा नारदाच्या वीणावादनाने विष्णू मुग्ध झाला आणि तो त्याच्या मागून अदृश्यपणे जाऊ लागला. नारद ब्रह्मलोकात गेला. ब्रह्मदेवाने त्याच्या मागे विष्णूला पाहिले आणि नमस्कार केला. पण त्याच वेळी विष्णू लगेच अंतर्धान पावला. हे पाहून तिथे असलेला प्रजापती ब्रह्मदेवाला हसू लागला. ब्रह्मदेवाने त्याला शाप देऊन म्हटले, की 'तू मानव होऊन जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात सापडशील.' तेव्हा नारदाने त्यावर उपाय म्हणून प्रजापतीला तप करायला सांगितले आणि त्याने आपले वल्कल खाली टाकले. ते वल्कल जिथे पडले त्या ठिकाणाला वल्कल हेच नाव मिळाले. वल्कल या शब्दाचेच भ्रष्ट रूप वर्कल होय. प्रजापतीने वर्कलला जनार्दनाचे मंदिर बांधून तिथे तप केले.

या स्थानासंबंधी आणखी एक कथा सांगतात, ती अशी –

एकदा ब्रह्मदेवाने इथे मोठा यज्ञ केला. जनार्दन आपले रूप बदलून तिथे आला आणि त्याने भोजनाची इच्छा व्यक्त केली. ब्रह्मदेवाने त्याला भोजन दिले आणि जनार्दनाने ते अन्न ओंजळीत घेऊन खाल्ले. केलेले सर्व अन्न संपले, पण जनार्दनाची तृप्ती काही झाली नाही. या घटनेवरून ब्रह्मदेवाने जनार्दनाला ओळखले व त्याची करुणा भाकली. मग जनार्दन चतुर्भुज रूपात प्रकट होऊन ब्रह्मदेवाच्या इच्छेसाठी तिथेच स्थिर झाला.

वर्कलमधील जनार्दनमंदिर समुद्राच्या किनाऱ्यावर एका टेकडीवर आहे. मंदिरात जनार्दनाची चतुर्भुज व श्यामवर्ण अशी सुंदर मूर्ती आहे. या मंदिराच्या परिसरात काही अन्यही मंदिरे आहेत. [त्रिवेंद्रम गॅझे.; कल्याण-तीर्थांक]

वर्ण (१) या शब्दाचा रंग असा एक अर्थ आहे. आपल्याला निसर्गसृष्टीत तांबडा, पांढरा, पिवळा, हिरवा, निळा, जांभळा असे विविध रंग व त्यांच्या छटा दिसतात. कोणत्याही वस्तूवर प्रकाशकिरण पडले असता त्यांचे परावर्तन होऊन ते आपल्या नेत्रगोलात शिरले, की मग आपल्याला त्या वस्तूचा रंग समजतो. सूर्याचा प्रकाश आपल्याला शुभ्र दिसतो; पण त्याचे किरण लोलकातून म्हणजे तीन बाजू असलेल्या भिंगातून पार केले असता त्यांचे पृथक्करण होऊन जांभळा, पारवा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निळा, हिरवा, पिवळा, नारिंगी व लाल हे सात रंग वेगळे दृष्टीस पडतात. यावरून पांढरा रंग हा निसर्गसिद्ध मूलवर्ण नसून, तो सात रंगांच्या मिश्रणाने निर्माण होतो, असे न्यूटनने सिद्ध केले आहे. कोणतीही वस्तू ज्या रंगाच्या किरणांचे परावर्तन करते, तो तिचा रंग व पारदर्शक वस्तूमधून ज्या रंगाचे किरण पार जातात, तो तिचा रंग होय. सर्व रंगांच्या प्रकाशलहरींचा वेग सारखा असतो; पण त्यांची आंदोलनसंख्या वेगळी असते. त्यामुळेच आपल्याला त्यांचे भिन्नत्व कळते. पाहा – रंग.

(२) वर्ण शब्दाचे ध्वनी व अक्षर असे दोन अर्थ आहेत. निरनिराळ्या अक्षरांचे ध्वनी भिन्न भिन्न असतात. त्यांनाही वर्ण असेच नाव आहे. वर्ण म्हणजे भाषा अस्तित्वात येण्याकरिता केलेली मूलभूत कल्पना होय.

संस्कृत भाषेत एकूण चौसष्ट वर्ण आहेत; पण कित्येक ऋषी व वैयाकरणी ते त्रेसष्ट आहेत, असे मानतात. एकवीस स्वर, पंचवीस व्यंजने, य र ल व श ष स ह हे आठ, चार यम (पलिक्क्नी, चख्ख्नतु, अग्ग्निं, घ्घ्नन्ति, या चार शब्दांतील क्, ख्, ग् व घ्) अनुस्वार, विसर्ग, दुःस्पृष्ट, लृ व प्लुत असे मिळून एकूण त्रेसष्ट वर्ण होतात.

हे सर्व वर्ण किंवा ध्वनी मनुष्य श्वासोच्छ्वासाच्या क्रियेचा उपयोग करून निर्माण करतो. शरीराच्या ज्या भागांत हवा खेळते, ते सर्व भाग आणि त्या भागांशी ज्यांचा निकटचा संबंध येतो, ते सर्व अवयवही ध्वनिनिर्मितीची आणि ध्वनीतील भेद दर्शविण्याची मलभूत साधने होत. छाती, पोट, फुप्फुसे, श्वासनलिका, कंठ, घसा, तालुपट, तोंड व नाक हे ध्वनियंत्राचे मुख्य घटक आहेत.

प्रथम श्वास घेतल्यावर हवा नाकपुड्यांच्या वाटेने टाळूच्या वर असलेल्या नाकाच्या पोकळीत येते. तिथून ती तालुपटाच्या मागील घशात येते. तिथून कंठप्रदेशात आल्यावर तिच्या पुढे श्वासमार्ग व अन्नमार्ग असे दोन मार्ग येतात. त्यांपैकी श्वासमार्गाने हवा फुप्फुसात शिरते. ही फुप्फुसात साठवलेली हवा श्वासनलिकेतून परत वर आल्यावर तोंडावाटे बाहेर नेण्यात आली, तरच ध्वनिनिर्मिती होऊ शकते.

ही हवा तोंडात आणण्याची रीत अशी – आपण ज्या वेळी श्वास आत घेतो, त्या वेळी नाकपुडी आणि नाकाची पोकळी या मार्गांनी, तालुपटाच्या मागच्या बाजूने हवा श्वासमार्गात प्रवेश करते. तालुपट आड आला नसता, तर काही हवा तोंडातही गेली असती. पण तालुपट हे घसा व तोंड यांना विभागणारे एक दार असून, ते पाहिजे तेव्हा उघडता येते व बंद करता येते. श्वास चालू असताना तालुपट खाली लोंवत असतो आणि हवेची तोंडाकडे जाण्याची वाट बंद असते. हा तालुपट मागच्या बाजूने वर नेऊन बाहेर पडणाऱ्या हवेला नाकाच्या पोकळीत प्रवेश करण्याचा मार्ग आपण पूर्णपणे बंद करू शकतो किंवा थोडी हवा नाकावाटे व थोडी तोंडावाटे जाईल, अशा रीतीने आपल्याला तो अर्धवट बंदही करता येतो. यावरून, तालुपटाची हालचाल ध्वनिनिर्मितीला अपरिहार्य आहे, हे दिसून येईल.

हवा फुप्फुसातून बाहेर येताना कंठ, तालु, मूर्धा, दंत, ओष्ठ इ. अवयवांना स्पर्श करते. त्यामुळे कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्त्य व ओष्ठ्य वर्णांचा उच्चार होतो. हे वर्ण कठिण, मृदू, तीव्र, उग्र, ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत, उदात्त, अनुदात्त व स्वरित असतील त्याप्रमाणे त्यांच्या उच्चाराला आवश्यक तो काल व प्रयत्न लागतो.

वर्णांचे स्वर आणि व्यंजने असे दोन भेद आहेत. अ, आ, इ, इ. स्वर असून, क ते ज्ञ ही व्यंजने आहेत. क, च, ट, त, प या वर्गांतील पहिली दोन अक्षरे कठोर असून, उरलेली तीन मृदू आहेत. तसेच प्रत्येक वर्गातील शेवटचा वर्ण, अनुनासिक आहे. अ, क वर्ग म्हणजे क, ख, ग, घ, ङ आणि ह हे वर्ण कण्ठ्य आहेत. इ, च वर्ग म्हणजे च, छ, ज, झ, ञ आणि य हे वर्ण तालव्य आहेत. ऋ, र, ष आणि ट वर्ग म्हणजे ट, ठ, ड, ढ, ण हे वर्ण मूर्धन्य आहेत. लृ, ल, स आणि त वर्ग म्हणजे त, थ, द, ध, न, वर्ण दन्त्य आहेत. उ, उपध्मानीय आणि प, फ, ब, भ, म, हे वर्ण ओष्ठ्य आहेत. वर्णांचे आणखीही काही भेद आहेत.

मनुष्याला अनेक वर्ण निर्माण करता येतात. पण कोणत्याही भाषेत साधारणपणे पन्नास-साठपेक्षा अधिक वर्ण आढळत नाहीत. एकाच भाषेतील सर्व वर्णांना मिळून वर्णमाला असे म्हणतात. [ध्वनिविचार; भाषाशास्त्र; सा. भा. वि.]

(३) गायनाच्या क्रियेत स्वर प्रकट करण्याच्या ज्या चार पद्धती आहेत, त्यांना वर्ण म्हणतात. स्थायी, आरोही, अवरोही व संचारी अशी त्यांची नावे आहेत. संगीतातील स्वरांचे अलंकार वर्णाश्रित असतात. पाहा – संगीतशास्त्र. [आर्य संस्कृति]

(४) समाजाचे वर्ग किंवा विभाग असाही या शब्दाचा अर्थ केला जातो. हिंदू समाजाचे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र हे जे चार वर्ग प्राचीन काळी अस्तित्वात आले त्यांना वर्ण म्हणतात आणि त्यांवर आधारित समाजव्यवस्थेला चातुर्वर्ण्य म्हणतात. या संस्थेच्या उगमाविषयी पाश्चात्य पंडितांची कल्पना अशी – अत्यंत प्राचीन काळी काही लोक भारतात आले. ते गोरे असून स्वतःला आर्य म्हणत. ज्यांच्याशी ते लढले, ते एतद्देशीय लोक काळे होते. त्यांना आर्य लोक दस्यू म्हणत. त्या दस्यूंपासून आर्यांनी हा देश जिंकला. पण पुढे त्या काळ्या व गोऱ्या लोकांच्या संनिकर्षाने वर्णभेद उत्पन्न झाले. तेच चातुर्वर्ण्याचे मूळ होय.

डॉ. श्री. व्यं. केतकर यांनी वरील कल्पना भ्रांत ठरविली आहे. त्यांच्या मते आर्य हा शब्द वंशवाचक नाही आणि आर्य व दस्यू हे भिन्न वंशाचे लोक नव्हते. माक्स म्यूलरनेही असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रतिपादिले आहे, की आर्य म्हणजे आर्यन भाषा बोलणारे लोक. डॉ. केतकरांनी केलेल्या विवेचनाचा सारांश असा –

वर्ण या शब्दाचा ऋग्वेदातील नेहमीचा अर्थ रंग हाच आहे. वर्ग या अर्थाने हा शब्द ऋग्वेदात क्वचितच आला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्गांचा उल्लेख ऋग्वेदात असला, तरी त्यांपैकी कोणत्याही वर्गाला वर्ण म्हटलेले नाही. वर्णभेदावरून वर्ग झाले असते, तर ते दोनच झाले असते. पण वर्ग चार आहेत आणि त्या चार वर्गांचे चार वर्ण (रंग) होते असे दिसत नाही. हे चार वर्ग केवळ भारतीय नसून, पर्शुभारतीय कालातील असावेत. कारण अशा प्रकारच्या चार वर्गांचे अस्तित्व अवेस्त्यात दिसते. यावरून काळ्या व गोऱ्या लोकांच्या संघर्षामुळे वर्ण या शब्दाला वर्ग हा अर्थ प्राप्त झाला, ही कल्पना ग्राह्य वाटत नाही.

कर्मांच्या भिन्नत्वामुळे समाजाचे चार विभाग होतात, ही कल्पना प्राचीन काळापासून सर्व देशांत आढळते; तशी ती भारतातदेखील पूर्वी होती. गीतेत (४.१३) तसे स्पष्ट वचनच आहे. त्यानंतर चातुर्वर्ण्य जन्माधिष्ठित मानले जाऊ लागले. पहा – चातुर्वर्ण्य. [म. ज्ञा. को. प्रस्तावना खंड, भाग ३; वर्ण व जाती – श्री. गो. वि. पटवर्धन, १९६६]

वर्णमंडल एक शैव मंडल. हे मंडल काढल्याने सर्व इच्छा पूर्ण होतात, असे लिंगपुराणात म्हटले आहे (अ.७७). हा शिवपूजेचाच एक प्रकार आहे. या मंडलाचे वर्णन असे – गोचर्माएवढी एक चौरस जागा सारवावी. तिच्यावर छत बांधावे. मग तो मंडप छत्रे, पल्लव, तोरणे, पताका, माळा व जलाने भरलेले पांढरे कलश यांनी शोभिवंत करावा. विधिपूर्वक अभ्युक्षण करून त्या भूमीवर पन्नास पाकळ्यांचे एक कमळ काढावे. त्याची प्रत्येक पाकळी निरनिराळ्या रंगाची असावी अथवा सर्वच पाकळ्या पांढऱ्या रंगाच्या असाव्या. या सर्व पाकळ्यांवर 'अ' पासून 'ह' पर्यंत पन्नास वर्णाक्षरे लिहावी. अक्षरांच्या प्रारंभी ॐ व शेवटी नमः असे लिहावे. कमळाच्या बीजस्थानात उमा-महेश्वरांची स्थापना करावी. मग त्यांची पूजा करावी. महाचरूचा नैवेद्य दाखवावा. पन्नास ब्राह्मणांना भोजन घालावे. रुद्राक्षाच्या माळा, यज्ञोपवीत, कुंडल, कमंडलू, आसन, वस्त्र आणि दोन काळ्या गाई शिवार्पण कराव्या. सर्व वर्णांचा जप करावा. यामुळे सर्व यज्ञांचे किंवा सर्व वर्णाश्रमधर्म पाळल्याचे फळ लाभते. शिवमंदिरात कोणत्याही दिशेला चतुष्कोण काढून त्यांची पूजा केली तर सर्व पापांचा निरास होतो.

वर्णमातृका एक तांत्रिक देवता. हिचे वर्णन असे – केसांनी मुख झाकलेली, त्रिनेत्र, चतुर्भुज. चार हातांत पाश, अंकुश, पुस्तक व अक्षमाला धारण करणारी. [श्रीविद्यार्णवतंत्र]

वर्णव्रत एक काम्यव्रत. या व्रताची गणना चतुर्मूर्तिव्रतात करतात. चैत्र शुद्ध प्रतिपदेला याचा प्रारंभ करून चार महिने हे व्रत आचरतात. व्रत करणाऱ्या व्यक्तीने व्रतकालात उपवास करून वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न व अनिरुद्ध यांची पूजा करावी आणि एका ब्राह्मणाला यज्ञोपयोगी साधने, क्षत्रियाला युद्धसाधने, वैश्याला व्यापारासाठी लागणारी व शूद्राला हाताने काम करण्याची साधने दान द्यावी. फल – इंद्रलोकप्राप्ती. [हि.ध.]

वर्णषष्ठी एक व्रत. श्रावण शुद्ध षष्ठीला हे व्रत करतात. व्रतावधी पाच वर्षे. व्रतदिनी शिवमंदिरात जाऊन शिवाची पूजा करावी अथवा त्याच्या प्रतिमेची पूजा घरीच करावी, असे सांगितले आहे. पूजेनंतर शिवाला वरण-भाताचा नैवेद्य दाखवावा. नैवेद्यात खारावलेल्या आंब्याचा समावेश असावा आणि मग हे पदार्थ ब्राह्मणाला दान द्यावे. उद्यापनाच्या वेळी होमहवन करून त्यात चरू व आंब्याची पाने यांच्या आहुती द्याव्या. फल – अपमृत्यूपासून सुटका. [व्रतराज]

वर्णसंकर चातुर्वर्ण्यातील भिन्न वर्णांचे परस्पर मिश्रण, असा याचा अर्थ आहे (मनु. १०.४०). रक्तसंकर व वृत्तिसंकर असे त्याचे दोन प्रकार आहेत. भिन्न वर्णांतील स्त्री-पुरुषांच्या समागमामुळे प्रजा उत्पन्न होते, तेव्हा तो रक्तसंकर होतो व एका वर्णातील व्यक्तीने दुसऱ्या वर्णाला विहित असे कर्म केले असता, तो वृत्तिसंकर होतो.

व्यभिचारेण वर्णानामवेद्यावेदनेन च ।
स्वकर्मणां च त्यागेन जायन्ते वर्णसङ्कराः ॥
(मनु. १७.२४)

अर्थ – असवर्ण किंवा सगोत्र–सप्रवरादी विवाह आणि वर्णविहित कर्मांचा त्याग या कारणांमुळे वर्णसंकर उत्पन्न होतात.

पूर्वी चातुर्वर्ण्य गुणकर्मांवर अवलंबून होते, तेव्हा वर्णसंकराची कल्पना उत्पन्न झाली नव्हती. कारण कोणी कोणाशी विवाह करावा किंवा कोणता व्यवसाय करावा यावर निर्बंध नव्हते. चातुर्वर्ण्य जन्माधिष्ठित मानले जाऊ लागल्यानंतर भिन्न वर्णांतील विवाहसंबंधावर निर्बंध घातले गेले आणि प्रत्येक वर्णाची विहित कर्मे ठरवण्यात आली. त्या नियमांचे पालन न केल्यामुळे वर्णसंकर होऊ लागला.

रक्तसंकर – धर्मशास्त्रात विविध नियम असले, तरी पूर्वी समाजात वर्णसंकर चालू होता. महाभारतकाली वर्णसंकर पराकोटीला पोचला होता, असे वनपर्वात म्हटले आहे (१८०.३१–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

३३). धन, लोभ, काम, वर्णांचा अनिश्चय किंवा अज्ञान यांमुळे वर्णसंकर होतो, असे अनुशासनपर्वात म्हटले आहे. (४८.१)

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णांत श्रेष्ठ-कनिष्ठता मानली जाऊ लागल्यानंतर भिन्न वर्णांतील विवाहांना अनुलोम व प्रतिलोम ही नावे देण्यात आली. उच्च वर्णातील पुरुष व कनिष्ठ वर्णाची स्त्री यांचा विवाह म्हणजे अनुलोम आणि उच्च वर्णाची स्त्री व कनिष्ठ वर्णाचा पुरुष यांचा विवाह म्हणजे प्रतिलोम होय. अशा विवाहांमुळे, म्हणजेच वर्णसंकरामुळे असंख्य जाती उत्पन्न झाल्या. प्राचीन धर्मशास्त्रकार उदार होते. त्यांनी अनुलोम व प्रतिलोम या दोन्ही प्रकारच्या विवाहांना मान्यता दिली होती. मात्र प्रतिलोम विवाहामुळे उत्पन्न झालेली प्रजा त्यांनी शूद्र ठरविली. बौधायनाने वर्णसंकरामुळे उत्पन्न झालेल्या प्रजेला व्रात्य म्हटले आहे. नंतरच्या शास्त्रकारांनी प्रतिलोमजन्य संततीला अधर्म्यच ठरविले. अनुलोम विवाह दीर्घ काळपर्यंत शास्त्रविहित होता. पण मातृसावर्ण्य रूढ झाल्यानंतर शूद्र स्त्रियांना द्विजांपासून झालेली संततीही शूद्र ठरू लागली.

शास्त्रकारांनी वर्णसंकर निषिद्ध का ठरवला हे समजत नाही. वस्तुतः वर्णसंकरामुळे समाजाचे कोणत्याही प्रकारचे अहित झालेले दिसत नाही. उलट कित्येक थोर पुरुष संकरज होते, हे ध्यानात घेता, वर्णसंकर हितावहच होता, असे म्हणता येते. ऐतरेय ब्राह्मणातील आविक्षित मरुत्त हा राजा आयोगव जातीचा होता. तो जितेंद्रिय, तेजस्वी, क्षमाशील व बुद्धिमान होता आणि त्याने शंभर अश्वमेध यज्ञ केले होते. आयोगव ही जात स्मृतिकारांनी प्रतिलोमोत्पन्न म्हणून शूद्र मानली आहे. व्यास हे वर्णसंकरातूनच उत्पन्न झाले होते. त्यांचा पिता पराशर हा ब्राह्मण होता व माता मत्स्यगंधा ही धीवर (कोळी) कन्या होती. व्यास हे सर्व ऋषिकुळाला ललामभूत ठरले आहेत. व्यासांचा शिष्य लोमहर्षण हा मोठा विद्वान असून, त्याने सहा पुराणसंहिता रचल्या, असे म्हणतात. तो एका क्षत्रियापासून ब्राह्मण स्त्रीच्या उदरी जन्मला म्हणून सूत जातीचा ठरला. असे विवाह प्राचीन काळी पुष्कळ होत. गुप्त घराणे वैश्य होते व लिच्छवी घराणे क्षत्रिय होते. चंद्रगुप्त (१ला) व लिच्छवी राजकन्या यांचा पुत्र समुद्रगुप्त प्रतिलोम विवाहातून जन्मला असूनही महापराक्रमी निघाला. कदंब या ब्राह्मण राजघराण्यातील कन्यांचे विवाह गुप्त घराण्यातील पुरुषांशी व काही क्षत्रियांशी झाले होते. शास्त्रकारांच्या मते त्यांची संतती शूद्र होय. अनुलोम विवाह तर विपुल प्रमाणात चालू होते. चंद्रगुप्त (२ रा) याची कन्या प्रभावती गुप्ता ही वाकाटक नृपती रुद्रसेन (२ रा–ब्राह्मण) याची पट्टराणी होती. विजयनगरचा राजा बुक्क (१ ला) याने आपली कन्या वोडेय या ब्राह्मणाला दिली होती. प्रतीहार राजा हरिश्चन्द्र हा ब्राह्मण असून, त्याची राणी क्षत्रिय कुलातली होती. प्रसिद्ध संस्कृत नाटककार राजशेखर याची पत्नी अवंतीसुंदरी ही क्षत्रियकन्या होती. गुहिल कुळाचा संस्थापक गुहदत्त हा ब्राह्मण होता. त्याचा वंशज भर्तृपट्ट याने एका राष्ट्रकूट राजकन्येशी विवाह केला होता. पुष्यमित्र शुंग हा ब्राह्मण होता. त्याचा पुत्र अग्निमित्र याने मालविका या क्षत्रिय राजकन्येशी विवाह केला होता. प्रसिद्ध कवी बाणभट्ट याची सावत्र आई शूद्र होती. सम्राट हर्षवर्धन (वैश्य) याने आपली कन्या वलभीचा क्षत्रिय राजा ध्रुवसेन याला दिली होती व त्याची बहीण राज्यश्री ही कनोजचा ग्रहवर्मा याची पट्टराणी होती. कलचुरी घराण्यातील यशकर्ण हा कर्णदेव व हूण राजकन्या अव्वलदेवी यांचा पुत्र होता. असे विवाह इ. स. च्या १०व्या शतकापर्यंत चालू होते, त्यानंतर ते बंद झाले. धर्मशास्त्रकारांनी कितीही निषेध केला असला व निर्बंध घातले असले, तरी वर्णसंकर त्या काळापर्यंत चालूच राहिला आणि त्याने समाजाचे काहीदेखील अकल्याण झाले नाही.

वृत्तिसंकर – विवाहाप्रमाणेच व्यवसायबंधनेही प्राचीन काळी कडक नव्हती. वेदांतील अनेक सूक्ते क्षत्रियांनी रचलेली आहेत. काही सूक्तदृष्टे नाग कुलातले होते. क्षत्रिय जसे मंत्रद्रष्टे होते तसेच औपनिषदिक ब्रह्मविद्येचे ज्ञाते व उपदेष्टेही होते. अनेक ब्राह्मणांनी क्षत्रिय राजांकडून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतल्याच्या कथा उपनिषदांत आहेत. यज्ञात पौरोहित्य करण्याचा म्हणजे याजनाचा अधिकारही क्षत्रियांना होता. क्षत्रिय देवापी याजन करीत असे. ऐतरेय ब्राह्मणातील शार्पण्य शायकायनाचे उदाहरण असेच आहे. ब्रह्मविद्या प्राप्त करून घेण्याचा अधिकार शूद्रांनादेखील होता, हे यजुर्वेदातील 'ही कल्याणकारक वाणी मी ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व चारण या सर्वांसाठी उच्चारली' या मंत्रावरून स्पष्ट होते.

कालांतराने वर्णव्यवस्था जन्माधिष्ठित झाली, वर्णांची श्रेष्ठता व कनिष्ठता ठरली आणि भिन्न वर्णांना विहित अशी कर्मेही ठरविण्यात आली. सर्व वर्णांचे लोक आपापल्या शास्त्रप्रणीत गुणांनी युक्त असतील, तरच अशा जन्मनिष्ठ व्यवस्थेला अर्थ असणार; पण तसे कधीही नसते. त्यामुळे ब्राह्मणांची किंवा इतर वर्णांची कर्तव्ये ठरवण्याचा काही उपयोग नसतो. सर्वच ब्राह्मणांना यजन, याजन, इ. शास्त्रविहित कर्तव्ये करता येत नसत आणि ते इतर निषिद्ध व्यवसाय करीत. अशा ब्राह्मणांना श्राद्धाला बोलावू नये, असे शास्त्रकारांनी सांगितले आहे.

धर्मशास्त्राने भिन्न वर्णांचे व्यवसाय ठरवून दिले असले, तरी त्यांचे पालन करणे नेहमीच शक्य नसते. याजन, अध्यापन व प्रतिग्रह ही ब्राह्मणांच्या उपजीविकेची साधनं होत. बौद्ध कालात यज्ञयाग कमी होऊ लागले व नंतर त्यांचा लोप झाला. त्यामुळे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अध्यापन व दानधर्म यांवर सर्व ब्राह्मणांचा योगक्षेम चालेनासा झाला. अशा वेळी ब्राह्मणांनी क्षत्रिय वैश्यांचे उद्योग करावे, असे स्मृतिकारांनी सांगितले आहे. या सवलतीमुळे बरेच ब्राह्मण शेती, व्यापार, गोपालन, वैद्यकी, ज्योतिष, हस्तकौशल्याची कामे, राजाची सेवा, इ. उद्योग करु लागले. क्षत्रियांनीही शेती वगैरे व्यवसाय करावे, असे पराशर म्हणतो. अनेक ब्राह्मणांनी क्षात्रवृत्ती स्वीकारली आणि राज्यकारभारात वरिष्ठ अधिकारपदे मिळविली. काही क्षत्रिय शेती करू लागले. वैश्यांनी शेती करणे सोडून दिले होते. खालच्या वर्णांतील लोकांना उच्च वर्णांची कामे करण्यास धर्मशास्त्राची बंदी होती. तरीही बरेच शूद्र शेती करू लागले. इ. स. च्या १०व्या शतकानंतर असली बंधने फारच कडक झाली आणि वृत्तिसंकर निषिद्ध ठरला. तरीही तो पूर्ण बंद झाला नाही. [हिं. ध.; ध. शा. वि.; हिं. स. सं. वि.; म. यु. भा.]

वर्णाश्रमधर्म

सनातन वैदिक धर्माचा एक आधारस्तंभ. काही विद्वान तत्त्वज्ञान हे धर्माचे प्रमुख अंग मानतात; तथापि बहुजनसमाजाच्या दृष्टीने ' आचारः प्रथमो धर्मः ' हेच वचन महत्त्वाचे आहे. उपनयन, अध्ययन, विवाह, दान, यज्ञ, व्यवसाय, भक्ष्याभक्ष्य, इ. आचारांसंबंधी केलेले नियम म्हणजेच धर्म होय. धर्मशास्त्रकारांनी चार वर्णांपैकी प्रत्येक वर्णाला विशिष्ट कर्मे वाटून दिली आहेत. पूर्वी चातुर्वर्ण्य हे गुणकर्मांवर अवलंबून होते; म्हणून ते समाजधारणेस उपयुक्त होते. कालांतराने वर्णव्यवस्थेत गुणांपेक्षा अनुवंशाला प्राधान्य मिळाल्यापासून तिची अवनती सुरू झाली. कर्मविपाक, पुनर्जन्म, स्वर्ग, नरक, विटाळचांडाळ, इ. कल्पना दृढ झाल्यानंतर वर्णधर्मांना जातिभेदाचे रूप प्राप्त झाले.

धर्मशास्त्रात सांगितलेल्या वर्णधर्माचे पालन सर्व समाजाकडून काटेकोरपणे कधीही झाले नाही. ब्राह्मणांचे श्रेष्ठत्व व पावित्र्य सर्वमान्य असले, तरी आचार व व्यवसाय या बाबतींत काही ब्राह्मण धर्मपालन करीनासे झाले. याउलट शूद्र हा त्रैवर्णिकांच्या सेवेव्यतिरिक्त शिल्प, वाणिज्य, नृत्य, गीत, वाद्य, इ. क्षेत्रांत चमकू लागल्यामुळे त्याचा उत्कर्ष होऊ लागला. अशा प्रकारे पूर्वीसारखे चातुर्वर्ण्य हिंदू समाजात दिसेनासे झाले. वर्णोचित व्यवसाय, संस्कार व आचार यांचा लोप होऊन वर्णव्यवस्थेच्या जागी जातिसंस्था आली.

समाजाचा एक घटक या नात्याने मनुष्याचे समाजातील स्थान व त्याची कर्तव्ये, हक्क व जबाबदारी यांचा विचार वर्णधर्मात केलेला आहे. आणि मनुष्याच्या जीवनातील विशिष्ट वयोवस्थेत निरनिराळी कर्तव्ये कोणती आणि भौतिक व आध्यात्मिक उन्नती साधण्यासाठी त्याने करायच्या गोष्टी कोणत्या, हे आश्रमधर्मात सांगितलेले आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ साध्य करण्याचा एक मुख्य उपाय आश्रमव्यवस्थेच्या रूपाने सांगितलेला आहे. आता ही वर्णाश्रमव्यवस्था नामशेष झाली आहे. पाहा – आश्रम; चातुर्वर्ण्य. [ध. शा. वि.; ध. शा. मं.]

वर्धन राजवंश

(इ. स. ५००–६४६) स्थानेश्वर, थानेसर किंवा स्थाण्वीश्वर येथे राज्य करणारा एक वंश. बाणाच्या हर्षचरितानुसार श्रीकंठ नामक प्रदेशात स्थाण्वीश्वर नामक एक विभाग होता व त्याच नावाचे एक नगरही होते. वर्धन वंशातील पुष्पभूती नामक पुरुषाने तिथे राज्य स्थापले. त्याच्या नंतरच्या राजांची नावे बाणाने दिलेली नसून, प्रभाकरवर्धनापासून कथेला आरंभ केला आहे. परंतु राजमुद्रा व अभिलेख यांत नरवर्धन, राज्यवर्धन व आदित्यवर्धन या प्रभाकरवर्धनाच्या आधीच्या राजांची नावे आढळतात. त्या तीन राजांना केवळ महाराज ही उपाधी होती. प्रभाकर वर्धनाला मात्र महाराजाधिराज ही उपाधी होती. त्याची माता म्हणजे आदित्यवर्धनाची राणी महासेनगुप्तादेवी ही गुप्त घराण्यातील महासेन गुप्त याची बहीण असावी. प्रभाकरवर्धनाने इ. स. च्या ६ व्या शतकाच्या शेवटच्या चरणात राज्य केले असावे. तो इ. स. ६०४ च्या सुमारास मरण पावला.

प्रभाकरवर्धनाच्या आधीचे राजे गुप्तांचे किंवा मौखरींचे सामंत असावे. प्रभाकरवर्धनाने मात्र आपले राज्य स्वतंत्र केले असावे. कारण बाणाच्या हर्षचरितात त्याची बरीच स्तुती केलेली आहे. त्याने आपल्या राज्याचा बराच विस्तार केला. संपूर्ण पंजाब व माळव्याचा काही भागही त्याने आपल्या सत्तेखाली आणला होता.

प्रभाकरवर्धनाला राज्यवर्धन व हर्षवर्धन हे दोन पुत्र व राज्यश्री नावाची एक कन्या होती. मौखरी राजा ग्रहवर्मा याच्याशी राज्यश्रीचा विवाह झाला होता. प्रभाकरवर्धनानंतर राज्यवर्धन सिंहासनावर बसला.

त्या वेळी बंगालचा राजा शशांक बराच प्रबळ झाला होता. माळव्याच्या राजाशी त्याने संधान बांधले होते. राज्यवर्धन गादीवर येताच माळव्याच्या राजाने कनौजवर अचानक स्वारी करून मौखरी राजा ग्रहवर्मा याला ठार मारले व राणी राज्यश्री हिला कैद केले. स्थानेश्वरावरही स्वारी करण्याचा त्याचा बेत होता. पण तो कळताच राज्यवर्धन १०,००० घोडदळासह त्याच्यावर चालून गेला. कनौजला पोचण्यापूर्वीच माळव्याच्या राजाशी त्याची गाठ पडली आणि त्याने माळव्याच्या राजाचा सहज पराभव केला. मग तो कनौजकडे निघाला. पण वंगाधिपती शशांक याने वाटेतच त्याचा कपटाने वध केला, असे म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मात्र त्याच्या मृत्यूसंबंधी निश्चित माहिती उपलब्ध नाही.

त्यानंतर स्थानेश्वर राज्यातील प्रतिष्ठित पुरुषांनी हर्षवर्धनाला सिंहासनावर बसवले (इ. स. ६०६). भावाच्या वधाबद्दल शशांकाचा सूड घेण्यासाठी त्याने कामरूपाचा राजा भास्करवर्मा याच्याशी मैत्री केली. मात्र प्रथम त्याने राज्यश्रीला सोडवण्याचे काम हाती घेतले. तेवढ्यात शशांकाने तिला मुक्त केल्याची वार्ता हर्षाला कळली. राज्यवर्धनाच्या मृत्यूची वार्ता ऐकून तिला अतिशय दुःख झाले व तिने विंध्यारण्यात जाऊन अग्निप्रवेश करण्याचे ठरविले. पण हर्ष योग्य वेळी तिथे पोचला आणि त्याने तिला त्या कृत्यापासून परावृत्त केले. तो तिला घेऊन परत आला.

त्यानंतर हर्ष दिग्विजय करण्यास निघाला. त्याने प्रथम पूर्व भारतावर स्वारी करून काही प्रदेश जिंकले. पण वंगदेशाचा राजा शशांक याला तो जिंकू शकला नाही, असे दिसते. कारण इ. स. ६१९ पर्यंत शशांकाची सत्ता अबाधित होती, असे एका अभिलेखावरून कळते. दक्षिणदिग्विजयातही त्याला यश मिळाले नाही. चालुक्य राजा पुलकेशी याने त्याचा पराभव केल्यामुळे त्याला नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रदेश जिंकता आला नाही. इ. स. ६१२ च्या सुमारास त्याने कनौज येथे आपली राजधानी नेली.

हर्षाच्या साम्राज्याविषयी अवास्तव कल्पना प्रचलित होत्या; कारण बाण व युआन च्वांग यांनी त्याच्या दिग्विजयाची तशीच वर्णने केलेली आहेत. पण त्यांत ऐतिहासिक तथ्य फारसे नाही. वलभीचा मैत्रक राजा त्याचा जावई होता व कामरूपाचा भास्करवर्मा त्याचा मित्र होता. ते दोघे त्याची सत्ता मानीत होते. आणि उत्तर भारतातील इतर राजेही त्याच्या पराक्रमामुळे दबून होते. मात्र पूर्व पंजाब, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल व ओडिसा या प्रदेशांच्या बाहेर त्याची सार्वभौम सत्ता पोचली नव्हती, असे दिसते.

आपल्या राजवटीच्या अखेरीस हर्षाने पूर्व भारतावर पुन्हा स्वारी केली. त्या वेळी शशांक मरण पावलेला होता. भास्करवर्म्याच्या साहाय्याने हर्षाने मगध व प. बंगाल हे प्रदेश जिंकून घेतले. बंगालचा उरलेला भाग भास्करवर्म्याला मिळाला.

इ. स. ६४६ च्या अंती हर्षवर्धन मृत्यू पावला. त्याला कोणी वारस नसल्यामुळे त्याचे सिंहासन त्याचा मंत्री अर्जुनाश्व याने बळकावले. हर्षवर्धन हा एक थोर सम्राट, महान शासक व शूर सेनापती होता; तसाच तो विद्वानांचा आश्रयदाताही होता. त्याने स्वतः नाटके लिहिली आहेत. प्रसिद्ध संस्कृत लेखक बाणभट्ट हा त्याच्या पदरी होता.

हर्षवर्धन प्रथम शिवभक्त होता. पण जीवनाच्या उत्तरकाली तो बौद्ध पंथाचा पक्षपाती झाला होता. त्याने अनेक स्तूप व बौद्ध मठ बांधले, असे म्हणतात. प्रतिवर्षी तो बौद्ध परिषद भरवीत असे. पाहा – हर्षवर्धन. [ए. इं. – मजु. ; हि. क. इं. पी. ३]

वर्धमान (१) अष्ट मांगलिक चिन्हांपैकी एक चिन्ह. मातीच्या दोन शरावांच्या (परळ) संपुटाला वर्धमान असे म्हणतात. मथुरा येथील आयागपट्टांवर अष्ट मांगलिक चिन्हांत याचेही चित्रण केलेले आहे. बाणाने हर्षचरितात राज्यश्रीच्या विवाहाच्या सजावटीत शीतलशालाजिरश्रेणीचा उल्लेख केलेला आहे. शालाजिर शब्दाचा अर्थ मातीचे परळ किंवा शराव असा आहे. दोन शराव एकावर एक ठेवले, की संपुट तयार होतो. एका शरावात असे तीन संपुट एकावर एक ठेवतात व त्यांना छिद्रे पाडून एका दोऱ्यात ओवतात. अशा प्रकारचे हे मांगलिक चिन्ह अद्यापही काही ठिकाणी बनवतात आणि विवाहमंडपात व सूतिकागृहात टांगतात. [का. ए. सां. अ.]

(२) (इ. स. चे १४ वे शतक) न्याय–वैशेषिक दर्शनाचा एक आचार्य. हा गंगेशोपाध्यायाचा पुत्र व शिष्यही होता. याला महामहोपाध्याय ही पदवी होती. याने आन्वीक्षानयतत्त्वबोध, न्यायनिबंधप्रकाश, न्यायपरिशिष्टप्रकाश, कुसुमांजलिप्रकाश, लीलावतीप्रकाश, खण्डनोद्धार, इ. ग्रंथ लिहिले आहेत. स्मृतिपरिभाषा नामक एक ग्रंथही याच्या नावावर आहे. [कं. गं. नि.]

वर्धापन पहिल्या जन्मतिथीला करायचा एक धार्मिक विधी. प्रत्येक वर्षी जन्मतिथीला हा वर्धापनविधी करावा, असेही काही धर्मग्रंथांत म्हटले आहे. हे सर्व कर्म गृह्याग्नीवर करायचे असते. मृत्युंजय देवतेसाठी एकशेआठ वेळा दूर्वांचा होम व आयुष्यसंज्ञक चरूचा होम करावा. विश्वेदेव, अग्नी व जातवेदस अग्नी यांच्यासाठी चरूच्या आहुती द्याव्या. वासुदेव, नक्षत्रदेवता, चंद्र व वरुण यांची स्थापना करून त्यांची पूजा करावी. मग आयुष्यवृद्धीसाठी आवाहित देवतांची प्रार्थना करावी. त्यानंतर मार्कंडेय, सप्त चिरंजीव यांचे पूजन करावे, असे काही ग्रंथकारांचे मत आहे. पाहा–अब्दपूर्ति, जन्मतिथिकृत्य. [ऋ. ब्र. स.]

वर्ष एक कालगणना. पृथ्वीचा सूर्याभोवती आपल्या कक्षेत फिरण्याचा जो काल, त्याला वर्ष असे म्हणतात. हा काल ३६५ दिवस, ५ तास, ४८ मिनिटे व ४६ सेकंद एवढा असतो. हिशेबाला सोयीचे जावे म्हणून इंग्रजी वर्ष ३६५ दिवसांचे धरतात आणि दर चार वर्षांनी त्यात एक दिवस मिळवतात. या वर्षाला प्लुत वर्ष (लीप इयर) असे म्हणतात.

भारतातील हिंदू लोकांनी वर्षगणना करण्याचे ब्राह्म, पित्र्य, दैव, प्राजापत्य, गौरव, सौर, सावन, चांद्र आणि नाक्षत्र असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेगवेगळे नऊ प्रकार मानलेले आहेत. कल्प, युग यासारखी मोठी कालगणना करायची असते, त्या वेळी ती ब्राह्म, दैव, पित्र्य आणि प्राजापत्य या चार प्रकारच्या संवत्सरांनी करतात. गौरव (बार्हस्पत्य), सौर, सावन, चांद्र आणि नाक्षत्र या पाच प्रकारच्या संवत्सराचा उपयोग लौकिक व्यवहारात करतात. काही लोक, विशेषतः मुसलमान लोक चांद्र वर्ष मानतात. बाकी काही लोक सौर किंवा सावन वर्ष मानतात. भारतात पाचही प्रकारची संवत्सरे प्रचारात असून, त्या सर्वांचा परस्परांशी मेळ राहावा, म्हणून सौर वर्षात क्षय-वृद्धी मासांचा समावेश करतात. सर्वसाधारणपणे लौकिक कालगणनेत सौर वर्ष मानण्याची पद्धत आहे. सौर वर्षाचे सायन व निरयण असे दोन प्रकार आहेत. भारतातच फक्त निरयण वर्षगणना चालू असून, इतर सर्व देशांत सायन वर्षगणना चालू आहे. कारण सायनमानाचा ऋतूंशी घनिष्ठ संबंध आहे.

निरयण गणनेचा संबंध यंत्राशी येत असल्यामुळे निरयण वर्षाच्या कालमानात मतभेदांना फार वाव आहे. निरनिराळ्या ज्योतिषाचार्यांच्या मतानुसार भिन्न वर्षांच्या कालमानात फरक पडतो, तो पुढीलप्रमाणे –

सूर्य सिद्धान्त	३६५ दि.	१५ घ.	३१ प.	३१ वि.	२४ प्र. वि.
वेदांगज्योतिष	३६६ ,,	० ,,	० ,,	० ,,	० ,,
आर्यभट्ट	३६५ ,,	१५ ,,	३१ ,,	१५ ,,	० ,,
ब्रह्मस्फुट सिद्धान्त	३६५ ,,	१५ ,,	३० ,,	२२ ,,	३० ,,
पितामह सिद्धान्त	३६५ ,,	२१ ,,	१५ ,,	० ,,	० ,,
ग्रहलाघव	३६५ ,,	१५ ,,	३१ ,,	३० ,,	० ,,
ज्योतिर्गणित(के.)	३६५ ,,	१५ ,,	२२ ,,	५७ ,,	० ,,
चांद्र	३५४ ,,	२२ ,,	१ ,,	२३ ,,	० ,,
सावन	३६० ,,	० ,,	० ,,	० ,,	० ,,
बार्हस्पत्य	३६१ ,,	१ ,,	३६ ,,	११ ,,	० ,,
नाक्षत्र	३७१ ,,	१ ,,	५२ ,,	३० ,,	० ,,
सौर	३६५ ,,	१५ ,,	३१ ,,	३० ,,	० ,,

भारत सरकारने सांप्रत सौर वर्षगणनेचा स्वीकार केला आहे. या वर्षाचा प्रारंभ २१ किंवा २२ मार्च या दिवशी होतो. तथापि धर्मकृत्ये व सणवार यांसाठी चैत्रादी व फाल्गुनान्त असे वर्ष धरतात. पंचांगे याच पद्धतीला अनुसरून केली जातात. [सु. वि. को.; कल्याण-सस्कृतिअंक]

वर्षपर्वत भारतादी वर्षांना म्हणजे देशांना विभागणाऱ्या पर्वतांना वर्षपर्वत असे म्हणतात. हिमवान, हेमकूट, निषध, मेरु, चैत्र, कर्णी व शृंगी हे सात वर्षपर्वत मानलेले आहेत. पुराणांत मात्र या पर्वतांची संख्या सहाच मानलेली असून, हिमवान, हेमकूट, निषध, मेरु, नील व शृंगवान अशी त्यांची नावे दिलेली आहेत. [श. क.; पु. इं.]

वर्षव्रत एक तिथिव्रत. चैत्र शुद्ध नवमीला हे व्रत करावे. या दिवशी हिमवान्, हेमकूट, शृंगवान, मेरु, माल्यवान आणि गंधमादन या पर्वतांची पूजा करून उपवास करणे, हाच या व्रताचा प्रमुख विधी आहे. शेवटी जंबूद्वीपाची चांदीची मूर्ती करून ती दान द्यावी. फल – इच्छापूर्ती व स्वर्गप्राप्ती. [हि. ध.]

वर्षाऋतू पावसाळ्यातील श्रावण-भाद्रपद या कालखंडाला वर्षाऋतू हे नाव आहे. हा पावसाळ्याचा मुख्य भाग होय. या दोन महिन्यांत खूप पाऊस पडतो. ज्येष्ठ व आषाढ या महिन्यांत पडलेल्या पावसामुळे पृथ्वी हिरवीगार झालेली असते. वर्षाकालात पडणाऱ्या जोरदार पावसामुळे नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागतात. याच काळात वृक्षवल्ली, तृणे व शेतांतील पिके खूप वाढतात.

या कालातील समृद्धीचे वर्णन संस्कृत साहित्यात सर्वत्र आढळते. संस्कृत कवींनी अनेक काव्यांतून वर्षाऋतूची वर्णने केली आहेत. त्यांत वर्षाकालीन घटनांचे व सृष्टिसौंदर्याचे अतिशयोक्तिपूर्ण वर्णन असते. याविषयी दोन श्लोक असे –

चन्द्रबिम्बरवितारतारकामण्डलानि घनमेघडम्बरैः।
भक्षितानि जलदोदरेषु तद्रोदनध्वनिरिवैष गर्जितम् ।।

अर्थ – भरून आलेल्या मेघांनी चंद्रबिंब, सूर्य आणि तारकामंडले खाऊन टाकली. मेघांच्या उदरात जो गडगडाट होतो, तो जणू वरील चंद्रादी मंडलांच्या रडण्याचा ध्वनी असतो.

उपैति घनमण्डली नदति नीलकण्ठावली
तडिल्लसति सर्वतो वहति केतकीमारुतः।
इतोऽपि यदि नागतः प्रियतमो नु मन्येऽधुना
बधाति मकरध्वजस्त्रुटितशिञ्जिनीकं धनुः ।।

अर्थ – (एक विरहिणी म्हणते) आकाशात मेघ भरून आले आहेत. मोर ओरडत आहेत. विजा चमकत आहेत. सर्व बाजूंनी केतकीवनातील वारा वाहत आहे. इतके झाल्यावरही माझा प्रियकर परदेशाहून घरी येणार नसेल, तर मला वाटते, सांप्रत मदनाच्या धनुष्याची दोरी तुटली असावी.

वराहमिहिराच्या बृहत्संहितेतील २१ ते २८ या अध्यायांत वर्षाकालाविषयी शास्त्रीय माहिती दिलेली आहे. प्रारंभी वराह म्हणतो, की अन्न हे वर्षाकालावर अवलंबून आहे आणि ते जगताचा प्राण आहे; म्हणून वर्षाकालाविषयी प्रयत्नपूर्वक ज्ञान मिळविणे आवश्यक आहे.

पावसाळ्यापूर्वी काही महिने मेघ उत्पन्न होण्याची प्रक्रिया

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुरू होते; तिला गर्भधारण म्हणतात. गर्गादी अनेक विद्वानांच्या मते चंद्र पूर्वाषाढा नक्षत्रात प्रविष्ट झाल्यानंतर मार्गशीर्ष मासात गर्भधारणाची लक्षणे स्पष्ट दिसू लागतात. तथापि मेघमाला नामक ग्रंथात कार्तिक मासातच गर्भधारण होत असल्याचे लिहिले आहे. गर्भधारणानंतर साडेसहा महिन्यांनी प्रसव होतो म्हणजे मेघ जलवर्षाव करू लागतात, असे म्हटले आहे (बृ. सं. २१.७). उत्तर किंवा पूर्व दिशेकडून वाहणारा शीतल वायू, निर्मळ आकाश, रंगीबेरंगी ढग, मंद मेघगर्जना, पक्ष्यांचा मधुर ध्वनी, इ. गर्भपुष्टीची सामान्य लक्षणे वराहमिहिराने सांगितली आहेत. कोणत्या प्रकारचे मेघ विपुल जलवृष्टी करतात, तेही त्याने सांगितले आहे. उल्कापात, अशनिपात, धूलिवर्षाव, भूकंप, इंद्रधनुष्य दिसणे, इ. उत्पात ही विपरीत लक्षणे दिसली, तर गर्भाचा उपघात होतो, असे त्याने म्हटले आहे (बृ. सं. २१.२५–२७).

पावसाळ्यात किती पाऊस पडेल, याचे अनुमान करण्यासाठी त्या काळी काही उपाय प्रचलित होते. आषाढ कृष्ण पक्षात चंद्राने रोहिणी नक्षत्रात प्रवेश केल्यानंतर एक ब्राह्मण गावाच्या उत्तरेला किंवा पूर्वेला जाऊन तीन दिवस उपास करून, भूमीवर ग्रहनक्षत्रांच्या आकृती काढून त्यांची पूजा करीत असे. मग तो चारही दिशांना चार कलश मांडून ठेवीत असे. उत्तर, पूर्व, दक्षिण व पश्चिम या दिशांना ठेवलेले कलश अनुक्रमे श्रावण, भाद्रपद, आश्विन व कार्तिक या मासांचे प्रतीक मानले जात. जो कलश पाण्याने भरून जाईल, त्या मासात विपुल वृष्टी होईल, असे अनुमान केले जाई. अशा प्रकारचे विविध संकेत त्या काळातल्या अनुभवी व ज्ञानी पुरुषांनी निश्चित केलेले होते. ते जाणणाऱ्यांना समाजात पुष्कळ मान मिळत असे.

कौटिलीय अर्थशास्त्रात याविषयी अल्पशी माहिती सापडते. कृषिपराशर व मेघमाला या दोन ग्रंथांतही काही संक्षिप्त माहिती दिलेली आहे. कृषिपराशर या ग्रंथात मेघांचे (१) आवर्त (२) संवर्त (३) पुष्कर व (४) द्रोण असे चार प्रकार सांगितले आहेत. आवर्त मेघ विशिष्ट स्थानी वृष्टी करतात, संवर्त सर्वत्र वृष्टी करतात, पुष्कर मेघ अल्प वृष्टी करतात, तर द्रोण मेघ विपुल वृष्टी करतात.

सध्या पर्जन्यमापन करण्यासाठी जशी साधने वापरली जातात, तशी प्राचीन काळीही वापरली जात होती. अर्थशास्त्रात प्रथम त्यांचा निर्देश आढळतो. कोष्ठागारात एक अरत्नी मानाचे (= १८ इंच व्यासाचे) कुंड ठेवावे, असे तिथे म्हटले आहे (अर्थ. २.२३.५). वराहमिहिरानेही अशाच कुंडाचे वर्णन केले आहे (बृ. सं. २३.२).

या कुंडाला मागधमान असे नाव होते. कृषिपराशर या ग्रंथात आढक नावाच्या कुंडाचे माप १२ अंगुळे (= ९ इंच) उंची, लांबी व रुंदी असे दिले आहे. हे कुंड आंबा किंवा पुन्नाग वृक्षाच्या लाकडाचे बनवीत.

पावसाळ्यातील एकूण पर्जन्यापैकी १/३ वृष्टी आषाढ व आश्विन मासांत होते आणि २/३ वृष्टी श्रावण व भाद्रपद मासांत म्हणजे वर्षा ऋतूत होते, असे अर्थशास्त्रात (२.२४) सांगितले आहे.

वरील माहितीवरून असे दिसते, की प्राचीन काळी भारतात पर्जन्यमानासंबंधी व्यापक अध्ययन केले जात होते; तसेच त्या काळातील तज्ज्ञांनी काढलेले निष्कर्ष खरे ठरले होते. अशा प्रकारचे परंपरागत संकेत ग्रामीण भागात म्हणींच्या रूपाने अजूनही प्रचलित आहेत. [श्री. अजयमित्र शास्त्री–वि. सं. मं. वा. १९६९]

वर्षारंभ नवीन वर्षाचा पहिला दिवस. द. भारतात आणि भारतातल्या अन्य काही प्रदेशांत चैत्र शुद्ध प्रतिपदेला वर्षारंभ मानतात. या दिवशी ब्रह्मदेवाने चराचर सृष्टी निर्माण केली आणि तेव्हापासून कालमापनाला सुरुवात झाली; तसेच ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या वस्तुमात्रानेही आपल्या नियोजित कार्याला याच दिवशी प्रारंभ केला, अशी कथा आहे. श्रीरामाने या दिवशी वालीच्या त्रासातून दक्षिणेकडील प्रदेश मुक्त केला, अशी समजूत आहे. शालिवाहन शकाचा प्रारंभ याच दिवशी झाला. हा साडेतीन मुहूर्तांतला एक मुहूर्त आहे.

वर्षप्रतिपदेला महाशांती करायची असते. शांतीच्या प्रारंभी ब्रह्मदेवाची पूजा करतात. पूजेत त्याला दवणा वाहतात. नंतर होमहवन व ब्राह्मणसंतर्पण करतात. मग अनंत रूपांनी अवतीर्ण होणाऱ्या विष्णूची पूजा करतात. 'नमस्ते बहुरूपाय विष्णवे नमः' हा मंत्र म्हणून त्याला नमस्कार करतात. नंतर ब्राह्मणांना दक्षिणा देतात. शक्य झाले तर इतिहास, पुराणे, इ. ग्रंथ ब्राह्मणाला दान देतात. ही शांती केल्याने सर्व पापांचा नाश होतो, उत्पात घडत नाहीत, आयुष्य वाढते आणि धनधान्याची समृद्धी होते, असे सांगितले आहे.

आंध्र प्रदेशातील लोक या दिवसाला उगादी असे म्हणतात. उगादी हा शब्द युगादी शब्दाचे अपभ्रष्ट रूप आहे. युगादी म्हणजे युगाचा आरंभदिन होय. हा सण ते तीन दिवस पाळतात. त्यात प्रतिपदेला सकाळी अंगाला तेल लावून गरम पाण्याने अभ्यंग स्नान करतात. तमिळनाड प्रदेशातील लोक या दिवशी मृतांना पिंडदान करतात.

ध्वजारोपण, कडुनिंबाच्या पानांचे भक्षण, संवत्सरफलश्रवण, काही नवे संकल्प, इ. कार्यक्रम या दिवशी सर्वत्र होत असतात. पाहा – गुढीपाडवा. [व्रतराज; जिवंत व्रतोत्सव.; सा. ह. फे.; द इलस्. विकली ऑफ इंडिया, जुलै १९६२]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्षावास पावसाळ्याच्या चार महिन्यांत एका ठिकाणी स्थिर राहणे याला वर्षावास (पाली – वस्सावास) म्हणतात. प्राचीन काळी भारतात खूप पाऊस पडे. नद्यानाले भरत. सर्वत्र चिखल होई. त्यामुळे प्रवास करणे दुष्कर ठरे. म्हणून वर्षाकालात माणसे आपापल्या जागी स्थिर राहत.

कालक्रमाने वर्षावासाला धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आणि पुढल्या बौद्धांनी त्याला धार्मिक स्वरूप दिले. गौतम बुद्ध वर्षातून आठ महिने धर्मोपदेशासाठी हिंडे व पावसाळ्याचे चार महिने कुठेतरी एका ठिकाणी राही. पावसाळ्यात प्रवास करीत असता भिक्षूंच्या हातून नकळत जीवहत्या व वनस्पतीहत्या घडणे शक्य आहे, असे बुद्धाला वाटले व ही आपत्ती टाळण्यासाठी बुद्धाने भिक्षूंना वर्षावासाचा नियम घालून दिला.

बौद्ध भिक्षू आपला वर्षावास स्थल–भेदानुसार आषाढ किंवा श्रावण महिन्याच्या पौर्णिमेपासून करीत. वर्षावासानिमित्त एखाद्या लेण्यात किंवा विहारात वास्तव्य करणाऱ्या भिक्षूंच्या निर्वाहासाठी काही राजांनी व श्रेष्ठींनी दाने दिल्याचा उल्लेख नासिक येथील लेण्यामध्ये; तसेच कान्हेरी येथील लेण्यामध्ये आढळतो. कान्हेरीच्या १८ व्या लेखावरून कळते, की आषाढ वद्य प्रतिपदा या दिवसापासून वर्षावासाचा प्रारंभ होत असे.

बौद्ध भिक्षू किंवा श्रमण वर्षावासाच्या कालात ध्यान-चिंतन व धर्माचा अभ्यास करीत. [वि. सं. मं. वा. १९५८; म. ज्ञा. को.]

वऱ्हाडी बोली मराठी भाषेची एक बोली. या बोलीचे क्षेत्र बरेच व्यापक आहे. बुलढाण्याचा पूर्व भाग; एलिचपूर, बैतूल, सिवनी व बालाघाट या प्रदेशाचा दक्षिण भाग; तसेच भंडारा, चांदा, वणी व वाशीम एवढ्या प्रदेशात ही बोली चालते. या बोलीचे प्रांत, जाती व धंदा यांवरून काही उपभेद झालेले आहेत. घाटावरची वऱ्हाडी व घाटाखालची वऱ्हाडी असे तिचे दोन स्थूल भेद असून, नागपुरी, बालाघाटी, चांदा वगैरे आणखी देशनिष्ठ उपभेद आहेत. झारपी, धनगरी, कतिया, कुणबी, कुंभारी, महारी व गोवरी हे तिचे जातींवरून पडलेले उपभेद आहेत. कैकाडी व हळबी हे तिचे आणखी दोन भेद आहेत.

वऱ्हाडी बोलीचे मूळ स्वरूप स्थूल मानाने पुढीलप्रमाणे आहे–

(१) दीर्घ स्वर – हिच्यात दीर्घ स्वर आणि विशेषतः अंत्य दीर्घ स्वर ऱ्हस्व उच्चारले जातात. उदा० मी किंवा मि. माही किंवा माहि. माहा किंवा महा.

(२) पुणेरी भाषेत जिथे ए हा अंत्य स्वर येतो, तिथे वऱ्हाडी भाषेत अ घालतात. उदा० सांगितले च्या ऐवजी सांगितल, त्याने ऐवजी त्यान, असेल ऐवजी असल.

(३) इ आणि य बद्दल वऱ्हाडी बोलीत ए आणि य हे वर्ण येतात. उदा० दिले – देल्ल, वेळ – येळ, राहिला-राह्यला.

(४) आद्य ए चा उच्चार वऱ्हाडीत ये असा करतात. उदा० एक – येक.

(५) अ आणि अवि या दोहोंबद्दल ओ हा स्वर उच्चारतात. उदा० जवळ – जोळ, उडविला – उडोला.

(६) अनुनासिकांचा उच्चार पुणेरी मराठीप्रमाणे अर्धवट न करता स्पष्ट करतात. तूं – तून्, देवाशीं – देवाशीन्.

(७) भविष्यकाळी रूपांत न ऐवजी ल येतो. उदा० मी मारीन – मी मारील.

(८) पुणेरी मराठीतील नपुंसकलिंगी एकवचनी व अनेकवचनी एँ कारान्त रूप वऱ्हाडीत अनेकदा अकारान्त होते. उदा० पोरगें – पोरग, माणसें – माणस. अशा नामांचे विशेषण मात्र नपुंसकलिंगी अनेक वचनात न राहता पुंलिंगी अनेक वचनात राहते. उदा० चांगली माणसें – चांगले माणस.

(९) मराठीतील चतुर्थीच्या ला प्रत्ययाबद्दल वऱ्हाडीत ले प्रत्यय येतो. उदा० बापाला – बापाले.

(१०) अनेकवचनाच्या प्रत्ययापूर्वी वऱ्हाडीत ही किंवा ई हा आगम येतो. उदा. बापांस – बापाईस, बापाहीस. माणसांना – माणसाइले.

(११) 'काय' या प्रश्नार्थक सर्वनामाची पंचमीची रूपे काव्हून, काहून, काम्हून अशी होतात.

(१२) द्वितीय पुरुष आणि तृतीय पुरुष यांची एकवचनी रूपे सारखीच होतात. उदा० तू आहे, तू गेला, तो आहे, तो गेला.

(१३) आज्ञार्थ द्वितीय पुरुषी एकवचनी रूपे य कारान्त होतात. उदा० जाय, खाय, पाह्य.

वऱ्हाडी बोलीचा एक नमुना असा –

कोन्या एका मानसाले दोन पोर व्हते. त्यांमधला एक लाह्यना बापले म्हने, बावा, जे जिनगीचा हिसा मले येईल, तो दे. मग त्यान त्याले पैसा वाटून देला. मग थोड्या दिसान लाह्यना पोर झाडून पैसा जमा करून लाम मुलकान गेला अन तथी उधयेपनान राहून आपला पैसा गमावून देला. मग त्यान अवघ खरचल्यावर त्या मुलकात काय पडला. त्यामुये तो खायाले मोताद झाला. [मराठी भाषा – उद्‌गम व विकास; भा. भा. स.]

वलभी विद्यापीठ

वलभी हे सौराष्ट्रातील भावनगरजवळ असलेले एक गाव आहे. याला सांप्रत वल हे नाव आहे. प्राचीन काळी हे गाव फार भरभराटीस आले होते. त्याच्या जवळच एक नाणावलेले बंदरही असून, तिथून भारताचा परदेशांशी व्यापार चाले.

वलभी ही मैत्रक राजवंशाची राजधानी होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या नगराचे अवशेष सांप्रत भावनगराच्या जवळ सापडले आहेत. कथासरित्सागरातल्या जीमूतवाहनाच्या कथेत वलभीचा 'एक व्यापारी ठाणे' म्हणून उल्लेख आला आहे. तिथे वैश्यांची फार मोठी वस्ती होती. दशकुमारचरितात वलभीचा उल्लेख आला आहे, तो असा – 'वलभी येथे ग्रहगुप्त नावाचा एक प्रसिद्ध व श्रीमंत खलाशी राहत होता. त्याला रत्नवती नावाची एक कन्या होती. तिचा विवाह मधुमती येथील एका वलभद्र नावाच्या वैश्यपुत्राशी झाला.' वलभी हे जसे व्यापारधंद्याचे ठिकाण होते, तसेच ते विद्येचेही माहेरघर होते, असे कथासरित्सागरात म्हटले आहे. यावरून गुप्तकालापूर्वी अनेक शतके वलभीचे माहात्म्य गाजत होते, असे दिसते.

प्राचीन काळी ज्या ज्या ठिकाणी मोठा व्यापारउदीम चाले, त्या त्या ठिकाणी जैन व बौद्ध धर्मांचा विशेषकरून प्रसार झाला, असे दिसून येते. हे धर्मप्रसाराचे काम व्यवस्थित चालावे म्हणून जैन व बौद्ध आचार्यांनी अशा औद्योगिक स्थानी आपले विहार बांधले. या विहारांत राहून विद्वान व चारित्र्यवान भिक्षू किंवा श्रमण आपापल्या शिष्यांना ज्ञानदानाचे कार्य करीत.

जैन धर्मात वलभीचे माहात्म्य पुढील घटनेसाठी आहे –

प्राचीन काळी वेदांप्रमाणेच जैनांचे धर्मग्रंथही लिपिबद्ध नसत. ते गुरुमुखाने शिष्य तोंडपाठ करीत. पण ही पद्धती फार काळ चालणे शक्य नव्हते. त्याचा परिणाम जैन धर्माच्या ऱ्हासात दिसू लागला. मग आपले धर्मग्रंथ लेखनिविष्ट न केल्यास जैन धर्म हळूहळू नामशेष होईल, अशी भीती वाटून काही विचारवंत जैन आचार्यांनी जैन सिद्धान्त लिहून काढण्याचे ठरवले. हे काम सुमारे चार शतके चालू होते. मगधातील पाटलिपुत्र येथे ते सुरू झाले आणि वलभी येथील एका धर्मपरिषदेत त्या कार्याला मान्यता देण्यात आली. ही धर्मपरिषद इ. स. ४५४ मध्ये वलभी येथे तेथील मुख्य आचार्य देवर्धिगणी याच्या अध्यक्षतेखाली भरली. तिने ४१ सूत्रे, ३० प्रकीर्ण, १२ निर्युक्ती व एक महाभाष्य अशा ८४ लिखित ग्रंथांना मान्यता दिली.

इ. स. ४५० ते ७७५ या कालखंडात वलभी हे विद्यापीठ म्हणून गाजले. नालंदा व वलभी या दोन विद्यापीठांत बऱ्याच बाबतींत साम्य आढळून येते. या विद्यापीठांच्या भरभराटीला तिथले राजे कारणीभूत झाले. गुप्त राजांनी नालंदाचे वैभव वाढवले, तर मैत्रक राजांनी वलभीला पुढे आणले. इथल्या ध्रुवसेन राजाच्या दुड्डा नामक भाचीने वलभी विद्यापीठाची पहिली इमारत बांधली, असे सांगतात. कित्येक राजांनी या विद्यापीठाच्या निर्वाहासाठी कित्येक खेड्यांचे उत्पन्न लावून दिले. कित्येकांनी विद्यार्थ्यांसाठी इमारती बांधल्या. कित्येकांनी पुस्तके घेण्यासाठी व लिहिण्यासाठी भरपूर द्रव्य दिले. थोड्याच काळात या विद्यापीठात १०० संघाराम निर्माण झाले व ६००० विद्यार्थी तिथे शिक्षण घेऊ लागले. सर्व जातींचे व सर्व पंथांचे विद्यार्थी दूरदूरच्या प्रदेशांतून शिक्षणासाठी इथे येत. त्यांत श्रेष्ठीपुत्र व राजपुत्रही असत. जैन धर्माचे विशेष शिक्षण या ठिकाणी मिळे.

गुणमती व स्थिरमती हे बौद्ध पंडित इथे आपल्या धर्माचे शिक्षण देत. वरील दोन्ही पंडितांचा विहार गावाबाहेर होता. त्याला 'बप्पपाद विहार' असे म्हणत. संस्कृती, शिक्षण व आचार या तीहींबद्दल नालंदाइतकीच वलभीने प्रसिद्धी मिळविली होती व नालंदाइतकेच श्रेष्ठ प्रतीचे शिक्षण तिथे दिले जात असे, असे इत्सिंग या चिनी प्रवाशाने लिहून ठेवले आहे. वलभीत शिकून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्याला राजदरबारी तावडतोब आश्रय मिळे. वलभीच्या शिक्षणपद्धतीला किती महत्त्व आले होते, ते या गोष्टीवरून कळून येईल.

वलभी विद्यापीठ जैन आचार्यांच्या प्रभावाखाली होते. तिथे जैन धर्माचे सांगोपांग शिक्षण देत, त्याचप्रमाणे इतरही ७२ विषय शिकवीत. त्यांमध्ये लेखनकला, गणित, गायन, वादन, नृत्य, व्याकरण, ज्योतिष, निरुक्त, निघंटू, इ. विषय असत. या ७२ विषयांची सूची राजशेखरसूरीने आपल्या प्रबंधकोशात दिली आहे. हे सर्व विषय सक्तीचे नव्हते. विद्यार्थ्यांना ज्या ज्या विषयांची गोडी वाटे, ते ते विषय विद्यार्थी पसंत करीत. मात्र ज्यांचा राज्यकारभाराशी संबंध असे, अशा राजपुत्रांना, प्रधानपुत्रांना व श्रेष्ठीपुत्रांना वरील सर्व विषयांची सामान्य माहिती देत असावे, असे वाटते. [प्रा. भा. वि.; ए. ए. इं.; हि. जॉ. ए. इं.]

वलांडण बेने इस्राएल लोकांचा एक प्रमुख सण. प्राचीन काळी या लोकांनी मिसर देशातून महाप्रस्थान करण्यासाठी सामुदायिकपणे त्या देशाची सीमा ओलांडली, त्या घटनेचे स्मारक म्हणून इस्राएल लोकांनी हा सण प्रचारात आणला.

अबीब (निसान) महिन्याच्या चौदाव्या दिवशी संध्याकाळी एक कोकरू मारून त्याचे विस्तवावर भाजलेले मांस बेखमीर म्हणजे बिन आंबवलेल्या पिठाच्या भाकरीबरोबर खायचे, हा या सणातला मुख्य विधी आहे. त्यासाठी संध्याकाळी हातपाय धुवून घरातली पुरुषमंडळी जेवायला बसतात. त्या वेळी द्राक्षरसाचा पेला हातात घेऊन यजमान म्हणतो. 'ज्या प्रभूने द्राक्षीचा हा उपज आम्हांला दिला, त्याची स्तुती असो.' नंतर भाकरींचे तुकडे करून ते सर्वांना वाटतात.

त्या वेळी एक लहान मुलगा विचारतो, 'हा काय प्रकार आहे?' त्यावर यजमान उत्तर देतो. 'हा परमेश्वराच्या वलांडणाचा यज्ञ आहे. ही दुःखस्मरणाची भाकरी आहे. आपण मिसर देशातून निघालो, त्या दिवसाचे हिच्या योगे जन्मभर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्मरण राहील.' भोजन झाल्यावर सर्वजण प्रभूची स्तोत्रे गातात.

हा सण सात दिवसांचा असून, यांतले पहिला व सातवा हे दिवस महत्त्वाचे असतात. हा सण साजरा करण्याच्या पद्धतीत कालमानानं अनेक बदल झाले आहेत. पुढे या दिवशी लोक पिकाच्या पहिल्या उपजाची पेंढी प्रभूला अर्पण करू लागले; तसेच दररोज त्याला निरनिराळे उपचार समर्पण करू लागले. या सणातच ख्रिस्ताचे शेवटचे भोजन होऊन, प्रभुभोजन हा विधी निर्माण झाला. [पवित्र धर्मशास्त्रविषयक कोश]

वलैयन एक जात. या लोकांची वसती तमिळनाड प्रदेशातील मदुरा, तंजाऊर व तिरुचिरापल्ली या जिल्ह्यांत आढळते. वलै म्हणजे जाळे होय. हे लोक जंगलात जाळे लावून पारध करतात, म्हणून त्यांना हे नाव मिळाले असे म्हणतात. तंजाऊरमधील वलैयन लोक प्रसिद्ध शैव संत कण्णप्प नायन्मार हा आमचा पूर्वज होता, असे म्हणतात. प्रारंभी हे वरिष्ठ समाजात गणले जात होते. परंतु त्यांनी उंदीर व बेडूक खायला सुरुवात केल्यापासून त्यांचा सामाजिक दर्जा निकृष्ट झाला, असे मानतात.

वलैयनांच्या मोनथिन्नी, पासिकट्टी, सरगू, वन्नियन, वेल्लांगुडु, इ. पोटजाती आहेत. मदुरा जिल्ह्यातील वलैयनांच्या वहनी, वळ्ळुवू, करदी आणि कंगू अशा चार पोटजाती आहेत. कंगू जातीचेही पासिकट्टी व कारैकट्टी असे दोन पोटभेद असून, पासिकट्टी स्त्रिया विवाहाची खूण म्हणून ताळीऐवजी मण्यांची माळ गळ्यांत घालतात आणि कारैकट्टी स्त्रिया घोड्याच्या केसांचा हार घालतात.

व्यवसाय – जाळे बांधून शिकार करणे हा यांचा एक व्यवसाय आहे. काही वलैयन मासेमारी, लोहारकी, शेतमजूरी, लाकडाच्या मोळ्या विकणे, इ. व्यवसाय करतात. जंगलातील उंदीर व कांवडे पकडण्यात ते फार पटाईत आहेत. आपल्याला त्रास देण्यासाठी परमेश्वराने उंदरांची निर्मिती केली, अशी त्यांची समजूत आहे.

विवाहप्रथा – हे लोक मुलामुलींची लग्ने मोठेपणी करतात. मुलगा मामेबहिणीशी विवाह करू शकतो. अन्य मुलीबरोबर विवाह ठरला असेल, तर त्याला मामाची संमती लागते. विवाहनिश्चित वराची बहीण जमलेल्या सर्व मंडळींना प्रथम ताळी दाखवून मग ती वधूच्या गळ्यात बांधते. ताळीबंधनाचा हा कार्यक्रम रात्री होतो. विवाह मार्गशीर्ष ते वैशाख महिन्यांत केव्हाही करतात. पण गर्भाधानविधी मात्र आदी म्हणजे कार्तिक महिना संपल्याशिवाय करीत नाहीत. कारण त्यापूर्वी हा विधी केला तर चैत्र महिन्यात अपत्याचा जन्म होण्याची शक्यता असते. हे लोक चैत्र महिना फार अशुभ मानतात. त्यांच्यांत विधवाविवाह व घटस्फोट रूढ आहेत. घटस्फोट घेण्यासाठी जमातीला दंड द्यावा लागतो. घटस्फोट घेतलेल्या स्त्रीच्या मुली तिच्या जवळ आणि मुलगे बापाजवळ राहतात.

मुलगी प्रथम ऋतुमती झाली असता तिला पंधरा दिवस एका नव्या झोपडीत ठेवतात व नंतर ती झोपडी जाळून टाकतात. या काळात त्या जातीतील मुली तिला भेटायला येतात आणि झोपडीबाहेर बसून गाणी म्हणतात. स्त्रीच्या गुणांचे मोहक वर्णन या गाण्यांत प्रामुख्याने असते.

वलैयनांच्या जातिप्रमुखाला कंबलियन असे म्हणतात. तो कांवळ्यावर बसून तंटयांचे निवाडे करतो, म्हणून त्याला हे नाव मिळाले असावे. विवाहित स्त्रीने व्यभिचार केला, तर तो निची खरडपट्टी काढून तिच्या प्रियकराचा करगोटा तिच्या गळ्यात बांधतो. एवढे केल्यावर त्यांना होणारी संतती कायदेशीर मानली जाते. त्याचप्रमाणे अविवाहित मुलामुलींना संतती झाली, तर त्या दांपत्याला काही दंड भरावा लागतो. तो दंड भरल्यावर त्यांच्याही संततीला कायदेशीर मान्यता मिळते. कंबलियन दंडाची निम्मी रक्कम स्वतःला घेतो आणि निम्मी रक्कम जातीच्या फंडात जमा करतो.

देवधर्म – या लोकांच्या सिंग पिडारी (ऐयनार), पडिनेत्तंपडडी करुप्पन, पप्पयर, इ. देवता आहेत. ते माघ महिन्यात त्यांचा वार्षिक उत्सव करतात. त्या वेळी सर्व लोक ऐयनारच्या देवळात जाऊन त्याला नमस्कार करतात. मग पुरुष शिकारीसाठी रानात जातात. शिकारीहून ते परतले, की घरच्या मोठ्या स्त्रिया त्यांना ओवाळतात. काही लोकांच्या अंगात येते. अंगात येणारे हे लोक मातांच्या विनंतीवरून त्यांच्या मुलांचे नामकरण करतात. शिकार करून आणलेली जनावरे जातिप्रमुख सर्वांना वाटून देतो. मग सर्वजण चांगला पोषाख करून पुन्हा रानात जातात आणि तिथे निरनिराळे खेळ खेळतात. याशिवाय हे लोक भूतपूजकही आहेत. ते नागाची पूजा करून त्याला कोंबड्याचा बळी देतात.

मृतिकप्रथा – यांच्यांत प्रेताला पुरण्याची प्रथा आहे. अंत्यविधीचा अखेरचा संस्कार ते सोळाव्या दिवशी करतात. मयताचा प्राण ज्या जागी गेला असेल, त्या ठिकाणी पाण्याने भरलेले एक भांडे आणि दोन नारळ ठेवतात. हा विधी पंधराव्या दिवशी होतो. सोळाव्या दिवशी मयताचे नातेवाईक मुंडन करून तलावात स्नान करतात. मग पाण्याने भरलेल्या भांड्याजवळ एक चौकोन करून त्यात अग्नी पेटवितात आणि भिकाऱ्यांना अन्नदान करतात.

याशिवाय त्यांच्यांत एक विशिष्ट पद्धत आहे, ती अशी – नवरा मेल्यावर त्याची बायको खांद्यावर पाण्याने भरलेले एक मडके घेऊन गावातील स्वजातीच्या मालकीच्या जागेभोवती तीन फेऱ्या घालते. फेरी पूर्ण झाली, की न्हावी मडक्याला छिद्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पाडतो. तिसरी फेरी झाल्यावर न्हावी ते मडके फेकून देतो आणि मृतात्म्याला शपथ घालून मोठ्याने म्हणतो. 'विधवेला आणि मुलांना शांतता मिळू दे.' [का. ट्रा. स. इं.; मदुरा गॅझे.]

वल्लंबन शेतकऱ्यांची एक जात. या लोकांची वसती तमिळनाडमधील मदुरा, तंजाऊर व त्रिचनापल्ली या भागात आढळते. वेल्लाळ पुरुष आणि वलैयन स्त्री यांचे हे वंशज आहेत. काही भागांत वल्लंबन लोकांना नाट्टर असे म्हणतात. त्या भागांत त्यांना काही सन्मानदर्शक विशिष्ट हक्कही असतात. मंदिरात पूजेच्या वेळी प्रथम ब्राह्मणांना व जमीनदारांना फुले व भस्म दिल्यानंतर यांना त्या वस्तू मिळतात.

वल्लंबनांच्या छेंजिनाडू, अमरावतीनाडू, पलयनाडू, मेलनाडू व किलनाडू अशा पाच पोटजाती आहेत. मेलनाडू व किलनाडू यांच्यांत बेटीव्यवहार होतात. मेलनाडू पुरुष मिशा ठेवतात आणि किलनाडू पुरुष त्या काढतात.

विवाहप्रथा – यांच्यांत मुला-मुलींची लग्ने ती वयात आल्यावर करतात. पुरुष मामेबहिणीशी अथवा आतेबहिणीशी लग्न करण्याचा आपला हक्क आहे, असे मानतात. त्यामुळे क्वचित दहा वर्षांचा मुलगा आणि प्रौढ वयाची मामेबहीण किंवा आतेबहीण यांचेही लग्न होते. अशा वेळी अल्पवयी नवऱ्याचा वडील भाऊ, पिता किंवा चुलता त्याच्या पत्नीशी संबंध ठेवतो. त्यांना झालेली संतती ही नवरा वयात आल्यावर त्याची मानली जाते. संपन्न वल्लंबन कुटुंबातील विवाहाला उंबलकारन म्हणजे जातिप्रमुख उपस्थित असतो. वराची बहीण ताळी घेऊन वधूगृही जाते आणि तिच्या गळ्यातील अगोदरचे, सोन्याच्या व काळ्या मण्यांचे कंठसूत्र काढून मग तिला ताळी बांधते. त्या वेळी शंख वाजवितात. नंतर वधू वराच्या घरी जाते आणि तिथे त्यांचा विवाह होतो. मग नातेवाईक त्यांना अहेर देतात.

देवधर्म – वल्लंबन लोक शैवपंथी आहेत. वेलंगकुडी गावची पेरीय नायकी ही त्यांची ज्ञातिदेवता आहे. मंगळवारी ते तिची पूजा करतात. त्या दिवशी घरोघर तांदुळाची दारू करून ती मंदिरात नेतात. दोन आठवडे असा कार्यक्रम झाल्यावर शेवटी ती सर्व दारू नजिकच्या तलावात टाकतात. ही दारूची भांडी कुमारिका किंवा विटाळ गेलेल्या वृद्ध स्त्रिया यांनी तलावाकडे न्यायची असतात. तिकडे जात असताना एखाद्या स्त्रीच्या अंगात येते. या उत्सवाच्या प्रसंगी कुंभार पाळणे, घोडे, हत्ती, इ. मातीची चित्रे करून देतो. ती चित्रे मग देवाला अर्पण करतात.

मर्तिकप्रथा – यांच्यांत प्रेत घराबाहेर मांडवात ठेवून त्याच्या तोंडावर तांदूळ टाकतात. मग त्याला स्मशानात नेऊन जाळतात किंवा पुरतात. तिसऱ्या दिवशी मयताची स्त्री आपल्या गळ्यातील ताळी काढून टाकते. प्रेताचा अखेरचा संस्कार सोळाव्या दिवशी करतात. महिनाभर सुतक पाळतात. [का. ट्रा. स. इं.]

वल्लभपूर एक प्रसिद्ध क्षेत्र. हे स्थान बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील श्रीरामपूर गावापासून सुमारे दोन मैलांवर आहे. इथे राधावल्लभाचे मोठे आणि सुंदर देवालय आहे. या क्षेत्राजवळच महेश नावाचे दुसरे क्षेत्र असून, तिथे जगन्नाथाचे मंदिर आहे. जगन्नाथाची रथयात्रा हा इथला मोठा सोहळा होय. ही यात्रा आठ दिवस चालते. यात्रेच्या पहिल्या दिवशी जगन्नाथाचा रथ वाजतगाजत, मोठ्या समारंभाने वल्लभपूरला आणतात. तिथे राधावल्लभासमवेत त्याचा मोठा उत्सव होतो आणि आठव्या दिवशी देवाचा रथ महेशक्षेत्री परत येतो. [स. भा. प्र. व.]

वल्लभ मेवाडो (इ. स. च्या १८ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक लोकप्रिय गुजराती कवी. हा बहुचरा देवीचा भक्त होता. याने आपले सर्व आयुष्य साधुसंगतीत घालवले. वल्लभाने आरासूरची अंबा, चुवाळची बहुचरा आणि पावागढची महाकाली या देवतांवर गरबे लिहिले आहेत. यांतील 'आनंदनो गरबो' हा बहुचरेचा गरबा आजही पूजाप्रसंगी घरोघर म्हटला जातो. याशिवाय त्याचे अन्यही काही गरबे प्रसिद्ध आहेत. 'शरणागरानो गरबो' हा आद्य शंकराचार्यांच्या सौंदर्यलहरीस्तोत्रासारखा आहे.

गुजराती गरबासाहित्यात याच्या तोडीचा कवी झाला नाही, असे म्हणतात. त्याला घोळा नावाचा एक भाऊ होता आणि तोही मोठा भक्त होता. [वि. मुं. रा. प.]

वल्लभ संप्रदाय वृंदावनाच्या पुण्यभूमीत निर्माण झालेला व वृद्धिगत झालेला एक भक्तिसंप्रदाय. हा वैष्णव संप्रदाय आहे. या संप्रदायाने उत्तर प्रदेश, राजस्थान व गुजरात या तीन प्रदेशांत कृष्णभक्तीची धारा प्रवाहित केली. वल्लभाचार्यांनी प्रवर्तित केला, म्हणून याला वल्लभ संप्रदाय म्हणतात. वल्लभाचार्य हे शुद्धाद्वैती होते, म्हणून त्यांच्या संप्रदायाला शुद्धाद्वैती संप्रदाय असेही नाव आहे. रुद्र संप्रदाय या नावानेही तो ओळखला जातो. विष्णुस्वामी हे रुद्र संप्रदायाचे मूळ प्रवर्तक होत. त्यांचा संप्रदाय त्यांच्या नंतर खंडित झाला होता. वल्लभाचार्य त्या गादीवर बसले आणि त्यांनी विष्णुस्वामींचे मत स्वीकारून त्याचा प्रचार केला.

वल्लभाचार्यांना दोन पुत्र होते. थोरला गोपीनाथ व धाकटा विठ्ठलनाथ. थोरला अकाली मृत्यू पावल्यामुळे धाकटा विठ्ठलनाथ हाच वडिलांच्या गादीवर बसला. संप्रदायाची वृद्धी व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यवस्था या दोहोंचे श्रेय यालाच आहे. विठ्ठलनाथ प्रगाढ विद्वान होता. त्याने वल्लभाचार्यांच्या ग्रंथांचा प्रचार केला व स्वतःही अनेक ग्रंथ लिहिले.

विठ्ठलनाथाने उत्तर भारतात सर्वत्र भ्रमण करून संप्रदायाचा विशेष प्रचार केला. गुजरातमध्ये तर त्याने सहा वेळा यात्रा केली. सांप्रत प्रस्तुत संप्रदायात प्रचलित असलेली सेवापद्धती यानेच निर्माण केली. विठ्ठलनाथाला सात पुत्र झाले. ते सातही वैष्णव होते. या सात पुत्रांनी वेगवेगळ्या गाद्या स्थापून तिथे वेगवेगळ्या नावांनी श्रीकृष्णमूर्ती स्थापन केल्या व संप्रदायाचा खूप विस्तार केला. त्या पुत्रांची नावे, त्यांचे उपास्य कृष्णरूप, व स्थाने अशी –

नाव	उपास्यनाम	स्थान
(१) गिरिधर	मथुरेश	कोटा
(२) गोविंदराय	विठ्ठलनाथ	नाथद्वारा
(३) बालकृष्ण	द्वारकाधीश	कांकरोली
(४) गोकुलनाथ	गोकुलनाथ	गोकुळ
(५) रघुनाथ	गोकुलचंद्रमा	कामवन
(३) यदुनाथ	बालकृष्ण	सुरत
(७) घनश्याम	मदनमोहन	कामवन

वल्लभाचार्य व विठ्ठलनाथ ब्रजभाषेचे उत्तम जाणकार होते. ब्रजभाषेला गौरव प्राप्त करून देण्याचे श्रेय या पिता–पुत्रांना दिले पाहिजे. त्यांच्या काळापर्यंत ब्रजभाषा ही रांगडी होती आणि साहित्याच्या क्षेत्रात तिचा प्रवेश झाला नव्हता; पण या पिता-पुत्रांनी निरंतर उद्योग करून व अनेकांना प्रोत्साहन देऊन त्या भाषेला समृद्धी मिळवून दिली. वल्लभाचार्यांचे चार व विठ्ठलनाथाचे चार, असे आठ कविशिष्य होते. पिता-पुत्रांच्या प्रेरणेने त्यांनीही ब्रजभाषेत बरीच कविता लिहिली.

या पिता-पुत्रांनी अनेक ठिकाणी भागवताचे सप्ताह केले. ज्या ज्या ठिकाणी हा सप्ताहसोहळा झाला, ती ती स्थाने संप्रदायात बैठक या नावाने प्रसिद्ध आहेत. अशा बैठका वल्लभाचार्यांच्या ८४ व विठ्ठलनाथाच्या २८ आहेत.

वल्लभ संप्रदायाने अनेक ललित कलांना प्रोत्साहन दिले. श्रीकृष्णाच्या सेवापद्धतीचे जे विस्तृत आणि व्यवस्थित असे विधान त्या संप्रदायात आहे, तसे ते अन्य कोणत्याही संप्रदायात आढळत नाही. सेवा, शृंगार व कीर्तन अशी या पद्धतीची तीन अंगे आहेत. समग्र वर्ष त्यांनी नाना पर्वे आणि उत्सव यांमध्ये विभागून टाकले आहे. प्रत्येक उत्सवात श्रीकृष्णाचा शृंगार कशा प्रकारचा असावा, पूजापद्धती कशी असावी, नित्यपूजेत कोणत्या वेळी कोणते पद गायिले जावे, या सर्व गोष्टींचे तपशीलवार वर्णन सांप्रदायिक ग्रंथांतून केलेले आढळते.

संप्रदायाचे दर्शन – वल्लभाचार्यांचा सिद्धान्त शुद्धाद्वैत या नावाने प्रसिद्ध आहे. या आचार्यांनी अद्वैताचा स्वीकार करून, त्याच्या मागे शुद्ध हे पद जोडले आहे. शुद्ध म्हणजे मायासंबंधरहित होय. याविषयी शुद्धाद्वैतमार्तंडातील एक श्लोक असा–

मायासम्बन्धरहितं शुद्धमित्युच्यते बुधैः ।
कार्यकारणरूपं हि शुद्धं ब्रह्म न मायिकम् ॥

अर्थ – मायासंबंधाने रहित असे जे ब्रह्म ते विद्वानांच्या मते शुद्ध होय. कार्यकारणरूप ब्रह्म शुद्ध असून, ते मायिक नाही.

शंकराचार्यांच्या अद्वैतात मायाशबलित ब्रह्म जगताचे कारण मानले आहे; पण वल्लभमतात मायोपाधिविरहित अतएव नितांत शुद्ध ब्रह्म हेच जगताचे कारण मानले आहे. ब्रह्म हेच विश्वामध्ये एकमात्र सत् आहे. त्याचा परिणाम जगत् व जीव यांच्या रूपाने दिसतो. त्यामुळे जीव आणि जगत् ही दोन्हीही सत्य आहेत.

शंकराचार्य नामरूपोपाधिविशिष्ट सगुण ब्रह्म व उपाधिरहित निर्गुण ब्रह्म अशी ब्रह्माची दोन रूपे मानतात. त्यांच्या मते या दोहोंत निर्गुण ब्रह्मच श्रेष्ठ असून, सगुण ब्रह्म मायाशबलित असल्याने कनिष्ठ आहे. पण वल्लभाचार्य म्हणतात, की ब्रह्माची ही दोन्ही रूपे सत्य आहेत. ब्रह्म हे परस्पर विरुद्ध धर्मांना आश्रय होऊ शकते. एकाच काळी ते निर्गुण आणि सगुणही असू शकते. ते अणूहूनही लहान आणि महताहूनही महान आहे. ते सदैव सबाह्यांतर एकरस आहे. ते अविकृत असूनही भक्तांवर कृपा करण्यासाठी परिणामरूप विकृती धारण करते. श्रीकृष्ण हाच परब्रह्म आहे. त्याचे शरीर सच्चिदानंदमय आहे. याविषयी निबंधातला त्यांचा श्लोक (नि. शा. ४४) असा –

निर्दोषपूर्णगुणविग्रह आत्मतन्त्रो
निश्चेतनात्मकशरीरगुणैश्च हीनः ।
आनन्दमात्रकरपादमुखोदरादिः
सर्वत्र च त्रिविधभेदविवर्जितात्मा ॥

अर्थ – जे दोषरहित, सर्व गुणांनी संपूर्ण, स्वतंत्र, जड शरीराच्या गुणांनी रहित, हात, पाय, मुख, उदर, इ. अवयव ज्याच्या आनंदमात्र स्वरूपाला असतात, जे सर्वत्र व विविध भेदांनी विवर्जित असते, असे जे (श्रीकृष्णरूप) तेच ब्रह्म होय.

श्रीकृष्ण जेव्हा आपल्या अनंत शक्तींच्या द्वारे आपल्याच ठिकाणी रममाण होतो, तेव्हा त्याला आत्माराम म्हणतात. जेव्हा बाह्य क्रीडेच्या इच्छेने तो आपल्या शक्तींची बाह्य अभिव्यक्ती करतो, तेव्हा त्याला पुरुषोत्तम म्हणतात. श्रीकृष्ण आपल्या अनंत शक्तींनी वेष्टित होऊन आपल्या भक्तांसह व्यापी वैकुंठात नित्य लीला करीत असतो. हा लोक विष्णूच्या वैकुंठाच्याही वर आहे. गोलोक हा या व्यापी वैकुंठाचा अंशमात्र आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रीकृष्णाच्या ठिकाणी अनेक शक्ती असून, त्यांपैकी श्री, पुष्टी, गिरा, इ. बारा शक्ती या मुख्य आहेत. भगवान क्रीडेसाठीच आपला समग्र परिवार घेऊन या भूतलावर अवतीर्ण होतो.

ब्रह्म – ब्रह्माचे तीन प्रकार होतात, ते असे – (१) आधिभौतिक = जगत् (२) आध्यात्मिक = अक्षरब्रह्म (३) आधिदैविक = परब्रह्म किंवा पुरुषोत्तम.

जगत् आणि त्यातले सर्व पदार्थ ब्रह्मरूपच आहेत. त्या भावनेनेच त्यांच्याकडे पाहावे. अक्षरब्रह्मात आनंदाचा अंश किंचिन्मात्र झाकला जातो; पण परब्रह्म हे आनंदाने सर्वथा परिपूर्ण असते. ब्रह्माच्या या उभय रूपांत केवळ स्वरूपाचाच भेद नाही; तर त्यांच्या प्राप्तीच्या साधनांतही भेद आहेत. अक्षरब्रह्म केवळ विशुद्ध ज्ञानाच्या द्वारेच प्राप्त होते; पण पुरुषोत्तमाची प्राप्ती होण्यासाठी अनन्यभक्ती हेच एकमेव साधन असते. शुद्धाद्वैतमताचे अवलंबन करून श्रीकृष्णाचे भजन करणे, हेच कल्याणाचे परम साधन आहे. चित्ताला कृष्णपरायण करणे हीच त्याची सेवा आहे. ही मानवी सेवा फलरूप असून, ती गोपींच्या ठिकाणी परिपूर्ण होती. शरीर व वित्त ही दोन्ही कृष्णार्पण करून कृष्णसेवा करावी. सर्व वासुदेव आहे, असे जाणल्याने अहंता-ममतारूप संसार निवृत्त होतो व सर्व ब्रह्म आहे, हे जाणणाऱ्याला परब्रह्माची प्राप्ती होते. अक्षरब्रह्म हे पुरुषोत्तमाच्या गृहासारखे आहे. तेच अव्यक्त होय. अव्यक्त व अक्षर अशा पुरुषोत्तमालाच परमगती म्हणतात. ही परमगती भक्तीनेच प्राप्त होते. ज्ञानाने जीवाचा अक्षरब्रह्मामध्ये लय झाल्यावरही परमपुरुषार्थ हा शिल्लक राहतोच. तो म्हणजे साक्षात भगवंताची प्राप्ती हा होय. हा परमपुरुषार्थ अनन्यभक्तीनेच सिद्ध होतो.

जीव – जेव्हा भगवंताला आत्मरतीची इच्छा होते, तेव्हा तो आपल्या आनंदादी अंशांना तिरोहित करून स्वतः जीवरूप ग्रहण करतो. या व्यापारात भगवंताची केवळ इच्छाच प्रधान कारण आहे. त्यात मायेचा संबंध अणुमात्रही नाही. ऐश्वर्याच्या तिरोधानाने त्याच्या ठिकाणी हीनता येते. श्रीच्या तिरोधानान सर्वहीनता येते. श्रीच्या तिरोधानाने तो समस्त आपत्तींचे पात्र बनतो आणि ज्ञानाच्या तिरोधानाने त्याच्या ठिकाणी देहात्मबुद्धी निर्माण होते. भगवान जेव्हा जीवभावाला प्राप्त होतो, तेव्हा प्रथमच आनंदाचा अंश तिरोहित होतो. स्फुलिंगातून जसा अग्नी उत्पन्न होतो, त्याप्रमाणे ब्रह्मातून जीवाचा आविर्भाव होत असतो. कोणताही आविर्भूत जीव नित्य असतो. तो खरे तर उत्पन्न होत नसून, त्याचे व्युच्चरण होते. तसे झाल्यावरही त्याच्या नित्यतेला कसलीही बाधा येत नाही. जीव हा ज्ञाता, ज्ञानरूप आणि अणू असतो. सच्चिदानंद भगवंताच्या अविकृत अशा सदंशातून जडाचे निर्गमन होते व अविकृत चिदंशापासून जीवाचा आविर्भाव होतो. जीवाच्या निर्गमनकाली चित् व आनंद या उभय अंशांचे तिरोधान असते.

जीवांचे शुद्ध, मुक्त व संसारी असे तीन प्रकार असतात. वर सांगितल्याप्रमाणे ब्रह्मातून निर्गमन होण्याच्या प्रसंगी आनंद या अंशाचे तिरोधान झाल्यावर त्याचा अविद्येशी संबंध येतो. या संबंधापूर्वीचा जीव हा शुद्ध समजला जातो. अविद्येशी संसर्ग आल्यावर त्यालाच संसारी म्हणतात. संसारी जीवही दोन प्रकारचे असतात– (१) दैव व (२) आसुर. त्यांतील दैव जीवांचेही मर्यादामार्गीय व पुष्टिमार्गीय असे दोन भेद आहेत. त्यांतील मर्यादामार्गीय जीव ज्ञान, भक्ती, कर्म, इ. उपायांच्या योगाने अनेक प्रकारचे झाले आहेत. ते सर्व मुक्तीचे अधिकारी आहेत. मुक्त जीवांमध्ये काही जीवन्मुक्त, तर काही केवलमुक्त असतात. जेव्हा संसारी दशेत पुष्टिमार्गी सेवेने भगवंताची स्वाभाविक दया जीवांवर होते, तेव्हा त्यांच्यामध्ये तिरोहित आनंदाचा अंश पुनः प्रादुर्भूत होतो. म्हणून मुक्त दशेत जीव आनंद या अंशाला प्रकटित करून स्वतः सच्चिदानंद बनतो आणि अशा प्रकारे भगवंताशी अभेद प्राप्त करून घेतो.

जगत् – निर्गुण सच्चिदानंद ब्रह्म हेच अविकृत भावाने जगद्रूपात परिणत होते. व्यवहारामध्येही ही गोष्ट दिसून येते. कुंडले, कंकणे, इ. रूपांमध्ये परिणत झाल्यावरही जसा सुवर्णाच्या ठिकाणी विकार उत्पन्न होत नाही, त्याच प्रकारे जगद्रूपात परिणत झाल्यावरही ब्रह्माच्या ठिकाणी कोणताही विकार उत्पन्न होत नाही. जगताला उत्पत्ती व विनाश नसतात, तर केवळ आविर्भाव व तिरोभाव असतात. अनुभावयोग्यता प्राप्त होणे म्हणजे आविर्भाव होय आणि अनुभावयोग्य न होणे हा तिरोभाव होय. ईश्वराच्या इच्छेनेच ही सृष्टी आविर्भूत होते.

जगत् व संसार यांच्यामध्ये सूक्ष्म भेद असतो. भगवंताच्या सदंशापासून प्रादुर्भूत झालेला पदार्थ म्हणजे जगत् होय व अविद्येच्या कारणाने जीवाने कल्पिलेला ममतारूप पदार्थ म्हणजे संसार होय. अविद्येची सत्ता असते तोवर संसार असतो. ज्ञानाचा उदय झाल्यावर तो आपोआप नष्ट होतो. मात्र जगत् हे जीव आणि ईश्वर यांच्या प्रमाणेच नित्य असते.

उपास्य – उपास्य विष्णूची स्वरूपे कोणत्या प्रकारची आहेत, याविषयी वल्लभाचार्यांनी सांगितले आहे, ते असे –

विष्णोस्तु त्रीणि रूपाणि पुरुषाख्यान्यथो विदुः ।
प्रथमं महतः स्रष्टृ द्वितीयं त्वण्डसंस्थितम् ।
तृतीयं सर्वभूतस्थं तानि ज्ञात्वा विमुच्यते ॥

अर्थ – विष्णूची पुरुषसंज्ञक तीन रूपे आहेत. त्यांतील पहिले रूप महत्-ब्रह्माला उत्पन्न करते, दुसरे ब्रह्मांडात असते व तिसरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सर्वभूतस्थ असते. या तीन्ही रूपांना जाणल्याने जीव मुक्त होतो.

याचे विवेचन श्री. द. वा. जोग यांनी केले आहे, ते असे– हा पुरुषच मत्स्यादी सर्व लीलावतारांचे मूळ आहे. मत्स्यादी लीलावतार भूमा या नावाचा जो ब्रह्मांडाहून अधिक असलेला अंतर्यामिरूप पुरुष, त्याचे आहेत. ते नारायणाचे अंश व कला आहेत; आणि कृष्ण तर साक्षात् भगवान आहे. म्हणूनच 'ध्येयः सदा सवितृमण्डलमध्यवर्ती०' या श्लोकात अंतर्यामीला 'नारायण' असे म्हटले आहे. तस्मात अंतर्यामी हे पुरुषोत्तमाचे एक रूप आहे. बाकीचे सर्व त्याचे अवतार आहेत. अक्षरापासून ज्या अंतर्यामीचे निर्गमन सांगितले आहे, ते या मुख्य अंतर्यामीचे अंश आहेत. त्यांच्यामध्ये आनंद हा मुख्य धर्म असतो. ते जीवाप्रमाणेच प्रत्येक शरीरात भिन्न आहेत. ते आपल्या नियत जीवांचेच नियमन करतात, सर्वांचे नियमन करीत नाहीत. जड, जीव व अंतर्यामी यांमध्ये भगवानाच्या सत्, चित् व आनंद या तीन गुणांतील क्रमाने एकेक गुणच प्रकट झालेला असतो. आचार्यांनी 'तत्तु समन्वयात्' (ब्र. सू. १.४) या सूत्रावरील भाष्यात त्या तिघांचाच निर्देश केला आहे.

पुरुषसंज्ञक विष्णूच्या मूलरूपाची चार रूपे होतात. पहिले पुरुषोत्तमस्वरूप. त्यालाच कृष्ण म्हणतात. दुसरे अक्षरस्वरूप. त्याचेच भक्तगोचर अक्षर व ज्ञानिगोचर अक्षर असे दोन प्रकार होतात. मिळून झाली तीन. चौथे अंतर्यामिस्वरूप. या चार रूपांनी प्रकट होणाऱ्या मूलरूपाचे ज्ञान भगवत्कृपेनेच प्राप्त होते.

पुष्टिमार्ग – भगवत्प्राप्तीचे एकमेव साधन म्हणून वल्लभाचार्यांनी पुष्टिमार्ग प्रवर्तित केला आहे. 'पोषणं तदनुग्रहः' (भाग. पु. २.१०) = भगवंताचा अनुग्रह हेच पोषण होय, असे शुकाचे वचन आहे. त्याचे विवेचन करताना वल्लभाचार्य आपल्या निबंधग्रंथात म्हणतात–

कृष्णानुग्रहरूपा हि पुष्टिः कालादिबाधिका।

अर्थ – कृष्णानुग्रहरूप पुष्टी ही काल, कर्म व स्वभाव यांना बाधा करते.

वास्तव अनुग्रहरूप भगवद्धर्म हीच पुष्टी आहे. लौकिक व अलौकिक फल साधून देत असल्यामुळे ती विलक्षण आहे. ती साधनहीन अशाही विशिष्ट अधिकाऱ्याच्या ठिकाणी उत्तम फल उत्पन्न करते. त्या फलावरूनच तिचे अनुमान होते. अनुग्रह गूढ असल्यामुळे उत्तम फल उत्पन्न करूनच तो प्रकट होतो. अजामिळ निंद्य कर्मांमध्ये निरत असूनही नुसत्या सांकेतिक भगवन्नामाने म्हणजे स्वतःच ठेवलेल्या पुत्राच्या 'नारायण' या नावाने मुक्त झाला. कर्मठ विश्वरूप, ज्ञानी दधीची व भक्त वृत्र यांना मारणारा व त्यामुळेच अनिष्ट फलाला योग्य असलेला इंद्र पुष्टीमुळे (भगवंताचा अनुग्रह) सुरक्षित राहिला. इंद्राने वज्र मारून दितीच्या गर्भाचे तुकडे केले; पण पुष्टीमुळेच तो मेला नाही.

ही पुष्टी चार प्रकारचे पुरुषार्थ साधते. पुष्टीमुळेच सहस्रार्जुन राजा झाला व देवहूती मुक्त झाली. योगाभ्यास, कर्म, ज्ञान, इ. सर्व त्या पुष्टीचीच द्वारे आहेत. हे अनुग्रहरूप पुष्टीचे सामान्य स्वरूप होय. पण याहून एक विशेष प्रकारची पुष्टी आहे. ती केवळ भगवत्स्वरूप प्राप्त करून देणारी भक्ती साधून देते. ही पुष्टिभक्ती होय.

प्राण्यांनी अनुसरण करण्यास योग्य असे तीन मार्ग वल्लभाचार्यांनी सांगितले आहेत– (१) पुष्टिमार्ग (२) प्रवाहमार्ग व (३) मर्यादामार्ग. भक्तिमार्ग हाच पुष्टिमार्ग असून, तो सर्वोत्तम आहे. अहंता–ममता शिल्लक असल्यामुळे केवळ कर्मामध्ये प्रेम ठेवणे, पण भगवंताला उपयोगी अशा क्रियेतच प्रवृत्त होणे, हा प्रवाहमार्ग होय. आणि केवळ वेदप्रतिपादित कर्म व ज्ञान यांचे संपादन करणे, हा मर्यादामार्ग होय. मर्यादामार्ग हा वैदिक आहे. कारण तो अक्षर ब्रह्माच्या वाणीपासून उत्पन्न झाला आहे; पण पुष्टिमार्ग मात्र साक्षात पुरुषोत्तमाच्या शरीरातून निघाला आहे. मर्यादामार्गाचा साधक ज्ञानाच्या द्वारे सायुज्य मुक्ती हे आपले ध्येय मानतो. पुष्टिमार्गी भक्त मात्र, आत्मसमर्पण व रसात्मक प्रीती यांच्या साहाय्याने आनंदधाम भगवंताच्या अधरामृताचे प्राशन करायला मिळणे, हेच आपल्या उपासनेचे फल मानतो. मर्यादाभक्तीत फलाची अपेक्षा कायम राहते. पुष्टिभक्ती मात्र फलाकांक्षेने रहित आहे. पहिलीचे लक्ष्य सायुज्यप्राप्ती हे आहे; तर दुसरीचे लक्ष्य अभेदज्ञान हे आहे.

वल्लभाचार्य म्हणतात, की पुष्टिमार्ग हा वर्ण, जाती, देश, इ. भेदांनी रहित असल्याने या कलिकालात जीवांना एकमात्र सुलभ मार्ग आहे. ज्याप्रमाणे सर्ग, विसर्ग, इ. प्रकार हे भगवान पुरुषोत्तमाच्या लीला आहेत, त्याचप्रमाणे अनुग्रह किंवा पुष्टी ही भगवंताची लीलाच आहे. मर्यादामार्गात भगवान हा साधनपरतंत्र असतो. कारण या मार्गात भगवंताला स्वतःच घालून दिलेल्या मर्यादा पाळाव्या लागतात. पुष्टिमार्गात मात्र तो कोणत्याही साधनाचा परतंत्र नसून सर्वस्वतंत्र असतो. तात्पर्य अनुग्रह हा भगवंताच्या नित्य लीलेचा एक आगळा विलास आहे.

अनुग्रहदशेत आनंदरूप भगवान प्रगट होऊन आपल्या स्वरूपबलानेच जीवाच्या देह, इंद्रिय व अंतःकरण यात आपला आनंद स्थापित करून, त्याला आपल्या स्वरूपात स्थिर करतो. जीवाची मुक्ती ती हीच. अन्यथाभाव सोडून स्वरूपाने अर्थात आनंदरूपाने अवस्थिती होणे, या गोष्टीलाच मुक्ती म्हणतात. जीवाला आनंदमय करणे हाच भगवंताचा स्वभाव आहे.

सेवा – भगवंताच्या अनुग्रहाच्या सिद्धीसाठी एकांत निष्ठेने व शुद्ध अनुरागाने त्याची सेवा करणे, हे जीवाचे श्रेष्ठ कर्तव्य आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वल्लभाचार्यांनी या सेवेचे तीन प्रकार सांगितले आहेत – (१) तनुजा – आपल्या शरीराने भगवंतासाठीच क्रिया करणे व शरीरव्यापार भगवंताला एकनिष्ठेने समर्पण करणे (२) वित्तजा – आपल्या जवळचे धन भगवत्कार्यासाठी वेचणे व (३) मानसी– मनाच्या द्वारे भगवंताची सेवा करणे.

आचार्य म्हणतात, की मनोनिरोधांच्या द्वारे केलेली भगवंताची सेवा ही मानसी होय. तीच सेवा सर्वश्रेष्ठ आहे. भगवंताच्या भेटीसाठी आतुर होणे व त्याच्या वियोगात नितांत व्याकुळ होणे, ही भक्तहृदयाची विशिष्ट घटना आहे. या घटनेमुळेच साधकावर भगवंताची कृपा होते. स्नेह, आसक्ती आणि व्यसन या प्रेमाच्या तीन अवस्था होत. या तीन्ही भावना भक्ती दृढ करण्यासाठी आवश्यक असतात. जेव्हा भगवंताच्या ठिकाणी भक्ताच्या स्नेह निर्माण होतो, तेव्हा त्याचा सांसारिक विषयांतला अनुराग संपतो. जेव्हा हा स्नेह आसक्तीमध्ये परिणत होतो, तेव्हा गृह, सुत, धन, दारा, इत्यादींच्या ठिकाणी त्याला अरुची उत्पन्न होते. व्यसन म्हणजे भगवंताच्या ठिकाणी निरंतर अनायास प्रेमभाव होय. याची प्राप्ती झाल्यावर जीव कृतार्थ होतो.

अन्य वैष्णव मतांप्रमाणेच वल्लभमतातही प्रपत्ती किंवा शरणागती हे नितांत उपादेय असे तत्त्व आहे. भक्ती व प्रपत्ती यांमध्ये वल्लभाचार्य फरक करतात. भक्तीमध्ये साधनांची अपेक्षा असते; पण प्रपत्तीत कोणत्याही साधनांची गरज नाही. प्रपत्तीत साधनानुष्ठानाचा स्वीकार नसतो, तर केवळ भगवंताचाच स्वीकार असतो. याचा अर्थ असा नव्हे, की पुष्टिमार्गात भजन-पूजनादिकांचा निषेध आहे. या गोष्टी अवश्य करणीय नाहीत एवढेच. प्रपत्तीचेही दोन प्रकार होतात – (१) मर्यादिकी व (२) पुष्टिमार्गी. मर्यादिकी प्रपत्तीत साधकाला कर्मानुष्ठान आवश्यक असते; पण पुष्टिमार्गी प्रपत्तीत कर्मानुष्ठानाची लवमात्र गरज नसते. त्या मार्गात भगवंताचा पूर्ण आश्रय असतो. सर्वथा, सर्वकाल, सर्वात्मभावाने भगवंताला जीवन समर्पित करणे, हे पुष्टिमार्गी प्रपत्तीचे स्वरूप आहे.

पुष्टिमार्गाची विशिष्टता – हा संसार विपत्तींचा सागर आहे. इथे चोहोकडून विपत्ती आपल्याला छळतात. जिकडे दृष्टी टाकावी तिकडे दुःखच दुःख आढळते. हे पाहून सर्व आचार्यांपुढे असा बिकट प्रश्न उपस्थित होत आला आहे, की या जगताची त्रिविध दुःखापासून आत्यंतिक निवृत्ती कोणत्या गोष्टीने होईल? असा कोणता सुगम उपाय आहे, की जो जीवांना या बंधनातून सोडवून आनंदाच्या मार्गावर आणील? प्राचीन आचार्यांनी या दुःखनिवृत्तीसाठी ज्ञान, कर्म व भक्ती हे मार्ग यथाधिकार उपदेशिले आहेत. वल्लभाचार्य या मार्गांची उपयोगिता मानतात; पण त्यांच्या मते वरील मार्गांचे यथायोग्य आचरण या कलिकालात होणे शक्य नाही. म्हणून स्त्री-शूद्रादी सर्व जीवांना सर्वसुलभ असा मुक्तिमार्ग कोणता तरी असला पाहिजे, असे त्यांना वाटले. याविषयी विचार करता करता वल्लभाचार्यांना पुष्टिमार्ग स्फुरला. या मार्गात परब्रह्म श्रीकृष्णाचा अनुग्रह हेच एकमेव साधन आहे आणि अन्य कोणत्याही साधनांची आवश्यकता नाही, हे त्यांना पटले. आपले सर्वस्व श्रीकृष्णचरणारविंदी समर्पण केल्यावर तो करुणाघन भक्ताचे भरण-पोषण अवश्य करील. फक्त त्याच्या कृपेवर भक्ताने पुरा विश्वास ठेवला पाहिजे.

ब्रह्मसंबंध – प्रस्तुत संप्रदायाने जीवाला पुष्टिमार्गी साधनेत अधिकार प्राप्त होण्यासाठी दोन प्रकारचे दीक्षाविधी निर्माण केले आहेत. पहिला शरणमंत्राचा उपदेश व दुसरा आत्मनिवेदन. पहिली दीक्षा ही साधकाचे वैष्णवत्व सिद्ध करण्याकरिता असून, दुसरी दीक्षा सेवामार्गात अधिकार मिळवून देण्यासाठी आहे. पहिल्या दीक्षेत वल्लभाचार्यांच्या वंशातला अधिकारी पुरुष साधकाच्या कानात 'श्रीकृष्णः शरणं मम' हा मंत्र उपदेशितो आणि त्याच्या गळ्यात तुळशीच्या मण्यांची माळ घालतो. दुसऱ्या दीक्षेचे नाव ब्रह्मसंबंध असे आहे. ही दीक्षाही वल्लभवंशातला पुरुषच देत असतो. ब्रह्मसंबंध याचा अर्थ पुष्टिमार्गात साधकाला अधिकारी करणे हा असतो. ब्रह्मसंबंध म्हणजे ब्रह्मरूप श्रीकृष्णाशी संबंध किंवा नाते प्रस्थापित करणे होय. हा संबंध गुरू शिष्याला पुढील मंत्र उच्चारायला लावून सिद्ध करतो –

सहस्रपरिवत्सरमितकालजातकृष्णवियोगजनिततापक्लेशानन्दतिरोभावोऽहं भगवते कृष्णाय देहेन्द्रियप्राणान्तःकरणानि तद्धर्मांश्च दारागारपुत्राप्तवित्तेहापराणि आत्मना सह समर्पयामि दासोऽहं कृष्ण तवास्मि।

भावार्थ – मी हजारो वर्षे तुझ्यापासून वेगळा पडलो आहे आणि त्यामुळे अनंत व्यथा भोगीत आहे. माझे सुख त्याच वेळी संपले, की ज्या वेळी मी तुझ्यापासून वेगळा झालो. म्हणून हे भगवंता, आज मी माझा देह, इंद्रिये, प्राण, अंतःकरण, इंद्रियांचे धर्म, गृह, सुत, धन, दारा, या सर्व गोष्टी माझ्या आत्म्यासह तुला समर्पित करीत आहे. हे श्रीकृष्णा, मी तुझा दास आहे.

साधकाने हे आत्मसमर्पण फक्त श्रीकृष्णालाच करायचे असते, कोणत्याही गुरूला किंवा आचार्याला नाही. ही आत्मसमर्पणाची भावना साधकाने आपल्या चित्तात आणि वृत्तीत सदैव जागी ठेवायची असते. वरील मंत्रही साधकाने गुप्त ठेवावा, असे सांगितले आहे.

हा समर्पणमंत्र मला साक्षात श्रीकृष्णाने श्रावण शुद्ध एकादशीच्या रात्री उपदेशिला, असे वल्लभाचार्यांनी सांगितले आहे.

पुष्टिमार्गी साहित्य – पुष्टिमार्गाचा प्रकाश करणारे मौलिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संस्कृत भाषेत व व्रज भाषेत विपुल आहे; पण त्याचे प्रमाणग्रंथ चारच आहेत. याविषयीचा श्लोक असा –

वेदाः श्रीकृष्णवाक्यानि व्याससूत्राणि चैव हि ।
समाधिभाषा व्यासस्य प्रमाणं तच्चतुष्टयम् ।।

(शुद्धाद्वैतमार्तंड ७९)

अर्थ – वेद, श्रीकृष्णाची उपदेशवाक्ये, ब्रह्मसूत्रे आणि व्यासांची समाधिभाषा म्हणजे (व्यासांना समाधिस्थितीत स्फुरलेले) भागवतपुराण ही पुष्टिमार्गाची चार प्रमाणे होत. त्यांतल्या त्यात ब्रह्मसूत्रे व भागवतपुराण ही दोन विशेष होत. वल्लभाचार्यांनी या दोन्ही ग्रंथांवर अणुभाष्य व सुबोधिनी या नावाचे दोन सरस व पांडित्यपूर्ण ग्रंथ रचले आहेत. आचार्यांचे हे दोन्ही ग्रंथ मुळात पूर्ण होते; पण त्यांचा ज्येष्ठ पुत्र गोपीनाथ याच्या मृत्यूनंतर त्या कुटुंबात जी अव्यवस्था निर्माण झाली, तिच्यात या ग्रंथांचे काही भाग गहाळ झाले. विठ्ठलनाथाला केवळ अडीच अध्यायांवरचेच अणुभाष्य उपलब्ध झाले. बाकीचे जेव्हा सापडेना, तेव्हा त्याने शेवटच्या दीड अध्यायावर स्वतः भाष्य लिहून या महत्त्वपूर्ण ग्रंथाची पूर्ती केली. सुबोधिनी ही भागवतावरची टीका आहे. ती प्रथम, द्वितीय, तृतीय, दशम या स्कंधांवर आणि एकादशस्कंधाच्या काही अध्यायांवर एवढीच उपलब्ध आहे.

अणुभाष्य हे पुष्टिमार्गाचे सर्वस्व आहे. त्यावर पुरुषोत्तम नामक आचार्याने भाष्यप्रकाश नावाची पांडित्यपूर्ण व्याख्या लिहिली. अणुभाष्यावरची ही सर्वोत्तम व्याख्या आहे. याव्यतिरिक्त पुरुषोत्तमाने सुबोधिनीप्रकाश, उपनिषद्दीपिका, आवरणभंग, प्रस्थानरत्नाकर, सुवर्णसूत्र, अमृततरंगिणी, षोडशग्रंथविवृत्ती, इ. ग्रंथ लिहिले. त्यानंतर मथुरानाथ व मुरलीधर यांनी अनुक्रमे प्रकाश व सिद्धान्तप्रदीप हे ग्रंथ लिहून अणुभाष्याच्या सिद्धान्तांना बोधगम्य केले. गोपेश्वराने भाष्यप्रकाशावर रश्मी नामक ग्रंथ लिहून संप्रदायाच्या हिताची गोष्ट केली. याचा शिष्य गिरिधर यानेही अणुभाष्यावर टीका लिहिली. त्याने अणुभाष्याच्या अनेक पाठांचे विवेचन करून, मूल ग्रंथाचा विशुद्ध पाठ निश्चित केला. याव्यतिरिक्त त्यानेच शुद्धाद्वैतमार्तंड नावाचा ग्रंथ लिहून, संप्रदायाचे सिद्धान्त स्पष्ट व सुगम केले. श्यामचंद्रमहाराजाने ब्रह्मसूत्रांवर भावप्रकाशिका वृत्ती लिहिली. भट्ट व्रजनाथ याने मरीचिका नामक वृत्ती लिहिली. आचार्यपुत्र विठ्ठल याने उर्वरित अणुभाष्य, तत्त्वदीपनिबंध, भागवतसूक्ष्मटीका, पूर्वमीमांसाभाष्य, निबंधप्रकाश, विद्वन्मंडन, शृंगाररसमंडन, सुबोधिनीटिप्पण, इ. ग्रंथ लिहून संप्रदायाला प्रतिष्ठा मिळवून दिली.

अष्टछाप कवी – वल्लभसंप्रदायात कुंभनदास, सूरदास, परमानंददास, कृष्णदास, गोविंदस्वामी, नंददास, छीतस्वामी व चतुर्भुजदास हे अष्टछाप कवी म्हणून प्रसिद्ध आहेत. यांपैकी पहिले चार वल्लभाचार्यांचे शिष्य असून, पुढचे चार विठ्ठलनाथाचे शिष्य आहेत. या आठही कवींनी श्रीकृष्णाच्या ललितलीलांवर पद्यरचना करून पुष्टिमार्ग वाढवला आणि व्रजभाषेचीही वृद्धी केली. या आठांतला सर्वश्रेष्ठ कवी सूरदास होय. त्याने सूरसागर रचून श्रीकृष्णाच्या बालरूपाचे समग्र व सांगोपांग वर्णन केले. परमानंददासानेही आपली समग्र काव्यशक्ती पुष्टि मार्गाच्या प्रसारासाठी वाहिली. अशीच अन्य कवींची काव्य – रचनाही संप्रदायाच्या वाढीला उपकारक ठरली. पाहा – वल्लभाचार्य.
[भा. सं. – श्री. बलदेव उपाध्याय; भा. द. सं; श्रीमद्वल्लभाचार्य और उनके सिद्धान्त – श्रीव्रजनाथ भट्ट, १९२७]

वल्लभाचार्य

(इ. स. १४७९–१५३१) वल्लभसंप्रदायाचे प्रवर्तक, शुद्धाद्वैत मताचे प्रतिष्ठापक व पुष्टिमार्गी भक्तिपरंपरेतील अग्रगण्य आचार्य. यांचा जन्म आंध्र प्रदेशातील एका तेलुगू ब्राह्मण कुळात झाला. हे घराणे सोमयाजी म्हणून प्रख्यात असून, या घराण्यातील पुरुषांनी सुमारे १०० सोमयाग केले होते. वल्लभाचार्यांच्या वडिलांनीही सोमयाग केले होते. या घराण्याचे मूळ गाव गोदावरीच्या काठचे कांकरवाड हे होय; पण वल्लभाचार्यांचा जन्म मध्य प्रदेशातील एका गहन वनात झाला. त्यांच्या जन्माविषयी एक कथा सांगतात, ती अशी –

वल्लभाचार्यांचे वडील लक्ष्मणभट्ट व आई इल्लम्मागारू हे सुखी व समाधानी दांपत्य म्हणून त्यांच्या गावात प्रसिद्ध होते. या दोघांना दोन मुली व एक मुलगाही होता. घरची आर्थिक स्थिती बेताचीच असली, तरी आहे त्यात संतुष्ट राहण्याची त्यांना सवय होती. परंतु पुढे एक दिवस लक्ष्मणभट्टांना एकाएकी संसाराविषयी विरक्ती उत्पन्न झाली व त्या भरात ते सर्वसंगपरित्याग करून प्रेमकर नामक एका सत्पुरुषाला शरण गेले. पुढे त्यांनी त्याचाच गुरूपदेश घेतला व त्याच्या जवळ राहून ते उर्वरित आयुष्याची कालक्रमणा करू लागले.

थोड्या दिवसांनंतर त्यांचा शोध घेत घेत त्यांचे वडील व पत्नी प्रेमकराच्या आश्रमात येऊन पोचले. तिथे लक्ष्मणभट्टाच्या पत्नीने प्रेमकराला सर्व हकीगत सांगून, आपल्या पतीला पुनश्च संसाराची प्रेरणा देण्याविषयी विनवले. प्रेमकराचे हृदय या कहाणीने द्रवले. त्याने लक्ष्मणभट्टाला पुन्हा संसार करण्याची आज्ञा केली. इतकेच नव्हे; तर त्याच्या पत्नीला आशीर्वाद देताना म्हटले. ‘ तुम्ही संसार नेटकेपणाने करा. लवकरच तुमच्या पोटी एक अलौकिक पुरुष जन्माला येणार आहे ! ’

या वार्तेने त्या दोघांना मनस्वी आनंद झाला व ते दोघे नव्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उत्साहाने संसाराला लागले. थोड्याच दिवसांत इल्लम्मागारू गर्भवती झाली. त्या वेळी लक्ष्मणभट्ट आपल्या कुटुंबियांना घेऊन यात्रेला निघाला होता. तो प्रथम प्रयागला व नंतर काशीला गेला. तिथे तो बरेच दिवस राहिला. एवढ्यात काशीवर दिल्लीच्या सुलतानाची स्वारी होणार असल्याची वदंता पसरली. त्यामुळे काशीतले अनेक नागरिक गाव सोडून अन्यत्र निघून जाऊ लागले. त्यांच्या बरोबरच लक्ष्मणभट्टही आपल्या कुटुंबाला घेऊन निघाला. मार्गात रात्र झाली. मध्य प्रदेशातील रायपुर जिल्ह्यातील चंपारण्य नावाच्या जंगलातून त्यांचा रस्ता जात होता. रात्रीच्या वेळी इल्लम्मागारूला असह्य प्रसववेदना सुरू झाल्या. लक्ष्मणभट्ट मोठ्या संकटात सापडला. तो मग पत्नीसह एका जागी थांबला. अखेर मध्यरात्री इल्लम्मागारू प्रसूत झाली; पण जन्मलेले बालक मात्र मृत निपजले. लक्ष्मणभट्टाला नियतीच्या करणीचे फार वाईट वाटले; परंतु अधिक शोक करायला अवधी नव्हता. लवकरात लवकर जंगल पार करायलाच हवे होते. मग त्याने त्या मृत बालकाला एका शमी वृक्षाखाली खळगा करून त्यात पुरले व त्यावर पालापाचोळा लोटून आपल्या पत्नीसह पुढचा रस्ता धरला.

दुसऱ्या दिवशी तो पुढच्या गावी पोचला. परंतु एव्हाना काशी-वर होणाऱ्या सुलतानी हल्ल्याची वार्ता ही नुसतीच हूल ठरली. त्यामुळे गाव सोडून निघालेले अनेक नागरिक पुन्हा परतू लागले. लक्ष्मणभट्टही आपल्या पत्नीसह त्याच मार्गाने परतला. जाताना तो चंपारण्यात शिरला. जिथे इल्लम्मागारू प्रसूत झाली होती, तिथून पुढे जात असता त्याने एक अद्‌भुत दृश्य पाहिले. लक्ष्मण-भट्टाने शमी वृक्षाखाली ज्या खळग्यात आपल्या नवजात मृत अर्भकाला पुरले होते, त्या जागी एक प्रदीप्त अग्निकुंड उत्पन्न झाले होते व त्या अग्निकुंडात एक सुकुमार, सुंदर बालक खेळत होते. लक्ष्मणभट्टाला मोठे नवल वाटले. त्याने ओळखले, की हे बालक दुसरे तिसरे कुणी नसून, आपण मृतावस्थेत पुरलेले आपले मूलच आहे व केवळ प्रभुकृपेनेच ते आपल्याला सजीव स्थितीत प्राप्त झाले आहे. मग त्याने व इल्लम्मागारूने त्या बालकाला उचलून घेण्यासाठी हात पसरले. त्याबरोबर ते अग्निकुंड एका-एकी विझले व त्या बालकाने इल्लम्मागारूकडे झेप घेतली. अशा प्रकारे अत्यंत नवलपूर्ण रीतीने पुनर्जन्म झालेल्या त्या बालकाला घेऊन ते दोघे स्वगृही परतले.

घरी परतल्यावर लक्ष्मणभट्टाने मुलाचे नाव वल्लभ असे ठेवले. वयाच्या पाचव्या वर्षीच लक्ष्मणभट्टाने त्याच्या शिक्षणाचा शुभारंभ केला. आठव्या वर्षी त्याचे उपनयन करून त्याला विष्णु-चित्त नामक गुरूच्या घरी अध्ययनार्थ पाठवले. वल्लभ हा जात्याच तैलबुद्धी व एकपाठी असल्यामुळे, त्याने आपले विद्या-ध्ययन झपाट्याने पुरे केले. पुढील शिक्षणासाठी त्याची काशीला पाठवणी करण्यात आली. तिथे त्याने वेद, वेदांगे, षड्दर्शने व भागवत धर्माचे महत्त्वाचे ग्रंथ अभ्यासले आणि त्यांत प्रावीण्य संपादन केले.

इ. स. १४८९ साली काशीतले अध्ययन पुरे करून तो घरी परतला. त्यानंतर त्याचे मातापिता त्याला घेऊन तीर्थयात्रेला निघाले. काशी, गया, जगन्नाथपुरी अशा यात्रा करीत ते दक्षिणेकडे चालले. दक्षिणेत फिरत असता तिरुपती येथे लक्ष्मण-भट्ट अकस्मात मरण पावला. वल्लभाचे वय या वेळी अवघे ११–१२ वर्षांचे होते. तथापि, याही वयात प्रकांडपंडित व धर्म-शास्त्रवेत्ता म्हणून तो प्रसिद्ध झाला. यात्राकालात त्याने काशी व जगन्नाथपुरी येथील अनेक विद्वानांशी वादविवाद केला व तो वल्लभाचार्य म्हणून मान्यता पावला.

वडिलांच्या निधनानंतर वल्लभाचार्यांनी पुनः यात्रेला आरंभ केला. मात्र त्यांची ही यात्रा केवळ देवदर्शन अगर तीर्थस्नान करण्यासाठी नव्हती; तर स्वतःच्या दार्शनिक सिद्धान्तांचा प्रचार करण्यासाठी होती.

वल्लभाचार्य

या प्रचारयात्रेत त्यांनी ठिकठिकाणच्या पंडितांना वादाची आव्हाने देऊन पाखंडवाद व शंकराचार्यांचा मायावाद,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

खंडन केले व स्वतः निश्चित केलेल्या शुद्धाद्वैताची सर्वत्र प्रतिष्ठापना केली. त्याप्रमाणे त्यांनी वैष्णवभक्तिमार्गाची ध्वजाही सर्वत्र फडकावली. त्यासाठी त्यांनी पुष्टिमार्ग नामक नवा भक्तिमार्ग प्रवर्तित केला. त्यालाच पुढे वल्लभसंप्रदाय म्हणू लागले. सतत वीस वर्षे परिभ्रमण करून त्यांनी हे प्रचारकार्य केले. त्या काळात ते कितीतरी वेळा सबंध भारतभर हिंडले. या प्रचारकार्यामुळे त्या काळचे सर्वश्रेष्ठ आचार्य म्हणून त्यांचा चहूकडे लौकिक झाला. या यात्राकालातच त्यांना अनेक शिष्य मिळाले व त्यांनी वल्लभाचार्यांच्या जीवनकार्याला वाहून घेतले. वल्लभाचार्यांच्या या परिभ्रमणाला त्यांच्या संप्रदायात पृथ्वीप्रदक्षिणा किंवा दिग्विजय अशी संज्ञा आहे. वल्लभाचार्यांच्या समग्र भारतभ्रमणापैकी तीन भारतयात्रा फार महत्त्वाच्या समजल्या जातात. या तीन प्रमुख भारतयात्रांचे वर्णन असे –

वल्लभाचार्यांनी आपली पहिली भारतयात्रा वैशाख वद्य २ शके १४१४ (इ. स. १४९२) या दिवशी सुरू केली व ६ वर्षे फिरून शके १४१९ (इ. स. १४९७)च्या शेवटी ती संपवली. या यात्राकालात ते झाडखंडात फिरत असता अकस्मात त्यांना व्रजप्रदेशात जाण्याची इच्छा झाली व ते तिकडे गेले. व्रजप्रदेश म्हणजे भगवान कृष्णाची क्रीडाभूमी. त्या भूमीत संचार करताना वल्लभाचार्यांच्या डोळ्यांसमोर सारी कृष्णलीला एखाद्या चित्रपटासारखी झळकली. कृष्णभक्तीने ते इतके भारावून गेले, की क्षणकाल त्यांच्यांतला प्रकांड पंडित विरघळून गेला व त्याच्या जागी एक भाववेडा भक्तकवी उभा राहिला. कृष्णाचे कीर्तन, कृष्णकथांचे श्रवण, कृष्णलीलांचे गायन, कृष्णमूर्तींचे दर्शन आणि कृष्णमूर्तीपुढेच नर्तन यांत ते अष्टौप्रहर रममाण होऊ लागले. सबंध चातुर्मास ते तिथे राहिले. गोविंदघाटावर त्यांनी श्रीमद्भागवताचे पारायण केले व त्याच जागी दामोदरदास हरसानी नावाच्या एका शिष्याला प्रथमच मंत्रदीक्षा दिली. अशा प्रकारे त्यांनी एका नव्या भक्तिपंथाची स्थापनाही केली.

त्यांची दुसरी भारतयात्रा ज्येष्ठ शु. २,' शके १४२० (इ. स. १४९८) या दिवशी सुरू झाली व शके १४२४ मध्ये त्यांनी ती संपवली. या यात्राकालात त्यांचा भर आपल्या नव्या भक्तिपंथाचा व शुद्धाद्वैत मताचा प्रचार करण्यावर विशेष होता. याच वेळी ते गोवर्धन पर्वतावर गेले व तिथे त्यांनी श्रीनाथाच्या मूर्तीची स्थापना करून तिच्या पूजे-अर्चेची व्यवस्था लावून दिली. या यात्राकालातच त्यांना सद्दू पांडे, रामदास चौहान, कुंभनदास, इ. शिष्यांचा लाभ झाला. महाराष्ट्रातील पंढरपूरच्या मुक्कामात पांडुरंगाचे दर्शन घेताना त्यांना विवाह करून संसार मांडण्याची इच्छा झाली. पुढे ते विजयनगरला गेले व तिथून आपल्या आईला बरोबर घेऊन त्यांनी काशीला प्रयाण केले. यात्रासमाप्तीनंतर शके १४२४ च्या आषाढ शुद्ध पंचमीला त्यांनी मधुमंगल नामक एका ब्राह्मणाच्या महालक्ष्मी नावाच्या मुलीशी विवाह केला. त्या वेळी त्यांच्या पत्नीचे वय केवळ ८ वर्षांचे होते व त्यामुळे ती अजून प्रपंच करण्यास योग्य झाली नव्हती. स्वाभाविकच हा काळ सत्कारणी लावण्यासाठी वल्लभाचार्यांनी आपल्या तिसऱ्या तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवले.

ही त्यांची यात्रा शके १४२४ च्या पौष मासात सुरू होऊन शके १४३१ मध्ये पूर्ण झाली. या यात्राकालात त्यांचा सर्वोच्च सन्मान झाला. म्हणून वल्लभ संप्रदायाचे अनुयायी त्यांची ही यात्रा अत्यंत महत्त्वाची मानतात. शके १४२४ मध्ये अंबाल्याचे श्रेष्ठी पूरणमल खत्री यांनी वल्लभाचार्यांच्या प्रेरणेने गोवर्धन येथील प्रसिद्ध श्रीनाथमंदिर बांधण्यास आरंभ केला. शके १४२८ मध्ये वल्लभाचार्य काशीला गेले व त्यांनी तिथे पत्रावलंबन नामक ग्रंथ निर्माण करून, मायावादी पंडितांना व शैव-शाक्तपंथियांना पराभूत केले. काशीहून ते पुन्हा गोवर्धन येथे गेले. तिथे त्यांनी पूरणमल खत्री यांनी बांधलेल्या नव्या देवळात श्रीनाथमूर्तीची नव्याने प्रतिष्ठापना केली. त्यानंतर वल्लभाचार्य दक्षिणयात्रेला गेले. विजयनगरच्या कृष्णदेवरायाच्या दरबारात त्यांचा विरोधी पंडितांशी वादविवाद होऊन, त्यात ते विजयी झाले. कृष्णदेवरायाने मग त्यांच्यावर कनकाभिषेक करून त्यांचा मोठाच बहुमान केला. विजयनगरहून वल्लभाचार्य पुनश्च गोवर्धन येथे गेले. तिथे त्यांना सूरदास, कृष्णदास, इ. आणखी शिष्य मिळाले. वल्लभाचार्यांनी सूरदासाला श्रीनाथजीच्या पुढे कीर्तन-गायन करण्याची व कृष्णदासाला मंदिराची व्यवस्था पाहण्याची आज्ञा देऊन गोवर्धनाचा निरोप घेतला.

यानंतर त्यांनी अडेल येथे राहून प्रपंच व परमार्थ यांत आपला काल व्यतीत केला. वयाच्या बावन्नाव्या वर्षी त्यांनी अडेल सोडले व ते प्रयाग येथे गेले. तिथे त्यांनी आपल्या संप्रदायानुसार संन्यासदीक्षा घेतली. मग ते काशीला गेले. तिथे त्यांनी ४० दिवस पूर्ण उपवास करून, सर्व काळ भगवच्चिंतनात घालविला आणि शेवटी शके १४५२ च्या आषाढ शुद्ध तृतीयेला मध्याह्नकाळी काशीच्या हनुमान घाटावरून उडी घेऊन गंगेत आत्मसमर्पण केले.

वल्लभाचार्य प्रकांड पंडित होते, तसेच उच्च कोटीचे साधक होते. गोवर्धनधारी श्रीकृष्णाचे ते अनन्य भक्त होते. सामान्यपणे त्यांनी ८४ ग्रंथ रचल्याची समजूत आहे. तथापि आज त्यांच्या नावावर असणाऱ्या ग्रंथांची संख्या केवळ ३१ इतकीच आहे. या ३१ ग्रंथांची नावे अशी –

(१) ब्रह्मसूत्र – अणुभाष्य किंवा बृहद्भाष्य (२) श्रीमद्भागवतावरील सुबोधिनी नामक टीका (३), भागवत व तत्त्वदीप निबंध (४) पूर्वमीमांसाभाष्य (५) गायत्रीभाष्य (६)

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पत्रावलंबन (७) पुरुषोत्तमसहस्रनाम (८) दशमस्कंध अनुक्रमणिका (९) त्रिविध नामावली (१०) शिक्षाश्लोक (११ ते २६) षोडशग्रंथ (यमुनाष्टक, बालबोध, सिद्धान्त मुक्तावली, पुष्टिप्रवाह मर्यादाभेद, सिद्धान्तरहस्य, नवरत्न, अंतःकरणप्रबोध, विवेकधैर्याश्रय, कृष्णाश्रय, चतुःश्लोकी, भक्तिवर्धिनी, जलभेद, पंचपद्य, संन्यासनिर्णय, निरोधलक्षण व सेवाफल) (२७) भगवत्पीठिका (२८) न्यायादेश (२९) सेवाफलविवरण (३०) प्रेमामृत आणि (३१) विविध अष्टके– यांत मधुराष्टक, परिवृढाष्टक, नंदकुमाराष्टक, श्रीकृष्णाष्टक, गोपीजन-वल्लभाष्टक, इ. अष्टकांचा समावेश आहे. या सर्व ग्रंथांतून वल्लभाचार्यांचे पांडित्य व प्रतिभा एकसमयावच्छेदाने दृष्टोत्पत्तीस येते. [ब्रज के धर्म-संप्रदायों का इतिहास– श्री. प्रभुदयाल मीतल, १९६८]

वल्लुपाट्टू तमिळनाडूतील लोकसंगीताचा एक प्रकार. मोठ्या मैदानात या संगीताचे कार्यक्रम होतात. हे एक उच्च प्रतीचे संगीत आहे. या संगीताला प्राधान्याने विल्लू नामक वाद्याची साथ असते. प्रमुख गायकाच्या हातात दोन काठ्या असतात. या काठ्यांना विसुकोल असे म्हणतात. विसुकोलांना पितळी मुठी असून, त्यांवर लहान लहान घुंगरे बसविलेली असतात. मुख्य गायकाला साथ देण्यासाठी अन्य चार जण असून, त्यांच्या हातांत लाकडी पट्ट्यांचे एक वाद्य, अडक्कू, काष्ठ व झांजा ही वाद्ये असतात. वाद्यांची लय वाढू लागल्यावर श्रोत्यांकडूनही चांगली साथ मिळते. कधी कधी गायकांचे दोन भाग होतात. पैकी एका भागाला वलथू पडुपवर (उजवी बाजू) आणि दुसऱ्याला इडथू पडुपवर (डावी बाजू) असे म्हणतात. या प्रसंगी आध्यात्मिक व पौराणिक विषयांवर सवाल-जबाबही होतात. हे सवाल-जबाब उत्स्फूर्त असतात.

या गीतांमधून शूरांच्या व देशभक्तांच्या कथा गायिल्या जातात, तशाच पुराणकथाही असतात. या सर्व कथांमधून मुख्यत्वे करुणरसाचा आविष्कार असतो. अलिकडे या लोकसंगीताच्या तंत्रात व प्रकारात बराच फरक झालेला आढळतो.

वल्लुवन द. भारतातील एक जात. या लोकांची वस्ती तमिळनाडूमध्ये आहे. यांच्या उत्पत्तीसंबंधीची एक दंतकथा अशी – ब्राह्मण ऋषी आणि परैयन स्त्री यांच्यापासून वल्लुवनांची उत्पत्ती झाली. या ऋषिपुत्रांना इतर लोक हीन मानू लागले; म्हणून त्यांनी पित्याकडे तक्रार केली. त्यावर ऋषीने त्यांना आशीर्वाद देऊन म्हटले, की 'तुम्ही पुढे प्रख्यात ज्योतिषी व्हाल आणि लोक तुम्हांला मान देतील.'

या जातीत अरुपथू कत्छी (साठ घरांचा विभाग) आणि नर्पथू कत्छी (चाळीस घरांचा विभाग) अशा दोन पोटजाती आहेत. अरुपथू हे नंदी गुरुक्कल यांचे वंशज असून, ते त्यांचे गोत्रही आहे. सिदंबर सयिच्छा अय्यंगर हे नर्पथूंचे गोत्र आहे.

विवाहप्रथा – वल्लुवनांमध्ये काही कुटुंबे शैव आणि काही वैष्णव आहेत. त्यांचा परस्पर रोटीव्यवहार होतो; पण बेटीव्यवहार होत नाही. त्यांच्यांत देजाची पद्धत आहे. वाङ्निश्चयाच्या वेळी भावी वधूच्या मांडीवर देज, पान, अलंकार, फुले व फळे ठेवतात. या वेळी ते सर्व नातलगांना ताडी देतात आणि त्याचा खर्च वरपक्ष करतो.

विवाहाच्या दिवशी दूधखांब उभा करून त्याच्या भोवती बरीच मडकी ठेवतात. बोहल्यावर चार दिवे लावतात. नंतर वधू-वर थोडी वाळू पसरून तिच्यावर सात पाने आणि त्यांवर भात ठेवतात. दूधखांबाला आणि मडक्यांना पिवळ्या दोऱ्याने सुतवतात. मग वधू–वर मडक्यांची आणि घरातील देवांची पूजा करतात. यानंतर त्यांचा पुरोहित काही संस्कृत मंत्र म्हणून सुतवलेल्या दोऱ्याचे कंकण करून ते वधू-वरांच्या मनगटांना बांधतो. मग घरात नेऊन त्यांना फुलांच्या माळा घालतात. माळा घालून बाहेर आल्यावर दूधखांबाजवळची मडकी बोहल्यावर ठेवतात. एका मडक्यांत धान्याची रोपे आणि दुसऱ्या चार मडक्यांत पाणी भरून ठेवतात. एका फडक्यात धान्याची रोपे बांधून ती पुरचुंडी पहिल्या मडक्यावर ठेवतात. दुसऱ्या दिवशी त्या पुरचुंडीतील रोपे चांगल्या स्थितीत असली, तर नेमस्त केलेली वधू वराला योग्य व अनुरूप आहे, असे मानतात आणि रोपे खराब झाली, तर वधू वाईट किंवा अल्पायुषी आहे, असे समजतात.

त्यानंतर तेल लावून स्नान केल्यावर वधू-वर पितरांना आणि गृहदेवतांना नैवेद्य दाखवितात. सायंकाळी ते बोहल्यावर बसून एकमेकांना पान व साळी नऊ किंवा बारा वेळा देतात आणि सतावीस वेळा तांदूळ देतात. नवऱ्या मुलाला तीन वेळा अरुंधतीचे दर्शन घडवितात. नंतर आकाशाला ताळी दाखवून ती कापुराने धुपवितात. धुपविलेली ताळी वर वधूच्या गळचात बांधतो. दुसऱ्या दिवशी वधू-वरांना गावातून मिरवून आणतात आणि तिसऱ्या दिवशी हातांतील कंकणे सोडल्यावर विवाहविधी पूर्ण होतो.

यांच्यांत विधवाविवाहाला मान्यता नाही; तसेच अनेक बायका करायला बंदी आहे. यांच्यांतील पुरुष बाराव्या वर्षानंतर जानवे घालतात.

व्यवसाय – वल्लुवन लोक परैयन व पल्लन या जातींचे पौरोहित्य करतात. त्यांच्यांतील अनेक स्त्रिया व पुरुष फलज्योतिष सांगण्याचा व वैद्यकीचा व्यवसाय करतात. ज्योतिष सांगणारा पुरुष दाढी वाढवतो, गळ्यात रुद्राक्षाची माळ व डोक्यावर पगडी घालतो. तो आपल्या बरोबर सदैव पंचांग व ज्योतिषशास्त्राचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पोंग्या बाळगतो. रोगनिवारक मंत्रांनी भारलेले ताईतही तो देतो. वल्लुवनांच्या जातीय तंटयांचा निवाडा कोल्करन व कन-क्कन हे दोन परंपरागत अधिकारी करतात.

हे लोक मलयनूर नामक शिवाचा उत्सव साजरा करतात. त्या वेळी काही पुरुष विचित्र वेष करून शिवाचे रूप धारण करतात.

मर्तिकप्रथा – लिंगधारी शैवपंथी माणूस मेल्यावर एक नारळ फोडून कापूर लावतात. मयताला नऊ घागरी पाण्याने स्नान घालून लिंग प्रेताच्या मस्तकावर बांधतात. एका फडक्यात एक रुपया, सात वेलाची पाने, नऊ तुळशीची काष्ठे व नऊ फुले बांधून ती पुरचुंडी प्रेताच्या उजव्या हाताला बांधतात. नंतर एका गाडीत पितळेची पाच भांडी व प्रेत ठेवून ती गाडी स्मशानात नेतात. तिथे एक खड्डा खणून त्यात गोमयाचा व गोमूत्राचा सडा टाकून प्रेत बसलेल्या स्थितीत पुरतात. प्रेताच्या थडग्यावर पुरोहिताने तयार केलेली एक मूर्ती ठेवतात. या वेळी पुरोहिताला मिळालेली दक्षिणा तो मूर्तीपुढे ठेवतो. हे पैसे खर्चून एक नंदी व लिंग घेतात आणि ते थडग्यावर ठेवतात.

शिवरूप घेतलेला वल्लुवन पुरुष

तिसऱ्या दिवशी मृताचे नातलग थडग्यापुढे दुधाने भरलेले एक भांडे ठेवतात. तिथे एक ओटा तयार करून त्यावर उत्तरेला नंदीची मातीची मूर्ती आणि दक्षिणेला मातीचाच एक भिक्षेकरी ठेवतात. ओटयाच्या चार कोपऱ्यांवर एकेक पान ठेवून त्यावर भात, भाज्या, फळे आणि इतर काही पदार्थ ठेवतात. सुतकाच्या अखेरच्या म्हणजे सतराव्या दिवशी मृताला शिवलोक मिळावा, म्हणून एक विधी करतात. [का. ट्रा. स. इं.]

वल्लुवर (इ. स. चे २ रे शतक) एक तमिळ संत आणि कुरळ या नीतिशास्त्रविषयक ग्रंथाचा कर्ता. याच्या कालाविषयी विद्वानात मतभेद आहेत. तथापि तो अठराशे वर्षांपूर्वी होऊन गेला, असे सर्वसामान्यतः समजले जाते. वल्लुवर या त्याच्या नावावरून तो वल्लुवन या हीन जातीत जन्मला असावा, असे काहींचे म्हणणे आहे; तर त्याच्या ग्रंथांतील विचारांच्या श्रेष्ठतेवरून तो उच्च जातीतला असून, एखाद्या राजाचा प्रधान किंवा मुरब्बी मुत्सद्दी असावा, असेही काहींचे म्हणणे आहे. पण त्याची निश्चित माहिती देणारे ऐतिहासिक चरित्र मिळत नाही; मिळतात त्या दंतकथा. त्यांवरून त्याच्याविषयी जी माहिती मिळते ती अशी –

याच्या बापाचे नाव भगवान व आईचे नाव आदी. या दांपत्याला जी एकूण सहा मुले झाली, त्यांपैकी वल्लुवर हा शेवटचा होय. हा मुलगा बुद्धिमान निपजला. शांत वृत्ती आणि कर्तव्यदक्षता याविषयी त्याचा सर्वत्र लौकिक होता. तो आणि त्याची पत्नी वासुकी ही दोघे तमिळनाडूमधील मैलापूर गावी साळयाचा व्यवसाय करून उदरनिर्वाह करीत व आल्या-गेल्या पाहुण्यांचे आतिथ्य करून हसतमुखाने प्रपंच चालवीत.

एके दिवशी तो बाजारात आमली सणंगे विकायला बसला असता, एक उनाड सावकारपुत्र त्याच्या पुढे येऊन उभा राहिला व त्याने वल्लुवराच्या सणंगांपैकी एक सणंग उचलून, त्याला त्याची किंमत विचारली. वल्लुवराने शांत स्वरात किंमत सांगितली. ‘ दोन रुपये. ’

सावकारपुत्राने ते सणंग मधोमध टरकावले व त्यांतले अर्धुक वल्लुवरापुढे धरून त्याची किंमत विचारली. वल्लुवर शांतपणे म्हणाला ‘ एक रुपया. ’

सावकारपुत्राने त्या अर्धुकाचे आणखी दोन तुकडे करून त्यांतल्या एका तुकडयाची किंमत विचारली. वल्लुवर शांतच होता. तो मुळीच न रागावता म्हणाला. ‘ अर्धा रुपया. ’

असे करता करता सावकारपुत्राने त्या सर्व लुगडयाच्या धांदोटया करून टाकल्या. आता तरी वल्लुवर चिडेल, संतापेल व आपल्याला शिवीगाळ करील अशी त्याची अपेक्षा होती; पण वल्लुवर तशाही परिस्थितीत शांतच राहिला. मग सावकारपुत्र म्हणाला. “ हे घे तुझ्या लुगडयाचे दोन रुपये. मी तुझे लुगडे फाडून टाकले, त्याच्या चिंध्या केल्या; आता ते माझ्या कामाला येणार नाही; पण मी जी चूक केली त्याचे शासन म्हणून मी हे दोन रुपये तुला देतो. ”

वल्लुवर हसला. विलक्षण मऊ स्वरात तो सावकारपुत्राला म्हणाला. ‘ खरे आहे तुझे म्हणणे. हे लुगडे आता तुझ्याच काय, कोणाच्याही उपयोगाचे राहिले नाही. पण तू दोन रुपये दिल्याने आणि मी ते घेतल्याने हे नुकसान कसे भरून येईल ? अरे, वस्तू वापरली, कारणी लागली, तर तिचा मोबदला मोजल्याचे, दिल्या-घेतल्याचे सुख. शेकडो शेतकरी शेतात अहोरात्र राबले, त्यांच्या श्रमांतून कापूस पिकला. तो कापूस वेचण्यात, निवड-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ण्यात, त्याचे पेळू बनवण्यात इतर अनेकांनी आपली शक्ती खर्ची टाकली. त्या पेळूंपासून मी व माझ्या सहकाऱ्यांनी सूत काढले व त्याचे हे सुंदर सणंग विणले. या सर्वांचे श्रम वाया गेले. ते असे या दोन रुपयांनी कसे भरून निघणार ? "

वल्लुवराचे ते शांत परंतु हितकारी बोलणे ऐकून सावकार-पुत्राचे हृदय हालले. त्याचा कंठ रुद्ध झाला. त्याच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. तो वल्लुवराचे पाय धरून म्हणाला.

" महाराज, मी चुकलो. मला क्षमा करा. "

वल्लुवरने त्याला उठवले. त्याला थोपटून कनवाळूपणानं तो म्हणाला. " मुला, तू शहाणा आहेस. अरे, वस्त्र फाटले तर दुसरे

संत वल्लुवर

बनवता येतं; पण आयुष्य एकदा बरबाद झाले, तर ते पुन्हा मिळत नाही. आता तू असा वेडेपणा कधी करणार नाहीस. "

सावकारपुत्र खाली मान घालून घरी गेला. परंतु दुसऱ्या दिवशी आपल्या वडिलांना घेऊन वल्लुवराचा पत्ता हुडकीत हुडकीत त्याच्या दारी येऊन उभा राहिला. सावकारालाही आपल्या मुलाला ताळ्यावर आणणारा हा सत्पुरुष कोण आहे, हे पाहण्याचे कुतूहल होते.

वल्लुवराने दारी आलेल्या या दोघा पिता-पुत्रांचे स्वागत केले व ' काय सेवा करू ', अशी विनयपूर्वक पृच्छा केली. सावकाराने म्हटले. " आपण माझ्या मुलाला काल सदुपदेश केला, त्याची चूक त्याला दाखवून दिली व त्याला सन्मार्गाला लावले म्हणून मी आपले आभार मानायला आलो आहे. याहीपुढे माझी आपणांस विनंती आहे, की त्याला आपण रोजच काही चांगल्या गोष्टींचे धडे देत जावे. "

सावकाराची ही विनंती वल्लुवराने आनंदाने मान्य केली. दुसऱ्या दिवसापासून सावकारपुत्र वल्लुवराकडे येऊ लागला व वल्लुवर त्याला नानाविध उपमा-दृष्टान्तांनी वेगवेगळ्या गोष्टी समजावून देऊ लागला. हळूहळू यांतूनच त्याच्या नीतिवचनांचा संग्रह तयार झाला व ही नीतिवचनेच पुढे कुरळ नावाच्या ग्रंथरूपात परिणत झाली. पाहा – कुरळ. [पुष्पदंत; तमिळनाडू]

वव्री आत्रेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील एकोणिसावे सूक्त याने रचले आहे. या सूक्ताची देवता अग्नी असून; त्याची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. याची एक ऋचा (ऋ. ५.१९.३) अशी –

आ श्वैत्रेयस्य जन्तवो द्युमद् वर्धन्त कृष्टयः।
निष्कग्रीवो बृहदुक्थ एना मध्वा न वाजयुः॥

अर्थ – अलंकारविभूषित बृहदुक्थ राजाने मधुर स्तोमांनी बलसंवर्धन केलेल्या अग्नीची सामर्थ्यप्राप्तीसाठी उपासना केली.

या सूक्ताच्या पहिल्या ऋचेत याने आपली आर्थिक स्थिती हलाखीची असल्याचे सांगितले आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वश अश्व्य एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील सेहेचाळिसावे सूक्त याने रचले आहे. याच्या नावावरून या सूक्ताला वशसूक्त म्हणतात. परंतु ऐतरेय आरण्यकान्वये, सर्व जगाला वश करणारे सूक्त म्हणून याला वशसूक्त हे नाव प्राप्त झाले (१.५.२०). अश्विनी देवांची कृपा या ऋषीवर होती, असा अन्यत्र उल्लेख आहे (ऋ. १.११२.१०; १.११६.२१). या सूक्तात इंद्र-वायुवर्णन आणि पृथुश्रवस् कानीत याच्या दानाची स्तुती आहे (८.४६.२२)–

षष्टिं सहस्राश्व्यस्यायुतासनमुष्ट्रानां विंशतिं शता।
दश श्यावीनां शता दश त्र्यरुषीणां दश गवां सहस्रा॥

अर्थ – (पृथुश्रवस् राजाने) मला साठ सहस्र अश्व, दोन हजार उंट, एक हजार कृष्णवर्णीय घोड्या व दहा सहस्र पिंगट धेनू दिल्या.

या सूक्ताच्या २१ व्या ऋचेत वशाचे अदेव म्हणजे देवसदृश असे वर्णन आढळते. वशाला अश्वांबरोबर उंटही दान मिळाले आहेत. त्यावरून सूक्तकार राजस्थान प्रदेशाशी परिचित असावा, असे अभ्यासकांचे मत आहे. तेहतीस ऋचांच्या या सूक्तात निरनिराळ्या पंधरा छंदांचा उपयोग केलेला आहे. त्यात भुज्यु तौग्र्य याची कथाही सांगितली आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वशवर्ती उत्तम मन्वंतरातील देवगण. हे संख्येने दहा आहेत. ब्रह्मांडपुराणात त्यांची नावे दिली आहेत, ती अशी – ज्योती, बृहद्वसू, मानस, विभास, विरजस्, विश्वकर्मन्, विश्वधा, विश्वायू, समितार आणि सहस्रधार. [प्रा. च. को.]

वशिता बौद्ध देवतांचा समूह. या बारा देवता असून, त्या अमिताभाच्या कन्या मानल्या जातात. बौद्ध लोकांच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी जे यमनियम केलेले असतात, त्यांना मूर्तरूप देऊन वज्रयानी बौद्धांनी त्यांची पूजा सुरू केली. त्याच

वश्य तारा

या देवता होत. सर्व वशिता द्विभुज असून, त्या उजव्या हातात कमळ आणि डाव्या हातात आपले अभिज्ञानचिन्ह धारण करतात. त्यांची नावे व वर्णने निष्पन्न योगावलीच्या धर्मधातुवागीश्वर मंडळात दिलेली आहेत. [इं. बु. इ.].

वशीकरण मंत्र, यंत्र, भस्म आणि विविध प्रकारची औषधी द्रव्ये यांच्या साहाय्याने एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला वश किंवा मोहित करू शकते व तिच्यावर हवा तो प्रभाव पाडू शकते, ही कल्पना प्राचीन कालापासून प्रचलित आहे. अथर्ववेदात वशीकरणासंबंधी पुष्कळ माहिती आढळते. स्त्रीला वश करून घेण्यासाठी त्यात अनेक मंत्र सांगितले आहेत. महाभारतात अशा विद्येचा उल्लेख आहे (वन. २३२.७–८). ही मुख्यतः तांत्रिक विद्या आहे. शिवस्वरोदय या ग्रंथात शिव–पार्वतींचा संवाद असून, त्यात शिवाने पार्वतीला, पुरुषाने स्त्रीला वश करण्याचे तंत्र सांगितले आहे. महायक्षिणीसाधनम् या ग्रंथात वशीकरणयक्षिणी मंत्र दिला आहे. त्याच्या जपाने स्त्री वश होते, असे सांगितले आहे. योगिनीतंत्रात वशीकरणाचे यंत्र व मंत्र दिले आहेत. त्यांच्या साहाय्याने शत्रूला वश करता येते, देवेंद्रालाही वश करता येते; एवढेच नव्हे, तर सर्व जगाला मोहिनी घालता येते, असे म्हटले आहे. [योगिनीतंत्र; शिवस्वरोदयशास्त्र; प्रा. भा. सा. सां. भू.; महायक्षिणीसाधनम्]

वश्य तारा एक बौद्ध देवता. हिला आर्यतारा असेही नाव आहे. ही ध्यानी बुद्ध अमोघसिद्धी याच्यापासून उत्पन्न झालेली आहे. हिचा वर्ण हिरवा आहे. ही भद्रासनात बसलेली असून, उजव्या हाताने वरद मुद्रा दर्शवते व डाव्या हातात उत्पल धारण करते. तिच्या मस्तकी अमोघसिद्धीची प्रतिमा आहे. हिचे नेपाळी चित्र उपलब्ध आहे. [इं. बु. इ.]

वषट्कार एक वैदिक मंत्र. हा मंत्र पवित्र आणि गूढ आहे. वषट् हा शब्द मोठ्याने व त्यावर जोर देऊन उच्चारतात. होत्याने याचा उच्चार केल्यावर अध्वर्यू अग्नीत आहुती टाकतो.

ऐतरेय ब्राह्मणानुसार (११.६) वषट्कार हा वज्रासारखा आहे. याचा उच्चार करताना तो म्हणणाऱ्याने आपल्या शत्रूचे स्मरण करावे. त्यामुळे शत्रूवर वज्राघात केल्यासारखा होतो.

आश्वलायन असे सांगतो, की वषट्काराचा उच्चार फक्त दिवसा करायचा असतो; रात्री नाही (१.५.१८).

सर्व याज्या आणि अनुयाज्या यांच्या शेवटी वषट्कार उच्चारतात. [हि. ध.; पा. का. भा.]

वसई ठाणे जिल्ह्यातले ऐतिहासिक ठिकाण. मुंबईच्या उत्तरेला सुमारे तीस मैलांवर वसईच्या खाडीच्या उत्तर तीरावर हे बंदर आहे. तिथे एक भुइकोट किल्ला आहे. त्याच्या तीन बाजूंना पाणी व एका बाजूला जमीन आहे. त्या किल्ल्यात पोर्तुगीजांनी बांधलेल्या भव्य चर्चेसचे अवशेष पाहायला मिळतात. तिथेच एक शंकराचे, एक देवीचे व दोन मारुतीची देवळे आहेत. त्यांतील एक मारुतीचे देऊळ चिमाजीअप्पाने बांधलेले आहे. वसई हे गाव किल्ल्याच्या कोटाबाहेर वसलेले आहे.

इ. स. १३४७ पर्यंत उत्तर कोकण प्रदेशावर हिंदू राजसत्ता होती. त्यानंतर तिथे गुजरातच्या मुसलमान सुभेदाराची सत्ता स्थापन झाली. इ. स. १५२६ मध्ये पोर्तुगीजांनी तिथे वखार घातली. त्यांच्यापासून संरक्षण करण्यासाठी दीवच्या सुभेदाराने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिथे एक लहानसा किल्ला बांधला. पण इ. स. १५३३ मध्ये पोर्तुगीज आरमाराने वसईवर स्वारी करून तो किल्ला नष्ट केला. तेव्हा गुजरातचा सुभेदार बहादुरशहा याने इ. स. १५३४ साली वसई व आसपासचा प्रदेश पोर्तुगीजांना देऊन त्यांच्याशी संरक्षणाचा तह केला. पुढे इ. स. १५३६ मध्ये त्यांनी वसईला किल्ला बांधला. इ. स. १५९०–१६०० या १० वर्षांत त्यांनी तो किल्ला पुन्हा बांधून काढला. त्याला ११ बुरूज होते व त्यावर ९० तोफा होत्या. तिथे गलबते बांधण्याचा मोठा कारखानाही होता. इ. स. १७३९ मध्ये चिमाजीअप्पाने वसईचा किल्ला मोठ्या शौर्याने लढून सर केला व तिथे मराठ्यांची सत्ता स्थापली. तोपर्यंत त्या भागात पोर्तुगीज लोक हिंदूंना खूप छळ करीत होते; पण त्यानंतर तो बंद झाला.

इथे इ. स. १८०२ साली दुसरा बाजीराव पेशवा याने इंग्रजांशी तह केला. [सु. वि. को.; उ. कों. प्रा. इ.; इति. सह.]

वसंत धरणी जातीतला एक लोकप्रिय राग. हा पूर्वी थाटातून निघतो. याची जाती षाडव संपूर्ण आहे. याचा वादी स्वर तार षड्ज व संवादी पंचम आहे. तथापि आरोहात पंचम वर्ज्य आहे. या रागात दोन मध्यमांचा प्रयोग होतो आणि गांधार व मध्यम स्वरांची संगती पुनरावृत्त होत असते. याच्या आरोहात ललितांग मिळवण्याची प्रथा आहे. याचा गानसमय उत्तररात्रीपासून दिनमध्यापर्यंत आहे; पण वसंत ऋतूत याला वेळेचे बंधन नसते. [क. सं.; भा. सं. मा. तृतीय पुष्प]

वसंत ऋतू वर्षाच्या ऋतुचक्रांतला पहिला व सर्वोत्तम मानलेला ऋतू. चैत्र, वैशाख या दोन महिन्यांच्या कालखंडाला हे नाव प्राचीन काळापासून दिलेले आहे. या ऋतूत ओषधी उत्पन्न होतात व वनस्पतींना फुले, फळे येतात, असे वर्णन शतपथ ब्राह्मणात केलेले आहे. त्या ग्रंथात वसंत ऋतूला संवत्सराचे द्वार मानले आहे, तर तैत्ति. ब्राह्मणात त्याला मुख मानले आहे. देवतेला पंचामृत स्नान घालताना मधुस्नानाच्या वेळी ऋग्वेदातले जे मंत्र म्हटले जातात, त्यांत वसंत ऋतूचे वर्णन आहे. ते मंत्र (ऋ.–१. ९०. ६-७) असे –

मधु वाता ऋतायते मधु क्षरन्ति सिन्धवः।
माध्वीर्नः सन्त्वोषधीः॥
मधु नक्तमुतोषसो मधुमत्पार्थिवं रजः।
मधु द्यौरस्तु नः पिता॥

अर्थ – आम्हां नियतमार्गी उपासकांसाठी सुखकारक वायू आणि मधुर रसपूर्ण नद्या वाहोत; तसेच ओषधी सुमधुर होवोत. आम्हां उपासकांप्रीत्यर्थ रात्र आणि उषा (प्रातःकाल), पृथ्वी आणि अंतरिक्ष, तसेच आम्हां सर्वांचा पिता द्यु सुखकर होवो.

वसंताचे आगमन होताच सर्व वातावरण आल्हाददायक होते, असा वरील मंत्राचा आशय आहे.

शतपथ ब्राह्मणाच्या काली सूर्य कृत्तिका नक्षत्रात आला, की वसंतसंपात होत असे. सूर्य कृत्तिका नक्षत्रात असला की उषःकाली पूर्व क्षितिजावर उगवणारे नक्षत्र अश्विनी असते. म्हणून अश्विनीचा उदय हे वसंतागमाचे चिन्ह समजले जाई.

गीतेत श्रीकृष्णाने 'ऋतूनां कुसुमाकरः' = ऋतूंमध्ये मी वसंत आहे असे म्हणून या ऋतूचा गौरव केला आहे. संस्कृत साहित्यात वसंताविषयी विशेष प्रीती व्यक्त केलेली आढळते. संस्कृत कवींचे हृदय वसंताच्या दर्शनाने मोहरून जात असे. आदिकवी वाल्मीकीने रंगवलेले वसंताचे चित्र अगदी सजीव वाटते. वसंतवायू वृक्षांना नाचवतो, कोकिळांना गायला लावतो आणि गिरिकंदरात घोष घुमवून जणू संगीतसभा भरवितो. वृक्षांवरील भ्रमरांचा गुंजारव ऐकून वाटते, की हे वृक्षच अंतरीची प्रसन्नता गीतातून व्यक्त करीत आहेस.

कालिदास हा तर वसंतवेडा कवी होता. ऋतुराज वसंताच्या आगमनामुळे वनश्रीच्या रंगरूपात होणारे बदल त्याने सूक्ष्मतेने टिपले आहेत. उदा० –(रघुवंश ९. २६, ३३)

कुसुमजन्म ततो नवपल्लवास्तदनु षट्पदकोकिलकूजितम्।
इति यथाक्रममाविरभून्मधुर्द्रुमवतीमवतीर्य वनस्थलीम्॥
अभिनयान् परिचेतुमिवोद्यता मलयमारुतकम्पितपल्लवा।
अमदयत् सहकारलता मनः सकलिका कलिकामजितामपि॥

अर्थ – जेव्हा वसंत वनस्थलीत अवतरतो तेव्हा फुले, नवपल्लव, भ्रमर व कोकिळ हे क्रमशः त्याच्या आगमनाची सूचना देतात. अशा वेळी आंब्यावर विस्तारलेल्या वेली नर्तनाने मनाला मोहून टाकतात आणि मलय मारुत त्यांचे पल्लव उडवीत राहतो.

कालिदासाने कुमारसंभवात वसंताच्या उन्मादक सौंदर्याची किमया अत्यंत प्रभावी शैलीत वर्णिली आहे. उमेने शिवाच्या सेवेसाठी त्याच्या तपोवनात पाऊल टाकताच तिथे मदनाच्या प्रभावामुळे अकालीच वसंत कसा अवतरला व त्याच्या दर्शनाने ते तपोवनाचे प्रमदवन कसे बनले, याचे त्याने केलेले चित्रण अतिशय हृदयंगम आहे. कालिदासाने केलेल्या या वसंतवर्णनात यौवनाच्या पहिल्या भरातील प्रीतीचा आवेग ओसंडून वाहत आहे.

माघ, भारवी व श्रीहर्ष यांनीही आपल्या महाकाव्यांत वसंतश्रीचे सौंदर्य वर्णिले आहे. भारवीने मंद मंद पदन्यासाने नूपुरांचे रुणझुण रसिकांच्या कानी भरणाऱ्या मदालसा रमणीच्या रूपात वसंताला पाहिले आहे. श्रीहर्षाने आपल्या नैषधीयचरितात विरही नलाला असह्य होणारा वसंत अतिशय कल्पकतेने चितारला आहे. वासंतिक सौंदर्याचा विरही जनांना होणारा ताप अर्थात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संस्कृत कवींनी नानाविध रीतींनी व्यक्त केला आहे. परंतु त्यातील जयदेवाची अभिव्यक्ती अत्यंत हृदयस्पर्शी आहे. त्याने गीतगोविंदात विरहोत्कंठ राधेच्या कृष्णप्रीतीचे भावचित्र हळुवारपणे रंगवले आहे. सखी राधेला म्हणते–

ललितलवङ्गलतापरिशीलनकोमलमलयसमीरे ।
मधुकरनिकरकरम्बितकोकिलकूजितकुञ्जकुटीरे ॥
विहरति हरिरिह सरसवसन्ते ।
नृत्यति युवतिजनेन समं सखि विरहिजनस्य दुरन्ते ॥

अर्थ – (राधे, वसंत बघ कसा बहरला आहे!) मलयवायू लवंगलतेच्या स्पर्शाने परिमळला आहे. कुंजकुटीरात भ्रमरावली फुलाफुलांवर रुंजी घालीत आहे आणि कोकिळांच्या कूजनाने सारा परिसर कसा धुंद झाला आहे. सखे, हा स्थलकाळ विरही जनांना दुःसह आहे. अशा वेळी कृष्ण गोपयुवतींसह नृत्य करण्यात रंगला आहे!

ते ऐकून विरहव्याकुळ राधा म्हणते–

मामहह विधुरयति मधुरमधुयामिनी ।
कापि हरिमनुभवति कृतसुकृतकामिनी ॥

अर्थ – हाय! ही वसंतातली मधुर रात्र मला विकल करीत आहे आणि तिकडे एखादी भाग्यवती कृष्णमीलनाचे सुख अनुभवीत आहे.

वसंत ऋतूतले वातावरण शृंगारभावनोद्दीपक असल्यामुळे या काळात तरुणांच्या क्रीडांना बहर येतो. वनविहार, जलक्रीडा, नृत्य-संगीत, इ. कार्यक्रमांत ते रममाण होतात. अशा जीवनाचे प्रतिबिंब संस्कृतप्रमाणेच इतर साहित्यांतही दिसून येते. प्रेमी जनांचे मीलन किंवा त्यांचा विरह यांचे काव्यमय वर्णन सर्वच भाषांत आढळते. त्याचप्रमाणे सामान्य जनांचा आनंदोल्लासही उत्सवाच्या रूपाने प्रकट झालेला दिसतो. [प्रा. भा. सं.; वै. दे. स्था. मं.; प्रा. भा. सा. सां. भू.; संस्कृत साहित्यातील वसंत– श्री. रा. चिं. ढेरे, सह्याद्री, मे १९६६]

वसंतपंचमी माघ शुद्ध पंचमीला वसंतपंचमी म्हणतात. कारण या तिथीपासून वसंतोत्सवाला आरंभ होतो. वास्तविक चैत्र-वैशाख हा वसंतऋतूचा काल मानलेला असला, तरी मकरसंक्रमणापासून उत्तरायण सुरू झालेले असल्यामुळे माघमासात वसंतागमाची लक्षणे दिसू लागतात. सृष्टीत नवचैतन्य खेळू लागते व मानवांच्या मनात उल्हास भरू लागतो. म्हणून माघ शुद्ध पंचमीला वसंतारंभाची तिथी मानतात. प्राचीन काळी त्या दिवशी सुवसंतक नामक उत्सव होत असे. उत्तर भारतात हा दिवस विविध प्रकारे साजरा केला जातो. त्या मानाने दक्षिण भारतात त्याला विशेष महत्त्व नसते.

कामदेव मदनाचा जन्म याच दिवशी झाला, असे म्हटले आहे. म्हणून पूर्वी या दिवशी मदन–रतीची पूजा करण्याची प्रथा होती. वसंत व मदन यांचा घनिष्ठ संबंध पुराणांत वर्णिलेला आहे. दांपत्य–जीवन सुखाचे जावे, यासाठी लोक रति–मदनांची पूजा व प्रार्थना करीत.

वसंत पंचमीला नवान्नेष्टी करण्याची प्रथाही काही ठिकाणी आहे. त्यासाठी नवीन पिकांच्या लोंब्या आणून त्या घरातील देवतेला अर्पण करतात. त्यानंतर नवान्न भक्षण करतात.

या तिथीला सरस्वतीदेवी उत्पन्न झाली, म्हणून तिची पूजा करतात. मुलाचा विद्यारंभही याच दिवशी होतो. हा लक्ष्मीचाही जन्मदिन मानला जातो. म्हणून या तिथीला श्रीपंचमी म्हणतात. विष्णू व लक्ष्मी यांची विविध उपचारांनी पूजा करून हा दिवस साजरा करावा, असे संवत्सरप्रदीपात सांगितले आहे. पूजेनंतर गायन-वादनाचा कार्यक्रम करायचा असतो. ब्रजमंडलात व राजस्थानात सर्व लोक आनंदाने व उत्साहाने हा सण साजरा करतात. काही स्त्रिया सौभाग्यवृद्धीसाठी व्रतही करतात.

वसंतपंचमीला धार्मिक व्रत-विधान फारसे नसते. सृष्टीतील नवचैतन्य व नवनिर्माण यांमुळे झालेला आनंद प्रकट करणे व मौज करणे, हाच या सणाचा उद्देश असतो. या दिवशी मुलांना कोणाच्याही बागेत शिरून फळे तोडण्याची मुभा असते. काही ठिकाणी अति–उत्साही तरुण होळीसाठी लाकडे वगैरे वस्तू गोळा करण्यास किंवा चोरून आणण्यास या दिवशीच आरंभ करतात. [हिं. व्र. प. त्यौ.; आः स. प्रा. अ. इ.; ब्र. सां. इ.]

वसतीवरी एक यज्ञीय पात्र. हा एक कुंभ असतो. सोमयागामध्ये सोमाचा रस काढून त्याचे हवन करतात. सोमाचा रस काढताना त्यामध्ये वसतीवरी कुंभातील पाणी घालतात. वाहत्या नदीतले आणि ऊन व सावली यांच्या संधीवर असलेले पाणी मंत्र म्हणून एका घागरीत भरून घेतात. या पाण्याला वसतीवरी असे नाव आहे. म्हणून त्या घागरीला वसतीवरीकुंभ असे म्हणतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वसंतोत्सव माघ मासातील वसंतपंचमीपासून फाल्गुन पौर्णिमेपर्यंत हा उत्सव करतात. चैत्र–वैशाख हा वसंत ऋतूचा काल असला, तरी माघातच वसंताची चिन्हे दिसू लागतात. हिवाळा संपून हवा उबदार झाल्यामुळे वातावरण प्रसन्न होते. लोक आनंदी व उत्साही होतात. प्राचीन काळी वसंत ऋतूच्या स्वागतासाठी सुवसंतक, वसंतोत्सव, मदनोत्सव, अशोकोत्सव, इ. उत्सव केले जात. सांप्रत उ. भारतात विशेषतः राजस्थानात व ब्रजमंडलात वसंतपंचमीपासून वसंतोत्सव साजरा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केला जातो. त्यानंतरचा होलिकोत्सव बहुतेक सर्वत्र होतो.

संस्कृत साहित्यात वसंतोत्सवाची वर्णने विपुल आहेत. वसंतोत्सवात वनविहार, जलक्रीडा, नृत्य, संगीत, नाटक, इ. मनोरंजनाचे विविध कार्यक्रम आयोजित केलेले असत. पूर्वीचे राजे सपरिवार व सर्व ऐश्वर्यानिशी अशा उत्सवात भाग घेत. सामान्य नागरिक स्वच्छंदाने नृत्य-गायनांत सहभागी होत. सर्वजण पिवळी वस्त्रे वापरीत व पिवळा रंग परस्परांच्या अंगावर उडवीत. स्त्रिया झूल्यावर झोके घेऊन वसंतविषयक गाणी म्हणत.

अशा आनंदमय उत्सवात शृंगाराला बहर येणे साहजिक असे. सर्व वातावरण कामोद्दीपक असल्यामुळे स्त्री-पुरुषांच्या प्रणयाला व क्रीडांना कसलेही बंधन राहत नसे.

राजस्थानातील राजपुतांमध्ये हा उत्सव विशेष उत्साहाने साजरा केला जात असे आणि काही प्रमाणात अजूनही केला जातो. गरीब, श्रीमंत, राव, रंक, सरदार, सैनिक सर्वजण भेदभाव विसरून या उत्सवात भाग घेत. विविध प्रकारची रंगीबेरंगी वस्त्रे परिधान करून स्त्री-पुरुष स्वैर संचार करीत आणि आनंद, मौज, विलास, यांत गुंग होऊन जात. निरनिराळ्या थरांतले लोक ढोल व खंजिऱ्या वाजवीत आणि कामदेवाची बहारदार गाणी म्हणत राजमार्गावरून भ्रमण करीत. ती गाणी ग्राम्य असली, तरी त्यांत सुंदर सृष्टिवर्णने असतात आणि हृदयस्पर्शी भावही आढळतात. भिल्ल, मीना, मेर, इ. जंगली लोकही या आनंदोत्सवात मोकळेपणाने सामील होतात आणि मोगरा, चमेली वगैरे फुलांच्या माळा गळ्यात घालून किंवा तुरे पगडीत खोचून नाचगाण्यात भाग घेतात.

माघ शुद्ध सप्तमीला रथसप्तमी म्हणतात. राजस्थानात तिला भानुसप्तमी म्हणतात व त्या दिवशी सूर्याची पूजा करून त्याच्या रथाची मिरवणूक काढतात. हा वसंतोत्सवाचाच एक भाग आहे. पूर्वी या उत्सवात आहेरिया म्हणजे डुकराची शिकार करण्याचीही चाल होती. राजपूत वीरांना आपले शौर्य व धाडस दाखविण्याची उत्तम संधी त्या शिकारीमुळे मिळत असे. गौरीला म्हणजे शिवानीला प्रसन्न करण्यासाठी डुकराची शिकार करून, त्याचे मांस प्रथम देवीला अर्पण करायचे आणि मग सर्वांनी तो प्रसाद वाटून घ्यायचा अशी पद्धत होती.

फाल्गुन मासातल्या वसंतोत्सवाला फाग म्हणतात. त्या दिवसांत गाणे-बजावणे व रंगगुलाल उधळणे यांना फारच बहर येतो. फाल्गुन शुद्ध अष्टमी हा दिवस त्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा असतो. मात्र पौर्णिमेच्या दिवशी सर्वत्र नाचरंगाचा कळस होतो. त्या उत्सवात जी गाणी गायिली जातात, त्यांनाही फाग म्हणतात. त्यांत आनंद, उत्साह, शृंगार, विलास यांचे मुक्त दर्शन होते. त्यात राधाकृष्ण, शिवगौरी, रामसीता, यांच्या रंगलीलांचे रसभरीत वर्णनही असते. होळीच्या सणातील स्वैरपणा व रंगेलपणा त्या गीतांत सहजपणे व्यक्त केलेला असतो.

फाल्गुन पौर्णिमेला वसंतोत्सव संपतो व होलिकोत्सव सुरू होतो. [व्र. सां. इ.; भारतीय व्रतोत्सव; राजपुत संस्कृती]

वसावा एक वन्य जात. या लोकांना वसवडा असेही म्हणतात. यांची वस्ती गुजरात प्रदेशातल्या वडोदे भागात आहे.

विवाहप्रथा – हे मुलाचे लग्न मोठेपणी करतात. मुलाला घेऊन त्याचे आई-बाप मुलीच्या शोधासाठी बाहेर पडतात. मुलगी पसंत पडल्यावर ते मुलीच्या माता-पित्यांसह ताडी पितात. यांच्यांत देजाची पद्धत आहे. लग्नाचा दिवस ठरवून मुलगा व त्याचे आई-बाप घरी परततात.

लग्नाच्या आदल्या दिवशी वराकडील लोक रात्रभर गावाबाहेर राहून नाच करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वजण मुलीच्या घरी जातात. तिथेही वरपक्ष व वधूपक्ष आपल्यामध्ये एक बांबू ठेवून नाचतात. थोडा वेळ नाच झाल्यावर मुलाचा बाप मुलीच्या बापाला दारूची एक बाटली व काही पैसे देतो. मग दोन्ही पक्षांतील लोक बांबूचा अडसर काढून एकत्रित नाचतात. नंतर मुलगा मुलीला साडी देतो. त्या साडीच्या पदरात एक रुपया व चार पैसे बांधलेले असतात. मग वधू-वरांना तेल-हळद लावून दोन माणसे त्यांना आपल्या खांद्यावर बसवतात व थोडा वेळ नाचतात. या वेळी मुलाच्या हातात तलवार आणि मुलीच्या हातात म्यान असते. नाचाचा कार्यक्रम संपल्यावर जेवण होते. जेवणानंतर वरपक्षाकडील लोक मुलीला घेऊन आपल्या घरी जातात. नंतर नवव्या दिवशी मुलीच्या गावातील काही पुढारी मंडळी मुलाच्या घरापुढे येतात व काही न बोलताच नाचू लागतात. मुलाच्या बापाने त्यांना एक रुपया व दारूची बाटली दिली, की त्यांचे नाचणे थांबते. मग परस्परांमध्ये बोलणे होऊन जेवण होते आणि मुलीला घेऊन ते आपल्या गावी परत जातात.

चालीरीती – वसवा स्त्रिया लग्नानंतरच चोळ्या घालतात. पत्नीसाठी नवे वस्त्र आणले म्हणजे त्याचा थोडा तुकडा फाडून नवरा तो दिवसा कमरेला बांधतो आणि रात्री त्याची लंगोटी करतो.

मृतकप्रथा – हे लोक प्रेतांना जाळतात. प्रेताला अग्नी देण्यापूर्वी प्रेतासह चितेभोवती सात प्रदक्षिणा घालतात. मग प्रेत चितेवर ठेवून व मृताच्या मुखात अन्न घालून त्याची नेहमीची अवजारे त्याच्या जवळ ठेवतात आणि मग अग्नी देतात. नंतर सर्वजण स्नान करून परततात. सायंकाळी पुन्हा सर्व लोक एकत्रित जमून दारू पितात व जेवण करतात. इतके झाल्यावर मृताचा नातेवाईक शेजारच्या झाडाला बाण मारतो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि मग अंत्यक्रिया संपली असे जाहीर करतो. [रजःकण]

वसाती एक प्राचीन जनपद. वसाती लोकांचा देश. चिनाव व सतलज या नद्यांची संयुक्त नदी जिथे सिंधूला मिळते, तिथे सिंधूच्या काठी शिबींच्या जवळ हे जनपद होते. महाभारतात या लोकांचा उल्लेख अनेक जागी आला आहे. सुमारे दोन सहस्र वसाती सैनिक भारतीय युद्धात लढले, असे कर्णपर्वात म्हटले आहे. हे लोक शूर व लढवय्ये होते, असे हरिवंशात सांगितले आहे. [पा. का. भा.; भा. वृ. इं.; ए. से. ए. इं.]

वसाहोमहवनी एक यज्ञीय पात्र. पशूच्या अवयवांचा होम करण्यासाठी ते अवयव प्रथम एका कुंभीत घालून शिजवितात. ते शिजल्यावर कुंभीत जो मांसरस तयार होतो, त्याला वसा असे म्हणतात. ही वसा एका स्रुचीमध्ये घेतात. वसा ज्या स्रुचीत घेतात, तिला वसाहोमहवनी म्हणतात. मग या वसेचा याग करतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वसिष्ठ (१) एक वैदिक ऋषी. मित्रा – वरुणांचा पुत्र. वसिष्ठ हा शब्द वस् या श्रेष्ठत्वसूचक धातूपासून बनला असून, वसिष्ठाच्या श्रेष्ठ व दिव्य गुणांना अनुलक्षूनच त्याला वसिष्ठ हे नाव प्राप्त झाले आहे. हा ऋग्वेदाच्या सातव्या मंडलाचा द्रष्टा आहे. या मंडलातील १०४ सूक्ते केवळ यानेच एकट्याने दृष्ट आहेत. वसिष्ठाच्या सूक्तांची महत्ता ही, की त्यांच्यामुळे भूगोल आणि इतिहास यांवर जेवढा प्रकाश पडतो, तेवढा तो दुसऱ्या ऋषींच्या सूक्तांमुळे पडत नाही. 'यूयं पात स्वस्तिभिः सदा नः' = तू स्वस्तींसह आमचे सदैव रक्षण कर, हे याचे घोषवाक्य आहे. याने पैजवन सुदासाला ऐंद्र महाभिषेक केला.

वसिष्ठाचे रूपगुणवर्णन – वसिष्ठ हा शुभ्र वस्त्रे परिधान करी. त्याच्या डोक्यावर उजव्या बाजूला चूडा होती. तो मंत्र-विद्या व यज्ञकर्म या दोहोंतही सारखाच निष्णात होता. त्याच्या जवळ सहस्रावधी संख्येचे गोधन होते. त्याच्या तपस्येला व कर्म-कौशल्याला भाळून इंद्राने त्याला प्रत्यक्ष दर्शन दिले होते (ऋ. ७.३३.१; ७.८.६; बृ. दे. ५.१५६). हा राजपुरोहित असता यानेच यज्ञकर्म करण्याची प्रथा सुरू केली. प्रथम वसिष्ठ कुळालाच तो अधिकार होता; पण पुढे तो सर्वच राजपुरोहितांना मिळाला (श. ब्रा. १२.६.१.४१; ष. वि. ब्रा. १.५). वसिष्ठ व त्याचे पुत्र यांना तृत्सू अशी दुसरी संज्ञा होती (ऋ. ७.८३.८).

पौराणिक युगात वसिष्ठाला उर्वशीचा पुत्र मानले आहे. याचा अर्थ, त्या युगात वसिष्ठाच्या आई–बापांचे नाव लोक विसरले असावे. पुराणवाङ्मयात वसिष्ठ आणि अगस्त्य हे दोघे भाऊ मानलेले आहेत. (अगस्त्य पाहा) वसिष्ठाच्या जीवनाची कृतार्थता म्हणजे त्याने दाशराज्ञ युद्धात सुदासाला हरप्रयत्नांनी विजय मिळवून दिला, ही होय. विखुरलेल्या आर्यजनांना सुसंघटित करण्याचे श्रेयही वसिष्ठालाच दिले पाहिजे.

वसिष्ठ–विश्वामित्रकलह – या दोन श्रेष्ठ ऋषींच्या खाजगी वैमनस्याचे बीज ऋग्वेदात सापडते, असे काही विद्वान म्हणतात; तर ते सापडत नसल्याचे काहींचे मत आहे. काहींच्या मते वसिष्ठपुत्र शक्ती आणि विश्वामित्र यांच्यांतला हा कलह होता आणि वसिष्ठाचा त्याच्याशी साक्षात संबंध नव्हता. पण काही उल्लेख व तदनुकूल परंपरा या गोष्टी तसा तो असल्याचे सुचवतात. ऋग्वेदाच्या तिसऱ्या मंडलातल्या ५३ व्या सूक्तात शेवटच्या चार ऋचा वसिष्ठद्वेषिणी म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यात मौनी वसिष्ठाला बांधून नेत असल्याचा उल्लेख आहे. याला परंपरेचीही पुष्टी मिळते. कारण दुर्गाचार्य या वसिष्ठगोत्री भाष्यकाराने त्या दोन ऋचांवर भाष्य करण्याचे नाकारले आहे. यावरून सुदास राजाचे पौरोहित्य कोणी करावे, यासंबंधी या दोन ऋषींत काही विवाद झाला असावा, असे वाटते.

विश्वामित्रही सुदासाचा पुरोहित असल्याचा उल्लेख निरुक्तात आहे. पुढे काही कारणाने तो अधिकार वसिष्ठाला मिळाला असावा व हेच त्यांच्या वैमनस्याचे कारण असावे.

तिसऱ्या मंडलात जमदग्नीने विश्वामित्राला ससर्परीविद्या दिल्याचा उल्लेख आहे. वसिष्ठाचा मुलगा शक्ती याने वाद-विवादात विश्वामित्राचा पराभव केला होता. तेव्हा विश्वामित्राने वरील विद्येचा उपयोग करून त्यावर विजय मिळवला. दोघांच्या मधील कटुतेचे हेही एक कारण असावे.

वसिष्ठ व विश्वामित्र यांच्या ध्येयदृष्टीत फरक असावा. म्हणजे विश्वामित्र हा अथर्वाङ्गिरस विद्येत तर वसिष्ठ हा कल्याणकारी मंत्रांत निपुण असावा. वसिष्ठाला कोणीतरी यातुधान म्हणजे अभिचार करणारा राक्षस असे म्हटले. त्यामुळे त्याला विलक्षण संताप आला व तसा आरोप करणाऱ्याला त्याने शिवीगाळही केली आहे.

यज्ञातील ब्रह्मा हा वसिष्ठगोत्रीच असावा, असे तैत्ति. संहितेत म्हटले आहे. यावरून त्या काळी वसिष्ठकुळातले लोक यज्ञकर्मात आदर्श मानले जात असावे, असे दिसते. विश्वामित्राला याचेही वैषम्य वाटत असावे. विश्वामित्राला ब्रह्मर्षिपद हवे होते व त्यासाठी त्याने अट्टाहासही केला होता, असे जे पुराणांत म्हटले आहे, ते तैत्ति. संहितेतल्या उल्लेखाला पुष्टी देणारे आहे.

मात्र त्या दोघांमधील ते वैर फार काळ धुमसत राहिले असावे, असे वाटत नाही. दोघेही थोर ऋषी होते. यज्ञसंस्थेचा उत्कर्ष घडविण्याच्या कामी त्या दोघांचाही फार मोठा वाटा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वसिष्ठसूक्ते – इंद्र, वरुण, उषा, अग्नी, विश्वेदेव यांनाच मुख्यत्वे उद्देशून वसिष्ठाची सूक्ते आहेत. काव्यदृष्टया ही सूक्ते विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांतल्या उपमा हृद्य व भाषा जिव्हाळ्याची वाटते. वसिष्ठाच्या इंद्रसूक्तात व वरुणसूक्तात भक्तिमार्गाची बीजे आढळतात. त्यांतल्या काही ऋचा अशा –

वसिष्ठ इंद्राला उद्देशून म्हणतो –

मा ते अस्यां सहसावन् परिष्टावघाय भूम हरिवः परादै ।
त्रायस्व नोऽवृकेभिर्वरूथैस्तव प्रियासः सूरिषु स्याम ॥
(ऋ. ७.१९.७)

अर्थ – हे शत्रुमर्दना इंद्रा, आमच्यावर तुझी कृपादृष्टी चोहोकडून पडत असता, हे हरिदश्वा देवा, आम्ही पातकाच्या आणि दुसऱ्याच्या अधीन कधीही होऊ नये, असे कर. तुझ्या प्रेमळपणाच्या चिलखतांनी आमचा बचाव करून लोकधुरीणांमध्ये आम्ही तुझे आवडते होऊ, असे कर.

न सोम इन्द्रमसुतो ममाद नाब्रह्माणो मघवानं सुतासः ।
तस्मा उक्थं जनये यज्जुजोषन्नृवन्नवीयः शृणवद् यथा नः ॥
(ऋ. ७.२६.१)

अर्थ – रस न पिळता नुसता सोमच इंद्राला अर्पण केला, तर त्याने तो कधी संतुष्ट होणार नाही; तसेच रस पिळून अर्पण केला, पण जर प्रार्थनासूक्ते भक्तीने म्हटली नाहीत, तरीही देवाला आनंद होत नाही. म्हणून आपण प्रार्थनासूक्तांचे गायन करू म्हणजे देव प्रसन्न होईल आणि वीराला प्रिय असें जे नवीन सुचलेले स्तोत्र, ते ऐकून आमची विनंती तो मान्य करील.

वरुणापुढे वसिष्ठाने शरणागती व्यक्त केली आहे, ती अशी –

उत स्वया तन्वा सं वदे तत् कदा न्वन्तर्वरुणे भुवानि ।
किं मे हव्यमहृणानो जुषेत कदा मृळीकं सुमना अभि ख्यम् ॥
(ऋ. ७.८६.२)

अर्थ – मी आपल्या मनाशी बोललो, की वरुणाच्या अंतःकरणात मला जागा केव्हा मिळेल ! भक्तांवर कोप न करणारा वरुण माझा हविर्भाव संतोषाने ग्रहण करील काय ? माझे मन शुद्ध होऊन मी त्या दयाघनाला केव्हा अवलोकन करू शकेन ?

किमाग आस वरुण ज्येष्ठं यत् स्तोतारं जिघांससि सखायम् ।
प्र तन्मे वोचो दूळभ स्वधावोऽव त्वानेना नमसा तुर इयाम् ॥
(ऋ. ७.८६.४)

अर्थ – हे वरुणा, मी असा मोठा अपराध तरी कोणता केला, की मी तुझा प्रेमळ भक्त असताही मला तू ठार मारायला प्रवृत्त व्हावेस ? हे अपराजिता देवा, हे सर्वतंत्रस्वतंत्रा, (माझा) तो अपराध तरी सांग म्हणजे तुझ्यापुढे प्रणिपात करून मी त्याचे निरसन करीन आणि त्वरेने तुझ्या पायावर लोळण घेईन.

इंद्रप्रधान दैवतशास्त्र निर्माण होण्यापूर्वी वैदिक आर्यांचे दैवतशास्त्र वरुणप्रधान होते. पण पुढे परिस्थिती बदलली आणि त्यामुळे सम्राट वरुण मागे पडून वृत्रहा इंद्र पुढे सरसावला. नव्या जमान्यात आपले भाईबंद वरुणाला विसरत आहेत, हे वसिष्ठाला रुचले नाही. कारण वसिष्ठ हा वरुणपंथी होता. म्हणून इंद्र आणि वरुण या दोघांत समेट घडवून आणण्याचा प्रयत्न त्याने केला आहे. इंद्र हा जेता असला, तरी राज्यावर सत्ता चालवणारा वरुणच होय, असे त्याने ठामपणे सांगितले आहे.

वसिष्ठाजवळ कामधेनू होती, अशी पुराणकथा आहे; पण ऋग्वेदात तिचा कुठे मागमूसही नाही. अथर्ववेदात ब्रह्मगवी नावाची जी सूक्ते आहेत, त्यांवरून पाहता वसिष्ठाची कामधेनू म्हणजे त्याच्या मंत्रसामर्थ्याचे प्रतीक असावी, असे अनुमानिता येते.

वसिष्ठसूक्तांत आढळणाऱ्या नद्यांच्या उल्लेखांवरून परुष्णी ते यमुना एवढ्या प्रदेशात विशेषतः सरस्वतीच्या तीरावर वसिष्ठकुलाचे वास्तव्य असावे, असे वाटते.

इंद्राच्या कृपेने वसिष्ठ सर्व लोकांचा पुरोहित झाला (गोपथ ब्रा. १.२.१३). विपाशा नदीत वसिष्ठशिला व कृष्णशिला अशी दोन स्थाने आहेत. त्या ठिकाणी त्याने तप केले (गोपथ ब्रा. १.२.८). 'एकोनपंचाशद्रात्र' नावाचा याग याच्या नावे प्रसिद्ध आहे (तैत्ति. सं. ७.४.७). स्तोमभाग नावाच्या मंत्रांचा हा प्रवर्तक आहे (तैत्ति. सं. ३.५.२).

(२) हा ब्रह्मदेवाच्या प्राणवायूपासून जन्मला. तो ब्रह्मयाच्या दहा मानसपुत्रांपैकी एक होता (भाग. पु. ३.१२.२३). हा वसिष्ठ नामक ब्राह्मण कुलाचा मूळ पुरुष मानला जातो. अयोध्येच्या इक्ष्वाकू वंशातील राजांचे पौरोहित्य अनेक शतकें या वसिष्ठ कुलाकडे होते. वसिष्ठाला ऊर्जा व अरुंधती अशा दोन भार्या होत्या. त्याला शतरूपा नावाचीही एक पत्नी होती. ऊर्जा दक्षप्रजापतीची कन्या व अरुंधती ही कर्दमप्रजापतीची आठवी कन्या होती. शतरूपा ही अयोनिसंभव असून, वसिष्ठापासून उत्पन्न झाली व पुढे त्याची पत्नी बनली.

ऊर्जेला पुंडलिका नावाची कन्या व दक्ष, गर्त, ऊर्ध्वबाहू, इ. सप्तर्षिसंज्ञक सात पुत्र झाले. याव्यतिरिक्त तिला आणखीही सात पुत्र झाले. सुकातादी पितरही हिचेच पुत्र मानलेले आहेत.

अरुंधतीला शक्ती नामक पुत्र झाला. त्याच्यापासून वंशपरंपरा चालू झाली, ती अशी– पराशर – कृष्णद्वैपायन – शुक – भूरिश्रवा – प्रभू, शंभू, कृष्ण, गौर व कीर्तिमती कन्या.

शतरूपेला वीर नामक पुत्र झाला. त्याने कर्दमप्रजापतीच्या काम्या नावाच्या कन्येशी विवाह केला. तिच्यापासून त्याला प्रियव्रत व उत्तानपाद नावाचे दोन पुत्र झाले. उत्तानपादाला अत्री ऋषीने दत्तक घेतले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वसिष्ठ कुलातल्या प्रसिद्ध पुरुषांची नावे व कृत्ये अशी —

वसिष्ठ अथर्वनिधी — हा अयोध्येच्या हरिश्चंद्र राजाच्या आठव्या पिढीत होऊन गेला. हा बाहुराजाचा पुरोहित होता. याच्या काळात हैहय, तालजंघ, इ. राजांनी वायव्य सीमेवरच्या कांबोज, यवन, इ. जमाती टोळयांच्या साहाय्याने बाहुराजाला राज्यभ्रष्ट केले. पुढे त्याचा पुत्र सगर याने समस्त शत्रूंचा पराभव करून आपले राज्य परत मिळविले. सगर राजा या सर्व शत्रूंचा संहार करण्याच्या तयारीत होता; पण वसिष्ठाने त्या पापकर्मापासून त्याला परावृत्त केले.

वसिष्ठ आपव — याचा आश्रम हिमालयात होता. कार्तवीर्य अर्जुनाने तो जाळला म्हणून त्याने कार्तवीर्याला शाप दिला. मत्स्यपुराणात याला ब्रह्मवादी म्हटले आहे (१४५.९०). वायुपुराणात त्याला वारुणी (वरुणपुत्र) म्हटले आहे (९४.४२.४१).

वसिष्ठ चैकितानेय — एक आचार्य. हा स्थिरक गार्ग्याचा शिष्य होता (वं. ब्रा. २). याचा गौतमी आरुणी नावाच्या आचार्याशी वादविवाद झाला होता (जै. उ. ब्रा. १.४.२.१).

वसिष्ठ देवराज — त्र्य्यारुण, सत्यव्रत, त्रिशंकू व हरिश्चंद्र या राजांचा पुरोहित. हरिश्चंद्राच्या यज्ञात हा ब्रह्मा होता. त्रिशंकूच्या संबंधात याचा व विश्वामित्राचा संघर्ष सुरू झाला व तो हरिश्चंद्राच्या राज्यकालापर्यंत चालू राहिला. सत्यव्रत सदेह स्वर्गात गेल्यावर त्याचा पुत्र हरिश्चंद्र याने विश्वामित्राला आपला पुरोहित नेमले; पण वसिष्ठाने हरिश्चंद्राच्या राजसूय यज्ञात बाधा उत्पन्न करून आपले पौरोहित्य परत मिळवले. हरिश्चंद्राच्या राज्यकालातच त्याचा पुत्र रोहित याच्या बदली विश्वामित्राचा एक नातेवाईक शुनःशेप याला यज्ञात बळी देण्याचे कारस्थान वसिष्ठाने रचले; पण विश्वामित्राने शुनःशेपाचे रक्षण करून त्याला आपला पुत्र मानले.

वसिष्ठ ऋषी — अयोध्येच्या दिलीप राजाचा पुरोहित. याच्या सांगण्याप्रमाणे राजाने कामधेनूची सेवा केली व त्याला पुत्र प्राप्त झाला. तोच रघू होय.

वसिष्ठ ब्रह्मर्षी — अयोध्येच्या दशरथ राजाचा पुरोहित व प्रमुख मंत्री. हा श्रेष्ठ तपस्वी व ब्रह्मज्ञानी होता आणि अत्यंत क्षमाशील पुरुष होता.

वसिष्ठ श्रेष्ठभाज — हा अयोध्येच्या मित्रसह कल्माष सौदास राजाचा समकालीन होता. कल्माषपाद राजाने एका राक्षसाच्या दुष्ट सल्ल्यावरून याला नरमांसयुक्त भोजन वाढले. ही गोष्ट लक्षात येताच वसिष्ठाने कल्माषपादाला 'तू नरमांस-भक्षक होशील' असा शाप दिला (ब्रह्मांड पु. २.६३.१५).

वसिष्ठ सुवर्चस — हा हस्तिनापूरच्या संवरण राजाचा पुरोहित होता. पांचाल देशाच्या सुदास राजाने संवरण राजाला राज्यभ्रष्ट केले असता, त्याने वसिष्ठाच्या साहाय्याने पुनश्च राज्य मिळवले. त्याच्याच राज्यकालात राज्यात दुष्काळ पडला. अशा स्थितीत संवरण राजा राज्यभ्रष्ट असताही वसिष्ठाने हस्तिनापुराचे राज्य योग्य प्रकारे चालवले. त्याने फल, मूल, औषधी, इ. वस्तू निर्माण करून देव, मनुष्य व अन्य प्राणी यांचे रक्षण केले (म. भा. आदि. १६०.१६४; ब्रह्मांड पु. ३.८८९.-९०).

वसिष्ठ हिरण्यनाभ कौशल्य — एक आचार्य. हा जैमिनीचा शिष्य होता. जैमिनीने याला वेदाच्या पाचशे शाखा शिकवल्या. त्यांतून दोन त्याने याज्ञवल्क्य नामक आपल्या शिष्याला दिल्या (वायुपु. ८८.२०७).

वसिष्ठकुळातले गोत्रकार — एकप्रवरात्मक व त्रिप्रवरात्मक असे गोत्रांचे दोन प्रकार वसिष्ठांमध्ये आहेत. अजब्ध, आपस्थूण, उपावृद्धी, औपगव ही एकप्रवर गोत्रे आहेत. त्रिप्रवर गोत्रात इंद्रप्रमदी, भगीवसू व वसिष्ठ असे तीन प्रवर आहेत. उद्गाह, उपनद औपमन्यव, काण्व, कालशिख, इ. गोत्रे त्रिप्रवरात्मक आहेत.

वसिष्ठगोत्रीय लोकांमध्ये जातूकर्ण्य नामक पैतृक नाव धारण करणारे लोक प्रमुख होते. अशाच एका जातूकर्ण्याने व्यास महर्षींना वेद व पुराणे शिकविली.

महाभारतात व पद्मपुराणात आणखी काही वसिष्ठ नामक व्यक्तींचे उल्लेख आहेत. त्यांची माहिती अशी —

कक्षसेनाने याला आपली संपत्ती दिली होती (म. भा. अनु. २००). याने पक्षवर्धिनी एकादशीचे व्रत केले होते (पद्मपु. उ. १३८). याला इंद्रप्रस्थातील सप्ततीर्थ प्रभावाने महापवित्र पुत्र झाले (पद्मपु. उ. २२२). ब्रह्मदेवाच्या पुष्करक्षेत्रातील यज्ञात हा होतृगणातील ऋत्विज होता (पद्मपु. सृ. ३४). याने भीष्मपंचक व्रत केले होते. (पद्मपु. उ. १२४). हा एक व्यास आहे. [प्रा. च. को.; सी. ऋ.; एकता, मार्ग-पौष-शके१८८८]

वसिष्ठ धर्मसूत्र

अनेक विद्वान वसिष्ठ धर्मसूत्र हे ऋग्वेदाचे धर्मसूत्र मानतात. याचा टीकाकार यज्ञस्वामी याचेही असेच मत आहे. या धर्मसूत्राचे तीस अध्याय आहेत. त्यांतील विषय पुढीलप्रमाणे —

पहिल्या अध्यायात धर्माची व्याख्या, आर्यावर्ताच्या सरहद्दी, पंचमहापातके, सहा विवाहप्रकार, इ. विषय आहेत. दुसऱ्यात चार वर्ण, त्यांचे हक्क व कर्तव्ये, आचार्याची थोरवी, इ. विषय आहेत. तिसऱ्यात वेदपठनाची आवश्यकता, अशिक्षित ब्राह्मणाची निंदा, गुप्त धन सापडल्यास त्याबद्दलचे नियम, आततायी व पंक्तिपावन लोक, इ. विषय आहेत. चौथ्यात सर्व वर्णांना समान असलेली कर्तव्ये, अतिथिसत्कार, मधुपर्क, जननमरणाशौच, इ. विषय आहेत. पाचव्यात स्त्रियांची कर्तव्ये सांगितलेली आहेत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सहाव्यात सदाचाराचे वर्णन आहे. सातव्यात चार आश्रम व विद्यार्थ्यांची कर्तव्ये याबद्दल माहिती आहे. आठव्यात गृहस्थधर्म वर्णिला आहे. नवव्यात वानप्रस्थधर्म दिला आहे. दहाव्यात संन्यासधर्म सांगितला आहे. अकराव्यात अतिथिसेवा, श्राद्ध व उपनयन यांचे नियम दिले आहेत. बाराव्यात स्नातकधर्म, तेराव्यात वेदपठनासंबंधीचे नियम. चौदाव्यात वर्ज्यावर्ज्य अन्नाचे नियम, पंधराव्यात दत्तकपुत्रासंबंधी नियम आणि वेदनिंदक, पापी व शूद्रांचे यज्ञ करणारे यांना जातिबहिष्कृत करण्यासंबंधीचे नियम, सोळाव्यात राजकीय विधी. सतराव्यात उत्तराधिकाराची चर्चा, अठराव्यात चांडाल, अंत्यावसायी, पुल्कस, सूत, अंबष्ठ, इ. प्रतिलोम जातींचे विवरण आणि एकोणिसाव्यात राजधर्म, पुरोहिताचे कर्तव्य, इ. विषय आहेत. वीस ते अठ्ठावीस या अध्यायांत व्यभिचार, गोवध, निषिद्ध अन्नभक्षण, अपेयपान, इ. गुन्ह्यांबद्दल निरनिराळी प्रायश्चित्ते सांगितली आहेत. आणि तिसाव्या अध्यायात दान व दक्षिणा यांचे विवरण आहे.

वसिष्ठ धर्मसूत्राचे गौतम धर्मसूत्र, बौधायन धर्मसूत्र, सांख्यायन गृह्यसूत्र, आश्वलायन गृह्यसूत्र आणि कौषीतकी गृह्यसूत्र यांच्याशी बरेच साम्य आहे.

हे धर्मसूत्र गद्यपद्यमय असून, त्यात ऋग्वेद, ऐतरेय ब्राह्मण, शतपथ ब्राह्मण; मैत्रायणी, तैत्तिरीय व काठक या संहिता, यांतील उतारे घेतलेले आहेत. ग्राउलट मिताक्षरादी ग्रंथांत व बृहदारण्यकोपनिषदावरील शंकराचार्यांच्या भाष्यात वसिष्ठधर्मसूत्रातील अनेक सूत्रे उद्धृत केली आहेत. मनू आणि याज्ञवल्क्य यांनी वसिष्ठाला धर्मशास्त्रावरील अधिकारी मानले आहे.

या धर्मसूत्रातील विषयांची मांडणी सर्वत्र सुसंबद्ध आणि तर्कशुद्ध नाही. अनेकदा विषयांची पुनरुक्ती झालेली आहे.

या धर्मसूत्राच्या छापील आवृत्त्या बऱ्याच निघाल्या आहेत. तथापि, छापील आवृत्ती आणि हस्तलिखित प्रती यांमध्ये फार फरक आहे. त्यामुळे सांप्रत उपलब्ध असलेले धर्मसूत्र मूळचे व अस्सल नसावे, असे वाटते. म. म. काणे यांनी या धर्मसूत्राचा काल सनपूर्व ३०० ते १०० हा मानला आहे. [हि. ध.; वै. सा.; ध. सू.; इं. वे. क. सू.; प्रा. च. को.]

वसिष्ठयज्ञ

प्रजा व पशुसमृद्धी प्राप्त व्हावी, यासाठी फाल्गुनी अमावास्येला हा यज्ञ करावा, असे शांखायन ब्राह्मणात (४.८) सांगितले आहे. यात दर्शेष्टी व पूर्णमासेष्टी यांतील देवतांच्यासाठी एकदम याग करायचा असतो. दर्शेष्टीतील देवता प्रथम घ्यायच्या असतात.

या यज्ञाचे तंत्र, सामान्यपणे सार्वसेनियज्ञ व शौनकयज्ञ यांसारखे आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वसिष्ठस्मृती

वसिष्ठाने लिहिलेला स्मृतिग्रंथ. यात एकवीस अध्याय आहेत. यांतील विषय पुढीलप्रमाणे -

पहिल्या अध्यायात माणसांची मुक्तीसाठी धर्मजिज्ञासा, धर्माचरणात आर्यावर्ताचे महत्त्व व ब्राह्मणांची प्रशंसा हे विषय आहेत. दुसऱ्यात त्रैवर्णिक हे द्विज असून, त्यांच्या अध्ययनाची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. तिसऱ्यात वेदाध्ययन न करणारा द्विज हा शूद्रसमान आहे, असे सांगून आततायी ब्राह्मणाचा वधही निंद्य मानलेला आहे. चौथ्यात संस्कारविशेषामुळे चार वर्णांचा विभाग, देवता व अतिथी यांच्या पूजेतील पशुवध दोषार्ह नाही हा व आशौचाचा विचार केला आहे. पाचव्यात स्त्रियांच्या पराधीनतेचे व रजस्वला स्त्रियांच्या नियमाचे कथन आहे. सहाव्यात आचारप्रशंसा व ब्राह्मणांच्या आचारांची माहिती दिली आहे. सातव्यात ब्रह्मचाऱ्याच्या कर्तव्याचे थोडक्यात निरूपण आहे. आठव्यात विवाहयोग्य स्त्रीचे वर्णन व विवाहानंतर पालन करायच्या धर्मांचे कथन आहे. नवव्यात वानप्रस्थाच्या व दहाव्यात संन्याशाच्या कर्तव्यांचे निवेदन आहे. अकराव्यात श्राद्ध, त्रैवर्णिकांना योग्य दंड, अजिन-वस्त्र-भिक्षा आणि उपनयनकाल यांचा विचार केलेला आहे. बाराव्यात स्नातकाची व्रते सांगितली आहेत. तेराव्यात स्वाध्याय व उपाकर्म, चौदाव्यात भक्ष्याभक्ष्यविचार, पंधराव्यात पुत्राच्या दानप्रतिग्रहांचा विचार, सोळाव्यात राज्यव्यवहार, इ. विचार हे विषय आलेले आहेत. सतराव्यात बारा प्रकारचे पुत्र, अठराव्यात प्रतिलोमज चांडालादी जाती, एकोणिसाव्यात राजधर्म, विसाव्यात ब्रह्महत्यादी पातकांबद्दल प्रायश्चित्तविधी आणि एकविसाव्यात क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनी ब्राह्मण स्त्रीशी समागम केला असता त्यांना कोणते प्रायश्चित्त द्यायचे, हे विषय आलेले आहेत. [हिंदुत्व]

वसिष्ठाश्रम

हिमाचल प्रदेशाच्या कुलूखोऱ्यातील मनाली गावाजवळच्या एका डोंगरात वसिष्ठाश्रम आहे. इथे वसिष्ठाचे एक प्राचीन मंदिर असून, त्यात त्याची सुंदर मूर्ती आहे. या मूर्तीसंबंधी एक आख्यायिका सांगतात, की रामाने अश्वमेध यज्ञ केल्यावर वसिष्ठ मुनी तपाला बसला असता त्याचा देह पाषाणाचा बनला. तीच ही सांप्रतची मूर्ती होय. या मंदिराजवळ रामाचे एक प्राचीन मंदिर आणि गरम पाण्याची तीन कुंडे आहेत. विश्वामित्राने या आश्रमाला भेट दिली होती. दिलीप व त्याची पत्नी सुदक्षिणा यांनी पुत्रप्राप्तीसाठी याच आश्रमात तप केले होते.

वसिष्ठाचा आणखी एक आश्रम अबूच्या पहाडावर असल्याचे महाभारतात सांगितले आहे (म. भा. वन. ८२.५५). तिथे एक रात्र वसती केली, तर एक सहस्र गोदानाचे पुण्य लाभते, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिथे म्हटले आहे. इथल्या मंदिरात वसिष्ठ व अरुंधती यांच्या मूर्ती आहेत. [हि. जॉ. ए. इं.; कल्याण–तीर्थांक]

वसुकर्ण वासुक्र एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील ६५ व ६६ ही दोन सूक्ते याने रचली आहेत. विश्वेदेवांची स्तुती हा उभय सूक्तांचा विषय आहे. याची एक ऋचा (१०.६५.९) अशी –

पर्जन्यावाता वृषभा पुरीषिणेन्द्रवायू वरुणो मित्रो अर्यमा ।
देवाँ आदित्याँ अदितिं हवामहे ये पार्थिवासो दिव्यासो अप्सु ये ॥

अर्थ – द्यावापृथिवी आणि स्वर्गस्थित समस्त देव, मित्रावरुण, अर्यमा, आदित्य, उदकयुक्त इंद्रवायू, अदितिदेवी, तसेच पर्जन्य-वायू या देवांना मी पाचारण करतो.

या सूक्तात भुज्यू तौर्ग्य आणि विश्वक कार्ष्णी यांच्या कथांचा निर्देश आढळतो.

वसुकर्णाच्या दोन्ही सूक्तांमध्ये ‘ देवान् वसिष्ठो ’ (१०.६५.१५; १०.६६.१५) ही ऋचा पुनरुक्त झालेली आहे. याअतिरिक्त याच ऋचेतील ‘ यूयं पात स्वस्तिभिः सदा नः ’ हा ध्रुवचरण वसिष्ठमैत्रावरुणिविरचित सातव्या मंडलातील शंभर सूक्तांपैकी चौऱ्याहत्तर सूक्तांच्या अखेरीला आला आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वसुक्र ऐंद्र एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील २७ ते २९ ही तीन सूक्ते याने रचली आहेत. वसुक्र हा या सूक्तांचा द्रष्टा असल्याचा उल्लेख ऐतरेय आरण्यकात (१.२.२) आणि शांखायन आरण्यकात आढळतो (१.३). या तीन सूक्तांपैकी पहिली दोन सूक्ते इंद्र-वसुक्र संवादसूक्ते असून, त्यांत इंद्रमाहात्म्य वर्णिले आहे. बृहद्देवतामते वसुक्र हा इंद्राचा मुलगा असून, वसुक्रपत्नी ही इंद्राची सून होय (बृ. दे. ७.२९.३२). प्रस्तुत सूक्तांच्या संदर्भात श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव म्हणतात – “ वसुक्र ऋषी स्वतःचे आणि इंद्राचे अशी दोन्ही भाषणे स्वतःच करतात. त्यामुळे अर्थदृष्टचा या सूक्तातील (१०.२७) आठ ते चौवीस ऋचा अत्यंत दुर्बोध झाल्या आहेत. वसुक्र हे इंद्रपुत्र कसे याचाही उलगडा होत नाही.”

इंद्राचे सामर्थ्य आणि माहात्म्य सांगणारी वसुक्राची एक चमत्कृतिपूर्ण ऋचा (ऋ. १०.२८.९) अशी –

शशः क्षुरं प्रत्यञ्चं जगाराद्रिं लोगेन व्यभेदमारात् ।
बृहन्तं चिदृहते रन्धयानि वयद्वत्सो वृषभं शूशुवानः ॥

अर्थ – (वसुक्र म्हणतो) हे इंद्रा, सिंहाचा प्रतिकार करणाऱ्या …शाण्यासदृश अथवा वृषभाचा प्रतिकार करणाऱ्या धेनुवत्साप्रमाणे पर्वत-उच्छेदाचे आणि शत्रुसंहाराचे सामर्थ्य तू मला देतोस.

सत्तावीस क्रमांकाच्या सूक्तातील नवव्या ऋचेत आत्मज्ञानप्राप्तीचे वर्णन असून, १८ व्या ऋचेत गांधर्वविवाह या विवाहप्रकाराचा अस्पष्ट उल्लेख आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; म. ज्ञा. को.]

वसुधारा एक बौद्ध देवता. हिचे वर्णन असे – ही द्विभुज, तरुण, पीतवर्ण आणि विविध अलंकार घातलेली असते. हिच्या डाव्या हातात धान्यमंजिरी असून, हिचा उजवा हात वरद मुद्रेत असतो हिच्या मस्तकावर ध्यानी बुद्ध अक्षोभ्याची किंवा रत्नसंभवाची प्रतिमा असते. हिच्या भोवती श्रीवसुंधरा, वसुश्री, श्रीवसुमुखी व वसुमतिश्री या देवता असतात.

वसुधारा (नेपाळी चित्रावरून)

महायान बौद्ध वसुधारेला जंभलाची पत्नी आणि समृद्धीची देवता मानतात. ही प्राचीन देवता आहे.

नेपाळात हिची षड्भुज प्रतिमा आढळते. तिचे शरीर अलंकारांनी सुशोभित असून, तिचे मुख अगदी शांत आहे.

बडोदा संग्रहालयात हिची षड्भुज कांस्यमूर्ती आहे. हिच्या प्रतिमा तिबेटमध्ये आढळतात. [इं. बु. इ.]

वसुबंधू (इ. स. चे ४ थे शतक) एक महान बौद्ध आचार्य. याचा जन्म गांधार देशात, पुरुषपूर (पेशावर) येथे एका कौशिकगोत्री ब्राह्मण कुळात झाला. त्याचा ज्येष्ठ बंधू असंग हादेखील एक थोर पंडित होता. त्या दोघांनी काश्मीरमध्ये वेद-शास्त्रांचे अध्ययन केले. पुढे दोघांनीही बौद्ध पंथ स्वीकारला. त्यांनी बौद्ध दर्शनातील शास्त्रीय युगाला आरंभ केला. प्रौढावस्थेत वसुबंधू अयोध्येला जाऊन तिथे स्थायिक झाला. तिथे त्याला गुप्त सम्राटांचा आश्रय लाभला. तिथेच त्याला स्थविर बुद्धमित्र याने हीनयान पंथाची दीक्षा दिली. असंग व वसुबंधू हे दोघेही प्रारंभी हीनयान पंथातील सर्वास्तिवादाचे अनुयायी होते; पण नंतर असंगाने महायान पंथातील योगाचार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

किंवा विज्ञानवाद स्वीकारला आणि त्याच्या प्रेरणेने पुढे वसुबंधूही त्या पंथाचा अनुयायी झाला.

वसुबंधूचा प्रसिद्ध ग्रंथ अभिधर्मकोश हा होय. हा समग्र बौद्ध दर्शनाचा ज्ञानकोश मानला जातो. त्याची रचना मूलतः सर्वास्तिवादातील वैभाषिक मतानुसार केलेली होती. त्या ग्रंथामुळे वसुबंधूला तत्कालीन पंडित द्वितीय बुद्धच मानू लागले होते, असे आचार्य यशोमित्र म्हणतो. समकालीन प्रसिद्ध सांख्याचार्य विंध्यवासी याच्या सांख्य-सप्तती नामक ग्रंथाचे खंडन करण्याच्या हेतूने वसुबंधूने परमार्थ-सप्तती हा ग्रंथ रचला आणि तोही खप गाजला. त्याचे न्यायशास्त्रावरील वादविधी व तर्कशास्त्र हे ग्रंथही प्रसिद्ध आहेत.

वसुबंधू – एक सांकेतिक चित्र

महायान पंथ स्वीकारल्यानंतर वसुबंधूने विंशिका व त्रिंशिका नामक दोन पुस्तिका लिहिल्या. त्यांत केवळ वीस व तीस कारिका असल्या, तरी त्या अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. त्या दोन्ही पुस्तिकांना मिळून विज्ञप्तिमात्रतासिद्धी अशी संज्ञा आहे. वसुबंधूने सद्धर्मपुण्डरिकसूत्र, महापरिनिर्वाणसूत्र आणि वज्रच्छेदिका प्रज्ञापारमिता या ग्रंथांवर व्याख्या लिहिल्या आहेत. त्याच्या अन्य काही ग्रंथांची नावे आढळतात; पण ते ग्रंथ उपलब्ध नाहीत.

वसुबंधू वादविवाद करण्यात अत्यंत कुशल होता. विरुद्ध पक्षाच्या मतांचे खंडन करण्यात व स्वपक्षाचे मंडन करण्यात त्याची बुद्धी विलक्षण चालत असे. चिनी भाषेतील त्रिपिटकात वसुबंधूच्या छत्तीस ग्रंथांचा उल्लेख आढळतो; पण ते सर्व या वसुबंधूचे नसावे. कारण चिनी व तिबटी साहित्यात वसुबंधु नामक सहा आचार्यांचा उल्लेख आहे. त्यांतले काही ग्रंथ इतर आचार्यांचे असण्याचा संभव आहे.

पेशावरमध्ये ज्या ठिकाणी वसुबंधूचा जन्म झाला, तिथे त्याचे स्मारक म्हणून एक शिलाखड प्राचीन काळी स्थापन करण्यात आला होता. युआन च्वांग गांधार देशातून प्रवास करीत होता, तेव्हा त्याने वाटेत ते स्मारक पाहिले होते. वसुबंधू वयाच्या ऐंशीव्या वर्षी अयोध्येतच मृत्यू पावला. [बौ. ध. द.; गु. सा. इ.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

वसुबारस आश्विन वद्य द्वादशी. या दिवशी गाय-वासरांची पूजा करतात. पाहा– गोवत्सद्वादशी, दीपावली.

वसुव्रत एक काम्यव्रत. अष्टवसूंप्रीत्यर्थ त्यांचे व्रत चैत्र महिन्यात करतात. यात चैत्र शुद्ध अष्टमीपासून पौर्णिमेपर्यंत उपवास करतात. याचा विधी असा – अष्टमीच्या दिवशी एका वर्तुळात अष्टवसूंची चित्रे काढून त्यांची पूजा करावी आणि असे आठ दिवस करून व्रताची पूर्ती करावी. शेवटी गोप्रदान करावे. फल – संपत्ती, समृद्धी व वसुलोक यांची प्राप्ती.

या व्रताचा दुसरा पर्याय असा – वसूंप्रीत्यर्थ द्विमुखी गाईचे दान करावे. (गाय प्रसूत होताना ज्या वेळी वासराचे डोके बाहेर येते, त्या वेळी तिला द्विमुखी किंवा उभयतोमुखी म्हणतात). गोप्रदानाबरोबर सुवर्णदानही करावे. त्या दिवशी केवळ दुग्धाहार करावा. फल– पुनर्जन्मनाश. [हि. ध.]

वसुश्रुत आत्रेय एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदात पाचव्या मंडलातील तीन ते सहा ही सूक्ते याने रचली आहेत. यांतील पाचवे सूक्त हे आप्रीसूक्त म्हणून प्रसिद्ध आहे. सहाव्या अन्य तीन सूक्तांमध्ये अग्निस्तुती हा विषय आहे. सहाव्या सूक्तातील 'आ ते अग्न इधीमहि' या ऋचेत वेदाध्ययनाचे प्रशंसा आहे. आश्वलायन गृह्यसूत्रांत या मंत्राचे विशेष वर्णन आहे (१.१.५). याची एक ऋचा (ऋ. ५.४.९) अशी –

विश्वानि नो दुर्गहा जातवेदः सिन्धुं न नावा दुरितातिपर्षि।
अग्ने अत्रिवन्नमसा गृणानो ऽस्माकं बोध्यविता तनूनाम्॥

अर्थ – हे अत्रिस्तुत अग्ने, नावेला समुद्रापार पोचविणाऱ्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाविका, दुःसह पापराशीतून तू आमची मुक्तता कर. आमच्या शरीराचे तू रक्षण कर.

"हे अग्ने, आम्हा स्तोत्यांना तू अन्न प्रदान कर" अशीही सूक्तद्रष्ट्याने प्रार्थना केली आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

वसू एक देवतासमूह. हे संख्येने आठ आहेत, म्हणून त्यांना अष्टवसू असे म्हणतात. तैत्ति. संहितेत यांची संख्या ३३३ दिलेली आहे. ऋग्वेदात वसू हे पृथ्वीवर वास्तव्य करणारे देव मानलेले आहेत (ऋ. ७.३६.१४). पौराणिक वाङ्मयात वसूंना धर्म व वसू यांचे पुत्र म्हटले आहे. यांना वासुदेवाचे अंश असेही म्हणतात. वैवस्वत मन्वंतरातल्या सात देवतासमूहांत वसूंची गणना केलेली आहे. अग्नी हा वसूंचा नायक होय (ब्रह्मांड पु.२. २७. २४; मत्स्य पु. ८.४). देवासुरसंग्रामात यांनी कालेय दैत्याबरोबर युद्ध केले होते (भाग. पु. ८. १०.३४). वसिष्ठ ऋषीने यांना स्त्री-पुरुष समागमातून जन्म घेण्याचा शाप दिला होता. हे साध्य देवांचे बंधू होत.

यांची वेगवेगळ्या पुराणांत वेगवेगळी नावे दिलेली आहेत. भागवतपुराणात त्यांची, त्यांच्या स्त्रियांची व पुत्रांची जी नावे दिली आहेत, त्यांचे कोष्टक असे —

वसू	पत्नी	पुत्र
(१) द्रोण	अभिमती	हर्ष, शोक, भय.
(२) प्राण	ऊर्जस्वती	सह, आयु, पुरोजव.
(३) ध्रुव	धरणी	पुरस्थ देवता.
(४) अर्क	वासना	तर्ष.
(५) अग्नी	वसोर्धारा	द्रविणक, विशाख.
	कृत्तिका	स्कंद.
(६) दोष	शर्वरी	शिशुमार.
(७) वसू	आंगिरसी	विश्वकर्मा.
(८) विभावसू	उषा	व्युष्ट, रोचिष, आतप, पंचयाम.

ऐश्वर्यप्राप्तीसाठी वसूंची पूजा करावी, असे सांगितले आहे (भाग. पु. २. ३. २). [पु. इं.; प्रा. च. को.]

वसु भारद्वाज एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या नवव्या मंडलातील ८० ते ८२ ही तीन सूक्ते याने रचली आहेत. पवमान सोमस्तुती हा या सूक्तांचा विषय आहे. याची एक ऋचा (ऋ. ९.८२.५) अशी —

यथा पूर्वेभ्यः शतसा अमृध्रः सहस्रसाः पर्यया वाजमिन्दो ।
एवा पवस्व सुविताय नव्यसे तव व्रतमन्वापः सचन्ते ॥

अर्थ — पुरातन भक्तांना सहस्रावधी धन देणाऱ्या हे उदकमिश्रित सोमा, आम्हां नूतन भक्तांप्रीत्यर्थ तू प्रवाहित हो.

या सूक्तद्रष्ट्याची चरित्रविषयक माहिती उपलब्ध नाही. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; सी. ऋ.]

वसूयु आत्रेय एक अत्रिकुलोत्पन्न सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील २५ व २६ ही दोन सूक्ते याच्या नावावर आहेत. अग्नी ही या सूक्ताची देवता आहे. याची एक ऋचा (ऋ. ५.२५.७) अशी —

यद् वाहिष्ठं तदग्नये बृहदर्च विभावसो ।
महिषीव त्वद् रयिस्त्वद् वाजा उदीरते ॥

अर्थ — हे अन्न आणि संपत्ती निर्माण करणाऱ्या तेजस्वी अग्ने, आमच्या सामर्थ्यदायी स्तोत्रांनी प्रसन्न होऊन तू आम्हांला विपुल अन्न प्रदान कर.

पंचविसाव्या सूक्तात अखेरच्या ऋचेत वसूयवः हा शब्द असून, त्याचा व्यक्तिवाचक अर्थ धरलेला आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.; म. ज्ञा. को.]

वस्तुपाल (इ. स. चे १३ वे शतक) एक कुशल सेनापती, उत्तम राजनीतिज्ञ, शिल्पकलाप्रेमी आणि संस्कृतकवी. आशराजाला (अश्वराज) कुमारदेवी नावाच्या विधवेपासून हा झाला. याला तेजपाल नावाचा आणखी एक भाऊ होता. वस्तुपाल गुजरातमधील ढोलकाचा राजा वीरधवल याचा मंत्री होता. तो मोठा विद्वान आणि गुणी जनांचा चाहता होता. त्याच्या पदरी अनेक विद्वान होते आणि त्यावरून तो लघुभोजराज या नावाने ओळखला जात असे. त्याच्या आश्रयाला असलेल्या अनेक समकालीन आणि उत्तरकालीन कवींनी त्याचे चरित्र रचले आहे. त्यांत सोमेश्वर, अरिसिंह, चंद्रप्रभसूरी, मेरुतुंगाचार्य, राजशेखर, जयसिंह व जिनहर्ष, इ. कवी प्रमुख आहेत. जिनहर्षाच्या वस्तुपालचरितात त्याचे विस्तृत चरित्र आहे.

वस्तुपालाने नरनारायणानंद नावाचे, सोळा सर्गांचे एक प्रख्यात महाकाव्य रचले आहे. त्यात कृष्णार्जुनमैत्री, गिरनारवरील त्यांची क्रीडा, सुभद्राहरण, इ. कथाभाग संक्षेपाने वर्णन केला आहे.

देवगिरीच्या यादववंशी सिंघण राजाने गुजरातवर स्वारी केली असता वस्तुपालाने मोठा पराक्रम करून ती परतवून लावली. त्याचप्रमाणे त्याने दिल्लीच्या मुइज्जुद्दीन बहरामशाह याचाही अबू-पहाडाजवळ पराभव केला. कच्छमधील भद्रेश्वराचा भीमसेन किंवा भीमसिंह याने जाबालिपूरचा सामंतपाल आणि त्रिलोकसिंह यांच्या मदतीने वीरधवलावर स्वारी केली असता याने मोठीच तलवार गाजविली होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वस्तुपाल जैन होता. त्याने मंदिरे बांधली, विहिरी खोदल्या आणि धर्मशाळाही उभ्या केल्या. अबूच्या पहाडावर त्याची प्रशस्ती आढळते. त्याचे शिलालेखही आहेत. [सं. सा. इ.– (१) श्री. बलदेव उपाध्याय, (२) ए. बी. कीथ; जै. ध.; ओ. नि. सं. भाग २; म. च. को.]

वस्तुपूजा निरनिराळ्या वस्तूंमध्ये काही शक्ती असते, अशा श्रद्धेने त्यांची पूजा करण्याची चाल प्राचीन काळापासून सर्वत्र आहे. अनेक आदिवासी जमातींचा तर तो धर्मच आहे. पाषाण, वृक्ष, अस्थी, दंत, कपाल, ताईत, दोरा, शस्त्रे, इ. वस्तूंसंबंधी पवित्र भावना उत्पन्न झाली, की लोक भक्तिभावाने त्यांची पूजा करू लागतात. त्यासाठी काही परंपरागत कथाही सांगितल्या जातात. एखादी देवता, साधुपुरुष, भूतपिशाच यांचे प्रतीक म्हणून ती वस्तू पूज्य ठरते. तिच्यात जी शक्ती असते, ती आपल्यावर प्रसन्न व्हावी, निदान कोपू नये, अशी पूजकाची इच्छा असते. शेतकरी नांगराची पूजा करतो, कारागीर आपल्या उपकरणांची, व्यापारी वजनामापांची किंवा सैनिक शस्त्रांची पूजा करतो, तीदेखील याच प्रकारची मानता येईल. म्हसोबा, वेताळ, मरीआई, सटवाई या क्षुद्र देवतांचे प्रतीक म्हणून दगड किंवा लाकडाचा ओंडका मांडून त्याला शेंदूर फासतात, तोही वस्तुपूजेचाच एक प्रकार होय. वड, पिंपळ, इ. वृक्षांची पूजा म्हणजे वस्तुपूजाच आहे, असे काही पंडितांचे मत आहे.

काही लोक वस्तुपूजा करताना, त्या वस्तूतील दैवताला 'माझी इच्छा पुरी झाली नाही, तर तुला जोडयाने मारीन' असा धाकही घालतात. अर्थात हे त्यांच्या असंस्कृतपणाचे लक्षण मानले पाहिजे. [एन्सा. रि. ए.; सु. वि. को.]

वस्तो (इ. स. चे १६ वे शतक) एक गुजराती कवी. हा जातीने डोलिया कोळी असून, खेडा जिल्ह्यातील बोरसद या गावी राहत होता. तरुण वयातच हा घर सोडून दक्षिण भारताच्या तीर्थयात्रेला गेला. तीर्थयात्रा करून तो परत येण्यापूर्वीच त्याचे आई-वडील मरण पावले होते आणि त्यांच्या मिळकतीची वाटणीही झाली होती. परंतु कवीच्या मनावर याचा काहीच परिणाम झाला नाही. त्याने वैराग्य घेतले आणि तो मथुरेला व तिथून बरहामपूरच्या यात्रेला गेला. तिथे त्याला गुप्त धन सापडले, पण त्याने ते साधूंना वाटून टाकले, असे म्हणतात.

वस्तोने महाभारताच्या आधारे शुकदेवाख्यान व सुभद्राहरण ही दोन काव्ये गुजरातीमध्ये रचली आहेत. सुभद्राहरणाला महाभारताशिवाय भागवताचाही आधार आहे. याव्यतिरिक्त त्याचे साधुचरित्र नावाचे आणखीही एक गुजराती काव्य आहे. त्यात त्याने नरसी मेहता, मीराबाई, नाभाजी, इ. संतांची चरित्रे गायिली आहेत. या कवीची स्फुट पदेही बरीच आढळतात. [गुज. सा. इ.; मा. गु. लि.]

वस्त्रदान (१) एक दान. त्यासाठी दाता प्रत्येकी आठ हात लांबीची मूल्यवान अशी दोन तलम वस्त्रे आणतो. मग तो शुचिर्भूत होऊन ब्राह्मणाची पूजा करतो व त्याच्या नाम-गोत्राचा उच्चार करून व यथाविधि संकल्प करून ब्राह्मणाच्या हातावर दानोदक सोडतो.

(२) केरळातील नायर लोकांचा लग्नविषयक एक संस्कार. एखाद्या नायर पुरुषाने एखाद्या स्त्रीशी केवळ लग्न केल्याने ती त्याची खरी पत्नी ठरत नाही. तशी ती ठरण्यासाठी त्याला वस्त्रदान नामक विधी करावा लागतो. हा विधी रात्रीच्या वेळी नातलग मंडळीच्या समक्ष होतो. त्या वेळी वस्त्रदाता पुरुष व ते घेणारी स्त्री एकमेकांसमोर तोंड करून बसतात. त्यांच्या समोर एक वस्त्र ठेवतात. त्या वस्त्रावर स्त्री-पुरुषांच्या जननेंद्रियांच्या आकृत्या काढलेल्या असतात. स्त्री आपला मामा व आई यांच्या संमतीने पुरुषाकडून ते वस्त्र स्वीकारते आणि नंतर त्या पुरुषाबरोबर नांदू लागते. कित्येकदा लग्न करणारा आणि वस्त्रदान करणारा हे पुरुष भिन्नही असू शकतात. [ल. वि. सो.]

वस्त्रधारण नवे वस्त्र कोणत्या दिवशी धारण करावे, यासंबंधी धर्मशास्त्रकारांनी काही नियम सांगितले आहेत. रोहिणी, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा, अनुराधा, अश्विनी, उत्तरा, उत्तराषाढा, उत्तरा भाद्रपदा, पुनर्वसू, पुष्य, रेवती व धनिष्ठा या नक्षत्रांवर नवे वस्त्र नेसावे. रविवारी नवे वस्त्र धारण केले असता, ते लवकर जीर्ण होते, सोमवारी आर्द्र होते, मंगळवारी शोककारक होते, बुधवारी धन देणारे होते, गुरुवारी ज्ञान देणारे होते, शुक्रवारी प्रियसंगतिदायक होते व शनिवारी मलदायक होते, असे सांगितलेले आहे. [नि. सिं.]

वस्त्रशुद्धी वस्त्रांच्या शुद्धाशुद्धतेबद्दल धर्मशास्त्रकारांनी काही मते मांडली आहेत, ती अशी – शुभ्र वस्त्रे नेहमी वापरावी, कारण ती कोणाच्याही स्पर्शाने अशुद्ध होत नाहीत, असे लघु–आश्वलायनाने म्हटले आहे (१.२८–३०). रेशमी व लोकरीची वस्त्रे नेहमी शुद्धच मानलेले आहे. रेशमी व लोकरीची वस्त्रे शुद्धतेसाठी धुवावी लागत नाहीत; गोमूत्र, बेलफळ, इ. पदार्थांनी ती शुद्ध करता येतात, असे मनुस्मृतीत (५.१२०–२१) व याज्ञवल्क्यस्मृतीत (१.१८६–७) सांगितले आहे. 'ऊर्णा वातेन शुद्धयति' = लोकरीचे वस्त्र नुसते झटकल्याने शुद्ध होते, असे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वचन आहे. अतिशय खराब झालेले वस्त्र पाण्याने किंवा वाफेने धुवावे किंवा अशुद्ध भाग कापून टाकावा, असे शंखाने म्हटले आहे. बांबू किंवा झाडांच्या साली यांपासून बनवलेली वस्त्रे कापराने व लोकरीची वस्त्रे फक्त प्रोक्षणाने शुद्ध होतात, असे पराशर माधवीयात (७.२८) सांगितले आहे. [हि. ध.]

वहाबी मुसलमानांचा एक पंथ. मुहंमद इब्न अब्दुल वहाब याने अरबस्तानात इ. स. १७६० च्या सुमारास या पंथाची स्थापना केली. इस्लामच्या स्थापनेनंतर १००० वर्षांत मुसलमान लोकांचे आचरण इस्लामच्या तत्त्वांपासून फार दूर गेले होते. एकाच अल्लाची उपासना करण्याऐवजी ते असंख्य पीर, वली व साधुसंत यांची भक्ती करू लागले होते; भव्य कबरी व स्मारके बांधून तिथे थाटाची आरास करू लागले होते. चैन बाजी, विलास व व्यसने यांत बहुसंख्य लोक मग्न झाले होते. त्यांच्या दुष्ट रूढी, अंधश्रद्धा व दुराचार पाहून मुहंमद वहाबीचे मन उद्विग्न झाले. त्याला सनातन इस्लाम धर्माचे पुनरुज्जीवन करावेसे वाटले. म्हणून त्याने कुराण व अहादीस यांवरून मूळ धर्मतत्त्वांचा सखोल अभ्यास करून, सनातन शुद्ध धर्माचा प्रचार सुरू केला. त्याने दरैयाचा सरदार महंमद इब्न सय्यद याच्या साहाय्याने आपल्या मतांचा बराच प्रचार केला. पुढे महंमद सय्यदाच्या वंशजांनी तरवारीच्या जोरावर वहाबी पंथाचा प्रसार केला. इ. स. १८०३–४ साली त्या पंथाने मक्का व मदीना ही शहरे जिंकून तिथे सनातन धर्माचे पुनरुज्जीवन केले. त्या पंथाच्या अनुयायांनी अनेक भव्य कबरी व मकबरे नष्ट केले. अमीर व मौलिये यांचा त्या पंथाला प्रथमपासूनच विरोध होता; तो अशा अत्याचारांमुळे वाढला. तुर्कस्तान, इजिप्त वगैरे देशांतील राजसत्तांशी या पंथाचा संघर्ष सुरू झाल्यानंतर त्याचा पराभव होऊन, त्याचा प्रभाव कमी झाला. मात्र मक्का व मदीना येथे सर्व जगातले मुसलमान यात्रेसाठी जात, त्यांना सनातन धर्माचा उपदेश करण्याचे कार्य वहाबी पंथाच्या प्रचारकांनी चालू ठेवले.

इ. स. १८२२ मध्ये रायबरेलीचा सय्यद अहंमद बरेलवी हा मक्केला जाऊन आला व त्याने भारतात वहाबी पंथाची स्थापना केली. त्याला हजारो अनुयायी मिळाले. त्याने शिखांविरुद्ध जिहाद पुकारून अफगाण व पठाण टोळ्यांना निमंत्रण दिले आणि कलकत्त्यापासून पेशावरपर्यंत मुस्लिम समाजात उठावणी करून एक लाख तरुण धर्मयुद्धासाठी तयार केले. त्या सैन्याच्या बळावर त्याने पेशावरला आपले राज्य स्थापले व तो स्वतः खलिफा झाला. त्या वेळी पंजाबात रणजितसिंहाचे राज्य होते. सय्यद अहंमद बरेलवीने आपल्या सर्व शक्तीनिशी त्या शीख राज्यावर चढाई केली. पण रणजितसिंहाने त्याचा पराभव केला व इ. स. १८३१ साली त्याला बालाकोटच्या लढाईत ठार मारले.

हिंदुस्थान हा 'दार-उल्-हरब' आहे; तो 'दार-उल्-इस्लाम' होईपर्यंत जिहाद चालू ठेवले पाहिजे, अशी इस्लामची आज्ञा आहे, हे वहाबी पंथाचे मुख्य सूत्र होते. त्याप्रमाणे त्या पंथाने इंग्रजी सत्तेविरुद्ध इ. स. १८६५ पर्यंत अनेकदा उठावणी केली. इ. स. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धात मुस्लिम सैनिक सामील झाले होते, ते याच प्रेरणेमुळे. त्या युद्धाची उठावणी हिंदू व मुस्लिम दोन्ही धर्मांच्या नेत्यांनी केली असली, तरी विजयानंतर दिल्लीच्या बादशहाची सत्ता चालू व्हायची होती. त्यामुळे हिंदुस्थान 'दार-उल्-इस्लाम' झाला असता. पण हिंदी सैन्याचा पराभव झाल्यामुळे ती योजना बारगळली. ब्रिटिश सरकारने वहाबी पंथाच्या पुढाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई केली. तरीही त्या पंथाने आपली जिद्द सोडली नाही. इ. स. १८५७ च्या पराभवानंतरही त्याने अनेकदा उठावणी केली. पण इंग्रजांनी क्रूरपणे तिचे दमन केले

वहाबी पंथाचे कार्य मूलतः धार्मिक स्वरूपाचे होते. अमीर-उमराव आणि मुल्ला-मौलवी यांचा त्याला विरोध असला, तरी सामान्य जनांवर त्याचा बराच प्रभाव पडला होता. भारतात सर्वत्र त्याचा खूप प्रचार झाला. बंगाल, बिहार व गुजरात या प्रदेशांत त्या पंथाला असंख्य अनुयायी मिळाले आणि अजूनही बरेच मुसलमान त्या पंथाची मते मानतात. द. भारतातही त्या पंथाचा प्रचार झाला. कालांतराने त्या पंथाच्या कार्याला राजकीय आंदोलनाचे रूप प्राप्त झाले. ब्रिटिश सरकारच्या विरुद्ध त्या पंथाने एक गुप्त संघटना उभारली होती. तिचे मुख्य केंद्रस्थान बिहारमध्ये पाटणा येथे असून, बंगाल व बिहार प्रदेशांतील सर्व जिल्ह्यांत तिची केंद्रे होती. पाटणा येथील प्रमुखाला खलिफा म्हणत. तिथल्या केंद्रात असंख्य स्वयंसेवकांना विविध प्रकारचे शिक्षण दिले जाई. शेकडो प्रचारक भारताच्या निरनिराळ्या भागांत हिंडून आपल्या तत्त्वांचा उपदेश करीत आणि संघटनेसाठी निधी जमवीत. त्यांच्या प्रचारात धार्मिक व सामाजिक सुधारणांवर भर दिलेला असला, तरी त्यात परकीय सत्तेविरुद्ध लढा करण्याची चिथावणीही दिली जात होती. मात्र राजद्रोहाचा आरोप ठेवता येणार नाही, अशा प्रकारची भाषा ते प्रचारक वापरीत. त्यांच्या उपदेशामुळे हजारो मुसलमान कट्टर धर्माभिमानी बनले, तसे सरकारद्रोहीदेखील झाले, असे हंटर नावाच्या ब्रिटिश लेखकाने लिहून ठेवले आहे.

खेडोपाडी निरनिराळ्या प्रकारे जमा झालेली मदत पाटणा येथील केंद्रात एकत्र करून ती वायव्य सीमाप्रदेशात ब्रिटिश सरकारविरुद्ध लढणाऱ्या टोळ्यांकडे पाठविली जाई. द्रव्य, धान्य, इतर वस्तू अशा विविध रूपांत मदत जमा होत असे. सोन्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मोहरांत तिचे रूपांतर करून त्या विश्वासू माणसांबरोबर पाठ-वल्या जात. त्यासाठी पंथाच्या नेत्यांनी एक अत्यंत गुप्त व मजबूत यंत्रणा बनवली होती. त्यांनी एक गूढ सांकेतिक भाषाही तयार केली होती. सीमाभागात लढण्यासाठी स्वयंसेवकही पाठवले जात होते. त्यापूर्वी त्यांना लष्करी शिक्षण दिले जाई. अशा दुहेरी मदतीमुळेच तिथला लढा दीर्घ काळ चालू राहिला होता. इ. स. १८६३ मध्ये ब्रिटिश सरकारला अचानक त्या संघटनेचा सुगावा लागला. त्यानंतर सरकारने खूप शोधाशोध करून तिच्या नेत्यांना पकडले व दीर्घ मुदतीच्या शिक्षा दिल्या. [म.ज्ञा. को.; डि. इ.; इ.वा.शा.; वि.मुं. रा. प.; सं. चा. अ.; क्य. अहमद—प्रो. ट्रॅ. ऑ. इं. ओ. कॉं. २१, श्रीनगर, १९६१]

वह्निमहोत्सव एक काम्य व्रत. कार्तिक मासाच्या शुक्ल पक्षात मंगळवारी षष्ठी आल्यास हे व्रत करतात. या दिवशी अग्नीची व कार्तिकस्वामीची पूजा करणे, हा या व्रताचा प्रधान विधी आहे. यात दक्षिणेकडे तोंड करून तूप, मध, जल व फुले यांचे हवन करतात व ब्राह्मणभोजन घालतात. रात्री भूमि-शयन करतात. फल — रोगनाश. [व्र. प.]

वह्निवासिनी एक शाक्त देवता. ही त्रिलोचना व अष्टभुजा आहे. हिच्या डाव्या हातांत तांबडे कमळ, शंख, इक्षुचाप व पूर्णचंद्र असून, उजव्या हातांत कल्हार, हेमशृंग, पुष्प-बाण व मातुलिंग आहे. [श्रीविद्यार्णवतंत्र]

वह्निव्रत एक काम्य व्रत. अग्नी ही या व्रताची देवता आहे. व्रताचा प्रारंभ चैत्र अमावास्येला करून ते एक वर्षभर आचरायचे असते. प्रत्येक अमावास्येस अग्नीची पूजा व तिलहोम असा याचा विधी आहे. फल — अग्निष्टोमाचे पुण्य. [हि. ध.]

वळ्ळत्तोळ नारायण मेनन (इ. स. १८७९–१९५८) केरळातील एक आधुनिक महाकवी व कथकळी या नृत्यप्रकाराचे पुनरुद्धारक. यांचा जन्म मलबार जिल्ह्याच्या दक्षिणेस असलेल्या वेट्टत्तुनाटू नामक गावी एका नायर कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव दामोदरन व आईचे पार्वतीअम्मा असे होते. वळ्ळत्तोळ यांचे शिक्षण पारं-परिक पद्धतीने गुरुगृही राहून झाले. त्यांचे मामा रामुण्णी मेनन यांनी त्यांना वैद्यकीचे शिक्षण दिले. पारक्कुळम सुब्रह्मण्यम शास्त्री, कैक्कुळङ्ङर व राम वारियर या तीन पंडितांनी त्यांना तर्कशास्त्र शिकविले. श्री. कुरुत्तपार दामोदरन नम्पूतिरी यांनी त्यांच्या कवी व साहित्यिक होण्याच्या आकांक्षेला प्रोत्साहन दिले. आरंभीचा काही काळ वळ्ळत्तोळ आपल्या मामांच्या आज्ञेने विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवीत व फावल्या वेळात वैद्य-कीचा व्यवसाय करीत.

इ. स. १८९७ साली त्यांची आई मरण पावली. आणखी ५-७ वर्षांनी त्यांचे मामा व वडील हेही दोघे मरण पावले. इ. स. १९०२ मध्ये त्यांचा चिट्टूषी माधवी नामक एका मुली-बरोबर विवाह झाला.

वडिलांच्या मृत्यूनंतर वळ्ळत्तोळ यांच्या जीवनाला वेगळे वळण लागले. त्यांनी आपला वैद्यकीचा व्यवसाय हळूहळू आटो-पता घेऊन, वडिलांनी स्थापन केलेल्या नाटकमंडळीची जबाब-दारी स्वीकारली. या नाटकमंडळीत ते नट म्हणूनही काम करीत. अभिनयाचे त्यांना चांगलेच अंग होते; त्यामुळे तीनचार वर्षे त्यांनी ती नाटकमंडळी चांगल्या प्रकारे टिकवली; परंतु पुढे मात्र त्यांना ती बंद करणे भाग पडले.

मग त्यांच्या काही स्नेह्यांनी परिष्काराभिवर्धिनी नामक दुसरी नाट्यसंस्था सुरू केली. वळ्ळत्तोळ यांनी तिच्या स्थापनेत उत्साहाने भाग घेतला; परंतु त्यांना त्या नाट्यसंस्थेद्वारे काही महत्त्वाची कामगिरी बजावता आली नाही. इ. स. १९१०साली ते फार आजारी पडले व त्या आजारातून उठल्यावर बहिरे झाले. या बहिरेपणामुळे त्यांना सबंध आयुष्यात ज्या यातना भोगाव्या लागल्या, त्याचे अत्यंत करुणाजनक व प्रत्ययकारी वर्णन त्यांनी आपल्या बधिरविलाप नामक काव्यात केले आहे. त्यानंतर त्यांनी आपले सर्व जीवन काव्यलेखनात व कथकळी, मोहिनीआट्टम् या नृत्यांच्या उद्धारार्थ वेचले.

इ. स. १९३२ साली त्यांनी नाट्य, नृत्य, अभिनय, इ. कलांचा विकास घडवून आणण्यासाठी तिरुत्तिप्परम्प या गावी कलामंडलम नामक एका संस्थेची उभारणी केली. या संस्थेच्या स्थापनेत मणक्कुळम सामन्त कुटुंबातील श्री. मुकुंद राजा यांचाही महत्त्वाचा वाटा होता. या संस्थेच्या स्थापनेनंतर वळ्ळत्तोळ हे चेरुतरुत्ती नामक गावी राहायला गेले व त्यांनी आपल्या संस्थेचे केंद्रकार्यालयही त्याच गावी स्थापले. कालांतराने त्यांनी त्या गावी आपले घर बांधले व एक छापखानाही उभारला. कलामंडलम या संस्थेत कथकळी, मोहिनीआट्टम्, भरतनाट्यम्, थुळ्ळल, इ. अनेक नृत्यप्रकारांचे शिक्षण दिले जाई; त्याचबरो-बर संगीत व वाद्यवादन हेही विषय पद्धतशीर शिकवले जात. वळ्ळत्तोळ यांनी पूर्वी केवळ केरळातच प्रचलित असलेले वरील नृत्यप्रकार हळूहळू सबंध भारतात लोकप्रिय केले. पुढे मलाया, सिंगापूर, ब्रह्मदेश, श्रीलंका, इ. देशांत आपले कलामंडळ नेऊन तिकडेही त्यांनी वरील कार्यक्रम लोकप्रिय केले. रशिया, चीन, इ. देशांचाही त्यांनी वेगवेगळ्या निमित्ताने दौरा केला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मद्रास राज्य सरकारने प्रत्येक द्राविडी भाषेतील सर्वश्रेष्ठ कवींपैकी एकाला राजकवी म्हणून सन्मान समर्पण करायचे ठरविले, तेव्हा हा सन्मान सर्वप्रथम वळ्ळत्तोळ यांना मिळाला. भारत सरकारने त्यांना पद्मविभूषण ही बहुमानाची पदवी देऊन गौरविले. पूर्वीच्या त्रिवांकूर संस्थानाच्या अधिपतींनीही त्यांना वेळोवेळी सन्मानचिन्हे व पदव्या अर्पण केल्या होत्या. केरळच्या व दिल्लीच्या साहित्य अकादमीचे ते सन्माननीय सदस्य होते.

महाकवी वळ्ळत्तोळ

वळ्ळत्तोळ यांची साहित्यसपदा विपुल व अमोल आहे. वयाच्या बाराव्या वर्षापासून ते कविता लिहीत होते. त्यांच्या या कवितांचे आठ भाग साहित्यमंजरी या नावाने प्रसिद्ध आहेत. याशिवाय विषुक्कणी, दिवास्वप्न, वीरशृंखला, परलोक, स्त्री, एण्टे गुरुनाथ, इ. आणखी काही त्यांचे कवितासंग्रह असून, त्यांत त्यांची स्फुट कविता संकलित केली आहे. स्त्री या कवितासंग्रहात केवळ स्त्रीविषयक, तर एण्टे गुरुनाथ या कवितासंग्रहात केवळ म. गांधी यांच्यासंबंधीच्या कविता आहेत. बधिरविलाप, चित्रयोगम, गणपती, विलासलतिका, बन्धनस्थानाय अनिरुद्धन, औदकत्तू शिष्यनुमकनुम, मग्दलम मरियम, अच्छनुमकळुम्, कॉच्युसीता, ही त्यांच्या खंडकाव्यांची व महाकाव्यांची नावे होत.

या स्वतंत्र कवितेशिवाय त्यांनी अनेक महत्त्वाच्या ग्रंथांचे अनुवाद केले आहेत. त्या ग्रंथांची नावे अशी – कालिदासाचे ऋतुसंहार (काहींच्या मते हीदेखील त्यांची स्वतंत्र काव्यकृतीच आहे व तिचे नाव ऋतुविलासम असे आहे.), वाल्मीकिरामायण, ऋग्वेद, मार्कंडेयपुराण, पद्मपुराण, वामनपुराण, मत्स्यपुराण, इत्यादी. ग्रंथविहारम या त्यांच्या पुस्तकात आत्मपोषिणी या नियतकालिकात लिहिलेल्या टीकालेखांचा संग्रह आहे.

वळ्ळत्तोळ हे आपल्या साहित्यिक जीवनाच्या आरंभी केरळोदयम, रामानुजन, आत्मपोषिणी, इ. पत्रांचे संपादन करीत व केरळकल्पद्रुम नामक मुद्रणालयही चालवीत. हेच मुद्रणालय पुढे त्यांनी मंगळोदयम नामक एका प्रकाशनसंस्थेत रूपांतरित केले.

वळ्ळत्तोळ यांना केरळातल्या राष्ट्रीय कवितेचे जनक समजतात. गुलामीच्या शृंखला तोडून स्वतंत्र होण्यासाठी वळ्ळत्तोळ यांनी जो कवितेचा स्वर लावला, तो जितका निर्भय तितकाच तीव्रही होता. त्यांच्या राष्ट्रगीतांनी केरळातल्या असंख्य युवयुवतींना कारागृह हेच स्वातंत्र्याचे मंदिर वाटू लागले. समग्र केरळभर राष्ट्रीय उत्थानाची जी एक लाट उसळली, तिला वळ्ळत्तोळ यांचीच प्रभावी प्रेरणा कारणीभूत होती. हिंदू, मुस्लीम व ख्रिस्ती या केरळातल्या तीनही प्रमुख धर्मांतील सारभूत तत्त्वे आत्मसात करून, त्या तत्त्वांनी त्यांनी आपल्या काव्याचे शब्दार्थ अनुप्राणित केले.

भारताचे गौरवगान करणाऱ्या एका कवितेत ते लिहितात –

भारतमेन्ना पेरकेट्टालभिमान पूरित माकण मंतरंगम्
अंपो ! महिमावितार्षभूवे, तव वन्।
पोर्कळत्तिलम ब्राह्मण्यसंपत्ति वेशत्तेवविलुम चरित्रसौरभम् ॥

अर्थ – भारताच्या केवळ नामश्रवणाने अंतःकरण अभिमानाने भरून यावे. काय सांगावा या आर्य भूमीचा महिमा ! इथे रणमैदानावरही निष्काम कर्मयोगाचा गुंजारव ऐकू येतो. इथल्या भिल्लाच्या झोपडीतही ब्रह्मज्ञान खेळत असते. इथे वारयोषितांच्या आळीतही चारित्र्याचा सुगंध भरून राहिलेला दिसतो !

प्रचलित जीवनसमस्यांपैकी प्रत्येक समस्येचे यथायोग्य चित्रण वळ्ळत्तोळ यांच्या कवितेत सापडते. त्यांची कविता अन्यायाच्या व अत्याचाराच्या विरुद्ध लढा पुकारणारी आणि न्यायनीतीचा जयघोष घुमविणारी असल्यामुळे, वळ्ळत्तोळ हे केरळातल्या आबालवृद्ध जनतेचे आवडते कवी ठरले आहेत. [भारतीय साहित्यकार – काशीनाथ पोतदार, १९६५; केरळ कवी-श्री माला (मलयाळम्), १९११; कै. सा. द.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वांगला गारो लोकांचा एक उत्सव. हा उत्सव ते भाद्रपद महिन्यात म्हणजे सुगीचा हंगाम संपल्यावर साजरा करतात. उत्सव सात दिवस चालतो आणि तो प्रत्येक खेड्यातील ग्रामप्रमुखाच्या घरी होतो. त्या प्रसंगी गावकरी ठेवणीतला पोषाख करून ग्रामप्रमुखाच्या घरी जमतात. तिथे म्हातारे लोक आतल्या खोलीत आणि तरुण बाहेर बसतात. धूप जाळून प्रार्थना केल्यावर जेवणाचा कार्यक्रम होतो. जेवणात भात व मांस एकत्र शिजविलेले असते. या भोजनाला ते पवित्र मानतात. जेवण वाढण्याचे काम ग्रामप्रमुखाच्या घरातली माणसे करतात.

प्रारंभीचा हा विधी संपल्यावर गावचा प्रमख वृद्ध लोकांबरोबर आतल्या खोलीत नाचतो. नाचात भाग घेणारे एकमेकांच्या खांद्यावर हात ठेवून वर्तुळाकार फिरतात. या वेळी ते काही मंत्रही म्हणतात. हा भाग आटोपल्यावर तरुणांना नाचायला परवानगी मिळते. नाचात सहभागी होणाऱ्या तरुणांच्या डोक्यावर पिसे खोवलेल्या पगडया असतात. लांब झगे घालून स्त्रियाही या वेळी नाच करतात. पुरुषांप्रमाणे त्यांच्याही डोक्यावर पगडया आणि गळयात दागिने असतात.

या सात दिवसांत अनेक प्रकारची नृत्ये केली जातात. त्यांत कोंबडयाची झुंज, युद्धनृत्ये, काही शेतीप्रधान नृत्ये, इ. प्रकार असतात. नाच नियमबद्ध असतो, असे नाही. तरुण कमरेला ढोल बांधून आणि मुली हवेत हात फिरवून फेरात नाचतात व गाणी म्हणतात. सामान्यतः वृद्ध लोक जन्मभूमीच्या वैभवाची गाणी गातात, तर तरुण प्रेमगीते गातात. गाण्यात काही वेळेला तरुण मुला-मुलींचे सवाल-जबाबही होतात. सवाल-जबाबांचा विषय प्रेम हा असतो.

या उत्सवात दारूची रेलचेल असते. हा उत्सव म्हणजे गारो लोकांची आनंदाची एक पर्वणीच होय. त्यांच्या आयुष्यातील हे अत्यंत सुखद दिवस असतात. त्यामुळे कोणताही गारो माणूस या उत्सवात भाग घेत नाही, असे सहसा घडत नाही. [फे. फे. आ.]

वांचो अरुणाचल (नेफा) प्रदेशाच्या तिरप विभागातील एक आदिवासी जमात. इंग्रजी राजवटीत हे लोक अगदी रानटी अवस्थेत होते. आजही त्यांच्यांत फारशी सुधारणा झालेली नाही.

या लोकांचा रंग सावळा, नाके नकटी व डोळे बारीक असतात. ते मध्यम उंचीचे असून, त्यांची अंगकाठी मजबूत असते.

वेषभूषा – पुरुष एक लंगोटी नेसतात. सणासुदीला केव्हातरी ते अंगात कोट किंवा जाकिट घालतात. मुलांपासून म्हाताऱ्यांपर्यंत सर्व पुरुषांच्या पोटाभोवती वेताची तीनचार वर्तुळे घट्ट गुंडाळलेली असतात. भूक कमी लागावी व पोटाचे विकार होऊ नयेत, हा त्यामागचा हेतू असतो. पुरुष कानात निरनिराळी रानटी फुले, पाने, लाकडी ठोकळे, जनावरांची शिंगे, सिगारेटची थोटके, इ. अनेक प्रकारच्या वस्तू घालतात. गळयात निरनिराळया मण्यांच्या व जुन्या रुपयांच्या माळा घालायची त्यांना फार हौस आहे. त्यांची कित्येक वयस्क मुले संपूर्ण विवस्त्र असतात. चौदा-पंधरा वर्षांपर्यंतच्या मुलीही नग्न अवस्थेत राहतात. मोठ्या स्त्रिया मात्र लज्जारक्षणार्थ कमरेभोवती वीतभर रुंदीची एक चिंधी गुंडाळतात. तीही पृष्ठभागी अगदी खालपर्यंत घसरलेली असते. स्त्रिया व मुली गळयात मण्यांच्या व गवताच्या पुष्कळ माळा घालतात. त्यामुळे त्यांची छाती झाकली जाते. या माळा त्या स्वतःच बनवतात. गवताच्या माळा बनविण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे. राजघराण्यातील स्त्रियांना फक्त लांब केस ठेवायची परवानगी असते. त्यांच्यापैकी काही केसांचा अंबाडा घालतात व काही गवताच्या गोलाकार नळीत केस ओवून ते पाठीवर सोडतात. बाकीच्या सर्वसाधारण स्त्रिया डोक्याचे संपूर्ण मुंडन करतात.

वांचोंचा नेता

स्त्रिया व पुरुष अंगावर जागजागी गोंदवून घेतात. स्त्रियांचे पाय, मांडया, हात, खांदे, पाठ व चेहरा हे अवयव उभ्या-आडव्या रेषांनी भरलेले असतात. तसेच, स्त्रिया व पुरुष दोघेही वांबूचा गरम रस दातांना लावतात व दात कायमचे काळे करून घेतात.

या लोकांना स्नानाचा कंटाळा असल्यामुळे आबालवृद्ध सर्वजण अत्यंत घाणेरडे असतात.

घरे – वांचो लोकांची घरे सुरक्षिततेसाठी उंच पहाडावर ते बांधलेली असतात. लाकडाच्या किंवा बांबूच्या मचाणावर ते

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपली घरे उभारतात. घराच्या भिंती बांबूच्या विणलेल्या चटयांच्या असतात आणि वर ताडाच्या पानांचे छप्पर असते. सर्वसाधारण लोकांच्या घरात तीन खोल्या असतात. अगदी शेवटच्या खोलीला लागून शौचगृह असते. घर लाकडी मचाणावर असल्यामुळे सर्व घाण खाली सांडते व वाहत राहते. त्यावर डुकरे पोसली जातात. या कारणाने गाव फार घाणेरडे असते व सगळीकडे दुर्गंध पसरलेला असतो.

राजाचे घर मात्र सर्वसाधारण लोकांपेक्षा खूपच मोठे असते. ते सुमारे दीडशे फूट लांब आणि चाळीस-पन्नास फूट रुंद असते. आत सर्वत्र अंधार असतो. मध्यभागी तीन-चार फूट रुंद वाट असते आणि तिच्या दोन्ही बाजूंना लहान लहान खोल्या असतात. काही वेळा एकाच बाजूने खोल्या असतात. घराच्या शेवटी एका आडव्या लांब लाकडी ओंडक्यात चार-पाच ठिकाणी खोलगट खड्डे पाडून भात कांडण्याची व्यवस्था केलेली असते. राजाच्या बैठकीच्या खोलीत अनेक प्रकारची शस्त्रे भिंतीला लटकवलेली असतात.



वांचो लोकांची कारागिरी—(१) वांचो योद्धयांचा अलंकार (२) मृताचे स्मारक (३) लाकडी बाहुला (४) तंबाखूची नळी

राजाला अनेक राण्या करता येतात. त्यामुळे त्याच्या महालात अनेक खोल्या असतात. प्रत्येकीची चूल वेगळी असते. राजाची मुख्य राणी त्याच्यासाठी स्वयंपाक करते.

सर्वसाधारण वांचो लोकांच्या घरात शस्त्रास्त्रे आणि चटया, बांबूच्या टोपल्या, पाणी साठवण्यासाठी बांबूचे मोठे नळे, धान्य कांडण्यासाठी लाकडाचे उखळ, इ. वस्तू असतात.

उद्योगधंदे – शेती हा वांचो लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. हे लोक झूम पद्धतीने शेती करतात. एखाद्या पहाडावरील सर्व झाडे तोडून ती वाळली, की त्यांना आग लावतात आणि नंतर त्या राखेत हे बी पेरतात. दोन वर्षे एका जागी शेती करून तो भाग सोडून देतात व दुसऱ्या जागी जंगल तोडायला सुरुवात करतात. यामुळे या लोकांना शारीरिक श्रम तर होतातच; शिवाय जंगलांचेही फार नुकसान होते. भात, मक्की आणि कोनी धान हे यांचे शेतीतील मुख्य उत्पादन असते. शेतीची सर्व कामे मुख्यत्वे स्त्रियाच करतात.

आहार व व्यसने–भात, मक्की, कोनी, कंदमुळे व मांस हे या लोकांचे मुख्य अन्न आहे. गाईसकट सर्व जनावरांचे मांस हे खातात. उंदीर हे त्यांचे आवडते खाद्य आहे.

हे लोक भातापासून मद्य तयार करतात. त्याला लौपाणी असे नाव आहे. सर्व लोक आवडीने हे मद्य पितात. सर्व सण-उत्सवांत मद्याला फार महत्त्व असते. काही वांचो लोक तंबाखू ओढतात. बऱ्याच लोकांना अफूचे जबरदस्त व्यसन आहे. त्यांचे हे व्यसन सोडण्यासाठी शासनातर्फे बरेच प्रयत्न चालले असून, खोनसा येथे त्यासाठी एक उपचारकेंद्र उघडण्यात आले आहे.

काही लोक सुपारी, तर बहुतेक सर्व स्त्री-पुरुष साजी नावाच्या झाडाची साल चुन्याला लावून खातात.

वांचो स्त्रिया फार मेहनती आहेत. घरातील स्वयंपाकादी सर्व कामे त्या करतात. शेतीची सर्व कामे, जंगलातून जळणासाठी लाकडे आणणे, पहाडाच्या शिखरावर गाव असल्यामुळे अगदी खालून झऱ्याचे पाणी बांबूच्या मोठ्या नळकांड्यांत भरून पाठीवर लादून आणणे, अशी कष्टाची कामे त्यांनाच करावी लागतात.

वांचो स्त्री-पुरुष बांबूच्या टोपल्या, करंड्या, चटया, वगैरे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विणण्यात फार प्रवीण आहेत. तसेच लाकडावर कोरीव काम करण्यातही ते निपुण आहेत. वांचो मली गवतापासून सुरेख माळा तयार करतात. बाहेरून आलेले लोक मुद्दाम या माळा विकत घेऊन जातात.

या लोकांची श्रीमंती मिथुन नामक पशूवरून ठरते. ज्याच्याकडे मिथुन पशू अधिक, तो श्रीमंत असे हे समजतात.

पूर्वी वांचो लोकांत आपापसात अनेक लढाया होत असत. एका गावाच्या लोकांनी दुसऱ्या गावातील लोकांवर हल्ला करून त्यांची कत्तल करणे, त्यांच्या मुली पळवणे किंवा सबंध गाव जाळून नष्ट करणे, हे प्रकार सर्रास चालत असत. दुसऱ्या टोळीचा किंवा जमातीचा माणूस हा निसर्गतःच आपला शत्रू आहे, अशी यांची भावना असे. शत्रुपक्षाच्या माणसाचे मुंडके कापून आणणाऱ्या माणसाला वांचो लोक फार मान देत. अशा पुरुषाला माणसाच्या चेहऱ्याच्या आकाराची पितळेची प्रतिमा जन्मभर गळयात घालायला मिळे. अजूनही तीन-चार प्रतिमा गळयात घालणारे बरेच वांचो पुरुष दिसतात. इ. स. १८७५मध्ये भू-मापन खात्याचे काही लोक, स्वसंरक्षणार्थ एक लष्करी तुकडी घेऊन, सर्व्हे करण्यासाठी नियानू गावी गेले होते. त्या वेळी कपटाने वांचो लोकांनी त्यांच्यापैकी ऐंशी लोकांना ठार मारले. तेव्हा या लोकांना जरब बसवण्यासाठी इंग्रज सरकारने पुन्हा एक लष्करी पलटण पाठवून संपूर्ण नियानू गाव जाळून टाकला.

विवाहप्रथा – लग्नापूर्वी वांचो मुलामुलींना बरेच स्वातंत्र्य असते. मुले व मुली एकमेकांत अनिर्बंध मिसळू शकतात. मुली आपला जोडीदार आपणच निवडतात. लग्नापूर्वी मुलगी गरोदर राहणे, ही एक क्षुल्लक घटना समजतात. मात्र संबंधित मुलाला तिच्याशी लग्न करावे लागते. त्याने ते नाकारल्यास त्याला दंड भरावा लागतो. प्रत्येक नवीन जोडप्याला गावातील लोक सामूहिक रीतीने नवे घर बांधून देतात.

पूर्वी वांचो लोकांत लग्नासंबंधी एक नियम होता. अंगावर गोंदून घेतल्याशिवाय पुरुषाला लग्न करता येत नसे; पण गोंदण्यापूर्वी त्याने शत्रुपक्षाशी झालेल्या लढाईत भाग घेऊन एकतरी मुंडके कापून आणले पाहिजे, असा नियम होता. मुंडके कापून आणलेल्या तरुणाशी विवाह करायला मुली तयार होत नसत. मुंडके कापून आणण्याची प्रथा बंद झाल्यावर, तरुणांनी अंगावर गोंदून कसे घ्यावे व लग्न कसे करावे, असा प्रश्न पडला. तेव्हा या लोकांनी एक युक्ती शोधून काढली. त्यांनी लाकडाची मुंडकी बनवली आणि ती ते शत्रूच्या जंगलात लपवून ठेवू लागले. मग तरुण चांगला पोषाख करून जंगलात जाऊन ती मुंडकी कापून आणू लागले. त्यानंतर या विजयाप्रीत्यर्थ नृत्य व मेजवानी होऊन मुलाच्या अंगावर गोंदायचे आणि मग तो लग्न करायला मोकळा व्हायचा, असा प्रघात त्यांनी सुरू केला.

काही गावातील तरुण दुसऱ्या गावच्या प्रदेशाला वेढा देत व त्या जमिनीतील काही झुडपे उपटून आणीत. एवढयाने त्यांच्या

वांचो तरुणी

अंगचे शौर्य सिद्ध होई व त्यांना लग्नासाठी परवानगी मिळे.

लग्नाच्या वेळी मुलाचा बाप मुलीच्या बापाला तिची किंमत म्हणून मिथुन नामक पशू देतो. लग्नकार्य किंवा मोठे उत्सव या वेळी मिथुन कापण्याची पद्धत आहे.

मोरंग ही वांचो लोकांची एक वैशिष्टयपूर्ण संस्था आहे. प्रत्येक गावात चार-सहा मोरंग घरे असतात. सर्वांची बांधणी सारखीच असते. बाहेर थोडा सज्जा व आत एक मोठी खोली अशी त्याची रचना असते. या मोठया खोलीतच एका बाजूला दोन-तीन लहान खोल्या काढलेल्या असतात. राजाच्या घराजवळ त्याचे मोरंग असते. त्यात राजा ग्रामस्थांच्या सभा भरवतो व जमातीसंबंधी महत्त्वाचे निर्णय सांगतो. या मोरंगमध्ये एका बाजूला, तीस-चाळीस फूट लांब व आतून पोकळ केलेला असा भलामोठा लाकडी ओंडका असतो. त्याच्यावर लाकडाच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ओंडक्यांनी प्रहार केला, की त्यातून ढम ढम असा आवाज येतो. ढोल, डफ किंवा इतर तालवाद्ये त्यांच्याजवळ नसल्यामुळे, करमणुकीचे एक साधन म्हणून ते लोक या ओंडक्याचा उपयोग करतात. गावात आग लागली असता किंवा शत्रूचे आक्रमण झाले असता हा ओंडका वाजवून गावकऱ्यांना सूचना देतात. लोक मग हातांतली कामे टाकून लगेच तिथे जमतात.

गावातील इतर मोरंगमध्ये गायी व मिथुन यांची शिंगे असलेली मुंडकी, इतर जनावरांच्या खोपड्या व त्यांचे जबडे शोभेच्या वस्तू म्हणून टांगलेल्या असतात. तिन्हीसांजा झाल्या, की गावातील मुले व तरुण या मोरंगमध्य जमतात. हे त्यांचे क्रीडास्थान असते. तिथे गप्पागोष्टी, विनोद व संगीत यांच्या द्वारे ते आपली करमणूक करून घेतात. मुलांना शिस्त लागावी, ती शूर व निर्भय व्हावी, अशा तऱ्हेचे शिक्षण मुलांना इथे देतात. भाले व धनुष्यबाण कसे चालवायचे, ते इथे शिकवतात. याशिवाय मोरंगच्या शेकोटीसाठी जंगलातून बांबू व लाकडे आणणे, पाणी भरणे, कंदमुळे आणणे, इ. कामे मुलांना करावी

वांचोंचे युद्धनृत्य

लागतात. सर्व मुलांचा एक प्रमुख असतो. त्याचे हुकूम इतर मुलांना पाळावे लागतात. राजाची मुले असली तरीही त्यांना सर्व प्रकारची कामे करावी लागतात. त्यांत त्यांना सवलत मिळत नाही. लग्न होईपर्यंत सर्व मुलांना मोरंगमध्ये झोपण्याची सक्ती असते. स्त्रियांना मात्र मोरंगमध्ये प्रवेश नसतो.

वांचो लोकांत नृत्याचा फारसा प्रघात नाही. त्यांच्यांत तांडव नृत्यासारखे एक रणनृत्य मात्र प्रचलित आहे. हे लोक लढाऊ बाण्याचे असल्यामुळे, प्रत्यक्ष लढाईवर जाण्यापूर्वी युद्धज्वर अंगात चढावा, म्हणून हे नृत्य त्यांच्यांत रूढ झाले असावे. आता ही लढाऊ प्रवृत्ती कमी होत चालली आहे; पण नृत्य म्हणून हा प्रकार अजूनही अस्तित्वात आहे. हातात डाओ व ढाल घेऊन, हो हो असा आवाज करीत वांचो पुरुष हे नृत्य करतात.

मर्तिकप्रथा – वांचो लोक मृताला जाळीत नाहीत किंवा पुरीतही नाहीत. त्याऐवजी बांबूच्या एका उंच मचाणावर ते मृताला गवतपाल्याने झाकून ठेवतात. त्याच्या वस्तूही त्याच्या शेजारी मांडून ठेवतात. सुरुवातीला काही दिवस दररोज मृताचे कुटुंबीय त्याच्या देहाला ऊब मिळावी म्हणून जवळपास शेकोटी पेटवतात व मृताभोवती प्रदक्षिणा घालून शोक करतात. मृताचे संपूर्ण शरीर सडून गेल्यावर त्याचे मुंडके कापून घरी आणतात आणि ते कोरून साफ करून एखाद्या मोठ्या दगडाखाली लपवून ठेवतात. वर्षातून एकदा अशी मुंडकी बाहेर काढून त्यांना मद्य व इतर काही वस्तू अर्पण करतात आणि पुन्हा ती दगडाखाली ठेवतात.

राजाच्या मृत्यूनंतर त्याच्या मचाणासमोर एक लाकडी प्रतिमा किंवा बांबूचे प्रतीक उभारतात. [फि. फॉ. ने.; जे. चि. क. के; सौ. वसुंधरा लघाटे, सह्याद्रि, ऑगस्ट १९७३]

वांझ काठियावाडमधील एक जात. गुजरातमध्येही यांची तुरळक वस्ती आहे. हे आपल्याविषयी पुढील कथा सांगतात–

परशुरामाने जेव्हा क्षत्रियांचा संहार आरंभला, तेव्हा आमच्यापैकी काही हिंगलाजमातेला शरण गेले. त्या वेळी तिने आम्हाला सांगितले, की ' तुम्ही जर लढाऊ पेशा सोडून देऊन वस्त्रे विणण्याचा व्यवसाय स्वीकाराल, तर मी तुमचे रक्षण करीन. ' आम्ही तिची ही अट मान्य केली आणि विंध्याचलावर राहायला आलो. तिथे तंतुपाल नामक एका ऋषीने आम्हांला विणण्याची कला शिकवली. विंध्याचलवासी झाल्यावर आम्ही वांझ हे सुटसुटीत नाव धारण केले.

आपण ब्रह्मक्षत्रिय असल्याचे ते सांगतात; तसेच आपण माध्यंदिन शाखेचे असून, आपले गोत्र मार्कंड आहे, असेही म्हणतात.

राहण्याच्या ठिकाणांवरून यांचे गढिया (जुनागड किल्ल्यावरील), नगरिया (जामनगर येथील) व वढवाणी (वढवाण येथील) असे तीन भेद आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे लोक पेशाने विणकर आहेत. यांच्यापैकी काही मात्र शेती व सुतारकाम करतात.

काठियावाडमध्ये राहणारे वांझ मांस खात नाहीत.

विवाहप्रथा – वांझ पुरुषाला आते, मामे किंवा मावस बहिणीशी लग्न करता येत नाही. काठियावाडमधील वांझ पुरुष आपल्या प्रांताबाहेरच्या वांझ मुलीशी लग्न करीत नाहीत. मुलामुलींचे लग्न साधारणपणे बारा ते चौदा या वयात करतात. लग्नापूर्वी मुलांच्या हातून काही अनैतिक वर्तन घडल्यास मुलीच्या बापाकडून पन्नास व मुलाच्या बापाकडून एकशे एक रुपये घेऊन ज्ञातिभोजन घालतात आणि मुलाला व मुलीला जातिबहिष्कृत न करता जातीतच ठेवून घेतात.

मुलाचा बाप मध्यस्थामार्फत मुलीला मागणी घालतो. ती मागणी मुलीच्या बापाने मान्य केल्यास मध्यस्थाला अडीच रुपये मिळतात. लग्न ठरल्यावर साखरपुडा करतात. त्या वेळी जमलेल्या लोकांना गूळ वाटतात. लग्नाचा मुहूर्त ब्राह्मणकाढून देतो.

लग्नापूर्वी दोन दिवस दोन्ही घरी मांडव घालतात. मांडवाच्या चारही कोपऱ्यांत मातीच्या सहा घटांची उतरंड रचतात. मांडवाच्या दाराला पंचपल्लवांचे तोरण बांधतात. नंतर गणपतीचे पूजन करतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधू-वरांच्या उजव्या हाताला मिंढोल नामक फळ बांधतात आणि त्यांच्या कपाळाला व गालांना हळद लावतात. लग्नाच्या दिवशी वराकडील मंडळी लग्नासाठी वधूगृही जातात. तिथे पोचल्यावर वधूमाता नांगराची प्रतिकृती, रवी, टकळी, इ. वस्तू वरावरून ओवाळून टाकते. नंतर वधू-वर समोरासमोर बसतात. मग ती दोघे विवाहहोमाभोवती चार प्रदक्षिणा करतात. लग्नातील हा आवश्यक विधी असतो. त्यानंतर ती दोघे कुलदेवतेला नमस्कार करतात. एवढ्याने लग्नविधी संपतो. यांच्यात विधवाविवाह आणि घटस्फोट रूढ आहे.

पित्याच्या हयातीत पुत्राला पैतृक संपत्तीत वाटणी मागता येत नाही.

यांच्यापैकी काही कबीरपंथी, रामानंदी व रामदासी आहेत. विष्णू हा त्यांचा प्रमुख देव आहे. चामुंडा, हर्षद, जम्राई, गंगाभवानी, इ. त्यांच्या कुलदेवता आहेत. औदीच्य ब्राह्मण हे त्यांचे पौरोहित्य करतात. दर अमावास्येला ते हिंगलाजमातेला आपले संरक्षण केल्याबद्दल, कणकेची लापशी अर्पण करतात.

मृतकप्रथा – हे लोक मृतांना जाळतात; लहान मुले, साधू व महारोगी यांची प्रेते मात्र पुरतात. प्रेत पुरताना मृताला उत्तरेकडे तोंड करून बसवतात.

प्रेत जाळल्यानंतर रक्षा नदीत विसर्जन करतात आणि अस्थी नदीजवळच्या एखाद्या खड्ड्यात टाकून देतात. [ट्रा. का. वां.]

वांदन दुवस्यू एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील १०० वे सूक्त याच्या नावावर आहे. या सूक्तातील काही ऋचा (ऋ. १०.१००.३–४) अशा –

आ नो देवः सविता साविषद्वय ऋजूयते यजमानाय सुन्वते।
यथा देवान् प्रतिभूषेम पाकवदा सर्वतातिमदितिं वृणीमहे ॥
इन्द्रो अस्मे सुमना अस्तु विश्वहा राजा सोमः सुवितस्याध्येतु नः।
यथायथा मित्रधितानि संदधुरा सर्वतातिमदितिं वृणीमहे ॥

अर्थ – जगत्प्रसूती जो सविता तो आमच्या नीतिमान आणि सोमयाजी यजमानाला नेहमी भर उमेदीचे वय देवो. म्हणजे त्या योगाने शुद्धांतःकरण साधूप्रमाणे आम्हीही दिव्य जनांची सेवा करू. परंतु वरदान हेच मागू, की आमचे सर्वतोपरी कल्याण होऊन आम्ही स्वतंत्र असावे. इंद्र हा आमच्याविषयी निरंतर वात्सल्यबुद्धी बाळगो. सोम राजा हादेखील आमच्या कल्याणाचीच चिंता वाहो. ज्याप्रमाणे लोक मित्रकार्यें घडवून आणतात, त्याप्रमाणे आम्ही हेच वरदान मागणार, की आमचे सर्वतोपरी मंगल होऊन आम्ही स्वतंत्र राहावे. [श्रुतिबोध]

वाई महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक प्राचीन क्षेत्र. याला वाई हे नाव का प्राप्त झाले, याचे विवेचन तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी पुढीलप्रमाणे केले आहे – या ठिकाणी आणि भोवताली कापडनिर्मितीचा ग्रामीण उद्योग हजारो वर्षे चालू होता. म्हणूनच धोमपासून कोरेगावपर्यंतच्या भागाला वायदेश म्हणत असत. वाय म्हणजे कोष्टी. वायदेश म्हणजे कोष्टयांचा देश.



वाई येथील मंदिरे

वाईचा सुमारे बाराशे वर्षांपूर्वीचा उल्लेख 'वायी' असा मिळतो. गावाभोवतालच्या डोंगरांमध्ये बरीच प्राचीन लेणी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेरा बौद्ध लेणी आहेत. उत्तरेकडील एका लेण्यात हीनयान बौद्धांचा एक लहानसा स्तूप आहे. आज लोक त्याला पालपेश्वर म्हणतात. वाईच्या परिसरात सातवाहनांची नाणी सापडली आहेत. शिलाहारकालीन पांडवगड, वैराटगड, कमळगड, चंदन व वंदन या नावाचे डोंगरी किल्ले इथे आहेत. यावरून वाईला बराच प्राचीन इतिहास असावा, असे दिसते. स्कंदपुराणांतर्गत म्हणविल्या जाणाऱ्या कृष्णामाहात्म्यात वाईचा वैराजक्षेत्र असा उल्लेख आढळतो. याशिवाय विराटनगर या नावानेही हे नगर परिचित आहे. पांडवांनी आपला अज्ञातवासाचा काळ इथे काढला, अशी समजूत आहे. या समजुतीच्या स्मृती अजूनही इथे आढळतात. या गावाच्या पूर्वेला एक ओढा असून, त्याला कीचक किंवा असे अभिधान आहे. भीमाने कीचकाचा वध केल्यावर त्याच्या रक्ताचा पाट ओढ्याच्या रूपाने इथे वाहू लागला असे म्हणतात. या क्षेत्राच्या परिसरात सिद्धेश्वर, वाकेश्वर, सोनेश्वर, इ. स्वयंभू स्थानेही आहेत.

मुसलमानांच्या राजवटीत वाईला खूप महत्त्व होते. इ. स. १४५३–१४८० पर्यंत इथे बहमनी सुलतानांचे लष्करी ठिकाण असून, इ. स. १५६८ मध्ये विजापूरकरांचा हा एक सुभा होता. इ. स. १६५९ नंतर वाई मराठ्यांकडे आली. पुढे पेशव्यांकडून हा गाव सरदार रास्त्यांना जहागीर म्हणून मिळाला.

रास्त्यांनी कृष्णाकाठावर अनेक घाट बांधले व मंदिरे उभारली. त्यामुळे वाईच्या धार्मिक माहात्म्यात अधिकच भर पडली. त्यात विष्णुलक्ष्मी, काशीविश्वेश्वर, ढोल्या गणपती, इ. देवस्थाने प्रसिद्ध आहेत. याशिवाय इथे काळाराम, विठोबा यांचीही मंदिरे आहेत. समर्थ रामदासांनी वाईत रोकडोबा मारुतीची स्थापना केली, अशी लोकांची श्रद्धा आहे.

कृष्णेचा उत्सव हे वाईचे वैशिष्ट्य आहे. वसंतपंचमीपासून होळीपौर्णिमेपर्यंत कृष्णा नदीच्या निरनिराळ्या घाटांवर हे उत्सव साजरे होतात. कथाकीर्तने, तीर्थप्रसाद, भजने आणि भोजने असे या उत्सवाचे स्वरूप असते. गंगापुरीपासून भीमकुंड आळीपर्यंत कृष्णेला सात घाट आहेत. एका घाटाचा उत्सव संपला की, दुसऱ्याचा उत्सव सुरू होतो. हा उत्सव सुरू होण्यामागे जी समजूत आहे, ती अशी –

छत्रपती शिवाजीमहाराजांच्या नाशासाठी अफझुलखानाचा वाईत तळ होता. छत्रपतींना यश प्राप्त व्हावे म्हणून रामडोह आळीतील लोकांनी रामेश्वरानजिक अनुष्ठानाला आरंभ केला. ही वार्ता छत्रपतींच्या कानावर गेली आणि त्यांनी विजय मिळाल्यावर त्या लोकांचा मोठा गौरव केला. कृष्णेच्या कृपेने हे यश मिळाले, या श्रद्धेने त्यांनी उत्सवासाठी वार्षिक इनामही दिले. तिथून पुढे उत्सव सुरू झाले.

वाई हे वेदविद्येचे माहेरघर म्हणून प्रसिद्ध होते. विष्णुशास्त्री मेणवलीकर, बाळंभट रानडे, धोंडशास्त्री डेंगवेकर, भाऊशास्त्री लेले, नारायणशास्त्री मराठे (स्वामी केवलानंद) यांसारखे अनेक पंडित इथे होऊन गेले. प्राज्ञपाठशाळा, गोशाळा, इ. नाणावलेल्या संस्था इथे आहेत. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृति मंडळाच्या वतीने प्रसिद्ध होणाऱ्या विश्वकोशाचे कामही इथेच चालू आहे आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे या कोशाचे प्रधान संपादक आहेत.



श्री विष्णू व लक्ष्मी यांची मूर्ती, वाई

वाईजवळ मेणवली नावाचे एक लहानसे गाव आहे. तिथे नाना फडणविसाचा सुंदर वाडा आहे. या वाड्याजवळ नानांनी मेणवलेश्वर व विष्णू यांची मंदिरे बांधली आणि कृष्णेला उत्तम घाटही बांधला. प्रसिद्ध मराठी कवी वामन पंडित याची समाधी वाईनजिकच्या भूगावी आहे, असे एक मत आहे. [श्रीक्षेत्र वाई–वर्णन–श्री. गो. वि. आपटे, १९११; कृष्णाकाठचे वैभव– श्री. रा. गो. भिडे, १९६३; श्रीचौंडेमहाराज यांचे चरित्र–श्री. अनंतदास रामदासी, श्री. धेनुदास डोळे, १९३८; म. ज्ञा. को.; वि. मुं. रा. प.; सातारा गॅझे.; श्री. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे आकाशवाणीवरील व्याख्यान, ७–८–७३]

वाक् एक देवता व शक्ती. हिला ब्राह्मी, भारती, भाषा, गीः, वाणी व सरस्वती अशी पर्याय नामे आहेत. अव्यक्त पुरुष म्हणजे आत्मा हा वाणीच्या अर्थात शक्तीच्या द्वारे व्यक्त होत असतो. शक्ती व शक्तिमान म्हणजेच आत्मा व वाणी यांचा अविनाभाव संबंध असतो. दाहकत्व जसे अग्नीला सोडून राहत नाही, त्याप्रमाणेच वाणी आत्म्याला सोडून राहत नाही. वाचेचे हे स्वरूप अव्यक्त व सूक्ष्म असते. मनुष्य जेव्हा स्वतःला व्यक्त करू इच्छितो, तेव्हा तो कोणत्या तरी वाक्चा प्रयोग करतो. म्हणूनच वाक् ही आत्म्याचे स्व किंवा महिमा असल्याचे म्हटले आहे. वाचेच्या द्वारेच तो एकाचा बहू आणि अव्यक्ताचा व्यक्त होतो. जी वाक् आपण बोलतो, ऐकतो, ती शब्दार्थमयी अशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्णात्मक स्थूल वाक् असते व ती अंतरातल्या अव्यक्त सूक्ष्म वाक्‌चे व्यक्ततम रूप असते. नृसिंहोत्तरतापनी या उपनिषदात 'ॐकार एवेदं सर्वा वाक्' = ॐकार म्हणजे सर्व प्रकारची वाणी अर्थात ॐकार हा सर्व प्रकारच्या वाणींचा मूलस्रोत, असे म्हटले आहे. या ॐकारात ही शक्ती अव्यक्त स्वरूपात असते. तिचे सारे प्रकार प्रणवात समाविष्ट असतात.

वैदिक आर्यांना वाणीचे महत्त्व पुरेपूर पटले होते. त्यांनी वाक्‌ला अनेक ऋचांच्या व सूक्तांच्या द्वारे गौरविले आहे. वाणीच्या अव्यक्त व व्यक्त रूपांची त्यांना जाणीव झाली होती. वाणी कोणाच्या ठिकाणी मंगलरूप होते, याबद्दल आंगिरस बृहस्पती हा वैदिक ऋषी म्हणतो (ऋ. १०.७१.२) –

सातू ज्याप्रमाणे चाळणीने चाळून किंवा सुपाने पाखडून निर्मळ करून घेतात, त्याप्रमाणे विद्वान लोक (प्रत्यक्ष न बोलता) आपल्या अंतःकरणानेच वाणीचा व्यवहार करीत असतात. अशा वेळी (ईश्वराला) जे प्रिय झालेले असतात, तेच न बोललेल्या वाणीतील मर्म ओळखतात; आणि अशा सत्पुरुषांच्याच वाणीच्या ठिकाणी मंगलरूप लक्ष्मी वास्तव्य करीत असते.

उत त्वः पश्यन्न ददर्श वाचमुत त्वः शृण्वन्न शृणोत्येनाम् ।
उतो त्वस्मै तन्वं वि सस्रे जायेव पत्य उशती सुवासाः ।।
(ऋ. १०.७१.४)

अर्थ – कोणी असा असतो, की त्याला डोळ्यांनी इतर सर्व दिसत असूनसुद्धा दिव्य वाणी दिसत नाही; पण एखादा क्वचितच असा निघतो, की जशी उत्कंठित आणि वस्त्राभरणांनी मंडित अशी पत्नी पतीकडे जाते, त्याप्रमाणे ती दिव्य वाणी त्यालाच आपली काया नाना प्रकारे दाखवीत असते.

दुसऱ्या एका सूक्तात वाणीची चार रूपे सांगितली आहेत. ती ऋचा (ऋ. १.१६४.४५) अशी –

चत्वारि वाक् परिमिता पदानि तानि विदुर्ब्राह्मणा ये मनीषिणः।
गुहा त्रीणि निहिता नेङ्गयन्ति तुरीयं वाचो मनुष्या वदन्ति ।।

भावार्थ – वाचेची चार रूपे सांगितली असून, ती विद्वान ब्राह्मणास माहीत असतात. त्यांतली तीन गुप्त असल्यामुळे ती कुणाच्या लक्षात येत नाहीत. तिचे जे चवथे रूप तेच तेवढे मनुष्ये बोलतात.

पुढे योगशास्त्रात वाचेची जी चार रूपे सांगितली आहेत, त्यांना वरील ऋचा हीच आधारभूत ठरली आहे. ही चार रूपे अशी – परा, पश्यन्ती, मध्यमा व वैखरी.

परा – हिचे स्थान नाभी आहे. शब्दसाधनेत विस्फोटाच्या पहिल्या अवस्थेला परा असे म्हटले आहे.

पश्यन्ती – ही केवळ स्पंदनमात्र असते. ही वाणी कोणताही विशेष अर्थ सुचवीत नाही. हिचे स्थान मूलाधारापासून मणिपूर चक्रापर्यंत असते. या स्थानातच तिचा मनाशी संयोग होतो.

मध्यमा – कंठ हे हिचे स्थान आहे. सृष्टीच्या प्रारंभी मध्यमा वाणीच प्रकट होते. त्या वेळी तिचा कोणताही बाह्य अर्थ असत नाही. कोणत्याही वस्तूची धारणा निर्माण करणारी ती मानसिक गती असते.

वैखरी – हिचे स्थान जिह्वा आहे. ही स्थूल आहे. याच वाणीने आपण शब्दोच्चार करतो व त्याचा अर्थ दुसऱ्याला प्रतीत होतो.

वरील चारही वाणींचा समन्वय असा – अव्यक्त स्थितीतून शब्दाचे जे उत्थान होते, ते नाभीपासूनच होते. हृदयात तो शब्द व्यक्तपणे विकास पावतो. कंठात तोच शब्द ध्वनिरूप होतो आणि पुढे जिह्वेच्या उपाधीने तो वर्णरूपाला प्राप्त होतो. जीवमात्राच्या शब्दोच्चाराची क्रिया याच अनुक्रमाने चालू असते.

शब्दसाधनेत वाणीचे रहस्य पुढीलप्रमाणे सांगितले आहे – वाक् ही सूक्ष्म किंवा लिंग शरीराशी संबद्ध असते. कोणत्याही अर्थाच्या ग्रहणक्रियेत मन दोन प्रकारांनी काम करते. त्याचा एक अंश सूक्ष्म शब्दाशी एकाकार होतो व दुसरा बाह्य वस्तूच्या रूपात आकाराचे ग्रहण करतो. यालाच सूक्ष्म अर्थ म्हणतात. हा सूक्ष्म शब्द आणि सूक्ष्म अर्थ मनाचीच दोन प्रतिरूपे असतात. सूक्ष्म शब्द व सूक्ष्म अर्थ ग्राहक व ग्राह्य अशा दोन रूपांत मनाचीच अभिव्यक्ती असते. सूक्ष्म शब्द ग्राहक व सूक्ष्म अर्थ ग्राह्य असतो. हे दोन्ही सूक्ष्म शरीराच्या अधीन असतात.

याव्यतिरिक्त दैवी व मानुषी या नावांनी वाणीचे दोन स्थूल प्रकार सांगितले आहेत. दैवी ही वैदिक ऋचांची वाणी असून, मानुषी ही सामान्यांची बोली होय. शतपथ ब्राह्मणात मानवांची, पशूंची, पक्ष्यांची व सरपटणाऱ्या प्राण्यांची असे वाणीचे चार प्रकार सांगितले आहेत.

ऋग्वेदाच्या १० व्या मंडलातील १२५ वे सूक्त हे वाक् आम्भृणीचे सूक्त आहे. हे सूक्त तेजस्वी विचारांनी ओतप्रोत आहे. प्रस्तुत सूक्तात वाक् या शक्तीचे वर्णन करताना सूक्तकर्त्री म्हणते – जी शक्ती सर्व विश्वात व प्राणिमात्रात वास करते, जिच्यापासून सर्व उत्पन्न होते, जिच्यापासून सर्वांना चैतन्य मिळते व जिच्यामुळे सृष्टीतील व्यवहार नियमितपणे चालतात, त्या शक्तीला वाक् हे नाव आहे. जे ज्ञान देव आणि मानव यांना अप्राप्य असते, ते वाक् शक्ती देऊ शकते. या ज्ञानामुळेच कोणत्याही व्यक्तीला श्रेष्ठत्व येते.

हाच आशय वाक्यपदीय या ग्रंथातून उद्धृत केलेल्या पुढील वचनात सांगितला आहे –

यां सूक्ष्मां नित्यामतीन्द्रियां वाचमृषयः
साक्षात्कृतधर्माणो मन्त्रदृशः पश्यन्ति ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – सूक्ष्म, नित्य, अतींद्रिय अशी वाणी मंत्रद्रष्टे अर्थात ज्यांना धर्माचा साक्षात्कार झालेला आहे, अशा ऋषींनाच अभिव्यक्त होते.

पतंजलीने आपल्या महाभाष्यात (१.१.२) म्हटले आहे, की अक्षरसमाम्नाय म्हणजेच वाक् होय. तोच ब्रह्मराशी आहे. त्याच्या ज्ञानाने सर्व वेदांच्या पुण्यफलांची प्राप्ती होते.

बृहदारण्यकात वाणीला धेनू म्हटले असून, तिच्यावर रूपक केले आहे, ते असे (बृहदा. ५.८) –

वाचं धेनुमुपासीत । तस्याश्चत्वारः स्तनाः स्वाहाकारो वषट्कारो हन्तकारः स्वधाकारः । तस्या द्वौ स्तनौ देवा उपजीवन्ति स्वाहाकारं च वषट्कारं च । हन्तकारं मनुष्याः । स्वधाकारं पितरः । तस्याः प्राण ऋषभो मनो वत्सः ।

अर्थ – वाणी ही धेनू आहे, असे समजून तिची उपासना करावी. स्वाहाकार, वषट्कार, हन्तकार व स्वधाकार हे तिचे चार स्तन होत. त्यांपैकी स्वाहाकार व वषट्कार हे दोन स्तन देवांना पोषण देतात; हन्तकार मनुष्यांना व स्वधाकार पितरांना जीवन देतात. प्राण हा या धेनूचा वृषभ (वळू) असून, मन हे तिचे वत्स आहे.

शतपथ, गोपथ, तांड्य ही ब्राह्मणे व मार्कंडेयपुराण यांमध्येही वाणीवर धेनूचे असेच रूपक केलेले आहे.

या वाक्च्या संबंधात वैदिक वाङ्मयामध्ये ज्या आख्यायिका आहेत, त्यांपैकी काही अशा –

(१) अक्षरशब्दयुक्त वाणी ही इंद्राने निर्मिली (तै. सं. ६.४.७.३)

(२) वाक्चे वरचे टोक ब्रह्मामध्ये आहे. तिच्यापासून समुद्र निर्माण होतात. अंतरिक्ष हे वाचेच्या द्वारेच श्वासोच्छ्वास करते. अक्षय असे अक्षर वाचेतूनच स्रवते आणि जगाला चैतन्य देते (ऋ. १.१६४.४२).

(३) वाक् ही सर्व प्रथम अस्तित्वात आली. तिने यज्ञ केला व श्रेष्ठत्व मिळवले. (जै. ब्रा. २. ३९६)

(४) वाक् ही प्रजापतीची पत्नी आहे. सोमाला जन्म देऊन ती प्रजापतीमध्ये विलीन झाली (काठक ब्रा. १२. ५.१४).

(५) सोम हा गंधर्वांनी आपल्या जवळच ठेवून घेतला. त्यामुळे तो देवांना अप्राप्य झाला. त्या वेळी वाक् देवांना म्हणाली, 'तुम्ही मला द्या व माझ्या बदल्यात सोम मिळवा.' पण देव तसे करायला तयार होईनात. कारण वाचेशिवाय राहणे त्यांना शक्य नव्हते (ऐ. ब्रा. १५.२५).

(६) देव आणि असुर हे प्रजापतीचे पुत्र होत. देवांनी प्रजापतीकडून मन घेतले व असुरांनी वाक् घेतली; पण देवांना, आपली चूक झाली, हे मागाहून लक्षात आले. वाणीवाचून देवांचे व्यवहार चालेनात. मग देवांनी असुरांकडून वाक्ला आणण्यासाठी यज्ञाला तिकडे पाठविले. यज्ञाने ती गोष्ट केली. मग देवांनी तिला यज्ञीय अग्नीत लपवून ठेवले. त्यामुळे असुरांचा पराभव झाला (श. ब्रा. ३.१.५.१८–२५).

(७) वाक् देवांना सोडून पळून गेली व पाण्यात लपून बसली. देवांनी जेव्हा तिला 'यापुढे माणसे तुला भ्रष्ट करणार नाहीत, म्हणजेच माणसे भ्रष्ट भाषा बोलणार नाहीत' असे अभिवचन दिले, तेव्हा ती देवांकडे गेली (तै. ब्रा. ६.५.१९).

वैदिक वाङ्मयात वाक् हा शब्द भाषा या अर्थानेच येतो. वर दिलेल्या एका ऋचेत 'वाचो मनुष्या वदन्ति' असे म्हटले आहे. यावरून ही गोष्ट कळून येते. यास्काच्या वेळी वैदिक भाषेला अन्वध्यायम् म्हणत व ऋषी जिचा उपयोग करीत तिला भाषा म्हणत. हा फरक वेदकाली दिसत नाही. पाणिनीने व्यावहारिक बोलीला भाषा म्हटले असून, वैदिक भाषेला छंद म्हटले आहे.

आगमग्रंथात वाक् ही शक्ती असल्याचे म्हटले आहे. हीच परा वाणी होय. ती पुढे पश्यन्ती, मध्यमा व वैखरी अशी त्रिधा विभक्त होते. परेच्या या तीन भेदांना अनुक्रमे इच्छा, ज्ञान व क्रिया म्हणतात.

आत्मा म्हणजेच ओंकार होय. याची शक्ती वाक्; ही अव्यक्त रूपात असते. अशा वेळी तिचे सारे प्रकार प्रणवात समाविष्ट होतात. पाहा – शब्द. [वै. द.; योगविद्या; डॉ. पी.एस्. शास्त्री – ओरिएंटल थॉट, एप्रिल–जुलै १९५६; भा. भा. सा.; श्री. विद्याविलास मिश्र – गो. क. अ. ग्रं.; वे. इं.; डे. हिं. इ.; वै. नि.; क्ला. डि. हिं. मा.; श्री. शं. बा. जोशी – नवभारत, जून १९५८]

वाकाटक राजवंश

(इ. स. २५०–५५०) महाराष्ट्रातील एक प्राचीन राजवंश. या वंशाचा संस्थापक विंध्यशक्ती याचा निर्देश पुराणात किलकिला वंशाबरोबर केलेला आढळतो. या किलकिला वंशाला पुराणात यवन किंवा वृश म्हटले आहे. त्यावरून विंध्यशक्तीदेखील यवन होता, अशी समजूत प्रचलित होती. पण आता काही ताम्रपट व शिलालेख सापडले आहेत, त्यांवरून विंध्यशक्ती हा ब्राह्मण होता, असे सिद्ध झाले आहे. अजंटा येथील १६ क्रमांकाच्या लेण्यातील कोरीव लेखात वाकाटकांची वंशावळ दिलेली असून, तिथे विंध्यशक्तीला द्विज म्हटले आहे. वाकाटकांच्या बहुतेक ताम्रपटांत त्यांचे विष्णुवृद्ध हे गोत्रनामही दिलेले आढळते.

इ. स. १९१२ मध्ये पुण्यातील एका तांबटाच्या घरी एक ताम्रपट सापडला. त्यात वाकाटक नृपती रुद्रसेन (दुसरा) याची पट्टराणी प्रभावतीगुप्ता ही चंद्रगुप्त (दुसरा) याची कन्या होती, असे स्पष्ट म्हटलेले असल्यामुळे, गुप्त व वाकाटक राजवंशांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

संबंध समजला आणि वाकाटकांचा काळही निश्चित झाला.

मूलस्थान – वाकाटक घराणे मूळचे उ. भारतातले होते, असे काही पंडितांचे मत आहे. झाशी जिल्ह्यात बागाट नावाचे एक गाव आहे. त्याचे मूळ नाव वाकाट असे असावे आणि तेच वाकाटकांचे मूलस्थान असावे, असे अनुमान डॉ. काशीप्रसाद जायस्वाल यांनी केले आहे. पण ते सिद्ध करण्याजोगा कोणताही पुरावा अजून उपलब्ध झालेला नाही. वाकाटकांचा एकही शिलालेख विंध्य पर्वताच्या उत्तरेला सापडलेला नाही आणि त्यांचे बहुतेक सर्व ताम्रपट विदर्भात सापडले आहेत. डॉ. वा. वि. मिराशी यांच्या मते वाकाटक घराणे मूळचे द. भारतातले होते. वाकाटक हे नाव ज्यात आहे, असा सर्वांत प्राचीन शिलालेख आंध्र प्रदेशातील अमरावती गावातल्या एका स्तंभावर कोरलेला आहे. या लेखातील वाकाटक हे वंशनाम नसून व्यक्तिनाम आहे. त्यावरून आणि आणखी काही प्रमाणे देऊन, हे घराणे दाक्षिणात्य होते, असे डॉ. मिराशी यांनी प्रतिपादले आहे. तथापि त्यांचे मूलस्थान कोणते हा प्रश्न अद्यापि अनिर्णितच राहिला आहे. पण डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या मते त्याला फारसे महत्त्व नाही. वाकाटक राजांची कर्मभूमी कोणती होती, ते कोणत्या प्रदेशांना साम्राज्याचे भाग मानीत, या गोष्टींना महत्त्व आहे. ते खरे निकष होत. शिलालेख व ताम्रपट यांच्या आधारे हे निश्चित सिद्ध झाले आहे, की वाकाटकांच्या राज्याची स्थापना प्रथम विदर्भात झाली. रामटेकजवळील नंदिवर्धन ही त्यांची पहिली राजधानी असून, वत्सगुल्म (वाशिम) व प्रवरपूर (पवनार) या नंतरच्या राजधान्या होत्या. वाकाटकांचे मूळ राज्य नागपूर, विदर्भ, कुंतल, अश्मक व मूलक या महाराष्ट्रातील प्रदेशांवर होते आणि त्यांचे साम्राज्य माळवा, कोसल, लाट, कलिंग व आंध्र या प्रदेशांवर होते. त्यांचे बहुतेक सारे कोरीव लेख, त्यांनी बांधलेली मंदिरे व त्यांच्या राजवटीतली लेणी महाराष्ट्रातच आहेत. त्यांनी महाराष्ट्री प्राकृत भाषेला आश्रय देऊन, त्या भाषेत स्वतः काव्यरचनाही केली. एवंच त्यांचे सर्व कर्तृत्व महाराष्ट्रात झाले व महाराष्ट्र हीच त्यांची कर्मभूमी होती. यावरून हे घराणे महाराष्ट्रीय होते, याविषयी संदेह उरत नाही.

विंध्यशक्ती (१ ला) (इ. स. २५०–२७०) – वाकाटक वंशातला हा पहिला राजा सातवाहनांचा मोठा अधिकारी असावा आणि सातवाहनांची सत्ता दुर्बल झाल्यानंतर त्याने विदर्भात स्वतंत्र राज्य स्थापले असावे, असे म. म. मिराशींचे अनुमान आहे. पुराणांतील वर्णनावरून तो विदिशेचा असावा, असेही अनुमान केले जाते, पण मिराशींच्या मते ते बरोबर नाही. अजंटा येथील लेखात विंध्यशक्तीच्या पराक्रमाचे खूप वर्णन केलेले असून, त्याला वाकाटकवंशकेतू म्हटले आहे. काही विद्वानांच्या मते त्याचे खरे नाव वेगळेच असून, विंध्यपर्वतापर्यंत आपली सत्ता स्थापल्यानंतर, तिचे द्योतक म्हणून त्याने विंध्यशक्ती हे बिरुद धारण केले होते; पण पुराणांतील वर्णनावरून हा विस्तार त्याच्या पुत्राच्या वेळी झाला, असे दिसते. वाकाटकांच्या दानपत्रांत विंध्यशक्तीचे नाव नाही. त्यांतील वंशावळ प्रथम प्रवरसेनापासून सुरू होते, कारण तोच साम्राज्यसंस्थापक होता.

प्रवरसेन (१ ला) (इ. स. २७०–३३०) – विंध्यशक्तीच्या नंतर त्याचा पुत्र प्रवरसेन गादीवर बसला. पुराणांत त्याला प्रवीर म्हटले आहे. हा या वंशातील सर्वश्रेष्ठ नृपती होता. त्याने नर्मदेपर्यंत स्वारी करून पुरिका ही नगरी जिंकली. ती नगरी ऋक्षवत् किंवा सातपुडा पर्वताच्या पायथ्याशी होती, असे हरिवंशात म्हटले आहे. पूर्वेकडील दक्षिण कोसल, कलिंग व आंध्र आणि दक्षिणेकडील उत्तर कुंतल या प्रदेशांतील लहान लहान राजांनी प्रवरसेनाचे वर्चस्व मान्य केले असावे. मात्र त्याच्या साम्राज्याच्या मर्यादा निश्चित सांगणे कठीण आहे. पुरिका ही त्याची राजधानी होती.

प्रवरसेन हा वैदिक धर्माचा पुरस्कर्ता होता. पुराणांत त्याने केलेल्या वाजपेय यज्ञाचा निर्देश आहे. त्याच्या वंशजांच्या बहुतेक सर्व ताम्रपटांत त्याने केलेल्या चार अश्वमेधांचा व सात सोमयागांचा उल्लेख आढळतो. त्याने धर्ममहाराज व सम्राट या पदव्या धारण केल्या होत्या आणि तो स्वतःला हारीतीपुत्र म्हणवून घेई.

आपल्या सत्तेला बळकटी आणण्यासाठी प्रवरसेनाने नागवंशी भारशिवांशी वैवाहिक संबंध जोडला. भारशिव नृपती भवनाग याने आपली कन्या प्रवरसेनाचा ज्येष्ठ पुत्र गौतमीपुत्र याला दिली.

प्रवरसेनाला चार पुत्र होते व ते सर्व राजे झाले, असे पुराणांत म्हटले आहे. वाशीम येथील ताम्रपटात सर्वसेन याचा उल्लेख आहे. गौतमीपुत्र अगोदरच निधन पावला होता. त्याचा पुत्र रुद्रसेन हा प्रवरसेनानंतर गादीवर बसला. तो कदाचित पुरिका येथून राज्य करीत असेल किंवा त्याने आपली राजधानी नागपूरजवळ नंदिवर्धन (नगरधन) येथे नेली असेल. त्याची सत्ता उत्तर विदर्भावर होती. दुसरा पुत्र सर्वसेन याचे राज्य दक्षिण विदर्भावर असून, अकोला जिल्ह्यातील वत्सगुल्म (वाशिम) ही त्याची राजधानी होती. इतर दोन पुत्रांची काही माहिती उपलब्ध नाही.

रुद्रसेन (१ ला) (इ. स. ३३०–३५०) – हा गुप्तसम्राट समुद्रगुप्ताचा समकालीन होता. समुद्रगुप्ताने अनेक राज्ये पादाक्रांत करून गुप्तसाम्राज्य प्रस्थापित केले असले, तरी वाकाटक राजांनी त्याचे वर्चस्व मान्य केल्याचे दिसत नाही. मात्र रुद्रसेनाची सत्ता नर्मदा नदी व इंध्यपर्वतराजी यांमधील प्रदेशावरच राहिली. तो महाभैरवाचा भक्त होता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पृथिवीषेण (१ ला) (इ. स. ३५०–४००)– रुद्रसेनानंतर त्याचा पुत्र पृथिवीषेण गादीवर आला. त्याच्या वंशजांच्या लेखांत त्याचे वर्णन केलेले आहे, त्यावरून तो शिवोपासक असून, अत्यंत शूर, सत्यप्रिय, बुद्धिमान, सदाचरणी व प्रजाहितदक्ष होता, असे समजते. त्याची तुलना अजातशत्रू धर्मराजाशी केली आहे व त्याला धर्मविजयी म्हटले आहे. इ. स. ३९५ च्या सुमारास गुप्त-सम्राट चंद्रगुप्त (२ रा) याने आपली कन्या प्रभावती गुप्ता पृथिवीषेणाचा पुत्र रुद्रसेन (२रा) याला दिली. त्याच वेळी चंद्र-गुप्ताने माळवा व सौराष्ट्र या प्रदेशांवर राज्य करणाऱ्या शक-क्षत्रपांशी युद्ध सुरू केले होते. त्या युद्धात त्याला वाकाटकांचे साहाय्य झाले असावे. मात्र त्यानंतर वाकाटकांवर गुप्तांचे वर्चस्व सुरू झाले, असे दिसते.

रुद्रसेन (२रा) (इ. स. ४००–४०५)– पृथिवीषेणानंतर त्याचा हा पुत्र राजा झाला. त्याची पट्टराणी प्रभावती गुप्ता ही पित्याप्रमाणेच विष्णूची उपासक होती. तिच्या प्रभावामुळे रुद्र-सेनही विष्णुभक्त झाला; पण तो लवकरच मरण पावला.

रुद्रसेनाला दिवाकरसेन व दामोदरसेन हे दोन पुत्र होते. ते दोघेही अल्पवयी असल्यामुळे दिवाकरसेनाच्या नावाने प्रभावती गुप्ता राज्यकारभार पाहू लागली. तिला मार्गदर्शन करण्यासाठी चंद्रगुप्ताने आपल्या पदरचे विश्वासू अधिकारी पाठवले होते, असे दिसते. कविकुलगुरू कालिदास हा त्यांतलाच एक अधिकारी असावा. तिथे असतानाच त्याने मेघदूत हे काव्य रचले असावे.

दिवाकरसेन (४०५–४२०) – प्रभावतीगुप्ताने सुमारे तेरा वर्षे याच्या नावाने राज्य केले; त्यानंतर लवकरच हा मरण पावला आणि त्याचा धाकटा भाऊ दामोदरसेन हा गादीवर बसला.

दामोदरसेन (इ. स. ४२०–४५०) – राज्यारोहणप्रसंगी याने प्रवरसेन (२रा) हे नाव धारण केले. तो सुमारे ११ वर्षे नंदिवर्धन येथूनच राज्य करीत असावा. त्यानंतर त्याने प्रवरपूर नामक नवीन नगर स्थापून तिथे आपली राजधानी केली. हे प्रवरपूर म्हणजे वर्धा जिल्ह्यातील पवनार असावे, असे अनुमान तेथील अवशेषांवरून करता येते.

प्रवरसेन शिवोपासक होता. भगवान शंकराच्या कृपाप्रसादाने आपल्याला कृतयुग स्थापन करता आले, असे त्याने एका ताम्र-पटात म्हटले आहे. हा अत्यंत दानशूर होता. हा शिवभक्त असला तरी मातेच्या आज्ञेवरून त्याने रामचरित्रावर सेतुबंध नामक काव्य महाराष्ट्री प्राकृतात रचले आणि उत्तुंग राममंदिरही बांधले. त्याचे राज्य उ. विदर्भ आणि छिंदवाडा, सिवनी, बालाघाट व बैतूल हे मध्य प्रदेशातील जिल्हे एवढ्या प्रदेशावर असावे.

नरेंद्रसेन (इ. स. ४५०–४७०) – प्रवरसेनानंतर त्याचा पुत्र नरेंद्रसेन गादीवर आला. त्याचा विवाह अज्झितभट्टारिका नामक कुंतल राजकन्येशी झाला होता. ती बहुधा मानपूरच्या तत्कालीन राष्ट्रकूट नृपतीची कन्या असावी. नरेंद्रसेनाने आपल्या शौर्याने आपल्या शत्रूंचा पराभव केला आणि मालव, कोसल व मेकल या देशांच्या राजांवर वर्चस्व प्रस्थापित केले, असे वर्णन एका ताम्रपटात केलेले आहे; पण त्याच्या राजवटीतच कोसलाधिपती नलवंशी भवदत्तवर्मा याने वाकाटकांच्या राज्यावर स्वारी करून त्यांची पूर्वीची राजधानी नंदिवर्धन जिंकली होती.

पृथिवीषेण (२ रा) (इ. स. ४७०–४९०)–याच्या बालाघाट येथील ताम्रपटात 'निमग्न वंशाचा उद्धर्ता' असे याचे वर्णन केले आहे. त्या काळात वाकाटकांची सत्ता दुर्बल झाली होती; ती याने सावरली असे दिसते. त्याने आपली राजधानी भंडारा जिल्ह्यातील पद्मपूर येथे नेली होती. त्याने नल राजाला विदर्भा-तून हाकलून लावले. एवढेच नव्हे; तर त्याच्या राज्यावर स्वारी करून त्याची राजधानी पुष्करी ही उद्ध्वस्त केली, असेही वर्णन आढळते. त्याने मेकलाच्या उत्तरेला चेदी देशापर्यंत आपले साम्राज्य वाढवले. बालाघाट ताम्रपटात या पृथिवीषेणाला परमभागवत म्हटले आहे. याचा अंत इ. स. ४९० च्या सुमारास झाला असावा. त्यानंतर या शाखेचा इतिहास ज्ञात नाही. या शाखेचे राज्य वत्सगुल्मशाखेच्या साम्राज्यात विलीन झाले असावे.

वत्सगुल्म शाखेचा इतिहास–

सर्वसेन (इ. स. ३३० – ३५५) – प्रवरसेन (१ ला) याचा पुत्र. याचे नाव वाशीम-ताम्रपटात व अजंटा येथील लेखातही आहे. याचे राज्य उत्तरेला इंध्याद्रीपासून दक्षिणेला गोदावरी-पर्यंत पसरले होते. याची राजधानी वत्सगुल्म येथे होती. हे पवित्र क्षेत्र म्हणून प्रख्यात होते. त्या ठिकाणी वत्स नामक ऋषीने देवांच्या गुल्मांची म्हणजे समूहांची स्थापना केली होती, म्हणून त्याला वत्सगुल्म हे नाव मिळाले. सर्वसेनाने पित्याप्रमाणेच धर्म-महाराज ही पदवी धारण केली. त्याने हरिविजय नामक काव्य महाराष्ट्री प्राकृतात रचले होते. त्याच्या काही सुंदर प्राकृत गाथा गाथासप्तशतीत आढळतात.

विंध्यसेन (इ. स. ३५५ – ४००)– सर्वसेनानंतर त्याचा पुत्र विंध्यसेन गादीवर आला. त्याचे द्वितीय विंध्यशक्ती असे नाव वाशीमच्या ताम्रपटात आहे. त्यानेही धर्मराज ही पदवी धारण केली होती. त्याने कुंतलाधिपतीचा पराभव केला, असे अजंटा येथील लेखात म्हटले आहे. हा कुंतलाधिपती म्हणजे मानपूरच्या राष्ट्रकूट घराण्याचा मूळ पुरुष मानांक असावा.

प्रवरसेन (दुसरा) (इ. स. ४००–४१५) – विंध्यसेनानंतर त्याचा पुत्र प्रवरसेन गादीवर बसला. त्याने उत्तम राज्यकारभार केला, एवढेच अजंटा येथील लेखावरून कळते.

तो निधन पावला तेव्हा त्याचा मुलगा केवळ आठ वर्षांचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

होता. त्याचे नाव लेखात नाही. मात्र त्याने उत्तम रीतीने राज्य केले, असे त्यात म्हटले आहे. त्याने इ. स. ४१५ ते ४५० पर्यंत राज्य केले असावे. त्यानंतर त्याचा पुत्र देवसेन गादीवर बसला.

देवसेन (इ. स. ४५०–४७५) – याचा सचिव हस्तिभोज हा अत्यंत दक्ष व गुणी होता. देवसेनाने त्याच्यावर सर्व राज्यकारभार सोपवून स्वतः ऐष-आरामात काळ घालवला. हस्तिभोजाने प्रजेचे चांगले पालन केले, असे अजंटाच्या लेखात म्हटलेले आहे. घटोत्कच लेण्यातील लेखातही त्याची प्रशंसा केलेली आहे. हे दोन्ही लेख त्याचा पुत्र वराहदेव याने कोरविले आहेत.

हरिषेण (इ. स. ४७५–५००) – देवसेनानंतर त्याचा पुत्र हरिषेण गादीवर आला. हा शूर व महत्त्वाकांक्षी असून, त्याला सर्वत्र विजय मिळाला. त्याच्या विजयाचे वर्णन अजंटाच्या लेखात केलेले आहे. त्यावरून असे वाटते, की त्याची सत्ता माळवा, कोसल (छत्तीसगड), कलिंग, लाट, त्रिकूट (नासिक जिल्हा) व कुंतल या प्रदेशांवरही चालत होती. मात्र तिथे त्याची प्रत्यक्ष सत्ता नसून, तियले राजे त्याचे मांडलिक असावे. त्याने माळवा जिंकला होता, त्याचप्रमाणे वाकाटकांच्या ज्येष्ठ शाखेकडील उत्तर विदर्भही आपल्या राज्यात सामील करून घेतला होता.

हस्तिभोजाचा पुत्र वराहदेव हा हरिषेणाचा सचिव होता. तो अत्यंत धार्मिक, उदार व दक्ष होता. तो बौद्ध पंथाचा अनुयायी होता. त्याने अजंटा येथील १६ क्रमांकाचे लेणे खोदवून, त्यात एक शिलालेख कोरविला. त्या लेखावरूनच वत्सगुल्म शाखेची बरीच माहिती मिळाली आहे. त्यानेच अजंटाच्या पश्चिमेला १० मैलांवर असलेले घटोत्कच लेणे खोदवून, त्यात आपल्या वंशाचा

अजंटा येथील लेणे क्र. १९ चा अंतर्भाग

वृत्तांत देणारा लेख कोरविला होता. तो सध्या जीर्ण अवस्थेत असला, तरी ऐतिहासिक दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

हरिषेण हा वत्सगुल्म शाखेचा शेवटचा ज्ञात राजा होय. त्याच्या नंतर एक दोन राजे होऊन गेले असावे; पण त्यांची नावे माहीत नाहीत. इ. स. ५५० च्या सुमारास माहिष्मतीच्या कलचुरी राजाने विदर्भात राज्य स्थापले, असे दिसते. त्यावरून हरिषेणानंतर लवकरच वाकाटकांचे राज्य नाश पावले असावे.

वाकाटकांच्या काळी विदर्भाची अत्यंत भरभराट झाली. त्यांचे साम्राज्य उत्तरेत माळव्यापासून दक्षिणेत तुंगभद्रेच्या खोऱ्यापर्यंत आणि पश्चिम समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत पसरले होते. त्यांचे राज्यशासन कार्यक्षम असून, त्यांच्या राज्यात शांतता, सुव्यवस्था व समृद्धी नांदत होती. त्यांनी राज्यकारभार न्यायाने चालवला आणि आपल्या गुणांनी, पुण्योपार्जनाने व पराक्रमाने विदर्भाचे नाव उज्ज्वल केले. त्या काळात विदर्भात संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कलाकौशल्य व व्यापार यांना उत्तेजन मिळून विदर्भाची कीर्ती दिगंत पसरली. म्हणून त्या काळाला विदर्भाच्या प्राचीन इतिहासातील सुवर्णयुग म्हणता येईल. वाकाटक राजांनी धर्म, विद्या व कला यांना उदार आश्रय दिल्यामुळे त्यांचा अभूतपूर्व विकास झाला. त्यांनी अनेक यज्ञ केले आणि पौराणिक धर्माचाही पुरस्कार केला. त्यांनी अनेक मंदिरे बांधली. त्यांतील काहींचे अवशेष अजून पाहायला मिळतात. अजंटा येथील सोळा क्रमांकाचे लेणे व गुलवाडा येथील घटोत्कच लेणे ही हरिषेणाचा सचिव वराहदेव याने निर्माण केली. त्यांतील शिल्पकाम व चित्रे यांमुळे ही लेणी अत्युत्कृष्ट मानली जातात. अजंटा येथील १७ व १९ क्रमांकांची लेणीही वाकाटककाळात हरिषेणाच्या एका मांडलिकाने खोदवली. तेथील १७ क्रमांकाचे लेणे विहारपद्धतीचे व १९ क्रमांकाचे चैत्यपद्धतीचे आहे.

वाकाटक राजे दानशूर होते. त्यांची बरीच दानपत्रे उपलब्ध झाली आहेत. त्यांच्या राज्यात बौद्ध पंथाचाही विकास झाला. त्यांचे मंत्री व मांडलिक यांनी त्या पंथाचा पुरस्कार केला.

संस्कृत व प्राकृत वाङ्मयाला त्या काळी बहर आला होता. त्या काळातील उत्कृष्ट काव्यरचनेमुळे साहित्यशास्त्रात वैदर्भी नामक रीतीला किंवा काव्यरचनाशैलीला प्राधान्य मिळाले आणि कालिदासालाही त्या शैलीत काव्य रचण्याची प्रेरणा झाली. त्याचे मेघदूत हे काव्य वैदर्भी रीतीचे उत्तम उदाहरण आहे. स्वतः वाकाटक नृपतींनी प्राकृत भाषेत उत्कृष्ट काव्यरचना केली होती. द्वितीय प्रवरसेनाचे सेतुबंध किंवा रावणवध हे महाराष्ट्री प्राकृतात रचलेले काव्य उपलब्ध आहे. बाण, दंडी व आनंदवर्धन यांनी त्याची मुक्तकंठाने स्तुती केली आहे. याव्यतिरिक्त त्याने प्राकृतात गाथाही रचल्या होत्या. त्यांतील काही गाथा सप्तशतीत आढळतात. सर्वसेनाने हरिविजय नामक काव्य महाराष्ट्री प्राकृतात रचले होते. ते आता उपलब्ध नाही, पण त्यातील ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उतारे ध्वन्यालोक, काव्यानुशासन, इ. अलंकारग्रंथांत घेतलेले आहेत. त्या काव्याची स्तुतीही अनेक आलंकारिकांनी केली आहे. सर्वसेनाने काही प्राकृत सुभाषितेही रचली होती. त्यांतील काही गाथासप्तशतीत घेतली गेली आहेत. प्रभावतीगुप्ताचा पुत्र दिवाकरसेन याने अनेक संस्कृत सुभाषिते रचली होती. त्यांतील काही सदुक्तिकर्णामृत नामक सुभाषितसंग्रहात आढळतात.

वाकाटकांचे बहुतेक सर्व लेख संस्कृत भाषेत लिहिलेले आहेत. वाशीमच्या दानपत्रातील राजवंशवर्णनाचा भाग संस्कृतात असून, नंतरचा दानविषयक भाग प्राकृतात आहे. वाकाटकांची सर्व दानपत्रे गद्यात असून, त्यांत काव्यमय वर्णनांचा अभाव आहे. त्या काळी संस्कृत भाषा हळूहळू प्राकृताची जागा घेऊ लागली होती, असे दिसते. [वा. नृ. का.; हि. क. इं. पी. २ व ३; सं. मु. ३]

वाक्पतिराज (इ. स. चे ८ वे शतक) प्राकृत नाव बप्पइ. गौडवहो या प्राकृत ऐतिहासिक काव्याचा कर्ता. याच्या पित्याचे नाव हर्षदेव व गुरूचे नाव कमलायुध असे होते. कनोजाधिपती यशोवर्मा याच्या दरबारी हा कवी होता. भवभूती हा याचा समकालीन होता. त्याच्याविषयी वाक्पतिराजाला नितांत आदर वाटे. तो आपली काव्यरचना भवभूतीला वाचून दाखवून त्याच्या सल्ल्यानुसार तिच्यात सुधारणा करीत असे.

त्याच्या गौडवहो (गौडवध) या काव्यात एकूण १२०९ गाथा आहेत. यशोवर्मा राजाच्या गुणांचे, पराक्रमांचे व त्याच्या प्रणयक्रीडांचे वर्णन या काव्यात आहे. एकंदरीत त्यात ऐतिहासिक भाग कमीच आहे. वास्तविक या काव्यात गौडवध झालेलाच नाही. जे लिहिले आहे, ते केवळ प्रास्ताविक आहे. प्रस्तुत काव्य महाराष्ट्री प्राकृतात व गौडी रीतीत लिहिलेले आहे. मात्र ते विशेषसे सरस नाही. त्यातली ग्रामीण जीवनाची वर्णने मात्र चांगली आहेत.

याव्यतिरिक्त याने मधुमहविजय नामक ७९ गाथांचे काव्य लिहिले होते, असे कळते; पण ते काव्य सांप्रत उपलब्ध नाही. मात्र त्यातील काही गाथा भोज व अभिनवगुप्त यांनी उद्धृत केल्या आहेत. त्यावरून त्या काव्यात कृष्णचरित्र वर्णिले असावे, असे वाटते. वाक्पतिराजाने काही मुक्तक स्वरूपाच्या गाथाही रचलेल्या दिसतात. [सं. सा. सो. इ. ; सं. मु. ३]

वाक्पारुष्य एखाद्याचा देश, जात, कुटुंब इत्यादीविषयी मोठ्याने निंदाव्यंजक शब्द उच्चारून त्याला त्रास देणे, याला वाक्पारुष्य म्हणतात. कात्यायनाने वाक्पारुष्याची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे –

हुङ्कार: कासनं चैव लोके यच्च विगर्हितम् ।
अनुकुर्यादनुब्रूयाद् वाक्पारुष्यं तदुच्यते ॥

अर्थ – दुसऱ्यासमोर 'हुं' असे तुच्छतादर्शक बोलणे, त्याच्या पुढे खोकणे किंवा जे गर्ह्य मानलेले आहे, त्याचा उच्चार किंवा अनुकरण करणे, हे वाक्पारुष्य होय.

निष्ठुर, अश्लील व तीव्र असे वाक्पारुष्याचे तीन प्रकार आहेत. एखाद्याला मूर्ख किंवा हलकट म्हणणे हे निष्ठुर वाक्पारुष्य, त्याला उद्देशून अश्लील बोलणे, हे अश्लील वाक्पारुष्य आणि त्याला ब्रह्मघातकी, मद्यपी, इ. म्हणणे हे तीव्र वाक्पारुष्य होय. यांना चढत्या क्रमाने शिक्षाही सांगितलेल्या आहेत. नारदाने विद्या, शिल्प, इ. विषयींच्या निंदायुक्त आक्षेपांचीही गणना वाक्पारुष्यातच केली आहे. तो निष्ठुर वाक्पारुष्यालाच साक्षेप वाक्पारुष्य असे म्हणतो.

बृहस्पतीने याचे अधम, मध्यम व उत्तम असे प्रकार सांगितले आहेत. एखाद्याचा देश, जात, कुटुंब यांविषयी अपशब्द बोलणे हे अधम वाक्पारुष्य, एखाद्याला उपपातके चिकटविणे हे मध्यम वाक्पारुष्य आणि एखाद्याने निषिद्ध खाद्यपेय घेतले म्हणून बोलणे किंवा त्याच्यावर गंभीर गुन्हा लादणे हे उत्तम वाक्पारुष्य होय. [हि. ध.; या. स्मृ.]

वागीश्वर एक बोधिसत्त्व. हा मंजुश्रीचा एक प्रकार आहे. याची उत्पत्ती पाच ध्यानी बुद्धांपासून झाली आहे. हा रक्तवर्ण व द्विभुज आहे. याच्या डाव्या हातात कमळ असून, उजवा हात मोकळाच आहे. हा सिंहासनावर अर्धपर्यंकासन घालून बसलेला आहे. याच्या मस्तकावर पाच ध्यानी बुद्धांच्या प्रतिमा विराजत आहेत. हा सर्व अलंकारांनी विभूषित आहे. 'ॐ वागीश्वर मूः' हा त्याचा मंत्र आहे.

वागीश्वराची कांस्यमूर्ती–नेपाळ.

नेपाळी बौद्ध लोक याला आपला संरक्षक देव मानतात. त्या देशात हा अत्यंत लोकप्रिय असून, तियले बहुतेक लोक याची भक्तिभावाने पूजा करतात. तिथल्या मंदिरात याचा मंत्र नेवारी अक्षरांत धारण करणारी असंख्य प्रार्थना-चक्रे आढळतात. याचा आणखी एक प्रकार असून, त्याचा वर्ण पिवळा आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला महाराजलीला मंजुश्री म्हणतात. याची नेपाळमधली एक कांस्यमूर्ती उपलब्ध झाली आहे. त्या मूर्तीत याचे रूप जरा वेगळे आहे. याच्या अनेक मूर्ती तिबेटात आढळतात. [इं. बु. इ.]

वाग्भट (१) एक आयुर्वेदाचार्य. याच्या कालाविषयी निश्चित माहिती उपलब्ध नाही. अष्टांगसंग्रह नावाचा आयुर्वेदावरचा एक ग्रंथ याने लिहिला आहे. वाग्भट नावाचे दोन आयुर्वेदाचार्य एकाच वंशात होऊन गेले आहेत. त्यांपैकी अष्टांगसंग्रहाच्या कर्त्याला म्हणजेच प्रस्तुत वाग्भटाला वृद्ध वाग्भट असे म्हणतात. याने अष्टांगसंग्रहाच्या उत्तरतंत्रात अ.पल्याविषयी माहिती सांगणारा पुढील श्लोक लिहिला आहे –

भिषग्वरो वाग्भट इत्यभून्मे पितामहो नामधरोऽस्मि यस्य ।
सुतोऽभवत्तस्य च सिंहगुप्तस्तस्याप्यहं सिन्धुषु जातजन्मा ॥

अर्थ – माझ्या आजोबांचे नाव वाग्भट असे असून, तेच नाव मलाही ठेवले गेले. त्याचा पुत्र सिंहगुप्त हा माझा पिता असून, माझा जन्म सिंधू देशात झाला आहे.

चिनी प्रवासी इत्सिंग याने अष्टांगसंग्रहकर्ता आयुर्वेदाचार्य वाग्भट याचा उल्लेख केला आहे. त्यावरून वृद्ध वाग्भट इ. स. च्या ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेला असावा, असे अनुमान होर्न्ले याने केले आहे. [स्ट. इं. लि. हि. १]

(२) हा सुप्रसिद्ध रसवैद्य होता. त्याने वैद्यकावर अनेक ग्रंथ लिहिले असून, अष्टांगहृदय हा त्याचा सर्वप्रसिद्ध ग्रंथ होय.

याला कोणी साक्षात धन्वंतरीच समजतात. आत्रेय संहितेत याला कलियुगातला महान आचार्य असे म्हटले आहे. अन्य काही विद्वान याला गौतम बुद्धाचा अवतार समजतात.

माधव, वाग्भट, सुश्रुत व चरक असे चार महान आयुर्वेदाचार्य होऊन गेले. ते आयुर्वेदाच्या कोणकोणत्या विषयात प्रसिद्ध होते, त्याविषयीचा एक श्लोक असा –

निदाने माधवः श्रेष्ठः सूत्रस्थाने तु वाग्भटः ।
शारीरे सुश्रुतः प्रोक्तः चरकस्तु चिकित्सिते ॥

अर्थ – रोगनिदानात माधव श्रेष्ठ, सूत्रस्थानात वाग्भट श्रेष्ठ, शारीरविज्ञानात सुश्रुत श्रेष्ठ व रोगचिकित्सेत चरक श्रेष्ठ होय.

याच्याही कालाबद्दल काही निश्चित माहिती मिळत नाही. होर्न्लेच्या मते हा इ. स. च्या ८ व्या किंवा ९ व्या शतकात होऊन गेला असावा. हा रसायन, रसकुपी व कायाकल्प या गोष्टींसाठी भारतातच नव्हे; तर जावा, कंबोडिया व इजिप्त या देशांतही प्रसिद्ध होता.

याचा अष्टांगहृदय नावाचा ग्रंथ आयुर्वेदाच्या अभ्यासाचा ग्रंथ मानला गेला आहे. या ग्रंथात सर्व वैद्यकशाखांचे श्लोकबद्ध विवेचन असून, शस्त्रक्रियेचेही विस्तृत विवेचन आहे.

हा इजिप्तच्या राजाला औषधोपचार करण्यासाठी तिकडे गेला होता व त्या देशातच त्याचा अंत झाला, असे मानतात. वाग्भटाच्या या इजिप्तच्या यात्रेच्या संबंधात एक रोमहर्षक आख्यायिका सांगितली जाते, ती अशी –

त्या काळी मिसर (इजिप्त) देशाचा राजा उदर रोगाने आजारी पडला. त्याने देशी-विदेशी पुष्कळ वैद्यांचे उपचार केले; पण त्याला काडीमात्र गुण आला नाही. एवढ्यात भारतातल्या वाग्भटाची कीर्ती त्याच्या कानावर गेली. त्याने वाग्भटाला बोलावण्यासाठी माणूस पाठवला. त्या वेळी वाग्भट वयोवृद्ध झाला होता. त्याला इतक्या दूर देशाचा प्रवास झेपणार नाही, असे त्याच्या शिष्यांना वाटले व त्यांनी त्याच्या जाण्याला विरोध केला. त्यावर वाग्भटाने म्हटले. " रोग्याने बोलावल्यावर वैद्य जर गेला नाही, तर तो देवाच्या घरी अपराधी ठरतो. मी आता जगलो, मेलो तरी त्यात वाईट वाटण्याचे कारण नाही. माझे या जन्मातले कर्तव्य संपले आहे. शिवाय असे पाहा, की जगातल्या वैद्यांना राजाचा रोग नष्ट करता आला नाही. ते कार्य जर माझ्या हातून घडले, तर त्यात माझाच नव्हे; तर भरतखंडाचा गौरव होईल. "

वाग्भटाने प्रवासाचा निश्चय केला. आपण बनविलेल्या रसकुप्यांचा आपले मुलगे अगर शिष्य दुरुपयोग करतील म्हणून जाण्यापूर्वी त्या रसकुप्या त्याने एका विहिरीत फेकून दिल्या. चार महिने मोठ्या कष्टाने अखंड प्रवास करून तो मिसर देशात पोचला. राजाने त्याचे उत्तम स्वागत केले. लागलीच त्याने राजाच्या रोगावर उपचार सुरू केले. तीन महिन्यांत राजाच्या पोटातल्या ग्रंथी पिकून पक्व झाल्या. मग एके दिवशी वाग्भटाने राजाला नौकाविहारासाठी नेले. एका जागी गेल्यावर त्याने राजाला उलटा करून झोके देण्याबद्दल त्याच्या शिपायांना सांगितले. त्यांनी तसे करताच राजाच्या पोटातले दूषित पाणी मुखावाटे बाहेर पडले आणि सर्व दूषित भागाचा निचरा झाला. अशा रीतीने राजा रोगमुक्त झाला.

मग राजाच्या आनंदाला पारावार राहिला नाही. त्याने एक भव्य महोत्सव करून वाग्भटाचा सन्मान केला व त्याला आपले अर्धे राज्य देण्याची घोषणा केली. त्यावर वाग्भट म्हणाला. " मला तुझे राज्य नको. तू रोगमुक्त झाल्यामुळे भारतीय वैद्यकाचे श्रेष्ठत्व प्रस्थापित झाले, एवढे मला पुरेसे आहे."

त्यानंतर काही काळ वाग्भट त्या देशात राहिला. त्याला तिथल्या काही वनस्पतींचे संशोधन करायचे होते; पण त्याच काळात एक मोठी दुर्घटना घडली.

मिसर देशाची राजकन्या एका कर्मचाऱ्याच्या प्रेमात पडली व तिला गर्भ राहिला. ते समजल्यावर राणीने वाग्भटाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एकांतात बोलावून घेतले व मुलीची सुटका करण्याबद्दल तिला विनविले. वाग्भट म्हणाला, " मी असले पाप कधीही करणार नाही." त्यावर राजकन्या पुढे आली आणि डोळ्यांत पाणी आणून म्हणाली. " वैद्यराज, तुम्ही हीं गोष्ट केली नाहीत, तर एका जीवाच्या हत्येऐवजी तीन जीवांच्या हत्येचे पाप तुम्हांला लागेल." वाग्भटाने विचारले, " कोणते तीन जीव?" राजकन्या म्हणाली. " मी व माझा प्रियकर आम्ही दोघेही आत्महत्या करू. माझ्याबरोबर माझा गर्भही नष्ट होईल." वाग्भट म्हणाला. "तरीही मी हे पाप करणार नाही. पण मी तुला दुसरा एक उपाय सांगतो. जन्मणाऱ्या मुलाचा बाप म्हणून तू माझे नाव जाहीर कर, म्हणजे सगळ्याच हत्या वाचतील." राजकन्या पुन्हा म्हणाली. " पण त्यात तुम्ही मराल. अशा गुन्ह्याला आमच्या राज्यात मृत्यूची शिक्षा आहे." वाग्भट म्हणाला. " काही हरकत नाही. परदेशात मृत्यू हे माझ्या जन्मपत्रिकेतले भविष्य आहे." त्यावर राणी बोलली, " तुम्ही आमचे उपकार कर्ते, माझ्या मुलीला जीवदान देणारे. आम्ही तुमच्यावर असा खोटा आरोप कसा ठेवायचा? तसे करणे कृतघ्नपणाचे ठरेल." वाग्भटाने म्हटले. "त्याला इलाज नाही. माझ्याऐवजी राजकन्येला जगू दे."

शेवटी निरुपाय होऊन राणीने राजाला वाग्भटाचे नाव सांगितले. राजाला परम दुःख झाले; पण एवढ्या वृद्धावस्थेत वाग्भटाच्या हातून असले पातक घडू शकेल का, या गोष्टीचा विवेक न करता, राजाने वाग्भटाचा द्वेष करणाऱ्या काही मंत्र्यांच्या दुराग्रहामुळे, राज्याच्या कायद्याप्रमाणे वाग्भटाला मृत्युदंडाची शिक्षा फर्मावली आणि ती अंमलातही आणली. मग राणीने चंदनाच्या चितेवर वाग्भटाच्या देहाला अग्निसंस्कार केला व त्याची रक्षा गंगेत विसर्जित करण्यासाठी सुवर्णकुंभात घालून भारतात पाठवून दिली. [स्ट. इं. लि. हि. १; महर्षी वाग्भट–डॉ. नटवरलाल व्यास, युगप्रभात, १ जानेवारी १९६६]

(३) (इ. स.च्या १२ व्या शतकाचा पूर्वार्ध) वाग्भटालंकार या ग्रंथांचा कर्ता. हा जैन असून, प्राकृतात त्याचे नाव बाहड असे आढळते. हा कोण्यातरी राज्याचा मंत्री होता व त्याच्या पित्याचे नाव सोम होते, असे त्याच्या टीकाकाराने लिहिले आहे. वाग्भटालंकार हा साहित्यशास्त्राचा ग्रंथ असून, त्यात अलंकारांचे विवेचन आहे. प्रस्तुत ग्रंथ सिंहदेवगणी याच्या टीकेसह काव्यमालेत प्रसिद्ध झाला आहे. त्या ग्रंथाचे पाच परिच्छेद असून, बहुतेक ग्रंथ अनुष्टुभ् छंदात आहे. त्या ग्रंथात उदाहरणांसाठी दिलेल्या श्लोकांत अनहिलवाडच्या चौलुक्य घराण्यातील राजा जयसिंह याचा उल्लेख आलेला आहे. [सं. सा. शा. इ.]

(४) (इ. स. चे १३ वे शतक) एक अलंकारशास्त्रज्ञ. याचे वास्तव्य मेवाडात होते. हा फार सुंदर होता. अनेक स्त्रिया त्याच्या सौंदर्यावर भाळत. तो आपल्याला पती म्हणून मिळावा, अशी उत्कट आकांक्षा धारण करणाऱ्या कित्येक मुली त्याच्या आवती-भोवती होत्या; पण बालपणापासूनच विरक्त असल्यामुळे तो कोणाच्याही प्रेमपाशात सापडला नाही. तो निरंतर जितेंद्र देवाची प्रार्थना करी, ती अशी–

नो मुक्त्यं स्पृहयामि नाथ विभवैः कार्यं न सांसारिकैः ।
किन्त्वायोज्य करौ पुनः पुनरिदं त्वामीशमभ्यर्थये ॥
स्वप्ने जागरणे स्थितौ विचलने दुःखे सुखे मन्दिरे ।
कान्तारे निशि वासरे च सततं भक्तिर्ममास्तु त्वयि ॥

(काव्यानुशासन ५३)

अर्थ– हे नाथ, मला मुक्ती नको आणि सांसारिक वैभवही नको. भगवन, हात जोडून माझी तुला पुनः पुन्हा एकच प्रार्थना आहे, की झोप, जागृती, चलन-वलन, सुख-दुःख, मंदिर, वन, सर्व स्थळी दिनरात्र सर्व काळी, तुझ्या ठिकाणी माझी भक्ती राहो.

वाग्भटाचा पिता नेमिकुमार हा एक तत्कालीन श्रीमंत व्यापारी होता. वाग्भट हा दिगंबर संप्रदायाचा अनुयायी होता, असे श्री. अमृतलाल शास्त्री यांनी म्हटले आहे.

काव्यानुशासन हा वाग्भटाचा सुप्रसिद्ध ग्रंथ होय. हेमचंद्राचा काव्यानुशासन हा ग्रंथ या ग्रंथाहून वेगळा आहे. तो सूत्रसंख्येने वाग्भटाच्या ग्रंथाहून लहान असून, त्यावर त्याने स्वतः लिहिलेली व्याख्या फार मोठी आहे. वाग्भटाचा हा ग्रंथ पाच अध्यायांचा अलंकारग्रंथ आहे. त्यात २८९ सूत्रे आहेत. पहिल्या अध्यायात काव्यप्रयोजन, कविसमय व काव्यभेद; दुसऱ्या अध्यायात पददोष, वाक्यदोष, अर्थदोष व १० गुण; तिसऱ्यात ६३ अर्थालंकार; चवथ्यात ६ शब्दालंकार व पाचव्यात नवरस, रसदोष, ऋतुभेद व नायकनायिकाभेद, इ. विषयांचे विवेचन आहे. याने स्वतःच्या ग्रंथावर स्वतःच व्याख्या लिहिली आहे. तिच्यात सूत्रांच्या अर्थाचे स्पष्टीकरण केलेले असून, आपल्या विवेचनाला आधारभूत अशी शेकडो पद्ये उद्धृत केलेली आहेत. त्याच्या या व्याख्येचे नाव अलंकारतिलकवृत्ती असे आहे. [महाकवी वाग्भट–श्री. अमृतलाल शास्त्री, जै. सि. भा., डिसेंबर, १९५५]

वाघ भारताचा राष्ट्रीय पशू. याची गणना मार्जारादी गणांतल्या हिंस्र पशूंमध्ये करतात. हा क्रूर, धिप्पाड व चपळ असून, अतिशय बलवान असतो. दिसायला हा उग्र व भयानक असतो. याचा रंग पिवळसर असून, याच्या अंगावर काळे पट्टे असतात. बिबळ्या वाघाच्या अंगावर काळे ठिपके असतात. तो झाडावर चढण्यात पटाईत असतो.

वाघ खूप प्राचीन आहे. ऋग्वेदात याचा उल्लेख नाही. पण पटकी नावाचा रोग वाघाला होत नाही व इंद्राच्या ओठावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्या मिशा आहेत ते वाघाचे केस आहेत, अशी माहिती शुक्ल-यजुर्वेदात आहे (१९.१०.९२). झोपलेल्या वाघाला डिवचून जागे केल्यावर निर्माण होणाऱ्या त्याच्या भयाचा उल्लेख कृष्ण-यजुर्वेदाच्या तैत्तिरीय संहितेत केला आहे. अथर्ववेदात तर व्याघ्रभयनिवारणासाठी एक संपूर्ण सूक्त असून, त्यात वाघाला वीस नखे असतात, असा तपशीलही दिला आहे. ऐतरेय ब्राह्मणा-नुसार सर्व पशूंमध्ये वाघ हा क्षत्रिय असून, तो क्षत्रियासारखा शूर आहे (८.२). राजसूय यज्ञात राजाला व्याघ्रचर्मावर बसवून राज्याभिषेक करावा, असे तैत्तिरीय ब्राह्मणात म्हटले आहे (१०.७.९). मृत्युमव नामक यज्ञात वाघाच्या कातड्याचे जोडे घालायचा विधी सांगितला आहे (बौ. श्रौ. १८.८६).

ढाण्या वाघ

ऋग्वेदात वाघाचा उल्लेख नाही, याचा अर्थ वैदिक ऋषींनी वाघ पाहिला नसेल किंवा माहीत असूनही त्यांनी त्याचा उल्लेख केला नसेल. मात्र त्या काळी भारतात वाघ वावरत असला पाहिजे, असे वाटते. कारण पंजाब हा ऋग्वेदाच्या रचनेचा परिसर मानण्यात येतो आणि त्याच परिसरात हडप्पाला मिळालेल्या उत्खनित वस्तूंवर वाघाची चित्रे आहेत, असे पुरातत्त्वज्ञ म्हणतात.

महाराष्ट्रांतील चांदोली (जि. पुणे) येथे झालेल्या उत्खननात भाजलेल्या मातीचे एक वाघसदृश खेळणे मिळाले आहे. या खेळ-ण्याचा आकार मोठ्या तोंडाच्या बाटलीसारखा असून, त्यावर वाघासारखे पट्टे दाखविले आहेत. चांदोलीच्या उत्खननातले अवशेष ताम्रपाषाणयुगातले म्हणजे सनपूर्व १२०० ते १५०० या कालखंडातले आहेत, असे डॉ. सांकलियांचे मत आहे. यावरून हा पशू प्राचीन आणि सर्वदेशीय आहे, असे ठरते.

नागर संस्कृतीत सिंहाच्या तुलनेने वाघाला कमी महत्त्व आहे. तो चंद्रघंटा, कूष्मांडा, अंबा व पद्मावती देवी यांचे वाहन आहे. शिव व्याघ्रचर्मावर बसतो किंवा व्याघ्रचर्म पांघरतो. दुर्गेचा जप करणाऱ्या व्यक्तीला वाघापासून भय नसते, असे वायुपुराणात म्हटले आहे. व्याघ्रचर्म हे राज्याभिषेकासाठी आवश्यक असलेल्या वस्तूंपैकी एक आहे. रामाच्या राज्याभिषेकासाठी सव्रंध व्याघ्र-चर्म आणायला वसिष्ठाने सांगितले होते (वा. रा. २.३.११).

वाघाप्रमाणे राजाही शक्तिसंपन्न व्हावा, या हेतूनेच वाघाचे कातडे उपयोगात आणले जात असावे.

काही ब्राह्मण घराण्यांत वाघासंबंधी कुलाचार होतात. या कुलाचारांत दरवर्षी अकरा ब्राह्मणांना भोजन देतात.

कोष्टी लोक वाघभक्त आहेत. ते लग्नाच्या वेळी आपल्याजवळ वाघाची मूर्ती ठेवतात. त्यांना कुठे वाघ भेटला, तर ते मार्कंडे-याचे स्मरण करतात. त्यामुळे वाघाचा शक्तिपात होतो, अशी त्यांची समजूत आहे.

नागर संस्कृतीपेक्षा आदिवासी संस्कृतीत वाघाचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. जंगलात राहणाऱ्या या लोकांना वाघाच्या तडाख्यात सापडण्याची भीती सदैव असते. त्यामुळे त्यांनी वाघाला देव समजून त्याची पूजा सुरू केली असणे स्वाभाविक आहे. वारली, कवार, नाईक, भूमिज, भिल्ल, संताळ, इ. जातीजमातींचे लोक वाघाला देव मानतात.

वाघाने आपली जनावरे पळवून नेऊ नयेत, म्हणून मान-पुड्यातील काही आदिवासी श्रावणात त्याची पूजा करतात. प्रत्येक खेड्याच्या वेशीपाशी वाघाच्या नावाने शेंदूर फासलेले दोन-चार गोटे असतात. हा त्यांचा वाघदेव होय. वाघ वेशीजवळ आला असता तो या देवाला पाहून गावात न शिरता तिथूनच परततो, अशी त्यांची समजूत आहे.

कवार जातीत या देवासंबंधी एक निराळीच कल्पना आहे. वाघाने एखाद्या कवाराला मारले, तर मृताच्या कुटुंबाचा आणि वाघाचा रक्तसंबंध जुळला, असे ते मानतात. हा संबंध तोडण्या-साठी ते बैगाच्या साहाय्याने ‘ दोरी तोडणे ’ नावाचा एक विधी करतात. बैगा वाघाचे सोंग घेऊन कवाराला जिथे मारले असेल, त्या जागी जातो आणि तिथली थोडी रक्तमिश्रित माती तोंडात घेऊन पळू लागतो. मग काहीजण त्याला धरून आणून तोंडातली माती टाकायला लावतात. मग बैगा मयताच्या घरच्या लोकांनी एका दोरीने बांधून कोंबडीला दाणे टाकतो. कोंबडीने ते धान्य खाल्ले म्हणजे वाघाचा आणि मृताच्या कुटुंबाचा संबंध तुटला असे समजतात.

वाघ ही एक देवताही आहे. ठाकूर, धनगर, रायकरी, गोंड, वाघाई इ. जातींचे लोक अनुक्रमे वाघीआ, वाघजाय, वाघमारी, वाघाई या नावांनी हिची पूजा करतात.

व्याघ्रांबरीचे एक ठाणे रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर येथे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. तिथे चैत्र महिन्यात तिचा उत्सवही साजरा होत असतो.

अनेक जातींच्या देवकांत वाघ आहे. वाघ देवकाचे लोक खारीचे मांस खात नाहीत, कारण तिच्या पाठीवर वाघासारखे पट्टे असतात. हे लोक बहुधा माघ महिन्यात लग्नेही करीत नाहीत. कारण त्यांना वाघ आणि माघ हे शब्द सारखेच वाटतात. मध्य प्रदेशातल्या भरिया जमातीतला एखादा माणूस वाघाने ठार केला, तर ते मृताच्या नातेवाइकांना जातिबहिष्कृत करतात. ठग लोक तर वाघाची शिकारही करीत नाहीत.

खुश्रो लोकांमध्ये वाघासंबंधी खूप आदर आहे. घरातील एखाद्या पाळीव जनावरासंबंधाने जसे बोलावे, तसे ते वाघासंबंधी बोलतात. त्यांच्या स्त्रिया वाघाला आपला मोठा दीर मानतात आणि तो दिसला तर त्याचा मान राखण्यासाठी डोक्यावर पदर घेतात. एखाद्या खुश्रो मुलीचे लग्न झाले, तर वाघाला फार वाईट वाटते, अशी त्यांची समजूत आहे. वधू-वर जेव्हा विवाहस्तंभाभोवती प्रदक्षिणा घालतात तेव्हा वधूचा बाप, भाऊ किंवा चुलता यांपैकी कोणाच्या तरी अंगात वाघ येऊन तो घुमू लागतो. त्या वेळी त्याच्या समोर डुक्कर किंवा बकरा आणतात. मग मनुष्य त्याच्या नरडीचा घोट घेऊन थोडे रक्त पितो. तसे करणे अशक्य असल्यास त्या जनावराला तत्काळ कापतात. पण तरीही तो शांत होत नाही. ज्या वेळी त्याच्या समोर लामणदिवा प्रज्वलित करण्यात येतो, तेव्हा तो शांत होतो.

कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, इ. प्रदेशांत वाघासंबंधी काही सणवारही साजरे केले जातात. जो माणूस वाघाची अथवा चित्त्याची शिकार करील, त्याचा सत्कार करण्याची एक मजेदार प्रथा कूर्ग भागात आहे. जेव्हा एखादा शिकारी वाघाची शिकार करतो, तेव्हा त्या वाघाबरोबर त्याचा विवाह लावतात. त्या वेळी नाच, गाणी, भोजन असे कार्यक्रम होतात. नंतर शिकाऱ्याला विशिष्ट प्रकारे मिशा ठेवायला मोकळीक असते. नरिमंगल हे या सत्कारविधीचे नाव असून, तो अलिकडे क्वचितच होतो. ठाण्यातील आदिवासींचा वाघवारस नावाचा एक सण असतो. हा गुराख्यांचा सण आहे, असे म्हणतात. गुजराती लोक आश्विन वद्य द्वादशीला वाघ-वारान म्हणतात. या दिवशी त्यांच्या दिवाळीला प्रारंभ होतो. स्त्रिया घरासमोर निरनिराळ्या प्रकारची रांगोळी काढतात, त्यात वाघाची रांगोळी हमखास असते. हे चित्र भाऊबिजेपर्यंत ठेवावे लागते.

वाघाने मारलेल्या माणसाचे भूत होते, ही समजूत सर्वत्र आढळते. मुंडा लोक या भुताला बगाऊत म्हणतात. हे भूत वाघाकडून येणाऱ्या मृत्यूची अगाऊ सूचना देते, अशी त्यांची समजूत आहे. हा अपमृत्यू टाळण्यासाठी ते बगाऊताला बळी देऊन संतुष्ट राखतात. पाइक लोक त्याला वाघभूत म्हणन ओळखतात, तर बंगाली माणसे याला बघौल म्हणतात. एखाद्या स्त्रीला वाघाने मारले असता ती चुडेल नावाचे भूत बनते, अशीही एक समजूत आहे.

भुईया जातीचे लोक वाघाने मारलेल्या माणसाला जाळून टाकतात. कारण त्याला पुरले तर वाघ त्या शवाला पळवून नेईल आणि इतर माणसांनाही तो मारील, असे ते म्हणतात. एखाद्या गारोला वाघाने जिथे मारले असेल, तिथेच त्याला जाळतात. कारण ते प्रेत गावात आणले तर वाघ त्याचा माग काढीत गावात येईल, अशी त्यांना भीती वाटते.

मुंडांच्या मते वाघ पूर्वजन्मीचा सांबर असून, त्याची शिंगे सात वेळा झडलेली असतात. एखाद्या शिकाऱ्याने शिकारीला जाताना अंगाला तेल लावले किंवा केस विंचरले, तर तो वाघाचे भक्ष्य होतो, असे ते समजतात. हे लोक मुंडकमदारू नावाचे झाड कधीही लावीत नाहीत. कारण ते लावले तर झाड लावणाऱ्याला वाघ खाऊन टाकतो, अशी त्यांची समजूत आहे. बिहारमधली बिरहोर आदिवासी स्त्री ज्या ठिकाणी बाळंतीण झाली असेल, त्या बाजूच्या भिंतीला नवीन दार पाडून त्यातून ती बाहेर येते. असे केल्याने मुलाला वाघ, साप यांच्यापासून भीती नसते, अशी त्यांची समजूत आहे. नाग जमातीतल्या एखाद्या व्यक्तीला वाघाने मारले, तर मृताचे सारे कुटुंब एक महिनाभर राहते घर सोडून जंगलात भटकते आणि मग दुसरे घर बांधून त्यात राहते. वाघाच्या मानेवर माणसांची भुते बसलेली असतात, म्हणून वाघ खाली मान घालून चालतो, अशी एक कल्पना रूढ आहे. व्याघ्रमुखी म्हणजे पुढे रुंद आणि मागे अरुंद असे घर बांधू नये, असे म्हणतात. असले घर मालकाला लाभत नाही, ही महाराष्ट्रात आढळणारी एक कल्पना आहे. आसामातले लुशाई लोक दुष्ट शक्तीपासून आपल्या धान्याचे रक्षण व्हावे, म्हणून वाघाचा दात गळ्यात बांधतात.

वाघासंबंधी अनेक लोककथा प्रसिद्ध आहेत. वाघ आणि मांजर यांच्यांतील शत्रुत्वासंबंधीची एक कथा वेरिअर एल्विनने पुढीलप्रमाणे दिली आहे —

पूर्वी वाघ आणि माणसे परस्परांचे मित्र होते. कालांतराने अन्नावरून त्यांच्यांत वैर निर्माण झाले. वाघाने जाहीर केले, की इथून पुढे मी माणसांच्या संगतीत न राहता जंगलात राहीन. जंगलातली थंडी वाघाला सोसवेना, म्हणून त्याने माणसाच्या घरचा विस्तव चोरून आणायला एक मांजर पाठवले. मांजर जेव्हा माणसाच्या घरी गेले, तेव्हा तिथले उबदार वातावरण पाहून ते तिथेच राहिले. त्यामुळे वाघ संतापला आणि ओरडून म्हणाला. " आता मला जेव्हा ते मांजर दिसेल तेव्हा त्याला मी खाऊन टाकीन. " म्हणून मांजर वाघाला नेहमीच घाबरून असते.

यासारख्या काही अन्य लोककथा महाराष्ट्र लोकसाहित्य-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

माला, इ. ग्रंथांतून वाचायला मिळतात. [म. ज्ञा. को. २ व ३; क. हि. वा. पु.; लो. दं.; एन्सा. मुंडा.; परधान्स]

वाघनख एक अलंकार आणि शस्त्र. लहान मुलाला कोणाची नजर लागून त्याचे स्वास्थ्य ढळू नये म्हणून हा अलंकार त्याच्या गळ्यात घालतात. मूल जन्मल्यावर सातव्या दिवशी त्याला मुक्तकेशी नावाची गृही पछाडते, असे अग्निपुराणात म्हटले असून, त्यावर वाघनखाचा धूप जाळणे हा उपचार सांगितला आहे (२९९.१३). पूतनाशांतिप्रयोगातही हाच उपचार दिला आहे. आदिवासींत ही प्रथा बऱ्याच प्रमाणात आहे. वाघ हे शक्तीचे प्रतीक आहे. नख हे त्याचे शस्त्र आहे. म्हणून नखही शक्तीचे प्रतीक बनून ते गळ्यात घालण्याची प्रथा निर्माण झाली असावी.

परमानंदविरचित शिवभारत (६.८५), सोमेश्वराचा अभिलषितार्थचिंतामणी (३.१२.१३२९), बाणभट्टाचे हर्षचरित, इ. अनेक संस्कृत ग्रंथांतून याचा उल्लेख आला आहे. जयपूरनजिकच्या मालव नगरात स्कंदाची एक गुप्तकालीन प्रस्तरप्रतिमा सापडली असून, तिच्या गळ्यात वाघनख आहे, असे श्री. रत्नचंद्र अग्रवाल यांनी म्हटले आहे. सूरदासाने सूरसागरात हरिनख, बघना, बघनिया म्हणून याचा वारंवार उल्लेख केला आहे. मराठी संतकवी नामदेव, एकनाथ, मध्वमुनी, वेणाबाई यांनीही वाघनखाचा उल्लेख केला आहे. तेलुगू रंगनाथ रामायणात (१.१४) आणि रामभद्रकवीच्या रामाभ्युदयातही वाघनख आढळते.

अलंकारात वाघनख

अलंकार बनवताना वाघाची दोन नखे एकत्र करून ती सोन्याच्या कोंदणात बसवून त्यावर निरनिराळी रत्ने जडविली जातात. कधी वाघनख हारातही गुंफलेले असते. शिवभारतकार परमानंद कवी सांगतात, की छत्रपती शिवाजी महाराजांच्या गळ्यातील वाघनखावर पाचू जडविलेले असून, ते काळ्या पोतीत पटविले होते.

वाघनख हे एक शस्त्र असून, छत्रपती शिवाजीमहाराजांनी अफझुलखानाला मारण्यासाठी याचा वापर केला होता, असे अगिनदासाने छत्रपतींवरील पोवाड्यात म्हटले आहे. कृष्णाजी अनंत सभासदानेही आपल्या बखरीत, या शस्त्राने छत्रपतींनी खानाला मारले, असा उल्लेख केला आहे. अगिनदास आणि कृष्णाजी अनंत हे छत्रपतींचे समकालीन किंवा निकटकालीन होते; पण परमानंदाने मात्र वाघनखाच्या ऐवजी कट्यारीचा उल्लेख केला आहे (शिवभारत २१.४०). आधुनिक अभ्यासकांमध्ये या संबंधी बरेच मतभेद आहेत.

लोककलेच्या परंपरेतही वाघनखाचा आढळ होतो. काही स्त्रिया आपल्या हातावर तुलसीवृंदावन, शंख, चक्र, इ. चिन्हांप्रमाणे वाघनखेही गोंदून घेतात. या गोंदणात आपल्या घराण्याचा इतिहास दडलेला असतो, अशी त्यांची समजूत असते. [पोवाडे; सू. सा. श.; शिवभारत; मानसोल्लास; ह. च. सां. अ.; म. इ. सा. जी. अ.; हिं. तें. म. रा. तु. अ.; रंगनाथरामायण; मरुभारती, जुलै १९६४; भा. इ. सं. मं. इतिवृत्त, शके १८३६]

वाघया वारली आदिवासींचे ग्रामदैवत. प्रत्येक गावाच्या बाहेर, घनदाट झाडीत, तीन फूट उंच अशा खांबासारख्या लाकडावर किंवा दगडावर याची मूर्ती कोरलेली असते. तिला शेंदूर लावलेला असतो. या मूर्तीच्या मागे एका लहान लाकडी खांबावर काही मूर्ती कोरलेल्या असून, त्यांना वाघयाचे शिपाई म्हणतात. आश्विन वद्य द्वादशीला वाघयाची पूजा करतात व त्याला कोंबडीचा बळी देतात. त्या दिवसाला वाघबारस अशी संज्ञा आहे. आर्थिक अडचणीमुळे वाघबारसेला पूजा-बलिदान करता आले नाही, तर मागाहून सोयीने पूजा-बलिदान केले



वाघया ग्रामदेव

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तरी चालते. वर तीन किंवा पांच वर्षांनी कोंबडीबरोबरच बकरीही कापावी लागते. वाघवारस हा सबंध गावाचा उत्सव असल्यामुळे, तो साजरा करण्यासाठी प्रत्येक गावकऱ्याने आपल्याला शक्य होईल तशी वर्गणी दिली पाहिजे, असा दंडक असतो. पूजेच्या दिवशी वाघयाला शेंदूरलेप करतात, त्याच्या पुढे गोडया तेलाचा किंवा तुपाचा दिवा लावतात व नारळ फोडून प्रसाद वाटतात. वाघयामुळे वाघ-सिंहादी क्रूर जनावरांपासून आपले रक्षण होते, अशी वारल्यांची समजूत आहे. वाघयालाच काही लोक वाघोबा या नावाने पूजतात. पाहा–वारली. [जं. रा.]

वाघरी गुजरात प्रदेशातील एक जात. वाघरी या शब्दाच्या व्युत्पत्तीसंबंधी विद्वानांत बरेच मतभेद आहेत. श्री. ना. गो. चापेकर म्हणतात, की वागुर म्हणजे जाळे, या शब्दावरून वाघरी हे नाव या जातीला मिळाले. राजस्थानाच्या ओसाड भागातील टेकड्यांना वागड् असे म्हणतात. त्या भागातून आलेले ते वाघरी, असे काहींचे म्हणणे आहे. पूर्वीच्या संयुक्त प्रांतातील आग्राभागात वागरी नावाचे रानटी लोक राहत होते. त्या शब्दाचे भ्रष्ट रूप वाघरी असावे, असे म्हटले जाते. ही कोळयांची एक पोटजात असावी. वाघरी लोकांचे असे म्हणणे आहे, की आमची उत्पत्ती राजपुतांपासून झाली असून, गुर्जरांशी आमचा काही संबंध नाही. ते आपणांला चौहान राजपूत समजतात.

वाघरींच्या चुनारिये, दांतनिये, वेडू व पातानेजिये अशा चार पोटजाती आहेत. याशिवाय त्यांचे आणखी काही पोटभेद आहेत. त्यांपैकी तलबदे व पोरनाले यांना कोणाच्याही हातचे काही चालत नाही. काही अन्य पोटभेदांत रोटीव्यवहार होतो; त्यांच्यांत बेटीव्यवहार मात्र होत नाही.

वाघरी जोडपे

वाघरी पुरुष बंडी आणि धोतर वापरतात. त्यांच्या डोक्याला लहानसा रुमाल असतो. स्त्रिया घागरा व चोळ्या वापरतात. त्यांना दागिन्यांची हौस फार कमी असते. ते गुजराती भाषा बोलतात. त्यांची घरे कुडाच्या भिंतींची असतात.

यांना गाय व कोल्हा यांचे मांस चालत नाही. परंतु ते बैल व सुसर यांचे मांस आवडीने खातात. मेलेल्या जनावरांचे मांस ते खात नाहीत.

विवाहप्रथा – यांच्यांत मामेबहीण, आतेबहीण व मावसबहीण यांच्याशी लग्न करीत नाहीत. समान देवक असलेल्या कुळांत, त्याचप्रमाणे एकाच गावात राहणाऱ्या आणि निकटच्या संबंधी लोकांतही विवाहसंबंध करीत नाहीत. यांची लग्ने प्रौढपणी होतात. यांच्यांत देजाची पद्धत आहे. देजाच्या रोख रकमेबरोबर मुलीसाठी वापरायच्या वस्त्रांचीही एक जोडी द्यावी लागते. हे विवाहविधीसाठी पुरोहित म्हणून कधी ब्राह्मणाला बोलावतात, तर कधी त्याच्या विनाही लग्ने लावतात. या जातीत विधवाविवाह व घटस्फोट रूढ आहेत.

मासे मारणे, पक्षी पकडणे, भाजीपाला लावणे, दात घासण्याच्या काड्या विकणे, जनावरे चारणे, इ. धंदे हे करतात.

वाघरी लोक आपल्याहून श्रेष्ठ जातीच्या लोकांना जातिप्रवेश देतात; पण कनिष्ठ जातीच्या माणसाला मात्र ते जातीत घेत नाहीत. ज्याला वाघरी जातीत समाविष्ट व्हायचे असते त्याला त्या जातीला एकदा जेवण द्यावे लागते.

हे लोक आपल्या स्त्रियांच्या पातिव्रत्याला फार जपतात. परगावाहून परत आल्यावर बायकोच्या वर्तनासंबंधी नवऱ्याला शंका आली, तर तो तिला विहद देवीसमोर नेतो. ती आपल्या हातून जी पापे घडली असतील, त्या प्रत्येकाचा उच्चार देवीसमोर करते. देवीला तिची माहिती खरी वाटली तर बरोबर आणलेला रेडा व बकरी हे पशू थरथर कापू लागतात. मग त्यांचा बळी दिला जातो. स्त्रीच्या सांगण्यावर देवीचे समाधान झाले नाही, तर तिचा कोप होऊन कुटुंबातील एखादी व्यक्ती मरण पावते, अशी वाघरींची समजूत आहे. आपण शुद्ध आहोत हे सिद्ध करण्यासाठी या स्त्रियांना कधी कधी अग्निदिव्यही करावे लागते. अशा वेळी विहद देवी पंचाक्षरी वाघऱ्यांच्या अंगात येते.

देवधर्म – वाघरी लोक बीजपंथाचे अनुयायी आहेत. ते बहुचरा, खोडियार, मेलडी, हडकाई, विहद, काली, इ. देवींना व हनुमंताला भजतात. ते आपल्या देवतांना पशुबलीही देतात.

मर्तिकप्रथा – वाघरी लोक प्रेते पुरतात; पण ज्यांनी तीर्थयात्रा केली असेल त्यांना मात्र जाळतात. मृताची रक्षा नदीत किंवा तीर्थात विसर्जित करतात. प्रेताला पुरल्यावर लोक स्नान करून घरी परततात. घरी आल्यावर निंबाचा पाला चावून, तोंड धुऊन शुद्ध होतात. मृताचा जावई आपल्या घरून शिजलेली ज्वारी आणून नातेवाईकांना जेवण देतो. तिसऱ्या दिवशी मुलगा क्षौर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करून, मृताला जिथे पुरले असेल तिथे जाऊन पिंड देतो. बाराव्या दिवशी ज्ञातिभोजन होते. [म. ज्ञा. को.; रजःकण; ट्रा. का. बाँ.; वन्यजाती, एप्रिल १९६८]

वाघरी नाचे गुजरातमधील भिक्षेकऱ्यांची एक जात. भिक्षा मागण्याचे काम बहुधा मुले किंवा मुली करतात तांबड्या रंगाचा अंगरखा व त्याच रंगाची टोपी हा त्यांचा पोषाख असतो. भिक्षेकरी मुले पायाला घुंगरूही बांधतात. भिक्षेकरी गाणी म्हणत नाचतात. नाचताना त्यांच्या मागे एक पुरुष अथवा एक स्त्री किंवा दोघेही असतात. ते मुलांचा नाच चालू असताना वाद्य वाजवून व गाणी म्हणून त्यांना साथ देतात. एखादा पैसा, मूठभर तांदूळ अथवा कपडे मिळाले की, हे लोक खूष होतात. [बाँ. बें. क्रा.]

वाघेर काठियावाडमधील एक जात. ओखामंडळात यांची वस्ती विशेष आहे. आधी मच्छिमार, नंतर चाचे आणि त्यानंतर जमीनदार अशी त्यांची स्थित्यंतरे झाली आहेत. या लोकांचा संबंध परंपरेने श्रीकृष्णाच्या काळापर्यंत मागे नेला गेला आहे.

ओखामंडळातील मूळच्या रहिवाशांचे काब, मोड व काल असे तीन भेद होते. काब लोक श्रीकृष्णाच्या काळी रानटी म्हणून प्रख्यात होते. कृष्णाच्या अवतारसमाप्तीनंतर, अर्जुन यादवांच्या बायकामुलांना द्वारकेहून मथुरेला नेत असता वाटेत या काब लोकांनीच त्यांच्यावर हल्ला केला होता. या लोकांपुढे अर्जुनाचे शौर्यही फिके पडले होते. याच काबांचे वंशज म्हणजे सांप्रतचे वाघेर लोक होत.

वाघेर लोक आपण क्षत्रिय असल्याचे सांगतात. इ. स. च्या ११ व्या शतकात ओखामंडळावर हेरोळ आणि चावडा या राजपुतांची सत्ता होती. त्यामुळे त्या दोघांत प्रदेशाच्या मालकीबद्दल संघर्ष चालत. हे संघर्ष मिटवण्यासाठी त्यांनी राठोड राजपुतांना बोलावले. पण राठोडांनी कपटाने त्यांच्यापैकी काहींना ठार मारले. त्या वेळी हेरोळांनी वाघेरांकडे आश्रय घेतला. त्यानंतर या हेरोळांपैकी एकाच्या मुलीचे लग्न कच्छच्या वाघेर वंशाच्या हमीरजीबरोबर झाले. पुढे या दोघांचे वंशज स्वतःला वाघेर असे म्हणू लागले. त्यांनीच पुढे माणेक ही उपाधी घेतली आणि ते द्वारका व ओखामंडळ या प्रदेशांवर राज्य करू लागले. पुढे त्यांची वस्ती कच्छच्या आखाताच्या दक्षिण किनाऱ्यापर्यंत पसरली. हे लोक सांप्रत हालार जिल्ह्याच्या काठाकाठाने खेडेगावात मच्छिमार किंवा खारवी म्हणून राहतात. हे मुसलमान आहेत. ओखामंडळात राहणारे हेरोळ हिंदू आहेत. पण पैशांच्या लोभाने त्यांतले काही आपल्या मुली मुसलमानांना देतात.

वाघेर लोक जात्याच लढाऊ व आक्रमक वृत्तीचे आहेत. लूटमार, चोरी व चाचेगिरी करण्यात एके काळी ते पटाईत होते. कोणत्याही सत्तेचे बंधन त्यांना नको असते. इ. स.च्या १९ व्या शतकाच्या सुरवातीपर्यंत सिंधपासून दीवच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत समुद्रावर त्यांचेच राज्य होते. समुद्रावर चाचेगिरी करून ते व्यापाऱ्यांकडून पैसे उकळीत असत. इ. स. १८१६ मध्ये इंग्रजांनी ओखामंडळ जिंकून ते बडोद्याच्या गायकवाडांना दिले. त्या वेळी वाघेरांनी बंड केले. इ. स. १८२० मध्ये इंग्रजांनी पुन्हा त्यांचा पराभव केला आणि ओखामंडळ गायकवाडांच्या ताब्यात दिले. पण पुढे इ. स. १८५७ मध्ये वाघेरांनी गायकवाडांच्या फौजेला आपल्या प्रदेशातून हाकलून लावले. त्यानंतर इंग्रजांनी काही काळ हा प्रदेश आपल्या ताब्यात ठेवला आणि मग गायकवाडांना दिला. पुढे इ. स. १८६५ मध्ये या लोकांनी सर्व काठियावाडमध्ये दंगे करून फार मोठे नुकसान केले. इ. स. १८७३ मध्ये मात्र इंग्रजांनी त्यांच्यावर आपला पुरता अंमल बसवला.

वाघेर लोक देखणे, सशक्त आणि खूप कष्टाळू आहेत. ते दाढी वाढवतात.

या लोकांचे हिंदू व मुसलमान असे मुख्य दोन भेद आहेत.

हिंदू वाघेर – हे लोक मासेमारी करतात, खलाशी म्हणून बोटीवर काम करतात व शेतमजुरी करतात. त्यांच्यापैकी काही जमीनदार असून, काही पोलिस पटेलाचे काम करतात.

यांच्यांत अनेक शाखा आहेत. पुरुषाला आते किंवा मामे बहिणीशी लग्न करता येते. मुलामुलींची लग्ने मोठेपणी होतात. गुजरातेतील यांच्या पातळीच्या इतर जमातींतल्या लग्नविधीप्रमाणेच यांचा लग्नविधी असतो. होमाभोवती वधू-वरांनी चार फेऱ्या घालणे, हा लग्नातील आवश्यक विधी असतो.

यांच्यापैकी बरेचसे लोक शैव असून, द्वारकेच्या आसपास राहणारे लोक विष्णू व रणछोड यांना भजतात. आसपुरा, वच्छडो, मोहमाया, खोडयार, कालिका, इ. त्यांच्या कुलदेवता आहेत. ज्येष्ठ शु. एकादशीला सर्व वाघेर द्वारकेला जातात आणि रणछोडजीची पूजा करतात. त्यांचे पुजारी राजगोर ब्राह्मण असतात; पण त्यांची धार्मिक कृत्ये मात्र वैद ब्राह्मण करतात.

हे लोक मृतांना जाळतात. लहान मुले आणि देवी व कुष्ठरोग यांनी मरण पावणाऱ्यांना मात्र पुरतात. दग्ध मृताची रक्षा समुद्रात आणि अस्थी गोमती नदीत टाकतात. अकराव्या दिवशी मृताची कणकेची प्रतिमा करून नदीकिनारी तिची पूजा करतात. पहिल्या वर्षी दर महिन्याला ब्राह्मणाला शिधा देतात. भाद्रपदात पितरांचे महालय श्राद्ध करतात.

मुसलमान वाघेर – हे लोक सुन्नी असून, मुसलमानांचे सर्व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रीतिरिवाज पाळतात. हे मूळचे हिंदूच होते, असे दिसते. हे साहसी दर्यावर्दी असून, आपली गलबते घेऊन ते कराची, मस्कत, इराणचे आखात, झांझिबार, मद्रास, श्रीलंका, कलकत्ता, इथपर्यंत जा ये करीत असतात. [वि. मुं. रा. प.; ट्रा. का. बाँ.]

वाघ्या खंडोबाचा उपासक. एखाद्या मनुष्यास मूल होत नसले किंवा होऊनही जगत नसले, तर तो ' मला मूल होऊ दे; ते जगल्यास मी तुला अर्पण करीन ' असा खंडोबाला नवस करतो. अशा तऱ्हेने नवसानंतर जन्मलेला मुलगा खंडोबाला अर्पण केला, की तो वाघ्या बनतो व मुलगी असेल तर, ती मुरळी बनते. वाघ्या बनण्याचा एक विवक्षित विधी असतो, तो असा– प्रथम चैत्र महिन्यात बाप आपला मुलगा देवाला वाहण्याचा संकल्प गुरवाला कळवतो. मग गुरव सांगेल त्या दिवशी वाघ्या बनणाऱ्या मुलाला मिरवणुकीने खंडोबाच्या देवळात नेतात. तिथे गुरव त्या मुलाला भंडार लावतो व वाघाच्या कातड्याच्या पिशवीत भंडार भरून ती पिशवी मुलाच्या गळ्यात बांधतो. मग देवावर भंडार उधळून तो देवाला त्या मुलाचा स्वीकार करण्याची विनंती करतो. अशा प्रकारे वाघ्या बनलेला तो मुलगा कालांतराने मुरळीबरोबर खंडोबाची गाणी म्हणत मल्हारीची वारी (भिक्षा) मागू लागतो.

वाघ्या व मुरळी यांचा संचार सर्व दक्षिण महाराष्ट्रभर व कर्नाटकात दिसतो. महाराष्ट्रात वाघ्याचा विवक्षित वेष नाही; कर्नाटकात मात्र आहे. तिथला वाघ्या घोंगडीची कफनी वापरतो. त्याच्या गळ्यात भंडारासाठी व्याघ्रचर्माची पिशवी असते. याशिवाय कोटंबा किंवा दोणी (धातूचे अगर लाकडी भिक्षापात्र), गांठा (रुप्याचा गोफ किंवा कातड्याची अगर वाखाची कवड्या गुंफलेली दोरी), दिवटी-बुदली, ध्वज, पोवते (गळ्यात बांधायची भंडाराने रंगलेली सुताची दोरी); घोळ (घंटावाद्य), शंख किंवा डमरू, शूल-त्रिशूल, इ. वस्तू प्रादेशिक भेदानुसार वाघ्या वापरीत असतो.

वाघ्या–मुरळी

वाघ्ये दोन प्रकारचे असतात – (१) घरवाघ्ये व (२) दारवाघ्ये. घरवाघ्ये म्हणजे नवसाच्या फेडीसाठी काही वेळ वाघ्याचा वेष परिधान करून वारी (भिक्षा) मागणारे. हे वाघ्ये केवळ खंडोबाविषयीची श्रद्धा व्यक्त करण्यासाठी वाघ्याचे रूप घेतात. दारवाघ्ये म्हणजे वाघ्याची कायमची दीक्षा घेतलेले, भिक्षेवर जगणारे व भक्तांची क्षेत्रांतील धार्मिक कृत्ये पार पाडणारे होत. भक्तांच्या वतीने जागरण करणे व लंगर (लोखंडी साखळी) तोडणे ही त्यांची विशेष कामे होत. वाघ्यांचे हे जागरणाचे कार्यक्रम गोंधळ्यांच्या गोंधळासारखेच असतात. या कार्यक्रमांत एक वाघ्या तुणतुणे वाजवतो, दुसरा खंजिरी वाजवून गाणी म्हणतो व मुरळी नाचते.

खंडोबाला मुलगे व मुली वाघ्ये व मुरळ्या म्हणून वाहण्याची चाल मुख्यत्वेकरून कुणबी, महार किंवा तत्सम अन्य जातींत आढळते. वाघ्यांची लग्ने बहुधा त्यांच्या वडिलांच्या जातीतील मुलीशी किंवा दुसऱ्या वाघ्याच्या मुलीशी होतात. वाघ्यांना खंडोबाचे चेले समजतात. मराठे व अन्य जातींचे लोक त्यांना नमस्कार करतात. वाघ्यांना दर तीन वर्षांनंतर एकदा जेजुरीची वारी करावी लागते. वाघ्यांच्या चालीरीती व धार्मिक समजुती मराठा कुणब्यांप्रमाणे आहेत.

वाघ्ये हे स्वतःला खंडोबाचे कुत्रे समजून भुंकतात, गुरंगुरं आवाज काढतात व चार पायांवर चालण्याचा अभिनय करतात. यासंबंधीचे उल्लेख इ. स. च्या १२ व्या शतकापासूनच्या वाङ्मयात आढळतात. बसवेश्वराने कुत्र्याप्रमाणे भुंकणाऱ्या मैलारभक्तांची म्हणजेच वाघ्यांची चेष्टा केली आहे. आनंदगिरी साधूच्या शंकरविजय नामक ग्रंथात खंडोबाच्या उपासकांची श्वानभाषा उल्लेखिली आहे. शेख महंमद श्रीगोंदेकर या सत्पुरुषाने वाघ्यांच्या या गुरगुरण्याचा व श्वानसदृश भुंकण्याचा वारंवार निषेध केला आहे.

वाघ्यांच्या या श्वानसदृश लीलांच्या संदर्भात सुप्रसिद्ध कन्नड संशोधक श्री. पांडुरंग देसाई लिहितात – " कुत्रे मल्हारीला प्रिय आहेत. मनुष्यरूपी वाघ्या स्वतःला कुत्रे समजून चाळे करतो. पाशुपत मतांत भक्त स्वतःस पशू व शिवाय पशुपती म्हणजे पशूंचे पालन करणारा, असे मानतात. वाघ्याचे वर्तन यासारख्या भावनेने प्रेरित झाले आहे. वाघ्या या नावाचे मूळ कन्नड भाषेत सापडते. त्याचे कन्नड नाव ओगय्य आहे. हा शब्द ' उगु ' या धातूपासून निघाला आहे. ' उगु ' म्हणजे बोबडे बोलणे. अर्थशून्य किंवा अस्पष्ट ध्वनी काढणे, इत्यादी. या अर्थाला अनुरूप असे वर्तन करून, म्हणजे कुत्र्याप्रमाणे भुंकून, गुरगुर शब्द करून, इ. प्रकाराने ओगय्य आपल्या नावाची अन्वर्थकता पटवून देतो.'

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्री. रा. चिं. ढेरे या संदर्भात लिहितात – वाघ्याचे कानडी नाव वग्गय्य किंवा ओग्गय्य आहे व त्याचा अर्थ जर 'बोबडे, अर्थशून्य व अस्पष्ट बोलणारा' असा असेल, तर त्याचा संबंध कुत्र्याकडे कसा पोचतो? वाघ्ये जर 'आपण देवाचे कुत्रे आहोत,' असे समजतात, तर त्यांना श्वानवाचक नावच मिळावयास नको होते काय? वग्गय्य हा कानडी शब्द जर श्वानवाचक असेल व तशा अर्थाने तो कानडी वाङ्मयात अन्यत्र, खंडोबाच्या उपासना–संदर्भाच्या बाहेर वापरला गेला असेल, तरच हे स्पष्टीकरण पत्करता येईल. वाघ्या हा शब्द ज्या मूळ शब्दाचा अपभ्रंश असेल, तो शब्द कानडीत किंवा अन्य द्राविड भाषेत श्वान या अर्थाने वापरात असला पाहिजे, असे निश्चयाने म्हणता येण्यासारखा पुरावा उपलब्ध झाला आहे. तंजावरकडे जाऊन राहिलेल्या रामकवी नामक एका मराठी पंडिताने मराठीत भाषाप्रकाश या नावाचा अमरकोशाच्या धर्तीवर एक कोशग्रंथ रचलेला आहे. या कोशात तिकडे मराठीत प्रविष्ट झालेल्या अनेक द्राविड शब्दांचाही समावेश आहे. त्याने आपल्या ग्रंथात पक्षी-खग-मृगादी वर्गात कुत्र्याचे पर्यायशब्द पुढीलप्रमाणे नोंदविले आहेत–

सुणा, कूतर, कुत्राही, कुतरा, तीं यथास्वरीं ॥
वाघ्या, तो बाल भाषेंत कुत्ताही म्हणिजे तसे ॥

या श्लोकात वाघ्या हा शब्द कुत्रा या अर्थाने आलेला असून, तो प्राण्याच्या संदर्भात आहे, खंडोबाच्या उपासनेच्या संदर्भात नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. या उल्लेखावरून हे स्पष्ट होत आहे, की वाघ्या म्हणजे कुत्रा. वाघ्या हा खंडोबाच्या परिवारातील कुत्र्याचा मानव-स्वरूपातील आविष्कार आहे. गोंधळी हा जसा मुळात भूतमातेच्या परिवारातील भूताचा, पिशाचाचा मानवी आविष्कार होता, तसाच हा वाघ्याचा प्रकार आहे.

मराठीत वाघ्या या शब्दाचे वाघाशी ध्वनिसाम्य आहे. तसेच वाघ्याच्या गळ्यात वाघाच्या कातड्याची पिशवी असते. चिन्ह वाघाचे आणि नाव व वर्तन कुत्र्याचे, अशी ही विसंगती आहे. या विसंगतीची कल्पना खंडोबाच्या जुन्या भाविक भक्तांनाही असावी. कारण 'जयाद्रिमाहात्म्य' नामक एका ग्रंथात या विसंगतीचे स्पष्टीकरण देणारी एक अद्भुत कल्पित कथा दिली असून, तिच्यातील आशयानुसार वाघ्या म्हणजे वाघाचे कुत्र्यात झालेले रूपांतर असल्याचे म्हटले आहे.

एकनाथांच्या भारुडात वाघ्या-मुरळ्यांवर काही भारुडे आहेत. त्यांपैकी एका भारुडात वाघ्याच्या भूमिकेतून नाथ लिहितात–

अहं वाघ्या सोहं वाघ्या प्रेमनगारा वारी।
सावध होउनी भजनीं लागा देव करा कैवारी।
मल्लारीची वारी माझ्या मल्लारीची वारी ॥
इच्छामुरळीस पाहूं नका पडाल नरकद्वारी।
बोधबुधली ज्ञानदिवटी उजळा महाद्वारी॥
आत्मनिवेदन रोडगा निवतील हारोहारी।
एका जनार्दनी धन्य खंडेराव त्यावर कुंचा वारी॥

एकनाथांप्रमाणेच अन्य अनेक संतांनी वाघ्या-मुरळ्यांवर पारमार्थिक रूपके रचली आहेत. [म. लो. उ.]

वाचस्पती मिश्र (१) (इ. स. चे ९ वे शतक) एक प्रकांड पंडित व टीकाकार. हा ब्राह्मण असून, मिथिलेचा रहिवासी होता. मिथिलेचा राजा नृग याचा त्याला आश्रय होता. याच्या गुरूचे नाव त्रिलोचन असे होते.

वैशेषिक दर्शन सोडून इतर सर्व दर्शनांवर याने टीका लिहिल्या आहेत. प्रत्येक दर्शनावर याने आपले स्वतंत्र विचार प्रकट केले आहेत. म्हणून याला सर्वतंत्रस्वतंत्र अशी गौरवपूर्ण उपाधी मिळाली होती. त्याच्या काळातील हा अद्वैतमताचा सर्वश्रेष्ठ आचार्य होता. त्याच्या नंतरच्या सर्व आचार्यांनी त्याची मते प्रमाण मानली आहेत. शांकरभाष्यावर याने भामती नामक टीका लिहिली आहे. शांकरमत समजून घेण्यासाठी या टीकेचे अध्ययन आवश्यक मानलेले आहे. याच्या विद्वत्तेचा बोलबाला झाल्यामुळे याला राजसन्मान प्राप्त झाला आणि याला आर्थिक सहाय्य मिळू लागले. आर्थिक स्थैर्य लाभल्यामुळे याने निश्चिंत मनाने ग्रंथलेखनाला प्रारंभ केला.

ग्रंथलेखनात हा किती तन्मय होत असे आणि त्या वेळी बाह्य जगाचा त्याला किती विसर पडत असे, यासंबंधी एक आख्यायिका सांगतात, ती अशी–

एकदा शारीरक भाष्यावर टीका लिहीत असता रात्री त्याच्या खोलीतील दिवा विझला. त्याच्या पत्नीने घरातून येऊन दिवा पुन्हा लावला व काही वेळ ती तिथे तशीच उभी राहिली. तिला उभी राहिलेली पाहून वाचस्पती मिश्राने तिला विचारले. 'तू कोण आहेस?' पत्नीने उत्तर दिले. 'मी आपली दासी आहे.' त्यावर त्याने पुन्हा विचारले. 'तुला माझ्याकडे काही मागायचे आहे का?' तिने उत्तर दिले. 'पतिसेवा हा हिंदू स्त्रीचा परम धर्म आहे. आपल्या चरणांची सेवा करायला मिळाल्यामुळे माझे जीवन कृतार्थ झाले आहे. मला दुसरी कोणतीच इच्छा नाही. आपल्या चरणांवर मस्तक ठेवून आपल्या आधी या जगाचा निरोप घ्यावा, एवढीच माझी इच्छा आहे.' ते बोलणे ऐकून ही आपली पत्नी आहे, हे त्याच्या ध्यानात आले व वाचस्पती फार खूष झाला.

तो तिला म्हणाला. 'हिंदू स्त्रियांमध्ये तू आदर्श आहेस. हा देह क्षणभंगुर आहे. त्याचा नाश होणारच आहे. पण मी तुला अमर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

करील. माझी ही टीका तुझ्या भामती या नावानेच प्रसिद्ध होईल.' अशा प्रकारे त्याने आपल्या शांकरभाष्यावरील टीकेचे नाव भामती असे ठेवले आणि पत्नीचे नाव अमर केले. लोकही त्याला भामतीकार म्हणूनच ओळखू लागले.

वाचस्पती मिश्राने वेदान्तावर भामती, सुरेश्वराच्या ब्रह्मसिद्धीवर ब्रह्मतत्त्वसमीक्षा, सांख्यकारिकांवर तत्त्वकौमुदी, पातञ्जलदर्शनावर तत्त्ववैशारदी, न्यायदर्शनावर न्यायवार्तिकतात्पर्य व न्यायसूचीनिबंध, भाट्टमतावर तत्त्वबिंदू व मण्डनमिश्राच्या विधिविवेक नामक ग्रंथावर न्यायकणिका नामक टीका लिहिली आहे.

न्यायवार्तिकाचा गूढार्थ विशद करून सांगण्यासाठी वाचस्पतीने तात्पर्यटीका रचली. ही टीका विद्वानांना इतकी पसंत पडली, की तात्पर्याचार्य या नावाने तो न्यायजगात प्रसिद्ध झाला. याची भाषा प्रौढ, प्रांजल व प्रभावशाली आहे. त्याची प्रतिपादनशैली दृढ आहे. निरनिराळ्या दर्शनांवर टीका लिहिताना त्या त्या दर्शनांचे सिद्धान्त त्याने निःपक्षपातीपणाने मांडले आहेत. मात्र शांकरसिद्धान्ताकडे त्याचा अधिक कल होता आणि त्याचा प्रचार करण्यातही त्याचा बराच वाटा होता. त्याची भामती टीका हा अद्वैतदर्शनाचा एक प्रामाणिक ग्रंथ मानला गेला आहे.

वाचस्पती मिश्र हा केवळ विद्वान नव्हता, तर उच्च कोटीचा साधकही होता. त्याने आपला प्रत्येक ग्रंथ भगवंताला अर्पण केला आहे. यावरून त्याची आध्यात्मिक वृत्ती दिसून येते. सुरेश्वराचार्यांनी याच्या रूपाने पुन्हा जन्म घेतला होता, असा काही लोकांचा विश्वास आहे. [म. च. को.; मी. द.; भा. द.; हिंदुत्व]

(२) (इ. स. चे १५ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा मिथिलेचा रहिवासी होता. हा अभिनव वाचस्पती मिश्र या नावानेही प्रसिद्ध आहे. हा राजा बहिरवेंद्र व रामभद्र यांच्या दरबारात होता. महाराजाधिराज हरिनारायण व त्याचा पुत्र रामभद्रदेव उर्फ रूपनारायण यांचा हा पारिषद होता. पारिषद म्हणजे धर्मशास्त्रातील अवघड मुद्यांबाबत निर्णय देण्यात राजाला सल्ला देणारा धर्मशास्त्रज्ञ होय. आपल्या आश्रयदात्या राजांची वंशावळ याने आपल्या ग्रंथांत दिली आहे. हा स्वतःला महामहोपाध्याय आणि मिश्र किंवा संमिश्र असे म्हणवीत असे.

याचा विवादचिंतामणी हा ग्रंथ फार प्रसिद्ध आहे. हिंदू कायद्याच्या बाबतीत भारतातील वरिष्ठ न्यायालये या ग्रंथाचा उपयोग करतात. या ग्रंथाव्यतिरिक्त चिंतामणी या नावाचे आणखी दहा ग्रंथ याने लिहिले आहेत. आचारचिंतामणी, आह्निकचिंतामणी, शुद्धिचिंतामणी, कृत्यचिंतामणी, तीर्थचिंतामणी, द्वैतचिंतामणी, नीतिचिंतामणी, व्ययचिंतामणी, शूद्रचिंतामणी व श्राद्ध चिंतामणी अशी त्यांची नावे आहेत. याने निर्णय या नावाचे तिथिनिर्णय, द्वैतनिर्णय व महादाननिर्णय हे ग्रंथही रचले आहेत. याच्या महार्णव या ग्रंथाचे कृत्य, आचार, विवाद, व्यवहार, दान, शुद्धी आणि पितृयज्ञ असे सात भाग आहेत. यांपैकी कृत्यमहार्णव हा ग्रंथ उपलब्ध असून, त्यात सण, उत्सव आणि उपवास यांविषयी माहिती आलेली आहे. गयाश्राद्धपद्धती, चंदनधेनुप्रमाण व दत्तकविधी हे ग्रंथही याने लिहिले आहेत.

आपल्या श्राद्धकल्प किंवा पितृभक्तितरंगिणी या ग्रंथात त्याने आपण तत्त्वज्ञानपर असे दहा ग्रंथ लिहिले आहेत, असे म्हटले आहे. त्यांपैकी अनुमानखण्डटीका (गंगेशाच्या ग्रंथावरील टीका), खण्डनखण्डोद्धार व न्यायसूत्रोद्धार हे तीन ग्रंथ उपलब्ध आहेत.

आपले विवेचन अतिशय विस्तारपूर्वक करणारा म्हणून याची ख्याती आहे. [हि. ध.; म. च. को.]

वाजपेय सप्त सोमसंस्थांपैकी एक महत्त्वाचा सोमयाग. वाजपेय म्हणजे 'बलाचे प्राशन' होय. या शब्दाची व्युत्पत्ती ब्राह्मणात दिली आहे, ती अशी – वाज म्हणजे अन्न. या यज्ञात सोमपान केले असता अन्नप्राप्ती होते, म्हणजे समृद्धी होते, म्हणून हा वाजपेय होय. स्वाराज्यकाम यजमानाने हा यज्ञ करावा, असे वेदात सांगितले आहे. प्रजापती ही या यज्ञातली एक प्रमुख देवता आहे. प्रजापती सतरा अंगांनी बनलेला आहे (श. ब्रा. ५.१.२.११), म्हणून या यज्ञात सतरा संख्येला महत्त्व आहे. या यज्ञाचा प्रारंभ शरदऋतूत करतात. ब्राह्मण व क्षत्रिय या दोघांनाही हा यज्ञ करता येतो.

यज्ञ करण्यापूर्वी यजमानाने सतरा दिवस, तेरा दिवस किंवा तीन दिवस दीक्षा धारण करावी, असे म्हटले आहे. या यज्ञात विनियोग करायचे मंत्र व त्यांचे विधान अनेक संहिता, ब्राह्मणे व सूत्रे यांमध्ये सांगितलेले आहे. यज्ञातील आध्वर्यव प्रयोग यजुर्वेदानुसार व हौत्र प्रयोग ऋग्वेदानुसार होतो. सामगान सामवेदाच्या आधारे केले जाते. ब्रह्मा हा ऋत्विज सामान्यतः अथर्ववेदीय असावा लागतो.

वाजपेयाचे तीन प्रमुख प्रकार आहेत – (१) आप्तवाजपेय, (२) कुरुवाजपेय व (३) संस्थावाजपेय. पहिल्या दोहोंत फार थोडा फरक आहे. तिसऱ्याचे विधान तांड्य ब्राह्मणात व सामवेदाच्या सूत्रांत सांगितले आहे. वाजपेयाचा समावेश सप्तसोमसंस्थांमध्ये होतो. या यज्ञाचे बहुतेक सर्व अनुष्ठान अग्निष्टोमाप्रमाणे असते –

पहिला दिवस – प्रथम मंडप, पात्रे व इतर सामग्री यांची तयारी करतात. यज्ञाला आरंभ होण्यापूर्वी यजमान पत्नीसह काही प्रायश्चित्ते करतो. मग तो गावातील प्रतिष्ठित लोकांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यज्ञाचा संकल्प निवेदित करतो; त्यांनी अनुमती दिल्यावर संकल्प करतो. नंतर गार्हपत्यादी तीन अग्नींसह व ऋत्विजांसह यज्ञमंडपात येऊन तो योग्य त्या जागी अग्नींची स्थापना करतो; नंतर ऋत्विजांचे वरण व त्यांची मधुपर्कविधीने पूजा करतो. त्यानंतर सर्व ऋत्विज आपापल्या कामाला लागतात.

दुसरा दिवस–यात प्रवर्ग्यसंभरण करतात. त्यासाठी अनेक प्रकारचे साहित्य मंडपात आणून ठेवतात. महावीर नामक मातीचे उभट भांडे तयार करून ते भाजून घेतात. सतरा हात उंचीचा यूप तोडून आणतात. यूप बेलाच्या झाडाचा करतात. यजमान वपन करवून स्नान करतो व नवे रेशमी वस्त्र परिधान करतो. यजमानपत्नीही रेशमी वस्त्र नेसते. मग यजमान अंगाला लोणी लावून डोळ्यात काजळ घालतो. नंतर तो पत्नीसह प्राग्वंशमंडपात प्रवेश करतो.

दीक्षाविधीनंतर दीक्षणीया नावाची इष्टी करतात. हिचे विधान दर्शपूर्णमासाप्रमाणे असते. ती झाल्यावर वेदीमध्ये एक कृष्णाजिन पसरून यजमान त्यावर बसतो. अध्वर्यू यजमानाला मेखला व यजमानपत्नीला जाळी आणि योक्त्र देतो. यजमानाला हरणाचे शिंग व उंबराचा दंड देतो. मग 'हा यजमान आता दीक्षित झाला' असे उद्घोषिले जाते.



वाजपेय यज्ञाचा मंडप

तिसरा दिवस–प्रायणीया नावाची इष्टी होते. मग सोम विकत घेऊन तो गाडीतून यज्ञमंडपात आणतात. सोमराजाच्या स्वागतासाठी आतिथ्येष्टी करतात. मग पूर्वद्वाराने सोमराजाला प्राग्वंशमंडपात आणून आहवनीयाच्या दक्षिणेस ठेवतात. त्याच्या भोवती वस्त्र गुंडाळल्यावर त्याची मधुपर्कविधीने पूजा करतात.

प्रवर्ग्याला सुरुवात करताना प्राग्वंशाची सर्व दारे बंद करतात. मग अध्वर्यू ब्रह्म्याची अनुज्ञा घेऊन ऋत्विजांना आपापली कामे करायला सांगतो. महावीरात आज्य घालून त्याचे उपस्थान करतात. मग त्यात आज्यासह शेळीचे दूध घालून महावीर तापवतात. त्या आज्यमिश्रित दुधाला घर्म म्हणतात. त्याचा आहवनीयावर याग करतात. त्या वेळी प्रतिप्रस्थाता अग्नीवर अध्वर्यूने धरलेल्या महावीरात दही घालतो. नंतर सर्व प्रवर्ग्यपात्रे आसंदीवर ठेवून देतात. नंतर उपसदिष्टी होते. ही इष्टी दर्शपूर्णमासेष्टीसारखीच असते. त्यानंतर सोमयागासाठी ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आवाहन केले जाते. याला सुब्रह्मण्याह्वान म्हणतात.

चौथा दिवस – या दिवशी प्रवर्ग्याचे अनुष्ठान करून नंतर महावेदी तयार करतात. तिच्यात पूर्वेकडे एक चौरस ओटा बनवतात, त्याला उत्तरवेदी म्हणतात. मग प्रवर्ग्याची पुनरावृत्ती होते.

पांचवा दिवस – प्रवर्ग्याचे अनुष्ठान करून नंतर सर्व प्रावर्ग्य पात्रांचे उत्तरवेदीवर उद्वासन करतात. मग उत्तरवेदीवर समंत्रक अग्निप्रणयन होते. मित्रावरुणासाठी आमिक्षा तयार करतात. मग हविर्धानशकट नावाचे दोन गाडे तयार करतात. त्यांपैकी एका गाड्यावर सोमराजा व दुसऱ्या गाड्यावर पूतभृत आणि आधवनीय नावाचे मातीचे घडे ठेवतात. दक्षिणेकडील हविर्धानशकटापुढे उपरव नावाचे चार खड्डे तयार करतात. हविर्धानमंडपाच्या पश्चिमेला सदोमंडप तयार करतात. नंतर वैसर्जन होम करतात. त्यानंतर अग्नीषोम देवतेसाठी पशुयागाचे अनुष्ठान सुरू होते. पशूला बांधण्यासाठी सतरा अरत्नी लांबीचा यूप उभारतात व त्याला सतरा वस्त्रे गुंडाळतात. पशूला अग्नीसह प्रदक्षिणा करतात. नंतर त्याचा श्वासनिरोध करून त्याला मारतात. त्यांची वपा काढून तिचा याग करतात. मग पशुपुरोडाशाचे हवन करतात. त्याचा याग झाल्यानंतर पशूच्या निरनिराळ्या अंगांचे अग्नीत हवन करतात. हुतशेषाचे यजमान व विशिष्ट ऋत्विज भक्षण करतात. एवढे झाल्याने पशूचे अनुष्ठान समाप्त होते.

सहावा दिवस – याला सुत्याह किंवा सवनीय दिवस म्हणतात. या दिवशी सर्व ऋत्विज सुवर्णाच्या कंठ्या गळ्यांत घालतात. होता नामक ऋत्विज प्रातरनुवाकसंज्ञक मंत्रसमूह पठण करतो. नंतर सोम कुटून त्याचा रस काढतात व तो गाळून घेतात. निरनिराळी पात्रे सोमरसाने भरून घेतल्यावर सतरा पात्रे सुरेने भरून घेतात. मग इंद्राग्नी व इंद्र यांच्यासाठी प्रत्येकी एक बोकड, मरुतांसाठी अंगावर ठिपके असलेली वशा (वांझ गाय), सरस्वान देवतेसाठी मेष, सरस्वतीसाठी मेंढी व प्रजापतीसाठी सतरा बोकड यांचे हवन करून, त्यांच्या वपांचा याग करतात. नंतर सोमरसाचे हवन करतात. त्या वेळी होता आज्यशस्त्रसंज्ञक विशिष्ट मंत्रसमूह म्हणतो. प्रातःसवनात पाच स्तोत्रे व पाच शस्त्रे म्हटली जातात. सोमरसाचे हवन झाल्यावर अध्वर्यू प्रायश्चित्ताहुती घालतो. मग त्याच्या प्रेरणेवरून मैत्रावरुण सर्व ऋत्विजांना सदोमंडपाच्या बाहेर जाण्यास सांगतो.

नंतर माध्यंदिन सवनाचे अनुष्ठान सुरू होते. हे बरेचसे प्रातःसवनाप्रमाणे असते. आहवनीयाच्या पूर्वेस पूर्वाभिमुख असे सतरा रथ सिद्ध करतात. समाजातील पुढारी, विद्वान, वगैरे सतराजण या रथांत बसतात. त्यांना वाजसृत असे म्हणतात. प्रत्येक रथाला तीन घोडे जोडतात. यानंतर त्या रथांच्या शर्यतींचे अंतर मोजतात. एक क्षत्रिय धनुर्धारी पूर्वेकडे किंवा उत्तरेकडे बाण सोडतो. जिथे बाण पडला असेल तिथे जाऊन पुन्हा दुसरा बाण सोडतो. याप्रमाणे सतरावा बाण पडेल, तिथे एक उंबराची मेढ पुरली जाते. हे शर्यतीचे अंतिम स्थान होय. नंतर सर्व ऋत्विजांना दक्षिणा दिली जाते. निष्क, घोडे, हत्ती, गाई, यान, शयन, वस्त्रे, शेळ्या, इ. सतरा प्रकारच्या दक्षिणा असतात. नंतर शर्यतीस सुरुवात होते. या शर्यतीत यजमानाचा रथ पुढे जातो. उंबराच्या मेढीपर्यंत गेल्यावर सर्व रथ उजव्या बाजूने वळतात व जाग्यावर परत येतात. शर्यत चालू असता एका चाकावर बसून ब्रह्मा सामगान करतो. यजमान व यजमानपत्नी सतरा पायऱ्यांच्या शिडीवरून यूपावर चढतात व सूर्याचे उपस्थान करतात. पिंपळाच्या पानात खाऱ्या मातीचे गोटे तयार करून ते लांब कळकांना बांधतात आणि अध्वर्यू, इ. चार प्रमुख ऋत्विज चारही दिशांनी ते गोटे यजमानाच्या मुखाला टोचतात. यजमान यूपावरून खाली उतरतो. मग यजमानास अभिषेक करतात. नंतर सोमरसाचे यजन होते. अध्वर्यू प्रायश्चित्ताच्या आहुती घालतो आणि माध्यंदिन सवनाचे अनुष्ठान समाप्त होते. माध्यंदिन सवनात पाच स्तोत्रे व पाच शस्त्रे म्हटली जातात.

तृतीयसवनाचे वेळी हविर्धान मंडपाची दारे बंद करून आदित्यग्रहाचा याग करतात. मग मागच्या सवनातल्या सोमाचा चोथा कुटून त्याचा रस गाळून घेतात. मग अध्वर्यू पशूंच्या शिजलेल्या अंगांचे हवन करतो. नंतर तो सोमरसाचे यजन करतो. याच वेळी मार्जालीयावर सुरेची पात्रे नेऊन त्यांतील थोडा भाग तेथे ओततात. नंतर रथांत बसणारे लोक सुरा प्राशन करतात; मग चरूचा याग करतात. नंतर प्रायश्चित्ताहुती झाल्यावर तृतीयसवनाचे अनुष्ठान समाप्त होते. तृतीयसवनात सात स्तोत्रे व सात शस्त्रे म्हटली जातात. सतराव्या स्तोत्राचे नाव वाजपेयसाम असेच आहे. म्हणून या यज्ञास वाजपेय असे म्हणतात.

मग अवभृथासंबंधी अनुष्ठान सुरू होते. यजमान, यजमानपत्नी व अध्वर्युप्रभृती सर्व ऋत्विज अवभृथस्नानाला जाण्यासाठी मंडपाबाहेर पडतात. जलाशयावर गेल्यावर वरुणदेवतेप्रीत्यर्थ ते पुरोडाशाचा याग करतात. आणि सोमवल्लीच्या चोथ्यावर दह्याच्या आहुती देतात. मग यजमानासह सर्व ऋत्विज स्नान करतात. यजमान कमरेला बांधलेली मेखला सोडून टाकतो व यजमानपत्नी आपल्या कमरेचे योक्त्र सोडून टाकते. नंतर ती दोघे नवी वस्त्रे परिधान करतात. मग सर्वजण मागे वळून न पाहता हातांत उंबराच्या समिधा घेऊन यज्ञभूमीवर परत येतात. मग त्या समिधा आहवनीयात टाकून उपस्थान करतात. नंतर उदयनीयेष्टी, अनुबंध्यायाग व सक्तुहोम करतात. मग यजमान अरणींच्या ठिकाणी अग्नींचा समारोप करून यज्ञस्थलातून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वगृही जातो. अशा प्रकारे वाजपेय यज्ञाचे अनुष्ठान समाप्त होते.

वाजपेय यज्ञ केल्यानंतर यजमानाला श्वेत छत्र धारण करण्याचा अधिकार प्राप्त होतो. वाजपेयकर्त्या यजमानाने कोणाविषयीही आदर दाखविण्यासाठी उठून उभे राहू नये, असे सांगितले आहे.

वाजपेय हा यज्ञ एके काळी लोकप्रिय होता. तो ब्राह्मण किंवा क्षत्रिय पुरुष करीत, असे शतपथ ब्राह्मणात म्हटले आहे (५.१. ५.२-३). वाजपेय हा राजसूयापेक्षा श्रेष्ठ असल्याचे काही ग्रंथकार म्हणतात; तर काही ग्रंथकार तो ब्राह्मण पुरोहिताने करायच्या बृहस्पतिसवाचा आणि राजाने करायच्या राजसूययज्ञाचा प्रास्ताविक भाग असल्याचे सांगतात. बृहस्पतिसव आणि वाजपेय एकच आहेत, असे शतपथात म्हटले आहे. वाजपेय केल्यावर सौत्रामणी नावाचा यज्ञ करावा, असेही काही सूत्रांत म्हटले आहे. शांखायन श्रौतसूत्रांत, हा यज्ञ कोणीही आर्य पुरुष करू शकतो, असे म्हटले आहे. ब्राह्मणकाळात कोण्याही ब्राह्मणाला पुरोहित म्हणून नेमण्यापूर्वी त्याला वाजपेय करावा लागत असे. राजे लोक विजय व सत्ता प्राप्त होण्यासाठी हा याग करीत. वाजपेय व सौत्रामणी या दोनच यज्ञांत सुरा तयार करण्यास सांगितले आहे.

पुढच्या काळात हा यज्ञ सम्राटाने करायच्या राजसूय यज्ञाच्या अगोदर करण्याची प्रथा निर्माण झाली. या यज्ञाला आरंभी राजकीय महत्त्व नव्हते. पण वेदोत्तरकाळात ते महत्त्व त्याला प्राप्त झाले. सूत्रकाळात हा यज्ञ ब्राह्मणांनीच करावा, अशी समजूत निर्माण झाली. वाजपेयाविषयी जातकांत मुळीच उल्लेख नाही आणि कौटिल्यानेही त्याचा उल्लेख केला नाही. इतिहासकाळात वाकाटक नृपती प्रवरसेन याने वाजपेय यज्ञ केल्याचा निर्देश आढळतो.

इ. स. १९५५ साली पुणे येथे वाजपेय यज्ञाचा एक महान धर्ममहोत्सव करण्यात आला. या यज्ञाचे यजमान श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट हे होते. त्यांनी त्यापूर्वी सप्तसोमसंस्थांपैकी सहा सोमसंस्था पूर्ण केल्या होत्या. हा शेवटचा वाजपेय यज्ञ करण्याचे भाग्य लाभल्यामुळे त्यांच्याकडून सप्तसोमसंस्थांचे अनुष्ठान पूर्ण झाले. या यज्ञाच्या प्रयोगाचे संचालन गोकर्ण क्षेत्रातील निष्णात वेदरत्न गणेशशास्त्री खरे यांनी केले.

हा महायज्ञ उत्तम रीतीने पार पाडण्यासाठी सत्तावान सभासदांची एक समिती स्थापन करण्यात आली होती. श्री. मा. श्री. अणे यांची अध्यक्ष म्हणून व म. म. द. वा. पोतदार यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड झाली होती. या वाजपेय यज्ञाला अखिल भारतीय प्रसिद्धी लाभली व यज्ञानुष्ठान सूत्रोक्त पद्धतीने व समृद्धपणे पार पडले. या वाजपेय यज्ञाचा लघुचित्रपट घेण्यात आला, त्याच्या माहितीचे पुस्तकही छापण्यात आले व अशा प्रकारे यज्ञसंस्थेचा जनतेला परिचय करून देण्यात आला. [वाजपेय यज्ञ – वाजपेय अनुष्ठान समिति, पुणे, १९५६]

वाजमाध्यंदिन ब्राह्मण विदर्भ, खानदेश, मराठवाडा व आंध्राचा काही भाग, या ठिकाणी हे आढळतात. त्यांची काश्यप, वत्स, भारद्वाज, गार्ग्य, इ. गोत्रे आहेत. पारस्कर गृह्यसूत्रानुसार त्यांचे संस्कार होतात. मातापूरची जगन्माता, शहादे देवी, खंडोबा, रेणुका, इ. त्यांच्या कुलदेवता आणि रामकृष्ण व बालाजी हे उपास्य देव आहेत.

वाजमाध्यंदिनांची उत्पत्ती आभीरांपासून झाली, असा एक समज होता. त्यामुळे लोक त्यांना हिणवीत असत. त्याचप्रमाणे श्रीरामाने वनात श्राद्ध करण्यासाठी त्यांना उत्पन्न केले, असे वृहज्ज्योतिषार्णव, पांक्तापांक्तार्थदीपिका, इ. ग्रंथांवरून कळते. परंतु हे ग्रंथ अर्वाचीन असल्यामुळे त्यांना प्रामाण्य मिळाले नाही. संकेश्वरच्या व करवीरच्या पीठाधीशांनी त्यांचे सद्ब्राह्मण्य मान्य केले आहे. [वर्ण व जाती – श्री. मो. वि. पटवर्धन, १९६६]

वाजसनेय संहिता शुक्ल यजुर्वेदाची एक संहिता. वाजी म्हणजे घोडा. त्याचे रूप धारण करून सूर्यदेवाने याज्ञवल्क्याला ही संहिता दिली, म्हणून हिचे नाव वाजसनेय असे पडले. माध्याह्न काली दिली म्हणून किंवा याज्ञवल्क्याचा शिष्य मध्यंदिन याने या संहितेचा प्रचार केला म्हणून हिला माध्यंदिन असेही म्हणतात. या संहितेत ४० अध्याय, ३०३ अनुवाक व १९७५ कंडिका किंवा मंत्र आहेत. चरणव्यूहाच्या मते हिच्यात १८०० आणि चिंतामणराव वैद्य यांच्या मते १९०० मंत्र आहेत. यातील पहिल्या अध्यायाचा व शेवटच्या अध्यायाचा ऋषी दध्यङ् आथर्वण हा असल्याचे सांगितले आहे. अजमेर येथे छापलेल्या प्रतीत शेवटच्या अध्यायाचा ऋषी दीर्घतमा सांगितला आहे.

प्रस्तुत संहितेचे शेवटचे १५ अध्याय विषयाच्या निराळेपणामुळे मागाहून जोडले असावे, असा डॉ. केतकर यांचा अंदाज आहे.

पहिल्या व दुसऱ्या अध्यायात दर्शपूर्णमास व पिंडपितृयज्ञ यांचे मंत्र आहेत. तिसऱ्या अध्यायात नित्य अग्न्याधान व प्रातःसायंकालीन अग्निहोत्र होम; तसेच चार महिन्यांनी करण्याचे चातुर्मास्य यज्ञ यांविषयी माहिती दिली आहे. चार ते आठ या अध्यायांत सोमयज्ञ व त्यांतील पशुयज्ञ यांविषयी मंत्र आहेत. नऊ व दहा या अध्यायांत राजसूय आणि सौत्रामणी या यागांचे वर्णन आहे. अकरा ते अठरा या अध्यायांत अग्निचयन व त्यांचे मंत्र आहेत. एकोणीस ते एकवीस या अध्यायांत सौत्रामणी यागाचा विधी सांगितला आहे. या मंत्रांमध्ये, या यागात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

सोमाच्या ऐवजी सुराच घ्यावी आणि ती अश्विनी, सरस्वती व इंद्र या देवतांना अर्पण करावी, असे म्हटले आहे. बावीस ते पंचवीस या अध्यायांत अश्वमेधाचे मंत्र देऊन पृथ्वीपती व पराक्रमी राजा यांनीच हा यज्ञ करावा, असे सांगितले आहे.

सव्वीस ते पस्तीस या अध्यायांना खिल म्हणजे पुरवणी असे म्हणतात. प्राचीन परंपरेतही या अध्यायांना खिल असेच म्हटले आहे. या विभागातील तिसाव्या अध्यायात पुरुषमेधाचे वर्णन आहे. पुरुषमेध म्हणजे पुरुषाला यज्ञीय पशू बनवून करायचा यज्ञ होय. पण असा यज्ञ क्वचितच होत असला पाहिजे. म्हणून तर मंत्र प्रतीकात्मक समजायला हवे. एकतिसाव्या अध्यायात पुरुषसूक्त दिले असून, त्यात विश्वोत्पत्तीचा उल्लेख आहे व पुरुष आणि विश्व एकच असल्याचे प्रतिपादिले आहे. पुरुषमेध यज्ञामध्ये ब्रह्मा हा ऋत्विज हे सूक्त म्हणतो. याला तिथे उपनिषद म्हटले आहे. बत्तिसाव्या अध्यायाची रचना पाहता तेही एक उपनिषदच आहे. बत्तीस ते चौतीस या अध्यायांतील मंत्रांचा विनियोग सर्वमेध यज्ञात करतात. हा सर्वश्रेष्ठ यज्ञ असून, यात यजमान ऋत्विजांना सर्वस्वाचे दान करून वानप्रस्थ स्वीकारतो, असे म्हटले आहे. पस्तिसाव्या अध्यायात अग्निहोत्र्याच्या प्रेतसंस्काराचे मंत्र आहेत.

छत्तीस ते अडतीस या अध्यायांत प्रवर्ग्य नामक कर्माचे, अश्वमेधातील काही शिल्लक राहिलेले, काही अग्निचयन कर्मापुरते व काही शांतिपाठाचे मंत्र आहेत. एकोणचाळिसाव्या अध्यायात प्रेतकर्म व अश्वमेध यातील अवशिष्ट मंत्र आले आहेत. या संहितेचा शेवटचा चाळिसावा अध्याय म्हणजे ईशावास्य उपनिषद होय.

प्रस्तुत संहितेतील काही मंत्र पद्यात्मक व काही गद्यात्मक आहेत. गद्य मंत्रांना यजुस् अशी संज्ञा आहे. त्यावरूनच ही संहिता यजुर्वेदाची ठरली आहे. हे यजुर्मंत्र लयबद्ध असून, काही ठिकाणी प्रासादिकही आहेत. स्थूल मानाने ही संहिता कृष्णयजुर्वेदाच्या एक तृतीयांश व ऋग्वेदाच्या एक पंचमांश इतकी आहे. हिच्यातला काही पद्यभाग ऋग्वेदातही आढळतो.

वाजसनेय संहिता याज्ञवल्क्याला सूर्याकडून मिळाली व त्याचा पूर्वीचा गुरू वैशंपायन याच्या परिपाठात नसलेले, अयातयाम म्हणजे अगदी नवे यजुर्मंत्र सूर्याने याज्ञवल्क्याला दिले, अशी कथा भागवतपुराणात दिलेली आहे. ती पूर्णपणे खरी मानायची तर वैशंपायनप्रणित कृष्णयजुर्वेदात न आढळणारे मंत्र प्रस्तुत संहितेत दिसले पाहिजेत; पण तसे ते दिसत नाहीत. प्रस्तुत संहितेत कृष्णयजुर्वेदातील मंत्रांची पुनरावृत्ती बरीच झाली आहे. कुठे कुठे तर कृष्णयजुर्वेदातील मंत्रांचे गटच्या गट समाविष्ट केलेले आहेत. काही ठिकाणी मूळ मंत्रातली पदे कमी केली आहेत, तर काही ठिकाणी एखादे नवे पद त्यात घातलेले आहे.

वाजसनेय संहितेतील मंत्रांचा प्रतिपाद्य विषय मुख्यत्वे यज्ञसंस्था हा आहे. प्रस्तुत संहितेचे इतिहासाच्या दृष्टीने व व्यावहारिक दृष्टीने फार महत्त्व आहे. याविषयी श्रौताचार्य धुंडिराजशास्त्री बापट यांनी सुबोध विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

शुक्ल यजुःसंहितेच्या मंत्रवाङ्मयाचा महत्त्वाचा उपयोग म्हणजे त्यावरून इतिहासाचे ज्ञान होते, हा आहे. उदा० पुरोहित हा शब्द घेऊ. वैदिक वाङ्मयात या शब्दाला मोठाच मोठा मान आहे. पुरोहित म्हणजे राष्ट्रकार्यधुरंधर असा पुढारी होय. नवव्या अध्यायाच्या मंत्रांत पुढील मंत्रभाग आला आहे –

वयं राष्ट्रे जागृयाम पुरोहिताः ।

अर्थ – आम्ही पुरोहित होऊन राष्ट्रामध्ये सदैव जागृत राहू.

आपले राष्ट्र उन्नतीच्या मार्गाने जाते का अवनतीच्या मार्गाने जाते याबद्दल तत्कालीन पुरोहित जागृत असत व योग्य वेळी राजाला योग्य तो सल्ला देऊन त्याची राष्ट्रनियंत्रणशक्ती कार्यक्षम राहील, अशी दक्षता घेत असत. पुढील मंत्रात या गोष्टीचे दिग्दर्शन आहे (शु. यजु. ११.८१)–

संशितं मे ब्रह्म संशितं वीर्यं बलम् ।
संशितं क्षत्रं जिष्णु यस्याहमस्मि पुरोहितः ।।

भावार्थ – शास्त्रशुद्ध आचरणाने मी आपले ब्राह्मण्य (ब्रह्मतेज) अतिशय तीक्ष्ण, कडकडीत राखले आहे. मी आपले शरीरसामर्थ्य व सर्व इंद्रियांच्या शक्ती सतत कार्यक्षम ठेवल्या आहेत. इतकेच नव्हे, तर ज्या राजाचा मी पुरोहित आहे, त्या राजाचे जयशाली असणारे क्षात्रतेज मी अत्यंत तीव्रतेने वृद्धिंगत केले आहे.

तत्कालीन पुरोहितांच्या आकांक्षा किती उच्च प्रकारच्या असत, ते पुढील मंत्रात (शु. यजु. ११.८२) व्यक्त झाले आहे–

उदेषां बाहू अतिरमुद्वर्चो अथो बलम् ।
क्षिणोमि ब्रह्मणाऽमित्रानुन्नयामि स्वाँ अहम् ।।

भावार्थ – स्वराष्ट्रसंरक्षणासाठी राष्ट्रातील वीर पुरुषांचे बाहू जेणे करून सदैव उभारलेले (सज्ज) असतील, अशी परिस्थिती मी निर्माण केली आहे. माझ्या राष्ट्रातील वीरांच्या मुखावरील वीरश्री व त्यांचे शरीरबल ही मी अत्यंत उज्ज्वल करून सोडली आहेत. माझ्या राष्ट्राविरुद्ध असलेल्या शत्रूंना मी आपल्या मंत्रसामर्थ्याने (मुत्सद्दीपणाच्या धोरणाने) क्षीण करून टाकीन आणि माझ्या राष्ट्रबांधवांना मी उत्कर्षाच्या शिखरावर नेऊन पोचवीन.

प्रस्तुत संहितेत काही प्रार्थनामंत्र असून, ते साधे, सरळ आणि सुबोध असे आहेत. त्यांत राष्ट्रीय वृत्तीचे प्रत्यंतर दिसून येते.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

**वाममद्य सवितर्वाममु श्वो दिवेदिवे वाममस्मभ्यं सावीः ।
वामस्य हि क्षयस्य देव भूरेरया धिया वामभाजः स्याम ॥**
(शु. यजु ८.६)

भावार्थ – सर्वांना प्रेरणा देणाऱ्या सवितृदेवा, आज केलेल्या सत्कर्माचे उपभोग्य असे फल आम्हांला आज दे व उद्या आम्ही जे सत्कर्म करू त्याचे उपभोग्य फल उद्याच आम्हांला दे. त्याचप्रमाणे परवांच्या दिवसांपासून प्रतिदिन आम्ही जे जे सत्कर्म करू, त्याचे उपभोग्य असे फल तू आम्हांला प्रतिदिन देत जा. कारण अशा प्रकारे ज्या दिवशी केलेल्या सत्कर्माचे फल त्या दिवशीच देत गेलास म्हणजे 'केलेल्या कर्माचे फल तू तत्काल देतोस' अशा विश्वस्त बुद्धीने उपभोग्य अशा स्वर्गलोकाच्या ठिकाणी आमचे दीर्घकाल वास्तव्य व्हावे म्हणून आम्ही नेहमी आचरणीय अशा यज्ञकर्माचे अनुष्ठान करणारे होऊ.

**भूर्भुव स्वः सुप्रजाः प्रजाभिः स्यां सुवीरो वीरैः सुपोषः पोषैः
नर्य प्रजां मे पाहि शंस्य पशून्मे पाह्यथर्य पितुं मे पाहि ॥**
(शु. यजु. ३.३७)

भावार्थ – हे अग्ने, भूः भुवः स्वः या तीन व्याहृतिरूपी असा तू आहेस. म्हणून तुझ्या प्रसादाने मी बंधुभृत्यादी प्रजेने युक्त व अनुकूल व प्रजावान होईन; हिरण्यादी द्रव्याने पुष्टिमान होईन. हे मनुष्यांचे हित करणाऱ्या गार्हपत्य अग्ने, माझ्या प्रजेचे रक्षण कर. अनुष्ठान करणाऱ्यांनी स्तुती करण्यास योग्य अशा हे आहवनीय अग्ने, माझ्या प्रजेचे रक्षण कर. हे अथर्व म्हणजे सर्वदा राहणाऱ्या दक्षिणाग्ने, आमच्या अन्नाचे रक्षण कर.

ज्याला वैदिक राष्ट्रगीत असे म्हणणे योग्य ठरेल, असा एक गद्य मंत्र प्रस्तुत संहितेत आहे, तो असा –

आ ब्रह्मन्ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामा राष्ट्रे राजन्यः शूर इषव्योऽतिव्याधी महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरन्धिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायतां निकामेनिकामे नः पर्जन्यो वर्षतु फलवत्यो न ओषधयः पच्यन्तां योगक्षेमो नः कल्पताम् ॥
(शु. यजु. २२.२२)

अर्थ – हे ब्रह्मदेवा, आमच्या राष्ट्रात वेदाध्ययनशील ब्राह्मण उत्पन्न होवो; पराक्रमी, धनुर्धारी, शत्रूंचा वेध करणारा व महारथी असा क्षत्रिय उत्पन्न होवो; दूध देणारी धेनू, गाडा वाहणारा बैल, शीघ्रगामी घोडा व सर्वगुणसंपन्न स्त्री उत्पन्न होवो. तसेच रथ चालवणारा, जयशील पुरुष आमच्या राष्ट्रात उत्पन्न होवो. या यजमानाला तरुण व सभेत बसण्यास योग्य असा वीरपुत्र होवो. आम्ही जेव्हा जेव्हा इच्छा करू तेव्हा तेव्हा मेघ आमच्यावर वृष्टी करोत. फलयुक्त ओषधी परिपक्व होऊन आम्हांला मिळोत व आमचा योगक्षेम उत्तम रीतीने चालो.

प्रस्तुत संहितेत काही शुभाकांक्षा, काही नीतिवचने व काही सूक्ते आढळतात, त्यांपैकी काही वचने अशी –

(१) ऋतस्य पथा प्रेत (७.४५)
अर्थ – सत्याच्या मार्गाने चला.

(२) अहमनृतात्सत्यमुपैमि । (१.५)
अर्थ – मी असत्यापासून दूर होऊन सत्याकडे जात आहे.

(३) अस्माकं सन्त्वाशिषः सत्याः । (२.१०)
अर्थ – आमच्या आकांक्षा सत्य होवोत.

(४) यशः श्रीः श्रयतां मयि । (२.१०)
अर्थ – माझ्या ठिकाणी कीर्ती व वैभव राहो.

(५) सुसस्याः कृषीस्कृधि । (४.१०)
अर्थ – उत्तम धान्याची शेती करा.

(६) तन्मे मनः शिवसङ्कल्पमस्तु । (३४.१)
अर्थ – माझे मन कल्याणकारी संकल्प करणारे होवो.

(७) भूत्यै जागरणं अभूत्यै स्वप्नम् । (३०.१७)
अर्थ – सर्व विषयीं जागृत राहणे हे वैभव देण्यात कारणीभूत होते आणि आळस किंवा झोपाळूपणा दारिद्र्याला आमंत्रण देणारा होतो.

वाजसनेय शाखेचे ब्राह्मण ष चा उच्चार ख करतात. तसेच त्यांची परंपरा आहे. उदा० – 'सहस्रशीर्षा पुरुषः' असे म्हणण्याऐवजी ते 'सहस्रशीर्खा पुरुखः' असे म्हणतात.

वाजसनेय संहितेवर उव्वट, महीधर, माधव, अनंत देव व आनंदभट्ट यांची भाष्ये आहेत. त्यांतली पहिल्या दोघांची प्रचलित आहेत. [वै. सा.; म. च. को.; म. ज्ञा. को.; शुक्ल यजुर्वेद- धुं. गो. बापट; वेदप्रकाश – श्रीधरशास्त्री पाठक, १९४२]

वाजसनेयी प्रातिशाख्य

हे कात्यायनमुनीने रचले. हा कात्यायन व वार्तिककार कात्यायन हे एक का भिन्न, याविषयी मतभेद आहेत. श्री. बलदेव उपाध्याय यांच्या मते हे दोन वेगवेगळे आहेत. प्रातिशाख्याचा लेखक पाणिनीहूनही प्राचीन आहे. याचा काल सनपूर्व ७००ते ८०० वर्षे हा मानतात.

प्रस्तुत प्रातिशाख्यात आठ अध्याय असून, त्यांत परिभाषा, स्वर व संस्कार या तीन विषयांचे विस्तृत विवेचन आहे. या विवेचनामुळेच कात्यायनाला 'स्वरसंस्कारप्रतिष्ठापयिता' अशी उपाधी मिळाली आहे. ग्रंथाच्या पहिल्या अध्यायात पारिभाषिक शब्दांचे विस्तृत लक्षण दिलेले आहे. दुसऱ्या अध्यायात स्वरांचे लक्षण व वैशिष्ट्य सांगितले आहे. तीन ते सात अध्यायांत संस्कारांचे (संधी) विवेचन आहे. शेवटच्या अध्यायात वर्णांची गणना व त्यांचे स्वरूप यांचे सुंदर विवेचन आहे. याने शास्त्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

काश्यप व शाकटायन या काही पूर्वाचार्यांचा निर्देश केला आहे. कात्यायन व पाणिनी या दोहोंच्या ग्रंथांची तुलना करता असे दिसते, की या दोहोंतही पारिभाषिक शब्दांची एकता आहे. पाणिनीने उपधा, उदात्त, अनुदात्त, इ. पारिभाषिक शब्द या प्रातिशाख्यातूनच घेतले आहेत. दोन्ही ग्रंथांची काही सूत्रे जवळ जवळ सारखी आहेत. उदा० —

(१) वर्णस्यादर्शनं लोपः । (प्राति. १.१४१)
अदर्शनं लोपः । (अष्टा. १.१.६०)

(२) सङ्ख्यातानामनुदेशो यथासङ्ख्यम् । (प्राति. १.१४३)
यथासङ्ख्यमनुदेशः समानाम् । (अष्टा. १.३.१०)

प्रस्तुत प्रातिशाख्यातले अनेक शब्द ऋग्वेदीय प्रातिशाख्याप्रमाणे प्राचीनतर अर्थाने प्रयुक्त आहेत. [वैं. सा.]

वाड एक तेलुगू जात. हे लोक व्यवसायाने कोळी असून, यांची वस्ती ओडिसाच्या गंजाम जिल्ह्यात व आंध्राच्या विशाखापट्टणम जिल्ह्यात समुद्रकिनारी आहे.

हे लोक डोक्याला ताडाच्या पानांची शंकूच्या आकाराची टोपी घालतात व कमरेभोवती लुंगी गुंडाळतात. मोठ्या लोकांना मान देण्यासाठी, त्यांच्यासमोर हे कमरेची लुंगी सोडून ती खांद्यावरून अंगाभोवती गुंडाळतात.

हे लोक अपभ्रष्ट तेलुगू भाषा बोलतात. यांच्या ज्ञातिप्रमुखाला कुलराजू किंवा पिळ्ळा अशी उपाधी असते. जातीसंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निवाडा ज्ञातिप्रमुख करतो. प्रत्येक लग्नाच्या वेळी तो संबंधित व्यक्तीकडून काही पैसे घेतो आणि लग्नसमारंभाची सर्व व्यवस्था करतो.

विवाहप्रथा — या लोकांत मैळपिळ्ळी, गणुपिळ्ळी, सोडूपिळ्ळी, इ. काही कुळ्या असून, एकाच कुळीत विवाहसंबंध होत नाही. मुलाच्या आईबापांनी एखादी मुलगी पसंत केली, की मुलाचे नातेवाईक मुलीच्या घरी जातात. मुलीच्या आईवडिलांना हा संबंध पसंत असेल, तर ते पितळेच्या तांब्यातून त्यांना पाणी देतात. यांचा विवाहविधी इतर तेलुगू जातींच्या विवाहविधीसारखाच असतो.

देवधर्म — हे लोक समुद्रात मासे मारण्यासाठी जातात तेव्हा, समुद्रापासून आपले रक्षण व्हावे, आपल्या होड्या बुडू नयेत व मासे पुष्कळ मिळावे, म्हणून हे अनेक देवदेवतांची पूजा करतात. प्रत्येक कुटुंबाचे बहुधा वेगळे देऊळ असते. देऊळ म्हणजे पुष्कळदा मातीचा एक मोठा घडा असतो. तो पालथा ठेवतात आणि समोरच्या बाजूने त्याचा थोडा भाग फोडून मोकळी जागा करतात व तिच्यात देवप्रतिमा ठेवतात. इतर काही देवळे म्हणजे विटा व चुना यांच्या छोट्या देवळ्या असतात. त्यांत ते देवतांच्या मृण्मय मूर्ती आणि पितरांच्या लाकडी प्रतिमा ठेवतात. सागरावर मच्छिमारी करायला जाण्यापूर्वी आणि एखादी साथ आली असता ते या देवतांची पूजा करतात.

बंगाली बाबू हा त्यांचा देव डोक्याला टोपी घालतो आणि काळ्या घोड्यावर बसतो. तो यांना खूप मासे मिळवून देतो आणि मासेमारी करताना कोणतेही संकट आले, तर त्याचे निवारण करतो. ओरुसंदिअम्म ही त्यांची प्रमुख सागरदेवता आहे. कडुलिंबाच्या झाडापासून तिची मूर्ती बनवली पाहिजे, असा नियम आहे. सागरतीरावरील पुष्कळशी घटमंदिरे हिचीच असतात. ती कोपेल असे कोणतेही कृत्य हे करीत नाहीत. कारण ती कोपली असता होड्या उलटवते, अशी यांची समजूत आहे. रात्री होडीत बसून ती समुद्रावर संचार करीत असते आणि तिच्या बरोबर तिचा भाऊ रामसोंदी हा असतो, अशीही यांची धारणा आहे. प्रत्येक कुटुंब तिची पूजा करते. पूजेच्या वेळी फुले, दोन कापडे, कोंबडा, बकरा, ताडीची बाटली, इ. साहित्य मिरवीत समुद्रकिनारी नेतात. तिथे एक मचाण बांधून त्यावर चुन्याने रंगवलेला घट ठेवतात. त्यात देवीची प्रतिमा ठेवतात व तिची पूजा करतात. तिला कोंबडा, बकरा बळी देतात. प्रत्येक कुटुंबाचे वेगळे घटमंदिर असल्यामुळे समुद्रकिनाऱ्यावर त्यांची लांबच लांब ओळ लागलेली असते.

वाडांचा देव

याशिवाय ते सामलम्म, राजम्म, येरेनम्म, भागीरथम्म, नूकलम्म, भूलोकम्म, इ. अनेक देवतांना भजतात. [का. ट्रा. स. इं.]

वाण एक वेदकालीन तंतुवाद्य. याला शंभर तारा असत. सोमपान करून त्याचा कैफ आल्यावर मरुत हे वाद्य वाजवीत असत, असा उल्लेख ऋग्वेदात आहे (१.८५.१०). याला सायणाने मरुद्वीणा असे म्हटले आहे. या वाद्याचा भोपळा तांबड्या रंगाच्या बैलाच्या कातड्याने मढवीत. याचा

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दांडा उंबराच्या लाकडाचा असून, तारा ओवण्यासाठी भोपळधाच्या कडेला दहा छिद्रे पाडीत. तारा मुंज किंवा दर्भ कमावून तयार करीत. एकेका छिद्रात दहा तारा ओवीत व त्या घोडीवर चढवून पुढे व्यवस्थित लावीत. शांडिल्य ऋषीच्या मते भोपळधाच्या कडेला तीनच छिद्रे पाडावी व त्यांत दोन्ही बाजूंच्या छिद्रांत तेहतीस, तेहतीस व मधल्या छिद्रात चौतीस तारा ओवून त्या पुढे घोडीवर घ्याव्या. वाद्य वाजवण्यासाठी इषिका किंवा वेतस नामक वेलीचा आपोआप वाकून धनुष्याकार झालेला तुकडा घेत व त्याला केस चिकटवून गज तयार करीत [म. ज्ञा. को.]

वाणिज्य विविध वस्तूंचा व्यापार किंवा क्रय-विक्रय. प्राचीन काळी भारतात समृद्धी होती आणि भारतातून विविध प्रकारच्या वस्तू परदेशी निर्यात केल्या जात होत्या. त्या वस्तूंचे मूल्य म्हणून परदेशातून विपुल सोने भारतात आणले जात होते. भारतात जागतिक व्यापाराची केंद्रे होती. चीन, ब्रह्मदेश, इ. पूर्वेकडील देशांतील माल भारतीय व्यापारी केंद्रांतून पाश्चात्य देशांकडे पाठवला जात असे. तो व्यापार मुख्यत: भूमार्गाने चाले. भारतात उत्पन्न होणारे विविध पदार्थ आणि निर्माण केल्या जाणाऱ्या निरनिराळ्या सुंदर वस्तू यांना परदेशांत पुष्कळ मागणी होती.

भारतीय व्यापाराची ही परंपरा सुमारे ५००० वर्षांपूर्वीपासूनची जुनी आहे. सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांवरून असे अनुमान केले जाते, की त्या काळी देशाच्या अन्य भागांतून व परदेशांतूनही अनेक वस्तू आयात केल्या जात होत्या. देशांतर्गत व्यापार मोठ्या प्रमाणात चालत होता. त्याचप्रमाणे असीरिया, इजिप्त, इ. देशांशी द्रविड लोकांचे व्यापारी संबंध होते. इजिप्तमध्ये मृत देहांना लपेटण्यासाठी जे तलम वस्त्र वापरीत, ते भारतात निर्माण झालेले होते. याव्यतिरिक्त सागाचे लाकूड, हस्तिदंत, मणी, इ. वस्तू आणि निरनिराळे पशुपक्षीही भारतातून परदेशांत पाठवले जात होते.

वैदिक साहित्यात व्यापाराचे काही निर्देश आढळतात. आर्य लोकांतील व्यापारी वर्गाला वणिक् ही संज्ञा होती. त्या काळी वस्तुविनिमय प्रचलित असून, गाय देऊन आवश्यक वस्तू किंवा पदार्थ घेण्याची प्रथा होती. ऋग्वेदात इंद्राच्या मूर्तीसाठी दहा गायी दिल्याचा उल्लेख आहे (४.२४.१०). सोमाच्या विक्रीचा उल्लेख शतपथ ब्राह्मणात (३.३.३.१-७) आढळतो. अथर्ववेदात वस्त्र व चर्म यांच्या क्रय-विक्रयाची माहिती मिळते (४.७.६). सिंधुप्रदेशातून घोडे व मीठ अन्य प्रदेशांत पाठवले जात होते, असे शतपथ ब्राह्मण व बृहदारण्यकोपनिषद या ग्रंथांवरून कळते. अथर्ववेदातील एका सूक्तात वाणिज्य व्यवसायात यश मिळावे, लुटारूंपासून संरक्षण व्हावे, कष्ट सोसण्याचे व साहस करण्याचे सामर्थ्य प्राप्त व्हावे, सर्व अडचणींचा परिहार व्हावा म्हणून मी अग्नीमध्ये घृत व समिधा यांचे हवन करतो, असे म्हटले आहे (३.१५). व्यापारात लाभ होण्यासाठी क्रय-विक्रयाला अनुकूल वेळ व परिस्थिती कोणती, हे ओळखणे याला चरित म्हटले आहे. व्यापारात उत्थान म्हणजे चढाई करणे यालाही महत्त्व असते. व्यापारात फसण्याची अनेक कारणे असतात. व्यसन, लुटारू, रुक्षपणा, स्वार्थ, कृपणता, भांडवलाची कमतरता, इ. कारणांचा उल्लेख या सूक्तात आहे. अशाप्रकारे व्यापारी नीतीची अनेक तत्त्वे त्यात सांगितलेली आहेत.

वैदिक साहित्यात पणी नामक आर्येतर जनांचा निर्देश आहे, हे पणी व्यापारी असून, मुख्यत: जलमार्गाने व्यापार करीत. ते नौकानयनात कुशल असून, दूरदूरच्या देशांशी व्यापार करीत.

पाणिनीची सूत्रे, बौद्ध जातके व जैन साहित्य यांतील उल्लेखांवरून मौर्यपूर्व कालातील वाणिज्य व्यवसायाची थोडीशी कल्पना करता येते. त्या काळी रेशमी, सुती व लोकरी वस्त्रे; भिन्न प्रकारच्या मदिरा, बहुमोल धातू, मणी, लवण, केशर, गुग्गुळ, लाक्षा, रोचना, मंजिष्ठा, नीळ, शस्त्रास्त्रे, इ. पदार्थ व वस्तू यांचा देशांतर्गत व्यापार मोठा होता. त्याचप्रमाणे रेशमी वस्त्रे, मलमल, कंबल, सुगंधी व औषधी द्रव्ये, हस्तिदंत व त्याच्यापासून बनवलेल्या वस्तू, लोहाची शस्त्रे, हिरे, मोती व अन्य रत्ने, उत्तम प्रकारचे लाकूड, वनस्पतींची बीजे व रोपे आणि मोर वगैरे पक्षीही परदेशी पाठवले जात. बौद्ध कालात विदेशी व्यापाराची खूप भरभराट झाली. त्या काळात समुद्रप्रवासाला बहर आला होता. जातक ग्रंथांत अनेक बंदरांची व समुद्रयात्रांची वर्णने आहेत. भारतीय व्यापारी सुवर्णद्वीप, मलाया, जावा, लंका, आफ्रिका, इजिप्त, इटली, इ. देशांत जाऊन व्यापार करीत होते. काही व्यापारी समुद्रमार्गे मेक्सिकोत जाऊन राहिले होते. काही व्यापारी वाराणसी वगैरे केंद्रांतून माल घेऊन राजस्थानमार्गे, भरुकच्छ व शूर्पारक या बंदरांतून बावेरूला म्हणजे बाबिलोनला जात होते. रोममधील विलासी लोकांना भारतातील उंची मुलायम वस्त्रे व सुंदर आभूषणे अत्यंत प्रिय होती. त्यांचे मूल्य म्हणून अपरंपार सोने भारतात येत होते. भारतीय व्यापारी चिनी रेशीम आणून ते पुन्हा पाश्चिमात्य देशांकडे निर्यात करीत, असे पेरिप्लसमध्ये म्हटले आहे. रोमचे व्यापारी चिनी रेशमी वस्त्रे ताम्रलिप्ती, खंबायत, त्रावणकोर येथे विकत घेऊन आपल्या देशात नेत होते. बंगाल व तमिळनाडू या प्रदेशांत तयार होणारी मलमलही फार लोकप्रिय होती.

ग्रामीण भागात उत्पन्न होणारे पदार्थ स्थानिक बाजारा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विकले जात. तिथे नगरांतील व्यापारी माल विकत घेऊन त्याची विक्री नगरांतील आपणांत म्हणजे दुकानांत करीत किंवा व्यापारी खेड्यांत नेऊन विकीत. एका गावात निरनिराळ्या प्रकारचा माल विकत घेऊन तो गाडीतून किंवा गाढवाच्या पाठीवरून अन्यत्र नेऊन विकणारे फेरीवालेही त्या काळी होते.

धनाढ्य व्यापारी एका प्रदेशातला माल दुसऱ्या प्रदेशांत नेऊन विकीत. त्यासाठी मोठाले राजमार्ग बनवलेले होते. मालाची वाहतूक बैलगाड्यांतून होत असे. काही व्यापारी नदीमार्गे नावांतून मालवाहतूक करीत. एका राज्यातून दुसऱ्या राज्यात प्रवेश करताना त्यांना कर द्यावा लागे.

त्या काळी मार्गात लुटारूंचे भय असल्यामुळे अनेक व्यापारी मिळून एक संरक्षक दल बरोबर बाळगीत. वाहतुकीची साधने चांगली नसल्यामुळे व लुटारूंच्या भयामुळे हा व्यापार अवघड असला, तरी त्यात पुष्कळ लाभही होत असे.

अशा सधन व्यापाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त होत असे. त्यांना गृहपती, श्रेष्ठी, इ. उपाधी दिल्या जात. त्यांना राजदरबारातही मान मिळत असे.

कौटिल्याच्या अर्थशास्त्रावरून मौर्यकालीन व्यापारव्यवहारांची कल्पना करता येते. त्यापूर्वी संपन्न लोक संपत्तीचा दुरुपयोग करीत असावे, म्हणून धर्मशास्त्रात सावकारी व भाववाढ यांचा निषेध केला आहे (मनु. ९-२५७). कौटिल्याने व्यापारीवर्गावर राजाचे नियंत्रण असावे, असे प्रतिपादले आहे. त्याप्रमाणे कोणालाही व्यापार-व्यवसाय सुरू करण्यापूर्वी राजाची अनुज्ञा मिळवावी लागे. वस्तूंचा पुरवठा व्यवस्थित व्हावा आणि त्यांचे मूल्य फार असू नये, या हेतूने त्यांची विक्री बाजारातच केली जावी, उत्पादनक्षेत्रांत होऊ नये, असे कौटिल्याने म्हटले आहे. त्यासाठी पण्याध्यक्ष, शुल्काध्यक्ष, इ. अधिकारी नेमलेले असत. ते व्यापारावर नियंत्रण ठेवीत. साठेबाजी, नफेखोरी, भेसळ, इ. गुन्हे करणाऱ्यांना शिक्षा केली जात असे. व्यापाऱ्यांनी किती नफा घ्यावा, हे निश्चित केले जात असे. परदेशी व्यापाराला प्रोत्साहन देण्यासाठी निर्यातकर कमी करावा, असेही अर्थशास्त्रात सांगितले आहे.

अर्थशास्त्रातील व्यापारव्यवस्थेचे नियम नंतरच्या स्मृतिकारांनीही दिले आहेत. महाकाव्यांत वाणिज्यव्यवस्थेचे वर्णन संकेतरूपाने आढळते. त्या काळी देशात समृद्धी नांदत होती आणि व्यापाराची पुष्कळ उन्नती झाली होती. मालवाहतुकीसाठी अनेक राजमार्ग तयार केलेले असून, व्यापाऱ्यांच्या संरक्षणाची व्यवस्था राजा करीत असे. अंतर्गत व्यापार नदीमार्गेही चालत होता आणि समुद्रमार्गेही बराच माल परदेशी पाठवला जात होता, असेही दिसते. सनपूर्व १ल्या शतकात सातवाहन राजाने भरुकच्छ बंदरातून वाघ, कासवे व वाज पक्षी सम्राट ऑगस्टसकडे पाठविल्याचा उल्लेख आढळतो. भारतीय पशु-पक्ष्यांना परदेशांत खूप मागणी होती. सिंह, गेंडा, कुत्रा, वानर, पोपट, चकोर, गरुड, इ. पशुपक्षी परदेशी पाठवले जात होते. त्याचप्रमाण शिसवी, चंदन, इ. लाकूड, मसाल्याचे विविध पदार्थ, वस्त्रे, फळे, अन्न-धान्य व खनिज पदार्थ यांचा मोठा व्यापार चालत असे. परदेशांतून सोने, चांदी, तांबे, कथिल, इ. धातू; तसेच गंधक, काचेची तावदाने, नाणी भारतात येत. चीनमधून रेशमी वस्त्रे आयात केली जात होती.

प्राचीन तमिळ साहित्यात भारताच्या अंतर्गत व बाह्य व्यापाराचे बरेच निर्देश आढळतात. संघमयुगातही सर्व व्यापार व्यवस्थित चालत असे. व्यापाऱ्यांचे तांडे गाड्यांतून व गाढवे, घोडे, वगैरे पशूंच्या पाठींवर अनेक प्रकारचा माल लादून निरनिराळ्या गावी नेत. त्यांचा माल जत्रांच्या वेळी जास्त खपत असे. त्या वेळी वस्तुविनिमयाची पद्धत प्रचलित होती.

त्या काळी द. भारतातून मिरे, लवंगा, मलमल, रत्ने, मोती, हस्तिदंत, रेशमी वस्त्रे, इ. माल परदेशी पाठवला जाई आणि तिकडून सोन्याची व चांदीची नाणी मोठ्या प्रमाणात आणली जात. पेरिप्लस या ग्रंथात भारत व रोमन साम्राज्य यांमधील या व्यापाराचे चांगले वर्णन केलेले आहे.

इ. स.च्या तिसऱ्या शतकात रोमचा व्यापार कमी झाला; पण इराणशी वाढला. भारतातून काश्मिरी शाली, रेशमी व सुती वस्त्रे, लोह व पितळ या धातूंच्या वस्तू; चंदन, तांदूळ, हस्तिदंताच्या वस्तू, नीळ, शस्त्रे, मसाले, रत्ने आणि पशु-पक्षी इराणकडे पाठवले जात. उलट इराणमधून तिथले प्रसिद्ध घोडे, सुकामेवा, काचेच्या वस्तू आणि दास-दासी भारतात येत.

गुप्तयुग हे सुवर्णयुग मानले जाते. त्या युगात व्यापाराची विलक्षण भरभराट झाली होती. त्या वेळी पूर्वेकडील द्वीपांत भारतीय वसाहती व राज्ये प्रस्थापित झालेली होती. तिथे भारतीय व्यापारी जाऊन वसले होते. त्यामुळे तिथला व्यापार खूपच वाढला होता. तिकडून मोती, सोने, चांदी, कथिल, अभ्रक, चंदन, मसाल्याचे पदार्थ, सुपारी, कापूर, गंधक, चामडी, हस्तिदंत, वेलची, तांदूळ, हत्ती, गेंडे, इ. असंख्य पदार्थ व पशू यांची भारतात आयात केली जात असे.

त्या काळात भारतीय व्यापारी इराणमध्येही स्थायिक झाले होते. ते भारत व इराण यांमध्ये मोठा व्यापार करीत. इजिप्तशीही भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत होता.

पूर्वेकडचा व्यापार समुद्रमार्गे चालत होता. त्यात अनंत संकटे येत, तरीही भारतीय व्यापारी निर्भयपणे प्रवास करीत होते. भारतातून ते सुती व लोकरी वस्त्रे, लोह, चांदी, पितळ, कांसे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

इ. धातूंच्या वस्तू व मूर्ती, मूल्यवान खडे, सुगंधी द्रव्ये, शस्त्रे, औषधी वनस्पती, हस्तिदंताच्या वस्तू, इ. माल तिकडे नेत.

पूर्वेकडील द्वीपांत स्थायिक झालेले भारतीय व्यापारी चीनशीही व्यापार करू लागले. भारतातले विविध पदार्थ तिकडे पाठवून चिनी रेशीम भारतात आयात केले जात असे. त्या रेशमाची तलम वस्त्रे बनवून ती अन्य देशांना निर्यात केली जात. चीनमार्गे मांचूरिया, मंगोलिया व जपान या देशांशीही व्यापार चालू झाला होता आणि जपानमधून काही व्यापारी अमेरिकेलाही पोचले होते, असे हॅविट म्हणतो.

इ. स. च्या सातव्या शतकापासून अरबांचे लष्करी सामर्थ्य बरेच वाढले आणि त्यांनी व्यापारी आक्रमणही सुरू केले. त्यांची जहाजे पूर्वेकडील द्वीपांपर्यंत जाऊ लागली. समुद्रप्रवासात त्या काळी चाचेगिरीचा जो त्रास होत असे, त्याला अरबांनी बराच पायबंद घातला. भारताचा पूर्वेकडील व्यापार काही अंशी त्यांनी बळकावला, तरी त्यांचा भारताशी होणारा व्यापार खूप वाढला. भारतातून सुती व रेशमी वस्त्रे, शालो, केशर, बहुमोल रत्ने, कस्तुरी, कापूर, चंदन, सुगंधी द्रव्ये, मसाले, नारळ, सुपारी, औषधी द्रव्ये, उत्तम लाकूड, हत्यारे, मोर, पोपट, इ. माल विपुल प्रमाणात अरबस्तानात जात होता. आणि तिकडून सुकामेवा, घोडे, यांची आयात होत होती. अरबी प्रवासी लेखकांनी भारतातील कारागिरीचे व इथल्या वस्तूंचे खूप वर्णन केले आहे.

त्या काळात लंका हे व्यापाराचे फार मोठे केंद्र बनले होते. चीन व आग्नेय आशियातील द्वीपे यांचा पाश्चात्य देशांशी संबंध जोडणारे ते महत्त्वाचे स्थान होते. दोन्हीकडचा माल प्रथम त्या केंद्रात येऊन मग पुढे जात असे. द. भारतातला मालही लंकामार्गे परदेशी पाठवला जात होता.

हिमालयापलिकडच्या पर्वतराजीतूनही चीनशी व मध्य आशियातील देशांशी भारताचा व्यापार चालत असे.

प्राचीन काळी व्यापारी लोकांचे संघ स्थापलेले असत. त्यांना संस्कृत साहित्यात श्रेणी, पूग, संघ, इ. नावे होती. द. भारतात त्यांना मणिग्रामम, नानादेशी, अशी नावे होती. मणिग्रामम हा वणिक्ग्रामचा अपभ्रंश असावा. या संघटना संपन्न व प्रबल होत्या. देशांतर्गत व परदेशी व्यापार त्या अगदी व्यवस्थित चालवीत. या संघटनांचे कार्य शतकानुशतके चालू होते. काही संघटना सरकारशी करार-मदार करून व्यापारात अमाप लाभ मिळवीत.

पूर्वी श्रेणी, पूग, इ. व्यापारी संघटनांमध्ये निरनिराळ्या जातीच्या लोकांचा समावेश होत असे. कारण प्राचीन काळी कोणताही व्यवसाय एखाद्या जातीपुरता मर्यादित नसे. पण कालांतराने निरनिराळ्या जाती निरनिराळे उद्योग परंपरेने करू लागल्या. त्यामुळे मध्ययुगात श्रेणीही बहुधा जातींप्रमाणे ठरू लागल्या. तथापि व्यापार हा व्यवसाय त्याला अपवाद असावा. कारण अनेक भिन्न जातींचे लोक तो व्यवसाय करीत होते. ठोक व्यापार करणाऱ्या श्रीमंत व्यापारी श्रेणींचे व्यवहार एखाद्या शहरापुरतेच मर्यादित नसून, निरनिराळ्या प्रदेशांतील शेकडो शहरांत त्यांची व्यापारी उलाढाल चालू असे. अशा संघटनांची घटना व कार्यपद्धती निश्चित केलेली असे. कार्यकारी समितीने केलेले नियम सर्व सभासदांना सारखेच बंधनकारक असत.

देशांतर्गत मालवाहतूक करताना स्वसंरक्षणासाठी सैन्य ठेवण्याची परवानगी त्या श्रेणींना होती. युद्धकाळी हे सैन्य व श्रेणींमधील व्यापाऱ्यांचे अमाप धन यांचा राजाला उपयोग होत असे. त्यामुळे अशा व्यापाऱ्यांना किंवा श्रेष्ठींना राजदरबारी बराच मान मिळत असे.

अशा व्यापारी संघांचे जाळे भारतात सर्वत्र पसरलेले होते. त्यामुळे कोणत्याही शहरातील व्यापारी पेढीची हुंडी दुसऱ्या शहरातील पेढीत चालत असे. सध्याच्या पेढ्यांप्रमाणे त्या काळातल्या पेढ्यांचेही सहकार्य उल्लेखनीय होते.

व्यापारधंद्यातली भागीदारीची पद्धत पूर्वीपासून चालत आलेली आहे. भागीदारांची कामाची व नफ्याची विभागणी यासंबंधी करार केलेले असत. ठोक व्यापारासाठीच बहुधा अशी भागीदारी आवश्यक असे. कारण त्याचा व्याप मोठा असून, त्याला मोठे भांडवल व जास्त मनुष्यबळ लागत असे. काही व्यापारी स्वतंत्रपणेही ठोक व्यापार करीत होते.

गावोगावी किरकोळीचा व्यापार आणि आठवडचाच्या बाजारात व जत्रेच्या वेळी दुकान मांडणारे व्यापारी असंख्य होते. खेडेगावात धंदा करणाऱ्या वाण्याकडे तेल, मीठ, धान्य, कापड, इ. सर्वच पदार्थ एकत्र मिळत. आठवडचाच्या व जत्रेच्या बाजारात मेवा-मिठाई, किराणा-भुसार माल, कापड, कांबळी, इ. जिनसांप्रमाणे बैल, म्हशी, घोडे, गाढवे वगैरे जनावरांचीही खरेदी-विक्री होत असे.

यादवकाळी शहरात बाहेरून येणाऱ्या व्यापारी मालावर जकात घेतली जात असे, तिला शुल्क म्हणत. तिची वसुली रोखीने किंवा ऐनजिनसी करण्याची पद्धत होती. तिचे प्रमाण शहरसमिती किंवा ग्रामपंचायत ठरवीत असे. साधारणपणे कापड, धातू, जवाहीर यासारख्या टिकाऊ वस्तूंवरील शुल्क रोख रकमेत व खारीक, खोबरे, पाने, फुले, भाजीपाला, तूप, तेल, इ. पदार्थांवरील शुल्क ऐनजिनसी वसूल करीत. यादवराजांनी दुकानांवर नव्याने कर आकारून आणि म्हशींसारख्या जनावरांवर पट्टी लादून काही गावांचे उत्पन्न वाढविले होते. शिलाहारांनी किनाऱ्यावरील बंदरांशीच व्यापार करीत असलेल्या प्रत्येक जहाजामागे एक धरण आणि परदेशातून माल आणणाऱ्या प्रत्येक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जहाजामागे एक सुवर्ण गद्याण कर बसवला होता. या सवलती-मुळे देशी व्यापाराला उत्तेजन मिळाले.

मालाचा क्रयविक्रय व्यापारी व ग्राहक यांच्यांतच होत असे. मोठे व्यापारी आणि किरकोळ व्यापारी यांच्यांत मध्यस्थी करणारा दलाल त्या काळी अस्तित्वात नव्हता. त्यामुळे बाजार-भावात अचानक व गैरवाजवी चढउतार होत नसे.

यादवकाळात क्रयविक्रयाचे माध्यम म्हणून नाण्यांचा उपयोग केला जात असे. त्याचप्रमाणे देवघेवीचे व्यवहारही होत असत. शेतकरी आपल्या शेतात पिकलेले धान्य देऊन हवा तो अन्य पदार्थ घेऊ शकत असे. ती पद्धत सोयीची होती व त्यानंतरही अनेक शतके चालू होती. चिंचोके, कवड्या यांचाही उपयोग नाण्यांसारखा केला जात असे. चलन म्हणून अशा वस्तूंचा वापर करण्यासाठी राजाची संमती आवश्यक होती.

अरबी लेखकांप्रमाणेच मार्को पोलोनेही भारतीय व्यापारा-विषयी बरीच माहिती लिहून ठेवली आहे. गुप्तयुगात जसा भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणात दूरदूरच्या देशांशी चालू होता, तसाच तो नंतरच्या ५-६ शतकांतही चालू होता. मार्को पोलोने मलबार व खंबायत येथील बंदरांमधील जहाजांची ये-जा आणि त्यांच्यांतून आयात-निर्यात होणारा माल, यांचे बरेच वर्णन केले आहे. अरबस्तानमधून व इराणमधून भारतात उत्तम घोड्यांची आयात पूर्वीपासून चालू होती. इ. स. च्या १२ व्या शतकानंतर ती खूपच वाढली. त्या घोड्यांसाठी भारतातून अमाप धन परदेशी व्यापारी घेऊन जात होते.

इ. स. च्या ११ व्या शतकात हिंदुधर्मशास्त्राने परदेशगमन निषिद्ध ठरवल्यामुळे हिंदू व्यापारी परदेशी जाईनासे झाले व साहजिकच त्यांचा व्यापार घटू लागला. इ. स. १२०० नंतर भारतात मुस्लिम सत्ता पसरू लागली, त्याचप्रमाणे व्यापारी क्षेत्रातही मुस्लिमांचे वर्चस्व सुरू झाले. त्यापूर्वी भारतात बरेच मुसलमान लोक येऊन वसलेले होते. त्यांनी बहुतेक सर्व परदेशी व्यापार आपल्या हाती घेतला. अरबी व इराणी व्यापाऱ्यांची असंख्य जहाजे भारताच्या निरनिराळ्या बंदरांत येऊन भारतातला माल अन्य देशांकडे घेऊन जात. भारताच्या किनाऱ्यालगतचा व्यापारही भारतातील मुस्लिम व्यापाऱ्यांच्या हाती होता. हिंदू राजे त्यांना खूप प्रोत्साहन व संरक्षण देत होते. त्यामुळे त्यांची भरभराट झाली होती.

इब्न बतूता, बर्बोसा, वगैरे परदेशी प्रवाशांनी त्या काळातल्या भारताचे वर्णन केले आहे. त्यावरून भारतातील व्यापाराविषयी बरीच माहिती मिळते. त्या काळी सर्व नगरांत मोठाले बाजार होते आणि निरनिराळ्या नगरांना जोडणारे उत्तम राजमार्गही होते. तेव्हाची राजकीय परिस्थिती अस्थिर होती. सतत युद्धे व सत्तांतरे चालू होती. त्यामुळे व्यापारात अडचणी उत्पन्न होणे साहजिकच होते. तथापि देशात खूप समृद्धी होती व व्यापारी उलाढाली मोठ्या प्रमाणात चालू होत्या. इब्न बतूताने दिल्लीतील बाजार सर्व जगातील बाजारांत मोठा होता, असे म्हटले आहे. भोवतालच्या प्रदेशांतून तांदूळ, साखर, गहू, विड्याची पाने, इ. विविध पदार्थ त्या बाजारात येत असत. विजयनगर-मधील प्रचंड व्यापारी उलाढालीचे वर्णन बर्बोसाने केले आहे. त्या काळी मालाची ने-आण करणारे हजारो बैलांचे तांडे रस्तो-रस्ती दिसून येत.

बहमनी सुलतान आणि विजयनगरचे सम्राट यांच्या घोड-दळासाठी हजारो घोडे परदेशातून आयात केले जात होते. सामान्य घोड्याची किंमत २००–३०० पोर्तुगीज सोन्याची नाणी, लढाऊ घोड्याची ४००–६०० नाणी व राजेशाही घोड्याची ९००–१००० नाणी एवढी असे.

बर्बोसाने त्या काळी भारतातून पश्चिमेकडील देशांना निर्यात केल्या जाणाऱ्या पदार्थांची नावे दिली आहेत, ती अशी— मिरी, लवंगा, वगैरे मसाल्याचे पदार्थ; चंदन, केशर, नीळ, मेण, लोखंड, साखर, तांदूळ, नारळ, मौल्यवान खडे, कापड, बेन्झाइन व मातीची उत्तम भांडी. परदेशातून उत्तम घोडे, खजूर, बेदाणा, मीठ, गंधक, अफू, तांबे, पारा, शेंदूर, गुलाबपाणी, सोने, लोकरी व मखमली कापड, सुगंधी द्रव्ये, चांदी, शिसे, तुरटी हे पदार्थ भारतात आयात केले जात. तसेच आफ्रिकेतून सोने, हस्तिदंत व मेण हे पदार्थ आणले जात.

पूर्वेकडील देशांशीही मोठा व्यापार चालू होता. चीनमधून रेशमी व मखमलीचे कापड, सोने, चांदी, तांबे, लोखंड, लवंगा, सुपारी, चिनी मातीची भांडी, शेंदूर व पारा आणि पूर्वेकडील द्वीपसमूहातून सोने, चंदन, लाख, लवंगा, सुपारी, कापूर, अगरू, लाकूड, कस्तुरी, माणिक, इ. पदार्थ भारतात येत होते. भारतातून मिरे, सुगंधी द्रव्ये, वस्त्रे, केशर, पोवळी, शेंदूर, पारा, अफू, औषधी द्रव्ये, मणी, इ. पदार्थ पूर्वेकडील देशांमध्ये पाठवले जात.

इ. स. १४९८ साली व्हास्को-द-गामा हा पोर्तुगीज खलाशी द. आफ्रिकेला वळसा घालून समुद्रमार्गे कालिकत बंदराला येऊन पोचला आणि तेव्हापासून भारत-युरोपसंबंधाला वेगळे वळण लागले. इ. स. च्या १६ व्या शतकात हिंदी महासागरात पोर्तुगीजांचे वर्चस्व होते. त्यांनी हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर चांगली ठिकाणे पाहून वसाहती केल्या, किल्ले बांधले आणि बंदरे निर्माण करून व्यापार सुरू केला. त्यांचे वर्चस्व फार काळ राहिले नाही. डच, फ्रेंच, इंग्लिश या दर्यावर्दी लोकांनी हिंदी महासागरावर वर्चस्व स्थापण्याचा उद्योग सुरू केला आणि त्यांच्यांत व्यापारी स्पर्धाही सुरू झाली. इंग्रज लोकांनी भारतात अनेक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ठिकाणी वखारी उघडल्या आणि मोगल बादशहांकडून व्यापारी सवलती मिळवल्या. फ्रेंच लोकांनीही द. भारतात बऱ्याच उलाढाली केल्या. पण शेवटी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीची सरशी होऊन तिने भारतात राजकीय सत्ताही स्थापली.

इंग्रजांच्या वखारी सुरत, अहमदाबाद, दाभोळ, राजापूर, चौल, बऱ्हाणपूर, इ. ठिकाणी होत्या. ते हिंदुस्थानच्या किनाऱ्या-किनाऱ्याने लाकूड, सुपारी, नारळ, इ. जिनसांचा क्रय-विक्रय करीत. सुरतेच्या बंदरातून ते नीळ, माणिक, डिंक, छीट वगैरे कापड इंग्लंडला पाठवीत. इंग्लंडहून लोखंड, जस्त, शिसे, लाल कापड, लांब सुरे, तलवारी वगैरे माल ते आणीत. पण तो इकडे फारसा खपत नव्हता. साखर, सुकामेवा, मसाल्याचे पदार्थ ते चीन, अफगाणिस्तान, इराण, पूर्वेकडील बेटे या प्रदेशांतूनच आणून हिंदुस्तानात विकत होते. चांगली काचेची तावदाने, भिंगे, दुर्बिणी, चष्मे, घड्याळे, आरसे, हंड्या, झुंबरे, चांगला मोहोरेदार कागद, इ. वस्तू मात्र युरोपातून येत होत्या. इ. स. च्या १८ व्या शतकात छ. शाहू महाराजांनी कान्होजी आंग्र्यामार्फत उत्तम इंग्लिश सुरे, तलवारी, हस्तिदंत, गुलाबी अत्तराच्या बाटल्या, मेणबत्त्या, अगरू, तंबाखू, कस्तुरी, शोभेची दारू या जिनसा मागवल्याचा उल्लेख आहे. अशा प्रकारे सागरावरील मोठा व्यापार पाश्चात्य लोकांच्या हातीं असून, दुय्यम प्रतीचा किनाऱ्यालगतचा व्यापार हिंदी लोकांच्या हाती होता. देशांतर्गत मालवाहतूक लमाण लोक बैलांच्या पाठीवरून करीत. प्रत्येक लमाणाजवळ एक बैल, अशा दहादहा हजार लमाणांचे तांडे निरनिराळ्या पेठांतील मालाची ने-आण करीत. मीठ, तुरटी, खोबरे, खारीक, इ. पदार्थांप्रमाणे कापड, धान्य, मसाल्याचे पदार्थ आणि परदेशांतून आयात केलेल्या वस्तू यांचा व्यापार देशातील व्यापारी मोठ्या प्रमाणावर करीत होते.

हिंदुस्थानात साखर तयार होत असे, पण ती शुभ्र नसल्यामुळे श्रीमंत लोक चिनी साखर वापरीत. माधवराव पेशव्यांच्या वेळी इंग्लंडहून आलेली पोलादी हत्यारे स्वदेशी हत्यारांपेक्षा पाणीदार व उपयुक्त असल्यामुळे सरकारही ती घेत असे. इंग्रज लोक पेशव्यांना नव्या नव्या वस्तू भेटीदाखल पाठवीत. त्यांत चष्मे, घड्याळे, दुर्बिणी व तपमापक असत. त्यामुळे त्यांचा व्यापार वाढू लागला. हिंदुस्थानात ज्या वस्तू तयार होत होत्या, त्यांपेक्षा परदेशी वस्तू अधिक सुबक व कार्यक्षम असल्यामुळे स्वदेशी वस्तूंचा खप कमी होऊ लागला. मेणबत्त्या, काचेची भिंगे, कुलपे, कागद, आरसे, अत्तरे हिंदुस्थानात पूर्वीपासून तयार होत असली, तरी परदेशी माल त्यापेक्षा चांगल्या प्रतीचा मिळू लागला होता.

इंग्रज लोकांनी चहा हिंदुस्थानात आणला. मात्र त्या काळी तो दुर्मिळ व महाग असल्यामुळे काही श्रीमंत लोकांतच त्याचा प्रसार झाला होता.

पेशवाईच्या अखेरपर्यंत हिंदुस्थानात विविध प्रकारची उत्तम वस्त्रे हातमागावर निर्माण केली जात होती व त्यांतील बराच माल परदेशी जात होता. पैठण, महेश्वर, नागपूर, सोलापूर, बऱ्हाणपूर, खंबायत, जालना, धनवड, अष्टी, चांदवड, चंदेरी, शहागड, मुलतान, सिरोंज, डाक्का, इ. पेठा त्या काळी कापडासाठी प्रख्यात होत्या. इ. स. च्या १९ व्या शतकाच्या आरंभी इंग्लंडमध्ये हिंदी कापड जाणे थांबले, कारण ब्रिटिश सरकारने त्यावर जबर जकात बसवली. त्यानंतर इंग्लंडमधील कारखान्यांत तयार होणारे स्वस्त कापड हिंदुस्थानात येऊ लागले आणि इकडचा हातमागाचा धंदा बसला.

बाष्पशक्तीच्या साहाय्याने चालणारी विविध प्रकारची यंत्रे युरोपात सुरू झाल्यामुळे औद्योगिक क्रांती होऊन, अनेक वस्तूंचे उत्पादन गरजेपेक्षा जास्त होऊ लागले. आगगाड्या व आगबोटी सुरू झाल्यामुळे मालवाहतूक वेगाने होऊ लागली. इंग्लंडमध्ये उत्पन्न होणारा माल विकण्यासाठी बाहेरच्या बाजारपेठेची आवश्यकता उत्पन्न झाली आणि इंग्रज व्यापारी तो माल हिंदुस्थानांत खपवण्याची धडपड करू लागले. कापडाप्रमाणे इतर ब्रिटिश मालही स्वदेशी मालापेक्षा कमी किमतीत मिळू लागल्यामुळे इथे जोरात खपू लागला. लोहमार्गावरून आगगाड्या धावू लागल्यामुळे परदेशातला पक्का माल हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोचला आणि तेथील कच्चा माल समुद्रकिनाऱ्यावरील केंद्रांत आणून आगबोटी भरून परदेशी पाठवण्याची सोय झाली. अशा प्रकारे ब्रिटिश व्यापाराची भरभराट झाली आणि ब्रिटिश लोकांनी अमाप धन इथून नेले. त्यामुळे इ. स. च्या १९व्या शतकात हिंदुस्थान कंगाल झाला. [वे. रा. द.; वै. सा. सं.; डॉ. परमानंद रस्तोगी–अजंता, ऑगस्ट १९५८; भा. सा. इ.; म. भा. सा. सां. भू.; या. का. म.; पे. का. म.; हिं. सा. इ.; हिं. क. इं. पी.; हिं. ब्रि. उ. वा.; भा. सां. इ.]

वाणिज्यलाभव्रत

व्यापाऱ्याने करायचे एक व्रत. या व्रताचा विधी असा – मूळ व पूर्वाषाढा नक्षत्र असेल त्या दिवशी व्रतकर्त्याने चार नव्या पात्रांत पाणी भरून त्यांत शंख, मोती, वोरूची मुळे व सोने घालावे आणि पूर्वाभिमुख होऊन त्या पाण्याने स्नान करावे. नंतर घराच्या अंगणात विष्णू, वरुण व चंद्र या देवतांची पूजा करावी. देवतांच्या प्रीत्यर्थ तुपाचा होम करावा आणि ब्राह्मणांना निळी वस्त्रे, दही, खोड, मद्य व पांढरी फुले दान द्यावी. या दिवशी उपवास करावा. फल–व्यापारात लाभ आणि समुद्रप्रवासात यश. [हिं. इ.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाणी महाराष्ट्रातील एक जात. यांना वैश्य वाणी असेही म्हणतात. हे लोक पेशाने व्यापारी आहेत. त्यांचे बावकुळे, कठर, खरोटे, कुलुम किंवा कुणबी किंवा मराठा, कुडाळे, नेवे, पाटाणे व संगमेश्वरी असे भेद आहेत. यांचा आपसात रोटीबेटीव्यवहार एके काळी होत नव्हता.

बावकुळे – यांची वस्ती मुख्यत्वे कारवार शहरात आढळते. यांची बोली कोकणी असल्यामुळे हे मूळचे गोव्यातील असावे असे वाटते. त्यांच्यांत आडनावे नाहीत. लग्नाच्या दिवशी आधी मुलाची मुंज करतात. वरपिता वधूपित्याला देज देतो. अंगडी येथील शिवनाथ व गोव्यातील म्हाळसा या त्यांच्या कुलदेवता आहेत. हे स्मार्त असून, शृंगेरी मठाच्या आचार्यांना हे आपला गुरू मानतात. चित्पावन, कऱ्हाडे किंवा कानडी ब्राह्मण यांचे पौरोहित्य करतात.

व्यापार हा यांचा प्रमुख व्यवसाय आहे. काही लोक जमीनदार असून, शेतीही करतात. हे मृताला जाळतात.

कठर – यांची वस्ती जळगाव आणि नसीराबाद या भागात आढळते. यांच्यांत भारद्वाज, काश्यप, कौंडिण्य, वसिष्ठ, इ. गोत्रे आहेत. यांच्यांत आते, मामे किंवा मावस बहिणीशी लग्न होत नाही. पंच पालवी हे त्यांचे देवक आहे. यांचे सणसमारंभ व चालीरीती त्यांच्या आजूबाजूच्या कुणबी लोकांप्रमाणे आहेत.

खरोटे किंवा लाडखाणी – यांची वस्ती खानदेशात व नासिक जिल्ह्यात आहे. हे मूळचे लाट देशाचे रहिवासी असावे. यांची मातृभाषा अहिराणी आहे. यांचे आचारविचार ब्राह्मण व मराठा लोकांसारखे आहेत.

हे लोक मुलीचे लग्न साधारणपणे पंधरा वर्षांच्या आत करतात. मुलीचे आईबाप प्रथम मुलगा पाहतात व नंतर मुलाकडील लोकांना मुलगी पाहायला बोलावतात. वधूपिता वरपित्याला हुंडा देतो. लग्न ठरल्यावर साखरपुडा करतात. त्या वेळी अनेक लोकांना बोलावतात. या वेळी देण्याघेण्याच्या याद्या करतात. हुंडा कितीही ठरला असला, तरी यादीत ४०१ रु. असा आकडा लिहितात. याद्या तयार करताना समाजातील दोन-चार प्रतिष्ठित व्यक्ती पंच म्हणून याद्यांवर सह्या करतात. याद्या मोडी लिपीत असतात.

या कार्यक्रमानंतर चोळी-परकर हा विधी असतो. या वेळी वधूला चोळी-परकर किंवा ती मोठी असल्यास साडी-चोळी देतात. याच वेळी लग्नतिथी निश्चित करतात.

लग्नाच्या आधी एक-दोन दिवस देवदिवाळी हा कार्यक्रम होतो. सकाळी मंडप घालतात व त्यात देवांचे लग्न लावतात. रात्री लोकांना पानसुपारीला बोलावतात आणि त्यांना घरातील मंगल कार्याला हातभार लावण्याची विनंती करतात.

लग्न वधूगृही होते. लग्नाच्या आदल्या रात्री शीमंती हा कार्यक्रम होतो. त्या वेळी वधूपक्षाकडील लोक गावातल्या मंदिरात. उतरलेल्या वराला घोड्यावर बसवून मिरवीत वधूगृही आणतात. लग्नाच्या आदल्या दिवशी वधूला सकाळपासून संध्याकाळपर्यंत ब्राह्मणाकडे ठेवतात आणि नंतर वाजतगाजत घरी नेतात. लग्नात वधू-वरांना बाशिंगाऐवजी मंडोळ्या बांधतात. लग्न लागल्यावर गूळपुरी नावाचा कार्यक्रम होतो. त्या वेळी वधूला विविध वस्त्रे व दागिने देतात आणि गूळ खायला देतात.

लग्नानंतर स्त्रीला नऊ वर्षे पिंपळ पुजायचे व्रत करावे लागते. श्रावण महिन्यात नऊ दिवस हे व्रत करतात.

कुलुम, कुणबी किंवा मराठा – व्यापारउदीम करणाऱ्या मराठा कुणबी लोकांना हे नाव मिळाले असावे. त्यांच्या चालीरीती मराठा कुणबी लोकांप्रमाणेच आहेत.

कुडाळे – यांना बांदेकर वाणी असेही म्हणतात. यांची वस्ती रत्नागिरी, सावंतवाडी, कुडाळ, कारवार, गोवा या भागात आहे. ते स्वतःला आर्य वैश्य किंवा आर्य दक्षिणी वैश्य असे म्हणतात. हेही मूळचे गोव्यातले व मराठा असावे. त्यांच्यांत बाभ्रव्य, भारद्वाज, हारीत, कपी, इ. अठरा गोत्रे आहेत.

वधूपिता मुलाकडे मुलगी सांगून जातो. यांच्यांत हुंड्याची पद्धत आहे. यांचा विवाहविधी ब्राह्मणांतील विवाहविधीसारखाच असतो.

हे ब्राह्मणांच्या व स्थानिक देवदेवतांना भजतात.

नेवे – हे लोक खानदेश व नासिक या जिल्ह्यांत आढळतात. त्यांच्यांत भारद्वाज, दत्तात्रय, काश्यप, इ. बारा गोत्रे आहेत. यांचे सणवार व धार्मिक विधी हे कठर वाण्यांप्रमाणेच आहेत.

पाटाणे – सातारा जिल्ह्यातील पाटण गावी यांची वस्ती असल्यामुळे यांना हे नाव मिळाले आहे. ही कुलुम वाण्यांचीच शाखा आहे व त्यांच्या चालीरीती कुलुम वाण्यांप्रमाणेच आहेत.

संगमेश्वरी – यांची वस्ती प्रामुख्याने संगमेश्वर भागात आहे, म्हणून यांना हे नाव मिळाले आहे. यांच्यांत मोरपीस, पोवळे, शंख, नाग, उंबर, इ. अनेक देवके आहेत. समान देवक असलेल्या कुळांत लग्नसंबंध होत नाही. मामे बहिणीशी लग्न करता येते, पण आते किंवा मावस बहिणीशी करता येत नाही. यांचा लग्नविधी कुडाळे वाण्यांच्या लग्नविधीसारखाच असतो. यांच्यांत सप्तपदी मात्र नसते. यांचे इतर आचारही कुडाळे वाण्यांप्रमाणेच आहेत. [ट्रा.का.बॉ.; म.लो.सं.; म.लो.मा.पु. ३]

वातरशना मुनी प्राचीन श्रमणपरंपरेतील मुनी. ऋग्वेदात या मुनींचा उल्लेख आहे. ते कशा प्रकारची साधना करीत, त्याचे वर्णन पुढील ऋचांत आहे –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुनयो वातरशनाः पिशंगा वसते मला ।
वातस्यानु ध्राजिं यन्ति यद्देवासो अविक्षत ॥
उन्मदिता मौनेयेन वातां आ तस्थिमा वयम् ।
शरीरेदस्माकं यूयं मर्तासो अभि पश्यथ ॥

(ऋ. १०. १३६. २-३)

अर्थ – वायू हाच या मुनींचे कौपीन असते. त्यांचे अंग धुळीने धूसर आणि मलिन झालेले असते. आणि त्यांनी एखादे वस्त्र परिधान केलेच, तर पिंगट आणि मळकट असेच वस्त्र ते नेसतात. वायूच्या वेगाचे अनुकरण करून जिथे दिव्य जनांचाच प्रवेश असतो, तिथेही ते जाऊ शकतात. ते उन्मत्ताप्रमाणे वागतात, कोणाशीही काही बोलत नाहीत. (पण मनाशी असे म्हणत असतात, की) आम्ही वायूचे अनुकरण करून वायुरूपच झालो आहो. तर हे मानवांनो, तुम्हांला आता आमची शरीरेच फक्त दिसतील.

वैदिक ऋषींपेक्षा हे मुनी वेगळे होते. वैदिक ऋषी हे गृहस्थाश्रमी होते. ते यज्ञयाग करीत व इहलौकिक इच्छांच्या पूर्तीसाठी इंद्रादी देवतांना आवाहन करीत. पण वातरशना मुनी घरदार, स्त्रीपुत्र यांचा, इतकेच नव्हे, तर वस्त्राचाही त्याग करून भिक्षावृत्तीने राहत. ते स्नानही करीत नसत. त्यामुळे त्यांच्या अंगावर मळ साचे. ते मौन धारण करून राहत. तसेच देवदेवतांची आराधना न करता ते आत्मध्यानात मग्न राहत, असे त्यांचे वर्णन केलेले आहे. वातरशना मुनी कूष्मांड होमाच्या सूक्तांचे द्रष्टे आहेत, असे सांगताना तैत्तिराय आरण्यकात (२.७) एक कथा आली आहे, तिचा सारांश असा–

वातरशना नावाचे तपस्वी व संयमी असे मुनी होते. एकदा काही ऋषी त्यांच्याकडे आले. कोणती इच्छा मनात धरून हे ऋषी येत आहेत याचा विचार करून ते मुनी एकदम अदृश्य झाले व रहस्यमय अशा मंत्रात त्यांनी प्रवेश केला. वातरशना मुनींचे दर्शन न झाल्यामुळे त्या ऋषींनी श्रद्धेने तपश्चर्या केली. मग त्यांना मंत्रात गुप्तरूपात असलेल्या वातरशनांचे दर्शन झाले. त्या ऋषींनी त्यांना विचारले 'अदृश्य रूपात फिरणारे तुम्ही कोण आहात ?' वातरशना मुनी म्हणाले 'हे ऋषींनो, तुम्ही ऐश्वर्यसंपन्न आणि मोठे आहा. तुम्ही आमच्या येथे आला आहात. आम्ही तुमची सेवा कशी करावी ?' त्यावर ते ऋषी म्हणाले, 'कोणत्या साधनाने आम्ही पापमुक्त होऊ असा एखादा पवित्र उपाय सांगा.' मग वातरशनांनी त्यांना कूष्मांड होमाची सूक्ते सांगितली व ते म्हणाले की, या सूक्तांनी होम केल्यास तुम्ही पापमुक्त व्हाल. नंतर त्या ऋषींनी कूष्मांड होम केला व ते पापमुक्त झाले.

वैदिक काळापासूनच अशी श्रमणपरंपरा चालू होती. पुढे अनेक अवैदिक संप्रदायांत तिची परिणती झाली. त्यांपैकी बौद्ध व जैन संप्रदाय आजही विद्यमान आहेत. [भा. सं. जै. यो.]

वातायन खिडकी. प्राचीन काळी सर्व प्रकारच्या घरांना व राजप्रासादांना आजच्याप्रमाणेच खिडक्या बनवलेल्या असत. या खिडक्यांचे आलोकमार्ग, गवाक्ष व जालमार्ग असे भेद होते. आलोकमार्गातून प्रकाश घरात येत असे व त्यातून बाहेरचे दृश्यही पाहता येत असे. गवाक्षाचा आकार गाईच्या डोळ्यासारखा असे. जालमार्ग म्हणजे जाळीदार खिडक्या. जालमार्गात काष्ठ, दगड किंवा छिद्रमय धातूची जाळी बसवीत असत. वारा घरात यावा म्हणून बनवलेल्या खिडक्यांना वातायन असे नाव होते. पण नंतर सर्व प्रकारच्या खिडक्यांना वातायन हे नाव रूढ झाले. वातायनाचे नागबंध (नागमोडी आकार), वल्ली (वेल), कुंजराक्ष (हत्ती वा डोळा), स्वस्तिक, सर्वतोभद्र, नंद्यावर्त (सर्व बाजूंना छिद्रे असलेली आकृती), पुष्पबंध, इ. अनेक आकार शिल्पशास्त्रात सांगितले आहेत. [ए-सा. हिं. आ.; का. भा.]

वात्सल्य रस आणि भक्ती. हा शब्द वत्स शब्दावरून व्युत्पादितात. मातापित्यांचे कन्यापुत्रादिकांवर जे नैसर्गिक प्रेम असते, त्याला वात्सल्य असे म्हणतात. काही आचार्यांनी याला रस न म्हणता भाव म्हटले आहे. मॅग्डुगल, इ. पाश्चात्य मानसशास्त्रज्ञांनी वात्सल्याला मानवी अंतःकरणातल्या प्रमुख भावांत परिगणित केले आहे. व्यवहारातला अनुभवही असाच आहे. दांपत्यप्रेमाच्या खालोखाल अपत्यस्नेह हा प्रभावी मनोभाव असतो. अपत्यस्नेहाची उत्कटता, आस्वादनीयता, इ. गुणांचा विचार केल्याअंती वात्सल्य हा एक स्वतंत्र आणि प्रधान भाव आहे, असे म्हणावे लागते. म्हणूनच तो एक स्थायीभाव समजला गेला आहे. विश्वनाथाने आपल्या साहित्यदर्पणात याचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करून त्याला रस ही पदवी दिली आहे. तो याचे लक्षण सांगताना म्हणतो –

स्फुटं चमत्कारितया वत्सलं च रसं विदुः ।
स्थायी वत्सलतास्नेहः पुत्राद्यालम्बनं मतम् ॥

(सा. द. ३.२५१)

अर्थ – प्रगट चमत्कार असण्याच्या कारणाने वत्सलाला रस मानतात. वात्सल्ययुक्त स्नेह हा याचा स्थायी भाव असतो आणि कन्यापुत्रादी अपत्ये हा याचा आलंबन विभाव असतो.

याचाच विस्तार करताना विश्वनाथ सांगतो – बालसुलभ चेष्टांबरोबरच अपत्याचे विद्या, शौर्य, दया, इ. गुणविशेष या रसाचे उद्दीपन विभाव आहेत. आलिंगन, अंगस्पर्श, मस्तकाचे अवघ्राण, दर्शन, रोमांच, आनंदाश्रू, हे याचे अनुभाव आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनिष्टांची आशंका, हर्ष, वर्ग, हे यांचे संचारीभाव होत. या रसाचा वर्ण कमलकेसराप्रमाणे असून, जगदम्बा ही त्याची देवता आहे (सा. द. ३.२५३–५४).

भोज या साहित्यशास्त्रकाराचा काळ इ. स. चे ११ वे शतक हा होय. त्याने नवरसांत वात्सल्य रसाची गणना करून रस-संख्या दहा ठरवली आहे. यावरून असे कळते, की भोजाच्या काळापर्यंत नवरसांच्या बरोबरीने वात्सल्य रसालाही मान्यता प्राप्त झाली होती. भामह, दंडी, उद्‌भट व रुद्रट या आलंकारिकांनी प्रेयस नावाचा अलंकार मानला असून, वात्सल्य रसाच्या उगमाशी त्याचा संबंध दिसून येतो. ‘प्रेयः प्रियतराख्यानम्’ (विशेष प्रिय अशा व्यक्तीचे आख्यान म्हणजे प्रेयस होय), असे म्हणून दंडीने प्रेयस अलंकाराचा प्रीतिभावाशी संबंध दर्शविला आहे.

वात्सल्याच्या स्थायीभावासंबंधात काही शास्त्रकारांनी भिन्न मते व्यक्त केली आहेत. कर्णपूर कवीने ममकार व मंदार, मकरंद चंपूकाराने कार्पण्य हे या रसाचे स्थायीभाव सांगितले आहेत. प्रारंभी वात्सल्याचा अंतर्भाव शृंगाराच्या अंतर्गतच केला जात होता. कारण वात्सल्य हे रतीचे एक विशिष्ट रूप आहे. सोमेश्वराने रतीचे स्नेह, भक्ती व वात्सल्य असे तीन भेद सांगितले आहेत. तुल्यांची अन्योन्यरती म्हणजे स्नेह, उत्तमाच्या ठिकाणी अनुत्तमाची रती म्हणजे भक्ती आणि अनुत्तमाच्या ठिकाणी उत्तमाची रती म्हणजे वात्सल्य होय (काव्य-प्रकाशावरची काव्यादर्श टीका).

संस्कृत वाङ्‌मयातील वात्सल्य रसाची दोन उदाहरणे अशी –

मेघैर्मेदुरमम्बरं वनभुवः श्यामास्तमालद्रुमै–
र्नक्तं भीरुरयं त्वमेव तदिमं राधे गृहं प्रापय ।।
इत्थं नन्दनिदेशतश्चलितयोः प्रत्यध्वकुञ्जद्रुमम् ।
राधामाधवयोर्जयन्ति यमुनाकूले रहः केलयः ।।

(गी. गो. १.१)

अर्थ – आकाश ढगांनी भरून आले आहे. तमालवृक्षांनी वनभूमी काळवंडली आहे. तिन्हीसांजेची वेळ आहे. माझा कृष्ण अंधाराला घाबरतो. म्हणून हे राधे, तूच याला घरी पोचव. अशा प्रकारे नंदाच्या आज्ञेने घराकडे निघालेल्या राधा-कृष्णांच्या मार्गस्थ वृक्ष आणि लताकुंज यांच्या अनुषंगाने यमुनातीरावर चालणाऱ्या एकांत क्रीडांचा जयजयकार असो.

वरील श्लोकात नंदाचे कृष्णविषयक प्रेम, त्याच्या अनिष्टाविषयी आशंका, त्याच्या संरक्षणाची काळजी, इ. वात्सल्य रसाचे भावविभाव दिसून येतात.

शाकुंतलाच्या सातव्या अंकात भरताच्या दर्शनाने दुष्यंताच्या मनात जो प्रेमभाव निर्माण झाला, त्याचे वर्णन कालिदासाने पुढील श्लोकात (अभिज्ञान शाकुंतल ७.१७) केले आहे –

आलक्ष्यदन्तमुकुलाननिमित्तहासै–
रव्यक्तवर्णरमणीयवचःप्रवृत्तीन् ।
अङ्काश्रयप्रणयिनस्तनयान् वहन्तो
धन्यास्तदङ्गरजसा मलिनीभवन्ति ।।

अर्थ – अकारण हास्यामुळे ज्याच्या नुकत्याच उगवणाऱ्या दंतकण्या कळीसारख्या दिसतात, ज्याचे वर्णोच्चार बोबडे असतात आणि त्यामुळे ते ऐकायला गोड वाटतात आणि ज्यांना आईबापांच्या मांडीवर बसायला फार आवडते, अशा पुत्रांना अंगाखांद्यावर खेळवणारे आणि त्यांच्या अंगावरच्या धुळीने स्वतः मलिन होणारे असे आईबाप धन्य होत.

वरील श्लोकात वत्सलरती हा स्थायी भाव असून, पुत्रदर्शन, त्याचे बोबडे बोल, त्याचे मातीत खेळणे, अकारण हसणे, इ. विभावानुभाव व्यक्त झाले आहेत.

वात्सल्यभक्ती – हिचा मूलभाव भगवंताच्या शिशुरूपाविषयी वडिलधाऱ्या माणसांच्या, विशेषतः आईबापांच्या अंतरातले वत्सलप्रेम हा होय. पाल्य-पोषकसंबंध हा याच भक्तीत शक्य होतो. सख्यभक्तीचा व्यवहार आदानप्रदानावर आधारलेला असतो. म्हणजे मित्राकडून काही घ्यायचे असते आणि मित्राला काही द्यायचे असते. वात्सल्यभक्तीत सर्व व्यवहार एकतर्फी असतो. तिच्यात आदान नसून केवळ प्रदान असते. तिच्यात निष्काम वृत्ती प्रबल असते. या भावात भक्त हा भगवंताला पुत्रवत मानतो, त्याचे लाड करतो आणि त्याला सर्वतोपरी सुखी व आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करतो. त्यातून आत्मसुखाव्यतिरिक्त त्या पालकभक्ताला काहीही मिळवायचे नसते.

वल्लभाचार्यांच्या पुष्टिमार्गात वात्सल्यभक्तीवरच विशेष भर आहे. श्रीनाथ (श्रीकृष्ण) हे लेकरू असून, आपण आईबाप घेतील तशी, त्याची काळजी घ्यायला हवी आणि त्याला प्रसन्न ठेवायला हवे, या भावनेतूनच आपली सेवापद्धती त्यांनी बसवली आहे. वात्सल्यभक्तीचा आदर्श म्हणजे यशोदा. तिच्या मातृहृदयाची प्रशंसा भागवतात केलेली आहे. पण तिच्या या मातृभावाला पूर्ण व प्रभावी रूप दिले ते सूरदास, नंददास, परमानंददास, इ. व्रजभाषेच्या संतकवींनी. त्यांना वात्सल्यकवी असेच म्हणतात. निंबार्क संप्रदायात हरिव्यासदेव, वृंदावनदेव, घनानंद, इ. कवींनी आपल्या कृष्णवर्णनात वात्सल्याचीच अभिव्यक्ती दाखवली आहे. रसिक रामोपासकांनीही रामाच्या संबंधात हेच काम केले आहे. रामोपासकांनी वृद्धवात्सल्य व लघुवात्सल्य असे त्याचे दोन भेद केले आहेत. पहिल्यात आपण देवाचे आई-बाप आहो, असे समजून त्याचे संगोपन करायचे व दुसऱ्यात राम-सीतेला आपले आई-बाप मानून शिशुरूपात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देवाला शरण जायचे असते. तुलसीरामायणातही वात्सल्य-भक्तीचा आढळ होतो. इथे तुलसीदासाने बाल रामाला रुग्ण दाखवले असून, त्याचा आजार दूर करण्यासाठी मातेने जे निरनिराळे मंत्र-तंत्र व तोडगे केले, त्यांचेही वर्णन केले आहे.

तमिळनाडमधील पेरियाळवारानेही कृष्णाच्या बाललीलांचे वर्णन करताना यशोदेच्या तोंडी पुढील वाक्ये घातली आहेत – अरे चंद्रा, माझ्या कृष्णाला तू फार आवडतोस. माझा लाल तुला आपल्या चिमुकल्या हातांनी बोलावतो आहे. तू त्याच्याशी खेळायला ये. स्वतःला ढगांत लपवू नको. तुझ्याशी थोडा वेळ खेळल्यानेच माझा बाळ स्वस्थ झोपेल आणि तो झोपेल तरच त्याला प्यालेले दूध पचेल.

उपासकाने स्वतः बालभाव धरून परमात्म्याचे आश्रित होणे, हा वात्सल्याचा दुसरा प्रकार. सर्व इंद्रियांत मन मुख्य असते. त्याला अबोध व रागद्वेषादिरहित करणे म्हणजे बालभाव होय. अशा बालभावी भक्ताला परमेश्वर सर्वभावे सांभाळतो आणि त्याची काळजी वाहतो. पद्मपुराणात श्रीहरी म्हणतो –

स्मरणालोकनस्पर्शैः कूर्ममीनविहङ्गमाः ।
यथा पुष्णन्त्यपत्यानि तथा पुष्णाम्यहं शिशून् ॥

अर्थ – स्मरण, दर्शन व स्पर्श यांनी अनुक्रमे कासव, मासा व पक्षी हे जसे अपत्यांचे पोषण करतात, तसा मी शिशुभावी भक्तांचे पोषण करतो.

नामदेव पांडुरंगाला माउली म्हणूनच शरण गेले आहेत. त्यांचा हा वात्सल्यभाव पुढील अभंगांत हृदयंगम रीतीने व्यक्त झाला आहे –

तूं माझी माउली । मी वो तुझा तान्हा ।
पाजीं प्रेमपान्हा । पांडुरंगे ॥
तूं माझी माउली । मी तुझें वासरूं ।
नको पान्हा चोरूं । पांडुरंगे ॥
तूं माझी हरिणी । मी तुझें पाडस ।
तोडीं भवपाश । पांडुरंगे ॥
तूं माझी पक्षिणी । मी तुझें अंडज ।
चारा घालीं मज । पांडुरंगे ॥
नामा म्हणे होसी । भक्तीचा वल्लभ ।
मागें पुढें उभा । सांभाळिसी ॥

ज्ञानेश्वर, तुकाराम, इ. संतही भगवंताला विशिष्ट प्रसंगी शिशुरूपातच आळवतात. 'विठाईमाउली' हा वारकरी संतांचा आवडता जोड शब्द आहे. स्वामी रामकृष्ण परमहंस हेही कालीमातेला पुत्रभावानेच शरण गेले आहेत. देवीला उद्देशून माँ असा त्यांचा आक्रोश त्यांच्या शिष्यांना व भक्तांना ऐकायला मिळे.

वात्सल्यभक्तीत जेव्हा विरह मिसळतो, तेव्हा तिची आर्तता विशेषच दिसते. बाळकृष्ण सकाळी उठून गुरे चारायला रानात निघाला म्हणजे, त्याच्या दिवसभराच्या वियोगासाठीही यशोदेचे हृदय कासावीस होत असे. कृष्ण जेव्हा अक्रूराच्या समागमे गोकुळ सोडून मथुरेला निघून गेला, तेव्हा तर यशोदा आणि गोपी यांचे वत्सल हृदय आक्रंदून उठले. [हिं. कृ. पु. प्र.; वे. पा. सौ.; व. श. ब्र. प्रे.; हिं. ते. वै. भ.; ब्र. सा.; हिं. सा. को.]

वात्स्यायन (१) (इ. स. चे ३ रे शतक) एक आचार्य. कामसूत्रांचा कर्ता. वात्स्यायन हे त्याचे गोत्रनाम असून, मल्लनाग हे व्यक्तिनाम होते. त्याच्या कामसूत्रांत अवंती, मालव, अपरान्त, सौराष्ट्र, महाराष्ट्र व आंध्र, या देशांतल्या आचार-विचारांची बरीच माहिती दिली आहे. त्या मानाने उ. भारताची माहिती अल्पांशानेच आली आहे. यावरून, वात्स्यायन पश्चिम किंवा दक्षिण भारतात राहणारा असावा, असे वाटते. कामसूत्रांच्या अंतिम श्लोकावरून तो योगी व ब्रह्मचारी होता, असे कळते. पंचतंत्रात वात्स्यायनाला वैद्यकशास्त्रज्ञ म्हटले असून, मधुसूदन सरस्वतीने कामसूत्रांना आयुर्वेदशास्त्रांतर्गत मानले आहे. त्याच्या ग्रंथाचा परिचय असा –

कामसूत्रे ही सात अधिकरणांत विभागलेली आहेत.-

(१) साधारण – यात कामशास्त्राची सामान्य तत्त्वे प्रतिपादली आहेत.

(२) सांप्रयोगिक – यात रतिक्रिया, प्रेमकलह, कामक्रीडेच्या पद्धती, आलिंगनादी गोष्टी, इ. विषय विवेचिले आहेत.

(३) कन्यासंप्रयुक्तक– यात अनुनय व विवाह यांचे विवेचन केलेले आहे.

(४) भार्याधिकारिक– यात पत्नीची कर्तव्ये व दिनचर्या सांगितली आहे.

(५) पारदारिक – यात रसिक नायक व परस्त्री यांच्या प्रेमसंबंधाविषयी विचार केला आहे.

(६) वैशिक – यात वेश्यांच्याविषयी विचार केला आहे.

(७) औपनिषदिक – यात वशीकरणादी विषय व कामाचे विविध योग सांगितले आहेत.

वात्स्यायनाने आपल्या ग्रंथात काहीं पूर्वाचार्यांचा निर्देश केला आहे, तो असा–प्रथम नंदीने एक हजार अध्यायांत कामशास्त्राची रचना केली. या महान ग्रंथाचा संक्षेप औद्दालकि श्वेतकेतूने केला. त्याचा आणखी संक्षेप बाभ्रव्य पांचालाने केला आणि शेवटी त्याचा अधिक संक्षेप करून वात्स्यायनाने आपली कामसूत्रे रचली. याव्यतिरिक्त दत्तकाचार्य, चारणाचार्य, सुवर्णनाभ, घोटकमुख, गोनर्दीय, गोणिकापुत्र व कुचुमार या आणखी काही कामशास्त्रकारांचा उल्लेख वात्स्यायनाने केला आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन भारतीय विचारसरणीप्रमाणे धर्म व अर्थ यांच्या-बरोबरच काम हादेखील एक पुरुषार्थ आहे. कामाची परिणती ऐहिक सुखप्राप्तीत होणे आवश्यक असते. काम ही मनुष्य-मात्राची सहजप्रवृत्ती असून, ती मानवी शरीराच्या स्थिती, धारणा व वंशसातत्य या गोष्टींसाठी अत्यंत आवश्यक आहे. म्हणून धर्म व अर्थ यांच्या बरोबरच काम या पुरुषार्थाची साधना करून सरते शेवटी मनुष्याने जितेंद्रिय बनावे, असा वात्स्यायनाचा ग्रंथरचनेचा उद्देश आहे.

वात्स्यायनाने कामसेवनाची तुलना मानवी आहाराबरोबर केली आहे. आहार व काम यांच्या योग्य सेवनाने मनुष्याला आरोग्यप्राप्ती होते आणि त्यांच्या अतिरिक्त सेवनाने त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्य बिघडते. हे लक्षात आणून मनुष्य-जातीला कामाचे योग्य व प्रमाणित सेवन करण्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण देण्याच्या उद्देशाने वात्स्यायनाने आपला ग्रंथ रचला आहे. स्त्री-पुरुषांचे रतिसुख हे मानवी जीवनाचे साध्य नसून, ते केवळ यशस्वी विवाहाचे साधन आहे, हे तत्त्वज्ञान वात्स्यायनाने सर्वप्रथम प्रस्थापित केले. श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव म्हण-तात –' स्त्री-पुरुषांच्या रतिसुखावरच जोर देणाऱ्या पाश्चात्य कामशास्त्रज्ञांच्या तुलनेने हे तत्त्वज्ञान कितीतरी श्रेष्ठ असल्याचे प्रतीत होते.'

विवाहाचे उद्देश व त्याचे नियम या बाबतीत धर्मशास्त्राशी वात्स्यायनाचे पूर्णपणे ऐकमत्य आहे. विशेषत: याज्ञवल्क्याच्या विचारांशी वात्स्यायनाचे विचार बरेच मिळते जुळते आहेत. वेदाध्ययन केलेल्या म्हणजेच शिकलेल्या मनुष्याने वधू शोधावी, असे तो सांगतो. वात्स्यायनाने विवाहाचा विचार मुख्यत्वे रति-सुखाच्या दृष्टीने केलेला असला, तरी दांपत्याच्या सामाजिक व आध्यात्मिक सुखाकडे दुर्लक्ष केलेले नाही. चांगल्या विवाहापासून धर्म, अर्थ, मान, मित्र व प्रेम या गोष्टी मिळू शकतात, असे तो सांगतो. पूर्वी लग्न न झालेल्या व स्वजातीय अशा कुमारिकेशी विवाह केल्याने विवाहाचा उद्देश सफल होतो. आपल्यापेक्षा उच्च जातीच्या मुलीशी लग्नसंबंध करू नये. उच्च जातीची स्त्री जर स्वैरिणी असेल, तर तिच्याशी प्रेमसंबंध ठेवावा; पण लग्न करू नये. धर्मदृष्टीने लग्नाचा विचार केल्यानंतर कोणत्या ऐहिक गोष्टींकडे लक्ष पुरवावे, ते वात्स्यायन पुढीलप्रमाणे सांगतो –

मुलीचे आई-बाप जिवंत असावे. ती वरापेक्षा तीन वर्षांनी किंवा थोडी अधिक लहान असावी. ती सुशील व धनवान कुळातली असावी. ती सुस्वरूप असावी. तिला नातेवाईक पुष्कळ असावे. दात, नखे, कान, केस, डोळे, स्तन, इ. तिचे अवयव प्रमाणबद्ध असावे. ही लक्षणे सांगितल्यावर त्याला वाटले, की अशी मुलगी हजारांत एखादीच असायची. तेव्हा त्याने दुसरा मार्ग सांगितला, की जी मुलगी आपणास सुखी करील व आपल्याला आप्तेष्टांचे अपशब्द ऐकायला लावणार नाही, तिच्याशी विवाह करावा. जेव्हा पति-पत्नींमध्ये परस्परांविषयी प्रेम उत्पन्न होईल, तेव्हाच तो विवाह उत्तम समजावा.

मुलींच्या आई-बापांना व नातेवाईकांना वात्स्यायनाने उप-देशाचे चार शब्द सांगितले आहेत, ते असे –

मुली वयात आल्यावर त्यांना चांगले कपडे घालायला द्यावे. त्या नीट-नेटक्या दिसतील अशा प्रकारे त्यांची वागणूक घडू द्यावी. मुलींनी आपल्या मैत्रिणींसह वेषभूषा करून दुपारच्या वेळी खेळावे. उत्सव, यज्ञ आणि विवाह अशा प्रसंगी जिथे जिथे तरुण मुले जमण्याचा संभव असेल, तिथे तिथे त्यांना नटवून सजवून पाठवावे.

वात्स्यायनाच्या काळी मुलींची लग्ने ऋतुप्राप्तीपूर्वी आणि नंतरही होत असत.

विवाहाच्या बाबतीत वात्स्यायन बराच उदारमतवादी आहे. नियम व वधू यांना फारसे महत्त्व न देता वधू-वरांच्या परस्पर प्रीतीला तो सर्वाधिक महत्त्व देतो. त्याचमुळे प्रेमावर अधिष्ठित असलेल्या गांधर्व विवाहाला त्याने फार मान दिला आहे.

वात्स्यायनाने कामसूत्रांत सुमारे १७०० वर्षांपूर्वीच्या समा-जाचे हुबेहूब आणि सुंदर चित्र रेखाटले आहे. इतरत्र न आढळ-णाऱ्या पुष्कळशा तत्कालीन सामाजिक गोष्टी कामसूत्रांवरून कळतात. इतर धार्मिक वाङ्मयाप्रमाणे वात्स्यायनही हिंदुसमा-जाची विभागणी चार वर्ण व चार आश्रम यांत करतो. पैकी ब्राह्मणांचा उल्लेख त्याने अनेकवार आदराने केला आहे.

यज्ञाच्या प्रसंगी राजस्त्रियांना अंत:पुर सोडून खाजगी व सार्वजनिक उत्सवात भाग घेता येत असे. यज्ञोत्सव पाहण्याच्या निमित्ताने समाज एकत्र जमत असे व त्या निमित्ताने तरुण-तरुणींना आपापला जोडीदार निवडण्याची संधीही मिळत असे.

क्षत्रिय वर्णात राजाचे स्थान महत्त्वाचे समजले जाई. मात्र कित्येक ठिकाणी राजे क्षत्रिय नसून, आभीर व कित्येक वेळा ब्राह्मणही असत. वैश्य-शूद्रांचा उल्लेख त्याने स्वतंत्रपणे केलेला नाही; पण त्यांचे धंदे व कलाव्यवसाय वर्णिले आहेत. मालाकार, अत्तरे विकणारा, रंगारी, धोबी, न्हावी, मद्यविक्रेता, तांबोळी, सुवर्णकार, मणिकार, नट, नायक, इ. व्यावसायिक लोक काम-सूत्रांत आढळतात. उच्च व्यवसायांत ज्योतिषी व वैद्य यांचा उल्लेख आढळतो. वात्स्यायनाच्या काळी ब्रह्मचर्य व गार्हस्थ्य हे दोन आश्रम महत्त्वाचे मानले जात होते. वानप्रस्थाची पद्धती बंद झाली होती. संन्यासाश्रमाविषयीही वात्स्यायन फारसे काही सांगत नाही. प्रव्रजिता, श्रमणा, क्षपणिका, तापसी, भिक्षुकी, मुंडा अशांसारख्या स्त्री-साध्वी त्या काळी आढळत. त्यांपैकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

श्रमणा या बौद्ध, क्षपणिका या जैन व तापसी ब्राह्मणधर्मी असत.

वात्स्यायनाने आपल्या ग्रंथात शहरातील जीवन हे आदर्श मानले आहे. शहरी जीवनाला अनुलक्षूनच त्याने आपला ग्रंथ सजवला आहे. ग्रंथाच्या एका प्रकरणाला नागरकवृत्त असे नाव त्याने दिले असून, त्यात शहरी माणसांच्या गुणावगुणांची चर्चा केली आहे. नागरक म्हणजे कला व युक्ती यांत निपुण असणारा मनुष्य, असा त्याचा अर्थ पाणिनीने दिला आहे. काशिकावृत्तीत त्याचे स्पष्टीकरण चतुर कलावंत किंवा धूर्त मनुष्य असे केले आहे. वात्स्यायनाने नागरकाची लक्षणे सांगितली आहेत, ती अशी – उच्च कुलात जन्म, उपजीविकेचे स्वतंत्र साधन, विविध कलांचे ज्ञान, वक्तृत्व, कवित्व आणि कथाकथनकौशल्य हे गुण ज्याच्या ठिकाणी असतील, तो आदर्श नागरक समजावा. विशेष म्हणजे त्याचे अंतःकरण उदार व स्वभाव प्रेमळ असावा. थोडक्यात सांगायचे तर शूद्रकाने मृच्छकटिकात वर्णिलेला चारुदत्त हा वात्स्यायनमतेही आदर्श नागरक ठरण्याजोगा आहे.

वात्स्यायनाच्या काळात भारताची भरभराट होती. अनेक परदेशांशी व्यापारउदीम करून भारतातले श्रेष्ठी भरपूर पैसा देशात आणीत असत. या समृद्धीचा परिणाम तत्कालीन नागरिकांच्या जीवनावर झाला होता. घर, घरातील सामान, पोषाख, दागदागिने, निरनिराळे खेळ, या सर्व गोष्टींत तत्कालीन नागरिक भरपूर पैसा खर्च करीत असे.

तत्कालीन नागरिकांच्या घराचे वर्णन वात्स्यायनाने केले आहे, ते असे – नागरिक आपले घर शहरात आणि जिथे पाण्याचा पुरवठा भरपूर असे, तिथे बांधीत असे. घराचे आतला व बाहेरचा असे दोन ठळक भाग असत. अंतर्भागात स्त्रियांचा वापर असे व बाहेरच्या भागात बसून घरमालक आपला धंदाउदीम चालवीत असे. घरात निरनिराळ्या कामांकरिता निरनिराळ्या खोल्या असत. घराला लागून बाग असे. बागेत भाजीपाला व झाडे लावली जात. उद्यानाच्या मध्यभागी विहीर किंवा पुष्करिणी असे. घराची मालकीण या बागेकडे लक्ष देई. बागेत सुंदर बैठका, लताकुंज व झोपाळे असत. घरावरही फुलत्या वेली चढवीत. घरे स्वच्छ असत. स्वयंपाकघरही स्वच्छ असे. घरातून सकाळ-संध्याकाळ देवतार्चन व इतर धर्मकृत्ये चालत.

कामसूत्रांवरून तत्कालीन नागरिकाची दिनचर्या सामान्यपणे कळते, ती अशी – नागरिक लोक सकाळच्या प्रहरी मुखप्रक्षालनादी केल्यावर शरीरप्रसाधन करीत. प्रथम सर्वांगाला चंदनाची उटी लावीत. नंतर आपली वस्त्रे धुपवून सुगंधी बनवीत. डोक्याभोवती किंवा खांद्यावर हार बांधीत व डोळ्यांत काजळ घालीत. विडा खाऊन रंगलेल्या ओठांना ते अधिक लाल दिसावे म्हणून अळिता लावीत. त्यावर मेण घाशीत. केस विंचरीत व बोटांत अंगठ्या घालीत. वापरायची वस्त्रे दोन असत. एक अधोवस्त्र व दुसरे उत्तरीय. उत्तरीयाला ते अत्तर लावीत. एवढे सगळे झाल्यावर मग ते आपल्या व्यवसायाच्या जागी येऊन बसत. धंदा झाल्यावर ते स्नान करीत. एका दिवसाआड शरीराला तैलमर्दन करून घेत व दर तिसऱ्या दिवशी फेसयुक्त पदार्थाने आपले शरीर स्वच्छ करीत. दर चौथ्या दिवशी ते आपली दाढी करीत व दर पाचव्या दिवशी किंवा दहाव्या दिवशी हजामत करून घेत. ते आपली नखे सफाइदारपणे कापीत. या नखांचा कौशल्याने उपयोग करून ते आपल्या प्रियेच्या शरीरावर वर्तुळ, चंद्रकोर, कमलपत्र, इ. आकृत्या काढीत. प्रेमवृद्धीसाठी नखे व दात यांचा जितका उपयोग होतो, तितका दुसरा कशाचाही नाही, असे वात्स्यायन म्हणतो. नागरिक घाम टिपण्यासाठी हातरुमाल जवळ बाळगीत.

नागरिक दिवसातून दोनदा जेवीत. भोजनात अनेक पदार्थ असत. ते मांस भाजून, सुकवून किंवा शिजवून खात. सुरा, मधु, मैरेय व आसव ही मद्येही घेत. या पेयांबरोबर ते आंबट-तिखट पदार्थ खात. दुपारचे जेवण झाल्यावर ते वामकुक्षी करीत. कधी कोंबड्याची झुंज, तर कधी मेंढ्यांच्या टकरा पाहत. ते मनोरंजनासाठी मोर, कोकिळ, वानर अशांसारखे प्राणी आपल्या घरात पाळीत. तिन्हीसांजा ते गायन-वादन ऐकण्यात किंवा नृत्य पाहण्यात वेळ घालवीत. कधी मित्रांबरोबर गप्पा मारीत किंवा आपल्या प्रियेची वाट पाहत. दर पंधरा दिवसांनी एकदा सर्व नागरिक एकत्र जमून सरस्वतीच्या मंदिरात जात व तेथील कलावंतांना आपल्या कलेचे प्रदर्शन करायला सांगत. कलाप्रयोग संपल्यावर ते त्यांना बक्षिसे देत.

कधी कधी असे नागरिक गोष्ठी किंवा संमेलने भरवीत. या संमेलनात शीघ्र कवित्व, समस्यापूर्ती, भेंड्या लावणे, ग्रंथवाचन, इ. गोष्टी होत. कधी कधी विविध कलांच्या स्पर्धाही लावीत. अशा संमेलनात कलावंत व सुसंस्कृत गणिकांनाही पाचारण करण्यात येई. कधी कधी असे संमेलन गणिकेच्या घरीही भरवीत. कलावंत गणिकांना समाजात मान असे. बायका व मुलीदेखील एकत्र जमून विविध खेळ खेळत व कला आणि वाङ्मय यांची चर्चा करीत. जेव्हा गोष्टी किंवा संमेलन नसे, तेव्हा नागरिक एकमेकांच्या घरी जाऊन मद्यपान करीत. उद्यानयात्रा व वनभोजन या गोष्टी नागरिकांना आवडत. त्यासाठी नगराबाहेर जाताना गणिकांनाही बरोबर घेत. राजेलोकही आपल्या राण्यांना आलटून पालटून वनविहाराला नेत. पुष्कळदा अशा वनविहारांतून आवडत्या मुलीला पळवून नेण्याचे प्रकारही होत.

नागरिक अशा सुखविलासात दिवस घालवीत असले, तरी त्यांच्या बायका मात्र घरात कोंडलेल्या राहत. त्या मनोभावे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या पतीची सेवा करीत. पतीच्या आवडीनिवडीकडे लक्ष पुरवीत. पतीची परवानगी मिळाली तरच उत्सवप्रसंगी बाहेर जात. पतीला आपण स्वच्छ, सुंदर व मोहक दिसावे, असा त्यांचा प्रयत्न असे. पती दूरदेशी गेला असता, त्या वियोगदर्शक पोषाख घालीत आणि व्रतोपवास करीत.

घरात देवांची त्रिकाळ पूजा असे व ती बहुधा गृहिणीलाच करावी लागे. पतीच्या वाट्याला आलेली व्रते व उपवास तीच करी. तिला जमाखर्चाची माहिती असे. घरात धान्यादिकांचा पुरवठा तीच करून घेई व नोकरांना पगारही तीच देई. पती दूरदेशी गेला असता त्याचा व्यवसायही शक्य तितका ती सांभाळी. स्वयंपाकादी घरची कामे उरकल्यावर ती सूत काढी व कापड विणी. विधवा, अनाथ किंवा साधुदीक्षा घेतलेल्या स्त्रिया सूत कातून व विणून आपली उपजीविका करीत.

कुटुंबे अविभक्त असत. त्यामुळे घरातल्या लहान स्त्रियांना मोठ्या माणसांची सेवा करावी लागे. श्रीमंत लोकांत अनेक बायका करण्याची चाल होती. अशा स्त्रिया वरवर सुखी दिसत असल्या तरी अंतर्यामी दुःखीकष्टीच असत. हे जाणून वात्स्यायनाने असा सल्ला दिला आहे, की मुलीने पुष्कळ स्त्रिया असलेल्या श्रीमंत किंवा हुशार मनुष्याबरोबर लग्न करण्याऐवजी कमी गुण असलेल्या गरिबाशी लग्न करावे.

त्या काळी स्त्रियांना सर्रास शिक्षण मिळत नव्हते; तरी पण नागरी मुली घरच्याघरी थोडबहुत शिक्षण घेत. येणाऱ्या प्रेमपत्रांना काव्यमय उत्तरे देण्याइतके त्यांना शिक्षण मिळत असे. राजकन्या व श्रीमंतांच्या मुली मात्र बहुधा शास्त्राध्ययन करीत. गणिका देखील शास्त्रे शिकत. त्या शीलवान पुरुषाबरोबर कामशास्त्राचे अध्ययन करीत. त्याशिवाय त्या ललित कलांचेही शिक्षण घेत.

त्या काळी सर्वसामान्यपणे विधवांचा पुनर्विवाह होत नसे; पण एखाद्या विधवेला आपली कामवासना आवरत नसेल, तर तिने सुखलोलुप व गुणवान अशा भोगी पुरुषाशी संबंध ठेवावा, असे वात्स्यायनाने सांगितले आहे. अशा स्त्रियांना पुनर्भू म्हणत. अशी एखादी पुनर्भू प्रियकराने घरी आणून ठेवली, तर ती घराची मालकीण बने. घरातल्या विवाहित स्त्रियांवर ती आपली हुकमत चालवी व प्रियकराच्या मित्रांबरोबर सलगीचे वर्तन ठेवी. कित्येक प्रसंगी ती प्रियकराबरोबर भांडतही असे.

वात्स्यायनकालीन शहरी समाज हा अशा प्रकारे समृद्ध जीवन जगत असल्याचा दाखला कामसूत्रांवरून मिळतो. नीतिविषयक धामक कल्पनांनी तत्कालीन लोकांची मने गढूळ झाली नव्हती. नुसत्या जगण्याकडे त्यांचा कल नसून, सुंदरपणे जगण्यात ते धन्यता मानीत व तसा प्रयत्न करीत. त्यांना जगण्यात मौज वाटे आणि ही मौज धर्म, अर्थ व काम या तीन्ही पुरुषार्थांत सारख्याच तऱ्हेने ते लुटीत असत.

कामसूत्रांवर वीरभद्रकृत कंदर्पचूडामणी, भास्कर नृसिंहकृत कामसूत्रटीका व यशोधरकृत कंदर्पचूडामणी अशा टीका उपलब्ध आहेत. पाहा – कामशास्त्र. [भारतीय सामाजिक स्थिती – वात्स्यायनकालीन, वि. पां. दांडेकर; प्रा. च. को.]

(२) (इ. स. च्या ५ व्या शतकाची अखेर) एक न्यायदर्शनकार. याने अक्षपाद गौतमाच्या न्यायसूत्रांवर भाष्य लिहिले आहे. हे सर्वांत प्राचीन भाष्य मानले जाते. याच ग्रंथावर उद्योतकराने न्यायवार्तिक नामक भाष्यग्रंथाची रचना केली. हा दक्षिण भारतातल्या कांची नगरात राहत होता. [प्रा. च. को.]

वादविद्या तत्त्वाचे स्वरूप निश्चित करण्याची एक विद्या. 'तत्त्वबुभुत्सुना सह कथा' तत्त्व जाणण्याची इच्छा करणाऱ्या व्यक्तीबरोबर संवाद म्हणजे वाद होय, अशी वाद शब्दाची व्याख्या सर्वलक्षणसंग्रहात दिलेली आहे. अनुकूल व प्रतिकूल प्रश्न उपस्थित करून कोणत्याही विषयाची चर्चा केल्याशिवाय त्यातील सत्याचा शोध करणे शक्य होत नाही. एखाद्या सिद्धान्ताचे सत्य किंवा महत्त्व चांगल्या प्रकारे समजण्यासाठी त्याची उलट बाजूही समजावी लागते. सत्य व असत्य ही पुष्कळदा बेमालूमपणे मिसळलेली असतात. त्रिकालाबाधित म्हणून जी सत्ये प्रसिद्ध असतात, त्यांच्याबद्दलही वाद उपस्थित केल्याशिवाय त्यांत मिसळलेली धामक विधाने दूर करता येत नाहीत. म्हणूनच प्राचीन भारतीयांनी 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' = नित्य वाद केल्याने तत्त्वाचा उलगडा होत जातो, असे म्हणून ठेवले आहे. तत्त्वबोध हाच वादाचा मुख्य उद्देश होय, असे वादविद्येत सांगितले आहे.

प्राचीन भारतीयांच्या अनेक बुद्धिप्रधान विचारांमुळे, दर्शनांमुळे व भौतिक शास्त्रांमुळे वादविद्या वाढीला लागली. धर्मतत्त्वांची मीमांसा, विश्वाच्या तत्त्वाची चर्चा, सृष्टिरचनेची तपासणी, रोग व आरोग्य यांचे संशोधन, न्यायालयात न्यायनिर्णयाची पद्धती ठरविण्याचा प्रयत्न, भाषेचे शास्त्र असलेले व्याकरण अत्यंत खोलपणे मांडण्यात मिळवलेले कौशल्य, इ. बौद्धिक संस्कृतीच्या अनेक अंगांची वाढ होत असताना, भारतीय वादविद्येचे सिद्धान्त निष्पन्न होऊ लागले.

वादविद्या ही बौद्धिक संस्कृतीच्या विकासाचे लक्षण होय. भारतात बौद्धिक संस्कृतीचा प्रारंभ उपनिषत्काली झाला. प्रश्न विचारण्याचे महत्त्व त्या काळी कळू लागले. शिष्य अनेक मूलग्राही प्रश्न गुरूला विचारताना उपनिषदांत आढळतात. तसेच त्या काळात पंडितांच्या सभा भरत आणि त्यांत तत्त्वांबद्दल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अहमहमिकेने वाद होत. जनक राजाने मोठमोठ्या तत्त्वदर्शी ऋषींची एक तत्त्वज्ञानपरिषद भरवली, तिच्यात मोठा वादविवाद घडवून आणला व त्यात याज्ञवल्क्य हा सर्वश्रेष्ठ वादपटू ठरला, असे बृहदारण्यकोपनिषदात सांगितले आहे. महाभारताच्या काळातही राजे व ऋषी दीर्घकालीन यज्ञयाग करीत आणि त्या वेळी तत्त्वविषयक वाङ्मयाकरता स्वतंत्र सभा भरवीत. बुद्धाच्या काळी ही वादाची परंपरा उत्कर्षाला पोचलेली दिसते. कारण, त्याच्या काळी धर्म, ईश्वर, नीती, इत्यादींविषयी परस्परविरुद्ध मते असलेले साठ संप्रदाय अस्तित्वात होते.

वादसभांचे वादविषयक नियम पहिल्याप्रथम चरकसंहितेत सांगितले आहेत. वादसभेला तिथे तद्विद्यसंभाषा असे म्हटले आहे. तद्विद्य म्हणजे तज्ज्ञ. त्यांची संभाषा म्हणजे वाद होय. मनू, याज्ञवल्क्य, नारद, इत्यादींच्या धर्मशास्त्रातही वादाचे शास्त्र सांगितले आहे. कारण, धर्माच्या अंतर्गत येणाऱ्या कायदा, कर्ज, जमीन, व्यापार, वारसा, राज्यकारभार, इ. बाबींसंबंधी धर्मशास्त्र किंवा रूढी यांच्या द्वारे काही नियम केलेले होते. त्या नियमांबद्दलच लोकांत वाद उत्पन्न होई. न्यायालये मग त्या वादाचा निवाड करीत. ही न्यायालये राजाने किंवा गावे, नगरे व जमाती यांनी स्थापलेली असत. तिथे वाद होत व त्यावरून निर्णय दिला जाई. त्याकरता लागणारे वादांचे व प्रमाणांचे काही नियम धर्मशास्त्रात सांगितले आहेत. पण गौतम मुनीने ही वादविद्या समग्र व विस्तृत स्वरूपात मांडली आणि वादविद्या स्वतंत्र दर्शन म्हणून प्रतिष्ठा पावली. गौतमाच्या दर्शनाला न्यायदर्शन असे नाव आहे. न्याय म्हणजे यथार्थ निर्णय किंवा यथार्थ निर्णय करण्यासाठी लागणारे नियम, म्हणजेच वादाचे किंवा चर्चेचे नियम. यथार्थ निर्णय म्हणजे सत्याचा निर्णय किंवा ज्ञान होय. यथार्थ ज्ञानाला गौतमाने प्रमा असे नाव दिले असून, त्यांच्या असाधारण साधनांना प्रमाण अशी संज्ञा दिली आहे. म्हणून न्यायदर्शनाला प्रामाण्यविद्या असेही नाव दिलेले आहे. प्रमाणांचे समग्र व व्यवस्थित ज्ञान असल्याशिवाय योग्य पद्धतीचा वाद करता येत नाही. या प्रमाणांची सविस्तर मांडणी गौतमाच्या न्यायदर्शनात केलेली आहे. प्रमाणांच्या विद्येला तर्कशास्त्र असेही म्हणतात. तर्कशास्त्र हा वादविद्येचा गाभा होय.

गौतमाने न्यायदर्शनात तत्त्वचर्चेचे वाद, जल्प व वितंडा असे तीन प्रकार सांगितले आहेत. पक्ष व प्रतिपक्ष यांच्यांत तत्त्वबोधाच्या इच्छेने जी चर्चा होते, तिला वाद असे नाव आहे. पक्ष व प्रतिपक्ष बौद्धिक विजय मिळवण्याच्या इच्छेने ज्या चर्चेला प्रवृत्त होतात, तिला जल्प असे म्हणतात. आणि विशिष्ट मत न स्वीकारता दोन पक्ष जेव्हा एकमेकांचे मत खोडून काढायला प्रवृत्त होतात, तेव्हा त्या चर्चेला वितंडा अशी संज्ञा आहे. या तीन्ही पद्धतींचे नियम व गुणदोष यांची सविस्तर मांडणी गौतमाने न्यायदर्शनात केली आहे. या न्यायदर्शनातून म्हणजे वादविद्येतून बौद्ध, जैन, पूर्वमीमांसक; तसेच अद्वैत, द्वैत, विशिष्टाद्वैत, इ. वेदान्ती संप्रदाय यांची समृद्ध अशी तर्कशास्त्रे निर्माण झाली. भारतीयांच्या षड्दर्शनांचे ग्रंथ हे वादपद्धतीने म्हणजे पूर्वपक्षमालिका व उत्तरपक्षमालिका यांची गुंफण करून लिहिलेले आहेत. वेद, ईश्वर, आत्मा व अमरत्व मानणाऱ्या शबरस्वामी, कुमारिलभट्ट, शंकराचार्य, उदयनाचार्य, इ. आस्तिक व समृद्ध आचार्यांनी आपल्या ग्रंथांत, ईश्वर नाही, वेद प्रमाण नाहीत, आत्मा नाही, परलोक नाही अशा प्रकारचे तर्कशुद्ध पूर्वपक्ष विस्ताराने मांडले आहेत आणि नंतर त्यांचे खंडन केले आहे.

प्राचीन काळी वादविद्येला फार मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली होती. या विद्येला आन्वीक्षिकी असे एक नाव आहे. तिचा गौरव पुढील श्लोकात केला आहे –

प्रदीपः सर्वविद्यानामुपायः सर्वकर्मणाम् ।
आश्रयः सर्वधर्माणां शश्वदान्वीक्षिकी मता ॥

अर्थ – आन्वीक्षिकी म्हणजे वादविद्या ही सर्व विद्यांचा दिवा, सर्व कर्मांचा उपाय व सर्व धर्मांचा आधार आहे.

वेदविद्या, राजनीती किंवा व्यापार व उद्योग यांची विद्या, या सर्व विद्यांची प्रमाणांनी तपासणी आन्वीक्षिकी विद्या करते व त्यांची वाढ करते. तसेच ती संकटकाळी व उत्कर्षाच्या वेळी बुद्धी स्थिर ठेवते आणि प्रज्ञावाक्यवैशारद्य म्हणजे प्रज्ञा व भाषण यांत प्रावीण्य आणते, अशी तिची प्रशस्ती कौटिल्याने केली आहे. भगवद्गीतेतही भगवंताने स्वतःच्या ज्या दिव्य विभूती सांगितल्या आहेत, त्यांत 'वादः प्रवदतामहम्' (=चर्चा करण्याच्या पद्धतीत मी वाद आहे), असे म्हटले आहे. [तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी]

वादिचंद्र

(इ. स. चे १७ वे शतक) एक जैन आचार्य व साहित्यकार. हा मूलसंघाच्या प्रभाचंद्राचा शिष्य होता. याने पार्श्वपुराण, ज्ञानसूर्योदय, पवनदूत, यशोधरचरित हे संस्कृत ग्रंथ लिहिले आहेत. याव्यतिरिक्त याने गुजरातीमिश्रित हिंदीमध्ये श्रीपाल–आख्यान, भरतबाहुबलीछंद, आराधनागीत, अंबिकाकथा, पांडवपुराण, इ. ग्रंथ लिहिले आहेत. [हिं. जै. प्र. क.]

वादिराजतीर्थ

(इ. स. चे १५ वे शतक) एक प्रकांड पंडित व माध्वमताचे एक श्रेष्ठ आचार्य. माध्वसंप्रदायात श्रीमध्वाचार्यांच्या नंतर यांचेच नाव प्रामुख्याने घेतले जाते. कर्नाटकातल्या मंगलोर जिल्ह्यातल्या हुविनकेरे या गावी यांचा जन्म झाला. यांच्या पित्याचे नाव रामाचार्य व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मातेचे गौरम्मा असे होते. या दंपतीला हा पुत्र वागीशतीर्थ यांच्या कृपाप्रसादाने झाला. त्याचे मूळचे नाव वराह होते. वागीशतीर्थांनी त्याला उपनयनानंतर आपल्या मठात घेतले व त्याला संन्यासदीक्षा देऊन वादिराजतीर्थ असे त्याचे नामकरण केले.

वादिराजांनी थोड्याच कालात वेद-वेदांगे, सूत्रे व दर्शने यांचे पांक्त अध्ययन केले. वादिराजांच्या काळी माध्वमताला ओहोटी लागली होती. वादिराजांनी अनेक क्षेत्रांत संचार करून उपदेशाने व ग्रंथनिर्मितीने माध्वमताची ध्वजा पुनश्च फडकावली.

ते जसे पंडित होते, तसेच योगीही होते. त्यांना योगसिद्धी प्राप्त होत्या. असे सांगतात, की ते आपल्या छाटीवर बसून सकाळी उडुपी, दुपारी धर्मस्थळ व रात्री सुब्रह्मण्यम या ठिकाणी आकाशमार्गाने देवपूजेसाठी जात.

तीर्थप्रबंध नामक ग्रंथ लिहिल्यावर माध्वमताचे अनुयायी त्यांना गुरुराज असे संबोधू लागले.

वादिराजांनी उडुपीच्या आठही मठांतली पूजापद्धती व तिचे नियम-उपनियम बनवून मठांची नवी व्यवस्था सुरू केली.

संस्कृत भाषेप्रमाणे ते कन्नड भाषेचेही पंडित होते. त्या भाषेत त्यांनी एक लाखाहून अधिक पद्यरचना केली आहे. त्यांच्या कन्नड ग्रंथांपैकी वैकुंठवर्णन, गोंडक्रिया, सुळादिगळू, साविरारू, कीर्तनेगळू, लक्ष्मीशोभन, इ. ग्रंथांतली पदे आजही कर्नाटकभर विवाहप्रसंगी गायिली जातात. स्त्रियांसाठी व हीन जातींच्या लोकांसाठीही त्यांनी काही भक्तिपर गीते लिहिली आहेत. त्यांपैकी गुरुराजीयसुधाटिप्पणी, तत्त्वप्रकाशिका, तीर्थप्रबंध, गुरुवार्तादीपिका, प्रमेयसंग्रह, पाषंडमतखंडन, श्रीकृष्णस्तुती, हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. शास्त्रग्रंथ, टीका-टिप्पणी, काव्यग्रंथ, विमर्शग्रंथ, स्तोत्रे असे ७१ ग्रंथ त्यांनी संस्कृतमध्ये लिहिले आहेत.

वादिराज हे ईश्वराला प्रिय असे साक्षात्कारी भक्त होते. याविषयी एक आख्यायिका सांगतात, ती अशी –

हयग्रीव नारायण हा वादिराजांचा इष्ट देव होता. ते जेव्हा त्याच्या पूजेला बसत, तेव्हा तो अश्वरूपात प्रकट होऊन त्यांच्या पाठीवर पाय ठेवी व मस्तकावर ठेवलेल्या ‘ हयग्रीव मड्डी ’ नामक नैवेद्याचे सेवन करी.

वादिराजांनी उत्तराधिकारी म्हणून एका शिष्याची नेमणूक केली होती. तो जराजर्जर झाला तरी वादिराज मात्र योगानुष्ठानामुळे तरुण राहिले होते. त्यामुळे गुरू समाधी केव्हा घेणार आणि आपल्याला उत्तराधिकार कधी मिळणार ही चिंता त्या शिष्याला लागली होती. ती जाणून वादिराजांनी त्याच्याकडे मठाचा अधिकार आपणहून सोपविला आणि ते तिथून निघून सोदे या गावी आले. तिथल्या राजाने त्यांचे आदरपूर्वक स्वागत केले. वादिराजांनी तिथे नवा मठ निर्माण करून त्यात कृष्णमूर्तीची प्रतिष्ठा केली. ते मग त्याच ठिकाणी उपासना व उपदेश करीत शेवटपर्यंत राहिले. त्यांचा हा सोदेमठ पुढे कर्नाटकात प्रसिद्ध झाला. आज उडुपीच्या खालोखाल त्याला स्थान आहे.

वादिराज हे कर्नाटकातील व्यासकूट व दासकट या दोन्ही संघांत प्रिय व पूज्य ठरले आहेत. [हिं. क. भ. तु. अ.; रसिक पुत्तिगे – युगप्रभात, १६ फेब्रुवारी १९६४]

वादिराज सूरी (इ. स. चे ११ वे शतक) दिगंबर जैन संप्रदायातला एक श्रेष्ठ आचार्य. याच्या जीवनचरित्राविषयी फारशी माहिती मिळत नाही. एवढेच कळते, की तो मतिसागर मुनीचा शिष्य होता व द्राविड जैनसंघांपैकी नंदिसंघातल्या अरुंगळ शाखेचा आचार्य होता.

वादिराज ही त्याची पदवी आहे. पण पुढे तेच त्याचे नाव ठरले. त्याचे मूळचे नाव वेगळेच काहीतरी असावे. हा अनेक शास्त्रांत पारंगत होता. एका शिलालेखात त्याची तुलना अकलंकदेव (जैन), धर्मकीर्ती (बौद्ध), बृहस्पती (चार्वाक) व गौतम (नैयायिक) यांच्याशी केलेली आहे. त्याला षट्तर्कषण्मुख, स्याद्वादविद्यापती व जगदेकमल्ल अशाही पदव्या होत्या.

वादिराज सूरीने लिहिलेले पुढील पाच ग्रंथ उपलब्ध आहेत–

(१) पार्श्वनाथचरित – हे बारा सर्गांचे महाकाव्य आहे. वादिराजाने हे काव्य चौलुक्य चक्रवर्ती जयसिंहदेव याच्या राजधानीत त्याच्याच प्रेरणेने लिहिले.

(२) यशोधरचरित – हे चार सर्गांचे खंडकाव्य आहे.

(३) एकीभावस्तोत्र – हे पंचवीस पद्यांचे सुंदर स्तोत्र आहे. या स्तोत्राने स्तवन केल्यामुळे वादिराजाला झालेला कुष्टरोग दूर झाला, असे सांगतात. या स्तोत्राबद्दल दिगंबर जैन लोकांना फार आदर आहे.

(४) न्यायविनिश्चयविवरण – अकलंकदेवाच्या न्यायनिश्चय ग्रंथावरची ही विस्तृत टीका आहे. प्रत्यक्ष, अनुमान व आगम अशी त्या ग्रंथाची प्रकरणे आहेत. या ग्रंथात वादिराजाने अनेक जैनेतर मतांचे खंडन करून जैनदर्शनाचे तर्कसंगत असे मंडन केले आहे. जैन न्यायाच्या प्रसिद्ध ग्रंथांत या ग्रंथाची गणना होते. त्याची श्लोकसंख्या वीस हजार आहे. भारतीय ज्ञानपीठ (काशी) या संस्थेने हा ग्रंथ प्रकाशित केला आहे.

(५) प्रमाणनिर्णय – हा एक छोटासा पण स्वतंत्र ग्रंथ असून, त्याचे प्रमाण, प्रत्यक्ष, परोक्ष व आगम असे चार अध्याय आहेत. माणिक्यचंद्र जैनमालेत हा ग्रंथ प्रकाशित झाला आहे. या व्यतिरिक्त काकुत्स्थचरित, अध्यात्माष्टक व त्रैलोक्यदीपिका हे ग्रंथही वादिराजाचे असल्याचे सांगतात.'

वादिराजाची परंपरा ही मठपतींची परंपरा होती. या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

परंपरेत दान घेतले जात होते व दिलेही जात होते. हे मठपती जिनमंदिरे निर्माण करीत होते; त्यांचा जीर्णोद्धार करीत होते व अन्य मुनींची खाण्याजवण्याची सोयही करीत होते. [जै. सा. इ.; पू. का. भा.; जै. सि. भा., सप्टेंबर १९३९]

वादिरात एक बोधिसत्त्व. मंजुश्रीचा एक प्रकार. याचे वर्णन साधनमालेत केलेले आहे, ते असे – हा सोळा वर्षे वयाचा तरुण वाटतो. अर्धपर्यंकासनावर बसलेला. गौरवर्ण. हातांची व्याख्यानमुद्रा. व्याघ्र हे वाहन. विविध अलंकारांनी सुशोभित. [इं. बु. इ.]

वादीभसिंह (इ. स. चे ११ वे किंवा १२ वे शतक) एक जैन आचार्य. याचे मूळ नाव ओडयदेव असे होते. पुढे त्याच्या वादविवादातल्या प्राविण्यामुळे त्याला वादीभसिंह म्हणू लागले. पोच्चुंब या कर्नाटकातल्या गावी किंवा त्याच्या परिसरात याचे वास्तव्य असावे, असा तर्क आहे. जैनधर्म व जैनसिद्धान्त यांचा तो मर्मज्ञ पंडित असून, तर्क, व्याकरण, अलंकार, इ. शास्त्रांचाही जाणकार होता.

वादीभसिंहाच्या दोन काव्यकृती उपलब्ध आहेत. क्षत्रचूडामणी व गद्यचिंतामणी अशी त्यांची नावे आहेत. पहिली कृती पद्य असून, दुसरी गद्य आहे. दोहोंतही जीवंधराचे चरित्र वर्णित आहे. क्षत्रचूडामणीला नीतिग्रंथ असेही म्हणता येईल. त्यात प्रत्येक श्लोकाच्या पूर्वार्धात चरित्राचा अंश आणि उत्तरार्धात त्याला पोषक असा नीतिसिद्धान्त सांगितला आहे.

वादीभसिंहाचे समाधिस्थान तमिळनाडमधील तिरुमलै पर्वतावर विद्यमान आहे. [जै. सा. इ.; जै. सि. भा., जून १९४० व जानेवारी १९४९]

वाद्ये नृत्यगायनाला साथ व ताल देण्यासाठी वापरले जाणारे एक साधन म्हणजे वाद्य होय. शंकराला वाद्यांचा जनक मानतात. त्याचा डमरू हेच पहिले वाद्य होय. दक्षयज्ञाचा विध्वंस केल्यानंतर शंकर तांडवनृत्य करू लागला, तेव्हा त्याने नारद, तुंबरू व नंदी यांना वाद्ये निर्माण करण्याची प्रेरणा दिली आणि त्यांनी विविध प्रकारची वाद्ये निर्माण केली, अशी आख्यायिका प्रचलित आहे. त्रिपुरासुराचा वध करताना शंकराने तांडवनृत्य केले, तेव्हा ब्रह्मदेवाने एक अवनद्ध वाद्य तयार केले, अशी दुसरी आख्यायिका सांगितली जाते. सारांश, भारतीय वाद्यांची परंपरा अत्यंत प्राचीन आहे.

वाद्यांचे तत, अवनद्ध किंवा आनद्ध, सुषिर व घन असे चार प्रकार आहेत. वीणा, सारंगी, इ. तंतुवाद्ये ही तत वाद्ये होत. डमरू, मृदंग, नगारा, दुंदुभी, इ. चर्मवाद्यांना अवनद्ध वाद्ये म्हणतात. तोंडाने हवा फुंकून वाजविली जाणारी, वासरी, सनई, इ. वाद्ये ही सुषिर वाद्ये होत आणि, ज्यांत लाकडाचे किंवा धातूचे तुकडे एकमेकांवर आपटून ध्वनी उत्पन्न केला जातो, अशा चिपळ्या, टाळ, झांजा वगैरे वाद्यांचा समावेश घन वाद्यांत होतो.

डमरू

वैदिक युगात वीणा हे सर्वांत लोकप्रिय वाद्य होते. या वाद्यातून सात स्वर निर्माण होतात, असे ऋग्वेदात (१०.३२.४) म्हटले आहे. सामगायनाच्या वेळी वीणा वाजवीत. त्या काळी शंख हे प्रमुख सुषिर वाद्य होते. वैदिक साहित्यात अनेक वाद्यांचा निर्देश आढळतो. काही वाद्ये धार्मिक व सामाजिक समारंभात वापरली जात, काही केवळ रणवाद्ये असत, तर काही युद्धाच्या प्रसंगी तशीच इतर वेळीही वापरली जात. आघाटी, कर्करी, गर्गर, गोधा, तुणव, वेणू, नाडी, नालिका, वीणा, इ. वाद्ये यज्ञासारख्या धार्मिक कार्यात किंवा सांस्कृतिक समारंभात वापरीत. बकुर म्हणजे तुतारी किंवा कर्णा हे एक रणवाद्य होते. भेरी, शंख, दुंदुभी, इ. वाद्यांचा उपयोग रणा-प्रमाणे सामाजिक समारंभातही केला जात असे.

वैदिक युगाच्या पूर्वीच्या सिंधुसंस्कृतीचे जे अवशेष सिंध व पंजाब या प्रदेशांत सापडले आहेत, त्यांत ढोल, वीणा, कांस्य-ताल, इ. वाद्यांच्या आकृती पाहायला मिळतात. त्यावरून भार-तीय वाद्यांची परंपरा वैदिक युगाच्याही पूर्वीची आहे, असे दिसून येते.

रामायण व महाभारत या ग्रंथांत पणव, मृदंग, दुंदुभी, क्रकच, महानक, भेरी, झर्झर, तुर्य, पटह, डिंडिम, वंश, विपंची, आडंबर, शंख, मुरज, इ. अनेक वाद्यांचा उल्लेख आहे. त्यांचा उपयोग युद्ध, निरनिराळे समारंभ व मनोरंजन यासाठी होत असे. पूर्वी वेळी वीणा वाजवीत. प्रातःकाळी राजाला जाग येण्यासाठी काही वाद्ये वाजवीत. रामराज्याभिषेकाच्या प्रसंगी वादकांचा एक संघ उपस्थित होता, असा रामायणात (अयोध्या. १४.४०) उल्लेख आहे. रावणाच्या स्त्रिया वीणावादनात कुशल होत्या. पाणिनीच्या अष्टाध्यायीत वीणा, झर्झर व दुर्दुर नामक वाद्यांचा उल्लेख आहे. भरताचे नाट्यशास्त्र, शार्ङ्गदेवाचा संगीतरत्नाकर, अहोबलकृत संगीतपारिजात, इ. शास्त्रीय ग्रंथांत, वि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

निरनिराळ्या पुराणांत आणि अन्य संस्कृत व प्राकृत ग्रंथांत अनेक वाद्यांचे वर्णन आढळते. तथापि त्यावरून सर्व वाद्यांचे स्वरूप ध्यानात येत नाही. सुदैवाने प्राचीन शिल्पकृतींत व भित्तिचित्रांत अनेक वाद्यांच्या प्रतिकृती पाहायला मिळतात. त्याचप्रमाणे काही प्राचीन नाण्यांवरही वाद्यांची चित्रे छापलेली आढळतात.

संगीत हे प्राचीन काळी लोकजीवनाचे एक प्रमुख अंग होते. पूजा व धार्मिक उत्सव यांतही संगीताला महत्त्वाचे स्थान होते. त्यामुळेच प्राचीन मंदिरे व मूर्ती यांत तत्कालीन वाद्यांचे रूप व्यक्त झालेले आहे, असे श्री. कृष्णदत्त वाजपेयी म्हणतात.

वर उल्लेखिलेल्या चार वाद्यवर्गांचा परिचय असा –

तंतुवाद्ये – वीणा, तानपुरा, सतार, सारंगी, सुरसोटा, बीन, एकतारी, सरोद, दिलरुबा, ताऊस, फिडल, सारमंडळ, तुणतुणे, इ. तंतुवाद्यांत वीणेला प्रमख स्थान आहे. प्राचीन साहित्यात



वीणा

वीणेची अनेक नावे आढळतात. अमरावती, मथुरा व अजंटा येथील शिल्पकामांत वीणेची भिन्न-भिन्न रूपे दिसतात. गुप्त-सम्राट समुद्रगुप्त याच्या एका सुवर्णमुद्रेवर तो स्वतः वीणावादन करीत असल्याचे चित्र दिसते.

अवनद्ध वाद्ये – या वाद्यांत मृदंग, तबला, ढोल, ताशा, डमरू, चौघडा, संबळ, डफ, खंजरी, पखवाज, नगारा, डंका, इ. वाद्यांचा समावेश होतो. या सर्वांत मृदंग मुख्य होय. प्राचीन साहित्य व कलाकृती यांत मृदंगाची अनेक रूपे दिसतात. पवाया, अमरावती, सांची, मथुरा, भूमरा येथील शिल्पकृतींत मृदंग वाजवणारे लोक दाखविले आहेत.

सुषिर वाद्य – या वर्गात वेणू, तुरही, शंख, सनई, इ. वाद्यांचा समावेश होतो. मथुरा, अमरावती, खजुराहो, कोणार्क, सांची येथील शिल्पांत वंशी किंवा बासरी या वाद्याची विविध रूपे आढळतात. भूमरा येथील शिवमंदिरात सनई व सिंगी वाजवणारे आढळतात. प्राचीन शिल्पांत शंखांचे विविध प्रकार दिसतात.

घन वाद्ये – कांसे, पितळ, लाकूड, यांपासून बनवलेली वाद्ये या वर्गात येतात. संगीतदामोदर नामक ग्रंथात करताल, कांस्यताल, जयघंटा, श्रुतिका, घर्घरा, झंझा, तालमंजीरा, इ. नावे आहेत. कोणार्क येथील मंदिरात झांज वाजविणाऱ्या तरुणीची प्रतिमा दिसते. मथुरा, भरहूत, अजंटा व पवाया येथील शिल्पांत मंजीरा हे वाद्य आढळते. काष्ठताल किंवा कठताल म्हणजे टिपऱ्या होत. बाघ येथील लेण्यात टिपऱ्या घेऊन नाचणारे स्त्री-पुरुष दिसतात.

श्री. कृष्णदत्त वाजपेयी यांच्या मते प्राचीन कलाकृतींमध्ये वृंदवादनाची चित्रेही आढळतात. सामूहिक वादनाला तूर्य असे नाव होते. त्यात पाच वाद्ये वाजवणारे असत. पुत्रजन्म, विवाह, इ. प्रसंगीं असे वृंदवादन होत असे. राजे व धनिक लोकच तसे समारंभ करीत. मोगलकालातील नौबत म्हणजे सामूहिक वादनच होय. भरहूत, पवाया, मथुरा, अमरावती, अजंटा, इ. ठिकाणी अशा प्रकारची शिल्पे आढळतात. भरहूत येथे सनपूर्व पहिल्या शतकातील शिल्पकामात दोन वीणा, मंजीरा, मृदंग, इ. वाजवणाऱ्या कित्येक स्त्रिया दिसतात.

मात्र विश्वंभरनाथ भट्ट यांच्या मते पाश्चात्य देशांत वृंदवादनाचा जसा विकास झाला आहे, तसा तो भारतात झालेला नाही. पाश्चात्य संगीतात स्वरसंवादाला महत्त्व असते, तर भारतीय संगीतात स्वरमाधुर्याला ते असते, हे त्याचे कारण त्यांनी सांगितले आहे.

भारतीय वाद्यांची विविधता महाकाव्ये व पुराणे यांतील वर्णनांवरून ध्यानात येते, तशीच ती निरनिराळ्या ठिकाणच्या शिल्पकामांतील वाद्यांच्या आकृतींतही दिसून येते. कलकत्ता येथील वस्तुसंग्रहालयात प्राचीन व अर्वाचीन वाद्यांचा जो महान



सारंगी

संग्रह केलेला आहे, तो पाहून हे कळते, की बहुतेक वाद्ये आजही त्यांच्या प्राचीन रूपांतच वापरली जात आहेत. मुसलमानांच्या आगमनामुळे अरबस्तान व इराण या देशांतील काही वाद्ये उ. भारतात प्रचारात आली. भारतीय वाद्यांचे प्राचीन स्वरूप द. भारतात विशेष प्रमाणात आढळते.

गजाचा उपयोग प्रथम भारतात सुरू झाला, तो सारंगी वाजविण्यासाठी होय. कालांतराने पाश्चात्य देशांतील लोक गज वापरू लागले. बासरीदेखील मूळची भारतातीलच आहे. ती गोपाल कृष्णामुळे विशेष प्रख्यात आहे. भारतीय वाद्यांचा प्रसार

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुर्कस्तान, चीन, इंडोनेशिया, हिंद-चीन, इ. देशांतही झालेला आहे. पूर्वेकडील अनेक मंदिरांत व प्रासादांत भारतीय वाद्यांची चित्रे अंकित केलेली दिसतात.

वाद्यांचा विकास – यासंबंधी प्रा. ग. ह. तारळेकर यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

फार प्राचीन काळापासून भारतात वक्राकार वीणा प्रचारात होती. सिंधु-संस्कृतीत उभी वक्राकार वीणा प्रचलित होती, हे तर्काने सांगता येते. धनुष्यावरून कल्पना घेऊन प्रगत मानव-समाजात गायनाच्या साथीसाठी अशी वीणा निर्माण होणे विकास-क्रमाच्या दृष्टीने साहजिकच होते. वैदिक आर्यांच्या संस्कृतीत



अमरावती येथील शिल्पातील वाद्ये

सामगायनामुळे कंठ-संगीताला क्रमबद्ध स्वरूप प्राप्त झाले. सामगायक वीणेची साथ सामगायनासाठी घेत असत. गंधर्व हे गायकही त्या काळी वीणेच्या साथीवर गायन करीत. त्यामुळे वीणावादनाचे महत्त्व धार्मिक व लौकिक या दोन्ही प्रकारच्या गायनात सिद्ध झाले होते.

सामगायनात भारतीय शुद्ध स्वरसप्तक सिद्ध झाले. त्यामुळे सात स्वरांसाठी वीणेला सात तारा लावणे क्रमप्राप्त झाले. अंतर गांधार व काकली निषाद हे दोन विकृत स्वरही अल्प-प्रमाणात का होईना, गानप्रचारात आल्याने वीणेला नऊ तारा योजणे आवश्यक झाले.

श्रौतसूत्रांत ज्या अनेक वीणांचा उल्लेख आहे, त्यांतील अलाबू ही भोपळा लावलेली वीणा होय. वाण ही प्राचीन काळातली काही प्रमाणात स्पष्ट स्वरूप असणारी वीणा होती. शंभर तारांचे हे वाद्य यज्ञाच्या वेळी वापरीत.

वक्राकार वीणेत तारा स्वरांना लावणे व स्थिर ठेवणे हे त्रासाचे काम होते. कारण त्या वीणेला खुंट्या नसत. खुंट्या असणाऱ्या वीणांचा प्रचार सुरू झाल्यावर वक्राकार वीणांचे महत्त्व कमी झाले. वक्राकार वीणेच्या तारा निमुळत्या अशा लहान काठीच्या तुकड्याने छेडून, हाताच्या बोटांनी वाजविल्या जात. दुसऱ्या प्रकारच्या वीणेच्या तारा एका हाताच्या बोटांनी छेडून; दुसऱ्या हाताच्या बोटांनी दाबून वाजवल्यामुळे गमक, मींड, इ. प्रकार व...नातून निर्माण करता येत. मध्यकालाच्या आरंभी वीणेच्या दांडीवर पडदे बसवले जाऊ लागले. त्यामुळे स्वरांची स्थाने निश्चित होऊन गमक व मींड सुलभपणे निर्माण करता येऊ लागली व अनेकविध स्वरालंकारही उत्पन्न करता येऊ लागले. मध्यकालात वादनासाठी लहान काठीऐवजी धनुकलीचा उपयोग सुरू झाला. धनुकलीची दोरी घोड्याच्या शेपटीच्या केसांची बनवीत. तिने तारेवर घर्षण करून वाजवल्यामुळे स्वराविष्काराचे स्वरूप थोडे वेगळे झाले. शार्ङ्गदेवाने वर्णिलेली पिनाकी वीणा धनुकलीने वाजवली जात होती.

वीणेच्या दांडीला एक किंवा दोन भोपळे लावण्याची प्रथा आहे. किनरी या वीणेच्या मोठ्या प्रकारात तीन भोपळे दिसून येतात. दोन भोपळे असलेली, वांबूच्या दांडीवर १३ पडदे असणारी वीणा बेलूर येथील शिल्पात आहे. ही वीणा आधुनिक बीनची जननी होय. मध्यकालाच्या प्रारंभीच्या अनेक शिल्पांत, भोपळ्याचा वरचा भाग कापून, त्यावर गोलाकार फळी किंवा कातडे बसवून व त्याच्या मध्यभागी घोडी ठेवून, भोपळ्याला पुढे दांडी जोडलेली अशी तंबोऱ्यासारखी वीणा आढळते. एकतारीसारखे केवळ आधारस्वरच देणारे वाद्य प्राचीन काळी होते. आधारस्वराचा भरणा देणारे तंबोऱ्यासारखे आधुनिक वाद्य विकसित होणे संगीतशास्त्राच्या विकासाच्या दृष्टीने क्रमप्राप्तच होय. पंचम किंवा मध्यम, दोन मध्य षड्ज व खर्ज षड्ज क्रमाने झंकारत असल्याने आणि अनुरणनामुळे षड्ज-मध्यम व षड्ज-पंचम हे संवाद मिळत असल्याने, गायनाच्या साथीमध्ये तंबोऱ्याचे स्थान अनिवार्य ठरले आहे.

तंबोऱ्यासारख्या तीन तारांच्या वीणेवर पडदे बसवून सितार हे वाद्य मध्यकाळात तयार झाले. ही सितार हे आधुनिक सतारीचे पूर्वरूप होय. मध्यकालात लाकडी पेटीवर तारा आडव्या बसवून मत्तकोकिळा किंवा स्वरमंडळ हे वाद्य तयार झाले. सांबो



शंख

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येथील शिल्पात अशा प्रकारचे सात तारांचे एक वाद्य आढळते. सरोद, सारंगी, रबाब ही आधुनिक वाद्ये वीणेतूनच विकसित झालेली आहेत.

सुषिर वाद्यांत शंख व वेणू ही वाद्ये बरीच प्राचीन आहेत. मधुकरी नावाचे, तोंडाशी थरथरणारी जिभली असणारे सुषिर वाद्य मध्यकाळात होते. ते वाद्य महुरी या नावाने लोकवाद्य म्हणून आजही प्रचारात आढळते. या वाद्याची सुधारलेली आवृत्ती म्हणजे आधुनिक काळातली सनई होय. नागस्वरम हे याच प्रकारचे दक्षिण भारतीय वाद्य आहे.

अवनद्ध वाद्यांचा आरंभ भूमि-दुंदुभीने झाला. त्याचे रूपांतर पुढे दुंदुभी या वाद्यात झाले. ते रणवाद्य होते. गायनाला साथ देण्यासाठी मृदंग हे तालवाद्य प्राचीन काळापासून प्रचारात आहे. त्याचे भांडे पूर्वी मातीचे होते; ते मध्यकाळात लाकडाचे करू लागले. प्राचीन काळी तीन तोंडांचा मृदंगही होता. सध्याचे पखवाज व खोल हे मृदंगाचेच प्रकार आहेत. एक तोंड असलेल्या अवनद्ध वाद्याचे सर्वांत प्राचीन स्वरूप म्हणजे दुर्दुर होय. हेच वाद्य पुढे घट या नावाने प्रचारात राहिले. याचे तोंड लहान असते. रुंद तोंडाचे असले वाद्य पवई येथील प्राचीन शिल्पात आढळते. बादामीच्या एका शिल्पात उभा मृदंग व हे रुंद तोंडाचे वाद्य एक वादक वाजवीत असल्याचे दृश्य आढळते. यावरूनच पुढे तबला व डग्गा या जोडवाद्याची निर्मिती झाली असावी.

काही पंडितांच्या मते अंबुज, वीणा, सतार, गोटुवाद्यम, सरोद, सारंगी व इसराज ही वाद्ये म्हणजे आलापिनी, परिवर्धिनी, विपंची, कच्छपी व मत्तकोकिला या प्राचीन वाद्यांची आधुनिक रूपे होत. त्याचप्रमाणे प्राचीन पटह, सुराज, भेरी, दुंदुभी, इ. वाद्यांची मृदंग व तबला ही आधुनिक रूपे आहेत. याच्या उलट काहींचे मत असे आहे, की भूमि-दुंदुभीवरून मृदंग हे वाद्य निर्माण झाले आणि त्यानंतर पणव, झल्लरी, पटह, इ. वाद्ये बनविली गेली. सांप्रत मृदंगाला पखवाजही म्हणतात. पण प्राचीन काली त्याला पुष्कर म्हणत. मृदंग हे अत्यंत प्राचीन वाद्य आहे. ते रामायणकालात प्रचारात होते. दुर्दुर नामक प्राचीन वाद्य तबल्यासारखे होते. काहींच्या मते दुर्दुर या वाद्यावरूनच तबला हे वाद्य बनवण्यात आले. फारसी तब्ल या शब्दापासून तबला हा शब्द आला आहे आणि त्याचा अर्थ नगारा असाच आहे. गेली सुमारे दीडशे वर्षे ख्यालगायन प्रचलित आहे आणि त्याच्या साथीला तबल्याचाच उपयोग केला जात आहे. हिंदूंच्या मंदिरांतून मात्र मृदंगाचाच उपयोग केला जातो. बोल-वादनाच्या दृष्टीने तबला अत्यंत उपयुक्त आहे. त्यामुळे बहुतेक गायक कलाकार तबल्याची साथ पसंत करतात. सर्व अवनद्ध वाद्यांत तबला अधिक लोकप्रिय आहे.



मृदंग

प्राचीन काळी धार्मिक विधीत व उत्सव-समारंभात वाद्य-वादनाला महत्त्वाचे स्थान असले, तरी धंदेवाईक वादकांना समाजात मानाचे स्थान नव्हते. त्यांचा गणिकांशी नित्य संबंध येत असल्यामुळे, ते शूद्र वर्णाचे मानले जात. मात्र त्यांच्या कलेला प्रतिष्ठा होती. सांप्रत संगीताच्या प्रसारामुळे समाजाची दृष्टी बदलली असून, वादकांना प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. गायकांची जशी घराणी आहेत, तशी तबला, सतार, इ. वाद्ये वाजवणाऱ्यांचीही काही घराणी प्रसिद्ध आहेत. प्रत्येक घराण्याचे वादन विशिष्ट स्वरूपाचे असून, ते गुरुशिष्यपरंपरेने चालू राहते. वाद्ये तयार करण्याचे कामही असेच परंपरेने चालत आलेले आहे.

शिंग

गायनाला अनुरूप अशी साथ करून वाद्य-वादक गायनाचा रंग खलवितो. तो स्वतःचे वादनकौशल्य श्रोत्यांना दाखविण्याचा प्रयत्न सहसा करीत नाही. काही वेळा गायक तंतुवाद्यातून निघणारे स्वरालंकार आपल्या गळ्यातून काढण्याचा प्रयत्न करतो किंवा तबल्याच्या बोलांना अनुसरून लयीचा आविष्कार करू लागतो. त्यामुळे गायनावर वादनाचा प्रभाव काही प्रमाणात पडतो. स्वतंत्र वाद्यवादनात मात्र वादकाला आपले कौशल्य दाखविण्याला पूर्ण अवसर मिळतो.

गेल्या शतकापासून बाजाची पेटी किंवा हार्मोनियम हे परदेशी वाद्य बरेच प्रचारात आले आहे. ते वाजवणे सहज शिकता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येत असून, ते खूप लोकप्रियही आहे. बालगंधर्वांसारखे थोर गायकही त्याचा उपयोग करीत होते. पण शास्त्रीय संगीतात त्याला स्थान लाभले नाही. रागपद्धती ही भारतीय संगीताचा प्राण आहे. पेटीच्या साहाय्याने रागगायन शिकल्याने त्या गायनाला ढोकळ स्वरूप येते. रागपद्धतीवर प्रभुत्व मिळाल्यावर गायकाने पेटीची साथ घेतली तर काही बिघडत नाही. मात्र संगीत शिकताना प्रारंभी पेटीची साथ घेऊन, पुरेशी प्रगती झाल्यानंतर गायकाने तंबोऱ्याच्या साथीनेच सराव करणे चांगले, असे जाणकारांचे मत आहे.

हिंदूंच्या धार्मिक कार्यांत व समारंभांत वाद्यांना महत्त्वाचे स्थान असते. वाद्यांचा निनाद म्हणजे आनंदाचा आविष्कार होय. त्यावाचून कोणताही धार्मिक विधी किंवा उत्सव पार पडत नाही. धर्मशास्त्रात वाद्यांचे विधान सांगितलेले आहे. उत्सव, यात्रा, जत्रा, इ. प्रसंगीं, तसेच पूजेअर्चेतही गायन, वादन, नर्तन हे राजोपचार असतात. सर्व देवस्थानांत हा उपक्रम चालू असतो. पहाटे चौघडा व पूजेच्या वेळी सनई ही त्यातली प्रमुख वाद्ये होत. सर्व देवालयांत घंटा टांगलेल्या असतात आणि प्रत्येक भक्त देवदर्शनाच्या वेळी घंटानाद करतोच. देव-पूजेतही घंटानाद केला जातो. लग्नासारख्या कार्यात चौघडा व सनई ही मंगल वाद्ये वाजवण्याची प्रथा पूर्वीपासून चालू आहे. निरनिराळ्या मिरवणुकींत चौघडा, ढोल, सनई, लेझीम, शिंग, तुतारी, इ. वाद्यांचा उपयोग करतात. चिपळ्या, टाळ, मृदंग, झांजा यांचा उपयोग भजनकीर्तनात केला जातो. [वे. रा. द.; प्रा. भा. सा. सां. भू.; श्री. कुळकर्णी-रविवार सकाळ, १ नोव्हेंबर १९७०; श्री. कृष्णदत्त वाजपेयी यांचे भाषण-आकाशवाणी, लखनऊ; श्री. प्यारेलाल श्रीमाल, धर्मयुग, ११ मार्च १९५८; 'संगीत' मासिक, वाद्य-संगीत-अंक, जानेवारी १९५१; न. हिं. ध.; भा. वा. इ.]

वानप्रस्थ हिंदू वर्णाश्रमधर्मातील चार आश्रमांपैकी तिसरा आश्रम. याची दोन लक्षणे अशी –

(१) गृहस्थाश्रममपहाय गृहीतमुनिवृत्तिरसंन्यस्तः। (ल. सं.)

अर्थ – गृहस्थाश्रमाचा त्याग करून पण संन्यास न घेता मुनिवृत्तीने वनात राहणे म्हणजे वानप्रस्थ होय.

(२) पुत्रमुत्पाद्य वनवासं कृत्वा अकृष्टपचफलादि भक्षयित्वा ईश्वराराधनं करोति यः स वानप्रस्थः। (श. क.)

अर्थ – पुत्र उत्पन्न करून आणि नंतर वनवासाला जाऊन न नांगरलेल्या भूमीतून फळे-मुळे, इ. भक्षण करून जो ईश्वराची आराधना करतो, तो वानप्रस्थ होय.

पंचवीस वर्षे गृहस्थाश्रमात राहिल्यावर नंतर घरदार सोडून वनात राहायला जाणे आणि तितिक्षा व तपश्चर्या यांनी आत्मकल्याण साधण्याचा प्रयत्न करणे याला वानप्रस्थ म्हणावे, असा याचा तात्पर्यार्थ आहे. हा आश्रम वयाच्या ७५ वर्षांपर्यंत करायचा असतो. जर अंतःकरणात तीव्र वैराग्य उत्पन्न झाले, तर गृहस्थाश्रम न करताही ब्रह्मचर्यातून सरळ वानप्रस्थ स्वीकारण्यास धर्मशास्त्राची अनुज्ञा आहे.

वानप्रस्थात आत्मशुद्धी व तत्त्वज्ञान या गोष्टी मिळवायच्या असतात. त्यात शारीरिक सुखोपभोगांचा त्याग करून तात्त्विक विचारांत निमग्न राहायचे असते. त्यासाठी वानप्रस्थाने अग्नी, ऊन आणि पाऊस सहन करावे, दाढी-मिशा व जटा वाढवाव्या, नखेही कापू नयेत, प्रायः मौन धारण करावे, ज्ञानप्राप्तीसाठी आरण्यके व उपनिषदे यांचे अध्ययन करावे आणि तत्त्वज्ञानविषयक सर्व संशय फेडून घेण्यासाठी एखाद्या तत्त्वज्ञ ऋषीचे शिष्यत्वही पत्करावे, असे सांगितले आहे.

बौधायनाने वानप्रस्थाचे पचमानक व अपचमानक असे दोन भेद सांगून त्या प्रत्येकाचे पुन्हा पाच पाच उपभेद दाखवले आहेत. फळे-मुळे व तृणधान्ये शिजवून खाणारे ते पचमानक आणि फळे व कंदमुळे न शिजवता खाणारे ते अपचमानक होत.

रामायण-महाभारतांत वानप्रस्थांच्या वैखानस, वालखिल्य, पत्राहार, सलिलाहार, फेनप, क्षीरप, धूमप, मरीचिप, गात्रशय्य, इ. अनेक कोटी सांगितल्या आहेत.

मन्वादी स्मृतिकार व आपस्तंबादी सूत्रकार यांनी वानप्रस्थातले आणखी काही विधि-निषेध सांगितले आहेत, ते असे –

मनू – गृहस्थाला नातवंड झाले, की त्याने वानप्रस्थ करावा. वाटल्यास पत्नीला बरोबर घेऊन जावे किंवा तिला मुलांच्या स्वाधीन करून जावे. प्राणधारणेपुरतेच अन्न मिळवावे. हर्ष-शोकांत समवृत्ती ठेवावी.

याज्ञवल्क्य – त्रिकाल स्नान करावे. प्रतिग्रह घेऊ नये. स्वाध्याय करावा. भिक्षा मागून आठ ग्रास खावे. उपकारक व अपकारक यांच्याविषयी समवृत्ती ठेवावी. तप करावे.

वसिष्ठ – जटा व मृगचर्म धारण करावे. नांगरलेल्या जमिनीवर राहू नये. तशा भूमीतली फळे व धान्येही खाऊ नयेत. ब्रह्मचर्य पाळावे. क्षमाशील असावे.

शंख – अग्नीची उपासना करावी. वन्य फल-मूलांचा आहार करावा. जे उपलब्ध असेल त्यानेच देव, पितर व अतिथी यांचे संतर्पण करावे.

आपस्तंब – अग्निहोत्र करावे. शिलोञ्छवृत्तीने राहावे. (शेतात पडलेली कणसे वेचून आणून त्यावर उपजीविका करणे म्हणजे शिल व कण गोळा करणे म्हणजे उञ्छ होय.) हळूहळू मूल, फल, पर्ण, तृण, आप, वायू, अशा प्रकारे आहार कमी करीत शेवटी निराहार व्हावे आणि जीविताचा शेवट करावा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वाध्याय, हवन व ब्रह्मचर्य यांचे पालन करावे. निवारा केव अग्निहोत्रासाठी असावा आणि स्वतः उघड्या आकाशाखाली राहावे.

बौधायन – यज्ञ व स्वाध्याय करावा. आहारावर नियंत्रण ठेवावे. आत्मशुद्धीसाठी चांद्रायणादी कृच्छ्र व्रते आचरावी.

ऋग्वेदात वानप्रस्थाचा उल्लेख नाही. तांड्यब्राह्मणात वैखानस मुनींचा निर्देश आहे, ते बहुधा वानप्रस्थच असावे (१४. १६). गौतमाने वानप्रस्थाला वैखानसच म्हटले आहे. बौधायन म्हणतो, की वैखानसशास्त्रात सांगितलेल्या विधि-निषेधांचे जो पालन करतो, तो वानप्रस्थ होय (बौ. ध. सू. २.६.१९). बौधायनाच्या काळी देशात वैखानसशास्त्र निर्माण झाले होते, असे वाटते. वेदोत्तरकाली वैखानसातूनच वानप्रस्थाचा विकास झाला. वानप्रस्थाचा स्पष्ट उल्लेख पहिल्या प्रथम मिळतो, तो जाबालोपनिषदात. तिथे म्हटले आहे, ते असे –

ब्रह्मचर्यं परिसमाप्य गृही भवेद् गृही भूत्वा वनी भवेद्वनी भूत्वा प्रव्रजेत् ।

अर्थ – ब्रह्मचर्याची परिसमाप्ती करून गृहस्थ व्हावे. गार्हस्थ्य पुरे करून वनी म्हणजे वानप्रस्थ व्हावे आणि वानप्रस्थातून संन्यास करावा.

मनच्या मते हा आश्रम त्रैवर्णिकांनाच विहित असून, शूद्रांना वर्ज्य आहे. मात्र राजाची आज्ञा मिळाली तर शूद्राला वानप्रस्थाश्रम घ्यायला हरकत नाही (म. भा. शांति. ६३.१२).

वानप्रस्थाचा विशेष प्रचार ब्राह्मण व क्षत्रिय यांच्यामध्येच होता. व्यास, वाल्मीकी, वसिष्ठ, अत्री, शरभंग, सुतीक्ष्ण, इ. ब्राह्मण वानप्रस्थ होत. ययाती, धृतराष्ट्र, रघू हे क्षत्रिय वानप्रस्थ होत. धृतराष्ट्र म्हणतो, की पुत्रांवर भार सोपवून वनाचा आश्रय करणे ही आमच्या वंशाची परंपरा आहे (म. भा. शांति. ३१.३८). वैश्यवर्गात वानप्रस्थाचा विशेषसा प्रचार नव्हता. अपवादात्मक उदाहरण श्रवणकुमाराच्या वापाचे होय. वैश्य हे धन-धान्याच्या व्यवसायात निमग्न असत. त्यातून त्यांना वर्चोत्पादन भरपूर होत असे. त्यामुळे प्रस्तुत व्यवसाय टाकून आणि त्याचबरोबर सर्वस्वाचा त्याग करून वनात जाणे, ही गोष्ट त्यांना कठीण होत असावी.

त्रैवर्णिकांच्या स्त्रियांना वानप्रस्थाची अनुज्ञा होती. कुंती, गांधारी, सत्यवती ही वानप्रस्थ स्त्रियांची उदाहरणे होत.

अंतिम सत्याचे ज्ञान मिळवून निःश्रेयस् किंवा मोक्ष मिळवणे, हे मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ ध्येय असल्याचे भारतातल्या सर्व विचारवंतांनी म्हटले आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी ब्रह्मचर्यातले शिक्षण व गृहस्थाश्रमातला कर्मयोग ही दोन्ही साधने अपुरी आहेत, असे काही विचारवंतांना वाटू लागले. त्यांनी गृहस्थाश्रमातल्या सांसारिक जीवनाची उपेक्षा केली नाही; पण एका निश्चित कालानंतर माणसाने गृहस्थाश्रमाचा त्याग करून आत्मज्ञानासाठी घराबाहेर पडावे, असे प्रतिपादिले.

उपनिषदांच्या कालापूर्वी गृहस्थाश्रमाविषयी दोन स्पष्ट मते होती, ती अशी –

(१) गृहस्थाश्रमात राहून निष्काम कर्मयोगाच्या आचरणाने कुटुंब व समाज यांच्याविषयीची कर्तव्ये आचरीत असताच आत्म्याचा विकास करावा.

(२) गृहस्थाश्रम न स्वीकारता म्हणजेच चार आश्रमांचा अनुक्रम न स्वीकारता ब्रह्मचर्यातूनच सरळ वनवास करावा.

उपनिषदांच्या कालापर्यंत वरील पहिल्या मताला प्राधान्य होते. तोवर वैदिक संस्कृतीत वानप्रस्थ व संन्यास यांना प्रतिष्ठा मिळाली नव्हती. पुढे सूत्रे व स्मृती यांच्या काली वैदिक धर्मात वरील दोन आश्रमांचा समावेश केला गेला आणि त्याबरोबरच गृहस्थ व वानप्रस्थ यांच्यासाठी प्रत्येकी २५ वर्षांचा कालही निश्चित केला गेला.

गृहस्थाश्रमाविषयी वैराग्य धारण करणे याचा प्रथम परिचय मुनी व यती यांच्या संस्थांमध्ये मिळतो. वेदकाळातच असे काही मुनिलोक होते, की जे गृहस्थ लोकांच्या वस्तीपासून दूर राहून तपोमय जीवन जगत. गृहस्थोपयोगी यज्ञ आणि सांसारिक ऐश्वर्य यांची त्यांना रुची नव्हती. वैदिक साहित्यातली आरण्यके ही अशा मुनींनीच निर्माण केलेली आहेत. त्यांच्या अध्ययनाचा अधिकार अरण्यात राहणाऱ्या लोकांनाच होता आणि गावात किंवा नगरात राहणाऱ्यांना तो नव्हता. अरण्यातले तप व श्रद्धा यांनी युक्त असलेले जीवन जगणारे हे लोक विद्वान असत. ब्रह्मचारी लोकांप्रमाणेच तेही भिक्षा मागून जगत. वानप्रस्थजीवन हे बहुतांशी ब्रह्मचर्याप्रमाणेच होते. ब्रह्मचर्यातली तपोमय वृत्ती आणि ज्ञानसाधना वानप्रस्थात अधिक दृढ होऊन ती चरम सीमेपर्यंत पोचत असे. याउलट गृहस्थ लोक आपल्या साऱ्या शक्ती केवळ ब्रह्मज्ञानासाठी वापरू शकत नसत. कारण त्यांना संसाराची अनेक व्यवधाने असत. पण हळूहळू लोकांमध्ये अशी भावना बळावू लागली, की ब्रह्मज्ञान मिळवणे हे गृहस्थालाही आवश्यक असून, त्यानेही शेवटी अरण्यात जाऊन तप आणि भिक्षाचर्य यांची कास धरली पाहिजे.

उपनिषत्कालात ही धारणा बलवत्तर झाली व लोकांची वानप्रस्थाविषयीची अभिरुची वाढली. गृहस्थाश्रम न स्वीकारताच वनात जाणे किंवा गृहस्थाश्रमात थोडे दिवस राहून लगेच त्यातून बाहेर पडणे, अशा वृत्तीचे बरेच लोक निर्माण होऊ लागले. केवळ ब्राह्मणांतच नव्हे, तर राजे लोकांतही अशी धारणा बळावली, की वार्धक्यात गृहस्थ-जीवनात राहणे बरे नाही, डोक्याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केस पिकू लागताच राज्यत्याग करून वनात जाणे, हे चांगले.

मनूने वैदिकांप्रमाणेच गृहस्थाश्रम हा सर्वश्रेष्ठ मानला हे खरे; पण त्यानेही आयुष्याच्या अखेरीस गृहस्थाने वानप्रस्थ व संन्यास करावे, असा आदेश दिलेला आहे. मनूच्या मते गृहस्थाश्रम अनिवार्य आहे. वानप्रस्थ त्या तुलनेने गौण होय. मनूचा संन्यास हा जवळजवळ कर्मयोगच आहे. मनूच्या मते संन्यासीही घरात राहू शकतो. जर एखादी व्यक्ती जीवनभर कर्तव्यपालन करीत गृहस्थच राहिली, तर ती मनूच्या मते निंदनीय नाही. पुराणकारांचा कल मात्र वानप्रस्थ व संन्यास यांच्याकडे अधिक वळला. त्यांनी म्हटले, की घरात राहत असता मरण आल्यास भवबंध कायम राहतो; कमीत कमी मृत्यू एखाद्या तीर्थस्थानात तरी व्हावा (पद्म पु. सृष्टि. ४७). भागवतपुराणात गृहस्थाला निष्काम कर्मयोगाच्या द्वारे मोक्ष मिळतो, असे सांगितले असले, तरी गृहस्थजीवनाला फारशी प्रतिष्ठा दिलेली नाही.

य: प्राप्य मानुषं लोकं मुक्तिद्वारमपावृतम् ।
गृहेषु खगवत् सक्तस्तमारूढच्युतं विदुः ॥

(भाग. पु. ११.७.७४)

अर्थ – हा मनुष्यलोक मुक्तीचे अनावृत द्वार आहे. मनुष्यजन्म घेऊनही जो, पक्ष्याने घरट्याचीच आसक्ती धरावी तसा, घराचीच आसक्ती धरतो, त्याला आरूढच्युत म्हणतात.

महाभारताच्या स्त्रीपर्वातही गृहस्थजीवनातल्या आपत्ती एका रूपकाच्या द्वारे सांगून, त्याविषयी वैराग्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे (स्त्री. ५.६–७).

बौद्ध व जैन संस्कृतींचा अभ्युदय झाल्यानंतर तर गृहस्थाश्रमाचे महत्त्व घटले आणि भिक्षुवृत्तीचे महत्त्व वाढले. बौद्ध–जैनांनी जरी गृहस्थाच्या आत्मकल्याणासाठी काही योजना सांगितली, तरी त्यांनी गृहस्थाश्रम आवश्यक असल्याचे कधीच मानले नाही. दोहोंच्याही शास्त्रग्रंथांत गृहस्थाश्रमाच्या दोषांचीच गणना अधिक आढळते. गौतम बुद्धाच्या उपदेशात अशी काही शक्ती होती, की जो कोणी त्याच्या समोर येईल, तो त्याचा अनुयायी बनावा. त्याने गृहस्थजीवन किती कष्टप्रद असते, याकडेच लोकांचे लक्ष वेधले. तो म्हणतो—' इंद्रिये आपापले विषय भोगीत असता जे सुख प्रत्ययाला येते, त्याला मी गोड विष समजतो. या सुखोपभोगासाठी मनुष्य मन, वाणी व शरीर यांच्या योगाने घोर दुराचार करतो व त्यांचा परिणाम म्हणून मेल्यानंतर दुर्गती भोगतो' (महादुक्खक्खन्ध सुत्तन्त । १.१२). गौतमाने गृहस्थाश्रमाचे विवेचन करीत असता म्हटले – ' पुत्र व पशू यांच्यामध्ये आसक्त असणाऱ्या मनुष्याला मृत्यू अशा प्रकारे कवटाळतो, की झोपलेल्या गावाला नदीचा पूर. अशा स्थितीत पुत्र, पिता किंवा बंधू कोणीही त्याला वाचवू शकत नाही. म्हणून शीलवान पंडित शीघ्र निर्वाणाला नेणाऱ्या मार्गाला अनुसरतात' (धम्मपद मग्गवग्ग ५.७). त्यावरोबरच गौतम बुद्धाने निर्वाणाचे असे काही मनोरम चित्र लोकांच्या पुढे उभे केले, की ऐकणाऱ्याला त्याचाच लोभ व्हावा. अशा स्थितीत बुद्धानुयायांनी गृहस्थजीवनाच्या जंजाळात न पडता सरळ निर्वाणासाठी मुनी होण्याचा मार्ग धरला तर त्यात नवल नाही.

जैनांनीही मुनिमार्गच सर्वश्रेष्ठ मानला. एखाद्या व्यक्तीने स्थावरजंगम संपत्ती बाळगणे किंवा तशा गोष्टींसाठी संमती देणे, हे मोक्षाला विरुद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. मानवजीवन हे नश्वर, घृणास्पद व चंचल असल्यामुळे ते सुधारण्यासाठी प्रव्रज्या हा एकमात्र उपाय त्यांनी मानला.

बौद्ध मुनींच्या बाबतीत एक नियम होता, की त्यांनी वर्षातले आठ महिने भ्रमण करावे व पावसाळ्याचे चार महिने एखाद्या विहारात आश्रय घ्यावा. भिक्षा मागून त्यांनी आपल्या भोजनाची सोय करावी. गौतम बुद्धाने मध्यमाप्रतिपद हा सिद्धान्त सांगून भिक्षूंचा जीवनमार्ग पुष्कळ सोपा केला. वैदिक वानप्रस्थ हे कठोर तप आचरीत आणि ऋतुचक्राचे सगळे आघात सहन करीत. तसा त्यांना नियम होता. बुद्धाने आपल्या भिक्षूंना सांगितले, की अतिरिक्त भोग भोगू नका, देह कष्टविणारे तप करू नका. या सवलतीमुळे बुद्धाचा भिक्षुसंघ खपच वाढला, विस्तारला.

जैनांनी मात्र कठोर तपस्येवर भर दिला. जैन मुनींनी आपल्या खाण्या-पिण्यासाठी घर बनवू नये, भोजनाची किंवा वस्त्राची चिंता करू नये, त्यांनी स्मशान, शून्यागार, गुहा किंवा शिल्पशाला यांमध्ये राहावे, थंडीपासून बचाव करण्यासाठी धुनी पेटवू नये, भिक्षेत मिळेल तेच अन्नवस्त्र स्वीकारावे, असे सांगितलेले आहे (आचारांगसूत्र). भगवान महावीराचे जीवन आदर्श मानून जैन आचार्यांनी मुनिजीवनाचा आराखडा तयार केला आहे. हे मुनिजीवन किंवा श्रमणजीवन अत्यंत खडतर व दुःसाध्य आहे. ते नियम ऐकूनच कुणीही माणूस घाबरून त्याच्यापासून दूर सरेल. पण मात्र तरीही शेकडो जैन मुनी त्या मार्गावर आरूढ झाले. त्यामुळेच बौद्धसंघाइतका जैनमुनिसंघ फोफावला नाही. त्याला साहजिकच मर्यादा पडली.

सांप्रत कालमानानुसार हा आश्रम लुप्तप्राय झाला आहे.

[भा. सं.; हिंदुधर्माची मूलतत्त्वे आणि पुनर्घटना—पं. महादेव-शास्त्री दिवेकर; वे. का. स.; म. भा. स.; श. क.]

वानर (१) माकडाच्या जातीचा एक चतुष्पाद प्राणी. माकडापेक्षा वानर बराच मोठा असतो. त्याचे तोंड लहान व काळे असते. माकडाचे तोंड व गुदद्वार तांबडे असते. वानराच्या हातापायाचे पंजे काळे असतात. त्याच्या अंगावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भुरकट रंगाचे लांब व मऊ केस असतात. त्याची शेपटी लांब असते.

वानरांचे कळप जंगलात झाडावर राहतात. हे प्राणी बळकट, धीट, चपळ व हुशार असतात. भारतात हे सर्वत्र आढळतात. यांच्या नील व लंगूर नावाच्या दोन जाती आहेत. हे प्राणी फळे व कंदमुळे यांवर जगतात. रानाच्या जवळपास असलेल्या शेता-

वानर -- चतुष्पाद पशू

तील ऊस, रताळी, गाजरे, भुइमूग, इ. पिकेही ते खाऊन फस्त करतात. कधी कधी गावात शिरून ते घरावरील कौले फोडतात आणि घरात शिरून वस्तूही पळवतात.

वानर हा असा त्रासदायक प्राणी असला, तरी लोक त्याला मारीत नाहीत. कारण, तो हनुमानाचा वंशज आहे, अशी त्यांची श्रद्धा आहे. काही लोक वानराला पवित्र मानून त्याची पूजाही करतात. तसेच एखादा वानर मेलेला आढळला तर भाविक लोक त्याचे पद्धतशीरपणे दहन करतात.

वानरे तोंडाने 'हुप्प' असा आवाज करतात, म्हणून त्यांना हुप्पा हे नाव मिळाले आहे. हे प्राणी फार चिडखोर व रागीट असतात. त्यांना कोणी खिजवले तर एखादे वेळी ते त्या माणसावर हल्ला करतात. वानर सहसा माणसाळत नाही व माकडाप्रमाणे लवकर काही शिकतही नाही.

या प्राण्यांतूनच मानव प्राणी उत्क्रांत झाला, असा विकासवादाचा सिद्धान्त आहे. वानर चतुष्पाद असला, तरी त्याला पुढील दोन पायांचा हातांसारखा उपयोग करता येतो. आफ्रिकेतील चिंपांझी व गोरिला हे याच जातीचे प्राणी असून, त्यांना मागील दोन पायांवर माणसाप्रमाणे चालता येते. वानर व माणूस यांच्यामधली अवस्था त्यांच्या रूपाने पाहायला मिळते.

[सु. वि. को.; जंगली प्राणी – श्री. ठिगळे, १९४७; प्राणिशास्त्र – वा. श्री. कोल्हटकर, १९२३]

(२) विंध्य व मध्य प्रदेश यांत राहणारी एक आदिवासी जमात. रामायणात वर्णिलेले वानर म्हणजे पशू किंवा शाखामृग नसून माणसेच होती, याबद्दल सर्व संशोधकांचे एकमत आहे. श्री. चिंतामणराव वैद्यांच्या मते हे लोक वानरासारखे दिसत, म्हणून लोक त्यांना वानर म्हणू लागले. प्राचीन भारतात जीवयोनीच्या नावावर ओळखल्या जाणाऱ्या वानरांप्रमाणेच नाग, ऋक्ष, गृध्र, काक अशा जमाती होत्या. कालांतराने लोकमानसाने ते तिर्यग् योनीतले जीवच मानले आणि कृत्ये माणसांची व नावे पशुपक्ष्यांची या स्वरूपात त्यांचे ग्रहण केले. रामायणात वाल्मीकीनेही तसेच केले आहे. रामायणातले वानर हे एकाच वेळी पशूही वाटतात आणि माणसेही वाटतात. वाल्मीकीनंतरच्या कवींनीही त्यांचे तसेच वर्णन केले आहे.

प्राचीन काळी काही जमाती पशू, पक्षी किंवा वृक्ष यांची देवता म्हणून पूजा करीत किंवा एखाद्या पशु-पक्ष्याला आपले जातीय चिन्ह मानीत. वानर लोकही वानरपूजक असावे किंवा जैन रामायणात वर्णिल्याप्रमाणे त्या जमातीचा ध्वज वानरचिन्हांकित असावा.

श्री. मन्मथराय यांनी वानरांना भारताचे मूल निवासी व्रात्य मानले आहे. त्यांच्या मते उत्तरेत आर्यांचा प्रभाव निर्माण झाल्यावर ते तिथून बाहेर पडले आणि विंध्य उतरून दख्खनच्या पठारावर येऊन वसले. गोरेशियो, व्हीलर, इ. विद्वान वानरांना द. भारताच्या पहाडी प्रदेशात वसणारी अनार्य जमात मानतात. पण श्री. रामस्वामी शास्त्री त्यांना आर्यांपैकीच मानतात. विंध्य पर्वत ओलांडून आल्यामुळे त्यांचा मूळ आर्य जातींशी संबंध तुटला. मात्र त्यांचे आर्य संस्कार शिल्लक राहिले. पुढे दाशरथी रामाच्या काळात त्यांचा व आर्य लोकांचा पुनश्च संपर्क निर्माण झाला. त्यानंतर ते विविध क्षेत्रांत आपली प्रगती करू लागले. वानरांना अनार्य मानणाऱ्यांच्या मते दंड नामक आर्य राजाने द. भारतावर विजय मिळविल्यानंतर हे अनार्य सर्व बाजूंनी आर्यांच्या प्रभावाखाली आले आणि त्यांनी आर्यांचे रीतिरिवाज ग्रहण केले.

श्री. शरच्चंद्र राय यांच्या मते छोटा नागपूरमध्ये राहणाऱ्या उरांव व मुंड या आदिवासींत तिग्गा, हलमान, बजरंग व गडी अशी गोत्रे आढळतात. त्या सर्वांचा अर्थ वानर असाच आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचप्रमाणे रेड्डी, बरई, बसोर, भैना व खंगार या जमातींतही वानरसूचक गोत्रे मिळतात. सिंगभूममध्ये राहणारी भुईया जमात आपण हनुमंताचे वंशज असल्याचे सांगते.

या वानरांची एक स्वतंत्र संस्कृती होती. त्यांची म्हणून एक विशिष्ट सामाजिक व्यवस्था होती. याविषयी ज्यावरून निश्चित काही समजू शकते, असा ग्रंथ म्हणजे वाल्मीकिरामायण हा होय. या ग्रंथावरून वानरांची माहिती मिळते ती अशी–

वानरांचे स्वरूप – वानर हे बलवान प्राणी होते. ते माया (इंद्रजाल) जाणणारे, वायूप्रमाणे वेगवान, नीतिज्ञ, बुद्धिमान, पराक्रमी, शस्त्रास्त्रकुशल व दिव्य शरीरधारी होते. कामरूपी, अर्थात इच्छेनुसार कोणाचेही रूप धारण करणारे, हे विशेषण त्यांना वारंवार लावले आहे. राम-लक्ष्मणांच्या प्रथम भेटीच्या वेळी हनुमंताने आपल्या वानररूपाचा त्याग करून भिक्षुरूप धारण केले होते. सीतेच्या शोधासाठी लंकेत प्रवेश केल्यावरही मारुतीने अनेक रूपे घेतली होती. वानर आपले दात व नखे यांचा शस्त्र म्हणून उपयोग करीत (वा. रा. ४.३१.२४). त्यांचा वर्ण पिंगट असे. काहींची मुखे लाल असत.

शारीरिक व मानसिक चपलता हे वानरांचे उल्लेखनीय वैशिष्ट्य होय. त्यांना रागही लवकर येत असे. रागावल्यावर ते भयानक दिसत. इतरांच्या खोड्या काढणे, त्यांना चिडवणे ही गोष्टही वानरांच्या स्वभावात होती. एखादी आनंदाची गोष्ट घडली, की ते आनंदाने नाचू लागत व एखादे संकट आले, की लगेच शोकविव्हल होत. त्यांना कोणीही सहजपणे चिथावू शकत असे. निराधार शंका-कुशंका, स्वभावसिद्ध भोळेपण आणि मूर्खपणाचे भित्रेपण यांचे एक चमत्कारिक मिश्रण वानरांच्या स्वभावात होते.

वानर लोक नेहमी टोळ्या बनवून फिरत. टोळीच्या पुढाऱ्याने एखादी गोष्ट केली, की तीच गोष्ट बाकीचे सारे करीत. वानर पराक्रमी होते हे खरे; पण ज्या मानाने टोळीचा पुढारी खंबीर व साहसी असेल, त्याप्रमाणे त्यांचा पराक्रम कमी-अधिक प्रमाणात दिसे. योग्य नेतृत्व लाभल्यास वानर कोणावरही प्राणपणाने तुटून पडत आणि शत्रुपक्षाची दाणादाण उडवीत.

किष्किंधा हे वानरांचे सत्ताकेंद्र होते. सुग्रीव हा किष्किंधेचा राजा होता. या किष्किंधेत हजारो वानर सुग्रीवाचे अनुचर म्हणून वास्तव्य करीत होते. याशिवाय अन्यत्र पहाडी प्रदेशात, मोठमोठ्या जंगलांत, तसेच नदीच्या व समुद्राच्या काठी त्यांच्या छोट्या-मोठ्या वसाहती होत्या. रामायणकाली वानरांचे संख्याबल फार मोठे असले पाहिजे. हे संख्याबल पाहूनच रामाने आपल्या कार्यासाठी वानरांचा उपयोग व्हावा, या हेतूने सुग्रीवाशी मैत्री केली होती. सुग्रीवाने ज्या वानरमुख्यांना रामाला साहाय्य करण्यासाठी पाचारण केले होते, ते आर्यप्रदेशांच्या पूर्वेला व उत्तरेला राहणारे आदिवासी होते.

वानरसमाज हरिगण या नावाने प्रसिद्ध होता. या हरिगणाच्या ऋक्ष, गोलांगूल व वानर अशा तीन शाखा होत्या. वानरसमाज अनेक संघांमध्ये किंवा टोळ्यांमध्ये विभक्त होता. या टोळीप्रमुखाला यूथप म्हणत. दुर्धर, केसरी, गवाक्ष व नील हे प्रसिद्ध यूथप होते. त्यांच्यावर संनादन व जांबवान हे महायूथप होते. आणि या सर्वांवर महायूथपयूथप नियंत्रण ठेवीत होता. त्यांची समाजव्यवस्था मध्ययुगीन सामंतप्रथेशी जुळणारी होती.

वनेचर असल्यामुळे वानर लोक फल-मूल या निसर्गदत्त आहारावरच आपला उदरनिर्वाह करीत. आजही अशा वन्य वस्तूंवर जगणाऱ्या काही आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. वानरांना भोजन शिजविण्याची कला ज्ञात नव्हती. या बाबतीत ते आर्य व राक्षस यांच्याहून मागसलेले होते. वानर स्त्री-पुरुषांना मद्यपानाची अत्यंत आसक्ती होती. अधोवस्त्र व उत्तरीय अशी दोन वस्त्रे ते वापरीत. लढाईवर जाताना अधोवस्त्र कसून बांधीत. त्यांना अलंकारांचीही फार हौस होती. वानर स्त्री-पुरुष आपल्या अंगा-खांद्यांवर खूप दागिने घालीत. त्यांना फुले, चंदन व उटणी फार आवडत.

शिष्टाचार व अतिथिसत्कार या बाबतींत ते आर्यांच्या मागे नव्हते. आपसातही त्यांचे वर्तन सभ्य व विनीत असे. ते वडिलधाऱ्यांना फार मान देत. भेटी किंवा उपायने देणे-घेणे त्यांच्यामध्ये खूप प्रचलित होते. त्यांनी आर्यांची धार्मिक पद्धती स्वीकारली होती. सुग्रीवाचा राज्याभिषेक आर्यपद्धतीने झाला होता व वालीचे और्ध्वदेहिकही त्याच पद्धतीने पार पडले होते. त्यांचे गृह्यसंस्कारही आर्यपद्धतीनेच होत.

रामायणात किष्किंधेचे जे वर्णन केले आहे, ते वाचल्यावर तिच्या समृद्धीची कल्पना येते. किष्किंधा नगरी सुंदर होती, कलापूर्ण होती व सुरक्षितही होती. वानरांना स्थापत्यकला उत्तम अवगत होती, हेही त्या वर्णनावरून सूचित होते.

वानरातले स्त्री-पुरुषसंबंध मात्र शिथिल होते असे दिसते. खुद्द हनुमान हा वायूचा औरस पुत्र व केसरी वानराचा क्षेत्रज पुत्र होता (वा. रा. ४. ६६. २९-३०). याचा अर्थ वायूने अंजनीची अभिलाषा धरून तिच्याशी समागम केला होता, असा होतो. पण हनुमंताला त्याचे वाईट वाटत नव्हते. उलट आपण वायुपुत्र असल्याचे तो अभिमानाने सांगत असे. वालीचा संबंध धाकट्या भावाची अर्थात सुग्रीवाची पत्नी रुमा हिच्याशी आला होता. व वालिवधानंतर त्याची पत्नी तारा सुग्रीवाची पत्नी झाली होती. कोणत्याही प्रकारे शुद्धी न करता सुग्रीवाने रुमेला जवळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केले होते. पण असे शैथिल्य असले तरी विवाह-संस्कार मात्र त्यांच्यांत रूढ झाला होता. वानरांचे पत्नीप्रेम व कुटुंबप्रेमही वाल्मीकीने काही ठिकाणीं सूचित केले आहे (वा. रा. ४. ५४. ७-९; ६. १२०. ५-६).

वानर वनात राहत असल्यामुळे त्यांना औषधिवनस्पतींचा चांगला परिचय होता. त्यांचा उपयोगही ते जाणत होते. चांगले रोगचिकित्सक म्हणून त्यांची प्रसिद्धी होती. राम-रावणांच्या युद्धात रामपक्षात असलेला सुषेण नामक वैद्य हा वानरच होता.

रामायणात वानरांना पुच्छयुक्त प्राणी म्हटले आहे. वानरांना मनुष्य मानण्यात मुख्य अडचण कोणती असेल, तर त्यांचे पुच्छ ही होय. पण सूक्ष्मपणे पाहिल्यास हे पुच्छ त्यांच्या शरीराचा अभिन्न अवयव नसून, ती त्यांची एक जातीय निशाणी होती. वानर लोक एक पुच्छ बनवून ते पृष्ठभागी बांधीत. रावणानेही पुच्छ हे वानरांचे एक आवडते भूषण आहे, असे म्हटले आहे. तसे नसते तर मारुतीच्या पुच्छाला रावणाने आग लावली असता त्याच्या शरीराला इजा व्हायला हवी होती; पण तसे झाले नाही. आजही पुच्छ लावणाऱ्या काही आदिम जाती अस्तित्वात आहेत. अंदमान बेटात पुच्छ लावणारी एक आदिवासी जमात आढळत असे, असे स्वा. सावरकरांनी आपल्या एका ग्रंथात सांगितले आहे. काही सवर जमातीत पुच्छ हा एक अलंकार समजला जातो.

वानरांचे राज्य कित्येक छोटी गावे व नगरे मिळून बनले होते. वानरराज्याला लागूनच वानरांची मधुवन नामक एक विहारभूमी होती. त्यांची राज्यव्यवस्था राजाधिष्ठित होती व परिषद, सेना, मंत्री, इत्यादींच्या साहाय्याने राजा राज्य करीत असे. राज्याधिकार परंपरागत चालत असे. [रा. का. स.; रामकथा]

वामदेव एक वैदिक ऋषी. गोतम व ममता यांचा पुत्र. ऋग्वेदाच्या ४ थ्या मंडलातली ४२-४४ ही सूक्ते सोडून बाकीचे सर्व मंडल वामदेवाने दृष्ट आहे. याला गर्भातच आत्मज्ञान झाले होते. ' गर्भे नु सन् ' (ऋ.४.२७.१) ही ऋचा त्याने गर्भातच रचली. त्याला निसर्गसिद्धमार्गाने जन्माला येणे आवडले नाही, म्हणून त्याने मातेचे पोट फाडून बाहेर येण्याचे ठरविले. त्या गोष्टीचे भय वाटून ममतेने अदितीचे ध्यान केले. तेव्हा इंद्रासह अदिती तिथे आली. त्या दोघांचा वामदेवाशी संवाद झाला. इंद्र वामदेवाला म्हणाला. " सर्वांना उपलब्ध असा हाच एक जननमार्ग आहे. तू त्या मार्गानेच जन्माला ये. भलत्या मार्गाने जन्माला येऊन मातेच्या मृत्यूला कारणीभूत होऊ नकोस." पण वामदेवाने ते ऐकले नाही. तो म्हणाला. " ही वाट अवघड आहे. मी असा त्राजूने आडवा बाहेर येईन. " आणि त्याने तसेच केले. आपल्या योगसामर्थ्याने श्येनरूप घेऊन तो आईचे पोट फाडून बाहेर आला.

याला नोधा नावाचा एक भाऊ होता. मूर्धन्वा, वृहद्दिव व वृहदुक्थ असे त्याला तीन पुत्र होते. हा विश्वामित्राच्या पुढील पिढीतला होता. त्याने विश्वामित्राच्या सूक्तांचा प्रचार केला. याने भरतांचा महिमा गायिला आहे. दिवोदास व सुदास यांनी युद्धांत जे विजय मिळविले त्यांचेही वर्णन याने केले आहे (ऋ. ४.२६.३).

वामदेव हा रसिक ऋषी होता. त्याला निसर्गाचे तसेच मानवी सौंदर्याचे आकर्षण होते. उषेच्या रथाबद्दल त्याने एक घटना सांगितली आहे, ती अशी—

> अपोषा अनसः सरत् सम्पिष्टादह बिभ्युषी ।
> नि यत्सीं शिश्नथद्वृषा ॥
> एतदस्या अनः शये सुसम्पिष्टं विपाश्या ।
> ससार सीं परावतः ॥
>
> (ऋ. ४.३०.१०-११)

अर्थ – जेव्हा वीरश्रेष्ठ इंद्राने उषेच्या रथाचा चुराडा केला तेव्हा घाबरून तो भग्नरथ सोडून ती बाजूला सरली. राई-राई एवढे तुकडे होऊन गेलेला तो तिचा रथ विपाशा नदीच्या काठीच पडला आणि ती उषा मात्र तिथून दूरच्या प्रदेशात निघून गेली.

उषा आणि सूर्योदय यांचे एखादे दृश्य त्याला जसे जाणवले तसे त्याने या ऋचेत वर्णिले असावे, असे वाटते. याच सूक्तात शुष्ण, शंबर, वर्ची या शत्रूंचा इंद्राने पराभव केला व तुर्वश आणि यदू या भक्तांना पैलतीरावर पोचविले, अशा कथाबीजांचा उल्लेख केला आहे. अर्ण व चित्ररथ हे दोघे आपणांस आर्य म्हणवीत होते; पण ते दुष्ट असल्याने इंद्राने त्यांचा शरयू नदीच्या पैलतीरावर वध केला, अशीही एक कथा वामदेवाने सांगितली आहे. अठ्ठावन्नाव्या सूक्तात त्याने सुंदर रमणींवर काव्यमय ऋचा लिहिल्या आहेत.

वामदेवाच्या सूक्तांत कृषिकर्माचेही उल्लेख आढळतात. तो शेतीच्या कामाविषयी प्रेम धारण करून म्हणतो—

बैल आनंदाने, लोक मजेने आणि नांगर सहज रीतीने जमीन नांगरोत. बैलांच्या जुंपण्या घट्ट बांधा. पुढच्या सुखावर लक्ष ठेवून बैलांवर आसूड चालवा. कृषिकर्माला सफल करणाऱ्या शुनासीर देवतांनो, आम्ही केलेली स्तुती ग्रहण करा आणि पावसाने आमची जमीन भिजवा (ऋ. ४.५७).

वामदेव हा संगीतप्रिय होता. त्याने काही सामे निर्माण केली आहेत. एका ठिकाणी (ऋ. ४.२४.१०) त्याने, आपण इंद्राला विकायला काढले आहे, असे म्हटले आहे. अर्थात विकायला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काढलेला इंद्र म्हणजे त्याची मूर्ती असावी. यावरून ऋग्वेदकाली मूर्तिकला प्रचारात आली होती, असे अनुमान काही संशोधक काढतात.

वामदेवाने पुनर्जन्मासंबंधी विचार करताना प्रत्येक मनुष्याचे तीन जन्म सांगितले आहेत— (१) पित्याचे शुक्रजंतू मातेच्या शोणितद्रव्याशी संगत होतात, तो. (२) मातेच्या उदरातून मूल जन्माला येते, तो. (३) मृत्यूनंतर मिळतो तो नवा जन्म.

वामदेवाला तत्त्वज्ञानाने आत्मानुभव घडला होता. तो परमात्म्याची शक्ती ती आपलीच शक्ती आणि परमात्म्याची जी कृत्ये ती आपलीच कृत्ये, असे अद्वैत भावनेने मानीत होता. याविषयी त्याच्या दोन ऋचा अशा—

अहं मनुरभवं सूर्यश्चाऽहं कक्षीवाँ ऋषिरस्मि विप्रः ।
अहं कुत्समार्जुनेयं न्यृञ्जेऽहं कविरुशना पश्यता मा ।
अहं भूमिमददामार्यायाऽहं वृष्टिं दाशुषे मर्त्याय ।
अहमपो अनयं वावशाना मम देवासो अनु केतमायन् ।
(ऋ. ४.२६.१–२)

अर्थ–मीच (पूर्वी) मनू झालो होतो. सूर्य मीच. महाबुद्धिवान असा कक्षीवान ऋषीही मीच. अर्जुनाचा पुत्र कुत्स तो मी व उशना कवीही मीच. सर्व भूमी आर्यांना मी दिली. दानशूर भाविक जनांकरिता पर्जन्यवृष्टी मी केली. धो धो शब्द करून वाहणाऱ्या उदकांना वाट मीच करून दिली आणि माझ्याच संकेताने देव वागत आले आहेत.

उपनिषदांत याच्याविषयी माहिती मिळते, ती अशी— गायत्री मंत्राच्या चौवीस ऋषींपैकी वामदेव हा पाचवा आहे. शुकाकडून याने तुलसी उपनिषद ऐकले व ते प्राचीन ऋषींना सांगितले. बिल्वपत्रांनी शिवपूजा केली असता शिवाशी सारूप्य प्राप्त होते, असे शिवानेच त्याला सांगितले. त्याने शरभ रूपातल्या रुद्राची स्तुती केली.

पौराणिक वामदेव – हा अकरा रुद्रांपैकी एक असून, रुद्रमुखापासून उत्पन्न झाला (मत्स्य पु. ४.२७–२८). हा भस्मप्रिय होता. अभिमंत्रित भस्म फुंकून याने एका ब्रह्मराक्षसाचा उद्धार केला (स्कंद पु. ३.१५–१६). याने भस्ममहिमा खूप वर्णिला आहे. बकुलासंगमी याने तप केले. युधिष्ठिराच्या यज्ञात हा उपस्थित होता व कृष्णाला भेटण्यासाठी स्यमंतपंचक क्षेत्रातही गेला होता. [ऋ. द.; प्रा. च. को.; क्रि. स्ट. ले. उ.]

वामन

(१) विष्णूच्या दशावतारांतला पाचवा अवतार. हा इंद्राच्या संरक्षणासाठी व बळी नामक दैत्याला बंधन करण्यासाठी उत्पन्न झाला. भागवतपुराणात त्याला विष्णूचा १५ वा अवतार म्हटले आहे (१.३.१९).

वामनावताराचा अस्पष्ट उद्‌गम ऋग्वेदात आढळतो. तिथे विष्णूने आपल्या पावलांनी समस्त पृथ्वी, द्युलोक व अंतरिक्ष यांचे व्यापन केल्याचा निर्देश आहे, ती ऋचा अशी –

इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा नि दधे पदम् ।
समूळ्हमस्य पांसुरे ॥ (ऋ १.२२.१७)

अर्थ – हे सर्व जगत विष्णूने आक्रमिले आहे. त्याने आपले पाऊल तीन ठिकाणी ठेवले. त्याबरोबर त्याच्या पदरजांत हे सर्व जग झाकून गेले.

ऋग्वेदात विष्णू हे सूर्यदेवतेचेच एक रूप मानलेले आहे आणि सूर्यरूप विष्णूला उद्देशूनच वरील तीन ऋचा आहेत. या तीन पावलांची निरुक्ती शाकपूणीच्या मते पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश, आणि और्णवाभाच्या मते समारोहण (उदयगिरी), विष्णुपद (खस्वस्तिक) व गयाशिर (अस्तगिरी) अशी आहे. आपला मित्र इंद्र याचे गेलेले राज्य त्याला मिळवून देण्यासाठी विष्णूने पृथ्वीवर अवतार घेतला, अशी कथा तैत्ति. संहितेत आढळते (२.४.१२.२). वामन अवताराचा सर्वप्रथम निर्देश हाच होय.

वैदिक साहित्यात आढळणाऱ्या निर्देशांवरून असे प्रतीत होते, की वामनावताराचा उगम प्रथम सूर्याच्या आकाशभ्रमणाच्या रूपात झाला. पुढच्या काळात जेव्हा विष्णूच्या दशावतारांची कल्पना दृढमूल झाली, तेव्हा विष्णूचे वामनावतार हे रूप निर्धारित झाले.

शतपथ ब्राह्मणात तीन पावलांत त्रिभुवन व्यापणाऱ्या वामनावताराची जी कथा आढळते, ती कथा पुढे दिलेल्या पौराणिक कथेहून सर्वस्वी भिन्न आहे. तिचा सारांश असा –

एकदा देवासुरसंग्राम झाला आणि त्यात देवांचा पराजय झाला. ते आपले ठिकाण सोडून पळून गेले. मग असुर समस्त पृथ्वीची वाटणी करण्यासाठी एकत्र बसले. एवढ्यात वामनाला पुढे घालून देवगण असुरांकडे गेले आणि त्यांनी पृथ्वीचा थोडासा हिस्सा देवांनाही मिळावा, अशी असुरांना प्रार्थना केली. त्या वेळी असुरांनी वामनाच्या तीन पावलांएवढी जमीन देवांना देण्याची तयारी दर्शविली. मग वामनरूपधारी विष्णूने विराट रूप घेऊन तीन पावलांत त्रिभुवन व्यापले. अशा प्रकारे त्याने असुरांचा पराभव केला आणि देवांना त्रलोक्याचे राज्य मिळवून दिले (श. ब्रा. १.२.२.१-५).

वरील कथेचे स्पष्टीकरण ‘भक्ति का विकास’ या ग्रंथात डॉ. मुन्शीराम शर्मा यांनी दिले आहे, त्याचा सारांश असा – जेव्हा देव म्हणजे दिव्य शक्ती असुरांकडून म्हणजे आसुरी प्रवृत्तींकडून पराभूत होतात, तेव्हा देवांनी यज्ञ करणे उचित होय. यज्ञक्रियेनेच देव असुरांवर विजय मिळवू शकतात. यज्ञ करण्यासाठी ही समस्त पृथ्वी वेदी म्हणून उपयोगात आणता

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येईल (यावती भूमिस्तावती वेदिः). कोणत्याही काळी व कोणत्याही स्थळी यज्ञभावनेने कार्य केले जावे. यज्ञभावना आसुरी प्रवृत्तींचे शमन करू शकेल. यज्ञकर्त्या यजमानाने आपले कार्य मंत्रांच्या द्वारे.आखून घेतलेल्या यज्ञवेदीपुरतेच सीमित करू नये. यज्ञ अर्थात विष्णू सीमित वेदीच्या रूपात वामन (लघू) आहे. तोच आपल्या विशाल रूपात विष्णू आहे, सर्वव्यापक आहे. म्हणून याज्ञिकाचे चित्त उदार आणि विशाल असावे. आसुरी प्रवृत्तींवर विजय मिळवण्याचे हेच एक साधन आहे.

पौराणिक वामन – हा कश्यप-अदिती यांचा पुत्र होय. पुत्रप्राप्तीसाठी अदितीने केशवतोषण नामक व्रत केले होते. त्या काळी बळी स्वर्ग जिंकून स्वतः इंद्र बनला होता. त्याने देवांना स्वर्गातून घालवून दिले होते. म्हणून देवांना पुनश्च त्यांचे पद प्राप्त करून देण्यासाठी विष्णूने हा वामनाचा अवतार घेतला. वामनाचा जन्म भाद्रपद शुद्ध द्वादशीच्या दिवशी श्रवण नक्षत्रावर अभिजित मुहूर्तावर झाला (भाग. पु. ८.१८.५-६). जन्मताच त्याने आपले विष्णुरूपी वास्तवदर्शन ब्रह्मा व अदिती यांना दिले. नंतर त्याने ब्राह्मण ब्रह्मचाऱ्याचे रूप घेतले. मुंडित मस्तक, त्यावर शिखा, गळयात यज्ञोपवीत, खांद्यावर कृष्णाजिन व हातात पलाशदंड, असे त्याचे ते रूप होते.

लगेच तो वैरोचन बळीच्या यज्ञमंडपात दाखल झाला. बलीचा हा यज्ञ नर्मदेच्या उत्तर तीरावर भृगुकच्छ म्हणजे भडोच येथे चालू होता. तिथे गेल्यावर त्याचे तेज पाहून बळी आश्चर्यचकित झाला. त्याने वामनाचा आदरसत्कार करून त्याला इच्छित गोष्ट मागण्यास विनवले. वामनाने बळीकडे त्रिपादभूमीची याचना केली. बळी त्या गोष्टीला तयार झाला. शुक्राचार्यांच्या विरोधाला न जुमानता त्याने वामनाच्या हातावर दानोदक सोडले. तावडतोब वामनाने विराट रूप धारण करून पहिल्या दोन पावलांतच पृथ्वी व स्वर्ग यांना व्यापून टाकले. आता तिसरे पाऊल उरले होते. त्यासाठी बलीने आपले मस्तक नम्र केले. वामनाने त्यावर आपला पाय दिला. एवढ्यात वीरभद्रादी असुर वामनाच्या अंगावर धावून आले. वामनाने त्यांचा पराभव केला. तेव्हा बळी, प्रल्हाद व बळिपत्नी विंध्यावती यांनी वामनाची स्तुती केली. वामनाने प्रसन्न होऊन बळीला नमुची, शंबर, प्रल्हाद, इ. असुरांसह सुतल नामक पाताळ लोकात स्थापित केले आणि अशा प्रकारे इंद्राला त्रिभुवनाचे राज्य मिळवून दिले.

वामनावताराच्या कथेत देवासुरांचा संबंध आलेला आहे. देवांच्या कार्यासाठीच विष्णूने वामनावतार घेतला. या अवताराचा व देवासुरसंघर्षाचा ऐतिहासिक अर्थ सांगण्याचा प्रयत्न पं. श्री. दा. सातवळेकर यांनी केला आहे, त्याचा सारांश असा – त्रिविष्टप अर्थात तिबेट प्रदेशात देव जमातीचे, उत्तर भारतात आर्यांचे व भारताच्या पश्चिम भागात असुरांचे अशी राज्ये होती. बळिराजाची गोष्ट भारतात आर्य जमातीचा प्रवेश होण्यापूर्वीची आहे. त्या काळी तिबेटच्या देवगणांचे राज्य त्रिविष्टपाप्रमाणे भरतखंडावरही चालत होते. देव जमात त्या काळी प्रबल होती.

बळी हा आर्यही नव्हता व देवही नव्हता. तो असुर होता. या असुरकुळाचे मूळ राज्य इराणच्या उत्तरेस होते. तिथून हे असुर भारतात आक्रमण करून आले आणि त्यांतून देवासुरसंग्राम सुरू झाले. बळीने भरतखंडावर स्वारी केली; पण त्या स्वारीत बळीचा पूर्ण पराभव झाला. बळीही या युद्धात घायाळ झाला होता. तो कसाबसा भृगूच्या आश्रमात पोचला व भृगूने केलेल्या औषधोपचारांनी जगला.

त्याने काही काळाने पुन्हा बळ बांधले व पुनश्च देवराज्यावर स्वारी केली. या स्वारीत त्याने देवांना सैरावैरा पळायला लावले. कारण, या वेळी देव असंघटित होते, गाफिल होते आणि विलासमग्न होते. देव पराभूत झाल्यानंतर बळी त्रिभुवनाचा राजा झाला. त्याने प्रजेला सुख होईल, अशा प्रकारे आपला कारभार चालविला. उद्देश हा, की राज्यात असंतोष माजू नये व देवांना आपल्या विरुद्ध उभे राहणे अशक्य व्हावे. आणि तसेच घडून आले. देव निराशेने ग्रस्त झाले. या पुढे बळीचा आपल्या हातून पराभव होणे अशक्य आहे, असे त्यांना वाटू लागले.

बळीने आणखी एक गोष्ट केली आणि ती म्हणजे तो वैदिक पद्धतीने यज्ञयाग करू लागला. त्या यज्ञांत तो ऋत्विजांना व याचकांना संतुष्ट करू लागला. प्रजाजन त्याच्या या धार्मिक वृत्तीवर व औदार्यावर खूष झाले.

आणि याच प्रसंगी देवकार्य सिद्धीस नेण्यासाठी विष्णूने वामनावतार घेतला. वामन हा आकाराने लहान असूनही बुद्धीने मोठा व राजकारणपटू होता. युद्धाचे डावपेच त्याला ठाऊक होते. आपले कार्य युक्तीने साधावे, असा विचार करून तो वटुवेषाने बळीच्या यज्ञमंडपात प्रविष्ट झाला. त्याच्या आधी त्याने ब्राह्मणवेषाने आपले काही वीर यज्ञमंडपात घुसवले होते व त्यांनी शस्त्रेही लपवून बरोबर घेतली होती. वामनाला पाहताच बळी प्रसन्न झाला आणि त्याने त्याला त्रिपादभूमीचे दान केले.

त्रिपादभूमीचा अर्थ तिबेट, भरतखंड व पाताळ यांतील सर्व भूमी असा होता; पण तो बळीला समजणे शक्य नव्हते. याचबरोबर देवांनी आपल्या विरुद्ध असा काही कट केला आहे, हेही त्याच्या ध्यानी आले नाही. त्रिपादभूमीचे दान देण्याच्या त्या प्रयोगात तो फसला आणि वामनाने त्याच्या मस्तकावर पाय देऊन त्याचा पाडाव केला. लगेच वामनाच्या अनुयायांनी प्रतीकारार्थ उठलेल्या दैत्यांवर चाल केली आणि त्यांचा फडशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पडला. अशा प्रकारे बळीचा पूर्ण पराभव झाला. मग वामनाने त्याला कैद केले आणि आपल्या अनुयायांसह सुतल देशात जाऊन वास्तव्य करण्यास आज्ञापिले. हा सुतलदेश म्हणजे कोकणाचा एक भाग होता. बळी तिकडे गेला व शेवटपर्यंत तिथे राहिला. वामनाने त्याच्या एकाही अनुचराला परत आपल्या देशात जाऊ दिले नाही, हे त्याचे मोठेच शहाणपण होय. शेवटपर्यंत त्या सर्वांना देवांच्या जणू नजरकैदेतच राहावे लागले.



वामनमूर्ती—आशुतोष संग्रहालय, कलकत्ता.

सुतल म्हणजे कन्याकुमारीच्या आसपासचा प्रदेश होय, असे उल्लेख तमिळ वाङ्मयात आढळतात. बळीचे सुतलातले राज्य एका सामुद्रिक उत्पाताने बुडाले.

वामनमूर्ती – वामनावतारी विष्णूच्या मूर्ती दोन प्रकारच्या आहेत – (१) वामनमूर्ती व (२) विराटस्वरूप त्रिविक्रमाची मूर्ती. वामनमूर्तीचे वर्णन ग्रंथांतरी आढळते, ते असे –

उंची पंचताल. द्विभुज. हातांत छत्र व दंड. मुखावरील भाव किशोराचा.

अशा फक्त दोन मूर्ती आढळल्या आहेत. पहिली मूर्ती कलकत्त्याच्या आशुतोष संग्रहालयात आहे. ही इ. स.च्या ११ व्या शतकातली असावी. हिला चार हात असून, त्यांत नेहमीची वैष्णव चिन्हे आहेत. पोट फार मोठे आहे. उभय अंगी श्री व पुष्टी या देवी आहेत. शिल्पकाम सुरेख आहे. दुसरी अशीच एक स्वतंत्र मूर्ती ढाका येथील संग्रहालयात आहे. ती विश्वपद्मावर असून, चतुर्भुज आहे. उभय अंगीं श्री व सरस्वती आहेत. बैठकीच्या दर्शनी भागावर गरुड व तीन भक्त आहेत. स्थूल उदर, खुजे रूप व अपुरे जानवे या लक्षणांवरून ती मूर्ती वामनाची ठरते.

बहुतेक सगळ्या वामनमूर्ती त्रिविक्रमाच्या संगतीनेच आढळतात. बादामी येथे त्रिविक्रमाचे एक शिल्प आहे, त्यात त्रिविक्रमाबरोबर वामनही दाखवला आहे.

यज्ञेश्वर वामन, दधिवामन व भोगवामन असे वामनाचे तीन मूर्तिभेद आढळतात. यज्ञेश्वर वामन हा श्वेतवर्ण, कमलासन व चतुर्भुज असतो. त्याच्या एका हाती दंड, दुसऱ्यात अमृतकलश, तिसऱ्यात दहिभात व चौथ्यात सोन्याचा पेला असतो. दधिवामन व भोगवामन हे दोन प्रकार काही अंशी यज्ञेश्वर वामनासारखेच असतात. पाहा – दधिवामन, त्रिविक्रम. [पु. वि.; प्रा. च. को.; डे. हिं. इ.; मू. वि.]

(२) (इ. स. चे ८ वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रज्ञ. हा काश्मीरनरेश जयापीड याचा मंत्री होता. याने काव्यालंकारसूत्र नामक ग्रंथ लिहिला आहे. 'रीतिरात्मा काव्यस्य' = रीती हा काव्याचा आत्मा आहे, असे याने प्रतिपादन केले आहे. आणि 'विशिष्टा पदरचना रीतिः' = विशेषगुणयुक्त शब्दांची रचना म्हणजे रीती होय, असे याने सांगितले आहे. वामन हा रीतिशास्त्राचा प्रवर्तक मानला जातो.

काव्यालंकारसूत्र या आपल्या ग्रंथात याने अलंकारशास्त्राच्या सर्व सिद्धान्तांचे सूत्रांत विवेचन केले आहे आणि त्या सूत्रांवर स्वतःच वृत्ती लिहिली आहे. ग्रंथात एकूण ३१९ सूत्रे असून, ती पाच परिच्छेदांत किंवा अधिकरणांत विभागलेली आहेत. पहिल्या शरीर नामक अधिकरणात काव्याचे प्रयोजन आणि वैदर्भी, गौडी व पांचाली या रीतींचे वर्णन आहे. दुसऱ्या दोषदर्शन नामक अधिकरणात पद, वाक्य आणि वाक्यार्थ यांचे दोष सांगितले आहेत. तिसऱ्या गुणविवेचन नावाच्या अधिकरणात दहा गुण हे शब्दगत व अर्थगत असल्यामुळे त्यांचे वीस भेद होतात, असे सांगितले आहे. चवथ्या आलंकारिकसंज्ञक अधिकरणात शब्दालंकार व अर्थालंकार यांची लक्षणे व उदाहरणे दिली आहेत. शेवटच्या अधिकरणात काही शब्दांची शुद्धी व त्यांचा प्रयोग सांगितला आहे.

वामनाचा हा ग्रंथ काही कारणाने नष्ट झाला होता आणि मुकुलभट्टाने इ. स.च्या दहाव्या शतकाच्या आरंभी तो उपलब्ध केला, असे या ग्रंथाचा प्राचीन टीकाकार सहदेव याने म्हटले आहे. [सं. सा. इ. – बलदेव उपाध्याय; भा. का. पं.]

वामनजयंती एक काम्य व्रत. भाद्रपद शु. द्वादशीला मध्याह्न काळी श्रवण नक्षत्रावर वामनावतार झाला म्हणून त्या दिवशी हे व्रत करतात. या तिथीला वामनद्वादशी असेही म्हणतात. काही धर्मशास्त्रकार भाद्रपद शुद्ध एकादशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही वामनावताराची तिथी मानतात. या व्रताचा विधी असा – द्वादशीच्या दिवशी सकाळी नद्यांच्या संगमावर यथाविधि स्नान करतात आणि तिथल्या जलाने मंत्रपूर्वक घट भरून आणतात. नंतर त्यात पंचरत्ने घालून त्याची शिक्यात स्थापना करतात. मध्याह्न उलटल्यावर पूजेचा संकल्प करतात व घटाची स्थापना करतात. त्याच्यावर सुवर्णाचे, चांदीचे, काष्ठाचे किंवा वेळूचे पूर्णपात्र भरून ठेवतात. एक आढक (४ शेर) तीळ, यव किंवा गहू घेऊन त्याच्या राशीवर कोऱ्या वस्त्राने व अजिनाने वेष्टिलेली वामनाची सुवर्णप्रतिमा ठेवतात. प्रतिमेच्या पुढे दंड, कमंडलू, छत्र, पादुका व अक्षमाला ठेवून पूजेला प्रारंभ करतात. षोडशोपचार पूजा झाल्यावर प्रार्थना करतात –

अजिनदण्डकमण्डलुमेखलारुचिरपावनवामनमूर्तये ।
मितजगत्त्रितयाय जितारये निगमवाक्पटवे बटवे नमः ॥

अर्थ–अजिन, दंड, कमंडलू, मेखला यांनी ज्याची मूर्ती शोभित आहे, ज्याने त्रैलोक्य व्यापले आहे, शत्रू जिंकला आहे आणि जो वेदवाणीत पटू आहे, अशा बटू वामनाला नमस्कार असो.

वामनाचा ध्यानमंत्र हाच आहे.

त्या रात्री जागरण करून कथापुराणश्रवण व नृत्यगायन यात वेळ घालवतात. दुसऱ्या दिवशी सकाळी पूजा करून देवाचे विसर्जन करतात. नंतर आचार्याला ती प्रतिमा व वस्त्रे दान देतात. एका ब्रह्मचाऱ्याला भोजन घालून त्याला दंड, जोडा, छत्र, कमंडलू वगैरे दान देतात. तीन ब्राह्मणांना दहीभाताचे भोजन घालून कर्मसमाप्ती करतात.

फल – पुत्रसंतती, दीर्घायुष्य व राजैश्वर्य यांची प्राप्ती.

बारा वर्षे व्रत केल्यावर त्याचे उद्यापन करतात. त्याचा विधी असा – भाद्रपद शु. द्वादशीला वामनाची सुवर्ण, रजत किंवा ताम्र या धातूची चतुर्भुज प्रतिमा करून तिची यथासांग पूजा करतात. दुसऱ्या दिवशी समिधा, तीळ, आज्य, इ. द्रव्यांनी होम करतात. आचार्याला धेनू व प्रतिमा दान देतात. [व्रतराज].

वामन पंडित (इ. स. चे १७ वे शतक) एक अग्रगण्य मराठी पंडितकवी. वामनाने स्वतःच्या चरित्रासंबंधी मौन पाळले आहे. प्राचीन भक्तमंजिरीकार राजाराम प्रासादीचा अपवाद वगळता श्रीधर, महिपती, मोरोपंत, उद्धवसुत यांनी त्याचा गौरव केला असला, तरी त्याचे चरित्र सांगितले नाही. राजारामाच्या लिखाणाला ऐतिहासिक कसोटीचा निकष फारसा लावता येत नसल्याने अभ्यासकांमध्ये वामनासंबंधी बरेच मतभेद निर्माण झाले आहेत. श्री. वि. अं. कानोले यांनी बरेच साधकबाधक पुरावे पाहून वामनाचे जे चरित्र उभे केले आहे, त्याची स्थूल रूपरेखा अशी –

वामन पंडित उर्फ वामनस्वामी हा शेष घराण्यातील देशस्थ ऋग्वेदी, आश्वलायन शाखेचा ब्राह्मण असून, त्याचे गोत्र वासिष्ठ अर्थात पाराशर होते. तो नांदेडला राहत होता; पण त्याचा जन्म मात्र विजापुरी झाला असावा. तानाजी हे त्याच्या वडिलांचे नाव होते आणि गिराबाई ही त्याची पत्नी होय.

वामन बालपणापासून अत्यंत बुद्धिमान होता. त्याला फारसी भाषा चांगली अवगत होती. विद्याभ्यासासाठी तो काशीला गेला असावा. तिथे अनेक शास्त्रांचा अभ्यास करून तो नांदेडला परतला. नंतर पारमार्थिक अनुभव घेण्यासाठी हिंडत असता तो रामदासस्वामींच्या सहवासात आला. तिथेही समाधान न झाल्यामुळे पुढे मलयाचलाकडे गेला. तिथेही ईश्वरप्राप्ती होत नाही, असे ध्यानी आल्यावर त्याने प्राणत्यागाचा विचार सुरू केला. तशा मनोवस्थेत एके दिवशी स्वयंपाक करीत असता त्याला सच्चिदानंद यतीचे दर्शन झाले. त्यांनी वामनाला उपदेश करून त्याची तळमळ शमवली. या यतीनेच त्याला भार्गवी वारुणी विद्या सांगितली. गुरुबोधानंतर त्याने नांदेडला येऊन संन्यास घेतला असावा. चतुर्थाश्रम स्वीकारण्यापूर्वी केव्हा तरी त्याची पत्नी निधन पावली असावी. पुढे यात्रा करीत हिंडत असता तो वारणातीरी शिगाव कोरेगावला गेला, तिथेच राहिला आणि तिथेच त्याने समाधी घेतली.

वामन माध्वमतानुयायी होता हे श्री. कानोले यांना मंजूर नाही. त्यांच्या मते ज्या शेष घराण्यात वामनाचा जन्म झाला, ते शेष घराणे कट्टर अद्वैती म्हणून प्रसिद्ध आहे. या घराण्याला शंकराचार्यांकडून पौरोहित्याचे व धर्मनिर्णयाचे अधिकार वेळोवेळी मिळाले होते. अंतर्गत पुरावा असा, की वामनाच्या काव्यात कुठेही द्वैताचा आढळ होत नाही.

वामन पंडित संपन्न आणि सधन होता. त्याचे आजोबा विजापुरात शाही ग्रंथालयाचे ग्रंथपाल होते. पौरोहित्य आणि इनामे यांचे वामनाला उत्पन्न होते. त्याचा चुलता शिवपंडित लहानपणीच वारल्यामुळे आज्याची सर्व मिळकत वामनालाच मिळाली. त्याने दीर्घ काळ सुखी संसार केला. रघुनाथ, काळोपंत, श्रीधर, अनंत, कोणेर व त्रिंबक अशी त्याला सहा मुले झाली. वामनाची काव्यपरंपरा रघुनाथाने पुढे चालविली. त्याचे कृष्णकौतुक नावाचे एक उत्तम काव्य असून, ते प्रकाशित झालेले आहे.

वामनाच्या परंपरागत चरित्रात बऱ्याच कथा आढळतात, त्यांतील काही अशा –

(१) वामनाचे फारसीवरील प्रभुत्व पाहून विजापूरच्या बादशहाची त्याच्यावर मर्जी बसली. बादशहाने त्याला बाटवून मुसलमान करायचे ठरविले. हे वृत्त त्याला कळताच त्याने विजापूर सोडून काशीचा मार्ग धरला. बरोबर त्याची पत्नी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu .Trust. Funding by MoE-IKS

होती. काशीत तो भिक्षा मागून निर्वाह करी. त्याला पत्नीच्या हातचे जेवण चालत नव्हते. तो स्वतः स्वयंपाक करी आणि पंचमहायज्ञ करून जेवी. त्यान काशीत ज्ञान संपादन केले, आणि विद्यामदाने गर्विष्ठ बनून तो जयपत्रे घेत फिरत राहिला. फिरताना त्याच्या बरोबर उंटाच्या पाठीवर बोजा होईल एवढी पोथ्या-पुस्तके असत.

(२) वामनाचा मुक्काम एकदा इंद्रायणीकाठी होता. तिथे एक मोठा पिंपळ होता. त्या पिंपळावर ब्रह्मराक्षस राहात होते. एके रात्री एक नवा ब्रह्मराक्षस तिथे आला आणि तो एका मोठ्या फांदीवर बसू लागला. त्या वेळी झाडावरचे इतर राक्षस त्याला म्हणाले. " तू त्या फांदीवर बसू नको. कारण, ती जागा आम्हां सर्वांमध्ये श्रेष्ठ असलेल्या वामन पंडितासाठी राखून ठेवलेली आहे. तू आधी त्याची परवानगी घे आणि मगच तिथे बस." तो ब्रह्मसमंध ब्राह्मणरूपाने वामनाकडे आला आणि त्याला म्हणाला. ' मी एक विद्वान ब्राह्मण आहे. तुम्ही मला या फांदीवर बसायला परवानगी द्या. तुम्ही ज्या वेळी देहत्याग कराल त्या वेळी तुमची जागा मी तुम्हांला देईन. ' ब्रह्मराक्षसाचे हे बोलणे ऐकून वामनाला, आपणही मृत्यूनंतर ब्रह्मराक्षस होणार, असे वाटले. तो घाबरला. त्याला पश्चाताप झाला. त्याने आपली दिवटी विझवली आणि अनुष्ठानाला प्रारंभ केला. तीन दिवसांनी त्याला कृष्णदर्शन झाले.

(३) वामनाच्या गुरूने त्याला समर्थांच्या सहवासात राहायला सांगितले. त्यानुसार तो सपत्नीक सज्जनगडावर गेला. एके दिवशी वामनाने कल्याणाला एक आध्यात्मिक प्रश्न विचारला असता कल्याणाने दासबोध पाहून त्याचे उत्तर दिले. वामन म्हणाला. 'याला आधार कोणता ?' त्या वेळी रामदासांनी हनुमानाचे रूप घेऊन त्याच्या पाठीवर आपल्या शेपटाचे तडाखे दिले. मग वामनाचा गर्वपरिहार झाला.

यथार्थदीपिकेसारखी विद्वत्ताप्रचुर व प्रौढ रचना एकीकडे आणि शृंगारप्रधान कृष्णकथा दुसरीकडे, अशा या परस्पर विरोधी प्रवृत्तींच्या वाङ्मयामुळे वामन एक की दोन असा वाद निर्माण झाला आहे. श्री. बा. अ. भिडे यांनी तर पाच वामन असावे, अशी कल्पना मांडली आहे. श्री. वि. ल. भावे यांच्या मते मात्र, भागवतातील अनेक शृंगारात्मक कृष्णकथा खुलवून सांगणारा वामन आणि यथार्थदीपिका लिहिणारा वामन हे एकच आहेत. श्री. आजगावकर व प्रा. शं. गो. तुळपुळे यांनीही हीच विचारसरणी मान्य केली आहे. श्री. कानोले यांनी मात्र शांडिल्यगोत्री वामन निराळा मानला आहे. शिवाय त्यांनी हरी दीक्षित नावाचा निराळा कवी मानून तो शांडिल्यगोत्री वामनाचा भाऊ असावा, असे म्हटले आहे. शांडिल्यगोत्री वामनाची निश्चित रचना म्हणजे विराटपर्व होय. भर्तृहरीच्या शतकत्रयाचे भाषांतर ही हरी दीक्षिताची रचना असल्याचा ठाम निर्वाळा त्यांनी दिला आहे. शतकत्रयाप्रमाणेच गंगालहरीचे समश्लोकी भाषांतरही आजवर यथार्थदीपिकाकाराच्या नावावर मोडत होते; पण ते आता खोटे ठरले आहे.

वामनाचा गुरू हा त्याच्या चरित्रातील एक विवाद्य मुद्दा आहे. निगमसार या ग्रंथाच्या प्रारंभीच मलयाचलावर झालेल्या गुरुबोधाच्या प्रसंगाचे विस्तृत वर्णन वामनाने केले आहे. त्यातील काही भाग असा—

श्री सच्चिदानंद गुरु । ब्रह्मविद्येचा कल्पतरु ।
करुणामृताचा सागरु । वेदांतवेद्य गोविंद ॥
जो भेटला मलयाचळीं । मार्गी पाक करिते काळीं ॥
आधीं स्फुरला हृदयकमळीं । सच्चित पदार्थ विचारितां ॥
उपनिषदार्थ पाहतां । आत्मा ब्रह्म हें तत्त्वतां ।
परी अनुभवा न ये ऐशी चिंता । ज्या दिवसांत अत्यंत ॥
जेथें सर्व वृत्ति शून्य । तें सद्रूप ब्रह्म हें चैतन्य ।
तैसें न कळे तोंवरी धन्य । नव्हे ऐसें वाटलें ॥
तथापि सत्पदें पाहतां । आपणासि घडे ब्रह्मता ।
परि आनंद कैसा न कळे तत्त्वतां । मनीं ऐसा विचार ॥
ऐसें विचारितां मनीं । तों ऐकों आली हास्यध्वनी
पाहतों जंव परतोनि । वस्त्र भगवें देखिलें
अवलोकिलें मुखा । संव मस्तकीं नाही शिखा ।
मुखचंद्र देखतां सुखा । भरतें जैसें समुद्रासी ॥
कृपावृष्टी अवलोकुनी । 'काय विचारितां हो मनीं ?'
म्हणोनि पुसतां, धावोनि । श्रीचरणां लागलों ॥

श्री. रा. म. आठवले यांच्या मते वामनाला भार्गववारुणी विद्या देणारे सच्चिदानंद यती म्हणजे शृंगेरी पीठाचे अधिपती होत.

राजाराम प्रासादीच्या मते वामनाची मूळ समाधी व वृंदावन वाईनिकटच्या गुरुघर येथे आहे. रेठरेकर नामक त्याच्या एका शिष्याने वामनाच्या पादुका कोरेगावला आणून तिथे त्यांचे वृंदावन बांधले. परंतु श्री. कानोले यांनी उपलब्ध सनदांच्या आधारे असे मत मांडले आहे की, गुरुघरची समाधी ही शके १६२० च्या नंतरची असून, ती वसिष्ठ वामनाची नसावी किंवा कोरेगांवची समाधी पाहून गुरुघराबरोबर वामनाचा संबंध लक्षात घेऊन तिथे नवी समाधी बांधली गेली असावी.

यथार्थदीपिकाकार वामनाच्या निगमसार, चित्सुधा, राजयोग, कर्मतत्त्व, या प्रकरणांसंबंधी वाद नाही. अभ्यासकांनी वामनी वाङ्मयाचे वळण ध्यानात घेऊन त्याचे म्हणून सांगितलेले वाङ्मय पुढीलप्रमाणे आहे— गीता समश्लोकी, कृष्णजन्म

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेणुसुधा, वनसुधा, नामसुधा, बालक्रीडा, रासक्रीडा, वनक्रीडा, ब्रह्मस्तुती, कंसवध, राधाविलास, राधाभुजंग, हरिविलास, द्वारकाविजय, नाममहिमा, कात्यायनीव्रत, भामाविलास, ही कृष्णवर्णनपर प्रकरणे आणि रामकथेवरील रामजन्म, अहिल्योद्धार, सीतास्वयंवर, जटायुस्तुती, सीता-लोपामुद्रासंवाद, भरतभाव, दशावतार, वामनावतार, नृसिंहचरित्र, गीतार्णव-सुधा, अपरोक्षानुभूती, चरममंजरी आणि पदपदांतरे. याशिवाय वामनाने संस्कृत भाषेत सिद्धांतविजय, श्रुतिसार, अनुभूतिलेश, ही प्रकरणेही रचली आहेत.

आयुष्याच्या अखेरच्या अवस्थेत वामनाने यथार्थदीपिका ही गीताटीका रचली. हा पंडिती वळणाचा ग्रंथ असून, त्यात अध्यात्माचे शास्त्र मांडले आहे. गीतेने सांगितलेले तत्त्वज्ञान यथार्थपणे सांगण्याच्या आग्रहाने त्याने ही टीका रचली आहे. (यथार्थदीपिका पाहा.)

प्रतिपक्षाचे खंडन करणे हा वामनाचा एक विशेष या ग्रंथात आढळतो. ज्ञानदेवांच्या भावार्थदीपिकेवर त्याचा कटाक्ष आहे. ज्ञानेश्वरांच्या दृष्टान्तांतील तार्किक उणेपणा टिपून त्यावर भाष्य करण्याची संधी वामन सोडत नाही.

वामनाची आख्यानरचना फार हृदयंगम आहे. त्यात ज्ञाननिष्ठ पण सगुणोपासक ही त्याची भूमिका स्पष्ट दिसून येते. रसवद्भक्ती हीच त्याची श्रेष्ठ प्रेरणा आहे. रसवत्ता, वर्णमाधुर्य, नादमाधुर्य हे त्याचे गुण वाचकाला मोहवितात. अध्यात्माचे अनुसंधान न सोडता तो शृंगार, करुण, वात्सल्य, इ. रस उत्कटपणे व्यक्त करतो. श्रीकृष्णाने रुक्मिणीला स्वर्गातले प्राजक्ताचे फूल आणून दिले, पण ते आपणांला दिले नाही, यामुळे सत्यभामा रागाने जमिनीवर गडबडा लोळू लागली. या प्रसंगाचे हुबेहूब चित्र कवीने द्रुतविलंबित वृत्तात रेखाटले आहे–

गडबडा धरणीवर लोळते । बडबती न कवीसही लोळ ते ।
रत मूर्छित होय घडी घडी । पवन निश्चल नेत्र न उघडी ।।
शतकहार गळ्यांतिल तोडिले । कुरळ केश मुखावरी सोडिले ।
करयुगें उर मस्तक ताडिते । वसन आणिक कंचुकि फाडिते.

(भामाविलास ८–९)

कृष्णासह कुंजवनात क्रीडा करणाऱ्या गोपाळांचे चित्र भुजंगप्रयातात त्याने वर्णन केले आहे, ते असे—

वनीं खेळती बाळ ते वल्लवांचे ।
पुरे खोविती मस्तकीं पल्लवांचे ।
फुलांचे गळां घालिती दिव्य हार ।
स्वभावासवे ते करीती विहार ।।
सकौशल्य ज्या गुंजमाळांत नाना ।
गळां घालिती ते करीती सनाना ।
शिरीं बांधिती मोर-पत्रें विचित्रें ।
शरीरावरी रेखिती दिव्य चित्रें ।।

(वनसुधा १. १६–१७)

वामनाची एकूण सारीच स्फुट रचना रसाळ आहे. रसाला पोषक असलेली वृत्तरचना, अनुप्रासादी अलंकार, शब्दचमत्कृती ही त्याच्या काव्याची वैशिष्टये आहेत. 'सुश्लोक वामनाचा' म्हटला जावा एवढा तो भाषाप्रभू आहे. त्याचे हे वळण त्याच्या अनेक शिष्यांनी उचलून मराठी वाङ्मयातले आख्यानकाव्याचे दालन समृद्ध केले आहे. [म. सा. आवृत्ती ५ वी; पं. क; प्रा. म. वा. स्व.; नवनीत – शतसांवत्सरिक आवृत्ती १९५७; प्रा. म. क. पं.; वामनपंडित – बा. म. हंस, १८८४; कवि वामन पंडिताविषयी नवीन माहिती – वि. अं. कानोले, १९६७]

वामनपुराण अठरा पुराणांपैकी एक पुराण. विष्णुपुराणात दिलेल्या अनुक्रमानुसार हे पुराण चौदावे, देवीभागवतानुसार आठवे आणि लिंग व कूर्म या पुराणांनुसार तेरावे मानले गेले आहे. हे पुराण नारदाने विचारल्यावरून पुलस्त्य ऋषीने त्याला सांगितले. पुढे नारदाला विचारल्यावर नैमिषारण्यात त्याने ते अन्य ऋषींना सांगितले. दुसऱ्या एका पोथीत रोमहर्षण सूताने ते नैमिषारण्यातल्या ऋषींना सांगितले, असे म्हटले आहे.

प्रस्तुत पुराणातील श्लोकसंख्या दहा हजार सांगितली असली, तरी उपलब्ध पोथीत चार ते पाच हजार श्लोकच आढळतात. याचे कारण या पुराणाचा उत्तर भाग लुप्त झाला आहे. या लुप्त झालेल्या भागात माहेश्वरी, भागवती, सौरी आणि गाणेश्वरी या नावांच्या चार संहिता असल्या पाहिजेत, असे नारदसूचीवरून वाटते. ही प्रत्येक संहिता एकेक हजार श्लोकांची असावी. माहेश्वरीत कृष्ण व त्याचे भक्त यांचे वर्णन, भागवतीत देवीच्या अवतारांचे वर्णन, सौरीत सूर्यमाहात्म्य व गाणेश्वरीत गणेशमाहात्म्य असावे.

प्रस्तुत उपलब्ध पुराणात एकूण ९५ अध्याय आहेत. अन्य विभाग नाहीत. याचा प्रारंभीचा श्लोक (१.१) असा –

त्रैलोक्यराज्यमाच्छिद्य बलेरिन्द्राय यो ददौ ।
नमस्तस्मै सुरेशाय सदा वामनरूपिणे ।।

अर्थ – ज्याने बलिराजापासून त्रैलोक्याचे राज्य छिनावून घेऊन इंद्राला दिले, त्या वामनरूपी सुरेश्वराला सर्वकाल नमस्कार असो.

प्रस्तुत पुराणाच्या ५ व ६ अध्यायांत शिवपार्वतींचे चरित्र, नर-नारायणांची उत्पत्ती, वीरभद्राची उत्पत्ती, हरिहरांचा संवाद, मदनदहन, इ. गोष्टींचा समावेश आहे. सात ते वीस या अध्या-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांत देव-दानवयुद्ध, अंधकासुराची कथा, भुवनकोशवर्णन, सुकेशी-चरित्र, अशून्यशयन द्वितीया व कालाष्टमी ही व्रते आणि महिषासुराच्या उत्पत्तीपासून वधापर्यंतचा भाग आहे. एकवीस ते बेचाळीस या अध्यायांत उमेची उत्पत्ती, बलीची कथा व त्याचा वंश, अदितीला विष्णूचा वर, वामन व बली यांची कथा, सरस्वतीचे माहात्म्य, ऋणमोचन, काम्यकवन, इ. तीर्थे, यांचे वर्णन आहे.

त्रेचाळीस ते ब्याहत्तर या अध्यायांत विविध धर्म, शिव-स्तुती, स्थाणुलिंगमाहात्म्य, वेनचरित्र, पार्वतीची तपस्या, शिव-पार्वतीविवाह, विनायकाची उत्पत्ती, चंडमुंडवध, कार्तिकेयजन्म, तारकोपाख्यान, दंडोपाख्यान, चित्रांगदेचा विवाह, जंभकुजवध, अंधकसैन्यपराजय, मरुतांची उत्पत्ती, कालनेमीचा वध, इ. गोष्टी सांगितल्या आहेत.

चौऱ्याहत्तर ते अठ्ठायशी या अध्यायांत प्रल्हादाने बलीला केलेला उपदेश, धुंधुदैत्य पराजय, पुरूरव्याचे आख्यान, नक्षत्र-पुरुषव्रत, श्रीदामचरित्र, गजेंद्रमोक्ष, सारस्वतस्तोत्र, इ. विषय आहेत. एकूणनव्वद ते पंचाण्णव या अध्यायांत वामनावतारवर्णन, शुक्र-बलिसंवाद, बलिबंधन व शेवटी भगवंताची स्तुती हे विषय आहेत.

वामनपुराणात शैव, पाशुपत, कालदमन व कापालिक अशा चार शैव संप्रदायांचा उल्लेख आढळतो. यांपैकी शैव संप्र-दायाचा प्रवर्तक वसिष्ठपुत्र शक्ती हा होय. त्याला या पुराणात शिवाचा अवतार मानले आहे (६.८८). याच शक्तीला गोपायन नावाचा एक शिष्य होता आणि तो शैव संप्रदायाचा एक प्रमुख आचार्य होता. कालदमन या नावाने इथे कालामुख संप्रदाय अभिप्रेत असावा. या संप्रदायाचे लोक शिवाची मृत्युं-जय किंवा भवांतक या नावाने उपासना करीत. कालामुख संप्रदायाचा विकास विशेषत: द. भारतात झाला. यासंबंधी शिलालेखादी बरीच सामग्री उपलब्ध आहे. कालामुख लोक लकुलीशाला आदिगुरू मानतात. पाशुपत संप्रदायाच्या आदि-कालातच कालामुख हे त्यातून फुटून निघाले असावे. पाशुपत व कालदमन या दोघांनाही मध्ययुगीन साहित्यात महाव्रती म्हटले आहे.

वरीलपैकी पाशुपत संप्रदाय हा लकुलीशाच्या कुशिक नावाच्या शिष्याने चालू केला.

कापालिकांचा संबंध कपाली शिव किंवा त्याचे भैरवरूप याच्याशी आहे. कापालिक संप्रदायाचा उगम धनद नामक आचार्यापासून झाला. त्याच्या शिष्याचे नाव अर्णोदर असून, तो शूद्र होता.

पाशुपतांची परंपरा क्षत्रिय राजांमध्ये विशेषरूपाने चालू झाली. कालदमन हा संप्रदाय आपस्तंबाने चालू केला व त्याचा शिष्य क्रायेश्वर याने त्याची वाढ केली.

या पुराणात वैष्णव आणि पाशुपत शैव या दोन्ही पंथांना सारखेच महत्त्व दिलेले आहे. त्याचबरोबर शैवांनी व वैष्णवांनी आपसांत कलह माजवू नये या उद्देशाने हरिहरांचे ऐक्यही दाख-विले आहे. शिव आपल्या गणांना सांगतो (६७.३७) –

यत्नात् क्रकचमादाय छिन्दध्वं मम विग्रहम् ।
तथापि दृश्यते विष्णुर्मम देहे सनातन: ॥

अर्थ–तुम्ही कुठून तरी करवत आणून माझा देह कापा. तिथे तुम्हांला दिसेल, की विष्णू हा माझ्या देहात कायमचा वास्तव्य करून आहे.

दुसऱ्या एका ठिकाणी विष्णूही देवांना सांगतो, की शिव माझ्या हृदयात लिंगरूपाने वसत आहे (६२.६) –

ततोऽव्ययात्मा स हरि: स्वहृत्पङ्कजशायिनम् ।
दर्शयामास देवानां मुरारिर्लिङ्गमैश्वरम् ॥

अर्थ–नंतर तो अव्ययात्मा श्रीहरी स्वत:च्या हृदयकमलात शयन करणारे शिवाचे लिंग देवांना दाखवता झाला.

प्रस्तुत पुराणाचे एक वैशिष्ट्य म्हणजे यात असुरांच्या कथाही आल्या आहेत. पुलस्त्य हा असुरांचा पूर्वज या पुराणाचा निवेदक असल्यामुळे हे घडले असावे. इथे असुरांना धर्माचे पालन करणारे असे म्हटले आहे. प्रल्हाद आणि त्याचा नातू बळी हे दोघेही धर्माने राज्य करणारे व महाभागवत होते, हे प्रसिद्धच आहे. मगधातील मुनींना म्हणजे बौद्ध आचार्यांनाही इथे असुर हे बिरुद लावलेले आहे. हे बौद्ध मुनी नालंदा व विक्रम-शिला या विद्यापीठांत आचार्य होते व ते अष्टांगिक धर्माचे पालन करणारे होते. त्यांचे असे एक खास तत्त्वज्ञानही होते. तेव्हा त्यांच्या धर्माकडे किंवा तत्त्वज्ञानाकडे पौराणिकांना डोळे-झाक करून चालण्यासारखे नव्हते. म्हणून वामनपुराणकर्त्यांनी या वेगळ्या धर्मपंथांना आपल्या पुराणात स्थान दिले. त्यामुळे या धर्मपंथांतील बरेचसे मतभेद दूर झाले व सामाजिक ऐक्य वाढीला लागले. हर्षवर्धनाच्या काळात (इ. स. ६०६–६४८) हे ऐक्य घडून आले. त्याचा भाऊ राज्यवर्धन हा परमसौगत म्हणजे बौद्ध होता. त्याचा पिता प्रभाकरवर्धन हा परम आदित्य-भक्त होता आणि स्वत: हर्षवर्धनही सूर्य, विष्णू आणि बुद्ध यांचा भक्त होता. या सर्व धर्मपंथांकडे हर्षवर्धन सहिष्णू वृत्तीने पहात असे व सर्वांना सारखेच द्रव्यदान करीत असे.

प्रस्तुत पुराणात काही मननीय अशी नीतिवचने आहेत. त्यांपैकी काही अशी (वामनपुराण १४.४४) –

परस्वे परदारेषु न कार्या बुद्धिरुत्तमै: ।
परस्वं नरकायैव परदाराश्च मृत्यवे ॥

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – शहाण्या माणसांनी परधन व परदारा यांची आसक्ती धरू नये. परधन हे नरकात नेण्यासाठी कारणीभूत होते व परदारा ही मृत्यूला कारणीभूत होते.

स्वधर्मं यः समुत्सृज्य परधर्मं समाचरेत् ।
अनापदि स विद्वद्भिः पतितः परिकीर्त्यते ॥

(वामनपुराण १४.८९)

अर्थ – आपत्ती नसलेल्या काळात जो स्वधर्माचा त्याग करून परधर्म स्वीकारतो, त्याला विद्वान लोक पतित म्हणतात.

आत्मा नदी संयमपुण्यतीर्था । सत्योदका शीलशमादियुक्ता ॥
तस्यां स्नातः पुण्यकर्मा पुनाति ।
न वारिणा शुद्ध्यति चान्तरात्मा ॥

(वामनपुराण ४३.२५)

अर्थ – आत्मा ही नदी आहे. संयम तिच्यातले पुण्यतीर्थ आहे. शीलशमादियुक्त असे सत्य हे तिचे जल आहे. अशा या आत्मनदीत स्नान करणारा पुण्यकर्मा पुनीत होऊन जातो. अंतरात्मा बाह्य तीर्थजलाने शुद्ध होत नाही.

समाश्रयन्ति बलिनं ह्रीः कीर्तिर्द्युतिरेव च ।
प्रभा गतिः क्षमा भूतिर्विद्या नीतिर्दया मतिः ॥

(वामनपुराण ७५.४९)

अर्थ – लज्जा, कीर्ती, प्रकाश, प्रभा, गती, क्षमा, ऐश्वर्य, विद्या, नीती, दया, बुद्धी या (सर्व) गोष्टी बलवंताच्या ठिकाणीच आश्रय घेतात.

धनक्षये न मुह्यन्ति न हृष्यन्ति धनागमे ।
धीराः कार्येषु च तथा भवन्ति पुरुषोत्तमाः ॥

(वामनपुराण ७५.५०)

अर्थ – जे लोक द्रव्यनाश झाला म्हणून मोह पावत नाहीत, जे धन मिळाले म्हणून हर्षाने उचंबळत नाहीत आणि जे धीरोदात्त वृत्तीने आपल्या कार्याच्या ठिकाणी तत्पर राहतात, तेच पुरुषोत्तम ठरतात.

प्रस्तुत पुराण इ. स. १०० ते २०० वर्षे या कालात निर्माण झाले असावे, असे विद्वानांचे मत आहे. डॉ. वासुदेवशरण अग्रवाल मात्र त्याचा काल इ. स. चे सातवे शतक हा मानतात. त्यांच्या मते हर्षवर्धनाच्या कालात देशातील निरनिराळ्या संप्रदायांची काय परिस्थिती होती, त्याची माहिती पुराणकर्त्याने दिली आहे. त्याचप्रमाणे गुप्तकालातील भौगोलिक परिस्थिती, धार्मिक स्थिती व लोकसमजुती यांचीही माहिती त्यात आहे. हे एक महापुराण आहे. प्रस्तुत पुराणाची रचना कुरुक्षेत्राच्या प्रदेशात झाली असली पाहिजे. त्या प्रदेशातील अनेक तीर्थांचे माहात्म्य प्रस्तुत पुराणात वाढले. [वा. पु. स्ट.; गो. क. अ. ग्रं.; श्री. बा. मो. कानिटकर – स्वराज्य, २९ ऑक्टो. १९६६; पु. वि.; पु. नि.]

वामाचार एक शाक्त आचारपद्धती. दक्षिणाचाराच्या उलट म्हणून याला वामाचार असे म्हणतात. मद्य, मांस, मत्स्य, मुद्रा व मैथुन अशा पाच मकारांनी शक्तीची उपासना ज्यात केली जाते, तो वामाचार होय. दक्षिणाचारातही पंच मकार असतातच; पण ते प्रतीकरूपाने घेतलेले असतात. वामाचारात मात्र हे पंच मकार वाच्यार्थाने स्वीकारले जातात. वामाचार हा अनेक तंत्रग्रंथांत व पुराणांत निषिद्ध ठरविलेला आहे. पण तरीही एका काळी भारतात त्या पद्धतीची उपासना करणारे शाक्त होते. या आचारातील कृत्ये समाजविरोधी असल्यामुळे अशा शाक्तांना आपली उपासना गुप्तपणे करावी लागे. सांप्रत हा वामाचार अस्तित्वात नाही. पाहा – शाक्तपंथ.

वामाक्षेपा (इ. स. १८३५ – १९१२) एक अघोरी संत. तारादेवीचा उपासक. बंगालमधल्या आटला गावी एका ब्राह्मण कुटुंबात याचा जन्म झाला. याचा पिता सर्वानंद चट्टोपाध्याय हा भक्त व सदाचारी होता. वामाक्षेपाचे खरे नाव वामाचरण असे होते. अल्पवयातच हा गृहत्याग करून तारापीठ गावी गेला. तिथे मोक्षदानंद नावाच्या गुरूचे शिष्यत्व पत्करून तो शाक्तसाधना करू लागला. तारापीठाजवळच्या एका वनात त्याने तारेच्या कृपेसाठी घोर तपस्या केली. तारादेवी ही आपली माता आहे, असे तो समजे व लहान मुलाप्रमाणे तिच्याशी लडिवाळपणा करी.

वामाक्षेपा हा बहुधा स्मशानात राही व 'बालोन्मत्तपिशाचवत्' वागे. त्याने एक कुत्राही जवळ बाळगला होता. तारेचा नामजप ही त्याची प्रमुख साधना होती. अघोरी संतमंडळीत याला फार मान होता. तारापीठाजवळच्या शाल्मली वृक्षाखाली त्याने समाधी घेतली. सांप्रत तिथे त्याचे स्मारक म्हणून एक मंदिर उभारले गेले आहे.

वचनामृत ही त्याची एक वाङ्मयकृती आहे. तिच्यातली काही वचने अशी –

(१) भक्ताची साधना गुप्त असली पाहिजे. ती लोकांना दाखवण्याची किंवा समजविण्याची वस्तू नव्हे.

(२) माता तारा हिचे दर्शन फार सोपे आहे. भक्ताने एक आर्त हाक मारताच ती दर्शन देते. आर्त भक्ती आणि विश्वास ही तिच्या प्राप्तीची साधने आहेत.

(३) चरित्र ही माणसाची अमूल्य संपत्ती आहे. चारित्र्य नष्ट झाले, की मनुष्यत्वही संपते. [भा. सं. म.]

वायन एखादे व्रत केल्यावर त्याच्या सांगतेसाठी अपूपादी मिष्ट पदार्थ ब्राह्मणास दान देतात, त्याला वायन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणतात. व्रतपूर्तीसाठी सुवासिनी स्त्रिया एका सुपात खण, नारळ, तांदूळ व इतर सौभाग्यचिन्हे घालून त्याचे दान देतात, त्यालाही वायन असे म्हणतात.

वायव्यकृच्छ्र एक प्रायश्चित्त. तळहात पसरून त्यावर जेवढे अन्न मावेल, तेवढेच रोज खाऊन महिनाभर राहायचे, असे याचे विधान अग्निपुराण (१७१.१४) व विष्णुधर्मोत्तरपुराण (४८) यांत सांगितले आहे. [हि. ध.]

वायव्यपात्र एक यज्ञीय पात्र. यात सोमरस भरून ठेवतात. निरनिराळ्या देवतांसाठी निरनिराळ्या लाकडांची व आकारांची वायव्यपात्रे असतात. सामान्यतः ते टीचभर उंचीचे, मध्यभागी बाक असलेले व उखळीच्या आकाराचे असते. वायव्यपात्रांनाच ग्रह अशी दुसरी संज्ञा आहे.

वायुपुराण एक महापुराण. विष्णुपुराणाच्या सूचीवरून वायुपुराणाचा अनुक्रम चौथा असल्याचे कळते. काहींच्या मते शिवपुराण हे चौथे असून, वायुपुराण हे अठरा पुराणांच्या बाहेरचे आहे. वस्तुतः हा मतभेदाचा मोठाच विषय आहे. कूर्म, पद्म, ब्रह्मवैवर्त, भागवत, मार्कंडेय, लिंग, वराह व विष्णू ही पुराणे अठरा पुराणांत शिवपुराणाची गणना करतात; तर देवी भागवत, नारद आणि मत्स्य ही पुराणे तो मान वायुपुराणाला देतात. पण या बाबतींत बहुमत हेच महत्त्वाचे प्रमाण ठरू शकत नाही. त्यासाठी अन्य कसोट्याही लावणे भाग आहे.

सांप्रत शिव व वायू या दोन नावांची वेगवेगळी पुराणे आढळतात. ती दोन्ही आकार, प्रकार आणि वर्ण्य विषय या बाबतींत भिन्न आहेत.

प्रस्तुत पुराणाचा आरंभश्लोक असा –

जयति पराशरसूनुः सत्यवतीहृदयनन्दनो व्यासः।
यस्यास्यकमलगलितं वाङ्मयममृतं जगत् पिबति॥

अर्थ – पराशरपुत्र व सत्यवतीच्या हृदयाला आनंद देणारा व्यास याचा जयजयकार असो. याच्या मुखकमलातून गळलेले वाङ्मयरूपी अमृत जग पीत आहे.

प्रस्तुत पुराणात ११२ अध्याय असून, श्लोकसंख्या १०,९९१ आहे. ब्रह्मांडपुराणाप्रमाणेच प्रस्तुत पुराणही चार पादांत विभक्त आहे –

(१) प्रक्रिया पाद – अ. १-६, (२) उपोद्घात पाद – अ.७-६४, (३) अनुषंग पाद – अ. ६५-९९ व (४) उपसंहार पाद – अ. १००-११२.

या ग्रंथाची अंतरंगपरीक्षा केल्यानंतर असे दिसते, की शेवटचे नऊ अध्याय (१०४-११२) वैष्णव मताच्या समर्थनासाठी कोण्या वैष्णव लेखकाने मागाहून लिहून जोडले आहेत. तेव्हा प्रस्तुत पुराणाचा शेवटचा अध्याय निःसंदेह १०३ हाच ठरतो. कारण त्याच्या शेवटी पुराणाच्या अवताराची गुरुपरंपरा दिलेली आहे, ती प्रामाणिक आहे. शेवटच्या श्लोकात फलश्रुती व महेश्वरस्तुती दिली आहे. या स्तुतीवरून वायुपुराण हे शैवतत्त्वप्रतिपादक असल्याचे समजते. याविषयी स्कंदपुराणाच्या रेवा खंडातला एक श्लोक असा –

चतुर्थं वायुना प्रोक्तं वायवीयमिति स्मृतम्।
शिवभक्तिसमायोगात् शैवं तच्चापराख्यया॥

अर्थ – वायूने कथन केले म्हणून या पुराणाला वायुपुराण म्हणतात. ते शिवभक्तिप्रतिपादक असल्यामुळे त्याला शिवपुराण असे दुसरेही नाव आहे.

नारदमते वायुपुराण रुद्राचे प्रतिपादक, चोवीस हजार श्लोकांनी संपन्न व श्वेतकल्पात वायूने कथित आहे. याचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पूर्व भागात सृष्टीची उत्पत्ती, मन्वंतरे, राजवंश, गयासुरवध, माघमाहात्म्य, व्रते, दानधर्म, राजधर्म, इ. विषयांचे विवरण आहे. उत्तरार्धात नर्मदेचे वर्णन आणि शिवमाहात्म्य आहे. वायुपुराणाचा उल्लेख द्वादशसाहस्री संहिता असा केलेला आहे. यावरून मुळात १२ हजारच श्लोक होते. पण कालांतराने अनेक माहात्म्यग्रंथ याला जोडले गेले आणि त्यामुळे त्याची श्लोकसंख्या चोवीस हजारावर गेली.

पुराणातले विषय – प्रस्तुत पुराणात पुढील विषयांचे वर्णन आहे–सृष्टीची उत्पत्ती (अ. १-६), प्रतिसंधिवर्णन (अ. ७), चार आश्रम (अ. ८), देवसृष्टिवर्णन (अ. ९), मन्वंतरे व मन्वंतराधिपती (अ. १०), पाशुपत योग (अ. ११-१५), आचारधर्म (अ. १६-१९), ॐकारप्राप्तिमार्ग, कल्पसंख्या, स्वरोत्पत्ती माहेश्वर स्तोत्र (अ. २०-३०), देववंश (अ. ३१), युगधर्म (अ. ३२), स्वायंभुववंश (अ. ३३), जंबुद्वीप व भुवनकोश (अ.३४–५०), खगोल, ऋषी व पितर, चतुर्युगे (अ. ५१-६०), महातीर्थे (अ. ६१), प्रजापतिवंश (अ. ६१), पृथुकथा व पृथ्वीदोहन (अ. ६२-७०), श्राद्धप्रक्रिया (अ. ७१-८४), वैवस्वतवंश (अ.८५-८९), सोमजन्म, सोमवंश, विष्णुवंश (अ. ९०-९६), विष्णुमाहात्म्य, तुर्वसुवंश, प्रतिसर्ग (अ. ९७ ते १०३).

अध्याय १०४ मध्ये व्यासकृत परमतत्त्व व साक्षात्कार यांचे विवरण आहे. हे परमतत्त्व म्हणजे राधासंवलित श्रीकृष्ण होय. प्रस्तुत अध्यायात आनंदकंद श्रीकृष्णाचे रसमय वर्णन आहे. ज्या राधेचा नामोल्लेख, भागवत व विष्णुपुराण ही वैष्णव पुराणे असूनही त्यांत आलेला नाही, तो उल्लेख प्रस्तुत पुराणात आहे.

शेवटच्या आठ अध्यायांत गयामाहात्म्याचे विस्ताराने ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पादन आहे. गया तीर्थाची देवता गदाधर विष्णू ही असून, या गदाधराचेही माहात्म्य या विभागात आलेले आहे. शैव पुराणाच्या अंती हा विष्णूसंबंधी अंश आढळतो, त्यावरून हा विभाग मागाहून जोडला गेला, यात संदेह उरत नाही.

वर दिलेल्या चार पादांनी युक्त असे वायुपुराण सांप्रत मिळत नाही. गयामाहात्म्य व रेवामाहात्म्य ही प्रकरणे स्वतंत्र मिळतात.

मत्स्यपुराणाप्रमाणेच प्रस्तुत पुराणातही धर्मशास्त्रीय विषयांचे वैपुल्य आहे. कल्पतरू या ग्रंथात धर्मशास्त्रविषयक १६० अवतरणे यातून घेतली आहेत. त्यांपैकी ३५ मोक्षपर, २२ तीर्थपर, ७ दानपर व प्रत्येकी ५ ब्रह्मचारी व गृहस्थ यांच्यासंबंधी आहेत. अपरार्कानि श्राद्धविषयात सुमारे ७५ अवतरणे आणि स्मृतिचंद्रिकेने त्याच विषयात २५ अवतरणे घेतली आहेत.

प्रस्तुत पुराणातले शिवचरित्रवर्णन सांप्रदायिक दृष्टीने दूषित नाही. यात पशुपतीच्या उपासनेशी संबद्ध असा पाशुपत योग विवेचिला असून, अनेक दृष्टींनी तो महत्त्वाचा आहे. पाशुपत योगाचे वर्णन अन्य पुराणांत मिळंत नाही. इथें मात्र त्याची पूर्ण प्रक्रिया सविस्तर मिळते. प्रस्तुत पुराणातला हा अंश प्राचीन योगशास्त्राचे स्वरूप समजण्याच्या कामी अत्यंत उपयुक्त आहे.

या पुराणात भविष्यकाली घडणाऱ्या गोष्टी म्हणून भूतकालातील काही गोष्टी दिल्या आहेत. उदाहरणार्थ —

अनुगङ्गं प्रयागं च साकेतं मगधांस्तथा ।
एतान् जनपदान् सर्वान् भोक्ष्यन्ते गुप्तवंशजा : ।।

(वायुपु. ९९.३८३)

अर्थ– गंगेच्या परिसरातला प्रदेश, प्रयाग, साकेत (अवध) व मगध या सर्व जनपदांवर गुप्तवंशीय राजे राज्य करतील.

हा भविष्यपर उल्लेख वस्तुतः पुराणरचनाकाली गुप्तराजवंशाची सत्ता भारताच्या जेवढ्या भागावर प्रस्थापित झाली होती, त्याचा निदर्शक आहे. भूतार्थ हा भविष्यार्थ म्हणून कथन करण्याची ही प्रथा वायुपुराणातच प्रथम रूढ केली गेली असावी. पुढे अन्य पुराणकारांनी तिचे अनुकरण केले.

कालनिर्णय– वायुपुराण हे सर्वांत काल–ज्येष्ठ असून, मत्स्यपुराण हे त्याच्या खालोखाल असल्याचे डॉ. भांडारकर सांगतात. त्यांच्या मते प्रस्तुत पुराण हे इ. स. ३०० च्या सुमाराचे असावे. आनंदाश्रमाच्या प्रतीत याविषयीच्या पुराव्याचा एक श्लोकार्ध आढळतो, तो असा —

अधिसीमकृष्णो धर्मात्मा साम्प्रतोऽयं महायशा : ।

(वायु पु. ९९.२५८)

अर्थ– सांप्रत मोठ्या कीर्तीचा व धर्मनिष्ठ असा अधिसीम कृष्ण (राज्य करीत आहे.)

अधिसीम कृष्णाचा काळ इ. स. ३०० च्या सुमाराचाच आहे.

समुद्रगुप्ताच्या काळात गुप्तांचे राज्य हे साम्राज्य झाले. त्याच्या वाढीचा इतिहास प्रस्तुत पुराणात नाही.

प्रा. बलदेव उपाध्याय हेही डॉ. भांडारकर यांच्या मताला जवळचे आहेत. ते कालनिर्णयाविषयी प्रतिपादन करतात ते असे – वायुपुराण हे निश्चित रूपाने प्राचीन आहे. त्याच्यावर सांप्रदायिक संकीर्णतेचा प्रभाव नाही, तंत्रमताचाही प्रभाव नाही. सहाव्या व सातव्या शतकात वायुपुराण हे फार लोकप्रिय होते. शंकराचार्यांचे ब्रह्मसूत्रभाष्य व बाणभट्टाची कादंबरी यांत वायुपुराणाचे उल्लेख मिळतात. शंकराचार्यांनी याचा नावाने उल्लेख केलेला नाही, पण 'नामरूपे च भूतानां' असा एक श्लोक स्मृतिवचन म्हणून उद्धृत केलेला आहे. हा वायुपुराणाच्या ९० व्या अध्यायातला ६३ वा श्लोक आहे. बाणभट्ट 'पुराणे वायुप्रलपितम्' म्हणून प्रस्तुत पुराणाचा उल्लेख करतो. गुप्त– राज्याच्या प्रारंभकालातील सीमा प्रस्तुत पुराणात सांगितलेल्या आहेत, पण समुद्रगुप्ताची कारकीर्द वायुपुराणाला अवगत नाही. यावरून या पुराणाचा काल इ. स. ३५० च्या सुमाराचा असावा असे वाटते.

राजवंश – वायुपुराणाच्या ८५ ते ९९ या अध्यायांत उ. भारतात राज्य करणाऱ्या काही राजांची वंशावळ व त्यांची राज्ये यांची माहिती दिली आहे. हे राजे सूर्य व सोम या दोन्ही वंशांचे होते.

सूर्यवंशात वैवस्वत मनू हा पहिला. त्याला नऊ पुत्र असल्याचे सांगितले आहे. मनूने पृथ्वीचे दहा भाग केले आणि त्यांतले नऊ आपल्या पुत्रांना आणि एक इलापुत्र पुरूरवा याला दिला. मनूच्या नऊ पुत्रांपैकी पृषध्राने आपल्या गुरूच्या गायीची हत्या केली. त्यामुळे गुरूने त्याला 'तू शूद्र होशील' असा शाप दिला. दुसरा मनुपुत्र अरिष्ट याच्या वंशातील शेवटचा राजा मरुत्त चक्रवर्ती झाला. नरिष्यंत या तिसऱ्या पुत्राच्या वंशजांनी वैशाली येथे राज्य केले. या वंशातील शेवटचा राजा प्रमती हा अयोध्येच्या दशरथाचा समकालीन होता. शर्याती या पुत्राने आनर्त देशावर राज्य केले. त्याच्या वंशातील रैवत ककुद्मिन हा मृत्यू पावल्यावर पुण्यजन राक्षसांनी कुशस्थली ही राजधानी वेढली आणि त्याचे शंभर भाऊ पळून गेले आणि या वंशाचा शेवट झाला. मनूचा आणखी एक पुत्र नाभाग याच्या वंशात रथीतर हाच शेवटचा राजा झाला. कारण रथीतराचे सर्व वंशज हे ब्राह्मण बनले.

आणखी एक पुत्र इक्ष्वाकू याला शंभर पुत्र होते. त्यांपैकी विकुक्षी, निमी आणि दंड हे महत्त्वाचे होते. त्यांपैकी निमीने विदेहावर राज्य केले. त्याच्या पुत्राचे नाव मिथी किंवा जनक असे होते. याच्याच नावावरून त्याच्या नगरीला मिथिला असे नाव मिळाले. याच्या वंशातला आणखी एक महत्त्वाचा राजा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणजे सीरध्वज जनक हा होय. हाच बहुधा दाशरथी रामाचा सासरा असावा.

विकुक्षीने अयोध्येवर राज्य केले. याच्या वंशात बृहदश्व, मांधाता, त्रिशंकू, हरिश्चंद्र, सगर, भगीरथ, अश्मक, राम, इ. राजे होऊन गेले.

मनूच्या इतर पुत्रांची नुसती नावेच दिली आहेत. यानंतर सोमवंशाची माहिती दिली आहे. सोम आणि तारा यांचा पुत्र बुध. बुध आणि इला यांचा पुत्र पुरूरवा. त्याने प्रतिष्ठान किंवा प्रयाग येथे राज्य केले. ऋषींच्या यज्ञीय संपत्तीची त्याने हाव धरली म्हणून त्याचा नाश झाला. त्याला सहा पुत्र होते. त्यांपैकी आयू आणि अमावसू नावाचे दोन पुत्र महत्त्वाचे होते. अमावसूने कान्यकुब्ज देशात स्वतंत्र राज्य स्थापले. त्यानंतर, याच्या वंशात जह्नू हा महत्त्वाचा राजा झाला.

आयू हा प्रतिष्ठान येथे गादीवर बसला. त्याला पाच पुत्र झाले. त्यांपैकी नहुष आणि पुत्रधर्म हे महत्त्वाचे होते. पुत्रधर्माने काशी येथे स्वतंत्र राज्य स्थापले. याच्या वंशात दीर्घतपा, धन्वंतरी व दिवोदास हे प्रसिद्ध राजे होऊन गेले. दिवोदास (पहिला) याच्या कारकीर्दीत काशीचे राजे व हैहय राजे यांच्यांत भांडणे सुरू झाली. भद्रश्रेण्य या हैहय राजाने दिवोदासाचा पराभव केला आणि त्याची राजधानी वाराणसी जिंकली. पण दिवोदासाने त्याच्या पुत्रांपासून आपला प्रदेश परत मिळवला आणि दुर्दमाखेरीज त्याच्या सर्व पुत्रांना ठार मारले. त्यानंतरच्या काळातही या दोन घराण्यांतील संघर्ष चालू राहिले. दिवोदास (दुसरा) याचा पुत्र प्रतर्दन हा पराक्रमी होता. त्याने हैहयांचा पराभव केला. पण मध्यंतरीच्या काळात राक्षसांनी त्याची राजधानी काबीज केली होती. ती त्याला परत मिळवता आली नाही. त्याचा नातू अलर्क याने राक्षसांना घालवून देऊन आपली राजधानी परत मिळवली आणि तिथे दीर्घ काळ राज्य केले.

आयूचा एक पुत्र रजी हा पराक्रमी होता. त्याने देव-दानव-संग्रामात देवांना साहाय्य केले आणि नंतर इंद्राचे पद बळकावले. त्यामुळे इंद्राने त्याच्या पुत्रांवर सूड घेतला आणि त्याचा वंश खलास केला.

प्रतिष्ठान येथील आयूच्या वंशात नहुष हा राजा झाला. त्याला सहा पुत्र होते. मोठ्याचे नाव यती व त्याच्या पाठच्या पुत्राचे ययाती असे होते. यती हा मुनी बनला, म्हणून ययाती गादीवर बसला. त्याने दीर्घ काळ राज्य केले आणि मुलांवर राज्यकारभार सोपवून तो वानप्रस्थ बनला. ययातीने आपल्या राज्याचे पाच वाटे केले आणि आपल्या पाच पुत्रांना दिले. पुरूने प्रतिष्ठान येथे, यदूने दक्षिणेत, तुर्वसूने आग्नेयीला, द्रुह्यूने पश्चिमेला आणि अनूने उत्तरेला राज्य केले.

यदूच्या पाच पुत्रांपैकी सहस्रजित आणि क्रोष्टू हे महत्त्वाचे होते. सहस्रजिताचा पुत्र शतजित आणि शतजिताचा पुत्र हैहय होय. त्याच्या वंशातील भद्रश्रेण याने काशीच्या राजाशी संघर्ष सुरू केले. याच वंशात कार्तवीर्य अर्जुन हा पराक्रमी राजा झाला.

क्रोष्टूच्या वंशात शशबिंदू हा पराक्रमी राजा झाला. तो चक्रवर्ती होता. त्याला शंभर पुत्र होते. त्यांपैकी सहांचीच नावे दिलेली आहेत. त्यांतल्या पृथुश्रवस राजाच्या वंशात रुक्मकवच हा राजा झाला. त्याला पाच पुत्र होते. त्यांपैकी धाकटा पुत्र ज्यामघ याने विदर्भात राज्य स्थापन केले. त्याचा पुत्र विदर्भ याच्या नावावरूनच त्या प्रदेशाला विदर्भ हे नाव पडले असावे. विदर्भाला क्रथ, कैशिक व लोमपाद असे तीन पुत्र होते.

विदर्भ देशातील क्रथाच्या वंशात सात्वत राजा झाला. सात्वताला भजमान, देवावृध, अंधक व वृष्णी असे चार पुत्र होते.

तुर्वसूच्या वंशात मरुत्त हा पराक्रमी राजा झाला. त्याला पुत्र नव्हता. म्हणून त्याने दुष्यंताला दत्तक घेतले. दुष्यंताचा नातू जनापीड याला चार पुत्र होते आणि त्यांनी दक्षिणेत जाऊन आपल्या नावांवरून पांड्य, चोळ, केरळ आणि कुल्य ही राज्ये स्थापली.

अनूच्या वंशात सातव्या पिढीत महामना हा राजा झाला. त्याला उशीनर आणि तितिक्षू असे दोन पुत्र होते. उशीनराला पाच पुत्र होते. त्यांपैकी एकाचे नाव शिबी होते.

तितिक्षूच्या वंशात बली हा राजा झाला. त्याला अंग, वंग, कलिंग, सुह्म आणि पुंड्र असे पाच पुत्र होते. अंगाच्या वंशात चंप हा प्रसिद्ध राजा झाला. त्याने चंपावती किंवा मालिनी या नगरीची स्थापना केली.

पुरू बहुधा ययातीच्या नंतर प्रतिष्ठान येथे गादीवर बसला. याच्याच वंशात दुष्यंताचा पुत्र भरत झाला. भरताला तीन राण्या होत्या आणि काही पुत्रही होते. पण ते चांगले नसल्यामुळे त्याने त्यांची हत्या केली, असे म्हणतात. नंतर त्याने भरद्वाजाला दत्तक घेतले. भरताचा पाचवा वंशज हस्ती याने हस्तिनापूर नगर वसवले. त्याला अजमीढ, द्विजामीढ व पुरुमीढ असे तीन पुत्र होते. अजमीढाला कंठ, ऋक्ष, बृहद्वसू व नील असे चार पुत्र होते. नीलाचा पणतू ऋक्ष होय. त्याला पाच पुत्र होते. त्यामुळे त्यांच्या राज्याला पांचाल असे नाव मिळाले. ऋग्वेदात उल्लेखिलेला दिवोदास हा याच वंशात होऊन गेला.

ऋक्ष हस्तिनापूर येथे राज्य करीत होता. त्याचा नातू कुरु होय. त्यानेच बहुधा कुरुक्षेत्र नगर वसवले. त्याला परीक्षित, सुधन्वा आणि जह्नू असे तीन पुत्र होते. परीक्षित पित्यानंतर त्याच्या गादीवर बसला. सुधन्वाने वेगळे राज्य स्थापले. त्याच्या वंशातील वसूने चेदी आणि मगध ही राज्ये स्थापली. वसूने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सात पुत्र होते. त्यांपैकी ज्येष्ठ पुत्राचे नाव बृहद्रथ असे होते. त्याच्याच वंशात जरासंध राजा झाला.

परीक्षिताला जनमेजय (दुसरा) नामक पुत्र होता आणि त्याला सुरथ नावाचा पुत्र झाला.

जह्नूच्या वंशात देवापी आणि शंतनू हे राजे झाले. शंतनूने हस्तिनापूर येथे राज्य केले. त्याच्या नंतर विचित्रवीर्य गादीवर बसला. त्यानंतरची वंशावळ प्रसिद्धच आहे. अभिमन्यूचा पुत्र परीक्षित याला जनमेजय नामक पुत्र होता. जनमेजयानंतर त्याचा पुत्र शतानीक हा गादीवर बसला. त्याचा नातू अधिसाम कृष्ण याच्या कारकीर्दीत नैमिषारण्यात झालेल्या यज्ञाच्या प्रसंगी सूताने जमलेल्या ऋषींना वायुपुराण सांगितले.

यानंतर या पुराणात भविष्यकालीन काही राजवंश दिले आहेत. पौरव आणि ऐक्ष्वाकू हे वंश जवळजवळ एकाच वेळी नामशेष झाले आणि त्याच सुमारास कलियुग सुरू झाले, असे यात सांगितले आहे.

वायुपुराणात नीतिपर सुभाषिते विपुलपणे विखुरलेली आहेत, त्यांपैकी काही अशी–

प्राणायामेन युक्तस्य विप्रस्य नियतात्मनः ।
सर्वे दोषाः प्रणश्यन्ति सत्त्वस्थश्चैव जायते ॥

(वायुपु. १.१०.९०)

अर्थ – नियमशील व प्राणायामाने युक्त अशा विप्राचे सर्व दोष नाश पावतात आणि तो सत्त्वगुणी होतो.

अविरोधेन धर्मस्य विचरेत् पृथिवीमिमाम् । (वायुपु. १.१६.६)

अर्थ – धर्माला अविरुद्ध अशा प्रकारे वागून या पृथ्वीवर संचार करावा.

चक्षुष्पूतं व्रजेन्मार्गं वस्त्रपूतं जलं पिबेत् ।
सत्यपूतां वदेद्वाणीमिति धर्मानुशासनम् ॥

(वायुपु. १.१६.७)

अर्थ – डोळ्यांनी नीट पाहून मार्ग चालावा, वस्त्राने गाळून पाणी प्यावे आणि सत्याने पवित्र अशी वाणी बोलावी, अशी धर्माची आज्ञा आहे.

अन्नदानात्परं दानं विद्यते नेह किञ्चन ।
अन्नाद् भूतानि जायन्ते जीवन्ति च न संशयः ॥

(वायुपु. १.८०.५५)

अर्थ – या जगात अन्नदानाहून श्रेष्ठ असे कोणतेही दान नाही. (कारण) अन्नातूनच प्राणिमात्र उत्पन्न होतात आणि अन्नावरच जगतात, यात संशय नाही.

यानि रत्नानि मेदिन्यां वाहनानि स्त्रियस्तथा ।
क्षिप्रं प्राप्नोति तत्सर्वं पितृभक्तो हि मानवः ॥

(वायुपु. १.८०.५८)

अर्थ – या पृथ्वीवर वाहने, स्त्रिया, रत्ने, इ. वैभवाच्या वस्तू आहेत. त्या सर्व पितृभक्त माणसाला तावडतोब मिळतात.

ब्रह्मज्ञानं गयाश्राद्धं गोगृहे मरणं तथा ।
वासः पुंसां कुरुक्षेत्रे मुक्तिरेषा चतुर्विधा ॥

(वायुपु. ४.१०५.१६)

अर्थ – ब्रह्मज्ञान मिळवणे, गयेत पितरांचे श्राद्ध करणे, गोठ्यात मरण आणि कुरुक्षेत्रात वास्तव्य, हा मनुष्याचा चतुर्विध मोक्ष आहे.

या पुराणाचा समाप्तिश्लोक असा–

इदं वायुपुराणं च श्रद्धया वाऽपि यः पठेत् ।
तस्य गृहे स्थिरा लक्ष्मीर्दीर्घमायुरवाप्नुयात् ॥

(वायुपु. १.११२.३८)

अर्थ – हे वायुपुराण जो श्रद्धेने पठण करील त्याच्या घरी लक्ष्मी स्थिर राहील व त्याला दीर्घायुष्य प्राप्त होईल.

वरील श्लोक म्हणजे प्रस्तुत पुराणाची फलश्रुती होय. [पु. वि.; पु. नि.; श्री. बा. मो. कानिटकर–स्वराज्य, १३ ऑगस्ट १९६७]

वायुव्रत

एक काम्य व्रत. याचा आरंभ ज्येष्ठ शु. चतुर्दशीला करतात. वायू ही या व्रताची देवता आहे. प्रत्येक चतुर्दशीला वायुपूजा व उपवास हा याचा विधी आहे. उद्यापनाच्या वेळी दोन वस्त्रे दान देतात. [हि. ध.]

वायू

एक वैदिक देवता. वायू ही अंतरिक्षाची देवता मानलेली आहे. वायूचा निर्देश प्रायः इंद्र-वायू अशा जोड-शब्दात होतो. वायूची उत्पत्ती विश्वपुरुषाच्या श्वासातून झाली, असे ऋग्वेदात म्हटले आहे (ऋ. १०.९५).

हा सुंदर, मनोगती आणि सहस्र नेत्रांचा आहे (ऋ. १.२३). याच्याजवळ एक प्रकाशमान रथ असून, एक सहस्र अश्व त्याला ओढतात (ऋ. १.२३). या अश्वसमूहाला नियुत असे नाव आहे. हा सोमप्रेमी आहे. सर्व देवांमध्ये हा क्षिप्र अर्थात द्रुतगती असल्यामुळे याने आधी सोमाचा पेय भाग प्राप्त करून घेतला, अशी कथा आहे (श. ब्रा. १३.१.२). अशीच एक कथा ऐतरेय ब्राह्मणात आली आहे (२.२५).

इंद्र-वायूंना उद्देशून ऋग्वेदात जी सूक्ते आहेत, त्यांपैकी एका सूक्तात त्याचे स्वभाववर्णन व त्याची प्रार्थना आढळते. त्या ऋचा अशा (ऋ. ४.४७.१–३)–

वायो शुक्रो अयामि ते मध्वो अग्रं दिविष्टिषु ।
आ याहि सोमपीतये स्पार्हो देव नियुत्वता ॥
इन्द्रश्च वायवेषां सोमानां पीतिमर्हथः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

युवां हि यन्तीन्दवो निम्नमापो न सध्र्यक् ।।
वायविन्द्रश्च शुष्मिणा सरथं शवसस्पती ।
नियुत्वन्ता न ऊतय आ यातं सोमपीतये ।।

अर्थ – हे वायो, श्रीमंत मनुष्य आपल्या ऐश्वर्याचा उपभोग घेतो, त्याप्रमाणे या अनुच्छिष्ट आहुतींचा व स्तुतींचा तू स्वीकार कर. तू आपल्या आल्हाददायक रथात आरोहण करून सोमप्राशनार्थ इथे आगमन कर. शिव्याशाप देणाऱ्या दुष्कर्मी लोकांचा पुरता निकाल लावून आणि आपल्या नियुत घोड्या रथास जोडून इंद्राच्या समागमे हे वायो, तू सोमप्राशनार्थ इथे आगमन कर. श्यामवर्ण, उत्कृष्ट संपत्तींचे आगर आणि ज्यात मनोहर आकृती दृग्गोचर होतात, त्या द्यावापृथिवी तुझ्यापुढे हात जोडून उभ्या आहेत. तर हे वायुदेवा, तू आपल्या आल्हाददायक रथात आरोहण करून सोमप्राशनार्थ इथे आगमन कर.

वायूच्या उपासनेने कीर्ती, संतती व संपत्ती प्राप्त होते आणि असा पुरुष शत्रूंना पिटाळून लावणारा व दुर्बलांचे रक्षण करणारा होतो (ऋ. ७.९०–९६; १.१३४.५).

वायू व वात – ऋग्वेदात वायू व वात हे दोन्ही शब्द भौतिक चमत्काराप्रमाणेच तशा चमत्काराच्या देवतेलाही योजिले आहेत. तथापि वायू ही मुख्यत्वे देवता आहे व वात हे पंचमहाभूतांतले भूत आहे. वाताची प्रार्थना ऋग्वेदातील १०व्या मंडलाच्या १६८ व १८६ या सूक्तांत केलेली आहे. कधी कधी एकाच ऋचेमध्ये वायू व वात ही दोन्ही नावे येतात. (ऋ. ६.५०.१२; १०.९२.१३). वायू व वात या दोहोंतील फरक ज्या एका गोष्टीवरून व्यक्त होतो, ती म्हणजे वायूचे इंद्राशी साहचर्य ही होय. इंद्र-वायू या जोडनावाने त्यांची स्तुती केलेली असते. उलटपक्षी मुख्यतः वात हा भौतिक चमत्कार करणारा असल्यामुळे त्याचा संबंध इंद्राशी जोडण्याऐवजी पर्जन्याशी जोडला आहे. या दोन देवतांना लावलेली विशेषणेही निरनिराळी आहेत. वाताची विशेषणे वेग व उग्रता सांगणारी आहेत. वात हा रुद्राप्रमाणेच आरोग्य व दीर्घायुष्य देतो; कारण त्याच्या गृहामध्ये अमृताचा साठा आहे (ऋ. १०.१८६.३).

पौराणिक वायू – पुराणांत वायूचा जन्म आकाशापासून सांगितला आहे. तो भुवर्लोकाचा अधिपती असल्यामुळे त्याला भुवस्पती व मातरिश्वा अशी अन्य नामे प्राप्त झाली आहेत. इलामुदा नामक अप्सरासमूह, पांडवांतला भीम आणि हनुमान या व्यक्ती वायूपासून जन्म पावल्या, असे पुराणांतरी सांगितले आहे. द्वैतमतात मध्वाचार्यांना वायुदेवाचा अवतार मानतात.

वायूविषयी दक्षिणेमध्ये एक कथा प्रसिद्ध आहे, ती अशी – विष्णूने शेषशयन केले तेव्हा वायूला वाटले, की आता पृथ्वीचा भार शेषाला असह्य होईल म्हणून त्याने पृथ्वीचे वजन कमी करण्यासाठी मेरू पर्वताची शिखरें उडवून देण्याचा प्रयत्न आरंभिला. मेरूवर वाऱ्याच्या धडका बसत आहेत, असे समजताच शेषाने आपली फणा उभारून त्याला सुरक्षित केले. ते पाहून वायू खजिल झाला. शेषाने आपल्या सहस्र फणांपैकी एक फणा किंचित वर उचलून वायूची अवस्था जाणून घेण्याचा प्रयत्न केला; पण तेवढ्यात वायू सावध झाला आणि जोराने धडक देऊन त्याने मेरू पर्वताचे एक शिखर उडवले. हे उडालेले शिखर वेंकटाचलम (तिरुपती) येथे पडले. त्यामुळे तिरुमलै हा पर्वत मेरूचे शिखर आहे, असे समजून दक्षिणेतील लोक त्याला पवित्र मानतात.

वायुमूर्ती – विष्णुधर्मोत्तर पुराणात वायूची मूर्ती कशी करावी याविषयी तपशील दिला आहे, तो असा –

वायुमूर्ती – लेपाक्षी

द्विभुज, गळ्याला गुंडाळलेल्या वस्त्राची दोन टोके दोन्ही हातांनी धरलेली, वारा आत शिरल्यामुळे वस्त्र फुगलेली, तोंड उघडे आणि केस विस्कटलेले, अशी वायुमूर्ती करावी.

आगम, शिल्परत्न, रूपमंडन, इ. ग्रंथांत या मूर्तीच्या रूपाचा आणखी तपशील मिळतो, तो असा –

एका हाती ध्वज, दुसऱ्या हातात दंड, कधी दंडाऐवजी अंकुश, कधी सिंहासनावर बसलेला, तर कधी हरिणावर स्वार. रूपमंडनात त्याला चतुर्भुज कल्पिलेले आहे. मध्ययुगीन मंदिरांतून वर्णन प्रकारच्या वायुमूर्ती वायव्येच्या कोपऱ्यात आढळतात. आणखी एका पर्यायात वायू चतुर्भुज असतो. त्याच्या वरच्या दोन हातांत पंखा आणि ध्वज असतो. खालचे दोन हात वरद आणि अभय या मुद्रेत असतात.

जैन शिल्पशास्त्रग्रंथांच्या मते वायू हा मृगवाहन असून, वृक्ष धारण करणारा आहे.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

Y73(P15):1k
155M2J.8

वायुतत्त्व – वायू हे पंचमहाभूतांपैकी दुसरे भूत आहे. स्पर्श हा त्याचा गुण आहे. 'रूपरहितः स्पर्शवान् वायुः' (ज्याला रूप नाही पण स्पर्श आहे, तो वायू होय), असे तर्कसंग्रहात त्याचे लक्षण दिले आहे. वायू हे तत्त्व आकाशोद्भव आणि आकाशाश्रित आहे. आकाशात वाहणाऱ्या अनेकविध वाऱ्यांना वायूच म्हणतात. ते गतितत्त्वाचे व प्राणतत्त्वाचे प्रतीक आहे.

वृष्टीच्या द्वारे वायू अन्न निर्माण करतो व सर्व प्राण्यांना बलही तोच देतो. यजुर्वेदाच्या प्रारंभमंत्रात म्हटले आहे, की सूर्य हा वायूला गतिशील करतो. ऐतरेय ब्राह्मणात सूर्याने प्रेरित वायू सर्वत्र संचार करून जगताला पवित्र करतो, असे म्हटले आहे (३.१). जगताचे पोषण करणे हे वायूचेच काम आहे.

प्रकाश, हालचाल, वजनातील लघुता, एखाद्या गोष्टीचा मागोवा घेण्यास साधनीभूत होणारा गंध या सर्व गोष्टी सूचित करणारे वायू हे सामान्य तत्त्व आहे. वायू व अग्नी ही दोन तत्त्वे क्रिया व पौरुष यांची निदर्शक मानलेली आहेत. विश्वोत्पत्तीच्या कार्यात वायू हे प्रमुख तत्त्व असून, जीवनाची सर्व रूपे त्याच्यापासूनच उत्पन्न होत असतात. पुष्कळ दाब देऊन घनीभूत केलेल्या वायूपासूनच उष्णता किंवा अग्नी उत्पन्न होतो. जीवनाला कारणीभूत ठरणारे श्वसन व जीवनक्रियेला पोषक ठरणाऱ्या सर्व प्रकारच्या हालचाली वायूशीच संबंधित असतात.

योगदर्शनात वायूची दहा रूपे सांगितली आहेत, ती अशी–

प्रमुख वायू – (१) प्राण – हा प्राण्यांच्या शरीरात श्वासनिःश्वासांची क्रिया करतो व हृदयात राहतो. याला हंस असेही म्हटले आहे. कारण हकाराने हा बाहेर जातो आणि सकाराने आत येतो. (२) अपान – रेचक आणि कुंभक हे प्राणायाम याच्या माहात्म्याने होतात. हा गुदद्वारात राहतो. (३) समान – हा जठराग्नी प्रदीप्त करून अन्न पचवितो. हा नाभीमध्ये राहतो. (४) व्यान – हा नाड्यांतील मलाचे शोषण करून पुष्टी देतो. हा सर्व शरीरभर राहतो. व (५) उदान – याच्यामुळे खाद्यपेयादी पदार्थ गळ्यातून खाली उतरतात. वमन आणि भाषण ही याच्यामुळेच होतात. हा कंठात राहतो.

गौण वायू – (१) नाग – याच्यामुळे ढेकरा येतात. (२) कूर्म – याच्यामुळे नेत्रांची उघडझाप होते. (३) कृकल – हा शिंका आणतो. (४) देवदत्त – याच्यामुळे जांभया येतात व (५) धनंजय – हा शरीराचे पोषण करतो.

हे प्राणादिपंचक कर्मेंद्रियांनी युक्त झाल्याने प्राणमय कोश बनतो. हा कोश रजोगुणात्मक असतो. त्यामुळे त्याच्या ठिकाणी क्रियाशक्ती वास्तव्य करते.

आयुर्वेदात कफ, पित्त यांच्याबरोबर वात नावाचा एक दोष मानलेला आहे. हे तिन्ही मिळून त्रिदोष बनतात. [श. क; वै. वि. भा. सं.; सा. इं. इ. गौं. गौं.; म. ज्ञा. को.; वेदविद्या]

वार (१) सामान्यपणे वार शब्दाचा अर्थ दिवस असा आहे. वार म्हणजे सात दिवसांच्या पुनःपुन्हा आवर्तित होणाऱ्या संचातला एक दिवस. या संचातल्या प्रत्येक दिवसाला एकेका ग्रहाचे नाव दिले असून, त्या वारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत –

रविवार, सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार. सात वारांचा एक आठवडा मानतात.

हे वार आजच्या क्रमाने कसे येतात, त्या विषयीचे गणित असे – पृथ्वीपासून सर्वांत दूरचा ग्रह शनी प्रथम घेतला तर ग्रहांचा क्रम शनी, गुरू, मंगळ, रवी, शुक्र, बुध व चंद्र असा येईल. यांतला शनी प्रथम घेऊन पुढे चौथा ग्रह घेतला म्हणजे सात वार सुलट क्रमाने येतील. हा क्रम सिद्ध करण्यासाठी दिवसाचे चोवीस सारखे भाग केलेले आहेत. या प्रत्येक भागाला होरा असे म्हणतात. समजा, एखाद्या दिवशी सूर्योदयानंतर पहिल्या होरेचा स्वामी शनी असला, तर तोच त्या संपूर्ण दिवसाचा स्वामी होतो. म्हणून त्याला शनिवार म्हणायचे. ग्रह सात आहेत. एका दिवसात त्यांचे होराधिपती म्हणून तीन पूर्ण फेरे होतात. म्हणजे एकवीस होरा भरल्या. उरल्या तीन. त्या शनी, गुरू, मंगळ यांच्यासाठी गेल्या. पुन्हा सूर्योदयाच्या वेळी जी होरा येते ती मंगळाच्या पुढचा चौथा जो रवी, याची असते. म्हणजे तो दिवस रविवार झाला. त्या पुढच्या दिवशी पुन्हा पहिली होरा वरील क्रमाने चंद्राची येते, म्हणून तो सोमवार ठरला. याच क्रमाने मंगळ, बुध, गुरू, शुक्र आणि पुन्हा शनी असे सात वार येत राहतात. यांचे कोष्टक असे –

ग्रह	होरांचा (तासांचा) क्रम			
शनी	१	८	१५	२२
गुरू	२	९	१६	२३
मंगळ	३	१०	१७	२४
रवी	४	११	१८	१
शुक्र	५	१२	१९	२
बुध	६	१३	२०	३
चंद्र	७	१४	२१	४

पृथ्वीवर हल्ली जिथे जिथे वार चालतात, तिथे तिथे त्यांचा हाच क्रम आहे. इतकेच नव्हे; तर आपल्या देशात आज जो वार असेल, तोच पृथ्वीवर सर्वत्र असतो. वारांची नावे ही सर्व देशांत बहुधा एकाच अर्थाची आहेत. भारतीय पद्धतीत सूर्योदयापासून सूर्योदयापर्यंत म्हणजे चोवीस होरांचा एक वार मानतात.

पारशी लोकांत तीस दिवसांचे तीस (३०) वार मानलेले असून, त्यांचा मात्र ग्रहांशी संबंध नाही. चीनमध्ये साठ दिवसांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वारचक्र असून, प्रत्येक दिवसाला वेगवेगळे नाव आहे. त्यांचाही ग्रहांशी संबंध नाही.

हिंदी मुसलमानांच्या वारपद्धतीविषयी श्री. ग. ह. खरे यांनी लिहिले आहे, ते असे – हिंदी मुसलमान वापरत असलेल्या वारनामांपैकी इतवार, मंगळ, बुध, शन्यर हे तर संस्कृतोद्भवच आहेत. शुक्रवार प्रार्थनेचा किंवा महत्त्वाचा दिवस आहे, म्हणून त्यास प्रार्थनेचा (जुम्मह) दिवस म्हटले असावे. मुसलमानी अहोरात्र रोज सायंकाळी सुरू होतो. गुरुवारची रात्र मुसलमानी कल्पनेप्रमाणे शुक्रवारात मोडते. अर्थात् त्यांचा शुक्रवार हिंदू गुरुवारच्या रात्री सुरू होतो. म्हणून हिंदू गुरुवारच्या रात्रीसाठी (पर्यायाने संपूर्ण गुरुवारास) जुम्अरात (शुक्रवारची रात) हा शब्द प्रचारात आला.

इतिहास – ग्रीक आणि रोमन यांच्या साम्राज्यात खाल्डियन लोक हे भविष्य सांगणारे म्हणून प्रसिद्ध होते. वार हे भविष्यकथनाचे साधन म्हणून त्यांनीच प्रचलित केले. तिथून ते आपल्या देशात ख्रिस्तपूर्व सुमारे १००० ते ५०० वर्षे या कालखंडात केव्हातरी आले. रामायण आणि महाभारत हे आपले ग्रंथ देशात वारपद्धती सुरू होण्याच्या आधी लिहिले गेले असले पाहिजेत; कारण या दोन्ही ग्रंथांत वारांचा उल्लेख नाही. बायबलमध्येही वार नाहीत. टॉलेमी नावाचा एक ज्योतिर्विद ख्रिस्तोत्तर दुसऱ्या शतकात होऊन गेला. त्याच्या ग्रंथावरून त्याच्या काळात मात्र बहुतेक सर्वत्र वारपद्धती प्रचारात आली होती, असे कळते. गुप्तराजांपैकी एका राजाचा इ. स. ४८४ चा शिलालेख सापडला आहे. त्यात आषाढ शुद्ध १२ गुरुवार असा स्पष्ट उल्लेख आहे. त्यावरून ख्रिस्तोत्तर पाचव्या किंवा सहाव्या शतकात भारतामध्ये वार मान्यता पावले होते, असे दिसते.

वारपद्धती रूढ झाल्यानंतर प्रत्येक वार एकेका देवतेच्या उपासनेचा वार ठरविला गेला. त्यांचा क्रम असा –

रविवार	सूर्य
सोमवार	शिव
मंगळवार	गणपती, गौरी
बुधवार	विष्णू व विठ्ठल
गुरुवार	दत्त
शुक्रवार	देवी
शनिवार	मारुती

आपल्या पुराणग्रंथांत प्रत्येक वाराची व्रतेही सांगितली आहेत. त्याचप्रमाणे विशिष्ट वारी कोणत्या गोष्टी कराव्या व कोणत्या करू नयेत त्याचेही विधि-निषेध सांगितले आहेत,

रवी, सोम, इ. सात वार हे शुभ, अशुभ, उग्र, सौम्य अशा भिन्न भिन्न प्रकृतींचे आहेत. त्यांच्या स्वभावगुणांना अनुलक्षून कोणती कर्मे कोणत्या वारी करावी अथवा करू नयेत, याविषयी मुहूर्तग्रंथ आणि लोकांच्या समजुती यांमध्ये काही संकेत रूढ झालेले आहेत, ते असे –

रविवार – शुभही नव्हे आणि अशुभही नव्हे. या वारी बी पेरू नये, झाडांना पाणी घालू नये, मुलीला सासरी पाठवावी, पण माहेरी आणू नये, नवे कपडे घालू नयेत.

सोमवार – शुभ. नवे वस्त्र वापरू नये. कापसाला शिवू नये.

मंगळवार – अशुभ. नवे कपडे वापरू नयेत. युद्धाला अनुकूल. दिवसा कोणताही बेत करू नये.

बुधवार – श्मश्रुकर्मास शुभ. भावा-बहिणींच्या भेटीला चांगला. स्त्रियांच्या प्रवासाला अशुभ. नवी वस्तू घ्यावी. पेरणी करावी.

गुरुवार – शुभ. विद्यारंभ, नववस्त्रधारण, इ. शुभ कर्मांना चांगला.

शुक्रवार – रात्री कोणताही बेत करू नये. श्मश्रुकर्मास चांगला. भाजलेले चणे खावे.

शनिवार – अशुभ. चणे खाऊ नयेत. प्रवास वर्ज्य. नवे वस्त्र वापरू नये. अभ्यंगस्नान करावे. घर बांधणे वगैरे चिरस्थायी कार्यांस उपयुक्त.

कोणत्याही वाराचे दोष रात्री बाधक होत नाहीत. [पं. ज्यो. शा.; सं. मि.; म. ज्ञा. को., विज्ञानेतिहास भाग ५ वा]

(२) एक जमात. आसाममधील खासी-जैंतिया जिल्ह्याच्या दक्षिण भागातील दऱ्या व डोंगरउतार हे या लोकांचे वसतिस्थान आहे. हे लोक खासींपेक्षा काळसर आहेत. भाला, डाओ व ढाल ही हत्यारे ते वापरतात. हे लोक बांबूच्या घरात राहतात. शेती व शिकार हे यांचे मुख्य व्यवसाय आहेत. या जमातीत मातृसत्ता चालू असली तरी संपत्तीचा वारसा मुले व मुली यांना सारखा मिळतो. [दि खासीज्]

वारकरी संप्रदाय

महाराष्ट्र व कर्नाटक या प्रदेशांमध्ये प्रचलित असलेला एक वैष्णव संप्रदाय. भारतीय भक्तिसंप्रदायांपैकी हा एक प्रमुख संप्रदाय आहे. पंढरपूरचा विठोबा हे याचे उपास्य दैवत असून, पंथानुयायांची संख्या सुमारे दहा लाख आहे. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, इ. संतश्रेष्ठ या पंथात होऊन गेले आणि त्यांनी आपल्या वाङ्मयाच्या रूपाने पंथाला प्रसिद्धी आणि गौरव प्राप्त करून दिले.

वारी करणारा तो वारकरी होय. या वारी शब्दाच्या अनेक व्युत्पत्त्या विद्वानांनी दिल्या आहेत; पण या संप्रदायात वारी हा शब्द फेरी किंवा खेप या अर्थाने अभिप्रेत आहे. प्रतिवर्षी अथवा प्रत्येक महिन्यास नियमितपणे एखाद्या पवित्र स्थळाच्या यात्रेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वाऱ्याची प्रथा, असा वारी शब्दाचा रूढार्थ आहे. वारकऱ्यांच्या वाटतीत हे पवित्र स्थळ म्हणजे पंढरपूर होय. आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री या पंढरपूरच्या मुख्य वाऱ्या होत. प्रा. शं. वा. दांडेकर म्हणतात –

"आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यांपैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो तो 'पंढरपूरचा वारकरी' म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो 'वारकरी पंथ' होय."

हे वारकरी कसे असतात व कसे दिसतात याचे नामदेव-महाराजांनी वर्णन केले आहे, ते असे –

आजी महासुखें सृष्टी भरली भाग्यवंती ।
जालीसे विक्रुती पापतापा ।।
चालिले देखोनी वैष्णव जगजेठी ।
उभविती वैकुंठी गुढीया देव ।।
आले आले रे हरीचे डिंगर ।
वीर वारीकर पंढरीचे ।।
ज्यांची चरणधुळी उधळे गगनपंथें ।
ब्रह्मादिकां तेथे जाली दाटी ।।
एकमेकां पुढे लवविती माथे ।
म्हणती आम्हां ते लागो रज ।।
भक्तिप्रेम भाव भरले ज्यांच्या अंगीं ।
नाचती हरिरंगीं नेणती लाजु ।।

महाराष्ट्रातील या भक्तिसंप्रदायाचे मंदिर कसे उभारले गेले याचे वर्णन तुकोबांनी केले आहे, ते असे –

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।
ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिलें देवालया ।।
नामा तयाचा किंकर । तेणें केला हा विस्तार ।।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।

ज्ञानदेवांनी पाया घातला याचा अर्थ संप्रदाय सुरू केला असा नव्हे; तर त्या पंथाला तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिले असा आहे. संप्रदायप्रवर्तकाचा मान पुंडलिकाकडे जातो. ज्ञानदेवांनी त्याचा उल्लेख केला आहे. या दृष्टीने संप्रदायाच्या इतिहासाचे स्थूलमानाने विभाग पडतात ते असे –

(१) पुंडलिक ते ज्ञानदेवापर्यंतचा काल.
(२) ज्ञानदेव व नामदेव यांचा काल.
(३) भानुदास व एकनाथ यांचा काल.
(४) तुकारामांचा काल.
(५) तुकारामोत्तर काल.

यांपैकी पुंडलिकाच्या कालासंबंधी माहिती फारच थोडी उपलब्ध आहे. पुंडलिक हा भक्तश्रेष्ठ होता व त्याच्या भावार्थासाठी पांडुरंग त्याच्याकडे येऊन विटेवर उभा राहिला, ही परंपरेने चालत आलेली कथा ज्ञानदेवादी सर्व संतांनी वर्णिली आहे. याविषयी तुकोबा म्हणतात –

पुंडलीक भक्तराज । तेणें साधियलें काज ।
वैकुंठीचें निज । परब्रह्म आणिलें ।।

पुंडलिकाची कथा पद्मपुराणात व स्कंदपुराणात दिलेली आहे. 'देवाने या रूपात असेच राहावे, अज्ञानी जीवांचा उद्धार करावा व हे क्षेत्र माझ्या नावाने पुंडलीकपुर म्हणून प्रसिद्ध व्हावे', असा वर त्याने देवाकडे मागितला आणि देवाने तो त्याला दिला.

ज्ञानेश्वरपूर्वकालात विठोबाचे असंख्य भक्त होते, त्याचे मंदिर होते, त्याला देणग्या मिळत होत्या आणि विठ्ठलाची पूजाअर्चाही व्यवस्थित चालू होती. ज्ञानेश्वरपूर्वकाली विठ्ठलाचे माहात्म्य वृद्धिगत झाले होते, याचे प्रत्यंतर मध्वाचार्यांच्या चरित्रात सापडते. त्यांचा काल इ. स. ११९९–१२७८ असा आहे. त्यांनी आपल्या मठाच्या आठ बालयतींपैकी तिघांना श्रीविठ्ठलाची मूर्ती उपासनेसाठी दिली होती, असे श्री. द. रा. बेंद्रे सांगतात. ज्ञानेश्वपूर्वकालातच महाराष्ट्र, कर्नाटक व तेलंगण या प्रदेशांतून लोक विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूर येथे येत होते. वारीची पद्धती कोणी घालून दिली याची माहिती मिळत नसली, तरी ती प्रथा ज्ञानेश्वरपूर्वकालातच चालू झाली होती. ज्ञानदेवांचे वडील विठ्ठलपंत हे आषाढी-कार्तिकी वारीला पंढरपुरी गेल्याचा उल्लेख नामदेवाने केला आहे. इ. स. च्या सहाव्या शतकात विठ्ठल देवतेची प्रसिद्धी झाली होती. त्याअगोदर दोन-तीनशे वर्षे तरी देवस्थानाचे अस्तित्व धरायला हरकत नाही. पुंडलिकाचा काल तर त्याच्याही आधीचा असावा, असे वाटते.

ज्ञानदेव व नामदेव यांचा काल – इ. स. च्या तेराव्या शतकाचा उत्तरार्ध व चौदाव्या शतकाचा पूर्वार्ध हा ज्ञानदेव व नामदेव यांचा काल होय. हा कालखंड वारकरी संप्रदायाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्याच्या योग्यतेचा आहे. या कालखंडाचे स्फूर्तिस्थान ज्ञानदेव हे होत. गोरोबा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, सेना न्हावी, परिसा भागवत, जनाबाई, चोखामेळा, इ. संतमंडळी ज्ञानदेवांच्या प्रभावळीत होती. या सर्व अठरापगड जातीच्या संतांनी आपल्या अभंगवाणीने विठ्ठल-महिमा गाजविला.

ज्ञानदेवांचे स्फूर्तिस्थान नाथसंप्रदाय होय. त्यांनी आपली सांप्रदायिक परंपरा ज्ञानेश्वरीच्या शेवटी दिली आहे (१८. १७५२-५९). नाथसंप्रदाय हा केवळ योगमार्गाचाच पुरस्कर्ता होता आणि त्यात भक्तिमार्गाला स्थान नव्हते, असे अनेक पंडि-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तांनी म्हटले आहे. पण निवृत्ती, ज्ञानदेव, इ. संतांचे वाङ्मय पाहिल्यास योगसाधनेच्या बरोबरच त्यात भक्तिसाधनेलाही महत्त्व दिल्याचे आढळते. गहिनीनाथांचे शिष्य निवृत्तिनाथ यांचा गुरुपरंपरा सांगणारा एक अभंग आहे. त्यात म्हटले आहे, की मच्छिंद्रनाथांनी गोरक्षनाथांना प्रेममुद्रा दिली व तीच पुढे परंपरेने गहिनीकडून निवृत्तिनाथांना मिळाली. कृष्णनामाची प्रेमभक्ती लाभून आपले सर्व कुल पावन झाले, असेही त्यांनी म्हटले आहे. तोच वारसा ज्ञानेश्वरांना लाभला. नाथसंप्रदायाच्या मुळाशी केवळ योगच नसून भक्तीचाही निर्झर आहे, ही गोष्ट ज्ञानदेवांनीही स्पष्ट केली आहे. या रीतीने नाथसंप्रदायातूनच ज्ञानदेवांच्या हृदयात योगाबरोबरच विठ्ठलभक्तीचाही संचार झाला. ते म्हणतात –

योगियां दुर्लभ तो म्यां देखिला साजणी ।
पाहतां पाहतां मना न पुरे धणी ।

पूर्वापार चालत आलेल्या या भक्तिपंथात ज्ञानदेवांनी नवीन आशय ओतला व तो अधिक सखोल व व्यापक केला. त्यामुळे पंढरीच्या भक्तिकेंद्राला नवे तेज प्राप्त झाले.

वारकरी संप्रदायाचा पाया रचण्याची ज्ञानदेवांची कामगिरी चतुर्विध आहे, ती अशी – (१) त्यांनी पंथाला सुसंगत व तर्कशुद्ध असे तत्त्वज्ञान दिले, (२) सूक्ष्म नीतिमीमांसा केली, (३) धार्मिक अनुभवांचे मूल्यमापन केले व (४) लोकजागृती करून संप्रदायाची प्रवाही व अकृत्रिम संघटना बांधली.

नामदेव व ज्ञानदेव हे दोघे एकमेकांचे जिवलग सखे होते. त्या दोघांचा संगम हा ज्ञानभक्तीचा संगम ठरला. नामदेवाने कीर्तनभक्ती करून महाराष्ट्रात विठ्ठलभक्तीचा खूप प्रसार केला व पुढे गुजरात, राजस्थान व पंजाब या प्रदेशांतही तो केला. ज्ञानदेव-नामदेवांनी प्रस्तुत पंथाची द्वारे आबालवृद्धांना, स्त्री-पुरुषांना व सर्व जमातींना उघडी असल्याचा उद्घोष केला. देवाच्या दरबारात कोणी उंच नाही, कोणी नीच नाही; तर हृदयात भक्तिप्रेम असणारे सर्वच सारखे व देवाचे लाडके, असे निस्संदिग्ध शब्दांत त्यांनी सांगितले. त्यामुळे पंढरपूर हे सार्वजनिक क्षेत्र ठरले.

भानुदास व एकनाथ यांचा काल – नामदेवांच्या निर्याणानंतर (इ. स. १३५०) सुमारे १०० वर्षांनी एकनाथांचे पणजे भानुदास हे पैठणात जन्मले. भानुदासांनी बालपणी सूर्याची उपासना केली असली, तरी त्यांच्या घराण्यांत विठ्ठलभक्तीची परंपरा होती. ते नियमाने पंढरीची वारी करीत. विजयनगरच्या तत्कालीन राजाने पांडुरंगाची मूर्ती आपल्या राजधानीत नेली असता, भानुदासांनी आपल्या भक्तीच्या बळावर ती पंढरपूरला परत आणली, अशी परंपरागत कथा आहे. पुढे एकनाथमहाराजांनी या भागवत धर्माच्या मंदिराला भागवताच्या रूपाने भक्कम असा आधार दिला.

एकनाथांच्या काळी महाराष्ट्रात स्वराज्याचा लोप झाला होता. महाराष्ट्र मुसलमानी सत्तेच्या टाचेखाली गेला होता. हिंदु-धर्म व संस्कृती यांची दैना उडाली होती. नाथांचे पैठण हे निज़ामशहाच्या अंमलाखाली होते. हिंदूंच्या देवळांची मोडतोड करून त्या जागी मशिदी उभारणे, तीर्थस्थानांचा विध्वंस करणे, यात्रा-उत्सवांवर प्रतिबंध लादणे, अशा गोष्टी करण्यात मुसलमानी सत्तेला आनंद वाटत असे. हिंदुसमाजाची अंतर्गत परिस्थितीही पार बिघडली होती. लोक धर्माचे तत्त्व विसरले होते आणि क्षुद्र देवतांच्या नादी लागले होते. पोटभरूंचा सुकाळ झाला होता. धार्मिक पुढारी म्हणवणारा ब्राह्मणवर्गही अज्ञानी, भोळसट आणि पोटार्थी बनला होता. अशा या बिकट परिस्थितीला तोंड देऊन एकनाथांनी वारकरी संप्रदायाच्या पुनरुज्जीवनाचे कार्य कसे केले व त्याला कोणते फल मिळाले, याविषयी प्रा. न. र. फाटक म्हणतात –

" महाराष्ट्रातील देवधर्मसंप्रदायाच्या रूपाने जी संघटना ज्ञानेश्वरांपासून अस्तित्वात होती, तिचे शैथिल्य व कर्त्या पुरुषांच्या अभावी या संघटनेला आलेले दैन्य एकनाथांच्या शिकवणीने नाहीसे झाले. लोकांमध्ये देवधर्माच्या अभिमानाचा उल्हास संचरला आणि यालाच पुढे पन्नास वर्षांनी स्वराज्यस्थापनेच्या प्रयत्नाचे फळ येऊन त्याचा परिपाक महाराष्ट्रातील जनतेस भोगावयास मिळाला. "

एकनाथांचा वाङ्मयसंभार प्रचंड आहे. एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणीस्वयंवर, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख, आनंदलहरी, गीतासार, चतुःश्लोकी भागवत, इ. त्यांच्या ग्रंथांची नावे आहेत. याशिवाय भारुडे आणि अभंग आहेतच. या सर्व ग्रंथांतून नाथांनी भागवत धर्माचे सुबोध स्पष्टीकरण निरनिराळ्या पद्धतींनी केले आहे.

मराठी भाषेला तत्कालीन परिस्थिती अत्यंत प्रतिकूल होती. राजभाषा फारसी होती. ग्रंथभाषा संस्कृत होती. संस्कृत पंडित मराठी रचनेचा उपहास करीत. या सर्व परिस्थितीत नाथांनी मोठ्या धैर्याने मराठीचाच पुरस्कार केला. सामान्य जनांना ज्ञानाची द्वारे खुली व्हायची, तर त्यासाठी मराठीतूनच ग्रंथरचना झाली पाहिजे, असा त्यांचा निर्धार होता. नामदेवांनी वारकरी संप्रदायाचा झेंडा उ. भारतात उभारला, तर नाथांनी संस्कृत पांडित्याचे आगर अशा काशीक्षेत्री तो फडकविला. लोकजागृतीच्या कार्यासाठी कीर्तन हे अत्यंत प्रभावी साधन आहे. हे जाणून नाथांनी कीर्तनाच्या मर्यादा घालून दिल्या. त्यांनी स्वतः कीर्तनद्वारा भक्तिमार्गाचा व पंढरीच्या वारीचा जोरदार प्र

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केला. पंढरीची वाट कशी आहे, हे सांगताना ते म्हणतात –

करा करा लागपाठ । धरा पंढरीची वाट ।।
पुंडलीकाची पेठ । सोपी आहे सर्वांसी ।।

तुकारामाचा काल – एकनाथांच्या निर्याणानंतर नऊ वर्षांनी तुकाराममहाराज देहू गावी जन्मले. श्री. बहिरट–भालेराव म्हणतात – भागवत धर्ममंदिराची इमारत श्रीतुकोबारूपी कळस वर चढल्यामुळे पूर्ण झाली. श्रीतुकोबांनंतर त्यांच्याइतक्या उंचीचा थोर पुरुष वारकरी संप्रदायात झाला नाही. म्हणून त्यांना कळसाची उपमा यथार्थतेने साजते. "तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ।।" असे खुद्द तुकोबांचेच पुरेपूर आत्मप्रत्ययाचे उद्गार आहेत. त्यांत गर्व नसून स्वाभिमान व स्वानंदाची परिसीमा आहे. ती त्यांच्या इतर अभंगवाणीतूनही दृग्गोचर होते.

तुकोबांनी परमार्थाची शिकवण चोखपणे दिली, त्याचप्रमाणे व्यवहारधर्मही सांगितला. गबाळा परमार्थ, तसाच गबाळा व्यवहारही त्यांना मान्य नव्हता. तुकोबांनी आपले सर्व सामर्थ्य धर्मक्षेत्रात भक्तीधर्माचे साम्राज्य रूढ करण्यासाठी खर्च केले. भक्तिप्रेमाच्या आड येणाऱ्या सर्व वेडगळ व भ्रामक समजुतींचे उच्चाटन करण्याचा त्यांनी निकराचा प्रयत्न केला. त्यांना बुडणाऱ्या जनांचा कळवळा होता. हे सारे लोक विठ्ठलाच्या साम्राज्यात येतील, तरच स्वानंदाचे धनी होतील, अशी त्यांची धारणा होती. विठ्ठल, पंढरपूर, नाममाहात्म्य, कीर्तनरंग, वारी, भक्तिरहस्य, आत्मसुख, इ. विषयांवर तुकोबांचे विपुल अभंग आहेत. हे अभंग स्पष्ट, निस्संदिग्ध व रोकड्या प्रचीतीचे आहेत.

तुकारामोत्तर काल – तुकोबांच्या निर्याणानंतर संप्रदाय चालविण्याच्या योग्यतेचे जे काही पुरुष निर्माण झाले, त्यांमध्ये निळोबांचे नाव अग्रगण्य आहे. निळोबा हेही साक्षात्कारी संत होते. ते स्वतःला तुकोबांचे अनुगृहीत म्हणवीत. त्यांची अभंगवाणी प्रौढ व रसाळ आहे. त्यांनी वारकरी संप्रदायाची धुरा समर्थपणे वाहिली. निळोबांनंतरच्या ३०० वर्षांत वारकरी संप्रदायामध्ये शंकरस्वामी शिऊरकर, मल्लाप्पा वासकर, हैबतराव बाबा, वासुदेवबाबा देहूकर, चातुर्मास्येमहाराज, साखरेमहाराज, विष्णुबुवा जोग, दादामहाराज सातारकर, केशवराव देशमुख, वंकटस्वामी, लोहिया महाराज, प्रा. शं. वा. दांडेकर, इ. अनेक कर्तबगार मंडळी होऊन गेली. या सर्वांनी कीर्तन, प्रवचन, संघटना, यांच्या द्वारे व शिष्यपरंपरा निर्माण करून तिच्या द्वारे संप्रदायाच्या कार्याचा प्रवाह आजतागायत चालू ठेवला.

तत्त्वज्ञान – ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत व तुकोबांची अभंगगाथा ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी होय. ज्ञानदेव हे वारकरी संप्रदायाचे अग्रणी असल्यामुळे, इतर सर्व संतांनी त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून ग्रंथरचना केली आहे. त्यांनी ज्ञानदेवांचेच तात्त्विक विचार आपापल्या भाषेत निरनिराळ्या स्वरूपांत मांडले आहेत. त्यामुळे त्या सर्वांच्या विचारसरणीत एकसूत्रता दिसून येते. वारकरी संप्रदाय शुद्ध भक्तिमार्गी आहे. भक्ती हा मूलसिद्धान्त म्हणून स्वीकारून या संप्रदायाने आपल्या तत्त्वज्ञानाची उभारणी केली आहे. या तत्त्वज्ञानाचे विस्तारपूर्वक विवेचन श्री. बहिरट–भालेराव यांनी केले आहे, त्याचा सारांश असा –

परमात्मा – हा स्वयंप्रकाशी आहे व स्वसंवेद्य आहे, असे ज्ञानेश्वरीच्या पहिल्याच ओवीत सांगितले आहे. तो सद्रूप असून, त्याची सत्ता स्वतःसिद्ध आहे. तो चिद्रूप व आनंदरूपही आहे. म्हणूनच त्याला सच्चिदानंद म्हणतात. सत्, चित् व आनंद ही पदे तीन असली, तरी त्यांनी एकाच वस्तूचा निर्देश केला जातो.

कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक ।
द्राव गोडी पियुख । पियुखचि जेवीं ।।

(अमृतानुभव ५.२)

परमात्मवस्तू ही एकच असून, तीच द्रष्टेपणा व दृश्यपणा यांचा आश्रय आहे. तीच प्रतिक्षणी जाणिवेचे व तिच्या विषयाचे नित्य नवे अलंकार व रूपे धारण करते. या दोहोंचा आधार त्यांच्या तळाशी असणारा चिन्मात्र परमात्माच आहे.

हे एकरूप आत्मतत्त्वच देव-देवी या रूपाने आविष्कृत होते. स्व व त्याची संवेद्यता म्हणजेच देव आणि देवी. भारतीय तत्त्वविचारात ब्रह्म-माया, पुरुष-प्रकृती या जोड्या आढळतात. त्यांच्याहून देव-देवीचे स्वरूप भिन्न आहे. वेदान्तविचारात माया ही मिथ्या असून ब्रह्माची उपाधी आहे. याच्या उलट ज्ञानेश्वरांचे देव-देवी हे निरुपाधिक व सत्य आहेत. देवाची देवीला किंवा देवीची देवाला उपाधी नाही. तीच शिव आणि शक्ती या नावाने जगाची मातापितरे होत. ही दोन मातापितरे एकमेकांवाचून गवताचे पानसुद्धा निर्माण करीत नाहीत. इतकी ती परस्पर सहकारी आहेत. दोघांची लीला अतर्क्य आहे. दोघे एकमेकांस जीवप्राण असून, ते अत्यंत आवडीने एकमेकांना गिळतात व पुन्हा द्वैताच्या मिषाने आविष्कृत होतात. या सिद्धान्ताचा अनुवाद एकनाथांनी पुढील ओव्यांत केला आहे –

ऐसा एकपणे एकुलता । तोचि आपण आपली झाला कांता ।
आपुले कांतेचा आपण भर्ता । अति लाघव अतर्क्य ।।
जेवीं अर्धनारीनटेश्वरी । जो पुरुष तोचि नारी ।।
तेवीं प्रकृतिपुरुष संसारी । एकाकारी नांदत ।।
तो पुरुष ते पतिव्रता । दोघां अनन्य प्रीति एकात्मता ।।
येरयेरां वेगळीकता । पाउल सर्वथा न घालिती ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दोघां एकत्र सदा असणें । दोघांसी एकचि नेसणें ॥
दोघां एके सत्ता बैसणें । दोघे एकचि प्राणे वर्तती ॥
दोघां एकचि बोलणे । दोघां एकचि चाखणें ॥
दोघां एकचि देखणें । दोघां करणें एकचि ॥
कैसी दोघां प्रीति अलोलिक । येर येराविण न येती, विख ॥
येर येराविण न चाखती उदक । येर येरेवीण देख आंधळी ॥
(एक. भाग. २४.९–१४)

जीव – जड सृष्टीप्रमाणेच असंख्य जीवही परमेश्वरानेच प्रकट केले आहेत. वाऱ्यामुळे पृथ्वीवरचे असंख्य परमाणू जसे अवकाशात उधळतात, तसे एका परमेश्वराच्या अंगातून अनंत जीव आविष्कृत होतात. जीव हा परमात्म्याचा चिन्मय अंश आहे. हा अंश निर्माण झाला त्याचे प्रयोजन परमात्म्याला स्वतःच्या प्रेमाची प्रतीती देणे हे होय. भगवत्प्रेमाच्या अनुभूतीचे द्वार हेच जीवाचे खरे स्वरूप होय. एकच स्वरूप सुवास होते व नाकही होते; डोळा होते व आरसाही होते. तद्वतच परमात्मा आत्मप्रीतीसाठी आपणच प्रभू आणि आपणच जीव होतो.

मानवी जीवन हे श्रेष्ठ अनुभवाचे साधन होय. अनुभव घेणे हेच त्याचे मूळ रूप आहे. कोणता अनुभव घ्यायचा ते जीवाच्या इच्छेवर अवलंबून असते. तो चांगला, वाईट दोन्ही प्रकारचा अनुभव घेऊ शकतो. वाईट अनुभव घेणारा अधोगतीला जातो, तर चांगला अनुभव घेणारा उच्च गतीला जातो. आरशाला बिंबग्रहणाची, तशी जीवाला अनुभव घेण्याची शक्ती असते. या शक्तीचा उपयोग त्याने श्रेष्ठ अनुभव घेण्यासाठी केला पाहिजे. तो घेण्यातच त्याचे साफल्य असते आणि त्यासाठीच त्याचे अस्तित्वही असते.

जगत – वेदान्तमतात जग हे अज्ञानाचे कार्य मानले आहे. अज्ञान किंवा अविद्या किंवा माया यामुळेच एकाचे अनेक पदार्थ दिसतात. मुळात वस्तुतत्त्व एकच आहे. पण ज्ञानदेवांनी वरील सिद्धान्त न स्वीकारता जग हे अज्ञानकार्य नसून, तो चिद्विलास आहे, असा सिद्धान्त मांडला आहे. चिद्विलास म्हणजे परमेश्वराचा आविष्कार, क्रीडा अगर विलास होय. एक परमात्मा अनेक रूपांनी व्यक्त होतो. मूळ अद्वैतच द्वैतरूपाने प्रगटून अद्वैताची शोभा वाढवते, असे ते सांगतात.

दृश्य विश्व क्षणभंगुर आहे, ही वस्तुस्थिती होय. क्षणभंगुरत्वाच्या दृष्टीने ज्ञानदेवांनी जगाला मायाकारित म्हटले आहे. पण ही जगताच्या स्वरूपाची एक बाजू आहे. ते संपूर्ण दर्शन नव्हे. ज्ञानेश्वरांनी क्षणभंगुरत्वाच्या मुळाशी जाऊन सखोल अनुभूतीचे दर्शन घेतले आहे. क्षणभंगुरत्वाची दुसरी बाजू नित्य नवीनता ही आहे. दृश्य क्षणोक्षणी पालटते, याचा अर्थ परमात्मा क्षणाक्षणाला नित्य नव्या रूपात प्रकट होत असतो. पाण्यावरचे तरंग वरवर पाहता क्षणभंगुर लाटा दिसतात; पण जलाशयाकडून पाहिल्यास एक पाणीच नित्य नव्या रूपाने विहरत आहे, असेच दृष्टोत्पत्तीस यते. एकनाथांनी याच विचाराचा पाठपुरावा धरून चराचर विश्वाला चिद्रत्नाची कळा असे म्हटले आहे. विविध दृष्टान्त देऊन त्यांनी हे विचार प्रगट केले आहेत.

जैसी सूर्याची किरणें । सूर्यापुढे धावती जाण ।
तेणें प्रकाशें सूर्यपण । अधिकाधिक ॥
का रत्नाची कीळ । रत्नावरी वाढे प्रबळ ।
तेणें रत्नासीचि केवळ । प्रबळता आणी ॥
का चंदनाचा वासू । चंदनाहुनी चौपसू ।
धावे तेणे अतिसुवासू । चंदना आणी ॥
का अग्नीच्या ज्वाळा । अग्नीवरी वाढती प्रबळा ।
तिनें अतिरूप अनळा । आणिलें जैसें ॥
तैसें विश्व प्रकाशितया गभस्ती । त्याचें किरणे नाना व्यक्ती ।
तेथें नास्तिकता जे देखती । ते मूर्ख मृगतृष्णिका ॥
हो का चिद्रत्नाची कळा । तें हें चराचर सकळा ।
(स्वात्मसुख ६९ – ७४)

साधनमार्ग – वारकरी संप्रदायात भक्ती हे मोक्षाचे आणि स्वात्मसुखाचे श्रेष्ठ साधन मानले आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ प्राचीन परंपरेत सांगितले आहेत. त्यांतील पहिले तीन हे साधन व चौथा साध्य मानला आहे. ज्ञानदेवांनी या साध्याची चिकित्सा करून पुरुषार्थकल्पनेत फरक केला आणि भक्तीला पाचवा पुरुषार्थ मानले. मानवी जीवनाचे अंतिम साध्य मोक्ष नसून भक्ती हे आहे व भक्तीतच जीवितसाफल्य आहे, असे ज्ञानेश्वर मानतात. इतर संतांनी त्याचाच अनुवाद केला आहे. ज्ञानदेव हे स्वतः पूर्ण आत्मानुभवी होते. त्यांनी योगातील समाधीचा, मुक्तीतील आत्मानंदाचा व भक्तीतील प्रेमसुखाचा असे सर्वच अनुभव घेतले होते. त्या अनुभवांच्या आधारेच त्यांनी भक्तीला सर्वोच्च स्थान दिले. समाधीच्या अवस्थेत वृत्तिशून्यता असते. तिच्यात केवळ एकरूपतेचा आनंद असतो. कारण, त्या वेळी जगताचा व इंद्रियांचा निरास झालेला असतो. उलट भक्तीच्या अनुभवात परमात्म्याच्या ऐक्यानुभवाबरोबरच त्याच्याशी वेगळेपणाने राहून प्रेमसुखाचा आस्वाद घेता येतो. मन, बुद्धी व सर्व इंद्रिये या आस्वादात सहभागी होतात.

भक्ती ही नुसती वैयक्तिक भावना नाही. ती परमात्म्याच्या मूळ स्वरूपातच आहे. किंबहुना ती त्याचा गाभाच आहे. भक्ती ही सहजस्वभावरूप आहे. परमात्म्याच्या ठिकाणी असणाऱ्या या सहज प्रेमाला परमात्म्याचा सहज प्रकाश, असे ज्ञानदेव म्हणतात. अद्वैतानुभवाचा व भक्तीचा विरोध नाही. त्या अनुभवातही भक्ती शक्य असते. किंबहुना पूर्ण अद्वैतानुभवाचे पर्यवसान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भक्तीतच होते. समुद्राच्या अंगात मिळून मिसळून ज्याप्रमाणे गंगा नदी त्यावरच विलसते, त्याप्रमाणे ऐक्याला पावलेला भक्त देवाच्या भक्तीचा भोग घेतो –

यालागीं तो कर्मयोगी । मी जालाचि मातें भोगी ।
तारुण्य का तरुणांगी । जियापरी ॥
तरंग सर्वांगी तोय चुंबी । प्रभा सर्वत्र विलसे बिंबी ॥
नाना अवकाश नभीं । लुंठतु जैसा ॥
तैसा रूप होउनी माझें । मातें क्रियावीण तो भजे ॥
अलंकारु का सहजें । सोनयातें जेवी ॥

(अमृतानुभव ११४७ – ४९)

याच भक्तीचे अधिक स्पष्टीकरण करताना एकनाथ महाराज पुढील ओव्या लिहितात –

जाग्रति सुषुप्ती स्वप्न । तिही अवस्था होय भजन ॥
तेथ अखंड अनुसंधान । निजबोधें पूर्ण ठसावें अंगीं ॥
मना होता समाधान । समाधानें अधिक भजन ॥
पूर्ण बाणलें अनुसंधान । ध्येय ध्याता ध्यान समरसें भजे ॥
तूर्या साक्षी उन्मनी । याही लाधिल्या भगवद्भजनीं ॥
जंववरी अवस्था आपणी । आपआपणा मुकल्या नाही ॥

भक्ती ही सर्व पुरुषार्थांची मुकुटमणी असून, परमार्थातील इतर सर्व मुक्काम अलीकडचे आहेत, असे तुकोबांनीही म्हटले आहे. देवाजवळ ते काय मागत असतील तर ती भक्तीच !

मोक्ष तुमचा देवा । दुर्लभ तो तुम्ही ठेवा ॥
मज भक्तीची आवडी । नाहीं अंतरी ते गोडी ॥
काय सायुज्यता मुक्तीसवें चाड । देह भक्त कोड तेथें नाहीं ॥
तुका म्हणे नाहीं मुक्तीसवे चाड । हेंचि आम्हां गोड जन्म घेतां ॥

आचार – वारकरी संप्रदायाची अधिष्ठात्री देवता विठ्ठल ही असून, ती सर्व विश्वालाच गवसणी घालणारी परमप्रेमरूप देवता आहे. मातापिता, बंधुभगिनी, ही सर्व प्रेमाची जिव्हाळ्याची नाती तिच्या ठिकाणी एकवटली आहेत. असा हा विठ्ठल, 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा' आहे. त्याचे हे विटेवरचे रूप बाल्यकालातील कृष्णाचे आहे.

पांडुरंग बाळमूर्ति । गाई गोपाळा सांगाति ।
येऊनिया प्रीति । उभे समचि राहिले ।

हा देव भक्तांची वाट पाहात असतो, त्यांच्या आलिंगनासाठी उतावीळ असतो.

'रामकृष्णहरी' हा संप्रदायाचा मंत्र आहे. राम म्हणजे हृदयात रमविणारा, कृष्ण म्हणजे आकर्षण करणारा व हरी म्हणजे ऐक्यरूप असणारा विठ्ठलरूप परमात्मा होय. या मंत्राला सोवळे–ओवळे, स्थळ-काळ, जाति–वित्त-कुळ, यांचा प्रतिबंध नाही. गळ्यात तुळशीच्या मण्यांची माळ, कपाळी गोपीचंदनाच्या मुद्रा व बुक्का आणि खांद्यावर पताका ही वारकऱ्यांची बोधचिन्हे होत. यांपैकी तुळशीमाळ ही एखाद्या ज्येष्ठ वारकऱ्याकडून घ्यायची असते. विधी साधाच असतो. गुरू माळ देताना शिष्याला पुढील नियम पाळण्याची शपथ घ्यायला सांगतो––

(१) खरे बोलणे.

(२) परस्त्री रुक्मिणीमातु:श्रीप्रमाणे मानणे.

(३) काही अपराध घडले असल्यास भगवंतानी त्याबद्दल क्षमा करावी, अशी कळकळीची प्रार्थना करणे.

(४) निरामिष आहार सेवन करणे.

(५) वर्षातून निदान एक पंढरीची वारी व आळंदीची वारी करणे. एकादशी व्रत करणे.

(६) दररोज नित्यनेम म्हणून 'रामकृष्णहरी' मंत्राचा १०८ वेळा माळेचे मणी ओढून जप करणे.

(७) ज्ञानेश्वरीच्या काही ओव्यांचे नियमित वाचन करणे व हरिपाठाचे अभंग म्हणणे.

(८) प्रपंचातील वाट्यास आलेली नित्य कर्मे श्रीविठ्ठलस्मरणात प्रामाणिकपणे पार पाडणे.

पंढरीची व आळंदीची अशा दोन वाऱ्या वारकरी संप्रदायात चालतात. पंढरीची सर्वांत महत्त्वाची वारी म्हणजे आषाढ शुद्ध एकादशी ही होय. आळंदीच्या वारीचा दिवस कार्तिक वद्य एकादशी हा आहे. आषाढीच्या वारीस ज्ञानेश्वरमहाराजांची पालखी आळंदीहून पंढरीस येते. आषाढी–कार्तिकी या वाऱ्यांना प्रत्येक फडावर दशमी ते पौर्णिमा भजने व कीर्तने होतात. रात्री हरिजागर असतो. पौर्णिमेस सर्व दिंड्या पंढरपुरापासून जवळच असणाऱ्या गोपाळपुरी जातात. तिथे काला होतो. काल्याच्या लाह्या एकमेकांच्या मुखी घालून वारकरी आपल्या वारीची सांगता करतात. यावेळी स्पृश्यास्पृश्य भेद मानला जात नाही.

आळंदीच्या वारीस पंढरीहून नामदेव, पुंडलीक, इ. संतांच्या पालख्या व दिंड्या येतात. भजन, कीर्तन, हरिजागर हे सोहळे होतात. कार्तिक वद्य त्रयोदशी हा ज्ञानेश्वरांचा समाधिदिन होय. या दिवशी समाधीचे अभंग म्हटले जातात व काला होतो. देहू, पैठण, त्र्यंबकेश्वर, सासवड, इ. संतक्षेत्रीं त्या त्या संतांच्या पुण्यतिथीला नियमाने जाणारेही वारकरी असतात.

उपसंप्रदाय – वारकरी संप्रदायात काही उपसंप्रदाय आहेत, त्यांची नावे अशी––

(१) चैतन्य संप्रदाय – यात दोन भेद आहेत. एकाचा 'रामकृष्णहरी' हा षडक्षरी मंत्र असून, दुसऱ्याचा, 'ॐनमो भगवते वासुदेवाय' हा द्वादशाक्षरी मंत्र आहे.

(२) स्वरूप संप्रदाय – याचा 'श्रीराम जय राम जयजय राम' हा त्रयोदशाक्षरी मंत्र आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यातही रामानुजीय व रामानंदी असे दोन भेद आहेत.

(३) आनंद संप्रदाय – याचा मंत्र, त्र्यक्षरी 'श्रीराम' किंवा दोन अक्षरी 'राम' आहे.

(४) प्रकाश संप्रदाय – याचा मंत्र, 'ॐनमो नारायणाय' हा आहे.

फड – फड म्हणजे वारकरीप्रमुख व त्याची शिष्यमंडळी यांचा संघटित समुदाय होय. वारकऱ्याने ज्याच्याकडून माळ घेऊन वारी पत्करली असेल, तो त्याचा गुरू होतो. शिष्याने वारीस गेल्यावर आपल्या गुरूच्या फडात जाऊन भजन-कीर्तनात भाग घ्यायचा असतो. अशा फडात नामदेव, वासकर व देहूकर यांचे फड प्रमुख मानले जातात. याशिवाय आजरेकर, बेलापूरकर, ठाकरबोवा, गंगूकाका शिरवळकर, धोंडोपंत दादा कन्हाडकर, दादामहाराज सातारकर, बंकटस्वामी, इ. संतांचेही फड आहेत.

वारकरी

वारकरी संप्रदाय हा मानवी जीवनात ईश्वरी प्रेमाची अनुभूती घेऊन जीवन खऱ्या अर्थाने समृद्ध करण्याचा भक्ती हा सुलभ मार्ग सांगणारा संप्रदाय आहे. हिंदू धर्माच्या निरनिराळया अवस्थांतून परिणत होत होत तो प्रस्तुत अवस्थेला आलेला आहे. भागवत धर्माला आलेले ते एक मधुर व परिपक्व फळ आहे. [वारकरी संप्रदाय उदय व विकास–भा. पं. बहिरट व प. ज्ञा. भालेराव; वारकरी पंथाचा इतिहास—शं. वा. दांडेकर.]

वारतंतवीय

कृष्ण-यजुर्वेदाची एक शाखा. वरतंतूने स्थापली म्हणून तिला वारतंतवीय म्हणू लागले. वरतंतु हा कौत्साचा गुरू होता, असे रघुवंशात म्हटले आहे (५.१). पाणिनीने या शाखेचा उल्लेख तित्तिरी, डख व खंडिक यांच्या-बरोबर केला आहे (अष्टा. ४.३.१०२). या शाखेचे वाङ्मय उपलब्ध नाही. [पा. का. भा.]

वार पुरणे

स्त्री प्रसूत झाल्यानंतर तिची वार घाण वस्तू म्हणून कोणत्याही जातीचे लोक बाहेर फेकीत नाहीत, तर ती पुरतात. हा सर्रास नियम आहे. कोणी घरातच बाळंतिणीच्या बाजेजवळ तर कोणी तिच्या न्हाणीशी बळचणीत ती पुरतात. कोणी मडक्यात घालून, तर कोणी पानावर ठेवून पुरतात. खळगा खोल खणण्याविषयी दक्षता बाळगतात. वारे-बरोबर त्या मडक्यात पैसा, सुपारी, तांदूळ या वस्तू घालतात. कातकरी जातीत वार पुरलेल्या जागी दगड ठेवतात आणि पाचव्या दिवशी सुईणीकडून त्याची पूजा करतात. [वदलापूर]

वारलक्ष्मीव्रत

श्रावण शु. चतुर्दशी किंवा पौर्णिमा या तिथींच्या अगदी नजिकच्या शुक्रवारी हे व्रत करतात. व्रताची देवता लक्ष्मी असून, तिची पूजा करणे, हा याचा विधी आहे. फल–सौभाग्य व ऐश्वर्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

वारली

एक आदिवासी जमात. या लोकांची वस्ती मुख्यतः महाराष्ट्रातील ठाणे व नासिक जिल्हा तसेच खान-देश, धरमपूर दमण, व सुरत जिल्हा या भागांत आढळते.

वारली जमात महाराष्ट्राच्या धरमपूर भागात फार पुरातन काळापासून राहत असावी, असा बऱ्याच शास्त्रज्ञांचा तर्क आहे. मेगॅस्थेनिसने आपल्या प्रवासवर्णनात या भूप्रदेशाला वरलाट असे संबोधले असून, इथे राहणाऱ्या वन्य जमातीला वारली असे म्हटले आहे. या वारली जमातीची या भागात पूर्वी राज्ये होती. आज जव्हार तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात जे कोळ्यांचे राज्य होते, ते मूळचे वारली जमातीचे होते. इ. स. च्या १४व्या शतकाच्या मध्यावर, सह्याद्रीच्या घाटमाथ्यावर वस्ती करून असलेल्या कोळी जमातीच्या मुकणे गावाच्या पौपेरा नामक एका कोळीप्रमुखाने जव्हारच्या वारली राजावर चढाई केली. या बाब-तीत दंतकथा सांगतात, ती अशी –

पौपेराने वारली राजाजवळ एका बैलाच्या चामड्याने झाकली जाईल एवढी जमीन मागितली. मागणी अल्प आहे, असे पाहून वारली राजाने ती कबूल केली. तेव्हा पौपेराने बैलाच्या चामड्याच्या लांबच लांब वाद्या तयार करून वारली राजाचे सं

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

राज्य व्यापले आणि वारली राजा आपले राज्य गमावून बसला. मग पोंपेराने गंभीरगड व त्याच्या आसपासचा मुलूख वारली राजाला दिला व जव्हारला आपले राज्य स्थापन केले.

धरमपूरच्या राजघराण्यांत अजूनही अशी चाल आहे, की राजा गादीवर बसताना वारल्यांमधील दळवी घराण्याच्या प्रमुखाच्या बोटाचे रक्त काढून त्याचा टिळा आपल्या कपाळी लावतो.

वारली या नावाच्या व्युत्पत्तीबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. कात्यायनाने आपल्या एका वार्तिकात विंध्य व सातपुडा या पर्वतांच्या आसपासच्या प्रदेशाची माहिती देताना निषाद, व्यास व वरूड या तीन अनार्य जमातींचा उल्लेख केला आहे. त्यांपैकी वरूड म्हणजे वारली होत, असे इतिहासकार राजवाडे यांनी आपल्या महिकावतीच्या बखरीत म्हटले आहे. वरूड शब्दावरून वरूड – वरुडाई – वरुलाई – वारुली – वारली, अशी त्यांनी या शब्दाची व्युत्पत्ती दिली आहे. डॉ. विल्सन यांनी दक्षिणेतील सात कोकणांपैकी वरलाट या कोकणात राहणारे ते वारली, असा वारली शब्द व्युत्पादिला आहे. श्री. एंथोवेन व श्री. लॅथॅम यांनी वारली ही भिल्लांची एक पोटजात असल्याचे सांगितले आहे.

वारली लोकांत मुरडे, डावर व निहिरे असे तीन प्रादेशिक भेद आहेत. मुरडे आणि डावर हे ठाणे जिल्ह्याच्या उत्तरेकडील भागात आढळतात; तर निहिरे वारल्यांची वस्ती पालघर, माहीम, जव्हार, वाडा या भागात आहे. वारली लोकांत भांगर, भावर, जाधव, किरकिरे, निवोरे, शनवार, वांगड, इ. काही कुळे आहेत. समान कुळांत लग्नसंबंध होत नाही.

वारली लोकांचा वर्ण सर्वसाधारणपणे काळा असतो. त्यांचे नाक फारसे बसके नसते किंवा सरळही नसते. त्यांची देहयष्टी कृश पण काटक असते आणि उंची मध्यम असते.

वेषभूषा – पुरुष शेंडी ठेवतात. कित्येकजण शेंडीभोवती घेराही ठेवतात. अंगात कुडते आणि कमरेला लंगोटी हा पुरुषांचा नेहमीचा पोषाख असतो. बाहेर जाताना ते गुडघ्यापर्यंत लोंबता असा साधारण वारभर लांबीरुंदीचा रुमाल कमरेभोवती तिरका बांधतात आणि डोक्यालाही एक रुमाल गुंडाळतात. बरेच पुरुष कानात मण्यांची लहानशी कुडी किंवा पितळेचा मोठासा मणी घालतात. काही पुरुष हातात चांदीचे गोल कडे घालतात.

अलिकडचे तरुण सदरा व लांडी विजार असा पोषाख करतात. ते केस राखून भांगही पाडतात. त्यांना फुलांचीही फार आवड असते. ते कानांवर झेंडूची, लिलीची किंवा कोणतीही लांब देठाची फुले घालून पुष्पशृंगाराची हौस भागवतात.

स्त्रियांचे केस आखूड असतात. त्या केसांचा घट्ट अंबाडा घालतात. मोठ्या केसांची त्यांना फार हौस असते. म्हणून त्या गंगावन किंवा गोंडा लावून अंबाडा मोठा करतात. शोभेसाठी त्या केसांना पिना लावतात. स्त्रिया नऊवारी लुगडे नेसतात. पण ते नेसण्याची पद्धत पांढरपेशा दक्षिणी स्त्रियांच्या पद्धतीपेक्षा वेगळी

वारली जोडपे

असते. त्या गुडघ्यापर्यंत तांटके व कमरेभोवती घट्ट लुगडे नेसतात. त्यांना शेतात किंवा डोंगराळ भागात नेहमी काम करावे लागते, त्या दृष्टीने ही पद्धत सोयीची वाटते. लग्न झाल्यानंतरच स्त्रिया लुगड्याचा पदर घेतात. स्त्रियांना तांबड्या रंगाचे लुगडे फार प्रिय असते. लग्नात नवऱ्याने तांबड्या रंगाचे लुगडे घेतलेच पाहिजे, असा यांच्यांत नियम आहे. वारली स्त्रिया अंगात गार्टीनी चोळी घालतात; गळ्यात विविध रंगाच्या मण्यांचे घट्ट सर घालतात. विवाहित स्त्रियांच्या गळ्यात काळ्या पोतीचे अनेक सर असतात आणि एका दुहेरी सराच्या मध्यभागी चांदीचे, कथलाचे किंवा पितळेचे मंगळसूत्र असते. अनेक स्त्रियांच्या गळ्यात कासेलाची जाड साखळी व पुतळ्यांची माळ असते. काही स्त्रिया हातांत कथलाच्या रुंद बांगड्या व काही काचेच्या बांगड्या घालतात. डावर स्त्रिया हातांत कोपरापर्यंत पितळेच्या बांगड्या व पायांतही गुडघ्यापर्यंत तगाव बांगड्या घालतात.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्त्रियांना फुलांची फार आवड असते. इतर फुले त्यांना मिळत नाहीत; पण घरामागच्या परसात लावलेली झेंडूची फुले त्या केसांत माळतात. वारली मुलींना लहानशी साडीच नेसवतात. परकर-चोळीची पद्धत त्यांच्यांत नाही. पाच वर्षांपर्यंतची मुले साधारणपणे उघडीच असतात.

स्वभाव – सर्वसाधारण वन्य जातीप्रमाणे वारली लोकांतही महत्त्वाकांक्षेचा अभाव आहे. घरात पुरेसे खायला असले, तर वारली पुरुष मजुरीच्या कामाला जाईलच, असे सांगता येत नाही. शिकार करावी, कंदमुळे-फळे खावी व निसर्गाचा मनमुराद आनंद लुटावा, असे आयुष्य त्यांच्या पूर्वजांनी घालवले आहे. त्यामुळे सघन व संपन्न होण्यासाठी दूरदर्शीपणाने कसून मेहनत करावी, असा पूर्वजांचा आदर्श त्यांच्या डोळ्यांपुढे नाही. अल्पसंतुष्टता हे त्यांचे आणखी एक वैशिष्ट्य आहे.

इतर समाजापासून अलिप्त राहिल्यामुळे व दळणवळणाची साधने दुर्मिळ असल्यामुळे वारल्यांचे जग अत्यंत मर्यादित असते. तसेच, त्यांच्यांत शिक्षणाचा अभाव असल्यामुळे वेळेचे आणि इतर मोजमाप त्यांना समजत नाही. विसाची पुढची संख्या त्यांना मोजता येत नाही. अज्ञानाच्या अनुषंगाने रूढीप्रियता आणि दैववादी मनोवृत्ती हे विशेष त्यांच्या स्वभावात आढळतात. वारली लोक स्वभावाने भित्रे आहेत; पण ही भीती हिंस्र श्वापदांबद्दल नसून पांढरपेशा समाजाबद्दल असते. गेल्या शंभर वर्षांत जमीनदार, सावकार, जंगलकंत्राटदार वगैरे लोकांनी स्वार्थापायी त्यांच्यावर फार जुलूमजबरदस्ती केली आहे, त्यामुळे त्यांच्या मनात ही भीती घर करून राहिली आहे. या भीतीपायीच आपल्या घरात किती धान्य व पैसे आहेत, ते इतरांना कळू नये म्हणून घरातल्या अगदी अंधाऱ्या जागेत ते धान्याची कणगी ठेवतात आणि पैसे बांबूच्या नळीत घालून ठेवतात.

हे लोक अत्यंत भोळे, निष्पाप व श्रद्धाळू असतात. ते सहसा चोरी करीत नाहीत व खोटे बोलत नाहीत. वारली स्त्रियांना घरात, शेतात व जंगलात खूप कष्ट करावे लागतात. तरी त्यांची वृत्ती सदैव आनंदी असते.

उद्योगधंदे – वारल्यांचा मुख्य धंदा शेतीचा आहे. पूर्वी बहुतेक सर्व वारल्यांच्या मालकीच्या जमिनी होत्या. त्यांतून ते पूर्वापार पद्धतीने उत्पन्न काढीत. पुढे त्यांच्या जमिनी त्यांच्या भागात व्यापाराच्या निमित्ताने शिरलेल्या ब्राह्मण, प्रभू, गुजराती, मारवाडी, मुसलमान, पारशी, इराणी वगैरे लोकांनी कर्ज, खावटी, इ. नावांखाली गिळंकृत केल्या. मग ते या नवीन जमीनदारांच्या शेतीवर अर्धेलीने कुळ म्हणून काम करू लागले. जमीनदार काही जमीन स्वतःकडे ठेवतात, त्या जमिनीवर वारल्यांना वेठ करावी लागते. तसेच काहीजण त्यांच्या जमिनीत उगवलेले गवत कापतात. विवाहासाठी वगैरे पैसे घेतलेल्या सावकाराकडे असे वारली घरकाम करतात. काही जंगलातील लाकडे तोडण्याचे, ते वाहून नेण्याचे व कोळशाच्या भट्ट्या लावण्याचे काम करतात. काही फळबागांत व फुलबागांत मजुरी करतात. वारली स्त्रिया जंगलातील लाकडे तोडून त्यांच्या मोळ्या बांधून शहरात आणून विकतात.

इतके असूनही बहुसंख्य वारली वर्षातून कमीत कमी पाच महिने तरी बेकार किंवा अर्धबेकार असतात. अत्यंत दारिद्र्यात ते जीवन कंठतात. वर्षांतून काही महिने त्यांना अर्धपोटी राहावे लागते. आतापर्यंत जमीनदार, सावकार, जंगलकंत्राटदार वगैरे लोकांनी त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन त्यांचा छळ केला व त्यांचे आर्थिक शोषणही भरपूर केले. वारल्यांच्या या दयनीय स्थितीकडे काही समाजसेवकांचे लक्ष गेले व ते त्यांच्यांत राहून त्यांची परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करू लागले. कैनाड येथे राहणारे श्री. वसंत नारगोळकर व त्यांच्या पत्नी सौ. कुसुम नारगोळकर हे त्यांपैकी एक दांपत्य होय. आदिवासी सेवा मंडळ, सेवाश्रम अशा काही संस्थांनी त्यांच्यासाठी दवाखाने व शाळा काढल्या, खावटी कोठारे व धान्यपेढ्या चालवल्या व जंगल-कामगार सहकारी संघांची स्थापना केली. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने सर्वच आदिवासींची परिस्थिती सुधारावी म्हणून अनेक कायदे केले आहेत.

घरे – वारली लोकांची खेडी विखुरलेल्या झोपड्यांच्या गटागटांनी वसलेली असतात. ज्यांच्या शेतजमिनी एकमेकांना लागून असतात, असे दहा-पंधरा लोक आपापल्या शेताजवळ राहता यावे म्हणून एकत्र झोपड्या बांधतात. या एकत्र बांधलेल्या झोपड्या मिळून एक पाडा होतो. असे तीन-चार ते दहा-बारा पाडे मिळून एक गाव होते. विहीर किंवा ओढा जवळ आहे, असे पाहूनच पाडा वसवतात. यांचे पाडे स्वच्छ असतात.

वारल्यांच्या झोपड्या चोकोनी किंवा लांबट चौकोनी असतात. झोपडीच्या भिंती कोवळ्या बांबूच्या किंवा कारवी वनस्पतीच्या असतात. त्यांच्यावर शेण व माती कालवून लिंपण करतात. छप्परही बांबूचेच करतात. छपरावर भाताच्या पेंढ्या पसरतात. काहीजण पेंढ्यांखाली सागाची किंवा पळसाची पाने पसरतात. त्यामुळे झोपडीत अजिबात गळत नाही. झोपडीला पूर्वेकडे एक दार ठेवतात. दारापुढे बहुधा ओटा व पडवी असते. झोपडीला खिडक्या नसतात. उजेडासाठी भिंतीला एक लहानसे भोक ठेवतात. घरात स्वयंपाकासाठी एक खोली असते. काही झोपड्यांत तीही नसते. बहुतेक झोपड्यांना माळा असतो. झोपडीच्या एका बाजूला बकऱ्यांसाठी पडवी बांधलेली असते. घरातल्या स्त्रिया कोंबड्या पाळतात. त्या घरभर फिरत असतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

पाण करीत असतात. रात्री त्यांना एका मोटचा टोपलीत ठेवतात.

घरात उखळ, मुसळ, सूप, दुध्या भोपळयापासून पाणी भरण्यासाठी केलेले तुंबडे, तीन-चार कोयते, एखादी कुऱ्हाड, काही माडपीमडकी, तिखटहळदीच्या बांबूच्या नळकांडचा, जेवणासाठी पितळेच्या थाळचा किंवा वाडगे, इ. सामान असते.

झोपडीच्या मागच्या बाजूला कुंपण घातलेले परसू असते. त्यात ते पावसाळयात काही भाज्या, मिरच्या, सुरण, अळू, मका, काकडी, झेंडू वगैरे लावतात.

आहार – भात हे यांचे मुख्य अन्न असते. परंतु बारा महिने पुरेल इतका तांदूळ त्यांच्याकडे नसतो. त्यामुळे भाताच्या जोडीने ते नाचण्याची भाकरी, आंबील, चवळी किंवा तूर यांची आमटी, कोवळ्या बांबूचे लोणचे असा आहार घेतात. कधी कधी मासळी आणि सणावारी काकडीच्या पानग्या हे त्यांचे पक्वान्न असते. उन्हाळयात मात्र घरातील धान्य संपल्यामुळे त्यांना शेवग्याचा किंवा चिंचेचा कोवळा पाला, शिंदीची फळे, करवंदे व कडूकंद खाऊन दिवस काढावे लागतात.

विवाहप्रथा – मुली वयात आल्यावर सर्वसाधारणपणे त्यांचे विवाह होतात. यांच्यांत आते-मामे भावंडांत लग्न होऊ शकते. या लोकांत विवाहाच्या तीन-चार पद्धती आहेत. त्यांपैकी सर्वसामान्य पद्धत पुढीलप्रमाणे –

प्रथम मुलाकडील काही स्त्रीपुरुष मुलगी पाहायला जातात. जाताना ते थोडी ताडी बरोबर नेतात व सर्वजण ती पितात. या विधीला बघवणी असे नाव आहे. मुलगी पसंत पडली, तर मागाहून लग्नाच्या गोष्टी करतात.

लग्न ठरवण्यासाठी मुलाकडील माणसे मुलीच्या घरी जातात व लग्नाचा तोंडी करार करतात. याला बोल करणे असे म्हणतात. या वेळी मुलीला वरपक्षाकडून साडीचोळी मिळते. बोल केल्यानंतर सहसा लग्न मोडीत नाहीत.

वारली लोकांत देज देण्याची पद्धत आहे. लग्नाच्या आधी काही दिवस वरपक्षाकडील लोक साडेतीन किंवा सव्वापाच मण धान्य, पंधरा रुपये व ताडी घेऊन वधूगृही जातात. त्यांना दारात सवाष्णी आरती ओवाळतात. पंधरा रुपयांपैकी मुलीच्या आईला लुगड्यासाठी सहा रुपये व बाकीचे मुलीचे मामा, काका, गावचा पाटील वगैरे व्यक्तींत विभागून देतात. देज दिल्यावर लग्नतिथी निश्चित करतात.

त्यानंतर झोपडीसमोरची जागा स्वच्छ सारवून नऊ मेढींचा मांडव घालतात. पहिली मेढ रोवण्यापूर्वी खड्ड्यात थोडे तांदूळ, हळद, सुपारी व पैसा टाकतात. मांडवात मध्यभागी उंबराची फांदी रोवतात. मुलाचा किंवा मुलीचा मामा ती विधिपूर्वक शोधून आणतो. फांदी पुरताना नवरा मुलगा तिला हात लावून उभा राहतो. त्या वेळी धवलेरी म्हणजे स्त्री पुरोहित गाणे म्हणते.

याच दिवशी देवाची पूजा असते. त्यासाठी सवाष्णी स्त्रिया घरातल्या भिंतीवरची सुमारे चार फूट चौरस जागा सारवून तिच्यावर तांदुळाच्या पिठाने देवांच्या आकृत्या काढतात. याला चौक काढणे असे म्हणतात. नंतर तो चौक फडक्याने झाकून ठेवतात. रात्री आंघोळ करून नवरा मुलगा चौकासमोर बसतो. भगत प्रथम चौकावरचा पडदा दूर करतो आणि जमिनीवर पाट मांडून त्याच्यावर देवांच्या मूर्ती ठेवतो. नंतर तो त्यांची पूजा करतो. मग तो एकामागून एक सर्व देवांना बोलावतो, अंगविक्षेप करून झुलतो व मंत्र म्हणतो. याला देव करणे असे नाव आहे. हा विधी रात्रभर चालू असतो. त्यानंतर सकाळी मुलाला हळद लावण्याचा समारंभ होतो.

संध्याकाळी वराला घेऊन सर्व मंडळी वाजतगाजत लग्नासाठी वधूगृही जातात. वधूगृही देव करायचा असतो. म्हणून भगत व धवलेरी म्हणजे स्त्री पुरोहित घरात जातात. नवऱ्या मुलाला मात्र एका हद्दीच्या बाहेर एका कांवळयावर रात्रभर बसवून ठेवतात. त्या रात्री त्याने झोपायचे नसते.

दुसऱ्या दिवशी सकाळी वधू-वरांना नवे कपडे नेसवून मांडवात आणतात. दोघांच्या मध्ये अंतरपाट धरतात. धवलेरी हातात दिवा घेऊन मंत्र म्हणते. नंतर ती टाळचा वाजवते व सर्वजण वधू-वरांवर अक्षता टाकतात. त्यानंतर नवरा मुलगा वधूच्या गळयात काळी पोत बांधतो. मग तरुण मुले व मुली वधू-वरांना खांद्यावर उचलून घेऊन नाचतात.

लग्नासाठी खास मुहूर्त ठरलेला नसतो. तथापि, साधारण दुपारी बाराची वेळ शुभ समजतात. लग्नानंतर पुरुषाला रामराम म्हणायचा अधिकार मिळतो.

वारली लोकांत घरजावयाचा एक वेगळा प्रकार रूढ आहे. ज्याला मुलगा नसेल किंवा मोठया मुलीच असतील, अशा वारली पुरुषाला शेतीच्या कामासाठी साहाय्याची अपेक्षा असते. म्हणून एखाद्या गरीब तरुणाला तो आपल्या मोठया मुलीचा वर म्हणून घरात ठेवून घेतो. शेतीची व इतर कामे करीत असता एकीकडे तो तरुण त्या मुलीचा अनुनय करीत असतो. तिला तो पसंत पडला, तर दोघांचे संबंध जडतात व ते पतिपत्नीच्या नात्याने वागू लागतात. नंतर घरातील कोणाच्या तरी लग्नात त्यांचे लग्न उरकून घेतात. कित्येकदा तोपर्यंत त्यांना एक दोन मुलेही झालेली असतात. अशा घरजावयाला घरोरी किंवा खंदाडया असे म्हणतात.

गरीब तरुणासाठी या लोकांत विवाहाची आणखी एक पद्धत रूढ आहे. लग्नाचा सगळा खर्च एकाच वेळी करणे ज्याला शक्य नसते, असा तरुण एखाद्या मुलीच्या बापाला काही थोडी

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रक्कम देऊन मुलीला आपल्या घरी घेऊन येतो व तिच्याशी संसार करू लागतो. अशा रीतीने आणलेल्या मुलीला कोरडयावर आणली असे म्हणतात. दुसऱ्या एखाद्या नातेवाईकाच्या लग्नात त्यांचे लग्न होते. मात्र हे लग्न त्यांच्या मुलींच्या लग्नाआधी होणे आवश्यक असते. तसे शक्य झाले नाही, तर मुलाच्या लग्नात प्रथम आईबापांचे लग्न लावतात.

वारली लोकांत घटस्फोटाची पद्धत रूढ आहे. तसेच स्त्रीला पुनर्विवाहही करता येतो. बरेच वेळा ती धाकटया दिराशी पाट लावते. विवाहबाह्य संततीचीही वारली समाज काळजी घेतो.

प्रसूतिप्रथा—गरोदर स्त्री शेवटपर्यंत सर्व कामे करीत असते. या काळात भुताखेतांची बाधा होऊ नये म्हणून ती खबरदारी घेते. बाळंतपणाच्या वेळी सुईण तिला मदत करते. मूल जन्मल्यानंतर चिरलेल्या बोरूच्या तीक्ष्ण चिपाटाने मुलाची नाळ कापतात. वार जमिनीत पुरतात. मुलगी असल्यास चौथ्या दिवशी व मुलगा असल्यास पाचव्या दिवशी सटीचे पूजन करतात. भिंतीवर सटीची व पाळण्याची आकृती काढतात. याच दिवशी मुलासाठी कोऱ्या कापडाची झोळी बांधतात. मुलाला झोळीत ठेवल्यावर सुईण त्याच्या कानात मोठयाने सांगते—

सरकारा दरबारा बिहजा नोको
पाटील कारभाऱ्या बिहजा नोको
सहराच्या मांज्या बिहजा नोको
अँसनी वाहारलां त पलून जा
ना बापासनीं वाहारलां त धावतुच ये

अर्थ – तू सरकारी अधिकाऱ्यांना, पाटील वगैरे गावच्या अधिकाऱ्यांना, भुताखेतांना भिऊ नको. आईने बोलावले तर पळून जा आणि बापाने बोलावले तर धावत ये.

मूल दहा-बारा दिवसांचे झाल्यावर एखादा वयस्कर पुरुष छत्रीची काडी तापवून त्याच्या पोटावर डाग देतो. त्यामुळे पचन चांगले होते व पोटाचे विकार उद्भवत नाहीत, अशी त्यांची समजूत आहे.

मुलाचे नाव लवकर ठेवीत नाहीत. भगताला विचारून तो सांगेल तेव्हा नाव ठेवतात. मूल दोन-तीन महिन्यांचे झाले, की त्याचे कान टोचतात आणि आठ-दहा महिन्यांचे झाले, की जावळ काढतात.

देवधर्म— शेत पिकवणारा पाऊस हा त्यांचा सर्वश्रेष्ठ देव असून, त्याला ते परमेसर म्हणतात. धान्य देणारी धरतरी (धरित्री), शेतीच्या कामी उपयोगी पडणारी गावतरी (गायत्री) आणि कणसरी (कणसे) या त्यांच्या पवित्र देवता आहेत. याशिवाय ते सूर्य, चांद, ढगेसर (ढग), जिजेसर (वीज), पावशा देव (ऊस) यांनाही पूज्य मानतात. पण वाघोवा किंवा वाघया, नारन्‌देव, हिरवा व हिमाई या त्यांच्या खास देवता आहेत. वाघया हा त्यांचा ग्रामदेव असून, त्याच्या प्रभावाने वाघ वगैरे हिंस्र पशूंपासून त्यांचे व त्यांच्या गुरांचे संरक्षण होते, असे मानतात. प्रत्येक गावाच्या बाहेरच्या बाजूला एखाद्या झाडांत लाकडी खांबावर किंवा दगडावर वाघयाची मूर्ती कोरलेली असते. तिला शेंदूर फासलेला असतो. त्याच्या मागच्या बाजूला त्याच्या सारख्याच पण लहान लाकडावर कोरलेल्या दुसऱ्या मूर्ती असतात. ते वाघयाचे शिपाई होत. आश्विन वद्य द्वादशीला गावकरी वर्गणी काढून त्याची पूजा करतात आणि तीन किंवा पाच वर्षांनी त्याला बकरा बळी देतात. नारन्‌देव हा त्यांची पर्जन्यदेवता आहे. एका दगडाला किंवा सुपारीला शेंदूर लावतात आणि त्यालाच ते नारन्‌देव म्हणतात. एका टोपलांत तांदूळ घालून त्यात त्याला ठेवतात. माघ शु. द्वितीयेला मोठ्या समारंभाने त्याची पूजा करतात व त्याला कोंबडी बळी देतात. हिरवा ही त्यांची कुलदेवता होय. याची चांदीची मूर्ती असते. दरवर्षी नवीन पीक आल्यावर हिरव्याची पूजा करतात.

डहाणूजवळ असलेल्या महालक्ष्मीला ते अत्यंत पूज्य मानतात आणि चैत्री पौर्णिमेला तिच्या जत्रेला जातात.

हे लोक भूतपिशाचे यांना फार घाबरतात. भगत हा त्यांचा पुरोहित असतो. तोच त्यांचा ज्योतिषी व वैद्यही असतो.

भगत होण्यासाठी खास शिक्षण घ्यावे लागते. अनुभवी भगत तरुण मुलांना ही विद्या शिकवतात. हे शिक्षण पावसाळ्याच्या आरंभी सुरू होते व दिवाळीपर्यंत पूर्ण होते. शिकाऊ भगतांना या काळात काही व्रते कडकपणे पाळावी लागतात.

वारली लोकांत नृत्याला फार महत्त्व असते. दिवाळी व शिमगा यासारखे सण, नारन्‌देवाच्या पूजेसारखे विधी, लग्नासारखे समारंभ या प्रसंगी वारली स्त्री-पुरुष शरीर शृंगारून निरनिराळी नृत्ये करतात. तारप्याच्या सुरावर हे नृत्य होते. तारपे हे वाद्य दुध्या भोपळ्यापासून तयार करतात. लांब आकाराच्या, पूर्ण पिकलेल्या भोपळ्याच्या आतल्या बिया काढून तो स्वच्छ करतात व त्याच्या आत बांबूच्या बासरीसारख्या दोन नळ्या घालतात. या नळ्यांना पुढे ताडाच्या पानांपासून बनवलेला कर्णा जोडतात. तारपे वाजवणारा मध्यभागी उभा राहतो आणि स्त्री-पुरुष त्याच्या भोवती फेर धरतात. एरवी पुरुषांच्या हातांत घुंगरे लावलेल्या काठ्या असतात आणि त्या जमिनीवर आपटून त्यांचा छन् छन् असा आवाज काढतात. आश्विनाच्या प्रारंभापासून कार्तिकी पौर्णिमेपर्यंत प्रत्येक गावात वर रोज रात्री हा नृत्याचा कार्यक्रम चालू असतो.

टाळ्यांचा नाच, बदक, मोर, पाऊशिवी वगैरे वरील नृत्याचे अनेक प्रकार आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोकगीते आणि लोककथा – आदिवासींच्या जीवनात लोकगीतांचे स्थान फार मोठे आहे. लिखित वाङ्मयाचा अभाव असल्यामुळे त्यांची संस्कृती ही त्यांच्या पिढ्या न् पिढ्या चालत आलेल्या गीतांच्या आणि कहाण्यांच्या द्वारा टिकून राहिलेली आहे. जीवनातील महत्त्वाच्या बहुतेक सर्व प्रसंगांना उद्देशून वारल्यांची गीते आहेत. लग्न आणि त्यातील वेगवेगळे विधी यांना उद्देशून असलेली गाणी, नारन्देवाच्या पूजेअर्चेच्या वेळी म्हणायची गाणी, मृताच्या उत्तरक्रियेच्या वेळी म्हणायची गाणी आणि धान्य, समृद्धी यांना उद्देशून असलेली मळणी वगैरेसारख्या प्रसंगी म्हणायची गाणी, असे त्यांचे चार भाग पाडता येतात.

लग्नात धवलेरी नामक पुरोहित स्त्री गाणी म्हणते.

लग्नप्रसंगी पूर्वी देवांनी ज्या चालीरीती पाळल्या, त्या आपणही अवलंबिल्या पाहिजेत, असे बऱ्याच गीतांत सुचवलेले असते. पुढील गीतात नारन्देव स्वतःच्या लग्नासाठी सर्वांना बोलावीत आहे, अशी मध्यवर्ती कल्पना आहे –

नारन्देव चालता जा आला हो
कमरभर रेसमी शेला हो
रेसमी टोपी माथी भरून आला हो
देवाघरशी काठी घेथली हो
हाथी काठी घेत आला हो ।।
चालता जा आला निघून गेला हो
यो वऱ्हाडक्याच्या गावां हो
वऱ्हाडक्या दादा, हो बाहेर नीघ जो
काय र देथा र कासां पडलीं र
मला पडलां हो लगिनाचा काम ।।

या कडव्यात लग्नातील मध्यस्थ जो वऱ्हाडक्या त्याला निमंत्रण दिलेले आहे.

पार्वतीच्या साखरपुड्याचे वर्णन पुढील गीतात केलेले आहे –

तले भरले चांदा हो, सूर्य चांदा हो
भरले ढगेसर देव देव आला सोन्याचे दारोटी
दारोटी कसा उभा हो, राही उभा हो ।।
देव आले सोन्याचे दारोटी
ईसर देवानं भरले पारवतीचे ओटे
भरले पारवतीचे ओटे ये देवांचे हो रीती
ये मांजानं हो केल्या ये मांजानं हो केल्या

वारली लोकांत अनेक लोककथा प्रचलित आहेत. त्यांपैकी एक पुढीलप्रमाणे –

महादेव आणि गौरी यांनी नवीन पृथ्वी निर्माण केली व तिच्यावर वृक्षवेलींची लागवड करण्यासाठी ते निघाले. वाटेत गौरीला तहान लागली. तेव्हा महादेवाने ताडाचे झाड उत्पन्न केले आणि त्याच्या बुंध्याशी लहानशी विहीर खणून तिच्यातले पाणी गौरीला प्यायला दिले. मग त्यालाही तहान लागली. गौरीने लगेच शिंदीचे (खजुरीचे) झाड निर्माण केले आणि त्याच्या बुंध्याशी विहीर खणून तिच्यातले पाणी महादेवाला प्यायला दिले. दोघांची तहान भागली; पण ते बेभान होऊन काहीतरी बडबडू लागले. काही वेळाने शुद्धीवर आल्यावर गौरी म्हणाली. 'अरेरे, या पाण्यामुळे आपल्यासारखे देवसुद्धा भान विसरतात, मग इतरांची स्थिती काय होईल! तेव्हा या झाडाच्या बुंध्याशी तृषार्ताला पाणी मिळणार नाही. त्याने पाहिजे तर झाडावर चढून खोदावे व पाणी प्यावे. त्याची तहान भागेल; पण शुद्धी जाईल. हे देवा, ताडाचे झाड तुम्ही लावलेले असल्यामुळे त्याच्या अंगात पुरुषाचे बल आहे, म्हणून त्याच्यापासून बारा महिने पाणी मिळेल. शिंदीचे झाड मी लावलेले आहे. त्याला विश्रांतीची गरज आहे. म्हणून त्याच्यापासून दर महिन्याला पंधरा दिवसच पाणी मिळेल.'

गौरीचे हे उद्गार सत्य आहेत. कारण ताडीचे झाड रोज छेदले, तरी त्यापासून नीरा मिळते. शिंदीचे झाड मात्र एक दिवसाआड छेदावे लागते.

वारली लोकांत जन्म, मृत्यू, निरनिराळे देव, कणसरी, यांच्याबद्दलही अनेक कथा प्रचलित आहेत.

वारली लोक मराठीचीच एक बोली बोलतात. तिच्यावर गुजराती व कोकणी यांचाही प्रभाव आहे.

मर्तिकप्रथा – माणूस मेला, की त्याचे प्रेत झाकून ठेवतात. प्रेत फार वेळ घरात ठेवत नाहीत. प्रेताला गरम पाण्याने आंघोळ घालतात व मग कोऱ्या वस्त्राने झाकतात. मृत व्यक्ती सवाष्ण स्त्री असेल, तर तिला कुंकू लावतात व तिची वेणी घालतात. प्रत्येक मृताला पायापासून कपाळापर्यंत चार-पाच ठिकाणी हळद, शेंदूर व काजळ यांचे टिळे लावतात.

प्रेताला तिरडीवरून स्मशानात नेतात. मृताचा उत्तराधिकारी मडक्यात अग्नी घेऊन पुढे चालतो. थोडे अंतर गेल्यावर ज्या ठिकाणी प्रथम आपट्याचे झाड लागेल, तिथे त्या झाडाभोवती प्रेत तीन किंवा पाच वेळा फिरवतात. मृताला पत्नी असेल, तर ती या ठिकाणी गाठी म्हणजे मंगळसूत्र तोडून टाकते व घरी परतते. बरोबर आलेल्या स्त्रियाही इथूनच परततात. या ठिकाणाला विसावा असे म्हणतात. मृताला बहुधा ओढ्याच्या काठी किंवा डोंगराच्या पायथ्याशी नेऊन जाळतात. प्रेत सरपणावर ठेवल्यावर त्याला बरोबर आणलेल्या शिदोरीतले पाच घास भरवतात व पाच घोट पाणी पाजतात. नंतर त्याच्या तोंडात पावली, अधेली असे नाणे ठेवून तोंड बंद करतात. सवाष्ण स्त्री मेली असेल, तर तिचे मूल्यवान दागिने काढून घेतात आणि बाकीचे तोडून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

फोडून प्रेतावर ठेवतात. शेवटी प्रेतावर एखाद्या झाडाच्या डहाळीने पाणी शिंपडतात व प्रेताला अग्नी देतात. प्रेत अर्धवट जळेपर्यंत तिथे थांबतात व मग आंघोळ करून घरी परततात. मृताला नेहमी दिवसाच जाळतात. मृताला सूर्यासमक्ष जाळले पाहिजे, अशी त्यांची समजूत आहे.

लहान मूल दात येण्यापूर्वी मृत्यू पावल्यास त्याला पुरतात. अचानक मेलेल्याला व असाध्य रोगाने मेलेल्याला प्रथम पुरतात व मग पंधरा-वीस दिवसांनी उकरून काढून जाळतात.

माणूस मेल्यावर पाचव्या दिवशी केळीच्या पानावर भात, भाजी वगैरे वाढून ते पान झोपडीच्या छपरावर ठेवतात. कावळ्याने येऊन ते खाल्ले, की ते मृताला पोचले, असे समजतात.

बाराव्या किंवा तेराव्या दिवशी मृताचे श्राद्ध करतात. साधारणपणे मार्गशीर्ष महिन्यात सर्वजण आपापल्या घरांतील मृतांची श्राद्धे करतात. माणूस मेला असेल, त्याच तिथीला श्राद्ध केले पाहिजे, असे बंधन नसते. इतकेच नव्हे, तर सवडीने दोन-चार वर्षांनी श्राद्ध केले तरी चालते. [जं. रा.; म. आ. प्र.; ट्रा. इं.; ट्रा. का. बॉ.; एं. हो. रा.]

वारसशाह (इ. स. चे १८ वे शतक) पंजाबचा एक सुप्रसिद्ध लोककवी. याचा जन्म जिडयाले या गावी झाला. सय्यद गुलशेरशाह हे त्याच्या वडिलांचे नाव होय. याचे प्राथमिक शिक्षण तिथल्या मशिदीत झाले. तारुण्यात त्याचे मोठ्या भावांशी बिनसले व तो जन्मगाव सोडून कसूर येथे गेला. तिथे तो सय्यद मखदुम याचा शिष्य बनला. तिथेच त्याने कुराणाचे अध्ययन केले व अध्यात्मातही प्रगती केली. त्याला तिथे प्रशंसक भेटले तसे निंदकही भेटले. या निंदकांच्या कारवायांना उबगून त्याने कसूर सोडले आणि फकिरी पत्करली. तो नित्य चिंतन करू लागला. त्या चिंतनात त्याला आपली अनेक प्रकारची अपूर्णता दिसून आली. ती दूर करण्यासाठी तो पाकपत्तण गावी गेला व शेख फरीद याचा शिष्य बनला. तिथे त्याच्या आत्म्याला समाधान लाभले. शेख फरीदने त्याच्या ठिकाणची कविप्रतिभाही जागृत केली.

नंतर तो पर्यटनाला निघाला. फिरत फिरत ठरा जाहृद या गावी गेला. तिथे त्याच्या फकिरी वृत्तीला लोक भाळले. विशेषतः तिथल्या बायकांना तो फार आवडला. त्या वारसशहाच्या भोवती नित्य घोळका करू लागल्या. त्यांतली एक बाई त्याच्यावर विशेष प्रेम करू लागली. तोही तिच्यावर अनुरक्त झाला. गावच्या लोकांना ते आवडले नाही. त्यामुळे वारसशहाला ते गाव सोडावे लागले.

तिथून तो मल्कीह्रास या गावी येऊन एका मशिदीत राहिला. त्याच्या कवितेला तिथेच कोंब फुटले. हीर-रांझा ही पंजाबची अत्यंत लोकप्रिय अशी प्रेमकथा होय. वारसशहाने त्याच कथेवर काव्य रचले. जणू त्याने स्वतःच्या जीवनातले असफल प्रेमच त्या काव्याच्या द्वारे अभिव्यक्त केले.

वारसशहाच्या पूर्वी पंजाबचा आदिकवी दामोदर याने आणि त्याच्या नंतर मुकबल व अहमद यांनी त्या कथेला काव्यरूप दिले होते; पण वारसशहाच्या त्या प्रेमाख्यानाने इतर कवी मागे पडले व त्या काव्यामुळे पंजाबच्या लोकजीवनात वारसशहाला अजरामर स्थान प्राप्त झाले.

वारसशहाचे हे काव्य केवळ प्रेमकथाच नाही; तर तो एक नीतिग्रंथही आहे. कवीला हिंदू विचारधारेचेही चांगले ज्ञान होते. एका ठिकाणी तो म्हणतो–

> उह मुरख निरवाण पद जा पहुँचे,
> पंजे इन्द्रियां जिनाने मारिआंने ॥

अर्थ – जो पुरुष आपल्या पाचही इंद्रियांचा निग्रह करतो, त्यालाच निर्वाणपदाची प्राप्ती होते.

समाज सुस्थित राहण्यासाठी तो एक रहस्य सांगतो–

> भेद किसे दा दसणा ठीक नाहीं,
> मरद सोई जो वेख दम घुट जाए ।
> भेद दसणा किसे दा भला नाहीं,
> भावें पुच्छ के लोक निखुट जाए ।
> वारसशाह ना भेद संदुक खुल्ले,
> भावें जान दा जंदरा टुट जाए ।

अर्थ – कोणाचे रहस्य कोणी कोणाला सांगू नये. एखाद्याचे रहस्य माहीत असूनही जो चूप राहतो तोच खरा मर्द होय. लोकांनी कितीही विचारले, तरी कोणाचे रहस्य उघड करणे चांगले नव्हे. वारसशहा म्हणतो, की रहस्याची पेटी कधीही उघडली जाता कामा नये; मग प्राणांचे कुलूप तुटले तरी हरकत नाही.

मलिक मोहंमद जायसी याने हिंदीत पद्‌मावत नावाचे प्रेमाख्यान लिहिले आणि ते असामान्य लोकप्रिय झाले. समीक्षक वारसशाहाची त्याच्याशी तुलना करतात. दोघेही सूफी होते. जायसीने पद्‌मावताला शेवटी शेवटी आध्यात्मिक डूब दिली. त्याचप्रमाणे वारसशहानेही आपल्या हीर-रांझा या प्रेमाख्यानाला अध्यात्माच्या उच्च पातळीवर नेले. [श्री. महिपालसिंह-साप्ताहिक हिंदुस्तान, २२ सप्टें. १९६३]

वारसा पैतृक संपत्तीवरील स्वामित्व. हिंदू संयुक्त कुटुंबात मूळ पुरुष व त्याच्या नंतरच्या तीन पिढ्यांतील वंशज आणि त्यांच्या स्त्रिया व अविवाहित कन्या यांचा समावेश होतो. मात्र त्यांतील केवळ पुरुषच संयुक्त संपत्तीचे वारसदार असतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही तीन पिढ्यांची मर्यादा पिंडदानावर आधारित आहे. तीन पितरांनाच उदक व पिंड दिले ज़ातात, आणि पिंडदांताच वारस होऊ शकतो (मनु. ९.१८६).

संपत्तीवरील स्वामित्वाचे संक्रमण दोन भिन्न पद्धतींनी होते. एक पद्धत विज्ञानेश्वराच्या मिताक्षरा या ग्रंथाला अनुसरते, तर दुसरी जीमूतवाहनाच्या दायभाग नामक ग्रंथावर आधारित आहे. बंगाल व आसाम या प्रदेशांत दायभागपद्धती प्रचलित आहे. रघुनंदनाचा दायतत्त्व हा ग्रंथही तिकडे प्रमाण मानला जातो. भारताच्या अन्य भागांत सर्वत्र मिताक्षरापद्धती प्रचलित असून, काही प्रदेशांत अन्य ग्रंथही प्रमाण मानले जातात.

मिताक्षरा ही याज्ञवल्क्यस्मृतीवरील टीका आहे. विज्ञानेश्वराच्या मते पुत्र जन्मला, की त्या क्षणीच पैतृक संपत्तीवर त्याचे स्वामित्व उत्पन्न होते. म्हणून या पद्धतीला जन्मस्वत्ववाद असे म्हणतात. दायभागानुसार पिता मरण पावतो, त्या क्षणी पुत्राला संपत्तीवर स्वामित्व प्राप्त होते. म्हणून या पद्धतीला उपरमस्वत्ववाद म्हणतात. या मतभेदाचे मुख्य कारण दाय या शब्दाचे भिन्न अर्थ, हे होय. विज्ञानेश्वराच्या मते संपत्तीच्या मूळ स्वामीशी असलेल्या संबंधामुळे ज्या संपत्तीवर स्वत्व स्थापित होते, तिला दाय म्हणतात. पिता-पुत्रांचा संबंध पुत्रजन्माच्या वेळीच, सुरू होतो आणि म्हणून पुत्राला जन्मतःच पैतृक संपत्तीवर अधिकार प्राप्त होतो. पण जीमूतवाहनाच्या मते दाय म्हणजे दिले जाणारे धन होय. मूळ धन्याचे धनावरील स्वामित्व नष्ट होते, तेव्हा ज्याला धन द्यायचे त्याचे स्वत्व सुरू होते. म्हणून पिता मरण पावतो, तेव्हा त्याचे संपत्तीवरील स्वामित्व नष्ट होऊन ते पुत्राला प्राप्त होते. जीमूतवाहनाच्या या मताला मनुस्मृतीचा व नारदस्मृतीचा आधार आहे. पित्याच्या मृत्यूनंतरच पुत्र पैतृकसंपत्तीचा व्यय करू शकतो, कारण पिता जिवंत असेपर्यंत पुत्र त्या संपत्तीचा स्वामी नसतो, असे मनूने म्हटले आहे (९.१०४). मिताक्षरेतील जन्मस्वत्ववाद विष्णुधर्मसूत्र (१७.२), याज्ञवल्क्यस्मृती (२.१२३), बृहस्पती (दायभाग २.५०), इ. ग्रंथांवर आधारलेला आहे. कुटुंबाच्या संपत्तीवर पितामह, पिता व पुत्र यांचे सारखे स्वामित्व असते, असे त्यांत सांगितले आहे.

सपिंड व रक्तसंबंध – ज्या मनुष्याला मृत व्यक्तीचे श्राद्ध करण्याचा अधिकार असतो, तोच त्या मृत व्यक्तीच्या संपत्तीचा वारस होऊ शकतो. श्राद्धाच्या प्रसंगी जो मनुष्य मृत व्यक्तीला पिंड अर्पण करतो, तो सपिंड होय. श्राद्धाच्या मुळाशी जी पारमार्थिक कल्पना आहे, ती दायभाग वारसापद्धतीत आधारभूत मानलेली आहे. मिताक्षरेत मात्र सपिंड याचा अर्थ त्याच पिंडाचा, रक्ताने संबंधित, असा केला आहे. जन्माने जो ज़वळचा त्याला वारसा हक्क मिळतो. वारसा हक्क व श्राद्धकर्तव्य यांचा संबंध मात्र सर्वमान्य आहे.

संपत्तीचे संयुक्त व स्वतंत्र असे दोन प्रकार आहेत. कुटुंबाच्या वडिलोपार्जित संपत्तीला संयुक्त संपत्ती म्हणतात. तिच्यावर सर्व कुटुंबियांचा अधिकार असतो. कुटुंबातील एखाद्या व्यक्तीने स्वकष्टाने मिळविलेली संपत्ती स्वतंत्र असते. तिच्यावर त्या व्यक्तीचाच पूर्ण अधिकार असतो आणि ती अविभाज्य असते. श्री. का. न. केळकर यांनी हिंदुव्यवहारधर्मशास्त्र या ग्रंथात संपत्तिसंक्रमणाविषयी केलेले विवेचन असे –

मिताक्षरेप्रमाणे हिंदू मनुष्याच्या मृत्यूनंतर त्याच्या धनाचा संक्रम होण्याच्या दोन पद्धती आहेत – (१) शेषाधिकार पद्धती व (२) वारसा पद्धती.

शेषाधिकार पद्धती केवळ अविभक्त कुटुंबातील धनास लागते. शेषाधिकाराने नवीन हक्क निर्माण होत नाही; तो जुनाच असतो. त्याची अंमलबजावणी मात्र नवी असते.

वारसाहक्काने मिळकत मिळणे म्हणजे केवळ कायद्याच्या योजनेमुळे मुळात नसलेला हक्क प्राप्त होणे होय. कारण, स्वतंत्र अगर स्वकष्टार्जित मिळकत हाती असणारा मनुष्य तिची वाटेल ती विल्हेवाट लावू शकतो. म्हणजेच दान, विक्रय, बक्षीस अगर अन्य कोणत्याही मार्गांनी तिचा व्यय करू शकतो. आपल्या पुत्राला कपर्दिकही ठेवण्यास तो बांधलेला नाही. त्याने जर ती मृत्युपत्राने देऊन टाकली असेल, तर वारसास काही मिळणार नाही. म्हणूनच मिळकतीचा मालक मेल्यावर वारसास नव्याने हक्क निर्माण होतो.

वारसा सद्यःपरिणामी असतो. मिळकतीचा मालक मरण पावताच, त्याच्या मिळकतीचा वारसा त्याच्या निकटच्या स्वामीमध्ये संक्रमित होतो. लक्ष्मी निराधार स्थितीत क्षणभरही राहत नाही. जो कायद्याने योग्य व जवळचा वारस असेल, त्याचा ती लगेच आश्रय घेते. मात्र याला गर्भसंभव पुत्र व दत्तक हे दोन अपवाद आहेत. मृताची पत्नी गरोदर असली तर, मृताच्या मिळकतीचा वारसा गर्भस्थ पुत्राच्या जन्मासाठी थांबून राहतो. परंतु पुत्रच झाला नाही, तर मात्र दुसरा जवळचा वारस असेल त्याला वारसा मिळतो. तसेच विधवेने दत्तक घेतला, की तत्पूर्वी विधवेत स्थित असलेला वारसा दत्तकाकडे फिरतो.

मिताक्षरेप्रमाणे वारसाच्या कायद्यात रक्तसंबंधाला प्राधान्य आहे, तर दायभागाने पिंडदानाच्या कल्पनेला महत्त्व दिले आहे. दोन्ही पंथांची विचारसरणी भिन्न असली, तरी मिताक्षरेत जे मुख्य वारस आहेत, तेच दायभागाच्या कल्पनेप्रमाणेही आहेत. जीमूतवाहनाचा युक्तिवाद निराळा असला, तरी त्यानेही रक्तसंबंधाचे वारसातत्त्व दायभागात अमान्य केलेले नाही. पिंडदान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हे वारस कोण हे ओळखण्याचे अनेकांपैकी एक गमक आहे; पण रक्तसंबंध हेच मुख्य गमक होय. दायभाग व मिताक्षरा यांत अशा रीतीने तत्त्वाचा फरक नाही; पण तपशिलाचा फरक मात्र खचित आहे. मिताक्षरा रक्तसंबंधाचे एकच तत्त्व मानीत असे; पण दायभागाने रक्तसंबंध व पिंडदान ही दोन्ही तत्त्वे लावली.

प्राचीन धर्मशास्त्रामध्ये रिक्थहरण – प्राचीन धर्मसूत्रांत धनाधिकारासंबंधी थोडेच नियम आढळतात. कारण, त्या काळी संयुक्त कुटुंबपद्धतीच विशेष प्रचलित असून, संयुक्त संपत्तीच्या संक्रमणासाठी विशेष विधिनियमांची आवश्यकता भासली नसावी. संपत्तीवर प्रथमाधिकार पुत्राचा होता. मृत व्यक्तीला पुत्र नसल्यास तिचे धन कोणाला मिळावे, याविषयी गौतम ध. सू. (२८.२१), आपस्तंब ध. सू. (२.६.१४.२-५), बौधा. ध. सू. (१.५.१-१३) व वसिष्ठ ध. सू. (१७.८१-८४), यांत अनुक्रमे सपिंड, गुरू, शिष्य व राजा यांना ते मिळावे, असे म्हटले आहे. सपिंड म्हणजे काय ते धर्मसूत्रकारांनी स्पष्ट केलेले नाही. त्यांनी धनसंक्रमणासाठी सगोत्रांची मर्यादा सांगितली आहे.

मनूने सर्वप्रथम अनपत्य व्यक्तीच्या वारसासंबंधी स्पष्ट नियम सांगितले आहेत. त्याच्या मते कन्या, दौहित्र, पिता, भाऊ, माता, आजी, अन्य सपिंड (तीन पिढ्यांतील गोत्रज), सकुल्य (नंतरचे गोत्रज), गुरू, शिष्य, ब्राह्मण व राजा हे क्रमाने अशा व्यक्तीच्या धनाचे वारस ठरतात. मनूने या वारसदारांत पत्नीचा उल्लेख केलेला नाही. याज्ञवल्क्याने मात्र मृताच्या पत्नीला त्याच्या धनावर अधिकार दिला आहे. त्याच्या पद्धतीने पत्नी, कन्या, दौहित्र, माता, पिता, भाऊ, भावांचे पुत्र, गोत्रज, बंधू (भिन्न गोत्रज सपिंड), शिष्य, सहपाठी हे क्रमाने निपुत्रिक मनुष्याचे वारस होतात. ही पद्धती आजही मिताक्षरा या नावाने प्रचलित आहे.

याज्ञवल्क्यानंतर नारद, बृहस्पती, कात्यायन व देवल हे स्मृतिकार उल्लेखनीय होत. त्यांत नारदाने कन्येचा वारसा मान्य केला आहे; पण पत्नीला स्थान दिलेले नाही. बृहस्पतीने मात्र पत्नीचा अधिकार मान्य केला आहे. बृहस्पती व कात्यायन यांनी मृताच्या पत्नीचा वारसाहक्क दृढपणे मान्य केल्यामुळे मध्ययुगात विधवेला पतीच्या धनाचा वाटा मिळत होता व आजही मिळतो. बृहस्पतीच्या मते पत्नी, कन्या, दौहित्र, पिता, माता, भाऊ, भाचा, सपिंड, सकुल्य (समानोदक), बांधव शिष्य व आचार्य हे वारस होत.

याज्ञवल्क्यस्मृतीच्या आधारे विज्ञानेश्वराने मिताक्षरेत दायादांचा जो क्रम दिला आहे, तो असा – (१) पुत्र, पौत्र, प्रपौत्र (२) विधवा पत्नी (३) कन्या (४) दौहित्र (५) माता (६) पिता (७) भाऊ (८) भाचा (९) त्याचा पुत्र (१०) गोत्रज सपिंड (११) समानोदक (१२) बंधू (१३) शिष्य (१४) सहपाठी (१५) राजा.

मिताक्षरा व दायभाग यांतील मतभेद – मृताच्या पूर्व किंवा उत्तर सहा पिढ्यांपर्यंतचे नातेवाईक मिताक्षरेत सपिंड मानले आहेत; तर जीमूतवाहन तीनच पिढ्या सपिंड व नंतरच्या तीन पिढ्या सकुल्य मानतो. मिताक्षरेत जे मुख्य सपिंड वारस मानलेले आहेत, ते पहिल्या तीन पिढ्यांतलेच आहेत. दायभागानुसार भिन्न गोत्रज सपिंडांना सामान्यतः तीन पिढ्यांच्या अंतराने वारसात स्थान मिळते. मिताक्षरेप्रमाणे मृत व्यक्तीचे सपिंड व समानोदक यांतील चौदा पिढ्यांपर्यंतचे पुरुष नातेवाईक संपल्यानंतर भिन्न गोत्रज सपिंडांना म्हणजे बंधूंना वारसा मिळू शकतो; पण दायभागानुसार स्त्रीकडून संबंधित काही भिन्न गोत्रज सपिंडांना काही सगोत्र सपिंडांपेक्षा वरचे स्थान वारसाक्रमात मिळू शकते.

मिताक्षरेत मातेला पित्यापेक्षा जवळची वारस मानली आहे, तर दायभागात पिता हा मातेहून जवळचा वारस मानलेला आहे. दायभागात वारस खरा जवळचा रक्तसंबंधी असेल तर त्याची शाखा कोणती, हा विचार गौण मानला आहे.

वारसा हक्काला अपात्र – कुटुंबाच्या संयुक्त संपत्तीला, स्वतंत्र असूनही काही व्यक्ती वारस होण्यास अपात्र मानल्या जात होत्या. अंधत्व, बहिरेपणा, मुकेपणा, पंगूपणा, नपुंसकत्व, कोड, क्षय, इ. दुर्धर रोग; तसेच वेडेपणा, मूर्खपणा, इ. मानसिक विकृती; दुराचरण, संन्यास, जातिभ्रष्टता, धर्मांतर या कारणांनी वारसा हक्क नष्ट होत असे (गौ. ध. सू. २८. ४१; आप. ध. सू. २-१४. १; बौधा. ध. सू. २.२४३-४६; वसिष्ठ ध. सू. १७.४६-४८; विष्णु. १५.३२-३४ व अर्थशास्त्र ३.५). मात्र अशा अपात्र व्यक्तीचे पालनपोषण सामायिक धनातून झाले पाहिजे, असे बंधन होते (गौ. ध. सू.-२८.४१; वि. स्मृ. १५.३२-३४). इ. स. १९२८च्या हिंदू वारसा-कायद्यानुसार मात्र अशा प्रकारे कोणाचा वारसाहक्क नष्ट होऊ शकत नाही; फक्त वेडेपणा, मूर्खपणा व नपुंसकत्व या कारणांमुळेच मनुष्य त्याला अपात्र ठरतो.

पित्याशी शत्रुत्वाने वागणारा पुत्र पितृधनाचा वारस होऊ शकत नाही. अनौरस संतती धर्मशास्त्राला मान्य नसल्यामुळे तिला वारसा हक्क मिळत नाही. खुनी मनुष्य वारस होऊ शकत नाही; त्याच्या वंशजांनाही वारसा मिळत नाही. मात्र वेडे व संन्यासी यांची संतती अपात्र ठरत नाही. भिन्न जातीतील मिश्र विवाहामुळे उत्पन्न झालेली मुले पूर्वी वारसा हक्काला अपात्र ठरत; पण आता त्यांना वारसा मिळू शकतो.

विविध प्रकारच्या पातकांमुळे मनुष्याचा वारसा हक्क नष्ट होतो, असे सर्व शास्त्रकारांनी मानले आहे (बौधा. २.२.४६;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

याज्ञ. २.१४०; विष्णु. ३.५). स्त्रीचा वारसा हक्क व्यभिचारामुळे नष्ट होत असे; पण सांप्रत तसा होत नाही.

स्त्रीला कुटुंबाच्या मिळकतीत वाटा मिळू नये, अशी धारणा वैदिक साहित्यात आढळते. तथापि, पुत्र नसल्यास कन्येला पित्याची संपत्ती मिळावी, ही कल्पना प्रचलित होती. त्या काळी मुलींचे उपनयन होत असे व त्या वेदाध्ययनही करीत. स्त्रिया यज्ञयागही करीत. त्यामुळे कन्येचे स्थान पुत्रापेक्षा कमी मानले जात नसे. बंधुहीन कन्येला पुत्रिका म्हणत व तिला पुत्राप्रमाणेच पितृधनाचा वारसा मिळत असे. ही प्रथा सनपूर्व ४ थ्या शतकापर्यंत चालू असावी. कौटिल्य, याज्ञवल्क्य, बृहस्पती, इ. शास्त्रकारांनी पुत्रहीन पित्याच्या संपत्तीवर त्याच्या कन्येचा अधिकार मान्य केला होता. त्यानंतर मुलींचे उपनयन व वेदाध्ययन बंद झाले आणि बालविवाह सुरू झाले. मग त्यांना वारसा हक्क नसावा हा विचार उगम पावला. या संबंधी श्री. का. न. केळकर यांनी केलेल्या विवेचनाचा सारांश असा—

प्राचीन धर्मशास्त्रकार स्त्रियांच्या वारसाहक्काविषयी अनुदार नव्हते. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या वचनावरून स्त्री वारसा हक्काला अपात्र ठरत नव्हती. नारदाच्या मते ती केवळ नैतिक दृष्टीने किंवा अबला म्हणून अस्वतंत्र असते; ती करारमदार, मिळकतीचा व्यवहार करण्यास असमर्थ नसते. पण नंतरच्या शास्त्रकारांनी स्मृतिवचनांचा व सूत्रांचा वेगळा अर्थ लावून स्त्रीच्या वारसाहक्कावर गदा आणली. स्त्री अबला असल्यामुळे वारसा घेण्यालाही अपात्र होय, असे कित्येक पंडितांनी ठरविले.

पत्नीचा पतीच्या संपत्तीवर वारसाहक्क बहुजन समाजाला पटवून देण्याकरिता, विज्ञानेश्वर व जीमूतवाहन या टीकाकारांना विरोधी लोकमताशी पदोपदी झगडावे लागले. रिक्थ, क्रय, संविभाग वगैरे सर्व धनप्रकार विज्ञानेश्वराने स्त्रीधनात समाविष्ट केले. जीमूतवाहनाने मनुस्मृतीच्या प्रामाण्यावर दाय शब्दाची वेगळी व्याख्या करून एकत्र कुटुंबात विभक्त सहभागीदारी स्थापन केली, पुत्रांचे अमर्याद जन्मसिद्ध हक्क मर्यादित केले व स्त्रियांच्या हक्कांना स्वतंत्र स्थान निर्माण केले. पण विज्ञानेश्वराप्रमाणेच त्यालाही विरोधी लोकमताचे बंधन असल्यामुळे त्याने कात्यायनाची नियतस्वाम्य धनाची कल्पना घेऊन ती स्त्रियांच्या संपूर्ण स्वामित्वाला उपाधी म्हणून जोडली. तत्कालीन धर्मशास्त्रात क्रांती घडवून आणण्याबद्दल त्या दोघा टीकाकारांना धन्यवाद द्यायला पाहिजेत. मात्र मिताक्षरा व दायभाग या ग्रंथांत काही ठिकाणी कसून मतप्रतिपादन केलेले असले, तरी ते केवळ मतप्रकाशक ग्रंथ नाहीत. ते चालू व्यवहाराचे टीकाग्रंथ असल्यामुळे तत्कालीन रूढाचारच त्यात ग्रथित केलेले आहेत. त्यावरून त्या काळातली स्थिती पुष्कळ चांगली होती, असे म्हणावे लागते. स्वराज्यात व पेशवाईत व्यवहारनिर्णयाला मिताक्षराच प्रमाण मानीत; आजही तो ग्रंथ प्रमाण मानला जातो. पण मध्यंतरी इंग्रज न्यायाधिशांनी स्वतःची बुद्धी चालवली व न सुचेल तिथे परकीय इंग्रजी कल्पनांची मदत घेतली आणि त्यानेच सर्व अनर्थ झाला.

आदिवासींची वारसा पद्धती — मालमत्तेचा वारसा ठरविण्याच्या अनेक पद्धती आदिमजातींत प्रचलित आहेत — (१) पूर्ण स्वातंत्र्य— काही जमातींमध्ये आपल्या मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचे पूर्ण स्वातंत्र्य व्यक्तीला दिलेले असते. ती व्यक्ती मृत्युपत्राने नंतरची व्यवस्थाही करून ठेवू शकते. (२) रीतिरिवाज—बऱ्याच जमातींत रूढ रिवाजाप्रमाणे व्यवस्था केली जाते. त्या व्यवस्थेत व्यक्तीच्या इच्छेला महत्त्व नसते. काही ठिकाणी मृत व्यक्तीबरोबर तिची मालमत्ता पुरण्याची, जाळण्याची किंवा नष्ट करण्याची प्रथा असते. त्यामुळे वारसाचा प्रश्नच उद्भवत नाही. (३) काही जमातींत आनुवंशिक व संपादित मालमत्ता यांमध्ये फरक केला जातो; त्यांच्या विल्हेवाटीचे नियम वेगळे असतात. वंशपरंपरागत मालमत्ता रूढीप्रमाणे व स्वकष्टार्जित मालमत्ता व्यक्तीच्या इच्छेप्रमाणे वाटली जाते. (४) मृताच्या मालकीच्या वस्तू त्याच्या वारसांना त्यांचा योग्य उपयोग होईल अशा दृष्टीने देण्यात येतात. (५) कुटुंबात ज्या पद्धतीने वंशपरंपरा गणली जाते, त्याच पद्धतीने वारसदारही ठरविले जातात. (६) काही जमातींत पुरुषाच्या निधनानंतर त्याच्या मुलांऐवजी त्याच्या भावांना त्याच्या मालमत्तेचे वारसदार मानण्यात येते. (७) काही जमातींत फक्त पहिल्या मुलाला किंवा मुलीला वारसाहक्क असतो. मात्र त्या वारसदाराने विश्वस्त म्हणून इतरांचे पोषण करावे, अशी अपेक्षा असते. (८) काही जमातींत सर्वांत लहान मुलाला वारसा मिळतो.

मुसलमानांचा वारसा कायदा — मुसलमानी वारसा कायद्याने मृताच्या वारसांचे निरनिराळे गट केलेले आहेत. ज्यांना संपत्तीचा विशिष्ट भाग दिलेला आहे, अशा वारसांचा एक गट कुराणात निर्दिष्ट आहे. अशा विशिष्ट भागाला किंवा वाटणीला फरीदाह व तो मिळणाऱ्या वारसांना धवुल फराइद असे म्हणतात. या वारसांना त्यांचा त्यांचा भाग मिळाल्यानंतर, जी संपत्ती शिल्लक राहील, ती मृताच्या पैतृक वंशातील पुरुष नातेवाइकांत विभागली जाते. अशा वारसांना असबात असे म्हणतात. इस्लाम धर्माचा उदय होण्यापूर्वी अरेबियात फक्त असबात वारसांनाच संपत्तीत हिस्सा मिळत असे. पण जेव्हा बद्र, उहुद, इ. ठिकाणी झालेल्या युद्धांत अनेक मुसलमान पुरुष मारले गेले, तेव्हा त्यांच्या कुटुंबातील लोकांत संपत्तीच्या वाटणीबाबत तंटे निर्माण होऊ लागले. अशा वेळी काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मृतांच्या विधवांनी महंमद पैगंबराकडे तक्रार केली, की आपल्याला आणि आपल्या मुलांना नवऱ्याच्या संपत्तीतील काहीच वाटा मिळाला नाही आणि ती सर्व संपत्ती त्याच्या पुरुष नातेवाईकांनी विभागून घेतली आहे. तेव्हा महंमदाने असा नियम केला, की आजपासून पुढे मृताच्या विधवेला व जवळच्या स्त्री-नातलगांना त्याच्या संपत्तीतला काही भाग मिळाला पाहिजे. आणि त्या नियमाचा त्याने कुराणात अंतर्भाव केला (कुराण ४.८.१२-१५; १७५).

जर असवात वारस नसतील आणि धवुल फराइदांनी आपला हिस्सा घेऊन काही संपत्ती शिल्लक उरत असेल, तर ती आपल्या हिश्श्याच्या प्रमाणात धवुल फराइदांनी पुन्हा वाटून घ्यावी असे हनिफाइटस यांचे मत आहे. शाफीइट आणि मालिकाइट हे मात्र अशी उरलेली संपत्ती सरकारी तिजोरीत जमा करावी, असे म्हणतात. [हिं. प. मो.; हिं. व्य. ध.; पो. वी. हिं. सि.; आ. सा. जी.; एन्सा. रि. ए.]

वाराणसी काशीचे दुसरे नाव. काशी व वाराणसी एकच समजतात; पण जुन्या काळी गंगेच्या पूर्व किनाऱ्यावर असलेल्या गावाला काशी व पश्चिम किनाऱ्यावरच्या गावाला वाराणसी म्हणत. गंगा व असी यांचा संगम आणि गंगा व वरुणा यांचा संगम यामध्ये असलेल्या क्षेत्रास वाराणसी म्हणतात. वाराणसी हे एक सर्वश्रेष्ठ पवित्र क्षेत्र आहे.

वाराणसीमाहात्म्य – मत्स्य पुराणात वाराणसी, अर्थात काशीक्षेत्र याचे माहात्म्य सांगितले आहे, ते असे –

विद्याधर, सिद्ध व चारण यांचे हे स्थान आहे. या ठिकाणी भगवान पिंगल हा गणेश्वर व क्षेत्रपाल झाला. तो नगरातील सर्व लोकांना अन्न मिळवून देत असे. मूलतः तो यक्ष असून, पूर्णभद्राचा पुत्र होता. त्याने उग्र तप केले म्हणून शिवाने त्याला गणपतिपद दिले. वाराणसी हे अविमुक्त तीर्थ आहे. कारण, या ठिकाणी शिव सर्वत्र भरलेला असून, तो इथून कधी अन्यत्र जात नाही. पापी लोकांनी इथे देह ठेवल्यास ते योग्य काळी रुद्रपद प्राप्त करून घेतात. शिव या ठिकाणी स्थाणुवत निश्चल उभा आहे. या नगराचा प्रत्येक भाग पवित्र आहे. जो कोणी या ठिकाणी महिनाभर वास करतो, त्याला पाशुपतदर्शनाचे ज्ञान होते. देहपातापर्यंत राहणाऱ्याला मोक्ष मिळतो. येथील मणिकर्णिका घाटावर देह ठेवल्याने इच्छित लोक प्राप्त होतात व पुढे शिवसायुज्यही मिळते. वाराणसीला गंगेमुळे महत्त्व मिळाले आहे. प्रलयकालीही हे क्षेत्र नष्ट होत नाही. या क्षेत्री धेनू व इतर वस्तू यांचे दान करणे कल्याणप्रद असते. इथे सर्व वर्णांच्या लोकांना देवत्व प्राप्त होते.

एकदा शंकराने ब्रह्मदेवाचे पाचवे मस्तक तोडले. त्यावर ब्रह्मदेवाने शंकराला शाप दिला, की 'तू सदासर्वकाळ कपाल हाती घेऊन फिरत राहशील.' शिव या ठिकाणी त्या शापातून मुक्त झाला व ते कपाल काशीत पडून त्याचे हजारो तुकडे झाले.

या क्षेत्राला पितृवन असे आणखी एक नाव आहे. हे ब्रह्मदेवाचे तपस्थान आहे. मात्र जे शिवभक्त नसतील, त्यांना इथे भ्रम पडतो.

या ठिकाणी वेदव्यास बारा वर्षे मौन धरून तप करीत राहिले. व्रतपूर्ती झाल्यावर ते क्षुधेने पीडित झाले म्हणून भिक्षा मागायला गेले, पण त्यांना भोजन द्यायला कोणी पुढे आला नाही. तेव्हा ते या नगरीला शाप द्यायला निघाले. ते पाहून शिव-पार्वती मानवरूपात त्यांच्या पुढे आली व त्यांनी वेदव्यासांना पोटभर भोजन वाढले. व्यासांसारख्या कोपिष्ठ पुरुषाने या नगरीत राहू नये, असे शंकराने त्यांना सांगितले. मात्र प्रत्येक पंधरवड्यात अष्टमी व चतुर्दशी या तिथींना त्यांना काशीत येण्याची मुभा दिली. पाहा – काशी. [हि. ध.]

वाराह गृह्यसूत्र मैत्रायणी या यजुर्वेदशाखेच्या वाराह नामक पोटशाखेचे हे सूत्र आहे. यात सुमारे निम्म्या गृह्यसंस्कारांचे वर्णन आहे. या सूत्राप्रमाणे आपले संस्कार करणारे लोक महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यात आढळतात. यातील बहुतेक सूत्रे मानव व काठक गृह्यसूत्रांतून घेतलेली असल्यामुळे प्रस्तुत सूत्रात नवी अशी फारशी माहिती नाही. हे सूत्र डॉ. रघुवीर यांनी संपादित करून छापले असून, डॉ. रोलाण्ड यांनी त्याचे फ्रेंच भाषेत भाषांतर केले आहे. [इं. वे. क. सू.]

वाराह श्रौतसूत्र मैत्रायणी शाखेचे श्रौतसूत्र. मैत्रायणी संहितेत आलेल्या मंत्रांचा विनियोग श्रौत-यज्ञांत सांगून, त्या यज्ञांचे तपशीलवार वर्णन या सूत्रात केले आहे. मानव श्रौतसूत्रांशी याचे पुष्कळच साम्य आहे. डॉ. रघुवीर व डॉ. कलान्द यांनी इ. स. १९३३ साली हे सूत्र संपादित करून छापले आहे. या सूत्राचे परिशिष्ट बरेच मोठे असून, त्यांत अनेक विषयांची चर्चा केली आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वाराह क्षेत्र (१) उत्तर प्रदेशात अयोध्येपासून पश्चिमेस ४० मैलांवर घाघरा व सरयू यांच्या संगमावर हे क्षेत्र आहे. इथे वराहाचे प्राचीन मंदिर असून, ते सांप्रत जीर्ण अवस्थेत आहे. अयोध्येची ८४ कोसांची एक परिक्रमा असून, ही २२ दिवसांत पूर्ण करायची असते. या यात्रेत वाराह क्षेत्रात एक रात्र राहायचे असते. तुलसीदासाचा गुरू नरहरिदास हा या ठिकाणी राहत असे. तिथे त्याची एक पर्णकुटी दाखवतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तुलसीदासाच्या शिष्यांच्या चौदाव्या पिढीतले गोसावी सांप्रत या कुटीची व्यवस्था पाहतात. या कुटीत रामचरितमानसाची एक जुनी पोथी असून, ती खुद्द तुलसीदासाच्या हातची आहे, असे सांगतात. तुलसीदासाने आपल्या गुरूकडून याच ठिकाणी प्रथम रामायणाचे श्रवण केले होते. दरवर्षी पौष महिन्यात इथे मोठी यात्रा भरते.

(२) नेपाळ राज्यातले एक क्षेत्र. याला कोकामुख असेही म्हणतात. हे कोसी नदीच्या तीरी धवलगिरीच्या शिखरावर आहे. इथे वराहाचे मंदिर असून, त्यात चतुर्भुज मूर्ती आहे. मंदिराजवळूनच कोवरा (कोका) नदी वाहते व तिचे जल वराहाच्या स्नानासाठी वापरतात. कार्तिक पौर्णिमेला इथे यात्रा भरते. [कल्याण–तीर्थांक; त्रिपथगा, ऑगस्ट १९६२]

वाराही ब्राह्मी, माहेश्वरी, इ. सात मातृदेवतांपैकी एक देवता. हिचे वर्णन असे – चतुर्भुज, नीलवर्ण, वराहमुख, दोन हातांत नांगर व शक्ती ही आयुधे. दुसरे दोन हात वरद व अभय या मुद्रेत. मस्तकावर करंडमुकुट, विशाल उदर, गजवाहन, गजध्वज व कल्पवृक्षाखाली उभी.

शत्रूचा बीमोड करण्यासाठी 'ऐं ग्लौं ठंठंठं हं स्वाहा' या वाराही मंत्राची सिद्धी करावी, असे मंत्रमहोदधीत सांगितले आहे. वार्तालो ही वाराहीचेच एक रूप असून, तिचा ११४ अक्षरांचा मंत्र मंत्रमहोदधीत दिलेला आहे. तो सिद्ध केल्याने शत्रूचा नाश होतो, असे म्हटले आहे. पुरी येथे वाराहीची मूर्ती आहे, तो सुळे व पिंजारलेले केस यांमुळे भयानक दिसते. रेडा हे तिचे वाहन आहे. [दे. को. २; डे. हि. इ.; मं. म.]



वाराही – पुरी

वारियर केरळातील एक जात. ही जात म्हणजे अंबलवासीचा एक पोटभेद आहे. केरळविशेषमाहात्म्य या ग्रंथात वारियरांना पारशव म्हटले आहे. ब्राह्मण पुरुष आणि शूद्र स्त्री यांच्या संततीला याज्ञवल्क्याने पारशव हे नाव दिले आहे. अनेक वारियर आपले नाव संस्कृतात लिहिताना त्याच्या पुढे पारशव उपाधी जोडतात. काही वारियर कुटुंबांना आसन (=आचार्य) पदवी मिळालेली आहे. कारण त्यांच्या घराण्यातील पुरुषांनी वंशपरंपरेने काही सरदारांच्या घराण्यात अध्यापनाचे काम केले आहे. मध्ययुगात काही वारियर कुटुंबांना आचार्य व ज्योतिषी असल्याबद्दल राजांकडून ताम्रपत्रे मिळाली आहेत.

वारियरांच्या उत्पत्तीविषयीची एक आख्यायिका प्रचलित आहे, ती अशी–

एका मंदिरात पडलेले एक हाड ब्राह्मण पुजाऱ्यांच्या विनंतीवरून एका शूद्र स्त्रीने उचलून फेकून दिले. तेव्हा तिला जातिबहिष्कृत करण्यात आले. तिची ही अवस्था पाहून ब्राह्मण पुजाऱ्यांना तिची कणव आली आणि त्यांनी तिच्याशी संबंध ठेवला. या संबंधातून निर्माण झालेल्या त्यांच्या संततीला वारियर हे नाव मिळाले.

वारियर जातीचे लोक सर्वसाधारणपणे व्युत्पन्न आणि संस्कृताचे विशेष अध्ययन केलेले असतात. तसेच, ते उत्तम ज्योतिषी आणि वैद्यही आहेत.

या लोकांचा व्यवसाय शैव मंदिरांशी संबंधित आहे. ते देवासाठी फुलांचे हार व माळा करतात, नैवेद्याची तयारी करतात, देवाच्या मिरवणुकीत मशाली व छत्रे धरतात आणि मंदिराची साफसफाई करतात. देवाचे दागिने त्यांच्याच ताब्यात असतात. या सर्व सेवेबद्दल त्यांना देवाचा नैवेद्य दाखवल्यानंतर त्यातले काही अन्न मिळते.

हे लोक प्रामुख्याने शिवाला भजतात. पण ते विष्णू, सुब्रह्मण्य, शास्ता, गणेश, इ. देवतांचीही पूजा करतात.

यांचे बहुतेक सर्व आचारविचार नंपूतिरी ब्राह्मणांच्या आचारविचारांप्रमाणे असतात.

वारियर लोक बारा ते सोळा या वयात मुलाला शिवदीक्षा देतात. एका शुभ मुहूर्तावर मुलगा आणि पुरोहित नवे कपडे घालून एका जलपूर्ण कलशाची पूजा करतात. नंतर पुरोहित तो कलश मुलाच्या डोक्यावर ओततो. नंतर दोघांचीही हजामत करतात. मग काही विधी होतात. ते झाल्यावर मुलगा नवे कपडे घालतो, उत्तरीय पांघरतो, कपाळाला भस्म व चंदन लावतो आणि रुद्राक्षमाळ व अलंकार घालतो. मग तो आईकडे भिक्षा मागतो आणि काशीच्या दिशेने सात पावले चालतो. हा विधी झाल्याशिवाय मुलाला लग्न करता येत नाही. उपनयनासारखाच हा विधी आहे.

विवाहप्रथा – या लोकांत ताळिकेट्टुकल्याणम आणि कुडीवेंपू अशा दोन्ही विवाहपद्धती प्रचलित आहेत. मुलगी वयात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

येण्यापूर्वी ताळी बांधण्याचा किंवा ताळिकेट्टुकल्याणम हा विधी होतो. आणि ती वयात आल्यावर एखाद्या पुरुषाशी संबंध करते.

कुडीवैपू या प्रकारात वधू व वर ही दोघेही आमरण पति-पत्नी म्हणून राहतात. विवाह वधूगृही होतो. नवीन पोषाख करून आणि नातलगांसह भोजन करून नवरा मुलगा मिरवीत वधूच्या घरी जातो. तिथे गेल्यावर तो स्नान करतो आणि वधूने स्पर्श केलेले कपडे घालतो. त्यानंतर होम होतो. मग वधूला मांडवात आणतात आणि नंपूतिरी ब्राह्मणांच्या विधीप्रमाणे सर्व लग्नविधी करतात. सूर्यास्तानंतर नवरा मुलगा गणपतीची पूजा करतो. त्यानंतर वराच्या घरी जाऊन वधू-वर गवत, व्याघाजिन व पांढरी चादर अंथरलेल्या जमिनीवर बसतात. मग सुवासिनी त्यांना आरती ओवाळतात. याला दीक्षाविरिप्पू असे नाव आहे.

मर्तिकप्रथा – हे लोक प्रेते जाळतात. आशौच अकरा दिवस पाळतात. हे मृताचे श्राद्ध करतात. [का. ट्रा. स. इं.]

वारिव्रत

एक मासव्रत. ब्रह्मा ही या व्रताची देवता आहे. चैत्र, ज्येष्ठ, आश्विन, पौष किंवा माघ हे चार महिने संपूर्ण अयाचित वृत्तीने निर्वाह करणे, हा या व्रताचा विधी आहे. उद्यापनाच्या वेळी वस्त्राच्छादित घडा, अन्न, तिलपूर्ण पात्र व सुवर्ण दान द्यायचे असते. फल – ब्रह्मलोकप्राप्ती. [हि. ध.]

वारिस अली शाह

(इ. स. १८१९–१९०५) एक सूफी संत व कवी. उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यातील देवा या गावी सय्यद कुलात याचा जन्म झाला. वयाच्या तिसऱ्याच वर्षी वारिस अली आपल्या आई-बापांना मुकला. सात वर्षे वयापर्यंत त्याने संपूर्ण कुराण मुखोद्‌गत केले. लहानपणापासूनच तो विरक्त होता. आधुनिक शिक्षणाविषयी त्याला मुळीच आस्था नव्हती. तो कुठेही एकांत स्थळी जाऊन ध्यान-धारणा करीत बसे.

वयाच्या अकराव्या वर्षी त्याला सूफी संप्रदायाची विधियुक्त दीक्षा मिळाली. त्यानंतर लगेच त्याने आपली वडिलार्जित संपत्ती नातेवाइकांना व गोरगरिबांना वाटून टाकली. त्याच्या घरी मोठा ग्रंथसंग्रह होता, तोही त्याने संबंधितांना देऊन टाकला.

वारिस अलीला यात्रेची मोठी आवड होती. पंधराव्या वर्षापासून तो सतत भ्रमण करू लागला. त्याने सात वेळा मक्केची यात्रा केली. भारतातली अनेक क्षेत्रे त्याने पाहिली.

हळूहळू त्याच्या जवळ शिष्यपरिवार जमू लागला. तो सूफी संप्रदायाची तत्त्वे त्यांना उपदेशी. त्याची इस्लामवर दृढ श्रद्धा होती; पण उपदेशात मात्र विश्वबंधुत्वावर भर होता. तो प्रेम-धर्माचा पाईक होता आणि त्यामुळेच अन्य धर्मांबद्दल सहिष्णू होता. कोणत्याही मार्गाने का होईना; पण ईश्वराची निष्काम भक्ती करावी, असे तो म्हणे. म्हणूनच त्याच्या शिष्यमंडळीत सर्व धर्मांचे आणि पंथांचे लोक सामील झाले होते. कमीतकमी अन्न, लज्जारक्षणापुरते वस्त्र, मित भाषण व कमालीची दयार्द्र वृत्ती ही त्याची वैशिष्ट्ये होती. त्याने आमरण ब्रह्मचर्य पाळले. यात्रा संपल्यानंतर शिष्यांच्या आग्रहावरून तो पुनश्च जन्मगावी गेला आणि तिथेच शवटपर्यंत राहिला. [भा. सं. म.

वारुणी

एक पर्व. चैत्र वद्य त्रयोदशीला शततारका नक्षत्र आल्यास, तिला वारुणी म्हणतात. त्याच तिथीस शनिवार असेल, तर तिला महावारुणी म्हणतात. आणि या सर्वांच्या जोडीला आणखी शुभयोग असतील, तर तिला महामहावारुणी म्हणतात. वरुण ही या पर्वाची देवता आहे. या तिथीस समुद्रस्नान केल्याने महत्पुण्य लाभते. [हि. ध.]

वारूळ

वाळवीने निर्माण केलेले मातीच्या कणांचे उंच व शिखरयुक्त घर. या अनेकपदरी वारुळात वाळवीच्या मुंग्या आपले अन्न साठवतात. वारुळात त्यांची एक राणी मुंगी असते. तिच्या अबोल आज्ञेवरूनच मुंग्या वारुळाची रचना व इतर कारभार करतात. वस्तुतः वारूळ ही एक कृमिकीटकांनी निर्माण केलेली त्यांच्या गरजेची वस्तू आहे; पण प्राचीन काळापासून या वारुळाला एक सांस्कृतिक महत्त्व प्राप्त झाले आहे व ते भूदेवीचे प्रतीक मानले गेले आहे.

असे म्हणतात, की शेतीचा प्रारंभ स्त्रीने केला. पहिले बीज तिने पेरले आणि तेही आपल्या घराच्या परिसरातच पेरले. घर आणि पेरलेली भूमी यांच्या भोवती पहिला गडगा तिनेच उभारला आणि तेवढी जमीन आपल्या मालकीची करून टाकली. पुरुषाचा शिकारीचा नाद अजून सुटला नव्हता. पुरुषाने शिकार करून ताजे मांस घरी आणावे आणि स्त्रीने मुले सांभाळून घराभोवतीच्या जमिनीत थोडेबहुत धान्य पिकवावे, असा तो श्रम विभाग सहजपणे ठरून गेला. त्या पुरातन स्त्रीने धरित्रीच्या ठिकाणी आत्मत्वाची कल्पना केली. स्त्रीच्या उदरात बीजनिक्षेप होतो. ती ते बीज नवमास धारण करते आणि मग एक दिवस सृष्टीतला एक नवा मानवांकुर उगवून बाहेर येतो. तोच अंकुर वाढतो, मोठा होतो आणि तोही स्वतः पुढे अनेक बीजे निर्माण करतो.

त्यामुळे अशा प्रकारचे निर्माणसामर्थ्य असलेली भूमी ही देवीस्वरूप आहे, असे स्त्रीला वाटले. फुलणारी, फळणारी, प्रसवणारी अशी ही स्त्रीरूपिणी देवता आहे, असा तिला प्रत्यय आला. सर्व काही तिच्या आधीन. ती तारील किंवा मारीलही. प्रसन्न झा-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तर अधिक पिकेल. पसाभर पेरले तर पायलीभर देईल: त्याच-प्रमाणे कोपली तर सगळ्यांचीच धूळमाती करील. माणसांना तसेच गुराढोरांना तडकाफडकी खलासही करील. तेव्हा आपले पोषण आणि रक्षण व्हायला हवे असेल, तर तिला सदैव प्रसन्न ठेवले पाहिजे आणि तिला राग आला तर बळी देऊन तो शम-विला पाहिजे, असे तिने मनाशी ठरविले.

अशा या प्राथमिक, सरळ धोपटमार्गी विचारातून धरित्री देवतेचा उगम झाला. धरित्री सगळीकडेच आहे. ती शेताखाली, रानाखाली, घराखाली अन् माणसाखालीही आहे. मग तिला पुजायचे कुठे ? तिचे प्रतीक कोणते ? असा विचार करता करता वारूळ पुढे आले. वारूळ म्हणजे बिनखड्याच्या शुद्ध मातीचा उंचवटा. त्यावरून माणसांनी मनाशी ठरविले, की धरतीची पूजा करायची तर ती वारुळाच्या ठिकाणी करावी.

वारुळाच्या पूजेची ही प्रथा दक्षिणेत सर्वत्र आहे. महाराष्ट्रा-तही नागपंचमीच्या दिवशी ग्रामललना वारुळाच्या पूजेसाठी समुदायानं गावाहेर जातात. दक्षिण कोकणात सांतेरी नावाची

वारूळरूपी मायमाउली – मसुरे

एक ग्रामदेवता आहे. वारूळ हेच तिचे प्रतीक असते. कित्येक ठिकाणी वारुळावरच देऊळ बांधलेले असते. मालवण तालुक्या-तील मसुरे या गावी मायमाउलीचे देऊळ आहे. त्यातील देवी वारूळरूपातच आहे. हे वारूळ चारपाचशे वर्षांचे जुने आहे. वारु-ळाचा घेर वीस फूट असून, उंची पंधरा फूट आहे. त्यात देवी नागिणीच्या रूपात वास करते, असे म्हणतात. परशुरामाची माता म्हणून प्रसिद्ध असलेली रेणुका ही एक ग्रामदेवताच मानली गेली आहे. तीही मुळात पृथ्वीदेवताच आहे. तिचा वारुळाशी संबंध अनेक कथाकहाण्यांतून आढळतो. रेणुका ही वारुळातूनच जन्म पावली आणि अखेर वारुळातच अदृश्य झाली, अशी कथा आहे. वारुळाच्या पूजेची प्रथा तिथूनच निघाली असावी.

वारूळ आणि रेणुका यांचा आणखी एक मजेदार संबंध त्या शब्दातूनच सूचित होतो. रेणू म्हणजे सूक्ष्म कण, यापासून स्त्रीलिंगी रेणुका हा शब्द बनला आहे. वारूळ हे सूक्ष्म मृत्तिकेचे म्हणजे रेणूंचेच बनलेले असते. त्यावरून रेणुका आणि पृथ्वी यांचा अभेदसंबंध जुळतो. धार्मिक कृत्यांसाठी ज्या पाच पवित्र मृत्तिका सांगितल्या आहेत, त्यांतली एक वारुळाची माती आहे. म्हणजे आर्येतर जनतेचा हा पावित्र्याचा संकेत पुढे आर्यांनाही मान्य झाला असे दिसते.

या वारुळाचा निरनिराळ्या देवतांशी संबंध सांगताना श्री. रा. चिं. ढेरे यांनी पुढील माहिती दिली आहे–

रेणुका ही भूदेवी आहे. तिचे रेणुका हे नाव पृथ्वीवाचकच आहे. रेणु + का = रेणुमयी = पृथ्वी.

मृदुल रेणूंनी बनलेले वारूळ हे रेणुकेच्या उपासनेसाठी वापरले जाणारे नैसर्गिक प्रतीक आहे. 'पोट्टु' हा दक्षिणी शब्द 'पोट' (=गर्भाशय) आणि वारूळ या उभय अर्थांचा द्योतक आहे.

वारुळाच्या रूपाने पूजिली जाणारी मातंगी आणि सांतेरी या दोन्ही देवी रेणुकेशी समरूप आहेत किंबहुना एकरूप आहेत. मातंगीचे चरित्र रेणुकेशी निगडित आहेच. दक्षिण कोकण आणि गोमंतक प्रांत प्रसिद्ध झालेली सांतेरी ही परशुरामस्थापित असल्याचीच पारंपारिक धारणा आहे.

योनिप्रतीक म्हणून नैसर्गिक वारुळाची उपासना अतिप्राचीन कालापासून आजपर्यंत दक्षिण भारतात तरी अखंड प्रचलित आहे. वारूळ हे फारच नाजूक असल्यामुळे वारूळसदृश घडीव शिला-मूर्तींचे प्रचलन बर्‍याच काळी झाल्याचा पुरावा उपलब्ध आहे. वारुळाच्या शिलारूप प्रतिकृतींनंतर नारीपर्यंतच्या योनिमूर्ती घडवल्या जाऊ लागल्या. तसेच प्रसवाबरोबरच पोषणाचाही मातृत्वाशी संबंध असल्यामुळे योनीप्रमाणेच स्तनांना उठाव देणाऱ्या स्कंधापर्यंतच्या मूर्तींची निर्मिती होत गेली. भूदेवीच्या सर्जक (आणि पोषक) इंद्रियांच्या मूर्तींचा हा, वारूळ ते योनि-स्तन-युक्त मूर्तीपर्यंतचा क्रमविकास पुराव्यांनी सिद्ध करता येतो. [शाक्ती दैवते; शक्तिपीठांचा शोध – श्री. रा. चिं. ढेरे, १९७३

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वार्ता एक अर्थशास्त्रीय संज्ञा. भारतात अर्थशास्त्र किंवा संपत्तिशास्त्र यांचे प्राचीन कालापासून अनुशीलन होत आले आहे. या संपत्तिनिर्माणशास्त्राला प्राचीन काळी वार्ता असे म्हणत. कृषी, व्यापार व पशुपालन हे तीन मुख्य विषय वार्तेच्या अंतर्गत येत. वार्ता आणि अर्थशास्त्र यांतला फरक हा, की वार्ता हे निव्वळ संपत्तिशास्त्र आहे, तर अर्थशास्त्र हे वार्तेला उपोद्बलक अशा अन्य आनुषंगिक विषयांची चर्चा करणारे आहे.

वार्ता या शास्त्राची उत्पत्ती ब्रह्मदेवापासून त्रेतायुगात झाली व कलियुगात त्याचा लोप होणार आहे, असे पुराणांतरी म्हटले आहे. त्रेतायुगात जेव्हा ग्राम-अरण्यातले धान्य अपुरे पडू लागले, तेव्हा लोकांना जगण्यासाठी आणखी कोणते तरी साधन असावे, असे वाटू लागले आणि त्यातूनच वार्तेचा जन्म झाला, असे वायू, ब्रह्म, इ. पुराणांत म्हटले आहे. वार्तेबरोबरच वागण्याच्या मर्यादा व सामाजिक रूढी निर्माण झाल्या.

वार्तेविषयी पुढील वचने विचारणीय आहेत.

अर्थानर्थौ वार्तायाम् ।

(अर्थ. २.७)

भावार्थ – वार्ता म्हणजे कृषी, पशुपालन आणि वाणिज्य या गोष्टींमध्ये सर्व अर्थ आहे. या गोष्टी बिघडल्या तर अनर्थ संभवतो.

वार्तया धार्यते सर्वम् ।

(म. भा. वन. १.५०)

अर्थ – वार्ता हीच सर्व राजनैतिक संघटनांना धारण करते.

वार्ता वै लोकसंश्रया ।

(कामंदकीय नीति. ४.२७)

अर्थ – वार्ता हा लोकसमाजाचा आधार आहे.

स्मृतींमध्येही आन्वीक्षिकी (तर्कशास्त्र), त्रयी (तीन वेद) व दंडनीती या तीन विद्यांबरोबरच वार्ता ही चौथी विद्या मानलेली आहे (मनु. ७.४३).

कौटिल्याच्या मतानुसार धर्म, वर्ण व आश्रम यांची सुस्थिती वार्तेवरच अवलंबून आहे. म्हणून प्राचीन काळी वार्ताशास्त्राचे सिद्धान्त अनुसरणे हे राजाचे प्रमुख कर्तव्य मानले जाई.

वार्तिके व्याकरण व इतर काही शास्त्रे यांत आढळणारी सुरूप किंवा श्लोकरूप रचना. वृत्ती या शब्दाला 'इक' हा प्रत्यय लागून वार्तिक हा शब्द बनला आहे. वार्तिकाचे लक्षण असे –

उक्तानुक्तदुरुक्तानां (द्विरुक्तानां) चिन्ता यत्र प्रवर्तते ।
तं ग्रन्थं वार्तिकं प्राहुर्वार्तिकज्ञा मनीषिण: ॥

(पराशरपुराण १८)

अर्थ – सूत्रात उच्चारलेला शब्द, न उच्चारलेला शब्द, भलताच वाटणारा शब्द किंवा द्विरुक्त झालेला शब्द या बाबतीत ज्यामध्ये सर्व प्रकारचा विचार केला जातो, त्याला वार्तिक म्हणतात.

पाणिनीच्या सूत्रांसारखा या वार्तिकांचा स्वतंत्र पाठ नाही व ती संकलित करून एकत्र दिलेलीही नाहीत. पतंजलीच्या महाभाष्यात बहुतेक वार्तिकांचा उल्लेख असला, तरी काही वार्तिके त्यात आढळत नाहीत. मात्र ती अन्य ठिकाणी सापडतात. कात्यायन हा वार्तिककार म्हणून प्रसिद्ध आहे.

गोल्डस्टुकर, वेबर, इ. विद्वानांच्या मते कात्यायन हा दोषैकदृष्टी होता. पाणिनीचे प्रमाद दाखवण्यासाठी मुख्यत्वे त्याने वार्तिके लिहिली; पण डॉ. कीलहॉर्न याचे मत याच्या उलट आहे. तो म्हणतो, की कात्यायन हा दोषैकदृष्टी नसून, तो चिकित्सक टीकाकार होता. कात्यायनाची नेमकी वार्तिके कोणती, हे सांगतांना तो म्हणतो – पतंजलीच्या इष्टी नामक ज्या वार्तिकांना परंपरागत मानले जाते, त्या इष्टी निराळ्या शोधून काढणे कठीण असते. तरी 'इति वक्तव्यम्', 'इति वाच्यम्' व 'इत्युपसङ्ख्यानम्' असे ज्या वार्तिकांच्या विषयी म्हटले आहे, ती वार्तिके कात्यायनाची समजावी.

पाणिनी व कात्यायन या दोहोंच्या मधल्या कालखंडात अन्य काही वार्तिककार होऊन गेले, असे महाभाष्यातील उल्लेखांवरून कळते. खुद्द कात्यायनाने वाजप्यायन, व्याडी, पौष्करस, इ. वार्तिककारांचा प्रत्यक्ष उल्लेख केला असून, 'इत्येके' म्हणून अप्रत्यक्षही काहींचा उल्लेख केला आहे. भारद्वाजीय, कृष्णयादव, सौर्यभगवत आणि कुणी हे वार्तिककार कात्यायनानंतरचे आहेत.

जी वार्तिके श्लोकरूपात असतात, त्यांना श्लोकवार्तिके म्हणतात. अशी वार्तिके महाभाष्यात असून, ती पतंजलीने रचली असावी.

मीमांसा दर्शनात कुमारिलभट्टाची व शंकराचार्यांच्या बृहदारण्यकोपनिषदाच्या भाष्यावर सुरेश्वराचार्यांची वार्तिके आहेत. उद्योतकराची न्यायवार्तिके वात्स्यायनाच्या न्यायभाष्यावर लिहिलेली आहेत. धर्मकीर्तीचा प्राणवार्तिक हा ग्रंथ व्याख्याग्रंथ असून, मौलिक आहे. [पा. पा. व्या. सं.; हिं. सा. को.]

वार्तेय एक प्राचीन गण किंवा संघ. कराचीच्या पश्चिमेस, पुराली नदीच्या पश्चिम भागी वसलेल्या ओराइतइ नामक भारतीय जनसमूहाचा उल्लेख एका ग्रीक लेखकाने केला आहे. तो वार्तेय संघच असावा. हा सर्वकाल स्वतंत्र होता. शिकंदराच्या भारतावरील आक्रमणाच्या वेळी या संघाने आपला दूत पाठवून शिकंदराशी संधी केला होता. [पा. का. भा.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वार्धक्य वृद्धपणा. वृद्धांना मान देणे हे भारताच्या सांस्कृतिक जीवनातले एक प्रमुख आणि स्पृहणीय असे अंग आहे. तरुणांनी, मुलांनी वृद्धांना वाकून नमस्कार करावा, उत्थापन द्यावे, मदत करावी, त्यांच्यापुढे मोठ्या आवाजात बोलू नये व इत्यकारे त्यांचा मान आणि आदर करावा, असा शिष्टाचार आहे. वृद्धांच्या अभिवादनाविषयी व त्याच्या फलाविषयी मनूने म्हटले आहे, ते असे—

ऊर्ध्वं प्राणा ह्युत्क्रामन्ति यूनः स्थविर आयति।
प्रत्युत्थानाभिवादाभ्यां पुनस्तान्प्रतिपद्यते ॥
अभिवादनशीलस्य नित्यं वृद्धोपसेविनः।
चत्वारि सम्प्रवर्धन्ते आयुर्विद्या यशोबलम् ॥

(मनु. २.१२०-२१)

अर्थ – वय, विद्या, इ. गोष्टींनी वृद्ध असा पुरुष येत असता तरुणाचे प्राण देहातून बाहेर जाऊ इच्छितात. (म्हणजे वृद्धाच्या स्वागतासाठी ते उचलल्यागत होतात.) अशा वृद्धाला प्रत्युत्थान आणि अभिवादन करून अल्पवयी माणसाने ते प्राण सुस्थित करावे. जो वृद्धांना अभिवादन करतो आणि जो नित्य वृद्धांची सेवा करतो, त्याच्या आयुष्य, विद्या, यश आणि बळ या चार गोष्टी प्रकर्षाने वाढतात.

वृद्धपणाविषयी निरनिराळ्या समाजांत ज्या समजुती प्रचलित आहेत, त्यांपैकी काही अशा—

वार्धक्यात माणसाच्या अंगात विशेष प्रकारची शक्ती वास करू लागते. म्हणून एखादे नवीन जनावर विकत घेतल्यानंतर त्याला दावे लावण्यासाठी म्हाताऱ्या माणसाला बोलावतात. एखाद्याची मुले जगत नसल्यास नवजात बालकाला सर्वप्रथम वृद्धाच्या कपड्यात गुंडाळतात. धान्याची रास मोजायचा प्रारंभ वृद्धाकरवी करतात. मृत वृद्धाचे कपडे आपले भले व्हावे म्हणून इतर माणसे वापरतात. वृद्ध माणसांची एखादी वस्तू जवळ बाळगल्याने उत्कर्ष होतो, असे समजतात. म्हणूनच काही समाजांत नवऱ्या मुलीला आंदण देताना वृद्धाची एखादी वस्तू देतात. नवीन व्यवसाय सुरू करताना वृद्धाचे आशीर्वाद घेतात. संध्याकाळी सांजवात लावल्यावर वृद्धांना नमस्कार करतात. लिंगायत लोकांत मुले जगत नसतील, तर वृद्ध माणूस मेल्यावर, त्याला ज्या तिरडीवरून नेतात, त्या तिरडीची एक सुतळी काढून घेतात. मुलगा झाला तर त्याच्या कंबरेला व मुलगी झाली तर तिच्या दंडाला ती सुतळी बांधतात.

वृद्धांच्या अंथरुणावर पाय ठेवीत नाहीत. तसे केल्याने आयुष्य कमी होते, अशी समजूत आहे.

वृद्धांच्या शेजारच्या खोलीत तरुण जोडप्याने रतिक्रीडा करू नये, असे मानतात. [की. पॉं.]

वार्ध्रीणस जो तीन अवयवांनी पाणी पितो म्हणजे पाणी पिताना ज्याचे लोंबते कान पाण्याला स्पर्श करतात, अशा कृश, शुभ्र व वृद्ध बोकडाला हे नाव आहे. असा बोकड प्राचीन काळी श्राद्धकर्मात मारून शिजवीत व त्याचे मांस ब्राह्मणांना वाढीत. मनू म्हणतो, की अशा बोकडाच्या मांसाने पितरांची बारा वर्षेपर्यंत तृप्ती होते. [नि. सिं.]

वार्षगण्य एक सांख्य आचार्य. याच्या कालाविषयी काही सांगता येत नाही. या नावातले मूल पद वृषगण असे आहे. त्या कुलात उत्पन्न झालेला म्हणून याला हे नाव मिळाले. हे त्याचे व्यक्तिनाम नसून गोत्रनाम असावे. सांख्यकारिकांचा कर्ता ईश्वरकृष्ण हाच वार्षगण्य असल्याचे काही विद्वान मानतात; पण हे मत चुकीचे आहे. ईश्वरकृष्णाचा काल इ. स. च्या पूर्वी काही वर्षांचा आहे; तर वार्षगण्याचा काल पाणिनीच्याही पूर्वीचा आहे. कारण, पाणिनीने आपल्या गर्गादिगणात वृषगणाचा निर्देश केला आहे (अष्टा. ४.१.१०५). या सर्व गोष्टींचा विचार करून श्री. उदयवीर शास्त्री यांनी वार्षगण्याचा काल भारतीय युद्धाच्याही आधीचा असू शकेल, असे मत व्यक्त केले आहे.

पतंजलिरचित निदानसूत्रात कोण्या वार्षगण्याच्या अनेक मतांचा उल्लेख आहे; पण ते गोत्रनाम असल्यामुळे हा निश्चित पुरुष कोण ते सांगणे अशक्य आहे. एवढेच सांगता येईल, की निदानसूत्रातल्या वार्षगण्याचा सांख्य दर्शनाशी कसलाही संबंध नाही. आश्वलायन श्रौतसूत्रातही (१०.९.१०) एका वार्षगण्याचे मत दिलेले आहे. हे सामवेदीय सूत्र आहे. मात्र निदानसूत्र व श्रौतसूत्र या दोहोंतला वार्षगण्य एकच असावा.

सांख्याचार्य वार्षगण्य हा सांख्य दर्शनातल्या एका विशेष विचारप्रवाहाचा अनुयायी होता व त्याचा संबंध योग दर्शनाशी अधिक होता. वृषगण पिता, वार्षगण्य पुत्र व वार्षगण हे त्याचे अनुयायी होत. या योगसंबद्ध सांख्यप्रवाहाला वार्षगणांनी मान्यता दिली, त्याचे अध्ययन केले व प्रचारही केला.

सांख्य-योग दर्शनांत याला भगवान वार्षगण्य म्हटले आहे. वार्षगण्याच्या अनेक मतांशी विंध्यवासाची मते सर्वथा जुळतात. विंध्यवास हा सांख्याचार्य वार्षगण्याचाच अनुयायी होता. वार्षगण्य हा विंध्यवासाचा सांप्रदायिक गुरूही होता. [सां. द. इ.]

वालखिल्य एक ऋषिसमुदाय. हा साठ सहस्र ऋषींचा एक संघ होता. प्रजोत्पत्तीसाठी तप करणाऱ्या प्रजापतीच्या केसापासून यांचा जन्म झाला (तै. आ. १.२३.३). विष्णुपुराणात यांना ब्रह्मपुत्र क्रतू याचे पुत्र मानले आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१.१०). सन्नती किंवा क्रिया ही यांची माता होय. वालखिल्यांतल्या प्रत्येक ऋषींची उंची आणि रुंदी अंगुष्ठमात्र होती. हे ऋषी सूर्याचे अनन्य भक्त होते आणि सूर्यलोकातच वास्तव्य करीत होते. पक्षी जसे एकेक दाणा टिपून आपला उदरनिर्वाह करतात, त्याचप्रमाणे हेही करीत होते. सूर्यकिरणांचे प्राशन करून हे तपश्चर्येत निमग्न राहत.

हे आपल्या पित्याप्रमाणेच पवित्र, सत्यवादी व व्रतपरायण होते. सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत हे सूर्याची स्तोत्रें गात गात त्याच्या पुढे चालत. मृगचर्म, चीर व वल्कले ही त्यांची वस्त्रे होती. हे वटवृक्षाच्या फांदीला उलटे लटकून तपश्चर्या करीत.

वालखिल्यांनी सरस्वतीच्या तीरावर यज्ञ केला होता. पृथू राजाचे हे मंत्रीही बनले होते. यांच्या तपःसामर्थ्याविषयाची एक कथा अशी–

'एकदा कश्यप ऋषीने पुत्रप्राप्तीसाठी यज्ञ आरंभिला. या यज्ञात भाग घेण्यासाठी पळसाच्या एका लहानश्या काठीवर लटकून वालखिल्य तिथे आले. त्यांचे अंगुष्ठमात्र रूप आणि फांदीला लटकणे या गोष्टी पाहून इंद्राने त्यांचा उपहास केला. त्यामुळे वालखिल्य रागावले. त्यांनी दुसरा इंद्र निर्माण करण्यासाठी एक यज्ञ आयोजित केला. इंद्र घाबरला. मग कश्यप ऋषी त्यांना म्हणाला. इंद्राच्या जागी दुसरा इंद्र उत्पन्न करणे अयोग्य आहे. तेव्हा तुम्ही हा प्रयत्न सोडून द्या. तुम्हांला जर इंद्र निर्माण करायचाच असेल, तर पक्ष्यांमधला इंद्र निर्माण करा.'

वालखिल्यांनी कश्यपाचे हे सांगणे मानले. त्याच वेळी इंद्रही त्यांना शरण आला. त्यांनी यज्ञ पूर्ण केला, पण त्याचे फल मात्र कश्यपाला दिले. तेच फल पुढे कश्यपाने विनतेला दिले आणि तिच्या पोटी गरुड हा पक्ष्यांचा इंद्र निर्माण झाला (म. भा. वन. २६.२७).

ऋग्वेदात वालखिल्य नामक अकरा सूक्ते (ऋ. ८.४९-५९) आहेत. ती सूक्ते परिशिष्टात्मक समजली जातात. ही सूक्ते वालखिल्यांनीच रचली, असे तैत्ति. आरण्यकात म्हटले आहे (१.२३). [प्रा. च. को.]

वालन केरळ प्रदेशाच्या कोचीन भागात राहणारी कोळ्यांची एक जात. वल म्हणजे तलावातील मासा. या माशांना पकडणारे ते वालन होत.

परशुरामाने या लोकांना नद्यांमध्ये व समुद्रकिनाऱ्यावर नावा चालविण्यासाठी इकडे आणले, अशी दंतकथा आहे. वालन हे मूळचे आर्य असून, त्यांना एका पेरुमल राजाने काही हक्क देऊन, नावाड्याचा धंदा करण्यासाठी केरळात आणले, असेही सांगितले जाते. राम-लक्ष्मणांना गंगापार करणारा गुह हा आमचा जातभाई होता, असे हे लोक फार अभिमानाने सांगतात.

यांच्यांत पोटजाती नाहीत. पण अलयकड, एन्नलू, वैश्य-गिरियम आणि वझ्हपल्ली या नावांची चार घराणी आहेत. प्राचीन काळी वालनांचे पूर्वज नंपूतिरी ब्राह्मणांच्या घराण्यांत सामावले गेले होते. पण तिथे त्यांच्याकडून काही गैरवर्तन घडल्यामुळे त्यांना हलक्या जातीचे मानण्यात येऊ लागले. त्यांचे वंशज म्हणजेच सांप्रतचे वालन होत, अशी समजूत आहे. आजही वालन माणूस काही अडचण निर्माण झाली, तर नंपूतिरी ब्राह्मणांकडे आशीर्वाद मागायला जातो.

हे लोक समुद्रकिनाऱ्यावर बांबूच्या झोपड्या बांधून राहतात. काही श्रीमंत वालनांची घरे मात्र विटा–दगडांची असतात. झोपड्यांत राहणारे लोक झोपडीबाहेर स्वयंपाक करतात आणि बाहेरच लाकडी फळ्यांवर किंवा चटयांवर झोपतात. मासे व खेकडे पकडणे हा यांचा व्यवसाय आहे.

विवाहप्रथा– हे लोक मुलीचा विवाह बालपणी किंवा ती वयात आल्यावरही करतात. ताळीबंधनाचा विधी न केला तर मुलीच्या आईबापांना जातिबहिष्कृत करतात. भिन्न घराण्यातील वधू–वरांचेच विवाह होतात.

एखाद्या शुभ दिनी ताळीबंधनाचा कार्यक्रम करतात. त्यावेळी मुलीचे नातलग अखन या जातिप्रमुखाकडे जाऊन त्याला विड्याची पाने आणि काही पैसे एवढी दक्षिणा देतात. मग अखन हा विधी करायला परवानगी देतो. नंतर वराकडील लोक रात्री वरासह वधूच्या घरी जातात. तिथे वर वधूच्या गळ्यात ताळी बांधतो. जो तरुण ही ताळी बांधतो, तोच पुढे त्या मुलीशी लग्न करतो असे नाही. पण त्या तरुणाला लग्न करण्याची इच्छा असेल, तर ताळीचा व इतर खर्च त्या मुलाच्या आईबापांना करावा लागतो. अन्यथा हा सर्व खर्च मुलीचा मामा करतो.

यांच्यांत पत्रिका पाहण्याची प्रथा आहे. पत्रिका जमल्यावर विवाहाचा मुहूर्त ठरवितात. लग्नाच्या दिवशी नवऱ्यामुलाकडील लोक कापडाचे दोन तुकडे, एक किंवा दीड रुपया, थोडे तांदूळ व विड्याची पाने घेऊन वधूच्या घरी जातात. तिथे एक कापड मुलीला आणि अन्य वस्तू देज म्हणून मुलीच्या आईला देतात. मग जेवण करून हे लोक परततात. नंतर मुलीकडील लोक मुलाच्या घरी जाऊन मिठाई वाटतात आणि उभय पक्षांचे लोक विवाह झाला, असे जाहीर करतात. तिथे सर्वांचा भोजनाचा कार्यक्रम होतो.

विधवा वालन स्त्री आईबापांच्या परवानगीने पुनर्विवाह करू शकते. स्वतःच्या दिराबरोबर तिला लग्न करता येत नाही. यांच्यांत घटस्फोटाची पध्दत रूढ आहे. घटस्फोटासाठी अखनला साडेसहा रुपयांपर्यंत देणगी द्यावी लागते. नंतर अखन तें

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दांडिचिठ्ठी देऊन, सर्व गावकऱ्यांना ही वार्ता लगेच कळवितो. मुलगी प्रथम ऋतुमती झाल्यावर तिला चार दिवस घरातील एका खोलीत ठेवतात. तिचे जेवणखाण वगैरे तिथेच होते. मुलीच्या जातीच्या स्त्रिया आणि एक धोबीण मुलीच्या घरी येतात आणि धोबीण त्या मुलीच्या अंगाला तिळाचे तेल व हळद लावते. हे चार दिवस विटाळ पाळतात.

देवधर्म – हे लोक राम, कृष्ण, शिव, विष्णू, इ. देवांना भजतात. भगवती ही त्यांची आवडती देवी असून, ते दर मंगळवारी व शुक्रवारी तिची पूजा करतात. पूजेच्या वेळी तिला ताडी, मेंढी, कोंबड्या व शहाळी वाहतात.

भगवतीचा कुंभोम भरणी नावाचा एक मोठा उत्सव ते प्रतिवर्षी फाल्गुन महिन्यात करतात. या उत्सवाला मलबार, कोचीन, त्रावणकोर, इ. भागांतून मोठ्या प्रमाणात लोक जमतात. नायर व इतर जातीचे लोक पुढील वर्ष सुखाचे जाण्यासाठी तिला कोंबडे वाहतात. देवीच्या देवळाकडे जाताना यात्रेकरू देवीची खूप निंदा करतात. काही भ्रष्टाचारही करतात. ही निंदा व भ्रष्टाचार देवीला आवडतो, अशी त्यांची समजूत आहे. चेंगनूर येथे मकरेच्या पहिल्या दिवशी (१४ जानेवारी) मकरविलक्कू नावाचा एक मोठा उत्सव होतो. त्या दिवशी रात्री मंदिरात आणि बाहेर दिव्यांची रोषणाई करतात व शृंगारलेल्या अनेक हत्तींना वाजतगाजत मंदिराला प्रदक्षिणा घालायला नेतात.

या लोकांची छौरिमल इयप्पन नावाची एक दुष्ट वनदेवता असून, तिचे ठाणे त्रावणकोरमधील छौरिमल येथे आहे. हे लोक कर्कडकम, तूलम व मकरम (कर्क, तूल, मकर) या संक्रांतींच्या दिवशी पितरांची पूजा करतात.

माघ मासाच्या अखेरीला ते शिवरात्रीचा उत्सव साजरा करतात. नदीत स्नान करून शिवाची पूजा, रात्री शिवपुराणाचे वाचन व जप करणे, असे या उत्सवाचे स्वरूप असते. दुसऱ्या दिवशी ते पितरांना पिंड देतात. याशिवाय ओणम, देसर, इ. सणही ते साजरे करतात.

वारसा – वालनांमध्ये पितृसत्ताक वारसापध्दती आहे. मयताची स्वकष्टार्जित मिळकत असेल, तर ती मयताच्या भावांना व पुत्रांना सारख्या प्रमाणात मिळते. परंतु ती वडिलार्जित असेल तर फक्त मृताच्या भावांनाच मिळते.

वालनांत जातपंचायत आहे. ती जातीमधील सामाजिक तंटे, तसेच फौजदारी व दिवाणी खटले या सर्वांचा निवाडा करते.

मृतकप्रथा – हे मृताला जाळतात किंवा पुरतात. उत्तरक्रियेचा आरंभ दुसऱ्या, पाचव्या किंवा सातव्या दिवशी करतात. क्रिया तेराव्या दिवसापर्यंत चालते. मयताचा मुलगा किंवा पुतण्या पिंड देतो. तेराव्या दिवशी निकटचे नातेवाईक मुंडण करतात. पंधराव्या दिवशी पिंड देऊन तो जलाशयात टाकतात. उत्तरक्रिया चालू असेपर्यंत पुरोहिताला रोज एक भांडेभर तांदूळ व शेवटी दहा रुपये देतात. योग्य वेळी उत्तरक्रिया केली नाही, तर मयताचे भूत कुटुंबातल्या लोकांना त्रास देते, अशी त्यांची समजूत आहे. तसे होऊ नये म्हणून मग ते पुरोहिताकडून संहर होम करतात. त्या वेळी मयताची सोन्याची किंवा रुप्याची प्रतिमा करून ती दक्षिणेसह पुरोहिताला दान देतात. [का. ट्रा. स. इं.]

वालम ब्राह्मणांतील एक पोटजात. उत्तर गुजरातमधील पाटण शहराजवळ वालम नावाचे खेडे आहे. तिथे राहत असल्यामुळे त्यांना वालम ब्राह्मण असे नाव मिळाले. शेती व भिक्षावृत्ती हे यांचे व्यवसाय आहेत. [वि. मुं. रा. प.]

वालर राजस्थानातील एक लोकनृत्य. गणगौरीच्या सणात हे नृत्य होते. यात स्त्री-पुरुष एकत्र नाचतात. नृत्याला सामुदायिक संगीताची साथ असते. अंगसंचालन हे या नृत्याचे वैशिष्टच आहे. घूमर नृत्याशी हे मिळतेजुळते आहे. [रा. जां.]

वालस्राव एक यज्ञीय पात्र. गायीच्या किंवा बैलाच्या शेपटीच्या केसांपासून बनवलेले एक गाळणे. यज्ञात सुरा तयार झाल्यावर यातून ती गाळतात. शेपटीचे केस न मिळाल्यास धात्रीने सुरा गाळतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वाल्मीकी संस्कृत भाषेचा आदिकवी व रामायणाचा कर्ता. या महाकवीच्या चरित्रासंबंधी प्रामाणिक अशी सामग्री उपलब्ध होत नाही. प्राचीन वाङ्मयात एकूण तीन वाल्मीकींचे उल्लेख मिळतात. तैत्तिरीय प्रातिशाख्यात (१.९.४) एक वैयाकरण वाल्मीकी आढळतो; पण तो प्रस्तुत आदिकवीहून निश्चितच भिन्न आहे. महाभारताच्या उद्योगपर्वात एका गरुडवंशी विष्णुभक्त वाल्मीकीचे नाव येते. हाही रामायणकर्त्या वाल्मीकीहून भिन्न मानला पाहिजे. कारण गरुडवंश हा विष्णुभक्त असून, रामायणकर्ता वाल्मीकी शिवभक्त होता.

भार्गव वाल्मीकी – महर्षी वाल्मीकी हा कवी होता, हे महाभारताच्या द्रोणपर्वावरून कळते (११८.४८). महाभारताच्या अन्य पर्वांतही अनेक स्थळीं वाल्मीकीचे उल्लेख येतात. तो भार्गव वंशातला ब्राह्मण होता, ही विशेष गोष्ट रामायणावरूनच कळते. रामायणाच्या बाल व उत्तर या कांडांत च्यवन भार्गवाचा कथाप्रसंग आलेला आहे (बाल. ७०.३२; उत्तर. ६०.९४). मात्र तिथे वाल्मीकीचा च्यवन भार्गवाशी संबंध असल्याचे सूचित होत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाही. पुढच्या काळात तो जोडला गेला. वाल्मीकी स्वतःच त्याबद्दल सांगतो, ते असे –

प्रचेतसोऽहं दशमः पुत्रो राघवनन्दन।

(वा. रा. उत्तर. ९६.१८)

अर्थ – (वाल्मीकी सीतेच्या शुचित्वाची साक्ष देताना रामाला म्हणतो) हे रघुनंदना, मी प्रचेत्याचा दहावा पुत्र आहे.

प्रचेता म्हणजे वरुण आणि भृगू हा वरुणपुत्र होय (श. ब्रा. ११.६.१.१). वरुणाची पत्नी चर्षणी हिला भृगू व वाल्मीकी असे दोन पुत्र झाले, असा उल्लेख भागवतातही आला आहे (६.१८.१) विष्णुपुराण व मत्स्यपुराण यांतही वाल्मीकीला भार्गवच म्हटले आहे.

वाल्मीकी या शब्दाची व्युत्पत्ती वल्मीक म्हणजे वारूळ या शब्दावरून सांगतात. वाल्मीकी म्हणजे वारुळातून बाहेर आलेला, असा त्या शब्दाचा अर्थ आहे. भार्गववंशी च्यवनाच्या बाबतीतही अशीच कथा मिळते. भृगुपुत्र च्यवन तपश्चर्या करीत असता इतका निश्चल होता, की त्याच्या शरीरावर वारूळ वाढले. फक्त त्याचे दोन डोळे तेवढे वारूळातून बाहेर दिसत होते आणि बाकीचे सगळे शरीर झाकून गेले होते.

हीच वारूळ वाढण्याची कथा वाल्मीकीच्या कथेशी पुढे मिश्रित झाली. कारण वाल्मीकी हे त्याचे नाव सार्थ होणे आवश्यक होते. कृत्तिवास रामायणात तर वाल्मीकीला च्यवनाचा पुत्रच मानले आहे.

दस्यू वाल्मीकी – वाल्मीकी हा मुळात दरवडेखोर होता आणि दीर्घकालीन तपस्येनंतर तो रामायणकर्ता कवी झाला, अशीही एक कथापरपरा आहे. मात्र या कथेच्या प्राचीनत्वाविषयी संदेह वाटतो. प्रस्तुत कथेचे पहिले विकसित रूप स्कदपुराणात आढळते. त्या पुराणाची अधिकांश सामग्री इ. स. च्या आठव्या शतकानंतरची आहे आणि त्यात बरेचसे प्रक्षेप झाले आहेत, असे श्री. हाजरा आपल्या पुराणिक रेकॉर्डस् या ग्रंथात म्हणतात. असे असले तरी, महाभारताच्या अनुशासनपर्वात वाल्मीकी डाकू दरवडेखोर असल्याचा आभास मिळतो, तो लक्षात घ्यावा लागतो. तिथले ते श्लोक असे –

वाल्मीकिश्चाह भगवान्युधिष्ठिरमिदं वचः।
विवादे साग्निमुनिभिर्ब्रह्मघ्नो वै भवानिति ॥
उक्त क्षणेन चाविष्टस्तेनाधर्मेण भारत।
सोऽहमीशानमनघममोघं शरणं गतः ॥
मुक्तश्चास्मि ततः पापैस्ततो दुःखविनाशनः।
आह मां त्रिपुरघ्नो वै यशस्तेऽग्र्यं भविष्यति ॥

(म. भा. अनु. १८.८.१०)

अर्थ – (भगवान वाल्मीकीने युधिष्ठिराला ही माहिती सांगितली.) एकदा कोणत्या तरी वादविवादात अग्निहोत्री मुनींनी मला ब्रह्मघ्न (ब्रह्महत्या करणारा) म्हटले. तेवढ्या उक्तीनेच मी पापी बनलो. मग त्या पापातून मुक्त होण्यासाठी मी शिवाला शरण गेलो आणि त्याच्या कृपेने पापमुक्त झालो. नंतर दुःखनिवारक व त्रिपुरांतक शिव मला म्हणाला, की 'तुझे यश श्रेष्ठ होईल.'

वरील वाल्मीकीच्याच उक्तीवरून पुढे त्याला ब्रह्मघातकी दस्यू मानण्याकडे कवींचा कल झुकला आणि त्यांनी तशा प्रकारच्या कथा निर्माण केल्या, असे म्हणता येते.

वाल्मीकीविषयीच्या अशा चार कथा आढळतात, त्या अशा–

(१) एक व्याध होता. रामनामाच्या जपाने त्याला वर मिळाला, की 'तू पुढच्या जन्मी वल्मीक कुलामध्ये जन्म घेशील आणि वाल्मीकी या नावाने कीर्तिवंत होशील.' कृष्ण नामक एका तपोधनाच्या शरीरावर वारूळ जमले आणि त्यामुळे त्याचे नाव वल्मीक पडले. वरील व्याध त्या वल्मीकाचाच पुत्र म्हणून जन्मला व त्याला वाल्मीकी हे नाव मिळाले. पुढे तो दिव्य रामकथा रचण्याच्या कामी समर्थ झाला (पद्मपुराण वैष्णवखंड).

(२) अग्निशर्मा नामक एक डाकू होता. एके दिवशी त्याला सप्तर्षी भेटले. तो त्यांना मारण्यासाठी धावून गेला. ऋषींनी त्याला थांबवून म्हटले. 'तू हे पाप करतोस आणि या पापाने कुटुंबाचा निर्वाह करतोस. तेव्हा तू आता घरी जा आणि कुटुंबातल्या माणसांना विचार, की 'तुम्ही माझ्या पापाचे वाटेकरी आहात का ?'

अग्निशर्मा घरी विचारायला गेला. सर्व कुटुंबियांनी त्याच्या पापात वाटेकरी होण्याचे नाकारले. त्यानंतर अग्निशर्मा पश्चात्तप्त होऊन सप्तर्षींच्या जवळ आला. सप्तर्षींनी त्याला एक मंत्र दिला व 'इथेच बसून या मंत्राचा अखंड जप कर' असे सांगितले.

अग्निशर्मा तसा बसला व तप करू लागला. अशी तेरा वर्षे गेली. त्यानंतर सप्तर्षी पुनः तिथे आले. पाहतात तो अग्निशर्म्याच्या अंगावर वारूळ वाढले आहे. त्यांनी मग त्याला वारुळातून बाहेर काढले, वाल्मीकी असे त्याचे नाव ठेवले व त्याला रामायण लिहिण्याचा आदेश दिला. (अवंतिखंड)

(३) लोहजंघ नामक एक ब्राह्मण होता. तो मातृ-पितृभक्त होता. एका वर्षी दुष्काळ पडला आणि त्याला कुटुंबपोषणासाठी दरोडेखोरी पत्करावी लागली. त्याला सप्तर्षी भेटले. त्यांच्या आज्ञेने तो घरी गेल्यावर त्याच्या दरोडेखोरीच्या पापात सहभागी व्हायला कोणीही तयार झाले नाही. तो पुनश्च सप्तर्षींकडे येताच त्यांनी त्याला जाटघोट नावाचा मंत्र उपदेशिला. खरे म्हणजे तो दुष्ट मंत्र होता; पण तरीही त्याच्या ... लोहजंघाला सिद्धी प्राप्त झाली. (पुढचा वृत्तांत वरील कथे- प्रमाणेच) (नागरखंड).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(४) शमीमुख नावाच्या ब्राह्मणाचा वैशाख नावाचा पुत्र होता. तो चोरीमारी करून कुटुंबपोषण करी. (पुढील कथा वरील क्रमांक दोनच्या कथेप्रमाणे)

वरील सर्व कथांना अंतिम व प्रचलित रूप अध्यात्मरामायणात प्राप्त झाले. तिथे रामनामाच्या माहात्म्याचे वर्णन करताना वाल्मीकीने स्वतःच आपली कथा रामाला निवेदली, ती अशी— मी जातीने ब्राह्मण. पण किरात लोकांमध्ये वाढलो व शूद्राचारात रत झालो. एका शूद्र स्त्रीपासून मला पुष्कळ पुत्र झाले. मी सदैव धनुष्यबाण घेऊन वाटमारी करीत असे. एके दिवशी मला सप्तर्षी भेटले. त्यांची वस्त्र-पात्रे लुबाडून घ्यावी, म्हणून मी त्यांना आडवा झालो. ऋषींनी मला सांगितले, की ' माझ्या पापात तुम्ही सहभागी आहा का, असे घरी जाऊन बायकामुलांना विचार. ' मी तसे केले. घरच्यांनी तुझे पाप तुझ्याकडे, म्हणून आपले हात झटकले. मला पश्चात्ताप झाला. मी सप्तर्षींना शरण गेलो. त्यांनी राम या नावाची अक्षरे उलटी म्हणजे मरा अशी करून मला त्या मंत्राचा जप करायला सांगितले. मी ' मरा मरा ' असे जपू लागलो; पण ते ' राम राम 'च ठरले. एका जागी उभे राहून तो मंत्र जपीत असता माझ्या देहावर वारूळ वाढले. अशी कित्येक युगे गेली. नंतर तेच ऋषी तिथे परत आले. त्यांनी मला वारुळातून बाहेर येण्याचा आदेश दिला. वल्मीकातून निघाल्यामुळे तू आता वाल्मीकी नावाने दुसरा जन्म घेतला आहेस ' असे ते मला म्हणाले (अध्यात्म. ६.४२.८८).

इसवीसनपूर्व पहिल्या शतकापासून वाल्मीकीला रामायणातील पात्रांशी समकालीन मानले गेले आहे. उत्तरकांडाच्या रचनाकाळात अयोध्येच्या राजवंशाशी वाल्मीकीचा घनिष्ठ संबंध स्थापित केला गेला. तो दशरथाचा मित्र ठरला. परित्यक्ता सीता त्याच्याच आश्रमात प्रसूत होऊन, तिला लव व कुश नामक दोन पुत्र झाले. आपण रचलेले रामायण वाल्मीकीने त्यांना शिकवले. रामाच्या अश्वमेधप्रसंगी वाल्मीकीने सीतेच्या सतीत्वाची ग्वाही दिली. कालांतराने तो विष्णूचा अवतारही मानला जाऊ लागला.

आदिकवी वाल्मीकी – वाल्मीकीला आदिकवी आणि त्याच्या रामायणाला आदिकाव्य म्हणतात. कवी आणि त्याचे काव्य या दोन्हींच्या विशुद्ध रूपांची कसोटी म्हणजे वाल्मीकीचे रामायण होय. क्रौंचमिथुनातील एकाचा निषादाने वध केलेला पाहून वाल्मीकीला जो शोक झाला, तोच श्लोकत्वाला म्हणजे काव्यरूपाला प्राप्त झाला, असे अनेक कवींनी म्हटले आहे. वाल्मीकीचे करुणामय अंतःकरण रामायणात जागोजागी पाझरताना दिसते. हा ग्रंथ म्हणजे कल्पक उपमा आणि रम्य उत्प्रेक्षा यांचा भव्य प्रासाद आहे. या बाह्य अलंकारांच्या आवरणातूनही कवीचे रसमय अंतःकरण स्पष्टपणे प्रत्ययाला येते. पुढच्या साहित्यकारांनी महाकाव्याची जी लक्षणे सांगितली, ती त्यांनी रामायणावरूनच तयार केली आहेत. आनंदवर्धन म्हणतो, की करुणरस हा रामायणाचा मुख्य रस होय. क्रौंचवधाच्या प्रसंगापासून सीता पृथ्वीच्या उदरात गडप होण्यापर्यंत हे सर्व महाकाव्य करुणरसाने ओथंबलेले आहे. आदर्श पिता, आदर्श माता, आदर्श बंधू, आदर्श पती, असे अनेक आदर्श रामायणात उदात्तपणे उभे केले आहेत. दाशरथी राम हा या महाकाव्याचा प्रमुख नायक असून, त्याच्या अनेक गुणविशेषांवर वाल्मीकीने आपल्या प्रतिभेचे अमृत सिंचन केले आहे. या सर्व गुणांमुळे रामायण हे भारतीय संस्कृतीचे महन्मंगल प्रतीकच वाटते. रामायण हा भारताचा राष्ट्रीय ग्रंथ ठरला आहे.

विष्णुधर्मोत्तर पुराणाच्या प्रथम खंडात म्हटले आहे, की त्रेतायुगात विष्णू वाल्मीकीच्या रूपाने जन्म घेऊन रामायण लिहील ! त्याच पुराणाच्या तिसऱ्या खंडात म्हटले आहे, की ज्याला विद्येची कामना असेल, त्याने वाल्मीकीची पूजा करावी. पूजेसाठी वाल्मीकीची मूर्ती कशी तयार करावी, तेही तिथेच सांगितले आहे. तो श्लोक असा –

गौरस्तु कार्यो वाल्मीकिर्जरामण्डलदुर्दशः ।
तपस्यभिरतः शान्तो न कृशो न च पीवरः ॥
(विष्णुधर्मोत्तर. ३.८५)

अर्थ – गौर, वार्धक्याने ग्रस्त, तपश्चर्येत निमग्न, शांत, कृशही नव्हे आणि स्थूलही नव्हे अशी वाल्मीकीची मूर्ती करावी.

पंजाबात वाल्मीकी ही भंगी लोकांची देवता आहे. यासंबंधी एक कथा प्रचलित आहे, ती अशी– जोवर नागरिक लोक भंग्यांवर नजर टाकायला इन्कार करीत होते, तोवर वाल्मीकीचे प्रेत प्रतिदिनी वाराणसीमध्ये लोकांना दिसत होते. [रामकथा; मं. गु. अ. ग्रं.; कवि और काव्य; वा. रा. को.]

वाल्मीकीचा आश्रम

वाल्मीकिरामायणातले सर्व उतारे एकत्र केल्यास वाल्मीकीचा आश्रम कुठे होता, या विषयी माहिती मिळते ती अशी –

(१) वाल्मीकीचा आश्रम तमसातीरी होता.

(२) त्याच्या जवळूनच गंगा नदी वाहत होती.

(३) तो गंगेच्या दक्षिण तीरापासून जवळच होता. कारण तिथे जायला लक्ष्मण व सीता यांना गंगा पार करावी लागली.

(४) तो अयोध्येपासून फार दूर नव्हता. कारण तिथे जायला लक्ष्मण व सीता यांना दोन अडीच दिवस लागले.

वरील सर्व उल्लेखांची छाननी करून म. म. मिराशी यांनी त्याचे स्थान निश्चित करण्याचा प्रयत्न केला आहे, त्याचा सारांश असा –

प्रचलित समजूत अशी, की वाल्मीकीचा आश्रम उत्तर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रदेशात कानपूरपासून चौदा मैलांवर असलेल्या बिठूर येथे होता. बिठूर हे गाव गंगेच्या काठी आहे खरे; पण त्याच्या जवळून तमसा नदी वाहत नाही. शिवाय अयोध्येहून तिथे रथाने दोन–अडीच दिवसांत पोचणे शक्य होणार नाही. त्यामळे वाल्मीकीच्या आश्रमाची ती जागा नव्हे. तमसातीर ही वाल्मीकीच्या आश्रमाची मोठी खूण होय. पण ही तमसा कोणती त्याचाही विचार व्हायला हवा. उत्तर तमसा, पूर्व तमसा आणि दक्षिण तमसा अशा तीन तमसा उत्तर भारतात आहेत. त्यांपैकी उत्तर तमसा ही यमुनेच्या उगमाच्या उत्तरेस उगम पावून पुढे यमुनेलाच मिळते. ती गंगेला मिळत नसल्यामुळे वाल्मीकीचा आश्रम तिच्या तीरावर असणे शक्य नाही. पूर्व तमसा ही फैजाबादच्या पश्चिमेस उगम पावून बलिया नगराच्या पश्चिमेस दोन मैलांवर गंगेला उत्तरेकडून मिळते. अयोध्येपासून चौदा मैलांवर वाहत असल्यामुळे वनवासाला जाताना रामाला ती प्रथम लागली. हिच्याही काठी वाल्मीकीचा आश्रम नव्हता; कारण तिथे जाण्यासाठी गंगा पार करण्याची आवश्यकता नाही.

दक्षिण तमसेला मात्र रामायणातील वर्णन पूर्णपणे लागू पडते. ही तमसा नागोदच्या दक्षिणेस पूर्वीच्या महियार संस्थानात उगम पावून रेवा जिल्ह्याच्या उत्तर भागातून वाहत जाऊन अलाहाबादच्या आग्नेयीस १८ मैलांवर दक्षिणेकडून गंगेला मिळते. याच तमसेच्या काठी वाल्मीकीचा आश्रम होता. म्हणून लक्ष्मणाने सीतेसह गंगा उतरून तिला सांगितले, की इथून जवळच वाल्मीकीचा आश्रम आहे. तिथे तू संन्यस्तवृत्तीने राहा. भवभूतीच्या उत्तर–रामचरितातील शेवटच्या अंकात वाल्मीकीच्या आश्रमात गर्भनाटकाचा प्रवेश घातला आहे. त्या नाटकाकरिता घातलेला मंडप गंगातीरी होता, असे त्याने दाखवले आहे. गर्भनाटक संपल्यावर गंगेच्या पाण्यात खळखळ होऊन तिच्यातून गंगा आणि पृथ्वी सीतेसह वर आल्या, असे भवभूतीने दाखवले आहे. त्यांवरूनही वाल्मीकीचा आश्रम गंगा व तमसा या दोन्ही नद्यांपासून जवळ होता; किंबहुना तो या दोन्ही नद्यांच्या संगमाजवळ प्रयागच्या आग्नेयीस १८ मैलांवर होता, असे सिद्ध होते. [सं. मु. ६]

वावटळ धुळीचे वादळ ही एक नैसर्गिक उत्पाती घटना असली, तरी लोकांच्या मनात वावटळीविषयी काही भ्रामक समजुती निर्माण झाल्या आहेत. त्यांपैकी काही अशा –

वावटळ ही आसुरी शक्ती आहे. तिच्या भीतीने भूतपिशाचे पळून जातात. काही भुते वावटळीबरोबरच गारांचा पाऊसही पाडतात. लोक लोखंडी तवा वाजवून त्यांना पळवून लावतात. काही ठिकाणी अविवाहित मुलीला तिच्या हातो लोखंडी तवा देऊन वादळाच्या वेळी बाहेर पाठवतात. काही ठिकाणी गारांचे वादळ सुरू झाले, की इस्माइल जोगी आणि नोना चमारिन या वादळाच्या देवतांची प्रार्थना करतात किंवा शिवमंदिरात जाऊन जोरात घंटा वाजवतात. खरवार लोकांत एखाद्याच्या अंगणात पिठाची गिरणी असल्यास त्या घरावर लाकडी खुंटी टाकतात. आकाशातून पडणारी गार जमिनीवर आपटण्यापूर्वी एखाद्याने झेलली व कात्रीने तिचे दोन तुकडे केले, तर गारांचा पाऊस थांबतो, अशी मुलतानमध्ये समजूत आहे. पंजाबात फेरू हा धुळीच्या वादळाचा देव समजला जातो. संत राहम हा असाच एक वादळाचा देव आहे. कोरवा स्त्रिया वादळाच्या वेळी घराच्या छपरात कुंचा कोंबून ठेवतात. घासी लोकांत अशा वेळी स्त्रियांच्या करवी लोखंडी पळी किंवा लाकडी चमचा घराच्या छपरात घुसवतात. पंका लोक बायकांना उखळी व जात्याची खुंटी छपरातून अंगणात टाकायला लावतात. [पॉ. रि. फो. नॉ. इ.]

वाविलाल कोचन्ना (इ. स. च्या १३व्या शतकाचे अंतर) तेलंगणातला एक ज्योतिषी. याने एक करणग्रंथ सूर्यसिद्धान्ताच्या आधारावर लिहिला आहे. त्याने त्यात फाल्गुन अमावास्या, गुरुवार शके १२१९ चा क्षेपक दिला आहे. एखाद्या ग्रंथात ग्रहगणना सुरू करताना सूर्य, चंद्र, इ. ग्रहांची जी स्थिती असते, तिला क्षेपक म्हणतात. हा क्षेपक आपल्या ग्रहगतीत मिळवला, की त्या त्या काळच्या ग्रहस्थितीचे ज्ञान होते. या ग्रंथात कोणताही बीजसंस्कार दिलेला नाही. एका काळी कोचन्नाच्या या करणग्रंथानुसार तमिळनाडू प्रदेशात पंचांगे बनवली जात होती. [भा. ज्यो. इ.]

वाशी एक वैदिक शस्त्र. हे मरुतांचे शस्त्र असल्याचा आणि ते त्वष्टचानेही धारण केल्याचा उल्लेख ऋग्वेदात आहे (१.३७.२; ८.२९.३). हे शस्त्र तांब्याचे होते. अथर्ववेदात सुताराची सुरी असा त्याचा अर्थ आहे.

सायणाचार्यांच्या मते या शब्दाचा अर्थ घुबड असा आहे.

वाशीम (सं. वत्सगुल्म) विदर्भाच्या अकोला जिल्ह्यातले एक गाव. इ. स.च्या चौथ्या व पाचव्या शतकांत वाकाटक राजघराण्याच्या एका शाखेची राजधानी इथे होती. पद्मपुराणात एक पुण्यक्षेत्र म्हणून याची प्रशंसा केली आहे. इ. स.च्या दहाव्या शतकातल्या राजशेखर कवीने याला विद्या, कला व संस्कृतीचे केंद्र म्हटले आहे. भारतीय ज्योतिषशास्त्राने गृहीत धरलेल्या भूमध्यरेषेचा मध्यबिंदू म्हणूनही याचे महत्त्व आहे.

वत्सगुल्म या नावाऐवजी वाशीम हे त्याचे नाव मुसलमान...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजवटीपासून रूढ झाले असावे. वत्सगुल्ममाहात्म्य या संस्कृत ग्रंथात या नगरातील १०८ तीर्थस्थानांचे व देवतांचे वर्णन आहे. त्यांपैकी काही क्षेत्रे व स्थाने अशी —

करुणेश्वर — या ठिकाणी असलेल्या वत्स मुनीच्या आश्रमात शिव करुणेश्वर या नावाने राहिला आहे. इथे महाशिवरात्र व वैकुंठचतुर्दशी या दिवशीं मोठा उत्सव होतो.

पद्मेश्वर — पद्मतीर्थ या नावाचा एक जलाशय या ठिकाणी आहे. त्याच्या तीरावर विष्णूने शिवलिंगाची स्थापना केली व तो शिव पद्मेश्वर झाला. प्राचीन काळापासून पद्मतीर्थात पितरांच्या अस्थी विसर्जित केल्या जातात. पद्मतीर्थाचा उत्सव कार्तिक शु. एकादशीला होतो.

बालाजीसंस्थान — या मंदिरात चतुर्भुज जनार्दनमूर्ती प्रतिष्ठित आहे. ही जनार्दनमूर्तीच बालाजी या नावाने ओळखली जाते. बालाजीचे हे मंदिर व शेजारचे तळे नागपूरकर भोसल्यांचा सेनापती भवानी काळू याने बांधले.

इतिहासकाळात इथे निजामाचे सैन्य व टांकसाळ होती. [वि.मु.रा.प.; श्री. शं. गो. डबीर—पुरुषार्थ, जून—जुलै, १९६३]

वासकसज्जा एक नायिकाभेद. हिची दोन लक्षणे दिलेली आहेत, ती अशी —

(१) भाविन्यागमने भर्तुरात्मानं च गृहं च या ।
अलङ्करोति हर्षेण सा स्याद्वासकसज्जिका ।।

अर्थ — आपला भर्ता आज घरी येणार आहे हे समजल्यावर जी हर्षभराने स्वतःचा साजशृंगार करते व आपले घरही सजवते, तिला वासकसज्जा म्हणावे.

(२) अद्य मे प्रियवासर इति निश्चित्य
या सुरतसामग्रीं सज्जीकरोति ।

अर्थ — आज माझा प्रियकर येण्याचा किंवा माझे प्रिय करण्याचा वार आहे, असे निश्चित समजून, जी सुरताची साधनसामग्री जुळवून सिद्ध ठेवते, ती वासकसज्जा होय.

अमरुशतकातला एक श्लोक वासकसज्जेचे उदाहरण म्हणून दिला जातो, तो असा —

दीर्घा वन्दनमालिका विरचिता दृष्ट्यैव नेन्दीवरैः ।
पुष्पाणां प्रकरः स्मितेन रचितो नो कुन्दजात्यादिभिः ।
दत्तः स्वेदमुचा पयोधरभरेणार्घो न कुम्भाम्भसा ।
स्वैरेवावयवैः प्रियस्य विशतस्तन्व्या कृतं मङ्गलम् ।।

अर्थ — प्रियकर मंदिरात येत आहे असे दिसताच वासकसज्जेने दारावर कमळांचे तोरण न बांधता दृष्टीचेच तोरण बांधले. कुंद, जाई, इ. फुलांनी पुष्पांचा गुच्छ न बनवता आपल्या स्मिताचाच गुच्छ त्याला दिला. कलशातल्या पाण्याने त्याला अर्घ्य न देता घामेजलेल्या स्तनांच्या भाराने ते दिले. अशा प्रकारे स्वतःच्या अवयवांनीच त्या तन्वंगीने प्रियकराचे मंगल केले.

वासकसज्जा नायिका

सर्व प्रथम भरताने वासकसज्जा ही नायिका कल्पिली व मग पुढच्या रसिक शास्त्रज्ञांनी तिला सजवले. विद्यापती, सूरदास, इ. भक्तकवींनी कृष्णाच्या संदर्भात राधेला वासकसज्जा कल्पून तिच्या साजशृंगारांचे व मनोभावांचे चित्रण केले आहे. [हिं. सा. को.; अमरुशतकम्; श. क.]

वासधौती योगमार्गातल्या षट्कर्मांतील एक कर्म. याचा विधी असा — चार बोटे रुंद व पंधरा हात लांब अशी तलम वस्त्रपट्टी घेऊन, ती एका टोकापासून हळूहळू गिळायला सुरुवात करावी. दुसरे टोक चिमटीत घट्ट पकडून ठेवावे. गिळता गिळता वस्त्रपट्टीचा थोडासाच भाग शिल्लक उरल्यावर बाहेरचे टोक ओढून ती पट्टी हळूहळू बाहेर काढावी. या क्रियेमुळे कास, श्वास, प्लीहा, इ. अनेक प्रकारचे कफदोप नाहीसे होतात. मात्र ही वासधौती तज्ञ गुरूच्या मार्गदर्शनाखाली करणे आवश्यक आहे. अन्यथा धोका संभवतो. [योगविद्या]

वासना तत्त्वचिंतनात वारंवार आढळणारा एक शब्द. हिची काही लक्षणे अशी —

(१) अनुभवजन्या स्मृतेर्हेतुः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

अर्थ – अनुभवातून जन्म पावणारी व स्मृतीला हेतुभूत असणारी ती वासना होय.

(२) सुषुप्त्यवस्थागता धीसूक्ष्मावस्था ।

अर्थ – सुषुप्ती अवस्थेत असणारी बुद्धीची सूक्ष्म अवस्था.

(३) दृढभावनया त्यक्तपूर्वापरविचारणम् ।
यदादानं पदार्थस्य वासना सा प्रकीर्तिता ॥

अर्थ – दृढ श्रद्धेमुळे पूर्वापर विचार न करता आपला देश, भाषा, वेष व धर्म या सर्वच गोष्टी उत्तम आहेत, अशी अभिनिवेशाची भावना जिच्यामुळे होते, ती वासना होय.

वासना मलिन व शुद्ध अशा दोन प्रकारची असते. मलिन वासना ही ब्रह्माच्या स्वरूपाला आच्छादित करणाऱ्या अज्ञानामुळे अतिस्थूल व घोर अहंकाराने युक्त असते आणि ती मनुष्याच्या पुनर्जन्माला कारणीभूत होते. शुद्ध वासना पुनर्जन्म टाळते.

वासना ही आत्म्याच्या यथार्थ ज्ञानाला बाधक असते. तिला शुभ वासनेने नष्ट करावी, असे सांगितले आहे. मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार शुभवासना होत. सुखी प्राणी पाहून हे माझेच आहेत, अशी भावना करणे ही मैत्री. दुःखी प्राणी पाहून त्यांचे ते दुःख निवारण व्हावे, असे वाटणे ही करुणा. पुण्यवंतांच्या दर्शनाने प्रसन्न होणे ही मुदिता व पापी पुरुषाविषयी उदासीनता उत्पन्न होणे ही उपेक्षा. ज्याच्या जवळ या शुभ वासना असतात, त्याच्या राग, द्वेष, असूया, मद, मत्सर, इ. मलिन वासना नष्ट होतात आणि त्यांचा नाश झाला, की चित्त शुद्ध होते.

प्रा. के. वि. बेलसरे यांनी आपल्या अध्यात्मदर्शन या ग्रंथात वासनेविषयी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा –

वासना या सामान्य मनुष्याच्या मनातील मुख्य घटक होत. माणसाला ज्या अनेक वासना असतात, त्यांची तृप्ती करण्यामध्ये त्याचा जीवनाचा रस साठवलेला असतो. प्रापंचिक जीवनासाठी जितका आवश्यक, तितकाच परमार्थामध्ये प्रगती होण्यासाठीही वासनांचा विचार आवश्यक आहे. आपली परिस्थिती जशी असावी तशी नाही, अशी अपूर्णतेची जाणीव उत्पन्न होऊन आपल्याला काहीतरी हवे आहे, अशा प्रकारची अस्पष्ट भावना निर्माण होणे, या गोष्टीला वासना असे म्हणतात. वासनेत स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव आणि तिच्यापासून निर्माण होणारी अस्वस्थता या दोन गोष्टी प्रामुख्याने असतात. वासना ही मूळ स्वरूपात क्वचितच अनुभवाला येते. कारण ती सूक्ष्म असून, मनाच्या खालच्या थरात राहते. त्यामुळे वासना ती ही असे म्हणून तिचा निर्देश करता येत नाही. परंतु वासना उत्पन्न झाल्यावर ती सूक्ष्म अवस्थेत फार काळ राहू शकत नाही. मनुष्याच्या मनामध्ये ती वृत्तिरूपाने बाहेर पडते.

म्हणून वासनेचा विचार करताना मनुष्याच्या वृत्तींचाच विचार करावा लागतो. वृत्ती हा शब्द वृत्, वर्त् = हालचाल करणे, कर्म करणे या धातूपासून बनलेला आहे. वृत्ती म्हणजे वासनेचे व्यक्त स्वरूप होय. वासना वृत्तिरूपाने प्रकट झाल्यावर तिच्यामध्ये बुद्धीचा आणि कर्मवृत्तीचा अंश निर्माण होतो. वासनातृप्तीचा मार्ग निश्चित करण्याचे काम बुद्धी करते. बहुतेक प्रसंगी वृत्ती उत्पन्न झाल्यावर बुद्धीच मनाचे क्षेत्र व्यापून टाकते आणि मन त्या वासनेवर चिंतन करीत राहते. अशा प्रकारच्या चिंतनाने वासनेला दृढपणा येतो. या दृढपणालाच आसक्ती असे म्हणतात. वासना आसक्तीच्या अवस्थेत गेली की, तिच्यातून ती तृप्त करण्याची प्रवृत्ती निर्माण होते. या प्रवृत्तीलाच ऊर्मी असे म्हणतात. ऊर्मी म्हणजे मनाची विशिष्ट मार्गाने वाहणारी शक्ती होय. तिचा ओघ आवरण्यासाठी मानसिक श्रम करावे लागतात. भल्याभल्यांनाही ऊर्मी आवरण्याचे काम कठिण जाते आणि तिचे पर्यवसान कृतीत घडते. सारांश वासनेतून वृत्ती, वृत्तीतून ऊर्मी आणि ऊर्मीचे पर्यवसान कृती अशी ही वासनेची परंपरा आहे.

परमार्थाचे अंतिम उद्दिष्ट मोक्षप्राप्ती हे असते आणि त्यासाठी वासनेचा क्षय करणे हे काम आधी करावे लागते. किंबहुना 'वासनाप्रक्षयो मोक्षः' = वासनांचा क्षय म्हणजेच मोक्ष, असे म्हटले आहे. [वै. शां. अ. म.; अध्यात्मदर्शन]

वासक्षेप केशर घालून उगाळलेल्या चंदनाच्या गंधाचे सावलीत वाळवून तयार केलेले चूर्ण. गुजरातेतील जैनांच्या लग्नात याचा एक विधी पुढीलप्रमाणे करतात – सप्तपदी झाल्यावर वधू-वरांना शेजारी बसवून उपाध्याय दर्भ, दूर्वा, अक्षत व वरील चंदनाचे चूर्ण 'येनाऽनुष्ठानेन॰' या मंत्राने वधू-वरांच्या मस्तकावर टाकतो. [ल. वि. मो.]

वासुकिनाथ एक शैव क्षेत्र. हे क्षेत्र बिहारमध्ये वैद्यनाथ (देवघर) पासून २८ मैलांवर ईशान्येस आहे. काही लोक यालाच बारा ज्योतिर्लिंगांपैकी नागेश हे ज्योतिर्लिंग मानतात. तिकडील लोकांच्या मते 'नागेशं दारुकावने' यातील दारुकावन म्हणजे या क्षेत्राच्या जवळ असलेले दुमका हे गाव होय. त्यावरून वासुकिनाथ म्हणजेच नागेश असे ते मानतात.

या क्षेत्राची पुराणातली कथा अशी – सुप्रिय नामक एक शिवभक्त वैश्य होता. तो तप करीत असता, दारुक नामक राक्षस त्याला मारण्यासाठी धावला. त्याच क्षणी शंकराने प्रकट होऊन दारुकाला मारले. मग सुप्रियाच्या प्रार्थनेवरून तो ज्योतिर्लिंगरूपात त्या ठिकाणी राहिला.

कालांतराने हे ज्योतिर्लिंग घोर अरण्यात लुप्त झाले. लोकांचे तिकडे जाणे-येणे बंद झाले. एका वर्षी दुष्काळ पडला.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लोक कंदमुळे गोळा करण्यासाठी दारुकावनात गेले. त्यांत वासू नावाचा एक मनुष्य होता. तो कुदळीने खणत असता, तिचा घाव ज्योतिर्लिंगाला लागला आणि त्यातून रक्तप्रवाह सुरू झाला. वासूला भीती वाटली; पण शिवाने आकाशवाणीच्या द्वारे त्याला 'भिऊ नको' म्हटले. वासू त्या दिवसापासून त्या लिंगाची पूजा करीत तिथेच राहिला. पुढे लोक त्याच्या नावावरून त्या लिंगाला वासुकिनाथ म्हणू लागले.

या क्षेत्राच्या ईशान्येस वासुकी पर्वत आहे. समुद्रमंथनानंतर देवांनी वासुकी नागाला या पर्वतावर सोडून दिले. हा वासुकी या शिवलिंगाची आराधना करू लागल्यामुळे त्याला नागेश, नागेश्वर किंवा वासुकिनाथ असे म्हणू लागले. ही कथा तिकडील प्रदेशात सांगितली जाते. [कल्याण-तीर्थांक]

वासुकी (१) नागांचा एक राजा. कश्यप व कद्रू यांच्या अनेक पुत्रांपैकी एक. काहींच्या मते अधोदिशेचा स्वामी. त्याचा वर्ण नील असून, कूर्म हे त्याचे वाहन आहे. त्याच्या पत्नीचे नाव शतशीर्षा असून, काहींच्या मते ते पातालवासिनी असे आहे. हा तक्षकाचा मित्र होता. समुद्रमंथनाच्या प्रसंगी देवासुरांनी याची दोरी केली होती. नागधन्वातीर्थ हे याचे निवासस्थान होय या स्थानी देवांनी त्याला नागराजपदाचा अभिषेक केला. धृतराष्ट्र नावाच्या नागाने याला विष्णुपुराण सांगितले आणि ते पुढे त्याने वत्सनागाला कथन केले. हा शिवाचा अनन्य भक्त असून, शिवाचा देह शर्मविण्यासाठी त्याच्या शरीरावरच राहत असे. शिवाने त्रिपुरदाह केला, त्या प्रसंगी वासुकी हा शिवधनुष्याची प्रत्यंचा बनला होता. जनमेजयाच्या सर्पसत्रात याची पंधरा कुळे जळून भस्म झाली. आस्तिक मुनी याचा भाचा होता. उरलेली नागकुळे त्याने वाचवली. [प्रा. च. को.]

(२) आकाशातला एक तारकापुंज. आश्लेषापंचक ही याची फणा असून, तो कर्क, सिंह, कन्या आणि तूळ या चार राशींच्या अंगाखालून वळणावळणांनी पसरला आहे. भचक्राच्या ३६० अंशांपैकी १२० अंश एवढी जागा या वासुकीपुंजाने व्यापली आहे. याची शेपटी चित्रेच्या दक्षिणेस चमकणाऱ्या नरतुरंगाच्या तोंडापुढे वळून संपली आहे. एक दुसऱ्या प्रतीची तारका वगळता या पुंजातल्या सर्व तारका चौथ्या प्रतीच्या आहेत. [नक्षत्रलोक]

वासुदेव एक भिक्षेकरी जात. या लोकांना घुकोट असेही एक नाव आहे. हे लोक दक्षिण महाराष्ट्रात सर्वत्र आढळतात. एका ब्राह्मण ज्योतिष्याला कुणबी स्त्रीपासून झालेल्या सहदेव नावाच्या मुलापासून आपली उत्पत्ती झाली असल्याचे हे सांगतात. ते मराठा कुणब्यांप्रमाणे दिसतात व त्यांचे रीतिरिवाजही त्यांच्यासारखेच आहेत. गावोगाव हिंडून भिक्षा मागून हे आपला उदरनिर्वाह करतात. मुलगा भिक्षा मागण्याजोगा झाला, की त्याला भिक्षा मागण्याची दीक्षा देतात. काही वासुदेव शेतीही करतात.

दीक्षा देण्याचा समारंभ असा– एखादा शुभ दिवस पाहून उपाध्याला घरी बोलावतात. मग उपाध्या मुलाला वासुदेवाचा वेष परिधान करायला सांगतो आणि मंत्रोच्चारपूर्वक त्याच्या कपाळी चंदनाचा टिळा लावतो. एवढे झाले, की दीक्षाविधी संपतो. मग उपाध्याला विडा-दक्षिणा देऊन निरोप देतात आणि सर्व ज्ञातिबांधवांसह भोजन करतात.

डोक्यावर मोरपिसांची उंच निमुळती होत गेलेली मुकुटाकार टोपी, अंगात घोळदार अंगरखा, गळ्यातून पुढे दोन्ही बाजूंना

वासुदेव

सोडलेला शेला, काखेत झोळी, सुरवार व कंबरेला खोचलेला पावा, पायांत चाळ व हातांत चिपळ्या आणि टाळ असा वासुदेवाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वेष असतो. वासुदेव अगदी सकाळी लोकांच्या दारोदार येऊन गाणी म्हणतो, त्याला टाळ चिपळ्यांची साथ देतो आणि मधूनच पावा वाजवीत भिक्षा मागतो. वासुदेवाचे एक गाणे असे –

गोविंदा रामा हो, गोपाळा रामा जी जी ।। ध्रु. ।।
श्रीकृष्ण सोंगाड्याचे. आम्ही बाळ बागडे जी जी ।
आनंदे गाऊं नाचूं, परी पाहू त्याकडे जी जी ।।
इंद्रियें गाई अमुच्या, जाताती चोहीकडे जी जी ।
अनुहात वेणुनादें, बळी आपणांकडे जी जी ।।१।।
गोविंदमूर्तीभवतें, गोपाळ शोभती जी जी ।
सोहं-सोहं हुंबरीनें, करीं टाळी वाजविती जी जी ।।
सत्कीर्ति-चामरें हो, हरिवरी ढाळिती जी जी ।
श्रीकृष्णमूर्तीवरुनी, देहलोण उतरिती जी जी ।।२।।

भिक्षा मागताना तो आपल्याला कशाची कसली भिक्षा हवी, त्याची यादी गाण्यातूनच सादर करतो –

तुम्ही आयाबायांनो द्या वासुदेवणीला चोळी
अहो लहान मुलींच्या द्या अंगींची काचोळी
घडी पाटावें लुगडीं तुम्ही द्यावीं याच वेळी
अहो पाटीलबाबा हो द्या शेला कृपा करून
डोईचे मुंडासे द्या आपुले हातें करून
आणि शाल-दुशाला टाकाव्या अंगावरून

वासुदेवाच्या या आवाहनाला प्रतिसाद म्हणून लोक जेव्हा त्याला काहीतरी दान देतात, तेव्हा तो एकदम खूष होतो व विलक्षण गतीने नाचत दान पावल्याची पावती देतो –

दान पावलंऽ दान पावलंऽ
पंढरपुरामंदी इट्टोबारायाला
कोंढणपुरामंदी तुकाऽबाईला
जेजुरीमंदी खंडोबारायाला
सासवडामंदी सोपानदेवाला

याप्रमाणे महाराष्ट्रातील बहुतेक छोट्यामोठ्या देवतांची नावे घेऊन त्यांना दान पावल्याचे तो सांगतो व एक गिरकी घेऊन पावा वाजवतो. मग पुढच्या घरी जातो.

वासुदेव ही जात केव्हा उदय पावली, ते निश्चित सांगता येत नाही. तथापि ती हजारबाराशे वर्षांइतकी जुनी आहे. ज्ञानदेव-नामदेवादी संतांपासून अनेक संतांची वासुदेवावरील रूपके मिळतात. महानुभाव वाङ्मयात या जातीच्या अस्तित्वाचे पुरावे सापडतात.

वासुदेवाची गाणी विविध प्रकारची आहेत. त्यांत जसे बाल-कृष्णाचे चरित्र वर्णन केले आहे, तसाच निर्मळ भक्तीचा महिमाही गायिला आहे. काही गाण्यांत प्रपंचाचे स्वरूप रेखाटून, तो नेटका करण्याची नीती सांगितली आहे, तर काही गाण्यांत सरळ सुबोध भाषेत वेदान्ताचे मर्म विशद केले आहे. [म. लो. ऊ.]

वासुदेव उपनिषद्

एक छोटे गद्य वैष्णव उपनिषद. हे सामवेदाशी संलग्न आहे. हे वासुदेवाने नारदाला सांगितले असून, त्यात ऊर्ध्वपुंड्र कसा लावावा, त्याची माहिती आहे. हा ऊर्ध्वपुंड्र गोपीचंदनाचा लावायचा असतो. वैकुंठात उत्पन्न झालेले विष्णुचंदन वासुदेवाच्या अंगावरून गोपींनी धुवून टाकले, तेव्हा त्याला गोपीचंदन असे नाव पडले. त्याचा मंत्र असा –

गोपीचन्दन पापघ्न विष्णुदेहसमुद्भव ।
चक्राङ्कित नमस्तुभ्यं धारणान्मुक्तिदो भव ।

या पीतवर्ण गोपीचंदनाच्या धारणाने मुक्ती साध्य होते, असेही सांगितले आहे. पुढे त्याचा तपशीलवार धारणविधी दिला आहे. गोपीचंदन न मिळाल्यास तुळशीच्या मुळातील माती पाण्यात भिजवून तिने ऊर्ध्वपुंड्र लावावा, असा पर्यायही सांगितला आहे. गोपीचंदनधारणामुळे विष्णूच्या ठिकाणी भक्ती स्थिरावते व अशा भक्ताला सम्यक् ज्ञान होऊन विष्णुसायुज्य लाभते असेही यात सांगितले आहे. [श्री. मी. ग. देसाई]

वासुदेव घोष

(इ. स. चे १६ वे शतक) एक चैतन्यानुयायी बंगाली भक्तकवी. याचा जन्म श्रीहट्ट जिल्ह्यातील वर्ण किंवा बुरंगी नामक गावी झाला. हा व याचे दोन बंधू माधव आणि गोविंद हे तिघेही चैतन्यमहाप्रभूंचे सम-कालीन व परमभक्त असून, उत्तम पदकर्ते व भावमधुर गायक होते. वासुदेव घोषाने चैतन्यमहाप्रभूला प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण मानले असल्यामुळे, त्याच्या गीतांतून वर्णिली जाणारी चैतन्य-लीला ही थेट कृष्णलीलेच्या थाटाची आहे. त्याने दानकेली, नौकाविहार व गोपीविहार या सर्व कृष्णलीलांची कल्पना चैतन्य महाप्रभूंच्या चरित्रातही घेतली आहे. नवद्वीपाच्या स्त्रियांचा चैतन्यमहाप्रभूविषयीचा भक्तिभाव कसा होता, हे जाणून घ्यायचे, तर वासुदेव घोषाची काव्ये वाचायला हवी. कृष्णदास कविराजाने आपल्या चैतन्यचरितामृतात याच्याविषयी पुढील गौरवपंक्ती लिहिल्या आहेत –

वासुदेव गीत करेन प्रभुर वर्णने
काष्ठपाषाणादि द्रवे जाहार श्रवणे ।।

भावार्थ – वासुदेवाने प्रभुवर्णनाची अशी बहारदार गीते लिहिली, की त्यांच्या श्रवणाने काष्ठ-पाषाणांनाही पाझर फुटे.

देवकीनंदनदासाने आपल्या वैष्णववंदनेत याला वंदन केले आहे. वैष्णवाचारदर्पण या ग्रंथानुसार शेवटच्या दिवसांत तामुलक गावी जाऊन राहिला होता. [हिं. बं. वै. क.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वासुदेव दीक्षित (इ. स. च्या १८ व्या शतकाचा पूर्वार्ध) मीमांसादर्शनाचा एक आचार्य व ग्रंथकार. याच्या वडिलांचे नाव महादेव व आईचे अन्नपूर्णा असे होते. हा तंजाऊरच्या सरफोजी आणि तुकोजी भोसले या राजांच्या दरबारी पंडितराज होता. याने जैमिनीच्या सूत्रांवर अध्वरमीमांसा-कुतूहल-वृत्ती नामक एक ग्रंथ लिहिला आहे. वासुदेव दीक्षित हा व्याकरणशास्त्राचाही गाढा विद्वान होता. भट्टोजी दीक्षिताच्या सिद्धान्तकौमुदीवर याने बालमनोरमा नावाची एक व्याख्या लिहिली आहे. [मी. द.]

वासुदेवद्वादशी एक काम्य व्रत. हे आश्विन शुद्ध द्वादशीला करतात. व्रतविधी असा— व्रतकर्त्याने एका ताम्हनात थोडे पाणी घेऊन त्यात वासुदेववेषातील श्रीकृष्णाची सुवर्णमूर्ती ठेवावी. मग वासुदेवाच्या वेगवेगळ्या नावांचा उच्चार करीत त्याला आपादमस्तक पूजोपचार समर्पण करावे. नंतर त्या मूर्तीवर वस्त्र आच्छादून ती ब्राह्मणास दान द्यावी. हे व्रत नारदाने वसुदेव-देवकी यांना सांगितले असल्याची समजूत आहे. फल–पुत्रप्राप्ती व पापनाश. [हि. ध.]

वासुदेवानंद सरस्वती (इ. स. १८५४–१९१४) एक दत्तोपासक सत्पुरुष व प्रासादिक ग्रंथकार. यांना टेंबेस्वामी असेही म्हणत. यांचे पूर्ण नाव वासुदेव गणेश टेंबे असे होते. यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील माण-

वासुदेवानंद सरस्वती

गाव या एका लहानशा खेड्यात झाला. यांच्या आईचे नाव रमाबाई. वासुदेवानंदांचे वडीलही दत्तोपासकच होते. गाणगापूरला दत्तोपासना करीत असताना त्यांचे वैराग्य तीव्र झाले आणि त्यांनी संन्यास घेण्याचा निश्चय केला. परंतु दत्ताने दर्शन देऊन त्यांना सांगितले, की, 'तू संन्यास न घेता प्रपंच कर.' त्यामुळे त्यांनी गृहस्थाश्रम स्वीकारला व त्यांना हा मुलगा झाला.

वासुदेवानंदांचे प्राथमिक संस्कृत शिक्षण त्यांचे पितामह हरिभट्ट यांच्या मार्गदर्शनाखाली झाले व पुढील अध्ययनासाठी त्यांनी वेगवेगळ्या पाठशाळांचा आश्रय केला. वेदोपनिषदे, पंच महाकाव्ये आणि ज्योतिषशास्त्र यांचा अभ्यास त्यांनी बालवयातच पूर्ण केला. वयाच्या एकविसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नी अन्नपूर्णाबाई या अत्यंत सुशील व पतिसेवारत होत्या. त्यांना एक मुलगा झाला होता; परंतु तो अल्पवयातच वारला.

वयाच्या २६–२७ व्या वर्षी ते प्रथम नरसोबाच्या वाडीस गेले. तिथे गोविंदस्वामी नामक एका सत्पुरुषाच्या मार्गदर्शनानुसार त्यांनी दत्तोपासना आरंभिली. वाडीतील उपासनेच्या काळात त्यांना वारंवार श्रीदत्तात्रेयाचे साक्षात्कार होऊ लागले. पुढे प्रत्यक्ष दत्तगुरूंनीच त्यांना एका अवधूताच्या रूपाने कृष्णातीरी मध्यरात्री मंत्रोपदेश दिला, असे सांगतात. त्यांनी योगाचाही अभ्यास या काळात केला.

वाडीहून माणगावी परत जाताना त्यांनी एक दत्तमूर्ती बरोबर नेली व ती एका नव्या मंदिरात स्थापन करून तिथेच ते राहू लागले. तिथे ते मौनव्रताने राहत. त्यांनी सात वर्षे अशा निग्रही वृत्तीने दत्तोपासना केली. इ. स. १८८९ मध्ये दत्तात्रेयाच्या दृष्टान्तानुसार त्यांनी पत्नीसह माणगाव सोडले आणि अकिंचन अवस्थेत यात्रा सुरू केली. यात्राकालातच इ. स. १८९१ च्या सुमारास त्यांच्या पत्नी निवर्तल्या. त्यानंतर तेराव्याच दिवशी त्यांनी संन्यास घेतला.

संन्यासग्रहणानंतर त्यांनी पुनश्च भ्रमंती सुरू केली. मार्गात ते वेगवेगळ्या देवळांतून, धर्मशाळांतून राहत व पुराण-प्रवचनांद्वारे लोकांत धर्मजागृती करीत. या काळात त्यांनी ठिकठिकाणी दत्तमूर्तींची प्रतिष्ठापना केली, दत्तोपासनेचा प्रचार केला व त्या उपासनेला प्रेरक ठरेल, अशा प्रकारची प्रासादिक ग्रंथरचनाही केली. उज्जयिनी, ब्रह्मावर्त, बदरीकेदार, गंगोत्री, हरिद्वार, द्वारका, तंजाऊर, कुरगड्डी, गरुडेश्वर, इ. ठिकाणी त्यांनी चातुर्मास केले. शेवटी गरुडेश्वर येथेच ज्येष्ठ वद्य ३०, शके १८३६ या दिवशी ते निर्वाणाला गेले. त्यांच्या निर्याणस्थली त्यांचे समाधिमंदिर उभारलेले असून, दत्तपादुकांचीही स्थापना केलेली आहे. प्रतिवर्षी तिथे त्यांचा पुण्यतिथिमहोत्सव साजरा होतो.

वासुदेवानंदांची ग्रंथसंपदा विपुल असून, ती संस्कृत व मराठी अशा उभय भाषांत आहे. त्यांची भाषा ललितमधुर, प्रासादिक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व अंतःकरणाचा ठाव घेणारी आहे. त्यांच्या काही ग्रंथांची माहिती अशी –

(१) गुरुसंहिता – हे मराठी ओवीबद्ध गुरुचरित्राचे संस्कृत रूपान्तर आहे.

(२) दत्तपुराण – यात दत्तात्रेयविषयक सर्व पौराणिक सामग्रीचा संग्रह असून, ते संस्कृत भाषेत आहे.

(३) शिक्षात्रय – जीवनाच्या कुमार, युवा व वृद्ध अशा तीन अवस्थांचे नियमन करण्यासाठी रचलेला संस्कृत ग्रंथ.

(४) स्त्रीशिक्षा – स्त्रियांच्या कर्तव्यांविषयी विवेचन करणारा संस्कृत ग्रंथ.

(५) दत्तमाहात्म्य – यात सामान्य लोकांसाठी दत्तात्रेयाचे चरित्र विवरून सांगितले असून, ते मराठी ओवीबद्ध आहे.

(६) सप्तशती गुरुचरित्र – हेही मराठी व ओवीबद्ध आहे.

(७) श्रीदत्तलीलामृताब्धिसार – दत्तमाहात्म्य या त्यांच्याच ग्रंथाचा सुलभ संक्षेप.

(८) माघमाहात्म्य – माघ मासाचे माहात्म्य सांगणारा ग्रंथ.

यांव्यतिरिक्त, त्यांनी काही कीर्तनोपयोगी आख्याने, पदे, पाळणे, आरत्या व शेकडो संस्कृत व मराठी स्तोत्रे रचली असून, ती दत्तसंप्रदायात लोकप्रिय ठरली आहेत. चार-पाच सहस्र पृष्ठांचा हा ग्रंथसंभार वासुदेवानंदांच्या दत्तभक्तीचे, धर्मनिष्ठेचे, प्रगाढ चिंतनशीलतेचे आणि लोकोद्धाराच्या तळमळीचे प्रत्यंतर घडवणारा आहे.

दत्तगुरूंच्या चरणांजवळून वाहणारी कृष्णा नदी ही त्यांना आपल्या उपास्य देवतेइतकीच प्रिय होती. त्यामुळे त्यांनी जगन्नाथाच्या गंगालहरीच्या धर्तीवर कृष्णालहरी नामक एक बावन्न श्लोकांचे कृष्णास्तोत्र रचले आहे. त्यातला एक श्लोक असा –

अपि श्रीकृष्णे ते महिमपरपारं व्रजति को
न शेषो ऽशेषास्यैरपि कथयितुं वा प्रभवति ।
अतो न्हीतो वाचः शुचय इह वच्म्यल्पकमिदं
नमः श्रीकृष्णे ते जय शमिततृष्णे गुरुमते ॥

भावार्थ – हे कृष्णानदी, तुझ्या माहात्म्याच्या पैलपार कोणता पुरुष जाऊ शकेल ? (अर्थातच कोणीही नाही.) सहस्र मुखांचा शेषही तुझा महिमा वर्णन करण्यास असमर्थ आहे. मला तर त्यामुळे संकोचच वाटतो; पण केवळ वाणीच्या शुद्धतेसाठी मी हे अल्पसे स्तोत्र करीत आहे. तृष्णा शमवणाऱ्या आणि दत्तगुरूला आदरणीय असणाऱ्या हे कृष्णे, तुझा जयजयकार असो. माझा तुला नमस्कार.

वासुदेवानंदांच्या मराठी भक्तिगीताचा एक नमुना असा –

शान्त हो श्रीगुरुदत्ता । मम चित्ता शमवी आता ।
तू केवळ माता जनिता । सर्वथा तूं हितकर्ता ।
तूं आप्त स्वजन भ्राता । सर्वथा तूंचि त्राता ।
भयकर्ता तूं भयहर्ता ।
दंडधर्ता तूं परिपाता ।
तुजवांचुनि न दुजी वार्ता ।
तूं आर्ता आश्रय दत्ता । शांत हो श्रीगुरुदत्ता ॥

यांना दत्तसंप्रदायात दत्तात्रेयाचे अवतार मानले जाते. [द. सं. इ.; श्रीवासुदेवानंद सरस्वती ग्रंथमाला, द्वादशं पुष्पम्, १९५४; श्रीवासुदेवानंद सरस्वती टेंबेस्वामीमहाराज विरचित नित्यउपासनाक्रम, श्रीवासुदेव प्रकाशन, १९६१]

वासुपूज्य

जैनांचा बारावा तीर्थंकर. जन्मस्थान चंपापुरी. बापाचे नाव वसुपूज्य व आईचे जयावती. जन्म-नक्षत्र शततारका. लांच्छन महिष. ज्ञानवृक्ष पाटल. मोक्षस्थान चंपापुर (सांप्रतचे भागलपूर). यक्ष–कुमार. यक्षिणी – चंडा (दिगंबरमते गांधारी).

हा गर्भात असता इंद्राने याच्या राजकुलाला वसू म्हणजे द्रव्य याने पूजिले म्हणून किंवा वसू नावाच्या देवांना तो पूज्य झाला म्हणून याला वासुपूज्य असे नाव मिळाले, अशा त्या नावाच्या व्याख्या आहेत. याची एकच सुरेख मूर्ती भागलपूर या ठिकाणी आढळते. [जै. इ.]

वास्तुपुरुष

वास्तोष्पती नामक प्राचीन वैदिक देवतेचे एक रूप. रुद्र प्रजापतीने उषेशी विवाह केला आणि त्या दांपत्याला चार पुत्र झाले. त्यांपैकी चौथ्या पुत्राचे नाव वास्तोष्पती किंवा गृहपती अग्नी असे होते. सायणाचार्यांनी त्याला यज्ञवास्तुस्वामी असे म्हटले आहे. वास्तोष्पती हा प्राचीन काळी यज्ञीय कर्माचा रक्षक व यज्ञवेदीचा अधिनायक मानला जात होता. पुढील काळात तोच सर्व प्रकारच्या भवनांचा स्वामी बनला. पृथिवी ही त्याची गृहस्वामिनी होय. [भा. वा. शा.]

वास्तुयज्ञ

नवी वास्तू उभारीत असता जो यज्ञ करतात त्याला वास्तुयज्ञ म्हणतात. वास्तुयज्ञ पाच वेळा करावा लागतो, असे मत्स्यपुराणात सांगितले आहे.

सूत्रपाते तथा कार्यमेवं स्तम्भोदये पुनः ।
द्वारवंशोच्छ्रये तद्वत् प्रवेशसमये तथा ।
वास्तूपशमने तद्वद्वास्तुयज्ञस्तु पञ्चधा ।
(मत्स्य. पु. २५६.१०)

अर्थ – आखणी करताना, पहिला खांब उभारताना, पहिले दार करताना, गृहप्रवेशाच्या वेळी आणि वास्तुशांतीच्या वेळी असे पाच वेळा वास्तुयज्ञ करतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वास्तुयज्ञात शुभ दिनी, शुभ मुहूर्तावर सर्व बीजे आणि रत्ने एका ठिकाणी ठेवून त्यांवर शिला बसवतात. चार ब्राह्मणांकरवी स्तंभाची पूजा करतात आणि गवंड्याकरवी तो पुरतात. मध आणि आज्य यांचा होम करतात आणि ब्राह्मणांना पायस देतात. भोजनापूर्वी रोज वास्तुपुरुषाला बलिहरणात आहुती देतात. त्यालाही वास्तुयज्ञ असे नाव आहे. [हि. ध.]

वास्तुविद्या गृहरचनाशास्त्र. वस् = राहणे, या धातूपासून वास्तु हा शब्द बनलेला आहे. त्याचा अर्थ निवासस्थान किंवा राहण्याचे घर असा होतो. निवासस्थान बांधण्याचे शास्त्र एवढाच मर्यादित अर्थ प्राचीन काळी वास्तुविद्या या शब्दाला होता. वास्तुविद्या ही शिल्पशास्त्राची एक शाखा होती. शुक्रनीतिसार या ग्रंथात मंदिरे, देवप्रतिमा, उद्याने, तलाव, प्रासाद इत्यादींच्या निर्मितीचे शास्त्र, अशी शिल्पशास्त्राची व्याख्या दिलेली आहे. परंतु त्यानंतरच्या वास्तुशास्त्रविषयक ग्रंथांत त्या संपूर्ण शिल्पशास्त्रालाच वास्तुशास्त्र म्हटले आहे. तथापि सर्वसाधारणपणे वास्तुविद्या म्हणजे गृहे, मंदिरे, प्रासाद, तट, मनोरे, बुरूज, किल्ले, तलाव, विहिरी, कालवे, स्तूप, विजयस्तंभ, इ. बांधण्याचे शास्त्र होय. याविषयी अनेक संस्कृत ग्रंथ उपलब्ध असून, त्यांत वास्तुशास्त्राचे नियम दिलेले आहेत. भारतात सर्वत्र मंदिरे, प्रासाद, मनोरे, स्तंभ, गडकोट, तलाव चांगल्या स्थितीत किंवा भग्नावशेषरूपांत आढळतात, त्यांना वास्तुशिल्पे म्हणतात.

वास्तुशास्त्र –ऋग्वेदात गृहरचनेसंबंधी काही उल्लेख आढळतात. त्यावरून हे ध्यानात येते, की वेदकाळी वास्तुरचना हे एक धार्मिक कृत्य मानले जात होते. वास्तोष्पती ही वास्तूची अधिष्ठात्री देवता असून, गृहरचनेच्या वेळी तिला आवाहन करण्याची प्रथा होती. वास्तूसाठी कोणती जमीन चांगली, गृहाची मापे कशी असावी, इत्यादीसंबंधी काही उल्लेख ऋग्वेदात आहेत. त्वष्टा, ऋभू, मान (अगस्त्य), वसिष्ठ हे त्या काळातले वास्तुशास्त्रज्ञ होते. त्या काळी घरे किंवा निवासस्थाने मुख्यतः लाकडाची करीत होते, असे अनुमान करता येते.

हर्म्य याचा अर्थ भव्य प्रासाद असा असावा. इंद्र हर्म्यांचा नाश करणारा होता. त्याने पुरांचाही नाश केला. त्यावरून हर्म्य व पुरे असुरांची वास्तुरचना असावी असे वाटते. ती अतिशय मजबूत असल्यामुळे इंद्राला त्यांचा नाश करण्यासाठी बरेच बळ वापरावे लागले. आयसी पुरे म्हणजे भक्कम तटबंदी असलेली ठिकाणे असावी. तटबंदी दगडी असण्याची शक्यता आहे.

ऋग्वेदातील कित्येक निर्देशांवरून हे स्पष्ट कळते, की त्या काळातील घरे कधीतरी उभारलेली लहानशी घरटी नसून, चांगल्या पद्धतीने बांधलेली मोठी व सुखसोयींनी युक्त अशी निवासस्थाने होती. एका ऋचेत (७.८८.५) वरुणाच्या प्रासादाचे वर्णन केलेले आहे. त्या विशाल वास्तूला सहस्र द्वारे होती. दुसऱ्या एका भव्य प्रासादाला सहस्र स्तंभ असल्याचा उल्लेख आहे. गृहरचनेत द्वारांना इतके महत्त्व होते, की त्या काळी द्वारपूजा प्रचलित होती. स्तंभावर सर्व वास्तू आधारलेली असल्यामुळे त्यांनाही महत्त्व होते. त्यांचा आकार यूपासारखा असे. यूप हे लाकडाचे बनवीत. त्यांची मापे निश्चित केलेली होती. ते बहुधा अष्टकोनी असत.

यज्ञवेदीची रचना धर्माशी संबद्ध होती. एका ऋचेत (१०. ११४.८) वेदीचे वर्णन केलेले आहे. त्या काळी मृतांच्या अस्थी जमिनीत पुरून त्यांवर स्मारके बांधण्याची प्रथा होती, असे काही पंडितांचे मत आहे. त्यांचे वर्णन दहाव्या मंडलातील १८ व्या सूक्तात आढळते. त्यावरूनच बौद्ध लोकांना स्तूपांची कल्पना स्फुरली असावी. स्तूप हा शब्द ऋग्वेदात आलेला आहे. पण त्याचा अर्थ सायणाचार्यांच्या मते, किरणांचा समूह असा आहे. मात्र दुसऱ्या एका ऋचेत (१.२४.७) वरुणाने स्तूप उभा केल्याचा उल्लेख आढळतो.

गृहरचनेच्या वेळी म्हणावयाची काही सूक्ते अथर्ववेदात आहेत (३.१२; ६.७३). त्यांत वास्तुशास्त्रातील अनेक पारिभाषिक शब्द वापरलेले आढळतात. त्यावरून तत्कालीन सर्वसामान्य घराची कल्पना करता येते. ती घरे विविध आकारांची असावी, असे वाटते. ऋग्वेदात वास्तोष्पती आहे, तर अथर्ववेदात (९.२०) गृहस्वामिनी आहे.

ब्राह्मणग्रंथांत यूप, वेदी व श्मशान यांचे विस्तृत वर्णन केलेले आढळते. ऐतरेय व शतपथ या ब्राह्मणांत त्यांची रचना कशी करावी तेही सांगितले आहे. वेदी, स्तूप व घरे बांधण्यासाठी त्या काळी भाजलेल्या विटा वापरीत असावे, असे वाटते. स्तूप म्हणजे मृताचे स्मारक बांधण्याची आर्यांची पद्धत होय. तिच्यात व असुरांची किंवा अनार्यांची पद्धत यांत भेद होता. शतपथ ब्राह्मणातील वर्णनावरून असे दिसते, की आर्यांच्या वास्तुरचनापद्धतीवर असुरांच्या पद्धतीचा प्रभाव पडू लागला होता.

वेद व ब्राह्मणे ग्रंथांतील वर्णनांवरून वास्तुरचना हळूहळू विकसित होत असल्याचे ध्यानात येते. वास्तुशास्त्रातील काही नियमही आढळू लागतात. मात्र त्या काळी वास्तुशास्त्र असे निर्माण झाले नव्हते. गृह्यसूत्रांत वास्तुशास्त्राचे अनेक सिद्धान्त आढळतात आणि त्यांतूनच पुढे हळूहळू वास्तुशास्त्र निर्माण झाले. वास्तुरचना करताना जे धार्मिक विधी केले जात, त्यांचे वर्णन गृह्यसूत्रांत मुख्यतः केलेले आहे. त्यांतच गृहरचनेविषयी सामान्य तत्त्वे सांगितली आहेत. घर बांधण्यासाठी योग्य भूमी कशी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असावी, कोणत्या जागी मुख्य स्तंभ उभा करावा, त्याच्या भोवती निरनिराळ्या खोल्यांची रचना कशी असावी, याविषयीचे नियम त्यांत आढळतात. घरातील द्वारे कुठे असावी, यालाही महत्त्व होते. घराभोवती झाडे लावताना, कोणते झाड कोणत्या दिशेला



विटांचे विविध प्रकार

लावावे किंवा लावू नये, त्याचे नियमही सूत्रग्रंथांत आहेत. त्यानंतर वास्तोष्पती व इतर देवता यांना हवी अर्पण करण्यासंबंधी नियम दिले आहेत. यज्ञवेदींची रचना करण्यासाठी कोणत्या विटा वापराव्या त्याचे नियम शुल्वसूत्रांत दिले आहेत. विटांचे विविध आकार– प्रकार असून, त्यांचा उपयोग वेदीच्या निरनिराळ्या भागांत केला जात असे.

वाल्मीकिरामायणात प्रासाद, नगरे व किल्ले यांची वर्णने जागोजागी आढळतात. त्यावरून ध्यानात येते, की त्या काळी वास्तुशास्त्र बरेच विकसित झाले होते. राजे वास्तुशास्त्रज्ञांना खूप मान देत आणि वास्तुरचनेविषयी त्यांच्याकडून मार्गदर्शन घेत. मय व विश्वकर्मा हे त्या काळातले प्रख्यात शिल्पज्ञ होते. मय हा असुरांचा व विश्वकर्मा हा देवांचा प्रमुख वास्तुविशारद मानला गेला आहे. मयाने शिल्पशास्त्राचे ज्ञान ब्रह्मदेवाकडून प्राप्त केले, अशी कथा किष्किंधा कांडात आहे.

गृहरचनेच्या वेळी पशुयज्ञ करण्याचे विधिविधान गृह्यसूत्रांत व शिल्पशास्त्राच्या अन्य ग्रंथांत सांगितलेले आहे. त्याला अनुसरूनच सर्व वास्तुरचना केल्या जात, असे रामायणावरून कळते. उत्तरकालीन वास्तुशास्त्रातले अनेक पारिभाषिक शब्द रामायणात आढळतात. घरे, राजप्रासाद व किल्ले यांचे भिन्न भिन्न प्रकार असून, त्यांचा उल्लेख रामायणात आहे.

नगरांची रचना, त्यांच्या भोवतीचे तट, मनोरे, खंदक वगैरे संरक्षक व्यवस्था, याविषयीची माहिती वाल्मीकीने दिली आहे.

त्या काळातील भव्य प्रासादांची वर्णने रामायणात पुष्कळ आढळतात. त्यांचे विविध प्रकार होते. सात किंवा आठ मजली प्रासादही त्या काळी बांधले जात. आणि तोरणे, स्तंभ, शिखरे, गवाक्षे यांच्या योगाने ते सुशोभित केले जात. पशुपक्षी, लक्ष्मी यांच्या प्रतिमाही जागोजागी कोरलेल्या असत.

यज्ञसभा, वेदी, चैत्य, देवमंदिरे इत्यादींची वर्णनेही रामायणात विपुल आहेत. तिथे विटा व दगड यांचे उल्लेख अगदी थोडे आहेत. बहुतेक वर्णने काव्यमय असल्यामुळे वास्तुरचनेसाठी कोणते पदार्थ वापरले जात ते मात्र निश्चित सांगता येत नाही. रामायणातील वर्णने पाली जातकांतील वर्णनांशी बऱ्हंशी मिळतीजुळती आहेत.

महाभारतात तर वास्तुशास्त्रविषयक विपुल उल्लेख आढळतात. त्या काळी नवीन वास्तुरचना करताना होमहवन करण्याची प्रथा होती. त्यात पशुबळीही दिले जात.

शांतिपर्वात नगरसंरक्षणासाठी तटबंदी करण्याविषयी बरीच माहिती दिलेली आहे. गडकोट, प्रासाद, घरे यांचे विविध प्रकार तिथे सांगितले असून, त्यांची नावेही दिलेली आहेत. भव्य सभागृहांची वर्णने वाचून त्या काळातील समृद्धीची कल्पना करता येते. मय नामक शिल्पशास्त्रज्ञाने पांडवांसाठी निर्माण केलेली मयसभा ही तर फारच विलक्षण होती. काही सभांना सहस्र स्तंभ व शंभर द्वारे असत. द्वारांवर तोरणे असत. वास्तुरचनेतील अनेक पारिभाषिक शब्द महाभारतात आढळतात. रामायणाप्रमाणेच महाभारतातही निरनिराळ्या प्रकारे सुशोभित केलेल्या वास्तूंची वर्णने आहेत. या दोन्ही महाकाव्यांत रत्ने, स्फटिक व अन्य बहुमोल वस्तू वास्तुरचनेमध्ये वापरल्याची वर्णने आहेत. ती वर्णने काव्यमय असली, तरी प्रत्यक्षात अशा वस्तूंचा उपयोग काही प्रमाणात केला जात असण्याचा संभव आहे. वेदींसाठी विटा वापरण्याचा स्पष्ट उल्लेख आढळतो. तट, तोरणे व द्वारांचा काही भाग यांच्या रचनेत पाषाणाचा उपयोग करीत होते. मात्र घरासाठी विटा किंवा दगड वापरल्याचा निर्देश नाही. पूल (संक्रम) व धरणे (सेतुबंध) बांधण्याचे ज्ञान त्या काळातील स्थापत्यविशारदांजवळ होते, असे वाटते. नगररचनेचीही चांगली माहिती त्यांना होती.

जातकांतील कथांमध्ये वास्तुविद्येविषयी बरीच माहिती मिळते. ती बहुतांशी वरीलप्रमाणेच आहे. एका कथेत भूगर्भातील भुयाराच्या रचनेचे वर्णन केलेले असून, त्याचे बांधकाम विटांचे करून त्यावर गिलावा केल्याचा उल्लेख आहे. घरे बांधण्यासाठी मुख्यतः लाकडाचा उपयोग करीत. लाकडाच्या विपुलतेमुळे त्याचा उपयोग फार प्राचीन काळापासून केला जात होता. काही जातक-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कथांत लोहाच्या उपयोगाचाही उल्लेख आहे. विटांचा उपयोग बांधकामात पुष्कळ केला जात होता. पाषाणाचा उपयोग मात्र अल्प प्रमाणात, विशेषतः स्तंभरचनेत केला जात होता.

जातककथांतील वर्णनांवरून, वास्तुरचना ही एक शिल्पकलेची शाखा मानली जात होती, असे ध्यानात येते. कारण वास्तूचे सौंदर्य वाढविण्यासाठी विविध प्रकारची कलाकुसर केल्याचे उल्लेख त्यांत आढळतात.

पालीमधील महावग्ग, चुल्लवग्ग, इ. धार्मिक ग्रंथांतही वास्तुशास्त्राचे बरेच उल्लेख आहेत. त्यांतील गुहा व विहार यांचा उल्लेख महत्त्वाचा वाटतो. बौद्ध धर्माच्या उदयापूर्वीच विहार निर्माण झाले असावे आणि त्यावरून कालांतराने बौद्ध विहार निर्माण झाले असावे, असे वाटते. नैसर्गिक गुहांप्रमाणे विटा,



प्राचीन विहार

दगड, लाकूड, इ. पदार्थ वापरून गुहा निर्माण करीत असावे.

चाणक्याच्या अर्थशास्त्रात वास्तुविद्येवर अनेक प्रकरणे आहेत. त्यांत वास्तूचा अर्थ घरे घरांची जागा, आराम-भवने, सेतुबंध, तलाव, धरणे असा दिला आहे (३.८). हा अर्थ शुक्रनीतिसार या ग्रंथात दिलेल्या अर्थाशी जुळता आहे. अर्थशास्त्रात वास्तुशास्त्राची स्पष्ट चर्चा नाही. तथापि त्यातील प्रकरणांत परंपरागत ज्ञानच संकलित केले असले पाहिजे. त्यापूर्वी वास्तुशास्त्र विकसित होऊन त्याचे नियम निश्चित झालेले होते आणि म्हणून त्यांना अनुसरून वास्तुरचना करावी, असे चाणक्याने काही ठिकाणी सांगितले आहे. नगराची आखणी आरोग्याच्या व सोयींच्या दृष्टीने कशी करावी, राजप्रासाद कुठे असावा, घरे कशी बांधावी, यांचे नियम त्याने दिलेले आहेत. दुर्ग म्हणजे तटबंदी केलेले नगर होय. संरक्षणाच्या दृष्टीने तटबंदी कशी बांधावी, तसेच मनोरे व खंदक कसे बांधावे, हे अर्थशास्त्रात विस्तृतपणे सांगितले आहे. नगराच्या द्वारावर बांधलेल्या भव्य शिल्पाला गोपुर म्हणत व घराच्या दारावर बांधतात, त्याला तोरण म्हणत. तट विटांचे किंवा दगडांचे बाधीत. त्यावरील मनोऱ्याला अट्टालक हे नाव होते. अर्थशास्त्रात अनेकमजली इमारतींचे वर्णनही आहे. द्वारे व स्तंभ यासंबंधी चाणक्याने पुष्कळ विवेचन केलेले आहे. अर्थशास्त्रात देवकुल, देवायतन, देवतागृह, इ. शब्द असले, तरी त्यांचे स्वरूप कसे होते, ते मात्र समजत नाही. चैत्य व स्तूप यांचा उल्लेख अर्थशास्त्रात आहे. स्तूप म्हणजे बौद्ध स्मारक होय. पण चैत्य म्हणजे नेमके काय, ते अर्थशास्त्रावरून समजत नाही.

सर्वसामान्य घरे लाकडाची बांधीत. काही भव्य वास्तूही लाकडाच्या असाव्या. मात्र बहुतेक बांधकाम विटांची होती. दगडाचा उपयोगही काही प्रमाणात केला जात होता.

चाणक्याच्या अर्थशास्त्रानंतर वास्तुशास्त्रावर असंख्य ग्रंथ रचले गेले. मत्स्यपुराणात असे ग्रंथ लिहिणाऱ्या भृगू, अत्री, वसिष्ठ, विश्वकर्मा, मय, नारद, नग्नजित, विशालाक्ष, पुरंदर, ब्रह्मा, कुमार, नंदीश, शौनक, गर्ग, वासुदेव, अनिरुद्ध, शुक्र व बृहस्पती या १८ वास्तुशास्त्रज्ञांची नावे दिलेली आहेत. काही पंडितांच्या मते ही केवळ परंपरागत नावे असून, त्यांनी ग्रंथ लिहिलेले नाहीत. कारण, तसे त्यांचे ग्रंथ उपलब्ध नाहीत. पण त्यांच्या ग्रंथांतली अनेक अवतरणे उत्तरकालीन ग्रंथांत आढळतात. त्यावरून त्या प्राचीन आचार्यांनी खरोखरच ग्रंथ लिहिले असले पाहिजेत, असे श्री. तारापद भट्टाचार्य यांनी प्रतिपादिले आहे. विश्वकर्मा हे नाव परंपरागत आहे. तो देवांचा वास्तुविशारद होता. कालांतराने विश्वकर्मा या शब्दाला चांगला वास्तुविशारद असा अर्थ प्राप्त झाला. आणि पुढे अनेक वास्तुशास्त्रज्ञांनी विश्वकर्मा ही पदवी धारण केली. त्यांतील एकाने वास्तुशास्त्रावर ग्रंथ रचला असेल व त्याचेच नाव मत्स्यपुराणात दिलेले असेल, असे श्री. भट्टाचार्यांचे म्हणणे आहे. विश्वकर्मप्रकाश हा ग्रंथ वासुदेवाने रचलेला आहे. त्यात त्याने शंभू–गर्ग–पराशर – बृहद्रथ– विश्वकर्मा – वासुदेव अशी गुरुशिष्यपरंपरा दिली आहे.

विश्वकर्मा नावाचे वास्तुविशारद उ. भारतातले असून, त्यांची शिल्पपद्धती आर्यांची होती. तीच नागर पद्धती या नावाने ओळखली जाते.

वास्तुशास्त्रावरील द. भारतीय ग्रंथांतही विश्वकर्मा नामक प्राचीन वास्तुविशारदाचा उल्लेख आढळतो. हा विश्वकर्मा द. भारतीय असून, नंतरच्या काळातला असावा. त्याचे अनेक ग्रंथ तिकडे सापडले आहेत. त्यांत द. भारतीय अर्थात द्राविड शिल्पपद्धतीची माहिती आहे. मानसार या ग्रंथात अशा विश्वकर्मा नामक कुटुंबाचा उल्लेख आहे.

मय हा एक दानव होता. त्याला शुक्राचार्यांकडून वास्तुविद्येचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञान प्राप्त झाले, असे म्हणतात. विश्वकर्मा हा जसा नागरपद्धतीचा सर्वश्रेष्ठ आचार्य मानला जातो, तसा मय हा द. भारतातील द्राविड शिल्पपद्धतीचा सर्वश्रेष्ठ आचार्य मानला जातो.



अजंटा येथील स्तूप

कालांतराने अन्य वास्तुविशारदांनी मय हे नाव धारण केले असेल. त्यांतील एकाने वास्तुशास्त्रावर ग्रंथ रचले. मत्स्यपुराणात व बृहत्संहितेत त्याचा उल्लेख आलेला आहे. त्याचा मयमत हा ग्रंथ उपलब्ध आहे.

श्री. भट्टाचार्यांच्या मते गर्ग हा नागर शिल्पपद्धतीचा संस्थापक असावा आणि सनपूर्व १५० ते इ. स. १५० या कालखंडात तो होऊन गेला असावा. त्याच्या ग्रंथाचा सारांश वराहमिहिराने आपल्या ग्रंथात दिला आहे. अशा प्रकारे भृगू, अत्री, वसिष्ठ, नारद, नग्नजित वगैरे ग्रंथकार प्राचीन काळी होऊन गेले असले पाहिजेत. बृहत्संहितेत आणखीही काही ग्रंथकारांचा नामनिर्देश आहे. मनू, पराशर, काश्यप व भरद्वाज अशी त्यांची नावे असून, ते वास्तुशास्त्राचे महान आचार्य मानले जात होते. मत्स्यपुराण व बृहत्संहिता यांत ज्याचा उल्लेख नाही असा एक आचार्य द. भारतात होऊन गेला, त्याचे नाव अगस्त्य. त्याचा सकलाधिकार नामक ग्रंथ उपलब्ध झाला आहे. मार्कंडेय नावाचाही एक वास्तुशास्त्रज्ञ होता. मत्स्यपुराणीत जी नावे दिलेली आहेत, त्यांतील नारद, नग्नजित, भृगू, शुक्र, बृहस्पती, अगस्त्य हे सनपूर्व २०० च्या पूर्वी होऊन गेले असावे.

विश्वकर्मप्रकाश हा वास्तुशास्त्राचा सर्वांत प्राचीन ग्रंथ होय. कारण, मत्स्यपुराणाच्या पूर्वी रचले गेलेले अन्य ग्रंथ उपलब्ध नाहीत. मत्स्यपुराणात वास्तुशास्त्राची माहिती सारांश रूपानेच दिलेली आहे. बृहत्संहिता हा ज्योतिषशास्त्रावरील ग्रंथ असून, त्यात वराहमिहिराने पूर्वीच्या वास्तुशास्त्रीय ग्रंथांतील माहिती संकलित केली आहे. त्याचप्रमाणे काही तांत्रिक ग्रंथांत व आगम ग्रंथांतही वास्तुविद्येची माहिती सापडते. मत्स्यपुराणाप्रमाणे अग्निपुराण, गरुडपुराण, देवीपुराण व भविष्यपुराण यांतही काही अध्याय वास्तुशास्त्रावर आहेत. मात्र त्यांतील माहिती नंतरच्या काळातली आहे. आगम ग्रंथांत द्राविड शिल्पपद्धतीची माहिती आहे. हयशीर्षपंचरात्र या ग्रंथातही काही अध्याय वास्तुविद्येवर आहेत.

वास्तुशास्त्राच्या उ. भारतीय व द. भारतीय अशा दोन पद्धती विशेष प्रसिद्ध आहेत, त्यांचे प्रवर्तक आचार्य व अधिकृत ग्रंथ यांची नावे अशी –

द्राविड किंवा द. भारतीय पद्धतीचे प्रवर्तक – ब्रह्मा, त्वष्टा, मय, मातंग, भृगू, काश्यप, अगस्त्य, शुक्र, पराशर, नग्नजित, नारद, प्रल्हाद, शक्र, बृहस्पती व मानसार.

आर्य किंवा उ. भारतीय पद्धतीचे प्रवर्तक– शंभू, गर्ग, अत्री, वसिष्ठ, पराशर, बृहद्रथ, विश्वकर्मा व वासुदेव.

काही ग्रंथ मुख्यतः वास्तुशास्त्राविषयी रचलेले आहेत, तर काही ग्रंथ धार्मिक किंवा अन्य विषयांवर रचलेले असून, त्यांत वास्तुशास्त्राची माहिती आहे. त्यांची नावे अशी –

द्राविड किंवा द. भारतीय पद्धतीचे –

(अ) वास्तुशास्त्रीय ग्रंथ – विश्वकर्मीय शिल्प, मयमत, मानसार, काश्यपशिल्प (अंशुमद्भेद), अगस्त्यसकलाधिकार, सनत्कुमारवास्तुशास्त्र, शिल्पसंग्रह, शिल्परत्न व चित्रलक्षण.

(आ) अन्य ग्रंथ – शैवागम, वैष्णव पंचरात्र, अत्रिसंहिता, वैखानसागम, तंत्रग्रंथ, तंत्रसमुच्चय, ईशानशिवगुरुदेवपद्धती.

यांतील आगम साहित्य अत्यंत विशाल असून, त्यातील वास्तुविद्येचे विवेचन विस्तृत व शास्त्रीय आहे.

नागर किंवा उ. भारतीय पद्धतीचे –

(अ) वास्तुशास्त्रीय ग्रंथ – विश्वकर्मप्रकाश, समरांगणसूत्रधार, सूत्रधार मंडन, वास्तुरत्नावली, वास्तुप्रदीप इत्यादी.

(आ) अन्य ग्रंथ – मत्स्यपुराण, अग्निपुराण, भविष्यपुराण, बृहत्संहिता, तंत्रग्रंथ, हयशीर्षपंचरात्र, विष्णुधर्मोत्तर प्रतिष्ठा ग्रंथ, हरिभक्तिविलास.

वरील ग्रंथांपैकी काही प्रमुख ग्रंथांत वास्तुशास्त्राविषयी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बरीच माहिती आढळते; ती उद्‌बोधक आहे. ती माहिती अशी–

मत्स्यपुराण – यात वास्तुविद्येचे सुमारे आठ अध्याय आहेत. एका अध्यायात प्राचीन आचार्यांची माहिती दिलेली आहे. एका अध्यायात स्तंभरचनेची माहिती आहे. स्तंभ हा संपूर्ण वास्तुरचनेचा आधार मानलेला आहे. रुचक, वज्र, द्विवज्र, प्रलीनक व वृत्त हे स्तंभाचे पाच प्रकार सांगितले आहेत. नवताललक्षण, पीठिकालक्षण व लिंगलक्षण या अध्यायांत कोरीव काम व मूर्तिकला यांवर विवेचन आहे. प्रासादवर्णन व मंडपलक्षण या दोन अध्यायांत प्रासादवास्तुरचनेची माहिती आहे.

बृहत्संहिता – वराहमिहिराच्या या ग्रंथात वास्तुचयन, भूमिपरीक्षा, वृक्षारोपण, दारु-आहरण, पादविन्यास, इ. प्रारंभिक माहिती देऊन, नंतर प्रासादांच्या विविध प्रकारांचे वर्णन केलेले आहे. त्यात वास्तुकलेचे शास्त्रीय विवेचन आहे, त्याचप्रमाणे मंदिरनिर्मितीची विस्तृत माहिती आहे. वज्रलेपलक्षण या अध्यायात गिलावा करण्यासाठी लागणाऱ्या द्रव्यांची माहिती आहे. अन्य शिल्पकलांची माहितीही या ग्रंथात आहे.

स्कंदपुराण – या पुराणाच्या दोन खंडांत महानगरस्थापना, स्वर्णशाला, रथनिर्मिती, स्थपती, विवाहमंडप, चित्र-कर्म, इ. विषयांची माहिती आहे.

गरुडपुराण – यातील दोन अध्यायांत सर्व प्रकारची भवने, दुर्गनिवेश, पुरनिवेश यांची माहिती आहे.

अग्निपुराण – या पुराणात वास्तुविद्येवर विस्तृत विवेचन केलेले आहे. त्यातील १६ अध्यायांत वास्तुविद्येच्या सर्व अंगांचे विवेचन आहे.

कामिकागम – आगम साहित्यातला हा ग्रंथ प्रातिनिधिक मानता येईल. त्यातील ६० पटलांत भूपरीक्षा, भूपरिग्रह, पादविन्यास, वास्तुदेवकाल, ग्रामादिलक्षण, ग्रामगृहविन्यास, वास्तुशास्त्रविधी, शालालक्षण विधी, नागरादिविभेद, पादमानविधी, प्रासादभूषणविधी, शिखरलक्षण, प्रतिमालक्षण, देवतास्थापनविधी, मंडपस्थापन, प्राकारलक्षण, इ. विषयांचे विवेचन आहे. कर्णागम, सुप्रभेदागम, वैखानसागम, इ. ग्रंथांतही वास्तुविद्येचे सांगोपांग विवेचन केलेले आढळते.

तंत्रग्रंथ – अनेक तंत्रग्रंथांत वास्तुविद्येची माहिती मिळते. त्यांपैकी हयशीर्षपंचरात्र हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध असून, त्यात मुख्यतः उ. भारतीय शिल्पपद्धतीचे विवेचन केलेले आहे.

विश्वकर्मप्रकाश – याचे केवळ १३ अध्याय असून, त्यांत भवनरचनेच्या नागर पद्धतीचे वर्णन मुख्यतः केलेले आहे. विश्वकर्मीय शिल्प हा याचा पूरक ग्रंथ असून, त्यात विशेषतः मूर्तिकलेचे विवेचन आहे.

मानसार – हा विशाल ग्रंथ दक्षिणी पद्धतीचा अधिकृत ग्रंथ मानला जातो. तो कोणी व केव्हा रचला, याविषयी निश्चित काही माहिती नाही. अगस्त्याचे नाव मान असे होते व त्यानेच तो रचला असावा किंवा मान म्हणजे मापन यावरून मानसार हे नाव या ग्रंथाला मिळाले असावे, असे श्री. तारापद भट्टाचार्यांचे मत आहे.

श्री. प्रसन्नकुमार आचार्य यांच्या मते हा ग्रंथ फार प्राचीन काळातला असावा; पण श्री. भट्टाचार्य, तो इ. स. च्या ११व्या शतकात रचला गेला, असे मानतात.

या ग्रंथात वास्तुशास्त्राचा ऊहापोह व्यापकपणे केलेला आहे. त्यात सर्व शिल्पकलांचा समावेश आहे. गावे, नगरे, किल्ले तट, बंधारे, बंदरे, तलाव, विहिरी, धरणे, गटारे, कठडे, पायऱ्या, घाट, घरे, राजप्रासाद, सभागृहे, कारागृहे, क्रीडांगणे, मंदिरे वगैरे सर्व प्रकारच्या बांधकामांची मापे व रचनापद्धती यांची विस्तृत माहिती त्यात दिलेली आहे. वास्तुनिर्मितीसाठी लागणारी जमीन व इतर सामग्री, पायाभरणी, भिंती, छत, मजले, जिने, खिडक्या, दारे, स्तंभ, चबुतरे आणि भिन्न भिन्न ठिकाणी करायची विविध प्रकारची कलाकुसर याविषयीचे निरूपण त्या ग्रंथात आहे. त्याचप्रमाणे पलंग, कोच, आसने, सिंहासने, कपाटे, करंड्या, पिंजरे, जाळ्या, वाहने, दिवे यांचेही वर्णन ग्रंथकाराने केले आहे. सर्व प्रकारच्या मूर्ती, पुतळे, अलंकार, वस्त्रे यांचाही अंतर्भाव त्यात केलेला आहे.

या ग्रंथाचे पहिले आठ अध्याय परिचयात्मक आहेत. नंतरचे बेचाळीस अध्याय नगररचना व निरनिराळ्या वास्तूंची रचना



पार्श्वनाथमंदिर, खजुराहो

याविषयी असून, बाकीचे वीस अध्याय मूर्तिकलेसंबंधी आहेत. परिचयात्मक आठ अध्यायांत वास्तुशास्त्राचे स्वरूप, कारागिरांचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शिक्षण, मोजमापे, वास्तूंचे वर्गीकरण, वास्तूची व्याख्या, वास्तुशास्त्राची व्यापकता, भूपरीक्षा, पादविन्यास, शंकुयंत्र, पाया, वास्तूंची मानचित्रे, वास्तुदेवता व त्यांना कोणत्या प्रकारच्या आहुती देऊन संतुष्ट करावे याचे विवेचन आहे. त्यानंतरच्या अध्यायांत नगररचना, नगरांचे भिन्न प्रकार, दुर्गांचे प्रकार, निरनिराळ्या प्रकारची निवासस्थाने, रस्ते, गटारे, खंदक, तट यांची भिन्न नावे; तसेच मोजमापे, रचनापद्धती यांची सविस्तर माहिती आहे. घरांचे अनेक मजले, मंदिरांची शिखरे, गोपुरे यांची रचना, पायाभरणी, स्तंभांचे प्रकार व चबुतरे, छपरे, दारे, खिडक्या यांचीही सविस्तर माहिती आहे. त्यासाठी कोणते लाकूड व अन्य सामान वापरावे तेही सांगितले आहे.

एका अध्यायात नागर, द्राविड आणि वेसर या तीन शिल्पपद्धतींचे वर्णन केलेले आहे. तसेच शिखरांचे चार भाग, मुखभद्र, उतरती छते यांची माहिती दिलेली आहे. प्रासादांतील अनेक भूमी म्हणजे मजले कोणत्या प्रमाणात असावे, तेही सांगितले आहे. एकतिसाव्या अध्यायात राजप्रासाद, उपगृहे, भव्य मंदिरे यांचे वर्णन आहे. एका अध्यायात निरनिराळ्या इमारतीतल्या भिन्न प्रकारच्या खिडक्यांचे वर्णन केलेले असून, नागबंध, वल्ली, गवाक्ष, कुंजराक्ष, स्वस्तिक, सर्वतोभद्र, पुष्पबंध अशी त्यांची नावे दिली आहेत व मापेही सांगितली आहेत.

त्यानंतर एका अध्यायात भव्य प्रासाद व मंदिरे यांचे विविध प्रकार, मजल्यांची संख्या, भिन्न भिन्न आकार; तसेच वास्तू केव्हा व कुठे बांधाव्या, ते सांगून मग गृहप्रवेश व वास्तुशांती या विधींची माहिती दिली आहे.

पुढे एका अध्यायात राजवाडे व देवालये यांतील नाट्यशाला व सर्वसामान्य नाट्यगृहे यांचे वर्णन केले आहे. दोन अध्यायांत कमानींचे वर्णन केले आहे. वर्तुळाकार, त्रिकोणी, अर्धगोल व धनुष्याकृती असे त्यांचे भिन्न आकार-प्रकार असून, विशेष प्रकारच्या कमानींची पत्र-तोरण, मत्स्य-तोरण, रत्न-तोरण, इ. नावे सांगितली आहेत.

मानसार या बृहद्ग्रंथाच्या आधारे वास्तुशास्त्रावर असंख्य लहानमोठे ग्रंथ रचले गेले आहेत. त्यांतील प्रमुख ग्रंथांचा अल्पसा परिचय वर दिलेला आहे. या सर्व ग्रंथांतील वास्तुशास्त्रविषयक माहितीवरून आपल्या प्राचीन वास्तुशास्त्राचे स्वरूप कळून येते.

मानसार या महान ग्रंथासारखाच मोठा ग्रंथ धारानगरीच्या भोजराजाने रचलेला आहे. त्याचे नाव समरांगणसूत्रधार असे आहे. त्याची माहिती श्री. द्विजेंद्रनाथ शुक्ल यांनी दिली आहे ती अशी – हा ग्रंथ वास्तुशास्त्रावरील एक अत्यंत प्रामाणिक, महत्त्वपूर्ण व अधिकृत ग्रंथ मानला जातो. त्याचे ८३ अध्याय असून, त्यांत पुरनिवेश, भवननिवेश, प्रासादनिवेश, प्रतिमा–निर्माण व यंत्रघटना या पाच विषयांचे विवेचन केलेले आहे. त्यात वास्तुविद्येचे सांगोपांग विवरण आहे. विविध प्रकारच्या



प्राचीन मंदिर, वैजनाथ

भवनांचे शास्त्रीय, सामाजिक व धार्मिक वर्गीकरण प्रथम याच ग्रंथात केलेले आढळते. भवनरचनेवर या ग्रंथात सुमारे छत्तीस अध्याय आहेत. प्रासाद–वास्तुविद्येचे म्हणजे मंदिररचनेचे विस्तृत निरूपणही यात केलेले आहे. यात नागर व द्राविड शिल्पपद्धतींप्रमाणे इतर शिल्पपद्धतींचेही विवेचन आहे. यात केवळ मध्ययुगीन वास्तुकलेची माहिती नसून, त्यात पूर्वपरंपरांचेही दर्शन घडते. प्राचीन ग्रंथांप्रमाणे यात नागर किंवा द्राविड या एकाच पद्धतीचे विवेचन केलेले नसून, सर्व पद्धतींचे निरूपण केलेले असल्यामुळे त्याला अखिल भारतीय वास्तुशास्त्राचा ज्ञानकोश मानला पाहिजे. त्याचप्रमाणे या ग्रंथात एका नवीन शैलीचाही पुरस्कार केलेला असून, ती लाटशैली या नावाने प्रसिद्ध आहे. लाट हे गुजरातचे प्राचीन नाव आहे. भोजराजाची राजधानी धारानगरी गुजरात प्रदेशाच्या समीप असल्यामुळे त्याने त्या प्रदेशातील सुंदर शैलीचा पुरस्कार केला असावा.

अगस्त्याचा सकलाधिकार व काश्यपाचा अंशुमद्भेद हे ग्रंथ अत्यंत लोकप्रिय असून, त्यांत प्रतिमानिर्मितीवर चांगले विवेचन केलेले आहे.

वास्तुशिल्पपद्धती – वास्तुशिल्पाच्या नागर म्हणजे उ. भारतीय व द्राविड म्हणजे द. भारतीय या दोन प्रमुख पद्धती प्रसि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहेत. उ. भारतीय पद्धती ही आर्यांची व द. भारतीय पद्धती द्रविडांची होय. प्राचीन काळी या दोन पद्धतींत विशेष भेद नव्हता. त्यांची मूलभूत तत्त्वे सारखीच होती. केवळ वास्तुरचनेचे स्वरूप व आकारमान यांत अल्पसा भेद असावा. आर्य व द्रविड संस्कृतींचा समन्वय चालू असल्यामुळे दोन्ही पद्धतींचे मिश्रण झाले असावे. पण इ. स. च्या ६ व्या शतकापासून द. भारतात नवी शिल्पपद्धती उदयाला आली आणि तिच्याविषयी



भूचरनाथ लेणे (हत्तीखाना) – आंबेजोगाई

वास्तुशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले. उ. भारतीय व द. भारतीय पद्धतींमधील प्रमुख भेद असे–(१) मंदिरांचे वर्गीकरण व नावे यांत भेद. दक्षिणी पद्धतीतले तालमान नागर पद्धतीत नाही. (२) नागर पद्धतीच्या वास्तुशास्त्रात आमलकाचा निर्देश असतो, तो दक्षिणी पद्धतीत नाही. (३) स्तंभ व त्यांचे भिन्न भिन्न भाग यांच्या नावांत भेद. (४) दक्षिणी पद्धतीच्या वास्तुशास्त्रात काही भवनांच्या नावांच्या अंती कान्त हा शब्द असतो, तसा नागर पद्धतीत नसतो. (५) वेसर पद्धतीची भवने दक्षिणी पद्धतीत आहेत, तशी उत्तरी पद्धतीत नाहीत. (६) चौथरे व चबुतरे यांचे वर्गीकरण भिन्न प्रकारचे. (७) निवासस्थानांची नावे भिन्न. (८) मंडपांची नावे भिन्न. (९) गोपुर हे द्राविड पद्धतीचे द्वारशिल्प नागर पद्धतीत नाही. (१०) दक्षिणी पद्धतीत मंदिराच्या भोवती अनेक भिंती असतात, तशा नागर पद्धतीत नसतात. (११) दक्षिणी पद्धतीच्या मंदिराना अधिष्ठाने किंवा पीठे असतात; नागर पद्धतीत तशी नाहीत.

वास्तुविद्येच्या विकासाबरोबर अन्य काही शिल्पपद्धती उदयाला आल्या. त्यांची नावे अशी – लाट, वैराट किंवा ववाट, भूमिज, कलिंग, आंध्र, वेसर, ओडिसा, महाराष्ट्र, पल्लव, चोळ, चालुक्य, होयसळ, इत्यादी. या नवीन पद्धती म्हणजे नागर व द्राविड पद्धतींचीच किंचित भिन्न रूपे होत. (देवालये पाहा) यासंबंधी श्री. तारापद भट्टाचार्यांचे मत असे– विश्वकर्मप्रकाश, बृहत्संहिता, समरांगणसूत्रधार वगैरे ग्रंथांत नागर पद्धतीच्या मंदिरांचेच चौकोनी, अष्टकोनी, गोल, इ. प्रकार वर्णिले आहेत. त्यावरून केवळ चौकोनी मंदिरे ती नागर पद्धतीची, असे म्हणता येत नाही. त्याचप्रमाणे गोलाकार मंदिरे सगळी वेसर पद्धतीची नव्हेत आणि सर्व अष्टकोनी मंदिरे द्राविड पद्धतीचीच नव्हेत. नागर, द्राविड व वेसर हे मंदिरांचे प्रकार केवळ आकारावरून ठरवलेले नसून ते प्रादेशिक आहेत, तसेच शिल्पकामातील भेदावरूनही मानले गेले आहेत.

वास्तुविधान – वास्तुशास्त्रावरील सर्व ग्रंथाचे स्वरूप स्थूलमानाने सारखेच आहे. त्यांत प्रथम ज्योतिषशास्त्रविषयक सिद्धान्त आणि नंतर रचनाविषयक सिद्धान्त असतात. वास्तुरचनेसाठी शुभाशुभ मुहूर्त कोणते, योग्य जागा कोणत्या, त्या जागेवरील अतिमानुषी शक्तींना संतुष्ट कसे करावे याचे आणि वास्तुपुरुषमंडलाच्या आखणीचे विवेचन पहिल्या भागात असते. त्यातच अष्टदिशा व नक्षत्रे यांचा विचार केलेला असतो. त्यानंतर जमिनीचा उतार, वाऱ्याची दिशा, मातीचे स्वरूप, पाण्याचे सान्निध्य यांचे विवेचन असते.

वास्तुरचनेविषयी विवेचन करण्यापूर्वी स्थपती व मापनपद्धती यांची माहिती दिलेली असते. स्थपती म्हणजे वास्तुरचना करणारा मुख्य कारागीर. त्याला सर्व शिल्पशाखांचे उत्कृष्ट ज्ञान असायला हवे; त्याचप्रमाणे वेदविद्याही अवगत असायला हवी, असे मानीत.

मापनपद्धतीची कोष्टके सर्व ग्रंथांत दिलेली आहेत. त्या कोष्टकांचा प्रारंभ परमाणूपासून झालेला असतो. अर्थात अंगुळ हे व्यवहारातले सर्वांत लहान माप होय. त्याच्या आठपट किंवा चौवीसपट मोठे माप दंड हे होय.

त्यानंतर जी वास्तू उभारायची तिचे विधान म्हणजे रूपरेखा तयार करणे, याविषयी माहिती असते. त्यात नगरविधान, दुर्गविधान, मंदिरविधान, गृहविधान, इ. सर्व प्रकारच्या बांधकामांचे आराखडे येतात. रस्त्याच्या आखणीमध्ये, त्या रस्त्यावरून कोणती वाहने जाणार, तो केवळ व्यापारी मार्ग आहे की सैनिकी मार्ग आहे, या गोष्टी ध्यानात घेतलेल्या आहेत. नगरांचे दंडक, सर्वतोभद्र, स्वस्तिक, पद्मक, नंद्यावर्त, असे अनेकविध प्रकार सांगितलेले आहेत. नगररचनेत दुर्गरचनेलाही महत्त्वाचे स्थान असते. तटबंदी, दरवाजे, बुरुज, खंदक या सर्वांची वर्णने असतात. तसेच जलदुर्ग, भूदुर्ग, वनदुर्ग, इ. प्रकारही आहेत. नगरात राजप्रासाद, सैनिकनिवास आणि इतर सामान्य लोक यांचे वेगवेगळे भाग असतात.

प्रासाद, घरे, मंदिरे, इ. वास्तूंच्या विधानात त्यांतील स्तंभाचे आकारमान व स्थान, द्वारे, भिंती, खिडक्या, मजले, छपरे, छते, दालने, महाल इत्यादींचे सविस्तर वर्णन केलेले असते. सांडपाण्याची व्यवस्था कशी करावी, तेही सांगितलेले असते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वास्तुरचनेसाठी कोणते लाकूड चांगले, तसेच कोणत्या प्रकारच्या विटा किंवा दगड वापरावे यासंबंधी बरेच नियम



विष्णुमंदिराचे अवशेष – किराडू, राजस्थान

केलेले आढळतात. कोणतीही वास्तू सुशोभित करण्यासाठी कोणती कलाकुसर करावी तेदेखील सांगितलेले आहे.

वास्तुरचनेनंतर निरनिराळ्या देवतांची पूजा करायची असते. द्वारपूजाही असते.

वास्तुशिल्प – वास्तुशास्त्राच्या प्रगतीप्रमाणेच भारतात वास्तुशिल्पाचा विकासही प्राचीन काळी झाला. मंदिरे, स्तूप, प्रासाद, लेणी, इ. असंख्य वास्तू चांगल्या किंवा भग्न अवस्थेत आज पाहायला मिळतात. शिल्पशास्त्रज्ञांनी त्यांचे कालखंड स्थूलमानाने निश्चित केले आहेत आणि त्यावरून वास्तुशिल्पाचा विकास कसकसा झाला ते सांगितले आहे. ग्रंथगत वास्तुशास्त्र आणि प्रत्यक्ष दिसणारी वास्तुशिल्पे यांचा परस्पर संबंध किती आहे ते मात्र सांगता येत नाही. प्रा. म. श्री. माटे यांच्या मते, वास्तुशिल्प हे वास्तुशास्त्राचे आचरण आहे किंवा वास्तुशास्त्र हे वास्तुशिल्पाचे प्रतिबिंब आहे, असे म्हणता येत नाही. पण भारतातील काही वास्तू व प्रतिमा वास्तुशास्त्रातील तत्त्वांचे पालन करून निर्माण केलेल्या आहेत, असे अनेक पंडितांचे मत आहे. भारतीय वास्तुशिल्पांची पाश्चात्य वास्तुशास्त्रज्ञांनी मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे आणि भारतातील अलौकिक वास्तुशिल्पे पाहून सारे जग स्तिमित झाले आहे. याचे श्रेय प्राचीन शिल्पकारांना दिले पाहिजे. अभिजात कलावंत आपल्या प्रतिभेने व हस्तकौशल्याने जे सुंदर शिल्प घडवितो, ते शास्त्रीय सिद्धान्तांना अनुसरून घडविलेले असेलच असे नाही.

भारतातील अत्यंत प्राचीन अशा सिंधुसंस्कृतीच्या अवशेषांत नगरांचे जे अवशेष सापडले आहेत, त्यावरून त्या संस्कृतीच्या निर्मात्यांचे वास्तुशास्त्र खूपच प्रगत झालेले होते, असे अनुमान केले जाते. त्या काळातली नगरे अगदी आखीव आणि सर्व सोयींनी युक्त होती. घरेही चांगली, हवा व उजेड आत येतील अशी, अनेक मजली असावी. विटा बनवून त्या भाजण्याची कलाही त्या काळातील लोकांना अवगत होती. त्यांना चांगला गिलावाही करता येत होता.

त्यानंतरच्या दोन हजार वर्षांच्या कालावधीतली नागरी शिल्पांची उदाहरणे आज उपलब्ध नाहीत. अयोध्या, कौशांबी, नालंदा, मथुरा, इ. प्राचीन नगरी ज्या जागी वसलेल्या होत्या, तिथे आता उत्खनन केल्यामुळे त्यांचे बरेच अवशेष हाती लागले आहेत आणि त्या अवशेषांचे संशोधन करून विद्वानांनी काही निष्कर्ष



वेगुनाई येथील मंदिर (जि. वर्द्धान)

काढले आहेत. असे संशोधन सध्या सर्वत्र चालू आहे. ... नागरी शिल्पा... बरेच ज्ञान उपलब्ध होईल असे वाटते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

संरक्षक शिल्पांची प्राचीन उदाहरणे क्वचितच पाहायला मिळतात. इ. स. १२०० च्या आधीचा कोणताही दुर्ग त्याच्या मूळ स्वरूपात सापडलेला नाही. कारण, अनेक महत्वाचे दुर्ग कालांतराने पुन्हा बांधले गेले आहेत.

धार्मिक म्हणजे मुख्यत: मंदिरशिल्पांची स्थिती मात्र अगदी भिन्न व चांगली आहे. नैसर्गिक आपत्ती किंवा मानवी अत्याचार यांमुळे असंख्य मंदिरे नष्ट झाली असली, तरी अजूनही असंख्य मंदिरे चांगल्या अवस्थेत उभी आहेत.

मौर्यपूर्वकालातील वास्तुशिल्पे आज उपलब्ध नाहीत. त्या काळी बांधकामासाठी पाषाणाचा उपयोग फारसा केला जात नव्हता. बहुतेक वास्तू लाकडाच्या असत. त्यामुळे त्या नष्ट झाल्या असाव्या. चंद्रगुप्त मौर्य याच्या दरबारात मेगॅस्थेनीस नावाचा ग्रीक वकील होता. त्याने राजधानीचे वर्णन करताना म्हटले आहे, की पाटलीपुत्र नगरीभोवती लाकडी तटबंदी होती. सम्राट अशोकाच्या राजवाड्यातही लाकडाचा बराच वापर केलेला होता. त्याचे काष्ठशिल्प सात–आठशे वर्षे चांगल्या स्थितीत होते. फाहियान या चिनी प्रवाशाने त्याचे सुंदर वर्णन केले आहे. अशोकाने बौद्ध धर्माच्या प्रसारासाठी जी दगडी शिल्पे निर्माण केली ती अजूनही पाहायला मिळतात. वास्तुशिल्पाची ती सर्वांत प्राचीन उदाहरणे होत. अशोकाने बौद्ध भिक्षूंसाठी विहार बांधले, बुद्धाच्या शरीराचे अवशेष सुरक्षित ठेवण्यासाठी त्यांवर असंख्य स्तूप बांधले; बौद्ध धर्माची प्रार्थनागृहे म्हणून चैत्य निर्माण केले आणि धर्माच्या आज्ञा सर्व लोकांना कळाव्या म्हणून त्या जागोजागी पाषाण-स्तंभांवर कोरून ठेवल्या. अशोकाने ८४००० स्तूप निर्माण केले, अशी आख्यायिका आहे. भारतात जी हजारो लेणी आढळतात, त्यांची निर्मिती अशोकाने सुरू केली. विहार व चैत्यगृहे अशी दोन प्रकारची लेणी सर्वत्र आहेत. भाजे व कार्ले येथील लेणी वास्तुकलेच्या दृष्टीने सर्वोत्कृष्ट गणली जातात. ओडिसात उदयगिरी-खंडगिरीवरील जैन लेणी सनपूर्व पहिल्या व दुसऱ्या शतकांतील आहेत.

सांची, सारनाथ, भरहूत, नंदनगढ, अमरावती येथे प्राचीन स्तूप आहेत. त्यानंतरच्या काळात कुशाण वंशातील राजा कनिष्क याने भारताच्या वायव्य भागात अनेक स्तूप बनवले. इ. स. च्या ९ व्या शतकापर्यंत त्या भागात असंख्य स्तूप निर्माण झाले. ते सर्व गांधार वास्तुशैलीचे आहेत. त्यांच्याबरोबर महाविहारही निर्माण झाले. ही सर्व वास्तुशिल्पे पाषाणाची असून, त्यांत बौद्ध मूर्ती आढळतात. पूर्व भारतात सारनाथ, श्रावस्ती, कसिया, इ. ठिकाणी गुप्त काळापासून इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत स्तूपनिर्मिती झाली.

लेण्यांची निर्मिती इ. स.च्या १०व्या शतकापर्यंत चालू होती. त्यांतील अजंठा, बेडसा, कान्हेरी, नासिक, वेरूळ व बाघ येथील लेणी विशेष उल्लेखनीय आहेत.

देवतांची मंदिरे गुप्तकाळात प्रथम निर्माण झाली. त्यापूर्वीची मंदिरे क्वचितच पाहायला मिळतात. बरेलीजवळ रामनगर येथे एका शिवमंदिराचे अवशेष सापडले आहेत. ते मंदिर इ. स.च्या पहिल्या शतकातले असावे. इ. स. च्या दुसऱ्या शतकांतील भारशिव राजांची मंदिरे नागर शैलीचे पूर्वरूप दाखवितात. त्या मंदिरांच्या द्वारावर गंगा व यमुना यांच्या मूर्ती कोरलेल्या दिसतात. गुप्तकाळापासून पुढे सुमारे हजार वर्षे मंदिर-शिल्पकलेचा खूप विकास झाला. नागर व द्राविड शैलीची असंख्य मंदिरे निर्माण झाली. त्या दोन पद्धतींतून विविध प्रादेशिक पद्धती उदय पावल्या. या सर्व पद्धतींची हजारो मंदिरे आज आपल्याला पाहायला मिळतात.

मुसलमानी वास्तुकला – इ. स.च्या १३ व्या शतकाच्या आरंभी दिल्लीवर मुसलमानांची सत्ता सुरू झाल्यानंतर या देशात मुस्लिम



जामा मशीद–अहमदाबाद

वास्तूंची निर्मिती सुरू झाली. पहिल्या शंभर सवाशे वर्षांतील इमारती खूप मोठ्या व सुशोभित आहेत. त्यांत सुंदर नक्षीकाम

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

केलेले आहे. कुतुबमिनाराच्या शेजारची कुतुब मशीद अशी कलात्मक पद्धतीने सजवलेली आहे. इल्तमशची कबरही तशीच आहे. अलाउद्दीन खिलजीची कबर, अलाइ दरवाजा वगैरे इमारती या पद्धतीच्या आहेत. इ. स. १३२० नंतरच्या बांधकामात साधेपणा फार दिसतो. दिल्लीतली ग्यासुद्दीन तुगलकाची कबर व कलन मशीद ही त्या काळातल्या वास्तुकलेची उदाहरणे आहेत. इ. स. च्या १५व्या शतकाच्या आरंभी पुन्हा सुशोभित इमारती बांधल्या जाऊ लागल्या. त्या काळी अनेक लहान घराणी उदयाला आली व त्यांनी वेगवेगळ्या शिल्पपद्धती उपयोगात आणल्या. जौनपूरच्या शर्की घराण्याच्या तीन मशिदी व कांही कबरी उल्लेखनीय आहेत. त्यांतील सोपे व सज्जे हिंदू पद्धतीप्रमाणे बांधलेले आहेत. मशिदींचे दरवाजे व मुख्य भाग कमानदार आहेत. नक्षीकाम नाजुक नसले, तरी प्रेक्षणीय आहे. माळव्याचा सुलतान होशंगशहा याने मांडू येथे अनेक चांगल्या इमारती बांधल्या. त्या १४व्या शतकातल्या पद्धतीच्या असल्या, तरी त्यांत कलाकुसरही दृष्टीस पडते. त्यांतील जामा मशीद सर्वोत्कृष्ट असून, तिचा विस्तार खूप मोठा आहे.

इ. स. च्या १४व्या शतकात दक्षिणेत स्थापन झालेल्या बहमनी राज्याची राजधानी इ. स. १४२८ पर्यंत गुलबर्गा येथे होती. त्या काळात तिथे बऱ्याच इमारती बांधल्या गेल्या. त्यांपैकी तिथली मोठी मशीद विशेष उल्लेखनीय आहे. हिचे पटांगण उघडे नसून आच्छादित आहे. त्यावर ६३ लहान घुमट आहेत. सुलतानांच्या कबरी म्हणजे चौकोनी, घुमट असलेल्या इमारती असून, त्यांच्या भिंतींवर सुंदर वेलबुट्टी कोरलेली आहे. बिदर शहरापासून ५ मैलांवर नंतरच्या बहामनी राजांच्या कबरी आहेत. त्या भव्य असून, त्यांचे बांधकाम उठावदार आहे.

विजापूरचे आदिलशाही घराणे अगदी परकीय असून, त्यांच्या राज्यातले अधिकारी इराणी होते. त्यामुळे त्यांची शिल्पकामे अगदी वेगळी दिसतात. त्यांत भव्यपणा व कलाकुसर हे दोन्ही गुण आढळतात; त्याचप्रमाणे कारागिरांची कल्पकताही दिसून येते. विजापूरचा प्रचंड गोलघुमट हे त्या पद्धतीच्या वास्तुशिल्पाचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अली आदिलशहाने बांधलेली जामी किंवा जुम्मा मशीद हिंदुस्थानातील सर्वोत्कृष्ट मशिदींपैकी एक ठरली आहे. इब्राहिम रोझा या कबरीत घुमट जास्त उंच असून, सर्व बांधकामात सुंदर नक्षी केलेली आढळते.

मोगल वंशाशी संबंधित भारतीय सारासेनिक शिल्पपद्धती इ. स. च्या १६ व्या शतकात उदय पावली. तिचे पहिले उदाहरण म्हणजे दिल्लीजवळ शेरशहाने बांधलेली मशीद होय. हुमायून बादशहाची कबर, अकबराने बांधलेल्या अनेक मशिदी, फत्तेपूर शिक्री येथील भव्य इमारती यांत हिंदु-मुस्लीम शिल्पकलेचे मिश्रण झालेले आढळते. आग्र्याजवळ सिकंदरा येथे असलेली अकबराची कबर फारच सुंदर आहे.

जहांगीर बादशहाच्या कारकिर्दीत बांधलेल्या मशिदी व कबरी इराणी पद्धतीच्या आहेत. त्यांत हिंदू शिल्पकलेची लक्षणे आढळत नाहीत. शहाजहान बादशहाच्या वेळी मोगल शिल्पकलेचे वैभव कळसाला पोचले. त्या काळातील शिल्पांत औरस कमी आहे, पण नाजुक लावण्य व कलाकुसर खूप आढळते. आग्रा व दिल्ली येथील राजवाडे, ताजमहाल व आग्रा किल्ल्यातील मोती मशीद ही मोगल–शिल्पकाळातील रत्ने होत. दिल्लीची जामा मशीद खूप भव्य असून, तिची रचना प्रमाणशीर व सुंदर आहे. औरंगजेबाच्या कारकिर्दीत मात्र या शिल्पपद्धतीला उतरती कळा आली. इ. स. च्या १७ व्या शतकातली विजापूर येथील शहानवाझखानाची कबर निरनिराळ्या शिल्पांचे अनुकरण करून बांधलेली आहे. मुसलमानी शिल्पांपैकी हे शेवटचे चांगले शिल्प होय.

अकबराच्या पूर्वी जे राजवाडे व किल्ले बांधले गेले, त्यांत संरक्षणाची दृष्टी प्रामुख्याने असल्यामुळे त्यांची तटबंदी खूप भक्कम केलेली आहे.

मुसलमानी सत्ता दिल्लीला स्थापन झाल्यानंतर प्रारंभी जे बांधकाम झाले, त्यात हिंदूंच्या मंदिरांची मोडतोड करून मिळवलेले भाग मोठ्या प्रमाणात वापरलेले आढळतात. त्यानंतरची स्वतंत्रपणे उभारलेली वास्तुशिल्पे पूर्णपणे परकीय पद्धतीची नसून, त्यांत हिंदू कारागिरांची कला स्पष्ट दिसून येते. हिंदूंची अनेक प्रतीके मुस्लिम वास्तुशिल्पांत आढळतात. त्यांची रचना मात्र वेगळी असते.

मोगल काळातील हुमायूनची कबर पूर्वीच्या मुस्लिम वास्तु-



हुमायून बादशहाची कबर-दिल्ली

शिल्पाहून खूप वेगळी आहे. ती गडकोटासारखी बंदिस्त व बागेत बांधलेली आहे. तिची भव्यता, शिल्पवैभव व सौंदर्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आदर्श मनात बाळगूनच नंतरच्या शिल्पकारांनी मोगल वास्तू निर्माण केल्या, असे चार्लस फॅब्री म्हणतात.

मुसलमानांच्या आक्रमणापासून हिंदुस्थानात वास्तुरचनेची नवीन पद्धत सुरू झाली, अशी काही विद्वानांची समजूत आहे. पण वस्तुस्थिती तशी नाही. कारण त्या काळी मुस्लिम वास्तुकला इतकी प्रगत झालेली नव्हती. तसेच मुसलमानी फौजांबरोबर कारागीर आले नव्हते. दिल्लीवर प्रथम सत्ता स्थापन करणाऱ्या सुलतानांनी इथल्याच कारागिरांकडून मशिदी व मकबरे बांधून घेतले. इतकेच नव्हे; तर जुनी हिंदू मंदिरे पाडून त्यांचे कित्येक घटक जसेच्या तसे मशिदी बांधण्यासाठी वापरण्यात आले. सारासेनिक म्हणून ओळखली जाणारी मुस्लिम वास्तुशिल्पेही काही अंशी हिंदू वाटतात. मुस्लिम रचनापद्धती मात्र वेगळी असते. मिहराब व घुमट ही मुस्लिम वास्तुकलेची विशेष अंगे मानली जातात. पण तीदेखील प्राचीन भारतीय शिल्पकामात आढळतात. हिंदूंच्या मंदिरांत कमानीयुक्त देवळ्या असतात, त्यावरून मिहराबची कल्पना उगम पावली आणि बौद्ध स्तूपावरूनच घुमट साकार झाला, असे पंडितांचे मत आहे.

इतर बांधकामे – प्राचीन काळातील अशा प्रकारची शिल्पे उपलब्ध नाहीत. पण मध्ययुगातले राजप्रासाद, घाट, तलाव, किल्ले-कोट, मृतांची स्मारके, इ. वास्तुशिल्पे बरीच पाहायला मिळतात. उ. भारतात ती सर्वत्र आढळतात. राजप्रासाद विलक्षण सुशोभित व कलापूर्ण असतात, यात नवल नाही. कारण तेथे राजेमहाराजे यांचा निवास असतो. पण मृतांची स्मारके म्हणून बांधलेल्या छत्र्या व कबरी यांचे बांधकामही अतिशय सुंदर असते. तलाव व घाट यांच्या बांधकामातही वास्तुकलेचे दर्शन घडते.

भारताच्या सर्व भागांत असंख्य ठिकाणी, प्राचीन व मध्ययुगीन वास्तुशिल्पे चांगल्या किंवा भग्न अवस्थेत पाहायला मिळतात. त्यांतील विविध प्रकारच्या प्रमुख वास्तुशिल्पांची वर्णने या कोशाच्या सर्व खंडांत विखुरलेली आहेत. त्यासाठी पाहा – अंबरनाथ, अजंटा, अजमेर, अट्टालक, अबू पहाड, अमरावती, अमृतसर, आंध्र, आग्रा, आमलक, उज्जैन, उत्तर प्रदेश, उदयगिरी, उदयपूर, एकलिंगजी, ऐहोळे, ओडिसा, कपिलवस्तु, कमान, करवीर, कर्नाटक, कांची, कार्ले, काश्मीर, किल्लेकोट, कुलू, केदारनाथ, केरळ, कोणार्क, खजुराहो, गर्भगृह, गवाक्ष, गुजरात, गुप्त राजवंश, गोपुर, गोमंतक, ग्राम, ग्वाल्हेर, घारापुरी, घुमट, चंबा, चर्च, चालुक्य राजवंश, चितोड, चैत्यगृह, चोळ राजवंश, जगन्नाथपुरी, जुन्नर, जैन कला, तंजाऊर, तमिळनाडू, तोरण, दिल्ली, देलवाडा, देवगिरी, देवालये, धाराशिव, नगरे, नांदेड, नागार्जुनकोंडा, नासिक, नेपाळ, पट्टदकल, पल्लव राजवंश, पाटलिपुत्र, फत्तेपूर शिक्री, बंगाल, बाघगुंफा, बादामी, बिहार, बीकानेर, बीदर, बेडसे, बेलूर, बोधगया, बौद्धकला, भरहूत, भाजे, भारत बृहत्तर,



शहानवाझची कबर–विजापूर (इ. स.चे १७ वे शतक)

भुवनेश्वर, मंडप, मथुरा, मदुरा, मध्य प्रदेश, मराठवाडा, महाराष्ट्र, मांडवगड, मूर्तिकला, मोढेरा, म्हैसूर, राजगृह, राजप्रासाद, राजस्थान, रामेश्वर, राष्ट्रकूट राजवंश, लेणी, लेपाक्षी, वरंगळ, विजयनगर, विजापूर, विदिशा, विमान, विहार, वेरूळ, शिखर, श्रीरंगपट्टण, सांची, सारनाथ, सिंधुसंस्कृती, सोमनाथ, स्तूप, हळेबिड, होयसळ राजवंश. [म. ज्ञा. को.; ल. क. मी.; श्री. प्रसन्नकुमार आचार्य, भा. ओ. रि. इं., सि. ज्यु. व्हॉ.; प्रा. भा. सा. सां. भू.; स्ट. वा. वि.; संमेलन पत्रिका–कला अंक १९५८; प्रा. म. श्री. माटे, ऐ. सं. नि. ८, १९६६; भा. वा. शा.; इं. इं. आ.; हि. इं. ई. आ.; स्प्लें. दं. वॉ. इं.]

वास्तुशांती

वास्तुपुरुषाच्या प्रसन्नतेसाठी आणि बांधलेले घर यजमानाला आयुष्य, आरोग्य, निर्विघ्नता, संपत्ती, इ. गोष्टींनी शुभावह होण्यासाठी जे कृत्य करतात, त्याला वास्तुशांती असे म्हणतात. मत्स्यपुराणात अध्याय २५३ ते २५७ यांमध्ये नवीन वास्तू निर्माण केल्यानंतर करायच्या शांतीचा विधी दिलेला आहे. तदनुसारच ब्रह्मकर्मामध्ये वास्तुशांतीचा प्रयोग बसविलेला आहे. त्याचे कृत्य असे –

प्रथम संकल्प आणि पुण्याहवाचनादी कृत्ये केल्यावर आचार्यवरण करून पुढची कृत्ये त्याच्या द्वारे केली जातात. देवतांच्या स्थापनेसाठी दोन चौकोनी वेदी बनवितात. त्यांपैकी उत्तरवेदीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

चार कोपऱ्यांवर लोखंडी खिळे ठोकतात. त्याच्याजवळ भाताचा बळी ठेवतात. यथाविधि अग्निस्थापना करतात. या सर्व रचनेला वास्तुमंडळ म्हणतात. ग्रहांचे आवाहन व पूजन करतात. वेदीवर शिखी, पर्जन्य, जयंत, इ. ४५ देवतांचे आवाहन करतात. वास्तुदेवता हा एक पुरुष आहे, अशी कल्पना करून त्याच्या निरनिराळ्या अवयवांच्या जागी देवतांची स्थापना करायची असते. वास्तुमंडलाच्या मध्यभागी वास्तुपुरुषाची सुवर्णप्रतिमा ठेवतात. मग इतर सर्व देवतांसह त्याची पूजा करतात. प्रधान होमाच्या वेळी ग्रहांच्यासाठी समिधा, चरू व आज्य यांचे हवन करतात. वास्तुमंडलदेवतांसाठी उंबराच्या समिधा, तीळ, पायस आणि आज्य यांच्या आहुती देतात. वास्तोष्पती या मुख्य देवतेसाठी वरील चारही हविर्द्रव्यांच्या प्रत्येकी १०८ आहुती देतात. त्याचप्रमाणे वास्तोष्पतिसूक्ताने (ऋ. ७.५४) वास्तोष्पतीसाठी बिल्वपत्रांच्या आहुती देतात.

प्रायश्चित्त–होमानंतर सर्व देवतांना यथाविधि उडदांसह चरूचा बली देतात. मग यजमान आपल्या पत्नीसह स्नान करतो व नवी वस्त्रे धारण करतो. मग यजमानदंपतीवर त्याच्या कुटुंबियांसह ऋत्विज अभिषेक करतात. तिहेरी सूत घेऊन पवमान व राक्षोघ्न ही सूक्ते म्हणत नव्या घराभोवती ते गुंडाळतात. त्या वेळी यजमान व त्याची पत्नी दूध व पाणी यांची संतत धार धरीत घराभोवती प्रदक्षिणा घालतात. घराच्या आग्नेय दिशेच्या एका दालनामध्ये कोपऱ्यात गुडघाभर खड्डा खणतात. एका पेटीत सात धान्ये, दहीभात, फुले व शेवाळ या वस्तू घालून तिच्यात वास्तुपुरुषाची प्रतिमा ठेवतात. त्या वेळी मंगलवाद्ये वाजवितात. मग यजमान ती पेटी (किंवा एखादे बोळके) खड्ड्यात ठेवून पुढीलप्रमाणे वास्तुपुरुषाची प्रार्थना करतो –

सशैलसागरां पृथ्वीं यथा वहसि मूर्धनि ।
तथा मां वह कल्याणसम्पत्सन्ततिभिः सह ।।

अर्थ – हे वास्तुपुरुषा, तू ज्याप्रमाणे पर्वत आणि सागर यांच्यासह पृथ्वी शिरावर वाहतोस, त्याप्रमाणे कल्याण, संपत्ती आणि संतती यांच्यासह मला मस्तकी धारण कर.

मग तो खड्डा मातीने भरून टाकतात. यजमान आचार्याला दक्षिणा देऊन शांतिविधी पुरा करतो.

मग निश्चित मुहूर्तावर गृहप्रवेश करायचा असतो. त्या वेळी यजमान दही, अक्षता, गंध, पल्लव, फुले व पाणी घातलेला एक कलश हातात घेऊन उभा राहतो व ब्राह्मणांना पुढे करून त्यांच्या मागून चालत गृहप्रवेश करतो. त्या वेळी 'गृहा मा बिभीत' या मंत्रांचा (वाज. सं. ३.४१–४३) जप करायचा असतो. गृहप्रवेश केल्यावर यजमान गणपतिपूजन व पुण्याहवाचन करतो. त्या वेळी आप्तेष्ट मंडळी दंपतीला अहेर करतात.

प्रत्येक वर्षी अथवा प्रत्येक-ऋतूमध्ये वास्तुशमन होम करावा, असेही सत्याषाढ गृह्यसूत्रात सांगितले आहे (१.८). [हि. ध.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

वाहने

स्थलमार्ग, जलमार्ग व आकाशमार्ग यांवरून दुसरीकडे जाण्यासाठी जी साधने उपयोजिली जातात, त्यांना वाहने म्हणतात. स्थलमार्गाची यात्रा करण्यासाठी पशूंच्या पाठीवर बसणे व त्यांना गाडीला जोडून तिच्यातून प्रवास करणे ही सर्वांत प्राचीन प्रथा होय. माणसांच्या पशुपालक अवस्थेनंतर बरच या वाहनांचा जन्म झाला आहे. वैदिक आर्यांचे रथ हे प्रमुख वाहन होते. प्रायः रथाला दोन घोडे जोडले जात. रथाच्या घोड्यांचे वैशिष्ट्य सांगताना ते सुंदर, तेजस्वी, लाल व पुरुषवाहक असावे, असे म्हटले आहे (ऋ. १.६.२). दोन घोड्यांच्या रथाला तीन चाके असत. त्यावर तीन खांब उभे करीत. रथांना सुवर्णाच्या अलंकारांनी सजवीत. काही काही रथांना सात किंवा दहा चाके असत आणि त्यांना चार किंवा त्याहूनही अधिक घोडे जोडले जात (ऋ.१.१२६.४). काही गाड्यांना चार चार उंट जोडीत (ऋ. ८.६.४८). वैदिक कालात हत्ती, उंट व गाढव या पशूंचाही वाहन म्हणून उपयोग करीत.

आर्येतर जातींत श्रीमंत माणसे एखाद्या ताकदवान माणसाच्या पाठीवरूनही प्रवास करीत. हनुमंताने राम व लक्ष्मण यांना आपल्या पाठीवर घेऊन सुग्रीवाजवळ पोचवले होते (वा. रा. ४.४.३४). राक्षसांच्या जवळही मोठमोठाले रथ असत. याशिवाय त्यांच्याजवळ विविध आकाराच्या पालख्या व डोल्याही असत. या पालख्या किंवा डोल्या माणसे खांद्यावरून वाहून नेत. पालख्या मुख्यत्वे स्त्रियांसाठी असत. महाभारतकालात रथांना प्राधान्य होते. त्यावेळी देशात दूरवर राजमार्ग तयार झाले होते. दूरदूरचा प्रवास मुख्यत्वे रथातूनच होत असे. नलराजाने अयोध्येपासून विदर्भापर्यंतचा प्रवास रथातूनच केला होता. श्रीकृष्णही द्वारकेतून हस्तिनापुरापर्यंत रथातूनच जात असे.

पतंजलीच्या कालात शकट व शकटी या नावाची वाहने प्रचारात होती. शकट म्हणजे मोठी बैलगाडी होय. तिला आठ बैल जोडले जात. प्रवहण नावाचे एक नागरिक-वाहन होते. त्याला दोन बैल जोडीत. नागरिक त्यात बसून नगरात इष्ट स्थळी जात येत.

सिंधुसंस्कृतीची मोहेंजोदडो व हडप्पा ही दोन मुख्य नगरे होती. नदीमार्गे त्यांमधला प्रवास होत असे. त्या संस्कृतीच्या लोकांना विविध प्रकारच्या नौका बनवता येत. तत्कालीन मुद्रांवरही नौकांच्या आकृत्या मिळतात. वैदिक आर्य लोकही नौकानयनात प्रवीण होते. ऋग्वेदात मोठमोठ्या नौकांची वर्णने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ज्ञात (ऋ. १.११६.५; ६.५.१८.१३). रामायण-कालात अनेक प्रकारच्या नौका नद्या आणि समुद्र यांतून संचार करीत. नावांच्या मुक्कामासाठी घाटही बांधलेले असत. नाव चालविण्यासाठी अनेक नाविक असत. कर्णधार नावाचा पुरुष नौकेची योग्य दिशा संभाळीत असे. गंगेच्या एका घाटावर ५०० नावा होत्या, असे रामायणावरून कळते (वा. रा. २.८४.८). या नौकांवरून रथ, घोडे वगैरे स्थलवाहने गंगापार केली जात. पुढच्या कालात राजे-महाराजे लोकांच्या सोईसाठी नद्यांवर सरकारी नावा ठेवीत. या नौकांतून यात्रिकांना निःशुल्क वाहून नेले जाई. उषवदात या राजाने इबा, पारादा, दमणा, तापी, करवेणा व दाहनुका या नद्यांवर यात्रिकांना पार घालण्यासाठी निःशुल्क नावा ठेवल्या होत्या, असा उल्लेख मिळतो.

समुद्रात चालणाऱ्या मोठ्या नौकांना काही छोट्या छोट्या होड्या बांधलेल्या असत. जर मोठ्या नौकेला काही हानी पोचली, तर या छोट्या होड्यांत बसून मोठ्या नौकेवरचे लोक किनारा गाठीत. फाहियान या चिनी यात्रिकाने लंकेपासून चीनपर्यंत ज्या नौकेतून प्रवास केला त्या नौकेवर २०० हून अधिक माणसे व व्यापारी माल होता. फाहियानला लंकेतून यवद्वीपात पोचायला ९० दिवस लागले.

भोजाच्या युक्तिकल्पतरू या ग्रंथात सर्वमंदिर, मध्यमंदिर व अग्रमंदिर या नावाच्या नौका सर्वश्रेष्ठ असल्याचे सांगितले आहे. सर्वमंदिरात अनेक खोल्या असत व तो जणू छोटा राजप्रासादच असे. त्यातून कोश, पशू व अंतःपुरातल्या स्त्रिया वाहून नेल्या जात. मध्यमंदिर ही क्रीडानौका असे व तिच्या मध्यभागी निवासासाठी खोल्या असत. अग्रमंदिर नौकेत पुढच्या अंगी खोल्या असत व मागचा भाग मोकळा असे. या तीन्ही प्रकारच्या नावा समुद्रात दूरवर संचार करीत.

विमानात बसून आकाशमार्गाने संचार करण्याचे उल्लेख पहिल्या प्रथम रामायणात आढळतात. रावणाच्या प्रासादात रथ होते व विमानेही होती. या सर्व विमानांत पुष्पक विमान श्रेष्ठ होते. ते स्वतः विश्वकर्म्याने बनवले होते. अनेक प्रकारच्या आभूषणांनी ते सजवलेले होते. ते लंकेतून अयोध्येपर्यंतचा प्रवास एका दिवसात करीत असे. महानाद करीत ते आकाशातून संचार करी. रामायणानंतरच्या वाङ्मयात देवतांच्या विमानांचे उल्लेखही मिळू लागतात. विमानांचा युद्धातही उपयोग करीत. शाल्वाने आपल्या सौभ नामक विमानातून द्वारकेवर आक्रमण केले होते.

या सर्व वर्णनांवरून असे वाटते, की आर्येतर जातींत विमानविषयक काही ज्ञान होते. आर्यांनी त्यांच्याकडूनच ते ग्रहण केले. भरद्वाजाने त्या ज्ञानावर वैमानिकशास्त्र नावाचा एक ग्रंथ रचला. त्यात अनेक प्रकारची विमाने बनवण्याच्या रीती दिलेल्या आहेत.

समरांगणसूत्रधार या ग्रंथात विमान निर्माण करण्याचा प्रयोग दिलेला आहे.

सांप्रतच्या काळात ही वर उल्लेखलेली सर्व वाहने काही मूळ स्वरूपात तर काही सुधारलेल्या स्वरूपात विद्यमान आहेत. आगगाडी व मोटार ही नवी वाहने आहेत. सांप्रत नौकानयनशास्त्रात व विमानविद्येत खूपच प्रगती झाली आहे. अलिकडेच अवकाशयान या नव्या साधनाने मनुष्य चंद्रापर्यंत जाऊन पोचला आहे. रशिया व अमेरिका यांची अनेक प्रकारच्या संशोधन सामग्रीने युक्त असलेली वाहने शुक्र व मंगळ यांचाही शोध घ्यायला निघाली आहेत.

देवतांची वाहने हा दैवतशास्त्रातला एक भाग आहे. त्यात शिवाचे वाहन नंदी, विष्णूचे गरुड, देवीचे सिंह, सरस्वतीचे मोर किंवा हंस, गणपतीचे उंदीर अशी वाहने सांगितली आहेत. नवग्रहांनाही अशाच प्रकारची वाहने आहेत. बौद्ध संप्रदायात बौद्ध देवतांनी हिंदूंची दैवते हीच आपली वाहने बनवली आहेत. उच्छुष्म, जंभल, प्रसन्नतारा, परमाश्व, विघ्नांतक इ. बौद्ध देवतांनी हिंदूंचे प्रमुख देव आपली वाहने बनवली आहेत. मनुष्य, राक्षस आणि प्रेत यांचीही वाहने करून संचार करणाऱ्या काही देवतांचे उल्लेख आढळतात.

हिंदूंच्या देवस्थानातून विशिष्ट प्रसंगी देवाची पालखीतून, रथातून व नौकेतून शोभायात्रा काढतात. कालमानानुसार बैलगाडी, मोटार, इ. वाहनेही अशा प्रसंगी देवाच्या यात्रेसाठी वापरतात. [प्रा. भा. सा. सां. भू.; इं. बु. इ.]

वाहीक एक प्राचीन देश व लोक. शतपथ ब्राह्मणात भारताच्या पश्चिम भागातील पंजाब, सिंध, इ. प्रदेशातल्या लोकांना वाहीक म्हटले आहे (श. ब्रा. १. ७. ३. ८). महाभारतात वाहीकाविषयी एक श्लोक आहे, तो असा —

शाकलं नाम नगरमापगा नाम निम्नगा ।
जार्तिका नाम वाहीकास्तेषां वृत्तं सुनिन्दितम् ।।
(म. भा. कर्ण. ४४. १०)

अर्थ — शाकल नावाचे नगर आहे; आपगा नावाची नदी आहे. या ठिकाणी जार्तिक नावाचे वाहीक लोक राहतात. त्यांचे वर्तन निंदित असते.

सिंधू व तिच्या साहाय्यक पाच नद्या यांच्यामधल्या प्रदेशाला महाभारतकाळी वाहीक म्हणत (म. भा. कर्ण. ४४.७). शाकल म्हणजे स्यालकोट ही वाहीकांची राजधानी होती. पतंजलीने वाहीक देश हा आर्यावर्ताच्या बाहेरचा प्रदेश असल्याचे म्हटले आहे. मात्र हा देश आर्यावर्ताला लागूनच होता, असे दिसते. पतं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जलीने त्या देशातली अनेक गावें उल्लेखिली आहेत. त्यावरून हा भारतातलाच देश होता, असे अनुमानिता येते. प्राचीन काळी हा देश विशाल व समृद्ध होता. सांप्रतच्या पूर्व पंजाबालाच पूर्वी वाहीक म्हणत असल्याचे डॉ. प्रभुदयाल अग्निहोत्री सांगतात. महाभारतकाळी वाहीक देशावर शल्य नावाचा राजा राज्य करीत होता. [हि. ध.; स्ट. जॉ. ए. मि. इं.; प. का. भा.]

विंध्य सात कुलपर्वतांपैकी एक. नर्मदा व तापी या नद्यांचे उगमस्थान. याच्या विभिन्न भागांना विभिन्न नावे मिळालेली आहेत. विंध्याचा आरंभ गुजरातमध्ये होतो. पुढें मध्य प्रदेशाच्या सागर व दमोह जिल्ह्यांच्या उत्तरेकडून तो बघेलखंड व पूर्वीचे रेवा संस्थान यांमधून जाऊन बिहारमध्ये संपतो. विंध्य व सातपुडा यांचा मिलाफ नर्मदेच्या उगमाजवळ अमरकंटक येथे झालेला असून, त्या ठिकाणचा देखावा कित्येक ठिकाणी आल्हादक व कित्येक ठिकाणी भयप्रद वाटतो. विंध्याचा उत्तरेकडील भाग झाशी, बांदा, अलाहाबाद व मिर्झापूर या जिल्ह्यांतून जातो. विंध्याची उंची कुठेही समुद्रसपाटीपासून २५०० फुटांहून जास्त नाही. याची लांबी ७०० मैल भरते. याचा दगड थराथरांचा व वालुकामिश्रित आहे. त्याच्यात कुठे कुठे सोन्याचा दगडही मिळतो. त्यांत शंखशिंपलेही आढळतात. याची शिखरे पावसाने धुपून गेल्यामुळे त्यांवर माती अगदी थोडी राहिली आहे. वरच्या अंगाला काटेदार झुडपे व खालच्या अंगाला सागाची वनें वाढलेली दिसतात. ग्वाल्हेर, इंदूर व भोपाळ ही विंध्यक्षत्रातली प्रमुख शहरे होत.

विंध्याद्री हा भारतातील सर्वांत प्राचीन पर्वत असल्याचे सांगतात. कुलपर्वतांच्या यादीत समाविष्ट केलेले ऋक्षवान व पारियात्र हे स्वतंत्र पर्वत नसून, ते विंध्यश्रेणीचेच भाग आहेत, असे आधुनिक संशोधकांचे मत आहे. शिप्रा, करतोया, वैनगंगा, तमसा, दशार्णा, विपाशा, शोण व महानदी या नद्याही विंध्य पर्वतश्रेणीवरच उगम पावतात.

विंध्याने भारताचे उत्तर व दक्षिण असे दोन भाग पाडले आहेत. तो उत्तर भारताची दक्षिणेकडील सीमारेषा असून, मध्य भारताचा आधार आहे. नर्मदेच्या दक्षिण किनाऱ्यावरून उत्तरेकडे पाहिले असता विंध्याद्री हा उत्तुंग तटबंदीसारखा दिसतो. या पर्वताला नर्मदेपासून गंगेच्या किनाऱ्यापर्यंत उत्तरेकडे संथ असा उतार आहे.

पुराणवाङ्मयात विंध्याची व अगस्त्याची मिळून एक कथा सांगितली आहे, ती अशी –

एका काळी विंध्य पर्वताने मेरू पर्वताशी स्पर्धा सुरू केली आणि तो हळू हळू वाढू लागला. तो सूर्याला म्हणाला. ' आजवर तू मेरूभोवती प्रदक्षिणा करीत आला आहेस. यापुढे तुला माझ्याभोवती प्रदक्षिणा करावी लागेल. ' असे म्हणून विंध्य इतका उंच झाला, की त्यामुळे सूर्याची गतीच कुंठित झाली. सान्या जगावर अंधार पसरला. देवा–मानवांना वाटले की, प्रलयकालच ओढवला. देव भ्याले आणि अगस्त्याला म्हणाले. ' विंध्य हा तुझा शिष्य आहे. तेव्हा तू त्याला ठेंगणा करून सूर्याचा मार्ग मोकळा करून दे. '

अगस्त्य हा वाराणसी येथे राहत असे. देवांच्या विनंतीवरून तो दक्षिणेकडे निघाला व विंध्यापर्यंत पोचला. गुरू आलेला पाहून विंध्याने त्याला साष्टांग नमस्कार घातला. त्यावर अगस्त्य त्याला म्हणाला. ' मी दक्षिणेकडे जात आहे. तेव्हा मी तिकडून परत येईपर्यंत तू उठू नकोस. ' विंध्याने अगस्त्याची आज्ञा मानली आणि तो तसाच पडून राहिला. अगस्त्य दक्षिणेतून परत गेलाच नाही. त्यामुळे विंध्याला कायमचे पडून राहावे लागले. त्यामुळे जगावरले अरिष्ट टळले (वा. पु. १८).

या कथेचा खरा अर्थ असा आहे, की सर्वप्रथम अगस्त्याने विंध्य पर्वत ओलांडून आर्यांचा दक्षिणेकडे पायरव सुरू केला आणि त्यानंतर आर्यांनी त्याच मार्गाने खाली येऊन दक्षिणेत जागोजाग आपल्या वसाहती स्थापल्या.

विंध्यप्रदेशात प्राचीन काळी मालद, करूप, मेकल, उत्कल, दशार्ण, भोज, तोसल, कोसल, त्रैपुर, वैदिश, नैषध व अवंती ही जनपदे नांदत होती.

गुणाढ्याच्या बृहत्कथेत विंध्याद्रीचे अनेक ठिकाणी वर्णन आले आहे, ते असे –

विंध्याद्रीवर मोठे अरण्य आहे. तिथे भिल्ल, शबर, पिशाच व विद्याधर यांची वस्ती आहे. यांतील कित्येक जमाती रानटी, क्रूर व नरबली देणाऱ्या आहेत.

विंध्याचे ऐतिहासिक कार्य सांगताना श्री. स. आ. जोगळेकर लिहितात, ते असे–

उत्तरेकडून दक्षिणेत येणाऱ्यांना किंवा दक्षिणेतून उत्तरेकडे जाणाऱ्यांना, मग ते प्रवासी असोत किंवा नसोत, आपल्या विस्ताराच्या, निबिड अरण्यांच्या व जंगली जमातींच्या जोरावर विरोध करणे, हे विंध्याद्रीचे प्राचीन काळातील प्रधान कार्य होय. अगस्तीने विंध्याद्रीला नमविले; पण त्याने आपले अडवणुकीचे धोरण सोडले नाही. हा त्याचा बाणा इतिहास सांगतो. सातवाहनांनी उत्तरदिग्विजय करून मगधात आपले साम्राज्य प्रस्थापित केले. पण त्यांची सत्ता तेथे फार काळपर्यंत टिकली नाही. एक दंतकथा अशी आहे, की दक्षिणदिग्विजयाला निघालेल्या विक्रमादित्याचा पराभव करून उत्तरदिग्विजयाच्या इच्छेने त्याचा पाठलाग करणाऱ्या शालिवाहनाचे सैन्य विंध्यकन्या नर्मदा हिने बुडविले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दक्षिणदिग्विजयासाठी निघालेल्या हर्षवर्धनाचा पराजय पुलकेशी चालुक्याने विंध्याद्रीत नर्मदातीरीच केला. [श. क.; सह्याद्री; म. ज्ञा. को.; पु. वि; जॉ. पु; हिं. वि को.]

विंध्यवास (इ. स. चे ३ रे किंवा ४ थे शतक) सांख्यदर्शनाचा एक आचार्य. याच्याविषयी चिनी भाषेतल्या बौद्ध ग्रंथांतच काही माहिती मिळते. परमार्थ नावाचा एक बौद्ध भिक्षू चीनमध्ये गेला होता. त्याने वसुबंधूचे चरित्र लिहिले आहे. त्यात विंध्यवासाच्या विषयात एक प्रसंग आढळतो, तो असा – वसुबंधूच्या काळी अयोध्येत विक्रमराजा राज्य करीत होता. त्याच्या दरबारात एकदा वसुबंधूचा गुरू बुद्धमित्र आणि विंध्यवास या दोघांत वादविवाद झाला आणि त्यात विंध्यवासाच्या प्रखर पांडित्यापुढे बुद्धमित्राला हार खावी लागली.

त्यानंतर विंध्यवास विंध्य पर्वतातल्या आपल्या आश्रमात गेला आणि तिथेच कालांतराने मरण पावला. तो विंध्यारण्यात राहत असल्यामुळे त्याला विंध्यवास हे नाव मिळाले; पण त्याचे खरे नाव रुद्रिक असल्याचे कळते. विंध्यवासाने हिरण्यसप्तती या नावाचा एक ग्रंथ सांख्यशास्त्रावर लिहिला होता. त्याचे खंडन करण्यासाठी वसुबंधूने परमार्थसप्तती या नावाचा ग्रंथ लिहिला; पण दुर्दैवाने विंध्यवासाचा मूळ ग्रंथ आणि वसुबंधूचा खंडनग्रंथ दोन्हीही उपलब्ध नाहीत.

सांख्यकारिका लिहिणारा ईश्वरकृष्ण आणि विंध्यवास हे दोघे एकच असल्याचे काही विद्वान मानतात; पण हे मत सबळ प्रमाणांच्या अभावी सिद्ध ठरण्याजोगे नाही. [गु. सा. इ.]

विंध्याचल क्षेत्र एक देवीक्षेत्र. हे स्थान उत्तर लोहमार्गावरील मिर्झापूर स्टेशनाच्या जवळ अवघ्या चार मैलांवर आहे. मिर्झापूरपासून पक्की सडक त्या क्षेत्रापर्यंत जाते. तिथे देवीची पूजा-अर्चा व यात्रेकरूंचे धर्मकृत्य करणारे पंडे राहतात. यात्रेकरूंच्या सोयीसाठी तिथे धर्म शाळाही आहेत. या क्षेत्रात देवीची तीन प्रमुख मंदिरे आहेत –.

(१) विंध्यवासिनी – हिचे मंदिर गावाच्या मध्यभागी उच्च स्थानी आहे. मंदिरात सिंहारूढ अशी अडीच हात उंचीची तिची मूर्ती आहे. हिला कौशिकी असेही म्हणतात. मंदिराच्या पश्चिमेस बारहभुजा नावाची देवी, एका मंडपात खर्परेश्वर शिव, दक्षिणेस महाकाली आणि उत्तरेस धर्मध्वजा देवी, असा तिचा परिवार आहे. नवरात्रात इथे मोठी यात्रा भरते. त्या वेळी शेकडो ब्राह्मण दुर्गासप्तशतीचा पाठ करतात. हे एक शक्तिपीठ आहे.

महाभारतकाळी या देवीचे माहात्म्य वाढले. हिच्या उत्पत्तीविषयी दोन कथा प्रचलित आहेत, त्या अशा –

ही देवी यशोदेच्या गर्भातून उत्पन्न झाली. वसुदेवाने कृष्णाला यशोदेजवळ नेऊन ठेवले आणि तिच्या बाजेवरच्या मुलीला उचलून आणले. देवकीचा आठवा गर्भ असे समजून कंस त्या मुलीला शिळेवर आपटायला निघाला असता ती त्याच्या हातातून निसटली आणि महाशून्यात अंतर्धान पावली. तीच पुढे विंध्यवासिनी म्हणून प्रसिद्धीस आली.

पार्वती प्रथम काली म्हणजे वर्णाने काळी होती. शिव त्याबद्दल तिची चेष्टा करी. मग तिने गौरी म्हणजे गोरी होण्याचे ठरविले. त्यासाठी ती विंध्य पर्वतावर जाऊन तपाला बसली. त्या तपाने तिच्या देहावरची काळी त्वचा अलग झाली. त्या त्वचारूप देवतेलाच पुढे विंध्यवासिनी व कौशिकी अशी दोन नावे मिळाली. तिने पुढे शुंभ-निशुंभांचा वध केला.

भिल्ल, शबर, पुलिंद, इ. वन्य जमातींनी तिला आपली उपास्य देवता मानले आहे. त्यावरून असे वाटते, की मुळात ही आर्येतर जमातींची देवता असावी. महाभारतकाळी तिची दुर्गा देवतेशी एकात्मता कल्पून तिला पौराणिक धर्मात समाविष्ट करण्यात आले.

(२) महाकाली – वस्तुतः ही चामुंडा देवी आहे. हिच्या स्थानाला कालीखोह म्हणतात. हे क्षेत्र विंध्यवासिनीपासून दोन मैलांवर आहे. या देवीचे शरीर लहान पण मुख खूप मोठे आहे.

(३) अष्टभुजा – हिचे मंदिर कालीखोहपासून एक मैलावर आहे. या देवीला कोणी महासरस्वती असेही म्हणतात.

या तीन्ही देवतांच्या दर्शनाच्या यात्रेला त्रिकोण–यात्रा असे म्हणतात. [कल्याण–तीर्थांक]

विंशोपका कोणत्याही शकात म्हणजे वर्षात घडणाऱ्या घटनांपैकी प्रत्येक घटना पूर्ण म्हणजे वीस भाग आहे, असे कल्पून त्या भागांपैकी एखाद्या वर्षात किती भाग प्राप्त होण्याचा संभव आहे, हे पंचांगात दाखवलेले असते. या सर्व घटना एकशे पाच मानलेल्या आहेत. त्यात वृष्टीपासून धान्योत्पत्तीपर्यंत अनेक गोष्टींचा समावेश आहे.

ज्या वर्षाच्या विंशोपका पाहायच्या असतील, त्या साली वृष्टी कशी होईल, उद्योग किती वाढेल व चोरांपासून उपद्रव किती प्रमाणात होईल, याबद्दल आकडे दिलेले असतात. या आकड्यांची तुलना वीस या आकड्याशी केलेली असते. म्हणून पाचपर्यंत आकडा असल्यास अगदी वाईट, पाच ते दहा कनिष्ठ, पंधरा मध्यम व पंधरा ते वीस उत्तम असे समजतात.

विकुंठ रैवत मन्वंतरात होऊन गेलेले चौदा देव. हे वैकुंठ या नावानेही परिचित आहेत. त्यांची नावे अशी –अजेय,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृश, गौर, जय, भीम, भेत्तृ, दम, दांत, ध्रुव, नाथ, यश, विद्रस, वृष व शुची. [प्रा. च. को.]

विक्रमशिला एक प्राचीन बौद्ध विद्यापीठ. मगधाचा पालवंशीराजा धर्मपाल (७६९–८०९ इ. स.) याने या विद्यापीठाची स्थापना केली. हे विद्यापीठ नेमके कोणत्या ठिकाणी होते, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. श्री. फणींद्रनाथ बोस यांच्या मते हे विद्यापीठ गंगेच्या काठी भागलपूर परगण्यात एका टेकडीवर असावे. श्री. नंदलाल डे म्हणतात, की अंग राजांची राजधानी असलेल्या चंपानगरच्या पूर्वेला चोवीस मैलांवर पत्थरद्वार नामक एक स्थान आहे, तिथेच विक्रमशिला नगरी असावी. डॉ. अळतेकरांचेही मत श्री. डे यांच्या मताप्रमाणेच आहे. पण अलिकडे श्री. सतीशचंद्र विद्याभूषण यांनी भागलपूर जिल्ह्यातील सुलतानगंज हे स्थान म्हणजे प्राचीन विक्रमशिला होय, असे निश्चित केले आहे. पूर्वी हा प्रदेश सहोर किंवा भगल (भंगल) या नावाने प्रसिद्ध होता.

धर्मपाल राजाने इथे विशाल महाविहार बांधला आणि त्यात एकशेआठ अध्यापक नेमले. धर्मपालानंतरच्या पाल राजांनीही या महाविहाराला भरपूर आर्थिक साहाय्य केले. त्यामुळे इ. स. च्या दहाव्या शतकापासून हे भारतातील एक प्रमुख शिक्षणकेंद्र बनले. भरभराटीच्या काळात या महाविहारात सहा विहार किंवा महाविद्यालये होती आणि या प्रत्येक विहारात एकशेआठ अध्यापक नेमलेले होते. महाविहाराची अंतर्गत व्यवस्था पाहण्यासाठी एक मंडळ नेमलेले होते. सहा विहारांचे सहा मुख्य आचार्य आणि महाविहाराचा प्रमुख अशा सात जणांचे हे मंडळ होते.

महाविहाराच्या चारही बाजूंना तटबंदी केलेली होती. तटाला चार दिशांना चार दरवाजे होते. प्रत्येक प्रवेशद्वारावर एक प्रवेशपरीक्षागृह होते. राजा जयपालाने आपल्या कारकिर्दीत अशी आणखी दोन प्रवेशपरीक्षागृहे बांधली होती. या प्रत्येक द्वारांवर दिग्गज पंडितांची नेमणूक केलेली होती. पूर्वद्वारावर आचार्य रत्नाकरशांती, पश्चिमद्वारावर वागीश्वरकीर्ती, उत्तरद्वारावर भट्टारक नरोप (नरोत्पल), दक्षिणद्वारावर प्रज्ञाकरमती, पहिल्या केंद्रद्वारावर रत्नवज्र व दुसऱ्या केंद्रद्वारावर ज्ञानश्रीमित्र हे पंडित होते. हे सहा विहारांचे प्रमुख आचार्य होते.

विक्रमशिला विद्यापीठात एक विशाल सभाभवन होते. सभाभवनाऐवजी प्रांगण होते, असे कोणी म्हटले आहे. त्यात एका वेळी आठ हजार माणसे बसायची सोय होती. त्यावरून इथल्या अध्यापक व विद्यार्थी यांच्या संख्येची कल्पना करता येते. विद्यार्थ्यांना इथे भोजन फुकट मिळत असे. त्याव्यतिरिक्त त्यांना दैनंदिन लागणाऱ्या इतर वस्तूही फुकटच मिळत. हा सर्व खर्च चालवण्यासाठी पाल राजांनी उदार द्रव्यसाहाय्य केले होते. इतर धनिकही त्यासाठी देणग्या देत असत.

विक्रमशिलेच्या तटाच्या मुख्य दरवाज्याच्या एका बाजूला आचार्य नागार्जुन व दुसऱ्या बाजूला आचार्य अतीश यांच्या प्रतिमा रेखलेल्या होत्या. याच द्वाराच्या बाहेर एक धर्मशाळा होती. तिच्यात अतिथी उतरत.

इथे उत्तम उत्तम ग्रंथांचे एक विशाल ग्रंथालय होते. बौद्ध धर्मातील विविध संप्रदाय, वेद, अध्यात्मविद्या, व्याकरण, न्यायशास्त्र, इ. विषय इथे शिकवले जात. मात्र तंत्रविद्येच्या अध्यापनावर विशेष भर होता. कारण इ. स. च्या दहाव्या-अकराव्या शतकांत तंत्रवाद आणि तांत्रिक प्रक्रिया हे बौद्ध धर्माचे प्रमुख अंग बनले होते. इथले अनेक आचार्य व विद्यार्थी तांत्रिक क्रियांचे अनुष्ठान करीत असत. तसेच इथले बरेचसे आचार्य न्यायशास्त्रात अत्यंत प्रवीण होते. इथले द्वारपंडितही समर्थ नैयायिक होते.

या विद्यापीठात भारतातील भिन्न भिन्न भागांतले विद्यार्थी अध्ययनासाठी येत, तसेच परदेशातूनही विद्यार्थी येत. द्वारस्थ आचार्य त्यांची कसून परीक्षा घेत आणि मगच त्यांना विद्यापीठात प्रवेश देत. अनेक तिबेटी भिक्षू इथे राहून अध्ययन करीत आणि ते संपल्यावर तिबेटी भाषेत संस्कृत ग्रंथांचा अनुवाद करीत.

या महाविहाराच्या मध्यभागी बोधिसत्त्वांच्या मूर्ती होत्या आणि एकशेआठ चैत्य होते.

इथे अध्ययन करून परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मगधाचा राजा ' पंडित ' ही पदवी देत असे. अशा पंडितांची उच्च राजकीय पदांवर नेमणूक होत असे आणि समाजातही त्यांना मान मिळत असे.

इथले रत्नवज्र, जेतारी, रत्नकीर्ती, रत्नाकरशांती, ज्ञानश्रीमित्र, दीपंकर श्रीज्ञान किंवा अतीश हे आचार्य आपल्या विद्वत्तेसाठी फार प्रसिद्ध होते.

इ. स. ११९३ मध्ये महंमद बिन बख्तियार याने मगधाचा पाल राजा गोविंद याच्यावर स्वारी केली आणि त्याचा पराभव केला. पुढे थोड्याच वर्षांत त्याने नालंदा, ओदंतपुरी आणि विक्रमशिला या विद्यापीठांचाही समूळ नाश केला. [प्रा. भा. वि.; ज. स्मा. ग्रं.; द्वि. अ. ग्रं.; पा. क.]

विक्रम संवत एक कालगणना. ही गणना बंगालखेरीज सं... उत्तर भारत, काठियावाड व गुजरात या प्र... ३०४४ व... शांत चालू आहे. या संवताचा प्रारंभ कलियुगाची ३०४४ ... उलटल्यावर झाला, अशी कल्पना केलेली आहे. याच्या न... वर्षाचा आरंभ सध्या उत्तर भारतात चैत्र शु. प्रतिपदा व द... भारतात कार्तिक शु. प्रतिपदा या मितीला होतो. पण इ. ...

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

च्या १२ व्या शतकापर्यंतच्या लेखांत याचे कार्तिकादी उल्लेख अधिक येतात; तर पुढे इ. स. १६ व्या शतकापर्यंतच्या लेखांत चैत्रादी निर्देश बहुसंख्य आढळतात. चैत्रादी पद्धतीमुळे उ. भारतातील विक्रम संवत दक्षिणेतील विक्रम संवतापेक्षा सात महिने अगोदर सुरू होतो. या संवताचे दक्षिणेतील महिने अमान्त व उत्तरेतील पूर्णिमान्त आहेत. सौराष्ट्र, गुजरात व राजस्थानचा काही भाग यांत या कालाचा आरंभ आषाढ शु. प्रतिपदेपासून होतो. उदेपूर, जोधपूर, इ. राजस्थानातील संस्थानांत राजकीय व्यवहारासाठी हा संवत श्रावणादी व पूर्णिमान्त धरतात. शालिवाहन शकाप्रमाणेच विक्रम संवताचे महिने चांद्र असून, त्यांची चैत्र, वैशाख, ज्येष्ठ अशीच नावे आहेत. शकात १३५ मिळवले असता चैत्रादी विक्रम संवत आणि १३४ किंवा १३५ मिळवले असता कार्तिकादी विक्रम संवत येतो. तसेच विक्रम संवतातून ५७ वजा केले असता इसवी सन मिळतो.

ही कालगणना प्रथम कोणी सुरू केली, तिचे उल्लेख कसे केलेले आहेत आणि तिला विक्रम हे नाव केव्हा व कसे मिळाले, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत.

डॉ. अ. स. अळतेकर यांच्या मते विक्रम संवताची स्थापना सनपूर्व ५७ या वर्षी मालव गणराज्यात झाली. याचे सुरुवातीचे नाव कृत संवत्सर असे होते. याचा संस्थापक मालवगण किंवा मालवप्रजातंत्र यातील कृत नामक एखादा प्रधान किंवा सेनापती होता आणि त्याच्या नावावरून त्याला प्रथम कृत हे नाव मिळाले. पण याला ऐतिहासिक प्रमाण मिळत नाही. इ. स. च्या सातव्या शतकापासून कृत संवताला मालव संवत असे नाव दिलेले आढळते. कारण लोक कृताचा पराक्रम विसरून गेले होते. मालवराज्यात ही कालगणना अधिक प्रसिद्ध होती, म्हणून तिला मालवसंवत म्हणू लागले. इ. स. च्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत हा संवत माळव्यात व त्याला लागून असलेल्या राजस्थानाच्या भागात प्रचलित होता. पण पुढे त्याचे क्षेत्र वाढले व तो बुंदेलखंड, त्या वेळचा संयुक्त प्रांत, गुजरात, काठियावाड, इ. प्रदेशांत प्रचलित झाला. या वेळेपर्यंत मालव लोकांची सत्ता नष्ट झाली होती. त्यामुळे या संवताला एखाद्या प्रसिद्ध राजाचे नाव द्यावे, असे लोकांना वाटू लागले. त्या काळी सर्व भारतात इ. स. च्या ५ व्या शतकातील गुप्तसम्राट चंद्रगुप्त द्वितीय याच्या यशाचे, दानशूरतेचे व पराक्रमाचे पोवाडे गायले जात होते. तो विक्रमादित्य या नावाने प्रसिद्ध होता. चंद्रगुप्त (१ला) याने स्थापलेला गुप्तसंवत विक्रमादित्याच्या वेळेपर्यंत लुप्त झाला होता. म्हणून लोकांनी मालव संवताला विक्रम संवत असे नाव दिले असावे.

डॉ. राजबली पांडेय यांच्या मते मालव प्रदेशात प्रचलित झालेल्या संवताला मालव संवत असे नाव मिळाले. मालवगणाने शकांचा पराभव केला, म्हणून मालवगणाच्या प्रमुखाला शकारी ही पदवी मिळाली. अभिज्ञान शाकुंतलाच्या एका प्रतीतील उल्लेखावरून त्यांनी हा मालवगणप्रमुख कालिदासाचा आश्रयदाता होता आणि त्याचे नाव विक्रमादित्य असे असून, त्याला साहसांक ही उपाधी होती, असे सांगितले आहे. मालव संवताला विक्रम संवत हे नाव पडण्याचे कारण असे, की इ. स. च्या पाचव्या शतकात चंद्रगुप्त द्वितीय विक्रमादित्य याने भारतातील गणराज्ये मोडून टाकली. इ. स. च्या आठव्या-नवव्या शतकापर्यंत भारतात एकतंत्री राज्य प्रस्थापित झाले होते आणि लोक गणराज्य ही कल्पनासुद्धा विसरले होते. म्हणून मालवगणाऐवजी त्या गणाच्या प्रमुखाचे, म्हणजे विक्रमादित्याचे नाव त्या संवताशी जोडले गेले व विक्रम संवत प्रचारात आला.

डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी पुरातत्त्वविषयक पुरावे व साहित्यिक अनुश्रुती यांच्या आधारे विक्रम संवताविषयी विवेचन केले आहे, ते असे–

विक्रम संवताचा प्रारंभ सनपूर्व ५७ या वर्षी झाला. इ. स. च्या नवव्या शतकाच्या सुमारास या संवताला विक्रम संवत असे नाव मिळाले. त्यापूर्वी याचे नाव मालव संवत असे होते. मालव संवत हे नाव पडण्यापूर्वी विक्रम संवताचे नाव कृत संवत असे होते.

मंदसोर येथे मिळालेल्या नरवर्म्याच्या संवत ४६१ च्या एका लेखात या संवताच्या प्राचीन नावाचा व क्षेत्राचा उल्लेख आहे, तो असा–

श्रीमालवगणाम्नाते प्रशस्ते कृतसंज्ञिते ।

अर्थ – या संवताचे नाव कृत असून, मालवगणात त्याची प्रसिद्धी व स्थापना झाली होती.

हा राजा नरवर्मा चंद्रगुप्त विक्रमादित्याचा समकालीन होता आणि संभवतः त्याच्याच वतीने मालव देशाचा राज्यकारभार पाहत होता.

गुप्त सम्राट चंद्रगुप्त विक्रमादित्य याने मालव प्रदेश जिंकला होता आणि इ. स. ४०० च्या सुमारास उत्तर भारतात व मालव प्रदेशात त्याचे राज्य होते. त्या वेळी विक्रमादित्य, विक्रमांक किंवा विक्रम हे बिरुद सर्वत्र प्रचारात होते.

विक्रम संवताच्या तिसऱ्या शतकापासून सहाव्या शतकापर्यंतचे जे लेख मिळाले आहेत, त्यावरून जयपूरच्या दक्षिणेपासून उज्जयिनीपर्यंतच्या प्रदेशात मालवगणाचा विस्तार होता आणि त्याच प्रदेशात कृत संवत प्रचलित होता, असे कळते. यशोधर्म्याच्या मंदसोर येथील लेखात (संवत ५८९) 'मालवगणस्थितिवशात कालज्ञानाय लिखितेषु ' (= मालवगणाच्या स्थापनेपासून संवताच्या कालगणनेला आरंभ झाला,) असे म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या लेखातील स्थिती शब्दाचा अर्थ स्थापना असा आहे. मालवगणाची स्थापना याचा अर्थ, या गणाची सत्ता पूर्वी लोकांना माहिती नव्हती, असा नाही. सनपूर्व ४ थ्या शतकात मालव लोक पंजाबात वस्ती करून राहिले होते. हे लोक फार पराक्रमी होते. त्यांनी सिकंदराबरोबर जोरदार लढाई केली होती. सनपूर्व दुसऱ्या शतकात मालव लोक जयपूर प्रदेशात येऊन राहिले. कर्कोटनगर हे मालवांचे मुख्य केंद्र होते. तिथे त्यांच्या अनेक मुद्रा सापडल्या आहेत. त्यांच्यावर ' मालवानां जयः ' असे लिहिलेले आहे.

त्यानंतर सनपूर्व पहिल्या शतकात शकस्थानच्या शकांच्या क्षहरात नामक शाखेने सुराष्ट्रावर आक्रमण केले व तिथे आपला अंमल बसवला. मालव लोकांचे उत्तमभद्रांशी वैर होते. या उत्तमभद्रांनी मालवांविरुद्ध लढण्यासाठी विदेशी क्षहरात शकांना आपल्या मदतीला बोलावले. तर मालवांनी गौतमीपुत्र सातकर्णीचे साहाय्य घेतले. सातकर्णीने शकांचा पराभव केला. त्यामुळे मालवांचे स्वातंत्र्य अबाधित राहिले. याच परिस्थितीला अनुलक्षून मालवगणाची स्थिती म्हणजे स्थापना असा उल्लेख मालवकृत संवताच्या लेखात केलेला आहे.

कृत शब्दाचा अर्थ सुवर्णयुग असा आहे. शकांवर विजय मिळवल्यानंतर कृतयुगाची स्थापना झाली, असे मालवांना वाटले व त्यांनी संवतगणनेला कृत असे नाव दिले. अशा प्रकारे या संवताचे निर्देश कृत, मालव व विक्रम या नावांनीं केलेले आहेत. [सं. मि.; पं. ज्यो. शा.; भा. प्रा. रा.; नागरी प्रचारिणी पत्रिका, विक्रमांक, संवत २००० वैक्रम]

विक्रमादित्य (१) (सनपूर्व १ ले शतक) उज्जयिनीचा राजा. विक्रमाच्या चरित्राविषयी इतिहास-संशोधकांत मतभेद आहेत. कित्येक पाश्चात्य व पौर्वात्य इतिहाससंशोधकांच्या मते विक्रम ही ऐतिहासिक व्यक्ती नसून, ती लोककल्पित आहे. काहींच्या मते विक्रम संवताशी विक्रम या व्यक्तीचा काही संबंध नाही; तर काहींनी चंद्रगुप्त द्वितीय हाच विक्रमादित्य होय, असे मानले आहे. पण सांप्रत वाङ्मय, अभिलेख, मुद्रा, इ. सामग्रीच्या अध्ययनातून विक्रमविषयक पुरेसे पुरावे उपलब्ध झाले आहेत.

डॉ. राजबली पांडेय यांनी हालाची गाथासप्तशती, गुणाढ्याची पैशाची भाषेतील बृहत्कथा, सोमदेवाचा कथासरित्सागर, सिंहासनबत्तिशी, वेताळपंचविशी, शुकसप्तती, भविष्यपुराण, जैन पट्टावली, जैनांचे हरिवंशपुराण, प्रभावकचरित, राजशेखराचा प्रबंधकोश, मेरुतुंगाचा प्रबंधचिंतामणी, इंद्रसूरी व देवमूर्ती यांची विक्रमचरिते, मंदसोरचा अभिलेख, लहान मुद्रा, ग्रीक इतिहासकारांची वर्णने, इ. सामग्रीचे अध्ययन करून पुढील निष्कर्ष काढले आहेत –

(१) विक्रमादित्य हा काल्पनिक पुरुष नसून, तो ऐतिहासिक होता आणि सनपूर्व पहिले शतक हा त्याचा काळ होता.

(२) तो मालवगणाच्या गर्दभिल्ल शाखेत जन्मला होता.

(३) तो मालवगणाचा मुख्य होता आणि उज्जयिनी ही त्याची राजधानी होती.

(४) त्याच्या लहानपणी उज्जयिनीसह माळव्यावर शक-क्षत्रपांचे राज्य प्रस्थापित झाले होते.

(५) विक्रमाने या शकांचा पराभव करून त्यांना देशांतून घालवून दिले आणि त्या विजयाचे स्मारक म्हणून सनपूर्व ५७ या वर्षी स्वतःच्यां नावाची संवत ही कालगणना चालू केली. शकांचा पराभव करणारा म्हणून लोकांनी त्याला शकारी विक्रमादित्य म्हणून गौरविले.

विक्रमादित्याच्या पित्याची महेंद्रादित्य, गर्दभिल्ल व गंधर्वसेन अशी तीन नावे आढळतात. महेंद्रादित्य हे नाव बृहत्कथा, कथासरित्सागर, इ. ग्रंथांत येते, गर्दभिल्ल हे जैन वाङ्मयात आढळते आणि गंधर्वसेन हे लोककथांत दिसते.

शकारी विक्रमादित्य

जैन परंपरेत येणारे गर्दभिल्ल हे त्याच्या पित्याचे व्यक्तिनाम नसून वंशनाम असावे. मालवगणाची गर्दभिल्ल नावाची एक मोठी शाखा असावी. सात किंवा दहा राजांचा एक गर्दभिल्ल नामक राजवंश आंध्रांच्या समकालीन होता आणि त्याने शंभर वर्षे राज्य केले, असे विष्णू आणि वायू या पुराणांत म्हटले आहे. गर्दभिल्लाला रासभी किंवा गर्दभी नावाची एक विद्या येत होती आणि त्या विद्येमुळे तो शत्रुपक्षात हलकल्लोळ उडवीत असे. काही संशोधकांच्या मते घोडदळासारखे गाढवांचे किंवा खेचरांचे दळ त्याने संघटित केले असावे.

याच गर्दभिल्लाचा विक्रम हा पुत्र होय. विक्रमाचे उपन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

झाल्यावर चारित्र्यसंपन्न आणि विद्वान आचार्यांनी त्याला विद्या, कला व शास्त्रे शिकवली. त्याने युद्धकलेचेही शिक्षण घेतले. तो यौवराज्याचा भार वाहायला योग्य झाला; पण एवढ्यात उज्जयिनीच्या राज्यावर एक मोठी आपत्ती आली.

या घटनेसंबंधीची कथा प्रभावकचरित नामक जैन ग्रंथात दिली आहे, ती अशी –

कालकाचार्य नावाचा एक जैन साधू होता. त्याला सरस्वती नावाची एक लावण्यवती बहीण होती. तिने ऐन तारुण्यातच परिव्राजकदीक्षा घेतली होती. एकदा ती दोघे भावंडे फिरत फिरत उज्जयिनी नगरीत गेली. तिथे ती रूपसुंदर श्रमणी गर्दभिल्लाच्या नजरेस पडली. तिच्या सौंदर्यावर तो भाळला आणि त्याने तिला आपल्या अंतःपुरात खेचले. बहिणीची अंतःपुरातून सुटका करावी, म्हणून कालकाचार्यांनी राजाच्या खूप विनवण्या केल्या. पण राजाने त्याला दाद दिली नाही.

तेव्हा कालकाचार्याने राजाचा सूड घ्यायचे ठरवले. म्हणून तो सिंधू नदी पार करून शक देशात पोचला. तिथला शक राजा बलदंड होता. त्याच्या जवळ प्रचंड घोडदळ होते. कालकाने त्याला भारतात राज्य मिळवून देण्याचे आमिष दाखवले. शक राजा भारतात आला आणि त्याने उज्जयिनीवर स्वारी केली. त्यात गर्दभिल्लाचा पाडाव झाला व तो रानावनात जाऊन आयुष्य कंठू लागला. उज्जयिनीसह माळवा शकांच्या ताब्यात गेला.

सनपूर्व पहिल्या शतकात भारतावर झालेले शकांचे आक्रमण ही घटना सर्व इतिहासकारांनी मान्य केली आहे. शक लोक बोलन खिंडीतून भारतात उतरले. प्रथम त्यांनी सिंध प्रांतात वस्ती केली. तिथे त्यांनी आपला चांगला जम बसवला. त्या प्रांताला त्यांच्या नावावरून शकद्वीप असे नाव पडले.

शकांनी माळव्याचे राज्य जिंकल्यावर विक्रमही आपल्या मातेबरोबर वनवासात काळ कंठू लागला. तिथेच आपले राज्य परत मिळवण्याचे मनसुबे तो रचीत होता. त्याने हळूहळू मालव युवकांना संघटित करून त्यांना लढाईचे शिक्षण दिले. तसेच त्याने राजस्थान, मध्य भारत व पंजाब या प्रदेशांतील गणराज्यांचे लढाऊ संघ निर्माण करण्याच्या कामी त्या गणांना प्रेरणा दिली. सर्व तयारी झाल्यावर त्याने उज्जयिनीवर स्वारी केली आणि शकांना माळव्यातून घालवून दिले. तो मालवगणाचा नेता आणि उज्जयिनीचा सिंहासनाधिपती बनला. या घटनेचे लोकांना स्मरण राहावे म्हणून त्याने सनपूर्व ५७ या वर्षी आपली नवी कालगणना सुरू केली.

प्रथम विक्रमाने आपला प्रदेश सुस्थिर बनवला आणि नंतर त्याने दिग्विजयाची तयारी सुरू केली. शक लोक उज्जयिनीतून पळाले होते, तरी ते उत्तर कोंकण, सौराष्ट्र आणि सिंध या प्रदेशांत ठाण मांडून होते. त्यांना तिथून हाकलून लावण्यानेच भारत परकीय आक्रमणातून मुक्त होणार होता. आपल्या दिग्विजयाची सुरुवात त्याने उत्तर भारतापासून केली. तो प्रदेश जिंकल्यावर त्याने अपरान्तासह दक्षिणापथ, सौराष्ट्रासह मध्य प्रदेश, अंग व वंग हे प्रदेश जिंकून घेतले. त्याच्या या दिग्विजयाचे उल्लेख कथासरित्सागरात मधून मधून आलेले आहेत.

विक्रमाने तत्कालीन लहान-मोठ्या राजांना जिंकले; पण त्यांना स्थानभ्रष्ट केले नाही. त्याने त्यांच्यावर राजनैतिक प्रभुत्व स्थापित केले आणि सारा देश आज्ञाधारक, संघटित व प्रतिकारक्षम बनवला. या त्याच्या कर्तृत्वामुळेच जनतेच्या हृदयात त्याला चिरंजीव पद लाभले आहे.

विक्रमादित्याचे व्यक्तिमत्त्व बहुमुखी होते. तो विद्याकलांचा आश्रयदाता होता. त्याच्या दरबारात धन्वंतरी, क्षपणक, शंकू, घटखर्पर, कालिदास, अमरसिंह, वेतालभट्ट, वराहमिहिर आणि वररुची ही नवरत्ने असल्याचे उल्लेख आहेत. ही सर्व नावे ऐतिहासिक असोत वा नसोत; पण त्यावरून त्याने विद्वानांना बहुमानपूर्वक आश्रय दिल्याचे कळते.

विक्रमादित्य हा एक आदर्श शासक होता. आदर्श राजाचे सर्व लोकोत्तर गुण त्याच्या अंगी होते. जैनांच्या अनेक ग्रंथांत त्याच्या राज्यशासनाचा गौरव केलेला आहे. लोकरंजन हे त्याचे एकमेव ध्येय होते. त्याने प्रजेसाठी अनेक प्रकारचे कष्ट सोसले. कथासरित्सागरात त्याचे जे वर्णन केले आहे, त्यांतला एक श्लोक त्याचे आगळे राजपण सिद्ध करायला पुरेसा होईल –

स पिता पितृहीनानामबन्धूनां च बान्धवः।
अनाथानां च नाथः स प्रजानां कः स नाभवत् ॥

अर्थ – तो पोरक्यांचा आईबाप होता. तो बंधुहीनांचा बांधव होता. तो अनाथांचा नाथ होता. तो प्रजेचा कोण नव्हता !

तो स्वतःच्या विक्रमाने आदित्य म्हणजे तेजोनिधी ठरला. तो भारतीय गौरवाचे, वैभवाचे, उत्कर्षाचे व ज्ञानाचे प्रतीक बनला. त्यामुळे पुढच्या काळात विक्रमादित्य हे व्यक्तीचे नाव न राहता ती गौरवास्पद उपाधी बनली. चंद्रगुप्त, स्कंदगुप्त, शीलादित्य, यशोधर्मा, इ. सम्राटांनी विक्रमादित्य ही पदवी आपले बिरुद म्हणून लावली. वेदकाळी अश्वमेध करणाऱ्या भूपतींचा जो दबदबा मानला जाई, तोच पुढच्या काळात विक्रमादित्य या पदवीधारकांचा मानला गेला.

अशा या राजर्षीलाही अखेरचे दिवस वाईट आले. दक्षिण भारतातील सम्राट, सातवाहन वंशातील तिसरा राजा सातकर्णी याने युद्धात त्याचा पराभव केला. त्यानंतर थोड्याच काळात विक्रमादित्याचा मृत्यू झाला.

देहानं मृत्यू पावला, तरी कथांच्या रूपानं तो अजरामर झाला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान आणि सारा उत्तर भारत विक्रमविषयक लोककथांनी परिपूर्ण आहे. [विक्रमादित्य, डॉ. राजवली पांडेय, १९६० ; वि. स्मृ. ग्रं.]

(२) चालुक्य राजवंशात विक्रमादित्य नावाचे काही राजे होऊन गेले. पाहा– चालुक्य राजवंश.

विघ्नांतक बौद्धांचा एक देव. हा पंचरक्षामंडलाचा द्वारपाल असून, नील वर्णाचा आणि प्रत्यालीढ आसनावर अधिष्ठित आहे. पाश व वज्र ही आयुधे त्याच्या हातीं असतात. त्याचे केस पिंजारलेले असून, तो भयानक दिसतो. उत्तर दिशेचा स्वामी असलेल्या विघ्नांतकाचे वर्णन निष्पन्नयोगावलीत केलेले आहे, ते असे– त्रिमुख, षड्भुज, हरितवर्ण; वज्र, खड्ग, रत्न व पद्म धारण करणारा, आपल्या शक्तीला आलिंगन देणारा.

हिंदूंच्या समजुतीनुसार गणेश हा विघ्नहर्ता असून, बौद्धमते तो विघ्नकर्ता आहे. त्यामुळे विघ्नांतक हा गणेशाचा प्रतिस्पर्धी बनला आहे. यासंबंधी एक नेपाळी कथा आहे, ती अशी –

ओडियान वज्राचार्य नामक एक पंडित होता. तो विशिष्ट सिद्धी मिळविण्यासाठी वाघमती नदीच्या तीरावर काही तांत्रिक विधान करीत असे. पण गणेशाने त्याच्या साधनेत संकटे आणायला प्रारंभ केला. वज्राचार्यांनी ती विघ्ने दूर होण्यासाठी विघ्नांतकाला आवाहन केले. मग विघ्नांतक प्रकट झाला आणि त्याने गणपतीचा पराभव केला.

वरील कथेतला विघ्नांतक षड्भुज असून, त्याच्या हातांत कर्तरी, कपाल, डमरू, अंकुश, त्रिशूळ व पाश ही आयुधे असतात. अशी मूर्ती बडोदा येथील वस्तुसंग्रहालयात आहे.

विघ्नांतकाची नेपाळमधून आणलेली एक मूर्ती बंगीय साहित्यपरिषदेत आहे. [इं. बु. इ.]

विचारसागर अद्वैत वेदान्त सुलभ करून सांगणारा एक ग्रंथ. संस्कृत न जाणणाऱ्या लोकांची ब्रह्मबोधाची भूक भागविण्यासाठी निश्चलदासाने हा ग्रंथ हिंदीत रचला असून, त्याची मांडणीही पूर्वपक्ष-उत्तरपक्ष अशा शास्त्रीय पद्धतीने केली आहे. या ग्रंथाचे मराठी भाषांतर कै. हरभरे यांनी केले असून, ब्रह्मीभूत वि. ना. जोशी (साखरे) यांनी तो सोपा करून सांगण्यासाठी त्यावर विचारसागररहस्य नावाचे भाष्यही लिहिले आहे. वारकरी संप्रदायात या ग्रंथाचा निष्ठेने अभ्यास केला जातो.

विचारसागरात वेदान्तविचारांचा मोठा साठा आहे, म्हणून त्याला विचारसागर हे नाव मिळाले. हा ग्रंथ सात तरंगांत विभागलेला असून, त्यातील विषय पुढीलप्रमाणे आहेत–

पहिल्या तरंगात अनुबंधचतुष्टयाचे वर्णन आहे. त्याच्या जोडीला अधिकारी व्यक्तीचे लक्षण सांगताना ज्ञानसाधनांचाही विचार केला आहे. पुढच्या तरंगात हाच विषय विस्ताराने वर्णिला आहे. तिसऱ्या तरंगात सद्गुरूचे लक्षण सांगून, शिष्याने त्याची सेवा कशी करावी आणि अध्यात्माचा विचार कसा करावा याचे निरूपण केले आहे. श्रोत्रिय म्हणजे वेदाध्ययन केलेला, ब्रह्मनिष्ठ व शिष्याला उपदेश करण्याची तळमळ असणारा तो सद्गुरू होय, अशी त्याची व्याख्या सांगून काही नकारात्मक बाबीही दिल्या आहेत. चौथ्या तरंगात वेदान्तविचारशास्त्र हे गुरु-शिष्यसंवादरूपाने मांडले आहे. यात ज्ञेय आणि ध्येय अशा रूपांनी ब्रह्माचे प्रतिपादन केले आहे. उत्तम अधिकारी व्यक्तीला ब्रह्म हे ज्ञेय म्हणजे ज्ञानाचा विषय आणि मध्यम अधिकाऱ्याला ब्रह्म हे ध्येय म्हणजे ध्यानाचा विषय असते, असे म्हटले आहे.

पाचव्या तरंगात मध्यम अधिकाऱ्याचा उपदेश व ब्रह्माचे स्वरूप स्पष्ट केले असून, सहाव्यात कनिष्ठ अधिकाऱ्याच्या उपदेशाचा प्रकार सांगितला आहे. या कनिष्ठ अधिकाऱ्याची बुद्धी तीव्र असली, तरी त्याला शंका फार असतात, असे त्याचे लक्षण सांगितले आहे. कनिष्ठ अधिकाऱ्याच्या शंकांचे निरसन करण्यासाठी अनेक उपायही सुचविले आहेत. म्हणजे पर्यायाने चौथ्या तरंगातलाच विषय 'अधिकार तैसा करूं उपदेश' या पद्धतीने मांडला आहे. अखेरच्या तरंगात सर्व शास्त्राचा समारोप करताना ज्ञानोत्तर जीवनक्रमाचा म्हणजे जीवनमुक्तांचा व्यवहार आणि देहपातानंतरची विदेहमुक्ती यांचे वर्णन केले आहे. पाहा – निश्चलदास. [विचारसागररहस्य]

विचित्र वीणा एक तंतुवाद्य. याचे स्वरूप स्थूलमानाने बीन वाद्याप्रमाणे असते. फरक इतकाच, की बीनची दांडी बांबूची असून, तिच्यावर पडदे बसविलेले असतात, तर विचित्र वीणेची दांडी लाकडाची असून ती, पोकळ व अधिक रुंद असते. तिच्यावर पडदे नसतात. दांडीचा वरचा भाग सपाट आणि खालचा भाग गोलाकार असतो. दांडीची लांबी सुमारे तीन फूट व रुंदी सहा इंच असते. दांडीच्या दोन्ही बाजूंना सुमारे दीड फूट व्यासाचे भोपळे बसविलेले असतात. दांडीवर एका बाजूला हस्तिदंती घोडी असते. पितळी व पोलादी पाच किंवा सहा मुख्य तारा घोडीवरून घेऊन व दांडीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या तारदानातून नेऊन बाजूला असलेल्या खुंट्यांना बांधलेल्या असतात. याशिवाय बाजूच्या तीन तारा असतात. [illegible] वाद्यात अनुध्वनीसाठी कमीअधिक लांबीच्या सुमारे तेरा तारा असतात. त्या मुख्य तारांच्या खालच्या बाजूला समांतर असतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तारांवर उजव्या हाताने एक काचेचा किंवा गारेचा गोळा मागे-पुढे फिरवून स्वर काढतात. हे वाद्य जलद लयीत वाजविणे कठीण असते. [भा. वा. इ.]

विजय जैन दैवतसमूहातला एक यक्ष. हा चंद्रप्रभ तीर्थंकराचा सेवक आहे. याचे वर्णन असे — श्यामवर्ण. त्रिनेत्र. तीन हातांत फल, माला व परशू आणि चौथ्या हाताची वरदमुद्रा. श्वेतांबरमते हंसवाहन. द्विभुज आणि त्यांत चक्र व मुद्गर धारण करणारा. ग्वाल्हेर येथील शिल्पात याची एक स्पष्ट मूर्ती आढळते. [जै. इ.]

विजयगुप्त (इ. स. चे १५वे शतक) मनसामंगल कविपरंपरेतील एक लोकप्रिय बंगाली कवी. याचा जन्म बकेरगंज जिल्ह्यातील फुल्लश्री नावाच्या गावी झाला. त्याच्या बापाचे नाव सनातन आणि आईचे नाव रुक्मिणी होते. हा जातीचा वैद्य होता. याचे मनसा-मंगल काव्य मनसेच्या पूजाप्रसंगी म्हटले जाते. हा प्रतिभासंपन्न कवी म्हणून प्रसिद्ध नाही; परंतु याने आपल्या काव्यात अनेक नवीन छंदांचा प्रयोग केला आणि व्याजस्तुती हा अलंकारही यानेच सर्वप्रथम उपयोगात आणला. म्हणून साहित्यशास्त्रदृष्ट्या विजयगुप्ताचा मान मोठा आहे. पाहा — मनसा. [हि. बें. लँ. लि.; बं. सा. सं. इ.]

विजयदास (इ. स. च्या १७ व्या शतकाचा उत्तरार्ध) एक कन्नड संतकवी. याचा जन्म रायचूर जिल्ह्यातल्या मानवी नामक गावी झाला. हे गाव तुंगभद्रा नदीच्या तीरावर आहे. विजयदासाच्या पित्याचे नाव श्रीनिवास व मातेचे नाव कूसम्मा होते.

घरची अत्यंत गरिबी असल्यामुळे विजयदासाला आपल्या कुटुंबाचा निर्वाह करता येईना. म्हणून तो विरक्त झाला आणि गृहत्याग करून काशीला निघून गेला. तिथे मणिकर्णिका घाटावर त्याने बराच काळ तप केले. पुढे एका रात्री कन्नड संत पुरंदरदास याने त्याला स्वप्नदर्शन दिले व विजयविठ्ठल असे त्याचे नाव ठेवले. पुरंदरदासाकडूनच त्याला काव्यस्फूर्ती मिळाली. असे सांगतात, की विजयदासाने कन्नड भाषेत पंचवीस हजार पद्ये रचली आहेत. त्यामुळे पुरंदरदासानंतर कवी म्हणून विजयदासाचेच नाव झाले आहे.

कर्नाटकातल्या हरिदास संप्रदायात विजयदासाच्या सुळादी नामक पद्यांना विशेष महत्त्व आहे. या सुळादीमध्ये विजयदासाने भक्ती, ज्ञान व संप्रदायाची तत्त्वे यांचे सहज-सुबोध शैलीत प्रतिपादन केले आहे. [हि. क., भ. तु. अ.]

विजयनगर एक हिंदू साम्राज्य व राजधानीचे नगर. कर्नाटक साम्राज्य किंवा कन्नड लोकांचे साम्राज्य या नावाने समकालीन लोक विजयनगरच्या साम्राज्याला ओळखीत असत. विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास म्हणजे तीनशे वर्षे या साम्राज्याने हिंदू धर्माचे आणि संस्कृतीचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी जे काही कार्य केले, त्याचा इतिहास होय.

इ. स. १३०० च्या सुमारास बहुतेक सर्व उत्तर हिंदुस्थान दिल्लीच्या सुलतानांच्या अंमलाखाली होता आणि दक्षिण भारतात देवगिरी, वरंगळ, द्वारसमुद्र व मदुरा येथे स्वतंत्र हिंदू राजवटी होत्या. या हिंदू राजांच्याही आपसांत नेहमी लढाया होत असत. अशा वेळी अलाउद्दीन खिलजीने आपला सेनापती मलिक काफूर याला दक्षिण हिंदुस्थान जिंकून खंडणी वसूल करायला तिकडे पाठवले. त्याने आक्रमण करून इ. स. १३०७ च्या सुमारास देवगिरी, इ. स. १३१० मध्ये वरंगळ व इ. स. १३११ मध्ये द्वारसमुद्र व मदुरा यांचा पाडाव केला. इ. स. १३११च्या सुमारास देवगिरीचा रामदेवराव मरण पावला व त्यानंतर तीन वर्षांच्या आतच त्याचा जावई हरपाळदेव याने मुसलमान सैन्य आपल्या मुलखातून हाकलून लावले. इ. स. १३१६ मध्ये अलाउद्दीन मेल्यावर इतर हिंदू राजांनीही हरपाळदेवाचाच कित्ता गिरवला. परंतु मुबारक खिलजीने पुन्हा दक्षिणेवर धाड घातली. इ. स. १३१८ मध्ये हरपाळदेवाला ठार करण्यात आले आणि लवकरच मुबारकचा सेनापती खुस्रूखान याला इतर हिंदू राजे शरण गेले. इ. स. १३२० मध्ये दिल्लीच्या तख्तावर तुघलुक घराणे आरूढ झाले.

कांपिली हे दक्षिण भारतात एक स्वतंत्र राज्य होते. त्यात धारवाड, बेल्लारी, रायचूर, अनंतपूर, चितळदुर्ग व शिमोगा हे जिल्हे समाविष्ट होते. मुहम्मद तुघलुकाने त्याच्यावर इ. स. १३२६ साली स्वारी केली. कांपिलीदेव त्या लढाईत मारला गेला. त्याच्या सर्व पुत्रांना आणि सरदारांना मुहम्मद तुघलुकाने कैद केले व सक्तीने बाटविले. हरिहर आणि बुक्क हे कांपिलीदेवाचे सरदार होते. सुलतानाने त्या दोघांना दिल्लीला नेऊन बाटविले व कांपिली राज्याच्या बंदोबस्तासाठी आपले सेनापतीसुभेदार म्हणून परत पाठवले. धर्मांतर झाले, तरी त्यांना इस्लामविषयी मुळीच प्रेम नव्हते. उलट, हिंदू धर्माविषयी त्यांच्या मनात दृढ भक्ती होती. म्हणून त्यांनी विद्यारण्यांना गुरू मानले. विद्यारण्यांनी शृंगेरीचे शंकराचार्य विद्यातीर्थ यांच्या संमतीने हरिहर व बुक्क यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले. नंतर त्यांनी हरिहर याला कांपिलीचा राजा केले. आनेगुंदी येथे त्याची राजधानी होती. सर्वसामान्य लोकांचा त्यांच्या शुद्धीकरणाला विरोध होता. म्हणून विद्यारण्यांनी जाहीर केले, की भगवान

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विरूपाक्षाचा प्रतिनिधी म्हणून हरिहर राज्य करील. प्रारंभी राजमुद्राही देवाच्या नावाचीच करण्यात आली .आणि अशा रीतीने लोकांचा विरोध शमविण्यात आला.

विजयनगर येथे संगम, साळुव, तुळुव व आरविडू या चार वंशांनी राज्य केले. त्यांची क्रमशः माहिती अशी –

संगम घराणे–हरिहर (पहिला) (इ. स. १३३६–१३५६)– याच्या पित्याचे नाव संगम असे होते. म्हणून या घराण्याला संगम हे नाव मिळाले. इ. स. १३३६ मध्ये तो या नव्या राज्याचा राजा झाला. ते राज्य धारवाडपासून पूर्वेला नेलोरपर्यंत पसरलेले होते. स्वतःच्या राज्याभिषेक या घटनेचे स्मारक म्हणून त्याच दिवशी त्याने विजयनगर या नव्या राजधानीचा पाया घातला. आपले धाकटे भाऊ कंपण्ण, बुक्कण्ण, मुद्दाप्पा व माराप्पा यांच्या मदतीने त्याने पहिली सात वर्षे आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापण्याचा प्रयत्न केला. विद्यारण्यस्वामींचा सहवास आणि उपदेश यांमुळे हरिहराचे खाजगी जीवन पवित्र झाले व त्याची राजकीय दृष्टी विस्तृत झाली. तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर नवीन शहराची स्थापना केल्यावर विद्यारण्यांना मान देण्याच्या हेतूने त्या शहराला त्याने विद्यानगर किंवा विजयनगर असे नाव दिले.

हरिहराच्या कारकिर्दीत त्याच्या राज्याचा विस्तार पुष्कळ झाला. त्याने इ. स. १३४६ साली होयसळांचे राज्य जिंकून घेतले. हरिहर व त्याचा भाऊ बुक्क यांनी तुंगभद्रेच्या उत्तरेचा व दक्षिणेचा मुलूख हस्तगत केला. इ. स. १३४३ च्या पूर्वीच कंपण्ण याने मन्मेयदेवापासून उदयगिरी जिंकून घेतले व तो नेलोर व कडाप्पा यांपैकी बऱ्याच मोठ्या भागाचा मालक बनला. माराप्पाही शिमोगा व उत्तर आणि दक्षिण कानडचातील कदंब राजांच्या मुलखावर चालून गेला व त्याने अरबी समुद्रापर्यंत विजयनगरचा अंमल बसवला. हरिहराने मदुरेच्या सुलतानावरही आपली फौज पाठवली आणि त्याचा पराभव केला.

इ. स. १३४७ मध्ये दक्षिणेतील मुसलमान सरदारांनी दिल्लीच्या मुहंमद तुघलुकाविरुद्ध बंड पुकारले व गुलबर्ग्याला एक स्वतंत्र राज्य स्थापन केले. काही काळाने तिथला पहिला सुलतान अलाउद्दीन हसन गंगू किंवा बहमनशाह याने दिल्लीच्या सुलतानाचा जो मुलूख हरिहराने घेतला होता, त्यावर आपला हक्क सांगण्यास सुरवात केली. हा हक्क प्रस्थापित करण्याकरिता इ. स. १३५१ मध्ये तो भीमा उतरून सागर बळकावून बसला. नंतर करवजूर, कणवारी व मुधोळ घेण्याकरिता त्याने आपले सरदार कुतुब उल्मुल्क व मुबारकखान यांना पाठवले. त्यांना तोंड देणे हरिहराच्या सरदारांना अशक्य झाले. म्हणून हरिहराला बहमनी सुलतानाबरोबर तह करावा लागला. त्यानुसार कृष्णेच्या उत्तरेचा पुष्कळसा मुलूख व मोठी रक्कम हरिहराने सुलतानाला दिली.

इ. स. १३५६मध्ये हरिहर मृत्यू पावला असावा. कारण त्यानंतरच्या कागदपत्रांत त्याचा उल्लेख आढळत नाही. हरिहराच्या कारकिर्दीत अनेक राजकीय घडामोडी झाल्या. त्याच्या कारकिर्दीत झालेल्या अनेक लढायांत त्याने स्वतः जरी भाग घेतला नाही, तरी आपले राज्य सुरक्षित राखण्यासाठी त्याने खूप प्रयत्न केले. तो कुशल प्रशासक होता. आपला विश्वासू मंत्री अनंतरस चिक्क उडैय याच्या साहाय्याने त्याने विजयनगर साम्राज्याचा बळकट पाया घातला.

राज्याचा महसूल वाढावा यासाठी त्याने विशेष प्रयत्न केले. त्याने शेतकऱ्यांना अल्प भाड्याने जमिनी दिल्या आणि त्यांना जंगले तोडून जमिनी लागवडीखाली आणायला प्रोत्साहन दिले. तसेच, त्याने आपल्या देशाचे स्थल, नाडू आणि सीमा असे तीन विभाग पाडले आणि त्यांवर प्रशासनासाठी व महसूल गोळा करण्यासाठी अधिकारी नेमले. त्यामुळे राज्याचे उत्पन्न वाढले आणि स्थानिक पातळीवरील प्रशासनही सुधारले.

बुक्क (पहिला) (इ. स. १३५६–१३७७)– हरिहराला मुलगा नव्हता. म्हणून त्याच्यानंतर त्याचा भाऊ, प्रधान मंत्री व राजकारणातील सहकारी बुक्क (पहिला) हा गादीवर बसला. राज्यावर आल्यावर प्रथम त्याने स्वतःचे आसन बळकट केले. हरिहर (पहिला) याने राज्याबाहेरच्या प्रांतांचे प्रशासन आपल्या भावांकडे सोपवले होते. ते जरी विजयनगरची केंद्रसत्ता मानीत होते, तरी स्वतःच्या प्रांतात आपल्यालाच सर्वाधिकारी समजत होते. उदयगिरीचा सुभेदार कंपण्ण (पहिला) इ. स. १३५५ च्या सुमारास मरण पावल्यावर त्याच्या दोघा मुलांनी तो प्रांत आपसांत विभागून घेतला. पण या घटनेत राज्याच्या फुटीरपणाची बीजे आहेत, हे जाणून बुक्काने आपल्या पुतण्यांच्या जागी आपल्या मुलांना सुभेदार नेमले आणि केंद्रसत्तेचे प्रतिनिधी म्हणून त्यांना कारभार पाहायला सांगितले. भास्कर भवदूर हा उदयगिरीचा, विरूपण्ण हा कुमार कंपण्ण हा मुळबागल आणि पडैविडू इथला, आणि चिक्क कंपण्ण पहिल्यांदा पेनुगोंड व नंतर आरग येथील, मल्लप व हरिहर (दुसरा) हे होयसळराज्याचे सुभेदार झाले.

त्यानंतर बुक्काने तमिळ प्रांतावर आपले सैन्य पाठवले. तिथला राजा शंबुवराय व त्याचा पुत्र हे दोघेही लढाईत मारले गेले आणि तमिळ प्रांत विजयनगरच्या ताब्यात आला.

त्यानंतर थोड्याच काळात बहमनी सुलतान मुहंमद शाह बहमनी (पहिला) याच्याशी बुक्काची लढाई झाली. मोठ्या सैन्यानिशी त्याने कृष्णा-तुंगभद्रा दुआबाला वेढा दिला. मोठे युद्ध झाले. त्यात बुक्काचाच विजय झाला, असे दिसते. कारण मुहंमद शाहने कृष्णा नदी ही विजयनगर व बहमनी राज्य यांमधली सरहद्द आहे हे बुक्काचे म्हणणे मान्य करायला नकार दिला होता व त्यावरून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

युद्ध उद्भवले होते. तहाच्या वेळी कृष्णा नदी हीच सरहद्द ठरवण्यात आली. फक्त कृष्णेच्या दक्षिण तीरावरील काही महालांवर दोन्ही राज्यांची संयुक्त सत्ता मान्य करण्यात आली. ही लढाई इ. स. १३६५ मध्ये संपली.

त्यानंतर थोड्याच काळात बुक्काने कोंडवीडूचे रेड्डी राज्य जिंकले आणि ते आपल्या राज्याला जोडले.

पुढे इ. स. १३७०च्या सुमारास कुमार कंपण्णाच्या आधिपत्याखाली बुक्काने मदुरेच्या सुलतानावर सैन्य पाठविले. तिथेही घनघोर युद्ध झाले. त्यात सुलतान मारला गेला व मदुरेचे राज्य बुक्काच्या ताब्यात आले. त्यामुळे रामेश्वरापर्यंतचा सर्व दक्षिण हिंदुस्थान विजयनगरच्या आधिपत्याखाली आला. परत येताना कंपण्णाने अनेक देवालये दुरुस्त केली व मुसलमानांनी जप्त केलेली हिंदूंची इनामे पुन्हा चालू केली.

कुमार कंपण्ण जसा शूर सेनापती होता, तसाच कुशल शासकही होता. पण दुर्दैवाने त्याचा मृत्यू लवकर झाला (इ. स. १३७४). त्यानंतर इ. स. १३७७ मध्ये बुक्क मरण पावला.

बुक्क हा त्याच्या काळातील सर्वश्रेष्ठ राजा होता. विजयनगरच्या साम्राज्याचा तोच खरा शिल्पकार होता. तो शूर योद्धाही होता. मुसलमानांविरुद्ध त्याने मोठा विजय मिळवला आणि दक्षिण भारतातून त्यांचा अंमल नाहीसा केला. धर्मांधतेच्या त्या काळात त्याने आपल्या राज्यातील सर्व धर्मांच्या लोकांच्या बाबतीत समान दृष्टी ठेवली. केवळ हिंदूच नव्हेत, तर ज्यू, ख्रिस्ती व मुसलमान यांनीही त्याला आपला व आपल्या धर्माचा रक्षणकर्ता मानीत.

वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी त्याने पुष्कळ प्रयत्न केले. त्याने स्वतःला वेदमार्गप्रतिष्ठापक ही पदवी घेतली. त्याने अनेक वैदिक विद्वानांना आश्रय दिला आणि आपले कुलगुरू माधवाचार्य (विद्यारण्य) व त्यांचे बंधू सायणाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली वेदांवर व इतर वैदिक वाङ्मयावर भाष्ये लिहवून घेतली. सायणाचार्यांनी चारही वेदांवर व ब्राह्मणग्रंथांवर भाष्य लिहिले.

हरिहर (दुसरा) (इ. स. १३७७–१४०४) — बुक्करायाची पहिली राणी गौरांबिका हिचा मुलगा हरिहर त्याच्या मागून गादीवर बसला. सुरवातीला कोकण आणि तमिळ प्रांत यांतील लोकांनी त्याच्याविरुद्ध बंड केले. पण हरिहर (दुसरा) याचा पुत्र विरूपाक्ष किंवा विरूपण्ण ओडेयर् याने कठोरपणे ते मोडून काढले.

त्यानंतर बहमनी सुलतान मुजाहिद शाह याने विजयनगरवर स्वारी केली; पण त्यात त्याला यश आले नाही. अदोनीच्या किल्ल्याला त्याने परतताना वेढा दिला; पण तो किल्लाही त्याला सर करता आला नाही. आणि आपल्या राजधानीला परत जात असता, त्याच्या तंबूतच त्याचा खून झाला (इ. स. १३७८). बहमनी राज्य निष्प्रभ झालेले पाहून, हरिहराने मोठे सैन्य घेऊन कोकण आणि उत्तर कर्नाटक या भागाला वेढा दिला. या युद्धातील दोन ठळक घटना म्हणजे बनवासीचा सुभेदार माधव मंत्री याने तुरुष्कांचा पराभव करून गोवा घेतला आणि सात कोकणे आपल्या आधिपत्याखाली आणली. तुरुष्क म्हणजे बहमनी सुलतानाचे सुभेदार असावे. उत्तर कोकणातील चौल आणि दाभोळ ही बंदरेही हरिहराच्या ताब्यात आली. त्यामुळे दक्षिण भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्याचे प्रभुत्व स्थापित झाले.

त्यानंतर हरिहराने रेड्डींच्या कोंडवीडू राज्याकडे मोर्चा वळवला. त्याने विजयनगरच्या सरहद्दीला लागून असलेल्या अद्दंकी व श्रीशैलम या प्रांतांवर स्वारी करून ते जिंकून घेतले. श्रीशैलम जिल्हा हा वेलमांच्या राचकोंडाच्या सरहद्दीवर होता. त्यामुळे वेलमा राजा अनपोता नायडू (पहिला) याने बहमनी सुलतान मुहंमद शाह दुसरा याची मदत मागितली आणि युद्धाची तयारी केली. तेव्हा हरिहर (दुसरा) याने आपला पुत्र इम्मडी बुक्क याच्या आधिपत्याखाली वेलमांवर चढाई करण्यासाठी सैन्य पाठवले. इम्मडी बुक्काच्या सैन्याने वरंगळपर्यंत मजल मारली आणि कोट्टकोंडा येथे मुसलमानांच्या घोडदळाचा पराभव केला. इ. स. १३९०–९१ मध्ये वेलमा राजाने बहमनी सुलतानाच्या मदतीने उदयगिरीवर हल्ला केला. देवराय हा तिथला सुभेदार होता. रामचंद्र ओडेय या देवरायाच्या पुत्राने त्याचा पराभव केला. त्यानंतर सात वर्षांनी म्हणजे इ. स. १३९८ मध्ये हरिहराने पुन्हा वेलमा राजा व बहमनी सुलतान फीरूज शाह यांच्यावर चढाई केली. सुरवातीला जरी फीरूज शाहाला यश मिळाले, तरी शेवटी त्याला माघार घ्यावी लागली व काही मुलूखही गमवावा लागला.

हरिहर (दुसरा) याची शेवटची काही वर्षे शांततेत गेली. इ. स. १४०४ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्याच्या कारकिर्दीत विजयनगरचे साम्राज्य चारही बाजूंनी वाढले. त्याच्या ताब्यात असलेल्या बंदरांमुळे युरोप आणि आशिया खंडातून संपत्तीचा ओघ त्याच्या राज्यात सुरू झाला. मंगळूर, बरकूर व गोवा या प्रांतांवर त्याने आपले सरदार राज्यव्यवस्थेसाठी नेमले, तर महत्त्वाच्या प्रांतांवर त्याने आपल्या पुत्रांची सुभेदार म्हणून नेमणूक केली. विरूपाक्ष हा तमिळ प्रांताचा, इम्मडी बुक्क आरग व होयसळ प्रांतांचा आणि देवराय (पहिला) उदयगिरी प्रांताचा सुभेदार होता.

आपल्या पित्याप्रमाणेच हरिहर (दुसरा) याने दक्षिण भारतात वैदिक धर्माचा प्रसार केला. नेलूर दानपत्रात त्याला वैदिकमार्गस्थापनाचार्य, चतुर्वर्णाश्रमपालक, धर्मधुरीण, इत्यादी पदव्या दिलेल्या आढळतात. तो विद्वानांचाही आश्रयदाता होता.

हरिहराच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये राजपदाकरता भांडणे सुरू झाली. त्यांत त्या वेळी जिंजीचा सुभेदार असलेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

विरूपाक्ष (पहिला) हा विजयी झाला. त्याने सुमारे वर्षभर (इ. स. १४०४–१४०५) राज्य केले. त्याच्या नंतर मुळवागलचा सुभेदार बुक्क (दुसरा) गादीवर बसला. त्यानेही सुमारे वर्षभर (इ. स. १४०५–१४०६) राज्यकारभार केला.

देवराय (पहिला) – (इ. स. १४०६–१४२२) आपला भाऊ बुक्क (दुसरा) याला पदच्युत करून देवराय (पहिला) गादीवर बसला. तो हरिहराला राणी मेलांबिकेपासून झालेला मुलगा होता. त्याची बहुतेक सर्व कारकीर्द बहमनी सुलतान, राचकोंडाचे वेलमा व कोंडविडूचे रेड्डी यांच्याशी लढण्यांत गेली. त्या शत्रूंशी समर्थपणे झुंज देऊन त्याने आपले राज्य वाढवले.

देवराय (पहिला) राज्यावर आल्याबरोबर फीरूज शाह बहमनीने वेलमा व रेड्डी राजांच्या मदतीने त्याच्या प्रदेशावर स्वारी केली. फिरूज शाहाने दुआबाला वेढा दिला आणि वेलमा व रेड्डी राजांनी त्याच्या पूर्वेकडील प्रांतांवर आक्रमण केले. देवरायाने मोठ्या सैन्यानिशी दोआब प्रदेशात फीरूज शाहाला रोखून धरले. या लढाईविषयी मुसलमान इतिहासकारांत एकवाक्यता नाही. पण देवरायाने सुलतानाशी तह केलेला दिसतो.

पूर्वेकडील चढाईत मात्र वेलमा व रेड्डी यांनी बरेच विजय मिळवले. कडाप्पा जिल्ह्यातील पोट्टपीनाडू व पुलुगुलनाडू या प्रदेशावर पुढे सात वर्षेपर्यंत रेड्डींची सत्ता होती. देवराय (पहिला) याने इ. स. १४१३–१४ मध्ये रेड्डींना तिथून हुसकून लावले व तो प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतला.

मध्यंतरीच्या काळात कोंडविडूच्या राज्यात गादीसंबंधी तंटेबखेडे सुरू झाले. कुमारगिरी रेड्डीच्या निधनानंतर त्याचा मेहुणा व मंत्री काटय वेम याने रेड्डी राज्याच्या उत्तरेकडील जिल्ह्यांवर आपली सत्ता स्थापली व गोदावरीच्या तीरावरील राजमुंद्री ही आपली राजधानी केली. पण त्याला पेड कोमटी वेमाने तिथून हाकलून लावले. तेव्हा काटय वेमाने देवराय (पहिला) याची मदत मागितली. गोदावरीतीरावर स्वतंत्र रेड्डी राज्य स्थापन झाल्यास बहमनी सुलतानाला शह देण्याच्या दृष्टीने आपल्याला त्याचा उपयोग होईल, या विचाराने देवरायाने त्याच्या मदतीसाठी आपले सैन्य पाठवले. त्या सैन्याच्या जोरावर काटय वेमाने पेड कोमटी वेमाचा रामेश्वर येथे पराभव केला. पण तेवढ्यात फिरूज शाहाचे सैन्य पेड कोमटी वेमाच्या मदतीला आल्याने लढाईचा रंग पालटला. पुढे झालेल्या युद्धात काटय वेम मारला गेला. त्याच्या सेनापतीने मात्र काही विजय मिळवले.

पुढे लढाईचे क्षेत्र गोदावरीच्या दुआबातून कृष्णेच्या उत्तर तीरावरील वेलमा राज्यात सरकले. आता देवराय (पहिला) व फीरूज शाहा यांच्यांत युद्ध सुरू झाले. फीरूज शाहाने पानगळच्या किल्ल्याला वेढा दिला (इ.स. १४१७). वेढा दोन वर्षे चालू होता. पण तेवढ्या अवधीतही त्याला किल्ला सर करता आला नाही; शिवाय दुष्काळामुळे, साथीमुळे त्याचे सैन्य हैराण झाले. अशा परिस्थितीत देवराय (पहिला) याने इतर हिंदू राजांच्या मदतीने त्याच्या सैन्याभोवती वेढा दिला व त्याला सळो की पळो करून सोडले. अशा रीतीने फीरूज शाह पराभूत झाल्यावर सबंध कृष्णा–तुंगभद्रा दुआबावर देवरायाने आपली सत्ता स्थापन केली.

देवराय (पहिला) याने एकदा राजमुंद्रीच्या राजाला मदत केली, त्यामुळे तो त्या राज्याच्या राजकारणात ओढला गेला. पुढे ओडिसाच्या गजपती भानुदेव (चौथा) या राजाने राजमुंद्रीवर स्वारी केली. तेव्हा त्याला हुसकावून लावण्यासाठी देवराय (पहिला) याने आपले सैन्य पाठवले. पण राजमुंद्री राज्याचा सेनापती दोड्डय अल्ल याने देवराय व गजपती या दोघांत समझोता घडवून आणला आणि दोघे युद्ध न करता परत फिरले. पण पुढे सुमारे शे-सव्वाशे वर्षे या दोन राज्यांत वैर मात्र धुमसत राहिले.

देवराय (पहिला) याची शेवटची वर्षे शांततेत गेली. त्याने सैन्याची चांगली व्यवस्था लावली. घोडदळाचे युद्धातील महत्त्व ओळखून त्याने अरबस्तान आणि इराण या देशांतून मोठ्या प्रमाणावर घोडे खरेदी केले आणि चांगल्या घोडेस्वारांची सैन्यात भरती केली. तसेच, त्याने प्रथमच आपल्या सैन्यात तुर्की धनुर्धरांची नेमणूक करून आपले सैन्य बळकट केले.

देवराय (पहिला) हा शैव होता. हंपीतीर्थ येथील पंपापती देवतेचा तो उपासक होता. त्याने विजयनगर येथे अनेक मंदिरे बांधली. तो विद्येचा व कलांचा भोक्ता होता. आपल्या राजवाड्यातील मोतीमहालात तो विद्वान, कवी व कलाकार यांना बोलावून त्यांच्यावर सुवर्णमोहोरा व रत्ने यांचा वर्षाव करीत असे. त्याच्या कारकिर्दीत विजयनगर हे दक्षिण भारतातील विद्येचे मोठे केंद्र बनले होते.

देवराय (पहिला) याच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा रामचंद्र हा त्याच्या हीरक सिंहासनावर बसला. त्याने फक्त सहा महिने राज्य केले.

रामचंद्रानंतर विजय (पहिला) हा गादीवर आला. त्याला विजयभूपती, विजय बुक्क किंवा वीर बुक्क असेही म्हणत असत. त्याने इ. स. १४२२ ते १४३० पर्यंत राज्य केले, असे विजयनगरच्या त्या वेळच्या शिलालेखांवरून कळते. हा राजा दुर्बल होता, असे दिसते. त्याने राज्यकारभारात विशेष लक्ष घातले नाही आणि राज्याचा सर्व कारभार आपला पुत्र देवराय (दुसरा) याच्याकडे सोपवला.

देवराय (दुसरा) (इ. स. १४३०–१४४६)—याच्या

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कीर्दीतही बहमनी सुलतानाशी विजयनगरच्या अनेक लढाया झाल्या. इ. स. १४२२मध्ये सुलतान अहमद शाहाने विजयनगरवर स्वारी केली. सुरवातीला विजयनगरच्या राजाला विजय मिळाला; पण वरंगळच्या राजाचे सैन्य रणक्षेत्रावरून त्याला सोडून गेल्यामुळे शेवटी त्याचा पराभव झाला.

याशिवाय, ओडिसाचा राजा भानुदेव (चौथा) याने किनारपट्टीवरील आंध्र प्रदेशावर हल्ला केला आणि कोंडविडूच्या रेड्डींचा जो प्रदेश पूर्वी विजयनगरच्या राजांनी घेतला होता, तो परत मिळवला. या अडचणीचा फायदा घेऊन अहमदशाहाने विजयनगरवर स्वारी केली असण्याची शक्यता आहे. पण फिरिश्ता म्हणतो त्याप्रमाणे त्याने राजधानीपर्यंत धडक मारून देवराय (दुसरा) याला तह करायला भाग पाडले, हे खरे वाटत नाही.

या संदर्भात एक विशेष घटना ध्यानात ठेवण्यासारखी आहे. विजयनगरशी लढाई चालू असतानाच अहमदशाहाने विजयनगरच्या सीमेवर असलेली आपली गुलबर्गा ही राजधानी सीमेपासून दूर व अधिक सुरक्षित अशा डोंगराळ भागात बीदर येथे नेली. एका शिलालेखावरून असे कळते, की देवराय (दुसरा) याने तुरुष्कांच्या मोठ्या घोडदळाचा पराभव केला. ही घटना बहमनी आक्रमणाच्या वेळीच (इ. स. १४२३) घडली असावी.

आंध्र व ओडिसा यांच्या राजांविरुद्धही देवराय (दुसरा) याने जय मिळवले.

यानंतर सहा-सात वर्षे शांततेत गेली. मध्यंतरी बहमनी सुलतान अहमदशाह मरण पावला व त्याचा मुलगा अलाउद्दीन (दुसरा) हा गादीवर बसला. त्याने इ. स. १४३५–३६ मध्ये विजयनगरवर चढाई केली. कृष्णा-तुंगभद्रा-दुआबातील मुद्गल व रायचूर हे किल्ले, हे लढाईचे क्षेत्र होते. त्या लढाईत अलाउद्दिनाचा पराभव झाला.

इ. स. १४४३मध्ये देवराय (दुसरा) याच्यावर एक मोठी आपत्ती आली. त्याच्या एका भावाने राजा, राजपुत्र व राज्यातील सरदार यांना आपल्या नवीन बांधलेल्या राजवाड्यात भोजनासाठी बोलावले. प्रकृती बरी नसल्याने देवराय भोजनासाठी गेला नाही. पण बाकीचे सर्वजण गेले. त्या वेळी त्याने त्या जमलेल्या सर्वांची कत्तल केली. देवराय याला भोजनासाठी नेण्याचा आग्रह करण्यासाठी तो भाऊ राजवाड्यात गेला. देवराय एकटाच आहे, असे पाहून त्याला त्याने अनेक ठिकाणी भोसकले आणि तो मेला, असे समजून राजवाड्याच्या सज्ज्यात येऊन आपण राजा झाल्याचे त्याने घोषित केले. देवराय थोड्याच काळात शुद्धीवर आला आणि सज्ज्यात येऊन त्याने जमलेल्या लोकांना या विश्वासघातकी भावाला पकडून ठार मारायची आज्ञा दिली. जमलेल्या लोकांनी तत्काळ त्याला ठार मारले. अनेक अधिकारी व्यक्तींना त्या भावाने ठार मारल्यामुळे राज्यात काही काळ गोंधळ निर्माण झाला. ही संधी साधून



विजयनगरच्या राजांची नाणी

बहमनी सुलतान अलाउद्दीन (दुसरा) याने विजयनगरच्या राजाकडे सात लक्ष वराह (नाणी) मागितले आणि ते न दिल्यास स्वारी करण्याची धमकी दिली. देवराय (दुसरा) याने ही मागणी अर्थातच नाकारली आणि त्या दोघांत युद्ध सुरू झाले. पण त्यात देवरायच विजयी झाला, असे दिसते.

याच सुमारास देवराय याचा सेनापती व दिवाण लक्कन दण्णाईक याने सागरी मार्गाने श्रीलंकेच्या किनाऱ्यापर्यंत धडक मारली व तिथल्या लोकांचा पराभव करून खंडणी वसूल केली. लक्कनाने अशा रीतीने दक्षिण समुद्रावर विजयनगरची सत्ता प्रस्थापित केली.

देवरायाला राजमुंद्रीच्या रेड्डी राजाच्या मदतीलाही जावे लागले. रेड्डी राजे अल्लय वेम व वीरभद्र यांनी ओडिसाच्या राजाचा प्रदेश व्यापून आपली सरहद्द चिल्का सरोवरापर्यंत नेऊन भिडवली होती. तेव्हा ओडिसाचा राजा गजपती कपिलेंद्र याने वेलमांच्या मदतीने इ. स. १४४३ मध्ये राजमुंद्रीच्या राजावर चढाई केली. त्या वेळी देवराय याने मल्लप्प उदैयरच्या आधिपत्याखाली रेड्डी राजांच्या मदतीसाठी सैन्य पाठवले. या युद्धात कपिलेंद्राचा पराभव झाला.

इ. स. १४४६ मध्ये देवराय मरण पावला. त्याच्या राज्याचा विस्तार कृष्णा नदीपासून श्रीलंकेपर्यंत व पश्चिम समुद्रापासून बंगालच्या उपसागरापर्यंत होता. आपल्या राज्यातील महसुला-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यतिरिक्त राज्यातील अनेक बंदरांतूनही तो कर गोळा करीत असे. तसेच त्याचे नाविकदल समुद्रावर संचार करून क्विलॉन, श्रीलंका, पेगू व इतर राज्ये यांच्याकडूनही खंडणी गोळा करीत असे. त्याच्याकडे युद्धोपयोगी असे एक हजार हत्ती व अकरा लाख पायदळ होते. तो विद्वानांचा आश्रयदाता होता. त्यांना तो उदार हस्ते जमिनी व रोख द्रव्य देत असे. आपल्या दरबारात तो साहित्य व तत्त्वज्ञान या विषयांवर वादविवाद घडवून आणीत असे. त्यांचे सूत्रचालन तो स्वतः करी. त्याने ललित कलांना उत्तेजन दिले व राजधानीत अनेक मंदिरे बांधली.

देवरायाच्या मृत्यूनंतर त्याचा धाकटा भाऊ विजय (दुसरा) किंवा प्रतापदेवराय हा गादीवर बसला. त्याने थोडेच दिवस राज्य केले. पण एवढ्या अल्प कालावधीत त्याने मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा व शासन स्वच्छ करण्याचा प्रयत्न केला. मंत्र्यांनी लोकांकडून देणग्या स्वीकारू नयेत किंवा जातीय करही वसूल करू नयेत, असा त्याने हुकूम काढला. पण त्यानंतर थोड्याच दिवसांत त्याची कारकीर्द संपल्यामुळे त्याचा हेतू सिद्धीला गेला नाही.

मल्लिकार्जुन (इ. स. १४४६-६५)–विजय (दुसरा) याच्या नंतर मल्लिकार्जुन राज्यावर आला. त्याला मुम्मडी देवराय (तिसरा) किंवा मुम्मडी प्रौढ देवराय अशी नावे दिलेली आढळतात. हा राजा दुबळा होता आणि याच्याच कारकिर्दीत संगम वंशाला उतरती कळा लागली.

इ. स. १४५०मध्ये ओडिसाचा राजा गजपती आणि बहमनी सुलतान यांनी मल्लिकार्जुनावर संयुक्तपणे चढाई केली. पण याने त्यांचा पराभव केला.

इ. स. १४५० ते १४५४ या काळात गजपतीने राजमुंद्रीचे रेड्डी राज्य जिंकले आणि विजयनगर राज्यातील कोंडवीडू प्रांतावर हल्ला केला. विजयनगरच्या सैन्याचा त्याने पराभव केला आणि त्यांना कोंडवीडू प्रांतातून हाकलून लावले. त्यामुळे कोंडवीडू, विनुकोंड व अद्दंकी हे महत्त्वाचे किल्ले आणि त्यांच्या आसपासचा प्रदेश त्याच्या ताब्यात गेला. कपिलेंद्र गजपतीने आपला शूर पुत्र कुमार हंवीर याला कोंडविडूचा सुभेदार नेमले आणि विजयनगरचा प्रदेश जिंकण्याची कामगिरी त्याच्यावर सोपवली.

हंवीर हा पराक्रमी योद्धा आणि समर्थ सेनापती होता. इ. स. १४६३मध्ये आपला पुत्र कुमार कपिलेश्वर महापात्र याच्या मदतीने त्याने मोठ्या सैन्यानिशी विजयनगर साम्राज्याच्या दक्षिणेकडील प्रांतांवर हल्ला केला आणि पूर्व किनाऱ्यावरील जवळजवळ सर्व महत्त्वाचे किल्ले जिंकून घेतले. उदयगिरी, चंद्रगिरी, पडैवीडू, कांची, इ. किल्ले एकामागोमाग एक त्याच्या हाती पडले. हंवीराने कावेरी नदीपर्यंतच्या प्रदेशावर आक्रमण केले. कपिलेंद्राने कुमार कपिलेश्वर याची त्या प्रदेशाचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. पण काही कारणाने दोन वर्षांच्या आत ओडिसाच्या सैन्याला तिथून काढता पाय घ्यावा लागला आणि उदयगिरी सोडून सर्व किल्ले त्यांच्या हातातून गेले. परंतु कोंडवीडू व उदयगिरीसारखे महत्त्वाचे किल्ले व त्यांच्या आसपासचा प्रदेश गमावल्यामुळे विजयनगर साम्राज्याची शक्ती क्षीण झाली आणि मल्लिकार्जुनाची प्रतिष्ठाही कमी झाली.

इ. स. १४६५मध्ये मल्लिकार्जुनाचा पुतण्या विरूपाक्ष याने त्याला व राजकुटुंबातील इतरही व्यक्तींना ठार मारले आणि आपण सिंहासन बळकावले, असे प्रपन्नामृतम् नामक ग्रंथावरून कळते.

विरूपाक्ष (दुसरा) (इ. स. १४६५-१४८५)– विरूपाक्षाने सिंहासन बळकावले खरे, पण त्याला सर्व साम्राज्यावर आपला अंमल बसवता आला नाही. पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्यावरील गुंडलकम्म ते कावेरीपर्यंतचा मुलूख, दक्षिण कर्नाटक आणि पश्चिम आंध्रचा बराच भाग यांवर साळुवांचे राज्य होते आणि विरूपाक्षाची सत्ता नामधारीच होती. मल्लिकार्जुनाचे वंशज तंजाऊर, द. अर्काट, तिरुचिरापल्ली, कोइंबतूर, सेलम व मदुरा या जिल्ह्यांवर राज्य करीत होते. तसेच पश्चिम किनाऱ्यावर तुळुव व कोकणी सरदार राज्यकारभार पाहत होते. त्यामुळे विरूपाक्षाची सत्ता कर्नाटक व पश्चिम आंध्रचा काही भाग एवढ्यापुरतीच मर्यादित झाली होती.

विरूपाक्षाच्या कारकिर्दीची पहिली काही वर्षे विशेष घडामोडीची नव्हती. गजपती कपिलेंद्र हा इ. स. १४७० मध्ये [illegible] पावला. त्याच्या स्वारीची भीती नष्ट झाल्यामुळे बहमनी सुलतान मुहंमद शाह (तिसरा) याने आपला मुख्य प्रधान महमूद गवान याच्या हाताखाली मोठे सैन्य देऊन विजयनगरच्या [illegible] तील कोकण प्रदेशावर स्वारी केली. त्याने खेळणा किल्ल्याला [illegible] वेढा दिला. पण दोन वर्षे त्याला तो अभेद्य किल्ला [illegible] आला नाही. शेवटी त्याने तो किल्ला फितुरीच्या [illegible] जिंकला. नंतर त्याने गोवा प्रदेशही जिंकला. गोवा [illegible] गेल्यामुळे विजयनगरच्या बाहेरील देशांशी चालणारा व्यापार [illegible] पडला आणि त्याचे खूप आर्थिक नुकसान होऊ लागले. [illegible] त्यामुळे त्याच्या सैन्याला आवश्यक असणारी घोड्यांची [illegible] मिळवण्याचा [illegible] कही बंद झाली. विरूपाक्षाने गोवा परत मिळवण्यासाठी [illegible] हल्ले केले. पण त्यात त्याला यश आले नाही. [illegible] विरूपाक्षाला उत्तर कोकणातील समुद्रकाठचा प्रदेश व [illegible] कर्नाटकाचा बराचसा भाग गमवावा लागला.

कपिलेंद्राच्या मृत्यूमुळे आंध्रच्या किनारपट्टीवरील [illegible]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अंदाधुंदी माजली आणि तो भाग परत मिळवण्याची आयती संधी विरूपाक्षाला मिळाली. पण त्याने ती साधली नाही. त्याचा एक प्रमुख सरदार साळुव नरसिंह याने ती घेतली आणि विजयनगरचे नाव उज्ज्वल केले.

साळुव नरसिंह हा चंद्रगिरीचा प्रमुख साळुव गुंड याचा ज्येष्ठ पुत्र होता. मधल्या काळात, मल्लिकार्जुनाच्या वधानंतर आणि विरूपाक्ष (दुसरा) गादीवर आल्यावर राज्यात जी अंदाधुंदी माजली, तेव्हा त्याने आपली सत्ता बळकट करायचा प्रयत्न केला. चित्तूर, उत्तर व दक्षिण अर्काट व कोलार हे जिल्हे त्याच्या ताब्यात होते. इ. स. १४६९मध्ये त्याने कपिलेंद्र गजपतीकडून उदयगिरीचा किल्ला परत मिळवला. तिथूनच आंध्र प्रदेशाच्या किनारपट्टीवर जाण्याचा मार्ग होता. पण पांड्य राजा भुवनैकवीर समरकोलाहल याने त्याचा पुढे जाण्याचा मार्ग रोखला. तेव्हा नरसिंहाने त्याचा पराभव केला व रामेश्वरापर्यंत त्याचा पाठलाग केला. तिथ श्रीलंकेच्या बौद्ध राजाने व इतर बेटांच्या राज्यकर्त्यांनी त्याला नजराणे पाठवले. नंतर तो अनंतशयनम (त्रिवेंद्रम) येथे गेला आणि त्याने पांड्य व त्यांचे मित्र गुरुकर्ण यांचा पराभव केला. त्यानंतर त्याने कृष्णा नदीच्या दक्षिणेकडील आंध्रची किनारपट्टी, मसुलीपट्टम हे बंदर आणि कोंडविडूचा किल्ला इ. स. १४८०मध्ये जिंकून घेतला आणि तो तेलंगण व विजयनगर यांचा शासक बनला.

इ. स. १४८५मध्ये विरूपाक्षाचा त्याच्या एका मुलाने वध केला. पण तो स्वतः गादीवर बसला नाही. त्याने आपला धाकटा भाऊ प्रौढ देवराय याला सिंहासन दिले. प्रौढ देवराय राज्य चालवण्याइतका लायक नव्हता. म्हणून साळुव नरसिंहाने त्याच्याकडून सिंहासन हिसकावून घेतले. त्याच्या आधी काही सरदारांना नजराणे देऊन त्याने आपल्या बाजूला वळवून घेतले. नंतर त्याने नरसा नायकाच्या आधिपत्याखाली विजयनगर राजधानीवर सैन्य पाठवले आणि प्रौढ देवरायाला तिथून हाकलून देऊन आपल्या नावाने सिंहासन ताब्यात घेण्याचा आदेश दिला. पण सैन्य विजयनगरात शिरताच प्रौढ देवराय स्वतःच तिथून पळाला आणि त्याने एका परकी देशात आश्रय घेतला. त्याच्या पलायनाबरोबर संगम वंशाचा शेवट झाला.

साळुव राजवंश – साळुव नरसिंह (इ. स. १४८५-९०)–गादी मिळवणे सोपे; पण राज्यात सगळीकडे आपला अंमल बसवणे कठीण, याची प्रचीती साळुव नरसिंहाला आली. ज्या सरदारांनी त्याला सिंहासन मिळवायला मदत केली, तेच त्याचे वर्चस्व मानायला तयार होईनात. त्यांपैकी पेरनिपाडूचा संबेट शिवराज याने त्याला खूप विरोध केला. तेव्हा त्याच्या मड्डीगुंडल या शहरावर नरसिंहाने तोफांचा मारा केला. मड्डीगुंडलचा किल्ला त्याने सर केला. या लढाईत शिवराज मरण पावला.

उम्मत्तूर व संगीतपुर येथील पाळेगारही नरसिंहाची सत्ता मानायला तयार नव्हते. त्यामुळे त्यांच्याशी त्याला लढा द्यावा लागला.

मध्यंतरीच्या काळात ओडिसाच्या पुरुषोत्तम गजपतीने विनुकोंडापर्यंतची आंध्रची किनारपट्टी जिंकून घेतली होती. साळुव नरसिंह गादीवर आल्यावर गजपतीने उदयगिरीच्या किल्ल्यावर हल्ला केला आणि त्या वेळी किल्ल्यात असलेल्या साळुव नरसिंहाला कैद केले, असे काही इतिहासकार म्हणतात. उदयगिरी किल्ला गजपतीने घेतला याबद्दल मात्र शंका नाही.

साळुव नरसिंह इ. स. १४९०मध्ये मरण पावला. त्याने अरबी व्यापाऱ्यांकडून उत्तम घोडे विकत घेतले आणि आपले



विजयनगरचे क राजचिन्ह – वराह

घोडदळ सुधारले. तसेच त्याने शेतकऱ्यांनाही वेळीप्रसंगी युद्धासाठी तयार केले. मुसलमानी आक्रमकांपासून हिंदू धर्माचे रक्षण करण्यासाठी त्याने गादी बळकावली. त्यामुळे त्याचे ते कृत्य समर्थनीय ठरते. त्याने विजयनगरच्या हिंदू राज्याचे रक्षण केले.

तुळुव राजवंश – नरसा नायक (इ. स. १४९०–१५०३)–. साळुव नरसिंहाचे दोन्ही मुलगे लहान असल्यामुळे मरताना त्याने आपला मंत्री नरसा नायक याला मुलांचा पालनकर्ता व राज्याचा कारभारी नेमले. तो तुळुव वंशातील पहिला राजा होय. त्याने साळुव नरसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा तिम्म याला गादीवर बसवले व तो स्वतः राज्यकारभार पाहू लागला. आपल्या सैनिकी सामर्थ्याने त्याने चेर, चोळ, पांड्य व दक्षिणेतील इतर राजे यांना नमवले. गजपतीचाही त्याने पराभव केला व आदिलखानाला कैद केले.

त्या वेळचा बहमनी सुलतान हा नामधारी होता आणि त्याचे सरदार स्वतंत्रपणे कारभार पाहत होते. बहमनी सुलतानाचा मुख्य प्रधान कासीम बरीद याने आदिलखानाविरुद्ध नरसा नायकाशी संधान बांधले. नरसा नायकाने कृष्णा–तुंगभद्रा दुआबावर आक्रमण केले आणि रायचूर व मुद्गल हे किल्ले घेतले. पण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

काही काळाने आदिलखानाने हे किल्ले परत मिळवण्यासाठी पुन्हा लढाई केली. पण नरसा नायकाने त्याचा पूर्ण पराभव केला आणि आदिलखानाला मानवच्या किल्ल्यात आश्रय घ्यावा लागला. नरसा नायकाने त्या किल्ल्याला वेढा दिला. यातून मार्ग काढण्यासाठी आदिलखानाने कपटाचा आश्रय केला. त्याने नरसा नायक, राजा, त्याचे इतर दरबारी लोक यांना शांततापूर्ण वाटाघाटींसाठी बोलावले आणि त्यांच्यावर हल्ला करून त्याने अनेकांना ठार मारले. नरसा नायक आणि राजा यातून निसटले आणि विजयनगरला पोचले.

नरसा नायकाला अंतर्गत शत्रू बरेच होते. त्यांपैकी एका सरदाराने तिम्म राजाचा वध केला आणि नरसाच्या आज्ञेवरून आपण हे कृत्य केले, असे खोटेच जाहीर केले. यात आपला निरपराधपणा सिद्ध करण्यासाठी नरसा नायकाने तिम्माचा धाकटा भाऊ इम्मडी नरसिंह किंवा धम्म तम्मराय याला गादीवर बसवले व त्याच्या वतीने तो कारभार पाहू लागला. पण इम्मडी नरसिंह त्याच्याविरुद्ध कारस्थाने करू लागला. म्हणून त्याने सैनिकी बळाने विजयनगरचा ताबा घेतला आणि इम्मडी नरसिंहाला पेनुगोंडा येथे कैदेत ठेऊन तो स्वतःच राज्य करू लागला.

त्यानंतर त्याने अंतर्गत बंडाळी मोडून कर्नाटक व तमिळ राज्य हे आपल्या सत्तेखाली आणले. अशा रीतीने त्याने विजयनगरच्या पूर्वीच्या सीमा जवळ जवळ कायम केल्या.

त्याच्या मागून त्याचा पुत्र वीर नरसिंहराय सिंहासनावर बसला. तोही पराक्रमी होता. त्याचा मुख्य प्रधान साळुव तिम्म अत्यंत कर्तबगार व नीतिमान होता. वीर नरसिंहाचा भाऊ कृष्ण-, देवराय यानेही खूप पराक्रम करून साम्राज्याचे रक्षण केले. इ. स. १५०९ मध्ये वीर नरसिंहाच्या मृत्यूनंतर कृष्णदेवराय सम्राट झाला. हा तुळुव वंशातला सर्वश्रेष्ठ सम्राट होय. (कृष्णदेवराय पाहा)

कृष्णदेवरायानंतर त्याचा सावत्र भाऊ अच्युत देवराय राजा झाला. पण तो दुबळा असून, त्याचा मेहुणा तिरुमल हाच खरा सत्ताधीश होता. याच्या राजवटीच्या प्रारंभीच सर्व नायक राजे स्वतंत्र झाले व उत्तरेकडे सुलतानांनीही रायचूर व मुद्गल हे प्रदेश बळकावले.

सामंतांवर वर्चस्व ठेवण्यासाठी अच्युतरायाने दक्षिणेकडे स्वारी केली. त्या स्वारीत तिरुमल हाच मुख्य सेनानी होता.

तिरुमलचे वर्चस्व इतरांना सहन होत नव्हते. कृष्णदेवरायाची विधवा राणी आपला जावई रामराय याला सिंहासनावर बसवू इच्छित होती. म्हणून रामरायाने मोठे सेनादल जमा करून राजधानीवर स्वारी केली. पण तिरुमलने त्याचा पराभव केला. पुढे इ. स. १५४२ मध्ये अच्युत मरण पावला. मग त्याचा पुत्र वेंकट गादीवर आला. तिरुमल स्वतः राज्य बळकावण्याची आकांक्षा बाळगून होता. त्याने अच्युतरायाचा पुत्र वेंकट याचा वध केला, व स्वतः गादी बळकावली, असे म्हणतात. पण लवकरच रामरायाने तिरुमलचा पराभव करून, कृष्णदेवरायाचा पुत्र सदाशिव याला राजपद दिले. त्या वेळी सदाशिव लहान असल्यामुळे खरी सत्ता रामरायाच्या हातीच राहिली. तोच सर्व राज्यकारभार करू लागला. आपला भाऊ तिरुमल याला त्याने प्रधान केले व दुसरा भाऊ वेंकटाद्री याला सेनापती नेमले.

इ. स. १५६२ पर्यंत मुस्लिम सुलतानांच्या आपसांत लढाया चालू होत्या. रामराय कधी याला तर कधी त्याला मदत करून आपला कार्यभाग साधीत असे. ते राजकारण त्याने अत्यंत कुशलतेने चालविले. आदिलशहा व कुतुबशहा यांचा बराच प्रदेश त्याने घेतल्यामुळे ते खवळले होते. निजामशहाचा बराच मुलूख त्याने लुटला होता व त्याला आपल्या पायांना वंदन करायला लावले होते. त्यामुळे तोही जळत होता. म्हणून त्या सर्वांनी एकजूट करून रामरायावर स्वारी करण्याचा घाट घातला.

एका ताम्रपत्रावरून कळते, की इ. स. १५६२ मध्ये रामराय हा विजयनगरचा सम्राट होता. याचा अर्थ असा, की तेव्हापासून सदाशिव हा नाममात्र राजाही राहिला नाही आणि तुळुव वंशाची सत्ता संपून ती आरविडू वंशाकडे गेली. (तुळुव राजवंश पाहा).

आरविडू राजवंश – रामराय हा या वंशातला पहिला सम्राट होय. तो कृष्णदेवरायाचा मंत्री श्रीरंग याचा पुत्र होता. कृष्णदेवरायाने त्याला आपली कन्या दिली व तमिळनाडूचा प्रांताधिप म्हणून त्याची नियुक्ती केली. तो एवढा कर्तबगार होता, की त्याने मनात आणले असते, तर तुळुव वंशाचा अंत करून त्याला सिंहासन बळकावता आले असते. पण त्याने इ. स. १५६२ पर्यंत सदाशिव याचा संरक्षक म्हणूनच राज्यकारभार केला. त्यानंतर मात्र तो स्वतःच सिंहासनावर बसला असे दिसते. त्याचा एक भाऊ तिरुमल नायक हादेखील कृष्णदेवरायाचा जावई होता.

रामरायाने सर्व शत्रूंचा पराजय करून आपली सार्वभौम सत्ता दक्षिणेत प्रस्थापित केली. लंकेच्या राजानेही त्याचे वर्चस्व मानले होते. पोर्तुगीजांशी त्याचे चांगले संबंध होते.

रामरायाचा पूर्ण नाश करण्याच्या उद्देशाने मुस्लिम सुलतानांनी आपली संघटित सेनादले विजयनगरवर पाठवली. त्यांच्या जवळ युद्धक्षेत्रात प्रलय करणारा प्रचंड तोफखाना होता आणि लाखो सैनिक होते. रामरायानेही त्या स्वारीला प्रतिकार करण्यासाठी सर्व सामंत-नायकांची सेनादले एकत्र बोलावली. त्यांत ३ लक्ष पदाती, ३४००० घोडेस्वार, १५०० हत्ती व लहान तोफा होत्या. त्याव्यतिरिक्त दहा मैल अंतरावर याच्या तिप्पट

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…ची सेना त्याने सज्ज ठेवली होती. इ. स. १५६५मध्ये तालि-कोट किंवा राक्षसतंगडी येथे घनघोर युद्ध झाले. प्रारंभी विजय-नगरच्या सैन्याचा विजय झाला होता. पण निजामशहाचा सेना-पती रूमी खां याने तोफांमधून तांब्याच्या पैशांचा वर्षाव केला. त्यामुळे हिंदू सैन्यात घबराट उत्पन्न झाली. त्याच वेळी रामरायाचे दोन मुसलमान सरदार आपली प्रत्येकी साठसत्तर हजार फौज घेऊन सुलतानी फौजांना फितुर झाले. त्यामुळे युद्धाचा रंग पालटला. तेवढ्यात रामराय स्वतः जखमी होऊन शत्रूच्या हाती सापडला व निजामशहाने त्याचे मस्तक उडवले. त्यामुळे सर्व सैन्य सैरावैरा पळू लागले आणि मुस्लिम सैनिकांनी त्याची कत्तल केली.

रामराय हा एक थोर शासक, न्यायी, साहसी व शूर राजा होता. तो दानशूर होता; त्याने साहित्य व कला यांना उत्तेजन दिले. तो संगीतप्रेमी असून, स्वतः वीणा वाजवीत असे. मृत्यू-समयी त्याचे वय नव्वद वर्षे होते.

सदाशिव पळून जात असता पकडला गेला. वेंकट व तिरुमल हे मात्र सुटून गेले. त्यानंतर विजयी मुस्लिम सेना राजधानीत शिरली आणि तिथे तिने सहा महिने भयानक लूटमार व अत्या-चार केले. मुसलमानांनी तिथली अलोट संपत्ती पाचसहाशे हत्तीं-वर लादून नेली आणि अनेक मंदिरे व राजवाडे यांचा नाश केला. त्यांनी जो विध्वंस केला व अत्याचार केले त्यांना जगात तोड नाही, असे म्हणतात.

त्यानंतर सुमारे एक वर्षाने, इ. स. १५६६ मध्ये तिरुमल राजधानीत परत आला व त्याने राज्यशासन सुरू केले. त्या वेळी सुलतानांची आपसांत भांडणे सुरू झाली होती. त्याचा फायदा घेऊन तिरुमलने आपली सत्ता दृढ केली. त्याने सदाशिवाला ठार मारले असे म्हणतात. आपला भाऊ वेंकट याला त्याने …नेमले. मुसलमानांच्या आक्रमणाच्या भयाने तिरुमलने पेनुगोंडा येथे राजधानी स्थापली. हे ठिकाण जुन्या राजधानी-पासून सुमारे १५० मैल दूर आहे इ. स. १५६९मध्ये तिथे त्याला राज्याभिषेक करण्यात आला.

या धामधुमीत विजापूर व गोवळकोंडा येथील सुलतानांनी विजयनगरचा काही भाग जिंकून घेतला. सिंहासनावर बसल्या-नंतर तिरुमलने ओडिसा व वरंगळ यांतील काही प्रदेश जिंकला. त्याने अनेक पुंड सरदारांचा बंदोबस्त करून राज्यात शांतता प्रस्थापित केली. तो इ. स. १५७२ मध्ये मरण पावला. तो पूर्वीचे साम्राज्य प्रस्थापित करू शकला नसला, तरी त्याने राज्य चांगले सांभाळले. तो मोठा दानशूर होता.

तिरुमलच्या मागून त्याचा पुत्र श्रीरंग हा सिंहासनावर बसला. त्यानंतर लगेच त्याच्या राज्यातले अनेक नायक बंड करून उठले. पण श्रीरंगाने त्यांचा पराभव केला. मुसलमानांच्या स्वाऱ्यांना मात्र तो यशस्वीपणे तोंड देऊ शकला नाही. सुलता-नांनी त्याचा बराच प्रदेश जिंकून घेतला. कर्नूल जिल्हा व त्याच्या आसपासचा काही भाग एवढ्याच प्रदेशावर श्रीरंगाची सत्ता राहिली. तो इ. स. १५८५ मध्ये मरण पावला. तो परमवैष्णव होता व त्याने विष्णुमंदिरांसाठी बरीच दाने दिली होती.

श्रीरंगाला पुत्र नसल्यामुळे त्याचा भाऊ वेंकटपतिदेवराय हा राजा झाला. तो पराक्रमी होता. अनेक नायकांनी त्याच्या विरुद्ध उठाव केला; पण तो त्याने मोडून काढला. त्याने उदयगिरी येथे राजधानी नेली. मग पेनुगोंडा मुसलमानांनी जिंकले. म्हणून वेंकटने गोवळकोंडावर स्वारी केली व सुलतानाचा पराभव केला.

इ. स. च्या १७ व्या शतकाच्या प्रारंभी मोगल बादशहाने निजामशाहीवर स्वारी केल्यामुळे सर्वच सुलतान चिंताग्रस्त झाले होते. त्यामुळे वेंकटपतिदेवाला त्यांचे भय उरले नव्हते. अकबराने वेंकटशी सलोख्याचे संबंध ठेवले होते. वेंकटाने आपल्या विशाल साम्राज्यात सुव्यवस्थित राज्यकारभार सुरू केला. इ. स. १६१४ पर्यंत त्याने राज्य केले. गोव्यातील पोर्तुगीज सत्ताधीशांशी त्याचे संबंध चांगले होते. पण राजधानीत जे पोर्तुगीज लोक येऊन वसले होते, त्यांचा व हिंदूंचा धार्मिक संघर्ष होऊन बरीच मार-काट झाली. त्या लढाईत पोर्तुगीजांचा पराभव झाला व शेवटी पोर्तुगीजांनी तह केला. यात पोर्तुगीजांनी राजधानीत धर्मप्रचार करू नये अशी एक अट होती. वेंकटपतिदेव परधर्मसहिष्णू होता. त्याने जेसुइट लोकांना एक चर्च बांधण्यास परवानगी दिली व द्रव्यही दिले. तो अत्यंत धार्मिक वृत्तीचा, विद्वान व उदार होता. चित्रकला त्याला फार प्रिय होती. तो न्यायी होता. त्याच्या राज्यात प्रजा सुखी झाली.

वेंकटपतिदेवाच्या मृत्यूनंतर त्याचा दुसरा पुतण्या श्रीरंग हा राजा झाला. पण त्यामुळे बरेच सरदार व नायक नाराज झाले आणि अंतर्गत यादवी सुरू झाली. दक्षिण भागात अनेक नाय-कांनी स्वतंत्र राज्ये सुरू केली. वेंकटरायाच्या लाडक्या राणीचा भाऊ जग्गराय याने तिच्या मानलेल्या मुलाचा पक्ष घेतला. राचम्मा नायकाने श्रीरंगाचा पक्ष घेतला. त्यानंतर सुमारे पन्नास वर्षे ही यादवी चालू होती. अखेर हे साम्राज्य नाश पावले. मुसलमान सुलतानांनी त्याचे काही भाग जिंकून घेतले. अशा प्रकारे आरविडू वंशाचाही अंत झाला.

राजधानीचे वर्णन – विजयनगर ही साम्राज्याची राजधानी होती. आनेगुंदी ही जुनी राजधानी तुंगभद्रेच्या उत्तर तीरावर असून, पूर्ण सुरक्षित नव्हती. म्हणून विद्यारण्यांच्या सूचनेवरून हरिहर (१ ला) याने तुंगभद्रेच्या दक्षिण तीरावर हेमकूट, मतंग व मालयवंत या पर्वतांच्यामध्ये नवी नगरी वसवली. ती पूर्ण

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बांधून व्हायला सात वर्षे लागली. मग हरिहराने तिथे राजधानी स्थापली. या साम्राज्याच्या कालखंडात काही परदेशी लोक भारतात आले होते. त्यांच्यापैकी काही प्रवाशांनी विजयनगर शहराचे वर्णन लिहून ठेवले आहे, त्याचा सारांश असा –

विजयनगर शहराइतके रमणीय व प्रेक्षणीय शहर साऱ्या दुनियेत क्वचितच कोणी पाहिले असेल. त्याची रचना काही विलक्षण आहे. त्याच्या सभोवार एकाबाहेर एक असे सात कोट आहेत. पहिल्या कोटाबाहेर पुरुषभर उंच व अर्धे जमिनीत गाडलेले दगड आहेत. ते स्वार व शिपाई यांना सहज ओलांडून जाता येण्यासारखे नाहीत. अगदी बाहेरच्या तीन कोटांमध्ये बागबगीचे, शेते, वाड्या, घरे व वस्ती आहे. आतली वस्ती फारच दाट आहे. तिथे कितीतरी दुकाने, घरे व बाजार लागलेले आहेत. राजवाड्याजवळ समोरासमोर चार बाजार आहेत. प्रत्येक बाजारात एकेक भव्य दिवाणखाना असून, त्याच्या पुढे सुरेख व प्रशस्त आगाशा बांधलेल्या आहेत.

अगदी आतल्या सातव्या कोटाच्या आत राजवाडे व सरकारी इमारती आहेत. या भागात उत्तर–दक्षिण सुमारे एक मैल व पूर्व-पश्चिम सुमारे सव्वा दोन मैल लांब मैदान आहे. अगदी बाहेरच्या कोटाच्या उत्तरेकडील व दक्षिणेकडील महाद्वारांमध्ये सुमारे सात मैल अंतर आहे. पूर्व-पश्चिम अंतरही बहुतेक तितकेच आहे.

अगदी बाहेरच्या कोटाच्या मुख्य वेशीवर पहारेकरी असतात. ते प्रत्येक गोष्टीची बारकाईने झडती घेतात. बाहेरच्या कोटात ठिकठिकाणी लहान लहान चौबुर्ज्या, दुर्गम बुरूज व आश्रयार्थ आणि बचावासाठी जागा केलेल्या आहेत. तसेच कोटाच्या बाहेरच्या बाजूला मोठमोठे अणकुचीदार व छातीइतके उंच दगडांचे सुळके जमिनीत रोवलेले आहेत. हा बाहेरचा कोट मैदानातून पुढे दोन्ही बाजूंच्या पहाड्यांपर्यंत नेऊन भिडवला आहे. या कोटातून आतल्या भागात पाणी नेलेले आहे. अंतर्भागात दोन तलावही आहेत.

मुख्य वेशीचा दरवाजा मोठा असून, त्याचे बांधकाम सुबक व प्रेक्षणीय आहे. वेशीच्या आत जवळच दोन देवालये आहेत. दुसऱ्या कोटाच्या द्वारापासून राजवाड्यापर्यंत सारखे सरळ राजमार्ग आहेत. त्यांच्या दुतर्फा वाडे व घरे बांधलेली आहेत. ती सेनाध्यक्ष, सरकारी कामगार, सुखवस्तू व संपन्न लोकांची आहेत. तसेच तिथे अनेक व्यापारी, सावकार व सौदागर राहतात. त्यांच्या दुकानांत मोती, हिरे, माणके, पाचू वगैरे जवाहीर; तऱ्हेतऱ्हेचे कापड, इ. साऱ्या दुनियेतील हवा तो माल मिळतो. दररोज सायंकाळी रस्त्याच्या कडेला बाजार लागतो. त्यात लहान-मोठे घोडे, तट्टे, घोड्या, इ. जनावरे; तसेच संत्री, लिंबे, नारिंगे, द्राक्षे, वगैरे हरतऱ्हेची फळफळावळ व बागायती जिन्नस, कलाकुसरीचे जिन्नस वगैरे विकायला असतात. तसेच सगळीकडे गुलाबाची फुले विकायला ठेवलेली असतात. त्या फुलांवाचून या लोकांचे क्षणभर चालत नाही.

सामानसुमान व धान्यसामग्री यांनी गच्च भरलेले असे दुसरे कोणतेही शहर साऱ्या दुनियेत नाही. तांदूळ, गहू, कडधान्ये व मका वगैरेंचा इथं भरपूर साठा आहे. तसेच जव, पावटे, मूग, तुरी, हरभरे, मसूर, कुळीथ, इ. इकडील लोकांच्या नेहमी खाण्यात येणाऱ्या धान्यांचा साठाही विपुल असून, त्यांचे भावही स्वस्त आहेत. मुसलमान लोक बहुशः गहू खातात. इतर लोकांत तो खाण्याचा रिवाज नाही.

या शहरात अगणित लोकवस्ती आहे. तिथल्या रस्त्यात माणसांची फार गर्दी असते आणि त्या गर्दीतून वाट काढणे मुष्कील असते. त्यातच सामान लादलेल्या असंख्य बैलांची भर पडलेली असते.

राजवाड्याच्या मोठ्या दरवाज्यावर बरेच उंच गोपुर आहे. राजा राहण्याचा मुख्य महाल राजवाड्याच्या आवारातच आहे. तसेच त्याच्या राण्या व इतर स्त्रिया राहण्याच्या वेगवेगळ्या जागा व महालही त्यातच आहेत. तिकडे जाण्याचे रस्ते वेगवेगळे आहेत.

राजवाड्यातील एका महालाचे वर्णन फियूरेडो नामक प्रवाशाने केले आहे, ते असे –

महालात दुमजली दालने आहेत. त्यातल्या तळमजल्यात जाण्यासाठी दोन पायऱ्या उतराव्या लागतात. त्या मुळापा

कमलमहाल, विजयनगर

केलेल्या तांब्याच्या पत्र्यांनी मढवलेल्या आहेत. आत जमिनी पासून छतापर्यंत सर्वत्र खऱ्या सोन्याचा पत्रा जडवलेला आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याला बाहेरून मेघडंबरी केलेली आहे. त्याच्या पुढे वेताच्या जाळीची चौकोनी मंडपी आहे. माणके, हिरे, मोती वगैरे तऱ्हेतऱ्हेची रत्ने लावून या मंडपीत जडावाचे काम केलेले आहे. मंडपीवर सुवर्णाचे दोन गोल टांगलेले आहेत. हे जडाऊ काम हस्तिदंती असून, त्याच्यामध्ये बारीक मोत्यांचे जाळीदार वेलबुट्टीदार भरतीचे काम केलेले आहे.

एका दालनातील खांब कोरीव दगडाचे आहेत. बाकीचे काम हस्तिदंती आहे. खालपासून वरपर्यंत भिंती, खांब, तुळया, वासे वगैरे सर्व काही हस्तिदंताचे आहे. तुळया व पाटणी यांच्यावर गुलाबाची फुले व कमळे कोरलेली आहेत, तीही हस्तिदंताची व फारच सुरेख आहेत. याच बाजूला या राज्यात येणाऱ्या सर्व तऱ्हेच्या देशी-परदेशी लोकांच्या तसबिरी व चित्रे काढलेली आहेत. ती हुबेहुब आहेत. त्यांच्यामध्ये त्या त्या लोकांचे पेहराव, रीतिरिवाज व राहणी फार सुरेख दाखवलेली आहे. त्यामुळे जनानखान्यातल्या स्त्रियांना बसल्या जागीच सर्व लोकांची राहणी वगैरे पाहायला मिळते.

इ. स. १५७५ च्या सुमारास बांधलेला कमलमहाल म्हणजे बगीचातील बंगलाच आहे. तो अत्यंत टुमदार असून त्यात द्राविड व मुस्लिम स्थापत्यकलेचे मनोहर मिश्रण झालेले दिसते.

विजयनगरात लहान-मोठी अनेक मंदिरे आहेत. देवरायाने इथे माधवाचार्यांचे स्मारक म्हणून विरूपाक्षाचे एक फारच विशाल व भव्य मंदिर बांधले आणि त्याला स्थावर उत्पन्न लावून दिले. पुढे कृष्णदेवरायाने इथे कृष्णस्वामीचे फार मोठे व प्रशस्त देवालय बांधले. त्याच वर्षी राजवाड्याच्या आवारात त्याने हजार रामस्वामीच्या मंदिराचे काम चालू केले. ते नंतर पुरे झाले. तुंगभद्रेच्या काठावरील विठ्ठलस्वामीच्या देवालयाचे बांधकामही त्यानेच सुरू केले. या मंदिरात अत्यंत कलाकुसरीचे व अप्रतिम नक्षीचे काम आहे. कृष्णस्वामीच्या देवालयाजवळ उग्र नृसिंहाची एक अवाढव्य व अखंड मूर्ती आहे. ती अठरा फूट उंच व सहा फूट रुंद आणि बसलेल्या स्थितीत आहे. सध्या ती खंडित अवस्थेत आहे.

विजयनगर हे फारच वैभवसंपन्न नगर होते. तिथल्या स्त्रियाच केवळ सोन्याच्या व हिरेमाणकांच्या दागिन्यांनी नखशिखान्त नटलेल्या असत, असे नाही; तर विशेष उत्सवप्रसंगी राजाच्या पागेतील हत्तीघोड्यांनाही मोती, हिरे, माणिक यांच्या अलंकारांनी सजवीत असत. विजयनगराचा पाडाव झाल्यानंतर पुढे सहा महिने शत्रूचे सैनिक त्या शहराची लूट करीत होते, यावरून या नगराच्या वैभवाची कल्पना करता येईल.

राज्यव्यवस्था – विजयनगरची राजसत्ता तत्त्वतः अनियंत्रित व एकतंत्री होती. पण विजयनगरचे सम्राट राजधर्माचे व दंडनीतीचे पालन करणारे होते. ते धार्मिक, सामाजिक व राजकीय परंपरांकडे दुर्लक्ष करीत नसत. राज्यातील सुविद्य आणि विचारवंत पुरुषांशी विचारविनिमय करूनच ते कोणताही महत्त्वाचा निर्णय घेत. त्यांच्या सत्तेचे अधिष्ठान स्वधर्मपालन हे होते.

सम्राटाला सल्ला देणारे आर्थिक, धार्मिक, राजकीय व लष्करी तज्ज्ञांचे मंत्रिमंडळ असे. ते तज्ज्ञ आपापल्या खात्यांचे प्रमुख असून, सम्राट त्यांचा सल्ला मानीत. राजाचा धार्मिक सल्लागार म्हणजे राजगुरू. हा ब्राह्मण असे. इतर मंत्री व अधिकारी यांची नेमणूक करताना मात्र जात किंवा वर्ण यांचा विचार न करता केवळ कर्तबगारीप्रमाणे निवड केली जात असे. महाप्रधान म्हणजे मुख्य प्रधान. हे पद माधवाचार्य, सायणाचार्य, सोवप्प, दंडनाथ, इ. थोर पुरुषांनी भूषविले होते. त्यांना जमिनी इनाम दिल्याचे व पदव्या दिल्याचे उल्लेख आढळतात.

साम्राज्याचे सहा भाग केलेले असून, त्यांवर प्रांताधिप म्हणून बहुधा राजघराण्यातील पुरुषांची नेमणूक केली जात असे. ते कर्तबगार व विश्वासार्ह होते, तोपर्यंत साम्राज्य टिकले. पण त्यांची बदली सहसा केली जात नसल्यामुळे सरंजामशाही वाढून, मध्यवर्ती सत्ता दुर्बल होताच ते प्रांताधिप स्वतंत्र झाले. सैन्य उभारणे, न्यायदान, लोकोपयोगी कामे, वसूल गोळा करणे आणि शासनाचा खर्च वजा करून उरलेली रक्कम सम्राटाकडे पाठवणे अशी त्यांची कर्तव्ये होती. प्रत्येक प्रांताधिप नायक सरंजामी पद्धतीचा अवलंब करून आपल्या हाताखाली कित्येक सरदार बाळगीत असे. अशा फौजबंद सरदारांना पाळेगार म्हणत. तेदेखील पुढे स्वतंत्र वृत्तीने वागू लागले. काही पाळेगारांनी जंगली टोळ्यांचा नाश करून आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण केली आणि अनेक उपयुक्त बांधकामे केली.

शासनव्यवस्थेचे स्थैर्य बहुतांशी ग्रामव्यवस्थेवर अवलंबून असे. ग्रामसंस्थांना महासभा म्हणत. त्यांत चार हजारांपर्यंत सभासद असत. या सभेव्यतिरिक्त गावोगावी दोन प्रकारचे अधिकारी असत. काही अधिकारी पिढीजाद वतनदार असत; तर काही राजाने नेमलेले असत. गौडिक म्हणजे पाटील, सानभोग म्हणजे कुलकर्णी व प्रलर म्हणजे ग्रामरक्षक हे वतनदार अधिकारी होते. त्यांच्या वंशपरंपरा नेमणुका व त्यांना इनाम दिलेल्या जमिनी यांची व्यवस्था पाहणारा महानायकाचार्य नामक अधिकारी राजधानीत असे.

विजयनगरचे साम्राज्य विशाल होते, तसे त्याचे सेनादलही विशाल होते. कृष्णदेवरायचरितम् या ग्रंथानुसार सम्राटाच्या सेनादलात ५ लाख पदाती, ६६ हजार घोडेस्वार व २२ हजार हत्ती होते. अबदुर रजाक याच्या मतानुसार सम्राटाच्या सैन्यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

११ लक्ष पदाती, ५ लाख घोडेस्वार व एक लक्ष हत्ती होते. सारांश, विजयनगरचे सेनादल प्रचंड होते.

धार्मिक धोरण – विजयनगरचे संगम घराणे शिवोपासक होते. विरूपाक्ष हे त्याचे कुलदैवत होते. त्यानंतरची तीन्ही



विरूपाक्षाचे मंदिर, विजयनगर

घराणी विष्णूची उपासना करीत. तथापि त्या सर्व घराण्यांतील राजे फार सहिष्णू व उदार होते. ते इतर पंथांच्या लोकांनाही जमिनी वगैरे देऊन मदत करीत. त्यांच्या राज्यांत शैव, वैष्णव, जैन, इ. पंथांचा चांगला उत्कर्ष झाला. मुस्लिम लोकांनाही विजयनगर साम्राज्यात त्रास झाला नाही. त्यांच्यासाठी राजांनी मशिदी बांधून दिल्याचे उल्लेख आढळतात. अनेक दर्ग्यांना जमिनी इनाम देण्यात आल्या होत्या. ख्रिस्ती लोकांशीही राजांचे सलोख्याचे संबंध होते. विजयनगरचे राजे अत्यंत परधर्मसहिष्णू होते, असे बार्बोसाने लिहून ठेवले आहे.

विजयनगरच्या साम्राज्यात समृद्धी नांदत होती. जमीन सुपीक आणि तलाव, पाटबंधारे व विहिरी यांची चांगली व्यवस्था यांमुळे शेतीचे उत्पादन भरपूर होत असे. त्या काळात व्यापाराची खूप भरभराट झाली होती. परदेशांशी मोठा व्यापार चालत होता. हंपी, पेनुगोंडा, उदयगिरी, चंद्रगिरी, नेलोर, मदुरा, इ. अनेक शहरे ही मोठी व्यापारी केंद्रे होती. सर्व परकीय प्रवाशांनी विजयनगरच्या समृद्धीचे व व्यापाराचे वर्णन केले आहे.

विजयनरच्या राजांनी सोने, चांदी व तांबे या धातूंची नाणी निर्माण केली. सोने विपुल असल्यामुळे सोन्याची नाणी अधिक होती. तांबे परदेशातून आयात केले जात होते. सोन्याच्या नाण्याचे नाव वराह असे होते; पण विदेशी लोक त्याला पगोडा म्हणत. चांदीच्या नाण्याला तार म्हणत. तांब्याचे नाणे जितल या नावाने ओळखले जात होते. ते पूर्वीच्या मोठ्या पैशासारखे होते. चांदीची नाणी फारशी उपलब्ध नाहीत, कारण चांदीची कमतरता होती. या राजांनी कोणती नाणी कोणत्या धातूची करावी, त्यांचा आकार कसा असावा व वजन किती असावे, हे निश्चित ठरवले. त्यापूर्वी तशी सुव्यवस्था नव्हती.

साहित्य – विजयनगरकालीन साहित्य एवढे विशाल आणि विविध प्रकारचे आहे, की त्याचे विवेचन म्हणजे द. भारतातील सर्व साहित्याचे व धार्मिक जीवनाचे वर्णन होईल. त्या काळात शैव, वैष्णव व जैन या सर्व पंथांचा प्रचार करण्यासाठी असंख्य ग्रंथ लिहिले गेले. त्याव्यतिरिक्त राजे, मंत्री व अन्य व्यक्ती यांनीही साहित्यभांडारात पुष्कळ भर घातली. सर्व राजांनी विद्वानांना व कवींना प्रोत्साहन दिले, तसेच स्वतःही साहित्य निर्माण केले. हे साहित्य कन्नड, तेलुगू व संस्कृत या तीन्ही भाषांतले आहे.

ललित कला – विजयनगर साम्राज्याचा काल हा भारतीय कलांचा उत्कर्षकाल मानला जातो. कारण त्या कालातील कलाकृती मध्ययुगीन कलाकृतींमध्ये सर्वोत्कृष्ट मानल्या जातात. तुळुव वंशातील कृष्णदेवरायाच्या राजवटीत कलांचा परमोत्कर्ष झाला. विजयनगरकाळात द्राविड पद्धतीची अनेक मंदिरे निर्माण झाली. त्याचप्रमाणे अनेक राजप्रासादही त्या काळी बांधले गेले. तालिकोटच्या युद्धानंतर मुसलमानांनी बहुतेक शिल्पकृतींचा नाश केला. तथापि जी मंदिरे अजून उभी आहेत, ती पाहून त्या काळातील वास्तुकलेची चांगली कल्पना येते (देवालये पाहा). या शैलीची काही मंदिरे वेलोर, कुंभकोणम्, कांची, श्रीरंगम्, इ. ठिकाणी आहेत. विजयनगरकालीन मंदिरांची कला विशेषतः त्यांतील स्तंभांमध्ये दिसून येते. ते स्तंभ अतिशय अलंकृत असतात व त्यांवर अनेक प्रकारच्या आकृती कोरलेल्या दिसतात.

विजयनगरच्या सम्राटांनी अनेक महाल व दुर्ग निर्माण केले. ते महाल पहाडावर उभे होते. पाषाणखंड जोडून ते तयार केले, की पहाड खोदून निर्माण केले, असा संभ्रम त्यांच्याकडे पाहून पडतो. दुर्ग खूप मोठे होते, असे वाटते.

विजयनगरची मूर्तिकला ही मूर्तिकलेचे प्रातिनिधिक रूप मानले जाते. या पद्धतीच्या मूर्तींत अलंकरण विपुल प्रमाणात असल्यामुळे भावचित्रण फारसे लक्षात येत नाही. मात्र शृंगारभावनाच बहुतेक मूर्तींच्या मुखांवर व्यक्त झालेली दिसते. निरनिराळ्या कलाकारांच्या कारागिरीत विशेष भेद आढळत नाही. कारण बहुतेक मूर्ती शास्त्रीय सिद्धान्तांना अनुसरून घडवलेल्या आहेत.

विजयनगर पद्धतीच्या मूर्ती भव्य असल्यामुळे त्या पाहणाऱ्याचे चित्त आकर्षित करतात. मंदिरांच्या भिंतींवर सर्वत्र विविध प्रकारच्या मूर्ती कोरून काढलेल्या आढळतात. त्यादेखील अत्यंत मनोहर आहेत. त्या मूर्तिशिल्पांत रामायणातील, तसेच जीवनातील निरनिराळे प्रसंग पाहायला मिळतात. पाषाणप्रमाणेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वास्तूचाही उपयोग त्या काळातील मूर्तिकारांनी केला आहे.

विजयनगरकाळात चित्रकलेचाही खूप उत्कर्ष झाला. त्या काळातली चित्रे थोडीच उपलब्ध झाली आहेत. मात्र द. भारतात सर्वत्र त्या शैलीची चित्रे आढळतात. त्या काळात संगीत, नृत्य, नाट्य या कलांचाही विकास चालू होता. विजयनगरचे राजे व नायक राजे या कलांचे जाणकार होते. ते सर्व कलाकारांना उदार आश्रय देत असत.

अशा प्रकारे विजयनगरच्या साम्राज्यात हिंदू संस्कृतीचा सर्वांगीण विकास झाला. एवढेच नव्हे, तर मुसलमानांच्या जबरदस्त आक्रमणाला प्रतिकार करून हिंदू संस्कृतीचे रक्षण केले ते विजयनगरच्या सम्राटांनीच. मुसलमानांनी दक्षिणेत मदुरेपर्यंत स्वारी करून तिथे आपले पाय रोवले होते. दक्षिणेतली मुस्लिम सत्ता नष्ट झाल्यानंतर विजयनगरला बहमनी सुलतानांच्या स्वाऱ्यांना तोंड द्यावे लागले. तो संघर्ष दीर्घ काळ चालू होता. त्यात शेवटी विजयनगरचा पराभव झाला असला, तरी दोन– अडीचशे वर्षे हे हिंदू साम्राज्य दक्षिण भारतात नांदत असल्यामुळेच हिंदू संस्कृती नष्ट झाली नाही. यासंबंधी डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांनी जे विवेचन केले आहे, त्याचा सारांश असा—

इ. स. १२९४ पासून १३३६ पर्यंत सतत चाळीस वर्षे दिल्लीचे सुलतान दक्षिणेवर स्वाऱ्या करीत होते. दक्षिणेत यादव, होयसळ, पांड्य व काकतीय या चार वंशांची हिंदू राज्ये होती. पण त्यांतील एकही वंश मुस्लिम आक्रमणाचा प्रतिकार करू शकला नाही. मुसलमानांचे अनेक सेनापती ती हिंदू राज्ये बुडवण्यात यशस्वी झाले. त्यांच्या अंगी असामान्य कर्तृत्व होते, असे नाही. त्यांचा प्रतिकार हिंदू राज्यांना करता आला नाही, याचा अर्थ स्पष्ट होतो, की हिंदू समाजात जीवनशक्तीच राहिली नव्हती. त्यांचा धर्म म्हणजे जीवनाचे तत्त्वज्ञान विकृत झाले होते. जन्मनिष्ठ चातुर्वर्ण्य, जातिभेद, अस्पृश्यता, तज्जन्य विषमता, अंधश्रद्धेचे प्राबल्य, कर्मकांड, निवृत्ती, शब्दप्रामाण्य, राजधर्माची उपेक्षा, स्वराज्य व स्वधर्म यांची फारकत, ही त्या विकृत धर्माची लक्षणे होत. त्या धर्मामुळेच हिंदू समाजाचा ऱ्हास झाला होता. अशी स्थिती असताना विजयनगरची राजसत्ता मुस्लिम आक्रमणाला थोपवून धरण्यात यशस्वी झाली, याचे कारण समाजधुरिणांनी धर्मशास्त्रात काही अंशी तरी क्रांती केली, हे होते. विजयनगर साम्राज्यात हिंदू संस्कृतीचे रक्षण झालें याचे श्रेय त्या धर्मक्रांतीलाच आहे, हे आता सर्वमान्य झाले आहे.

त्या धर्मक्रांतीचे पहिले गमक म्हणजे पतितशुद्धीच्या रूढीचे पुनरुज्जीवन हे होय. मुसलमानांनी सक्तीने ज्यांचे धर्मांतर केले, त्यांची शुद्धी करावी, असे शास्त्र देवलस्मृतीत इ. स. च्या ८ व्या शतकात सांगितले होते. पण नंतरच्या धर्मशास्त्रकारांनी ते त्याज्य ठरविले होते. तरीदेखील माधवाचार्य या थोर पुरुषाने हरिहर व बुक्क यांना शुद्ध करून परत स्वधर्मात घेतले.

धर्मक्रांतीचे दुसरे लक्षण म्हणजे राजधर्माचे पुनरुज्जीवन हे होय. महाभारतात सांगितलेल्या राजधर्माचा अनेक शतके लोप झाला होता. माधवाचार्यांनी त्याचे पुनरुज्जीवन केले. त्यांनी ब्रह्म व क्षत्र यांचा संयोग घडवून आणला. त्यांचे गुरू शृंगेरीचे शंकराचार्य विद्यातीर्थ यांनी दक्षिणेत आठ पीठे स्थापून प्रत्येक ठिकाणी एका थोर संन्याशाची नियुक्ती केली. विद्यारण्य हे त्या सर्वांचे प्रमुख होते. हरिहर व बुक्क यांना स्वधर्मात घेतल्यानंतर त्यांनी त्या पीठांच्या द्वारे स्वधर्मरक्षणासाठी स्वराज्याची स्थापना केली पाहिजे, हा संदेश रामेश्वरापर्यंत जनतेत प्रसृत केला. स्वराज्य व स्वधर्म यांचा असा संयोग झाल्यामुळेच विजयनगरच्या राजांना यश प्राप्त झाले. विद्यारण्यांनी शुद्धिबंदीची घातक रूढी नष्ट केली आणि शृंगेरीच्या पीठाकडूनच जनतेच्या मनावरील निवृत्तिवादाचे, राजकीय उदासीनतेचे, कल्मष झाडून टाकले. त्यांना हे सर्व करण्याचे धैर्य झाले याचे कारण म्हणजे देशकालपरिस्थिती पाहून धर्मनिर्णय करणे आवश्यक असते, असा त्यांचा बुद्धिनिश्चय झाला होता हे होय. माधवाचार्य (विद्यारण्य) यांनी आपल्या वेदभाष्यात बुद्धिप्रामाण्याचा पुरस्कार केला आहे.

विद्यारण्यांसारखा द्रष्टा व सर्वज्ञ गुरू आणि हरिहर व बुक्क हे धर्मवेत्ते राजपुरुष लाभले हे विजयनगरचे मोठे भाग्य होय. सम्राट बुक्क हा एक राजर्षीच होता. त्याने राजपद लाभताच अखिल वेदविद्येचे संशोधन करण्याचे ठरवून विद्यारण्यांच्या नेतृत्वाखाली एक पीठ स्थापन केले आणि देशातील सर्व विद्वानांना एकत्र जमवून वेदग्रंथांवर नवी भाष्ये लिहिण्याचा आदेश दिला. त्याचप्रमाणे त्याने शैव, वैष्णव, जैन, इ. पंथांतील वैमनस्य नष्ट करून हिंदू धर्मातील विघटक वृत्तींना आळा घातला. या पंथभेदांमुळे हिंदू धर्माचे ऐक्य भंगले होते; ते ऐक्य साधून सम्राट बुक्क याने धर्माला संघटित रूप दिले.

विजयनगरच्या सम्राटांनी विद्येप्रमाणेच लष्करी यंत्रणाही अत्यंत कार्यक्षम ठेवण्याची दक्षता बाळगली होती. हरिहर व बुक्क यांच्या संगम वंशात इ. स. १४८५ नंतर अत्यंत दुबळे व व्यसनी वारस निर्माण झाले, तेव्हा साळुव नरसिंह या सेनापतीने त्यांना बाजूस सारून स्वतः सत्ता हाती घेतली. याबद्दल इतिहासकार त्याला दोष न देता, त्याने हिंदू धर्माच्या रक्षणासाठीच हे केले, असे त्याचे समर्थन करतात. या साळुव नरसिंहाने राज्यातील सर्व लोकांना, शेतकऱ्यांनासुद्धा, युद्धप्रवण करून मुसलमानांशी वीरश्रीने लढण्यास शिकविले. वीर नरसिंहानेही प्रजेमध्ये मर्दानी बाणा चेतविण्यासाठी हरतऱ्हेचे प्रयत्न केले. जातिभेदनिरपेक्ष सैन्यात सर्वांची भरती केली आणि भ्याडपणा ही सर्वांत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

लज्जास्पद गोष्ट ठरवून, त्यांना धर्मसंग्रामासाठी तयार केले.

कृष्णदेवराय यानेही सेनादल अत्यंत सुसज्ज व कार्यक्षम ठेवण्याची दक्षता बाळगली होती. मुस्लिम आक्रमण हे मुख्यत्वे लष्करी आक्रमण होते. लूटमार, कपटनीती, जाळपोळ, कत्तल हेच त्यांचे मुख्य बळ होते. हे ओळखून त्याने तशाच राजनीतीचा निःशंकपणे अवलंब केला. विजयनगरच्या सम्राटांनी राजपुतांच्या आत्मघातकी उदार धोरणाचा व सात्त्विक राजनीतीचा अवलंब न करता चाणक्यनीतीचा आश्रय केल्यामुळेच दक्षिण हिंदुस्थान दीर्घकाळपर्यंत मुस्लिमवर्चस्वापासून सुरक्षित ठेवण्यात ते यशस्वी झाले. [वि. सा. इ.; वि. स्मा. ग्रं.; हि. क. इं. पी. ६; हि. स. सं. वि.; एक नष्टस्मृति साम्राज्य किंवा विजयनगरच्या साम्राज्याचा इतिहास, मा. व्यं. लेले, १९१९]

विजय नृत्य

उत्तर प्रदेशाच्या पर्वतीय भागातील एक लोकनृत्य. शत्रूचा पराभव केल्यावर तो आनंद व्यक्त करण्यासाठी या नृत्याचे कार्यक्रम करतात. पौरुषाशी संबंधित असलेल्या या नृत्यात केवळ पुरुषच भाग घेतात. नाचाच्या प्रारंभी नर्तक लोक हातांत ढाल-तलवार घेऊन पुढे येतात आणि मोठ्या जोरात तलवारीचे हात करून दाखवतात. मग आणखी काही नर्तक येऊन त्यांच्या भोवती कडे करून नाचतात. त्यांच्या मागे ढोल,झांजा,तुताऱ्या, रणशिंगे वाजविणारे वादक असतात. ते वाद्ये वाजवीतच नाचात भाग घेतात. [ए. हो. रा.; उ. प्र. लो. नृ.]

विजयपुरी

एक प्राचीन नगरी. आंध्र प्रदेशातील नागार्जुनकोंड हे स्थान प्राचीन काळी विजयपुरी या नावाने प्रसिद्ध होते. ही नगरी श्रीपर्वताच्या पश्चिमेला सुमारे एक मैलावर होती. तिथे उत्खनन केले असता त्या नगरीचे अवशेष सापडले. त्यावरून तियली प्रचंड तटबंदी, दरवाजे, खंदक यांची कल्पना येते. तटाची भिंत भक्कम विटांची बांधलेली होती. ती कृष्णा नदीच्या तीरापासून जवळच आहे. सातवाहनांचे मांडलिक असलेले इक्ष्वाकू नामक एक घराणे होते. त्याने सातवाहनांच्या नंतर आपले स्वतंत्र राज्य स्थापले व ही राजधानी वसवली. तिचा निर्देश अनेक शिलालेखांत आढळतो. महाराज वाशिष्ठीपुत्र श्रीचांतमूल हा इक्ष्वाकू वंशातला पहिला राजा होता. त्याने या नगरीत अनेक यज्ञ केले. या वंशाचे राज्य तिथे शंभराहून अधिक वर्षे चालू होते.

या नगरीचा पश्चिमेकडील तट व कृष्णा नदी यांच्या मधल्या भागात अनेक मंदिरे होती. त्यांतील काही मंदिरे कार्तिकेयाची होती. इक्ष्वाकू वंशातील राजे वैदिक धर्माचे अभिमानी असले, तरी त्यांच्या राण्यांनी बौद्ध पंथाला उदारपणे साहाय्य करून अनेक स्तूप, चैत्य व विहार निर्माण केले होते. त्या काळी त्या प्रदेशात बौद्ध पंथाचा बराच प्रभाव पडलेला होता.

विजयपुरीजवळ कृष्णा नदीत जहाजे थांबण्याजोगी गोदीही आढळते. त्या काळी कृष्णा नदी बरीच मोठी असावी आणि तिच्या पात्रातून मोठी जहाजे प्रवास करीत असावी. इ. स. च्या पहिल्या तीन शतकांत या स्थानाचा इतर बौद्ध केंद्रांशी घनिष्ठ संबंध होता, असे दिसते. या नगरीत एक विद्यापीठ होते. तिथे लंका, चीन, इ. दूरच्या देशांतून विद्यार्थी येत होते. त्यांच्यासाठी अनेक विहारही निर्माण केलेले होते.

या नगरीच्या अवशेषांत काही यज्ञवेदी आढळल्या आहेत. जवळच एक मोठे पाण्याचे कुंड आहे. एक कासवासारखे बांधकाम आहे, ते कूर्मचिती असावे. एका भागात एका विस्तीर्ण प्रासादाचे स्तंभ वगैरे अवशेष आहेत. जवळच एक महादेवमंदिर होते. त्याचा गाभारा सापडला असून, तिथे एक ध्वजस्तंभही मिळाला आहे.

कृष्णा नदीच्या तीरावरचा त्या काळातील घाट अजूनही चांगल्या स्थितीत आढळतो. हा घाट उत्तम भाजलेल्या विटांचा बांधलेला असून, त्यावर उत्तम चुन्यामध्ये गुळगुळीत पाषाण बसवलेले आहेत. घाटाच्या पायऱ्यांच्या दोन्ही अंगी सुंदर कठडे असून, त्यांत मकर, हत्ती, इ. आकृती दिसतात. [श्री. आय. के. शर्मा – इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टरली, डिसेंबर १९६२]

विजयरंग चोक्कनाथ

(इ. स. चे १८ वे शतक) एक तेलुगू कवी आणि मदुरेचा शासक. हा अनेक साहित्यिकांचा आश्रयदाता होता. याच्या पदरी वेंकटाचलपती, तिरुमल, इ. अनेक कवी होते. मदुरेच्या कवींनी तेलुगू वाङ्मयाचे संवर्धन केले, त्यात विजयरंग चोक्कनाथाचा वाटा मोठा आहे. श्रीरंगमाहात्म्य व माघमाहात्म्य अशा दोन कृती याच्या नावावर आहेत. पहिल्या काव्यात श्रीरंग क्षेत्राचे माहात्म्य व दुसऱ्यात माघ महिन्याचे माहात्म्य वर्णिले आहे. [ते. सा. इ.]

विजय राघव

(इ. स. १६३४–१६७३) तंजाऊरच्या नायक राजवंशातील एक राजा. हा तेलगू भाषेचा साहित्यिक आणि साहित्यिकांचा पाठिंबा होता. याच्या राजसभेचे नाव विजय-राघव-विलास असे होते. या सभागृहात व्याकरण, न्याय, मीमांसा, इ. शास्त्रांची सदैव चर्चा होत असे. त्याचप्रमाणे अनेक निपुण नर्तकीही आपल्या कलेतले प्रावीण्य दाखवीत असत. विजय राघवाने तेवीस नाटके, तीन द्विपद काव्ये, इ. रचना केली होती, असे म्हणतात. परंतु आज केवळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रघुनाथकाभ्युदय हे द्विपद काव्य, रघुनाथाभ्युदय हे नाटक, शालिवामर्दन व पूतनाहरण ही कथाकाव्ये व विप्रनारायण-चरित्र एवढीच त्याची रचना उपलब्ध आहे. रघुनाथाभ्युदयात त्याच्या पित्याचे म्हणजे रघुनाथ नायकाचे जीवनचरित्र वर्णिले असून, विप्रनारायणचरित्रात बारा आळवार संतांची चरित्रे सांगितली आहेत. पाहा – नायक राजे. [तें. सा. इ.; वि. स्मा. ग्रं.]

विजय राजेन्द्रसूरी (इ. स. १८२७ – १९०६) एक जैन आचार्य व प्रकांडपंडित. यांचा जन्म भरतपूर येथे झाला. त्यांचे मूळचे नाव रत्नराज असे होते. विसाव्या वर्षी त्यांनी यतिदीक्षा घेतली व त्यांना रत्नविजय हे नाव मिळाले. हे प्रमोदविजयसूरी यांचे शिष्य होत. इ. स. १८६६ मध्ये त्यांना विजय राजेंद्रसूरी हे नामाभिधान प्राप्त झाले. यांनी सुमारे ५८ ग्रंथ लिहिले. या सर्वांतला प्रमुख ग्रंथ म्हणजे अभिधान राजेंद्रकोश हा होय. हा प्राकृत भाषेत असून, याचे सात खंड आहेत. याचे संपादन भूपेन्द्र सूरी व यतीन्द्र सूरी या दोन शिष्यांनी विजय राजेन्द्रांच्या हाताखाली केले. हा कोश म्हणजे प्राकृत शब्दांचा महासागर होय. या ग्रंथात समाविष्ट झाला नाही असा जैन संस्कृतीतला एकही शब्द आढळणार नाही. डॉ. ग्रिअर्सन व इतर अनेक विद्वान यांनी या कोशाची मुक्त-कंठाने प्रशंसा केली आहे. यात प्रत्येक शब्दाचे संदर्भासहित स्पष्टीकरण केलेले आहे. जैनांच्या पंचेचाळीसही आगम ग्रंथांचे मंथन करून विजय राजेन्द्रांनी हा कोश निर्माण केला आहे.

याव्यतिरिक्त विजय राजेन्द्रांनी गुजराती व हिंदी भाषेत स्तुती, स्तवन, चैत्यवंदना, सज्झाय वगैरे विषयांवर पुष्कळ काव्यरचना केली आहे. नवपदपूजा व महावीरपंचकल्याणपूजा ही त्यांची मोठी काव्ये होत.

विजय राजेन्द्र हे जसे पंडित, तसेच महान तपस्वी होते. जैन साधुसमाजाला त्यांनी आपल्या आचरणाने एक आदर्श घालून दिला. मांगीतुंगी डोंगरावर व राजस्थानातील चामुंडवनात त्यांनी बराच काळ ध्यानसाधना केली. सामाजिक सुधारणेतही ते अग्रेसर होते. किरोला येथील समाज २५० वर्षे वाळीत टाकला गेला होता. त्या समाजाला त्यांनी जैन समाजात पुनश्च मानाचे स्थान प्राप्त करून दिले. जालोर येथे ७०० घरांत त्यांनी जैन संस्कृतीचा प्रकाश पोचवला. त्यांनी अनेक तीर्थांचा जीर्णोद्धारही केला. त्यांनी सदैव आणि वार्धक्यातही आपले ओझे आपणच वाहिले. [श्री. वसंतीलाल केसरीमल जैन]

विजयवाडा आंध्रातले एक प्रसिद्ध शहर. जुन्या ग्रंथांत याला विजयवत असे म्हटले आहे. काही ठिकाणी राजेंद्र चोलपूर असेही नाव आढळते. अगस्त्य ऋषीची ही तपोभूमी असल्याचे सांगतात.

इथे कनकदुर्गा, मल्लेश्वर व विजयेश्वर अशी तीन मंदिरे आहेत. कनकदुर्गा स्वयंभू आहे. मल्लेश्वराची स्थापना युधिष्ठिराने केल्याचे म्हटले आहे. त्याचे मंदिर मात्र चालुक्य राजा त्रिभुवनमल्ल याने इ. स. च्या १० व्या शतकात बांधले. विजयेश्वराची स्थापना किरातरूपी शंकराला युद्धात जिंकल्यानंतर अर्जुनाने केली, असे म्हटले आहे. ज्या पर्वतावर शंकर व अर्जुन यांचे युद्ध झाले, तो इंद्रकील पर्वतही इथे दाखवतात. वस्तुतः ही घटना हिमालयातली आहे; पण लोकांनी तिची इथे प्रतिसृष्टी केली आहे. [टें. सी. आं. प्र.]

विजयविधी एक वारव्रत. शुक्ल पक्षातील सप्तमीला रविवार आणि रोहिणी नक्षत्र असेल, तर अशा योगाला विजय हे नाव आहे. म्हणून त्या दिवशी हे व्रत करतात. सूर्य ही या व्रताची देवता होय. स्नान, दान, जप, होम, पितृपूजा, देवपूजा, सूर्याची पूजा व रात्री उपवास करणे, हा या व्रताचा विधी आहे. फल – सप्तलोकांचे स्वामित्व. [हि. ध.; कृ. व. त.]

विजयसेन उ. भारतातला एक लोकदेव. हा भुताखेतांचा अधिपती आहे. मुलांना भूतबाधा होऊ नये म्हणून याच्या नावाचा गंडा त्यांच्या गळ्यात बांधतात व तो मुलाचे लग्न होईपर्यंत ठेवतात. [पॉ. रि. फो. नॉ. इं.]

विजया एक जैन देवता. ही चतुर्भुज असून, तिच्या तीन हातांत शंख, खड्ग व चक्र ही आयुधे असतात. चौथा हात वरदमुद्रेत असतो. ही अश्वलावर आरूढ झालेली दाखवतात. श्वेतांबरमते ही याला असून, मयूरवाहना आहे. तिच्या हातांत भाला, खेटक व कमळ ही आयुधे असतात.

विजया नावाची जैनांची एक विद्यादेवीही आहे. अजितनाथ या दुसऱ्या तीर्थंकराच्या मातेचे आणि वासुपूज्य या बाराव्या तीर्थंकराच्या मातेचे नाव विजया असेच आहे. जैन लोक सर्व तीर्थंकरांच्या मातांना देवता मानून, शुभ कार्याच्या वेळी त्यांचे स्मरण करतात. [दे. को. ३]

विजयाएकादशी माघ वद्य एकादशीला हे नाव आहे. या व्रताचरणाने विजय मिळतो. या व्रतासंबंधाने पद्मपुराणाच्या उत्तरखंडात एक कथा आहे, ती अशी –

रामाचे पंचवटीत वास्तव्य असता रावणाने सीतेचे हरण केले. राम वानरसैन्यासह लंकेवर चाल करण्यासाठी समुद्रतीरी गेला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एवढा मोठा सागर कसा तरून जायचा ही चिंता रामाला पडली. तिथे जवळच बकदाल्भ्य ऋषीचा आश्रम होता. राम त्याच्याकडे गेला. बकदाल्भ्याने त्याला विजया एकादशीचे व्रत करायला सांगितले. रामाने वानरांसह ते व्रत केले आणि त्याच्या पुण्यामुळे त्याला समुद्र पार करणे व रावणवध करणे शक्य झाले.

विजयांका (इ. स. चे ५ वे किंवा ६ वे शतक) एक महान कवयित्री. हिला विजया असेही म्हणत. राजशेखराने हिची सरस्वतीशी तुलना करून, तिला कालिदासाच्या खालोखाल मानले आहे. हिच्याविषयी निश्चित काही सांगणे कठीण आहे. फक्त अनुमान असे, की चालुक्य सम्राट पुलिकेशी (२रा) याचा मुलगा चंद्रादित्य याची ही पत्नी असावी. तिचे काव्य कोणते ते माहीत नाही, पण संस्कृत साहित्यात तिचे नाव मात्र प्रसिद्ध आहे. [क. द.]

विजयादशमी आश्विन शुद्ध दशमीला विजयादशमी असे म्हणतात. या दिवशी शुंभ, निशुंभ, महिषासुर, इ. प्रबल दैत्यांवर दुर्गेने आणि दुर्दांत रावणावर रामाने विजय मिळविला, अशी समजूत असल्याने या तिथीला हे नाव प्राप्त झाले. हा सण दसरा म्हणून प्रसिद्ध आहे. पाहा–दसरा.

विजयादुर्गा गोमंतकातील एक देवता. हिचे मंदिर केरी गावी आहे. मुळात ही देवी सांकवाळ येथे होती; पण पोर्तुगीजांनी सुरू केलेल्या बाटवाबाटवीच्या धामधुमीत तिचे अंत्रुज महालात स्थलांतर होऊन केरी गावी तिची स्थापना झाली.

देवीने कालांतक नावाच्या दुष्ट राक्षसाचा वध केला म्हणून ऋषि-मुनींनी तिला विजयादुर्गा असे नाव दिले, अशी कथा आहे. रणांगणात हिचे स्मरण केले असता विजय मिळतो, असे समजतात.

देवीची मूर्ती पाषाणाची असून तिचे ध्यान महिषासुरमर्दिनीचे आहे. हे मंदिर बरेच जुने असून, नागर पद्धतीचे आहे. सभामंडपात क्षेत्रपाळ असून, त्याला पाणी किंवा वाग्रा असे म्हणतात. वाघाचा त्रास होऊ नये म्हणून अनेक लोक त्याला नारळ फोडतात. प्रत्येक दशमीला रात्री देवीची पालखी निघते.

काही कऱ्हाडे ब्राह्मणांची व पद्ये घराण्याची ही कुलदेवता आहे. [दे. को. २; सा. भू.; गो. दे.]

विजयाद्वादशी एक काम्य व्रत. भाद्रपद वद्य एकादशीला किंवा द्वादशीला बुधवार व श्रवणनक्षत्र असेल, तर तिला विजया असे म्हणतात. विष्णू ही या व्रताची देवता आहे. एकादशीला व्रतसंकल्प आणि द्वादशीला विष्णुपूजा हा या व्रताचा विधी आहे. शुक्ल पक्षात हे व्रत केले तर स्वर्गप्राप्ती होते आणि वद्य पक्षात केले तर पापनाश होतो.

या व्रताचे आणखी काही पर्याय आहेत. उदा० फाल्गुन शुद्ध एकादशी किंवा द्वादशी पुष्य नक्षत्राने युक्त असेल, तर तिलाही विजया असे म्हणतात. [हि. ध.]

विजययज्ञसप्तमी एक तिथिव्रत. माघ शुद्ध सप्तमीला हे व्रत करतात. सूर्य ही या व्रताची देवता होय. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – प्रत्येक महिन्यात सूर्याची निरनिराळ्या नावाने पूजा करावी. बारा ब्राह्मणांचा सत्कार करावा. उद्यापनाच्या वेळी सूर्याची सोन्याची मूर्ती, सोन्याचा रथ व सारथी करून त्या वस्तू आचार्याला दान द्याव्या. फल–आरोग्य व दीर्घायुष्य यांची प्राप्ती. [हि. ध.]

विजयासप्तमी एक तिथिव्रत. शुद्ध सप्तमीला रविवार असेल, तर त्या दिवशी हे व्रत करतात. सूर्य ही या व्रताची देवता आहे. या व्रताचे अन्यही काही पर्याय आहेत. उदा० माघ शुद्ध सप्तमीला हे व्रत करावे, असे म्हटले आहे. व्रतावधी एक वर्ष. व्रतदेवता सूर्य. व्रताच्या दिवशी उपवास करून सूर्याच्या एक सहस्र नावांचा जप करतात. फल–रोग व पाप यांपासून मुक्तता.

याचा आणखी एक पर्याय असा– सात सप्तम्यांना उपवास करावा आणि गहू, उडीद, यव, साठ दिवसांत पिकणारे भात, कांसे, दगडी जात्यात दळलेले अन्न, स्त्रीसंग, मद्य, मांस, अभ्यंगस्नान, काजळ व तीळ हे सर्व वर्ज्य करावे. [हि. ध.]

विजापूर कर्नाटकातील एक इतिहास–प्रसिद्ध शहर आणि विजापूर जिल्ह्याचे मुख्य ठिकाण. पूर्वी या जागी सात खेडी होती. तिथे यादवांनी हे नगर वसविले, असे डॉ. फ्लीटचे मत आहे. त्यांपैकी एका खेड्याचे नाव बिज्जनहळ्ळी होते; त्याचे रूपांतर होऊन विजापूर हे नाव त्या नगराला मिळाले असावे, असे म्हणतात. या नगराच्या परिसरातील काही देवालयांत चालुक्य व यादव वंशांतील राजांचे शिलालेख आहेत. चालुक्य राजा सोमेश्वर याने इ. स. १०७४ मध्ये आपल्या विजयाचे स्मारक म्हणून या नगराला विजयपूर हे नाव दिले, असा उल्लेख एका लेखात आहे. कालांतराने त्याचेच विजापूर असे रूपांतर झाले.

बहमनी राज्याची पाच शकले झाल्यानंतर विजापूरचा सुल-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

युसुफ आदिलशाहा याने आदिलशाहीची स्थापना करून विजापूर हीच आपली राजधानी केली. हे स्थान राजधानीसाठी योग्य नव्हते; कारण त्याच्या सभोवतालचा सर्व प्रदेश सपाट व वैराण असून, जवळपास एकही नदी नाही. त्यामुळे ते अगदी असुरक्षित होते. पुढे इ. स. च्या १६ व्या शतकात अली आदिलशहा (१ ला) याने शहराभोवती प्रचंड तट बांधला. त्या तटाचा घेर सव्वासहा मैलांचा असून, त्याला ९६ बुरुज व ५ मोठे दरवाजे आहेत. दरवाजांची नावे अल्लीपूर दरवाजा, बहमनी दरवाजा, शहापूर दरवाजा, मक्का दरवाजा व फत्ते दरवाजा अशी आहेत. हे दरवाजे एकाच्या आत दुसरा असे दुहेरी आहेत. प्रत्येक दरवाजावर सज्जा असून, दोन्ही अंगी गोल मनोरे आहेत. तटाभोवती ४०–५० फूट रुंदीचा खंदक आहे.

आर्क किल्ला – शहराच्या मध्यभागी असलेला आर्क किल्ला प्रथम युसुफ आदिलशहाने बांधला. तो मातीचा होता. पुढे इब्राहिम आदिलशहाने त्याचा तट व खंदक दगडांनी बांधून काढला. त्याचा घेर एक मैल आहे; पण बहुतेक तट आता पडून गेला आहे. त्याच्या आत आसार महाल, आनंद महाल, आरसे महाल, सोनेरी महाल, चिनी महाल, सातमजली महाल, गगन महाल, मक्का मशीद, चिंदडी मशीद, इ. इमारती आहेत. त्यांतील आसार महाल हाच फक्त चांगल्या स्थितीत आहे. त्यालाच पूर्वी अदालत महाल हे नाव होते. तो सुलतान महमूदशहाने बांधला. त्यात महंमद पैगंबराच्या दाढीचे केस व काही वस्त्रे ठेवली आहेत, असे म्हणतात. त्याच्या पटांगणात एक मोठा तलाव आहे. मक्का मशीद मक्केतील मुख्य मशिदीसारखी आहे. तिच्या आतील सर्व खांब दगडी व कमानीयुक्त आहेत. चिंदडी मशीद पूर्वेकडील भव्य बुरुजावर असून, तिचे बांधकाम सुरेखचे आहे. किल्ल्याच्या पडकोटात श्रीनृसिंहमंदिर असून, ते एक जागृत देवस्थान समजले जाते.



गोलघुमट, विजापूर

गोलघुमट – महंमद आदिलशहाने ही भव्य वास्तू निर्माण केली. तिचे बांधकाम इ. स. १६३२–१६६४ असे ३३ वर्षे चालू होते. ही इमारत चौकोनी असून, तिची प्रत्येक बाजू १३५ फूट लांब आहे. भिंती ९ फूट जाड व १०० फूट उंच आहेत या दालनाच्या चारी कोपऱ्यांना लागून चार अष्टकोनी, सातमजली मनोरे आहेत. त्यांच्या माथ्यावर चार लहान घुमट आहेत. दालनाच्या वर चौथरा असून, त्यावर प्रचंड घुमट आहे. त्याची उंची ६० फूट व आतील व्यास १२५ फूट आहे. त्याच्या भिंती १० फूट जाड आहेत. संपूर्ण इमारतीची उंची २०६ फूट आहे. घुमटाभोवती एक सज्जा आहे.

घुमटाच्या आत शिरल्यानंतर खालच्या दालनाच्या भिंतींना लागून दालनाच्या फरसबंदीपासून ११० फूट उंचीवर ११ फूट रुंदीचा एक सज्जा आहे. या सज्जावर उभे राहून अगदी हळू बोलले तरी त्याचे १०-१२ प्रतिध्वनी ऐकू येतात.

खालच्या दालनात ७७ फूट लांब – रुंद व २४ फूट उंच अशा चबुतऱ्यावर सुलतान महमूद, त्याच्या दोन बायका, नाटकशाळा रंभावती, मुलगी व नातू यांची थडगी आहेत. ही थडगी शोभेची असून, खरी थडगी खाली आहेत.

गोलघुमट ही इमारत अतिशय भव्य पण साधी आहे. तिच्यात फारशी कलाकुसर दिसत नाही. तिच्या शेजारीच एक लहानशी मशीद आहे, ती मात्र सुबक व सुंदर आहे.

जुम्मा मशीद – किल्ल्याच्या पूर्वेला सुमारे पाऊण मैल अंतरावर ही मशीद आहे. हिलाच जामी मशीद असे म्हणतात. विजयनगरचा पराजय करून अली आदिलशहा परत आल्यानंतर त्याने इ. स. १५७५ च्या सुमारास ही भव्य मशीद बांधली. हिचा विस्तार फारच मोठा असून, तिच्यात एकाच वेळी २२०० ते २५०० माणसे नमाज पढू शकतात. हिच्या रचनेत असंख्य कमानी असल्यामुळे ही मशीद विलक्षण दिसते. हिच्या मुख्य मिहरापाचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रंगकाम फार मनोहर आहे. या मशिदीवरचा घुमट आकाराने लहान असला, तरी अतिशय सुबक आहे. ही इमारत बाहेरून



जुम्मा (जामी) मशीद, विजापूर

मात्र अगदी साधी दिसते. या मशिदीजवळचा मेहेतर महालही अत्यंत सुंदर आहे. त्यांतील मशीद उत्कृष्ट कलाकुसरीमुळे शोभिवंत दिसते.

ताजबावडी – ही तलावाप्रमाणे मोठी विहीर महंमद आदिलशहाने ताजखान नामक सरदाराच्या स्मरणार्थ बांधली, असे म्हणतात.

अली रोझा – अली आदिलशहा (दुसरा) याची कबर. आर्क किल्ल्याच्या वायव्येस ही मोठी इमारत आहे. ती चौकोनी असून, २० फूट उंच चौथऱ्यावर उभी आहे. या कबरीत पूर्ण न बांधलेल्या अनेक मोठ्या कमानी असून, त्यावर छत नाही. मध्यभागी अली व त्याच्या कुटुंबातली माणसे यांची थडगी आहेत. त्यावरचा हिरवा पाषाण अत्यंत मनोहर आहे. या इमारतीचे बांधकाम अर्धवट झालेले असूनही, गेली सुमारे ३०० वर्षे उन्हापावसाला दाद न देता ते चांगल्या स्थितीत राहिले आहे.

जोड घुमट – मक्का दरवाज्यापासून जवळच दोन अगदी सारखे दिसणारे घुमट आहेत. त्यांचे चौथरे बरेच उंच असून, त्यांत थडगी आहेत. दोन्ही घुमटांच्या आत सज्जे आहेत.

करीमुद्दीन मशीद – आर्क किल्ल्यात आनंद महालापासून जवळच ही मशीद आहे. इ. स.च्या १४व्या शतकाच्या पूर्वार्धात विजापूरच्या सुभेदार करीमुद्दीन याने ही रेवय्या नामक कारागिराकडून बांधून घेतली. ही हिंदू देवालयांचे भाग घेऊन हिंदू पद्धतीने बांधलेली विजापुरातील सर्वांत जुनी मशीद आहे. तिथे पूर्वी एक अग्रहार होता व त्याचेच मशिदीत रूपांतर केले गेले, असेही म्हणतात.

मलिक-इ-मैदान – या नावाची एक प्रचंड तोफ मक्का दरवाजा व शहापूर दरवाजा यांच्यामधील तटावर ठेवलेली आहे. त्या जागेला शेरझा बुरुज म्हणतात. ही तोफ ओतीव असून, तिची लांबी १४ फूट ४ इंच आहे. मुलुखमैदान असे तिचे नाव रूढ झाले आहे.

लांडाकसाव तोफ – ही विजापुरातली सर्वांत मोठी तोफ होय. तिची लांबी २१ फूट ७ इंच आहे. तिचे वजन ४७ टन असावे.

चांदबावडी – अली (पहिला) याने बेगम चांदबिबी हिच्या स्मरणार्थ ही विहीर इ. स. १५७९मध्ये बांधली. या विहिरीच्या सारखीच ताजबावडी ही मोठी विहीर नंतर बांधण्यात आली.

इब्राहिम रोझा – इब्राहिम (दुसरा) याची ही कबर शहराच्या तटाबाहेर अर्ध्या मैलावर आहे. ही एका उंच चबुतऱ्यावर उभी असून, तिचे मधले दालन ५४ फूट लांब-रुंद आहे. त्याच्याभोवती एक रुंद पडवी असून, तिच्यात कमानींच्या दोन रांगा आहेत. हिचे दगडी छत सपाट असून, त्याला खाली कसलाही आधार नाही. त्या छतावर एक चौथरा व त्यावर घुमट आहे. त्याच्याभोवती अनेक मिनार आहेत. या इमारतीच्या भिंती व कमानी सुंदर नक्षीकामांनी सुशोभित असून, त्यातील खांबही प्रेक्षणीय आहेत.

या कबरीसमोरची मशीदही अत्यंत सुरेख आहे. तिच्या कमानी आणि मिनार नाजुक नक्षीमुळे फार सुंदर दिसतात. हिच्या दक्षिणी भागात दगडी साखळ्यांच्या जोत्रा आहेत त्या एकेका पाषाणखंडातून कोरून काढलेल्या आहेत. या मशिदीची रचना व कलापूर्ण सजावट दक्षिणी शिल्पकलेत उत्कृष्ट मानली जाते. गोलघुमट भव्यतेमुळे विख्यात आहे, तर इब्राहिम रोझा त्याच्या शिल्पसौंदर्यामुळे प्रेक्षणीय आहे.



इब्राहिम रोझा, विजापूर

मोती घुमट – शहराच्या तटाबाहेर पश्चिमेला इब्राहिम रोझापासून जवळच ही इमारत आहे. तिचा घुमट शुभ्र आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच्या आतील बाजूला गिलावा करण्यासाठी मोत्यांचे चूर्ण वापरले होते, अशी आख्यायिका आहे.

अमिन दर्गा – शहापूर दरवाजाच्या पश्चिमेला तटाच्या बाहेर सुमारे दोन मैलांवर हा दर्गा आहे. तिथे हजरत ख्वाजा अमिनुद्दीन याची कबर असल्यामुळे हे विजापुरातले मुसलमानांचे सर्वांत पवित्र स्थान मानले जाते.

विजापुरात नेहमी पाण्याची टंचाई असे, म्हणून आदिलशाहांनी बेगम तलाव, तोरवे तलाव, महंमद तलाव, रामटंका हे तलाव बांधून, त्यांतील पाणी चांगल्या खापरी नळातून शहराला पुरवण्याची व्यवस्था केली होती.

वरील मशिदी व कब्‍री यांव्यतिरिक्त विजापुरात आणखी कितीतरी लहान-मोठ्या प्रेक्षणीय इमारती आहेत. त्यांतील अंडू मशीद विशेष उल्लेखनीय आहे. ही दुमजली इमारत आर्क किल्ला व लांडाकसाब बुरुज यांच्यामधील रस्त्यावर आहे. हिच्या दुसऱ्या मजल्यावर मशीद आहे. हिच्यावरील मुख्य घुमट आणि हिच्या मिनारांवरील लहान घुमट अंडाकृती असल्यामुळे हिला अंडू मशीद हे नाव पडले आहे. विजापुरातील उत्कृष्ट वास्तुशिल्पांत हिची गणना केली जाते. हिचा दगडी पृष्ठभाग अजूनही उत्तम स्थितीत आहे.



अंडू मशीद, विजापूर

आदिलशाही सुलतानांनी वास्तुशिल्पे निर्माण करण्याकडे विशेष लक्ष दिल्यामुळे त्यांच्या २०० वर्षांच्या राजवटीत मशिदी, कबरी व महाल मिळून सुमारे शंभर इमारती बांधण्यात आल्या. त्यांतील मशिदींची संख्या पन्नासहून जास्त आहे. कबरी वीसपेक्षा अधिक व महालही तेवढेच असतील. त्यांतील बऱ्याच इमारती पडल्या आहेत. मात्र ज्या अजून चांगल्या स्थितीत उभ्या आहेत, त्यांचे उत्कृष्ट शिल्पकाम आणि कलात्मक सौंदर्य पाहून मन चकित होते. त्यांतील घुमट, कमानी आणि सज्जे यांची रचना विशेष प्रकारची आहे. [विजापूर गॅझे.; स. भा. प्र. व.; व्हि. टु. वि.; ये. इ. घ.; इं. आ. (इ. पि.); क. द.]

विजितीष्टी

एक काम्य इष्टी. हिच्यात वैमृध इंद्र, अंहोमुच इंद्र आणि इंद्रियावान इंद्र अशा तीन प्रधान देवता असतात. त्यांच्यासाठी तीन पुरोडाशांचा याग करतात. इतर सर्व विधी दर्शपूर्णमासासारखाच असतो. प्राचीन काळी शत्रूवर विजय मिळविण्यासाठी राजे लोक ही इष्टी करीत.

विजौलिया

एक प्राचीन जैनक्षेत्र. चाहमान सोमेश्वराच्या बिझोली शिलालेखानुसार, हे तटबंदी असलेले व चित्रासारखे सुंदर दिसणारे नगर उदेपूरच्या ईशान्येला एकशे बारा मैलांवर आहे. याचे प्राचीन संस्कृत नाव विंध्यावली असे होते. इथे पार्श्वनाथाचे एक प्राचीन मंदिर आहे. मंदिराच्या चारही भिंतींवर जैनमुनींच्या मूर्ती खोदलेल्या आहेत. याशिवाय इथे दोन मोठे मानस्तंभ असून, त्यांवर शिलालेख व प्रतिमा आहेत. [जै. ध.; भा. प्रा. जै. ती.; हि. जॉ. ए. इं.]

विज्जका

(इ. स. चे ८वे व ९वे शतक) एक संस्कृत कवयित्री. एक प्रतिभाशालिनी म्हणून संस्कृत साहित्यात हिचे चांगले नाव आहे. काही विद्वान विज्जका व कर्नाटकातील विजया या दोन्ही व्यक्ती एकच असाव्या असे मानतात; पण श्री. बलदेव उपाध्याय यांना हे मत मान्य नाही. विज्जकेचे चरित्र उपलब्ध नाही. ती दक्षिणापथात कुठेतरी जन्मली, एवढेच सामान्यतः कळते. तिचा एखादा काव्यग्रंथही आढळत नाही. निरनिराळ्या साहित्यशास्त्रज्ञांनी उदाहरणासाठी म्हणून वापरलेले तिचे काही फुटकळ श्लोक तेवढे मिळतात. पण तेवढे ते श्लोकही तिच्या उत्तम कवित्वाची साक्ष द्यायला पुरेसे आहेत. तिला आपल्या कवित्वशक्तीबद्दल अभिमान वाटत असे. त्या विषयीचा श्लोक असा –

नीलोत्पलदलश्यामां विज्जकां मामजानता ।
वृथैव दण्डिना प्रोक्तं ‘ सर्वशुक्ला सरस्वती ’ ।।

अर्थ – नीलकमलाच्या पत्राप्रमाणे जिचा वर्ण श्यामल आहे, अशा मला विज्जकेला न जाणून घेता दंडीने व्यर्थच सरस्वतीला सर्वशुक्ला म्हटले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तुत श्लोकातला चौथा चरण दंडीच्या काव्यादर्शाच्या मंगलाचरणाचा शेवटचा चरण आहे.

विज्जकेने मुसळांचे घाव घालून भात कांडणाऱ्या स्त्रियांचे वर्णन स्वभावोक्तीने केले आहे, ते असे –

विलासमसृणोल्लसन्मुसललोलदोःकन्दली –
परस्परपरिस्खलद्वलयनिःस्वनोद्वन्धुराः ।
लसन्ति कलहुंकृतिप्रसभकम्पितोरःस्थल –
त्रुटद्गमकसङ्कुलाः कलमकण्डिनीगीतयः ॥

भावार्थ – बायका गुळगुळीत व सुंदर मुसळांनी धान्य कांडीत आहेत. या कामात त्यांचे हात खालीवर होतात आणि त्यांची कंकणे एकमेकांवर आदळून रमणीय ध्वनी करतात. मधून मधून त्यांच्या मुखांतून जो हुंकार निघतो, तोही मनोहर असतो. कांडताना त्यांचे उरस्थल खालीवर होत असते. कांडताना त्या जे गीत गातात, ते गमके आणि तालस्वर यांनी युक्त असल्यामुळे श्रुतिमधुर वाटते.

पुढच्या श्लोकात तिने एका विरहिणीची मर्मभेदक व्यथा व्यक्त केली आहे –

गते प्रेमाबन्धे हृदयबहुमानेऽपि गलिते
निवृत्ते सद्भावे जन इव जने गच्छति पुरः ।
तथा चैवोत्प्रेक्ष्य प्रियसखि गतान् तांश्च दिवसान् ।
न जाने को हेतुर्दलति शतधा यन्न हृदयम् ॥

भावार्थ – (एक विरहिणी आपल्या सखीला म्हणते –) हे सखी, प्रेमाचे बंधन ढिले पडले, सन्मान हृदयातून दूर झाला व सद्भावाची इतिश्री झाली; असा तो माझा प्राणप्रिय सामान्य, निःस्नेह माणसाप्रमाणे निघून गेला आणि इतके दिवस लोटले तरीही त्याने माझा शोध घेतला नाही किंवा खबरही घेतली नाही. अशा स्थितीत माझे हृदय फुटून त्याचे शतशः तुकडे व्हायला हवे होते. (म्हणजे माझे मरण ओढवायला हवे होते.) पण तसे का बरे होत नाही ?

हिची कविता शृंगारप्रधान आहे. संभोग आणि विप्रलंभ अशा दोन्ही शृंगारांच्या छटा तिच्या कवितेत आढळतात. [क. का.]

विज्जल बिंदू

एक स्थान. आनंदगिरीच्या मते हे हस्तिनापूरच्या आग्नेयेला असून, तिथे मंडनमिश्राचा निवास होता. त्या वेळचे ते एक प्रसिद्ध विद्यापीठ होते. मंडनमिश्राने या विद्यापीठात विद्यार्थ्यांची राहण्याची व भोजनाची व्यवस्था केली होती. त्याच्या नावाचे आकर्षण आणि तिथली व्यवस्था या उभयविध कारणांमुळे विज्जल बिंदूत अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी येत असत.

हे स्थान उ. प्रदेशाच्या पश्चिम भागात असावे. [शंकराचार्य.]

विट

वेश्यावस्तीत फिरणारा, वेश्यांची कामे करणारा व त्या व्यवहारावर उपजीविका करणारा एक पुरुष. कामसूत्रांत विटाचे लक्षण सांगितले आहे, ते असे – ज्याने व्यसनीपणात आपली मालमत्ता गमावली आहे असा, गुणी, गृहस्थ, अनेक कला जाणणारा व त्या कलांचा उपयोग करून उपजीविका चालवणारा जो पुरुष तो विट होय (१.४.४५).

प्राचीन काळी या विटांचा एक वर्ग होता. विटांमध्ये कामुकता, कलाचातुर्य, मैत्री, गुंडपणा व हजरजबाबीपणा यांचे एक अपूर्व मिश्रण असे. मध्यकालीन साहित्यात विटाच्या चातुर्याच्या अनेक गोष्टी आढळतात. विट हे वेश्यांना गिऱ्हाईक मिळवून देत. त्या कामी कधी कधी गुंडगिरीही करीत. ते कधी कधी नायकाचे दूतही बनत. एखादा नायक आपल्या आवडत्या नायिकेकडे विटाच्या मार्फत निरोप पाठवून तिला आपल्या घरी बोलावून घेत असे.

संस्कृत नाटकांत अनेक ठिकाणी विट हे पात्र आढळते. भाण नामक नाट्यप्रकारात विट हाच नायक असतो. [शृंगार-हाट]

विटीदांडू

क्रीडांगणावर खेळायचा एक खेळ. हा खेळ खूप प्राचीन आहे. एकदा कौरव-पांडव विटीदांडू खेळत असता, त्यांची विटी एका विहिरीत पडली आणि ती द्रोणाचार्यांनी काढून दिली, असा उल्लेख महाभारतात आढळतो (आदि. १३०. १६-१७); यादवकालातील या खेळाचे स्पष्ट वर्णन लीळाचरित्रात आहे. एका सकाळी पूजावसर आटोपल्यावर चक्रधर फिरायला बाहेर पडला असता एक राजगुरु आपल्या शिष्याला या खेळाचे धडे देत असल्याचे त्याला दिसले. चक्रधराला पाहिल्यावर राजगुरूने आपल्या हातातला दांडू त्याच्या हातात दिला आणि शिष्याचा दांडू आपण घेतला. चक्रधराने बद म्हणजे गली करून विटीला टोला मारला. नंतर राजगुरूने चक्रधराला एक भीमटोला मारण्याची विनंती केली (ली. च. पू. भाग १ ला ११८). ज्ञानदेवांनीही या खेळाचा उल्लेख केला आहे (ज्ञाने. ११.५४८).

संत एकनाथांनी विटीदांडूच्या खेळावर रूपक करून काही नीतिबोध सांगितला आहे. सत्त्वाच्या विटीला धीराच्या दांडूने भक्तिबळाच्या आधारे टोला मारला असता कळिकाळालाही भिण्याचे कारण नाही, असे ते रूपक आहे. (स. सं. गा. खंड २ रा. १८४–१८८). तुकारामाने हा खेळ सोडून अन्य खेळ मांडायचा आग्रह धरला आहे (स. सं. गा. खंड १ ला ३७१९). मुक्तेश्वरासारखा संपन्न कवी विटीदांडूचे वर्णन करू लागला म्हणजे त्याच्या वाणीला कशी बहार येते ते पुढील ओव्यांवरून कळेल–

कौरव पांडव भार्त्यपिंड । कनकवीटा कनकदंड ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खेळ खेळता प्रचंड । चोज काही वर्तले ॥
दंडप्रहारे ताडितां वीटा । बळे उसळोनि गगनवाटा ।
कूपीं पडली नरेंद्र श्रेष्ठा । जे काढितां अवघड ॥

(आदि. ३०. १०१–१०२)

हा खेळ भारतात सर्वत्र खेळला जातो. आंध्र, गुजरात व महाराष्ट्र या प्रदेशांत तर हा खेळ फार लोकप्रिय आहे. उत्तर प्रदेशांत गुल्ली डंडा या नावाने हा खेळ खेळला जातो.

विटी व दांडू ही या खेळाची दोन साधने आहेत. दांडू सुमारे दीड फूट लांबीचा असतो. त्याचे एक टोक शंक्वाकृती व दुसरे तासून चपटे केलेले असते. विटी चार-पाच इंच लांबीची आणि दोन्ही बाजूंना टोकदार असते. विटीदांडूसाठी सामान्यतः बाभ-ळीचे लाकूड वापरतात. त्यामुळे विटी फुटत नाही व दांडू मोडत नाही. दांडू सहज रीतीने हातात धरता येईल एवढ्या जाडीचा असतो आणि त्याच प्रमाणात विटी असते.

हा खेळ खेळणारांचे दोन संघ असतात. प्रत्येक संघात सारखे गडी असतात. कमीत कमी एकेक गडी जरी प्रत्येक संघात असला तरी हा खेळ खेळता येतो. हे दोन्ही संघ मारणारे व झेलणारे या नावाने ओळखले जातात. मारणाऱ्या संघातला एका वेळी एकच गडी खेळू शकतो; पण झेलणाऱ्या संघातले सर्व गडी एकदम खेळत असतात. खेळाला प्रारंभ करताना मारणारा गडी गलीवर आडवी विटी ठेवून ती दांडूने समोर हवेत कोलतो. कोललेली विटी झेलणाऱ्या संघातल्या कोणत्याही गड्याने झेलली तर मारणारा गडी बाद होतो आणि नवा गडी खेळायला प्रारंभ करतो. परंतु जर विटी झेलली गेली नाही, तर झेलणारा गडी ती विटी गलीजवळ टाकण्याचा प्रयत्न करतो आणि मारणारा गडी ती विटी दूर उडवितो. त्यातूनही विटी गलीनजिक पडली, तर मारणारा गडी बाद होतो. दूर उडालेल्या विटीवर खेळणारा दांडूने आघात करून ती हवेत उडवून तिला टोला मारतो. अशा प्रकारे तीन टोले मारण्याची संधी खेळणाऱ्या गड्याला मिळते. तिन्ही संधी हुकल्या, म्हणजे विटीला टोला लागला नाही, तर तो गडी बाद होतो. शिवाय टोला मारलेली विटी प्रतिस्पर्ध्या-कडून हवेत झेलली गेली तरीही मारणारा बाद होतो. तीन टोले मारल्यानंतर विटी जितकी दूर गेली असेल तेथपासून गलीपर्यंत किती दांडू होतात हे मारणाराला सांगावे लागते. या वेळी कदाचित झेलणाऱ्यापैकी कोणी आव्हान दिले तर दांडूने ते अंतर मोजावे लागते. सांगितलेल्या संख्येपेक्षा मोजलेली संख्या कमी भरली तरीही मारणारा बाद होतो. अन्यथा खेळाला पुन्हा प्रारंभ होतो. मारणाऱ्या संघातले गडी संपले म्हणजे झेलणारा संघ खेळायला प्रारंभ करतो.

दोन्ही संघांची विशिष्ट संख्येची एक कावड असते. ती संख्या ज्या संघाची प्रथम पुरी होते, तो संघ विजयी असे समजले जाते. विजयी संघातील प्रत्येक जण तीन टोले मारून विटी दूर उड-वितो आणि पराभूत संघातील प्रत्येक गडी विटीपासून गलीपर्यंत लंगडी घालून कावड पुरी करतो.

विटी कोलण्याच्या पद्धतीवरून या खेळाचे विविध प्रकार मानले जातात. [स. म. खं. पु.]

विटोलिया एक जात. या लोकांची वस्ती गुजरात राज्याच्या सुरत जिल्ह्यात आढळते. हे लोक बुरुड आहेत. वांबूच्या टोपल्या, सुपे, इ. विणणे हा त्यांचा परंपरागत व्यवसाय आहे. पोषाख व दागिने यांवरून त्यांच्या स्त्रिया सहज ओळखता येतात. सदरी, देसाई, चौधरी, इ. कुळे त्यांच्यांत असून, ते समान कुळात लग्ने करीत नाहीत. त्यांची एक स्वतंत्र बोली आहे.

विवाहप्रथा– मुलाचे आई-वडील मुलीला मागणी घालतात मुलीसाठी देज देतात. चाळीसपासून एकशे चाळीस रुपयांपर्यंत देजाची रक्कम असते. शिवाय मुलीला साडी, चोळी, वेणी घालण्या-साठी काळे सूत व फणी या वस्तू द्याव्या लागतात. लग्नसमारंभ मुलीच्या घरी होतो. तिथे नवरा-नवरी एकमेकांशेजारी बसून चहाने भरलेल्या पेल्याची अदलाबदल करतात. मग त्यांच्या वस्त्रांची गाठ मारून त्यांना दोन माणसे खांद्यावर घेऊन मंडपाला पाच प्रदक्षिणा घालतात. नंतर वधू-वर एका झोपडीत जाऊन वस्त्रगाठ सोडतात आणि नाचात भाग घेतात.

यांच्यांत विधवाविवाह व सोड-चिठ्ठीची पद्धत आहे. विधवा आपल्या धाकट्या दिराबरोबर लग्न करू शकते; पण अन्य माणूस तिच्याशी लग्न करणार असेल, तर त्याला तिच्या आई-बापांना तीस ते पसतीस रुपये द्यावे लागतात.

प्रसूतिप्रथा– मूल जन्मल्यावर त्याची नाळ वोरूने कापतात आणि ती पुरून तिच्यावर एक दगड ठेवतात. पाचव्या दिवशी ज्या ठिकाणी मूल जन्मले असेल, त्या ठिकाणी किंवा त्याची नाळ पुरली असेल, त्या ठिकाणी पाच दाणे टाकतात.

मूल थोडे मोठे झाल्यावर त्याचे जावळ काढून ते एखाद्या झुडपाजवळ टाकतात

देव-देवता - हे देवाली, पंडरदेव, इ. क्षुद्र देवांना भजतात. जादु-टोणा, चेटुक यावर त्यांचा विश्वास आहे. आपले धार्मिक विधी पुरोहिताला न बोलावता ते स्वतःच करतात.

यांच्यांत जातपंचायत आहे. पंचायतप्रमुखाला ते कारभारी असे म्हणतात.

मर्तिकप्रथा– हे मृताला पुरतात. मृत्यूनंतर दोन महिन्यांनी एका दगडाला शेंदूर फासून, तो मृताच्या नावाने एका झाडाखाली ठेवतात. [मुं. इ. जा.; सुरत गॅझे.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विठलाई एक ग्रामदेवता. हिचे ठाणे रत्नागिरी जिल्ह्यातील देवळे गावी आहे. विठाई या नावाने ओळखली जाणारी देवताही हीच असावी. गुहागर, देवरूख व कुवेशी, इ. ठिकाणी विठाई देवतेची स्थाने आहेत. विठाई ही नवसाला पावणारी जागृत देवता म्हणून प्रसिद्ध आहे. एखाद्या भक्ताचा नवस चुकला तर तिच्या उत्सवाच्या दिवशी तिची पालखीतून मिरवणूक निघाली असता त्या भक्ताच्या घराजवळ पालखी जड होते, अशी समजूत आहे. नवस पुरा करण्याचे अभिवचन मिळाले, की पालखी पुढे चालू लागते.

विठलाई देवीचा नैवेद्य घरातील लोक न खाता शूद्राला देतात. [दे. को. खंड ३; चित्पावन.]

विठाबाई (जन्म इ. स. १७९२) एक मराठी संत कवयित्री. हिच्या वडिलांचे नाव रामप्पा नायक आणि आईचे नाव संतुबाई होते. विठ्ठलाच्या कृपेने हिचा जन्म झाला म्हणून तिचे नाव विठाबाई असे ठेवण्यात आले. ही पंढरपूर येथे राहत असे. विठाला बालपणापासूनच विठोबाची भक्ती होती. वयाच्या चौदाव्या वर्षी तिचे लग्न झाले. तिचे सासरही पंढरपुरातच होते. पण नवऱ्याच्या छळाला कंटाळून ती घराबाहेर पडली. कुठेतरी दूर जायचे म्हणून ती निघाली असता, वाटेत तिला राजारामस्वामींची दिंडी भेटली. राजारामाचे दर्शन झाल्याबरोबर तिला विदेहावस्था प्राप्त झाली. दिंडीबरोबर प्रवास करीत ती दोन महिन्यांनी कुंदगोळला गेली. तिथे तिला चिदंबरस्वामींचे दर्शन झाले. विठाबाईने राजारामाकडूनच अनुग्रह घेतला आणि उरलेले आयुष्य चिदंबरस्वामींच्या सेवेत व्यतीत केले.

विठाने सुमारे चार हजार अभंग लिहिले होते, असे म्हणतात. पण सांप्रत तिचे सुमारे सहाशे अभंगच उपलब्ध आहेत. त्यात आत्मचरित्र, चिदंबरस्वामींच्या व त्यांच्या भक्तांच्या कथा आणि नाममाहात्म्य, इ. विषय आहेत. योगापेक्षा व ज्ञानापेक्षा नाममहिमा मोठा आहे, असे सांगणारा तिचा एक अभंग असा–

कलियुगी हो नामापेक्षा मोठे नाही
योगयागयज्ञ तृणतुल्य ।।
योगयाग वर्ज करी नाम वीदेही हो घरी
नादबिंदु नको पाही। इडा पिंगळा नको काही ।।
ब्रह्मरंध्र नको शोधुं। आसन नको कधी घालु।।
नको भ्रमरगुंफा पाही। नको चवद चक्र काही ।।
हृदई कमळ नको आठउ। कुंडलिनी नको शोधु ।।
यम अहो जाणा भागवतामदे मुख्य।
नाम म्हणता सख्य होते त्यासी ।।

विठाबाईच्या अभंगांवर बहिणाबाईच्या विचारांची छाप आहे. बहिणाबाईप्रमाणे विठाबाईही आपल्या पूर्वजन्मातला वृत्तांत विस्ताराने सांगते. चिदंबरस्वामी हे विठ्ठल आणि आपले गुरू राजाराम हे नामदेव असताना आपण जनाबाई होतो, असे तिने म्हटले आहे. [जु. वा. न. सं.; म. सा.]

विठा रेणुकानंदन (इ. स. चे १६ वे शतक) एक मराठी संतकवी व एकनाथपंचकापैकी पहिला. याचे ऐतिहासिक व सलग चरित्र उपलब्ध नाही; परंतु कोण्या शंकर नामक कवीने लिहिलेल्या एका ओवीबद्ध ग्रंथात याचे पारंपरिक चरित्र मिळते, ते असे–

विठा रेणुकानंदन या कविनामातले विठा किंवा विठ्ठल हे या कवीचे मूळ नाव. रेणुकानंदन हे, कवीची जी उपास्यदेवता रेणुका तिचा पुत्र या अर्थी कवीने धारण केलेले टोपणनाव. विठा रेणुकानंदन हा मूळचा नगर जिल्ह्यातील अकोळनेरचा. त्याचा जन्म तिथल्या बडवे उपनामक शुक्ल यजुर्वेदी वत्सगोत्री ब्राह्मण घराण्यात झाला. त्याचे वडील मनोहरपंत हे अकोळनेरचे कुलकर्णी होते. विठा रेणुकानंदनाच्या घराण्यात रेणुकेची उपासना होती, त्यामुळे व पूर्वार्जित ओढीमुळे त्याला देवी रेणुकेच्या दर्शनाची तळमळ लागून राहिली. शेवटी वयाच्या १४ व्या वर्षी त्याला देवीने स्वप्नादेश देऊन सांगितले, की 'तू माझ्या दर्शनासाठी माहूरला ये.' त्याबरोबर विठा रेणुकानंदनाने घरात कोणाला न विचारता सरळ माहूरकडे पावले वळवली. सुदैवाने त्याला माहूरला जाणाऱ्या काही यात्रेकरूंची सोबत मिळाली. जाता जाता ही सर्व मंडळी गोलटगावी जाऊन पोचली. त्या गावी विठाचे आजोळ असून, तिथे त्याचे मामा तेव्हा कुलकर्णी होते. माहूरकडे जाणाऱ्या यात्रेकरू मंडळीत आपला भाचा आहे व तो घरातल्या मंडळींना न सांगता आला आहे, हे कळल्यावर ते तिथे आले. आणि त्यांनी विठाला पुढे जाऊ न देता आपल्या घरी ठेवून घेतले व घरची गुरे राखण्याचे काम त्यांनी त्याला दिले.

एके दिवशी रानात गुरे चरायला सोडून तो झाडाखाली बसला असता, त्याला दूर एका टेकडीवर एक देऊळ दिसले. जिज्ञासेने त्याने आपल्या सवंगड्यांना विचारले, 'ते देऊळ कोणाचे आहे?' गुराखी म्हणाले, 'रेणुकादेवीचे.' विठाला हे समजल्यावर त्याचा आनंद गगनात मावेना. तो तसाच पळत टेकडीवर गेला व त्याने रेणुकामातेपुढे लोटांगण घातले. देवीचे चरण घट्ट पकडून तो रडू लागला. 'आई, आता मला अंतर देऊ नकोस,' अशी त्याने तिची करुणा भाकली. तेव्हा देवीचा त्याला आदेश झाला, की 'माहूरला न जाता इथेच माझी उपासना कर.' त्याप्रमाणे त्याने तिची उपासना सुरू केली.

एके दिवशी अभिषेकजलाचा कलश भरून घेऊन तो देवीच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंदिराच्या पायऱ्या चढत असता त्याला मंदिराच्या दारात एक अंत्यजातीची स्त्री बसलेली दिसली. तिने विठाजवळ पाणी मागितले. विठाने विनातक्रार तो कलश तिच्या स्वाधीन केला व तिचे पाणी पिऊन होताच रिकामा कलश घेऊन तो पुनश्च पाणी आणण्यासाठी पायऱ्या उतरला. परंतु पाणी घेऊन येताच पुन्हा त्या स्त्रीने तसेच पाणी मागितले व विठानेही ते दिले. असे अनेकदा झाले; तेव्हा विठा समजला, की आपल्याला साक्षात रेणुका मातेने दर्शन दिले.

विठाच्या उपासनेत त्याला देवीचे असे अनेक साक्षात्कार अनुभवायला मिळाले. त्याने मग आपल्याला रेणुकेचा पुत्र या अर्थी रेणुकानंदन हे नवे नाव धारण केले. नंतर त्याच्या वडिलांनी त्याला घरी आणून त्याचे लग्न केले. पुढे तो सपत्नीक गोलटगावी जाऊन राहिला. तिथे त्याने देवीच्या आदेशानुसार सहस्रचंडी होम केला. पूर्णाहुतीच्या वेळी होमातून अर्धनारीनटेश्वराची मूर्ती वर आली व त्याच वेळी देवीची अशरीरिणी वाणी उमटली. 'आता तू गावाबाहेर दूर पूजेसाठी येण्याची गरज नाही. या मूर्तीची देवघरात प्रतिष्ठापना कर आणि तिचीच पूजाअर्चा करीत राहा.' विठाने तसे केले.

विठा रेणुकानंदनाने कोणताही मोठा ग्रंथ रचला नाही. दहा बारा अभंग व पदे, वीस कडव्यांचा एक धावा आणि एकवीस प्रश्नांचे उत्तर नामक एक प्रकरण एवढीच त्याची रचना आज पाहायला मिळते. ढोंगी संतांबद्दल तो लिहितो–

चांफियाच्या चढे पळसें बापुडें । वसंतेसी केली हेवा ॥
देखोवेखीं पुष्प आणूं गेले जंव ।
तोंड काळें जालें तेव्हां ॥ धर्म वेगळें रे ॥
निंबाचें फळ देखोनि वृन्दावन । रसवृत्ति आणूं गेलें ॥
भीतरीं पाहतां भरलें काळकूट ।
अवघ्या पाडा चुकलें ॥ धर्म वेगळें रे ॥

विठाची कविता आत्मप्रत्ययाने रंगलेली वाटते. [गंगाजळी]

विठ्ठल महाराष्ट्रातला एक प्रधान देव आणि वारकरी संप्रदायाची उपास्य देवता. विष्णूचा अवतार असणारा कृष्ण आणि तत्स्वरूपी विठ्ठल याची भक्ती महाराष्ट्र–कर्नाटकात प्राचीन काळापासून रूढ आहे. विष्णूशी संबंधित असलेले एकादशी व्रत विठ्ठलाचे वारकरी निष्ठेने आचरीत असतात. विष्णुप्रिय तुळस त्यांना अतीव प्रिय आहे. तिच्या काष्ठमण्यांच्या माळा हे त्यांच्या अभिज्ञान चिन्हांतील एक चिन्ह आहे. विष्णूच्या हृदयावरचे श्रीवत्सलांछन हे विठ्ठलाच्या हृदयावरही शोभत असते. काला हा गोकुळातल्या बाळकृष्णाचा एक भोग आहे आणि विठ्ठलाच्या वारीची सांगता काल्याविना होत नाही. असा हा विष्णू, कृष्ण व विठ्ठल यांचा ऐक्यसंबंध लोकमान्य आहे.

बेळगाव जिल्ह्यातील बेंडेगिरी गावी सापडलेल्या ताम्रपटात विठ्ठलाचा विष्णू असा स्पष्ट उल्लेख आहे आणि या ताम्रपटाचा काल शके ११७१ असा आहे. हीच धारणा मराठी संतांच्या अभंगांत सर्वत्र पाहायला मिळते. नंदाघरी नांदणारा कृष्णच विठ्ठलरूपाने पंढरीत प्रकटला, असे निवृत्तिनाथांनी म्हटले आहे (अभंग १५१).

ज्ञानदेवांच्या मतेही श्रीहरीच विठ्ठलरूपाने भीमातीरी आला आणि त्याने आपल्या सुदर्शन चक्रावर पंढरी वसविली (अभंग ५३). संत एकनाथांनी कृष्ण-विठ्ठल ऐक्याचा स्पष्ट पुकारा केला आहे. द्वारकेचा राणा गायी–गोपाळांसह पंढरीच्या पुंडलिकाला भेटायला आला आणि त्या वेळेपासून तो जो विटेवर उभा आहे, तो अजून खाली बसलाच नाही (अभंग ४८०). द्वारकेहून आलेला कृष्ण हाच विठ्ठल आहे, असा श्रद्धाभाव सर्व वारकऱ्यांत असला, तरी प्रत्यक्ष विठ्ठल देवतेची प्राचीनता कुठवर जाते, हे पाहणे उपयुक्त ठरेल.

कोरीव लेखातील पुरावे–(१) पंढरपूर आणि विठ्ठल यांचा निर्णायक उल्लेख असलेला शके ११५९ चा एक शिलालेख आहे. हा लेख पंढरपूरच्या विठ्ठलमंदिरात असून, त्याची भाषा संस्कृत व कन्नड आहे. या लेखात पंढरपूरचा पंडरंग आणि विठ्ठलाचा विठ्ठलदेव असा उल्लेख आहे.

(२) यापूर्वीचा आणखी एक शिलालेख श्री. शं. गो. तुळपुळे यांना नव्याने उपलब्ध झाला असून, तो शके १११०चा आहे. श्री. ग. ह. खरे यांना या लेखाचा काळ मंजूर नसला, तरी त्यातील विठ्ठलाची आण त्यांना मान्य आहे. परंतु म. म. मिराशींनी डॉ. तुळपुळ्यांचे वाचन बरोबर असावे, असे मत दिले आहे (म. सा. प., जुलै–सप्टेंबर १९५६).

(३) शके ११९५ मधील चौऱ्याऐंशीचा शिलालेख विठ्ठल आणि विठ्ठलमंदिराच्या इतिहासासाठी महत्त्वाचा आहे. या लेखात विठ्ठलाच्या पूजेसाठी देणग्या देणाऱ्यांची नावे आहेत. त्यात रामदेवराव यादव व हेमाडपंत यांची नावे प्रमुख असून, रामदेवराव यादवाला 'पांडरीफडमुख्य' म्हटले आहे. कर्नाटक, तेलंगण, महाराष्ट्र, इ. भागांतील देणगीदारांची नावेही या शिळेत कोरली आहेत. यावरून कानडी, तेलुगू, मराठी, इ. विठ्ठलभक्तांचे पंढरपूर हे एक गाजते भक्तिपीठ होते, असे म्हणायला हरकत नाही.

(४) पंढरपुराशिवाय अन्यत्रही विठ्ठल हा देव आहे. कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यातील सोगाने गावात, शिवाच्या मंदिरात शके ११३५ (२७ जानेवारी १२१४ इ. स.) चा एक लेख आहे. त्यात वीर बल्लाळ या होयसळ राजाने त्या गावातील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विठ्ठलेशाला तीन निष्क भूमी दान दिल्याचे सांगितले आहे.

(५) इष्ट देवतेचे नाव आपल्या मुलाला ठेवण्याची एक प्राचीन प्रथा आहे. राष्ट्रकूट तिसरा गोविंद याच्या इ. स. ८०८ च्या राधनपूर दानपत्रात 'विठ्ठद्विज' व 'विठ्ठपु' अशी ब्राह्मणांची दोन नावे आढळतात. वरील प्रथेत काही तथ्यांश असेल तर शिलालेखीय पुराव्याच्या आधारे निदान इ. स. चे ८ वे शतक इतकी तरी विठ्ठलाची प्राचीनता मानता येते.

वाङ्मयातील पुरावे– शिलालेखीय पुराव्यांशिवाय विठ्ठलासंबंधी वाङ्मयीन पुरावे विपुल मिळतात. पद्मपुराणाच्या उत्तरखंडात (अ. १७६) द्विभुज विठ्ठलाचा उल्लेख आहे. त्याचप्रमाणे स्कंदपुराणातही विठ्ठलाची माहिती आहे; पण निश्चित कालनिर्णयासाठी या पुराव्यांचा उपयोग होण्यासारखा नाही.

श्रीपतीचा श्रीकरभाष्य हा ब्रह्मसूत्रांवरील भाष्यग्रंथ आहे. त्याचा काळ इ. स. ११६० असा मानण्यात येतो. या भाष्यात मस्तकावर शिवलिंग धारण करणाऱ्या विठ्ठलाचा उल्लेख आहे.

विठ्ठलमूर्ती, कोल्हापूर

मध्वाचार्यांनी (जन्म इ. स. ११९९) आपल्या मठाच्या आठ बालयतींमधल्या तीन यतींना उपासनेसाठी विठ्ठलाची मूर्ती दिली होती, असे कन्नड कवी श्री. द. रा. बेंद्रे यांनी सांगितले आहे. श्री. बहिरट म्हणतात. "मध्वसंप्रदाय।च्या उत्तरादिमठात श्रीरामाच्या मूर्तीबरोबर श्रीविठ्ठलाच्या आद्य आचार्यांकडून मिळालेल्या मूर्तीची पूजा चालू आहे." हेमाद्रीने चतुर्वर्गचिंतामणीत, बिल्वमंगलाने कृष्णकर्णामृतात आणि प्राचीन कन्नड कवी चौंडरस याने आपल्या अभिनवदशकुमारचरितात विठ्ठलाचा उल्लेख केला आहे. चौंडरसाने विठ्ठलाचे केलेले वर्णन असे– विठ्ठलाच्या डोक्यावर मुकुट आहे. त्याचे मुख सुंदर असून त्यावर हास्य विलसत आहे. कानात सुंदर कुंडले व खांद्यावर चमकणारी पदके आहेत. तो गोपालक असून, त्याच्या एका हातात दंड आहे. त्याचे पाय कमळासारखे आहेत. त्याचा वर्ण निळा आहे. त्याच्या डाव्या हातात शंख असून, त्याचे दोन्ही हात कटीवर ठेवलेले आहेत. तो विटेवर उभा आहे.

ज्ञानदेवांच्या घराण्यात विठ्ठलभक्ती होती. त्यांना गुरुपरंपरेनेही विठ्ठलभक्तीचा वारसा मिळाला होता. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत होते. विठ्ठलपंतांचे लग्न झाल्यावर ज्ञानदेवांच्या आजोबांनी म्हणजे सिधोपंतांनी या वधू-वरांना विठ्ठलाच्या दर्शनाला नेले होते, असे नामदेवांनी एका अभंगात म्हटले आहे.

पंढरपूर क्षेत्रात विटेवर उभा असलेला विठ्ठल आजकालचा नसून, अठ्ठावीस युगापासूनचा आहे, अशी निवृत्तिनाथ (स. सं. गा. क्र. २), ज्ञानदेव (स. सं. गा. क्र. ६४), नामदेव (स. सं. गा. क्र. २३६६), इ. अनेक संतांची धारणा आहे. पण यातील अठ्ठावीस युगे म्हणजे नेमका किती काळ हे सांगता येत नाही. संतांची ही वचने केवळ अज्ञात प्राचीनत्व सुचवितात.

व्युत्पत्ती – विठ्ठल शब्दाच्या अनेक व्युत्पत्ती आहेत. कै. राजवाड्यांच्या मते विष्ठल शब्दावरून विठ्ठल हे रूप तयार झाले. विष्ठल म्हणजे दूर, रानातील जागा किंवा स्थळ होय. यावरून विठ्ठलदेव म्हणजे रानात असणारा देव, असा त्याचा अर्थ होतो.

डॉ. रा. गो. भांडारकर म्हणतात, की विष्णू या संस्कृत शब्दाचे कानडी अपभ्रंश रूप विट्टि होते आणि या अपभ्रंशापासून विठ्ठल शब्द तयार झाला.

मसिअ जे झिलस्कीना, विष्णूचे विठ्ठल हे रूप आस्ट्रोएशियाटिक भाषेतून सिद्ध झालेले आहे, असे दिसते; तर बीम्स या गौडीभाषाकोविदाने 'ए कंपॅरिटिव्ह ग्रामर ऑफ् दि इंडोआर्यन लँग्वेजेस' या ग्रंथात म्हटले आहे, की विष्णूचा विठ्ठु हा अपभ्रंश आर्य–प्राकृत भाषांच्या नियमानुसार होतो. श्री. चिं. वि. वैद्यांचेही मत असेच आहे.

कै. विष्णुबुवा जोग यांनी 'वीचा केला ठोबा' या तुकारामाच्या अभंगाच्या आधारे सांगितलेली व्युत्पत्ती अशी– वि म्हणजे विद्=जाणणे किंवा ज्ञान. आणि ठोबा म्हणजे मूर्ती. विठोबा म्हणजे ज्ञानमूर्ती.

सारांश विठ्ठल हा शब्द विष्णू या शब्दाचे अपभ्रंश रूप आहे, हे बहुतेकांना मान्य असले, तरी ते रूप अपभ्रंश प्राकृत भाषांतील आहे की द्राविडी भाषांतील आहे, हा वाद शिल्लकच राहतो.

विठोबाला पांडुरंग असेही म्हणतात. हे नाव त्याला कसे मिळाले ते सांगता येत नाही. कारण पांडुरंग हे धवल शिवाचे नाव आहे. याचेच कानडीत पंडरगे हे रूप होते, म्हणून पांडुरंग अथवा पंडरंग याचे पूर ते पंढरपूर होय, असे डॉ. भांडारकर म्हणतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्थानाही ही संज्ञा आहे. त्याचप्रमाणे सप्तर्षी व ध्रुव यांच्या-वरील ज्या प्रदेशात यती व योगी राहतात, तो प्रदेश याच नावाने ओळखला जातो. विष्णुपद हे पावसाचे उगमस्थान आणि त्रिलोकांचे आश्रयस्थान मानलेले आहे. इथूनच गंगा उगम पावते, अशी समजूत आहे. याला स्वर्गीय मंडलाचा तिसरा विभाग म्हणतात.

कुरुक्षेत्र, गया, निषध, पंढरपूर, इ. ठिकाणी विष्णुपदे आहेत. गयेतल्या विष्णुपदावर श्राद्धाचे पिंड अर्पण करतात. इथल्या एका पर्वतावर धर्मराजाने यज्ञ केला, त्यालाही विष्णुपद हेच नाव आहे. पंढरपुरातील विष्णुपदाला वेणुनाद असे दुसरे नाव आहे. हे नाव मिळण्याचे स्कंदपुराणातील स्पष्टीकरण असे –

या ठिकाणी श्रीकृष्णाचे व संगम नामक राक्षसाचे मोठें युद्ध होऊन त्यात संगमाचा पराभव झाला. श्रीकृष्णाच्या भीतीने संगम इथल्या शिलेखाली दडून बसला. मग कृष्णाने त्या शिलेवर पाय देऊन वेणू वाजवायला प्रारंभ केला. हा श्रीकृष्णाचा पाय म्हणजेच विष्णुपद होय. पाहा– गया, पंढरपूर. [पु. इ.; पंढरीमाहात्म्य]

विष्णुपदव्रत एक काम्य व्रत. आषाढ महिन्यात पूर्वाषाढा नक्षत्र असेल, तेव्हा या व्रताला प्रारंभ करावा. विष्णूचे तीन पाय दुधात किंवा तुपात ठेवून त्यांची पूजा करावी. रात्री हविष्यान्न भक्षण करावे. श्रावण महिन्यात उत्तराषाढा नक्षत्र असेल, तेव्हा गोविंदाच्या आणि विष्णूच्या तीन पदांची पूजा करून दोघांनाही निरनिराळ्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवावा आणि ब्राह्मणांना निराळी दाने द्यावी. भाद्रपदात पूर्वाषाढा नक्षत्राला, फाल्गुनात पूर्वा–फल्गुनी नक्षत्राला व चैत्रात उत्तरा–फल्गुनी नक्षत्राला वरीलप्रमाणेच पूजा करावी. फल – आरोग्य, ऐश्वर्य व विष्णुलोक यांची प्राप्ती. [हि. ध.]

विष्णुपुराण एक महापुराण. महापुराणसूचीत याचा तिसरा क्रमांक आहे. हे एक प्राचीन पुराण आहे. सर्व प्रथम ब्रह्मपुराण, त्यानंतर पद्मपुराण आणि त्यानंतर विष्णुपुराण निर्माण झाले. वेदव्यासांनी आपली पुराणसंहिता लोमहर्षण या आपल्या प्रसिद्ध शिष्याला शिकवली. त्याचे सहा शिष्य होते. त्यांपैकी अकृतव्रण, सावर्ण्य व शांशपायन या तिघांनी गुरूने दिलेल्या संहितेचे अध्ययन करून स्वतःची एकेक पुराणसंहिता तयार केली. विष्णुपुराण हे वरील चार संहितांचे संग्रहरूप आहे. विष्णुपुराण कसे प्रकट झाले, याविषयी पुराणाच्या आरंभीच एक कथा दिली आहे, ती अशी –

वसिष्ठ ऋषीचा पुत्र शक्ती आणि त्याचा पुत्र पराशर होय. पराशराला एके दिवशी कळले, की आपला पिता शक्ती याला विश्वामित्राच्या प्रेरणेने एका राक्षसाने मारून खाल्ले. पराशराला त्या गोष्टीचा क्रोध आला आणि समस्त राक्षसांच्या नाशासाठी त्याने एक यज्ञ आरंभिला. त्या यज्ञात शेकडो राक्षस जळून भस्म होऊ लागले. वसिष्ठाने हे पाहिले आणि त्याला परमदुःख झाले. तो आपल्या नातवाला म्हणाला –

'बापाच्या वधाबद्दल सगळ्या राक्षसांना अपराधी ठरवणे हे न्याय्य नव्हे. ती एक दुर्दैवी घटना होती. वत्सा, मनुष्य बहुत कष्टांनी जे यश व तप संचित करतो, ते क्रोधामुळे ताबडतोब नष्ट होते. त्यामुळे स्वर्ग व मोक्षही अप्राप्य होतो. हे लक्षात घेऊन तू क्रोध सोडून दे आणि राक्षसांचा संहार थांबव.'

पराशराने आजोबाचा हा उपदेश मानला आणि राक्षससत्र बंद केले. राक्षसवंशाचा पूर्वज महर्षी पुलस्त्य हा होय. त्याला हे सत्र थांबल्याचा परमानंद झाला. तो तिथे येऊन पराशराला भेटला आणि त्याने 'तू एका पुराणसंहितेची रचना करशील' असा पराशराला वर दिला.

त्यानंतर मैत्रेयाने प्रश्न केल्यावरून पराशराने हे विष्णुपुराण त्याला सांगोपांग कथन केले. ते सर्व सांगून झाल्यावर तो म्हणाला (वि. पु. ६. ८. ३) –

पुराणं वैष्णवं चैतत्सर्वकिल्बिषनाशनम् ।
विशिष्टं सर्वशास्त्रेभ्यः पुरुषार्थोपपादकम् ॥

अर्थ – हे विष्णुपुराण सर्व पापांचा नाश करणारे असून, सर्व शास्त्रांहून विशिष्ट आणि पुरुषार्थ सिद्ध करून देणारे आहे.

ब्रह्म, वायू आणि मत्स्य या तीन्ही पुराणांपेक्षा इतिहास आणि संस्कृती या दोन्ही दृष्टींनी यात महत्त्वपूर्ण सामग्री उपलब्ध होते.

विष्णुपुराणाच्या श्लोकसंख्येविषयी फार मोठे मतभेद आहेत. नारदीय पुराणात याचे चौवीस हजार श्लोक असल्याचे सांगितले आहे. बल्लाळसेनाने तेवीस हजार ही त्याची श्लोकसंख्या दिली आहे. इतर टीकाकारही वेगवेगळ्या संख्या सांगतात. पण सांप्रतच्या पोथीत फक्त सात हजारच श्लोक आढळतात. श्री. बलदेव उपाध्याय ही संख्या सहा हजारच सांगतात. मग सतरा किंवा अठरा हजार श्लोक म्हणजेच तीन चतुर्थांश भाग गेला कुठे? याचे निर्णायक उत्तर सापडत नाही. पं. श्रीराम-शर्मा आचार्य यांचे याविषयी मत असे, की कोणत्या तरी कारणाने प्राचीन कालीच कोण्या विद्वानाने प्रस्तुत पुराणाचे हे संक्षिप्त संस्करण तयार केले असावे आणि मूळचा मोठा ग्रंथ विधर्मियांच्या आक्रमणकालात नष्ट झाला असावा.

अन्य पंडितांच्या मते विष्णुधर्मोत्तरपुराण हा प्रस्तुत पुराणाचा एक भाग असावा. कारण विष्णुधर्मोत्तरात आलेले विषय नारदसूचीला अनुसरून आहेत आणि ते प्रचलित पुराणात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असा एक वादाचा विषय आहे. 'पांडुरंगकांती दिव्य तेज झळ-कती.' या चरणाने प्रारंभ होणारा ज्ञानदेवांचा एक अभंग असून, त्यात 'कानडा वो विठ्ठलु कर्नाटकु' असा चरण आहे. प्रामुख्याने याचा आधार घेऊन विठ्ठल हे दैवत मूळचे कानडी होते, असे म्हणतात. परंतु प्रा. शं. वा. दांडेकर याच अभंगाचे विवेचन कर-ताना म्हणतात. 'कानडा हा शब्द विठ्ठलाच्या वर्णनपर अभंगात आला म्हणजे मागचा पुढचा संदर्भ न पाहता हा देव कर्नाटका-तला आहे, असे सांगण्याचा ज्ञानदेवांचा हेतू होता, असे म्हणणे धाष्ट्याचे आहे. या संपूर्ण अभंगाचे मननपूर्वक जो वाचन करील त्याच्या लक्षात येईल, की या अभंगात पांडुरंगाचा 'देश' सांगणे हे मुख्य प्रयोजन नाही. उलट 'देश काल रूप नाम शब्द' यांच्या पलिकडे तो आहे, हे या अभंगात सांगायचे आहे.' श्री भा. पं. बहिरट, श्री. प. ज्ञा. भालेराव यांनीही आपल्या ग्रंथांत याच मताचा पुनरु-च्चार केला आहे. ते लिहितात. 'ज्ञानेश्वर-कालीही कानडा हा शब्द अगम्य अनाकल-नीय अशा अर्थी वाप-रला जात होता. 'कर्नाटकु' या शब्दातही कर्नाटक देशाचा उल्लेख नसून, त्या शब्दाचा अर्थ हा देव लाघवी, नाटकी, लीला दाखविणारा आहे,' असा आहे.

विठ्ठलमूर्ती – तिरुपती

पण कानडा या शब्दाचा अर्थ गूढ, अगम्य, अनाकलनीय असा मान्य केला तरी, सर्व संत सर्व ठिकाणी या अर्थानेच तो शब्द वापरीत असतील, असे वाटत नाही. एकनाथांच्या पुढील अभंगात देशवाची अर्थ व्यक्त होत असावा, असे वाटते. म्हणून तो समग्र अभंग पुढे उद्‌धृत केला आहे–

तीर्थ कानडे, देव कानडे । क्षेत्र कानडे पंढरिये ।
विठ्ठल कानडे भक्त कानडे । पुंडलिक उघडे, उभे केले ।
एका जनार्दनी भक्तांचिया चाडा । विठ्ठलु कानडा विटेवरी ।।

यावरून विठ्ठल हे मूळचे कानडी दैवत असल्याची जाणीव मराठी संतांना होती, असे दिसते.

काशीये कनोजु, द्वारका गुजरु ।
कानडा विठ्ठल पंढरीये ।

इथे तर उघड उघड देशवाची पदे आहेत. या चरणांचे स्पष्टी-करण करताना श्री. शं. वा. जोशी म्हणतात. "काशी, द्वारका, या स्थळनामांप्रमाणेच कर्नाटकाचे नाव देऊन पंढरी क्षेत्र त्या प्रांतातील-आहे, असे वरील अभंगात म्हटले आहे."

या विवेचनाव्यतिरिक्त पुढील परिस्थितिजन्य पुराव्यांचाही विचार व्हायला हवाच–

(१) विठ्ठलाचा अंगभोग व रंगभोग यांसाठी होयसळ यादव वीर सोमेश्वराने कर्नाटकातील एक गाव दान दिल्याचा उल्लेख आहे.

(२) चौयायंशीच्या शिलालेखात विठ्ठलाच्या पूजे-अर्चे-साठी देणगी देणाऱ्यांमध्ये कर्नाटकी लोक आहेत.

(३) कर्नाटकातील शिमोगा जिल्ह्यात सोगाने गावी विठ्ठलाचे प्राचीन मंदिर आहे.

(४) अहोबल गावी विठ्ठलाची एक जुनी मूर्ती असून, ती पंढरीच्या विठ्ठलमूर्तीहून जुनी असावी, असे श्री. ग. ह. खरे यांचे मत आहे. त्याचप्रमाणे तिरुपतीलाही एक सुंदर विठ्ठलमूर्ती आहे.

(५) पुरंदरदास, कनकदास, विजयदास, जगन्नाथ, चौंडरस, इ. अनेक कर्नाटकी संतांनी विठ्ठलभक्तीचा प्रसार केला आहे. यांतील बहुतेकांची पदे विठ्ठलमुद्रिकेने अंकित आहेत.

(६) अनेक कर्नाटकी ब्राह्मणांचे विठ्ठल हे कुलदैवत आहे.

एकंदरीत विठ्ठल हे कर्नाटकाचे दैवत आहे, हे मान्य केले, तरी तो महाराष्ट्रात का आला याचे उत्तर शोधावेच लागते. कदाचित कर्नाटकातील शैव-वैष्णवांच्या कलहाला कंटाळून तो पंढरीत स्थिरावला असावा आणि इथल्या संतांचे भक्तीच्या अधिष्ठाना-वर जातीला अप्रमाण समजणारे सर्वसमावेशक उदात्त तत्त्वज्ञान त्याला आवडले असावे. कदाचित कोण्या एका काळी पंढरपूर हे कर्नाटकात गणले जात असावे.

विठ्ठल या देवतेचा इतिहास हा असा असला तरी त्याच्या भक्तीचा इतिहास याहून भिन्न आहे. तो इतिहास म्हणजे वार-करी संप्रदायाचा उदय आणि विकास यांचा इतिहास होय. पाहा–वारकरी संप्रदाय; पंढरपूर; रखुमाई. [वा. सं. उ. वि.; श्रीविठ्ठल आणि पंढरपूर – श्री. ग. ह. खरे, १९६३; वा. पं. इ.; विठोबाचे राज्य– श्री. पु. रा. बेहेरे, १९६४; द. क. वि.; ज्ञानदेव आणि नामदेव–डॉ. शं. दा. पेंडसे, १९६९; संवाद-श्री. द. रा. बेंद्रे, १९६५; सं. सु.; लीळाचरित्र उत्तरार्ध, भाग २ श्री. शं. गो. तुळपुळे; वै. ऐ. नि.; प्रा. म. जै. सा.; सं. मु. ५;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हि. ध. भाग ४ था; स्टडीज इन इंडियन हिस्टरी – संपादक डॉ. व्ही. डी. राव, १९६८; म. सा. आवृत्ती ५ वी; स. सं. वा. खंड १ व २, १९६७; प्रा. म. को. ले.; वि. स्मा. ग्रं.; म. चा. दै.; म. म. पू.; मऱ्हाटी संस्कृती – काही प्रभात–जुलै समस्या–श्री. शं. बा. जोशी १९५२; ज्ञानेश्वर, फेब्रु. १९७४; १९१४; म. सं. प. मा. १]

विठ्ठलनाथ (इ. स. १५१५-१५८५) वल्लभ पंथाचे थोर आचार्य, वल्लभाचार्यांचे द्वितीय पुत्र व अष्टछाप कविमंडळाचे प्रवर्तक. यांना गोस्वामी विठ्ठलनाथ असेही म्हणत. यांचा जन्म काशीजवळच्या चरणाद्री किंवा चुनारगढ नामक गावी, शके १४३७च्या पौष शुद्ध ९ ला झाला. त्यांचे वडील त्या वेळी प्रयागजवळच्या अडेल गावी संन्यस्तपणे राहत होते. विठ्ठलनाथांच्या जन्मानंतर त्यांनी आपल्या पत्नीला दोन्ही मुलांसह अडेल गावी आणले. आरंभीची काही वर्षे पित्याच्या देखरेखीखाली घालविल्यावर, विठ्ठलनाथ काशीचे विद्वान यती पंडित मधुसूदन सरस्वती यांच्याकडे विद्याध्ययनार्थ जाऊन राहिले. कुशाग्र बुद्धी आणि विनम्र वृत्ती यांच्या बळावर लौकरच, म्हणजे वयाच्या पंधराव्या वर्षीच ते वेद, शास्त्रे व पुराणे यांचे अध्ययन संपवून प्रकांड पंडित बनले. बालपणापासूनच त्यांचे मन सगुण भक्तीकडे ओढ घेत होते. त्यामुळे स्वसंप्रदायातील तात्त्विक सिद्धान्तांच्या वादचर्चेपेक्षा त्यांना भागवतातील कृष्णलीलेत रंगून जाणे अधिक बरे वाटे. अध्ययन चालू असतानाच त्यांचे तीर्थरूप वल्लभाचार्य निजधामाला गेले. त्या आधी थोडे दिवस विठ्ठलनाथ आपले ज्येष्ठ बंधू गोपीनाथ यांच्यासह वडिलांना भेटण्यास गेले असताना, विठ्ठलनाथांनी वल्लभाचार्यांना आपणांस उपदेश देण्याची विनंती केली. वल्लभाचार्यांनी एका कागदावर साडेतीन श्लोक लिहिले व तो कागद विठ्ठलनाथांना दिला. कारण, त्या वेळी वल्लभाचार्य बोलू शकत नव्हते किंवा त्यांचे मौन असावे. हे श्लोक वल्लभ संप्रदायात 'शिक्षासार्धत्रय श्लोक' या नावाने मान्यता पावले आहेत.

वल्लभाचार्यांच्या निर्याणानंतर विठ्ठलनाथांनी वल्लभाचार्यांच्या अपुऱ्या ग्रंथांना पूर्णरूप देण्याचे काम अंगीकारले. प्रथमतः त्यांनी अपूर्ण अणुभाष्य पूर्ण केले. तत्त्वदीप नामक निबन्धांतर्गत भागवतार्थ नावाच्या प्रकरणाचा विस्तार वल्लभाचार्यांनी तृतीय स्कंधापर्यंतच केला होता. विठ्ठलनाथांनी तो पंचमस्कंधापर्यन्त करून ग्रंथसमाप्ती केली. याव्यतिरिक्त त्यांनी सुबोधिनी, षोडशग्रंथ, इ. वल्लभाचार्यकृत बऱ्याच ग्रंथावर टीका लिहिल्या. त्याच काळात त्यांनी आपले ज्येष्ठ बंधू गोपीनाथ यांना संप्रदायसंवर्धनाच्या कामी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केले.

इ. स. १५४२ मध्ये गोपीनाथ हेही निवर्तल्यामुळे व त्या वेळी त्यांचा मुलगा पुरुषोत्तम हा अल्पवयी असल्यामुळे वल्लभपंथाच्या प्रमुख आचार्यपदाची सूत्रे विठ्ठलनाथांकडे आली. आचार्यपदी विराजमान झाल्यावर ते आपल्या ज्येष्ठ बंधूंच्या पुण्यस्मृत्यर्थ सहकुटुंब व्रजयात्रेला निघाले.

याच वेळी त्यांची कीर्ती गोंडवनाची राणी दुर्गावती हिच्या कानी जाऊन पोचली. तिने मोठ्या भक्तिभावाने विठ्ठलनाथांना गढमंडल या राजधानीच्या गावी बोलवून घेतले व त्यांचा मोठा सन्मान केला. राणीच्या आग्रहावरूनच सागरच्या पद्मावती नामक मुलीशी विठ्ठलनाथांचा दुसरा विवाह मोठ्या थाटामाटात झाला. त्यांची प्रथम पत्नी रुक्मिणी व तिचे सहा मुलगे यावेळी त्यांच्या समवेत होतेच. पुढे पद्मावतीलाही एक मुलगा झाला. विठ्ठलनाथांच्या या सात मुलांची नावे अशी – रुक्मिणीचे गिरिधर, गोविंद, बाळकृष्ण, गोकुळनाथ, रघुनाथ व यदुनाथ आणि पद्मावतीचा घनश्याम. राणी दुर्गावतीने विठ्ठलनाथांना कायम गढमंडलातच राहण्याची विनंती केली होती; परंतु त्यांची इच्छा व्रजमंडळात स्थायिक होण्याची दिसली. तेव्हा तिने मथुरेला त्यांच्यासाठी एक प्रशस्त व भव्य वास्तू उभारून दिली. त्या वास्तूत विठ्ठलनाथांच्या स्वतंत्र निवासस्थानाव्यतिरिक्त त्यांच्या सात मुलांसाठी आणखी सात घरे बांधली होती. त्यामुळे त्या वास्तूला सातघरा किंवा सतघरा असे नाव मिळाले. विठ्ठलनाथ आपल्या मुला-माणसांसह या वास्तूत जाऊन राहिले; परंतु थोड्याच दिवसात गोंडवनावर अकबर बादशहाची स्वारी झाली व त्या वेळी झालेल्या लढाईत राणी दुर्गावती मारली गेली. या घटनेने विठ्ठलनाथ फार

गोस्वामी विठ्ठलनाथ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व्यथित झाले. मनःशांतीसाठी काही दिवस ते अडेल या आपल्या गावी जाऊन राहिले. काही दिवसांनी त्यांनी पुनश्च मथुरा-वास पत्करला.

मथुरेच्या मुक्कामातच इ. स. १५६६ मध्ये त्यांचा अकबर बादशाहाशी संपर्क आला. विठ्ठलनाथांच्या विद्वत्तेचा आणि साधुत्वाचा सुगंध यापूर्वीच त्याच्यापर्यन्त पोचला होता व त्यामुळे त्यांच्या प्रथम भेटीतच अकबराचा आणि त्यांचा गाढ स्नेह निर्माण झाला. विठ्ठलनाथांच्या मृदुमधुर स्वभावाने व अलौकिक व्यक्तिमत्त्वाने अकबर एवढा प्रभावित झाला, की त्याने त्यांना जतीपुरा व गोकुळ हे दोन गाव मोठ्या प्रसन्नतेने वंशपरंपरागत इनाम देऊन टाकले. व्रजमंडळातील पशुहत्येला बंदी घालून त्याने विठ्ठलनाथांच्या इच्छेला मान दिला. अकबराच्या प्रेरणेने गोकुळात एक नवी वस्ती झाली. अनेक घरे आणि देवमंदिरे उभारण्यात आली. उद्याने आणि उपवने यांची मुद्दाम निर्मिती करण्यात आली. एका नोकराने विठ्ठलनाथांची अवज्ञा केल्याचे समजताच अकबराने जातीने लक्ष घालून त्याला कडक शासन दिले. इ. स. १५८१ मध्ये अकबराने विठ्ठलनाथांच्या नेतृत्वाखाली शिक्रीच्या इबादतखान्यात एक धर्म-परिषद भरवली होती व सर्वधर्मसमन्वयाचा प्रयत्न केला होता.

एके प्रसंगी विठ्ठलनाथांच्या न्यायीपणाची परीक्षा घेण्यासाठी अकबराने त्यांच्याकडे सुरतेच्या एका सावकाराच्या सुनेचा न्याय करण्याचे काम सोपविले. विठ्ठलनाथांनी ते काम अत्यंत निःस्पृहपणे पार पाडले. त्यामुळे अकबराने त्यांना न्यायाधीशाचे अधिकारही बहाल केले. त्याचबरोबर त्याने त्यांना महावस्त्र, घोडा, पुष्पगुच्छ, इ. सन्मानचिन्हे समर्पून डंका किंवा नगारा व पंखा वापरण्याचा अधिकारसुद्धा दिला. या सर्व गोष्टी इस्लामी अमदानीत सर्वश्रेष्ठ व्यक्तीलाच प्राप्त होत.

अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी राजा तोडरमल हा विठ्ठलनाथांना इतका मानीत असे, की रणांगणावर जाताना तो आवर्जून त्यांच्या दर्शनाला जाई व त्यांनी प्रसाद म्हणून दिलेले उत्तरीय पांघरून मगच रणक्षेत्राकडे कूच करी.

अकबराप्रमाणेच अन्यही अनेक राजे-महाराजे त्यांच्या भजनी लागले होते.

गोस्वामी विठ्ठलनाथांचे सर्वांत महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी वल्लभसंप्रदायाची केलेली चिरेबंद बांधणी. वल्लभाचार्यांचा तत्त्वविचार लोकाभिमुख करण्यासाठी त्यांनी प्रथम त्यावर टीका व भाष्ये लिहिली. केवळ तत्त्वज्ञान हे जनसामान्यांना रुक्षच वाटणार, हे ध्यानी घेऊन त्याच्या जोडीला त्यांनी भगवद्भक्तीचे नानाविध उपासनामार्ग निर्माण केले. श्रीनाथाच्या पूजे-अर्चेचे नियम घालून दिले व भक्तिपर पदसाहित्याच्या निर्मितीलाही प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या लेखनाने, वक्तृत्वाने व व्यक्तिमत्वाच्या प्रभावाने पुष्टिसंप्रदाय परिपुष्ट व लोकाभिमुख केला. श्रीनाथमंदिरात अष्टभोग, अष्टदर्शने अशा काही नवीन प्रथा त्यांनी सुरू केल्या. तसेच वार्षिक उत्सव-महोत्सवही सुरू केले.

अष्टछाप कविमंडळाचे प्रवर्तन हे विठ्ठलनाथांचे दुसरे महत्त्वाचे कार्य. आपले चार आणि आपल्या पित्याचे चार शिष्य, असे आठ भक्तकवी एकत्र आणून अष्टछाप कवी नामक एक कविमंडळ त्यांनी सिद्ध केले. या कवींनी रचलेल्या गीतरचना श्रीनाथजीच्या सांप्रदायिक उपासनेत गायिल्या जातात. या अष्टछाप कवींची नावे गुंफलेला एक दोहा असा –

कृष्ण जु कुंभनदास हैं, सूरहि परमानंद ।
नंद चतुर्भुजदास जु, छीतस्वामी गोविंद ॥

यांतले पहिले चार वल्लभाचार्यांचे शिष्य असून, नंतरचे चार विठ्ठलनाथांचे शिष्य आहेत. या सर्व कवींची कविता रसाळ व मनोहर आहे.

विठ्ठलनाथांच्या नावावर एकूण ४६ ग्रंथांची नामावली मिळते; त्यांपैकी विद्वन्मंडन, भक्तिनिर्णय, शृंगाररसमंडन, भक्तिहंस, ललिताभंग, इ. लहानमोठे ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत. या ग्रंथांतून त्यांची प्रकांड विद्वत्ता व जनसामान्यांविषयीचा जिव्हाळा दिसून येतो.

एके प्रसंगी श्रीनाथाचा मुख्य पुजारी कृष्णदास याला आपल्या जागेचा गर्व वाटू लागला व त्या भरात त्याने प्रत्यक्ष विठ्ठलनाथांनाच श्रीनाथमंदिराचे दर्शन बंद केले. त्यामुळे विठ्ठलनाथांना जे परम दुःख झाले, ते त्यांनी प्रतिदिवशी एक 'विज्ञप्ती' लिहून श्रीचरणी व्यक्त करण्यास सुरुवात केली. असे सहा महिने गेल्यावर त्यांना पुनश्च श्रीमुखदर्शनाचा लाभ होऊ लागला. त्यांच्या 'विज्ञप्तिसंग्रहा' वरून त्यांना श्रीनाथाच्या विरहामुळे झालेल्या दुःखाची कल्पना येते.

उणेपुरे सत्तर वर्षांचे कृतार्थ आयुष्य भोगून विठ्ठलनाथांनी माघ शु. ७ ला देह ठेवला.

वल्लभ संप्रदायात विठ्ठलनाथांना कृष्णाचा व त्यांचे ज्येष्ठ बंधू गोपीनाथ यांना बलभद्राचा अवतार मानण्याची प्रथा आहे.

[हिं. बं. वैं. क.; म. सा. अ.; व्र. सां. इ.; हिं. सा. को.; हिं. सा. द्वितीय खंड; श्रीमद्वल्लभाचार्य और उनके सिद्धान्त - श्री. व्रजनाथ शास्त्री, १९२७]

विठ्ठल बीडकर (इ. स. १६२८ – १६९०) एक मराठी पंडितकवी. विठ्ठल अनंत क्षीरसागर हे याचे पूर्ण नाव. हा आश्वलायन शाखेचा ऋग्वेदी कौशिकगोत्री ब्राह्मण होता. हा बीडजवळच्या गोरीपूर गावचा रहिवासी होता, म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विठ्ठल बीडकर या नावाने प्रसिद्ध झाला. हा व्यवसायाने व्यापारी होता. पंढरपूरचा विठ्ठल हे याचे कुलदैवत होते. म्हणून हा प्रत्येक वर्षी पंढरपूरच्या वारीला जात असे.

याने रुक्मिणीस्वयंवर, सीतास्वयंवर, द्रौपदीवस्त्रहरण, पंचालीस्तव, रसमंजरी, विद्वज्जीवन व बिल्हणचरित्र अशी सात काव्ये रचली आहेत. याशिवाय वामनचरित, शुकरंभासंवाद, स्त्रीकथा, इ. आख्याने व स्फुट पदे; तसेच भूपाळ्या, पाळणे, कूटपदे अशासारखी काव्यरचनाही याने केली आहे.

रसमंजरी हा भानुदासाच्या संस्कृत काव्याचा मराठी अनुवाद आहे. बिल्हणचरित्र हेही अनुवादात्मक असले तरी त्याचेच आहे की नाही, यासंबंधी अभ्यासकांत मतभेद आहेत.

राम व कृष्ण यांच्या अवतारकृत्यांतील साम्य दाखविणारा, त्याच्या विद्वज्जीवन काव्यातील एक श्लोक (१.३७) असा–

रामें राक्षस मारिले, यदुवरें संहारिले दानवां।
श्रीरामें मृत वानरे उठविले, कृष्णे व्रजी बल्लवां।
श्रीरामें कपिपुंगवांसह वनीं क्रीडा करी काननीं।
कृष्णें गोपसमागमें विचरितो वृंदावना जाउनी॥

विठ्ठल हा त्याच्या कूटात्मक काव्यासाठीही प्रसिद्ध आहे. त्याचा एक कूटश्लोक असा–

कोणे एक वनीं विचित्र पुतळा जेवावया बैसला।
पात्रीं जेवण जेवितां, अति बळे पात्रेंचि तो भक्षिला।
त्याची जे वनिता वनात फिरता सूर्यास प्रार्थी सदा।
बोले विठ्ठल हा पदार्थ उमगा षण्मासिचा वायदा॥

या कूटाचे उत्तर 'भुंगा' असे आहे.

विठ्ठलाची बहुतेक रचना संस्कृताच्या धर्तीवर असून, त्यात विविध वृत्ते, निरनिराळे चित्रबंध, चमत्कृतिजनक यमके, अनुप्रास व श्लेष यांची रेलचेल आहे. शब्दालंकारांच्या या आवडीमुळे त्याला रसनिष्पत्तीकडे लक्ष पुरविता आले नाही. [म. सा.; म. प्रा. वा. स्व.; प्रा. म. सं.; म. वा. वि.]

विठ्ठल विपुल देव

(इ. स. चे १६ वे शतक) एक वैष्णव भक्तकवी व स्वामी हरिदासाचा शिष्य. काही विद्वानांच्या मते हा स्वामी हरिदासाचा मामा, तर काहींच्या मते मामेभाऊ होता. हरिदासाच्या जन्मानंतर हा त्याच्या घरी येऊन राहिला व त्याच्या प्रभावाने एवढा दिपून गेला, की वयाने ज्येष्ठ असूनही त्याने हरिदासाचे शिष्यत्व पत्करले. हरिदासावर त्याची इतकी विलक्षण भक्ती होती, की त्याच्या मृत्यूनंतर याने आपल्या डोळ्यांवर कायमची पट्टी बांधून घेतली. असे सांगतात, की एकदा रासलीलेत धुंद होऊन नाचत असता प्रत्यक्ष श्रीकृष्णाने त्याची ती नेत्रपट्टी सोडली व त्याला दर्शन दिले.

विठ्ठल विपुल देव हा माधुर्यभावाने श्रीकृष्णाची भक्ती करीत असे. आपल्या गुरूच्या निर्याणानंतर त्याला गुरूचे उत्तराधिकार संभाळण्यासाठी टट्टी येथील गुरुगादीवर आरूढ व्हावे लागले; तथापि, केवळ कर्तव्य म्हणूनच त्याने ही जबाबदारी स्वीकारली. कारण गुरुविरहाने तो एवढा व्याकुळ झाला होता, की गुरूच्या निर्याणानंतर अवघ्या एका वर्षातच त्यानेही देह ठेवला. अंत्यसमयी तो रासलीलेत निमग्न होता.

विठ्ठल विपुलाच्या नावावर कोणताही ग्रंथ मिळत नाही; मिळतात ती चाळीस-बेचाळीस भावमधुर पदे! टट्टीच्या अचार्यांचा एक पदसंग्रह उपलब्ध आहे, त्यात ही पदे समाविष्ट आहेत. राधा-कृष्णांचे लीलागुणगान हा या पदांचा प्रधान विषय असून, त्याच्या जोडीला विठ्ठल विपुलाने काही सुंदर निसर्गदृश्येही शब्दांकित केली आहेत. [ब्र. कृ. मा. भ.; भक्तनामावली]

विड्या तोडणे

लग्नातील एक लौकिक समारंभ. विवाहाच्या दुसऱ्या दिवशी हा समारंभ होतो. त्या वेळी नवरा-नवरीला समोरासमोर बसवतात. नवरा मुलगा नागवेलीच्या पानाची वळकटी करून आपल्या दातात घट्ट धरतो व नवरी आपल्या दातांनी तिचा पुढचा भाग तोडून घेते. याचप्रमाणे नवरीच्या तोंडातली विडी नवरा मुलगा तोडतो. अनेक ठिकाणी या विड्या खोबऱ्याच्याही असतात. पूर्वी लहान मलांची लग्ने होत, तेव्हां त्यांची गंमत व कौतुक म्हणून हा कार्यक्रम करीत. पण अलिकडे मुला-मुलींचे विवाह प्रौढपणी होत असल्यामुळे हा कौतुकाचा प्रकार बंद झाला आहे. [ल. वि. सो.]

विणकाम

वस्त्र विणण्याची कला. विणकाम हे मानवाच्या तांत्रिक प्रगतीचे एक लक्षण आहे. ही कला प्रागैतिहासिक काळापासून भारतात प्रचलित आहे. मोहेंजोदडोमधील उत्खननात सूत कातण्यास उपयोगी अशा मातीच्या व धातूच्या काही चकत्या सापडल्या आहेत. त्यावरून त्या काळातील काही लोक सूत कातीत होते, असे दिसते. तिथे वस्त्राचा एक तुकडाही मिळाला असून. तो कापसाच्या धाग्यांचा होता, असे प्रयोगशाळेत सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे कापसाची लागवड सिंधूच्या तीरावर होत होती, हेही आता सर्वमान्य झाले आहे. मेसापोटेमियात व ग्रीसमध्ये कापसाला अनुक्रमे सिंदू व सिंडान अशी नावे होती. त्यावरून सिंधू देशातून तिकडे कापूस निर्यात होत असावा, असे दिसते. या पुराव्यांच्या आधारावर डॉ. मोतीचंद्र म्हणतात, की कापसापासून कापड तयार करण्याचे श्रेय सर्वप्रथम भारताला मिळाले आहे.

ही कला वैदिक आर्यांच्या संस्कृतीचे एक अविभाज्य अंग

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. वेदकाली लोकरीचे सूत कातून ते विणण्याचे काम घरोघर स्त्री-पुरुष करीत असत; पण त्यातही विशेषतः ही जबाबदारी स्त्रियांची असे (ऋ. २.३.६; २.३८.४, अथर्व. १०.७.४२; १४.२.५१). 'वस्त्रा पुत्राय मातरो वयन्ति' म्हणजे माता पुत्रासाठी वस्त्र विणतात, असा उल्लेख ऋग्वेदात आढळतो (५.४७.६). अथर्ववेदातील एका रूपकात्मक मंत्रात रात्र व दिवस या दोन बहिणी वर्षारूपी वस्त्र विणतात असा उल्लेख आहे. तो मंत्र (१०.७.४२) असा –

तन्त्रमेके युवती विरूपे अभ्याक्रामं वयत. षण्मयूखम् ।
प्रान्या तन्तूंस्तिरते धत्ते अन्या नाप वृञ्जाते न गमातो अन्तम् ॥

अर्थ – दोन भिन्नरूपधारिणी युवतीस्वरूपी नियती सहा खुंट्यांच्या मागावर पुनःपुन्हा वस्त्र विणतात. त्यांपैकी एक धागे काढते आणि दुसरी जोडते. त्यांचे हे कार्य अविरत आणि अविश्रांतपणे चालू असते.

याव्यतिरिक्त या व्यवसायासंबंधी आणखी दोन मंत्र आहेत, (अथर्व. १०.७.४३–४४) ते असे –

तयोरहं परिनृत्यन्त्योरिव न वि जानामि यतरा परस्तात् ।
पुमानेनद्वयत्युद्गृणत्ति पुमानेनद्वि जभाराधि नाके ॥
इमे मयूखा उप तस्तभुर्दिवं सामानि चक्रुस्तसराणि वातवे ॥

अर्थ – नर्तनकारी स्त्रियांपैकी अलिकडची आणि पलिकडची स्वतंत्रपणे ओळखू येत नाही. तद्वत् स्वलोकी नियतीचे धागे विणणाऱ्या आणि उकलणाऱ्या पुरुषांचे स्वतंत्र अस्तित्व ओळखू येत नाही. (स्कंभस्वरूपी मागाच्या) ताण्यांच्या खुंट्या द्युलोकाला आधार देतात आणि या विणकामासाठी सामगायन (उत्तेजनरूपी) धागे पुरविते.

विणकामासंबंधीचे पारिभाषिक शब्दही वैदिक साहित्यात आढळतात. उभ्या व आडव्या धाग्यांना अनुक्रमे तंतू व ओतू असे शब्द आहेत (ऋ. ६.९.२; अथर्व. १४.२.५१; तैत्ति. सं. ६. १.१.४). हे दोन्ही शब्द वा म्हणजे विणणे आणि तन् म्हणजे ताणणे या धातूंपासून तयार झाले आहेत (ऋ. १०. १३०.२; अथर्व. १०.७.४३; वाज. सं. १९.८०). वेमन् म्हणजे माग होय (वाज. सं. १९.८३). विणलेले वस्त्र अडकविण्यासाठी ते मयूख म्हणजे लाकडी खुंटीचा उपयोग करीत आणि त्याला ताण देण्यासाठी शिशाचा गोळा बांधीत. (वाज. सं. १९.८०). तसर म्हणजे धोटा वापरण्याची पद्धत त्या काळी होती. वाय हा शब्द पुरुष विणकरासाठी आणि वायित्री हा स्त्री विणकरासाठी आला आहे (पंच. ब्रा. १.८.९; श. ब्रा. ३.१.२.१३). अथर्ववेदात सिरी शब्दाचा उपयोग स्त्री विणकर म्हणून केला आहे (१४.२.५१).

डॉ. सरकारांच्या मते सिरी शब्द तमिळ सलॅवरून आला आहे आणि त्याचा लोकभाषेतील अर्थ विणलेला कपडा असा होतो.

सूत विणताना त्याला खळ लावण्याची क्रिया केली जात असे (ऋ. १.१०५.८).

गाईच्या केसापासून आणि मेंढीच्या लोकरीपासून सोमरस गाळण्यासाठी तयार केलेल्या गाळण्याचा उल्लेख शुक्ल यजुर्वेदात आहे (१९.८८; १९.४३). तार्प्य :नावाचे रेशमी वस्त्र गवतापासून अथवा त्रिपर्ण नावाच्या वेलीच्या धाग्यापासून बनवीत असावे, असे सायणाचार्यांचे मत आहे (अथर्व. १८.४.३१). कुश गवतापासून वस्त्रे विणण्याची प्रथा होती असे दिसते. कारण यज्ञ करणाऱ्या यजमानाच्या पत्नीला आपल्या वस्त्रावरून कमरेभोवती कुशचीर गुंडाळावे लागत असे. हे कुशवस्त्र पूर्वीच्या कुशवस्त्राची आठवण म्हणून वापरले जात असावे. याशिवाय ताग, अंबाडी, इ. वनस्पतींचे धागेही वस्त्रासाठी वापरीत असावे, असे वाटते.

विणकामाच्या साधनांसंबंधी एवढी प्रगती असली, तरी वैदिक आर्यांना कापूस माहीत होता की नाहीं, यासंबंधी अभ्यासकांत बरेच मतभेद आहेत. संहिताग्रंथांत आणि ब्राह्मणग्रंथांत कापसाचा उल्लेख नाही. त्याचा प्रथम उल्लेख आश्वलायन (२.३.४.१७) व लाट्यायन श्रौतसूत्रांत (२.६.१; १.२.१४) आढळतो. यावरून संहिताब्राह्मणकाळात आर्यांना कापूस व कापसाचे सूत माहीत नव्हते, अशी एक विचारधारा आहे. परंतु केवळ उल्लेखाचा अभाव हा पुरावा होऊ शकत नाही, असेही काहींचे मत आहे. हिंदुस्थानातला कापूस मेसापोटेमियात जात होता आणि इथली मलमल बाबिलोनमध्ये जात असे. यावरून कापसाची वस्त्रे आर्यांना माहीत नव्हती, असे म्हणता येत नाही.

जनपदयुगात विणकाम करणाऱ्यांची एक जात निर्माण झाली होती; पण ती जात तिरस्कृत मानली जात असे. विणकाम अत्यंत कष्टाचे व हलक्या दर्जाचे असल्याचा उल्लेख भीमसेन जातकात आढळतो. तुंडिल व महाजनक या जातकांत कापूस, कापसाची शेते, सूत कातणे, विणणे यासंबंधी बरीच माहिती आहे. स्त्रिया सूत कातून त्याच्या गुंड्या बनवीत असत, असेही तिथे म्हटले आहे. जंबूद्वीपप्रज्ञप्ती या जैन ग्रंथात विणकरांचा उल्लेख आहे. रेशमी कापड विणणाऱ्यांना त्यात पट्टगार म्हटले असून, या धंद्यातील कसबावरून आपली जात उन्नत करून घेता येते, असा आशावाद प्रकट केला आहे. या काळात राजगृह, साकेत, वाराणसी, वैशाली व पुष्कलावती ही शहरे या कामासाठी प्रसिद्ध होती. काशीचे कापड तर इतके प्रसिद्ध होते, की गौतम बुद्धांचे मृत शरीर काशीच्या कापडाने झाकले होते, असे महापरिनिर्वाणसूत्राचा टीकाकार म्हणतो.

रामायण–महाभारताच्या कालात या कलेची बरीच प्रगती

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

क्षाती. केकय देशाहून भरत अयोध्येला परत येत असता त्याच्या मामाने त्याला आश्चर्यकारक शंभर वस्त्रे दिली होती. (वा. रा. २.७०.१९). त्याचप्रमाणे तो चित्रकूटावर रामभेटीला जात होता, तेव्हा त्याच्याबरोबर सूत्रकर्मविशेषज्ञ, कंबलक, इ. विणकाम करणारे लोक होते (२.८३.१२ – १५). राजसूय यज्ञाच्या प्रसंगी धर्मराजाला विविध देशांतून उत्तमोत्तम वस्त्रे भेट म्हणून आली होती. त्यांत कंबोजच्या राजाने उपहार म्हणून दिलेली वस्त्रे सर्वोत्कृष्ट म्हणून गणली गेली होती. ती वस्त्रे कशापासून तयार केली होती याचे वर्णन पुढील श्लोकात आहे –

और्णान् बैलान् वार्षदंशान् जातरूपपरिष्कृतान्।
प्रावाराजिनमुख्यांश्च काम्बोजः प्रददौ बहून् ॥
(म. भा. सभा. ५१.३)

अर्थ – कंबोजच्या राजाने मेंढीच्या लोकरीपासून बनविलेले और्ण, उंदराच्या केसांपासून केलेले बैल व मांजरांच्या केसांचे वार्षदंश, इ. अनेक सुंदर भरजरी वस्त्रे व मृगचर्मे (युधिष्ठिराला) भेट म्हणून दिली.

कंबोज देशातील लोकांप्रमाणेच वैराम, पारद, आभीर, इ. लोकांनीही भेटवस्त्रे आणली होती. त्यांतील काही वस्त्रे हरिणांच्या केसांपासून व काही रेशमी किड्यांच्या धाग्यांपासून तयार केलेली होती. राजसूय यज्ञाच्या वेळी दिग्विजयासाठी पूर्वेला गेलेला भीम, दक्षिणेला गेलेला सहदेव, पश्चिमेला गेलेला नकुल आणि उत्तरेला गेलेला अर्जुन यांनाही अनेक वस्त्रे भेट म्हणून मिळाली होती. यावरून त्या काळी साऱ्या भारत देशात विणकामाचा व्यवसाय चांगल्या पद्धतीने चालला होता, असे म्हणता येते.

कौटिल्याने अर्थशास्त्रात विणकामासंबंधी बरीच माहिती पुरविली आहे. विणकामावरील अधिकाऱ्याला सूत्राध्यक्ष अशी संज्ञा होती. लोकर, झाडांच्या साली, गवत, ताग, घायपात, इत्यादींपासून तंतू काढणे, कापसाचे सूत कातणे, त्याची वस्त्रे विणणे, इ. कामे तो कारागिरांकडून करून घेत असे. सूत कातण्याचे काम ... विधवा, दंड देण्यास असमर्थ असणाऱ्या स्त्रिया, जोगिणी, ... ठ्ठा, वृद्ध राजदासी आणि वेश्या करीत असत. त्यांना कामाच्या मोबदल्यात योग्य ते वेतन दिले जात असे. वस्त्रे विणण्याचे काम ज्या कारागिराकडे असे त्याच्या हुशारीप्रमाणे आणि कामातील सुबकतेप्रमाणे त्याला वेतन दिले जाई.

उपजीविकेचे काहीच साधन नसणाऱ्या स्त्रियांना सूत कातण्याचे काम प्रथम दिले जात असे. शिवाय एखाद्या स्त्रीला कामासाठी कारखान्यात जाता येणे शक्य नसेल, तर तिला तिच्या घरी काम पुरविले जात असे.

कौटिल्याने कौशेय व चीनपट्ट असे रेशमी कापडाचे दोन प्रकार दिले आहेत. त्याचप्रमाणे माथुर, आपरांतक, कलिंगक, काशिक, वांगक, वात्सक, माहिषक अशी सुती कापडांची नावे दिली आहेत. अर्थात् ही सारी नावे देशांवरून पडली आहेत. कलिंग देशातील नाग विणकर तर आपल्या कामात एवढे निष्णात होते, की तमिळ देशात कलिंग हा शब्दच कापडाचा पर्यायी शब्द बनला होता. एका प्राचीन तमिळ काव्यात अय नावाच्या राजाला नील नागाने मलमली कापड भेट दिल्याचा उल्लेख आहे.

सातवाहनांच्या नासिक जुन्नर येथील शिलालेखांत विणकरांचा कोलिक असा उल्लेख केलेला आढळतो. या काळात भारतात जशी उत्तम वस्त्रे तयार होत, तशी विदेशांतही तयार होत. चीन, मध्य आशिया, अफगाणिस्तान, इ. देशांतली वस्त्रे भारतात येत असल्याचा उल्लेख आहे. पेरिप्लस या ग्रंथानुसार चिनी कापडाचा व्यापार सिंधू नदीवरील बॅक्ट्रिकन या बंदरातून होत असे. प्लिनीच्या मते चिनी वस्त्रे मूल्यवान आणि पक्क्या रंगाची असत.

भारतीय मलमलीला रोमन साम्राज्यात फार मागणी असल्याचा उल्लेख पेरिप्लसमध्ये आढळतो. रोमन लोकांनी इथल्या मलमलीला काही नावे दिली होती. नेबुला हे त्यांतीलच एक नाव असून, त्याचा अर्थ धुराप्रमाणे विरळ दिसणारी म्हणजे तलम मलमल असा होता. त्रिचनापल्ली, तंजाऊर, इ. ठिकाणच्या मलमलीला आर्गरितिक असे म्हणत. डाक्क्याला तयार होणारी मलमल गँजेटिक म्हणून ओळखली जात असे.

संस्कृत बौद्ध साहित्यात मलमलीसाठी विरली असा शब्द वापरला आहे. यावरून या कालात सुती कापडाला बरेच महत्त्व असावे, असे दिसते. विणकर लोक आपले काम कसे करीत असत याचे उत्तम वर्णन दिव्यावदानात आढळते. त्यानुसार विणकर प्रथम चीर (शिरोभूषण) काढून ठेवून आणि डोके वर करून, हात-पाय हालवीत कामाला प्रारंभ करी. त्याच्या जवळ असलेली त्याची पत्नी त्याला मद्य (दिव्यसुधा) देऊन उभ्या धाग्यांना ताण द्यायला प्रारंभ करी.

अमरकोशात कापडाचे चार प्रकार दिले आहेत, ते असे– वल्कल, फाल म्हणजे फळापासून तयार केलेले (यातच सुती कापडाची गणना केली जाते), कौशेय म्हणजे रेशमी आणि रांकव म्हणजे रंकूच्या (हरणाची एक जात) केसापासून केलेले होय. अनुयोगसूत्रातही अंडज, बोंडज व कीडज असे कापडाचे प्रकार सांगितले आहेत. टीकाकारांच्या कल्पनेनुसार अंडज म्हणजे हंसाच्या अंड्यापासून बनविलेले कापड, बोंडज म्हणजे सुती कापड आणि कीडज म्हणजे रेशमी कापड होय.

पैठण, ठाणे, चौल, इ. नगरे प्राचीन कालापासून मलमली, मलमली व रेशमी कापडासाठी प्रसिद्ध होती. इ. स. च्या तेराव्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शतकात इथे तयार होणारे कापड जगप्रसिद्ध होते. एकट्या ठाणे शहरात पाच हजार विणकर मखमली कापड तयार करीत होते. नंतरच्या काळात बऱ्हाणपुरला तयार झालेले कापड अरबस्तान, इराण, इजिप्त, पोलंड, इ. देशांतील बाजारपेठांत विकले जात होते. अत्यंत बारीक पण पक्क्या धाग्याच्या रेशमाच्या विणकामासाठी पैठणची ख्याती होती. इथे तयार होणारे महावस्त्र पैठणी या नावाने आजही परिचित आहे. पैठणीत जरीचे नक्षीकामही असे. या कालातील सुती किंवा रेशमी वस्त्रे नळीत घालून ठेवण्याची पद्धत होती. त्यावरून कापडाच्या तलमपणाची कल्पना येते.

मुसलमानी सत्ता इथे सुरू झाल्यावर तागाच्या कापडाचा वापर विपुल प्रमाणात सुरू झाला. अकबराच्या दरबारातील अबुल फैजीने वस्त्रनिर्मितीसंबंधी बरीच माहिती लिहून ठेवली आहे. या कालात तयार होणारी सुमारे दोनशे प्रकारची वस्त्रे बाहेर पाठविली जात होती. ही या कलेच्या प्रगतीची एक मोठी खूण आहे. त्यातही सुती वस्त्रांची निर्मिती उत्तम दर्जाची होती. डाक्क्यात निर्माण होणारी मलमल जगप्रसिद्ध होती.

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात, मागावर विणलेल्या मलमली कापडाचा एक अंगरखा आहे. तो नाना फडणविसाचा आहे, असे म्हणतात. त्यातून आतील अंग स्पष्ट दिसते. त्याचा रंग पांढरा आहे. कमरेखाली त्या अंगरख्याचा झोळ साडेतेरा वार असून, त्याचे वजन वीस तोळ्यांहून कमी आहे, इतकी ती मलमल तलम आहे. पेशवाईच्या अखेरच्या काळापर्यंत इथे हातमागावर विणलेली उत्तम वस्त्रे तयार होत होती. त्यासाठी पैठण, महेश्वर, नागपूर, खंबायत, डाक्का, मुलतान, इ. पेठा प्रसिद्ध होत्या. पुढे इंग्रज लोक भारतात आले. त्यांची कारकीर्द सुरू होताच इथले कापड परदेशात जाईनासे झाले. कारण युरोपात त्या वेळी यंत्रयुग सुरू झाल्यामुळे गरजेपेक्षा अधिक कापड तिथे निर्माण होत असे. या अधिक कापडासाठी इंग्रजांना निरनिराळ्या बाजारपेठा हस्तगत कराव्या लागल्या. ते भारताचे शासक झाल्यामुळे इथल्या पेठेत आपले वर्चस्व राहावे आणि भारतीय विणकला नष्ट व्हावी म्हणून त्यांनी योजनाबद्ध प्रयत्न केले. अत्यंत तलम मलमल विणणाऱ्या बंगालमधील कारागिरांचे आंगठे त्यांनी तोडले असेही म्हणतात. त्यामुळे इथला हातमागावर कापड विणण्याचा व्यवसाय खूप खालावला. [मो. सिं. स.; हडप्पा; सिं. स.; प्रा. भा. वे.; ऋ. सां. इ.; सिं. ऋ. हिं. सं.; वे. का. स.; वै. वि. भा. प.; प्रा. भा. सं.; रा. का. स; म. भा. स.; म. भा. उ.; जा. का. भा. सं.; बु. भा. स.; नं. मौ. यु. भा.; कौ. अ. प्र.; मु. पू. म. २; म. प्रा. इ. सं.; या. का. म.; पे. का. म.; प्रा. भा. सा. सां. भू.; हिं. दे. क़ा. व.; वे. इं.; हिं. ध.; प्रवास; ना. प्र. प., विक्रमांक उत्तरार्ध, १९४४; म. मु. भा.; कॉं. टे. इं.

वितर्कमुद्रा मूर्तिकलेतील एक मुद्रा. मूर्तीचा उजवा हात कोपरापासून वर उचललेला, तळवा उभा आणि मधली तीन बोटेही उभी. तर्जनीचे टोक आंगठीप्रमाणे वाकून आंगठ्याला भिडलेले. ही मुद्रा तात्त्विक संवादाची द्योतक आहे. बौद्ध मूर्तिकलेत अवलोकितेश्वराच्या कित्येक मूर्ती या मुद्रेत असतात. [इं. बु. इ.]

वितल सप्तपातालांपैकी दुसरे. इथे हाटकेश्वर या नावाने शंकर आपल्या पार्षदगणांसह राहतो. तो पार्वतीशी संलग्न अवस्थेत असतो. तिथे देव त्याची पूजा करतात. तिथे वास्तव्य करून तो प्रजापतीच्या सृष्टीचे संवर्धन करतो.

वितलात हाटकी नावाची एक नदीव ह्रत असून, नी शिवाच्या वीर्यापासून उत्पन्न झाली आहे. या नदीत अग्नीच्या मुखातून गळलेले हाटक नावाचे सुवर्ण मिळते. या सुवर्णाची दैत्यांना फार आवड असून, दैत्य स्त्रिया त्याचे अलंकार धारण करतात. (दे. भा. ८. १९.८–११).

वितस्तापूजा एक व्रत. भाद्रपद शुद्ध दशमीला प्रारंभ करून पुढे सात दिवस हे व्रत करतात. वितस्ता नदीचे दर्शन, स्नान, तिचे जलपान, तिची पूजा व तिचे ध्यान हा व्रताचा प्रधान विधी आहे. वितस्ता व सिंधू यांच्या संगमस्थानी हे व्रत करणे अधिक प्रशस्त मानले जाते. उद्यापनाच्या वेळी या नदीच्या सन्मानार्थ उत्सव करून, त्यात नट व नर्तक यांचा सन्मान करतात. या नदीला सतीचा (पार्वती) अवतार मानतात. वितस्तेला सांप्रत झेलम हे नाव आहे. [हि. ध.]

विदर्भ महाराष्ट्राचा एक विभाग. विदर्भ हे नाव अत्यंत प्राचीन आहे. विदर्भ नामक राजाने या प्रदेशात आर्यांची वसाहत स्थापून ती समृद्ध केली, म्हणून याला विदर्भ हे नाव मिळाले, अशी आख्यायिका आहे. भागवत पुराणात (५.४.१०) विदर्भ हा ऋषभदेवाचा पुत्र होता, असे म्हटले आहे. यदुवंशाची भोज नावाची एक शाखा होती. त्या शाखेतला ऋषभदेव हा प्रमुख होय. याला नऊ पुत्र होते. त्यांतील विदर्भ नामक पुत्राला हा प्रदेश मिळाला.

विदर्भाची प्राचीन राजधानी कुंडिनपूर अमरावती जिल्ह्यात पूर्वीच्याच नावाचे विद्यमान आहे. प्राचीन काळी विदर्भात नर्मदा नदीपासून दक्षिणेस कृष्णा नदीच्या खोऱ्यापर्यंत आणि पश्चिमेस ऋषिक (खानदेश) देशापासून पूर्वेस कोसल (छत्तीसगड)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देशापर्यंत पसरलेल्या विशाल भूभागाचा समावेश होत असे.

अगस्त्य ऋषीने प्रथम विंध्य पर्वतातून मार्ग काढून दक्षिण भारतात प्रवेश केला आणि विदर्भात आश्रम स्थापून आर्य संस्कृतीचा प्रसार केला. त्याने विदर्भराजकन्या लोपामुद्रा हिच्याशी विवाह केला होता. तिचा नामनिर्देश ऋग्वेदात (१.१७९.४) आहे. विदर्भाचा उल्लेख उपनिषदांत आहे. उपनिषदत्काली विदर्भ देश प्रसिद्ध होता, असे दिसते.

महाभारत, रामायण, पुराणे, इ. उत्तरकालीन ग्रंथांत विदर्भाचा उल्लेख अनेकदा आला आहे. त्यातील पयोष्णी (पूर्णा), वरदा (वर्धा), वेणा (वैन गंगा), इ. नद्यांचे व त्यांच्या तीरावरील पुण्यक्षेत्रांचे वर्णनही वरील ग्रंथांत आढळते. श्रीकृष्णाची पट्टराणी रुक्मिणी, नलराजाची दमयंती व रघुवंशातील अजराजाची राणी इंदुमती या विदर्भराजकन्या होत्या.

प्राचीन इतिहास – सनपूर्व तिसऱ्या शतकात हा प्रदेश मौर्य सम्राट अशोक याच्या साम्राज्याचा एक भाग बनला. अशोकाचा शिलालेख या प्रदेशात अजून सापडलेला नाही; पण त्याच्या महामात्राचा एक शिलालेख मात्र चांदा जिल्ह्यातील देवटेक येथे मिळाला आहे. मौर्यांच्या नंतर या प्रदेशावर सातवाहनांची सत्ता प्रस्थापित झाली. त्यांच्या नाण्यांचा मोठा संग्रह अकोला जिल्ह्यातील तऱ्हाळा येथे सापडला आहे. त्यात बहुतेक सातवाहन राजांची नाणी मिळाली आहेत. त्यावरून या प्रदेशावर सातवाहनांचे राज्य अगदी अखेरपर्यंत म्हणजे इ. स. २५० पर्यंत चालू होते, असे दिसते. कलिंगाधिपती खारवेल याने विदर्भावर स्वारी केली होती व त्याचे सैन्य कण्हवेण्णा नदीपर्यंत पोचले होते, असे भुवनेश्वराजवळच्या हाथीगुंफा लेण्यातील लेखात म्हटले आहे. ही कण्हवेण्णा म्हणजे नागपूरजवळची कन्हान नदी असावी, असे म. म. मिराशी यांचे मत आहे.

इ. स. २५० च्या सुमारास सातवाहनांचा अस्त होऊन वाकाटक वंशाचा उदय झाला. त्या वंशातील विंध्यशक्ती नामक पुरुषाने विदर्भात आपले राज्य स्थापले. वाकाटकांच्या काळी विदर्भात अतिशय समृद्धी होती; संस्कृत व प्राकृत वाङ्मय, कलाकौशल्य, व्यापार यांचाही विकास झाला होता.

वाकाटकांच्या अस्तानंतर इ. स. ५५७ च्या सुमारास माहिष्मतीच्या कलचुरींचे राज्य विदर्भात प्रस्थापित झाले. कलचुरींचे लेख अद्यापि विदर्भात सापडले नाहीत; पण त्या वंशाचा संस्थापक कृष्णराज याची अनेक चांदीची नाणी अमरावती जिल्ह्यातील धामोरी व बैतुल जिल्ह्यातील पट्टन या गावी सापडली आहेत.

इ. स. च्या ७ व्या शतकाच्या पूर्वार्धात उदयास आलेला बदामीचा चालुक्यनृपती पुलकेशी (दुसरा) याने कलचुरींचा पराभव करून तीन महाराष्ट्र आपल्या साम्राज्याला जोडले. चालुक्यांच्या व राष्ट्रकूटांच्या वेळी विदर्भात एक राष्ट्रकूट घराणे राज्य करीत होते. त्याचे काही ताम्रपट अकोला जिल्ह्यात सांगळूद व बैतुल जिल्ह्यात मुलताई येथे सापडले आहेत. त्यांची राजधानी नंतरच्या काळात अचलपूर येथे होती. हे घराणे मांडलिक असल्यामुळे त्याच्याकडून विद्वानांना उदार आश्रय मिळू शकला नाही. म्हणून विदर्भीय पंडित इतरत्र राजाश्रयासाठी गेले.

राष्ट्रकूटांचे अनेक ताम्रपट विदर्भात मिळाले आहेत. मान्यखेटच्या राष्ट्रकूटांची सत्ता विदर्भावर प्रस्थापित झाल्यानंतर काही विदर्भीय विद्वान त्यांच्या आश्रयाला गेले. राष्ट्रकूटांच्या राजवटीत चांदा जिल्ह्यातील मार्कंडी येथील सुंदर शिवमंदिर बांधले गेले.

धारानृपती भोज याचा पुतण्या जगद्देव हा चालुक्य विक्रमादित्य (सहावा) याच्या आश्रयाला गेला होता. विक्रमादित्याने त्याला विदर्भाच्या काही भागाचा अधिपती नेमले होते. त्याचा इ. स. १११२ चा शिलालेख यवतमाळ जिल्ह्यातील डोंगरगाव येथे सापडला आहे. विदर्भाच्या पूर्वभागावर परमारांची सत्ता असावी. भांदक येथे परमारनृपती लक्ष्मदेव याचा इ. स. ११०४–५ चा शिलालेख सापडला आहे. त्या काळातल्या काही सुंदर मूर्तीही विदर्भात सापडल्या आहेत.

त्यानंतर विदर्भावर यादवांची सत्ता आली. त्या वंशातील राजांचे अनेक लेख विदर्भात निरनिराळ्या जागीं सापडले आहेत. यादवांच्या राजवटीत बोपदेव हा प्रसिद्ध ग्रंथकार व वैयाकरण होऊन गेला. तो वर्धा नदीच्या तीरावर असलेल्या वेदपद गावचा रहिवासी होता. त्याच काळात विदर्भात महानुभाव पंथाचा उदय झाला. या पंथाचे मूळ पुरुष गोविंद प्रभू हे अमरावतीजवळच्या ऋद्धपूरचे रहिवासी होते.

यादवांच्या काळात वैदिकधर्मियांनीही विदर्भात उत्कृष्ट ग्रंथरचना केली. मुकुंदराजाचे परमगुरू हरिनाथ यांची समाधी वैनगंगेच्या तीरी अंबानगरी (अंभोरे) येथे आहे. यादवनृपती सिंघण याचा सेनापती खोलेश्वर हा मूळचा विदर्भातला होता. त्याने अचलपुरात शार्ङ्गधराचे (विष्णूचे) भव्य मंदिर बांधले आणि पूर्णेच्या तीरावर आपल्या नावाचा अग्रहार वसविला; त्याचप्रमाणे वऱ्हाडात अनेक मंदिरे, अग्रहार, वापी व पाणपोयाही बांधल्या. यादवांच्या नंतर विदर्भावर मुसलमानांची सत्ता प्रस्थापित झाली.

सांप्रत महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर, चांदा, भंडारा, अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या जिल्ह्यांचा विदर्भात समावेश होतो. त्यांतील अमरावती, अकोला, यवतमाळ व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

बुलढाणा या भागाला वऱ्हाड म्हणतात. विदर्भाला पूर्वी वरदा-तट असे नाव होते (नलचम्पू६.६६). त्यापासूनच वऱ्हाड हे नाव प्रचलित झाले असावे. मात्र विदर्भाची व्याप्ती सध्याच्या वऱ्हाड प्रदेशापेक्षा विशाल होती. [सं. मु. ३]

विदिशा एक प्राचीन नगरी. विदिशा ही पुरातन काळच्या सोळा महाजनपदांपैकी दशार्ण नामक जनपदाची राजधानी होती. सांप्रत जिथे भिलसा किंवा भेलसा हे नगर वसले आहे, त्याच जागी प्राचीन विदिशा वसली होती. काही संशोधकांच्या मते गुप्तकाळात विदिशा नगरी वसली, तर काहींच्या मते ती शत्रुघ्नाने किंवा रामाने वसवली. पहिले मत इतिहास-प्रसिद्ध असून, दुसऱ्या मताला दंतकथांशिवाय वेगळा आधार नाही. कालपरत्वे या नगरीला भिन्न भिन्न नावे दिलेली आढळतात. पुराणात तिला भद्रावती म्हटले असून, बौद्ध व जैन साहित्यात भादलपूर किंवा भद्रपूर म्हटले आहे. अल् बिरूनी विदिशेचे नाव महाबलिस्थान असे देतो.

मध्ययुगीन इतिहासात भैलिशा, भैलस्वामिन किंवा औरंगजेबाच्या काळात अलमगिरपूर या नावांनी विदिशेचा उल्लेख केला जाई. बृहत्संहितेत या नगरीचा नामनिर्देश असून, कालिदास, बाण, इ. संस्कृत कवींनी आपापल्या ग्रंथांतून तिचे यशोगान केले आहे. सांप्रतचे भिलसा हे नगरनाम मध्ययुगीन विदिशेच्या भैलिशा या नावाशी जुळते आहे. विदिशेच्या एका बाजूला दशान किंवा धसाण नदीच्या तीरावर भैलस्वामी मंदिर नावाचे एक सूर्यमंदिर असल्यामुळे भैलस्वामिन किंवा भैलिशा असे नाव विदिशेला मिळाले असावे, असे अल् बिरूनीने म्हटले आहे. पुराणांतील माहितीवरून कळते, की हे सूर्यमंदिर चेदी राजाचा पराभव करणारा श्रीकृष्णाचा प्रधान वाचस्पती याने बांधले व ते वेत्रवतीच्या पुरात केव्हातरी नामशेष झाले; परंतु गावच्या जीर्ण तटाजवळ असलेला एक लहानसा शिलालेख आजही त्याच्या एका काळच्या अस्तित्वाची साक्ष देत आहे.

विदिशेचे उल्लेख थेट रामायणकाळापासून मिळतात. वनवासाला जात असता राम इथे काही काळ थांबला होता, अशी जनश्रुती आहे. रामाच्या स्वर्गारोहणसमयी शत्रुघ्न जेव्हा मथुरेहून अयोध्येला गेला, तेव्हा त्याने आपला पुत्र सुबाहू याला मथुरेत व शत्रुघाती याला विदिशेत राज्यपाल नेमले (वा. रा. उत्तर. १०८. १०-११) कालिदासही विदिशेचा असाच उल्लेख करतो (रघु. १५.३६). मेघदूतात विदिशा ही दशार्ण देशाची राजधानी असल्याचे म्हटले आहे (पूर्वमेघ २३-२४). युधिष्ठिराने राजसूय यज्ञ मांडला, तेव्हा विदिशेच्या युवनाश्व नामक राजाने त्याला एक उत्तम अश्व बहाल केला. प्रत्यक्ष महाभारतीय युद्धात इथला दशार्ण नामक लोकसंघ पांडवांच्या बाजूने लढला होता. कर्णाचा पुत्र व भीम यांचे युद्ध जुंपले असता, श्रीकृष्णाने विदिशेच्या लोहगिरी नामक डोंगरावरून त्या युद्धाचे संचालन केले. मार्कंडेयपुराणातील उल्लेखावरून कळते, की इथे एक स्वयंवर झाले. त्याचे निमित्त होऊन विदिशेचा राजा व वैशालीच्या राजाचा मुलगा आविक्षित यांच्यांत लढाई झाली. त्या लढाईत विदिशेचा राजा विजयी झाला व त्याने आविक्षिताला कैद केले. ती वार्ता समजल्यावर वैशालीचा राजा करंधम हा आपल्या मुलाच्या मुक्ततेसाठी विदिशेवर चालून आला आणि त्याने विदिशेच्या राजाला पराजित करून आविक्षिताला सोडवून नेले. विदिशेचा हा राजा हैहय कुलातला होता. यानंतर काही वर्षांनी सगर राजाने हैहयांना जिंकून विदिशेवर आपला अंमल वसवला. सगरांच्या नंतर इथे यादव आले व त्यांनी अनेक छोटी छोटी राज्ये स्थापन केली. विदिशेचेही एक छोटे राज्य त्यांत होतेच.

विदिशेचा ज्ञात इतिहास अशोक मौर्यांच्या काळापासून सुरू होतो. अशोक युवराज असताना त्याच्याकडे उज्जयिनीचे राज्यपालपद आले. एकदा तो पाटलिपुत्राहून उज्जयिनीकडे जात असता विदिशेला थांबला. तिथे त्याचे एका श्रेष्ठीकन्येशी प्रेम जमले. तिचे नाव वेदिसमहादेवी असे होते. अशोकाने तिच्याशी लग्न केले. पुढे तिला महेंद्र व संघमित्रा अशी दोन अपत्ये झाली. अशोकाचा पिता बिंदुसार मरण पावल्यावर, अशोक आपल्या दोन्ही मुलांसह पाटलिपुत्राला गेला; परंतु वेदिसमहादेवी मात्र विदिशेतच राहिली. महेंद्र व संघमित्रा यांना आपण विदिशेत जन्मलो, याचा सदैव अभिमान वाटे.

शेवटचा मौर्य सम्राट बृहद्रथ याचा वध करून पुष्यमित्र शुंग गादीवर आला आणि तेव्हापासून विदिशेच्या वैभवाला सुरुवात झाली. पुष्यमित्र शुंग हा वैदिक धर्माचा कट्टर पुरस्कर्ता होता. त्याने आपल्या राज्यकाळात हिंदू धर्माचे सर्वार्थाने पुनरुत्थान आरंभिले व त्यासाठी केलेल्या अश्वमेध, राजसूय, इ. यज्ञयागांची पूर्णाहुती त्याने विदिशेत केली. या यज्ञयागांचे पौरोहित्य करणारा भगवान पतंजली हा विदिशेजवळच्या गोनर्द नामक गावाचा रहिवासी होता.

शुंग घराण्यातले कित्येक राजे हे वैष्णव किंवा भागवत धर्माचे अभिमानी व अनुयायी होते. त्यांनी विदिशेत अनेक विष्णुमंदिरे उभारली. शुंग सम्राट भागभद्र याच्या राज्यकालात तक्षशिलेच्या ग्रीक राजाने हेलियोडोरस नामक एका राजदूताला भागभद्राच्या दरबारी पाठविले. विदिशेतली विष्णुमंदिरे आणि तिथल्या लोकांची विष्णुभक्ती पाहून हेलियोडोरस विलक्षण प्रभावित झाला. त्याच मनःस्थितीत त्याने स्वतः भागवत धर्माचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वीकार केला व विदिशेतल्या एका विष्णुमंदिरापुढे एक भव्य गरुडध्वज (स्तंभ) उभा केला. ब्राह्मण किंवा वैदिक धर्माशी नाते सांगणारा हा पहिला पाषाणस्तंभ होय. अशोकस्तंभाप्रमाणेच याही स्तंभाचा शिरोभाग घंटाकार दिसतो. याची घडण पुष्कळशी अशोककालीन स्तंभासारखी असली, तरी त्यात आदीत्यही बरेच आहे. अशोकस्तंभाचा खालचा भाग साधा व गोल आहे; तर या स्तंभाचा खालचा भाग अलंकृत व अष्टकोनी आहे. मधला भाग सोळाकोनी असून, त्या भागावर व सर्वांत वरच्या भागाच्या मधोमध पुष्पमाला खोदली आहे. स्तंभाच्या माथ्यावर तालपत्राची आकृती कोरली आहे. या स्तंभाचा वरचा भाग बत्तीस कोनी आहे. यात्रेकरू व प्रवासी या स्तंभाची पूजा करतात.

हेलियोडोरसप्रमाणेच डिमिट्रियस नावाच्या आणखी एका ग्रीक सरदाराने विदिशेत भागवत पंथाचा स्वीकार करून तिथे वास केला होता.

सम्राट खारवेल याने आपला राजसूय यज्ञ करण्यासाठी विदिशेच्या भूमीचीच निवड केली होती.

शुंगांच्या नंतर भारशिव नाग विदिशेचे शासक झाले. ते अत्यंत पराक्रमी व हिंदू धर्माचे पराकोटीचे अभिमानी होते. त्यांनी कुशाणादी परकीय आक्रमकांशी दोन हात करून त्यांना यमुनेपार हाकलून दिले. शुंग जसे कडवे वैष्णव होते, तसे हे भारशिव नाग शैव होते. त्यांनी गंगाकिनारी दहा अश्वमेध करून तिथे दशाश्वमेध घाटाची उभारणी केली. त्यांच्या नंतर गुप्त राजे प्रभावी झाले. समुद्रगुप्ताने विदिशेवर आपले स्वामित्व प्रस्थापित केले. चंद्रगुप्त विक्रमादित्य हा उज्जयिनीत राज्य करीत होता. त्या वेळी विदिशेजवळच्या उदयगिरीच्या डोंगरात अनेक गुंफा निर्माण केल्या गेल्या. त्यांत शेषशायी विष्णू व वराह यांच्या प्रचंड प्रस्तरमूर्ती आहेत.

त्यानंतरचा विदिशेचा अनेक शतकांचा इतिहास अज्ञात आहे. त्या काळात मध्य भारतावर चंदेल वंशाची सत्ता होती. इ. स. १२३० मध्ये गुलाम वंशातील इल्तुमिशाने विदिशेचा विध्वंस केला. त्याने शहर लुटले आणि मंदिरे व मूर्ती मोडून-फोडून टाकल्या. त्याच्या नंतर अलाउद्दीन खिलजी आला. त्याने व त्याचा सेनापती मलिक काफुर याने विदिशेचे विख्यात ऐतिहासिक विजयमंदिर पूर्णपणे उद्ध्वस्त केले. हे विजयमंदिर त्या काळी अतिशय भव्य व अद्वितीय गणले गेले होते. त्याची लांबी व रुंदी १००० गज होती. इ. स. १५३० मध्ये चितोडच्या राणा सांगाने विदिशेवर स्वामित्व प्रस्थापित केले. राणा सांगाची बाबराशी लढाई जुंपली, तेव्हा विदिशेचा राजा सिलहदी हा राणा सांगाच्या बाजूने लढला. सिलहदीच्या सामर्थ्याची कल्पना आल्यामुळे

बाबर विदिशेवर चढाई करण्यास धजला नाही. त्याने सिलहदीला टाळून चंदेरीच्या मेदिनीरायावर चढाई केली.

विदिशेचे हे हिंदू राज्य अनेक मुस्लीम सुलतानांच्या डोळ्यात सलत होते. परंतु एकट्या सुलतानाचे विदिशेच्या सामर्थ्यापुढे काही चालत नसे. अखेर गुजरातचा सुलतान बहादुरशहा याच्या नेतृत्वाखाली सगळे लहानमोठे शासक एकत्र आले व इ. स. १५३३ मध्ये त्यांनी विदिशेवर जोरदार हल्ला चढविला. या लढाईत सिलहदी शत्रूच्या हाती सापडला. परंतु सिलहदीच्या दोन पुत्रांनी त्याला सोडवले व मुसलमानी आक्रमकांनाही पराभूत केले. अशा प्रकारे विदिशेवर स्वामित्व प्रस्थापित करण्याचे मुस्लिम शासकांचे स्वप्न या वेळी जरी धुळीला मिळाले असले, तरी त्यांनी पुन्हा उठाव केला व १५४४ मध्ये विदिशा जिंकून माळव्याच्या राज्यात समाविष्ट केली. यानंतर विदिशेचे नाव भेलसा असे ठेवण्यात आले. पुढे औरंगजेबाच्या काळी त्याने हे भेलसा नावही बदलले व आलमगिरपूर असे नवे नाव ठेवले.

इ. स. १७३८ मध्ये भोपाळच्या लढाईनंतर थोरले बाजीराव पेशवे यांनी विदिशेवर अधिकार मिळवला व राणोजी शिंदे याला विदिशेची सुभेदारी दिली. परंतु थोड्याच दिवसांत अमीरखान चीतू आणि करीमखान नामक दोघा पुंड पाळेगारांनी विदिशेत धुडगुस घातला. त्यांनी शिंद्याला पकडले, विदिशेतल्या लोकांची कत्तल केली व खुद्द शिंद्यांच्या घरातले २७ पुरुष मारले.

पानिपतच्या तिसऱ्या लढाईत मराठ्यांचा जबर पराभव झाला, तेव्हा नानासाहेब पेशवे विदिशेतच डेरा देऊन होते. तिथेच त्यांना पराजयाची वार्ता पोचली व मग ते पुढे न जाता माघारी फिरले.

प्राचीन काळापासून विदिशा हे नगर सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, व्यापारी, औद्योगिक व शैक्षणिक अशा सर्व दृष्टींनी नावाजलेले होते. हे नगर सर्व सुखसंपत्तीने युक्त, नाना देशांतील लोकांच्या आगमन-निर्गमनामुळे गजबजलेले, विविध रत्न-माणकांनी समृद्ध; मोठमोठ्या इमारती, राजवाडे, मंदिरे, स्तूप, मशिदी, स्तंभ इत्यादींनी शोभिवंत बनलेले असे होते. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरे व पाटलिपुत्र, श्रावस्ती, उज्जयिनी, इ. महत्त्वाची नगरे यांच्या मार्गावर असल्यामुळे विदिशेला मध्यवर्ती व्यापारी व औद्योगिक केंद्राचे माहात्म्य प्राप्त झाले होते. इथल्या हस्तिदंती वस्तू, तीक्ष्ण धारेच्या तलवारी, विदेशी बाजारपेठेतही मोलाच्या ठरत. विदिशेचे नगरजन संपन्न व दानधर्मात सदैव पुढे असत. इथल्या व या नगराच्या परिसरातल्या अनेक बौद्ध, जैन व ब्राह्मणी वास्तू विदिशेच्या उदार सज्जनांच्या दानादेणग्यांतून उभ्या राहिल्या. वेदिस गिरिमहाविहार हा अशोकाची पत्नी वेदिस महादेवी हिने स्वतःच्या पैशातून उभारला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भरहुतच्या स्तूपाच्या निर्मितीसाठी १८ देणगीदारांनी देणग्या दिल्या असून, त्यांची नावे तिथल्या शिलापट्टावर खोदली आहेत. सांचीच्या स्तूपाच्या उभारणीतही विदिशेच्या धनिकांचे धन मोठ्या प्रमाणात खर्ची पडले आहे.

विदिशेच्या परिसरात सांची, उदयगिरी–गुंफा, जमदग्नीचा आश्रम, नीलकंठेश्वर महादेवाचे मंदिर, ऐरणचे भव्य मंदिर, ग्यारसपूरचा हिंडोला, माळवादेवीचे देवालय, रावणग्रामची प्रचंड यक्षमूर्ती, रायसेनचा किल्ला, भोजपूरचे प्रसिद्ध मंदिर या आणि यासारख्या आणखी अनेक धार्मिक व ऐतिहासिक महत्त्वाच्या वास्तू दिसतात. विदिशेच्या भूमीवर व तिच्या सभोवतालच्या ५० चौरस मैलांत जेवढी पुरातत्त्वविषयक सामग्री आढळते, तेवढी अन्यत्र क्वचितच सापडेल. विदिशेचे हे कलाविष्कार गांधार, अवंती, इ. कलाशैलीपेक्षा उच्च श्रेणीचे असल्याचे कलाकोविदांचे मत आहे. इथली शिल्पे व चित्रे चित्रनिरुपण, केशविन्यास, वस्त्राभूषणाच्या परी, वेलबुट्या, नखशिखसौंदर्य, शरीरसौष्ठव अशा अनेक दृष्टींनी अतीव सुंदर व सजीवतेचा भास निर्माण करणारी आहेत. 'विदिशाकला' या नावानेच इथली कला भारतीय कलाजीवनात आपले वैशिष्टय मिरवीत आहे. इथल्या कितीतरी मूर्ती लंडनच्या संग्रहालयात व भारताच्या राष्ट्रपतिभवनात प्रेक्षकांचे चित्त वेधून घेत उभ्या आहेत. सांचीच्या स्तूपद्वारावर खोदलेल्या एका चित्राखाली म्हटले आहे– 'हे चित्र मुळात विदिशेच्या एका आर्य चित्रकाराच्या घरी हस्तिदंताने बनवले होते. त्यावरूनच त्याची इथे प्रतिकृती खोदली आहे.' मूळ चित्र आज अर्थातच उपलब्ध नाही; तथापि त्याच्या प्रतिकृतीवरून त्याच्या मूळ स्वरूपाची कल्पना येते.

विदिशेची महत्त्वाची हिंदू वास्तू म्हणजे विजयमंदिर ही होय. औरंगजेबाने त्या मंदिराची मशीद बनवण्याचा एकदा प्रयत्न करून पाहिला; परंतु तो असफल झाला. त्याच्या पूर्वीच हे मंदिर अलाउद्दीनाने उद्ध्वस्त केले होते. तथापि त्या दोघांच्या तडाख्यातून वाचलेले या मंदिराचे जे अवशेष आज आपणांस दिसतात, त्यावरून मूळ वास्तूची भव्यता, डौल, बांधणी व शिल्पसौंदर्य लक्षात येते. माळव्याचा सुलतान महमूद खिलजी (पहिला) याने इ. स. १४६० मध्ये बांधलेला लुहांगी पीराचा मकबरा व मोगल सम्राट अकबराचे इ. स. १५८३ चे दोन शिलालेख धारण करणारी एक मशीद, ही विदिशेच्या मुस्लिम वास्तुकलेची प्रमुख उदाहरणे होत. विदिशा नगरीभोवतीचा मूळचा भरभक्कम, परंतु आज जीर्णशीर्ण होऊन पडलेला तट हाही प्रेक्षकांना विदिशेच्या गतवैभवाची जाणीव देतो.

याशिवाय, विदिशेत अनेक जैन मंदिरे व जैन धर्मशाळा होत्या. उदयगिरी–गुंफांपैकी दोन गुंफा जैनांच्या आहेत. जैनांचा दहावा तीर्थंकर शीतलनाथ याचे विदिशा हे जन्मस्थान समजले जाते. [वि. स्मृ. ग्रं.; कल्याण–तीर्थांक; हि. जॉ. ए. इं.; म. ज. अ. ग्रं.; माळव्याच्या प्राचीन राजधान्या–कृ. गं. कवचाळे, सहविचार, एप्रिल १९२८; प्रा. भा. न. न. जी.]

विदुर (१) एक राजनीतिज्ञ व साधुवृत्तीचा पुरुषश्रेष्ठ. विचित्रवीर्य राजाची पत्नी अंबिका हिच्या दासीच्या पोटी व्यासापासून याचा जन्म झाला (म. भा. सभा. ५१.२०). ती कथा अशी–

कुरू राजा विचित्रवीर्य हा अपत्य न होताच मृत्यू पावला. त्यामुळे कुरुवंश खंडित झाला. म्हणून विचित्रवीर्याची माता सत्यवती हिने नियोग पद्धतीचा अवलंब करायचे ठरविले. त्या कामी तिने व्यास महर्षींना विचित्रवीर्याच्या भार्यांच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ती करायला सांगितले. त्यासाठी अंबिका या सुनेला तिने व्यासांच्याकडे पाठविले. तिला त्यांचे तेज सहन झाले नाही. त्यामुळे जो पुत्र झाला तो जन्मांध निपजला. सत्यवतीने अंबिकेला पुन्हा व्यासांच्याकडे जाण्याची आज्ञा दिली. त्या वेळी मात्र अंबिकेने लबाडी केली. स्वत: न जाता तिने आपल्या दासीला व्यासांच्याकडे पाठविले. तिला व्यासांकडून एक तेजस्वी आणि बुद्धिमान पुत्र उत्पन्न झाला. त्याचे नाव विदुर ठेवले गेले.

ब्राह्मणद्वारा पण शूद्र स्त्रीच्या ठिकाणी उत्पन्न झाल्यामुळे त्याचा वर्ण हीन ठरला व त्याला राज्यप्राप्ती झाली नाही. विदुराची पत्नी पारशवी देवकराजाची कन्या होती. विदुराला अनेक पुत्र होते.

विदुराच्या पूर्वजन्माची कथा महाभारतात आली आहे, ती अशी– एकदा अणिमांडव्य ऋषी आणि यमधर्म यांच्यामध्ये तात्त्विक बाबतीत मतभेद झाला. त्या वेळी मांडव्याने यमाला शाप दिला, की 'तू शूद्र योनीत जन्म घेशील.' या शापामुळेच यमाला विदुराच्या रूपात जन्म घ्यावा लागला (म. भा. आदि. १०१.२५–२७).

भीष्माने धृतराष्ट्र व पांडू यांच्याबरोबरच विदुराचेही यथायोग्य पालन-पोषण केले. विदुराला लहानपणापासून धर्म व सत्य यांची आवड होती. तो जसा तत्त्वज्ञ होता, तसाच श्रेष्ठ मुत्सद्दीही होता. या त्याच्या गुणविशेषांमुळेच भीष्माने त्याला धृतराष्ट्राचा मंत्री नेमले. त्याने धृतराष्ट्र, दुर्योधन, युधिष्ठिर, इ. राजपुरुषांना योग्य सल्ला देण्याचे काम जन्मभर केले. कठोर असले, तरी जे सत्य असेल ते सांगण्यास तो कधीही कचरला नाही.

तो आमरण कौरवपक्षात राहिला असला, तरी त्याचा ओढा पांडवांकडे होता. पांडवांवर त्याने पुत्रवत प्रेम केले, योग्य वेळी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांना सल्लामसलत दिली आणि एकदा तर त्यांना मृत्यूपासूनही वाचवले. पांडव ज्या वेळी वारणावताला जायला निघाले, तेव्हा विदुराने युधिष्ठिराला एकांती गाठून म्लेच्छ भाषेत कौरवांचे कपट-कारस्थान सांगितले. तो म्हणाला. “ तुम्ही ज्या घरात वस्ती करणार आहां, त्या घराला आगीचे भय आहे. कारण, ते लाक्षागृह आहे. त्या घरातून प्रसंगी बाहेर पडण्यासाठी तुम्ही एक भुयार खोदवून घ्या. मी त्यासाठी एक कुशल खनक तिथे पाठवून देतो." विदुराच्या या दूरदेशी धोरणीपणामुळेच पांडवांचा मृत्यू टळला.

विदुराच्या प्रगाढ बुद्धिमत्तेचा धाक धृतराष्ट्राला व कौरवांनाही किती वाटत होता, त्याची उदाहरणे महाभारतभर विखुरलेली आहेत. आंधळ्या धृतराष्ट्राचे आपल्या पुत्रांविषयीचे प्रेमही आंधळेच होते. त्याला विदुराचा सल्ला रुचत नसे; पण तरीही तो विचारल्याशिवाय राहावत नसे. पुत्रमोह व राज्यलोभ यांमुळे धृतराष्ट्राला विदुरासारख्या नररत्नाच्या नीतिज्ञानाचा लाभ करून घेता आला नाही, हे त्याचे दुर्दैव होय. विदुराचा सहवास त्याला दाहक वाटत असे; पण तरीही विदुराच्या वियोगाने तो अस्वस्थ होत असे. पांडव वनात गेल्यानंतर एकदा संभाषणप्रसंगी विदुर पांडव-पक्षपाती आहे, असे समजून धृतराष्ट्र त्याच्यावर संतापला. “आत्ताच्या आत्ता माझे राज्य सोडून जा" असे त्याने विदुराला सांगितले. विदुर तिथून निघाला आणि वनात येऊन पांडवांच्याकडे राहिला. पण तो जाताच धृतराष्ट्राची अवस्था शोचनीय झाली. विदुराच्या अभावी जणू आपले हातपाय तुटून पडले आहेत, असे त्याला वाटले. त्याने मग संजयाला विदुराकडे पाठविले व त्याला परत आणून त्याची क्षमा मागितली. विदुरानेही त्याला उदार मनाने क्षमा केली.

विदुराची विचक्षणता व विवेकशक्ती यांची छाप कुरुकुलातील वृद्ध व कर्त्या पुरुषांवरही दिसून येते. महत्त्वाच्या राजकीय, कौटुंबिक, इ. बाबतीत भीष्मासारख्या दीर्घदर्शी, कर्तृत्ववान पुरुषालाही विदुराचा सल्ला घेणे आवश्यक वाटत असे. विदुर वस्तुतः पांडु व धृतराष्ट्र यांच्याहून वयाने लहान होता; पण त्या दोघांच्या लग्नाच्या बाबतीत भीष्माने बरोबरीच्या नात्याने विदुराचे मत जाणून घेतले.

कौरव-पांडवांत सख्य नांदावे आणि त्यांनी एकजुटीने राहून कुरुकुलाचा उत्कर्ष करावा, हे विदुराच्या विचाराचे बळकट सूत्र होते. ज्या ज्या वेळी कौरव-पांडवांत अंतःस्थ कलहाचा प्रसंग येई, त्या त्या वेळी विदुर त्यांना कल्याणाचा आणि सामोपचाराचा उपदेश करी. धृतराष्ट्र जेव्हा द्यूताचे कारस्थान रचू लागला, तेव्हा विदुराने मंत्री या नात्याने त्याला बजावले. ‘ तू हे कुकर्म करू नकोस. त्यामुळे तुझे पुत्र व पांडव यांच्यामध्ये संघर्ष उत्पन्न होईल व त्या संघर्षात संपूर्ण कुळाचा सर्वनाश होईल !’

ज्या वेळी दुर्योधनाने द्रौपदीला द्यूतात जिंकलेली दासी म्हणून राजसभेत आणायचा हुकूम दिला, त्या वेळीही विदुराने दुर्योधनाला तसे न करण्याबद्दल स्पष्ट शब्दांत बजावले होते.

विदुरनीती – महाभारतातील उद्योग पर्वात (अध्याय ३३ ते ४०) विदुरनीती नावाचे एक प्रकरण आहे. त्याचे विवरण करताना पं. चित्रावशास्त्री म्हणतात–

श्रीकृष्ण शिष्टाईला ज्या दिवशी यायचा होता, त्याच्या आदल्या रात्री धृतराष्ट्र व्याकुळ मनःस्थितीत होता. त्याने ती सारी रात्र विदुराचे विचार ऐकण्यात घालवली. त्या रात्री विदुराने धृतराष्ट्राला जो उपदेश केला, तो विदुरनीती या नावाने महाभारतात प्रसिद्ध आहे. या विदुरनीतीचा प्रमुख उद्देश भ्रांत धृतराष्ट्राला योग्य मार्ग दाखविणे, हा आहे. त्या दृष्टीने श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेशिलेल्या गीतेशी विदुरनीतीची तुलना होऊ शकते. भगवद्‌गीता अर्जुनाला युद्धप्रवण करण्यासाठी सांगितली गेली आहे, तर विदुरनीती सार्वकालीन शांतिमय जीवन आणि युद्धविरोध ही उद्दिष्टे डोळ्यांपुढे ठेवून सांगितली गेली आहेत.

विदुरनीतीला राजनीतिशास्त्रात फार महत्त्व आहे. कारण, त्याच्या कालापर्यंत जे राजनीतिशास्त्रज्ञ होऊन गेले, त्यांच्या विचारांचा परामर्श घेत घेत विदुराने हे नीतिकथन केले आहे. प्रथम तो पंडित व मूर्ख यांची लक्षणे सांगतो, ती अशी–

जो जीवनात प्रशस्त असे ध्येय निवडतो, निंदित गोष्टींत मन घालीत नाही, श्रद्धा ही ज्याच्या कर्मांचे मुख्य लक्षण असते, जो ठरविलेले लक्ष्य गाठण्याच्या मार्गात क्रोध, दर्प व सन्मान यांच्यामुळे मागे येत नाही, जो आत्मशक्तीला अनुसरूनच इच्छा करतो, जो दुसऱ्याने विचारल्याशिवाय त्याच्या कामात हस्तक्षेप करीत नाही, जो सर्व बाजू जाणून घेऊन कार्याचा निश्चय करतो, जो अप्राप्य वस्तूची इच्छा करीत नाही, जो नष्ट झालेल्याचा शोक करीत नाही आणि जो आपत्ती आल्या म्हणून घाबरून जात नाही, तो पंडित होय.

यस्य संसारिणी प्रज्ञा धर्मार्थावनुवर्तते ।
कामादर्थं वृणीते यः स वै पण्डित उच्यते ।।

(म. भा. उद्योग. ३३.२०)

अर्थ– ज्यांची लौकिक बुद्धी धर्म व अर्थ यांचेच अनुसरण करते आणि जो भोगाचा त्याग करून पुरुषार्थाचा स्वीकार करतो, त्याला पंडित म्हणावे.

जो आपले कर्तव्य टाकून दुसऱ्याच्या कामात ढवळाढवळ करतो, जो न बोलावता जातो, न विचारता बोलतो, जो आपल्या डोळ्यातील मुसळ न पाहता दुसऱ्याच्या डोळ्यातले कुसळ पाहतो, जो सामर्थ्य नसूनही क्रोध करतो आणि जो नैष्कर्म्य अव-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्येत राहून मोठ्या फलाची अपेक्षा करतो, तो मूढ समजावा.

संसारयति कृत्यानि सर्वत्र विचिकित्सते ।
चिरं करोति क्षिप्रार्थे स मूढो भरतर्षभ ॥
(म. भा. उद्योग. ३३.३४).

अर्थ– हे राजा, जो आपल्या कामाचा उगाच पसारा मांडतो, जो सगळीकडच संशयाने पाहतो आणि जो त्वरित होणाऱ्या कामालाही विलंब लावतो, त्याला मूर्ख म्हणावे.

त्यानंतर विदुराने धृतराष्ट्राला उपदेश केला, तो असा –

हे धृतराष्ट्रा, मला कौरवांच्या हिताची तळमळ आहे, म्हणून मी तुला अप्रिय वाटणाऱ्या गोष्टीही स्पष्ट शब्दांत सांगणार आहे. मी सांगेन ते धर्म आणि नीती यांना धरूनच सांगेन. जो राजा आपल्या राज्यातल्या कोश, जनपद, दंड, वृद्धी, क्षय, सैन्य, इ. गोष्टींविषयी परिपूर्ण माहिती घेत नाही, त्याचे राज्य कधीही स्थिर राहत नाही. राज्य मिळाले एवढीच गोष्ट पुरेशी नाही; तर राज्य चालविण्याचे ज्ञानही पाहिजे. तसे नसेल तर राज्य-लक्ष्मी केव्हाच निघून जाईल. राजाने धर्मन्यायाने द्रव्य मिळवावे व योग्य त्या ठिकाणी आणि योग्य त्या प्रसंगी त्याचा व्यय करावा.

न्यायागतस्य द्रव्यस्य बोद्धव्यौ द्वावतिक्रमौ ।
अपात्रे प्रतिपत्तिश्च पात्रे चाप्रतिपादनम् ॥
(म. भा. उद्योग. ३३.५९)

अर्थ– न्यायपूर्वक मिळविलेल्या धनाचे दोन दुरुपयोग समजावे—(१) अपात्री दान आणि (२) सत्पात्री अदान.

दुसऱ्याच्या धनाचा अपहार करणे, दुसऱ्याच्या स्त्रीचे धर्षण करणे आणि खऱ्या मित्राचा परित्याग करणे, हे तीन दोष क्षय करणारे आहेत. (म. भा. उ. ३३.६५)

जो व्यवस्थितपणे गिळता येईल, जो गिळलेला पचेल आणि जो पचल्यानंतर हितकर ठरेल, असा घास घेणेच योग्य होय, हे राजनीतीच्या बाबतीतही समजावे. वृक्षाची कच्ची फळे जो तोडतो, त्याला त्यातून रस तर मिळत नाहीच, उलट बीजही नष्ट होऊन जाते.

जानाति विश्वासयितुं मनुष्यान् । विज्ञातदोषेषु दधाति दण्डम् ।
जानाति मात्रां च तथा क्षमां च । तं तादृशं श्रीर्जुषते समग्रा ॥
(म. भा. उद्योग. ३३.१०५)

अर्थ– जो माणसांच्या ठिकाणी विश्वास उत्पन्न करण्याचे कसब जाणतो, जो साक्षीपुराव्यांनी अपराधी ठरेल, त्यालाच दंड देतो आणि जो दंडाची न्यूनाधिक मात्रा जाणतो व क्षमा केव्हा करावी हे जाणतो, अशा राजाला समग्र लक्ष्मी प्राप्त होते.

मन, वाणी, कर्म आणि दृष्टी यांनी जो राजा लोकांना प्रसन्न ठेवतो, तोच लोकांचा आवडता होतो. वाघाला जसे इतर वन्य पशू घाबरतात, तसे जर प्रजाजन राजाला घाबरत असतील, तर त्याचे समुद्रान्त राज्यही निरर्थक होय. (म. भा. उ. ३४.२५-२६)

विदुरनीती हे एक प्रज्ञादर्शन असल्याचे डॉ. वासुदेव शरण अग्रवाल म्हणतात. कारण, त्या नीतीत प्रज्ञाबलाला सर्वश्रेष्ठ बल म्हटले आहे. विदुर म्हणतो– एखाद्या राजाला शरीरबल प्राप्त असणे हे सर्वांत कनिष्ठ बल होय. चांगला मंत्री मिळणे हे त्यावरचे बल, राज्य धनसंपन्न असणे हे त्यावरचे बल आणि अनुवंशाने प्राप्त झालेला स्वभाव हे त्यावरचे बल होय. सर्वांत वरचे बल म्हणजे प्रज्ञाबल होय. ते सर्वश्रेष्ठ आहे. कारण त्यामुळे इतर बलांचा संग्रह करता येतो (म. भा. उ. ३७.५२-५५). विदुरनीतीत आर्य (श्रेष्ठ) शीलाला फार महत्त्व दिलेले आहे. इथे शील शब्दाचा अर्थ केवळ पापभीरुत्व किंवा सदाचरण एवढाच संकुचित नाही. त्यात जीवनाचा व्यापक आणि विवेकयुक्त असा आचार-विचार अभिप्रेत आहे. उदा०–

न वैरमुद्दीपयति प्रशान्तं न दर्पमारोहति नास्तमेति ।
न दुर्गतोऽस्मीति करोत्यकार्यं तमार्यशीलं परमाहुरार्याः ॥
(म. भा. उद्योग. ३३.११२)

अर्थ– जो शांत झालेले वैर पुनः प्रज्वलित करीत नाही, जो गर्व करीत नाही, हीनता दाखवीत नाही आणि जो मी विपत्तीत सापडलो आहे, तेव्हा यातून सुटण्यासाठी मी वाटेल ते करीन, अशा समजुतीने अनुचित कृत्य करीत नाही, अशा श्रेष्ठ शील धारण करणाऱ्या पुरुषाला आर्यजन मोठा मानतात.

न स्वे सुखे वै कुरुते प्रहर्षं नान्यस्य दुःखे भवति प्रहृष्टः ।
दत्त्वा न पश्चात् कुरुतेऽनुतापं स कथ्यते सत्पुरुषार्यशीलः ॥
(म. भा. उद्योग. ३३-११३)

अर्थ– जो आपल्याला सुख मिळाले म्हणून हर्ष करीत नाही, जो दुसऱ्याला दुःख झाले म्हणून प्रहृष्ट होत नाही आणि जो एकदा दान दिल्यानंतर पश्चात्ताप करीत नाही, अशा पुरुषाला श्रेष्ठ पुरुष म्हणतात.

देशाचारान् समयाञ्जातिधर्मान् बुभूषते यः स परावरज्ञः ।
स यत्र तत्राभिगतः सदैव महाजनस्याधिपत्यं करोति ॥
(म. भा. उद्योग. ३३.११४)

अर्थ– जो मनुष्य देशाचे व्यवहार, संकेत आणि जातिधर्म यांचे तत्त्व जाणतो आणि जो उत्तम व अधम यांतला विवेक समजतो, असा पुरुष जिथे जिथे जाईल तिथे तिथे मोठ्या जन-समूहावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करू शकतो.

वरील श्रेष्ठ विचारांमुळेच महाभारत हा भारतीय युद्धाचा इतिहास सांगणारा एक सामान्य ग्रंथ न राहता तो राजनीति-शास्त्राचाही एक महान ग्रंथ ठरला आहे.

विदुराचे सर्व हितोपदेश व्यर्थ ठरले आणि अखेर कौरव-पांडव रणभूमीवर मरण-मारणासाठी उभे राहिले. या घटनेने

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विदुराचे मन उद्विग्न झाले. तो त्या युद्धात सहभागी न होता तीर्थ-यात्रेला निघून गेला, ही गोष्ट भागवतपुराणावरून कळते. भार-तीय युद्धाच्या समाप्तीची वार्ता त्याला प्रभास क्षेत्रात कळली.

पांडव राज्याचे स्वामी झाले. धृतराष्ट्राचे सारे पुत्र युद्धात मारले गेले; पण तरीही तो जीवनाला उबगत नाही आणि पांडवांच्या अन्नावर पिंड पोशीत राहिला आहे, हे पाहून विदु-राला खंत वाटली. ' यापुढे संसाराची व जगण्याची आसक्ती टाकून दे आणि राज्यातून निघून वानप्रस्थ स्वीकार ' असे त्याने धृतराष्ट्राला सांगितले. त्याच्या सांगण्यावरून धृतराष्ट्र गंगा-तीरावर जाऊन तप करू लागला. त्याच्या पाठोपाठ विदुरही महाप्रस्थानासाठी वनात निघून गेला. तो एकाएकी निघून गेला हे समजताच युधिष्ठिराला परम दुःख झाले. तो विदुराच्या शोधासाठी निघाला व प्रथम धृतराष्ट्राकडे आला. विदुर कुठे आहे, ते धृतराष्ट्राने त्याला सांगितले. तो शोध करीत करीत विदुरापर्यंत पोचला. विदुर एका वृक्षाच्या खोडाला टेकून उभा होता. त्याच्या जटा वाढल्या होत्या. देह कृश झाला होता. तो दिगंबर होता. वनात उडणाऱ्या धुळीने त्याचे शरीर माखले होते. त्याने आपल्या तोंडात दगडाचा एक तुकडा धरून ठेवला होता. एक प्रकारच्या उन्मनी अवस्थेत तो उभा होता. ' मी युधिष्ठिर आलो आहे ' असे वाक्य युधिष्ठिराने त्याच्या काना-जवळ उच्चारले, तरी तो काहीच बोलला नाही. त्याने फक्त एकटक दृष्टी युधिष्ठिरावर रोखली. त्या दृष्टीच्या द्वारे विदु-राने आपली इंद्रिये, प्राण व सर्व सामर्थ्य युधिष्ठिराच्या देहात विलीन करून टाकले आणि लगोलग देहत्यागही केला. विदु-राच्या या क्रियेमुळे युधिष्ठिराला आपले सामर्थ्य अनेक पटींनी वाढल्याचा प्रत्यय आला.

मग युधिष्ठिराने विदुराच्या देहाचा दाहसंस्कार करण्याचा विचार केला. पण त्याच वेळी आकाशवाणी झाली —

ज्ञानदग्धस्य देहस्य पुनर्दाहो न विद्यते ।

(म. भा. आश्रम. ३५. ३७)

अर्थ – ज्याचा देह ज्ञानाने दग्ध झाला, त्याला पुनश्च दाह-संस्कार करण्याची गरज नाही.

धर्मनिष्ठा, न्यायनिष्ठा, कर्तव्यतत्परता, सत्यसंधता, विच-क्षणता, विवेकीपणा व खरे महानुभावत्व प्रकट करणारे सौहार्द या सर्व दृष्टींनी महामंत्री विदुर केवळ अद्वितीय पुरुष होता, असे त्याच्याविषयी श्री. बाळशास्त्री हरदास यांनी म्हटले आहे. [म. भा. व्या.; म. भा. स.; भा. सा.; प्रा. च. को.]

(२) एक ब्राह्मण जात. या जातीत कृष्णयजुर्वेदी व शुक्ल-यजुर्वेदी पाराशर ब्राह्मण असे दोन पोटभेद आहेत. यांची वस्ती प्राधान्याने पूर्व खानदेश, विदर्भ, मराठवाडा व मध्य प्रदेशाचा माळवा भाग यांत आढळते. पूर्वी यांचे धार्मिक संस्कार स्वशा-खीयांकडून होत असत. परंतु अलिकडे ते अन्य यजुःशाखीयांकडून होतात. यांच्यांतील काही घराणी आपली नित्यनैमित्तिक कर्मे आश्वलायनांप्रमाणे करतात. या जातीतील काही लोकांना कुल-कर्ण्यांची वतने आहेत. मध्य प्रदेशात व विदर्भात यांना कृष्ण-पक्षी असेही म्हणतात. [म. ज्ञा. को.]

विदूषक संस्कृत नाटकातले एक विनोदी पात्र. प्राचीन संस्कृत रंगभूमीवर जी लोकप्रिय पात्रे चमकली, त्यांत विदूषकाची गणना केली पाहिजे. विदूषक या शब्दाची व्युत्पत्ती दूष धातूवरून सांगता येते. दोष देणे, ठपका देणे, विघडवून टाकणे, असा त्या धातूचा अर्थ आहे. ' वि ' हा उपसर्ग दोष देण्याच्या किंवा बिघाड करण्याच्या विशिष्ट पद्धतीचा बोध करून देतो. यावरून आपल्या वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीने दोष दाख-विणारा आणि सरळ असलेले विघडवून टाकणारा, असा जो नाटकीय पुरुष, तो विदूषक समजावा.

विदूषकाचा उगम – प्रारंभीच्या नाट्यप्रयोगांचे स्वरूप देव आणि असुर यांचे द्वंद्व असे होते. भरताने म्हटले आहे, की नाट्यप्रयोग पाहून देव आनंदित झाले; परंतु असुर मात्र खूप चिडले. याचे एक कारण, असुर पराभूत झाल्याचे दृश्य त्या नाटकात दाखविले होते, हे तर असलेच पाहिजे. तसेच ज्या नटांनी असुरांची सोंगे घेतलेली होती, त्यांनी आपल्या हाव-भावांनी असुरांना हास्यास्पद करून स्वर्गस्थानी जमलेल्या प्रेक्षकगणात हशा पिकवला असला पाहिजे. नाट्याची परिणती असुरांच्या पराभवात किंवा नाशात झाल्याचे लक्षात घेतले म्हणजे याच्या दृश्यीकरणात असुरपात्रांना हास्यास्पदता कशी येते आणि नट आपल्या अभिनयाने ती कशी वाढवू शकतो, हे समजणे सोपे आहे. पराभूत व्यक्तीची हास्यास्पदता ही सामूहिक मानसशास्त्रातील परिचित बाब आहे. त्याच्या जोडीला असुराचे अक्राळविक्राळ सोंग, त्याचे पतन किंवा पलायन, आरडाओरडी, इ. दृश्ये नटाने आपल्या उचित अभिनयाच्या द्वारे मूर्त केली म्हणजे प्रेक्षक वर्गात हास्यस्फोट होणे स्वाभाविक आहे. या-वरून असा निष्कर्ष काढायला हरकत नाही, की असुराच्या किंवा दुष्ट व्यक्तीच्या रूपाने विनोदी पात्राचा अवतार रंगभूमीवर पहिल्या प्रथम झाला आणि तोच हा विदूषक होय.

हास्य आणि करमणूक यांची माणसांना गरज असते. या मानसिक गरजेतूनच विदूषकाची निर्मिती झाली आहे. त्या दृष्टीने पाहिल्यास विदूषक हा पुरातन आहे, असे समजायला हरकत नाही.

विदूषक ही सामान्य संज्ञा आहे. भरताच्या नाट्यशास्त्रात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तेवढीच आढळते; पण पुढील काही शास्त्रकारांनी मात्र विदूषकाच्या विशेष संज्ञा सांगितल्या आहेत. वात्स्यायन, शाकल्य, मौद्गल्य, वसंतक, गालव, कुसुम, कापिलेय अशी विदूषकांची नावे शारदातनय, विश्वनाथ, शिंगभूपाल यांनी सांगितली आहेत.

विदूषकाच्या नावाचा दुसरा संबंध ब्राह्मण जातीशी आहे. मालविकाग्निमित्रातला गौतम, मृच्छकटिकातला मैत्रेय, नागानंदामधला आत्रेय हे आणि असेच अन्यही विदूषक ब्राह्मण जातीचे आहेत. शारीरिक व्यंग आणि मानसिक विकृती या गोष्टीही विदूषकाच्या पात्राशी संबंधित आहेत.

नाटकात विदूषकाचे एक विशिष्ट कार्य असते. तो थट्टेखोरपणे बोलतो, इतरांचे दोष काढतो आणि चालू असलेल्या प्रसंगाला विनोदाने कलाटणी देतो. विदूषकामध्ये स्पष्टवक्ता टीकाकार आणि हास्य निर्माण करणारा विनोदक या दोन भूमिका एकत्र झाल्या आहेत. विदूषक हा नाटकात राजाचा म्हणजे नायकाचा मित्र म्हणून वावरतो. राजाचा विदूषक कसा असावा, ते भावप्रकाश या ग्रंथात पुढीलप्रमाणे सांगितले आहे –

विदूषकस्तु भूपानामग्राम्यपरिहासकः ।
अर्थिषु स्त्रीषु शुद्धश्च देवीपरिजनप्रियः ।।
ईर्ष्याकलहकारी स्यादन्तःपुरचरः सदा ।
नर्मवित् प्रणयक्रोधे देव्याः किञ्चित्प्रसादकः ।।
भूपतेर्भोगिनीनां च मिथः प्रीतिं रतिं तथा ।
क्वचिच्च घटयत्येव क्वचिद्विघटयत्यपि ।।
विदूषकश्च भूपानामेवमादिगुणो भवेत् ।

अर्थ – राजाच्या पदरी विदूषक असतो. सुसंस्कृत लोकांनाही हसविण्याची पात्रता याच्या अंगी असते. द्रव्य आणि स्त्री यांच्या बाबतीत त्याचे वर्तन शुद्ध असते. राणी आणि परिजन यांना तो प्रिय असतो. अंतःपुरात वावरत असल्याने तो ईर्ष्या उत्पन्न करून भांडणे लावून देतो. तो मार्मिक बोलतो. त्यामुळे राजाराणीच्या प्रेमकलहात राणीचा राग तो थोडासा शांत करू शकतो. राजा आणि त्याच्या प्रेयसी यांच्यामध्ये तो प्रेम आणि रती उत्पन्न करतो आणि काही वेळा जसे त्यांचे मीलन घडवून आणतो, तशी त्यांची ताटातूटही करतो. राजाच्या विदूषकाच्या अंगी अशा प्रकारचे गुण असतात.

विदूषक बडबड्या असतो, हे उघडच आहे. बडबड हेच त्याचे हास्यनिर्मितीचे प्रमुख साधन होय. कित्येकदा तो त्यात अतिरेकही करतो; पण तरीही तो राजाचा मित्र असतो. त्या दोघांचा परस्पर गाढ स्नेह भरतालाही अभिप्रेत असावा. अग्निपुराणामध्ये विट आणि पीठमर्द यांच्या बरोबरीने विदूषकालाही नायकाचा सहचर म्हटले असून, शृंगाररसाच्या दर्शनात त्याला नर्मसचिव अशी संज्ञा दिली आहे. प्रेमात पडलेल्या नायकाला उत्तेजन देण्याचे कार्य बहुतेक विदूषक करीत असतात. श्री. गो. के. भट लिहितात –

प्रेमसाफल्य मिळेपर्यंत किंवा काही कारणाने नायिकेची ताटातूट झाल्यावर नायकाला विरहावस्थेचे कठिण दुःख भोगावे लागते. विप्रलंभ शृंगाराच्या या प्रसंगात विदूषकाचे साहचर्य नायकाला अतिशय उपकारक होते. विदूषक नायकाच्या प्रेमयातना हळुवार फुंकर घालून कमी करतो आणि जिवलग मित्राप्रमाणे दुःखाच्या कालात त्याच्या पाठीशी राहतो. अन्य विषयांकडे किंवा दृश्यांकडे नायकाचे लक्ष वेधून तो त्याला आपले दुःख क्षणभर विसरायला लावतो. गंमतीचे बोलून किंवा धीराच्या गोष्टी सांगून त्याच्या मनावरील ताण कमी करतो आणि अशा रीतीने विनोदाचे साधन उत्पन्न करून सच्च्या मित्राप्रमाणे नायकाची सोबत करतो.

विदूषकाची कार्ये – असूचित पात्राचा प्रवेश होऊ नये, हा नाट्यशास्त्राचा नियम आहे. त्या दृष्टीने रंगभूमीवर नायकाचा प्रवेश सूचित करण्याचे काम विदूषकाकडे असते. नाट्यदृष्ट्या विदूषक नीच म्हणजे खालच्या दर्जाचे पात्र आहे. त्यामुळे सेवकाचे किंवा निरोप्याचे काम विदूषकाला करावे लागते. विदूषक हा राजाचा दरबारी खुषमस्कऱ्याही असतो. त्याचा वेष वावळा असला तरी, त्याच्या अंतरी नाना कळा असतात. त्याला व्यवहारी शहाणपण बरेच असते. नाटकातील कळसाला चढलेल्या नाट्यप्रसंगाने प्रेक्षकांच्या भावनांचा प्रक्षोभ झाला असता, विदूषकाचा विनोद तो मानसिक ताण कमी करणारा उतारा होऊ शकतो.
[विदूषक – डॉ. गो. के. भट, १९५९]

विदेघ माथव

विदेघ लोकांचा एक राजा. विदेघ लोकच पुढे विदेह या नावाने ओळखले जाऊ लागले. माथव हा मथूचा वंशज असल्याने त्याला हे नाव मिळाले. या राजासंबंधी शतपथ ब्राह्मणात (१.४.१.१०–१७) एक कथा आहे, ती अशी –

विदेघ आपल्या मुखात अग्नी ठेवीत असे. तोंड उघडले तर अग्नी निघून जाईल, या भीतीने तो बोलतही नसे. रहूगण गौतम हा त्याचा पुरोहित होता. राजाच्या मुखातला अग्नी बाहेर यावा म्हणून तो अग्नीची प्रार्थना करीत असता एकदा प्रसंगवशात त्याच्या तोंडून घृत हा शब्द निघाला. त्यासरशी अग्नी बाहेर पडून पूर्वेकडे जाऊ लागला. त्यामुळे तो सारा प्रदेश जळू लागला. नद्या कोरड्या पडल्या. राजा व पुरोहित यांनाही त्याचे चटके बसू लागले. राजाने हा दाह शांत व्हावा म्हणून मग आपल्या राज्यसीमेवरून वाहणाऱ्या सदानीरा नदीत बुडी मारली. या नदीपुढे मात्र अग्नीचे काही चालेना.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही कथा, शतपथ ब्राह्मणाच्या कालापर्यंत वैदिकांची यज्ञप्रधान संस्कृती पूर्वेस सदानीरेच्या ऐलतीरापर्यंत पोचली होती, या गोष्टीची सूचक मानतात. विदेघ माथवाने विदेह जनपदाची स्थापना केली. पाहा – बिहार; मिथिला; विदेह. [प्रा. च. को.]

विदेह एक जनपद. याला विदेघ असेही म्हणत. हे कोसल देशाच्या पूर्वेस होते. पुराणांच्या मते विदेह ही कोसल जनपदाचीच एक शाखा होती. कोसलाधिपती रामाची भार्या सीता ही विदेहाधिपती जनकाची कन्या होती. प्रसिद्ध औपनिषदिक ऋषी याज्ञवल्क्य हा विदेहाचाच रहिवासी होता. मिथिला ही विदेहाची राजधानी होती. बिहारमधला आजचा तिरहूत हाच प्राचीन विदेह होय. कुरु-पांचालांनंतर या देशात आर्य-संस्कृतीचा प्रसार झाला. वैदिक कालापासून बौद्ध कालापर्यंत विदेह हा वैदिक संस्कृतीचे महान केंद्र होता.

विदेहांचा उल्लेख नेहमी कोसलांच्या बरोबरीने केला जातो. कारण, विदेघ माथव हा एकच पुरुष दोन्ही जनपदांचा संस्थापक होता. लोककथांमध्येही तसे उल्लेख आढळतात. काशी, कोसल व विदेह या तिघांचा जलजातुकर्ण हा एकच पुरोहित होता. सदानीरा नदी ही विदेहाची पूर्वेकडील सीमा होती.

ब्राह्मणकाळात कुरुक्षेत्राला जे धार्मिक व राजकीय महत्त्व होते, ते उपनिषदांच्या काळात विदेहाला प्राप्त झाले. त्या काळात विदेहामध्ये जनकवंशीय राजे राज्य करीत होते. त्यांचा तत्त्वज्ञानाकडे विशेष ओढा होता. ' जनक कुरु–पांचालांच्या ब्राह्मणांना मागे टाकतो ' असा बृहदारण्यकात उल्लेख आहे. अग्निहोत्रादी विषयांचे ज्ञान हे ब्राह्मणांचेच क्षेत्र आहे, या कल्पनेविरुद्ध जनकाने आघाडी उघडली. तो अग्निहोत्राच्या विषयात ब्राह्मणांच्या चुका काढू लागला. त्याचबरोबर तो हा विषय ब्राह्मणांना समजावूनही देऊ लागला. अशा ब्राह्मणांमध्ये श्वेतकेतू, आरुणेय, याज्ञवल्क्य, इ. प्रसिद्ध विद्वान ऋषी होते. वैदेह जनकाशी ब्रह्मोद्य या विषयावर वाद करावा, असे ऋषी म्हणत असता, त्यांना याज्ञवल्क्याने सांगितले. आपण ' ब्राह्मण असल्यामुळे वादात आपला जय झाला तर त्यात नवल नाही; पण जनकासारख्या क्षत्रियाकडून आपण हरलो, तर ते लाजिरवाणे आहे. त्यापेक्षा जनकाकडून आपण ब्रह्मोद्याचा विषय सरळ समजावून घ्यावा, हे बरे. ' जनकाच्या या विद्वत्तेमुळेच त्या काली विदेहाची खूप कीर्ती झाली. ' हा काळ छोटासाच होता; पण वैचारिक प्रवाहाचे गांभीर्य व तात्त्विक दृष्टिकोणाचे नावीन्य या दृष्टीने या प्रदेशाच्या इतिहासात विलक्षण होता, ' असे स. का. दीक्षित म्हणतात. औपनिषदिक तत्त्वज्ञानाच्या वाढीत विदेहाला बरेच श्रेय आहे.

बौद्ध काळात विदेह जनपद वृजी (वज्जि) गणाच्या रूपात परिवर्तित झाले. त्याच्या अंतर्गत आठ जन होते. त्यांत विदेह व लिच्छवी हे प्रमुख होते. पुढे वृजिगणांनी वैशाली ही आपली राजधानी केली. पाहा – जनक; मिथिला. [मध्यदेश–डॉ. धीरेंद्र वर्मा ; प. का. भा.; भा. बृ. इ.; प्रा. भा. सं.; वे. इं.]

विदेहमुक्ती मुक्तीचा एक प्रकार. सर्वलक्षणसंग्रहात हिची दोन लक्षणे दिली आहेत–

(१) ' भाविशरीरानारम्भः ' = (चालू शरीर पडल्यानंतर) पुढचे शरीर प्राप्त न होणे.

(२) ' तत्त्वज्ञानिनो भोगेन प्रारब्धकर्मक्षये वर्तमानशरीरपातः ' = तत्त्वज्ञान झाल्यावर अशा ज्ञानी पुरुषाच्या प्रारब्धकर्मांचा भोगाने क्षय झाल्यानंतर त्याचे वर्तमान शरीर गळून पडणे.

ब्रह्मसाक्षात्काराने मुक्ती मिळते, असा उपनिषदांचा सिद्धान्त आहे. ही मुक्ती दोन प्रकारची आहे –(१) जीवन्मुक्ती आणि (२) विदेहमुक्ती. शंकराचार्य विदेहमुक्तीबरोबर जीवन्मुक्तीही मानतात; पण इतर आचार्य केवळ विदेहमुक्ती मानणारे आहेत. त्यांच्या मते ब्रह्मसाक्षात्काराने पुरुषाला विदेहमुक्तीच प्राप्त होते. ' मी ब्रह्म आहे, ' या ज्ञानाने युक्त झालेल्या पुरुषाचे शरीर प्रारब्धभोगानंतर नाश पावते, या गोष्टीला विदेहमुक्ती म्हणतात. याविषयी श्री. द. वा. जोग लिहितात –

श्रीबादरायणांनी ' भोगेन त्वितरे क्षपयित्वा संपद्यते ' या सूत्रामध्ये या मुक्तीचाच निर्देश केला आहे. सूत्रकार म्हणतात– ज्ञानी पुरुष प्रारब्धाने प्राप्त झालेल्या सुखदुःखांचा अनुभव घेऊन (प्रारब्ध)पुण्यपापांचा क्षय करतो आणि शरीरनाशानंतर अखंड, एकरस व आनंदब्रह्मरूपाने स्थित होतो. त्यास पुनर्जन्म घ्यावा लागत नाही. कारण, आत्मज्ञानाच्या योगाने त्याचे संचित पाप-पुण्य नष्ट होते व ज्ञानमाहात्म्याने ज्ञानानंतर होणाऱ्या आगामी कर्मांचा (क्रियमाणांचा) स्पर्श होत नाही. प्रारब्धाचा भोगाने क्षय होतो आणि त्यामुळे पुनर्जन्म घेण्याचे त्यास कारण राहत नाही. अर्थात शरीरपातानंतर तो निर्विशेष ब्रह्मरूप होतो, असे म्हणण्यास काहीच हरकत नाही. या विदेहमुक्तीचे स्वरूप श्रुतीने असे सांगितले आहे. ' तस्य तावदेव चिरं यावन्न विमोक्ष्येऽथ ' (छां. ६.१४.२). यावरून विदेहमुक्ती श्रुती आणि सूत्र यांनी उपोद्बलक झाली आहे. [वै. शां. अ. म.]

विद्या विशिष्ट अध्ययनसामग्रीच्या द्वारे प्राप्त होणारे ज्ञान म्हणजे विद्या होय. ज्ञान हे पवित्रतम असल्यामुळे भारतीय संस्कृतीत विद्येला देवता मानले आहे. प्रथम वेदत्रयीच्या ज्ञानाला देवता मानीत. सायणाचार्यांनी ऋग्वेद भाष्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रस्तावनेत या त्रयी विद्या नामक देवतेविषयी एक कथा दिली आहे, ती अशी–

एकदा विद्या एका ब्राह्मणाजवळ गेली आणि त्याला म्हणाली. "मी तुझी शेवधी (निधी) आहे. आता तुझे कर्तव्य हे, की तुझ्या शिष्यांमध्ये जे कोणी पवित्र, ब्रह्मचारी, नियमनिष्ठ, निधिरक्षक व अवधानी असतील त्यांना तू माझे दान कर आणि जे कोणी असूया करणारे असतील त्यांना मला देऊ नकोस."

मानवी संस्कृतीच्या विकासात ज्ञानोपासनेला फार महत्त्व आहे. ज्ञानासारखी दुसरी पवित्र गोष्ट नाही, या गीतावचनावर (४.३०) प्राचीन भारतीयांची अपार श्रद्धा होती. त्यामुळेच विद्या मिळवणे हे त्यांना जीवनाचे सारसर्वस्व वाटत होते. काही प्रमुख विद्या मिळविण्यासाठी प्राचीन भारतीयांना विलक्षण ओढ होती. विद्याप्राप्तीसाठी ते अतोनात परिश्रम करीत. सतत अभ्यासाने कोणतीही विद्या साध्य होते, अशी त्यांची श्रद्धा होती. तप आणि विद्या ही दोन मोक्षाची साधने आहेत, असे मनू सांगतो. विद्येच्या योगाने अमृतत्वाची प्राप्ती होते, असेही मनुवचन आहे (१२.१०४). विद्या, तप आणि धन ही मानवाची तीन बलस्थाने असून, त्यांच्या योगे मानवाचे इहपरकल्याण साधते, असे देवलस्मृतीत म्हटले आहे.

विद्यांचे परिगणन फार प्राचीन काळीच सुरू झालेले होते. चार वेद, इतिहास, पुराणे, सर्पविद्या आणि देवजनविद्या, अशी विद्यांचीन ावे तैत्तिरीय ब्राह्मणात आढळतात (३.१२.८. ३–४). चार वेद, ब्राह्मणे, इतिहास, पुराणे, कल्प व नाराशंसी गाथा अशी विद्यांची नावे तैत्तिरीय आरण्यकात दिली आहेत (२.१०). चार वेद, इतिहास, पुराणे, उपनिषदे, श्लोक, सूत्रे, व्याख्याने व अनुव्याख्याने या विद्यांचा उल्लेख बृहदारण्यकात आला आहे (२.४.१०; ४.१.२; ४.५.११). छांदोग्यातील विद्यांची सूची याहून विस्तृत आहे, ती अशी– चार वेद, इतिहास, पुराणे, व्याकरण, श्राद्धकल्प, गणित, उत्पातादिकांचे ज्ञान, महाकालादिशास्त्र, तर्कशास्त्र, नीतिशास्त्र, निरुक्त, ब्रह्मविद्या, भूतविद्या, क्षत्रविद्या, नक्षत्रविद्या, देवजनविद्या (नृत्य, गीत, वाद्य, इ.) या सर्व विद्या होत (छांदो. ७.१.२).

व्याकरणशास्त्राच्या पुरस्कर्त्यांनी त्या शास्त्राला, राज्यशास्त्राच्या पुरस्कर्त्यांनी दंडनीतीला आणि धर्मशास्त्रकारांनी त्या शास्त्राला सर्व विद्यांमध्ये प्राधान्य दिले आहे. बृहस्पतिस्मृतीत तीन वेदांच्या जोडीला आयुर्वेद, अर्थशास्त्र, ज्योतिषशास्त्र, गजशास्त्र, अश्वशास्त्र, कुक्कुटशास्त्र, योगशास्त्र, शब्दशास्त्र, ब्रह्मविद्या, शैवागम, वैष्णवागम, या विद्यांचा उल्लेख केला आहे.

प्राचीनांनी चौदा किंवा अठरा ही विद्यांची संख्या मानलेली आहे. चार वेद. चार उपवेद आणि सहा वेदांगे मिळून चौदा विद्या होतात. त्यांची उत्तरांगे म्हणून दर्शन, इतिहास, पुराणे व यज्ञ ही मानली, तर त्यांची संख्या अठरा होते. जैन धर्मग्रंथांत चार वेद, इतिहास, निघंटू, सहा वेदांगे आणि सहा उपांगे मिळून अठरा ही विद्यांची संख्या मानली आहे. अन्यत्र याज्ञवल्क्यादि स्मृतींत आन्वीक्षिकी, त्रयी, वार्ता व दंडनीती हे चार प्रकार चौदा विद्यांमध्ये मिळवून त्यांची अठरा ही संख्या सांगितली आहे. चौदा विद्यांचे उल्लेख प्रामुख्याने आढळतात आणि त्या मानाने अठरा विद्यांचे खूप कमी आढळतात.

भारतीय विद्या या निगम आणि आगम अशा दोन रूपांत विकसित झाल्या. वर उल्लेखिलेल्या बहुतांश विद्या या निगम विद्या होत. आगम विद्यांचे जे भेदप्रभेद आहेत, त्यांचे प्रायोगिक क्षेत्र फार मोठे आहे. कल्प, सिद्धान्त, संहिता, तंत्र, यामल व डामर हे आगम विद्यांचे मुख्य भेद होत. यांचेही अनेक पोटभेद झालेले असून, त्यांतल्या एकेकावर अनेक ग्रंथ लिहिले गेले आहेत. या आगम विद्यांना प्राकृत विद्या असेही म्हणतात, कारण त्यांचा प्राकृतिक पदार्थांशी विशेष संबंध असतो.

याव्यतिरिक्त आत्मबलाने किंवा योगबलाने प्राप्त होणाऱ्या अशाही काही दिव्य विद्या आहेत. त्यांना सिद्धी असेही म्हणतात. या दिव्य विद्यांच्या मुळाशी आत्मा किंवा चैतन्य हे मुख्य असते. या विद्या मिळविण्यासाठी चैतन्याच्या ठिकाणी मन व इंद्रिये यांचा ओघ लावावा लागतो. मन व इंद्रिये यांच्या शक्ती दुसरीकडून ओढून घेऊन त्या आत्म्याच्या ठिकाणी केंद्रित केल्या, तर त्यांची शक्ती अनंतपटींनी वाढते, हे प्राचीन प्रज्ञावंत जाणीत होते. अणिमा, महिमा, गरिमा, इ. ज्या अष्टसिद्धी आहेत, त्या मन व इंद्रिये यांचे सारे प्रवाह आत्म्याच्या ठिकाणी केंद्रित केल्यानेच प्राप्त होणाऱ्या असतात. [पु. प.; प्रा. च. को.; विद्याज]

विद्यागोपाल मंत्र

एक पौराणिक मंत्र. पद्मपुराणाच्या पातालखंडात याचा उल्लेख आहे. भगवान शंकराने काश्यपवंशीय पुण्यश्रवा मुनीच्या मुलाला हा मंत्र सांगितला. या मंत्रात एकवीस अक्षरे असून, त्याच्या पुरश्चरणाने साधकाला वाक्‌सिद्धी प्राप्त होते. [पु. नि.]

विद्यातीर्थ

(इ. स. च्या १४ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक विद्वान यती. हे माधवाचार्य व सायणाचार्य यांचे गुरू होते. विजयनगरच्या राजांचेही ते आध्यात्मिक गुरू होते. ते त्रिदंडी स्वामी असून, शृंगेरी पीठाचे शंकराचार्य होते. माधवाचार्य व सायणाचार्य यांची आपल्या या गुरुवर अगाध भक्ती व अनुपम श्रद्धा होती. ते दोघे यांना परमात्मस्वरूप मानीत होते. त्या दोघांनी आपल्या जीवन्मुक्तिविवेक व वेद-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भाष्य या ग्रंथांच्या आरंभी गुरूला वंदन केले आहे, ते असे –

यस्य निःश्वसितं वेदा यो वेदेभ्योऽखिलं जगत् ।
निर्ममे तमहं वन्दे विद्यातीर्थमहेश्वरम् ।।

अर्थ – वेद हे ज्याचे निःश्वसित आहे, आणि ज्याने वेदांपासून सर्व जग निर्माण केले, त्या विद्यातीर्थरूप महेश्वराला मी नमस्कार करतो.

विद्यातीर्थांनी रुद्रप्रश्नभाष्य नामक एक ग्रंथ रचला आहे. माधवाचार्यांनी विजयनगरचा सम्राट बुक्कराय याच्या साहाय्याने शृंगेरी येथे विद्यातीर्थांचे मंदिर निर्माण केले व त्यात विद्याशंकर या नावाने त्यांची मूर्ती स्थापली. [आ. सा. मा.]

विद्यादान अध्यापन, पुस्तकदान व एखाद्याच्या शिक्षणास मदत या गोष्टी विद्यादानात येतात. हजारो यज्ञांच्या पुण्यापेक्षा; तसेच गाय, भूमी, सुवर्ण, वस्त्र, इ. दानांपेक्षाही विद्यादानाचे पुण्य फार मोठे असल्याचे अग्निपुराणात सांगितले आहे. [श. क.]

विद्यादेवी (१) जैनांनी सोळा विद्यादेवता मानल्या आहेत. त्यांची नावे अशी – रोहिणी, प्रज्ञाप्ती, वज्रशृंखला, वज्रांकुशा, अप्रतिचक्रा, पुरुषदत्ता, काली, महाकाली, गौरी, गांधारी, महाज्वाला, मानवी, वैरोटी, अच्छाप्ता, मानसी व महामानसी. विद्यादेवी ही जैनांची अभिनव कल्पना आहे. हिंदु धर्मात सरस्वती ही एकच विद्येची देवता आहे. सोळा विद्यादेवींपैकी काही देवता यक्षिणीही आहेत. त्यांचे स्वरूप, स्वभाव, आयुधे व वाहने लक्षात घेता या देवी ब्रह्माणी, चंडी, लक्ष्मी आणि सरस्वती यांच्याच प्रतिकृती वाटतात.

श्रुतदेवी ही विद्याकलांची स्वामिनी आहे, अशी त्यांची समजूत आहे. [जै. इ.; देवीकोश ३]

(२) वृंदावनात विद्यादेवीचे एक स्थान आहे. तिला काही जन बरसाना देवी म्हणतात. विद्यादेवीचे भारतातील हे एकमेव स्थान होय. इथे मोठ्या प्रमाणावर होलिकोत्सव साजरा होतो. एकावन्न शक्तिपीठांत या स्थानाची गणना होते. [देवीकोश ३]

विद्याधर (१) एक अतिमानवी किंवा देवयोनी. हे लोक कश्यपाचे वंशज असल्याचे अग्निपुराणात सांगितले आहे. त्यांचे वर्णन तिथेच आढळते, ते असे – विद्याधर हे स्वेच्छाचारी, गगनसंचारी, पराक्रमी व युद्धात अजिंक्य असे असतात. हिरण्यरोमा, कपिल, सुलोमा, माधव, इंद्रकेतू, पिंगांग, नाग, महाबल, इ. विद्याधरांचे गण आहेत. पृथ्वी व आकाश यांच्या मध्ये अवकाशात ते वास्तव्य करतात. स्वभावाने ते परोपकारी असतात. हे इंद्राचे अनुचर असले तरी, यांच्यापैकी काही लोक राज्यकर्तेही होऊन गेले. यांचा मानवाशी संबंध आला असून, पुष्कळदा मानव-विद्याधर यांच्यात विवाहसंबंधही झाले आहेत.

वेदांमध्ये विद्याधरांचा उल्लेख येत नाही. जैन कथांमध्ये मात्र त्यांचे बरेच उल्लेख आढळतात. उदयन आणि नरवाहन यांची लग्ने गांधार व पारसीक किंवा कैकेय राजकन्यांशी झाली असावी आणि त्या मुलींनाच गौरवात्मक भाषेत गंधर्वकन्या आणि विद्याधरकन्या मानले असावे, असे डॉ. केतकर म्हणतात.

गांधार व कैकेय या प्राचीन जातींना विद्याधर म्हणत असत. वत्स देशाच्या पश्चिमेस शूरसेनापासून सिंधूपर्यंत अनेक छोटी छोटी गंधर्वराज्ये व विद्याधरराज्ये बृहत्कथेच्या कालात नांदत असावी. त्यामुळे विद्याधरकन्यांशी लग्न करणाऱ्या राजांच्या गोष्टींना बृहत्कथेत प्राधान्याने स्थान मिळाले असावे. त्या काळी विद्याधरेशत्व मिळणे ही जीवनाची इतिकर्तव्यता वाटत असावी.

बृहत्कथेत विद्याधरकथांना प्रमुख स्थान आहे. त्या कथांतले विद्याधर हे जसे देवयोनी वाटतात, तसेच ते सामान्य मानवही वाटतात. बौद्ध साहित्यातील विहेठ जातकात म्हटले आहे, की विद्याधर हे फार रसिक प्राणी होते; ते रात्रभर कामक्रीडेमध्ये निमग्न राहत व दिवसा पापनिवारणार्थ अनेक प्रकारची प्रायश्चित्ते करीत. जैन कथांवरून असे दिसते, की एखादी मुलगी आवडल्यास ते तिला लग्नमंडपातून उचलून नेत (उत्तराध्ययन टीका). विद्याधरांमध्ये गणराज्ये प्रचलित होती हे वर दिलेल्या गणांच्या नावावरून कळून येईल. विंध्यपरिसरात मालव गणाबरोबरच विद्याधरांचीही गणराज्ये चालत होती.

विद्याधर वर्ग व जैन संस्कृती यांचे काही विलक्षण नाते दिसते. जैनांनी विद्याधरांना देवयोनीत गणले आहे. कधी कधी जैन संघातही ते प्रविष्ट झालेले दिसतात. ऋषभ हा त्यांचा पहिला तीर्थंकर पूर्वजन्मी विद्याधरांचा राजा होता, असे म्हटले आहे. त्रिषष्टिशलाकापुरुषचरित्रात विद्याधरांविषयी पुढील माहिती आहे– विद्याधर राजाचा देश पश्चिम विदेह आणि प्रांत गंधिलावती हा होता. हा देश वैताढ्य (विंध्य) पर्वतावर होता. गांधार देशही त्याच पर्वतावर असून, त्यात गंधसमृद्धक नावाचे नगर होते. वैताढ्य पर्वताच्या दक्षिणेच्या उतरणीवर विद्याधरांची पन्नास नगरे होती. दक्षिणेकडची नगरे नमी राजाची व उत्तरेकडची विनमी राजाची होती. हे दोन्ही राजे विद्याधर होते. कथासरित्सागरामध्ये जीमूतवाहनाची कथा असून, तो विद्याधरांचा राजा होता, असे म्हटले आहे. [प्रा. म.; श. क.]

(२) (इ. स. चे १४ वे शतक) एक संस्कृत साहित्यशास्त्रकार. हा ओडिसाच्या केशवनरसिंह (किंवा प्रतापसिंह)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या राजाचा आश्रित होता. त्याने एकावली नावाचा एक काव्य-ग्रंथ लिहिला असून, त्यात त्याने उत्कलाच्या नरसिंहराजाची प्रशंसा केली आहे. हा काव्यशास्त्रावरचा ग्रंथ असून, त्याचे आठ उन्मेष आहेत. या ग्रंथावर मल्लिनाथाची तरल नामक टीका असून, ती आदर्श टीका समजली जाते. [सं. सा. इ.]

विद्यानंदी (इ. स. चे ९ वे शतक) एक जैन आचार्य. याचे चरित्र मिळत नाही. हा महान दार्शनिक होता. त्याची अकलंकदेवाच्या अष्टशतीवरील अष्टसहस्री नावाची टीका त्याच्या विद्वत्तेची साक्ष देणारी आहे. या टीकेसंबधाने तो स्वतःच म्हणतो, की 'हजारो शास्त्रे वाचण्यापेक्षा अभ्यासकाने लक्षपूर्वक अष्टसहस्री वाचली, तरी त्याला सर्व सिद्धान्तांचे व परसिद्धान्तांचे चांगले ज्ञान होईल.' तत्त्वार्थश्लोकवार्तिक, युक्त्य-नुशासनालंकार, आप्तपरीक्षा, प्रमाणपरीक्षा, पत्रपरीक्षा, सत्य-शासन हे ग्रंथ त्याने रचले आहेत [जै. ध.; अं. दे. अ. सा.]

विद्यानाथ (इ. स. चे १४ वे शतक) एक काव्यशास्त्रकार. याचे चरित्र उपलब्ध नाही. याने प्रतापरुद्रयशो-भूषण नावाचा एक ग्रंथ लिहिला असून, त्यात तेलंगणातल्या काकतीय वंशातील प्रतापरुद्रदेव या राजाचे चरित्र वर्णिले आहे. याची नऊ प्रकरणे आहेत. याने सामान्यतः काव्यप्रकाशाचा मागोवा घेत घेत आपला ग्रंथ लिहिला आहे. अलंकारांच्या बाब-तीत मात्र त्याने अलंकारसर्वस्व या ग्रंथाचे अनुकरण केले आहे. प्रस्तुत ग्रंथावर कुमारस्वामीची रत्नापण नामक टीका आहे. द. भारतात हा ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. [सं. सा. इ.]

विद्यानिधी (इ. स. च्या १७ व्या शतकाचा पूर्वार्ध) एक संन्यासी व पंडित. याने अनेक ग्रंथ लिहिले आहेत. याच्या काळी काशी व प्रयाग येथे यात्रेसाठी जाणाऱ्या यात्रेकरू-कडून मोगल राजे कर वसूल करीत. विद्यानिधीला हा अन्याय सहन झाला नाही. त्याने शहाजहान व त्याचा मुलगा दाराशुकोह यांच्याकडे रदबदली करून हा कर बंद करवला. शहाजहानने याला 'सर्वविद्यानिधी' अशी पदवी दिली होती. लोकांनीही याला अनेक मानपत्रे दिली होती. ती कलकत्त्याच्या रॉयल एशिआटिक सोसायटीत जतन करून ठेवलेली आहेत. [सु. वि. को.]

विद्यापती (इ. स. चे १४वे १५वे शतक) एक थोर मैथिली कवी व पंडित. याचे समग्र, साधार चरित्र उपलब्ध नाही. त्याच्या काव्यातील त्रोटक उल्लेख, मिथिला प्रदेशात प्रचलित असणाऱ्या दंतकथा, मिथिलेच्या राजांचा इतिहास व समकालीन कागदपत्रे यांतून त्याच्या विषयी जी माहिती मिळते, ती अशी–

बिहार राज्यातील गढ बिसपी नामक एका छोट्या गावी विद्यापती जन्मला. विद्यापतीचे हे जन्मग्राम आजच्या बिहार राज्याच्या दरभंगा जिल्हातील कमतौल नामक स्थानकापासून सुमारे ५ मैल दूर आहे. तेराव्या शतकाच्या पूर्वार्धात कधीतरी विद्यापतींचे पूर्वज इथे स्थायिक झाले. विद्यापतीचे घराणे पंडितांचे व कवींचे म्हणून त्या भागात प्रसिद्ध होते. विद्यापतीचा पिता गणपती ठाकूर हा एक व्युत्पन्न पंडित असून, त्याने गंगाभक्ति-तरंगिणी नामक काव्य लिहिल्याचे नमूद आहे. गणपती ठाकुराचे मिथिलेच्या राजदरबारी जाणे-येणे होते. आपल्याप्रमाणेच आपल्या मुलानेही राजदरबारी मानमरातब मिळवावा, असे गणपती ठाकुराला नेहमी वाटे. त्यासाठी त्याने हरिमिश्र नामक एका विद्वान पंडिताकडे विद्यापतीला पाठवले. यथाकाल विद्या-ध्ययन संपवून व पंडित बनून विद्यापती स्वगृही परतला.

गणपतीने मग त्याला मिथिलेचा राजा कीर्तिसिंह याच्या दरबारी जाऊन आपल्या पांडित्याची परीक्षा करवून घ्यायला सांगितले. विद्यापतीने ते केले. राजा कीर्तिसिंहाच्या दरबारी विद्यापती पंडित ठरला.

राजा कीर्तिसिंह हा स्वतः जसा विद्वान व रसिक होता, तसाच तो विद्वानांचा आश्रयदाताही होता. कीर्तिसिंहाच्या दर-बारी रुजू झाल्यावर विद्यापतीने त्या शौर्यशाली नृपतीचे गौरवगान करणारे कीर्तिलता नामक एक काव्य लिहिले. या काव्याची भाषा अवहट्ठ असली, तरी त्यातले माधुर्य वाखाणण्या-सारखे आहे. काव्यक्षेत्रातल्या या प्रथम पदक्षेपानेच विद्यापतीची कीर्तिलता बहरून दरवळू लागली.

थोड्याच दिवसांत कीर्तिसिंह मरण पावला. त्याच्या नंतर गादीवर आणखी एक-दोन राजे आले आणि गेले. मग आला शिवसिंह. तो आणि त्याची राणी लखिमा किंवा लक्ष्मीदेवी दोघे, रसज्ञ आणि गुणज्ञ होती. विद्यापतीवर व त्याच्या काव्यांवर तर त्यांचे विलक्षण प्रेम होते. त्यामुळे केवळ राजदरबारातच नव्हे; तर मिथिलाधिपतीच्या अंतःपुरातही विद्यापतीचा अनिर्बंध संचार सुरू झाला. आजपर्यंत मिथिलेच्या राजसिंहासनाचा भाट एव-ढीच विद्यापतीची कीर्ती होती; परंतु शिवसिंहाच्या राज्यकालात तो राजाचा सुहृद बनला. राजा–राणींना एक क्षणही विद्या-पतीविना रमेना.

अशातच एके दिवशी मिथिलेवर एक भयानक संकट गुदरले. राजा शिवसिंहाने दिल्लीच्या मुसलमान सुलतानाचे मांडलिकपद झुगारून दिल्यामुळे संतापलेला तो सुलतान प्रचंड सेनादलासह मिथिलेवर चालून आला. शिवसिंहही सिद्ध होताच. दोघांचे घमासान युद्ध झाले आणि त्यात शिवसिंह विजयी झाला. आपल्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वामीचा तो अतुलनीय पराक्रम पाहून विद्यापतीला कवित्वाचे भरते आले. कीर्तिपताका या काव्यग्रंथात त्याने या समरप्रसंगाचे सुरेख व प्रत्ययकारी वर्णन केले आहे.

शिवसिंह तीन-साडेतीन वर्षेच राज्यावर होता. दिल्लीच्या सुलतानाचे एक आक्रमण त्याने मोडून काढले असले तरी पुन्हा जेव्हा तो मिथिलेवर चालून आला, तेव्हा त्याच्यापुढे शिवसिंहाचा टिकाव लागला नाही. शिवसिंह त्या युद्धात मारला गेला आणि मग त्याचा बहिश्चर प्राण असलेला विद्यापती अगदी उदास झाला. तथापि त्याला आपल्या कर्तव्याचा मात्र विसर पडला नाही. राणी लक्ष्मीदेवी व शिवसिंहाचा अन्य परिवार यांना घेऊन तो नेपाळसीमेवर असलेल्या बनौली नामक राज्याच्या पुरादित्य राजाकडे गेला. राजा पुरादित्य शिवसिंहाचा परम मित्र होता. त्याने शिवसिंहाच्या सर्व राजपरिवाराला तर उदार आश्रय दिलाच; आणि विद्यापतीलाही आपल्या दरबारात कविराज म्हणून ठेवून घेतले.

विद्यापती

विद्यापतीने पुरादित्यासाठी लिखनावली नामक एक काव्यग्रंथ लिहिला. तथापि तो आता निराशेने ग्रासून गेला होता. शिवसिंहाशिवाय जगणे त्याला आता असह्य व अशक्य झाले. शिवसिंहाचा भाऊ पद्मसिंह याच वेळी मिथिलेचा राजा झाला. त्याने विद्यापतीला आग्रहाने मिथिलेला बोलावून घेतले. विद्यापतीही मिथिलेला परतला. त्याने पद्मसिंहासाठी काही काव्यलेखन केले. परंतु त्याच्यात आता पूर्वीची उत्कटता उरली नव्हती. दिवसेंदिवस तो अधिकाधिक निराश व हताश होत होता. तशातच त्याला वार्धक्यानेही ग्रासले. मग त्याने आत्मसमर्पण करायचे ठरविले व तो उत्तर बिहारमधल्या बाजितपुर नामक गावी गेला. तिथे गंगातीरावर उभा राहून गंगामातेने आपल्याला उदरात ठाव द्यावा, म्हणून त्याने तिची स्तुती सुरू केली. दंतकथा अशी आहे, की गंगेने पंडितराज जगन्नाथाप्रमाणेच विद्यापतीचीही प्रार्थना ऐकली व त्याला आपल्यात सामावून घेतले.

विद्यापतीच्या स्मृतिप्रीत्यर्थ गंगेच्या घाटावर आज एक शिवमंदिर उभारलेले आहे. प्रतिवर्षी कार्तिक शुद्ध त्रयोदशीला तिथे मोठी यात्रा भरते. लांबलांबून श्रद्धावान यात्रेकरू तिथे येतात. त्या यात्रेत विद्यापतीच्या कवितांचे गायन होते. दोन-चार दिवस मोठा मनोरम सोहळा होतो.

विद्यापतीने एकूण १४ ग्रंथ लिहिल्याची नोंद सापडते. कीर्तिलता, कीर्तिपताका, पुरुषपरीक्षा, शैवसर्वस्वसार, पदावली ही त्यांपैकी काही प्रमुख ग्रंथांची नावे होत. मात्र विद्यापती आज सर्वपरिचित आहे, तो मुख्यतः त्याच्या पदावलीमुळे. या एकाच ग्रंथामुळे त्याला मैथिलकविकोकिल हे बिरुद मिळाले असावे. या पदावलीचा विषय राधाकृष्णप्रेम हा आहे. एका पदात विद्यापती म्हणतो–

नहाइ उठल तीर राइ कमलमुखि ।
समुख हेरल बर कान ॥
गुरुजन संग लाज धनि नतमुखि ॥
कइसन हेरब बयान ॥
सखि हे अपरुब चातुरि गोरि ।
सब जन तेजि कए अगुसरि संचरि ।
आड़ बदन तहँ फेरि ॥
तँहि पुनि मोतिहार तोरि फेकल ।
कहइत हार टूटि गेल ॥
सब जन एक-एक चुनि संचरु ।
स्याम-दरस धनि लेल ॥
नयन चकोर-कान्हु मुख ससि-बर ।
कएल अमिय-रस-पान ॥
दुहु दुहु दरसन रसहु पसारन ।
कवि विद्यापति भान ॥

अर्थ – कमलमुखी राधा स्नान करून (यमुनेच्या) तीरावर आली आणि तिने श्रीकृष्णाला पाहिले. त्याच्या बरोबर घरची वडिलधारी माणसे होती. (त्यांना पाहून) लाजून अधोमुख झालेल्या तिला श्रीकृष्णाचे मुखदर्शन कसे घेता येणार ? पण हे सखे, ती मोठी चतुर मुलगी होती. सगळ्यांना सोडून ती (चटकन) पुढे आली व तिने मागे वळून पाहिले. नंतर आपल्या गळ्यातला मोत्यांचा हार तोडून तिने मागे फेकला आणि ती म्हणाली. 'हार तुटला हो माझा!' सगळी माणसे एक एक करून त्या हाराचे मोती गोळा करू लागली. तेवढ्यात तिने कृष्णाचे मुखदर्शन घेतले. कवी विद्यापती म्हणतो, राधेच्या नेत्ररूपी चकोरांनी कृष्णाच्या मुखरूपी चंद्राचे अमृत प्राशन केले. इतकेच नव्हे, तर दोघांनी तो रसरंग सर्वत्र उधळून दिला.

विद्यापती सुमारे ८० वर्षे जगला, असे संशोधकांचे म्हणणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आहे. [विद्यापती पदावली– संपा. श्री. कुमुद विद्यालंकार व श्री. जयवंशी झा, १९६१; कीर्तिलता (संजीवनी व्याख्या)– डॉ. वासुदेवशरण अग्रवाल, १९६२]

विद्याप्रतिपद्व्रत एक तिथिव्रत. कोणत्याही महिन्याच्या प्रतिपदेला हे व्रत करायचे असते. त्याचा विधी असा– तांदुळांची चौकोनी वेदी तयार करावी. तिच्यावर विष्णू व लक्ष्मी यांची स्थापना करून त्यांची कमळांनी पूजा करावी. विष्णु–लक्ष्मीच्या शेजारी सरस्वती आणि चंद्र यांच्या मूर्ती ठेवून त्यांचीही पूजा करावी. गुरूचा सन्मान करावा. उपवास करावा. द्वितीयेला पुनश्च वरील मूर्तींची पूजा करून आचार्याला सुवर्णदक्षिणा द्यावी व भोजन करावे. [हि. ध.]

विद्यारण्य (इ. स. चे १४ वे शतक) एक महान वैदिक विद्वान व यती. यांचे पूर्वाश्रमीचे नाव माधवाचार्य होते. त्यांनी हरिहर व बुक्क या दोन सरदारांना शुद्ध करून हिंदू धर्मात परत घेतले आणि त्यांच्या साहाय्याने विजयनगरचे राज्य स्थापले. तीस वर्षे ते विजयनगरचे प्रधानमंत्री होते. त्यानंतर वयाच्या ८० व्या वर्षी त्यांनी संन्यास घेतला. इ. स. १३८० साली शृंगेरी पीठाचे शंकराचार्य भारतीतीर्थ स्वर्गवासी झाले आणि त्यांच्या जागी विद्यारण्य हे त्या पीठाचे आचार्य झाले.

संन्यासग्रहणानंतर विद्यारण्यांनी पंचदशी नामक वेदान्ताचा ग्रंथ रचला. आद्य शंकराचार्यांच्या नंतर संस्कृत भाषेत सुबोध ग्रंथरचना करणारा विद्यारण्यांसारखा दुसरा अधिकारी पुरुष कोणीही झाला नाही. पाहा – माधवाचार्य; विजयनगर. [आ. सा. मा.; सार्थ पंचदशी – द. वा. जोग, १९५१]

विद्यारंभ एक संस्कार. याला अक्षरारंभ असेही म्हणतात. मुलाला अक्षर–ओळख करून देणे किंवा त्याच्या प्राथमिक शिक्षणाला आरंभ करून देणे, असा याचा अर्थ आहे. वेदांच्या काळात लेखनकला अवगत नसल्यामुळे मुलाला अक्षर–ओळख करून देण्याचा प्रश्न उत्पन्न होत नसे. तत्कालीन लोक आठव्या वर्षी मुलाचे उपनयन करून त्याला वेद शिकवायला प्रारंभ करीत. हे शिक्षण लेखरूप नसून मौखिक असे. पुढे लेखनकलेचा शोध लागल्यावर आणि ती प्रगत झाल्यानंतर सन पूर्व सुमारे २०० वर्षे या काळात मुलांना अक्षरे शिकविण्याची पद्धत सुरू झाली.

सामान्यपणे मुलगा ५ किंवा ७ वर्षांचा झाला, की हा संस्कार करीत. जर काही अडचणीमुळे हा संस्कार योग्य वेळी करता आला नाही, तर तो उपनयन संस्काराच्या अगोदर करीत.

उत्तरायण हा विद्यारंभाला उपयुक्त काल मानलेला आहे. प्राक्सूत्रकाली व सूत्रकाली विशेषेकरून वर्षा ऋतूतच अध्ययनाच्या सत्राचा प्रारंभ होत असे. श्रावणात केली जाणारी श्रावणी हे मुख्यत्वे उपाकर्म (अध्ययनसत्रारंभ) असे; पण पुढच्या काळात चातुर्मास्याचा काळ विद्यारंभासाठी निषिद्ध ठरला. प्रस्तुत विद्यारंभाचा विधी असा–

शुभ दिनी बालकाला स्नान घालीत. त्याला वस्त्राभरणांनी सजवीत. नंतर त्याच्याकरवी विनायक, सरस्वती, बृहस्पती व गृहदेवता यांची पूजा करवीत. मग सूत्रकार गुरू व ब्राह्मण यांचीही पूजा करवीत. श्रीमंत लोक चांदीच्या फलकावर केशराचा चुरा पसरीत. मग मुलाच्या हाती सोन्याची लेखणी देत. गुरू पूर्वाभिमुख व बालक पश्चिमाभिमुख बसे. गुरू बालकाचा हात धरून त्याच्या करवी 'श्रीगणेशाय नमः, श्रीसरस्वत्यै नमः' हीं अक्षरे लिहून घेत असे. सामान्य लोक लाकडी पाटावर तांदूळ पसरून बोरूच्या लेखणीने मुलाकडून अक्षरे लिहून घेत. मग गुरू लिहिलेली अक्षरे मुलाकडून तीन वेळा वाचून घेई. मग गुरूचे व ब्राह्मणांची पूजा केली जाई. ते सर्व लोक बालकाला आशीर्वाद देत. सुवासिनी स्त्रिया मुलाला आरती ओवाळीत. मग आवाहित देवतांचे विसर्जन करून कर्म समाप्त करीत [हि. सं.]

विद्याराज्ञी मंत्र विद्या, वाक्सिद्धी, संपत्ती, आरोग्य, इ. गोष्टींच्या प्राप्तीसाठी या मंत्राची साधना करतात. हा बत्तीस अक्षरी मंत्र असून, त्याचा ऋषी ब्रह्मा, छंद अनुष्टुभ व देवता सरस्वती आहे. मंत्र पुढीलप्रमाणे आहे–

ऐं, ह्रीं श्रीं क्लीं सौं क्लीं ह्रीं ऐं ब्लूं स्त्रीं नीलतारे सरस्वति द्रां द्रीं क्लीं ब्लूं सः ऐं ह्रीं श्रीं क्लीं सौः सौः ह्रीं स्वाहा।

या मंत्राच्या पुरश्चरणाने विद्या प्राप्त होते.

या मंत्रातील काही अक्षरांनी षडंगन्यास करून पीठावर यंत्राची स्थापना व पूजा करतात.

या मंत्रासंबंधी काही तोडगेही सांगितले आहेत. त्यांतील काही असे – अर्भकाचे नालच्छेदन केल्याबरोबर त्याच्या जिभेवर दूर्वेच्या लेखणीने गोरोचनरसाने हा मंत्र लिहिल्यास त्या मुलाला आठवे वर्ष लागल्यावर तो सर्वशास्त्रवेत्ता होतो. वेखंडाच्या मुळीवर या मंत्राचा दहा हजार जप करून ती मुळी मुलाच्या गळ्यात बांधावी. बारावे वर्ष लागल्यावर ती मुळी मुलाने भक्षण केली असता त्याला कवित्वशक्ती प्राप्त होते. ज्योतिष्मतीपासून काढलेले तेल एक कर्ष (सुमारे दीड तोळा) घेऊन ग्रहणाच्या दिवशी पाण्यात बसून व विद्याराज्ञी मंत्राने अभिमंत्रून प्याल्याने पिणारा मनुष्य वाचस्पती होतो. [मंत्रमहोदधि]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विद्यावाप्तीव्रत एक मासव्रत. माघ शुद्ध प्रतिपदेपासून या व्रताला आरंभ करावा. तिळांनी हयग्रीवाची पूजा व तिळांचा होम हे या व्रताचे विधान आहे. व्रताचे पहिले तीन दिवस उपवास करायचा असतो. व्रतावधी एक मास. फल – विद्वत्ताप्राप्ती. [हि. ध.]

विद्याव्रत चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतविधी असा – प्रतिपदेच्या दिवशी उपवास करून निरनिराळ्या रंगांचे एक अष्टदल कमळ काढावे. कमळाच्या कर्णिकेत ब्रह्मदेवाची स्थापना करावी आणि पूर्व, दक्षिण, पश्चिम व उत्तर या दिशांच्या पाकळ्यांवर अनुक्रमे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद यांची स्थापना करावी. त्याचप्रमाणे आग्नेय, नैर्ऋत्य, वायव्य व ईशान्य या दिशांच्या दलांवर अनुक्रमे वेदांगे, धर्मशास्त्रे, पुराणे व न्यायशास्त्र यांची पूजा करावी. खिरीचा नैवेद्य दाखवावा. अशा प्रकारे वर्षभर प्रत्येक शुद्ध प्रतिपदेला हा विधी करून उद्यापनाच्या वेळी गाय दान द्यावी. फल – विद्याप्राप्ती. बारा वर्षे हे व्रत केले तर ब्रह्मलोकप्राप्ती. या व्रताचे अन्यही काही पर्याय आहेत. [व्रतराज; हि. ध.]

विद्युज्ज्वाला कराली बौद्धांची एक देवता. एकजटा देवीचे हे एक निराळे रूप आहे. हिचा जन्म बुद्धाच्या घामातून झाला आहे. ही नीलवर्ण असून, बारा मुखांची व चौवीस हातांची आहे. हिच्या उजव्या हातांत खड्ग, वज्र, चक्र, रत्न, अंकुश, बाण, भाला, हातोडा, मुसळ, करवत, दुंदुभी, व माळा ही आयुधे आहेत. डाव्या हातांत धनुष्य, पाश, तर्जनीमुद्रा, निशाण, गदा, त्रिशूळ, भांडे, नीलकमल, घंटा, कुऱ्हाड, ब्रह्मदेवाचे तुटलेले मस्तक व कपाल या वस्तू आहेत. ही ब्रह्मा, विष्णू, शिव व इंद्र यांच्या शरीरावर नाचते आणि प्रत्यालीढ आसनात उभी असते. ही अग्नीप्रमाणे संहारक भासते. तिचे मुख पसरलेले असून, त्यातून 'हाँ हाँ' असे शब्द बाहेर पडतात. तिची जीभही बाहेर आलेली असते. हिच्या मुकुटात अक्षोभ्याची मूर्ती असते.

इंद्र, ब्रह्मा, विष्णू व शिव ही तिची वाहने आहेत. या देवतेच्या मूर्ती क्वचितच आढळतात. [इं. बु. इ.; देवीकोश ३]

विधन (१) एक यज्ञ. प्रजेकडून कराची वसुली होत नसली अथवा तिच्यावरील राजाचा वचक कमी झाला असला, तर त्या राजाने हा यज्ञ करावा, असे सांगितले आहे. त्याचप्रमाणे कोणत्या तरी पातकामुळे एखादा ब्राह्मण समाजमनातून उतरला, तर त्यानेही हा यज्ञ करावा. विधनामध्ये बारा स्तोत्रे म्हणायची असतात. याचा बहुतेक सारा विधी अग्निष्टोमासारखा असतो. [म. ज्ञा. को.]

(२) यज्ञवेदी तयार करायला लागणारे एक उपकरण. याचा आकार चोपण्यासारखा किंवा हातोड्यासारखा असतो. यज्ञीय वृक्षापासूनच ते बनवतात. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

विधवा जिचा पती मृत झाला आहे, अशा स्त्रीला विधवा म्हणतात. कष्टमय, खडतर, उपेक्षित आणि अपमानित जिणे जगणारी आणि त्याचबरोबर सहृदय अंतःकरणाच्या माणसाच्या हृदयात दयेचा द्रव निर्माण करणारी कोणती व्यक्ती भारतीय समाजात असेल, तर ती विधवा स्त्री ही होय. तशात जर तिला मुलगा नसेल, तर तिची स्थिती अधिकच केविलवाणी होते. विधवेकडे पाहण्याची समाजाची दृष्टी सामान्यतः सहानुभूतिशून्य असते. पती हयात असताना जिचा आदर आणि सन्मान व्हायचा तीच स्त्री पती मृत होताच कुटुंबातल्या सर्व माणसांना तिरस्करणीय वाटू लागते. तिचे दर्शनदेखील अपशकुनी मानले जाते. संन्यस्त वृत्तीने राहणे, एकत्र कुटुंबातील सर्वांच्या खस्ता खाणे, पोटभर अन्नावरही सत्ता नसणे आणि इतरांच्या केवळ दयाबुद्धीवर अवलंबून, जे मिळेल त्यात समाधान मानणे, हेच भोग तिच्या वाट्याला येतात. विधवेने उंची वस्त्रे नेसू नयेत, अलंकार घालू नयेत, मंगल प्रसंगांत पुढे येऊ नये, प्रत्यक्ष पोटच्या मुलाचा मंगल संस्कार होत असतानाही तो डोळे भरून पाहता येऊ नये, अशी सर्व बाजूंनी कोंडमारा करणारी परिस्थिती काही कालापूर्वी विधवांच्या वाट्याला येत होती. समाजाने तर त्यांना हीन लेखलेच; शिवाय त्यांच्या या उपेक्षित व अपमानित अवस्थेला स्मृति-शास्त्र-पुराणांनीही हातभार लावला. उदा० – स्कंद पुराणात म्हटले आहे –

अमङ्गलेभ्यः सर्वेभ्यो विधवा स्यादमङ्गला ।
विधवादर्शनात् सिद्धिः क्वापि जातु न विद्यते ।।

अर्थ – सर्व अमंगलांहून विधवा ही अधिक अमंगल असते. विधवेचे दर्शन झाल्याने कार्यसिद्धी होत नाही.

विधवेने उघडपणे वावरायचे, तर त्यांची काय स्थिती होते, याविषयी महाभारत म्हणते –

उत्सृष्टमामिषं भूमौ प्रार्थयन्ति यथा खगाः ।
प्रार्थयन्ति जनाः सर्वे पतिहीनां तथा स्त्रियम् ।।

अर्थ – भूमीवर टाकून दिलेल्या मांसखंडावर ज्याप्रमाणे पक्षी तुटून पडतात, त्याचप्रमाणे (समाजकंटक) लोक विधवा स्त्रीच्या मागे लागतात.

विधवांची ही अत्यंत दयनीय अवस्था लक्षात घेऊनच महाकवी वाल्मीकीने उद्गार काढला आहे, तो असा –

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

न हीदृशं भयं किञ्चित् कुलस्त्रीणामिहोच्यते ।
भयानामपि सर्वेषां वैधव्यं व्यसनं महत् ।।

अर्थ– कुलस्त्रियांना वैधव्यासारखे दुसरे कोणतेही भय नाही, असे म्हणतात. सर्व संकटांमध्य वैधव्य हे संकट फार दारुण होय.

केशवपन– विधवा स्त्रियांनी केशवपन करावे ही चाल सांप्रत लुप्त झाली असली तरी, काही वर्षांच्या मागे विशेषतः ब्राह्मण समाजात आणि त्यातही दक्षिणेत ही प्रथा सर्रास प्रचलित होती. सकेशा विधवा ही अशुची आणि अपवित्र मानली जात असे. तिच्या हातचे पाणीही देवाधर्माला निषिद्ध असे. सनातनी विचारांचे स्त्री-पुरुष तिच्या हातचे जेवीत नसत. म्हणून विधवा स्त्री प्रौढ असो किंवा बालवयाची असो, समाज तिला केशवपन करायला भाग पाडीत असे. याला आधार स्कंदपुराणाचा–

विधवाकबरीबन्धो भर्तृबन्धाय कल्पते ।
शिरसो वपनं तस्मात् कार्यं विधवया सदा ।।

अर्थ– विधवेचा केशबंध हा (परलोकी) पतीच्या बंधाला कारणीभूत होतो. म्हणून विधवेने नेहमी आपल्या मस्तकाचे वपन करावे.

सनातनी विचारांच्या लोकांनी हे आणि अशीच काही वचने प्रमाण मानली आणि विधवेला विरूप करण्याचा आग्रह धरला. या बाबतीत कारण सांगितले जात असे, ते असे– विधवा स्त्रीचे आचरण शुद्ध असायला हवे. म्हणून तिने स्वतःचा देह व्रतोपवासादिकांनी कष्टवून कृश केला पाहिजे. तिच्याकडे समाजातल्या कामासक्त पुरुषांची नजर जाऊ नये आणि ती कोणाच्याही दृष्टीला लोभस व आकर्षक वाटू नये, यासाठी विधवेचे केशवपन अत्यावश्यक आहे. सनातनी लोकांचा केशवपनाच्या बाबतीतला हा हेतू फारसा साध्य झाला नाही; मात्र त्यामुळ विधवा विरूप झाल्या आणि त्यांना समाजात मोकळेपणाने वावरणे कठिण झाले.

वपनाची ही प्रथा केव्हापासून सुरू झाली हे निश्चित सांगता येत नाही. मध्ययुगात ज्या जैन व बौद्ध स्त्रिया संन्यासदीक्षा घेत, त्या आपल्या मस्तकाचे मुंडन करीत. पुरुषांच्या यतिधर्मातही मुंडन आवश्यक मानले आहे. त्यावरून केशवपनाची ही चाल जैन व बौद्ध भिक्षुणींच्या आदर्शावरुन समाजात सुरू झाली असावी, असे वाटते.

स्मृतिग्रंथ व शिलालेख यांवरून इ. स. च्या ९ व्या शतकापर्यंत वपनाची चाल नव्हती, असे दिसते. त्यापूर्वीच्या धार्मिक वाङ्मयात विधवांची कर्तव्ये सविस्तर सांगितली आहेत; पण त्यात वपनाचा उल्लेख नाही. उल्लेख आहेत ते वपनाच्या विरुद्धच आहेत. विधवा स्त्रियांनी केसांना तेल लावू नये व केशभूषा करू नये, असा एक नियम सांगितलेला आहे. केसच शिल्लक नसतील तर केशभूषा कशाची करणार? भारतीय युद्धानंतर विधवा झालेल्या कौरव स्त्रियांचे वर्णन महाभारतात आहे. पण तिथे त्यांनी केशवपन केल्याचा उल्लेख नाही. या उलट त्यांचे केस अस्ताव्यस्त झाले होते, असेच म्हटले आहे.

इ. स. च्या ११ व्या किंवा १२ व्या शतकानंतर विधवांच्या केशवपनाचा पुरस्कार होऊ लागला. मध्ययुगीन निबंधकारांनी त्या प्रथेला उचलून धरले. फक्त वैष्णव संप्रदायातल्या आचार्यांनी तेवढा या वपनपद्धतीला जोराचा विरोध केला. शंभुसंहितेत या विषयी म्हटले आहे, ते असे–

जन्मरोमणि या नारी क्षुरकर्म समाचरेत् ।
कन्या वा विधवा वापि रौरवं नरकं व्रजेत् ।।

अर्थ – केस हे माणसाला जन्मजात असतात. त्या केसांचे क्षौर करणारी कन्या असो किंवा विधवा असो, ती रौरव नरकात जाईल.

मात्र या विरोधाचा समाजावर फारसा प्रभाव पडला नाही. इ. स. च्या १९व्या शतकाच्या अखेरीपर्यंत ही प्रथा चालूच राहिली. पुढें मात्र समाजातल्या विचारवंत सुधारकांनी या प्रथेला कडाडून विरोध केला. महाराष्ट्रात श्री. आगरकर यांनी याविषयी सडेतोड लेख लिहून समाजात खूप खळबळ उडवली. तिथून पुढे ही प्रथा हळूहळू कमी होत शेवटी नामशेष झाली.

विधवाविवाह – विधवेने पुन्हा लग्न करावे की करू नये, याविषयी शास्त्रकारांत खूप चर्चा आणि वादविवाद झालेले आहेत. प्राचीन काळी पतिनिधनानंतर स्त्रिया इच्छा असल्यास दुसऱ्या पुरुषाशी पुनर्विवाह करीत असाव्या, असे दिसते. ऋग्वेदात विधवा-विवाहाचा स्पष्ट उल्लेख मिळत नसला, तरी तसा आभास मिळतो. अथर्ववेदात मात्र त्याचा स्पष्ट उल्लेख आहे –

या पूर्वं पतिं वित्त्वाथान्यं विन्दतेऽ परम् ।।
(अथर्व. ९.५.२७)

अर्थ – पूर्वपती मृत झाल्याने जी दुसरा पती मिळवते.

तैत्तिरीय संहितेत विधवेच्या पुत्राला दैधिषव्य म्हटले आहे (६.१). त्यावरून त्या काळी विधवाविवाह होत असत, असे दिसते. विधवेने विवाह करायचा तर तो धाकट्या दिराशीच करावा, असा काही शास्त्रकारांनी दंडक घातला आहे. कित्येक जातीजमातींत तशी चाल आजही दिसते. पण वैदिकांनी तसा निर्बंध घातलेला नाही. त्यामुळे विधवा स्त्रिया कुटुंबाबाहेरच्या पुरुषांशीही लग्न करीत असाव्या. मात्र विधवाविवाहाची चाल वेदकाली आणि वेदोत्तरकालीही फारशी रूढ नसावी. मनूच्या काळापर्यंत तर नियोगपद्धतीच चालू होती. या पद्धतीत निपुत्रिक विधवेला तीन पुत्र होईपर्यंत आपल्या दिराशी संबंध ठेवता येत असे. नियोग हाच त्या काळी पुनर्विवाहाचा वेगळा पर्याय होता.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

एखाद्या पुरुषाला पुत्र न होता मृत्यू आल्यास त्याला स्वर्ग मिळत नाही, 'अपुत्रस्य गतीर्नास्ति' अशी प्राचीन काळच्या लोकांची धारणा होती. मृताला स्वर्गमार्ग मोकळा व्हावा आणि कुटुंबात मृत बंधूची स्मृती टिकून राहावी म्हणून त्या काळी लोक विधवांना नियोगाची परवानगी देत. महाभारतातले पंडू व धृतराष्ट्र हे नियोगजन्यच आहेत. नियोगात धाकट्या दिराकडून पुत्रप्राप्ती करून घ्यावी, असा संकेत असे. एखाद्या विधवेला दीर पसंत नसला, तर ती कुटुंबाबाहेरच्या एखाद्या योग्य पुरुषाकडूनही पुत्रप्राप्ती करून घेत असे; मात्र ही गोष्ट समाजाला फारशी मान्य नव्हती. कारण, बाहेरच्या पुरुषाकडून पुत्रप्राप्ती झाल्यास कुटुंबात रक्तसंकर होईल व मिळकतीचा वारसाही दुसऱ्या कुटुंबात जाईल, असे त्यांना वाटे. म्हणून विधवेने दत्तक पुत्र घेणे ही गोष्टच लोक अधिक पसंत करीत. नियोग मान्य नसेल अशा विधवांना पुनर्विवाहाची परवानगी होती. पण विधवा स्त्रीशी पुनर्विवाह करण्यास विधुर बहुधा उत्सुक नसत. त्यामुळे समाजाची अनुकूलता असूनही असे विवाह फारसे घडून येत नसत.

इतिहासकाळात विधवेच्या पुनर्विवाहाचे एकच एक उदाहरण आढळते, ते ध्रुवदेवीचे. ही गुप्तसम्राट रामगुप्त याची राणी होती. पतीच्या मृत्यूनंतर तिने चंद्रगुप्ताशी विवाह केला आणि या संबंधातून कुमारगुप्त हा पुत्र जन्मला.

सनपूर्व ४०० ते १०० या कालातले धर्मशास्त्रकार फार उदार विचारांचे होते. पतीचा मृत्यू संभवनीय असेल किंवा पती पाच वर्षांपेक्षा अधिक काळ दूर राहिला असेल, तर अशा स्त्रीने इच्छा असल्यास, पोटी पुत्रसंतान असले तरी, पुनर्विवाह करावा, असे वसिष्ठाने म्हटले आहे (वसिष्ठ ध. सू. १७.६७). जिचा केवळ मंत्रसंस्कार झाला; पण जिला पतिसमागम लाभला नाही आणि त्यामुळे जी अक्षतयोनी राहिली, तिने पुनर्विवाह करणे योग्य ठरेल, असे बौधायन, लघुशातातप, इ. स्मृतिकारांनीही मान्य केले आहे. महाभारताच्या अनुशासनपर्वात बालविधवेच्या विवाहाला संमती दिली आहे आणि तिच्या पुनर्विवाहातून जन्मलेल्या पुत्रांना देव-पितरांचे तर्पण करण्याचा अधिकारही मान्य केला आहे. हा दृष्टिकोन निश्चित दयाबुद्धीचा आहे. कौटिल्याने तर याच्याही पुढे जाऊन प्रतिपादन केले आहे, ते असे — दीर्घ काळ प्रवास करणाऱ्या, संन्यास घेतलेल्या किंवा मरण पावलेल्या पुरुषाच्या स्त्रीने सामान्यतः सात महिने वाट पाहावी. जिला पुत्र झाला असेल तर वर्षभर थांबावे. नंतर पतीच्या भावाशी लग्न करावे. त्याचे पुष्कळ भाऊ असतील तर त्यांत जो धार्मिक असेल किंवा विवाह न झालेला कनिष्ठ असेल, त्याच्याशी लग्न करावे. दीर मुळीच नसेल तर दुसरा कोणी दिरासारखा जवळचा असेल, त्याचा आश्रय करावा.

कौटिल्याने पुनर्विवाहाची येथपर्यंत मर्यादा नेली आहे. इतकेच नव्हे तर काही प्रसंगी स्त्रीने पतीचा त्याग करूनही पुनर्विवाह करण्यास हरकत नाही, असेही म्हटले आहे.

पण या सवलतीचा आणि अनुकूल वचनांचा विधवा स्त्रिया फारसा वापर करीत नसत, असे वाटते. पुत्रवती विधवा तर पुनर्विवाहाचा प्रश्न विचारातच घेत नसत. त्या व्रत-वैकल्ये करून पुण्यमार्ग आचरण्यात समाधान मानीत.

विधवाविवाहाचा निषेध करणाऱ्यांमध्ये मनू फार कडक आहे. पती मेल्यानंतर विधवेने अन्य पुरुषाचे नाव सुद्धा घेऊ नये, असे तो म्हणतो (५.१५७). पुढच्या स्मृतिकारांनी व निबंधकारांनी मनूचेच मत स्वीकारले आहे. इ. स.च्या ६ व्या शतकात विधवांच्या पुनर्विवाहाचा निषेध जवरदस्त झाला. तत्कालीन समाजानेही तो मानला. पूर्वीच्या शास्त्रकारांनी काहीही लिहिले असले तरी ते इतिहासजमा झाले आणि कलियुगाला ते लागू नाही, असे नवे शास्त्रकार प्रतिपादू लागले (लघुआश्व. २१.१४).

इ. स. च्या १० व्या शतकापासून बालविधवांनाही पुनर्विवाह वर्ज्य ठरले. विधवा शब्दाच्या अर्थाची व्याप्ती वाढविण्यात आली. वाङ्‌निश्चय केवळ वाणीने नव्हे, तर मनानेही झाला तरी त्या कन्येला विवाहित मानावे; तसेच विवाह होण्यापूर्वी वर मृत झाला तरी ती कन्या विधवा समजावी, इथवर धर्मशास्त्रकारांची मजल गेली. लघुआश्वलायनाने म्हटले आहे, की अशा कन्येशी न कळत कोणी विवाह केल्यास वस्तुस्थिती कळल्यावर त्याने तिचा त्याग करून स्वतः प्रायश्चित्त घ्यावे.

त्यामुळे बालविधवांची स्थिती अत्यंत शोचनीय झाली. त्यांच्यावर ब्रह्मचर्य सक्तीने लादले गेले. अशा वयात आलेल्या कित्येक बालविधवा ब्रह्मचर्य असह्य ठरल्यामुळे वाकड्या मार्गाला लागत आणि काही तर धनिक पुरुषांचा आश्रय करून विवाह न करताच त्यांच्या भोगदासी बनत.

विधवेला पतीच्या मिळकतीत वाटा असावा का नसावा या बाबतीतही धर्मशास्त्रकारांत मतभेद आहेत. आपस्तंब धर्मसूत्रात विधवेचे रक्षण वारसांनी करावे; पण तिला वारसा हक्क मिळू नये, असे म्हटले आहे. या उलट निपुत्रिक विधवेचा पतीच्या मिळकतीवर वारसा हक्क पोचतो, असे वृद्ध मनू व बृहस्पती यांनी म्हटले आहे. आणि प्रजापती, विश्वरूप, श्रीकर, जीतेंद्रिय, पारिजात, जीमूतवाहन व हरदत्त यांचीही वारसाहक्काला मान्यता आहे. अशा सर्व धर्मग्रंथांचा विचार करून विज्ञानेश्वराने मिताक्षरेत जो सिद्धान्त प्रस्थापित केला, तो असा —

निपुत्रिक विधवा सदाचरणी असेल, तर तिला आपल्या पतीची सर्व मिळकत मिळू शकते. तिने त्या मिळकतीचा उपभोग हयातभर घ्यावा; पण कोणाला ती मिळकत देणगी म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देऊ नये. तिच्या मृत्यूनंतर ती मिळकत दुसऱ्या वारसाकडे जाईल (याज्ञ. २.१३५ वरील मिताक्षरा टीका).

इ. स. च्या २० व्या शतकाच्या प्रारंभी सामाजिक बाबतीत विचारपद्धती बदलू लागली. शिक्षणाचा प्रचार वाढला. त्यामुळे ग्रंथप्रामाण्याचे महत्त्व कमी कमी होऊ लागले. सुशिक्षित लोक बुद्धिवादाला अनुसरून तर्कपद्धतीने विचार करू लागले. त्यामुळे विधवांकडे पाहण्याचा सुशिक्षित समाजाचा दृष्टिकोन बदलू लागला. माणूस म्हणून विधवांच्याकडे पाहिले जाऊ लागले. विधवाविवाहाबाबतही समाजाची अनुकूलता वाढू लागली.

सांप्रत काळी तर विधवाविवाह ही गोष्ट चर्चेचीसुद्धा राहिली नसून, ती एक वैयक्तिक बाब समजली जाते. त्याबाबतीत कोणीही कोणाला दोष देत नाही. पण हे सर्व आपोआप घडले नाही. त्यासाठी समाजाची निंदा व छळ सोसून बुद्धिवादी सुधारकांनी विधवांची स्थिती सुधारण्यासाठी जे दुर्दम्य प्रयत्न केले, त्यांचे हे फलित होय.

विधवाविवाहाच्या चळवळीला महाराष्ट्रात इ. स. १८४० च्या सुमारास आरंभ झाला. त्या वर्षी विष्णुशास्त्री बापट नावाच्या एका गृहस्थांनी 'पुनर्विवाहप्रकरण' नामक एक चोपडे प्रसिद्ध करून या विषयाला चालना दिली. नुसत्या बुद्धिवादाच्या गोष्टी सांगून लोकांची मने वळवीत बसण्यापेक्षा शास्त्रवचनांच्या आधाराने कोणत्याही सुधारणेचे समर्थन करता आल्यास समाजाच्या ते लवकर पचनी पडेल, या कल्पनेने काही शास्त्री-पंडितांनी धर्मग्रंथांचे परिशीलन करून, त्यांच्या आधारे सुधारणांचा पुरस्कार सुरू केला. विष्णुशास्त्र्यांचे उपरिनिर्दिष्ट पुस्तक हे त्या परंपरेतले होते. स्त्रीशिक्षण व पुनर्विवाह किंवा विधवाविवाह या विषयांचा थोडक्यात ऊहापोह या पुस्तकात केलेला आहे. त्यानंतर लोकहितवादींनी आपल्या निबंधांतून या विषयाला आणखी चालना दिली. विधवांच्या दुःस्थितीविषयी एतद्देशीय पुरुषांनी जरा तरी विचार करावा, भावनिक दृष्ट्या नाही तरी बौद्धिक दृष्टीने तरी विधवांची स्थिती आपण पालटायला हवी, असे सांगताना ते लिहितात--

"इतके दिवस तुम्ही स्त्रियांस या देशात दुःखात घातल्या. अजून तरी त्यांस या तुमच्या ब्राह्मणी पाशापासून सोडवावे. मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो, ब्रह्मदेवाचे का असेना. 'बुद्धिरेव बलीयसी' असे आहे. त्यापेक्षा तुम्ही जे उघड पाहता त्याचा बंदोबस्त शास्त्रात नाही म्हणून करीत नाही, हे योग्य नाही. शास्त्रास एकीकडे ठेवा. आपली बुद्धी चालवा. विचार करून पाहा. घातक वचनांवर हरताळ लावा. ह्या प्रसंग तुम्ही कसा जाणत नाही ? मी तुम्हां सर्वांस असे म्हणतो, की तुम्ही आपल्या मुली व बहिणी विधवा पाहता, तेव्हा तुम्हांस लाज वाटत नाही काय ? त्यांस सुखी करण्यास तुम्हांस सामर्थ्य आहे, परंतु तुम्ही करीत नाही हा मूर्खपणा आहे. तुम्ही आजपर्यंत बायकांचे शाप घेतलेत व पुढे घेता, त्याचे झाडे कोठे घाल ? "

इ. स. १८५७मध्ये बाबा पदमनजी यांनी यमुनापर्यटन नामक कादंबरी लिहिली. तिच्यात त्यांनी हिंदुस्थानातील विधवांच्या दुःस्थितीचे यथातथ्य चित्रण केले आहे. या ग्रंथाच्या प्रथमावृत्तीला श्री. दादोबा पांडुरंग यांनी विधवाश्रुमार्जन नावाचा एक संस्कृत निबंध जोडून त्याचा मराठी सारांश दिला आहे. या निबंधात दादोबांनी पुनर्विवाहासंबंधी शास्त्रीय विवेचन केले आहे.

त्यांच्या नंतर सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करण्यासाठी विष्णुशास्त्री पंडित हे पुढे झाले. त्यांनी विचार मांडले, ते असे-आपली संस्कृती जितकी उच्च तितकीच उदार आहे. मंत्रद्रष्ट्या ऋषींच्या पवित्र वचनांवर आपल्या धर्माची उभारणी झालेली आहे. तेव्हा त्यात अशा अन्याय्य व अमानुष रूढींना थारा मिळण्याचा मुळीच संभव नाही.

विष्णुशास्त्री पुढे वृत्तपत्रव्यवसायात शिरले. ते आरंभी इंदुप्रकाश साप्ताहिकाचे उपसंपादक झाले व पुढे संपादकही झाले. इंदुप्रकाशात त्यांनी बालविवाह, पुनर्विवाह, केशवपन, जरठकुमारीविवाह, इ. विषयांवर सांगोपांग व विवेचक लेख लिहून सुधारणाविरोधकांना निष्प्रभ करण्याचा उद्योग आरंभला. याच सुमारास मुंबईच्या 'परमहंस' सभेनेही, विधवांच्या विवाहास संमती असावी, असा ठराव संमत केला. इ. स. १८५६ मध्ये तत्कालीन इंग्रज सरकारने विधवाविवाहाचा कायदा करून या सुधारकांना बळ दिले.

इ. स. १८६६ मध्ये श्री. विष्णुशास्त्री पंडित यांनी पुण्यात पुनर्विवाहोत्तेजक मंडळीची स्थापना करून विधवा विवाहाच्या चळवळीला क्रियाशील रूप दिले. लवकरच या संस्थेच्या वतीने विष्णुशास्त्री पंडितांनी अनेक विधवाविवाह घडवून आणले व त्यांना न्यायमूर्ती रानडे, लोकहितवादी, गोपाळराव जोशी, इ. मंडळींनी पाठिंबा दिला. विष्णुशास्त्री एवढ्यावरच थांबले नाहीत. त्यांनी ब्राह्मणकन्याविवाह, विधवोद्वाहविवेक (संस्कृत), इ. ग्रंथही लिहिले.

विष्णुशास्त्री पंडितांप्रमाणेच महात्मा फुले, अण्णासाहेब कर्वे, पंडिता रमाबाई, गोपाळराव देवधर, गोपाळराव आगरकर, इ. थोर व्यक्तींनीही विधवाविवाहाला सर्वतोमुखी उत्तेजन दिले.

महाराष्ट्राप्रमाणेच बंगालमध्येही राजा राममोहन राय, ईश्वरचंद्र विद्यासागर, इ. धर्मसुधारकांनी विधवाविवाहाची चळवळ चालू केली. विधवेने आपल्या कुळाच्या मिळकतीत वाटा मागू नये, या स्वार्थी हेतूने बंगालमधले कित्येक लोक विधवेला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

स्त्रीने सहगमन करायला लावीत. या क्रूर चालीविरुद्ध राजा राममोहन यांनी रान उठवले. पुढे त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन सरकारने सतीबंदीचा कायदाच केला. त्यानंतर विधवांचे सहगमन थांबले; पण विधवांच्या पुढील जीवनाचा प्रश्न उपस्थित झाला. त्या वेळी राममोहन राय यांनी विधवा–विवाहाचा पुरस्कार केला. इ. स. १८८२च्या संवादकौमुदी नामक एका वृत्तपत्राच्या पहिल्याच अंकात त्यांनी विधवांसाठी फंड उभारण्याची एक योजना काढली व पुनर्विवाहाचे समर्थन करणारे एक पत्रकही प्रसिद्ध केले. खाजगी संभाषणांतून व सार्वजनिक भाषणांतून ते विधवा–विवाहाचा जोरदार पुरस्कार सतत करीत राहिले.

राजा राममोहन राय हे जसे सतीबंदीच्या सुधारणेचे प्रमुख नेते समजले जातात, तसेच ईश्वरचंद्र विद्यासागर हे विधवा–विवाहाच्या चळवळीचे बंगालमधील अग्रदूत मानले जातात. त्यांनी विधवांची दुःस्थिती सुधारण्यासाठी निधी उभारले, तरुण सुशिक्षितांना विधवांशी विवाह करण्यास प्रोत्साहित केले, विधवा-विवाह या विषयावर ग्रंथ लिहिले आणि व्याख्यानेही दिली. जे जे शक्य होते ते ते सर्व त्यांनी केले. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विधवांना पुनश्च संसार थाटता आला. [महाराष्ट्राचे उपेक्षित मानकरी– श्री. गं. बा. सरदार, १९४१; निबंध माला–खंड १, रवींद्रनाथ ठाकूर, १९६६; हि. ध.; धर्मशास्त्रविचार; धर्मविवादस्वरूप; पो. यी. हिं. सि.]

विधवाकर्तृकमहालय विधवेला महालय करण्याचा अधिकार आहे. तिच्या पतीची त्रयी, त्याच्या आईची त्रयी, पित्याची त्रयी आणि मातेची त्रयी या चार पार्वणांचा उल्लेख करून तिने संकल्प करावा असे सांगितले आहे. हा सर्व महालयाचा विधी तिने ब्राह्मणद्वारा करावा असे सांगितले आहे. विधवेने आपल्या मातेच्या वडिलांची त्रयी व त्याच्या मातेची त्रयी यांचाही निर्देश करावा, असेही एक मत आहे. पाहा– महालय पक्ष. [ऋ. ब्र. स.]

विशोकसप्तमी एक तिथिव्रत. सूर्य ही या व्रताची देवता आहे. व्रतावधी एक वर्ष. याचे विधान असे– माघ शुद्ध सप्तमीला व्रताचा आरंभ करावा आणि त्याच महिन्यापासून दर प्रत्येक शुद्ध सप्तमीला बारा पदार्थांपैकी एकेका पदार्थावर निर्वाह करावा. त्या पदार्थांची नावे अशी–रुईच्या फुलांचे शेंडे, गोमय, मिरे, जल, फळ, मुळा, नक्त पद्धतीने उपवास, एकभुक्त, दूध, उपवास, वायुभक्षण व तूप. काहींच्या मते हे व्रत विशोकाहून भिन्न आहे. [हि. ध.]

विधिपूजा एक काम्य व्रत. विधी म्हणजे ब्रह्मा. त्याची पूजा हा या व्रताचा मुख्य विधी आहे. पौष शु. द्वितीयेला जर गुरुवार असेल, तर त्या दिवशी यथाविधि ब्रह्म्याची पूजा करावी व नक्त भोजन करावे, असे ब्रह्मपुराणात सांगितले आहे. फल– संपत्तिलाभ. या व्रताचा दुसरा पर्याय भविष्योत्तर पुराणात सांगितला आहे, तो असा –

माघी आमावास्येला सकाळी स्नान वगैरे करून वस्त्राच्छादित वेदीवर वेद-वेदांगभूषित अशा ब्रह्मदेवाची गायत्रीसह पूजा करावी. नंतर दुमती गाय, सुवर्ण, छत्र, वस्त्र, जोडा, शय्या, अंजन, आरसा, इ. वस्तू देवाला अर्पण कराव्या व ब्राह्मणाला दान द्यावे. दुपारी इष्टमित्रांसह भोजन करावे. फल – पापनाश. [व्र. प.]

विनयचंद्रसूरी (इ. स. चे १३ वे शतक) एक जैन विद्वान व कवी. याने अपभ्रंश भाषेत बरेच साहित्य रचले आहे. त्याचे बारहव्रतरास हे त्रेपन्न कडव्यांचे काव्य उपलब्ध बारहमासी काव्यांतले पहिले आहे, असे म्हणतात. याशिवाय आणंद प्रथमोपासक संधी, नमिनाथ–चऊपाई, मल्लिनाथमहाकाव्य, पार्श्वनाथचरित व कल्पनिरुक्त या नावांचे याचे काही ग्रंथ उपलब्ध आहेत. [रा. सा. प.; गुज. सा. इ.; म. ज्ञा. को]

विनयपिटक त्रिपिटक या बौद्ध धर्मग्रंथाचे तीन विभाग असून, त्यांतील एका भागाचे नाव विनयपिटक असे आहे. विनय म्हणजे आचरणाचे नियम होत. गौतम बुद्धाच्या अनुयायांची संख्या जेव्हा वाढू लागली, तेव्हा त्यांचा निवास विहारात होऊ लागला. त्यामुळे भिक्षु-भिक्षुणींच्या आचारासंबंधी व बौद्धसंघासंबंधी काही नियम करणे आवश्यक ठरले. त्यासाठी बुद्धाने जे आचारसंविधान सांगितले, त्यांचा संग्रह विनयपिटकात आहे.

बुद्धाच्या निर्वाणानंतर बौद्ध धर्म स्थविर व महासांघिक अशा दोन संप्रदायांत विभागला गेला. काही काळाने पुन्हा त्यांच्या अठरा शाखा निर्माण झाल्या. त्या सर्व शाखांचे सुत्त, विनय व अभिधम्मपिटक असे ग्रंथ होते. काळाच्या ओघात यांतील काही शाखा व त्यांचे पिटक ग्रंथही नष्ट झाले. महासांघिक व स्थविरसंप्रदायातील सर्वास्तिवादी या शाखा तेवढ्या जिवंत राहिल्या. या दोन्ही शाखांचे आचार थोडेफार निरनिराळे आहेत.

स्थविरवादी–विनयपिटकात विभंग व खंधक असे दोन ग्रंथ असून, विभंग या ग्रंथाचे भिक्खु विभंग व भिक्खुनी-विभंग असे दोन भाग आहेत. सर्वास्तिवादी–विनयपिटक हे विभंग व विनयवस्तू अशा प्रकारे विभागले गेले आहे. या विभंगात भिक्खुविभंग व भिक्खुनीविभंग हे दोन पोटग्रंथ आहेत.

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS
CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विनयवस्तूत विनयमहावस्तू व विनयक्षुद्रकवस्तू असें ग्रंथ आहेत.

या दोन्ही विनयांचे अवलोकन केले तर असे दिसते, की विभंगाच्या संबंधात उभय संप्रदायांचे एकमत आहे. परंतु दुसऱ्या भागाला स्थविरवादी खंधक म्हणतात, तर सर्वास्तिवादी विनयवस्तू म्हणतात. साकल्याने दोन्ही विनय-पिटकांतील वर्णित विषयांचा संक्षेप-विस्तार जवळ जवळ सारखाच आहे. फरक इतकाच, की स्थविरविनयात भिक्षूंसाठी सर्वास्तिवाद्याहून पस्तीस व भिक्षुणींसाठी साठ नियम कमी आहेत.

सम्राट अशोकाच्या काळात सर्वास्तिवाद्यांच्या विनयपिटकांचे संस्कृत रूपांतर झाले. नंतर कनिष्काने एक विद्वत्सभा भरवून त्रिपिटक लेखबद्ध केले. त्यावर विभाषा नावाच्या टीकाही करविल्या. त्यामुळे या संप्रदायाचे लोक पुढे वैभाषिक या नावाने ओळखले जाऊ लागले.

हा आचारप्रधान ग्रंथ विभंग, खंधक व परिवार अशा प्रकारे विभागला आहे. विभंगाला पातिमोक्ख असेही म्हणतात. त्यात पापांची यादी दिली असून, त्या पापांचे पाराजिक व पाचित्तिय असे दोन प्रकार सांगितले आहेत. पाराजिक पापे करणाऱ्याला संप्रदायातून बहिष्कृत करण्यात येत असे. पाचित्तिय पापे करणारा प्रायश्चित्ताने शुद्ध होत असे. पाराजिक पापांत मैथुन, मनुष्यहत्या, इ. पापांची गणना केली जाते; तर पाचित्तियांत मद्यपान, परनिंदा, प्राण्यांची हिंसा, झगडे, इ. पापे येतात. प्रत्येक अमावास्येला व पौर्णिमेला विभंगाचा पाठ करण्याची पद्धत होती. विभंग हा विनयपिटकाचा सारभूत भाग होय.

खंधकाच्या महावग्ग व चुल्लवग्ग या प्रधान खंडांपैकी पहिल्यात बौद्धसंघाच्या विकासाची माहिती आहे. शिवाय संप्रदायप्रवेश, उपोसथविधी, बुद्धचरित्र, त्याचा पहिला उपदेश, गोतमपुत्र राहुलाच्या दीक्षेचे वर्णन, इ. मजकूर आहे चुल्लवग्गात बुद्धानुयायांच्या दिनचर्येचे नियम, अनार्थपिंडिक व देवदत्त यांच्या कथा आणि भिक्षुणीसंघाच्या स्थापनेचे वर्णन आहे.

परिवार विभागात याच नियमांचे पुन्हा संक्षेपाने वर्णन आले आहे. हा भाग अशोककालीन आहे, असे म्हणतात. यावरून विनयपिटकातील सर्वच वचने बुद्धमुखातली नाहीत, असे म्हणता येते.

बौद्धकालीन भारतीय समाजाच्या अभ्यासासाठी हा एक उपयुक्त ग्रंथ आहे. त्यात तत्कालीन वेषभूषा, आभूषणे, राजनीती, इ. विषयांची माहिती आढळते. पाहा– त्रिपिटक. [विनय-पिटक– संपा. राहुल सांकृत्यायन; बौ. द. मी.; बौ. का. भा.; बु. द.; पा. सा. इ.; आजकल, वार्षिक अंक, डिसेंबर १९५६]

विनयवाद जैन साहित्यात अनेक पंथांचा उल्लेख असून, महावीराने त्या पंथांचे चार वर्गांत विभाजन केले असल्याचे सांगितले आहे. त्यांतील एका वर्गाला विनयवाद असे नाव आहे. विनयवादी लोक बाह्योपचाराचे विधिनियम किंवा धर्मग्रंथ यांना महत्त्व देत नाहीत. आदरभाव हाच पूर्णत्वाला जाण्याचा श्रेष्ठ मार्ग आहे, असे ते मानतात. ईश्वर, साधू, मानव, वृद्ध व्यक्ती, कनिष्ठ व्यक्ती, माता, पिता आणि स्वामी या आठांपैकी कोण्या एकाविषयी आदरभाव दाखवणे आणि वाणी, तन, मन व धन या चार साधनांनी तो व्यक्त करणे, यामुळे या पंथाचे एकूण बत्तीस उपपंथ होतात. [स्कू. से. जै. लि.]

विनयविजय (इ. स. चे १७ वे शतक) एक श्वेतांबर जैन साधू व जैन तत्त्वज्ञानाचा पंडित. कीर्तिविजय हा याचा गुरू होय. याचे अध्ययन काशीत झाले. विनयविजयाने संस्कृत व गुजराती भाषेत बरीच ग्रंथरचना केली आहे. लोकप्रकाश व कल्पसूत्रावरील सुखबोधिनी टीका हे त्याचे संस्कृत ग्रंथ प्रसिद्ध आहेत. नेमिनाथ भ्रमरगीतास्तवन, नेमिनाथ बारमास स्तवन, इ. त्याचे गुजराती ग्रंथ होत. याची काही हिंदी पदेही उपलब्ध आहेत. पुण्यप्रकाशस्तवनम् व पंचसमवायस्तवनम् हे याचे दोन भक्तिपर ग्रंथ होत. [हिं. सा. २.; हिं. जै. भ. क.]

विनयसमुद्र (इ. स. चे १६ वे शतक) एक जैन भक्तकवी. हा उपकेशगच्छाचा अनुयायी असून, हर्षसमुद्राचा शिष्य होता. याचे विक्रमप्रबंध चौपाई, आरामशोभा चौपाई, इ. आठ ग्रंथ उपलब्ध आहेत. हे सारे ग्रंथ हिंदीत असून, त्यांवर गुजराती भाषेचा प्रभाव आहे. [हिं. जै. भ. क.]

विनायक गणपतीचे एक नाव. विनायकाच्या पाषाणाच्या किंवा पंचरसी धातूच्या विविध प्रकारच्या मूर्ती आढळतात. तंजाऊर जिल्ह्यातील नागपट्टिनम येथील कयरोगण स्वामीच्या मंदिरात पंचमुखी व दशभुज अशी विनायकाची मूर्ती आहे. शुचींद्रम येथे विघ्नेश्वरी या स्त्रीरूपी विनायकाची मूर्ती आहे. वेदारण्यम येथे नर्तक विनायकाची प्रतिमा आहे. मदुरेच्या एका मंदिरात, एका स्तंभावर व्याघ्रपाद विनायकाची मूर्ती कोरलेली आहे. तिचे शरीर स्त्रीचे असून, पाय व पावले वाघाची आहेत. सर्वसाधारणपणे विनायकाची मूर्ती चतुर्भुज किंवा दशभुज करतात. तिच्या हातांत शंख, चक्र, गदा व पद्म ही आयुधे असतात. पाहा–गणपती. [इलस्. वीकली १४ सप्टें. १९५८]

विनायकगण मानवगृह्यसूत्र, बौधायनगृह्यसूत्र, वैजवापगृह्यसूत्र, याज्ञवल्क्यस्मृती, इ. ग्रंथांत विनायकगणाची माहिती आलेली आहे. मानवगृह्यसूत्रांत शालकं-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कद, कूष्मांडराजपुत्र, उस्मित आणि देवयजन असे चार विनायक सांगितले आहेत. बैजवापगृह्यसूत्रांत मित, संमित, शालकटंकट व कूष्मांडराजपुत्र अशी त्यांची नावे दिलेली आहेत. काही ग्रंथांत या गणांची संख्या सहा मानलेली असून, शाल, कटंकट, मित, संमित, कूष्मांड व राजपुत्र अशी त्यांची नावे आहेत.

हे विनायक म्हणजे दुष्ट पिशाच असून, ते माणसांना पछाडतात. अशा माणसांना वाईट स्वप्ने पडतात. त्यांनी पछाडलेला राजपुत्र लायक असला, तरी त्याला राज्य मिळत नाही. मुलगी गुणी असली, तरी तिला पती मिळत नाही. विवाहित स्त्रीला मूल होत नाही. प्रत्येक व्यवहारात अपयश येते. म्हणून या विनायकगणांची शांती करावी, असे सांगितले आहे.

विनायकाच्या चरित्रातील ही पहिली अवस्था असून, त्यात त्याचे काही क्रूर स्वभावविशेष मूळच्या विनायकाच्या स्वभावाशी जोडून देण्यात आलेले आहेत.

विनायकचरित्रातील दुसरी अवस्था याज्ञवल्क्यस्मृतीत सांगितलेली आहे. ब्रह्मा आणि रुद्र यांनी विनायकाला गणांचा अधिपती नेमले. या अवस्थेत तो लोकांच्या अंगीकृत कार्यात विघ्ने आणतो, त्याचप्रमाणे त्यांना यशप्राप्तीही करून देतो, असे म्हटले आहे. मित, संमित, इ. एकाच विनायकाची चार नावे असून, अंबिका ही त्यांची माता आहे, असे याज्ञवल्क्याने म्हटले आहे. बोधायन गृह्यशेषसूत्रांत त्याला भूतनाथ, हस्तिमुख आणि विघ्नेश्वर ही नावे दिलेली असून, त्याला अपूप आणि मोदक अर्पण करावे, असे सांगितले आहे. विनायकाच्या मूर्ती कशा कराव्या, ते मत्स्यपुराणात (२६०.५२–५५) सांगितले आहे.

काशी क्षेत्रात विश्वेश्वराच्या सभोवार आठ आवरणांत प्रत्येकी आठ असे छपन्न विनायक आहेत. या सर्वांचा अधिपती ढुंढिराज हा होय. महाराष्ट्रात अष्ट विनायक क्षेत्रे प्रसिद्ध आहेत. पहा–विनायकशांती. [हि. ध.; मं. मू. श्री.]

विनायकचतुर्थी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला विनायकचतुर्थी म्हणतात. विनायकचतुर्थी नावाचे एक व्रतही आहे. त्याचा विधी असा – व्रतधारी व्यक्तीने प्रत्येक चतुर्थीला तिळाचा खाद्यपदार्थ दान द्यावा आणि स्वतः त्यावरच निर्वाह करावा. रात्री पाणी प्यावे. व्रतावधी दोन वर्षे. फल– इच्छित फलप्राप्ती. [हि. ध.]

विनायकव्रत एक तिथिव्रत. फाल्गुन शुद्ध चतुर्थीला या व्रताचा प्रारंभ करतात. विनायक ही या व्रताची देवता आहे. याचा विधी असा – चार महिने प्रत्येक शुद्ध चतुर्थीला नक्तभोजन करावे, तिळांचा होम करावा, तीळ दान द्यावे. उद्यापनाच्या वेळी पाचव्या महिन्यात विनायकाची सोन्याची मूर्ती, पायसाने भरलेली चार ताम्रपात्रे व एक तिलपात्र यांचे दान द्यावे. फल – विघ्नपरिहार व शिवलोकप्राप्ती. [हि. ध.]

विनायकशांती उपनयन, विवाह, इ. कार्ये निर्विघ्न समाप्त व्हावी, सपिंडांचा मृत्यू यासारख्या प्रतिकूलांची निवृत्ती व्हावी, तसेच संपत्ती प्राप्त व्हावी व रोगपरिहारही व्हावा म्हणून विनायकशांती करतात. याज्ञवल्क्य, बृहत्पराशर, इ. स्मृतींमध्ये; तसेच विष्णुधर्म, भविष्य, इ. पुराणांत या शांतीचा विधी दिलेला आहे, तो असा –

शुभ दिनी यजमानाने संकल्पपूर्वक शांतिविधीला प्रारंभ करावा. आचार्यवरण व ऋत्विग्वरण केल्यावर सारवलेल्या जमिनीवर पूर्वेला कलशाची स्थापना करावी व त्याच्यावर पूर्णपात्र ठेवावे. याचप्रमाणे आचार्याने दक्षिण, पश्चिम व उत्तर या दिशांनाही कलश मांडून त्यांच्यावर वरुणाचे आवाहन करावे. नंतर ग्रहांचे आवाहन व पूजन करावे. मग आचार्याने अग्निस्थापना करून ईशान्य दिशेला एक पीठ तयार करावे आणि त्याच्यावर विनायक व अंबिका यांच्या प्रतिमा मांडाव्या. मग त्यांचे यथाविधि आवाहन व पूजन करावे.

नंतर यजमानाने अग्नीची स्थापना व अन्वाधान करावे. नंतर मित, संमित, शाल, कटंकट, कूष्मांड, राजपुत्र, व्योमकेश, पार्वती, इ. देवतांसाठी हविर्द्रव्याचा निर्वाप करून त्याचे प्रोक्षण करावे व हवन करावे. मग आचार्याने यजमानाला एका उच्च आसनावर म्हणजे पीठावर बसवावे व ब्राह्मणांनी त्याला आशीर्वाद द्यावे. नंतर ऋत्विजांनी दिलेला एकेक कुंभ हातात घेऊन आचार्याने यजमानाला अभिषेक करावा. त्या वेळी वेदोक्त व पुराणोक्त मंत्र म्हणावे.

नंतर यजमानाने स्नान करून शुभ्र वस्त्रे परिधान करावी व आचार्यासह विनायकाला व अंबिकेला बलिसमर्पण करावे. त्यात गूळ, मध व पीठ यांपासून तयार केलेल्या पुऱ्या, मुळे, दहीभात, पायस, लाडू, खरे मासे किंवा उडदांच्या पिठाचे मासे, शिजवलेले व कच्चे मांस किंवा उडदाचे पदार्थ, सुगंधी पुष्पे, चंदनादी सुगंधी द्रव्ये, इ. पदार्थ असावे. नंतर देवतांची उत्तरपूजा करून त्यांचे विसर्जन करावे.

यजमानाने आचार्य व ऋत्विज यांना दक्षिणा द्यावी. ब्राह्मणभोजन घालावे. [सं. कौ.; श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

विनायकी चतुर्थी एक तिथिव्रत. प्रत्येक महिन्यातील शुद्ध चतुर्थीला हे नाव आहे. ही मध्याह्नकालव्यापिनी घेतात. दोन दिवस ही चतुर्थी असल्यास पहिली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घेतात. ही तृतीयायुक्त असल्यास अधिक चांगली. या दिवशी गणेशाची पूजा हा प्रधानविधी असतो. मुख्यतः गाणपत्य संप्रदायाचे अनुयायी हे व्रत करतात. चतुर्थीला संपूर्ण उपवास करून, दुसऱ्या दिवशी पारणे करायचे असते.

विनायकी लिपी एक सांकेतिक लिपी. या लिपीत वैद्यकावरील काही ग्रंथ लिहिलेले आढळतात. या लिपीतील स्वर व स्वरचिन्हे बालबोध देवनागरी लिपीतील स्वर व स्वरचिन्हे यांसारखीच आहेत; पण व्यंजने मात्र सांकेतिक आहेत. इतर सांकेतिक लिप्या व ही लिपी यांत फरक आहे. इतर सांकेतिक लिप्यांत एका वर्णाबद्दल दुसरा वर्ण योजलेला असतो. पण ते दोन्ही वर्ण देवनागरी लिपीतीलच असतात. पण या विनायकी लिपीत एका वर्णासाठी निराळेच एक सूचक चिन्ह वापरलेले आहे. त्यामुळे हिच्यातील वर्णांत व देवनागरीतील वर्णांत आकृतिसाम्य अजिबात नाही.

संयुक्त वर्णांच्या बाबतीत या लिपीचे पूर्वकालीन अशोक लिपीशी व आधुनिक मोडी लिपीशी अतिशय साम्य आहे. देवनागरीत किंवा बालबोधीत स्वरविरहित व्यंजनांचा अर्धा उच्चार होतो व त्या उच्चारानुरूप ते व्यंजन अर्धे लिहितात. पण अशोक लिपीत, मोडी लिपीत किंवा विनायकी लिपीत तसे अर्धे रूप लिहिण्याची सोय नाही. उदा० ख्य (ख्+य्+अ) हे जोडाक्षर देवनागरीत किंवा आधुनिक बालबोधीत अर्धा ख काढून व त्याला य जोडून लिहितात. पण विनायकी लिपीत अर्धा ख काढण्याची सोय नाही. तिच्यात ख्य आणि खय या दोहोंचे स्वरूप एकच आहे. या लिपीचा चित्रपट भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३४ च्या अहवालामध्ये दिलेला आहे. [म. ज्ञा. को.]

विनुकोंडा अंकम्मा द. भारतातील एक ग्रामदेवता. एका धनगराच्या घरी हिचा जन्म झाला, अशी समजूत आहे. ही फार हसतमुख मुलगी होती. एक दिवस ही अचानक अदृश्य झाली. त्या पाठोपाठ गावात पटकी सुरू झाली. लोकांना वाटले, की अंकम्मा मरण पावली असावी व तिचे भूत झाले असावे. लवकरच तिचे भूत एका भगताच्या अंगात आले आणि तिने 'माझी पूजा करा, म्हणजे साथ जाईल,' असा आदेश दिला. तेव्हापासून हिची पूजा सुरू झाली असावी. ही माणसांशी मैत्रीने वागते, असे म्हणतात.

आंध्र प्रदेशातील कृष्णा जिल्ह्यात विनुकोंडा नावाचा एक प्रसिद्ध किल्ला आहे. त्या किल्ल्याच्या परिसरात हिचे ठाणे असावे. म्हणून हिला विनुकोंडा अंकम्मा हे नाव प्राप्त झाले असावे, असेही म्हणतात. [द्र. गॉ. मॉ. हिं.]

विनोदीलाल (जन्म इ. स. १६२१) एक जैन भक्तकवी. याचा जन्म गर्गगोत्री अग्रवाल कुळात झाला. हा अवध प्रदेशातल्या गंगाकाठच्या शाहिजादपूर नावाच्या गावी राहत होता. याच्या वडिलांचे नाव दुर्गमल असे होते. लहानपणापासूनच त्याचा भक्तिमार्गाकडे ओढा होता. त्याची ही भक्तिमयता त्याच्या काव्यात सर्वत्र विखुरलेली दिसते. विनोदीलाल नेमिनाथाचा परमभक्त होता. त्याच्या रचनेतील अधिकांश भाग नेमिनाथस्तुतीसाठीच खर्ची पडला आहे. विवाहमंडपाच्या बाहेरूनच परतलेला नेमिनाथ आणि त्यामुळे विलाप करणारी राजुल हे त्याचे आवडते विषय आहेत. त्याने नेमि-राजूल, बारहमासा, नेमिब्याह ही लघु खंडकाव्ये; तसेच राजुलपच्चीसी, फूलमालपच्चीसी, नेमजी रेखता, प्रभात जयमाल, जिनस्तवन, इ. काव्ये रचली आहेत. याशिवाय नौकाबंध, सम्यक्त्वकौमुदी, विष्णुकुमारमुनिकथा, श्रीपाल विनोद हे त्याचे अन्य साहित्य होय. भक्तामरस्तोत्रकथा किंवा भक्तामरचरित या नावाचे अनुवादात्मक काव्य त्याने रचले आहे. विनोदीलालच्या वाङ्मयाची भाषा हिंदी असून, ते सारेच प्रकाशित झालेले नाही. [हिं. सा. २; हिं. जै. भ. क.]

विपाशा एक नदी. ही पंजाबमधील आधुनिक विआस नदी होय. याच नदीला ग्रीक लोक हिफासिस, हिपानिस किंवा विपासिस असे म्हणत. ऋग्वेदात या नदीचा फक्त दोनदा उल्लेख आलेला आहे आणि इतर वैदिक वाङ्मयात तिचा मुळीच उल्लेख नाही. यावरून वैदिक आर्यांना या नदीचे फारसे महत्त्व वाटत नव्हते, असे मॅकडोनेल याने म्हटले आहे. या नदीला निरुक्तात उरुंजिरा असे नाव दिलेले आहे. वेदोत्तर वाङ्मयात ही विपाशा या नावाने ओळखली जाते. प्राचीन काळापेक्षा या नदीचा प्रवाह सांप्रत बराच बदलला आहे.

ऋग्वेदात (३.३३.१) या नदीचा उल्लेख आहे. तिथे शुतुद्री आणि विपाशा यांच्या संगमावर विश्वामित्र आला असून, तो त्यांच्याशी संवाद करतो आहे व त्या नद्यांचा पुढे सिंधू नदीशी संगम झाला आहे, असे वर्णन आहे. निरुक्तकारांनी मात्र, वाट देण्यासाठी विश्वामित्राने त्यांची प्रार्थना केली, असे म्हटले आहे.

महाभारतात या नदीला हे नाव का मिळाले, त्या संबंधीची कथा दिली आहे, ती अशी – आपले चार पुत्र विश्वामित्राने मारले, म्हणून वसिष्ठाला फार दुःख झाले आणि त्याने आत्मघात करायचे ठरवले. त्याने आपले हातपाय बांधले आणि स्वतःला नदीच्या प्रवाहात झोकून दिले. पण नदीच्या वेगवान प्रवाहाने त्याचे पाश मोकळे केले (विगत + पाश) आणि

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…चे संरक्षण केले, म्हणून या नदीला विपाशा हे नाव मिळाले. …मार्कंडेयपुराणात (५७.१८) या नदीचा उल्लेख आहे. रोहटांग …खिंडीतील पीरपंजाल पहाडात या नदीचा उगम आहे. चंबा गावा…पासून नैर्ऋत्य दिशेला वाहत जाऊन ती शुतुद्री नदीला मिळते. …पाणिनीच्या अष्टाध्यायीत (४.२.७४) हिचा निर्देश आहे.

[…इं. इं.; वै. सा.; हि. जॉ. ए. इं.]

…विप्रनारायण तोंडरडीपोडी

(इ. स. चे ८ वे शतक) द. भारतातील एक आळवार …त. याचा जन्म एका उच्च ब्राह्मणकुलात झाला. याने लहान …पणातच शास्त्राध्ययन पुरे केले आणि तमिळ व संस्कृत भाषांत …पांडित्य मिळविले. त्यानंतर श्रीरंगमजवळच्या एका गावी राहून …तो भगवान श्रीरंगनाथाची भक्ती करू लागला. या वेळी त्याच्या …आयुष्यात एक घटना घडली आणि तो रंगनाथाचा अनन्य भक्त …झाला. ती घटना अशी –

…भगवान रंगनाथाच्या मंदिरात देवदेवी नावाची एक अत्यंत …सुंदर देवदासी राहत होती. एक दिवस ती आपल्या बहिणीसह …विप्रनारायणाच्या बागेत गेली. त्या वेळी विप्रनारायण तोंडाने …भगवंताची स्तुतिस्तोत्रे गात पूजेसाठी फुले व तुळशी तोडीत …होता. देवदेवीच्या बहिणीने तिला या भक्ताच्या हृदयात काम…वासना उत्पन्न करण्याचा आग्रह केला. देवदेवीने ते मान्य केले …आणि माघातील एका शीत रात्री विप्रनारायणाच्या झोपडीचा …दरवाजा ठोठावला. आपण अडचणीत असल्याचे सोंग करून तिने …त्या रात्रीपुरता त्याच्या झोपडीत आश्रय मागितला. त्याने तो …दिला. तिचे लावण्य पाहून त्याचे चित्त विचलित झाले आणि …तिच्यावर तो मोहित झाला. भगवंताला त्याची दया आली. त्याने …त्याला या मोहातून मुक्त करायचे ठरवले.

…एका रात्री एका व्यक्तीने आपण विप्रनारायणाचा सेवक …असल्याचे सांगून देवदेवीच्या घरी एक सोन्याची थाळी नेऊन …दिली. परंतु दुसऱ्या दिवशी ती रंगनाथाच्या मंदिरातील थाळी …असल्याचे निष्पन्न झाले. विप्रनारायणाला चोरीच्या अपराधा…वरून पकडून कारागृहात ठेवण्यात आले. त्या वेळी रंगनाथाने …राजाला स्वप्नदृष्टान्त देऊन चोरीचा अपराध आपल्यावर घेतला …व विप्रनारायणाची कारागृहातून मुक्तता करायला सांगितले.

…या प्रसंगामुळे विप्रनारायणाच्या अंतरात खऱ्या भक्तीचा …उदय झाला. तो मंदिरात येणाऱ्या भक्तांच्या चरणधूली धारण …करू लागला. त्यामुळे लोक त्याला 'भक्तपदरेणू' म्हणू लागले. …त्याने आपले सर्व उर्वरित आयुष्य भगवद्भक्तीत घालवले. …देवदेवीनेही आपली सर्व संपत्ती मंदिराला दान दिली आणि …रंगनाथाच्या सेवेत आपले आयुष्य वेचले. [भा.सं.; त. प्र. हिं. कृ.]

विप्रलब्धा

संस्कृत साहित्यातील एक नायिकाभेद. हिचे लक्षण रसमंजरीत दिले आहे, ते असे–'सङ्केत–निकेतने प्रियमनवलोक्य समाकुलहृदया विप्रलब्धा' = संकेतस्थळी प्रियकर आलेला नाही असे पाहून जिचे हृदय व्याकुळ झाले आहे, अशी नायिका विप्रलब्धा होय. भरताने हिचा सर्वप्रथम उल्लेख केला आहे. निश्वास टाकणे, सख्यांची निंदा करणे, भय वाटणे, अश्रू ढाळणे,

विप्रलब्धा नायिका

मूर्च्छा येणे, इ. तिच्या चेष्टा सांगितल्या आहेत. नायिकाभेदानुसार विप्रलब्धेचेही अनेक भेद आहेत. त्यांपैकी प्रगल्भ विप्रलब्धेचे उदाहरण असे –

शून्यं कुञ्जगृहं निरीक्ष्य कुटिलं विज्ञातचेतोभवं
दूती नापि निवेदिता सहचरी पृष्टापि नो वा तया।
शम्भो शङ्कर चन्द्रशेखर हर श्रीकण्ठ शूलिन् शिव
त्रायस्वेति परन्तु पङ्कजदृशा मगंस्य चक्रे स्तुतिः॥

अर्थ –कुंजगृह रिकामे आहे असे पाहून आणि मदन हा कुटिल आहे, हे जाणून तिने दूतीला काही सांगितले नाही किंवा सखीलाही काही विचारले नाही. तिने फक्त हे शंकरा, मला तार, असे म्हणून शंकराची स्तुती केली. [हिं. सा. को.]

विभूतिद्वादशी व्रत

एक विष्णुव्रत. चैत्र, वैशाख, आषाढ, श्रावण, कार्तिक किंवा मार्गशीर्ष या महिन्यात या व्रताला प्रारंभ करतात. या व्रताचा विधी असा–

शुद्ध दशमीला अल्पाहार करून रात्री 'नमो नारायणाय' अशी प्रार्थना करून निजावे. एकादशीच्या दिवशी स्नान झाल्यावर गायत्री मंत्राचा एकशे आठ वेळा जप करावा व विष्णूची पूजा करावी. सोन्याच्या कमळासह एक मत्स्य करून त्याची उदकुंभावर स्थापना करावी. रात्री जागरण करावे. दुसऱ्या दिवशी द्वादशीला तीळ व गूळ भरलेले एक पात्र, सुवर्णकमळ व मत्स्य

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

यांचे ब्राह्मणाला दान करावे. प्रत्येक महिन्यात हे व्रत करावे. त्या वेळी दशावतारांतील विष्णूची दहा नावे आणि दत्तात्रेय व व्यास मिळून बारा नावांपैकी एकेक नाव घेऊन विष्णूची पूजा करावी. वर्षअखेर आचार्यांची वस्त्रालंकारांनी पूजा करावी व ब्राह्मणांना दाने द्यावी. फल– व्याधी व दारिद्र्य यांचा नाश आणि वैभवप्राप्ती. [मत्स्यपुराण]

विभ्राज सौर्य एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे सत्तरावे सूक्त याने रचले आहे. सूर्यस्तुती हा या सूक्ताचा विषय असून, सूक्ताची देवताही सूर्यच आहे. याची एक ऋचा (१०.१७०.२) अशी–

विभ्राड् बृहत् सुभृतं वाजसातमं धर्मन् दिवो धरुणे सत्यमर्पितम् ।
अमित्रहा वृत्रहा दस्युहन्तमं ज्योतिर्जज्ञे असुरहा सपत्नहा ।।

अर्थ – द्युलोकाचा आधार, अशा व्यापक आणि बलसंपन्न सूर्याचे अविनाशी, असुरशत्रुनाशक, मेघोद्भेदक आणि दस्युसंहारक तेज उत्पन्न होत आहे.

या सूक्ताच्या चौथ्या ऋचेत विश्वरक्षक व देवरक्षक सूर्य आपल्या तेजाने त्रैलोक्याचे पोषण करतो, असा उल्लेख आहे. [ऋ. म. भा.; प्रा. च. को.]

विमद ऐंद्र प्राजापत्य एक सूक्तद्रष्टा. याला वसुकृत वासुक्र असेही म्हणतात. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील वीस ते सव्वीस ही सात सूक्ते याने रचली असून, त्यात अग्नी, इंद्र, सोम व पूषा यांची स्तुती आहे. याची एक ऋचा (१०.२३.५) अशी–

यो वाचा विवाचो मृध्रवाचः पुरू सहस्रा शिवा जघान ।
तत्तदिदस्य पौंस्यं गृणीमसि पितेव यस्तविषीं वावृधे शवः ।।

अर्थ – स्वतःच्या नेत्रसामर्थ्याने सहस्रावधी वाचाट शत्रूंना ठार मारणाऱ्या, सृष्टिबलवर्धक आणि पितृवत्सल इंद्राचे आम्ही स्तवन करतो.

विमदाचा स्पष्ट नामोल्लेख ऋग्वेदात आढळतो (१०. २०. १०; २३. ७). इंद्राची व अश्विनीकुमारांची त्याच्यावर कृपा आहे. त्याला इंद्र व प्रजापती यांचा मानसपुत्र मानतात, म्हणूनच तो इंद्र व प्राजापत्य या पैतृक नावांनी ओळखला जातो. पुरुमित्राची मुलगी कमद्यू ही याची पत्नी होती. तिने याला स्वयंवरात माळ घातली होती. त्या वेळी उपस्थित असलेल्या राजांनी असूयेमुळे याच्याशी युद्ध केले, पण अश्वीदेवांनी विमदाला साहाय्य करून, त्याच्या शत्रूंचा पराभव केला आणि कमद्यूला रथातून त्याच्याकडे पोचते केले.

काही अभ्यासकांच्या मते सूक्तद्रष्टा विमद आणि अश्वींचा कृपापात्र विमद या दोन भिन्न व्यक्ती आहेत. लुडविग्च्या मतानुसार या दोन्ही व्यक्ती एकच आहेत. वत्स, काण्व व विमद यांचा एकत्रित निर्देशही ऋग्वेदात केलेला आहे (८. ९. १५). [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

विमलनाथ जैनांचा तेरावा तीर्थंकर. याच्या पित्याचे नाव कृतवर्मा व मातेचे नाव सुरम्या असे होते. जन्मस्थान कांपिल्य. जन्मनक्षत्र उत्तराषाढा. लांच्छन रानडुक्कर. ज्ञानवृक्ष जंबू. मोक्षस्थान पारसनाथ पर्वत. यक्ष षण्मुख. यक्षिणी वैरोटी; (श्वेतांबर मते विदिता.)

हा गर्भात असता याच्या आईची काया आणि बुद्धी दोन्ही निर्मल झाली, म्हणून त्याचे नाव विमलनाथ असे ठेवले, अशी त्या नावाची व्युत्पत्ती दिलेली आहे.

त्याच्या मातेची मती कशी विमल झाली होती, त्याबद्दल एक कथा सांगतात, ती अशी –

एकदा एका देवळात एक जोडपे उतरले होते. तिथे एक स्त्री-पिशाच राहत होते. त्या पिशाचिनीचे त्या पुरुषावर प्रेम जडले. ती त्याच्या पत्नीचे रूप घेऊन तिथे आली. तेव्हा पुरुषाला आपली खरी पत्नी कोणती ते कळेना. त्याने कृतवर्मा राजाकडे गाऱ्हाणे नेले. पण राजालाही निर्णय देता येईना. त्या वेळी त्याची गर्भवती राणी सुरम्या पुढे आली. तिने त्या पुरुषाला त्या दोन्ही स्त्रियांपासून हात पुरणार नाही, इतक्या अंतरावर उभे केले. आणि त्या दोन्ही स्त्रियांना आपल्या जागेवरून न हालता त्याला स्पर्श करायला सांगितले. खऱ्या बायकोचा हात नवऱ्यापर्यंत पोचला नाही. पिशाच स्त्रीने मात्र आपला हात खूप लांब करून त्या पुरुषाला स्पर्श केला. केवळ पिशाचच असल्या गोष्टी करू शकतात, असे सांगून राणीने पहिली स्त्री खरी, असा निर्णय दिला. तिची बुद्धी योग्य निर्णय देण्याइतकी स्वच्छ (विमल) झाली, याचे कारण तिच्या उदरातील तीर्थंकराचा गर्भ हे होय.

विमलनाथाच्या बुद्धीची तीक्ष्णता दर्शविण्यासाठी डुक्कर हे त्याचे लांच्छन ठरविण्यात आले. कारण डुकराचे सुळे तसेच तीक्ष्ण असतात. [जै. इ.]

विमलनाथपुराण कृष्णदासविरचित एक जैन पुराण. यात जिनस्तुती, सज्जनस्तुती, राजगृहवर्णन, मगधराज श्रेणिकाचे वर्णन, त्याचा निर्वेद व परिव्रज्याग्रहण, त्याचे महावीराजवळ गमन, विमलनाथपुराणाविषयी त्याची जिज्ञासा, कपिलपुराधिप कृतवर्मा व त्याची राणी यांना ज्येष्ठ वद्य दशमीला पुत्रप्राप्ती, इंद्रादी देवगणाकडून त्याचा अभिषेक, विमलनाथ हे नामकरण, त्याची दीक्षा, निष्क्रमण, मेरुमंदरावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

...त्याने केलेला ब्रह्मज्ञानोपदेश, त्याचे निर्वाण, इ. विषय ...आहेत. [हिंदुत्व]

एक विद्वान बौद्ध धर्मप्रचारक. इ. स. ४०६ ते विमलाक्ष ४१३ या काळात त्याने कुमारजीवाबरोबर उत्तर ...मध्ये राहून तिथे बौद्ध धर्माचा प्रचार केला. त्याने काही ...ग्रंथांचा चिनी भाषेत अनुवादही केला आहे. कुमारजीवाच्या ...त्याने चिनी विद्वानांत प्रसार केला. कुमारजीवाच्या मृत्यू-...तो दक्षिण चीनमध्ये गेला आणि तिथेच शेवटपर्यंत धर्म-...प्रचार करीत राहिला. [रोचक पंडित, धर्मयुग, २८ जून १९६४]

(१) आकाशात संचार करणारे वाहन. या शब्दाचा विमान अर्थ पक्षीसदृश असा आहे. वेदांत विमान नामक ...चा निर्देश आढळतो; ते यंत्र म्हणजे पक्ष्याप्रमाणे आकाशात ...संचार करणारे यानच असावे. पूर्वी गरुड, मोर, इ. पक्ष्यांसारखी ...त्याने बनवीत असावे. प्राचीन काळातील विमानांची रचना व ...आधारभूत तत्त्वे ज्ञात नाहीत. पण ती आकाशात सहज संचार ...आणि दूर ...प्रवास करीत, ...दिसते. ...वाल्मीकिरामाय-...पुष्पक विमा-...चे विस्तृत वर्णन ...आहे. त्याच-...महाभार-...शाल्वराजा-...विमानाचे ...आहे. त्या ...विमानात ...द्वारका ...वर स्वारी ...आणि आकाशातून शस्त्रांचा भडिमार केला, अशी कथा आहे. ...भागवतपुराणात त्रिपुर नामक विमानाचे वर्णन आहे. देव ...दैत्य यांच्यांत एकदा युद्ध चालू असताना मयासुराने तीन ...विमाने निर्माण केली. मयासुर हा महान शिल्पकार होता. त्याने ...निर्माण केलेल्या विमानांना त्रिपुर हे नाव मिळाले. कारण प्रत्येक ...विमान एखाद्या नगराएवढे प्रचंड होते. त्यांत बसून सर्व दानव ...संचार करून देवांचा व मानवांचा संहार करू लागले. ...देव व मानव शंकराला शरण गेले. मग शंकराने त्रिपुरांवर ...संधान करून त्यांचा नाश केला.



हंसवाही देवविमान

अंशुबोधिनी नामक एक प्राचीन पुस्तक भारद्वाज ऋषीने रचलेले असून, त्यात विमान-विद्येवर एक अधिकरण आहे. पाहा – पुष्पक. [वैदिक सम्पत्ती; श्रीबलरामशास्त्री – त्रिपथगा, जुलै १९६२]

(२) एक शिल्पप्रकार. प्राचीन काळी विविध प्रकारची भव्य भवनें निर्माण केली जात असून, सभा प्रासाद, विमान, सौध व हर्म्य अशी त्यांची नावे होती. या विविध प्रकारच्या भवनांची वर्णने रामायण-महाभारतांत असली, तरी त्यांतील भेद ध्यानात येत नाहीत. मयमत या ग्रंथात हर्म्य, प्रासाद व विमान हे शब्द एकाच अर्थी वापरलेले आहेत. मानसार, मयमत, शिल्परत्नम, इ. ग्रंथांत विमान हा देवालयाचा एक प्रकार मानलेला आहे.

द. भारतातील उत्तरकालीन वास्तुशास्त्रात विमान हा शब्द देवालय या अर्थाने वापरलेला आहे.

अमरकोशात विमान याचा अर्थ रथ असा दिला आहे. त्यावरून उत्तरकालीन शिल्पशास्त्रकारांनी देवांच्या रथासारख्या प्रासादांचे वर्णन केले आहे. समरांगणसूत्रधार या ग्रंथाच्या ४९व्या अध्यायात मंदिरांच्या निर्मितीविषयी सांगितले आहे, ते असे – प्राचीन काळी ब्रह्मदेवाने देवांसाठी पाच विमाने किंवा रथ निर्माण केले. ते हवेतून प्रवास करू शकत होते. त्यानंतर त्या प्रकारचे प्रासाद दगड, भाजलेल्या विटा व लाकूड वापरून नगरे सुशोभित करण्यासाठी बांधले गेले.

मंदिरातील गर्भगृहावर जे उंच शिल्प रचलेले असते, त्यालाही विमान म्हणतात. ते गोल किंवा चौकोनी असून, त्याच्या माथ्यावर कलश असतो. सामान्यपणे हे शिल्प शिखर या नावाने ओळखले जाते. पाहा – शिखर. [स्ट. वा. वि.; इं. इं. आ.]

विमुक्तात्मा (इ. स. चे १२ वे शतक) अद्वैत वेदान्ताचा एक आचार्य. हा अव्यक्तात्म्याचा शिष्य होता. विमुक्तात्म्याचा अद्वैत वेदान्तावरील इष्टसिद्धी हा ग्रंथ प्राचीन कालापासून प्रमाणभूत मानला जातो. मधुसूदन सरस्वतीने आपला अद्वैतसिद्धी हा ग्रंथ सिद्धनामान्त ग्रंथांत चौथा मानला आहे. कारण, त्यापूर्वी मंडनमिश्राचा ब्रह्मसिद्धी, सुरेश्वराचा नैष्कर्म्यसिद्धी आणि विमुक्तात्म्याचा इष्टसिद्धी हे ग्रंथ प्रसिद्ध होते. इष्टसिद्धी हा ग्रंथ गायकवाड ग्रंथमालेत प्रकाशित झाला आहे. या ग्रंथावर ज्ञानोत्तमाची प्रामाणिक टीका आहे.

इष्टसिद्धीचे आठ भाग असून, त्यांतील बराच भाग ख्यातिविचाराने व्यापलेला आहे. वस्तुभेद या विषयावरही विमुक्तात्मा याने पुष्कळ चर्चा केली आहे व वस्तुभेद सांगता येत नाही, असे सिद्ध केले आहे. प्रमाणवृत्तिनिर्णय नावाचा आणखी एक ग्रंथ याने लिहिला आहे. [शंकराचार्य; हिं. इं. फि.]

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विरजा होम संन्यासग्रहणापूर्वीचा एक विधी. तो पुढील प्रमाणे करायचा असतो – संन्यास घेणारा प्रथम समिधा, चरू व आज्य या तीन्ही द्रव्यांच्या प्रत्येकी चाळीस आहुतींनी होम करतो. गाय, सोने व वस्त्र यांचे दान देऊन गृह्याग्नीचे उपस्थान करतो. मग सर्व काष्ठपात्रे अग्नीत टाकून अग्नीचा समारोप करतो. नंतर घरातून बाहेर पडून आप्तेष्टांचा निरोप घेतो. जलाशयावर जाऊन उदकात तीन ओंजळी सोडतो. पाण्यात उभे राहून 'तरत्सं मन्दी' या सूक्ताचा पाठ करून उदकात जलाहुती देतो. [ध. सिं.]

विराट एक प्राचीन देश व नगर. विदर्भाच्या उत्तरेला, दिल्लीच्या दक्षिणेला व मारवाडाच्या पूर्वेला हा देश होता. विराटनगर ही त्याची राजधानी होती. जयपूरच्या उत्तरेला ४१ मैलांवर विराटनगरचे प्राचीन अवशेष आहेत. पांडवांनी आपला अज्ञातवासाचा एक वर्षाचा काळ इथे घालवला होता. इथे त्यांच्या राहण्याच्या गुहा दाखवतात.

विराट नावाची आणखीही काही ठिकाणे आहेत. त्यांपैकी एक उदयपूर राज्यात आहे. विराट हे एक शक्तिपीठही आहे.

श्री. शुकदेव दुबे यांनी मध्य प्रदेशाच्या शहडोल जिल्ह्यातील सोहागपूर गाव म्हणजे प्राचीन विराटनगर होय, असे म्हटले आहे. महाभारतात उल्लेख केल्याप्रमाणे इथे एक प्राचीन व मोठा शमीवृक्ष आहे. हा वृक्ष जीर्ण झाला, की आपोआपच मोडून पडतो व त्याच्या मुळापासून पुन्हा एक नवीन विशाल शमीवृक्ष उत्पन्न होतो, असे इथले लोक सांगतात.

इथे विराटेश्वर शिवाचे एक प्राचीन मंदिर आहे. राजा विराटानेच या मंदिरात महादेवाची मूर्ती स्थापन केली होती, असे सांगतात. हे मंदिर पाषाणाचे असून, त्याची उंची सुमारे १२५ फूट आहे. मंदिराचे स्थापत्य भुवनेश्वराच्या लिंगराजमंदिरासारखे आहे. स्थापत्याच्या दृष्टीने या मंदिराचे बांधकाम इ. स. च्या ८ व्या किंवा ९ व्या शतकातले असावे. मंदिराचा मंडप पडलेला असून, गाभारा मात्र सुरक्षित आहे. मंदिराच्या विशाल तोरणद्वारावर अनेक मूर्ती कोरलेल्या आहेत.

इथून जवळच असलेल्या चकदेवरा या ठिकाणी, काही वर्षांपूर्वी, कीचकाची सात फूट उंचीची एक विशाल पाषाणप्रतिमा सापडली आहे. ती सांप्रत धुबेला संग्रहालयात ठेवलेली आहे.

विराटनगरात प्रवेश करण्यापूर्वी पांडवांना यक्ष भेटला होता, असे महाभारतात सांगितले आहे. या ठिकाणी यक्षाच्या अनेक मूर्ती सापडल्या आहेत. तसेच, इथे महाभारतातील उल्लेखाप्रमाणे विराटगंगा नामक एक विहीर, बाणगंगा नावाचे एक कुंड आणि भगवती दुर्गेचे मंदिर आहे. विराटाप्रमाणेच बले लोक अजूनही धष्टपुष्ट गाई पाळतात, असे श्री. दुबे यांनी सांगितले आहे. [ओ. नि. सं.; कल्याण-तीर्थांक; साप्ताहिक हिंदुस्तान, २७ जुलै, १९६७]

विरिविघ्नेश गणपतीचे एक रूप. याची प्रतिमा कशी करावी, ते श्रीविद्यार्णवतंत्रात पुढीलप्रमाणे सांगितले आहे – सिंदूरवर्ण, त्रिनेत्र, शशिकलाधर, चतुर्भुज, डाव्या वरच्या हातात पाश व उजव्या वरच्या हातात अंकुश घेतलेला; पुष्टीला आलिंगन देऊन खालच्या उजव्या हाताने तिच्या योनीला स्पर्श करणारा आणि सोंडेने सुवर्णपात्र धारण करणारा. त्याचप्रमाणे डाव्या हातात कमळ धारण करणारी व उजव्या हाताने विरिविघ्नेशाला आलिंगन देणारी अशी पुष्टी देवतेची प्रतिमा निर्माण करावी, असे म्हटले आहे.

या मूर्तीचा आणखी एक प्रकार सांगितला आहे, तो असा – त्रिलोचन, दशभुज, डावीकडील खालच्या हातापासून क्रमाने महाळुंग, गदा, चाप, चक्र, अक्षमाला व उजव्या खालच्या हातापासून, क्रमाने पद्म, पाश, शर, रद आणि रत्नपाश धारण करणारा; तसेच हातात लिंग धरले आहे अशा पुष्टीच्या योनीला शुंडाग्राने स्पर्श करणारा. [श्रीविद्यार्णवतंत्र]

विरूप आंगिरस एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील ४३, ४४ व ७५ ही सूक्ते याने रचली आहेत. हा अंगिराकुलातील मंत्रकार व प्रवर आहे. याला अंगिराचा पुत्र असेही म्हटले आहे.

याची तीनही सूक्ते अग्नीला उद्देशून आहेत. त्या सूक्तातील एक ऋचा (ऋ. ८.४३.३) अशी –

आरोका इव घेदह तिग्मा अग्ने तव त्विषः ।
दद्भिर्वनानि बप्सति ।

अर्थ – हे अग्ने, पाहा, रश्मीप्रमाणे या तुझ्या तीव्र ज्वाला आपल्या दाढांनी वने खाऊन फस्त करतात.

विरूपा चौऱ्यायंशी सिद्धांपैकी तिसरा सिद्ध. याला विरूपाक्ष, कालविरूप व धर्मपाल अशीही नावे आहेत. त्रिउर (मगध) देशात याचा जन्म झाला. पुढे भिक्षू बनून तो नालंदा विहारात अध्ययनासाठी गेला आणि एक विख्यात पंडित बनला. त्यानंतर त्याने श्रीपर्वत व देवीकोट या स्थानांची यात्रा केली. श्रीपर्वतावर त्याची सिद्ध नागबोधीशी भेट झाली आणि त्याने नागबोधीचे शिष्यत्व पत्करले. त्यानंतर तो नालंदाला परत गेला. तिथे त्याला आढळले, की सहजचर्येला आवश्यक असणाऱ्या मद्य, स्त्री, इ. साधनांचा व्यवहार तिथे केला जात नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...मून तो ओडिसात गेला. डोंबिपा व कण्हपा हे याचे प्रमुख शिष्य होते. हा ...शारितंत्राचा प्रवर्तक होता. ...ग्रंथांमध्ये याचे ...अमृतसिद्धी, दोहा-कोष, विरूपगीतिका, विरूपवज्र-गीतिका, विरूप-...दचतुरशीती, ...सुनिष्प्रपंचतत्त्वोप-देश, इ. अठरा ग्रंथ आहेत. [पु. ...द. नि.; हिं. सा. ...; भो. क. का.]

विरूपा

...रूपाक्षव्रत एक शैव व्रत. पौष शुद्ध चतुर्दशीला या व्रताचा आरंभ करावा आणि वर्षभर दर महिन्याच्या ...चतुर्दशीला हे व्रत करावे, असे सांगितले आहे. शिवाची पूजा ...या व्रताचा विधी आहे. उद्यापनाच्या वेळी मोठा बैल किंवा ...दान द्यावा. फल – राक्षसांचे भय नष्ट होते आणि घरात ...शांती, आरोग्य व ऐश्वर्य नांदते. [हि. ध.; व्र. प.]

...लायती सन एक कालगणना. बंगालच्या व ओडिसाच्या काही भागात फसली सनालाच विलायती ...असे म्हणतात. विलायती सनाचे महिने व वर्षे हे दोन्ही ...सौरच आहेत. या सनाच्या महिन्यांना चैत्रादी बारा नावे आहेत. ...या वर्षारंभ कन्यासंक्रांतीपासून म्हणजे सौर आश्विनापासून ...होतात. ज्या दिवशी सूर्याचे दुसऱ्या राशीत संक्रमण होते, तो ...महिन्याचा पहिला दिवस असतो. या सनात ५९२ किंवा ५९३ ...मिळवले असता इसवी सन येतो. [म. ज्ञा. को.–प्रस्तावना खंड]

...ल्लिपुत्तुर एक प्रसिद्ध वैष्णव क्षेत्र. हे स्थान तमिळनाडू प्रदेशातील रामनाथपुरम जिल्ह्यात आहे. इथे ...चे एक विशाल मंदिर असून; तो रंगमन्नार या नावाने ...परिचित आहे. मंदिरात रंगनाथासह आंडाळची मूर्ती आहे. ...मंदिरात राम, लक्ष्मण व सीता यांच्याही मूर्ती आहेत. आंडाळ व तिचे वडील पेरियाळवार यांची ही जन्मभूमी असल्याने ...क्षेत्राला विशेष महत्त्व मिळाले आहे. विष्णुमंदिरापासून ...अंतरावर एक सरोवर असून, तिथे आंडाळ स्नानाला येत होती, अशी समजूत आहे. विल्लिपुत्तुरच्या परिसरात शिव व वेंकटेश यांची मंदिरे आहेत. [कल्याण–तीर्थांक; त. सा. सं.]

विल्ली द. भारतातील एक मागसलेली जमात. या लोकांची वस्ती तमिळनाडू प्रदेशाच्या चिंगलपुट जिल्ह्यात आढळते. यांना कट्टुकरण असेही म्हणतात. कट्टुकरण म्हणजे जंगलात राहणारे लोक. हे लोक गुन्हेगार व भटके म्हणून ओळखले जातात; पण हे भटके नाहीत, असे अभ्यासकांचे मत आहे. कारण, पोटाच्या उद्योगासाठी हे बाहेर जात असले, तरी तो उद्योग संपला म्हणजे हे आपल्या गावी परत जातात.

विल्ली माणूस सडपातळ असतो. तो आपल्या केसांची निगा राखत नाही आणि फारसे कपडे वापरीत नाही. त्याचे दातही अस्वच्छ असतात.

यांच्यांतील पुरुष घरगडी, शेतमजूर, पहारेकरी, म्हणून कामे करतात. ते देवळात मशाली लावतात आणि भातही सडतात. अरप्पू नावाच्या झाडांची पाने गोळा करून व वाळवून ती विकणे हा एक यांचा जोड-व्यवसाय आहे. या पानांच्या भुकटीचा उपयोग उटण्यासारखा केला जातो. हे मोठ्या कौशल्याने साप-नागांना पकडून त्यांची कातडी विकतात. या प्राण्यांचे विष बाधू नये म्हणून ते नवकुंजीची मुळे व काही झाडपाला खातात. त्यांची मुले गुराख्याचे काम करतात आणि त्याच वेळी ती ससे, सार, उंदीर व निरनिराळे पक्षी पकडायला शिकतात. यांच्या स्त्रिया मोलकरणी म्हणून कामे करतात. त्या जंगलातला लाकूडफाटा आणून तोही विकतात.

विल्ली लोक झाडाखाली झोपड्या बांधून अथवा देवळांच्या किंवा जमीनदारांच्या मागच्या पडव्यांत राहतात. ससे, मासे, उंदीर, बोकड यांचे मांस ते खातात; पण त्यांना गायीचे मांस चालत नाही.

विवाहप्रथा –मुलगा दहा-बारा वर्षांचा झाला, की त्याचे लग्न होते. त्यांच्यांत देजाची पद्धत आहे. देजाची रक्कम साडेसात रुपये असते. शिवाय मुलीच्या आईला एक लुगडे व अडीच आणे द्यावे लागतात. त्याचप्रमाणे मुलीचा मोठा भाऊ नवऱ्या मुलाला चांदीची एक आंगठी देतो. त्यांचा विवाहविधी अगदी साधा असतो. तो एक दिवसात उरकतो. जुन्या काळी विवाहाचा सारा खर्च सुमारे तीस रुपयापर्यंत होत असे. विवाहाचे पौरोहित्य वृद्ध विल्ली करतो. लग्नाच्या भोजनप्रसंगी मांसाचा उपयोग केला जात नाही. त्यांच्यांत घटस्फोटाची पद्धत रूढ आहे.

प्रसूतिप्रथा – पहिल्या बाळंतपणासाठी हे मुलीला माहेरी नेतात. या वेळी मुलीला एक लुगडे व जावयाला एक कापड देतात. हे नऊ दिवस जननाशौच पाळतात. मुलाचे नाव नवव्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दिवशी ठेवतात. यांच्या स्त्रिया मासिकपाळीचा विटाळ तीन ते चार दिवस पाळतात.

कन्नीअम्मा ही त्यांची देवता होय. तिला ते मुला-मुलींचे जावळ वाहतात.

विल्ली स्त्री-पुरुषांना गोंदण्याची फार आवड असते. ते आपल्या दोन्ही हातांवर कृष्ण, कमळ, पोपटाचा पिंजरा, इ. आकृत्या गोंदून घेतात. प्रत्येक विल्लीजवळ शेळीच्या कातडयाने मढविलेला एक ढोल असतो. देवीच्या पूजाप्रसंगी, गाताना व नाचताना ते ढोल वाजवितात.

मर्तिकप्रथा – हे मृताला पुरतात. त्याला पुरण्यापूर्वी त्याच्या तोंडात थोडे दूध घालतात. मग त्याला तळयावर आंघोळ घालून आत्म्याच्या तृप्तीसाठी तिलोदक सोडतात. दहा दिवस सुतक पाळतात. नंतर भोजनाचा एक कार्यक्रम करतात. त्यानंतर मात्र मृतप्रीत्यर्थ हे कोणताही श्राद्धविधी करीत नाहीत.

अलिकडे तमिळनाड सरकारने आणि भारत सेवक समाजाने यांच्या पुनर्वसनाचा पद्धतशीर प्रयत्न चालू केला आहे. [दू साउथ इंडियन ट्राइब्ज – एस. आर. वेंकटरामन.]

विवटनरव्खत्त एक प्राचीन महोत्सव. साकेतात दरवर्षी हा उत्सव साजरा करीत. या दिवशी, दिवस उजाडताच गावातील स्त्रिया व तरुण मुली स्नान करण्यासाठी नदीवर जात. या वेळी नगरातले तरुण हातात फुलांच्या माळा घेऊन रस्त्याच्या कडेला उभे राहत आणि समान कुल-जातीची जी तरुणी त्यांना आवडली असेल, तिच्यावर हातातील फुलांच्या माळा टाकीत. [ह. प्रा. लो.]

विवस्वान एक वैदिक देवता. ऋग्वेदात या देवतेच्या वर्णनपर सबंध व स्वतंत्र असे एकही सूक्त नाही. फक्त तीस-पस्तीस ठिकाणी इतर देवतांबरोबर तिचा उल्लेख आलेला आहे. विवस्वानाला अश्विनींचा व यमाचा पिता असे म्हटले आहे. वेदोत्तर वाङ्मयात विवस्वानाला मानवजातीचा मूळ पुरुष जो मनू त्याचा पिता मानले आहे.

इंद्राचा विवस्वानाशी संबंध असून, विवस्वानाच्या स्तवनाने इंद्राला आनंद होतो, असे सांगितले आहे (ऋ. ८. ६. ३९). ब्राह्मणग्रंथांत विवस्वानालाच आदित्य म्हटले आहे. वेदोत्तर वाङ्मयात विवस्वान शब्द सूर्याचे एक नाव या अर्थी रूढ झाला.

विवस्वान हा विवङ्‌ह्वन्त = यिमाचा पिता या नावाने इराणी साहित्यातही आढळतो.

विवस्वान हे नाव उगवत्या सूर्याला दिलेले असावे आणि नंतर सोम तयार करणारा पहिला पुरुष असे स्थान त्याला प्राप्त झाले असावे. [रि. वे. लि.; वै. मा.; म. ज्ञा. को. – वेदविद्या]

विवाद-विजय यंत्र वाद-विवादात विजय मिळविण्याची इच्छा असल्यास या यंत्राचा प्रयोग करतात. या यंत्राची पूजा देवांनीही केली होती, असे सांगतात. याचा प्रयोग असा –

भूर्जपत्रावर कुंकवाने एक वर्तुळ काढून त्यावर चार पयदळे काढतात. प्रत्येक कमलपत्रावर ह्रीं यं ह्रीं यं ह्री.. बीजाक्षरे लिहितात. मग यंत्राची यथाविधि पूजा करतात. नंतर ते यंत्र त्रिलोहाच्या डबीत घालून ती डबी दुधात ठेवतात. एवढे करून मग वादविवादाला जातात. आपणांस सिद्धी प्राप्त व्हावी अशी इच्छा असेल, तर यंत्र गुप्त ठेवतात. [यं. चिं.]

विवाह एक संस्कार. ज्यामुळे विवाहेच्छू पुरुष आणि उपवर कन्या ब्राह्मण, इष्टमित्र आणि अग्नी यांच्या साक्षीने पति-पत्नी म्हणून संबद्ध होतात, त्या संस्काराला विवाह असे म्हणतात. विवाहाला पुढील प्रतिशब्द आहेत – पाणिग्रहण म्हणजे वराने वधूचा पत्नी होण्यासाठी हात धरणे. उपयम म्हणजे वधूच्या जवळ जाणे किंवा तिचा स्वीकार करणे. परिणय म्हणजे वधूला हाती धरून अग्नीभोवती प्रदक्षिणा घालणे. विवाह किंवा उद्वाह म्हणजे वधूला पित्याच्या घरून आपल्या घरी नेणे. सांप्रतच्या ब्राह्मविवाहपद्धतीत हे सर्व प्रकार असतात.

विवाहसंस्था – मानवी समाजातील सर्व संस्थांमधली ही मुख्य संस्था आहे. सोळा संस्कारांमध्ये विवाह ही संस्था केंद्रस्थानी आहे. विवाहामुळे स्त्री व पुरुष या दोघांमधील संबंधाचे नियमन होते, त्याचप्रमाणे पति-पत्नींना होणाऱ्या मुलांचा सामाजिक संबंधही ठरतो. कुटुंबसंस्था ही विवाहसंस्थेवर अवलंबून असते, म्हणूनच विवाहसंस्कारावर सामाजिक नीतीचा प्रभाव पडला आहे. विवाहसंस्कारासाठी जेवढ्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात, तेवढ्या अन्य कोणत्याही संस्कारात घ्याव्या लागत नाहीत. या संबंधात वधू-वरांचे पावित्र्य आणि कुलाचे पावित्र्य प्रामुख्याने विचारात घेतले जाते. कारण, या पावित्र्यावरच त्या दोघांचा संसार श्रेयस्कर व्हायचा असतो. विवाहसंस्कारात जे मंत्र आहेत, तेही पावित्र्यनिदर्शकच आहेत. याव्यतिरिक्त वंश, जात, पोटजात, सामाजिक दर्जा, अर्थोत्पादनाची क्षमता, निरोगित्व, अव्यंगत्व, इ. अनेक गोष्टी विवाह जुळवताना निरखून-पारखून घेतात.

विवाहसंस्था ही कुटुंबसंस्थेपुरतीच मर्यादित नसते, तर तिचा सामाजिक अनुबंध असतो. गुणी, नीतिमान, चारित्र्यसंपन्न, परोपकारी अशी विवाहित दांपत्ये समाजाच्याही उत्कर्षाला उपयोगी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शकतात. तसेच दुर्गुणी व अनीतिमान दांपत्ये समाजाचे विघटन करण्याला कारणीभूत होऊ शकतात. विवाहामुळे स्त्री-पुरुषांचा समाजविघातक उच्छृंखलपणा संयत होतो. समाजात वावरणाऱ्या पुरुषाला जे नियंत्रण हवे असते, ते भार्येमुळे त्याला मिळू शकते. अविवाहित मनुष्य समाजात राहूनही समाजापासून वेगळा पडल्यासारखा असतो. समाजाशी त्याचे सामरस्य होऊ शकत नाही. भार्या आल्यानंतर मात्र तो समाजाशी एकजीव होतो. विवाहाने त्याचे नात्या-गोत्याचे संबंध वाढतात आणि तेवढा त्याच्या' जीवनात व्यापकपणा येतो. कर्तव्य निश्चित झाल्यामुळे त्याला ताळतंत्र सोडून वागता येत नाही. मनुष्याच्या ठिकाणी आत्मौपम्यबुद्धी जितकी वाढेल, तितका तो संयमी, नीतिमान, उपकारक आणि अहिंसक बनतो आणि आत्मौपम्य-बुद्धीचा हा धडा पत्नी आणि कन्या-पुत्र यांच्या रूपाने त्याला मिळत असतो.

विवाहाचा उद्देश – 'धर्मप्रजासम्पत्तिः प्रयोजनं दारसङ्ग्रहस्य' = धर्मसंपत्ती आणि प्रजासंपत्ती हे विवाहाचे प्रयोजन होय, असे मिताक्षराकार म्हणतो (याज्ञ. स्मृ. १.७८ वरील टीका). आपस्तंबाचेही तेच मत आहे. समाजाचे अस्तित्व टिकावे, त्याचा उत्कर्ष व्हावा यासाठी समाजात सुप्रजा निर्माण होण्याची नितांत आवश्यकता असते. सुप्रजा निर्माण व्हायची असेल, तर पति-पत्नी परस्परांवर अनुरक्त, सच्छील व कर्तव्यदक्ष असावी लागतात. लहानपणीच मुलांवर चांगले संस्कार झाले, तर मोठेपणी ती समाजाला उपयुक्त ठरतील. त्यासाठी पति-पत्नींनी धर्माचरणाने वागून सुप्रजानिर्मितीची पात्रता मिळवायची असते. विवाहसंस्कार हा त्यासाठीच असतो. विवाहातले मंत्र व प्रार्थना प्रजाविषयकच असतात. वधूला हाती धरून अग्नीला प्रदक्षिणा करताना वराने म्हणायचा एक मंत्र आहे, तो असा –

तावेव विवहावहै । प्रजां प्रजनयावहै सं प्रियौ रोचिष्णू
सुमनस्यमानौ जीवेम शरदः शतम् ।

(आश्व. गृ. सू. १.७.३.२२)

अर्थ – आपण विवाहबद्ध होऊन प्रजा उत्पन्न करू या. एकमेकांवर प्रेम करून एकमेकांना आवडते होऊ या. एकमेकांविषयी सुप्रसन्न मन ठेवून शंभर वर्षे जगू या.

वस्त्रारोपणाच्या मंत्रांत वधू-वर एकमेकांकडे ज्या कामना व्यक्त करतात, त्या जितक्या व्यावहारिक आहेत, तितक्याच धार्मिक व नैतिकही आहेत. विवाहबद्ध होणाऱ्या पति-पत्नींनी धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ परस्पर सहकार्याने संपादित करायचे असतात. या सर्व गोष्टी साध्य होण्यासाठी पति-पत्नींचे शारीरिक संबंध निष्ठेचे असले पाहिजेत, असाही वेदांचा आणि धर्मशास्त्रांचा आग्रह आहे.

म्हणूनच अन्य धर्मांत एक करार या स्वरूपात साजरा केला जाणारा विवाह, हा हिंदूंमध्ये एक पवित्र संस्कार समजला जातो. कराराच्या अटींचा भंग झाल्यावर करार संपुष्टात येतो आणि दंपती विभक्त होतात. संस्काराने बद्ध झालेले वधू-वर दुर्दैवाने परस्परांपासून दूर झाले, तरीहीं वियोगाची कारणे निरस्त झाल्यावर ते परत एकत्र येऊन संसार करू शकतात. यदाकदाचित ती दोघे एकत्र न आली तरी त्यांचे पति-पत्नी हे नाते यावज्जीव अभंग राहते. कारण, ते नाते कराराने नव्हे, तर धर्माने निर्माण झालेले असते.

अतिप्राचीन काळी विवाहसंस्थाच अस्तित्वात नव्हती, असे काही विद्वानांचे मत आहे. त्याला आधार म्हणून महाभारतातली एक कथा सांगितली जाते. जनावरांच्या कळपात जसे स्त्री-पुरुष भेदाशिवाय इतर नाते लैंगिक संबंधाच्या बाबतीत नसते, त्या प्रकारची समाजाची अवस्था उत्तरकुरू देशात होती, असे उद्दालक ऋषी व त्यांचा पुत्र श्वेतकेतू यांच्या संवादात म्हटले आहे. उद्दालकापर्यंत अरणिधर्म प्रचलित होता. अरणिधर्म म्हणजे पतीच्या संमतीने पत्नीने दुसऱ्या पुरुषाकडे राहणे व त्या पुरुषाला स्वतःपासून संतती झाल्यावर पुनश्च पतीकडे परत येणे होय. ही चाल श्वेतकेतूने बंद पाडली, असे महाभारतात सांगितले आहे (आदि. १२२). पण वेदांच्या काळी भारतात अशी पशुधर्मी अवस्था असल्याचे प्रमाण सापडत नाही. रुद्राने आपल्या भगिनीशी आणि प्रजापतीने आपल्या मुलीशी विवाह केल्याची कथा वेदांत मिळते. प्रजापतीपासून अग्नी, वायू, आदित्य, चंद्रमा व उषा ही भावंडे जन्मली. उषेच्या ठिकाणी भावांचे मन गेले. त्या संबंधापासून रुद्र उत्पन्न झाला, अशी एक कथा कौषीतकी ब्राह्मणात आढळते (६.१). परंतु ही कथा वेदकालीन सामाजिक जीवनाची निदर्शक नाही. वेदपूर्वकालीन सपिंड विवाहाची स्मृती वैदिकांच्या मनात शिल्लक उरली होती, एवढेच तिच्यावरून निश्चित करता येते. पुराणांमध्येही सपिंडदर्शक विवाहाच्या अशा काही कथा आहेत. ऋग्वेदात सहोदरांच्या वैवाहिक संबंधांचा नवा निषेध सूचित करणारा यम-यमी संवाद वर्णिलेला आहे. यम व यमी ही जुळी भावंडे होत. यमी सहोदर भावापाशी विवाहबद्ध होण्याची याचना करीत आहे व यम ती गोष्ट अनुचित म्हणून नाकारीत आहे. इजिप्त व इराण येथील संस्कृतीत अतिप्राचीन काळी सहोदरांचा विवाह होत असे. ऋग्वेदकाली वैदिकांनी त्या चालीचा निषेध केला, असे या सूक्तावरून निश्चित होते. ऋग्वेदाच्या काळी विवाहसंस्था सुस्थिर झाली, हे वेदातील अनेक उल्लेखांवरून कळून येते.

विवाहसंस्था किती प्राचीन आहे, हे सांगण्यासाठी तांड्यब्राह्मणात एक कथा सांगितली आहे. ती अशी–

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पृथ्वी व आकाश ही दोघे प्रथम एकत्र होती. पुढे ती दूर जाऊ लागली. ते दूर जाणे त्यांना बरे वाटले नाही, म्हणून ती एकमेकांना म्हणाली, "आपण विवाह करू आणि एकत्र राहू."

पृथ्वी व आकाश यांचा हा आदर्श मानवांनी मानला आणि आपल्या समाजात विवाहसंस्था रूढ केली, असे या कथेचे तात्पर्य आहे. ऋग्वेदातील विवाहसंस्थेचे स्वरूप अतिशय मंगल आणि आणि उदात्त आहे.

धर्मशास्त्रकारांनी सपिंड विवाहाचा निषेध केला असला, तरी भारतीय समाजात काही सपिंड विवाह मान्यता पावलेले आहेत.

जगात आणि भारतातही बहुतेक सर्व जातींत आते-मामे भावंडांच्या विवाहाची प्रथा रूढ आहे. या प्रथेला मान्यताही आहे. ब्राह्मणांत चित्पावन सोडल्यास कऱ्हाडे, देशस्थ, इ. सर्व पोटजातींत अशा भावंडांचे विवाह होतात. मात्र अशा विवाहात मुलगा बहिणीचा व मुलगी भावाची असावी लागते. द. भारतातील काही जातींत या उलट म्हणजे भावाचा मुलगा आणि बहिणीची मुलगी असे विवाह घडून येतात.

द. भारतातल्या काही जमातींमध्ये मामा व भाची यांचाही विवाह होतो. काही जमातींत मात्र मुलगी थोरल्या बहिणीचीच असावी लागते.

सगोत्र-सपिंड-निषेध—वैवाहिक संबंध जोडायला वधू-वरांचा वर्ण एक, पण गोत्र व प्रवर भिन्न असले पाहिजेत, असे मन्वादी स्मृतिकार आणि सूत्रकार यांनी सांगितले आहे. याविषयी मनूचा श्लोक (मनु. ३. ५) असा—

असपिण्डा च या मातुरसगोत्रा च या पितुः ।
सा प्रशस्ता द्विजातीनां दारकर्मणि मैथुने ॥

अर्थ—जी वधू मातेच्या सपिंडाबाहेर असेल आणि जी पित्याच्या गोत्राबाहेरची असेल, तीच त्रैवर्णिकांना विवाह आणि मैथुन या बाबतींत प्रशस्त होय.

हिरण्यकेशी गृह्यसूत्र (१.१९.२) व गौतम गृह्यसूत्र (४.२.३) यांतही सगोत्र आणि सपिंड विवाहाचा निषेध सांगितलेला आहे. सापिण्ड्य सात पिढ्यांपर्यंत मानावे, असे निबंधग्रंथात म्हटले आहे. काही शास्त्रकार ते पाच पिढ्यांपर्यंतच मानतात.

विश्वामित्र, जमदग्नी, भारद्वाज, गौतम, अत्री, वसिष्ठ, कश्यप आणि अगस्त्य हे आठ ऋषी मूळ गोत्रकार म्हणून सांगितले आहेत. महाभारताच्या शांतिपर्वात तर चारांचीच नावे दिली आहेत. बोधायनाने मात्र गोत्रे अनंत असल्याचे सांगून प्रवर ४९ दिले आहेत. गोत्रे म्हणजे ऋषींची अपत्ये होत. गोत्रांतील ज्या पुरुषांनी अग्नीचे विशेषत्वाने आवाहन केले, त्यांतले तीन, पाच दोन किंवा एक पुरुष म्हणजे प्रवर होत. (गोत्र-प्रवर पाहा)

स्मृतिकारांनी जरी सगोत्र-सप्रवर विवाहाचा निषेध केला असला, तरी असा निषेध वेदांत सापडत नाही. सगोत्र विवाह निषिद्ध का ठरला, याविषयी अनेक विद्वानांनी अनेक कारणे दिली आहेत. सगोत्र विवाहाला प्रतिबंध केवळ भारतातच नाही, तर तो जगाच्या अनेक भागांत आहे. ज्या जनजातीत गोत्रव्यवस्था नाही, तिथे समान देवकांत म्हणजे समान धार्मिक चिन्ह असलेल्या लोकांत विवाहाला प्रतिबंध आहे. ही प्रथा असभ्य, अर्धसभ्य आणि सभ्य अशा सर्व जातींत आढळते.

सगोत्रविवाह निषेधाची जी कारणे संशोधकांनी दिली आहेत, त्यांपैकी काही अशी —

(१) आदिम कालात मुलांपेक्षा मुली कमी असल्यामुळे ही प्रथा निर्माण झाली.

(२) प्रादेशिक जनसमूहात किंवा तरुण-तरुणींच्या कामचाराला प्रतिबंध व्हावा म्हणून हा निषेध निर्माण झाला.

(३) एकत्र पालनपोषण झालेल्या भिन्नलिंगी व्यक्तींत कामाकर्षण योग्य प्रकारे निर्माण होत नाही, म्हणून हा निषेध निर्माण केला गेला.

(४) आदिम कालात गोत्रमुख्य प्रजापती याचीच सगळ्या गोत्रपरिवारावर सत्ता चालत असे. तिच्या आधारे तो गोत्रपरिवारातल्या तरुण मुली त्याच परिवारातल्या तरुणांना मिळू न देता स्वतःसाठी राखून ठेवी. प्रजापतीच्या या अधिकाराला पायबंद घालणे शक्य न झाल्याने गोत्रातले तरुण गोत्राबाहेरच्या मुली मिळवण्याचा प्रयत्न करू लागले. केवळ गरजेच्या पोटी ते गोत्राबाहेरच्या मुलींशी विवाह करीत; पण हळूहळू ती प्रथा वाढली आणि त्यामुळे पुढे सगोत्र विवाहच निषिद्ध ठरला.

(५) डॉ. राजवली पांडेय यांनी आणखी एक कारण सांगून, त्याचे विवरण केले आहे, ते असे — सगोत्र विवाह निषिद्ध ठरण्याचे सर्वांत अधिक संभवनीय कारण म्हणजे गण किंवा गोत्र याच्यातले तरुण आपल्या प्रदेशात अन्न मिळवणे कठीण होऊ लागल्यामुळे निर्वाहसाधनांच्या शोधात गोत्रातून फुटून दूरदूरच्या प्रदेशात जाऊ लागले. त्या प्रवासात त्यांचा अन्य गण-गोत्रांशी संपर्क येणे स्वाभाविक होते. त्या संपर्कातून या तरुणांची गणगोत्राबाहेर लग्ने होऊ लागली. त्यांना तसे करणेच भाग पडले. त्यातूनच गोत्राबाहेर विवाह करण्याची प्रवृत्ती वाढली, सगोत्र विवाह आपोआप मागे पडला आणि निषिद्धही ठरला. गोत्रपरिवारात ईर्षा व कलह साहजिकपणेच उत्पन्न होत. स्त्री हे या संघर्षाच्या कारणांपैकी एक प्रमुख कारण असे. गोत्राबाहेर लग्न करून गोत्रातले तरुण जसजसे दूर राहू लागले, तसतसे गोत्रज संघर्षाचे प्रमाण कमी होऊ लागले. ते पाहून तत्कालीन विचारवंतांना वाटले, की गोत्र सुस्थित राहण्यासाठी सगोत्र विवाहच निषिद्ध ठरवावा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सगोत्र विवाहनिषेधाची ही प्रथा इ. स. च्या प्रारंभकालात प्रतिष्ठित झालेली दिसते. स्मृतींची रचना त्या आणि त्यापुढच्या काळातली असून, बहुतेक सर्व छंदोबद्ध स्मृतींनी सगोत्र विवाह पूर्णतया अवैध ठरवला. इतकेच नव्हे, तर अशा विवाहापासून झालेल्या संततीलाही त्यांनी अवैध ठरवले. त्यापुढच्या काळात अशा विवाह तर निषिद्ध ठरलाच; पण तो करणाऱ्याला कठोर शिक्षाही सांगितली गेली.

सांप्रत नव्या हिंदू आचारसंहितेने सगोत्र विवाह वैध ठरविल्यामुळे आता अशा विवाहांना काही अडचण राहिली नाही. सपिंड विवाहाबद्दल तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी विवेचन केले आहे, ते असे – ऋग्वेदकाली सपिंड विवाहाला मर्यादा घालण्यात आली. साधारणपणे तिसऱ्या पिढीला कुटुंबे विभक्त होतात; म्हणून पहिल्या दोन पिढ्या म्हणजे सख्खी, चुलत व चुलत नाती वगळून मुलांमुलींची लग्नेच त्या वेळी मान्य होऊ लागली. आतेबहीण व मामेभाऊ अथवा आतेभाऊ व मामेबहीण यांची आपसांत लग्ने ऋग्वेदकाली मान्य होती. ऋग्वेदी-देशस्थ, कऱ्हाडे आणि कर्नाटक इत्यादी दक्षिण प्रांतातील ब्राह्मण ह्यांच्यामध्ये अशा प्रकारच्या जवळच्या नात्यात लग्न करण्याची प्रथा अजून विद्यमान आहे. याचे मूळ ऋग्वेदाच्या खिलपर्वातील एका मंत्रात सापडते. ऋग्वेदातील तो मंत्र असा –

आ याहीन्द्र पथिभिरीळितेभिर्यज्ञमिमं नो भागधेयं जुषस्व ।
तृप्तां जहुर्मातुलस्येव योषा भागस्ते पैतृष्वसेयी वपामिव ॥

अर्थ – इंद्रा, स्तुत्य मार्गांनी या यज्ञात ये, आमचा हा भाग घे. मामाची मुलगी किंवा आतेबहीण यांच्याप्रमाणे हा तुझा भाग आहे. तृप्ती निर्माण करणाऱ्या वपेचे हवन केले आहे.

अनुलोम-प्रतिलोम – सगोत्र विवाहाप्रमाणे असवर्ण विवाहही स्मृतिकारांनी निषिद्ध ठरवला आहे. मनू म्हणतो (मनु. ३.४)–

उद्वहेत द्विजो भार्यां सवर्णां लक्षणान्विताम् ।

अर्थ – द्विजाने शुभलक्षणांनी युक्त अशी सवर्णाची भार्या करावी.

पुढे सर्व स्मृतींनी मनूचे हे विधान उचलून धरले. वस्तुतः सवर्णविवाह ही एक स्वाभाविक गोष्ट आहे. प्राचीन कालातही सामान्यपणे हा नियम पाळला जात असावा; पण या नियमाला वर्णबाह्य विवाहाच्या निषेधाचे स्वरूप त्या काळी आले नाही. कारण, महाभारतकालापर्यंत वर्ण-जातिप्रथा लवचिकच होती. उच्च वर्णाचा पुरुष व कनिष्ठ वर्णाची स्त्री यांचा विवाह हा अनुलोम होय. आणि उच्च वर्णाची स्त्री व कनिष्ठ वर्णाचा पुरुष यांचा विवाह हा प्रतिलोम होय. वर्णबाह्य विवाह वैदिक कालापासून चालत आलेले आहेत; पण त्यांचे स्वरूप सामान्यतः अनुलोम पद्धतीचे होते. ऋग्वेदकालीन च्यवन, श्यावाश्व, इ. काही वैदिक ऋषींनी क्षत्रिय कन्यांशी विवाह केल्याचे उल्लेख ऋग्वेदात आढळतात (१.११२.१९; १.११६.१; १.११७.२०; १.१०.३९). अपवाद म्हणून का होईना, प्रतिलोम विवाहाचे एक उदाहरण ऋग्वेदातच (१.१.१२६) आढळते. स्वनय भावयव्य या क्षत्रियाने आंगिरसी नामक ब्राह्मण कन्येशी विवाह केला होता.

अथर्ववेदात ब्राह्मणाला सर्व वर्णांच्या कन्यांचा श्रेष्ठतम पती म्हणून गौरविले आहे (५.१७.८९.). प्राचीन ब्राह्मणग्रंथ वैशीपुत्रांशी परिचित आहेत. शूद्र स्त्रीशी संबंध करणाऱ्या आर्य पुरुषांची राजसभेत आणि पुरोहित वर्गांत थट्टा केली जाते, असे तैत्तिरीय ब्राह्मणात म्हटले आहे (३.९.७.३). त्यावरून असे वाटते, की ब्राह्मणाने दासीशी लग्न करणे ही गोष्ट त्या काळात प्रचलित असावी. दासी याचा अर्थ मोलकरीण असा नव्हे, तर खालच्या वर्गातली स्त्री असा त्या शब्दाचा अर्थ श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी सांगतात. दासीशी विवाह म्हणजे खालच्या वर्गातल्या स्त्रीशी विवाह होय. असे विवाह त्या काळी समाजात प्रचलित असावे. कारण औषिज, कवष, वत्स, इ. महान ऋषी ऋग्वेदात दासीपुत्र म्हणून उल्लेखित आहेत (ऋ. १.१८.१; १.११२.२). या आणि अशा प्रकारच्या दासीपुत्रांना समाजात मानाचे स्थान होते, असे दिसते. वैदिक साहित्यात शूद्र पुरुष आणि आर्य स्त्री अशा विवाहाची काही उदाहरणे मिळतात. यजुर्वेदसंहितेत ‘अयोगु’ असा एक शब्द आला आहे (३०.५) याचा संबंध पुढच्या काळातील आयोगव या जातीशी जोडता येईल. वैश्य स्त्रीला शूद्रापासून झालेल्या पुत्राला मनूने आयोगव म्हटले आहे. याला पुष्टी देणारी एक परंपरा आश्वलायन गृह्यसूत्रात आढळते. एखादा कुटुंबपरिवारातला दासही दिराप्रमाणे धन्याच्या विधवा स्त्रीशी विवाह करू शकतो (४.२.१८). ज्या वर्णसंकराचे भय पुढील स्मृतिकारांनी सांगितले, त्या वर्णसंकराचा प्रारंभ वैदिक कालातच झाला होता, असे यावरून म्हणावे लागते.

गृह्यसूत्रांच्या कालापर्यंत सवर्ण कन्येशी विवाह हा सामान्य नियम होता; पण अनुलोम विवाहाला त्या काळापर्यंत शास्त्रीय व सामाजिक मान्यता होती. मात्र अनुलोम विवाह त्रैवर्णिकांपुरताच मर्यादित असावा, असे मत होते. पराशर म्हणतो, की शूद्र स्त्रीशी विवाह करायचा असेल, तर तो अमंत्रक असावा. पण अशी उदाहरणे फार थोडी असत आणि ती लौकिक दृष्ट्या निंद्य समजली जात. मात्र सर्व धर्मशास्त्रे उच्च वर्णाची कन्या आणि कनिष्ठ वर्णाचा पुरुष यांच्या विवाहाला विरुद्धच आहेत.

यद्यपि सवर्ण वधू-वरांना विवाहबंधनाने एकत्र आणणे ही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गोष्ट प्रशस्त मानली गेली असली, तरी असवर्ण किंवा आंतर्जातीय विवाह मध्ययुगाच्या अखेरीपर्यंत तुरळक प्रमाणात का होईना, प्रचलित होते. संस्कृत काव्य-साहित्य आणि अभिलेख यांच्यावरून ही गोष्ट सिद्ध होते. महाकवी बाणाचे दोन पारशव बंधू होते आणि ते त्याच्या शूद्र सावत्र आईपासून जन्मले होते. राजशेखर कवीची पत्नी अवंतिसुंदरी ही क्षत्रिय कन्या होती. कल्हणाने आपल्या राजतरंगिणीत संग्राम या क्षत्रिय राजाच्या बहिणीचा ब्राह्मणाशी विवाह झाल्याचे वर्णिले आहे. कालिदासाच्या मालविकाग्निमित्रातला अग्निमित्र हा नायक ब्राह्मण होता. त्याने मालविका या क्षत्रिय कन्येशी लग्न केले होते. कथासरित्सागरात आंतर्जातीय विवाहाची अनेक उदाहरणे दिलेली आहेत. तिथला एक राजा 'आपल्या कन्येसाठी ब्राह्मण किंवा क्षत्रिय वर शोधून आण' असे आपल्या सेनापतीला सांगतो. जोधपूर जिल्ह्यातला बाउकच्या अभिलेखात प्रतिहार वंशाच्या संस्थापकाची उत्पत्ती ब्राह्मण पुरुष व क्षत्रिय स्त्री यांच्या विवाहातून झाल्याचे सांगितले आहे. वाकाटक हस्तिभोजाच्या अभिलेखात सोमदेव नामक ब्राह्मणाने क्षत्रिय कन्येशी विवाह केल्याचे म्हटले आहे. अर्थात ही सगळी उदाहरणे अनुलोम विवाहाची आहेत. प्रतिलोम विवाहाची उदाहरणे जवळजवळ नाहीतच म्हटले तरी चालेल.

इ. स. च्या अकराव्या शतकापासून अनुलोम विवाहही बंद पडले. आठव्या-नवव्या शतकानंतर नव्या स्मृतींची रचना थांबली. पुराणांना प्रस्तुतचे स्वरूप येण्यास चौथ्या शतकापासून प्रारंभ झाला व दहाव्या शतकापर्यंत त्यांना प्रामाण्यही लाभले. या प्रामाण्यामुळे अनुलोम मिश्रविवाहही पुढे बंद झाले.

सांप्रत ही प्रक्रिया पूर्ण झाली आहे. गेल्या हजार वर्षांत चारही वर्णांतले विवाहसंबंध वर्णापुरतेच मर्यादित राहिले नाहीत, तर जाती उपजाती, पोटजाती इथपर्यंत त्यांचे नियमन झाले आहे. पण आता कालचक्र फिरले आहे. देशात शिक्षणाचा प्रसार वाढला आहे. सरकारी कचेऱ्या आणि औद्योगिक क्षेत्रे यांत मुली आणि मुले एकत्र नोकऱ्या करू लागली आहेत. सुशिक्षितांचा जातिप्रथेवरचा विश्वास उडाला आहे. तरुण मुले-मुली जातिप्रथेच्या बाहेर जाऊन आचार-विचार करू लागल्या आहेत. त्यामुळे आता पुनश्च आंतर्जातीयच नव्हे, तर आंतर्धर्मिक विवाहांचेही पुनरुज्जीवन होऊ लागले आहे. नव्या हिंदू आचारसंहितेनेही असे विवाह वैध ठरवले असल्यामुळे, भावी काळात त्यांची संख्या वाढत जाणार, हे स्पष्ट दिसते.

वधूपरीक्षा — गृह्यसूत्रकारांनी वधू कशी असावी आणि कशी नसावी, हे सांगताना पुढील गोष्टींना महत्त्व दिले आहे— कन्या शुभलक्षणी व सुबुद्ध असावी (भार. गृ. सू. १-१६). मनूच्या मते कन्या शरीराने अव्यंग असावी, तिचे नाव सौम्य असावे, ती गजगती किंवा हंसगती असावी, तिच्या मस्तकावर सौंदर्य खुलेल इतक्या प्रमाणातच केस असावे, तसेच तिचे दात लहान, अवयव मृदू आणि कोमल असावे (मनु. ३-१०). भुऱ्या केसांची, रोगी, शरीरावर केसच नाहीत किंवा फार दाट आहेत अशी, वाचाळ आणि पिंगट डोळ्यांची कन्या विवाहाला अयोग्य होय (मनु. ३-८). जिच्या चेहऱ्यावर दाढीमिशा उगवल्या आहेत, जिच्या शरीराचा घाट पुरुषी आहे, जिची वाणी कर्कश आहे आणि जिला नेहमी दुसऱ्याची अवज्ञा व थट्टा करण्याची सवय आहे, अशी मुलगी लग्नासाठी निवडू नये, असे विष्णुपुराणातल्या एका श्लोकात म्हटले आहे. नग्निका म्हणजे जी अद्यापि स्त्रीभावाला प्राप्त झाली नाही, अशी कन्या विवाहाला योग्य होय, असे निबंधग्रंथात म्हटले आहे. कन्या वराहून वयाने लहान असावी. तिच्या ठिकाणी वंध्यत्वादी दोष नसावे. तात्पर्य, वधू सर्वप्रकारे आदर्श, आकर्षक, सुंदर, सुस्वभावी, मधुरभाषी, इ. गुणांनी युक्त असावी, असेच सर्व धर्मशास्त्रकारांचे मत आहे. धर्मशास्त्रातला हा आदर्शवाद ठीक असला, तरी तो काटेकोरपणे अंमलात आणायचा झाल्यास, शेकडा पन्नास मुली लग्नावाचून राहण्याची शक्यता आहे. पण तसे होत नाही. व्यवहार हा धर्मशास्त्रापेक्षा रोखठोक असतो. माणसे पुष्कळदा मुलीच्या सौंदर्यादी गुणांकडे दुर्लक्ष करून अन्य गोष्टींना महत्त्व देतात आणि सामान्य व असुंदर मुलींचीही लग्ने होतात.

वरपरीक्षा — गुणवान वधूला वरही गुणीच मिळायला हवा. त्या दृष्टीने वराच्या अंगी कोणते गुण असावे हे सांगताना मनू म्हणतो— लग्नापूर्वी त्याचे ब्रह्मचर्य अखंड असले पाहिजे. एक, दोन, किंवा तीन वेदांचे अध्ययन त्याने केलेले असले पाहिजे (३.२). वीरमित्रोदयात वराचे वय प्रथम लक्षात घ्यावे, असे सांगितले आहे. ज्या पुरुषाचे लग्नाचे वय उलटून गेले आहे, अशा पुरुषाच्या अंगी कितीही चांगले गुण असले, तरी त्यांचा काय उपयोग ! संपत्ती, सौंदर्य, विद्या, बुद्धी आणि कुल हे वराचे अपेक्षित गुण असून, ते क्रमाने एकाहून एक श्रेष्ठ आहेत. कुल, शील, शरीर, वय, विद्या, वित्त आणि साधनसंपन्नता या सात गोष्टींची परीक्षा करूनच वर पसंत करावा, असे यमस्मृतीत म्हटले आहे. पारस्कर गृह्यसूत्रात वराच्या पौरुषावर विशेष भर दिलेला आहे. नारदाने चौदा प्रकारची नपुंसकलक्षणे सांगून, त्यांनी युक्त असा वर विवाहाला अयोग्य ठरवला आहे. संन्यासी, मित्रांनी टाकलेला, असवर्ण, पक्षाघाताने पीडित, प्रच्छन्न वेषात राहणारा, पोट सुटलेला, पतित व नपुंसक असा वर सर्वथा अयोग्य होय, असे कात्यायन म्हणतो. जो फार दूर किंवा फार जवळ आहे, जो अतिबलवान् किंवा अतिदुर्बल आहे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि जो मंदबुद्धी असून, ज्याच्याजवळ उपजीविकेचे कोणतेही साधन नाही, असा वर विवाहाला अयोग्य होय, असे वसिष्ठाने सांगितले आहे.

कुलपरीक्षा – विवाहसंबंधात सर्व शास्त्रकारांनी कुलाला फार महत्त्व दिले आहे. आईचे कुल आणि बापाचे कुल अशा दोन्ही कुलांची प्रथम परीक्षा करावी, असे आश्वलायन गृह्यसूत्रात म्हटले आहे (१.५). उत्तम कुलातल्या पुरुषाशी विवाहसंबंध करावा आणि अधमकुलात मुलगी देऊ नये किंवा तशा कुलातली मुलगी स्वीकारू नये, असे मनूनेही स्पष्ट म्हटले आहे. स्मृत्युत्तरकाळी कुलाचे महत्त्व इतके वाढले, की मुलगी वराला नव्हे, तर त्याच्या कुलालाच दिली जाते, असे शास्त्रकार प्रतिपादू लागले. विशेषेकरून ब्राह्मणवर्गात या प्रवृत्तीने बळ घेतले. कुलाच्या तुलनेने विद्यासंपन्नताही गौण ठरली. ब्राह्मणाचे केवळ कुलच पाहावे, त्याची विद्या नव्हे, असे विष्णुस्मृतीत म्हटले आहे. कुलीनतेची व्याख्या करताना दहा पिढ्या जे कुल विख्यात श्रोत्रियांनी संपन्न आहे, असे कुल श्रेष्ठ समजावे, असे याज्ञवल्क्य म्हणतो (१.५४).

नैतिक आणि भौतिक कारणांनी अनेक कुले निषिद्ध ठरवली गेली आहेत. ज्या कुलांत सत्कृत्ये होत नाहीत, ज्यांतले पुरुष संतानरहित आहेत, ज्या कुलांत वेदशास्त्रांच्या अध्ययन–अध्यापनाची परंपरा नाही, ज्या कुलातल्या स्त्री–पुरुषांच्या शरीरावर दाट आणि लांब केस आहेत, जी कुले क्षय, मंदाग्नी, श्वेतकुष्ठ, गलितकुष्ठ अशा रोगांनी ग्रस्त आहेत, ती कुले विवाहसंबंधाला वर्ज्य समजावी, असे मनू म्हणतो (३.६; ३.१७). नैतिकदृष्ट्या पुढे दिलेली कुले वर्ज्य ठरवण्यात आली होती -- चोरटे, नास्तिक, निंद्य साधनांनी उपजीविका करणारी, कुरूप, बलवंतांशी सदैव शत्रुत्व करणारी, राज्याचे शत्रू, श्राद्धभोजी, भित्री आणि अपमानित अशी कुले; त्याचप्रमाणे ज्या कुलांतल्या स्त्रिया वंध्या किंवा केवळ मुलींनाच जन्म देणाऱ्या असतील, अशी कुले वर्ज्य करावी, असे मनूने म्हटले आहे.

कुलाच्या बाबतीत इतकी सावधानता घेण्याचे कारण मुख्यत्वे सुप्रजाजननशास्त्राशी संबद्ध होते. भौतिक, बौद्धिक आणि नैतिक दृष्ट्यांनी हीन, दुर्बल आणि विकृत अशा कुलांशी संबंध आल्यास संतती चांगली निपजत नाही, हे तत्त्व धर्मशास्त्रकारांना पूर्णपणे जाणवले होते.

विवाहयोग्य वय – ऋग्वेदकाळी भारतात विवाहसंस्था प्रतिष्ठित झालेली असली, तरी त्या काळातल्या वधू-वरांची वयोमर्यादा तिथे सांगितलेली नाही. मात्र ऋग्वेद व अथर्ववेद यांतील मंत्रांवरून स्पष्ट दिसते, की त्या काळातले वधू-वर प्रौढ असत. त्यांना समज आलेली असे. तत्कालीन तरुण एखादी मुलगी आवडली असल्यास तिला मागणी घाली आणि ती मुलगी तो तरुण योग्य वाटल्यास स्वतःच्या इच्छेनुसार त्या मागणीला संमती देई (ऋ. १०.८५; अथर्व. १४.१.२). लहान वयाच्या मुला-मुलींत ही गोष्ट असंभवनीय ठरते. वैदिक कालातील कन्येचा विवाह ती वयात आल्यानंतर म्हणजेच तिच्या ठिकाणी प्रजोत्पादनाची क्षमता आल्यावर होत असे आणि ही गोष्ट सूचित करणारे कित्येक मंत्र वेदात आहेत. गृह्यसूत्रांच्या कालातही यात फारसा बदल झाला नव्हता. चतुर्थीकर्मासारख्या संस्कारावरून असे कळते, की विवाहानंतर लगेच पति-पत्नी समागमसुख उपभोगू शकत. विवाहाच्या वेळी जर वधू रजस्वला झाली तर काय करावे, याविषयी बोधायनाने ज्या सूचना केल्या आहेत, त्याही कन्येच्या प्रौढत्वाच्या निदर्शक होत.

रामायण व महाभारत यांच्या कालातल्या मुलीही विवाहसमयी प्रौढ असत. दशरथाच्या पुत्रांशी लग्न करून आलेल्या वधूंनी लगेच आपापल्या पतींशी एकांतात समागमसुख उपभोगले होते (वा. रा. १.७७.१४). त्या काळी मुलींचे आईवडील मुलींना ऋतुप्राप्ती झाल्यानंतरही काही वर्षे योग्य वर मिळावा यासाठी वाट पाहत. शकुंतलेने दुष्यंताशी गांधर्व विवाह केलेला पाहून कण्व तिला म्हणाला. " हे शुचिस्मिते, आजवर तुझे अनेक ऋतुकाल (संभोगावाचून) व्यर्थ गेले. आज दुष्यंताशी विवाह केल्याने ते आता सफल होतील. " दमयंती, सावित्री, द्रौपदी, सुभद्रा, इ. महाभारतातल्या स्त्रिया प्रौढपणीच विवाहित झाल्या आहेत.

सनपूर्व पाचशे वर्षे हा धर्मसूत्रांच्या निर्मितीचा काल होय. त्या काळी मुलींचे विवाह प्रौढ वयात होत; पण त्यात मुलीच्या विवाहाची वयोमर्यादा कमी करण्याची प्रवृत्ती सूचित होते. प्राचीन धर्मशास्त्रकारांच्या सर्व मतांचा आणि विधिनिषेधांचा तौलनिक अभ्यास करून म. म. काणे यांनी या विषयाचे विवेचन केले आहे, ते असे--

प्राचीन धर्मशास्त्रग्रंथ पाहता, मुलीच्या लग्नाचे वय चारपासून वीसपर्यंत कोणतेही चाले, असे आढळून येते. अमुकच वर्षी मुलीचे लग्न करावे, असे निश्चयात्मक कोठेही सांगितलेले नाही. मुलगी अंगावर वस्त्र घेऊ लागण्यापूर्वी (प्राग्वाससः प्रतिपत्तेरित्येके) लग्न करावे, असे काहींचे मत देऊन, गौतमाने ऋतुप्राप्तीपूर्वी विवाह करावा (प्रदानं प्रागृतोः), असा स्वतःचा अभिप्राय सांगितला आहे. स्मृतिकारांना हा सिद्धांत मान्य आहे. या प्रकरणी नग्निका हा जो शब्द मूळ विवाहयोग्य कन्येसंबंधाने योजिलेला आहे, त्याचे अनेकांनी अनेक अर्थ केले आहेत. गृह्यसंग्रहात ' कुचहीना तु नग्निका ' असे म्हटले आहे. मातृदत्ताने ' नग्निकामासन्नार्तवाम् ' असे सांगून ' तस्माद्वस्त्रविक्षेपणार्हा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नग्निका मैथुनार्हा' असे स्पष्टीकरणही केले आहे. मानवगृह्य-सूत्रातील नग्निका शब्दावर टीका करताना अष्टावक्र म्हणतो– 'नग्नैव नग्निका, अप्राप्तस्त्रीभावाम् अयौवनरसां श्रेष्ठां लावण्यवतीम्' असा मतभेद असल्यामुळे 'तुल्यबलविरोधे विकल्पः' हा पूर्वी सांगितलेला न्याय या बाबतीत लावणेच इष्ट होईल. आपल्या मुलीला अगदी मनाजोगे स्थळ मिळाल्यास चवथ्या वर्षीही लग्न करावे; पण तसे न मिळेल तर 'काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि। न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित्'।। या मनुवचनाप्रमाणेही (९.८९) वागण्यास हरकत नाही. गुणवानालाच कन्या द्यावी हा उत्तम पक्ष, असे कालिदासानेही म्हटले आहे. (गुणवते कन्यका प्रदेया इति तावत्प्रथमः कल्पः।– शाकुंतल)

सामान्यतः पाहता पंधराव्या किंवा सोळाव्या वर्षी मुलींची लग्ने पूर्वी होत असत, असे दिसते. याविषयी मोठे प्रमाण म्हणजे बहुतेक प्रत्येक गृह्यसूत्रात सांगितलेले चतुर्थीकर्म होय. विवाहविधीनंतर किती दिवस ब्रह्मचर्य पाळावे हे सांगताना वर्षांचा अवधी दिला आहे व शेवटी तीन दिवस तरी पाळावे, असे पारस्कर गृह्यसूत्रात म्हटले आहे. आश्वलायन, शांखायन, गोभिल यांही गृह्यसूत्रांत तसेच सांगितले आहे. 'त्रिरात्रमुभयोरधःशय्या ब्रह्मचर्यं क्षारलवणवर्जनं च' असे आपस्तंबगृह्यसूत्रातही आहे. कन्या ऋतुमती झाल्यावरही लग्न होई. आश्वलायनगृह्यसूत्रातील 'यत्तु समानं तद्वक्ष्यामः' = 'जे सर्वत्र लागू आहेत, तेच धर्म सांगतो' या वचनावरील टीकेत इ. स. च्या बाराव्या शतकात होऊन गेलेला हरदत्त म्हणतो, 'काही देशांत विवाहानंतर लगेच समावेशन म्हणजे संभोग होतो असे आढळते; पण ही गोष्ट तीन रात्री किंवा बारा रात्री ब्रह्मचर्य पाळावे, असे जे या सूत्रात पुढे सांगण्यात येणार आहे, त्याशी विरुद्ध आहे.' या सर्व गोष्टीवरून मुलींच्या लग्नाच्या वयाची कल्पना येईल. 'ऋतुप्राप्तीनंतर कन्येने तीन वर्षे, आपला पिता आपले लग्न करतो की काय याची वाट पाहावी व तेव्हाही पित्याने लग्न न केल्यास तिने स्वतः आपला पती निवडावा; त्यात पाप नाही' असे मनूने म्हटले आहे (९.२२).

पण ही वयोमर्यादा संकुचित होऊन आठ वर्षांवर आली. 'अष्टवर्षा भवेद्गौरी नववर्षा तु रोहिणी। दशवर्षा भवेत्कन्या तत ऊर्ध्वं रजस्वला' अशा व्याख्या प्रचारात येऊन अविवाहित रजस्वला कन्येला रजोदर्शन घडल्यास माता–पिता व वडील बंधू यांना नरकप्राप्ती होते, असे प्रतिपादन होऊ लागले (पराशर स्मृती). आणि आठवे वर्ष हे मुलीचे वय विवाहास उत्तम असे ठरविण्यात आले. वैखानसस्मार्तप्रश्नात दहा ते बारा वर्षांच्या मुलीला गौरी म्हटले आहे, तर पराशर, यम, संवर्त यांनी आठ वर्षांच्या मुलीला गौरी म्हटले आहे. स्मृतींत विरोध असल्यामुळे वयाचे बाबतीत विकल्प आहे व दोषासंबंधाने जी वाक्ये आहेत, ती निंदात्मक असल्यामुळे अर्थवाद आहेत, असेच मानले पाहिजे. 'विवाहो ह्यष्टवर्षायाः कन्यायास्तु प्रशस्यते' असा जो दंडक घालण्यात आला याची कारणे काय, असा प्रश्न आहे. हूण, मुसलमान, इत्यादी विधर्मीय लोकांच्या जाचामुळे व स्त्रियांना भिक्षुणी बनविण्याच्या पद्धतीमुळे मुलींची लग्ने एकदाची लवकर उरकून, त्यांना कोणाच्या तरी हाती लावून द्यावे, अशी आवश्यकता उत्पन्न झाल्यामुळे हा प्रकार झाला असावा. प्राचीन स्मृतींत, कन्या ऋतुमती झाल्यावर तिने विवाह केला तर तिच्या पतीला दोष नाही, असे म्हटले आहे (मनु. ९.९२). पण पुढील स्मृतींत पतीला दोष आहे असे म्हटले आहे. पुरुषांना विवाहवयाची मर्यादा स्पष्ट सांगितलेली नाही; पण आठव्या वर्षी उपनयन व पुढे बारा वर्षे वेदाध्ययन व ब्रह्मचर्य ही दोन्ही जमेस धरली म्हणजे पुरुषाचे विवाहाचे वय विसापासून पुढे होते, असे सहजच ठरते. मनूनेही तीस वर्षांच्या पुरुषाने बारा वर्षांच्या मुलीशी व चोवीस वर्षांच्या पुरुषाने आठ वर्षांच्या मुलीशी लग्न करावे, असे म्हटले आहे.

भारतात ब्रिटिश अंमल सुरू झाला, त्या वेळी मुलीचे विवाहयोग्य वय आठ ते नऊ वर्षांचे असल्याचे दिसते. ब्रिटिशशासनाबरोबरच या देशात पाश्चात्य विद्यांचा प्रसार होऊ लागला. शिकलेले लोक पोथीनिष्ठ विचारसरणीं सोडून स्वतंत्र प्रज्ञेने विचार करायला शिकले. या लोकांची सनातनी लोक सुधारक म्हणून हेटाळणी करीत. पण त्यामुळे नवे विचार दबले नाहीत. मुलामुलींचे लग्नाचे वय वाढवावे, असे त्यांना वाटू लागले. या आणि अशाच अन्यही सामाजिक प्रश्नांच्या विचारासाठी सामाजिक परिषदा भरू लागल्या. त्यातच इ. स. च्या १९ व्या शतकाच्या अखेरीस प्लेगाच्या साथीने देशात मोठाच कहर उडवून दिला. या सर्वांचा परिणाम म्हणून मुलींची विवाहमर्यादा ८ वर्षांपासून १३ वर्षांपर्यंत गेली. तथापि २० वे शतक सुरू होईपर्यंत मुलींच्या विवाहाचे वय ऋतुप्राप्तीपर्यंत वाढवण्याची प्रवृत्ती झाली नाही. ते काम बदलत्या सामाजिक परिस्थितीने केले.

पूर्वी सर्व कुटुंबे अविभक्त असत; पण २० व्या शतकात कुटुंबातली माणसे नोकरी-धंद्यानिमित्त देशभर पांगू लागली. त्याचप्रमाणे लोकांना स्त्रीशिक्षणाची उपयुक्तता पटू लागली आणि मुलींच्या शिक्षणासाठी १०–१२ वर्षांचा काल जाऊ लागला. तरुणांना जीवनासाठी आर्थिक क्षेत्रात फार मोठा झगडा करण्याची वेळ आली. त्यामुळे ते पंचविशी ओलांडीपर्यंत लग्नाचा विचारच करीनासे झाले. अशा स्थितीत धर्मशास्त्राकडे कानाडोळा करणे अपरिहार्यच होते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

१९२९ साली लग्नाच्या बाबतीत शारदाकायदा संमत झाला आणि त्या कायद्यान्वये मुलांच्या व मुलींच्या लग्नाची किमान वयोमर्यादा अनुक्रमे अठरा व चौदा ही ठरली. या कायद्याविरुद्ध पुराणमतवादी लोकांनी बराच आरडा-ओरडा केला; पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर तर वधूच्या वयाची मर्यादा यापेक्षाही वाढू लागली. महागाई वाढली. जीवनकलह तीव्रतर होऊ लागला. आधी आई-बापांच्या आणि नंतर पतीच्या संसारात खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी मध्यम वर्गातल्या बऱ्याच सुशिक्षित मुली नोकऱ्या करू लागल्या. त्या समाजात अधिक मिसळू लागल्या. त्यामुळे त्यांनाही आपले लग्न लवकर होऊ नये असे वाटू लागले. परिणामी मध्यमवर्गात मुलींच्या विवाहाचे वय २०–२२ च्या वर गेले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात ते २५पर्यंत् पुढे गेले आहे. बालविवाह तर नामशेषच झाले आहेत. ग्रामीण समाजातंही युवती वयात येईपर्यंत तिचे लग्न होत नाही. वेदकाळी व ब्राह्मणकाळी लग्नाच्या वेळी मुली प्रौढ असत आणि त्याचे कारण त्यांचे उपनयन व वेदाध्ययन हे असे. आजही वेगळ्या प्रकारे ते आहे. त्या काळातील कित्येक स्त्रिया आमरण अविवाहित राहून ब्रह्मवादिनी बनत. आजही अविवाहित राहून समाजकार्याला सर्वस्वी वाहून घेणाऱ्या काही सुशिक्षित स्त्रिया समाजात आढळतात. इथवर सारे जे घडले ते परिस्थितिप्राप्त होते; पण मुलामुलींच्या विवाहवयाबाबत वेगळा विचार करण्याची वेळ आली आहे किंवा ती पुढे येईल, हा विचार मनात ठेवून प्रा. अ. स. अळतेकर लिहितात, ते असे –

समाजाचे परिवर्तन घडत असले तरी, त्यात जे धोके संभवनीय आहेत, त्यांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. कन्येचा विवाह दहाव्या वर्षी होणे जितके अनिष्ट, तितकाच तो तिसाव्या वर्षी होणेही अनिष्टच आहे. प्राचीन काळी प्रौढपणी मुलींची लग्ने होत, त्यामागे धार्मिक व आध्यात्मिक दृष्टी होती. समाजातले एकंदर वातावरण नीतीला पोषक होते. त्या काळी ब्रह्मचर्याचे कठोर पालन केले जात असे. सांप्रत तशी परिस्थिती नाही. धर्माचे अधिष्ठान ढासळले आहे. समाजाच्या आचारविचारात नीतीला महत्त्व उरले नाही. मुलींभोवती अनेक विलोभने पसरली आहेत. एकंदर वातावरणच नैतिक दृष्ट्या दूषित झाले आहे. अशा वातावरणात मुक्तपणे वावरत असताना मुलामुलींचे पाऊल वाकडे पडण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे बालविवाहापेक्षा प्रौढविवाह फारसे बरे नाहीत, असे म्हणण्याची पाळी येण्याचा संभव आहे. अशा वेळी समाजधुरीणांनी सर्व परिस्थितीचा विचार करून वधू-वरांचे ऐन तारुण्यात लग्न होऊन ती संसाराला कशी लागतील, याविषयी योग्य तो विचार करणे जरूर आहे.

पत्रिकामेलन – वधू-वर उभय पक्षांना पसंत पडले, तरी तेवढ्यावरच लग्न ठरत नाही. त्यासाठी वधू-वरांच्या जन्मपत्रिका एकमेकींशी जुळवून पाहतात व त्या जुळणीत आवश्यक तेवढे गुण मिळाले तरच लग्नाविषयी पुढील बोलणी करतात. या प्रकाराला पत्रिकामेलन किंवा घटित पाहणे, असे म्हणतात. पत्रिका जुळविण्यासाठी वर्ण, वश्य, नक्षत्र, योनी, ग्रह, गण, कूट व नाडी एवढ्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. वरील आठही प्रकार सर्व प्रकारे जमल्यास एकोत्तर वृद्धीने छत्तीस गुण येतात. कमीत कमी अठरा गुण जमल्यास पत्रिका जुळल्या असे समजतात. अठराहून जितके अधिक गुण येतील तेवढे चांगले.

वधू-वरांचे जन्मनक्षत्र व जन्मराशी यांवरून घटिताचा विचार करायचा असतो. घटित जुळल्यावर परस्परांच्या जन्मकुंडलीतल्या ग्रहांचेही आनुकूल्य व बलाबल पाहतात. त्यासाठी जन्मवेळ निश्चित घटका-पळांनिशी समजावी लागते. जन्मवेळेबद्दलच जर खात्री नसेल, तर घटिताचा काहीही उपयोग नाही. वस्तुतः घटित पाहणे हेच मुळी ऐच्छिक आहे. धर्मशास्त्रात विवाह जुळवताना गोत्र-प्रवर आणि सापिंड्य यांचा विचार आवश्यक सांगितला आहे; पण घटिताबद्दल काहीच सांगितलेले नाही. वर्ण, वश्य, इ. आठ प्रकार; तसेच मंगळ पाहणे या गोष्टींचा कोणत्याही गृह्यसूत्रांत उल्लेख नाही. पण शास्त्र नसले तरी रूढी मात्र तशी पडली असून, ती शास्त्रापेक्षाही बलीयसी ठरली आहे.

घटित पाहण्याची पद्धत अशी –

राशींचे स्वामी, वर्ण व जाती

राशी	मेष	वृषभ	मिथुन	कर्क	सिंह	कन्या	तुला	वृश्चिक	धनू	मकर	कुंभ	मीन
स्वामी	मंगळ	शुक्र	बुध	चंद्र	रवी	बुध	शुक्र	मंगळ	गुरू	शनी	शनी	गुरू
वर्ण	क्षत्रिय	वैश्य	शूद्र	ब्राह्मण	क्षत्रिय	वैश्य	शूद्र	ब्राह्मण	क्षत्रिय	वैश्य	शूद्र	ब्राह्मण
जाती	वनचर	वनचर	मनुष्य	जलचर	वनचर	मनुष्य	मनुष्य	वनचर	मनुष्य	जलचर	मनुष्य	जलचर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

(१) वर्णगुण – वरील कोष्टकात राशींचे स्वामी, त्यांचे वर्ण व जाती दिल्या आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र असे चार वर्ण आहेत. प्रत्येक राशीला वरीलपैकी कोणता तरी वर्ण असतोच. वर्ण एक किंवा वधूपेक्षा वराचा वर्ण वरचा असेल, तर एक गुण धरतात. त्याच्या उलट असेल तर गुण शून्य.

(२) वश्य गुण – मनुष्यराशीला जलचरराशी भक्ष्य आहेत. सिंहाशिवाय इतर सर्व राशी मनुष्याला वश्य आहेत. वृश्चिक हा सिंहाचा शत्रू आहे. मनुष्यराशीला जलचर व सिंह हे शत्रू आहेत. दोघांच्याही राशी एकच असतील तर मित्रत्व समजावे. याला दोन गुण आहेत. शत्रु-वश्य संबंधाला एक गुण, वश्य-भक्ष्य संबंधाला अर्धा गुण व शत्रु-भक्ष्य संबंधाला शून्य गुण समजावा.

(३) योनीचे किंवा जातीचे गुण – पुढील कोष्टकात दोन दोन नक्षत्रांची एक अशा चौदा जाती दाखविल्या आहेत. वधू-

नक्षत्रांच्या जाती

नक्षत्रे		जाती
अश्विनी	शततारका	अश्व
भरणी	रेवती	हत्ती
कृत्तिका	पुष्य	मेंढा
रोहिणी	मृग	सर्प
आर्द्रा	मूळ	कुत्रा
पुनर्वसू	आश्लेषा	मार्जार
मघा	पूर्वा फा.	उंदीर
उत्तरा फा.	उत्तरा भा.	गाय
हस्त	स्वाती	महिष
चित्रा	विशाखा	व्याघ्र
अनुराधा	ज्येष्ठा	हरिण
पूर्वाषाढा	श्रवण	वानर
उत्तराषाढा	अभिजित	मुंगुस
धनिष्ठा	पूर्वा भाद्र.	सिंह

वरांच्या नक्षत्रांची एक जात असेल तर चार गुण समजावे. गाय-महिष हे परस्पर मित्र होत. त्यांचे तीन गुण समजावे. कुत्रा व सर्प हे परस्पर उदासीन आहेत. त्यांचे दोन गुण मानावे. सिंह-हत्ती, महिष-घोडा, उंदीर-मांजर, कुत्रा-हरिण, वानर-मेंढा, मुंगूस–सर्प आणि गाय-वाघ यांचे जातिवैर आहे. अशा संबंधांत गुण शून्य समजावे.

(४) नक्षत्रगुण – वधूच्या जन्मनक्षत्रापासून वराचे व वराच्या जन्मनक्षत्रापासून वधूचे जन्मनक्षत्र मोजून जी संख्या येईल, तिला पृथक पृथक नवांनी भागावे. तीन, पाच, सात बाकी राहील तर अशुभ; याशिवाय कोणताही अंक शेष राहिला तर चांगले. दोन्ही बाजूंनी तीन, पाच, सात यांपैकी कोणताच अंक शेष न राहील तर गुण तीन. एकाकडून तीन, पाच, सात पैकी कोणता तरी अंक राहिला आणि दुसरीकडून इतर अंक शेष राहिला, तर गुण दीड आणि दोन्हीकडूनही तीन, पाच, सात यांपैकीच कोणताही अंक शेष राहिला तर गुण शून्य.

(५) ग्रहगुण – पुढील कोष्टकात दाखविल्याप्रमाणे वधू-वरांचा राशिस्वामी एकच असेल किंवा ते दोघे परस्पर मित्र असतील तर पाच गुण मानावे. एक मित्र आणि दुसरा सम असेल तर गुण चार, दोघेही परस्पर सम असतील तर गुण तीन. मित्र-शत्रू असतील तर गुण एक, सम-शत्रू असतील तर गुण अर्धा आणि परस्पर शत्रू असतील तर गुण शून्य.

ग्रहांचे मित्रत्व-शत्रुत्व

ग्रह	मित्र	शत्रू	सम
रवी	चंद्र, मंगळ, गुरू	शुक्र, शनी	बुध
चंद्र	रवी, बुध	०	मंगळ, गुरू, शुक्र, शनी
मंगळ	रवी, चंद्र, गुरू	बुध	शुक्र, शनी
बुध	रवी, शुक्र	चंद्र	मंगळ, गुरू, शनी
गुरू	रवी, चंद्र, मंगळ	बुध, शुक्र	शनी
शुक्र	बुध, शनी	चंद्र, रवी	मंगळ, गुरू
शनी	बुध, शुक्र	रवी, चंद्र, मंगळ	गुरू

(६) गणगुण – पुढील कोष्टकात प्रत्येक नक्षत्राचा देव, मनुष्य किंवा राक्षस असा कोणता तरी गण असल्याचे दाखविले आहे. वधू-वरांचा गण एक किंवा वधूचा मनुष्य आणि वराचा

देवगण	मनुष्यगण	राक्षसगण
अश्विनी	भरणी	कृत्तिका
मृग	रोहिणी	आश्लेषा
पुनर्वसू	आर्द्रा	मघा
पुष्य	पूर्वाफाल्गुनी	चित्रा
हस्त	उत्तराफाल्गुनी	विशाखा
स्वाती	पूर्वाषाढा	ज्येष्ठा
अनुराधा	उत्तराषाढा	मूळ
श्रवण	पूर्वाभाद्रपदा	धनिष्ठा
रेवती	उत्तराभाद्रपदा	शततारका

देव गण असेल तर गुण सहा, वधूचा देव व वराचा मनुष्य असेल

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

... गुण पाच. वधूचा देव आणि वराचा राक्षस असेल तर गुण ... आणि इतरत्र शून्य गुण होय. मनुष्य गणाच्या वराचा ... गणाच्या वधूशी विवाह करीत नाहीत. मात्र याला पुढील ... आहेत —

सत्कूट असून अठरांपेक्षा अधिक गुण असणे, ग्रहमैत्री असणे ... दोघी शुद्धी असणे.

(७) कूटगुण — वधूच्या राशीपासून वराची व वराच्या ...पासून वधूची रास मोजावी. एकाच्या राशीपासून दुसऱ्याची ... सहावी किंवा आठवी येईल तर षडाष्टक होते; दुसरी किंवा ...वी येईल तर द्विर्द्वादशक होते आणि पाचवी किंवा नववी ... तर नवपंचम होते. ही तीनही दुष्कूटे होत.

एकापासून दुसऱ्याची रास तिसरी किंवा अकरावी, चौथी ... दहावी, किंवा परस्पर सातवी येईल तर ती सत्कूटे होत.

सत्कूट असेल तर गुण सात, दुष्कूट असूनही योनिमैत्री असेल ... गुण चार, दोहोंतून एक असेल तर गुण एक आणि एकही ... तर गुण शून्य. सत्कूट असून नृदूर (वधूच्या नक्षत्रापासून ... नक्षत्र दुसरे असणे) व योनिवैर नसेल तर गुण सहा. ... भिन्न असून, राशी एक असेल तर गुण पाच. तसेच नक्षत्र ... असून, राशी एक आणि नक्षत्र एक असून, चरण भिन्न ...तील तरीही गुण पाच समजावे. नक्षत्रे भिन्न असून, राशी एक ... आणि नक्षत्र एक असून, चरण भिन्न असतील तर हे घटित ... समजावे.

(८) नाडीगुण — पुढील कोष्टकात प्रत्येक नक्षत्राला आद्य, ... व अंत्य यांपैकी कोणती नाडी असते, ते सांगितले आहे. ...वरांची नाडी भिन्न असेल तर गुण आठ व एक नाडी असेल ... गुण शून्य.

नाडी व तिचे गुण

आद्य नाडी	मध्य नाडी	अंत्य नाडी
अश्विनी	भरणी	कृत्तिका
आर्द्रा	मृग	रोहिणी
पुनर्वसू	पुष्य	आश्लेषा
उत्तराफाल्गुनी	पूर्वाफाल्गुनी	मघा
हस्त	चित्रा	स्वाती
ज्येष्ठा	अनुराधा	विशाखा
मूळ	पूर्वाषाढा	उत्तराषाढा
शततारका	धनिष्ठा	श्रवण
पूर्वाभाद्रपदा	उत्तराभाद्रपदा	रेवती

गोदावरीच्या दक्षिण भागातल्या ब्राह्मणेतरांत आद्य व अंत्य या नाड्या एक असल्या तरी ते निषिद्ध मानीत नाहीत. नाडीला पुढील पाच अपवाद सांगितले आहेत —

वधू-वरांची नक्षत्रे एकनाडीत असून, त्या दोन नक्षत्रांपैकी एका नक्षत्राचा प्रथम चरण व दुसऱ्या नक्षत्राचा चतुर्थ चरण असेल तरच, किंवा एका नक्षत्राचा दुसरा चरण असेल तरच नाडीदोष समजावा.

वधू-वरांच्या नक्षत्रांपैकी एका नक्षत्राचा प्रथम चरण असून, दुसऱ्या नक्षत्राचा दुसरा किंवा तिसरा चरण असेल तर एक-नाडीचा दोष नाही, असे समजावे.

वधू-वरांच्या नक्षत्रांपैकी एका नक्षत्राचा दुसरा चरण असून दुसऱ्या नक्षत्राचा प्रथम किंवा चतुर्थ चरण असेल, तर एकनाडीचा दोष नाही, असे समजावे.

नाडीवाचून गुण जाणण्याचे जे सात प्रकार आहेत, ते उत्तम असतील तर एकनाडीचा दोष नाही व अठराच्यावर गुण असून, सत्कूट असेल तरीही एकनाडीचा दोष नाही, असे समजावे.

मंगळाचा दोष — वधूच्या जन्मकुंडलीत एक, चार, सात, आठ आणि बारा या स्थानी मंगळ असेल, तर ती पत्रिका मंगळाची आहे, असे समजतात. दोघांच्यापैकी एकाच्या कुंडलीत मंगळ असेल, तर तो विवाहाला अनिष्ट समजतात. याला काही अपवाद आहेत, ते असे —

वधूच्या कुंडलीत वरील पैकी ज्या स्थानी मंगळ असेल, त्याच स्थानी वराच्या कुंडलीत मंगळ, शनी, राहू किंवा केतू यांपैकी कोणताही पापग्रह असेल तर वधूच्या मंगळाचा दोष नाही. किंवा घटिताच्या छत्तीस गुणांपैकी सत्तावीसपेक्षा जास्त गुण येत असतील तरीही मंगळाचा दोष नाही. असेच आणखीही काही अपवाद आहेत.

घटित हे जन्मनक्षत्रावरून पाहायचे असते, तर व्यावहारिक नावावरून नक्षत्र व त्यावरून राशी ठरवतात. मात्र एकाचे जन्म-नक्षत्र व दुसऱ्याचे नामनक्षत्र धरून घटित जमवू नये.

ग्रहांची अनुकूलता — विवाहप्रसंगी वधूला गुरूचे व वराला रवीचे आनुकूल्य आवश्यक आहे. वधूच्या जन्मराशीपासून २।५।७।९।११ या स्थानी असलेला गुरू उत्तम, १।३।६।१० या स्थानी असलेला मध्यम आणि ४।८।१२ या स्थानी असलेला अशुभ. पण कर्क, धन आणि मीन यांतून कोणत्याही राशीला असलेला गुरू ४।८।१२ यांपैकी कोणत्याही अशुभ स्थानी असला तरी तो चांगला. वराच्या जन्मराशीपासून ३।६।१०।११ या स्थानात असेल तर रवी उत्तम आणि १।२।४।५।७।८।९।१२ या स्थानी असेल तर अनिष्ट; पण जन्मराशीपासून ३।६।१०।११ या स्थानी असेल तर तो इष्ट होय.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विवाहप्रकार – प्राचीन काळी वधू-वर विवाहबंधनाने बद्ध होत, त्या विवाहाचे आठ प्रकार मनूने सांगितले आहेत, ते असे –

ब्राह्मो दैवस्तथा चार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ।।

(मनु.३.२१)

अर्थ – ब्राह्म, दैव, आर्ष, प्राजापत्य, आसुर, गांधर्व, राक्षस आणि आठवा पैशाच अधम, असे विवाहाचे आठ प्रकार आहेत.

काही गृह्यसूत्रांत या आठ प्रकारांचा उल्लेख नाही. मानव-गृह्यसूत्रात केवळ ब्राह्म व शुल्क (आसुर) या दोनच प्रकारांचा उल्लेख आहे (१.७.१२). आश्वलायन गृह्यसूत्रातच वरील आठही प्रकारांचा निर्देश आहे.

मनूने, वरील आठ प्रकारांना प्रशस्त व अप्रशस्त अशा दोन भागांत विभक्त केले असून, पहिले चार प्रशस्त व पुढचे चार अप्रशस्त होत (मनु. ३.२४–२५). मात्र दोन्ही प्रकार वैध समजले जात. सांप्रत ब्राह्म व आसुर हे दोनच प्रकार समाजात स्वीकृत आहेत. आसुर जरी अप्रशस्त मानलेला असला तरी तो सर्वांत प्राचीन आहे. वरील आठही प्रकारांचे वर्णन असे –

(१) पैशाच–हा सर्वांत अधिक अप्रशस्त होय. यात झोपलेल्या, वेड्या किंवा मूर्च्छित अशा कन्येवर बलात्कार करून तिचा उपभोग घेतला जातो. आणि अशा रीतीने त्या कन्येला पत्नी बनविले जाते. हा प्रकार आदिम समाजातील रानटी लोकांमध्ये होता. डॉ. राजवली पांडेय म्हणतात, की वायव्य भारतात पिशाच नावाची एक जात वसत होती आणि तिच्यामध्ये ही प्रथा प्रचलित होती, म्हणून तिला पैशाच हे नाव पडले. (पैशाच विवाह पाहा).

(२) राक्षस – नातेवाइकांना मारहाण करून, रडणाऱ्या व आक्रोश करणाऱ्या कन्येला जबरदस्तीने पळवून नेणे व तिच्याशी लग्न करणे याला राक्षसविवाह म्हणतात. हा प्रकार प्राचीन लढाऊ गणांत प्रचलित होता. ते शत्रूच्या धनसंपत्तीबरोबरच त्यांच्या मुलींचीही लूटमार करीत व त्यांचा उपभोग घेत. काही विद्वानांच्या मते हा विवाहाचा प्राचीनतम प्रकार आहे. आधुनिक कालातही काही आदिवासी लोकांच्या लग्नपद्धतीत त्याचे अवशेष आढळतात.

राक्षसविवाहात जो बलप्रयोग होत असे, त्यामध्ये वधूची अनुमती आधी घेतली जात असे. ज्या मुलींना आई-बापांनी ठरविलेला वर मान्य नसे, अशा मुली आपल्या प्रियकराला स्वतःचे अपहरण करण्यास संमती देत. भागवतात वर्णिलेला रुक्मिणीहरणाचा प्रसंग पूर्वनियोजित होता. किंबहुना रुक्मिणीनेच द्वारकाधीशाला तशी गळ घातली होती. राक्षसविवाह क्षत्रियांना प्रशस्त मानला आहे (मनु. ३.२४). बलपूर्वक हरण करणे हे क्षत्रियांना प्रशस्त असल्याचे भीष्मानेही म्हटले आहे. भीष्माने विचित्रवीर्यासाठी कन्या पळवूनच आणल्या होत्या. भारतीय इतिहासात क्षत्रियांमध्ये राजपुतांच्या कालापर्यंत ही चाल होती (राक्षसविवाह पाहा).

(३) गांधर्व – ज्यात स्त्री-पुरुष परस्पर निर्णय ठरवून विवाहबद्ध होतात, त्याला गांधर्व म्हणतात. या विवाहात कामाकर्षण हेच प्रमुख सूत्र असल्यामुळे, हा विवाह अप्रशस्त मानला गेला. यात वधू-वरांच्या आई-बापांचा कुठे संबंधच येत नाही आणि लग्नाच्या आधीच संभोग होतो. हाही प्रकार फार प्राचीन आहे. संस्कृत महाकाव्यात अशा विवाहाची अनेक उदाहरणे मिळतात. हा प्रकार क्षत्रियांमध्ये विशेष प्रचलित होता. स्मृतिकारांनी जरी याला नावे ठेवली असली, तरी शकुंतलेचा पालक पिता कण्व मात्र म्हणतो, " सकाम स्त्री सकाम पुरुषाशी संगत झाली म्हणून काही विघडत नाही. जरी अशा विवाहाला धार्मिक संस्काराने पुनीत केले नाही, तरीही हा सर्वश्रेष्ठ विवाह-प्रकार होय. "

सूत्रकाली हा प्रकार प्रचारात नसावा. कारण, गृह्यसूत्रांत कन्येचे दान सांगितले आहे. कालांतराने इतर मिळकतीबरोबरच कन्या-पुत्रही कुटुंबप्रमुखाची मालमत्ता समजली जाऊ लागली. आई-बापांचे त्यांच्यावरचे नियंत्रण वाढले. ते बहुतेक सगळे विवाह आपल्या अधिकारात ठरवू लागले. वधू-वरांचे स्वातंत्र्य अशा प्रकारे संपुष्टात आल्यामुळे गांधर्वविवाहाला अवसरच उरला नाही. पुढे बालविवाह प्रचलित झाले आणि प्रणयाचा अंकुर उगविण्यापूर्वीच अशा मुली दुसऱ्याच्या मालकीच्या होऊ लागल्या. (गांधर्वविवाह पाहा).

(४) आसुर – गांधर्वापेक्षा हा विवाह श्रेष्ठतर होय. ज्या विवाहात भावी पती कन्या व तिचे पालक यांना यथाशक्ति धन देऊन स्वच्छंदतापूर्वक कन्येशी विवाह करतो, त्याला आसुर म्हणावे, असे मनू म्हणतो (मनु. ३.३१). विवाहाच्या या प्रकारात धन हेच मुख्य निर्णायक तत्त्व असते आणि कमी-जास्त प्रकारे हे मुलीला विकत घेणेच असते.

प्राचीन काळी ही प्रथा हीन मानली जात नव्हती. महाभारतावरून कळते, की भीष्माने कित्येक कुरुराजकुमारांसाठी द्रव्य देऊनच कन्या मिळवल्या होत्या. स्मृतिकारांनी या प्रकाराला परंपरागत मानले असून, यात हीनत्व असले, तरी ते अनिवार्य असल्याचे म्हटले आहे. मनू व आपस्तंब यांनी मात्र याचा निषेध केला असून, हा कन्याविक्रय असल्याचे म्हटले आहे. बोधायनाच्या मते अशा विकत घेतलेल्या स्त्रीला खऱ्या अर्थाने पत्नीपद लाभत नाही आणि ती केवळ दासी या स्वरूपात राहते (बौ. ध. सू. १.२.२०).

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या प्रकारे धर्मशास्त्रकारांनी निंद्य ठरवलेली, असली तरी अद्यापि ही प्रथा अनेक समाजात चालू आहे. आई-बापांचे दारिद्र्य हे याच्या मुळाशी एक महत्त्वाचे कारण आहे (आसुरविवाह पाहा).

(५) प्राजापत्य – मुलीला मागणी घालणाऱ्या वराला 'तुम्ही दोघे परस्पर सहकार्याने धर्माचरण व कर्तव्यपालन करा' अशी अट घालून मुलगी देणे, या प्रकाराला प्राजापत्य म्हणतात. (प्राजापत्यविवाह पाहा).

(६) आर्ष – यज्ञयागादी धर्मकार्य संपन्न करण्यासाठी वराकडून गाय-बैलांची एक जोडी घेऊन बाप कन्यादान करतो, त्या आर्ष विवाह हे नाव आहे (आर्षविवाह पाहा).

(७) दैव – पिता कन्येला अलंकृत करून आपल्या आरंभिलेल्या यज्ञात पौरोहित्य करणाऱ्या ऋत्विजाला कन्यादान करतो, या प्रकाराला दैव विवाह म्हणतात. याला दैव अशासाठी म्हटले आहे की कन्यादान देवतांना उद्देशून केल्या जाणाऱ्या यज्ञातच होत असते. हा प्रकार प्रशस्त मानलेला असला, तरी ब्राह्मविवाहापेक्षा खालच्या दर्जाचा आहे. यातले कन्यादान यज्ञीय सेवेबद्दल दक्षिणा म्हणून पुरोहिताला मिळत असे. हे दान त्यामुळे विशुद्ध ठरत नाही (दैवविवाह पाहा).

(८) ब्राह्म – हा विवाहप्रकार अत्यंत शुद्ध आणि सर्वांगीण संस्कारित असा आहे. यात वधूपिता विद्वान आणि शीलवान वराला स्वतः बोलावून आणून, तसेच त्याचा विधियुक्त सत्कार करून, त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे शुल्क न स्वीकारता, अलंकृत कन्येचे दक्षिणेसह त्याला दान करतो. सर्व स्मृतींनी या प्रकाराला एकमताने गौरविले आहे. हा विवाह बलप्रयोग, कामुकता, कोणत्याही प्रकारची अट आणि धनाभिलाषा या दोषांपासून मुक्त आहे. यात सामाजिक सुसंस्कृतपणाचे पूर्ण रूपाने दर्शन केले जाते व धार्मिक आचार-विचारांचाही अवलंब केला जातो. हा विवाहप्रकार रूढ करून समाजाने आपल्या संस्कृतीची प्रतिष्ठा केली. ऋग्वेदात वर्णिलेला सोम व सूर्या यांचा विवाह म्हणजे ब्राह्मविवाहाचेच पूर्वरूप आहे.

वरील अष्टविध विवाहांच्या बाहेरचेही काही विवाहप्रकार भिन्न भिन्न समाजांत प्रचलित आहेत, ते असे –

संबंधम – केरळात नायर नावाची एक जात आहे. तिच्यात मातृसत्ताक कुटुंबपद्धती प्रचारात होती. त्यांच्या लग्नपद्धतीत नायर मुलगी लग्न करून सासरी जात नाही, तर तिचा नवरा आवश्यक तेव्हा तिच्या घरी राहायला येतो. या पद्धतीत मुलीला मातृगृहाच्या मिळकतीचा वारसाहक्क असतो. त्यामुळे तिच्या पालनपोषणाची जबाबदारी तिच्या पतीवर फारशी पडत नाही. नवऱ्याने वधूला वर्षभर पुरेशा साड्या-चोळ्या आणि केश-प्रसाधनासाठी तेल दिले म्हणजे त्याची जबाबदारी संपते. या पद्धतीला संबंधम म्हणतात. सांप्रत ही प्रथा कायद्याने बंद पडली असली, तरी तिचे अवशेष आजही पाहायला मिळतात.

स्वयंवर – कन्येने आपल्या इच्छेनुरूप पतीची निवड करून त्याला वरणे या पद्धतीला स्वयंवर अशी संज्ञा आहे. वेदकाली कन्यादानाच्या पद्धतीपेक्षा उभयपक्षी स्वयंवराची पद्धत अधिक रूढ असावी, असे पुढील मंत्रावरून सूचित होते.–

भद्रा वधूर्भवति यत्सुपेशाः स्वयं सा मित्रं वनुते जने चित् ।

(ऋ. १०.२७.१२)

अर्थ – जी वधू भाग्यवती व लावण्यवती असते, ती समाजात स्वतःचा पती निवडते.

विवाहाच्या अगोदर प्रेम करणाऱ्याला ऋग्वेदात जार हा शब्द योजला आहे. या शब्दाला अनैतिक अर्थ नसून, प्रणयी प्रियकर असाच अर्थ त्यावरून सूचित होतो. त्या कालातल्या वधू प्रौढ असल्यामुळे अनुरूप पतीची निवड करण्याची पात्रता त्यांच्यामध्ये आलेली असे. तरुण-तरुणी त्या काळी विवाहाच्या बाबतीत पुष्कळ स्वातंत्र्य उपभोगीत. या बाबतीत त्यांचे पालक भाग घेत असल्याचे उल्लेख फारसे आढळत नाहीत. क्षत्रिय वर्णातले लोक तर पती निवडण्याच्या बाबतीत आपल्या मुलींना पूर्ण स्वातंत्र्य देत. या बाबतीत सावित्री, दमयंती, रुक्मिणी, इ. कन्यांची नावे उदाहरण म्हणून सांगता येतील.

सनपूर्व चारशे वर्षांपासून ऋतुप्राप्तीपूर्वीच मुलीचे लग्न व्हावे अशी सामाजिक धारणा बनत चालली. त्यामुळे स्वयंवरपद्धती हळूहळू बंद पडत चालली, इतकेच नव्हे तर पौराणिक कालात क्वचितच का होईना, स्वयंवरपद्धतीचा निषेधच केला आहे. क्षत्रिय वर्णातील लोकांनी मात्र धर्मशास्त्रकारांच्या या मताची फारशी पर्वा केली नाही. इ. स. च्या १२ व्या शतकापर्यंत त्यांनी स्वयंवराची प्रथा चालू ठेवली होती, असे तत्कालीन वाङ्मयातील उल्लेखांवरून दिसते. पृथ्वीराज-संयोगिता यांचे स्वयंवर हे त्याचे प्रसिद्ध उदाहरण होय.

पणविवाह – मुलीच्या लग्नासाठी एखादा पण लावून त्यात जो विजयी होईल, त्याला मुलगी देणे, असाही एक प्रकार पुराणकाळी रूढ होता. जनकाने सीतेच्या लग्नासाठी शिवधनुष्य वाकवणे हा पण ठेवला होता. द्रुपदाने यंत्रवेध करील, त्याला द्रौपदी द्यायचे ठरवले होते. श्रीकृष्णाच्या अष्ट-नायिकांपैकी काही स्त्रिया त्याने पण जिंकूनच वरल्या होत्या.

प्रेमविवाह – वधू-वरांनी परस्परांवर अनुरक्त होऊन स्वयंप्रेरणेने केलेल्या विवाहाला प्रेमविवाह अशी संज्ञा आहे. वेदोत्तर वाङ्मयात अशा विवाहाचा उल्लेख गांधर्व विवाह या नावाने केलेला आढळतो. या विवाहाच्या इष्टानिष्टतेविषयी भिन्न भिन्न

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मते होती. पण इ. स. २०० ते १८०० या काळात विशिष्ट वर्गात तरी प्रेमविवाह हा प्रकार विशेष प्रचलित असावा, असे तत्कालीन वाङ्मयात दिसते. मध्ययुगीन संस्कृत नाटके, कादंबरी, कामसूत्र, इ. ग्रंथांत प्रेमविवाहाचे बीज कसे पडे, पुढे त्याचा विकास कसकसा होत जाई, त्या कामी प्रणयी युवकयुवतींना कोणाकोणाचे कस-कसे सहाय्य होई, निर्माण झालेले प्रेम उभयतांच्या हिताचे वाटले नाही, तर त्या बाबतीत पालक मंडळी त्याला आळा कसा घालीत, प्रणयसिद्धीसाठी मंत्र-तंत्र, जादूटोणा, आजाराचे सोंग, इ. गोष्टी कशा केल्या जात, इ. प्रकारांचे तपशीलवार वर्णन केलेले आहे.

अलिकडे बदलत्या परिस्थितीमुळे बरेच प्रेमविवाह होत असल्याचे आढळून येते. त्याला कारणेही तशीच आहेत. मुलेमुली एकत्र शिकतात, एकत्र खेळतात; कलेच्या आविष्कारात एकत्र-भाग घेतात; एकत्र सहली काढतात. शिक्षण संपल्यावर तरुण-तरुणी एकत्र नोकऱ्या करतात. अशा परिस्थितीत त्यांना परस्पर आकर्षण निर्माण होणे अपरिहार्य असते. सगळेच प्रेमविवाह अशा प्रकारे आकाराला येतात. पुष्कळदा हे प्रेमविवाह जाति-धर्माच्या मर्यादाही उल्लंघून जातात. आजकाल सवर्ण आणि वर्णबाह्य जातींत विवाह घडून आल्यास सरकारकडून अशा जोडप्याला पुरस्कारही मिळतो.

सेवाविवाह – काही जातीजमातींत नवरा मुलगा बायको मिळविण्यासाठी आर्थिक दृष्ट्या असमर्थ असला, तर तो वधू-पित्याच्या घरी संकेत ठरला असेल त्याप्रमाणे नोकरी करतो. नोकरीचे मूल्य वधूमूल्य चुकते करण्याइतके झाले, की तो त्या मुलीशी लग्न करतो. काही काही वेळा लग्नाच्या आधीच वधूशी त्याचा संबंध येतो. त्या संबंधातून त्या कन्येला मुले झाली तरीही मुलीच्या आईबापांना ते पाप वाटत नाही. कित्येकदा दोन-तीन मुले झाल्यावर मग त्यांचे लग्न होते.

विनिमयविवाह – आर्थिक दृष्ट्या लग्न करण्यास अपात्र असलेला किंवा क्वचित काही शारीरिक व्यंग असलेला तरुण तशाच प्रकारच्या एखाद्या तरुणाला आपली बहीण देतो व त्या मोबदल्यात त्याची बहीण किंवा पुतणी किंवा अन्य नात्यातली मुलगी आपल्या घरी बायको म्हणून आणतो.

विधि-विधान – वधू आणि वर हे निश्चित ठरले, की मग विवाहविषयक विधि-विधान सुरू होते. प्रारंभी हे विधिविधान अत्यंत साधे आणि सुटसुटीत असावे. कन्येच्या पित्याने नातेवाईक आणि इष्टमित्र यांच्या समक्ष वधूला वराच्या हाती देणे आणि त्या दोघांनी पति-पत्नी होणे, एवढीच गोष्ट प्राचीन काळी प्रामुख्याने होत असावी. वेदपूर्वकालीन वैवाहिक विधि-विधानांची माहिती आपल्याला मिळू शकत नाही. ऋग्वेदकालात भिन्न भिन्न कुलांतले विवाहविधान थोडेसे भिन्न असण्याची शक्यता आहे; पण याही विषयात निश्चित माहिती उपलब्ध नाही. ऋग्वेदात एक (१०.८५) आणि अथर्ववेदात दोन (१४.१,२) विवाहसूक्ते आहेत. त्या सूक्तांवरून विवाहातल्या मुख्य क्रिया कोणत्या, ते समजते; पण त्यांचा अनुक्रम कळणे कठीण जाते. अथर्ववेदातल्या मंत्रांवरून हा अनुक्रम अंदाजाने सांगता येतो, तो असा – वधू सुंदर वस्त्र परिधान करी. वरच्या भागी उत्तरीय घेई. डोळ्यांत अंजन घाली. शिरोवेष्टन धारण करी. मग आपल्या मैत्रिणीसह रथात बसून वरगृही जाण्यास निघे. या रथात वराला आंदण म्हणून द्यायच्या वस्तू आणि द्रव्य असे. रथ निघाला, की वधूचा बाप तिला आशीर्वाद देताना म्हणे – ज्या प्रकारे फळ देठापासून विलग केले जाते, त्याप्रमाणे मी तुला पितृगृहातून मुक्त करतो; पतिगृहातून नाही. मी इथून तुला स्वतंत्र करतो, तिथून नाही. पतिगृहातल्या मधुर बंधनाने मी तुला बांधतो. उदार अशा इंद्राने तुला ऐश्वर्य आणि पुत्र द्यावे (अथर्व. १४. १.१७–२०).

वरगृही वधूला एका दगडावर उभी करीत. त्याला अश्मारोहण म्हणत. मग वर मंत्रोच्चारण करीत तिचे पाणिग्रहण करी आणि तिला पालनपोषणाचे वचन देई (अथर्व. १४.१. ४८–५१). त्यानंतर वर वधूला वस्त्रालंकार देई. मग भूतप्रेतांचे निराकरण करण्यासाठी मंत्र म्हणून पुरोहित त्या दंपतीला मंगल आशीर्वाद देत. मग वधू-वरांची गावातून मिरवणूक निघे. परत घरी आल्यावर वधूला उत्तरीय वस्त्र देत. ते पांघरून वधू आपल्या पतीसह गृह्याग्नीजवळ येई. तिथे विशिष्ट गवत आंथरले जाई. त्यावर बैलाचे कातडे पसरीत. त्या कातड्यावर बसून ती पतीसह अग्नीची उपासना करी (अथर्व. १४.२.२–११). एवढा संस्कार झाल्यावर रात्री पती नववधूला शयनकक्षात घेऊन जाई. त्या वेळी तिथे तिला आणखी एक विशिष्ट वस्त्र नेसायला देऊन आणि उचित मंत्रांचे उच्चारण करून तो तिला शय्येवर आरूढ व्हायला सांगे. दुसऱ्या दिवशी वधूचे ते वस्त्र पुरोहिताला दिले जाई. त्या वस्त्राबरोबरच भूतप्रेतांची पीडाही दूर गेली, असे समजत.

सूत्रकालात शास्त्रकारांनी वैदिक विवाहपद्धतीतल्या क्रिया क्रमबद्ध केल्या, त्यांचा विस्तार केला आणि त्या पद्धतीत अनेक उल्लेखनीय परिवर्तनेही केली. मधुपर्क, लाजाहोम, गाथागान, मूर्धाभिषेक, हृदयस्पर्श, सूर्यदर्शन, इ. नव्या क्रिया सूत्रकारांनी विवाहसंस्कारात समाविष्ट केल्या. सप्तपदीला त्यांनी सर्वात अधिक महत्त्व दिले.

सूत्रकालानंतर वैवाहिक विधि-विधानात आणखी भर पडली. त्यात अनेक सुधारणा झाल्या व नवीन प्रथाही निर्माण झाल्या. त्या नवीन प्रथा ग्राम आणि जनपद यांतील लोकांच्या समजुतींतून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…रीतीभातींतून विवाहसंस्कारात प्रविष्ट झाल्या. सूत्र-…कारांनी त्या रीतीरिवाजांचा आदर केला. याविषयी आश्व-…लायन गृह्यसूत्रात (१.५) स्पष्ट विधान आहे, ते असे –

अथ खलूच्चावचा जनपदधर्मा ग्रामधर्माश्च

तान् विवाहे प्रतीयात् ।

अर्थ – जे उच्च, कनिष्ठ असे जनपदातले व ग्रामातले धर्म (रूढी) असतील, त्यांचा विवाहसंस्कारात समावेश करावा. नारायणभट्ट, कमलाकर, इ. धर्मनिबंधकारांनीही आश्व-लायनाचे वरील विधान उचलून धरले आहे.

सांप्रतकाली विवाहसंस्कारात आणखी परिवर्तन घडून आले आहे. संस्काराचा मूळ गाभा कायम ठेवून त्याच्या भोवती अनेक लौकिक सोहळ्यांचे व सोपस्कारांचे जाळे विणले गेले आहे. हे सोहळे आणि सोपस्कार भारतातल्या प्रत्येक प्रदेशात, इतकेच नव्हे तर, प्रदेशाच्या भिन्न भिन्न भागांतही वेगवेगळे आहेत.

अष्टविध विवाहात ब्राह्मविवाह हा सर्वश्रेष्ठ विवाहप्रकार …. त्या विवाहाचा प्रयोग असा –

विवाहप्रयोग – विवाहप्रयोगात वाङ्‌निश्चय, सीमांतपूजन, मधुपर्क, परस्परनिरीक्षण, कन्यादान, अक्षतारोपण, विवाहहोम, …प्रवेशनीय होम, ऐरिणीदान, गृहप्रवेश व आशीर्वचन, इतकी …गे सामान्यत: येतात. प्रत्येकाचा विधी असा –

(१) वाङ्‌निश्चय – याला वाग्दान असेही म्हणतात. याचा …, कन्या व वर यांच्या पालकांनी परस्परांना विवाहविषयक वचन देणे, असा आहे. ब्राह्मविवाहात हा विधी प्रथम करायचा असतो. याचे विधान गृह्यपरिशिष्टात सांगितले आहे, ते असे – वराच्या पित्याने किंवा पालकाने ब्राह्मण व सुवासिनी यांना …बरोबर घेऊन मंगल वाद्यांच्या गजरात कन्या-पित्याच्या घरी जावे. कन्या-पित्याने त्यांचे स्वागत करावे. कन्येला पूर्वाभिमुख बसवून वर-पित्याने तिच्या हातात विडा, नारळ द्यावा. गणप-…ती इष्टदेवतांचे स्मरण करून वराच्या गोत्रप्रवरांचा उच्चार करावा. अमक्याचा पणतू, अमक्याचा नातू आणि अमक्याचा पुत्र असा अमुक नावाचा वर याची भार्या होण्यासाठी अमुक …प्रवरात उत्पन्न झालेली अमक्याची पणती, अमक्याची नात आणि अमक्याची मुलगी, अमुक नावाची कन्या हिला आम्ही स्वीकारतो, असे वर-पित्याने म्हणावे. ते ऐकून कन्या-पित्याने 'स्वीकारा' असे म्हणावे. याप्रमाणे तीन वेळा नामगोत्राचा उच्चार करावा व शेवटी कन्या-पित्याने 'प्रदास्यामि' (देतो), असे निर्धार मोठ्याने उच्चारावे. मग वरपक्षियांनी वधूच्या …पित्याची पूजा करावी. नंतर कन्येच्या पित्याने प्राङ्‌मुख …न कन्येला आपल्या डाव्या बाजूला बसवावे. देशकालाचे …ण करून वाग्दानाचा संकल्प करावा. गणपतिपूजन करावे. मग कन्येच्या मात्यापित्यांनी उठून आपल्या जागी वराच्या माता-पित्यांना बसवावे. मग पाच हळकुंडे व पाच सुपाऱ्या उभय पित्यांनी एकमेकांच्या उपरण्याच्या पदरात बांधून त्या गाठींना हळदकुंकू लावावे. ब्राह्मणांनी 'शिवा आप: सन्तु:' इ. आशी-र्वादमंत्र म्हणावे. कन्या-पित्याने तंडुलपुंजावर शचीच्या नावाने सुपारी ठेवून तिची पूजा करावी. कन्येने शचीची प्रार्थना करावी. सुवासिनींनी औक्षण करावे. नंतर उभयपक्षियांनी ब्राह्मणांची पूजा करून त्यांना दक्षिणा द्यावी.

(२) सीमांतपूजन – यात लग्नासाठी येणाऱ्या वराची वधू-पित्याने ग्रामसीमेवर पूजा करायची असते. यातही संकल्प करून गणपती व वरुण यांची पूजा करायची असते. या पूजेत वधू-पिता वराचे पाय धुवून त्याला वस्त्र-भूषणे देतो. त्याचबरोबर समस्त वरपक्षियांनाही पानसुपारी देतो. हुंड्याला कायद्याने बंदी येण्यापूर्वी वधूपिता याच वेळी वरपित्याला हुंड्याची रक्कमही देत असे. सीमांतपूजनाच्या वेळी वधूपित्याने ज्येष्ठ जावई व ज्येष्ठ मुलगी यांचा वस्त्राभरणे देऊन सत्कार करायचा असतो. त्याला ज्येष्ठ जावयाचा मान असे म्हणतात.

(३) मधुपर्क – विवाहाच्या पूर्वदिवशी वर-वधूसह त्यांच्या माता-पित्यांनी अभ्यंग स्नान करावे. मंगल वेष धारण करावा. मंडप उभारून तो सुशोभित करावा. उभय पक्षांनी आपापल्या मंडपात बसून विवाहाचा संकल्प करावा. विवाहाच्या दिवशी वराने नित्यकर्मे आटोपून इष्टमित्रांसह भोजन करावे. नूतन वस्त्रे परिधान करावी. मुंडावळी बांधून घ्याव्या. वडिलधाऱ्यांना नमस्कार करावा व वाहनात बसून इष्टमित्रांसमवेत वधूच्या घरी जाण्यास निघावे. ब्राह्मणांनी 'कनिक्रदज्जनुषं' हे सूक्त म्हणत वराबरोबर जावे. सुवासिनीही बरोबर असाव्या. मंगल वाद्ये व गीते यांच्या घोषात ही मिरवणूक निघावी. मंडपाच्या दारात सुवासिनींनी वराला ओवाळावे. वधू-पित्याने वराच्या हाती नारळ देऊन त्याला मंडपात आणावे व मधुपर्क विधीने त्याचे पूजन करावे.

दही व मध एकत्र करणे म्हणजे मधुपर्क होय. कन्या-पित्याने वराला सुशोभित आसनावर बसवून मधुपर्काने त्याची पूजा करावी. तिच्यात प्रत्येक उपचार तीन वेळा उच्चारून तो वराला समर्पण करावा. वराचे पाय धुवून ते कोऱ्या वस्त्राने पुसावे. त्या वेळी ब्राह्मणांनी 'अस्मिन् राष्ट्रे०' इ. मंत्र म्हणावे. नंतर वराने कन्या-पित्याने दिलेले मधुपर्क-पात्र आपल्या ओंजळीत घ्यावे आणि मधुपर्काकडे पाहावे. तो तीनदा ढवळावा. अंगुष्ठ व अना-मिका यांच्या चिमटीने तो तीन वेळा वर उडवावा. मग तीनदा त्याचे प्राशन करून आचमन करावे. मग कन्या-पित्याने एक धेनू वराला निवेदन करावी. वराने 'माता रुद्राणां०' हा मंत्र म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'तिला सोडून द्या' असे सांगावे. मग कन्या-पित्याने वराला वस्त्रालंकार द्यावे.

(४) परस्परनिरीक्षण – सुमुहूर्ताच्या वेळी मंडपात एका हाताच्या अंतराने पूर्व-पश्चिम तांदुळांच्या दोन राशी घालाव्या. ब्राह्मणांनी त्या दोन राशींमध्ये अंतःपट धरावा. मग पूर्वेकडील राशीवर वराला पश्चिमाभिमुख व पश्चिमेकडील राशीवर कन्येला पूर्वाभिमुख उभे करावे. दोघांच्याही हाती तांदूळ, गूळ व जिरे एकत्र करून द्यावे. दोघांनी कुलदेवतेचे स्मरण करीत अंतःपटावरील स्वस्तिकाकडे एकाग्र दृष्टीने पाहत राहावे. ब्राह्मणांनी मंगलाष्टक म्हणावे. 'सुमुहूर्ते सावधान' म्हणून अंतःपट दूर करावा. तांदूळ, गूळ व जिरे वधू-वरांनी परस्परांच्या मस्तकावर टाकावे. सांप्रत ही प्रथा अस्तित्वात नाही. त्याऐवजी वधू-वर एकमेकांना पुष्पमाला घालतात. प्रथम वधूने वराला व नंतर वराने वधूला माळ घालावी. मग उभयतांनी परस्परांकडे पाहावे. वराने वधूच्या भुवयांमध्ये दर्भाग्राने स्पर्श करावा. मग दोघांना समोरासमोर बसवून ब्राह्मणांनी 'ऋक् च वा इदमग्रे' इ. ऐतरेय ब्राह्मणातील खंडे म्हणावी. त्या वेळी वधू-वरांनी एकमेकांच्या मस्तकावर पाच वेळा अक्षता टाकाव्या.

(५) कन्यादान – हे दान कन्यापित्याने करायचे असते. त्यासाठी वराला पूर्वाभिमुख आणि वधूला पश्चिमाभिमुख उभे करावे. कन्यादानाचा संकल्प करावा. संकल्पाच्या वेळी पुढील अर्थाचा मंत्र म्हणावा –

माझ्या पितरांस ब्रह्मलोकाची प्राप्ती होऊन, त्या ठिकाणी अक्षय्य सुख लाभावे आणि या वरापासून माझ्या कन्येला होणाऱ्या संततीमुळे मातृ-पितृकुलातील मागचे बारा व पुढचे बारा पुरुष पवित्र व्हावे व माझ्यावर लक्ष्मी-नारायणांची प्रीती व्हावी, यासाठी मी ब्राह्मविधीने कन्यादान करतो.

मग एका कांस्यपात्रावर कन्येने ओंजळ करावी. तिच्यावर वराने व तिच्यावर कन्यापित्याने आपली ओंजळ करावी. मग उपाध्यायाने पूर्वी मंत्रून ठेवलेले उदकपात्र वधूच्या आईच्या हाती द्यावे. तिने आपल्या पतीच्या ओंजळीवर त्या उदकाची धार धरावी. पित्याच्या ओंजळीतून वराच्या आणि तिथून कन्येच्या ओंजळीतून ते उदक कांस्यपात्रात पडत असावे. या वेळी वधू आणि वर यांच्या गोत्र-प्रवरांचा व बाप, आजा व पणजा यांच्या नावांचा व वधू-वरांच्या नावांचा उच्चार करावा. कन्यापित्याने 'तुम्ही माझ्या कन्येचा स्वीकार करा' अशी वराला प्रार्थना करावी. अशा प्रकारे हा विधी तीनदा करावा. वराने वधूच्या उजव्या खांद्यास स्पर्श करून 'धर्म आणि प्रजा यांच्या सिद्धीसाठी या कन्येचा मी स्वीकार करतो' असे म्हणावे. मग कन्यापित्याने वराला सांगावे –

धर्मे चार्थे च कामेच नातिचरितव्या त्वयेयम् ।

अर्थ – धर्म, अर्थ व काम या तीन पुरुषार्थांच्या साधनेत तुम्ही या कन्येचे अतिक्रमण करू नये.

त्यावर वराने म्हणावे – नातिचरामि ।

अर्थ – मी अतिक्रमण करणार नाही.

मग कन्यापित्याने वराला यथाशक्ति दक्षिणा द्यावी. वराने कन्येच्या उजव्या कुशीला स्पर्श करावा. उपाध्यायाने वधू-वरांना अभिषेक करावा. मग वधू-वरांना समोरासमोर बसवून उपाध्यायाने त्यांच्या भोवती सूत्रवेष्टन करावे. सूत्राचे दोन फेरे कंठाजवळ व दोन फेरे कटीजवळ द्यावे. मग ती वेष्टने काढून घ्यावी. कुंकू लावून त्यांना पीळ घालावा. त्यात लोकर व हळकुंड बांधावे. मग ती सूत्रे वधू-वरांनी वधूच्या डाव्या व वराच्या उजव्या मनगटात बांधावी. मग पुनश्च वधू-वरांनी परस्परांच्या मस्तकावर आर्द्राक्षता टाकाव्या. तसे करताना वधूने म्हणावे, 'भगो मे कामः समृध्यताम्' = माझी ऐश्वर्यप्राप्तीची इच्छा पूर्ण होवो. वराने म्हणावे 'यज्ञो मे कामः समृध्यताम्' = यज्ञ करण्याची माझी इच्छा पूर्ण होवो. वधूने म्हणावे, 'श्रियो मे कामः समृध्यताम्' = माझी संपत्तीची इच्छा पूर्ण होवो. वराने म्हणावे, 'धर्मो मे कामः समृध्यताम्' = माझी धर्माची इच्छा पूर्ण होवो. वधूने म्हणावे, 'प्रजा मे कामः समृध्यताम्' = माझी संततीची इच्छा पूर्ण होवो. वराने म्हणावे. 'यशो मे कामः समृध्यताम्' = माझी कीर्तीची इच्छा पूर्ण होवो.

मग वराने आपल्या मुंडावळीतील एक फूल घ्यावे, ते दूध व तूप मिश्र केलेल्या पात्रात बुडवावे व त्याने वधूच्या ललाटी तिलक करावा. तसाच तिलक वधूनेही वराच्या मस्तकी करावा. वरपक्षीय सुवासिनींनी वधूला अष्टपुत्री नावाची दोन पीत वस्त्रे, चोळी. व मंगळसूत्र द्यावे. वराने ते मंगळसूत्र वधूच्या गळ्यात बांधावे.

(६) विवाहहोम – विवाहसंस्कारातले हे सर्वांत महत्त्वाचे कृत्य होय. त्यासाठी वधू-वरांना बोहल्यावर पूर्वाभिमुख बसवावे. वधू वराच्या उजव्या हाताला असावी. 'स्वीकारलेल्या या वधूला भार्यात्व प्राप्त व्हावे आणि गृह्याग्नी सिद्ध व्हावा, यासाठी मी विवाहहोम करतो.' असा वराने संकल्प करावा. स्थंडिलादी कृत्ये करावी. स्थंडिलाच्या पश्चिमेस पाटा-वरवंटा ठेवावा. ईशान्येस जलपूर्ण कलश मांडावा. स्थंडिलाच्या उत्तर बाजूस तांदुळाचे सात पुंजके घालावे. 'अग्न आयूंषि' इ. पाच मंत्रांनी घृताच्या पाच आहुती दिल्यावर वराने उठून वधूच्या पुढे उभे राहावे. पाचही बोटांसह वधूचा उताणा उजवा हात स्वतःच्या हाती धरावा. यालाच पाणिग्रहण म्हणतात. या वेळचा मंत्र असा –

गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया पत्या जरदष्टिर्यथासः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

…गो अर्यमा सविता पुरन्धिर्मह्यं त्वाऽदुर्गार्हपत्याय देवाः।
(ऋ. १०.८५.३६)

अर्थ – हा तुझा हात तुझ्या सौभाग्याकरिता मी माझ्या हातात धरतो. मी जो तुझा पती, त्याच्यासह तू वृद्ध हो. …धिपती अर्यमा, सविता, पुरंधी या सर्व दिव्य विबुधांनी …गृहस्थधर्म आचरावा म्हणून तुला माझ्या हाती दिले आहे. नंतर वधूच्या धुतलेल्या ओंजळीत तूप लावून तिच्यात वधूच्या भावाकडून मूठभर लाह्या घालाव्या. वराने त्या लाह्यांवर तुपाचा अभिघार करावा. स्वतः उभे राहावे. दोन्ही हातांनी वधूची ओंजळ धरावी व त्या लाह्या अग्नीत हवन कराव्या. मग वधूला हाती धरून अग्नीला प्रदक्षिणा करावी. वधूला दोन्ही …पाटयावर ठेवून उभे करावे. पुनश्च लाजाहोम व पुनश्च प्रदक्षिणा असे तीन वेळा करावे. शेवटी उरलेल्या सर्व लाह्या अग्नीत घालाव्या. मग स्थंडिलाच्या उत्तरेला घातलेल्या सातही तंदुलपुंजांवरून वधूला चालवावे. प्रत्येक राशीवर एक असे सात मंत्र म्हणावे. या कृत्याला सप्तपदी असे म्हणतात.

सप्तपदी झाल्यावरच विवाहसंस्कार पूर्ण होतो व त्याला कायदेशीरपणा प्राप्त होतो. इतर सर्व कृत्ये झाली तरी, सप्तपदी होईपर्यंत तो विवाह कायदेशीर ठरत नाही.

मग वराने स्वतःच्या मस्तकाने वधूच्या मस्तकाला स्पर्श करावा. रात्री विवाह झाला असल्यास मग वराने वधूसह ध्रुव, अरुंधती व सप्तर्षी यांचे दर्शन करावे. दिवसा विवाह झाला …संध्येच्या पूर्वी ध्रुवदर्शन करावे. होम ज्यावर केला असेल तो अग्नी गृह्याग्नी म्हणून त्या दिवसापासून वधू-वरांनी आपल्या …री सांभाळावा.

(७) गृहप्रवेशनीय होम – हा होम विवाहाग्नीला गृह्यत्व …साठी करायचा असतो. प्रथम अग्निस्थापनादी कृत्ये करून 'आ नः प्रजां०' इ. चार मंत्रांनी तुपाच्या चार आहुती घालाव्या. …राहिलेले तूप आपल्या अंगुलीने आपल्या व वधूच्या हृदयाला लावावे. होम संपल्यावर सुवासिनींनी वधू-वरांना कुरवंडी करावी. हा गृहप्रवेशनीय होम सांप्रत स्वतंत्रपणे न करता विवाहहोमातच चार आहुती देऊन उरकून घेतात.

(८) ऐरिणीदान – विवाहदिवसापासून चौथ्या दिवसाच्या …री कन्यापित्याने वराच्या मातेला ऐरिणीदान करायचे असते. …दानाच्या सिद्धीसाठी व कन्येच्या वंशवृद्धीसाठी हे दान करतात. सांप्रत हे विवाहाच्याच दिवशी वरात निघण्याच्या …र्वी करून घेतात.

ऐरिणी म्हणजे वेळूची लहान सोळा सुपे व वेळूची मोठी …शी एवढा संभार होय. गृह्यसूत्रांत ऐरिणीदानाला आधार नाही. केवळ रूढी म्हणून हे करतात. वेळूला वंश असे नाव आहे. त्यामुळे ऐरिणी हे वंशवृद्धीचे प्रतीक ठरते. सोळा सुपांत सौभाग्यवायने असतात. डाली किंवा झाल हिच्यामध्ये पिठाचे सोळा दिवे लावलेले असतात.

प्रारंभी ऐरिणीवर उमा–महेश्वरांची षोडशोपचारे पूजा करावी व त्या दानाचे उदक वरमातेच्या हातावर सोडावे. नंतर कन्येच्या पित्याने कन्येला वरपित्याच्या मांडीवर बसवून त्याची प्रार्थना करावी. वधूकडून सौभाग्यवायने द्यावीत. त्या दिवशी वधूच्या पित्याने उपोषित राहून ऐरिणीदान झाल्यावर मग भोजन करावे.

(९) गृहप्रवेश – नवरा मुलगा वाद्यांच्या गजरात वधूला घेऊन स्वगृही येतो, त्याला गृहप्रवेश म्हणतात. घरी आल्यावर गणपतिपूजन, पुण्याहवाचन करून लक्ष्मीपूजन करावे. त्याच वेळी वराने वधूचे आपल्या घरचे नाव ठेवावे. वडिलधाऱ्या मंडळींना उभयतांनी नमस्कार करावा.

(१०) आशीर्वचन – मग ब्राह्मणांनी पुढील अर्थाचे मंत्र म्हणून वधू-वरांना आशीर्वाद द्यावा–

तू शंभर वर्षे आरंभापासून शेवटपर्यंत नेमिष्ठ पतिव्रता असावीस. तुला अनेक पुत्र होवोत आणि तुला केव्हाही दुःख प्राप्त होऊ नये. तुझा पती सदोदित धर्मपरायण आणि सोम पिणारा असो. तुला पराक्रमी आठ पुत्र असोत. तू भाग्यशाली पतिव्रता हो. पती, पिता आणि भाऊ यांना तू नेहमी आनंद देणारी हो. इंद्राची जशी इंद्राणी, विष्णूची जशी लक्ष्मी आणि शंकराची जशी पार्वती, तशी तू पतीला प्रिय हो. अत्रीची जशी अनसूया, वसिष्ठाची जशी अरुंधती आणि कौशिकाची जशी सती, तशी तू पतीला प्रिय हो.

चतुर्थी कर्म – विवाहसंस्काराची पूर्ती पतिपत्नींच्या समागमानंतर होते. वेदकाळी विवाहाच्या वेळी वधू-वर प्रौढ असत. त्यामुळे विवाहाच्या चौथ्या रात्री त्या दोघांना समागमासाठी एकत्र येऊ देत. त्या कृत्याला चतुर्थी कर्म असे नाव आहे. गोभिलगृह्यसूत्रात चतुर्थी कर्माचा उल्लेख आहे. गर्भाधान हा विधी त्या काळी नव्हता. बालविवाह रूढ झाल्यानंतर चतुर्थी कर्म आपोआप बंद पडले. (चतुर्थी कर्म पाहा)

विवाहसंस्कारातल्या लौकिक प्रथा – रूढीने प्राप्त झालेले लौकिक सोहळे व सोपस्कार विवाहविधीमध्ये आचरावे, अशी आश्वलायनगृह्यसूत्रात त्याविषयी अनुमती दिलेली आहे. असे काही लौकिक संस्कार पुढीलप्रमाणे–

साखरपुडा – वरपक्षाकडील मंडळींना मुलगी पसंत पडल्यावर बोलणी होऊन लग्न ठरले की, त्याचे द्योतक म्हणून तिच्या हाती खाऊचा पुडा, साडी व एखादा दागिना देतात. याला साखरपुडा असे नाव आहे. हा लौकिक वाङ्निश्चयच होय. अलिकडे साखर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पुढचाचाही मोठा समारंभ करण्याची पद्धती सुरू झाली आहे.

वधू पसंत पडली, देण्याघेण्याच्या गोष्टी ठरल्या म्हणजे मग ज्योतिष्याला बोलावून लग्नाचा दिवस व मुहूर्त ठरवितात. त्याला मुहूर्तनिश्चय असे म्हणतात.

कार्याची सिद्धता – लग्नतिथी निश्चित झाल्यावर उभय पक्षांकडे तयारीला प्रारंभ होतो. लग्नसाहित्य बाजारातून विकत आणताना प्रथम हळकुंडे व कुंकू घेतात. पाच सवाष्णींना बोलावून हळकुंडे दळतात. मग सांडगे, पापड, कुरडया, गव्हले, शेवया, इ. पदार्थ तयार करतात. घराला रंग देऊन दर्शनी भागावर गणपतीचे चित्र चिकटवतात व तोरण बांधतात. त्याच्या मध्यभागी नारळ लोंबवतात. कापड घेतात व दागिने घडवतात. वाजंत्री सांगतात, मांडव घालतात, मुहूर्तमेढ रोवतात, बोहले घालतात व वधूसाठी चोळया, मणिमंगळसूत्र, जोडवी, विरोल्या, इ. वस्तू तयार करून ठेवतात. निमंत्रणासाठी कुंकुमपत्रिका छापून घेतात. काही ठिकाणी पत्रिका तर काही ठिकाणी पत्रिकेसह अक्षत देतात. वधू-वरांचे आपापल्या घरी केळवण करतात. देवक बसवतात. घाणा भरतात. कार्याच्या आदल्या दिवशी ग्रहमख करतात.

मंडावळया – लग्नप्रसंगी वधू-वरांच्या मस्तकाला मंडावळया बांधतात. मणी, वेलदोडे, लवंगा, हलवा, किंवा फुले यांचे सर तयार करून ते एका आडव्या सुताच्या दोऱ्याला दोन्ही गालांवर लोंबतील, अशा पद्धतीने गुंफतात व ते कपाळाच्या वरच्या बाजूस आडवे बांधतात. इतर जातीजमातींत कागदी बाशिंगे बांधण्याची पद्धती आहे. अशी बाशिंगे बाजारात विकत मिळतात.

हळद लावणे – हळद लावताना वधूला तिच्या आई-बापांसह गव्हाचा चौक घातलेल्या पाटावर बसवतात. मग सुवासिनी त्या तिघांच्या अंगाला तेलहळद लावून त्यांना मंगलस्नान घालतात. वधूला लावून शिल्लक राहिलेली हळद उष्टी हळद या नावाने वराकडे पाठवतात. ती हळद वराच्या अंगाला लावल्यानंतर त्यालाही मंगलस्नान घालतात.

व्याहीभोजन – कन्यादान करणाऱ्या दंपतीला लग्नानंतर मुलीला मुलगा होईपर्यंत तिच्या घरी भोजन करणे निषिद्ध मानलेले आहे. म्हणून सर्वांची एक पंगत व्हावी, या हेतूने वराचे आई-वडील वधूच्या आई-वडिलांना लग्नाच्या आधी आपल्या घरी जेवायला बोलावतात व त्यांना आहेर करतात. याला व्याही- भोजन असे नाव आहे.

तेलफळ – वरप्रस्थानापूर्वी ब्राह्मण समाजात वराकडून वधूकडे तेलफळ नेण्याची चाल आहे. या तेलफळात सुवासिक तेले, मांगलिक द्रव्ये, साडी-चोळी, ओटी भरण्याचे साहित्य, मंडावळया आणि खाद्य पदार्थ एवढ्या वस्तू असतात. वराकडील सुवासिनी ते वधूकडे मिरवीत नेतात व तिला देतात.

रुखवत – वरप्रस्थान निघण्यापूर्वी वधूपक्षाकडील मंडळी वराला बोलावण्यासाठी वाजतगाजत वराच्या जानवशात जातात. त्या मिरवणुकीबरोबर वराला बसण्यासाठी शृंगारलेले वाहनही असते. याच मिरवणुकीबरोबर वराला खाऊ घालायचे रुखवताचे पदार्थही घेऊन जातात. रुखवत खाऊन झाल्यावर वराला वधूगृही येण्याची विनंती करतात. या प्रकाराला मूळ जाणे असे नाव आहे.

वरप्रस्थान – मंगल वाद्यांच्या गजरात मिरवणुकीने वर वधूगृही जायला निघतो, त्याला वरप्रस्थान म्हणतात. वराच्या पाठीमागे हाळण्याचे ताट घेऊन मोलकरीण चालते. वराची बहीण हातात करा घेऊन वराच्या बरोबर चालते. तिला करवली असे म्हणतात. वाटेत एखाद्या देवतेचे स्थान किंवा चवाठा लागल्यास, वरावरून नारळ ओवाळून तो फोडतात. वर मांडवाच्या तोरणाखाली येताच मोलकरीण त्याच्या पायावर पाण्याची धागर ओतते. सुवासिनी किंवा वधूमाता त्याच्यावरून दहीभात ओवाळून टाकते व औक्षण करते. मग वधूचा बाप पुढे होऊन वराच्या हातात नारळ देतो व त्याला मांडवात आणतो.

गौरीहरपूजा – वधूपक्षाकडील स्त्रिया वराला रुखवत घालायला गेल्या, की इकडे वधू गौरीहरापुढे बसून, त्याची पूजा करते. या वेळी ती विशिष्ट वधूवेष करते. गौरीहराची रचना पुढीलप्रमाणे असते–

भिंतीचा चौकोन चुन्याने सारवतात. त्यावर आंब्याचे झाड व सूर्य–चंद्रांच्या प्रतिमा काढतात. त्याखाली जमिनीवर पाट अथवा पाट ठेवतात. त्याच्या चारी कोपऱ्यांना रंगवून सफेद केलेल्या व कुंकवाचे पट्टे ओढलेल्या पाच बोळक्यांच्या उतरंडी रचतात. त्यांना कच्च्या सुताचे वेष्टण करतात. पाटचावर मध्यभागी तांदुळांच्या राशीवर गौरीहराच्या प्रतिमा ठेवतात. पुढे मातीच्या घड्यात किंवा बांबूच्या रोवळीत एक दिवा ठेवतात. त्याच्या भोवती खण वेढतात. त्याला शकुन-दिवा म्हणतात. वधू या गौरीहराची पूजा करून त्यावर तांदूळ वाहत राहते. तिथूनच तिला विवाहासाठी मंडपात नेतात.

लग्नसभा – लग्नात वधू-वरांच्या गळयात माळ पडल्यावर जमलेली सर्व मंडळी मांडवातल्या बैठकीवर बसतात. तिला लग्नसभा म्हणतात. मग उभय पक्षांचे यजमान लोकांना पानसुपारी, अत्तरगुलाब, तुरे, पेढे, नारळ, इ. देऊन त्यांचा सत्कार करतात. यजमानपत्नी जमलेल्या सुवासिनींच्या ओटचा भरते.

लग्न लागल्यानंतर वराची आई वधूचे तोंड न पाहता मंडपातून आपल्या जानवशात निघून जाते. मग वधूची आई काही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सुवासिनींना बरोबर घेऊन तिच्याकडे जाते व गुळाची ढेप देऊन तिला परत आणते. मग वरमाता सुनमुखाचे दागिने आणि साडी, चोळी, इ. वस्तू बरोबर घेऊन वधूगृही येते. ती दाराशी येताच गडुळ्यांच्या धुवणाचे पाट सोडतात. ते पाट ओलांडून व कापडाच्या छताखालून ती लग्नाच्या मांडवात जाते. मग कन्येची आई तिला हिरवे लुगडे देते. अलिकडे हे उपचार लग्नाच्या दुसऱ्या दिवशी करतात व त्या वेळी वरमातेला प्रसाधनाचे साहित्य व गुडांचे वगैरे वस्तू देतात.

वरदक्षिणा – कन्यादानाच्या सांगतेसाठी वधू-पिता वराला सुवर्णदक्षिणा देतो. तिला वरदक्षिणा असे म्हणतात. त्याचबरोबर तांब्या, ताम्हन, पंचपात्री, ताट, इ. पात्रे देण्याचीही प्रथा आहे.

घास देणे – लग्नाच्या दिवशी वराच्या शेजारी वधू जेवायला बसते. तिने नवऱ्याचे नाव उखाण्यात घेऊन त्याला पक्वान्नाचा घास भरवायचा असतो. तिने घास दिल्यानंतर वरही तिला उष्टाच घास भरवतो.

सुनमुख – ऐरिणीदानापूर्वी वरमाता वधूला जे वस्त्रालंकार देते, त्याला सुनमुख म्हणतात. तसे करताना ती प्रथम सुनेच्या तोंडात साखर घालते. ऐरिणीदानाच्या वेळी वरमातेला जे लुगडे देतात, त्याला मांडी चेपणे म्हणतात.

ऐरिणीदानानंतर वधू-वरांना गौरीहराजवळ नेतात. तिथे भिंतीवर चितारलेल्या आम्रवृक्षाला वधू नागवेलीचे पान कुंकवाच्या पाण्यात बुडवून शिंपते. हे करताना ती आपला डावा पाय वराच्या उजव्या मांडीवर व डावा हात त्याच्या पगडीवर ठेवते. मग नवरा-मुलगा सासऱ्याच्या देव्हाऱ्यातून अन्नपूर्णेची मूर्ती उचलून घेतो.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशी वधू–वरांना एकत्र स्नान घालतात. त्या प्रसंगी मंगलवाद्यांच्या गजरात करवल्या वधू-वरांच्या अंगाला तेल, उटणे लावतात. स्नान चालू असताना वधू-वर एकमेकांच्या अंगावर चुळा टाकतात.

वरात – उभय पक्षांकडील मंडळी वधू-वरांना मिरवणुकीने वधूगृही घेऊन जाऊ लागली, म्हणजे त्या समुदायाला वरात असे म्हणतात. वरातीची सर्व व्यवस्था वरपक्षाने करायची असते. वरात निघाल्यावर नळे-चंद्रज्योती यांचे दारूकाम करतात.

भेट – वरात घरी आल्यावर वधू-वर घरात जात असता वराची बहीण माजघराच्या दारात त्यांना अडवते. त्या वेळी वर विचारतो. 'हे भेट कोणाचे ?' वराची बहीण उखाण्यात त्याचे नाव घेते. वर विचारतो. 'का अडवले ?' बहीण म्हणते. 'माझ्या मुलाला तुमची मुलगी देण्याचे कबूल करा.' वराने ते कबूल केल्यावर बहीण दार सोडते.

वरात घरी येताच वधू-वरांच्या वरून दहीभात ओवाळून टाकतात. वधू घरात प्रवेश करताना उंबऱ्यावर तांदुळांनी भरून ठेवलेले माप उजव्या पायाने लवंडून आत जाते. मग लक्ष्मीपूजन होऊन वधूला सासरचे नवे नाव ठेवले जाते.

धेंडा नाचवणे – लग्नकार्य निर्विघ्न पार पडल्यावर काही जातींत धेंडा नाचवण्याची पद्धती आहे. त्यासाठी वाजंत्री बोलावतात. एक सशक्त पुरुष कंबर बांधून मांडवात उभा राहतो. मग एका कडेवर नवरा मुलगा व दुसऱ्या कडेवर नवरी मुलगी घेऊन तो वाद्यांच्या तालावर मांडवभर नाचतो. त्या वेळी वधू-वरांवर गुलाल उधळतात. काही लोकांच्या घरी लग्नानंतर गोंधळ घालण्याचीही पद्धत आहे.

रास न्हाणे – लग्न झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी वधूची आई विहिणींना व इतर मानकरणींना घरी न्हायला बोलावते. त्या स्त्रिया शुभ्र पातळे नेसून वाजतगाजत निघतात. त्यांच्यासाठी रस्त्यावर परीट पायघड्या घालतो. वधूगृही आल्यावर प्रथम त्यांना वांगड्या घालतात. मग गरम पाण्याने अभ्यंगस्नान घालतात. या स्नानाला रास न्हाणे म्हणतात.

दुपारी मेजवानी होते. त्या भोजनात करंज्या व पाटवड्या अवश्य असाव्या लागतात. भोजनोत्तर व्याहीमंडळींना शेला, पागोटे व स्त्रियांना खण-लुगडी देतात.

पूर्वी लग्नसमारंभ सोळा दिवस चालत असे. त्या दिवसांत वधू-वरांची कित्येक न्हाणी होत. आठव्या, दहाव्या, तेराव्या व सोळाव्या दिवशी होणाऱ्या न्हाण्यांना अनुक्रमे आठन्हाणे, दसन्हाणे, तेरन्हाणे व सोळन्हाणे म्हणत. मधली दोन न्हाणी मुलीच्या घरी व आद्यंतीची वरगृही होत.

वर दिलेले विवाहातले सोपस्कार महाराष्ट्रातले आहेत. इतरही प्रदेशांत असेच आणि याहून वेगळे सोपस्कार आहेत. त्या सर्वांची माहिती येथे दिली नाही.

हुंडापद्धती – कन्येचा विवाह होण्यापूर्वी भावी जावयाला किंवा त्याच्या पित्याला, त्याने आपली मुलगी स्वीकारावी म्हणून जे द्रव्य देतात, त्याला हुंडा असे नाव आहे. भारतीय लोकांनी विवाह हे एक प्रकारचे दान मानलेले आहे. विवाहात कन्येचे वराला दान करायचे असते. आणि दान म्हटले, की त्याबरोबर रोख रकमेत किंवा सोन्याच्या स्वरूपात दक्षिणा द्यावीच लागते. कारण दक्षिणेवाचून दान पूर्ण होत नाही. त्यामुळे विवाहाच्या वेळी कन्येचे दान केल्यावर तिच्यासाठी काही रोख रक्कम किंवा एखादा दागिना वराला देण्याची प्राचीन पद्धत होती. पण याला प्रचलित अर्थाने हुंडा असे म्हणता येणार नाही. कारण, हे सर्व देणे मुलीच्या पित्याच्या इच्छेवर अवलंबून असे. त्या काळातील लोकांना हुंड्याची पद्धतच माहिती नव्हती. श्रीमंत घराण्यात आणि राजघराण्यांत लग्नाच्या वेळी वराला काही वस्तू भेट म्हणून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

देत असत. अथर्ववेदात, राजघराण्यातील वधूंनी आपल्या बरोबर शंभर गाई भेट म्हणून आणल्याचा उल्लेख आहे. द्रौपदी, सुभद्रा व उत्तरा या कन्यांनी सासरी जाताना आपल्या बरोबर घोडे, हत्ती व दागिने आंदण म्हणून नेले होते. धनवान श्रेष्ठी मुलीला सासरी पाठवताना तिच्या बरोबर जावयासाठी मौल्यवान भेटवस्तू देत असत, असे उल्लेख जातकग्रंथांत आढळतात. याही वस्तूंना हुंडा हे नाव देणे योग्य होणार नाही. कारण, वधूपित्याने त्या स्वेच्छेने व मुलीवरील मायेच्या पोटी दिलेल्या असत. स्मृतींत व काव्यनाटकादी ग्रंथांतही हुंड्याचा मुळीच उल्लेख नाही. फक्त वधूला लग्नाच्या वेळी काही अलंकार द्यावे, असे स्मृतींत सांगितले आहे; पण त्यांची संख्या किंवा किंमत वधूपित्याच्या ऐपतीवर ठेवलेली होती. त्या बाबतींत कसलाच आग्रह नव्हता.

वैदिक वाङ्मयात स्त्रीच्या पतिगृहातल्या मालमत्तेवरील हक्काविषयी काही सांगितलेले नाही. पण ऋग्वेदातील विवाहसूक्तात (१०.८५) व तैत्ति. संहितेत परिणाह्य म्हणजे लग्नाच्या वेळी पित्याने वधूला दिलेल्या अलंकारांवर तिचीच मालकी असे, असे म्हटले आहे. स्मृतिकारांनी त्याला स्त्रीधन असे नाव दिलेले आहे.

विष्णुस्मृतीत स्त्रीधनाचे पुढील प्रकार दिले आहेत–

(१) माता, पिता, पुत्र व भाऊ यांनी दिलेल्या वस्तू; (२) अध्यग्नी – विवाहहोमाच्या वेळी दिलेल्या वस्तू; (३) उपागत – लग्नानंतर मिळालेले द्रव्य; (४) अधिवेदक – पतीने आपल्या दुसऱ्या लग्नाच्या वेळी पहिल्या पत्नीला दिलेले धन; (५) बांधवांनी दिलेल्या भेटवस्तू; (६) कन्याशुल्क; व (७) अनुवधेयक – लग्नानंतर दिलेल्या वस्तू.

मनूने स्त्रीधनाचे सहा प्रकार सांगितले आहेत. नारदानेही तेवढेच दिलेले आहेत, ते असे– (१) अध्यग्नी (२) अध्यवहनिक (३) भर्तृदान (४) भर्तृदत्त (५) पितृदत्त व (६) मातृदत्त.

प्राचीन काळी स्त्रियांना पैतृक संपत्तीत वारसा हक्क नव्हता. नंतरच्या काळात तो मिळाला. विष्णू, नारद व मनू या स्मृतिकारांनी पुत्राबरोबरच कन्येलाही पैतृक संपत्तींत काही भाग मिळावा, असे सांगितले आहे. अर्थात विवाहप्रसंगी द्यायच्या दक्षिणेशी याचा काही संबंध नाही.

मध्ययुगापर्यंतच्या विवाहसंस्थेचा इतिहास पाहिला, तर त्यात हुंडा घेण्याची पद्धती नव्हती, असेच दिसते. मध्ययुगात ती प्रथमतः राजस्थानातल्या राजपूत लोकांत सुरू झाली. त्या लोकांना आपल्या कुलाविषयी वाटणारा जाज्वल्य अभिमान या प्रथेच्या बुडाशी होता. तथापि ती पद्धती राजेलोकांत व अमीर-उमरावांत तेवढी होती. सामान्य लोकांत तिचा प्रघात नव्हता.

भारतात ईस्ट इंडिया कंपनीचा अधिकार जाऊन त्याऐवजी ब्रिटिश सरकारचा प्रत्यक्ष अंमल सुरू झाल्यापासून हुंडा-पद्धतीचा प्रसार जास्त प्रमाणावर सुरू झाला. आपला राज्यशकट व्यवस्थित चालविण्यासाठी अवश्य असणारे मनुष्यबळ इथेच मिळावे यासाठी शिक्षणाचा प्रसार करण्याचे कार्य इंग्रजांनी हाती घेतले. ब्रिटिशांच्या अंमलापूर्वी भारतात शेतकरी वर्गाचा भरणा मोठा होता आणि नोकरदार नावाचा नवा वर्ग निर्माण झाला नव्हता. ब्रिटिशांचे राज्य सुरू झाल्यावर ती परिस्थिती पालटली. शिक्षणाचा दर्जा असेल त्या मानाने तरुणांना मोठमोठ्या पगाराच्या नोकऱ्या मिळू लागल्या. नोकरवर्गाला समाजामध्ये विशेष मान मिळू लागला. धनोत्पादक व्यवसाय वाढून त्याकडे सुशिक्षितांचे लक्ष लागले. आपल्या कन्येला सुशिक्षित, मोठ्या पगाराची नोकरी असलेला पती मिळावा अशी पालकांची प्रवृत्ती वाढू लागल्यामुळे हुंडापद्धतीला विशेष जोर चढला. कालांतराने हुंड्याविषयीच्या वरपित्यांच्या आकांक्षा इतक्या वाढल्या, की आपल्या पित्याला संकटात घालू नये म्हणून सुजाण कन्यांनी आत्महत्याही केल्याची उदाहरणे आहेत. सध्या तर या पद्धतीला अत्यंत घृणास्पद स्वरूप आलेले आहे.

द. भारतात, विशेषतः पडैविडू राज्यातील ब्राह्मणांत मध्ययुगीन कालात जबरदस्त कन्याशुल्क घेण्याची पद्धत होती. तिला आळा घालण्यासाठी विजयनगरचा राजा देवराय दुसरा याने एक कायदा केला. त्याअन्वये कन्याशुल्क देणारा व ते घेणारा या दोघांनाही समाजातून बहिष्कृत करण्याची सजा देण्यात येत असे. तसेच, लग्नाच्या वेळी केलेला पैशाच्या देवघेवीचा व्यवहार हा बेकायदेशीर ठरवला गेला होता.

त्यानंतरच्या काळात सुजाण व विचारवंत नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व समाजसुधारक यांनी वेळोवेळी हुंडा आणि कन्याशुल्क घ्यायला विरोध दर्शवला आहे, पण त्याचा काहीही उपयोग झालेला नाही. दिवसेंदिवस समाजातील वरिष्ठ व पांढरपेशा वर्गात हुंडा घेण्याची चाल वाढतच चालली आहे. त्यामुळे गरीब पालकांना मुलीचें लग्न ही काळजीची बाब वाटू लागली आहे. मुलीच्या लग्नासाठी कर्ज काढायचे आणि जन्मभर ते फेडीत राहायचे, अशी गरीब पित्यांची परिस्थिती झाली आहे. हुंडा देण्याची ऐपत नसल्यामुळे कित्येक मुली अविवाहित राहू लागल्या आहेत. या सर्व सामाजिक अरिष्टाला आळा घालण्यासाठी सरकारने इ. स. १९६१ मध्ये हुंडाबंदीचा कायदा केला. हुंडा मागणाऱ्याला, देणाऱ्याला व घेणाऱ्याला या कायद्यान्वये सहा महिने कारावास व पाच हजार रुपयांपर्यंत दंडाची शिक्षा ठेवलेली आहे.

पण या कायद्यानेही हुंड्याची प्रथा बंद झाली नाही. उलट हुंड्याच्या रकमेचे प्रमाण वाढतच आहे. सांप्रत हुंडा रोख रकमेत न मागता सोन्याच्या स्वरूपात मागतात. प्रत्येक जातीतली परंपरागत पद्धती किंवा मुलाचे शिक्षण, त्याचा व्यवसाय व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...ची संपन्न परिस्थिती यांवर हुंड्याचे प्रमाण अवलंबून असते. रेड्डी, कम्म किंवा राजू या दक्षिणेतल्या जातींतील तरुण डॉक्टर किंवा इंजिनिअर याची जर घरची थोडी स्थावर किंवा जंगम मिळकत असेल, तर तो एका लाखापेक्षा जास्त हुंडा मागतो. मोठ्या पगाराची नोकरी हेसुद्धा भरपूर हुंडा मिळण्याचे एक साधन असते. या जातींतील मध्यम वर्गातील लोक हुंड्यावर चाळीस ते पन्नास हजार रुपये खर्च करतात. आंध्रातील ब्राह्मणांना मात्र इतका हुंडा मिळत नाही; पण तरीही घरचे थोडे ... असणाऱ्या सुशिक्षित आंध्र ब्राह्मण तरुणाला पंधरा हजार रुपये हुंडा मिळतो. काही वेळा ही रक्कम पाच ते पंधरा हजारांच्या दरम्यान असते. हुंड्याची बहुतेक रक्कम वधूला दागिने व रेशमी साड्या घेण्यात खर्च करण्याची पद्धत आहे.

म्हैसूरमधील ब्राह्मण जातीत हुंडा घेण्याची पद्धत आहे. तर काही ब्राह्मणेतर जातींत कन्याशुल्क देण्याची चाल आहे. सुमारे सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी काही ब्राह्मण जातीत कन्याशुल्क देण्याची प्रथा होती; पण हळूहळू त्यांच्यांत हुंडा घेण्याची प्रथा सुरू झाली. काही वेळा रोख रकमेत किंवा काही वेळा वस्तूंच्या स्वरूपात हुंडा घेतात. सर्वसाधारणपणे मुलाचे शिक्षण, नोकरी, आर्थिक स्थिती यानुसार हुंड्याची रक्कम दोन ते वीस हजार रुपये असते. वस्तू घ्यायच्या असल्यास पितळेची, स्टीलची व चांदीची भांडी, दागिने, फर्निचर, स्कूटर, मोटार, काही वेळा घर बांधण्यासाठी जमीन किंवा राहण्यासाठी घर अशा वस्तू मागतात. काही वेळा परदेशी जाऊन पुढील उच्च शिक्षण घेण्यासाठी लागणारा सर्व खर्चही मागतात. श्रीमंत वधूपित्यांना हा खर्च परवडतो; पण मध्यम वर्गाची या प्रकारात ससेहोलपट होते. मुलींना हुंडा देऊन चांगली स्थळे मिळविण्यासाठी त्यांना स्वतःच्या मुलांच्या वधूकडून हुंडा घ्यावा लागतो. काही वेळा मुली नोकरी करून हुंड्यासाठी रक्कम जमवतात. ती रक्कम जमेपर्यंत त्यांचे लग्नाचे वय उलटून जाते व काही वेळा त्यांना जन्मभर कुमारिकाच राहावे लागते. काही वेळा मोठ्या बहिणी धाकट्या बहिणींच्या हुंड्यासाठी पैसे जमवतात व आपण लग्न न करता अविवाहितच राहतात.

बंगाली वर-पितेही खूप हुंडा मागतात. त्याशिवाय, खूप सोने, भांडी, फर्निचर, इ. वस्तूही वधूपित्याला वधूला द्याव्या लागतात. त्यामुळे हा खर्च फारच वाढतो. महाराष्ट्रातही हीच परिस्थिती आहे.

सुमारे चाळीस वर्षांपूर्वी ओडिसात वरपिता हुंड्याची मागणी क्वचितच करीत असे. आपल्या ऐपतीप्रमाणे वधूपिता मुलीला सोन्याचे दागिने, कपडे आणि स्वयंपाकासाठी भांडी देत असे. पण सांप्रत तिथेही हुंडा मागण्याची पद्धत सुरू झाली आहे. ही रक्कम दोन हजारांपासून दोन लाखांपर्यंत असते. याशिवाय श्रीमंत वधू-पित्याला कधी कधी मोटार, मुलीला दागिने, मुलाला बारा शर्ट पँट, घड्याळ, सोन्याची बटणे, रेफ्रिजिरेटर, स्टीलची अनेक भांडी, क्रोकरी, रेडिओ, फर्निचर, सूटकेसेस, आरशाचे ड्रेसिंग टेबल, गाद्या वगैरे सामान द्यावे लागते. गरीब बाप मुलीला काशाचा थाळा, लोटा, पितळेच्या बांगड्या व थोडे कपडे देतो. कनिष्ठमध्यमवर्गीय वधूपिता सुशिक्षित जावयाला घड्याळ, सायकल व रेडिओ आणि मुलीला पंधरा तोळे सोने देतो. एखाद्या मुलीच्या बापाने जर कमी हुंडा दिला, तर त्याबद्दल सासरी मुलीचा छळ होतो.

बनिया लोक लग्नात खूप खर्च करतात. हे लोक खूप श्रीमंत असल्यामुळे लग्नात हुंडाही बराच देतात. कंपन्यांचे शेअर्स, धंद्यात भागिदारी, वाहन आणि परदेशातून आयात केलेल्या वस्तू यांचा हुंड्यात समावेश होतो.

नागर ब्राह्मणांत वरपिता वधूला एक ठराविक रक्कम देतो. तिच्यावर जर पुढे काही आपत्ती आली, तर त्या वेळी तिला त्या पैशांचा उपयोग करता यावा, ही त्यामागची कल्पना आहे.

गुजरातमधील पटेल लोकांत खूप हुंडा घेण्याची पद्धत आहे. सगाईच्या वेळेपासून वरपक्ष वधूपक्षाकडून रोख रक्कम व वस्तू उकळायला सुरुवात करतो. सगाईच्या वेळी वधूपित्याला वराच्या घरी एक किंवा दोन मण मिठाई पाठवावी लागते. त्याशिवाय पितळेची मोठमोठी भांडी आणि दागिने द्यावे लागतात, ते निराळेच. पुढे लग्नाच्या वेळी पुन्हा एक किंवा दोन मण मिठाई, पापड, मुलीला पंचवीस तोळे सोने आणि एकावन्न ते एकशेएक कपड्यांचे सेट द्यावे लागतात. याच्या बदल्यात वराने वधूला एक साडी व एक चप्पलजोड एवढेच द्यायचे असते.

पंजाबी लोक लग्नात हुंडा मागत नाहीत; पण वधूपिता मुलीला तिच्या नव्या घरासाठी सर्व प्रकारचे फर्निचर देतो. शिवाय त्याने मुलीला जर सोळा साड्या दिल्या, तर तेवढेच पलंगपोस, उशांचे अभ्रे, टेबलावरचे नॅपकिन्स वगैरे द्यावे लागतात.

कूर्गमधील कोडव लोक हुंडा घेत नाहीत. वधूपिता आपल्या ऐपतीप्रमाणे मुलीला दागिने घालतो.

दक्षिण कानडा जिल्ह्यातील बंट लोकांत पूर्वी हुंड्याची चाल नव्हती. पण आता ती त्यांच्यांतही शिरली आहे.

तमिळ ब्राह्मणांपैकी श्रीमंत लोक दोन ते वीस हजार रुपये आणि मध्यमवर्गीय पाच ते सहा हजार रुपये हुंडा घेतात.

अशा प्रकारे भारतातील बहुतेक जातींत हुंडा घेण्याची अनिष्ट प्रथा रूढ झाली आहे. आणि हुंड्याच्या रकमेचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत चालले आहे. या प्रथेला आळा घालावा म्हणून काही तरुण प्रयत्न करीत आहेत. ”

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थात आपल्या मुलाच्या लग्नात हुंडा न घेणारेही काही लोक समाजात असतात. पण त्यांचे प्रमाण थोडे आहे. [ध. शा. वि.; विवाह संस्कार–काळ प्रकाशन; वै. सं. वि.; ल. वि. सो.; दप्तरी–लेखसंग्रह, खंड दुसरा, १९७१; डावरी कस्टम, विवेकानंद केंद्र पत्रिका, ऑगस्ट १९७३]

विवेकसिंधू अद्वैत वेदान्ताचे प्रतिपादन करणारा मराठी भाषेतला आद्य ग्रंथ. मुकुंदराज हा या ग्रंथाचा कर्ता होय. या ग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन भाग आहेत. पहिल्या भागात विश्वाची उभारणी व दुसऱ्या भागात त्याची संहारणी कशी होते, ते सांगितले आहे. विश्वाच्या उभारणीसाठी स्वरूपसमावेशन, स्वानुभवदृढीकरण, तत्त्वसृष्टिक्रम, ईश्वरतनुत्रय, त्वंपदकारणलिंगदेह, स्थूलदेह व सर्वं ब्रह्म या विषयांचे विवेचन केले आहे. संहारासाठी पिंडब्रह्मांडाचे स्थूलदेह, लिंगदेह, कारणदेह व महाकारणदेह यांचे विवरण आणि नंतर निरसन आहे. पुढे पंचप्रलयांचे स्वरूप व तत्पदार्थाचे शोधन सांगितले आहेत. जीवात्मा व परमात्मा यांचे तादात्म्य सिद्ध करून मुक्तिस्वरूप स्पष्ट केले आहे. त्यापुढे अध्यात्मासंबंधी उत्पन्न झालेल्या विविध प्रश्नांचे खंडन करून, अद्वैत प्रतिपादन केले आहे. या विषयाच्या अनुरोधानेच सत्-चित्-आनंद या पदत्रयावर प्रवचन आहे. अखेर गुरुमाहात्म्य आहे.

या गाभ्याच्या विषयांव्यतिरिक्त काही आनुषंगिक विषयांचा ऊहापोहही या ग्रंथात केलेला आढळतो. त्यात मराठीची थोरवी, ग्रंथाचा उद्देश, त्याचे फल, गुरु-शिष्यलक्षणे, इ. विषय आहेत. परमेश्वराच्या स्वरूपाचा अनुभव प्राप्त झाल्यावर त्याचे चिंतन करीत स्वस्थ बसण्याऐवजी मी परोपकारासाठी ग्रंथरचना केली, असे मुकुंदराजाने म्हटले आहे. पाहा – मुकुंदराज. [श्री विवेकसिंधू – संपा. कृ. पां. कुलकर्णी, १९५७]

विवेकानंद (इ. स. १८६३–१९०२) आधुनिक काळातील एक महान वेदान्तमार्गी राष्ट्रसंत व थोर विचारवंत. स्वामी विवेकानंद या नावाने हे जगद्विख्यात आहेत. यांचा जन्म बंगालमधील दत्त आडनावाच्या एका श्रीमंत व प्रतिष्ठित अशा कायस्थ घराण्यात झाला. यांच्या वडिलांचे नाव विश्वनाथ दत्त व आईचे भुवनेश्वरीदेवी असे होते. विवेकानंदांचे वडील, आजोबा व पणजोबा हे सगळे कलकत्त्याच्या सर्वोच्च न्यायालयात नामवंत वकील म्हणून गाजले होते. त्यामुळे त्यांच्या घरी धनधान्यसमृद्धी होती. पाश्चात्य विद्येचा व्यासंगही त्यांच्या घरात पणजोबांपासून सुरू होता. विवेकानंदांचे वडील आणि पणजोबा हे दोघे ऐहिक उत्कर्षासाठी विशेष परिश्रम घेणारे होते. आजोबा दुर्गाचरण हे मात्र आरंभापासूनच अध्यात्ममार्गी व विरक्त वृत्तीचे होते. त्यामुळे एक मुलगा जन्माला येताच त्यांनी संन्यास घेतला व ते काशीकडे निघून गेले. त्यांचा आध्यात्मिक वारसा पुढे त्यांचा नातू विवेकानंद यांनी सांभाळला.

विवेकानंदांचे मूळ नाव नरेंद्रनाथ. नरेंद्रनाथांचे वडील विश्वनाथ दत्त हे एक हुशार, कर्तबगार आणि दिलदार गृहस्थ होते. त्यांनी दोन हातांनी मिळवलेला पैसा दहा हातांनी दानधर्म करून खर्चून टाकला. ते जातिभेद व धर्मभेद मुळीच मानीत नव्हते.

नरेंद्रनाथांच्या मातुःश्री भुवनेश्वरीदेवी याही विश्वनाथबाबूंप्रमाणेच सहृदय व सुस्वभावी होत्या. देवा-धर्मावर त्यांची नितांत निष्ठा होती. त्यांची स्मरणशक्ती तीव्र होती. रामायण, भारत, भागवत, इ. ग्रंथांतील बराचसा भाग त्यांनी मुखोद्गत केला होता. त्यांना पहिल्या दोन मुली झाल्यानंतर त्या पुत्रमुखदर्शनासाठी आतुर झाल्या. त्यासाठी त्यांनी अनेक व्रतवैकल्ये केली व नवससायासही केले. काशीच्या विश्वनाथावर त्यांची फार भक्ती होती. त्यांच्या घराण्यातील कोणी एक वृद्ध स्त्री याच वेळी काशीला राहात होती; तिला पत्र पाठवून भुवनेश्वरीदेवींनी विश्वनाथाला आपल्या वतीने प्रतिदिवशी पूजाहोमाची व नैवेद्याची व्यवस्था करण्यासाठी विनविले. भुवनेश्वरीदेवींची ही तपश्चर्या अखेर फलद्रूप झाली व त्यांच्या पोटी पौष कृष्ण ७, शके १७८४ (दि. १२ जानेवारी १८६३) या दिवशी एक पुत्र जन्माला आला. या नवागत मुलाचा तोंडवळा थेट त्याच्या आजोबांच्या – दुर्गाचरणांच्या – चेहऱ्यामोहऱ्याशी जुळणारा असल्यामुळे घरातल्या सर्व वडिलधाऱ्या मंडळींनी मुलाचे नाव दुर्गाचरण किंवा दुर्गादास ठेवावे, असे सुचवले. परंतु या पुत्रजन्मापूर्वी भुवनेश्वरीदेवींना स्वप्नात साक्षात शिवदर्शन घडले असल्यामुळे व त्यांचीही त्याच दैवतावर अपार श्रद्धा असल्यामुळे त्यांनी मुलाचे नाव वीरेश्वर असे ठेवले. कालांतराने लाडके नाव म्हणून बिले या टोपणनावाने त्याला संबोधण्यात येऊ लागले. उष्टावणप्रसंगी या बिलेचे आणखी एकदा नामकरण होऊन नरेंद्रनाथ हे नवे नाव रूढ झाले.

बालपणापासून नरेंद्रनाथाच्या वर्तणुकीत दोन गोष्टी सातत्याने व प्रकर्षाने दृष्टोत्पत्तीस येऊ लागल्या. वृत्तीने तो विरक्त होता आणि स्वभावाने फार खोडकर होता. हट्टीपणा व आग्रहीपणा तर त्याच्या रोमरोमांत भिनलेला होता. तथापि त्याच्या ठिकाणी श्रद्धाळूपणा व कनवाळूपणाही भरपूर होता. कोणतेही साहसी कृत्य तो बेधडकपणे करी. त्याच्या या अशा गुणांमुळे भुवनेश्वरीदेवी त्याला सांभाळता सांभाळता अगदी मेटाकुटीस येत. समजावून सांगून किंवा धाकदपटशा दाखवून देखील तो ऐकत नाही, असे पाहिल्यावर भुवनेश्वरीदेवी 'शिव', 'शिव,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

असे शब्द उच्चारत त्याच्या डोक्यावर पाणी शिंपडीत. मग मात्र नरेंद्रनाथ सुतासारखा सरळ येई.

याच काळात आईने त्याला रामायण– महाभारत– भागवत या ग्रंथांतील उद्बोधक कथा सांगितल्या. त्यांचा परिणाम होऊन नरेंद्रनाथ राम, कृष्ण, इ. देवतांच्या छोट्या मूर्ती आणून त्यांची पूजाअर्चा करू लागला. पुराण-प्रवचनांतल्या व कीर्तनांतल्या भक्तमंडळींच्या गोष्टी ऐकल्यावर तो कधी कृष्णाचे, कधी रामाचे तर कधी बलभीम हनुमानाचे दर्शन व्हावे म्हणून तळमळू लागला व त्यासाठी दिवसचे दिवस इकडे तिकडे भटकू लागला. भेटेल त्याला 'तुम्ही देव पाहिला आहे का ? आणि तो मला दाखवाल का ?' असे तो विचारू लागला.

लहानपणापासूनच त्याच्या ठायी योग्याची लक्षणे दिसून येऊ लागली. दारी येणाऱ्या भिक्षेकऱ्याला पुढ्यातले अन्नाचे ताट किंवा कमरेचे वस्त्रही सोडून देण्यापर्यंत त्याची अनेक वेळा मजल जाई. रोज झोपताना त्याचे डोळे मिटल्याबरोबर त्याला एक तेजस्वी प्रकाशगोल दिसू लागे व तो जवळ जवळ येत त्याच्या भुवयांमधून शरीरात प्रवेश करी. मग त्याचे सर्व शरीर प्रकाशमान झाल्यासारखे त्याला वाटे व नंतर त्याला गाढ झोप लागे. हा प्रकार सर्वच माणसांच्या बाबतीत घडत असावा, असे त्याला वाटे; परंतु पुढे त्याने चौकशी केली, तेव्हा असा प्रकाश केवळ आपल्यालाच दिसतो व भासतो असे त्याला समजले आणि त्याचे त्याला नवल वाटू लागले.

पाचव्या वर्षी नरेंद्राला शाळेत पाठवण्यात आले. तथापि त्याच्या एकपाठी वृत्तीमुळे अवघ्या आठ दिवसांत त्याने शालेय अभ्यासाबरोबरच अनेक अर्वाच्य शिव्या व अपशब्दही पाठ केले. त्यामुळे विश्वनाथबाबूंनी त्याची शाळा बंद करून त्याला शिकवण्यासाठी घरीच पंतोजी ठेवला.

प्राथमिक उजळणी व अक्षरओळख घरीच झाल्यावर इ. स. १८७० साली नरेन्द्राला ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या नव्या शाळेत पाठवण्यात आले. या शाळेत असताना त्याने अभ्यासाबरोबर वलोपासनाही केली. इंग्रजी शिक्षणाच्या वेळी मात्र त्याने "ही साहेबाची म्हणजे जेत्याची भाषा मी मुळीच शिकणार नाही" असे म्हणून सुमारे ७–८ महिने ती भाषा शिकण्याचेच नाकारले. पुढे त्याची समजूत पटली आणि त्याने इंग्रजीत कौतुकास्पद प्रगती केली. कोणतीही गोष्ट प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय किंवा अनुभवल्याशिवाय खरी मानायचीच नाही, अशी वृत्ती याच काळापासून त्याच्या ठिकाणी दिसून येऊ लागली.

वयाच्या चौदाव्या वर्षी नरेंद्राला पोटदुखीने ग्रासले. विश्वनाथबाबू या वेळी आपल्या धंद्याच्या कामानिमित्त रायपूर येथे वास्तव्यास होते. त्यांनी आजाराने अशक्त झालेल्या नरेंद्रासह सर्वच कुटुंबियांना रायपूरला नेले. स्वाभाविकच त्याची शाळा या वेळी बंद पडली. परंतु विश्वनाथबाबू त्याला घरच्या घरीच नानाविध विषय शिकवीत. या काळात पिता-पुत्रांचे संबंध अगदी जवळकीचे झाले होते. कोणतीही गोष्ट नरेंद्र विश्वनाथबाबूंना बिनदिक्कत विचारीत असे.

एके दिवशी ते असेच शिकवीत असता नरेंद्र एकदम म्हणाला, "बाबा, तुम्ही आमच्यासाठी काय ठेवले आहे ?" आपल्या खर्चिक स्वभावाला उद्देशून हा प्रश्न आहे, हे विश्वनाथबाबूंनी तत्काळ ओळखले. ते न रागावता नरेंद्राला म्हणाले: "त्या समोरच्या आरशात आपले प्रतिबिंब पाहून ये." नरेंद्राने तसे केले. मग विश्वनाथबाबूंनी त्याला म्हटले. "समजले, तुमच्यासाठी काय ठेवलं आहे मी ते ?" आई-वडील मुलांना सुदृढ शरीर आणि शिक्षण फक्त देऊ शकतात. संपत्ती ठेवली तर तिच्यामुळे माणसाचे हित होतेच असे नाही. वडिलांचे ते उद्‌गार ऐकल्यावर नरेंद्र मनस्वी लाजला.

सुमारे दोन वर्षे रायपूरला राहून प्रकृती ठणठणीत झाल्यावर नरेंद्र पुनश्च कलकत्त्याला गेला व त्याने दोन वर्षांचा शालेय अभ्यास काही महिन्यांतच पूर्ण करून मॅट्रिकच्या वर्गात प्रवेश केला. मॅट्रिकच्या परीक्षेत त्याने प्रथम क्रमांकाचे गुण मिळवून आपल्या कुळाची व शाळेची कीर्तिध्वजा उंचावली. मेट्रॉपॉलिटन इन्स्टिटयूशनमध्ये शिकत असताना त्याने एकदा सुमारे अर्धा-तासपर्यंत उत्तम व ललितमधुर इंग्रजी भाषेत भाषण करून आपल्या वक्तृत्वाचीही चुणुक दाखवली व त्या प्रसंगी तिथे पाहुणे म्हणून उपस्थित असणाऱ्या सुरेंद्रनाथ बानर्जी यांच्यासारख्या तत्कालीन श्रेष्ठ वक्त्याकडून शाबासकी मिळवली.

अशा प्रकारे शालेय विश्वात नाना प्रकारे कीर्ती मिळवून नरेंद्रनाथाने इ. स. १८८० साली महाविद्यालयीन शिक्षणाला आरंभ केला. प्रथम तो कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी कॉलेजात गेला; परंतु मधेच मलेरियाच्या आजारामुळे त्याला कॉलेज सोडून घरी बसावे लागले. मग पुढच्या वर्षी त्याने जनरल असेंब्ली इन्स्टिटयूशनमध्ये नाव घातले. या संस्थेतून त्याने एफ. ए. च्या अभ्यासक्रमास सुरुवात केली. नरेंद्रनाथाच्या बुद्धिमत्तेवर, वक्तृत्वावर व व्यक्तिमत्वावर कॉलेजचे प्रिन्सिपॉल विल्यम हेस्टी हे अगदी आरंभापासून फार खूष होते. त्यांनी नरेंद्रनाथाच्या तत्त्वज्ञानविषयक अभिरुचीचे विशेष पोषण केले. मिल, ह्यूम, हर्बर्ट स्पेन्सर, इ. पाश्चात्य तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ नरेंद्राने यापूर्वीच अभ्यासले होते. त्यामुळे त्याच्या विचारांना एक प्रकारची खोली लाभली होती. नरेंद्रनाथाच्या तत्त्वज्ञान विषयातल्या प्रावीण्यावर बोलताना एकदा हेस्टीसाहेब भर वर्गात म्हणाले. "तत्त्वज्ञानातील याची गती अगदी असाधारण आहे. सगळ्या जर्मन

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आणि आंग्ल विद्यापीठांत याच्या तोडीचा प्रतिभासंपन्न विद्यार्थी सापडणे कठीण आहे."

या काळात नरेंद्रनाथाचे मोठे वैचारिक परिवर्तन होत होते. त्याच्या या अवस्थेचे वर्णन करताना श्री. सत्येन्द्रनाथ मुजुमदार लिहितात –

"पाश्चात्य विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांच्या अनुशीलनाने नरेंद्रनाथाच्या हृदयात एक प्रचंड वादळ उठवून दिले. त्याचे जन्मजात संस्कार आणि दृढमूल विश्वास यांचा भोवतालच्या एकंदर परिस्थितीशी संघर्ष होऊन ते डळमळू लागले. अंतर्गत विचारांशी आणि भाव-भावनांशी त्याच्या अंतःकरणात सतत चाललेल्या या घनघोर संग्रामाची पुसटदेखील कल्पना त्याच्या सर्वसामान्य स्थूल दृष्टीच्या सहाध्यायांना येणे दुरापास्तच होते. डॉ. ब्रजेंद्रनाथ शील प्रभृती काही निवडक, अंतरंगीच्या मित्रांनाच काय ती या वस्तुस्थितीची बरीचशी जाणीव होती.

डेकार्टचा अहंवाद, ह्यूम व बेनची नास्तिकता, डार्विनचा क्रमविकासवाद आणि त्याहीपेक्षा स्पेन्सरचा अज्ञेयवाद, इ. विभिन्न तत्त्वज्ञानांच्या विचारकांतारात नरेंद्रनाथाचे पंचप्राण यथार्थसत्याच्या लाभासाठी तळमळू लागले. सतत वाढत्या ज्ञानपिपासेच्या प्रेरणेने नरेंद्रनाथ जसजसा अधिकाधिक पुढे जाऊ लागला, तसतसे त्याला उमजून येऊ लागले, की अंतिम सत्याच्या प्रत्यक्ष लाभाचीच आकांक्षा असेल, तर केवळ तर्काने काम भागणार नाही. त्यासाठी निराळे काहीतरी हवे."

यानंतर तो एकसारखा त्या अंतिम सत्याचाच शोध घेऊ लागला आणि त्या विषयीचेच विचार करू लागला. 'या पंचेन्द्रियग्राह्य, जड जगताच्या पाठीमागे त्याचा चालक असा कोणी सर्वशक्तिमान पुरुष आहे की नाही ? या मानवजीवनाचा उद्देश काय ?' यासारख्या अनेक गहनगूढ प्रश्नांनी त्याच्या मनात थैमान घातले. त्यामुळे अनेक वेळा तो कॉलेजचा अभ्यास दूर सारून यती-संन्याशी, तडी-तापसी व संत-महंत यांच्या दर्शनाला जाऊ लागला व त्यांना विचारू लागला. "महाराज, तुम्ही तो जगच्चालक परमात्मा पाहिला आहे काय ? आपण तो मला दाखवाल काय ?" परंतु नरेन्द्राची ही ईश्वरदर्शनाची तीव्र ओढ लक्षात येऊनही कोणी त्याचे परिपूर्ण समाधान करू शकला नाही. पुढे तो त्याच जिज्ञासेने ब्राह्मसमाजाच्या उपासनामंदिरात जाऊ लागला. पण तिथेही त्याचे समाधान होईना.

एकदा त्याने महर्षी देवेंद्रनाथ ठाकुरांना विचारले. "तुम्ही देव पाहिला आहे का?" तेव्हा त्यांनी त्याला म्हटले. "नाही रे बाळ. पण एक गोष्ट मी सांगतो; तुझ्या अंगप्रत्यंगावर योग्याची चिन्हे स्पष्ट दिसतात. ध्यानाभ्यास करशील, तर तुला सत्य आणि शांती यांचा अवश्य लाभ होईल."

देवेंद्रनाथांच्या उपदेशपर उत्साहवाणीने त्याचा ध्यानानुराग द्विगुणित झाला व त्याने त्या दिवसापासून ब्रह्मचर्य स्वीकारले. परिमित आहार, भूमीवर शयन, बिनकाठी वस्त्रांचा वापर, सर्व विलासांचा त्याग, इ. कठोर नियमांचे तो काटेकोर पालन करू लागला. या वेळी तो आपल्या आजीकडे राहत असे. त्यामुळे त्याला स्वाभाविकच तिथे खूप एकान्त मिळत असे. मानसिक शांततेसाठी ईशचिंतन, व्यावहारिक यशःसिद्धीसाठी नेमलेल्या पुस्तकांचे वाचन-मनन आणि उरलेल्या वेळात गायन, वादन, लेखन व संभाषण अशा प्रकारे त्याने आपले जीवन व्यतीत करण्यास सुरुवात केली. दिवसामागून दिवस, असा काळ जात राहिला; परंतु नरेंद्रनाथाला शांती व समाधान काही मिळेना.

तशातच एके दिवशी त्याची तत्कालीन विख्यात बंगाली साधू श्रीरामकृष्ण परमहंस यांच्याशी भेट झाली आणि त्या घटनेने नरेन्द्रनाथाच्या आयुष्याचा ओघच बदलून गेला. ती घटना अशी–

कलकत्ता शहराच्या शिमला नामक एका मोहल्ल्यात श्री. सुरेंद्रनाथ मित्र या नावाचे एक सद्गृहस्थ राहत. त्यांनी एके दिवशी श्रीरामकृष्ण परमहंस यांना आपल्या घरी बोलावले होते. त्या दिवशी त्यांच्या समोर भजन-गायन करणारा माणूस ऐन वेळी येऊ शकला नाही. त्यामुळे त्यांनी धावत-पळत जाऊन नरेंद्रनाथाला बोलावून आणले व रामकृष्णांच्या समोर एक-दोन भजने गाण्याची त्याला विनंती केली. नरेंद्रनाथाने ती मान्य केली व एक-दोन भजने गाऊन तो बाजूला झाला; परंतु रामकृष्णांनी त्याला जवळ बोलावले, त्याची आस्थापूर्वक चौकशी केली व 'आपल्या निवासस्थानी एकदा ये' असे त्याला सांगितले. रामकृष्णांना या प्रथम भेटीतच नरेंद्राविषयी खूप प्रेम वाटले व त्याने आपणाकडे वारंवार यावे असेही वाटले. पण नरेंद्रनाथाला रामकृष्णांविषयी सकृद्दर्शनी आस्था वाटली नाही. 'बरे येईन,' एवढेच तोंडदेखले बोलून तो तिथून निघून गेला.

सुरेंद्रनाथ मित्रांच्या घरून नरेंद्रनाथ आपल्या घरी परतला आणि तिथे त्याच्या पुढे नवेच संकट उभे राहिले. त्याच्या वडिलांनी त्याचे लग्न करण्याचा घाट घातला होता; कारण त्यांना नरेंद्राच्या वैराग्यविचाराची फारशी कल्पनाच नव्हती. पण नरेंद्राने त्यांना निक्षून सांगितले, की "मी आजन्म संन्यस्त वृत्तीने राहणार आहे." विश्वनाथबाबूंना त्याचा हा कृतनिश्चय ऐकून धक्काच बसला; तथापि कोणावरही बळजबरी करण्याचे त्यांच्या स्वभावात नव्हते. त्यामुळे त्यांनी नरेंद्राच्या या निश्चयाला विरोध न करता मूक संमती दिली.

इतक्या सुलभपणे आपल्या निश्चयाला मान्यता मिळालेली पाहून नरेंद्रनाथाला आश्चर्य वाटले. आता पुढे काय करावे, याचा तो विचार करीत असतानाच रामचंद्र दत्त नावाचे एक

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डॉक्टर त्याच्या मदतीला धावले. हे गृहस्थ नरेंद्राच्या घरीच लहानाचे मोठे झालेले असल्यामुळे व वयाने ते त्याच्यापेक्षा ज्येष्ठ असल्यामुळे त्यांचे मत त्याला ग्राह्य वाटले. त्यांनी नरेंद्राला म्हटले, "सत्याचा लाभ करून घेणे हेच जर तुझे ध्येय असेल, तर ब्राह्मसमाजात वगैरे न जाता तू सरळ दक्षिणेश्वरी श्रीरामकृष्णदेवांकडे जा !" रामचंद्र दत्तांचे हे म्हणणे मान्य करून नरेंद्रनाथ रामकृष्णांकडे गेला.

त्याला पाहून रामकृष्णांना प्रेमाचे भरते आले. ते जवळजवळ धावतच त्याच्याकडे गेले व त्याचा हात स्नेहभराने कुरवाळीत विलक्षण गद्‌गदलेल्या सुरात त्याला म्हणाले. "इतके दिवस तू मला अगदीच कसा रे विसरलास ? तू आज येशील, उद्या येशील म्हणून मी सारखा तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलो होतो. भोगी लोकांशी बोलून बोलून माझे तोंड होरपळून गेल्यासारखे झाले आहे. आता आजपासून तुझ्यासारख्या खऱ्याखुऱ्या त्यागी माणसाशी मला बोलायला मिळेल आणि माझा अंतरात्मा निवेल." बोलता बोलता त्यांचे डोळे पाणावले, कंठ रुद्ध झाला. काही काळ ते थांबले; पण पुन्हा नरेंद्रनाथाला हात जोडून म्हणाले. "प्रभो, मला ठाऊक आहे, तुम्ही त्या दिव्य सप्तर्षिमंडळातील एक ऋषी— साक्षात नररूपी नारायण— आहां. जीवांचे कल्याण करण्याच्या हेतूने तुम्ही देह धारण करून आला आहां."

श्रीरामकृष्णांचे हे गूढ चमत्कारिक बोलणे ऐकून आणि वेड्यासारखे वर्तन पाहून नरेंद्रनाथ अगदी गोंधळून गेला. तो लगबगीने त्यांच्यापासून दूर झाला. त्याला तिथे एक क्षणभरही उभे राहवेना. एका निःसंग वैराग्याने अशा प्रकारे आपल्याशी लगट करावी, हे त्याला आवडले नाही. रामकृष्ण पूर्ण वेडे असावे आणि आपण त्यांच्या नादी लागलो, ही घोडचूक झाली, असे त्याला पुनःपुन्हा वाटू लागले. त्या दिवशी तिथून काहीशा रागाने आणि परत तिथे न जाण्याच्या निश्चयाने तो परतला खरा; पण दोनचार दिवस गेले नाहीत, तोच त्याला रामकृष्णांकडे जावे असे वाटू लागले. त्याप्रमाणे तो गेलाही. पुन्हा रामकृष्ण मागच्यासारखेच त्याला कुरवाळू लागले व भावपूर्ण भाषेत त्याच्याशी बोलू लागले. नरेंद्राला ते आवडेना; परंतु वारंवार त्यांचा राग येऊनही त्यांना भेटल्याशिवाय त्याला चैन पडेना. तो रागावला, की रामकृष्ण म्हणत. "एवढा मानीपणा करून वागतोस तर येतोस तरी कशाला इथे ?" मग नरेंद्र न राहवून उत्तर देई, "तुम्हाला पाहिल्या-भेटल्याशिवाय चैन पडत नाही म्हणून !"

हळूहळू त्या दोघांना परस्परांशिवाय अगदी गमेना. या काळात नरेंद्र ज्या अंतिम सत्याचा शोध घेण्याच्या मागे होता, त्यातही विशेष प्रगती होईना. असाच एके दिवशी तो विलक्षण गंभीर झाला व धावत धावत रामकृष्णांकडे येऊन म्हणाला.

"महाराज, तुम्ही तरी सांगा, तुम्ही देव पाहिला आहे का ?" तेव्हा रामकृष्ण त्याला म्हणाले. "होय, मी देव पाहिला आहे आणि हवा तर तुलासुद्धा मी तो आताच्या आता दाखवीन !"

रामकृष्णांचे ते विलक्षण आत्मविश्वासाचे बोल ऐकून नरेंद्र अत्यंत आनंदित झाला आणि त्यांना अनन्यभावाने शरण गेला.

एके दिवशी तो आपल्या मित्रमंडळीत गप्पागोष्टी करीत बसला असता कोणीतरी येऊन सांगितले. "नरेंद्रा, तुझे वडील हृदयक्रिया बंद पडून मरण पावले." ती वार्ता ऐकून नरेंद्र एकदम अवाक झाला. धावत धावत तो घरी परतला. त्याच्या घरावर जणू वज्राघात झाला होता. आता घरातला कर्ता पुरुष तोच होता. त्यामुळे त्याला स्वतःचे दुःख दाबून आपल्या आईचे व भावंडांचे सांत्वन करावे लागले.

वडिलांच्या माघारी त्याची आणि त्याच्या कुटुंबियांची फारच दुर्दशा झाली. कारण, विश्वनाथ दत्तांनी वकिलीत खूप पैसा मिळवला असला, तरी तो आपल्या उदार व खर्चिक स्वभावानुसार संपवूनही टाकला होता. त्यामुळे मागे उरलेल्यांना कष्ट करूनच उदरभरण करणे जरूर होते. काही आप्त-स्वजनांनी त्यांना साहाय्य देऊ केले; परंतु नरेंद्राने ते विनयाने आणि स्वाभिमानपूर्वक नाकारले. 'माझ्या समस्या मीच सोडवीन,' असे तो म्हणे. या काळात रामकृष्णांकडे तो जाई; पण तिथे आपल्या व्यक्तिगत दुःख-संकटांसंबंधी क्वचितच बोलत असे. रामकृष्णांनी मात्र त्याचे दुःख जाणले होते.

एके दिवशी त्यांनी एका श्रीमंत गृहस्थांना म्हटले. "अहो, आमच्या या नरेंद्राला कुठेतरी नोकरी द्या ना पाहून !" नरेंद्राने ते ऐकले मात्र; त्याला राग आला. तो काहीशा तिरसट स्वरात रामकृष्णांना म्हणाला. "हे पाहा, तुम्ही माझ्यासाठी अशी कोणाजवळ याचना करीत जाऊ नका. मला नाही आवडत ते !" रामकृष्ण त्यावर म्हणाले. "मी मुद्दाम कुठे काय करतो ? आईनेच मला सांगितले, की तू त्याच्यासाठी याच्या-त्याच्यापुढे पदर पसर !" नरेंद्र म्हणाला, "पुरे झालं तुमचं ते 'आईनं म्हटलं' आणि 'आईनं सांगितलं.' एवढी जर तुमची आई कनवाळू आहे, तर तुम्ही तिलाच का सांगत नाही माझ्या अडचणी दूर करायला !" नरेंद्राचे हे बोलणे ऐकून रामकृष्ण हसले आणि म्हणाले. 'मला नाही जमणार बाबा आईला असलं काही सांगायला. पण मी म्हणतो, की मी असलं काही आईजवळ सांगण्या-मागण्यापेक्षा तू स्वतःच का नाही तिच्याकडे मागत ? आता जा आणि आईजवळ माग काय मागायचे ते !"

'हो मागतोच.' असे म्हणून नरेंद्र खरोखरीच कालीमातेच्या मंदिरात धावला. तो काय नवल ! साक्षात भगवती कालीमाता साकार होऊन त्याच्यापुढे हसतमुखाने उभी राहिली. नरेंद्राला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्या चमत्काराचा अर्थच कळेना. तो जडमूढ बनून पाहत राहिला. थोड्या वेळाने तो भानावर आला व परत फिरला. रामकृष्णांनी त्याला विचारले. "काय रे, मागितलंस काय हवे ते ?" नरेंद्र म्हणाला 'छे ! विसरलोच ते !' "मग आता पुन्हा जा. माग काहीतरी. विसरू नकोस !" नरेंद्र गेला; पण पुन्हा मागच्या सारखीच त्याची अवस्था झाली. असे दोन-तीनदा झाले व मग त्याच्या लक्षात आले, की आपण ज्या अंतिम सत्याचा शोध घेत होतो, तेच आपल्याला गवसले आहे. हा आनंद एवढा अतुलनीय आहे, की प्रत्यक्ष भगवंताच्या दर्शनापुढे सर्व ऐहिक गोष्टी तुच्छ आहेत. आपण शुद्ध वेडेपणा करून देवीकडून ऐहिक सुखाची व समृद्धीची अपेक्षा करीत होतो. आता या शाश्वत सत्याचा मार्ग सोडून दुसऱ्या कोणत्याही गोष्टीची अपेक्षा करणे चूक आहे.

अर्थातच हा बोध होऊनही दैनंदिन जीवनातल्या त्याच्या अडचणी काही लगेच कमी झाल्या नाहीत; पण थोड्याच दिवसांत परिस्थिती बदलली. त्याला अॅटर्नी-ऑफिसात काम मिळाले. जोडीला त्याने काही पुस्तकांची भाषांतरे करूनही पैसे मिळवायला आरंभ केला. आणखी थोड्या दिवसांनी ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या शाळेत त्याला शिक्षकाची नोकरी मिळाली. त्यामुळे त्याच्या प्रापंचिक अडचणी जवळ जवळ संपल्या.

इ. स. १८८३ पासून रामकृष्णांनी नरेंद्रनाथांप्रमाणेच आणखीही काही बुद्धिमान व विश्वविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या तरुणांना आध्यात्मिक मार्गदर्शन सुरू केले. परंतु थोड्याच वर्षांनी म्हणजे इ. स. १८८५ च्या मध्यानंतर रामकृष्णांना घशाचा आजार झाला व दिवसेंदिवस तो विकोपाला जाऊन अंती दुखणे कर्क रोगावर गेले. रामकृष्णांच्या असंख्य भक्तांना आणि तरुण अनुयायांना त्यामुळे धक्का बसला. तथापि "देहापेक्षा त्या देहात वास करणारा आत्मा श्रेष्ठ" हे चिरंजीवी तत्त्वज्ञान अहोरात्र सांगणाऱ्या आणि ते प्रत्यक्ष जगून दाखवणाऱ्या रामकृष्णांनी त्यांची समजूत काढली. शिष्यमंडळींनी रामकृष्णांना थोडी हवापालट व्हावी या हेतूने कलकत्त्याच्या उत्तरेस काशीपूर नामक विभागात, भोवताली एक बगीचा असलेल्या घरात नेऊन ठेवले. नरेंद्राने आपल्या नोकरीचे त्यागपत्र दिले व तो पूर्ण वेळ गुरूच्या सेवाशुश्रूषेसाठी तिथे जाऊन राहिला.

नरेंद्र या काळात अनन्यचित्त होऊन, गुरूपदिष्ट मार्गाने साधना करीत स्वतःची प्रगती करू लागला.

श्रीरामकृष्ण त्याच्यावर फार खूष होते. एके दिवशी त्यांनी नरेंद्राला म्हटले. "साधनाकाली मला अष्टसिद्धी प्राप्त झाल्या होत्या; पण आजवर मला त्यांचे काहीच काम पडले नाही. मी त्या तुला देतो. पुढे कधीतरी तुला त्यांचा उपयोग होईल."

त्यावर नरेंद्रनाथाने विचारले. "पण महाराज, त्यांच्यामुळे ईश्वरप्राप्ती करून घेण्यासाठी काही मदत होईल का ?"

"नाही. मुळीच नाही. पण एक होईल, तुझी एकही ऐहिक वासना अपूर्ण राहणार नाही." रामकृष्ण उत्तरले.

"मग महाराज, मला त्यांची मुळीच गरज नाही !" नरेंद्रनाथ तत्काळ म्हणाला.

नरेंद्राच्या या उत्तराने रामकृष्णांना अतीव समाधान वाटले. आणखी एके दिवशी त्यांनी आपल्या निवडक अधिकारी शिष्यांना संन्यासदीक्षा देण्याचे ठरविले. मग एका शुभ दिनी त्यांनी नरेंद्रनाथ व त्याच्या बरोबरीचे काही शिष्य यांना स्वहस्ते भगवी वस्त्रे दिली. मग त्यांनी त्या सर्व शिष्यांना पृच्छा केली.

"तुम्ही सारे आता पूर्ण अभिमानरहित होऊन भिक्षेची झोळी खांद्यावर घेऊन कलकत्त्याच्या राजरस्त्यातून भिक्षा मागू शकाल काय ?" नरेंद्राने आपल्या सर्व गुरुबंधूंच्या वतीने होय म्हटले व तत्काळ ते सगळे भिक्षाटनासाठी बाहेर पडले. त्या दिवशी स्वसंपादित भिक्षेच्या अन्नाचे त्यांनी रामकृष्णांना भोजन दिले.

संन्यासग्रहणानंतर नरेंद्र आपल्या दोघा गुरुबंधूंसह बुद्धगयेच्या यात्रेला गेला. भगवान बुद्धदेवांना ज्या बोधिवृक्षाखाली बोधी प्राप्त झाली, तिथेच बसून नरेंद्रानेही तीन दिवस कठोर तपस्या केली. मग तो पुन्हा काशीपूरला परतला. तथापि अजूनही त्याला पूर्ण शांती लाभली नव्हती. त्याला कशाची तरी तीव्र ओढ लागली होती. रामकृष्णांनी ते जाणले व त्याला विचारले.

'नरेन, काय हवंय तुला ?'

योग्य संधी आलेली पाहून तो उत्तरला.

"मी शुकदेवांप्रमाणे सर्वदा निर्विकल्प समाधीच्या साहाय्याने सच्चिदानंदात डुंबून राहू इच्छितो."

रामकृष्णांनी त्याची ती इच्छा ऐकली आणि ते एकदम तीव्र स्वरात म्हणाले. "पुनःपुन्हा ही गोष्ट उच्चारायला तुला लाज कशी वाटत नाही ? एखाद्या विशाल वटवृक्षासमान वाढायचे आणि हजारो लोकांना शांतीची सावली द्यायची, ते सोडून तू स्वतःच्याच मुक्तीसाठी तडफडणार ? इतके क्षुद्र ध्येय तुझे ?"

रामकृष्णांचे हे शब्द ऐकून नरेंद्रनाथाच्या डोळ्यांना धारा लागल्या; पण तरीही तो म्हणाला. "निर्विकल्प समाधी लाभेपर्यंत माझे मन कशानेही शांत होणार नाही."

"बरं आहे जा. निर्विकल्प समाधी लाभेल तुला."

त्यानंतर एके दिवशी सायंकाळी ध्यानसमयी त्याला अकल्पितपणे निर्विकल्प समाधी प्राप्त झाली. बऱ्याच वेळानंतर त्याची समाधी उतरली. त्याचे मन त्या समाधीअवस्थेत पूर्ण कामनाशून्य झाले असले, तरी एक अलौकिक शक्ती त्याला त्याच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने पंचेंद्रियग्राह्य अशा बाह्य जगतात उतरवीत होती. त्याच्या प्रत्ययास येत होते, की 'बहुजन-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हिताय-बहुजनसुखाय कर्म करीन, अपरोक्षानुभूतीद्वारा लाभलेल्या सत्याचा प्रचार करीन' या महान कामनेचे सूत्र धरून त्याचे मन निर्विकल्प अवस्थेतून परतत होते. त्याच्या हे लक्षात येऊन चुकले, की ज्या ज्ञानामृताने आपण तृप्त झालो आहोत, त्याचेच अनुभवजन्य ज्ञान यापुढे जगातील असंख्य दुःखदैन्यपीडित आणि मोहभ्रान्त जीवांना आपल्याला द्यावे लागणार आहे आणि भारताच्या प्राचीन मंत्रद्रष्टया ऋषींप्रमाणे आपल्यालाही घन-गंभीर स्वरात हे उद्‌घोषून सांगावे लागणार आहे–

शृण्वन्तु विश्वे अमृतस्य पुत्राः । आ ये धामानि दिव्यानि तस्थुः ।
वेदाहमेतं पुरुषं महान्तम् । आदित्यवर्णं तमसः परस्तात् ।
तमेव विदित्वाऽतिमृत्युमेति । नान्यः पन्था विद्यतेऽयनाय ।।

अर्थ – हे विश्ववासी अमृतपुरुषाच्या पुत्रांनो, हे दिव्यधाम-निवासी देवतांनो, ऐका. अज्ञानांधकाराच्या पलिकडे असणाऱ्या त्या सूर्यासारख्या देदीप्यमान महान पुरुषाला मी जाणले आहे. त्याला जाणूनच आपण मृत्यूला जिंकू शकू. याखेरीज मृत्युंजय होण्याचा आणखी दुसरा कोणताच मार्ग नाही.

निर्विकल्प समाधीपासून झालेला हा बोध आणि आनंद यांच्यामुळे नरेंद्राचे हृदय आता अत्यंत तृप्त झाले होते. त्याच्या चेहऱ्यावर एक अतिशय अप्राप्य वस्तू मिळवल्याचा आनंद ओसंडून जात होता. हा आनंद ज्या सद्‌गुरूच्या कृपेमुळेच केवळ आपल्याला प्राप्त झाला, त्या रामकृष्णांच्या चरणांवर नतमस्तक होताना त्याचे हृदय कृतज्ञतेने भरून आले.

नरेंद्रावर प्राणापलिकडे प्रेम करणाऱ्या त्याच्या मित्रांना या घटनेमुळे फार आनंद झाला. हा आनंदोत्सव साजरा करण्यासाठी ते रात्रंदिवस भजन-संकीर्तनाच्या कार्यक्रमात रंगून गेले. स्वतः नरेंद्र हा तर भावोन्मत्त होऊन राधा-कृष्ण, सीता-राम आणि चैतन्य महाप्रभू यांची गीते गात होता. रामकृष्ण मात्र त्या सर्वांचा हा जल्लोष पाहून अतिशय व्याकुळ झाले व काली-मातेला पुनःपुन्हा विनवीत राहीले. "आई, त्याची (नरेंद्राची) अद्वैतानुभूती आपल्या मायाशक्तीने झाकून टाक. आई, मला त्याच्याकडून कितीतरी काम करवून घ्यायचे आहे!" कारण नरेंद्राने केवळ अध्यात्म, जपजाप्य, समाधी यांच्यातच मग्न न होता, यांतून मिळणाऱ्या ज्ञानाचा व सामर्थ्याचा उपयोग कोट्यवधी देशबांधवांच्या सर्वांगीण कल्याणासाठी करावा, अशी त्यांची इच्छा होती.

इ. स. १८८६ च्या जुलै महिन्यात रामकृष्ण परमहंसांची प्रकृती फार गंभीर झाली. आपला देहपाताचा समय जवळ आला, हे जाणून त्यांनी एके दिवशी नरेंद्राला जवळ बोलावून म्हटले– "नरेन, ही सारी मुले मागे राहिलीत. तू त्यांच्यापेक्षा बुद्धि-मान आणि शक्तिमान आहेस. म्हणून तूच त्यांच्याकडे पाहा, त्यांचे रक्षण कर. त्यांना सन्मार्गाने ने. मी आता लवकरच देह सोडीन."

रामकृष्णांच्या प्रयाणापूर्वी दोन दिवस आधी नरेंद्राच्या मनात विचार आला. "हे महापुरुष आहेत हे तर खरंच! परंतु रामचंद्र, गिरीश, इ. भक्त त्यांना साक्षात भगवान मानतात, हे बरोबर आहे का? रामकृष्णांनी स्वतःच या कोड्याचा उलगडा केला, तरच विश्वास ठेवता येईल!"

नरेंद्राच्या मनात अजूनही हे शंकाकुशंकांचे जाळे शिल्लक आहे, असे पाहताच ते सर्वसाक्षी रामकृष्ण डोळे पूर्णपणे उघडून नरेंद्राकडे पाहत म्हणाले. "अजून तुझा विश्वास बसला नाही? ऐक, जो राम, जो कृष्ण तोच या वेळी रामकृष्ण. तुझ्या वेदान्ताच्या दृष्टीने नव्हे, प्रत्यक्ष."

आपल्या गुरूंचे ते विलक्षण आत्मविश्वासाचे बोल ऐकून त्याच्या मनातले उरले सुरले किल्मिष नष्ट झाले.

यानंतर १५ ऑगस्ट १८८६ या दिवशी रामकृष्ण परम-हंसांचे निर्याण झाले. त्यांच्या निर्याणामुळे क्षणकाल त्यांच्या सर्व शिष्यांची अवस्था अत्यंत केविलवाणी झाली. त्यांच्या जीवनातला प्रकाशच जणू लोपला. रामकृष्णांच्या निर्याणानंतर काशीपूरचे उद्यानगृह सोडणे भाग होते. परंतु नरेंद्राला या सर्व रामकृष्ण-शिष्यांची फाटाफूट होणे बरे वाटेना. रामकृष्णांच्या आदर्शांचा प्रचार-प्रसार सर्वत्र व्हायचा, तर निदान काही दिवस तरी या शिष्यमंडळाला एकत्र ठेवून प्रचाराचे शिक्षण द्यायला हवे, असे त्याच्या मनाने घेतले. त्यासाठीच त्याने राम-कृष्णांचे एक गृहस्थाश्रमी ज्येष्ठ अनुयायी श्री. सुरेंद्रनाथ मित्र यांच्या मदतीने वराहनगर विभागात एक घर भाड्याने घेतले व तिथे त्या सर्व शिष्यांचा एक संघ स्थापन केला. संघस्थापने-नंतर त्या सर्व गुरुबंधूंनी संन्यासदीक्षा घेतली आणि नवीन नावे धारण केली. नरेंद्राने स्वामी विविदिशानंद व सच्चिदानंद ही दोन नावे घेतली होती.

त्यानंतर नरेंद्राने आपल्या सर्व गुरुबंधूंना नाना प्रकारे मार्ग-दर्शन सुरू केले. सर्वजण त्याच्या आदेशाचे पालन श्रद्धापूर्वक करू लागले. मठात सदैव पूजा, ध्यान, जप व संकीर्तन चालू असे.

याप्रमाणे वराहनगरात काही दिवस काढल्यानंतर त्यांना असे दिसून आले, की आपल्या गुरुबंधूंना तीर्थाटणाची उत्कट इच्छा झाली आहे. आपण सारे इथे एकत्र राहतो, परंतु त्यांतून परस्परांच्या विषयीच्या मायाबंधात जखडले जातो. संन्यासी मनुष्याने अशा प्रकारे मायाबंधात अडकणे बरे नव्हे. त्यापेक्षा हे सर्व संन्यासी निरनिराळ्या मार्गांनी तीर्थाटणाला जाऊ इच्छि-तात, एकान्तात परिभ्रमण करू पाहतात, हेच बरोबर आहे. आपणही आता इथून बाहेर पडावे व आसेतुहिमाचल भारत-वर्षाची पदयात्रा करावी, असे त्यांनी ठरवले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स्वामीजी प्रथम काशीला जाऊन राहिले. तिथे त्यांनी शास्त्र-चर्चा, जपध्यान, सत्संग यांत आपला काळ व्यतीत केला. मग ते तिथून अयोध्येला गेले. त्यानंतर लखनौ, आग्रा, वृंदावन अशी स्थाने पाहत ते पुढे चालले. या परिभ्रमणात त्यांना देशबांधवांचे दैन्य, दास्य, दारिद्र्य प्रकर्षाने जाणवू लागले. आपापसांतील भेदाभेद, अज्ञान, सामर्थ्यहीनता, इ. नानाविध सामाजिक दुर्गुण त्यांना बोचू लागले. हा दुर्दैवी समाज पुनश्च आपल्या समर्थ व स्वतंत्र वैभवाने कधी तळपू लागेल, याचा ते एकसारखा विचार करीत. कोणती संजीवनी, कोणती मात्रा, या समाजाच्या रोगांवर उपयोगी पडेल, याचे ते चिंतन करीत. एकीकडे वेदान्तचर्चा, ध्यानधारणा, योग, समाधी, इत्यादींच्या अनुष्ठानाचे इहलोक-विमुख आदर्श; तर दुसरीकडे भारतातील सर्वसाधारण जनतेची दुर्गती निवारण्याचे सेवाव्रत. वरवर विरोधी भासणाऱ्या दोन्ही आदर्शांचा आपण जर सुयोग्य समन्वय घडवून आणू शकलो, तरच आपल्याला श्रीरामकृष्णांचे शिष्य म्हणवून घेण्याचा अधिकार आहे, असे त्यांना वाटे. ठिकठिकाणी भेटणाऱ्या साधु-संन्याशांशी, संत-महंतांशी, विचारवंतांशी, सामाजिक व राजकीय नेत्यांशी ते याच एका विषयावर बोलत.

१८८८ च्या नोव्हेंबर महिन्यात स्वामीजी वराहनगरच्या मठात परत आले. त्यानंतर १८९० च्या जानेवारी महिन्यात ते गाझीपूरला गेले. गाझीपूरच्या मुक्कामात ते पवहारीबाबा नामक एका जीवन्मुक्त सत्पुरुषाच्या सहवासात राहिले व त्यामुळे त्यांचे मनोबल शतपटीने वाढले. त्यानंतर ते मठात परत येऊन काही दिवस तिथे राहिले. पण त्यांच्या हृदयात पुन्हा भारतभ्रमणाची तीव्र इच्छा उद्भवली.

भारतयात्रेला आरंभ करण्यापूर्वी ते श्रीरामकृष्णांच्या सहधर्म-चारिणी श्रीशारदादेवी यांच्या भेटीला गेले व त्यांना चरणस्पर्श-पूर्वक म्हणाले. “ जोपर्यंत श्रीगुरूंचे कार्य मी पूर्ण करू शकणार नाही, तोपर्यंत परत फिरणार नाही. माझा संकल्प पूर्ण होईल, असा आशीर्वाद द्या. ” माताजींनी त्यांना तसा आशीर्वाद दिला. मग इ. स. १८९० च्या जुलै महिन्यात ते भारतयात्रेसाठी बाहेर पडले. प्रथम ते भागलपूर व देवघर येथे राहून काशीला गेले. तिथे त्यांना हिमालयाकडे जाण्याची ओढ लागली. मग त्यांनी हिमालयाची पदयात्रा केली.

यानंतर स्वामीजींनी पंजाब, राजस्थान, गुजरात, इ. प्रदेशात संचार केला व लोकस्थितीचे अवलोकन केले. या प्रवासात त्यांनी आपल्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाने व आत्मविश्वाससंपन्न वक्तृत्वाने शेकडो-हजारो लोकांना मंत्रमुग्ध करून सोडले. अनेक राजे-महाराजे त्यांच्या अनुयायांत समाविष्ट झाले. पोरबंदर मुक्कामात त्यांची तिथले विख्यात महाराष्ट्रीय विद्वान श्री. शंकर पांडुरंग पंडित यांच्याशी भेट झाली. त्यांच्या जवळ स्वामीजींनी पातंजल महाभाष्याचे अध्ययन आरंभिले. अध्ययनाच्या वेळे-व्यतिरिक्त स्वामीजी नानाविध विषयांवर जे पुरुषार्थी विचार बोलून दाखवीत, ते ऐकून शंकरराव पंडित थक्क होऊन जात. एके दिवशी ते स्वामीजींना म्हणाले–

“ स्वामीजी, या देशात धर्मप्रचार करून आपल्या मनासारखे विशेष काही होईल, असे निदान मला तरी वाटत नाही. आपला व्यापक, उदार भाव या देशातील लोकांना समजण्यास बराच वेळ लागेल. म्हणून उगाच शक्तीचा अपव्यय न करता आपण पाश्चात्य देशात जाणेच श्रेयस्कर होय. पाश्चात्य विद्येवर आणि सभ्यतेवर आपल्या सनातन धर्माचा अपूर्व प्रकाश पाडून आपण एक नवेच युग अस्तित्वात आणू शकाल, यात मला मुळीच संदेह नाही. ”

पंडितांचे म्हणणे ऐकून स्वामीजी थोडा वेळ स्तब्ध बसले व मग म्हणाले. “ आपल्या म्हणण्यात बराच तथ्यांश आहे. ”

पोरबंदर सोडल्यावर स्वामीजी द्वारका, मांडवी, पालिताणा, बडोदा, खांडवा, इ. ठिकाणी लहानमोठे मुक्काम करीत शेवटी मुंबईला आले. मुंबईहून पुण्याला जाणाऱ्या गाडीतच त्यांची लोकमान्य टिळकांशी भेट झाली व ते पुण्याच्या मुक्कामात टिळकांकडेच राहिले. या मुक्कामात उभयतांची राष्ट्रोत्थानविषयक चर्चा झाली. पुण्यानंतर महाबळेश्वराला जाऊन आल्यावर ते बेळगावाकडे गेले. बेळगावहून बंगलोरमार्गे ते म्हैसूरला गेले. म्हैसूरचे राजेसाहेब स्वामीजींच्या विचारांनी भारावून गेले. कर्नाटक प्रदेश सोडल्यावर स्वामीजी मद्रास राज्यात गेले आणि शेवटी ते कन्याकुमारीच्या समुद्रकिनाऱ्यावर जाऊन पोचले.

कन्याकुमारीजवळ समुद्रात एक प्रचंड खडक आहे. पुराणांत त्याला श्रीपद असे नाव असून, ते एक पवित्र स्थान मानले जाते. स्वामी विवेकानंद पोहत जाऊन त्या खडकावर बसले. तिथे त्यांनी देवीचे ध्यान सुरू केले. त्या ध्यानावस्थेतच त्यांना साक्षात्कार झाला आणि राष्ट्रोत्थानाविषयी प्रेरणाही मिळाली. त्यानंतर ते स्थान विवेकानंद–खडक या नावाने प्रख्यात झाले.

समोर उसळत्या लाटांचा पिंगा घालणारा हिंदी महासागर आणि पाठीशी सस्यशामल भारतवर्ष–या भव्य दृश्याने स्वामी-जींच्या मनात अनेकविध विचारांचा कल्लोळ माजला. ‘मी समग्र भारताचे भ्रमण केले. धनी, राजे, महाराजे, प्रत्येकाच्या दारोदारी गेलो; गरीबांच्या साहाय्यार्थ प्रार्थना करीत फिरलो; परंतु फक्त शाब्दिक सहानुभूतीखेरीज फारसे काहीच लाभले नाही. अशा परिस्थितीत केवळ भारताच्याच तोंडाकडे बघत बसणे म्हणजे व्यर्थ वेळ दवडणे होय. म्हणून हा विस्तीर्ण सागर ओलांडून, भारतातील लक्षावधी दरिद्री लोकांचा प्रतिनिधी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणून मी पाश्चात्य देशात जाईन. तिथे आपल्या बुद्धीच्या व विचारांच्या बळावर पैसा मिळवून स्वदेशी परत येईन आणि उरलेले जीवन मातृभूमीची उन्नती साधण्यात वेचीन किंवा याच प्रयत्नात प्राण तरी सोडीन.'

या विचारकल्लोळातून निर्धार प्रकटला. स्वामीजी माघारी वळले. मग त्यांनी रामनद, पांडेचरी, मद्रास, इ. गावी संचार केला. याच सुमारास अमेरिकेतील शिकागो नामक शहरात एक सर्वधर्मपरिषद भरणार असल्याची वार्ता स्वामीजींच्या मद्रासी शिष्यांना समजली व त्यांनी या धर्मपरिषदेत स्वामी विवेकानंदांनी भारताचे प्रतिनिधित्व करावे, असा आग्रह सुरू केला. त्याचबरोबर त्यांनी सुमारे५०० रुपयांची रक्कमही त्यांच्या हाती दिली. परंतु या संकल्पात आरंभी तरीच संकटे आली. स्वामीजी अमेरिकेत जाऊ शकणार नाहीत, अशीच जवळजवळ काही काळ स्थिती निर्माण झाली. एवढ्या दूरच्या प्रवासाला जाण्यासाठी लागणारा पैसा ही अजून जमा झाला नव्हता. स्वामीजींचे राजे-रजवाड्यांत असणारे वजन लक्षात घेऊन त्यांच्या काही शिष्यांनी श्रीमंत संस्थानिकांकडून थोडे फार पैसे जमवले, पण स्वामीजींना ते विशेषसे रुचले नाही. ते आपले मद्रास येथील एक शिष्य अलासिंग पेरुमल यांच्याजवळ म्हणाले. "मी अमेरिकेला जावे अशी

स्वामी विवेकानंद

जर जगन्मातेची इच्छाच असेल, तर अर्थातच मला जावे लागेल. तुम्ही लोकांनी मला हिंदू धर्माचा प्रतिनिधी म्हणून पाठविण्याचा संकल्प केला आहे व मीदेखील या सामान्य जनतेच्याच वतीने तिथे जाऊ इच्छितो. आणि म्हणून केवळ राजे-रजवाडयांच्या पैशापेक्षा या कार्यास इथल्या सर्वसाधारण जनतेकडून पै-पैसा जमवून, तिचा कल काय आहे, तो तुम्ही पाहा." स्वामीजींच्या शिष्यवृंदांनी ही आज्ञा शिरोधार्य मानून सामान्य जनतेतून भिक्षा मागून उर्वरित रकमेची पूर्तता केली.

एवढ्यातच एके दिवशी स्वामीजींना स्वप्नदृष्टांत झाला. त्यांचे गुरुदेव श्रीरामकृष्ण दिव्य देह धारण करून समुद्रावरून चालत पुढे जात आहेत आणि स्वामी विवेकानंदांना आपल्या मागोमाग येण्यासाठी खुणावीत आहेत, असे दृश्य त्यांना स्वप्नात दिसले. त्यामुळे त्यांच्या विदेशप्रवासाला प्रत्यक्ष सद्‌गुरूंचे वरदानच मिळाले. स्वामीजींना त्या घटनेने परमानंद झाला. दि. ३१ मे १८९३ या दिवशी त्यांनी मुंबई बंदरातून सुटणाऱ्या एका बोटीवरून अमेरिकेला प्रयाण केले. प्रयाणापूर्वी खेत्रीच्या राजाच्या विनंतीवरून त्यांनी विवेकानंद हे नाव धारण केले.

बरेच दिवस प्रवास केल्यावर स्वामीजी शिकागोत जाऊन पोचले; परंतु तिथे त्यांची फार परवड झाली. अनोळखी मुलुख, विदेशी प्रवाशांकडून प्रत्येक गोष्टीसाठी वारेमाप पैसा घेऊन त्यांना ठकविण्याची अमेरिकेतील व्यापाऱ्यांची वृत्ती; स्वामीजींचे भगवे कपडे व काहीसे गबाळे ध्यान यांमुळे पोरे-सोरे त्यांची टिंगल-टवाळी करीत त्यांच्यामागे लागू लागली. शेवटी इथे आपले जमणार नाही, हे ओळखून स्वामीजींनी एका अमेरिकन स्नेह्यांच्या सल्ल्याने बोस्टनचा रस्ता धरला. बोस्टन येथे त्यांची एका सहृदय अमेरिकन महिलेशी ओळख झाली व स्वामीजींशी बोलत असता तिला त्यांच्याविषयी आदर वाटू लागला. स्वामीजी अमेरिकेत सर्वधर्मपरिषदेचे प्रतिनिधी म्हणून आले आहेत, असे कळल्यावर तर तिचा त्यांच्याविषयीचा आदर आणखीच दुणावला. मग तिने त्यांना आपल्या घरीच येऊन राहण्याचे निमंत्रण दिले. स्वामीजींनी ते स्वीकारले आणि नंतर तिनेच त्यांच्या प्रत्येक अडचणीत त्यांना हवे ते साहाय्य देऊन त्यांना सर्वधर्मपरिषदेच्या मुख्य व्यासपीठापर्यंत पोचविले.

दि. ११ सप्टेंबर १८९३ या दिवशी ते शिकागोच्या परिषदेत प्रथम बोलले. त्या संस्मरणीय घटनेचे वर्णन खुद्द स्वामीजींनीच लिहून ठेवले आहे, ते असे –

" खूप धामधुमीने सभेला आरंभ तर झाला एकदाचा. नंतर प्रतिनिधींचा एकामागून एक असा क्रमाने सभेला परिचय करून देण्यात आला. इकडे माझी अवस्था विचारूच नका ! छाती धडधड करीत होती, जीभ सुकून चालली होती. मी इतका

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

घाबरून गेलो होतो, की दुपारपर्यंत तर भाषण करण्याचे मला धाडसच झाले नाही. ब्राह्मसमाजाचे मुजुमदार छान बोलले. थिऑसफीचे चक्रवर्ती त्यांच्याहीपेक्षा छान बोलले. सारखा टाळ्यांचा गजर होत होता. ते सारेजण आपापली भाषणे तयार करून आले होते. मूर्ख फक्त मी एकटाच. मी काहीच तयारी केली नव्हती. अखेर भगवती सरस्वतीदेवीला प्रणाम करून कसा तरी पुढे झालो. बॅरोजसाहेबांनी श्रोत्यांना माझी ओळख करून दिली. माझ्या भगव्या कपड्यांनी श्रोतृवृंदाचे चित्त थोडे आकर्षून घेतले. मग मी बोलायला आरंभ केला. ज्या वेळी मी 'अमेरिकेतील माझ्या भगिनींनो आणि बंधूंनो' अशा शब्दांत सभेला संबोधले, त्या वेळी पुरी दोन मिनिटे टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला."

यानंतर स्वामीजींनी आपल्या अत्यंत आत्मविश्वासपूर्ण आणि मधुर वाणीने हिंदू धर्माचे रहस्य अत्यंत समर्पक व थोडक्या शब्दांत परिषदेच्या श्रोत्यांना समजावून सांगितले. स्वामीजींचे हे आणि यानंतरचे प्रत्येक भाषण अमेरिकन श्रोत्यांच्या हृदयाला भिडणारे ठरले. हा संन्यासी काही वेगळाच आहे, हे त्यांनी ओळखले. त्यानंतर त्यांची शेकडो लहानमोठी भाषणे झाली.

या सुप्रसिद्ध धर्मपरिषदेनंतर स्वामीजींनी सबंध पाश्चात्य जगतात एक प्रदीर्घ दौरा काढून हिंदू धर्माची आणि वेदान्ताची दिग्विजयी ध्वजा सर्वत्र फडकावून दिली. लंडनच्या मुक्कामात त्यांचा मिस मार्गारेट ई. नोबल या विदुषीशी परिचय झाला. स्वामीजींच्या दिव्य-भव्य व्यक्तिमत्वाने ती एवढी प्रभावित झाली, की पुढे तिने भारतात येऊन स्वामीजींच्या कार्याला वाहून घेतले व इथेच देह ठेवला. ही नोबल म्हणजेच स्वामी विवेकानंदांची 'मानसकन्या भगिनी निवेदिता होय. हिच्या प्रमाणेच अनेक पाश्चात्य स्त्री-पुरुषांनी स्वामीजींच्या वेदान्त धर्माच्या प्रचारार्थ स्वतःला वाहून घेतले. अमेरिकेतील व अन्य पाश्चात्य शहरांतून वेदान्तधर्मसाधनेची केन्द्रे उघडण्यात आली. स्वामीजींचे वक्तृत्व, व्यक्तिमत्व, विशुद्ध जीवनचरित्र, हे सारे पाश्चात्य जगताला कौतुकाचे व आदराचे ठरले. काही ख्रिश्चन मिशनऱ्यांनी त्यांना विरोध करण्याचा, त्यांच्या भूमिकेविषयी गैरसमज पसरविण्याचा आणि प्रचलित हिंदू धर्मातील वैगुण्ये शोधून त्याची निंदा करण्याचा प्रयत्न करून पाहिला; परंतु विवेकानंदांच्या झंझावाती प्रचारामुळे तो निष्फळ ठरला.

अशा प्रकारे आपले अंगीकृत कार्य विलक्षण प्रभावीपणे यशस्वी करून स्वामीजी दि. १५ जानेवारी १८९७ या दिवशी कोलंबो बंदरात उतरले. तिथून पुढे त्यांनी पुनश्च भारत-यात्रा केली. कोलंबोपासून अल्मोऱ्यापर्यंत त्यांनी ज्या ज्या नगरात प्रवेश केला, तिथे तिथे त्यांचे अपूर्व स्वागत झाले. लोक त्यांचा प्रत्येक शब्द कानामनात साठविण्याच्या उत्साहाने त्यांच्या व्याख्यानांना येत व स्वामीजी त्यांना पुरुषार्थी, पराक्रमी बनण्याचा उपदेश करीत.

यानंतर त्यांनी आपल्या सर्व गुरूबंधूंना एकत्र करून रामकृष्ण संघ या लोकसेवकांच्या संघटनेची स्थापना केली. शहरो-शहरी, प्रांतो-प्रांतीं तिच्या शाखा निघाव्या, या हेतूने निःस्वार्थी व पुरुषार्थी अशा तरुणांना शिक्षण देऊन त्यांनी तयार केले. त्यासाठी त्यांनी अविश्रांत दौरे, भाषणे, प्रवचने, बैठकी, यांचा एक कार्यक्रमही केला. त्या काळातही ते आपले ध्यान, जप-जाप्य, सद्गुरूंचे पूजन-अर्चन, समाधी, इ. गोष्टी विसरले नाहीत. हे सारे केल्यानेच आपले राष्ट्रजागृतीचे कार्य यशस्वी होणार आहे, अशी त्यांची श्रद्धा होती.

यानंतरची चार वर्षे स्वामीजींनी आपल्या लोकसेवाव्रती अशा संन्यासी गणांसह दुष्काळात, भूकंपांत, जलप्रलयात, रोगांच्या साथीत आणि अन्य अनेक संकटांत सापडलेल्या दुर्दैवी भारतीय बांधवांच्या सेवेसाठी वेचली. हे करीत असताना त्यांनी व्यवहार, प्रवृत्तिधर्म, अध्यात्म, व्यक्तिगत योगसाधना, मनुष्याच्या दैनंदिन गरजा या सर्वांचा नेमका विचार करून आपले तत्त्वज्ञान मांडले. गुलामीच्या गर्तेत पिचत पडणारे एक पुरातन, पवित्र राष्ट्र वैभवाच्या शिखराप्रत पोचवणे, हे त्यांचे जीवितकार्य होते आणि ते त्यांनी जिवात जीव असेपर्यंत केले.

मग एके दिवशी त्यांनी आपल्या शिष्यांना स्वतः जेवू घातले व त्यांची जेवणे झाल्यावर त्यांच्या हातावर पाणी घालण्यासाठीही ते पुढे झाले. ते पाहून भगिनी निवेदिता उचंबळून म्हणाल्या. 'गुरुदेव, आपण हे काय करता?' स्वामीजी अत्यंत कनवाळूपणाने म्हणाले. "का बरं, भगवान येशूने नव्हते का आपल्या शिष्याचे पाय धुतले!"

"पण ते अंतिम भोजनाच्या वेळी!" निवेदिता पुटपुटल्या. स्वामीजी केवळ हसले. ते त्यांचे हसणे नेहमीचे नव्हते. त्यात कसला तरी गंभीर आशय होता. निवेदितांना तो समजला.

यानंतर दि. ४ जुलै १९०२ या दिवशी रात्री त्यांनी बेलूर-मठात देहत्याग केला!

विचारधन–स्वामी विवेकानंद हे आधुनिक भारतातील एक सर्वश्रेष्ठ विचारवंत होते, हे निर्विवाद सत्य आहे. मानवी जीवनाच्या सर्व अंगोपांगांचे त्यांनी गांभीर्याने व विचारपूर्वक निरीक्षण केले होते. काय केले म्हणजे आधुनिक मानव जीवनात यशस्वी होईल, याविषयी त्यांच्या काही निश्चित धारणा होत्या. त्यामुळेच पाश्चात्य जीवनातील अतिरिक्त भोगविलास पाहून त्यांनी तिथल्या लोकांना त्यागी जीवनाचा संदेश दिला, तर भारतात अर्धपोटी राहूनही अध्यात्माची जोपासना कर-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

गाऱ्या व आळशी, अगतिक, निराश झालेल्या सर्वसामान्य जनतेला त्यांनी 'प्रयत्नशील व्हा, पराक्रमी व्हा, पुरुषार्थी व्हा' असा उपदेश केला. दुबळ्या अहिंसाधर्मापेक्षा गुंड – डाकूंचा निधडा हिंसामार्ग मला अधिक पसंत आहे, असे ते म्हणत. त्यांनी जो वेदान्तधर्माचा प्रचार केला, त्याला अनुलक्षून लो. टिळकांनी त्यांना 'विसाव्या शतकातील शंकराचार्य' अशा शब्दांनी गौरवले.

स्वामीजींचे विचार आणि उच्चार नेहमीच प्रेरक आणि उत्साहवर्धक असत. ते जिथे जिथे गेले तिथे तिथे त्यांनी सर्वांच्या मनात आत्मविश्वास उत्पन्न केला. त्यांनी लोकांना अनासक्त कर्माची प्रेरणा दिली; जनांना ज्ञान-विज्ञान सन्मुख केले. दुबळेपणा किंवा आत्मविश्वासाचा अभाव हा दुर्गुण त्यांनी झाडून टाकायला शिकविले. सुख आणि दुःख, जीवन आणि मरण, वेदान्त आणि व्यवहार या गोष्टी उत्तम प्रकारे समजावून सांगितल्या. त्यांचे काही विचार पुढे दिले आहेत –

प्रथमतः आपण हे पक्के ध्यानात वाळगले पाहिजे की, आपणच जगाचे ऋणी आहोत, जग आपले कोणत्याही प्रकारे ऋणी नाही. जगासाठी काही करण्याचा सुयोग आपल्याला लाभत आहे, हे आपले महान सौभाग्य म्हटले पाहिजे. जगाला साहाय्य करण्याने वस्तुतः आपण स्वतःचेच कल्याण करीत असतो. त्यानंतर, दुसरा मुद्दा म्हटला म्हणजे, आपण ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, या विश्व ब्रह्मांडाचा नियंता असा एक ईश्वर अस्तित्वात आहे. सारेच्या सारे विश्व घसरगुंडीला लागले असून, तुमच्या आमच्या मदतीची ते सारखी वाट पाहत आहे, अशी खरोखरच वस्तुस्थिती नाही; ईश्वर त्यांत सर्वदा विद्यमान आहे. तो अविनाशी, सतत क्रियाशील व सदा जागरूक असतो. ज्या वेळी हे सर्व चराचर विश्व सुषुप्तीच्या अंकावर निद्रिस्त झालेले असते त्या वेळीही तो जागृत असतो. तो विश्वनियंता अविरत कार्य करीत आहे, जगात दिसून येणारी सारी परिवर्तने आणि विकास याचेच कार्य होय.

तिसरा मुद्दा म्हणजे आपण कोणाचीही घृणा करणे उचित नाही. हे जग नेहमीच शुभाशुभाचें मिश्रण असणार. आपले कर्तव्य आहे दुबळ्यांना सहानुभूती दाखविणे आणि कुकर्म करणाऱ्यावरही प्रेम करणे. आपले हे जग म्हणजे एक विशाल नैतिक व्यायामशाळा आहे. इथे आपणा सर्वांनाच व्यायाम घ्यावा लागतो, की जेणेकरून आपण दिवसें-दिवस अधिकाधिक आध्यात्मिक, बलसंपन्न होऊ शकू. चवथा मुद्दा आपण कोणत्याच प्रकारच्यां मतांधतेस बळी पडून दुराग्रही होता कामा नये. कारण, दुराग्रही धर्मांधता आणि निःस्वार्थ प्रेम एकाच हृदयात कदापि नांदू शकत नाहीत. त्यांच्यांत परस्पर अहिनकुलवत शाश्वत विरोध विद्यमान आहे. मतांधता प्रेमाचा निर्मळ झरा सुकवून टाकीत असते. स्वमतांध दुराग्रही लोक बरळत असतात की, "आम्ही पाप्याची घृणा करीत नाही तर पापाची." परंतु पाप व पापी यांमध्ये फरक करू शकतो, अशा एकाजणाचेही दर्शन घडण्यासाठी मी काय वाटेल ते कष्ट झेलण्यास अगदी एका पायावर तयार आहे. मग त्यासाठी अर्धी पृथ्वीही पायाखाली घालावी लागली, तरी बेहत्तर. फुकाचे जीभ उचलून टाळूला लावणे फार सोपे आहे. आपण जर द्रव्य आणि गुण या दोहोंत खरोखरच फरक करू शकू, तर मग आपण सिद्ध होण्याला उशीर तो कसला ? पण हे 'करणे' वाटते तितके सोपे नाही. सोपे आहे 'बरळणे.' आणि शेवटी, म्हणजे आपण जितके शांत असू आणि आपले ज्ञानतंतूही जितके शांत राहतील तितके आपण अधिक प्रेमसंपन्न होऊ आणि तितकेच अधिक चांगले काम करण्यास आपण समर्थ होऊ शकू.

भगवंताला शरण जाऊन सारे काही त्याला समर्पण करा. जिथे कर्तव्यरूपी वह्नी सर्वांना होरपळून टाकीत आहे, अशा या संसाराच्या धगधगत्या भयंकर अग्नि-कुंडात राहताना हे भगवत्समर्पणाचे अमृत आकंठ पान करून सुखी व्हा. आपण सारेजण केवळ त्याच्याच इच्छेनुसार कार्य करीत आहोत. पारितोषिक अथवा दंड, कशाशीही आपला काडीचाही संबंध नाही. तुम्हांला जर पारितोषिकाच्या लाभाची आकांक्षा असेल, तर मग त्याबरोबरच दंडाचाही स्वीकार करावा लागेल. दंड टाळण्याचा एकमेव उपाय म्हणजे पारितोषिकाची आशा सोडणे हाच होय. दुःख टाळण्याचा एकमेव उपाय म्हणजे सुखाच्या कल्पनेचा त्याग करणे. कारण, सुख आणि दुःख दोन्ही परस्पर संबद्ध होत. एकीकडे सुख आहे तर दुसरीकडे दुःख. एकीकडे जीवन आहे तर दुसरीकडे मरण. मृत्यूचे अतिक्रमण करून पलीकडे जाण्याचा एकमात्र उपाय म्हटला म्हणजे, जीवनाची आशा सोडून देणे हाच होय.

श्री. यज्ञेश्वर भट्टाचार्य यांना लिहिलेल्या पत्रात स्वामीजी म्हणतात –

एक विशेष गोष्ट मी तुम्हांला सांगतो. आणि ती तुम्ही सदैव ध्यानात ठेवावी. कदाचित तुमची व माझी पुनः भेट होणार नाही. नीतिपरायण व साहसी व्हा. हृदय अगदी शुद्ध असू द्या. पूर्णपणे नीतिपरायण व शूर व्हा. प्राणाची देखील पर्वा करू नका. धार्मिक मतमतान्तरांच्या बाबतीत उगीच डोके शिणवू नका. जे भित्रे आहेत तेच पाप करीत असतात. वीर कधीही पाप करीत नाहीत. पापी विचारदेखील ते मनात येऊ देत नाहीत. सर्वांवर प्रेम करण्याचा प्रयत्न करा. तुम्ही स्वतः खऱ्या अर्थाने 'माणूस' व्हा आणि तुमच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली असणाऱ्या राम, कृष्णमयी, इंदू प्रभृतींना साहसी, नीतिपरायण व सहानु-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

भूतिसंपन्न बनविण्याचा प्रयत्न करा. वत्सांनो, तुमच्यासाठी नीतिपरायणता व साहस यांच्याव्यतिरिक्त दुसरा धर्म नाही. भित्रेपणा, पाप, दुराचरण वा दुर्बलता यांना मुळीच थारा देऊ नका. बाकी सर्व काही मग तुम्हांला आपोआपच मिळेल.

स्वामी विवेकानंदांच्या जीवनकार्याचे समालोचन करताना डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे लिहितात–

पाश्चात्यांच्या भौतिक–वादाचा जो प्रसार इथे होत होता, त्याच्याविरुद्ध त्या काळी प्रतिक्रिया होणे अवश्य होतें. ती प्रतिक्रिया घडवून आणण्यास स्वामी विवेकानंदांसारख्या विभूतीचा भरतभूमीत जन्म झाला. दुसऱ्या एखाद्या कट्टर सनातन्याच्या हातून हे कार्य झाले असते, तर त्याने ती लाट दुसऱ्या ध्रुवापर्यंत खेचून, पुन्हा दुसऱ्या उलट्या प्रतिक्रियेची तयारी करून ठेवली असती. आणि मग त्या क्रिया-प्रतिक्रियांपायी भरतभूमी हैराण होऊन गेली असती. पण तसे घडले नाही. याला कारण स्वामीजींची प्रज्ञा, त्यांची दिव्यदृष्टी, त्यांची अलौकिक समयज्ञता हेच होय. भारताचा तेजोभंग झाला आहे, तो पराभूत झाला आहे, त्याचा आत्मप्रत्यय ढळण्याचा क्षण आला आहे, हे त्यांनी जाणले होते. आणि या रोगावर स्वाभिमान-जागृती, पूर्वजांच्या वैभवाचे दर्शन, परंपरेच्या दिव्य तेजाची प्रतीती, हीच संजीवनी होय, असा त्यांचा बुद्धिनिश्चय तर होताच; पण त्याबरोबरच भौतिकवाद हितावह आहे, पाश्चात्य सुधारणा मारक नसून तारकच आहेत, त्यांचा स्वीकार अपरिहार्य आहे, हेही सत्य त्यांनी आकळिले होते. आणि म्हणूनच आपला संदेश राष्ट्राला देत असताना त्यांनी हे अनुसंधान कधी सुटू दिले नाही. आरंभी प्राचीन इतिहासाच्या मुक्तकंठ प्रशंसेने, उज्ज्वल वर्णनाने व उपनिषद्धर्माच्या पुनरुज्जीवनाने त्यांनी स्वकीय समाजाला विश्वासात घेतले, त्याचे मन उल्हसित केले, त्याच्या मनाला नवसंजीवन दिले आणि नंतर त्याचा आत्मप्रत्यय ढळण्याची भीती नष्ट होताच त्यांनी त्याच्या खऱ्या अवस्थेचे त्याला ज्ञान करून दिले!



स्वामी विवेकानंदांचे स्मारक, कन्याकुमारी–विवेकानंदमंडप

स्वामी विवेकानंदांच्या जन्मशताब्दि-महोत्सवाच्या प्रसंगी कन्याकुमारीजवळील विवेकानंद खडकावर स्वामीजींचे भव्य स्मारक उभारण्यात आले आहे. त्याचे तीन भाग आहेत– (१) विवेकानंद मंडप–खडकावर सर्वांत उंच स्थानी ही वास्तू आहे. या मंडपाची लांबी १८१ फूट व रुंदी ५६ फूट असून, त्याचेही मुखमंडप, सभामंडप व प्रतिमामंडप असे पोटभाग केलेले आहेत. प्रतिमा-मंडपावरील शिखराची उंची जमिनीपासून ६५.५ फूट आहे. त्या मंडपात स्वामीजींची पूर्णाकृती, ब्राँझची मूर्ती आहे. (२) ध्यानमंडप – सभामंडपाच्या मागच्या बाजूला, पण खालच्या पातळीवर हा मंडप आहे. याची लांबी व रुंदी ५८ फूट व ४० फूट असून, उंची १४ फूट आहे. त्याच्या भितींवर स्वामीजींच्या जीवनातील प्रसंगांची उठावदार चित्रे आहेत. (३) श्रीपद मंडप–विवेकानंद मंडपासमोर जरा खालच्या पातळीवरील खडकावर श्रीपदाभोवती मंडप व गर्भगृह बांधले आहे. त्याची लांबी-रुंदी ७२ फूट असून, त्याच्या कळसाची उंची २० फूट आहे. मंडपाचे छत ९। फूट उंच आहे.

ही सर्व वास्तू मुख्यत: निळ्या स्फटिकमय पाषाणाची बांधलेली असून, विवेकानंद मंडपाचे शिखर लाल स्फटिक-पाषाणाचें आहे. प्रतिमा-मंडपावर अखंड पाषाणाचे चार स्तंभ उभारलेले असून, त्यांवर शिखर बांधलेले आहे. त्या स्तंभांचे वजन प्रत्येकी १३.५ टन आहे. त्या स्तंभांची उंची १२ फूट व जाडी ४.५×४.५ फूट आहे. त्यांवर सुंदर नक्षीकाम केलेले आहे. या वास्तूत सर्वत्र सुंदर नक्षीकाम कोरलेले आढळते.

श्रीपद–मंडपाचे गर्भगृह शिल्पशास्त्रातील प्रमाणलक्षणानुसार बांधलेले असून, त्याची रचना चोळ शिल्पशैलीची आहे. त्याच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंडपात तीन प्राकारम असून, त्याचे विमान एकताल आहे.

विवेकानंद मंडपाचे शिखर पल्लव शैलीचे असून, त्याच्या खालचा भाग अजंटा पद्धतीचा आहे. त्याच्या खाली सहा अजंटा पद्धतीचे स्तंभ आहेत. छताच्या मध्यभागी एक मोठे कमळ खोदलेले आहे. सभामंडप चोळ शैलीचा बांधलेला आहे. सभामंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ दोन लहान खोल्या काढून, त्यांत श्रीरामकृष्ण परमहंस व शारदादेवी यांची चित्रे ठेवलेली आहेत.

प्रतिमा मंडपावरचे मुख्य शिखर छतापासून ४१.५ फूट उंच असून, त्याच्या चारी कोपऱ्यांजवळ जी चार शिखरे आहेत ती २०.७५ फूट उंच आहेत. सभामंडपातील खोल्यांवरही १३फूट उंचीची शिखरे आहेत. ही सर्व शिखरे कलकत्त्याजवळच्या बेलूर येथील रामकृष्ण मंदिराच्या शिखरासारखीच आहेत.

स्मारक पाहण्यासाठी आलेल्या यात्रेकरूंपैकी ज्यांना थोडा वेळ ध्यानधारणा करण्याची इच्छा असेल, त्यांच्यासाठी ध्यानमंडप बांधलेला आहे. त्यात एका बाजूला एका वेदीवर ॐ चे काचेत कोरलेले सदैव प्रकाशित असे प्रतीक ठेवलेले आहे. त्या वेदीला प्रणवपीठ असे नाव देण्यात आले आहे. [स्वामी विवेकानंद यांचे चरित्र-श्री. सत्येंद्रनाथ मुजुमदार, १९६३; विवेकानंद– चरित्र, स्वामी निखिलानंद १९७१; भारतीय लोकसत्ता– डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे, १९५४; इं. कॉ. व षॉ. क.]

विव्री काश्यप एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशे त्रेसष्टावे सूक्त याने रचले आहे. रोगनाश हा या सूक्ताचा विषय असून, तीच या सूक्ताची देवता आहे. याची एक ऋचा (१०.१६३.१) अशी –

अक्षीभ्यां ते नासिकाभ्यां कर्णाभ्यां छुबुकादधि ।
यक्ष्मं शीर्षण्यं मस्तिष्काज्जिह्वाया वि वृहामि ते ।

अर्थ – हे रुग्णा, तुझे डोळे, नाक, कान, हनुवटी, जीभ आणि मेंदूतील रोग मी दूर करतो.

हे सूक्त अनुष्टुभ छंदात आहे. [ऋ. म. भा.; प्रा. च. को.]

विश याचा अर्थ काहीसा शंकास्पद आहे. ऋग्वेदातील अनेक उताऱ्यांत विश्‌चा अर्थ वसाहत किंवा राहण्याचे ठिकाण असा होतो. काही ठिकाणी प्रजाजन या अर्थानेही तो वापरलेला आहे. नंतरच्या काळात मात्र या शब्दाला निश्चित अर्थ प्राप्त झाला. जसे ब्रह्म व क्षत्र हे दोन वर्ग, तसाच विश शब्दाने वैश्य या तिसऱ्या वर्गाचा बोध होऊ लागला. [वे. इं.]

विशाखदत्त (इ. स. चे ६ वे शतक) मुद्राराक्षस या संस्कृत नाटकाचा कर्ता. या नाटकाच्या प्रस्तावनेत याची थोडीशी माहिती आलेली आहे, ती अशी– याचा पितामह वटेश्वरदत्त किंवा वत्सराज कोणत्यातरी देशाचा सामंत होता आणि पिता भास्करदत्त किंवा पृथू याने महाराज ही पदवी मिळवली होती. विशाखदत्त हा राजनीतीचा, विशेषतः कौटिलीय अर्थशास्त्र व शुक्रनीती यांचा प्रकांड पंडित होता. याव्यतिरिक्त न्याय व ज्योतिष या शास्त्रांचेही त्याने सखोल अध्ययन केले होते. वैदिक धर्माचा अभिमानी असूनही तो बौद्ध धर्माकडे उदार दृष्टीने पाहत असे.

विशाखदत्ताच्या कालाविषयी विद्वानांत मतभेद आहेत. मुद्राराक्षसाच्या भरतवाक्यात एका राजाचे नाव आलेले आहे. "म्लेच्छांनी त्रस्त केलेल्या या पृथ्वीचे हा राजा रक्षण करो" असे तिथे म्हटले आहे. निरनिराळ्या हस्तलिखित प्रतींत हे नाव दंतिवर्मा, अवंतिवर्मा, रंतिवर्मा व चंद्रगुप्त असे दिलेले आढळते. या राजांचा काळ भिन्न भिन्न असल्यामुळे विशाखदत्ताच्या काळाविषयीही एकमत होऊ शकत नाही.

श्री. तेलंग आणि प्रा. ध्रुव यांच्या मते भरतवाक्यातील 'पार्थिवो अवन्तिवर्मा' हा पाठ ग्राह्य असून, कनोजचा राजा अवंतिवर्मा हाच विशाखदत्ताचा आश्रयदाता होता. अवंतिवर्मा हा मौखरी वंशाचा राजा होता. त्याचा पुत्र ग्रहवर्मा याच्याशी स्थानेश्वरचा राजा श्रीहर्ष याची वहीण राज्यश्री हिचा विवाह झाला होता. या सुमारास वायव्य भारतात, विशेषतः पंजाबमध्ये म्लेच्छांचा (हूणांचा) उपद्रव वाढला होता. अवंतिवर्म्याने स्थानेश्वरच्या प्रभाकरवर्धनाच्या साहाय्याने या हूणांचा पराभव केला. ही घटना इ. स. ५८२ च्या सुमाराची आहे. त्यावरून विशाखदत्ताचा काळ इ. स. च्या सहाव्या शतकाचा उत्तरार्ध मानणे सयुक्तिक होईल.

डॉ. जायसवाल यांनी 'पार्थिवः चन्द्रगुप्तः' हा पाठ ग्राह्य मानला असून, भरतवाक्यातला उल्लेख चंद्रगुप्त द्वितीय (इ. स. ३७५–४१३) याचा असल्याचे मानले आहे; पण हे मत बरोबर नाही, असे श्री. बलदेव उपाध्याय सांगतात. कारण, म्लेच्छांच्या (हूणांचा) आक्रमणाचा काल चंद्रगुप्तानंतर सुमारे पन्नास वर्षांनी येतो, असे इतिहासावरून कळते.

मुद्राराक्षस हे संस्कृत नाटकांतील एक अद्वितीय नाटक आहे. बहुतेक संस्कृत नाटकांप्रमाणे याची कथा प्रणय किंवा युद्ध या विषयावर आधारलेली नाही. हे नाटक पूर्णपणे ऐतिहासिक असून, कूटनीतीवर आधारलेले आहे.

या नाटकात घटनांची रेलचेल असून, त्या सर्व घटना एकाच साध्याच्या दिशेने प्रेरित केलेल्या आहेत. चाणक्याने नंद वंशाचा उच्छेद करून चंद्रगुप्त मौर्याला राजसिंहासनावर बसवले. आता त्याला चंद्रगुप्ताचे शासन दृढमूल करायचे होते. त्यासाठी नंद

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

राजाचा कर्तबगार व स्वामिनिष्ठ मंत्री राक्षस यालाच चंद्रगुप्ताचा प्रधान अमात्य करावे, असे त्याने ठरवले. पण राक्षस ती गोष्ट सहजासहजी स्वीकारील हे शक्य नव्हते. शिवाय तो या राज्यक्रांतीनंतर गुप्तपणे वावरत होता. त्यासाठी घटनाव्यूह रचून चाणक्याने त्याला शोधून काढले व त्याला चंद्रगुप्ताचे अमात्यपद स्वीकारायला भाग पाडले. त्यामुळे नाटकातील आरंभापासून अखेरपर्यंतच्या सर्व घटना राक्षसाला वश करण्याच्या दिशेने योजल्या गेल्या आहेत आणि त्या सर्व गुंतागुंतीच्या आहेत.

मुद्राराक्षस हे नाटक संस्कृत साहित्यात अनेक दृष्टींनी अपूर्व आहे. राजकीय विषयावरील हे एकमेव संस्कृत नाटक होय. राजनीती हा एकच् विषय यात असून युद्ध, रक्तपात, मारामाऱ्या अशी उबग आणणारी दृश्ये यात नाहीत. तसेच सर्वसाधारण संस्कृत नाटकात आढळणारा शृंगार व विनोद या नाटकात अजिबात आढळत नाही. यात प्राधान्य आहे, ते वीररसाला. तरीसुद्धा विशाखदत्ताने ते यशस्वी केले आहे. त्याच्या संविधानकरचनेत प्रारंभी गूढता असली, तरी एकंदर कथानक उत्सुकता वाढवणारे आहे. सर्व नाटकभर चाणक्य आणि राक्षस या दोन व्यक्ती कूटनीतीचा आश्रय करून एकमेकांना नामोहरम करण्याच्या प्रयत्नात दिसतात. पण शेवटी चाणक्याचा जय होतो. राक्षसाला चंद्रगुप्ताचा प्रधान अमात्य बनवून तो कृतार्थतेच्या भावनेने राजकारणातून निवृत्त होतो.

विशाखदत्ताची भाषाशैली ओजस्वी व वीररसाला पोषक आहे. आपण हयात असताना चंद्रगुप्ताचा पराभव करणे कोणालाही शक्य होणार नाही, अशी खात्री बाळगून चाणक्य म्हणतो –

आस्वादितद्विरदशोणितशोणशोभां
सन्ध्यारुणामिव कलां शशलाञ्छनस्य ।
जृम्भाविदारितमुखस्य मुखात् स्फुरन्तीं
को हर्तुमिच्छति हरेः परिभूय दंष्ट्राम् ।।

अर्थ – जांभई देण्यासाठी तोंड उघडलेल्या सिंहाला पराभूत करून त्याची चमकणारी दाढ उपटण्याचा कोण प्रयत्न करील ? हत्तीच्या रक्ताचे पान केल्यामुळे लाल झालेली त्याची दाढ चमकत आहे व संध्याकालीन चंद्राच्या लालसर कलेप्रमाणे ती शोभत आहे.

या नाटकात काही सुभाषितेही आलेली आहेत. उदा०– 'अत्यादरः शङ्कनीयः' = वाजवीपेक्षा जास्त आदर कोणी दाखवला, तर त्याबद्दल शंका येऊ लागते. 'निर्वाहः प्रतिपन्नवस्तुषु सतामेतद्धि गोत्रव्रतम्' = हाती घेतलेले काम तडीला नेणे, हे सज्जनांचे कुलव्रतच आहे. 'निरीहाणामीशः स्तृणमिव तिरस्कारविषयः' = निःस्पृह माणसांना राजासुद्धा गवताच्या काडीप्रमाणे तुच्छ वाटतो. 'दैवमविद्वांसः प्रमाणयन्ति' = मूर्ख लोक दैववाद खरा मानतात.

विशाखदत्ताने देवी – चंद्रगुप्त या नावाचे आणखीही एक ऐतिहासिक नाटक लिहिले आहे. [सं. ना. सौं.; सं. सा. इ.; सं. क. द.; मुद्राराक्षसम् – टीका. श्री. सत्यव्रत सिंह, १९५४]

विशाखा

अश्विन्यादी सत्तावीस नक्षत्रांतील सोळावे नक्षत्र. या नक्षत्राचे पहिले तीन चरण तुला राशीत आणि चौथा वृश्चिक राशीत येतो. हे नक्षत्र त्रिपाद, मिश्र, अधोमुख, अंध व नपुंसक आहे. विशाखांच्या कोणी दोन तर कोणी चार तारका मानतात. वेदांत दोनच तारका मानलेल्या आहेत.

'नक्षत्राणामधिपत्नी विशाखे ।' = विशाखांच्या दोन तारका या नक्षत्रांच्या स्वामिनी आहेत, असे तैत्ति. ब्राह्मणात म्हटले आहे.

क्रांतिवृत्ताच्या उत्तरेस याच्या दोन तारका दिसतात. त्यांपैकी उत्तरेकडची तारका दुसऱ्या प्रतीची आणि दक्षिणेकडची तिसऱ्या प्रतीची आहे. हिला योगतारा मानले आहे. वृश्चिकाचे मुख व चित्रा यांच्या मध्यभागी त्यांचे स्थान आहे. दुसऱ्या प्रतीची तारका चित्रेच्या पश्चिमेला येते आणि तिसऱ्या प्रतीची स्वातीच्या खूप खाली पण दक्षिणोत्तर रेषेत बसते. पहिली खस्वस्तिकाच्या दक्षिणेला १५ अंशांवर असून, दुसरी २९ अंशांवर आहे. पूर्णचंद्र जेव्हा यांच्या जवळ येतो, तेव्हा त्या झाकळून जातात. पण चंद्राची कोर जेव्हा त्या दोघींच्या मधून जाते, तेव्हा त्यांची हमखास ओळख पटते आणि त्यांचे सौंदर्यही प्रत्ययाला येते. विशाखेला राधा असे दुसरे नाव आहे. [श. क.; नक्षत्रलोक]

विशालकीर्ती

(इ. स. चे १७ वे शतक) एक जैन मराठी कवी. हा देवेंद्रकीर्तीचा शिष्य होय. देवेंद्रकीर्तीला सुरेंद्रकीर्ती असेही म्हटले आहे. विशालकीर्तीने धर्मपरीक्षा नावाचा एक मराठी ग्रंथ रचला असून, तो पाच अधिकारांत विभागला आहे. त्यात ९५८ ओव्या आहेत. निरनिराळ्या धर्मांच्या परीक्षा करून त्यात जैनधर्म हा सर्वश्रेष्ठ आहे, असे या ग्रंथाचे प्रतिपादन आहे. तत्कालीन समाजाच्या अभ्यासासाठी एक महत्त्वाचा आधार म्हणून या ग्रंथाचे महत्त्व आहे.

विशालकीर्तीने ब्रह्मजिनदासाच्या धर्मपरीक्षारासाचा अभ्यास करून हा ग्रंथ रचला असे म्हणतात. [प्रा. म. जै. सा.]

विशाला

एक यक्षिणी. हिचा दशाक्षरी मंत्र असा – 'ॐ ऐं विशाले ह्रीं श्रीं क्लीं स्वाहा ।' या मंत्राचे एक लक्ष पुरश्चरण चिंचेच्या झाडाखाली बसून केल्याने मंत्र सिद्ध होतो

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

व त्यामुळे कोणताही रोग दूर होतो, असे सांगितले आहे. [सं. म.]

विशिष्टाद्वैत एक दर्शन. रामानुजाचार्यांनी या दर्शनाची उभारणी केल्यामुळे याला रामानुजीय दर्शन असेही म्हणतात. हे त्यांच्या श्रीसंप्रदायाचे दर्शन आहे. विशिष्टाद्वैत या शब्दाची दोन लक्षणे अशी –

(१) द्वैतविशिष्टमद्वैतम् ।

अर्थ – द्वैताने विशिष्ट अद्वैत ते विशिष्टाद्वैत होय.

(२) सूक्ष्मचिदचिदात्मकशरीरविशिष्टस्य कारणस्य परमात्मनः स्थूलचिदचिदात्मकशरीरविशिष्टस्य कार्यस्य परमात्मनश्चैक्यम् ।

अर्थ – सूक्ष्म, चित् व अचित् एतद्रूप शरीराने विशिष्ट असा जो कारणरूप परमात्मा त्याचे, स्थूल, चित् व अचित् एतद्रूप शरीराने विशिष्ट असा जो कार्यरूप परमात्मा, त्याच्याशी ऐक्य म्हणजे विशिष्टाद्वैत होय.

परंपरा – इ. स. च्या १० व्या शतकात तमिळनाडमध्ये वैष्णव धर्म विशेष उत्कर्षाला पोचला. त्या काळापासून संस्कृत जाणणाऱ्या विद्वानांनी तमिळ जनतेत विष्णुभक्तीचा प्रचार सुरू केला. या विद्वानांना आचार्य म्हणत. या आचार्यांनी आळवारांनी उपदेशिलेल्या भक्तीशी कर्म व वेदप्रतिपादित ज्ञान यांचा सुंदर समन्वय केला. तमिळ वेद अर्थात आळवारांचे वाङ्मय आणि संस्कृत वेद यांचे अध्ययन करून या आचार्यांनी तमिळ वेदातल्या सिद्धान्तांचे वैदिक सिद्धान्तांशी पूर्ण सामंजस्य दर्शविले. म्हणूनच या आचार्यांना उभयवेदान्ती असे म्हणू लागले. यांनी दक्षिणेत विशिष्टाद्वैताचा, सिद्धान्त व प्रपत्तिमार्ग यांचा प्रचार करून एक नवीन वैष्णव मत चालू केले. त्या मताला श्रीवैष्णव असे नाव मिळाले.

प्रस्तुत मताचा पहिला आचार्य रंगनाथ मुनी किंवा नाथमुनी हा होय (इ. स. ८२४–९२४). नाथमुनी हे शठकोपाचार्यांच्या शिष्यपरंपरेतले होते. त्यांनी लुप्तप्राय झालेल्या तमिळ वेदाचा पुनरुच्चार केला, श्रीरंगम येथील रंगनाथाच्या पुढे त्यांचे गायन व्हावे, अशी व्यवस्था केली आणि वैदिक ग्रंथांप्रमाणेच आळवारांच्या वाङ्मयाच्या अध्यापनालाही प्रारंभ केला.

यामुनाचार्य हे नाथमुनींचे नातू होत. ते तमिळमध्ये आळवंदार या नावाने प्रसिद्ध आहेत. इ. स. ९७३ च्या सुमारास ते नाथमुनींच्या गादीवर बसले. रामानुजाचार्य हे यामुनाचार्यांचे नातू श्रीशैलपूर्ण यांचे भाचे होत. यामुनाचार्यांच्या नंतर हेच संप्रदायाचे प्रधान आचार्य बनले. रामानुजाचार्यांनी आपल्या विशिष्टाद्वैत संप्रदायाचा खूप प्रचार करून त्याला दक्षिण भारतात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली.

रामानुजांच्या नंतर दीडशे वर्षांच्या आत श्रीवैष्णवपंथात दोन वेगवेगळे पक्ष निर्माण झाले. त्यांतला एक पक्ष तमिळ वेदांनाच प्रमाण मानून, त्यांचा यथावत स्वीकार करू लागला व त्याने संस्कृत निबंधग्रंथांविषयी आस्था उणी केली. हा पक्ष तेंगलई या नावाने प्रसिद्ध झाला. दुसरा पक्ष तमिळ वेद व संस्कृत वेद या दोहोंचेही प्रामाण्य मानीत होता; पण त्याची संस्कृत ग्रंथांवर विशेष श्रद्धा होती. या पक्षाला वडकलै असे नाव मिळाले. या दोहोंत केवळ भाषाभेदच नाही, तर सिद्धान्तगत भेदही आहे आणि तो अठरा प्रकारचा आहे. त्यामध्ये प्रपत्ती या विषयीचा भेद विशेष आहे. तेंगलई मताप्रमाणे प्रपत्तीसाठी जीवाला कर्म करण्याची आवश्यकता राहत नाही. जीव शरणापन्न होताच भगवान स्वतः त्या जीवाचा उद्धार करतो. यासाठी त्यांनी मार्जारकिशोर (मांजरीचे पोर) याचा दृष्टान्त दिला आहे. मांजरीचे पोर केवळ आपल्या आईवर निर्भर राहते. ते काहीच करीत नाही. मांजरी त्याला आपल्या तोंडात धरून इकडे तिकडे फिरवते, त्याचे पोषण करते अणि रक्षणही करते.

पण वडकलै पंथाला हे मत मान्य नाही. ते लोक म्हणतात, की ईश्वराला शरण गेल्यानंतरही जीवाला आपल्या कर्तव्यकर्माचा परित्याग करता येत नाही. त्यासाठी त्यांनी कपिकिशोराचा दृष्टान्त दिला आहे. कपिकिशोर (वानरीचे पोर) याचेही त्याची आई रक्षण-पोषण करते; पण त्याही अवस्थेत त्या पोराला आईची कंबर घट्ट धरून ठेवावीच लागते. म्हणजे त्या अवस्थेत त्या पोरालाही काही कर्तव्य राहतेच.

तेंगलई मताचे प्रतिष्ठापक श्रीलोकाचार्य हे होत. हे तेराव्या शतकात होऊन गेले. त्यांनी श्रीवचनभूषण नावाचा ग्रंथ लिहून प्रपत्तिमार्गाचे शास्त्रीय विवेचन केले आहे. वडकलै मताचे प्रतिष्ठापक वेदान्तदेशिक हे होत. हेही तेराव्या शतकातच झाले. तमिळ भाषेविषयी विशेष पक्षपात असल्यामुळे सांप्रत तेंगलई मताचा प्रचार आणि प्रभाव दक्षिणेत विशेषत्वाने दिसतो.

रामानुजदर्शनाचे वैशिष्ट्य – रामानुजदर्शनाची विशेषता ही, की त्यात ईश्वराच्या पुरुषवादी धारणेला ब्रह्मवादी दर्शनाशी जोडून दिले आहे. सामान्य जनता आणि सुसंस्कृत लोक या दोहोंतही रामानुजदर्शनाला यामुळेच विशेष लोकप्रियता लाभली. धार्मिक व दार्शनिक या उभय दृष्टींनी हे दर्शन अधिक तंत्रबद्ध आहे. इतिहासाच्या दृष्टीने पाहिल्यास या दर्शनामध्ये जो संयुक्त विचार झाला, त्याची तत्त्वे परस्पराहून वेगळी आहेत. पहिले तत्त्व ईश्वरवाद हे होय. हा ईश्वरवाद भागवतपुराणाला अनुसरून सांगितला आहे, तो असा – पुरुषरूप आणि सर्व लोकातीत अशा ईश्वरावर दृढश्रद्धा ठेवल्याने तो करुणामय प्रभू आपल्या एकान्त भक्ताचे परित्राण करतो. दुसरे तत्त्व भागवतपुराणाहूनही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्राचीन आहे. ते म्हणजे ब्रह्मवाद हे होय. ते त्यांनी उपनिषदातून घेतले आहे. मात्र भागवत व उपनिषदे या दोहोंतूनही रामानुजांनी आपली तत्त्वे ग्रहण केली असली, तरी ती पूर्ण रूपात घेतलेली नाहीत.

ईश्वरवाद आणि ब्रह्मवाद हे दोन्ही एकत्र आणण्याचा प्रयत्न हा फार प्राचीन आहे. वैदिक साहित्यातही काही अंशी तो दिसून येतो. पुढे गीतेतही तो आढळतो. रामानुजांच्या कालात शंकराचार्यांच्या निर्गुण ब्रह्मवादी अद्वैतदर्शनाच्या विरुद्ध लोकांत एक प्रतिक्रिया निर्माण झाली. कारण, त्या दर्शनात शंकराचार्यांनी मायाकल्पित म्हणून जगताचे स्वतंत्र अस्तित्वच नाकारले. कित्येक जाणत्या लोकांनाही ते पटवून घ्यायला अडचण वाटू लागली. म्हणून जगन्निषेधाचे निराकरण करून वेदोक्त व गीतोक्त तत्त्वांचे संश्लेषण करण्याची आवश्यकता निर्माण झाली. रामानुजांच्या दर्शनात हा प्रयत्न पद्धतशीरपणे केलेला दिसतो.

संप्रदायाचे वाङ्मय – प्रस्तुत दर्शनाची ग्रंथसंपदा शंकराचार्यांच्या अद्वैत दर्शनाहून कमी नाही; पण प्रकाशित ग्रंथांची संख्या मात्र थोडी आहे.

या दर्शनाचे आद्य आचार्य नाथमुनी यांनी योगरहस्य व न्यायतत्त्व हे दोन ग्रंथ रचले. यामुनाचार्यांनी गीतार्थसंग्रह, श्रीचतुःश्लोकी, सिद्धित्रय, महापुरुषनिर्णय, आगमप्रामाण्य व आळवंदारस्तोत्र इतके ग्रंथ लिहिले. रामानुजाचार्यांनी वेदार्थसंग्रह, वेदान्तसार, वेदान्तदीप, गद्यत्रय, गीताभाष्य व श्रीभाष्य इतके ग्रंथ लिहून विशिष्टाद्वैताच्या सिद्धान्तांचे विस्तृत व प्रमाणसिद्ध असे विवेचन केले.

पुढील आचार्यांनी रामानुजांच्या पांडित्यपूर्ण श्रीभाष्याचे गूढार्थ उलगडून सांगण्यासाठी वृत्ति-ग्रंथांची रचना केली. त्या सर्वांत सुदर्शनसूरींची श्रुतप्रकाशिका अधिक प्रसिद्ध आहे. याव्यतिरिक्त उपनिषद्व्याख्या, तात्पर्य दीपिका, भागवतपुराणावर शुकपक्षीय टीका असे आणखी ग्रंथ आहेत.

वेंकटनाथ हे वेदान्ताचार्य या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांच्या तोडीचा गाढा पंडित वैष्णवपंथात दुसरा झाला नाही. त्यांनी तत्त्वटीका, अधिकरणसारावली, तत्त्वमुक्ताकलाप, न्यायपरिशुद्धी, न्यायसिद्धांजन, इ. ग्रंथ लिहून प्रस्तुत दर्शनाला सखोलपणा प्राप्त करून दिला. हे इ. स. च्या १३ व्या व १४ व्या शतकांत होऊन गेले.

चौदाव्या शतकातले लोकाचार्य हे आणखी एक महाविद्वान होत. त्यांनी श्रीवचनभूषण आणि अन्य सोळा रहस्ये निर्माण करून या दर्शनाला व्यापकपणा आणला.

वखरमुनी हा तेंगलई मताचा सर्वश्रेष्ठ आचार्य होय. त्याने लोकाचार्यांच्या ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. हा इ. स. च्या पंधराव्या शतकात झाला. श्रीनिवास हा सोळाव्या शतकात होऊन गेला. त्याचा यतीन्द्रमतदीपिका हा ग्रंथ रामानुजदर्शनाचा लोकप्रिय ग्रंथ आहे. त्या शतकात झालेल्या रंगरामानुजाचार्यांनी छांदोग्य व बृहदारण्यक या दोन उपनिषदांवर विशिष्टाद्वैतमताला धरून टीकाग्रंथ लिहिले.

सिद्धान्त – रामानुजाचार्यांनी इतर दर्शनांप्रमाणेच ईश्वर, ब्रह्म, जीव आणि जगत यांचा विचार करून आपली तत्त्वे सांगितली आहेत. त्यांचे थोडक्यात विवरण असे –

ईश्वर – ब्रह्म ही ईश्वराचीच संज्ञा होय. चित्, अचित् व ईश्वर अशी तीन तत्त्वे आहेत. चित् म्हणजे जीव, अचित् म्हणजे जडतत्त्व किंवा प्रकृती आणि ईश्वर म्हणजे सर्वांतर्यामी असणारा होय. ईश्वर चित् व अचित् या दोन्ही तत्त्वांनी युक्त असतो. ईश्वर ही एकमात्र सत्ता असून, त्याला सोडून जगात कोणतीही स्वतंत्र सत्ता नाही. जीव आणि जगत् हे वस्तुतः नित्य आणि स्वतंत्र पदार्थ आहेत. तथापि ते नेहमी ईश्वराच्या अधीन असतात. कारण ईश्वर भोक्ता (जीव) आणि भोग्य (जड पदार्थ) या दोहोंच्या आत अंतर्यामी रूपाने विद्यमान असतो. म्हणून चित् व अचित् म्हणजेच जीव आणि जगत् हे ब्रह्माचे शरीर समजावे. ईश्वर हा सगुण आणि सविशेष आहे.

निर्गुण वस्तूची कल्पनाच संभवत नाही. संसारातले समस्त पदार्थ गुणविशिष्टच असतात. इतकेच नव्हे; तर निर्विकल्पक प्रत्यक्षातही सविशेष वस्तूची प्रतीती येते. ईश्वर हा गुणनिधी, अनंतज्ञानरूप, आनंदरूप आणि ज्ञान, शक्ती, इ. कल्याणगुणांनी विभूषित आहे. जगताचा सृष्टि-स्थिति-प्रलयकर्ता तोच आहे. ब्रह्म हे नेहमी सगुणच असते आणि निर्गुण कधीच नसते. उपनिषदांत ब्रह्माला निर्गुण म्हटले आहे खरे; पण त्याचे तात्पर्य हे, की अल्पज्ञ जीवाचे रागद्वेषादी गुण त्यात असत नाहीत.

भेद– हा तीन प्रकारचा असतो– (१) सजातीय भेद = त्याच जातीच्या पदार्थाचा त्याच जातीच्या अन्य पदार्थाशी भेद. उदा॰ एका गाईचा दुसऱ्या गाईशी भेद. (२) विजातीय भेद= गाईचा म्हशीशी भेद. व (३) स्वगत भेद = एका वस्तूतल्या एका अंगाचा दुसऱ्या अंगाशी भेद. उदा॰ गाय या प्राण्यातला शिंग व शेपूट असा भेद. ईश्वराच्या ठिकाणी पहिले दोन भेद अवश्य असतात; पण शेवटचा स्वगत भेद नसतो. मात्र ईश्वराचा चिदंश अचिदंशापासून भिन्न असतो. अशा दशेतच फक्त ईश्वराच्या ठिकाणी स्वगत भेद राहतो. प्रलयदशेत जीवांचा आणि भौतिक पदार्थांचा नाश होतो. त्या वेळीही चित् व अचित् ही दोन्ही तत्त्वे सूक्ष्मावस्थेत ब्रह्मामध्ये विद्यमान असतात. या दशेतल्या ब्रह्माला कारणब्रह्म म्हणतात. जेव्हा प्रलय संपून सृष्टीचा प्रारंभ होतो, तेव्हा ब्रह्म हे देहधारी जीव आणि भौतिक पदार्थ यांच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

रूपाने अभिव्यक्त होते. त्या वेळी त्याला कार्यब्रह्म म्हणतात.

जीव आणि जगत् हे दोन्ही पदार्थ नित्य आहेत. सृष्टिकाळी त्यांचे रूप स्थूल असते आणि प्रलयकाळी ते सूक्ष्म असते. 'एकमेवाद्वितीयम्' इ. वाक्यांचा विषय जे अव्याकृत ब्रह्म, त्यात प्रलयकाली जीव आणि जगत् सूक्ष्मरूप धारण करून राहतात. ब्रह्म हे विशिष्टतेने हीन असण्याची अवस्था कधीही नसते. प्रलयकाली विषयांचा अभाव असल्यामुळे जीव आणि जगत् दोन्ही सूक्ष्म रूपे धारण करतात आणि त्या काली ब्रह्म या सूक्ष्म जीव-जगताने विशिष्ट असे बनलेलेच राहते. कोणत्याही अवस्थेत ब्रह्माच्या ठिकाणी विशिष्टता राहतेच. म्हणूनच या दर्शनाला विशिष्टाद्वैत असे म्हटले आहे.

इथे शंकराचार्यांच्या मताप्रमाणे केवल ब्रह्माचे अद्वैत असत नाही, तर विशिष्ट म्हणजेच चिदचित् यांनी विशिष्ट अशा ब्रह्माचेच अद्वैत असते. याचा अर्थ असा, की चित् आणि अचित् ज्यात अंशरूपाने विद्यमान राहतात, असे अंशीरूप विशिष्ट ब्रह्मच अद्वैत रूपात राहते.

ईश्वर हा नित्य, एकरूप, शुद्धसत्त्वमय, अत्यंत तेजोमय, सुकुमार, सुंदर, चिरयुवा, दिव्यरूपधारी, इ. असतो. तो इतका दयाळू असतो, की दुसऱ्याचे दुःख पाहून त्याला फार दुःख होते. मग तो जीवांच्या कल्याणासाठी मार्ग शोधून काढतो. भक्तांवर अनुग्रह करण्यासाठी आणि जगताचे रक्षण करण्यासाठी ईश्वर पंचविध होतो. ही पाच रूपे म्हणजे पर, व्यूह, विभव, अंतर्यामी व अर्चावतार ही होत–

(१) पर–हेच वासुदेवरूप होय. हे स्वरूप कालातीत आहे. त्याच्यावर कधी परिणाम होत नाही. ते निरवधी आनंदाने सार्वकाल विभूषित असते. यालाच वैकुंठात सर्व देव आपल्या नेत्रांनी आणि ज्ञानाने प्रत्यक्ष करीत असतात.

(२) व्यूह–विश्वातल्या लीलेसाठी ईश्वर हे स्वरूप धारण करतो. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध मिळून ईश्वराचा व्यूह होतो.

(३) विभव – ईश्वराचे हे रूप अनंत असून, त्याचे मुख्य व गौण असे दोन प्रकार असतात. मुख्य विभव हे स्वरूप मुमुक्षूंना उपास्य आहे. स्वरूपावेश व शक्त्यावेश या ईश्वराच्या अवतारांना गौण विभव म्हणतात. हे गौण रूप साधूंचे परित्राण, दुष्टांचा नाश आणि धर्मसंस्थापना यांच्यासाठी असते.

(४) अंतर्यामी – या स्वरूपाने ईश्वर जीवांच्या अंत:करणात प्रवेश करून, त्यांच्या सकल प्रवृत्तींचे नियमन करतो. याच रूपाने ईश्वर सर्व स्थळीं, सर्व अवस्थेंत, सर्व जीवांना साहाय्य करतो.

(५) अर्चावतार – या स्वरूपात ईश्वर भक्तांच्या आवडीला अनुसरून मूर्तिरूप धारण करतो.

चित् अर्थात जीव – चित् तत्त्व हे देह, इंद्रिय, मन, प्राण व बुद्धी याहून विलक्षण, अनंत, आनंदरूप, नित्य, अणू, अव्यक्त, अचिंत्य, निरवयव, निर्विकार आणि ज्ञानाश्रय आहे. ज्ञानावाचून स्वयमेव प्रकाशित होत असल्यामुळे ते अजड आहे. सुषुप्तीच्या नंतर जाग आल्यावर मनुष्य म्हणतो, की मी सुखाने झोपलो होतो. या अनुभवावरून त्याचे आनंदरूप सिद्ध होते. हृदयदेशात वसत असल्यामुळे चित् तत्त्व हे अणू आहे. जीव हा ईश्वराच्या द्वारे नियमित होतो. त्याच्या ठिकाणी शेषत्व हा एक विशेष गुण असतो. जीव शेष असल्यामुळे ईश्वर शेषी होतो. जीव आपल्या कार्यकलापासाठी ईश्वरावर म्हणजेच शेषीवर सर्वभावे अवलंबून असतो. ईश्वराच्या अनुग्रहावाचून तो आपली कर्तव्ये योग्य प्रकारे आचरू शकत नाही.

जीव हा ब्रह्माशी कोणत्याही प्रकारे अभिन्न नाही. तो ब्रह्माहून नितांत भिन्न आहे. जीव हा सदैव त्रिविध तापांनी तप्त राहत असल्यामुळे ब्रह्माशी त्याची अभिन्नता कशी मानता येईल ! ब्रह्म हे जगताचे कारण आणि जीवाचा अधिपती आहे. ब्रह्म ईश आहे; जीव अनीश आहे. ब्रह्म प्राज्ञ आहे; जीव अज्ञ आहे. म्हणून दोहोंचा अभेद अशक्य आहे. ठिणगी ही जशी अग्नीचा अंश असते, त्याचप्रमाणे जीव हा ब्रह्माचा अंश आहे. त्या दोहोंमध्ये अंशांशीभाव किंवा विशेषणविशेष्यभाव हा संबंध आहे. 'तत्त्वमसि' या महावाक्यातला 'त्वं'पदार्थ वेदान्तमतात जीवाचे प्रतीक मानला जातो. 'तत्'पदार्थ हा परब्रह्माचे प्रतीक मानला जातो. 'असि'पदाने त्या दोहोंचा अभेद दर्शविला जातो; पण 'त्वं'चा अर्थ अचिद्विशिष्ट, जीवशरीर धारण करणारे ब्रह्म असा आहे आणि 'तत्'चा अर्थ सर्वज्ञ, सत्यसंकल्प आणि जगत्कारण असा ईश्वर हा आहे. आशय असा, की अंतर्यामी ईश्वर व विश्वप्रपंचाचा निर्माता ईश्वर या दोहोंचे तात्त्विक ऐक्य आहे. अर्थात एका विशेषणाने विशिष्ट असा ईश्वर त्याहून अन्य विशेषणाने विशिष्ट ईश्वराशी नितांत अभिन्न आहे. ही एकता विशिष्ट ईश्वरांची आहे.

जीवात्म्याचे बद्ध, मुक्त व नित्य असे तीन भेद आहेत. त्यांचे थोडक्यात वर्णन असे–

(१) बद्ध – ज्यांचे सांसारिक जीवन समाप्त झाले नाही, अशांना बद्ध म्हणतात. चौदा भुवने हे अशा जीवांचे राहण्याचे ठिकाण आहे. ब्रह्मदेवापासून कृमिकीटकांपर्यंत सर्व जीव बद्ध आहेत. रुद्र, सनक, इ. देवर्षी; वसिष्ठ, भृगू, इ. ब्रह्मर्षी; पुलस्त्य, मरीची, इ. प्रजापती; इंद्र, अग्नी, यम, इ. दिक्पाल; चौदा मनू, आठ वसू, बारा आदित्य, देवयोनी, मनुष्य, पशु-पक्षी, हे सगळे बद्ध जीव होत.

(२) मुक्त – जे जीव भगवंताची आराधना करीत केवळ

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याचेच दासवत बनून राहतात, ते मुक्त होत. ते देहत्यागाच्या वेळी आपल्या सुकृत-दुष्कृतांचे भोग नष्ट करून हृदयस्थ परमात्म्याचे ध्यान करीत सुषुम्ना नाडीत प्रवेश करतात, तिथून ब्रह्मरंध्रातून बाहेर पडतात आणि सूर्यकिरणांच्या आश्रयाने अग्निलोकात निघून जातात. तिथून पुढे ते वैकुंठाच्या सीमेवरील विरजा नामक तीर्थात स्नान करून, सूक्ष्म शरीराचा परित्याग करतात. त्यांना मग दिव्य शरीर प्राप्त होते. ते चतुर्भुज होतात. तिथे त्यांना भगवंताचे दर्शन होते. भगवान त्यांना आपल्या अंकावर बसवून घेतो. नंतर त्या जीवांच्या ठिकाणी भगवंताच्या विषयी सेवकभाव प्रगट होतो. ते त्या ठिकाणी ब्रह्मतुल्य भोग भोगतात. मुक्त जीव अनेक असतात आणि स्वेच्छेने सर्व लोकांत विचरण करतात.

(३) नित्य – जे कधी संसारात आलेच नाहीत, त्यांना नित्य जीव म्हणतात. त्यांच्यामध्ये ज्ञान कधीही संकुचित होत नाही. ते भगवंताच्या विरुद्ध कधीही आचरण करीत नाहीत. ईश्वराच्या नित्य इच्छेनेच त्यांचे भिन्न भिन्न अधिकार अनादिकालापासून नियत आहेत. भगवंताच्या अवतारांप्रमाणेच हेही अवतार धारण करतात. अनंत, गरुड, विष्वक्सेन हे नित्य जीव होत.

आत्म्याच्या ठिकाणी अचित्‌च्या संसर्गाने अविद्या, कर्म, वासना आणि रुची या गोष्टी उत्पन्न होतात. अचित्‌ची निवृत्ती झाल्याने त्यांचीही आपोआप निवृत्ती होते.

वरील तीन्ही प्रकारच्या जीवांच्या ठिकाणी जे ज्ञान असते, ते आत्म्याच्या स्वरूपाप्रमाणे नित्य द्रव्यात्मक, अजड व आनंदस्वरूप असते. आत्म्याच्या स्वरूपात संकोच आणि विकास हे संभवत नाहीत. जीव स्वतःला सोडून अन्य कशाचाही प्रकाशक नसतो; पण ज्ञान मात्र संकोच-विकासाने युक्त असते आणि ते स्वतःहून अतिरिक्त असलेल्याचे प्रकाशक असते.

मुक्तावस्थेत ज्ञान सर्व आत्म्यांच्या ठिकाणी पूर्णतया विकसित असते. काहींचे ते नित्य व्यापक असते, काहींचे कधीच व्यापक नसते आणि काहींचे कधी कधी व्यापक असते.

अचित् अर्थात जगत् – ज्ञानशून्य विकारास्पद वस्तूला अचित् म्हणतात. लोकाचार्यांनी या अचित्‌चे शुद्धसत्त्व, मिश्रसत्त्व आणि सत्त्वशून्य असे तीन भेद मानले आहेत, त्यांचे वर्णन असे–

(१) शुद्धसत्त्व – यात रज आणि तम हे गुण नसतात. म्हणून ते नित्य आणि ज्ञान व आनंद यांचे जनक आहे. कोणत्याही कर्मावाचून केवळ भगवंताच्या इच्छेने ते नित्यधामातल्या वस्तुमानाचा आकार धारण करते. या शुद्धसत्त्वानेच वैकुंठ, विमान, गोपूर, मंडप, प्रासाद, इ. वस्तू; तसेच नित्यमुक्त जीव आणि भगवंताचा देह इथपर्यंत सगळे बनते. ही एक अपूर्व तेजोमय वस्तू आहे. तिचा पत्ता नित्यमुक्तांना आणि ईश्वरालाही लागत नाही. याच्या स्वरूपाचा निर्णय करणे कठीण आहे.

(२) मिश्रसत्त्व – हे तीन्ही गुणांनी मिश्रित असते. हे बद्ध-पुरुषांच्या ज्ञानाला आणि आनंदाला आवरण घालते. विपरीत ज्ञानही याच्यामुळेच उत्पन्न होते. हे ईश्वराच्या सृष्टिस्वरूप-क्रीडेत साहाय्यक होते. विकार उत्पन्न करीत असल्यामुळे याला प्रकृती, ज्ञानाला विरोधी असल्यामुळे अविद्या आणि विचित्र सृष्टी उत्पन्न करीत असल्यामुळे माया असे म्हणतात.

(३) सत्त्वशून्य – हे कालतत्त्व होय. हे प्रकृती व प्राकृतिक पदार्थ यांच्या परिणामाला कारण बनते. कालाच्या अधीन झाल्यावाचून ईश्वरही जगताची सृष्टी करू शकत नाही. नित्य, नैमित्तिक व प्राकृत हे तीन्ही प्रलय याच्या आधीन आहेत.

साधनमार्ग – वेदान्ताच्या शुष्क अध्ययनाने काहीही सिद्ध होत नाही. ते केवळ पुस्तकी ज्ञान असते आणि दुसऱ्या कोणाच्या तरी अनुभूत तथ्याची शाब्दिक पुनरावृत्ती असते. यथार्थ ज्ञान हे तर अपरोक्ष ज्ञान होय. ज्ञानावाचून मुक्ती मिळत नाही, हा उपनिषदांचा सिद्धान्त ठीक आहे; पण ज्ञानाचा अर्थ काय? प्रस्तुत दर्शनाच्या मते ईश्वराचे निरंतर स्मरण हेच यथार्थ ज्ञान होय. यथार्थ ज्ञान हीच उपासना आणि हीच भक्ती. भगवंताच्या प्राप्तीसाठी भक्ती हेच मुख्य साधन आहे. भक्तीच्या प्राप्तीसाठी वैदिक कर्मांचे अनुष्ठान हे साधक आणि साहाय्यक होत असते. रामानुजमते भक्ती ही ज्ञान आणि कर्म यांचा समुच्चय आहे. कर्माच्या साहाय्याने उपलब्ध होणारी ज्ञानरूप भक्ती ही जीवाच्या मोक्षाचा श्रेष्ठ उपाय आहे. भक्तीने प्रसन्न होऊन भगवान जीवाच्या समस्त बंधनांचा आणि क्लेशांचा नाश करतो. तसे झाल्यावर त्याला ब्रह्मज्ञान होते. भक्तीचेही सर्वश्रेष्ठ तात्पर्य प्रपत्ती हे आहे. प्रपत्ती म्हणजे शरणागती होय. शरणागत जीवच भगवत्कृपेला पात्र बनतो.

अद्वैत वेदान्ताच्या सिद्धान्तानुसार मुक्त आत्मा हा ब्रह्माशी अभिन्न होतो. जे रूप ब्रह्माचे तेच त्याचेही होते; पण प्रस्तुत दर्शनाच्या मते मुक्तात्मा ईश्वराशी समान होत नाही. ईश्वराशी त्याचे ऐकात्म्य कधीही होत नाही. त्याला ब्रह्माचे स्वरूप आणि गुण यांची प्राप्ती अवश्य होते; पण ब्रह्माशी मिळून तो त्याच्याशी एकरूप होत नाही. म्हणजे जीव हा ब्रह्म होत नाही; पण ब्रह्मासारखा होतो. मुक्त जीवाच्या ठिकाणी सर्वज्ञत्व आणि सत्यसंकल्पत्व हे ब्रह्माचे गुण अवश्य येतात; पण सर्वकर्तृत्व हा गुण केवळ ईश्वराच्याच ठिकाणी राहतो. मुक्त जीव स्वराट, अनन्याधिपती व सत्यसंकल्प होतो खरा; पण त्याला जगताचे सृष्टि-स्थिति-लय करण्याचा यत्किंचितही अधिकार मिळत नाही.

अन्य वैष्णवसंप्रदायांच्या मताप्रमाणे रामानुजमतात जीवन्मुक्तीला मान्यता नाही. रामानुजमताचे अनुयायी केवळ विदेह-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मुक्तीच मानतात. त्यांच्या मते वैकुंठात भगवंताचा किंकर बनून राहणे हीच परम मुक्ती होय. [भा. द. सं.; भा. द.; औ. इं. फि.; अध्यात्मदर्शन – श्री. के. वि. बेलसरे, १९६२]

विशुद्ध चक्र योगविद्येतील ज्ञानचक्रांमधले पाचवे चक्र. कंठ हे याचे स्थान, जीवात्मा ही त्याची देवता, तेज हे तत्त्व आणि शाकिनी ही नियंत्रक शक्ती आहे. मणिपूर व अनाहत चक्रांचा भेद करून प्राण या कंठस्थ चक्रात येतो व तिथून ज्ञानचक्रात जातो. श्रीपूर्णानंदयतीच्या श्रीतत्त्वचिंतामणी या ग्रंथात विशुद्ध चक्राचे वर्णन केलेले आहे, ते असे –

विशुद्धाख्यं कण्ठे सरसिजममलं धूमधूम्रावभासम् ।
स्वरैः सर्वैः शोणैर्दलपरिलसितैर्दीपितं दीप्तबुद्धेः ॥
समास्ते पूर्णेन्दुप्रथिततमनभोमण्डलं वृत्तरूपम् ।
हिमच्छायानागोपरिलसिततनोः शुक्लवर्णाम्बरस्य ॥

अर्थ– कंठस्थानी विशुद्ध नामक शुद्ध, व धूम्रवर्ण कमल आहे. अपासून अःपर्यंत सर्व सोळा स्वर याच्या सोळा पाकळ्यांवर चमकत आहेत. त्यांचा वर्ण लाल असून, ज्याची बुद्धी दीप्त आहे, त्याला ते स्पष्ट दिसतात. या पद्माच्या आवरणात वृत्ताकार व



विशुद्ध चक्र ।

पूर्णेंदूप्रमाणे शुभ्र असे नभोमंडल असून, त्यात हिमशुभ्र अशा हत्तीवर आकाशाचे शुक्लवर्ण बीज अधिष्ठित आहे.

हे बीज चतुर्भुज असून, त्याच्या मांडीवर सदाशिव आहे.

या कमलातील नभोमंडलात त्रिकोण असून, त्यात चंद्रमंडल आहे व त्यात सुधासिंधूपेक्षाही शुद्ध अशी शाकिनी देवी वास करते.

या पद्मचक्रावर आपले चित्त स्थिर करून जो ब्रह्मज्ञान प्राप्त करतो, त्याच्या मनाला चिरशांती लाभते.

पंच ज्ञानेंद्रिये, कंठगत रक्तवाहिन्या, श्वासनलिका व अन्ननलिका या सर्वांवर या चक्राची सत्ता चालते. पंचप्राणांपैकी उदान वायूच्या भ्रमणाचे हे स्थान होय. तसेच मध्यमा वाणीचेही हे स्थान आहे. सप्तपुऱ्यांपैकी द्वारकानगरी हिचेही स्थान या चक्रात आहे, असे मानले जाते. सरूपता या मुक्तीचेही हेच स्थान आहे.

या चक्राच्या प्रत्येक दलात एकेक शक्ती वास करते आणि प्रत्येक दलात एकेका आनंदाचा भोग मिळतो. त्यांची नावे अशी– सर्वतोभद्रा, प्राणधारिणी, सप्तद्योतिनी, ब्रह्मायणी, शबरी, लोहिता, यक्षिणी, सौभाग्यदायिका, भानुमती, मदालसा, शिखरिणी, छाया, विष्णुप्रिया, विश्वोदरा, माया व चित्रघंटा या शक्ती व हुम्, फट्, वौषट्, स्वाहा, स्वधा, मन, अमृत, गांग, शुद्ध, स्प, धर, तीज, धीम व प्राण हे आनंद होत. [स. पॉ.; ष. द. भे.]

विशेषसप्तमी एक काम्य व्रत. हे माघ शुद्ध सप्तमीच्या दिवशी करायचे असते. व्रतावधी एक वर्ष. व्रतदेवता सूर्य. याचा विधी असा – षष्ठीला म्हणजे आदल्या दिवशी तीळ, तांदूळ व दूध यांचे एकभुक्त. सप्तमीच्या दिवशी सुवर्णकमलावर सूर्यप्रतिमेची पूजा. त्या दिवशीच्या भोजनात तेल व मीठ वर्ज्य. सायंकाळी पुराणश्रवण. उद्यापनाच्या दिवशी सुवर्णकमल, शय्या व गाय यांचे दान. फल – मनोरथपूर्ती.

विशोकद्वादशीव्रत एक काम्य व्रत. आश्विन शुद्ध दशमीला विशोका हे नाव असून, दशमीपासूनच या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. दशमीला रात्री अल्पभोजन करून 'मी एकादशीला उपवास करीन, केशवाची पूजा करीन आणि द्वादशीला अन्नभक्षण करीन' असा संकल्प करावा. द्वादशीला पंचगव्यमिश्रित पाण्याने स्नान करून केशवाची पायापासून मस्तकापर्यंत पूजा करावी. एक मंडल करून त्यावर चौकोनी वेदी करावी. वेदी उत्तरेकडे उतरती असावी. वेदीवर सूप ठेवून, त्यात वाळूने केलेली लक्ष्मीची विशोका नावाची मूर्ती ठेवावी. मग "विशोका दुःख नष्ट करो व संपत्ती आणि सर्वत्र विजय प्राप्त करून देवो," अशी प्रार्थना करावी. सर्व रात्री व्रतधारी व्यक्तीने दर्भ बुडविलेले जल प्राशन करावे आणि रात्र नृत्य-गायनात घालवावी. हे व्रत प्रत्येक महिन्यात करावे. उद्यापनाच्या वेळी एक पलंग, गुडधेनू, सूप व लक्ष्मीची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूर्ती दान द्यावी. फल – शोकनाश व मोक्षप्राप्ती. [हि. ध.]

विशोकषष्ठी एक काम्य व्रत. माघ शुद्ध पंचमीला या व्रताला आरंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. पहिल्या दिवशी तिलमिश्रित जलाने स्नान करावे. तिळा-तांदुळांचे अन्न खावे. रात्री भोजन करू नये. षष्ठीला सूर्याचे प्रतीक म्हणून सोन्याच्या कमळाची तांबड्या करवीर पुष्पांनी पूजा करावी. दोन तांबडी वस्त्रे अर्पण करावी. 'शोकापासून मुक्तता होवो' अशी प्रार्थना करावी. गोमूत्र प्राशन करून झोपावे. सप्तमीला गुरूला व ब्राह्मणाला दाने देऊन तेल व मीठ यांनी विरहित असलेले अन्न खावे, मौन पाळावे आणि पुराण श्रवण करावे. उद्यापनाच्या वेळी सुवर्णाचे कमळ, बिछान्यासह पलंग आणि एक कपिला गाय दान द्यावी. हे व्रत दोन्ही पक्षांत करतात. फल – मनोरथपूर्ती.

हे व्रत विशोक-सप्तमी म्हणूनही करतात. [हि. ध.]

विशोक संक्रांती एक काम्य व्रत. अयन संक्रांत किंवा विषुव संक्रांत या दिवशी व्यतिपात योग असेल, तर त्या दिवशी या व्रताला प्रारंभ करतात. व्रतावधी एक वर्ष. याचा विधी असा–

व्रतदिनी तिलमिश्रित जलाने स्नान करून एकभुक्त राहावे. सूर्याच्या सोन्याच्या मूर्तीला पंचगव्याने स्नान घालावे आणि गंध-पुष्पे वाहून ती मूर्ती दोन तांबड्या वस्त्रांनी आच्छादित करावी. मग ती मूर्ती तांब्याच्या पात्रात ठेवून तिची आपादमस्तक सूर्याच्या निरनिराळ्या नावांनी पूजा करून अर्घ्य द्यावे. उद्यापनाच्या वेळी सूर्याची पूजा करावी आणि सूर्याला उद्देशून असलेल्या मंत्रांनी होम करावा. शक्य असल्यास बारा कपिला गायी, नाहीतर निदान एक कपिला गाय आणि सूर्यप्रतिमा यांचे दान करावे. फल – संतती, संपत्ती व आयुरारोग्य यांची प्राप्ती. पाहा – अशोक संक्रांती [हि. ध.; व्रतराज.]

विश्नोई एक संप्रदाय. संत जंभनाथ हा या संप्रदायाचा प्रवर्तक होय. राजस्थानात व उत्तर प्रदेशातील काही जिल्ह्यांत त्याचे हिंदू व मुसलमान अनुयायी आढळतात. त्यांच्यांत बरेच भेद आहेत. त्यांच्या चालीरीतींवर हिंदूंच्या व मुसलमानांच्या चालीरीतींचा बराच प्रभाव पडला असून, ते कर्मठ आहेत. हिंदू अनुयायी शेंडी राखत नाहीत. त्यांना लोकरीचे कपडे पवित्र वाटतात. त्यांना मांस व तंबाखू चालत नाही. शेती हा त्यांचा प्रधान व्यवसाय आहे. ते उंटही पाळतात.

मृतकप्रथा – हे मृताला झोपलेल्या स्थितीत किंवा संन्याशाप्रमाणे बसलेल्या स्थितीत, घराच्या ओसरीवर किंवा गोठ्यात पुरतात. पाहा – जंभनाथ. [रा. जा.; ट्रा. का. सें. प्रॉ. इं.]

विश्पती एक वैदिक संज्ञा. या शब्दाचा अर्थ निश्चित सांगता येत नसला तरी, बहुतेक ठिकाणी तो घराचा मालक या अर्थी वापरलेला आहे. हा मालक मनुष्य किंवा अग्नीही असू शकेल. काही ठिकाणी त्याचा अर्थ 'विशांपती' म्हणजे प्रजेचा मालक अर्थात राजा असाही होतो. प्रजेचा प्रमुख किंवा पुढारी असाही त्याचा अर्थ होऊ शकेल. [वे. इं.]

विश्रामोपनिषद एक नव्य उपनिषद. हे छोटेसे पद्यमय उपनिषद असून, त्यात हृदयकमळाच्या आठ पाकळ्यांपैकी कोणत्या पाकळीवर मन केंद्रित केले असता कोणता परिणाम होतो, त्याचे वर्णन आहे. अष्टदिशांच्या आठ पाकळ्या विविध रंगांच्या असून, त्या मनामध्ये विविध विकार व विविध भावना निर्माण करतात. म्हणून त्या सर्वांना वगळून मध्यदळात मन स्थिर करावे; त्यामुळे चैतन्याचा प्रत्यय येतो व त्याच्या स्मरणानेही सर्व पापे नष्ट होतात, असे या उपनिषदात सांगितले आहे. [श्री. सी. ग. देसाई]

विश्वक कार्ष्णी एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील ८६ वे सूक्त याने रचले असून, अश्विनीकुमारांची स्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. याची एक ऋचा (ऋ. ८.८६.५) अशी–

ऋतेन देवः सविता शमायत ऋतस्य शृङ्गमुर्विया वि पप्रथे।
ऋतं सासाह महि चित् पृतन्यतो मा नो वि यौष्टं सख्या मुमोचतम्॥

अर्थ – हे अश्विनीकुमारांनो, सायंकालीन सूर्यास्त, प्रातःकालीन सूर्योदय, तसेच शत्रुसैन्यांचा पराजय या गोष्टी त्रिकालाबाधित सृष्टिनियमानुसार होत असतात. तुम्ही आम्हांला स्नेहवंचित करू नका. द्रुतगामी रथाने तुम्ही या.

विश्वक हा कृष्ण आंगिरसाचा मुलगा म्हणून याला कार्ष्णी म्हटले असावे किंवा ते त्याचे पैतृक नाव असावे. याच्यावर अश्विनीकुमारांची फार कृपा होती. विष्णापू हा त्याचा हरवलेला मुलगा त्यांनी परत मिळवून दिला, असा उल्लेख ऋग्वेदात अनेक ठिकाणी आढळतो (१.११६.२३; ८.८६.१; १०.६५.१२). हे सूक्त जगती छंदात रचलेले आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

विश्वकर्मा (१) एक वैदिक देवता. ऋग्वेदाच्या एका सूक्तात (१०.१२१) याला पृथ्वी, जल व सर्व प्राणी यांचा निर्माता आणि सर्वश्रेष्ठ देव म्हटले आहे. सर्व देवांचे

CC0. In Public Domain: Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मकरणही यानेच केले (ऋ. १०.८२.३). हा सर्वद्रष्टा असून,
ला असंख्य मुखे, नेत्र, भुजा, पाय, इ. अवयव आणि पंखही
आहेत, असे याचे वर्णन केलेले आहे. हे रूपवर्णन पौराणिक
साहित्यातील चतुर्मुख ब्रह्मयाच्या वर्णनाशी मिळते-जुळते वाटते
अथर्ववेद, वाज. संहिता व ब्राह्मणे यांतही त्याला सर्वोच्च देव:।

भगवान विश्वकर्मा

ले आहे. वाज. संहितेत (१२.६१) याला सर्वद्रष्टा प्रजापती
ले आहे; तर शत. ब्राह्मणात (८.२.१.३) त्याला विधाता
पती म्हटले आहे. सृष्टीच्या प्रारंभी केवळ हाच अस्तित्वात
. प्रारंभी विश्वकर्मा हा सौर देवतेची उपाधी म्हणून मानला
होता. पण नंतरच्या काळात तो समस्त प्राणिसृष्टीचा
मानला गेला. ब्राह्मणग्रंथांत त्याला विधात्या प्रजापतीशी
केले गेले.

पुराणे व महाभारत यांत विश्वकर्म्याला देवांचा महान शिल्प-
मानले आहे. तो स्वायंभुव मन्वन्तरातील शिल्पप्रजापती
. हा प्रभास वसू व बृहस्पतीची भगिनी योगसिद्धा यांचा पुत्र
. ब्रह्मदेवाच्या दक्षिण वक्षभागातून हा उत्पन्न झाला, असे
भारतात म्हटले आहे (आदि. ६०.२६–३२).

याने देवांसाठी शस्त्रास्त्रे, आभूषणे, विमाने, इ. असंख्य वस्तू
निर्माण केल्या. विष्णूचे सुदर्शनचक्र, शिवाचा त्रिशूळ आणि इंद्राचे वज्र व विजय नामक धनुष्य ही शस्त्रे यानच निर्माण केली. त्रिपुर-दहनाच्या वेळी शिवासाठी रथ यानेच बनवला. पद्मपुराणात याच्याविषयी एक कथा आहे ती अशी–

याला संज्ञा नामक कन्या होती. तिचा विवाह विवस्वान म्हणजे सूर्य याच्याशी झाला; पण सूर्याचे तेज तिला सहन करता येईना; म्हणून ती पित्याकडे परत आली. तिला नेण्यासाठी तिचा पती विवस्वानही विश्वकर्म्याकडे आला. तेव्हा विश्वकर्म्याने त्याचे बरेच तेज काढून घेतले आणि त्या तेजापासून देवांसाठी अनेक शस्त्रास्त्रे उत्पन्न केली.

याने इंद्रासाठी इंद्रलोक निर्माण केला (भाग. पु. ६.९.५४). सुतल नामक पाताळलोक यानेच निर्माण केला (भाग. पु. ७. ४.८). श्रीकृष्णासाठी द्वारका नगरी, वृंदावन, राक्षसांसाठी लंका, तसेच हस्तिनापूर आणि इंद्रप्रस्थ ही नगरे यानेच निर्माण केली. हाच गरुडभवनाचा निर्माता होय.

मनू, चाक्षुष, शम, काम, हर्ष, नल, वानर, विश्वरूप व वृत्रासुर हे याचे पुत्र आणि बर्हिष्मती, संज्ञा, छाया व तिलोत्तमा या कन्या होत. यांपैकी विश्वरूप हा इंद्राचा प्रतिस्पर्धी म्हणून व वृत्र हा विश्वरूपाला इंद्राने मारल्यानंतर त्याचा सूड घेण्यासाठी म्हणून त्याने निर्माण केला होता. याच्याविषयी ब्रह्मवैवर्त-पुराणात (१.१०) एक कथा आहे, ती अशी–

घृताची नामक एक अप्सरा विश्वकर्म्याची प्रेयसी होती; पण एकदा क्रोधवश होऊन याने तिला 'तू शूद्र कुलात जन्म घेशील' असा शाप दिला. त्यामुळे ती एका गवळ्याची कन्या म्हणून जन्मली. ब्रह्मदेवाच्या कृपेमुळे विश्वकर्म्यालाही एका ब्राह्मण कुलात जन्म प्राप्त झाला. पुढे त्या दोघांचा संबंध येऊन जी मुले उत्पन्न झाली, त्यांच्यापासून शिंपी, कुंभार, सोनार, सुतार, इ. जाती निर्माण झाल्या. म्हणून हे लोक स्वतःला विश्वकर्म्याचे वंशज मानतात. [प्रा. च. को.]

(२) एक वैदिक राजा. याला कश्यपाने ऐंद्र महाभिषेक केला होता. त्या प्रसंगी विश्वकर्म्याने कश्यपाला पृथ्वीचे दान दिले, असे ऐत. ब्राह्मणात सांगितले आहे (८.२१.८). याने सर्वमेध यज्ञ केला तेव्हाही याने कश्यपाला पृथ्वीचे दान दिल्याचा निर्देश शत. ब्राह्मणात (१३.७.१.१५) आहे; पण त्या दोन्ही प्रसंगी पृथ्वीने तिचे असे दान देण्याला विरोध केला. त्यामुळे क्रुद्ध होऊन याने सर्व प्राणिसृष्टीची आणि स्वतःची आहुती यज्ञात दिली (ऋ. १०.८१.१).

यज्ञसंस्था सुरू झाली, त्या काळी भूमिदान निषिद्ध मानले जात असावे, असे या कथेवरून अनुमान करता येते. [प्रा. च. को.]

(३) एक शिल्पशास्त्रकार. विश्वकर्मावास्तुशास्त्र हा ग्रंथ याच्या नावावर आहे. (वास्तुविद्या पाहा.)

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वचक्रदान सोळा महादानांपैकी एक. याचा विधी पुढील-प्रमाणे— वीस ते एक हजार पळेपर्यंत सोने घेऊन त्याचे विश्वचक्र करावे. त्याला सोळा अऱ्या आणि आठ आवरणे असावी. त्याच्या तुंब्यावर जलशायी विष्णूची मूर्ती बसवावी. त्याचे अवतार, ऋषी, चतुर्वेद, पंचमहाभूते, रुद्र व लोकपाल यांचे परिवारदेवता म्हणून आवाहन करावे. मग हे चक्र तिळांच्या राशीवर ठेवून शुभ दिनी दान द्यावे. फल — वैकुंठप्राप्ती. या चक्राची रोज पूजा करणाऱ्याला विपुल धन व दीर्घायुष्य लाभते असे सांगितले आहे. [पु. इं.]

विश्वजित एक एकाह याग. या यज्ञात यजमानाने एक हजार गाई किंवा मोठ्या मुलाची वाटणी बाजूला ठेवून इतर सर्व मालमत्तेचे दान करायचे असते. आपले मातापिता व इतर नातेवाईक, कर्तव्य म्हणून सेवा करणाऱ्या शूद्र दासदासी, जमीन आणि राज्य यांचे दान मात्र त्यात करायचे नसते.

या यज्ञानंतर यजमानाने तीन दिवस उदुंबर वृक्षाच्या तळी निवास करून, कंदमुळे व फळे यांवर निर्वाह करावा. त्यानंतर त्याने तीन दिवस निषादवस्तीत, तीन दिवस वैश्यवस्तीत आणि तीन दिवस क्षत्रियवस्तीत राहावे; तसेच एक वर्षभर अयाचित वृत्तीने राहावे, भिक्षा मागू नये, असे जैमिनीने सांगितले आहे.

विश्वजित यज्ञ केल्यानंतर यजमानाने एक वर्षभर सगोत्र ब्राह्मणाच्या घरी राहावे, असे कौषीतकी ब्राह्मणात (२५.१५) म्हटले आहे.

रघुराजाने दिग्विजयानंतर विश्वजित यज्ञ केला होता आणि त्यात आपला सर्व राजकोश दान दिला होता, असे कालिदासाने रघुवंशात सांगितले आहे. [हि. ध.]

विश्वनाथ (१) (इ. स. चे १४ वे शतक) एक काव्यमीमांसक आणि कवी. ओडिसा प्रदेशातील एका विद्वान ब्राह्मण घराण्यात याचा जन्म झाला. विश्वनाथाच्या पित्याचे नाव चंद्रशेखर होते. चंद्रशेखर कवी होता. विश्वनाथाने "मम तातपादानाम्" असे म्हणून त्याचे अनेक श्लोक उदाहरणांसाठी साहित्यदर्पणात उद्धृत केले आहेत. तो संस्कृत, शौरसेनी, महाराष्ट्री व प्राकृत भाषांचा वैयाकरण होता. चंद्रशेखर व विश्वनाथ या दोघांनाही सांधिविग्रहिकमहापात्र अशी पदवी लावलेली आढळते. त्यावरून ते दोघेही कोण्या राजाच्या दरबारातील महत्त्वाचे अधिकारी असावे, असे वाटते. डॉ. पां. वा. काणे यांच्या मते हा देश बहुधा कलिंग असावा. विश्वनाथ वैष्णवमतानुयायी असावा, असे पंडितांचे मत आहे.

साहित्यदर्पणाव्यतिरिक्त या कवीने आणखी सात ग्रंथ रचले असून, त्यांत राघवविलास हे संस्कृत महाकाव्य, कुवलयाश्वचरित नामक प्राकृत काव्य, प्रभावतीपरिणय व चंद्रकला या दोन नाटिका, प्रशस्तिरत्नावली नावाचा सोळा भाषांतील करंभक, नरसिंहविजय हे काव्य आणि काव्यप्रकाशावरील काव्यप्रकाशदर्पण नावाची टीका, हे ग्रंथ आहेत. त्याचप्रमाणे पुष्पमाला व भाषार्णव नावाचे दोन ग्रंथ त्याने रचल्याचा उल्लेख साहित्यदर्पणात आढळतो.

साहित्यदर्पण हा विश्वनाथाचा काव्यशास्त्रविषयक महत्त्वाचा ग्रंथ होय. हा ग्रंथ दहा परिच्छेदांत विभागलेला आहे. पहिल्या परिच्छेदात प्रथम काव्याचे फल सांगून अन्य साहित्यिकांच्या काव्यलक्षणांची चर्चा केली आहे आणि अखेर 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हे स्वतःचे काव्यलक्षण सांगून त्याचे विवरण केले आहे. दुसऱ्या परिच्छेदात अभिधा, लक्षणा व व्यंजना या शब्दशक्तींची माहिती असून, तिसऱ्यात रस, भाव, त्यांचे दोष, नायक-नायिका, त्यांचे भेद, इ. विषय आहेत. चौथ्यात ध्वनी व गुणीभूतव्यङ्ग्य हे काव्यप्रकार आणि त्यांचे उपप्रकार सांगितले आहेत. पाचव्या परिच्छेदात व्यंजनेचे विवेचन आहे. सहाव्यात नाटकासंबंधी निरूपण आहे. यापुढील दोन परिच्छेद काव्याच्या गुणदोषांसाठी खर्ची पडले आहेत. नवव्यात रीतिविवेचन आणि दहाव्यात शब्दालंकार व अर्थालंकार यांची चर्चा आहे.

संस्कृत साहित्यशास्त्राच्या इतिहासात साहित्यदर्पणाला दुय्यम स्थान असले, तरीही त्यात काही चांगले गुण आहेत. सर्वस्पर्शित्व आणि सुबोध विवेचनपद्धती हे ते गुण होत. या शास्त्रावरील अन्य ग्रंथकारांनी नाटकाविषयी विवेचन केले नाही; पण साहित्यदर्पणात या विषयाची सांगोपांग माहिती आहे. विश्वनाथाने हे विवेचन भरत व धनंजय यांना वाट पुशीत केले असले, तरी त्याचा हा ग्रंथ नाट्यशास्त्रावरील एक प्रमाणभूत ग्रंथ म्हणून मान्यता पावला आहे. त्याचप्रमाणे त्याने अलंकारविषयक भाग रुय्यकाला आणि उर्वरित भाग मम्मटाला अनुसरून लिहिला आहे. त्यामुळे या ग्रंथात नवा विचार, नवी मांडणी, बारीक निरीक्षण, इ. आढळत नाही, असे सर्व अभ्यासक म्हणतात. असे असले तरी काव्यशास्त्राच्या जिज्ञासू अभ्यासकांना हा मार्गदर्शक ग्रंथ ठरतो, यात शंका नाही.

साहित्यदर्पणाचा प्रसार भारताच्या पूर्वभागात, विशेषतः बंगालमध्ये आहे. या ग्रंथावर आतापर्यंत केवळ चार टीका झालेल्या आहेत. [सं. सा. शा. इ.; काव्यप्रकाश, —संपादक— श्री. अर्जुनवाडकर, श्री. मंगरूळकर १९६२]

(२) (इ. स. चे १६ वे शतक) एक प्रसिद्ध टीकाकार. हा तैत्तिरीय शाखेचा भारद्वाजगोत्री ब्राह्मण व गोलग्रामस्थ दिवाकराचा मुलगा असून, काशीला राहत होता. याने सूर्यसिद्धान्तादी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याच ग्रंथावर उदाहरणरूप टीका रचल्या आहेत. त्यांत मुख्य उदाहरणात शक १५३४ घेतला आहे. विश्वनाथाचे उदाहरणरूप टीकाग्रंथ सुमारे अठरा आहेत. त्यांतील काही नावे अशी— सूर्यसिद्धान्तावर गहनार्थप्रकाशिका टीका, सिद्धान्तशिरोमणिटीका, करणकुतूहल टीका, मकरंद टीका, ग्रहलाघव टीका, गणेशदैवज्ञकृत पातसारणी टीका, केशवी जातकपद्धतीची टीका आणि नीलकंठ ताजक ग्रंथावर समातंत्र प्रकाशिका टीका.

विश्वनाथाने टीकाग्रंथांत उदाहरणे करून दाखविली आहेत. त्यामुळे अभ्यासकांना त्याचे ग्रंथ फार उपयोगी पडतात; परंतु या ग्रंथांतून त्याने उपपत्ती दिलेल्या नाहीत. तरीही त्याला सिद्धान्तज्ञान चांगले होते, असे दिसून येते.

कृष्णशास्त्री गोडबोले यांनी मराठीत ग्रहलाघव हा ग्रंथ सोदाहरण छापला आहे; तो बहुतेक विश्वनाथी टीकेचे भाषांतर आहे, असे श्री. शं. बा. दीक्षितांचे मत आहे. [भा. ज्यो. शा.]

(३) (इ. स. चे १७ वे शतक) एक संस्कृत कोशकार. हा अग्निहोत्री नारायणाचा मुलगा असून, विदर्भातल्या देवळपट्टण नामक गावी राहत होता. वैद्यकी हा त्याच्या घराण्याचा व्यवसाय होता. हा कवी असून, न्याय, मीमांसा, इ. शास्त्रांतही पारंगत होता. तो काही काळ नवानगरच्या जाम सत्तारसालच्या आश्रयाला होता. तिथे त्याने शत्रुशल्यचरित हे काव्य रचले. पुढे तो मेवाडच्या जगतसिंहाच्या आश्रयाला गेला असता, त्याने जगतसिंहाच्या प्रशंसेसाठी जगतप्रकाश नामक काव्य रचले.

कोशकल्पतरू हा त्याचा प्रमुख ग्रंथ होय. या ग्रंथाच्या पहिल्या भागात स्वर्गखंड, भूखंड, पातालखंड, लिंगवर्ग व अव्ययसामान्यकांड, इ. प्रकरणे असून, दुसऱ्या भागात क, च, ट, त, प हे पाच वर्ग आहेत. क वर्गात क, ख, ग व घ या अक्षरांनी शेवट होणारे शब्द आहेत. हाच क्रम पुढच्या वर्गांतही पाहायला मिळतो. पहिल्या भागाच्या स्वर्गखंडात परमात्मवर्ग, स्वर्गवर्ग, व्योमवर्ग, दिग्वर्ग, धीवर्ग व नाट्यवर्ग अशी प्रकरणे आहेत. भूखंडातील औषधिवर्ग हे प्रकरण बरेच मोठे असून, त्यात वने, उपवने, फुले, फळे इत्यादींची एकार्थी अनेक नावे दिली आहेत; काहींचे औषधी गुणधर्मही सांगितले आहेत. [कोशकल्पतरू.]

विश्वनाथ खुंटिया

(इ. स. चे १८ वे शतक) उडिया भाषेतील एक कवी. याचे विचित्र रामायण नावाचे एक छंदोबद्ध काव्य फार लोकप्रिय आहे. त्या प्रदेशातील घराघरातून ते वाचले जात. त्याने त्यात संपूर्ण परंतु संक्षिप्त स्वरूपात रामचरित्र सांगितले आहे. त्याची भाषा अत्यंत तरल आणि शैली ओघवती आहे.

विश्वनाथाच्या रामायणाची प्रामाणिक प्रत आज उपलब्ध नाही. या रामायणाचा जो पाठ आज उपलब्ध आहे, त्यात विक्रम, गोपी, पद्मनाभ, नारण, इ. कवींची रचनाही मिसळलेली आढळते. [उ. सा. इ.; रामकथा.; मैं. गु. अ. ग्रं.]

विश्वनाथ जानी

(इ. स. चे १७ वे शतक) एक गुजराती कवी. हा नागर ब्राह्मण असून, पाटणचा रहिवासी होता. 'नरसिं मेहतानु चरित्र' या आपल्या काव्यात त्याने नरसी मेहताच्या जीवनातील ठळक प्रसंग वर्णिले आहेत. सगालचरित्र हे तेवीस कडव्यांचे आख्यान त्याने शिवपुराणातील एका कथेवरून रचले आहे. प्रेमपचीसी या पंचवीस पदांच्या काव्यात त्याने उद्धवाचा संदेश ग्रथित केला आहे. चातुरीचालीसी या काव्यात त्याने कृष्ण व गोपी यांचा शृंगार वर्णिला आहे. याशिवाय, त्याने मोसालाचरित्र व मामेरू या नावाची काव्येही रचली आहेत. [गुज. सा. इ.; मा. गु. लि.]

विश्वनाथ व्यास बीडकर

(इ. स. चे १६वे शतक) एक महानुभावीय मराठी कवी. उपाध्य आम्नायातील रेवेराज हा त्याचा दीक्षागुरू आणि वाल्हन पंडित हा विद्यागुरू होय. विश्वनाथाने आचार, दृष्टान्तस्थळ, इ. ग्रंथांवर महाभाष्य केले असून, हयग्रीवाच्या गद्यराज स्तोत्रावर आणि पं. दामोदरकृत साठी, चौपद्या, इ. ग्रंथांवर टीका लिहिल्या आहेत. ध्यानामृतस्तोत्र हा त्याचा प्रमुख ग्रंथ होय. हे स्तोत्र श्लोकबद्ध असून, त्यात अनेक वृत्तांचा वापर केलेला आहे. त्याच्या काव्याचा नमुना असा —

> त्या श्रीपादसरोजवेध बहुळे त्रैलोक्य आनंदले ।
> योगीभृंग आमोद चुंबित भले दास्यस्व झंकारले ।।
> त्याने स्पर्शित वंदिता निधुजने कीर्ती स्तवी सदा मंगळे ।।
> द्विपद तळतळा त्या नंद जिव्हाळ सांगा ।
> परम सरळ फुंवा ब्रह्मरूपाचि पांगा ।।
> भिरवत वसभागा कोवळीया सुरागा ।
> विलसत सकुमारा पूतळी मातिधांगा ।।
> गमत मज जनी त्या मूर्ति कैवल्य गंगा ।
> जन आघवेचये नासा तीर्थ की सेचलिंगा ।।
> नखचय मिसरूपें चंद्रकी तेथ राहे ।
> क्षणरहित असावे शुद्धती मागताहे ।।

या ध्यानामृतस्तोत्रावर नंतरच्या काळात अनेक टीका झाल्या आहेत. [म. म. वा.; म. सा.; म. वा. इ. खंड २]

विश्वनाथ सिंह

(इ. स. १७८९–१८५४) एक रसिक रामभक्त, तसेच उत्तम कवी व नाटककार.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मध्य प्रदेशातील रीवाच्या राजवंशात याचा जन्म झाला. याच्या पित्याचे नाव जयसिंह होते. वडिलांच्या मृत्यूनंतर हा रीवाच्या गादीवर बसला. गादीवर आल्यावर याने अनेक कवींना आश्रय दिला. प्रियादासाने याला रसिकभावाचे रहस्य सांगून षडक्षरी राममंत्राचा उपदेश केला होता. त्यानंतर याने स्वतःला राम-सीता या दिव्य दंपतीचा पार्षद मानून त्यांची आजन्म उपासना केली. याने सगुणोपासक रामभक्तीची सीमा ओलांडून निर्गुण क्षेत्रातही पदार्पण केले होते. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कबीरबीजक ग्रंथावरील त्याची पाखंड-खंडिनी नावाची टीका होय. ही टीका म्हणजे त्याच्या अगाध पांडित्याचा एक ठेवा समजला जातो. विश्वनाथ संस्कृत भाषा व साहित्य यांचा चांगला जाणकार होता.

याला रघुराजसिंह नावाचा एक मुलगा होता. तोही रामोपासक आणि अधिकारी कवी होता. (रघुराजसिंह पाहा)

त्याने हिंदी भाषेत सुमारे अडतीस ग्रंथ रचले आहेत. त्यांतील काही ग्रंथांची नावे अशी – रामगीताटीका, रामरहस्य-टीका, राममंत्रार्थनिर्णयटीका, संगीत रघुनंदन, रामपरत्व, रामायण, तत्वमस्यर्थसिद्धान्तभाष्य, सर्वसिद्धान्त, आह्निक-अष्टयाम, उत्तमकाव्यप्रकाश, सर्वसंग्रह, इत्यादी.

याव्यतिरिक्त आनंद रघुनंदन नावाचे नाटक ही त्याची एक महत्त्वपूर्ण रचना आहे. नाट्यगुणांच्या दृष्टीने याला फारसे मोल नसले तरी, हिंदी साहित्यातील पहिले नाटक म्हणून ते महत्त्वाचे आहे. हे नाटक पद्यप्रचुर असून, त्यातील संवाद व्रज भाषेतील गद्यात आहेत. याचे बहुतेक साहित्य उपदेशात्मक व वर्णनात्मक आहे. [हिं. सा. को. २; हिं. सा. इ.– शुक्ल; हिं. सा. २; रा. र. सं; हिं. सा. इ. – वर्मा]

विश्वपाणी

विश्वपद्म

कमळाच्या पाकळ्या जेव्हा खाली आणि वर अशा दोन्ही बाजूंना उमललेल्या असतात, तेव्हा त्याला विश्वपद्म म्हणतात. अनेक ठिकाणी बुद्धाच्या आणि कित्येक बौद्ध देवतांच्या मूर्ती अशा प्रकारच्या विश्वपद्मावर अधिष्ठित असलेल्या दिसतात. [इं. बु. इ.]

विश्वपाणी

एक बोधिसत्त्व. हा अमोघसिद्धी व तारा यांचा पुत्र असून, विश्ववज्र हे याचे अभिधानचिन्ह आहे. हा कर्मकुळातील असल्यामुळे, याचा वर्ण हिरवा आहे. याची मूर्ती कधी उभ्या स्थितीत, तर कधी बसलेल्या स्थितीत असते. याच्या थोड्याच मूर्ती आढळतात. [इं. बु. इ.]

विश्वंभरोपनिषद

रामोपासनेच्या मधुर उपासनेतील एक आकरग्रंथ. हा ग्रंथ अथर्ववेदाचे एक अंग मानलेला आहे. यात शांडिल्य मुनीने महाशंभूला पुढील प्रश्न विचारले आहेत – सर्व देवांत श्रेष्ठ, वाणीमनबुद्धीला अगोचर व ब्रह्मा–विष्णू–शिव यांचाही सर्वेश्वर असा कोण आहे ? ज्यामुळे जीव संसारातून मुक्त होऊन भगवंताशी सायुज्य पावतो, असा मंत्र कोणता ?

या प्रश्नांना उत्तर म्हणून महाशंभूने सांगितले, की राम हाच सगुण-निर्गुण ब्रह्माच्या पलिकडे असून, तो अयोध्येत रासलीला करतो. त्याचे अनेक मंत्र आहेत; पण त्यांपैकी ' रां रामाय नमः', 'श्रीमद्रामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ', ' श्रीमते रामचन्द्राय नमः' व 'ॐ नमः सीतारामाभ्याम्' हे तीन मंत्र अत्यंत श्रेष्ठ आहेत. श्रीरामाची परिच्छिन्न व अपरिच्छिन्न अशी दोन रूपे आहेत. परिच्छिन्न रूपाने तो साकेतलोकात रमणींच्या सहवासात राहून रासलीला करतो आणि अपरिच्छिन्न रूपाने तो जगदुत्पत्तीचे कारण आहे. त्याच्या उजव्या अंगापासून क्षीरसमुद्रवासी अष्टभुज भूमा पुरुष, डाव्या अंगापासून रमा वैकुंठवासी, हृदयातून परनारायण आणि चरणांपासून बदरीवननिवासी नरनारायण उत्पन्न झाले आहेत. सर्व अवतार रामचंद्राच्या चरणांपासूनच उत्पन्न होतात.

हे उपनिषद अयोध्येत प्रकाशित झाले असून, त्यावर रामतत्त्वप्रकाशिका नामक टीकाही आहे. [रा. सा. म. उ.]

विश्वभूषण

(इ. स. चे १७ वे शतक) एक जैन भक्तकवी. हा बलात्कारगणाच्या अटेर शाखेचा एक आचार्य होता. याच्या गुरूचे नाव जगद्भूषण असे होते. याची गादी आग्रा जिल्ह्यातील हथिकांत गावी होती. याचे अनेक शिष्य होते. याने निर्वाणमंगल, जिनदत्तचरित, जिनमतखिचरी, नेमिजीका मंगल, पार्श्वनाथका चरित, पंचमेरुपूजा, इ. लहान-मोठे ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय, त्याने अनेक स्फुट पदेही रचली आहेत. त्याचे एक पद असे –

> जिन नाम लैरे बौरा तू जिन नाम लैरे बौरा ।
> जे तू परम तत्त्व कौं चाहै तौ तन कौ लगे न औरा ॥
> मातरकै मवबधि में परिहै भयौ चहुंगति बौरा ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विश्वभूषण पदपंकज राच्यौ ज्यौं कमलम विचि भौंरा ।।

अर्थ – हे जीवा, तू सदैव जिनेंद्राचे नामस्मरण कर. जर तुला परम तत्त्वाची प्राप्ती करून घ्यायची असेल, तर तू शरीराच्या बाबतीत उदासीन हो. जर तू असे केले नाहीस, तर भवसागरात गटांगळ्या खाशील आणि पुन्हा चारही गतींत फिरशील. कमळात जसा भ्रमर, तसा विश्वभूषण जिनेंद्राच्या पदकमलावर लीन झाला आहे.

हिंदी भाषेतील काव्यरचनेप्रमाणेच याने संस्कृत भाषेतही काही रचना केली आहे. [हिं. जै. भ. क.]

विश्वमनस वैयश्व एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या आठव्या मंडलातील तेवीस ते सव्वीस ही चार सूक्ते याने रचली आहेत. हा व्यश्वाचा मुलगा म्हणून याला वैयश्व हे पैतृक नाव मिळाले. विश्वमनस इंद्रमित्र असून, त्याने वरोसुषापासून धनप्राप्ती व्हावी म्हणून प्रार्थना केली आहे. परंतु सायणाचार्यांच्या मते इथे वरोसुषामन् हे कोण्या व्यक्तीचे नाव नाही.

याच्या चार सूक्तांमध्ये अनुक्रमे अग्नी, इंद्र, मित्रावरुण व अश्विनौ यांची स्तुती आढळते. याची एक ऋचा अशी –

नह्यङ्ग पुरा चन जज्ञे वीरतरस्त्वत् ।
नकी राया नैवथा न भन्दना ।।

(ऋ. ८.२४.१५)

अर्थ – हे इंद्रा, तुझ्याइतका पराक्रमी, धनवान आणि संरक्षणकर्ता अन्य कोणी जन्मला नाही. तुझ्याइतका प्रशंसनीय अन्य कोणी नाही.

चौविसाव्या सूक्तात, मानवाच्या शरीरात नऊ प्राण आणि दहावा आत्मारूपी इंद्र निवास करीत असल्याचा उल्लेख आहे (८.२४.२३). त्याचप्रमाणे या सूक्तात सप्तसिंधू प्रदेशात राहणाऱ्या आर्यांचा उल्लेख आहे (८.२४.२७). हा उल्लेख म्हणजे वैदिक आर्यांच्या आद्य वसाहतीचा उल्लेख असावा, असे म्हणतात. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

विश्वरचना पृथ्वी; सूर्यादी तारे; चंद्र, मंगळ, इ. ग्रह, नक्षत्रे व आकाशगंगा एवढे सारे घटक ज्या विशाल अवकाशात भ्रमण करतात, त्याला विश्व म्हणतात. संस्कृत साहित्यात याला जगत्, ब्रह्मांड अशी अन्य नावेही आहेत. जगताची उत्पत्ती व ब्रह्मांडाचा विस्तार यासंबंधीच्या प्राचीन कल्पना अन्यत्र दिल्या आहेत.

विश्वरचनेविषयी काही स्थूल कल्पना वेदांत व वैदिक साहित्यात आहेत. ऋग्वेदात द्यौ, अंतरिक्ष व पृथ्वी या तीन लोकांचा निर्देश आहे. कुठे द्यूलोकाचा पृष्ठभाग किंवा अत्युच्च भाग म्हणजे स्वर्ग असे म्हटले आहे. अंतरिक्ष हे द्यौ व पृथ्वी यांच्यामध्ये असून, ते वायू, मेघ व विद्युत् यांचे स्थान होय, असे वर्णन केलेले आहे. सूर्य द्युलोकाच्या अत्युच्च प्रदेशातून संचार करतो, असे पुष्कळ उल्लेख आहेत. तैत्ति. संहितेत (७.५.२३) अग्नी पृथ्वीवर आहे, वायू अंतरिक्षाचा आश्रय करतो, सूर्य द्युलोकी आक्रमण करतो आणि चंद्रमा नक्षत्रमंडलात संचार करतो, असे वर्णन आहे. सूर्यापेक्षा चंद्र उंच, अशी समजूत या वर्णनात दिसते; पण चंद्र अंतरिक्षात असल्याचाही उल्लेख काही ठिकाणी आढळतो.

पृथ्वीची विश्वाशी तुलना केली असता, पृथ्वी अत्यंत लहान आहे आणि विश्व अतिशय विशाल आहे, ही कल्पना ऋग्वेदात (१.५२.११) व तैत्ति. ब्राह्मणात (३.११.१) आढळते. सूर्य हा सकल विश्वाचा आधार आहे; त्याच्यामुळे ऋतू उत्पन्न होतात आणि प्रकाश, उष्णता व पर्जन्य प्राप्त होतात ही कल्पनाही वेदांत आहे. पृथ्वी गोल असून, आकाशात निराधार अशी राहिलेली आहे, हे ज्ञानही वैदिक आर्यांना होते, यात शंका नाही.

विश्वामध्ये पृथ्वी, चंद्र, इ. ग्रहांच्या स्थानाविषयी श्री. शं. बा. दीक्षित यांनी विवेचन केले आहे, ते असे–

विश्वाच्या मध्यभागी पृथ्वी आहे, तिच्या भोवती चंद्रादी ग्रह फिरतात; त्यांचा क्रम चंद्र, बुध, शुक्र, रवी, मंगळ, गुरू, शनी आणि तारकामंडल असा आहे. नक्षत्रमंडल फिरते, ते ध्रुवद्वयबद्ध असे फिरते. पृथ्वी गोल व निराधार आहे; तिच्या भोवती वायू आहे, त्याला भूवायू म्हणतात. त्याच्यावर आकाशात प्रवाह नामक वायू संचार करतो. त्याच्या प्रेरणेने चंद्रादी तेजोगोलांना गती प्राप्त होते आणि ते पृथ्वीभोवती फिरतात, असे भारतीय ज्योतिषशास्त्राचे मत आहे. याबद्दलचे वर्णन सर्व सिद्धान्तग्रंथांत आणि तंत्रांत असते.

ग्रहांसह सर्व तारकामंडल सुमारे एका दिवसात पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा करते, असे दिसते. परंतु ही दैनंदिन गती वास्तविक नाही; पृथ्वीच्या दैनंदिन गतीमुळे तसे भासते, असे आधुनिक शास्त्रज्ञांचे मत आहे. आपल्या ज्योतिर्विदांपैकी पहिल्या आर्यभटाचे मत तसेच आहे. इतर सर्वांच्या मते नक्षत्रमंडलाची दैनंदिन गती वास्तविकच आहे आणि बहुतेक पौरुष सिद्धान्तकारांनी आर्यभटाचे मत सदोष मानले आहे.

चंद्रकक्षेच्या प्रदेशात त्याच्या कक्षेची एक कला पहिला आर्यभट सोडून सर्वांनी १५ योजने मानली आहे. म्हणजे सर्व कक्षा ३६० × ६० × १५ = ३२,४०० योजने होते. या कक्षेची त्रिज्या ५१,५६६ योजने होते. हे पृथ्वीपासून चंद्राचे अंतर होय. पृथ्वीची त्रिज्या सूर्यसिद्धान्तानुसार ८०० योजने आहे. म्हणजे चंद्राचे अंतर पृथ्वीच्या त्रिज्येच्या ६४ पट झाले. आधुनिक शास्त्रज्ञांनी हे अंतर भूत्रिज्येच्या ५१ पट ठरवले आहे. यात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

थोडाच भेद आहे. सूर्यसिद्धान्ताप्रमाणे सूर्याचे पृथ्वीपासून अंतर ६,८९,४३० योजने येते. म्हणजे ते भूत्रिज्येच्या सुमारे ८६२ पट आहे. पण नवीन मापनपद्धतीने ते भूत्रिज्येच्या सुमारे २३,३०० पट आहे. याचप्रमाणे दूरच्या ग्रहांची, प्राचीन सिद्धान्तावरून निघणारी अंतरेही चुकीची आहेत.

विज्ञानातील विलक्षण प्रगतीमुळे जी विविध उपकरणे निर्माण झाली आहेत, त्यांच्या साहाय्याने आधुनिक शास्त्रज्ञांनी विश्वाचे सूक्ष्म निरीक्षण करून असंख्य तारे शोधून काढले आहेत. त्यामुळे हे विश्व अत्यंत विशाल व अमर्याद आहे, असे त्यांच्या ध्यानात आले आहे. आपली पृथ्वी आणि चंद्र, मंगळ, इ. ग्रह सूर्याभोवती प्रदक्षिणा घालीत असतात. सूर्य स्थिर नसून, तोही दुसऱ्या एखाद्या मध्यवर्ती सूर्याभोवती फिरत असावा, अशी कल्पना आहे. आपल्या सूर्यमालेसारख्या आणखीही काही सूर्यमाला आकाशात भ्रमण करीत असाव्या, असेही अनुमान केले जाते.

पृथ्वीपासून सूर्याचे अंतर ९ कोटी ३० लक्ष मैल आहे; पण त्याच्यापलिकडे जे तारे आहेत, त्यांचे अंतर मोजायला मैलांचे माप अगदीच तोटके पडते. त्यासाठी प्रकाशवर्ष हे मान वापरले जाते. प्रत्येक सेकंदाला १,८६,००० मैलांच्या वेगाने एका वर्षात प्रकाश जेवढे अंतर जातो, त्याला १ प्रकाशवर्ष म्हणतात. ते ६ महापद्म मैल भरते. कृत्तिका, रोहिणी, मृग व पुष्य या नक्षत्रांतील ठळक तारे पृथ्वीपासून ५०० प्रकाशवर्षे अंतरावर आहेत. व्याधाचा तारा अवघा ८.७५ प्रकाशवर्षे दूर आहे. मघा व सप्तर्षी ७०–८० प्रकाशवर्षे, चित्रा ३०० प्रकाशवर्षे, ज्येष्ठा २५० प्रकाशवर्षे, स्वाती ३८ प्रकाशवर्षे, श्रवण १६ प्रकाशवर्षे, अशी काही ताऱ्यांची अंतरे आहेत. हे तारेही सूर्यापेक्षा खूप मोठे आहेत. उदा० स्वातीचा व्यास सूर्याच्या २७ पट, रोहिणीचा ३८ पट आणि ज्येष्ठेचा २५० पट आहे. सूर्य हा एक मध्यम प्रतीचा तेजस्वी तारा असून, कित्येक तारे त्याच्या १२ ते १०० पट अधिक तेजस्वी आहेत.

नक्षत्रताऱ्यांच्या व्यतिरिक्त आकाशात असंख्य तारकापुंज आहेत. अशा तारकापुंजांमुळे आकाशात एक लांबलचक, रुंद व पांढुरका पट्टा दृष्टीस पडतो. त्याला आकाशगंगा म्हणतात. तो शर्मिष्ठा, ब्रह्महृदय व मृग यांच्या पूर्वेकडून दक्षिणेला गेलेला दिसतो. मग तो थोडासा पूर्वेला वळून वृश्चिक, श्रवण, इ. नक्षत्रांमधून उत्तरेकडे जातो आणि पुन्हा शर्मिष्ठेजवळ येतो. ही आकाशगंगा म्हणजे आपल्या तारकामय विश्वाची कंगोरेदार कडाच आहे, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. आकाशगंगा आपल्या सूर्यमालेपासून अतिशय दूर असून, तिचा व्यास सुमारे दोन लक्ष प्रकाशवर्षे असावा, असे अनुमान एका शास्त्रज्ञाने केले आहे.

आकाशगंगेने युक्त अशा आपल्या विश्वासारखी अनेक विश्वे आकाशात आहेत, असेही शास्त्रज्ञांचे मत आहे. पाहा – जगत; ब्रह्मांड. [भा. ज्यो. शा.; सु. वि. को.; ज्योतिर्वैभव]

विश्वरूप (१) त्वष्टयाचा पुत्र. हा देवांचा पुरोहित होता; पण याचा ओढा देवांपेक्षा असुरांकडे अधिक असल्यामुळे हा स्वतः असुर असावा, असे वाटते.

ऋग्वेदात (१०.८) याला त्रिशिरस (तीन शिरांचा) दैत्य असे म्हटले आहे. तैत्तिरीय संहितेत (२.५.१) इंद्राने याचा वध केला, त्याबद्दलची कथा आली आहे. विश्वरूप जरी देवांचा पुरोहित होता, तरी तो यज्ञात जास्त हविर्भाग असुरांना देत असे. त्यामुळे इंद्राला राग आला आणि त्याने आपल्या वज्राने त्याची तीनही शिरे कापून त्याचा वध केला. पण त्यामुळे इंद्राला ब्रह्महत्येचे पातक लागले. इंद्राने आपल्या पातकाचे तीन भाग केले आणि ते पृथ्वी, वृक्ष व स्त्रिया यांच्यामध्ये वाटून दिले. त्यामुळे पृथ्वीत सडण्याचा, वृक्षांत खुडले जाण्याचा आणि स्त्रियांत रजस्राव होण्याचा दोष निर्माण झाला.

शतपथ ब्राह्मणात (१.२.३.२) मात्र त्रिताने याचा वध केला आणि इंद्राची ब्रह्महत्येच्या, पातकांपासून मुक्तता केली, असे सांगितले आहे.

महाभारतात आणि पुराणांतही विश्वरूपाचा उल्लेख आला आहे. असुरराज प्रल्हादाची कन्या विरोचना ही याची माता होती, असे काही पुराणांत सांगितले आहे. याच्या तीन मस्तकांपैकी एकाने तो अन्न भक्षण करीत असे, दुसऱ्याने सोमपान करीत असे व तिसऱ्याने सुरा पीत असे. याच्या मृत्यूनंतर सोमपीथ मस्तकापासून कपिंजल, सुरापीथ मस्तकापासून कलविंक व अन्नाद मस्तकापासून तित्तिर नामक पक्षी उत्पन्न झाले. महाभारतात याची एक निराळी कथा आहे, ती अशी –

एकदा इंद्राने देवगुरू बृहस्पतीचा अपमान केला. त्यामुळे तो देवांचा पक्ष सोडून निघून गेला. तेव्हा इंद्राने विश्वरूपाला देवांचा पुरोहित केले. पण त्याचा ओढा असुरांकडे अधिक आहे, असे पाहून त्याला देवगुरुपदावरून स्थानभ्रष्ट करण्यासाठी इंद्राने त्याच्याकडे अनेक अप्सरा पाठवल्या; पण विश्वरूपाने इंद्राचा कावा ओळखला आणि इंद्रवधासाठी तो उग्र तपश्चर्या करू लागला (म. भा. शांति. ३२९.२७).

सूर्यकन्या विष्टी ही याची पत्नी होती. तिच्या ठिकाणी याला गंड, रक्ताश, क्रोधन, व्यय, दुर्मुख व हर्षण असे भीषणस्वरूप पुत्र झाले (ब्रह्म पु. १६५).

श्री. प्र. रा. देशमुख यांनी विश्वरूपाविषयी विवेचन केले आहे, ते असे – मुळात विश्वरूप हा दासांचा देव होता, असे ऋग्वेदात सांगितले आहे. त्यावरून सिंधुमुद्रेवरील तीन तोंडाचा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

...र आणि विश्वरूप एकच होत, असे मानायला हरकत नाही. ...र आर्यांनी त्याचा आपला देव म्हणून स्वीकार केला. हल्ली ...ा होत असलेल्या देवांत विश्वरूप नावाचा कोणताही देव ...ही; पण गोसावी, नाथपंथी, अघोरी, शाक्तपंथी, महानुभाव, इ. लोक तीन तोंडे असलेल्या भैरवाची पूजा करतात. हे लोक ...या देवाच्या मूर्तीची पूजा न करता त्याच्या पादुकांची पूजा करतात व त्याला गुरुस्वरूप मानतात. भक्तिमार्गातील बरेच लोक दत्त या त्रिमूर्ती देवाची पूजा करतात. सांप्रत दत्ताचे स्वरूप ...ठ योगिराजाचे आहे. दत्ताचे विश्वरूपाशी बरेच साम्य आहे आणि दोघांचेही स्वरूप भैरवाचे आहे. तेव्हा प्राचीन त्रिमुख ...विश्वरूपाचे रूपांतर त्रिमुख दत्तात होणे अगदी शक्य आहे. [प्रा. च. को.; हि. ध.; सि. ऋ. हिं. सं.]

(२) धर्मशास्त्रावरील एक टीकाकार. याज्ञवल्क्यस्मृतीवरील ...ची बालक्रीडा नामक टीका प्रसिद्ध झाली आहे. या स्मृतीतील व्यवहार या विषयावरची टीका त्रोटक आहे; पण आचार आणि प्रायश्चित या विषयांवरील टीका विस्तृत आहे. आपल्या टीकेत याने ऋग्वेद, शतपथ ब्राह्मण, निरनिराळी उपनिषदे, ...सूत्रे, स्मृती व पुराणे यांतील उतारे दिले आहेत. तो पूर्व-मीमांसा व वेदान्त या शास्त्रांचा विद्वान होता. त्यामुळे त्याच्या टीकेत या दोन दर्शनांतील उतारेही बरेच आढळतात.

शंकराचार्यांच्या चार प्रमुख शिष्यांपैकी सुरेश्वराचार्य व विश्वरूप या दोन व्यक्ती अभिन्न आहेत, असे अनेक विद्वानांचे मत आहे. त्यावरून याचा काळ इ. स. ८०० ते ८२५ या सुमाराचा ठरतो. [हि. ध.; पू. का. भा.; आ. सं. मू.]

विश्वरूप व्रत

एक काम्य व्रत. एखाद्या अष्टमीला किंवा चतुर्दशीला शनिवार आणि रेवती नक्षत्र असेल, ...र त्या दिवशी या व्रताचा प्रारंभ करावा. शिव ही या व्रताची देवता आहे. त्या दिवशी शिवलिंगाला महास्नान घालावे. कापूर, ...री कमळे व पुष्कळ अलंकार लिंगावर ठेवावे, धूप म्हणून ...र लावावा, पायस व तूप यांचा नैवेद्य दाखवावा आणि अश्व ...वा गज आचार्याला दान द्यावा. रात्री जागरण करावे. असा ...व्रताचा विधी आहे. फल – कामनापूर्ती. [हि. ध.]

विश्ववारा

एक वैदिक सूक्तद्रष्टी. ऋग्वेदातील पाचव्या मंडलातील अठ्ठाविसावे सूक्त हिच्या नावावर आहे. हिने आपल्या सूक्तात अग्नीचा महिमा गायला आहे. या सूक्तातील एक ऋचा (५.२८.१) अशी –

समिद्धो अग्निर्दिवि शोचिरश्रेत् प्रत्यङ्ङुषसमुर्विया वि भाति।
एति प्राची विश्ववारा नमोभिर्देवाँ ईळाना हविषा घृताची ।।

अर्थ– प्रज्वलित अग्नी द्युलोकात किरण पसरवतो. उषेच्या समोर विस्तृत शोभा देतो. हवी आणि नमस्कार यांच्यासह देवांची उपासना करणारी विश्ववारा (सर्व वर मिळवून देणारी) स्रुवा दिशांच्या रोखाने जात आहे.

विश्ववारा ही अत्रिकुळात जन्मली होती. [ऋ. आ.]

विश्ववैष्णवराज सभा

एक धार्मिक संस्था. काशी क्षेत्रातील गौडीय मठाने ही सभा स्थापन केलेली आहे. हिच्या शाखा सीतापूर, कलकत्ता, कटक, पुरी, डाक्का, बरद्वान, इ. पस्तीस ठिकाणी असून, अन्य स्थानींही शाखा काढण्याचे काम चालू आहे. या संस्थेचे स्वतःचे मुद्रणालय असून, त्यात संस्कृत, हिंदी व बंगाली भाषांतील पुस्तके व मासिके छापली जातात. चैतन्यप्रभू यांनी निवेदिलेल्या शुद्ध विष्णुभक्तीचा प्रसार करणे, लुप्तप्राय झालेल्या तीर्थस्थानांचा पुनरुद्धार करणे, परदेशात चैतन्यमताचा प्रचार करणे, अहिंसा धर्माचा उपदेश करणे, वैष्णव लोकांत शिरलेल्या निषिद्ध आचारांचे निर्मूलन करण्यासाठी प्रयत्न करणे, इ. उद्देश साध्य करण्यासाठी या सभेची स्थापना केलेली आहे. यासाठी बुद्धिमान लोकांना इथे शिक्षण देऊन तयार करतात व प्रचारकार्यासाठी निरनिराळ्या ठिकाणी पाठवतात. यांच्यापैकी काही लोक परदेशांतही प्रचारकार्य करतात. [सु. वि. को.]

विश्वव्रत

(१) एक तिथिव्रत. प्रत्येक महिन्याच्या दशमीला हे व्रत करतात. व्रतावधी एक वर्ष. व्रतदिनी एकभुक्त राहावे. उद्यापनाच्या वेळी तिळांनी भरलेला एक द्रोण, दहा गायी आणि दहा दिशांच्या सोन्याच्या किंवा चांदीच्या मूर्ती करून त्या दान द्याव्या. फल–पापनाश व सम्राटपदप्राप्ती.

(२) या तिथिव्रताचा आणखी एक प्रकार आहे. व्रतावधी एक वर्ष. विश्वेदेव ही या व्रताची देवता होय. एकादशीला विश्वेदेवांची पूजा करावी. त्यांच्या मूर्ती कमलदलांवर ठेवाव्या आणि त्यांना तुपाची धार, समिधा, दही, दूध व मध अर्पण करावे. हे व्रत वैश्वानरप्रतिपदव्रतासारखे आहे. [हि. ध.]

विश्वसामन आत्रेय

एक सूक्तद्रष्टा. हा अत्रिकुळातला ऋषी असल्याने याला आत्रेय असे म्हटले आहे. ऋग्वेदाच्या पाचव्या मंडलातील बाविसावे सूक्त याने रचले असून, अग्निस्तुती हा या सूक्ताचा विषय आहे. याची एक ऋचा (ऋ. ५.२२.२) अशी –

न्यग्निं जातवेदसं दधाता देवमृत्विजम् ।
प्र यज्ञ एत्वानुषगद्या देवव्यचस्तमः ।।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अर्थ – हे यज्ञीय ऋत्विजांनो, प्रत्येक ऋतूमध्ये पूजिल्या जाणाऱ्या सर्वज्ञ, यज्ञीय अग्नीची स्थापना करून तुम्ही आमचा यज्ञ देवांप्रत नेऊन पोचवा.

हा ऋषी या सूक्तात अग्नीची उपासना करण्याची प्रेरणा देत आहे. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

विश्वामित्र (१) एक सूक्तद्रष्टा वैदिक ऋषी. ऋग्वेदातील तिसरे मंडल याच्या नावावर आहे. वसिष्ठ आणि भरद्वाज यांच्या तोडीचा हा ऋषी आहे. यांचे चरित्र अद्‌भुत आहे. वर्षानुवर्षे खडतर तपश्चर्या करणारा, त्रिशंकूला सदेह स्वर्गाला पाठवण्याची जिद्द धरणारा, प्रतिसृष्टी निर्माण करणारा, बळी देण्यासाठी यूपाला बांधलेल्या शुनःशेपाला सोडवून मांडीवर घेणारा, वसिष्ठाच्या शतपुत्रांची हत्या करणारा, दक्षिणेसाठी हरिश्चंद्र–तारामतीचा छळ करणारा, अशा अनेकविध स्वरूपांत विश्वामित्र आपल्या डोळ्यांपुढे उभा राहतो. त्याच्या या अद्‌भुत चरित्रातले काही अंश वैदिक असून, काही पौराणिक आहेत. वेदांतल्या अंशांतूनच पुराणांत त्याच्या चरित्राचे उपबृंहण झाले आहे. वेदांत उपलब्ध होणारे त्याचे चरित्र असे –

विश्वामित्राचा जन्म कान्यकुब्ज (कनौज) देशात झाला. तो अमावसू वंशातल्या कुशिक राजाचा नातू आणि गाथीचा (पौराणिक गाधी) पुत्र होता. त्याचे जन्मनाम विश्वरथ होते. पुढे तो क्षत्रियाचा ब्राह्मण झाल्यावर लोक त्याला विश्वामित्र म्हणू लागले. आरण्यक ग्रंथांत विश्वामित्र शब्दाची व्युत्पत्ती विश्वाचा मित्र अशी दिली आहे. वस्तुतः विश्वाचा मित्र या अर्थी हा संधी चूक आहे; पण पाणिनीने व्याकरणदृष्टया हे अनियमित रूप मानून, त्याची सिद्धी करण्यासाठी विशेष नियम सांगितला तो असा – मित्र शब्दाच्या मागे जेव्हा विश्व शब्द येतो तेव्हा त्याचा अर्थ ऋषी असा होतो आणि ते रूप विश्वामित्र असे बनते (अष्टा. ६.३.१३०).

विश्वामित्र हा कुशिकांचा पुढारी होता. कुशिक लोक संख्येने मोठे तसेच प्रभुशक्तिसंपन्न होते. सुदास हा भरतजनांचा राजा होता. वसिष्ठ हा त्यांचा पुरोहित होता. सुदासाला राज्याभिषेक वसिष्ठानेच केला होता. पण कुशिकजनांचे साहाय्य आणि सहकार्य मिळवून आपल्या भरतजनांचा अधिक उत्कर्ष साधण्याची महत्त्वाकांक्षा सुदासाच्या मनात उत्पन्न झाली आणि त्याने वसिष्ठाला बाजूला सारून विश्वामित्राला आपले पौरोहित्य दिले. वसिष्ठाला तो अपमान वाटला आणि त्या दिवसापासून वसिष्ठ–विश्वामित्रांचा संघर्ष सुरू झाला. वसिष्ठापेक्षाही त्याचा पुत्र शक्ती हा बापाच्या या पराभवाने अधिक चिडला. त्याने विश्वामित्राचा पराभव करण्याचा प्रयत्न केल्याचा उल्लेखही ऋग्वेदात आढळतो. सुदासाने केलेल्या यज्ञप्रसंगी जो वादविवाद झाला, त्यात शक्तीने विश्वामित्राचा पराजय केला. पण विश्वामित्राने जमदग्नीकडून ससर्परी नामक विद्या मिळवून शक्तीला पराभूत केले आणि अखेर सुदासाच्या सेवकांच्या करवी त्याचा वधही केला (ऋ. ३.५३.१५–१६; तै. सं. ७.४.७.१).

विश्वामित्राने हरप्रकारे साहाय्य करून भरतांचा उत्कर्ष घडवून आणला. सुदास राजाला पंजाबातल्या संवरण राजावर आक्रमण करायचे होते. त्या मोहिमेवर तो सैन्य घेऊन निघाला असता वाटेत त्याला विपाशा (बियास) आणि शुतुद्री (सतलज) या दोन नद्या आडव्या आल्या. त्या नद्या जलौघाने ओसंडून वाहत होत्या. कुठेही त्यांना पायउतार नव्हता. अशा वेळी विश्वामित्राने पुढे होऊन त्या दोन्ही नद्यांना उथळ होण्याविषयी व भरतांना पायउतार देण्याविषयी प्रार्थिले आणि त्यासाठी एक सूक्त रचले. विश्वामित्राचे हे नदीसूक्त भावपूर्ण असून, ते उपमा–दृष्टान्तांनी नटलेलेही आहे. त्यातील काही ऋचा (ऋ. ३.३३.१-४) अशा –

प्र पर्वतानामुशती उपस्थाद् अश्वे इव विषिते हासमाने।
गावेव शुभ्रे मातरा रिहाणे विपाट्छुतुद्री पयसा जवेते॥

अर्थ – वासरांना चाटण्यासाठी धावणाऱ्या दोन शुभ्र गायींप्रमाण अथवा रथापासून सोडलेल्या व म्हणूनच आनंदाने खिंकाळत जाणाऱ्या दोन घोड्यांप्रमाणे विपाशा आणि शुतुद्री या दोन प्रेमपूरित नद्या पर्वतांच्या उतारांवरून आपल्या जलासह वेगाने धावत जात आहेत.

इन्द्रेषिते प्रसवं भिक्षमाणे अच्छा समुद्रं रथ्येव याथः।
समाराणे ऊर्मिभिः पिन्वमाने अन्या वामन्यामप्येति शुभ्रे॥

अर्थ – इंद्राकडून प्रेरित होऊन आणि त्याच्याकडेच पुढच्या मार्गक्रमणाची अनुज्ञा मागून एकाच रथाला जोडल्याप्रमाणे तुम्ही समुद्राकडे जाता. हे शुभ्र नद्यांनो, उसळणाऱ्या लाटांनी तुम्ही भरून जात असता, आपले प्रवाह एकत्र करून तुमच्यापैकी एक दुसरीत बेमालूम मिळून जाते.

अच्छा सिन्धुं मातृतमामयासं विपाशमुर्वीं सुभगामगन्म।
वत्समिव मातरा संरिहाणे समानं योनिमनु संचरन्ती॥

अर्थ – अत्यंत श्रेष्ठ माता जी सिंधू तिच्याजवळ मी प्राप्त झालो आहे. विशाल व सौख्यदायिनी अशा विपाशा नदीजवळ मी गेलो आहे. आपल्या वासरांना चाटण्याची इच्छा करणाऱ्या दोन व्यालेल्या गायींप्रमाणे या दोघी एकाच मार्गाने धावत आहेत.

एना वयं पयसा पिन्वमाना अनु योनिं देवकृतं चरन्ती।
न वर्तवे प्रसवः सर्गतक्तः किंयुर्विप्रो नद्यो जोहवीति॥

अर्थ – (नद्या म्हणतात) जलाने भरून जाऊन देवनियुक्त मार्गांनी आम्ही वाढत आहो. पुढे जाण्याविषयी निश्चित असलेली

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आमची गती कोणालाही रोखता येणार नाही; तर कोणती इच्छा धरून हा विद्वान भक्त आम्हांला पाचारण करीत आहे ?

वसिष्ठाशी वैर असल्याच्या संदर्भातही विश्वामित्राने काही ऋचा रचल्या असून, त्या 'वसिष्ठद्वेषिणी' म्हणून प्रसिद्ध आहेत (ऋ. ३.५३.२०-२४). वसिष्ठ गोत्रातले वैदिक आजही त्या ऋचा म्हणत नाहीत. दुर्गाचार्य हा ऋग्वेदाचा एक भाष्यकार होता. तो वसिष्ठ गोत्राचा असल्यामुळे त्याने त्या ऋचांवर भाष्य लिहिले नाही.

पुढे विश्वामित्राने सुदासाकडून अश्वमेध करवला आणि त्याचा सर्व प्रकारे उत्कर्ष केला. विश्वामित्राला आपल्या या पराक्रमी कृत्याचा अभिमानही बराच होता. तो एका ठिकाणी आत्मविश्वासपूर्वक म्हणतो (ऋ. ३.५३.१२) –

विश्वामित्रस्य रक्षति ब्रह्मेदं भारतं जनम् ।

अर्थ – विश्वामित्राचे हे ब्रह्म म्हणजे सूक्त भरतजनांचे रक्षण करीत आहे.

शुनःशेपाचे आख्यान – शुनःशेप हा एक ब्राह्मण तरुण, पुत्र म्हणून विश्वामित्राच्या जीवनात आला. त्याची कथा ऐतरेय ब्राह्मणात (७.१३–१८) आली आहे, ती अशी –

हरिश्चंद्र नावाचा एक राजा होता. त्याला पुत्रसंतान नव्हते. त्याने वरुणाची प्रार्थना केली, की मला तू मुलगा दिलास, तर तोच मी तुला बळी म्हणून देईन. वरुणाच्या कृपेने त्याला पुत्र झाला. त्याचे नाव त्याने रोहित ठेवले. पुढे पुत्रमोहात सापडून त्याने वरुणाला बळी देण्याची चालढकल सुरू केली. रोहित मोठा झाला, तरुण झाला, तरी आपल्याला त्याचा बळी मिळत नाही, असे पाहून वरुण रागावला. त्याने हरिश्चंद्राला उदर-रोग निर्माण केला. आपला बाप रोगग्रस्त झालेला पाहून वरुणाला बळी देण्याची एक निराळीच कल्पना रोहिताने काढली.

रोहित अजीगर्त ऋषीच्या आश्रमात गेला. त्याला तीन पुत्र होते. त्यापैकी मधला पुत्र शुनःशेप हा त्याने बळीसाठी अजीगर्ताकडून विकत घेतला. त्याला आणून बळी देण्यासाठी यूपाला बांधले. शुनःशेप मृत्युभयाने गयावया करू लागला. विश्वामित्र तिथे होता. त्याला शुनःशेपाची ती अवस्था पाहवेना. त्याचे मन करुणेने द्रवले. त्याने शुनःशेपाला यूपावरून सोडले, स्वतःचा ज्येष्ठ पुत्र म्हणून त्याला मांडीवर बसवले व देवरात असे त्याचे नाव ठेवले.

विश्वामित्राला शंभर पुत्र होते. त्यांत मधुच्छंदा नावाचा पुत्र मधला होता. 'देवराताला जेष्ठ बंधू माना' असे बापाने त्यांना सांगताच मधुच्छंदाच्या वरच्या पुत्रांनी ते नाकारले, तेव्हा विश्वामित्राने त्यांना शाप दिला, की 'तुम्ही म्लेच्छ बनून अभक्ष्यभोजी व्हाल.' विश्वामित्राचे ते शापित पुत्र पुढे आंध्र, शबर, पुलिंद, पुंड्र, मूतिब, इ. दस्युजमातींचे जनक बनले.

मधुच्छंदा व त्याच्या खालच्या पाच पुत्रांनी विश्वामित्राच्या आज्ञेनुसार देवराताला ज्येष्ठ मानले. त्यांच्यावर प्रसन्न होऊन विश्वामित्राने त्यांना आशीर्वाद दिला –

'माझ्या पुत्रांनो, तुम्ही देवराताचे अनुचर व्हा. तो तुम्हांला सत्याचा मार्ग दाखवील. तो आमच्या कुलाच्या विद्येचा दायभागी होईल. तुम्हाला धन, यश आणि कीर्ती प्राप्त होईल.'

शुनःशेपाच्या वरील आख्यानावरून विश्वामित्र हा नरबलीच्या विरुद्ध होता, असे अनुमान निघते. या अनुमानाचे विशदीकरण प्रा. सदाशिव आठवले यांनी केले आहे, ते असे –

ही शुनःशेपकथा आणि इतर उल्लेख ह्या सगळ्यांचा सारासार विचार करता एवढे उघड दिसते की, विश्वामित्राच्या काळी नरमेध सर्रास करीत नसत; पण ती प्रथा बंद पडलेली मात्र नव्हती. त्याविरुद्ध आवाज उठत होते, नापसंती व्यक्त केली जात होती. धंदेवाईक पुरोहितही कुरकुरू लागले होते. तथापि वेळप्रसंगी नरमेध करायला ते मागेही सरले नसते. कदाचित पुष्कळदा हा नरमेध तत्कालीन धर्मधुरीणांच्या प्रामाणिक निष्ठेतून निघालेला असेल. तरीपण विश्वामित्रासारखा थोर पुरुष ह्या धर्ममार्तंडाहून कितीतरी अधिक थोर. विश्वामित्र प्रस्थापित धर्म आणि कर्मकांड ह्यांच्या मुळाशी जातो. तो भूतदयेचा नवा धर्म सांगतो. धर्माचा आधार मानवता आणि धर्माचा हेतू मानवाचे कल्याण हे सुस्पष्ट करतो. हरिश्चंद्रासारख्या राजाच्या यज्ञमंडपात वसिष्ठांसारख्या प्रस्यासमोर शुनःशेपाला सोडून देण्याचा हट्ट धरतो आणि तिथे तो यशस्वीही होतो. प्राचीन काळात नरहत्येला विरोध करणारा विश्वामित्र हा पहिलाच सत्पुरुष असेल असे नाही; तरी पण त्याच्या काळापर्यंत ही प्रथा बंद पडलेली दिसत नाही. त्याला त्या अमानुष चालीविरुद्ध आवाज उठवावा लागला. त्याने तो उठविला आणि अपूर्व असे यश मिळवले.

पौराणिक विश्वामित्र – महाभारत आणि पुराणे यांत विश्वामित्राची कथा बरीच अद्भुत आणि अतिशयोक्त झाली आहे. विश्वामित्र हा क्षत्रिय होता. त्याला ब्राह्मण बनण्याची इच्छा उत्पन्न झाली. त्यासाठी त्याने भगीरथ प्रयत्न केले. या कामी त्याला वसिष्ठाचा प्रखर विरोध झाला. पण सरते शेवटी त्याने आपली ब्रह्मर्षी होण्याची महत्त्वाकांक्षा पूर्ण केली. विश्वामित्राला हे ब्रह्मर्षिपद प्राप्त झाल्याचे उल्लेख वैदिक संहिता आणि ब्राह्मणे यांतही आढळतात (का. सं. १६. १९; मै. सं. २. ७. १९; तै. सं. २. २. १. २; ऐ. ब्रा. ६. १८१ इत्यादी). विश्वामित्राचे हे वर्णान्तर प्राचीन काळी एक महत्त्वाची घटना ठरली होती वरील वैदिक उल्लेखांवरून सूचित होते.

वाल्मीकिरामायण व महाभारत या ग्रंथांतही विश्वामित्राच्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

वर्णान्तराची कथा विस्ताराने दिलेली आहे. तिचा सारांश असा—

राजा विश्वामित्र एकदा शिकारीला गेला असता वसिष्ठाच्या आश्रमात पोचला. वसिष्ठाजवळ नंदिनी नावाची कामधेनू होती. तिच्या साहृयाने वसिष्ठाने विश्वामित्राचे राजेशाही आतिथ्य केले. 'एवढे राजभोग तुम्ह्याकडे कुठून आले ?' असे विश्वामित्राने विचारताच वसिष्ठाने नंदिनीकडे बोट दाखविले. विश्वामित्राने ती धेनू पाहिली आणि त्याला तिचा लोभ उत्पन्न झाला. त्याने ती गाय असंख्य गायींच्या मोबदल्यात वसिष्ठाकडे मागितली; पण वसिष्ठाने त्याची मागणी नाकारली. विश्वामित्र आपले सगळे राज्य द्यायलाही तयार झाला; पण वसिष्ठाचा नकार कायम राहिला. शेवटी विश्वामित्राने बलप्रयोग करायचे ठरविले. त्याने आपल्या बरोबरच्या शिकारी सैन्याला ती धेनू ओढून नेण्यास सांगितले. ते धेनूला ओढून नेऊ लागताच एक आश्चर्य घडले. त्या धेनूच्या अंगातून शक, यवन, पल्हव, बर्बर, किरात, इ. म्लेंच्छ सैनिक बाहेर पडले आणि त्यांनी विश्वामित्राच्या सैनिकांचा पराभव केला.

तो पराभव विश्वामित्राच्या जिव्हारी झोंबला. त्याने वसिष्ठाचा घात करण्यासाठी अस्त्रविद्या संपादून त्या अस्त्रांचाही प्रयोग वसिष्ठावर केला; पण कशाचाच उपयोग झाला नाही. त्या वेळी त्याला साक्षात्कार झाला, की क्षत्रबलापेक्षा ब्रह्मबल श्रेष्ठ आहे. लगेच त्याने क्षत्रियत्वाचा त्याग करून ब्राह्मण व्हायचे ठरविले. ही गोष्ट तपानेच सिद्ध होणार होती. म्हणून तो रुषंग नामक तीर्थावर गेला. तिथे त्याने कितीतरी काळ घोर तप केले आणि सरते शेवटी तो ब्राह्मण बनला (वा. रा. १.५१–५६; म. भा. वन. ८५).

पण ही कथा कालदृष्टया असंगत असल्याचे सांगताना श्री. चित्रावशास्त्री म्हणतात –

विश्वामित्राचे ज्याच्याशी वैर झाले, तो वसिष्ठ देवराज वसिष्ठ होता. नंदिनी धेनूचा पालक वसिष्ठ अथर्वानिधी होता. आणि तो विश्वामित्राच्या आधी बराच काल होऊन गेला. त्यामुळे ही कथा अनैतिहासिक ठरते.

पण हे ब्रह्मर्षिपद विश्वामित्राला अल्प श्रमात मिळाले नाही. तो ब्रह्मर्षी झाला; पण तरीही त्याचे काम, क्रोध, मोह, इ. विकार कमी झाले नाहीत. त्यामुळे तत्कालीन ब्राह्मण त्याला ब्रह्मर्षी म्हणायला संकोच करीत, हे विश्वामित्राला समजले. त्याने वरील विकारांवर विजय मिळवण्यासाठी पुन्हा एकवार घोर तप केले. त्याच्या तपस्येचा भंग करण्यासाठी देवेंद्राच्या आज्ञेने रंभा नामक अप्सरा त्याच्याकडे आली; पण विश्वामित्र सावध होता. त्याने तिला शापून शिळा बनविले.

महाभारतात त्याच्या ब्रह्मर्षिपदाची साक्ष देणारी आणखी एक कथा आहे, ती अशी – एके दिवशी विश्वामित्राची सत्वपरीक्षा पाहण्यासाठी धर्म नामक ऋषी त्याच्याकडे आला. त्याने विश्वामित्राकडे भोजन मागितले. विश्वामित्राने चुलीवर भात शिजत ठेवला; पण एवढ्यात धर्म ऋषी तिथून अदृश्य झाला. शंभर वर्षांनी तो परत तिथे आला, तर विश्वामित्र न जेवता अतिथीची वाट पाहत उभा. धर्म ऋषीला त्याची ही तितिक्षा प्रशंसनीय वाटली. त्याने प्रसन्न मनाने विश्वामित्राला ब्रह्मर्षी म्हटले (म. भा. उद्योग. १०४.७–१८). ब्रह्मर्षी झाल्यावर त्याला इंद्राबरोबर सोमपान करण्याचा अधिकार व इंद्राचा कृपाप्रसाद प्राप्त झाला.

त्रिशंकूचे आख्यान – ब्राह्मणत्व मिळाल्यानंतर विश्वामित्राने बायकामुलांना कोसल देशातल्या आपल्या आश्रमात ठेवले आणि तो पुनश्च तपस्येसाठी सागरानूप तीर्थाकडे निघून गेला. त्यानंतर अयोध्येत एक वेगळे राजकारण घडले. अयोध्येचा राजपुत्र सत्यव्रत (पुढच्या कालातला त्रिशंकू) हूड प्रकृतीचा होता. त्याच्या पित्याने त्याला हद्दपार केले. त्याच्या जागी वसिष्ठ राज्यकारभार पाहू लागला. त्रिशंकू अयोध्येनजीकच्या चंडाल वस्तीत राहू लागला.

याच सुमारास अयोध्या प्रांतात मोठा दुष्काळ पडला. सर्वांबरोबर विश्वामित्राची पत्नी आणि मुले अन्नावाचून तडफडू लागली. या प्रसंगात त्रिशंकूने त्यांना अन्नपाणी पोचवले आणि त्यांचे प्राण वाचविले. बारा वर्षांनी विश्वामित्र तपस्येहून परत आल्यावर त्याला ही गोष्ट समजली. सहाजिकच त्रिशंकूविषयी त्याला कृतज्ञता वाटली. पुढे त्या दोघांची भेट झाल्यावर त्रिशंकूने आपली सारी हकीकत विश्वामित्राला सांगितली. विश्वामित्राने त्याला पुनश्च राज्याधिष्ठित करायचे ठरवले. तो त्या प्रयत्नाला लागला. त्या कार्यात त्याला वसिष्ठाशी बराच संघर्ष करावा लागला; पण त्यात विश्वामित्र विजयी झाला. वसिष्ठाला हतप्रभ करून त्याने त्रिशंकूला अयोध्येच्या गादीवर बसविले. त्याच्याकडून अनेक यज्ञही करून घेतले. त्रिशंकूला सदेह स्वर्गाला जाण्याची आकांक्षा होती. तीही त्याने पुरी केली. या कामी त्याला इंद्राशीही लढा द्यावा लागला; पण या सर्वांत विश्वामित्र पूर्ण विजयी झाला.

या बाबतीत पार्जिटर या पुराणसंशोधकाचे मत असे– त्रिशंकू सदेह स्वर्गाला गेला ही कथा केवळ कल्पित आहे. त्याने दक्षिण दिशेच्या एका तारकासमूहाला त्रिशंकू असे नाव दिले आणि अशा प्रकारे त्रिशंकूच्या जीविताचे स्मारक केले.

पण तेवढ्याने वसिष्ठ नामोहरम झाला नाही. तो केवळ दबून राहिला होता आणि आतून विश्वामित्राविरुद्ध कारस्थाने रचीत होता. त्रिशंकूचा पुत्र हरिश्चंद्र गादीवर आल्यानंतर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

ही आपणांस त्याचे पौरोहित्य मिळेल अशी वसिष्ठाला आशा होती; पण हरिश्चंद्रानेही विश्वामित्रालाच पुरोहित केले. पुढे त्याच्या देखरेखीखाली हरिश्चंद्राने राजसूय यज्ञ आरंभला; पण अयोध्येतल्या पौर-जनांना हाताशी धरून वसिष्ठाने तो यज्ञ हाणून पाडला. या प्रसंगी मात्र वसिष्ठ वरचढ ठरला. हरिश्चंद्राचा तो यज्ञ पुढे वसिष्ठाच्या देखरेखीखाली पार पडला. त्या यज्ञात हरिश्चंद्राने सर्व ऋषींना दक्षिणा दिली; पण विश्वामित्राला मात्र दिली नाही. विश्वामित्राला तिथे हार खावी लागली. त्या अपमानित अवस्थेत त्याने अयोध्येच्या राजकुलाचे पौरोहित्य सोडले. तो पुन्हा तप करण्यासाठी पुष्कर तीर्थाकडे निघून गेला.

वसिष्ठ – विश्वामित्र संघर्षाच्या आणखीही काही कथा मार्कंडेय पुराणात दिल्या आहेत, त्या अशा–

स्वप्नात राज्यदान करणाऱ्या हरिश्चंद्राला विश्वामित्राने दक्षिणेसाठी अनन्वित छळले. त्याने पक्षी बनून वसिष्ठावर आक्रमण केले. त्याने वसिष्ठाचे शंभर पुत्र मारले.

त्रिशंकूला सदेह स्वर्गात येण्यास ब्रह्मदेवाने विरोध केला. तेव्हा तो त्या सृष्टिकर्त्यावरही चिडला. त्याने प्रतिज्ञा केली– "मी नवी प्रतिसृष्टी निर्माण करीन; त्या सृष्टीत नवा स्वर्ग रचवीन, नवा इंद्र तयार करीन किंवा इंद्रावाचून स्वर्ग चालवीन. आणि त्या स्वर्गात त्रिशंकूला सदेह पोचता करीन." म्हणून त्याने नवी प्रतिसृष्टी निर्माण करण्याचे काम सुरू केले. प्रतिसृष्टी याचा अर्थ जे जे वस्तुजात विधात्याच्या सृष्टीत असेल, ते ते तसेच वेगळे निर्माण करणे. विश्वामित्र अशी एकेक वस्तू स्वतःची निर्माण करीत चालला. सगळे देव त्यामुळे घाबरले. त्यांनी विधात्याला प्रार्थिले, की "तू विश्वामित्राला प्रतिसृष्टीच्या कार्यापासून परावृत्त कर." विधात्याने विश्वामित्राला तसे सांगितले. विश्वामित्राने ते मानले; पण त्याने विधात्याला सांगितले, की "झाली एवढी माझी प्रतिसृष्टी सुरक्षित राहायला हवी." विधाता म्हणाला, "तुझी प्रतिसृष्टी अक्षय्य राहील; पण तिच्यात यज्ञ कधीच होणार नाहीत." विश्वामित्राने ते मान्य करून आपले प्रतिसृष्टीचे कार्य थांबविले. ही कथा रामायणाच्या बालकांडात आणि स्कंदपुराणात आलेली आहे. विश्वामित्राच्या या प्रतिसृष्टीचा एक नवा अर्थ प्रा. सदाशिव आठवले यांनी सांगितला आहे, त्याचा सारांश असा –

"विश्वामित्र खरोखरीच नवी सृष्टी घडवू लागला म्हणजे विचारांची, कल्पनांची नवी दुनिया तो त्रिशंकूला दाखवू लागला. यज्ञाने न मिळणाऱ्या स्वर्गाबद्दलची खंत सोडून दुसरा स्वर्ग पाहण्याची, अन्य तऱ्हेने स्वर्गसुख भोगण्याची नवी दृष्टी त्याने त्रिशंकूला दिली. एवंच प्रतिसृष्टी म्हणजे एक नवे तत्त्वज्ञान, निराळी कल्पनासृष्टी. इंद्रादी देवता आणि त्यांना खूष करण्यासाठी निर्माण झालेली यज्ञसंस्था, त्यांवर आधारलेल्या जगताहून निराळे विचारविश्व निर्माण करण्याचा एक प्रयत्न. या प्रयत्नात विश्वामित्राची स्वतंत्र बुद्धी स्पष्ट दिसते. त्याचे धाडस वाखाणण्यासारखे आहे."

शकुंतलेचा जन्मदाता विश्वामित्र व रामाला यज्ञरक्षणासाठी घेऊन जाणारा विश्वामित्र हे दोघे मूळ वरील विश्वामित्राहून भिन्न समजायला हवे.

विश्वामित्राचे आश्रम – विश्वामित्राचे एकूण चार आश्रम पुराणांत दिसतात. एक ताटका वनाजवळ, दुसरा सरस्वतीच्या पश्चिम तीरावर, तिसरा वेदगर्भपुरी येथे आणि चौथा कौशिकी नदीच्या तीरावर होता.

विश्वामित्रपरिवार – विश्वामित्राला रेणू, शालावती, सांकृती, माधवी आणि दृषद्वती अशा भार्या होत्या (हरिवंश.१.३२, ब्रह्मपु. १०, वायु पु. ९१.९९–१०३). विश्वामित्राच्या पुत्रांची नावे महाभारताच्या अनुशासन पर्वात दिलेली आहेत (४.४९–५९). इतर अनेक पुराणांतून विश्वामित्राच्या पुत्रांच्या वेगवेगळ्या सूची आढळतात.

भार्गवकुलातल्या ऋचीकाची भार्या सत्यवती ही विश्वामित्राची आत्या होती. त्यामुळे तिचा पुत्र जमदग्नी हा विश्वामित्राचा आतेभाऊ ठरतो. विश्वामित्राने आपल्या ५० पुत्रांना शाप दिल्यावरून त्यांच्या कुलात पुढील दोन शाखा निर्माण झाल्या– (१) कुशिकशाखा– ही विश्वामित्राच्या कृपापात्र पुत्रांची आणि (२) विश्वामित्रशाखा– ही शापित पुत्रांची. विश्वामित्राच्या कुलात उदुंबर, कारूजक, कौशिक, गालव, इ. २९ गोत्रे निर्माण झाली आहेत. या गोत्रांत काही गोत्रे त्रिप्रवरी व काही द्विप्रवरी आहेत. [प्रा. च. को.; ऋ. आ.; नवभारत, डिसेंबर १९५९; सी. ऋ.]

(२) एक धर्मशास्त्रकार. वृद्ध याज्ञवल्क्याने धर्मशास्त्रकारांच्या यादीत याचे नाव दिले असून, अपरार्क, स्मृतिचंद्रिका, कालविवेक, इ. ग्रंथांमध्ये विश्वामित्राचे श्लोक उद्धृत केले आहेत. ते श्लोक व्यवहारप्रकरण सोडून इतर म्हणजे पंचमहापातके, श्राद्धे, प्रायश्चित्ते, इ. सर्व विषयांवर आहेत. विश्वामित्राचे पंचमहापातकाविषयीचे श्लोक वारंवार उद्धृत केले जातात. त्यांचा अर्थ असा आहे –

ब्राह्मणांचा वध करू नये. ब्राह्मणांनी सुरापान करू नये. ब्राह्मणांचे सुवर्ण कोणीही हरण करू नये. गुरुपत्नीगमन करू नये. आणि तसे करणाऱ्यांचा संसर्गही टाळावा.

विश्वामित्राने धर्म शब्दाची व्याख्या दिली आहे, ती अशी –

यमार्याः क्रियमाणं तु शंसन्त्यागमवेदिनः ।

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

स धर्मो यं विगर्हन्ति तमधर्मं प्रचक्षते ।।

अर्थ – वेदवेत्ते आचार्य ज्या कृत्यांची प्रशंसा करतात, त्याला धर्म व ज्या कृत्यांची निंदा करतात त्याला अधर्म म्हणतात.

विश्वामित्राची दुसरी एक स्मृती श्लोकबद्ध असून, तिच्यात नऊ अध्याय आहेत. [हि. ध.]

विश्वाराध्य वीरशैवांचा एक आचार्य. याने दुर्वास मुनीला आपला शिष्य बनवले होते. नेपाळ, काश्मीर, इ. देशांतल्या राजांना याने शिवतत्त्वाचा उपदेश केला आणि शेवटी विश्वनाथलिंगात स्वतःला विलीन केले. [वी. शै. र.]

विश्वेदेव एक यज्ञीय देवतासमूह. ऋग्वेदात विश्वेदेवांना उद्देशून चाळिसाहून अधिक सूक्ते आहेत. विश्वेदेव याचा शब्दशः अर्थ सर्व देव असा आहे. हा एक काल्पनिक देवतासमूह असून, यज्ञात तो सर्व देवतांचे प्रतिनिधित्व करतो, असे मानलेले आहे. वेदांतील ज्या मंत्रात अनेक देवतांचा संबंध येतो आणि जिथे विशिष्ट नावाने देवतेचा उल्लेख केलेला नसतो, तिथे विश्वेदेव ही देवता आहे, असे समजतात.

काही विद्वानांच्या मते, ऋग्वेदातील आप्रीसूक्त विश्वेदेवांना उद्देशूनच रचलेले आहे. त्यात सुसमिद्ध, तनूनपात्, नराशंस, इला, बर्ही, उषा व रात्री, होता नामक दोन अग्नी, सरस्वती, भारती; तसेच त्वष्टा, वनस्पती आणि स्वाहा या देवतांचा निर्देश आहे. ऋग्वेदातील विश्वेदेवांना अनुलक्षून असणाऱ्या इतर सूक्तांत त्वष्टा, ऋभू, अग्नी, पर्जन्य, पूषा, वायू, बृहद्दिवा, इ. देवदेवतांचा व अहिर्बुध्न्यादी सर्पांचा समावेश आहे.

ऐतरेय ब्राह्मणात (३९.८.२१), आविक्षित कामप्री राजाच्या यज्ञात विश्वेदेव हे यज्ञीय सभासद असल्याचा उल्लेख आहे.

विश्वेदेवांचे उत्क्रांत रूप पुराणांत दिसते. तिथे त्यांना स्पष्टपणे देवतासमूह असे म्हटले आहे. वायुपुराणात त्यांना दक्षकन्या विश्वा व धर्म ऋषी यांची संतती म्हटले असून, त्यांची संख्या दहा आहे, असे सांगितले आहे. राज्यप्राप्तीसाठी लोक त्यांची उपासना करीत, असेही सांगितलेले आहे.

निरनिराळ्या पुराणांत यांची ऋतू, दक्ष, श्रव, सत्य, काल, काम, मुनी, पुरूरवा, आर्द्रवास, रोचमान, वसू, कुरज, मनुज, बीज, धुरी, लोचन, इ. नावे दिलेली आढळतात. महाभारतातही यांची नावे दिलेली असून, भुवर्लोक हे त्यांचे निवासस्थान असल्याचे सांगितले आहे.

विश्वेदेव हे स्वतः संततिहीन होते. ते इंद्राची उपासना करीत असत. देवासुरसंग्रामात त्यांनी देवांच्या बाजूने भाग घेतला होता. हिमालय पर्वतावर यांनी पितरांची व ब्रह्माची उपासना केली. त्यामुळे ते प्रसन्न झाले आणि त्यांनी यांना, मनुष्यांच्या श्राद्धात तुम्हांला पूजेचा अग्रमान मिळेल, असा वर दिला.

निरनिराळ्या श्राद्धांत निरनिराळ्या विश्वेदेवांना प्राधान्य देतात. पार्वण श्राद्ध – पुरूरव आणि आर्द्रव. महालय श्राद्ध – धूरी व लोचन. नांदी श्राद्ध – सत्य व वसू. जीवत्पितृक श्राद्ध – ऋतू व दक्ष.

भागवतपुराणात यांना वर्तमानकालीन वैवस्वत मन्वंतरातील देवता असे म्हटले आहे. विश्वामित्राच्या शापामुळे यांना द्रौपदीच्या पाच पुत्रांच्या रूपाने जन्म घ्यावा लागला, असे मार्कंडेयपुराणात (६२.६९) सांगितले आहे. [प्रा. च. को.]

विश्वेश्वरभट्ट (इ. स. चे १४ वे शतक) एक धर्मशास्त्रकार. हा कौशिकगोत्री पेलिभट्टाचा मुलगा होय. याच्या आईचे नाव अंबिका असे होते. व्यासारण्य नावाचे मुनी याचे गुरू असून, तो द्रविडदेशाचा रहिवासी असावा असे म्हणतात. विश्वेश्वराने सुबोधिनी हा ग्रंथ रचल्यावर तो राजाश्रयासाठी उत्तरेकडे गेला असता, त्याला मदनपाल नामक राजाने आश्रय दिला. मदनपाल काष्ठ घराण्यातला राजा असून, त्याचे राज्य यमुनेच्या काठी होते. तो स्वतः विद्वान असून, विद्वानांचा चाहता होता. त्यानेही अनेक ग्रंथ रचले आहेत.

विश्वेश्वराने मदनपारिजात, तिथिनिर्णयसार, स्मृतिकौमुदी व सुबोधिनी असे चार ग्रंथ रचले. मदनपारिजातात नऊ स्तबक असून, त्यात पुढील विषयांची चर्चा आहे – ब्रह्मचर्य, गृहस्थधर्म, नित्यकर्मे, गर्भाधानापासून पुढचे संस्कार, जननमरणाशौच, निरनिराळ्या वस्तूंची शुद्धी, श्राद्ध, दायभाग व प्रायश्चित्त.

यातील दायभाग हा मिताक्षरेचे अनुकरण करून लिहिलेला आहे. स्मृतिकौमुदीचे चार कलोल्लास असून, प्रत्येक कलोल्लासात किरण नावाचे विभाग आहेत. शूद्रांचे धर्म सांगणे हा या ग्रंथाचा विषय आहे. त्यात शूद्रांच्या जाती, त्यांना धार्मिक कृत्ये करण्याचा अधिकार आहे की नाही, याचा विचार; विवाह, विवाहाचे प्रकार; त्यांची नित्यकर्मे, इ. गोष्टींची चर्चा आहे. त्याचा सुबोधिनी हा ग्रंथ म्हणजे विज्ञानेश्वराच्या मिताक्षरेवरील भाष्य होय.

उत्तर भारतातील प्रमाणभूत धर्मशास्त्रकारांच्या मालिकेत याला मानाचे स्थान आहे. [हि. ध.]

विश्वेश्वरय्या, मोक्षगुंडम (इ. स. १८६१ – १९६२) भारतरत्न, सुप्रसिद्ध स्थापत्यविशारद आणि औद्योगिक युगाचे अग्रदूत. म्हैसूर राज्यातील कोलार जिल्ह्यात असलेल्या मदनहळ्ळी नामक एका लहानशा गावी १५ सप्टेंबर १८६१ रोजी यांचा जन्म झाला. यांचे पूर्वज

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आंध्र प्रदेशातील मोक्षगुंडम या गावाचे रहिवासी होते. पण पुढे ते मदनहळ्ळी इथे येऊन स्थायिक झाले. विश्वेश्वरय्या यांचे वडील पं. श्रीनिवासशास्त्री हे फार मोठे विद्वान ब्राह्मण होते. त्यांची आई व्यंकचम्मा ही सुद्धा थोर साध्वी, धर्मनिष्ठ आणि धार्मिक होती. घरातील कामधाम आटोपल्यावर राहिलेला मोकळा वेळ ती ईश्वरभजनात घालवी. घरात व्रतवैकल्ये, पूजापाठ वगैरे नेहमी चालू असल्यामुळे, विश्वेश्वरय्यांच्या मनावर लहानपणी धार्मिकतेचे व शुद्ध आचारविचारांचे संस्कार झाले. त्यांच्या घरची आर्थिक स्थिती अगदी बेताचीच होती.

विश्वेश्वरय्या साधारण पाच वर्षांचे असताना त्यांचे वडील मदनहळ्ळी सोडून जवळच असलेल्या चिकवल्लापूर गावी राहायला गेले. तिथेच यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. त्यांची कुशाग्र बुद्धी, नम्रता व शिस्त पाहून शाळेतील गुरुजी त्यांच्यावर खूष असत. शाळेत शिकत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे शालेय शिक्षण संपल्यावर उच्च शिक्षण कसे घ्यावे, असा प्रश्न त्यांच्यापुढे उभा राहिला; पण त्यांच्या आईने आलेल्या संकटावर मात करून विश्वेश्वरय्यांना उच्च शिक्षणासाठी बंगलोरच्या सेंट्रल कॉलेजमध्ये दाखल केले.

बंगलोर येथे कॉलेजशिक्षण घेत असताना विश्वेश्वरय्यांना खूप त्रास सोसावा लागला. जवळ पैसा नसल्यामुळे त्यांचे राहण्याचे व खाण्यापिण्याचे खूपच हाल झाले. पण तशाही परिस्थितीत त्यांनी नेटाने शिक्षण पुढे चालू ठेवले. शिक्षणाचा भार आपल्या आईवर पडू नये, म्हणून त्यांनी एक शिकवणी धरली. त्यांची बुद्धिमत्ता व उत्तम वागणूक पाहून कॉलेजचे प्राचार्य श्री. चार्ल्स यांनीही त्यांना बरेच साहाय्य केले. इ. स. १८८० मध्ये ते उत्तम गुण मिळवून बी. ए. च्या परीक्षेत उत्तीर्ण झाले. त्यानंतर श्री. चार्ल्स यांनी त्यांना इंजिनियर होण्याचा सल्ला दिला. त्यासाठी त्यांनी पुणे येथील इंजिनियरिंग कॉलेजच्या प्राचार्यांना ओळखपत्र देऊन त्यांना पुण्याला धाडले. पुण्याच्या इंजिनियरिंग कॉलेजात त्यांना लगेच प्रवेश मिळाला. कॉलेजात त्यांना नादारीही मिळाली. कॉलेजच्या या वर्षांत त्यांनी खूप झटून अभ्यास केला. त्याचे फळही त्यांना मिळाले. इ. स. १८८३ साली इंजिनियरिंगच्या उच्च परीक्षेत ते प्रथम श्रेणीत प्रथम आले. एवढेच, त्या वेळच्या मुंबई इलाख्यातही ते पहिले आले.

त्यानंतर मुंबई सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात त्यांना साहाय्यक इंजिनियर म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे त्यांच्या हालअपेष्टा संपल्या आणि आर्थिक चिंताही मिटल्या. हाती घेतलेल्या कामाची आधी संपूर्ण माहिती करून घेणे आणि आपल्या बुद्धिसामर्थ्याच्या जोरावर ते व्यवस्थित पार पाडणे, यामुळे नोकरीत त्यांचा चांगला जम बसला.

इ. स. १८९३ साली त्यांच्याकडे खानदेशमधल्या एका नाल्यावर पाइप सायफन बसविण्याचे काम सोपवण्यात आले. हे काम कौशल्याचे व अवघड होते. मोठमोठ्या इंजिनियरांनाही ते जमले नव्हते. विश्वेश्वरय्यांना ते आव्हानच वाटले. अनेक अडचणींना तोंड देऊन आणि अहोरात्र काम करून त्यांनी तो पाइप सायफन व्यवस्थित बसवला. त्यांच्या या कामाबद्दल वरिष्ठांनी त्यांना धन्यवाद दिले.

त्याच वर्षी सिंध प्रांतातील सक्कर शहराची पिण्याच्या पाण्याची योजना साकार करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यात आली. आधी तिथे सिंधू नदीच्या किनाऱ्यावर एका उंच डोंगरावर एक जलाशय बांधलेला होता. नदीचे पाणी मोठ्या पंपांनी या जलाशयात आणून साठवीत आणि तिथून नळांनी ते सक्कर शहराला पुरवीत. सिंधू नदीचे पाणी वाळूमिश्रित, घाणेरडे व गढूळ होते. म्हणून ते फिल्टर करणे आवश्यक होते; पण त्याचा खर्च सक्कर नगरपालिकेला झेपणारा नव्हता. म्हणून नगरपालिकेचा फिल्टरयोजनेला विरोध होता. तेव्हा तिथे निराळी योजना आखणे आवश्यक होते. म्हणून विश्वेश्वरय्यांनी त्या स्थानाची बारकाईने पाहणी केली. विचार करता करता त्यांना एक नवी कल्पना सुचली. त्यांनी सिंधू नदीच्या पात्रातच, तिच्या काठाजवळ एक गोल व खोल विहीर खोदून काढली आणि त्या विहिरीच्या तळापासून, नदीच्या प्रवाहाखाली एक बोगदा खणला. त्यामुळे विहिरीत भरपूर शुद्ध पाणी साचू लागले. ज्या वेळी हे काम यशस्वी रीत्या पूर्ण झाले, तेव्हा विश्वेश्वरय्या यांची कीर्ती भारतात सर्वत्र पसरली.

इ. स.१९०४ साली त्यांना सुपरिंटेंडिंग इंजिनियर म्हणून बढती मिळाली. त्यानंतर त्यांनी शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या पद्धतीत सुधारणा केल्या. कमीत कमी पाण्यात अनेक तऱ्हेच्या पिकांना पाणीपुरवठा करण्याची पद्धती त्यांनी सुरू केली. याला ब्लॉक सिस्टिम असे नाव आहे. सुरुवातीला सरकारी अधिकारी व शेतकरी या दोघांनीही या योजनेला विरोध केला. पण विश्वेश्वरय्यांनी हिंमत धरून आपली योजना राबवली आणि यशस्वी करून दाखवली. पुण्याजवळच्या खडकवासला धरणाला लावलेले, आपोआप उघडणारे कळसूत्री दरवाजे त्यांनीच प्रथम तयार केले. धरणातील पाणी विशिष्ट उंचीहून वर चढले की, दरवाजे उघडतात व कमी झाले की ते बंद होतात. नंतर त्या कल्पनेचा उपयोग पनामा कालव्यातही करण्यात आला.

एडन येथे इंग्रजांच्या सैन्याची फार मोठी छावणी होती. त्याकरता पिण्याच्या पाण्याची सोय करायची होती म्हणून एडनच्या सरकारने भारत सरकारकडे एका हुशार व कल्पक इंजिनियरची मागणी केली. मोठेमोठे इंजिनियर बाजूला

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सारून विश्वेश्वरय्यांची या कामासाठी निवड करण्यात आली. विश्वेश्वरय्यांनी केलेल्या कामाबद्दल तिथला प्रमुख इंजिनियर क्रीप खूष झाला आणि म्हणाला, की "विश्वेश्वरय्या यांच्यांसारखा महान इंजिनियर सर्व जगात एखादद्दुसराच असेल."

परंतु एवढ्या कामावर किंवा प्रशंसेवर विश्वेश्वरय्यांचे समाधान नव्हते. याहून व्यापक क्षेत्रात आपण काम करावे, असे त्यांना वाटू लागले आणि त्यांनी सरकारी नोकरीचा राजिनामा दिला. मध्येच नोकरी सोडल्यामुळे वास्तविक त्यांना पेन्शन मिळणार नव्हते; पण त्यांची सेवा व योग्यता ध्यानी घेऊन मुंबई सरकारने त्यांना योग्य ते पेन्शन दिले.

त्यानंतर युरोपातील स्थापत्यशास्त्रातील प्रगती पाहावी, या उद्देशाने त्यांनी युरोपचा दौरा केला. ते दौऱ्यावर असताना हैदराबादजवळून वाहणाऱ्या मुसी नदीने रौद्र रूप धारण केले आणि हैदराबाद नगर जलमय होण्याचा धोका निर्माण झाला. हैदराबादच्या निजामाने शहर वाचवण्यासाठी तार करून विश्वेश्वरय्यांना बोलावून घेतले. विश्वेश्वरय्यांनी आपला युरोपचा दौरा अर्धवट टाकला व ते हैदराबादला गेले. पुढे सहा-सात महिने काम करून त्यांनी मुसी नदीला काबूत ठेवण्याची योजना पूर्ण केली. त्यानंतर मुसीच्या पाण्यापासून हैदराबाद शहराला कधीही धोका पोचला नाही. इ. स. १९०८ साली निजामाच्या राज्यात प्रमुख निरीक्षक इंजिनियर म्हणून सुमारे वर्षभर काम केल्यावर ते त्या जबाबदारीतून मुक्त झाले.

त्यानंतर म्हैसूर संस्थानच्या महाराजांनी त्यांना संस्थानचे प्रमुख इंजिनियर म्हणून नेमले. कामावर रुजू होताच विश्वेश्वरय्यांनी कावेरीबंधारा योजना हाती घेतली. काम सुरू केल्यावर त्यात अनेक अडचणी आल्या; पण त्यांना धैर्याने तोंड देऊन ठरलेल्या वेळी, त्यांनी त्या बंधाऱ्याचे काम पूर्ण केले. म्हैसूरपासून बारा मैलांवर कृष्णराजसागर या नावाचे हे अजस्त्र धरण उभे आहे. त्याची लांबी ८६०० फूट, रुंदी १११ फूट आणि उंची १४० फूट आहे. धरणाच्या माथ्यावर ५० फूट रुंदीचा ऐसपैस रस्ता आहे. कृष्णराजसागर जलाशय पन्नास चौरस मैल क्षेत्रफळाचा आहे. पाणी सोडण्यासाठी धरणाला १७१ दरवाजे आहेत. त्यांपैकी अनेक दरवाजे आपोआप उघडण्याची व बंद होण्याची योजना केलेली आहे. धरणाच्या डाव्या बाजूला साठ मैल लांबीचा एक कालवा काढलेला आहे. त्याला विश्वेश्वरय्या कालवा असेच नाव दिले गेले आहे. या कालव्यासाठी डोंगर खोदून ३९६० फूट लांबीचा बोगदा तयार केलेला आहे. इतक्या लांबीचा बोगदा क्वचितच कुठे आढळतो. या धरणातून काही ठराविक पाणी शिवसमुद्रम धबधब्यात सोडतात आणि या पाण्याच्या नियमित पुरवठ्यावर शिवसमुद्रमचे विद्युत्‌निर्मिती केंद्र चालते. धरणाच्या जवळच सुप्रसिद्ध वृंदावन उद्यान आहे.

श्री. विश्वेश्वरय्या

विश्वेश्वरय्यांच्या या भव्य कामाची कीर्ती परदेशातही पसरली आणि कितीतरी परदेशी तज्ज्ञ हे काम पाहण्यासाठी मुद्दाम भारतात येऊन गेले. म. गांधी हे धरण पाहून उद्गारले, की सर्व जगात अजोड असणारी ही कृष्णराजसागरची निर्मिती सर विश्वेश्वरय्यांना अमर वनविण्यास समर्थ आहे.

इ. स. १९१२ साली ते म्हैसूर संस्थानचे दिवाण झाले. आपल्या दिवाणपदाच्या कारकिर्दीत त्यांनी संस्थानचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला. सर्वप्रथम त्यांनी शेतीच्या सुधारणेकडे लक्ष दिले. नंतर त्यांनी संस्थानात निरनिराळ्या उद्योगधंद्यांची स्थापना केली. त्यामुळे सिमेंट, कागद, साबण, इ. वस्तू संस्थानातच तयार होऊ लागल्या. भद्रावती येथे त्यांनी पोलादाचा कारखाना उभारला आणि उत्तम प्रतीचे पोलाद निर्माण करून दाखवले. याशिवाय, त्यांनी म्हैसूर स्टेट बँकेची स्थापना केली आणि शिक्षणाच्या प्रसारासाठी म्हैसूर विद्यापीठ स्थापले. तसेच तांत्रिक शिक्षण देण्यासाठी जयचामराजेंद्र ऑक्युपेशनल इन्स्टिट्यूट ही संस्थाही त्यांनी काढली.

काही वर्षांनंतर त्यांनी दिवाणपदाचा राजिनामा दिला आणि पुन्हा दोन वर्षे ते परदेशात हिंडून, तिथली विकासकार्ये पाहून आले. परत आल्यावर त्यांनी अनेक लोककल्याणकारी कामांत लक्ष घातले. अनेक तऱ्हेच्या समित्यांचे ते सदस्य व अधिकारी बनले. इ. स. १९२१ ते २२ पर्यंत मुंबई सरकारने नेमलेल्या मुंबईतील औद्योगिक शिक्षणसमितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले. इ. स. १९२५ साली भारतीय अर्थविषयक बाबींची चौकशी करणाऱ्या समितीच्या अध्यक्षपदावर त्यांची नियुक्ती झाली. नवी दिल्ली राजधानी कमिटीचेही ते एक प्रमुख सल्लागार झाले. इ. स. १९४१ साली अखिल भारतीय उत्पादक संस्थेचे ते अध्यक्ष झाले.

भोपाळ, बडोदा, इंदूर व कोल्हापूर या संस्थानांनी आपल्या विकासकार्याबद्दल त्यांचा मोलाचा सल्ला घेतला. नागपूर व विजापूर येथील पाणीपुरवठ्याची योजना आणि पुणे, हैदराबाद व म्हैसूर येथील भुयारी गटारपद्धतीच्या योजना त्यांनीच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

सल्लेल्या आहेत. ओडिसातील पूरनियंत्रणयोजना त्यांनीच आखलेली आहे. अशीच आणखी कितीतरी कामे त्यांनी केली आहेत. जमशेदपूरच्या टाटांच्या पोलाद कारखान्याचे ते काही वर्षे डायरेक्टर होते.

त्यांची योग्यता जाणून भारतातील इंग्रज सरकारने त्यांना के. सी. आय. ई. ही पदवी दिली होती. त्याचप्रमाणे कलकत्ता, पाटणा व अलाहाबाद या विश्वविद्यालयांनी त्यांना डी. एससी., मुंबई व म्हैसूर या विश्वविद्यालयांनी एल्. एल. डी. आणि बनारस हिंदू युनिव्हर्सिटीने डी. लिट या सन्माननिदर्शक पदव्या देऊन त्यांचा गौरव केला. पण या सर्वांत अत्यंत बहुमानाची पदवी म्हणजे भारतरत्न ही होय. इ. स. १९५५ साली डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्यांच्या आजवरच्या कामगिरीबद्दल त्यांना भारतरत्न ही उपाधी देऊन त्यांचा सन्मान केला.

विश्वेश्वरय्यांचे सार्वजनिक जीवन सर्वार्थाने सफल झाले; पण कौटुंबिक जीवनात मात्र ते दुर्दैवी ठरले. पत्नीसुख त्यांना मिळाले नाही. संततीही झाली नाही. हे वैयक्तिक दुःख हृदयात बाळगून ते आयुष्यभर वागले. देशातल्या लाखो मुलांकडे त्यांनी वात्सल्याने पाहिले आणि त्यांच्या शिक्षणाची व आरोग्याची काळजी वाहिली. आपल्याला मिळणाऱ्या पेन्शनपैकी अर्ध्याहून अधिक रक्कम ते विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर व शैक्षणिक संस्थांना दान देण्यावर खर्च करीत.

विश्वेश्वरय्यांना दीर्घायुष्य लाभले. आपल्या दीर्घायुष्याविषयी बोलतांना ते म्हणाले होते, " सुनियंत्रित आचरण, कठीण परिश्रम, प्रसन्नता आणि भोगविलासामध्ये संयम हेच माझ्या दीर्घ जीवनाचे सूत्र आहे. अन्य कसलेही रहस्य माझ्याजवळ नाही. मात्र मला असे वाटते, की सदैव आशावादी राहणे हा एक मोठा मंत्र आहे. माझा स्वतःचा असा अनुभव आहे, की आशावादी मनुष्य एक नवी स्फूर्ती व शक्ती घेऊनच सदैव वावरत असतो. याहून दीर्घायुष्याचा अधिक चांगला विमा दुसरा कोणता असेल ? शांततापूर्ण व सफल जीवन यासाठी शरीराऐवजीही मी मनाला अधिक जबाबदार मानतो."

१५ सप्टेंबर १९६१ रोजी त्यांची जन्मशताब्दी साऱ्या देशाने साजरी केली. त्या वेळी भारत सरकारने त्यांच्या सन्मानार्थ त्यांच्या नावाची पोस्टाची तिकिटे काढली.

१४ एप्रिल १९६२ रोजी या महापुरुषाचे बंगलोर येथे निधन झाले. [अ. च. को.; हिं. वि. को.; भारतरत्न २]

विष एक जीवनाशक पदार्थ. विषाची निर्मिती कशी झाली याची कथा महाभारत (आदि. १८), भागवत (८.१७), ब्रह्मपुराण (ब्रह्म. ९), लिंगपुराण (उत्तर. ६) इ. ठिकाणीं आली असून, त्यांत देवासुरांच्या समुद्रमंथनातून विष निर्माण झाले, असे म्हटले आहे. मंथनातून वर आलेले हे विष सृष्टीला जाळू लागले. ते पाहून सर्व देव घाबरून शिवाला शरण गेले. शिवाने लोककल्याणासाठी त्याचे प्राशन केले. त्यामुळे शिवाचा कंठ निळा झाला, म्हणून त्याला नीलकंठ हे नाव मिळाले. शिव विषप्राशन करीत असताना त्यातले काही थेंब खाली पडले, त्यांपासून विंचू, सर्प, नाग व काही वृक्ष यांना त्याची प्राप्ती झाली.

मानसोल्लासकर्त्या सोमेश्वराने स्थावर, जंगम व कृत्रिम अशा तीन प्रकारांत विषांचे वर्गीकरण केले आहे. त्याच्या मते हालाहल, शृंगी, कालकूट व वत्सनाभ ही स्थावर विषे, सर्पादी प्राण्यांचे विष हे जंगम विष आणि अनेक विरुद्ध द्रव्यांच्या मिश्रणाने तयार केलेले विष ते कृत्रिम विष होय. महाराष्ट्र शब्दकोशात विषाचे पुढील नऊ प्रकार सांगितले आहेत—कालकूट, हालाहल, सौराष्ट्रिक, ब्रह्मपुत्र, प्रदीपन, काकोल (शृंगक), वत्सनाभ (बचनाग), शौक्तिकेय (सक्तुक) व दारद (हरित्र).

वेदकाली लोकांना विषाची माहिती होऊ लागली होती. वसिष्ठ मैत्रावरुणीने एका सूक्तात वृक्ष, नद्या व निरनिराळ्या औषधींमध्ये असणाऱ्या विषाच्या परिहाराची प्रार्थना केली आहे (ऋ.७.५०). त्याचप्रमाणे अगस्त्याचे विषनिर्मूलनाचे रहस्य सांगणारे सूक्त तर विषघ्नोपनिषद् या नावानेच प्रसिद्ध आहे. प्रस्तुत सूक्तात विषप्रकार, विषहारक औषधींची स्तुती व विषवनस्पतींची माहिती दिलेली असून, पुढे विषचिकित्सेचे मार्ग सांगितले आहेत. त्यात सूर्य, पक्षी, नदी, मयूर, नकुल (मुंगूस) इत्यादींच्या द्वारे विषचिकित्सा होते असे म्हटले आहे (ऋ.१.१९१). सर्पविष, दृष्टिविष, श्वानविष, इ. अनेक प्रकारांच्या विषपरिहारासाठी या सूक्ताचा पाठ करण्याची पद्धत आजही आहे.

प्राचीन काळापासून शत्रूला नष्ट करण्यासाठी केलेल्या विषप्रयोगांची अनेक उदाहरणे इतिहासात वाचायला मिळतात. हे प्रयोग अनेक प्रकारांनी केले जात असत. कंसभगिनी पूतना ही आपल्या स्तनात विष भरून कृष्णाला मारण्यासाठी गोकुळात गेली होती (भाग. पु. १०.६.१०). हिरण्यकशिपूने प्रल्हादावर विषप्रयोग केला होता (विष्णुपु. १.१८). दुर्योधनाने भीमाच्या अन्नात कालकूट कालविले होते (म. भा. आदि. १२८). याव्यतिरिक्त काशिराजाच्या राणीने विषाने माखलेल्या लाह्यांचा प्रयोग करून प्रत्यक्ष राजालाच मारले होते. वैरात्याच्या राणीने नवऱ्याच्या तोंडाला विषलेप देऊन त्याचा प्राण घेतला होता. सौवीरदेशाच्या राजाला त्याच्या पत्नीने कमरपट्ट्यात ठेवलेल्या आणि विषाने माखलेल्या रत्नाने ठार केले होते. अशी अनेक प्रकारची उदाहरणे चाणक्याने अर्थशास्त्रात दिली आहेत.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विषकन्या हे विषप्रयोगाचे एक फार मोठे शस्त्र मानलेले आहे. या शस्त्रानेच राक्षसाने महाराज पर्वतकाला मारल्याची वदंता चाणक्याने पसरविल्याचा उल्लेख मुद्राराक्षसात आढळतो (अंक १ ला).

विषकन्या तयार करण्याची पद्धत अष्टांगसंग्रहात दिली आहे, ती अशी – एखादी लावण्यवती बालकन्या शोधून तिला हळूहळू विष पचविण्याची सवय लावायची. त्यामुळे कालांतराने ती विषसिद्धा बनते. या विषसिद्धेशी एखाद्या पुरुषाचा अंगसंग झाला की, त्याचा मृत्यू ठरलेलाच असतो. या विषकन्येचा प्रभाव केवळ मनुष्यावरच नव्हे; तर लहानमोठ्या वनस्पती, पशु-पक्षी यांच्यावरही पडतो. याशिवाय एखाद्या स्त्रीच्या योनिमार्गात विषदंत ठेवून तिचा उपयोग करीत. सामान्यतः विषकन्येचा प्रयोग शत्रुविशेष नष्ट करण्यासाठी केला जात होता. समस्त शत्रूंच्या नाशासाठी निरनिराळे तलाव, सरोवरे, विहिरी, इ. ठिकाणी विष टाकावे, असे सोमेश्वराने म्हटले आहे.

बिहार प्रदेशाच्या संथाळ परगण्यातील आदिवासी लोकांत विषकन्येची पूजा करण्याची प्रथा आहे. त्यासाठी एका तरुण कुमारिकेच्या गळ्यात विषकुपी अडकविली, की ती विषकन्या बनते. नागपंचमीला तिची पूजा करतात. त्यामुळे अनेक संकटांचे निवारण होते, अशी त्यांची समजूत आहे.

विषदिव्य हा विषप्रयोगाचा एक भाग असला, तरी त्याच्या हेतूत फार भिन्नता आहे. विषप्रयोग हा मृत्युदंडाचा एक भाग आहे आणि विषदिव्य हे सत्यासत्यतेच्या निर्णयासाठी करावे लागणारे एक दिव्य आहे. स्मृतिकारांनी या प्रायश्चिताचे काही संकेतही सांगितले आहेत. (दिव्य पाहा)

विषप्रयोगापासून सावध राहणे हे राजकीय जीवनातले एक महत्त्वाचे अंग आहे. त्याचा प्रतिकार कसा करावा याचे विवेचन मनुस्मृती, अर्थशास्त्र, इ. ग्रंथांत आढळते. चाणक्याने केलेल्या विवेचनाचा सारांश असा – राजवाड्यात सर्पादी विषारी प्राण्यांनी प्रवेश करू नये म्हणून पिंपळाची झाडे आणि जीवंती, श्वेता, मुष्कका, पुष्पवंदाक वगैरे वेली लावाव्या. कारण त्या ठिकाणी सर्प व विष यांचा प्रभाव पडत नाही. मोर, मुंगूस, पृषत, इ. प्राणी सांभाळावे. हे सर्प दिसला की त्याला खाऊन टाकतात. पोपट, मैना, भृंगराज, इ. पक्ष्यांना आसपास विषारी प्राणी असल्याचा संशय आला, की ते ओरडायला लागतात. क्रौंच पक्षी विषाच्या सान्निध्यात बेशुद्ध पडतो, तितर पांढरा पडतो, कोकिळा मरण पावते, तर चकोराचे डोळे लाल होतात. म्हणून हे पशु-पक्षी राजवाड्यात पाळावे.

राजासाठी तयार केलेल्या अन्नात विष कालवले जाऊ नये, याची दक्षता घेतली पाहिजे. त्यासाठी पाकशालाधिकाऱ्याने ते अन्न वारंवार चाखून पाहावे. भोजनाला प्रारंभ करण्यापूर्वी राजाने अन्नातील थोडा भाग अग्नीला समर्पण करावा आणि योग्य पक्षांना त्याचा घास द्यावा. विषारी पदार्थ अग्नीत पडला तर, अग्निज्वालेचा व धुराचा रंग निळा होतो व तडतडल्यासारखा आवाज उत्पन्न होतो. पक्षी ते अन्न खाताच तत्काळ मरण पावतात. भातात विष मिसळले असेल तर, त्याच्या वाफेचा रंग मोराच्या मानेच्या रंगासारखा दिसतो. तसेच, भात अल्पावधीत थंड होतो. सामिष भाज्यांत विष असेल तर त्या रसयुक्त असूनही कोरड्या पडतात व पातळ पदार्थांवर बुरशी येते. त्यांच्या वरच्या बाजूला रेषा उमटतात. हा पातळ पदार्थ फळादिकांचा रस असला, तर त्याच्या मध्यभागी निळी रेषा उमटते व दुधात तांबडी रेषा दिसते. काही कोरड्या पदार्थांवर हा प्रयोग झाला असेल, तर त्याचे तुकडे पडतात. विषमिश्रणाने कठीण पदार्थ शिजल्यावर मऊ होतात आणि मऊ पदार्थ कठीण बनतात. वस्त्रे-प्रावरणे विषमय झाली असतील, तर त्यांवर घाणेरडी वर्तुळे दिसू लागतात. त्यांचे पदर व धागे गळू लागतात. धातूच्या भांड्यांना विष माखले असता, ती धुरकट व घाणेरडी दिसतात.

विषप्रयोगाचे सर्व संभाव्य धोके टाळण्यासाठी राजाजवळ सदैव विषबाधा दूर करणारे चिकित्सक असावे. अशा वैद्यांना चाणक्याने जांगलिविद असे म्हटले आहे.

विषप्रयोग करणारा माणूस कसा ओळखावा, याचेही काही आडाखे चाणक्याने सांगितले आहेत. विषप्रयोगाचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीचा चेहरा काळा ठिक्कर पडलेला असतो. त्याचे शरीर घामाने डबडबते. त्याच्या अंगाला कंप सुटतो. तो चालताबोलताना अडखळतो आणि एका जागेवर कधीही स्थिर राहू शकत नाही.

चाणक्याप्रमाणेच विषपरीक्षणाची माहिती सुश्रुत, वाग्भट, इत्यादींच्या ग्रंथांत आढळते. आश्वलायन श्रौतसूत्रात विषविद्या नावाची एक विद्या सांगितली आहे; पण तिचा तपशील मात्र आढळत नाही.

विषाचा परिणाम नष्ट व्हावा किंवा त्यापासून भय राहू नये म्हणून धर्मशास्त्रात सर्पविषावह पंचमी यासारखी व्रते करायला सांगितली आहेत. मंत्राने व यंत्राने विषहरण होते, अशीही समजूत आहे. विषहरणाचा एक मंत्र असा –

ॐ नमो रक्ताबिंदू नमो अडतरी, खडतरी, पाची पांडव विखाव निरविख करी, सर्व विख नाश करी.

अशा तऱ्हेचे अनेक मंत्र गारुड्यांच्या मुखी असतात. यंत्रचिंतामणी नामक ग्रंथात विषस्तंभन यंत्र व त्याचा प्रयोग सांगितला आहे.

वैद्यकशास्त्रात विंचू, साप, उंदीर, गोम, कुत्रे यांच्या विषावर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

[वि]विनिराळ्या वनस्पतींचा उपयोग सांगितलेला आहे. उदा०–[ना]गरमोथा या वनस्पतीचे चूर्ण विंचवाच्या विषबाधेवर, षडं-[कोळ]ंच्या मुळाचे चूर्ण किंवा वज्रवल्लीचे मूळ उगाळून सापाच्या [वि]षबाधेवर, कवठीचा पाला व मूळ, व्याघाटाची शेंग उंदीर-[वि]षावर, हृदग्याचा पाला व तुळशीचा रस गोमेच्या विषावर [उप]योगी पडतो.

लोकसाहित्यात विषबाधा दूर करण्यासाठी औषधोपचारा-[ब]रोबर अनेक तोडगेही सांगितलेले असतात. सर्पदंश झालेल्या [जा]गी कोंबड्यांची पिले (त्यांचे गुदद्वार) लावतात. या पिलांच्या [अं]गी विष शोषून घेण्याची शक्ती असते, असे सांगतात; पण [अ]से केल्याने ती पिले मात्र मरण पावतात. सर्प किंवा नाग [यां]च्या डोक्यावर असलेला मणी दंश झालेल्या जागी ठेवला [अस]ता तो विष शोषून घेतो आणि हिरवा पडतो. मग काही [वे]ळ तो दुधात ठेवला तर पूर्ववत होतो, असे म्हणतात. नाग-[वे]लींच्या शेंगांची पूड पाण्यातून दिली असता किंवा मोराच्या [पि]सांची अग्रे कुटून ते चूर्ण चिलमीतून ओढले असता विषबाधा [न]ष्ट होते, अशी समजूत आहे. काही प्रदेशातील मांत्रिक सर्पदंश [झा]लेल्या माणसाच्या मुखात एक जुना जोडा देऊन त्याला सर्पा-[प्रमा]णे सरपटायला लावतात. हा तोडगा केला म्हणजे रोगी [वि]समुक्त होतो असे समजतात. काही मांत्रिक सात पेरे अस-[णा]री एक काठी घेऊन तिचे एकेक पेर तोडून टाकतात. पेरे [ज]सजशी कमी होतात तसतसा रोगी बरा होतो, असे समजतात. [[हि]ं. म. भा.; अ. म. भा.; कौ. अ. प्र.; चं. मौ. उ. का.; आर्य [वै]द्यक, भाग १ ला – पं. बाळशास्त्री हरदास, १९६८; [वि]षशास्त्र; लो. दं.; म. ज्ञा. को.; मानसोल्लास.; डॉ. पु. ज. [स]रस – धर्मयुग, २१ जुलै १९७४]

[वि]षनाडीजननशांती एक शांती. विषघटिका आणि क्रूर ग्रहांनी युक्त असे लग्न किंवा लग्नांश [यां]वर ज्या व्यक्तीचा जन्म होतो, ती व्यक्ती विष, शस्त्रे व अस्त्रे [यां]च्या द्वारे पिता, माता, धन व आपण स्वत: यांचा नाश [कर]णारी होते. हा दोष नाहीसा करण्यासाठी जी शांती करतात, [ति]ला विषनाडीजननशांती असे म्हणतात.

[ति]थी व वार यांच्या बाबतीत विषनाडी (विषघटिका) [कोण]त्या, त्या वृद्ध गर्गाने पुढे दिल्या आहेत –

[ति]थी – १५, ५, ८, ७, ७, ११, ४, ८, ७, १०, ३, १०, ११, [१]३, ८. प्रतिपदेपासून अनुक्रमे तिथींच्या वर लिहिलेल्या आक-[ड्यां]च्या क्रमाप्रमाणे ज्या घटिका, त्यांच्या पुढील चार घटिका [विषघ]टिका होत. उदा० पहिली तिथी प्रतिपदा. तिच्या पहिल्या [पंधरा] घटका सोडून पुढच्या चार म्हणजे १६, १७, १८ व १९ या घटका विषघटिका होत. द्वितीयेच्या ६, ७, ८ व ९ या चार घटिका विषघटिका होत.

वार – रविवारपासून अनुक्रमे पहिल्या २०, ४, १२, १०, ७, ५ व ६ घटिका सोडून पुढच्या चार घटिका विषघटिका होत.

शांतिप्रयोग – जननाशौच संपल्यावर देशकालाचा उच्चार करून शांतिकर्माचा संकल्प करावा. नंतर गणेशपूजनापासून आचार्यवरण, ऋत्विग्वरण, इ. कृत्ये केल्यावर आचार्याने ‘यदत्र संस्थितं....’ या मंत्राने स्थलशुद्धी करावी आणि रुद्र, यम, अग्नी व मृत्यू या देवतांच्या सुवर्णप्रतिमांचे अग्न्युत्तारण करावे. पूर्व-भागी ‘मही द्यौ...’ या मंत्राने भूमीला स्पर्श करून, त्या भूमीवर पायलीभर तांदुळांचे स्थंडिल तयार करावे. त्यावर कलशाची स्थापना करून त्यात जल भरावे व त्याची पूजा करावी. स्थंडि-लावर अग्निप्रतिष्ठा करून. अग्नीच्या उत्तर भागी ग्रहपूजन, कलशस्थापन व अन्वाधान करावे. नंतर समिधा, चरू, तिल आणि घृत यांच्या रुद्र, यम, अग्नी व मृत्यू या देवतांना उद्देशून प्रत्येकी एकशे आठ आहुती द्याव्या. नंतर प्रायश्चित्तहोम करावा व लोकपाल, ग्रहपीठदेवता, रुद्र, यम, अग्नी व मृत्यू यांना बलिदान करावे. आचार्य व ऋत्विज यांनी यजमानाला अभि-षेक करावा. यजमानाने आचार्याला यथाशक्ति दक्षिणा द्यावी. ब्राह्मणभोजन घालून कर्म समाप्त करावे. [सं. कौ.]

विषय पाच ज्ञानेंद्रियांनी ग्राह्य असणारे पाच पदार्थ म्हणजे विषय होत. भोगसाधन म्हणजे विषय, असेही म्हटले आहे. याची व्याख्या अशी –

> विशब्दो हि विशेषार्थः सिनोतेर्बन्ध उच्यते ।
> विशेषेण सिनोतीति विषयोऽतो नियामकः ॥

(भट्टकारिका)

विस्तृतार्थ – विषय हा शब्द सि या बंधनार्थक धातूपासून निघाला आहे. सि = बांधणे, अडकविणे, जाळ्यात पकडणे. याच्या मागे वि हा उपसर्ग लावला म्हणजे विशेषरूपाने बांधणे, असा त्याचा अर्थ होतो. इंद्रिये ज्याच्या ठिकाणी विशेषरूपाने बांधली जातात, त्यांना विषय म्हणतात.

शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे पाच विषय होत. ते अनु-क्रमे कान, त्वचा, नेत्र, जिव्हा व नाक यांनी ग्रहण केले जातात.

वेदान्तग्रंथात आणि संतवाङ्मयात विषय शब्द व्यापक अर्थाने वापरला आहे. आपली इंद्रिये, मन आणि बुद्धी ही जड आहेत. बाहेरच्या जगातील सर्व निर्जीव वस्तूही जड आहेत. ज्ञानेंद्रिये आपापल्या शक्तीप्रमाणे जड वस्तूंची माहिती बुद्धीला पुरवितात आणि ज्या वस्तू आपल्या वासनातृप्तीसाठी उप-योगी पडतात, त्यांच्या ठिकाणी आपले मन बांधले जाते;

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणजे तिथे ते चिकटते किंवा आसक्त होते.

वासनेची धाव नेहमीच जडाकडे असल्यामुळे, ती आपल्याला आत्म्यापासून दूर नेते. म्हणून अत्यंत सूक्ष्म अशा आत्म्या-व्यतिरिक्त इतर सर्व अनात्म वस्तूंना विषय हा शब्द लागतो. आत्म्याचा आनंद विसरून जडामधून सुख घेण्याची जी मनाची वृत्ती, तिला विषयासक्ती असे म्हटले आहे. विषयासक्तीमुळे एकातून अनेक अशा अनर्थांची परंपरा सुरू होते आणि शेवटी विषयासक्त पुरुषाचा नाश होतो, असे गीतेतील पुढील श्लोकांत सांगितले आहे–

ध्यायतो विषयान्पुंसः सङ्गस्तेषूपजायते ।
सङ्गात्सञ्जायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ।।
क्रोधाद् भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ।
स्मृतिभ्रंशाद् बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ।।

अर्थ – विषयांचे चिंतन करणाऱ्या पुरुषाचा सदर विषयांच्या ठिकाणी संग म्हणजे सलगी वाढत जाते. या संगापासून पुढे काम म्हणजे सदर विषय आपल्याला पाहिजेत ही वासना उत्पन्न होते. आणि (हा काम तृप्त होण्यास अडथळा झाला म्हणजे) त्या कामापासूनच क्रोधाचा उद्भव होतो. क्रोधापासून संमोह म्हणजे अविवेक होतो. संमोहापासून स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशापासून बुद्धि-नाश आणि बुद्धिनाशापासून (पुरुषाचा) सर्वस्वी घात होतो.

विषयांत सुखाचा अनुभव येतो, म्हणूनच विषयसेवनाची गोडी सर्व प्राणिमात्रांना उपजत असते. पण विषयांपासून मिळ-णारे सुख हे क्षणिक असते, नाशवंत असते हे जाणले पाहिजे, विषयांचे सुख कितीही सेवन केले तरी तृप्ती कधीच होत नाही. ती थोडा वेळ वाटली तरी, पुनश्च त्या त्या विषयाची आसक्ती निर्माण होते. माणसांना वाटते की, विषयांचा एकदा भरपूर उपभोग घेतला म्हणजे आपली त्याच्यापासून निवृत्ती होईल; पण ही गोष्ट खरी नसते. या बाबतीत ययातीचे उदाहरण सांगण्यासारखे आहे. शुक्राचार्यांच्या शापाने अकाली वार्धक्य आले असता त्याने पुत्राचे तारुण्य उसन घेतले व अनेक वर्षे यथेष्ट विषयसुख उपभोगले. पण शेवटी त्याला अनुभव आला तो असा–

न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।।

(भा. पु. ९.१९.१४)

अर्थ – कामाच्या म्हणजेच विषयांच्या उपभोगाने काम शांत होत नाही; तर अग्नीत जसजसे तूप घालीत जावे, तसतसा तो अधिकाधिक पेटत जातो, तशी विषयभोगांची स्थिती आहे.

विषयोपभोगात सुख कशाने वाटते, याचा मनुष्याने शोध घेतला पाहिजे. विषयांतले सुख हेही आत्मसुखाचाच अंश असते. याविषयी पंचदशीत (१५.१९) सांगितले आहे, ते असे –

यद्यत्सुखं भवेत्तत्तद् ब्रह्मैव प्रतिबिम्बनात् ।
वृत्तिष्वन्तर्मुखास्वस्य निर्विघ्नं प्रतिबिम्बनम् ।।

अर्थ – जे जे सुख ते ते ब्रह्मच होय. अंतर्मुख वृत्तीत ते निर्विघ्नपणे प्रतिबिंबित होते.

याचा अर्थ असा, की कोणत्याही पदार्थापासून सुखाचा जो अंश मिळतो असे वाटते, तो अंश त्या पदार्थात ब्रह्माचे जे प्रतिबिंब पडते, त्यापासून होतो; असे समजावे. म्हणून खरे शाश्वत सुख हवे असल्यास मनाला अंतर्मुख करून, ते सुख ब्रह्माच्या ठिकाणी शोधण्याचा प्रयत्न करावा. सुखाचे स्थान विषय नसून, अंतर्यामी आत्मा हे आहे, असे एकदा समजले, म्हणजे मनुष्याची विषया-सक्ती सुटेल. [अध्यात्मदर्शन, प्रा. के. वि. बेलसरे; गी. र.]

विषयोग मुहूर्तज्योतिषात सांगितलेला एक अशुभ योग. रविवारी चतुर्थी, सोमवारी षष्ठी, मंगळवारी सप्तमी, बुधवारी द्वितीया, गुरुवारी अष्टमी, शुक्रवारी नवमी व शनिवारी सप्तमी अशा तिथी आल्या तर त्याला विषयोग म्हणतात. [मुहूर्तचिंतामणि; बृहज्ज्योतिषसार.]

विषवन द. भारतातील एक जमात. या लोकांची वसती केरळ प्रदेशातील त्रिवेंद्रम व अर्नाकुलम या जिल्ह्यांत आहे. मुथुवन हे त्यांचे पूर्वज होते असे म्हणतात. हे घनदाट अरण्यात झोपड्या बांधून राहतात आणि मलयाळम भाषा बोलतात. पूर्वी इडारा नावाच्या प्रदेशावर यांनी राज्य केले अशी समजूत आहे.

प्राचीन काळी हे माकडे पकडण्याचा व्यवसाय करीत होते. सांप्रत ते भातशेती करतात. काही विषवनांची स्वतःची भात-शेती आहे. कित्येक जण कोंबड्या, मेंढ्या पाळतात; तर काही मजुरी व मासेमारी करतात. भात, मासे, कंदमुळे व झाडपाला हे त्यांचे अन्न आहे.

मुलीला न्हाण आले म्हणजे तिला एका स्वतंत्र झोपडीत सात दिवस ठेवतात. या काळात तिला पुरुषाचे तोंड दिसू देत नाहीत. पुरुष दृष्टीस पडला तर गावावर काही संकट येते अशी त्यांची समजूत आहे. आठव्या दिवशी मुलीला स्नान घालून घरात घेतात. लग्नापूर्वी मुलगी गरोदर राहिली तर गर्भपाताचा प्रयत्न न करता, ज्याच्यापासून तिला गर्भ राहिला असेल त्याच्याशी तिचे लग्न लावून देतात.

विवाहप्रथा – यांच्यांत आते किंवा मामे बहिणीवरोबर लग्न करायला मोकळीक असते. हे मुलीचे लग्न ती वयात आल्यावर करतात. जमातीबाहेरच्या लोकांशी हे लग्न करीत नाहीत. यांचा लग्नसमारंभ मुलीच्या घरी होत असून, तो एका दिवसात आटो-

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

प्तो. वराने वधूला दोन साड्या देणे, हाच लग्नसमारंभातला मुख्य कार्यक्रम असतो. यांच्यांत ताळीच्या ऐवजी गळयात एक कद्दे बांधण्याची प्रथा आहे. यांच्यांत देजाची प्रथा कधीही प्रचलित नव्हती. हे एकच बायको करतात. घटस्फोटाची व साटेलोटयाची पद्धत यांच्यांत रूढ आहे.

प्रसूतिप्रथा – विषवन स्त्री एका स्वतंत्र खोलीत प्रसूत होते. तिथे पुरुषाला जायला बंदी असते. पहिले पंधरा दिवस ती या खोलीत राहते. मग स्नान करून ती घरात येते.

यांच्यांत मिळकतीचा वारसा भाच्याकडे जातो. तो बायकांकडे जात नाही.

हे लोक साष्ट देवतेची पूजा करतात.

विषवनांमध्ये जातपंचायत असते. पंचायतप्रमुखाला ते कनक्करण असे म्हणतात. कनक्करणाला तंटेबखेड्यांचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असतो.

मृतकप्रथा – हे मृताला पुरतात. मृताचे थडगे पूर्व-पश्चिम असते. हे सोळा दिवस मृताशौच पाळतात. [ट्रा. के.; रज: कण]

विषहारी एक ग्रामदेवता. ही सर्पदंशाचे विष हरण करते, म्हणून हिला हे नाव मिळाले असावे. मध्य प्रदेशातील व उत्तर प्रदेशातील कांची जमातीचे लोक हिचे उपासक आहेत. उत्तर प्रदेशात हिची अनेक मंदिरे आढळतात. या प्रदेशातील लोक शीतळा देवीलाच विषहारी अथवा धरतीमाता असे म्हणतात. हिला मनसा असेही एक नाव आहे. पाहा – शीतळा. [देवीकोश ३]

विषाणी एक वेदकालीन जमात. या लोकांचा उल्लेख ऋग्वेदात एकदाच आला आहे (७.१८.७) आणि यांचे नाव तृत्सूंच्या शत्रुगणांत दिले आहे. विषाणी या शब्दाचा अर्थ शिंगे असलेला असा आहे. परंतु त्यावरून स्पष्ट बोध होत नाही. सदर जमातीची शिरस्त्राणे शिंगाच्या आकाराची असावी किंवा ते लोक आपल्या शिरस्त्राणांना शिंगांनी सुशोभित करीत असावे. यांचा उल्लेख अलिन, भलान, शिव आणि पक्थ या जमातींच्या बरोबर होतो. ही जमात त्यांच्याप्रमाणेच भारताच्या वायव्य भागात राहणारी असावी. [वे. इं.; वे. का. इ.]

विषु केरळमधील वर्षारंभदिन. मेष म्हणजे चैत्र मासाच्या शुद्ध प्रतिपदेला केरळातले नवीन वर्ष सुरू होते. एप्रिल महिन्यात जेव्हा सूर्य विषुववृत्तरेषेवर पोचतो आणि दिवस व रात्र समान होतात, त्या दिवसाला विषु म्हणतात. केरळीय लोक या दिवशी उत्सव करतात. हा मुलांचा सणही मानला जातो.

नववर्षारंभ सुंदर व मंगल वस्तूंच्या दर्शनाने व्हावा, या भावनेने आदल्या रात्री एका तबकात फळे, फुले, तांदूळ, सोन्या-चांदीचे अलंकार, घृत वस्त्र, इ. वस्तू नीट मांडून ठेवतात. जवळच देवतांची चित्रे आणि त्यांच्या समोर तेवती समई किंवा नारळाच्या दोन अर्धुकांत दीपज्योती लावून ठेवतात. विषूच्या दिवशी प्रात:काळी उठून प्रथम त्या संभाराचे दर्शन घ्यायचे असते. याला विषुकणी म्हणजे शुभदर्शन असे म्हणतात. हे शुभदर्शन घरातल्या गाई-म्हशींना व झाडा-झुडपांनाही घडवले जाते.



विषुकणी

या शुभदर्शनानंतर कुटुंबप्रमुख घरातील माणसांना, नोकर-चाकरांना व बलुतेदारांनाही यथाशक्ति द्रव्य देतो. त्या द्रव्याला कैनेट्टम म्हणतात. त्यानंतर सर्वजण तो दिवस सणाप्रमाणे आनंदात घालवतात. दिवाळीच्या उत्सवाप्रमाणे केरळीय लोक विषूच्या दिवशीही फटाके वगैरे शोभेची दारू उडवितात.

काही भाविक लोक आदल्या रात्री गुरुवायूर, वैकम, इ. क्षेत्रांत जाऊन विषूच्या दिवशी पहाटे उठताना डोळे मिटून घेतात आणि मंदिराच्या गाभाऱ्यात जाऊन प्रथम देवाचे दर्शन घेताना ते उघडतात. या मंगल दर्शनामुळे 'वर्षभर आपण मंगलच पाहू व मंगलच अनुभवू' अशी त्यांची भावना असते. [केरळ; लोकयात्रा; श्री. के. पी. के. मेनन–मार्च ऑफ इंडिया, मे-जून १९५३; युगप्रभात, १६ एप्रिल १९६४]

विष्टर दर्भनिर्मित आसनाला विष्टर असे म्हणतात. विष्टर पंचवीस दर्भांचा बनवलेला असतो. पंचवीस दर्भ घेऊन त्यांची वेणी वळायची व अग्रांच्या बाजूने गाठ द्यायची म्हणजे विष्टर होतो. डावा फेरा देऊन विष्टर बांधतात. मधुपर्कांत पूजनीय व्यक्तीला विष्टराचे आसन देतात. [सं. कौ.; श. क.]

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्टिव्रत विष्टी हे एक करण आहे. फलज्योतिषाच्या ग्रंथांमध्ये विष्टीला अत्यंत कुरूप व दुष्ट राक्षसिणीचा दर्जा दिलेला आहे. ती सूर्यकन्या व शनीची बहीण आहे. तिला गाढवाचे तोंड आणि तीन पाय असतात. विष्टी सामान्यतः अशुभ मानली जाते. म्हणून कोणत्याही शुभकार्याला प्रारंभ करताना विष्टी टाळतात. परंतु शत्रुनाश किंवा विषप्रयोग करायला ही वेळ अनुकूल मानतात. हिच्या संबंधीचा व्रतविधी असा –

ज्या दिवशी विष्टी असेल त्या दिवशी उपवास करावा. विष्टी रात्री असेल तर दोन दिवस एकभुक्त करावे. देवांची व पितरांची आणि दर्भापासून केलेल्या विष्णूच्या मूर्तीची पूजा करावी. खिचडीचा नैवेद्य दाखवावा. काळी वस्त्रे, काळी गाय व काळे पांघरूण दान द्यावे.

या व्रताचा आणखी एक पर्याय पुढीलप्रमाणे आहे –

मार्गशीर्ष शुद्ध चतुर्थीला या व्रताला प्रारंभ करावा. व्रतावधी एक वर्ष. लोहाची, पाषाणाची किंवा लाकडाची भद्रामूर्ती करून, तिची अष्टदल कमलावर स्थापना करावी. मग पूजन, हवन व ब्राह्मणभोजन करून दान द्यावे. उद्यापनाच्या वेळी अभिषेक करून मूर्तीचे विसर्जन करावे.

वृत्रासुराला मारण्यासाठी इंद्राने, त्रिपुरासुराच्या वधासाठी शिवाने, विमानासाठी वरुणाने आणि पांचजन्याच्या प्राप्तीसाठी विष्णूने हे व्रत केले होते, अशा कथा आहेत. फल–मनोरथसिद्धी.

विष्टी व भद्रा या एकच होत. पाहा – भद्रा. [हि. ध.; व्र. प.]

विष्णुकांची द. भारतातील प्रख्यात नगरी कांचीपुरी हिच्या एका भागाला हे नाव आहे. इथे अनेक वैष्णव मंदिरे असून, त्यांतले वरदराज मंदिर अत्यंत भव्य आहे. त्याचे एक गोपूर बारा मजली आहे.

वैशाख पौर्णिमेला इथे ब्रह्मोत्सव होतो. इथे शंकराचार्यांचे कामकोटीपीठ आहे. पाहा–कांची. [कल्याण–तीर्थांक]

विष्णुकुंडी राजवंश आंध्र प्रदेशात राज्य करणारा एक वंश. त्या प्रदेशात कृष्णा नदीच्या दक्षिणेस सुमारे ५० मैलांवर विष्णुकोंड नामक गाव आहे. त्या ठिकाणी एक किल्ला व काही प्राचीन अवशेष अजून आढळतात. ते गाव या राजवंशाचे मूळ ठिकाण असावे, असे अनुमान आहे.

या वंशाचा मूळ पुरुष विक्रममहेंद्र हा इ. स. ४५० च्या सुमारास होऊन गेला. त्याचा पुत्र गोविंदवर्मा हा वाकाटक सम्राट हरिषेण (इ. स. ४७५–५००) याचा समकालीन होता. हरिषेणाने आंध्र प्रदेश जिंकल्याचा उल्लेख अजंटाच्या १६ क्रमांकाच्या लेण्यातील कोरीव लेखात आहे. त्याने त्या प्रदेशाचे राज्य गोविंदवर्म्याला दिले असावे. या गोविंदवर्म्यानेच विष्णुकुंडी वंशात महाराज ही पदवी प्रथम धारण केली. त्याचा पुत्र माधववर्मा (पहिला) याने वाकाटक राजकन्येशी विवाह केला होता. त्याचा उल्लेख कोरीव लेखात आहे. ही राजकन्या हरिषेणाचीच कन्या किंवा जवळची नातेवाईक असावी.

या माधववर्म्याचे दोन ताम्रपट सापडले आहेत. त्यांत आणि त्याच्या वंशजांच्या ताम्रपटांतही त्याच्याविषयी बरीच माहिती मिळते. त्याचे राज्य आंध्र प्रदेशात होते. त्याची साम्राज्यसत्ता दक्षिण भारतातील बऱ्याच मोठ्या भागावर होती. त्याचप्रमाणे द. कोसल (छत्तीसगड) हा प्रदेशही त्याच्या साम्राज्यात असावा.

सातारा जिल्ह्यातील खानापूर गावी एक अपूर्ण ताम्रपट सापडला आहे, तो या वंशातील माधववर्मा (पहिला) याचाच आहे, असे म. म. वा. वि. मिराशी यांनी सिद्ध केले आहे. त्या ताम्रपटात माधववर्मन नृपतीने कृष्णावेण्णा नदीकाठचे रेट्टुरक नामक गाव एका ब्राह्मणाला दान दिल्याचा निर्देश आहे. हे गाव म्हणजे कृष्णाकाठचे रेटरे बुद्रुक होय. या ताम्रपटामुळे महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर महत्त्वाचा प्रकाश पडतो. त्यावरून असे दिसते, की वाकाटकांचा अस्त झाल्यानंतर त्यांच्या जागी विष्णुकुंडी वंशाची साम्राज्यसत्ता प्रस्थापित झाली. वाकाटक सम्राट हरिषेण याच्या नंतर विदर्भाच्या मांडलिकांनी स्वतंत्र राज्ये चालविण्यास प्रारंभ केला; पण माधववर्म्याने त्यांचा पराभव करून आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, कोसल, इ. प्रदेशांवर आपले वर्चस्व स्थापन केले.

माधववर्मा अत्यंत धार्मिक असून, त्याने अकरा अश्वमेध, एक सहस्र अग्निष्टोम व पौंडरीक, बहुसुवर्ण, वाजपेय, राजसूय, पुरुषमेध, इ. अनेक श्रौतयाग केले होते, असे सांगतात. धार्मिक कृत्यांच्या अनुष्ठानार्थ त्याने ब्राह्मणांना अनेक गावे दान दिली होती. दक्षिण भारतातील थोर सम्राटांमध्ये या माधववर्म्याची गणना केली जाईल.

माधववर्म्याचा एक ताम्रपट त्याच्या राजवटीच्या ४०व्या वर्षी दिलेला आहे. त्यावरून त्याने दीर्घकाल राज्य केले, असे दिसते. त्याला देववर्मा व विक्रमेंद्रवर्मा नामक दोन पुत्र होते; पण ते आधीच मरण पावल्यामुळे माधववर्मा (पहिला) याच्या मृत्यूनंतर त्याच्या नातवांमध्ये त्याच्या साम्राज्याची वाटणी झाली. माधववर्मा (दुसरा) याला महाराष्ट्र, कर्नाटक, इ. पश्चिमेकडील प्रदेश आणि दुसरा नातू इंद्रवर्मा याला आंध्र, कोसल, इ. पूर्वेकडील प्रदेश मिळाले, असे दिसते. माधववर्मा (दुसरा) याच्या एका ताम्रपटात त्याला त्रिकूट-मलयाधिपती म्हटलेले आहे. त्रिकूट म्हणजे नासिकजवळची पर्वतराजी होय, असे आता सिद्ध झाले आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्णुकुंडी वंशातील राजांची नाणी प्रथम कोल्हापूरजवळ ब्रह्मपुरी येथील उत्खननात सापडली. नेवासे येथेही त्यांची नाणी सापडली आहेत. त्याचप्रमाणे भंडारा जिल्ह्यातील नगर नावाच्या गावी आणि वर्धा जिल्ह्यातील पवनार नामक स्थानी या राजांची नाणी मिळाली आहेत. नागपूरजवळ व नासिकजवळही असली नाणी मिळाली आहेत. त्यावरून महाराष्ट्रातील विस्तृत प्रदेशावर विष्णुकुंडीची सत्ता होती, असे सिद्ध झाले आहे. मात्र महाराष्ट्रात त्यांची सत्ता माधववर्म्यानंतर फार वर्षे टिकली नाही. माधववर्मा (दुसरा) याच्या वंशजांचे ताम्रपट महाराष्ट्रात सापडलेले नाहीत. त्यानंतर दक्षिण महाराष्ट्रात राष्ट्रकूटांनी सत्ता स्थापली आणि उ. महाराष्ट्र व विदर्भ या प्रदेशांवर माहिष्मतीच्या कलचुरींची सत्ता इ. स. ५५०च्या सुमारास प्रस्थापित झाली. त्यावरून विष्णुकुंडी वंशाचे साम्राज्य त्या वेळी संपले होते, असे दिसते. आंध्र प्रदेशात मात्र त्यांचे राज्य इ. स.च्या ७व्या शतकापर्यंत चालू होते. ७व्या शतकाच्या आरंभी चालुक्यनृपती पुलकेशी (दुसरा) याने ते राज्य आपल्या साम्राज्यात समाविष्ट केले.

विष्णुकुंडींचे दोन ताम्रपट आंध्र प्रदेशातील तुमलगुडेम या गावी सापडले आहेत. त्या ताम्रपटांत विष्णुकुंडी राजांची वंशावळ दिलेली असून, एका ताम्रपटात विक्रमेंद्रभट्टारक याने सिंहवर्मा नामक पल्लवनृपतीवर विजय मिळवून आल्यावर इंद्रपूर येथे आपल्या राजवटीच्या अकराव्या वर्षी, शके ४८८ कार्तिक वद्य अष्टमीला इंद्रपूरच्या महाविहारासाठी इरुंडेर नामक गाव दिल्याचा उल्लेख आहे. शके ४८८ (इ. स. ५६६–६७) हे विक्रमेंद्रभट्टारकवर्म्याच्या राजवटीचे अकरावे वर्ष होते, ही महत्त्वाची माहिती मिळाल्यामुळे विष्णुकुंडी वंशातील राजांच्या कालांना थोडा निश्चितपणा प्राप्त झाला आहे.

माधववर्मा (पहिला) याने सुमारे ५० वर्षे राज्य केले आणि त्याचा नातू इंद्रभट्टारकवर्मा याने सुमारे २७ वर्षे राज्य केले. त्यानंतर त्याचा पुत्र विक्रमेंद्रवर्मा राजा झाला. त्याच्या राजवटीची ११ वर्षे आणि आधीच्या राजांची ५० व २७ वर्षे ही मिळून ८८ वर्षे ५६६ मधून वजा केली असता ४७८ हे वर्ष मिळते. माधववर्मा व इंद्रवर्मा यांच्या राजवटींची निश्चित वर्षे ज्ञात नसल्यामुळे त्यांत ७–८ वर्षांचा फरक पडेल, असे धरून माधववर्मा इ. स. ४७०च्या सुमारास राजा झाला, असे अनुमान करता येते.

दुसरा ताम्रपट विष्णुकुंडीनृपती गोविंदवर्मा याचा असून, त्यात महाराज इंद्रवर्मा, त्याचा पुत्र महाराज माधववर्मा, त्याचा पुत्र महाराज गोविंदवर्मा अशी वंशावळ दिलेली आहे. गोविंदवर्म्याने अनेक देवळांना व विहारांना दाने दिली. आपल्या राजवटीच्या सदतिसाव्या वर्षी वैशाख पौर्णिमेला राणीच्या विनंतीवरून त्याने परममहादेवीच्या विहाराला एक गाव दान दिल्याचा उल्लेख त्यात आहे. विक्रमेंद्रभट्टारकवर्मा हा माधवराजाला पुत्रवत मानीत असे व त्या माधवराजाने अनेक राजांचा उच्छेद करून साम्राज्य वाढविले असेही त्यात म्हटले आहे. हे दोघे भाऊ होते. विक्रमेंद्रवर्मा निपुत्रिक मरण पावला असावा, म्हणून त्याच्यानंतर माधवराज माधववर्मा या नावाने गादीवर आला त्याचा राज्यकाल ज्ञात नाही. विक्रमेंद्रभट्टारकवर्मा याने किती वर्षे राज्य केले तेही कळत नाही. माधववर्मा याच्या नंतर गोविंदवर्मा राजा झाला. इ. स. ६१५मध्ये वादामीच्या चालुक्यवंशी पुलकेशीने ज्याचा उच्छेद करून आंध्र प्रदेश आपल्या राज्यास जोडला, तो विष्णुकुंडी वंशातला गोविंदवर्माच असावा.

वरील दोन ताम्रपटांचा अभ्यास करून डॉ. राम राव यांनी विष्णुकुंडी राजांची सुधारित वंशावळ दिली आहे, ती अशी –

विक्रमेंद्रवर्मा	इ. स. ४५०–४५८
गोविंदवर्मा	इ. स. ४५८–४६८
माधववर्मा (१ला)	इ. स. ४६८–५१८
विक्रमेंद्रवर्मा (१ला)	इ. स. ५१८–५२८
इंद्रभट्टारकवर्मा	इ. स. ५२८–५५५
विक्रमेंद्रवर्मा (२रा)	इ. स. ५५५–५६६
इंद्रवर्मा	इ. स. ५६६–५७०
माधववर्मा	इ. स. ५७०–५७५
गोविंदवर्मा	इ. स. ५७५–६१५

या ताम्रपटांवरून असेही ध्यानात येते की, विष्णुकुंडी वंशातले राजे वैदिक धर्माचे अभिमानी आणि यज्ञयाग करणारे असले तरी, त्यांनी बौद्ध विहार निर्माण करण्यासाठी पुष्कळ साहाय्य केले होते, गावे दान दिली होती आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा अभ्यासही केला होता.

या ताम्रपटांत विक्रमेंद्र (१ला) याला महाकवी म्हटले आहे. या राजवंशात असे अनेक थोर पुरुष होऊन गेल्याचे कळते.

कलेच्या क्षेत्रातही विष्णुकुंडी वंशातील राजांनी चांगली कामगिरी केलेली दिसते. विजयवाडा या नगराजवळ उंडवल्ली व मोगलराजपूर नामक लेणी आहेत. ती या वंशाच्या राजवटीत निर्माण झालेली असून, त्यांत विष्णुकुंडी राजांनी इक्ष्वाकू वंशाची कलापरंपरा चालू ठेवली आहे. मोगलराजपूर हे लेणे अधिक चांगल्या स्थितीत आहे. तिथल्या शिल्पकामात त्या काळातल्या शिल्पकारांची प्रतिभा स्पष्ट दिसून येते. एका गुंफेच्या दर्शनी भागावर सिंह व हत्ती कोरलेले आहेत. त्यांच्या वरच्या भागात कोरलेली अष्टभुज नटराजाची आकृती अतीव मनोहर आहे. तिच्या घडणीतं उत्तर भारतीय व

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

दक्षिणी कलाशैलींचा संगम झालेला दिसतो. या लेण्यातील स्तंभांवर कृष्णाने केलेला गोवर्धनोद्धार, वराहकृत पृथ्वीचा उद्धार, हिरण्यकशिपुवध, त्रिविक्रम–बली, लिंगोद्भव, इ. प्रसंग सुरेख कोरले आहेत. तिथले शृंगयुक्त द्वारपालही प्रेक्षणीय आहेत. उंडवल्ली लेण्यातील बहुतेक कोरीव काम नष्ट झालेले आहे. पण जे थोडेसे अवशिष्ट आहे, त्यातील पशू व मानव यांच्या आकृतींत शिल्पकाराचे कसब चांगले दिसून येते. [सं. मु. २ व ६; डॉ. अजयमित्र शास्त्री – वि. सं. मं. वा. १९७३; डॉ. राम राव – प्रो. इं. हि. कॉं. २७ वे सें., १९६५; इं. स्क.]

विष्णुगीता

वैष्णव संप्रदायात मान्यता पावलेला एक ग्रंथ. ही गीता देवलोकात विष्णूने देवांना सांगितली आणि त्यानंतर व्यासांनी ती सूताला सांगितली. तिच्यातले अध्यायवार काही विषय असे –

अध्याय १ – देवासुरांचे युद्ध. त्यात देवराज्याच्या काही भागावर असुरांचे आधिपत्य. भोगवृद्धीमुळे देवांचा तपःक्षय. नारदाच्या उपदेशाने देवांची तपश्चर्या. देवांना महाविष्णूचे दर्शन. विष्णू देवतांना म्हणाला, "तुम्ही सदाचार सोडलात, म्हणून ही दुरवस्था तुम्हांला प्राप्त झाली." नंतर तापत्रयाचा हेतू; ज्ञान, ध्यान, कर्मफलत्याग व शांती यांचे उत्तरोत्तर श्रेष्ठत्व; वैराग्यप्रशंसा, दृश्य प्रपंचाचे यथार्थ स्वरूप, इत्यादी.

अध्याय २ – निर्गुणावस्थेत अद्वितीयता आणि शक्ती यांच्या आविर्भावाने महाविष्णू सगुण स्वरूपात प्रकट होणे. शक्तीची विद्या व अविद्या अशी दोन रूपे. शक्ती व मूल प्रकृती यांचे तादात्म्य, सृष्टी प्रवाहरूपाने अनाद्यनंत. सृष्टी, स्थिती व लय हे प्रकृतीचेच कार्य. त्या कामी तिला ब्रह्मा, विष्णू व महेश साहाय्य करतात. धर्म हा सृष्टीचा आधार आणि नियामक आहे. ज्ञानयज्ञाचे श्रेष्ठत्व. दैवी व आसुरी संपत्ती, जीवांचे भेद, इत्यादी.

अध्याय ३ – त्रिगुणांचे स्वरूप. गुणातीताचे लक्षण. गुणकर्मविभागाने चातुर्वर्ण्याची सृष्टी. भगवंताला शरण गेल्याने मायेतून उत्तीर्णता. इंद्रिये, मन, बुद्धी व आत्मा यांचे उत्तरोत्तर श्रेष्ठत्व, इत्यादी.

अध्याय ४ – सृष्टिप्रवाहाचा प्रवर्तक भगवान. कर्मयोगाने प्राप्त होणाऱ्या शुक्ल व कृष्ण गती. कर्मयोग व ज्ञानयोग यांत कर्मयोगाची श्रेष्ठता. लोकसंग्रहार्थ कर्माची अवश्य कर्तव्यता, योगभ्रष्टाची गती, इत्यादी.

अध्याय ५ – भक्तियोग, पराभक्तीचा अधिकार. सगुणोपासनेची आवश्यकता. अवतारांचे प्रयोजन व भेद. चतुर्विध भक्ताचे लक्षण. भक्तीचे सर्वश्रेष्ठत्व. भक्तीनेच मुक्ती, इत्यादी.

अध्याय ६ – त्रिविध ज्ञान. ज्ञानाचे अधिकारी. ज्ञानलक्षण, ज्ञानप्राप्तीचा उपाय. क्षेत्रक्षेत्रज्ञवर्णन. ब्रह्मवेत्त्याचे वर्णन, इत्यादी.

अध्याय ७ – महाविष्णूकडून देवांना दिव्यचक्षूंची प्राप्ती. विश्वरूपदर्शन, विभूतियोग इत्यादी.

प्रस्तुत गीतेवर भगवद्गीतेची छाप आहे. गीतेतले बरेचसे श्लोक प्रस्तुत ग्रंथात जसेच्या तसे घेतले आहेत, तर काही थोडाफार फरक करून घेतले आहेत. [श्रीविष्णुगीता]

विष्णुत्रिमूर्तिव्रत

एक काम्य व्रत. ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशीला याला आरंभ करावा. व्रतावधी एक वर्ष. व्रतदिनी उपवास करून विष्णूची पूजा करावी. सकाळी वायूची पूजा करावी. दुपारी अग्नीमध्ये यव व तीळ यांचा होम करावा. सूर्यास्ताच्या वेळी जलामधील चंद्राची पूजा करावी. फल – स्वर्गप्राप्ती.

वायू, चंद्र व सूर्य ही विष्णूची तीन स्वरूपे असून, ते सर्व लोकांचे रक्षण करतात, अशी धारणा आहे. [हि. ध.]

विष्णुदास

(१) (इ. स. च्या १५व्या शतकाचा पूर्वार्ध) एक हिंदी कवी. हा ग्वाल्हेरचा रहिवासी होता, एवढीच याच्या चरित्रासंबंधी माहिती मिळते. वल्लभाचार्य वृंदावनात येण्यापूर्वी सुमारे ८०–९० वर्षे याने ब्रजभाषेत सगुण कृष्णभक्तीला प्रारंभ केला, हे आता सिद्ध झाले आहे. याच्या भाषेमुळे ब्रजभाषेची साहित्यिक पातळी उंचावण्यास प्रारंभ झाला, असे म्हणतात. इ. स. च्या १७ व्या शतकातील ब्रजभाषेचा एक मानदंड म्हणून याच्या भाषेकडे अंगुलिनिर्देश करतात.

याने महाभारतकथा, रुक्मिणीमंगल, स्वर्गारोहण, स्वर्गारोहणपर्व व स्नेहलीला असे पाच ग्रंथ रचले असून, ते सर्व अप्रकाशित आहेत. अभ्यासकांच्या मते स्वर्गारोहण आणि स्वर्गारोहणपर्व हे एकाच ग्रंथाचे भाग असावे. त्यात पांडवांच्या स्वर्गारोहणाची माहिती रोचक पद्धतीने सांगितली आहे. स्नेहलीला या ग्रंथात स्नेहविव्हल झालेल्या कृष्णाने उद्धवाला गोपींसाठी ज्ञानसंदेश देऊन गोकुळात पाठविले तो प्रसंग आहे. [सू. ब्र. सा.]

(२) (इ. स. चे १६ वे शतक) एक गुजराती कवी. हा खंबायतचा रहिवासी असून, जातीने नागर ब्राह्मण होता. हा स्वतःला मकरकुलोत्पन्न गंगापुत्र समजत असे. वेळोवेळी याने हरिभट्ट, भूधरव्यास, विश्वनाथव्यास, इ. गुरू केले.

विष्णुदासाने ३९ ग्रंथांची रचना केली. महाभारताच्या पंधरा पर्वांचा आणि संपूर्ण रामायणाचा त्याने गुजरातीत अनुवाद केला व अनेक आख्याने रचली. याच्या विपुल वाङ्मयनिर्मितीमुळे इ. स. १५६८–१६१२ पर्यंतच्या काळाला गुजराती साहित्यात विष्णुदासयुग म्हटले जाते. याचे वाङ्मय फारसे कसदार नाही. याचे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

अनेक ग्रंथ अजून अप्रकाशित आहेत. [गुज. सा. इ.; मा. गु. लि.]

(३) (इ. स. १८४४ – १९१७) एक साक्षात्कारी मराठी संत. हे दत्तभक्त आणि रेणुकेचे निस्सीम उपासक होते. यांचा जन्म गंगाबाई व रावजी या माता-पित्यांच्या पोटी, सातारा येथे धांदरफळे आडनावाच्या कुटुंबात झाला. हे घराणे काश्यपगोत्री व शुक्लयजुर्वेदी वाजसनेयी शाखेचे होते. विष्णुदासांचे मूळचे आडनाव मुळे आणि पाळण्यातले नाव कृष्ण असे होते.

विष्णुदास बालपणापासूनच देवलसी होते. भजन, पूजन, कीर्तन हेच त्यांचे खेळणे होते. ते कधी घरातील भिंतीच्या अंबारात, तर कधी औदुंबरतळी बसून गुरुचरित्राचे पारायण करीत. त्यांच्या वडिलांनी त्यांना धर्मकृत्याचे शिक्षण देण्याचा बराच प्रयत्न केला; पण त्यात त्यांना यश आले नाही. पुढे वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. ते संसारी बनले, तरी त्यांची दत्त-भेटीची तळमळ कमी झाली नाही. त्याचा परिणाम म्हणून त्यांनी

विष्णुदास, मराठी संत

एके रात्री घर सोडले. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, हंपी, श्रीशैल, इ. क्षेत्रांच्या यात्रा करीत ते अखेर माहूरला जाऊन स्थिर झाले. तिथे ते माधुकरी मागून अनुष्ठान करू लागले. कालांतराने त्यांना देवदेवेश्वरानजीकच्या तीर्थकुंडात सगुण दत्त-दर्शन झाले. दरम्यानच्या काळात त्यांनी हठयोगाचाही अभ्यास केला. दत्ताप्रमाणेच त्यांना रेणुकेचेही वारंवार दर्शन होत असे.

त्यांनी सुमारे सोळा वर्षे माहूरला वास्तव्य केल्यानंतर त्यांच्या घरच्या लोकांना त्यांचा शोध लागला. अठरा वर्षांच्या दीर्घ विरहानंतर त्यांची व त्यांच्या पत्नीची भेट झाली. पुनश्च त्यांचा संसार सुरू झाला. त्यांना दोन अपत्येही झाली, पण ती जगली नाहीत. सुमारे चौदा वर्षे संसार केल्यावर विष्णुदासांच्या पत्नी तिथेच निवर्तल्या. त्यानंतर काही काळाने विष्णुदासांनी नित्यानंदसरस्वतींकडून संन्यासदीक्षा घेतली आणि पुरुषोत्तमानंद सरस्वती असे नाव धारण केले. संन्यासग्रहणानंतर मातृतीर्था-जवळ त्यांनी मठ स्थापला आणि तिथेच जीवनयात्रा संपविली.

विष्णुदास माहूरच्या मार्गावर असताना वाटेत बासर क्षेत्री त्यांच्यावर सरस्वतीचा अनुग्रह झाला आणि तेव्हापासून त्यांचा काव्यप्रपंच सुरू झाला. त्यांची कविता फार प्रासादिक आणि रसाळ आहे. त्यांनी निरनिराळ्या देवतांविषयी अनेक पदे, अभंग, आरत्या, अष्टके, पाळणे, लावण्या व पोवाडे रचले आहेत. त्यांना रेणुकामातेचे ज्या स्वरूपात दर्शन झाले, त्याचे वर्णन त्यांनी एका पदात केले आहे. ते—

आली आई भवानी स्वप्नात ॥ ध्रु. ॥
श्रीवरदा सुप्रसन्न मूर्ति । जशि विज चमके गगनात ॥ १ ॥
सरळ भांग, निळभुजंगवेणी । काजळ ल्याली नयनांत ॥ २ ॥
रत्नजडित हार, पीत पितांबर । कंचुकि हिरवी अंगांत ॥ ३ ॥
केशरकस्तुरिमिश्रित तांबुल । लाल रंगला वदनात ॥ ४ ॥
कंकणे कनकाचीं खणखणती । वाजति पैंजण पायांत ॥ ५ ॥
विष्णुदास म्हणे अशिच निरंतर । दे आवडि मज भजनात ॥ ६ ॥

याशिवाय त्यांनी अनेक आख्याने व नाटकेही लिहिली आहेत. त्यांचा आत्मचरित्रपर एक सुंदर पोवाडाही आहे. विष्णुदासांची बरीच कविता दोन खंडांत प्रकाशित झाली असून, त्यांच्या चरित्राचे तीन खंड प्रकशित झाले आहेत. [विष्णुदासचरित्रामृत, खंड १ ते ३.—श्री. न. स. जोशी उर्फ खरशीकरशास्त्री; द. सं. इ.]

विष्णुदास नामा

(इ. स. चे १६ शतक) एक मराठी संत-कवी. विष्णुदास नामा ही व्यक्ती कोण असावी, याबद्दल विद्वानांत मतभेद आहेत. तो महानुभाव असावा, असे श्री. य. खु. देशपांडे सुचवतात; तर श्री. ज. र. आजगावकर, तो नामा पाठक असावा, असा तर्क करतात. श्री. वि. ल. भावे तो एकनाथांचा समकालीन किंवा किंचित पूर्वकालीन दुसरा नामदेव असावा, असे म्हणतात; तर श्री. गो. का. चांदोरकर विष्णुदास नामा व नामा कृष्णदास हे दोघे एकच, असे प्रतिपादन करतात. ल. रा. पांगारकर त्याला एकनाथांचा समकालीन, शिंपी व विठ्ठलभक्त मानतात.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

डॉ. सरोजिनी शेंडे यांनी विष्णुदास नामा व त्याचे वाङ्मय यावर एक संशोधनात्मक प्रबंध लिहिला आहे. त्यात त्यांनी पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढले आहेत –

विष्णुदास नामा कोणत्याही विशिष्ट संप्रदायाचा किंवा परंपरेचा अनुयायी वाटत नाही. तो ब्राह्मण असावा. त्याचा काळ शके १५०२ (इ. स. १५८०) ते १५५५ (इ. स. १६३३) पर्यंत असावा. तो व संत नामदेव या भिन्न व्यक्ती आहेत. त्याच्या महाभारताची काही पर्वे महानुभावांच्या सांकेतिक लिपीत लिहिलेली सापडतात. तथापि तो महानुभाव होता, असे मानण्यास सबळ पुरावा नाही.

याने मराठीत संपूर्ण महाभारत लिहिले आहे. त्याची ओवीसंख्या सुमारे १३,५०० भरते. त्यात मूळ भारतातील अनेक कथा व उपकथा गाळल्या आहेत व त्यांच्या जागी स्वतः रचलेल्या किंवा त्याच्या काळी लोकांत रूढ असलेल्या नवीन कथा घातल्या आहेत. तसेच, भारतीय कथांचे पौर्वापर्य न पाहता निरनिराळ्या पर्वांत आलेल्या कथांचे मिश्रण करून नवीनच कथा त्याने बनविल्या आहेत. मूळ भारतीय कथेचा आराखडा तेवढा कायम ठेवून त्याने तपशिलात स्वैरपणे बदल केले आहेत.

त्याचे समग्र मराठी महाभारत व इतर आख्याने उपलब्ध आहेत. तुळशी–आख्यान, एकादशीमाहात्म्य, म्हाळसेनकथा, द्रौपदीस्वयंवर, कपोताख्यान, शुकाख्यान, हरिश्चंद्राख्यान, स्फुट अभंग व पदे या त्याच्या रचना निरनिराळ्या ठिकाणी सापडतात. यावरून एके काळी तो बराच लोकप्रिय असावा, असे वाटते.

याने बुधबावणी नावाचे एक काव्य लिहिले आहे. त्यात 'ॐ नमः सिद्धं,' हा मंत्र आणि सोळा स्वर व व्यंजने यांतील एक एक अक्षर ओवीच्या सुरुवातीचे अक्षर म्हणून योजिले आहे. त्यात सर्वत्र व्यावहारिक उपदेश केलेला आहे.

याने अध्यात्मपर विनोदी कविताही केली आहे. उदा०–

आम्ही न बोलों लटकें । अवघें वर्तमान खोटें ।।ध्रु०।।
मुंगी व्याली शिंगी झाली तिचे दूध ऋती ।
अठरा रांजण भरूनि ठेविले प्याले बारा हत्ती ।।
तळयांत कांसव गीत गाय तडिवर कोल्हा नाचे ।
घेउनि कागद दौत लेखणी खेंकडा पुस्तक वाचे ।।
विष्णुदास नामा म्हणे ऐका याची ख्याती ।
जो लटिके म्हणेल त्याचे पूर्वज नरकीं जाती ।।

विष्णुदास नाम्याचा पुढील अभंग फार प्रसिद्ध आहे –

येई वो विठ्ठले माझे माउलिये ।
निढळावरी कर ठेवुनी वाट मी पाहें ।।
आलिया गेलिया हातीं धाडीं निरोप ।
पंढरपुरीं आहे माझा मायबाप ।।
पिवळा पीतांबर कैसा गगनीं झळकला ।
गरुडावर बैसोनि माझा कैवारी आला ।।
विठोबाचे राज्य आम्हां नित्य दिवाळी ।
विष्णुदास नामा जीवें भावें ओवाळी ।।

विष्णुदास नामा नावाच्या अनेक व्यक्ती होत्या, असे श्री. अ. ना. देशपांडे यांनी म्हटले आहे. [प्रा. म. सं. १; म. सा.; प्रा. म. वा. इ., भाग १ उत्तरार्ध; श्री. वसंत पारखे - महाराष्ट्र साहित्य पत्रिका, जानेवारी १९६२; म. वा. इ. २]

विष्णुदूत यमाच्या दूतांप्रमाणेच विष्णूचेही दूत असतात व ते हरिभक्तांचे रक्षण करून, मृत्यूनंतर त्यांना विष्णुलोकी घेऊन जातात. अजामिळ राजा पापाचरणी होता. तो मेल्यानंतर यमदूत त्याला यमलोकी नेण्यासाठी आले. त्याच वेळी त्याला वैकुंठात नेण्यासाठी, विष्णुदूतही आले. त्यांनी यमदूतांना अडविले. अजामिळाने मृत्यूपूर्वी नारायण नावाचा उच्चार केला होता. त्यामुळे त्याची समस्त पापे भस्म झाली आहेत आणि म्हणून आम्ही त्याला वैकुंठात नेणार आहोत, असे त्यांना विष्णुदूतांनी सांगितले.'

विष्णुदूतांचा सदैव वैकुंठात निवास असतो. विष्णूप्रमाणेच त्यांच्याही हाती शंख, चक्र, गदा या वस्तू असतात. चौथ्या हाती सोटा असतो. त्यांच्या गळयात तुळशीची माळ असते. यमही त्यांना मान देतो. [पु. इ.; सा. इं. गॉ.]

विष्णुदेवकीव्रत एक काम्य व्रत. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला या व्रताला प्रारंभ करावा. व्रतावधी एक वर्ष. व्रतदिनी पंचगव्याने स्नान करून ते थोडे प्राशन करावे. वासुदेवाची बाणपुष्पांनी व चंदनाने पूजा करून त्याला महानैवेद्य दाखवावा. एक महिना कोणत्याही प्राण्याला इजा न करण्याचा, असत्य न बोलण्याचा, चोरी न करण्याचा आणि मद्य व मांस भक्षण न करण्याचा निश्चय करावा. सतत विष्णूचे ध्यान करावे. शास्त्राची, यज्ञाची किंवा देवतांची चेष्टा करू नये. प्रत्येक दिवशी मौन पाळून नैवेद्य भक्षण करावा. मार्गशीर्ष, पौष, माघ आणि इतर महिन्यांतही असाच विधी करावा. परंतु प्रत्येक महिन्यात फुले, धूप व नैवेद्य हे साहित्य निरनिराळे असावे.

कृष्णमाता देवकीने सत्पुत्राच्या प्राप्तीसाठी हे व्रत केले होते, अशी कथा आहे. [हि. ध.]

विष्णुदोलोत्सव चैत्र शुक्ल पंचमीच्या दिवशी विष्णुदोलोत्सव करतात. त्या दिवशी विष्णूची पूजा व देवपितृतर्पण करतात. ब्राह्मणांस फुलांच्या माळा व चंदनाची

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उटी देऊन सुग्रास भोजन घालतात. फल—वैभवप्राप्ती. [व्रतराज]

विष्णुधर्मपुराण एक उपपुराण. हा ग्रंथ वैष्णवसंप्रदायात लोकप्रिय असून, त्यात त्या संप्रदायाचे धार्मिक आचार व कर्तव्ये सांगितली आहेत. ग्रंथाचे स्वरूप पुराणासारखे नसून शास्त्रासारखे आहे. प्रथम त्याला शास्त्रच मानीत; पण पुढे विविध संप्रदायांची पुराणे रचली गेल्यानंतर यालाही पुराण म्हणू लागले.

प्रस्तुत ग्रंथात प्रारंभी क्रियायोगाचे वर्णन आहे. होम-हवन, पूजा, वंदन, सेवा, व्रत, उपवास, ब्राह्मणभोजन, इ. क्रियांचा त्यात समावेश आहे. क्रियायोगाने नारायण प्रसन्न होतो व भक्ताला कैवल्यप्राप्ती होते, असे सांगितले आहे; अंबरीष राजा व प्रल्हाद हे विष्णुभक्त क्रियायोगानेच कैवल्यपद पावले.

यांत विष्णूची अनेक स्तोत्रे आहेत. त्यांमध्ये विष्णू हाच अनादी, अनंत, परमात्मा, जगाचा नियंता व निर्माता असल्याचे प्रतिपादिले आहे.

आत्म्याचे व परमात्म्याचे मीलन म्हणजेच योग होय. योगाचे पर आणि अपर किंवा ज्ञान आणि क्रिया असे दोन प्रकार होतात. ज्ञानयोग म्हणजे मनाचा संयम करून परब्रह्माशी एकरूप होणे. हे ज्यांना जमत नसेल, त्यांच्यासाठी क्रिया म्हणजे पूजा-अर्चा, इ. बाह्यकर्मे सांगितली आहेत. विष्णुभक्ताला वर्णाश्रमांचे पालन करणेही आवश्यक आहे, कारण वर्ण म्हणजे मोक्षप्राप्तीच्या पायऱ्या होत, असे म्हटले आहे.

भेदाभेद किंवा द्वैताद्वैत हे या पुराणाचे तत्त्वज्ञान आहे. 'ॐ नमो वासुदेवाय' हा याचा मंत्र आहे.

इ. स. २००—३०० या काळात हे पुराण निर्माण झाले असावे. त्या काळी बौद्ध धर्माचा खूप प्रसार झाला होता. पुराणकर्त्याला तो मान्य नव्हता. प्रस्तुत पुराणात बौद्धांना पाखंडी म्हटले असून, वर्णाश्रमधर्माचे पालन न करणारे, मायामोहामुळे दुष्कृत्ये करून वितंडवाद करणारे व दुराचार माजवणारे असे त्यांचे वर्णन केले आहे. म्हणून वैदिक धर्माचा पुन्हा प्रचार करण्यासाठीच या ग्रंथाचा अवतार झाला. हे पुराण भारताच्या वायव्यभागात रचले गेले असावे. कारण तिकडील प्रदेशातल्या पुण्यक्षेत्रांचे त्यात विशेषत्वाने वर्णन केलेले आहे. [स्ट. उ.]

विष्णुधर्मसूत्र या धर्मसूत्रात शंभर प्रकरणे आहेत. प्रकरणांची संख्या इतकी मोठी असली, तरी हे धर्मसूत्र फार मोठे नाही. यातील ४०, ४२ व ७६ यांसारखी काही प्रकरणे इतकी लहान आहेत, की त्यांत एकच सूत्र व एकच श्लोक आहे. पहिले प्रकरण आणि शेवटची दोन प्रकरणे पद्यमय असून, बाकीची गद्य-पद्यात्मक आहेत. या सूत्राचा निकट संबंध यजुर्वेदाच्या काठक शाखेशी आहे. या सूत्रात पुढील विषय विवेचिले आहेत —

वर्णाश्रमधर्म, राजधर्म, व्यवहार, दिव्ये, दायविभाग, बारा प्रकारचे पुत्र, युगे आणि मन्वंतरे, आशौच, शुद्धी, विवाह, स्त्रीधर्म, प्रायश्चित्ते, श्राद्ध, दान, इष्टापूर्त कर्मे, इत्यादी.

या धर्मसूत्राची भाषा सोपी आणि सविस्तर आहे. शिवाय ती व्याकरणशुद्ध आहे. प्रस्तुत धर्मसूत्र विभिन्न कालांत रचले गेले असावे. याचा काही भाग सनपूर्व ३०० ते १०० या दरम्यानचा असावा. आणि बाकीचा भाग इ. स.च्या तिसऱ्या शतकानंतरचा असावा. या धर्मसूत्रात काठक शाखेचे मंत्र आहेत आणि काठक गृह्यसूत्रातले उतारेही आहेत. काठक शाखेचे लोक प्राचीन काळी पंजाब व काश्मीर या भागात होते. त्यावरून प्रस्तुत ग्रंथ त्याच भागात निर्माण झाला असावा, असे अनुमान आहे. [हि. घ.]

विष्णुधर्मोत्तरपुराण एक उपपुराण. हे पुराण म्हणजे विष्णुधर्मपुराणाचा उत्तरार्ध होय, असे त्याच पुराणात म्हटले आहे. याचे तीन खंड असून, पहिल्या खंडात २६९, दुसऱ्या खंडात १८३ व तिसऱ्या खंडात ३५५ अध्याय आहेत. यात वैष्णवांचा आचारधर्म सांगितला आहे. मात्र ही रचना भागवत संप्रदायाची नसून, पांचरात्रांची आहे. त्यात विष्णुपूजेची पांचरात्र पद्धती वर्णिली आहे व त्या संप्रदायाचा व्यूहसिद्धान्तही स्वीकारला आहे. यात पाखंडी लोकांना अमंगल व तिरस्करणीय मानले आहे. यात विष्णुपूजेचे अनेक मंत्र दिले असले, तरी त्या मंत्रविधानाला तांत्रिक विचारसरणीचा स्पर्श झालेला नाही.

हे पुराण मार्कंडेय मुनीने कृष्णाचा नातू वज्र याला सांगितले. यात विश्वोत्पत्ती, लोकवर्णन, भूवर्णन, गंगादी नद्यांचे वर्णन, वामन-परशुराम यांच्या कथा, ग्रहज्योतिष, फलज्योतिष, आकाशवर्णन; तसेच वेन, पृथू, पुरूरवा, अगस्त्य, रावण, इ. पुरुषांची आख्याने; राजधर्म, राज्याभिषेकपद्धती, गायीची उपासना, युद्धशास्त्र, धनुर्वेद, इ. विषय वर्णिले आहेत. मधु-कैटभ वधाच्या वेळी विष्णूने सागरावर नृत्य केले; त्यातूनच पुढे नृत्यशास्त्राचा अवतार झाला. नारायणाने ऊर्वशीचे चित्र काढले., तेच जगातले पहिले चित्र होय; त्यातून पुढे चित्रकलेचे व मूर्तिकलेचे शास्त्र निर्माण झाले. मूर्तिपूजा ही सामान्य जनांच्या भक्तिमार्गासाठी उपयुक्त आहे, असे म्हटले आहे (३.१०८.२६).

आदौ कृत्वा महाभाग साकारे लक्ष्यबन्धनम् ।
ततः समर्थो भवति शून्ये ध्याने नरोत्तम ॥

अर्थ — हे राजा, मनुष्य ईश्वराच्या आकारावर म्हणजेच

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मूर्तीवर ध्यान धरण्यास शिकल्यानंतर त्यातूनच पुढे त्याला शून्याच्या ठिकाणी ध्यान धरण्याचे सामर्थ्य प्राप्त होते.

प्रस्तुत पुराण म्हणजे एक सांस्कृतिक ज्ञानकोशच आहे. त्यात व्यावहारिक, सांप्रदायिक, कलाविषयक, शास्त्रविषयक, धर्मविषयक, अशा अनेक विषयांची माहिती दिली आहे. यात रामायण, महाभारत, गीता, उपनिषदे, मनुस्मृती व गर्गादिकांचे ज्योतिषग्रंथ यांतून शेकडो उतारे घेतलेले आहेत. वस्तुतः ही स्वतंत्र निर्मिती नसून, हा ग्रंथ म्हणजे अनेक ग्रंथांतून एकत्रित केलेला ज्ञानसंग्रहच आहे. नृत्य, नाट्य, चित्र, शिल्प, मूर्ती या कलाप्रकारांचे वर्णन आणि त्या त्या कलासाधकांना तपशीलवार मार्गदर्शन, हें या ग्रंथाचे आगळे वैशिष्ट्य होय.

यात चित्राला व नृत्याला नवरसात्मकता असते असे म्हटले असून, भरताच्या सिद्धान्तानुसार वरील कलाप्रकारांचे विवरण केले आहे. कला-सौंदर्याची तत्त्वे भरताच्या परिभाषेत सांगितली आहेत, ती अशी—

त्रैलोकस्यानुकरणं नृत्ते देवि प्रतिष्ठितम् ।
(३.३४.१७)

यथा नृत्ते तथा चित्रे त्रैलोकस्यानुकृतिः स्मृता ।
दृष्टयश्च तथा भावा अङ्गोपाङ्गानि सर्वशः ॥
कराश्च ये महानृत्ते पूर्वोक्ता नृपसत्तम ।
त एव चित्रे विज्ञेया नृत्तं चित्रं परं स्मृतम् ॥
(३.३५.५–७)

वृष्टं सुसदृशं कार्यं सर्वेषामविशेषतः ।
चित्रे सादृश्यकरणं प्रधानं परिकीर्तितम् ॥
(३.४२.४८)

शृङ्गारहासकरुणवीररौद्रभयानकाः ।
बीभत्साद्भुतशान्ताश्च नव चित्ररसाः स्मृताः ॥
(३.४३.१)

विना तु नृत्यशास्त्रेण चित्रसूत्रं सुदुर्विदम् ।
जगतो न क्रिया कार्या द्वयोरपि यतो नृप ॥
आतोद्यं यो न जानाति तस्य नृत्तं हि दुर्विदम् ।
आतोद्येन विना नृत्तं विद्यते न कथंचन ॥
न गीतेन विना शक्यं ज्ञातुमातोद्यमप्युत ।
गीतशास्त्रविधानज्ञः सर्वं वेत्ति यथाविधि ॥
(३.२.३५–३७)

अर्थ – हे देवि, नृत्यामध्ये त्रैलोक्याचे अनुकरण करणे याला प्रतिष्ठा प्राप्त आहे. नृत्याप्रमाणेच चित्रातही त्रैलोक्याची अनुकृती असते. नृत्यातील सर्व दृष्टी, सर्व भाव, अंगे आणि उपांगे हे सर्व मिळून संपूर्ण अनुकृतीच असते. महानृत्यात ज्याप्रमाणे हस्ताभिनय असतात, तसेच ते चित्रातही असतात, असे समजावे. चित्र हे श्रेष्ठ नृत्यच होय. शृंगार, हास्य, करुण, वीर, रौद्र, भयानक, बीभत्स, अद्भुत आणि शांत हे नऊ चित्ररस म्हणून शास्त्रात सांगितले आहेत. नृत्यशास्त्रावाचून चित्रशास्त्र समजणे कठीण आहे. चित्र व नृत्य या दोहोंची संगती लक्षात न घेता जगातील कोणत्याही कलेची निर्मिती करू नये. ज्याला वाद्य कळत नाही, त्याला नृत्यही कळणार नाही. वाद्यावाचून नृत्य असूच शकत नाही. गीत जाणल्यावाचून वाद्य जाणता येत नाही. गीतशास्त्राचे विधान ज्याला कळले, तोच सर्व कला यथाविधि जाणतो.

प्रस्तुत पुराणात शंकरगीता नावाचे एक प्रकरण आहे. ही गीता शंकराने परशुरामाला सांगितली आहे. या गीतेत शंकराने नारायणाचे माहात्म्य सांगून, आपण स्वतः विष्णूचेच ध्यान करतो, असे म्हटले आहे. पुढे सात वारांना आणि सर्व तिथींना विष्णूची पूजा कशी करावी, तेही सांगितले आहे.

प्रस्तुत पुराणाचा काल इ. स. चे ५ वे शतक हा आहे. हे पुराण काश्मीरमध्ये किंवा पंजाबाच्या उत्तर भागात लिहिले गेले असावे, असे डॉ. हाजरा म्हणतात. हे कमीत कमी परिवर्तन किंवा प्रक्षेपण झालेले उपपुराण आहे. [स्ट. उ.; वै. सं. वि.]

विष्णुपंचकव्रत एक काम्य व्रत. कार्तिक मासाच्या शेवटच्या पाच दिवसांना विष्णुपंचक असे नाव आहे. हे पाचही दिवस व्रतकर्त्याने उपवास करून, राधादामोदर यांची षोडशोपचार पूजा करायची असते. या व्रतात कार्तिकातले सर्व नेम-धर्म आचरायचे असतात. व्रताची कथा अशी –

दंडकर नावाचा एक मनुष्य होता. तो गावात सदैव चोऱ्यामाऱ्या करी. म्हणून लोकांनी त्याला गावातून हाकलून दिले. मग तो अरण्यात गेला आणि एका दरोडेखोरांच्या टोळीत शिरून लूटमार करू लागला. दरोडेखोरांच्या भीतीने मग लोकांनी त्या अरण्यातला रस्ताच सोडून दिला. त्यामुळे त्या दरोडेखोरांना उपास पडू लागले. दंडकरही अन्नावाचून हैराण झाला. एके दिवशी त्या रानात काही लोक एका आवळीच्या झाडाखाली जमलेले त्याला दिसले. दंडकर त्यांच्या जवळ गेला आणि अन्न मागू लागला. लोक म्हणाले की, 'विष्णुपंचक असल्यामुळे आम्हाला उपवास आहे.' दंडकर प्राप्त परिस्थितीला कंटाळला होता. त्याने त्या लोकांकडून विष्णुपंचक व्रताचे विधान समजावून घेतले आणि भक्तिभावाने ते केले. त्या पुण्याने तो उद्धरून गेला. [हि. ध.]

विष्णुपद पवित्र स्थान. भारतात अनेक ठिकाणी ही स्थाने आहेत. नभोमंडलात सप्तर्षींच्या वरच्या बाजूला ज्या मार्गावर धर्म, ध्रुव इत्यादिकांनी आश्रय घेतला आहे,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यालाही ही संज्ञा आहे. त्याचप्रमाणे सप्तर्षी व ध्रुव यांच्यामधील ज्या प्रदेशात यती व योगी राहतात, तो प्रदेश याच नावाने ओळखला जातो. विष्णुपद हे पावसाचे उगमस्थान आणि त्रिलोकांचे आश्रयस्थान मानलेले आहे. इथूनच गंगा उगम पावते, अशी समजूत आहे. याला स्वर्गीय मंडलाचा तिसरा विभाग म्हणतात.

कुरुक्षेत्र, गया, निषध, पंढरपूर, इ. ठिकाणी विष्णुपदे आहेत. गयेतल्या विष्णुपदावर श्राद्धाचे पिंड अर्पण करतात. इथल्या एका पर्वतावर धर्मरथाने यज्ञ केला, त्यालाही विष्णुपद हेच नाव आहे. पंढरपुरातील विष्णुपदाला वेणुनाद असे दुसरे नाव आहे. हे नाव मिळण्याचे स्कंदपुराणातील स्पष्टीकरण असे –

या ठिकाणी श्रीकृष्णाचे व संगम नामक राक्षसाचे मोठे युद्ध होऊन त्यात संगमाचा पराभव झाला. श्रीकृष्णाच्या भीतीने संगम इथल्या शिलेखाली दडून बसला. मग कृष्णाने त्या शिलेवर पाय देऊन वेणू वाजवायला प्रारंभ केला. हा श्रीकृष्णाचा पाय म्हणजेच विष्णुपद होय. पाहा– गया, पंढरपूर. [पु. इं.; पंढरीमाहात्म्य]

विष्णुपदव्रत एक काम्य व्रत. आषाढ महिन्यात पूर्वाषाढा नक्षत्र असेल, तेव्हा या व्रताला प्रारंभ करावा. विष्णूचे तीन पाय दुधात किंवा तुपात ठेवून त्यांची पूजा करावी. रात्री हविष्यान्न भक्षण करावे. श्रावण महिन्यात उत्तराषाढा नक्षत्र असेल, तेव्हा गोविंदाच्या आणि विष्णूच्या तीन पदांची पूजा करून दोघांनाही निरानिराळ्या खाद्यपदार्थांचा नैवेद्य दाखवावा आणि ब्राह्मणांना निराळी दाने द्यावी. भाद्रपदात पूर्वाषाढा नक्षत्राला, फाल्गुनात पूर्वा–फल्गुनी नक्षत्राला व चैत्रात उत्तरा–फल्गुनी नक्षत्राला वरीलप्रमाणेच पूजा करावी. फल – आरोग्य, ऐश्वर्य व विष्णुलोक यांची प्राप्ती. [हि. ध.]

विष्णुपुराण एक महापुराण. महापुराणसूचीत याचा तिसरा क्रमांक आहे. हे एक प्राचीन पुराण आहे. सर्व प्रथम ब्रह्मपुराण, त्यानंतर पद्मपुराण आणि त्यानंतर विष्णुपुराण निर्माण झाले. वेदव्यासांनी आपली पुराणसंहिता लोमहर्षण या आपल्या प्रसिद्ध शिष्याला शिकवली. त्याचे सहा शिष्य होते. त्यांतल्या अकृतव्रण, सावर्ण्य व शांशपायन या तिघांनी गुरूने दिलेल्या संहितेचे अध्ययन करून स्वतःची एकेक पुराणसंहिता तयार केली. विष्णुपुराण हे वरील चार संहितांचे संग्रहरूप आहे.

विष्णुपुराण कसे प्रकट झाले, याविषयी पुराणाच्या आरंभीच एक कथा दिली आहे, ती अशी –

वसिष्ठ ऋषीचा पुत्र शक्ती आणि त्याचा पुत्र पराशर होय. पराशराला एके दिवशी कळले, की आपला पिता शक्ती याला विश्वामित्राच्या प्रेरणेने एका राक्षसाने मारून खाल्ले. पराशराला त्या गोष्टीचा क्रोध आला आणि समस्त राक्षसांच्या नाशासाठी त्याने एक यज्ञ आरंभिला. त्या यज्ञात शेकडो राक्षस जळून भस्म होऊ लागले. वसिष्ठाने हे पाहिले आणि त्याला परमदुःख झाले. तो आपल्या नातवाला म्हणाला –

' बापाच्या वधाबद्दल सगळ्या राक्षसांना अपराधी ठरवणे हे न्याय्य नव्हे. ती एक दुर्दैवी घटना होती. वत्सा, मनुष्य बहुत कष्टांनी जे यश व तप संचित करतो, ते क्रोधामुळे ताबडतोब नष्ट होते. त्यामुळे स्वर्ग व मोक्षही अप्राप्य होतो. हे लक्षात घेऊन तू क्रोध सोडून दे आणि राक्षसांचा संहार थांबव. '

पराशराने आजोबाचा हा उपदेश मानला आणि राक्षससत्र बंद केले. राक्षसवंशाचा पूर्वज महर्षी पुलस्त्य हा होय. त्याला हे सत्र थांबल्याचा परमानंद झाला. तो तिथे येऊन पराशराला भेटला आणि त्याने ' तू एका पुराणसंहितेची रचना करशील ' असा पराशराला वर दिला.

त्यानंतर मैत्रेयाने प्रश्न केल्यावरून पराशराने हे विष्णुपुराण त्याला सांगोपांग कथन केले. ते सर्व सांगून झाल्यावर तो म्हणाला (वि. पु. ६. ८. ३) –

पुराणं वैष्णवं चैतत्सर्वकिल्बिषनाशनम् ।
विशिष्टं सर्वशास्त्रेभ्यः पुरुषार्थोपपादकम् ॥

अर्थ – हे विष्णुपुराण सर्व पापांचा नाश करणारे असून, सर्व शास्त्रांहून विशिष्ट आणि पुरुषार्थ सिद्ध करून देणारे आहे.

ब्रह्म, वायू आणि मत्स्य या तीन्ही पुराणांपेक्षा इतिहास आणि संस्कृती या दोन्ही दृष्टींनी यात महत्त्वपूर्ण सामग्री उपलब्ध होते.

विष्णुपुराणाच्या श्लोकसंख्येविषयी फार मोठे मतभेद आहेत. नारदीय पुराणात याचे चौवीस हजार श्लोक असल्याचे सांगितले आहे. बल्लाळसेनाने तेवीस हजार ही त्याची श्लोकसंख्या दिली आहे. इतर टीकाकारही वेगवेगळ्या संख्या सांगतात. पण सांप्रतच्या पोथीत फक्त सात हजारच श्लोक आढळतात. श्री. बलदेव उपाध्याय ही संख्या सहा हजारच सांगतात. मग सतरा किंवा अठरा हजार श्लोक म्हणजेच तीन चतुर्थांश भाग गेला कुठे ? याचे निर्णायक उत्तर सापडत नाही. पं. श्रीरामशर्मा आचार्य यांचे याविषयी मत असे, की कोणत्या तरी कारणाने प्राचीन कालीच कोण्या विद्वानाने प्रस्तुत पुराणाचे हे संक्षिप्त संस्करण तयार केले असावे आणि मूळचा मोठा ग्रंथ विधर्मियांच्या आक्रमणकालात नष्ट झाला असावा.

अन्य पंडितांच्या मते विष्णुधर्मोत्तरपुराण हा प्रस्तुत पुराणाचा एक भाग असावा. कारण विष्णुधर्मोत्तरात आलेले विषय नारदसूचीला अनुसरून आहेत आणि ते प्रचलित पुराणात

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

नाहीत. तेव्हा प्रचलित विष्णुपुराण हा पूर्वार्ध व विष्णुधर्मोत्तर-पुराण हा त्याचा उत्तरार्ध समजावा.

प्रस्तुत पुराण अंश या संज्ञेने विभागलेले असून, त्याचे १२६ अध्याय आहेत. या पुराणात पुराणाची पाचही लक्षणे उत्तम प्रकारे घटित होतात.

पहिल्या अंशात कालाचे स्वरूप, सृष्टीची उत्पत्ती आणि ध्रुव, पृथू व प्रल्हाद यांची आख्याने आहेत. याच अंशात दुर्वासाची कथा आली आहे. इंद्र ऐरावतावर बसून चालला असता, वाटेत त्याला दुर्वास ऋषी भेटला. त्याने इंद्राला एक पुष्पमाला दिली. इंद्राने तो ऐरावताच्या गंडस्थळावर ठेवली. ऐरावताने ती सोंडेने ओढून पायदळी तुडवली. दुर्वासाला तो अपमान वाटला. त्याने इंद्राला शाप दिला, की "तुझे संपूर्ण वैभव नष्ट होईल." त्या शापामुळे इंद्राचे सर्व वैभव क्षीरसागरात बुडाले. मग देव-दैत्यांनी त्यासाठी समुद्रमंथन केले.

तिथून पुढे प्रचेतसांची कथा आहे. हे प्रचेतस दक्षपुत्र असून, संख्येने दहा होते. ते सागराच्या तळाशी अनेक वर्षे तप करीत बसले होते. तप पुरे करून जेव्हा ते वर आले, तेव्हा त्यांना सारी पृथ्वी झाडा-झुडपांनी गच्च भरलेली दिसली. या वृक्षसृष्टीमुळे पृथ्वीवर माणसांना वस्ती करायला जागाच उरली नव्हती. ते पाहून त्यांनी आपल्या मुखातून अग्नी उत्पन्न केला व तो अग्नी सारी वृक्षसृष्टी जाळीत सुटला. चंद्राला हा संहार पाहवेना. तो प्रचेतसांपुढे प्रकट झाला. वृक्षांनी वाढविलेली मारिषा नावाची एक कन्या होती. ती प्रचेतसांना देऊन त्याने तो वृक्षसंहार थांबवला.

यापुढे प्रल्हादाचे आख्यान आले आहे. त्याच्या ओघात विष्णूच्या चार विभूती सांगितल्या आहेत, त्या अशा – पहिली विभूती शेषावर शयन करते, दुसरी सृष्टीचे पालन करते, तिसरी अवतार घेऊन धर्मरक्षण करते आणि चौथी अधर्माचा व असुरांचा नाश करते.

दुसऱ्या अंशाचा विविध लोकांशी संबंध आहे. यात पृथ्वीचे नऊ खंड, सप्त स्वर्ग, सप्त पाताळ, इत्यादींचे वर्णन आहे. प्रस्तुत भूगोलाचे वर्णन करताना त्यात भारतवर्षाचेही वर्णन आले असून, ते अत्यंत आत्मीयतेने केलेले आहे. पुराणकार भारत-महिमा वर्णन करताना म्हणतो–

अत्रापि भारतं श्रेष्ठं जम्बुद्वीपे महामुने ।
यतो हि कर्मभूरेषा ह्यतोऽन्या भोगभूमयः ॥
अत्र जन्मसहस्राणां सहस्रैरपि सत्तम ।
कदाचिल्लभते जन्तुर्मानुष्यं पुण्यसञ्चयात् ॥
गायन्ति देवाः किल गीतकानि । धन्यास्तु ते भारतभूमिभागे ॥
स्वर्गापवर्गास्पदमार्गभूते । भवन्ति भूयः पुरुषाः सुरत्वात् ॥
कर्माण्यसङ्कल्पिततत्फलानि । संन्यस्य विष्णौ परमात्मभूते ॥
अवाप्य तां कर्ममहीमनन्ते । तस्मिंल्लयं ये त्वमलाः प्रयान्ति ॥
(वि. पु. २१.२२-२५)

भावार्थ – हे मैत्रेय महामुने, जंबुद्वीपात भारत हे श्रेष्ठ आहे. कारण ही मनुष्याची कर्मभूमी असून, अन्य भूमी या भोगभूमी आहेत. हजारो जन्मांचे फेरे फिरल्यावर जर पुण्यसंचय असला, तर या देशात जीवाला मनुष्यजन्म प्राप्त होतो. हा देश स्वर्ग व मोक्ष यांना मार्गभूत आहे. इथे जन्मलेले जे पुरुष फलासक्ती सोडून कर्म करतात, कर्मफल भगवंताला अर्पण करतात आणि त्यामुळे मलरहित होऊन भगवंताच्या ठिकाणी लीन होतात, ते पुरुष आमच्यापेक्षाही अधिक भाग्यवान होत, असे स्वर्गातले देवही म्हणतात.

याच अंशात ग्रह, नक्षत्रे, ज्योतिश्चक्र, इ. खगोलांचा परिचय करून दिला आहे. त्यानंतर जडभरताचे आख्यान विस्ताराने सांगितले आहे, ते असे–

भरत हा नाभिसुत ऋषभ राजाचा जेष्ठ पुत्र होय. विश्वरूपाची कन्या पंचजनी हिच्याशी त्याचा विवाह झाला. तिच्या साह्याने त्याने गृहस्थाश्रमाची उत्कृष्ट सुखे उपभोगली. त्याने राज्यही चांगल्या प्रकारे केले. मुले मोठी झाल्यावर त्याने राज्यकारभार मुलांच्या शिरावर दिला आणि तो वानप्रस्थासाठी गंडकीच्या तीरी पुलह ऋषीच्या आश्रमात गेला. तो नदीवर तप करीत बसला असता, एके दिवशी एक गर्भवती हरिणी नदीवर पाणी पिण्यासाठी आली. एवढ्यात कुठूनतरी सिंहगर्जना हरिणीच्या कानी पडली. हरिणी घाबरली आणि तिने एकच उड्डाण मारले. त्या झटक्याने तिचा गर्भ गळून पाण्यात पडला. भरताने त्या पाडसाला प्रवाहातून उचलले आणि आश्रमात आणले.

भरताला त्या पाडसाचा इतका लळा लागला की, त्याच्या ध्यान-धारणेतही त्याला तेच दिसू लागले. मृत्युसमयीही त्याला ते पाडसच आठवले. त्या पाडसावर अशी आसक्ती जडल्यामुळे भरताला पुढचा जन्म हरिणीचाच आला. तो जन्म संपल्यावर तो ब्राह्मणकुळात जन्मला. त्या जन्मात तो जडमूढासारखा वागू लागला. लोक त्यामुळे त्याला जडभरत म्हणू लागले.

एके दिवशी सिंधुसौवीर देशाचा राजा रहूगण पालखीत बसून चालला होता. काहीतरी कारणाने त्याला एक वाहक (भोई) कमी पडला. त्याने जडभरतालाच वेठीला धरले. पालखीचा दांडा खांद्यावर वाहताना जडभरत कीड-मुंगी डावलून उड्या मारीत चालू लागला. त्यामुळे पालखीला हिसके बसू लागले. रहूगण राजा संतापला. त्याची व जडभरताची बोलाचाली झाली. त्या बोलण्यात राजाला जडभरताची आध्यात्मिक उंची कळून चुकली. राजा पालखीतून उतरला व भरताच्या पाया पडला. मग भरताने त्याला तत्त्वज्ञानाचा उपदेश केला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

तिसऱ्या अंशात मन्वंतरे, वेदविभाग, वेदांच्या शाखा, इत्यादींची माहिती देऊन यमगीता सांगितली आहे. पुढे विष्णु-पूजेचे फल, वर्णाश्रमांची कर्तव्ये, श्राद्धे, जैन व बौद्ध संप्रदाय, इत्यादींची माहिती दिली आहे.

चौथ्या अंशात सूर्य-चंद्रवंश, त्यांतले राजे, गंगावतरण, चंद्र-कृत ताराहरण, इ. गोष्टी सांगितलेल्या असून, भविष्यकालीन राजवंशही कथन केले आहेत. इतिहासदृष्टचा हा अंश फार महत्त्वाचा आहे.

पाचवा अंश सर्वांत मोठा आहे. त्यात कृष्णचरित्र आणि कृष्णाच्या लीला विस्ताराने वर्णित आहेत. त्यात रामचरित्र सुमारे १५–२० श्लोकांत संक्षिप्त सांगितले आहे, तर कृष्णचरित्र खूप विस्ताराने सांगितले आहे. भागवतपुराणातल्या कृष्णचरित्राला विष्णुपुराणाचाच आधार आहे. यातल्याच कृष्णकथा भागवतात वाढवून सांगितल्या आहेत.

सहावा अंश लहान असून, त्यात प्रलयाचे व मोक्षमार्गाचे वर्णन आहे. याच्या दुसऱ्या अध्यायात एक अद्‌भुत कथा सांगितली आहे, ती अशी –

पुण्यानुष्ठान, त्याचा काल आणि त्याची योग्यता याविषयी निश्चय करण्यास असमर्थ ठरल्यामुळे मुनिगण पृच्छेसाठी व्यास महर्षींच्याकडे आले. व्यास त्या वेळी गंगेत स्नान करीत होते. त्यांनी थोडे पाणी वर उडवून मुनींना म्हटले –

'समय म्हटला तर कलियुग श्रेष्ठ आहे.' फिरून एक वार बुडी मारून ते म्हणाले, 'स्त्रियाच साधू आहेत. त्याच धन्य आहेत.' ते ऐकून मुनिजन अधिकच वुचकळयात पडले. मग व्यासांनी आपल्या विधानाचे स्पष्टीकरण केले; ते असे –

कलियुगात तात्काळ फळ मिळते. त्रैवर्णिकांना पुण्यासाठी यज्ञ-यागादी कठीण कर्मकांड आचरावे लागते. शूद्र केवळ सेवा-धर्माने सद्‌गती मिळवतो म्हणून तो त्रैवर्णिकांपेक्षा श्रेष्ठ. पुरुषांना द्रव्यार्जनासाठी आणि एकूण संसार चालवण्यासाठी फार कष्ट पडतात. त्यामुळे त्यांचा परमार्थ दुर्घट होतो; पण पतिपरायण स्त्रिया केवळ सेवाधर्म आचरून पुण्य लोक मिळवतात. म्हणून त्या धन्य होत.

वरील कथेवरून पुराणकाराचा आशय दिसतो, तो असा –

कोणताही काळ किंवा कोणतेही युग वाईट नसते. कोणतीही जाती निकृष्ट नसते. स्त्रियाही परमार्थाच्या अधिकारी आहेत. भगवंताकडे जातीची प्रतिष्ठा नाही. तो श्रद्धा-भक्तीचा भुकेला असतो. तात्पर्य, स्त्री व शूद्र हे कोणत्याही बाबतीत हीन नाहीत.

ग्रंथाचा उपसंहार करताना पुराणकार काही महत्त्वाच्या तत्त्वज्ञानात्मक गोष्टी सांगतो, त्या अशा –

जन्मापासून मृत्यूपर्यंत जीव अनेक दुःखे व अनंत यातना भोगीत असतो. मी कोण, कुठून आलो, मला कुठे जायचे आहे, माझे स्वरूप काय, मी कोणत्या बंधनाने बांधला गेलो आहे, माझे कर्तव्याकर्तव्य कोणते, धर्म कोणता, अधर्म कोणता, याविषयी जीव काही विचारच करीत नाही. कारण तो अज्ञानाने आवृत असतो. इंद्रियभोगातच सुख आहे, असे तो समजतो; पण स्त्री, पुत्र, भूमी, संपदा या गोष्टींत माणसाला खरे सुख कधीच मिळत नाही. म्हणून शाश्वत सुख हवे असेल, तर माणसाने निष्काम कर्मयोग आचरला पाहिजे आणि त्याबरोबरच ज्ञान-योगाचीही कास धरली पाहिजे.

शास्त्रजन्य आणि विवेकजन्य असे दोन प्रकारचे ज्ञान असते. शब्दब्रह्माचे ज्ञान हे शास्त्रजन्य असून, परब्रह्माचे ज्ञान विवेकजन्य असते. जिज्ञासूने या दुसऱ्या ज्ञानाचाच मार्ग धरावा. भगवान विष्णूचे स्वरूप अव्यक्त, अजर, अचिंत्य, इ. आहे. मुमुक्षू जनांनी त्याचेच ध्यान करावे. स्वाध्याय आणि योग ही त्याची दोन साधने होत. ही दोन्ही परस्पर साहाय्यक व अन्योन्याश्रित आहेत. या दोहोंच्या योगे परमात्म्याचे ज्ञान होऊ शकते.

विष्णुपुराणात सृष्टीचा कर्ता-धर्ता या रूपाने भगवताचे चित्रण आहे. परमात्म्याचे स्वरूप विश्वव्यापक आहे, हे सांगताना पुराणकार म्हणतो (६.५.६९)–

तदेव भगवद्वाच्यं स्वरूपं परमात्मनः ।
वाचको भगवच्छब्दस्तस्याद्यस्याक्षयात्मनः ॥

अर्थ– परमात्म्याचे स्वरूप भगवच्छब्दवाच्य आहे आणि तोच शब्द त्या आद्य आणि अक्षय स्वरूपाचा वाचकही आहे.

भगवान कोणाला म्हणावे, हे पुढील श्लोकात (६.५.७८) सांगितले आहे –

उत्पत्तिं प्रलयं चैव भूतानामागतिं गतिम् ।
वेत्ति विद्यामविद्यां च स वाच्यो भगवानिति ॥

अर्थ – समस्त प्राण्यांची उत्पत्ती आणि त्यांचा प्रलय, त्यांचे येणे आणि जाणे (जन्म-मृत्यू); तसेच विद्या आणि अविद्या हे सर्व जो जाणतो, त्याला भगवान म्हणावे.

विष्णूला वासुदेव म्हणतात त्याचे कारण असे (६.५.८०)–

सर्वाणि तत्र भूतानि वसन्ति परमात्मनि ।
भूतेषु च स सर्वात्मा वासुदेवस्ततः स्मृतः ॥

अर्थ – या परमात्म्याच्या ठिकाणी सर्व भूते वास करतात आणि तो सर्वात्मा सर्व भूतांच्या ठिकाणी वास करतो. म्हणून त्याला वासुदेव म्हटले आहे.

विष्णूचे प्रमुख असे चार अंश आहेत. एका अंशाने तो अव्यक्तरूप ब्रह्मा होतो, दुसऱ्या अंशाने मरीच्यादी प्रजापती होतो, तिसऱ्या अंशाने तो काल असतो आणि चौथ्या अंशाने तो प्राणिमात्र असतो. या चार प्रकारांनी सृष्टीत तो स्थित आहे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

म्हणूनच त्याला चार भुजा आहेत. तो सर्वशक्तिमान, मंगलमय, शरणागतरक्षक आणि भक्तपरिपालक आहे. तोच इष्ट आहे, तोच ध्येय आहे आणि तोच परमपद आहे (वि. पु. १.२२).

विष्णुपुराणात चित्तशुद्धी, लौकिक अभ्युदय आणि सन्मार्गाने प्रगती या गोष्टी साध्य होण्यासाठी काही व्रते आणि पर्वे यांचे पालनही आवश्यक मानले आहे. त्यात जन्माष्टमी, चातुर्मास्य, अजित–एकादशी, विजयद्वादशी, इ. सुमारे ८० व्रतांचे विधान सांगितले आहे. योगमार्ग आणि भक्तिमार्ग यांचेही निरूपण हृदयंगम रीतीने केले आहे. वैधी आणि रागानुगा अशी भक्ती द्विविधा आहे. वैधी भक्तीत बाह्य विधी, आचार, प्रतिमापूजन, इ. गोष्टी येतात. या भक्तीच्या द्वारे साधकाचे मन हळूहळू भगवंताकडे वळते. रागानुगा भक्ती ही प्रेममूलक आहे. या भक्तीत भगवंताच्याच ममत्वाची प्राप्ती होते. ध्रुव व प्रल्हाद हे या भक्तीचे अधिकारी होत. भगवंताच्या भक्ताला जी गती प्राप्त होते, तिचे वर्णन असे –

विष्णुसंस्मरणात्क्षीणसमस्तक्लेशसञ्चयः।
मुक्तिं प्रयाति स्वर्गाप्तिस्तस्य विघ्नोऽनुमीयते ॥

अर्थ–विष्णु-नाम-गुणस्मरण केल्याने ज्याच्या समस्त क्लेशांचा संचय क्षीण झाला आहे, असा भक्त मोक्षाप्रत जातो. स्वर्ग मिळणे हे त्याला संकट वाटते. (त्याची त्याला अपेक्षाच नसते.)

प्रस्तुत पुराण हे विष्णुभक्तीला सर्वप्रकारे श्रेष्ठत्व देणारे असले, तरी ते द्वैतमार्गी नाही. त्यात अद्वैत सिद्धान्ताचे पूर्ण रूपाने प्रतिपादन केलेले आहे. जडभरत रहूगण राजाला उपदेश करताना म्हणतो –

आत्मा व्यापक, सम, शुद्ध, निर्गुण आणि प्रकृतीच्याही पलिकडचा आहे. तो एकमेवाद्वितीय आहे. तो सर्वव्यापी, अव्यय आणि जन्ममृत्यूंनी रहित आहे. तो परमज्ञानमय आहे. नामरूपे आणि जाती यांच्याशी त्याचा काहीही संबंध नाही.

तस्यात्मपरदेहेषु सतोऽप्येकमयं हि यत्।
विज्ञानं परमार्थोऽसौ द्वैतिनोऽतथ्यदर्शिनः ॥
वेणुरन्ध्रप्रभेदेन भेदः षड्जादिसंज्ञितः।
अभेदव्यापिनो वायोस्तथास्य परमात्मनः ॥
एकस्वरूपभेदश्च बाह्यकर्मप्रवृत्तिजः।
देवादिभेदेऽपध्वस्ते नास्त्येवावरणे हि सः ॥
(वि. पु. २.१४.३१–३३)

अर्थ–आत्मा आपल्या आणि अनेक प्राण्यांच्या देहामध्ये स्थित असूनही तो एक आहे, अशा प्रकारचे जे विशेषज्ञान, त्यालाच परमार्थ म्हणतात. जे लोक द्वैतभावना बाळगतात, त्यांना खरा परमार्थ कळला नाही. वायू एकच असतो, पण बासरीतल्या छिद्रांतून बाहेर पडताना तो षड्ज, ऋषभ, इ. प्रकारांनी भिन्न होतो. त्याप्रमाणे एकाच परमात्म्याचे प्राणिमात्रानुसार अनेक भेद दिसतात. हे आत्म्याचे अनेक भेद बाह्य कर्मप्रवृत्तींतून निर्माण झालेले आहेत. देवादिकांच्या शरीरांचे भेद समजल्यावर हे भेदक ज्ञान नष्ट होते. अविद्येचे आवरण असते, तोवरच अज्ञान शिल्लक राहते.

वरीलसारख्या दार्शनिक विवेचनावरून प्रस्तुत पुराण हे वैष्णव पुराणांच्या श्रेणीत श्रेष्ठ दर्जाचे ठरते. पहिला मान भागवतपुराणाचा व दुसरा याचा. हे वैष्णव दर्शनांचा मूलाधार आहे. म्हणूनच रामानुजाचार्यांनी आपल्या श्रीभाष्यात यातील अनेक अवतरणे दिली आहेत.

वाङ्मयीन दृष्टीनेही प्रस्तुत पुराण रमणीय, सरस आणि सुंदर आहे. याच्या चौथ्या अंशात प्राचीन सुंदर गद्याची झलक मिळते. प्रस्तुत पुराणात ज्ञानाशी भक्तीचे सामंजस्य सुरेखपणे दाखवलेले आहे. विष्णूची उपासना यात प्रामुख्याने सांगितलेली असली, तरी याला सांप्रदायिकतेचा स्पर्श झालेला नाही.

विष्णुपुराणाच्या कालाबद्दल अनेक मतभेद आहेत. सामान्यपणे इ. स. चे ३ रे ते ५ वे शतक एवढ्या कालात ते निर्माण झाले असावे, असे मानले जाते. श्री. बलदेव उपाध्याय यांच्या मते मात्र याचा रचनाकाल सनपूर्व २ रे शतक हा आहे.

हे सात्त्विक पुराण असून, डॉ. हाजरा यांच्या मते यात कमीत कमी फेरफार झालेला आहे. [विष्णुपुराण–संपा. पं. श्रीराम-शर्मा आचार्य, १९६७; विष्णुपुराणका भारत – डॉ. सर्वानंद पाठक, १९६७; पु. वि.; पु. नि.; बा. मो. कानिटकर]

विष्णुपुरी

(इ. स. चे १५ वे शतक) एक हिंदी संतकवी. याला परमहंस किंवा तीरभुक्ती-परमहंस असे म्हणत. विष्णुपुरी हे याचे संन्यासाश्रमातले नाव असून, पूर्वीचे नाव रमापती असे होते. हा बिहारमधल्या दरभंगा जिल्ह्यातल्या तरौनी या गावी राहत असे. याने संन्यास घेतल्यानंतर पुनश्च गृहस्थाश्रम स्वीकारला व दुसरे लग्न केले असे सांगतात. या दुसऱ्या बायकोपासून त्याला महादेव नामक एक पुत्र झाला. बंगाली वैष्णव धर्माच्या प्रवर्तकांत विष्णुपुरीची गणना होते. हा संस्कृत भाषेचा प्रकांडपंडित होता. विष्णुभक्तिरत्नावली नावाचा एक संस्कृत ग्रंथ याने जगन्नाथपुरी येथे राहून रचला आणि तो जगन्नाथाला समर्पण केला. मैथिली भाषेतली याची काही पद्येही उपलब्ध आहेत. [हिं. सा. बि.]

विष्णुप्राप्तिद्वादशी

एक तिथिव्रत. यात एकादशीला उपवास केल्यानंतर द्वादशीलाही तो करायचा असतो. द्वादशीच्या दिवशी हे व्रत करायचे असते. यात पुढील

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

कृत्ये असतात– आदित्याकडे तोंड करून ' नमो नारायणाय ' या मंत्राचा जप, विष्णुपूजा, सूर्यार्घ्य, यवान्नभक्षण किंवा अयाचित वृत्तीने राहणे व पारणा. फल–विष्णुपदप्राप्ती. [कृ. क. त.]

विष्णुबली एक संस्कार. गर्भस्थ शिशूच्या आठव्या महिन्यात हा संस्कार करतात. त्या वेळी विष्णूला चौसष्ट बली देतात आणि ऋग्वेदातील मंत्रांनी त्याची स्तुती करतात. गर्भाचे संरक्षण व्हावे आणि प्रसूती निर्विघ्नपणे व्हावी, म्हणून हा संस्कार सांगितला आहे. [प्रा. भा. सा. सां. भू.]

विष्णुबावा ब्रह्मचारी (इ. स. १८२५–१८७१) आधुनिक महाराष्ट्रातील एक थोर विचारवंत व मिशनरी वृत्तीचे धर्मसुधारक. यांचे संपूर्ण नाव विष्णू भिकाजी गोखले असे होते. हे मूळचे कुलाबा जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील शिरवली गावचे रहिवासी होते. विष्णुबावा हे आपल्या आई–वडिलांच्या एकूण अकरा अपत्यांपैकी दहावे अपत्य होते. त्यांना पाच भाऊ व पाच बहिणी होत्या. विष्णुबावा पाच वर्षांचे असताना त्यांचे वडील मरण पावले. सातव्या वर्षी त्यांचे मौंजीबंधन झाले. मग सुमारे एक वर्षपर्यंत त्यांनी प्राचीन परंपरेप्रमाणे वेदाध्ययन केले व त्याचबरोबर लेखन-वाचन, हिशेब वगैरे व्यावहारिक शिक्षणही घेतले. त्यांचे अक्षर सुंदर, सुरेख व वळणदार होते.

नवव्या वर्षी विष्णुबावा जमीन-महसूल खात्यात नोकरीला लागले. परंतु थोड्याच दिवसांत त्यांच्या आईने त्यांना परत बोलावून घरच्या शेतीव्यवसायात व गुरे चारण्यात गुंतविले. तथापि विष्णुबावांची महत्त्वाकांक्षा वेगळीच असल्यामुळे ते लवकरच तिथून निसटले आणि वयाच्या बाराव्या वर्षी महाडच्या एका किराणाभुसार दुकानात नोकरीला राहिले. याही नोकरीचा त्यांना दोन वर्षांतच कंटाळा आला. तिथून निघून ते रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर बंदरावर कस्टम खात्यात उमेदवारी करीत राहिले. तीन महिन्यांनंतर त्यांनी ठाणे जिल्ह्याच्या कमिटीसमोर सरकारी नोकरीची परीक्षा दिली आणि वयाच्या सोळाव्या वर्षी साष्टी तालुक्यात कस्टम खात्यात नोकरी धरली. नंतरची सात वर्षे ते वसई, कल्याण, भिवंडी, उरण, इ. ठिकाणी नोकरीनिमित्ताने फिरत राहिले.

तथापि नोकरी करून पोट भरणे, हे त्यांचे ध्येय नव्हते. लहानपणापासून त्यांचा धार्मिक गोष्टींकडे विशेष ओढा होता. कथा–कीर्तने, पुराण-प्रवचने आणि पूजा-प्रार्थना यांत ते रंगून जात. साधु–संन्यासी, बुवा–बैरागी, यांसारख्या लोकांकडून आपणास अध्यात्माचा लाभ मिळेल, अशा समजुतीने ते त्यांच्या मागे मागे भटकत व दिवसचे दिवस त्यांच्या तांड्यातून हिंडत. परंतु या उद्योगात त्यांना हवे होते ते आत्मसमाधान मिळाले नाही. एव्हाना त्यांचे धार्मिक ग्रंथांचे वाचन भरपूर झाले होते. विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, दासबोध, बोधसागर, इ. प्राकृत ग्रंथ त्यांनी फार बारकाईने अभ्यासले होते. वयाच्या तेविसाव्या वर्षी त्यांना एकूण व्यावहारिक जीवनाचा वीट आला आणि सर्वसंगपरित्याग करून ते परमात्म्याच्या प्राप्तीसाठी घराबाहेर पडले.

आरंभी त्यांनी सद्गुरूचा शोध घेण्याचे ठरविले. त्यासाठी ते रानावनांतून भटकले आणि अनेक संत-महंतांच्या सहवासात राहिले; पण त्यांना सद्गुरू भेटला नाही. अखेर सद्गुरूचा शोध घेण्याचे सोडून व आपला आपणच उद्धार करण्याचे ठरवून ते थेट सप्तशृंगीच्या डोंगरावर जाऊन राहिले. तिथे त्यांनी अक्षरशः कंदमुळे खाऊन खडतर तपश्चर्या केली. या तपश्चर्येनंतर त्यांना आत्मज्ञान झाले. त्याचबरोबर त्यांच्या मनात आणखीही एक नवा विचार वळावू लागला. एवढ्या उग्र आणि तीव्र तपस्येने आपल्याला जो आत्मसुखाचा ठेवा गवसला, त्याचा लाभ आपण एकट्याने घेणे, हा अपराध आहे. ज्या हिंदू समाजात आपण जन्मलो, त्याच्याही उद्धारार्थ आपण झटले पाहिजे व आपल्याला गवसलेला सुखाचा मार्ग आपल्या बांधवांनाही दाखविला पाहिजे, असे त्यांना तीव्रतेने वाटू लागले. त्यासाठी त्यांनी आपल्या समाजाचे बारकाईने निरीक्षण आरंभले. या निरीक्षणात त्यांना दिसले, की परकीय इंग्रजांच्या नवस्थापित राजवटीने आपले भारतीय बांधव दिपून व गोंधळून गेले आहेत. स्वराज्य गेल्याची खंत अनेकांना जाणवते आहे. तथापि त्याहीपेक्षा इंग्रजांच्या राजकीय आक्रमणाबरोबर ख्रिश्चन मिशनऱ्यांचे जे सांस्कृतिक आक्रमण सुरू झाले, त्यामुळे समाजातील विचारवंत अधिक अस्वस्थ आणि अशांत झाले आहेत. उच्चवर्णीय ब्राह्मणसमाज आणि त्यांच्या जोडीला मराठा सरदारवर्ग जर सोडला तर बाकीचा सर्व समाज दारिद्र्यात खितपत पडला आहे. महार, मांग, चांभार, इ. अस्पृश्य जातींच्या दुःखदैन्याला तर तोडच नाही. भोळ्याखुळ्या चालीरीती आणि समजुती यांनी सरसकट समाज पोखरून टाकला आहे. त्यांना आणखी एक गोष्ट तीव्रतेने जाणवली ती अशी की, इंग्रजी राज्याबरोबर आलेल्या ख्रिश्चन धर्मोपदेशकांनी भारतीयांची लांडगेतोड चालवली आहे. कुठे शाळा काढून, कुठे मोफत औषधे वाटून, कुठे विहिरीत पाव टाकून, कुठे दीनदुबळ्यांची व आपद्ग्रस्तांची सेवाशुश्रूषा करून, तर कुठे हिंदू धर्मातील दुष्प्रवृत्तींवर व्याख्याने झोडून किंवा लेख लिहून भारतीय बांधवांना ख्रिश्चन धर्मात ओढण्याचा त्यांनी सपाटा चालविला आहे. नासिक, पंढरपूर आणि नगर

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

 Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या ठिकाणी तर त्यांच्या या उद्योगांना ऊत आला आहे. तात्पर्य, सरसकट भारतीय समाज इंग्रजांच्या आणि ख्रिश्चनांच्या मानसिक गुलामगिरीत गुरफटला जात आहे.

विष्णुबावांना या गोष्टीचे शल्य बोचले. त्यांचा राष्ट्रीय स्वाभिमान जागृत झाला. ख्रिश्चन धर्मोपदेशकांविषयीच्या संतापाने ते पेटून उठले. वाटेल ते करून आपल्याला ही धर्मांतराची लाट परतवून लावली पाहिजे आणि स्वदेशबांधवांना या मोहनिद्रेतून खडबडून जाग आणली पाहिजे, असा त्यांनी निश्चय केला. ख्रिश्चन धर्मोपदेशकांची वाणी आणि लेखणी ही हत्यारेच वापरून व त्यांच्या सारखेच युक्तिवाद करून, त्यांनी सर्वत्र स्वधर्मप्रचार सुरू केला. मुंबईत जिथे त्यांच्या सभा चालत, ती जागा प्रेक्षकांना व श्रोत्यांना अपुरी पडू लागली, म्हणून पुढे त्यांनी समुद्रकिनाऱ्यावर खुल्या मैदानात भाषणे सुरू केली. जिथे जिथे ख्रिश्चन धर्मोपदेशक भेटत, तिथे तिथे विष्णुबावा त्यांच्याच पद्धतीने ख्रिश्चन धर्मातील वैगुण्यांवर हल्ले चढवू लागले. ख्रिश्चन धर्माचे खंडन आणि हिंदू धर्माचे मंडन असे त्यांचे दुधारी शस्त्र होते. स्वदेशबांधवांना तर ते बिनदिक्कत सांगू लागले की, " मला दत्तात्रेयाचा वर आहे आणि कसलीही शंका निघाल्यास मी तिचे समाधान करू शकतो. "

विष्णुबावांचे हे विलक्षण आत्मप्रत्ययाचे व निःस्पृहतेचे बोलणे ऐकून भारतीय बांधवांना बराच धीर आला व ते त्यांच्या भाषणांना जागोजाग गर्दी करू लागले. लोक आपल्या मागे येतात आणि ख्रिश्चन धर्मोपदेशक आपल्या युक्तिवादापुढे गोंधळतात व निरुत्तर होतात, असे पाहिल्यावर विष्णुबावांना आणखी आवेश आला. मग त्यांनी ख्रिस्तीमतखंडनाबरोबरच हिंदू समाजाच्या परिशुद्धीचे विचारही बेधडक सांगण्यास आरंभ केला. सर्व सत्कार्यांची व सुधारणांची गंगोत्री व्यक्तीच्या सुसंस्कारित मनात असते आणि व्यक्तीच्या मनावरील सुसंस्कार हे कौटुंबिक जीवनात प्राधान्याने स्त्रियांच्या द्वाराच घडू शकतात, हे विष्णुबावांच्या प्रत्ययाला आले. त्यामुळे हिंदू समाजात नानाविध मार्गांनी स्त्रीला दास्यात डांबून टाकले गेले आहे, तिची मुक्तता आधी झाली पाहिजे, असे त्यांनी ठरवले व स्त्रीदास्य मुक्तीच्या चळवळीला प्रथम हात घातला.

स्त्रीजीवन दास्यमुक्त व्हायचे, तर स्त्रीशिक्षण अपरिहार्य आहे, हे विष्णुबावांना मनोमन पटले होते. ते सांगत– " लेखन, वाचन, गणित इत्यादी विद्या स्त्रियांना शिकवल्याच पाहिजेत. कारण न शिकविले, तर स्त्रियांना प्रपंच-परमार्थाचे यथास्थित ज्ञान होत नाही. पूर्वीपासून राजकन्या व इतर लोकांच्या मुली लेखन, वाचन, गणित, नीती वगैरे प्रपंच-परमार्थोपयोगी विद्यांचा अभ्यास करीत असत व त्यांना शिक्षण देणाऱ्या नीतिमान स्त्रिया असत, असे पुराणांत म्हणजे पुरातन इतिहासात बहुत ठिकाणी लिहिले आहे. विराट राजाच्या कन्या, रुक्मिणी व चंद्रहासाची स्त्री विषया, लेखनादिक अभ्यास करीत असत, इत्यादी



विष्णुबावा ब्रह्मचारी

पुरातन वहिवाटीच्या गोष्टी आहेत. " पुराणकथांचा सुधारणापोषक अर्थ लावणाऱ्या विष्णुबावांची दृष्टी कशी विधायक होती, हे यावरून दिसून येईल. " सर्व स्त्रिया जर लेखन, वाचन व नीती शिकतील, तर निर्मत्सर होतील आणि भांडण-झगडे करणार नाहीत, " असे ते म्हणत.

स्त्रीशिक्षणाप्रमाणेच स्त्रीच्या विवाहविषयातही विष्णुबावांनी पुरोगामी विचार व्यक्त केले आहेत. त्यांच्या मते रामायण-महाभारतकाळातली स्वयंवरपद्धती योग्य होती. 'स्त्रियांनी स्वेच्छेने व परेच्छेने अशा उभय इच्छेच्या संयोगाने विवाह करावा ' असा सिद्धान्त सांगून, त्यांनी पुढे त्या सिद्धान्ताचे स्पष्टीकरण करताना सीतास्वयंवराचा दाखला दिला आहे.

विवाहाच्या बाबतीत वय, जात, पुनःसंबंध, इ. अनेक बाबींचा तपशीलवार विचार विष्णुबावांनी मांडला आहे. वधूहून वराचे वय सहा ते आठ वर्षे अधिक असावे, असे त्यांचे मत होते. परंतु प्रथम संबंधाच्या बाबतीत वर तीस वर्षांहून मोठा नसावा,

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

हेही त्यांनी आवर्जून सांगितले आहे. तीस वर्षांच्या पुरुषाने बारा वर्षांहून लहान मुलीशी लग्न करू नये आणि जर पुरुषाचे वय तीसहून अधिक असेल, तर त्याला कुमारिकेशी लग्न करण्याचा अधिकार असू नये, असा विष्णुबावांचा आग्रह होता. कोणाही स्त्रीला जो वर मिळायचा तो जन्मश्रेष्ठत्वावरून अनुरूप न ठरता गुणश्रेष्ठत्वावरून अनुरूप ठरेल, असा असावा, असे त्यांचे सांगणे असे. हे मत व्यक्त करतानाही त्यांनी पुराणकथेतील ययाती– देवयानीच्या विवाहाचा दाखला दिला आहे. विष्णुबावा स्वतः जरी ब्रह्मचारी होते, तरी त्यांनी मानवी मनाचा फार सूक्ष्म अभ्यास केला असल्यामुळे, स्त्री-पुरुषांच्या परस्परसंबंधाचे व आकर्षणाचे योग्य ते भान त्यांना होते. त्यामुळे या विषयातली आपली मते ते सारासार विचार करून मांडीत. ते म्हणतात–"स्त्रीचे व्यसन पुरुषास व पुरुषाचे व्यसन स्त्रियेस आहे. यास्तव स्त्री-पुरुषांचे जोडे असावे; बहुधा कोणी एकाकी नसावे. एखाद्याला प्रामाणिकपणे विरक्ती आली असेल, तर त्याला प्रथमविवाह किंवा पुनर्विवाह करण्याची सक्ती करू नये. त्याचबरोबर अविवाहित राहून व ब्रह्मचर्याचा देखावा करून जर कोणी अनीतीने वागू लागला, तर त्याला राजाने कडक शासन करावे."

विधवांच्या दुःखांची त्यांना पूर्ण कल्पना होती व त्यामुळेच ते विधवा-विवाहाचे कट्टर पुरस्कर्ते बनले होते. तथापि मूळ विवाहसंस्थेतच आमूलाग्र सुधारणा झाली म्हणजे स्त्रियांवर वैधव्यांचा प्रसंगच ओढवण्याचे कमी होईल, असे त्यांना वाटे. बाला-जरठविवाहपद्धतीमुळे समाजात विधवांचे प्रमाण वाढले आहे, असे त्यांचे स्पष्ट मत होते. त्यामुळे ते बाला-जरठविवाहाचे निषेधक आणि विधवा-विवाहाचे समर्थक बनले. विधुराने विधवेशीच लग्न केले पाहिजे; इतकेच नव्हे, तर तिशीच्या वर वय असलेल्या प्रथम वरानेही कुमारिकेशी लग्न न करता ऋतू प्राप्त झालेल्या विधवेशीच लग्न केले पाहिजे, असा त्यांचा आग्रह होता. ऋतू प्राप्त होण्यापूर्वीच जिच्यावर वैधव्याची कुऱ्हाड कोसळली आहे, अशा बालविधवेला कुमारीच समजावे आणि तिचा विवाह तरुण प्रथम वराशीच व्हावा, असेही त्यांना वाटे.

विधवांच्या दुःखांचा एवढा सहानुभूतिपूर्ण विचार करून, आपल्या परीने त्यांच्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविल्यावर विष्णुबावा विधवा स्त्रियांच्या आणखी एका मानसिक भूमिकेवर प्रकाश टाकून पुढे म्हणतात. "ज्या पतिपरायण स्त्रीला वैधव्याच्या काळात व्रतस्थपणे जीवन व्यतीत करण्याची इच्छा असेल, तिला ते गौरवाने व्यतीत करता यावे." सतीप्रथेचा मात्र ते कडाडून निषेध करतात व सांगतात. "पतीच्या प्रेताबरोबर जळून मरणे ह्यात पुण्य आहे आणि जळून मरणारी सती आहे, असे समजू नका. जी स्त्री कामाचे व अज्ञानाचे दहन स्वविचाराने करील, तीच सती समजावी."

स्त्रीजीवनाचा इतका सांगोपांग विचार करणाऱ्या विष्णुबावांच्या विचारकक्षेतून घटस्फोटाचा विचारही सुटला नाही. ते म्हणतात. "पती जर मादक पदार्थ सेवन करून अथवा व्यभिचार कर्मात शिरून स्त्रियेस पीडा करू लागला, अथवा वैराग्यशील होऊन स्त्रियेचा त्याग करून गेला, अथवा महाव्याधिग्रस्त झाला, तर स्त्रियेने मातापितरांच्या स्वाधीन राहावे, अथवा इच्छा असेल तर राजाच्या आज्ञेने पुनर्विवाह करावा; अथवा जवळ द्रव्य आहे, अथवा कष्ट करून पोटापुरते मिळेल आणि पुनर्विवाहाची इच्छा नसेल, तर तो न करिता ईश्वरभजनात काळ खर्च करावा."

स्त्रीदास्यविमोचनाप्रमाणे जातिभेद, अस्पृश्यता, इ. अनेक सामाजिक दोषांवर विष्णुबावांनी अचूक बोट ठेवले आहे व त्यावर नेमकी उपाययोजनाही सुचविली आहे. गुणकर्मानुसारी वर्णव्यवस्था हा त्यांच्या मते आदर्श समाजव्यवस्थेचा पाया होय. असंख्य भेदाभेदांनी भेगाळलेल्या समाजाची दुरवस्था पाहून विष्णुबावा व्यथित होत व तळमळीने लोकांना उपदेश करीत–

"मनुष्यमात्रांनी परस्परांवर प्रीती ठेवून, परस्परांचे उणे पडू देऊ नये. एकमेकांचे सहाय्य करीत जावे, हीच आज्ञा आहे. सर्व पृथ्वीवरील मनुष्ये गुणकर्मविभागाने वेगवेगळ्या वर्गांत आहेत, तरी एका शक्तीने जग धरणाऱ्या ईश्वराची आम्ही सर्व लेकरे आहो, असे समजून, ईश्वराच्या वेदाज्ञेप्रमाणे, भूमंडळावरील मनुष्यांनी मतवाद सोडून, वेदोक्त धर्माप्रमाणे वागून परस्परांवर प्रीती करावी आणि परस्परांचे सहाय्य करावे, हीच आज्ञा आहे."

जो शुद्ध सत्त्वगुणाने युक्त आहे आणि म्हणूनच सर्वांना वेदप्रतिपाद्य धर्माप्रमाणे सुमार्ग दाखविण्यास समर्थ आहे, त्यालाच ब्राह्मण म्हणावे, असे सांगून पुढे विष्णुबावा सांगतात. "अशा सुपात्र ब्राह्मणाच्या पोटी चार पुत्र जन्मले असता ते सर्वच ब्राह्मण आहेत, असे नाही. अशा गुणाचे व कर्माचे जे मुलगे नसतील आणि ते जरी ब्राह्मणाच्या पोटी जन्मले असतील, तरीही त्यांच्या त्यांच्या गुणकर्माप्रमाणे क्षत्रिय, वैश्य किंवा शूद्र इत्यादी वर्गांत त्यांना गणावे किंवा मिळवावे."

तात्पर्य, जाती किंवा वर्ण जन्मावरून न ठरवता कर्मावरून ठरविल्या जाव्या, असा विष्णुबावांचा ठाम आग्रह होता.

अस्पृश्यतेच्या संदर्भातही विष्णुबावांची मते अशीच क्रांतिकारक व विचारपूर्वक बनवलेली होती. विटाळ किंवा आशौच ही कल्पना अमंगळ विचारांच्या आणि क्रियांच्या संपर्कानेच येते, अशी त्यांची स्वच्छ धारणा असल्यामुळे, ते विवक्षित वर्गातील व्यक्तींना अस्पृश्य मानायला तयार नव्हते. मेलेली ढोरे खाणारे जर अस्पृश्य, तर जिव्हालौल्यासाठी जिवंत प्राण्यांना मारून

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

खाणारे अधिकच अस्पृश्य ठरवले पाहिजेत, असे ते म्हणत. अस्पृश्य मानले गेलेल्यांना अशुची आचार टाकायला लावून, त्यांना सर्वत्र सन्मानाने वावरू द्यावे, असे त्यांचे सांगणे असे.

आदिवासींनाही ते हिंदू समाजाचेच घटक मानीत व क्रिया-लोपामुळे त्यांना आलेली धर्मभ्रष्टता दूर करून, त्यांचा गुण-कर्मानुसार हिंदू समाजात अधिकृत समावेश करावा, असें प्रतिपादीत. अज्ञानाने नीच स्थितीस पोचलेल्या लोकांना ज्ञानामृत पाजून उन्नतावस्थेस नेण्याचे काम ब्राह्मणांचे आहे व ते त्यांनी केले पाहिजे, असे विष्णुबावांनी वारंवार बजावले आहे.

मांसाहार, यज्ञातील पशुहिंसा, इ. गोष्टींचाही विष्णुबावांनी निषेध केला आहे.

इंग्रजी राज्याच्या स्थापनेबरोबर ज्या यांत्रिक सुधारणा भारतात सर्वत्र सुरू झाल्या, त्यामुळे देशी उद्योगधंदे बसले व जुनी समाजव्यवस्था कोसळून पडली. उद्योगधंद्यांचे नवे विराट स्वरूप कारखाने, छापखाने यांच्या रूपाने सामान्य जनांना भेडसावू लागले. कारखान्यांतून, छापखान्यांतून काम करणाऱ्या लोकांचा एक नवाच कामगारवर्ग समाजात निर्माण झाला. या कामगार-वर्गाच्या आकांक्षा आणि दु:खे यांचा उच्चारही सर्वप्रथम विष्णु-बावांनी आपल्या लेखनात व भाषणांत केला. "सुखदायक राज्य-प्रकरणी निबंध" नामक एका चोपड्यात विष्णुबावांचे एतद्-विषयक विचार संकलित आहेत. त्यात विष्णुबावा लिहितात —

"राज्यकारभार चालविणारे कामगार वंशपरंपरेने नेमू नयेत. राजाने सर्व मनुष्यांस मजुरी व अन्नवस्त्र मिळावे अशा-साठी देशोदेशी जगाला सुखोपयोगी असे नवीन नवीन कारखाने काढावे व जुने कारखाने सुधारावे व मंडळचा नेमून त्या कार-खान्यांचा बंदोबस्त राखीत जावा व हरएक मजुराला किंवा कामगाराला दररोज किंवा दरमहिन्याचे महिन्यास ठरविलेला मजुरीचा पैका देत जावा. मजुराचा पैका कोणी बुडवू नये म्हणून अधिक जपत जावे."

सांप्रत ज्याला आपण समाजवादी विचार म्हणतो व ज्याचे श्रेय जागतिक दृष्टया कार्ल मार्क्सला दिले जाते, त्या विचाराचा बीजरूप आविष्कार विष्णुबावांच्या 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' या लेखात सर्वप्रथम झालेला दिसतो. ते लिहितात —

"खाजगी संपत्ती ही जगातील सर्व दु:खांचे मूळ आहे, सर्व गुन्ह्यांचे उत्पत्तिस्थान आहे. सर्व प्रजा हे एक कुटुंब मानून देशातील सर्व जमीन व संपत्ती यांवर सामाजिक मालकी स्थापन करणे, हाच यावर एकमेव तोडगा आहे. प्रजेने व राज्यकर्त्यांनी सारखेच कष्ट करून एकसारखे खाणे खावे व तेही एकाच कोठारातून नेऊन खावे. या तत्त्वावर उभारलेली समाजरचना अस्तित्वात आल्यास चोरी, मारामारी, तर्कट व खून इत्यादी गुन्हे समाजातून नाहीसे होतील व न्यायालयांची गरज राहणार नाही, राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष इतिहासजमा होतील व भूतलावर शांतता व समाधान यांचे राज्य अवतरेल."

आरंभी विष्णुबावांनी आपले हे विचार वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या भाषणांतून व्यक्त केले व मग त्यांना ग्रंथरूप दिले. वेदोक्त धर्मप्रकाश, भावार्थसिंधू, चतु:श्लोकी श्रीमद्‌भागवताचा मराठी भाषेत अर्थ, सुखदायक राज्यप्रकरणी निबंध आणि बोध-सागर हे विष्णुबावांचे पाच ग्रंथ प्रसिद्ध आहेत. भगवद्‌गीतेवरील सेतुबंधनी टीका ही त्यांच्या हयातीत पूर्ण झाली नाही; ती पुढे त्यांचे शिष्य रामचंद्र राऊत यांनी अप्पाशास्त्री बडवे यांचेकरवी पूर्ण करवून विष्णुबावांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथीला छापून प्रसृत केली.

अशा प्रकारे सतत सोळा वर्षे व्याख्यानद्वारा स्वमतप्रतिपादन व ख्रिस्तीमतखंडन करून, दि. १८ फेब्रुवारी १८७१ या दिवशी विष्णुबावांनी मुंबई मुक्कामी देह ठेवला.

विष्णुबावांचे व्यक्तिमत्त्व विलक्षण प्रभावी होते. ते गौर वर्णाचे, उंच बांध्याचे, हसतमुख व भव्य होते. त्यांचा स्वभाव नि:स्पृह व निष्कपटी होता. ते निर्व्यसनी व नि:स्वार्थी होते. त्यांचे वक्तृत्व परिणामकारक असे. [महाराष्ट्राचे उपेक्षित मान-करी—श्री. गं. बा. सरदार, १९५१; श्री. रा. चिं. ढेरे, केसरी, दि. २० व २७ जुलै १९६९; श्री. पंढरीनाथ रानडे, सा. माणूस, दि. २५ नोव्हें. १९६७; विवेकमंडन— श्री. म. माटे, १९५६]

विष्णुयाग

विष्णूप्रीत्यर्थ पुरुषसूक्ताच्या आधारे जो याग करतात, त्याला हे नाव आहे. ऋग्विधानात याचे विधान सांगितले आहे. याचा श्रौतकर्माशी संबंध नाही, म्हणून याला स्मार्तयाग म्हणतात. यात विष्णूसाठी आहुतींचे हवन करताना पुरुषसूक्तातील प्रत्येक ऋचेच्या शेवटी 'नाराय-णाय स्वाहा' असे म्हणायचे असते. विष्णुकुमार नावाच्या ऋषीने ऋग्विधानाच्या आधारे याचा प्रयोग रचला आहे, तो असा—

शुक्लपक्षी शुभ नक्षत्रावर विष्णुयागाचा प्रारंभ करावा. तत्पूर्वी यजमानाने गायत्रीजप करून स्वत:ची शुद्धी करावी. मग संकल्प व पुण्याहवाचनादी कृत्ये करावी. वास्तुमंडलावर वास्तुदेवतांची स्थापना करावी. मध्यभागी कलश मांडावा. त्यावर वास्तुपुरुषा-ची सुवर्णप्रतिमा ठेवावी. तिच्यासह सर्व मंडलदेवतांची पूजा करावी. त्यांना भाताचा बली द्यावा. यज्ञमंडपाच्या भोवती सूत्र-वेष्टन करून मंडपदेवतांची पूजा करावी. त्यांनाही बली द्यावा. मंडपाला चार दिशांना चार द्वारे असावी. प्रत्येक द्वारावर एकेक, असे चार वेदांचे चार ब्राह्मण वेदपाठासाठी बसवावे. द्वारात निरनिराळे ध्वज उभारावे.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मंडपात चौकोनी वेदीवर सर्वतोभद्रमंडल निर्माण करावे. मध्यभागी एका कलशावर विष्णूची सुवर्णप्रतिमा स्थापावी. तिची प्राणप्रतिष्ठा करावी. मग विष्णूसह सर्व देवतांची पूजा करावी.

अग्नीची स्थापना करावी. त्याच्या ईशान्येस एका पीठावर नवग्रह व दुसऱ्या पीठावर चौसष्ट योगिनी यांचे आवाहन व पूजन करावे. प्रधानहोमात पुरुषसूक्तातल्या प्रत्येक ऋचेने सोळा आहुती द्याव्या. विष्णुसहस्रनामातील प्रत्येक नावाने पायसाच्या आहुती द्याव्या. नंतर इतर सर्व पीठदेवता आणि मंडलदेवता यांना आहुती द्याव्या. मग स्थापित देवता आणि क्षेत्रपाल यांना बलिदान करावे. पूर्णाहुती व वसोर्धारा करावी. मग ऋत्विजांनी सपत्नीक यजमानाला अभिषेक करावा. यजमानाने दक्षिणा देऊन व ब्राह्मणभोजन घालून आशीर्वाद घ्यावा.

विष्णू ही जगताचे धारण करणारी देवता आहे. पापक्षय व कामनापूर्ती यांच्यासाठी विष्णुयागाचे विधान करायला सांगितले आहे. [श्री. विद्याधरशास्त्री भिडे]

विष्णुलक्षनमस्कारव्रत एक काम्य व्रत. हे स्त्री व पुरुष यांना विहित आहे. यात विष्णूला नमस्कार घालायचे असतात. आषाढ शुद्ध एकादशीला संकल्पपूर्वक नमस्कार घालायला प्रारंभ करतात. नित्य नियत संख्येने नमस्कार घालून कार्तिक पौर्णिमेला लक्ष पुरा करतात. व्रतकालात हविष्यान्नाचे भोजन करतात.

उद्यापनाच्या दिवशी विष्णूच्या सुवर्णप्रतिमेची पूजा करून त्याला तीन अर्घ्ये देतात. चरू, तीळ, साळी, समिधा व आज्य यांचे हवन करतात. शेवटी आचार्याला विष्णुप्रतिमेचे दान करून व ब्राह्मणभोजन घालून व्रताची समाप्ती करतात. फल– समस्त पापांचा नाश व परमपदाची प्राप्ती. [व्रतराज]

विष्णुलक्षप्रदक्षिणाव्रत स्त्री व पुरुष यांना विहित असे एक काम्य व्रत. आषाढ शुद्ध एकादशी, द्वादशी किंवा पौर्णिमा या दिवशी या व्रताचा प्रारंभ करतात. प्रथम नदीवर स्नान करून संकल्प करतात. मग विष्णूची पूजा करून त्याला पायसाचा नैवेद्य दाखवितात. नंतर पुढील मंत्र जपीत विष्णूला प्रदक्षिणा घालतात–

अनन्तमव्ययं विष्णुं लक्ष्मीनारायणं हरिम् ।
जगदीशं नमस्मि त्वां प्रदक्षिणपदे पदे ॥

नित्य ठराविक संख्येने प्रदक्षिणा घालून आषाढात ज्या तिथीला व्रताचा प्रारंभ केला असेल, त्याच तिथीला कार्तिक मासात लक्ष प्रदक्षिणा पुऱ्या करतात.

उद्यापनाच्या दिवशी विष्णूच्या सुवर्णप्रतिमेची पूजा, रात्री जागरण व दुसऱ्या दिवशी तीळ, आज्य व पायस यांचे हवन करतात. पूर्णाहुती झाल्यावर गोप्रदान आणि आचार्याला विष्णुप्रतिमेचे दान करतात. फल – समस्त पातकांचा नाश व विष्णुलोकाची प्राप्ती. [व्रतराज]

विष्णुलक्षवर्तिव्रत एक काम्य व्रत. दक्षिणेतील स्त्रिया हे व्रत करतात. लक्षवर्ती म्हणजे लक्ष वाती होत. कापसाच्या सुताच्या त्या बनवतात. चार बोटे लांबीचे एक सूत अशा पाच सुतांची एक वात बनते. या वाती तुपात भिजवून रुप्याच्या किंवा तांब्याच्या पात्रात ठेवून त्या विष्णुपुढे प्रज्वलित करतात. कार्तिक, माघ किंवा वैशाख या महिन्यांत या व्रताचा प्रारंभ करतात. प्रत्येक दिवशी नियत संख्येने वाती लावून ज्या महिन्यात व्रताला आरंभ केला असेल, त्याच महिन्याच्या पौर्णिमेस वातींची लक्षसंख्या पुरी करतात.

उद्यापनाच्या दिवशी विष्णूच्या सुवर्णप्रतिमेची पूजा करून त्या रात्री जागरण करतात. दुसऱ्या दिवशी विष्णुगायत्रीमंत्राने घृत व पायस यांचे सहस्र हवन करतात. मग सोन्याची एक वात करून ती कापसाच्या वातीसह रौप्यपात्रात ठेवून प्रज्वलित करतात व तिने विष्णूला ओवाळतात. मग आचार्याला विष्णुप्रतिमेचे दान करून व ब्राह्मणभोजन घालून व्रताची समाप्ती करतात. फल – पापक्षय व मनोरथपूर्ती. [हि. ध.; व्रतराज]

विष्णुव्रते विष्णू या देवतेला उद्देशून पाच व्रते सांगितलेली आहेत, ती अशी –

(१) कमळावर विष्णूची आकृती काढून तिची पूजा करावी. फल – पापनाश.

(२) वर्षातील बारा द्वादश्यांना उपवास करावा आणि शेवटी गाय, वासरू व सोने दान द्यावे. फल – अत्युच्च ध्येयाची प्राप्ती.

(३) पौष शु. द्वितीयेला व्रतारंभ करावा. द्वितीयेपासून चार दिवस मोहरी, तीळ, वेखंड आणि सर्वौषधी यांनी मिश्रित जलाने स्नान करावे. विष्णूची कृष्ण, अच्युत, हृषीकेश व केशव या एकेका नावाने रोज पूजा करावी. चार दिवस रोज रात्री चंद्रकोरीला शशी, चंद्र, शशांक व निशापती अशा एकेका नावाने अर्घ्य द्यावे. रात्रौ फक्त एकदा, चंद्रप्रकाश असताना अन्न ग्रहण करावे. पंचमीला आचार्याला दक्षिणा द्यावी. हे व्रत दिलीप, दुष्यन्त या प्राचीन राजांनी; मरीची, च्यवन, इ. ऋषींनी व देवकी, सावित्री, इ. स्त्रियांनी केले होते. फल– पापनाश व ईप्सितप्राप्ती.

(४) आषाढीपासून चार महिने प्रातःस्नान करावे. कार्तिकी

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

पौर्णिमेला एक गाय दान द्यावी आणि ब्राह्मणभोजन घालावे. फल – विष्णुलोकप्राप्ती.

(५) चैत्र शुद्ध चतुर्थीला उपवास करावा आणि विष्णूची नर, नारायण, हय व हंस किंवा मित्र, वरुण, इंद्र व विष्णू या रूपांत पूजा करावी. फल – मोक्षप्राप्ती. [हि. ध.]

विष्णुशंकरव्रत एक काम्य व्रत. भाद्रपद किंवा आश्विन मासात मृगशीर्ष, आर्द्रा, पूर्वा फाल्गुनी, अनुराधा किंवा ज्येष्ठा नक्षत्र असेल, त्या दिवशी हे व्रत करतात. विष्णू व शंकर यांच्या सुवर्णप्रतिमांची पूजा करावी, हविष्यान्नाचे भोजन करावे आणि विष्णूसाठी सोने व शंकरासाठी मोती दान द्यावे, असे सांगितले आहे. फल – मनोरथपूर्ती. [हि. ध.]

विष्णुशयन एक काम्य व्रत. आषाढ शुद्ध एकादशीच्या दिवशी विष्णू क्षीरसागरात शेषावर शयन करतो, अशी कथा आहे. त्यानिमित्त हे तीन दिवसांचे व्रत करतात. व्रतविधी असा –

एकादशीच्या दिवशी उपवास व अनंतशयन विष्णूच्या प्रतिमेची पूजा आणि रात्री जागरण. द्वादशीच्या दिवशी पारणे. त्रयोदशीच्या दिवशी नृत्य, वाद्य, गीत, इ. उपचारांनी विष्णूचा उत्सव. फल – विष्णुलोकप्राप्ती. [व्रतराज]

विष्णुशृंखल एक पुण्ययोग. एकादशी, द्वादशी आणि श्रवण नक्षत्र ही तीन एका दिवशी आल्यास त्या योगाला विष्णुशृंखल म्हणतात. या दिवशी यथाविधि विष्णुपूजा व उपवास करायचा असतो. फल – विष्णुसायुज्यप्राप्ती. [पुरुषार्थ-चिंतामणि]

विष्णुसप्तमी मार्गशीर्ष शुद्ध सप्तमीला हे नाव आहे. या दिवशी रक्तचंदन व रक्तपुष्पे यांनी विष्णूची पूजा करून त्याला घारग्यांचा नैवेद्य दाखवायचा असतो. फल – अभीष्टसिद्धी. [व्र. प.]

विष्णुसहस्रनाम वैष्णव सांप्रदायिकांचे पाच प्रमुख आधारग्रंथ पंचरत्न या संज्ञेने ओळखले जातात. त्यांपैकी विष्णुसहस्रनाम हे एक होय. एकशे सात श्लोकांचे हे स्तोत्र महाभारताच्या अनुशासन पर्वात समाविष्ट असून, त्यात विष्णूची एक सहस्र नावे दिली आहेत. या स्तोत्राला जोडलेला प्रास्ताविक श्लोक असा (म. भा. अनु. १३५.१३)–

यानि नामानि गौणानि विख्यातानि महात्मनः ।
ऋषिभिः परिगीतानि तानि वक्ष्यामि भूतये ॥

अर्थ – महापुरुष विष्णूची जी गुणश्रेष्ठ नावे ऋषींनी सर्वत्र गायिली, ती मी माझ्या ऐश्वर्यप्राप्तीसाठी पुढे कथन करीत आहे.

म्हणजे प्राचीन ऋषींनी ऋग्वेदापासून स्मृतिग्रंथांपर्यंतच्या वाङ्मयात निरनिराळ्या प्रसंगीं परमेश्वराचे ज्या नावांनी स्तवन केले, ती नावे इथे एकत्रित केली आणि ती भीष्मांनी स्तोत्ररूपाने युधिष्ठिराला सांगितली, असा त्याचा अर्थ होतो. या संदर्भात लोकमान्य टिळक म्हणतात. "ज्याने हे सहस्रनाम रचले त्याच्या नजरेपुढे सर्व ऋषिप्रणीत परमेश्वराची वर्णने असून, त्या सर्व वर्णनांचे सार म्हणून त्याने मोठ्या व्यापक दृष्टीने हे स्तोत्र रचले आहे."

यातील विश्व, वषट्कार, भूतात्मा, पूतात्मा, मनू, हिरण्यगर्भ, त्वष्टा, इ. सुमारे एकशे पन्नास नावे वैदिक वाङ्मयातील असली तरी, अनेक नावे लौकिक आहेत. उदा० सहस्रमूर्धा, महेंद्र, सत्य, धर्म, पराक्रम, शिखंडी, अच्युत, काल, इत्यादी. यांत शर्व, शिव, रुद्र, शंभू, इ. प्रसिद्ध शिवनामे विष्णुवाचक म्हणून आलेली आहेत. हा हरिहरैक्याचाच प्रयत्न आहे, असे म्हटले पाहिजे.

या सहस्रनामाचे वर्गीकरण करताना शिवरामपंत परांजपे लिहितात. "विष्णू ब्रह्मरूपाने स्थित असून, वस्तुतः तो कधीही जन्माला येत नाही, हे अज, अयोनिज, अनादी, या शब्दांनी दाखविले आहे. तो नित्य, स्थिर असतो, हे स्थाणु, स्थविरोध्रुव, शाश्वत, शाश्वतस्थाणु, स्थिर, ध्रुव, स्थावरस्थाणु, शाश्वत, शाश्वतस्थिर, इत्यादी शब्दांनी दाखविले आहे. आणि त्याला जन्म नाही, तसा नाशही नाही, हे जन्ममृत्युजरातिग, अव्यय, अक्षर, निधिरव्यय, अच्युत, अमृत, बीजमव्यय, अनंत, इत्यादी शब्दांनी व्यक्त करण्यात आलेले आहे." आणखी काही वर्गीकरणातून त्यांनी विष्णूचे कार्य आणि गुणधर्म स्पष्ट करून सांगितले आहेत.

या स्तोत्राची रचना इ. स. च्या पहिल्या शतकात झाली असावी, असे वासुदेवशरण अग्रवाल यांचे मत आहे. परंतु बौधायन गृह्यसूत्रात या स्तोत्राचा उल्लेख असल्याचा स्पष्ट निर्देश डॉ. बि. वा. करबेळकर व श्री. बलदेव उपाध्याय यांनी केला आहे. या गृह्यसूत्राचा काळ सनपूर्व ५०० ते २०० असा मानण्यात येतो. म्हणजे त्याच्या पूर्वी सहस्रनामाची रचना झाली होती, असे म्हणायला हरकत नाही.

बऱ्याच प्राचीन काळापासून या स्तोत्राचा पाठ करण्याची प्रथा असावी असे वाटते. याचे नित्य पाठ करणाऱ्यांना धर्म, अर्थ व काम हे तीन पुरुषार्थ प्राप्त होतात, असे आश्वासन महाभारतात दिले आहे (अनु. १३५. १२४). पुरूरवा राजाने रूपप्राप्तीसाठी हिमालयातील विष्णुमंदिरात मासोपवास करीत या स्तोत्राचे पाठ केले, असे मत्स्यपुराणात म्हटले आहे. आद्य शंकराचार्यांनीही

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

या सहस्रनामावर टीका लिहिताना त्याचे पाठ श्रवण करावे, असा उपदेश केला आहे. आचार्यांप्रमाणेच रामानुजाचार्य व कुरेशपुत्र पराशर यांनीही यावर भाष्ये लिहिली आहेत.

विष्णुसहस्रनामाचा गौरव करताना लोकमान्य टिळक म्हणतात. "हे सहस्रनाम म्हणजे परमेश्वराचे गुण मनात बिंबून त्याच्या ठायी मनुष्याची भक्ती दृढ करण्यात साधनीभूत असा एक भक्तिकोशच होय." अनेक धनाढ्य व्यापारी आपल्या पेढ्यांवरून या स्तोत्राचे पाठ नित्य करविताना आढळतात. त्यामुळे व्यापाराची भरभराट होते अशी त्यांची श्रद्धा आहे. [भा. सा. भाग ३ रा.; सा. सं. भाग १ ला.; हिंदुत्व.; प्रा. च. को. (हिंदी); लो. बा. गं. टिळक, केसरी, २ ऑगस्ट १९३५]

विष्णुस्मृती एक स्मृतिग्रंथ. या ग्रंथाला वैष्णव धर्मशास्त्र असे नाव दिलेले असून, हा ग्रंथ भगवान विष्णूने रचला असे आरंभीच्या श्लोकात सांगितले आहे. विष्णूने ग्रंथ रचला ही कथा सत्याला धरून नाही. त्यामुळे आपल्या स्मृतीला प्रामाण्य व पावित्र्य मिळावे, या उद्देशाने कोण्या ग्रंथकाराने ही स्मृती भगवंताच्या नावावर पुढे केली असावी. सदर ग्रंथकार कोण हे मात्र समजायला मार्ग नाही. ही स्मृती यजुर्वेदाच्या काठक नामक प्राचीनतम शाखेशी संबद्ध आहे, असे तिच्या वैजयंती नामक टीकेत म्हटले आहे. ही टीका नंदपंडित नावाच्या पुरुषाने लिहिली आहे.

ही स्मृती मनू व याज्ञवल्क्य यांच्या नंतरची आहे. तिच्यात वरील स्मृतींतील उतारे घेतलेले दिसतात. या स्मृतीचे निर्मितिस्थळ काश्मीर किंवा पंजाब असावे, असे म. म. काणे यांचे मत आहे. हिच्यात संस्कार व आश्रमधर्म यांचे प्रतिपादन आहे. प्रस्तुत स्मृतीचे पाच अध्याय असून, अष्टादशस्मृतिसमुच्चय या ग्रंथात ती उपलब्ध आहे. [ध. सू.; प्रा. च. को.]

विष्णुस्वामी एक भक्तिमार्गी आचार्य. याला रुद्र-संप्रदायाचा प्रवर्तक मानतात. पण याचा काल आणि याचे चरित्र दोन्ही गोष्टी अज्ञात आहेत. याच्याविषयी एक आख्यायिका तेवढी प्रचलित आहे, ती अशी —

भगवंताचे साक्षात दर्शन व्हावे या उद्देशाने विष्णुस्वामीने घोर तपश्चर्या केली. पण तपस्येने एवढा देह झिजवूनही दर्शन होत नाही, असे समजल्यावर, त्याने अन्न-पाणी सोडून दिले. मग मात्र सातव्या दिवशी बालकृष्णाने वेणुवादन करीत असल्याच्या स्वरूपात त्याला दर्शन दिले. तेव्हापासून विष्णुस्वामी बाळकृष्णाचा उपासक बनला.

काही विद्वान विष्णुस्वामीला इ. स. च्या ६ व्या शतकाच्या पूर्वीचा मानतात. वल्लभाचार्य विष्णुस्वामीला शरण गेले आणि विष्णुस्वामींच्या नंतर त्याच्या गादीवर बसले.

विष्णुस्वामी मुक्तीपेक्षाही भक्तीला श्रेष्ठ मानतो. त्याच्या मते ईश्वर हा सच्चिदानंदस्वरूप असून, तो आपल्या ह्लादिनी संवित्ने आलिंगित आहे. माया नेहमी त्याच्या अधीन असते.

विष्णुस्वामीने सर्वज्ञसूक्त नावाचा एक ग्रंथ रचला होता, असे भागवताच्या श्रीधरी टीकेवरून कळते.

वल्लभसंप्रदायाचा संप्रदायप्रदीप नावाचा ग्रंथ असून, त्यात विष्णुस्वामीला एका द्रविड देशाच्या मंत्र्याचा पुत्र म्हटले आहे.

महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय हा विष्णुस्वामीच्या मताचेच एक रूपांतर असल्याचे काही विद्वान मानतात. काहींच्या मते सायणाचार्यांचे गुरु विद्याशंकर यांचेच दुसरे नाव विष्णुस्वामी होते. [म. वि.; भागवत दर्शन]

विष्णू एक वैदिक व पौराणिक देवता. विष्णू शब्दाची उत्पत्ती अनेक प्रकारे सांगितली जाते. विष्=सतत क्रियाशील असणे, यावरून यास्काने तो शब्द व्युत्पादिला आहे (निरुक्त १२.१९). मॅक्डोनेल, श्रोडर, इ. पाश्चात्य विद्वानांनीही तोच अर्थ घेतला आहे. पण यास्काने विश्= व्यापणे, या धातूवरूनही तो शब्द सिद्ध होतो, असा पर्याय दिला आहे आणि सायणाचार्यांनीही त्याला अनुसरून विष्णू म्हणजे व्यापक किंवा व्यापनशील, असा त्याचा अर्थ सांगितला आहे (ऋ. १.१५४.१ व ५ वरील भाष्य). विष्णुसहस्रनामावरच्या एका टीकेत ह्याच अर्थ स्वीकारून म्हटले आहे, ते असे —

चराचरेषु भूतेषु वेशनाद्विष्णुरुच्यते।

अर्थ — चराचर भूतांच्या ठिकाणी प्रविष्ट असल्यामुळे त्याला विष्णू असे म्हणतात.

पण वरील दोन्ही व्युत्पत्ती बाजूला सारून डॉ. रा. ना. दांडेकर हे त्या शब्दाची वेगळी व्युत्पत्ती सांगतात, ती अशी —

वि (=उडणे) या धातूला 'स्नु' हा प्रत्यय लागून विष्णुशब्द सिद्ध झाला आहे. जिष्णू, अलंकरिष्णू वगैरे अनेक रूपेही अशीच स्नुप्रत्ययान्त आहेत. त्यावरून विष्णू म्हणजे उडणारा पक्षी हा अर्थ प्राचीन काळी प्रचलित असणे असंभवनीय नाही. विष्णू या देवतेचे मूळचे प्रतीक पक्षी हेच असले पाहिजे, असा यावरून निष्कर्ष निघू शकतो. आणि विष्णूच्या या मूळच्या पक्षी-रूपावरूनच वैदिक कवींना पुढची म्हणजे सूर्य-पक्षी ही कल्पना सुचली असली पाहिजे. सूर्यावर पक्षिस्वरूपाचा आरोप करणे ही गोष्ट सर्व प्राचीन दैवतशास्त्रांना चांगली परिचित अशीच आहे. दैवतशास्त्रीय कल्पनांच्या विकासक्रमातील एक अगदी प्राथमिक अवस्था अशी असली पाहिजे, की ज्या वेळी अत्यंत

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

शीघ्रतेने अखिल विश्वाचे– त्याच्या तीन विभागांचे – आक्रमण करणारी अशी एखादी देवता कवींनी कल्पिली होती आणि या

शेषशायी विष्णू, त्रिवेंद्रम

कल्पनेशी संबद्ध व त्या वेळच्या विचारसरणीस अनुरूप अशी दुसरी कल्पना म्हणजे ती देवता पक्षि-स्वरूप असली पाहिजे ही होय. कारण अत्यंत शीघ्रगती प्राणी म्हणजे पक्षी. इतर प्राचीन लोकांप्रमाणे वैदिक कवींनीही सूर्यदेवतेचा पक्षिस्वरूपात निर्देश केला आणि ती पक्षि-स्वरूप सूर्यदेवता म्हणजेच विष्णू. ऋग्वेदाच्या १० व्या मंडलात (१०.१४९.३) 'सुपर्णो अङ्ग सवितुर्गरुत्मान् पूर्वो जात:' असा उल्लेख आलेला आहे. ब्लोक या पंडिताने या व एतत्सदृश इतर उल्लेखांचा चिकित्सापूर्वक विचार करून अशी उपपत्ती पुढे मांडली आहे, की हा वैदिक सुपर्ण म्हणजे सूर्यपक्षीच असला पाहिजे.'

ऋग्वेदात सामान्यत: विष्णू म्हणजे पक्षिस्वरूपातील सूर्य असेच मानले आहे. या सूर्यरूप पक्ष्याला सुपर्ण व गरुत्मान् (गरुड) अशी नावे दिली आहेत. तीच नावे पुढे विष्णूलाही लागली. विष्णुसहस्रनामात सुपर्ण हे विष्णूचे एक नाव आहे. पुराणकारांनी गरुड हे विष्णूचे वाहन मानले आहे, ते मूलत: विष्णूचेच एक रूप असले पाहिजे. वाहन आणि वाह्य यांच्या मूळ सारूप्याची कल्पना प्राचीन दैवतशास्त्राला अपरिचित नाही. विष्णूची त्रिविक्रम, उरुगाय (विस्तीर्ण गती असलेला) व उरुक्रम (विस्तीर्ण पदक्षेप करणारा) ही विशेषणे मूळ सूर्याचीच आहेत. सूर्य तीन पावलांत त्रिभुवन व्यापतो. तो पहिल्या दोन पावलांत पृथ्वी व अंतरिक्ष व्यापतो. त्याचे तिसरे स्थान सर्वोच्च आहे. तेच त्याचे परम पद होय. उरुक्रम या शब्दावरून सूर्याचे पूर्व क्षितिजापासून पश्चिम क्षितिजापर्यंतचे आक्रमण सूचित होते. सूर्य हा पूर्व्य म्हणजे प्राचीन आहे. कारण जगाच्या आरंभापासून तो अंतरिक्षाचे आक्रमण करीत राहिला आहे. पण त्याबरोबरच तो नव्य म्हणजे अभिनव असाही आहे. कारण रोज सकाळी तो नव्यानेच आपल्याला दिसतो. वरील सर्व विशेषणांवरून आणि वर्णनांवरून विष्णूचे सौर स्वरूप संशयातीत ठरते. याचा अर्थ असा, की सूर्याचे प्रमुख तसेच गौण अंशही स्वत:च्या स्वरूपात सामावून घेऊन विष्णू ही देवता सिद्ध झाली व उत्कर्षाप्रत पोचली.

ऋग्वेदात विष्णूची स्तुती करणारी अशी केवळ तीन सूक्ते आहेत. आणखी दोन-तीन सूक्तांतील काही ऋचांमधून विष्णूची स्तुती आहे. ऋग्वेदात विष्णूला अशी अल्प जागा का मिळाली, याविषयी विवेचन करताना डॉ. रा. ना. दांडेकर लिहितात –

" वैदिक आर्यांपैकीच एका फार मोठ्या जमातीची विष्णू ही सर्वश्रेष्ठ देवता होती. पण ऋग्वेदकाली पुढारलेली म्हणून समजली जाणारी वैदिक आर्यांची जी कुटुंबे होती, त्या कुटुंबांतील कवींच्या मनाला, विष्णूच्या मूळ व्यक्तिमत्त्वातील काही

महाविष्णूची मूर्ती, तंजाऊर कलामंदिर

अंश, काही कारणामुळे न रुचण्यासारखे होते आणि म्हणून, त्या कवींनी आपल्या 'अधिकृत' देवतामण्डलात विष्णूस सहजगत्या

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

प्रवेश करू दिला नाही. तो प्रवेश प्रयत्नपूर्वक मिळवावा लागला. आणि 'अधिकृत' वैदिक देवतामण्डलात विष्णूला स्थान मिळाले तेव्हाही 'प्रतिष्ठित' वैदिक कवींनी विष्णूच्या मूळच्या व्यक्तिमत्त्वांतील काही अंश दडपून टाकले."



विष्णूची ब्रॉंझची मूर्ती, बंगाल (इ. स. १३ वे शतक)

डॉ. दांडेकरांच्या मते हा दडपून टाकलेला अंश म्हणजे शिपिविष्ट हे त्याचे स्वरूप होय. याविषयी ते पुढीलप्रमाणे विवेचन करतात – "भाषाशास्त्रदृष्ट्या 'शिपिविष्ट' या शब्दाचा विचार केल्यास त्यातील 'शिपि' या भागाचा 'शेप' (=पुरुषलिङ्ग) या शब्दाशी असलेला संबंध डोळचाआड करता येत नाही. 'शिपि' या पुरुषलिङ्ग शब्दाला 'विष्' या धातूपासून साधलेले एक रूप जोडलेले आहे. त्यावरून 'शिपिविष्ट' या शब्दाचा मूळ अर्थ 'वाढणारे, क्रियाशील, लहानमोठे होणारे पुरुषलिङ्ग' असा काहीसा असावा, असे अनुमान करता येते. विष्णूच्या या स्वरूपाचा उल्लेख वैदिक कवी इतक्या सावधानतेने आणि गूढपणे का करतात हे आता सहज कळून येण्यासारखे आहे. 'शिपिविष्ट' या विष्णूच्या नावाबद्दल 'कुत्सितार्थीऽयं पूर्वं भवति' असे औपमन्यवाने विधान करावे (निरुक्त ५.७) हेही अगदी नैसर्गिक आहे. 'शिपिविष्ट' या शब्दाने विष्णू या देवतेचे प्राचीन लिङ्गसंबद्ध स्वरूप स्पष्टपणे सूचित केलेले आहे. विष्णूचा सुलभप्रसूत्वाच्या, प्रभूतफलत्वाच्या, अवन्ध्यत्वाच्या, सामान्यतः सृजनाच्या कल्पनांशी प्रथमपासूनच असलेला संबंध 'शिपिविष्ट' या शब्दाने तर सूचित होतोच; पण या संबंधास, वैदिक सूक्तांत आणि यागविधीत विष्णूविषयी काही प्रासंगिक आणि गौण प्रकारचे उल्लेख आलेले आहेत, त्यामुळेही पुष्टी मिळते."

ऋग्वेदात सहा ऋचांचे (ऋ. १.२२.१६-२१) एक छोटेसे विष्णुसूक्त आहे; पण विष्णूचे माहात्म्य समजेल इतके ते बोलके आहे. ते सूक्त असे –

अतो देवा अवन्तु नो यतो विष्णुर्वि चक्रमे ।
पृथिव्याः सप्त धामभिः ॥
इदं विष्णुर्वि चक्रमे त्रेधा निदधे पदम् ।
समूळ्हमस्य पांसुरे ॥
त्रीणि पदा वि चक्रमे विष्णुर्गोपा अदाभ्यः ।
अतो धर्माणि धारयन् ॥
विष्णोः कर्माणि पश्यत यतो व्रतानि पस्पशे ।
इन्द्रस्य युज्यः सखा ॥
तद्विष्णोः परमं पदं सदा पश्यन्ति सूरयः ।
दिवीव चक्षुराततम् ॥
तद्विप्रासो विपन्यवो जागृवांसः समिन्धते ।
विष्णोर्यत्परमं पदम् ॥

अर्थ – पृथ्वीचे सात विभाग धरून ज्या ज्या स्थानाचे विष्णूने आक्रमण केले, तिथून देव आमचे रक्षण करोत. हे सर्व जग विष्णूने आक्रमून टाकले आहे. त्याने आपले पाऊल तीन ठिकाणी ठेवले. त्याबरोबर त्याच्या पदरजात हे सर्व जगत झाकून गेले. जो सर्व विश्वाचा प्रतिपालक आहे, ज्याला कोणी फसवू शकत नाही किंवा ज्याचा कोणी पराभवही करू शकत नाही, अशा

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्णूने तीनच पावलांनी आक्रमण केले आणि त्या प्रत्येक ठिकाणी सद्धर्माच्या विधि-नियमांची प्रस्थापना केली. जियून विष्णूने तुमची सर्व धर्म-कर्मे अवलोकन केली, तियेच (तुमच्या हृदयात) तुम्हीही त्याच्या अद्भुत पराक्रमी कृत्यांकडे आपले लक्ष ठेवा. विष्णू हा इंद्राचा त्याच्यासह एकत्र राहणारा मित्र होय. अशा त्या विष्णूच्या अत्युच्च पदाचे ज्ञानी भक्त नेहमी निरीक्षण करीत असतात. आणि त्या वेळी त्यांचे नेत्र जणू आकाशाकडेच टक लावल्याप्रमाणे विस्तृत दिसतात. नाना प्रकारे स्तवन करणारे, जागरूक आणि ज्ञानशील असे स्तोत्रकर्ते विष्णूचे जे परम धाम त्याची महती नेहमीच प्रसृत करीत असतात.

विष्णुमूर्ती, पल्लव शैली

ऋग्वेदात विष्णूला अत्यल्प अवसर मिळाला असला, तरी त्यावरून वेदातला विष्णू दुर्बळ, गौण किंवा उपेक्षणीय होता, असे समजण्याचे कारण नाही. तिथे त्याचे काही पराक्रम वर्णिले आहेत, ते असे —

विष्णू हा इंद्राचा घनिष्ठ मित्र असून, तो इंद्राइतकाच वीर्यबलसंपन्न आहे. इंद्र-वृत्र युद्धात वृत्र जेव्हा इंद्राला अनावर ठरला तेव्हा त्याने विष्णूची प्रार्थना केली, की 'तू स्वतःचा विक्रम अधिक वाढव.' विष्णू मदतीला होता म्हणूनच इंद्र वृत्राला मारू शकला. पृथ्वीवरचे रजःकण विष्णू मोजता झाला. विद्यमान असलेले पृथ्वीवरील लोक विष्णूने निर्माण केले; अस्थिर असलेले आकाश दृढ केले व तीन पावलांत त्रिभुवन व्यापले. त्याचे तिसरे पाऊल हे परम पद असून, त्यात मधूचा संचय असतो. विष्णू वंध्या स्त्रीच्या ठिकाणी गर्भसंभव निर्माण करतो. तो गर्भाचे रक्षणही करतो. हे सर्व लक्षात घेऊन एक वैदिक ऋषी म्हणतो— पर्वतात राहणारा आणि स्वच्छंद विचरण करणारा सिंह जसा आपल्या पराक्रमाने प्रख्यात आहे, तसाच विष्णूही आपल्या पराक्रमांमुळे मनुष्यांकडून स्तुतीला पात्र ठरला आहे.

मात्र कितीही बलवान असला, तरी ऋग्वेदात विष्णू उपेंद्रच होता. इंद्राचा आज्ञाधारक अशाच प्रकारचे दुय्यम स्थान त्याला ऋग्वेदात होते. पण यजुर्वेदाच्या काळात हळूहळू विष्णूचा लौकिक वाढू लागला. ब्राह्मणकालात या प्रक्रियेने अधिक जोर धरला. ब्राह्मणकाल हा यज्ञसंस्थेच्या भरभराटीचा काल होय. या कालात विष्णूने लोकप्रियतेच्या बाबतीत बरीच मजल मारली. ब्राह्मणांनी 'यज्ञो वै विष्णुः' — यज्ञ म्हणजेच विष्णू किंवा विष्णू म्हणजेच यज्ञ, असे समीकरण ठरविले. ऐतरेय ब्राह्मणात (१.१) तर स्पष्ट घोषणा केलेली आहे, की—

अग्निर्वै देवानामवमो विष्णुः परमः ।
तदन्तरेण सर्वा अन्या देवताः ।

अर्थ — अग्नी ही सर्वांत खालची देवता असून, विष्णू हा सर्वांत वरचा देव आहे. या दोघांच्या मध्ये सर्व देवता आहेत.

ब्राह्मणकालात विष्णूच्या तीन पावलांचा संबंध पृथ्वी, अंतरिक्ष व आकाश यांच्याशी स्पष्टपणे जोडला गेला. त्याला विष्णुक्रम असे नाव मिळाले. यज्ञकर्त्या यजमानाचे विष्णूशी ऐक्य कल्पिले गेले. यजमानाने वेदीवर तीन पावले ठेवून विष्णुक्रमाचे अनुकरण करावे, असा विधी निर्माण करण्यात आला. तीन पावलांत त्रिभुवन व्यापणे हे ऋग्वेदातील कथाबीज ब्राह्मणग्रंथांनी वाढवले. त्याच्या दोन कथा अशा—

(१) देवासुरांचा संघर्ष झाला. त्यात असुर विजयी झाले.

उपासनेसाठी वापरले जाणारे विष्णुचक्र

ते असुर सगळी पृथ्वी बळकावू लागले, तेव्हा 'आम्हांला पृथ्वीचा काहीतरी वाटा द्या' असे देवांनी प्रार्थिले. त्यावर असुर म्हणाले.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

'तुमच्यापैकी विष्णू आपल्या तीन पावलांनी जेवढी भूमी व्यापील, तेवढीच जागा आम्ही तुम्हांला देऊ.' ते ऐकून विष्णूने आपल्या तीन पावलांत समस्त लोक, वेद आणि वाणी ही तीन्ही व्यापली आणि त्यांना स्वतंत्र केले (ऐ. ब्रा. ६.३.१५).

(२) देव आणि असुर हे दोघेही प्रजापतीचे पुत्र. त्या दोघांत सत्ता-वैभवाची स्पर्धा चालत असे. त्या स्पर्धेत एकदा असुर विजयी झाले. सर्व जग त्यांनी आत्मसात केले. देव भूमिहीन झाले. मग त्यांनी एक युक्ती केली. त्यांनी एक कूट योजना ठरवली. त्यांच्यांतला विष्णू हा वामन (खुजा) होता. त्याच्यासह देव असुरांकडे गेले आणि भूमी मागू लागले.

असुर म्हणाले. 'ठीक आहे. हा तुम्हां सर्वांतला जो वामन आहे, त्याला आडवे होण्यापुरेशी भूमी आम्ही तुम्हांला देऊ.' देवांना तेवढेच हवे होते. त्यांनी ते मान्य केले. लगेच त्या 'वामन' विष्णूला पूर्व दिशेला नेऊन त्यांनी निजवले. मग ते गायत्री छंदांनी त्याचे स्तोत्र गाऊ लागले. त्या स्तोत्राच्या सामर्थ्याने त्यांनी वामनाला इतके वाढविले, की समस्त पृथ्वीच त्याच्या अंगाखाली आली. त्यामुळे असुर भूमिहीन झाले आणि त्यांची सारी सत्तासंपदा देवांना मिळाली (श. ब्रा. १.९.३.९).

पुढे उपनिषत्कालात विष्णू तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात प्रविष्ट झाला. मैत्री उपनिषदात म्हटले आहे, की समस्त सृष्टीचे धारण पोषण करणारे अन्नरूपी परब्रह्म म्हणजे विष्णू होय. कठोपनिषदात म्हटले आहे, की साधकाचे अंतिम साध्य जे श्रेय, तेच विष्णूचे परमपद होय. गृह्यसूत्रांच्या कालात विष्णू हा नित्यपूजेचा देव बनला. त्या पुढच्या कालात त्याला पंचायतनात प्रमुख स्थान मिळाले. उपनिषत्कालातच ब्रह्मा-विष्णु-महेशांच्या त्रिमूर्तीची कल्पना प्रचलित झाली. सांख्यमतानुसार हे तीन मोठे देव अनुक्रमे सत्त्व-रज-तमांची प्रतीके ठरले. विष्णूच्या सत्त्वगुणामुळे सृष्टीच्या स्थितीचे म्हणजेच पालन-पोषणाचे काम त्याच्याकडे आले. ॐकाराच्या उपासनेत त्यातल्या उकाराशी विष्णूचे तादात्म्य मानले गेले.

महाभारतात विष्णूचे माहात्म्य याहून अधिक वाढले. विष्णू समस्त सृष्टीचा शास्ता ठरला. परमेश्वर ही उपाधी त्याला ब्रह्मदेवाच्या मुखाने दिली गेली.

शांतिपर्वातले नारायणीय उपाख्यान निर्मून व्यासांनी नारायणाला म्हणजे विष्णूला परम उपास्य बनवले. उपासनेचे एक साधन असलेले विष्णुसहस्रनाम हे स्तोत्रही महाभारतकारांनी निर्माण केले. अनुगीतेत विष्णूचे वासुदेव कृष्णाशी तादात्म्य सांगण्यात आले.

अष्टादश महापुराणांतली गरुड, नारद, विष्णू, विष्णुधर्मोत्तर व भागवत ही पुराणे वैष्णव आहेत. त्यांत भागवत पुराणाचा क्रमांक सर्वांत वरचा लागतो. या भागवतादी पुराणांनी विष्णूचा महिमा अपरंपार वाढवला. नित्य, अव्यय, अक्षय, एकरस आणि



योगासन विष्णू (मथुरा)

एकमेवाद्वितीय अशा परब्रह्मालाच पुराणकारांनी विष्णू ही संज्ञा दिली. विष्णू हा प्रकृतीहून पर, परमश्रेष्ठ, अंतरात्म्यात स्थित; तसेच रूप, वर्ण, नाम, इ. विशेषणांनी विरहित आणि षड्विकाररहित आहे. ब्रह्मा तोच आणि शिवही तोच. विष्णुपुराणात म्हटले आहे–

सृष्टिस्थित्यन्तकरणीं ब्रह्म-विष्णु-शिवात्मिकाम् ॥
स संज्ञां याति भगवान् एक एव जनार्दनः ॥

(वि. पु. १.२.६६)

अर्थ – सृष्टि-स्थिती आणि प्रलय करणाऱ्या आणि त्यासाठी ब्रह्मा–विष्णु–शिव हे नाव धारण करणाऱ्या देवता म्हणजे एकाच भगवंताच्या संज्ञा होत.

विष्णूचे भक्तवात्सल्य हे पुराणकारांनी पराकोटीला पोचविले. गजेंद्राच्या मोक्षासाठी तोच धावला. देव-दैत्य संघर्षात देवांना अमृत मिळवून देण्यासाठी तोच मोहिनीरूपाने प्रकटला. ध्रुवाला त्यानेच अढळपदी बसविले. प्रल्हादासाठी तोच नृसिंहरूपाने स्तंभातून प्रकटला. दुर्वास मुनींनी 'तुला दहा जन्म घ्यावे लागतील,' हा अंबरीष या एकांत भक्ताला दिलेला शाप भगवंताने भक्ताचे हित करण्यासाठी स्वतःवर ओढवून घेतला.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

आपल्या परमभक्तांच्या योगक्षेमाची चिंता त्यानेच वाहिली. वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध या चार व्यूहांच्या रूपाने तोच चतुरात्मा बनला. समस्त वैष्णव पुराणे अशा अनेक विष्णुकथांनी भरून राहिली आहेत. विष्णूच्या गुणमाहात्म्याचे झळाळते दर्शन त्यांतून होते. याच पुराणांत विष्णूच्या सांग-सपरिवार रूपाची आणि त्याच्या पूजापद्धतीची व्यवस्थित मांडणी केली.

लोक आणि परिवार – वैकुंठ हा विष्णूचा लोक होय. तो सप्तस्वर्गांच्या आणि कैलासाच्याही वर असून, तो परम दर्शनीय आहे. वैकुंठ याचा अर्थच 'आनंददायक' असा आहे. वैकुंठात आनंद भरून राहिला आहे. तो हिरे-माणकांनी लखलखत असतो. त्याच्या मध्यभागी एका भव्य, सुंदर प्रासादात विष्णू लक्ष्मीसह नांदतो. प्रद्युम्न हा त्याचा पुत्र आणि अनिरुद्ध हा नातू हे त्याच्या जवळ असतात. तिथून तो चराचर सृष्टीचे पालन करतो. शेषनाग ही त्याची शय्या आणि गरुड हे त्याचे वाहन होय. नारद, तुंबरू, ऋषी, मुनी हे तिथे विष्णूचे गुणगान करतात. विष्णूच्या प्रासादापुढे नयनरम्य उद्यान असून, ते बाराही महिने फल-पुष्पांनी संपन्न असते. जय-विजय हे वैकुंठात द्वारपालाचे काम करतात आणि विष्णुभक्तांनाच आत प्रवेश देतात. वैकुंठातूनच विरजा नावाची एक नदी वाहते. वैकुंठात गेलेले विष्णुभक्त तिच्या तीरावर शांतपणे ध्यान-धारणा करीत असतात.

पुराणकारांनी विष्णूचे माहात्म्य अनेक प्रकारे विशद रूपाने वर्णिले आहे. पुढे वैष्णव संप्रदायांनी पौराणिक विष्णुमाहात्म्याला अधिक उजळा आणि तात्त्विक अर्थ दिला. या सर्व स्तुति-स्तोत्रांतून उपासनेसाठी विष्णूचे जे ध्यान निर्माण केले गेले, त्याचा श्लोक असा–

> शान्ताकारं भुजगशयनं पद्मनाभं सुरेशं
> विश्वाधारं गगनसदृशं मेघवर्णं शुभाङ्गम् ।।
> लक्ष्मीकान्तं कमलनयनं योगिभिर्ध्यानगम्यं
> वन्दे विष्णुं भवभयहरं सर्वलोकैकनाथम् ।।

अर्थ – शांतमूर्ती, शेषावर शयन करणारा, नाभीत कमल धारण करणारा, देवांचा अधिपती, विश्वाधार, आकाशासारखा व्यापक, मेघवर्ण, शुभांग, लक्ष्मीकांत, कमलनयन, योग्यांना केवळ ध्यानातच गम्य, भव-भय हरण करणारा आणि सर्व लोकांचा एकमेव अधिपती अशा विष्णूला मी नमस्कार करतो.

विष्णूचे अवतार – जेव्हा जेव्हा पृथ्वीवर अधर्म माजतो, धर्माचा ऱ्हास होतो, दुर्जन बलदंड होतात आणि सज्जनांचा छळ होतो, त्या त्या वेळी भगवान विष्णू अवतार धारण करून भूभार हलका करतो आणि धर्माची घडी पुन्हा स्थापतो, अशी वैष्णव पुराणकारांची धारणा आहे.

महाभारताच्या शांतिपर्वातील नारायणीय उपाख्यानात विष्णूचे पुढील दहा अवतार सांगितले आहेत – वराह, नारसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, हंस, कूर्म, मत्स्य व कल्की. वायुपुराणात विष्णूचे दहाच अवतार सांगितले आहेत; पण तिथे हंस, कूर्म व मत्स्य यांच्या जागी दत्तात्रेय, वेदव्यास व एक अनामिक अशी त्यांची नावे आहेत (९८.२११). भागवत पुराणात विष्णूचे बावीस अवतार सांगितले असून, त्यांत कपिल, दत्तात्रेय, ऋषभ व धन्वंतरी यांचा समावेश आहे. तसे पाहू गेल्यास विष्णूच्या अवतारांची संख्या अनंत आहे आणि हे जाणूनच हरिवंशात म्हटले आहे –

> प्रादुर्भावसहस्राणि अतीतानि न संशयः ।
> भूयश्चैव भविष्यन्तीत्येवमाह प्रजापतिः ।।

(हृ. वं. १.४१.११; ब्रह्म. २१३.१७)

अर्थ – विष्णूचे अनंत अवतार पूर्वकाली होऊन गेले आहेत आणि तितकेच ते भविष्यकालीही होतील, असे प्रजापती म्हणतो. (अवतार पाहा)

भारतीय दैवतशास्त्राच्या इतिहासात विष्णू व शिव हे दोन देव मानवाकृतीतल्या दैवतोपासनेचे आद्य प्रतीक मानले जातात. या देवतांचे मानवीकरण उत्तर वैदिक कालात झाले. त्या काळी वेदप्रणीत यज्ञ–याग क्लिष्ट, अधिक तंत्रबद्ध अतएव नित्या-चरणासाठी दुर्घट बनले होते. अशा त्या काळात माणसांच्या भक्तिभावनेसाठी आणि उपासनेसाठी सुलभ मार्ग निर्माण करून देण्याची आवश्यकता निर्माण झाली. त्यासाठी मग शिव आणि विष्णू या देवतांचे मानवीकरण झाले. त्यातूनच शैव व वैष्णव संप्रदाय निर्माण झाले. विष्णूच्या या परिवर्धित स्वरूपात सात्वतांचा उपास्य वासुदेव आणि नारायणीय उपाख्यानातला जगत्संचालक नारायण या दोन देवता संमीलित करण्याचा यशस्वी प्रयत्न पुराणकारांनी केला. त्यामुळे ऋग्वेदात चतुर्थ श्रेणीचा असलेला विष्णू पौराणिक कालात सर्वश्रेष्ठ देव बनला.

भारतावर बौद्धपर्व हे एखाद्या महापुरासारखे लोटून गेले. त्याने पूर्वीच्या देव-धर्मविषयक कल्पनांना विलक्षण हादरा दिला. त्यात ब्रह्मा, इंद्र, इ. काही देव शिल्लक राहिले खरे; पण त्यांना बुद्धाचे पाईक बनावे लागले. बुद्ध हा देवाधिदेव झाला. अव-तारांच्या जागी बोधिसत्व आले. नवे स्वर्ग, नवे लोक-परलोक उभारले गेले. जुन्या कथांना नव्या आशयाची पाटावे नेसवून बुद्ध आणि त्याचा धर्म यांना अनुकूल होतील, अशा प्रकारे त्या रूपांतरित केल्या गेल्या.

या महापुरात विष्णूही काही काळ बुडालेला दिसतो; पण तो अस्तंगत मात्र झाला नाही. तो आतून अधिकाधिक लोकप्रिय होत चालला. त्याच्या भोवती अनेक कथा गोळा होऊ लागल्या.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यांचें तात्त्विक अर्थही सांगितले जाऊ लागले. त्या विष्णुकथा पुराणांच्या पोटात शिरल्या तशा रामायण-महाभारतातही प्रविष्ट झाल्या. कालांतराने बुद्धाचे तेजोवलय मंद झाले, बौद्ध धर्माचाही वद्य पक्ष सुरू झाला आणि त्या वेळी आपोआप विष्णू षड्विधैश्वर्यसंपन्न भगवान होऊन पूजेच्या मखरात विराजित झाला. बुद्धाचे नाव राहिले ते विष्णूचा नववा अवतार म्हणून.

विष्णूची पाषाण–मूर्ती

विष्णुमूर्ती – भारतात विष्णुमूर्ती असंख्य आहेत. त्यांचे साधारण व अवतार असे दोन मोठे वर्ग पडतात. विष्णुमूर्ती कित्येकदा एकटी असते, तर कित्येकदा श्री, भू, लक्ष्मी व सरस्वती यांपैकी कोणत्या तरी दोन देवतांनी युक्त असते. विष्णू बसलेला असतो, तेव्हा लक्ष्मी एकटीच त्याच्या शेजारी दाखवतात. ती कधी विष्णूच्या मांडीवर असते, तर कधी त्याच्या डाव्या किंवा उजव्या अंगी असते. विष्णू उभा असेल तेव्हा लक्ष्मी सूक्ष्म रूपाने दाखवतात व दुसऱ्या अंगी गरुड दाखवतात. बैठी मूर्ती गरुडावर आरूढ असते. विष्णू जेव्हा केशवादी २४ नावांपैकी एका नावाने असतो, तेव्हा त्याला नियमाने चार हात असतात. इतर रूपांत हातांची संख्या दोन, चार, सहा, आठ किंवा त्यांहूनही अधिक असू शकते. विष्णूच्या चार हातांत शंख, चक्र, गदा व पद्म या वस्तू असतात, हृदयावर कौस्तुभमणी व श्रीवत्सलांच्छन असते आणि गळचात गुडघ्यांपर्यंत लोंबणारी वैजयंतीमाला असते.

कुशाणकालापासूनच विष्णूच्या अवतारांच्या मूर्ती आढळू लागतात. अवतारांचे एकत्रित मूर्तीकरण त्या कालात मंदिरद्वारावर दिसू लागले. बंगालमध्ये विष्णुपट्ट बनू लागले आणि त्यांवर दशावतारांच्या मूर्ती कोरल्या जाऊ लागल्या. अवतारांच्या पृथक पृथक मूर्तीही बनू लागल्या. त्यांमध्ये वराह, नृसिंह आणि वामन यांच्या मूर्ती विपुल प्रमाणांत घडू लागल्या.

गुप्तकालात भारतामध्ये वैष्णव धर्माचा खूप प्रसार झाला. गुप्तराजे वैष्णव होते. त्यांच्यापैकी काहींनी स्वतःला परम भागवत म्हणवून घेतले आहे. त्यांनी विष्णूचे अनेक ध्वजस्तंभ निर्माण केले; तसाच विष्णूच्या मूल रूपातल्या आणि अवताररूपांतल्या अनेक मूर्तीही निर्माण केल्या.

मध्ययुगात विष्णूच्या चतुर्मुख मूर्तीही बनू लागल्या. नर, नरसिंह, स्त्रीमुख आणि वराहमुख अशी चार मुखे घडवून कलाकारांनी या मूर्ती आकाराला आणल्या. वैकुंठ, अनंत, त्रैलोक्यमोहन व विश्वरूप अशी त्यांना नावे दिली. त्यांना ८, १२, १६ व २० अशा भुजा लावल्या. अशा काही मूर्ती काश्मीरमधल्या अवंतीपूर येथील उत्खननात सापडल्या आहेत. तिथल्या मार्तंडमंदिरातली विष्णुमूर्ती अष्टभुज आहे.

रंगनाथ, पद्मनाभ, जलशयन, वैकुंठनारायण, लक्ष्मीनारायण, गरुडनारायण, गजेंद्रमोक्ष, योगेश्वर विष्णू, पांडुरंग, हयग्रीव, वेंकटेश, असे विष्णुमूर्तींचे आणखीही काही प्रकार आढळतात.

विष्णुमूर्तींत शेषशायी किंवा अनंतशयन हे मूर्तिरूप कलाकारांचे फार आवडते आहे. ही मूर्ती कशी घडवावी, त्याचे वर्णन अग्निपुराणात आहे. त्रिविक्रम हे आणखी एक लोकप्रिय वैष्णव शिल्प होय. या शिल्पात त्रिविक्रम विष्णूचा डावा पाय मस्तकाच्या समांतर उचललेला दाखवतात. बादामी येथील त्रिविक्रममूर्ती भारतातली एक उत्कृष्ट मूर्ती मानतात.

विश्वरूप विष्णू असाही एक मूर्तिप्रकार आहे. अशा काही मूर्ती मथुरा येथे सापडल्या आहेत. या मूर्तींत दोन वैशिष्ट्ये आढळतात. काही मूर्तींच्या चारही बाजूंना वसू, रुद्र, आदित्य, शिव, ब्रह्मा, चंद्र, सूर्य, इ. अनेक देवतांच्या मूर्ती कोरलेल्या आढळतात; तर काही मूर्तींत विष्णूच्या एका बाजूला वराह व दुसऱ्या बाजूला नरसिंहाचे मस्तक बनवलेले असते.

वैखानस आगम आणि पांचरात्रसंहिता यांमध्ये मूर्तींच्या श्रेणीत ३६ विष्णूंची गणना केलेली आहे. विष्णूच्या स्थिर मूर्तींना ध्रुवबेर असे म्हणतात. योग, भोग, वीर आणि आभिचारिक असे विष्णुमूर्तींचे चार भेद मानलेले आहेत. स्थानक, आसन, शयन आणि उत्तम, मध्यम, अधम असेही एक वर्गीकरण केलेले आहे.

बौद्ध शिल्पात विद्युज्ज्वालाकराली, दशभुज सितमारीचो आणि उभयवराहानन मारीची या तीन बौद्ध देवता विष्णूला आपल्या पायदळी तुडवीत आहेत, असे विष्णूचे रूप आढळते.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

विष्णुवाहन अवलोकितेश्वराची मूर्तीही काही ठिकाणी आढळते.

जैन मूर्तिकलेत ऋषभनाथ या तीर्थंकराचा चाकर या स्वरूपात विष्णू दाखवलेला असतो.

विश्वरूप विष्णू, गुर्जरप्रतीहार (इ. स. चे ९ वे शतक)

विष्णूची आयुधे व अलंकरणे – शंख, चक्र, गदा, पद्म, धनुष्य, श्रीवत्स, कौस्तुभ, वैजयंती, किरीट आणि कुंडल ही विष्णूची आयुधे व अलंकरणे होत. वैष्णव संप्रदायात या प्रत्येकाचा तात्त्विक अर्थ सांगितला आहे, तो असा –

शंख – पंचमहाभूतात्मक शब्दब्रह्माचे प्रतीक. नाव पांचजन्य. चक्र – मनाचे प्रतीक. नाव सुदर्शन. गदा – आदिविद्या. नाव कौमोदकी. पद्म – सृष्टीचे प्रतीक. धनुष्य – आदिमायेचे प्रतीक. नाव शार्ङ्ग. श्रीवत्स (कौस्तुभमणियुक्त) – तेजाचे प्रतीक. वैजयंती – आद्या, अजया शक्ती. किरीट – कूटस्थ सत्त्व. कुंडले – क्षर आणि अ-क्षर तत्त्वाची प्रतीके.

विष्णूची आयुधे व परिवार यांचे वर्ण पुढीलप्रमाणे आहेत –

गरुड – कमलवर्ण. गदा – कृष्णवर्ण. पुष्टी – (एक भार्या) – शिरीषपुष्पासारखी. लक्ष्मी – सुवर्णवर्णाची. शंख – पूर्ण चंद्रासारखा. कौस्तुभ – लाल रंगाचा. चक्र – सहस्र सूर्यांच्या वर्णाचे. श्रीवत्स – कुंदपुष्पाच्या वर्णाचे. वैजयंती माला – पंचवर्णाची. अनंतनाग – मेघवर्णाचा.

विष्णूची नावे – विष्णूची नाम–रूपे अनंत असल्याचे सांगितले आहे. त्याची सहस्र नामे वेगळी काढून त्यांचे 'विष्णुसहस्रनाम' हे स्वतंत्र स्तोत्र बनवलेले आहे. त्या नावांनी विष्णुपूजेत विष्णूला तुलसीदले किंवा कमळे अर्पण करतात. पण विष्णूची पुढील २४ नावे विशेष प्रसिद्ध आहेत ती अशी –

केशव, नारायण, माधव, गोविंद, विष्णू, मधुसूदन, त्रिविक्रम, वामन, श्रीधर, हृषीकेश, पद्मनाभ, दामोदर, संकर्षण, वासुदेव, प्रद्युम्न, अनिरुद्ध, पुरुषोत्तम, अधोक्षज, नारसिंह, अच्युत, जनार्दन, उपेंद्र, हरी आणि श्रीकृष्ण. आचमनाच्या वेळी या नावांचा उच्चार करतात.

विष्णुपूजा – इतर देवतांच्यासारखीच विष्णूची षोडशोपचारे पूजा करतात. विष्णुपूजेत तुलसीदल आवश्यक असते. कमळ मिळाल्यास विशेष चांगले. खीर किंवा शिरा हा विष्णूचा प्रिय असा नैवेद्य आहे. विष्णूचे विशेष पूजाविधान असे –

प्रत्येक मासात वेगवेगळ्या नावांनी वर्षभर पूजा करावी. पूजेची तिथी द्वादशी असावी. मार्गशीर्षादी गणनेप्रमाणे मार्गशीर्षात केशव, पौषात नारायण, माघात माधव, फाल्गुनात गोविंद, चैत्रात विष्णू, वैशाखात मधुसूदन, ज्येष्ठात त्रिविक्रम, आषाढात वामन, श्रावणात श्रीधर, भाद्रपदात हृषीकेश, आश्विनात पद्मनाभ व कार्तिकात दामोदर या नावांनी विष्णू पुजावा. मूर्ती सोन्याची करून व शुभ्र वस्त्राने वेष्टून कलशावर स्थापावी. 'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या द्वादशाक्षरी मंत्राने उपचार समर्पावे. प्रत्येक महिन्याला पुष्प आणि फल वेगवेगळे असावे.

विष्णुस्मरण – कोणत्याही व्रतादी विधानातले न्यून असेल ते पूर्ण व्हावे म्हणून कृत्याच्या अंती विष्णुस्मरण करावे, असे सांगितले आहे. हे स्मरण पुढील वेदमंत्राने करतात –

वषट् ते विष्णवास आ कृणोमि तन्मे जुषस्व शिपिविष्ट हव्यम्।
वर्धन्तु त्वा सुष्टुतयो गिरो मे यूयं पात स्वस्तिभिः सदा नः॥

(ऋ. ७.९९.७)

अर्थ – हे विष्णो, मी स्वमुखाने 'वषट्' ही निविद म्हणून आदराने (तुला) पाचारण करीत आहे. हे दीप्तकिरणवेष्टिता, माझा हविर्भाग तू संतोषाने मान्य करून घे. माझी सामान्य वाणीची ही प्रेमळ स्तुती तुझा महिमा वृद्धिंगत करो. आणि दिव्य विबुधांनो, तुम्हीही असेच आशीर्वाद देऊन सदैव आमचा प्रतिपाळ करा.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्यानंतर तीन वेळा 'विष्णवे नमः' असा उच्चार करतात. [वै. दे. अ. द.; वै. वा. भा. वि.; पौ. भा. ध.; भ. वि.; मू. वि.; वै. मा.; प्रा. च. को.; गा. दं.; पु. वि.]

विष्वक्सेन विष्णूचा अंशरूप देव. हा विष्णूचा निर्माल्य धारण करतो. वैष्णव मंदिरांतून कोणत्याही महोत्सवाच्या प्रारंभी उत्सव निर्विघ्न पार पडावा, म्हणून याची पूजा करतात. शैव परिवारात जे स्थान गणेशाचे, तेच स्थान वैष्णव परिवारात विष्वक्सेनाचे आहे. हा विष्णुमंदिराचा रक्षक असतो. याचे मुख दक्षिणेकडे वळवलेले असते. हा चतुर्भुज असतो. तीन हातांत शंख, चक्र व गदा आणि चौथ्या हाताची तर्जनी उभारलेली, उजवा पाय खाली सोडलेला व डावा दुमडलेला अशा अवस्थेत याच्या बैठ्या मूर्ती असतात. [सा. हं. इ. गॉ. गॉ.]

विसुद्धिमग्ग (सं. विशुद्धिमार्ग) आचार्य बुद्धघोषाचा सर्वांत महत्त्वपूर्ण ग्रंथ. याला बौद्ध धर्माचा विश्वकोश असेही म्हणता येईल. बौद्ध धर्म किंवा बौद्ध साधना या विषयीच्या सर्व महत्त्वपूर्ण विषयांचे विस्तृत विवेचन यात आहे. पूर्वसूरींच्या संपूर्ण पिटक व अनुपिटक साहित्याचे मंथन करून बुद्धघोषाने हे ग्रंथरत्न प्रकाशात आणले आहे. तो म्हणतो 'चारही आगमांच्या मध्ये स्थित राहून हा विसुद्धिमग्ग त्या आगमांचा खरा अर्थ प्रकाशित करील.'

विसुद्धिमग्ग हा पूर्ण अर्थाने एक मौलिक ग्रंथ असला, तरी तो दोन गाथांच्या विवरणाच्या रूपात लिहिला गेला आहे. त्या दोन गाथा अशा–

अन्तो जटा बहि जटा जटाय जटिता पजा।
तं तं गोतम ! पुच्छामि को इमं विजटये जटं ?।

अर्थ – आत कोडे, बाहेरही कोडे; अशा या कोड्यात जनता घडवून पडली आहे. म्हणून हे गोतमा, मी तुला विचारतो, की हे कोडे कोण उलगडून दाखवील ?

त्यावर बुद्धाने उत्तर दिले ती गाथा अशी–

सीले पतिट्ठाय नरो सपञ्ञो चित्तं पञ्ञञ्च भावयं।
आतापी निपको भिक्खु सो इमं विजटये जटं।

अर्थ – शीलामध्ये प्रतिष्ठित होऊन प्रज्ञावान मनुष्य समाधी आणि प्रज्ञा यांची भावना करील, तर तो उद्योगी आणि ज्ञानवान भिक्षू हे कोडे उलगडून दाखवील.

वरील गाथेतील समाधी आणि प्रज्ञा हे दोन शब्द पातंजल योगदर्शनातले आहेत. बुद्धघोष हा योगशास्त्रात पारंगत होता. पातंजल योगदर्शनातल्या उणीवा त्याने या ग्रंथात भरून काढल्या आणि आपला ग्रंथ अधिक सुव्यवस्थित आणि नियमबद्ध केला. हा ग्रंथ त्याने मुख्यत्वे साधकांच्या कल्याणासाठी रचला आहे. ग्रंथाच्या प्रारंभी तो म्हणतो–

विसुद्धिमग्गं भासिस्सं तं मे सक्कच्च भासतो।
विसुद्धिकामा सब्बेपि निसामयथ साधवो ति।

अर्थ – मी विशुद्धीच्या मार्गाचे भाषण करीत आहे. ज्यांना पवित्रतेची इच्छा आहे, अशा सर्व साधुपुरुषांनी माझे भाषण आदरपूर्वक ऐकावे.

विशुद्धी म्हणजे सर्व मलरहित आणि अत्यंत परिशुद्ध असे निर्वाण आणि मग्ग म्हणजे त्याच्या प्राप्तीचा उपाय, असे आपल्या ग्रंथाच्या नावाचे लक्षण बुद्धघोष करतो. शील, समाधी आणि प्रज्ञा या विशुद्धिमार्गाच्या तीन भूमिका असून, त्या उत्तरोत्तर प्राप्त करायच्या असतात. भगवान बुद्धाच्या शब्दांत सांगायचे, तर या तीन भूमिका म्हणजे धर्मस्कंध अर्थात धर्माचे आधार आहेत. हे लक्षात घेऊन बुद्धघोषाने शील, समाधी आणि प्रज्ञा यांच्या रूपाने बौद्ध साधनेच्या संपूर्ण मार्गाचे विवरण केले आहे.

प्रस्तुत ग्रंथाचे २३ परिच्छेद आहेत. यांतील पहिल्या दोन परिच्छेदांत शीलाचे, ३ ते १३ या परिच्छेदांत समाधीचे आणि १४ ते २३ या परिच्छेदांत प्रज्ञेचे निरूपण आहे. वरील तीन्ही संज्ञांचा थोडक्यात आशय असा–

शील – जीवहिंसा न करणे, उपाध्यायादिकांची सेवा–शुश्रूषा करणे, संयम करणे, ब्रह्मचर्याचे पालन करणे, इ. गोष्टी शीलामध्ये येतात. थोडक्यात सांगायचे, तर संपूर्ण सदाचार म्हणजे शील होय.

समाधी – कुशल चित्ताची एकाग्रता म्हणजे समाधी होय. कोणत्या तरी एका आलंबनाच्या ठिकाणी चित्त आणि चेतसिक कर्मे यांना समान व सम्यक रूपाने दृढ ठेवणे, म्हणजे समाधी होय. समाधीचे उपचारसमाधी व अर्पणासमाधी असे दोन भेद बुद्धघोषाने सांगितले आहेत.

प्रज्ञा – कुशल चित्ताने युक्त असे विपश्यनाज्ञान म्हणजे प्रज्ञा होय. स्कंध, आयतन, धातू, इंद्रिय, सत्य आणि प्रतीत्य समुत्पाद या प्रज्ञेच्या सहा भूमी आहेत.

प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य विषय योग असला, तरी यात त्याच्या अनुषंगाने समग्र बौद्ध दर्शनाचे संशोधनपूर्वक प्रतिपादन आहे. त्याचबरोबर अन्य दर्शनांचे बौद्ध दर्शनाशी कशा प्रकारे विभिन्नत्व आहे, त्याचेही दिग्दर्शन बुद्धघोषाने केले आहे. पाहा – बुद्धघोष. [विशुद्धिमार्ग–भिक्षू धर्मरक्षित, १९१६; पा. सा. इ.]

विसोबा खेचर (इ. स. चे १३ वे शतक) एक मराठी संतकवी. हा संत नामदेवाचा गुरू होय. याच्या जीवनचरित्राविषयी विशेष व विश्वसनीय माहिती मिळत नाही.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

त्याची स्फुट कविता, नामदेवादी समकालीन संतांनी आपापल्या काव्यांत त्याच्याविषयी केलेले उल्लेख व काही दंतकथा यांतूनच त्याच्या चरित्राचे काही कण हाती लागतात.

विसोबा हा शुक्लयजुर्वेदीय माध्यंदिन शाखेचा ब्राह्मण होता. याचे उपनाव चाटी होते. हा वेदशास्त्रसंपन्न असून, सावकारही होता. काहींच्या मते याचे घराणे मराठवाड्यातील मुंगी पैठणचे, तर काहींच्या मते औंढ्या नागनाथचे. हा आळंदी येथे सावकारी करीत असे.

आरंभी याने पांडित्याच्या व संपन्नतेच्या मदाने ज्ञानेश्वरादी भावंडांचा खूप छळ केला; परंतु पुढे एका प्रसंगी ज्ञानेश्वरांच्या माहात्म्याची प्रचीती येऊन तो त्यांच्या भजनी लागला. तो प्रसंग असा–

एकदा निवृत्तिनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाल्यामुळे मुक्ताईने भांड्यांची जमवाजमव सुरू केली. परंतु विसोबाने आळंदीतील सर्वांना बजावले, की कोणीही तिला भांडी देऊ नयेत. मग ज्ञानदेवांनी आपला जठराग्नी प्रदीप्त करून आपल्या पाठीवर मांडे भाजण्यास मुक्ताईला सांगितले. मुक्ताईने तसे केले व ते विसोबाने खिडकीतून पाहिले. त्याला मग ज्ञानदेवांच्या सामर्थ्याची कल्पना आली व तो त्यांना शरण गेला.

विसोबाच्या नावावर आज जे १०।१२ अभंग उपलब्ध आहेत, त्यांतील एकात त्याने आपली गुरुपरंपरा आदिनाथ – मत्स्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – गहिनीनाथ – ज्ञानदेव – सोपानदेव – विसोबा खेचर अशी दिली आहे. त्यावरून त्याचे गुरू ज्ञानेश्वर न ठरता सोपानदेव ठरतात.

अलिकडे श्री. रा. चिं. ढेरे यांना विसोबाचा 'षट्स्थल' नावाचा आजवर अज्ञात असलेला एक ग्रंथ नव्याने उपलब्ध झाला आहे. त्यावरून विसोबाची गुरुपरंपरा आढळते, ती अशी– आदिनाथ – मत्स्येंद्रनाथ – गोरक्षनाथ – मुक्ताबाई – चांगावटेश्वर – कृष्णनाथ – विसोबा खेचर.

विसोबाचा हा ग्रंथ व ही परंपराच ऐतिहासिक दृष्ट्या खरी आहे, असे श्री. ढेरे यांचे मत आहे.

उत्तरायुष्यात एकदा वृद्ध विसोबा औंढ्या नागनाथाच्या देवालयात शिवपिंडीवर पाय ठेवून निजला असता, नामदेव तिथे गेला. ज्ञानदेव, गोरा कुंभार, इ. संतांनी नामदेवाला विसोबाचा गुरूपदेश मिळावा, म्हणून तिथे पाठवले होते. परंतु गलितगात्र विसोबा शिवपिंडीवर पाय ठेवून निजलेला पाहून नामदेवाला राग आला व तो त्याला तिथून उठवायला निघाला. त्यावर विसोबा त्याला म्हणाला. 'मी वृद्ध असल्यामुळे मला उठता येत नाही. तूच माझे पाय उचलून दुसरीकडे ठेव.' नामदेवाने तसे केले. परंतु नवल असे, की विसोबाचे पाय नामदेवाने जिथे जिथे ठेवले तिथे तिथे त्यांच्या खाली पुन्हा शिवपिंड दिसू लागली. असे दोनचार वेळा झाले. तेव्हा नामदेवाला स्थिरचरात भरून राहिलेल्या परमेश्वराची साक्ष पटली व विसोबाचा पारमार्थिक अधिकारही कळून आला. मग विसोबाने नामदेवाला गुरूपदेश दिला.

श्रावण शु. ११, शके १२३१ या दिवशी विसोबाने औंढ्या नागनाथ येथे समाधी घेतली. [म. सा.; म. सं. जी.; श्रीनामदेव: एक विजययात्रा–श्री. रा. चिं. ढेरे व श्री. अ. प्र. कामत, १९७०]

विहव्य आंगिरस

आंगिरस कुळातील एक सूक्तद्रष्टा. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलातील एकशेअठ्ठाविसावे सूक्त याने रचले आहे. विश्वेदेव ही या सूक्ताची देवता होय. याची एक ऋचा (१०.१२८.५) अशी –

देवीः षळुर्वीरुरु नः कृणोत विश्वे देवास इह वीरयध्वम् ।
मा हास्महि प्रजया मा तनूभिर्मा रधाम द्विषते सोम राजन् ॥

अर्थ – हे उर्वीदेवीसहित धनदात्या देवांनो, पुत्रपौत्रांचा सहवास आम्हांला अखंडपणे लाभू द्या. हे सोमराजा, तू आम्हांला द्वेष करणाऱ्या शत्रूंच्या स्वाधीन करू नकोस.

प्रस्तुत सूक्त समावर्तन (सोडमुंज) संस्काराच्या वेळी आहुती देताना म्हणतात. [प्रा. च. को.; ऋ. म. भा.]

विहार

बौद्ध भिक्षूंचे निवासस्थान. बौद्ध धर्माच्या उदयकाली काही भिक्षू मनुष्यवसतीपासून दूर अरण्यात लहानशी झोपडी बांधून राहत असत. अशा निवासस्थानाला सुत्तनिपातात विहार म्हटले आहे. बौद्ध संघाचा विस्तार झाल्यानंतर अनेक भिक्षू वर्षावासाच्या काळात एकत्र राहू लागले. मग त्यांच्या मठालाही विहार हे नाव मिळाले. पाली साहित्यात आराम हा शब्द त्याच अर्थी वापरलेला आढळतो. बौद्ध संघातील भिक्षूंच्या वास्तव्यामुळे त्याला संघाराम असेही म्हणत. अशा विहारात अनेक खोल्या ओळीने खोदलेल्या असून, प्रत्येक खोलीत एका भिक्षूसाठी दगडी बाकही असे. सर्व खोल्यांना जोडणारी पडवी असे किंवा एका दालनाच्या तीन्ही बाजूंना खोल्या असत. कालांतराने नालंदा विद्यापीठातील प्राध्यापकांच्या वसतिगृहालाही विहार म्हणू लागले.

बुद्धाच्या काळीदेखील असे विहार अस्तित्वात होते, असे महावग्गावरून कळते. मगधाधिपती बिंबिसार याने आपला वेळुवनविहार बौद्ध संघाला दान दिला होता (महावग्ग १.२२.१८).

बौद्ध भिक्षूंनी धर्मप्रचारार्थ पर्यटन करावे अशी अपेक्षा होती. वर्षाकाळातील तीन महिने मात्र त्यांनी एका जागी, एकत्र वास करावा, असे ठरवण्यात आले. त्या काळात ते भिक्षा मागण्यासाठी जवळपासच्या गावात जाऊ शकत. इतर सोयी मात्र त्यांना

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

मठातच उपलब्ध असत. प्रथम भिक्षू केवळ वर्षावासासाठीच विहारांत राहत होते. त्या सामूहिक जीवनाची सवय झाल्यामुळे कालांतराने ते वर्षातील बरेच महिने विहारांत घालवू लागले. कित्येक भिक्षू तर विहारांत स्थायिक राहूनच संघाचे कार्य करू लागले. त्यामुळे विहारांचा खूप विस्तार झाला. त्यांचा आकार वाढला व संख्याही वाढली. भारतात सर्वत्र बौद्ध लेणी आढळतात; त्यांत चैत्यगृहे म्हणजे प्रार्थनेसाठी सभागृहे असतात आणि विहार म्हणजे भिक्षूंची निवासस्थानेही असतात. काही ठिकाणी उंच डोंगरावर अनेक मजली विहार खोदलेले आढळतात.

कालांतराने या विहारांचे शिक्षणकेंद्रात रूपांतर झालेले दिसते. केवळ धर्माचरण व साधना करून भागत नाही; ज्ञानही प्राप्त केले पाहिजे, अशी जाणीव कित्येक भिक्षूंना झाल्यामुळे ते स्वतः ज्ञानप्राप्तीसाठी प्रयत्न करू लागले आणि स्वतःला मिळालेले ज्ञान आपल्या शिष्यांनाही देऊ लागले. प्रथम त्यांनी बौद्ध धर्माचा व तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यानंतर वेदवेदांगे, दर्शने, विद्या व कला यांचे अध्ययन–अध्यापनही अशा विद्यापीठांत सुरू केले. हजारो विद्यार्थी तिथे विद्याभ्यासासाठी येऊ लागले. त्यांच्यासाठी मोठी ग्रंथालये निर्माण करण्यात आली. हे रूपांतर हळूहळू पण निश्चितपणे होत राहिले. चिनी प्रवाशांनी अशा विद्यापीठांची जी वर्णने लिहून ठेवली आहेत, त्यावरून तिथे थोर, ज्ञानी अध्यापक आणि ज्ञानप्राप्तीसाठी अपार कष्ट करणारे विद्यार्थी होते, हे समजते.

प्रारंभी एकेका भिक्षूसाठी लहान निवासस्थाने असत. ती लाकडाची असून, दगडी किंवा विटांच्या जोटयावर बांधलेली असत. पण जेव्हा भिक्षूंची संख्या वाढली, तेव्हा विटांचे अनेक मजली विहार बांधले जाऊ लागले. राजे व श्रीमान श्रेष्ठी यांनी बांधून दिलेले विहार तर अत्यंत भव्य आणि सर्व सोयींनी युक्त असे होते. पाली साहित्यात अशा विहारांची वर्णने अनेक जागी केलेली आहेत. सामान्यपणे विहारांची रचना साधी व सर्वत्र सारखी होती. त्यांत सर्व प्रकारच्या सुखसोयी होत्या; अन्नसामग्रीसाठी व पाकसिद्धीसाठी वेगळ्या खोल्या, प्रातर्विधीसाठी सोय; प्रार्थना व सभा यांसाठी दालने, स्नानगृहे, इ. सर्व प्रकार होते. विहारांच्या भोवती विस्तीर्ण प्रांगणे व त्याभोवती दगडी किंवा विटांच्या भिंती असत आणि शेवटी बांबूचे किंवा काटेरी झाडांचे कुंपण किंवा खंदक असे. विहारांची छपरे कौलांची, पाषाणांची, चुनेगच्चीची, गवताची किंवा झाडांच्या पानांची असत.

द. भारतात बौद्ध धर्माचा प्रसार होऊ लागला, तेव्हा भिक्षूंना रानावनात हिंडताना अनेक चांगली आणि मठवासी जीवनाला योग्य अशी ठिकाणे आढळली, तिथे त्यांनी कड्यात खोदून अनेक लहानमोठी लेणी निर्माण केली. त्यासाठी त्यांना उदार दात्यांकडून पुष्कळ द्रव्य मिळाले. प्रारंभी त्यांनी काही खोल्या एका रांगेत खोदून काढल्या. अशा दोनतीन रांगा वेगवेगळ्या जागी खोदलेल्या दिसतात. त्यांची मांडणी पद्धतशीर नाही. पुढे मात्र ती सुधारली. मध्यभागी एक दालन, त्याच्या तीन्ही बाजूंना लहानलहान खोल्या आणि चौथ्या म्हणजे दर्शनी भागात स्तंभयुक्त पडवी, अशी रचना नंतरच्या विहारांत आढळते. भाजे येथील लेणी सर्वांत प्राचीन आहेत. बेडसे, अजंटा (क्र. १२ व १३), कोंडाणे, पितळखोरे व नासिक येथील काही विहार सनपूर्व काळातलेच आहेत. कोंडाणे व पितळखोरे येथील विहारांतील दालनांतही स्तंभ आहेत. नासिक येथे इ. स. च्या दुसऱ्या शतकात जे विहार खोदले गेले, त्यांच्या दर्शनी भागात स्तंभयुक्त आगाशी असल्यामुळे ते प्रेक्षणीय झाले आहेत. या आगाशीची सुबक रचना व स्तंभांची सुरेख घडण यामुळे हे विहार त्या काळातील वास्तुशिल्पाची उत्कृष्ट उदाहरणे ठरली आहेत. त्या काळातील काही विहारांत भिंतींना गिलावा करून रंगही दिलेला दिसतो. अजंटा येथील विहारांत रंगीत चित्रेही आढळतात.

विहारचर्या – भिक्षू व भिक्षुणी यांचे विहारांतील जीवन शिस्तबद्ध असे. त्यासाठी निश्चित केलेले नियम विनयपिटकात दिलेले आहेत. प्रातःकाळी लवकर उठून भिक्षूंनी ध्यानधारणा करणे आवश्यक होते. त्यानंतर दात स्वच्छ करून मग इतर कामे करायची. स्वच्छतेला अत्यंत महत्त्व होते. स्वतःचे निवासस्थान स्वच्छ ठेवणे हे प्रत्येकाचे कर्तव्य होते. तसेच स्वतःची वस्त्रेही धुणे अवश्य होते. नियमित वेळी स्नान करणेही महत्त्वाचे होते. चैत्यगृहे स्वच्छ ठेवणे, त्यांची दुरुस्ती करणे, त्यांना रंग देणे ही कामेही भिक्षूंना करावी लागत.

सायंकाळी सर्व भिक्षू एकत्र बसून सुत्तपठण करीत. भिक्षुणी व इतर माणसे त्याचे श्रवण करीत. त्यानंतर तरुण भिक्षूंसमोर थेराचे म्हणजे वयोवृद्ध भिक्षूचे प्रवचन होत असे आणि मग धर्मविषयक प्रश्नांची चर्चाही होत असे. तरुण भिक्षूंनी थेरांच्या समोर नम्रतेने वागून त्यांचा मान ठेवावा, अशी अपेक्षा असे. भिक्षूंना स्वतःच्या उपजीविकेसाठी भिक्षा मागावी लागे. उरलेल्या वेळात नवीन भिक्षूंना शिक्षण देण्याचे कामही त्यांच्याकडे असे. रात्री निजण्यापूर्वी पुन्हा ध्यानधारणा करणे, हा दिनचर्येचा एक भाग होता. विहारांतील सर्व कामकाजाच्या व्यवस्थेसाठी निरनिराळे अधिकारी नेमलेले असत. ते भिक्षूंमधूनच निवडलेले असत.

विहारांतील बौद्ध मठात भिक्षूंसह भिक्षुणीही वर्षावास करीत. त्यांच्यावर भिक्षूंपेक्षा अधिक निर्बंध होते. स्त्रिया म्हणून त्यांना कोणत्याही सवलती मिळत नव्हत्या. त्यांनी दुपारी ध्यान करावे व नंतर अध्ययन, अध्यापन, भिक्षा मागणे, इ. कामे करावी अशी पद्धत सर्व विहारांत प्रचलित होती.

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

उत्तर भारतातील बहुतेक विहार विटांचे बांधलेले होते. त्यांतील बरेच सांप्रत उद्ध्वस्त झालेले आहेत. द. भारतातले विहार मात्र भक्कम पहाडांत खोदलेले असल्यामुळे अजून सुरक्षित आढळतात. काही महत्त्वाच्या बौद्ध केंद्रांतील विहारांची माहिती मिळते, ती अशी —

तक्षशिला — कुशाणांच्या काळात इथे बौद्ध पंथाचा बराच प्रसार झाला आणि अनेक मठ स्थापन झाले. रावळपिंडीच्या जवळ या नगरीचे भग्नावशेष सापडले आहेत, त्यांत अनेक बौद्ध मठांचे अवशेष आढळतात. त्यांतील काही इ. स. च्या पहिल्या शतकातील असावे. धर्मराजिक स्तूपाजवळचा विहार विशेष उल्लेखनीय आहे. त्यांत अनेक प्रांगणे असून, त्यांच्या भोवती खोल्यांच्या दुमजली रांगा होत्या. समोरच्या अंगाला आगाशी होती. जवळच सभागृह, स्वयंपाकगृह वगैरे इमारतीही होत्या. हा विहार अनेकदा उद्ध्वस्त झाला आणि पुनःपुन्हा बांधला गेला. आज त्याचे जे अवशेष दिसतात, ते मध्ययुगाच्या सुरवातीच्या काळातले आहेत.

मोहरा, मोराडू व जौलियन या ठिकाणांच्या मध्ये असलेल्या डोंगराच्या पायथ्याशी एक ढिगारा सापडला आहे. त्यात दोन कालखंडांतील मठांचे अवशेष मिळतात, काही भाग कुशाण काळातील आहे, तर काही भाग इ. स. च्या चौथ्या शतकातला आहे. हे विहार दगडी व दुमजली होते. जुन्या विहाराच्या प्रांगणात स्तूपाचा चबुतरा आहे.

असे आणखी अनेक मठांचे अवशेष तक्षशिला येथील उत्खननात सापडले आहेत.

काश्मीर — मौर्य सम्राट अशोकाच्याही पूर्वी काश्मीरचा राजा सुरेंद्र याने काश्मीरमध्ये अनेक बौद्ध मठ स्थापले होते. त्यानंतर सम्राट अशोकाने त्या प्रदेशात बरेच विहार निर्माण केले. जेहलमच्या उगमाजवळ त्याने धर्मारण्यविहार निर्माण केला. त्यातील चैत्यगृह अत्यंत भव्य आहे, असे राजतरंगिणीत म्हटले आहे. अशोकाचा पुत्र जलौक याने बारामुल्ला (वराहमूल) जवळ एक विहार बांधला. त्याला कृत्याश्रमविहार म्हणतात. कृत्यादेवी नामक बौद्ध चेटकीच्या नावाने बांधलेला हा विहार इ. स. च्या ११ व्या शतकापर्यंत अस्तित्वात होता. वितस्ता (जेहलम) नदीच्या काठी, बारामुल्लापासून ५ मैलांवर कितशोम नावाचे खेडेगाव आहे, तिथेच हा विहार होता. त्या गावाला हे नाव विहाराच्या नावावरूनच मिळालेले आहे.

कुशाण वंशातील प्रसिद्ध राजा कनिष्क यानेही काश्मीरमध्ये अनेक बौद्ध मठ स्थापले. त्यांतला कनिष्क महाविहार हा फार नामांकित होता. सांप्रत कनिसपूर नावाने ओळखले जाणारे गाव म्हणजे प्राचीन कनिष्कपूर होय. तिथेच या विहाराचे अवशेष आहेत. युआन च्वांग इ. स. च्या ७ व्या शतकात तिथे गेला, तेव्हाच तो विहार पडू लागला होता. तथापि त्याचे शिल्पकाम उत्कृष्ट होते.

काश्मीरमधील कुंडलवन विहार हा तिथे भरलेल्या चौथ्या बौद्ध परिषदेमुळे प्रख्यात आहे.

श्रीनगरमध्ये शंकराचार्य–टेकडीजवळ हरबन (षडर्हद्वन) येथे कुशाण काळातील एका विहाराचे अवशेष आढळलेले आहेत. इ. स. च्या दुसऱ्या शतकात बौद्ध पंडित नागार्जुन काश्मीरमध्ये गेला असता या विहारात त्याने वास्तव्य केले होते, असे म्हणतात. त्या ठिकाणी एका टेकडीवर निरनिराळ्या उंचीवर चैत्य, स्तूप, विहार अशा दगडी वास्तू उभारलेल्या होत्या.

कुशाण वंशातील राजा हुष्क याने हुष्कनगर वसवून तिथे एक विहार उभारला होता. त्या विहारात युआन च्वांग काही काळ राहिला होता. ललितादित्य मुक्तापीड राजाने इ. स. च्या आठव्या शतकात तो विहार पुन्हा बांधला.

श्रीनगरच्या उत्तरेला सुमारे तीन मैलांवर अंतभवन येथे अमृतभवन नामक विहार होता. तो मेघवाहन राजाची पट्टराणी अमृतप्रभा हिने बांधला होता. तो खूपच मोठा असावा, असे वाटते.

प्रवरसेन (२ रा) याच्या राजवटीत (इ. स. चे ६ वे शतक) जयेंद्रविहार निर्माण झाला. त्यात बुद्धाची एक प्रचंड मूर्ती होती. युआन च्वांगने त्यात वसती केली होती. इ. स. च्या १० व्या शतकात क्षेमगुप्त राजाने तो मठ उद्ध्वस्त करून त्याचे दगड शिवमंदिर बांधण्यासाठी वापरले आणि बुद्धाची पितळेची मूर्ती वितळून टाकली.

ललितादित्य याने परिहासपूर येथे राजविहार बांधला होता. तोही फार मोठा होता. युआन च्वांगच्या लेखांवरून कळते, की काश्मीरमध्ये शंभराहून अधिक संघाराम होते आणि त्यांत ५००० भिक्षू राहत होते.

लडाखमध्येही प्राचीन काळी अनेक संघाराम होते आणि अजूनही बरेच बौद्ध मठ त्या प्रदेशात आढळतात. त्यांना गोंपा म्हणतात. त्यांतील हेमिस गोंपा सर्वांत प्राचीन व प्रख्यात आहे. तो लेहच्या आग्नेयीस सुमारे २२ मैलांवर आहे. त्यात शेकडो लामा राहू शकतात. लेहपासून साठ मैलांवर लामा युरू येथे एक गोंपा आहे. त्यात अनेक मठ असून, एका जागी अवलोकितेश्वराची विशालकाय प्रतिमा आहे. तिला अकरा मस्तके व हजार हात आहेत, असे म्हणतात. लेहजवळच्या शंकरगोंपामध्येही अवलोकितेश्वराची अशीच एक मोठी प्रतिमा आहे. (अपूर्ण)

S.J.V.J. PRATISHTHAN LIBRARY
Jangamawadimath, Varanasi
Acc. No. 8

SRI JAGADGURU VISHWARADHYA JNANA SIMHASAN JNANAMANDAL
LIBRARY
Jangamwadi Math, Varanasi
ACC No. 2419

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi

Digitization by eGangotri and Sarayu Trust. Funding by MoE-IKS

जगात ज्या मोठमोठ्या शक्ती काम करीत आहेत, त्यांचे यथातथ्य आकलन आपणांस न होणें ही गोष्ट शक्य आहे. पण एवढें तरी आपण समजून घेणें अगत्याचे आहे, की भारत म्हणजे काय आहे व त्याने आपल्या सामाजिक व्यक्तित्वाचा विकास कशा प्रकारे करून घेतला आहे; भारताच्या विभिन्नत्वाचे पैलू कोणते आणि त्याची सुदृढता कुठे सुगुप्त आहे. या मूलभूत गोष्टी आहेत. त्यांचे ज्ञान जर आपण मिळवले नाही, तर आपण भारत काय आहे ते जाणण्यास असमर्थ ठरू आणि जर आपण भारताला जाणू शकलो नाही. तर आमचे भाव, आमचे विचार. आमची कार्ये या सर्व गोष्टी अपूर्ण राहतील व आपण भारताची सर्वांगीण आणि प्रभावपूर्ण अशी सेवा करू शकणार नाही,

— पं. जवाहरलाल नेहरू
(' संस्कृति के चार अध्याय ' प्रस्तावना)

भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे

CC0. In Public Domain. Jangamwadi Math Collection, Varanasi